Barcode - 99999990319680
Title - Maharashtra Shabdakosh Bhag-III
Subject - Devotional
Author - Yashvant,Ramkrishan
Language - marathi
Pages - 543
Publication Year - 1934
Creator - Fast DLI Downloader
https://github.com/cancerian0684/dli-downloader
Barcode EAN.UCC-13
9 999999 031968

# महाराष्ट्र शब्दकोश

## विभाग तिसरा

## ग–ठ

कोशमंडळांतील व बाहेरील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केलेला.

प्रकाशक—महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणें; तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत रामकृष्ण दाते, ४८१ शनिवार, पुणें २.

मुद्रक—यशवंत रामकृष्ण दाते, महाराष्ट्र कोशमंडळाचा शारदा प्रेस, ४८१ शनिवार, पुणें २.

किंमत १० रुपये

इ. सन १९३४] पुणें [शा. श. १८५६

## संपादकमंडळ.

श्री. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एल्‌एल्. बी. (प्रमुख)

श्री. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.

श्री. आबा चांदोरकर.

श्री. चिंतामण शंकर दातार.

---

### प्रमुख शाखा-साहाय्यक संस्था

विदर्भसाहित्यसंघ ( वऱ्हाडी बोली ); गोमंतकसाहित्यसेवकमंडळ ( गोमंतकी वाङ्मयचर्चामंडळ ( कर्नाटकी. बेळगांव ); शारदोपासकमंडळ ( कोंकणी. मालवण ); महाराष्ट्र शब्दकोशमंडळ ( कुडाळी. पेडणें ); पुणें भाषाशास्त्रमंडळ ( व्युत्पत्ति ); शारदाश्रम ( महानुभावी. यवतमाळ ); हेटकरी भंडारीमंडळ ( दादर ); साहित्यसेवामंडळ ( कऱ्हाड ). इ. इ.

# संपादकीय निवेदन.

वक्ता वाचस्पतिर्यत्र श्रोता शक्रस्तथापि तौ।
शब्दपारायणस्यान्तं न गतो तत्र के वयम् ॥ –धनंजय

श्रीकृपेनें आज रोजीं हा तिसरा विभाग प्रसिद्ध होत आहे आम्ही मनात सतत अशी योजना बाळगीत आहों कीं, होता होईल तों लवकर लवकर विभाग काढावेत परंतु त्याप्रमाणें अमलात येण्यास अनेक अडचणी तोंड उघडून आमच्यापुढें उभ्या आहेत त्याचा प्रथम निरास करावा लागतो मागील सालीं असें वाटलें होतें कीं, आर्थिक मंदाई आता संपून पुन्हा परिस्थिति पूर्वपदावर येईल परंतु ती आशा फोल ठरली व त्या मंदाईशीं पुनरपि आम्हास झगडा करावा लागला आणि आता असें वाटतें कीं, ही अडचण निघून जाण्यास निदान आणखी ३–४ वर्षे तरी लागतील याचा थोडा तरी परिहार व्हावा म्हणून संपादकाम प्रचारासाठीं बाहेर हिंडावें लागलें मंडळाची कचेरी गल्यासाली बदलावी लागली पहिल्या दोन भागाचें काम छापून निघाल्यानंतर त्यावेळीं घेतलेला टाईप बराचसा भिजल्यामुळें नवीन अखंड टाईप घेण्यात आला, इत्यादि कारणानीं अपेक्षेप्रमाणें हा विभाग लवकर निघाला नाहीं त्याबद्दल आश्रयदात्यानीं स्नेहार्द्रदृष्टीनें मंडळाकडे पाहावें अशी विनंति आहे.

या विभागाच्या रचनेचें धोरण दुसऱ्या विभागातील संपादकीय निवेदनात दिग्दर्शित केल्याप्रमाणेंच ठेविलें आहे

या वर्षी मध्यप्रांत सरकारनें आपला शब्दकोश तिकडील शाळा-पाठशाळा-मधून घेण्यास मंजुरी दिली आहे मुंबई सरकारनें एक सर्क्युलर काढून या प्रांतातील शाळांस सदरहू कोश घेण्याची शिफारस पूर्वीच केली आहे

या भागात ग पासून ठ अखेर शब्दसंग्रह आला आहे आतापर्यंत निवळ कोशाचीं १४१० पृष्ठें (व तीनहि विभागाची प्रस्तावना पृष्ठें १७५–२०० धरून एकूण पृष्ठें १६००) आम्ही आश्रयदात्याच्या पदरात घातलीं आहेत म्हणजे जवळ जवळ निमें काम संपत आलें आहे व उरलेलें निमें काम थोड्याच दिवसात उरकूं अशी आशा आहे

सध्या भागीदार २४२८ आणि वर्गणीदार ५१६ मिळून एकूण २९४४ आश्रयदात्याची संख्या आहे आतापर्यंत झालेल्या कामावरून आम्ही असा निश्चित अंदाज बांधला आहे कीं हें सर्व काम उत्तम प्रकारें तडीस जावयाचें तर अद्यापि २ हजार महाराष्ट्रीयानीं या कार्यास हातभार लावला पाहिजे हें काम एकट्या संपादकाचेंच नसून सर्व महाराष्ट्रीयाचें असल्यानें व त्याची जाणीव प्रत्येक सुशिक्षित महाराष्ट्रीयास असल्यानें (कारण ती आहे असें आमच्या प्रत्ययास आलें आहे) आम्ही विनंति करण्यापूर्वीच दोन हजार महाराष्ट्रीय आपलीं नावें आश्रयदात्याच्या पटात नोंदतील आणि "ये महाराष्ट्राचिया नगरीं। शब्दब्रह्माचा सुकाळु।" करण्याचें श्रेय पदरीं बांधतील अशी आम्हास बळकट आशा आहे

नेहमींच्या रीतीप्रमाणें सर्व साहाय्यकाचे आम्ही आभार मानतों या कार्याच्या अवभृतस्नानाच्या वेळीं या सर्व सहृदयांचा नामोच्चार करून आम्ही ऋणमुक्त होऊं तावत्काल त्यांच्या ऋणातच राहिलेलें अधिक बरें!

यशवंत रामकृष्ण दाते.

# प्रस्तावना

## महाराष्ट्र देश, जनता व भाषा

चमूनियमनेन वा जनपदाधिकारेण वा ।
द्विजव्रज उपव्रजन्प्रभुपदं महाराष्ट्रजाः ॥
न वृत्तिमिह पालयेद्यदि धरासुराणां ततो ।
भवेद्यवनवेष्टितं भुवनमेतदब्राह्मणम् ॥ विश्वगुणादर्शः

**महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्तिः**—महाराष्ट्र या शब्दाची व्युत्पत्ति करण्याचा आजपर्यंत अनेकांनी प्रयत्न केला आहे. डॉ. विल्सन् यांनीं मोल्सवर्थच्या कोशाच्या प्रास्ताविक भाषाविषयक निबंधांत व १८७२-७३च्या मुंबई इलाख्याच्या कारभाराच्या सरकारी अहवालांत महाराष्ट्र शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल पुढें दिल्याप्रमाणें चर्चा केली आहेः 'महरट्ठ हें महाराष्ट्र या संस्कृत शब्दाचें पाली रूप आहे. हें रूप महाराष्ट्र या शब्दाबरोबर विष्णुपुराण वगैरे पुराणग्रंथांत आढळतें. संस्कृत पंडित महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति 'महा+राष्ट्र=मोठें राष्ट्र' अशी करतात व भाषाशास्त्रदृष्ट्या तीवर कांहीं आक्षेप घेता येण्यासारखा नाहीं; परंतु त्या व्युत्पत्तीस पुरेसा ऐतिहासिक अगर भौगोलिक पुरावा आढळत नाहीं.' असें त्याचें म्हणणें आहे. दुसरी व्युत्पत्ति त्यांच्या मतें 'महाराष्ट्र' म्हणजे महार + राष्ट्र = महारांचा देश ही देतां येईल; या व्युत्पत्तीस त्यांनीं असा आधार दिला आहे कीं, महार जातीची वस्ती महाराष्ट्रांत पुष्कळच आहे आणि जरी ती अगदीं खालावलेली जात असली तरी तिची व्याप्ति या देशांत इतकी आहे कीं 'गांव तेथें महारवाडा' ही मराठीमध्यें म्हणच पडली आहे. तसेंच टॉलेमीनें 'परव री' या नावानें त्याचा स्वतंत्र लोकजाति म्हणून उल्लेख केला असून तें नाव ते अद्यापि वापरतात. हे लोक आर्यसंस्कृतीच्या कक्षेबाहेरचे असून मराठ्यांना आपणाहून भिन्न संस्कृतीचे लोक म्हणून आर्य असें नाव लावतात व हें नामाभिधान अद्यापि कानडींमध्यें 'आरे' अशा रूपांत प्रचलित आहे. माग लोकहि मराठ्यांना आर्य या नावानेंच संबोधतात. अरिअन यानेंहि आपल्या इंडिका ग्रंथांत मराठ्यांच्या प्रदेशास 'अरिअके' असें संबोधलें आहे. लोकांच्या नावावरून प्रदेशास नाव मिळाल्याचीं उदाहरणें आपणास अनेक देतां येतील. उदा० गुर्जरराष्ट्र यावरून गुजराथ, सौरराष्ट्र यावरून सौराष्ट्र, रोहिले लोकांचा देश तो रोहिलखंड, बुंदेल्यांचा तो बुंदेलखंड, वंग लोकांचा बंगाल व ओड्र लोकांचा ओडिसा (ओरिसा), इत्यादि. परंतु येथें याविरुद्ध एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे कीं, ऐहोळी येथील शिलालेखांत (इ. स. ६३४) महाराष्ट्र हें एक राष्ट्र नसून तीन महाराष्ट्रांचा समुदाय आहे असें स्पष्ट म्हटलें आहे.

**मल्लराष्ट्रः**—डॉ. ऑप्पर्ट यांनीं (The Original Inhabitants of Bharatvarsha) 'भारतवर्षांतील मूळचे रहिवासी' (पृ. २२, १८९३) यामध्यें असें म्हटलें आहे कीं, 'महाराष्ट्रालाच मल्लराष्ट्र (मल्ल लोकांचें राष्ट्र) असें म्हणत. मार म्हणजेच मल्ल व मार लोकांनाच म्हार असें म्हणतात. म्हार याचें हळूहळू महार असें रूप बनलें. हल्लींच्या मराठींत महार व म्हार अशीं दोन्ही रूपें आढळतात. अशा रीतीनें एकाच अर्थाचे दोन शब्द मल्लराष्ट्र व महाराष्ट्र हे प्रचारांत होते त्यापैकीं पहिला हळू हळू प्रचारांतून गेला, व महार लोकांच्या भाग्याला उतरती कळा जसजशी लागत चालली तसतसा त्यांच्या महाराष्ट्र व मल्लराष्ट्र या नांवाशीं असलेल्या संबंधाचा विसर पडत चालला आणि महाराष्ट्र म्हणजे महारांचें किंवा मल्लांचें राष्ट्र हा अर्थ जाऊन 'मोठें राष्ट्र' असा अर्थ करण्यांत येऊं लागला. येथें यासंबंधीं एवढें म्हणतां येईल कीं, महाराष्ट्रांत आज जरी मल्ल लोकांचा आपणास पत्ता लागत नाहीं, तरी पूर्वी एका काळीं मल्ल लोकांची येथें वस्ती असली पाहिजे. कारण महाराष्ट्रांतील अनेक लोकांचें कुलदैवत

ज खंडोबा, ज्याचा संबंध या देवतेशीं संबंध जोडतात, ती देवता येथील फार प्राचीन स्थानदेवता असून खंडोबानें मणिमल्ल या नावाच्या दैत्याचा वध केल्याची कथा सार्वत्रिक आहे, व यावरून त्यास मल्लारि (मल्ल+अरि) असें नाव प्राप्त झालें आहे. पण आज या मल्लाचा महाराष्ट्रांत मागमूस आढळत नाहीं. तथापि मल्ल ही एक गोंडांतील जात मध्यप्रांतांत आढळते व तिकडील नावाडी भोई लोकांस मल्ल असें म्हणतात. यावरून मल्ल नांवाची जाति महाराष्ट्राच्या आसपास पूर्वी असली पाहिजे. मल्हण वगैरे गावांच्या नांवांत त्याचा अवशेष दिसतो. रा. राजवाडे यांनीं मळवली, मालेगांव, मल्हार्णे, मळसर, मळगांव, मल्हारजन, मलदेवें, मलवाण, मलोनी हीं महाराष्ट्र जातिदर्शक गांवें म्हणून नमूद केलीं आहेत. पण रा. राजवाडे यांनीं मल्ल हे आर्यांपैकींच होते असें म्हटलें आहे.

याप्रमाणें दोन पाश्चात्य विद्वान पंडितांचीं महाराष्ट्र शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल मतें दिलीं. आतां आपल्या-कडील महाराष्ट्रीय पंडित यासंबंधीं काय म्हणतात तें पाहूं.

**महारट्टांचें महाराष्ट्र**:—डॉ. भांडारकर हे आपल्या दक्षिणच्या प्राचीन इतिहासांत एका ठिकाणीं असें म्हणतात कीं, कुडा येथील शिलालेखांत एकदा ' महाभोज ' असा उल्लेख आहे. त्याप्रमाणें भोज हे स्वतःला महाभोज म्हणवून घेत त्याप्रमाणेंच या प्रदेशांत राहणाऱ्या राष्ट्रिकांनीं स्वतःला महाराष्ट्रिक अथवा महारठ असें म्हणवून घेतलें व ते ज्या देशांत रहात त्या देशाला अर्थात् महारठ्ठ व संस्कृतमध्यें महाराष्ट्र असें नांव पडलें.

**महारथींचा महाराष्ट्र**:—राजारामशास्त्री भागवत महाराष्ट्र शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल म्हणतात कीं, संस्कृत नाटकांत ' मरहट्ट ' असा जनवाचक शब्द येतो. हा ' मऱ्हाठा ' शब्दाची प्रकृति दिसतो. ' मरता तर हटता ' म्हणजे मरतो तेव्हां हटतो, अर्थात् प्राणांतींहि शत्रूस पाठ न दाखविणारा अशी मरहट्ट शब्दाची व्युत्पत्ति केली आहे. मराठ्यांच्या वीरश्रीच्या सबबीनें पाहूं गेलें असतां ही व्युत्पत्ति यथार्थ आहे. तरी अशा रीतीनें क्रियापदांचीं छिन्नभिन्न झालेलीं किंवा केलेलीं रूपें जोडून झालेल्या आणखी एका जनवाचक किंवा जनपदवाचक शब्दाचें उदाहरण देतां येत नाहीं. त्या पक्षीं ही व्युत्पत्ति विलक्षण दिसते. राठोड नांवाचे रजपूत मारवाडांत प्रसिद्ध आहेत. ' महाराठोड ' म्हणजे ' मोठा राठोड ' ' महाराठोड ' शब्दाचा अपभ्रंश मऱ्हाठा असें कित्येक मानतात. पण एकाच रजपूत गोत्रांतले लोक सर्व महाराष्ट्रभर पसरले हें अगदीं असंभाव्य आहे. शिवाय महाराठोड असें गोत्र रजपुतांत नाहीं.

' मऱ्हाठा ' प्राय. ' महाराष्ट्र ' शब्दाचा अपभ्रंश समजतात. महाराष्ट्र शब्द बराच जुनाट आहे. याचा उल्लेख वररुचीच्या ' प्राकृत प्रकाश ' नावाच्या बालभाषेच्या व्याकरण ग्रंथांत अगदीं शेवटच्या सूत्रांत ' शेषं महाराष्ट्रीवत् ' अशा रीतीनें येतो. अशोकानें महारठ्ठ देशांत धर्मोपदेशक पाठविले असल्याबद्दलची बौद्ध लोकांत दंतकथा आहे. यावरून ' मरहट्ट ' किंवा ' महाराष्ट्र ' हा शब्द चांगला बावीसशें वर्षांपूर्वींचा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

भाषेच्या नियमावरून पाहतां ' महाराष्ट्र ' शब्दाचा ' महाराठ ' व ' सुराष्ट्र ' शब्दाचा ' सुराठ ' असे अपभ्रंश व्हावयास पाहिजेत. पण शिलालेखांत ' महारठ ' व ' सुरठ ' रूपें आढळतात. हीं जर अस्सल रूपें असतील तर ते शब्द महारथ = मोठा योद्धा व सुरथ = चांगला योद्धा या शब्दांचे अपभ्रंश असावे. अशा प्रकारचीं विशेष गुणहेतुक जनवाचक नांवें क्वचित् क्वचित् आढळतात. उ० फ्रेंच हा फ्रांक = स्वतंत्र या शब्दापासून बनला आहे. मूळचें संस्कृत रूप एक असून त्याचा जो अपभ्रंश झाला त्यापासून एक अपूर्व शब्द निर्माण होऊन तो पुन: संस्कृत भाषेस मिळाला अशीं पुष्कळच उदाहरणें सापडतील. उ० त्रिकलिंग = तीन कलिंग = तेलगणाची खालाटी व आंध्र नांवाची वलाटी व या दोहोंच्या दक्षिणेस द्रोणकटक-धेनुकटक असे तीन प्रांत. त्याचप्रमाणें ' मलय ' देशाचे चोल, पाण्ड्य व चेर असे तीन भाग मानीत, त्यामुळें त्यास त्रिमलय = तमूळ = तम्मूळ असें म्हणत. त्याप्रमाणें ' त्रिकलिंग ' = तिअलिंग = तिलिंग असा अपभ्रंश होऊन पुन्हा त्याचें त्रिलिंग असें अपूर्व संस्कृत रूप होऊन, मल्लिकार्जुन, कालेश्वर व भीमेश्वर या तीन लिंगांमधील प्रदेश अशी त्याची अपूर्व व्युत्पत्तीहि झाली. तेव्हां ' महारथ ' = महारठ = मरहट्ट असा अपभ्रंश होऊन कालान्तरानें या अपभ्रंशाचें पुन: महाराष्ट्र असें संस्कृत रूपांतर झालें हें म्हणणें सोपपत्तिक दिसतें.

**महाराष्ट्रिकांचा महाराष्ट्र**:—यानंतर रा. वि. का. राजवाडे हे ' महाराष्ट्राचा वसाहतकाल ' या निबंधांत रट्ट शब्दावरून महाराष्ट्र शब्दाची उत्पत्ति सुचवितात. महाराष्ट्रांत प्रथम उत्तरेकडून बौद्ध व जैन या पाखंडांच्यामुळें झालेल्या धर्मक्रांतीमुळें व त्यांस मिळालेल्या राजाश्रयामुळें रट्ट हे वसाहत करण्यास दक्षिणेंत आले. हे रट्ट लोक मूळचे कोण व कोठील हा एक अद्यापपर्यंत न सोडवलेला प्रश्न आहे. चोल नामक लोकांचें नांव जसें चोल नामक देशा-

वरून पडलेले दिसते, तसें रट्ट हें नाव देशावरून पडलेलें दिसत नाही. हे लोक भारतवर्षाबाहेरही नाहींत. हें नाव वर्ण किंवा जाति यांचेहि नाहीं. भिल्लादि लोकांप्रमाणें हे लोक वन्यहि नाहींत. वर्ण नाहींत, जाति नाहींत, विशिष्ट देशोत्पन्न नाहींत, बाह्य नाहींत व वन्यहि नाहींत, मग हे रट्ट आहेत तरी कोण? रट्ट या शब्दाचें संस्कृत रूप राष्ट्रिक. राष्ट्रिक म्हणजे राष्ट्रांत अधिकाराचें काम करणारा मनुष्य. ग्रामकूट म्हणजे गावडा उर्फ पाटील, तसा राष्ट्रकूट म्हणजे राठोड उर्फ राष्ट्राचा महत्वाचा अधिकारी. राष्ट्र म्हणजे राजाच्या ताब्यातील देश किंवा देशभाग. जसें शंभर वर्षांपूर्वी देशाच्या मुख्य अधिकाऱ्याला देशमुख किंवा देशपति किंवा देसाई किंवा देशाधिकारी म्हणत, तसें हजार दोन हजार वर्षांपूर्वी राष्ट्रांतील महत्वाच्या अधिकाऱ्यांना राष्ट्रिक किंवा राष्ट्रकूट हीं दोन नावें असत. तेव्हां इतकें स्पष्ट झालें कीं राष्ट्रिक उर्फ रट्ट म्हणजे देसाई, देशमुखस्वरूपाचे अधिकारी. देश म्हणजे दहापांच गावांपासून शंभर सवाशें गावांचा मुलुख. त्याचप्रमाणे राष्ट्र म्हणजे दहापांच गावांपासून शंभर सवाशें गावांचा राष्ट्रांतील अधिकाऱ्याला पेलता येईल असा मुलुख.

शैशुनाग, शुंग, काण्व, मौर्य इत्यादि राजकुलाच्याहि फार पूर्वींच्या राजकुलाच्या कारकीर्दीत हे राष्ट्रिक उर्फ राष्ट्रकूट म्हणजे देसाई देशमुख अधिकारी त्या त्या तर्फेच्या राजकीय, आर्थिक व व्यावहारिक व्यवस्थेकरितां नमलेले असत. प्रथम प्रथम ह्या नेमणुका वैयक्तिक असत. परंतु कालांतरानें व भारतीय लोकरीतीप्रमाणें ह्या नेमणुका पुढें पिढीजाद झाल्या. हे राष्ट्रिक उर्फ राष्ट्रकूट अर्वाचीन देसाई देशमुखांप्रमाणें प्रायः क्षत्रिय असत; अर्थात्, क्षत्रियांचीं जीं शहाण्णव कुळें आहेत त्यांपकीं असत. वर्णानें क्षत्रिय व पिढीजाद पेशानें देशाधिकारी असा दुहेरी दर्जा या राष्ट्रिकांचा किंवा रट्टांचा असे त्यामुळें क्षत्रिय व रट्ट या दोन्ही नावांनीं ह्या देशाधिकाऱ्यांचें संबोधन होऊं लागलें. देसाई देशमुखांच्याहून थोर अधिकाऱ्याला शंभर वर्षांपूर्वी सरदेसाई, सरदेशमुख म्हणत. तसेंच हजार बाराशें वर्षांपूर्वी राष्ट्रिकाहून उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्रिक उर्फ महरट्ट म्हणत. सामंत व महासामंत हेहि शब्द असेच इयत्तादर्शक आहेत. राष्ट्र म्हणजे जेवढा प्रांत त्याहून महाराष्ट्र म्हणजे महत्तर प्रांत. ह्या महत्तर राष्ट्रावरील उर्फ प्रांतावरील जो अधिकारी तो महाराष्ट्रिक. महाराष्ट्रिक याचा अपभ्रंश महरट्ट व महरट्ट याचा अपभ्रंश मऱ्हाट.'

या उपपत्तीस पुरावा म्हणून ते पुढील तुल्य शब्दाचा इतिहास देतात. 'याप्रमाणेंच गुजर, सीद, शेलार, वगैरे शब्दांचाहि इतिहास आहे. गुह्यक, गुह्यकाजर, गुज्जर, गुजर हे मूळचे कैलास पर्वत व चैत्ररथ या प्रान्तांत राहणारे लोक होत. तेथून ते पंजाब, गुजराथ व खानदेश या प्रदेशांत उतरले. हे गुह्यक-गुजर लोक मूळचे देवयोनि होत. सिद्ध या शब्दाचा मराठींत अपभ्रंश सीद झाला आहे. धनगरांच्या एका कुळीला सीद म्हणतात, म्हणजे धनगरांतील सीद कुळी मूळची देवयोनि आहे असें होतें. धनगर = धनकर धन म्हणजे शेळ्या मेंढ्यांची संपत्ति बाळगणारे. धनगर देवयोनींत पडल्यामुळें गुह्यक = गुजर यांच्याप्रमाणेंच मराठा क्षत्रियांत सहजच मोडले जात. आधुनिक अनभिज्ञ शास्त्रीमंडळांत धनगरांना शूद्र लेखण्याची चाल आहे. परंतु ती इतिहाससंमत दिसत नाहीं.

विद्याधरवंशीय जीमूतवाहनाचा वंश म्हणजे सध्याचे शेलार व प्राचीन शिलाहार आहेत. विद्याधरादि देवयोनींपासून शिलाहार, पिशाच, राक्षे, सीद, भोट, वगैरे अर्वाचीन लोक निपजले व आदित्यादि गणदेवांपासून वसू, रोडे, हाडे, मराठे वगैरे अर्वाचीन लोक उत्पन्न झाले.

सर्वांत महाराजिकांचा गण अत्यंत मोठा असल्यामुळें देवयोनींपासून व गणदेवांपासून निपजलेले बाकीचे सर्व लोक दंडकारण्यांत महरट्टांच्या साहित्यानें मराठ्यांत मोडूं लागले. महाराजिकांची गणना पुराणकालीं जशी गणांत म्हणजे संघराज्यांत होत असे, तशी शातवाहनकालींहि महरट्टांची गणना गणांतच होत असे नाणे-घाटांतील लेण्यांतील लेखांत महरट्टांना गण या उपपदानें भूषविलें आहे. मेरुपर्वतावरून देव, गणदेव व देवयोनी पंजाबांत उतरले. तेथून ते तिथे पुढें ज्याला आर्यावर्त नांव पडलें त्या प्रदेशांत पसरले. आर्यावर्तांत नांदत असतां महाराजिकगणाला महरट्टगण अशी संज्ञा प्राप्त झाली, आणि दंडकारण्यांत शिरल्यावर त्यांना मराठे या अपभ्रंशानें ओळखूं लागले. मेरु पर्वताच्या आसमंतांतभागीं असतांना महाराजिकांच्या २२० कुळें होत्या. त्या दंडकारण्यांत शिरल्यावर फक्त ९६ राहिल्या.'

याप्रमाणें रा. राजवाडे यांनी रट्ट, महारट्ट, राष्ट्रिक व महाराष्ट्रिक यांपासून महाराष्ट्र व मराठे यांचा संबंध दाखविला आहे. परंतु रट्ट हे उत्तरेकडून दक्षिणेकडे वसाहत करण्यास आले या गोष्टीस सबळ पुरावा आढळत नाहीं व ही गोष्ट राजवाडे यांनींहि कबूल केली आहे. रट्टांचें अस्तित्व विंध्यपर्वताच्या उत्तरेस असल्याचा दाखला पुराणांतरीं आढळत नाहीं. उलट तेलंगण वगैरे द्राविड प्रांतात रेड्डी नावचे लोक वसाहत करून शेती वगैरे धंदे करीत असलेले आढळतात व यांचा आणि रट्टांचा समन्वय असणें संभवनीय दिसतें. राष्ट्रकूटांचें घराणें रथिक अथवा रट्ट या लोकांपैकींच असावें व तें मूळ लातूर( लट्टलूर )हून वर एलिचपूर वगैरे ठिकाणीं गेलें असें रा. आळतेकर यांनीं आपल्या राष्ट्रकूटांच्या इतिहासांत दाखविलें आहे व हे रड्डी लोकांपासून भिन्न होते असें म्हटलें आहे. पण ते मूळ कानडी होते असे त्यांनीं प्रतिपादन केलें आहे यावरुन ते आर्य असून उत्तरेकडून आले असल्याचें संभवत नाहीं.

**मोठें राष्ट्र म्हणून महाराष्ट्र**—याचसंबंधानें रा. पा. वा. काणे आपल्या विविधज्ञानविस्तारांतील (४९) एका लेखांत म्हणतात:—महाराष्ट्र शब्दाची साधी व्युत्पत्ति म्हणजे मोठें विस्तृत राष्ट्र हीच खरी असावी असें म्हणावें लागतें. फार प्राचीन काळापासून दक्षिणच्या मधोमध एक प्रचंड अरण्य होतें असें सर्व ग्रंथांत वर्णन आहे. त्याच अरण्याला महाकान्तार, महाटवि, दण्डकारण्य अशीं नावें प्राचीन ग्रंथांत दिलेलीं दिसतात. हळूहळू या प्रचंड अरण्यांत आर्य घुसले, त्या अरण्यात त्यांनीं वसाहती स्थापून अरण्य तोडून साफ केलें, जिकडे तिकडे नगरें, गांवें वसविलीं, समृद्ध अशीं राज्यें स्थापिलीं व आर्यसंस्कृति पसरविली. तेव्हा जेथें पूर्वीं महाकान्तार किंवा महारण्य होतें त्या ठिकाणीं प्रचंड राष्ट्र झाल्यामुळें त्याला महाराष्ट्र म्हणू लागले. हें परिवर्तन घडून येण्याला अनेक शतकें लोटलीं असलीं पाहिजेत. महाराष्ट्र हें नांव इ. स. पूर्वीं ३००च्या सुमारास पडलें असावें. आंध्रभृत्य किंवा सातवाहन या बलाढ्य राजांचें साम्राज्य पूर्वेस कारोमांडल किनाऱ्यापासून तों पश्चिमेस सह्याद्रीपर्यंत पसरलें होतें. त्या वेळीं महाराष्ट्र हा शब्द चांगलाच प्रचारांत आला असावा. ह्या आंध्रभृत्यांच्या अफाट साम्राज्यापैकीं पश्चिमेकडील भागाचें राजधानीचें शहर पैठण होतें. अशा रीतीनें कोणत्याहि लोकाच्या नांवावरून नव्हे तर देशाच्या विस्तारावरून व त्याच्या प्राचीन स्थितीवरून महाराष्ट्र हा शब्द प्रचारांत आला असावा. पुष्कळ ताम्रपटांत व शिलाशासनांत धर्मराष्ट्र, देवराष्ट्र, गोपराष्ट्र, पूर्वराष्ट्र अशीं प्रदेशवाचक नावें येतात. हीं नावें कोणत्याही बलाढ्य राज्यवंशाचीं किंवा लोकांचीं (गोपराष्ट्र खेरीज करून) द्योतक नाहींत. वरील चारही राष्ट्रशब्दयुक्त देश महाराष्ट्रांत मोडत असें दिसतें. म्हणून महाराष्ट्र हें नांवहि वंशावरून किंवा जातीवरून न पडतां देशाच्या विस्तारावरून पडलें असावें या अनुमानाला बळकटी येते.

याप्रमाणेंच केसरीमधील एका लेखांत करहाट, वरहाट व मरहाट हे तिन्ही शब्द मूळ कानडी असून अनुक्रमें करहाटप्रांत, वऱ्हाडप्रांत व महाराष्ट्र या भूप्रदेशांचे वाचक होते असे सुचविलें आहे.

वरील निरनिराळ्या व्युत्पत्तींचा विचार करतां आपणांस असें दिसून येईल कीं, मि. विल्सन हे महाराष्ट्र दर्शी भाषाशास्त्रदृष्ट्या महा + राष्ट्र = मोठें राष्ट्र ही व्युत्पत्ति सयुक्तिक म्हणून मान्य करूनहि महारांचें राष्ट्र ही दुसरी वैकल्पिक व्युत्पत्ति सुचवितात व मि. ओपर्ट हेहि त्यांचीच जवळ जवळ री ओढतात आणि महार व मल्ल हीं एकच धरून असेर महाराष्ट्र हें महारांचें राष्ट्र ठरवितात. डॉ. भांडारकर रट्ट व महारट्ट या जनवाचक शब्दांवरून महाराष्ट्र शब्द व्युत्पादितात. रा. राजारामशास्त्री भागवत प्रथम मराठ्यांस अभिमानार्ह अशी व्युत्पत्ति 'मरता रान हटतां' अशी सुचवून नंतरीस महाराष्ट्री म्हणजे बोलणारे तें महाराष्ट्र ही व्युत्पत्ति स्वीकारतात. रा. राजवाडे महारट्ट या शब्दावरून महाराष्ट्रिक ऊर्फ महारट्ट या लोकांचा देश तो महाराष्ट्र देश अशी व्युत्पत्ति सुचवितात. व शेवटीस प्रा. काणे वरील सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्र हें नांव कोणत्याहि जातिवाचक अगर देशवाचक शब्दावरून पडलें नसून विस्तारावरून व अनेक राष्ट्रवाचक लोकांचा व देशांचा समावेश करणार म्हणून मोठें राष्ट्र (महा + राष्ट्र) होतें म्हणून असलें नामाभिधान पडलें असें म्हणतात व तेंच आम्हांस अधिक सयुक्तिक दिसतें. महानुभावी वाङ्मयांतहि तत्कालीन लोकांची हीच समजूत व्यक्त केलेली आढळते. उदाहरणार्थ, आचार महाभाष्यांत २४व्या सूत्रावरील भाष्यांत 'महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र । म्हणौनि महाराष्ट्र । महंत म्हणजे थोर । तर सेचि थोरी करूनि अर्थ घ्यावा ।' इत्यादि विवेचन केलें आहे.

**व्याप्ति व मर्यादा:**—आज महाराष्ट्र या नावानें ओळखला जाणारा भरतखंडाचा भाग म्हटला म्हणजे स्थूल मानानें ज्या भागात मराठी भाषा चालते तो होय. या प्रदेशाची व्याप्ति निरनिराळ्या काळीं कमी अधिक असण्याचा संभव आहे. ज्या वेळीं मराठी भाषा बाल्यावस्थेमध्यें असेल व मराठी साम्राज्याचा प्रादुर्भाव झालेला नसेल त्या वेळीं हें क्षेत्र संकुचित स्वरूपाचें असेल तर मराठी साम्राज्याच्या उत्कर्षकाळीं त्याची व्याप्ति बरीच वाढलेली असली पाहिजे. तथापि सामान्यतः या क्षेत्राच्या मर्यादा पुढें दिल्याप्रमाणें सांगता येतील. 'मुख्य मराठी भाषा भरतखंडाच्या पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीज अमलाखालीं असलेल्या गोंव्याच्या हद्दीपासून सुरू होऊन समुद्र किनाऱ्यानें वर उत्तरेकडे दमणजवळील दमणगंगा या नदीपर्यंत जाते. (या दमणगंगा नदीलाच टॉलेमी डुगा असें म्हणतो.) ही नदी या सह्याद्रीच्या पश्चिमेकडील सकल प्रदेशापुरती मराठी भाषेची उत्तरेकडील सीमा होय. घाटमाथ्यावर मात्र ही सीमा पाणलोटाच्या बाजूबाजूनें कोळी, भिल्ल वगैरे वन्य समाजातून वर नर्मदेपर्यंत जाते. नर्मदा नदी गुजराती व नेमाडी किंवा नेवाडी या भाषांपासून मराठीला विभिन्न करणारी रेषा होय. हीच सीमारेषा पुढें नर्मदेला पूर्वेस व पश्चिमेस स्पर्श करून असलेल्या सातपुडा पर्वताच्या कडेनें गेली आहे. गाविलगडाच्या आसपास ज्या ठिकाणीं सातपुड्याच्या एका दुसऱ्या फाट्यास सुरुवात होते तेथें ही सीमारेषा पूर्वेकडे बेतुल व शिवणीकडे जाण्यास प्रारंभ करून नागपूर व शिवणी यामधील घाटात सरते, व तेथून नागपूर मध्य करून काहींशा अर्धवर्तुळाकार रेषेंत ही सीमारेषा थोडी दक्षिणेकडे व थोडी पूर्वेकडे आणि नंतर पश्चिम दिशेकडे वळून लांजी व वरागड यांना स्पर्श करून जाते. तेथें तिची गोंडी व तेलगू भाषांशीं गांठ पडते. येथून नंतर ही सीमारेषा चांद्याच्या नजीक जाऊन तेथून पश्चिमेकडे जाण्यास सुरुवात करून पैनगंगेच्या बाजूनें माहूरपर्यंत जाते. ही रेषा मराठी व तेलगू यामधील विभाजक रेषा होय. माहूरपासून गोदावरीपर्यंत जाऊन नागमोडी मार्गानें ती नैर्ऋत्य दिशेकडे देगलूर, नळदुर्ग, सोलापूर, विजापूर, यांना स्पर्श करून जाते. तेथून ही रेषा कृष्णेपर्यंत जाऊन जवळजवळ कोल्हापूरपर्यंत जेथें कृष्णा उत्तरेकडे वळण घेते तेथपर्यंत जाते. कृष्णा ही मराठी व कानडी यामधील विभाजक रेषा आहे. नंतर ही रेषा नैर्ऋत्य दिशेकडे वळून कोल्हापूर संस्थानचा मुलूख व गोंव्याच्या घाटाच्या वरील मुलूख पोटात घेऊन वेंगुर्ल्याच्या खाडीशेजारीं समुद्रास मिळते.'

**नर्मदा कीं तापी**—याप्रमाणें डॉ. जॉन विल्सन यांनीं मोल्सवर्थच्या कोशास जोडलेल्या प्रास्ताविक निबंधात (१८५७) मराठीच्या क्षेत्रमर्यादा नमूद केल्या आहेत व त्याच मर्यादा मुंबई इलाख्याच्या कारभाराच्या अहवालात (१८७२–७३) त्यांनीं पुन्हा दिलेल्या आढळतात व त्यातून इंडियन अँटिक्वरी मासिकात (१८७४) उद्धृत केलेल्या दिसतात. परंतु त्या वेळीं डब्ल्यू. एफ्. सिन्क्लेअर यांनीं (इं. अँ. ३२. १८७४) या क्षेत्राबद्दल असें म्हटलें आहे कीं, 'डॉ. विल्सन यांनीं नर्मदा नदी ही मराठी भाषेची उत्तरसीमा म्हणून दिली आहे. परंतु वास्तविक नर्मदेच्या ऐवजीं तापी किंवा सातपुडा पर्वत ही मर्यादारेषा मानणें अधिक निर्दोष होईल. कारण नर्मदेस लागून असणारे मुंबई इलाख्यातील भाग म्हटले म्हणजे रेवाकांठा व खानदेश हे होत. यांपैकीं रेवाकांठाची भाषा गुजराथी असून खानदेशामध्यें अक्राणी परगण्यात पावरी नावाचे रानटी लोक आहेत त्यांची बोली गुजराथीजवळजवळ आहे. उदा० 'मोइ तोह्नो घोरमां गोलोर थाइजो' = मी त्याच्या घरांत गेलों. यांतील 'न' प्रत्ययानें दर्शविलेली षष्ठी व थोइओ हे गुजराथी विशेष आहेत. होळकरांच्या मुलखांत नेमाडमध्यें पेशवाईच्या काळीं वस्ती केलेल्या कुणब्यांच्या वस्तींत मराठी भाषा प्रचलित आहे. परंतु सातपुड्यातील भिल्ल गुजराथीचीच एक बोली बोलतात त्याखालीकडे पूर्वेस असलेल्या भिल्लांची बोली नमाडीजवळजवळ येते व जरी त्यास मराठी बोलतां येतें तरी त्यांची आपसातील बोली धेडगुजरी असून तापीपलीकडील गुजराथी कुणबी गुजराथीच बोलतात. येथें मराठी ही केवळ सरकारी भाषा आहे. तापीच्या अलीकडेहि नवापूर, पिंपळनेर, नंदुरबारमधील भागेंत स्वरूप गुजराथी आहे. तथापि शाळा व सरकारी कचेऱ्या यामध्यें मराठीचा उपयोग होत असल्यामुळें या परिस्थितींत फरक पडत आहे व एकदोन पिढ्यांत विल्सन यांनीं उल्लेखिलेली स्थिति वास्तविक आढळेल.' आज पाहतां याप्रमाणें प्रत्यक्ष परिस्थिति दृष्टीस पडते. यामुळें डॉ. विल्सन यांनीं नमूद केल्याप्रमाणें आज नर्मदा ही मराठीची उत्तरसीमा मानावयास हरकत नाहीं.

**खानदेशी मराठी कीं गुजराथी**—वरील कारणाकरितांच ग्रिअर्सन यांनीं संपादन केलेल्या व स्टेन कोनो यांनीं लिहिलेल्या भारतीय भाषांच्या पाहणींमध्यें खानदेशी ही भाषा स्वतंत्र धरून तिचा अंतर्भाव मराठीमध्यें न

र्ना गुजराथीमध्यें करण्यांत आला आहे. खानदेशांत प्रचलित असलेल्या अहिराणी भाषेवर गुजराथीचा ठसा स्पष्ट दिसत आहे. तथापि हळूहळू मराठीचा पगडा अधिक अधिक बसत असून आज तिचा कल मराठीकडे झुकता वाढत असून आज सर्व खानदेश मराठी भाषेच्या क्षेत्रांत अंतर्भूत करण्यास हरकत नाहीं. परंतु १९३१ च्या खानेसुमारींत खानदेशी म्हणून स्वतंत्र भाषा मानून तिचा अंतर्भाव मराठीमध्यें करण्यांत आला नाहीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

**कोंकणीचा अंतर्भाव**—तसेच विल्सन यांनीं मराठी भाषेच्या क्षेत्रास दक्षिणेकडे गोव्यापासून आरंभ केला आहे, परंतु गोव्याचा प्रदेश व त्यालगतचा बराच मुलूख यामध्यें प्रचलित असलेली कोंकणी भाषा ही मराठीचीच एक बोली असून ती दक्षिणेकडे कारवारच्याहि खालीं होनावरपर्यंत चालू आहे असें डॉ. विल्सन यांनीं त्याच लेखांत पुढें म्हटलें आहे. त्याअर्थी गोव्याचा पोर्तुगीज मुलूख व त्याच्या खालील किनाऱ्याची पट्टी यांचा अंतर्भाव मराठीच्या क्षेत्रांत केला पाहिजे हीच गोष्ट रा. वेंगुरेकर यांनीं केसरीमध्यें ता. १९ व २३ ऑगस्ट १९३२ च्या लेखांत निर्दिष्ट करून बेळगाव कारवार या जिल्ह्यांचा कांहीं भाग मिळून मराठी भाषा असलेला एक स्वतंत्र जिल्हा करतां येईल असें प्रतिपादलें आहे.

**महानुभावकालीन महाराष्ट्र**—'महाराष्ट्रा'ची व्याप्ति महानुभावांच्या उदयकालींहि याच प्रदेशापुरती मर्यादित होती हें त्यांच्या आचारपाठांतील महाभाष्यांत पाहावयास सांपडतें. तेथें पहिल्या सूत्रांतील भाष्यांत महाराष्ट्राचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें आहे. "छाटी एक देश महाराष्ट्रु। तेथिंचे शिष्टाणें सुभद्रु। वेदशास्त्र चातुर्याची पेठु। भरली तियें देशीं॥ ऐसे ते महाराष्ट्राचे सुंदरू। वरी महाराष्ट्रभाषा चतुरू। तेही वसविलें गंगातीरू। क्षेत्र त्र्यंबकु वेर्‍हीं॥ पश्चिमे त्र्यंबक पूर्वे सागर वेर्‍हीं। द्वादश योजनें उभय गंगातीरीं। ऐसे ते गंगातट महाराष्ट्रीं। वसिजे पुण्यायतन॥ तियें महाराष्ट्रीं गंगातीरीं महतु। तेथ सदा ईश्वरावतारू क्रीडतु॥ देश म्हणजे खंडमंडळ। जैसे फलेठाणापासौनि दक्षिणेसि म्हाटी भाष जेतुलां ठाईं वर्ते तें एक मंडळ। तयासि उत्तरें बाळेघाटाचा सेवट असे। ऐसे एक खंडमंडळ। मग उभय गंगातीर तेंहि एक खंडमंडळ। आन तयापासौनि मेघकरघाट ते एक मंडळ। तयापासौनि आवघें वराड तेंहि एक मंडळ। पर आघवीचि मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे। किंचित किंचित भाषेचा पालट असे म्हणौनि खंडमंडळें म्हणावीं। मग ऐसे मंडळांचा पैला मंडळासि जाए आन पैलें मंडळीचा ऐलासि ए। तया पुरुषाचे तेंचि सेवट आणावे॥"

**बृहन्महाराष्ट्रांतील मराठी**—वर वर्णन केलेलें क्षेत्र म्हणजे जेथें मराठी भाषा मुख्य भाषा म्हणून बोलली जाते असा सलग भूप्रदेश होय. याखेरीज बडोदें, ग्वाल्हेर, इंदूर, धार, देवास इत्यादि शहरें व त्यालगतचा संस्थानी प्रदेश यामध्यें मराठी भाषा प्रामुख्यानें प्रचलित आहे. याखेरीज छत्तिसगड व बस्तर संस्थान यांमध्यें मराठीचा पुष्कळच प्रचार असून तेथें असलेल्या महारी व हलबी या कांहीं अर्धी मराठीच्याच बोली समजण्यांत येतात व छत्तिसगडी भाषेच्या व्याकरणावरहि मराठी भाषेंतील प्रत्ययांची छाप स्पष्टपणें दृष्टीस पडते. याखेरीज महाराष्ट्राबाहेर मराठी बोलणारे लोक अनेक ठिकाणीं मराठी स्वाऱ्या व साम्राज्यविस्तार यामुळें पसरले आहेत. त्यांची आज वस्ती कोठें किती आहे हें शेवटीं दिलेल्या कोष्टकांवरून दृष्टीस पडेल.

**मराठीच्या सीमेवरील भाषा**—मराठी भाषेच्या उत्तर सीमेवर पश्चिमेकडून पूर्वेकडे गुजराथी, राजस्थानी, पश्चिम हिंदी व पूर्वहिंदी या भाषा असून, पूर्वेकडील सीमेवर पूर्व हिंदी, गोंडी व तेलुगु या भाषा आहेत. हलबी भाषा ही पूर्वेकडे हळूहळू बिहारी बोलीच्या द्वारें उडिया भाषेमध्यें मिसळून जाते. दक्षिणेकडे पूर्वेकडून पश्चिमेकडे गोंडी, तेलुगु, मल्याळी व कानडी या भाषा आहेत. पश्चिमेस हें क्षेत्र समुद्रानें मर्यादित आहे.

**मराठी भाषेचें क्षेत्र**—वर दिलेल्या मराठी भाषेच्या क्षेत्रांत आपणांस आज परिचित नावांनीं पाहावयाचें म्हणजे मुख्यतः पुढील प्रदेश येतात. गोमंतक, गोवें प्रांत, कोंकण, देश, खानदेश, वऱ्हाड, मराठी मध्यप्रांत, व निझामच्या राज्यांतील मराठवाडा या मुख्य भागांत पुढील जिल्हे सामान्यतः अंतर्भूत होतात. कारवारचा कांहीं भाग, गोवा, बेळगावचा कांहीं भाग, रत्नागिरी, कुलाबा, ठाणें, सातारा, सोलापूर, पुणें, अहमदनगर, पूर्व व पश्चिम खानदेश, हे मुंबई इलाख्यांतील जिल्हे, वऱ्हाडचे बुलढाणा, अकोला, यवतमाळ व उमरावती हे चार जिल्हे, तसेंच मध्यप्रांताचे वर्धा, नागपूर, चांदा व भंडारा हे जिल्हे आणि बालाघाट व छिंदवाडा या जिल्ह्यांचा

काही भाग व छत्तिसगड, नस्तर संस्थान व रायपूर, दुग वगैरेंचा काही भाग आणि या वरील प्रदेशात अंतर्भूत होणारी दक्षिणेतील व इतर संस्थानें, आणि निजामशाहीतील औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हे जिल्हे व उस्मानाबाद, व बेदर यांचा काही भाग या सर्व प्रदेशास आज आपण महाराष्ट्र या नावानें संबोधतो. परंतु यास महाराष्ट्र हें नाव फार प्राचीन काळापासून असलेलें आढळत नाही. प्राचीन काळीं या प्रदेशाच्या निरनिराळ्या भागांस निरनिराळीं नावें असलेली आढळतात. उदाहरणार्थ, वऱ्हाड या प्रदेशास पूर्वी विदर्भ हें नाव रूढ होतें. खानदेश, अजंठ्याचा पहाड वगैरे भागास अश्मक असें नाव रूढ होतें. सामान्यत: नाशिकच्या आसपासच्या भागास दण्डकारण्य असें नाव होतें व जवळ जवळ याच प्रदेशास दक्षिणापथ असेंहि नाव रूढ होतें व त्यासच सामान्यत: दक्षिण ऊर्फ दख्खन या नावानें ओळखीत. त्याच्या दक्षिण भागास कुंतल व कोंकणास अपरांत असें नाव आढळतें. याकरिता आपण आता या निरनिराळ्या प्रदेशाचा आपणास प्राचीन वाङ्मयावरून कसकसा परिचय होत जातो तें प्रथम पाहू.

**महाराष्ट्रासंबंधीं प्राचीन उल्लेख**—वैदिक आर्यांची वसाहत मुख्यत: पंजाब व आर्यावर्त या भागांतच असल्यामुळें वैदिक वाङ्मयामध्यें दक्षिण हिंदुस्थानातील प्रदेशासंबंधानें कोणताहि उल्लेख येणें संभवनीय नाही. या प्रदेशासंबंधी सर्वांत प्राचीन उल्लेख पाहू गेलें असता ऐतरेय ब्राह्मणात अन्ध्र, पुण्ड्र, शबर, पुलिन्द, मूतिब इत्यादि दस्यूंचा उल्लेख आढळतो. 'त एतेऽन्ध्राः पुण्ड्राः शबराः पुलिन्दा मूतिबा इत्युदन्त्या बहवो भवन्ति वैश्वामित्रा दस्यूनां भूयिष्ठाः' । (७. १८) या ठिकाणीं विश्वामित्रानें आपल्या शुन:शेप यास ज्येष्ठ न्रु या नात्यानें परिग्रह न करणाऱ्या मधुच्छंदाहून वडील पन्नास पुत्रांना 'तुम्ही नीच योनींत जाल' असा शाप दिला व त्याचे वंशज अन्ध्र, पुंड्र, शबर, पुलिंद आणि मुतिब इत्यादि होत, अशी कथा आहे. वरीलपैकीं पहिल्या चार जातीं दक्षिणेंत राहत असल्याबद्दलचा दाखला आहे. पुंड्रांचा रामायणात उल्लेख असून बाकीच्या तिन्हींचा पुराणातून उल्लेख आहे. नंतरच्या वाङ्मयावरून पुलिंद व शबर विंध्य पर्वताच्या आसपास राहात असावे असें दिसतें. टॉलेमी मात्र त्यांचें वसतिस्थान नर्मदेच्या तीरावर मानतो. आंध्र लोक, ज्यांना आधुनिक काळात आपण तेलगु लोक म्हणतों, हे गोदावरीच्या मुखाच्या आसपास किंवा त्याच्या जरा उत्तरेकडील भागात राहात होते. ऐतरेय ब्राह्मणाच्या काळात जर ह्या जातींचीं हीं वसतिस्थानें होतीं तर आर्य लोक अर्थातच त्या काळात विंध्याच्या उत्तरेकडील सर्व प्रदेशाशीं व त्याच पर्वताच्या रांगेच्या आग्नेय भागाकडील प्रदेशाशीं परिचित असले पाहिजेत. तसेंच त्याच ब्राह्मणात ('एतमु हैव प्रोचतु पर्वत नारदा सोमकाय साहदेव्याय सहदेवाय बाभ्रवे दैवावृधाय भीमाय वैदर्भाय नग्नजिते गांधाराय।' ७. ३४. ९) एका वैदर्भ भीमास पर्वत व नारद यांनीं सोमवल्ली बद्दल क्षत्रियांनीं कोणतें प्रतिनिधि पेय घ्यावें याबद्दलची माहिती दिल्याचा उल्लेख आढळतो. विदर्भ देशाचा उल्लेख जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणात आला असून त्या देशांतील कुत्रे (माचल) वाघास ठार मारतात असें म्हटलें आहे. बृहदारण्यकोपनिषदामध्यें (२. ६, ३, ४. ६, २१) विदर्भि कौण्डिण्याचा उल्लेख आढळतो. तसेंच प्रश्नोपनिषदामध्यें एका भार्गवास वैदर्भि म्हटलेलें आहे. याप्रमाणें विदर्भासंबंधीं काहीं उल्लेख प्राचीन वाङ्मयात आढळतात. तसेंच शतपथ ब्राह्मणात (१२. ८. १, १७. १२. ९. ३, १) रेवोत्तर या शब्दामध्यें रेवा (नर्मदा) नदी निर्दिष्ट असावी असें वाटतें. सामान्यत: विन्ध्य पर्वताच्या दक्षिणेकडे असलेल्या स्थळांसंबंधीं वैदिक वाङ्मयामध्यें एवढेच उल्लेख आढळतात व त्या काळात हा प्रदेश आर्यांना बहुधा अज्ञातच असावा व नर्मदा ही नदी आर्यावर्त व दक्षिण यामधील सीमा मानीत असावे. विदर्भ हा सीमाप्रातावर असून अन्ध्रादि लोकांची वस्ती बहुधा कलिंग देशात असावी.

यास्कानीं आपल्या निरुक्तामध्यें दाक्षिणात्यामधील काही चालींचा उल्लेख केला आहे. 'अभ्रातृकेव पुंस एति प्रतीची गर्तारुगिव सनये धनानाम्' ... 'अभ्रातृकेव पुंस पितृनेत्याभिमुखी सन्तानकर्मणे पिण्डदानाय न पतिं गर्तारोहिणीव धनलाभाय दाक्षिणाजी (नि. ३. ५)' परंतु त्यास त्यावरून महाराष्ट्रातील लोकांचा निर्देश करावयाचा होता असें निश्चितपणें मानता येत नाहीं. यास्कानंतरच्या काळात विंध्याच्या दक्षिणेकडील लोकांस दाक्षिणात्य व त्याच्या प्रदेशास दाक्षिणापथ या नावानें संबोधलेलें आढळतें.

पाणिनीनें एका सूत्रात, (जनपद शब्दात् क्षत्रियादञ्, पा. ४. १. १६८) योध्याच्या टोळ्याच्या नांवावरून साधित शब्द बनविण्याचा नियम सांगितला असून त्या साधित शब्दानें 'त्या देशाचा राजा' अथवा 'तन्नामक देशातील रहिवासी' असे दोन अर्थ प्रतीत होतात असें सांगितलें आहे. उदाहरणादाखल पाणिनीनें 'पंचालाचा राजा' किंवा 'पंचाळ देशांतील एक रहिवासी' असे दोन्ही अर्थ 'पांचाळ' या शब्दानें होतील, तसेंच शाल्व देशाचा

रहिवासी किंवा राजा 'शाल्वेय' होय इ. इ. असें विवरण केलें आहे. यात कात्यायनाच्या दृष्टीनें पाणिनीनें पांड्य (पांडु देशाचा राजा किंवा रहिवासी) हा शब्द उदाहरणादाखल द्यावयास पाहिजे होता. तो पुढें कात्यायनानें वार्तिकांत (पाण्डोर्ड्यण्) दिला आहे.

त्याचप्रमाणें, कंबोज हा आर्येतर लोकांचा वायव्येकडील एक तत्कालीन देश होता. या कंबोज शब्दांत वरील नियमाप्रमाणें कांहींहि फेरबदल करूं नये असें पाणिनि म्हणतो. (कंबोजाल्लुक्, पा. ४. १. १७५) म्हणजे कंबोज हा शब्दच स्वदेशीय राजा व रहिवासी या अर्थानें वापरावा असें एका सूत्रांत सांगितलें आहे. या सूत्राच्या वार्तिकांत 'हा शब्द आणि इतर कांहीं शब्द' अशी पुस्ती जोडावयास पाहिजे असें कात्यायन (कंबोजादिभ्य इति वक्तव्यम्, वा. पा. ४. १. १७५) म्हणतो. कारण चोल इ. शब्दहि त्याच वर्गांत पडतात.

तसेंच पाणिनीनें एका दुसऱ्या सूत्रांत 'कुमुद्वत्, नड्वत्, वेतस्वत्' या देशांना हीं नांवें पडण्याचें कारण त्यांत अनुक्रमें कुमुद, नड व वेतस आहेत असें सांगितलें आहे. (कुमुदनडवेतसेभ्यो ड्मतुप्, पा. ४. २. ८७) कात्यायनानें या वरील देशांच्या यादींत महिष्मत् नावाच्या आणखी एका देशाचें नाव जास्त घातलें. (महिषाच्चेति वक्तव्यम्) महिष्मत् म्हणजे पुराणांत महाराष्ट्राशीं संबद्ध असलेला आणि महिषक नांवानें ओळखला जाणारा दक्षिणेकडील देश होय. नर्मदेच्या कांठचें माहिष्मती (महेश्वर) शहर या देशाची राजधानी असावें.

यावरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, पाणिनीच्या काळीं उत्तरेंत राहणाऱ्या आर्यांचा अद्याप दक्षिणेकडील देशांशीं संबंध आला नव्हता. कारण इतकीं बारीक सारीक सूत्रें देणारा सूक्ष्मदर्शी पाणिनि, त्याला माहीत असलेल्या दक्षिणेकडील देशांचा उल्लेख करण्यास विसरेल हें अगदीं असंभाव्य दिसतें. पाणिनीनें आपल्या सूत्रांत दक्षिणेकडील एकाहि देशाचा उल्लेख केलेला नाहीं. कात्यायनानें वरील कांहीं दक्षिणेकडील देशांचा उल्लेख त्याच्या वार्तिकांत केला असल्यानें, त्याच्या काळीं आर्यांचें या देशांशीं बरेंच दळणवळण होत असावें असें अनुमान करणें चूक होणार नाहीं. शिवाय कात्यायनानें 'नारिकेर' या शब्दाचा उल्लेख केला आहे तो बहुधा दक्षिणेंतील नारळाचेंच असावें. यावरून पाणिनीच्या व्याकरण-सूत्रांच्या स्पष्टीकरणार्थ व पूरक म्हणून वार्तिक रचणाऱ्या कात्यायनाला दक्षिणेकडील देशांची माहिती होती असें दिसतें.

परकीय ग्रंथकारांसंबंधें पाहूं जातां पेरिप्लस (इ. स. पहिलें शतक) यानें दक्षिणापथाचा 'दक्षिणादेस' या नांवानें उल्लेख केलेला आहे. फाहियान यानें ताशन (दक्षिण) देशाचा उल्लेख केला आहे व तेथें कश्यपबुद्धाचा संघाराम एका डोंगरामध्यें दगडांत कोरलेला आहे व हा प्रदेश डोंगराचे उभे कडे असलेला व भयंकर आहे असें वर्णन केलें आहे. हीं अजिंठ्याचीं लेणीं असावीं.

सिंहली भाषेंतील महावंसो नामक ग्रंथांत (इ. स. ४७५, टर्नर, पृ. ७१-७२) आणि त्याहिपेक्षां अधिक जुन्या अशा दीपवंसा (ओल्डेनबर्ग, पृ. ५४) नामक ग्रंथांत, अशोककालीन तिसऱ्या संगीतीचा अध्यक्ष बुद्धगुरु मोग्गलिपुत्त यानें महारट्ठ, अपरांत व वनवासी या देशांत प्रचारक पाठविल्याचे उल्लेख आहेत. 'विनय पिटकांतहि याचाच उल्लेख आहे. 'रक्खितथेर वनवास योनकधम्मरक्खित थेर अपरंतक महाधम्मरक्खित थेर महारट्ठ' (ओल्डे. विनय पिटक पृ. ३१४) अशोकाच्या काळांत महरट्ठ किंवा महाराष्ट्र हें नाव रूढ झालें असेल कीं नाहीं हें यावरून निश्चित सांगतां येणार नाहीं. पण एवढें मात्र खास कीं ख्रिस्तोत्तर काळांत आरंभींच्या शतकांत तरी निदान हा शब्द रूढ झाला असावा.

भाजें (१), बेडसा (२) व कार्लें (२; १४) येथील शिलालेखांत (इ. स. २ रें शतक) यजमानाचा महारथी व यजमानणीचा महारथिनी म्हणून उल्लेख आहे. अशोकाच्या गिरनार, धौलि, कालसी, जौगड, शहाबाजगढी इत्यादि शासनांत त्यानें रास्टिक, पेतनिक, अपरांत वगैरे राष्ट्रांत धर्मप्रचारक पाठविल्याचा उल्लेख आढळतो. यांपैकी अपरांत म्हणजे कोंकण असून त्याची राजधानी सोपारा होती. पेतनिक हें प्रतिष्ठान अथवा अर्वाचीन पैठण याचें निदर्शक असावें. व रास्टिक अथवा संस्कृत राष्ट्रिक हे महाराष्ट्रीयांबद्दल योजलेलें असावें.

दक्षिणापथ—पाणिनीच्या सूत्रांत दक्षिणापथ या शब्दाचा उल्लेख आढळत नाहीं. परंतु अष्टाध्यायीमध्यें कलिंग आणि अश्मक या देशांचा उल्लेख आढळतो ('इयम् मगध कालिंगसूरमसादय,' 'साल्वायव प्रत्यग्रथ

कल्कूटाश्मकादिन्' पा. ७. १, १७०-१७३ ) कौटिलीय अर्थशास्त्रामध्यें निरनिराळ्या देशातील पावसाचें वार्षिक मान सांगतांना अश्मक व अपरांत या देशांचा उल्लेख आला आहे. 'अर्ध त्रयोदशाश्मकाना त्रयोविंशतिरवन्तीनाममितमपरान्ताना हैमन्यानाच कालतः' (कौ.अ. २). अश्मक म्हणजे अजंठा याच्या आसपासचा म्हणजे सध्याचा खानदेशचा व निजामशाहींतील कांहीं भाग होय. व कलिंग म्हणजे गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या मुखाच्या दरम्यानचा प्रदेश होय.

दक्षिणापथाचा उल्लेख बौधायन स्मृतीमध्यें आढळतो. तेथें एका भाल्लवीच्या गाथेचें अवतरण घेतलें आहे. 'अथाप्यत्र भाल्लविनो गाथामुदाहरन्ति । अवन्तयोऽगमगधाः सुराष्ट्रादक्षिणापथाः' (बौस्मृ. १-१-२९-३०). कौटिलीय अर्थशास्त्रांतहि हैमवत पथापेक्षा दक्षिणापथ श्रेष्ठ असें कौटिल्याचें मत नमूद केलें आहे. (स्थलपथेऽपि हैमवतो दक्षिणापथाच्छ्रेयान् ...इत्याचार्याः नेति कौटिल्य' । कौ. अ. ७.) महाभारतामध्यें दक्षिणापथाचा उल्लेख अनेकवार आला आहे. सभापर्वामध्यें पाण्ड्य राजास जिंकल्यावर सहदेव दक्षिणापथास गेला असें म्हटलें आहे. (सभा. ३१.१७) सहदेवानें पाड्य, द्रवीड, उड्र, केरळ व आंध्र इत्यादि देश जिंकून तो किष्किंधेसहि' गेल्याबद्दलचें वर्णन आहे. ही किष्किंधा म्हणजे हंपीजवळील पंपा सरोवराच्या किंवा नदीच्या आसपास वसलेली असावी. येथेंच रामानें सुग्रीवाची गांठ घेतली होती. परंतु पुराणात किष्किंधा विंध्य पर्वताच्या आसपासच्या प्रदेशात असल्याचें वर्णन आहे. किष्किंधेहून पुढें सहदेव शूर्पारक, म्हणजे अर्वाचीन सोपारा ( वसईजवळील ), दडका व करहाटक म्हणजे कृष्णा व कोयना यांच्या संगमावरील आधुनिक कऱ्हाड इत्यादि ठिकाणीं गेल्याचें वर्णन आहे. वनपर्वामध्यें दक्षिणापथास अवन्तीवरून ऋक्षपर्वत ओलांडून जावें लागतें असें म्हटलें आहे. (वन. ६१. २३-२४). भीष्मपर्वामध्यें माहिष्मतीचा राजा नील हा दक्षिणापथातील नीलायुध योद्ध्यासह कौरवांच्या बाजूनें लढला असें वर्णन आहे ( भीष्म. ९.४३ ).

नाणेघाटातील शिलालेखात ( १. वेदिसिरिस • महारठिनो) दक्षिणापथाचा राजा वेदिश्री होता ( खि. पू. २०७ ) असा उल्लेख आढळतो.

रामायणामध्यें दक्षिणापथाचा सौराष्ट्राबरोबर उल्लेख केलेला आढळतो. ( २, १०, ३७ ) पतञ्जली आपल्या महाभाष्यामध्यें ( दक्षिणापथेहि महान्ति सरांसि सरस्य इत्युच्यन्ते । पा. सू. १. १. १९ ) दक्षिणापथामध्यें मोठ्या सरोवरास सरस्सुच्या ऐवजीं सरसी असें म्हणतात असें निवेदन करतो. क्षत्रप रुद्रदामन् याच्या गिरनार शिलालेखात ( इ. स. १५० ) दक्षिणापथाचा राजा शातकर्णि होता असा उल्लेख आढळतो. तसेंच नाशिक येथील शिलालेखातहि दक्षिणापथाचा उल्लेख आढळतो. समुद्रगुप्तानें आपल्या स्वारीमध्यें दक्षिणापथातील पराभव केलेल्या अनेक राजांचीं नावें अलाहाबाद येथील स्तंभावर कोरलेलीं आढळतात. ( ४ थें शतक ) यानंतर या प्रदेशाचे उल्लेख पुष्कळ सापडतात.

दण्डकारण्यः—पार्गिटर 'रामवनवासातील भूगोल' या विषयावरील विस्तृत लेखात (जर्नल रॉ.ए. सो., १८९४, पान २४२ ) बुंदेलखंडापासून कृष्णानदीपर्यंत जें प्रचंड अरण्य होतें त्याला दंडकारण्य असें सामान्य नाव होतें असें प्रतिपादितो. वनपर्वांत ( अ. ८५. ४० ते ४२ श्लोक ) दिलेल्या यादीवरून तापी, पयोष्णी या नद्या व मध्यहिंदुस्थान यांच्यामध्यें दंडकारण्य होतें असें दिसतें. बॉंबे गॅझेटियर, व्हॉ. २३, पान ३५८ वर, विजापूर जिल्ह्यापैकीं ऐहोळी, बदामी, बागलकोट वगैरे आठ स्थानांचा दंडकारण्याशीं संबंध लावण्यात येतो असें म्हटलें आहे. मार्कंडेय पुराणात वैदर्भ व दंडक एकत्र आणले आहेत.—'वैदर्भा दंडकैः सह ।' (अ. ५७. ४७.) दक्षिणेंतील महाटवि नांवाच्या देशाचा बृहत्संहितेंत उल्लेख आहे 'कर्णाटमहाटवि चित्रकूट नासिक्य कोलगिरि.' (अ. १४. १३.) रामायण उत्तरकांडांत ( अ. ८१ ) दंडकारण्य हें मूळचें विस्तृत राष्ट्र असून पुढें त्याचें अरण्य कसें बनलें याची कथा दिलेली आहे. पेरिप्लसमध्यें म्हटलें आहे, 'किनाऱ्यापासून दूर आंत असलेल्या प्रदेशात अनेक अरण्यें व पर्वत आहेत व त्यामध्यें थेट गंगानदीपर्यंत अनेक वन्य पशु, चित्ते, वाघ, हत्ती, प्रचंड सर्प, तरस, अनेक प्रकारचीं माकडें व लोकांनीं गजबजलेलीं राष्ट्रें आहेत.' 'देवगिरी सेउण देशात असून सेउन देश दंडकारण्याच्या सीमेवर आहे,' असें हेमाद्रीसारखा अलीकडील ग्रंथकार म्हणतो ( गॅ. व्हॉ. १, भाग २, पृ. ५३१ ). समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभशासनात दक्षिणापथांत महाकांतार म्हणून एक प्रदेश होता असें वर्णन आहे ( गुप्तशासनें पृ ७ ).

**अपरान्त ऊर्फ कोंकण**—अपरान्ताचा अवयवार्थ घेतला तर 'पश्चिम टोकाकडील देश' असा होईल; पण हा अर्थ कोंकण असाच होता. डॉ. फ्लीटच्या मतें अपरान्त म्हणजे कोंकण, उत्तर गुजरात, काठेवाड, कच्छ व सिंध देश, परंतु हा अर्थ मूळ अवयवार्थाला धरून आहे इतकेंच म्हणतां येईल. पण कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील अवन्ति व अश्मक देशांत पाऊस थोडा पडतो, पण अपरान्त व हिमालय येथें अपरिमित पडतो, हें वर्णन कच्छ, सिंध व गुजरात यांना लागू पडत नाहीं. अपरान्ताचा व कल्याणचा संबंध कान्हेरी येथील एका शिलालेखांत आणलेला आहे. अशोकाच्या पांचव्या शिलाशासनांत अपरांत शब्द येतो, परंतु तेथें कोंकणच अभिप्रेत आहे असें निश्चयानें म्हणवत नाहीं. आदिपर्वांत ( अध्याय २१७, २१८ ) अर्जुन गोकर्णाहून अपरान्ताला, तेथून प्रभासाला, तेथून रैवतक येथ व नंतर द्वारकेला गेला असें वर्णन आहे. म्हणजे अपरान्त देश गोकर्ण व प्रभास यांच्यामध्यें होता असें दिसतें. रुद्रदामन् याच्या शिलालेखांत सुराष्ट्र ( काठेवाड ) व इतर देश यांहून भिन्न असा अपरान्त म्हणून एक स्वतंत्र देश होता असें वर्णन आहे ( आर्कियॉ. सर्व्हे वे इ., व्हॉ २, पृष्ठ १२८ ). केरळ देश जिंकल्यावर अपरान्त पादाक्रांत करून मग रघु पारसीकांस जिंकण्यासाठीं खुष्कीच्या मार्गानें निघाला असें रघुवंशांत ( ४. ५२ ५९ ) वर्णन आहे. कालिदासाच्या वेळीं पारसीक काठेवाडापर्यंत आले होते शिवाय रघुवंशातील वर्णनावरून अपरान्त हा देश समुद्र व सह्य पर्वत यांच्यामध्यें होता असें दिसतें ( रघु ४. ५८ ). या सर्व पुराव्यांवरून अपरान्त म्हणजे दमणपासून गोव्यापर्यंतचा सह्याद्रि व समुद्र यांतील प्रदेश असें अनुमान दृढतर होतें.

जुन्या संस्कृत आणि फारसी ग्रंथांत कोंकण हा शब्द निरनिराळ्या प्रकारांनीं लिहिलेला आढळतो. संस्कृतमध्यें 'कुंकुण, कुङ्कण, कोङ्कण, कोंकण' हीं त्याचीं रूपें दिसतात. ह्या 'कोंकण' शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल अद्याप ठाम निर्णय झाला नाहीं विद्वान् लोक कांहीं निरनिराळ्या प्रकारांनीं त्याची व्युत्पत्ति देतात. कानडीमध्यें कोङ्कु = वाकडा + वन = कोङ्कुवन = कोंकण = वक्रप्रदेश. कोंकणांतील जमीन समुद्राकिनाऱ्यामुळें व डोंगराळ असल्यामुळें ही व्युत्पत्ति समर्थनीय दिसते फारशीमध्यें कोह ( = पर्वत ), कुण्ड ( = खांच, खड्डा ), असे दोन शब्द आहेत कोहकुण्ड = कोकुण्ड = कोंकण अशा मार्गानेंहि हा शब्द व्युत्पादितां येतो. किम् + किण्वम् ( कसली ही वनस्पति ? ) अशा तऱ्हेचा प्रश्न पहिल्या वसाहतवाल्यांनीं उन्मादक ताडीसंबंधीं विचारला असावा व त्यावरून कोंकण शब्द साधला असावा असेंहि एक मत आहे कोंग नांवाचे रानटी लोक या प्रांतांत प्रथम वसले असावेत व त्यावरून या देशास कोंगवन ( = कोंकण ) हें नांव मिळालें असावें. काणकोण या नांवाचा एक तालुका गोव्याच्या दक्षिणेस आहे त्यावरून कोंकण हें नांव आलें असावें कुकुण या नांवाचें एक नागांचें कुल महाभारतात उद्योग पर्वांत सांगितलें आहे त्याची वस्ती येथें असल्यावरून कोंकण हें नांव त्या देशास मिळालें (वामनश्चैव पनसकुकुर कुकुणस्तथा—म. भा उद्योग ) गंग या नांवाचे राजे म्हैसूर व पश्चिम किनाऱ्याच्या प्रांतावर सन ७००–१००० इसवीमध्यें राज्य करीत असत त्यांच्यावरून या देशास कोंकण हें नांव पडलें असण्याचा संभव आहे. ( गंगवन > गोंगवन > कोंकण ) यांपैकीं आम्हांस प्रथम व्युत्पत्तिच ग्राह्य दिसते

**विदर्भ**—हल्लींचा वऱ्हाड प्रांत हा पूर्वी ज्याला विदर्भ म्हणत त्या देशाचा केवळ एक भाग आहे. हल्लीं निजामाच्या राज्यात असलेलें बेदर शहर हें विदर्भ याचें अपभ्रष्ट रूप आहे तसें असल्यास विदर्भाचा विस्तार किती मोठा होता हें आपोआप लक्ष्यांत येईल. हल्लींचा महाराष्ट्राचा विस्तार सर्वांना माहीत आहेच पण प्राचीन काळीं महाराष्ट्राचा विस्तार हल्लींच्याहूनही मोठा होता व महाराष्ट्रांत विदर्भाचाही अंतर्भाव करीत, हें नलचम्पूतील वगैरे उताऱ्यांनीं सिद्ध होतें बृहदारण्यकोपनिषदांत ( अ. २, ब्रा ६. ३ ) जो वंश आहे त्यामध्यें एका ऋषीचें नांव 'विदर्भी कौण्डिण्य' आहे हें पूर्वी उल्लेखिलें आहेच. पुष्कळ प्राचीन ऋषींच्या नांवांच्या मागें देशांचीं नांवें लावीत उदा० पांचाल बाभ्रव्य त्याप्रमाणें विदर्भी कौण्डिण्य हा विदर्भांतील असावा असें वाटतें कौंडिन्य हें नांवहि विचारांत घेण्यासारखें आहे विदर्भ देशाचें प्राचीन काळीं कुंडिनपुर हें राजधानीचें शहर होत. त्या शहरावरून कौंडिन्य हें नांव पडलें असेल किंवा कौंडिन्य गोत्राचे लोक नगरांत असल्यामुळें शहरालाच कुंडिन असें नांव पडलें असेल भृगुकच्छ येथें भार्गव ब्राह्मणांची वस्ती होती व आहे सह्याद्रि वर्धातीरावर कौण्डिण्यपूर म्हणून एक गांव असून तेथें देवीचें मंदिर आहे व तेथें वार्षिक जत्रा भरते या ठिकाणीं कांहीं जुने अवशेष रा. अ. रा देशपांडे यांनीं शोधून काढले आहेत. महाभारतात नलोपाख्यानांत विदर्भ देशाचा उल्लेख अनेकदां आलेला आहे,

दमयन्तीला प्रवासांत त्रास होईल म्हणून तिनें आपल्या पितृगृहीं विदर्भ देशांत जावें असें नल सुचवितो. ' एष विन्ध्यो महाशैलः पयोष्णी च समुद्रगा ॥ २३ ॥ एष पन्थाः विदर्भाणामेष यास्यति कोसलान् । अतःपरं च देशोऽयं दक्षिणे दक्षिणापथः ॥ २४ ॥ [ वनपर्व अ. ६१ श्लो. २३, २४. ] वरील अवतरणावरून, विदर्भ देश, विंध्य पर्वत व पयोष्णी ( तापी ) यांचेपासून जवळच व दक्षिणापथाचे हद्दीवर असावा असें दिसतें. शान्तिपर्वांत विदर्भाला अत्यंत धर्मनिष्ठ व श्रेष्ठ असें राष्ट्र म्हटलें आहे. ( शान्तिपर्व २७२. ३. ) रामायणात बालकांडांत सगराची स्त्री केशिनी ही विदर्भ देशातील राजकन्या होती असें सांगितलें आहे. त्याचप्रमाणें किष्किंधाकांडांत विदर्भ, ऋषिक व माहिषिकी ( माहिष्मती, म्हणजे जबलपुराजवळील प्रदेश) याचा उल्लेख आहे ( किष्किंधाकांड ४१.१६. ). मार्कंडेयपुराणाच्या ५७ व्या अध्यायांत दक्षिणापथांत अंतर्भूत झालेल्या देशांत महाराष्ट्र, माहिषक, कलिंग, विदर्भ वगैरेंचा उल्लेख आहे (मार्कण्डेयपुराण ५७, श्लोक ४२, ४६, ४७.). त्याच पुराणाच्या ५८ व्या अध्यायांत पुनः महाराष्ट्र (५८. २३ ), नासिक्य ( ५८, २४ ), व विदर्भ ( ५८,१७ ) यांचा उल्लेख आहे. पतञ्जलीच्या महाभाष्यात नासिक्य ( नाशिक ) या नगराचें नांव आलें आहे. हें महाभाष्य इ. सनापूर्वी १४० चे सुमारास लिहिलें गेलें असा बहुतेक विद्वानांचा सिद्धांत आहे ( किलहॉर्नकृत महाभाष्य, भाग ३ रा, पृ. ४२ ). नाशिक येथील प्रसिद्ध लेणीं, अशोकाच्या शिलालेखांच्या खालोखाल, ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचीं आहेत. या लेण्यांतील अनेक शिलालेखांत नासिक्य, सूपारग ( सोपारा ), कलियण (कल्याण), पतिठाण ( पैठण ), चेमुलक ( चेऊल किंवा चौल ), इ. महाराष्ट्रीय स्थलांचा उल्लेख आहे. हीं बहुतेक लेणीं इ. स. पूर्वी १०० पासून इ. स. २०० पर्यंतच्या काळांत कोरलेलीं आहेत. टॉलेमी या प्रसिद्ध ग्रीक ग्रंथकारानें (इ. स. १२७–१६१) भडोच, पैठण, सोपारा, तगर इ. महाराष्ट्रांतील शहरांचा उल्लेख केला आहे. कालिदासाच्या रघुवंशांत विदर्भ देश व त्याची राजधानी कुंडिनपूर यांना उल्लेख अनेक वेळां केलेला आहे [ रघु. ५. ६०. ]. विदर्भालाच क्रथकैशिक असें नाव होतें असें रघुवंशावरून दिसतें. ' प्रत्युज्जगाम क्रथकैशिकेंद्रश्चन्द्रं प्रवृद्धोर्मिरिवोर्मिमाली ।' [रघु. ५. ६१]. भागवतांतील दशमस्कधात श्रीकृष्ण आनर्त देशाहून एका रात्रींत विदर्भाला आला व कुंडिनपुराच्या राजानें आपली कन्या रुक्मिणी शिशुपालाला देण्याचा विचार केला होता इ. वर्णन आहे( भा. १० स्कं. अ. ५३. ६ व ७ ). दशकुमारचरिताच्या आठव्या उच्छ्वासात विदर्भ देशांतील कांहीं राजांबद्दल हकीगत दिली आहे. ती कदाचित् ऐतिहासिक दृष्ट्या खरी नसेल, पण त्यांत असें म्हटलें आहे कीं, त्यात भोजवंशाचे राजे राज्य करीत होते. रघुवंशांतहि विदर्भ देशाचे राजे भोज वंशांतील होते असें म्हटलें आहे व त्या राजांचे अश्मक, वनवासी, कुंतल, मुरला, ऋचीक ( ऋषीक ), कोंकण वगैरे देशाचे राजे सामंत होते. नलचंपूचा कर्ता त्रिविक्रमभट्ट हा बाणभट्टानंतर ( ६००-६५० इ. स. ) व सरस्वतीकंठाभरणाचा कर्ता भोजराज (इ.स. १०५० ) ह्यांच्या दरम्यान झाला आहे. त्यानें असें म्हटलें आहे कीं, वरदातट ज्याचें नाव आहे तें महाराष्ट्र वीरपुरुषांनीं युक्त आहे व त्यांत विदर्भा नदी आहे ती दक्षिणेंतील जणू कांहीं सरस्वती नदीच होय ( नलचंपू ६. ६६ ). ह्या ग्रंथकाराच्या मतानें वरदातट हें नांव महाराष्ट्राला म्हणजे त्याच्या एका भागाला आहे. विदर्भा म्हणजे कोणती नदी तें मात्र सांगता येत नाहीं. कदाचित् ग्रंथकाराचा आशय असा असेल कीं, वरदा ही नदी विदर्भा म्हणजे दर्भरहित आहे. वरील श्लोकाचा असाहि अर्थ समजनीय आहे कीं, वरदातट या नांवाचें राष्ट्र मोठें वीरपुरुषयुक्त आहे. परंतु पौराणिक किंवा इतर ग्रंथांत वरदातट या नांवाच्या राष्ट्राचा उल्लेख केलेला नसल्यामुळें पूर्वी केलेलाच अर्थ बरोबर दिसतो.

कुंतलः—राजशेखराच्या बालरामायणावरून ( अंक १० ) विदर्भ व कुंतल हे दोन्ही देश महाराष्ट्रांत मोडत होते असें दिसतें. सुग्रीव म्हणतो, 'हे भरताग्रजरामा, हा पहा आपला महाराष्ट्र देश.' त्यावर श्रीराम म्हणतात, 'त्रैलोक्याला सुखद, वेदाचें केवळ सातवें अंग, उसाच्या रसाहूनहि स्वादिष्ट असें मधुर, प्रसादयुक्त, रसवत् व सुंदर काव्यामृत ज्या देशांत पाझरतें तो हा विदर्भ देश आपल्यापुढें आहे.' त्याचप्रमाणें कुंतल देशांतील स्त्रियांचाही लागलाच उल्लेख केलेला आहे. त्यावर सीता म्हणाली, 'हा तो देश कीं ज्या ठिकाणीं माझ्या आजेसासऱ्याची स्त्री इंदुमती जन्मली.' त्यानंतर मग नर्मदा नदीचें वर्णन आहे. कुंतल देश म्हणजे कांहींच्या मतानें नाशिकच्या आसपासचा देश असावा. परंतु कुंतल म्हणजे कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या मधील प्रदेश असावा. अर्वाचीन काळीं मराठे गडी ज्याप्रमाणें उत्तम भालाईत म्हणून प्रसिद्ध आहेत त्याचप्रमाणें प्राचीन काळीं ते प्रसिद्ध होते की काय हें समजत नाहीं;

परंतु संस्कृतांत कुंत = भाला असा अर्थ आहे. तेव्हा या देशाला कुंतल असें नांव पडण्याचें कारण वरीलप्रमाणेंच कांहीं तरी असावें. राजशेखरानें आपल्या कर्पूरमंजरींत ( १. १५ ) पांड्य, कांची, चोल, कर्णाट, कुंतल, व मलय इतक्यांचा एकाच श्लोकांत उल्लेख केलेला आहे; यावरून कुंतल म्हणजे वर निर्दिष्ट केलेला प्रदेश असावा. वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, प्राचीन काळीं महाराष्ट्र देशाची मर्यादा निश्चित नव्हती. कधीं कधीं भडोच-पासून किनार्यानें दक्षिणेस गोंव्यापर्यंत व पूर्वेकडून नर्मदा नदी, इल्लींचा वऱ्हाड व बदामीपर्यंतच्या सर्व मुलखाला महाराष्ट्र म्हणत. या एवढ्या मोठ्या प्रदेशांतील निरनिराळ्या भागांना कोंकण, विदर्भ, कुंतल इत्यादि नांवें होतीं. सामान्यतः हल्लीं जेवढा महाराष्ट्राचा विस्तार आहे, तेवढ्या प्रदेशालाही कधीं कधीं महाराष्ट्र म्हणत.

महाराष्ट्र:—वर सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांत अंतर्भूत होणार्या निरनिराळ्या प्रदेशाचा उल्लेख अनेक ठिकाणीं आढळतो. परंतु महाराष्ट्र या नांवानें या प्रदेशाचा उल्लेख वराहमिहिराच्या कालापर्यंत आढळत नाहीं. वराहमिहिराच्या बृहत्संहितेंत विदर्भ देश भारतवर्षाच्या मध्यभागाच्या आग्नेय दिशेला आहे असें सांगितलें आहे ( बृहत्संहिता अ. १४. ८ ). याच ग्रंथाच्या दहाव्या अध्यायांत महाराष्ट्राचें नांव आलेलें आहे. ‘ भाग्ये रसविक्रयिणः पण्यस्त्रीकन्यका महाराष्ट्राः।’ (बृ. सं. १०-८). ऐहोळीचा जैन रविकीर्ति यानें लिहिलेला शिलालेख अत्यंत महत्त्वाचा आहे. तो इ. स. ६३४ मध्यें सत्याश्रय पुलिकेशी ह्याच्या कारकीर्दींत लिहिण्यांत आला असें त्यांतील शकावरून दिसतें. वातापीपुर (बदामी) हें सत्याश्रयाची राजधानी होतें असें दिसतें. रविकीर्तीनें म्हटलें आहे कीं, महाराष्ट्राचे तीन भाग असून त्यांत ९९००० गांवें आहेत. या शिलालेखातील २५ वा श्लोक असा आहे. ‘ अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणां। नवनवति सहस्रग्रामभाजां त्रयाणाम् ॥ ’ रविकीर्तीच्या वेळीं बदामी शहर महाराष्ट्रांत मोडत होतें, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. ऐहोळी शिलालेखाच्या वेळीं हिंदुस्थानांत आलेला चिनी प्रवासी ह्युएनत्संग ( ६२९, ६४९ इ. स. ) ह्यानें आपल्या प्रवासवृत्तांतांत हिंदुस्थानाविषयीं दिलेल्या हकीगतींत महाराष्ट्राबद्दल खालील मजकूर आहे. द्राविड देशाहून उत्तरेस तो एकाकी एका लहान गांवास गेला तेथून २००० ‘ ली ’ ( म्हणजे २५०–३०० मैल ) प्रवास केल्यावर तो कोंकण पुर ( Kung-kin-na-puls ) ह्या देशाला पोंचला. ह्या देश ५००० ली ( सुमारें ८०० मैल ) आहे व त्याच्या राजधानीचा विस्तार ३० ‘ ली ’ आहे. कोंकणपुर देश सोडून वायव्येस ( ईशान्येस ? ) प्रवास केल्यावर एक मोठें अरण्य लागलें. त्यांत वन्य पशु व पुष्कळ क्रूर लुटारू होते. कोंकणपुरापासून २४०० ‘ ली ’ ( ३५०–४०० मैल ) वाट चालल्यावर तो चिनी प्रवासी महाराष्ट्र (Mo-ha-la-cho) देशांत आला. ह्या देशाचा विस्तार ६००० ली ( १००० मैल ) होता व त्याची राजधानी ३० ‘ ली ’ इतकी विस्तृत होती. राजधानीच्या पश्चिमेला नदी होती. ही राजधानी पैठण असणें शक्य नाहीं; कारण त्या प्रवाशानें पुढें लिहिलें आहे कीं, राजधानीपासून भडोच १००० ली म्हणजे सुमारें १६० मैल आहे. पण पैठणाहून भडोच सुमारें २५९ मैल आहे. दुसर्या एका फ्रेंच ग्रंथकाराचें मत असें आहे कीं, देवगिरी राजधानी असावी. पण हेंहि जुळत नाहीं. कारण देवगिरीच्या पश्चिमेला नदी नाहीं व अंतरहि १६० मैलांहून जास्त आहे. कनिंगहॅमच्या मतानें कल्याण हें राजधानीचें शहर असावें. कल्याणला खाडी आहे. कान्हेरी व नाशिक येथील कोरीव लेणीं, त्याचप्रमाणें ‘ पेरिप्लस ’ वगैरे ग्रंथांवरून कल्याण हें फार प्रसिद्ध व्यापाराचें ठाणें होतें असें दिसतें. कल्याणहून भडोच १८० मैल आहे. फ्लीटच्या मतें नाशिक हें राजधानीचें शहर असावें. नाशिक हें पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे व तेथें गोदावरी नदी आहे. भडोच शहर त्याच्या उत्तरेस १६० मैलांवर आहे. महाराष्ट्राचा राजा क्षत्रिय असून त्याचें नांव पुलकेशी होतें. उत्तरेकडील सम्राट् शिलादित्य जरी सर्व देश जिंकीत होता तरी महाराष्ट्र त्याच्या कह्यांत गेला नाहीं. चिनी प्रवाशानें महाराष्ट्राचा विस्तार १००० मैल सांगितला आहे. व उत्तरेकडे भडोच आणि माळवा, पूर्वेकडे कोसल व आंध्र, दक्षिणेकडे कोंकणपूर व पश्चिमेकडे समुद्र ह्यांमधील मुलखांत महाराष्ट्राशिवाय दुसर्या कोणत्याहि देशाचा उल्लेख केलेला नाहीं. यावरूनच त्या मुलखाला महाराष्ट्रच म्हणत होते असें दिसतें. सर्व मुंबई इलाख्यांत सिंध व नेटिव्ह संस्थानें वजा करून ४४००० गांवें व कोंड आहेत असें डॉ. फ्लीट म्हणतो. म्हणून ९९००० गांवें असणारा महाराष्ट्र निदान याहून दुप्पट असला पाहिजे व त्याचा विस्तार उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस कृष्णेपर्यंत व पूर्वेस मध्यप्रांत व निजामच्या राज्यांतील बराच भाग इतका तरी असला पाहिजे. ज्या अर्थी अजंठा ही महाराष्ट्राची पूर्वसीमा म्हणून सांगितली त्यावरून ह्युएनत्संगच्या मतें महाराष्ट्रांत वऱ्हाड, मध्यप्रांत

याचा अंतर्भाव होत नव्हता. अलबिरुणी (इ. स. १०००) म्हणतो, ' धार येथून दक्षिणेकडे कूच केले असता नर्मीय्य (नर्मदा नदी) काठ लागतो. तो धारहून ७ फरसख आहे. मरहट्ट देश १८ फरसख, कोंकणप्रांत व त्याची समुद्रकांठीं असलेली राजधानी ठाणें (Tana) २५ फरसख.' या अवतरणावरून अलबिरुणीच्या वेळींसुद्धा कोंकणाचा महाराष्ट्रांत अंतर्भाव करीत नसत असें दिसून येईल. (डॉ. साचो याचा अलबिरुणी, व्हॉ. १, पृ. २०३.) कोंकण किनाऱ्याचीं चाल व सोपारा ह्यासारखीं पश्चिमेकडील बंदरें व्यापारासाठीं अत्यंत प्रसिद्ध होतीं. व त्याचें ग्रीक वगैरे पाश्चात्य राष्ट्रांशीं दळणवळण असे. सह्याद्रीच्यावरील प्रदेशाचा कोंकणाशीं अगदीं निकट संबंध प्राचीन काळीं होता याची साक्ष नाणेघाट येथील व सह्याद्रीतील इतर घाटांत जी प्राचीन लेणीं आढळतात त्यावरून पटते. कोंकण व सह्याद्रीकडील प्रदेश हे राजकीय दृष्ट्या एकत्र निगडित झालेले असत. उत्तर कोंकण वलभीच्या क्षत्रपाच्या व सातवाहनांच्या साम्राज्यांत मोडत असे. चालुक्य सम्राट् कीर्तिवर्मन् व पुलकेशी (दुसरा) यांनी कोंकणचे राजे मौर्य याचा पराभव केला होता. ठाणें येथील शिलाहार वंशांतील राजे मालखेडच्या सम्राट् राष्ट्रकूटाच्या अंकित होते. अशा रीतीनें कोंकण व घाटावरील प्रदेश जरी राजकीय व व्यापारी दृष्टीनें संबद्ध होते तरी त्यांच्या विशिष्ट परिस्थितीमुळें त्यांना भिन्न लेखण्यांत येऊन कोंकणचा महाराष्ट्रांत अंतर्भाव करीत नसत.

**महाराष्ट्राची वसाहत:**—आतां या महाराष्ट्र देशामध्यें निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या लोकांचें आगमन होऊन त्यांची वसाहत कशी होत गेली याचा प्रथम विचार करूं.

या प्रश्नावर रा. वि. का. राजवाडे असें म्हणतात कीं, 'ह्या गोष्टीचा शोध (१) वैदिक सारस्वत व (२) अनार्यांच्या भाषा व कहाण्या यांतील उल्लेखांवरून किंवा गमकांवरून करता येण्याचा फारच अल्प संभव आहे. कारण पाणिनीच्या कालापर्यंत विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेशाची माहिती यत्किंचित्‌हि आर्यांस नव्हती. तेव्हां वैदिक सारस्वतांत विंध्याच्या दक्षिणेस राहणाऱ्या (कोणी रहात होते कीं काय हाच मुळीं संशय आहे.) अनार्य लोकांचे उल्लेख किंवा ज्ञापकें सांपडणें शक्य व संभाव्य नाहीं. वैदिक सारस्वतांत येणारी दस्यु, असुर, रक्षस, इ. जी लोकनामें येतात तीं विंध्याच्या दक्षिणेकडील लोकांचीं नाहींत. अर्थात् वैदिक सारस्वताचा या शोधांत कांहीं एक उपयोग नाहीं. भिल्ल, कोळी, कातकरी वगैरेंच्या भाषा व कहाण्या सर्वांच्या तोंडीं आहेत व त्या संस्कृत व वैदिक भाषेहून किंवा कहाण्यांहून जुन्या आहेत, असें विधान करण्याला कांहींच आधार नाहीं. भिल्लादींना शंभर वर्षांपूर्वींचा व पांच हजार वर्षांपलीकडील काळ हे दोन्ही सारखेच वाटतात. अर्थात् त्यांच्या भाषांचें व कहाण्यांचेंहि त्या शोधास कांहीं साहाय्य होईल असा रंग दिसत नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत मूतिबादि जे लोक सांगितले आहेत त्या लोकांचीं नांवें अपभ्रंश होऊन प्राकृत भाषांत सध्या, खरें पाहिलें तर सांपडावीं. परंतु तींहि सांपडत नाहींत किंवा सांपडलेलीं नाहींत. भिल्ल, खोंड, गोंड, कातकरी, ठाकूर, कोळी हे लोक ऐतरेय ब्राह्मणांतील मूतिबादि लोकांहून नांवावरून तरी अगदीं भिन्न असलेले दिसतात व वैदिक कालानंतर व पाणिनी कालानंतर त्यापैकीं कांहीं आर्यांना माहीत असलेले आढळतात.

या उल्लेखावरून एवढेंच सिद्ध होतें कीं, आर्यांना दक्षिणेंत शबराची ओळख झाल्यावर रामायणाची रचना झाली. गोंड, खोंड, कातकरी, ठाकूर व कोळी यांचा उल्लेख रामायणांत नाहीं. भारतांत तर गोंड, खोंड वगैरे शब्द नाहींतच नाहींत. रामायणांत व भारतांत पांड्यादि लोकांचीं नांवें येतात. त्यावरून हे दोन्ही ग्रंथ पांड्यादींच्या राज्यांची दक्षिणेंत स्थापना झालेली माहीत झाल्यानंतर लिहिले गेले एवढें सिद्ध होतें. हे दोन्ही ग्रंथ सापेक्षतः बरेच अर्वाचीन आहेत असें सर्व शोधक म्हणतात, तें साधार दिसतें. भिल्ल, शबर यांचा उल्लेख रामायणांत आहे यावरून दक्षिणेंत आर्यांच्या अगोदर शबरांची व भिल्लांची वस्ती झालेली होती, असेंच केवळ म्हणतां येत नाहीं. अगस्त्यादि आर्य ऋषि व भिल्ल शबरादि अनार्य लोक समकालीं दंडकारण्यांत आले असण्याचा संभव आहे. इतकेंच नव्हे, तर आर्यांनीं अल्पस्वल्प जंगल साफ केल्यानंतरहि भिल्लादि अनार्य दंडकारण्यांत येऊन राहूं लागले असण्याचा संभव आहे. तात्पर्य दंडकारण्यांत आर्य आधीं आले कीं अनार्य आधीं आले, हा प्रश्न रामायण व महाभारत ह्या ग्रंथांतील उल्लेखांवरून निश्चित सुटण्यासारखा नाहीं. तत्पश्चात्य संस्कृत ग्रंथांची तर त्या शोधांत कांहींच मातब्बरी नाहीं.

आपण आर्य लोक व ज्यांना आपण प्रस्तुत काळीं अनार्य म्हणण्याचा प्रघात पाडला आहे ते मूतिब, पुलिंद, शबरादि लोक जेव्हा विंध्योत्तर एकाच प्रदेशात राहात होते तेव्हां मूतिबादींना आपण ज्या अर्थी अनार्य ही संज्ञा लाविली जात नसे, असें म्हणण्याला पुरावा आहे. विश्वामित्राचे शंभर पुत्र होते. पैकीं कांहीं अधार्म्य आचरण करू लागले, उनन पतित झाले ते हे पतित मूतिबादी लोक होत, असा वैदिक इतिहास आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, आर्य ऋषि व मूतिबादि लोक मूलतः एकवंशीय असून, अधर्म्य आचरणास्तव पतित होऊन निराळे गणले जाऊ लागले, अशी समजूत ब्राह्मणकालीन विचारवंतांची होती. समजूत कशीहि असो, एवढें सिद्ध आहे कीं,-मूतिबादि लोक आर्यसंघातून निघून निराळे झाले, म्हणजे मूतिबादि लोक आर्यांची विंध्योत्तर प्रदेशात वसती झाल्यानंतर अस्तित्वांत आले, असा इतिहास ब्राह्मणकालीं प्रचलित होता.

मूतिब, पुलिंद, शबर, भिल्ल, कातकरी, ठाकूर, गोंड, खोंड, कोळी इत्यादि लोक विंध्योत्तर व विंध्य-दक्षिण प्रदेशातील मूळचे स्वयंभू लोक आहेत व ते आर्यांच्या फार पूर्वीपासून ह्या प्रदेशांत राहात आहेत अशी जी युरोपीयन व तदनुयायी हिंदु शोधकांची समजूत ती उपरिनिर्दिष्ट ऐतरेय ब्राह्मणांतर्गत परंपरित इतिहासाच्या विरुद्ध आहे. उत्तर दक्षिण हिंदुस्थानात आर्यांच्या अगोदर अनार्यांची वसति होती, हें युरोपीयन शोधकांचें मत साधार आहे, असें वरील प्रपंचावरून म्हणता येण्यास वराच प्रतिबंध होतो.

सामान्यत कोणत्याहि प्रदेशात रानटी लोक जे आढळतात ते सुधारलेल्या लोकांहून पुरातन असतात, असा समज युरोपियन शोधकांच्या तर्कसरणींत गर्भित असतो ह्या गर्भित समज सर्वत्र खरा नाहीं. युनायटेड स्टेट्समध्यें कमजास्त रानटी असे नीग्रो लोक तीनशें वर्षांपूर्वी गोऱ्या लोकांनीं आणले, ते गोऱ्यांच्या आगमनाच्या पश्चात्‌ आहेत. तसेच भिल्लादि कमजास्त रानटी लोक दक्षिणेंत आर्यांच्या पश्चात्क असण्याचा संभव आहे '

परंतु रा राजवाडे यांचे वरील मत सर्वांसच पटेल असें नाही. आर्यांच्या परिभ्रमणाचा व त्यांच्या सामाजिक जीवनविकासाचा इतिहास पाहिला असता असें स्पष्ट दिसतें कीं, ते जेथें जेथें गेले तेथे त्यांनीं आपल्या वैदिक संस्कृतीचा प्रसार केला व यज्ञसंस्थेच्या साहाय्यानें अनेक समाजास आपणामध्यें अंतर्भूत करून घेतलें म्हणजे आपणामध्यें घेणें, निषाद, रथकार वगैरेंस यज्ञसंस्थेत स्थान देणें वगैरे गोष्टी हेच दाखवितात. तसेंच विश्वामित्राच्या पुत्रांची कथा ही एक सामाजिक तत्त्वज्ञानदर्शक गोष्ट असून तो इतिहास न हे त्याप्रमाणें पुरु, यदु, तुर्वश, अनु, द्रुह्यु हे ययातीचे पाच पुत्र असून त्यापासून पुढें पांच राष्ट्रें निर्माण झाल्याची कथा ही निरनिराळ्या पाच राष्ट्रांना एकवंशसंभवता देण्यास मागाहून उत्पन्न केलेली कथा होय, त्याप्रमाणें आन्ध्र, पुलिंद, मूतिबादि लोकांना वैदिक समाजाच्या परंपरेंत स्थान देण्याकरिता या निरनिराळ्या राष्ट्रांच्या पूर्वज एक एक व्यक्ती असून त्या विश्वामित्राचे पुत्र होते व ते पतित झाले ही कथा सामाजिक तत्त्वज्ञान म्हणून पुढें उदयास आली वास्तविक ह्या निरनिराळ्या राष्ट्रजाती आर्यसंस्कृतीपेक्षा हीन संस्कृतीच्या पण त्यांच्यापूर्वीपासून त्या प्रदेशात अस्तित्वात होत्या व त्यांना आर्यांनीं मोकळ्या मैदानाच्या व सुपीक प्रदेशातून डोंगराळ व नापिक भागात घालवून दिले व त्यांच्यावर आपलें सांस्कृतिक वर्चस्व स्थापन केले असेंच मानणें अधिक सयुक्तिक होय. आर्यांच्या मागाहून अनार्य लोक आल्याचा पुरावा कोठेंच आढळत नाही राजवाडे पुढें म्हणतात

'नर्मदोत्तर प्रदेशांत लोकसंख्या अतोनात वाढल्यानें महाकातारांत किंवा दंडकारण्यात वसाहत करण्याची आवश्यकता निकडीनें भासू लागली द्रव्यबल, मनुष्यबल व सत्ताधिकार चालविण्याचें सामर्थ्य ज्यांच्याजवळ असतें तेच वसाहत करण्यासारखें जोखमीचें व बिकट काम हातीं घेऊ शकतात या न्यायानें साहजिकच हें काम महाराष्ट्रिकां-कडे आलें दंडकारण्यात जेथें जेथें वसाहती झाल्या तेथें तेथें ग्रामकूटपणा म्हणजे पाटिल व राष्ट्रकूटपणा म्हणजे देशमुख्या व महाराष्ट्रकूटपणा म्हणजे सरदेशमुख्या राष्ट्रिकांकडे किंवा महाराष्ट्रिकांकडे ओघानेंच व हक्कानेंच आल्या.

हें वसाहतकर्म पाचसातशें वर्षें म्हणजे शकपूर्व १००० पासून शकपूर्व ५०० किंवा ३०० पर्यंत चाललेलें होतें तें जसजसें परिपूर्णतेस येत चाललें, तसतसें वसाहतींतील राष्ट्रिक ऊर्फ रट्ट नावाच्या पुढाऱ्यांचें सामर्थ्य ठळकपणें निदर्शनास येऊ लागलें ह्या रट्टांच्या ठायीं द्रव्यशक्ति, मनुष्यशक्ति व अधिकारशक्ति, अशा तिन्ही शक्ति समुच्चित झालेल्या दिसतात इतकेंच नव्हे तर हे रट्ट जी संस्कृतोत्पन्न अपभ्रष्ट भाषा बोलत ती दंडकारण्यातील राजमान्य, लोकमान्य व कविमान्य महाराष्ट्री ऊर्फ मरहट्टी व पुढें कालांतरानें मराठी भाषा सर्व प्राकृत भाषांत उत्तम

म्हणून प्रख्या पावली. 'महाराष्ट्राश्रया भाषा प्रकृष्ट प्राकृत विदु'।'-(दण्डीकाव्यादर्श) ही प्रख्या फुकाची मिळाली होती असें नव्हे. कारण महरट्ट लोकानीं सर्व प्रकराचे पुढारीपण प्राप्त करून घेतल्यानें ते उच्चस्थानापन्न लोक बनले व ते जो अपभ्रंश बोलत तोच श्रेष्ठतम ठरावा यात नवल तें काय? भारतवर्षात काश्मीरपासून कुमारीपर्यंत जे जे संस्कृत प्राकृत नाटककार होऊन गेले त्यानीं उच्च दर्जाच्या पात्राच्या तोंडी महाराष्ट्री भाषा घातलेली आढळते. याचें कारण ही भाषा द्रव्यबल, मनुष्यबल व सत्ताबल यानी युक्त अशा उच्चवर्ण क्षत्रिय रट्टाची होती.

असे हे रट्ट लोक तत्कालीन सम्राटाकडून अत्यंत उच्च कोटीचा मान पावलेले आढळतात. जुन्नराजवळील नाणेघाटात आंध्रभृत्याचीं काही चित्रें कोरलेली आहेत. त्या चित्रात राजा, राणी व राजपुत्र याच्या बरोबरीनें एका महरट्ट वीराचें चित्र काढलेलें आहे आणि चित्र कोणाचें ते दर्शविण्याकरिता 'महारठिगनकयिरो' अशीं अक्षरें खोदली आहेत.

नाणेघाटातल्या या लेखात महरट्टाना गण हे उपपद लाविलेले आहे गण म्हणजे tribe असा कित्येकानी अर्थ केलेला आहे. परतु गण या शब्दाचा तो अर्थ येथे युक्त नव्हे. येथें गण म्हणजे संघ, जमाव, पथक असा करणें सदर्थ्य आहे. [ जातिस्य संघाहून भिन्न भिन्न असा जो व्यापार, व्यवहार, आयुधोपजीवन, इत्याद्यर्थ माणसाचा जमाव त्याला गण अशी संज्ञा आहे.] राष्ट्रिकांचा, रट्टाचा, महाराष्ट्रिकाचा किंवा महरट्टाचा युद्धादि क्षत्रियकर्माच्या सिध्यर्थ जो जमाव तो 'महारठिगन' होय. असें दिसतें कीं, आंध्रभृत्याना या शूर व धाडसी महरट्ट्याचें साहाय्य व मैत्र्य अत्यंत आर्जवाने संपादावें लागे इतकें माहात्म्य सिमुक शातवाहनाच्या काळीं म्हणजे शकपूर्व दुसऱ्या शतकात म्हणजे दोन हजार वर्षापूर्वी रट्टाचें असलेले सप्रमाण आढळतें. आंध्रभृत्याच्या संबंध राजियतीत ह्या महरट्टांचें प्राबल्य विशेष असल्याचें दिसतें. शातवाहन महाराजा हाल शातकर्णि यानें गाथासप्तशती नामक पद्यमंजरी महरट्टाच्या महाराष्ट्री भाषेतल्या पद्याची एके ठिकाणीं गुंफिली. आंध्रभृत्याची घरची भाषा कोणती असेल ती असो, परतु इतके स्पष्ट आहे कीं त्याची दरबारी व इतर व्यवहाराची भाषा महारट्टाची महाराष्ट्री होय. शा. शकाच्या दुसऱ्या शतकाच्या प्रारंभीं शातवाहनाचें साम्राज्य नष्ट झाल्यावर ठिकठिकाणीं रट्ट म्हणजे राष्ट्रकूट यानीं लहान लहान संस्थानें उभारिलीं. अद्याप साम्राज्य उभारण्याची ताकद त्याच्यात आलेली नव्हती पुढें चालुक्याच्या राजियतीनतर ह्या राष्ट्रकूटानीं साम्राज्यारोपणाचा धडा गिरवून पाहिला. रट्ट-राष्ट्रकूट म्हणजे देसाई-सरदेसाई स्वरूपाचे अधिकारी. ह्या अधीकाऱ्यानीं सम्राटपदाची हाव धरावी, हें साहजिकच होतें. पेशवा, पाटील, देशमुख हे शब्द भट, शिंदे व भोसले याच्या पिढीजात वृत्तीचे वाचक जसे आहेत तसाच राष्ट्रकूट हा शब्द वृत्तीचा वाचक आहे. राष्ट्रकूटराजाचें मूळ गोत्र आडनाव सात्यकि होतें, म्हणजेच सध्याच्या मराठींत सतके.

नर्मदोत्तर प्रदेशातून हे राष्ट्रिक दडकारण्यांत वसाहत करण्यास येऊन ग्रामकूटपणा, विषयकूटपणा, राष्ट्रकूटपणा इत्यादि अधिकाराच्या जागा बळकावीत. याच्यापैकी काहीं लहान लहान संस्थानिक झाले व कालातरानें सात्यकि नावाच्या गोत्रानें अथवा घराण्याने साम्राज्यपद गाठलें नर्मदोत्तर प्रदेशातून आलेले राष्ट्रीक सारे एकाच गोत्राचे नव्हते हें सागावयाला नको. मानव्य, हहय, भोज, यादव, नल, कदब, मौर्य, चालुक्य इत्यादि शेंकडों गोत्राचे रट्ट दडकारण्यात शिरले. ह्या शेंकडों गोत्राच्या रट्टांना शहाण्णव कुळींचे मराठे म्हणण्याची चाल आहे. शहाण्णव कुळीच्या रट्टावरून व महरट्टांवरून सबध देशाला महरट्टाचा देश उर्फ महाराष्ट्र ही संज्ञा पडली '

तथापि भरतखडामध्यें वैदिक आर्य उत्तर ध्रुवापासून हळूहळू इराण, अफगाणिस्तान या मार्गानें आपली वैदिक संस्कृति घेऊन प्रवेश करते झाले. परतु या मार्गात त्याचा प्रवास सुकर झाला नसून त्यास वाटेंत अनेक युद्धें करावी लागली. या युद्धाकडे-उदाहरणार्थ दाशराज्ञ युद्धाकडे-पाहिलें असता असें दिसतें कीं, विशिष्ट आर्यांच्या समाजाच्या नवप्रवेशाच्या वेळीं त्याना तत्पूर्वी आलेल्या आर्य व अनार्य अशा समानांबरोबर झगडावें लागे. आर्यानीं भरतखंड व्यापण्यापूर्वी येथें द्राविड संस्कृति सर्वत्र पसरलेली होती. याचे अनेक दाखले आढळतात. बलुचिस्तानांत एका प्रातात ब्राहुई नांवाची द्राविड भाषेची एक शाखा अद्यापपर्यंतहि अस्तित्वांत आहे. यारशिवाय भरतखडाच्या निरनिराळ्या भागात अनेक असंस्कृत अयाजक लोक वास्तव्य करीत असें वर्णन वेदग्रथातहि आढळतें. उदाहरणार्थ, मगध देशात कीकट नांवाचे अयाजक लोक राहत होते. (ऋ. ३. ५३. १४.) याप्रमाणेंच निषाद वगैरे लोकांस व मात्यांस मागाहून

वैदिक समाजात अंतर्भूत करण्यात आले. याप्रमाणे निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळीं लहानलहान राष्ट्रें अथवा लोकसमूह वैदिक आर्यांना आढळले व त्यांना त्यांनीं हळूहळू आत्मसात् केलें. नाग लोकांचा प्रसार तर जवळ जवळ सर्व भरतखंडांत आढळतो. कोंकणांत महार लोक आपल्या नांवापुढें रामनाक, विठनाक याप्रमाणें नाक हें पद लावतात. हें नागवाचक असावें असें एक मत आहे. कदाचित् तें नायकवाचकहि असू शकेल, परंतु खांडवनदहनाच्या प्रसंगीं तक्षक नागास अर्जुनानें तक्षशिलेकडे घालवून दिलें व त्यानेंच पुढें परीक्षिताचा प्राण घेतला. म्हणून जनमेजय यानें तक्षशिलेवर स्वारी करून नागसत्र केलें. याशिवाय नागपर्वत, मणिपूर येथील नागांचें राज्य व तेथील राजकन्येचें अर्जुनानें केलेलें पाणिग्रहण, नागपूर, नागनदी, नागापट्टम् वगैरे नागांशीं संबद्ध स्थलांचीं नांवें, नागार्जुन, नागवर्मा यासारखीं प्राचीन नांवें, बौद्ध वाङ्मयांत आढळणारे नागराजासंबंधीं उल्लेख, नागांची नागपंचमी वगैरे प्रसंगीं होणारी पूजा वगैरे अनेक गोष्टींवरून नाग लोकांसारखे अनार्य लोक भरतखंडांत पूर्वी वास्तव्य करीत होते व हळूहळू आर्यांनीं आक्रमण करून सर्व प्रदेश व्यापून त्यांना आत्मसात् केलें ही गोष्ट स्पष्ट होते.

नाग लोकांप्रमाणेंच कोल, मुंड वगैरे सारखीं राष्ट्रें भरतखंडांत पूर्वी राहत असून त्यांनीं कांहीं सांस्कृतिक प्रगति केली होती, त्यांची स्वतंत्र भाषा होती व त्यांच्याशीं आर्यांनीं सांस्कृतिक देवाणघेवाण केली असली पाहिजे, असें भाषाशास्त्रविषयक शोधांवरून अलीकडे अधिकाधिक स्पष्ट होत आहे. ज्याप्रमाणें भरतखंडाच्या पश्चिम बाजूला असुरादि राष्ट्रांबरोबर आर्यांचा संबंध आल्याचा वेदवाङ्मयांत स्पष्ट पुरावा आढळतो, त्याप्रमाणें भरतखंडाच्या वायव्य व उत्तरभागांत पणि, शिबी, पांचाल वगैरे राष्ट्रांशीं त्यांचा संबंध आला होता. व आजहि बलुचिस्तानांत पणि व शिबी नांवाच्या राष्ट्रजाती ह्यात आहेत. तसेंच पिशाच्च जातीच्या वसतिस्थानाचा पुरावा पिशाच्चपुर अथवा अर्वाचीन पेशावर या नांवानें आढळतो. गंधर्वांचा गांधार ऊर्फ कंदाहार देश तर प्रसिद्धच आहे. तसेंच रक्सोल, रक्सगी हीं नांवें राक्षसांच्या गांवांचीं वाचक असणें संभवनीय आहे. याप्रमाणें उत्तरेकडील आर्येतर राष्ट्रांच्या अस्तित्वाचा पुरावा आपणांस वेदांत आढळतो. पण आर्यावर्ताबाहेर त्या वेळीं आर्यांचा प्रसार झाला नसल्यामुळें याकरितां आपणांस उत्तरकालीन ग्रंथावरच विसंबून राहावें लागतें व महाभारत, रामायण व इतर पुराणें यामध्यें या वन्य जातींच्या अस्तित्वाबद्दल व आर्यांशीं त्यांच्या आलेल्या संबंधाबद्दल भरपूर पुरावा आढळतो.

वैदिक वाङ्मयांत व नंतरच्या पौराणिक ग्रंथांत आर्यांच्या प्रसाराचे निरनिराळे टप्पे मधून मधून आढळतात. भगीरथानें समुद्रापर्यंत केलेलें गंगेच्या प्रवाहाचें संशोधन, अगस्ति ऋषीनें केलेलें विंध्य पर्वताचें उल्लंघन, त्यानें दक्षिणेंत केलेली आश्रमाची स्थापना वगैरे गोष्टी याची साक्ष देतात. दक्षिणेंत अगस्त्यमलय या नांवाचा एक पर्वत आहे यांतील मलय या शब्दाचा अर्थच तामिल भाषेंत पर्वत असा होतो.

अपरांत अथवा कोंकण म्हणून संस्कृत वाङ्मयांत उल्लेखिलेला प्रांत भृगुवंशीयांनीं आर्य संस्कृतीच्या कक्षेंत आणला ही गोष्ट परशुरामाची कथा व पश्चिम किनाऱ्यावरील कांहीं स्थानांचीं नांवें यावरून स्पष्ट होते. केरळोत्पत्ति आणि सह्याद्रिखंड हे ग्रंथ भार्गवरामानें तेथील वसाहत करून मलबार व कोंकण या भागांत ब्राह्मणांस स्थापन केलें असें सांगतात. तसेंच भडोचचें प्राचीन नांव भृगुकच्छ अथवा भरुकच्छ असून तेथें भार्गव ब्राह्मण म्हणून ब्राह्मणांची एक जात आहे. प्रसिद्ध कन्हय्यालाल मुनशी हे भडोचचे भार्गव ब्राह्मण आहेत. तसेंच परशुरामाचीं चिपळूणसारख्या ठिकाणीं असणारीं मंदिरें यावरून भृगुवंशीयांनीं प्रथम त्या भागांत वसती केली असें दिसतें. सातारा जिल्ह्यांतील भुइंज येथें भृगुऋषींचा आश्रम असल्याची दंतकथा असून तेथें एक आश्रमाचें स्थान अद्यापि दाखवितात. रामानें दक्षिणेंत स्वारी केली त्या वेळींहि त्याला वानर, ऋक्ष यांसारखे जंगली लोक आढळले व कांहीं शबरासारखे रानटी लोक आढळले असें वर्णन आहेच.

हिंदुस्थानांत आल्यानंतर प्रथमतः आर्यलोक पूर्वअफगाणिस्थान व पंजाब या प्रदेशांतच वसाहत करून होते हें अगदीं निर्विवाद आहे. तेथून ते पूर्वेकडे वळले व ब्रह्मावर्तापर्यंत—अर्वाचीन ठाणेश्वरापर्यंत—त्यांनीं वसाहत केली. येथें वैदिक धर्म व वर्णाश्रमव्यवस्था अस्तित्वांत आल्यानंतर त्यांनीं हळूहळू पूर्व व दक्षिण या दिशांनीं पसरून हिमालय व विंध्य या दोन पर्वतांमधील जवळजवळ सर्व प्रदेश व्यापिला. पुष्कळ काळपर्यंत विंध्य ही त्यांच्या वसाहतीची दक्षिण सरहद्द असावीसें दिसतें. कारण मनु व पतंजली यांनीं आर्यावर्त—आर्यांचा राहण्याचा प्रदेश—म्हणून याच प्रदेशाचा उल्लेख केला आहे (मनु २. २२ व पातंजल महाभाष्य २. ४. १० पहा.) या पर्वताच्या वायव्य

भागाला 'पारियात्र' असें नांव दिलेलें आढळतें. यावरून साधारणतः ही डोंगरांची रांग त्यांच्या वाटेची म्हणजे दळणवळणाची सरहद्द असावी. काहीं कालानंतर अगस्ति ऋषीनें विंध्य पर्वतास उंच न वाढण्याची ताकीद देऊन तो ओलांडून दक्षिणेंत आपला आश्रम स्थापून दक्षिणेकडे येण्याचा व वसाहत करण्याचा मार्ग काढला.

विदर्भ वऱ्हाड हीच आर्यांची दक्षिणेंतील पहिली वसाहत असावी. कारण सुग्रीवानें आपल्या अनुचरांस विदर्भ, ऋचीक, महीषक या देशांत व गोदावरीच्या कांठीं व दण्डकारण्यांतहि सीतेचा व तिचें हरण करणाऱ्या दुष्ट रावणाचा शोध करण्यास सांगितल्याबद्दल रामायणांत उल्लेख आहे (रामायण ४. ४१). यावरून असें दिसतें कीं, गोदावरीच्या आसपासचा प्रदेश म्हणजे दख्खन–म्हणजेच अगदीं संकुचित अर्थानें महाराष्ट्र हा देश–त्या वेळीं अरण्यच होता व विदर्भांत मात्र वसति होती. शिवाय अगस्ति ऋषीनें दैवी शक्तीनें एक मुलगी उत्पन्न करून ती विदर्भाच्या राजास दिली व नंतर ती मोठी झाल्यावर तिला मागणी घातल्याची महाभारतांतील कथा विश्रुतच आहे (महा. पर्व ३, अध्याय ९६. ९७). रामायणांतहि राम बरेच दिवस दण्डकारण्यांत गोदावरीच्या कांठीं पञ्चवटींत, अगस्तीच्या आश्रमापासून सुमारें दोन योजनांवर असलेल्या आपल्या आश्रमांत राहत असल्याचें वर्णन आहे. (रामा. ३. अध्या. १३).

'दण्डकारण्य म्हणजे अर्वाचीन महाराष्ट्र' व त्यांत गोदावरी इ. नद्या आहेत हें वरील विधानावरून स्पष्ट दिसतें. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें, कोणतेंहि धार्मिक कृत्य करतांना तें कोणत्या प्रदेशांत होत आहे याचा, संकल्पांत उच्चार करावा लागतो. व त्याप्रमाणें अशा वेळीं महाराष्ट्रांतील ब्राह्मण 'महाराष्ट्रे' असें न म्हणतां त्या ऐवजी 'दण्डकारण्ये देशे' असा उच्चार करतात. सहाशें वर्षांपेक्षांहि जास्त पूर्वी लिहिलेल्या हेमाद्रीच्या व्रतखंड नामक ग्रंथाच्या प्रस्तावनेंत अर्वाचीन देवगिरी दौलताबाद हें दण्डकारण्याच्या सरहद्दीवर असल्याचें म्हटलें आहे. यावरून विदर्भानंतर दण्डकारण्यातच प्रथम आर्यांनीं दक्षिणेंत वसाहत केली.

जरी महाराष्ट्र हा आर्यांनीं सर्वांत शेवटीं व्यापलेला प्रदेश होय, तरी आर्यांनी तो इतर कोणत्याहि वसाहतींपेक्षां अधिक पूर्णपणें पादाक्रांत केला. पूर्वीप्रमाणें येथेंहि त्यांनीं मूळच्या रानटी रहिवाशांस जंगलांत, डोंगरदऱ्यांत हाकून लावलें व त्यांपैकीं कांहींना आपल्यांत सामील करून घेतलें. उत्तर हिंदुस्थानांतील भाषांप्रमाणेंच मराठी ही संस्कृतपासून निघालेली आहे. या बोलींच्या प्राचीन प्रतिनिधि म्हणून आपण मानूं अशा महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पाली या भाषांत मूळ संस्कृत उच्चाराचे बरेच विकृत विकार आढळतात व हे विकार काहीं थोड्याशा ठोकळ नियमानें झालेले आहेत. या प्राकृत शब्दांच्या उच्चारांत असा फरक का व कसकसा पडत गेला हें सांगणें फार कठीण आहे; कारण ही क्रिया अतिशय हळूहळू पण बराच काळपर्यंत अविरत चालू असते. उच्चाराशिवाय इतरहि फरक या भाषांतून एवढ्या अवधींत व्हावयास पाहिजे होता, पण तसा फरक झालेला दिसत नाहीं, कारण त्या संस्कृतपेक्षां विशेष भिन्न आहेत असें नाहीं.

यावरून या अपभ्रष्ट उच्चाराचें एकच कारण दिसतें तें हें कीं, आर्यांच्या सहवासांत राहणाऱ्या मूळ रानटी रहिवाशांना संस्कृत भाषा बोलावी लागली व ती त्यांना योग्य पद्धतीनें उच्चारतां आली नाहीं व तेच अपभ्रष्ट विकृत उच्चार भाषेंत रूढ झाले असावेत. संस्कृत भाषेत न आढळणारे कांहीं उच्चार व शब्द प्राकृत भाषेंत आहेत यावरून या सिद्धांतास पुष्टी मिळते.

यावरून असें अनुमान निघतें कीं, जसजसे आर्यलोक पुढे पुढे सरकत गेले तसतसे त्यांचें व मूळ (रानटी) रहिवाशांचें संघर्षण होत जाऊन त्यांपैकीं बरेच आर्यांत सामील केले गेले. ते आर्यांची भाषा शिकले पण त्यांनीं आपल्या मातृभाषेंतील कांहीं उच्चारविशेष व कांहीं शब्द तसेच संस्कृतमध्यें घुसडून दिले असावेत. उत्तर हिंदुस्थानांतील आर्यांच्या वसाहतींपासून तहत मराठी मातापर्यंत अशी स्थिति होती.

येणेंप्रमाणे आर्यांना दण्डकारण्यात वसाहत करीपर्यंत पूर्ण यश आलें. ते अधिकाधिक दक्षिणेकडे व पूर्व समुद्र किनाऱ्याकडे वळले व त्या प्रदेशांतील रहिवाशांत त्यांनी आपली संस्कृति व भाषाहि पसरविण्याचा उपक्रम केला. पण त्यांना या बाबतींत विशेष यश आलें नाहीं. उलट आर्यांनाच या प्रदेशांतील मूळ रहिवाशांची भाषा व संस्कृति थोडथोडी उचलावी लागली. दक्षिणेंतील कानडी, तेलगु, तामील या भाषा संस्कृत भाषेहून अगदीं भिन्न आहेत व दक्षिणेंतील कला उत्तरेकडील कलापेक्षां भिन्न आहेत, याचें कारण हेंच होय. आर्यांचें हें दक्षिणेकडील आक्रमण त्यांच्या उत्तरेकडील आक्रमणाप्रमाणें जोरकस का होऊं शकलें नाहीं याचें कारण अगदीं उघड आहे.

उत्तरेत आर्यांचा राज्य लौकरींच स्थिर झाला त्यामुळे त्यांचेनंतर आर्यसंस्कृति व आर्यभाषा ह्या आर्यांना सहज लादतां आल्या. परंतु दक्षिणेकडील या भागा वसाहतीची स्थिति अगदींच उलट होती. येथें आर्यांच्या आक्रमणाच्या अगोदर-पासूनच सुसंघटित समाज व राज्यें अस्तित्वात होतीं. द्राविड लोकांत शिल्पकलेची वाढ पुष्कळच झाली होती ही गोष्ट, दक्षिणेतील भव्य शिल्पकामें यावरून प्रतीत होते, एवढेंच नव्हे तर कलिंगादि देशांतील लोकांनीं त्या पूर्वेकडे वसाहती केल्या व स्याम वगैरे देशात अंकोरवात, अंकोरथोम सारखीं भव्य मंदिरें उभारलीं त्यांवरून स्पष्ट होते. रामायणातील मार्गे सांगितलेल्या सुग्रीवाच्या उतार्‍यांत दक्षिणेकडील चोल, पांड्य, केरळ इ. देशाचा उल्लेख आहे. त्याप्रमाणेंच पांड्यांच्या राजधानीचा दरवाजा सुवर्णानें व रत्नांनीं शृंगारलेला होता इ. उल्लेख आहे. तसेंच सेतुबंधनाचें काम नल या वानरानें केलें ही गोष्टहि लक्षांत घेण्यासारखी आहे. इतर संस्कृत ग्रंथांतूनहि या देशाचा, त्यांतील लोकांचा व राजांचा निर्देश आहे.

**महाराष्ट्राची भाषा**—रा. राजारामशास्त्री भागवत आपल्या मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार या ग्रंथांत मराठीचें वर्चस्व प्रतिपादन करताना म्हणतात की, 'शेषं महाराष्ट्रीवत्' हें प्राकृतप्रकाशाचें अगदीं शेवटलें सूत्र, 'बाकी सर्व मराठी भाषेप्रमाणें शौरसेनी भाषेचे नियम आहेत असें समजावें' हा या सूत्राचा अर्थ होय. ज्यास आपण 'बालभाषा' म्हणतों त्यामध्यें पूर्वींच्या काळीं 'शौरसेनी' ही होती. 'शूरसेन' म्हणजे मथुरामंडळ. या प्रांताची जी भाषा ती शौरसेनी. उच्च जातीच्या व कुलीन स्त्रिया नाटकांत हीच भाषा बोलत.

शौरसेनी भाषेची एक प्रकृति जशी संस्कृत तशीच दुसरी प्रकृति 'महाराष्ट्री' ऊर्फ अति प्राचीन मराठी असें कात्यायन म्हणतो. शौरसेनीपासून पैशाची व मागधी निघाल्या. तर मग सर्व बालभाषांचें मूळ प्राचीन मराठी असा सिद्धांत करण्यास प्रत्यवाय नाहीं. 'गाथांची' भाषा महाराष्ट्री असें आलंकारिक म्हणतात. यावरून गाण्याची भाषा प्राचीन काळीं 'महाराष्ट्री'च होती असें म्हणावें लागतें

कात्यायनाच्या शेवटच्या सूत्रांतील महाराष्ट्री व प्राकृत हे शब्द जवळ जवळ पर्याय आहेत. प्राकृत = प्रकृतेः आगतम्। प्रकृतिश्च संस्कृतम्। अशी ब्राह्मण पंडितांनीं व्युत्पत्ति केली आहे. पण सर्व प्राकृत शब्द कांहीं संस्कृत भाषेंतून आलेले नव्हत यात संशय नको. तशांत 'प्रकृति' शब्दहि संस्कृताचा वाचक नाहीं. कात्यायनास जर ही प्राकृत शब्दाची व्युत्पत्ति पसंत असती तर 'शेषं महाराष्ट्रीवत्' हें सूत्रच त्यानें रचलें नसतें. शौरसेनीची प्रकृति संस्कृत हें तर त्यानें प्रथमच सांगितलें आहे. तेव्हा प्राकृत यातील मूळचा शब्द 'पाअड' होय. 'पाअड भाषा' = प्रकट भाषा. कारण पाअड शब्दाच्या जवळजवळ संस्कृतांत प्रकट हा शब्द येतो, अर्थात् सर्व लोकांचा व्यवहार व दळणवळण जींत चालतें ती प्रकट = प्राकृत भाषा होय अर्थात् संस्कृत भाषा सर्वसाधारण नव्हती. ब्राह्मणांनीं आपल्या बुद्धिप्रभावानें जिला धर्मभाषेचें संस्कृत = चकचकीत रूप दिलें ती संस्कृत, या शब्दाबरोबर मेळ दिसावा म्हणून कांहीं काळानें, 'पाअड' या शब्दाचें प्रकट याऐवजी प्राकृत असें रूप रूढ झालें. त्यावरून प्राकृत या शब्दाचा अर्थ दररोज पाहण्यांत येणारें = क्षुल्लक असा झाला. प्राचीन काळींहि प्राकृत ही स्वतंत्र भाषा होती. कारण वेदांगापैकीं शिक्षेंत 'प्राकृते संस्कृते चापि' असा उल्लेख आहे. तेव्हा महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व पैशाची या सर्व जितक्या पाअड भाषा होत्या तितक्या प्राकृत झाल्या व या प्राकृत भाषांचें 'प्राकृतप्रकाश' नावाचें व्याकरण कात्यायनानें प्रथम लिहिलें. ज्याप्रमाणें इंग्रजी भाषेच्या मातृस्थानाचा मान सॅक्सन भाषेस (ग्रीक, लॅटिन इ. भाषांस न मिळता) मिळाला आहे त्याचप्रमाणें शौरसेनीच्या मातृपदाचा मान संस्कृत इ. भाषांस न देतां एकट्या प्राचीन 'मराठीस' दिला पाहिजे. एव्हांच्या मराठीची आई अति प्राचीन मराठी, जीस 'महाराष्ट्री' असें कात्यायन म्हणतो ती अर्वाचीन मराठीचीच नव्हे तर अर्वाचीन गुजराथी व हिंदी या भाषांचीहि जननी आहे असें यावरून रा. रा. भागवत म्हणतात. ब्राह्मणांच्या संबंधानें थोडेबहुत संस्कृत शब्द आंत शिरले म्हणून मराठीची संस्कृत ही आई होणें शक्य नाहीं. या महाराष्ट्रीच्या दोन प्रकृति होत. एक प्रकृति म्हणजे संस्कृताचें पूर्वरूप ज्यास त्यांनीं आपल्या ग्रंथांत 'मानवी रूप' म्हटलें आहे तें आणि दुसरें 'पोट्ट, चुक, मुल्ल' असे शब्द जींतून आले ती 'दानवी' = द्राविडी प्रकृति होय संस्कृताचें जें 'आर्ष' रूप त्याचा कोणत्याहि मराठीशीं बिलकुल जन्यजनक भाव नाहीं

उलट रा. रा. राजवाडे म्हणतात कीं, 'मूळचा एक अत्यंत प्राचीन आर्य समाज. त्यापासून दुसरा एक आर्य समाज झाला. ह्या दुसऱ्या आर्यसमाजापासून वैदिक व प्राचीन महाराष्ट्रिक समाज झाला. वैदिक समाजापासून

संस्कृत भाषा बोलणारा समाज झाला. आणि प्राचीन महाराष्ट्रसमाजापासून अर्वाचीन महाराष्ट्रसमाज झाला. हा अर्वाचीन महाराष्ट्रसमाज म्हणजेच महरट्ट वसाहतवाल्याचा समाज. कविता करणारे मन्त्रद्रष्टे असे जे शिष्ट ऋषि ते वैदिक व संस्कृत भाषा बोलत. राजधानींत राहणारे उच्च क्षत्रिय व त्या नगराध्यक्षाच्या आश्रयाने राहणारे उच्च शिष्ट ब्राह्मण प्रथम वैदिक व नंतर संस्कृत भाषा वापरीत. नगरापासून दूर राहणारे जे ग्रामकूट, विषयकूट, व राष्ट्रकूट म्हणजे पाटील, देशमुख व सरदेशमुख त्याना उच्च ब्राह्मणाची व क्षत्रियाची भाषा परिचित नसे. ते अहम्मिपक्षाची जुनी भाषा बोलत. हा प्रकार सध्याही आपण पाहतों. (पुण्यासारख्या शहरातील ब्राह्मण व मराठे जी शिष्ट मराठी भाषा बोलतात ती शिष्ट मराठी भाषा, खेड्यातील पाटील, देशमुख, ब्राह्मण यांच्या बोलण्यात येते.) तोच प्रकार अडीच हजार वर्षांपूर्वी महरट्टाच्या भाषेचा होता. खेड्यातील पाटील कुळकर्ण्यांच्या मराठी भाषेला शिष्ट मराठी भाषेचा अपभ्रंश म्हणून कित्येक वय्याकरणी हल्गर्जीपणानें नाव ठेवतात. परंतु ही निव्वळ अवास्तव निंदा आहे. खेड्यातील पाटील कुळकर्णी वर्तमान शिष्टमराठीचा अपभ्रंश बोलत नाहींत, तर जुन्या मराठींतील रूपें बोलत असतात. उदाहरणार्थ, 'करत्यात, जनू, इथले, वाइच,' हीं रूपें वर्तमान शिष्ट मराठीचे अपभ्रंश नव्हत, हीं रूपें जुनीं मराठी आहेत. त्याप्रमाणेच प्राचीन काळीं वैदिक भाषेची माता जी अहम्मि भाषा तींतील रूपें प्रांतातील व खेड्यातील हे राष्ट्रक किंवा राष्ट्रिक किंवा रट्टक किंवा रट्ट लोक बोलत. ही प्राचीन महरट्ट भाषा घेऊन महरट्ट वसाहतवाले दक्षिणारण्यांत शिरले, व नवीन वसविलेल्या गावाचीं नावें आपल्या बोलींतील लकबीप्रमाणें उच्चारू लागले.

महरट्ट क्षत्रिय एकटेच वसाहत करण्यास गेलेले नव्हते. त्यांनीं आपल्याबरोबर आपले पुरोहितहि नेलेले होते. ह्या पुरोहितापैकीं जे सुशिक्षित व शास्त्रसंपन्न होते ते अर्थात् पाणिनीय संस्कृत भाषेतील उच्चारप्रमाणें बोलत. केंव्हाहि ब्राह्मणाची संख्या अत्यल्प पडल्यामुळे व क्षत्रियादि लोकांची संख्या बेसुमार जास्त असल्यामुळें महरट्ट उच्चाराचा पगडा अतोनात वाढला. व सध्या आपणास ऐकू येतात तशासारखे उच्चार प्रचलित झाले. ह्या प्राचीन महाराष्ट्री भाषेचा प्रपंच पाणिनीनें केलेला नाहीं. तसेंच तिसऱ्या वैदिक भाषेच्या पूर्वज ज्या दुसरी व पहिली वैदिक भाषा त्यांचा निर्देशहि पाणिनीनें केला नाहीं. पाणिनी हा काहीं ऐतिहासिक निरुक्तकार नव्हता त्याचें काम प्रचलित शिष्ट, संस्कृत भाषा व वेदभाषा ह्यांचें व्याकरण रचण्याचें होतें. पूर्व, पश्चिम व उत्तर दिशाकडील देशांत शिष्टांच्या बोलण्यात जे रूपभेद येत ते त्यानें काळजीनें नमूद करून ठेवले. अशिष्ट जे केवळ त्यांच्या ग्राम्य भाषेकडे त्यानें जाणून किंवा नेणून लक्ष्य दिलेलें नाहीं. बाकी पाणिनीच्या काळीं संस्कृत भाषेखेरीज इतर सोदर प्राकृत भाषा प्रचलित होत्या यांत बिल्कुल संशय नाहीं. पाणिनीच्याहि पूर्वी प्राकृत भाषाना व उच्चाराना म्लेंच्छ ऊर्फ अस्पष्ट भाषा व उच्चार म्हणण्याची चाल होती. ब्राह्मणानीं म्लेंच्छ उच्चार करू नये, असे इषारेहि ब्राह्मणग्रंथातून पाणिनीच्या पूर्वीच दिले गेले होते. या सर्व विवेचनाचा इत्यर्थ इतकाच कीं, महरट्ट वसाहतकार वैदिक भाषेची सोदर जी प्राचीन प्राकृत महाराष्ट्री भाषा ती बोलत.'

अतां आपण वर पाहिलें आहेच कीं, आर्यांचा विस्तार जसजसा दक्षिणत होत गेला तसतसा त्यांचा अनेक असंस्कृत राष्ट्रजातींशीं संबंध येत गेला. आर्यांच्या आगमनापूर्वी येथें कोणत्याच लोकांची वस्ती नसून दण्डकारण्य वगैरे भाग केवळ निर्मनुष्य होता असें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. अगस्ति कथेमध्यें किंवा राम दण्डकारण्यात राहिला असतां त्याचा शबर राक्षसादि लोकाशीं व नंतर वानर, ऋक्ष वगैरे लोकांशीं संबंध आला वगैरे गोष्टींवरून येथें मनुष्यवस्ती पूर्वीपासून असली पाहिजे. अर्थात् उत्तरेकडे आर्यावर्त, कीकट वगैरे भागात ज्या राष्ट्रजातींची वस्ती होती त्यांपेक्षां या जाती निराळ्या असल्या पाहिजेत व त्यांचीं नावें प्राचीन ग्रंथकारास अपरिचित असलीं पाहिजेत या गोष्टी खऱ्या आहेत, पण येथें मनुष्यवस्ती असून त्यांची प्राथमिक अवस्थेंतील एखादि भाषा असली पाहिजे व त्यांच्या दैनिक गरजा भागविणाऱ्या वस्तूचे निदर्शक शब्द त्यांच्या भाषेत असले पाहिजेत या गोष्टी निर्विवाद होत. तसेंच आर्यांचें दक्षिणेंत आगमन निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या मार्गांनीं व समूहांनीं होत गेल्यामुळें मध्यंतरीं असलेल्या सर्व प्रकारच्या लोकांशीं, भाषांशीं व परिस्थितींशीं त्यांचा निरनिराळ्या वेळीं संबंध आल्यामुळें, त्यांच्या राहणीवर, आचारविचारांवर व भाषेवर अनेक प्रकारच्या भिन्नकालीन भिन्न गोष्टांचा संस्कार झाला असला पाहिजे. संस्कृत भाषेवरहि द्राविड भाषांचा संस्कार काहीं बाबतीत झाल्याचें आढळून आलेंच आहे. (म. ज्ञा. को., वि २, प्रस्तावना पृ. ५९ पुढें) प्रत्यक्ष संस्कृत भाषेत मूर्धन्यवर्ग व कवल, लांगल, लिंग, नीर इत्यादि शब्द

कोल द्राविड भाषांतून गेले आहेत. याकरितां महाराष्ट्रांत अलीकडे स्थायिक होऊन राहणाऱ्या व राष्ट्रस्वरूप पावणाऱ्या लोकांची भाषा ही अनेक लोकांच्या व भाषांच्या भिन्नकालीन संस्कारांनीं बनलेल्या भाषेचें स्वरूप पावली असली पाहिजे व तसें अनेक विदेश विभ्याम यें आढळतात. कांहीं नित्याच्या व्यवहारांतील प्राथमिक गरजा भागविणाऱ्या वस्तूंचीं नांवें आरणास संस्कृतेतर भाषेपासून बनलेलीं आज मराठीमध्यें प्रचलित असलेलीं आढळतात. म्हणून आर्यांपासून इतरांनीं जरी त्यांची भाषा मुख्यतः घेतली तरी आर्यांनींहि हार असंस्कृत लोकांच्या भाषेंतील कांहीं शब्द व रचना घेऊन सर्वांची आपली मराठी भाषा बनविली ही गोष्ट स्पष्ट आहे. मराठी भाषेची ही बनावट कशी होत होत गेली हें पुढील विभागाच्या प्रस्तावनेंत आम्ही दाखविणार आहों.

महाराष्ट्रींतील ग्रंथ —आतां या महाराष्ट्रांतील प्रचलित मराठीची जी प्रकृति महाराष्ट्री तीमधील वाङ्मयाचा थोडक्यांत परिचय करून घेऊं. ज्याप्रमाणें संस्कृत वाङ्मयांत त्याचप्रमाणें प्राकृत वाङ्मयांतहि महाराष्ट्र व विदर्भ यांनीं मोठी कामगिरी बजावली आहे. प्राचीन प्राकृत वैयाकरण वररुचि यानें चार प्राकृत भाषांचें वर्णन केलें आहे, शौरसेनी, महाराष्ट्री, मागधी, व पैशाची. यांपैकीं शौरसेनी म्हणजे मथुरेकडील, मागधी म्हणजे बहारकडील, हें सर्व पाश्चात्य व पौरस्त्य विद्वानांना मान्य आहे. महाराष्ट्री म्हणजे महाराष्ट्रांतील प्राकृत असें बऱ्याच विद्वानांचें म्हणणें आहे. परंतु हॉर्नेल यांचें म्हणणें असें आहे कीं, महाराष्ट्री म्हणजे महाराष्ट्र देशाची भाषा असा अर्थ नव्हे, तर महाराष्ट्री हें नांव त्या प्राकृत भाषेला केवळ स्तुत्यर्थ दिलेलें आहे ( मोठ्या राष्ट्राची भाषा ). तें मोठें राष्ट्र म्हणजे दुआब व रजपुताना हा प्रदेश होय. ग्रीअर्सननेंहि असें म्हणणें आहे कीं, महाराष्ट्री व हल्लींची मराठी यांचा निकट संबंध आहे हें अजून सिद्ध झालें नाहीं. देशाच्या किंवा लोकांच्या नांवावरून भाषेला नांव देण्याची पद्धत सार्वत्रिक आहे. यावरून महाराष्ट्री ही महाराष्ट्राची भाषा असली पाहिजे असें दिसतें. परंतु याला पुष्टि देणारीं आणखीहि कांहीं प्रमाणें आहेत. ' महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः । सागरः सूक्तिरत्नानां सेतुबन्धादि यन्मयम् ॥ ' दंडी काव्यादर्श, १. ३४. दंडीनें म्हटल्याप्रमाणें ही महाराष्ट्री प्राकृत भाषांत इतकी श्रेष्ठ होती कीं, पुढें पुढें तिचें महाराष्ट्री हें नांव जाऊन तिला नुसतीच प्राकृत म्हणूं लागले. उ० ' प्राकृत संस्कृत मागध पिशाच भाषाश्च शूरसेनीच । षष्ठोऽत्र भूरिभेदो देश विशेषादपभ्रंशः ॥ ' रुद्रट, काव्यालंकार २. १२. या ठिकाणीं वररुचीनें वर्णिलेल्या मागधी, शौरसेनी व पैशाची ह्या त्याच नांवांनीं प्रचलित आहेत व संस्कृत व अपभ्रंश ह्या निराळ्याच असल्यामुळें प्राकृत म्हणजे महाराष्ट्रीच होय. लक्ष्मीधरानें आपल्या षड्भाषाचंद्रिकेंत ' तत्र तु प्राकृतं नाम महाराष्ट्रोद्भवं विदुः । ' असें म्हटलें आहे. तथापि महाराष्ट्री ही भाषा पाली किंवा अर्धमागधीप्रमाणें कोणत्याहि पंथाची धर्मग्रंथाची भाषा नसल्यामुळें केवळ महाराष्ट्री भाषेंत असें प्राकृत वाङ्मय फारसें आढळत नाहीं. सेतुबंध, सप्तशती व कर्पूरमंजरी हेच महाराष्ट्रीमधील उपलब्ध असलेले प्रमुख ग्रंथ होत. सेतुबंध हा ग्रंथ महाराष्ट्रींत आहे म्हणून दंडीचें मत आहे. या ग्रंथाचा कर्ता प्रवरसेन म्हणून होता असें हर्षचरित्रावरून कळतें. बाणभट्ट प्रवरसेनाची इतकी स्तुति करतो आहे यावरून तो बराच पूर्वीं झाला असला पाहिजे. हा प्रवरसेन कोण हें निश्चित नाहीं. राजतरंगिणींत काश्मीरचा प्रवरसेन म्हणून एक राजा होता, असें सांगितलें आहे. तोच या ग्रंथाचा कर्ता असावा असें कांहींचें म्हणणें आहे. या ग्रंथाच्या कांहीं हस्तलिखित प्रतींत कालिदासानें तो केलेला आहे असा मजकूर आहे. म्हणून तो ग्रंथ कोठें लिहिण्यांत आला हें निश्चितपणानें सांगतां येत नाहीं.

हाल किंवा सातवाहन याचा प्राकृत सुभाषिताचा ' सप्तशती ' म्हणून एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. हाहि ग्रंथ प्राचीन आहे. बाणानें या ग्रंथाची स्तुति केली आहे. सातवाहन कुळांतील राजांपैकीं सिरिपुळुमायि हा विदर्भ देशाचा राजा होता हें वर उल्लेखिलेल्या नाशिकच्या लेण्यांतील उताऱ्यावरून कळेल. त्या शिलालेखांत पुळुमायीला सातवाहन कुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा असें म्हटलें आहे. आतां सप्तशतीचा कर्ता सातवाहन कोणता हें जरी निश्चित नसलं तरी हा ग्रंथ नर्मदा नदी, विंध्य व गोदावरी यांच्यामध्यें कोठेंतरी लिहिला गेला असावा यांत कांहीं संशय नाहीं. या ग्रंथांत गोदा नदीचा उल्लेख दहा बारा वेळां, विंध्यपर्वताचा सहासात वेळा, नर्मदेचा तीनदां, तापी नदीचा एकदां याप्रमाणें आला आहे. नर्मदा नदी सर्व नद्यांमध्यें श्रेष्ठ आहे असें म्हटलें आहे.

यावरून वर म्हटल्याप्रमाणें सप्तशती हा ग्रंथ महाराष्ट्रांतच लिहिण्यांत आला व त्याची भाषा ही महाराष्ट्री आहे, म्हणून प्राचीन महाराष्ट्री ही महाराष्ट्राची भाषा होती. शिवाय त्या सप्तशतींत हल्लींच्या

मराठींत सापडणारे अनेक शब्द बहुतेक जसेच्या तसेच सापडतात. उ० भण्डण = भांडण, गोल्लिसम् = घोलेन, वाहुल्लअ = वाहुलें, वेल्लहल = वेल्हाळ, वइ = वई, सगाडि = सागाडी, सागट, इ.

कर्पूरमंजरीचा कर्ता राजशेखर याला त्या ग्रंथाच्या हस्तलिखित प्रतींत अनेक ठिकाणीं महाराष्ट्रचूडामणी असें म्हटलेलें आहे. त्याचा पणजा अकालजलद यालाहि राजशेखरानेंच आपल्या बालरामायणांत महाराष्ट्रचूडामणी असें म्हटलें आहे. कर्पूरमंजरींतील श्लोक महाराष्ट्रीय आहेत. ह्या ग्रंथांत अनेक शब्द हल्लींच्या मराठींत आढळतात तसे आले आहेत उ० पक्खराउज्ज (पखराज), ढिल्ल = ढिला, इ. यानंतर आपणास ज्ञानेश्वरकालीन व महानुभावी वाङ्मयास प्रारंभ झाल्याचें आढळतें व तत्कालीन भाषेचें स्वरूप ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु व महानुभावी ग्रंथांत दृष्टीस पडतें.

**महाराष्ट्रांतील प्राचीन राजवंश**—पुराणांतरी निर्देशिलेल्या राजवंशांपैकीं मौर्यवंश हा अति प्राचीन होय. या राजवंशाचा मूळ पुरुष चंद्रगुप्त असून या वंशांत एकूण दहा राजे झाल्याचा पुराणांत उल्लेख आहे. डॉक्टर कर्न यांच्या मतें या वंशाच्या राजवटीस ख्रि. पूर्व ३२२ च्या वर्षी प्रारंभ झाला. मौर्यांची सत्ता महाराष्ट्रावर असल्याबद्दल अशोकाचीं शिलाशासनें याच्या चारी बाजूस आढळतात यावरून अनुमान निघतें. या घराण्यातील शेवटचा राजा बृहद्रथ यास त्याचा सेनापति शुंगवंशीय पुष्यमित्र किंवा पुष्पमित्र यानें ठार करून शुंगवंशाची गादीवर स्थापना केली. या वंशानें ख्रिस्तपूर्व १८५ पासून ख्रिस्तपूर्व ७३ पर्यंत एकूण ११२ वर्षे राज्य केलें. या अवधींत या वंशाचे एकूण दहा राजे झाले. पण या वंशाच्या राजवटीचा शेवटच्या ४५ वर्षांतील राज्यकारभार कण्व किंवा काण्वायन या घराण्याकडे असावा. कारण आंध्रभृत्यासंबंधींच्या पुराणांतील उल्लेखांत 'सिंधुक आंध्रभृत्य कण्व वंश व उरलासुरला शुंग वंश यांचा निःपात करून पृथ्वीवर राज्य करील' असें म्हटलें आहे. शिवाय कण्वाचा शुंगवंश म्हणूनहि उल्लेख आहे. त्यावरून असें दिसतें कीं मराठेशाहींतील पेशव्याप्रमाणें शुंगातर्फे कण्ववंश राज्यकारभार पाहू लागला. पेशव्याप्रमाणें कण्वहि ब्राह्मण होते या गोष्टीमुळेंहि वरील तर्कास पुष्टी मिळते. कण्व वंशाच्या या ४५ वर्षांच्या कारकीर्दीत चार राजे झाले. सिंधुक किंवा सिमुक किंवा शिशुक नावाच्या आंध्रभृत्यानें कण्वाचा पाडाव करून दक्षिणेंत आंध्रभृत्याचा किंवा शातवाहनाचा अमल बसविला. या वंशाची कारकीर्द ख्रिस्तपूर्व ७३ पासून इ. स. २१८ पर्यंत होती. मध्यंतरीं कांहीं काळ या वंशाच्या राजवटीवर शकांनीं आक्रमण करून साधारणपणें ५३ वर्षे राज्य केलें होतें त्यापैकीं क्षहरात नहपान व त्याचा जावई उषवदात याचा उल्लेख नाशिक व जुन्नर येथील लेखांत आढळतो. या आंध्रभृत्य घराण्यांतील सिमुक किंवा सिंधुक, कृष्ण, शातकर्णी, गोतमीपुत्र, पुलुमायी, यज्ञश्री व मढरिपुत्र इत्यादि राजाचा शिलालेखांत उल्लेख आहे. याच राजवटींत गुणाढ्याचा बृहत्कथानामक पैशाची भाषेंतील ग्रंथ व हालाची महाराष्ट्रीमधील सप्तशती अस्तित्वांत आली. आंध्रभृत्यांच्या नंतरच्या तीन शतकांचा इतिहास जवळ जवळ अज्ञात आहे त्याबद्दल एवढेंच म्हणतां येईल कीं, इ. स. तिसऱ्या शतकाच्या शेवटापासून तों सहाव्या शतकाच्या शेवटापर्यंत राष्ट्रकूटाचा अमल असावा, कारण सहाव्या शतकाच्या प्रारंभीं चालुक्यांचें राज्य स्थापन झालें व तें चालुक्यवंशीय जयसिंह यानें राष्ट्रकूट वंशांतील कृष्ण राजाचा पुत्र इंद्र याचा पराभव करून स्थापन केलें असें मिरज, येऊर, येथील ताम्रपटावरून दिसतें या राष्ट्रकूट राजांपैकीं पुढील नांवें प्राचीन लेखांत आढळतात. दुर्गराज (५७०), गोविन्दराज, स्वामिकराज, दक्षराज, युधासुर, दंतिवर्मन्, इन्द्र (पृछकराज), गोविन्द (पहिला), कर्क (पहिला), आणि इन्द्र (पहिला ७३०). जयसिंह चालुक्यानंतर रणराग व त्यानंतर त्याचा पुत्र पुलकेशी हा गादीवर बसला. हा महान पराक्रमी राजा होऊन गेला. याचें पूर्ण नांव सत्याश्रय श्री पुलकेशी वल्लभ महाराज असें होतें. त्यानंतर कीर्तिवर्मा, मंगलिश, दुसरा पुलकेशी, विक्रमादित्य १ ला, विनयादित्य, विजयादित्य, दुसरा विक्रमादित्य, दुसरा कीर्तिवर्मा असे अकरा राजे इ. स ७५३ पर्यंतच्या कालावधींत झाले. या सुमारास राष्ट्रकूट वंशानें पुन्हा उचल खाऊन त्या वंशांतील राजा दंतिदुर्ग यानें चालुक्यावर आक्रमण करून राष्ट्रकूटाच्या राजवटीस प्रारंभ केला. राष्ट्रकूट वंश या इ. स. ७४५ ते ९७३ पर्यंतच्या अमदानीच्या काळांत दंतिदुर्ग, कृष्णराज, गोविंद (दुसरा), ध्रुव, गोविंद (तिसरा), शर्व किंवा अमोघवर्ष, कृष्ण (दुसरा) किंवा अकालवर्ष, जगत्तुंग (दुसरा), इंद्र (तिसरा), अमोघवर्ष (दुसरा), गोविंद (चौथा), अमोघवर्ष (तिसरा), कृष्ण तिसरा, खोट्टिग व कक्काल असे अनुक्रमानें वीस राजे होऊन गेले. या शेवटच्या कक्काल राजास चालुक्यवंशीय तैलपानें इ. स ९७३च्या सुमारास जिंकून दक्षिणेंत पुन्हा चालुक्यांचें साम्राज्य स्थापिलें,

तैलपानंतर सत्याश्रय, विक्रमादित्य, जयसिंह, सोमेश्वर इत्यादि दहा राजे या वंशांत इ. स. ११८९ पर्यंतच्या काळांत झाले. शेवटचे राजे दिवसेंदिवस दुबळे बनावयास लागले, त्यामुळें मांडलिक राजांनीं त्यांच्याविरुद्ध बंड पुकारण्यास सुरवात केली. अशा मांडलिकांपैकींच कलचुरी वंशाचे राजे होत. यांचा मूळ पुरुष जोगमाचा पुत्र पेरमादि हा तिसऱ्या सोमेश्वराचा मांडलिक होता ( इ. स. ११२८ ). यानंतरचा विज्जल हा जगदेकमल्लाचा मांडलिक व पुढें तिसऱ्या तैलपाचा सेनापति होता. हा इ. स. ११६१त स्वतंत्र होऊन कल्याणि येथें यानें आपली राजधानी केली. याची स्त्री पद्मावती हिचा भाऊ प्रसिद्ध लिंगायत बसव यानें याचा खून केला. यानंतर सोमेश्वर हा गादीवर आला व त्यानंतर संकम, आहवमल्ल व सिंघण या त्याच्या तिघा भावांपासून होयसळ बल्लाळ दुसरा यानें हें राज्य घेतलें ( इ. स. ११८३ ४ ). चालुक्यांचीं कौटुंबिक भांडणें त्यांच्या दुबळेपणास कारणीभूत होऊन अखेरीस यादवघराण्याच्या भिल्लमानें हळूहळू दक्षिणेंतील एक एक प्रांत पादाक्रांत करून, इ. स. ११८९च्या सुमारास यादवांचें साम्राज्य स्थापिलें. यादवराज हा मूळचा उत्तरेंत मथुरेस राज्य करीत होता. तो कृष्णाच्या काळीं द्वारावतीचा किंवा द्वारकेचा राजराज झाला. याच वंशांतील सुबाहु नावाच्या चक्रवर्ती राजाचा मुलगा दृढप्रहार यानें प्रथम दक्षिणेंत चंद्रादित्यपूर किंवा चांदवड या गांवानजीक आपलें लहान राज्य इ. स. ७५४च्या सुमारास स्थापिलें होतें. पुढें या वंशांतील बलाढ्य राजा भिल्लम (पांचवा) यानें चालुक्यांचा बीमोड करून स्वतःस राज्याभिषेक करून देवगिरी किंवा दौलताबाद येथें राजधानी नेली. दृढप्रहारापासून भिल्लमापर्यंतच्या सुमारें ४३७ वर्षांच्या काळांत या वंशाचे तेवीस राजे झाले. भिल्लमानंतर त्याचा मुलगा जैत्रपाल हा गादीवर बसला व त्याच्यानंतर त्याचा मुलगा सिंघण यानें सर्व दक्षिणभर यादवांची सत्ता स्थापून गुजरातहि आपल्या अमलाखालीं आणला. सिंघणानंतर त्याचे नातू कृष्ण व महादेव यांनीं अनुक्रमें इ. स. १२४७ ते १२६० व १२६० ते १२७१पर्यंत राज्य केलें. महादेवानंतर त्याचा पुतण्या रामचंद्र किंवा रामदेव हा इ. स. १२७१त गादीवर बसला. याच महादेव व रामदेव राजाचा प्रधान हेमाद्रि किंवा हेमाडपंत नावाचा विद्वान ब्राह्मण होऊन गेला. यानेंच मराठींतील मोडी लिपी अस्तित्वांत आणली. यानें चतुर्वर्ग चिंतामणि नावाचा चारही पुरुषार्थांचें सांगोपांग विवेचन करणारा ग्रंथ लिहिला. रामदेव राजाच्याच कारकीर्दींत मराठींतील कविश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरमहाराज उदयास आले व त्यांनीं मराठी भाषेंतील अत्यंत बहुमोल असा ज्ञानेश्वरी-नामक ग्रंथ रचिला. ज्ञानेश्वरीच्या शेवटीं श्रीज्ञानेश्वरांनीं रामदेव राजाचें 'येथ यदुवंश विलासु । जो सकळकळा निवासु । न्यायातें पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ॥' इ. ओव्यांनीं गुणवर्णन केलें आहे. रामदेवावर पुढें इ. स. १२९४मध्यें अल्लाउद्दिन खिलजी यानें स्वारी केली व त्याचा पराभव करून त्याला खंडणी देण्यास लावलें. येथूनच पुढें हळूहळू महाराष्ट्रांतील हिंदु साम्राज्याला उतरती कळा लागून यवनांच्या अमलास सुरवात झाली. अर्वाचीन काळाचा इतिहास सर्वांस विश्रुतच आहे.

सातवाहनानंतर कांहीं काल महाराष्ट्रावर एका महाराष्ट्रीय घराण्याची सत्ता असल्याचें कान्हेरी लेण्यांतील लेखावरून दिसतें. यांनीं आपला स्वतंत्र शक सुरू केला होता व त्या शकांतील २४५ व्या वर्षीं लिहिलेला वरील लेख आहे. या लेखांत रट्टकूट असें नाव आहे तें बहुतेक राष्ट्रकूट असावें. व हें एखादें स्थानिक रट्टी, महारट्टी अथवा मराठे कुल असून आंध्रभृत्यांच्या कालांत त्यांचे मांडलिक असावें, असें डॉ. भांडारकर म्हणतात. रा. कृ. पा. कुळकर्णी हे त्यास त्रैकूटक वंश असें म्हणतात. विदर्भ देशावर इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत वाकाटक घराण्याचें राज्य होतें. व यांनीं आपल्या राज्याचा विस्तार महाराष्ट्राच्या बऱ्याच मोठ्या भागावर केला होता. या घराण्यातील राजासंबंधीं अजंठा वगैरे लेण्यांतील लेखावरून माहिती मिळते. यांची राजधानी चांद्याजवळील भद्रावती उर्फ भांदक ही असावी. या घराण्यांत विंध्यशक्ति, प्रवरसेन ( पहिला ), गौतमीपुत्र, रुद्रसेन ( पहिला ), पृथ्वीसेन ( पहिला ), रुद्रसेन ( दुसरा ) व प्रवरसेन ( दुसरा ) इत्यादि राजे झाले प्रवरसेन ( दुसरा ) यास दोन पुत्र होते. त्यापैकीं पहिल्यास देवसेन नावाचा पुत्र होता. व देवसेनास हरिषेण नांवाचा पुत्र होता. दुसऱ्या प्रवरसेनाचा दुसरा पुत्र नरेंद्रसेन यास पृथ्वीषेण या नांवाचा पुत्र होता. यापैकीं दुसरा रुद्रसेन यानें चंद्रगुप्त दुसरा याची बहीण प्रभावती गुप्ता हिच्याशीं विवाह केला होता व तिचीं कांहीं दानपत्रें उपलब्ध आहेत. यांच्यानंतर विदर्भावर राष्ट्रकूटांची सत्ता स्थापित झाली व त्यानंतर चालुक्य आले. वाकाटकांच्या

अमदानींतच समुद्रगुप्तानें दक्षिणेवर स्वारी केली. तो दक्षिणेंत देवराष्ट्र येथपर्यंत जाऊन तेथे त्यानें सागरेश्वर देवालयाची स्थापना केली. रघुवंशांतील रघुदिग्विजयवर्णन याच स्वारीवरून केलें असल्याचा कांहींचा तर्क आहे.

दक्षिण महाराष्ट्रांत कोल्हापूर येथें शिलाहारांचें राज्य महत्त्वाचें होतें. यांच्यापैकीं भोज (इ. स. १०९८) हा फार प्रख्यात राजा होऊन गेला. या घराण्याचा मूळ पुरुष जतिग हा असून त्यानंतर नायिवर्मा ( नायिम्म ), चन्द्रराय, जतिग ( दुसरा ), गोंक, मारसिंह, भोज, बल्लाळ, गंगरादित्य ( इ. स. ११०९-११३५ ), विजयादित्य ( विजयार्क ११४२-११५३ ), व भोज ( दुसरा ) ( इ. स. ११७८-१२०९ ) हे राजे होऊन गेले.

प्राचीन महाराष्ट्रांतील सामाजिक स्थिति—फार प्राचीन काळापासून हिंदु समाजाचें चातुर्वर्ण्य हें एक वैशिष्ट्य मानलें गेलें आहे. मूळचे चार वर्ण असून पुढे निरनिराळ्या धंद्यामुळें अनेक जाती उत्पन्न झाल्या. राष्ट्रकूटाच्या वेळीं जाती व पोटजाती मिळून सोळापेक्षा बऱ्याच जास्त असाव्या. वरहणा या म्हणण्यावरून त्या ६४ असल्याचें दिसतें. इब्नखुर्दाद्बा हा मुख्य जाती सात असल्याचें सांगतो. ब्राह्मण, क्षत्रिय, सत्क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चंडाल आणि लहुद किंवा झम्या. धोबी, चांभार, गारुडी, बुरुड, नाविक, कोळी, पारधी, विणकरांतील एक विशिष्ट वर्ग हे अत्यंज म्हणून समजले जात. अस्पृश्यता आतासारखी त्या वेळींहि तीव्र होती. अस्पृश्यांना राजदरबारांत प्रवेश नसे. राजे लोक त्यांना बाहेरील आंगणांत जाऊन भेटत असत. अस्पृश्यांशीं भाषणहि दोषास्पद मानणारा एक वर्ग त्या वेळींहि समाजांत होता. ब्राह्मण केवळ वेदाध्ययन व विद्यादान यांनीच उपजीविका करीत असत असें नाहीं. वेदाध्ययन व विद्यादान करणारा ब्राह्मणांत एक वर्ग त्या काळीं होता. त्यानें निरनिराळ्या शाळा, विद्यापीठें चालवून विद्याप्रसाराचें कार्य करावें. कांहीं ब्राह्मण सरकारी नोकरींत शिरत व कांहीं वैश्यांना हाताशीं धरून अप्रत्यक्षपणें व्यापारादि धंदे करीत. श्रोत्रिय व षट्शास्त्रसंपन्न ब्राह्मणाला कर माफ असत व त्यांना कायद्यानें देहांताची शिक्षा देता येत नसे. क्षत्रियांत, राजवंशांतील क्षत्रिय किंवा सत्क्षत्रिय व सामान्य क्षत्रिय असे दोन भेद असत. त्यांपैकीं सत्क्षत्रियांना कायद्यानें देहान्त शिक्षा देता येत नसे. ब्राह्मणाप्रमाणेंच त्यांनाहि या शिक्षेऐवजीं उजवा हात व डावा पाय तोडून टाकण्याची शिक्षा देत असत. ब्राह्मणांना वरील शिक्षेला जोडून डोळे काढण्याची शिक्षाहि देहांत शिक्षेऐवजीं देत असत. क्षत्रियांनीं निरनिराळे यज्ञ करण्याचा प्रचार विशेष नव्हता. त्यांना वेदाध्ययनाची परवानगी असावी पण ताम्रपटांतील एकाहि लेखांत राजाचें गोत्र आढळत नाहीं. यावरून राष्ट्रकूटाच्या काळापासून क्षत्रिय धार्मिकदृष्ट्या हळूहळू वैश्य व शूद्र यांच्याच कोटींत घसरत जात असावेसें दिसतें. वैश्य तर या अमलाच्या पूर्वीपासूनच शूद्रांच्या कोटींत मिळाले होते. बौधायन धर्मसूत्रांत त्यांचा दर्जा शूद्राइतकाच मानलेला आहे. 'जर कोणी वैश्य किंवा शूद्र वेदाध्ययन करतांना आढळला तर त्याची जीभ कापीत' असें अलबिरुणी म्हणतो. त्यांना आपत्काळीं क्षत्रिय धर्म स्वीकारण्याची परवानगी होती. पुष्कळसे जन वैश्यहि सैन्यांत नोकरी करीत. शूद्रांत सच्छूद्र व असच्छूद्र असे भेद मानीत. सच्छूद्रांना ब्राह्मणद्वारा पौराणिक मंत्रांनीं श्राद्ध, संस्कार इ. करण्याचा अधिकार होता. शूद्रांचा द्विजातीय वर्णांची सेवा हा धर्म या काळापूर्वींच नाहींसा होऊन त्यांनीं निरनिराळे किरकोळ धंदे व व्यापार उचलले व तशी त्यांना बृहद्यम, देवल, उशनस् या स्मृतींतून परवानगीहि असल्याचें दिसतें. मुख्य मुख्य जातींतील प्रातिक पोटभेद त्या वेळीं उत्पन्न झाले नव्हते. चौथा गोविंद राष्ट्रकूट या राजानें उत्तर बंगालांतील पुंड्रवर्धन नगराहून आलेल्या ब्राह्मणासही भूमिदान केल्याचें सांगली येथील एका ताम्रपटावरून दिसतें. आंतर्जातीय अनुलोम विवाह विहित मानले जात. दायभाग व अशौच यासंबंधीं स्मृतिनियमावरून असले विवाह बरेच रूढ झाले असावेत असें दिसतें. बाणभट्टाच्या पित्यानें ब्राह्मणी बायको असूनहि शूद्र स्त्रीशीं विवाह केल्याचा हर्षचरिताच्या दुसऱ्या उच्छ्वासांत उल्लेख आहे. प्रतीहार बौकाच्या जोधपूरच्या शिलालेखांत हरिश्चंद्रास एक ब्राह्मण व दुसरी क्षत्रिय अशा दोन स्त्रिया होत्या असा उल्लेख आहे. परंतु असले विवाह या काळाच्या अखेरीं अखेरीस विशेष जनसंमत नसल्याचें दिसतें. आपस्तंब व गौतम या स्मृतींनीं बौधायन सूत्रानें विहित असलेलें आंतर्जातीय भोजन राष्ट्रकूटाच्या काळांत निषिद्ध समजलें जाऊं लागलें. एकत्र कुटुंबपद्धतीच सार्वत्रिक होती. परंतु विभक्त कुटुंबाचीं कांहीं उदाहरणें आढळतात. राष्ट्रकूट गोविंद तिसरा याच्या तोरखेडें येथील ताम्रपटांत दोन भावांना निरनिराळे हिस्से दिल्याचा उल्लेख आहे. चिक्क-बागेवाडी येथील ताम्रलेखांत रल्ल आणि त्याचा भाऊ जज्जुक यांना निरनिराळे हिस्से दिल्याचा उल्लेख आहे. रामचंद्र

राजाच्या पठण येथील इ. स. १२७१च्या ताम्रलेखांतही वरील गोष्टीस दखल पुरावा मिळतो. मिताक्षरेंतील वारसा हक्काचे नियम हे त्या वेळच्या रूढीवरूनच बनले असावेत असें दिसतें.

मुलगा नसल्यास बायको अथवा मुली वारस समजल्या जात. स्त्रियांना स्त्रीधनाचा हक्क असे. मुलगा सोळा वर्षांचा झाला असता विवाहाला योग्य मानला जात असे. मुलीचें लग्न ती बारा वर्षांची होण्याच्या आंतच करीत. राजघराण्यांतील मुली मात्र क्वचित् ऋतुस्नात झाल्यानंतर विवाहित होत असें रुद्रांबिकेच्या उदाहरणावरून दिसतें. मामे बहिणीशीं विवाह बराच रूढ असल्याचें दिसतें. दुसऱ्या कृष्णाचा मुलगा जगत्तुंग यानें मामाच्या मुलीशी विवाह केला होता. चौथा इंद्र याचेंहि उदाहरण देण्यासारखें आहे. अर्थात् असले विवाह त्या काळीं शास्त्रनिषिद्ध नव्हते व आताहि नाहींत. कारण दाक्षिणात्यांत अद्यापहि असले विवाह प्रचारात आहेत. राजघराण्यांशिवाय इतरत्र पडद्याची चाल नव्हती, व राजघराण्यांतहि ती उत्तरेकडील लोकांच्या अनुकरणाच्या बुद्धीनें शिरली असावी. सती जाण्याची पद्धत काश्मीरप्रमाणें इकडे रूढीची नव्हती. ही पद्धत विशेषतः राजघराण्यांतच होती. बहुजन समाजांतून तिचा प्रसार झाला नव्हता. विधवावपनाची चाल त्या काळीं नव्हती. पण ती १७व्या शतकाच्या अगोदर अस्तित्वांत आली असावी असें टॅव्हर्नियर यानें केलेल्या उल्लेखावरून दिसतें. खालच्या जातींशिवाय इतरत्र विधवांचा पुनर्विवाह शिष्टसंमत समजला जात नसे. जमीन एकाच्या नांवावरून दुसऱ्याच्या नांवावर घालणें इ. सारखे व्यवहार साक्षीदारांसमक्ष होत, असें कान्हेरी येथील बौद्ध संघास दिलेल्या भूमिदानासंबंधीं शिलालेखावरून दिसतें. जमीन, गांवें इत्यादिकांच्या खात्याच्या सरकारी कागदावर नेहमींच साक्षी असत असें नाहीं. मात्र असले दस्तऐवज सरकारदप्तरीं पुराव्यासाठीं ठेवीत असत. व जुने करार नवे करताना त्याचा उपयोग होत असे. जहागिरीचे, इनामाचे ताम्रपट वंशपरंपरा सांभाळून ठेवावे असा सरकारचा नियम असे व असे ताम्रपट दाखविते न आल्यास इनामें इ. खालसा केलीं जात. तीन पिढ्यांच्या भोगवट्यानें मालकी हक्क आतांप्रमाणें त्या काळींही संपादितां येत असे. यावरून धर्मशास्त्रांतील दिवाणी कायद्याचा भाग बराचसा तत्कालीन व्यवहारावरच उभारला गेला असला पाहिजे असें नीलकंठाचें म्हणणें खरें वाटतें. मार्को पोलो व इब्न बतूता या अनुक्रमें १३व्या व १४ व्या शतकांतील प्रवाशांच्या वर्णनांवरून त्या काळापर्यंत हिंदु लोक धोतर नेसत व एक उपरणें पांघरीत असे दिसतें. शिवलेले कपडे अस्तित्वांत आले नव्हते. मार्को पोलो यास सबंध मलबारांत आंगरखा कापता व शिवता येणारा एकहि शिंपी आढळला नाहीं. हामीरीनहि एक सैलसें उपरणें पांघरीत असे असें तो म्हणतो. स्त्रियांतून मात्र शिवलेल्या चोळ्यांचा प्रघात असावा असें त्या काळच्या वाङ्मयावरून दिसतें. अजंठ्याच्या लेण्यावरून पुरुष डोकीला पागोटें अगर फेटा घालीत असें दिसतें. काश्मीरांत मात्र राजपुरुषच डोक्याला कांहीं घालीत.

दाढी वाढविण्याचा प्रघात बराच रूढ असावा असें दिसतें व बांबूच्या छत्र्या वापरण्यात येत असत असें इत्सिंग या चिनी प्रवाशानें केलेल्या वर्णनावरून दिसतें. हीं कदाचित् आपणास आज आढळणारीं इरलीं असतील. राष्ट्रकूटांच्या काळानंतर आडनांवाची प्रथा अस्तित्वांत आलीसें दिसतें. कारण राष्ट्रकूटांपर्यंतच्या काळांत नामलेखांतून गोत्राचाच उल्लेख करीत. यादव राजा कृष्ण याच्या बागेवाडी व बेंडेगिरी येथील ताम्रलेखांत पाठक, द्विवेदी, उपाध्याय, दीक्षित, पंडित, पटवर्धन, घलिसास, वेदार्थद, मरुकसरस्वती, प्रौढसरस्वती हीं आडनांवें सांपडतात. यांपैकीं कांहींचहीं हल्लींहि आढळतात. हीं आडनांवें बहुधा विद्वत्तेच्या विवक्षित पदवीचीं वाचक होतीं व नंतर तीं पिढीजाद परंपरेनें रूढ झालीं हें सहज लक्षांत येतें. राजाच्या करमणुकीसाठीं दरबारी नर्तिका किंवा नटहि असत देवदासींचा प्रघात अकराव्या शतकापूर्वीपासून असावा. कारण राजेश्वराच्या देवळांतील अकराव्या शतकांतील शिलालेखांत राजराज यानें ४०० नर्तिका तंजावरच्या देवळांत पाठविल्याचा उल्लेख आहे. दसरा, रामनवमी, गोकुळाष्टमी, शिमगा इत्यादि उत्सवाच्या वेळीं पौराणिक नाटकें करण्याची प्रथा लोकप्रिय असून तिला राजाश्रयहि होता. राजे लोकांना शिकारीचा नाद होता व त्याकरितां ठिकठिकाणीं राखीव जंगलेंहि होतीं. ग्रहज्योतिष व फलज्योतिष या शास्त्रांची विशेष प्रगति या काळांत झाली. फलज्योतिषावर लोकांची श्रद्धा दृढ होती. जैन लोकांवरहि या शास्त्राचा पगडा बराच होता. अपराजित देव, महामंडलेश्वर, गोवुणरस या शिलाहार राजांनीं तर स्वतः ला ' शनिवार-विजय ' हें उपपद मोठ्या अभिमानानें, शनिवारींहि आम्ही जय मिळवितों हें दर्शविण्याकरितां, लावून घेतलें होतें. याशिवाय शकुन अपशकुन इत्यादिकांवर लोकांची व राजांचीहि श्रद्धा असे. देवादिकांना नवस करण्याची प्रथा

रूढ असून ' बनहट्टीच्या कोशिराजानें आपल्या प्रजेस रोगराई व इतर त्रास झाल्यास आपण देवाचें दर्शन कधींहि घेणार नाहीं असा देवास धाक घातल्याचा उल्लेख सौंदत्तीच्या एका रट्ट शिलालेखांत आहे. हातांत जिवंत सर्प धरून पातिव्रत्याचा व सच्चारित्र्याचा प्रभाव दाखविण्याची रूढी होती. स्वतः स्त्रिया राजास पुत्रप्राप्ती होण्याकरितां एखादा मनुष्य देवतेस स्वतःचें शरीर अर्पण करण्याचा नवस करीत असे. शरीरानें जरठ व दुर्बळ झालेले लोक केव्हा केव्हां तीर्थक्षेत्रीं जाऊन स्वतः जलसमाधि घेत किंवा जाळून घेत. अर्थात् वरील प्रकार सरसहा रूढ होते अशी कल्पना करून घेऊं नये.

शिक्षण —त्या काळीं शिक्षणाचा प्रसार सार्वत्रिक नव्हता. ब्राह्मण व वैश्य या दोन वर्णांपैकींच लोक विशेषतः शिकत. ब्राह्मण साधारणपणें वेदशास्त्रादिकांचें शिक्षण घेत व वैश्य लोक हिशेब ठिशेब इ. मामुली शिक्षण घेत. वैश्यांचा शिक्षणापेक्षा व्यावहारिक अनुभवावरच विशेष भर होता.

व्याकरणशास्त्रांत पारंगत असलेल्या ब्राह्मणास विद्वत्तेच्या दृष्टीनें विशेष मान होता. सरकारी न्यायखात्यांत ज्याची नोकरी पाहिजे असल्यास धर्मशास्त्राचें सांगोपांग ज्ञान अवश्य होतें. मोठमोठ्या देवालयांना जोडलेल्या मठांतून, ब्राह्मणांना दिलेल्या अग्रहारांतून, खाजगी विद्यालयांतून उच्च शिक्षणाची सोय केली जात असे. शिवाय खेड्यां-पाड्यांतून खाजगी शिक्षक नेमून गांवठी शाळा चालवीत. या शिक्षकाला धान्यानें रूपानें वेतन देत व विजया दशमी-सारख्या सणाच्या दिवशीं दक्षिणा मिळे. असल्या शिक्षकाला मामुली वैद्यकीय ज्ञान व अर्ज आणि दस्तऐवज लिहिण्याचें ज्ञान असे व या जोड धंद्यानींहि त्याच्या प्रपंचास बरीच मदत होई.

प्राचीन महाराष्ट्राची आर्थिक स्थिति —व्यापार, उद्योगधंदे, शेती व परदेशावर आक्रमण हींच पूर्वीच्या काळांतील राष्ट्राच्या संपत्तीचीं साधनें होतीं. देशाची तात्कालीन प्राकृतिक स्थिति ही जवळ जवळ हल्लींच्या सारखीच असल्यानें हल्लींचीच निसर्गसंपत्ति पूर्वींही होती हें साहजिकच आहे. गुजरात, वऱ्हाड व खानदेश हे प्रांत कापसाच्या निपजीकरितां प्रसिद्ध होते. भडोच बंदरांतून बरेंचसें सूत व कापूस निर्यात होत असल्याबद्दल प्राचीन ऐतिहासिक उल्लेख आहेत. शिवाय गुजराथ व ठाणें या प्रांतांतून नीळहि निर्यात होत असे. नरा व तेरा या शतकांत ठाणें व हैमूर येथून सुगंधी द्रव्याची निर्गत होत असे. महाराष्ट्रांत बाजरी, ज्वारी, व गळिताचीं धान्यें हीं मुख्य असून कर्नाटकांत या पिकांखेरीज कापूसहि होत असे. कोंकणांत आताप्रमाणेंच सुपारी, नारळ विपुल होत असून म्हैसूरमध्यें चंदन, साग व टेंभुरणी यांची निपज अतोनात होत असून त्याची निर्गतहि इतिहासपूर्वकालापासून विश्रुत आहे. भडोच बंदरांतून तांबें परदेशीं जात असे. कडप्पा, बल्लारी, चांदा, बुलढाणा, नरसिंगपूर, अहमदनगर, विजापूर व धारवाड येथेंही थोड्याबहुत प्रमाणावर खाणींतून तांबें काढीत असल्याबद्दल शोध लागला आहे. पूर्वी तांब्याची किंमत हल्लींपेक्षां बरीच महाग होती. १७ व्या शतकांत तीं हल्लींच्या पांचपट होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सोन्याच्या व तांब्याच्या किंमतींचें परस्परप्रमाण १ : ४८ हें होतें तेंच हल्लीं १ : १५०० आहे. यावरून पूर्वी तांबें किती महाग होतें याची कल्पना होईल. कडप्पा, बल्लारी, कर्नुल, गोवळकोंडा येथें अगदीं अलीकडच्या काळापर्यंत हिऱ्यांच्या खाणी होत्या. राष्ट्रकूटाच्या काळांत मालखेड, व यादवांच्या काळांत देवगिरी ह्या जवाहिरांच्या पेठा म्हणून प्रसिद्ध होत्या. वस्त्रें विणण्याचा धंदा हा सर्वांत मोठ्या प्रमाणावर होता व भडोच व द्रविड देशांतून बरेंच कापड परदेशीं जात असल्या बद्दल पेरिप्लसमध्यें उल्लेख आहे. मीनगर, उज्जैन, गुजराथ, पठण, तगर, हीं या धंद्याचीं मुख्य ठाणीं होतीं व यापैकीं बरींचशीं १७ व्या शतकापर्यंतही विणकामाबद्दल प्रसिद्ध होतीं. ठाणें व वारंगळ हीं कापडाची निपज व निर्यात याकरितां आणि वऱ्हाड व बऱ्हाणपूर हीं शुभ्र चिटाकरितां १३ व्या शतकांत प्रसिद्ध होतीं व तीं अरबस्तान, पोलंड, कायरो, तुर्कस्थान, इराण येथें जात असत असें मार्को पोलो म्हणतो. पठण हें रेशमी कापडाकरितां प्रसिद्ध आहे व होतें हें पैठणी या दक्षिणेंतील विशिष्ट वस्त्रवाचक नामावरून सिद्ध होतें.

तेराव्या शतकांत महाराष्ट्र व दक्षिण गुजराथ या देशांत कातडीं कमावण्याचा धंदा इतक्या मोठ्या प्रमाणावर चालत असे कीं अरबस्तान व इराण या देशांत गलबतेंचीं गलबतें भरून हीं कमावलेलीं कातडीं पाठवीत असत असें मार्को पोलो वर्णन करितो. दौलताबाद व नदुरबार यांच्या आसपासच्या प्रदेशांतील लोक त्यांच्या कला-नैपुण्याबद्दल प्रसिद्ध असल्याचें इब्न बतूता सांगतो. दक्षिण गुजराथ व उत्तर महाराष्ट्र या प्रांतांत निळ्या व तांबड्या चामड्याच्या सुंदर व कलाकुसरीनें युक्त व कलाबतूनें निरनिराळीं चित्रें काढलेल्याल्या चटया तयार होत असत असें

मार्को पोलो म्हणतो. म्हैसूरची हत्तीविषयीं प्रसिद्धी होती व तें त्या काळींहि हस्तिदंताच्या व्यापाराबद्दल प्रसिद्ध असावें. भडोच व कल्याण हीं निर्यातीचीं मुख्य बंदरें होतीं. पुढें खंबायत हें नवीन बंदर झाल्यानें भडोच येथील दळणवळण जरा कमी झालें, शिवाय सोपारा, नवसारी, ठाणें, चेमूर, दाभोळ, जयगड, देवगड, मालवण हीं किनाऱ्यालगतच्या जलमार्गानें होणाऱ्या व्यापाराचीं बंदरें होतीं. या सर्व बंदरांतील सरकारचें जकातीचें उत्पन्न बरेंच मोठें असावें.

भडोच बंदरांत, मोत्यें, खजूर, सोनें, गुलाम, शिसें, टिन, सुरमा, इटालियन मद्य, सोन्या चांदीचीं नाणीं इत्यादिकाची आयात बरीच होती. शिवाय घोड्यांचीही आयात मोठ्या प्रमाणावर होती. सर्व दळण-वळण बैलगाड्यांनीं चाले. सतरा या शतकांतील बैलगाड्या चांगल्या व आरामशीर व फ्रान्स, इटली या देशांतील गाड्यांपेक्षां किती तरी चांगल्या होत्या असें टॅव्हर्निअरनें वर्णन केलें आहे. अर्थात् या देशांतील पुराणप्रियता लक्षांत घेतल्यास यादवकाळीं व यादवपूर्वकाळींही वरील वर्णनापेक्षा त्या काहीं कमी दर्जाच्या असतील असें म्हणतां येणार नाहीं. बैलगाड्यांशिवाय डोंगराळ मुलखांतून बैल व घोडे यांच्यावर मालाची वाहतुक होत असे. अठरा प्रमाणाचा धंदा करून मुलाबाळांसह गांवोगांव फिरणाऱ्या पोटजाती त्या वेळीं बऱ्याच होत्या. त्या काळीं सडका थोड्या असाव्यात व डोंगरांतून त्या अगदीं नसाव्या, त्यामुळें अशा दुर्गम ठिकाणीं मालाची वाहतुक निरनिराळ्या गाड्यांतून होत असे, असें पेरिप्लसमध्यें पैठण ते भडोच या मार्गाच्या केलेल्या वर्णनावरून दिसतें. देवघेवीचे व्यवहार काहीं अंशीं पदार्थांच्या विनिमयानें किंवा अदलाबदलीनें व कांहीं अंशीं नाण्यांनीं होत. सरकारहि आपला वसूल काहींसा द्रव्यरूपानें व काहीं धान्यरूपानें, क्वचित् सर्व वसूलहि धान्य इत्यादिकांच्या रूपानें घेत असे. द्रम्म, सुवर्ण, गद्याणक, कळंजु, कासु हीं सोन्याच्या निरनिराळ्या वजनांचीं नांवें आढळतात. क्वचित् द्रम्म हें नाणें रुप्याचेंहि असल्याचें आढळतें. याच्या वजनासंबंधीं निश्चितपणें माहिती जशी उपलब्ध असावयास पाहिजे तशी नाहीं, तरीपण साधारणपणें द्रम्म, कळंजु व गद्याणक हीं अनुक्रमें १/३, १/४, व १/२ तोळा वजनाची असावीत असें म्हणतां येईल.

व्यापार व उद्योगधंद्यास आवश्यक अशा पेढ्या, सनदी मंडळी किंवा महाजनमंडळें चालवीत. प्रत्येक धंद्यांत असें महाजनमंडळ आंध्रभृत्यांच्या काळापासून ठिकठिकाणीं असे. व धंद्यांतील सर्व अडचणी दूर करणें, धंद्यावर योग्य तें नियंत्रण घालणें, धंद्यासाठीं उमेदवार तयार करणें इ. कामें हीं मंडळें करीत. प्रत्येक धंद्यांत असें महाजनमंडळ असे. रोखीच्या कर्जावर साधारणपणें दरवर्षी १२ ते १५ टक्के व्याजाचा दर असे, पण धान्य इत्यादिकांच्या रूपानें दिलेल्या कर्जावर तो क्वचित् शें. ५० पर्यंतहि आढळतो. त्या काळीं खालील पदार्थांच्या, साधारण मानानें, खालील कोष्टकांत दर्शविल्याप्रमाणें किंमती होत्या असें म्हणतां येईल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तांदुळ | १ रुपयास | ३२ शेर | मोहरी | १ रुपयास | ५ शेर |
| चांगलें तूप | ,, | २ १/२ शेर | केळीं | १ पैशास | १० |
| ,, तेल | ,, | २ १/२ शेर | वेलदोडे | १ रुपयास | ३ शेर |
| डाळी | ,, | २५ शेर | | | |
| मीठ | ,, | ७५ शेर | गाय | प्रत्येकीं १ रुपया दोन आण्यांस | |
| दहीं | ,, | २४ शेर | म्हैस | ,, २ १/२ रुपये. | |

अग्रसत्रांतून ब्राह्मण इत्यादिकांच्या जेवणाकरितां धान्यरूपानें, द्रव्यरूपानें, दिलेल्या खर्चाच्या ताम्रलेखीय उल्लेखावरून दर माणशीं जेवणाचा खर्च किती येत असेल याचा अंदाज करतां येतो. उत्तम चोळाच्या कारकीर्दीतील एका ताम्रलेखांत 'अग्रसत्रांतील २५ ब्राह्मणांच्या १ वर्षाच्या जेवणाकरितां ९३७ १/२ कलम तांदूळ' (भाजीपाला, तेलतूप, इ.कांच्या खर्चासह) असा उल्लेख आहे. यावरून चांगल्या प्रतीच्या एक वेळच्या जेवणाचा वार्षिक खर्च त्या वेळच्या किंमतीनें १९ रु. पर्यंत येईल. अर्थात् एक वेळच्या साध्या जेवणाचा वार्षिक खर्च याच्या निम्मे यावा. एखाद्या मोठ्या संस्कृत विद्यापीठांतील अध्यापकास ५० निवर्तन किंवा २५० एकर जमिनीच्या उत्पन्नाइतका पगार असे. हा पगार सामान्य ब्राह्मणाच्या उत्पन्नाच्या वीसपट, आणि खेडेगांवांतील संस्कृत शिक्षकाच्या पगाराच्या

दसपट होता, असें साधारण अनुमानानें सांगतां येईल. तंजावर येथील राजराज याच्या लेखावरून एका मंदिरांतील नोकरांच्या पगाराबद्दल खालील माहिती मिळते. तीवरून त्या काळच्या नोकरांना मिळणार्‍या वार्षिक वेतनाची थोडीशी कल्पना येईल.

| हुद्दा | वेतन | | | |
|---|---|---|---|---|
| हिशेबनीस | २०० | कलम | = | ८० मण तांदूळ |
| सुतार ( चांगल्यांपैकीं ) | १५० | ,, | = | ६० ,, ,, |
| पहारेकरी | १०० | ,, | = | ४० ,, ,, |
| पाणक्या | ६० | ,, | = | २४ ,, ,, |

धार्मिक स्थितिः—मौर्यांच्या राजवटींत बौद्धधर्माचा बराच उत्कर्ष झाला. परंतु त्यानंतर शुंग घराण्याच्या अमदानींत हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनास सुरवात झाली व त्याची प्रगति राष्ट्रकूटांच्या अमलापर्यंत सारखी चालू होती. सिंधमध्यें मात्र बौद्धधर्म आठव्या शतकापर्यंत टिकून होता असें चचनाम्यावरून दिसतें. बंगालमध्यें तर बाराव्या शतकात मुसलमानांचा अमल प्रस्थापित होईपर्यंत बौद्धधर्म भरभराटींत होता. दक्षिणेंत बौद्धधर्माच्या ऐवजीं जैन धर्माचें प्राबल्य असलेलें आढळतें व त्यावर हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाचा फारसा परिणाम झालेला आढळत नाहीं. या पंथानीं विशेष प्रगति बाराव्या शतकांत गुजराथेंत कुमारपालाच्या कारकीर्दींत हेमचंद्र वगैरेंनीं केलेली आढळते. बौद्ध व जैन धर्मांचें कांहीं काळपर्यंत जरी विशिष्ट ठिकाणीं प्राबल्य दिसून आलें तरी या मध्ययुगीन काळांत हिंदुधर्माची बरीच प्रगति व सुधारणा होत असलेली स्पष्ट दिसते. हिंदुधर्माचा जरी विशेष पुरस्कार तत्कालीन राजे लोक करीत असलेले दिसतात, तथापि गुप्त राजाच्या अमदानींत बौद्धधर्माची विशेषच चलती असावी असें फाहिआन यानें केलेल्या वर्णनावरून व तत्कालीन सारनाथ वगैरे ठिकाणच्या शिल्पकामावरून दिसतें. तथापि या कालापासून बौद्धधर्मास उतरती कळा लागून सातव्या शतकात तिचे परिणाम स्पष्ट दिसू लागले. मध्यंतरीं हर्षराजानें जरी बौद्ध धर्माचा पुरस्कार केला तरी ह्यूएनत्संग हिंदुस्थानात आला त्या वेळीं त्यास पूर्वीं बौद्धधर्मी असलेले पंजाब व उत्तर संयुक्तप्रांत हे पूर्णपणें हिंदु वर्चस्वाखालीं गेलेले आढळले. बौद्धांचीं कोसांबी, श्रावस्ती, कुशीनगर, वैशाली वगैरे तीर्थक्षेत्रें नष्ट झालेलीं किंवा हिंदुधर्मीयांनीं व्यापिलेलीं आढळलीं. प्रत्यक्ष मगधातहि बौद्ध धर्माचें वर्चस्व राहिलेलें नव्हतें. तद्वतच बौद्ध धर्मीयांचीहि समजूत आपला धर्म लवकरच नष्ट होणार अशी असल्याचें ह्युएनत्संग व इत्सिंग यानीं नमूद करून ठेवलेलें आढळतें. दक्षिणेंत व कर्नाटकात बौद्धधर्माचें प्राबल्य विशेष कधींच नव्हतें. या प्रांतात पाखंडी लोक राहतात म्हणून फाहिआन दक्षिणेंत आला देखील नाहीं. उत्तर महाराष्ट्रांतील वाकाटक राजे हिंदुधर्माचे पुरस्कर्ते असून त्या घराण्याच्या संस्थापकानीं अग्निष्टोम, अश्वमेध, वगैरे यज्ञ केले होते व त्याचे वंशज केव्हांहि बुद्धाचे अनुयायी नव्हते. चालुक्य घराण्यातीलहि राजे हिंदुधर्मी असून अग्निचयन, वाजपेय, अश्वमेध, बहुसुवर्ण इत्यादि यज्ञ केल्याचा ते अभिमान बाळगीत. यामुळें बौद्धधर्मास साहजीकच उतरती कळा लागली. ह्युएनत्संग यानें कोंकणात सुमारें शंभर बौद्ध मठ असल्याचें नमूद केलें आहे. महाराष्ट्रामध्येंहि बहुतेक इतकीच संख्या असावी. एकंदर दक्षिणेंत सातव्या शतकांत दहा हजारापेक्षा अधिक बौद्ध नसावेत.

जैन संप्रदाय मात्र हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनकाळींहि टिकाव धरून राहिला होता. याचें कारण या धर्माचा कदंब, चालुक्य व पश्चिम गंग या घराण्यातील राजांनीं पुरस्कार केला हें होय. तसेंच राष्ट्रकूट घराण्यातीलहि पुष्कळसे राजे व त्याचे प्रतिनिधी व सेनापती जैनसंप्रदायी होते. तसेंच समंतभद्र, अकलंकदेव, विद्यानंद, माणिक्यनंदी, प्रभाचंद्र, जिनसेन, गुणचंद्र व पंप इत्यादि साधु व ग्रंथकार यानींहि या पंथाच्या उत्कर्षास बरीच मदत केली.

सामान्यतः या मध्ययुगीन कालामध्यें लोकात परधर्माबद्दल सहिष्णुता असलेली आढळते. क्वचित् कांहीं ठिकाणीं परधर्मीयांचा छळ केल्याचीं वर्णनें शंकरदिग्विजय, चचनामा वगैरे ग्रंथांत आढळतात. परंतु या गोष्टी अपवादात्मकच होत. पांचव्या शतकापासून सामान्यतः निरनिराळ्या देवता ही एकाच परमेश्वराचीं भिन्न रूपें असून त्याच्या अनुयायानीं परस्परांचा द्रोह करू नये अशी शिकवण पुराण ग्रंथातून आढळते. याचा परिणाम जनतेच्या मनावर झालेला आढळतो. कदंब घराण्यांतील कृष्णवर्मा यानें स्वतः अश्वमेध केला असून एका जैन मठासहि देणगी

दिल्याचें आढळतें. तसेंच हर्ष स्वत बौद्ध असून सूर्य व शिव याची पूजा सार्वजनिक रीत्या करताना आढळतो. गुजरायेतील र्कर्क सुगर्णवर्ष स्वत शैव असून नवसारी येथील एका जैन विहारास एका क्षेत्राची देणगी देतो. अमोघवर्ष पहिला स्वतः जैन असून महालक्ष्मीस आपल्या हाताचें बोट देऊन संतुष्ट करताना आढळतो. दंतिवर्मा स्वतः हिंदु असून बौद्ध विहारास एक गाव देतो. मुळगुंद येथील बल्लाळपयी ब्राह्मण राजा जैन मठास एक शेत देतो ( इ. स. ९०२ ). सौंदत्ती येथील रट्टाचे लेख या बाबतींत महत्त्वाचे आहेत. महासामंत पृथ्वीराम यानें एक जैन देवालय बांधल्याचा उल्लेख आहे ( सुमारें ८७५ इ. स ). याचा नातु जैन होता. परंतु त्याचा नातू हिंदुधर्मी असून आपल्या त्रैविद्य गुरूस वारा निवर्तनें भूमि दान करताना आढळतो. सर्व धर्मांस समदृष्टीनें पाहणारेहि कांहीं राजे वगैरे आढळतात. बेलूर येथील जयसिंहाच्या लेखामध्यें ( इ. स. १०२२ ) अक्कादेवी, जिन, बुद्ध, अनंत या सर्व देवतांची उपासना करताना आढळतेः तिनें त्रिपुरुष ( ब्रह्मा, विष्णु, महेश ) देवतेचें देवालय बांधल्याचा उल्लेख आहे. एका लेखात राजाच्या आज्ञेनें नागवर्मा यानें जिन, विष्णु, ईश्वर आणि सत्पुरुष यांचें देवालय बांधल्याचा उल्लेख आढळतो ( सोमेश्वर १ ला याचा बेळगावे येथील लेख इ. स. १०४८ ). एका ठिकाणीं तर शैव लोकांनीं तारा व बुद्ध याच्या देवालयाकरिता देणगी दिलेली असून त्या लेखाच्या प्रशस्तीमध्यें जैन मुनींद्राची स्तुति केली आहे ( दाव, ११ शनव ).

यांसारखींच उदाहरणें आपणास उत्तरेमध्येंहि आढळतात. कनोज येथील गहडवाल राजा गोविंदचंद्र हा शैव असून त्यानें कुमार देवी या बौद्ध राजकन्येशीं लग्न लावून श्रावस्ती येथील जेतवनांतील बौद्ध भिक्षूकरितां सहा गांवें दिलीं होतीं. बंगालचा राजा मदनपाल स्वतः बौद्ध असून आपली राणी चित्रमतिका हिला महाभारत सांगणाऱ्या ब्राह्मणास एक गाव दान देतो. यावरून सामान्यतः लोकांची अशी समजूत झालेली दिसते कीं, हिंदू, जैन किंवा बौद्ध या तिन्ही संप्रदायात संस्कृतिदृष्ट्या भेद नसून कोणीहि आपल्या मताप्रमाणें इष्ट तो पंथ अनुसरावा. या पंथाच्या तत्त्वज्ञानामध्यें थोडा फार फरक असला तरी सामान्यत अंतर्गत साम्य आढळतें. शंकराचार्यांच्या अद्वैत वेदांतावर नागार्जुनाच्या शून्यवादाचा परिणाम बराच झालेला आहे ही गोष्ट सामान्यतः सर्वमान्य आहे व शंकराचार्यांनीं प्रतिपादन केलेलीं तत्त्वें त्याच्या मूलमध्यमकारिकेमध्यें पूर्वीच नमूद केलेलीं आढळतात. शैव व वैष्णव यांमध्यें तर यापेक्षाहि अधिक सहिष्णुता वसत असून राष्ट्रकूटांच्या दानलेखांत शिव व विष्णु या दोहोंची प्रथम स्तुति केलेली आढळते. खरोतगी येथें दहाव्या शतकात ब्रह्मा, विष्णु, महेश या त्रिमूर्तींचें देवालय बांधलेलें आढळतें. तसेंच करगुद्री येथें शंकर, विष्णु व भास्कर यांचें एक देऊळ आढळतें.

ही परमतसहिष्णुता महमदीयांच्या बाबतींतहि आढळून येते. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांत व्यापाराच्या निमित्तानें पुष्कळ महमदी येत असत. त्यांस प्रार्थनेसाठीं जुम्मामशीदहि बांधण्यास परवानगी दिलेली आढळते.

या मध्यकालीन हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनाचा परिणाम आपणांस उपासना, तत्त्वज्ञान व आचार या तीन स्वरूपात झालेला आढळतो. कुमारिल भट्टांनीं श्रौत धर्म अथवा यज्ञसंस्थेचें पुनरुज्जीवन केलें. परंतु वास्तविक ही प्रथा पतंजलीपासून सुरू असून कुमारिल हा तिचा अखेरचा पुरस्कर्ता होय पतंजलीचा समकालीन पुष्यमित्र शुंग यानें दोनदां अश्वमेध यज्ञ केला होता. या वाङ्मयाची अथवा पूर्वमीमांसा संप्रदायाची परंपरा शबरस्वामी, प्रभाकर वगैरे वृत्तिकारांनीं चालविलेली आढळते. तिसऱ्या सातवाहन राजाची विधवा नयनिका हिनें अश्वमेधादि अनेक यज्ञ करविल्याचा उल्लेख आढळतो. वाकाटक घराण्याचा संस्थापक प्रवरसेन यानेंहि यज्ञ केल्याचा उल्लेख वर केलाच आहे. गुप्त घराण्यातील दोन सम्राटांनीं अश्वमेध यज्ञ केल्याचे उल्लेख आढळतात तसेंच एका चालुक्य राजानेंहि यज्ञ केल्याचा दाखला मिळतो. परंतु ही यज्ञांची परंपरा फार दिवस चालली नाहीं. बौद्ध व जैन धर्मांच्या संसर्गामुळें लोकांच्या मनावर अहिंसा व संन्यास याचा पगडा बराच बसला होता व त्यामुळें श्रौत धर्म मागें पडून स्मार्त धर्माचा पुरस्कार सुरू झाला. अत्रिस्मृतिमध्यें तर धर्मशास्त्रास सोडून वेदास अनुसरणारा मनुष्य एकवीस वेळां पशुयोनींत जातो असें म्हटलें आहे ( ५·३५४ ). यावरून यज्ञसंस्था मागें पडली होती असें दिसतें. अल्बिरुनीनेंहि यज्ञसमारंभ क्वचित् होत असल्याचें नमूद केलें आहे.

मध्ययुगीन तत्त्वज्ञानपरंपरेला खिस्तपूर्व दुसऱ्या शतकात रचलेल्या ब्रह्मसूत्रापासून प्रारंभ झालेला दिसतो. या संप्रदायानें जैन व बौद्ध तत्त्वज्ञानाशीं बराच लढा चालविला व इ. सनाच्या तिसऱ्या शतकांत ब्रह्मसूत्रांस सांप्रतचें

स्वरूप प्राप्त झाले. अनेक ग्रंथकारांनीं या सूत्रांचें विवरण केलें. परंतु त्याचा महत्त्वाचा पुरस्कर्ता आद्य श्रीशंकराचार्य हा होय. यांचा जन्म केरळ प्रांतांतील असला तरी त्यांचें कार्य सर्व भरतखंडावर परिणामकारक झालें. यांनीं कर्म मार्गापेक्षां संन्यास श्रेयस्कर होय असें प्रतिपादन केलें व श्रौतकर्मांनीं केवळ चित्तशुद्धि होते असें प्रतिपादिलें. हें तत्त्वज्ञान यज्ञास प्रतिकूल असलेल्या लोकांच्या मनोभूमीवर फारच परिणामकारक झालें. तथापि शंकराचार्यांनीं उपदेशिलेल्या संन्यासमार्गाचा लोकांच्या मनावर फारसा परिणाम झाला नाहीं व शंकराचार्यहि स्वतः पौराणिक देवतांचे उपासक होते, असें त्यांनीं अनेक देवतांच्या स्तुतिपर रचलेल्या स्तोत्रावरून दिसतें. शंकराचार्यांनीं बद्रि-केदार, पुरी, शृंगेरी व द्वारका या चार ठिकाणीं मठ स्थापन केले व त्यांचेमागून आणखी कांही ठिकाणीं मठ स्थापन झाले. आज धार्मिक बाबतींत या मठांस बरीच सत्ता प्राप्त झालेली दिसते. परंतु बाराव्या शतकापर्यंत या मठांकडे तशी सत्ता असल्याचें आढळत नाहीं व जगद्गुरु ही पदवीहि केवळ शंकराचार्यवाचक असल्याचेंहि दिसत नाहीं. याप्रमाणेंच या पीठाकडे धर्मशास्त्रसंबंधीं निर्णय देण्याची व समाजनियमन करण्याची सत्ताहि त्या काळीं असल्याचें दिसत नाहीं. हिंदु राजांच्या अमदानींत हें कार्य सरकारचें असून त्याकरितां विनयस्थितिस्थापक, धर्मां-कुश, धर्मप्रधान किंवा पंडित या नांवाचे अधिकारी नेमलेले असत. शुक्रनीतिमध्यें कोणते आचार शास्त्रविरुद्ध आहेत तें पाहण्याचें व त्याप्रमाणें राजास कथन करण्याचें काम पंडिताचें आहे असें वर्णन आढळतें ( २. ९८-१०० ). स्मृतीमध्यें हें कार्य विद्वान् लोकांच्या परिषदेचें आहे असें सांगितलेलें आढळतें. पेशव्यांच्या काळींहि विवादित प्रश्नांचा निर्णय करण्याचें काम पंचाकडे सोपवीत असत व पंचांचा निर्णय पेशवे किंवा त्यांचे न्यायाधिकारी अमलात आणीत असत. हिंदु राजे नष्ट झाल्यानंतर मुसलमानी राज्यांत धर्मशास्त्रनिर्णयाचें काम पीठाकडे आलें असें दिसतें.

आतां या मध्यकालामध्यें सामान्य लोकांचा धार्मिक आचार काय होता तें पाहूं. सामान्यतः या कालांतील धर्माचें स्वरूप स्मार्त पौराणिक होतें असें म्हणतां येईल. स्मृतीमध्यें पंचमहायज्ञांचें विवेचन केलेलें आढळतें व त्यांस पूर्वींच्या श्रौत यज्ञांचें स्थान मिळालेलें दिसतें. या वेळचे ब्राह्मण सामान्यतः स्मार्त अग्निहोत्र पाळीत असलेले आढळतात. पूर्वींच्या स्मृतिकालीन आचारामध्यें व या काळच्या निबंधग्रंथांच्या आचारामध्यें फरक झालेला दिसून येईल.

मनु व याज्ञवल्क्य यांच्या मतें दिवसातून एकदां स्नान व दोन वेळ संध्या आणि पंचमहायज्ञ विहित दिसतात. निबंधग्रंथामध्यें दिवसातून तीन स्नानें केलीं पाहिजेत असा आदेश आढळतो. मध्यकालीन स्मृतींतील विधानें या दोहोंच्यामध्यें आढळतात. शंखस्मृतींत एकच स्नान तर दक्ष, कात्यायन व वैयाघ्रपाद स्मृतींत दोन स्नानें विहित आहेत व हें दुसरें माध्यान्ह काळीं करावयाचें आहे. तेराव्या शतकांत मार्को पोलो यानें मलबारांतील हिंदु स्त्रीपुरुष दिवसांतून दोनदां स्नानें करतात असें नमूद केलें आहे, तर आल्बिरुणीनें ब्राह्मणानें तीनदा स्नान केलें पाहिजे असा नियम असल्याचें लिहिलें आहे. त्याचप्रमाणें संध्या ही प्रथम सायं व प्रातः काळींच करण्याची पद्धत होती. परंतु अत्रि वगैरे स्मृतींमध्यें या काळांत ब्राह्मणानीं तीन वेळ संध्या करावी असे आदेश आढळतात. व तीच गोष्ट निबंधामध्येंहि दिसून येते. यावरून स्मार्त आचार या वेळीं जास्त व्यापक व बंधनकारक होत असलेला दिसून येतो. याच सुमारास व्रतांचीहि वाढ फार झालेली असून तीं अधिक लोकप्रिय झालेलीं दिसून येतात. या व्रतांस बहुतेक पुराणाचा आधार असे. शंकरभट्टाच्या व्रतार्कामध्यें एकशें तेरा, तर व्रतकौमुदीमध्यें एकशें अठ्ठावीस व व्रतराज या ग्रंथात दोनशें पांच व्रतांचें वर्णन आढळतें. हेमाद्रीच्या चतुर्वर्ग चिंतामणीचा एक पूर्ण खंड व्रतखंड या नांवानें प्रसिद्ध आहे व त्यात अनेक व्रतासंबंधीं माहिती दिली आहे. व्रतामुळें स्त्री व पुरुष या दोघांचीहि धार्मिक आचार व नियम पाळण्याची सोय झाली. त्याप्रमाणेंच या काळात प्रायश्चित्ताचाहि बराच सुळसुळाट झालेला दिसतो. या काळाच्या जवळपास लिहिलेल्या शातातप, लघु शातातप, वृद्ध शातातप, देवल, यम, आपस्तंब या स्मृतींत मुख्यतः प्रायश्चित्तासंबंधीच नियम सांगितले आहेत.

पुराणग्रंथ लोकप्रिय होत चालले तसतशी लोकांमध्यें सगुण भक्तीहि अधिकाधिक वाढत चालली. व सर्व सगुण देवता या एकाच परमेश्वराचीं भिन्नभिन्न रूपें आहेत ही कल्पना सगुण भक्तीस पोषकच होत गेली. यामुळें या हिंदु राजवटींत अनेक देवतांचीं देवालयें बांधणें व पूजाअर्चा चालविणें यासंबंधीं अनेक शिलालेखादि उल्लेख आढळतात. सामान्यतः शिव, विष्णु या देवतांचीं देवालयें अधिक लोकप्रिय दिसतात. तसेंच सूर्याचीहि उपासना चालू

असल्याचें गोविंद राष्ट्रकूट ( गुजराथ ) याच्या लेखावरून दिसतें. सौरी व शारदा यांच्याहि देवालयासंबंधीं उल्लेख आढळतो. पंढरपूर येथील विठोबाचें देवालय नक्की केव्हां बांधलें गेलें हें कळण्यास मार्ग नाहीं, परंतु इ. स. १२५० मधील बेळगाव जिल्ह्यातील एका लेखात भीमेच्या कांठीं असलेल्या पुंडरीक क्षेत्रांतील विष्णूचा उल्लेख आढळतो. यावरून पंढरपूर येथील विठ्ठलाच त्या वेळींहि बरेंच महत्व असावें. अर्थात् या संप्रदायाचा आरंभ यापूर्वीहि दोनतीन शतकें झाला असावा. आजच्याप्रमाणें तत्कालीन सामान्य लोकांत कांहीं ग्राम व क्षुद्र देवतांची उपासना चालू होती असें तत्कालीन प्रवाशाच्या वर्णनावरून दिसतें.

या निरनिराळ्या देवतांच्या उपासनावरून अनेक भिन्नभिन्न संप्रदाय अस्तित्वात आले होते. अल् इद्रिसी यानें त्या वेळीं बेचाळीस पंथ होते असें वर्णन केलें आहे परंतु कांहीं लोक एकाच वेळीं अनेक देवतांची उपासना करीत असून व सर्व देवता परमेश्वरस्वरूपीच आहेत असें मानीत. यामुळें या संप्रदायात फारसे तीव्र भेद नसावेत असें वाटतें. तथापि आपणास शैव, वैष्णव, सौर, गाणपत्य व शाक्त हे प्रमुख पांच संप्रदाय आढळतात व पंचायतन पूजेमध्यें त्यांचें ऐक्य करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

सगुणपूजा अथवा मूर्तिपूजा केव्हां अस्तित्वात आली हें नक्की सांगणें कठीण आहे. धर्मसूत्रामध्यें किंवा मनुस्मृतीमध्यें यासंबंधीं उल्लेख आढळत नाहीं. ही बहुधा अशोकाच्या नंतर व बौद्धधर्म मागें पडल्यावर सुरू झाली असावी. बहुतकरून बुद्धांचे मठ व देवालयें यांचें अनुकरण करून हिंदूंनीं आपल्या मूर्ति व देवळें बनविलीं असावीं व त्यातील कांहीं मूर्तींचें साम्य, उदाहरणार्थ शयनी बुद्ध व शेषशायी, तसेंच पद्मासनस्थित बुद्ध किंवा विष्णूचें ध्यान यावरून हें स्पष्ट होतें कांहीं हिंदुदेवालयांतील मूर्ति मूळच्या जैन असाव्या असाहि कांहीं संशोधकांचा तर्क आहे. कांहीं जैन देवाल्यात आजहि ब्राह्मण पुजारी आढळतात तसेंच फारसी भाषेत मूर्तिवाचक शब्द बुत् हा आहे तो बुद्ध या शब्दावरून बनला असावा मूर्तिपूजेचें मूळ कांहींहि असो, या हिंदु राजवटींत अनेक देवालयें भरभराटीस आलीं व त्यास अनेक राजांनीं देणग्या दिल्यामुळें तीं बरींच संपन्न असावींत असें दिसतें. यापैकीं कांहीं संपत्तीचा उपयोग देवालयास जोडून असलेलीं विद्यालयें चालविण्यात होत असे व गोरगरिबांस अन्नदानहि करण्यात खर्च होत असे या देवालयातील देवाची तीन वेळ पूजा करण्यात येत असून देवतेचे अंगभोग व रंगभोग याकरिता देणग्या दिल्याचे उल्लेख आढळतात तसेंच या देवताचे मधून मधून महोत्सवहि होत असत. अशा प्रकारच्या चैत्र व श्रावण महिन्यात होणाऱ्या दमनारोपण व पवित्रारोपण उत्सवांचा उल्लेख मनगोळी व सिद्धपूर या लेखांत आढळतो. देवालयातील पुजारी सामान्यत ब्राह्मण असत. परंतु कांहीं देवालयामध्यें, विशेषत शिवालयांतून गुरव पुजारी नेमलेले आढळतात. देवालयास देवदासी अथवा नर्तिका अर्पण करण्याचा प्रघात दक्षिणेंत विशेष दिसतो तंजावर येथील राजराजेश्वर मंदिरामध्यें राजराजानें चारशे देवदासी निरनिराळ्या ठिकाणाहून आणून अर्पण केल्याबद्दलचा एक लेख आहे या चालीचा उगम पूजेच्या वेळीं देवतेस चांगलें गायन ऐकविण्याच्या इच्छेमध्यें असावा प्राचीन काळीं ही चाल असल्याचें अर्थशास्त्र किंवा जातककथा यावरून आढळत नाही. परंतु मत्स्य व पद्मपुराणात तीसंबंधीं उल्लेख आढळतो. या चालीस ब्राह्मणाचा विरोध असावा असें सददी येथील लेखावरून दिसतें.

पुराण ग्रंथातून तीर्थांचें व क्षेत्रांचें माहात्म्य वर्णन केलेलें आढळतें त्यावरून तीर्थयात्रा करण्याची पद्धत बरीच वाढलेली असावी असें वाटतें मुलतान येथील सूर्याचे देवालय, प्रभास येथील शिवालय, प्रयाग, वाराणसी, गया इत्यादि तीर्थांचें माहात्म्य बरेंच वाढलेलें असावें. तीर्थांच्या ठिकाणीं केलेल्या सत्कृत्यांचें महत्व विशेष आहे ही समजूत, दंतिदुर्ग हिरण्यगर्भमहादान करण्यास उज्जयनी येथें गेला यावरून स्पष्ट होतें गाय ही अत्यंत पवित्र समजून गोहत्येचे पातक हें अत्यंत भयंकर मानीत असत असें तत्कालीन शिलालेखांवरून दिसतें

दक्षिणेंतील शैव व वैष्णव साधूंनीं भक्तिसंप्रदायाचा पुरस्कार बराच केलेला आढळतो. परंतु महाराष्ट्रामध्यें या संप्रदायाचें महत्व तेराव्या शतकापर्यंत फारसें आढळत नाहीं. तथापि पंढरपूर येथील विठ्ठलाची भक्ति यापूर्वीं कांहीं तरी काळ चालू असावी व ज्ञानदेवाच्या काळीं भक्तिमार्गास असलेलें महत्व पाहून ज्ञानदेवापूर्वीं कांहीं तरी भक्तिमार्ग साधुसंत होऊन गेले असले पाहिजेत असें वाटतें.

तसेच अनेक प्रकारच्या वस्तू सत्पात्र मनुष्यास दान करण्याची प्रवृत्ति या काळांत आढळते या दानासंबंधीं विस्तृत वर्णन मत्स्य, स्कंध इत्यादि पुराणग्रंथात व हेमाद्रीच्या दानखंडात आढळतें, भूमिदान, सुवर्णदान,

गोदान हीं फार महत्त्वाचीं समजत असत. हीं दानें देण्याचे प्रसंग म्हणजे संक्रांत, रथसप्तमी, अमावास्या इत्यादि पर्वे व कार्तिकी, वैशाखी वगैरे पौर्णिमा इत्यादि असत. फाल्गुन वद्य त्रयोदशीस शततारका नक्षत्र असल्यास वारुणी अशी संज्ञा असे व त्या दिवशीं शनिवार असल्यास तीस महावारुणी म्हणत व शुभ योग असल्यास महामहावारुणी म्हणत. यासंबंधाचीं वर्णनें तत्कालीन स्मृतिग्रंथ, पुराणें व शिलालेख यांतून आढळतात

या मध्ययुगामध्यें हिंदु व मुसलमान यांचा संबंध येऊं लागला. अनेक मुसलमान व्यापारी व प्रवासी पश्चिम हिंदुस्थानांत स्थायिक झाले व त्यांच्यासाठीं मशिदी उभारल्या गेल्या. कांहीं हिंदू जुलमानें बाटविले गेले अशा लोकांस शुद्ध करून घेण्याकरितां सिंधमध्यें मुसलमानांच्या स्वारीनंतर देवलस्मृति लिहिली गेली. बृहद्यम या स्मृतीमध्येंहि शुद्धिकरणार्थ कांहीं प्रायश्चित्त याने असें विधान आढळतें. तसेंच भ्रष्ट झालेल्या स्त्रियांनाहि पुन्हा प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घ्यावें इत्यादि विधानें देवल वगैरे स्मृतींमधून आढळतात व अशा तऱ्हेचीं शुद्धीकरणें घडून आल्याचे दाखलेहि आढळतात. अल्उतबी व अल्बिलादुरी यांच्या ग्रंथांतून अशा तऱ्हेनें जुलमानें बाटविलेल्यांना पुन्हा हिंदुधर्मांत घेतल्याबद्दलचे उल्लेख आढळतात. परंतु ही परंपरा फार दिवस टिकून राहिली नाहीं. अल्बिरुणी हा, तत्कालिक ब्राह्मण शुद्धिकरणास अनुकूल नसल्याचें नमूद करतो. याच सुमारास जातीजातींतील सहभोजन व अंतर्विवाह हींहि बंद झाल्याचें दिसतें.

महाराष्ट्रामध्यें वैदिक धर्मानंतर बौद्ध व विशेषतः जैन संप्रदायाचा प्रसार बराच झालेला दिसतो. मध्यंतरीं कुमारिलभट्टानें केलेल्या श्रौतधर्माच्या पुनरुज्जीवनामुळें कांहीं राजे लोक वगैरे श्रौतधर्माकडे वळले. परंतु सामान्य लोकांत बौद्ध व जैन संप्रदायांतील अहिंसा व त्याग हीं तत्त्वें इतकीं दृढमूल झालीं होतीं कीं, श्रौतधर्म लवकरच मागें पडून शंकराचार्यांनीं ज्ञानमूलक संन्यासमार्गाचा उपदेश करून आपल्या अद्वैत संप्रदायास अनेक अनुयायी मिळविले. मध्यंतरीं हिंदुसमाजांतील जातिनिर्बंध काढून टाकून ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व झुगारून देण्यासाठीं बसवानें कळचुरींच्या अमदानींत आपल्या लिंगायत धर्माचा प्रसार केला पुढें यादवांच्या राजवटींत चक्रधरानें अशाच तऱ्हेचा जातिभेद न मानणारा महानुभाव पंथ स्थापन केला. परंतु पहिल्या संप्रदायास दक्षिणेमध्यें थोडेफार अनुयायी मिळाले व दुसऱ्याचा प्रसार पंजाबसारखीकडेहि झाला तरी त्यांच्या अनुयायांची संख्या फारशी कधींच वाढली नाहीं. याच सुमारास ज्ञानेश्वरादि संतमंडळींनीं भक्तिसंप्रदायाचा जोरानें पुरस्कार करून त्याचें माहात्म्य सर्व महाराष्ट्रांत वाढविलें व आजहि महाराष्ट्रामध्यें शंकराचार्यांच्या अद्वैत संप्रदायाप्रमाणें वारकरी संप्रदायाचे अनेक अनुयायी विशेषतः खालच्या वर्गामध्यें आढळतात.

सांप्रतची मराठी भाषेची स्थिति —हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या ३५,२८,३७,७७८ आहे. त्यापैकीं मराठी भाषा बोलणारांची संख्या २,०८,८९,६५८ आहे. यांत कोंकणी बोलणारांची ४,७१,७३५ ही संख्या मिळविली म्हणजे एकंदर २,१३,६१,३९३ लोकसंख्या मराठी बोलणारी होते परंतु खानेसुमारीकर्त्यांनीं जरी कोंकणी ही मराठीची पोटभाषा धरली आहे तरी खानदेशी ही गुजराथीची पोटभाषा धरून तिचें वर्गीकरण निराळें केलें आहे. पण पूर्वी विवेचन केल्याप्रमाणें वास्तविक खानदेशीहि दिवसेंदिवस अधिकाधिक मराठीशीं समरस होत असून खान देश हा मराठी क्षेत्रांतच अंतर्भूत होतो व त्यामुळें खानदेशी बोलणारांची संख्या २,२३,०१० ही वरील संख्येंत अंतर्भूत केली असतां एकंदर मराठी बोलणारांची संख्या २,१५,९४,४०३ होते. म्हणजे हिंदुस्थानच्या एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ६ लोक मराठी भाषा बोलतात. यांत वास्तविक पोर्तुगीज हिंदुस्थानची लोकसंख्या मिळविली पाहिजे कारण पोर्तुगीज मुलखाची म्हणजे गोवें प्रांताची भाषा कोंकणीच असल्यामुळें तिचा अंतर्भाव मराठी बोलणारांमध्येंच केला पाहिजे तथापि त्यामुळें हें प्रमाण फारसें बदलणार नाहीं.

हिंदुस्थानांत ज्या इतर भाषा प्रचलित आहेत त्यांमध्यें मराठीचा अनुक्रम चवथा लागतो. मराठीपेक्षां हिंदी, बंगाली व तेलगु बोलणारांची संख्या अधिक आहे. हा क्रम हिंदुस्थानांतील एकंदर भाषांचा कसा लागतो हें दर हजारीं विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांचे प्रमाण दाखविणारें कोष्टक पुढें दिलें आहे त्यावरून लक्षांत येईल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हिंदी | २०६ | पंजाबी | ४५ | मल्याळम् | २६ | ब्रह्मी | २५ |
| बंगाली | १५७ | राजस्थानी | ३२ | कानडी | ३२ | उर्दू | २४ |
| तेलगु | ७५ | उडिया | ३२ | गुजराथी | ३१ | सिंधी | ११ |
| मराठी | ६० | तामिळ | ५८ | आसामी | ६ | इतर | [illegible] |

क्षेत्रफळासंबंधीं विचार करतां भरतखंडाचें एकदर क्षेत्रफळ १८,०८,६७९ चौरस मैल आहे. त्यामध्यें प्रामुख्यानें ज्या प्रदेशांत मराठी भाषा बोलली जाते असें क्षेत्रफळ काढल्यास सुमारें १,४९,१२० चौरस मैल येतें. म्हणजे एकदर हिंदुस्थानच्या क्षेत्रफळापैकीं शेंकडा ८ म्हणजे सुमारें बारावा हिस्सा मराठी भाषेनें व्यापला आहे. या बाबतींत हिंदी भाषेनें अर्थात् फारच मोठ्या क्षेत्राचें आक्रमण केलें आहे. तथापि मराठी भाषेनें लोकसंख्येचा फक्त सोळावा हिस्सा व्यापला असता क्षेत्राचा बारावा हिस्सा व्यापला आहे म्हणजे संख्येच्या मानानें क्षेत्र थोडेंसें अधिक विस्तृत आहे. यांतहि अर्धवट मराठी जिल्हे व संस्थानें यांचा अंतर्भाव केला नाहीं.

गेल्या खानेसुमारीपेक्षा या खानेसुमारींमध्यें एकदर हिंदुस्थानच्या लोकसंख्येची वाढ शेंकडा दहांनीं झाली आहे तर मराठी बोलणारांची संख्या शेंकडा साडेबारा टक्यांनीं वाढली आहे, ही गोष्ट एकदर हिंदुस्थानच्या दृष्टीनें विचार करतां स्पृहणीय आहे. परंतु मराठीचें आगर जें मुंबई इलाखा त्यासंबंधीं विचार करतां मात्र याच्या उलट परिस्थिति आढळते. म्हणजे मुंबई इलाख्याच्या लोकसंख्येमध्यें एकदर वाढ शेंकडा साडेचवदा टक्के झाली आहे, तर मराठी बोलणाराच्या संख्येमध्यें ती फक्त शेंकडा साडेतेरा टक्के झाली आहे. म्हणजे मराठी भाषा बोलणाऱ्या लोकसंख्येची वृद्धि एकदर लोकसंख्येच्या मानानें कमी झाली आहे.

याशिवाय मराठी मातृभाषा म्हणून नव्हे पण दुय्यम भाषा म्हणून बोलणारे लोकहि एकंदर हिंदुस्थानांत बरेच असून त्यांची एकदर संख्या १४,६४,२२३ आहे. या लोकांत अर्थात् हिंदी मातृभाषा (पूर्व, पश्चिम व राजस्थानी) असलेल्या लोकांचेंच आधिक्य असून त्या खालोखाल बंगाली, पंजाबी व गुजराथी भाषा बोलणारांची संख्या आहे. याची वस्ती अर्थात् मराठीचें मुख्य क्षेत्र मुंबई इलाखा, मध्यप्रांत, वऱ्हाड इत्यादि भागांत असून त्या त्या भाषांच्या क्षेत्रांत आहे.

याप्रमाणेंच मराठी ज्यांची मातृभाषा आहे त्यांनाहि व्यवहाराकरितां दुसरी एखादी भाषा शिकावी लागतेच. अशा द्वैभाषिक लोकांची एकदर लोकसंख्या १०,३९,४१४ असून त्यांमध्यें हिंदीनंतर कानडीचा अनुक्रम लागतो व त्यानंतर तेलगू आणि गुजराथी या येतात. म्हणजे मराठी बोलणाऱ्या लोकांचें परिभ्रमण अगर वसाहती विशेष कोणत्या भागांत झाल्या आहेत ही गोष्ट यावरून स्पष्ट होते.

ही प्रस्तावना लिहिण्याकरितां मुख्यतः पुढें दिलेल्या ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला आहे व त्या ग्रंथकारांचे आम्ही याबद्दल आभारी आहों. तसेंच संपादकवर्गापैकीं रा. पुरुषोत्तम सावळाराम दीक्षित यांचेंहि साहाय्य ही प्रस्तावना लिहिण्याच्या कामीं झालें हें येथें नमूद करणें इष्ट आहे.

1 Dr R G Bhandarkar — Early History of the Deccan
2 Prof J Dubreuil —Ancient History of the Deccan
3 Dr A S Altekar —Rashtrakutas and Their Times 4 Indian Antiquary Vol. III, XXXII.
५ रा. वि. का. राजवाडे:—महाराष्ट्राचा वसाहतकाल.
६ रा. राजारामशास्त्री भागवत'—मराठ्यासंबंधीं चार उद्गार, 'कोंकणासंबंधीं चार उद्गार' हा विविधज्ञानविस्तार पृ. २१ मधील लेख.
७ डॉ. जॉन् विल्सनः—मोल्स्वर्थ कँडी या कोशाची प्रस्तावना.
८ प्रो. पां. वा. काणे —Ancient Geography and Civilization of Maharashtra. विविधज्ञानविस्तार— पृ. ४३, ४९, ५० मधील लेख.
९ रा. या. मा. काळे:—वऱ्हाडचा इतिहास.
१० रा. कृ. पां. कुलकर्णी:—मराठी भाषा—उद्गम व विकास
११ रा. नी. व. भवाळकर } चक्रधरसिद्धांतसूत्रें.
१२ रा. ह. ना. नेने }
१३ १९३१ च्या खानेसुमारीचा मुंबई इलाखा व हिंदुस्थान याचा अहवाल.

यशवंत रामकृष्ण दाते.

परिशिष्ट १

# मराठी मातृभाषा असणारांची प्रांतवार लोकसंख्या

( खानेसुमारी १९३१ )

| प्रदेश | मराठी व कोंकणी |
|---|---|
| हिंदुस्थान | २१३६१३९३ |
| ब्रिटिश मुलुख | १५३२८२९६ |
| संस्थानें व एजन्सीज | ६०३३०९७ |
| १ अजमीर–मेरवाडा | ०४९ |
| २ अंदमान–निकोबार बेटें | ३५२ |
| ३ आसाम | ४३१९ |
| ४ बलुचिस्तान ( ब्रिटिश | ८८१ |
| ५ बंगाल | ३१६० |
| ६ बहार व ओरिसा | १३०० |
| ७ मुंबई इलाखा ( एडनसह ) | ९५४२०८४ |
| एडन | ४०८ |
| ८ ब्रह्मदेश | १३८४ |
| ९ मध्यप्रांत व वऱ्हाड | ५४३२७४७ |
| १० कुर्ग प्रांत | ३९०८ |
| ११ दिल्ली प्रांत | ८५० |
| १२ मद्रास इलाखा | ३३०७६९ |
| १३ वायव्य सरहद्दीवरील प्रांत | २६२ |
| १४ पंजाब | ९३५ |
| १५ संयुक्तप्रांत | ४३९६ |
| १६ आसामांतील संस्थानें | २ |
| १७ बलुचिस्तानांतील संस्थानें | १ |
| १८ बडोदें संस्थान | २५८४१ |
| १९ बंगाल्यांतील संस्थानें | १ |
| २० बिहार व ओरिसा यांतील संस्थानें | ४१२ |
| २१ मुंबई इलाख्यांतील संस्थानें | १७८७४४१ |
| २२ मध्यहिंदुस्थानांतील एजन्सीज् | ५५००७ |
| २३ मध्यप्रांतांतील संस्थानें | १८५२७९ |
| २४ ग्वाल्हेर संस्थान | २१८२८ |
| २५ हैद्राबाद संस्थान | ३७८६८३१ |
| २६ जम्मू आणि काश्मीर संस्थान | २६ |
| २७ मद्रास इलाख्यांतील संस्थानांच्या एजन्सीज | ४८२७ |
| कोचीन संस्थान | २७५६० |
| त्रावणकोर संस्थान | १९२२९ |
| मद्रास इलाख्यांतील इतर संस्थानें | १४९० |
| २८ म्हैसूर संस्थान | १०७६१७ |
| २९ वायव्य सरहद्दीवरील प्रदेश | १८४ |
| ३० पंजाबांतील संस्थानें | २२ |
| ३१ पंजाब स्टेट्स् एजन्सी | १६ |
| ३२ रजपुताना एजन्सी | २४४४ |
| ३३ सिक्किम संस्थान | ० |
| ३४ संयुक्त प्रांतांतील संस्थानें | १४ |
| ३५ वेस्टर्न इंडिया स्टेट्स् एजन्सी | २१५१ |

परिशिष्ट २

# हिंदुस्थानांत मराठी दुय्यम भाषा म्हणून बोलणारांची संख्या

| मुख्य भाषा व प्रांत | सदर ( १ ) मधील मातृभाषा बोलणारांची एकूण संख्या | सदर ( १ ) मधील मातृभाषा असलेल्यांपैकीं मराठी दुय्यम भाषा बोलणारांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | मराठी | कोंकणी |
| कोरकु–( मध्यप्रांत व वऱ्हाड ) .. | १६१९७८ | २०४४ | ० |
| तामिळ–( बंगाल, बहार व ओरिसा, मद्रास, हैद्राबाद, कोचीन, त्रावणकोर व म्हैसूर . | २०१७७८९४ | २०७ | १४ |

| | | | |
|---|---|---|---|
| मल्याळी–( बंगाल, कुर्ग, मद्रास, त्रावणकोर, कोचीन )... | ९१०१४४० | ० | २८ |
| कानडी–( बंगाल, मुंबई इ., कुर्ग, मद्रास इ., हैद्राबाद, कोचीन, त्रावणकोर, म्हैसूर ) ... | ११११६१०३ | १८५५२१ | १५४५७ |
| तुळु–( कुर्ग, मद्रास, कोचीन, त्रावणकोर, म्हैसूर ) ... | ६२१४२५ | ११ | ५१ |
| गोंडी–( बंगाल, बहार व ओरिसा, मध्यप्रांत व वऱ्हाड, मध्य हिंदुस्थानातील संस्थानें, हैद्राबाद सं. ) ... | १७२०७९० | ३२१३८८ | ० |
| तेलगु–( बंगाल, बहार व ओरिसा, मुंबई इ., मध्यप्रांत व वऱ्हाड, मद्रास इ., हैद्राबाद सं., कोचीन, त्रावणकोर, म्हैसूर ) ... | २६१७६४११ | १४४१४८ | २ |
| बलुची–( बलुचिस्तान, मुंबई इ., पंजाब ) ... | ६२५७०८ | १३ | |
| सिंधी–( बलुचिस्तान, बंगाल इ., मुंबई इ., बडोदें सं., कोचीन, राजपुताना एजन्सी, वेस्टर्न इंडिया स्टेटस् एजन्सी ) ... | ३९६७०४२ | २०१३ | |
| कोंकणी–( मुंबई इ., मद्रास इ., कोचीन, त्रावणकोर, म्हैसूर ) ... | ४६६३८६ | १३६०९ | |
| ऊरिया–( बंगाल, बहार, ओरिसा, मध्यप्रांत व वऱ्हाड, मद्रास इ. ) | १०९२८७५९ | १०९१७ | |
| बंगाली–( आसाम, बंगाल, बहार व ओरिसा, कोचीन ) | ५३०३७८४१ | १ | |
| पूर्वहिंदी–( बंगाल, बहार, ओरिसा, मध्यप्रांत व वऱ्हाड, सेंट्रल इ. एजन्सी, सिक्किम ) ... | ४१३६३४३९ | ३७६८०९ | |
| पश्चिम हिंदी–( बलुचिस्तान, मुंबई इ. दिल्ली, मद्रास इ. वायव्य सरहद्दप्रांत, पंजाब, संयुक्तप्रांत, बडोदें सं., सेंट्रल इ. एजन्सी, ग्वाल्हेर सं., हैद्राबाद सं., कोचीन त्रावणकोर, म्हैसूर, वेस्टर्न इंडिया स्टे. एजन्सी ) ... | ६३,२७०४३ | ३०८९४६ | ६९५२ |
| राजस्थानी–( बंगाल, मुंबई इ., दिल्ली प्रांत, पंजाब, मध्य हिंदुस्थान एजन्सी, ग्वाल्हेर सं., हैद्राबाद, म्हैसूर सिक्किम ) ... | १२६८३१७३ | ५३७७१ | |
| गुजराथी–( बंगाल, मुंबई इ., बडोदें सं., सेंट्रल इ. ए., ग्वाल्हेर, हैद्राबाद, कोचीन, राजपुताना एजन्सी, वेस्टर्न इंडिया स्टेटस् एजन्सी ) ... | १०६३३८६१ | ५०५६९ | |
| भिल्ली–( मुंबई इ., बडोदें सं., सेंट्रल इं. ए., ग्वाल्हेर सं., हैद्राबाद, राजपुताना एजन्सी ) ... | २१८५८७६ | ५७८४६ | |
| खानदेशी–( मुंबई इलाखा ) ... | २२२१६८ | १३३५३ | |
| पंजाबी–( बंगाल, बहार व ओरिसा, दिल्ली प्रांत, वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब, जम्मू व काश्मीर, राजपुताना एजन्सी, सिक्किम ) ... | १५७२५१९३ | ५४५ | |

## परिशिष्ट ३

# मराठी मातृभाषा असून इतर दुय्यम भाषा म्हणून बोलणारांची संख्या

| भाषा | संख्या | भाषा | संख्या |
|---|---|---|---|
| हिंदुस्थानी | ५०२४४६ | उरिया | ९३४८ |
| कानडी | २७९३१० | राजस्थानी | ५४७५ |
| तेलगु | ६३५८३ | कोंकणी | ३३९३ |
| पश्चिम हिंदी | ५८३१२ | तामिल | २४२७ |
| गुजराथी | ४२४६६ | तुळु | ५२० |
| खानदेशी | २३१४४ | पूर्वहिंदी | ८१ |
| गोंडी | २२८३३ | बंगाली | ४० |
| इंग्रजी | १६११६ | कोरकु | २४ |
| मल्याळी | ९८६० | कच्छी | ९ |
| | | एकूण | १३३९३८७ |

---

## परिशिष्ट ४

# मराठी भाषाक्षेत्र

| | प्रदेश नांव | क्षेत्रफळ चौ. मैल | एकूण लोकसंख्या | मराठी लोकसंख्या | कोंकणी लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| मु. इ. जिल्हे | अहमदनगर | ६६११ | ९८८२०६ | ८६९७९४ | २०४ |
| | नाशिक | ५८८२ | १००००४८ | ८६७४६२ | ५३७ |
| | पुणें | ५३३२ | ११६९७९८ | १०३५२५४ | १८२१ |
| | सातारा | ५०५३ | ११७९७१२ | ११११९०८ | १८६ |
| | सोलापूर | ४५६९ | ८७७५२० | ६८४९५७ | २३० |
| | मुंबई उपनगर जिल्हा | १५४ | १७९५२४ | १११२३२ | ४२४९ |
| | पूर्व खानदेश | ४५५१ | १२०६०३५ | ९३४९९३ | १४६ |
| | पश्चिम खानदेश | ६४०१ | ७७१७९४ | २०८३९१ | ४५ |
| | बेळगाव | ४६१२ | १०७६७०१ | २६८४०० | ४८७५ |
| | विजापूर | ५७१० | ८६९२२० | २६८५३ | ६४३ |
| | कुलाबा | २१६६ | ६२८७२१ | ५९८९७७ | ६४६ |
| | रत्नागिरी | ३९८९ | १३०२५२७ | १२४१३३३ | ८०४४ |
| | धारवाड | ४६०६ | ११०२६७७ | ४१९३९ | ४०७९ |
| | कानडा | ३९४६ | ४१७८३५ | २७६९५ | १३०४१८ |
| | ठाणें | ३४२२ | ८३६६२५ | ७२६१३५ | ३५०७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मु. इ. संस्थानें | जव्हार | ३१० | ५७२६१ | ५५९८५ | |
| | जंजिरा | ३२४ | ९८२९६ | ८२५१७ | २३५७ |
| | भोर | ९२५ | १४१५४६ | १३९२४६ | ६ |
| | औंध | ५०१ | ७६५०७ | ६५४६६ | |
| | फलटण | ३९७ | ५८७६१ | ५५६३२ | |
| | अक्कलकोट | ४९८ | ९२६०५ | २७७७३ | १ |
| | सावंतवाडी | ९२६ | २३०५८९ | २२०२४५ | ५२४२ |
| | कोल्हापूर | ३२१७ | ९५७१३७ | ७६४२४६ | ६४२ |
| | कुरुंदवाड ( थोरली पाती | १८५ | ४४२०४ | २१७७५ | |
| | कुरुंदवाड ( धाकटी पाती | ११६ | ३९५८३ | १८४९६ | |
| | मिरज ( थोरली पाती ) | ३४३ | ९३९३८ | ५६३६७ | ४४ |
| | मिरज ( धाकटी पाती ) | २११ | ४०६८४ | २१३३८ | |
| | सांगली | ११११ | २५८४४२ | १३६०८४ | ८९ |
| | जत | ९८१ | ९१०९९ | ४८४८७ | १ |
| | वासदें | २१५ | ४८८३९ | २६७०९ | |
| | मुरगोंड | ३६० | १५२४५ | १५०७३ | |
| मध्य प्रा. जिल्हे | वर्धा | २४३४ | ५१६२६६ | ४००१३१ | |
| | नागपूर | ३८३४ | ९४००४९ | ७१२५३३ | |
| | चांदा | ९३१२ | ७५९६९५ | ५४८०११ | |
| | भंडारा | ३६२३ | ८२४४९६ | ६१०१४० | |
| वऱ्हाड जिल्हे | उमरावती | ४६९१ | ९४१६०४ | ७२१५२८ | |
| | अकोला | ४०९१ | ८७६३६२ | ७०७५४९ | |
| | बुल्ढाणा | ३७६६ | ७६६५८४ | ६४७०९८ | |
| | यवतमाळ | ५२१९ | ८५७२८८ | ५९६१०० | |
| निजाम जिल्हे | औरंगाबाद | ६२१२ | ९४४७९३ | ७४०६१४ | |
| | बीड | ४१३२ | ६३३६९० | ५५३६४२ | |
| | नांदेड | ३७७१ | ७२३०८१ | ४५०६२१ | |
| | परभणी | ५१२५ | ८५३७६० | ७०८७२० | |
| | गुल्बुर्गा | ६९७५ | १२२५००८ | ११८९५० | |
| | उस्मानाबाद | ३५२६ | ६९१०६८ | ५४६७४९ | |
| | बेदर | ४८२५ | ८७३६१५ | ३२७५३८ | |

॥ श्री ॥

# महाराष्ट्र शब्दकोश

## विभाग तिसरा

## ग

**ग**—व्यंजनमालेंतील तिसरें व्यंजन अक्षरविकास—या वर्णा च्या चार अवस्था असून त्यांपैकीं पहिली काकपदाकृति अशोक कालीन, अर्धवर्तुळाकार दुसरी व तिसरी इ स पहिल्या-दुसऱ्या शतकांतील व चवथी जपानी मठांतल्या ताडपत्रावरची, ६ व्या शतकांतली पुढें दोन शतकानंतर आजचा 'ग' तयार झाला —ओझा (सांकेतिक) गर्व, अहंमन्यता, वृथाभिमान गर्व शब्दाचा संक्षेप 'विद्यापर्वताची चढण अगोदर कठीण, त्यांत पायथ्या पासून 'ग' महाराज पाठुंगळीस चिकटल्यावर मोठा खंबीर चढणारा असला तरी त्याची किती मजल होणार?' **गची बाधा-पीडा**—स्त्री गर्वाचा ताठा, गर्व (क्रि० होणें) 'श्रीची प्राप्ति झाली म्हणजे ग ची बाधा व्हावयाचीच'—गुप्तमंजूष 'त्याला अलीकडे गची पीडा फार झाली आहे'

**ग**—वि (समासांत) १—नें गमन करणारा, जाणारा, जसें—उरग=उरानें, पोटानें जाणारा, सरपटणारा. २ पोहोंचला आहे, दाखल झाला आहे असा, समाविष्ट, अधिष्ठित, अंतर्वर्ती, जसें—भूमिग, बुद्धिग, खग, जलग [स गम्—ग]

**ग**—उद्गा गे! अग-गे! (यांत लडिवाळपणाचा, सहानु भूतीचा ध्वनि निघतो) 'आई तूं किती ग वेडी आहेस?' —रजपुतकुमारी तारा ७६ [अग]

**गइवती-त्या, गइवी**—गै पहा

**गइमेढकें**—न गईचा खांब [गई+मेढकें]

**गइ(ई)सर-रा**—पु गइमेढक्यावरील आडवा लांब वासा [गई+सर]

**गई**—स्त्री १ (अपराधाबद्दल) गय, सद्यतेचा काणाडोळा, माफी, क्षमा २ उपेक्षा, दुर्लक्ष, हयगय 'नका गई करूं आई काल ज्या कानीं।'—तुगा २९२ [स गत, हिं गया, गई=झाले]

**गई**—स्त्री १ खालचा इदकट, गईसरा, घराचे पाख्याचे शेवटीं आश्रयार्थ उभारलेल्या मेढीवर आडवें लाकूड घालतात तें (गा) माळ्याला जोडलेले फटि घराच्या चाऱ्ही भिंतीवरील ज्या तुळईवर ठेवण्यांत येतात ती तुळई २ तिच्या जवळची छपराची जागा

**गई**—स्त्री (मावळी) गाय 'जनाई दासी गरिब बिचारी गई'—नामना ८८ [स गो, म गाय]

**गईगुदर**—स्त्री दिरंगाई, वेळ मारून नेणें, कळटळं, टाळा टाळ 'वजीर पैका द्यावयाची गईगुदर करितात'—रा ६ ६३२ [फा गाह्=वेळ+गुदरणें]

**गईगोळा**—पु (कों) पावसाळ्यांत गईसऱ्यास चिकटवून वाळविलेली गोवरी, शेणगोळा [गई+गोळा]

**गईब-प, गयब, गैब**—वि १ अदृश्य, हरवलेला, नाहींसा झालेला, गहाळ, मागमूस नसलेलें २ मृत, मेलेला 'राजा गईब जाहला'—सभासद ४२ [अर घैब्]

**गईर**—हा शब्द व त्याचे सामासिक शब्द गैर शब्दा खालीं पहा

**गउ**—स्त्री गाय 'दहा छिद्राचे एक चिटके। क्वचकोल ते पान ओमण निके। अगावरी घेतले हरिखे। चर्म कवतुके गउचे।'—नागेशलीलामृत [स गो]

**गऊबाई**—स्त्री काशीविश्वेश्वराची बहीण, ही फार सोवळी असल्यानें हिचें देऊळ गावाबाहेर आहे 'सोवळी गऊबाई'

**गऊळवाडा**—पु १ गवळी लोकांची आळी, पेठ, गुरांचा गोठा [गवळी+वाडा]

**गंगकड**—क्रिवि (व) दक्षिणेकडे

**गंगथड**—स्त्री गोदावरीच्या काठचा प्रदेश, किंवा तिचें तीर 'गंगथडीच्या ज्वारीची गोडी फारच उत्कृष्ट' (गोदाव रीला गंगा असेंहि नांव आहे) **गंगथडी**—वि गंगथडी देशा संबंधीं **गंगथड्या**—वि गोदातीरचा (माणूस) [स गंगातट]

**गगन**—न आकाश, अंतरिक्ष, नभ, आभाळ 'गगन मुठीं सुवावें। मशकें केवीं।' –ज्ञा १ ७४ 'सर्वत्र संपूर्ण गगन जैसा।' –तुगा २२०९ [स] (वाप्र) ०**कापणें, थरारणें**–आकाश दणाणणें, भयंकर कृत्य करणें (क्रूर व भयंकर पुरुषाचें वर्णन करितांना हें रूपक योजतात) ०**बावडा दाखविणें**–(कर) ताणणें, दमविणें (कोल्हापुर प्रांतात गगनबावडा गांव आहे) –**नांत भरणें**–आकाशांत भरारी मारणें 'दुसरा गरुड उपजता भरला गगनीं न मंदिरीं राहे।' –मोआदि ४ ३४ –**नाशीं गांठ बांधणें–लावणें**–(उंच वडणें) महत्कृत्य करणें, अचाट पराक्रम करणें –**नाशीं दिवस भांडणें**– १ उन्हाळ्यांत दिवस मोठा होणें २ दिवस कमी कमी होण्यास प्रारंभ होणें –**नाशीं भांडणें**–आकाशाशीं बरोबरी करणें (उंच वृक्ष किंवा गर्विष्ठ माणूस यासंबंधीं योजतात) –**नीची वीज कोसळणें**–आकाशाची कुऱ्हाड पडणें, भयंकर संकट येणें 'गगनींची वीज जाणों कोसळली त्यावर।' –विक २० –**नीं दिवा लावणें**–प्रख्यात होणें, पुष्कळ प्रसिद्धीस येणें म्ह० गगनासारखी मैत्री तिळा बरोबर नातें (बरोबर होत नाहीं) =इंद्राचा ऐरावत व शामभटाची तट्टाणी या अर्थीं सामाशब्द– ०ग–गगनसंचारी, आकाशांत उडणारा ०**गज**–पु ऐरावत, दिग्गज 'गगनगजाचे शुंडादंड। तैसे सरळ बाहुदंड।' –एरुस्व १ ४४ ०**गर्ती**–वि (गो) आकाशास पोहोंचेल अशी (राक्षसी) ०**गर्भ**–पु (काव्य) आकाशाची पोकळी, अंतराळ 'गगनगर्भीं न समाये सुख।' [स] ०**चक्र**–न मोठी वावटळ 'कीं गगनचक्र उठावलें अलोट।' –शिशु ९३१ ०**चुंबित चुंबी**–वि आकाशाला पोहोंचण्याइतकें उंच आकाशाशीं स्पर्धा करणारा 'गगनचुंबी वाढले वृक्ष।' 'पूर्णाहुतीची ज्वाळा। गगनचुंबित विशाळा।' ०**दीप**–पु सूर्य 'विदित नसे काय गगनदीपाला।' –मोआदि २२ ११ 'तो झाकिला गगनदीप तरी झळाळी।' –र २२ ०**प(पं)थ**–पु आकाशमार्ग ०**पुष्प–कुसुम**–न आकाशाचें फूल, खपुष्प, असंभाव्य किंवा असत् वस्तु दर्शविण्याची संज्ञा ०**मंडल**–न आकाशगोल किंवा पोकळी, आकाश ०**मणि**–पु सूर्य 'गगनमणिकरींच्या तम केव्हां तरि काय हो शिवे कमला।' –मोविराट १ १६ –**ना सारखा–एवढा**–वि पुष्कळ वाढलेला, लांबलेला, विस्तृत (दिवस, काम, खातें इ०)

**गगनगाठा**—पु रव्याचे केलेले व तुपांत तळलेले व वर साखर पेरलेले गांठे –मुदि १ ३९८

**गगनो(नौ)ल–ळ**—न आकाशपुष्प, खपुष्प 'तुरंगिती अश्वोसें। गगनौळें तिये।' –ज्ञा १६ ३६३ –अमृ ७ ८२ –एभा ३ ४५

**गंगमुखी**—वि गोदावरीकडे तोंड केलेलें म्हणजे (पुणें, सातारा यांच्या) उत्तरेकडील

**गंग(गा)मोहरा–री**—क्रिवि गोदावरीकडे, उत्तरेकडे (गोदा व कृष्णा यांमधील खालच्या लोकांत रूढ) याचप्रमाणें पुढील दिशावाचक शब्द रूढ आहेत राखेसमोहरा (राक्षसाच्या दिशेकडे)=दक्षिणेकडे खालीं– खालता– खलत्याकडे=पूर्वेकडे वर–वरता–वरत्याकडे=पश्चिमेकडे इ०

**गंगरणें**—अक्रि (कु) चढून जाणें, गर्व होणें [स ग–ग–गर्व ?]

**गंगा**—स्त्री १ गंगा (भागीरथी) नदी, तिचा दैवी अवतार (देवी), नदी देवता म्ह० लेंड नाले गंगेस मिळतां गंगा झाले २ गोदावरी नदी 'गंगातीरास येऊन रहावें' –ख २६२३ –पया १२ ३ (सामा) पवित्र नदी 'भयताली एक गंगा झुळझुळ वाहे।' –देप १८ ४ पवित्र कार्याकरितां घेतलेलें पवित्र नदी, झरा, कुंड यांतील पाणी [स] (वाप्र) ०**घेणें, उचलणें**–गंगेची शपथ घेणें ०**मनाला घालणें**–(कऱ्हाड) मन निर्मळ करणें, रुसरुस घालवून टाकणें, केलेला अपराध कबूल करून विवेकाची टोंचणी दूर करणें ०**यमुना वाहणें**–रडें येणें, डोळ्यांतून पाणी येणें (दोन्ही डोळ्यांतील अश्रुधारा वाहून गंगायमुना नद्यांप्रमाणें एकत्र मिळतात यावरून) (**आळशावर**) **गंगा लोटणें**–आपोआप फायदा होण्याची संधि येणें (**वाहते**) **गंगेत हात धुणें**–दुसरा मनुष्य एखादें पुण्यकृत्य करीत असतां त्यास थोडासा हातभार लावून त्याच्या पुण्यांत वांटेकरी होणें, कोणाचें नुकसान न करतां सहजगत्या होण्यासारखा आपला फायदा करून घेणें **गंगेतील पाणी गंगेत सोडणें**–उपकार फेडतांना नम्रपणें योजावयाचा वाक्प्रचार **गंगेस(त) घोडे न्हाणें**–आरंभिलेलें महत्कृत्य शेवटास जाणें, भगीरथ प्रयत्न करून कृतकृत्य होणें (महाराष्ट्रांतील घोड्यांना, पेशव्यांनीं गंगेच्या म्हणजे भागीरथीच्या आसपासचा प्रांत जिंकून तिचें पाणी पाजलें व मराठी साम्राज्य स्थापिलें यावरून) 'एकदाचा हा कोश संपविला म्हणजे गंगेस घोडे न्हायले' –शाको म्ह० १ वाहिली ती गंगा राहिलें तें तीर्थ, वाहती गंगा आणि चालता धर्म=सढळ हातानें व औदार्यानें केलेला खर्च (कारण खर्च झालेल्या व शिलक टाकलेल्या दोन्ही हि पैशापासून फायदाच होणार) (अ) गंगास्नान व तुंगापान=गंगेस घोडे न्हाणें (मराठ्यांनीं उत्तरेकडे भागीरथी व दक्षिणेकडे तुंगभद्रा यांमध्यें साम्राज्य स्थापिलें त्यावरून) (आ) संन्यासी मतानें राहणें (गंगेचें स्नान व तुंगा नदीचें पाणी पिणें), कोठेंहि खाणें–पिणें व रहाणें सामाशब्द– ०**गोत**–न ग्रामपंचायत, जातगंगा (वादाच्या निकालासाठीं जमलेली) ०**जमनी–जम्नी**–वि १ ज्याचा एका बाजूचा कांठ एका रंगाचा व दुसरा दुसऱ्या रंगाचा असतो असें (धोतर इ०) २ भिन्न व विसदृश वस्तूंचा समागम किंवा संयोग, मिश्र, संकरज 'परस्पर विरोधी

असे-इमजो मराठी विचार एकत्र करून गंगाजमनी पुस्तक करण्या पेक्षा नवीनच पुस्तक लिहिणें बरें ' -विकारविलसित [ हिं गंगा+जमना=यमुना] ०जल-जलस्पर्श-जलशपथ-नपुसी गंगेची शपथ घेणें, गंगेचें पाणी हातांत घेऊन शपथ घेणें (शपथेचा एक प्रकार ) ०जळी-स्त्री १ गंगा किंवा दुसऱ्या पवित्र नदीचें पाणी ठेवण्याचें पात्र २ मोठा खजिना, कायम शिलकीचा खजिना, ज्या शिलकीला कधीं हात लावावयाचा नाहीं ती शिल्लक ( शिंदे सरकारच्या खजिन्याला गंगाजळी असें नाव आहे ) 'पैशानें गच्च भरलेली गंगाजळी हातीं लागली ' -सभाजी ३ चलनी नोटा वटविण्याकरिता वेळेवर उपयोगी पडावा म्हणून ठेवलेला रोकड किंवा सोनें याचा साठा ०तीर-न गोदावरीच्या कांठचा प्रदेश, गंगथडी ०तिया-वि गंगथडया पहा ०द्वार-न १ त्र्यंबक गावीं असलेलें गंगा प्रगट होण्याचें ठिकाण, गोदावरीचें उगमस्थान 'गंगाद्वारे कुशावर्ते' २ हरिद्वार ( या ठिकाणीं गंगा हिमालयावरून प्रथम सपाट प्रदेशावर खालीं उतरली आहे ) ०पाट-ठ-पु घोड्याच्या छातीवरील लांब केसांची गोम ही शुभ मानितात हिचीं कांहीं लक्षणें वाईट असतात -मोल ०पुत्र-पु ( गंगेमुळें यांची उपजीविका होते म्हणून ) १ काशी क्षेत्रांतील पंड्या, गंगेवरचा अधिकारी ब्राह्मण २ एक हलकी ब्राह्मण जात हे आपणाला कनोजी म्हणवितात गंगातीरावर पंड्येगिरी किंवा शेतकी करून राहतात ०पूजन-न १ काशीयात्रा करून गावीं आल्यावर बरोबर आणिलेल्या गंगेचें पूजन करून तें तीर्थ आप्तष्टांना देण्याचा विधि २ सिंहस्थ-कन्यागतांत श्राद्धविधी नंतर गोदावरी-कृष्णा नदीचें केलेलें पूजन ०प्रदक्षिणा-स्त्री त्र्यंबकेश्वरीं गोदावरीस उजवी घातलेली प्रदक्षिणा, गोदावरी प्रद क्षिणा ०प्रवाह-पु १ गंगेच्या ओघांत सोडणें ( मृताच्या अस्थी, राख, किंवा देवावरचा निर्माल्य ) २ गंगेचा प्रवाह ओघ ०भागीरथी-स्त्री वयस्क विधवा स्त्रीस लिहिण्याचा माय ना, याच्या उलट सौभाग्यवती ०भेट-स्त्री तीर्थक्षेत्रीं गेल्यावर तेथील तीर्थाचें प्रथम दर्शन घेण्याचा विधि ०माती, मृत्तिका -स्त्री गोपीचंदनासारखी, गंगाकांठची पांढरी माती ०माहात्म्य -न गंगेच्या स्तुतिपर कविता, गंगाप्रशस्तिकाव्य ०वती-स्त्री निरगुडी वनस्पती 'म्हणोनि बोलज ही गंगावती। तरी स्वीकाराल कीं।' -ज्ञा ९ १४ ०वळ-पु गयावळ पहा ०सागर-पु गंगेचें ( समुद्राशीं जेथें संगम झाला तेथील ) मुख ०सागर संगम-पु गंगा ज्या ठिकाणीं सागराला मिळते तें ठिकाण ०सागरी-वि रंगीत( काळें, तांबडें )कांठी, कांठाचें ( धोतर, पातळ इ० ) गंगोत्री-स्त्री १ गंगेचें उगमस्थान हें गढवाल संस्थानांत आहे २ वीत, दीडवीत उंचीचें व तांबूस फुलांचें एक झुडूप ताप आला असतां याचा रस अंगास चोळतात -खेया ४४ [ गंगा+उतरणें ] गंगोत्साह-पु गंगेच्या आराधनेसाठीं पुराण, कीर्तन, ब्राह्मणभोजन इ० करणें, उत्सव करणें, गंगेचा उत्सव [ स गंगा+उत्साह=उत्सव ] गंगोदक-न गंगेचें किंवा पवित्र तीर्थाचें पाणी, तीर्थ [ स ]

गंगावन-न तातरी किंवा नेपाळ देशांतील वनगायीच्या शेपटीचे काळे केंस, स्त्रियांचे केंस थोडे असल्यास वेणी घालतांना हे त्यांत मिसळवितात, कृत्रिम केश ( अलीकडे अबाड्याची चाल पडल्यामुळें गंगावन मागें पडलें ) ०वनी संडका-स्त्रीअव (बडोदें) हत्तीच्या कानांपासून पायापर्यंत लोंबणाऱ्या लांब माळा. -खानगीखातें, सामानासंबंधी लागतीचे नियम ५५

गंगाळ-न घंगाळ, अर्धगोलाकार, स्नानाचें किंवा धुण्याचें, पाणी ठेवण्याचें धातुपात्र याला धरण्यासाठीं कड्या असतात [ स गंगालय ] ०पोतें न फाजील पोकळ व मोठा अंगरखा, झकळ, ऐसपैस अंगवस्त्र इ० गंगाळें टोपलें-न गंगाळाच्या आकाराचें टोपलें

गंगेरी-पान-न विड्याच्या पानांची एक जात, हीं पानें काळसर असतात 'तबकीं भरोन गंगेरी पानें।' -नव २० १०१. [ गंगातीर ]

गच-वि घट्ट, गच्च पहा -पु भावळून राहिलेला जमाव, वस्तु 'आम्ही जागा पाहून तोफा सुरू मोगलाच्या गचावर फौजेच्या केल्या ' -पेद ११.

गच-पु ठोका, टोल 'काळोखी रात्र अंधारी दुसरे प्रहरीं। वाजतो गच अखाराचा राजदरबारीं।' -होला ९५ [ ध्व ]

गच-कन-कर-दिशी-क्रिवि मऊ वस्तूमध्यें दुसरा पदार्थ शिरतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें, गच असा शब्द होऊन ( घशांत पाणी येणें, चिखलांत पाय जाणें इ० ) 'गचकन तीर मारला-भाला भोसकला-पोटांत खोंचला, गचकन पाय चिखलांत शिरला-गेला-रुतला-भरला '

गचका-पु ( व ) गाडीरस्त्यावरील खड्डा [ ध्व गच ]

गचका-स्त्री १ विपुलता, गर्दी २ चैनबाजी, चगळ, ऐषा राम -क्रिवि १ विपुलतेनें, दाटीनें, चेंगराचेंगरीनें, रगडून, ठचकावून भरपूर ( पाऊस पीक, पैका, चांगल्या वस्तू ), २ प्रशस्तपणें, वेलाशक, निर्धोक ( मेजवानी, धुमाळी )

गचकणी-स्त्री १ हिसका, झटका २ गचकी पहा [गचकणें]

गचकणें-अक्रि १ हिसका बसणें, आचकणें, हबकणें, आचका बसणें ( खळग्यांत किंवा पुरता न टेकलेल्या दगडावर अवचित पाय पडून ) २ ( ल ) मरणें, गचणें [ गचका ]

गचकवणें-क्रि ( वे ) मारणें

गचकळणें-अक्रि १ गचका खाणें ( व्यापारात निभाव न लागल्यानें ) २ नदी इ० मध्यें नाकातोंडात पाणी जाऊन धावरें

होऊन खालींवर होणें ३ ( ल ) हालअपेष्टांनीं झगडणें, सङ्कटांत रितपत राहणें [ गचकळी ]

**गचकळी, गचंगळी**—स्त्री १ गटंगळी, डुबकी (बुडत्या माणसाची) २ ( ल ) निकराचा झगडा, प्रयत्न, सर्व प्रकारें खट पट, धडपड ३ आरंभिलेल्या कार्यांत भयादिकामुळें कुंठित होण्याची अवस्था ०ळ्या खाणें–अडखळत, चाचरत बोलणें घाचणें ' तो बोलण्यांत गचकळ्या खातो ' [ ध्व ]

**गचका**—पु १ अकस्मात् बसणारा हिसका, झटका, धक्का आंचका २ ( ल ) खड्डा, दगड इ० हिसका बसण्याची जागा (ज्यामुळें आचका बसतो अशी) 'तो तेथें गचका आहे बरें, तेथून गाडी सांभाळून ने ' ३ ( ल ) दुर्दैवाचा घाला, तडाखा, ठोकर, व्यवहारांतील तोटा ४ ( ल ) फांस, जाळें, चोरखळी, सांपळा, खड्डा ५ एखाद्या लेखांतील दुर्बोध स्थळ, मेख, कोडें ६ मऊ व आवाज होणाऱ्या पदार्थांत मारलेला गुद्दा, ठोसा [ध्व गच्]

**गचकी**—स्त्री १ गचका अर्थ १, २, ४ पहा २ बारीक लहान ठेंकर किंवा उचकी ( क्रि० देणें ) [ गचका ]

**गचक्या**—वि खांचखळग्याचा, विषम, सपाट नसणारा ०उतार–पु खाचखळगे, चढउतार, गचगचीत असा नदीचा उतार, उताऱ्यास गच ! गच ! आचके बसविणारा उतार 'कर्णोल येथें यमुनेस गचक्या उतार होता ' –भाव १२४

**गचगच**—स्त्री १ चिखलांत होणारा वस्तूचा आवाज २ ( ल ) रेंदाड, चिखल ३ ढिलाई ४ भडगळ, गळाटा, गचपण पहा ' न कळतां करीं कार्य जें तें। तें काम तत्काळचि होतें। गचगचेंत पडतां तें। चमत्कारें नव्हे ॥ ' –दा १९ ९ १३

**गचगच-चा**—क्रिवि उतावीळपणानें, खातांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन, मचामचा (क्रि० खाणें, जेवणें)

**गचगचीत**—वि १ गजगजीत, रवरवीत, बुळबुळीत, चिकण ( चिखल ) २ ( ल ) भरपूर विपुल रगड, दाट (पीक, पैसा, आयात जिनस, मेजवानी, उधळपट्टी ) ३ गजबजीत तत्पर, चूर, उद्योगी, कामसू गोंगाटाचें (गाव, घर) ( गचगचीत व गजगजीत यांत भेद एवढाच कीं पहिल्याचा अर्थ रेटारेटी, चेंगराचेंगरी असा होतो तर दुसऱ्याचा गोंगाट, बजबज, भरलेला आवाज असा होतो) [ ध्व गच् ! ]

**गचगिरी**—स्त्री १ चुनेगच्ची २ चुनेगच्चीची क्रिया, चुने गच्ची करणें [ फा गच=चुना, सिमेंट, गच्ची ]

**गचणें**—अक्रि ( चिखल इ० ) मऊ पदार्थांत रुतणें, गचकणें पहा [ ध्व गच ]

**गचदा, गचादा, गचांद , गचदी, गचादी, गचोंदी**—स्त्री १ हिसका धक्का, धांचका (सजीव प्राण्यास बसलला) (क्रि० देणें; मारणें) २ गचांडी पहा [ गच ]

**गचपच**—स्त्री रेंदा, चिखल, राड गच–कण पहा

**गचपण**—न १ कचरा, पडसड, गळाटा, अडगळ २ पसा ऱ्याची किंवा अडगळीची स्थिति ३ गवत, लव्हाळा इ० रानटी झाडें उगविलेली जागा, ऐतण, ऐचण

**गचमुट्टी**—स्त्री ( गो ) चिकार गर्दी

**गचा**—पु दाटी, गर्दी, समुदाय [गच] ०ड–न १ (को ) झाडें, गवत इ० चें दाट रान २ निबिडपणा, घनता, अभेद्यता ( अरण्य, झाडीझुडप याची ) –वि ( व ) पुष्कळ, भरपूर ०बोच–क्रिवि दाटीनें, गर्दीनें, रेटून [ ध्व ] ०बोची–स्त्री खेंचाखेंच, चेंगराचेंगरी, फार दाटी [ ध्व ]

**गचागच-चां**—क्रिवि १ ढसाढसा, मटामटां, गटागटां (क्रि० पिणें, खाणें, गिळणें). उतावीळपणें गिळतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें २ झोंपेची झापड येण्याच्या स्थितीप्रमाणें ' गचागच झोंप येती किंवा डोळे झांकतात ' ३ गच–कण–कन पहा ( मात्र एकसारखी क्रिया असतांना योजना) [ ध्व गच ]

**गचाच**—क्रिवि गच–कण–कन पहा ( मात्र उत्कटपणा, अतिशयितता असतांना वापरतात )

**गचाटी, गचांडी, गचोडी, गचोरा**—स्त्रीपु हाताचा पंजा मानेवर टेंकून दिलेला धक्का, अर्धचंद्र (क्रि० देणें, मारणें) २ ( धरण्याच्या वेळीं ) मान, गळा (क्रि० धरणें) 'शिवराम्या, गचांडी सोडून माझे छातीवरून ऊठ ' बाळ–२ १४४ [गचा=गळा]

**गचापिची**—स्त्री ( व ) एकमेकाची गच्ची ( मानगुटी ) पिचेपर्यंत झालेलें भांडण [ गचा+पिचणें ]

**गचाबोचा**—पु. मान व ढुंगण, फरा व ढुंगण (जनावराचें) [ गचा=गर्दन, गळा+बोचा=ढुंगण, ढुंदार ] ०एक असणें–( निंदार्थी ) फार लठ्ठ असणें, गब्दुल होणें ( अतिशय लठ्ठ बैल, थलथलीत किंवा पुष्ट माणूस यासंबंधीं वापरतात) मिष्टान्न खाव याला मिळतें मग त्याचा गचाबोचा एक होईल तर काय झालें. '

**गचावणी**—स्त्री गटंगळी गचकळी [ गचावणें ]

**गचावणें**—अक्रि १ गचकळणें, गटंगळ्या खाणें, खालीं–वर बुचकळ्या खाणें (बुडणाऱ्या माणसानें) २ उद्योगधंद्यांत खूड लागणें ३ अडखळणें, बोबडी वळणें धैर्य सुटणें ४ खुंटणें, खूट पडणें ५ ( कु ) मरणें [ राच ]

**गचा(च्या)ळी–ळ्या, गचाळखोर**—वि १ गप्पीदास, बकबक करणारा, चेष्टेखोर, वाचाळ २ गबाळ, भोंगळ, गंदी, अव्यवस्थित ( माणूस, वर्तणूक, कृत्य ) ३ वेमळट [ फा गयाळ=अव्यवस्थित, ध्व गच ! ]

**गचाळकी गचाळी, गचाळचाळे**—स्त्रीपुअव १ गप्पा टप्पा निरर्थक सांगणें किंवा बोलणें २ गचाळपणा, वाईट, घाणे रडे चाळे

**गची-चि**—स्त्री. १ (गो.) गळा; मान. 'तो गचिये धरूनि मागारा। आंतु घाली।' –ज्ञा ६.२३६. २ गचांडी; अर्धचंद्र 'म्हणे आतां यासि गचि देउन दवडा।' –पंच ४.४.

**गचेंडा**—वि. (कों.) मोठा; धडाकडा; दांडगा; गबदुल; स्थूलदेह.

**गचोटा**—पु. (माण.) (गालाला घेतलेला) चिमटा. (क्रि० घेणें).[ गच्चा ]

**गचोरा**—पु. धान्याचीं कणसें निसवणें; कणसें येणें. 'जोंधळे गचोऱ्यास आले.' [ गच्चा=कणीस ]

**गचोरा**—पु. मुठीनें मारलेला गुद्दा, ठोसा, धक्का. [ गच ]

**गच्च**—क्रिवि. ताणून; घट्ट; आवळून; मजबुतीनें; बळकट; खेटून; दाटीनें; खच्चून; ठेचून (बांधणें, आवळणें, कोंडणें इ०). –वि. १ आवळ; घट्ट (गांठ, पदार्थ इ०). २ निबिड; घन (दाटी, झाडी). 'या गावाला गच्च झाडी आहे.' [ धं. हिं. गच; ध्व. गच ]

**गच्च**—पु. १ चुना. 'स्वल्पमात्र दरज असेल तरी गच्च लावून पाक्षर न फुटे असें करावें.' –मराआ ३२. २ चुनेगच्ची. 'तळघरांत गच्च करावा.' –मराआ ३२. [ फा. गच्; हिं. गच; का. गच्ची–च्चु=चुना ]

**गच्चा**—पु १ (नाशिक) चांगलें भरदार कणीस (धान्याचें) २ भरगच्च कणीस असण्याची स्थिति. 'शेताचे गच्चे बाहेर पडले.' 'बाजरीनें गच्चा धरला.' ३ (निदार्थी) लठ्ठ, फुगीर गाल, गालांचा फुगीरपणा. 'गालांचे गच्चे फुगले–धरले–बसले–तोडले.' [ गच्च ]

**गच्चा**—पु. (व.) मध्य; मधला भाग.

**गच्चागुच्चा**—पु. कां कूं करणें; अळंटळं. (क्रि० खाणें; घेणें; लावणें). –क्रिवि. अडखळत; अळंटळं करीत; चांचरत. (क्रि० बोलणें; करणें). [ ध्व. गच ]

**गच्ची**—स्त्री. चुन्याची केलेली भुई; आगाशी; चुना बसवून केलेली जमीन. गच्च पहा [ फा. गच ]

**गच्ची**—स्त्री. गर्दी, चेंगराचेंगरी; दामटी वळण्याची स्थिति. [ गच ]

**गच्ची**—स्त्री. (नाविक) डोलकाठीस आडवी टांगलेली काठी सुरक्षित ठेवण्यासाठीं वापरलेले बंद आणि दांताळीं.

**गच्ची**—स्त्री. मानेस दिलेली ढोसणी; गचांडी; गचांडी देण्याच्या वेळची मान; मानेचा कांटा; नरडी; मानगुटी. 'तुझ्या गच्चीवर भूत बसेल.'

**गच्ची**—स्त्री. (निदार्थी) गाल; गालफड (चिमटा घेणें, चिडणें, चपराक देणें इ० वेळीं वापरतात). 'गच्ची दाबून–धरली–फोडली–मुरगाळली–दुखवली–सुजली–फुगली.'

**गच्चू**—पु. (कर.) टाळा; नकार; टुकालपट्टी. टच्चू पहा. 'अभ्यासाला आज गच्चू दिलास पण परिणाम चांगला होणार नाहीं.' [ ध्व. ]

**गच्छ**—पु. गणित किंवा भूमितिश्रेणींतील पदसंख्या. –छअं १६३. [ सं. ]

**गच्छ**—पु. १ समुदाय; संघात. २ जैनांतील पंथ, शाखा. उदा० तपागच्छ. [ सं. ]

**गच्छ, गच्छंती, गच्छंतीचें**—स्त्रीन. गमन; दूर पळणें; पळ; तोंड काळें करणें; काढता पाय घेणें. (क्रि० करणें; म्हणणें). 'केलें गच्छ माहरूद बयातिल पद्मीत।' –ऐपो ३९७. 'तो आला आला इतकें ऐकतांच त्यानें गच्छंती केली.' [ सं. गम्–गच्छ ]

**गच्छणें**—अक्रि. (क.) जाणें. (भूतकाळीं प्रयोग). 'ऐशीं तो कठिणोत्तरें वदुनियां मातेसवें गच्छला।' –वस्वलिंग, गजगौरीव्रत १६. 'वीर गच्छले सैन्य घेउनी।' –लवकुशाख्यान.

**गच्छंती**—स्त्री. १ समाप्ति, नाश; मृत्यु. 'इंग्लंडांत तर दोघांची गच्छंती झाल्याचें वर्तमान सुद्धां पत्रांतून जाहीर झालें होतें.' –नि ७३१. (क्रि० करणें; होणें). २ पराभव; सामर्थ्यभंग.

**गज**—पु. १ लोखंडी सळई किंवा तिचा लांब तुकडा. (जाळी, खिडकी, कटडा यांतील). 'खिडकीचे गज वांकविले.' २ (पाणरहाट) पोहऱ्याच्या काठाशीं बसविलेला लोखंडी तुकडा. ३ बंदुकींत दारू ठासण्याची लोखंडी सळई. ४ (विणकाम) वशारन्यांच्या गांठी देतांना तंग ठेवणारी लोखंडी ३।४ हात लांबीची गोल सळई ५ सारंगी इ० तंतुवाद्यें वाजविण्यास वांकविलेल्या लांकडी काठीस दोन्ही टोंकांस घोड्याचे केस बांधून तयार केलेली धनुकली. ६ लांबीचें एक परिमाण; चोवीस तसु किंवा दोन फूट लांबीचें कापड मोजण्याचें लोखंडी किंवा लांकडी पट्टीचें एक माप, वार (सरासरी तीन फूट). कापड मापण्याचें साधन (इंग्रजी यार्डाबरोबर याचें प्रमाण धरितात). ७ वरील मापाच्या लांबीची पट्टी. 'त्यास तट, गजाप्रमाणें नेमून द्यावे.' –चित्रगुम ३५ ८ वरील मापानें मापलेलें परिमाण (कापड इ०चें); गजानें परिमित वस्त्रादि पदार्थ. ९ तळें, विहीर यांची पाळ, वरवडी, कांठ १० प्रमाण, सामर्थ्य, शक्ति ११ विहीर इ० कांचे बंदिस्तीस, गजाचें प्रमाण भरलें असतां जें चिन्ह दाखवितात त्या चिन्हापर्यंतचें बंदिस्तीचें अंग, काम. 'रात्रीच्या पावसानें विहिरीचा एक गज बुडाला' [ फा. गज़् ] ०पुटी–वि. गजपुटानें सिद्ध केलेलें (औषध). ०पुट–ठ–न. औषध तयार करण्याची क्रिया. एक गज औरसचौरस व खोल खळगा खणून, त्यांत गोंवऱ्या, वकरीच्या लेंड्या इ० जळण खालींवर घालून त्यामध्यें रसायन किंवा औषधी द्रव्यें ठेवून त्यांस केलेला अग्निसंस्कार. (क्रि० देणें;

करणें) [गज=एक माप+पूट] ०मोंगळी-स्त्री उपराच्या मोठ्या पानाच्या वर चार घोटें उचीच्या खिट्या मारून त्यावर बसविलेला लोखडी लांब तुकडा (कौलें खालीं घसरू नयेत म्हणून), (दोन खिट्यांतील अतर साधारण ५ पन्हाळींचें) ०मोजणी स्त्री जमीन गजानें मोजण्याची पद्धति, जमीन मोजणी (जमीन मोजणीचा गज निरनिराळ्या लांबीचा असे २९ ते ३५ इंचा पर्यंत तो असे साधारणत ३३ इंचाचा गज सरकारी मोजणींत धरला जाई) ०वार-गजानें मोजून दिलेलें 'वाटिलें ठाणकुणाला गजवार' -ऐपो २००

गज—पु हत्ती [स] सामाशब्द- ०कर्णी-वि हत्तीप्रमाणें कान असलेला ०कुंभ-न हत्तीचें गंडस्थळ 'स्वगातें गजकुंभ भेदुनि जी सत्कीर्ति ही धाडिली।'-वैराग्यशतक, श्लोक ४३ ०कौंत-पु १ हत्तीचें गंडस्थळ (?) 'सावळी झेलिती। गजकौंती गुसळिती।'-शिशु १०४५ २ हत्तीला टोंचण्याचा भाला [गज+स कुंत, म कोंत=भाला] ०क्रीडित(करण)-न (नृत्य) हात अंचित करून कमरेवर ठेवणें, उजवा हात लताहस्त करणें, उजवा पाय दोलित करणें [स] ०गति-स्त्री (हत्तीची चाल) गंभीर व दबाबदार चाल, डौलदार गति, चालणें, डुमकत जाणें, ऐश्वर्यवान ठमका, तोरा 'गजगती जगतीप्रति दाविते।'-वामन, सीतास्वयंवर ५९ 'डुमकत मुरडत चाले गजगतीं।'-शाकुंतल -वि दबावदार चालीचा, गजगतीनें विशिष्ट [स] ०गमा-गामिनी-स्त्री गज गतीनें, ऐटीनें चालणारी स्त्री, गजगति स्त्री [स] ०गौर-री-स्त्री हत्तीवर ठेवून पुजिलेली पार्वतीची मूर्ति गजारूढ गौरी ०गौरीव्रत-न १ भाद्रपदांतील स्त्रियांचें एक व्रत, हस्तनक्षत्रीं सूर्यप्रवेश होण्याच्या वेळचें व्रत यात सोन्याच्या शंकर, पार्वती व गणपती यांच्या मूर्ती करून त्या सोन्याच्या हत्तीवर बसवून ब्राह्मणास दान देतात २ हत्तीवर बसविलेल्या पार्वतीचें पूजन ०घंटा-स्त्री हत्तींचा कळप समुदाय 'जैसें न गणिजे पचाननें। गजघटांतें।' -ज्ञा १ ९२ [स घटा=कळप] ०घंटा-घाट-स्त्री १ हत्तीच्या गळ्यांतील घाट २ (ल) वाचाट कर्कश कजाग स्त्री, (विशेषत) मोठ्यानें भाषण करणारी स्त्री ३ गुप्त गोष्ट फोडणारा मनुष्य ज्याच्या पोटांत काहीं रहात नाहीं असा [तुल० का गज्जे=घंटा] ०चर्म-न १ हत्तीचें कातडें २ घोड्याचा एक रोग, यांत अंग वारंवार झाडणें, अंगावर चट्टे पडणें व हत्तीच्या अंगाप्रमाणें अंग खरखरीत होणें ही लक्षणें होतात -अश्वप १ २५२ ०छाया-छायापर्व-स्त्रीन भाद्रपदी अमावास्येला सूर्य व चंद्र हस्तनक्षत्रीं येणें, अशा योगाची पर्वणी, हस्तनक्षत्रीं सूर्य असतां मघानक्षत्रयुक्त त्रयोदशी येणें या योगासहि गजच्छायापर्व म्हणतात ०झंपा-पु (ताल) एकताल, याच्या मात्रा पधरा व विभाग चार असतात ०ढाल-ला-ळा-स्त्री हत्तीवरील मोठा ध्वज, निशाण 'गजढाला ओढोळती।' -जै ६७ ४८ -पु निशाणाचा हत्ती 'लाविला गजढाळा।' -ऐपो १४ [ढाल=निशाण] ०दंत-पु १ (हत्तीचा दांत) हस्तिदंत २ घोड्याचा हत्तीसारखा बाहेर आलेला दांत, सुळा, असा घोडा (हा अशुभकारक मानितात) -अश्वप १ १०५ ३ (संयुक्तहस्त) (नृत्य) डाव्या हतक्या सरळ रेषेंत दोन्ही हातांची कोंपरें उंच करणें व डोक्याच्या प्रत्येक बाजूस हातांची बोटें एकमेकांस चिकटवून उंच करून त्यांस थोडा खळगा पाडणें गजदर-वि गजेंदर, गजेंद्र पहा गज०नख-न हत्तीच्या पायाचें नख (हें औषधी असतें) ०नेत्र-त्री-वि १ हत्तीच्या डोळ्याप्रमाणें डोळे असणारा, बारीक, मिचमिच्या डोळ्यांचा २ अधु दृष्टीचा, उलट्या बाहुल्या असलेला ०पति-पु १ हत्तींचा धनी, हत्ती बाळगणारा ऐश्वर्यवान माणूस २ गजदळाचा सेनापति ३ (विनोदार्थी) धोतराऐवजी गजा (पंचा) नसलेला ४ ऐरावत 'कां मांडुरी लोकांचा घोडा। गजपतिही मानी थोडा।' -ज्ञा १६ २२५ ५ ओरिसा येथील राजांचें बिरुद ०पिंपळी-स्त्री १ एक औषधी झाड; मिरवेल २ मिरवेलीवर आलेल्या शेंगा (औषधी) ०भार-पु गजदळाचा समावेश असलेलें सैन्य २ हत्तींचा कळप, झुंड ०मस्तकारूढ-वि १ हत्तीच्या गंडस्थळावर बसलेला २ (ल) अतिशय गर्विष्ठ, मगरूर ०मुख-न हत्तीचें तोंड -पु गणपती देवता 'नमिला गजमुख ज्याचें सेवुनि मृदु मधुर बोल कानाहीं।'-मोस्फुटआर्या (नवनीत पृ २५४) ०मृत्तिका-स्त्री (एका विशिष्ट अनुष्ठानांत लागणारी) हत्तीच्या पायाखालची माती मृत्तिका पहा ०राज-पु मोठा हत्ती, हत्तीला बहुमानानें म्हणतात 'घेतोचि घास गजराज कशी बढाई॥' ०वदन-पु गणपती देव ०वेल-स्त्री तांदुळाची एक जात ०श्रद्धा-स्त्री प्रारंभीं मोठा डौल किंवा गाजावाजा दाखविणारें पण परिणामीं अगदींच क्षुद्र ठरणारें काम किंवा त्याचा प्रकार भपकेदार व विस्तृत पण निरर्थक काम, डोंगर पोखरून उंदीर काढणें 'हा या प्रयोजनीं हजार रुपये खर्च करील असा डौल दिसतो खरा परंतु शेवटीं गजश्रद्धा झाली नाहीं म्हणजे पुरे।' [गज+श्रद्धा] ०सिंहासन-न हत्तीच्या आकाराचें आसन ०स्कंधीं बसणें-नवीन मिळालेल्या वैभवांत पहिली ओळख विसरणें, गर्वानें फुगणें, आढ्यताखोर होणें ०स्नान-न (हत्तीस स्नान घातल्यावर किंवा त्यानें स्वत सोंडेनें स्नान केल्यावर तो आपल्या अंगावर पुन्हा धूळ, चिखल उडवितो त्यावरून) निष्फळ प्रयत्न, विपरीत फळ मिळालेला प्रयत्न बरें होण्याकरितां योजलेले असतां उलट रोग वाढविणारे उपाय गजांत लक्ष्मी-स्त्री १ दाराशीं हत्ती झुलण्याइतकी म्हणजे हत्ती पोसण्याइतकी श्रीमती, अतोनात श्रीमती, वैभव २ (विनोदानें) अतिशय दारिद्र्य धोतर विकत घेण्यास पैका नसल्यानें गजा (पंचा) विकत घेण्याची पाळी येणें ३ (विनोदानें)

अंगावरील गजकर्ण; नायटे. 'तुला गजांतलक्ष्मी प्राप्त झाली!' [गज+अंत+लक्ष्मी]

**गंज**–पुस्त्री. १ ढीग; रास; उडवें; ढिगारा; गंजी; संचय (धान्य, गवत, लांकूड, गठ्ठा इ० चा). 'दिल्लींत माईना मुडदा गंज पडला।'–ऐपो ११३. २ पेटी; पूड; धोकटी; वेष्टन; नळकांडें (गणिताचीं यंत्रें, लेखनसाहित्य, फण्या, कुंचे, वस्तरे, पान, पात, मळसूत्र, काटे इ० ठेवण्याची पेटी. पान, सुपारी, चुना, इ० ठेवण्याचे पुडे). ३ हत्यारें, सामान ठेवण्याची पेटी. ४ पेठ; हाट; बाजार; हा शब्द दुसऱ्या एखाद्या शब्दाशीं जोडून येतो. उदा. थगड–गंज; दारागंज; कॅप्टन गंज. 'पुणें शहरांत गंज पेठ आहे.' ५ (सा.)(सोनारी) घुंगरू, कर्णफुलें इ०च्या टप्प्यांची पट्टी. –वि. (व.) पुष्कळ; फार; गडगंच; लई. 'गंज पैसा हाय.' 'आज गंज काम झालें.' [फा. गंज्; सिं. गंजु; पं. गंज]

**गंज**–पु. १ (ना.) पाणी सांठविण्याचा मोठा तांब्याचा हांडा. २ एक उभट भांडें. ३ (व.) पातेलें; चोगुणें (उभट).

**गंज**—पु. १ तांब; जंग (लोखंडावर चढणारा); कीट; २ (ल.) कलंक; डाग. [सं. गंजन; प्रा. गंजण=डाग, कलंक; फा. झंग्] **गंजणें**—अक्रि. गंज लागणें; कीट चढणें. जंगणें पहा.

**गजक-प**—स्त्री. वैपुल्य; सुभिक्ष; आबादानी; सुकाळ. [फा. गजक]

**गजकर्ण**—न. एक अतिशय खाज सुटणारा व पसरत जाणारा त्वचारोग. बाहव्याचीं पानें कांजींत वाटून त्याचा लेप केल्यानें गजकर्ण, दद्रु, कोड, खरूज यांचा नाश होतो. –योर २. ३६४. [सं.]–र्णी–स्त्री. १ वरील रोग बरा करणारी एक वनस्पती. २ (योग) अपानवायूला ऊर्ध्व करून कंठाशीं आणून पोटांतील दूषित पदार्थ उद्गमित करण्याची क्रिया. –संयोग ३५७.

**गजकाठ्या**—स्त्रीअव. न्हाणवलीच्या मखराचे खांब. –बदलापूर २४१.

**गजकिंकरी**—स्त्री. (व.) गोखरू; सराटा. [सं.]

**गजगज**—स्त्री. १ गलबला; गजबज; गोंगाट (गर्दीतील माणसांचा); गडबड. 'सुखसमयाची गजगज।' –वेसीस्व ३.२४. २ चिवचिव; किलबिल (चिमण्याची). [सं. गज्=ओरडणें; का. गज] –वि. भरपूर; पोटभर. 'समर्थ जेविले गजगजा।' –सप्र १५.३५

**गजगज**—पु. (गो.) ऊष्मा; उकाडा.

**गजगजणें**—क्रि. १ गजबजणें; उद्योगी असणें; भरलेलें असणें (गाव, घर). २ भरणें; भरून येणें. 'रायां गहिंवर गजगजे।' –वेसीस्व २.८. [ध्व.]

**गजगजाट**—पु. गजबजाट; घोषा; गडबड; गाजावाजा (कृत्यांचा); गर्दी; धलकलाट (माणसांचा); किलबिलाट; चिवचिव; गुंजारव; गुणगुण; घोंगाट (माशा, पक्षी यांचा). [ध्व.]

**गजगजीत**—वि. १ गलबललेलें; गजबजलेलें; भरलेलें (घर, गांव इ०) २ गडबड्या (माणूस). [ध्व.]

**गजगा**—पु. सागरगोटा; गजरगोटीचें फळ; एका कांटेरी वेलाचें फळ. [का. गजुगे]

**गजगाजला**—पु. बोलबाला. 'हल्लीं लिहिण्यावाचण्याचा गजगाजला आहे.' –लो. टिळकांचें ५० वर्षांचें चरित्र १.७. [गजगज]

**गजगोटा**—पु. (ना.) समारंभांत बार काढण्यासाठीं दारू भरलेला व मोठा बार होणारा एक गोटा. [ध्व. गज+गोटा]

**गजणें**—अक्रि. १ शरीरांत जिरलें जाण्याइतपत मर्दन करणें; चोळणें (तूप, उटी इ०). २ चोळणें; रगडणें; घांसणें. ३ (प्रां.) मागें टाकणें; चढ करणें; वरचढ होणें.

**गजन**—पु. यूरोपमध्यें गोड्या पाण्यांत आढळणारा एक मासा. –प्राणिमो ८१.

**गजनी**—स्त्री. अर्धसुती व अर्धरेशमी, एका बाजूनें रंगीत, वर पट्टे किंवा रेघा असलेलें कापड; गजनी येथें तयार होणारें उंची कापड. –वि. वरील कापडाची (चोळी, परकर इ०). [गझनी शहर]

**गंजनी**—स्त्री. (कर.) एक प्रकारचें गवत. [का.]

**गजपण**—न. गचपण पहा.

**गजब**—पु. १ गहजब; कडक जाचणूक; कहर; जुलूम. (क्रि० करणें; मांडणें; चालवणें). 'पर्वदिगार, मोठा गजब जहाला.' –चित्रगुप्त ४५. २ जोराचें, दबावाचें भाषण; गालिप्रदान; मारणें; चवताळून अंगावर जाणें. (क्रि० करणें). ३ दुःसह तडाखा; दैवाचा जबर घाला; अवसान खचण्याजोगें संकट; दुःखप्रद दैवी घटना. (क्रि० होणें; गुदरणें). ४ हद्द; परिसीमा; कमाल. [अर्. घज़ब्] **एकगजब**–पु (घातक, क्रूर कृत्यांचा) जोर, आवेश, अतिशयितता इ० दर्शविण्याकरितां योजतात. 'त्यानें एकगजब मांडला.' =१ तो भयंकर नाधाडी करीत आहे (स्वारी, जुलूम इ० करणारा; भयंकर सांथ, दुष्काळ इ०); २ तो जोरानें रडतो (मुलगा), ३ तो जिवंत भुतासारखा भांडतो; ४ तो राक्षसासारखा काम करतो. इ० अर्थ होतील (ज्या शब्दाशीं हा शब्द जोडतात त्या ठिकाणीं त्याच्या अर्थाचा जोरकसपणा दाखविला जातो) 'त्यानें मारण्याचा–लुटण्याचा–रडण्याचा–लढण्याचा–ओरडण्याचा एकगजब मांडला.'

**गजबज**—स्त्री. १ गडबड; गलबला; गोंगाट (अनेक माणसांच्या बोलण्याचा). 'गजबज ऐकोनि थोर। उपरीवरी चढला उधावर।' –कथा १.७.२४. २ खळबळ; मनांतील अस्वस्थता. 'तेथ मनीं गजबज जाहाली।'–ज्ञा १.१८५. ३ गडबड; गोंधळ (एखाद्या दुःखदायक कृत्याचा). 'गजबज बहु झाली माय धावोनि आली।' –र ३३. [ध्व. सं. गज्; का. गज=एक ध्वनी]

गजबजणें—अक्रि. १ गलनल, गडबड, धामधूम, गजगज असणें; भरलेलें असणें; उद्योगांत असणें (घर, गांव). 'त्याला मामलत होती तोंवर त्याचें घर गजबजत होतें.' २ विस्मय पावणें; घाबरणें; गोंधळणें; खडबडणें; धैर्य सुटून घाबरें होणें. 'ऐसी उदास वाक्यें ऐकोनी । मनीं गजबजली त्रिभुवनजननी ।' –ह २७.१०१. ३ दाटणें; कोंदलेलें भरलेलें असणें; कोंदणें. 'नाना रंगीं गजबजे । जैसें इंद्रधनुष्य देखिजे ।' –ज्ञा १५.२४० ४ (अकर्तृक). खळबळ उडणें; हाःहा.कार होणें. 'तंव गजबजिलें अंबरीं । देवतागणु ।' –दाव १११. [गजबज] **गजबजून उठणें**–दचकून, धावन्याधावन्या, गोंधळून उठणें (क्षेप इ० मधून).

गजबजीत—वि. १ गजबजलेलें; गजगजीत; गलबलीत; उद्योगानें, गलबलीनें भरलेलें (घर, गांव) २ गडबड्या (मनुष्य) [गजबज]

गजवाव—स्त्री. चुनकामांत बांधलेली विहीर. [फा. गच=चुना+वाव=विहीर]

गजबु—पु. गोंधळ; गजबज; गोंगाट 'तंव यादवां गजबु जाला ।' –उषा १३७१. [सं. गज्=नाद करणें. ध्व. गज]

गजमुड्डी—स्त्री. (गो.) गर्दी; दाटी; गचमुड्डी पहा.

गजर—पु १ अनेक वाद्यांचा एकत्रित नाद, घोष. 'गजराची भिक्षावळ मिरविली ।' –ऐपो २१०. २ प्रहराप्रहराच्या शेवटीं तास माजविणें; तासाचे टोल, घड्याळाच्या घंटेचा आवाज. ३ कथेंत होणारा जयघोष; कीर्तनांत ईश्वरनामाचा शब्द, नामस्मरणाची टाळी. ४ (ल) मोठा शब्द; उंच स्वराची आरोळी. 'परा पश्यंती मध्यमा वैखरी । गजरें गाती चारहि नारी ।' ५ डांगोरा; दवंडी 'मी सांगतों या गोष्टीचा गावभर गजर करू नका.' ६ लौकिक, डिंडवडा [सं गज्=नाद करणें, ओरडणें; फा. गज=विशिष्ट ध्वनि]

गजरगोटा—पु सागर–गजरगोटीचें बीं मुली खेळावयास घेतात तो खडा. (हट) गजरघटा

गजरगोटी,गजरी—स्त्री. १ सागरगोटीचें झाड. २ सागरगोटा.

गजरा—पु १ सागरगोटा २ लाख गोटी (ल्हान मुलांच्या खेळांतील)

गजरा—पु. १ पुष्पहार; वेणींतील, हातांतील ल्हान हार; पुष्पगुच्छ. २ मोती इ० चें कांकण, बांगडी; करभूषण. ३ (सोनारी) दाभणाच्या जाडीच्या एका धोटपाच्या मापाच्या व दोन्ही टोकांस फांसे केलेल्या अशा चांदीच्या सळईवर एक बारीक सूत गुंडाळून तयार होणारा दागिना. ४ पखवाज किंवा तबला यांच्या तोंडांच्या कांठाबरोबर जाड व अरुंद चामड्याच्या पादीचा भक्कम वेढ, वेढण, वेणीनें करें; याला भोंकें घेऊन त्या कातड्यासह भोंकांतून वादी आवळतात. [हिं.] **गजरेदार**–वि.गजऱ्याच्या आकाराचा (अंगरखा) गजऱ्याची आकृतियुक्त. 'गजरेदार आंगरखे जाऊन पोकळ आंगरख्यांची भास पडली,' –नि २८.

गजरा–रो—पु. (कु.) ज्याचें मांस खाण्यायोग्य आहे असा एक पक्षी.

गजल—पु १ (संगीत.) एक फारसी वृत्तांतील गीत; चीज; गज्जल; हा बहुधां ठुमरीयोग्य रागांतच गायला जातो. यांतील विषय आशुकमाशुकांचे यमकपूर्ण प्रेमोद्गार. ताल पस्तु शोभतो. फारसी प्रेमगीत. गजल एकयमकी असून त्यांतील पंक्तियुग्मकांची संख्या पांच ते सतरापर्यंत असते. गज्जलांच्या संग्रहास दिवाण म्हणतात. २ (ताल) एक ताल, याच्या मात्रा ९ व विभाग २ आहेत. [अर. घझल्]

गजलगोष्टी — स्त्रीअव. गप्पागोष्टी; बोलणें; संभाषण. गजाल पहा.

गजवा–वें—पुन कमरेचा कांचा; पैशाचा कसा; (मुंबई) शिसा [फा. गमावा=हत्तीच्या किंवा उंटाच्या पाठीवरील पिशवी]

गजविहीर—स्त्री. गजवाव पहा.

गजा–जें—पुन. मेसावयाचा अति ल्हान पंचा. [गज=एक माप; तु. फा. गझी=एक जाडेभरडें कापड]

गंजाड—वि. (व.) गडगंज; पुष्कळ; भरपूर. 'गंजाड आंबे आलेत.' [गंज+ढीग]

गंजाण—न. (वे.) एक प्रकारचें गवत. गंजनी पहा.

गजानंद—वि. (विनोदानें.) गजा(पंचा)नें आनंद पावणारा; अल्पसंतुष्ट. [गजा+आनंद]

गजानन—पु १ गणेश, गणपती देवता. २ कापूस तोलून घेतांना दोन रत्तलाचा दगड वजनाच्या बाजूला लावतात तो. [गज+आनन]

गजाल—स्त्री. १ (कु.) गोष्ट; कहाणी; रिकामी बटवट; गप्पा; गजलगोष्टी. (क्रि० सांगणें; करणें). २ (राजा.गो.) आरडाओरड; कोलाहल, गडबड. [ध्व.]

गंजिफिया—पु. दारूगोळा. 'पन्नास तोफा व पंचवीस गंजिफियाच्या गाड्या,' –भाव ९. [फा. गंजीना=दारूचें कोठार?]

गंजि(जी)फा—स्त्रीअव. (एव.गंजीफ) खेळण्याच्या (विशेषतः दशावतारी, वाटोळया १२०) पत्त्यांचा जोड. (क्रि० खेळणें). 'गंजीफा सतरंज चोपड नवें तें नवेंही सांग जे ।' –सारुह ३.४६. [फा. गंजीफा]

गजिवेल—स्त्री. करवतीच्या सारखी दात्यांची तलवार; ही शत्रूच्या चिलखतास अडकवून त्याला ताब्यात घेता येते.

गजी—स्त्री. हत्तीण. 'गजी गजरावें नेणों किती । कादी हतीबाहेरी ।' —एभा १७.४४७ [सं गज]

गजी—स्त्री १ तासून चौरस केलेली लाकडाची कडी, लांब व बारीक सुळक्यांचें लाकूड २ लांब, अरुंद व भरड पोताचें कापड, जाळें, गजरें [ फा गज्ञी=एक जाडें भरडें कापड ]

गंजी—स्त्री १ लहान रास, गंज ढीग (गवत इ० चा) २ चौघडा पहा ३ (व ) एकत्र, समायिक वहिवाट, उद्योगधंदा, भागी [ गंज ]

गंजी—स्त्री (वे गो ) कांजी, भाताची पेज [ कांजी ]

गंजी—स्त्री (व ) लहान गंज ( भांडें ), बोगोणी

गजीकोट—वि गजीकोट ( जिंजी ) गांवचा ( पैसा ) 'अरकाट गजिकोट '

गजीकोट—वि प्रचंड, विशाल, असंख्य, विपुल, प्रशस्त [गजी+कोटि] ०कारखाना-पु फार मोठा, अवाढव्य कारखाना खातें

गजीखाना—पु १ ( कडबा, गवत इ० च्या ) अनेक गंजी ठेवण्याची जागा आवार २ ( ल ) अडगळीची खोली, रोज न लागणारें सामान ठेवण्याची जागा [ फा गजीखाना ]

गंजीफ—स्त्री गंजीफाच्या डावातील एक पत्ता [ फा गंजीफा ]

गजीफरास-फ्राक—पु सबंध किंवा अर्ध्या बाह्याचा विणलेला खमीस, सदरा, आंगरखा [ गजी+इ फ्रॉक ]

गजीव—वि (क ) चुनकामात बांधलेली ( विहीर इ० ) याच्या उलट आढाव=तुमनी खोदीव [ फा गच्=चुना ]

गर्जीवटक्न-ण—न आव्हान, दिमाख मगरूरी, ताठा, गर्व, वृथाभिमान ( क्रि० काढणें, मोडणें=गर्व खंडन करणें या अर्थी ) [ गर्जी+वटकण=ताठा ]

गजेकौतुक—पु १ ( कु ) महदाश्चर्य २ बढाई [ गज+ कौतुक ]

गंजेटी-डी—वि (ना ) गांजेकस, गांजा ओढणारा [ गांजा ]

गजेंद्र—वि १ प्रचंड, अवाढव्य, मोठी, विस्तृत अफाट ( इमारत, धंदा कारखाना, खातें, गोष्ट, थाटमाट खर्च ) २ विशाल, धीताल, मोठा ( देश उध्वस्तप्रांत अरण्यें, पीक सैन्य, संपत्ति इ० ) [ स गज+इंद्र ]

गजेरी—स्त्री १ नदी समुद्र, खाडी इ० च्या भरतीनें, पुरानें वाहून आलेला गाळ मळी २ त्या गाळानें बनलेली जमीन पुळीण

गजोली—स्त्री (ना ) लहानसा गज

गज्जा उर्जे—पुन पन्ना गजा पहा

गॅझि(झे)ट—न १ वर्तमानपत्र २ सरकारी पत्रक [ इ गॅझेट ]

गझ्झी—गजी ( कापड ) पहा

गट—पु १ मंडळी टोळी, जमाव, समुदाय, एका कटा तील किंवा जमावातील मंडळी, मेळा 'कौन्सिल त कांहीं गट असतात ' –के १४ ६ ३० २ भरगच्च टोळी, जमाव ( सैन्य, जनावरें याचा ), कळप, जथा ३ वीट, लगड (सोनें, रुपें इ० ची) 'तो त्याजवळ सुमारें दोन हजार रुपयांचे चांदीचे गट अनामत ठेवून परत आपल्या गांवीं गेला '–मराठी ३ रें पुस्तक पृ १ (१८७३) ४ ( किराणा दुकान ) वजनाचा सच ५ रास, ढीग, कांहीं विशिष्ट संख्याचा समुदाय [ का गट्टि, हिं गठि ]

गट-ट्ट—क्रिवि एखादा पदार्थ त्वरेनें गिळण्याच्या वेळेच्या शब्दाचें अनुकरण [ ध्व ] ०करणें-गटकाविणें(गिळणें)- १ दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करणें २ उधळपट्टीनें फस्त करणें ३ मटकावणें, गिळून टाकणें, सगळें एका घासात खाणें सद्दर्शनचि सुदर्शन करि गट चट करून अतरायाचें।'–मोआदि १० ८५ ०कन-कर-दिनीं-दिशीं-क्रिवि भरभर, एकदम ( खाणें, पिणें याचा वाचक ), गटगटा, ढसढसा, मटमटा, गट शब्द होईल असें ०कळी, गटंगळी, गटागळी, गटकळण-गचकळी, गचकळणें पहा ०गट-टा-क्रिवि १ गटकन पहा ( क्रि० पिणें ) 'फळें खातीं गटगटां।'–भारा किष्किंधा १५ ११९ २ उकळणें, कढणें यातील आवाजाचें अनुकरण (क्रि० शिजणें, वाजणें) ०गटणें, गटगटावणें-अक्रि १ गटकन गिळणें, ढसढस पिणें, मटमट खाणें २ गदगद उकळणें, कढणें (तांदूळ डाळ, भाजी इ० ) ०गिळ्या-गीळ-वि दुस ऱ्याचा पका खाणारा, हरामखोर ०गोळा-गटगाळा-पु बकाणा गटाणा, तोंडभर मोठा घास खाणें, बोकणा ( क्रि० करणें करून टाकणें) गटगोळा-गटगाळा वरती डोळा-वि वरून साळसपणा दाखवून सर्वस्व नागविणारा, गोगलगाय पोटात पाय

गटगटणें—अक्रि गरगरीत, वाटोळी बसणें, तंग बसणें, जरिकाठ कंचुकी ताठ राठ गटगटली।'–प्रला २३८ । [स. ग्रथि, म गाठ-गट्टु ]

गटगटीत—वि १ टपोरे, मोठे व सुंदर, वाटोळे व भरदार ( डोळे ) २ ढिलें, खिळखिळीत सैल, डगमगीत, गट्गट् कर- णारें हलणारें ( यंत्र ) ०डोळ्या-वि भोकरडोळ्या, मोठ्या डोळ्याचा

गटगटे—न (अलिबाग ) बोंबिल काड्या ( मासा )

गटण—नस्त्री ( संगीत ) ताल, मात्रा, काळ, गठण पहा

गटणें—अक्रि ठासून उभें राहणें, गटानें उभें राहणें 'विर सारे नटल लड्ड लड्ड गटले, नाहीं कुणि हटले।'–ऐपो २४० [ गट ]

**गटणें**—अकि फसणें, पेचात येणें 'त्याला गटव, न गटे त्यास मला सांग'

**गटपट**—स्त्री (गु) दाट परिचय, गाढ मैत्री, दोस्ती [गट्टी]

**गटपट**—स्त्री (व) सटपट, गडबड, लटपट पहा

**गटपट, गटंपटं, गट्टंपट्टं**—न १ फुशारी किंवा ढोल मिरविण्याचें भाषण २ अप्रासंगिक किंवा क्षुद्र युक्तीचें भाषण, ठकबाजीची व मूर्खपणाची बडबड ३ गडबडगुंडा, सतरा-पचरा बाता (क्रि० लावणें, मांडणें, चालवणें, लागणें, चालणें)

**गटपटणें**—अकि (ना) गोंधळणें, भांबावणें, लटपटणें

**गटर, गटार**—न १ रस्त्याच्या बाजूचें घाण पाणी वाहून नेणारी मोरी, नाली २ (छाप) फर्मा ठोकतांना दोन पृष्ठांमधील सोडलेलें अंतर [इ गटर] ०बातमी-स्त्री अफवा, वदंता ०यंत्र-न १ निराधार, खोट्या बाता उत्पन्न करणारा २ गांवांतील कुटाळ लोकांची चकाट्या पिटण्याची चव्हाट्या वरील जागा (पूर्वी पुण्यांत सध्याकाळच्या वेळीं गटारावरील फरशावर बसून गप्पा मारीत भांग्यामारुती व सोमेश्वर येथें गटाराजवळ बसून आचारी-पाणक्ये गांवांतील कुटाळ्या करीत त्यावरून)

**गटरफटर**—न पटरफटर, क्षुद्र गोष्टी, हलक्या-सलक्या वस्तूचा समूह अनेक किरकोळ वस्तूंचा एकत्र साठा

**गटरगांवज्या**—वि (व) वाटेल तो पदार्थ (खावयास) व वाटेल ती परिस्थिति ज्यास चालते असा बिनतक्रारी (माणूस)

**गटागट-टां, गटाट-टां**—क्रिवि भराभर, ढसढसां, मटमटां गपगपां गटगट पहा (क्रि० पिणें, खाणें, गिळणें) 'गटागट गोळे मार म्हणजे लौकर जवण होईल' [ध्व]

**गटाणा**—पु गटगोळा पहा (क्रि० करणें, करून टाकणें) [ध्व गट+दाणा]

**गटाणा**—घाटा, घाटाणा पहा

**गटापर्चा**—पु मलाया द्वीपकल्पांतील एक झाड, याचा रस आटवून त्याचा पाढऱ्या रंगाचा केलेला राघा हा पाण्यात शिज विला म्हणजे लवचीक बनतो व वाळविल्यावर पुन्हां कठिण होतो याच्या चाकूच्या मुठी, हातातील काठ्यांच्या मुठी, ठस वगैरे करतात [मलाया-गटा=गोंद+पर्चा=एक झाड]

**गटुंगा, गटुणा-ना**—वि ठेंगणा पण मजबूत, लहान आकाराचा पण सदृढ [गट्ट]

**गटोळा**—वि गोटोळा, वाटोळा, गोलाकार [गोटा]

**गट्ट**—गट पहा

**गट्ट**—वि गटुणा पहा

**गट्टंपट्टं, गट्टापट्टा, गटापटा**—गटपट पहा

**गट्टा**—पु १ गट अर्थ १, २ पहा. २ गट्ठा. ३ (क) गड्डा पहा

**गट्टाण**—न (गो) गठडी, नाश [गट्ठा]

**गट्टी**—स्त्री १ दाट मैत्री, सलगी, परिचय २ निकटसंबंध, एकी, एकत्रपणा, संघ, समुच्चय, जमावाची स्थिति गट अर्थ १ पहा (क्रि० करणें, मोडणें) [गट, का गट्टी]

**गट्टू**—पु १ (ना.) गडू, कच्चेर पाणी मावेल असें पितळी भांडें २ (पिडाचें काम) मादीच्या डाक्यावरील टोपण सिळा -वि ठेंगणाठुसका पण मजबूत, पुष्ट [गट]

**गट्टेछोड**—वि मालाचे गठ्ठे सोडून आंतील माल चोर णारा -सर [गट्ठा+हिं छोडना=सोडणें]

**गट्ट्या**—गप्पा पहा.

**ग(गं)ठडी-डें**—स्त्रीन १ गाठोडें, लहान मोट, गट्ठा (कापडचोपड, चिरगूटपांघरूण इ० चा) २ लहान गाठोडें, पुर-चुंडी (एखाद्या वस्त्राच्या पदरांत थोडेसे रुपये, धान्य, गोटे, चुनखडी, साखर इ० बांधलेली) ३ (ल) गुप्त द्रव्य, मालमत्ता, भांडवल, पुंजी, संग्रह 'त्याच्या बापाच्या वेळची गठडी होती म्हणून उड्या मारीत होता' ४ (ल) दारूच्या अमलांत किंवा मूतबाधेनें किंवा इतर प्रसंगीं हातपाय पोटाशीं घेऊन निचेष्ट, गाठोड्या प्रमाणें पडलेला माणूस ५ गट्ठा, बांधलेली वस्तु पार्सल [स ग्रथ्, प्रा गठ हिं गठडी] (वाप्र) ०उपटणें-उचलणें-पार करणें-लांबविणें-दुसऱ्याची मालमत्ता घेऊन पळणें, अपहार करणें ०करणें-बांधणें(हातापायाची)-१ हातपाय पोटाशीं घेऊन पडणें, पाडणें २ एखाद्याचे हातपाय एकत्र करणें, मोट बांधणें ३ मंत्रानें एखाद्याच्या हातांतील शस्त्रें काढून घेऊन त्यास हतबल करणें, बांधणें, शक्तिहीन करणें ४ गोंधळविणें, निरुत्तर करणें, कुंठित करणें, पराभव करणें (वादविवादात). ०पुरणें-द्रव्य पुरणें ०होणें-वळणें-१ गुंडाळलें जाऊन गठ्ठा होणें, हातपाय एकत्र होऊन बांधलें जाणें २ शक्तिहीन, निरा-श्रित होणें, लोळत पडणें, कुजणें (ताप इ० मध्यें) ३ मरणें

**गठण**—स्त्रीन (संगीत) मृदंग वाजविण्यातील एक प्रकार, ताल ०गाठणें-गठणास आणणें-आपल्या उद्देशाशीं अथवा विचाराशीं मिळतें करणें, जमविणें -णास येणें-उद्देश, विचार, परिणाम यांच्याशीं मेळ पडणें, पाडणें, पटवून घेणें [स ग्रथन, हिं गठना]

**गठणें**—उक्रि (चे) वेढणें, गुंडाळणें [स ग्रथन]

**गठली-ळी**—स्त्री. गठडी पहा

**गठया**—पु गडा, सोन्याचा मणी, हळकुंड व पोंगडीची दशी बांधलेलें कच्चें सूत -बदलापूर २१२ [स ग्रंथी]

**गठळ**—वि अव्यवस्थित, गबाळ, गढळ पहा.

गठळी—स्त्री १ गुडी २ गुरफुली (सुतामधील) [ गांठ ]

गठ(ठो)ळें—न गठडी-डें पहा

गठाण—स्त्री ( व ) मोठी गाठ, गाठोडें, आवळलेला बोझा 'कापसाच्या लाख गठाणी गाडावर चढल्या ' [ सं ग्रथन ]

ग(ग)ठीछोड—वि १ ( गांठोडें सोडणारा ) गाठोडें सोडून चोऱ्या करणारा, भामटा, गुप्त ठेवा चोरणारा, चिलटर भाल ( चोर ) 'गठीछोडे द्रव्य सोडिती। नाना आळकार काढिती।'—दा ३ ७ ५० २ ( उप ) कृपण, कद्रु, जो आपला पैका, मालमत्ता फार जपून ठेवतो तो [ हिं गठी+छोडना ]

गठोळी—स्त्री १ पुरचुडी, ल्हान गाठोडें (कपडे इ० चें) २ ( क ) गुठळी [ गुठळी, गांठ, प्रा गंठिआ ]

गठ्ठ—वि १ घट्ट, आटस गट्टू, बांधेसूत ( शरीर ) २ मासल, गोंडस ( अवयव )

गठ्ठा—पु १ विंडा, दिंड, बांधलेला मोठा बोजा ( कापड इ० चा ), बोजा, भारा ( लांकडें, पान याचा ), ( सामा ) घट्ट आवळलेलें ओझें २ ( क ) गट 'अकस्मात भलतीकडून पाच दाहाशें, दोनशें असे गठ्ठयांनीं शिरून दाबून दुभंग करावें ' —मराचियोरा ५५ ३ लचका, घट गोळा, लगदा ( मुरवा, दहीं याचा ) ४ ( ल ) भांडवल, पुंजी, द्रव्य, मालमत्ता ५ पखवाज किंवा तबला आवळण्याचा, वादींत घातलेला ल्हान लांकडी ठोकळा हे ३ इंच लांब व दीड इंच गोल असून सुमारें आठ असतात ह खालीं-वर केल्यामुळें तबल्याच्या स्वरांत चढउतार होतो [ स ग्रंथ, प्रा गंठ, तुल० फा गठ्ठी ]

गठ्ठी-ठ्ठू—गठी-ठ्ठू पहा ०चोर-वि अट्टल चोर, गठी छोड अर्थ १ पहा ०जोड-वि ( गांठीशीं गाठ घालणारा ) कद्रू, पैसे राखणारा गठीछोड अर्थ २ पहा

गठ्या—पु १ कवड्याच्या खेळांतील फेंकण्याची मोठी कवडी, कवडा, पसा २ गठ्ठा पहा ३ ( अशिष्ट ) शिस्न, पुरुषाचें इंद्रिय ०गोंधळ-पु १ ( ग्रा अशिष्ट ) वर्ज फैली प्रकार जातीमध्यें किंवा स्त्रीपुरुषामध्यें अनिर्बंध व्यभिचार, अगम्या गमन, गोत्रगमन २ ( ल ) घोंटाळा, गोंधळ, सावळागोंधळ, सबगोलंकार [ गठ्ठा ]

गड—पु ( व ) गायवाडा, गोठा

गड—स्त्री अडचण, घोळ, उपद्रव, संकट, अत्यवस्था निकड, आणीबाणीची वेळ ( क्रि० यण लागण, पडणें, वारण टळणें, चुकण, सरणें, टाळणें, चुकवणें, सभाळणें, सारणें ) [ स गड=अडथळा ] सामाशब्द— ०खळ-न पेंच ल्चाड, उपद्रव अडचण —वि ( राजा ) वर्चस्व किंवा प्रावीण्य मिळण्यास कठिण (एखादी गोष्ट), अजिंक्य ( किल्ला ), खडा तुटलेला, धोक्याचा, उभा चिकट ( रस्ता ), घोंटाळ्याचा, गोंधळ्याचा, अतिशयक, क्लिष्ट, गूढ (पुस्तकांतील विषय, वाक्य) ०ज्ञाप-स्त्री ( ना ) अडचण, संकट, गडांतर ०संद-ध-स्त्री १ निकडीचा प्रसंग, जरूरीचा वेळ किंवा हंगाम २ निकड, तातडी, ताण, भेट, झेंगट ( एखादें काम, गोष्ट याचें ) ( क्रि० होणें, पडणें, येणें, लागणें ) 'मला दोन रुपयांची गडसद आहे 'कामाची मोठी गडसद पडली ' ३ अत्यंत समयोचित प्रसंग, अत्यंत जरूरीचा, उपयोग होईल असा निकडीचा हंगाम किंवा वेळ 'हा तों गडसंदीचा डाव।'—तुगा २२७८ ( आवटेप्रत ) 'ही लग्नाची गडसद आहे, लग्न करून घ्या ' ४ ( व्यापक ) अडचण, संकट, कचाट ५ अडचणीची व धोक्याची जागा 'एवढी दहा कोस गडसद ओलांडली म्हणजे भय नाहीं ' ६ आणीबाणीची सूट, संकटाच्या वळची एकी 'ते गडसंधीचे येती समस्त। समासामासी।'—शिपु १ १७ ११० गडसंड असेंहि रूप आढळतें पण तें अशुद्ध आहे

गड-पु किल्ला, दुर्ग (मुख्यत्वें डोंगरावरचा) 'ढेंकणासी बाज गड। उतरचड केवढी॥'—तुगा ३२६४ २ (गो) उभ्या चढावाचा डोंगर, पहाड [ प्रा गड=दुर्ग ] म्ह० १ गड बांका नसावा पण गडपती बांका असावा २ गड घेववेल पण बायको घववत नाहीं सामाशब्द— ०करी-पु. १ किल्ल्यातील नोकर, शिपाई २ गडाचा बंदोबस्त करणारा, गडावरील अधिकारी ३ ( क ) महातार्‍याच्या हातांत लचा माणूस 'गडकऱ्यानें हत्तीची उम्तवारी बरोबर केली नाहीं ' ०कोट-पु किल्लेकोट, (सामा) गड, किल्ले 'गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटल्न्याय होय ' —मराआ २६ ०कोन-पु पुढें आलेली टेंकडी —दार ०घेणा-वि ( किल्ला सर करण्याइतक ) कठिण, असाध्य, दुर्घट [ गड+घेणें ] ०निविसी-निसी-स्त्री गडनीस याचें काम किंवा हुद्दा [ गड+फा नवीसी ] ०नीस-पु किल्ल्यावरील हिशेबनीस [गड+फा नवीस] ०पति-पु किल्लेदार, किल्ल्यावरील मुख्य अधिकारी, हा गडावरील चौकी, पहारा इ० च्या बदोबस्ताचेंहि काम पहात असे ०वई-पु गडकरी, गडाच्या कमाला योग्य अधिकारी 'एका घरच भाऊबंद एक, दोन तीन आहेत आणि इतकेही गडवई तर त्यास किल्लेच मामले सांगावेच लागतात ' —मराआ २८

गड—पु १ तोंडाची कानशिलासह एक बाजू गालफड, गाल 'श्रीकुंडलमंडित गडललित बाहुरम्य सरळ।'—रामजन्म कटिबंध २ (शिवराम कविकृत) २ हत्तीचें गडस्थल, कुंभस्थळ ३ (ज्यो) विष्कंभादि सत्तावीस योगांतील दहावा योग त्यावरून ४ (ल) जोर, उग्रता, वेग, आवेग, सपाटा (रोग, पाऊस, वादळ खरूज याचा) ५ ( ल ) गर्व, आढ्यता, अहंकार, फुशारकी

(क्रि० मोडणें, जिरवण) ६ कांहीं विशिष्ट धंदेवाईकास तिरस्कारार्थी त्याच्या नावाच्या शेवटीं जोडावयाचा प्रत्यय जसन्हावगड (=न्हावी), तेलगड (=तेली), वाणगड (=वाणी) जोसगड (=जोसी) इ० तसेंच कुणब्याच्या नावानांहि जोडतात (प्राकृतात गड म्हणजे नापित (न्हावी) असा अर्थ आहे तेव्हा त्यावरूनहि तिरस्कारार्थी शब्द बनला असेल) —पु गळू केस्तूड 'मी सर्वज्ञु एकुचि रुद्ध। ऐसा गर्वतुष्टीगडु। चेऊनि ठाके।' —ज्ञा १३ ७१७ 'तुझें माथा शृंग पूर्ण तीक्ष्ण। तुज ऋष्यशृंग अभिधान। आमुचे हृदयीं गड तीक्ष्ण। गडऋषि जाण आम्हासि म्हणती।' —भारा बाल २ ३० [स] सामाशब्द- ०खोल-पु घाव्याचा गळा, गडखोल ०गूळ-(प्रां) गळगुंड पहा ०मंडल-न (काव्य) गड अर्थ ३ पहा 'वोतिली शशीमित्र गाळून। गडमडळीं प्रभा पूर्ण।' ०स्थळ-न गड अर्थ २ पहा 'गडस्थळींच तेज अधिक। लखलखीत दोन्हीं भार्गी।' —व्यं३५

**गंडें**—न गडांतर, मृत्युभय 'षोडशवर्षीतिक गंड सम जोनि।' —आमा ३४

**गडक**—वि गरक पहा

**गडक्न-कर**—गटकन-कर पहा

**गडका-खा-खी**—पुस्त्री १ (राजा) फळें, फुलें तोडण्याची लाकडी आकडी गरखी पहा २ (उपहासानें) उंच व सडसडीत स्त्री —वि गिऱ्हाइकास चतुरतेनें आपल्या दुकानीं ओढणारा (वाणी इ०)

**गंडकी**—स्त्री १ नेपाळांत उगम पावणारी एक पवित्र नदी २ गंडकी नदींतील शिळा, शाळिग्राम मूर्ती, सोनें पारखण्याची कसोटी इ० 'रत्नपारखियांच्या गांवीं। जाईल गंडकी तरि सोडावी।' —ज्ञा १३ ३१९ ०शिळा-स्त्री गंडकी नदींतील दगड, शाळिग्राम 'तारक तुल्य स्वधर्म गुरुमूर्ती गंडकी शिला आहे।' —मोवन ५ २९

**गडगंच गडगच्च-च्चा**—क्रिवि दाटीनें चेंगराचेंगरीनें, भरपूरपणें पुरेपूर, विपुलतेनें ०आभाळ भरणें किंवा अंधार पडणें—ढगाची गर्दी होणें, पूर्ण काळोख होणें

**गडगच-ज**—स्त्री अतिशय वैपुल्य, भरलेपणा मोठी दाटी, गर्दी (वस्तूची) —वि १ गच्च, दाट लोकवस्तीचें (धनधान्यादिकांचा) भरपूर पुरवठा असलेलें, चांगलें पोसलें जाणारें, सुखवस्तु (गांव घर, पात्र) २ पुष्कळ, रगड, भरपूर (मेजवानींतील वस्तु पदार्थ) ३ पूर्ण समग्र, भरपूर वाढता (सरजाम स्वारी, आटाळा) ४ ऐवजदार श्रीमंत ऐपतदार (व्यापारी) ५ गंभीर, गाढ (झोंप) ६ (सामा) अलोट पुष्कळ, पुरून उरण्याजोगें 'घरीं गडगज आहे मग नोकरीची फिकीर कशाला।' [गज्ज+ग्र गज=गाण]

**गडगच्च**—पु चेंपाचेंपी, दाटी, निबिडता (लोक, अभ्रें, धूळ, वस्तु वगैरेची) (क्रि० जमणें, मिळणें, येणें, मोडणें, विरणें) जास्त स्पष्टीकरणार्थ गरगशा पहा [गड्डा+गच्च?]

**गडगज**—वि (गो) फट न ठेवता गच्च सांधलेला(सांधा)

**गडगंजा-ज्या**—पु (व) घोंटाळा, अव्यवस्था, गर्दी अर इ श्रीमंताच्या घरच लग्न या गडगजात तुझें धोतर कुठें सापडायला गेलें?' गडगच-ज पहा

**गडगड डां**—क्रिवि घडघड, करकर इ० आवाज होऊन (मेघगर्जना, गाडी, खगारा इ० चा), पोटांत वाजणाऱ्या आवाजाप्रमाणें 'कडकड शब्द उडाला, गडगड गगनांत खाव जों चिरला।' —रामवडव-मोरोपंतचरित्र (प्रस्तावना) [ध्व स गड्=वाहणें (द्रवपदार्थ), प्रा दे गडयड=गडगडाट]

**गडगड-डी**—स्त्री गुरगुर, खरखर, घडघड, गडगडाट, गर्जना

**गडगडणें**—अक्रि १ गडगड शब्द होणें, धडधडणें, गुरगुरणें, कडाडणें (मेघ, गाडी इ०) 'आज दोन दिवस गडगडतें आहे' २ मोठी गर्जना करणें, ओरडणें (वन्य पशु इ० नीं) 'वाटेसी गडगडतां व्याघ्र। योरती जैसे अजाचे भार।' ३ गडगड शब्द करीत खालीं पडणें, गडगडत खालीं येणें ४ मरणें ५ (ल) अधिकारच्युत होणें 'फडणीस अधिकारावरून गडगडले होते' —अस्तमा ३५ ६ (अकर्तृक) पोटांत गुरगुरणें, आवाज होणें [ध्व गड! गड!]

**गडगडाट**—पु (गडगडचा अतिशय) मोठी गर्जना, खडखडाट गुरगुर, करकर, गडगड शब्दांचा समुदाय 'मेघांच्या गडगडाटापुढें ऐकावयास येत नाहीं' [ध्व]

**गडगडा धोंडा**—पु गोलाकार, ओबडधोबड दगड, गोटा, धोंडा गडगडत जाईल असा दगड

**गडगडावणें**—क्रि १ (गो) मूग चणे वगैरे पाटावरून खालीं तिरकस लोटून निवडणें २ नारळाचा कीस बारीक करणें

**गडगडी**—स्त्री (बडोदें) पाणी काढावयाचें लहान लोखंडी चाक खराडी, पुली **गडगडो**—पु (गो) लहान पाणरहाट [ध्व]

**गडगडेप**—न (गो) गडगडाट

**गडगणे(ने)र**—न केळवण लग्न, मुंज यांच्या पूर्वी होणारा एक समारंभ (वधू किंवा वर यांच्या स्वत च्या) घरीं थाटानें मेजवानी करून आप्तांस जेवण्यास घालणें, तसेंच हे आप्तेष्ट (वराला किंवा वधूला) आपआपल्या घरीं मेजवानी करितात ती यांत भोजनोत्तर परचा आहेर देतात हा लौकिक प्रचार आहे, याला शास्त्राधार नाहीं [गडू+नीर=पाण्याचा तांब्या व पाणी यावरून]

**गडगर्ज**—पु मोठी गर्जना 'मेघ गर्जती आकाशीं। तैसा गर्जासी गडगज।' —एरुस्व ८ १८ —वि प्रसिद्ध 'गडगज

बधमोक्ष पाही। गादती नवायीं हरि बोले।' –एभा १८ १३७

**गडगर्जना**—स्त्री मोठी गर्जना, गडगर्न 'येऊनि नाना मेघ पडळें। गडगर्जना गगन गाजों ळे।' –एभा ११ ४०९

**गडगप**—क्रिवि हरवलल्या, गैरविल्ह लागलेल्या, गहाळ झालेल्या, गिळकृत केलेल्या, दडपलेल्या, खाल्लेल्या स्थितीत

**गडगळ-ळी, गडंगळ-ळी**—वि ओबडधोबड व गोल सर, खडबडीत व मोपळसुर्ती, कसाबसा, आबडधोबड तोडलेला, फोडलेला (दगड, खडक)

**गडगा-धा, गडगें-घें**—पुन १ दगडाची ओबडधोबड रचलेली ताल, भिंत, ढीग २ (कों) बांध, बधारा ३ (अलिबाग) पार, चौथरा

**गडगा, गरगा**—पु (प्रा) खड्डा, वीळ, खाच [स प्रा गड=खाच, खदक]

**गडगिळ्या-गीळ**—वि गिळकृत करणारा, गटगिळ्या गटगीळ पहा

**गडगूप**—पु बुंध्याला अनेक ताटें फुटणारी जोंधळ्याची एक जात

**गंडगूळ**—न गळगुड पहा

**गंडगोळ**—स्त्री १ उखळी तोफ, गरनाळ २ लाकडी गाठाळ ओंडा ३ (ल) गिड्डा व घट्टाकट्टा माणूस, बेडौल व जाड आणि मोठी वस्तु

**गडण-णी**—स्त्री मत्रीण, सखी 'न लगा गडणी आम्हा तैस्या।' –तुगा ३२१ 'निर्दय नसुन मन निष्ठुर केले प्राणस स्यानो गडणी।' –पला ४ १४ [गडी]

**गडणें**—अक्रि १ आत शिरून पुरला जाणें, गाडला जाउन आच्छादित असणें २ (ल) मग्न चूर असणें, ग्रासलेला असणें ३ कायम होणें, चिकटणें (कचेरींत, कामधंद्यात) ४ परिचय ओळख होणें ५ (मुलांचा खेळ) एका बाजूकडे असणें खळ गडी होणें ६ तंग, घट्ट बसणें (वस्त्र) [स गाढ, म गाडणें?]

**गडत-द**—न गर्द काळोखी, दाट अंधारी (क्रि० पडणें, येणें) 'डोळ्या गडद पडे मारी।' –परमा १० ९४ –क्रिवि १ दाट, घोर, निबिड, किट्ट (काळोख) २ गाढ, चूर, घोर (झोंप, अभ्यास, अमल, धुंदी, कामकाज) ३ घन, गर्द, दाट, निबिड (जंगल, अरण्य) ४ एकसारखा, सततधार, मोठा जोराचा (पाऊस) ५ काळा कुट्ट, घनचक्कर (ढग, अभ्रें), ६ दाट, भडक (रंग) [फा गर्द=धूळ]

**गडत-द**—वि मृतप्राय, नष्टप्राय, मारलेला, हरवलेला, अदृश्य, अगदीं नाहींसा झालेला, बुडालेला, पुरलेला, गिळकृत, दडपलेला, लयास गेलेला, कत्तल केलेला [अर गरत]

**गडत**—वि (व) गाडलेलें

**गडद**—स्त्रीन खाण, पोखरण, खड्डा, अडवीतिडवी खाच, खडगा [स गड=खदक]

**गडदणें**—उक्रि जमिनींत पुरून ठेवणें, लपवून टेवणें (वस्तु, पैसा इ०) 'कोणी मागेल म्हणून भाड्यें होतीं तीं गडदून टाकलीं' [हिं गाडना, म गाडणें]

**गडदन**—न (प्र) गरदन, गर्दन, मान [फा गर्दन्]

**गडदम**—पु (कु) एक जातीचा मासा

**गडद(ध)र-रा**—स्त्रीपु १ (प्रा) ओबडधोबड व मोठा खळगा, खाच 'गारीं आणी गडधरा।' –दा ५ १ ३७ २ आड, विहीर [स गड=खाच+दर]

**गडदा**—पु १ खड्डा, गडद गडदर पहा २ (ल) पोट.

**गडडू-धू**—पु १ दाबण्याकरिता ठेवलेलें वजन, जड ओझें, बोजा २ (ल) भार, ओझें, बोजा, आवश्यक कर्तव्य, जबाबदारी, आपल्या वाडवडिलांच्या किंवा आपणापूर्वी होऊन गेलेल्या अधिकाऱ्याच्या मागील उदाहरणाप्रमाणें पाळण्यासारख्या वहिवाटी किंवा सत्कार अथवा नेमणुकी –वि बळकट, घनमूठ लठ्ठ धडधाकट, घिप्पाड, घट्टपुष्ट (माणूस, जनावर) २ मोठाड, दांडगा, रपाटा, भरभक्कम (वजन, वस्तु, ओझें) [गड्डा] (उरा-र)०रचून ठेवणें-एखादें मोठसंकट उपस्थित करून ठेवणें

**गडप-व**—वि बेपत्ता, नष्ट, अदृश्य, गिळकृत, अंतरलेल्या स्थितींत, सापडावयाची नाहीं किंवा केव्हांहि बातमी लागावयाची नाहीं अशा स्थितींत अथवा जागेंत, ठावठिकाण लागणार नाहीं अशा प्रकारें ०करणें–दडपून टाकणें, लाटणें दाबणें, गिळकृत करणें 'का पाठविर्तो, कळत जरि करिल व्यूह नर गडप यातें' –मोद्रोण ११ ५६ 'त्या कारकुनानें त्याचे दोन हजार रुपये गडप केले' [अर घर्ब=गुप्त होणें]

**गडबड**—स्त्री १ धादल, दंगल, धामधूम घोंटाळा २ हुल्लड, दंगा, कोलाहल, कल्ला, गलबला ३ धालमेल, अव्यवस्था, मिसळ, भेसळ, बिघाड 'याच्या कागदपत्राची सारी गडबडच दिसते' ४ चलबिचल, एकाग्रता नसणें, व्यग्रता (मनाची) 'मी गडबडींत होतों म्हणून ऐकिलें नाहीं' ५ धादल, तिरपिट, तारांबळ, उतावीळ, घाई, गर्दी ६ (ल) बंड, दंगा ७ (ल) दबावाचें, घाबरून सोडणारें भाषण किंवा व्यवहार 'अरे जा! एवढी तुझी गडबड कशाला पाहिजे! अशा गडबडीला कोणी भीत नाहीं' [ध्व] ०गुंडा–पु १ (एखादा सत्कार किंवा काम) उतावळीनें व अव्यवस्थितपणें करणें २ महानुभावपंथातील रुमास हा शब्द लावतात (कारण तो चटपट उरकून घेतात असें म्हणतात) भक्ति आणि भावार्थाचा गडबडगुंडा केला। एकाजनार्दन पायीं मानभाव झाला' –भज ४१ ३ पुन्हा पुन्हा जमीनीवर लोळण

घेणें, गडबडा लोळणें ( ल्हानमुलानें रडताना ), ४ लोळण्याचा एक खेळ ५ गुप्त व गूढ प्रकारानें घात करणें, पैसा खाणें, लाटणें दाबणें ६ घोटाळा, घालमेल करणें, विस्कळितपणें विवरण करणें, अव्यवस्थितपणें आणि घाईघाईनें उरकलेलें काम, 'एका घटकेत ल्माचा गडबडगुंडा करून भटजी निघून गेला ' ७ ( व ) सावळागोंधळ ८ व्यभिचार 'याणें केला गडबडगुंडा।' -राला ७४ [ गडबड+गुंडा=गोळा ] ०सडबड-स्त्री गडबड द्वि ०करणें-(काम चागलें होतें किंवा वाईट होतें इकडे लक्ष्य न देता ) गडबडीनें कसें तरी उरकणें

गडबड —स्त्री (हमाली) खाचखळग्याची, उचनखल खडबडीत जमीन, खडबड पहा

गडबडणें—अक्रि १ गडबड होणें, गोंधळणें, घोंगाळा, गलबल धादल उतावीळ, तारांबळ, आवेश यांनीं युक्त होणें गडबड पहा 'गडबडले सुर गेले सत्याच्या नायका पुसायातें।' —मोमत्र ३ ५९ पेंढाऱ्यांची आवई ऐकताच गाव गडबडला ' २ गमावणें हरवणें. 'या रुमालातली चिठ्ठी गडबडली ' ३ गैरविल्हे लागणें, अव्यवस्थित होणें विस्कटणें 'पोथी गडब डली आहे ती लावितों ' ४ गडगडत, ठणठण, खडखड आवाजानें खालीं येणें, उलथेंपालथें होणें, कोसळणें, ढासळणें, 'घाय गडबडती घोडे।' -ज्ञा ७ ८० ५ गडबडा लोळणें, लोटांगण घालणें, लोळणीवर लोळण घेणें 'दखोनि राघवपदाब्जरजास वाटे। लोटांगणीं गडबडी सुख फार वाटे ।' —वामन, भरतभाव ६० ६ चित्त व्यग्र होणें भ्रमणें ७ ठरल्याप्रमाणें काम न होता बिघडून भलतेंच होणें ८ मरावयाच्या बेतात येणें 'कालच तो गडबडला होता पण मात्रेनें शुद्धीवर आला '

गडबडव(वि)णें—उक्रि घाईघाईनें (काम) उरकणें, करणें, धादलीनें व अव्यवस्थितपणें करणें [ गडबडणें, याचें प्रयोजक ]

गडबडा—क्रिवि अस्ताव्यस्तपणें, दु खानें, गडबड शब्द होईल असें जोरानें झपाट्यानें ( लोळणें ) 'गडबडा धरणीवरि लोळते। द्रवती न कवीसहि लाळ त। -वामन भामाविलास ४ (नवनीत पृ ९९) पोटांत कळ उठताच गडबडा लोळू लागला [गडबड]

गडबडाध्याय-पु गोंधळ, घालमेल, अव्यघोटाळा

गडबडाट—पु अतिशय गडबड, कमालीचा घोटाळा, आरडाओरड, मोठा गोंधळ [ गडबड ]

गडबडी—स्त्री गडबड, धादल, घाई धांवपळ, घोळ, दंगा [ गडबड ]

गडबड्या—वि १ धांदरट घालमेल्या, उतावळ्या २ उद्यमशीला, चपल उद्योगी, खटपट्या

गंडभेर-भेरव-भेरी—पु १ एक प्रकारचा काल्पनिक पक्षी २ गेंडा ( पशु )

गडमाळा-ला—स्त्रीअव मानेस गळवें होण्याचा एक रोग, कफ मेद हे दूषित होऊन काख खांदा, मान, गळा व अडसधी या ठिकाणीं सावकाश पिकणाऱ्या गांठी होतात यावर कांचनाच्या सालीचा काढा, सुंठीचें चूर्ण घालून पिणें, अथवा वायवर्णाच्या सालीचा काढा दूध घालून पिणें म्हणजे गडमाळाचा नाश होतो -योर २ ७५३

गडमृग—पु गेंडा पशु [ स गडक, गड+मृग ]

गंड(डे,री)—स्त्री १ सोललेल्या उसाचें ( जोंधळ्याचेंहि ) पेरें, कांडें तुकडा, कर्वा (तोंडात मावण्याइतका) २ ढुगडें इ० वस्त्राच्या पदरावरील ३।४ पट्टे किंवा फुल्या, अशा तऱ्हेचा काठ ३ लहान तुकडा, चिलपी (लाकडाची, धातूच्या कांबीची) [ प्रा गडीरी=उसाचा तुकडा, तुल० स गड गडिका=लहान गोटा, खोड ] ०पदर-पु ज्यात जरीच्या आडव्या दोन पट्या आहेत असा पदर, गंडेरी पट्टी ०दार-वि 'गंडेरी नक्षी (काठ, पदर ) असलेला ०गोफ-पु फुल्याच्या आकाराचा गोफ 'लाल पदर आम्हीं हातीं धरितो। गंडेरी गोफातें विणितो।' —मसाप २ ३०

गडरी—स्त्री ( गो ) तिरपिट, त्रेधा, गडबड, हुवेल्डी

गडलगप—क्रिवि १ हरवलेला, गेलेला, अदृश्य २ हरवण्याच्या, खऊन फस्त करण्याच्या, गहाळ होण्याच्या स्थितींत असलेलें [ गडप+गप् ]

गडवा—पु १ विशिष्ट आकाराचें धातूचें भांडें, खालीं वर आवळ व मध्यें फुगीर तांब्या, गडू २ ( व ) तांब्याच्या आकाराचें मडकें, ( उत्तरहिंदुस्तान ) गाणाऱ्या व नाचणाऱ्या स्त्रिया जो डोक्यावर पाण्याचा कलश घेऊन रगपचमीस थोरामोठ्याकडे जाऊन बक्षीस मिळवितात तो तांब्या [ गडू ]

गंडविणें—अक्रि फसविणें, लुबाडणें, घोळांत घालणें, तोटा आणणें, गंडा घालणें [ गंडा ]

गडस—वि ( अशिष्ट ) १ अनैसर्गिक कृत्य विपरीत संभोग करवून घेणारा, त्यावरून २ (ल) दुबळा, निर्बल [गांड]

गडस—गोंडस पहा

गंडलगोळा—पु टेंगूळ, उठाणु, अवाढव्य गांठ, गोळा ( शरीरावरील किंवा कापूस भरलेल्या रजई इ० वरील )

गंडसूची(करण)—न ( नृत्य ) पाय सुची करून त्याच त्याच पायाच्या बाजूचा भाग उंच करणें, उजवा हात वक्ष स्थलावर ठेवणें डावा हात वक्ष स्थलाच्या बाजूस वांकडा करणें

गडा—स्त्री ( कु ) झाडावरील पानें, फुलें काढावयाची आकडी गडका-खा पहा

**गडॉ**—पु (गो) गडी, सोबती (शाळेतील) [गडी]

**गंडा**—पु १ चौकडी, चारांचें परिमाण (पवड्या, पैसे यांतील), चार कवड्यांचा एक गडा होतो गडा हें पूर्वी चलन असे, हिशेबांत याचा उपयोग करीत २ वस्ताद (गायन, नृत्य, मंत्र, जादू यांचे) लोक शिक्षणारंभीं आपल्या चेल्याच्या किंवा शिष्याच्या उजव्या हाताच्या मनगटास (किंवा घोटास, गळ्यात) जो दोरा बांधतात तो (क्रि० घालणें, करणें, बांधणें) ३ घोड्याच्या गळ्यांत बांधलेली काळ्या सुताची (तींत आणीक काहीं वस्तू किंवा अलंकार घातलेली) दोरी ४ भूतबाधा, रोग इ० नाहींसा करण्यासाठीं मनगटास किंवा पायाचे घोट्यास बांधावयाची अभिमंत्रित दोरी ५ काशीच्या काळभैरवाचा प्रसादाचा काळ्या रेशमाचा, मनगटांत बांधावयाचा दोरा ६ (मह्ई) चौपट संख्या 'रस(म्हणजे तीन) गडे =बारा संख्या (बाप्र) ०घालणें चढविणें-(ल) १ भारणें, भुलविणें, फुसलावणें, मोह किंवा भुरळ घालणें २ (सामा) ठकविणें, फसविण, झुलविणें, पसे काढणें **गडारणें**-सक्रि गडा घालणें पहा सामाशब्द-०नाडा-दोरा-पु गडा अर्थ २, ३, ४ पहा ०पट्टा-पु घोड्याच्या डोक्या वरील व गळ्यातील अलकार 'गडापट्टा गेंदजोड्या रेशमी फुंदणी लाऊन तिला।' -पला ४ २१

**गंडा**—पु घोड्याच्या स्वारीचें सामान, खोगिराचें एक उपकरण

**गडाड**—पु १ मोठा गडगडाट, गर्जना, घडघडाट, गलबला इ० [ध्व गड] २ आवेश, उत्साह 'अभ्यासाच्या गडाडीं। प्राण खवळल्या कडाडीं।' -एभा १४४३० -वि १ अति शय चढीचा, उभट, मोठ्या उतरणीचा (उतार) २ खोल 'ये नदिचें पाणि गडाड।' -पच ४९ [ध्व] **गडाडणें**-अक्रि (काव्य) १ गडगडणें, घडघडणें, गरजणें, गाजणें, गुरगुरणें घुमणें (मेघनाद गाडा, जनावर, पोट) 'होऊ पाहे खडखड गगन गडाडलें।' २ (संकेत) मरणें, कामावरून वडतर्फ होणें, फसणें, मोडणें, ढांसळणें (वेत, कट) [ध्व गड]

**गंडात, गंडांतर**—पुन (ज्यो) १ अनिष्ट काल ग्रहदशा कुयोग २ (गंडांतर) अपमृत्यु जिवावरचें दुखणें भयकर धोका अघोर अरिष्ट, निकट आलेलें सकट, अशुभसूचक भावी घटना भयदायक दशा, आपलें अस्तित्वच नाहींसें होतें कीं काय अशी भीति उत्पन्न करणारें सकट (क्रि० येणें जाणें चुकणें टळणें वारणें, निवारणें, उडणें). 'तव द्वादशवर्षी मृत्युचिन्ह। गडांतर घोर होतें।' -शिलि ११ १५७ 'विविधज्ञान विस्ताराच्या दैव दुर्विपाकामुळें त्याच्यावर अनेक गडांतरें आलीं' -विवि

**गंडार**—स्त्री (व) सोंगाचें भजन, ललित 'कालची गडार चांगली होती'

**गंडारणें**—अक्रि (कु) (तारुण्याचा) उन्माद येण [का गंडा=शक्ति, बल, नवरा]

**गडाला**—पु (प्रा) १ ओबडधोबड रड्डा, भोंक, खाच २ (ल) अवघड काम, घोटाळ्याचें प्रकरण, जिकीरीचें कार्य [रा गड=खदक, खड्डा]

**गडाविणें**—उक्रि मित्रभाव दाखवून वळविणें, लाडीगोडी लावणें, भुरळ घालणें, फुसलाविणें, गळविणें (नेहमीं वाईटअर्थी प्रयोग) [गडी=मित्री]

**गडि(डी)ण-णी**—स्त्री गडणी, सोबतीण, सखी, मैत्रीण 'गडिण वडिल भोळी स बळी रम्य लीला।' -हरिराजकृत मुद्गलाचार्य विरचित रामार्याचें भाषांतर ८२ 'मग बोलाऊन आपल्या गडिणी।' -भवि २२ ४८ [गडी (स्त्री) तुल०का गडणिसु=एकत्र करणें]

**गंडिया**—पु १ षढ, हिजडा, नपुसक २ गाढ्या, एक शिवी (निंदेनें) अपराक्रमी, दुर्बळ माणूस म्ह० गावचा गडिया तो सासुबाईचा दशगंडिया' [गाड]

**डियागडणी**—स्त्रीअव मैत्रिणी, कुमारिका, सोबतिणी, सख्या -इसापनीति [गडीणचें अव +गडिया, ही द्विरुक्ति]

**गंडियेरी**—स्त्री गडेरी, उसाचा कर्वा, गडरी पहा 'ले रे सगीत गुलाब गडियेरी।' -सगीत घोंटाळा ८

**गडी**—पु १ मनुष्य, 'आम्हीं ज्ञानी शुद्ध गडी' -विक ९५ २ हाताखालचा माणूस, हस्तक, बगल्या, आडकाम्या माणूस, मुलगा, छोकरा, माणूस, मोलकरी मजूर, चाकर इ० ३ सहचर सोबती, लाग्या (सहाध्यायी, गुरुबधु वगैबधु खेळगडी, एका धद्यातील सहकारी) मित्र 'भला माझा तू हसगडी राया।' -र १८ ४ (धदेवाचक शब्दाच्या पुढें) व्यक्ति, असामी, माणूस जसें -ब्राह्मण-भट-मुसाफीर-शिपाई गडी 'येताचि विक्रम लवें श्रीहरिचा दयितदास वीर गडी।' -मोविराट ४ ८९ ५ खळातील भागीदार, भाग घेणारी मडळी 'रगोऱ्याचे खळास दहाबारा गडी लागतात' ६ (सोंगटी इ० खेळ) भिडू जोडी दार -स्त्री (मुलें व अडाणी यात) मैत्री, सोबत, गट्टी पहा. (क्रि० धरणें, मिटण तोडणें, फुकणें) 'पुरे पुरे तुझी कान्हो गडी रे।' -मध्व १७३ 'यमे तुझें मी मोतीं ओंवून द्यायचा नाहीं, आणखी गडी फू करीन बर का?' -पकोघे [स. घट=जुळणें, एकत्र होणें, घन, घड, तुल० का गडियु=एकत्र आणणें] **गडियागडी**-क्रिवि दर, प्रति, प्रत्येक गड्यास (सोबती सवगडी, माणूस) 'आणविल्या डांगा घेवोनिया का काठी। बसोनिया वाटी गडियागडी।' ०माणूस-पु (सामा) मजूर, माणूस, हरकाम्या नोकर, चाकर

गड्डा-ड्डी—स्त्री पेंढी, जुडी (भाजी, गवत, काटया, काड लाकूड) [का गड्डे, म गड्डा]

गडी—स्त्री गढी, भुईकोट लहानसा [गड याचें अल्पत्व] 'आली उच उज्जनीची गडी।' —ऐपो ४३४ गढी पहा

गडो-ड्डी—स्त्री (सोनारी, खा) चौकोनी दोन इंची घन किंवा सुमारें ४० ते ६० भारांचा ठोकळा, यास वाटयांसारखे लहान लहान खळगे असून त्यात मण्याचे अर्धे गोल भाग ठोकून तयार करतात

गंडो—स्त्री लहान चवू गिंदी पहा

गडीगंज—वि गडगंज पहा

गडीसीडी—क्रिवि कानाकोपऱ्यांत, एकांतात 'गडीसीडी असावे।' —गुरुपाट ३५

गडु—पु गडमळा, गलड रोग [स]

गडुवा—पु गडवा पहा.

गडू—पु पाणी पिण्याचें लहान भांडें, लहान तांब्या किंवा गडवा, गुडगुली [स]

गंडू—पु दर्प, गर्व —शार [कडु?]

गंडूष—पु १ चूळ, घोट, गुळणा (क्रि० घेणें) २ चूळ खळखळावणें, खुळखुळ (क्रि० करणें), [स] ०पात्र—न तस्त, पिकदाणी [स]

गडे—सबो उद्गा बये! अग! सखे! १ लाडक्या माण साला-विशेषत. मैत्रिणीला-हाक मारतांना, कांहीं सांगतांना स्त्रिया वापरतात 'गडे अनुसूय! सांग मांग कीं बाई।' शाकुंतल २ मवऱ्याशीं लडिवाळपणें बोलतानाहि वापरतात 'मला सांगायच गडे! '[गडी]

गोंडे—न (गो) असम राहिलेली शेष संख्या, दोहोंनी भागल्यास शेष उरते अशी (३, ५, ७इ०) संख्या, एकीबेकी खळ ण्यातील विषम (एकी) संख्या ०फाँडे—न (गो) वरीलप्रमाण पण सम (२, ४, ६, ८) संख्या (चिंचोक्याचे खेळांतील) बेकी

गडेकरी—वि. हत्तीच्या पुढील भालाईत (माणूस) हत्ती बिथरला असता हे लोक आपल्या भाल्यानीं त्याला टोंचून टोंचून ताळ्यावर आणतात त्याच्याजवळ कांटयाचे चिमटेहि अस तात व ते वरील प्रसंगीं हत्तीच्या पायांत अडकवितात, गडकरी अर्थ ३ पहा 'हरकामे, गडेकरी, साठमार व बारनिशी कारकून यांनीं आपआपलीं कामें करावींत' —ऐराघुप्र ११ ६२२ [स गड= छोग, भाला]

गडेगडप—(गो) शिमगी पौर्णिमेस (लोकगीताप्रमाणें) एकताली ढोल वाजवून अगांत एक प्रकारचा अवसर आणणें ह अवसर आलेले लोक रात्रभर भटकून दुसरे दिवशीं ठराविक वेळीं शुद्धीवर येतात

गंडरी, गंडेरादार गंडोर, गंडोरी—गडरी-दार पहा.

गंडोरी—पु १ (माळी) गाठी, वर, पानें व इतर फुलें आणि मध्यें गुलाबाचें फूल असलेला हाराचा भाग अशा हाराला गडोरी हार म्हणतात २ (ओतकाम) समईच्या खांबाच्या वरचा व खालचा भाग ०हुसळी—स्त्री (सोनारी) गळयांत घालावयाच्या साध्या हुमळीप्रमाणेंच परंतु जिच्या मधल्या मुठमर ज ड भागावर यांची पाडून मटरेल आकाराच्या मण्यासारखी रांग केलेली असते अशी हुसळी [गडरी, गडेरी]

गड्डर—स्त्री (व) गड्डी, चळत, उतरड 'पचवीस पंच- वीस रुपयांची एक गड्डर अशा रुपयांच्या गड्डरी लावा, म्हणजे माजायला सोपें जाईल' [गड्डी]

गड्डा—पु १ भाजीपाल्याचा दळदार कांदा (कोबी, नवल रोल इ०) २ ढेंप, डिखळ गोळा, लगदा, कांदा (कमळकांदा, मुरब्याचा लगदा, नारळांत कधीं कधीं होणारा गड्डा, एके ठिकाणाहून उपटून दुसऱ्या ठिकाणीं लावण्यास न्यावयाच्या रोपटयाच्या किंवा झुडीच्या मातीचा घट्ट गोळा चिकटलेल्या मुळया) ३ नदींतील लहान लहान खाडवीं, कोरडी जागा ४ (तजा) गळू, फोड, गळू नारू, मुळव्याध इ० चा मूलभूत असलेला अंश ५ (क गा) चाकाचे अरे ज्यात बसवितात तो चाकाचा मधला भाग, तुंबा ६ (व) गर्व, अभिमान ७ (वे) बटाटा ८ (ल) साठा, समृद्ध, वद 'शहाणपणाचा गड्डा' गड्डों— पु (गो) गाठी [का गडडे]

गड्डा—पु (गो) १ गाडीच्या चाकाचा तुंबा २ गोटी

गड्डा—(व) खड्डा [स गर्ता]

गड्डासणें—अक्रि (गो) नाहींसें करणें, लपविणें

गड्डाळिका—स्त्री १ लांबलचक गद्य वाक्य, गद्य लेखाचा लांब भाग किंवा अशा भागाची मालिका २ यमानें साधलेली गद्यरूप कविता, गाथा, चूर्णिका, रम्य, सुंदर गद्याचा छोटासा भाग, अलंकारिक रूपकाची वाक्यपरंपरा ३ (ल) कटाळवाणी गोष्ट, चऱ्हाटपंजरी (प्रपंचादि संबंधीं) (क्रि० लावणें) [गद्य+ आली=ओळ]

गड्डी—स्त्री १ पेंढी, जुडी, जुडगा (भाजी, काड्या, लाकडें इ० चा) २ (कागदाच्या) दहा दस्त्यांचा जुडगा, गठ्ठा [का गड्डे]

गड्डी—स्त्री गढी, भुईकोट किल्ला. [गड, गढी]

गड्डू—वि ठेंगणा पण मजबूत, घट्टमूठ व खंबीर, मजबूत पण आटोपसर [गद्दू]

गड्या—पु (गडी याचें संबोधन) मित्रा! दोस्ता! 'सांग गड्या तुला काय स्वप्न पडलें तें?' —कम ३ ८०

गंड्या—पु शिंपी गडिया पहा [गोंड]

**गड्याळ-ळी**—वि १ घाणेरडा, अव्यवस्थित, बेशिस्त, भाभळभटी ( मनुष्य, व्यवहार, भाषण ) २ ( कुणबी ) गडळ गदळ पहा

**गड्याळी गड्याळकी**—स्त्री अव्यवस्थितपणा, भाभळ भटपणा, गैरीपणा, घोटाळा

**गड्येकार**--पु ( गो ) गाडीवाला [ प्रा दे गड्डिआ, गड्डी=गाडी ]

**गढण**—अक्रि तल्लीन होणे गडणे पहा

**गढळ**—वि १ वाखट, विद्रुप, निरुपयोगी, जीर्ण, गदळ २ भिकार, नादान, नालायक, वाईट ३ अमंगळ, घाणेरडा, द्वाड कुजकामाचा, गदळ (माणूस पशु जमीन, वस्तु) [गदळ]

**गंढारणे**—अक्रि सर्वच्या सर्व उलथून पडणे, ढासळणे कोसळणे ( विहिरीच्या बाजू इमारत, खाण )

**गंढार(ळ)णे**—अक्रि १ नामाडी होणे, बुडणे ( पीक उत्पन्न धंदा ) २ फसणे नाश पावणे बिनसणे, मोडणे, चुराडा होणे, ढासळले जाणे ( मनुष्य, मनस्थ वेत ) ३ अंग झडणे, रोडावणे, चोपणे (वार्धक्याने, रोगाने) ४ मधार घण, भीतीने काढत घेणे (वादांत) बावडा बळणे, कचरणे, खचणे, दुर्बल बस्या येणे ५ ( वादादिकात ) थकणे

**गढी**—गडडी पहा

**गढा**—स्त्री १ लहान भुईकोट किल्ला, गावचा मातीचा किल्ला, देशमुख, देशपांडे, पाटील याना पूर्वी राहण्यास बहुधा गढया असत 'किल्ले व गढिया बळकावून आम्हांशी वेदिल। —भाव ३५. २ ( व ) पाढऱ्या मातीची किंवा विटांची अति शय भरद भिंत [प्रा गढ=गड, तुल० का गुड्ड=डोंगर] ०वंद्-वि १ ज्याच्या मालकीची गढी आहे असा ( जमीनदार ) २ जो गढीत अडकून पडला आहे असा

**गढुळण**—उक्रि १ गढूळ होणे, करणे, गदळणे, रेंदाडणे, मळकट करणे, खडुळण २ ( ल ) क्षोभविणे, चवताळविणे, दंगल, गडबड माजविणे [ गढूळ ]

**गढूळ**—वि १ खढूळ, गदळ, रेंदाड, मातीने युक्त, राड असलेले 'किंवा गढूळ झाले असतां उदक। स्थीरावल्या द वा पवित्र सुख।' —नव २४ १४९ २ ताबडसर ( डोळा ) ३ ( ल ) क्षुब्ध, अस्वस्थ, व्यग्र कलुषित, विकारवश ( राग दुःख, क्लेश, मत्सर संशय हेवा इ० मनोधर्मामुळे ) ४ भदा धुंदी, बडाळाने व्याप्त (राज्य, देश ) ५ आचारभ्रष्ट धर्मभ्रष्ट (जात, वर्ण, व्यक्ति ) ६ खडखळ, गोंधळाचा ( हिशोब ) [ प्रा गडुल=तांदूळ वगैरे धुतलेले पाणी ? तुल० का गदडु= चोरान हालविणे ]

**गढेपरा**—पु किल्ल्यातील शिपाई, नोकर, गडकरी पहा धाको १ ३

**गढ्ढा**—पु ( व ) खड्डा, खळगा [ स गर्ता ]

**गण**—पु १ जमाव, संख्या, समुदाय, मेळा, समूह 'या स्वधर्मपूजा पूजिता। देवतागणा समस्ता।' —ज्ञा ३ ९६ २ पंथ, जाती, वर्ग, विभाग, वर्ण ३ ( ज्यो ) फल ज्योतिषातील एक संज्ञा हे गण तीन असुन देवगण, मनुष्यगण, राक्षसगण अशी त्यांची नांवे आहेत २७ नक्षत्रामध्ये एक एक गण नऊ वेळा येतो व ज्योतिषात त्याचा अनुक्रम ( अश्विनीपासुन ) दे म रा म दे म दे दे इ० आहे हा जन्मनक्षत्रावरून धरतात व लग्न इ० प्रसंगी विचारात घेतात ) ४ तीन गुल्म सैन्य ( २७ रथ, २७ हत्ती, ८१ घोडे, १३५ पायदळ ) ५ गणपती देवाच्या हाताखालचा क्षुद्र देवतावर्ग, प्रमथादि शिवगण, शंकराचे सेवक, यावरून ६ मंगलप्रसंगी अवग्याम किंवा समारंभाला बोलावलेल्या मंडळातील एक पुरुष ( याच्या उलट सुवासिनी ) गणपवासीण पहा ७ (गणित) संख्या, रक्कम बेरीज, जमा ८ पंथ, संप्रदाय ( न्याय शास्त्र, धर्म यातील ) ९ (व्या ) धातूचे रूपाख्यान, धातुपाठ तील भ्वादि अदादि गण प्र १० गणपती देवता, गजानन ११ (शाप ) कोटी, वर्ग, प्रत, ( इ ) ऑर्डर १२ मानस, अभिप्राय, हेतु, खरा उद्देश 'त माझे मुलास मुलगी देतात की नाहीं तो गण काढून या ' १३ जमाव, समुदाय, राशी, पुंज, संघ समासात— अहर्गण, मासगण, वर्षगण, भगण इ०=दिवस, महिने, वर्षे, तारे यांचा समूह १४ सेवक, भक्त यांचा समूह १५ (काव्य) अक्ष राच्या गुरुलघुत्वावरून दिलेली संज्ञा, गण तीन अक्षराचा होतो हे गण आठ असुन म, य, र, स त, ज, भ, न अशी त्यांचीं नांवे आहेत १६(गणित)गुण्याक व गुणकांक एक करून केलेला गुणा कार, वर्ग १७ तमाशातील ईश्वरस्तुतिपर प्रारंभीचे गीत (बहुधा गणपतीच ) मान नमन आधीं गणा।' —ऐपो ७ १८ (ना ) खेळातील डाव १९ ( सांकेतिक ) राघोबादादा पेशवे यांचे शागीर्द 'श्रीमंताचे तर्फे गणाचा कारखाना' —ख १२७८ २० ( ल ) देवाच्या उत्सवातील चोपदार, चवरी वारणारा, पालखी उचलणारा इ० प्रत्येक माणूस व्यक्ति २१ ( इंग्रजी तील कोरम या शब्दास हल्ली योजला जाणारा प्रतिशब्द ) सदस्या (सभासदा) पैकी निदान अमुक भाग किंवा निमान अमुक संख्या हजर असली तरच सभेची कायदेशीर बैठक होऊ शकते अशी किमान मर्यादा —सभा ७१ संख्यामर्यादा [ स गण्=मोजणे] ( वाप्र ) ०न(ने)मणे—१ गणपतीची आराधना करणे, आराधन सा ी गणपतीस्थापना करणे २ प्रयास लागणे, एखादी गोष्ट कर ण्याचे ठरविणे ०चौथ पुजणे-( ना )मारणे, चोप देणे. ०देणे, पुजणे-( व ) १ ठोक देणे, मारणे 'लोकांनीं त्याचा गण दिला—पुजला' २ डाव ( खेळातील ) देणे किंवा घेणे 'मामा गण दे' सामाशब्द—गणक—पु कुडली मांडणारा, जोशी, राव,

पंचांग पाहणारा ज्योतिषी, जोशी, पंचांग करणारा ज्योतिषी, दैवज्ञ 'ब्राह्मण बोलाविले गणक जाशी।' -ह २३ ६६ [गण] ०गोत-न कुटुंब, घराणें, नातलग, संबंध, सोयरेधायरे, भाऊबंद इ० व्यापकअर्थी 'गण गोत मित्र तू माझें जीवन।' -तुगा ७६९ [गण+गोत्र] ०दीक्षा-स्त्री १ जमावांत (किंवा शिष्यमंडळींत) दाखल होण्याचा संस्कार, मंत्रोपदेश २ पुष्कळ लोकांकरितां व्रताचरण, धार्मिक विधि ३ ज्यांत गणपती देव मुख्य आहे असा विशेष प्रकारचा संस्कार ०दीक्षी-पु १ अनेक जातींचा उपाध्याय, वर्णगुरू, आचार्य, पुरोहित २ गणेशपूजेची दीक्षा घेतलेला पुरुष ०द्रव्य-न सार्वजनिक मालमत्ता, समाईक द्रव्य सार्वजनिक किंवा सर्वसाधारण भांडवल 'गणद्रव्यचोरी करी।' -गुच २८ ५६ ०नाथ-पु १ शिवगणाचा स्वामी, गणपती देव त्यावरून २ नायक, अधिपति ०नायक-पु गणपतीदेव 'ओं नमो जि गणनायेका। -दा १ २ १ 'उठाउठा सकळलोक। आधीं स्मरा गणनायक।' -गणपतीचीभूपाळी ५ ०गण भोंवरी-स्त्री मुलांचा एक खेळ, अगाऱ्या भिगाऱ्या ०पत चतुर्थी-स्त्री (अशिष्टप्रयोग) गणेशचतुर्थी ०पति-पु १ गणेश देव, गजानन २ (ल) ढेरपोट्या माणूस ३ (गु-हाळ) कढईतून गूळ बाहेर ओततांना गजाननाच्या नावानें एकीकडे थोडासा काढून ठेवलेला गूळ, यावर गुरवाचा हक्क असतो त्यावरून ४ गूळ खरेदी करतांना वजनाच्या पारड्यांत टाकावयाचा दगड गण पतीचें करणें-स्त्रीनें गर्भार होणें ०पतीचें केलें-स्त्रीस गर्भ राहिला ०पतीचें झालें-(कोण्या गणपतीची करणी) कोणी स्त्री गर्भार झाली ०पतीचें नाव घेणें-प्रारंभ करणें म्ह० उंदराला बोललेले गणपतीस लागतें ०पतिपूजन-न १ गणेश पूजा (कांहीं एक कार्यारंभीं करतात ती) २ (ल) कार्यारंभ ०पंचायतन-न. गणपती, शिव, नारायण, रवि व देवी अशा पांच देवता यांत गणपती प्रमुख असतो ०पूर्ती, भर्ती-स्त्री किमान मर्यादेइतके सभासद जमणें, जमाव, कोरम 'सरकारपक्षाच्या लोकांनीं संगनमत करून दडी दिली असती तर योग्य गणभरती (कोरम) नाहीं म्हणून अध्यक्षांना सभा बरखास्त करावी लागली असती' -सास २ ९९ ०मंडळी स्त्री ठराविक नेमलेली, स्थापन केलेली मंडळी, जूट, तुकडी, टोळी, गट, समूह, टोळकें इ० ०मध्य-न पत्रिका अथवा जन्मकुंडलींतील ऐक्य आणि शत्रुत्व या दोहोंहून भिन्न (गणमैत्री किंवा गणवैर नसणें), नवरा व बायको, धनी व चाकर इ० कांच्या गणांचा भेद असें-एकाचा देवगण तर दुसऱ्याचा मनुष्यगण गण अर्थ ३ पहा ०मैत्री-स्त्री जन्मपत्रिकेंतील गणांमधली मैत्री एक गण असणें, बहुतेक दोघांचा (नवरा, नवरी, धनी, चाकर) गण एक आला म्हणजे त्यास गणमैत्री म्हणतात 'या मुलाची व त्या मुलीची गणमैत्री येते कां पहा?' गण अर्थ ३ पहा. ०वेष-पु संघांतील व्यक्तींचा ठराविक पोषाख, (इं) युनिफॉर्म 'तुमच्या हिरव्या रंगानें ते गणवेष इतके खुलून दिसले नसते' -सास २ २१३ ०वैर-न जन्म पत्रिकेंतील गणाची प्रतिकूलता, वैर, शत्रुत्व, जसें-राक्षसगण आणि मनुष्यगण

गणश -क्रिवि जमाती-वर्ग-टोळी-मंडळीकडून ०सत्ताक राज्य-न विशिष्ट प्रजासत्ताक राज्य, याचा प्रमुख अधिकारी लोकनियुक्त असतो व सर्वांच्या हिताचे प्रश्न सर्वांनीं मिळूनच सोडविले जातात या पद्धतीचें मूळ फार प्राचीनकाळापासून भारतवर्षांत दृष्टीस पडतें ०सवाशीण-स्त्री १ गावाचा मेहतर, पाटील किंवा चौगुला यांची बायको, मेजवानी किंवा इतर समारंभांतील एक हक्कदार व्यक्ति. गावांतील स्त्रियांच्या गाव भोजनांत हिला पहिल्यानें आमंत्रण द्यावें लागतें उत्तरेकडे पाटील किंवा त्या जागेवरील अथवा तत्संबंधींच्या माणसाला गण म्हणतात व त्याच्या बायकोस (किंवा इतर स्त्रीसहि) सवाशीण म्हणतात त्यावरून २ समारंभांतील भोजनप्रसंगीं बोलावलेला एखादा पुरुष व स्त्री (अथवा कोणतेंहि मेहूण)

गणक-गणांग—पु (वे) १ भाताप्रमाणें शेतांत उगवणारें गवत -कृपि २०३ २ रानभात

गणंग, गणगट—पुन १ धान्यांतील न शिजणारा दाणा, भिजण्यांत मऊ न होतां, शिजविल्यानंतरहि टणक राहाणारा दाणा जोंधळा इ० धान्याच्या लाह्या केल्या असतां त्यांतला न फुटलेला दाणा २ (ल) मूर्ख, टोणपा, अक्षरशत्रु ठोंच्या, मतिमंद माणूस

गणगण, गणगणणें, गणगणा, गणगणीत, गणगणाट, गणगण्या—गिणगिण इ० पहा

गणगणी—शम (कों) प्रत्येकीं, प्रत्येकाकडून, दर, दरगणीक पहा [गण द्वि]

गणगर—(गो) कटिकणगी, कणगर पहा

गणगी—स्त्री (कुरडी) काडी, उदबत्त्या वगैरे करण्यासाठीं केलेली बांबूची जाड चोय

गणगूट—न (प्रां) निकण पाखडल्यानंतर निघालेली कणी, फोलकट, मणी मदन पहा [कण+कूट]

गणगौर—स्त्री चैत्रांतील बायकांनीं काढलेली गौरीची-पार्वतीची मिरवणूक (मारवाड्यांत ह चाल) [सं गण+गौर]

गणणें—उक्रि १ मोजणें, हिशेब करणें, अजमास करणें 'तिथी गणा, मास दुणा, त्यांत एक उणा, तें नक्षत्र जाणा.' २ (ल) समजणें, लेखणें, पर्वा करणें, मानणें, महत्त्व देणें 'जैसें न गणिजे पंचाननें। गजघटातें।' -ज्ञा १ ९२ 'जो मृत्युलाहि न गणी। जसा योगी मुनीरूप सवारी।' -मोकर्ण ६ ९९ [सं गण्, गणन=मोजणें]

**गणतगर**—स्त्री न तगरी या फुलझाडाची एक जात व तिचें फूल

**गणता**—वि मोजणारा, हिशेब करणारा 'वरी एकपणें गणिजे। तें गणनेंनर्मी दुजें।' –अमृ ५ ३४

**गणती**—स्त्री १ मोजणी, हिशेब, अजमास, सख्या 'हरि! हरि! हरि–हरिणातचि त्याची केलीच त्या जनें गणती।' –मोसभा ५ ९२ 'टोपीवाले नाहीं गणती।' –ऐपो ३५८ २ (ल ) गणना, मान, योग्यता, गुमान, किंमत, खिजगणती 'जो देवास भीत नाहीं त्याला मनुष्याची काय गणती आहे?' समासात–वर्षो–सालो–महिनो–खडो–मणो–शेरो–लक्षो–शेकडा गणती=वर्षांनीं इ० गणणें ३ (गो ) सीमा, अखेर –तीस लागणें–नोंद होणें, येऊन मिळणें 'नित्य नवे गणतीस लागती एकाडे देशावरले।' –ऐपो २१६

**गणन**—न १ मोजदाद, सख्या मोजणें, गणना पहा २ रक्कम, बेरीज, एकूण सख्या

**गणना**—स्त्री गणन, मोजणी अथवा हिशेब करणें, गणती, हिशेब २ (ल ) मान, योग्यता, दर्जा, प्रतिष्ठा ३ अतर्भाव, समावेश [स गण्]

**गणनीय**—वि १ मोजला किंवा गणला जाण्यास योग्य, मोजण्यालायक, अजमास करण्याजोगा २ (ल ) लक्ष्य, विचाराई, वर्णनीय, सन्माननीय, मोलवान

**गणपत**—पु (पुणें ) सापसुरळी

**गणर(म)णणें**—अक्रि गडबडणें, कांकू करणें, शकित होणें, घाबरलेलें किंवा गोंधळलेलें असणें, माघार घेणें, भय पावणें (निषेधार्थी ) 'तो पुण्याचे मोठमोठ्या पडितास उत्तर करायाला गणमणायाचा नाहीं तो का तुला भितो!' [ध्व गण–मण–बण?]

**गणमणणें**—अक्रि (गो ) दाद घेणें, सागितलेलें ऐकणें

**गणसरी–सुरी, गणसूर**—स्त्री निच्या पानाच्या रसानें सूज उतरते अशी वनस्पति एक औषधी झाड

**गणसागर–सागोर**—पु (गो ) नदी

**गणसुरंग**—स्त्री एक औषधी वनस्पति

**गणा**—पु जोंधळा किंवा बाजरीच्या ताटाचा शेंडा अथवा शेंड्याचा भाग बोरूचें किंवा वेताचें कांडें (कोष्टी लोक काडी करावयास घेतात तें), साळया–कोष्ट्याची चाकावरील सूत गुडाळण्याची काडी, काडीकरितां घेतलेला ताटाचा तुकडा

**गणा**—पु तेल लावून करतात ती भाकरी

**गणा**—गणगूट पहा

**गणात**—न गळत पहा

**गणान्न**—न १ अनेकाच्या मालकीचें (भात अथवा इतर ) धान्य, सगळयानीं करून ठेवलेला धान्याचा पुरवठा, वेगमी २ समाराधनेसाठीं तयार केलेला स्वयपाक, अनेकाचा एकत्र स्वयपाक [स गण+अन्न]

**गणाधीश**—पु गणाचा अधिपति, गणपती देव 'गणाधीश जो ईश सर्वां गुणाचा' –राम १ [गण+अधीश]

**गणावचें**—अक्रि (गो ) रेंगाळणें

**गणिक–त**—शअ १ बरोबर, सह, मागें, ला 'जो देत होतों दर हाके गणिक।' –तोब १३ समासात–माणसागणिक, मुलागणिक इ० २ दर, प्रत्येक, (समासात) वृक्षा–खिडकी–गृहा–खेपेगणिक इ० [गणश]

**गणिका**—स्त्री वेश्या, कलावतीण, कसबीण, राड 'भिक्षा मागुनि दारोदारीं फेडिन ऋण गणिकेचें।' –मृच्छ ३५ [स]

**गणिकारिका**—स्त्री अरणी नावाचें ल्हान झाड [स]

**गणित**—न १ हिशेब, गणनक्रिया, मोजदाद, आकडेमोड व त्यानें सिद्ध जें फल तें २ गणनाशास्त्र (अक किंवा पाटी गणित, बीजगणित रेखागणित) ३ श्रेणीची बेरीज (सामा ) बेरीज ४ गणती, सख्या, माप 'ह्याशिवाय क्षमकती पागा नाहीं गणित।' –ऐपो १४० 'नाना पुष्प–जाती माळा। गणित नाहीं परिमळा।' –मुहरिश्चद्राख्यान (नवनीत पृ १८३) ५ (गो ) प्रश्न, ज्योतिष 'भटजी, बैल चुकला आहे, गणित सागा' –वि मोजलेलें, गणलेलें, हिशेब केलेलें [स] ०शास्त्र–न याचे व्यक्त किंवा अकगणित आणि अव्यक्त किंवा बीज गणित असे दोन भेद असुन त्याचे दोन दोन असे प्रकार होत गले आहेत बेरीज, वजावाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्ग मूळ, घन, घनमूळ इ० चतुर्विध गणित आहे आधुनिक गणित शास्त्रात वरील प्रकाराखेरीज, भूमिति, त्रिकोणमिती, स्थिति–गतिशास्त्र, जलगतिशास्त्र, ज्योतिर्गणित, कलन इ० दुसरे अनेक प्रकार पडतात (इ ) मॅथेमॅटिक्स ०श्रेढी–धी–प्रमाणश्रेधी, श्रेढी–स्त्री एकाच नियमित अकानें (अतरानें ) कमी होत अगर वाढत जाणाऱ्या सख्याची मालिका उदा० ५, ८, ११, १४, इ० किंवा १२ १०, ८, ६, इ० [स] –तागत–वि गणितानें आलेला किंवा काढलेला [गणित+आगत] गणिती–वि गणित जाणणारा, हिशेबी, गणित्या, गणितज्ञ

**गणिमा**—स्त्री १ गनिमी, द्वेष शत्रुत्व, वैर (क्रि० करणें, माडणें, चालवणें) २ क्षोभ, बडावी, दगा, (सामा ) दगा माजविण रीं क्रूरें, दगाफिस्त द [गनीम]

**गणिया**—पु (हा एका गणेशस्तोत्रातील पहिला शब्द आहे) अस्तमानीं विद्यार्थ्यांनीं आपले धडे पाठ झाल्यानतर म्हणावयाचें गणेशस्तोत्र (क्रि० म्हणणें) [गण]

**गणीक**—पु (अप ) गणक, जोशी [स गणक]

**गणीम**—गनीम पहा,

**गणेय, गणितव्य**—वि गणन किंवा हिशेब करण्यास योग्य, मोजण्याजोगे [ सं ]

**गणेश**—पु शिवपार्वतीचा पुत्र गणपती, गजानन, बुध्दिदाता व विघ्नहर्ता देव, म्हणून विद्यारंभीं किंवा ग्रंथरचनेच्या प्रारंभीं याचें स्तवन करतात, जसें –श्रीगणेशायनम , शिवगणाचा नायक, 'देवा तूंचि गणेशु।' –ज्ञा १ २ लेखक किंवा ग्रंथकर्ता यांचा हा आदर्श मानला जातो ( ज्याप्रमाणें बृहस्पति=सर्वोत्कृष्ट वक्ता, मारुती किंवा हनुमान=उड्डाणपटु भीमसेन किंवा दुर्वास=खादाड माणूस, कुंभकर्ण=अत्यंत झोपाळू, कद्रु=फार चिकु, कर्ण किंवा बली=अतिशय उदार ) [ स गण+ईश ] म्ह० (गो ) १ गणेसा गाण झालेन गणेसा तिवॉ=इकडचें तिकडे व तिकडच इकडे (असा घोटाळा ) करणें २ गणेशाचें हालें दोंद, चंडिकेचा जातो प्राण सामाशब्द– ०कंद–कांदा–पु वाडगुळाच्या जातीची एक वनस्पति ०कुंड–पु गणपतीचें छाटलेलें मस्तक ज्यांत टाकलें असें नर्मदा नदींतील एक कुंड [ स ] ०गामा–पु ( विनो )गोमा गणेश लोंढा कारभारी, लुडबुड्या माणूस, लटपट्या पुरुष ०चतुर्थी–स्त्री गजाननाचा जन्मदिवस भाद्रपद शुध्द चतुर्थी ०टेबल–पु ( उप ) कानस्टेबल, विशेषत गोरा सार्जंट 'या सर्वांनी एका य कथित गणेशटेबलाच्या म्हणण्यावरून प्रथम असा दोवळ सुरू कराव्या '–टि १ ३९५ ०टोपी–स्त्री ( मुलांच्या खेळांतील किंवा क्षेत्रांतील शब्द ) एखाद्याला बडविण्यापूर्वी कोणीं मारलें हें त्यास न समजावें म्हणून त्याच्या डोक्यावर घातलेला वस्त्राचा घुंगट, असें घुंगट एखाद्यास घालण्याची क्रिया (क्रि० घालणें) ०टोपी घालणें–( ल ) १ मूर्ख बनविणें, वश करणें २ फसविणें, बुचाडणे टोपी घालणें ०थापटी–स्त्री होळीच्या सणांतील एक खेळ एखाद्यास गणेशटोपी घालून डोकीवर थापट्या मारणें किंवा धोतराच्या टोंक्यानें चोपणें, चोपणाऱ्यास ओळखलें म्हणजे, ज्याला चोपलें त्याच्यावरील डाव जातो ०धौती–स्त्री एरंडे लाचें बोट गुदद्वारांत फिरवून मळ काढणें, यानें मलकोष्ठ नाहींशी होते –सयोग ३६० ०पट्टी–स्त्री पुढील दरवाज्याच्या वरची आडवी पट्टी, कपाळपट्टी दाववटा, हिच्यावर मधोमध गणपतीची मूर्ति कोरलेली असते कुलकेपट्टी पहा ०पूजा–स्त्री १ गणपतीचें पूजन २ कथा इ० समारंभांत वाटलेली खिरापत म्ह० (गो )गणेशपुजेक पुरको नाल (नारळ)=प्रथमग्रासे मक्षिकापात आरंभीच अपशकुन होणें ०वात–स्त्री कापसाची २१ सुतांची ४ बोटें लांबीची वात, या वाती गणेशचतुर्थीपासून दररोज दोन याप्रमाणें वर्षभर लावतात किंवा एकदम लक्ष वाती लावतात ०वेल–स्त्री आकाशवेल –शोत्सव–पु गणपतीचा भाद्रपद महिन्यांतील उत्सव

**गणेशिया**—न ( कोळी ) काळी लोकांचें परकाडीच्या हत्याराचें सांकेतिक नांव –गुजा ६८.

**गणैक्य**—न वधूवरांच्या लग्नकुंडलींची मैत्री, गणमैत्री पहा. [ स ]

**गणोबा**—पु १ गणपती देव 'गणोबा विकाळ। लाडुमोदकाचा काळ।' –तुगा ७११. २ (ल ) ढेरपोट्या माणूस, मूल [ गणपती ]

**गण्णाठें**—न ( गो ) पायलीचा ३२ वा भाग

**गण्य**—वि मोजण्यास, गणला जाण्यास शक्य, सभाग्य, आवश्यक, योग्य, गणनीय, सख्येय [ स गण् ]

**गण्या**—पु १ खड्या, पाणकावळा, ढिसा, मासे खाणारा एक पक्षी २ गणा, कोष्टयाची सूत गुंडाळण्याची काडी

**गत**—स्त्री १ स्थिति, अवस्था, दशा, पूर्वावस्था जाऊन आलेली दुसरी अवस्था, अवस्थांतर ( वाईट अर्थानें ) 'चार दिवस ताप यतांच पोराची गत काय झाली पहा?' २ भूत, पिशाच्च यांनीं बाधा करावयाची सोडून घेतलेली मुक्ति ( क्रि० घेणें ) ३ (वाद्य) कोणत्याहि रागांतील वाद्यांत वाजविण्यासाठीं स्वरांची सताल रचना, ताल, ठेका, वाद्य वाजविण्याचा प्रकार रीत, तान, मिलाफ 'रोज सतारीची एक गत वाजीव' ४ ( संगीत ) फिरक, फिरकी, झोल, काप ( क्रि० घेणें ) ५ वर होण्याचा उपाय, तोड, युक्ति, आश्रय 'एवढीं औषधें घेतलीं तरी तिढिक राहिना, आतां कोणती गत करूं?' ६ शेवट, परिणाम निकाल, 'दुष्कर्माची गत हीच' ७ मार्ग, प्रकार, तऱ्हा (समान सारखा, सदृश असें दाखवितांना ) 'वडयाचें गत, वडयाचें गतीनें हा बृहस्पतीचें बोलतो' 'खरेंच बाई अगदीं नाटकागत सगळें वाटत आहे' –वेडगांचा बाजार ८ (वे ) ताकद गति पहा [स गति] ०भरणा–पु मृदंगादि वाद्यविण्याचे रीतीचा समुदाय, तान, सूर, राग, रागिणी यांचा साठा, समूह 'या मृदंग्यापाशीं गतभरणा फार असून वाजवायाला आळस करतो' [ गति+भरणा ]

**गत**—वि १ गळेला, नष्ट, निघून गेलेला, जुना मागचा समासांत–गत–दारिद्र–धन–बुद्धि–भय–मान–लज्जा –श्रम –सन्मान, गताभिमान गतावधान, गतेंद्रिय, गत–धीर–धैर्य–प्रतिष्ठ २ कडे, आंत जाणें, आंत स्थिरावणें किंवा बसणें 'अंतर्गत, मध्यगत, हस्तगत' ०होणें–१ लोटणें, गुजरणें जाणें, घालवणें ( वेळ, काळ ) २ निघून गेलेला असणें ( या अर्थानें ), नष्ट होणें मरणें म्ह० –गतं न शोच्यम्। =गेल्याचा शोक वृथा न करावा सामासशब्द– ०कथा–स्त्री होऊन गेलेली जुनी, प्राचीन काळची गोष्ट, मागें घडलेला वृत्तांत ०काळ–पु. गेलेले दिवस पुराणकाळ, भूतकाळ ०कुळा–कुळ–वि १ आपण नीं किंवा दोन्हीकडच्यांनीं सामान्यतः कन्यादान करून राहिलेली (अमान, ढोल, कन्नड मिराम) २ मालक किंवा कोणाचा वडवरपणाचा हक्क नसलेली ( अर्थात

इ० ). अशी जमीन गांवच्या मालकीची समजून गावकरी तिची विल्हेवाट लावीत किंवा सरकार ती इनाम देत असे. ३ पूर्वज —गांगा २१२. ०कुळ–न. १ देशांतरास उठून गेलेलें किंवा नष्ट पावलेलें कुटुंब. २ जमीन सोडून दिलेलें कुळ, शेतकरी. ०गोष्ट–स्त्री. गतकथा पहा. ०चेतन–वि. हालचाल नष्ट झालेला; मूर्च्छा आलेला; देहभान वर नसलेला. [सं.] ०तेजस्क, तेज–वि. १ निस्तेज; प्रकाश कमी झालेला किंवा नाहींसा झालेला २ (ल) कांति, शोभा, वैभव यांनीं हीन [सं.] ०धवा–स्त्री. विधवा [सं.] ' नगरिंगतधवा ते आणि निर्वीर्य योद्धे।' –वामन भरत भाव ३. ०पराक्रम–वि. दुर्बळ; शक्तिहीन. [सं.] ०प्राण–वि. १ मृत; मेलेला. २ (ल) भ्रांतचित्त; भयभीत; शुद्धी गेलेला ०भर्तृका–स्त्री. विधवा; गतधवा पहा. [सं.] ०मन–स्त्री (मुलाच्या बोलींत) एकोपा; सल्ला; गुप्त विचार किंवा उद्देश ०रस–वि शुष्क; सुकें; रस नाहींसा झालेला [सं.] ०वयस्क–वि. वयस्कर; वयातीत; वृद्ध [सं.] ०वर्ष–न गतसाल; मागचें वर्ष [सं] ०वित्त–वि. दरिद्री; कफल्लक; रंक. सं.] ०विश्वास–वि. विश्वास, भरंवसा उमेद, अवसान गेलेला [सं.] ०वीर्य–वि १ पुरुषत्वहीन. षंढ २ (ल.) नेभळा; हताश; दुर्बल [सं] ०शक्ति–सामर्थ्य–वि. बलहीन; गततेजस्क पहा [सं.] ०श्री,–लक्ष्मी,–संपत्ति,–सौभाग्य–वि दरिद्री; दैवहीन. अभागी. [सं.] ०सत्त्व–वि निर्जीव; निर्वीर्य; दुर्बळ. [सं.] ०साल–न गतवर्ष पहा. [गत+फा. साल]

**गत**—भूधावि (क.) (ज्यो.) अस्त; मधून गेलेलें (ग्रहाच्या संक्रमणांत नक्षत्र किंवा राशी); एष्य याच्या उलट. ' गत असल्यामुळें मुलीला पाठविता आली नाहीं. '

**गॅत**—न. (गो.) गेळ; खुर.

**गतक**—न १ मिष; ढोंग; बहाणा; सोंग (दारिद्र्य, वेड दुखापत, वेदना यांचें); किंचित् असतां फार करणें (क्रि० घेणें, करणें) २ गद्यपद्यपाचा छोटासा व रसभरित चुटका; मजेदार विनोदी कवन (भाट, बंदीजन, भिक्षेकरी यांनीं गाइलेलें); न्यायप्रचुर वचन अथवा म्हण ३ (कों.) मनोरंजक, हास्यकारक गोष्ट ' त्यानें एक गतक घातलें तर सर्वांच्या हसताना मुरकुंड्या पाडील. ' ४ लांबलचक भाकडकथा; कंटाळवाणी गोष्ट (क्रि० लावणें; लागणें) ' त्याला कां रे आलोस इतकें पुसताच त्यानें दोन घटका मजपाशीं गतक लाविलें. ' ५ दुसऱ्यानें घाबरें व्हावें किंवा चमत्कार वाटून हंसें यावें असें भाषण किंवा भाषणाची नक्कल. ' हुरे बाळ्यावर मला एक गतक सुचलें, काय तर, आकाशाची कुऱ्हाड कोल्ह्याच्या डोक्यावर. '

**गत(द)का**—पु १ धाम धूम स्थिति; घामाची चिकचिक वाहणें; गदगद; ' अंगाचा गतका झाला ' २ उकाडा, उबारा; गरमी; हवेचा कोंडमारा. 'उन्हाचा गदका.' ३ उकळण; शिजणें; खदखद; उकळी; कढ (क्रि० येणें). ४ पिकणें (ठाठरलेलें व विकोपास गेलेलें गळूं, गळूं); आग; तळमळ (खरजेची). ५ उमाळा; आवेश; हुदका; उकळी; क्षोभ (ममता, इच्छा, रडें, हास्य यांचा). (क्रि० येणें). ' गतका आला तवलिला तेव्हां तो पांढ कानाच्या सुमारे। ' –अफला ७१ [ध्व.]

**गतकाळा–ळ्या**—वि कागावा; अकांडतांडव करणारा; थोडेंसें मारलें असतां जीव तोडून ओरडणारा, श्रीमंत असून दारिद्र्याचा बहाणा करणारा; वेड्याचें सोंग आणणारा; ढोंगी. [गतक=गत+कला]

**गतकेडी**—वि. (वे.) निर्लज्ज. [गति=शक्ति+का. केड, क्यडु=बिघडविणें ?]

**गतक्या**—वि १ गतकाळा पहा. २ (कों.) विनोदी; ख्याली; नकल्या; गोष्टीवेल्हाळ [गतक]

**गतणें**—अक्रि. १ कांहीं एक गोष्ट इ० होऊन जाणें. २ (ल.) मरण गतला पहा. [सं गम्–गत]

**गतला**—वि १ गेला, संपला, लोटला (हंगाम, काळ, वेळ) ' खरेंच गोष्ट गतली ' –मिव ४२. २ (ल.) मेला. [गतपासून गतणें या क्रियापदाचा भूतकाळ; हा भूतकाळी प्रयोगच नेहमीं होतो.]

**गंतव्य**—न. जाणें; पळणें; गमन; पळ. ' दोषाविरहित सर्व जनीं। शीघ्र गंतव्य करावें॥ ' –ज १० ३९. (क्रि० करणें) [सं. गम्=जाणें]

**गतागत**—न जाणेंयेणें; जायें; वारंवार हालचाल करणें; पुनरपि चलनवलन; अस्तोदय. ' जेणें सूर्याचें गतागत। केला भ्रांत कंदर्प। ' –एभा २६ ८५. [सं गत+आगत]

**गताड**—न (राजा.) अजस्र, अगडबंब जनावर (गाय, म्हैस). [सं. गज, प्रा गत्त+आड]

**गताडी**—स्त्री. (कु) गव्हाणी. [प्रा. दे गत्ताडी=गवादनी]

**गतानुगतिक**—वि. १ पुढें गेलेल्यांच्या मागून (पूर्ण विचार न करतां) डोळे मिटून जाणारा; अज्ञानानें परंपरागत चालणारा किंवा वागणारा. २ (ल) अडाणी; मूर्ख; बुद्धीचा उपयोग न करणारे ३ परंपरेनें चालत आलेलें (आचरण, गोष्ट). म्ह० गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ०न्याय–पु लोक केवळ (सद्सद्विचार न करतां) दुसऱ्याचें अनुकरण करणारे असतात; आपण अमुक गोष्ट अशी कां करतों हें त्यांचें त्यांनाच माहीत नसतें. हे मूर्खपणाचें लक्षण दाखवितांना या न्यायाचा उपयोग करितात; अंधपरंपरान्याय याप्रमाणेच आहे.

**गतायु**. **गतायुषी**. **गतायुष्य**—वि १ अत्यंत वृद्ध; म्हातारा. २ ज्याचें आयुष्य संपलें तो; मृत. ' हा गवटा दाभर दोरावर जातां त्स्मत गतायु समजावा. ' ' जसें गतायुषी

शरीरीं। चैतन्य वायु न करी ॥' –ज्ञा ३ १०९. 'पैं धातयाही पायां पडतां। तुटी गतायु पडुमुना ॥' –ज्ञा १६.१२९. [स ]

**गतार्थ**—वि १ समजलेला; दर्शविलेला, अभिप्रेत; अध्याहृत; सूचित केलेला. २ साधिलेला; तडीस नेलेला; संपादलेला ३ दरिद्री झालेला. [ स. ]

**गतालका, गत.ळका**—वि. केशविहीन स्त्री; वपन केलेली स्त्री; विधवा. 'गतालकाही अंगीकारी।' –एभा २३.२७९. [ सं गत+अलक=केस ]

**गतावणें**—अक्रि. जाणें; शेवट होणें; मरणें, गतणें. [सं. गत]

**गति–ती**—स्त्री १ जाणें; चळवळ; हालचाल, गमन; धाव; प्रयाण; चाल; प्रगति. 'रथाची गती।' –ज्ञा १७.३८९. २ वर्तन; वागणूक; चाल; पद्धति. 'परी ते गती समस्तां। न मनेल यथा।' –ज्ञा २.२०३. ३ स्थिति; दशा (मुख्यत्वें वाईट अर्थी). 'सुमति बापाजी झाली हे कां गती।' –मोअभंग सीतागीत (नवनीत पृ. २५९); गत अर्थ १–६ पहा. ४ आवांका; पोहोंच आटोप; टप्पा; प्रसार. ( समासांत ) कल्पना–कौशल्य–चातुर्य–पराक्रम–शौर्य–ज्ञान–गति, वगैरे. 'गती खुटली ज्ञानबोधें प्रबोध।' –राम १५७ ५ प्रारब्ध; दैव; घटित; नशिबाचा फेरा. 'दैवाची गति विलक्षण अति' ६ आयुष्यांतील बाल–तरुण–वृद्ध अवस्था, ७ आकाशस्थ गोलांचें एकंदर परिभ्रमण, फेरी. ८ चढती पायरी; भरभराट; सुस्थिति; आबादानी; प्रगति. ९ ग्रहाची आपल्या कक्षेतील दैनिक फेरी. १० प्रकार; अवस्था;. म्ह० कर्माच्या गती सांगाव्या किती. ११ खरें स्वरूप, खरा अर्थ, मर्म. 'अगा गति कळावी कर्माची। ... गहन कर्माची गति म्हणानि।' –यथा ४ ४२०. 'मिया गति दाखिली असे निकी।' –ज्ञा १५.११६ १२ ( यंत्रशास्त्र ) चलन; चाल (इं.)मोशन १३ सामर्थ्य, योग्यता, स्थिति, पदवी. 'जिष्णु म्हणे पावति गति इतर पशु न त्या विनाकिच्या पशुची।' –मोआदि २५९. 'शय्यायमरी म्हणती, आम्ही याश्या इच्या नसों गतिला।' –आवन ४.१४७ १४ मोक्ष; सद्गति, मुक्ति, उत्तम लोक 'उपायसाधन आइका कोण गति अवगति।' –तुगा ४२८ 'पशुदेहीं नाहीं गती। ऐसें सर्वत्र बोलती॥' –दा १ १० २१ १५ आश्रय, कृपास्थान. 'गति तूंचि आमुची वा आश्रय आम्हांसि तूंचि मावासा।' –मोकर्ण ४२ ७ १६ गत, पर्यवसान शेवट 'असेर संग्रामाच्या गति।' –ऐपो २२. 'तिज वाट मृगमुखाची कस्तूरीच सा ती गती।' –विह २०. १७ गत इलाज, उपाय. 'तसें कल्याणावांचून कशाशान्यांत गतीन नाहीं' –विक्षिप्त १.९९. १८ वाद्यविषयांतील एक प्रकार, रीत. 'गति न पडता आवरं सरती।' –प्रला ११४ -क्रिवि गत्या पहा रीतीनें क्रोमानें. (शाप.) ०मिळणें–अक्रि. मुक्ति मिळणें. ०यर, ०स येणें–१ कृत्रिम (वेष, मुखवटा) टाकून मुळावर येणें. २ ताळ्यावर येणें; पूर्वीचें वर्तन टाकणें; सुधारणें. ०होणें–प्रवेश होणें; समजणें. 'त्याची संस्कृतांत गति झाली होती' –कोरकि ४२९. सामासिकशब्द– ०गतीं–क्रिवि. (व.)हळू हळू. 'गतिगति करत्यें काम' ०चक्र–न. ( यंत्र. ) यंत्र चालू करणारें मोठें चाक (इं.) फ्लायव्हील [सं.] ०दाता–वि. (इहलोकापासून, विपन्नपणा किंवा जन्ममरणापासून) बंधमुक्त करणारा मुक्तिदाता; ईश्वर. [सं.] ०दायक मज्जारज्जु–(शाप.) इंद्रियांच्या गतीस कारण होणारा मज्जातंतु (इं.) मोटर नर्व्ह. ०फल–न. दोन ग्रहांच्या परिभ्रमणातील वेळांचें; अंतर [सं.] ०भंग–पु. चालीला अवरोध; प्रतिबंध; अडथळा. ०भ्रंश–पु खोळंबा; खोटी; आडकाठी; खळ; खड (कोणतेंहि गमन किंवा चाल यामध्यें)[सं.] ०मंडल (अंगहार)–पु (नृत्य) आखंडल स्थान करून हात रेचित करणें व उजवा पाय उद्घटित करून मत्तल्लि, आक्षिप्त, उरोमंडल व कटिछिन्न हीं क्रमानें करणें ०मान–वि. चालणारा, हालणारा, गतींत असणारा [सं] ०वर घातलेला, पडलेला–वि. मरणोन्मुख झालेला, मरावयास टेंकलेला. [सं] ०विशिष्ट कर्तृत्वशक्ति–स्त्री (शाप.) गति उत्पन्न करणारी शक्ति (इं.) कायनेटिक एनर्जी. ०विशिष्ट कल्पना–स्त्री. (शाप) गतीस प्राधान्य देणारी उपपत्ति (इं.) डायनामिकल थिअरी. ०शास्त्र–न. प्रेरणाच्या कार्यानें ज्या नियमांनीं पदार्थास गति मिळते त्यांचा विचार करणारें शास्त्र. –यंस्थि १. (इं) डायनामिक्स. ०हीन–वि. १ आश्रय, आधार किंवा उपाय यांनीं रहित; अनाथ; निरुपायी. २ हालचालरहित; स्थिर; कुंठितगति. [सं.]

**गंतुकाम**—वि. १ गमन करण्याची इच्छा झालेला; जाऊं इच्छिणारा; गमनेच्छु २ (ल.) आसन्नमरण. 'विश्वासराव गोळीचे जखमेनें कार्य होऊन गतुकाम' –होकै २७. [सं.]

**गतैश्वर्य**—वि भरभराट, थोरवी, ऐश्वर्य यांनीं रहित; वैभवहीन [सं.]

**गतोत्साह**—वि. निराश; हताश, निरुत्साही; उदास; बेदिल. [स.]

**गत्यंतर**—न अन्य उपाय, आश्रय; टाळणें, मुक्त होणें, संपादण इ० चा दुसरा मार्ग, इलाज, सवड; उपायांतर. 'गत्यंतर नसतां शत्रूस शरण जाऊं नये' 'असावांचून गत्यंतर नाहीं.' [सं गति+अंतर=अन्यगति]

*गत्या*—क्रिवि. अनुसरून, रीतीनें; योगें; मार्गानें; सहित (समासांत) स्वभावगत्या, दैव–कर्म–प्रारब्ध–वस्तु–आत्म–भेद–गत्या [गति]

**गथडी**—स्त्री गंगथडी पहा.

**गथड्या**—वि नाचणी धान्याची एक जात.

**गथ,गाथा–थी, गथागोंध**—पुस्त्री. १ घोटाळा; गुंतागुंत; घालमेल; पेंच, गोंधळ; (लक्षणेनें व शब्दशः उपयोग)

'जन्म हेंचि अकारण । गयागावी ।' -दा ३ १ ४ २ घालमेलो इ०चें काम, धदा [ गुतण+गावणें ]

**गद्**—पु रोग, आजार 'शरीरीं गद दुतिल धडका ।' -राला ९२ [ सं ]

**गद्क**—पु १ खदखद, कढ किंवा त्याचा आवाज (क्रि० येणें) २ उकळत्या वस्तूचा फेंस, ऊत [ ध्व स गर्दी=गर्जना करणें ]

**गद्का**—पु गतका पहा

**गद्की**—स्त्री १ घाण, कचरा २ (ल) घोंटाळा 'एकंदर मागील गदकी वारून पुढें ठीक करून टाकून घेणें आहे' -रा ३ १४१ [ फा गदगी, तुल० स गध ]

**गद्गद्**—स्त्री १ खाज, कड (क्रि० सुटणें) २ ऊत उकाडा ३ कढ, उकळी, कढ-उकळीचा आवाज ४ हसणें, हसण्याचा आवाज [ ध्व, स गद्गद ]

**गद्गद-दां**—क्रिवि १ शिजण्याच्या, उकळीच्या आवाजाचें अनुकरण, खदखदा, २ मोकळें, आनंदयुक्त हसण्याचा आवाज 'गदगदां हासति । मुरकुंड्या वळति ऐकानिया ।' 'तरी मम अभिलाष धरूनी । गदगदां हाससी पापिणी ॥' -नव २० २४ ३ ओक्साबोक्सीं, जोरानें हुंदक देऊन रडणें

**गद्गदणें**—अक्रि खदखदणें ( आधणातील पदार्थ ) -अकर्तृकक्रि १ उकडणें, गदमदणें, गदादणें २ उकाड्यानें, गुदमरल्यानें घामाघूम होणें ३ गदगदून येणें, जबरदस्त क्षोभ किंवा मनोवृत्तीनें कंठ दाटून येणें, गहिंवरणें [ ध्व स गद्गद ]

**गद्गदाट**—पु गदगद पहा हसण्याचा ध्वनि 'थोर हासे गदगदाटें ।' -मुसभा १४४० [ ध्व ]

**गद्गा-गी**—पुस्त्री (व्यायाम) चामड्यानें मढविलेली काठी, सोटा, तलवारीचे हात शिकण्याचें एक हत्यार, बरोबरच चामड्याची एक लहान ढाल (फरी) असते [ स गदा हिं गदका ]

**गद्गी, गजगी**—स्त्री (क) खाचाखालचा दगड, खुर्ची उथळें 'गदगी चांगली घडीव'

**गद्म**—वि (राजा) पावसाळा संपल्यानंतर ज्यांत फार दिवस ओल राहते तें, पाणथळ, दलदलित (शेत, जमीन)

**गद्म**—न (कु) गलबत थोड्या पाण्यात असतांना त्याला दिलेला टेंका गदाम पहा

**गद्मणें गद्मरणें**—अकर्तृकक्रि १ उकडणें, ऊष्मा होणें २ अक्रि उकाड्यानें घामाघूम होणें

**गद्मद्**—स्त्री १ गुदमरा, उकाडा, ऊत २ अतिशय गदगदणें, तग्मी, घामाघुमी [ गदगद ]

**गद्र**—स्त्रीन १ बंड, गर्दी 'मल्हारजी पागेलावरी आपण चालोन गदर केली' -रा १५ ३३ २ वैर, विश्वासघात [ अर गद्र ]

**गद्र**—पु गजर पहा

**गद्रणें**—अक्रि १ फुगून इ० पिकण्याच्या स्थितीस येणें (फळ, गळू) २ घामाघूम होणें

**गद्रा गद्रल**—वि परिपक्व दशेस आलेलें (विड्याचें पान, फळ) [ हिं गदरा, गदर ]

**गंदलकी गद्चल**—स्त्रीन १ बसावयाच्या पाटाच्या खालच्या टेंकण्याच्या दोन पट्या, आढात, खुर २ दरवाजा, झडप इ० च्या फळ्या जोडल्यानंतर मजबुतीसाठीं त्यांना आडव्या ठोकलेल्या पट्ट्या, दाढवी

**गद्वाली**—वि गद(ढ)वाल येथील, पैठेसबर्गी (वस्त्र इ०)

**गद्ळ**—न १ घाण, गढूळपणा, राड (प्रवाही पदार्थांतील) २ गाळ, मेल कचरा, मळ ३ केर, धूळ, भूस तूस (धान्यांतील) ४ (सामा) एखाद्या वस्तूतील निरुपयोगी भाग, ५ गाळसाळ, हेंदळ, घुरळा ६ माजलेलें व घाणेरडें गवत, रान -पु (ल) अव्यवस्था, गोंधळ, घोंटाळा, धादल (वस्तु, कामकाज यातील) -वि १ घाणेरडें, मळकट, मलीन, गढूळ, भिकार, क्षुल्लक, कवडीमोल ओंगळ, हिडिस (पाणी, माणूस, वस्तु, गोष्ट) २ घोंटाळ्याचें, गडबडीचें, घालमेली, गबाळी (कृत्य, पुस्तक, लेख) ३ क्षुभित (वाईट मनोविकाराच्या जोरानें मन) जसें दु खी संतप्त, मत्सरी, सशयी इ० [ सं गलित-गलिद-गल्द, गदल हिं गदला तुल० का गद्दु=वाईट वास ]

**गद्ळणें**—उक्रि १ मळकट, गढूळ करणें 'नभ पृथ्वीरजें न गदळे ।' -एभा ७ ४४८ २ घालमेल करणें, विसकटणें, अस्ताव्यस्त, दुर्दशा करणें 'पापानें पापी गदळली आहे ती लावितों' -अक्रि गवत, रान माजून खराब होणें (पीक, शेत)

**गद्ळावच**—उक्रि (गो) गोंधळांत टाकणें

**गदा**—स्त्री १ लांब दांड्याचें व टोंकास मोठा गोल जोडलेलें एक प्राचीन आयुध, लाखडी अगेळा 'भीमाला आणुन दे वृषपर्व्याच्या गर्वोत्तम गदेतें । -मोसभा १ ६ २ काय करणें ल्हाहदेंक गदा घेऊन । देत्यास मारी मल्लिकार्जुन ॥' ३ (ल) घाला, हल्ला, धाड (क्रि० येणें आणणें) 'मूळ व्यापारावर इंग्रजांनी गदा आणली' -क १७-६-३० ०धर-वि गदा धारण करणारा, बलवंत विष्णु [ स ] ०युद्ध-न गदेनें करावयाचें परस्पर युद्ध [ स ]

**गदा**—पु १ भिकारी २ भीक मधुकरी 'तुका म्हणे वृत्ति सांडुनि । गदा मागत जाती ॥' -तुगा ४१२ [ फा गदा ]

**गदाई**—स्त्री. एक भिक्षेकरी जात, मेंढे जोशाच्या पाटलाची कुळी. —गांगा ३०. [फा गदा]

**गदादणें**—अकर्मकक्रि. १ उकडणें. गुदमरणें. लाहीलाही होणें 'गदादीत काया समुद्रात घाली।' —रामदास कविता खं. १ पृ ९. २ उकाड्याने उवण, घामाघूम होणें.

**गदाधर**—पु पाणी पिण्याचें विशिष्ट भांडें. हें गदेच्या प्रमाणें असत [सं.]

**गदाम**—न. (हट) (नाविक) गलबतें चोपडण्यास लवते वेळीं तीं तराजू सारखीं राहण्यासाठीं दोन्ही बाजूंस, पाण्यात लांकडें उभी करून त्यांना आडव्या दांड्या बांधतात त्या. गलबताच्या बाहतांच्या दुरमिणास दोरी बांधून गदामावर गलबतांचा तोल घतात गदम

**गदा(द)रोळ-ळी**—पुस्त्री. १ मोठा गोंगाट, गजर, ओरडण 'सभोंवत मिळोनि गोपाळ। गदरोळ करिताती।' —ह १३ ४५ 'करूं गदारोळीं हरिकथा॥' तुगा १८११. २ (ल) मोठें पांडित्य, निरूपण. 'निज मंडपीं शिशुपाळ। करीत होता गदारोळ।' —एरुस्व १२.१. ३ लढाईंतील वीरांच्या आरोळ्या ४ लढाई, लढाईंतील घुमचक्री. 'मांडोनि गदारोळु। मज एने घातला आळु।' —शिशु १९२. ५ खटाटोप; प्रयत्न. 'तेणें करविला हा गदारोळ। प्रयत्नचनेचा॥' —विवेकसिंधु [सं. गद्=शब्द करणें; गद=मेघध्वनि. तुल० का गद्दल=आवाज, आरोळी ते. गंदरगोळ्ळु]

**गदी**—वि. रोगी, आजारी. 'असुनहि पिता न स्वारस्याला वरील गदी क्षण।' —मांअंबरीष (नवनीत) पृ ३६९ [सं. गदिन्]

**गदीन**—वि गदायुद्धनिपुण, गदाप्रवीण 'श्रीकृष्ण म्हणे हा रे भीमा जरि तू महाभुज गदीन।' —मोउद्योग ६ १८ [गदा]

**गदे(द्दे)पदे(द्दे)**—पुअव १ टाळाटाळी, अळटळ, चालढकली, बहाणे, सबबी, लबाडीची चुकवाचुकवी २ (सामा) छक्केपंजे, पाचपेंच, डावपेच [सं. गद्यपद्य]

**गदेरा**—पु (बे) गदळ, घाण.

**गदेला**—पु मोठी गादी, सभागृहांत बरीच मंडळी बसतील अशी केलेली बरीच लांबरुंद पातळ गादी. 'ठाईं ठाईं चोपाळ गादिले।' —पला १०१. 'आगगाडीच्या एका मोकळ्या डब्यात गदेला टाकून त्यावर उशाचे टेंके देऊन व गाडीच्या पुढच्याच बाजूकडे तोंड करून तुरा बसविले' —सूर्य ३ [हिं]

**गद्देला**—(ओतकाम) निरनिराळे आकार देण्याची पेरण

**गद्गद गद्गदध्वनि-वाणी**—पुस्त्री अंतःकरण उचंबळून आल्याने तोंडातून निघणारा अडखळत किंवा अस्पष्ट आवाज, उमासा, जोराचा हुंदका, दाबलेलें रडणें [सं]

**गद्दा**—पु (गो.) गदला. [हि. गद्दी=गादी]

**गद्दी(द्दी), गद्दी जमीन**—स्त्री. १ नदी किंवा तलाव यांच्या कांठची मळईची जमीन, मळई मळी. २ (मावळ; कों.) अव्वल प्रतीची भातजमीन. [का. गद्दे=भात शेत]

**गद्धा**—पु गाढव म्हण० (व.) गद्धयाने खाल्ले पाप ना पुण्य [सं गर्दभ. प्रा. गद्दह हिं गधा]

**गद्धेपंचविशी**—स्त्री. (ल.) तारुण्यकाळ (यांत विवेक, पोक्तपणा फारसा नसतो), चुका होण्याचा काळ.

**गद्धेमल्हार**—पु (विद्यार्थी) १ गाढवांच्या ओरडण्याचा मिलाफ २ (ल) वाईट, कर्कश गाणें इ० ३ (ल.) मूर्ख माणूस. [हिं गधा+मल्हार=राग]

**गद्य**—न १ अक्षरें किंवा मात्रा अमुक असाव्या असा नियम नसलेली कविता, छंदविरहित अथवा तालसुरानुरूप रचलेल्या पदरचनेचा स्वतंत्र भाग. किंवा वाक्यखंड. (सामा) छंदोरहित प्रबंध, लेखन.भाषा पद्याच्या उलट लेखन प्रकार २ साधी वाक्यरचना; काव्यगुणरहित लिखाण ३ (ल.) अरसिक बेचव, कंटाळवाणें विवेचन, लेखन ०रूप, गद्यात्मक—वि ज्यांत साध्या पदरचनेचा समावेश आहे तें. ०पद्य—न. १ छंदोरहित व छंदोबद्ध रचना. २ (ल.) छक्केपंजे, डावपेंच, कपट; कारस्थान, कावा, कुलंगडें, दगा. गदे पदे पहा. [सं गद्=बोलणें.] ०पद्यरूप,—द्यात्मक—ज्यात गद्य (साधी रचना) आणि पद्य (छंदोबद्ध किंवा कविता) यांचा समावेश आहे तें. चंपूकाव्य म्हण० गद्य उद्योगाचा सांठा, पद्य दैवाचा सपाटा.

**गंध**—पु १ वास (चांगला, वाईट); सुवास किंवा घाण. 'मी पृथ्वीच्या ठायीं गंधु।' —ज्ञा ७ ३४. २ सुवास, परिमळ; परिमळ द्रव्य. ३ (कर्ना) चंदनकाष्ठ, खोड —पुन. १ (चंदन, रक्षा, अगरु, केशर इ० चा) कपाळावर किंवा शरीरावर लाविलेला टिळा किंवा उटी २ अगरु व उटी गंध आर्देचि असो अनुसूया। दे मला घर न जीस अपूपा।' —वामन लोपामुद्रा संवाद १८. [सं] ०काष्ठ न सुवासिक लांकूड, चंदनाचें खोड (वाप्र) ०नसणें—(वास देखील नसणें) अगदीं अस्तित्व नसणें, कांहीं ज्ञान नसणें (एखाद्या गोष्टीचें) 'तिच्या माहेरीं इमजीचा कीं नवीन कमल गंध देखील नाहीं' —पाधे त्याला संस्कृतचा गंधहि नाहीं =त्याला संस्कृतचें अल्प ज्ञानहि नाहीं (एखादे पदार्थ खावयास न मिळतां नुसता त्याचा वास (गंध) घेऊनहि एखाद्याचें समाधान होतें; पण तो वास सुद्धां न मिळतां अतृप्त रहाणें, यावरून हा प्रयोग रूढ. सामासिक— ०फूल करणें—१ पूजा करणें. २ (ल) फजीती करणें, खरडपट्टी काढणें. ०धीड, धीडु—न. पादेलोण, काळें मीठ, बीडलवण. ०मार्जार—पु जवादि मांजर. [सं] ०मोरी—स्त्री. घाण पाण्याची मोरी, गटार. 'मग गंधीकुची गधमोरी। आऊनी तेथें वस्ती करी॥' —नव १३.६०.

०रस-पु बोळ [स] ०राज-पु एक फुलझाड [गि] ०वाटी-स्त्री गंध व त्याची वाटी, गंधाची वाटी ०वान-वि सुवासिक व गंध्या पैमाचे [म] ०वार्ता-स्त्री (वासानें बातमी) यत्किंचित ज्ञान समगुप (क्रि० नये ) 'याची मला गंध वार्ता सुद्धा नाहीं' -ऋद्र १७८ ०हास्य-न एक उपरत्न, याचा रंग पाढरा लाल किंवा लालसर पढरा असतो हें प्रकारात नाहीं गंधाकाडा-स्त्री (गा) चंदनाचा तुकडा, चंदन गंधाटा-डा-स्त्री एक वनस्पति -बदलापूर १६४ गंधानिळ-पु सुगंधी वारा 'उठिला मदगंधानिळीं।'-ज्ञा १७२ गंधापान्तु-पु (व) (ल) मर, ठाक 'आताच गंधापान्तु काढ । तुमा' गंधाक्षत-ता-स्त्री धार्मिक कृत्याच्या आरंभीं यजमानाने उपाध्यायाच्या कपाळीं लावावयाचे गंध व अक्षता. 'या आणि मडेकपाळाच्या गंधाक्षता पहा' २ (शुद्ध व पवित्र लोक याचा उपयोग नेहमी करतात त्यावरून) शुद्ध व पवित्र सहवास संबंध 'ह्याची त्याची गंधाक्षता हात नाहीं' गंधाक्षतवर्जन-न मिलाफ, एकजूट बरोबरीचें दळणवळण यास प्रतिबंध, अडथळा गंधाक्षतवर्ज्य-वि प्रतिबंध इ० करण्यास योग्य

गंधक—पु १ एक खनिज द्रव्य, उपरस, अधातुरूप ज्वालाग्राही रासायनिक मूलद्रव्य धातुर्नी २ एक विशेष मिश्रक (औपधीसाठीं) गंधकाच्या चार जाती—तांबडा (हा सुवर्णक्रियेंत उपयोगी), पढरा (हा जखमांच्या लेपनापयोगीं) पिवळा (रसायनासाठीं) व काळा (श्रेष्ठ पण दुर्मिळ) —या १ २४० ०रसायन-न गंधकाचें एक औषध गंधकाडी स्त्री गंधक लावलेली काडी, आगकाडी गंधकाचें तेल-न (इ) सल्फ्युरिक ॲसिड, गंधकाम्ल पहा गंधकाचें फूल-न गंधकाला आच देऊन त्याची केलेली भुकटी गंधकाम्ल गंधकाम्ल-न गंधकाचा तेजाब, सल्फ्युरिक ॲसिड, सर्व रासायनिक क्रियांतरात याचा फार उपयोग होतो हें फार दाहक आहे

गंधकिसल—न उपयुक्त व गुण आणणारें द्रव्य (इ) सल्फानल

गधडा—पु गाढव (तिरस्कारार्थी वापरतात) [हिं गदहा]

गंधन—न (इ) सल्फोन

गंधराघाळ—पु (क) गिगाणा, गोंधळ 'त्यानें गंधराघाळ घातला पण कांहीं चालल नाहीं'

गंधर्व—पु १ एक उपदेव स्वर्गातील गायक सुरगायक हे स्वर्गात राहून प्रमुख देवाच्या गवई ताफ्यात काम करतात 'धनपति सभत गुह्यक, राक्षस, गंधर्व, अप्सरा यक्ष।'-मोसभा १४२ २ (ल) गानवादनपटु ३ अदृश्य पुरुष ४ (मराठा व इतर अब्राह्मण जातींत) पाटाचें लग्न, स्त्रीचा पुनर्विवाह, म्होतूर, मोहतीर, (स्त्रीचा पहिला नवरा जिवंत असल्यास त्याच्याशीं फारकत, घटस्फोट किंवा काडीमोड करून मग म्होतूर लावतात) 'मी मग गंधर्व करीन, त्यानंतर तुमा माझेवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं' [स] सामासिक शब्द- ०गायन-गान-न १ गंधर्वांचें गाणें 'गंधर्वगान गाणीं। जेथ रंभेऐशिया नाचणी॥'-ज्ञा ९ ३२३ २ स्वर्गीय गाणें (अंतराळीं ऐकलें) ३ अत्यंत मधुर व आलापदारीचें गाणें [म] ०नगर-न १ गंधर्वांनीं शहर, दिसतें न दिसतें व एकाएकीं अदृश्य होतें किंवा अभ्राभ्यंतरानीं आढळतें असें अंतरिक्षस्थ किंवा मांत्रिक शहर 'गगनीं गंधर्वनगर जैसें।'-विपु ३ ४४ २ हवेंत प्रकाशकिरणांच्या वक्रगतीनें उत्पन्न झालेला मूलोकावरील शहरें, वगैरे इ० पदार्थांचा देखावा, आकाशांतील ढगाच्या आकृतींवर होणारा नगरादिकांचा भास 'गंधर्वनगरींची ठाणीं। घेतलीं देऊनि चिंतामणी।' -एभा २ २२६ 'पोकळीमध्यें गंधर्वनगरें। नाना रंगें ल्हानथोरें।' -दा १६ ९ २३ ३ (ल) छाया, आभास, मिथ्याभास, काल्पनिक अथवा मिथ्या गोष्ट 'कीं गंधर्वनगरींचें सैन्य।'-ह १२ २६. ०नगरासारिखा-वि अशाश्वत, क्षणिक, चल, पाण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणें ०पूजा-स्त्री सन्मानानें एखाद्यास बोलावून आणून मग त्याची भोसडपट्टी काढून त्याला मार देणें [स] ०भुवन न. गंधर्वनगर पहा 'न रचितां गंधर्वभुवन। उठी जैसें।'-ज्ञा १८ ४२९ ०लग्न-विवाह-नपु १ गांधर्व विवाह अष्टविवाहांपैकीं एक, उभयपक्षाच्या (नवरा व नवरीच्या) अनुमतीनें होणारा विवाह (यांत आईबाप किंवा इतर वडील माणसांच्या परवानगीची गरज नसते) 'मग करूनि गंधर्वलग्न। भोगिती रती॥'-कथा १ ४ १२५ २ पाट, म्होतूर [सं] ०विद्या-वेद-स्त्रीपु संगीतविद्या गायनकला, गाणें-बजावणें यांची कला ०सृष्टि-गंधर्वनगर पहा

गंधलकी गंधवल—स्त्रीन गदलकी पहा

गंधा—वि घाणेरडें, दुर्गंधी वासट [फा गंदा=वासट तुल० सं गंध] हा शब्द बहुधा पुढील समासांत येतो ०नाला-पु गटार, घाण पाण्याची मोरी गंधेराणा-न घाणेरडें गाणी

गंधाबिरुजा-बेराजा—पु राळ सुरूचे झाडाचा चीक, एक वनस्पतिद्रव्य याला उग्र व कडू वास असून औषधें व रोगण यांच्या कामीं हा उपयोगी आहे [फा गंधाबीरोजा]

गंधार—पु (संगीत) मूळभूत सप्तस्वरांतील तिसरा स्वर, सा रे ग पैकीं [स गांधार]

गंधिकाळिक—स्त्री गंध (कल्क) व काळेपणा 'धातूची गंधिकाळिक जैशी। जाती रजतमें तैशी।'-ज्ञा १८ २०९.

**गंधी**—स्त्री गंध, घाण, दुर्गंध 'लसणातें न सांडी गंधी ।' –ज्ञा १८ ७५७ 'त्याच्या जखमेला गंधी सुटली यामुळें जवळ बसवत नाहीं ' –पु १ सुगंधी द्रव्यें विकणारा, अत्तारी २ औषधें विकणारा, गांधी –सयाजी कोश (इ) अॅपोथेकरी [स गंध]

**गंधी कर्पित**—न कॅर्बॉलिकाम्ल व गंधकित यांच्या संयोगानें तयार झालेलें द्रव्य, हें विषावर गुणकारी आहे

**गधुळणें गधूळ**—गढुळणें, गढूळ पहा

**गधेघाट**—पु (व ना) ढोरांचा कोंडवाडा [गद्धा+घाट]

**गंधेल**—न (गो) चंदनी अत्तर, तेल [गंध+तेल-एल]

**गधेलोट**—पु (कुस्ती) (गाढवें आडतात त्या वेळच्या करणीवरून) कुस्तींतील एक डाव आपल्यास कोणी खालीं धरलें तर आपला हात जोडीदाराच्या दोन्ही पायांच्या आतून घालून जोडीदाराची मांडी आपल्या पंजानें धरून त्याच बाजूनें आपण फिरून जोडीदारास चीत करतात तो डाव [गद्धा+लोटणें]

**गंध्या**—वि १ गंधी अर्थ २ पहा २ घाणेरडा, घाण्या, ज्याच्या अंगास घाण येते असा (माणूस) [स गंध]

**गध्यागाढव**—पु (नाशिक) गांवाच्या शिवेचा दगड

**गना**—पु (वीणकाम) कापड विणताना आडवें घालावयाचें सूत जीवर गुंडाळतात व जी धोट्यात बसवून त्यायोगें आडवें सूत घातलें जातें ती काडी, गणा, (इ) बाबीन

**गनिमत**—न (व) पुरें होणें, बस्स 'बोलावण्यानें आला हेंच गनिमत समजा ' [अर घनीमत्]

**गनिम(मा)त**—स्त्री लूट, मिळकत, बरकत, विपुलता [अर घनीमत्]

**गनिमाई**—स्त्री १ शत्रूची धाड लूट, हल्ला २ गनिमी कावा, गनिमी लढाई शत्रूचें सामान भारी आल्यास चुणगे एकीकडे लावून द्यावें, आणि खडी फौज करून आज या ठाण्या जवळ, उद्या दुसऱ्या ठाण्याजवळ याप्रमाणें गनिमाई करावी ' –ख ६ २७९६ **गनीमी**–स्त्री गनिमाई गनिमी कावा, गनिमी लढाई पहा 'उभयतां सर्दारांनीं त्याचे फौजेभोंवतीं गनिमी करून अन्नपाणी हुगमूत बंद करून आठ रोजांत लुटून घेतलें ' –होकै १५ **गनीमी कावा-लढाई**–पुस्त्री १ पळपुटी लढाई कजावी, अगोदर भ्यालोंसें दाखवून शत्रूला पाठीवर घ्यावयाचें व तो अडचणींच्या जागेंत आला असें पाहून त्याच्यावर जोरानें उलटून हल्ला करावयाचा व त्याचा फन्ना उडवायचा समोरा समोर लढाई न करता युक्तीनें, आडमार्गांनीं शत्रूला जेर करणें मुसलमानांशीं लढताना मराठे या रीतीचा अवलंब करीत 'आम्हीं गनीमी काव्यानें राहतों, ' –भाव ५८ २ (ल) लबाडीची युक्ति, लडाव, कपटप्रयोग

**गनिमात**—स्त्री १ ईश्वरी कृपा, आशीर्वाद, दया 'तू वांच लास गनिमात झाली ' २ चांगली गोष्ट, कृत्य 'इतक्या सक टांत त्याचा परम मित्र भाला, काय गनिमात हो ! ' [अर घनीमत्]

**गनी(नि)म, गलीम**—पु १ शत्रु दुश्मन् वैरी 'गनी माच्या देखतां फौजा । रणशाच्या फुर्कुरिती भुजा । ' –दा १९ ९ २५ २ चोर, लुटारू 'सेख निजाम गनीम सरमेश्वरास आला ' –इरे ५ ५० ३ (सांकेतिक) मराठ्यांस मुसलमानांनीं दिलेलें नांव 'गनीमांनीं मसुरास वेढा घातला ' –इम ३७ [अर घनीम्]

**गप-प्प**—वि स्तब्ध, चूप, शांत, निश्चल –क्रिवि गडप, ठावठिकाणा न लागेल अशा प्रकारें 'त्या रानांत गाय शिरली ती कोणीकडे गप्प झाली [ध्व हिं तुल० का गप्प=अदृश्य] ०**करणें**–१ गट्ट करणें, मटकावणें २ गडप करणें, नाहींसें करणें ०**छाटणें-तासणें-झोकणें**–एखाद्या बातमीची चर्चा चालविणें, रिकाम्या बातम्या पसरविणें ' आम्हीं कवी नवीना रीति नव्हे छाटितों चिलास गपा । ' –मोरोपंत सामाशब्द– ०**कन-कर-दिशीं**–क्रिवि अकस्मात, तडकाफडकीं, एकदम, एकाएकीं झालेल्या गोष्टींच्या आवाजाचें अनुकरण (क्रि० धरणें, बसणें, गिळणें, खाणें, मारणें, पाहणें, उचलणें) **गपका**–पु १ आवाज होऊन गट्ट केलेला घास, गटगुळा, मटका (क्रि० मारणें) २ (ल) हात मारणें, लांच (क्रि० मारणें) ३ हलका ठुस्सा, गुद्दा (क्रि० मारणें) [ध्व] **गपगप-गपा गपागप, गपापा, गपापून**–क्रिवि उतावीळपणें मटकावतांना गिळताना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण, अतित्वरेनें, भराभर ' घोडी लागताच मग घोडा गपागप खाऊं लागली ' म्ह० अपापाचा माल गपापा **गपचि(चू)प, गप्पचि(चू)प**–क्रिवि निवांतपणें, निश्चलपणें, मुकाट्यानें, न बोलता ' एवढा तो रागें भरला तरी मीं उत्तर दिलें नाहीं, गपचूप बसलों होतों '

**गप-प्प**—स्त्री १ सामान्य बोलणें, उडत बातमी, अफवा वार्ता, आवई २ निरर्थक बोलण, भाषण, बकवा, रिकामी वटवट, बाता ३ खोटी बनावट हकीकत, मिथ्या गोष्ट [फा हिं गप] **गपछप-शप-सप** स्त्री रिकामटेकड्या गप्पा, चकाट्या [फा गप्शप्] **गपाटा**–पु गप्प, बात कृष्णराव नावाच्या मुंबईकरानें महाराजाच्या मुलाखतींत बरेच गपाटे मारले ' –विविधज्ञा ३ ५३ (हिं) **गपा-प्पा-गप्फा**–स्त्रीअव बडबडी, चकाट्या गप पहा ' न सार्थक लटक्या साऱ्या गपा । ' –राला ८७ **गप्पागोष्टी**–स्त्रीअव १ गोष्टी, कथा, हकीकती, खबरबखर २ बकवा बाता; रिकामी वटवट ३ शिळोप्याच्या गोष्टी रिकामपणचें बोलणें (क्रि० करणें, हाकणें) **गपापणें**–अक्रि वटवट, बडबड करणें [गप]

गपाप्या-वि बटबट्या, बडबड्या, बरळणारा, बाताड्या गप्पाष्टक-न गप्पा, बटबट, बडबड, रिकामपणच्या गोष्टी 'उगीच गप्पाष्टकें ऐकून फळ काय, घटकाभर देवाचें तरी नांव घ्यावें ' [गप्प+अष्टक=समूह] गप्पाष्टक्या, गपी-प्पी-प्या गपोड्या-ड्या-वि बाता झोकणारा, बटबट्या गप्पिष्ट गप्पी, गप्पीस्त, गप्पीदास-नाथ-वि बाता झोकणारा गोष्टीवेल्हाळ, थापाड्या, बाताड्या

**गपच(चि)प**—न सायीमध्यें कणीक मळून तळलेलें पक्वान्न

**गपाणा**—पु बकाणा, मोठा घांस ( भाजलेले दाणे, कोरडें खाणें याचा ) [ गप+दाणा ]

**गप्पाघोळ**—पु गडगळ

**गफलत**—स्त्री १ निष्काळजीपणा, हयगय, दुर्लक्ष, गैर सावधपणा, अविचार, चूक, गलती, असावधानता, 'करारात दोघांच्या झाली काहीं किंचित गफलत।' -ऐपो ३९५ 'गफल तीमुळें पोथी विसरून आलों ' २ हयगयीमुळें वस्तु हरवल्याची स्थिति, निष्काळजीपणामुळें नाहींसें होणें, न सापडणें 'माझ्या लेखणीची गफलत झाली ' ३ अव्यवस्था, गोंधळ, घाल्मेल ( पदार्थ, वस्तु यांची ) 'पोरानें पोथीची सारी गफलत केली ' [ अर घफ्लत् ] गफलतणें-उक्रि १ गैरसावधपणानें गमावणें, पाडणें, गळणें, हरवणें २ अव्यवस्थितपणें भेंसळ करणें, स्थान भ्रष्ट करणें, ढवळाढवळ करणें, गोंधळ करणें, विस्कटणें गफ लती-त्या-वि १ नेहमीं हरविणारा, नेहमीं भलत्या ठिकाणीं वस्तु ठेवणारा, विसराळू गैरसावध, हलगर्जी २ लबाड, अवि श्वासु

**गबरून कर, गब(रा)गब-बा, गबाबां, गबाबून**-क्रिवि गपकन इ० पहा

**गबका**—गपका पहा

**गबगबणें**—अक्रि १ अतिशय पडसें-खोकल्यानें पिडणें २ अश्रूंनीं डोळे भरून येणें ३ गुबगुबीत, लठ्ठ होणें (याचा व्युत्क्रमानेंहि उपयोग करतात 'मांस गबगबतें अंगावर ' ४ भरगच्च दिसणें होणें, भरपेठ ( प्रफुल्लित ) दिसणें 'ठळक हातामधी चुडे झळाली डागिन्यात रुप गबगबशी।' -पला ४ ४० [ स गर्भ प्रा गब्भ, ध्व ]

**गबगबीत**—वि १ गुबगुबीत, तुंद लठ्ठ, मांसाळ 'हा शरीरानें गबगबीत दिसतो, पण शक्ति नाहीं ' २ भरदार, दळ दार, रसभरित ( फळें ) 'हा आंबा रसानें भरला आहे म्हणून गबगबीत दिसतो' ३ मसालेदार पदार्थांनीं पूर्ण भरलेली (पोळी, करंजी इ० ) 'पुरण पुष्कळ घातलें म्हणजे पोळ' गबगबीत होते -वि क्रिवि भरपूर, भरगच्च 'तेणें पात्रें भरली गबगबीत।' -महिकथा ३३ १९९

**गबदुल्ला, गबदू, गबदूल**—वि ठेंगू व बळकट, घटमूठ बांध्याचा, लठ्ठ व मजबूत, वाटोळ्या अंगाचा, गलेलठ्ठ [ हिं गबदल, स गर्भ, प्रा गब्भ, म गब+दुल्ला ? ]

**गब(ब्ब)र**—स्त्रीपु १ एक सोन्याचें नाणें त्यावरून ( ल ) २ तीं ज्याच्यापाशीं पुष्कळ आहेत असा माणूस, श्रीमंत व्यक्ति [ हिं ]-वि श्रीमंत, द्रव्यसंपन्न, धनवान् 'श्रीमान् पुरुष आणि दरोडेखोर यांमध्यें वास्तविक वाटतो तितका फरक नाहीं दोघेहि दुसऱ्याच्या वित्तावरच गबर होतात ' -सहचारिणी ६० [ स गव्हर, प्रा गब्भर, किंवा स गर्भकर, प्रा गब्भगर किंवा गुब्भर ? हिं ]

**गबरू**—पु १ रूपवान व मजबूत माणूस २ ( ल ) श्रीमंत व्यक्ति, अबादानीचा किंवा मालमत्तेचा माणूस [ गब्रू पहा ]

**गबान**—वि ( राजा ) सुपीक, फायदेशीर, नफा देणारी ( जमीन, देश, व्यापार इ० )

**गबान, गबानी**—नस्त्री (राजा) किफायत, नफा, फायदा, लाभ 'यंदा कापडाचे व्यापारात शंभर रुपये गबानी झाली '

**गबाळ**—वि निरुपयोगी, टाकाऊ गावाळ पहा 'भोंवतें मेळवूनि गबाळ। -तुगा१८१६ ०ग्रंथी-वि वेंधळा, गोंधळ्या, गरीब 'महाराष्ट्र सांप्रत आणि गबाळग्रंथी आहे ' -इप ९२

**गबाळ**—वि ( गो ) पाणथळ

**गबाळ, गबाळग्रंथ, गबाळणें, गबाळी-ळ्या**—गावाळ पहा

**गबां, गब्बा, गाब्बोटा, गबा**—पु ( गो वे ) केळीच्या खुंटाचीं सोपटें [ गाभा ]

**गबेलें**—न (कों ) घमेलें, कोळवें, लाकडाची पाटी (चिखल, चुना इ० वाहून न्यावयाची )

**गब्बू**—वि १ लठ्ठ व ठेंगणा, गुबगुबीत गबदूल पहा २ (ल ) ऐपतदार, श्रीमंत गबरू ३ भरभराटीचें, श्रीमंत ( शहर इ० ) [ स गर्भ, गब्भ ? ]

**गब्रा**—स्त्री पिकावरील कीड ( ज्वारी, मका, ऊस इ० च्या गाभ्यातील ). [ स गर्भ, म गाभा ]

**गब्रू**—वि १ पठ्ठा, बहाद्दर २ सुंदर, तरुण ३ आडमता खोर, खोटा विद्वान ४ गबरू पहा [ गबर हिं गब्रू किंवा गब्बर, तुल० हिब्रु ग्याब्रिएल=बलाढ्य देव, हगेरि गबोर, इटालि गब्रिएलो ]

**गभस्ति**—पु सूर्य 'जैसा प्रगटलिया गभस्ती। अशेषही मार्ग दिसती।' -ज्ञा २ २६१ [ स ]

**गभीर, गभीर**—वि १ खोल, अगाध ( समुद्र, नदी ) 'विमल हृदय तूझें पोत गभीर वारा।' -मुरामा अयोध्या ५७

(हा शब्द बहुधा लाक्षणिक अर्थानें वापरतात). २ शांत; सोशीक; भारदस्त; जरबी; धीराचा. ३ विचारशील; विवेकी. ४ आंतल्या गांठीचा; खोल मनाचा किंवा विचाराचा; ५ घन; धीर; उद्दाम (मेघ, सिंह, प्रवाह इ० चा ध्वनि). [सं गभीर]

**गम**—पु (क) रोख; कटाक्ष; झोंक; कल; अभिप्राय; पेंच; धोरण; आशय (भाषण इ० चा). 'त्याचे बोलण्यांतला कांहीं गम समजत नाहीं.' [सं. गम्य ?]

**गम**—पुस्त्री. १ संयमन; कानाडोळा; क्षमा; दुर्लक्ष (अपराधाकडे). (क्रि० करणें, खाणें; येणें). २ विराम; थोडें थांबणें; अवसान. (क्रि० खाणें) [अर. घम्=दु:ख] ०खाणें-धीर धरणें; क्षमा करणें; सोसणें; शांत रहाणें. 'त्यानें एवढा अन्याय केला तथापि आम्ही आजपावेतों गमच खात आलों.' [घमखाना] ०गिना-गम्गीनी-स्त्री. दु:ख. 'हें एकून दिलास बहुत गम्गीनी व खपगी जाली.' —पया ४६७.

**गम**—पु. (कों.) एक मत्स्य; गमफ्लास. [इं गम्=गोंद]

**गमक**—न. १ दाखला; पुरावा; कारण. 'ईश्वरास भजावें एतद्विषयीं वेदशास्त्रपुराणादि अनेक गमकें आहेत.' २ आभासन; आश्रय; अंगिकार केल्याचा मुद्दा; साक्ष; मजुरी; आधार; प्रमाण. ३ –स्त्री. (संगीत) तान; एकणाराच्या मनास आनंद वाटेल अशा प्रकारें स्वरास कंप देणें; आलाप, जोर व गमक या तीनपैकीं एक. शास्त्रांत असलेल्या प्रकारचे गमक कांहींच्या मतें १०, १५ व २२ वर्णितात. तथापि प्रचलित गायनांत त्याचा व्यवहार योग्य प्रकारें केलेला दृष्टीस पडत नाहीं व गमकांचें योग्य स्वरूपहि ग्रथांत वर्णिलेल्या वर्णनावरून ध्यानांत येत नाहीं त्यांचीं नावें ग्रथांत अशीं आहेत-स्फुरित, कंपित, लीन, आंदोलित वलि, त्रिभिन्न, कुरुल, आहत, हुंफित, नामित इ०. ४ –वि सूचक. [सं. गमक=जाणण्यास कारणीभूत होणें] गमकेची तान–स्त्री, गमकयुक्त तान.

**गमक, गमका**—पु. १ तोरा; मिजास; चाळा; नखरा; डौल. 'नयनाचे हाणी भाले, चाले करीत गमके।' —प्रला ११२ २ गर्व. 'इंद्रधनुष्याचा गमक। तृणतुच्छ ज्यां केला।' —वेसीस्व ४.१४.

**गमजा, गम्जा**—पु. १ तोरा; ऐट; मिजास नखरा; गर्व; ताठा. 'सज्ञानीं सत्त्वगुणेंवांचुनि मतिचे न चालती गमजे।' —मोविराट ६.१२०. २ चाटचाट; शृंगारिक नेत्रकटाक्ष; नखरे बाजी; मुरका; चोचला, तिरप्या दृष्टीनें पाहणें, हावभाव; नटणें; मुरडणें (स्त्रियांचे); कामविकाराचें कृत्रिम प्रदर्शन. 'तहि टाके हुमक बहुतांपरि। गमजा उत्तम तियेचा।' —स्वादि २.३.१० ३ दिमाख; दांडगेपणा; चावटपणा, धटाई; अमर्यादा (भाषेची नवऱ्याशीं, मुलाची बापाशीं, चाकराची धन्याशीं इ०); बहुधा अनेकवचनी प्रयोग ४ (सामा.) चोचले; चाळे; चेष्टा. [फा घम्जा=कटाक्ष; विभ्रम] ०करणें–१ दिमाख दाखविणें; गर्व करणें. २ (माण.) मजेंत असणें. ३ उच्छृंखलपणानें वागणें; चाळे करणें. 'गमजा करिता मनि उमजाना, हें सुख न पुरें पडेल बजा।' —राला ८५. ०चालणें–अमर्याद वर्तन खपणें, करणें. ०न चालणें–न चालू देणें–चाळ्यांना अवसर न देणें, नियंत्रण असणें.

**गमणूक**—स्त्री. रिकामे चाळे, खेळ. [गमणें]

**गमणें**—अक्रि. १ आळसानें काम करणें; सुस्त किंवा हळू हळू काम करणें; निरुत्साहानें, रेंगाळत जाणें; खेळणें; घुटमळणें; रगाळणें, रखडणें, रमत रमत फिरणें. 'नाना उदिजे दिवाकरें। गमावा मार्गु दिठी भरे।' —ज्ञा १७.१७८. २ मजेनें वाटेल तसा वेळ घालविणें [सं गम्=जाणें]

**गमणें**—अक्रि. १ शोभणें; पसंत पडणें; पटणें; आवडणें. 'तशी न यमुना गमे जशि गमे निर्लिपपणा।' —केका १०८. इ० राज्याप गमली ती राणी. २ (काव्य) दिसणें; वाटणें; भासणें. 'श्रीरंगास ऐसें गमलें। कीं हा राक्षस बैसला।'; 'कर्णवध क्षितिपाच्या चित्तास गमे क्षणक्षणीं रुचिका।' —मोकर्ण ६.१. काव्यांत गमिजे असें रूप आढळतें 'ज्ञानें ज्ञेय गमिजे।' —ज्ञा ४.१४२. ३ बरें वाटणें; चैन पडणें; (ना.) चैन पडणें, करमणें, 'म्हणे कृष्णाविण कैसें तुम्हां गमे।' —तुगा ३३. ४ काळ काढणें; राहणें; कंठणें. 'अनाथासी आम्हां तुजविण गमेनाचि सहसा।' —कीर्तन १.१७. [सं. गम=जाणणें]

**गंमत**—स्त्री १ सुखासमाधानाचें कारण; चैन. २ करमणुकीची, चैनीची वस्तु, विषय, व्यापार, साधन. [सं. गम्=जाणें]

**गमत**—न. (गो) गाबऱ्यावाटें किंवा गलबताच्या तळाच्या फळ्यांच्या सांध्यांतून आंत (गमताईत) आलेलें पाणी; घमत पहा.

**गमत(ता)ई-ही**—स्त्री. १ गमत सांचण्याची गलबतांतील जागा. २ गमत; गलबतांतील गाळ पाणी. [ग–घमत]

**गमतरमत**–क्रिवि. खेळत व आळसत; रखडत; रेंगाळत; चाळे करीत; घुटमळत; झुलत; हळू हळू (जाणें, येणें, खाणें, काम करणें) (प्र.) रमतगमत [गमणें+रमणें]

**गमतीं-त्या**—वि. कामगार, मनोरंजन करणारा; विनोदी; दुसऱ्याचा काळ सुखानें जाई असा हास्यविनोद इ० करणारा. (माणूस, व्यक्ति प्रसंग) [गमत]

**गमद्(दा)सडा, गमदासरा**—वि. खेळणारा, रेंगणारा; चाळे करणारा; रंगाळणारा, रखडणारा; आळसानें किंवा सुस्तपणानें काम करणारा [गमणें+दास]

**गमन**—न जाणें; हलणें; जाण्याचा व्यापार. [सं.] ०शीलत्व-स्त्री. (शाप.) गतिप्राप्त होण्याचा धर्म.

**गमनागमन**—न येणें जाणें; येरझार; वारंवार जाणें येणें. [सं.]

**गमनाज्ञा**—स्त्री. (काव्य) जाण्यास परवानगी; वाटेस लावणें; निरोप; बिदागी. 'जमी दिल्ही गमनाज्ञा । गोवर्धन्यासि देवें ।' [सं. गमन+आज्ञा]

**गमानी**—वि. १ (शिवी) लुच्चा; पोरा; गुलाम; हरामखोर; दगलबाज. २ मातागमनी; आईच्या खाटल्यावर जाणारा (समासांत) मातृगमनी; मातृगमनी. [सं. गम्=जाणें]

**गमनीय**—वि. १ जाण्यास, पोहोंचण्यास योग्य, शक्य, गम्य; जायाजोगा; जाण्यास सुलभ. २ अभिगम्य; आक्रमण्याजोगें; पावायाजोगा. ३ सुगम; सुगम; साधण्याजोगें; प्राप्य; संपादनीय.

**गमला**—स्त्री. (काशी) फुलझाडाची कुंडी.

**गमरड**—(व. प टा) बरें न वाटणें; न करमणें.

**गमाविणें**—उक्रि. १ फुकट घालविणें; हरविणें; अतीत करणें; गमाविणें पहा. २ खेळांत, आळसांत, रंगाळण्यांत (वेळ) घालविणें. ३ खेळत, रेंगाळत करणें (काम): ४ करमणूक करून कालक्रमणा करविणें (माणसाची). [सं. गमन, हिं. गंवाना; प. गंवाउणा: सिं. गंवाइणु]

**गमविणें. गमावणें-विणें**—अक्रि. (ल )नाहनाट होणें; मरणें. —उक्रि. हरविणें; पाडणें; हरपणें; साडणें; उधळणें; घालवणें (वस्तु, वेळ, प्रकृति) 'स्वयें बोधा काढावेल । गमवीतु असे ।'—ऋ ७७. 'का रे गमाविल्या गाई ।' —तुगा १८८. [सं. गम्=जाणें; हिं. गंवाना]

**गमावा**—वि. चालून जाण्याचा; आक्रमण करण्याचा (मार्ग). 'नाना चरितें दिवाकरें । गमावा मार्गु दिटी भरे ।' —ज्ञा १७ १७८. [सं. गम्]

**गमावू-उ**—वि. घालविणारा; हरविणारा. 'आलें हें नाव गमाऊं ।' —सप्र मगोतें ८२.

**गमी**—स्त्री. १ शोक; दुःख 'गमी करून कोणास न बोलतां दाखल जाले.' —रा ७ १४२. २ दुखवटा. 'वर्षे गमीचीं.' —रा ७. खलप ११२. [फा. घम्]

**गमूत्र**—न. गोमूत्र; गाईचें मूत. [सं गोमूत्र]

**गमेल**—न घमेलें; पाटी, गवेलें पहा.

**गम्मत**—स्त्री गमत पहा.

**गम्य**—वि १ गमनीय: जाण्याजोगें किंवा योग्य: सुलभ 'तेथ आम्हां ऐसें मानवां तुज स्वग असे गम्य ।' —माआदि ४९५ २ (शाक्त: व ल ) पावण्याजोगा; भेटण्याजोगा. ३ प्राप्य. 'ऐसें अगाध माहात्म्य । जे सकळमार्गैकगम्य ।' —ज्ञा ११. ७३. ४ जाणण्यासारखा: समजण्यासारखा; सुलभ. समासांत—अनुमान-अभ्यास-अनुभव-इंद्रिय-परिचय-बुद्धि विचार-व्यवहार-गम्य. इ०. दुसरी आणखीं उदाहरणें—उपदेश-गुरु-भाववाद-शास्त्र-श्रम-साधन-अध्ययन-अर्थ-उपभोग-तर्क-निर्णय-ज्ञानगम्य; म्हणजे अनुमानानें, अभ्यासानें, अनुभवानें इ० नीं जाणलें जाण्यास किंवा समजण्यास योग्य (आहे किंवा होतें); याप्रमाणेंच उपदेशानें भावानें इ० समजण्यास योग्य. —न. प्रवेश; परिज्ञान; परिचय; ज्ञान; माहिती 'तुला चित्रकलेंत काही गम्य आहे काय?' (क्रि० असणें). ०मान-वि. ज्ञेय; जाणण्याजोगें.

**गय. गयगोळा**—गई मध्यें पहा.

**गयतमयत. गयामयत. गयामत**—वि मेले गेलेले; नाहींसे झालेले; नष्ट 'दरम्यान मंजामदार लोक गयतमयत होत गेले.' —इनाम ३६ —बदलापूर ३७१ [सं. गत+मृत: प्रा. गय+मय; हिं गया+मयत]

**गयफ**—वि. गत; गुम 'भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गत कशी जाली... गयफ जाले किंवा असमानांत गेले...' —भाव १२०. [गयब पहा]

**गयवान्या**—वि. (व.) बावळट.

**गयवडा**—पु. दैन्य; दीनवाणी स्थिति. 'मागा तो यदुरावडा गयवडा नाशील त्या आवडा ।' —आसु ५.

**गयसून गयससना**—(गो. खा.) (जाणें या क्रियापदाच्या काहीं रूपांत गय शब्द येतो) गेल्यापासून.

**गया**—स्त्री. विहार प्रांतातील एक हिंदूंचें (व बौद्धधर्मीयांचेंहि) पुण्यक्षेत्र. येथें विष्णूनें गयासुरास ठार मारलें व त्याच्या विनंतीवरून त्याच्या पाठीवर एक यज्ञ केला. येथें विष्णूचें एक पाऊल उमटलें आहे, त्याची पूजा करून मृत पितरांस पिंड दिला आणि तेथील गयावळानें (पिंड देणारास) 'तेरे पितर सरग भये' असें म्हटलें म्हणजे पिंड देणाराच्या पितरांस स्वर्ग प्राप्त होतो व पुन्हा (श्राद्धसमयीं) पिंडदान करण्याचें कारण पडत नाहीं असें हिंदुलोक मानितात गौतम (बुद्धावस्था प्राप्त झाल्यानंतर) येथें राहून उपदेश करीत असे म्हणून बौद्धधर्मीय लोकहि यास पुण्यक्षेत्र मानतात ०वर्जन—न (अप ) गयावर्जन-वर्तन: गयेस जाऊन करावयाचें पिंडप्रदान व तीर्थश्राद्ध 'पितर उद्धारा आपण । गयावर्जन करानियां ।' —नभा ११ ३७८. [गया+वर्जन] ०वळ-पुत्र-पु १ गयेतील यात्रेकरूंचा तीर्थयात्रा करणारा भिक्षुक, पंडया; पुजारी. 'गयावळ ते गंगेचे । गंगापुत' —दावि ४७४. २ (ल ) आचारविचारहीन, भ्रष्ट मनुष्य. धर्मशास्त्रप्रमाणें न चालणारा: मळीन: आचारहीन भिक्षुक, भट ३ निकृष्ट, घाणेरडा, वेड पांघरलेला मनुष्य. ४ बावळट. गयाळ्या पहा. म्ह० बुरा गयावळ आणि बाई चंद्रावळ. ५ (गो ) निष्ठुर माणूस.

**गयाल-ळ गयाळी**—वि १ बिनवारस २ पडित सोडलेली, टाकलेली ( मिरास, वतन, जमीन, घर ) 'गाव गयाळी पडलें ' —थोमारो २ १६५. ३ (राजा ) परागंदा, दशोधडी झालेला ( मनुष्य, कुटुंब ) 'सरकारचे उपद्रवामुळें त्या गावचीं दहा कुळें गयाळ झालीं ' ४ बेपरवा ५ अजागळ, गचाळ, बावळा गाईसारखा भित्रा, गरीव, गयाळ 'गयाळाचें काम हिताचा आवारा।' —तुगा ३१२८ ६ ज्यास स्वत ज्ञान नाहीं व सांगितलेलें समजत नाहीं असा, मूर्ख, मंदी, खुळा, भोंगळमुती, अव्यवस्थित गोबरागणेश ( मनुष्य ), गयाबळ अर्थ ४ पहा ७ अयोग्य, गचाळ, घाण, फुसकी, वाईट ( वस्तु ) [स गत, प्रा गय, हिं गया, गु घेला ]

**गयाली**—वि गांव सोडून गेलेले —पदलापूर २८७

**गयावया**—स्त्री क्षमेची याचना, विनवणी, करुणा भाकणें दीनवाणीची प्रार्थना ( क्रि० करणें) 'असें म्हणून व पुष्कळ गयावया करून मीं त्याचा राग शांत केला ' —पकोघे [ गई-गय= क्षमा+स वद, प्रा वय ? ]

**गयावया**—क्रिवि अति लीनतेनें, करुणास्पद रीतीनें, अजीजीन, दीनवाणीनें ( क्रि० करणें )

**गय्या**—वि (गो ) मूर्ख, अडाणी गयाल अर्थ ६ पहा

**गर**—फारसी प्रत्यय कर, कार, करणारा या अर्थी उदा० सिकलगर, बाजीगर

**गर**—पुन १ विष, हालाहल २ (ज्यो ) अकरा करणांतील पांचवें करण [ स ]

**गर**—पु गामा, दळ, गीर, मगज ( फळांतील ) [ स गर्भ सिं गरु] **गरच**—पु (कु ) फळांतील मगज **गरभरू**-वि मगज, दळ यांनी भरपूर

**गर**—स्त्री १ घोड्याच्या छातींतील व घशांतील किंवा मानेंतील एक रोग अथवा सूज ( क्रि० भरणें ) २ खरारा न केल्यानें घोड्याच्या अंगावर जमलेला मळ [ स गर=रोग ? ]

**गरऊ**—पु गर्व ताठा 'बंधूनें गरऊ सांडविला। —शिशु २१७ [ गर्व ]

**गरक**—वि १ गर्क, मग्न विमग्न बुडालेलें ( जलादिकामध्यें ) २ चिंतनांत निमग्न गढलेला, गुंतलेला, विचारांत चूर ३ ( ल ) निमग्न झालेला, तल्लीन ग्रस्त आसक्त, वाहिलेला 'साधू ईश्वरध्यानामध्येंच गरक होऊन जातात ' ४ गाढ, गहन घोर ( झोप ) ५ हरवलेला मरस्य नाहींसा झालेला गडप, नाहीसा झालेला; नष्ट मृत [ अर. घर्क ] ०करणें—मारणें, गिळणें, दगलबाजीनें अपहार करणें ( ठेव इ० ) 'त्यांनीं तिचा ठेवा गरक केला '

**गरकणें**—अक्रि १ लवकर मुरणें, भिनणें, आत शिरणें 'शेतामध्यें पाणी लागतांच गरकलें ' २ दचकणें, घुसणें, घाबरणें, गोंधळणें [ गरं ! अर घरीक=बुडालेला ]

**गर-कन-कर-दिशीं, गरंक( कां )डा, गरकांडी, गरका, गरगंडा**—गिरकन इ० पहा

**गरका**—पु. १ घेर, वेढा, परीघ २ घेरणें, वेढा घालणें, गराडा 'त्या किल्ल्याभोंवता जेव्हां हजार मनुष्यांनीं गरका घातला तेव्हां उपाय नाहींसा झाला ' ३ वाटोळा, मंडलाकार फेरा, गरगरा फिरकी, गिरकांडी, चक्कर घिरटी प्रदक्षिणा (क्रि० घेणें, मारणें, बसणें ) 'मग परमस्नेहाचा खुंट उभवोन। गरके घालिती त्यासवें।' —नव २४ १५५ ४ (ल ) घोंटाळा, गुरफटा, गूढ, तारवळ घोळ ५ सोंडी भोंवतालचा घेरा, चक्कर ६ शेतांतील नादुरुस्त, पडित, वाटोळा जमिनीचा तुकडा [अर घर्क]

**गरकू**—स्त्री (कों ) आकडीसारखी काठी, काठीला लहान लाकडाचा तुकडा बांधून करतात ती 'फुलें हातास येणार नाहींत गरकू घेऊन फांद्या ओढ ' गरखी पहा

**गरको**—पु (कु ) दाटी, गर्दी 'एकदम गरको कोलो '

**गरखी**—स्त्री (कों ) आकडी, टोंक वाकडी असलेली काठी ( फळें इ० काढण्याची ) गरकू पहा

**गरगच्चा**—पु गलबला, गोंगाट, गरगशा पहा ( सामा ) आरडाओरड, गवगवा [ ध्व ]

**गरगट-ड गरगटा-टें**—पुन १ एकत्र वाटलेल्या किंवा उगाळलेल्या अथवा कढविलेल्या पुष्कळ प्रकारच्या औषधांचें सरबरीत मिश्रण, बाळंतिणीचा काढा, दाट मिश्रण २ भाकरी साठीं आलें ( दाट आमटी इ० ) भाजीपाला डाळ, पीठ यांचें सरबरीत मिश्रण 'आज भाकरीचें गरगट केलें होतें ' ३ (थट्टेनें) अतिशय पाणी राहून पचपचित बनलेला भात किंवा इतर खाद्य पदार्थ ४ खालीं उरलासुरला सरबरीत गाळसाळ ( औषध काढा इ० कांचा ) ५ तंबाखूवर पडणारा एक रोग [ गर्=वाटोळें+ गट ]

**गरगटणें**—उक्रि १ (दगडी खलांत) खलणें, घोटणें, उगाळणें, चूर्ण करणें, वाटणें 'तूं एवढें पुरण गरगटून दे म्हणजे मी पोळ्या लाटीन ' [ गरगटा=खल ] २ गरगाटानें ( भिंत इ० सारवण्यासाठीं केलेलें शेण व पाणी यांचें मिश्रण, त्यानें ) धार धरणें, पातळ घालणें, शेणमाती इ० नीं लिंपाटणें ३ ( माण ) चुलीवर शिजत असलेल्या पदार्थांस ढवळणें, कालविणें, घाटणें [ गर्=वाटोळें+घटणें=घाटणें ]

**गरगटणें गरगाणें**—नपु औषधी, मसाला इ० वाटण्याचा, खलण्याचा दगडी खल उखळ [ गरगट ]

**गरगडा**—पु १ गोंधळ, घोंटाळा, गर्दी, गडबड अव्यवस्था, अदाधुंदी ( स्वयपाक, लग्न दगदार काम इ० ची ) २ गरगट अर्थ १ पहा

**गरगर रां**—क्रिवि १ चक्रवत, सभोंवतीं, मडलाकार होईल असें, गिरकींत फेरात ( फिरणें, भोवडणें ) 'गरगरा आतु भव तुसें तैसा।'—शिशु १०४३ चित्र गदा महोग्रा गरगर फिर वुनि सोडिली जे गा।'—मोकर्ण ९ २६ २ अति त्वरनें, उठाउठीं, भराभरा ( मूल किंवा रोप याची वाढ ) पुष्पापेक्षा पारींची जात वाढू लागली म्हणजे गरगरा वाढते ' [ गर्र द्वि ]

**गरगरणें**—अक्रि १ गिरकाड्या घेणें, भोंवतीं फिरणें २ घेरी, भोवड येणें ( मस्तकात ) ३ उफाड्यान वाढणें, फोंफावणें (झाड) [गरगर] **गरगरून येणें, गरगरायास लागणें गरगरणें**-पोटात ढवळणें, फिरणें, घेरी येणें 'सकाळपासून या चुलीचं डोसक धरून बसल्यामुळें गरगरायला लागल आहे ' —नाट्यछटा ( फाटक ) ३ [ गर्र द्वि ]

**गरगरा**—पु १ गिरकांडी, भिरकाडी, भोंवरा २ ( ल ) कामाचा घोंटाळा, गोंधळ ( क्रि० करणें, घालण, पडण ) [ गर् द्वि ]

**गरगराट**—पु जोराची गिरकाडी, घेरी, फेरा 'फासे फिरती गरगराटें।'—मुसभा १४ ४०

**गरगरीत**—वि ( याच्या मागें किंवा पुढें वाटोळा शब्द जोडून अतिशयत्व दर्शवितात ) १ अगदीं वाटोळा २ मोठे, गोल व सुदर ( डोळे ) [ गरगर ]

**गरगशा, गर्गशा**—पु गोंधळ, आरडाओरड वगैरे गलबल्याचा हल्ला किंवा भोंवतीं गर्दी २ त्रासदायक किंवा घोंटाळा करणारा गलगा, गवगवा, ओरड ३ त्रास उपद्रव, अव्यवस्था त्यामुळें झालेला घोंटाळा ( क्रि० घालणें, पडणें होणें ) 'मसरूतीच्या प्रसगाचा गरगशा आहे '—पया ८५. ४ अव्यवस्थित कामकाज धदा, घोंटाळ्याचा कारभार, गडगच्चा पहा ५ —न तटा, भांडण 'तुरकाचे काहीं गरगशा जहाल नव्हत —इम ६ [ फा पर्घशा ]

**गरगस्त-स्ती**—स्त्री ( व ) सकट दुर्दशा 'आमच्यावर गरगस्त आली '

**गरगा**—पु खांच, खड्डा [का गरकु=चढउताराचा पृष्ठभाग, विषमता ?]

**गरंगाटा**—पु ( गो ) पदें पदें असणारा व करकऱ्यास रसा एक मासा [ स गर्गाट ]

**गरंगाल**—वि ( राजा ) लाजरा, गायनोंडया, भेकड, गरीब, गोगल्याय ( माणूस )

**गरगूट**—न ( गो ) भाताची एक जात

**गरगोट**—न ( व ) चिंचेचा दाट पदार्थ, गरगटें पहा

**गरगोटी, गरगुटी**—स्त्री मान, मानगुटी ( धरणें, आंवळणें, दाबणें बसण इ० क्रियापदाबरोबर योजतात ) 'त्याची गरगोटी धरू नको, प्राण जाईल '

**गरज**—पु मोत्यातील नर दाणा

**गरज**—स्त्री १ दरकार, पर्वा २ उपयोगासाठीं ( कोणत्याहि वस्तूची इ० ) उणीव, अभाव, अडचण, चणचण ३ ओढ, ताण, निकडीची आवश्यकता, जरूरीचा प्रसग किंवा इच्छा मला लेखणी करावयास चाकूची गरज आहे ' ४ हक्क, प्रयोजन 'सुदरशुकदेव यास कथला करावया गरज काय ? '—रा १५ ७१ [ अर घरज, तुल० स गृध-गृध्य-गरज्ज-गरज=इच्छा —भाइम १८३२ ] ( वाप्र ) ०करणें-१ चालवून घेणें, गुजराण करणें, कसा तरी निर्वाह करणें 'धोतरें घ्यावयास पैसे नाहींत म्हणून पचावर गरज करतों ' २ हेळसांड चालढकल करणें, कसें तरी रेटणें नीट जपून लिहा, गरज करू नका '? ३ एखाद्याची अपेक्षा, निकड, उणीव पुरविणें ४ ( आपली साधनें, शक्ति ) हात राखून खर्चणें, शिल्लक टाकणें, बचत करणें, आपल्या आटोक्यात, ऐपतींत आटोपणें ०चालविणें-पुरविणें-गरज भागविणें ०होणें-गरज पुरविली जाणें म्ह० १ आपले गरजे गाढव राजे २ गरज सरो वैद्य मरो=आपलें काम सपल्यावर मदत करणाऱ्याशीं बेपर्वाईनें वागणें सामाशब्द- ०गो-वि स्वार्थानें प्रेरित होऊन बोलणारा, गरजेपुरता हांजीहाजीखोर, मतलबी 'गरजगो लोकांनीं मनास यईल तसें नबाबास समजाविलें '—रा ६ ३५७ [ फा गो=बोल ] ०वत-वि १ अडलेला, जरूरी असलेला २ कगाल, मुकेबगाल म्ह० १ गरजवता अक्कल नाहीं=गरज असल्यानें वाटल त्याचीं वाटल तीं बोलणीं ऐकण्याचा प्रसग येणें —भा ५२ २ गरजवत तो दरदवत [ फा परज्मद ] ०साधू-वि आपले हेतु साधण्याविषयीं तत्पर, आपली गरज झाली कीं पुरें असा स्वार्थी अप्पलपोटया [ गरज+साधणें ] **गरजी-जू**-पु १ गरजवत पहा २ आपन श्रम वांचविणारा वरवर किंवा उपराट परी काम करणारा बेतावातानें श्रम करणारा अगचोर 'असल्या गरजी मनुष्यांनीं कांहें काम चांगलें होत असतें ? ' [ स गृधु ? ]

**गरजेची**—वि जरूरीपुरती, कामचलाऊ कशीबशी 'गडाची इमारत गरजेची करू नये '—मराभा १०

**गरजणी**—स्त्री गर्जना, गरजण्याचा व्यापार [ स गर्जना ]

**गरजणें**—अक्रि १ जरूर असणें अपेक्षा, अडचण, कारण असणें 'मी आज दहा रुपयांसाठीं गरजलों '

**गरजणें**—अक्रि ( अनुकरण ) १ गर्जना करणें, गडगडणें, घडघडणें २ ( ल ) गर्जना करणें, मोठ्यानें ओरडणें, डुरकणें, आरोळी मारणें ( तोफ, वन्य पशु यांनीं ) 'गरजला गजराज

घनारवें।' –र ५७. ३ गर्जणे; दुमदुमणें; घुमणें; प्रतिध्वनि करणें, होणें. 'श्री वसंत देखान सुस्वर। कोकिळा गरजती आनंदे।' [सं. गर्ज्] म्ह० बोलेल तो करील काय, गरजेल तो पडेल (वर्षेल) काय? =ज्याची फार वटवट त्याचे हातून प्रत्यक्ष कार्य होणार नाहीं.

गरजणें—क्रि. (गो.) खर्च करणें.

गरजिणें—क्रि (गो.) गरज भागविणें, जिरविणें. [गरज]

गॅरंटी—स्त्री. १ हमी; जिम्मा २ खात्री. [इं.]

गरड—पु (गो.) मोठ्यानें केलेला आक्रोश.

गरडगप—क्रिवि. घुरल्या, गिळल्या, हरवल्या, घुसल्या जाण्याच्या स्थितींतील, गडप [सं. गॄ-गर= गळणें+गप]

गरडर गर्डर—पु लोखंडी तुळई 'गर्डरे बसवतांना त्याचे भिन्न भिन्न भाग हंग मी बोल्टानी जोडावे.' –मॅरट २२. [इं]

गरडा—पु १ हलकी ढेकर; गरदई २ घरघर; श्वास (मरणोन्मुख प्राण्याचा) [ध्व घर!]

गरंडेल—पु (कु) एक प्रकारचा फटाका (आतषबाजींतील).

गरद(ड)ई—स्त्री. अजीर्णामुळें पोटांतील वायु ऊर्ध्वगत होऊन घशात येणारा जराँश; घशाशीं येणें; उचकी. (क्रि० येणें; लागणें).

गरत-ती—स्त्री. संभावित, मर्यादशील, कुलीन स्त्री (सवाष्ण किंवा विधवा) अव्यभिचारी, पतिव्रता स्त्री; ह्याच्या उलट नगरभवानी: भटकी, व्यभिचारी 'ऐका बाई लाज नाहीं आणिकी त्या गरतीची।' –तुगा २९६ 'करत होती तेंच नवसा गरता रती।' –माकृष्ण ५५४३ [म गृहरत, गृहरती]

गरता-दा—स्त्री १ गर्ता, खड्डा, खांच २ पोट (क्रि० भरणें) [स. गर्ता]

गरद—विक्रांव दाट, गर्द; गच्द पहा.

गरद—न. धुराळा, गरदा पहा 'गरद बहुत उठला.' –रा १.६४ [फा. गर्द्]

गरद—न. एक प्रकारचें रेशमी कापड

गरद(ध)ट—वि मनस्वी; अविचारी, बेपर्वा; गळदट पहा.

गरदन. गर्दन—स्त्री मान, गळा. [फा. गर्दन्] मारणें–ठार करणें.

गरदा—पु. १ गर्दी, दाटी. २ (व.) धूळ धुराळा 'रस्त्यात गरदा उडाला' [फा. गर्द] गरदून जाणें–भयभीत होणें; गांगरणें; भ्रांती पडणें.

गरदा-गर्दा—पु. वाळलेली व चुरलेली तंबाखूची पत्ती; गांजा; चूर इ०. कुसुंब्याचा गरदा–गोमाच्या कादयाचा उरलेला भाग, गाळसाळ.

गरदुड. गरदोडा—पु (व.) खड्डा; खच. [सं. गर्ता. हिं. गर्दोडा]

गरनळा-नाळ. गरनाल—पुस्त्री. मोठी तोफ; कुलपी गोळ्यांची तोफ. हिचा आकार खंडकी उखळीसारखा असतो. 'गरनाळा भर गोळ्याचा मार।' –ऐपो ११३. [हिं.]

गरयखिळी—स्त्री (नाविक) जमीनीत उभें केलेलें नाखवळ भट्टळ होण्यासाठीं आगींतून व नाळवळाच्या नेढ्यांतून पार नेलेला लोखंडी खिळा. [गर्भ+खिळी]

गरवड—गडबड पहा.

गरवरणें—अक्रि. पोटांत गुरगुरणें; गुडगुडणें; पित्तादिकानें वांती होण्याजोगें ढवळणें. 'मला गरबरतें.' 'माझें पोटांत गरबरतें' [ध्व]

गरवीण—स्त्री. (सुतारी) सरळ रेघ काढण्याचें हत्यार.

गरभा—पु. एक प्रकारचें गुजराथी नाच-गाणें; नवरात्रांत व इतर सणांत समईभोंवती फेर धरून बायका ईशस्तुतिपर किंवा कृष्णलीलेचीं गाणीं म्हणतात तो प्रकार. गर्भा पहा.

गरभार—गर्भार पहा.

गरम—वि. १ ऊष्ण; ऊन (शब्दशः व ल) २ कडक; तिखट; रागीट. ३ ऊबदार (कापड इ०). 'थंडीचे दिवसात गरम कपडे अंगात घालावे' ४ दाट (बातमी इ०). 'बेरदास्त होतात म्हणून आवई गरम होती.' –रा १.५४ ५ कढ; संतप्त. 'तो मजवर फार गरम झाला.' [फा गर्म] (वाप्र.) ०होणें–(ल) रागावणें; संतापणें सामाशब्द– ०नरम–वि. १ फार ऊन किंवा थंड नाहीं असे (वस्तु इ०) २ (ल.) कडक व सौम्य; निष्ठुर व दयाळु; कधीं कडक व कधीं शांत (मनुष्य, स्वभाव, भाषण). ३ बेगुन; उत्तममध्यम; चांगले व सामान्य. ०बाजारी–स्त्री. १ फार मागणी; भारी किंमत; व्यापारांत तेजी. २ श्रीमंत लोकांची मर्जी साधणें 'मध्यस्थ लोकांनी गरमबाजारी करून ...' –दिमरा २ २८२ [फा. गर्म+बाजारी] ०मसाला–पु १ भाजीला घालण्याचा धने, लवंग. दालचिनी, हिंग इ०चा कच्चा मसाला. २ ऊष्ण व शक्तिवर्धक औषधें, मसाले. [हिं.]

गरमर-ळ—न. माईनमूळ याचें झाड २ फूट उंच असून पानांस ममाळ्यासारखा तिखट वास व रुचि असते मूळ लोणच्यांत घालतात.

गरमा—पु. उकाडा; ऊष्मा (हवेंतील) गरमी पहा. [फा. गर्मा=उन्हाळा]

गरमाई—स्त्री. वितुष्ट; तंटा. 'मित्र इतिहासांच्या लोकांत केव्हां केव्हां थोडीबहुत गरमाई उत्पन्न झाली तर...' –भागर ३.१६५. [गरम]

**गरमागरम**—वि फार ऊन, ऊनऊन, कढत [गरम द्वि फा गर्मागर्म] ०**गरमी**—स्त्री उष्णता, संताप, राग, क्षोभ

**गरमी**—स्त्री १ उष्णता, ऊन उकाडा 'दाटली दिव्यार्ची गरमी सदनांतरी।' —प्रश्न १०० २ (ल) अंगाची तलखी कढ़ाली, आग, ताप, रोगाची उष्णता ३ राग, क्षोभ ४ उपदश, फिरंग रोग, गर्मी [स घर्म, झेंद गरेम, फा गर्मी]

**गरररर**—क्रिवि जोरानें गरगर फिरणाऱ्या वस्तूच्या होणाऱ्या आवाजाप्रमाणें [ध्व]

**गरल**—न विष, जहर सापाचें विष गरळ पहा 'शीत मंद सुगंधहि वद सेवावा कसा गरल वायु।' —मोवन १३ २१

**गरवणें**—(कों कु) गळ टाकून मासे पकडणें, वेंचणें (गो) गरवप, गरोंव [गरी]

**गरवस, गरवा**—वि (कों) उशीरानें पिकणारा, मागस (धान्य, पीक) याच्या उलट हळवा [स गुरु गरीयस्, तुल० हिं गरावा=हलकी जमीन] **गरवें भात**—न पाच, साडेपाच महिन्यात तयार होणारें भात **गरवी अवणी, गरवी शेत**

**गौरी**—स्त्री नाचणीची एक जात

**गरवार**—वि गर्भार 'झालों गुरूदर जशा अत्यासन्नप्रसूति गरवारी।' —मोवन ८ ३७ [गर्भार]

**गरवारशी हळकुंड**—न ज्या हळकुंडास बाजूला लहान कुडीं अथवा कोंब फुटलेले असतात असें —प्रसूतीकृत्यादर्श (बडोदें) ८ [गर्भारशी]

**गरस**—स्त्री मोठें, कठिण, टणक व तोंड नसलेलें गळू गाठ (अव गरशी गरसा) 'दोन्ही खावाला दोन्ही पें बाधल्या गरशी।' —पला ८० 'उरी उभासले गेंद लाहान गरसा। —सला ७ [गर्‍रा=वाटोळें]

**गरसळी-सुळी-सोळी**—स्त्री १ गळसरी गळ्यातील एक दागिना, काचेचे किंवा सोन्याचे मणी व मध्यें पुतळी असलेली माळ 'प्रियाच्या बाहूंचा गरसळ गळ्यामाजि असतां।' —विवि ८ १ २० 'तोडून गरसुळी फोडून हातचीं कांकण।' —ऐपो ११६ २ (तंजा) मंगळसूत्र 'मंगलराज गरसळी।' —वेसीस्व १० ८४ [स गल, हिं गर+सरी]

**गरळ**—न विष हालाहल, गर 'गरळ जें वमी मुखें। —ज्ञा ६ २४१ —स्त्री १ साप, पाल इ० ज्या तोंडाचा विषारी फेस (गवतावर पडणारा) २ (प्रा) आस्था, छंद नाद 'त्या-पडण्याची गरळ सोडली ३ लाळ तोंडास सुटलेलें पाणी (क्रि० येण) [स गरल]

**गरळा**—पु १ काहीं औषधी किंवा वनस्पती विडयात घालून चावून त्यांचा काढलेला रस (तान्ह्या मुलास खोकला, इगबण इ० प्रसगीं आई देते तो) 'ते माय देत गरळा तयाला। —शको ३ ५ —सारुह १ ५४ (क्रि० घालणें) २ (ल) लांच, मूठदाबी (क्रि० देणें) [गरळ]

**गरळा**—पु (कों) भात, वरी इ० काच्या लोंबीच्या देंठाजवळचा भाग (कापण्याच्या वेळीं म्हणतात)

**गरळी**—स्त्री अजीर्णानें पोटातून घशात येणारें पाणी, अम्ल इ०, घशाशीं येणें (क्रि० येणें, आणणें) (वाप्र) **जेवूं घालून गरळ्या आणणें**—अति आग्रह करणें, एखाद्या गोष्टीचा अतिरेक करणें

**गरा**—वि गरवस, गरवा पहा [स गुरु]

**गरा**—पु १ फळाचा गर असलेला फणसांतील भाग, आठळीविशिष्ट खाण्याचा अंश गऱ्यात बी—आठळी असते जसे बरे गरे ०हु कपी भड।' —मोसीतागीत १४१ (नवनीत पृ २६१) २ दाणेदार कणीक रवा ३ (क) उसाचा करवा, गंडेरी [गर]

**गरॉ**—पु (गो) गळ, आमिष गरी पहा

**गरागर-रा**—क्रिवि वाटोळें, गिरकींत, वर्तुळात (फिरणें, गुडाळणें) गरगरा पहा

**गराज**—पु लोखंडी किंवा लाकडी गज, कांब, कठडा (जाळी, खिडकींतील) गराद—दा पहा

**गराठी**—स्त्री १ (कों) गरखी, आंकडी (दुबेळक्याची, किंवा शेवटास आकडा असलेली, फळें तोडण्याची) २ (गो) गराटी—ठी, मासे पकडण्याचा गळ, गरी [गरा+काठी]

**गराड**—न (व) जोराची वावटळ, झंझावात, वादळ [हिं गिर्द गिर्दबाद गराडा]

**गराडगप**—क्रिवि गरडगप पहा

**गराडणें**—अक्रि (व) झाडें इ० तोडणें, वर पाडणें '

**गराडा**—पु १ घेरा वेढा सैन्याची टोळी (वेढा घालणारी) 'त्या शहराभोंवता हजार स्वारांचा गराडा पडला आहे' २ कुपण आवार, आवाराची गोलाकार भिंत (क्रि० घालणें, करणें) ३ वेढा घालून बसणें (क्रि० घालणें, देणें, पडणें) [गर्द, गिर्द]

**गराद्या**—पु गराद़ा गराज पहा

**गराडी**—स्त्री १ (रस्त्यावर पडलेली गाडीची) चाकोरी 'चेंड्र गाडीच्या अरद गराडींत असला म्हणजे ' —कुबडी चेंडू (मडादें) १३ २ चुन्याच्या घाणीचें चाक फिरण्यासाठीं केलेला गाल खड्डा, घाणी

**गराडी**—स्त्री करपट ढेकर, उचकी गरळी पहा

**गराद-दा**—स्त्रीपु गज कांब, कठडा गराज पहा 'ती एक भल्या मोठ्या गरादा लाविलेली खिडकी होती '

–सूर्योदय १०२. [पोर्तु. प्राद, हा शब्द हिं. बं. गु इत्यादि भाषांतून आहे]

गरारणें—अक्रि १ जलदीनें किंवा मोठा आवाज करून भोंवताली फिरणें; गिरक्या घेणें. २ जलदीनें भिजणें, मुरणें, जिरणें ३ उफाळ्यानें, जोरानें अंकुर फुटणें, फोंफावणें (पीक, झाड). जोमात किंवा ज्वानींत येणें; रसरसणें (फळ, तरुण स्त्री). 'ग ल शरीर घडु इहून तसें दिसंदिवस वाढे गरारतें।' –प्रला १४२. ४ एकाएकीं, घराटून घाबरणें. 'चोर म्हणताच गरारला.' ५ मालदार, वाढाळे होणें. [गरारा]

गरारां—क्रिवि गरगर; सभोंवार; वाटोळें; चक्राकार (फिरणें, गुडाळणें, लोळणें). [गरर]

गरांव—पु (गो.) अर्धगुंज (वजनी म प). [पोर्तु इं. ग्रेन]

गरिब—गरीब पहा.

गरिमा—पु १ भारदस्तपणा; गुरु-व. गांभीर्य २ मान्यता; थोरवी; श्रेष्ठत्व; मोठेपणा. 'गरिमेतें अ गाकडे। येवोंनि नेदी।' –ज्ञा १३ १८७ ३ (ल.) गुरुपणा. ४ अणिमादि अष्टसिद्धींतील तिसरी सिद्धि ५ मोठेपणा; प्रचंडता. 'प्रतापगरिमा पाहे माझा।' –भारा किष्किंधा ३ ६५. [सं]

गरिमान—पु मोठेपणा. गरिमा पहा. 'ईच्या नितंबा गरिमान यावा।' –साहद २.५४.

गरिष्ठ—वि १ फार किंवा अतिशय जड; अवजड. २ भव्य, अपरिमित, जबरदस्त; अति वजनदार. ३ प्रौढ, प्रतिष्ठित; संभावित ४ पचण्यास जड वाटणारें जड (भक्ष्य). [सं.]

गरी—स्त्री १ (कों) मासे पकडावयाची गळाची काठी; जाळें वीतभर दारांची दोन टोंकें काठीच्या अग्रास बांधून त्या वलयाकार दोरींत चिमोरी ६० चा नागडा सापडवून पीळ घालून त्यास धरितात ती काठीसहित वलयाकार दोरी. २ (राजा.) लहान मासे धरावयाचा गळ.

गरा—स्त्री (गो) फणस तील लहान गरा.

गर्रा—स्त्री (व) कडब्याच्या ७५।८० पेंढ्या उभ्या करून केलेला गंज 'कडबा कापून त्याच्या गऱ्या करून ठेव पथाला सुरवात करा.' [गरा=वाटोळें]

गरां—वि उशिरां येणारी भाजी वगैरेची जात. –वागेची माहिती २३ [गरवी]

गरातोड—क्रिवि तावडतोब; लवकर, एकदम. –शारे.

गरीब—वि. १ दरिद्री; कंगाल, द्रव्यहीन. २ शांत; निरुपद्रवी; सात्विक; भेडा. ३ दीन; लाचार. [अर. घरीब्] म्ह० (व. गरीब की जोरू सबकी भाबी=गरिबाला सर्व जण त्रास देतात; गरिबाचा काळ. ॰गाय–वि. अगदीं निरुपद्रवी; दीन, लाचार (मनुष्य). ॰गुरीब गुरबा–वि. गोरगरीब, गरीब लोक (समुच्चयार्थी). 'गरीब गुरबाची घरें बहुतेक वाहून गेलीं.' –रा ५.७०. 'धर्म करणें तो गरीबगुरिबास करावा.' [अर. घरीब+गुरबा (भव)] ॰नवाज, परवर–वि. दीनदयाळ; अनाथनाथ; गरीबांचा पालनकर्ता. 'गरिबानवाज माधवजीची दुरुनि द्वारावती देखियली।' –अमृत ३०. धनी, मोठे लोक, यांना अर्जदारांकडून ही पदवी लावण्यांत येई. [फा. घरीब्+नवाज़, घरीब्+पर्वर्] ॰सार–वि. लाचार; कंगाल; बापुडा. गरिबाई–स्त्री. १ गरीबी; कंगाली, लाचारी; पराधीनता; दैन्य. २ शांतपणा; सात्विकपणा; भेडाई (स्वभावाची) [फा. घरीबी]–गांचा काळ (आणि मोठ्यांचा प्रतिपाळ)–वि. दुबळ्या लोकांना त्रास देणारा व श्रीमंताच्या लाथा खाणारा. गरिबी–स्त्री. १ दारिद्र्य. २ सात्विकवृत्ति; नम्रता; शांत स्वभाव; गरीबपणा [फा. घरीबी] –यी दुरिबी–स्त्री. १ दारिद्र्य व श्रीमंती. २ नीचता व मोठेपणा.

गरुड—पु. १ विष्णूचें वाहन असणारा पक्ष्यांचा राजा; हा चपळ, भव्य, सुंदर व पिंगट पिसाऱ्याचा, निर्भय, तीव्रदृष्टि, वेगवान असतो, म्हणून याला पक्ष्यांचा राजा (खगेंद्र) म्हणतात. २ गिधाडाची मोठी जात. [सं]( वाप्र. ) ॰करणें–अक्रि (कु.) बनविणें, फसविणें. म्ह॰ गरुडापुढें मशक सामासवर– ॰घुबड–न. अतिमोठें घुबड. हें ठर्की पक्ष्याएवढें असतें. –प्राणिमो ६६. ॰टका–स्त्री. गरुडाचें चिन्ह काढलेला ध्वज, निशाण, पताका. दिंडी पताका गरुडटके। नामघोषें गर्जत।' –एभा ११ १२८०. ॰ध्वज–पु १ गरुडांकित निशाण, गरुडटका. 'अनर्घ्यरत्नीं रत्नखचित। गरुडध्वज लखलखित।' –एरुस्व ५.११. २ विष्णु. 'धांव धांव गरुडध्वजा। आम्हां अनाथांच्या काजा।' –तुगा १५७९. ॰पक्ष–वि. दोन्ही कुशीवर दोन भोंवरे असणारा (घोडा); हा शुभदायक आहे. –अश्वप १.११. ॰पक्षकर(संयुतहस्त)–पु. (नृत्य) त्रिपताक हस्त एकमेकांत गुंतवून त्यांचे तळहात खालीं नेणें ॰पक्षी–पु गरुड. –वि (व) दोन्ही बाजूंनीं फांसोळी कमी असलेलें (जनावर) ॰पाचू पाच–पुस्त्री. पाचू नांवाचें रत्न, राजनीळ. गरुडपाचूच्या ज्योती पूर्ण। प्रभामय विराजती।' –ह २.१६. [सं. गरुत्मत मणी] ॰पार–पु गरुडाचा पार. विष्णु किंवा त्याचा अवतार यांच्या मूर्तीपुढें गरुडाची मूर्ति बसविलेला व ह. विठोबाच्या देवळांतील गरुडाची स्थापना केलेला ओटा जागा. गरुडपारावरी उभा राहिलासी।' –तुगा ८२८. ॰वृक्ष–पु. एक झाड. ॰वेल–स्त्री. गरुळ, गरोळ; गुळवेल पहा. [सं. गडुची] –ासन–न (हठयोग) याचे चार प्रकार–उभ्याचे दोन व ओणव्याचे दोन. उभे रहावें; नंतर डावे पायानें उजव्या पायास वेढा घालावा व ज्या पायानें वेढा घातला त्याचा आंगठा जमीनीवर टेंकावा व दोन्ही हात गुडघ्यावर टेकावेत. यांतच पायांची अदलाबदल केल्यानें दुसरा प्रकार होतो. –संयोग ३५२.

**गरुरी**—स्त्री मगरुरी, ताठा, गर्व; तोरा; दिमाख. [ सं गर्व; अर. घुरूर् ]

**गरुवती**—स्त्री श्रेष्ठता; गुरुत्व. 'म्हणोनि हा काव्यां रावो । ग्रंथ गरुवतीचा ठावो । ' –माज्ञा १.३३. [ गुरु ]

**गरुवा**—वि. म्हातारा, मोठा. 'पिंड गरुवा माकडु । होईल हा । ' –माज्ञा १३.५६९. [सं. गुरुवत्]

**गरुवा**—पु. गर्व; ताठा; गरुरी. [ सं. गर्व ]

**गरुस्ती**—स्त्री ( कु ) दरवडयांतील वस्तु ठेवण्याची पिशवी

**गरूर-री**—पुस्त्री गर्व; मगरुरी. 'टिपूही आतां मस्नद नसीन जाहला तो गरूरीच्या पहाडावर चढला । '–ख ८.४३५५. 'मग नवाब म्हणो लागऽ गरूर प्रधान पंतांत फार जाहला आहे.' –पेद १०.६६. [ अर घुरूर ]

**गरू(रो)ळ**—स्त्री गुरुवेल पहा.

**गॅरेज**—पु मोटार ठेवण्याचा तबेला; (सामा.) तबेला. [ इं ]

**गरो(ज)झ**—स्त्री. (गो ) पक्ष्यांची शीळ. [ पोर्तु ]

**गरोडा**—पु कापसावरील रोग –कृषि ३९०. [सं गर=रोग?]

**गरोदर**—वि. गर्भार; गर्भवती. (क्रि० होणें; येणें ) 'मग तयाचे पाठीवर । कनकाई आली गरोदर । ' [ सं. गुरु+उदर ]

**गरौणी**—स्त्री. (गो.) आमिष दाखविण्याचा प्रकार [ गरा–री=आमिष ]

**गर्क**—गरक पहा. मृत. 'ज्या ठिकाणीं भाऊसाहेब गेले आणि गर्क जहाले तें ठिकाण आपण दृष्टीनें पाहूं नये ' –पाब ४७

**गर्क, गर्ग**—वि. घोडयाचा एक रंग? –अश्वप १.२८.

**गर्का**—पु कुंकू लावण्याच्या ठिकाणीं मेणानें चिकटवून लावण्याची नक्षीदार टिकली. –जनि ( बडोदें ) शेवटची यादी २.

**गर्ग**—पु १ एक ज्योतिषशास्त्रप्रणेता ऋषि. यादवांचा ज्योतिषी.

***गर्गट*** — *गरगट पहा. 'आला पाला वाटुनि गर्गट घेतां पोट* भरे रे । ' –अमृत ११९.

**गर्गरणें**— गरगरणें पहा.

**गर्गशा**—पु भांडण; गोंधळ; गडबड, गरगशा पहा. 'या उभयतांमध्यें कसबे मसुरचे पटेलगीचा गर्गशा देणियाबद्दल लागला होता.' –रा १५.३२. 'बाहयापुढें बहुतच गगशा करूं लागले. –मराठवि २.५०३.

**गर्गाचार्याचा मुहूर्त**—पु सूर्योदयापूर्वीच्या ५व्या घटकेपासुन तिसऱ्या घटकापर्यंतचा काल किंवा (सामा.) सूर्योदयापर्यंतची वेळ. हा शुभ मुहूर्त असून गमनास योग्य मानतात उष:काल, प्रभात. 'गर्गमुहूर्तें प्रयाण रामा श्रुतिवर्गें गाइन मी । ' –आप ७२.

**गर्जणें**—गरजणें पहा. 'ते वेळीं जयजयकार शब्दीं । गर्जीनले समस्त । ' –मुआदि ४५.१४७.

**गर्जन-ना, गर्जित**—नस्त्रीन. १ मेघनाद; ढगांचा गडगडाट. 'हें ना घनगर्जितासरिसा । ' –माज्ञा १८.४८४. २ आरोळी; डुरकणी; प्रचंड आवाज (वन्य पशु किंवा तोफ यांचा). 'वाघाची गर्जना जरी झाली तरी मेघाचे गर्जनेखालीं.' [ सं. गर्ज्=शब्द करणें ] **गर्जित**–वि. गर्जना करणारा. 'गर्जितें नि शब्दें ।' –ज्ञा ११.१२७.

**गर्ता**—स्त्री १ खळगा. गरता पहा. 'एवं तमाचिये पडिले गर्ते ।' –ज्ञा ९.१८५ २ डोळयाची खाच; डाळे चांगले असून न दिसणें; डोळयाचा एक रोग 'फुलें वडस आणी पडळें । कीड गर्ता रातांधळें ।' –दा ३.६.४०. [ स. ]

**गर्ती, गर्तिणी**—स्त्री स्त्रीभव गरती पहा. 'पतिव्रताधर्म ऐका गे साजणी । धन्य त्या गर्तिणी पुण्यशील ।' –ब ४६७ [गरती]

**गर्द**—स्त्री गरद, गडद धूळ; धुराळा, छाया; काळोखी, 'मनांत संशयाची गर्द आली असेल ती काढून टाकिली म्हणजे साफ कांहींच खत्रा रहात नाहीं ' –रा ५.१६६ –वि. १ दाट (छाया). २ धुळीभूत, गडद; निबीड (झाडी). ३ नष्ट. 'टिपूचें संस्थान गर्द जालें ह सरकारचे दौलतीस चांगलें नाहीं.' –ख ११.६०५६. [फा. गर्द् ] ०**होणें**–नष्ट होणें. **गर्दबाज, गर्दावाज**–वि. १ घोर; निबीड; दाट,घन, विरळ ( झाडी ). 'त्या रानाला मारे कीं गर्दबाज झाडी लागून गेली आहे.' २ भरदार; पानाफुलांनीं भरगच्च ( झुडप, वनस्पति ). ३ गहिरा; गाढ; काळाकुट्ट ( पाऊस, अंधारी, छाया ). **गर्दबाजी, गर्दाबाजी**–स्त्री निबीडपणा; गर्दी; दाटी ( गर्दबाज पहा ) **गर्दीस मिळविणें**–धुळीस मिळविणें, नायनाट करणें. 'उपेक्षा केलियानें अन्यायाची बुद्धि होणार असे होते त्यास मारून गर्दीस मिळविले.' –मराआ ५.

***गर्दन*** —*स्त्री. मान, गरदन पहा. 'माझी गर्दन कापली तरी* रसा मिळावयाचा नाहीं.' [ फा गर्दन् ] ०**बाजी**–स्त्री. तळहातावर शीर घेऊन, जिवावर उदार होऊन लढणें.

**गर्दपोस**—पु. धुराळा बसूं नये म्हणून (बिछाना इ० वरील) घालावयाचा अभ्रा, चादर, रुमाल. 'गर्दपोस काढून करू या नीट तक्ये पलंगावरले । ' –होला ९५. [ फा. गिर्दपोश ]

**गर्दभ**—पु घोडयाच्या पायाचा एक रोग –अश्वप २.३८.

**गर्दभ-व**—पु गाढव पशु, खर. 'जरी गर्दभ वर्गी धांव । तरी कां अश्वमोल पावे । ' [ सं ]

**गर्दा**—गर्द पहा. ०**वाज**–वि गर्दबाज पहा.

**गर्दा**—पु आगीची पूड [ फा. ]

**गर्दास**—वि. घोडयाचा एक रंग. दाढीपासून नाकापर्यंत असलेला पांढरी लकर. –अश्वप १.२७

**गर्दी-र्द्दी**—स्त्री १ फार दाटी, भरगच्ची (धूळ, चूर्ण, धुगधी धुकणी, धूर इ०ची) २ (ल) दाटी, चेपाचेपी, चेंगरा चेंगरी 'हरदास नामी होता म्हणून आज श्रोत्यांची भारी देव ळांत गर्दी झाली' ३ अतिशय विपुलता, रेलचेल (पाऊस, पीक, हंगामातील उत्पन्न, जेवणांतील पदार्थ यांची) ४ मोठा गोंगाट आरडाओरड [फा गर्द]

**गर्दी-र्द्दी**—स्त्री १ उत्पात, नासधूस (लुटारूनीं केलेली) २ दाणादाण, धूळदाण (सैन्याची) भाऊगर्दी=भयंकर पराभव व नाश (पानिपत येथील भयंकर युद्धावरून) ३ (सामा) अंदाधुंदी, अव्यवस्था, सैन्याचा हल्ला 'गर्दी झाली त्यावरती।' –ऐपो ३५८ ४ अकस्मात हुद्दा नाहींसा होणें, बडतर्फ होणें, अस्त जाणें (मुत्सद्दी, सरदार, अधिकारी यांची) [फा गर्दी=नाश, कमनशीब] ०करणें-(कायदा) गैरकायदा मंडळीनें किंवा त्यांपैकीं कांहीं जणांनीं बळजोरी किंवा जुलूम करणें, (इं) रायटिंग

**गर्दीद**—क्रिवि (भूतकाळीं) झालें, होऊन गेलें [फा गर्दीद]

**गर्दोगर्दी, गर्दागर्दी**—क्रिवि चारी बाजूस, सभोंवार, आसमतात, आवतींभोंवतीं [फा गिर्दागिर्द]

**गर्नाळ**—पु गरनाळ पहा [पोर्तु गार्नेल]

**गर्भी-र्भी**—स्त्री (गो) दोन भिंतींच्या आंतील अंतर [स गर्भ]

**गर्भ**—पु १ पोटांतील जीव, पुरुषवीर्य व स्त्रीरज यापासून तयार झालेला व स्त्रीच्या गर्भाशयांत असणारा पिंड २ मगज, गीर, मेंदू, काळजाचा बोका, (सामा) आंतील भाग ३ (ल) तत्त्व, कस, तात्पर्य, हाशील, सारांश, ऐवज 'त्यावरून येथील गर्भ सर्व अवगत जाहलाच असेल' –पेद १ ४४ ४ व्यापलेली जागा, क्षेत्रफळ ५ मध्य, केंद्र मध्यबिंदु ६ अर्थ, भाव 'ग्रंथ-श्लोक-वाक्यगर्भ' ७ आंतील प्रदेश, बाजू 'या चौकटीचा गर्भ सांधा' ८ गर्भाशय, पोट 'न ना भरतें सिंधुगर्भी।' –ज्ञा ११ ६५० ९ आंतील खोली, बाळंतिणीची खोली १० देवळाचा गाभारा समासांत–गर्भ कवि-गायक-बृहस्पति=उपजत-कवि-गायक-वक्ता इ० [स] (वाप्र) **गर्भगाळ कोसळणें**–गर्भगळित होणें 'गर्भगाळ कोसळला' –ऐपो ५८ [गर्भ] **०संभवणें-समा वणें-राहणें**–पोटांत राहणें, गर्भार राहणें, गरोदर होणें **गर्भाचें करणें-होणें**–चैनीनें जेवणें, पोटपूजा करणें, आपल्या पिशव्या भरणें सामाशब्द– **०कर-कर्ता-कारक-जनक**–वि गर्भ धारणेस कारणीभूत होणारा, गर्भस्थापना करणारा **०कोश**–पु गर्भाशय, पोटांतील गर्भ राहण्याचें ठिकाण [स] **०ग(गि)ळीत-गीळ**–वि १ जिनें गर्भ टाकला आहे किंवा जिचा गर्भ गळाला आहे अशी २ ज्याची पाचावर धारण बसली आहे असा, घाबरा, भ्यालेला (बहुधा लाक्षणिक अर्थीं प्रयोग) [गर्भ+गळणें] **०गलित होणें**-(भीतीनें गरोदर स्त्रियांचा गर्भ गळतो त्यावरून) फार घाबरणें 'वाघ दृष्टीस पडतांच तो गर्भगलित झाला **०गुल्म**–न गर्भाच्या वाढीच्या आनुषंगिक मांसमयीची वृद्धि. [स] **०गृह**–न गाभारा, माजघर [स] **०गोळ**–पु गर्भांतील मूल 'जैसा गर्भगोळु उपमाते। कोणाही नेणे।' –ज्ञा ९ ३३५. **०ग्रहण**–न गर्भधारण, गाभ धरणें [स] **०घाती-पाती**–वि ज्यानें गर्भाचा (बेताचा) घात होतो तें, गर्भाचा घात करणारा [स] **०चलन**–न. गर्भाशयांतील गर्भाची हालचाल, चळवळ किंवा त्यांत प्राणशक्ति येणें [स] **०च्युत**-वि गाभ पडलेली, गुपावलेली **०च्युति**–स्त्री गाभ पडणें, धुपावणें **०छाट**–पु, १ गर्भाशयांत गर्भाचा नाश त्यावरून २ (ल) समूळ नाश, संहार, गर्भाशयांतील मूल छुर्दा कापणें –पुस्त्री १ निवड, वेचणी, टिपणी, नेमलेला भाग २ कुलपी गोळ्यांचा स्फोट, धडाका –वि. गोळ्या, छरे, खिळे, दगड इ०नीं भरलेला (कुलपी गोळा, तोफ) स्त्री. १ कुलपी गोळा २ गरनाळी तोफ [स गर्भ+हिं छाटना=कापणें, तोडणें] **०छाट गोळा**–पु स्फोटक द्रव्यें भरलेला गोळा, कुलपी गोळा **०छाट तोफ**–स्त्री कुलपी गोळे भरलेली तोफ, तसले गोळे भरावयाची तोफ, गरनाळी तोफ **०छाया**–स्त्री गर्भ धारणा झाल्याची सूचक खूण, चिन्ह, दर्शन (मुखावरील टवटवी इ०) 'तत्काळ आली तिस गर्भछाया।' –सादह २ २७ 'आंगीं नसतां गर्भछाया। वध्या डोहळे सांगतसे वाया।' [स] **०दास-दासी**–पुस्त्री जन्मापासून एखाद्याची बटीक, दासी, कुणबीण, तिचें मूल, लेकवळा (मुलगा, मुलगी), दासदासीचा पुत्र किंवा कन्या, दासीपुत्र-पुत्री [स] **०द्वार**–न गर्भाशयाचें मुख, तोंड **०धनी**–वि (चंद्रपुरी) गर्भार 'हरणी एकटी धनीं। असे रे गर्भधनि। पारधी आला।' –मासिक मनोरंजन, जुलै १९२२ [गर्भ+धनी] **०धारण**–न गर्भ राहणें, गाभण होणें, गरोदर होणें [स] **०नाडी**–स्त्री नाळ, वार [स] **०पंडित**–पु १ गर्भांत असतांच विद्वान झालेला पुरुष २ (ल) अतिशय मूर्ख, अक्षरशत्रु मनुष्य [स] **०पतन, पात**–न गर्भच्युति, धुपाव, पूर्ण महिने न भरतां गर्भ बाहेर येणें, बाळंत होणें विणें हा होऊं नये म्हणून लाजाळु धायटीचीं फुलें, कमळाचीं फुलें, मध, लोध्र यांचा काढा कमळाचा कल्क घालून घ्यावा –योर २ ६२५ **०पोषण**–न गर्भाशयांत गर्भाचें संगोपन [स] **०पत्र**–न आंतून निघणारें कोंवळें पान 'तियें अंगवसा गर्भपत्रें।' –ज्ञा १५.९९ **०पुट**–न गाभ्याचा पडदा, ज्यांतून सुयरा बाहेर येतो तो भाग 'कर्पूरकेळीचीं गर्भपुटें।' –ज्ञा ११ २५०. [स] **०भाव**–पु तात्पर्य, गोपवारा 'त्या कथेचा गर्भभावो। सांगा मज।' –कथा १ २ २८. **०यातना**–स्त्री गर्भांत असतांना त्या प्राण्यानें भोगलेले क्लेश [स गर्भ+यातना] **०रेशमी**–वि (कांठाशिवाय

अगांत रेशमाचे धागे असलेलें ( वस्त्र ) याच्या उलट गर्भसुती ०वती–स्त्री गर्भार, गर्भारशी स्त्री [ स ] ०वायु–पु. गर्भाचा किंवा गुल्माचा वात [ स ] ०वास–पु. १ गर्भाशयांत राहणें 'नवमास गर्भवासीं। कष्टविलें त्या मातेशीं।' २ जन्माचा फेरा मुक्ति नसणें 'तुका म्हणे गर्भवासीं। सुख घालावें आम्हांसीं।' –तुगा ११६३ [ सं ] ०वासी–निवासी–वि गर्भाशयांत राहणारा, पोटांत असणारा [ स ] ०विकासशास्त्र–न गर्भाची वाढ कसकशी होते इ० शिकविणारें शास्त्र ०वेदना–स्त्री स्त्री बाळंत होतांना तिला होणारे कष्ट, प्रसुतियातना [ स ] ०वेष्टन–न गर्भास ल्पेटणारी अतरत्वचा, खोळ, वार [ स ] ०वोवरा–पु गर्भ, गर्भात असलेला जीव 'देवकीचा गर्भवोवर'। माझा अवताररूप होय।' –ह ३ २५ [ गर्भ+वोवर=घर ] ०शंकु–पु मृतगर्भ बाहेर काढण्याचें शस्त्र [ स ] ०शय्या–स्त्री गर्भाचें विश्रांतिस्थान, गर्भाशय [ स ] ०शूर–वि जन्मा पासुन धीट, स्वाभाविक धैर्याचा [ स ] ०श्राव, स्राव–पु गर्भपात, धुपणें [ स ] ०श्रावी–वि गर्भपात करणारें गर्भ घाती [ सं ] ०श्रीमंत, श्रीमान्–वि जन्मापासुन श्रीमत बाडवडिलांपासून ज्याच्या घरीं संपत्ति आहे असा पिढीजात श्रीमान [ स गर्भ+श्रीमान ] ०सभव–पु गर्भधारण [ स ] ०सुखी–वि गर्भश्रीमत, जन्मापासुन कशाचीहि ददात नसलेला 'शिष्य नसावा गर्भसुखी।' –दा ५ ३ ३३ ०सुती–वि ताणा (उभें सूत ) सुताचा व बाणा (आडवें सूत) रेशमाचा असें (वस्त्र) [ गर्भ+सुत ] ०सूत्र–न १ मध्यरेषा, मध्यापासुनची रेषा २ (ज्यो ) भूमध्यापासून ओढलेली रेघ ३ केंद्रातून जाणारी कोणतीहि रेघ [ स ] ०स्थ–वि १ गर्भाशयात असलेला २ मध्यवर्ती आंतील, आत किंवा मध्यात वसलेला ३ (काव्य) गर्भार 'तिघी राण्या जाहल्या गर्भस्था।' –रावि ४ २७ [ स ] ०स्थान–न गर्भाशय [ स ] ०ज्ञानी–वि गर्भपडित, जन्मत ज्ञानी विद्वान असलेला गर्भी–क्रिवि पोटात असतांना, जन्मापासुन जन्मास येण्यापूर्वी समासात– गर्भी अधळा–रोगी–ज्ञानी–शहाणा–श्रीमत गर्भी–रोग–राज्य–वैराग्य–पुन जन्मा पासून रोग इ० ०रोजमुरा–जन्मास येणाऱ्या मुलाची पोटगी इ०

**गर्भा**—पु (गु ) १ रासक्रीडेसबधीं हिंदी किंवा गुजराथी गाणें, नवरात्रात देवीपुढे गर्भे गातात २ गर्भारशी किंवा गर्भार होऊ इच्छिणाऱ्या स्त्रियाची एक क्रीडा यात देवीची पुजा कर तात व वर्तुलाकार फेर धरून गाणीं म्हणतात हा सस्कार आश्विन शु दशमीपासून पौर्णिमेपर्यंत करतात वरील वेळच्या गाण्यांनाहि गर्भा म्हणतात आश्विनी नवरात्र किंवा सर्व शुक्लपक्षा मध्येंहि हा विधि होतो [ स गर्भ ]

**गर्भागार**—पु देवळाचा गाभारा [ स गर्भ+अगार ]

**गर्भांध**—वि जन्मापासून आंधळा [ स ]

**गर्भाधान**—न १ गर्भधारण, गर्भ राहणें २ त्रैवर्णिकांच्या सोळा सस्कारांपैकीं एक सस्कार गर्भस्थानाची शुद्धि होऊन गर्भ धारणा सुलभ व्हावी म्हणून प्रथमरजोदर्शनानतर जो सस्कार करतात तो, हा सस्कारविधि रजोदर्शनापासून १६ दिवसाचे आंत करितात [ स ]

**गर्भार, गर्भारशी**—स्त्री गरोदर स्त्री, गर्भवती [ गर्भ+ वार ? ]

**गर्भारा**—पु गाभारा ( देवळाचा ) [ स गर्भागार ]

**गर्भार्थ**—पु फलितार्थ, ध्वनितार्थ [ स ]

**गर्भावली**—स्त्री मूळ गर्भात असतानांच त्याच्या सबधानें केलेल्या योजनांची मालिका [ स ]

**गर्भाशय**—पु १ गर्भशय्या, गर्भस्थान, कूस २ गर्भाची खोळ, वार, गर्भवेष्टन [ स गर्भ+आशय ]

**गर्भासन**—न योगशास्त्रातील ८४ आसनांपैकीं एक आसन

**गर्भिण**—स्त्री ( कु ) समांतर रेषा काढण्याचें सुताराचें एक हत्यार गरवीण पहा

**गर्भिणी**—स्त्री १ गर्भार स्त्री २ फळ देण्याच्या बेतात आलेली वनस्पती 'एके गर्भिणी उकडविली। पुढामार्जी।' –ज्ञा १३ २२७

**गर्भित**—वि ध्वनित, फलित, आकलित, बोधित, समाविष्ट [ स ]

**गर्मी**—स्त्री १ व्यापलेली जागा, क्षेत्रफळ, गर्भ अर्थ ४ पहा २ घेरा, वेढा (इमारत लाकुड याचा) ३ मध्य, केंद्र ४ मधला भाग, अश ५ ( कु ) सुपारीच्या कोंवळ्या घोसावरील, लोंगरा वरील कोश, आवरण [ स गर्भ ]

**गर्मा–र्मी गर्मिणा**—पुस्त्री १ गरमा–मी, उकाडा, तलखी गरमा पहा 'दोनी मडप बुलदीस कमी, याजमुळें गर्मिणा भारी,' –ख १० ५४४५ २ उपदश रोग या रोगाचा कौशिक सुत्रांत ग्राम्य असा उल्लेख आहे ग्राम्य=मैथुन, ग्राम्यव्याधि= मैथुनसयोगापासुन होणारी व्याधि –भाअ १८३२ [ फा गर्मा, हिं गरम ]

**गर्मी**—स्त्री १ त्राण, गुर्मी 'इकडील मोंगलांची गर्मी राहिलीच नाहीं –रा १ २६२ २ जरब 'गर्मी दाखवून जें मिळेल त मेळवावें ' –पया ३२७ [ फा ]

**गर्मजणें**—अक्रि ( व ) ऊन किंवा कोंबट होणें 'मी गर्मजल पाणी पितों ' [ हिं गरम+होणें ]

**गर्व**—पु अभिमान, ताठा तोरा, डौल, दिमाख, अहकार, मान ( क्रि० वहाणें, होणें, फुगण ) 'इंग्लिश लोक आपल्या

उत्कट भाषेचा साऱ्या भूमंडळावर प्रसार होत चालला आहे याच। अतिशय गर्व वाहतात ' –नि ५ [स ] म्ह० गर्वाचें घर खालीं=खोट्या अभिमानाचा परिणाम वाईट होतो सामासिक शब्द– ०मोचन–न अभिमानापासून सुटका, अहंकारपरिहार ०हत–वि अभिमानापासून सुटलेला मानभंग झालेला, तोरा गेलेला 'गर्वहत नळ होऊन । खालपाय अधोवदन। गर्वित गर्विष्ठ गर्वी–वि अभिमानी, दिमाखखोर मगरूर गर्वोक्ति–स्त्री अभिमानाचें, आढ्यतेचें भाषण, (सामा ) गर्व शब्द 'गर्वोक्त फाल्गुन वदे जगदेकराया । ' –वामन भीष्मयुद्ध ७

गर्वस–वि मागाहून पिकणारें (धान्य) गरवा, गरवस पहा

गर्वेल–न ( को ) गरवस गर्वे भात –वदलापूर २८३

गर्हण गर्हणीय–वि (प्र ) गर्हणीय निंद्य,तिरस्करणीय टपका ठेवण्यास योग्य दूषणीय, त्याज्य, अयोग्य ' जैसें उदकरूपी लवण । तृषिता सेविता हाय गर्हण । ' –कथा ६ १२ ५ [स गर्ह=निंदा करणें ]

गर्हगार गर्ह्वार गर्ह्वारदारी–स्त्री गर्हदर स्त्री गर्भार स्त्री पहा गर्हवारें हा विधि । पाट वादविल चिंधीं ।'–तुगा ६३५

गर्हा गर्हा–स्त्री १ (प्र ) गर्हा निंदा, दोष, टपका, तक्रार 'देवब्राह्मणी करूं नको गर्हा । '–मो २ निंदा करण, टपका ठेवण [स गर्हा]

ग(गा)र्हाणें–न १ कागाळी, तक्रार गिला ( क्रि० सांगणें, करणें ) तरी तो मजची दे गर्हाणें । ' –उपा १०६५ २ प्रार्थना, विनवणी, विनंति (देवाजवळ) ( क्रि० घालणें, करणें ) [स गर्हण]

गर्हि(र्हि)त–वि दोष दिलेला निंदा केलेला, कुटाळी किंवा कागाळी केलेला निंदित [स ]

गर्ह्य–वि निंद्य गर्हण गर्हणीय पहा [स ]

गल–स्त्री विटी–दांडू गोट्या इ० खेळण्यासाठीं जमिनीत केलेला खळगा [का अगळु ]

गल–१ गाल २ (गा गलें) कल्ले [स गल] सामासिक शब्द– ०गचा–च्ची स्त्री ( मावळी ) गाल व मान 'त्याची गल गची एक झाली ' ०कल्ला–गुच्छ–पु गालावरचा मिशांचा झुबका,कल्ला ०मिशा मिशी–मुची मुच्छा–मूच्छ बुच्छ–शाप–स्त्रीअव कल्लेमिशा गलगुच्छ पहा ०मुच्छा–वि ज्याच्या मिशांचीं जाड अग्रें गालावर वळविलेलीं आहेत असा

गल–पु गळा, मान [स गल] ०कंबल पु बैलाच्या मानेखालची पोळी [स ] ०गंड–पु गंडमाळा रोग ०ग्रह–पु १ गचांडी, गळचेपी ( क्रि० करणें ) २ प्रतिपदा चतुर्थी षष्ठी सप्तमी, अष्टमी नवमी चतुर्दशी, त्रयोदशी, पौर्णिमा व अमावास्या या तिथी (या तिथींस मुंज करीत नाहींत) ३ अन ध्यायाचा दिवस ४ ज्याच्या अपराधाचा भार त्याच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्यावर पडलेला असतो तो, खायला काळ व भुईला भार असा मनुष्य –दाद. ०घांटी–स्त्री गळघांटी पहा गलची–स्त्री गळा, मानगुटी ०च्छ(स्थ) कंठच्छ स्थ–स्थ)–वि जीवघ कठिण, अतिशय दाट, गहन ( मंत्री ) ' आज गलस्थ प्रश्न ' –पेद ६ ? [स] ०शुंडिका–स्त्री १ अग्रभाग गळा, मनाची नळी गळघांटी (निघंटु) २ पडजीभ, लोळा, घशांतील शुंडाकृति गाठ [स ]

गलका–गा–पु गलबला, गोंगाट कल्ला, गडबड, गव गवा [स कल–कलका, तुल० का गलगु=मोठ्यानें बडबड ]

गलगती, गलंती, गलंतकी–स्त्री कांवळा, घोंगडी किंवा इतर वस्त्र यास घोंगर टाके घालून व मुरडून कामचलाऊ बनविलेली पैली, पातें पडशी [स गलंतिका ]

गलगल–स्त्री कलकल, बडबड गलका पहा [स कलकल]

गलगल–पु १ कांहीं वनस्पतींचा चिकट पदार्थ, मोकर इ० फळाचा चीक २ दवगाळाची चरबी, समुद्रांतील जार [स. गल= गळणें]

गलग्रह–पु घटसर्प, घाटसर्प [स ]

गलजोड–पु (वास्तुशास्त्र) एकावर एक असलेला सांधा, (इं ) ओव्हरलॅपिंग जॉइंट

गलगलणें–अक्रि जलमय किंवा दलदलीत होणें, पाणथ ळीचें होणें [स गल्]

गलगलणें–अक्रि गोंगाट करणें, बडबड करणें, घोंगावणें, गुणगुणणें, [स कल्–कलकल, का गलगु ]

गलगला–पु (ना ) घोसाळें, गिलकें

गलगलाट–पु कलकलाट मोठी गलबल, मोठा गलबला, आरडाओरड मोठ्यानें घोंगावणें [गलगल ]

गलगली–स्त्री १ दलदल, रेवण २ थलथलीतपणा, रबर बीतपणा [स गल् द्वि ]

गलगलीत–वि १ थलथलीत, बिलबिलीत (फार पिकलेलें फळ भात गर ), २ मृदु व चेपें (चीक, गाळ, जार) ३(गो ) चिकचिकीत ( घाम )

गलड–न गळ, केसतूह, आवाळू गठ वेंड ' घाम खिळ गलडें असें । ' –दा ३ ६ ५० [स गलगंड ]

गलडणें–उक्रि (व ) कलडणें, लवडणें

गलत–वि १ अव्यवस्थित, घोंटाळ्याचें,गोंधळी (कृत्य, वस्तु ) २ अव्यवस्थित, गफलत्या, वेंधळ्या ( माणूस ) ३ खोट, 'पदारी यांची आवई उठली होती परंतु तें गलत वर्तमान ' –रा १० ३६९ ४ रद्द ' सरदेशमुखीचा परवाना पहिलें जाला होता तो गलत करून ' –इम १७४ ५ बेपत्ता, हरवलेली

'दो मोती गल्त ' पेशव्याची बखर —क्रिवि १ वाट चुकून, आड वाटेनें, आडरानीं, गड्बड किंवा गडबडलेल्या स्थितींत २ बाहेर किंवा आड बाजूस फेंकलेला, जास्त किंवा निरुपयोग। म्हणून टाकलेला [स गलित हिं गल्त]

**गलत, गलतन–तान**—स्त्री १ अस्ताव्यस्त व गफलतीची भेसळ ( पुस्तकें, कागद याची ) 'हीं असलीं गल्तपानें कोण घेतो, चांगलीं असतील तर काढ ' २ नाश, वाटोळें, घातपात (कामकाज उद्योगधंदा याची) ३ चिवडाचिवड, अव्यवस्था, बिघडलेली स्थिति, चूक ४ ( पत्ते गंजिफाचा खेळ ) घोळ गल्त, पिसणी (क्रि० करणें) [अर घल्त्, घल् तान्]

**गलतपत्र**—गलितपत्र पहा

**गलतान**—वि १ ( व ) आजारी, 'त्याची आई गल्तान आहे ' २ नालायक, निरर्थक, अयोग्य, अशक्त, मूर्ख गबाळ (मनुष्य) ३ लब्यापेब्या, फुसका, कुचकामाची (वस्तु) ४ बेसूर, कर्कश, कर्णकठोर ( गाणारा, गाणें, आवाज इ० ) [अर घल्तान, तुल० स गलस्तन ?]

**गलता**—स्त्री चूक, दोष अपराध 'नोकराच्या हातून गलती होण्याचा फार संभव ' –वज्राघात ११९ [अर घल्ती, सं गल्=गळणें, हिं गलती]

**गलत्कुष्ट**—न ज्यांत रोग्याचे अवयव हळू हळू क्षीण होऊन गळून पडतात असा महारोग, रक्तपिती [स]

**गलत्या**—वि गाफील, गबाळ्या, विसराळू, नेहमी हर विणारा, गलतान [गलत]

**गलथा**—पु गठ्ठा, गड्डी 'त्याच्या कारकुनानीं याचे दोन गलथे घेतले आहेत ते देत नाहींत –पेद ८२५

**गलथा**—पु १ ( वास्तुशास्त्र ) गुळगुळीत किंवा वक्र कड, कोर ( पायऱ्या, कंगोरा, पुढें आलेला दर्शनी भाग खुर्ची-टेबल इ० चा ), अशा रीतीनें घडलेला व पुढें आलेला भाग, कंगोरा साधलेला तुकडा, दर्शनी भाग, अशा प्रकारचा घोळ केलेला, उलटलेला, मुरडलेला भाग (भिंत इ० चा), शेवटास दिलेला गोल निमुळता आकार (इं कॉर्निस) २ (ल ) उत्तम ठेवणीची आणि वर्तुळाकार केलेली फरसबंदी रस्ता [गोल+स्था ?] **गलथेदार**–वि गलथ्याची आकृति दिलेला गलथा केलेला (चौरंग पाट इ०)

**गलथा**—पु ( तंजा ) गचांडी, अर्धचंद्र ( क्रि० देणें ) [स गलहस्त, प्रा दे गल्हत्थल=गचांडी]

**गलद(घ)ट**—वि गळद(घ)ट पहा

**गलदुम**—स्त्री वर पाय करून हातावर चालणें (क्रि० करणें टाकणें, चालणें) [गल+दुम]

**गलन**—न १ विरघळणी, आटणी २ गळती, द्रव, पाझर, स्राव [स] **गलनीय**–वि आटण्याजोगें, प्रवाही करण्यास किंवा द्रवण्यास योग्य, द्राव्य

**गलपोजी**—पु ( वे ) खडवळ नाटकातील सूत्रधार.

**गलफ**—न अभ्रा, आच्छादन गलेफ पहा

**गलफ(फा)टणें**—अक्रि १ गाविल्हे लागणें, हरवणें, थांग न लागणें, सांडणें (वस्तु) 'कालपासून लेखणी कोठें गलफटली आहे ती शोधिताना दमलों ' २ रस्ता चुकणें, गमावणें, आडरानात जाणें, बहकणें ३ सुचेनासें होणें, गोंधळणें ( सकटादि कारणामुळें) (क्वचित सकर्मकहि उपयोग करतात) [गफलत]

**गलफ(फा)टा–डा**—पु घोटाळा, घादल, घोळ, तारंबळ, घालमेल, घोळकार, बहकण्याची, हरवण्याची, गडबड होण्याची परिस्थिति ( मनुष्य, प्राणी, वस्तु याची ) 'याचा अर्थ होत नाहीं म्हणून मी मोठ्या गलफट्यात पडलों ' [गफलत]

**गलबत**—न जलमार्गानें प्रवास करावयाचें साधन, नौका; तारू, जहाज, डोलकाठी असलेलें कोणतेंहि जहाज, यास लाकूड साग, बटेक, फणस आंबा धूप याचें चालत गलबत सुमारें ४०–५० वर्षें टिकतें याची वहनशक्ति खंडीवर मोजतात, एक खंडी=एकचतुर्थांश टन (क्रि० हाकारणें) [पोर्तु, गल्हलत, इ गॅली=डोलकाठी व शिडें असलेलें किंवा नसलेलें वल्ह्यानीं चालविलेलें पसरट गलबत+बोट-गलिबत]

**गलबल–ला**—स्त्रीपु १ गल्का, गडबड, आरडाओरड. 'स्नानदान देवपूजा गलबलित अगदींच अतरली।'–ऐपो ३०८. २ घाबरेपणा ( भयादिकामुळें ) ३ गफलत, गोंधळ, घालमेल ( काम, हिशेब याची ) 'याचे कागदपत्र सगीत नाहींत आत गलबल पुष्कळ दिसते ४ हुल्लड, दंगल 'फौज रवाना होत आहे तव्हा राज्यात कांहीं गलबल दिसते ' [ध्व]

**गलबलणें**—अक्रि १ घाबरणें भिणें, धाका घेणें 'दरवडा आला असं समजताच माणसें गलबलली २ तारंबळींत, गोंधळांत, दगलींत असणें ३ हरवणें, गमावणें चुकणें, बहकणें, आडरानांत जाणें ४ गडबडणें घोटाळणें घादलणें ५ जीव घोटाळणें, घाबरणें बेचैन होणें माझा जीव गलबलतो आहे ' 'तो काल अगदीं गलबलला होता '

**गलबलाट**—पु (गलबलाचा अतिशय) १ मोठी गलबल, आरडाओरड २ घोटाळा

**गलबलित**—वि विस्कळित अव्यवस्थित 'तिचा (कवितावधूचा) ओंचा पदर फार टेकटेकीचा नसतो किंबहुना गलबलीत असतो ' –आ प्रस्तावना ८

**गलबल्या**—वि १ बोभाट्या, गडबड माजविणारा २ गोंधळ्या, अव्यवस्थित, अमिश्र, गफलती

**गल्या**—पु १ गल्का, गोंगाट, आरडा, गवगवा, कलकलाट. २ हल्ला 'गलबला उठेल '–ख ८४३५९. ३ जोर

घामधूम 'शिवाचा गलबा भारी' -दिमा [अर घल्बा ?] -स्त्री 'गडबड 'तयारीची गल्बा दाखविली म्हणजे यणेकडून श्रीमंत संतोष मानितील' -रा २ १०८१

गलंभ—पु स्त्रियाचे स्तन (गलड ?) 'कोरिलिया पुतळियांचे गलंभ।' -रयोवा १० ८८३

गॅल(ले)री—स्त्री सज्जा, वरील मजल्या (माडी) चा भींतींच्या बाहेर आलेला पुढील स्वतंत्र भाग [इ]

गलांकुर—पु. पडजीभ मोठी होणें (इ) टॉन्सील [स]

गलांड, गलांडा—नपु गलड पहा 'तेथ गलांडें राहावें। -जै ४५ १०१ ०वात-पु गड उद्भवण्यास कारण होणारा वात

गलाफ गॉल्फ, गॉलाफ—पु (गो) हडी (डुकर) [पोर्तु ?]

गलास—पु १ काचेचा पेला २ (ल) आत वात ठेवून पेट दिलेले कांचेचे पेले 'चवतर्फा लाविले गलासे जिकडे तिकडे उजाले।' -पला ४ २७ ३ फुलपात्र, पेला 'सोन्याचा गलास ठेवून . ' -ऐरापुप्र २ १४५ [इ ग्लास]

गलाव—न (हेट) ल्हान गलबत

गलिच-च्छ, गलीच-च्छ—वि घाणेरडा, मलिन, अमंगळ [अर घलीझ]

गलिचा—पु गालिचा पहा

गलित—वि १ पडलेला, सांडलेला, फेंकलेला, गळलेला 'भक्षोनिया शुष्क गलीत पाला।' -नरहरि गंगारत्नमाला ५६ (नवनीत पृ ४२२) २ वितळलेलें, पाघळविलेलें, पातळ (रस) केलेलें ३ (ल) खगळेला, सुकलेला, क्षयी, ऱ्हास किंवा खराब झालेला निःशक्त 'गलित झाली काया। तेंवि ललित पडरि राया।' [स गल=गळणें] सामासशब्द- ०काय-देह-शरीर-अंग-वि रोडका, लुकडा क्षीण, सकट्या ०काया-स्त्री अशक्त झालेलें शरीर ०कुष्ठ-नपु वाहणारें कोड, रक्तपिती शर मशु महाऋषि। परि गलितकुष्ठ भरला त्यासि। [स] ०चक्षु-पु अश्रु (आसवें) पाझरणारा, वाहणारा डोळा [स] ०दंत-चक्षु-नास-केश-नख-वि दात पडलेला, डोळे गेलेला इ० [स] ०नास-न बैठें नाक [स] ०पत्र-न १ झाडाचें गळलेलें पान २ (ल) फार वार्धक्यानें किंवा रोगानें निःशक्त झालेला माणूस शिथिलावयवी पदार्थ ३ (ल) पदभ्रष्ट अधिकारच्युत, सत्ता हीन माणूस [स] ०पात्र-न गलितपत्र अर्थ ३ पहा ०यौवन-वि उतारवयाचा, म्हातारा [स] -तेंद्रिय-वि इंद्रियें किंवा ज्ञानेंद्रिय नष्ट झालेला [स]

गलि(ली)म, गलिमाई—गनीम, गनिमाई पहा 'मुलुख सरंजामास देऊन केली कायम गलिमाई।' -ऐपो ४२१

गली—स्त्री १ गल्ली पहा २ गल पहा ३ खळी, खाच 'आज एकादशवर्षपर्यंत। गरत गलीत पचला योगीनाथ।' -नव १७ ७४

गलु(लो)त—न पाटीवर झालरीवजा कापड सोडलेलें वर्दाचें (ल्हान मुलाचें) टोपरें. एक प्रकारची कुंची

गलू(लो)ल—स्त्री खडे मारावयाची कमान, गोफण 'विना यकपताचा गलोल।' -ऐपो २२२ 'कवळ कुणी मदनाचे गलोले प्राणपक्षि विंधिती। -प्रला २३६ -पु. आगीच्या ज्वाळांचा समूह -स्त्रीन लोंबता अवयव, अंग (बकरीच्या गळ्स्तनासारखा) [फा पद्ल, हिं गुलेल] ०खडा-पु गलू लीन मारावयाचा खडा

गले(ल्ले)पट्टी-पट्टी—स्त्री एक कर, सरकारी पागाकरिता मुमार घान्यावर बसविलेली पट्टी, धान्यमहसुलावरील कर -मसाप २ १४८ 'गलेपट्टी दर खंडीस रुपये ४ प्रमाणें' -मसाप २ १७८

गलेफ—पु १ गवसणी, पिशवी, अभ्रा, खोळ (रजई, उशी, सुर्वी कोच, पुस्तक इ०ची) 'वर गलेफ हिरवा जरतार।' -होला १५० २ पिराच्या कबरेवर घालण्याचें, झालर लावलेलें वस्त्र, प्रेताचें वस्त्र 'तटा सुरू झाल्यावर त्याच्यावरील गलेफ उचलून पहातात तों त्याखालीं फुलाचा ढीग!' -हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचे प्रयत्न [अर घिलाफ]

गलेलठ्ठ—वि १ अवजड, फार मोठा, स्थूल (पोळ, बैल) २ लठ्ठभारती, गावढळ, अडाणी, दांडगा, धष्टपुष्ट पण अक्षरशत्रु (माणूस) [स गल्=बळकट पण आळशी बैल ? +लठ्ठ]

गलेलोट—वि (माण) गल्याकुल्या लोटल्या (फिरल्या) न पुष्कळ अन्न मिळून लठ्ठ बनलेला गलेलठ्ठ पहा

गलोरा—पु गालास घेतलेला चिमटा, गालोरा (क्रि० घेणें, धरणें, उपटणें) [स गल=गाल]

गल्ल—स्त्री गोट्या, विटीदांडू इ० खेळांतील गल, खाच गल पहा

गल्ल—पु १ गाल 'ओले गल्ल प्राज्य प्रेमाश्रुभरें करूनिया डोले।' -मोभीष्म १० ९८ २ (गो) व्याघ्रादि क्रूर पशूच्या गळ्याभोंवतालचे केंस [स] ०चूर्ण-न गालास लावण्याची पूड 'कमांडर इन चीफच्या तुन्यानेंच मडमाच्या गल्लचूर्णानं . ख्रिस्ती धर्मास अपूर्व शोभा यऊन ' -नि ३४७ ०श्मश्रु-पु गालमुच्छ गालमिशी [स]

गल्लत—गलत पहा 'म्हणुनी फिरून मानांनीं सलटी मारूनी केली गल्लत।' -ऐपो ३५५.

गल्ला—पु १ धान्य, दाणागोटा, प्रत्येक प्रकारचें धान्य २ धान्याचा साठा (मण, खंडी या प्रमाणांत) 'आम्हीं यंदा पन्नास खंडी गल्ला खरेदी करून ठेवला आहे' ३ पीक, उत्पन्न

पुरी शेनसारा किंवा त्याचा कांहीं भाग गल्याच्या (धान्याच्या) स्वरूपात भरीत असत. [भर घल्ल =धान्य] ०खरीदी–स्त्री गांवानें विकत घेतलेल्या सर्व घ न्यावरील पट्टी, कर ०चाढविणें–विक्री (येळ झाल्यामुळे ) बंद झाल्याननरची जादा विक्री करणें

गल्ला—पु १ व्यापारी, सराफ याची पैसे ठेवण्याची पेटी किंवा लहानसा खळगा 'गल्ल्यांत पैसे टाक' २ पैसे ठेव ण्याचें भांडें 'गल्ला घासून आण' ३ रोकड रकम, साठलेले पैसे, रोजच्या विक्रीचे पैसे ४ मजुरांस वाटावयाचा पैसा [गल्ल, गल]

गल्ला—पु घोड्याच्या पायाचा (खुमावरचा) रोग –अश्वप २ २७३

गल्ली—स्त्री वाळ, आळी, लहान रस्ता 'अमगळ गल्ली कुथळ।' –नव १६ १२० [हिं गली] ०कुची–स्त्री १ आळी, बोळ, बिदी यांस व्यापक सज्ञा २ आड गल्ली 'त्याला शहरांतील गल्लीकुची माहीत नाहीं, पण मोठमोठे रस्ते सर्व ठाऊक आहेत' [हिं गली+फा कुचाह तुल० स कुलिसन] ०कुचीचा–वि. लोक विख्यात नसलेला, गांवढळ, अडाणी, असभ्य, अधम, नीच, पाजी, अप्रसिद्ध, गैर मालूमचा (मनुष्य, काम, गोष्ट, वस्तु) असल्या गल्लीकुचीच्या मनुष्यासंगतीं व्यवहार केला असता त्यात आपली फजीती होते'

गल्ली—गल, गल्ल पहा

गल्लेकरी—पु भुसारी, वाणी, मोदी [गल्ला+करी]

गॅल्व्हनोमीटर—न (शाप) रसायनजन्य (घर्षणजन्य नव्हे) चलविद्युत्च्या प्रवाहाचा जोर, किंवा तीव्रता मोजण्याचें यत्र, चलविद्युन्मापक [इ]

गल्हाटणें—१ रोग वगैरेनीं अशक्त होणें २ सावसावका रीत तोटा, युद्ध आल्यानें दारिद्र्य येणें गल्फटणें, गळहाटणें पहा

गल्हाटा—पु गळाठा, अस्ताव्यस्त समुदाय, अव्यवस्था इ० कारणानें झालेली दुर्दशा गळहाटा पहा

गव—स्त्री १ पकड, चिमटा, अडकण (पक्ष्याच्या पंजाचा, नख–बोटें याची), २ हाताची कव, वेंघ, मिठी, आलिंगन 'हा खाव माझ्या गवेंत मावत नाहीं' ३ऐन वेळ, योग्य प्रसग, काळ वेळ, संधि 'कोणताहि उद्योग करणें तो गव पाहून करावा' ४ फुरसत, अवसर, संधि, रिकामी किंवा सोईची वेळ ५ पत, अब्रू, विश्वास (व्यापारात) ६ ताकद अटोका [कव, तुल० का गवि=व्यापणें, झाकणें]

गव—स्त्री (कों) १ गुप्तपणा 'तयाहि साक्षित्वाची गव। सापडे केंवी।' –सिस १ ९४ २ मतलब

गव—स्त्री (व) महत्त्व 'काढून पेरलें जव तर ज्याची त्याला गव' ०लाचणें–क्रि फायद्याची वस्तु सापडणें, अदृश्य निधि सांपडणें

शाको १ ६

ग(गं)व—पु (गो) गहू

गवई—पु गायक, गाणारा, गवय्या [हिं]

गंवई—स्त्री गावई पहा –चे लोक–पुअव (काशी) खेड वळ, गावढळ लोक

गवख-खें—न (प्र) गवाक्ष खिडकी, छिद्र, गुहा 'जळतया गिरीच्या गवखा–। माजीं घापनी पतगाचिया झाका।'–ज्ञा ११ ४२५ [स गवाक्ष, प्रा गवक्ख, हिं गवाख]

गवगब—स्त्री आरडाओरड, गलबल, गडबड, कलकल [ध्व]

गवगवणें—क्रि (गो) क्षुधेनें व्याकुळ होणें

गवगवा—पु १ गवगब पहा गडबड 'असो ऐकोनि गवगवा। द्वारीं आली शामवा।' –कथा २ १० ९३ २ (ल) बोभाटा, परिस्फोट, डांकाटी, डंका, प्रसिद्धि (क्रि० होणें) 'या गोष्टीचा गवगवा करूनका, सरकारात समजलें तर दड पडेल'

गवग्वशी—वि भरलेला –बदलापूर ४०

गवठ्या—पु (छत्तीसगडी) पाटील, खेडेगांवांत राहणारा ०महाजन–पु (व) (ल) मठ्ठ, मूर्ख

गवंड-डी—पुनस्त्री (कों) गोवंड, डोंगरावर चरणाऱ्या गुराचा रस्ता, गुराच्या पायांनीं मळलेली वाट, नदीची दरड (रस्ता असलेली), जगल किंवा टेकडीवरील चरण्याची जागा, (व) दोन्ही बाजूला कुपणें असून मधून गेलेला गुरांचा रस्ता, पांदण [स. गोवर्तनी ?]

गंवडा—पु गव्हाचा भुसा गव्हाडा पहा [गव=गहू]

गवडी-ड्या—पु दगड, विटा, चुना, माती वगैरे साध नानीं बांधकाम करणारा, घर बांधणारा, विटा रचणारा

गवण—स्त्री (गो) गव्हाण, गोठ्यातील गुरांना चारा टाकण्याची जागा, गोठ्याचा मध्यभाग

गवणें—सक्रि प्राप्त होणें, लाभणें, सापडणें, आटोक्यात येणें ना गवे दखोनि गृध्रावो। इइ इच्छी मिनभावो।'–मुआदि ५ १०१ [स ग्रह्, म गव]

गवत—न १ तृण, शष्प, याचे पुष्कळ प्रकार आहेत– पवनी, गोंडवळ, कुसळ, मारवेल, वरखेल, सुरी, कुंदा, काशा, काळम, तिखाडी, करड, शिपी इ०. २ घास, चारा, ज्या वनस्पतींच्या मुळ्या व पानें सर्व प्रकारचीं जनावरें खातात तें [स गो+अत्त, प्रा ८ गवत्त] (वाप्र) गवत(ता)ळणें–अक्रि (कों) १ गवतानें आच्छादित होणें (नवीन केलेली पाळ, शेत, गवताची हुडी) २ गवत किंवा रानपाडानीं गुदमरणें, खुरटणें (पिकांची वाढ) म्ह०(व) गवतीची गरूढार उताणी चाले=एखाद्या जयानें किंवा क्वचितकाळीं चालेल्या धनलाभानें गर्विष्ठ बनून छाती काढून चालणाऱ्यास म्हणतात सामासिकशब्द– ०कटाई–स्त्री १

गवत कापण्यास परवानगी मिळण्याची पट्टी, कर २ सरकारी पागांकरितां गवतखरेदीचा खर्च भागविण्यासाठीं बसविलेला कर ३ गवत कापण्याची मजुरी ४ (सामा) गवतकापणी ०काडी-स्त्री सामान्यपणें गवत, चारा इ० ०कापी-वि (निंदार्थी) लोणीकापी (तलवार, वस्तरा यांची धार बोथट असल्यास त्यास म्हणतात) ०काप्या-अडाणी न्हावी, शिपाई कामकरी व त्यांचें हत्यार किंवा शस्त्र [गवत+कापणें] ०चराई-स्त्री कुरणांतील चरणावळ, चरण्याचें भाडें **गवतणी**-स्त्री (कों) पेंढ्याची एक काडी **-ताचा उंट**-पु गवत्या टोळ, नाकतोडा, याचे पंख साळ असून हा काळोख्या रात्रीं झिंग झिंग करीत हिंडतो **-तारू**-वि गवती छपराचें 'एक गवतारू खोप रहायातें।' -केक १५ **-ताळ**-वि सपाटून गवत उत्पन्न होणारी (जमीन) विपुल गवत असलेली (जागा) **-ती चहा**-पु पातीचा चहा हा हिरवा व खरखरीत असून याचें सुवासिक तेल काढतात तापांत घाम येण्यासाठीं हा देतात याची उंची १-१॥ हात पाती कढींत घालतात **-ती जमीन**-स्त्री गायरान, गवताची जागा **-तुर्ले**-न (माण) एक तृणधान्य **-त्या**-वि १ गवताविषयीं २ गवतकाप्या, अडाणी **-त्यागोमाजी**-पु (तिरस्कारार्थी-एक कल्पित विशेष नाम) अलवत्यागलवत्या माणूस कोणी तरी अप्रसिद्ध, गल्लीकुचींतील माणूस, भलतासलता, बिनओळखीचा, क्षुद्र, गफलती, गवतकाप्या मनुष्य, गवत्या

**गवंत**—न (गो) टेबलाचा खण, कप्पा [पोर्तु]

**गवद्**—स्त्री १ रानोमाळ उगवणारी एक वनस्पती, गवत २ गर्दी, दाटी

**गवनसार**—क्रिवि सोईस्कर किफायतशीर, गवसार [गवणें+सार]

**गवना**—पु (व हिं) गर्भाधान 'गवन्याचा दिवस नेमला'

**गवय**—पु गवा, रानबैलाची एक जात 'गवय गडय हस्ती, शूकर, रेडा, सरूप इ० जनावरांस अनूपवासी म्हणतात -अश्वप २७ [स गो]

**गवय्या**—पु गवई पहा [गवई] म्ह० गवयाचें पोर रडलें तरी सुरावरच रडणार=(आनुवंशिक संस्काराची थोरवी वर्णन करितांना योजतात) परिचित गोष्ट सहज घडते

**गवर, गवरणी**—स्त्री (गो व) गौरी, गौर

**गंवर-री**—गोंवरी पहा (वाप्र) गवऱ्या मसणात जाणें-मृत्युकाल जवळ आलेला असणें

**गं(ग)वरणें**—अक्रि (व तंजा) गहिवरणें, आठवण काढून रडणें 'तो शोकानें गवरतें' [गहिवर]

**गवराई**—गवर, गवरणी पहा

**गवरीचे केश**—पुअव एक लहान वेल

**गवली**—स्त्री (खा) तार ओढून काढण्याची सोनाराची पट्ट, चिमटा

**गवल्यो**—स्त्रीअव (कु) गव्हले पहा

**गं(ग)वशा**—वि १ फुकट सांपडलेला, उचललेला, यत्नें किंवा प्रयत्नावांचून मिळालेलें 'ही घोडी मी विकत घेतलेली नाहीं, गवशी आहे' २ ठेवलेला (लग्नाशिवाय राखलेला पुरुष किंवा स्त्री), जार, रखेली ३ मिळालेला, हातीं आलेला (पोरका, निराश्रित पोर) [गवसणें]

**गवस**—पु. १ (ब) शोध तपास, टाव, चौकशी (क्रि० लागणें, लावणें) २ संधि 'आला दिवस किती करूं गवस गवसेना गवस।' -प्रला २०४ [स गवेषण] ०गाढव-पु ढोणपा, मूर्ख माणूस

**गवसणी-नी**—स्त्री १ खोळ, अस्तर, वेष्टण, आच्छादन, झांकणी, आच्छादनाची पिशवी (तरवार, ढाल, तबला, सतार, पालखी इ०ची) 'जयांचें चित्त गवसणी। व्यापका मज।' -ज्ञा ९ १९३ 'तैसी कोंदडाची गवसणी।' -राधि २५ १११ २ व्याप्ति, समावेश [म गवसणें, का गवसणिग=झांकण खोळ इ०] ०करणें-(राज्यास) आपल्या आवरणाखालीं ठेवणें ०घालणें-झांकण घालणें 'घालितु आला लोहाची गवसनी।' -शिशु ६७९

**गवसणी-गवसणीची पोळी**—स्त्री (कों) उकडपुरणाची केलेली कणकेची पोळी, तांदुळाची उकड पुरणासारखी भरून केलेली कणकेची पोळी, ही आवरसाबरोबर खातात

**गवसणें**—अक्रि १ सांपडणें, उचललें जाणें आढळणें 'इच्छी आलिंगाया कर्णातें अन्य कांत गवसेना।' -मोकर्ण ७ ६ २ मनांत यण्याजोगें, धरण्याजोगें असणें, एखाद्याच्या कचाटींत सांपडणें, हातीं लागणें गवसलाच असा खग भासला। -र २१ -उक्रि १ शोधणें, धुंडाळणें २ गोळा करणें, गुंडाळणें आवरणें, एकत्र करणें (एखाद्या वस्तूचे सर्व भाग) [स गवेषण, प्रा गवसण]

**गवसणें**—उक्रि १ आच्छादन करणें, कवटाळणें 'की दुष्यारां गवसलें।' -ऋ २१ २ आश्रयाखालीं आणणें 'आतां याचेनि बळें गवसलें। हें दुर्ग जैसें पनासिलें।' -ज्ञा १ ११६ ३ व्यापणें 'कांतिचें मुख रम्य जें गवशिलें कोपाश्रु बिंदूत्करें।' वैराग्यशतक श्लो ९३ [गवसणी]

**गवसविणें**—उक्रि स्थानाबाहेर काढणें, गवसणींतून काढणें, २ (ल) सरसावून घेणें 'ऐसें बोलोनि पापमती। खड्ग गवसवूनि आपुलें हातीं।' -ह ३५ ३३ [गवसणी]

**गवसार**—क्रिवि १ (वेळेच्या दृष्टीनें) फायदेशीरपणें, सरफेवार गव पहा 'जो बाजारांत नेहमीं बसतो त्याला पदार्थ गवसार मिळतात' २ (सामा) नफ्यानें, फायदेशीर [गव+सार प्रत्यय]

**गवळ**—पु. (गो.) दुपारची घर; मांगर. [ गोंवळ ]

**गवळट**—पु. ( तिरस्कारार्थी ) गवळी.

**गवळण**—स्त्री. गवळी (पुरुष) याची स्त्री; गवळयाचा धंदा करणारी स्त्री; गवळीण. 'गवळण करिते न्हाणंधुणं । आजीं बाजाराशीं जाणं ।' [ सं. गोपालिनी; प्रा. गावालिणी ]

**गवळण**— १ कोष्टी पक्षी; हा धान्य खातो. २ कोळी किड्या सारखा एक किडा. [ का. गवुळि=पाल ]

**गवळणकालो**—पु (गो.) कलावंतिणी देवळांत श्रीकृष्ण चरित्राचें नाटक करून दाखवितात तें.

**गवळदा**—पु. (कु.) शेतांतील देवांस दाखविलेला नैवेद्य

**गवळदेव**—पु. (कु.) गुरें व गुराखी यांची संरक्षक देवता

**गवळवाडा**—पु. गांवांतील गवळी वस्तीचा भाग; गवळी आळी.

**गवळहाट**—पु. गवळयाच्या वस्तीचा भाग; गवळवाडा पहा.

**गवळा**—वि. पांढरे ठिपके अंगावर असणारा (बैल). गव्हळा पहा.

**गवळी**—पु. १ गुराखी, खिल्लारी यांची एक जात व तींतील व्यक्ति. हे गायी, म्हशी पाळून दूधदुभत्याचा धंदा करतात. 'सहसा व्रजात गाडुनि बहु ताडुनि करूनि बद्ध-भुज गवळी।' —मोविराट ३.२. २ (गो.) गांवठी; भाधाभोळा माणूस. [ सं. गोपालिन्; प्रा. गोवालि; हिं. गोवाल ]

**गवळीण**—स्त्री. गवळण पहा.

**गवळे**—पुअव. दैवज्ञ ब्राह्मणांतील मुंज झालेलीं लहान मुलें. —बदलापुर २२८.

**गवा**—पु. रानटी बैल; रानरेडा; याचें कपाळ रुंद, अवयव लांब व भरदार, डौलदार वशिंड, बांकदार व आखुड शिंगें व शरीर दणकट असतात. याच्या शिंगाच्या नक्षीदार वस्तू होतात. याच्या शिंगाचें शंकराच्या पूजेंत अभिषेकपात्र करतात. हें जनावर म्हैसूर व मध्यप्रांतात आढळतें. [ सं. गवय ]

**गवा**—पु ठसा, शिक्का किंवा छाप याला शाई लावण्याचा कापडी चेंडू, बोळा. [ फा. गो-ए=चेंडू ]

**गंवाई**—स्त्री. गांवई पहा.

**गवाण**—पु. (माण ) झरोका; सवाण; माणें.

**गवाणी**—स्त्री. (कु.) गाताडी; चाऱ्याची जागा. व्हाण पहा.

**गवांद**—स्त्री (खा.) भागी; भागीदारी. **गवांद्या**-वि. (खा.) भागीदार; वाटेदार; सोबती; मित्र. 'काल राते माझा वांद्याची अन् रुपा सोनाराची मोठी लढाई झाल्ती.'

**गवादी**—स्त्री. गव्याचें शिंग. याच्या टोंकास गायमुख बसवून त्यांतून शंकरावर अभिषेक करतात. [ गवा ]

**गवादी, गवांदी**—स्त्री. १ अन्नछत्र. 'कृष्णउद्धव संवादीं। होईल परब्रह्म गवादी।' —एभा ५.५६७. 'जयानें घातली मुक्तीची गवांदी।' —तुगा. ५४२. २ मेळवण. 'निंदास्तुतीची होय गवादी।' —भाए १८५.

**गवान**—पु. (गो.) सरळ व सुरेख केंस.

**गवाय**—स्त्री. (गो.) साक्ष. —पु साक्षीदार. 'नसती गवाय पंचवाडे.' [ फा. गवाह् ]

**गवार-री**—स्त्री. गवारीची भाजी; बांवच्या; या झाडाच्या शेंगांची भाजी करतात त्या वाळल्या म्हणजे आंतील दाणे जनावरांस घालतात. या भाजीच्या ४ जाती आहेत. गोवारी पहा. [ प्रा. गवर ]

**गंवार**—वि. गांवढळ; खेडवळ; मूर्ख. गव्हार पहा. [ प्रा. गवार=खेळवड; हिं. गंवार; तुल० फा. गवार=जिप्सी जात ]

**गवालंभन**—न. मधुपर्काच्या किंवा आतिथ्याच्या वेळचा एक विधि. प्राचीन काळीं यावेळीं गाय मारीत असत, आतां त्याऐवजीं गोरुत्सर्ग करतात. 'यज्ञदान गवालंभन।' —गुच १२.९४.

**गवांव(वि)णें**—सक्रि. गमावणें. 'तैसें नरदेह पावोनि गवाविलें।' —स्वादि ६.४.६८.

**गवासणें**—क्रि (कों.) सांपडणें; गवसणें पहा.

**गवाळा**—पु पोथ्यापत्रांचा गळाठा; गबाळ; गाबाळ पहा.

**गवाळी**—स्त्री. (व.) भिंत व वळचण यामधील मोकळी जागा.

**गवाळें**—न. १ सोवळें, उपकरणी, देव ठेवण्याचें लोंकरीचें वस्त्र किंवा पिशवी; आसन. 'माळा गवाळीं आसनें।' —दा २.७.८२. चेंबुगवाळें असाहि शब्द येतो. २ (गो.) बोचकें; सामानसुमान. ०**आटोपणें**-१ (ल.) पळ काढणें; निसटून जाणें. २ कामावरून काढला जाणें; स्थानभ्रष्ट होणें. ३ मरणें. ०**चवाळें**-न. (व्यापक रीतीनें) सामानसुमान; चीजवस्तु; बोचकें. —**ख्यांत घालणें, टाकणें**-ताब्यांत घेणें; थैलींत टाकणें; मुठींत ठेवणें.

**गवाळया**—वि. १ गवाळें नेणारा. २ ज्याचेपाशीं गवाळें आहे तो.

**गवाक्ष**—पुन. १ वारा व प्रकाश येण्यासाठीं घरास ठेवलेलें भोंक, लहान खिडकी; जंगी; धारें; झरोका; सार्णे. 'मग मोहार्णवगवाक्षें। रिघोनि ठेला।' २ बैलासारखे डोळे असणारा एक माकड. ३ (ल.) गव्याचें शिंग. 'गवाक्ष नव्हे हाड।' —तुगा ३४२. [सं.] ०**जाल**-पु. जाळीदार खिडकी; जाळी.

**गवी**—स्त्री. १ लोहाराचा चिमटा; साडस इ०; गावी पहा. २ (कैकाडी) दरोडा घालण्याची कुऱ्हाड व वेगटी (घरफोडीचें एक हत्यार), दरोडा घालण्यापूर्वी यांची पूजा करतात. –गुजा ४७.

**गवी**—स्त्री. सरकारी कामदारांनीं केलेली जमाबंदी किंवा सोडलेले हुकूम मान्य न करणाऱ्या गांवकऱ्यांची जूट.

**गवी**—स्त्री. गव; हातांची कव; पकड; खेंव; क्षेप. 'समय पाहून त्वरित धाऊन येऊनया गवी गवून स्ववस्तु घेऊन जाई हो।' –होला ३३. 'त्यांच्या गवींत एखादें भोळसर भक्ष्य सांपडण्यापूर्वीच...' –नि ३२३. [गव]

**गवी**—स्त्री. १ गुहा. 'मग चंद्रगिरीगवींत हृदयत।' –दावि १०१. २ (माण) आंतून पोकळ असलेली धान्याची गरी, उडवी. [का.]

**गवेंची**—स्त्री. खड्डा.

**गवेंडा**—पु शिताफळीसारखें एक रानटी झुडप.

**गवेषण**—नस्त्री. गवसणी; शोध; तपास; चौकशी; तलास. 'ते तुमतें न देखोन। करितील वो गवेषण।' –रास १.५४९. [सं.]

**गव्य**—वि. गाईसंबंधीं; गाईपासून झालेलें (दूध, दहीं, तूप इ०). 'पंचगव्य' –न. गोरस. [सं.]

**गव्हर**—वि. गांवढळ; अडाणी; गंवार पहा

**गव्हर**—स्त्री. १ गुहा, कंदरा, गुफा; 'जैसा सिंह उफाळला हिमगिरीच्या गव्हरापासूनी।' –आसी ६३. २ (ल) हृद्गत; अर्थ; अभिप्राय; अंतरंग 'वेदाचें गव्हर न कळे पाठकां। अधिकार लोकां नाहीं येरां।' –तुगा २५१४. [सं.]

**गव्हर–रू**—पु. गह्विर 'जो जें दुःखाचा पूरु। तो सांगिता गव्हरु। सावरेना॥' –शिशु १०३.

**गव्हरणें**—अक्रि विवरण करणें, गूढार्थ सांगणें. 'पंचमी गव्हरिलें। योगतत्त्व।' –ज्ञा १०.२५.

**गव्हरनर**—पु. १ प्रांताधिपति; इलाख्याचा अधिकारी, सरसुभेदार. २ (यंत्र) नियंत्रक; वाफेचा दाब नियमित ठेवणारें यंत्र. [इं.] ०जनरल–पु देशाचा मुख्य अधिकारी, हा सर्व गव्हरनरावर मुख्य असतो. [इं]

**गव्हला**—पु. एक सुगंधित द्रव्य, प्रियंगु, याचें झाड लहान असतें. याचा सुवासिक तेलें, उटणें, उदबत्ती वगैरेकडे उपयोग करतात. हा तुरट, शीतल व वांती, दाह, पित्त याचा नाशक आहे. [सं. गंधफला, गु. घउला]

**गव्हला**—१ योटवा; दुधांत भिजविलेल्या गव्हाच्या पिठाची किंवा सपिठाची दोन बोटांत वळून केलेली लांबट वळी (याची खीर करतात) अनेकवचनी गव्हले. २ गव्हाच्या रुचीचें एक फळ. [गहूं]

**गव्ह(व्हा)ळा, गव्हाळ्या**—वि. १ गव्हाच्या रंगाचा. २ गव्हासारखा ठिपके असलेला (साप, गुरूं) 'वय नूतन हातीं निऱ्या चालणें चपळ जशी नागीण गव्हळी।' –होला ८७. ३ गहूं पिकण्यास योग्य (शेत जमीन). ४ गदरलेलें; पक्व दशेस आलेलें; पिवळें जर्द (फळ). [सं. गोधूम; म. गहूं]

**गव्हा, गव्हाई**—स्त्री. (व) साक्ष; साक्षीदार. गवाय पहा. 'तुमची गव्हा दस्तऐवजांत टाकतों.' [फा. गवाह्]

**गव्हाची माळ**—स्त्री. (तंजा.) स्त्रियांच्या गळ्यांतील गव्हासारख्या आकाराच्या मण्यांची माळ; एक अलंकार.

**गव्हांडा**—पु. (व.) गव्हाचें कूट, कुटार. गंवडा पहा. 'बैल गव्हांडा खात नाहींत.' [गहूं]

**गव्हाण–णी**—स्त्री. १ गताडी; गुरांना चारा घालण्यासाठीं केलेली जागा; २ (व) गोठ्यांत गुरें उभीं राहण्याची जागा व भिंत यांच्या दरम्यान घातलेलें आडवें लांकूड, किंवा तुराठ्यांचें कुड; यामुळें वैरण गुरांच्या पायाखालीं येत नाहीं. [सं. गवादनी]

**गव्हान**—न. आश्रयस्थान. 'वायो वरुणाचीं गव्ह नें मोडिलीं।' –शिशु १६१. 'ह्रिवतां गव्हानें गा शिणलों येरझारी।' –तुगा ३४९.

**गव्हार–रू**—मुर्ख; गंवार पहा. 'गव्हारु निद्रासुखें। घर जळत असे तें न देखे।' –ज्ञा १३.७४१. 'चतुराला देहे हजर, गव्हारा अयोग्य पदर पसरावे।' –प्रला १६२.

**गव्हारी**—पु. ठाकूर लोकांत नवरा मुलगा लग्नमंडपांत शिरण्यापूर्वी हातांत काठी धरून उभे राहणारे दोन मुलगे. –बदलापूर १४८.

**गव्हाळ–ळी**—वि. १ गहूं पिकण्यासारखी (जमीन) गव्हळा अर्थ ३ पहा. २ गव्हळा अर्थ २ पहा 'गव्हाळे तैसेचि संखपाळ। विषधर सारखेचि व्याळ।' –गीता १.२६९.

**गव्हा**—वि. गव्हाच्या पोळीचा पाहुणचार करण्यास योग्य (पाहुणा); याच्या उलट पिव्या.

**गॅस**—पु पदार्थाची घन, द्रव या विरहित एक वायुरूप अवस्था, वायुरूपी पदार्थ. याचें एकाएकीं द्रवीभवन होत नाहीं. [इं.] –गॅसचा दिवा–पु. किटसन दिवा; तेलाच्या धुरावर जळणारा मोठ्या प्रकारचा दिवा.

**गस्त**—स्त्री. रात्रीं संरक्षणार्थ काढलेली फिरटी, रखवाली; जागल; रौंड, रोण; पहारा. 'देती गस्तीवर गस्ती।' –ऐपो १६९. २ जागल करीत फिरणें, पहारा करणें. ३ जागल करणारे शिपाई किंवा पाहारेकरी. 'फिरे काळ गस्ती।' –दावि २१६. –न. १ (कों) दोन खांब किंवा तुळवटें यांतील जागा; खण; सोपा. 'या गस्तापेक्षां त्या गस्ताची रुंदी अधिक आहे.' २ गांवांतील एका भागाची व्याप्ति; पेठ; वाडे. [फा. गश्त (वाप्र.)]

०येणें-(व.) भोंवळ, चक्कर, घेरी येणें. सामाशब्द- ०करी-पु. गस्त घालणारा शिपाई; रोणकरी. गस्तंगर-गिर्दा-स्त्री. फेरी; व्यापाऱ्याची फेरी; उत्पन्न पाहून दरदाम इ० समजून घेण्याकरितां देशावरी किंवा बाजारांत घातलेली फेरी; व्यापार पाहण्यासाठीं फिरती. [फा.] गस्तंगीर-पु गस्तंगर करणारा; फिरता व्यापारी.

**गहं**—पु. (गो.) गहूं.

**गहजप-ब**—पु. गजब पहा.

**गहजर**—गजर पहा.

**गहजरी**—स्त्री. जोराचा तडाखा; महत्संकट; जीवावरची पीडा. गजब शब्दाबद्दलहि योजतात (क्रि० गुदरणें; होणें)

**गहदम**—क्रिवि. वेळोवेळीं; एकसारखा; सतत -शर [फा. गहे=कोणतीहि वेळ+दम ?]

**गहन**—न. १ संकट. 'मा पडिलिया गहन कवण तयाचें।' -ज्ञा ८.६३. २ अरण्य. 'ग्रीष्मीं गहनामध्यें वायूनें दहन जेवि पेटविला।' -मोकर्ण १२.१५.-वि. १ विकट मार्गाचा, वाटेचा; जाण्यास, पोंचण्यास अवघड; दुर्गम (नदी, रस्ता, अरण्य, डोंगर). २ दुर्ज्ञेय; जाणण्यास अवघड; समजण्यास कठिण (शास्त्र, ग्रंथ, काव्य). 'त्यांचा अर्थ न कळे गहन। अज्ञान जनां कलियुगीं।' -भवि २.१. ३ गाढा; जाडा. '(जोतीराव) हे कवि आहेत, इतिहासज्ञ आहेत, मोठे गहन भाषापंडित आहेत.' -नि ४५८. ४ दुर्घट; दुष्कर. 'तें याग अथवा दानें। तपादिकें गहनें।' -ज्ञा १७.४०६. ५ थोर; श्रेष्ठ 'परमगहन अति सुशील, सत्य उपाय, सत्य अंतरीं। सुर्य वंशीचा राव जसा हरिश्चंद्र अयोध्यापुरीं।' -ऐपो ३१९. [सं.] ०गति-वि. गूढ; अगम्य; खोल; गुप्त मार्गाचें. 'ईश्वरी कर्तृत्व गहनगति आहे.' गूढ व्यवहार, रस्ता, मार्ग; अगाध लीला. म्ह० कर्मणो गहना गतिः (गो.) गहनो कर्मणो गती, कोंब्यान गिळो हत्ती=गहन कर्मगतीनें विपरीत गोष्ट होणें. ०बुध्दि-वि. खोल, गाढ बुद्धीचा, कल्पनेचा. [सं.]

**गह(हि)ना, गहनागाठा**—पु १ किडुकमिडुक; दागीने; अलंकार (व्यापक अर्थी.) २ (सामा.) दागिना; अलंकार. 'खुशालिनें घातला ग अंगावर फार गहिना।' -प्रला १४३. [हिं. गहना]

**गहाण, गहाणवट, गहाणखत, गहाणपत्र, गहाणलहाण, गहाळ, गहाळणें**—गाहा मध्यें पहा.

**गहि-ही**—स्त्री. १ गई पहा. २ गईच्या समीपचा प्रदेश. ३ सोनाराचें एक आऊत.

**गहिगट**—न. कुंभाऱ्याचा खालीं उरलेला गाळ, रेंदा; गरगट. ०काढणें-जबर मार देणें; भीतीनें लेंड्या गाळावयास लावणें; गांड फाडणें. ०जमणें-परस्परांशीं एकमेकांची दृढ मैत्री जमणें.

**गहि(ही)न**—वि. गरीब; दीन; सात्विक; थंड; धिम्मा; शांत; सौम्य; सालस; क्षमाशील (माणूस). -शास्त्रीको [सं. गहन]

**गहिरा**—वि. १ गडद; दाट; पक्का; जबर; चांगला खुललेला (रंग) २ खोल; दाट; निबिड; गाढ (पाणी, पीक, जंगल, छाया, झोंप). ३ गडद रंगानें रंगविलेलें (वस्त्र). ४ मोठा; उंच; कडाक्याचा (आवाज, स्वर). 'भाट गर्जती गहिरावचनीं।' -भारा बाल ७.५५. [सं. गभीर; प्रा. गहिर; हिं. गहरा] -री नजर-स्त्री. जिवांत भरणारी, हृदयास चटका लावणारी नजर, दृष्टि; बांकडी नजर.

**ग(गं)हिरु**—वि उच्च; गंभीर; गहिरा पहा. 'परी तो महाघोषु थोर। गर्जतु असे गहिरु।' -ज्ञा १.१४४. [गहिरा]

**गहिला, (व) गहिल दा, गहिरादा**—वि. वेडा; गैरशिस्त; अज्ञानी; मूढ; अडाणी. [सं. ग्रहिल; प्रा. गहिल=पछाडलेला, पागल]

**गहिंवर**—पु. प्रेम, शोक-दुःखादि विकारांच्या अतिरेकानें रडें येण्यापूर्वी कंठ दाटून येण्याची अवस्था; कंठ दाटणें; हुंदका; मनोविकारांचा उमाळा. 'मग अत्यंत उद्वेगला। न धरत गहिंवरु आला।' -ज्ञा १.२६९. 'मेल्याला फार वर्षे झालीं तरी आईचें नांव घेतलें कीं त्याला गहिंवर येतो.' [सं. गह्वर]

**गहिंवरणें**—अक्रि. गहिंवर येणें; कंठ दाटून येणें; सद्गदित होणें (आनंद, दुःखादिकामुळें). 'पडुनि गळां गहिंवरल्या सीतेच्या कन्यका तशा गमल्या।' -मोरा १.४६१. 'दशरथ गहिंवरला हृदयीं।' गहिंवरविणें-गहिंवर आणणें. 'ब्रह्मासहि गहिंवरवी महिवर वीरेंद्र-पांडुची भार्या।' -मोउद्योग ७.४४. गहिंवरी-वि. रडें आणणारें 'गाई करून गहींवरी करून।' -प्रला ११.

**गहिस**—वि १ जड; भारी. 'जें हलुवट ना गहिस। जें चिवळ ना सपोस।' -एभा ३.६७९. २ प्रचंड. 'प्रळयकाळीं अति गहिसू। अगाध उयळे जळोल्हासू।' -एभा ३ १७४. ०पण-न. मूर्खपण 'अगा मरे हा बोलु न साहती। आणि मेलिया तरी रडती। परि असतें जात न गणिती। गहिसपणें।' -ज्ञा ९ ५१२ [सं. गरिष्ठ]

**गहिसर-रा**—गइसरा पहा.

**गहुला-ळा**—गव्हला पहा.

**गहू**—पु गवा (पशु) पहा.

**गहूं**—पु एक धान्य; याच्या जाती-काठ्या, खपली, जोड, पोट्या, बक्षी, सोनसळ, शेत, जोंधारी, तांबडा, पांढरा, पिवळा, पाण, दाऊदखानी, कवड्या, पिसी, सरबती इ० हा फार पौष्टिक

आहे याचें झाड मडीच ते चार फूट उंचीचें असून एका मुळ ख्यापासून अनेक फणगे फुटून प्रत्येकास शेवटीं चोट-वीतचोट लांब लोंबी येते त्यांत दाणा असतो कोंवळ्या लोंब्यांचा हुरडा भाजतात त्यास ओंब्या म्हणतात [स गोधूम, प्रा गहूम्, प घेऊ, हिं गेहूं, गोहू, गु घऊं, पोर्तुजि गीर, गील, फ्रेंजि गीव] (वाप्र) गव्हाची कणीक करणें-श्रम कमी करण्याच्या प्रयत्नांत श्रमाची वृद्धि करणें (कुणब्यानें उलटून कणविल्याची वेताळाची एक जुनी कथा आहे तिजवरून) म्ह० १ गव्हासरसे (बरोबर) किडे रगडले जातात=श्रीमंत माणूस विपत्तींत पडला म्हणजे त्या बरोबर गरिबावरहि संकट कोसळतें २ एक गहू प्रकार बहू ३ कुण-ब्याची बेटी गव्हाची रोटी मळल्यानें तिला चव येते ०गिळ्या-वि. मुष्टस्तंभ, सूंगळ्या

गद्दा—पु (कों) वाऱ्यानें फुगलेली समुद्राची मोठी लाट 'समुद्रावर मोठमोठ्या गद्दा भरतीच्या वेळीं येतात [स गद्द प्रा दे गद्दिअ=मोडलेली?]

गह्वर—स्त्री दरी, गुहा गव्हर पहा [स]

गळ—पु १ मासे धरण्याचा लोखंडी आकडा, गरी 'परी सयामाजीं गळु आहे। जो प्राणातें घेऊनि जाये।' —ज्ञा ३ २१४ २ विहिरींत पडलेली वस्तु वर काढण्यासाठीं एका लोखंडी कडीला ५-६ आंकडे (हूक) अडकविलेले असतात ती कडी ३ नवस फेडण्याच्या बगाडाचा आकडा हा वाघ्या, मुरळी किंवा नवस फेडणारा हे आपल्या पाठींत अडकवून घेतात 'केले गळाचे नवस।' —दा २ ६ २९ ४ फाशीचा फांस, आकडा [स गल= दोरी, प्रा गल=मासे पकडण्याचा आकडा] (वाप्र) ०काढणें-(चांभारी) जोड्याच्या सगळेंचे तुकडे करणें ०घालणें-१ भीड घालणें, मत्याग्रह करणें. २ जबरदस्ती करणें, बलात्कार करणें ०घेणें-ओळखणें ०टाकून पहाणें-उद्योग, प्रयत्न करणें, टाव घेणें गळीं देणें-१ फाशीं देणें (माणसास) २ (ल) मोठ्या संकटात क्लेशात घालणें गळीं लागणें- १ कोंडमारा होणें, फास लागणें (दाव्याच्या आवळण्यानें वासरास) २ (ल) यातनेंत पडणें, गुंतणें, फासांत अडकणें (अपेक्षा, आशा, लालूच इ०च्या), ताणण्याच्या आकडींत असणें ३ न झेंपेल इतक्या मोठ्यानें ओरडण्यानें दुरवस्था पावणें सामासिक शब्द- ०खंड-पु गळाच्या ज्या भागास आमिष लावतात तो भाग 'जैसा गळ खंडाचिये भेदीं। न शके मीन आपण।' —कथा ४ १५ ४०

गळ—न (राजा) दमेकऱ्याची धाप, कण्हणें, कुथणें, दमा

गळ—स्त्री गळती, स्राव, पाझर, सतत प्रवाह (दुखऱ्या डोळ्यातील पाण्याचा, क्षतांतील पुवाचा), पडझड, गळती (जोराच्या वादळानें फळें किंवा मोहोर याची), [सं गल्]

गळ—स्त्री गोट्या खेळण्याची गली, खाच गल पहा [स गर्त, फा अगलु]

गळ—पु (ना) शिमग्याच्या दुसऱ्या दिवशीं भरणारी जत्रा, उत्सव

गळ—गळा, गल पहा [स गल] सामासिक शब्द- ०खुंटी-स्त्री (व) नाठाळ पशूच्या एका पायास व गळ्यास बांधावयाची दोरी ०खोड्याची टांग-स्त्री (कुस्ती) गळ्याची टांग पहा ०गट बांधणें- (माण) अंगावरून धोतर लपेटून बांधून गळ्या मागे गांठ देणें ०गंड-न गंडमाळा, गळ्याच्या मांसग्रंथींची वाढ (आवाळू वाढक इ० [स गलगंड] ०गुं(गूं)ड-नस्त्री १ गाय, बैल यांची मानेखालची पोळी २ अजागलस्तन ३ गळ्या-खालची गाठ गलांड ०गोटी-स्त्री गळगुंड अर्थ १ पहा ०ग्रह-पु गलग्रह पहा १ मानगुटी धरणारा पुरुष, डोईजड माणूस 'तो घरांत गळग्रहच होऊन बसला आहे' २ (ल) फार त्रास देणारा, विनवणी किंवा बळजबरी करून पाठ पुरविणारा माणूस जिगजिग लावणारा भिकारी, तगादेदार, धरणेकरी, वेठीस धरून कामें करून घेणारा 'तो गळग्रह अगरीं दारांतच धरण धरून बसला' ३ (नियमितपणाच्या अभावीं, अविश्वासानें) थांबवि-णारा, अडथळा आणणारा, हरकत किंवा प्रतिबंध करणारा, खोळंबविणारा माणूस ४ लोढणें, खोडा, प्रतिबंध, फास ५ आग्रह, जबरी, बलात्कार 'तुम्ही भोजनास यण्याविषयीं मला गळग्रह घालतां परंतु मला फावणार नाहीं' ६ गळ्यास येणारी सूज गळा धरणें ७ एक प्रकारचा चिमटा (तापलेली भांडी उतरविण्याचा) ८ (ज्यो) एक दुष्ट ग्रह सामासिक शब्द- [स गलग्रह] ०घांटी-स्त्री १ गळ्यापुढचें हाड, घाटी, मणका, घसा, गळा (यांत श्वासनलिका व अन्नमार्ग याचा समावेश होतो) २ बैलाच्या गळ्यातील घंटा ०चंडी-चोंडी-स्त्री १ मान (क्रि० धरणें) २ गचांडी, अर्धचंद्र (क्रि० देणें) ०चढाव-पुन. फाशी 'अपाजीराम यास गळचढाव केलें' —ख २९६९ ०चिपी-स्त्री १ मानगुटी धरणें, दाबणें गळा 'त्याची गळचिपी आवडू नको, कदाचित प्राण जाईल' २ (ल) खोटी, तहकुबी, आशेंत लोंबकळत ठेवणें ३ पिच्छा, अति आग्रह, तगादा, खणपटी, पाठ पुरावा (क्रि० धरणें, आवळणें, करणें, लावणें) [गळा+चेपणें] ०चुवा-पु (बडोदें) गायकांच्या चिंचपेटीप्रमाणें पुरुषाच्या गळ्यां-तील एक अलंकार —जनि, शेवटची यादी २ ०चुटी-चुटया-चेटया-चोटया-स्त्रीअव गळघाटीची सूज, (इं) टॉन्सील (क्रि० बसणें, येणें, फुगणें, होणें) २ (निदार्थी किंवा सूचकतेनें) श्वास किंवा अन्ननलिका (क्रि० भरणें, धरणें, चेपणें, फोडणें) 'निबाला निघोण्या आल्या व कावळ्याच्या गळचुट्या धरल्या' ३ (एव) अजागलस्तन ४ (क) बैलाच्या मानेखालची पोळी.

०**घुटी मोकळी होणें**–गळघुटी ओसरणें, नाहींशी होणें. ०**चेपी**–स्त्री. १ गळचिपी पहा. २ दडपणें; न जुमानणें; पॅटाळणी. 'सरकार लोकांच्या हक्कांची गळचेपी करते.' –के २७.५ ३०. –वि. (माण.) गळ्याला दोन भोंवरे असलेला. हें अशुभचिन्ह समजतात. ०**जोट–ड**–स्त्री. जीवश्चकंठ्य मैत्री. 'बाह्यइंद्रियांची घडफड। शमेसि कराबा गळजोड।' –एभा २५.५४. ०**तंतु**–पु. गळसरी; जानवें. 'गळतंतुवत भजन हो।' –दावि १७७. ०**द(ध)ट**–वि. १ कोडगा; २ दांडिट; बेकाम व गाफिल [गळा+दाट] ०**दंड**–पु गळ्यातील सांखळी, हार. 'रिते कुंजर गळदंडीं।' –एरुस्व ७.५६. ०**पट्टा**–पु. चारसहा बोटें रुंद व तीन हात लांब विणलेलें, गळ्याभोंवतीं बांधावयाचें लोंकरीचें वस्त्र [गळा+पट्टा] ०**पट्टी**–स्त्री १ (इं) कॉलर. 'ज्या महाद्दरानीं इंग्रजी पाटलुन... इंग्रजी गळपट्टी वगैरे सुधारणेची सामग्री आपलीशी करून टाकली...' –नि ९१३. पपत्रे ७८. २ (कुस्ती) जोडीवाल्याच्या गालफडाच्या खालून आपल्या हाताच्या पोटरीनें जोडीदाराच्या गळ्यावर पट्टी बांधून (दाब देऊन) त्याला चीत करणें. ०**पातें**–न. (व) मोटेचें जूं. 'मोटेचें गळपातें घे व वाढ्याकडे दुरुस्त करण्यास घेऊन जा.' [गळा+पातें] ०**पेंडें–ढें**–न. खुंट्यास बांधलेल्या जनावराच्या दाव्यास जोडलेला गळबंद (हा चामड्याचाहि असतो). ०**फाशा**–वि. हट्टी; अत्याग्रही (भिकारी). ०**फांस**–पु. १ सरफांस; गळ्याला घातलेला फांस; फाशीं देण्याचा फास. २ जीव जायवयाजोगा दोरीचा वेढा (गुरें इ०च्या गळ्यास) (क्रि० देणें; घालणें). ०**फांस घेणें**–स्वतःच्या मानेस फांस लावून लोंबकळणें; मरणें; जीव देणें; आत्महत्या करणें. ०**फास देणें**–दुसऱ्याच्या गळ्यास फांस लावणें; मारणें. ०**फांसणें**–अक्रि. (काव्यांत) गळ्यास फांस लावणें, लागणें. ०**बंद**–पु. १ खोगिराचा पुढील बंद. २ दोर (गुराला दावणीला बांधावयाचा) गळपेंडें पहा. ३ गळ्याभोंवतीं विशिष्ट तऱ्हेनें बांधावयाची पट्टी; नेकटाय (इं.) 'मोजे, बूट, गळबंद इत्यादिकासंबंधींहि विशिष्ट पद्धत ठरली असल्यानें...' –सासं २.२१२. ०**घट–चंड–चणा–चणी**–वि.क्रिवि. गळ्यापर्यंत भरलेलें; काठोकांठ भरलेलें (भांडें); तोंडोतोंड; भरपूर; तुडुंब. 'दुधाचें भांडें एक शेरानेंच गळवट भरलें मग त्यांत दुसरा शेर कसा मावेल?' 'गळबंड निर्ळे ताद्ळ घे.' ०**वटी–चडशी**–स्त्री मानेखालची पोळी. गळगोटी पहा. ०**श्चकंठश्च–स्यकंठस्य**–न. दृढतर मैत्री; गळेलागु स्नेह; जीवश्चकंठ्य. ०**सट**–न. कफ अथवा श्लेष्माची तार, चिकटा. ०**सर–री**–पुस्त्री. १ गळ्यांत बांधावयाचा मणी. २ चार ते आठ पदरी कांचेच्या किंवा सोन्याच्या मण्यांचा हार; एक दागिना. ३ एकपदरी हार. 'गळसरी दुसरी न धरी गळां।' –वामन, रुक्मिणीविलास १३. ४ सौभाग्यालंकार; मंगळसूत्र; काळ्या पोतीचा सर. 'वीं लियेसी सर्व शृंगार। परि गळसरीविण अपवित्र॥' –कथा ३.८.७३. 'सुगंधामाजी कस्तुरी। कीं अलंकारांत गळसरी।' –भवि २.२०७.५. (कु.) एक दागिना, यांत पागऱ्याचें मंगळसूत्र, पदक इ० असून दोन बाजूस (सुवेंदें) (सुमारें १॥ तोळा सोन्याचीं पोतुगाली चलनी नाणीं), गिन्या किंवा पुतळ्या ओंवतात, तसेंच बिलोरी काळ्या–हिरव्या पोतेचे सर असतात हा फक्त सौभाग्यवती स्त्रिया घालतात. ६ (ल.) वेढा; वेष्टन. 'असो त्या सिंधूच्या पैलपारीं। कुशद्वीपाची गळसरी।' –कथा ६.३.६९. [सं. गल+सृ] ०**सरी बांधणें**–(ल.) लग्न लावणें; सौभाग्यचिन्हांकित करणें. 'कीं माझा पिता दिनकर। तो हा जाणे विवाहविचार। त्याचे विचारें गळसर। बांधीन तुमचा॥' –कथा ५ १३.१५७. ०**सुजी**–स्त्री. गुरांचा एक स्पर्शजन्य रोग. ०**सु(सों)टी**–नअव. गळघांटीची सूज; गळचुट्या पहा. (क्रि० बसणें; येणें; फुगणें; होणें). 'गळसोट्या आणी जीभ झडे।' –दा ३.६.२६. 'गळसुट्या गंडमाळा सुक्ष्म।' –स्वानु २.५ ७. ०**सूत्र**–नअव. (विनोदानें) १ गळघांटी. २ (काव्य) गळ्यांतील दोरा. 'योजितो हयगळा गळसूत्रें।' ०**होड**–स्त्री. गळ्याची शपथ.

**गळका**—वि. गळणारा; पाझरणारा; फुटका. [गळणें]

**गळगळ**—क्रिवि. उतावळीनें खाणें किंवा पिणें याच्या आवाजाचें अनुकरण; गटागटां; ढसांढसां. [ध्व.] ०**घाशी**–वि. खाण्याला पुढें पण कामाच्या वेळीं अंगचुकारपणा करणारा; भोजनभाऊ; ऐतखाऊ. [गळगळ+घास]

**गळगळा**—पु. (गो.) घुटी; काढा; अर्क.

**गळगळां**—क्रिवि. रडकुंडीस, काकुळतीस येऊन; गयावया करून (प्रार्थिणें, मागणें). (क्रि० येणें). 'तो दोन रुपयांसाठीं अगदीं गळगळां आला.' [गळणें].

**गळगळाट**—पु. रेलचेल, भरपूर; तुडुंब, उचंबळ. [गळणें द्वि.]

**गळगळीत**—वि. तोंडोतोंड; भरपूर; तुडुंब.

**गळगळीत**—वि १ पचपचीत; अरुचकर; पाणचट (पक्वान्न). २ पुळपुळीत; निरर्थक; अर्थबोध न होणारें. ३ (सामा.) गुळगुळीत, मऊ व तजेलेदार 'माझा गडवा गळगळीत पडला म्हणून लौकर उजळतो.' ४ (गो.) सैल; विस्कळित.

**गळगा**—पु गळती–शर.

**गळंगा**—पु. १ गवत, कडब्याचीं ताटें, पानें इ० अस्ताव्यस्त पडलेला कचरा; अडगळ; गळाठा, पसारा (कागद, वस्त्रप्रावरण इ०चा), गाळसाळ; चोथा. (क्रि० पडणें; होणें). 'गळंग्यांमधील जग ज्योति। चेतेल कोठें।' –दा १९.२.५. २ (ल.) गोंधळ; घोंटाळा. 'प्रत्ययाविण गळंगा होये। अनुमानज्ञानें॥' –दा १०.१०.९. ३ (ल.) खरेंखोटें. –मनको. –वि. ढिला; सैल; खिळखिळा; सैल बांधलेलें, आवळलेलें; अखडलेलें. [सं. गल्; म. गळणें]

गळण—न (गो) गरल, सापाचें विष [स गरल]

गळणी—स्त्री १ गळती, पाझर, स्राव चाळण, गाळणें, नरसाळें [गळणें]

गळणें—अक्रि १ झरणें, पडणें, ढळणें (सुटून, उकलून, मोकळा होऊन), पतन पावणें (फळें, फुलें भिंतीचा गिलावा) 'मोठा वारा येतांच त्या आंब्याचे आंबे पटापट गळले ' २ ठिबकणें, पाझरणें, वाहणें (पाणी, दाणे इ० जिन्नस) चाळणीतून दाणे गळले ' ३ वाहणें, पाझरणें (भांडें, नाव इ०) 'ताब्या गळतो ' ४ निचरणें, रस वाहणें (बरबरीत मण, क्षत), वाहणें, झिरपणें (पु), ५ थकणें, दमणें, घटणें क्षीण होणें, अशक्त होणें 'हिंडे वनोवनीं तो अन्नावांचुनि बहु गळाला हो।' —मोवन ४ १०४ ६ चोपणें, अंग सोडणें ७ गमावणें, खचणें, न श पावणें ८ नाहींसें होणें, अंतर्धान पावणें, तहकूब होणें, मालवणें, मागें राहणें 'सुर असुर तई मी वैसवी वेगळाले। सहजरिपु तरी ते भाव त्यांचे गळाले।' —वामन, बालक्रीडा ५१ काशीस पन्नास असामी जावयास निघाले त्यांतुन पांच गळाले ' ९ वाळविलें जाणें, नापसंत होणें 'चाकरीस सात असामी गेले, तीन राहिले, चार गळाले ' १० कमी होणें, उणावणें ११ खचणें, गमावणें, सुटणें, मृतप्राय होणें (धैर्य, विश्वास, आशा सुटून) 'तावदरि पाडुसुतातें दूरुनि पाहुनि भये गळाले हो।' —मोशल्य ३ ७२ १२ कचरणें, कांकू करणें (माणसानें) १३ चुकणें, विसरणें (विषय, मुद्दा) १४ रतस्खलन होणें, खळणें १५ फाटणें, जीर्ण होणें, न्यूनता असणें (पुस्तकांत पानांची) 'काही ग्रंथ गळाला ' १६ (हिं) विघुळणें (धातु इ०) १७ थकणें एक स्वव्यसनीं सहाय हय जो होता सखा तो गळे।' —मोकृष्ण २३ ५७ १८ ढळणें, चळणें 'निज मनापासुनि त्या गळाल्या।' —सारुह १ ६९ [स गल्न, हिं गल्ना]

गळंत—न १ एखाद्या अक्षराचा शब्दाचा किंवा वाक्याचा संक्षेप करतेवेळीं त्याचें पहिलें अक्षर लिहून पुढें पूज्य लिहितात तें (क्रि० घालणें) २ ज्याकरितां पूज्य घातलेलें आहे तें गाळलेलें वाक्य शब्द इ० —वि संक्षेपानें सोडलेलें, गाळलेलें, वर्ज्य केलेलें, गहाळ, नष्ट (वाक्यांतील शब्द, शब्दांतील अक्षरें) [गळणें] ०करणें— गिळणें, गट्ट करणें (सरकारी पैसा इ०)

गळती—स्त्री १ उन्हाळ्यांत देवावर अभिषेक करण्याचें तळाशीं छिद्र असलेलें धातूचें किंवा मातीचें भांडें 'वरी त्या मृलिंगास निर्मळा। गळत्या लाविल्या अधोपर्यी।' —पांप्र ४ १२३ ज्यांतून पाणी गळत असतें असें कोणतेंहि पात्र २ देवावरील पाण्याची सतत धार, अभिषेक ३ ठिबकणी, पाझरणी, पाघळणी 'तापार्तांची गळती जी पाहुनि अमृतबिंदु शीतळ गळती।' —मोरा १ ३४२ ४ सपाट्याचें पतन (वाऱ्यानें फळें, तराजूत किंवा त्याच्या पारड्यांत न मावणारे जिन्नस) ५ गठ्ठे वजन करण्यासाठीं ज्यांत लोंबकळवितात तो सरफांस (दोरीचा इ०) ६ गळ (डोळ्याला लागणारी) ७ गळतें पहा [स गल्=गळणें]

गळतें—वि गळण, पाझरण, ठिबक, सुळकी, भोंक, ज्यांतून गळतें तें छिद्र ०काढणें—गळणें बंद करणें, भोंक बुजविणें [गळणें]

गळदगें—वि ओढण्यास कडक व शौचास साफ करणारी (विडी)

गळपट—स्त्री गफलत, नजरचूक, भूल, भ्रम, दृष्टिदोष —क्रिवि १ बळकट घट, गच्च (क्रि० बांधणें, आवळणें, धरणें) २ टांगून, चेंदून, कचडावून (क्रि० भरणें)

गळपत्तर—वि (व) गढून गेलेला, थकलेला 'हगण्यानें गळपत्तर झाला ' [गळणें]

गळफटणें गळफाटणें गळफटविणें—उक्रि गुंतागुंत करणें, घोंटाळा माजवून एकमेकांत गुरफटविणें (दोरा किंवा त्याच्या जाळ्यांत एखादी वस्तु), गोवणें, गुंतविणें, घोंटाळ्यांत घालणें २ (ल) हरविणें, सांडणें, गमावणें, पाडणें [अर गफलत]

गळफटा-फाटा—पु गुंतागुंत, घोंटाळा, अव्यवस्थित किंवा गुरफटलेली स्थिति (वस्तु, प्राणी, माणसें यांची) [गळफटणें]

गळबळीत—वि १ खळबळीत मनाचा मोकळा, सरळ बुद्धीचा, सलगीचा, भला, निष्कपट (मनुष्य, पत्ता इ०) २ ढिला, सैल भोंगळ, गदी, गबाळ (मनुष्य पोषाख, कृत्य, कार्य इ०) ०पात्र—न गबाळ माणूस

गळवणी— न गाळलेलें, गळलेलें, निरपलेलें पाणी [गळणें+पाणी]

गळस—वि मांसल-धार

गळसरणें—अक्रि उरणें, तडकणें, भेगा पडणें (ओल किंवा थंडीपासून पायाचीं बोटें इ०) [गिळा=ओल+सर प्रत्यय?]

गळहाटणें—अक्रि गळफटणें गलित होणें कंठात प्राण येणें गळ्हाटणें पहा

गळहाटा—गळ्हाटा पहा

गळा—पु १ घसा कंठ मानेचा पुढील भाग व आंतील भाग २ (गायन) सूर, आवाज कंठ 'तिचा गळा बसला ' 'त्याचा गळा मधुर आहे ' म्ह० १ गाणाराचा गळा नाचणाराचा चाळा २ गातां गळा शिंपतां मळा ३ घागर बाटली, मडकें इ० चा कंठ, मान तोंड व पोट यांचेमधील आकुंचित भाग ४ (सतार) दांडीचें आरंभस्थान [स गल हिं गला] (वाप्र) ०उगविणें—कर्जमुक्त होणें, संकटांतून पार पडणें

०ओरडून पडणें–मोठ्यानें शोक करून कंठास मिठी मारणें. ०फाडणें–मोठ्यानें रडणें. ०फापणें–१ फसविणें; ठकविणें; भोंदणें. २ उमेद खचवून नाश करणें. ३ (शिंपी) गळ्याचें कापड बेतणें. म्ह० गळा कापला तोंडला मिटला–वारला= संकटापेक्षां त्याच्या परिहाराचा उपाय जेथें विशेष घातक असतो तेथें वापरतात. केसानें गळा कापणें–वरून मैत्री दाखवून आंतून विश्वासघात करून नुकसान करणें. गळा गुंतणें–अटकणें–अडविलें, बांधलें जाणें; एखाद्या अडचणींत गोंवलें जाणें. ०गोवणें–१ प्रतिबंध करणें; अडकविणें; एखाद्याचे हातपाय बांधणें (जुलमानें, वचन इ० घेऊन). २ गुंतविणें; अडक-विणें (त्रासदायक कामांत). ०घालणें–(चांभारी) जोड्यावर रेशीम भरणें (रेशीम भरण्याचा एक प्रकार). ०तांगडून बोलणें–फाडफाड, खरडून, मोठ्यानें बोलणें. ०ताणणें–टांगणें–(गायन) गळ्याच्या शक्तीपेक्षां फार उंच स्वरानें गाणें; अशा प्रकारें गाइलें असतां गळ्यास त्रास होणें. ०तापणें–सुटणें–कंठातील कफ इ० जाऊन टीपेस जाण्याइतका स्वर मोकळा होणें. ०दाटणें–गहिंवरणें; उमाळ्यानें घसा दाटणें (दुःख, माया इ० मुळें). 'तथ्यप्रभुक्त परिसुनि धर्माचा गहिंवरें गळा दाटे।'–मोशांति ६.४२. ०धरणें–१ घसा बसणें (रोग, आंबट, तिखट, खवट, इ० पदार्थांमुळें). २ थांबविणें; खोटी करणें; हरकत आणणें (बोली, करार यांत बेइमानपणानें वागून) ३ वाचा बसणें; आवाज नष्ट होणें; निरु-त्तर होणें. ४ ताब्यांत घेणें. 'स्वद्‌गुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरू न गळा।'–अप्रमयूरकेका ५८. ०निवळणें–(गायन) फुटलेला आवाज चांगला होणें. ०पडणें–आळ येणें. 'गळां मोतीं असोन निधाडें। लोकांचिया गळां पडे।'–ह २१. २२९. ०पडणें–फुटणें–बसणें–आवाज घोगरा होणें, चिरकणें. गळां–गळीं पडणें–१ मानेस मिठ मारणें. 'गेलों गृहासि माता धावुनियां माझिया गळां पडली।'–मोमनु ६.६८. आलिंगन देणें. 'लावशील लळा तर पडेल गळां.' २ गळ घालणें; निकड लावणें; तगादा लावणें; सक्तीनें पाठ पुरविणें. ३ अन्या-यानें दोषारोप करणें. ४ शिव्या, दैत अंगावर तुटून पडणें. ५ एखाद्याच्या अंगावर भार घालणें; लोढणें होणें; फार भीड घालणें; विघ्नासारखें होणें. ६ वाईट संवय, खोड लागणें. ०पिंजणें–गळा सोलवटणें; आवाज चिरकणें (वाती होऊन किंवा गातांना). ०बसणें–मानेंत बसणें; थबकट किंवा चपटा होणें (भांडें). ०बांधणें–आळ घालणें; हातपाय बांधणें, अडकविणें. गळां–गळीं बांधणें–१ सक्ती करणें; घेण्यास भाग पाडणें. २ अन्या-यानें दोषारोप करणें; आळ घेणें; कलंक लावणें. ०भरणें–भरून येणें–गहिंवरणें (मनोविकारामुळें) व त्यामुळें आवाज कंपित होणें; गुदमरणें; श्वास कोंडणें. 'असुहृदुदासीनाचे भरले भरतिल न अन्य काय गळे।'–मोभीष्म ११.११९. ०मोठा करून रडणें–मोकाड पसरणें; मोठ्यानें रडणें. ०लागणें–(संगीत) आवाज चांगला लागणें; सूर लागणें. ०सोडविणें–(खाटीक) १ धडापासून मान वेगळी करणें, कापणें. 'केली हत्या मर्थी शिरला सोडवी गळा कानडयाचा।'–ऐपो ३९२. २ एखाद्यास पेंचांतून मुक्त करणें. गळां–ळीं–कंठांत; मानेवर. 'अर्पी गळां हार जया मुक्ताळी।'–वामन सीता स्वयंवर ६९. म्ह० १ गळां माही सरी सुखी निद्रा करी. २ गळ्यांत माळा, पोटांत काळा. गळीं उत-रणें–पटणें; समजणें. ०जाणें–फाशीं जाणें. ०लागणें–१ पाठ पुरविणें; आळी घेणें (मूल, तगादेदार, काम घेणारा). २ मोठ्यानें ओरडणें, हरकणें. 'गळीं काय लागतोस, हळू कां बोलेनास!' गळ्याखालीं उतरणें–१ गट्ट करणें (लांच, लुच्चे-गिरीचा पैसा इ०). २ स्वाधीन होणें; पदरांत पडणें. –ळ्याचा खाखोटा होणें–श्वास बंद होणें, कोंडणें; गुदमरणें. –ळ्याची आण–शपथ, गळ्याचेण (संक्षिप्त)–गळ्याची शपथ वाहणें, घेणें. –ळ्याची फुंकणी होणें–घसा घोगरा होणें, बसणें. गळ्यांत असणें–भार पडणें (काळजी, काम, खटपट इ०चा); अवलंबून असणें. ०गळा घालणें–दुःखानें दुसऱ्याच्या कंठास मिठी मारणें. ०गोणी येणें–१ अडचण, दुःख यांचें असमंजस उपायांनीं निरसन करीत असतां उलट जास्त अडचणींत येणें (जसें, एखाद्या बैलानें पाठीवरील ओझें लोटून देण्याचा प्रयत्न केला असतां तें मानेवर येऊन जास्त ओझें होणें). २ नुकसानी, दुःखभार अंगावर ओढून घेणें. ०घोंगडें–लचांड येणें–(डोईवरचें घोंगडें घसरत घसरत गळ्यांत आलें म्हणजे जीव गुदमरतो त्या-वरून). संकट गुदरणें. 'ताई, आलें घोंगडें गळ्यांत!'–शारिका. ०धनुष्य घालणें–(प्राचीन पद्धत) पराभव करणें व पराभव केल्याची खूण. 'घालुनि धनुष्य कंठीं धरिला धरि गारुडी जसा अहितें।'–मोकर्ण १४.६७. ०धोतर घालणें–स्वतःचें म्हणणें सिद्ध करण्यासाठीं एखाद्यावर सक्ति करणें ०पडणें–हिताहिताची, रक्षणाची, पोसण्याची, बजावणीची, निस्तरण्याची इ० जबाब-दारी अंगावर येणें. 'भाऊ गेल्यापासून त्याचा संसार माझ्या गळ्यात पडला' ०तंगड्या–पाय येणें–सुटण्यास कठिण अशा अडचणींत जास्त गुरफटलें जाणें. 'ज्याच्या तंगड्या त्याच्या गळ्यात.' ०बांधणें–आग्रहानें देणें; स्वीकारण्यास भाग पाडणें. ०माळ, माळखंड घालणें–१ शिस्त दाखवून काम सोंप-विणें, हवालीं करणें; व्यवहार गळ्यांत टाकणें. २ वरानें वधू-किंवा वधूनें वर पसंत करणें, वरणें (माळेचा उपयोग लग्नांत होतो यावरून). ०येणें–अंगावर येणें, बेतणें (धंदा, कारभार, काळजीचें कार्य). ०लोढणें किंवा धोंड बांधणें–नाखुषीनें अडचणींत आणणें; कठिण काम करण्याचा प्रसंग आणणें.

'राष्ट्रीय पक्ष हा कांहीं जुन्या पक्षाच्या गळ्यांत लोढणें बांधण्यासाठीं निर्माण झालेला नाहीं ' –टि ३ २६३ ०हात घालणें–१ आलिंगन देणें २ मन अनुकूल करणें, वळविणें, दादा–बाबा करणें **गळ्यापर्यंत येणें**–सहनशक्तीची परमावधि होणें (कष्ट, पीडा, दुःख यात) **गळ्याला दोरी–फास–रसायण–तात लागणें**–एखाद्या कार्याकडे ओढ लागणें, त्याविषयीं अतिशय चिंता लागणें, पेचांत असणें, संकटांत पडणें 'आग्रह करूनि लावू कोणेकाच्या गळ्यां कशी तात।' –भक्तमयूरकेका २ 'माझ्या गळ्याला त्या कामाचं रसायण लागलें आहे ' **गळ्यावर–गळ्यात गाणें**–सुरेलपणें, शास्त्रीय पद्धतीनें व मनमोकळेपणानें गाणें **–वर बोलणें**–सहज बोलणें, अविचारीपणाचें भाषण करणें, कपटयुक्त बोलणें **–वर सुरी ठेवणें, गळ्यास नख लावणें**–जीव घेण्याची भीति घालणें, अत्यंत संकटांत घालणें 'का नख न लाविलें जननी।' –मोउद्योग ११ २३ **गळ्याशीं गळा मिळविणें**–१ (गायन) दुसऱ्याच्या सुराशीं आपला सुर मिळविणें २ गळ्यांत गळा घालणें **गळ्याशीं येणें किंवा ०पाणी लागणें**–नुकसानीची बाध होणें, परमावधीस पोहोंचणें 'मुलगी गळ्याशीं लागली ' (वयानें फार झाली, उपवर होऊन दिवसगत झाले) म्हृ० १ त्याचा गळा व माझा नळा जेव्हां एकत्र होईल तेव्हां हें काम उरकेल=एखाद्याच्या खणपटीस बसल्याशिवाय कार्य होत नाहीं अशा वेळीं म्हणतात २ गळ्यांत माळा पोटांत काळा ३ गळ्यात गळा आणि नळ्यात नळा=निकट मैत्री ४ गळ्यात गरसोळी आणि गावात बोंब=खांद्यावर मूल व गावात शोध ५ माझा गळा आणि कादा मुळा सामाशब्द– ०**गळाकाढू**–वि १ गळ्याच्या एके बाजूवर भोंवरा असलेला (घोडा) २ गळेकाढू गळेकापू **गळ्यातला ताईत–तन्मणा**–वि अत्यंत लाडका प्रिय (क्रि० करणें; मानणें, मोजणें, बाळगणें, बनणें, होणें) 'तू नवऱ्याच्या गळ्यांतला ताईत ' –विवि ८ २ ३०

**गळागोठा**—पु धोळका, गर्दी, दाटी (भांडण इ०च्या वेळची)

**गळाट**—वि (व) गळ्याबरोबर

**गळाटा–ठा**—१ गल्हाटा पहा २ गोंधळ 'पृथ्वीचा जाला गळाटा।' –दा ११ २ १८

**गळाठणें**—गल्हाटणें पहा

**गळाठी**—स्त्री (कों) १ गुंतागुंत भानगड, अडचण २ भानगडीची परिस्थिति गल्हाटा पहा

**गळाड–डा**—स्पु गव्ह गलांड पहा

**गळांत**—क्रिवि गळ्यांत पहा 'या श्लोकाचा चौथा चरण गळांत केला.' ०करणें–खाणें

**गळाळा**—पु १ मधुर रसाची धारा 'कृष्णदास मुद्गलासी श्रीरामरसें गळाळे यती।' –सप्र १६ ३० २ घोट, घांस 'निवालिया विषोदकाचा गळाळा।' –ज्ञा ८ १४७

**गळि(ळी)तकुष्ठ**—पुन (काव्य) झरविणारें, पटविणारें, वाहणारें कोड, महारोग गलत्कुष्ट, गलितकुष्ट पहा

**गळी**—स्त्री टीप, किनरी, तिपदरी गळा, बारीक स्वराचा गळा (आवाज) –वि खड्या सुराचा, टीपेचा; किनरी, तिपदरी, तिप्पट उच्च चढण्यास योग्य [गळा]

**गळीं**—स्त्री (गु) नीळ –कृषि ३९७

**गळीत**—न १ तेल निघणारें धान्य, ज्यापासून तेल निघतें असा पदार्थ, तल्कट (आंत तेल असणारा) पदार्थ २ रस निघणारी वस्तु (ऊस वगैरे) –वि १ गळलेलें, पडलेलें, झाडलेलें २ ज्याचीं पानें गळालीं आहेत असें (झाड) ३ फाटलेलें, खराब झालेलें (पुस्तक) ४ गाळलेला, पाझरलेला, ठिबकलेला (प्रवाही पदार्थ) [स गलित]

**गळींव**—वि गळलेला पडलेला झिरपलेला गळणें पहा

**गळींवसुक(ख)ड गळींसुक(ख)ड**—स्त्री पुरता पिकून झाडावरून खालीं गळलेला नारळ [गळणें+सुकड]

**गळुगा**—पु कचरा, गळाठा, गळगा पहा

**गळू**—पु बेळगांवकडील एक जातीचा हलका बाजू [का गळे]

**गळूं**—न मोठा फोड, करट गळाड केस्तुड, येंड, उठाणू [वैदिक–ग्लौ=चंद्र स गल=गळणें]

**गळूबंद**—पु (बडोद) हुशीप्रमाणें गळ्यात घालण्याचा बायकांचा एक दागिना –जनि शबरची यादी ३

**गळेकापू–काप्या, गळेकाढू**—वि (गळा कापणारा) विश्वासघातकी, दगलबाज भेद शत्रु

**गळेपडू**—वि १ स्वतःचें काम करून घेण्यासाठीं दुसऱ्यास त्रास यईपर्यंत अत्याग्रह करणारा, छळवादी (भिकारी, धरणेकरी) २ आळ घेणारा, दुसऱ्यावर लटकें तुफान घेणारा, असा माणूस करीत असलेला (धंदा) ३ कुभांडी, बाल्टी (भाषण) 'याचा गळेपडू धंदा आहे, सरळ कामाची नव्हे ' ४ गळ्यांत पडणारें, न टाळतां येणारें (काम, व्यवहार) [गळा+पडणें]

**गळेफाड**—स्त्री घसाफाड, त्रासदायक व निष्फळ आरडाओरड, खरडपट्टी उपन्यास विवरण, शिक्षण इ० [गळा+फोडणें]

**गळेबंद**—पु गळोटी (इ) नेकटाय

**गळेबाज**—वि सुरेल मधुर कंठाचा, सुराचा (गवई)

**गळेलठ**—वि १ गलेलठ्ठ पहा लठ्ठ गर्दन मान असणारा (पशु) २ आडदांड, धट्टाकट्टा गबदूल पण मूर्ख (माणूस)

**गळेसर–री, गळेसरी**—गळसर–री पहा

**गळोगदी**—स्त्री बगाड, गळवगदी

**गळोटी-ठी**—स्त्री गळपट्टी, (६) नेकगाय गळेबद पहा -विद्याहरण.

**गळोधो**—स्त्री मुठीच्या (खोगराच्या) उराठीपासून मानेवर जाणारा कासरा, दोर (बैलाचा), चढणीच्या वेळीं मूठ बळकट करण्याकरिता हा बाधतात

**गल्ल्या**—पु (राजा) गळींवसुखड पहा [गळणें]

**गळ्हांग(घ)ती**—स्त्री गळ्यातील घोंगडी किंवा पासोडी खाकेखालून आणून तिची केलेली खोळ (क्रि० घालणें, बांधणें) [स गल+प्रा दे अगुढी=घुगुट खोळ]

**गळ्हाटणें**—उक्रि १ गळाठा, अव्यवस्थितपणा, गोंधळ होणें २ हुरवणें गमावणें ३ (आजारीपणामुळें) चिजणें क्षीण होणें, थकणें, दमणें 'मुख्य हुजुरात तें अगदीं गळ्हाटान हुजुरात असें नाव मात्र अवशिष्ट राहिले होतें' -मराआ ५

**गळ्हाटा-ठा**—पु १ गवत, कडबा इ० चा गळगा, पाचोळा २ पदार्थ किंवा कामकाजाचा घोंटाळा, घालमेल, गोंधळ ३ दुर्दशा, चिवडाचिवड, रेंदा ४ (माळवी) अश क्तता ५ (ना) दीर्घ परिश्रमानें व तुंबलेलें काम ६ अफाट, अवजड, अनावर खातें, ताडा, स्वारी [गळणें]

**गा**—संबोधन (बहुधा काव्यांत) अरे! अगा पहा 'चाला, गा राउत हो भणतिलें।' -शिशु ५६१ 'हा गा! रोगु कायी रोगिया।' -ज्ञा १८ १२९७

**गाइजणें**—उक्रि गाणें, म्हणणें 'तुझीं लीला नामें गाइजेसी।' -दाव ४२५ [स गै]

**गाई**—स्त्री १ (कों) गाय (जनावर) २ गायचें अनेक वचन, गाया ३ अगाई, जो जो ४ (ल) दीन, गरीब 'हे त्यापुढें नृपति केवळ जाण गाई।' -सारुह ८ ११६ [स गो, प्रा गाई] ०पाण्यावर आणणें-(कुत्सितार्थी) गाल फुगवून रडणें -चा गोहरा-वि (ल) मुके

**गाईर**—स्त्री १ (राजा) गारभीचे शेंगेतील बीं (कागद इ० घासण्यास व मऊ करण्यास उपयोगी) २ (ल) गळ्यातील गांठ किंवा कठिण भाग ३ प्रौढ कुमारिकेच्या स्तनातील काठिण्य किंवा गांठ, स्तनात प्रथम येणारी गाठ ४ अड्यातील पिवळा बलक

**गाईर**—स्त्री शेणखळी, शेण साठविण्याची खाच [गाय]

**गाउ-ऊ**—न गाव पहा 'आठरा गाउआ बाहीरि वाडी।' -शिशु ३२१ [स ग्राम, म गाव, हिं गाओं]

**गाउ(ऊ)ली**—स्त्री (काव्य) लाडवाळपणें गायीस म्हणतात (माय-माउलीप्रमाण रूप) 'गुरूचि शिष्यवासुरासि कामधेनु गाउली।' -निमा १ ३६

**गाऊ**—स्त्री अगाई, जो जो [गा-गाई]

**गाऊडी**—वि गावढळ -ठार [हिं गोंवदी, गावडा-डा]

**गाऊल**—न १ नफा, फायदा, किफायत, कमाई २ श्रम विरहित किंवा अकल्पित फायदा, भूमिगतधनाचा लाभ, घबाड (क्रि० सापडणें, लागणें) [गावणें]

**गाक(ख)र, गागरा**—पु. पट्टी, भरोळी, निखाऱ्यावर भाजलेली-गव्हाच्या कणकेची-जाड दामटी (क्रि० घालणें, पाडणें करणें) खाकर पहा

**गाकरी**—स्त्री पिठीची (तादळाच्या) व कणकेची दामटी.

**गाखर**—पु (प्रा) फुफाटा, निखारा

**गाग**—न गगेचें पाणी 'कां वोघ साडूनि गांग।' -ज्ञा १४ ३५३ [स] -वि गगेचें, गगेसबधीं 'आता निर्वाळूनि कनकें। भरिला गांगेंपीयूखें।' -ज्ञा १६ १९७ [स गगा]

**गांगउडा**—पु (व) गर्दी, घोंटाळा गागरडा पहा

**गागजणें**—गागण पहा

**गागणें**—अक्रि १ ओरडणें, मोठ्यानें बोलणें, गर्जना करणें 'हलुच तिस म्हणे हे गागसी का गव्हारे।' -सारुह ४ ७२ 'तू मोठ्यानें गागलास म्हणून भिणारा नाहीं' २ मोठ्यानें बोलावणें, हांक मारणें ३ त्रासणें [स गर्ज्, गद्, घघ्?]

**गागर्या**—वि (गो) तोतरा [पोर्तु.]

**गागर**—पु एक मासा, गेगर हा कोरड्या हवेंत असतो.

**गागर**—वि (व) ढेरपोट्या

**गांगरडा, गांगर्डा**—पु १ आरडाओरड, कोलाहल, गलबला २ एक कुळी 'चित्रकण्याच्या पाटलाची एक कुळी गांगर्डा' -गागा ३० [ध्व]

**गांगरणें, गागारणें, गांगावणें, गांगणें**—अक्रि भीतीनें घाबरणें, गोंधळणें, सुचेनासें होणें 'त्यानें दोन शब्दांचा अर्थ विचारताच तो गागरला' [ध्व गा?, प्रा गग्गर= अति अस्पष्ट वक्ता] **गागी-गुगे घनिष्ठा करूं लागणें-म्हणणें**-(ओश्याला कढली दाखविल्यास तो काहीं बडबडत आतक पहातो त्यावरून) गोंधळण, गागरणें, काहीं तरी बडबडणें

**गागरा**—पु (व) धूळ, कचरा, धुरळा

**गागा**—वि पाढरा, तांबूस छटा असलेला पाढरा, (शेपटीखालीं व तोंडावर तांबडा बाकी सर्व पाढरा-घोड्याचा रग) 'शुद्ध श्वेत निर्मळ। गाग जैसें सोज्वळ। त्या वर्णाचे केवळ। ते गागे घोडे।' -गीता १ ७८४ [स गगा]

**गागाचार्य, गागादीक्षित, गागाभट्ट**—पु (मूळचा गागाभट्ट हा अति विद्वान पडित असून त्यानें शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक केला होता त्यावरून) (ल) दिखाऊ ढोंगी विद्वान, भक्टो-विकट पडित **गागाभट्टी**-स्त्री, १ गागाभट्टानें

लिहिलेला धर्मशास्त्रावरील ग्रंथ २ (ल) विशेषें आडवर, अवटो विस्ट पांडित्य

**गागावणें**—अक्रि आरडाओरड करणें, खेकसणें, रागानें ओरडणें, गागणें पहा

**गागाळी**—स्त्री (कों) गान्हाणें, तक्रार, फिर्याद, कागाळी

**गागो**—पु (राजा) गावाची व गावांतील गुरांचें रक्षण करणारी एक देवता, ग्रामदेवता [प्रा दे गामगोह=गावचा मुख्य ?]

**गाज**—पु (गो) गाजावाजा, भयंकर आवाज, ओरड. [स गर्ज्, प्रा गज्ज]

**गांज**—स्त्री (गो) ओरखडा [गाजणें]

**गांजणी, गांजणूक**—स्त्री १ जाचणूक, त्रास, छळ, गांजणें 'वाटे त्या धरितील तुज तरुणी, होते मला गाजणी' —आक ८ २ गाजल्यामुळें होणारें दुःख [गाजणें]

**गांजणीचें गवत**—न एक प्रकारचें मसाल्याचें गवत

**गाजणें**—अक्रि १ वाजणें, शब्द होणें, गर्जना होणें, गरजणें, गागणें (मेघ, पडघम, नगारा) 'तो गाजत असे अद्भुतु।' —ज्ञा ११२६ २ दुमदुमणें, घुमघुमणें, प्रतिध्वनि होणें, नाद निघणें (वाद्यें इ० चा) 'आम्ही गाजत वाजत गेलों शिबिरासि विजय साधूनी।' —मोभीष्म १० ११८ ३ जगजाहीर होणें, प्रसिद्ध असणें, सर्वांना माहीत असणें ४ डौल मिरविणें 'कां रूपें वयसा माजा। आथिलेपणें कां गाजा।' —ज्ञा ९ ४३२ [स गर्जन, प्रा गज्जण, हिं. गाजना]

**गांजणें**—उक्रि १ चैन पडूं न देणें, छळणें, जाच करणें, यातना देणें २ खणपटीस बसणें, निकड लावणें, सचोटीनें पाठ पुरविणें —अक्रि जाच, छळ, त्रास, सक्ति इ० होणें, सोसणें, गांजणूक काढणें 'आइल गांजिळ पीडिले संसारी। त्याचा तूं कैवारी नारायणा।' —तुगा ८८३

**गाजती राणीव**—स्त्री श्रुतींची गर्जना —मनको

**गाजर**—न एक कंद, हा लांबट, तांबूस रंगाचा असतो याच्या झाडाची उंची हात-सव्वा हात असते गाजर गाई-म्हशींना घालतात त्यास त्या पुष्कळ दूध देतात [स गृंजर, प्रा गज्जर, फा गज्जरी] (वाप्र) —रासारखा होणें-रागानें तांबडा लाल होणें म्ह० १ जेव्हां येते वेळ, तेव्हां होते गाजराचें केळ २ गाजराची चोरी व फांशीची शिक्षा ३ गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर मोडून खाल्ली=ज्याच्यास फायदा होईल नाहीं तर तोटा तरी खास होणार नाहीं अशा अर्थी ०पारखी-ख्या-पु गाजराची परीक्षा करणारा, अक्कलेचा खंदक, शुंभ, दीडशहाणा माणूस, मूर्ख, रिकामा डौली, परीक्षा नसणारा मनुष्य (कुत्सितार्थी) 'आम्ही पुरुषांची जात अशी गाजरपारखी आहे' —कीचकवध सामाराभद- ०मुटके-पुअव गाजरांचा कीस मसाला घालून डाळीच्या पिठांत मिसळून तळलेले गोळे. —गृशि १ ३५८ ०सुंय-स्त्री नरम नाजूक खूर (घोड्याचा) ०सुंबा-म्या-वि गाजरसुंबाचा (घोडा) —राची तुळा-तुला पहा म्ह० गाजराची तुला आणि विमानाची वाट

**गाजरा**—वि गाजरासारखा ठिसूळ व नरम (घोड्याचा खूर) ०तीळ-पु १ काळा तीळ गाजराच्या पदार्थांत याचा मसाला घालतात म्हणून २ गाजराच्या रंगाचा तीळ (शरीरावरील)

**गांजवा-जिवा**—पु पिशवीसारखें जाळें (फळें वगैरे नेण्याचें) गजवा पहा 'मोहरी पावा गांजिवा पाठीं।' —निगा १७

**गांजवा**—पु एक औषधी मूळ, काष्ठौषधी

**गाजविणें**—उक्रि १ वाजविणें, गर्जना करणें, आरोळी मारणें, डुरकळी फोडणें २ प्रसिद्ध करणें, डांगोरा पिटणें ३ (विशिष्ट नामाशीं संयोग होऊन) मोठीं, प्रतापी, कीर्तिमान, आश्चर्याचीं कृत्यें करणें, प्रसिद्धीस आणणें उ० तरवार गाजविणें= शौर्याचीं कृत्यें करणें, कीर्ति, नाव इ० गाजविणें=आपल्या नांवानें कीर्तीनें जग भरून टाकणें लग्न, मुंज प्रयोजन इ० गाजविणें=लग्न इत्यादि मोठ्या थाटमाटानें साजरें करणें इतर कारागिरी, चाकरी डंका इ० गाजविणें गाजवून वाजवून करणें-एखादें कृत्य उघडपणें व प्रसिद्धपणें करणें [गाजणें]

**गाजा**—पु १ (राजा) आरडाओरड २ (बालभाषा) मेघ 'गाजा गाजा गाजू दे। तवशी ओपळी लागू दे।' [गाजणें] ०वज्य-न गलबज, गडबड, गोंधळ 'गाजावज्यही न धरावें।' —ज्ञा ४ ३१ ०वाजा-वाज-वाजी-पुस्त्री १गाण, गायनवादन २ (ल) कीर्ति, प्रसिद्धि ३ गवगवा, बोभाटा [गाजणें+वाजणें]

**गांजा**—पु भांगेच्या झाडाचीं वाळलेलीं फुलें, देंठ, मंजिऱ्या, तुरे गांजाचें झाड सुमारें ३ हात उंच वाढतें यास अंबाडीच्या पानासारखे तुरे येतात हे सुकवितात याच्या चुऱ्यास भांग म्हणतात भांग पाट्यावर वाटतात, त्यास घोटा म्हणतात गांजा-भांग यानें निशा येते गांजाच्या व्यसनी माणसास गंजेकस म्हणतात 'गांजा ओढू नको सुरा पिउ नको। तूं भांग घोटूं नको।' [स गंजिका=दारूचा पिठा, हिं गांजा-जा, गंजा=एक वनस्पति]

**गांजा**—पु पिशवीवजा जाळें गांजवा, गाझा पहा

**गाजी**—पु लावा किंवा लाहूरची एक जात [गांजिकाय]

**गाजी**—वि १ धर्मवीर, धर्मसंरक्षक २ शूर, योद्धा; पराक्रमी, महत्कृत्यें करणारा 'यवादा आइळे गाजी।' —दा१६ ८५ [अर. घाझी] म्ह० क्षणामध्यें गाजीचा पाजी, पाजीचा गाजी होतो ०मर्द-पु १ शूर, वीर इ० २ (कौतुकानें) पोरगा [फा घाझी+मर्द]

गाजीनणें—अक्रि (काव्य) गाजणें पहा 'गगनु गाजी निलें।' –दाव ७०.

गांजील-मूस—पु (गो) गांधील माशी.

गांजूल—न (गो) कुदप उपडण्याचें (विळीशिवाय) एक हत्यार [पोर्तु]

गांजेकस—वि गांजा ओढण्याचें व्यसन असणारा, गांजा पहा. [हिं]

गांजो-झो—पु (गो.) १ पश्याच्या शरीरांतील अन्नाची पिशवी, कोठा २ माणसाच्या पोटावरची कातडी, गांजा पहा

गांझा—पु गांजवा, गांजा, आंबे इ० ढेलणीनें गोळा केल्या नंतर ते ठेवण्याचें आळें, हारा, ढेला, सारणी. [फा गन्ना, तुल० सं गंज, हिं गजिया, तुल० इं गॅझ]

गाटा—पु. (व) १ पाणी धरून ठेवणारें व चिखल होणारें शेत २ चिखल, गारा 'नाल्यात गाटा झाला आहे' [हिं गारा ?]

गाटा-टी-ट्या—वि हट्टी, दुराग्रही, स्वच्छंदी, हेकड, हटेल 'जात होते मथुरेच्या हाटा। तेथें आला यशोदेचा गाटा।' –मन्व ११६ गाटें–क्रिवि हटवादानें, हट्ट धरून

गॉटॉ—पु (गो) शिजलेला दाणा, दाटा.

गाटेगीळ—वि (व) कधीं न चिडणारा, शांत, मुख स्तंभ 'एवढें त्याला चिडवलें ना, पण तो पुरा गाटेगीळ पडला, कांहीं रागावला नाहीं' [गाठ+गिळणें ?]

गाटेगोटे—पुअव १ दगडगोटे. २ (ल) मूर्ख अडाणी लोक 'फार माजले गाटे गाटे।' –अफला ६५ [गोटा द्वि]

गांठ—स्त्री १ तिढा, अढी, गुढाळा, वेटाळें, गुंतागुंत इ० हिचे प्रकारः–निर–सुर–सुट–आयुड–पोकळ–ब्रह्म–आढाणी–खुण–चाडे–निसर–गांठ २ झाडाचें टेंगूळ, लाकडातील गा। गुळुव ३ बोरू, ऊस यांच्या दोन पेऱ्यामधील सांधा ४ (ल) शरीराचा गोल मांसल भाग, पोटरींतील बेडकी ५ स्त्रियांच्या गर्भाशयांतील गर्भ ६ सामना, भेट मुलाखत, दृष्टादृष्ट, उत्तरप्रत्युत्तर ७ कामकाजाचा संबंध, व्यवहार प्रसंग (क्रि० घालणें, असणें, होणें) 'बळवानाशीं गाठ आहे विचार करून बोल मजशीं मशीं, माशीं गाठ, तुज्शी–त्याशीं गाठ' ८ विष तोंडाचें (माथळें) गळू कंठ तुड, सूज, अवधाणा, बेंड, (प्लेगच्या आजारांत बहुधा सांध्यात गाठ येते) ९ परिणामाचा भविष्याशीं बसलेला ताळा, मेळ, तसेंच गोष्टींचा मेळ, कालैक्य, समकालिकत्व 'बोलाफुलांस गाठ पडली' १० एकवाक्यता, संगति, संबंध, मेळ 'त्याच मागचें बोलणें व पुढचें बोलणें ह्यांत गाठ नाहीं' ११ पैशाचा कसा, थैली (मूळांत पैसे ठेवून वस्त्राला मारलेली गाठ) १२ (अव) कपाळावरील आठ्या १३ सोय, सवड 'तुमचे रुपये मला गाठ पडेल तेव्हां देईन' १४ वेंबीभोंवतालची ग्रंथी किंवा काठिण्य, ही प्राण व अपान या दोन वायूंच्या संयोगानें बनते असें म्हणतात १५ (ल) बंधन, आळा, बेडी; अंगेळा 'ऐसा निर्विकार अगमेठी। न चालती द्वैतभावाच्या गाठी।' १६ अढी; पूर्वग्रह 'त्याजविषयीं जर आपल्या मनांत गांठ आहे तर' –नि १४९ [स ग्रंथि, प्रा गंठि, फ्रेंजि गेड] (याप्र) ०घालणें–ठेवणें–१ लक्ष्य ठेवणें दृष्टि पुरविणें, मनावर घेणें 'हा मतलबाशीं–स्वार्थाशीं–तात्पर्याशीं–कामाशीं गाठ घालतो–ठेवतो' ०घालणें–१ भेटणें, एकत्र येणें, समोरासमोर येणें २ चढाई करून जाणें, सामना घेणें 'घालीन गांठ त्यातें, मी कीं मारील तो मला आजीं।' –मोकर्ण २० २१ 'रोम सारख्या कसलेल्या सस्थानशीं गाठ घालून. ' –नि ५५ ०घेणें–भेटणें ०पडणें–भेट होणें 'सर्व मग मम अज्ञानतम झडेल।स्वजन सधाशीं गाठही पडेल।' –भा भा भिडे ०लागण–(गो) इच्छा होणें गांठीस असणें–हुकमात किंवा ताब्यात असणें, जवळ असणें 'ऐसें गांठीस असता शस्त्र। तुज भय नाहीं जे।' २ शिल्कीस ठेवलेला असणें, संग्रही असणें (पैसा इ०) म्ह० आपण करील तें काम, गांठीं असेल तो दाम (कतरी) गांठीस करणें–साठविणें, राखणें, शिल्लक ठेवणें जन्माची गांठ–विवाहसंबंध, हिंदू लोकांत एकदां लग्न झालें म्हणजे तें मृत्यूपर्यंत कायम टिकतें. सात गांठी देऊन ठेवणें किंवा सात गांठीपलीकडे ठेवणें–केव्हांहि खर्च न करण्याच्या उद्देशानें साठविणें म्ह० १ गांठीचा एक बाहेरच्या शंभराबरोबर=आपल्या हातीं असलेली गोष्ट अपेक्षित गाठीपेक्षा जास्त महत्त्वाची आहे २ गांठचें द्यावें पण जामीन न व्हावें ०चा–चा–चें–वि जवळचा, स्वतःच्या कह्यातील थैलीतील पदरचा, कडासरीचा म्ह० १ खोटा तरी गाठचा वेडा तरी पोटचा २ (गों) गाठचें खर्चून दुसऱ्याचें उत्रौपन्हरच खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणें ०चा वाहणें–स्वतःचा पैसा (शिलकी) खर्च करणें 'जामीन रहा आणि गाठचें वहा' गांठळ गुंजट–गुठळ–वि गांठीगाठींचा. ०दाम० सोडावण–पु लग्नांत वधूवरांच्या पदराची गाठ सोडविण्यासाठीं वधूच्या बहिणीस दिलेलें बक्षीस, करवलीचा मान ०वल–वेल–न (गो) दवाचा नवस फेडतांना एकमेकांच्या पदरांस गाठ मारून पूजा करणारें जोडपें, चोहर हा प्रकार जत्रेच्या दिवसांत दृष्टीस पडतो ०सर्पळी–स्त्री (गो) गाठी गाठी असलेली सोन्याची साखळी [ग्रंथि+सर्प] गांठळ, गांठाळ गाठेळ–वि १ गांठी असलेलें, गाठीचें (लाकूड) २ (ल) मांसल, धष्टपुष्ट

गाठडी—स्त्री गाठोडें, गठडी पहा

गांठण—स्त्री १ गुंतवणी, वीण, गायण (कुपणाच्या काट्याची, बांबूच्या तट्या, खाट ताटी इ० ची), छपराच्या

ओमण रिफाइ इत्यादींची बांधणी ( कृति व काम दोन्हीहि ) २ गाठ मारलेली स्थिति किंवा गाठींचें काम ( क्रि० देणें, मारणें बांधणें, सोडणें सुटणें, तुटणें इ० ) [ स ग्रथन ]

**गोंठणी**—( गो ) गुरांची रानांतील दुपारची विश्रांति, गोठण ' आमची गोरवा गाठणीं दवल्यात ' [ गोठण ]

**गांठणें गांठविणें**—उक्रि १ गाठीनें बांधणें जोडणें गांठ देणें–मारणें गाठळणें (दोरी सुत इ० नीं) २ गाठीनें बद्ध किंवा सुरक्षित करणें दोरींत ओवून हालेनासें करणें ( माळेंतील मणी इ० ) ३ ऐन वेळीं जाणें, अवचित धरणें किंवा अडविणें, ऐन संधि साधणें व पकडणें 'त्याला चोरांनीं ऐन खिंडींत गाठलें' ४ ( ल ) आकळणें वश करून घेणें, वठणीवर आणणें कह्यांत आणणें ' हा पराकाष्ठेचा दुराग्रही याला गाठेल तो धन्य।' ५ मिळविणें, संपादणें ' सर्वत्र तू यशस्वी त्वद्धामें यश सुखचि गाठवें।' –मोसभा १ ६८ ६ मपविणें, साधणें पोंहोंचणें (प्रवास मजल मुक्काम गाव ) ७ ताब्यांत आणणें, कबजा घेणें (देश प्रांत यांचा) ८ भेटणें भिडणें, सन्मुख होणें [गाठ]

**गाठलें**—न १ मुलें किंवा स्त्रिया यांच्या गळ्यांतील पुतळ्यांची, रत्नांची किंवा मण्यांची साधी माळ, एक अलंकार, यांत पुतळ्या, वाघनखें, पदकें इ० ओंवलेलीं असतात २ (व ) (गाठळ्)=मंगळसूत्र ३ ( कु ) साखरेची गाठी, साखरेच्या पुतळ्यांची माळ [ स ग्रंथिल ]

**गाठलें माठलें**—न *ब्राह्मणांत प्रसूतीनंतर तिसऱ्या दिवशीं* कच्च्या सुताला हळद लावून पिवळें करून त्याला काळ्या घोंगडीची दशी व निरगुडीचा पाला बांधतात व तो दोरा मुलाच्या गळ्यांत बांधण्याचा प्रकार, विधि –बदलापुर २०८

**गाठा**—पु १ खंडोबाच्या भक्ताच्या गळ्यांतील कवड्यांची हसळी किंवा कडें गळा गाठा हिंडे द्वारीं।' –तुगा ४१६ २ (कु ) सोन्याची साखळी असलेला कानांतील एक अलंकार ३ ( ल ) पिंजरा 'पुंपा लावोनि बांधिजे गाठा।'–ज्ञा १३ २३३ [ग्रंथि]

**गाठी**—स्त्री कातकरणीच्या गळ्यांतील पोत –बदलापूर १२८

**गा(गां)ठी**—स्त्री १ खारीक खोबरें लवंगा,जायफळ इ०ची माळ, गाठलें (मुलांचे) २ होळीच्या सणांतील गळ्यांत घालावयाची साखरेच्या पदकांची माळ ( ही होळी–पाडव्याला मुलांना देतात ३ –पु (राजा ) मळवाच्या पानांचा गाठलेला तुकडा किंवा त्या पानांची सुपारीएवढ्या गाठींची दद्यातील भाजी, अळुवडी ४ गाठ या स्त्रीलिंगी शब्दाचें अनेकवचन ५ (गो ) दाण्याची भाजी ६ (गो ) मूग इ० कडदणांची पालक भाजी इ० मुगाची, घण्याची गाठी ७ अहंकार, आग्रह –दार –वि हट्टी [स ग्रंथि]

०कि(चि)राईत, गांठिकि(चि)राईत–न एक प्रकारचें चिराईत ०चा दाम–मान–पु गाठदाम–सोडावण पहा **गाठींव**–वि गांठलेलें, गाठींनीं कायम केलेलें ( हार, माळ ) [ गाठणें ] ०हळद–स्त्री गाठी गांठी असलेली हळकुंडें

**गाठुलीमाठुली**—स्त्री अव ( बायकी ) बाळंतिणीच्या ५ व्या दिवशीं सुईण व बारशाच्या दिवशीं घरच्या स्त्रिया मुलाच्या हातापायांस व कमरेस जे दोरे बांधतात ते गाठलें–माठलें पहा [ गाठलें द्वि ]

**गाठूर**—पु. घोड्याचा एक रोग, टाचक –अभप २ २६०.

**गाठे-ठो**—पु ( ) कु ) कानांतील अलंकार गाठा अर्थ २ पहा म्ह० ( कु ) गांठा शेंडलो कान मुडलो=दागिना गेला व तो घालण्याच भोंकहि बुजलें

**गाठेविटप**—क्रि ( गो ) कटाला वीट येणें

**गाठोडी-ळी**—स्त्री लहान गांठोड, गठडी [स ग्रंथकुटी–गांठकुडि–गाठोडी –भाअ १८३४ ]

**गाठोडें-ळें**—न १ गाठ, गठ्ठा, बोजा, बोचकें (गाठ मारलेलें, वस्त्रांत बांधलेलें कापड इ० चें ) २ ( ल ) पुंजी, भांडवल, मालमत्ता, संपत्ति, ऐवज, द्रव्य, गुप्त धन 'तुझ्या बापाचें गाठोडें येथें पुरलें नाहीं' ३ नागपंचमीच्या दिवशीं केलेलें लाकडीचें दिंड (एकपक्वान्न) [स ग्रंथ्=रचणें] ०आटोपणें–गुंडाळणें–बांधणें–१ आवरणें, आखडणें, बंद करणें (व्यापार धंदा, कामकाज ) २ पळून जाणें, निघून जाणें ३ मरणें ०होणें–जमणें–लठ्ठ गबर श्रीमान होणें

**गाठ्या**—पु १ गांठा अर्थ १,२ पहा २ भाजीकरितां केलेली मळवाच्या पानांची गाठ गाठी अर्थ ३ पहा नेहमीं अनेकवचनीं प्रयोग जसें– गाठे आळू ३ सुमारें ९ इंच लांबीच्या काहसर वेलीचें (ताण्याचें) नाव ४ तीन इंच उंचीची एक वेल [ गाठ ]

**गाठ्याळ**—वि १ गाठाळ, गांठळ. ' गाठ्याळ वेळू वेत्र जाती।' –मुआदि १७ १०४ २ ( ल ) आंतल्या गाठीचा, खोल मनाचा ' कपटी कुटिल गाठ्याळ।' –दा २ ३ २३ [ स ग्रंथिल ]

**गाड**—न ( व ) फट

**गोंड**—न ( कों गो ) मूळ

**गाड**—स्त्री १गुदप्रदेश, ढुंगण २ मलद्वार, बुढ्ढी, बोचा ३ मागची अथवा खालची बाजू बुड अथवा तळ(वस्तूचा) [स गुद] (ग्राम्य ) ०गुडाख होणें–क्रि भीतीनें दबून बसणें, पडणें, पेटके वगैरेंनीं आखडलें जाणें ०जड होणें–गर्विष्ठ बनणें, शेखी चढणें ०तोंड हातीं धरणें–बाहेरख्यालीस किंवा बाजूपणास प्रवृत्त होणें, सोकावणें, बदफैलीपणा व अविश्वास ह्या दोन्ही गोष्टी करणें ०फाटणें–भीतीनें गांगरणें, लेंड्या गाळणें, गर्भगळित

होणें ०मारणें–१ गुदमैथुन करणें, मुहती सतरणें ०घलणें गांडीवर रेघ ओढणें–मागें सरणें, नाकबूल करणें **गांडी खालचें घोडें**–न उपजीविकेचें साधन (नोकरी, व्यापार धंदा वगैरे) **गांडींत सुंठ फुकणें**–गाडींत काडया घालणें, एखाद्यास उत्तेजन देणें, भर, फूस देणें २ (ल) शिक्षा, फजिती करणें, पराभव करणें **गांडीवर घाव घेणें**–काम काजांत फजीत होणें, अपमानानें मागें सरणें, पराभव पावणें **गांडीस हात पोंचणें**–मातापितादिकांच्या ताब्यांतून सुटून स्वच्छंदानें वागण्यास मोकळें होणें म्ह० १ गांडीवरचा घाव झांकतां नये आणि दाखवितां नये २ गांड फाटे पण कपडा न फाटे ३ गाडींत नाहीं गू कावळयाला आमन्त्रण=शक्तीबाहेरचें काम कर ण्याचा आव घालणें कांहीं महत्त्वाचे सामासिक शब्द पुढें दिले आहेत – ०कणी–स्त्री गोणीच्या मागचा पट्टा, लेंडी याच्या उलट उराठी ०गमाऊ–वि बेमअकली, मूर्ख, नालायक ०गुद्दघा–घी, गांडगुंडा–पुस्त्रीपु गांडीवर गुडघ्यानें मारलेला ठोसा (क्रि० देणें, मारणें, बसणें) ०गुलामी–स्त्री मानहानीची खुशामती, फार हांजीहांजी ०गोटा–पु (ना) पाण्याच्या अभावीं दग डानें गाड पुसणें ०चाळणा–पु चहडी ०जोरा–पु (अशिष्ट) मागून दुजोरा, अनुमोदन, फूस, पाठ पुरावा (क्रि० देणें) ०पिटकी–स्त्री १ ढुंगणावर ढुंगण आपटणें (लहान मुलांत रूढ) २ खेळीमेळी, दाट मैत्री ०पुरा–वि हलकट, नीच, क्षुद्रक, य:कश्चित ०पोतें–न (कु) जाडेंभरडें वस्त्र, नेसणें ०फोला–पु ढुंगणावर आलेलें गळू, व्रण, क्षत ०भरू–वि (निंदावाचक) सपत्तिमान, द्रव्यवान धनवान, श्रीमंत ०मणा–पु गुह्य गोष्ट राग नको धरू मनीं। गांडमणी सांगतों॥ –तुगा ३००३ ०माहुळ–महांहुळ–पु काळ, लाल रंगाचा, दुतोंडी, पावसाळ्यांत उत्पन्न होणारा उरगामी किडा ०मैत्री–मैत्रिकी–स्त्री गांडपिटकी अर्थ २ पहा ०मोडी इरलें–न माणूस वाकलें असतां दुमडून ढुंगण झाकलें जाईल अशा पद्धतीचें इरलें ०मोडा मुंगा–स्त्री एक मुंगीची जात (ही चालत असतां हिचें ढुंगण मोडल्यासारखें दिसतें) ०मोरा–वि पाठमोरा, ढुंगणाकडून तेव्हां त्याला गांडमोरा वर बोलावलान् '–लोक २ ४६ ०रग–स्त्री खोटा अभिमान, अहंकार, रिकामा तोरा, ताठा, बढाई ०राऊ–वू–पु गाडू, गांडभरावू गडया ०वळ–पुन (कों) काडू गांडमां हूळ पहा ०सुकाळ–ळा–ळ्या–पु गांडराऊ–वू पहा

**गाडगा–गें, गाडला–लें**—पुन लहान मडकें 'तव गरळ वमिलें उरगीं। त पडिलें गौळणीचें गाडगीं '–कथा २ १५.४१ [स घट, का गडिगे] म्ह० ताकास जाऊन मग गाडगें लपवू नये

**गाडगुलाव**—वि (गो) लठ्ठ व ढेंपू. [गाडगूल]

**गाडगूड**—स्त्रीन १ (तोफा बंदुका, मेघ याचा) गडगडाट, धडधडाट २ पोटांतील गुरगुर, कुरकुर ३ (ल) काळजी, चिंता, धस्स होणें (पोटात या शब्दाशीं जोडून योजना) [ध्व]

**गाडगूल**—न (गो) लहान गाडगें, मडकें [गाडगें लघुत्व]

**गाडगे(ग्या) आंबा**—पु मडक्याच्या आकाराचा मोठा आंबा

**गाडण**—न (ना) चिखल, दलदल [स गाढ, हिं गाडा=गढूळ, चिखली]

**गाडणें**—उक्रि १ (खड्यांत) पुरणें, मातीआड, भूमिगत करणें २ मूठमाती देणें ३ (ल) (न भितां एका जागेवर) पाय रोवणें, टाकणें ' म्हणून गाडून उभे राहिले '–भाब ८० [स गर्त, प्रा गड्ड, हिं गाडना, का गड्डायिसु]

**गाडतक हानाव**—पु (कों) (नाविक) पहिल्यानें कोंदीला तिरपा, नंतर सरळ व पुन्हां तिरपा असा सांधा जोडणें हा हानाव फार मजबूत असतो [गाडणें+हानाव]

**गाडद**—पु पाहारा, चौकी 'मामा यांजकडील गाडद आहे ' –खरे ४९७८ [इ गार्ड]

**गाडदी**—पु शिपाई, पायदळांतील शिपाई विशेषत शरीर सरक्षक शिपाई पाहारेकरी पेशवे, इतर सरदार व राजे यांज वळ असे गाडदी असत यांत विशेषत परदेशीय व मुसल्मा नाचा विशेष भरणा होता गारदी पहा [पोर्तु गार्दा, इ गार्ड]

**गाडली लें**—स्त्रीन (प्रां) लहान गाडी [प्रा दे गड्डिआ=गाडी]

**गाडवाट**—स्त्री गाडीचा रस्ता, गाडीवाट [गाडी+वाट]

**गाडहत्यारी**—वि मोठेंधारकरी, शूर मर्द, तरवार (भाला) वगैरे शस्त्रांनीं जवळून लढणारे ' आम्हाकडील आधींच गनीम यांचे कच्चे दील गाडहत्यारी निढवले तरि झाडास बांधले तरि झाड घेऊन जातील '–भाब ९ [गाडे+हत्यारी]

**गाडा**—पु १ ओझें नेण्याची गाडी, पेटा किंवा चौकटी खेरीज गाडी ' म्हणे मी गाडा जुंपिलों होतों। '–पच १ २६ म्ह० भरल्या गाड्यास सूप जड नाहीं २ चाकाचा घेर, रहाटाचा वृत्ताकार अंश ३ कडें वेढें सागाडा, वलय (ढोल, तबूर डफ, चाळण, नथ इ० चा) ४ (तंजा) चाक **संसाराचा गाडा**–पु आयुष्यांतील एकंदर व्याप कामकाज, खटाटोप, आटापीट संसारासबंधीं खटला, प्रपंच पसारा [प्रा दे गड्डिआ] (वाप्र) **चालत्या गाड्याला खीळ घालणें**=चालू काम बंद पाडणें अडविणें **गाड्याला जुंपलेला**–वि कामाचा रगाडा पाठीमागें असणारा, नेहमीं कामांत गुंतलेला **गाड्याबरोबर नाव नावेवर गाडा**=(कधीं नाव गाड्यावर घालून नेतात तर कधीं गाडा नावेवर घालून नेतात त्यावरून)

१ कामाची उलटापालट, अदलाबदल चक्रनेमिक्रम २ दैवाची उलटापालट किंवा फेरा, दुःखांची भरभराट व सज्जनाची पडती वेळ याअर्थी शब्द- ०नाडा-पु सामान, प्रपंच, पसारा इ० गाडा पहा 'या सावकाराचा गाडानाडा कवडा हो ! [गाडा द्वि०] ०भर- १ गाड्याच्या भरतीचे ओझें २ (ल) पुष्कळ सामान -वि फार पुष्कळ, अफाट ०भर अन्न घाहणें-अन्न मुठी नसणें याअर्थी ०उतार- नदींतून गाडी जाण्याचा रस्ता ०करी पु गाडी हांकणारा, गाडीवान ०कार (महानु) वेरे दण्याच कम करणारा फरास 'भगओनि ते गाडकार हींडी । -शिशु ५६८ ०घगाड-न एक प्रकारचें ल्हान बगाड, हें गाड्यांत ठेवलेलें असतें व तो गाडा दवाभोंवती फिरतो ०भिगाऱ्या-गाड्या भिगोऱ्या-क्रीभव ०गाडे भिगारे-पुभव सभोंवार गिर काढ्या मारण्याचा मुलांचा एक खेळ हा खेळ धारस्यंदन कालींहि होता -मधाप ४ ४ २५७ ०वाट-रस्ता-मार्ग-स्त्रीपु गाडीची वाट, गाडवाट पहा म्ह० १ गाड्याबरोबर नळ्यासहि यात्रा=दुसऱ्याच्या बरोबर सहजासहजीं झालेलें काम, 'गाड्याबरोबर या न्यायानें करमणुकी खातर परक्या भाषांचा अभ्यास केला असता त्यापासून दुसरेहि पुष्कळ फायदे करून घेता येतील' के २ भरल्या गाड्यास सूप जड नाहीं ३ चालला तर गाडा नाहीं तर खोडा

गॉडॉ-पु (गो) कैफ नसलेलें मद्य [स गौडी]

गाडा-पु एक प्रकारचा ऊस [हिं गन्ना]

गाडा-वि १ (व) खराब, वेडब, वाईट 'गांडा माल कमी किंमतीला जाईल' २ (गु) वेडा, खुळा

गॉडाघ-न (गो) कुणब्याचें एक गुळाचें पक्वान्न [गुड+अन्न]

गाडाळ-वि (अशिष्ट) १ मोठे कुल्ले किंवा ढुंगण असलेली, पृथुजघना २ जारिणी, व्यभिचारी (स्त्री) [गांड]

गाडी-स्त्री १ माणसं बसावयाचा व सामान ठेवण्याचा पेटी असलेला ल्हान गाडा, छकडा, रथ, शकट, वाहन २ (मोटेच्या विहिरीची) चाक, चाक ३ (राजा) कण्या, कणी, कण्यांनील चाक, फिरकी ४ नय, रफ, इ०चें कडें, सागाडा, गाडा अर्थ ३ पहा ५ (ल) आगगाडी, सायकल मोटार [प्रा गड्डिआ, गड्डि=गाडी] ०चें चाक-(हें उलटसुलट फिरतें यावरून) दोन दगडींवर हात ठेवणारा, विशेषत आपल्या चाकराच्या कोणत्याहि कामांत दोष काढणारा धनी ०घालणें-(व) दशाच्या ढुंग्यावर मातीची भर घालणें ०भराई-स्त्री गाडींत माल भरण्याची मजुरी ०भाडें-न मालाच्या वहातुकीची मजुरी, गाडींत बसण्याबद्दल भाडे ०वान-पु. गाडी हांकणारा, कोचमन, ड्रायव्हर. [हिं] ०वडार-पु. वडारांतील एक जात -खया ९९ ०सुटणें-सपाटयान पाठ म्हणणें

गाडींव-वि गाडलेला पुरलेला, जमीनींत बसविलेला (खांब दगड निशाण इ०) [गाडणे]

गाडींव-पु १ अर्जुनाचें धनुष्य 'तेथ केवळ हातु गेला। गांडिवाचा ।' -ज्ञा १ १९७ २ (सामा) धनुष्य [स] ०गुण-पु धनुष्याची दोरी [स]

गाडु-पु ल्हान मडकें, गडू, बोळकें, गुंडगी 'अमेदार याज कडे सरकारतीच खण व मडकी व घट गाडु .' -मसाप २ १७५ [स गडु]

गाडू गाड्या-वि १ (शिवी) गांडू गांडमारू पद, नपुंसक गांड मुकडा २ दुर्दैवी, हतभागी, कुचकामाचा, नीच प्रतीचा, हलका म्ह० मन पातशाही दैव गाडू ३ (ल) नामर्द, भित्रा, असमर्थ [गांड हिं सिं गांडू]

गाडू(डो)ळ-पुन काडू गाडवळ पहा [म गडू प्रा गड्डल

गाडें-न पंज होड पण (सोंगट्या, जुवा या खेळांत)

गाडें-न १ ल्हान गाडा, गाडी २ व्यवहार काम धडामोड 'व्यापाराचें गाडें । माडलाही अपाडें ।' -अमृ ६ ३१ ३ मालका एका मागून एक यणें, आणें, चक्र

गाडेचिरी-पु प्रासा, एक प्रकारचा मासा

गाडेराव-पु (व) अव्यवस्थित, घरांतली, स्वतःच्या कामाराची दाद नसणारा, वेंधळा माणूस 'त्याच्या घरीं कोणी गृहस्थ येऊन कितीहि दिवस राहिला तरी कळून येणार नाहीं, असा तो गाडेराव पडला'

गाडेसोनाऱ्या-पु (व) एक प्रकारचा वाघ, दोन्या, बिबट्या ह्या आणखी दोन प्रकार

गा(गा)डो(डौ)रा-रें-पुन इमारतीचा पाया, पायांतील भर किंवा पायशोधनी जडा शोधुनि गाडारें । -माए ४८६. की फाडानि आम्ही गाडोरा घातला।' -ज्ञा ११ ५३६

गाड्या-वि गाडणारा पुरणारा म्ह० गाडण्याची वाट आणि गाडल्याची वाट एकच ' [गाडणे]

गाडथा-वि गाडू पहा -क्रिवि ढुंगणानें वर फरपटणारा -जाणारा

गाड्डी-पु (गो) गाडडी पहा

गाढ-वि १ गडद स्वस्थ भरपूर (झोंप) २ निबिड, घन (काळोख) ३ अत्यंत, दाट, घोर (अज्ञान) ४ गर्द, दाट, घनदाट (जंगल) ५ घट्ट मजबूत, दृढ, गच्च, भरपूर 'रसें गाढीं भरी ढिली।' -ज्ञा १७ १२८ ६ आवळ, तंग, बळकट. 'घट्टे मुंडीत गाढीं।' -एरुस्व ७ ७४ ७ मोठा, पुष्कळ द्वात्रिंशद्दस्तावरि करिति महागजसमान गाढ कली ।' -मोआदि २८ ३६ 'तथापि ते बुद्धि न ये च गाढी।' -वामन २ १२

८ शूर, पराक्रमी, खंबीर 'मानवी वीर गाढा।'–मुवन १० ४९ ९ उत्कृष्ट, अप्रतिम 'तुझें सौंदर्य देखोनि गाढें।'–ह १ ३० [स ] ०मूढ–वि अतिशय गडद, घोर, स्वस्थ, प्रशांत (झोप) 'येक ते गाढमुढीं पडिले। सुपुप्तिमधें।'–दा १८ ९ १९ [स गाढ+मूढ]

**गाढणें**—सकि कसणें, घट्ट करणें 'तैसें नितंबावरी गाढिलें। पीतांबर झळके।'–ज्ञा ११ ३२१

**गाढव**—पुस्त्रीन १ रासभ, खर, गद्धा (ज्यावेळीं लिंग भेद उल्लेखिला नसतो त्यावेळीं नपु वापरतात) '२ उकिरड्या वरील एक पांढरा किडा, कसर, वाळवी ३ गाढवी दगड पहा [स गर्दभ, प्रा गड्ढ, हिं गदहा, गधा, फ्रें जि गेर, पोर्तु गे] (वाप्र ) **गाढव ना ब्रह्मचारी**–मूर्खहि नाहीं किंवा शहाणा अथवा साधूहि नाहीं **गाढवाचा नांगर फिरविणें**–एखा द्याच्या घरादाराचें किंवा वतनवाडीचें वाटोळें करणें एक जुना शिक्षेचा प्रकार गुन्हेगाराचें घर जमीनदोस्त करून त्याचें शेत करीत **–वाच्या लेका**–एक शिवी म्ह० १ गाढवाच्या गोणीस खडीभर तूट किंवा भोलें=लागणाऱ्या सामानापेक्षा नासधूस जास्त होते तेव्हां म्हणतात प्रमाणाबाहेर लुच्चेगिरी, नाश २ ज्याचें त्याला आणि गाढव ओझ्याला=ज्याचें ओझें त्याचेकडे जाईल गाढव फक्त ओझें वाहून नेण्याचें मालक (वाप्र ) **गाढवाचा खरारा**–पु मूर्ख, टोणपा, मनुष्य **गाढवी दगड–धोंडा**–पु ओबडधोबड दगड

**गाढवा–ण**—स्त्री गाढवाची मादी [ गाढव ]

**गाढहत्यारी**—वि मोठे धारकरी, शूर, मर्द, तरवार, भाला वगैरे शस्त्रांनीं लढणारे [ गाढें+हत्यारी ]

**गाढा**—वि १ गाढ, घट्ट, दाट ( पातळ पदार्थ ) २ दाढग, मजबूत, बळकट, धटमूट (शरीर) 'तैसा भुजौ निजो गाढा। परि म्हो।'–ज्ञा १८ १०६२ ३ शूर, पराक्रमी 'ऐसें करवेशें कोपला वीर गाढा।' राक १ १५ ४ प्रवीण, तरबेज, पक्का, बाका, निष्णात, पराईत (वाईट किंवा चांगल्या गुणांत) 'गाढा खाडिल गाढा गायक' ५ दृढ, अचल 'दतीं म्यां देवदत्ती धरुनि मुरडिला शैल कैलास गाढा।'–आसी ३२ ६ (व ) खोल मनाचा, गुपित न फोडणारा [ गाढ ]

**गांढा**—वि (प्रा ) गांडू पहा

**गाढिका**—स्त्री दृढता, बळकटपणा 'म्हणोनि आवना चिया गाढिका।'–ज्ञा ६ ३६४

**गांढूळ**—पु गांडूळ पहा

**गाढें**—वि भक्तिपूर्वक केलेलें, कळकळीचें दृढभावदर्शक 'ऐसें करितां स्तवन गाढें।'–मुआदि २ १३३ 'गाढा पहा

शको. ३ ८

**गाढें**—वि दुर्बल, कमकुवत, गांढ्या पहा ०पण न दुबळे पणा, भित्रेपणा, गाढपणा 'काय देवा नेणों स्वामी गाढेपणें।'–तुगा १२९०

**गांढ्या**—वि (निंदार्थी) पडिया, गाढू, हतभागी, कृपाळ-करटा, गाड्या पहा म्ह० गांवचा गांढ्या तो सांगे ... देव पाड्या [ गाड ]

**गांढ्याळ**—वि भित्रा, दुर्बल, गाढ्या, गांडू पहा. 'देव गाढ्याळ देव गाढ्याळ। देखोनिया बळ लपतसे।'–तुगा ३७००

**गाण**—स्त्री (कों ) डोंगरातील पाण्याची जागा, उथळ विहीर, डवकें, पोखरण

**गाण**—पु १ (गो ) गवई, वदा (जात), देवळी, गायक –नागा २१९ २ (कु ) नायकिणीचा साजिंदा [स. गान, प्रा गाण ] **गाणावाणा**–पु गाणें व वाणणें, गानवर्णन 'घेऊनि गीतार्थ उगाणा। ज्ञानियें जे विचक्षणा। ठाकिती तें गाणावाणा। गीतेचा तो लाहे।'–ज्ञा १८ १५२७

**गाणपत्य**—वि १ गणपतिविषयक सांप्रदायिक २ गणप तीचा भक्त 'गाणपत्य म्हणती गणेश। तो जाण द्वारकाधीश।' –ह ३४ १७८ [स ]

**गाणी**—वि गाणारीण, गायिका, गानी 'जेथें सरस्वती-सारखी गाणी।'–कालिका ४९ **गाणीक**–वि गायक, गाणारा –न गायनचातुर्य **गाणीव**–न १ गायनचातुर्य 'गाणीव जाणीव शहाणीव। ओंवाळूनि साडावी सर्व।'–एभा ११ ७३८ २ गाणें 'बहिरीयापुढ हृषीकेशा। गाणीव करा।' –ज्ञा ११ १५७ [ गाणें ]

**गाणें**—उकि १ गान करणें, गळ्यावर म्हणणें २ कवि पेशात कवन, गायन करणें, काव्यांत वाखाणणी, गुणवर्णन करणें 'गातसे सकळ रामकथा।' ३ प्रशंसा करणें, वाखाणणें, स्तवणें 'साधुजन जे ते निरंतर हरीतें गातात' ४ (ल ) एकच एक सूर लावणें, जपमाळ घेणें, पिरपीर चालविणें, लावणें 'जें प्रथम गात होता गाणें अद्यापि तेंचि खळ गातो।' मोशल्य ३ ७४ [म गै=गान] म्ह० कैलास करावळतों गाणें आणि कान फाटतों लेणें ०बजावणें–न गाणें म्हणणें व वाद्य वाजविणें, गायन वादन (सामा ) संगीत [ हिं गाना+बजाना ]

**गाणें**—न १ गायन, गीत (ध्रुपद, ख्याल इ० ) म्हणणें २ तत्त्वबर्धी ध्रुपद इ० पद कवन ३ (ल ) ( पोरासोरांची ) पिरपीर, टुरटूर, भुणभुण पोरानें खाऊ दे। खाऊ दे। असें दिवसभर गाणें लाविलें आहे ' ४ लावचलांग, कटाळा यावयाजोगें कृत्य, कहाणी, कथा, रडगाणें ( क्रि० गाणें, गात बसणें ) ५ (ल ) काम, कारभार, व्यवहार, देणें घेणें इ० चें सटलें, प्रकरण 'या सावकाराच्या गाण्यांतून मी मोकळा झालों म्हणजे देईन' ६ घडून आल्ली गोष्ट, प्रसंग, वेळ [ स गै–गान] ( वाप्र )

०म्हणणें-साधें पद म्हणणें; साधारणपणें गाणें, हें बहुधा स्त्रियांकडून होतें. शास्त्रीय नव्हे असें गायन करणें. ०गाणें-कुशलतेचें गाणें. हें गवयांकडून होतें; शास्त्रोक्त गायन करणें.

**गात-तें**—न. खाट, पलंग यांच्या चौकटीचीं चार लांकडें प्रत्येकीं. 'तेव्हां पलंगाचें तडतडी गात।' —अफला ७७. [सं. गात्र] आडवें गात न उभें गात-अनिश्चित व असंदिग्ध कृत्य, भाषण, वर्तन (माणसें वगैरेचें). [सं. गात्र]

**गांत**—न. (गो.) दुखण्यानें, रोगानें बिघडलेलें रक्त.

**गात(ता)डी**—स्त्री. १ गव्हाणी; गव्हाणीचा दांडा, फळी. २ गाभाऱ्या(देवाच्या मूर्ती)पुढील खाट, आडवें लांकूड; अडवण. ३ (ल.) गर्दे ढगाची रांग, ओळ. (क्रि० जमणें; धरणें; करणें; मोडणें; विरणें). ४ हातमागावरील लांकडी दांडा. [गात. प्रा. दे. गत्ताडी, गत्तडी=गवादनी, डोणी]

**गातदार**—वि. जोडण्यासारखा सुंभ असणारा (घोडा). यापासून भयव नाहीं. —अश्वप १.१०३.

**गाता**—वि. गाणारा; गायक. 'पोवाडा गाल्याला उद्धाण ऐकल्याला घडो पुण्य।' —ऐपो ६३. [सं. गातृ]

**गाताडा**—वि. १ स्वच्छंदी; अडेल; दुराग्रही. २ मूर्ख; मंदधी; जडबुद्धि.

**गात्र**—न. १ अवयव; अंग. 'नाडीतें सोडवी। गात्रातें विघडवी।' —ज्ञा ६.२१९. २ (शाप. प्राणि.) काटा; सोंड; शिंग (गोगलगाय इ० प्राण्यांना स्पर्शज्ञान होण्यासाठीं असणारा अवयव). (इं) टेंटॅकल. [सं.] ०भंग-पु. गात्रास आलेली अशक्तता, अवयवाची बधिरता; विकलता. 'नको जाऊं देऊं भंग। गात्रें माझीं पांडुरंगा।' —तुगा ११९८ [सं.] ०विक्षेप-पु अंगविक्षेप.

**गात्रीयंत्र**—न. ब्रह्मवीणा; गायनयंत्र. 'गात्रीयंत्राची मिळणी। सप्त स्वरां गुंफितु वेणी।' —शिशु ४४. [सं गायत्र=गवयी+यंत्र]

**गांथण**—स्त्री. कूड, साठ इ०ची बांधणी, गुंफण, वीण; गुंतण (कुडणाच्या उभ्या काठ्यांची); छपराची ओमण; वीण व कृति दोन्ही. [सं. ग्रथन]

**गांथणें**—उक्रि १ गाथणीनें बांधणें; विणणें; गुंफणें; गुंतविणें. २ (गो.) ओंवणें; माळ करणें. [सं. ग्रथन]

**गा(गां)थन**—स्त्री. (गो. कु.) माळ विशेषतः काजू किंवा मासे यांची. [सं. ग्रथन]

**गाथा**—स्त्री. १ कविता; धार्मिक काव्य. २ प्राकृत; छंदरहित रचना; साधें गद्य. ३ फक्किका; पूर्ण वाक्य. ४ गप्पा; भाकड कथा; गटारगप्पा; (क्रि० सांगणें; कुटणें). ५ हकीकत; बातमी. 'सांग तो मज सविस्तर गाथा।' —आपू २. ६ आर्या. 'गाथा म्हणजे आर्या गीति तिपेक्षन विशेष नादवती।' —छंद १२४. [सं.]

**गाथा**—पु. १ गुंतागुंत; घालमेल; गोंधळ. २ घुरकुतलेली, घुटमळलेली स्थिति; अपयश, निगा नसणें. 'विषयाचा काय गाथा। अनुचित की उलथा।' —राला ४४. ०गोवा-वी-पुस्त्री. १ घोंटाळा; घालमेल; गुंतागुंत. २ (विशेषतः) धांदल; तारांबळ; गडबड. 'जन्म हेंचि अकारण। गाथागोवी।' —दा ३.१.४. [गोवणें द्वि.] —वि. व्यर्थ. ! —हंको.

**गाथा**—पु. अभिमान. 'मी देह ऐसा गाथा। आला देहबुद्धीचे माथां।'

**गाथिक**—वि. १ कथा, कहाणी, चरित्रें, गोष्टी इ० सांगणारा-रें. २ गाथा किंवा गद्य रचणारा.

**गादॅच**—(गो.) भुकेनें घेरी येणें. [गादणें]

**गादणें**—अक्रि १ गढूळ, मलिन होणें; पीडणें; मासणें. 'महामळें मन होतें जें गादलें। शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें॥' —तुगा २०७२. २ (व.) तेरे तणानें खराब होणें. [हिं. गाद=गाळ]

**गा(गां)दणें**—उक्रि. (काव्य) गांजणें; पीडा देणें. —अक्रि. पीडा पावणें; पीडित होणें. 'जे भवगीचेनि उपद्रवें। गादले विषभावें।' —ज्ञा १३.२२१. [हिं. गादना=ठासणें]

**गादथेकार**—पु. (गो.) गुत्तेवाला; गुत्तेदार.

**गादरगुदर**—वि. (ना.) मांसल; गुटगुटीत. [हिं. गादर=अर्धपिका; म. गदरणें ?]

**गादला ली**—वि. मलिन. [गादा]

**गाद(दा)विणें**—उक्रि. १ गढूळ, रेंदाड करणें. २ (ल.) विसकटणें; गढूळ, खराब करणें. 'तृणें गादळिये वसुधरे।' —गीता २.१९८९. ३ अव्यवस्थित करणें; गोंधळ उडविणें (सैन्य किंवा कळप यांत). [गादणें.]

**गाद(दा)विणें**—उक्रि. त्रास देणें; चिडविणें; कंटाळा आणणें. [गादणें]

**गादा**—पु. समुद्रांतील देवमाशाच्या जातीचा एक मोठा मासा. (इं.) पोरपोईस किंवा डोलफिन. —प्राणिमो ४५.

**गादा**—पु. राड; चिखल; रेंदा; खळमळ (बहुतेक गढूळ व दाट द्रवपदार्थासंबंधीं; माती मिसळलेलें पाणी, सूप इ०). [हिं. गादा]

**गादा**—पु (व) भातजमीनीचा तुकडा. [गद्दी; का. गद्दे. (गद्दे=जमीन करणें)]

**गादाड**—(गो.) दलदलीची जमीन; गादा पहा.

**गादापादा**—पु. घोळामोळा; घुरकुतलेली स्थिति (कागद, कापड यांची). [गादा द्वि.]

**गादावणें**—अकर्मक्रि. पोटांत गदळ, घाण सांचणें; गदळणें; अजीर्ण होणें; आमांश होणें. [गादा=चिखल]

**गादॉळ**—स्त्री (गो) ओली, दलदलीची जमीन, गादाड [गादा]

**गाद्रिजणें**—अक्रि लिप्त होणें, गादणें पहा 'भगा आकाश के नाहीं। हें न रिघेचि कवणे ठायीं। परि कादिम्नी कहीं। गादिजेना जैसें।'–ज्ञा १३ १११९ [गादा]

**गादी**—स्त्री कागदाचे दहा दस्ते गड्डी

**गादी**—स्त्री १ कापूस भरलेला गाशा, बिछाना, गदेला कोणतेंहि कापूस भरलेलें नरम आस्तरण किंवा बिछाईत, तक्क्या लोड २ प्रख्यात पुरुषाचें आसन स्थान, दर्जा अधिकार, पद, सिंहासन 'राजाचे गादीस इतरानें पाय लावू नये' 'सावकाराची गादी' (=सावकाराचा गाशा) ३ मक्ता, विकण्याचा संपूर्ण हक्क 'मुंबईत तंबाखूची गादी आहे म्हणून दुसऱ्यास विकतां नये' ४ मऊ भाग (हाताचा, जोड्याचा) हुशा, टिका यांचा तळचा गेंदासो विणलेला भाग ५ जनावराच्या पाठीवरील खोगीर [हिं] (वाप्र) **गादीला पाय लावणें**–१ राजाविरुद्ध बंड करणें २ वरिष्ठांशीं उद्धटपणें वागणें, उपमर्द करणें **०वर गोष्टी सांगणें**-गर्विष्ठपणें भाषण करणें सामाशब्द- **०चा चाकर**-पु संस्थानचा नोकर याच्या उलट राजाचा चाकर **०ची चाकरी-नोकरी**-स्त्री राज्याची सेवा **०ची दौलत**-स्त्री राज्याचा (राजाचा नव्हे) खजिना, संस्थानचा खजिना **गादी हुजुर**-क्रिवि सिंहासनासमोर, राजासमोर

**गादी**—स्त्री (गो) दारूचें दुकान

**गादीतंबाकू**—स्त्री (राजा) सुपारी, वाणी व किरकोळ व्यापारी याचें दुकान

**गाद्याळ**—वि. (व) तणानें खराब झालेलें (शेत) [गादणें]

**गाध**—स्त्री १ (ल्हान) फोड, गाठ, टेंगूळ, आवाळू (मुंगी, माशी इ० च्या दंशापासून, किंवा पित्तापासून झालेली) २ गाधीलमाशी किंवा गोमाशी (जिच्या दंशापासून गांध येते ती) [स गधाली, ग्रंथि] **गाधट गाधाड**-न मोठी गांध, गाठ (गाध याचें विस्तारविशेष रूप)

**गांधगी, गांधल**—स्त्री गाधील माशी, गाधीण पहा

**गाधर्व**—न (गधर्वानें गायिलेलें) संगीत, गाणें, गायन इ० [स] **०लग्न-विवाह**-नपु १ वधुवराच्या परस्पर संमतीनें झालेलें लग्न, प्रीतिविवाह अष्टविवाह पहा 'विवाह तव बहुतापरि। पिशाच गाधर्व आसुरी।'–एरुस्व ४ ४२ २ (कायदा) स्त्री व पुरुष यांनीं परस्परावर प्रेमानें मोहित होऊन केलेला सांकेतिक विवाह [गधर्व पहा]

**गाँधाड**—न (कों) गाधट

**गांधार**—न सात स्वरापैकीं तिसरा 'स्वरसप्तक' पहा **०ग्राम**-न गाधार ग्रामांतील एक गायनाचा प्रकार हा भरताच्या पूर्वीपासून प्रचारांतून नाहींसा झाला आहे **०देश**-पु कंदाहार [स]

**गाधिक**—वि गधयुक्त (इ) घायो **०भानिन** (इ) घायाफेन

**गाधी**—पु गधी, औषधी द्रव्यें विकणारा, औषधविक्या, (इ) ड्रुजिस्ट [स गाधिक, प्रा गधिअ]

**गांध्राण-ल गांधल गांधीलमाशी**—स्त्री एक प्रकारची माशी, ही चावल्यानें गांध उठते गाध अर्थ २ पहा या माशा मधमाशांसारख्या टोळ्यांनीं पोळें करून रहतात यातहि नर, माद्या व कामकरी माशा असतात म्ह० उगाच गाधीण चाल विणे [स गधा(घो)ली]

**गांधेल**—न गाधीलमाशी 'गांधेलें म्हणती आमुचें घर।'–दा १ १० ४२

**गान**—न गाणें, गायन (कला किंवा गाण्याची क्रिया) हें वाग्गेयकारांनीं रचून लक्षणबद्ध करून देसी रागाच्या द्वारें प्रचलित केलेलें असतें अनिबद्ध गान व निबद्ध गान असे याचे दोन प्रकार आहेत 'गानरूप ही सृष्टी जाणा।'–विक्र ८७ [स गै] **०लिपी**-स्त्री गाण्यातील बोल, स्वर व ताल वगैरे लिहिण्यासाठीं तयार केलेली चिन्हमालिका **गानवी**-स्त्री (काव्य) बोलणें, भाषण **गानश्रेढी**-स्त्री १ (संगीत) गायनासबधीं स्वरमालिका, स्वरमेलनाच्या चढउतारासबधीं अक्षरपंक्ति २ (गणित) गायनश्रेढी पहा [स]

**गानी**—स्त्री गाणारीण, गायिका 'आळती गानी सरस्वती।'–शिशु ५१ [स] म्ह० कचित् गानी पतिव्रता

**गॉपॉ**—पु (गो) माडाची पोय फुटून न जाता सुर निघावी म्हणून तिच्या भोंवतीं बाधावयाचा दोर

**गाफ(फी)ल गाफली**—वि १ असावध, बेफाम, बेभान २ जड, सुस्त, मूर्ख, निशाखोर, झिंगट, दारूनें धुंद झालेला ३ निष्काळजी, आळशी, बेफिकीर [अर घाफिल] **गाफलाई**-स्त्री बेसावधपणा 'गाफलाई जाहली'–मदरू २ १८ **गाफली, गापली**-स्त्री जिचा मालक मेला किंवा फार दिवस गैरहजर आहे अशी जमीन **गाफिली गाफीलगिरी**-स्त्री गैरसावधपणा, गाफलाई 'हे गाफिली कांकूनापासून जाहली'–वाड–बाबा २ ८६ 'शिपाई लोकाचे व घोड्याचे सामान सरजाम कसे आहेत ते वरचेवर पहात जाऊन दुरुस्त ठेवण्यास कदापि गाफीलगिरी करीत जाऊ नये'–ऐस्फुले ५४ 'गाफीलगिरी तरिहि जगा वरि।'–केक ९९ [फा घाफिली]

**गाय-भ**—पु १ (गो) गर्भ 'गाय धर्रों' गर्भ राहिला २ (कु) फळ (कोंवळ्या) पेक्षाहि कोंवळें फळ [स गर्भ]

**गायडी-डें**—स्त्रीन भोंक, खड्डा, चीर बुजविण्या–आच्छादण्यासाठीं लाविलेला तुकडा, पुस्ती, जोड, ठिगळ, दुसऱ्या

तुकड्यांत घसविलेला तुकडा २ (नाविक) भिरपें, भोंक, छिद्र 'खांदेरीच्या जवळ आमच्या गलबतांना गावडया पडून आंत पाणी येवूं लागलें' [फा गश्वरिसु=रापणें, फाडणें ?]

**गायणॉ**—वि (गो) श्रीमंत, पैकेवाला, गाभणा [स गर्भ, म गाभ]

**गायणें**—क्रि. (गो.) मासे धरणें.

**गायती-दी**—पु (राजा.) गाबीत, गावती, खारवी, कोळी, मासे धरणारा, एक कोंकणी जात —शाको (ग) १०१पहा. [अर घुराब-गाब(गुराब)=एक आरबी गलबत यावरचे लढाऊ मराठे ते गा(गा)वती. शिवाजीच्या काळीं हा शब्द रूढ झाला] म्ह० गावयास गुरु, गुराख्यास तारू **गावतीण**—स्त्री कोळीण, मासे विकणारी स्त्री

**गाय(या)ळणें**—उक्रि १ गमावणें, सांडणें, गळपटणें, हरवणें, गैरविल्हे लागणें 'पोरानें पोथीचीं पानें सारीं गावळिलीं' २ भेसळ करणें, होणें, अव्यवस्थित ठेवणें (कागद, वस्तु), गोंधळ होणें, गुरफटणें, घालमेल्ला जाणें 'तुमच्या घरांतले चिरगुटांत कोठें मासा पचा गावळला तो सांपडत नाहीं' ३ (कर) डाग ळणें, डाग पडणें 'गायळलेले आंबे फेकून दे' [गाबाळ]

**गाबागुबी**—स्त्री १ (सामान्य किंवा परस्पर) घुकलाघुकली, धकाधुकी, कुटाकुटी, कुदाकुदी (क्रि० करणें, होणें) २ (ल) लांचलुचपत, दाबादाबी. हरामखोरी, दगलबाजी [ध्व, गब्, गुब्]

**गाबाळ**—नपु १ गळाटा, चोथा, घाण, केरकचरा, गाळ 'माणिक नका कांहीं गाबाळाचे भरी ॥ पडों येते थोरी नाग वण ।' —तुगा २७१६ २ जुनाट, फाटक्यातुटक्या, निरुपयोगी वस्तूचा ढीग, रास (रद्दी, कसरीनें खाल्लेल्या कागदाची, पुस्तकाची) ३ उंसाचा वाळलेला पाचोळा, चोयटया —पु (कों) नारळाच्या बोंडशापासून, डोक्यापासून फुटलेले तंतू, शेंडी याचा काथ्या करतात (कु) **गाबाळो** —वि १ जुनाट व उरलासुरला, जीर्ण व फाटका, चिरलेला व विदारलेला इ० २ निरर्थक [गबाळ] सामा शब्द— **०गुबाळ**—वि गाबाळ पहा [गाबाळ द्वि] **०ग्रंथ**—पु १ फाटकातुटका, कसर लागलेला ग्रंथ, पुस्तक २ अनेक पुस्तकांतून घेतलेल्या पानांचें बांधीव पुस्तक, रद्दी कागदाचा ढीग, वेड्यांचें पुस्तक, खर्ड्यांचें पुस्तक 'ज्या लक्षावधि लोकांस बायबल हें केवळ गाबाळ ग्रंथ वाटतें' नि ४२० **०मुद्रा**—स्त्री अजागळी किंवा मूर्ख चर्या, चेहरा, भोंगळ मुद्रा, सुरत, **गाबाळी-ळ्या**—वि अव्यवस्थित, निष्काळजी, गदी, अजागळ 'रामदास म्हणे अवघेची गाबाळी ।' —रामदास, स्फुट अभंग ५ (नवनीत पृ १४५)

**गाबाळी**—स्त्री (कु) माशाच्या पोटांतील अंड्याची जाळी गाभळी पहा

**गाबी**—स्त्री गाभी पहा.

**गाबीत-द**—पु (राजा) गावती पहा

**गाॅब्रॉ**—पु (गो.) राखी रंगाचा एक मासा.

**गाॅब्रॉ-मर**—स्त्री उसावरील कीड

**गाभ**—स्त्री (राजा) दोन टेकड्यांतील मोठी खिंड, कपार.

**गाभ**—पु १ गर्भ (विशेषत पशूचा) २ मध्य; गाभा [स गर्भ, प्रा गब्भ, में जि खपनी=गर्भार] **गाभटणें, गाभ** **डणें**—अक्रि गाभ सांडणें पहा दुबेतणें, गर्भपात होणें —शे ३०४ **०सांडणें-टाकणें** १ विणें, गर्भ पडणें २ पूर्ण काल होण्यापूर्वी विणें **गाभास जाणें**—१ गर्भ धारण करणें २ विणें, प्रसवणें

**गाभडा**—वि पूर्णत्वास आलेलें, दळदार, मगजाचें, गाभुळलेलें, पाडाचा, पिकण्यास आलेला, गुरमा (आंबा, चिंच) [गाभ]

**गाभडी-डें, गाभणी**—स्त्रीन स्त्री टिगळ, भोंक बुजविणारा तुकडा, गावडी पहा

**गाभण-णा**—वि १ गर्भार, सबर, गर्भानें युक्त (घोडी शिवाय इतर पशु) २ उघड न केलेली, मोघम ठेवलेली (गोष्ट) 'तिकडलें वर्तमान गाभणें कशास ठेविलें, बोला ना ?' [गाभ] (ग्राम्र) (एखाद्याच्या पुढें) **गाभणी गाभ टाकील**—उग्र, कडक, आज्वल्य अशा पुरुषाविषयीं योजितात

**गाभणी**—वि (गो) गर्भिणी, गाभण पहा [प्रा गब्भिण]

**गाभणें**—अक्रि गाभण होणें (गाय, म्हैस, सर्पीण इ० प्राय विणें क्रियापदासह) —न (ल) गुप्त गोष्ट, मोघम ठेवलेला मजकूर [गाभ]

**गाभरू**—पु (व) उनाड पोर [गबरू]

**गाभसाड**—पु गर्भपात (जनावरासंबंधीं योजतात) (क्रि० करणें, होणें) [गर्भ+साटणें].

**गाभळणें**—अक्रि गाभुळणें पहा

**गाभळी**—स्त्री (गो) माशाच्या अंड्याचा समुदाय

**गाभा**—पु १ मगज, गर, गर्भ, नार, पोटांतील अंश (लाकूड, तार्टे, मुळें यांच्या) २ मोना, कोका, ताडक (ताड वृक्षाचा अथवा केळीचा) ३ बोखा, शका (ताड, नारळी यांचा) ४ पागोट्यांतील घताणा, आंतील भाग, पागोट्याच्या आंतील लहान पागोटें, फडकें ५ (ल) मतलब, सार 'बुद्धीचिया भाजि। बोलाचा न चाखता गाभा ।' —ज्ञा ७ २०७ ६ मधला भाग, मध्य, गर्भागार (दळ इ० चा) [स गर्भ, प्रा गब्भ]

**गाभाटणें**— १ गाभटणें, अकालीं प्रसवण २ अपूर्ण राहणें

**गाभागोभा**—पु हरकत, प्रतिबंध, अडथळा 'जैसी जळींची प्रतिमा। जळनाशीं दिवा। येतां गाभागोभा। कांहीं आहे।' —ज्ञा १८ १३६५

**गाभार-रा**—पु १ देवळाचा आंतील (ज्यांत मूर्ति असते तो) भाग, याच्या बाहेरील सभामंडप २ माजघर, अंतर्गृह 'जो संतोषाचा गाभारा।' -ज्ञा ४ १०७ ३ (ल) हृद्गत, मनोगत 'तसें जया अखरा। भटती गाभारा।'-अमृ १० २८ [सं गर्भागार]

**गाभारी**—स्त्री लहान गाभारा [स गर्भागार]

**गाभाळ, गाभाळणें**--गाबाळ, गाबाळणें पहा.

**गाभिणी. गाभीण**--स्त्री गाभण, गाभणी पहा 'कर्म कर्ता काय ऐसी। त्रिपुटी असे ते जैसी। गाभिणी मारिली।' -ज्ञा १८ ९७१ [स गर्भिणी]

**गाभिणें**--वि १ फदफदलेलें, किडे पडलेलें 'शुष्क अथवा सडलें। गाभिणेंही हो।' -ज्ञा १७ १५९ २ फुगलेलें [गाभण]

**गाभी**--स्त्री गावडी पहा

**गाभी**--स्त्री गाभ, गर्भावस्था

**गांभीर्य**—न १ मनाची शांति, स्थैर्य, गंभीरता, भारदस्त पणा २ खोली, ओंडी (पाणी, आवाज, सूर याची) गभीर पहा [स]

**गाभुट(ड)णें, गाभोट(ड)णें**--अकि. १ गाभटणें पहा २ गुरमळणें, गाभुळणें पहा [गाभ]

**गाभुटा धरणें**--सकि (चांभारी) तळाच्या बाहेरच्या बाजूस बसविलेला चामड्याचा तुकडा जर पातळ असेल तर त्यास जोड देणें.

**गाभु(भो)ळणें**—अकि १ पाडास लागणें, मगज भरून परिपक्व होण्याच्या स्थितीस येणें, गुरमळणें (फळ) २ उम ळणें, उतणें, सडीस लागणें (आंबा इ०) ३ (व) जनाव राचा गर्भपात होणें [गाभ]

**गाभूळ गाभोळ**—वि दळदार, भरदार, मगजाचें (पाडाचं फळ) [गाभ]

**गाभेवन**—न सूक्ष्म अंकुर गर्भातील पान 'कां गाभेवन वडु गिवसवे।' -ज्ञा १० ७० [गाभ+वन]

**गाभोळी**—स्त्री १ धान्याचें भरदार कणीस २ (क) माशाच्या पोटांतील गर्भ [गाभ]

**गॉम**—न (गो) गोंद खळ [पोतु इ गम्] **गॉमार करचें**-कि कपडे खळीत घालून इस्त्री करणें

**गामचाल**—स्त्री घोड्याची गति चाल, सरळ व एकसारखी (साग्रक) चाल, डौलदार छानदार, दिमाखदार तुर्की चालीचा एक प्रकार यास संस्कृतम यें धौरितक म्हणतात

**गॉमॉ**—पु (गो) मासे विकण्याचें माप, लहान खोटली किंवा कुरणो

**गामी**—पुवि जाणारा, गमन करणारा, (स्त्री) गामिनी (समासांत)-आकाश-पाताळ-पितृ-मातृ-गामी [स गामिन्]

**गाय**—स्त्री १ धेनु दूध देणारा एक माणसाळलेला चार पायाचा सस्तन प्राणी २ (ल) गरीब ३ स्वभावानें गरीब, सात्विक अनाथ, दीन माणूस ४ एका जातीचें काळ्या रंगाचें झुरळ एक पक्षी ५ पारी पहा ६ एक वनस्पति, लहान इंद्रा वण, कडुदावन (अव गायी रूप एव हि वापरतात) [स गो-गाव(म्), प्रा गावी, हिं-गाओ] (वाप्र) ०**गोवणें**-आक्षे पित, अयोग्य स्थळीं मुलगी देणें ०**चिखलांत अडकणें**-अडचणींत, पेंचात सांपडणें ०**माय सारखी**-दोन्हीहि आपल्या दुधानें पोषण करतात म्हणून ०**गायवाना करणें**-(व) काकळूत करणें गयावया करणें पहा 'गाय गायवाना करू लागला तेव्हां सोडलें ' ०**होणें**-दीन, दुबळा होणें, (दुर्दैवानें, दुखण्यानें) रंजीस येणें 'उगिच अबोला धरिला। काहीं भिउन असावें हरिला। झालें मी गाय।' -प्रभाकर, पदें **गायीचा खूर तिखट**-अनाथाचा वाली ईश्वर **गायीनें माणीक गिळणें**-जेथें फार मोठा तोटा सोसल्यावाचून किंवा पाप केल्यावाचून बूड भरून येत नाहीं तेथें योजतात **गायी पाण्यावर आणणें**-गाल फुगवून रडणें **गायीवासराची ताडातोड करणें**-नातेवाईकांत भेद करणें, त्याचा संबंध तोडणें (विशेषत मायलेकराची ताडातोड) **गायीवासराची भेट करणें**-जवळचे आप्त, स्नेही, नातेवाईक भेटविणें, त्याना एकत्र आणणें **गायीसारखा हंबरडा फोडणें**-मोठ्यानें कळवळून आक्रोश करणें (मुलानें) म्ह० १ गायीनें गाय फळत नाहीं=एका गरिबाला दुसऱ्या गरिबास मदत करवत नाहीं २ दुभत्या गाईच्या लाथा गोड=लाभासाठीं माणूस अपमानहि सहन करतो ३ अल्लाची गाय=फार गरीब माणूस इ० ४ अडकली गाय फटके खाय= अडचणींत सापडल्यावर हालअपेष्टा सोसाव्याच लागतात ५ कसा यास गाय धारजिणी=दुष्टापुढें निमूटपणें वावरतात पण गरीबाला मात्र छळतात सोनारानें कान टोंचणें याअर्थी ६ एकानें गाय मारली तरी दुसऱ्यानें वासरू मारू नये=एकानें चुकी केली तर दुसऱ्यानें तरी करू नये स माशब्द- ०**कवाड-कैवारा**-पु एक आडनाव **गायकश्या**-वि गुराखा ०**चाळा**-पु लहान मुलाचा एक खेळ ०**तुरा**-स्त्री (गा) गायत्री ०**तोंड्या-डा**-वि लाजाळू भितरा ०**दूम** वि गायपुच्छासारखा निमुळता [फा गावदुम] ०**नासे**-वि १ (गा) निर्लज्ज २ अधिकच्चे ०**पारख**-स्त्री गुराची परीक्षा किंवा वयकी ०**पारखी**-पु गुराचा परीक्षक किंवा वैद्य ०**मुख**-न गाईचें तोंड पाणी वहाण्यासाठीं केलेलें (लांकूड, दगड याच) ०**रट**-न (निंदार्थी) गाय **गायरा**-पु गुराखी **गायरान**-न १ गोचूर, कुरण

२ नापीक, माळ जमीन. गायरूं–न. १ ( निदार्थी किंवा लडिवाळपणें ) गाय. गायरट पहा. २ ( ल. ) सौम्य, गरीब, निरुपद्रवी माणूस. 'तो गरीब बापडा गायरूं.' ३ ( गो. ) वयांत आलेली गाय. ४ ( के. ) अगदीं लहान जातीची कोंकणी गाय ०घट–न. (चांभारी) गोचर्म. ०वाडा–पु गोठा. 'गंगा आपली पाटी ( शेणाची ) घेऊन गायवाडयांत गेली.' –माझे हाल मीच सोसूं जाणें ६ (उषा मंगमाला). गायीचा गो(ह्)रा–पु. १ कृतघ्न माणूस. २ मूर्ख; द मनुष्य. ३ वासरूं; बैल. ४ ( ल ) गांगरलेला माणूस; वेडा. गायीचा पुत्र पहा. 'गाईचे गोरे जाले' –भ ब १२३. गायीचा पुत्र, गायीचें बाळ–मूल. गायीचा बाप–पु नपु बैल ( ल. ) टोणगा; मूर्ख माणूस

गायक—वि. गाणारा; विशेषकरून त्या धंद्यावर पोट भरणारा; गवई. [सं. गै=गाणें] ०गण–वर्ग–पु (ख्रि) सामुदायिक उपासनेच्या वेळीं प्रमुखपणें गदापद्य गाणारी मंडळी. (इं) कॉयर 'हा गायकगण हो तुमचा । मजनाहिं काहिं कामाचा ।' ०गुण–पु. गवयाच्या गाण्यांतील गुण, हे २२ आहेत ( भारतीय नाटय शास्त्र ). ०दोष–पु गवयाच्या गाण्यांतील दोष हे २५ आहेत.

गायकी—स्त्री. १ गुरुपासून निरनिराळया रागांतील चिजा म्हणण्याचें ज्ञान; संपादन केलेल्या गाण्यांत जास्त भर घालून तयार केलेलें ज्ञान; गाण्याचें कसब. २ गाण्याची पद्धत. 'हिंदुस्थानी गायकी निराळी, दक्षिणी निराळी.' ३ गायनाचा धंदा.

गायकी-क्या—वि. गुरें राखणारा; गुराखी. [ गाय ]

गायंडोळ—पु ( गो ) गांडवळ पहा.

गायंद्रोळी—स्त्री ( गो. ) आतडी.

गायणी-नी—स्त्री गाणारीण; गानी पहा.

गायत्री—स्त्री. १ गाय. 'गायत्री विकोनी पोट जे जाळती । तयां होय गती यमलोकीं ।' –तुगा २४२४. २ वेदांतील एक मंत्र ( ऋ ३. ६२ १०. ) उपनयनसंस्कारांत याचा उपदेश होतो; त्या वेळेपासून संध्यावंदनांत याचा जप करावयाचा असतो. ३ एक वैदिक छंद, वृत्त. या वृत्ताचीं २४ अक्षरें व ३ चरण असतात. 'गायत्रीछंद जे म्हणिजे ।' –ज्ञा १०.२८२. ४ (उपलक्षणेनें) हिंदूंतील ब्रह्मर्षि कांची माता; एक देवता. ५ ब्रह्मदेवाची स्त्री. [सं ] ०मंत्र–पु. गायत्री अर्थ २ पहा. 'तत्सवितुर्वरेण्यम्' इ० सूर्यस्तुति. या मंत्राचें महत्त्व व प्रभाव फार मानीत. ब्राह्मणांना हा मंत्र पवित्र आहे. संकटनिरसनार्थहि याचा जप करतात.

गायदड—स्त्री. एक वनस्पति; कोबीचें झाड.

गायन—न. १ जेव्हां एखादा मनुष्य आनंदानें स्वयरंजनार्थ स्वच्छंदानें प्रमाणबद्ध मधुर ध्वनि कांहीं वेळ काढीत राहतो ती क्रिया; गाणें; गान; गीत २ तदुपयोगी ध्रुवपद इ० पद. [सं गै=गाणें ] ०श्रेढी–स्त्री. (गणित) ज्या श्रेढींतील लागोपाठची तीन पदें घेतलीं असतां पहिल्या व दुसऱ्या पदांतील अंतर आणि दुसऱ्या व तिसऱ्या पदांतील अंतर या दोन अंतरांचें जें गुणोत्तर तेंच गुणोत्तर पहिल्या व तिसऱ्या पदाचें असतें ती श्रेढी. उदा० १२, १५, २०, हीं तीन पदें. यांत तीनपंचमांश हें गुणोत्तर सारख आढळेल. ( इं. ) हार्मोनिक प्रोग्रेशन.

गायब—वि. हरवलेला; नष्ट; गत; गुप्त. गईब पहा. 'चाकू गायब झाला.'

गायबाना—क्रिवि. अपरोक्ष. [ अर. घाइबाना ]

गायर—पु. ( कु. गां. ) शेण सांठविण्याचा खड्डा; गार.

गायांवायां—क्रिवि. दीनवाणीनें; काकुळतीनें (याचना इ०). ( क्रि० करणें ). गयांवयां पहा.

गार—स्त्री. १ एक कठिण पांढरा दगड; करका; गारगोटी. 'का रत्नें म्हणोनि गारा । वेंचो जेविं ।' –ज्ञा ९.१४८. २ पावसांतून पाणी गोठून पडणारा खडा. ३ ( ल. ) जडजवाहीर, रत्न इ०. 'टार, नार, गार, सार.' टार पहा. [ सं. ग्रावन्; प्रा. दे. गार=पाषाण, कंकर ]

गार—स्त्री. १ खड्डा; खांच. 'हा रस्ता गारेचा आहे.' 'शेणाची गार.' 'गारींत निघाले जीवें जीत ।' –दावि १९.१२१. २ ( ल. ) पोट. ३ ( विणकाम ) माग उभा केला असेल त्या जागीं चाळाच्या पावडया दाबण्यासाठीं व खालीं सोडण्यासाठीं केलेला खड्डा. ४ झाडाचें आळें. 'पूर्वाभिमुख गारिंभि कोहळी घाइ घालणें.' –ऋ १२६. [ सं. गर्ता; हिं. गाडा ? ]

गार—वि. १ थंड; फार थंड (पाणी इ०) थंड शब्दाबरोबर उपयोग:–थंडगार=अतिशय गार. 'आणि आधार्थु पडे गार ।' –ज्ञा ६.१३४. २ अतिशयितपणा दाखविण्यासाठीं हिरवा या शब्दाबरोबर उपयोग; जसें– हिरवा गार=दाट, गर्द हिरवा. [ सं. गुड=गार ( स्तब्ध, थंड ); गोत्वाय–गारवभ. –भाभ १८३२ ] ( वाप्र. ) ०पडणें–शांत व थंड पडणें ( वाईट किंवा भलतेंसलतें काम केल्यावर ). ०होणें–१ संतुष्ट होणें; सुख होणें ( हेतु सिद्ध झाल्यानंतर ). २ निरुपायास्तव स्वस्थ राहणें. ( वाप्र. ) गारगार थंड. गारगार करवंद गार करवत, गारकरवंद. गार टणक अतिशय थंड ( पाणी, हवा ).

गार—स्त्री. ( गो. ) घोरपड.

गार—कर्ता, करणारा या अर्थी फारसी प्रत्यय. हा समासांत येतो. जसें– खिदमतगार.

गारगोट-टी—पुस्त्री. गार; पांढरा वाटोळा दगड; चकमकीचा धोंडा. [ गार+गोटा ]

गारट—वि. १ थोडासा गार, थंड ( हवा, पाणी, वस्तु ). २ नुसता गार ( कमी किंवा जास्त नव्हे–खारट, आंबट, तुरट या सारखा प्रयोग ). ३ फारच थंड. [ गार ]

गारट(ठ)णें, गारणें—अक्रि. थंडीनें गोठणें; थिजणें(वस्तु). २ थंडीनें किंवा इतर कारणानें बधिर, जड होणें; बधिरावणें (शरीर, अवयव). 'एवढ्या सकाळीं जाऊं नको, दहिंवरानें पाय गारठतील.' ३ दडस, निबर, कठिण होणें (थंडीमुळें न पिकलेला आंबा किंवा गहूं). ४ नरम येणें; उत्साहरहित होणें (माणूस). [गार, गारठा]

गारटें—न. खड्डा; खळगा. [गार=खड्डा]

गारठा—पु. १ कडाक्याची थंडी; हवेंतील अति गारवा. (क्रि० पडणें). 'आज भारी गारठा पडला आहे.' २ अतिशय थंडपणा, शीतता (पाणी इ० ची). 'एवढा वेळ तापते आहे तरी अजून पाण्याचा गारठा मोडत नाहीं.' [गार]

•गारत-द—क्रिवि. १ पुरलेल्या, बुडलेल्या, नासलेल्या स्थितींत. २ नष्ट; समूळ नाहींसा झालेला; उध्वस्त; फस्त; ठार. 'जनकोजी शिंदे गारद अले.' –इमं २९६. [अर. घरत्=लूट]

गारती—स्त्री. नाश; गर्दी. 'सदाशिवराव कार्यवर्ते, लेकीन गहर मोठा या सबबानें गारती जाहली.' –ऐटि ३.१७ [गारत]

गारदी—पु. गाडदी पहा. 'ते गारदी निष्ठुर, त्यांजला दया कोठून? इच्छारामपंत गाईच्या आड पडला असतां, गाईसुद्धां गारद्यांनीं इच्छारामपंतास ठार केलें.' –पेब ९१. गारदाई—स्त्री. १ गाडद्यांचा दंगा, बंड. २ (ल.) गोंधळ; दंगा; गलगा; गर्दी; धिंगामस्ती. ३ नाश; नुकसान; खराबा; बिघाड. 'धनाची मालाची, संसाराची गारदाई.' [इं. गार्ड–गारदी पहा]

गारपगार-री-ऱ्या—पु. १ मत्रतंत्रानें गारांचा पाऊस पाडणारी किंवा गारापासून संरक्षण करणारी एक जात. 'थंडीनें मेले लोक उठविले गारपगाऱ्यांनीं भुन।' –ऐपो ४०१. पिकांना नुकसानी पोंहचूं नये म्हणून कांहीं खेड्यांतून गारपगारी ठेवलेला असे. वऱ्हाडांत अद्याप असे लोक वेतन देऊन ठेवलेले असतात. २ (ल.) ढोंगी; लबाड; ठक. 'हरि ऐसा गारपगारी मर्दुनया काल खगारी।' –प्रला १६. ३ वाममार्गी; मांत्रिक. [गार+अपकार?]

गार(रं)बी-भी—स्त्री. एक वेल व तिचें बीं.

गारमांड-डें—न. चापी बंदूक; गारेच्या चापाची बंदूक; हिच्या उलट तोडयाची बंदूक. 'गंजिफियाच्या वगैरे गारमांडी व बंदुकांचा मार ऐसा जाला कीं.' –भाब ६३. [गार+भांडें=तोफ]

गारमणी—स्त्री. गारगोटी.

गारवट—वि. गारट पहा.

गारवट, गारवंठा-डा, गारवा, गारिवठा, गारिंघडा—पु. अतिशय थंडपणा; गारठा. (हवा, पाणी इ. चा). (क्रि० पडणें). गारट-ठा पहा. [गार]

गारशेल—वि. कांहींसा दळदार व पिकलेला; गदरलेला (आंबा, फळ). [गर]

गारसणें—अक्रि. गारांनीं नासाडी होणें. [गारा]

गारसणें—अक्रि. थंड होणें (वस्तु, पाणी). [गार=थंड]

गारसणें—अक्रि. गदरणें; पिकूं लागणें (फळ); गाभुळणें. 'गारसल्या आंबाची रुचि उत्कृष्ट.' [गर]

गारसा—वि. (व.) गारोळा; घारा (डोळा इ०). 'त्याचे डोळे गारसे आहेत.' [घार]

गारा—पु. १ गिलावा; चिखल; सरबरीत मिश्रण (गिलाव्यासाठीं केलेलें पाणी, माती, गवत चुना, शेण इ० चें). २ (ल.) पातळ व घट्ट अन्नाचें बरबट. [सं. गाढ? हिं. गारा=कुंभार कामाची मळलेली माती; का. गारे]

गारा—पु. (ना.) शिकारीच्या वेळीं जनावराकरितां केलेला बांधणें. [?]

गारा—पु. गाडा. –बदलापूर ९२.

गारा—पु. (संगीत) एक राग; यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण, वादी षड्ज व संवादी पंचम; वेळ सार्वकालिक; आरोहांत तीव्र गांधार, तीव्र निषाद आणि अवरोहांत कोमल गांधार, कोमल निषाद घेतात.

गाराणें, गाऱ्हाणें—न. १ कागाळी; तक्रार; दुसऱ्याचा अपराध सांगणें. (क्रि० सांगणें; करणें; गाणें; देणें). 'प्रजान प्रजा तें अवघरीं। मज सांगती गाराणीं।' 'असुर सुरातें उत्पादिती। ते गाऱ्हाणें हरिशीं देती।' –एरुस्व १.७९. २ प्रार्थना; विनंति; विनवणी (देवाची, मूर्तीची). (क्रि० घालणें; करणें). [सं. गर्हणा; प्रा. गरहणा]

गाराफ, गार्फ—न. (कु गो.) कलमी आंब्याचें झाड. [पोर्तु, इं ग्राफ्ट] गार्फलॉ—वि. कलमी आंबे लावणारा.

गारीगडदल-र—(तंजा.) खाचखळगा; खड्डा; उंचसखल भाग. 'जैसें मार्पळे चांचरोन पडे। गारीं आणि गडघरा।' –दा ५.१.३७. [गार=खाच+गड=उंच भाग]

गारुड—न. विषावरील उताराचा मंत्र. गारूड पहा. [सं. गरुड]

गारुंडा, गारोंठा-डा—पु. अतिशय गारवा, गारठा (हवा, पाणी इ० चा). [गार]

गारु(रो)डी—पु. १ सर्पमांत्रिक; सर्प बाळगून त्यावर पोट भरणारा. 'हें जाणोनि ऐसी प्रौढी। जो दृष्टिवे विष फेडी। तो धावया श्रीहरी गारुडी। पातला कीं।' –ज्ञा २.७२. २ जादुगार; नजरबंद करणारा. 'गारुडी नाहीं ऐसा एकु। जो भारी जाणे पूर्वेकु।' –शिशु ८१०. [सं. गरुड–गारुड]

**गारूड**—न १ जादू इंद्रजाल, नजरबंदी २ कपट, रूप डाव, पाचपेंच, छक्केपंजे, जादूटोणा [स गारुड]

**गारो(न्हो)ळा**—वि १ मांजराच्या डोळ्याच्या रंगाचा (डोळा), घारा २ बिडालाक्ष, घाऱ्या डोळ्याचा 'गारोळ जामून टाकरें।' –दा ३ ६ ४२ [घार+डोळा?]

**गार्जप**—अक्रि १ (गो) कीर्ति पसरणें २ मोठा नाद होणें. [स गर्ज्]

**गार्टर**—पु मोजेबंद, पायमोज्याचा बंद, पायमोजा बांधावयाची पट्टी [इं]

**गार्ड, गार्द**—पु रखवालदार, अरण्यरक्षक, शिपाई [पो गार्दा, इं गार्ड]

**गार्डियन**—पु मालक, सांभाळणारा, संरक्षक (अज्ञान्याचा), पालनकर्ता 'आपल्या अज्ञान मुलाकरिता गार्डियन किंवा पालक नेमण्याचा प्रत्येक बापाला हक्क आहे' –घका २२७ [इं]

**गार्दी(गर्दी)**—पु कुलाबा जिल्ह्यातील महारांतील एक पोटजात –अस्पृ ३४

**गान्याभिंगोऱ्या**—गादेभिंगोऱ्या पहा

**गार्हपत्य**—पु श्रौतकर्मांतील एक प्रमुख अग्नि पंचाग्नी पहा [स]

**गाल**—पु कपोल, तोंडाच्या दोन्ही बाजूचे मांसल भाग 'अरे त्याणें डाव्ये गालावर मारलें तर उजवा पुढें करावा पण बोलू नये' [स गल्ल] (वाप्र) **॰घडणें**–(उद्धटपणाबद्दल) शिक्षा करणें **॰निपटणें**–गाल बसणें, खोल जाणें, तोंड चापट होणें (दुखणें, उपवास यांनीं) **॰फुगणें**–१ राग येणें २ गर्वानें अंध होणें 'न तुजपुढेंचि पराचें गर्वभरें गाल बा ल्वहि फुगती।' –मोशल्य १ ६३ **॰फुगविणें** १ फुगणें राग येणें 'बसि का गाल फुगवून।' २ फुगणें, शेखी, बढाई मारणें **॰रंगविणें किंवा गालात बसविणें**–थोबाडीत मारणें गाल (मारल्यानें) लाल करणें **गालात बसणें**–थोबाडीत मिळणें **गालावर गाल चढणें-येणें**–(चांगल्या खाण्यापिण्यामुळें) चेहरा गुबगुबीत होणें **गालात–गालीं–गालींगालीं–गालावर हंसणें**–गालांतल्यागालात हसणें, मंदस्मित स्मितहास्य करणें म्ह॰ १ एका गालात मारली तर दुसरा पुढें करावा=(ही ख्रिस्ताची शिकवण आहे)=नामर्दीचें लक्षण 'एका गालात मारली असतां दुसरा गाल पुढें करण्याचे आतां दिवस उरले नाहींत' –टि १ ५१० २ खातीच गाल व न्हातीचे बाल सामासब्द– **॰कल्ला**–पु गालांवरील मिशांचा गुच्छ, कल्ला **॰कुचा–च्चा**–पु गालावरील खळी **गालठें**–नअव (एव गालठ) गाल (निंदार्थी) **गालडी, गालोडी**–स्त्री १ तोंडाच्या कोपऱ्याजवळील गालाची खळी २ गाल फुगविल्यानें पडलेली खळी **॰गुच्चा**–पु गालास घेतलेला चिमटा, गाल ओढणें (क्रि॰ घेणें, धरणें, उपटणें) **॰गुंड–डा** स्त्री गालात लहान गाठी होऊन त्या फुगून होणारा रोग, गालाचा रोग, गालफुगी म्ह॰ वैद्याचीं पोरें गालगुंडानें मेलीं **॰गुडा**–पु (कों) चपराक थोबाडींत मारणें **॰गोंजारणी**–स्त्री (गाल गोंजारणें, कुरवाळणें) रागावलेल्याचीं आर्जवें, शांतवन, मनधरणी **॰चिंवा**–वि गालफडें बसलेला, खप्पड **॰दोडी**–स्त्री १ गालडी अर्थ २ पहा २ माकडाच्या गालातील पिशवी (माकड यांत खाद्य भरून ठेवतें) गालफड (क्रि॰ भरणें, फुगविणें) **॰पट्ट**–न (रागानें, निंदार्थी) गाल, थोबाड **॰फट–ड**–न १ गालाची (बाहेरील) बाटी, गाल बसलेली जागा २ गालपट ३ गाल फुगवून तोंडात केलेली पोकळी, गालाची आतील जागा 'वानराचें ठेवणें। गालफडीं भरावे चणे।' –आराकिष्किंधा १३ १०६ [गल+पट] **॰फुगा–गी, गालफें**–पुस्त्री न गालगुंड पहा **॰बोट**–न दृष्टीची बाधा न व्हावी म्हणून (मूल, नवरदेव, नवरी इ॰च्या) गालांवर काजळ किंवा कुंकू याचा लावलेला टिकला **॰वाद्य**–न गालावर बोटें ठेवून डमरूप्रमाणें (शंकरापुढें) आवाज करण्याचा प्रकार 'जिकडे तिकडे 'शंभो हरहर' शब्दाचा व दक्षप्रजापतीचे गालवाद्यांचा घोष होत आहे' –मजुघोषा (भावि १०) ५ **॰विंधा**–पु गालकुच्चा पहा (क्रि॰ घेणें) **–लाचा ढोपर**–पु पुढें आलेलें गालाचें हाड **–चा ढोपर फाटलेला**–वि काटकुळा, रोड, मांस जाऊन हाडें राहिलेला

**गॉल**—न (गा) अगरख्याचा गळा [पोर्तु]

**गॉलँ**—न (गा) पातळ पदार्थ मोजण्याचें ४ शेरी माप. हें मातीचें असतें

**गॉलभर**—वि (गो) सैल

**गालन**—न १ वितळविणें २ सधान, निस्सारण करणें, (दारू) गाळणें ३ चाळणें, छानणें गाळून काढणें [स]

**गाल(ली)ब**—वि बरचढ, जोरदार. शिरजोर 'इमजावर टिपू गालब –ख ८ ४४०७ 'राज्ञीचे ठायीं विषप्रयोग करून असह्य दहायमान व्हावें ही शरम गालीब जाली' –इम २९२. [अर घालिब्]

॰**गाल्वा, गालमा**—पु. (गो) बारीक कोळंबी (मासा), सुकट

**गालिचा**—पु १ लोंकरीची सतरंजी, चित्रविचित्र रंगीत नक्षीचें उंची आसन, चित्रवर्ण कर्णावस्र २ (नेवासें प्रांत) लिफाफा, पाकीट (पत्राचें) [तु फा कालिचा] **–च्याचा भूट**–पु देखणा, छानछोक पण कामाला निरुपयोगी माणूस, छानछबेला, अलबेला माणूस गालिच्यावरचें फूल जसें निरुपयोगी त्याप्रमाणें), दिखाऊ, ऐदी माणूस [गालिचा+भूट=बुट्टी]

गालिप्रदान—न १ शिवीगाळ, निंदा २ ती करण्याचा व्यापार. [स ]

गाली—स्त्री शिवी, अपशब्द [स गालि] ०गलोची—स्त्री मोठी शिवीगाळ, निंदा (क्रि० करणें) [गाली द्वि ]

गालीधुपास—पु (कु ) गाळेक्यास पद्दा

गालुंडा—पु (अलिबाग) झोडून झालेल्या भाताच्या पेंढ्याची पेंढी, जुडी [गळणें+उडा ? ]

गालो—पु (कु ) दालन [गाळा ? ]

गालोरा—पु गालगुचा 'एक डगेच गालोरे घेती।' –अफला २६ [गाल ]

गॉल्ल—न (गो ) गर्द झाडी

गा(गा)व—पुन १ वस्तीचें ठिकाण, ग्राम, मौजा, खेडें २ (व्यापक) नगर, शहर ३ गांवातील वस्ती, समाज 'यदा दयामुळें क्विनीक गाव पळून गेले' ४ आश्रय ५ (दोन गांवामधील अंतरावरून) चार कोस योजन, चार ते नऊ मैल अंतर 'मारीचातें प्रभु शत गावें पुखसमीरें उडवी'–मोरा १ १९९ हा शब्द कोंकण आणि देशात पुल्लिंगी व सामान्य पणें नपुंसकलिंगी योजतात समासांत–गाव–कुलकर्णी–चांभार–न्हावी–भट इ० याप्रमाणें बारा बलुत्याच्या नावापूर्वी गांव हा शब्द लागून सामासिक शब्द होतात व त्या शब्दावरून त्या त्या बलुतेदाराच्या एक वर्षाच्या कामगिरीवरील हक्काचा बोध होतो [स ग्राम, प्रा गाम, हिं गु गाम, सिं गांउ, मैंजि गाव, पोर्तुजि गाऊ] (वाप्र ) (त्या) गांवचा नसणें–दुसऱ्यावर लोटणें, टाळणें (काम), (त्या) कामाशीं आपला कांहीं अर्थाअर्थी संबंध नाहीं असें दर्शविणें ०मारणें–लुटणें, खंडणी बसविणें 'दौड करून गांव मारू लागले'–पया १८८ गावानावाची हरकी देणें–सांगणें–(तू कोठून आलास, तुझें नाव काय आहे सांग इ०) ज्याच्या अंगांत भूतसंचार झाला आहे अशा मनुष्यास (भुतास, किंवा झाडास) विचारतात यावरून पाहुण्यास आपण कोठून आलांत इ० नम्रपणें विचारणें गावाला जाणें–१ जवळ नसणें २ (ल ) निरुपयोगी असणें जसें–'माझे हात कांहीं गावाला गेले नाहींत' (जवळच आहेत, वेळ आली तर तुला रट्टा मारतील) गावीं नसणें–पूर्ण अभाव असणें अज्ञानी असणें, दरकार नसणें, खिजगणतींत नसणें सामाशब्द–०आकार–आकारणी–पुस्त्री गावचा हिशेब हिशेबाचा तक्ता ०आखरी–क्रिवि (व ) गावालगत–शेवटीं–लागून गाई–स्त्री सरकारी जुलुमामुळें आपलें गाव सोडून दुसऱ्या गावीं केलेली वस्ती, सरकारी हुकुमाची अमान्यता, सरकारी अटींना प्रतिरोध (सान्यात सूट तहकुबी इ० मिळविण्यासाठीं गावचे सर्व लोक हा उपाय अमलांत आणतात) ०कंटक–वि गावाची पीडा, गावाला त्रास देणारा [स ग्राम+कंटक] ०कबुलात–स्त्री. १ (कों ) वहिवाटदार खोतानें गांवातील जमीनीचा सारा भरण्याबाबत दिलेली कबुली २ गावांतील गावकऱ्यांनीं वहीत किंवा पडित जमीन कोणती ठेवावी याबद्दल केलेला निश्चय, ठराव ०कर–पु १ गावातील वृत्तिवंत –कोंकणी इतिहाससाहित्य लेख ४०० २ (राजा ) गावच्या हद्दींतील देवस्कीच्या मानपानासंबधातील एक अधिकारी ३ भूतबाधा नाहींशी करणारा, देवस्की करणारा माणूस, धाडी –झांमु १०२ ४ गावचे लोक, रहिवासी, गावात घरदार शेतभात असणारा 'गावकर म्हणती हो पेटली आग।'–दावि ३५० ५ (कु कों ) पाटील, खोत, पुढारी ६ (रत्नागिरी) कुणबीवाड्याचा व्यवस्थापक, कुणबी ०करी–पु. १ एखाद्या गांवात ज्याचें घरदार आहे तो त्या गांवचा रहिवासी, गांवांत राहणारा 'त्या गांवचे सर्व गांवकरी आज देवळाजवळ मिळाले होते' २ शेतकरी गावकी–स्त्री. १ गावाच्या संबंधीचा हरयेक अधिकार (अमल इ० ), गांवचा कारभार २ गावसभा, तींत झालेले ठराव ३ गावचा विचार, गावकरी व पुढारी यांनीं एकत्र जमून केलेला विचारविनिमय ४ वतनदाराचा गावासंबधाचा परस्पर संबंध व त्याचा समाईक अंतर्बाह्य व्यवहार –गागा १६७ [स ग्रामिक] गांवकुटाळ–वि गावटुचाळ, गांवांतील निंदक, टवाळ, लोकांची निंदा करणारा ०कुठार–वि १ गावांतील लोकांवर संकट आणणारा (चहाडी, वाईट कर्म इ० करून), गांवभेद्या, कुऱ्हाडीचा दांडा २ गावातील सामान्य लोक 'दिल्लींतील वाणी, बक्काल, बायका देशील गावकुठार (हे) लष्करच्या लोकांस मारू लागले'–भाब १६० ०कुप–कुसूं–कोस–नपु १ गावाच्या भोंवतालचा तट २ (ल ) वस्त्राचा (रंगीत) काठ (धोतरजोडा, शेला इ० चा रेशमी, कलाबतूचा) ०कुळकर्णी–पु गावचा वतनदार पिढीजात हिशेबनीस याच्या उलट देशकुळकर्णी (जिल्हा, प्रांत, याचा कुळकरणी) ०खर–न गावाची सीमा हद्द, सीमाप्रदेश, परिकर [गाव+आखर] ०खर्च–पु (जमीनमहसुली) गावचा (धार्मिक समारंभ करमणूक इ० चा ) खर्च,पडित गोसावी, फकीर इ० स द्रव्य शिधासामुग्री इ० देतात त्याचा खर्च ०खातें–न १ (पोलीस कुळकर्णी वगैरे गावकामगार लोक २ गावचा हिशेब ०खिडकी–स्त्री गावकुसवाची दिंडी हिच्या उलट गाववेस (दरवाजा) ०खुरास–क्रिवि गावानजीक, जवळपास ०गन्ना क्रिवि दर गावास प्रत्येक गावाकडून–गणिक–पासून गावगन्ना चार रुपये करून घ्यावे' गावगन्ना ताकीद करून सर्व लोक बोलावून आणा' ०गर्रा–वि (गो ) गावठी ०गाडा–पु गावातील सर्व प्रकारचे (तंटे, प्रकरणें, बाबी इ०) कामकाज, गांवचा कारभार, गावकी (क्रि० हाकणें, चालविणें, समाळणें )

शको ३ १

०गाय–स्त्री माळशी व गर्विष्ट स्त्री, नगरभवानी ०गांवढें–न गावें, खेडें ( व्यापक अर्थी ) ०गिरी–वि गावांत उत्पन्न झालेलें, तयार केलेलें, गावराणी, गावठी, याच्या उलट घाटी, तरवटी, वदरी इ० ०गुंड-गुंडा–पु १ गावचा म्होरक्या २ विद्वानास आपल्या हुशारीनें ( वास्तविक विद्या नसता ) कुंठित करणारा गावढळ ३ जादुगारांची माया चालू न देणारा पंचाक्षरी, गारुड्यास त्याच्याच विद्येनें जिंकणारा 'जेवी गारुडी याचें चेटक उदड । क्षणें निवारीत गावगुंड ।' –जै २४ ९ ४ गावांत रिकाम्या उठाठेवी करणारा, त्रासदायक माणूस, मवाली, सोकाजी, फुकट फौजदार, दगवाज व्यक्ति, खेळ्या ०गुंडकी–स्त्री १ गावगुंडाचा कारभार, गावकी २ ( ल ) फसवेगिरी, लबाडी ०गुंडांचा खेळ–पु पचाक्षरी किंवा जादूगार यांच्याशी गावगुंडाचा चढाओढीचा सामना, मुठीचा खेळ ०गोहन–पु (व ) सरव गांवातील गाई एकत्र असलेला कळप ०गौर–स्त्री सवध गावात भटकणारी स्त्री, गावभवानी 'पोरीबाळीसुद्धा हिणवून पुरेसें करतील कीं, या गावगौरीला हें भिकेचें वाण कुणी वाहिलें म्हणुन ? ' –पुण्यप्रभाव ०घेणी–स्त्री दरवडा, हल्ला 'समुद्राचें पाणी सासवा दिसीं करील गावघेणी ।' –भाए ६९ ०चलण-णी, गावचलनी–वि गांवांत चालणारें (नाणें) ०चा डोळा–पु गांवचा वेसकर, महार, जागल्या ०चा लोक–पु गावातील कोणी तरी, कोणास ठाऊक नसलेला, परका, अनोळखी ०चावडी–स्त्री गावातील सरकारी कामकाजाची जागा, चौकी ०जाण्या–वि गांवदेवतेस वाहिलेलें ( मूल ) ०जेवण-जेवणावळ-भोजन–स्त्रीन १ गावांतील सर्व जातींना घातलेलें जेवण २ गावांतील स्वजातीस दिलेली मेजवानी म्ह० हें गांव जेवण नव्हे कीं घेतला थाळाता०या चालला जेवायला ( महत्त्वाच्या गोष्टीची थट्टा करणारास उपरोधिकपणें म्हणतात ) ०जोशी–पु गावांतील वृत्तिवंत जोसपण करणारा ०झाडा–पु गावांतील ( शेत इ० ) जमीनींचा कुळकर्ण्यानें तयार केलेला वर्णनपर तक्ता, कुळकर्णीदप्तर ०झोंड–पु १ सर्व गावापासून कर्ज काढून नागविणारा २ गावांतील खटयाळ खाष्ट माणूस, गावास त्रास देणारा माणूस ०ठण-ठाण–न स्त्री गावांतील वस्तीची जागा (अस्तित्वात असलेली किंवा उजाड झालेली) आईपांढर [स ग्राम+स्थान=प्र गाव+ठाण] गावठा–पु १ गावचा एक वतनदार म्ह० गावचा गावठा गावीं बळी २ खेडवळ, गावढळ गावठी-ठू–वि १ गावचें, स्थानिक गावगिरी अर्थ १ पहा 'बाजारी तुपापेक्षा गावठी तूप नामी ' २ गावढळ, खेडवळ ३ (विशेषत गावठू) रानटी, खेडवळ (माणूस, चालरीत) गावठी वकील–पु दशी भाषेंत वकिलीची परीक्षा दिलेला माणूस इंग्रजी न जाणणारा किंवा वकिलीची मोठी परीक्षा न दिलेला साधा मुखत्यार वकील गांवडुकर–पु डुकराची एक जात, गावातच राहणारें डुक्कर, याच्या उलट रानडुक्कर गांवडें-ढें–पु अनाडीपण, अडाणीपणा गांवढ(ढा)ळ-गांवढ्या–वि १ खेडवळ, मूर्ख, रानवट, अडाणी, 'खती करिती कर्मांची । ते गावढे गा ।' –ज्ञा ३ १४५ २ खेड्यात राहणारा, शेतकरी ०ढळकर–पु ( गो ) गावढळ, खेडवळ, शूद्र गांवढें–न लहान खेडें, गाव, शेतकऱ्यांची वाडी, शेतवाडी, 'मला माझें गावढेंच बरें ' –इसाप नीति (छत्रे)[स प्राकृतिक प्रा गामड] गावढेकर–वि खेडवळ, गावढ्या 'तेथें कोणी गावढेकर कुणबी बसला होता ' –नि १४९ गावढेकरी–पु खेड्यात राहणारा माणूस, गावकरी गांवढें गाव–पुन वाडी, पाडा, खेडें, निवळ शेतकरी राहतात तें गांव म्ह० गावढे गावात गाढवी सवाशीण (गाढवी बद्दल गावठी असा पाठभेद )=लहान गावात क्षुद्र माणसासहि महत्त्व येतें ०थळ–न गावठण पहा [स ग्राम+स्थल] ०था–वि गावढळ –शर ०दर-री–स्त्री गांवाच्या लगतची जागा 'आताशीं वाघ रानीचा गावदरीस येत असतो ' ०देवता-देवी–स्त्री गावची संरक्षक देवता, ग्रामदेवता [स ग्राम+देवता] ०धणें–न गावचीं गुरें –शर [गाव+धन ?] गावधें–न १ वाडी, खेडें, गावढें पहा २ दुसऱ्या खेड्यांतील कामकाज 'मला गावधें उपस्थित झालें ' गावधोंड–स्त्री १ गावावर बसविलेली जबरदस्त खंडणी २ ( सामा ) गावावर आलेलें संकट, अरिष्ट [गांव+धोंडा] ०निसबत इनाम–न निरनिराळ्या प्रासंगिक खर्चाकरिता किंवा सरकारी खर्चाकरिता काढिलेल्या सार्वजनिक कर्जाच्या फेडीकरिता गावकऱ्यांनीं गहाण ठेवलेली जमीन ०निसबत मिरास स्त्री जिचा मालकीहक्क सर्व गावकऱ्यांकडे मिळून आहे अशी जमीन ०नेमणुक–स्त्री गावखर्चाकरितां तोडून दिलेला पैका ०पडीत–न गांवांतील बिन लागवडीची, पडीत जमीन ०पण–( गो ) ग्रामसभा, गावकी 'गावपण मांडलिया वायसें ।' –सिसं ८ १५७ ०पाणोठा-था–पु गावची नदी–तळ्यावरील पाणी भरण्याची जागा ०पाहणी–स्त्री गांवांतील पीक किंवा शेतजमीन यांची पाटलानें केलेली पाहणी, मोजणी, ( सामा ) गावाची सर्वदृष्टीनें पाहणी ०बंदी–वि गांवात वस्ती करून असलेला (फिरस्ता नव्हे) ०बैल–पु (पोळ्याच्या दिवशींचा ) पाटलाचा बैल, हा सर्व बैलांच्या पुढें असतो, हा पाटलाचा एक मान आहे ०महार–पु (बिगारी इ०च्या ) गावच्या चाकरीवर असलेला वतनदार महार ०मामा–पु गावांतील शहाणा माणूस गावकऱ्यांवर चरितार्थ चालविणारा व सर्वांशीं मिळूनमिसळून असणारा माणूस ( उपहासात्मक ) ०मावशी–स्त्री गांवांतील कुलीन, (सामा ) वयस्क व स्वैरिणी स्त्री ०मुकादम–पुअव गांवचे सारे श्रेष्ठ वतनदार –गागा ४५ ०मुकादमी–स्त्री वतनी

ग्रामव्यवस्था ०मुनसफ-पु होलकऱ्याचे १० रु ज्या आतील दावे चालविण्यासाठीं, शेतकी कायद्याप्रमाणें नेमलेला विनपगारी मुनसफ -गागा७२ ०मेव्हणी-स्त्री गावातीलवेश्या ०म्हसन-न गांवातील स्मशान ०रस-न गावातील घाणेरडें पाणी, लेंडी नाला, लेंडे ओहोळ 'हां गा गावरसें भरलें। पाणी पाठीं पाय देत आलें।'-ज्ञा १६ २५ ०रान-न १ गाव व त्याच्या आस पासचा प्रदेश, जमीन २ गावची व आसपासची लोकसंख्या ०रान-नी-राणी-वि स्थानिक, गावठी, घरगुती, रानवट (भाजी, पदार्थ इ०), याच्या उलट शहरी, पेठी ०वर्दळ-स्त्री गायरानाखेरीज गावच्या दिमतीस असलेली इतर जमीन ०वसाहत-वसात-स्त्री १ गावची वसलेली स्थिति, वस्ती २ गांवचा वसलेला भाग ३ गावची लोकसंख्या ०वहीत-न गावची लागवडीखालची जमीन ०वेस-स्त्री गावाच्या तटाचा मोठा दरवाजा ०वेसकर-पु गावाच्या वेशीवर पहारा कर णारा पाळीचा महार, याच्याकडे गावाचें निकडीचें काम कर ण्याचें असतें ०शाई-स्त्री खडबडीत चपटें मोतीं ०शीव-स्त्रीन गाव किंवा गावें (याना सामान्य संज्ञा), गावगाव वगैरे माहिती 'त्याची गांवशीव मला ठाऊक नाहीं' ०सई-स्त्री १ गावच्या भुताखेताना दरसाल द्यावयाची ओंवाळणी, बळी (नारळ, कोंबडें इ०) २ एकुणएक गाववस्ती, गावकरी, अखिल ग्रामस्थ ३ भगत सांगेल ते सात किंवा नऊ दिवस गावा तील यच्चावत माणसानीं बाहेर जाऊन राहणें -वदलापूर ३२० ०समाराधना-स्त्री गावजेवण पहा ०सवाशीण-सवाष्ण-स्त्री १ (गोंधळ, मोहतूर इ० प्रसगीं) पाटील किंवा चौगुला याच्या बायकोस म्हणतात २ (ल) गावची वेश्या गावळी-क्रिवि गावोगाव, सर्व गावातुन 'जेवीं निळहाऱ्याची नासे लिळी। तो मिथ्यामात उठवी वायकोळी। ते देशीं विस्तारे गावळी। साचा सारिखी।'-ज्ञाप्र६२७ गांवाची खरवड-स्त्री गावास त्रास देणारा, द्वाड माणूस गांवा-देशानें ओंवा ळलेला-वि द्वाड, वाईट म्हणून गावानें दूर केलेला, कुप्रसिद्ध, गावाची खरूज (ओंवाळणें पहा) गावाबाहेरचा, गांवा भायला-वि. महार, परवारी (कु) गावाभायला. गावार-न गावजेवण गावीक-वि (राजा) सार्वजनिक, गावचें (शेत, पाणी, खर्च, पट्टी, कथा) गावुडगो-वि (गो) गावात राहणारा

**गावगाई**—स्त्री नगरभवानी, भटकभवानी स्वैरिणी स्त्री

**गावट(ठ)विणें**—उक्रि १ समावेश करणें, अतर्भूत करणें होणें २ धरणें, पकडणें [गावणें]

**गावडमोट**—स्त्री (माण) पाटलास द्यावयाची मोट (कण साची) [का गौडा=पाटील+मोट]

**गावडा**—पु १ मीठ, कात तयार करणारी एक जात व तींतील व्यक्ति याची वस्ती कोंकण व गोंवे प्रांतीं आहे [स ग्राम=गाव? का गौडा?] २ एक क्षुल्लक गांवकामदार, घन गरातील एक मुख्य अधिकारी [स गौ? गाव? का गौडा] ३ (गो) गोव्यातील एक कुणबी जात सारस्वतानीं हे गौड देशाहून आणले असें समजतात हे अभक्ष्यभक्षण करीत नाहींत [स गौड? का गौडा=पाटील]

**गावडी, गावडें गाभाडें**—स्त्रीन १ गाय (लडिवाळपणें किंवा कुत्सितअर्थी) २ (खा) गाय (सामान्यपणें) 'गावडी गुमी ग्यल्ती ती वी भेटली' [गो-गाव+डी प्रत्यय]

**गावडेगजाल**—स्त्री (कु) अर्थशून्य बडबड [गावडा+ जाल?]

**गावणें**—अक्रि १ सापडणें, आढळणें (हरवलेली वस्तु), २ मिळणें, प्राप्त होणें (इच्छित वस्तु, हेतु) ३ भेटणें, गाठ पडणें, मिळणें, भेटविणें (सरळ व व्युत्क्रमानें प्रयोग) 'तो मला वाटेनें गावला' 'मी तुला उद्यां गावेन' ४ पकडला जाणें, हातात सापडणें, हातीं लागणें, कह्यात येणें [स ग्रह्=घेणें]

**गावणें**—अक्रि १ (व) गाणें म्हणणें, गाणें २ (कों) सदासर्वदा म्हणणें, जपमाळ घेणें, घोष घेणें (काहीं एक कर्तव्य गोष्टीसबधीं), काशीस जावें काशीस जावें असें दोन वर्षे गावत होता' [स गै, प्रा गाव, हिं गावगा=गाणें]

**गावदी**—वि अडाणी, (हिं) मूर्ख, टोणपा, ढ [स गो, हिं गा=बैल]

**गावरान**—न (कु) (नाविक) नैर्ऋत्येकडील वारा गावाकडे येणारा वारा

**गावली**—स्त्री (काव्य) गाय (लडिवाळपणें माय, माउली प्रमाणें) गावडी पहा

**गावलें**—न उपन्लेल्या हरभऱ्याच्या डाळयाची लहान जुडी, पेंढी, याची वाळल्यावर गजी करतात, तिला उडवें म्हणतात

**गावस**—पु (गो) क्षत्रियाची एक जात

**गावा**—पु (कों) पुन्हा पुन्हा बोलून दाखविलेली इच्छा, ध्यास, एकाच गोष्टीची जपमाळ, अट्टाहास, घोष 'घर बांधीन बांधीन म्हणून चार वर्षांनीं गावा लागला' (क्रि० गाणें, लागणें, (सपला असल्यास) मोडणें, सरणें, सपणें, आटोपणें) [गावणें, स गै, प्रा गाव]

**गावा-वी**—पुस्त्री (कारागिरी) धातूची तार ओढण्याचें हत्यार, चिमटा [गावणें=सापडणें, पकडणें]

**गावाई**—स्त्री गुतागुत, घोंटाळा 'एथ उपदेशामाजि गोंवाई।'-ज्ञा ३ २१ [गावणें]

०होणें–भीतीनें गांगरून जाणें गाळणा–स्त्री ( क ) भीतीनें उडालेली त्रेधा, गोंधळ, पळ काढण्यासारखी स्थिति, गाळण उडणें 'वाघ पाहिला, माझी गाळणा झाली ' ( इसापनीतींत ( भाषा सरित ) असे बनविलेले शब्द येतात )

**गाळणावळ**—स्त्री गाळणेचाळणेची मजुरी [ गाळणें ]

**गाळणी**—स्त्री १ चाळणें, गाळणें, शोधणें २ स्वच्छ करणें, गाळ काढणें, साफ करणें ( विहीर, तळें ) ३ ( सोनारी ) ( कु गो ) मूस ४ नरसाळें, गाळणी पातळ पदार्थांतील केर कचरा काढून टाकण्याकरिता वापरावयाचें वस्त्र किंवा छिद्रयुक्त पात्र, ( इ ) फनेल. –क्रि. गाळणें पहा

**गाळणें**—उक्रि १ वस्त्रातून किंवा छिद्रयुक्त पात्रातून ओतून चाळणें, स्वच्छ करणें २ रद्द करणें, बाजूस टाकणें, परतविणें, घालविणें, वाटेस लावणें ३ ढाळणें ( अश्रु, केंस, पिसें ) ४ घालणें ( अंडीं ) ५ वर्जणें, वगळणें, टाकणें ( माणूस, वस्तु गोष्ट ) 'सगळा गाव बोलावला पण चार घरें गाळलीं ' ६ शुद्ध करणें, चकचकीत करणें ( धातूचे जिन्नस विस्तवांत घालून ) ७ यंत्रात दाबून पिळून काढणें, तेल, अर्क काढणें ( गळिताचें धान्य, बीं यांचें ) ८ ( अवसान हातपाय इ० शब्दास जोडून ) धीर सोडणें, कच खाणें, खचणें ९ रस करणें, वितळविणें, पातळ करणें १० स्वच्छ करणें, मळ, गाळ काढणें ( विहीर, तळें, धरण यांतील ) 'प्राज्य प्रीतिद झालें सुहृदाला गाळिलें जसें आज्य।'–मोसभा ७ ३ [ सं गल्=गळण ]

**गाळणें, गाळाणें**—न चाळणी, गाळणी

**गाळा**—पु १ मळ, गाळ, रेंदा, गाळल्यानंतर राहिलेला साका २ नदीला पूर येऊन गेल्यानंतर काठावरील झाडास अड कून पडलेला पातेरा, केरकचरा, चिखल, मळी ३ स्वच्छ पिंज लेला कापूस [ गाळणें ]

**गाळा**—पु १ खण, दोन वहालातील जागा २ चौकट इ० च्या गर्भाचें प्रमाण 'या चौकटीचा गाळा दोन गज आहे ' ३ इमारतींच्या दोन भिंतीमधील भाग, खोली 'कडेचा गाळा भाडयानें घेतला आहे '

**गाळाँ**—पु ( गो ) एक प्रकारचें रेशमी पातळ, ( दैवज्ञ ) वधूची रेशमी साडी, वधूवस्त्र –बदलापूर ४८२

**गाळागाळ**—स्त्री १ वर्जन, वगळणें, टाकणें २ नाकबुली, नकार ३ ( ल ) वेंचणें, निवडणें [ गाळणें द्वि ]

**गाळीत**—न गाळण्याचें वस्त्र

**गाळींव**—वि १ गाळलेलें, चाळलेलें, वेंचलेलें, स्वच्छ केलेलें २ निवडक, निवडून घेतलेलें ३ ( ल ) उत्कृष्ट, चांगलें ४ ( ल ) पक्का, बिलंदर, अट्टल, लबाड ( लुच्चा, शठ वेडा ) ( निंदार्थी ) [ गाळणें ] ०मूर्ती किंवा वस्तु–वि सर्व दुर्गुण एकत्र असलेला ( माणूस ), अट्टल सोदा

**गाळेकंपास**—पु ( पों ) ( सुतारी ) गळ्याचें आंतून व बाहेरून माप घेण्याचा कंपास, कैवार ( इ ) कॅलिपर गाली-कुपास पहा

**गाळेखेरें**—नअव गोट्या उडविणें व झेलणें ( लहान मुलांचा एक खेळ )

**गाळोटी**—स्त्री ( व ) गाळवड जमीन

**गिग्गी**—स्त्री ( क ) लहान दुबेळकें, मेड

**गिचका, गिचगिचीत**—वि मऊ आणि चिकट, चिक-चिकीत, मोकळा नव्हे असा ( शिजविलेला भात ) [ध्व गिच्, का गिज ]

**गिचगिंदा**—पु एकत्र कालविलेला, सरसरीत, खाण्याचा पदार्थ, काला, बोडण [ का गिज, गिजति ]

**गिचमिट-ड**—स्त्री १ बिजबिड लिहिलेलीं अक्षरें, चित्रें आकडे, आकृति, गोष्ट, अव्यवस्थित लिखाण, खरडणें, कुत्र्या-मांजराचे पाय २ खरडलेला, चिंताड कागदाचा तुकडा –वि १ ओरबाडलेलें, ओरखडलेलें, चिडविड लिहिलेलें ओबड-धोबड केलेलें ( लिखाण, काम ) २ गोंधळाचें, भरमसाट, भरकटलेलें ( भाषण ) [ का गीजु=खरडणें, ओरखडा ]

**गिचाड**—न १ गर्द झाडी, दाट अरण्य २ घनता, दाटी ( अरण्य, झाडी इ० ची ) गचाड पहा

**गिच्च**—क्रिवि गच्च, दाट, गर्द, खेटून, गर्दीनें ( क्रि० होणें, भरणें, घालणें, लावणें, लागणें ) गच्च पहा ०दाटी–स्त्री निबिडदाटी, गर्द, चेप, गर्दी

**गिच्ची**—स्त्री ( भोंवऱ्याचा खळ ) भोंवऱ्याच्या डाव्यांत एक भोंवरा दुसऱ्या फिरत्या भोंवऱ्यावर आपटून तो तसाच फिरत ठेवणें गुच्चा पहा [ का ]

**गिजगिजीत, गिचगिचीत**—वि गिचका, मऊ, चिक चिकीत (भात, भाकर, केळें, अपुरें शिजलेलें–भाजलेलें अन्न, पिकलेलें फळ ) गिचका पहा

**गिजगोळा**—वि ( क ) लद्दा, डिचका, गिचका पहा. 'गिजगोळा भात केलास तर तोंडाला शिवणार देखील नाहीं ' [ का गिज+म गोळा ]

**गिजबिजलें**—न काचेच्या व सोन्याच्या मण्यांची माळ, गळसरी

**गिजबिड गिजमिड**—गिचमिट पहा

**गिजरा**—वि ( व ) घारा त्याचे डोळे गिजरे आहेत '

**गिट**—वि ( क ) दुहेरी सुताची वीण असलेलें, भक्कम ( लुगडें, कापड ) [ का ]

**गिटकडी-कारी**—स्त्री ( हिं ) ( संगीत ) गळ्यातील कंप, कोणताहि स्वर वाजवीत असता त्याच्या मागच्या व

पुढल्या चार स्वरांस झटका देऊन उत्पन्न केलेला मिश्र स्वर [का गिट=अनुकारी आवाज ?]

**गिटकळी, गिटंगळी**—गटकळी, गग्गळी पहा

**गिट्टी**—स्त्री (ना) दगडाची खडी

**गिडगाप**—न सातारा जिल्ह्यात होणारें खरीपातील जोंधळ्याचें हलकें पीक, या जोंधळ्याचें कणीस मोठें असतें -कृषि २६६

**गिडगिडी**—स्त्री (सोनारी) करणीसारखें एक हत्यार, यानें भांड्याच्या किनारीवर तोड्याच्या आकाराची गोलाई मारतात

**गिडगिडि(आ)या**—पु (महानु) वाद्यविशेष 'सुप रिवारें जय वाद्यनें राय गिडगिडिआ गोमुखे भेटी।'-धवळे, उत्तरार्ध ४७ गिडविडि पहा [ध्व गिड्]

**गिडगी**—स्त्री (प्रा) दारूचें दुकान

**गिडगें**—न. (गो) सगाणा

**गिडघिड**—क्रिवि डवराच्या आवाजाप्रमाणें (शब्द, आवाज करणें) [ध्व]

**गिडघिडणें**—अक्रि खरडणें, ओरखडणें, रेखाटणें [का गीचु गिचविड]

**गिडघिडि-डी**—स्त्री. एक वाद्य 'दुदुंभि गिडबिडिया भेरी।'-कुमुरा १७६९ 'मुखवातें सनया रसाळ। गर्जती ढोल गिडबिडी।'-ह २२ २७ [ध्व]

**गिडबिडीत**—वि गिचमिड, खरडलेलें, चिरखोडया ओढलेलें

**गिडविड्या**—वि एक जात डाकुता, दाकोता पहा [गिड विड]

**गिडमंग्या**—पु (वे) एक प्रकारचा झाडावरील खेळ [का गिडा=झाड+मग्या=माकड]

**गिंडी**—स्त्री १ तीर्थ ठेवण्याचें, खालीं रुंद पोटाचें व ल्हान गळ्याचें व अरुंद चबूसारखें भांडें २ सतेले, युरोपीयन लोक हात धुण्याच्या सतेल्यासारख्या भांड्यास म्हणतात ३ (तजा) मारी [का]

**गिड्डु-ड्डा**—वि १ ठेंगणा, खुजा २ ठेंगणा व जाड, थपकट व बळकट [का] **गिड्डुयावलें**-वि (गो) ठेंगू [गिड्डा+बाहुली]

**गिणगिण-णा**—क्रिवि १ गुणगुणत, गात आवाज करीत २ नाकातील आवाजानें, गोंगावत [ध्व] **गिणगिण**-स्त्री १ नाकांत बोलणें २ गुणगुण, गाण्याचा, वाजण्याचा आवाज ३ भुणभुण, रड रड मागणें [ध्व] **गिणगिणणें**-अक्रि १ नाकांत बोलणें, गेंगाणा, नाकातील असणें (शब्द, आवाज, याचा कर्ता आवाज, बोलणें, बोलणारा, किंवा नाक असतो) २ गुणगुणणें, गाणें, गोंगावणें (चिलट, घुंगुरटें) (डोक्यात अथवा कानांत) **गिणगिणणें**-अकर्मकक्रि एखाद्या ठिकाणीं गुणगुण असा आवाज होणें **गिणगिणा-गिण**

**गिणीत**-वि १ सानुनासिक, नाकांतील (उच्चार) २ अस्पष्ट, गुळमुळीत ३ गात, गुणगुणत (डांस) **गिणगिणाट**-पु (गिणगिणचा अतिशय) १ गुणगुणाट, गोंगाट, सर्वांचा मिळून मोठा आवाज (माशा, मच्छर, भुंगा यांचा) २ खणखणाट, घणघणाट, मोठा गोंगाट ३ लांबचा व अस्पष्ट गोंगाट (विद्यार्थी किंवा लोकसमूह याचा), ४ गिल्ला, त्रासदायक बडबड, कलकलाट ५ लोकांची गुणगुण, कुरकूर **गिणगिण्या**-वि गेंगणा, नाकांत बोलणारा [ध्व]

**गिणमिणणें, गणमणणें**—अक्रि (गो) सांगितलेलें ऐकणें, दाद घेणें

**गिण्णाठें**—न (गो) पायलीचा ३२ वा भाग, अर्धे चिपटें, कोळवें

**गितस(सा)ई**—स्त्री एक ल्हान व सरळ वाढणारें झुडुप

**गितु-तू**—न गाणें, गीत [स गीत]

**गिद(दा)वा**—पु धराच्या धान्यावर पसरण्याची (विटाच्या भट्टीतील) माती, चुरा, विटकरांची पूड

**गिदाडा**—पु (ना व) केरकचरा, घाण -वि घाणेरडा [गिदावा]

**गिदार**—न (गो) शिप्याचें अगुस्तान [पोर्तु, द गार्ड]

**गिद्री**—स्त्री (गो) वराई, नफ्याचा भाग, हिस्सेरशी

**गिध, गिध(धा)ड, गिधाडा**—नपु एक मृत मांस खाणारा मोठा पक्षी, गरुडवायलें [स गृध्र, प्रा, गिध्दो, प गिध्दो, गु हिं गीध, ब गिधर]

**गिधण**—न एक औषधी वनस्पती

**गिधाऊ**—पु (खा) डोळ्यांतील पू चिपडें इ०

**गिधाडीमशीन**—न (छाप) एक छापण्याचें यंत्र, कोलंबियन हँडप्रेसला प्रतिशब्द -मुद्रण ६०

**गिध्यान**—स्त्री १ (व) गांधीलमाशी २ एक औषधी वनस्पती

**गिनी**—स्त्री १ पूर्वी इंग्लंडात चालणारें एक सोन्याचें नाणें आतां हें चलनी नाणें नसून फक्त हिशेबी आहे याची किंमत २१ शिलिंग ठरलेली आहे २ पौंडाच्या नाण्यास (युरोपीयन) म्हणतात ३ (गिन्नी)-स्त्री निकलचें, हिंदुस्थानात चालणारें एक आणा किमतीचें नाणें [पोर्तु गिने आफ्रिकेंतील गिनी प्रदेशावरून नांव]

**गिनी**—न एक प्रकारचें विलायती गवत, चारा [गिनी देश]

**गिन्ना**—पु. (क.) खरवस; चीक (दुधाचा). [का. गिण्ण]

**गिबत**—स्त्री. (व.) निंदा; चहाडी. 'याची गिबत त्याच्या पाशीं अशी सवय त्याला आहे.' [अर. घीबत]

**गिम**—न. भळवाची एक जात. –कृषि ६४५.

**गिमवस**—स्त्री. १ उन्हाळ्यांत पाट–मोट यांच्या पाण्यानें तयार केलेलें (नाचणी, भात यांचें) शेत. २ अशा तऱ्हेचें पीक, धान्य. [सं. ग्रीष्म; प्रा. गिम्ह; हिं. गीम. गीम+वस]

**गिम(म्ह)वा**—पु. गिमवस अर्थ २ पहा.

**गिमावणें**—अक्रि. (राजा. कु.) उन्हाळ्यांतील त्रासानें (चारा पाणी यांचा अभावानें) मलूल होणें, सुकणें, रोडावणें (पशु); उन्हाळा बाधणें. [सं. ग्रीष्म]

**गिमाळा**—पु. उन्हाळा. 'आपदेचा मोडला भंगला। आला आनंदु गिमाळा।' –शिपु २.५१.४८. गीम पहा. [ग्रीष्म+काल]

**गिर–कन–कर–दिनी–दिशी**—क्रिवि. गरगरां; गरगर. (भोंवरा इ० वाटोळें फिरणें). [ध्व.]

**गिरका**—पु. १ कापसांतील सरकया काढण्याचें यंत्र, जीन. २ फेरी; चक्कर; गिरकांडा; गरका पहा.

**गिरकांडा–डी, गिरकंडा**–पुस्त्री. १ गरका; चक्कर; भोंवरी; वेढा; फेरा; वळसा. २ फेरी; चक्कर. (क्रि० देणें; मारणें; घेणें; घालणें), ३ भोंवांडा; वाटोळा रस्ता; घेर. (क्रि० खाणें; घेणें; घालणें (उलट) क्रि० बसणें; पडणें). ४ एखाद्या स्थलीं जाऊन येणें; हेलपाटा; खेप. ५ (ल.) द्राविडी प्राणायाम; चरपटपंजरी. ६ (ल.) गोंधळ; घोंटाळा; गळफांटा; घोळ; फेरा (क्रि० पडणें).

**गिरकी**—स्त्री. १ गिरकांडा अर्थ १।२ पहा (क्रि० मारणें; देणें; खाणें; घेणें). २ भोंवंड; घेरी. (क्रि० येणें) ३ (गाण्यांतील) कंप; तान (क्रि० घेणें). **गिरकें**–न. १ घेरी, घुरें, अपस्मार, फेंफरें यांचा झटका. (क्रि० येणें). २ गिरगिरें पहा. **गिरगिंडा**–पु. १ माणसांचा गराडा; गिरकांडा, गरका पहा. २ (ल.) भेसळ; मिसळ; खिचडी; काला (अनेक भिन्न सदृश वस्तूंचा). **गिरगिर–रां**–क्रिवि. सभोंवार; भोंवतालीं; गरगर (फिरणें, भोंवंडणें इ०). [ध्व.] **गिरगिरणें**–अक्रि. १ सभोंवार फिरणें; वाटोळें भोंवंडणें २ चक्कर, भोंवळ येणें; फिरणें (डोकें). **गिरगिरमाथा**–पु एकमेकाचे हात धरून वाटोळें फिरण्याचा मुलांचा एक खेळ. **गिरगिरी**–स्त्री. मूर्च्छा; भोंवंड. (क्रि० येणें). 'तशा संधीं हाणी नर शर तयानें गिरगिरी।' –वामन विराट ७.१६९. **गिरगिरें–गिरी**–नस्त्री. १ खेळणें; लांकडी फिरकिर. २ हवेनें फिरणारें कागदी भिरभिरें. **गिरगिरें**–न. (गो.) एका खांबावर एक लहान लोखंडी कांब गरगर फिरवून खेळण्याचा जुगार. **गिरगोट**–पु. (ना.) उडता पतंग खालीं पाडण्याकरितां लहान दगडाला दोरा बांधून केलेलें एक साधन. **गिरटी**–स्त्री. १ घिरटी; प्रदक्षिणा; वळसा; फेरी. (क्रि० घालणें). २ फेरी; गिरकी; भोंवरी. ३ (ल.) (अव. प्रयोग) घिरट्या; येरझारा; जा ये; फेरे. **गिरवणी**–स्त्री. अक्षरवळवणी; घोटणी. [गिरविणें]

**गिरगटण**—न. (व.) दाट सारवणें; चेंदामेंदा होऊन झालेलें सारवण; गिरगटणें. 'देवीचे फोड इतके दाट आले आहेत कीं अंगाचें सारें गिरगटणच झालें आहे.' [गरगट]

**गिरगटणें**—उक्रि. (प्रां.) फासणें; सारवणें (भांडीं, जमीन). गरगटणें पहा.

**गिरगदार–री**—गिरवदार–री पहा.

**गिरगिटाविणें**—उक्रि. गिरविणें पहा.

**गिरचटणें**—उक्रि. (प्रां) जमीन, भांडीं खसखसां घासणें; गिरगटणें.

**गिरड, गिरप**—पु. (गो.) मगज; गर.

**गिरण–णी**—स्त्री. कापसाचें सूत काढण्याचा, गठ्ठे बांधण्याचा, दळण दळण्याचा इ० कारखाना; सामान्यतः यंत्रांनीं चालणारा कारखाना.

**गिरणूळ**—पुस्त्री. ज्याच्यामुळें खरूज बरी होते असें एक वनस्पतीचें मूळ.

**गिरदनी**—स्त्री. (गो.) उशी; गिरदी पहा.

**गिरदा**—पु. १ हुक्क्याच्या खालचा लहान गालिचा, बैठक. २ गिर्दी; उशी. ३ घेरा; गराडा. [फा. गिर्द]

**गिरदी**—स्त्री. १ लहान वाटोळी उशी. २ (ल.) ठेंगणी ठुसकी, गुबगुबीत स्त्री. [फा. गिर्द=वर्तुळ]

**गिरपथा**—पु. घोड्याच्या शिरा आंखडणारा एक वायुरोग; वात. –अश्वप २.१८२.

**गिर(रि)फतार–दार**—वि. १ अडकलेला; कैदी; बद्ध; बंदी. २ निमग्न. 'तोंपर्यंत याच मनसुब्यांत गिरिफदार आहों.' –रा १. ९७. ३ विवंचनामग्न; चिंतातुर; ४ हैराण. 'वाढेनें पर्जन्यामुळें फार गिरफतार जहाले.' –पया ४२८. [फा. गिरिफ्तार्] ०री–स्त्री. १ कैद; बंदी; बंधन. २ विवंचना; चिंता. 'अम्हांप्रारखे आहेत ते गिरफदारींत मग्न असतात.' –ख १.३९. [फा. गिरिफ्तारी]

**गिरव(वि)डणें**—अक्रि. माखलें जाणें; लडबडणें; बरबटणें; –उक्रि. (व.) माखणें; सारविणें; पोतणें (चिखलानें) 'जैसे बाभुळीचे खोड। गिरवडूनि जाती सरड।' –ज्ञा ११.५६१.

**गिरवडा**—पु. (व.) सारवण.

**गिरवॉ**—पु. (गो.) सामता.

**गिरबुजली**—वि (गो) खुजी, टेंगू (मुलगी)

**गिरभी**—स्त्री (राजा) पोफळीच्या किंवा सुपारीच्या माडाच्या गाभ्यातून निघणारें शिवट तुरा, कणिस [स गर्भ]

**गिरमाळ**—वि उच, नापीक, माळरानाचा, पठाराचा (प्रदेश) [गिरि+माळा]

**गिरमीट**—न एक प्रकारचा सामता, भोंक पाडण्याचें एक हत्यार [इ गिम्लेट]

**गिरव, गिरो**—न गहाण [फा]

**गिरविणें**—उक्रि १ वळविणें, क्रियातील अक्षरांच्या वळणावरून (घाईत न बुडविता) लेखणी फिरविणें २ (क्रिया) (ल) सारखें वागणें, बरहुकूम करणें [गिर्]

**गिरा**—पु १ मद्द गिन्हा पहा २ भूतावळ [स मह]

**गिरा**—पु १ दीड तसूचें (गजाचा एकचवदांश किंवा एकमाळाश भाग) कापड वगैरे मोजण्याचें साधन 'तोफ लांबी दहा गज दोन गिरे आली' –रा ७ २६६ २ (व) तुकडा

**गिरा**—स्त्री• वाचा, भाषा, वचन 'भक्तकामकल्पद्रुम तमालनीळ। मेघगंभीर गिरा बोले।' [स]

**गिराण**—न ग्रहण 'दे दान सुटे गिराण' [स ग्रहण]

**गिराणी**—स्त्री १ संकट, ओझें, दु ख 'लोकांस खर्चाची गिराणी फार आहे' –मदवा १ ७० २ टंचना, खपणी 'मजीस गिराणी येईल' –रा १० २५२ ३ जेरी, मेगकुटी 'किल्लेवालेहि गिराणीस आले आहेत' –मदवा १ २०७ ४ महागाई, दुष्काळ 'लष्करात गिराणी फार म्हणून लोक बहुत हैराण' –दिमरा २ १० [फा गिरानी]

**गिरामी**—वि श्रेष्ठ पूज्य, थोर [फा]

**गिरायण गिरवाण गिरेवान**—न आंगरख्याचा खांद्याचा भाग [फा गिरेवान्=गळा, गळपट्टी]

**गिरावळ**—स्त्री (राजा) अत्यंत हट्टी पोर [ग्रह+वलय?]

**गिराशी-सी**—पु १ गुजराथेंतील एक जमीनदार, वाटमारे लुटारू, चावेलोकाची जात –पया ६५ –स्त्री गिराशाचा धंदा, वाटमारूपणा [स ग्रास गिराशिया, गिराश]

**गिरास**—पु १ गिराशांचा धंदा, लूट, गिराशी (–स्त्री) पहा –न गिराशीची टोळधाड समुदाय, टोळी (लुटण्यासाठीं निघालेली) [स ग्रास, हिं गिरास]

**गिरि**—पु १ पर्वत डोंगर २ (दसनाम) गोसावी जातींतील एक शाखा, गोसाव्यात एक भेद [स गिरि] •कंदर-रा-पुस्त्री डोंगर-पर्वतातील गुहा, दरीखोरीं, कपार 'कपी सोडिती युद्ध समाम भूमी। निघाले गिरीकंदरी वृक्ष गुल्मी।' –सुरामायण, युद्ध १६० •गीता–स्त्री (ख्रि) येशुख्रिस्ताचा पर्वतावरील उपदेश (इ) सर्मन ऑन दी माउंट. –मतया ५ ७ अध्याय 'ख्रिस्ती धर्माचें सार गिरिगीतेंत आहे असें पुष्कळ विद्वानाचें म्हणणें आहे'

**गिरिघांटी**—स्त्री १ (मुलांचा खेळ) ओंवळ्यामोंवळ्या २ गिर्की, फेरा, हेलपाटा (क्रि॰ घालणें, करणें, लागणें) [ध्व गिर्+घांटी=एक चक्री गुद्दा]

**गिरिजा**—स्त्री हिमालयाची मुलगी, पार्वती [स गिरि+जा]

**गिरिफ्दार**—वि गरीब, दरिद्री, संकटग्रस्त •री–स्त्री गरीबी, ओटगस्त स्थिति, संकट, हालअपेष्टा [फा]

**गिरिरी-गिरी-गिरीगिरी, गिरीघिरी**—स्त्री मूर्च्छा, घेरी, चक्कर, भोंवंड 'तेणें घाए गिरिरी आली।' –शिशु १०६६ 'आले शहरातून गरकन हरकन आली पहातां मज गिरी। –पला ४ २ 'तेणें गिरगिरी आली अपार।' 'गिरी घिरी आणि अंधारें।' –दा ३ ६ २६ [गिर्]

**गिरेयाज**—वि हवेंत उडतांना गिरक्या मारण्यास शिकविलेलें (कबूतर) [गिर(की)बाज]

**गिरेस्तकाय**—स्त्री (गो) श्रीमती, ऐश्वर्य [स गृहस्थ]

**गिरो**—न (गु) गहाण, गिरव पहा –मौज २ ६ ३० [फा]

**गिर्कांडा-डी, गिर्की, गिर्गिर, गिर्टी**—गिरकांडा पहा

**गिर्द**—क्रिवि सभोंवार. 'सर्व फौजा दिल्लीचे गिर्द जाऊन रसद बंद करावी' –दिमरा १ २६६ –स्त्री १ परिघ, घेर, सभोंवतालचा प्रदेश 'नवशें रुपयाचे जमेचा गाव सांरी गिर्दीत तजवीज करणें' –ऐटि ३ ५७ २ चौकी 'अल्फिस्टन साहेब यांणीं शहराभोंवतीं गिर्द बसवून' –रा १४ ६४ •नवाई–ही–स्त्री १ (किल्लाकोट यांच्या) भोंवतालचा प्रदेश आसमंतातील भाग 'गिर्दनवाईचे गाव लुटून उध्वस्त केले' –रा १४ २० २ भोंवतालच्या प्रदेशाचें संरक्षण [फा गिर्द+नवाह्] •नवाजी–पु गस्तकरी, किल्लेकरी 'गिर्दनवाजी गनिमाकडील अताजी माणकेश्वर आहे त्यास पुरावें' –भाव २० •व गिर्द–क्रिवि चाऱ्हीबाजूनीं –रा १• ३० •वारी–स्त्री १ गिर्दावरी पहा २ (व) मुशाफरी **गिर्दावरी**–स्त्री १ जमवाजमव 'तू बाहेर खमे दाखल होऊन फौजची गिर्दावरी करावी' –रा ५ ७८ २ बंदोबस्त ३ जकातवसुली, जकात बंदोबस्त –रा ८ २१ [फा]

**गिर्दी**—स्त्री १ ल्हान उशी, गिरदी २ किल्ल्याच्या घेराचा प्रदेश ३ गस्त, घरटी, पहारा [फा गिर्दा]–ची पार्टी–स्त्री १ गस्त घालणारी टोळी गस्त, पाहारे [फा गर्द+इ पार्टी]

**गिर्वड**—स्त्री (गो) कटकट [गरबड?]

**गिर्वींदगी**—स्त्री १ निष्ठा २ चहा, नवाजीस 'मर्दमाणूस लोकांस गिर्वींदगी करून कित्येकाचें पारपत्यच केलिया उत्तम आहे' –ऐटि २ ७१ [फा]

गिन्हा—पु १ जलग्रह, पाण्यांतील पिशाच २ राहु (चंद्राला ग्रासतो म्हणून), ग्रहण ३ रोडके, भुतासारखें पोर ४ (ल) त्रास, कटकट, पीडा (एखाद्याला लागलेली) [स ग्रह] -न्हेपूजन-न लग्नाच्या वेळीं केलेलें ग्रहांचें (सूर्य व इतर ग्रह यांचें) पूजन, ग्रहमख [स ग्रह+पूजन]

गिन्हाईक-यीक—पु १ माल खरेदी करणारा २ (ल) गुणग्राहक, रसिक, चाहता 'तुझे गुणास कोणी गिऱ्हाईक नाहीं' —न सामान्यत माल घेणार वर्ग [स ग्राहक] ०मरणें-आपल्याकडे गिऱ्हाईक पाठविलें जाणें ०मारणें-आपल्याकडे गिऱ्हाईक ओढून घेणें, पटकविणें ०(जिवाचा-प्राणाचा)होणें-जीव, प्राण ग्रहण करणारा होणें ०गिऱ्हाइकी-यकी—स्त्री १ धंदा, व्यापार, वर्दळ, वहिवाट (मालखरेदी-विक्री करणाऱ्याची दुकानावर) २ माल घेणारा वर्ग, लोक

गिन्हाण—न (ना) ग्रहण अपभ्रष्ट [स ग्रहण]

गिन्हाद—वि (गो) दारूनें झिंगलेला

गिन्हवाळ—स्त्री गिरावळ, गिऱ्याची पीडा, भुतावळ गिऱ्हा अर्थ ३ पहा

गिन्हे—गिऱ्हा, ग्रह पहा

गिलकी, गिलची, गिलकें—स्त्री घोसाळी-ळें पहा

गिलकें—न (ना) फाटक, झडप, दार झापा (काठ्या-कामट्यांचा)

गिलगिलीत—वि १ बिलबिलीत, गलगलीत, थलथलीत (अधिक पिकलेलें केळें इ०) २ मऊ आणि दबदबीत (जार, खळमळ) ३ गिळगिळीत पहा [स गिल्]

गिलथिलें—न (गो) सरीसारखा एक दागिना, गिज बिजलें

गिलाणी—(राजा कुण) आर्जव, विनवणी 'साव कारापेंत्र जातो नि गिलाण्यो करून दिवाळयेसर वायदो करून येतो' —मसाप २.३६९

गिलावा—पु १ लेप (भिंतीस दिलेला चुना, माती इ चा), चुन्याचा अगर मातीचा थर, गारा २ लिंपण, सारवण [फा गिल्=माती+आवा, फा गिल=ओली, गिलावा=तयार माती तुल० प्रा दे गिलोइया, गिलोई=भिंतीची खपली]

गिलास—पु (व) ग्लास, पाणी पिण्याचा पेला (काच, धातु इ० चा) [इ ग्लास]

गिलि(ली)ट—न मुलामा, पाणी (चांदी, पितळ, इ धातूंस दिलेलें) [इ गिल्ट]

गिलित—वि गिळलेलें 'राहु गिलित, सर्पगिलित, मत्स्य गिलित इ०' [स गल]

गिलेगुजार—वि १ दुरावलेला, २ रुष्ट 'हे वृत्त शहाजीस समजल्यावर बहुत गिलेगुजार आहेत' —दिमरा ० २३ [फा. गिला+गुजार] गिलेगुजारी—स्त्री १ रुष्टता २ तक्रार 'भवानी पुरंदर ही दरबारास जाऊन खलबत करितात म्हणून बहुत गिले गुजारीनें लिहिलें होतें.' —दिमरा २ ०३ [फा गिला+गुजारी]

गिले(ली)फ—पु अभ्रा (उशी, लोड, तक्या इ० वरील) गलेफ पहा [फा गलेफ]

गिल्ला, गिला—पु १ ओरडाओरड, गोंगाट, गडबड, गलबल 'येथें कांहीं गिला पडणार नाहीं' —मराचिथोरा ३०. २ तक्रार, गाऱ्हाणें, फिर्याद, निषेध, नालिश (क्रि० करणें, सांगणें, येणें, पडणें, होणें) 'भटजीनीं नानाप्रकारें इकडील गिला दरबारांत लिहिला आहे' —रा ० ३२५ ३ हाकाटी, नालस्ती, निंदा (क्रि० सांगणें) ४ रडगाणें (प्रपंचादि संबंधीं) 'याला जेव्हांतेव्हां संसाराचे गिले लोकांपाशीं सांगावे अशी खोडच आहे' ५ दोष, ठपका 'या गोष्टीचा गिला आम्हांकडे नाहीं' —रा ७, खलप २ ३२ [फा गिला] ०शिकवा-पु तक्रार, कागाळी 'न जाणों, पूर्वी सोजीमकुली खानांहीं गिला शिकाही आमचा काय लिहिला असेल' —रा ६ ६०० [गिला+शक्वा]

गिल्ली—स्त्री (व ना काशी) विटी 'गिल्ली दांडूचा खेळ' [हिं] ०दांडू-पु (व) विटीदांडू

गिवसण—स्त्री (गो) उशीचा अभ्रा, गवसणी पहा

गिवसणें—गवसणें पहा 'जेया वेदाची आम्हा आशु। तेयां गिवसितां जाले सायासु।' —शिशु ८३

गिवसु—पु विस्तार —शर ?

गिळंकृत-ता—क्रिवि दुसऱ्याचा पैसा लुबाडणें, खाणें (क्रि०करणें) —वि गिळलेलें, लुबाडलेलें, बळकावलेलें (धन, पैसा, ठेव) ०कन्यादान-न १ नवऱ्यामुलाकडून पैसा घेऊन मुलगी देणें याच्या उलट खाळकृत कन्यादान (क्रि० करणें) २ एखाद्या म्हाताऱ्यास मुलगी देणें (उद्देश हा कीं म्हातारा जावई वारल्यावर त्याच्याकडून-मुलीला विकून घेतलेल्या पैशाखेरीज-तो मेल्यावर त्याच्या मालमत्तेवर गवर व्हावें) [गिळणें+अलकृत]

गिळगिळीत—वि गळगळित कांठोकांठ, पळपळीत [स गल, म गळा]

गिळगिळीत—वि गळपळीत, बेचव, पाणचट, नीरस [स गर=गिळणें]

गिळणें—उक्रि १ गट्ट करणें, गळ्याखालीं उतरविणें 'मला नीरहा भात गिळत नाहीं, कालवण असेल तर गिळेल' २(ल) शोषून घेणें, खाऊन टाकणें (पारा सोनें शोषतो, भाकर तूप शोषून घेते त्याप्रमाणें) ३ (ढग, राहु इ० नीं) ग्रासणें, व्यापणें, घेरणें.

'गौतमपत्नी गिळिली होती जे पापतापशापाहीं' –भक्तमयूर केका ४ ४ लांच खाणें ५ दाबणें, दडपणें, आंत कोंडणें, आंत त्याआंत चेपणें (अश्रू, राग, दुःख) ६ अपकार, अपमान, अपराध) सहन करणें, पोटांत घालणें, प्रतिकार न करणें 'त्यानें त्याला एवढ्या शिव्या दिल्या परंतु त्यानें गिळिल्या' [सं. गल्+गिळणें]

**गी**—स्त्री (काव्य) वाणी वाचा, वचन 'आटा पुत्रांतें दे राज्यें प्रभुवर करि सत्या गी।' –मोरा १ २०६ [सं.]

**गीडवीड-डें**—न. एक वाद्य गिडबिड पहा 'दोंहीची गीडवीडीं दुटाळा।' –ऋमुरा ६५ ३०

**गीत**—न. १ (संगीत) मनोरंजक स्वरसमुदाय 'गीत आटीव तो श्रवणीं। कर्णजपु।' –ज्ञा १७ २९७ गीताचे प्रकार दोन–गांधर्व व गान २ गाणें, पद 'सुखगीत नृत्य तेथें मजलाही तोचि एक थारा हो।' –मोसभा १ ३३ ३ गाणें म्हणणें, पद गाणें (क्रि॰ गाणें, म्हणणें) ४ दळताना किंवा रमात म्हणतात त्या ओंव्या ५ पदाचा छंद, वृत्त, छंदोबद्ध गाण्यांतील एक भेद –वि. गायिलेलें, म्हटलेलें (नाचें) ॰गाणें–श्रोणी बरें केलें असता त्याच्या अपरोक्ष त्याची स्तुति करणें ॰गाणें–१ दुसऱ्याजवळ, आपली सर्व हकीकत सांगणें, रडगाणें लावणें २ तेंचतेंच सांगणें एकच धरून बसणें [सं. गै=गाणें] म्हण॰ जात्यावर बसलें म्हणजे गीत आठवतें सामाशब्द– ॰मान–न. गाण्याच्या (संगीतातील) मात्रा, अंतरा, नियम वगैरे गीतोपयोगी नाद–पु. (संगीत) ज्या नादांत अखंडता, स्पष्टता, व माधुर्य हे गुण असून ज्यांत कांहीं प्रमाण असतें तो नाद

**गीतसावा**—पु. एक वनस्पति

**गीता**—स्त्री. १ गाइलेलें काव्य, गीत २ पुराणाचा भाग, धर्मपर पवित्र, आध्यात्मिक काव्य उदा॰ भगवद्गीता, शिवगीता, नारदगीता ३ (विशेषेंकरून) भगवद्गीता, श्रीकृष्णानें अर्जुनास केलेला उपदेश हा महाभारतांतील भाग असून याचे १८ अध्याय आहेत [सं.] ॰सप्तक–न. भगवद्गीता, रामगीता, गणेशगीता, शिवगीता, देवगीता कपिलगीता व अष्टावक्रगीता या सात गीता

**गीति**—स्त्री. १ एक छंद, आर्येचा एक प्रकार, मोरोपंती आर्या याचे चार चरण असून पहिल्या व तिसऱ्या चरणांत प्रत्येकी मात्रा १२ व दुसऱ्यांत व चवथ्यांत १८ मात्रा असतात २ गाणें गीत [सं.]

**गीद-ध**—पु. १ गिधाड 'करितां रामनामस्मरण। गीध भक्षण करूं न शके।' –भारा किष्किंधा १६ ९० २ घार [सं. गृध्र, प्रा. गिद्ध, हिं. गीध]

**गीम-म्ह**—पु. (राजा. कु. गो.) उन्हाळा गिम पहा [सं. ग्रीष्म, प्रा. गिम्ह]

**गीर**—पु. १ गर, मगज, दळ, गाभा, सार, गर पहा २ गाईची एक जात –शे ११ २६

**गीर**—अ. काम करणारा, कर्ता याअर्थी नामाला जोडून येणारा प्रत्यय जसें–तगादगीर, तमासगीर गर, गार, पहा [फा. गर्, गीर्]

**गीर्दपाषाण**—पु. घोड्याचा एक रोग हा पायाला होतो –अश्वप २ २५८

**गीर्वाण**—पु. देव, देवता –स्त्रीन. १ भाषा, भाषण, बोलणें 'बळिराम आणि जगज्जीवन। बोलती स्वर्गीचे गीर्वाण।' –ह १४ १८३ २ संस्कृत भाषा, देवांची भाषा गीर्वाण-णी–वि. ईश्वरी, दैवी, स्वर्गीय गीर्वाण(भाषा)–स्त्री दैवी भाषा, देवभाषा, संस्कृत भाषा 'गीर्वाण शब्द पुष्कळ जनपद भाषाचि देखता पोटीं' –मोरोपंत स्फुट आर्या (नवनीत पृ. २५४) [सं. गिर्वण=देव–गीर्वाण=देव]

**गीर्वाण**—न. अंगरख्याच्या मानेचा (वस्त्राचा) तुकडा गिरावण, गिरवाण पहा

**गील**—पु. गर, मगज, दळ, गीर पहा

**गीळ, गिळ**—पु. (गो.) गळ्याची एक बाजू 'गिळ धरॉ' =घसा बंद झाला [गिळणें]

**गु॥**—(संक्षेप) १ गुजारत २ गुदस्त, गुदस्तां ३ गुरुवर्य

**गुखडी, गुखाड-डी**—स्त्री. १ सर्वजण, शौचास जातात ती जागा, हगीनदारी २ चहूंकडे विष्टा पडली आहे असें स्थल [सं. गू=विष्टा करणें+खाडा, खाणी]

**गुंग**—वि. १ बेभान, मूढ, धुंद, जड, निश्चित (ज्वर झोंप, दुःख, निशा इ॰ नीं) २ गर्क, तल्लीन, निमग्न (एखाद्या विद्येचा अभ्यास, व्यासंग यांत) ३ चकित, आश्चर्ययुक्त, मोहपावून पराङ्मुख, स्तम्भित (शास्त्रांतील कठिण अंश पुरतेपणीं मनांत न आल्यामुळें इ॰) ४ एखाद्या विषयांत एकतानता झाल्यामुळें इतर व्यवसायांत अनासक्त, विरक्त [फा. गुंग=मुका]

**गुंगणी**—स्त्री. गुंगी, झापड (झोंप, निशा वगैरेची) गुंगी पहा

**गुंगणें**—अक्रि. १ गुंगुं करणें घुमणें, गुणगुण करणें (गांधील माशी, भुंगा, भोंवरा जोरानें फेंकलेला धोंडा, गोळा वगैरेनीं) 'गुंगत गोळे येती छणाछण।' –ऐपो २२३ २ (ए.) हुं हुं हुं असें हळु गाणें, मोठा शब्द न करतां तोंडांतल्या तोंडांत गाणें म्हणणें [ध्व.]

**गुंगणें**—अक्रि. १ धुंद, जड, मूढ, सुस्त होणें (मूर्च्छा, निशा, झोंप यांनीं) २ मागें लागणें, भुलणें, वेडावणें 'त्या राडेच्या पाटीमागें राजेश्री गुंगले' ३ हळूंच जाणें, निसटणें, सटकणें ४ तल्लीन, गर्क होणें, निमग्न असणें ५ गुंग होऊन झुलूं लागणें, थक्क होणें [फा. गुंग, गुंगा=मुका]

**गुंगविणें**—सक्रि १ गुग करणें, मूढ, मुग्ध, जड करणें २ २ गुगु करावयास लावणें ३ (ल) एखादी वस्तु पळविणे ४ (मुलाच्या खेळात) जेरीस आणणें 'माता तुला गुगवतों पहा.' [गुगणें प्रयोजक]

**गुगळी**—स्त्री माशाची एक जात

**गुंगारणें**—अक्रि सू सू करीत जाणें (गोफणगुडा) [ध्व गु]

**गुंगारणें**—अक्रि १ फसवून फरारी होणें, पळून जाणें, पसार होणें, लवाडीनें नाहीसें होणें (गोफणीच्या दगडाप्रमाणें) २ गुगींत, धुंदींत, अमलात असणें (औषध, दारू वगैरेच्या) ३ डोळे जड, सुस्त होणें (औषध, झोंप यामुळें) [फा गुग]

**गुंगारा**—पु १ गुगु आवाज, गुणगुण २ गोफणगुडयाचा आवाज [ध्व]

**गुंगारा**—पु १ फसवून पळणें, फरारी होणें, फसविणें (क्रि० देणें, मारणें) 'एवढें त्याचें केलें पण शेवटीं त्यानें मला गुगारा दिला' २ (सामा) नजर चुकवून जाणें, निसटणें 'लिहायला नको म्हणून केव्हाच मला गुगारा देऊन जातो' [फा गुग]

**गुंगावणें**—गुगणें अर्थ १, २, ४ पहा

**गुंगी**—स्त्री १ सुस्ती, जाडय, धुंदी, झापड (झोंप, ताप, दु:ख, दारू, यामुळें आलेली) (क्रि० येणें, चढणें) २ भूल, नष्टबुद्धि (औषधानें येणारी) **गुंगीचें औषध**-न. क्लोरोफॉर्म **गुंगी-ग्या**—वि गुगींत असलेला, गुगलेला [फा गुग]

**गुगुपंजर**—न एक औषध, डोळयात फूल पडल्यास त्यावर औषध 'गुगुपजर लिंबाचे रसात घालून लावावें'—अश्वप २ १२१

**गुग्गल**—पु दक्षिणेंत लिंगायतावर बसवावयाचे कर—विल्सन कोश

**गुग्गुळ, गुगुळ, गुगूळ**—१ एक काटेरी झाड याच्या चिकाचा धूप करितात हा सुगधी असतो हें झाड औषधी आहे २ गुगुळाचा चीक, धूप 'जे घे फुलागधाचा गुग्गुळु।'—ज्ञा १७ २९८ [स गुग्गुलु हिं गुगल, गु गुगुल, ते गुग्गिल, सिं गुगुर] म्ह० घे गुग्गुळ दे प्रसाद=थोडें देऊन फार मिळावें अशी अपेक्षा धरणें **गुगळ काढणें**-क्रि (माण) १ भदें काढणें २ लमात फुलक्या भडक्यात विस्तव घालून नवऱ्या मुलाच्या व त्याच्या आईच्या डोक्यावर देऊन त्यानीं नाचत देवास जाणें [गुग्गुळ+काढणें]

**गुग्गुळी**—स्त्री हत्तीवेल

**गुंघाटा**—पु गोंगाट, गलबला, आवाज 'आस्वलें दिवा भितें सायेळ्या। देती गुघाट किंकाळया। बदकें बिडाळकें पाकोळया।'—होला ११४ [ध्व]

**गुघाण**—पु १ गुवाची घाण, हगीनदारी २ अत्यंत दुर्दशा, अनिष्टावस्था, दैना ३ घोंटाळा, गैरव्यवस्था, गोंधळ (कारभार, संसार, वस्तु इ० चा) ४ नासाडी [गू+घाण]

**गुचकी**—स्त्री १ (राजा) उचकी २ गटागळी 'पोहणारचि गुचक्या खातो।'—दा १७४४ [ध्व गुच]

**गुचकुला**—वि (कों) ल्हान व गोंडस, चिमुकला [का गुच्चु-उच्चु=लघुता, ल्हानगेपणा]

**गुच्चा**—पु १ भोंवऱ्यावर भोंवरा मारून पडलेला भरीचा खोंचा (क्रि० मारणें) गिच्ची पहा २ (ल) पोंचा, खोचा, सोलगा ३ ठुका, ठोसा ४ आटयापाटयाच्या खेळातील हुल्का वर्णी [का गिच्ची]

**गुच्ची-च्छी**—स्त्री गुच्चा अर्थ १, २, ३ पहा

**गुच्छ गुच्छक**—पु १ झुबका, गोंडा, घड, घोंस, गेंद, तुरा, गोटा (फुलें, फलें, पानें वगैरेचा) 'झाला धीर परि परिम्लान सखा जातिपुष्पगुच्छक सा।'—मोभीष्म १० ९३ २ माळ, हार, कंठा ३ जुडी, जुडगा, जमाव ४ गवताची पेंढी [स]

**गुज**—न गुपित, गूढ, गुप्त गोष्ट, रहस्य, मर्म, (हित, निज इ० शब्दावरोबर प्रयोग) 'हें जीवींचें निज गुज।'—ज्ञा ४ २८ —परमा १४ २१ [स गुह्य] ०**गुज**-न हलु हलु बोलणें, कुजबुज ०**गुज-जा**-क्रिवि कुजबुजत, पुटपुटत ०**गोष्ट**-स्त्री गुप्त गोष्ट, मनातील बेत **गुजणें, गुजगुजणें**-अक्रि कुजबुजणें, पुटपुटणें, हलु हलु बोलणें 'आपणपयाचि गुजाये।दुर्जनवीण।'—गीता १ ३००१

**गुज**—पु घोडयाचा एक रोग हा गुढग्याला होतो —अश्वप २ २८८

**गुंज**—न माळ, हार 'गुंजें हीं मोत्याचीं धरित निज कर्डी सुचतुरा।'—निमा ३ ७० [स गुञ्छ?]

**गु(गुं)ज**—न सकट, कोडें 'मातापित्र्यावर गुज पडलें।'—वसा ४३ [का गुजु=गुंता होणें]

**गुंज**—पु (कों) एक मासा (पावसाच्या आरंभी उडणारा)

**गुज**—पु १ कुं. 'तिला आपल्या गुजात घेता कामा नये'—विवि १० ९ २१० २ जमाव 'मोंगलाची गुज बळावली म्हणजे भारी पडेल'—पेद १ ५२ [का गुजु]

**गुंज**—स्त्री विंडा, गुजडा पहा —चागदेव पासष्टी १९ 'रेशमाचे गुंज'—मुप्या १६५

**गुंज**—स्त्री १ एक औषधि वनस्पति, हिचा वेल असतो पानें बारीक व लाबट असतात गुंजेच्या तावडी व पाढरी अशा दोन जाती आहेत तावडी गुज विषारी असते २ गुंजेचें बीं, यानें सोनें वगैरे जोखतात ३ एक वजन, परिमाण, एका तोळयाचें ९६ गुंजाभार वजन असतें [स गुञ्जा] म्ह० जातो तेथें हत्ती जातो नाहीं तर गुंजहि मारक होते' **गुंजडा-डी, गुंजवडा-ला, गुंजाडा**-पुस्त्री वर गुजा दडविलेला मेणाचा गोळा, गुडी, चेंडू मुलास खेळण्यासाठीं हा करतात [प्रा गुंजल्लिअ=पिंडी

कृत] गुंजलाडू-पु गुंजा चिकटविलेला लाडू 'दाखलाडू गुंज लाड।' -वेसीस्व ८ ११५

गुंज, गुंजट—न लाकडास आलेलें टेंगूळ, गांठ [फा गुजु=गुता, गुंडा?] गुंजट-वि गांठाळ (लाकूड), गुंजाट

गुजगुज-जें—न गुजगुज, गुणगुण वाजणारें एक वाद्य (नदीबैलासह येणारे पांगुळलोक वाजवितात तें) 'गुजगुजें ताम नगारा उपांग।' -स्वादि १० २ ४६ [ध्व]

गुंजडा-डी-डें—पुस्त्रीन गोळा, बिंडा, रीळ (फीत, दोरा, दोरी इ० चा) [प्रा गुंजेल्लिअ=पिंडीकृत, फा गुजु]

गुंजणें—अक्रि गुंगु करणें, घोंगावणें (मधमाशी), गुंजारव करणें 'ज्याचिया पदनखावरी। भ्रमर गुंजी सुवासा।' [ध्व स गुंजन]

गुजर—स्त्री गुजराथेंतील एक वाणी जात [सं गुर्जर, प्रा गुज्जर] गुजर-रीण-पुस्त्री गुजराथी माणूस, गुजराथेंतील रहिवासी (पुरुष, स्त्री) गुजरड्या-पु गुजराला निंदाव्यंजक शब्द

गुजर—पु १ कसा तरी होणारा उदरनिर्वाह, निर्वाह, गुजारा, गुजराण पहा 'तीनशें रुपये रोजांत गुजर होत नाहीं' -दिमरा १ ६१३ २ चालढकल, जोगवण, निर्वाह [फा गुजर्] गुजरणें-अक्रि १ गुदरणें, (दिवस, काळ) कंठणें, घालविणें 'सदा चार महिने तिथें गुजरले पुण्यास येऊनी।' -ऐपो २७४ २ नाहीसें होणें (वैभव, संपत्ति, सौंदर्य) ३ मरणें ४ ओढवणें, येऊन बेतणें, कोसळणें, येणें (आपत्ति संकट) -उक्रि १ ताब्यांत देणें, स्वाधीन करणें, दाखल करणें (अर्ज वगैरे) २ कायम करणें, जागा देणें अधिष्ठित करणें (हुद्दा, जागा) [फा हिं गुजरना, फा गुजर्-गुजश्तन्चें आज्ञार्थी रूप]

गुंजरडी—स्त्री (व) बिंडा, रीळ, गुजडी पहा

गुजर(रा)णी—स्त्री दागिन्यावर रेघोतळीनें सोनारानें काढलेली बारीक रेघ, नकशी

गुजरवा—पु (सोनारी) दोन वाटया जोडून तयार केलेला भोंक पाडण्यापूर्वीचा मणी, भोंक नसलेला मणी (क्रि० उठवणें, =गुजरवा करणें) [गुंज+रवा]

गुजराण गुजराणी—नस्त्री १ गुजर, गुजारा, कसा तरी उदरनिर्वाह कष्टप्रद उपजीविका 'आमची गुजराणी चालेल' -रा १३ १४ २ कालक्षेप ३ पाठवणूक ४ नजर 'शहानशहांनीं मेहेरबानगी करून श्रीमंत प्रधानास जवाहीर घोडे हस्ती गुजरान केले' -रा ६ ५०५ [फा गुजरान्]

गुजराणणें—सक्रि प्रविष्ट करणें गुजरणें पहा 'अर्जी तजवीज करोन गुजराणिली आहे' -रा ८ २०२

गुजरात-थ—पु १ मुंबई इलाख्यांतील एक प्रांत २ (निंदार्थी) गुलामी, हलीनदारी ०कमावणें-सपत्ति मिळविणें • गुजराथी—वि गुजरातविषयक, गुजराथेसंबंधीं [स गुर्जर+राष्ट्र]

गुजराविणें, गुजरविणें—उक्रि १ प्रविष्ट करणें, गुजराणणें २ कंठणें, काढणें (काळ, दिवस) गुजरणें पहा

गुजरी—स्त्री तांबडें अंग व पांढरे पट्टे असलेलें लुगडें कृष्ण गुजरी लुगडें 'पैठण्यापितांबर गुजऱ्या शाल सजेले।' -प्रला २८ [गुजर]

गुजरी—स्त्री एक पायांतील दागिना 'चरणीं वाळे घागरिया। वाकी वरत्या गुजरिया।' -ध्य ५६ [स गुञ्ज्=ध्वनि करणें?]

गुजरी—वि गुजरासंबंधीं (वस्त्र, वेष, इ०)

गुजरी—वि १ गोजिरी २ (लक) दुष्ट, वाईट 'भाऊ ग म्हणीतो घाल बहिणीला दूधभात। भावजय गुजरी म्हणती आज म्हशीनें दिली लाथ।' -ओंपाळ्यावरचीं गाणीं [गाजिरा]

गुजरी, गुजरीचा बाजार—स्त्रीपु १ सायंकाळचा बाजार २ भाजीबाजार, मंडई, मार्केट 'सायंकाळ गुजरीचा समय' -शिदि २५१ [फा गुज्री] गुजरीची वेळ स्त्री मंडई करण्याची वेळ

गुजरीतोडी—स्त्री (संगीत) गायनशास्त्रातील एक राग ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, तीव्र निषाद हे स्वर लागतात ह्या रागांत पंचम वर्ज्य आहे जाति षाडव-षाडव वादी धैवत व संवादी ऋषभ गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर

गुंजली—न (कु) एक मासा

गुजवला—पु एक वनस्पति चिचुडाच्या जातीचें वाटोळें फळ

गुजस्त—वि गुदस्त, गत, झालेलें [फा गुजश्त]

गुंजाइशी, गुजाईश-ष-स, गुजायस—१ उत्पन्न, ऐपत 'दिवाणानें गुजाईस अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे राहतात' -सभासद २५ २ व्यंग, दोष, लबाडी 'यात गुजाईश आहे हें निमित्य ठेऊन लिहिलें' -पेद १० ३३ ३ सवड, जागा ४ फायदा गुजावीस पहा [फा गुजाइश्=जागा, सवड]

गुजागर—पु टांकसाळींतील धातु गाळणारा, गुदागर -भाद सप्तमसमेलनवृत्त ८५ [फा गुदाह्]

गुंजायरी—स्त्री (हिं) (प्रयाग) सवड 'आपणास पैसे देण्यास तूर्त गुंजायरी नाहीं' [फा गुजाई=जागा]

गुंजायश-ष—स्त्री गुजावीस पहा १ उपयोग 'स्वारांची गुजायश चहू महिन्यात (वर्सांनीच्या) नाहीं' -रा ८ ४३५४

२ ( व ) प्राप्ती, नफा 'आजकाल वकीलीच्या धंद्यात बिलकुल गुजायश नाहीं ' ३ ( माळवी ) सवड, गुजायरी पहा [ फा गुजाइश् ]

**गुजार**—स्त्री आदा, सोंपवणूक, देणें, ( क्रि० करणें ), 'तुम्ही आपले पचसहस्रीचा जो जमाल कराल तो मशार्निलेसी गुजार करीत जाणें' –रा १५ ३७५. [ फा गुझार ]

**गुजारत-ती**—स्त्री १मार्फत, द्वारभूतता, मध्यस्थी ( माणसाची) 'तेंही निळो कृष्ण याचे गुजारतीन विदित केलें कीं' –इम १३१ २ ( सावकारी ) कायदेशीर विद्यमानता, समक्षता, साक्ष 'मी खऱ्या माणसाच्या गुजारतीनें तुला रुपये देईन' ३ ( जमाखर्चे ) खर्डा, कीर्दे इ०त अमुकाचे गुजारतीन ( कडोन, मार्फत या अर्थी ) गुजारत अमुक असें लिहितात 'अ कडोन आपली रकम यणें होती ती अच्या पत्रावरून बनें क बरोबर पाठविली, तर या रकमेस ब ची गुजारत व क ची हस्तें लिहावी ' ०वार–क्रिवि गुजारतीसह, कायदेशीर साक्षीसह जसें–गुजार तवार अर्ज्या–पावत्या–तपासणी–वसूल–पटी ०हाय–स्त्रीअव ( सावकारी ) कायदेशीर साक्षी [ गुजारत+हाय, अव प्रत्यय ]

**गुंजारव**—पु भुंग्याचा गुंगु आवाज 'प्रदक्षिणा ते अवघे तिलाहो । धरूनि गुंजारव घेति लाहो । ' –वामन, वेणुसुधा–प्रसंग २, श्लो ३ [ स गुंज्+रव ]

**गुजारा**—पु १ गुजर गुजराण पहा निर्वाह, कालक्षेप ( क्रि० करणें होणें ) २ ( व ) गत, हिशेब, पर्वा, पाड 'रामासारखे राजे गेले, तुझा काय गुजारा ' [ फा गुझारा ]

**गुंजावा**—पु विंडा, गुंडाळी (सूत, दोरा याची) 'सुताचा गुंजावा करी शुद्धला । ' –वसा ५८, [ का गुंजु=गुंता ]

**गुंजावीस**—स्त्री गुजाईस, गुजायश पहा १ दोष, अपुरेपणा, व्यंग, कसर 'हें लाकूड सारखें तासलें गुजावीस राहिली नाहीं ' २ चूक, तफावत 'ह्या हिशेबात गुजावीस काहीं नाहीं ' ३ व्यत्यय, अंतर, कसूर (चाकरी, उद्योगधंदा, काम इ० मध्यें ) ४ उत्पन्न, नफा, मिळकत, लाभ (धंदा, व्यापार यात) ५ बेकायदेशीर नफा, खादगी, लांचखोरी ६ फुरसत, बाकी ७ उपयोग ८ खोंच 'बोलण्यात काहीं गुजावीस नाहीं ' –ऐच ७ ९ सवड, गुजायरी पहा 'मला खर्च करण्यास गुजावीस नाहीं ' [ फा गुजाइश् ]

**गुंजाळें**—न एक प्रकारचें लुगडें

**गुजास्त**—स्त्री स्वाधीन, सोपवणूक 'माल गुजास्त करू ' –ख ७ ३५७२ [ फा गुझास्त् ]

**गुजी**—स्त्री कालवड, वासरू, लहान गाय, गोजी [ स गो+जन् ? दे प्रा गोज्ज=रूपी वैर, का गुज्जो=ल्हानगी, ठुसकी ? ]

**गुंजी**—स्त्री ( गो ) गुंज पहा

**गुंजुला-ळा**—१ गुंजवला, गुंजडा पहा २ ( कों ) वसलेल्या माणसाचें कोंडाळें, कडें ३ ( गो ) जमाव, घोंटाळा. [ का गुंजु ]

**गुंज्या**—पु ( गो ) एक मासा ( मुडशीच्या जातीचा लाल रंगाचा ) –मसाप ३ ३

**गुझरान, गुझार, गुझारत, गुझरी**—गुजरान इ० पहा

**गुट–कन–कर–दिशी, गुटगुट**—घुट–कन पहा

**गुटक(कु)ळी**—स्त्री १ गचकळी, गुचकळी, गटगळी, निमज्जन, पाण्यांत खालींवर होण्याची स्थिति ( बुडणाऱ्याची ) ( क्रि० खाणें ) २ लहानशी ढेंकर, गुचकळी, आवंढा, घशाशीं येणें [ ध्व ]

**गुटका**—पु १ साधु, जादूगारानें दिलेली, तोंडात धरावयाची गोळी ( हिनें मनुष्य अदृश्य वगैरे होतो असें म्हणतात), जादूची गोळी, गुटिका २ ल्हान गोळी ( औषधाची, बंदुकीची ) ३ ल्हानसा घोंट, घुटका ४ लहानसें मापीव पुस्तक, पोथी [ स गुटिका ]

**गुटकुला, गुटुंगा, गुटुणा**—वि ठेंगणाठुसका, आखूड पण मजबूत, गिड्डा, गट्टू

**गुटगुटीत**—वि १ वाटोळा, गरगरीत २ लठ्ठ, पुष्ट ( माणूस ) [ गुटी, गोटी ]

**गुटळणें**—अक्रि १ घुटमळणें, अडखळणें, आवाकणें, गोंधळणें २ गमणें, रेंगाळणें, कुचराई करणें ३ धरसोड करणें काकू करणें गुपटणें पहा [ घुटमळणें ]

**गुटा–ट्या**—पु १ एक शेतकरी औत २ ( वाई ) बीन पासेचा व बीन जानवळयाचा कुळव

**गुट(ठ)लावणें**—क्रि १ ( गो ) चोरणें, लांबविणें २ गुंडाळणें [ गुठुळी=गाठोडें ? ]

**गुटावणें**—क्रि ( गो ) कापसातील सरकी काढणें [ स गुड=कापसाचें झाड ? ]

**गुटिका**—स्त्री १ गोळी २ गोटी वरूल लहान पोथी, गुटका अर्थ २, ४ पहा [स] ०पात–पु चिठ्या टाकणें, नशीब पाहणें ( क्रि करणें ) [ स. ]

**गुटी**—स्त्री गोळी, गोटी, गुटिका गुटका पहा [स गुटिका ]

**गुटी**—स्त्री फळ येणारें पण फूल न येणारें एक मोठें झाड

**गुटे(ठे)ल**—न ( गो ) सुताची गुंजडी, विंडा [ गुंडुळी ]

**गुटोळा**—वि गोटोळा, वाटोळा, गोट्यासारख्या, गोलाकार [ गोटा ]

**गुठळी, गुठोळी, गुटळी–गुटोळी**—स्त्री १ गोळी, गोळा ( गोठलेलें रक्त, दुधातील–दह्यांतील कवडी, आमटींतील

पीठ इ० चा ) २ गाळा, जमाव, गांठ ( पिंजलेल्या कापूस, कापड याची ) ३ गाठ, गठ्ठ, गरस ४ पिठाचा खडा ५ कठिण भाग ( पुटकुळी, स्त्रियांचे स्तन यांतील ) ६ बीज, बी, आठोळी [ स ग्रथिल, प्रा गठिल ]

**गुठळेबाज**—वि कामचुकारू, जडभरत, अंगचोर [ गुठळी+बाज ] **गुठळेबाजी**-स्त्री कामचुकारपणा, हयगय.

**गुठा-ठें**—पुन नांगरलेली शेतजमीन सारखी करण्याचें, ढिफळें फोडण्याचें एक औत, मैद ( कु ) गुठो नांगरलेली जमीन साफ करण्याचा फलक, औत याला मधोमध वितीच्या अंतरानें एक लांब व एक आखूड अशा दोन दांड्या असून त्यांचीं टोकें पुढें एकत्र बांधून टाकतात व तें एकत्रित जोड टोंक बैलाच्या मानेवरील जुवाच्या मधोमध बांधून तोल सभाळण्यासाठीं बांधलेली दोरी हातात धरून शेतकरी या आउतावर उभा राहून त्यावर आपलें वजन पाडतो [ का गुंट ] ०घालणें-१ चुरडणें, फोडणें २ तुडवून मळविणें, चुरगळणें ( वस्त्र इ० ) **गुठाचणें-विणें**-उक्रि गुठ्यानें नांगरलेली जमीन सारखी करणें **गुठेफळी**-स्त्री ( राजा ) गुठा पहा **गुठेणी**-स्त्री ( कु ) गुठा

**गुंठा**—पु एक चौरस सांखळी भर जमीन, जमीन मोजण्याचें एक माप, एकचाळिसांश एकर किंवा १२१ चौरस यार्ड ३३ फूट लांब व रुंद जमीनीचा तुकडा [ का गुंटे ( गुट=धुरी, खाच ) ]

**गुड**—पु गूळ [ स गुड ]

**गुड**—पु १ ( व ) रास, गंज-गंजी ( कडब्याची, गवताची ) —वशाप ५२१ २ ( खा ) वदिंग्न ढीग [ का गुड्ड=डोंगर ]

**गुंड**—पुन १ वाटोळें भांडें, हंडा गंज 'तेव्हां ठेवी चुलीवर गुंड पाण्याचा राही तत्क्षणीं।' —अफला ५६ २ ( विणकाम ) हरऱ्या मावाच्या चौकटीखालचें लांकूड ३ ( ल ) खडा मोत्याचा पुढें आलेला भाग गाठ ४ वाटोळा दगड, गुंडा, गोंग, ( सामा ) घडीव दगड 'वरि यमनियमेंसीं गुंड घडिले।' —स्वादि ७ ३ ५४ ५ गोळा ( लोखंडी, दगडी ) ६ ( तंजा ) तोफेचा बार ७ ( तंजा मद्रास ) लाकूड, कोळसा मोजण्याचें ५६ पौंडी वजन [ स गुड=चेंडू, का गुंड=वाटोळी वस्तु ]

**गुंड**— वि १ वस्ताद कावेबाज धूर्त २ चतुरस्र हर हुन्नरी, हुषार, तरबेज [ जु का गुंड=नोकर ]

**गुंडगडगी**—स्त्री ( कर्ना ) लिंगायतांच्या गळ्यातील लिंगाची पेटी

**गुंडगळें-गाळें गुंडगुळें, गुडगें गुंडगी**—न १ लहान गुंड, गुणगळें, गुडगी मातीची २ ( ल ) ठेंगू ठसका माणूस —वि वाटोळें, वर्तुळाकार गडगडत जाणारें [ गुंड ]

**गुडगुड-डां**—क्रिवि गुडगुड, घुडघुड, गुरगुर ( पोटांतील गडबड, वाळलेल्या नारळांतील खोबरें, शेंगेंतील दाणा, गुडगुडींतील पाणी याप्रमाणें ) शब्द होईसें [ ध्व ]

**गुडगुडणें**—अक्रि १ गुडगुड असा शब्द होणें २ पोटांत गुडगुड आवाज होणें [ ध्व ]

**गुडगुडा**—वि. पिकून वाळल्यानंतर फळाच्या पोटांतील मग गर अंगापासून सुटून गुडगुड असा शब्द व्हावयाजोगा होतो तो ( नारळ, उडी इ० ) —पु सुकलेला, आंत वाजणारा नारळ, गुडगुडें [ ध्व ]

**गुडगुडी**—स्त्री धूम्रपान करण्याचें, तंबाखू ओढण्याचें एक साधन, हुक्का 'गुडगुडीचें पाणी नभ्ह मदाकिनी।' —मध्व ४९९ [ ध्व गुडगुड ] ०बंद करणें—जातीबाहेर टाकणें

**गुडगुडीत**—वि लठ्ठ, फोफशा गुरगुरीत पहा

**गुडगुडें**—न ( कु ) सुकून करवटीपासून सुटलेला नारळ, गोटा गुडगुडा ( —वि ) पहा [ ध्व गुडगुड ]

**गुडघा**—पु १ पायाच्या मध्यभागावरील सांधा, जानु, ढोंपर २ ( ल ) आधार, मदत, पाठिंबा, आश्रय [ स घोटक, सिं गुड ] ( वाप्र ) **गुडघे टेकणें**—जानू खालीं टेकणें ०टेकणें,—ऱ्यावर हात देणें-येणें—१ म्हातारपणामुळें वाकणें, गुडघ्यावर हात देऊन उठणें, चालणें २ ( ल ) दमणें, शरणें, शरण येणें, मरगळीस येणें **गुडघेमेटी येणें**—( बैलगाडी ) रेताड जमीन, फुपाट्याचा रस्ता, चढण इ० ठिकाणीं बैल पुढील पायाच्या गुडघ्यानें चालतात त्यास म्हणतात **गुडघ्यात मान घालणें—घालून बसणें**—१ हताश, निराश होणें, असणें २ दुःखी असणें सामाशब्द— **गुडघा देणारा**—वि मदतगार **गुडघिल्यो**—क्रिवि ( कों ) गुडघ्यावरून कटी मारणें **गुडघी-गी**—स्त्री १ गुडघ्यापर्यंतची विजार, चोळणा 'गुडगी तंग वर काचा जी।' —सला ३८ २ गुडघ्यास होणारा एक रोग

**गुडघेमार**—स्त्री एखाद्याच्या ढुंगणावर गुडघ्यानें मारणें ( क्रि० देणें, करणें ) 'बुक्या गचांड्या गुडघेमार' —दा ३ ७ ६५

**गुडणें**—अक्रि ( कों ) गुढणें, बेताला येणें, दारीं असणें, सम्मुख, उन्मुख होणें ( मरणाला ) 'तो मरायला गुडला असता लग्न कशाला पाहिजे' [ स प्रा गुड=सजविणें, तयार ठेवणें ]

**गुडणें**—उक्रि १ बांधणें गुडाळणें, वळकटी करणें, लपेटणें 'तया गुडलिया प्रकाशा। क्षेत्रज्ञ नाम।' —ज्ञा १४ ७९ २ गोत्यात सापडणें गडणें पहा [ गुड ]

**गुडदा**—पु गुर्दा, तरवारीसारखें पातें असलेली लोखंडी गदा, एक शस्त्र [ फा गुर्द ]

**गुडदा**—पु १ बकऱ्याच्या पोटांतील एक खाण्यालायक मांसाचा गोळा —गृशि २ ६ २ ( क ) केसाची विशिष्ट रचना 'त्यानें गुडदा राखला'

**गुडदाणी**—स्त्री. एक मासा; तेपडी.

**गुडदा(धा)णी–नी, गुडधान**—स्त्री. चिक्की; गुळाच्या पाकांत पाकविलेले चुरमुरे, दाणे, राजगिऱ्याच्या लाह्या वगैरेची मिठाई. [ सं. गुड+धाना ]

**गुडदावणी**—स्त्री. (कु गो.) पायानें चेंचणें; तुडवणी (पायांखालील); घुस्तावणी.

**गुडदा(द-धा)विणें**—उक्रि. चेंचणें; ठेचणें; तुडविणें; अस्ताव्यस्त करणें; सुरकुत्या पाडणें; चिरडणें; चुरडणें; गुधडणें पहा.

**गुडदी**—स्त्री. बूच; बोळा; दट्टया; झांकण ( आंतील पदार्थ पडूं सांडूं नयेत म्हणून दौत, बाटली इ० च्या तोंडावर बसवितात तो लांकूड, कांच इ० चा तुकडा ). [ का. गुडसु=बंद करणें ]

**गुडदू**—वि. टेंगणा आणि जाड; गट्टू; गिड्डा व लठ्ठ.

**गुडबुर्जे**—न. एक वाद्य. 'गीडवीडीं सावेरीं। गुडबुर्जी दुटाळा।' –कमुरा ७७.२९. [ ध्व. ]

**गुंडरी**—स्त्री. (गो.) आम्हीसारखी एक वनस्पती.

**गुडवें**—न. (गो.) उडवें; गंजी. गुड पहा. [ का. गुडी ]

**गुंड(डा)ळी–ळें**—स्त्रीन. गुंजडी; गुंडाळा; वळकटी; पिंडा; बिंडा एकावर एक वेढून केलेला गोळा. ( कागद, कापड, दोरी इ० चा ). [ गुंड ]

**गुडा**—पु. (व.) १ गुढीपाडवा. २ गुढीपाडव्याची गुढी.

**'गुडॉ**—पु. (गो.) पाणी उपसण्याचें साधन; तेडा; ओकती.

**गुंडा**—पु. १ वाटोळा, मोठा गोटा, दगड. 'जैसा पर्वतावरौनि वोहटळि गुंडा लोटित तयासि तळवटा। यावया वेळ न लगे तैसा।' –चक्रधर सिद्धांतसूत्रें पृ. ५२. २ (ल.) मोठा गुंड; एक भांडें. 'दोंच घागरीचा गुंडा नित्य घ्यावे।' –रामदासी २.३५. ३ (बांधकाम) माठीव चौरस दगड; चिरा; मोठी खांडकी. ४ (कुंभारी) मडक्यांना आकार यावयाचा दगड, हा मडकें घडवितांना एका हातानें मडक्याच्या आंतील बाजूस धरून बाहेरून लांकडी पट्टीनें ठोकतात. यामुळें मडकें पाहिजे तसें जाड–पातळ होतें. ५ जोत्याचा मधला थर; पेटी, वेदरीच्यावर पायाशीं ओळंब्यांत बांधलेलें दगडी काम. ६ (कुंभारी) चाकाचा मधला ठोकळा, याच्यावर मातीचा गोळा ठेवून त्यास आकार देतात. बिंडा; गुंडी; गुंजडी ( सूतदोऱ्याची ). [ का. गुंडु ]

**गुंडा**—वि. धूर्त हरहुन्नरी, हरकामी माणूस. अतिशय शहाणा, हुषार. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिहीं लोकीं झेंडा।' –तुगा.(वाईट अर्थानेंहि योजतात).सोदा; ठक; काशीकर. [का.गुंड]

**गुडाका**—स्त्री. आळस, निद्रा; झोंप. –गीर ६०७. [ सं. ]

**गुडाकू–खू**—स्त्री. १ गूळ, केळीं इ० मिश्र करून केलेली तंबाकू. २ रोगट पिकाच्या पानांवर शिंपडावयाचा तंबाखूचा काढा. ३ (ल.) त्रेधा; तिरपीट; दुःखपूर्ण स्थिति; दुर्दशा. [ सं. गुडक ] ०**काढणें**–वि. (ना.) खरडपट्टी काढणें.

**गुडाकेश**—वि. आळसाला, निद्रेला जिंकणारा ( अर्जुन ) –गीर ६०७. [ सं. गुडाका=आळस, निद्रा. +ईश ]

**गुडार**—न. १ जाजमः झोंन्या; पालपट्टें; तंबू ( लहान ). [ का. ]

**गुडाल**—न. (कु. गो.) केंबळाचें लहान घर; खोपट. [ का. गुडलु=केंबळाची झोंपडी ]

**गुंडाळणी**—स्त्री. उंसाचीं पातीं उंसाभोंवतीं गुंडाळण्याचें काम; ऊसबांधणी.

**गुंडाळणें**—उक्रि. १ वळकटी करणें; (दोरी इ० नें) लपेटणें; वेष्टणें. २ एकत्र गोळा करणें. ३ आवरणें; आटोपणें; बंद करणें, टेवणें ( उद्योग, कामधंदा ). 'सारे कागद रुमालांत गुंडाळून टेव.' ४ पराजित करणें; जिंकणें; कुंठित करणें; निरुत्तर करणें. ४ हाताखालीं घालणें; बळकावणें; काबीज करणें ( परका देश, माल इ० ). 'यास ज्ञान नाहीं म्हणून चार शेतें होतीं तीं दायादांनीं गुंडाळिलीं.' ६ (सामा.) व्याप्ति कमी करणें. ७ आच्छादणें; वेढणें. 'माथें वस्त्रानें गुंडाळतो.' –अक्रि. १ गुंडाळलें जाणें. २ ( पंचप्राण एकत्र आल्यामुळें ) मरणें. [ सं. गुड्=वेष्टणें, प्रा. गुडदालिअ=एकत्र करणें ? ] **गुंडाळून ठेवणें**–न जुमानणें; बाजूला सारणें. 'प्रसंग पडला म्हणजे युक्तिवाद गुंडाळून ठेवणारी सुधारक मंडळी दृष्टीस पडते.' –टि ४.१३८.

**गुंडाळा–ळी–ळें**—पुस्त्रीन. १ वळकटी; रुळी; भेंडोळें; बिंडा; बंडल ( कागद, कापड, दोरा इ० चें ). २ गाठोडें; गांठ. 'दें केशांचा गुंडाळा।' –माज्ञा ८.४२. ३ ( विशेषतः गुंडाळें, निदार्थी ) वेडेंवांकडें गुंडाळलेलें पागोटें, रुमाल. ४ दोऱ्याची गुंतागुंत व त्याचा गोळा; कसेंतरी अस्ताव्यस्तपणें एकत्र बांधणें; सटरफटर मालाचें बोचकें. 'ईश्वरें मोठें, सुत्र केलें। मनुष्यमात्र गुंतोन राहिले। लोभाचें गुंडाळें केलें। उगवेना ऐसें॥' –दा १७.२.३०. ५ फेरा; भोंवतीं फिरविणें; हात (पट्टयाचे). 'पट्टयाचा गुंडाळा मारिला।' –ऐपो १९. ६ (ल.) गोंधळ, गुंतागुंत.

**गुंडिका**—स्त्री. ( प्र. गुण्णिका ) घोकंपट्टी; संथा; पुन्हां पुन्हा वाचणें व म्हणणें; घोकणें; उद्घोष. 'तिनें जशी कांहीं पत्राचीं पाठांतरें किंवा गुंडिकाच केल्या.' –नवलपुरचा संस्थानिक, प्रकरण ५. [ सं. गुणनिका. सं. गुंडिक=पीठ ? ]

**गुडी–पाडवा**—गुढीपाडवा पहा. [ का. गुडि=निशाण, पताका ]

**गुंडी**—स्त्री. एक वनस्पति; जाफरीची गुंडी.

**गुंडी**—स्त्री. १ लहान गुंड, भांडें; लहान चरवी; कासंडी. २ बिरडयांत अडकविण्याची गोळी; भुतावें; बटन ( अंगरखा,

कोट यांचे). ३ (कों.) पेंढी (पेंढा, गवत इ० ची). ४ (कों.) विडा; गुंडा; गुंडाळा (दोरा, सूत, इ० चा). 'नवारीची गुंडी करून ठेव म्हणजे पलंग भळायास बरें पडेल.' [गुंड]

**गुंडीचा विडा**—पु. (बडोदे) केळीच्या सोपटानें एकत्र बांधलेले दोन विडे; पट्‌या. –ऐरापु प्र २.४२.

**गुंडीदार**—वि. गुंडी असलेला (आंगरखा). आंगरखा पहा.

**गुडुप**—वि. गडद; गर्द; दाट (काळोख, अंधकार). 'एथें गुडुप अंधार पडला.' –कमं ३.१३. –न. अतिशय अंधार; अंधाराचें बाहुल्य. 'दिवे मालवतांच घरामध्यें गुडुप झालें.' [का. गुडपु-गुब्पु=लोखंडाची काव] ०निजणें-डोळ्यांवरून पांघरूण घेऊन स्वस्थ निजणें.

**गुडुंब-बा, गुडूम**—न. गळूं; गुर्दुब पहा.

**गुडूची**—स्त्री. गुळवेल; गरूळ. [सं.]

**गुंडें**—न. (कु.) चेंडू; गोळा; विंडा; पिंडा (सूत, सुंभ, दोरी वगैरेचा). [गुंड]

**गुंडेरी**—स्त्री. (गो.) भाजी वनस्पति.

**गुंडो**—पु. (कु.) वरवंटा; दगड-धोंडा. गुंडा पहा.

**गुड्डी**—स्त्री. (गो.) १ बूच; गुडदी. २ गुप्त कारस्थान; कूट; कट. [सं. गूढ] **गुड्डुलासांव**—न. (गो.) कारस्थान.

**गुड्डु**—वि. ठेंगणा व जाडजूड; गिड्डा. [का.]

**गुढ**—न. मर्यादा; आवरण. गुड्डी अर्थ १ पहा. 'अधोर्ध्वें गुढेंकादी।' –ज्ञा १८.७३९. [गुढणें]

**गुढगा**—पु गुडघा पहा.

**गुढणें, गुंढाळणें**—गुंडणें-गुंडाळणें पहा. व्यास होणें. 'जी मूर्ती मूतळ माडिलें। जैसें नक्षत्रीं गगन गुढलें।' –ज्ञा ११. २८६. [सं. गुंठन]

**गुढन**—न. (व.) कापणी केल्यानंतर धान्यांच्या कणसांच्या पेंढ्या बांधणें. [सं. गुंठन]

**गुढर, गुढार**—न. १ हत्तीचें खोगीर; कवच. 'एक हस्ती गुढर घालीत।' –उषा ८२०. 'पृष्ठीं मिरवलीं गुढारीं।' –कथा १.९.४६. २ हौदा; अंबारी. 'रत्न-चाकें सुवर्ण गुढार। माजी शोभला लक्ष्मीवर।' –मुसभा १६५ 'गुढर घातला ऐरावती। री अटैजणी कन्या बैसती।' –कालिका १७.१४. ३ डेरा; झुडी; पाल. 'जैसें होति गुढरूं। अनंगाचे॥' –शिशु २१०. सं. गुड=हत्तीचें कवच, प्रा. गुडा; का. गुडार=तंबु]

**गुंढल**—स्त्री. (गो.) गुंडी.

**गुढा**—पु. दगड. –चर. ?

**गुढा**—पु. १ (व.) कंबरेभोंवती वस्त्र घट्ट राहण्यासाठी खोवतात तो वस्त्राचा भाग; कनवटी. २ देवकस्थापनेच्या वेळीं बांधलेलें फडकें; मुहूर्तमेढीचें फडकें. [गुढी]

**गुढार**—न. १ परचक्राला भिऊन गांवकरी लोकांनीं केलेलें पलायन; दंग्यामुळें पळून आलेला मनुष्यसमुदाय.

**गुढार**—न. कोडें; गुह्य गोष्ट. 'तुका म्हणे तूंचि निवडी हें गुढार।' –तुगा १३७. [सं. गूढ]

**गुढार**—न. १ पाल; खोंप; झोंपडी. गुढर पहा. २ (क.) पालथें; हांथरी; जाजम 'गुढार वसावयाला घाल.' [गुढर; का गुडार]

**गुढारणें**—उक्रि. १ आच्छादणें; झांकणें. २ सज्ज असणें, ठेवणें; सजविणें. 'गाढा वीर गुढारल्या निजरथीं संमूढ आरूढला।' –आविश्वायज्ञ २५. ३ कवच, वस्त्र घालून सजविणें (हत्ती) 'त्यामागें शमदमादि। मतांग गुढारले योगसिद्धि।' –स्वादि १०.२.५७ [सं. गुड्; प्रा. गुड=हत्तीला कवच इत्यादि घालून सजविणें]

**गुढी**—स्त्री. १ वर्षप्रतिपदेस उभारावयाचा ध्वज (आंब्याचा मोहोर, लिंबाचा टाहाळा, उंची वस्त्र, गाठी व एक भांडें यांसह काठीला बांधून उभारतात तो). (त्यावरून) आनंद-प्रदर्शनार्थ उभारलेली ध्वजा, पताका. 'तंव आत्मा उभिताअे गुढी। रोमांचमिषें।' –शिशु ६०. –एरुस्व ५.७९. २ देवास कांहीं प्रश्नादि विचारणें झाल्यास गोटी, फूल, तांदूळ वगैरे चिकटवितात व प्रसाद किंवा कौल मागतात ती. 'देवानें त्या-विषयीं डावी गुढी दिली कीं उजवी?' ०उजवी देणें-विनंति मान्य करणें. ०डावी देणें-विनंति अमान्य करणें. (यशाची) ०उभारणें-(ल) प्रसिद्धि पावणें. कीर्तिवंत होणें. ०**पाडवा**-पु वर्षप्रतिपदा; चैत्र शु॥ १. या दिवशीं गुढी उभारतात.-[फा. गुदि=काठी, निशाण]

**गुढी**—स्त्री. १ देशांतराहून आलेली मृत्यूची बातमी. 'गोमाजीपंत मेल्याची कालच लष्करांतून गुढी आली.' २ (सामा.) बातमी; वर्तमान; निरोप. 'विजयाची सांगे गुढी।' –ज्ञा १४. ४१०. ०काढ-पु. निरोप्या; जासूद. 'गुढीकाढ पुढें पाठविला।' कालिका १७.२१.

**गुढी**—स्त्री. १ अढी; दुमड; फांस (पिळतांना दोरी-पडणारा). (क्रि० पडणें). २ सुरकुती; घडी (वस्त्राला [illegible]यार [illegible]करणें [सं. ग्रंथि; प्रा. गंठी, गुत्थ; हिं. गूंथ?]

**गुढी**—स्त्री. खोपटी; झोंपडी; पाल; गुढर, गु[illegible] 'गुढ्या घालुनया वनीं राहूं, म्हणा त्यातें।' –प्रला १[illegible]

**गुढें**—न. १ गावचा पळ; गुढार अर्थ १ पहा. (क्रि[illegible]ली' पळणें). २ आपलें घरदार, मालमत्ता सोडून परागंदा होणें माणूस, कुटुंब ३ गूढ; दुसऱ्या गांवीं पीक कापण्यासाठीं [illegible] करण्याकरितां निघालेली एका गांवची शेतकरी लोकांची [illegible] विशि[illegible] ४ गूड-ड; न मळलेल्या धान्याची पेंढी, गुढी; [illegible]

मळावयाच्या धान्याच्या पेंढया. ५ कापणी; शेत काढणी. [का. गुड्डे=रास, ढीग; गुडी=जमाव, जूट]

**गुढें**—न. कोडें; उखाणा. (क्रि० घालणें; सांगणें उकलणें). [सं. गूढ]

**गुढें**—न. (विणकाम) वशारन झाल्यावर जो पांजणीचा भाग शिल्लक राहतो तो.

**गुढयाचा पाडवा**—पु गुढें झाल्यानंतरचा, पिकें कापल्यानंतरचा दुसरा दिवस. ब्राह्मणांच्या तीन मोठया भिक्षेच्या दिवसांपैकीं एक. दुसरे दोन दिवस म्हणजे दिवाळीचा पाडवा व राखी पाडवा हे होत.

**गुण**—पु. १ मनोधर्म किंवा पदार्थाचा धर्म; त्यांतील बल; तेज; सत्त्व; अंतःस्थित धर्म; विद्या, कला, सत्य, शौर्य इ० धर्म. 'एवं गुण लक्षण।' –ज्ञा १७ १११. २ (न्यायशास्त्र) रूप, रस, गंध, स्पर्श, संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, गुरुत्व, द्रवत्व, स्नेह, शब्द, बुद्धि, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, धर्म, अधर्म, संस्कार हे २४ धर्म. ३ सृष्ट, उत्पन्न केलेल्या वस्तूंचा धर्म. हे गुण तीन आहेत, सत्व, रज, तम. हे ब्रह्मा, विष्णु, शिव यांचें अनुक्रमें लक्षण दर्शवितात. 'गुणीं देवां त्रयी लाविली' –ज्ञा १८ ८१७ ४ उत्कृष्टता; योग्यता; व्यंगापासून अलिप्तता; निर्दोषता. ५ उपयोग; फायदा; नफा; फल; लाभ. ६ निपजलेलें फल, वस्तु, परिणाम, निपज; उत्पन्न. ७ (अंकगणित) गुणून आलेलें फळ; गुणाकार. ८ दोरी; रज्जू. 'हें कर्माचे गुणीं गुंथलें।' –ज्ञा १३.११०२. 'मुक्तमोती लग संपूर्ण। गुणेविण लेइलासे॥' –एरुस्व १.३९. ९ प्रत्यंचा; धनुष्याची दोरी. 'गेला लक्ष्मण किष्किंधेतें गुण जोडुनि चापातें।' –मोरामा १.५११. १० (समासांत)–पट; प्रमाण; गुणाकार. –अष्टगुण=आठपट; सप्तगुण, इ०. 'शतकोटिगुणें तदधिक शर निकर विखरितां पार्थे।' –मोभीष्म ३.५६ ११ ; कमीपणा (रोगाचा). १२ (अंकगणित) गुणक. १३ ति) वर्तुळखंडाची ज्या. १४ दिव्याची वात. 'पै गुणु ला खाय।' –ज्ञा १३.७१९. १५ परीक्षा उतरण्यासाठीं ठरविण्यांत आलेले संख्यांक; (इं.) मार्क. १६ (व्याक.) संधि करतांना वगैरे स्वराच्या रूपांत होणारा फेरफार. [इचा ए, उचा ओ, ऋचा अर्, लृचा अल्] १७ वधुवरांचे घटित पाहण्याचे अंक. हे ३६ असतात. १८ (ल.) रोग, व्याधि. म्ह० अठरा गुणांचा चंडोबा. १९ प्रभाव; परिणाम. 'संपत्ति हें एका तऱ्हेचें मद्य ऐ. तें आपला गुण केल्याखेरीज बहुधा सोडणार नाहीं.' ३१. [सं.] (वाप्र) ०आठविणें–(मृत, गैरहजर मनु गुड) चांगल्या गोष्टी स्मरणें; त्यांचा उल्लेख करणें. ०उध- तंबाकू. रणें–पाघळणें–स्वाभाविक वाईट, दुष्ट स्वभाव को. ३. ११ बाहेर पडणें; वाईट गुणांचें आविष्करण करणें. 'पत्र पुरतें झाल्यावर सदाशिवराव म्हणाले हे आपल्या मातोश्रींनीं कसे गुण उधळले पहा!' –रंगराव. ०काढणें–१ दुर्गुण काढून टाकणें. २ यथेच्छ झोडपणें. 'बोलाचालीनंतर त्यांचे गुण चांगलेच बाहेर काढले.' ०घेणें, देणें–पिशाचादि बाधा न व्हावी म्हणून देवादिकांपासून कौल घेणें, देणें. ०दाखविणें, गुणावर येणें–खरा स्वभाव दाखविणें. ०शिकविणें–मारून शहाणा करणें; गुण काढणें ०सोडणें–विसरणें–सन्मार्ग सोडून वाईट मार्गास लागणें. **गुणाची चहा करणें–होणें**–सद्गुणावर प्रीति करणें, असणें; चांगल्या गोष्टींचा सन्मान करणें. **गुणाची माती करणें**–सद्गुणांचा, बुद्धीचा दुरुपयोग करणें; अंगच्या चांगल्या गोष्टी, बुद्धि नासणें **गुणा येणें**–सगुण होणें. 'गुणा आला विटेवरी। पीतांबर धारी सुंदर जो।' –तुगा ७. **गुणास येणें–पडणें**–१ लागू होणें; फळणें; इष्ट परिणाम होणें. २ चांगल्या रीतीनें वागणें. म्ह० १ ढवळया शेजारीं बांधला पोंवळा वाण नाहीं पण गुण लागला. २ गुणाः पूजास्थानम्। =गुणामुळे माणसाला आदर प्राप्त होतो; जेथें गुण तेथें आदर. सामाशब्द–**गुणक**, **गुणकांक**–पु. (गणित) ज्या संख्येनें गुणतात ती संख्या. **गुणक**–वि. १ हिशेब टेवणारा; गणना करणारा. २ मध्य गुणक; विशिष्ट शक्तीचें, गुणाचें मान दाखविणारा वर्ण, जात. [सं.] ०कथा–स्त्री. १ ईश्वराच्या गुणांचें कीर्तन, प्रशंसन. 'गुणकथा श्रवणादि साधनें। करुनि सेवटीं आत्मनिवेदन.' २ (सामा.) गुण, ईश्वरी देणगी, स्वधर्म इ० विषयीं स्तुति. **गुणकप्रमाण**–न. (गणित) गुणाकारानें वाढणारें संख्येचें प्रमाण. १.४.८. १६.६० प्रमाण; (इं.) रेशिओ. ०कर–कारक–कारी–गुणकारीक–वि. (अशुद्ध) १ गुणावह; गुण करणारें, देणारें. २ परिणामी; प्रभावी. **गुण–कर**–वि. (काव्य) गुणसंपन्न; बुद्धि, सुलक्षण, सद्गुण यांनीं युक्त (मूल). ०गंभीर–वि. चांगल्या गुणानीं युक्त. 'उदारधीर गुणगंभीर।' [सं.] ०गहिना–स्त्री. गुणवती व रूपवती स्त्री. 'जेव्हां जिवाला वाटेल तुमच्या आतां पाहिजे गुणगहिना।' –सला६. ०गान–गाणें–न. गुणांचें स्तवन, गायन, प्रशंसा, प्रशस्ति, गुणकथा. [सं.] ०ग्रहण–न. गुण ओळखणें; गुणाची चहा; गुणीजनांचा परामर्ष, आदर करणें–उमगणें. [सं.] ०ग्राम–निधि–पात्र–राशि–सागर, **गुणाकर** **गुणाची रास–खाण**–वि सर्वगुणसंपन्न; सुलक्षणी; सद्गुणी; अनेककलाकोविद. ०ग्राहक–ग्राही–वि. गुणांचा भोक्ता, चहाता, गुणाचें चीज करणारा, गुण ग्रहण करणारा; दुसऱ्याचे गुण ओळखून संतोष मानणारा. [सं] ०घाती–वि. गुणदूषक; निंदक; हेटाळणी करणारा. [सं.] ०ठेली–स्त्री. गुणांची थैली; गुणखनि. 'सुतारुण्यें तारुण्य गुणठेली।' –आपू १०.

[स गुण+स्था-थैली] ०गुणत –क्रिवि गुणाप्रमाणें, गुणानुरोधानें [स] गुणत्रय–न सर्व पदार्थांचे सत्त्व, रज, तम हे तीन गुण, धर्म [स] ०त्रयविरहित–वि वरील तीनहि गुणां विरहित असा (ईश्वर), निर्गुण 'गुणत्रयविरहित अगम्य तू।' [स] ०दोष–पुअव चांगले वाईट गुणधर्म, सुलक्षणें आणि कुलक्षणें 'नको माझे कांहीं । गुणदोष घालूं ठायीं।' ०दोष परीक्षा–स्त्री गुणदोषाची चौकशी, छाननी, तपास ०धर्म–पु गुणलक्षण, स्वभाव (बरा किंवा वाईट) गुण अर्थ १पहा गुणन–न १ गुणाकार, मोजणी, गणना गुणनिधान-निधी–न गुणांचा साठा, गुणग्राम पहा 'त्याची कन्या चिद्रत्न लावण्यागुणें गुणनिधान।' –एरुस्व ३ ४६ गुणनीय–वि गणण्यास, गुणण्यास योग्य ०पंचक–न आधिभौतिक वस्तूंचा मूळभूत पांच गुणांचा समाहार (पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश, किंवा शब्द, रूप, रस, गंध व स्पर्श) 'गुण पंचकें धरित्री आथिली।' ०परिणाम–पु मूळ वस्तूचें तात्त्विक स्वरूप कायम राहून त्यास दुसरें नाव-रूप प्राप्त होणें उदा० काथ्याची दोरी होणें, दुधाचें दहीं होणें –गीर ७३९ ०परिणामवाद–पु त्रिगुणात्मक प्रकृतींतील गुणांच्या विकासानें किंवा परिणामानें व्यक्त सृष्टि निर्माण होते असें मत (सांख्य मत) –गीर ७३८ ०भूत–वि १ गौण, दुय्यम प्रतीचें २ वरून, पासून निघणारें, अनुकल्पित ०माया–स्त्री त्रिगुणांनीं युक्त असलेली माया 'मुळीं झाली तें मूळमाया। निर्गुण झालें ते गुणमाया।' –दा ११ १ ९ –गज ३५ ०वचन-वाचक–न गुण दाखविणारें वचन, शब्द विशेषण ०वंत-वान–वि गुणसंपन्न ०विशेषण–न (व्या) विशेषणाचा एक प्रकार, ह्या नामाचे गुण दाखवितो ०वेल्हाळ-ळी–विपुस्त्री (काव्य) गुणांनीं आकर्षिलेला-ली, मोहित, परितुष्ट ०वैषम्य–न गुणत्रयांचें (सत्व रज-तम) विषम मिश्रण याच्या उलट गुणसाम्य ०सुशीळ–वि (काव्य) गुणी व शीलवान्, चांगल्या गुणांचा स्वभावाचा 'पतिसेवे सदा अनुकूल। सत्य वचनीं गुणसुशीळ।' ०स्तुति–स्त्री गुणांची प्रशंसा ०हीन–वि १ गुणविरहित, गुणाशिवाय २ दुर्गुणी ०क्षोभ(भि)णी-माया–स्त्री माया, त्रिगुणांची साम्यावस्था मोडणारी (माया), मूळ मायेंतील गुप्त असलेले त्रिगुण जेव्हां स्पष्ट होतात तेव्हां तिला गुणक्षोभिणी म्हणतात 'पट होती सधी चतुरी। जाणावी गुणक्षोभिणी।' –दा ९ ६ ६ गुणज्ञ–वि गुणग्राहक जाणता (विद्यादि गुणांचा) पहा गुणांक पु (गणित) गुणाकार गुणाकभागोत्री–स्त्री १ गुणाकार व भागाकार २ (व्यापक) अंकगणित गणित 'तुझा पतोजी कांहीं गुणांकभागोत्री शिकवतो कीं नाहीं?' गुणाकार–पु १ गुणांक, गुणनाचें फळ, गणिताचा एक प्रकार, गुणकानें गुण्यांकास गुणणें याचे कांहीं प्रकार – कोष्टकी-धावरा-बैठा-विविध गुणाकार इ० कपटसिंधु पहा २ गुणणें, गुणाकार करणें [स गुण, म गुणणें] गुणाकारक-कारी–वि गुणकारक-कारी पहा गुणागुण–पु गुण आणि अवगुण, गुणदोष गुणाचा–वि भलेपणा, चांगले गुण अंगीं असणारा गुणाची खाणी-रास–स्त्री अनेक प्रकारचे चांगले गुण अंगीं असणारा, विविध गुणांचा गुणाचें गुणपात्र लेंकरूं–न (ल उप) अट्टल लुच्चा, लबाड, सोदा 'गुणाचें गुणपात्र हातीं फुलपात्र' गुणाढ्य–वि १ गुणसंपन्न २ एक प्रसिद्ध कवि बृहत्कथेचा कर्ता [स] गुणातीत–वि गुणविरहित, निर्गुण (ईश्वर) गुणानुवाद–पु गुणांची वाखाणणी, गुणकीर्तन, प्रशंसा गुणानुवादकीर्तन–न गुणांचें स्तवन गुणावह–वि गुण देणारें, गुणकारक, परिणामी, प्रभावी (औषध वगैरे) गुणांश–पु १ गुणकारीपणा, प्रभाव, सुपरिणाम 'ह्या जें औषध सांगतो त्याचा गुणांश केवढा?' २ परिणाम, फळ, यश –'त्या औषधानें अद्यापि गुणांश आला नाहीं' गुणित–वि (गणित) गुणलेलें गुणें(ण्या)गोविंदें-दानें–क्रिवि १ शांततेनें, भांडणतंटा न करितां, मुकाट्यानें, आनंदानें, स्वेच्छेनें 'पक्षीही लहान। घरटीं बांधुन। गुण्यागोविंदानें नांदताती॥' २ मोठ्या स्नेहानें ममतेनें 'गुण्यागोविंदें मला दहा वेळ पलंगावर घालवा।' –प्रश्न ३ चांगल्या प्रकारानें, रीतीनें गुणोत्कर्ष–पु गुणांचें वैपुल्य विकास, वाढ गुणोत्कीर्तन–न गुणांचें कीर्तन, गुणानुवाद, प्रशंसा गुणोत्तर–न (गणित) संख्यांची, दोन परिमाणांची पट, हिस्सा, प्रमाण, भूमितिश्रेणींतील पदामधील ठराविक अंतर, एका संख्येनें दुसरीस भागिलें म्हणजे दोहोंमधील गुणोत्तर निघतें गुण्य–वि १ जिला गुणावयाचें ती संख्या २ गुणण्यास, गणण्यास योग्य [स गुण्=मोजणें] गुण्यांक–पु गुण्य संख्या

गुणकली-टली—स्त्रीपु (संगीत) एक राग या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल मध्यम, पंचम कोमल धैवत हे स्वर लागतात गांधार व निषाद हे स्वर वर्ज्य आहेत जाति औडुव-औडुव वादी धैवत व संवादी ऋषभ गानसमय प्रात काळ हा एक भैरवप्रकार आहे

गुणगुण—स्त्री १ गुंगु आवाज, गिणगिण (डांस, चिलट, याची) २ हळू हळू नाकांतल्याप्रमाणें, दबून, अस्पष्ट बोलणें, वाचणें ३ कुजबुज, कुजबूज ४ वदंता, बातमी [ध्व] गुणगुणणें–अक्रि १ तोंडांतल्या तोंडांत म्हणणें, गाणें, आळवणें, गुंगु करणें, मनाशींच म्हणणें २ ओठांतल्या ओठांत बोलणें, अस्पष्ट उच्चार करणें, पुटपुटणें ३ नाकांत बोलणें, गेंगाणें भाषण करणें 'तो गेंगाणा घटकाभर गुणगुणतो आहे पण मला कांहींच समजत नाहीं' ४ चिंतित न सांगण्याजोगें, मळमळीत बोलणें,

रोखठोक न सांगणें 'रुपये मागितले पण गुणगुणला आहे, खचित काहींच बोलला नाहीं' [ध्व]

**गुणगुणा**—पु नाकाचा पडदा, भाग, घोणा धक्का लाग ल्यास यातून रक्त वाहतें [स घोणा=नाक द्रि] **०फुटणें**–नाका तून रक्त वाहणें

**गुणगुणीत**—वि १ सानुनासिक, नाकातील २ अस्पष्ट, गुळमुळीत, गुणगुणल्याप्रमाणें (उच्चार) [गुणगुण]

**गुणगुण्या**—वि १ गुणगुणणारा, हळू, आपल्याशींच गाणारा २ नाकात बोलणारा ३ अस्पष्ट शब्द करणारा, पुटपुट णारा ४ अस्पष्ट, हळू, नाकातला, अनिश्चित (भाषण) [गुण गुण]

**गुणगुळें**—गुडगळें पहा

**गुणणिका**—गुण्णिका, गुडिका पहा

**गुणणें**—उक्रि १ (अंकगणित) गुण्य आणि गुणक याचा गुणाकार करणें, सख्येची पट करणें २ पुन्हा पुन्हा वाचणें व म्हणणें, पाठ करणें, गुडिका करणें, घोकपट्टी करणें [स गुणन]

**गुणफोड**—स्त्री एक औषधी

**गुणा**—पु १ गाडीचा कणा, आंस २ सुतार गवडी याचें एक हत्यार, गुण्या काटकोन बाधण्याचें साधन

**गुणांबर**—न (काव्य) गुणस्थान, स्वर्ग 'जेथें मानव शलभ पामर। गुणांबर केविं कमी।' [स गुण+अंबर]

**गुणांब्ली**—स्त्री (गो) एक वृक्ष.

**गुणिया**—पु १ गारोडी, पचाक्षरी, मान्त्रिक –एभा ७ २०६ 'आहे गुणिया देवरसी जाणता।'–सप्र १ ३३ २ गुणी, गुणवान् [गुणी]

**गुणी**—वि १ गुणानीं युक्त, शास्त्र, कला यात पारंगत, बुद्धिवान २ मान्त्रिक, गुणिया –ज्ञा १३ ७२१ 'तुझिया कप टाची चाडणी। करावया आलों मी गुणी। –एरुस्व १२ ९५ ३ (ल) खोडकर द्वाड [स] **गुणीक**–वि गुणयुक्त 'गुणीक योजविले असता।'–गीता १३ १७४ **गुणि(णी)जन-लोक**–पुअव १ गायक, वादक नर्तक वगैरे लोक (सामुदायिक), कलावत मडळी २ हिंदु कलावतिणींचे पोटची सतति, कलावति णीचा पुत्र

**गुणा**—स्त्री (चे) (शेतकी) ठिपरी, नाडा व मोट याना जोडणारें लांकूड) [का]

**गुणी**—स्त्री गुरांचा मानमोडी रोग

**गुणें**—गुण शब्दाचें तृतीयेचें रूप १ (काव्य) मुळें, करिता साठीं 'तृणाचे बुझवणें। आदाळें वारे गुणें।'–ज्ञा १३ ५६९ –गुच ३८ २७ २ आश्रयानें 'कोठें तरी देउळाच्या गुणें। देव पहा।'–दा १७ १ १२ [स गुण]

**गुणेस्त**—वि (गो) सद्गुणी

**गुण्णिका**—स्त्री आठवण राहण्यासाठीं पुन्हा पुन्हा वाचणें, म्हणणें, घोकपट्टी [गुणणें]

**गुण्या**—पु काटकोन्या, गुणा पहा

**गु(गु)त**—स्त्री गुतणें, गुता पहा 'या सेताची गुत सिलक असेल त्याची किंमत '–मसाप २ १७७ [स ग्रथित, प्रा गुत्थ] **गुंतणु(णू)क**–स्त्री (क) अडवणूक, गुतागुत गोंधळाची, घोंटाळ्याची स्थिति [गुतणें] **गु(गुं)तणें**–अक्रि १ एकमेकात गुरफटलें जाणें (दोरा), अडकणें 'सुत सुतें गुतलें।' –ज्ञा १८ १३०६ २ गुरफाटणें, अडचणींत सापडणें मोकळेपणा खुंटणें ३ गुग असणें, गढून जाणें, व्याप्त असणें, अडकणें (कामात उद्योगात–मनुष्य पशु वस्तु जागा) 'यदुतिलक जिचे हा गुतला पूर्ण भाके। –सारुह ४ ८७ ४ फसणें [स ग्रथन] **गुंतत बोलणें**–अडखळत घुटमळत बोलणें, अडखळणें **गुंतलें**–न गुता, गुतागुत, गुताड–डा 'तुटे बधमोक्षाचें गुतलें एथ।'–माज्ञा १८ ३१९ **गु(गुं)तवळ**–स्त्री १ केंस विंचरताना गळालेल्या केसाचा (गुतवळाचा) गुजडा, समुदाय २ (अव प्रयोग) (ल) तुरळक थोडे वाढणारे खुंट –पु १ डोक्याच्या केसातून गळलेला केस, गुतवळी पैकीं केंस २ गुतागुत (केंस दोरी इ० ची) **गुतविणें**–उक्रि (ल व शब्दश) गुरफाटणें, गोंवणें, अडकविणें

**गुतका-गा, गुता**—पु (कों गो) गुत्ता, मक्ता (विक्री, पुरवठा वगैरेचा) 'पाच सात हजार रुपये तूर्त व सत्तावीस हजार येयील बाबतीचा गुतका जाला होता'–पेद १० ५८ **गुतके(गे)दार**–पु (गो) मक्तेदार [का गुत्तिगे=करार]

**गुतकुली**—स्त्री गुदगुली पहा 'तव तव गुतकुलिया होती।'–शिशु ६६६ [ध्व]

**गुं(गु)ता**—पु १ अटकाव, अडथळा, खोटी, प्रतिबध २ (ल) अडचण, हरकत, नड 'ग्रामधिं काहीं गुता नाहीं।' –ऐपो ३२ ३ शेंडी–वेणींतील गुतवळ, विंचरतांना बाहेर निघालेले केंस ४ (ल) गुतक ५ गुतागुती (केस, दोरा इ० ची) ६ (भात सावा, हरीक वगैरेचें) मळणीनतरचें तृण गवत, कचरा ७ (ना) ब्याद, लचाड ८ लढा, तग **०गुत–गुत, गुतामूत** स्त्री १ गुता, गुताड २ गळफास, घोंटाळा, गोंधळ, घोळ **गुंताड, गुताड**–नपु १ गुता, गुतलेली स्थिति (विशेषत केसाची) २ गुतवळ ३ गुता अर्थ ६ पहा ४ शिवऱ्यावरून आयडा काढला व बुऱ्याची दोरी सोडून शेंडयाला बाधून तो हालवल्यावर खालीं पडतात त्या भाताच्या बारीक पाती –वदलापूर २९१ ५ गुतागुत, घोंटाळा गोंधळ **गुंतागुंता, गुतागुता**–पु १ अडथळा, अटकाव, अडचण (क्रि० घालणें, पाडणें)

२ अडथळा केल्याची स्थिति (क्रि० करणें, होणें) [गुतणें+ घालणें] **गुंतापणें**-क्रि (वे) गुतणें **गुतापा, गुंतोळा**-पु (वे) गुताड-डा (सूत, केस, इ० चा) पहा

**गुताघ, गुंताघा**—पु १ गुतविण्याचें साधन, बंधन २ करार, (इ) बांध

**गुंति-ती**—स्त्री १ प्रतिबंध, अडचण, गुता, बंधन 'ज्ञानदेवा सार सावळिय मूर्ति निवृत्तीनें गुति उगविली।' -ज्ञागा १४६. -मुआदि २२ ७६. २ गरज -दार ३ (ल) ओढा, पाश 'ज्यांची भुज गुती। ते तों मोकलिती अर्नी।' -तुगा ७६८० ०पाडणें-अडचण आणणें, संकटात ढकलणें 'मग योजे प्रभावनी। त्यांचि मजसी पाडिली गुंती।' -कथा १५२१४ [गुतणें]

**गुत्ता**—पु १ मक्ता गुतका पहा २ अड्डा, ठिकाण ३ (त्यावरून) दारूचा पिठा दुकान, (मक्त्यानें घेतलेलें) ४ गुता, गुता पहा [का गुत्तिगे=करार]

**गुत्तेर**—न कापड -देहु १६१.

**गु(गुं)थणें**—अक्रि (प्रा) गुतणें पहा १ गुफलें जाणें 'देह तव पांचांचें जालें। हें कर्मांच गुणीं गुथलें।' -ज्ञा १३ ११०२. २ अडकून पडणें, गुतलें जाणें -उक्रि ओंवणें, माळ करणें, गुफणें [स ग्रथन]

**गुथयागुथय**—स्त्री (साभा) गुतागुत, गोंधळ, गुताडा. गुतागुत पहा [गुथणें द्वि]

**गुथा**—पु एक लहान झाड

**गुंथाडें**—न गुतागुत, गुताडा पहा 'तत्त्वाचें गुथाडें जालें।' -दा ९७२१ [गुथणें]

**गुद**—पु अपानद्वार, पंचकर्मेंद्रियांपैकीं पाचवें इंद्रिय, गांड, बोचा, मलद्वार 'गुदमेंढ्रामातौतीं। चारी अंगुलें निगुतीं।' -ज्ञा ६ १९५ [स] ०द्वार-न गुद, अपानद्वार ०भ्रंश-पु शौचाच्या वेळीं अंग बाहेर येणें (अशक्ततेमुळें) एक रोग ०मस्ती-स्त्री मग्रूरपणा शिरजोरी, उद्धटपणा, दांडगाई 'त्यानें आपल्या गुदमस्तीनें हातची भाकरी घालविली' -विविधज्ञानविस्तार ३ ९१ ०मैथुन-न अनैसर्गिक संभोग, गांड मारणें. ०रोग-अंकुर-अर्श-पु मूळव्याध ०व्रण-न भगंदर ०शूल-ळ-पु अपान द्वारांतून निघणाऱ्या कळा

**गुद गोद**—पु हाडांच्या नळींतील द्रवपदार्थ, चरबी

**गुंद, गुदणी**—नस्त्री भोंकर, गोंधण, गोंधण, सेलवन, एक झाड [गु गुंदी, का गोंदिणी]

**गुदगसाळ**—स्त्री (वे) साळीचा एक प्रकार [का गुदग=लाड]

**गुदगुद-दी, गुदगुली**—स्त्री १ शरीरास हात वगैरेचा स्पर्श झाल्यामुळें हसू येण्याचा जो विकार होतो तो (क्रि० करणें, येणें, सुटणें, वाटणें) २ (ल) संतोषणें, हर्ष, आनंद, सुख आनंदाची उकळी 'भगवद्गुणश्रवणेंकरून चित्तास गुदगुल्या होतात' ३ कंड, आग, खाज (फोड, उगाणा इ०मुळें होणारी) ४ (ल) फुरफुरी, सुरसुरी, कंडू (लढाई, भांडणतंटा इ० ची) (क्रि० मोडणें, जिरवणें) **गुदगुद-दां**-क्रिवि खदखदां (कढ ऊन याच्या ध्वनीप्रमाणें) गदगद-दां पहा **गुदगुदणें**-अक्रि १ कढ येणें; खदखदणें (पदार्थ कढतांना, ऊत यतांना) २ कंड, खाज सुटणें (शरीर, अवयव यांस) [ध्व गुद्गुद स गद्गद, हिं गुदगुदना]

**गुदड**—पु गाळसाळ, हलकें रेशीम [गुदडणें]

**गुदडणें, गुदडा**—गुरडणें, गुधडा पहा

**गुदम(मा-मु)रणें**—अक्रि १ कोंडमारा होणें, दम, श्वास कोंडणें, श्वास बंद झाल्यामुळें घाबरणें, घुसमटणें 'श्वास गुदमरला' २ उबगणें, उकडणें (उन्हानें) गदमदणें, उकाड्यानें जीव कासावीस होणें **गुदमरा-मारा**-पु कोंडमारा, जीव घाबरा होणें, कासाविसी, श्वासावरोध (क्रि० करणें, होणें)

**गुदया**—स्त्रीअव (विणकाम) कामट्याचे तुकडे, हे चार चार बोटें लांब असून यांमध्यें नवी चाळ्याच्या वशा फास घालून अडकवितात [का गुदग=अडकणीची काठी ?]

**गुदरणें**—अक्रि उक्रि १ गुजरणें पहा २ प्राप्त होणें, ओढवणें (संकटादि) 'समय गुदरला असतां याला कोणी कामास यावयाचा नाहीं'

**गुदरणें**—अक्रि १ (राजा) लेपाटणें, बरबटणें, लिड बिडणें 'शेणानें गुदरलेले पाय धू' २ (ल) (दुर्गुणांनीं दुर्वर्तनांनीं) कलंकित होणें, काळिमा लागणें ३ काळजीग्रस्त होणें, गुतणें, अडकणें (संसारांत) [हिं गुदरना]

**गुदराण-णी**—गुजराण-णी पहा उपजीविका, निर्वाह 'दाणे खाऊन करी गुदरान।' -पला ८७ कालक्षेप 'आपखी मास-पक्ष गुदराण करायाचें' -रा ७ ३६१६ [फा गुझरान्]

**गुदस्त-स्ता**—वि १ मागचें, गत (वेळ, महिना, वर्ष) 'साल गुदस्त' २ झाली गकेली, होऊन गेलेली (गोष्ट) [फा गुझश्ता] ०बाकी-स्त्री (बंद केलेल्या खात्याची) राहिलेली बाकी **गुदस्ता**-क्रिवि गतवर्षी

**गुदाजार**—गुजाज्यार पहा

**गुदाम**—पु वखार, तळघर, माल किंवा अडगळ साठविण्याची जागा [पो गुदांव, मलाया गोदाग, इ गोडाऊन]

**गुदाम**—पु (शिंपी) गुंडी, बटण

**गुदारा**—गुजारा पहा

**गुदाळी**—स्त्री (गो) प्रदक्षिणा 'आदाळी गुदाळी' =स्वत भोंवतीं गरगर फिरण्याचा मुलांचा एक खेळ

**गुद्दा**—पु मुष्टिप्रहार, ठोसा, बुक्की (क्रि० देणें मारणें, लगावणें) [का गुद्] ०**गुद्दी**–स्त्री ठोसाठोसी (क्रि० करणें)

**गुद्दा**—पु (व) खणाळें, खणाचा तागा 'या गुद्द्यात वीस खण आहेत '

**गुधडणें**—उक्रि १ गुधड्या घालणें, पायानें तुडविणें, चोळा मोळा करणें, चिरडणें, उलथापालथ करणें २ (धसमुसळेपणानें अव्यवस्थितपणें वापरून) खराब करणें मळविणें, नासणें (कापड, वस्तु) दामटणें, खुदळणें, दपटणें (जनावर) –अक्रि धुडगूस घालणें दाडगाई करणें [का गुद्द]

**गुधडा**—पु १ (तुडवून, लाथाडून) गुधडण्याचा व्यापार, चोळामोळा, धसफस, दुर्दशा 'पधरा दिवसात पोरानें पोथीचा गुधडा केला' २ दाडगाई धुडगुस (क्रि० घालणें) ३ खुद ळणी, दामटणी, (फार कामानें झालेली) खराब स्थिति

**गुधाडी**—स्त्री (व) उकिरडा, घाण, गुखडी पहा 'घराभोंवतीं गुधाडी आहे '

**गुनकल्ली**—एक राग गुणकली पहा

**गुना**—पु १ सुरत चेहरा, रग २ भार, पुढारीपणा 'सर्व मसलतीचा गुना तुम्हावर आला आहे ' –रा १२ ७९ [फा गूना]

**गुन्याव**—पु (गो) गुन्हा पहा ०**कार**–वि गुन्हेगार

**गुन्हा**—पु अपराध, दोष, अन्याय, कायद्याचें उल्लघन [फा गुनाह] सामाशब्द–**गुन्हेगार**–वि अपराधी, दोषी, गुन्हा करणारा [फा गुनाह+गार] **गुन्हेगारी**–स्त्री १ गुन्हा, अपराध २ दड (अपराधाबद्दल गुन्हेगाराकडून घेण्यात येणारा) ३ दड पासुन सरकारास होणारें उत्पन्न [फा गुनाह्+गारी] –०**पत्र**–न दडपत्र –भाअ १८३२ **गुन्हे-बे-गुन्हे**–क्रिवि १ गुन्हा असो नसो, हकनाहक २ खात्रीनें 'जर हें काम न करितों तर गुन्हे ब गुन्हे हा पारिपत्य करील ' –जोरा १०७ **गुन्हेवार**  क्रिवि गुन्ह्या प्रमाणें–गणिक–प्रती–बरहुकूम, (समासात) गुन्हेवार–तक्ता–ताळेबद–पत्रक लिहिणें ०**वारी**–स्त्री कालानुक्रमें नोंदलेली गुन्ह्याची यादी–तक्ता (शिक्षावारी शब्दाशीं जोडून योजना) उ० गुन्हेगारी शिक्षावारी अपराध्याच्या शिक्षाचा तक्ता

**गुप, गुपचिप गुपचुप-चूप**—क्रिवि १ निमूटपणें, मुकाट्यानें, हलकेंच, निवांत २ चोरून, लपून नकळत [स गुप्=लपविणें+चुप्=मद गतीनें जाणें का गुप्पन=हुद्द्च' हि गुपचुप्]

**गुपका**—पु मारलेल्या जागेवर फिरेल अशा भोंवरा फेंकण [गपका]

**गुपचीप**—न दुधावरील साईच्या मिठाईचा एक प्रकार –च्या **वड्या**–स्त्रीअव (व) साखरपाकाच्या वड्या

**गुपटणें**—अक्रि १ अडखळणें (भाषणात) २ धरसोड, काकू करणें, आवाकू लागणें (व्यवहार, कामधदा यामध्यें) ३ घोंटाळणें, गोंधळणें, सुचेनासें होणें

**गुपट(त)मार-मारा-घाला**—गुपित मार, बाहेर दृष्टोत्प त्तीस न येणारें दु ख, छपलेलें, छपवावें लागणारें दु ख गुप्त घाला, मार पहा

**गुंपणें**—अक्रि गुतणें पहा 'गुपलें नुगवे मन चरणीं।' –गीता १ ८३

**गुपित**—गुप्त, लपविलेलें –न गुप्त गोष्ट ०**घाला-मारा**–पु गुप्तमारा, गुपटमार

**गुपिस्त**—क्रिवि गजीफातील एक सज्ञा

**गुप्त**—क्रिवि १ गुपित, अगोचर, दडविलेलें, लपविलेलें, चोरटें २ सरक्षित, राखीव ३ गूढ [स गुप्=रक्षण करणें] स मा-शब्द–०**घाला-मार-रा**–पु गुपित–आडून घाला, मार, गुप्तपणें नाश, अपकार छळ (मत्र, कलह, मर्मभेद करणारी, चीड आण णारी भाषा इ०नीं) २ एकदम, चोरटा घाला–हल्ला करणें (भूत, आजार, चोर शत्रु यानीं) (क्रि० घालणें, मारणें, करणें, पडणें) ०**दान**–न न दिसावें अशा तऱ्हेनें, हलक्या किंमतीच्या वस्तूत दिलेलें भारी किंमतीचें दान (उदा० कोहळा वगैरे फळात द्रव्य), प्रच्छन्न दान २ निनावी दान, आपलें नाव जाहीर न करिता दिलेलें दान ०**दूत**–पु हेर, गुप्तपोलीस, गुप्त रूपानें बातमी पुरविणारा ०**धन**–न १ (ल) तप, विद्या, ज्ञान, गुण चातुर्य, शहाणपणा इ० न दिसणारें धन २ जमीनींत पुरून ठेवलेलें द्रव्य –वि विद्या, ज्ञान, चातुर्य यानीं युक्त (माणूस) ०**भाग**–पु गुह्यांग, ढुगण किंवा पुढला भाग, गुह्य भाग –के १६ ४ ३०

**गुप्ती**—स्त्री एक शस्त्र, हें बहुधा ओळखलें जात नाहीं काठींत लपविलेली तरवार किंवा आत तरवार असलेली काठी 'गुप्ती माले असिलता।' –नव १२ १८१ [स गुप्त]

**गुप्तेश्वर**—पु (गुप्त असणारा ईश्वर शब्द) महादेवाचें लिंग पिंडी [स]

**गुप्प**—क्रिवि हळूच, नकळत गुप पहा

**गु(गुं)फ**—स्त्री गुतवळ (शेंडी वेणी केंस इ०ची) [सं गुफ्–गुफ्]

**गु(गुं)फटणें-फाटणें**—गाफाटणें पहा

**गुफणी**—स्त्री १ गांठणें, गायण, गोंवणी, ओंवणी २ वेणी, वीण [गुफणें]

**गुफणें**—सक्रि १ एकत्र माळेंत आणणें, गाठणें, माळ करणें ओंवणं, गोवणें २ वेणी घालणें, विणणें, वळण ३ जोडणें, जुळणी करणें रचणें ४–अक्रि घोंगळण्यांत पडणें, गुतणें 'ऐसें विचारता विचक्षण। गुफोनि ठेले॥' –ज्ञा ८ ८७ **गुफित**–वि १ गुफलेला,

रचलेला, सनविण्या २ विणलेला, माळेंत ओंवलेला गुंफिता-रें-पुन गुताडा, गुतागुत, जाळें 'परी चाज हे भनुरीत। जे एखा गुफिरा।' -ज्ञा १४ २८४

**गुंफाटणें**—उकि पाईवाईनें पसरणें, भरारणें, वावर करणें गोफाटणें पहा

**गु(गुं)फा**—स्त्री १ लताकुंज, पर्णकुटी, पाल्याची बांधलेली झोंपडी 'काश्यपाश्रम अति विकळ। आला तत्काळ गुंफेसी।' -भारा बाल २ १२ २ गुहा, दरी ३ गुंतागुंत 'आवडीचा मंत्र सांगितला सोपा। जेणें नोहे गुंफा कांहीं कोठें।' -तुगा ४८७ [स ]

**गुफेद**—पु (गो ) हरब्याचा एक प्रकार [ पातु ]

**गुबकणें**—उकि कुदणें, धबकणें, कुटणें, मारणें गबका पहा [ ध्व गुब् ? ]

**गुबगुबणें**—अक्रि १ लठ्ठ, जाडजूड होणें, फोपसा होणें २ अतिशय लठ्ठ होणें, 'शरीरावरील चर्बीची अधिक वाढ होणें 'मांस गुबगुबतें अंगावर।' **गुबगुबीत**-वि १ लठ्ठ, जाडजूड, मांसल (माणूस, पशु ) २ चांगलें, भरदार ( फळ ) गबगबीत पहा

**गुबडें, गुब्री**—नस्त्री (व ) ढुगण, कपरडे 'गुबडयावर लाथा बसल्या'

**गुबर**—न भ्रम -शर

**गुबार**—पु १ मळ, धूळ 'दिलांतील गुबार माइन नियोन प्राजळ व्हावें' -रा ५ ७५ २ संशय, किलाफ 'बालण्यात कोणत्या गोष्टींचा पडदा व गुबार राहिला नाहीं' -ख ९ ४८४२ [अर घुबार]

**गुबा(भा)र-रा**—पु १ अंतर्दाह, दु ख, तोंड बंद पण आंत पू असलेली जखम २ पोटात वारा धरणें, पोट गच्च होणें पोटाचा फुगारा, तडतडी, तणावा, फुगवटी (वायूमुळे) (क्रि० (पोटात)धरणें ) ३ गुप्त द्वेष, मत्सर हेवा ४ ढगाचा जमाव 'पावसाचा-मेघाचा गुबारा ५ जलप्रवाह, पाण्याचा संचय (क्रि० धरणें ) ६ ऊन उष्णता, तापन, ताव, उष्णतेनें होणारी स्थिति, उन्हूनपणा (क्रि० दणें, घेणें) [अर घुबार=वाफ, मशुद्धता ]

**गुबारणें**—क्रि आतील उष्णतेनें कासावीस होणें, उबगणें धामाधूम होणें [ गुबारा ]

**गुबारा**—पु १ गोळे उडविण्याची तोफ, गरनाळ, गड गोळ २ (दारूकाम ) आकाशात उडविण्याचा दिवा, कंदील (यात स्पिरिटचा धूर किंवा साधा दिव्याचा धूर कोंडतात) [फा घुबारा ]

**गुबाल्या काढणें**—सक्रि (व ) पिच्छा पुरविणें 'भाइ भाई गुबाल्या काढला'

**गुम**—क्रिवि शांतपणें, स्वस्थपणें, मुकाटयानें (क्रि० बसणें, असणें) [प्रा दे गुम्म=मूढ होणें ? फा गुम्=हरवलेलें, दुर्लक्षित]

**गुम**—विवि चुकलेल्या, हरवलेल्या स्थितींत -वि नष्ट, हरवलेलें, चुकलेलें [फा गुम्] ०शुद-वि (पत्रव्यवहार) गहाळ, हरवलेलें, नष्ट झालेलें 'सनद गुमशुद झाली म्हणोनु दिकौल न करों।' -रा २० ३११ [फा गुमशुद ]

**गुम**—न (व ) टेंगूळ, फुगवटा, गुबारा 'पाठाला गुम धरलें' [हिं गूमडा ]

**गुमकट**—पु (व ) चाकाच्या तुब्याला बसविलेल्या दोन्ही लोखंडी वाटूंच्या पट्टया प्र पर्या

**गुमगुमीत**—वि गुबगुबीत पहा

**गुमज-ट-गुमट**—पु मुकबरा, रोजा घुमट पहा 'नंतर सर्वत्रांनीं जाऊन माती दिली आणि गुमजही बांधिला' -पया ४०० [फा गुंबज]

**गुमठा-डा**—पु परसाकडच्या, गुदद्वाराच्या मोडाचा फुगलेला भाग [हिं गुमडा=उंचवटा, पुढें आलेला भाग ]

**गुमणें**—उक्रि (खा ) हरवणें 'गावडी गुमी गयली ता बी भेटली.' [फा हिं गुमाना=हरवणें ]

**गुमन घुसक्या**—वि १ (माण ) मुकम्मा २ (ल ) कपटी [फा गुम=स्तब्ध+घुस ? ]

**गुमझा**—पु (शोभेची दारू ) स्वत भोंवती गरगर फिरणारे दुतोंडी बाण [प्रा दे गुम=घुमणें ]

**गुमा**—पु (कों ) मक्ता (जमीनीचा )

**गुमान**—क्रिवि (क ) मुकाटयानें, निमूटपणें गुम पहा 'गुमान निघून जा'

**गुमान**—पु १ पर्वा, खातर, क्षिति, खिसगणती (क्रि० नसणें, धरणें, करणें ) 'एकमेका गुमान। न धरिती पैं।' -मिस ३ १०९ 'औरंगजेब याचे फौजेचा गुमान काय आहे' -मराचिस (आवृत्ति ३ ) २२ २ गर्व, ताठा 'उदास वृत्तीच्या गुमानें। उठोन जातो।' -दा १५ २ १८ ३ आधिक्य -हको ४ विचार, मत ५ वहीम, संशय, किंतु 'श्रीमंताकडील सुत्र आली जाहाकडे असेल ऐसा गुमान येथें आहे' -रा ५ ५३ [फा गुमान्=संशय मत ] **गुमानात ठेवणें राखणें**-मोघम, अनिश्चित ठेवणें, स्पष्ट न करणें, सांगणें **गुमानी**-स्त्री संशय 'तेव्हा त्यास सरकारचा आश्रा नाही गुमानी येऊन' -मदरु २ १२७ -वि १ अहंकारी, गर्विष्ठ बढाईखोर 'धरू धाविला निदसलें गुमानी।' -किंद्रौपदी ११ २ बेगुमान, बेपर्वा, बफिकीर ३ संशयी, संशयित [गुमान ]

**गुमान**—वि तृप्त, धड -शर

**गुमानीत**—न (गो) गुप्त

**गुमास्ता**—पु १ मुनीम, प्रतिनिधि, मुखत्यार, कारभारी, अडत्या, बातमीदार, मुतालीक 'प्रधान याचे गुमास्ते व अमात्याचे वगैरे यांणीं काम तूर्त करावें'—मराचिस ८ २ (कायदा) कोणत्याहि व्यवहारांत दुसऱ्या ऐवजीं प्रतिनिधि दाखल वागण्याकरिता मोबदला देऊन नेमलेला मनुष्य, एजंट ३ (वतन कायदा) वतनी नोकरीचें काम करण्याकरिता नेमलेला बदली इसम —वि पाठविलेला. [फा गुमाश्ता] **गुमास्त(स्ते)गिरी**—स्त्री १ गुमास्त्याचें काम, मुतालिकी, एजंटी २ प्रतिनिधि व 'नामाजी लाडा पुणेहून गुमास्तगिरी देऊन कार्यांत मावळास पाठविला'—इम १६

**गुरकणी**—स्त्री १ गर्जन; गुरगुर, डुरकावणी (हिंस्र पशूची) 'त्या वाटेनें जात होतों पण वाघाची गुरकणी ऐकताच मागें फिरलों' २ माणसानें तसा केलेला शब्द ३ (ल) धमकी, रागाचें बोलणें [ध्व गुर+करणें]

**गुरकणें, गुरकाव(वि)णें**—उक्रि १ गर्जना करणें, गरजणें, गुरगुरणें, डरकाळी फोडणें २ भेडसावणें, धमकावणें, आरडाओरडा करून दबविणें, धाक दाखविणें **गुरकावणी**—स्त्री दुसऱ्यानें म्यावें, दबलें जावें म्हणून गुरकणें, डोळे वटारणें, धमकावणी, डरकावणी **गुरकी, गुरकाई**—स्त्री १ गुरकणी गुरकावणी पहा 'इनकी गुरकी दाखवितोस कोणाला?' २ डोळे वटारणें, रागानें पाहणें

**गुरक**—पु रागाचा झटका, घुस्सा (क्रि० येणें) **गुरकाक्या**—वि गुरकावणारा, अरेराव, दांडगा, मोठ्यानें आरडाओरड करणारा, खणखया, मस्त [गुरकणें]

**गुरखा**—पु गुरें राखणारा, गोवारी गुराखी पहा [म गो+रक्ष्—म राखणें]

**गुरखीटाळा**—पु (चांभारी) टाळयाच्या वरच्या चामड्याचा भाग

**गुरग(गु)टणें, गुरगुटणें**—उक्रि शरीर अवगुंठित करणें, कपड्यानें झाकणें, गुरफटून घेणें, बुरखा घेणें, सर्व अवयव झाकतील असें पांघरूण घेणें

**गुरगुर-रां**—क्रिवि १ गुरगुरत, गुरकावीत २ दुरदुरत, फुरफुरत

**गुरगुर-री**—स्त्री १ आरडाओरड, दुरदुर, डुरडुर, गुरकणी २ पोटांतील, घशांतील घरघर आवाज **गुरगुरण-णी**—स्त्री गुरकणी, धुरधुरणें, गुरगुरणें **गुरगुरणें गुरगुरणें** अक्रि १ गुरगुर करणें, धुरधुरणें, गुरकणें, गुरकावणें, अंगावर येणें 'अपमान असा करिता पाहे तो वीरसिंह गुरगुरुनी।'—मोउयोग १२ ६० २ मांजराप्रमाणें ओरडणें, म्याव करणें ३ (पोटांत) गुरगुर आवाज होणें 'पोट-पोटात गुरगुरतें' ४ (घशांत) घरघर आवाज होणें ५ क्रोधाविष्ट होणें **गुरगुराट**—पु अतिशय मोठा गुरगुर आवाज, एकदम सर्वांची गर्जना **गुरगुरावणें**—अक्रि १ गर्जना करणें, अंगावर ओरडणें (माणसाच्या) २ डोळे वटारणें, धमकावणें

**गुरघुस**—स्त्री घूस व मांजर यांची गर्जना. **गुरम्याम**—क्रिवि गाढपणें, शांतपणें, घोरत (झोंप) (क्रि० करणें, निजणें) [ध्व गुर+घुम तुल० का गुरु=घोरण्याचा आवाज]

**गुरगु(गू)ज**—पु १ गदा, लोखंडी सोटा, पर्शु गुरदा २ फकिराजवळ असणारी (साखळ्या लावलेली) लहान गदा हिनें तो स्वतःला मारून घेऊन भिक्षा मिळवितो [फा गुर्झ]

**गुरगुडी गुर्गुडी**—गुडगुडी पहा 'आधीं लागे सवय विडिची मागुनी गुर्गुडीची।'—अर्वाचीन ३८८

**गुरगुरीत**—वि १ टवकारलेले, वटारलेले, गुरकावणारे (डोळे) २ फुगलेली, वर उचलून आलेली (पुरी, पोळी, भाकरी, गुरोळी) ३ फुगलेलें, सुजलेलें (शरीरावयव)

**गुरचरण**—स्त्री १ गायरान, गुरें चारण्याची जागा, गोपचार २ त्याबद्दल दिलेली मजुरी ३ गुरें चारण्याबद्दलची फी **गुरचराई**—स्त्री चरणावळ गुरचरण अर्थ २,३ पहा [गुरें+चारणें]

**गुरजी**—स्त्री एक कुत्र्याची जात. [फा गुर्ज=लांडगा]

**गुरंजणी**—स्त्री (गो) गुरगुरणी, गर्जना **गुरंजणें**—(गो) गुरगुरणें पहा

**गुरथळ-ळी**—स्त्री १ चेंदामेंदा चुरगाळा, गुंधडा गुंधडणें पहा २ (सामा) अव्यवस्था, गोंधळ (क्रि० घालणें, लावणें, मांडणें)

**गुरदंड**—पु (चारणीकरिता) डोंगरावरील गुरें जाण्याचा मार्ग **गुरव(वा)डा**—पु गुरें बांधण्याची जागा, गोठा

**गुरदा**—पु गदा, साखळ्या लावलेलें भिक्षेकऱ्याचें हत्यार गुरगुज पहा [फा गुर्झ]

**गुरदा**—पु १ मूत्रपिंड २ पातळ वाटोळी चपाती, मांडोळी [फा गुर्दा, गिर्दा]

**गुरपटणें, गुरपटिण, गुरफटणें, गुरफाटणें**—अक्रि १ गुंतागुंत होणें, करणें, एकमेकांत गुंतवणें, जाळ्यांत सांपडणें, अडकणें (दोरा पदार्थ इ० फेऱ्यांत). २ (शब्दशः व ल) गळफटणें, गोंधळणें, भांबावणें ३ गहाळणें, गहाळ करणें, गमावणें **गुरपटा, गुरफटा-फाटा**—पु घालमेल, गोंधळ, गळफटा, गुंतागुंत, अव्यवस्थित घालमेलीची, गडबडलेली स्थिति (वस्तु, माणूस इ० ची) (विशेषतः अलंकारार्थी पंचमी विभक्तींत योजतात जसें—गुरफट्यांत पडणें)

**गुरवी**—स्त्री (चे) चिमणी [का गुब्बी]

**गुरंमळणें**—अक्रि गोडसर होणें, गाभुळणें (पेरू, आंबा इ० ), पिकण्यापर्यंत येणें **गुरंभा-भी-**वि पाडाचें, गदरलेलें, गाभुळलेलें (फळ)

**गुरमळणें**—अक्रि १ गुणगुणणें, गुळमुळणें, पुटपुटणें, चाचरत, अस्पष्ट बोलणें २ गुरमळणें, गोंधळणें, भवांडणें, कांकं, भळटळ करणें ३ गुरमळणें, गमणें, रेंगाळणें, वेळ दवडणें

**गुरमा, गुरमाई, गुरमी**—पुस्त्री मस्ती, आवेश, ताठा, धुंदी, ऐट (कैफ तारुण्य, विद्या इ० ची) 'प्रहर दिसा रवि यारी सर्व झाले आरव गुरमीस।'–ऐपो ३९८ २ जेवणानंतर पशात होणारी, औषधानें होण री जळजळ, आग ३ रागाचा झटका ४ जागरणानें होणारी डोळ्यांची जळजळ, लाली [फा गर्मी]

**गुरव**—पु एक ब्राह्मणेतर पुजारी जात किंवा तींतील व्यक्ति विशेषत शंकराची पूजा करणारी जात, एक बलुतेदार, गांवच्या देवाचा पुजारी, याशिवाय याचा धंदा वाजंत्री वाजविणें, द्रोण पत्रावळी लावणें इ० [का गोरव=भिक्षावेषांत शंकर, शैव भिक्षेकरी, धनगराचा उपाध्याय] म्ह० १ देवळाची मेली घाट व गुरवाचें गलें पडहार (क्याट) **गुरवकी**–स्त्री. गुरवाचा धंदा (देवपूजादि कर्म), हक्क, वृत्ति वगैरे **०डा**–पु (निंदार्थी) गुरव [गुरव+डा निंदार्थी प्रत्यय] **०पुंज**–पु शेतकऱ्याकडून गुरवाला देण्यासाठीं सरकारनें वसूल केलेला–घतलेला –हक्क, गुरवाचा धान्यांतील वाटा, बलुतें **गुरवासय** पु (गो) गुरव लोकांची वस्ती, वाडा **गुरवी**–वि गुरवासंबंधीं (पान, पत्रावळ इ०) **गुरवीण**–स्त्री गुरवजातीची स्त्री

**गुरवळी, गुरळी**—स्त्री एक पक्वान्न, गुळाची पोळी, साखरपुरी, गुळवरी 'अनारसे फेणिया गुरवळिया।'–जै ९४ ५२ [गुळवरी वर्णव्यत्यासानें]

**गुरवा**—वि श्रेष्ठ [स गुरु, गुर्वी]

**गुरवार**—वि (कु गो) गरोदर [गर्भार]

**गुर(रा)ळा-ळी**—पुस्त्री चूळ, गुळणा 'उदकामधें साडी गुरळी।'–दा २ १ ६४ [ध्व]

**गुराखी-ख्या**—पु गोवारी, गुरें राखणारा, गोपाल [स गोरक्षक, प्रा गोरक्ख] म्ह० गुराख्यानें गुरें टाकलीं म्हणून धरधनी टाकील काय

**गुराब-ब, गुराबा-बा**—स्त्री एक लढाऊ मोठें गलबत हें फक्त अरबी समुद्रातच चालत असून याची घडण विशिष्ट प्रकारांची असे 'स्वर्वैरि मद्यपींच्या भवसिंधूतील वा गुराबा ज्या।'–मोउद्योग १२ १७२ 'चालीच्या गुराबा बहुत थोर ना बहुत ल्हान ऐशिया मच्छरीतीनें सजाव्या '–मराभा ३४ [फा घुराब्, इ ग्रॅब]

**गुराळ**—गुऱ्हाळ पहा

**गुरु**—पु १ मंत्रोपदेशक २ धार्मिक उपाध्याय धार्मिक संस्कार इ० करणारा ३ उपनयन संस्कारामध्यें गायत्र्युपदेश करणारा ४ शाळेंत इ० शिकविणारा, विद्यादाता. 'सकोप दिसती गुरु क्षणभरीच जे तापले।'–केका ८८ (यावरून) ५ (ल निंदार्थी) कुश, भर, प्रोत्साहन देणारा वाईट मसलत देणारा माणूस ६ पिता, बाप, पूज्य, वडील माणूस 'गाति जामे जया तव गुरुच्या आश्चर्य मरण जननाचें।'–मोभभ ४ ८० ७ या नांवाचा ग्रह ८बृहस्पति, देवाचा गुरु 'धूम्रारिप्रमि वदला गुरु ज्या या भद्रधामनीतीतें।'–मोसभा ६ ७० (सामा) शिक्षक, मास्तर, आचार्य ९ –संबोधन अहो। स्वप्रतिष्ठित, बोवाजी। म्ह० गुरुची विद्या गुरुस फळली–भोंवली=लोकांस फसविण्याची युक्ति ज्याला शिकविली त्यानेंच त्याला (शिकविणाराला) फसविलें सामासन्द– **०किल्ली**–स्त्री १ न समजणारें, खोल, गूढ लिखाण, प्रबंध, मंत्र (गुरूनें सांगितल्याखेरीज न समजणारें) २ (सामा) गूढ, कठिण गोष्ट, शंका ३ खुबी, मख्खी, मर्म (कुलपादिकांचें), गूढ उकलण्याची युक्ति 'प्रकरण जरा जड आहे, पण तुझ्यापासून तिला नरम करण्याची गुरु किल्ली मात्र शिकलोंच आहे'–नाटिका [गुरु+किल्ली=फक्त गुरूलाच चालवितां येणारी किल्ली] **०कुल**–न गुरूचें कुटुंब २ गुरूनें विद्यार्थ्यांना पुत्रवत् मानून, त्यांचें खाणें, पिणें, विद्याभ्यास इ० सर्व सोय लावणारी पाठशाळा, प्राचीन आश्रम पद्धति [स] **०कृपा**–स्त्री. गुरूची मर्जी, आशीर्वाद गुरुकृपा संपादन केली असतां विद्या लवकर येते' **०क्रम**–पु गुरुपरंपरागत, अधिकृत शिक्षण [स] **०गम्य**–वि ज्याच्या समजुतीस गुरु लागतो असें, गुरुकिल्ली लागणारें, दुर्बोध, गहन (श्लोक, वचन प्रयोग) गम्य पहा 'की गुरुगम्य हुने ठाय।'–ज्ञा ६ ४७९ [स] **०जन**–पु पूज्य, माननीय व्यक्ति, वडील माणसें 'कशि गुरुजनीं सतीची शिवला ज्या कुमुदिनीस अस दर्के।'–मोसशयरत्नमाला १३ (नवनीत पृ ३५०) वडील धारी माणस, मानाची मंडळी **०जनसभा**–स्त्री १ (ख्रि) युनायटेड चर्च ऑफ नॉर्दर्न इंडियाच्या एका विशिष्ट क्षेत्रातील चर्चेसच्या आचार्य व प्रातिनिधिक मंडिलाची सभा २ इंग्लंडचे चर्चेच्या एखाद्या पादरीच्या आचार्यांची व मंडळीच्या अनेक कामांत त्याची मदत करणाराची प्रातिनिधिक सभा हे सहाय्यक वडीलच असावेत असें नाहीं **गुरुजी**–पु गुरु, शिक्षक, आचार्य, पुरोहित **गुरुतल्पग-तल्पी**–पु १ गुरुपत्नीशीं गमन करणारा २ (ल) मातेसमान स्त्रीपाशीं गमन करणारा, महापापी, नीच [स गुरु+तल्प+ग] **०दक्षिणा**–स्त्री विद्या संपल्यानंतर शिष्यानें गुरूस द्यावयाची देणगी, संभावना, शिकण्याची फी [स]

०द्रव्य–न आपल्या गुरूची मालमत्ता (समासात)गुरुद्रव्यहरण–साधन–अपहार–अभिलाष [स] ०द्रोह–पु गुरूचा द्वेष, गुरूचा गुन्हा करणें, गुरूचा विश्वासघात [स] ०द्रोही–वि गुरूचा द्वेष करणारा, गुरूशीं वैर करणारा 'मित्रद्रोही गुरुद्रोही। विश्वद्रोही देवद्रोही।' [स] ०द्वार–न शीखाच्या गुरूंनीं स्थापन केलेलें देऊळ (सामा.) शिखाचें देऊळ ०परंपरा–स्त्री आपला गुरु गुरूचा गुरु, त्याचा गुरु असा गुरूचा वंश ०पीठ–न गुरूचें राहण्याचें ठिकाण, गुरूची गादी [स] ०पुत्र–पु १ गुरूचा मुलगा २ साधुसतामध्यें वाढलेला व त्याच्याप्रमाणें वागणारा, सत्पुरुषानें उपदेश केलला, साधु शिष्य [स] ०पुरुष–पु नवरा, पति 'व्रतोपवास करावा। गुरुपुरुष निरोपानें।' –गुच ३५ ८७ [स] ०पूजा–स्त्री १ कार्यारंभीं राशीस प्रतिकूल असल्यास करावयाची बृहस्पतीची पूजा २ स्वगुरूची पूजा ०पौर्णिमा–स्त्री आषाढी पौर्णिमा, यादिवशीं आपला मन्त्रोपदेशक गुरु, सन्यासी इ० ची पूजा करतात [स] ०प्रचीति–स्त्री १ गुरूची पारख, गुणदोष परीक्षा २ गुरूचा अनुभव (बरा–वाईट) येणें [स प्रतीति] ०प्रसाद–पु १ गुरूची कृपा २ गुरूच्या आशीर्वादाचें फल (विद्या, कौशल्य भरभराट इ०) ३ (ल) भाग, अफू, तबाखु [स] ०बंधु–पु १ एकाच गुरूचे दोन किंवा अनेक शिष्य, ते परस्पर २ सहाध्यायी ३ स्वत च्या गुरूचा पुत्र [स] ०मंडली–गुरु करणें (महाराच्या जातींत)–बदलापूर १७५ ०मन्त्र–पु १ गुरूनें सांगितलेला धार्मिक उपदेश, गुरूनें उपदेशिलेला मत्र २ (ल) वरी वाईट सल्ला मसलत, गुप्त शिकवण (बहुतेक वाईट अर्थानें) (क्रि० देणें, शिकविणें, सागणें, म्हणणें) [स] ०मार्ग–पु गुरूनें उपदेशिलेल्या मन्त्रासबंधीं जपादि विधि [स] ०मुख–न अध्ययनाच्या प्रसगीं गुरूच्या मुखातून वाक्य निघणें, प्रत्यक्ष गुरूचा उपदेश, शिकवण 'ही माझी विद्या ऐकीव आहे, हिला गुरुमुख नाहीं' [स] ०शाप–पु गुरूनें रागानें काढलेलें वचन, गुरूनें दिलेला शाप [स] ०शिक्षा–स्त्री १ अभ्यासाविषयीं गुरूनें लावून दिलेले नियम, गुरूची शिकवण २ नियम वगैरे मोडल्याबद्दल गुरूनें दिलेला मार [स] ०सप्रदाय–पु १ गुरुमार्ग पद्धा २ विशिष्ट गुरूचे अनुयायी लोकाचा आचार, परपरा वगैरे ०सप्रदायी–वि १ गुरुमार्गी २ विशिष्ट गुरूचे अनुयायी (लोक जमाव, सघ) ०स्मरण करणें–कार्यास प्रारभ करण गुरूपदेश गुरोपदेश–पु गुरूनें दिलेला मत्र

गुरु—पु सूर्यमालेंतील सर्वात मोठा ग्रह गुरु अर्थ ५ पहा दर तेरा महिन्यास एक राशि अशी याची गति आहे याच्या अस्ताचा काल मगलकार्यास वर्ज्य मानितात गुरु सिंह राशींत असला म्हणजे सिंहस्थ व कन्याराशीस असला म्हणजे त्यास कन्यागत म्हणतात ०पुष्ययोग–पु एक चागला योग गुरुवारीं पुष्य नक्षत्र आलें असता त्या योगास म्हणतात हा अमृत सिद्धि योग होय ०बल–न स्वराशीस या ग्रहाचें आनुकूल्य असणें जन्मलग्नकुडलींत हा ग्रह दोन, पाच सात, नऊ, यास्थानीं असलेला शुभ मानितात व या कालीं गुरुबल आहे असें मानितात ०वार–पु बृहस्पतीचा वार, (रविवारापासून) आठवड्यातील पाचवा दिवस, बृहस्पतवार घको ३ १२

गुरु—वि १ जड, ल्हड, वजनदार २ मोठा विस्तृत 'हा गुरु मार्गुय गा।' –गीता १३ २२२ ३ पचण्यास जड (पदार्थ) ४ दीर्घ, द्विमात्र (स्वर) ५ कठिण, अवघड, भारी (वस्तु) ६ आदरणीय, मान्य, पूज्य सामाशब्द– ०घंटाळ–वि (को) अवडबर माजविणारी गुरुत्व–न १ (यत्रशास्त्र) पृथ्वीच्या मध्याकडे पडण्याचा पदार्थाचा कल २ जडत्व, वजन ३ मोठेपण, थोरपणा 'तोपेचिना शार्ङ्गधर। गुरुत्वासीं।' –ज्ञा १६ २६ ४ गुरुपणा गुरुत्वमध्य–पु गुरुत्वाकर्षणाचा मध्यबिंदु ज्या बिंदूसभोंवतीं पदार्थाच्या सर्व भागाचें कोण त्याहि स्थितींत समतोल्न होतें तो बिंदु गुरुत्वशून्य–वि मुळींच वजन नसलेलें गुरुत्वाकर्षण–न विश्वातील वस्तूचें परस्पराकर्षण, एक जड पदार्थ दुसऱ्याला आपणाकडे ओढतो अशी स्थिति, पृथ्वीमध्याकडे ओढण्याची शक्ति गुरुलघु विचार–पु १ बोलण्यात लिहिण्यात ऱ्हस्वदीर्घ स्वराचा काळजीपूर्वक विचार, ऱ्हस्वदीर्घाकडे लक्ष २ बारीक, खोल विचार, सव बाजूंनीं विचार ०वती–वि महत्त्व, मोठेपणा, विस्तार 'प्रथ गुरुवतीचा ठावो।' –ज्ञा १ ३३ गुरुवी–वि थोर, मोठा, श्रेष्ठ 'अर्जुना हे गुरुवी भक्ती।' –ज्ञा ९ २२८ गुरुवृत्त–न मोठें वर्तुल, मडळ

गुरु—पु (सगीत) दोन मात्राचा काल

गुरुमुखी—स्त्री शिखाच्या धर्मग्रथाची लिपि, ही देवनागरीवरून बनली आहे [गुरु+मुख]

गुररी—स्त्री ताठा, गर्व, मस्ती, गुर्मी, जोर 'जुनरकर मोगलानेंहि आपले टाई गुररी आणली आहे' –पेद ३ १४७ [अर घुरूर]

गुरळा—स्त्री चूळ, गुळणी 'मीचि होईन साळा। करूनि गुरळा।' –ज्ञा १३ ४१८ [ध्व]

गुर(रो)ळी—गुरळी, गुरवळी पहा

गुरू—पु गोवर देवी या दुखण्याचे वाहणारे फोड मुका गुरु न वाहणारे फोड [का गुरुळे=खळी, ट्टिर]

गुरू—न चतुष्पाद प्राणी, जनावर, गाय, बैल, म्हैस, रेडा, ढोर, ढोर एक पशुजात [तुल० प्रेंजि गुरव, पा गुरई] म्ह० लेंकरागुरानीं वाडा साजरा ०ढोरू–र–न गुरू,

गवत खाणारें सशृंग जनावर ०घासर्क-न १ सर्व लहानमोठ्या जनावरांना व्यापक शब्द, गुरेंढोरें, जनावरें २ जनावर, गुरू, यांपैकी एक.

गुरूप-य—वि गुडुप, गडद, अंधाराचा, अंधारमय, दाट (अपशार) [अर घुरूब=सूर्यास्त, का गुड्डु गुड्डु=गोल डाची कांव ]

गुरूळ—पु (गो ) दोनाच्या धाधाला सेकड्यानें पाड लेलें भोंक, यांतून दोतांतील पाणी वाहून जातें [का गुरुळे= खळी, भोंक]

गुरोडा—पु १ जनावरांचा गोठा, गायवाडा २ (विद्यार्थी) गुरू [गुरू]

गुर्की—गुरकी पहा. धचक, दाब 'लागेलगे कवि भेदरले अवघ्यावर त्याची गुर्की।' -होला १८

गुर्गलॅत—न (गो ) थड पाण्याचा माठ, मातीची घागर [पोर्तु]

गुर्गना—पु (गो ) कोळी, किडा

गुर्जर—पु गुजराथ देश, त्यांतील रहिवासी गुजर पहा [स ]

गुर्दा—गदा, गुडदा पहा 'बारा हजार गुर्दा। -ऐपो ४४ [फा गुर्झ]

गुर्फटणें—गुरफटणें पहा

गुर्वत—स्त्री नम्रता अजिजी, काकळूत 'इंग्रज गुर्वत दाख वून कानू साधण्यास चुकणार नाहीत' -दिमरा १ ५४ [अर गुर्बत]

गुर्मळणें—गुरमळण पहा

गुर्मी—गुरमी पहा

गुर्रावणें—अक्रि (व ) गुरगुर करून अंगावर येणें, गुरका वणें पहा [ध्व गुर]

गुर्वचार—पु (गो ) गरोदरपण, गर्भारपण

गुर्वार—वि (गो ) गरोदर, गर्भार गरवार पहा

गुर्विणी—वि गर्भिणी, गरोदर गर्भार 'आणि सत्ता संभोगें। गुर्विणी होय।' -ज्ञा १४ ८९ [स ]

गुऱ्हाळ—न १ ऊस गाळण्याचा चरक, ऊस गाळण्याचें यंत्र २ चरक असलेली जागा ३ गूळ तयार करण्याचा कार खाना (यंत्र, इमारत इत्यादि सर्व उपकरणांसह) ४ ऊस गाळ ण्याचा, गूळ करण्याचा धंदा काम 'गुऱ्हाळ-लागलें-चाललें- संपलें.' ५ (ल ) लांबट हकीकत भाषण कंटाळवाणें भाषण, चऱ्हाट 'पण श्रीमंतांचें गुऱ्हाळ आवरेना त्याला ते काय कर णार।' -ख [गुऱ्हार] म्ह० गोष्टीचें गुऱ्हाळ पायलीचा फराळ ०घर-न गूळ करण्याचा कारखाना, गुऱ्हाळ म्ह० गुऱ्हाळघर आणि रगोनघर बरोबर

गुल—स्त्री गहजब ? -शर [?]

गुल—पु १ फूल २ दिव्याची काजळी, कीट ३ आग काढील लावलेलें फास्फरस व गधक यांचें पुट ४ हुक्क्यांतील कोळशाचा गोळा, विस्तव [फा गुल्] सामासिक-गुल(ला) अनार-पु १ डाळिंबीचें फूल, अनारकली 'सर्व गुलअनार गुलचमन निदिचा रमग तमा गाजिरा मुशा मुसब्बटा।' -होला १०४ २ डाळिंबी रंग ३ एक झाड, गुलनार पहा -वि डाळिंबी रंगाची (शालजोडी, वस्त्र इ०) [फा गुल्+अनार्=डाळिंब] ०कंद-पु एक लेह गुलाबाच्या फुलाच्या पाकळ्या व खडी साखर यांचें मिश्रण, गुलाबाचा मुरब्बा ०काडी-स्त्री आग काडी ०केंदा-पु झेंडूच्या गेंडी-तुऱ्याप्रमाणें असलेलें फूल ०गुलाब-पु गुलाबाचें फूल, गुलाब ०गेंद-पु फुलांचा गुच्छ 'संगीन कुच मादार, सजिव सरदार, गुलगेंद उमासले।' -प्रला ११३ ०चनी-चिनी गुलाचीन-स्त्री फुलाची एक जात, गुलदावरी ०चांदणी-स्त्री एक फूल ०चिमणी-स्त्री पिवळ्या पोटाची चिमणी (पक्षी) ०छबू-ब्बू-पु निशीगंध, हें झाड कंदापासून होतें पुलें विशेषत सायंकाळीं उमलतात, त्यांस फार मधुर वास येतो फूल लांबट असून सफेत रंगाचें असतें व देंठ थोडासा वक्र असतो -वि मोहक चेहेरा असलेला (माणूस) [फा गुल्शब्बो] ०छडी-जाफिरी-स्त्री एक प्रकारचें फूल [फा गुलिजाफरी] ०जार-वि १ नाजूक, सुंदर मोहक, रमणीय २ टवटवीत, प्रफुल्ल ३ संपन्न, ऐश्वर्ययुक्त 'वाच्छाई सक्त गुलजार दिसे रंगबहार पुण्याची वस्ती।' -होला १७८ ४ आबाद 'महाल उदणगाव वगैरे महाल गुलजार दिले' -रा ८ २१२ [फा गुल्झार्=गुलाबांची बाग] ०टोप-पु १ एक फूलझाड, व त्याचें फूल 'पर्यंतक गुलटोप गुलगुलित अळीं कमळणवावरी।' -प्रला १५५ २ कबूतराची जात ०तुरा-पु १ (व ) शंकासुर नांवाचें फूलझाड २ गुलमोहोर, यास पिवळ्या व तांबड्या रंगाचीं झुबकेदार फुलें येतात फुलास वास नसतो याचें मूळ काढ्यांत घालतात, लांकूड बळकट असल्यामुळें खुंटे करतात 'डवना मरवा गुलतुरा। बाळागीर पडदे आणवा।' -पला ४ २२ ०दान-न १ फुलें ठेवण्याचें पात्र २ पेटलेला तोडा न विझता ठेवण्याची लोखंडी पेटी ३ कात्रीनें दिव्याची काजळी काढण्याचें पात्र 'गुलदानें रुप्याचीं' -पया २८७ 'गुल दानांनीं गूल काढावे' -पया २८७ ०दावदी-री-ली-स्त्री एक फूल व झाड 'शरिर सुकुमार की गुलदावरी।' -प्रला ११० ०नार-१ डाळिंबीचें फूल, गुलअनार २ डाळिंबाची एक जात, हीस फक्त फुलें येतात, फळ धरत नाहीं -कृषि ७०१ ०फूल-न०

गोजिव्हा, गुलगोजबान -मुव्या १४० ०वदन-वि गुलाबाच्या फुलासारखा सुंदर देह असणारी (स्त्री) -पु १ ताफत्यातील (रेशमी वस्त्र) एक भेद, प्रकार, एक प्रकारचें कापड 'दाविली पचुडी गुलवदनी।' -प्रला १४९ 'गुलवदनें रेशमी' -ऐटि ५२३. २ एक रंग ०वस-वाशी, गुलवाक्षी-स्त्री सायंकाळी फुलणारें एक फुलझाड याचीं फुलें पांढरीं, तांबडीं, जांभळीं वगैरे अनेक प्रकारचीं असतात 'छतें मारशांचीं बशिवली रंग गुल बासी।' -प्रला ९२ -न या झाडाचें फूल -वि या फुलाच्या रंगाचें [फा गुलि-अब्बास] ०मखमल-पुस्त्री एक फुलझाड व त्याचें फूल, गेंद, इंडु. ०मस-पु रानटी पांढरें फूल व त्याचें झाड ०मेंधी-मेंहंधी-स्त्री मेंदीचा एक प्रकार व त्याचें फूल ०मोहोर-पु १ एक फुलझाड २ (शोभेची दारू) दारूच्या झाडाचा एक प्रकार एका बाजूस १६ लोखंडी तारा बांधतात, शेंडयाला फुलाची व इतर रंगीबेरंगी ज्योती बांधतात (जळता) भुईनळा दाखविल्याबरोबर ४ मिनिटांत फटफट आवाज होऊन तारा पडतात

**गुलकणें**—अक्रि खुदीनें चकून रंगेलपणें, मनापासून, मोकळेपणानें, सदवतेनें हसणें गुल-कण-कन-कर हीं अव्ययें **गुलकणें-हांसणें, गुळणी टाकणें**-यावरोबरहि योजतात [ध्व फ गुल=फूल? गुलकी खुरकन पहा]

**गुलकातरी**—स्त्री गुल दिव्याची काजळी काढण्याची कातरी, दिव्याची कातरी [फा गुल=काजळी+कातरी]

**गुलकावणी**—स्त्री हुलकावणी, टोंग, फसवणूक, मायावी भाषण, व्यापार, रोंख, झोंक, भाव (क्रि० दाखविणें, करणें)

**गुलकाविणें**—उक्रि १ हुलकावणी दाखविणें, फसविणें २ आरडाओरड करून दबावणानें घाबरें करणें, गोंधळविणें ३ (मान शब्दावरोबर प्रयोग) ओवाळणें, हलविणें (मान), चेष्टेनें मान मुरडणें घुलकाविणें पहा **गुलकावून घेणें** गुल्क विणें अर्थ २ पहा

**गुलकी**—स्त्री स्वच्छंदी, रंगल हास्य दयापूर्ण हास्य, सरल हास्य (क्रि० येणें, टाकणें, मारणें)

**गुलखैरा-रू**—पु एक चिनी-इराणी फूलझाड [फा गुलखार?]

**गुलगुल, गुळगुळ**—क्रिवि हळू हळू कानाला गोड लागेल अशा प्रकारें, हलक्या स्वरात (प्रेम रहस्य, इ०च्या गोष्टी बोलणें) [ध्व स गुलगुलाय प्रा गुलगुल] ०गोष्टी-स्त्रीअव हळू हळू चाललेल्या प्रेमाच्या गोष्टी, कानगोष्टी 'रोगी आपल्या घरींच बायकोशीं गुलगुल गोष्टी बोलण्यास निघून गेले' -सुद ७५

**गुलगुलीत**—वि १ जाड, लठ्ठ, गुबगुबीत, गोंडस (शरीर) २ मऊ व दबणारी (उशी, गादी) ३ फुगलेला आणि मऊ (भात) ४ (सामा) फार मऊ (पदार्थ) [हिं गुलगुलाना= मऊ करणें]

**गुलगुलेत**—पु (गो) पाण्याचा सुजा

**गुलड**—स्त्री एक झाड.

**गुलडा**—पु १ (विणकाम) ज्यास ताण्याच्या पलीकडचीं शेपटें बांधलेलीं असतात असे येत्रीवरील आडवें लाकूड ताण्याची दुसरीं टोकें जुपगी अथवा जुपणें याला बांधलेलीं असतात गुलडा आणि जुपगी यांनीं ताणा ताणला जातो २ येलीच्या डोक्यावरील आडवी दांडी, हिच्या प्रत्येक टोंकास एक लांब पेंढें-पेंढ-पेंढी असते ही सुताऱ्याला (गुलडयाशीं समांतर असणाऱ्या काटीला) स्थिर राखते

**गुलदस्त**—पु १ फुलाचा गुच्छ, झेला २ गंजीफांतील एक मजा चार चार पानांचा एक एक दस्त पानें वाटताना एक दस्त तसाच न पाहता ठेवून शेवटीं तो लावतात **गुलदस्तांत ठेवणें**-१ राखून ठेवणें २ लावून ठेवणें, गुप्त राखणें 'पण तें सध्या गुलदस्तातच राहू देणें बरें' -नपुक १८ [फा]

**गुलदस्ता**—पु (माळवी) फूलपात्र, फूल ठेवण्याचें भांडें

**गुलप(फ)णें**—अक्रि १ (को) कष्टानें उच्चारणें, बोलताना अडखळणें, चाचरणें २ पायात पाय पडतील असें चालणें, पायांना आळेपिळे देत चालणें ३ गुरफटणें पहा

**गुलमाल**—क्रिवि नापत्ता (क्रि० करणें, पळविणें)

**गुलमुच्छा**—स्त्री गलमिशा, गालावरील राखलेले केस 'गुलमुच्छा होत्या त्या वरच्या बाजूस चढविलेल्या' -सूर्योदय १४७

**गुलमेख**—स्त्री एक प्रकारचा खिळा, गठदार खिळा हा लहान असून याचें डोकें पसरट असतें [फा]

**गुलसान**—स्त्री (गो) बंदुकींत घालण्याची शिशाची गोळी [फा गुल=गोळी]

**गुलहवस-हौस**—स्त्री ऐषआरामाची आसक्ति, चैनबाजी. **गुलहंसी-हवसी-हौशी-हौसी**-वि चैनबाज, ऐषारामी, आवडशोकी, विषयी, हौशी व खर्चिक [फा गुल्हवस्]

**गुलाई**—स्त्री (गवंडी काम) गोलाई, कोपऱ्याच्या बाहेरील भिंतीचा गोल भाग 'दरजा भरलेले साधे स्पष्ट दिसून दरजा सारख्या जाडीच्या असून चपट्या गुलाइच्या किंवा घोटणीच्या असाव्या' -मॅरेट ७९ [हिं गुलाई, स गोल]

**गुलाडी**—स्त्री (विणकाम) करवतीकाठाचें विणकाम करण्याचें यंत्र, चाळा [फा गुल=फूल]

**गुलाब**—पु १ एक फुलझाड हें झाड सरळ वाढतें याचीं पानें सुंदर असून झाडाच्या सर्वांगास काटे असतात फुलाचा रंग तांबडा, गुलाबी, पिवळा, पांढरा असतो फुलापासून अत्तर

काढतात व गुलकंद तयार करतात २ त्याचें फूल ३ गुलाबपाणी व अत्तर 'गुलाबशिसे उपमेगे तीन चार पाठविल्न तर बरें होतें.' -ब्रच २५३ [फा गुल्=फूल+आब=पाणी, हिं गुलाब=गुलाबाचें फूल] ०कंद-पु गुलकंद 'गुलाबकंद वजन पक्के एक शेर पाठविला तो पावेल' -ब्रच १२९ ०काठी-स्त्री गुलाबाची काठी, ही औषधी असते ०चक्री छकडी-स्त्री साखरेच्या पाकांतील गुलाबाची मिठाई ०छकडी-स्त्री १ चटकचांदणी स्त्री, एक प्रकारचें गाणें ०छडी-पु छडीसारखी कांडी ०जांब-जामून-पु मैद्यामध्यें तूप व खवा मिसळून तुपांत तळून आणि नंतर जिलबीसारखी पाकांत घुरत टाकून केलेली मिठाई -गृशि १४३६. [फा गुलाबजामन्=एक फळ] ०दान-दाणी-नस्त्री गुलाबपाणी ठेवण्याची व तें शिंपडण्याची झारी [फा गुलाबदान्] गुलाबदान-पु द्राक्षाची एक जात -कृषि ५१२ ०पाणी-न (पांढऱ्या रंगाच्या) एक जात -कृषि ५१२ ०पाणी-न गुलाबाच्या फुलापासून तयार केलेलें सुगंधी पाणी हें पानसुपारीच्या वेळीं अंगावर शिंपडतात ०पाश-पु गुलाबदाणी [फा ] ०शकर-स्त्री गुलाबपाक 'गुलाब-शकरीच्या वड्या सुमार पन्नास पाठविल्या त्या पावल्या' -ख १२ ६६२६ ०शेवंती-न (गो) सोन्याचें गुलाबाचें फूल एक दागिना गुलाबाचें फूल-न १ गुलाब २ गुलजार ३ (ल) नाजूक स्त्री, मुल बाईसाहेब हें फूल फार कडक आहे बरें आपण आपलें हें गुलाबाचें फूल घरांत नेऊन जपून ठेवा' -नाटिका गुलाबी-स्त्री १ (कोल्हाटी, डोंबारी) दोरावर काम करणारी मुलगी, हिला लाडकें नांव २ एक लहान झुडुप -वि गुलाबविषयक गुलाबाचा (रंग, वास, अत्तर) ०अत्तर-न गुलाबाच्या फुलापासून काढलेलें अत्तर. ०चंदन-न गुलाबासारख्या वासाचें चंदन चंदनाची एक जात ०जांब-आंब-पु एक फळ रायजांभूळ [फा गुलाब्-जामन्] ०झोंप-स्त्री पहाटेची, थंड वेळेची झोंप ०थंडी-स्त्री सौम्य प्रकारची, सुखावह थंड हवा (ही गुलाबाला हितावह असते असें म्हणतात), पहाटेची थंडी

**गुलाम**-पु १ बटकीचा मुलगा, दासीपुत्र २ कामासाठीं विकत घेतलेला माणूस, दास ३ (ल) लुच्चा, वस्ताद ठक, चोर, हरामखोर, सोदा (हैदरअलीस उद्देशून) 'गुलामानें दगाच केला होता' -ख ८७९ ४ पत्त्यांतील गुलाम, गुलाम्या (इ) नेक ५ (कौतुकानें) हुषार लहान मुलगा ६ चंगळांचन गंजिफांतील सहावा रंग [अर घुलाम्] ०गिरी **गुलामी**-स्त्री १ दास्य गुलामासारखें राबणें, गुलामवृत्ति, गुलामाप्रमाणें सुश्रूषा २ सोदेगिरी, शाठ्य हरामी लुच्चेगिरी ३ गुलामांचा व्यापार ४ (ल) हांजी हांजी, खुशामत (क्रि० करणें) ०जादा-पु. (शिवीगाळ) हरामखोर ०मडा-पु (तिरस्कारार्थी) गुलाम **गुलामपिचणी-पिसणी**-स्त्री (पत्त्याचा खेळ) प्रथम पानें वाटतांना एक एक उताणें पान देऊन पहिल्यानें ज्याला गुलाम येईल त्यानें करावयाची पिसणी

**गुलाल**-पु एक रंग, तांबडा रंग दिलेलें पीठ, बाजरी, नाचणी इ० चें पीठ बुरजी, फणगी इ० लाकडाच्या पाण्यानें रंगविलेलें असतें ती बुकणी मंगलप्रसंगीं, उत्सवांत, दवताच्या जन्मोत्सवांत व जेवणावळीच्या समयीं रांगोळींत व विशेषत शिमग्यांत याचा उपयोग करतात [हिं] ०गोटा-पु गुलाल भरलेला गोळा, पातळ काचेच्या, लाखेच्या, अभ्रकाच्या गोळ्यांत गुलाल भरून तो ज्याच्या अंगावर फेकावा त्याच्या अंगावर तो गोळा फुटतो व गुलाल पडतो शिमग्यांत हे एकमेकांच्या अंगावर फेकीत. 'गुलालगोटे शिवाय [illegible] ठेविले निरनिराळे अंबारींत।' -ऐपो १९९

**गुलाली**-वि १ [illegible] गुलालाच्या, गुलालासारख्या रंगाचें (वस्त्र) २ गुलालाचा, गुला[illegible]सारखा (रंग)

**गुलाल**-स्त्रीन [illegible] गुलवासी पहा एक फुलझाड व त्याचें फूल.

**गुलाला, गुल्लाल**[illegible]-पु एक फूल झाड

**गुलालाड**-पु १ ([illegible] मल्लविद्या) एक कुस्तीचा डाव याचे दोन प्रकार आहेत (१) जो[illegible] जोडीदाराच्या हाताचें मनगट त्याच्या पाय[illegible]धून बाहेर धरून आपलें [illegible] दुसरा हात जोडीदाराच्या [illegible] [illegible] वक्र असतो [illegible] ठेवावा व पंज्यानें जोडीदा[illegible] [illegible] मानवर [illegible] काढून घेतलेला हात व[illegible] राची मान दाबून व त्याच्या [illegible] -वि [illegible]राचा एक हात पायां उचलून त्याला चीत करावें [illegible] २ सपन्न, [illegible] मनगट धरावें [illegible] तून बाहेर काढून आपण [illegible] [illegible] आपला बाहेरील दुसऱ्या हातानें जोडीदाराची [illegible] [illegible] मान (उजवा किंवा डावा जो बाहेर असेल तो) [illegible] [illegible] वर घालून गुडघ्याच्या रचणीं जोडीदाराची [illegible] त्या प्र[illegible] त्यास चीत करावें [हिं]

**गु[illegible]**-स्त्री (प्रां) प्रवाळ [हिं गुली-[illegible]] [illegible]ळाची एक जात]

**गुलुगा**-कुलगा कु[illegible] [illegible] गोफण [हिं]

**गुलेल**-स्त्री (व) [illegible] गुलरी उमी गुलरी नमून या

**गुलरी**-स्त्री [illegible] -व[illegible] [फा गुल्+परी] परी कर जोडून सेवेमधीं।' -[illegible]

**गुल्फ**-पु [illegible] पायाचा घोटा 'गुल्फद्वय धरिजे।' -ज्ञा ६ १५७ [सं]

**गुल्बांग**-पु भुमका, आवई, बोलणें, कडी 'बेदराम देण्याचा गुल्बांग दाट होता' -रा ७ ११२ [फा]

**गुल्म**-पु १ प्रकुपित वातादि दोषानें पोटांत उत्पन्न [illegible] गोळ्यासारखा एक रो[illegible] [illegible] हृदय, नाभी, बस्ती हीं [illegible] [illegible]नें होत, वायगोळा 'एकातें गुल्म [illegible]

दे गु[illegible]

१३ २४९४ २ पाणयरी ३ विशिष्ट सख्येचा व रचनेचा सैन्यविभाग, तुकडी तीन सेनामुखाची तुकडी (सेनामुख=३ हत्ती, ३ रथ, ९ घोडे व १५ पायदळ) ४ ग्रंथि, गाठ. ५ गाठ, गोळा, गद्, गरस ६ गुतागुतीचें व दाट किंवा पसरणारें क्षुद्रप, तृण, क्षुप, लता व गुल्म हे वनस्पतिक्षेत्रातील मोठे वर्ग होत [स] ०वात-पु एक प्रकारचा वात पोटाची किंवा पाण थरीची सूज [स] **गुल्मोदर**-न उदररोगाचा एक प्रकार [स]

**गुल्ल**—न (गो) अतिशय गुंगी, कैफ -वि कैफानें उल्लू झालेला, धुंद [स गुड गुल=गुळ?]

**गुल्ल-ल्ली**—पुस्त्री गलबल -शर 'तन्द्राचा गल्वला जेथें। निवात केलें असेल तेथें। याकारणें गुल्लिपरतें। कोणियेकें असावें।' -दा १३ ५ २४ [ध्व]

**गुल्लडाग**—पु तापविलेल्या खिळयानें, मुद्रेनें दिलेला डाग, चोचा, गूल 'गुल्लडागाची जाचणी।' -दा ३ ७ ३४ [फा गुल=डागल्याची खूण+डाग]

**गुल्ला**—पु (व) तुकाडा, भुकाडी

**गुल्ली**—स्त्री १ (काशी) विटी, इगी २ (ओतकाम) धातूचा चूर पुन्हा वितळून त्याची ओतलेली चपटी वाटोळी चकती [हिं]

**गुल्ली**—स्त्री (व) लहानसा ढीग, गंज, लहान गुड

**गुल्हेर**—वि शेंदरी, डाळिंबी (रगाचें) [फा गुल? गुलाल?]

**गुवलणें**—उक्रि (व) वापरणें

**गुवाड**—स्त्री (राजा) गुखडी पहा [गू] **गुवाडा**-पु (बे) घाणेरी गुवारडो, गुवाड्डॉ -वि १ (कु गो) घाणेरडा, ओंगळ, गूधाण २ (ल) कमी किंमतीचा

**गुवार**—स्त्री (गु) गोवारी, गवार (भाजी) पहा

**गुवेरें**—न (लहान मूल किंवा आजारी माणूस याच्या) विष्टेनें भरलेलें वस्त्र [गू+चीर, चेल]

**गुसपणें**—अक्रि (गो) गोंधळणें, गुतणें **गुसपागोंधळ**-पु (गो) गोंधळ गुतागुत

**गुस(सु)ल**—स्त्री आघोळ, घुसळ पहा 'आराम होऊन गुसल केली' -पया ४६७ [अर गुस्ल्] ०खाना-पु न्हाणी घर, स्नानगृह, घुसळखाना [फा घुस्ल्+खाना]

**गुसळण-णें घुसळीच**—घुसळण इ० पहा

**गुसाई**—पु गोसाई, गोसावी साधु हरिदास गोसावी पहा

**गुस्सा**—पु राग क्रोध कोप [अर् घुस्सा]

**गुह**—पु १ कार्तिकस्वामी २ रामास गगापार नेणारा कोळी [स]

**गुहा**—स्त्री दरी, कदरा, घळ, कपार, डोंगर-पर्वतातील बीळ [स गुप्-गुह् गुहा, तुल० इ केव्ह]

**गुहाडी**—(व) गुधाडी पहा

**गुहिरा**—पु सरडयाच्या जातीचा एक प्राणी, हा इ०छेस येईल त्याप्रमाणें रग पालटतो 'कीं गुहिरिया सरडाचे नाना रग।' -स्वानु १३ २ ९७ [गहिरा?]

**गुहिरा**—वि (व) कुजट स्वभावाचा 'तिच्या नवऱ्याचा स्वभाव गुहिरा आहे तो बोलून दाखवीत नसता' [स गुह्, गूढ]

**गुह्य**—न १ जननेंद्रिय, उपस्थ, शिश्न, योनी, भग २ गुप्त गोष्ट, वर्तमान -वि १ खाजगी, एकांताची, आडवळणाची (जागा) २ गुप्त गूढ, प्रच्छन्न (कृत्य, कारभार, गोष्ट) [स गुह=लपविणें]

**गुळकी-खी-खें**—स्त्री न (शिंपी) गुंडी, बिरडें, बटन २ (दावें इ० च्या) बिरडयात अडकावावयाची गाठ ३ बिरडें व गाठ (एकत्र मिळून) ४ (कु राजा) स्त्रियांचें एक शिरोभूषण, वेणी०या आत किंवा अबाडयाच्या वर घालावयाचें अग्र फूल [स गोलक]

**गुळखें**—न (गो) गोंधळ, लचाड (गो) अपुरें [स गोलक]

**गुळगुळथापडी गुळथापडी**—स्त्री १ (लहान मुलास निजविण्यासाठीं हळू हळू थोपटणें) गोड गोड भाषण, वर्तन, नरम नरम शब्द २ गुळगुळीत, सदिग्ध किंवा मोघम भाषण गुळमुळ बोलणें याच्या उलट खडसावणें 'असल्या ठिकाणीं गुळगुळथापडी काय करतोस? तो चोर ठरला, त्याग चोर म्हण ३ समजूत पाडणारें वळविणारें, अनुकूल करून घेणारें भाषण, वर्तन, युक्तिप्रयुक्ति 'ज्या कोण्हाला काहीं सागून कोण्हाला काहीं देऊन अशी सर्वाची गुळगुळथापडी करून अनुकूल केले'

**गुळगुळीत**—वि साफ मऊ व चकचकीत नितळ, सफाईदार खाचखळग्याविरहित खरखरीत नव्हे असा [स गुल्-गोल, हि गुळ (मऊ पृष्ठभागावर होणारा)?] ०करणें-(ल) उलटीसुलटी (हुनामत खरडपट्टी) करणें

**गुळचट, गुळंबा गुळमट गुळमटणें, गुळवणी-वरी गुळव्या गुळसर गुळार**—गूळ मध्यें पहा

**गुळणा णी**—पु स्त्री (चूळ भरण्यासाठीं घेतलेलें) तोंडभर पाणी घोट (क्रि० घेणें) २ (पाण्याची, रक्ताची) टाकलेली चूळ (क्रि० टाकणें) ३ तोंडांत येणारें पित्त तोंडातील मग (क्रि० येणें) ४ तोंड खुळखुळावणें, गुळणे चूळ भरणें (क्रि० करणें) [ध्व गुळगुळ, स गुल्गुलाय् प्रा गुलगुल=गुलगुल आवाज करणें, घोळणें?] ०धरणें-१ गुप्त ठेवणें, मिठाची

गुळणी धरणें असा प्रयोग रूढ आहे ( गुळणी धरल्यावर बोलतां येत नाहीं यावरून अर्थ ) २ न बोलणें, तोंड दाबून धरणें ०सोडणें-गुप्त फोडणें तुपादुधाच्या गुळण्या टाकणें=सवत्तीत लोळणें, सवत्तीत न्हाणें

गुळधवा-गुळधा, गुळधिवा-धुवा—गूळभवा पहा

गुळव-वा, गुळंभ—नपु न गुडुंब-भ पहा

गुळंव, गुळम -मा-मी, गुळाम, गुळीम—न (गा कु ) वाडगें, पितळेची मोठी वाटी गुळव-न ( वे गो ) जेवण्याचें काशाचें पात्र

गुळंवा, गुळाय-या—पु गूळ शब्दांत पहा

गुळमु(म)ळणें—अक्रि १ गुणगुणणें, तोंडातल्या तोंडांत बोलणें २ बोलण्यांत अडखळणें, घुटमळणें, कांकू करणें [ ध्व ]

गुळमुळीत–वि मुळमुळीत, असंदिग्ध अर्धवट, अस्पष्ट, तोंडातल्या तोंडांत ( भाषण इ० )

गुळमेख—स्त्री मोटेच्या खालच्या चाकाची ( कण्याची ) आरी

गुळवेल—स्त्री एक कडुवेल, ( वै ) गडडिवळ गरुळवल लॅ मेनिस्पेर्मम कॉर्डिफोलियम, ही औषधांत फार उपयुक्त व महत्त्वाची असून तुरट, कडू, उष्ण, वीर्योद्दीपक व ज्वरनाशक आहे बहुतेक सर्व रोगावर ही उपयोगी पडते हिला बारीक फळांचे घोंस येतात शेर इ० विषारी झाडावरील गुळवेल औषधास घेऊ नये कडू लिंबावर वाढलेली उत्तम [ स गुडूची हिं गु(गी)लोय बगाली गुलच, गु गलो का गुराई, अर मिळोई इ गुळाचा ]

गुळहार—गुऱ्हाळ पहा गुळहारी—वि गूळ तयार करणारा 'कवणी एक गुळहारी असे, तो गुळ करी ' -चक्रधर सिद्धांतसूत्रें ५१

गुळ(ळा)ळा—पु गुळणा, चूळ गुळळा कीजे राउळीं। आरोगणातीं।' -ऋ ८४ [ ध्व ]

गुळाफो—पु ( कु ) शिजविलेला, पाणी मुरलेला भात

गुळी—स्त्री नीळ ( झाड व त्यापासून होणारा पदार्थ ) [ गु गळी ] ०तोळ-पु निळीच्या एक मण उत्पन्नावर घ्यावयाचा एक रुपयाचा कर

गुळी गुळी सासर—स्त्री तांबडसर भरड अशी एक प्रकारची साखर गुळासारखा रंग असणारी एक प्रकारची साखर [ गूळ ]

गुळी—स्त्री १ पोंचाच्या वेळीं बाहेर येणारा मलाशय ( क्रि० उतरणें ) २ ( गो कु ) गोळा गुटिका, लहान गड्डू ०होणें-( गो ) चरकाप होणें गुळी झाली ' =चरकाप झाला

गुळीं—न १ ( कों ) वाल इ० द्विदल धान्याच्या मळणी नतर निघालेलें, गुरांस घालावयाचें भुस २ शेंगांची टरफलें झाडाचा पाला, वेलाचे तुकडे इ० मिळून झालेलें गुरांचें खाणें

गुळुंब-भ, गुळुंभा, गुडूम—नपु १ गरस, गांठ, फोड, गळू २ झाडावर येणारी आवाळूसारखी गांठ ३ बांडगूळ, परोपजीवी वनस्पती [ स गुल्म ]

गुळें—न ( राजा ) ( कु ) दुष्काळ-दंग्यामुळें परागंदा झालेला गांव, वस्ती, गुढार, गुढें पहा [ का ] ०येणें-( वे ) पेंढार येणें

गुळ्यें—न ( कों ) ( अव गुळिया ) मासे पकडण्याच्या जाळ्यास वजनासाठीं लाविलेली चपटी कडी [ गोळी, किंवा का गुळ=लोखंडी गज, सापळा ? ]

गू—पु १ विष्ठा (मनुष्याची), हाग २ धातूचा गज, मळ ३ डोळ्यातील पू, मळ ४ ( ल ) दारू [ स ] ( ग्राम्य ) गूकाडी करणें-( काडीनें गू चिवडणें ) १ एखाद्याचे दोष पुन्हां पुन्हां उच्चारणें २ अतिशय त्रास देणें ३ अतिशय अपकीर्ति करणें ४ नासविणें, बिघडविणें, खराब करणें गूचा भाऊ पाद पादाचा भाऊ गू-दोघही सारखेच बदमाष लुच्चे गू चिवडणें-( ल ) वडें होणें, बावचळणें गूजाळणें-१ अंगांतील पिशाच्च जाण्यासाठीं अंगांत येणाऱ्यापुढें विष्ठा जाळतात तो प्रयोग २ ( ल ) एखाद्याला अगदीं खिजविणारें, अपमानाचें, चिडविणारें कृत्य करणें गू जाळून धूर घेणें-वाईट कृत्य करून त्याचा आनंद मानणें त्याची मौज करणें, पाहाणें म्हृ० गूवांत धोंडा टाकावा आणि शितोडा घ्यावा=वाईट वर्तणुकीचें फळ भोगणें गुवावरून आडणें-अतिशय फजीती, अपमान करणें, छी थू करणें सामाशब्द- गूधाण-स्त्री वाईट परिस्थिति ' कोल्हुपुरांत न भूतो न भविष्यति अशी राज्यव्यवस्थेचें कामीं गूधाण झाली असें इतिहास बोलतो ' -केका आर्या ७ -वि वाईट त्याज्य गूधाण करणें-नासणें, बिघडणें गूमाणूस-पु घाणेरडा, अव्यवस्थित माणूस गुवांतील कवडी घेणारा-वि अतिशय कंजूष गुवावरची माशी-स्त्री एक प्रकारची माशी

गूज—न गुप्त गोष्ट गुह्य हित, निज या शब्दांशीं जोडून उपयोग गुज पहा ' वर पाहतां गूज तयेंचि राहे। ' -राम १५५ निजगूज-न स्वत च आपलें गुह्य [ स गुह्य ]

गूड-ढ—न गुड पहा १ कणसाकडून बाजूलची पेंढी जुडी ( जोंधळा बाजरी वगैरेची ) 'बाजरीच-जोंधळ्याचें-गव्हाचें-गूड-ढ ' २ ( खा ) गंजी ढीग, रास जुडी ३ ( व ) कड्याचा वगैरे उंच व टेंकाच्या शिखरासारखी रचलेली गंज [ का गुड्ड=डोंगर गुडी=कळ ]

गूढ—न १ कूट, कोडें २ ग्रथांतील लेखांतील कठिण स्थळ, मेख ३ पेंच पचायत ४ गुप्त गोष्ट, गुह्य ' म्हणौनि आघवीचि गूढें। जें पाकळी अति उघडें।' -ज्ञा १८ १३५२. -वि

१ गहन, दुर्ज्ञेय दुर्बोध, अगम्य (विद्या शास्त्र). 'तया हा परमार्थ गूढ।' –ज्ञा ३ १७९ २ खोल गुप्त अज्ञात (काम, गोष्ट) [स] (वाप्र) ०वाटणें-दिसणें-पडणें, गूढांत पडणें–विचारात पडणें, कोडें, पेंच पडणें सामाशब्द– ०अर्थ–पु १ पुरलेला ठेवा, भूमिगत द्रव्य गूढ अर्थसंचयाच्या भ्रमानें कोणी . . परातील जमीन ठोक ठोकून पहावी ' –नि ७९६ २ गुप्त गोष्ट हेतु, अभिप्राय [गूढ+अर्थ] ०चार–पु गुप्त बातमीदार, हेर, गुप्तपोलीस गूढज गूढपुत्र गूढोत्पन्न–पु (कायदा) हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें बारा पुत्रांपैकीं चवथा, येणाऱ्या बापाचा पत्ता नसलेला ०जत्रु–वि फोपशा, लठ्ठ निरंजन (ज्याचें गळ्याचें हाड मांसांत गुप्त झालें आहे असा) [स जत्रु=गळ्याचें हाड] गूढणें–समाविष्ट होणें, व्यापणें 'दर्पु कामक्रोधीं गूढला।' –ज्ञा १६ ३९६ ०साक्षी–पु (कायदा) गुप्त साक्षीदार ०स्मृति–स्त्री (वैद्यक) थोडासा स्मृतिभ्रंश, कांहीं वेळानें आठवणें गूढार्थ–पु १ समजण्यास कठिण असे ग्रंथ, लेख इ० तील भाग २–वि दुर्ज्ञेय, दुर्बोध [गूढ+अर्थ]

गूत-थ—स्त्री १ गुंतागुंत, तिढा, गांठ 'दीर्घकाळ ग्रथित (मराठी भाषेची) तिची जी गूत ती हातीं घेऊन तिचे पदर सोडवून कांहीं तरी उकलण्याच्या धोरणांत आणून बसवावी ' –दादोबाकृत मराठी भाषेचें व्याकरण प्रस्तावना (३ आ) पृ २१ २ (कों) अव्यवस्थितपणें पडलेलें, तुडविलेलें गवत, गुरांनींच खाण्याजोगें झालेलें गवत ३ भाताच्याण्याचा पेंढा बांधताना त्यांतून खालीं पडणारे भाताण्याचे लहान लहान तुकडे ४ गुंतवळ [गुंतणें, स ग्रथित, प्रा गुत्थ]

गूथ—स्त्री (व) सूज

गूद—पु १ कंडू, खाज, आग (क्रि० येणें, सुटणें) २ (ल) जोर, भर, चढ (रोग, साथ, पाऊस इ० चा)

गून, घून—वि (तजा) कुबडा, पोंक्या [का गूनु=पोंक]

गूम—वि नष्ट, गहाळ, गुप्त 'इनामतीच्या सनदा अला हिदा आपल्यापाशीं आल्या होत्या त्या फित्रतीकरितां गूम जालिया ' –वाडसनदा १४० –स्त्री (गो) गुप्त गोष्ट [फा गुम्]

गूय—पु (खा) गूळ पहा

गूल—पु (गो) जरीची वीण [फा गुल्=फूल]

गूल—पुस्त्री १ (आगकाडी, मशाल, वात, याचा) जळालेला भाग २ आगकाडीचें टोंक, जो भाग जळतो तो ३ बंदुक इ० चा तोंडा पेटविल्यावर शेवटीं जो कळीसारखा आकार होतो तो ४ विस्तवाची काजळी, किटाळ, फुणगी ५ खिळ्याचा माथा, डोकें ६ खिळ्याचें डोकें इ० तापवून दिलेला वाटोळा डाग –पु गुलाब गुल पहा [फा गुल्] ०खिळा–पु मोठ्या दरवाज्यांत ठोकला येणारा रोंदाचा खिळा गूलडाग–गुल्लडाग पहा

गूल—स्त्री १ दंगल, आरडाओरड, गलगा 'तीन रोज उपवास लष्करांत गुल एकच जाहाली ' –पेद २० १७९ २ (ल) बोभाटा, प्रसिद्धि, जाहीरपणा 'रात्रींच गूल झाली असती तर फार वाईट होतें ' –वाळ २ १२७ [अ घुला, फा घुल् घुला] ०गलबा–पु दंगा, धसेडा 'सवायतकर मोगल उगेच सरकारचे महाल राऊन गूल गलब्याचे वेळेस हे शैत्य होतात ' –ऐटि १ ८०

गूळ—पु आटवलेला उसाचा रस, पदार्थाला गोडपणा येण्यासाठीं रस आटवून केलेला घन पदार्थ, साखरेचा कच्चा प्रकार, अवस्था, तांबडी साखर [स गुड, प्रा गुल, पाली गुळ, कों गोड, खा गूय] (वाप्र) ०करणें–उपहास, निंदा करणें ०देणें–हातीं देणें–१ लालूच दाखविणें, लांच देणें २ फसविणें, भुरळ घालणें, झुलविणें, तोंडावर हात फिरविणें ०पुन्या वाटणें–हौस पुरविणें गुळमटणें–१ (राजा) आंबा, चिंच इत्यादींनीं गुळमट, गोडसर होणें २ गुळमळणें, संदिग्ध, अडखळत बोलणें म्ह० १ गाढवास गुळाची चव काय? २ जो गुळानें मरतो त्याला विष कशाला? सामाशब्द– ०आंबा, गुळंबा–ळावा, गुळांब–पु एक पक्वान्न गुळाच्या पाकांत शिजविलेल्या आंब्याच्या फोडी, गुळाचा मोरंबा ०कैरी–स्त्री (व) गूळ घालून केलेलें बिन मोहरीचें आंब्याचें लोणचें ०खोबरें–न (गूळ आणि खोबरें यांचा खाऊ) १ (ल) निवळ फसवणूक, लांच, लालूच 'गुळखोबरें विलोकुनि भलत्याहि जनासि बाळक वळावा।' –मो उद्योग ७९ २ पोकळ भाषण, वचन ०चट–चीट–मट–वि १ थोडेंसें गोड, गोडसर 'येक्या सगें तें कडवट। येक्या सगें तें गुळचट।' –दा ११ ७ १६. २ (तजा) गोड, मधुर ०चट, चीट–गूळसाखर वगैरे गोड पदार्थ गुळणणा–पु (गो) गुळाचा गणपति [गूळ+अण्णा] गुळत्र–य–न गूळ, राब, काकवी यांचा समुदाय 'मद पारा गुळत्र।' –दा १५ ४ १५. गूळदगड–धोंडा–पु १ गुळाच्या ढेपेंत सांपडणारा दगड 'गुळासारिखा गुळदगड। परी तो कठिण निचाड।' –दा ८ ५ ४७ २ (ल) ढोंगी, कपटी मनुष्य ०धवा–धाविा–धुवा–देवा–धेवा धावी–पु केवळ तांबडा नव्हे, केवळ पांढरा नव्हे असा मिश्र रंग, गुळी रंग –वि अशा रंगाचा (मोती, इ० पदार्थ) ०धानी–वि लालसर, गुळधवा रंगाचा (मोती) ०पापडी–स्त्री १ एक पक्वान्न, गुळांत पाकविलेल्या रव्याच्या वड्या २ (राजा) गुळाच्या पाकांत भाजलेली कणीक वगैरे घालून केलेले लाडू ३ (ल) एखाद्यानें मागें अपराध करून समक्ष गोड गोड, कपटी भाषण करणें, गुळगुळ थापडी, गुळमट, गुळवणी

०पीठ–न एकमेकाचा दाट स्नेह, मेतकूट, गट्टी, सलोखा, एक विचार ०पोळी–स्त्री गूळ घालून केलेली पोळी गुळमट, गुळचट–१ गुळचट अर्थ १ पहा २ (गो) ओंगटमर ०मारी–स्त्री दर उसाच्या मळ्यापाटीमागें २२॥ दर गूळ घ्यावयाचा कर ०वणी, गुळवणी गुळोणी–न १ गुळ मिश्रित पाणी २ (कु व) गुळाच्या पाण्याचें कालवण (पोळीशीं खाण्यासाटीं) यांत कधीं थोडें पीठहि घालतात [गूळ+पाणी] ०वरी, गुळोरी–स्त्री एक खाद्य, पक्वान्न गुरोळी पहा 'मांडा साखरमांडा गुळवरी।' –एभा २७ २९०, –ह१० ३४ गुळरा-गुळावा-गुळवी-व्या-गुळव्या, गुळराध्या–पु गूळ तयार करणारा [गुड वाहक] ०शील-शेल-शेँल–न (व) ताबडा भोपळा उकडून त्यात दूध, गूळ घालून केलेली खीर गुळाचा गणपती–गणेश–पुवि १ आळशी, मंद, गलेलठ्ठ, अचळोजी २ होयबा, बुळा, दुर्बळ, शेणाचा पोहो म्ह० गुळाचा गणपति गुळाचाच नैवेद्य–वस्तुत, एकच असणाऱ्या दोन व्यक्ती, ज्याचें त्यासच देणें गुळार, गुळहार–गुऱ्हाळ पहा गुळेरस पु (हेट) नारळाचें दूध व गूळ घालून केलेले पिठाचे गोळे यांचें घनविरेलें एक पक्वान्न

गृध्र—पु गिधाड, मोठी घार [स] ०व्यूह–पु गृध्र पक्ष्याच्या आकारासारखी सैन्यरचना 'गृध्रव्यूह सैन्य रचावें। गृध्रास देखून स्वभावें। गरुड नय त्या स्थळीं।' –अ १२ ९३ ०गृध्रावलीनक(करण)–न (नृत्य) पाय थोडा गुडघ्यात वाकवून पाटीमागें पसरणें व दोन्ही हात पुढें पसरणें

गृह—न घर सदन, आलय, आगार, मंदिर, मकान [स] सामाशब्द– ०कच्छप–पु कासवाच्या पाटीच्या आकाराचा दगडी पाटा, खल ०कर्म-कृत्य-कार्य-धंदा–न घरकाम घरगुती धंदा (विशेषतः बायकांचें–झाडसारवणादि) ०कलह–पु भाऊबंदकी घरगुती तटा, यादवी, मत कलह ०कुक्कुट-मार्जार-श्वान–पुन घर–कोंबडा–मांजर–कुत्रा पाळलेला कोंबडा वगैरे, पाळीव जनावर ०छिद्र–न १ कुटुंबांतील दोष व्यंग, उणेपणा खाजगी वाईट गोष्टी, वर्मेंकर्में (क्रि० काढणें, बोलणें) श्रीमतांच्या घरोघर दुराचार व गृहच्छिद्रें किती असतात हे जवळजवळच्या लोकांस तरी पूर्णपणें विदित असतें' –नि २ (ल) घरातील फूट भेद, बेबनाव ज्यामुळें तिऱ्हाइताचा शिरकाव, फायदा होईल अशी घरातील गुप्त नाजुक गोष्ट ०जात–गृहदास अर्थ २ पहा ०दान–न घर दान करणें ०दार–न घराचा पुढचा दरवाजा दार ०दास–पु १ घरातील चाकर गुलाम २ (हिंदु कायदा) दासीपुत्र ०दासी–स्त्री मोलकरीण ०निमग्न–वि घरच्या गोष्टींत नेहमीं गुंतलेला, पाजील पहा नंतर क, घरबशा ०पति–पु यजमान, घरधनी, मालक ०प्रवेश–पु १ सुमुहूर्त पाहून, धार्मिक विधि करून नवीन घरांत समारंभानें रहावयास जाणें, घरभरणी, वास्तुशांति २ विवाहानंतर नूतन वधूचा स्वगृहीं प्रथम प्रवेश, वरात ०भंग–पु घर, कुटुंब, पेढी, मंडळी इ० ची फूट, वाताहत, नाश, मोड, घरादाराचा सत्यानाश ०भूमि–स्त्री घराची जागा. ०भेद–पु १ गृहकलह पहा यादवी २ गृहच्छिद्रें, घरांतील बिंग कळण्यासाटीं घरांत भांडण लावणें ३ घरफोडी, दरवडा ०भेदी–वि १ घरांत कुटुंबांत भांडणें लावणारा, उत्पन्न करणारा, घरभेद्या २ घरांतील बिंग माहीत असणारा ३ चोर, दरोडेखोर ०मंडन–न घराची मांडामांड करणें, घर सुव्यवस्थित राखणें, सुशोभित, अलंकृत, सज्ज –वि घरांतील कर्ता पुरुष घराला भूषणभूत असा माणूस, घराचा अलंकार ०मंडप–पु घरांतला, घरालगत घातलेला (रस्त्यावरील–सार्वजनिक नव्हे) मांडव ०मंत्री–पु. दिवाण–मंत्र्यांपैकीं एक, देशात शांतता आणि सुव्यवस्था राखणारा मंत्री, (इ) होमर्मेबर ०रत्न–न (ल.) मुलेंबाळें. 'गृहरत्नानि बालकाः।' ०लंपट–लोलुप–गृहनिमग्न पहा ०वास–पु घरात राहणें, गृहस्थाश्रमी असणें याच्या उलट अरण्यवास ०विच्छेद–पु कुटुंब निर्वंश होणें–करणें, घराक्षय, कुलक्षय ०शांति-संमार्जन-शुद्धि–स्त्री १ घराच्या शुद्धीकरणाचा धार्मिक विधि, वास्तुशांति, भूतेंखेतें, विटाळ, रोग इ० च्या नाशासाठीं केलेला धार्मिक विधि २ घराची स्वच्छता, सारवण, झाडलो[illegible] करणें ०संपत्ति–स्त्री १ गृहसौख्य, घर चांगलें अस[illegible]सौख्य २ मोठा घरखटला, मोठें कुटुंब, मोठा परिवार [illegible]स्थ–पु १ घरबारी, गृहस्थाश्रमी, चार आश्रमापैं[illegible] आश्रमांतील व्यक्ति (संन्यासी, अरण्यवासी नव्हे [illegible] सहकुटुंब, कुटुंबवत्सल, प्रापंचिक याच्या [illegible] माणूस, इसम, व्यक्ति ४ भिक्षुक नव्हे तो ५ [illegible] भला गृहस्थ [illegible]गिरी–पणा, गृहस्थाई–गृहस्[illegible]स्त्रीपुन्नी १ माणुसकी, सभ्यता, भलेपणा २ गृहस्थवृत्ति, गृहस्थाचें कर्तव्यकर्म, आचरण ०स्थधर्म–पु गृहस्थाश्रम, गृहस्थाचीं कर्तव्यकर्में, वर्तन, भाग पू६ 'श्रीकृष्ण म्हणे सुता सर्वांत गृहस्थधर्म सम्मत रे।' –मोउद्योग ३ ५३ ०स्थभाई–पु सामान्य नोकरपेशाचा, भिक्षुकीखेरीज धंद्याचा, भिक्षुक नव्हे असा मनुष्य ०स्थाश्रम–पु चार आश्रमांपैकीं दुसरा आश्रम गृहस्थधर्म पहा 'आता स्त्रीकरून यथार्थ। गृहस्थाश्रम करावी।' ०स्थिति–स्त्री घरची स्थिति, घरप्रपंचाची व्यवस्था ०स्थी–वि गृहस्थाविषयींची (रीत–भात, वेष, भाषण, डौल बाणा इत्यादि) ०स्थी अक्षर–न सुबोध, ठसठशीत, ऐटबाज अक्षर, व्यवहाराला योग्य असें लेखन ०स्थी कारभार–पु १ घरगुती खर्चाचा बेनवात, टापटीप २ घराची आर्थिक, पैशासबंधीं नीट व्यवस्था, मितव्यय ०स्थी

हाय।

खर्च-पु मितव्यय, बेताने गृहस्थी कावा ०स्थी बाणा-पु १ गृहस्थाची वृत्ति गृहस्थ धर्म २ टापटिपीची, व्यवस्थित पणाची वागणूक ०स्थी घेत-गृहस्थीबाणा अर्थ २ पहा गृहांगन-ण-न घराचे अंगण गृहांगना-स्त्री घरधनीण, मालकीण गृहांतर-न दुसरे घर गृहातर, गृहाभ्यंतर-न घराच्या आतील, खोलीतील भाग. गृहासक्त-वि गृहनिमग्न पहा. गृहिणी-स्त्री गृहांगना, घरधनीण, पत्नी, बायको, विवाहित स्त्री. गृह्य-वि १ घरासंबंधी, घरगुती २ पाळीव, माणसाळलेले गृह्याग्नि-पु प्रत्येक त्रैवर्णिकाने स्नानानंतर किंवा वेगळे विन्हाड केल्यानंतर निरंतर पाळावयाचा अग्नि विवाहानंतर वधूसह गृहप्रवेश करतेवेळी ज्या अग्नीवर होम करावयाचा तोच अग्नि पुढे निरंतर जतन करून ठेवावयाचा असतो व यावर नित्य सकाळ-संध्याकाळ होम धावयाचा असतो

गृहीत—वि १ धरलेले, पकडलेले, घेतलेले २ मनात धरलेले, समजलेले —तागमा—स्त्री बी ए च्या तोडीची महिला विश्वविद्यालयीन पदवी, स्त्री पदवीधर —विचावि १४०

गे—उद्गा १ अगे! चे संक्षिप्त रूप 'तो गे! तोचि राम सर्वत्र पाहे।' —राम २०० २ (व) म्हशीला बोलावण्याचा शब्द, हॉय

गॅगडी—स्त्री (व) बेंगडी, हातपाय लटपटणे, भग्नग्रस्त स्थिति, घाबरगुंडी 'समोर या राक्षसाला पाहताच त्याची गॅगडी वळली'

गॅग(गा)णे—अक्रि नाकातून बोलणे गॅगाणा-ण्या, गॅगणा-वि १ नाकात बोलणारा (माणूस) २ सानुनासिक, नाकातील (उच्चार) गॅगा(ग)रणे-अक्रि १ पडशामुळे, सर्दीमुळे नाकातून बोलणे २ भेदरणे, तिरपीट उडणे, गांगरणे, अतिशय घाबरणे [ध्व ]

गेचक गेचकळ—न १ झाड, खुंट याचे बेचक, बळके, २ हात, पाय यांच्या दोन बोटांमधील जागा, बेचकी [का गेज्जे=भडसजी ? ]

गेचु(चो)डी—स्त्री (व) गोचीड पहा

गेज—पु माप, मापण्याचे साधन (आगगाडीसंबंधी) आगगाडीच्या दोन रूळांमधील कमीजास्त अंतर, (इ) ब्रॉड-मिटरगेज गेजग्लास-पु (यांत्रिक) बॉयलरांतील पाणी व वाफ बरोबर दाखविणारी नळी, गेजचेंबर [इ ]

गेज गेजमाळ—स्त्री (कुमाण) गौरीला घालावयाची कापसाची साखळीसारखी माळ, वस्त्र, कापमाळे सुतपुतळी यात मध्ये थोडासा कापसाचा पुंजका, नंतर वातीप्रमाण बारीक, नंतर पुन्हा पुंजका अशा प्रकारे पेळू घळून वळतात

गॅझट, गॅझा, गेझट, गेझा—वि (को) अतिशय लोचट, हट्टी, दरामखी, चेंगट (मा.धूम)

गेट—न १ दार, फाटक (बंगल्याच्या आवाराचे, बाहेरचे) २ चौकी, देवडी ३ पोलीसचौकी [इ ]

गेट(ठ)ण—न बैलाच्या गळ्यातील वळलेला दोर, पट्टा, याला टाकडा किंवा घाट बांधतात, घाटपट्टा [घांटवण ? ]

गेटम—पुन १ जर्मनहून येणारे लोकरीचे आजम, कापड, गालिचा, रग, कव्हर 'मानिट ओजिट घारिवट। गेटम जातीचे पट निघोट।' —मुगभा १५ ७२० २ (खा व) सुताचा झोन्या, घोंगड्या, तडव, सुताडा [हिं गौटम ]

गेटम्—वि (व) व्यवस्थित, टाकटीक 'ही इमारत फार गेटम आहे'

गेठा—पु कमर आणि पाय यांना (गुडघ्याखाली) उपरणे गुंडाळून बसण्याची पद्धत, जेटा पहा. (क्रि० मारून बसणे)

गे(ग)ठा—पु १ (खा व) बैलाच्या गळ्यातील रंगीबेरंगी मण्याची अगर कवड्याची माळ २ कानातील एक दागिना (हा मराठ्याच्या बायका घालतात), गाठ्या पहा 'कानी घाउनी गेठे हो।' —मध्व ३९ ३ खंडोबाच्या गळ्यातील एक चांदीचा अलंकार, हा जेवतांना कानावर ठेवावा लागतो गाठा-ठ्या पहा (ठामा) एक चांदीचा दागिना 'महार पोराच्याचे गळ्यात गेठे।' —अफला ६६ म्ह० गेठे गेले भोके राहिली [स ग्रंथि ? ]

गेठू—पु (व) लग्न इ० वेळी माहेराच्या मुहूर्तमेढीला (त्यांत सुपारी, हळकुंड घालून) बांधावयाचे फडके 'गठू बांधला' [गाठ ]

गेडकणे—अक्रि गडणे, पाडाला येणे-लागणे (आंबा, फळ)

गेडमिळे-मेळी—स्त्री (विणकाम) मागावरील ताणाच्या खाली (वहीच्यापुढे) असणाऱ्या अडसराची दोन टोके ज्यात बसवितात ते दोन उभे खुंट

गेड(डू)र—पु (को) एक मासा

गेंडा—पु नाकावर शिंग असणारा एक वन्य क्रूर पशु [स. गड]

गेंडा—पु (व) जनावराच्या गळ्यातील गोंडेदार दोर, गेठण व गेठा २ अर्थ १ पहा

गेडुर—न (व) गाडूळ [स गडोल, प्रा गडुल, तुल० प्रा द गडु=माती ]

गेडे—वि (कु) विषम संख्या उ० १, ३, ५, ७ इ०, सम संख्येला फाडे म्हणतात ०फडे-न (कु) १ लहान मुलांचा एक (एकीबेकीचा) खेळ, २ पहिल्याने मुलगा व मग मुलगी असा जन्म नुक्रम

गेणा—पु (गो) पायाच्या बोटातील एक चांदीचा अलंकार [का गणिर=बोटाचे पेर ]

गेणी—स्त्री. (को.) एक मासा. याची लांबी १५ ते २० फूट असून याच्यापासून ५ ते १० मण तेल निघतें; तें गलबताच्या अवजारांना टिकाऊपणा येण्यासाठीं लावतात.

गेणी—स्त्री. कर; वेतसारा; भाडें. 'सोडवीन भक्तमोनी अपराधु। मासी गेणी देती तरी।'—शिपु २.४२.७७. [का.]

गेत—न. (गो.) गेळ.

गेताडपट्टी—स्त्री. (ना.) जोराची चपराक.

गेंद—पु. १ तुरा; झुबका; गोंडा (फुलांचा). २ पुष्कळशा पाकळ्यांचें फूल (झेंडू, बटमोगरा, इ॰चें). मात्र अशा फुलाचें नांव गेंदाच्या पुढें जोडतात. जसें—गेंदमोगरा, गेंदशेवंती इ॰. ३ झेंडूचें फूल. ४ घोड्याच्या लेंडीवरील रेशमाचीं किंवा चांदीचीं फुलें किंवा मुदा. ५ बायकांच्या पायांतील चौंप्या बोटांतील चांदीचा, मोगऱ्याच्या फुलाच्या आकाराचा दागिना यांत बाहेर बारीक खडे असल्यानें चालतांना त्यांचा आवाज होतो. ६ (ल.) गेंदेदार वस्तू. उदा॰ स्त्रियांचे स्तन. 'रुंद छातिवर बुंद गेंद जणुं गुलाब बहारामधीं फुलती।'—प्रला ११३. ७ (सामा.) गुच्छ; झुबका; तुरा. ८ गोळा; गोलदार पदार्थ. [सं. गेंडुक=कंदुक; प्रा. गेंदुअ] ॰जोडी-स्त्री. घोड्याच्या शेपटीवरील गेंद भूषणांचा समूह. गेंद अर्थ ४ पहा. 'जीन भिडविला घोड्याला गेंदजोड त्याला'—ऐपो ४३१. गेंदातगर-स्त्री. तगरी (फुलझाड) मधील अनेक पाकळ्यांचें फूल असणारा एक प्रकार. गेंदेदार-वि. गेंद असलेला; गोंडेदार; झुबकेदार.

गेना—पु (व) तांदुळांत न कुटतां राहिलेला भातकण. 'गेने घान आहेत'

गेम—स्त्री. १ खेळ, डाव. २ खेळ पुरा होण्याची मर्यादा. [इं.] ॰लागणें—हरणें; डाव अंगावर येणें.

गेय—वि गाण्यास, प्रशंसा करण्यास योग्य. [सं.]

गेर—स्त्रीपु (को.) लोकक्षोभ; बंडाळी; दंगा. 'होळकराचे गेरींत त्याचें सर्वस्व लुटलें गेलें.'

गेर—पु (व.) तुकडा, पेरें. 'या लांकडाचे तीन गेर करा.'

गेर—अ (गो.कु.) घरीं, कडे, इकडे या अर्थाचा प्रत्यय. 'मामगेर,'=मामाच्याकडे [गृह ?]

गेर—न (कु.) अति कोंवळी सुपारी. [गर ?]

गेरवा—पु. थंडी इ॰ नें धान्यावर पडणारा तांबेरा-रोग, गव्हाचा एक रोग. यानें गहूं बारीक होतो. 'यंदा गव्हावरुन गेरवा गेला.' [गेरू]

गेरू—पु. १ काव, तांबडी माती. २ विटकरीची भुकटी; पाटीवर घालण्याची तांबडी धूळ ३ (सुतारी) लाकडावर खुणा करण्यासाठीं तयार केलेलें (कसलेंहि) तांबडें पाणी [सं. गैरिक, प्रा. गेरुअ; हिं. गेरू] गेरुंडी-स्त्री. (सुतार) खुणा करण्याचें, पाणी ठेवण्याचें पात्र, कांचेचा टोकला; गेरूचें भांडें.

गेल—धावि. गत; मृत; गेला पहा. 'गेल येउनी जावें नेदेवर।'—उषा १४१८.

गेल—स्त्री. चेष्टा; आगळीक ? 'गेल घेतली मोर मर्कटें। लंका दग्ध केली कपटें।'—कमुरा ३.३ ८९. [सं. केलि=क्रीडा; का. गेली=चेष्टा ?]

गेला—धावि. (जाणें याचा भूतकाल) १ गेलेला; संपलेला; गत झालेला (काळ, दिवस इ॰). २ (ल) मेलेला; मृत. ॰गेला-नि. १ मेलागेला; नष्ट. २ कांहीं झालें तरी; केव्हांहि, निदान. 'गेला गेला पाउस पडेलच कोंकणांत.' ॰बाजार-क्रिवि. (बाजाराची वेळ सरल्यावर देखील) किमानपक्षीं; निदान; कमीतकमी.

गेस्ट—पु. अतिथि; पाहुणा; अभ्यागत; आला गेला. [इं.]

गेह—न. घर; गृह, वस्ती; राहाण्याचें ठिकाण. 'प्रभो तुज जवें तमें मतिस गेह भासे वन।'—केका १०५. [सं.] गेहात्यय-पु घरदार, आप्तसंबंधी यांचा त्याग. गेहात्यय आणि देहात्यय-पु. संन्याशानें केलेला घरादाराचा व शरीराचा त्याग. गेहेपटु-वि. घरचा हुषार; घरांत फक्त वाकबगार पण बाहेर कुचकामाचा; घरचा देशपांड्या (बाहेर भित्रा). गेहेंपंडित-वि. गांवढ्यांत पंडित, अरेराव; घरचा काळ; घरपंडित. [सं.] गेहेप्रगल्भ-वि. जेथें विशेष गरजच नाहीं तेथें धाडस, चपळाई इ॰ दाखविणारा; घरशूर. [सं] गेहेमेही-वि. (घरांत मुतणारा) घरबस्या; घरकोंबडा [सं.] गेहेशूर-नर्दी-पु. घरांत शूर; घायकांत शौर्याच्या गप्पा मारणारा पण बाहेर भित्रट, शेंदाडशिपाई. [सं.]

गेळ—न. १ बेचकें; दोन बोटांतील भाग; गेचक अर्थ १ पहा. २ दुभागलेल्या खुराचा एक भाग; दोन भागांतील अंतर. म्ह॰ गाईचे गेळीं, म्हशीचे वेळीं (दूध काढावें)=गाय दुरणांतून आल्यावर व म्हशीचें नियमित वेळीं दूध काढावें.

गेळ-ळी, गेळा, गेळफळ—स्त्रीपुन. एक झाड व त्याचें फळ. या झाडास दोन अंगुळें लांबीचे कांटे असतात, फळ सुपारीएवढें असून पिकल्यावर पिवळें होतें, याचा गळ्यावर लेप केल्यास तें पिकतें; याला (कु.) गेळी-गेळो किंवा गेळफळ असेंहि म्हणतात. [सं. गालव]

गेळंटी—स्त्री. (सुतार) तांबड्या रंगाची लोंकडी.

गेळा—पु ल्हान तोंडाचें पाटोळें भांडें; तेल इ॰ ठेवण्याची किंवा पाणी पिण्याची झारी, सुजा; सुरई.

गेळी—स्त्री. ल्हान गेळा.

गेळी—स्त्री. खुराचा भाग. गेळ अर्थ २ पहा. (अव. गेळया)

गै, गैगोळा इ०—गई, गईगोळा पहा. 'ते देवोल मज कारी करीन गै मी।' –र २६.

गैदी, गैवती–त्या, गैवी–गैयान्या — वि. १ ढिला; नेभळा; गबाळ्या; अजागळ; बावळा; अव्यवस्थित. २ आळशी आणि टोणपा. गावदी पहा. [फा. घइद्; हिं–गैबी]

गैब–प, गैबत–ती—क्रिवि. (प्र. गईब, गईप) १ गुप्त; न दिसणारा; अदृश्य. 'गैबचि होऊनि जाती' –दावि २९५. 'त्यांतच गैबत जाले. त्यांचा मुर्दा देखिल दृष्टीनें कोणी देखिला नाही' –भाब ६३. २ नष्ट; गहाळ. [अर. घइब्; घइबत्]

गैंब—पु. (गो.) गुरांनीं केलेल्या नासाडीची नुकसानभरपाई करून देणारें खातें. [पोर्तु.]

गैबती—न. (राजा.) धूपार्तीचा गुदलीवजा दिवा, यांत तेलाचें भांडेंहि असतें.

गैबती—वि. (गो.) अलाहिदा. फालतू; कोणीतरी; माहीत नसलेला; अल्ताच.

गैबी—वि. १ गुप्त; गूढ. २ निनांवी. [अर. घइबी] ०अर्जी–स्त्री. गुप्त, निनांवी अर्ज (व्हाड खानदेशांत रू.). ०आवाज–पु. आकाशवाणी; दैवी, गुप्त संदेश. 'गैबी आवाज वाजवी घंटा जलमय ब्रह्महृदय नीलकंठा।' ०खबर–चर,माग–वार्ता–बातमी–स्त्रीवि. गुप्त, गुप्त बातमी; चोरबातमी. ०फकीर–पु. गुप्त सामर्थ्यामुळें चमत्कार करणारा फकीर, गोसावी. ०वार–पु. कोठून आला हें न कळणारा बंदुकीचा वार. ०माणूस–पु तोतया. ०मार–पु. आडून केलेला, न दिसणारा मारा. 'गैबीचा मारा जाहला.' –भाब ३४. ०वाद्य–न. आकाशवाद्य. 'विचित्र गैबीवाद्यें वाजीनलीं।' –सप्र २०.६८.

गैर—अ. निराळेपणा, भिन्नपणा दाखविणारा परंतु सामान्यतः अभाव किंवा अन्यथाभावदर्शक अरबी अव्ययशब्द किंवा प्रत्यय. याचा मनसोक्त (विशेषतः हिंदुस्थानी शब्दांबरोबर) उपयोग करितात. या शब्दाचे पुढील कांहीं अर्थ होतात—१ इतर; अन्य. 'गैर पथकें येऊन मोर्चेबंदी केली आहे.' –रा १२.१२५. २ अयोग्य; अन्यायाचा. 'हें तुम्हीं गैर केलें.' –मदरु १.१०६. ३ (नामाच्या किंवा विशेषणाच्या प्रारंभीं जोडल्यास) अवास्तविक, उलट; विपरीत. ४ विना; वांचून. 'गैर अन्याय मला गांजतो.' 'गैर अपराध दंड घेऊं नये.' [अर. घैर=निराळा, व्यतिरिक्त] (वाप्र.) ०अदबी–स्त्री. असभ्यता; अपमान; अनादर. 'गैर अदबी बोलला सबब पातशाहा यास राग येऊन होळे काढिले.' –मदरु २.७०. ०अदा–वि. रद्द; न पटलेलें. 'शिंदे कर्डील वरात आली तर मग गैरअदाही व्हावयाची नाहीं.' –ख१०.५२.७९. ०अब्रू–स्त्री. अप्रतिष्ठा. 'गैर–अब्रू फारशी न करणें.' –वाडबाबा २.७५. ०अमली–वि. परस्वाधीन; दुसऱ्याचें. 'चार लक्षाचे भरतीस अमली महालांपैकीं बेरीज कमी आल्यास गैर–अमली महाल आहेत त्यांपैकीं भरतीस कमाल आकाराचे बेरजेचा महाल लावून देणें.' –रा १०.३२१. ०आबादी–वि. ओसाड; उजाड; बेचिराख. ०आरामी–स्त्री. अस्वस्थता. 'दुम्रतांचे शरीरास दोन दिवस गैरआरामी आहे.' –दिमरा २.३२. ०इतबार–पु. अविश्वास. 'तमाम फौजेस गैरइतबार जाहला.' –भाब ८०. ०इमान–न. इमान नसणें; द्रोह; अनिष्ठा. 'आमचे गैरइमान असतें तरी आम्हीं आजपर्यंत येथें तुम्हापाशीं न राहतों.' –भाब १११. ०कबजी–वि. परस्वाधीन; गैरअमली पहा. 'सरंजाम गैरकबजी, कांहीं सुटला त्यांत वस्ती नाहीं.' –ख २ १४२. ०कायदा–वि. बेकायदेशीर; असनदशीर. (इं.) इलीगल. ०कायदा मंडळी–स्त्री. (कायदा) गुन्ह्याचें कृत्य करण्याच्या इरादानें पांच किंवा पांचाहून अधिक एकत्र जमलेले इसम. (इं.) अनलॉफुल असेंब्ली. ०किफायत–स्त्री. तोटा; नुकसान. 'किफायत, गैरकिफायत समयासमयास चित्तांत आणून किफायतीचीं कामें करीत आलां, पुढें त्याचप्रमाणें करावीं' –रा १.२४६. ०कौली–वि. परवाना किंवा अभयपत्र न दिलेलें; विगर परवाना –मराभा ०खर्च–पु १ जादा, किरकोळ खर्च. २ गैरवाजवी, अयोग्य खर्च. ०खुशी–षी–वि. नाकबूल, नाखुष; रुष्ट. 'खुषी किंवा गैरखुषी असा हा कौल बायकांशी।' –पला १०४. ०चलन–नी–वि. १ चालू नसलेलें (नाणें). २ (ल.) अव्यवस्थित; बेशिस्त; अशिष्ट (वर्तन). ०चलन–स्त्री. १ चलनाचा अभाव; चलन नसणें. २ (क) गैर वर्तन; वदचाल. ०चाकर–वि. बडतर्फ; माजूल. 'जासूदी जहाले त्यांस गैरचाकर करून जागिरा तगीर करविल्या.' –जोरा ७५. ०जप्त–वि. गैरअमल; गैरकबजी; परस्वाधीन. 'गैरजप्त देश साधावे.' –चित्रगुप्त ११०. ०जबाब–पु उद्धटपणाचें, अनादराचें उत्तर. ०दस्त–स्ती–वि. सरकारसाऱ्याची सूट असलेली (जमीन). ०नफा–फायदा–पु तोटा; नुकसान. 'येणेंकरून तुमचा गैरनफा जाहला.' –जोरा १४. 'अत्यंत वोढ केल्यास पाटीलबावांचा गैर फायदा आहे.' –जोरा ४७. ०प्रकारचा–वि. १ इतर; भिन्न; दुसरा. २ चमत्कारिक; हास्यास्पद; तऱ्हेवाईक; विलक्षण. ०बर्दार–वि. बहार नसलेला; फळहीन. 'पोफळी गैर–बर्दार, शेंडे वाळलेल्या आहेत.' –रा ११ ७९ ०मजुरा–क्रिवि. (हिशेब) मजुरा(वजा) टाकल्याशिवाय; वजावाट न करिता. [गैर+मजुरा–मुजरा] ०मंजूर–वि. नामंजूर; रद्द. 'अष्टप्रधानीं आपले जागा वाजवी असतां गैरमंजूर करून एकपक्षी तह केला.' –रा १२.१२२. ०मर्जी–स्त्री अवकृपा; दुष्टता; इतराजी; नाराजी. ०मसलत–मनसुबा–स्त्रीपु. मूर्खपणाचा, वेडगळपणाचा बेत, कट, योजना. ०महसर्दार–वि. अप्रतिष्ठित. –रा ८.४३. [अर. मआसिर=योरवी] ०महसूल–पु. जुलमी करांपासून किंवा अन्याय्य मार्गानें

काढलेला वसूल; योग्य सरकारवाऱ्याविरहित वसूल. 'विजापुराहून एक हवालदार गैरमहसूल पैदागिरी वसूल करून आला.' –इऐ ५.१००. ०माफूल–मूर्ख; अडाणी; गैर; वाईट. 'दाभोरास सलेल करणे हे गैरमाकूल गोष्टी आहे.' –रा १८.३३. –क्रिवि. मूर्खपणे. 'लोक गैरमाकूल आम्हांस न कळत वर्तले तरी त्याची बदलामी आपणावरी न ठेवावी.' –रा ८.१०. ०मान्य–वि. अमान्य; असंमत. ०मार्ग–पु गैरशिस्त आचार, रीत; दुराचरण. ०माहीत–वि. १ अपरिचित; अनोळखी. २ अजाण; नेणता. 'साठे आहेत ते गैरमाहीत.' –ख ७.३५५१. ०माहीतगार–वि. अजाणी, अडाणी. ०मिरासी–वि. वंशपरंपरा मालकी नसलेला. 'मातकदीम मिरासी खरी जाहली, कागद मजकूर गैरमिरासी मुतालीक ऐसे जाहले.' –इऐ ५ १०२. ०मेहनत–स्त्री. निरुद्योग. 'परंतु मेहनत, गैर–मेहनत सर्व एक ईश्वरी शोभाने वाया गेल्या.' –ऐ ५. ०मेहेरबानी–स्त्री. अवकृपा; इतराजी. 'सांगितल्यावरून मनांत गैर मेहेरबानी न धरावी.' –रा ८.१०. ०मोसम–हंगाम–पु. अवेळ. 'गैर मोसमांत (पौष वद्य १२ स) आवे आले यावरून कौतुक वाटले.' –रा २२.५. ०रजावंद–वि. नाराज; नाकबूल. 'तो किरेस गैररजावंद जाहला.' –वाडबाछ १३२. [फा.] ०रहा–रीत–स्त्री. बदचाल; अयोग्य रीत; वाईट आचरण. –वि. बदचालीचा–चलकाचा. 'भुजंगराव याची वर्तणूक गैररहा दिसते.' –ख ११. ५७७६. ०राजी–वि. असंतुष्ट; नाराज. 'पादसकर गैर–राजी जाले.' –रा ६ २६. ०रावता–वि. १ बंदी, मनाई; खंड (मार्ग, मिळणे, येणे–जाणे, वहिवाट, चाल यामध्ये). 'नाना फडणीस लष्करांतून आल्यापासून गैररावता बहुत करूं लागले, कोणाचीच गांठ पडत नाहीं.' –ख ८ ४१५१. २ वहिवाट, चाल यामध्ये अनभ्यास; अपरिचय; अवापर; वळण नसणे. ०रास्त–वि. गैरवाजवी; असत्य; खोटा. ०रुजू–वि. १ गैरहजर. २ मंजूर किंवा दाखल किंवा मान्य न केलेले (हिशेब). ०लायक–वि. अयोग्य; नालायक; अनुचित. ०वळण–न. १ गैररावता. 'त्या मार्गास सध्यां गैरवळण आहे.' २ एकीकडे असणे; आडवळण; दळणवळण नसणे. 'हा गांव गैरवळणांत पडला.' ३ गबाळ, वाईट लिखाण. ४ सरावांत नसणे; संवय नसणे, निरुपयोग. ०वाका–पु. खोटी किंवा बनावट गोष्ट; गैरसमजूत; लबाडी. 'ऐसा गैरवाका सांगितला.' –रा ८ ५२. –वि. वेडावांकडा. –शर [फा. घैर्–वाकिअ] ०वाजवी–वाजिवी–वि अयोग्य; अनुचित; फाजील, अन्याय्य. 'त्यांचा अभिमान गैर–वाजवी यांणी नच धरावा.' –रा १२.७९. [फा. घैर्+वाजिबी] ०वाजवी दाब–पु. (कायदा) अयोग्य वजन. (इं.) अनड्यू इन्फ्लुअन्स. ०वास्तविक–वि. खोटा, असत्य; वस्तुस्थितीस सोडून. ०विल्हा–क्रिवि. आडवाटून; आडवळणी. –वि. (विलगमाठी घुकने योजलेला) न मिळणारा; न जुळणारा. ०विल्हईस–विल्हेस–विल्हे–क्रिवि. आपल्या (योग्य) ठिकाणाच्या विरुद्ध जागी; भलतीकडे. ०विल्हेस लागणे–पडणे–१ दुसरीकडे किंवा चुकीच्या ठिकाणी लागणे; गमावणे. २ योग्य ठिकाणाहून गहाळणे; गमावणे. ३ गोंधळ होणे, अव्यवस्थित असणे ०शर्ती–स्त्री मालीजमीन म्हणून ठरविल्यानंतर जिला इतर दुसऱ्या कोणत्याहि शर्ती पाळावयाच्या नसतात अशी जमीन. ०शिस्त–वि. बेशिस्त; अव्यवस्थित; विना रीतभात; नियमबाह्य; असभ्य; फाजील (माणूस, वर्तन, भाषण). –स्त्री. बेशिस्तपणा; अव्यवस्थितपणा; अयोग्यपणा; अनियमितपणा. ०शेरा–शरा–वि. धर्मशास्त्रविरहित. 'काजीपासून गैरशेरा अमल होऊन आला.' –वाडसनदा १५. [अर. घैर्+शरअ=धर्मशास्त्र] ०संधी–स्त्री अवेळ; गैरमोसम; अवकाळ. ०सनदी–वि. १ बेसनदशीर; बेकायदेशीर; सनदेने अधिकृत नसलेले. २ जादा मंजुरीशिवाय. 'गैर–सनदी खर्च करावयाची सरकारची आज्ञा नाहीं.' –ख ५. २३५३. ०समजाविशी–स्त्री. (कायदा) गैरसमजूत; (इं.) मिस्‌रिप्रेझेंटेशन ०समजूत–स्त्री. उलट, चुकीची समजूत, चूक. ०सल्ला–सलाह–गैरमसलत पहा. 'हे कपणी इंग्रज बहादूर यांचे सलाहाने अगर गैर सलाहाने ...' –रा २२.१२५. ०साल–वि. अनिश्चित वेळेचा; वर्ष नमूद नसलेला. 'गुणवरे यांनीं कागद एक काढिला, तो बहुता दिवसांचा, गैर–साल।' –रा ६.८९. ०सावध–वि. १ बेसावध; गाफील. २ बेशुद्ध; मूर्छित. ०साळ–वि. १ खोटसाळ; सरकारी टांकसाळींतून न पाडलेले, इतर ठिकाणचे म्हणजे हिणकस, कमी किंमतीचे (नाणें). 'गैरसाळ तामगिरी। कोणी नवी मुद्रा करी।' –दा १०.८.१४. (त्यावरून) खोटा; बनावट; लबाडीचा. २ (ल.) बेशिस्त; अनभ्यासी, गांवढळ; अडाणी (माणूस); अयोग्य; अनुचित (वर्तन). ३ अशिष्ट; अडाणी; हलका; राकट; बेडौल, गावंढा इ० ०सोई–य–स्त्री. अडचण; त्रास; हाल, अव्यवस्थितता. ०सोईचा–वि. अडचणीचा; सोईचा, सुखकर नसलेला. ०हंगाम–पु गैरमोसम पहा. 'त्यांस गैरहंगाम, हल्ली खर्चुनी तयार मिळाली ते आठ सेवनी पाठविली असेत.' –रा ३.३१२. ०ह(हा)जीर–वि. मोजदा किंवा वेळीं समक्ष नसलेला; अविद्यमान, अनुपस्थित. [फा.] ०हिसा(शे)बी–स्त्री. अन्याय; अव्यवस्थितपणा. –क्रिवि. . अन्यायानें. 'आपले जागिरींत नाहक गैरहिसाबी पादशाह खलल करवितात।' –इमं ६७. ०हुकुमा–वि अनधिकृत, संमति, आज्ञा नसलेले; नामंजूर. ०हुर्मत–स्त्री. अप्रतिष्ठा, बेअब्रू.

गैरत–स्त्री. लज्जा; भीड. 'इतकेच शिकस्तेची गैरत आणि शरमिंदगी नवाबास फार झाली आहे.' –रा,५,१६. [अर. घैरत]

**गैरा-री**—वि. १ अशक्त; मंद; मूर्ख; गयाळ; खुळा(मानस) २ कुचकामाचें; कवडीमोल; क्षुद्र ( वस्तु ). ३ भलता; अपेक्षे विरहित ( पदार्थ ). [ गैर ]

**गैरात**—वि. १ गैदी; अव्यवस्थित; बेपर्वा. २ मंद; मूर्ख. गैरा-री पहा.

**गैराद**—पु. वरकड इतर लोक. -समासद १४. [ अर घैरात घैर् ( अव. ) ]

**गैरांव**—पु. (गो.) कोळ्याचें जाळें; जळमट; घेरू; घेरोसा.

**गैरी**—स्त्री. गुन्हा; तफावत; अन्याय. 'ज्याकडेम गैरी लागेल त्यापैकीं मसाला होनु एक देणें.' -सासंइ ८८. [ गैर ] **गैरी करणें**-वाईट वर्तणूक, दुर्वर्तन करणें.

**गैहरा**—वि. गडद; दाट; गहिरा पहा.

**गो॥**—( संक्षेप. ) गोसावी.

**गो**—उद्गा ( कों. काशी ) अगो! अगे! ( बंगालींतही हें संबोधन आहे ) 'असें कायगो करतेस?' -फका १.

**गो**—स्त्री. १ गाय. २ बैल ( पशु ) समासांत- गाईपासुन झालेलें; गाईसंबधीं (दूध, चामडें, मांस इ०). 'अगा गोक्षीर जरी जाहलें। तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें।' -ज्ञा २.१८४. [ सं. ] सामाशब्द- **०कर्ण- ०कर्ण**-न. १ मुलाला दूध पाजावयाचें (गाईच्या कानाच्या आकाराच) बोंडलें. २ एक वेल व तिचें फूल ३ बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक. हें कुमठें (कानडा जिल्हा) तालुक्यात आहे. ४ ( तजा. ) दांड्याचें सारपात्र; कावळा. याचा आकार गोकर्णासारखा असतो. -पु गाईचा कान. **गोकर्णांत येणें**-संपुष्टांत, गोकुळांत येणें; संपणें; दरिद्री होणें. **गोकर्णिका- कर्णी**-स्त्री. एक प्रकारचा लगाम. **गोकर्णी**-स्त्री. एक वेल, हिचीं फुलें ( पांढरीं, निळीं ) गाईच्या कानास रखीं असतात. [ सं. ] **गोकु(कू)ल ळ**-न. १ श्रीकृष्णाच्या लहानपणच्या वसतीचें गांव. २ गोकुळाष्टमीस नंद, यशोदा, गोप-गोपी, गाईवासरें इ० ची पूजा करण्यासाठीं केलेलीं मातीचीं चित्रें. ३ ( ल. ) स्वैरसंभोग; व्यभिचार. ( क्रि० माजविणें ). [ सं. गो+कुल ] **गोकुळांत येणें**-१ संकोचित होणें; संपुष्टात येणें; संपणें. २ आटोक्यांत येणें (व्यवहार). [ विश्वव्यापी कृष्णपरमात्मा ज्याप्रमाणें गोकुळाच्या मर्यादेंत आला त्याप्रमाणें ] **गोकुळाष्टमी**-स्त्री. श्रावण वद्य अष्टमी; या दिवशीं भगवान् श्रीकृष्णाचा जन्म झाला. [ सं. ] **गोकुळासारखें घर**-न. मुलाबाळांनीं गुरांढोरांनीं भरलेलें घर. **गोकोश**-पु. जमीन मोजण्याचें एक माप; गायींच्या हंबरण्याचा टप्पा; गोरुत; दोन कोसांचें अंतर. **गोखडी**-स्त्री गाई उभ्या राहण्याची जागा; गोठण. 'गिलच्यानीं गोखडींत दहा-पांच बैरागी सत्पुरुष होते तेहि वधके ठिकाणीं लढे केले.' -भाब २८. **गोखमा**-पु. १ गुराखी. २ ( ल. ) गावढळ खेडवळ; शेत्या; नांगऱ्या. **गोखरें, गोखरेण-रेड**-न. ( कों. ) गुरांनीं खाऊन शिल्लक राहिलेलें गुरांच्या पायाखालचें, निरुपयोगी गवत. 'केळीला गाखरेडाचें खत चांगलें' [गो+खुर] **गोखाना**-पु १ सरकारी किंवा एखाद्या मोठ्या माणसाचा गायवाडा; गुरांचें खातें. २ गायठाण; गोठा. [ सं. गो+फा. खाना ] **गोग्रहण**-न. गाईचें हरण, चोरी. 'उत्तरगोग्रहण.' 'तुर्या गोग्रहणाचेनि अवसरें। घातलें मोहनास्त्र एकसर।' -ज्ञा ११.४६९. [ सं. ] **गोग्रास**-पु. १ जेवण्यास बसण्यापूर्वी गायीसाठीं राखून ठेवलेला अन्नाचा नैवेद्य. २ गाईसाठीं भिक्षा. [ सं. ] **गोचर**-न. गुरचरण; गुरचराई. [सं.] **गोचर्म**-न. १ गाईचें कातडें. २ ( ल. ) जमीन मोजण्याचें एक माप. गाईच्या चामड्याइतकी जमीन; ( गाईच्या कातड्याची वादी काढून तिनें वेष्टिलेली जमीन एका माणसानें राजापासुन मागून घेतल्याची एक जुनी गोष्ट आहे तिच्यावरून ) तीनशें फूट लांब व दहा फूट रुंद या मानाचें क्षेत्र (यांतील धान्य एका माणसास एक वर्ष पुरतें असा हिशोब आहे). [सं.] **गोजरूं गोजी**-नस्त्री. ( प्रेमानें किंवा तिरस्कार करतेवेळीं योजना)कालवड, वासरी **गोजिव्हा**-स्त्री. एक वनस्पति.गोजबान पाथरी; दवली. [ सं. ] **गोठ(ठा)ण**-स्त्रीन. दुपारीं सावलीसाठीं पाण्याजवळ झाडाखालची बसण्याची गुरांची आखर. जागा; गोठा. 'पशु पीडती पर्जन्यें। गळती गाईचा गोठणें।' -मुमभा ३ ७९. [सं. गोष्ठ, गोस्थान] म्ह० गोठणीच्या गाई माभळभट दान घेई. =हलवायाच्या घरावर तुळशीपत्र. **गोठण घालून बसणें**-सभेत अस्ताव्यस्त बसणें. **गोठा-ठो**-पु गुरें बांधण्याची जागा; जनावर रहाण्याची जागा. [ सं. गोष्ठ; प्रा. गोट्ठ ] **गोठापाणी**-न. सकाळीं गोठा झाडणें. गुरांचें शेण, मूत काढणें इ० गोठ्यांतील व्यवस्थेचें काम **गोठाव(वि)णें**-सक्रि. गोठ्यात गुरें जमविणें; गोठ्यांत गुरें पाळणें. **गोठी**-स्त्री. ( कों. ) वासरांचा लहान गोठा. **गोठ्यावें**-क्रि ( गो. ) पशूंचें बसण [ गोठा ] **गोथवड**-स्त्री. ( कों. ) गुरांची दावण. ठाण; लाथ पडळ; खोटेवा. [ सं. गोष्ठ-वट ] **गोदंती हरताळ**-स्त्री. पिवळा हरताळ. **गोदण**-स्त्री. ( बे. ) गुरांपुढें वैरण टाकण्याची जागा. [ गवादनी ] **गोदन**-न. ( माण. ) लहान गोठा. **गोदरड**-स्त्री. ( राजा. ) गोठ्यांतील केरकचरा, घाण. **गोदान, गोप्रदान**-न. ब्राह्मणास गाईचें दिलेलें दान 'प्राचीन काळीं गाय दान मिळणें सोपें होतें, पण ती मिळणें कठीण, पण हलीं चार आण्यांत गोप्रदान.' -गांगा १४८ **गोदान**-न. सोळा संस्कारापैकीं व समावर्तनाच्या वेळीं करावयाचा एक संस्कार. [सं.] **गोधन**-न. गुरेंढोरें किंवा त्यांच्या रुपानें संपत्ति. 'धन्य ती गायनें कांबळी काठीका।' -तुगा २०८. **गोधूल गोधूल मुहूर्त, गोधूलिक, गोधुलक**-पुन. १ सायंकाळचा ( गुरें रानातून परत घरीं येत असतां त्यांच्या

चालण्यानें उडालेली धूळ दिसते तेव्हांचा ) काळ. २ सूर्यास्ता-पूर्वीचीं व नंतरचीं ३० पळें यामधील काळ; हा लग्नास शुभ मानतात. गोरज मुहूर्त. **गोधूल लग्न**-न. १ गोरज लग्न. गोधूल पहा. २ सूर्यास्तसमयीं उदय पावणारी राशी, लग्न. **गोधूलिक**-वि. गोधूलसमयवर्ती ( कार्य, लग्न-मुहूर्त ). **गोधूळ-ळी**-स्त्री. गोधूल पहा. **गोप**-पु. गुराखी, गवळी जात. व तींतील एक व्यक्ति. 'पूजिति सांग नगा ती रीति । मुखाचीच गोप सांगत गातीं ।' -मोकृष्ण २४ ७. **गोपचार**-पु. गायरान, गोचरण. **गोपद**-न १ गाईचें पाऊल. २ गाईच्या पावलाचा मार्ग, खूण ३ आंत पाणी भरलेली गोपदाची खूण, ठसा. **गोपद्म**-न. चातुर्मास्यांत र गोळीनें गाईचीं पावलें नववधू काढतात व पूजा करतात तें. गोपदचिन्ह. [ सं ] **गोपवाडा**-पु. गवळीवाडा. 'जो नांदवी उत्कट गोपवाडे ।' -साप्त १.७८. **गोपाल-ळ**-पु. १ गुराखी, गुरें पाळणारा. २ राजा. ३ भगवान श्रीकृष्ण. ४ एक जात व ती ील व्यक्ति, डोंबारी; हे मनगटानें दगड फोडतात, मोठाली वजनें उचलतात व कसरतीचे खेळ खेळतात. हे गांवकऱ्यांचीं गुरें राखोळीस घेतात. -गांगा १२२. **गोपाष्टमी**-स्त्री. कार्तिक शुद्ध अष्टमी या दिवशीं श्रीकृष्ण हे प्रथम गाई चारण्यास निघाले, म्हणून या दिवशीं त्यांची व गाईची पूजा करतात. **गोपाळकाला**-पु. गोकुळअष्टमीच्या उत्सवाच्या व श्रीकृष्णाच्या इतर उत्सवाच्या शेवटीं करावयाचे खेळ, द्यावयाचा प्रसाद, जेवण इ०; गोकुळाष्टमीच्या पारणेच्या दिवशीं दहीहंडी फोडून तींतील प्रसाद वाटतात तो. **गोपाळखेळ**-पु. गोपाळ लोकांची कसरत, खेळ; डोंबाऱ्यांचा खेळ. **गोपाळीं**-क्रिवि. गोरजीं; गोधूललग्नीं. **गोपिका, गोपी**-स्त्री. गोपालस्त्री; गवळण. 'तुझे कथिति गोपिका विविध तीस दोभाट ते ।' -केका ८६. [ सं. ] **गोप्रदान**-१ गोदान पहा. २ ( थट्टेनें ) शिव्या. 'त्यानें त्यास गोप्रदानें केलीं.' **गोप्रसव**-पु. कुनक्षत्रीं जन्मलेलें मूल गाईच्या तोंडापुढें धरतात व असें केल्यानें तें गाईचें मूल होऊन अशुभापासून मुक्त होतें, अशा मुलाला म्हणतात. **गोप्रसवशांति**-स्त्री. कुयोगीं जन्मलेलें मूल गाईच्या मुखांतून जन्मलें अशी भावना धरून कुयोगदोषनाशार्थ करावयाची शांति. **गोब्राह्मण**-पु. १ गाय आणि ब्राह्मण २ (ल.) अगदीं साधाभोळा, गरीब ब्राह्मण. **गोमय**-नपु. गाईचें शेण. 'शुद्ध करूनिया गोमय गोळा । मृत्तिकाकण विरहित ।' [ सं. ] **गोमाशी**-स्त्री. घोडे, गाई इ० च्या अंगावरील एक मोठी माशी; माशीची एक जात. **गोमांस**-न. गाईचें मांस; शपथेसारखा किंवा निषेध दाखवितांना याचा उपयोग करतात. कारण हिंदूंना गोमांस अगदीं निषिद्ध आहे 'ही तुमची टेप मला गोमांसाप्रमाणें आहे.' **गोमुख**-न १ सोंगें इ० पवित्र पाणी खालीं पडण्यासाठीं बांधलेलें किंवा बनविलेलें दगडी किंवा धातूचें गाईचें तोंड. २ एक प्रकारचें गाईच्या तोंडासारखें वाद्य. 'तों वाजे शंखभेर्यादी पणवानक गोमुखें ।' -वामन गीताश्लोकी १.१३. **गोमुखव्याघ्र**-पु. १ दिसण्यांत गाईसारखा सौम्य पण अतिशय क्रूर असा वाघ. २ गाईचें कातडें पांघरलेला लांडगा. ३ ( ल. ) वरून गरीब पण आंतून लुच्चा माणूस. [ सं. ] **गोमुखी**-स्त्री. गाईच्या तोंडासारखी काटकोनी जपमाळेची पिशवी; हिच्या आंत हात घालून जपाची माळ ओढतात. 'काय मौन धरूनियां गोमुखीला जाळिसी ।' -राला ८७. -पु. (कों.) एक प्रकारच्या नवसांत नियम केल्यामुळें हात न लावतां तोंडानें अन्न उचलून जेवणारा माणूस [ सं. ] **गोमूत्र**-न. गाईचें मूत; हें पवित्र मानतात व अपवित्र वस्तूंवर शिंपडून त्या पवित्र करतात. **गोमूत्रिका, गोमूत्रिकान्यायगुणाकार**-पु (ज्यो.) गुणाकाराचा एक प्रकार. **गोमूत्रिकाबंध**-पु. काव्याचा एक प्रकार या या द्वितीय चरणांत पहिल्या चरणांतील बहुतेक अक्षरें येतात. **गोमूत्रवायु**-पु एक नवयुक वायु. (इं) आमोनिया. **गोमेध**-पु ज्यामध्यें गाय मारतात तो यज्ञ [सं.] **गोरखो**-पु. गुराखी; गुरें (गाई) पाळणारा. 'कळाचिया सुखें । परब्रह्म झालें गोरखें ।' -तुगा १८१. **गोरज**-पु. गाईची धूळ. गोधूल पहा. 'गोरजें डवरला, मुखचंद्र ।' -ह ८.६३. **गोरजमुहूर्त**- गोधूलमुहूर्त पहा. **गोरस**-पु गाईचें दूध, दहीं, तूप इ० गाईपासून होणारे पदार्थ. [ सं. ] **गोरक्ष-रक्षक**-पु. १गुराखी. २ गुरांची रक्षक देवता. ३ नाथपंथातील गोरखनाथ नांवाची एक प्रसिद्ध व्यक्ति गोरख-गोरखनाथ पहा. **गोरक्षण**-न. कसायापासून गाय वांचविणें; गोपालन. **गोरा-ऱ्हा**-पु. गाईचा पाडा, खोंड; धांडा. **गोरुच**-न. गोवत्स. **गोरुं, गोरवा, गोरें**-न. ( राजा. गो. ) ढोर, गुरूं. 'गोरूं खडबडी बाहिरी ।' -भाए ३५४. **गोरोचन-ना**-नस्त्री. गोवर्धन; हें गोमूत्रापासून किंवा कुपित्याच्या रूपानें गाईच्या ओकण्यापासून, किंवा गाईच्या डोक्यांत उत्पन्न होतें याचा रंग पिवळा. हें रंग, चित्रें औषधें यांत उपयोगी आहे 'गोरोचनापरिस गौर असें गण.वें ।' -र ६. ( लोकसमजूत अशी कीं वाजीकरण किंवा स्त्रियांस मोहविण्यांत गोरोचनाचा उपयोग होतो ) [सं.] **गोवंड-डी. गोवडी**-पुनस्त्री. जंगल किंवा डोंगरावरील धनावरांची चरण्यास जाण्याची पाऊलवाट, गायवाट [ सं. गोवर्तनी ] **गोवंडास लागणें-येणें**-सरळ रस्त्यास लागणें; चालीस लागणें (माणूस, काम). **गोवत्स**-पुन. गाईचें वांसरूं **गोवत्सद्वादशी**-स्त्री. आश्विन वद्य द्वादशी; या दिवशीं गाईची पूजा करितात. **गोवपा**-स्त्री. गाईच्या आतड्यावरील आवरण; सामान्यतः गाय, बैल यांच्या चरबीस व हाडांतील मगजासहि म्हणतात. [ सं. ] **गोवर**-पु. १ शेणी; न थापलेलें वाळलेलें शेण, वाळलेल्या शेणाचा चुरा. २ गाईनें

खाल्यानंतर उरलेला चारा, गळाठा ३ (कों) राव ४ (हिट) उकिरडा [स प्रा गोवर] गोवरकोंडा–पु गोठ्यातील केरकचरा, शेणमूत गोवरी–स्त्री १ वाळलेल्या शेणाची थापटी, शेणी, गोवर अर्थ १ पहा. २ (कु) शेगरात ३ राव भाजण्यासाठी वाळविलेला शेणगोळा गोवरीची आग–स्त्री गोवरी जाळली असता वर राख दिसते परंतु आत विस्तव असतो यावरून गुप्त परंतु भयंकर वैर गोवऱ्या मसणांत जाणें–वृद्धपण येणें मरण जवळ येणें, वय होणें गोवर्धन–पु १ मथुरेजवळील टेकडी, इंद्रानें पाडलेल्या पावसापासून गोकुळाचें रक्षण करण्यासाठीं श्रीकृष्णानें याला करंगळीवर धारण केलें व याच्या खालीं गोकुळातील सर्व माणसें आणि पशु सुरक्षित राहिले २ कार्तिक शुद्ध प्रतिपदेच्या (बलिप्रतिपदेच्या) दिवशीं भात, शेण, भाजीपाला इ० चा वल्लभसंप्रदायी लोक गोवर्धनासारखा पर्वत करून त्याची पूजा करतात तो –न १ गोरोचन २ महाराष्ट्रातील एक प्राचीन राष्ट्र हल्लींच्या नाशिक जवळच्या भागात हें असावें ०ब्राह्मण–पु एक महाराष्ट्रीय ब्राह्मण जात गाईच्या तोंडें गोवर्धन निवडणें–पचाईत इ० प्रकरणीं ज्याचा विषय त्याच्याच तोंडानें निवाडा करणें गोवळ, गोवळगोठा–पु (कों) गोशाला, गायवाडा, गोठा गोवळ, गोवळा, गोवाळ–ळी–पु १ गुराखी, गवळी 'उगला राहे न करी चाळा। तुज किती सांगों रे गोवळा।' –तुगा १२९ २ (राजा) वयानें मोठा पण पोरकट माणूस, दुधखुळा (निंदार्थी) [स गोपाल, प्रा गोवाल] गोवारी–पु गुराखी, गवळी 'तंव गाई आलिया रानीं। कच नाहीं आला गोवारी।' –कथा १ ५ ८२ गोवाल–पुअव गगावन, गाईच्या शेपटीचे केस [स] गोवेल–पुस्त्री एक वेल, ही गुरांना विषकारक असते म्हणतात, भारे बांधण्याच्या कामीं हिचा उपयोग होतो गोवैद्य–पु गाईचा वैद्य, गुराचा वैद्य, पशुवैद्य गोशत–न १ शंभर गाई २ शंभर गाई दान देण्याचें कर्म [स] गोशाला–ळा–स्त्री गोखाना, गोठा पहा गोष्ठ–पुन गोठा गोष्पद–न १ गाईचें पाऊल, पाऊलाचें चिन्ह २ गावडी ३ गोपदाइतकें माप, गाईच्या खुराखालीं समावेश होईल इतकी जमीन ४ चिखलात उमटलेलें व पाण्यानें भरलेलें गाईचें पाऊल 'गज गोष्पदीं बुडाला हा दैवा सिंधु शोषिला मशकें।' –मोद्रोण १ २३ 'गोष्पद मानुनि दिनात शतदा यमुना ओलांडिली।' –राला ८१ गोष्पदोपम–वि गोष्पदाप्रमाणें (४) ओलांडून तरून जाण्यास सुलभ, सहजसुलभ, क्षुद्र, सुगम 'ईश्वरभजन केलें असता भव गोष्पदोपम होतो' गोस्फुरण–न गाईचें अंग थरारणें, गाईनें भोंवरा करणें [स] गोहण–स्त्री गव्हाण पहा गाताडी गोहन–न (व) गाईचा कळप [गोधन] गोहण्या–पु (व) गुराखी गोहत्या,–हनन–क्लीन १ गाईचा वध २ गोवधाचें पातक गोहरा–गोहोरा–पु गोऱ्हा पहा म्ह० 'गोऱ्हयाच्यानें शेत पोराच्यानें समार होता तर मग काय?' गोहोत–न (राजा) १ दाणा, पेंडा, पेंड इ० गुरासाठीं शिजविलेलें आंबोण, मिश्रण २ (ल) घोटाळा, खिचडी, गोंधळ गोक्षुर–पु १ गोखरू, सराटा २ गाईचा खुर ३ गाईची पाऊलवाट, गोवडी [स]

गोईवाई–वि (व) नामर्द, खुळा, दुर्बळ गउवाई पहा 'आमचा अधिकारी गोईवाई निघाला'

गोकटी–कनळी–स्त्री (राजा) (वाघ गोकटीस बसतो यावरून) मान, गळा, बोकांडी (क्रि० धरणें, फोडणें फुटणें, बसणें) [गो+कटि] गोकटी धरणें–गडविणें, कुचंबविणें, दुःसह स्थितींत तिष्ठत ठेवणें गोकटीस बसणें–मानगुटीस बसणें, पिच्छा पुरवणें खनपटीस बसणें (शत) गोकटीस येणें–पीक पोटरीस येणें, कणसात दाणे भरेपर्यंत भरणें

गोकरा–पु (वे) लाकूड–शेणीचा चुरा गोखरें पहा

गोक्क–न (वे) पाटबंध्याऱ्यातील भगदाड, भोंक [गो अक्ष–गोक्ष?]

गोख–न १ पोट २ मध्य भाग गोखा पहा मध्यवर्ती लोक 'कैसा नव्हता प्रलयाचा वेळु। गोखा तूंचि माडला काळु।' –ज्ञा ११ ३८४ ३ झरोखा [स गवाक्ष, प्रा गवक्ख]

गोखडा–पु १ सज्जा २ कोनाडा, झरोका, गोखला. 'तरणीजी गोखड्यातुनी। बघा जरा तर हळूच डुकुनी।' –भा रा तांबे कविता, भाग २

गोखणें–उक्रि (कों) १ घोकणें, पाठ करणें २ तेंच तेंच पुन्हा म्हणणें, सांगणें, गाणें गाणें, रडगाणें लावणें [घोकणें]

गोखरू, गोखरूचें झाड–पुन १ एक जमिनीवर पसरणारी वनस्पती व तिचें फळ, सराटा हीं फळें फार औषधी आहेत २ पालखीच्या दांड्या (गोंड्या)चे शेवटीं लावलेला लहान गेंद ३ (चांभार) जुत्याच्या उंच तळास (हायसोलास) लागणारा खिळा [स गोक्षुर, प्रा गोक्खुर] गोखरूबांगडी–स्त्री स्त्रियांचा एक दागिना, हातातील कडण, याच्यावर गोखरूची आकृती असते

गोखला–१ कोनाडा २ गवाक्ष, खिडकी, वातायन, जाळी, झरोका गोख, गोखडा पहा [स गवाक्ष, गोमक्ष–गोख+ल]

गोखा–क्रिवि मध्यतरीं, मध्यें 'कैसा नव्हता प्रळयाचा वेळु। गोखा तूंचि मिनलासि काळु।' –ज्ञा ११ ३८९

गोखा–खी–स्त्री (कु) फळें, फुलें काढण्याची शेंड्यास आकडी कामटी बांधलेली लांब काठी, देकाटा, आकडी, गरकू.

गोगडी–न एक प्रकारचें गवत 'कुदा गोगडी द्राळी।' –गीता २ ५२८६

**गोंगणें**—अक्रि. गुंगु आवाज करणें; सणाणणें ( तीर, हवाई बाण ) [ ध्व. ]

**गोंगणें**—अक्रि. रागानें, दुःखानें घुमसणें; कुरकुरणें. [ गुंगुं ]

**गोंगर(रा)ण**—न. जेर होईपर्यंत खावयाचा मार; मारठोक, शिव्या इ०.

**गोंगरणें**—अक्रि. गांगरणें; घाबरणें; पावरणें. [ गांगरणें ]

**गोगलगाय**—स्त्री. १ एक जउरप दवर्गातील कीटक. हिचें शरीर मांसल, थंड, नरम असून वर कवच असतें. हिला दोन शिंगें व त्यांच्या शेवटीं डोळे असतात. २ ( ल ) सौम्य; गरीब; कष्टाळु-प्राणी माणूस. ३ एक प्रकारची सुवडी; पाण्यांतील प्राणी. [ दे. प्रा. गोभालिका ] म्ह० गोगलगाय आणि पोटांत पाय= बाहेरून गरीब व आतून दुष्ट.

**गोंगलु**—न. ( गो. ) गर्द झाडी.

**गोंगाट**—पु. १ गलगा; बडबड; आरडाओरड. २ गों गों शब्द (माशी, बाण इ० चा) ३ गुप्त गोष्टीची प्रसिद्धि; बोभाट. ४ ( संगीत ) प्रमाणबद्धता नसल्यामुळें जो गायनोपयोगी असत नाहीं असा आवाज. **गोंगाट्या**-वि. १ गलबल्या. २ बोभाट्या.

**गोंगाणी**—स्त्री. माशांचा गुणगुण आवाज; घोंगाट अर्थ २ पहा. ' उठली माशांची गोंगाणी । ' –एरुस्व १४.६६. [ ध्व. गों ]

**गोंगावणें**—अक्रि. १ गों गों शब्द करणें; घोंगावणें (माशा इ० ). २ बाण, बंदुकीची गोळी इ० नीं विशिष्ट शब्द करणें. ३ कुत्र्यानीं मारलें असतां गों गों आवाज काढणें. [ ध्व. ]

**गोंच**—स्त्री. ( प्रां. ) खोंच; लोमा. ( क्रि० मारणें ).

**गोचका**—पु. १ ( व. ) पेच ' गोचक्यात अडकलें. ' २ पाणीनें पुड.

**गोचका**—स्त्री. १ कचकी ( विशेषतः शेवटची ). २ लचका ( मांस, मेदा याचा हातानें, तोंडानें तोडलेला ). ( क्रि० तोडणें; घेणें; काढणें ).

**गोचका. गोचकुला, गुचकुला**— वि. लहान; चिमुकला, ठेंगु पण सुंदर ( मूल ).

**गोच(चि-ची)ड, गोचिडी**—स्त्री. १ अष्टपाद वर्गातील प्राणी. कुत्रा, गाय, म्हैस यांच्या अंगास चिकटून रहाणारा लहान किडा. हा माणसाला चावल्यास सूज किंवा टायफस ताप येतो. मोठी ती गोचडी तो गोचीड होय. २ ( ल ) लोचट माणूस. [ गो+चिकटणें, सं. गो+कीट; प्रा. गोकीड ? ]

**गोचमाडणें**—अक्रि. ( माण ) भर येणें, गच्च भरणें ( पिकानें, फळानीं झाड ) [ गिर्चमिडणें ]

**गोचर**—वि. १ दृश्य; माहीत; प्रकट; प्रच्छन्न. ' पै जीवा भया बोधा । गोचर जो हा धांदा । ' –माज्ञा १५.२४६. २ मनानें किंवा इंद्रियानीं समजणारा; ज्या पदार्थांचें प्रत्यक्ष ज्ञान ज्या इंद्रियास होतें तो त्याला गोचर. जसें–दृष्टि–कर्ण–इंद्रिय–गोचर. –न ( ज्यो. ) जन्मराशीपासून द्वादशराशींच्या ठिकाणीं सूर्यादि ग्रहांचा वर्तमान संचार. [ सं. ]

**गोज**—पु ( गो. ) सरला; प्रकरण; व्यवहार; तंटा. [गूज]

**गोगोंज**—न. १ ( कों ) एक प्रकारचें कारल्याचें पंचामृत, तोंडीलावणें. २ ( व. ) उडदाच्या पिठाचें डांगर. [ का. गोज्जु ]

**गोजका-कुला**—गोचका, गोचकुला पहा.

**गोजडी**—स्त्री. ( गो. कु. ) गोधडी; कंथा.

**गोंज(जा)रणें**—सक्रि. १ गोंजारणें-गोंजारणें; अंगावरून हात प्रेमानें फिरविणें ( समजाविण्याकरितां, कमविण्याकरितां ); कुरवाळणें; समजूत पाडणें. २ ( माण. ) माया लावणें. म्ह० आपलें तें गोंजारणें लोकाचें तें लाजिरवाणें.

**गोज(जि)रा-रें, गोजिरवाणा**—वि. नाजूक आणि सुंदर; कुसुमर व लहान; सुरेख; देखणा. ' तुका म्हणे गोजिरीया । विठोबा ! पाया पडो या । ' –तुगा ५. [ का. गुजुरु=लहानगेपणा; धाकटेपणा ? ]

**गोज्जणें**—अक्रि. ( वै. ) झिरपणें; झिंतडणें ( पाणी इ० ).

**गोटें**—शअ. ( चि. ) जवळ. गोटा-टे-टेस पहा.

**गोट**—पु ( खा. ) जमीन नांगरतांना चुकून मध्यें राहिलेला न नांगरलेला तुकडा, भाग.

**गोट-ठ**—पु १ हातसर; बायकांच्या हातांतील गोल बांगडी; सलकड्यासारखा धातूचा एक दागिना. २ घेरा; वेढा. ( क्रि० घालणें; देणें) ३ सैन्याची छावणी, तळ, कंपू; तळाचा एक भाग. सामाशब्द- ०गणती–स्त्री. टापबंदी घोड्यांची मोजदाद; यांच्या उलट मोकळया किंवा एक एक घोडा चालू असतां गणती घेतात ती. ' गोट गणतिला तमाम जपले । ' –ऐपो २२०. ०गस्ते–पु. १ ( बडोदें ) लष्कराच्या गोटाची व्यवस्था ठेवणारा अंमलदार. २ राजवाड्यांत होणाऱ्या नित्यनैमित्तिक कामगिऱ्यांची सर्व व्यवस्था पाहणारा अधिकारी; दरबार, स्वाऱ्या इ० ची व्यवस्था ठेवणें याजकडेसच असतें. –ऐरापुप ८.४०६. **गोटांत घालणें**–मागें हटविणें; छावणीपर्यंत मागें रेटणें. ' त्यास शिकस्त करून बरें बजेन गोटांत घातला. ' –दमं २७३ [का. गोट्टु=मर्यादा, सीमा]

**गोट**—पु. १ (फाटू, झिजूं नये किंवा शोभा यावी म्हणून) वस्त्राच्या बाजूस घातलेली मुरड किंवा लावलेला काठ, किनार ( वस्त्राचा, जोड्याचा इ० ). [ का. गोट्टु=१ कोंवरा २ काठ; फीत; मुरड. तुल० हिं. गोट–टा=मुरड, फीत ]

**गोटगीळ**—वि. ( व. ) आपला अपराध कधींहि कबूल न करणारा.

**गोटमार-री**—पु १ (ना) गोटे-दगड-फेंक, वर्षाव २ (विनोदानें) इंग्रजी बोलणें -री-स्त्री (ना) एक खेळ यात गोट्याची फेंक व पळसाचा झेंडा सर करणें हे प्रकार असतात [गोट'+मारणें]

**गोटली गोटी आंबा**—स्त्रीपु ल्हान जातीचा आंबा [गोटी]

**गोटा**—पु १ गोलसर वाटोळा दगड २ वेटूळ (दगड लाख, लाकूड इ० चा) ३ (ल) कणसातील धान्याचा दाणा, डाळीचा दाणा 'पावसानें भाताचे गोटे झडले' ४ सुका नारळ पूर्ण वाळलेला व खडखड वाजणारा किंवा करवटीपासून सुटून सुटलेला नारळ ५ (व) वजनाचा दगड ६ निंदा-तिरस्कार वाचक प्रत्यय उदा० तेलगोटा, माळगोटा इ० [का गोट्ट= वाटा, कोय गोट्टु=वाळलेपणा ?] **गोटाड-ळ**-वि (व) दगडाळ खडकाळ (जमीन) **गोटाळें**-न (व) दगडी, ल्हान भांडे (तेलासाठीं) **गोटा मारणें**-(चांभारी) घोटणें

**गोटा-टे-टेस**—(चि) **गोटीं**-शअ (काव्य) जवळच समीप

**गोटा**—पु (हिं) कलाबतू चांदी-सोन्याची जर

**गोटा**—पु (व) भिलावा, बिब्बा

**गोटी**—स्त्री १ ल्हान गोटा, गोळी गोटा अर्थ १ २ पहा २ तालमींतील उचलण्याचा मोठा वाटोळा दगड ३ देवळातील कौलाचा दगड उचला पहा ४ (ल) मजबूत व बांधसूत गुटगुटीत शरीर ५ रुप्याचा गाळा (जर वितळवून केलेला) ६ वाटोळा व ल्हान आंबा ७ खराब झालेली चांदीची तार (ही आटवून चांदी काढतात) [गोटा, का गोट्टु ?]

**गोटु(टो)ळा**—वि १ गोल, गोलसर, गोट्याच्या आकाराचा २ (ल) मजबूत व भाडक्या अंगाचा, ठेंगणा व पिळदार (माणूस, पशु) [गोटा]

**गोटो**—पु (गो) शिजलेलें (भाताचें) शीत भातगोटा

**गोठ-ट-गोठगणती**—गोट गोट-गणती पहा

**गोठ**—स्त्री (खा) गोष्ट [स गोष्ठी प्रा गोट्ठी=वार्तालाप]

**गोठघोळणी**—स्त्री (सोनारी) गोठ (दागिना) तयार करण्याचें हत्यार

**गोठणें**—अक्रि दृढ किंवा घट्ट होणें, थिजणें, आटणें (जमीन चोपून शाई इ० वाळून दूध इ० उकळून पातळ पदार्थ थिजून) 'ज्याच्या भयें गोरस नित्य गोठे।'-सारुह १ ६१ २ गोळा होणें एकत्र होणें 'तों शिळा गोठल्या सत्रही।' -ह २५ १२३, [स गोष्ठ्=एकत्र येणें प्रा गोट्ठ]

**गोठला**—न (गो) एक फूल

**गोठवण**—स्त्री (बडोदें, गु) मांडणी, व्यवस्था गोठविणें-व्यवस्थित लावणें [गोठण]

**गोठळी**—स्त्री गुठळी पहा

**गोठी**—स्त्री १ (काव्य) गोष्ट, कथा 'गोठी साधति श्रीकृष्णाचिया। विरहिणीसी।'-शिशु २८५ २ कामकाज, कारभार, विषय, मुद्दा [स गोष्ठी, प्रा गोट्ठी]

**गोठुलें**—न गठोडें, गठळें, गठडी पहा

**गोठु(ठो)ळा**—वि गोटुळा पहा

**गोठु(ठो)ळी**—स्त्री १ डिखळ, गोळा, गोळी, गुठळी पहा २ साखरेच्या पाकातील तिळाचा हल्वा, तिळगूळ [गठुली]

**गोड**—पु (कासी) लगडी, पाय [प्रा दे हिं]

**गोड**—न १ षड्रसांतील मधुर रस २ (व खा) मीठ 'वरण अलोणी झालें गोडाशिवाय बरें लागत नाहीं' [तुल० स मिष्ट-मीठ] ३ (वैद्यक) पथ्याला अनुसरून मधुर किंवा साखरेनें युक्त असा पदार्थ 'त्या औषधास गोड वर्ज्य' -पु (गा कों) गुळ -वि १ मधुर (मावट, तिखट, खारट नव्हे असें), स्वादिष्ट २ सुवासिक ३ मंजुळ, सुंदर, सात्विक ४ मृदु ५ सौम्य ६ सुखकारक, संतोषदायक 'मनास गोड वाटत नाहीं' ७ नीटनेटकें, नियमित, योग्य चांगलें, शुद्ध (भ्रष्ट नसलेलें) जसें गोड-प्रयोग-उदाहरण-वाक्य-कवन इ० ८ (ताजा) चांगलें, सुरस, चवदार 'पाणी गोड आहे' ९ औरस (लग्नाच्या स्त्रीची) संतति हिच्या उलट कडू (दासीपुत्र-कन्या) १० शुभदायक मंगलकारक 'सत्वाचा गोड जाहला अंत।' -विक ८ [स गुड प्रा गोडु में पो जि -गुडलो, गोळास] (वाप्र) ०करून घेणें-कसेंहि असलें तरी गोडीनें, चांगल्या हतूनें स्वीकारणें, मान देणें, अव्हेर न करणें ०गोड गुळचट-अतिशय गोड दिलेंद घेतलें गोड-मिळून मिसळून वागणें चांगलें ०वणें, गोडावणें-अक्रि १ गोड करणें, होणें, खारट, मावट नाहींसें करणें (जमीन, पाणी, फळें इ०) २ मिठ्ठी बसणें (गोड पदार्थ खाल्ल्यानें जिभेस) ३ (काव्य) गोडी लागणें लुब्ध होणें, लालचावणें 'भक्तीचिया सुखा गोडावली।' ४ पाड लागणें पिकणें (फळ) म्ह० १ गोड करून खावें मऊ करून निजावें=अडचणींतहि सोय करून घ्यावी २ गळे नाहीं तव वर जड खाणें नाहीं तवंवर गोड=माहीत नसलेलें सर्वच चांगलें असतें सामासिक शब्द- ०उंडी-स्त्री एक झाड ०करांदा-पु खाण्याला गोड लागणारा करांदा, करांदा पहा ०गळा-पु १ (संगीत) गाण्याला मधुर आवाज २ मधुर गायन, गाणें ०घास पु १ जेवणाच्या शेवटीं खाण्यासाठीं ठेवलेला आवडत्या पदार्थांचा घांस २ सुग्रास, मिष्ट भोजन 'त्याचे एथें गोड घांस मिळता, तो टाकून तुमचेकडे कशाला येऊं?' ३

अप्रिय, दुःखद गोष्टीचा शेवट गोड करणारा मुद्दा, प्रकार ०घाशा-खाऊ-वि १ सदा गोड खाण्यास पाहिजे असा, गोड गोड खाण्याची आवड असलेला. २ चोखंदळ, मिजाजी ०जेवण-तोंड-न १ वधूपक्षानें वरपक्षास अथवा वरपक्षानें वधूपक्षास दिलेली मेजवानी २ मृत माणसाचें सुतक धरणाऱ्या नातेवाइकास आणि इष्टमित्रास, सुतकाच्या १४ व्या दिवशीं (सुतक फिटल्यावर) मुख्य सुतक धरणाऱ्यानें दिलेलें (विशेषतः गुळाच्या पक्वान्नाचें) जेवण ३ पक्वान्नाचें जेवण 'गोड जेवण केलें तर पाण्याचा शोष लागणारच' ०दोडकी-स्त्री (भाजी) घोसाळी, घोवक याची एक जात हिचीं फुलें पांढरीं असतात. ०धड-न नेहमींच्या पेक्षां थोडेसें गोडाचें चांगलें जेवण, पक्वान्न, मिष्टान्न 'उद्या सण आहे, तर कांहीं तरी गोडधड करा' ०निंब-पु (व) कढीनिंब ०बोल्या-वि मृदु, सौम्य भाषण करणारा, तोंडचा गोड, दुसऱ्याला आवडेल असेंच बोलणारा म्ह० गोड बोल्या साल सोल्या=बोलणारा मिठ्ठा परंतु मानकाप्या गोडरें-वि गोड, गोडवें 'बायका गोडरें प्रिय अत।' -गीता २ १७५ गोड लापशी-स्त्री दुधातील लापशी (ताकांतील नव्हे) ०वणी-स्त्री गोड पाणी 'हिंग पडताचि राजणीं। गोडवणी होय हिंगवणी।' -भारा बाल १० ३६ ०वा-गोडा-वि १ सापेक्षतेनें गोड, विद्यमान पदार्थांत-गोष्टींत अधिक, विशेष गोड २ (ल) कोरा, असडा, अपेट, अस्पष्ट, कोंवळा इ० ३ ताजें (पाणी, खारट नव्हे असें), क्षारयुक्त नसणारें, मधुर ४ बिन काटेरी, किड्यांना प्रिय (झाड, वनस्पती) ५ मऊ, नरम (लाकडाचा गाभ्याखेरीज बाहेरचा भाग) ६ बिन खारवट, क्षार, लोणा नसणारी (जमीन) ७ गोडें (तीळ, कारळे यांचें तेल याच्या उलट उंडी, करंज यांचें कडवें तेल) ८ सात्त्विक, सुस्वभावी, सौम्य (माणूस) ९ जिंत, जीवंत (मांस-मुरदाड, मृत नव्हे असें) १० सौम्य (खाणाऱ्या, उष्ण, तिखट, नव्हत असा सुरण इ० भाज्या) ११ मादक नसणारी (हरीक, खडसावळी इ० वनस्पतींतील प्रकार) १२ निर्विष (साप) १३ कोमल, नाजुक, रोगाला बळी पडणारें (शरीर, अवयव), १४ नदींतील, गोड्या पाण्यातील (मासा) १५ खारवणांतील नस लेलें, गोड्या जमीनींत तयार केलेलें (गोडें भात) १६ जिव्हा ळ्याचें, नाजूक, मर्माचें (अंग, गोडें अंग-जाग, वस्ती, अड इ०) १७ खारट नसलेला (दाणा-धान्यातील) १८ शुद्ध, नेक जात, भेसळ रक्ताचा नसलेला (मराठा माणूस), (कडव्याच्या उलट) गोडवा-पु स्तुति, प्रशंसा गोडवा(वे)गाणें-सांगणें-१ दुसऱ्याच्याबाबतीं आपण केलेल्या चांगल्या कृत्यांचा पाढा वाचणें, (उपकृत इसम हजर असतां विशेषत) दुसऱ्या वर केलेले उपकार किंवा अनुग्रह यांचा उच्चार करणें, आपलें एखाद्यावर प्रेम असून तो तें विसरला असता त्याच्यासमक्ष आपल्या मुखांतून निघणारे उद्गार 'जिष्णु म्हणे त्वद्‌चित्तें भज मिळतिल हे न गोडवे दासें।' -मोआदि ३६ ७४ २ एखा द्याच्या कृत्याची स्तुति करणें, प्रशंसा करणें, नावाजणें गोडवे-गाणें(सागणें नव्हे)-(औप) कुरकुर करणें, निंदा करणें गोडवी--गोडी-स्त्री मुख व तोंडास रुचि असल्यानें जेवण्या सबधींची इच्छा, रुचि, याच्या उलट वीट, कटाळा, तिरस्कार, गोडसें-न (गो) मिठाई गोडसर-सा-वि थोडेसें गोड, मधुर. 'जे आंगेंचि पदार्थ गोडसे।' -ज्ञा १७ १२६ ०सांद (ध)णें-न दुधांत, गव्हांच्या रसांत तयार केलेलें (ताकांतील नव्हे) सांदणें गोडसाण-स्त्री (गो) गोडी

गोंड—पुन १ दाण्यावरचें टोपण, कचोळें, तुरमणें (कांहीं वनस्पतींचें नागली वगैरेचें २ (माण) टोपणें वर असलेलें धान्य.

गोंड—स्त्रीन १ (कों) पाणद, गल्ली (गाव किंवा कुंपणां-तील) २ घोळ, खेंडकली, खिंड, अरुंद रस्ता, डोंगरातील गाय वाट किंवा जनावरांची पाऊलवाट [का गोंदी]

गोंड—न १ (राजा) मिऱ्यांचा घड, देंठासकट घड २ गोंडाळ शेवाळ्याप्रमाणें झुबकेदार वनस्पती (विहिरीच्या, तला-वाच्या पाण्यावरील) गोंडाळ पहा. [प्रा दे गोंडी=मंजरी, का गोंडे झुबका, गुच्छ] ०घळ-वण-न गोंडाळ पहा ०वेल-स्त्री (गाई) एक प्रकारची हरळी

गोंड—पु विंध्य पर्वतांतील एक अनार्य जात व तींतील व्यक्ति, याच्यात राजगोंड म्हणून एक उच्च जात आहे [दे प्रा गोंड=जंगल] ०वण-वन-न चांदा जिल्ह्याजवळील विंध्याद्री जवळचें गोंड लोक राहातात तें जंगल, हें वर्धा-नर्मदा-महानदी यांच्या तिआवात आहे

गोंड—पु गोठण, गोवड पहा

गोडगस्ता—पु पाटलाच्या हाताखालील एक गांवकामगार गावात काय काय गोष्टी होतात त्या तो पाटलाला सांगतो गोठगस्ते पहा

गोडगस्ती—पु जकातीकडील एक अमलदार.

गोंडण—न धान्यावरचें टोपण गोंड पहा

गोंडवी-डांवी—स्त्री १ भिंताडातील वी (ही शेत्यावर देतात) २ काजूतील बी

गोडली—स्त्री जनावरांच्या नळीस होणारा रोग.

गोंडस—वि १ हत्तीच्या सोंडेप्रमाणें मांसल व निमुळतें २ सुंदर, सुरेख, मोहक गोंड्यासारखें [प्रा गोंडी=मंजरी, का गोंडे]

गोडसाण—वि (गो) सुबक, सुरेख (केस)

गोडा—वि 'गोडवा' पहा ०एरंड-पु सुरती एरंड याचे उलट मोगली एरंड गोडांबा-आंब्याची एक जात, याचा फळें

फार येतात व तीं मधुर असतात **गोडवर्णे**–गोडमध्यें पहा **गोडविणें**–सक्रि समुद्राजवळची खारी जमीन चिकण माती टाकून लागवडीस योग्य करणें, क्षार काढून टाकणें

**गोंडा**—पु. १ गुच्छाप्रमाणें फूल, घुमका, तुरा ( शेंडू इ० फुलांचा ) २ पद, पुजका, गोळा ३ गेंद, झेला, घुमका, गूल, फुगा ( पालखी, जनावराची शेंपटी इ० चा गुच्छसदृश असणारा ) ४ ( कों ) रोंडूचें फूल, मखमल ५ गुडा पहा ६ वेणींतील एक अलंकार 'वेणीस जीचे विलसेत गोंडे ।' –सारुह २.३७ [का गोंडे प्रा गोंडी=मंजरी] (वाप्र) **०घोळणें**–कांहीं मिळेल या आशेनें पुढें पुढें नाचणें, शेंपूट हलविणें, खुशामत करणें, धुकी सेलणें **०फुटणें**–( गुळाला, रसाला )–कढणाऱ्या रसावर साय येणें **०फोडणें**–१ (सूर्य) पुरापुरा उगवणें, वर येणें 'सूर्यानें गोंडा फोडला नाहीं तों दारीं येऊन बसला' २ ठळकपणें प्रख्यात होणें, पुढें येणें ( माणूस, बहुधा वाईट अर्थानें ) **०काढणें**–( व ) फसविणें, घात करणें **०लावणें**–(चांभारी)जोडयाच्या शेंगेस रेशमाचा गोंडा लावणें **०हालणें–झुलणें**–( को. ) सतत काम चालू ठेवणें ( उत्तेजनासाठीं किंवा चेष्टेनें म्हणतात )

**गोंडाचं घचप**—( गो ) फुकटयावारीं जाणें

**गोडावी**—स्त्री भिलाव्याची बी, गोडंबी

**गोंडाळ**—न गोंद पहा १ झुबकेदार गवत म्ह० गवत गोंडाळ, शेत धोंडाळ बायको तोंडाळ २ ( कों स्त्री ) तळें, विहीर इ० च्या पाण्यावर शेवाळासारखी पसरणारी, पाणी शुद्ध राखणारी व झुबकेदार वनस्पति, गोंडाळी 'गोंडाळ सांडून नीर घेइजे ।'–दा ६ ५ १२ –वि. १ भरदार, भरगच्च, ठेंचून भरलेलें(कणीस) २ गोंडाळशेवाळानें आच्छादलेली (विहीर इ०) ३ गोंडस 'दह पाहुन गोंडाळ हस्ती गडस्थळीं धुळ घालून बसले।' –प्रला १३३ [गोंडा]

**गो(गों)डाळी**—स्त्री गोंडाळ गवत 'कडवेळु, मारवेळु गोंडाळी।'–गीता २ ५२ ८६

**गोडिरा–सा**—वि गोड, गोडसर 'कीं सेविता चराचरां। माझा स्वामि गोडिरा।'–ऋ ७४ 'निर्गुणा उपजवी। गुण गोडिसे।'–ऋ ७७ [गोड]

**गोडिळणें–गोडुळणें**—अक्रि (राजा) गोड, पक्व होणें ( फळें, फणस, केळी ) [ गोड ]

**गोडी**—स्त्री १ गोडपणा, मिष्टता, सुवासिकपणा, मधुरता गोड(–वि )पहा २ चव, रुची, अरुचीच्या उलट 'तापानें तोंडाची गोडी गेली' ३ नामीपणा, रुचकरपणा ( पक्वान्नाचा ) ४ सौम्यता, मृदुता, मधुरता ( भाषणाची ) ५ चटक, लज्जत, आवड 'नीच दास्यत्वाची गोडी।'–दा २ ७ ३० ६ सख्यभाव, मैत्री ७ (गो.) फेफ नसलेली (दारु) [स. गुड](वाप्र.) **गोडीस चढणें**–गाड होत जाणें, पिकणें **गोडीस पडणें**–मानवणें, पचनीं पडणें (औषध, काम) **गोडीस येणें**–१ पुन्हा सख्य, मैत्री होणें २ चटक लागणें, शौकी बनणें सामाशब्द– **०गुलाबी**–स्त्री १ मैत्री, रहस्य, भलेपणा 'त्याची आमची गोडीगुलाबी आहे म्हणून एकमेकांचे घरीं येतों जातों' २ मौज, आनंद, खेळीमेळी ३ सामोपचार, मनमिळाऊपणा. **गोडीळ, गोडूस, गोडूळ**–वि १ गोडसर २ गदरलेलें (फळ)

**गोंडी**—स्त्री जोंधळा, बाजरी यांच्या दाण्यावरील टोपण गोंड पहा

**गोंडी**—स्त्री १ ( कों ) पाणंद, गल्ली २ मोठ्या रस्त्याला फुटलेला आडरस्ता, आडवाट ३ गोवंडी, गायरस्ता गोंड पहा [ का ]

**गोंडी**—वि गोंडा असलेलें(फूल, झाड) समासात– 'गोंडी–तगर–मखमल–जास्वंदी' [गोंडा का गोंडे] **०कुड्री–ली–कुवली**–स्त्री साधी कुड्री ( खाजकुईरीच्या उलट )

**गोंडु**—न भोंक –पदलापूर १३३

**गोडें**—न गोड कालवण, गुळवणी ( गूळ, नारळ, दूध यांचें ) [गुड] (वाप्र) **०करणें**–(वे ) रान काढणें सामाशब्द– **०अळू**–न अळवाची गोडी जात **०काष्ठ**–न (गा ) ज्येष्ठमध **०वृंदावन**–न या नावाची गोडया जातीची वनस्पति कडू (हिच्या उलट कडू वृंदावन)

**गोंडें**—न ( राजा ) झाडाच्या खोडाच्या गाभ्यावरचा कोंवळा भाग, नार सोडून इतर भाग

**गोंडेरा–री गोंडेर**—वि गोंडेदार, झुबकेदार ( फूल–जास्वंद मखमल, तगर इ० चें ) [ गोंडा ]

**गोड्डु**—वि ( क ) वांझ 'ती बाई गोड्डु आहे' [ का गोड्डु ]

**गोड्या**—पु ( कों ) धान्यांतून दारू काढून घेतल्यानंतर राहिलेला चोथा [ का गोड्डु=नीरस, शुष्क वस्तु ]

**गोड्या**—वि १ गोडघाशा, गोडखाऊ २ पक्वान्नाचा शोकी, मिष्टान्नप्रिय [ गोड ]

**गोड्यादेवी**—स्त्रीअव बळी न घेणाऱ्या देवी, ज्यांना बळी, हत्या लागत नाहीं अशी ब्राह्मणी देवता –पदलापूर २२२

**गोण**—स्त्री १ पोतें, कोथळा थैला गोणी (गोणपाटाची केलेली, दाणे साठविण्याची) २ (ल ) ओझें संकट भार (काम, काळजी याचा ) [स का गोणी हिं गोण, तुल० प्रा दे गोणपी=बैल] म्ह० गाढवाचे गोणीस खडीची गूड **गोणता**–पु गोणताटाचा किंवा ताडाच्या पात्याचा विणलेला बैलावर लादण्याचा गोण, पोतें **०ताट**–न १ तागाचें, गोणाचें कापड,

गोणपट, तरट. २ गोणी पहा 'घरीं गोणताटें मुठ होतें । तें विकिलें त्वरित वाणियासी ' **गोणती**–स्त्री ( राजा ) गोणताटाची ल्हान पिशवी **गोणतें-टें**–न (खा व ) गोण, पोतें, वाटवें **गोणपट-पाट**–पुन तरट गोणताट पहा [का गोणी+स. पट]

**गोणा**—पु १ मोठा गोण, गोणी, मोठा थैला, पिशवी, पोतें २ रस्त्यावरील वाळू, गाळ इ० नेण्यासाठीं केलेलें ओबड धोबड विणीचें तरट ३ बांबूची किंवा वाळुंजीची विरळ विण० केलेली पाटी ( कावडींत, बहंगींत नेण्यासाठीं ) ४ गाढवावरची गोण ( दगड, विटा, कौलें, माती इ० नेण्याची ) ५ ( ना ) तलव, जाड पण पीळ नसणाऱ्या सुताचें दणकट जाजम, सुताडा [ स का गोणी ]

**गोणी**—स्त्री १ तरट, गोणपाट २ पोतें, गोण, कठाळी 'रचोनी गोण्या कनकपट सकळीं।' –नव २१६. ३ ( ल ) भार, ओझें, संकट गोण अर्थ २ पहा [स का गोणी, प्रा दे गोण=बैल तुल० महाभाष्यात–गावि, गाणि हे तद्धित शब्द येतात ] ( वाप्र ) ०**गळ्यांत-मानेवर येणें, पडणें**–गळा पहा ०**दंडावर-मनगटावर देणें**–एखाद्याच्या इच्छेविरुद्ध त्याचेवर भार, संकट, जिकीर, काम इ० लादणें, भार घालणें, अवघड काम सांगणें ' मी धर्मस्थापनेसाठीं युगायुगाचे ठिकाणीं संभवत असतों अशा प्रकारचें विधान केलेंस, त्या वेळेस तें करण्याविषयीं तुझ्या दंडावर कोणी गोणी दिली होती '–गाल ०**पाठीवर घालणें**–एखाद्यावर ओझें, काम बळेंच लादणें ०**मणगटावर येणें-पडणें**–जिकीरीचें काम इ० एखाद्याच्या अंगावर येणें,पडणें सामाशब्द– ०**लाट**–(कुस्ती) लंगोट खोंवतात त्या ठिकाणीं चड्डी धरून जोडीदारास थोडा मागें गोता (झटका) देऊन जोडीदाराच्या मागें आपण ओणवें बसून आपल्या खांद्या वरून जोडीदारास ढकलण्याचा पेंच ( गोणी बैलाच्या पाठी वरून खालीं पाडताना एका बाजूची गोणी थोडीशी वर उचलतात म्हणजे तिच्या ओझ्यानें दुसरी बाजू खालीं येते याप्रमाणें पेंच ) [ गोणी+लोटणें ]

**गात, गोतगंगा-गोतपत-पात-गोतवळ-वळा**—नस्त्रीपु १ भांडण, बहिष्कार इ० च्या चौकशीसाठीं जमलेली जातीची सभा, पंचायत, जातीचें कोर्ट, निवाडाकचेरी २ ( सामुदायिक ) एकत्रित झालेली जात, सबंध जात, गोत्रज ३ ( सामुदायिक ) नातेवाईक मंडळी, सगेसोयेर, भाऊबंद 'सांडून सर्वेंहि गात।'–दा २१९ ४ नातें ५ आळुनेबळुते ६ ( पेशवाईंतील ) धार्मिक किंवा सामाजिक अपराधाच्या चौकशी सारीं किंवा दत्तक, वांटणी, वतन इ० चा निर्णय देण्यासाठीं भरणारी गांवांतील सरकारी कामगार, वतनी अधिकारी, अलुते बलुते व प्रतिष्ठित माणसें यांची न्यायनिवाडा करण्याची सभा, हिनें दिलेला निवाडा सरकारहि सहसा फिरवीत नसे [ स गोत्र ] ( वाप्र ) ०**मिळणें**–१ एकत्र जुळणें, जमणें २ मिळ० ळणें, संयोग, एकजीव होणें ' ताकाचें व तेलकट भाजीचें गोत मिळत नाहीं ' ३ एकमत होणें, जुळणें ( मुद्दे, गोष्टी ) ४ सख्य होणें ५ पूर्वापर गोष्टींचा संबंध जुळणें म्ह० कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ=स्वकीयाशीं फितूर होणारा माणूस सामाशब्द– ०**घोडा**–पु १ अगम्यगमन करणारा माणूस २ अशिक्षित, अक्षर शत्रु असें मोठें मूल, पोळ, म्हशा ३ कुटुंबातील शुभ, ढ माणूस ०**पत-पात, गोताई**–स्त्री १ जातिबहिष्कृत, गुन्हेगारास शुद्ध करून पुन्हा जातींत घेण्याच्या वेळचा संस्कार, प्रायश्चित्तांचें जातजेवण २ जातसभा (मराठ्यांत), पतितास आपल्या पक्तीस घेऊन जात त्याला पावन करते तो विधि ०**पत्र**–न वंशावळ ०**पुड्या**–स्त्रीअव (खा ) देवप्रतिष्ठा 'गोतपुड्या वाधून टाक'= देवप्रतिष्ठा वसव ०**महजर**–पु गोतसभेनें दिलेलें निकालपत्र, निकाल, थळपत्र **गोताई**–स्त्री १ गोतसभा, ग्रामसभा २ गोत पत अर्थ १ पहा **गोतावळ-ळें, गोतावळा, गोतोळा**– गोत, गोतसभा, गोतगंगा [स गोत्र+आवलि म गोत+ओळ]

**गोतर**—पु गव्हाच्या काडाचा भुस्सा –कृपि २५८

**गोतरचाटा**—पु ( कु ) नवरीनें नवऱ्याच्या गोतांतील मंडळीबरोर केलेला अल्पाहार (हा वरात निघण्यापूर्वी नवरीच्या घरीं होतो) [ गोत्र+चाटणें ]

**गोतरणी**—पु स्त्री ( कातकरी ) गोतसभेची आमंत्रणें कर० णारा –बदलापूर १२४ गोतारणा पहा

**गोता, गोत**—पु स्त्री १ आचका, गचका, हिसका, झोंका (पतग, वावडी यास दिलेला) ( क्रि० खाणें, मारणें, देणें ) २ बुचकुळी, बुडी (पक्ष्यानें मारलेली) ३ (ल ) संकट, विघ्न, पेंच, ४ तोटा, धक्का, गचका, तोट्याची बाब (क्रि० खाणें, बसणें) ५ थाप, फसवणूक, ठकवण (क्रि० देणें) ६ व्यर्थ एरझार, हेलपाटा, हिसका ( क्रि० खाणें, बसणें ) [ अर घोता ] ( वाप्र ) ०**खाणें**–तोटा, नुकसान, पराभव, निराशा, दंड, इजा इ० प्रसंग ओढवणें, प्राप्त होणें, अपेश येणें, बुडणें, फसणें म्ह० (गु ) जेतु काम तेने थाय बिजा करे सो गोता खाय ' ०**बसणें**–नुकसान येणें **गोत्यांत येणें**–संकटात सापडणें, अडकणें–**त्यात आणणें**–संकटात किंवा निष्कारण खर्चांत आणणें, घालणें

**गोतापा**—पु ( क ) गोता, गुतावा

**गोतांबील**—स्त्री १ शरीरसंबंध न होणाऱ्या जातींतील परस्पर शरीरसंबंध झाल्यानें होणारा वर्णसंकर, सबगोलंकार जातीजातींची सरमिसळ २ सर्वांनीं एका पात्रांत जेवणें ' का सर्वें बैसोनि नारी । गोतांबील करी।'–ज्ञा १७१३० ३ ( ल ) पंचमेळ, खिचडी, सरमिसळ, गोंधळ [ गोत+आंबील ]

**गोतारणा**—पु १ (आगरी) गात जमविण्याचा हक्क असणारा इसम –बदलापूर ३३ २ ठाकरातला प्रमुख –बदलापूर १४५ गोतरणी पहा.

**गोती**—स्त्री गोता पहा –वि (राजा) नात्याचे, गोता संबंधीं [गोत]

**गोतीशेरॉ, घोटीशॅरॉ**—पु (गो) सहस्रमुळी (एक वनस्पति)

**गोत्र**—न १ कुटुंब, जात, वंश २ वंश–कुलस्थापक, वंशाचा मूळ ऋषि (अत्रि, कौंडिण्य इ०) ३ गोतावळा, नातेवाईक 'माझें गोत्र अलीकडे भारी वाढलें' गोत पहा (समासात) गोत्र वध–हत्या–संबंध–विचार–घटित [स] (वाप्र) ०उतरणें–जमणें येणें–लग्न जुळविण्याच्या वेळीं परस्पर घराण्यातील गोत्राचा मेळ बसणें, संबंधास अनुकूल असणें ०मिळणें–१ जुळणें, जुडणें २ मिसळणें **गोत्री लागणें**–दत्तकानें एखाद्या कुटुंबात जाणें २ (ल) एखाद्याच्या नादीं लागणें, चटावणें ३ कक्षेत, आटोक्यात येणें (व्यवहार) सामाशब्द–**कुठार–कुदळ**–पु १अगम्यागमनी, स्वगोत्रज स्त्रीशीं गमन करणारा गोतघोडा अर्थ १ पहा २ गोताचा काळ **गोत्रज, गोत्री**–वि संबंध असलेला, नात्याचा 'हे येर येर आघवे। गोत्रज आमुचे'। –ज्ञा१ २०७ ०पुरुष–बंधु–पु गोत्रात उत्पन्न झालेला मनुष्य स्वत चे गोत्रातला पण पिढ्या तुटलेला दायाद (कायद्यात हे शब्द एकाच सामान्य गोत्राच्या दायादास ल वितात, याच्या उलट बंधु) ०हत्या स्त्री १ गोत्रजाचा वध २ (विनोदानें) आपल्याच भिडूची सोंगटी मारणें **गोत्रैक्य**–न समानगोत्र याच्या उलट प्रवरैक्य (लग्नाच्या वेळीं विचारात घेतात) [स गोत्र]

**गोथवड**—स्त्री (कों) चाळीसारखा गोठा दावण, ठाण, कोटवा [स गो]

**गोट–दी**—स्त्री १ खाडीचें पाणी आत येईल अशा बेताची गलबतें बांधण्याची जागा ही चारी बाजूंनीं बंद असते व उघडझाप करता येईल असें हिला समुद्राच्याकडे दार असतें २ सांठवण, वखार ३ धक्का [हिं गोद=मांडी, वक्ष स्थल, फा गोदी]

**गोंद–ध**—पु १ चीक, डिंक, हा बाभळ, खैर इ० झाडाच्या चिकापासुन निघतो अरबीगोंद हा सर्वांत चांगला असतो रंग, चिटें छापणें, चित्रें इ० कामीं हा उपयोगी आहे याचे लाडू फार पौष्टिक असतात २ सरस, चिकट पदार्थ [हिं] ०दाणी–नी–स्त्री गोंद ठेवण्याचें पात्र, डिंकदाणी, डिंकपात्र ०शर्करा–(रसा शाप) डिंकापासुन होणारी साखर (इ) अर्बिनोस **गोंदाम्ल**–न डिंकापासून होणारें अम्ल (इं) अरेबिक ॲसिड

**गोदई**—स्त्री (व) गर्भाधानसमयीं मुलीस माहेराकडून पलंग, बिछाना, विड्याचें तबक इ० मिळणारें सामान, गर्भाधानाचें साहित्य

**गोदड**—वि खरबरीत, राठ पुळ्या आलेली (कातडी, पित्तातिशयामुळें होणारी)

**गोद(ध)ड, गोंदड**—पु गोसाव्यांच्या १८ पथांपैकीं एक पंथ, हे गोधडी पांघरतात अखाडा पहा ०शाई–वि १ गोदड पंथी २ ठिगळाचा, तुकड्याचा, गोधडीसारखा (कापड) ३ अव्यवस्थित, भोंगळसुनी (काम कारखाना) **गोदडी–ड्या, गोदड पंथी–बावा**–वि गोदड गोसाव्यासंबंधीं–सारखा, गोदडशाई

**गोद(ध)डी**—स्त्री १ थोडासा कापूस आत असलेली व अनेक कापडाचे तुकडे एकत्र शिवलेली पासोडी, वाकळ, रजई २ (ल) फाटलेलें, ठिगळ दिलेलें वस्त्र, चोथरी ३ गोंवर, घामोळें इ० नें भरलेलें अंग [हिं गूदड–डी] ०आंबा–पु ज्याची साल गोदडीसारखी जाड असते असा आंबा ०निंबू–लिंबू–न चकोत्र्याप्रमाणें असणारें (ज ड सालीचें) एक जातीचें लिंबू

**गोदडें**—न (निंदार्थी) गोदडी

**गोदण**—स्त्री (व.) गवाणी (गुरांपुढें वैरण टाकण्याची) [स गवादनी]

**गोंदण–न णी, गोधण–णी**—स्त्री १ एक मोठें रानटी झाड यास भोंकरासारखीं बारीक लाल फळें येतात २ त्याचें फळ

**गोंदणें**—उक्रि काटा, सुई यानीं टोंचुन वर पानें चोळून कातड्यावर आकृती काढणें, अंगावर नक्षी काढणें (वायव्यात रूढ) –न टोंचून घेणें पूर्वी अपराध्यांना गोंदण्याची एक शिक्षा दिली जात **गोंदण–लें** न गोंदलेलें चिन्ह 'गालीं गोंदण नवें। नैशी वासनी सजली जाणा।' –वत्सुभंग ७१ **गोंदवण**–न गोंदण्याचें साहित्य व साधनें

**गोदंती हरताळ**—पु हरिताल, हरताळ पहा

**गोंदविडा**—पु नागवेलीच्या पानाचा एक विशिष्ट आकाराचा विडा गोविंदविडा पहा

**गोदवेल**—स्त्री भाताची एक जात

**गोंदळा**—पु समुदाय –मनको [गोंधळ]

**गोंदळी**—पु १ पिशाच 'का साधूतें गोंदळी। सचरानिसुये मेळीं।' –ज्ञा १३ १००९

**गोदा**—पु १ खिळा इ० नें तापवून दिलेला वाटोळा डाग २ गादी, लेप यांच्यातून आरपार नेलेल्या दोऱ्याच्या गांठींचा (टाक्याचा) वरचा भाग, डोकें

**गोदा**—स्त्री गोदावरी, नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वरीं उगम पावणारी नदी, वृद्ध गंगा हिला गंगा गौतमी म्हणतात

**गोदी**—स्त्री गोद पहा

**गोद्री, गोदरी**—स्त्री १ (व) गुराडी, गावाजवळची ढोराची जागा. २ (व देऊळगांव) गुजरी, मंडई [गोदरह?]

**गोंध**—स्त्री १ (राजा) गुलबळ २ (ल) गोंधळाचें, जिकीरीचें काम, भानगड

**गोधड-डी-गोधडीआया-गोधडें**—गोदड पहा

**गोधट-टी**—स्त्री (वाई) एक वनस्पति

**गोधण-णी**—स्त्री एक झाड गोंदण-णी पहा

**गोधणें**—अक्रि गुतणें, गुताडा होणें, गोंधरणें, गोंधवणें पहा. [का गोंदण]

**गोधणें**—गोंदणें पहा

**गोंधता**—पु (व) पळसाच्या फुलांचा रंग 'गोंधता केशरी असतो'

**गोंधरणें-गोंधवणें**—अक्रि १ गुतलें जाणें २ अव्यवस्थित होणें, गैरविल्हे ए लागणें (पोथ्यांचीं पानें इ०) 'पोथी गोंधरली आहे ती लावितों' ३ गुरफटणें, घाबरणें, गोंधळणें —सक्रि गुतविणें अडकविणें

**गोंधलें**—गोंदलें पहा

**गोंधवण**—स्त्री १ गुतागुत, गोंदरण २ गुतागुतीचा गोळा, गुतागुत, गुताडा ३ गुतलेली स्थिति

**गोंधळ**—पु १ अव्यवस्था, अस्ताव्यस्तपणा, घालमेल (वस्तु काम, हिशेब यांत) २ अंदाधुंदी, घोटाळा, दगदग, त्रास ३ धांदल, गडबड तारांबळ 'कां उपभोगाचे गोंधळ।' —दा २ ५ २९ ४ धांवाधांव, धांवपळ, धामधूम ५ देवीच्या कुलधर्मांत देवीप्रीत्यर्थ गोंधळी लोकांकडून करावयाचें गाणें, नाचणें, कीर्तन देवीचें भजन, स्तुति 'वेदवाचा वरदायिनी। गोंधळ गाती इयेचा।' —मुआदि ४ १२८ ६ गडबडीचा, आरडाओरडीचा प्रकार, कोलाहल, धुडगूस (क्रि० घालणें) [स गुध्=खेळणें? स गुदल=एका वाद्याचा आवाज, तुल० का गोंदल] (वाप्र) ०घालणें-१ (गोंधळाप्रमाणें) अव्यवस्थितपणें वागणें, वाटेल तसें वागणें 'खर्चापुरतें दिलें असतें फेकून असें म्हटलें असतें घाला गोंधळ' —रंगराव २ धुडगूस घालणें, गडबड करणें **गोंधळणें-ळविणें**—उक्रि अव्यवस्था, घालमेल करणें, घोळ घालणें, एकत्र करणें, मिसळणें —अक्रि १ गैरविल्हे लागणें (वस्तु) 'पोथी गोंधळली ती नीट लावतों' २ भोंवडणें भ्रमणें, भोंवरा होणें (वारा पाणी यांचा संकुचित जागेंत) ३ चोहोंकडे झटक्यानें फेंकलें, गुरफटलें जाणें (गवत धूळ) ४ घाबरणें त्रेधा उडणें, भांबावणें, घोंटाळ्यांत पडणें म्ह० गाढवांचा गोंधळ, लाथांचा सुकाळ सामाशब्द— **गोंधळ लग्न**—न गोधूल लग्न पहा **गोंधळी**—पु १ देवीचा गोंधळ घालणारी जात व व्यक्ति. हे गातात, नाचतात व चोंडकाडें वाजविते वाजवितात २ भिक्षेकऱ्यांची एक जात [गोंधळ, का गोंदलिग]

**गोंधळीक-ळूक**—वि (चि गा) गोधूलिक, गोरज (मुहूर्त) —न धांतवेळ, सायंकाळ 'मग वैराग्याची गोंधळुक। ने ज्ञानाभ्यासाचें चांदणें।' —ज्ञा १८ १०८५ [स गोधूलिक]

**गोंधळ्या**—वि १ घालमेल्या, धांदल्या, अव्यवस्थित (माणूस) २ धांदरट, गफलती, गोंधळलेला

**गोधा**—स्त्री घोरपड [स] **गोधांगुली-ळी, गोधा**—स्त्री. (काव्य) धनुर्धाऱ्याचें अंगुस्त्राण, हें घोरपडीच्या चामड्याचें असून धनुष्याच्या दोरीपासून इजा होऊं नये म्हणून हें डाव्या हाताला गुंडाळलेलें असतें 'जरासंध पादें हस्त विलोकून। तों देख गोधांगुळीचिन्ह।' —ह ३३ ७५ [स]

**गोधागोध**—स्त्री गुतागुत, गुताडा [गोंधणें]

**गोधूम**—पु गहूं [स]

**गोनचवळी**—स्त्री (व) लांब शेंगा येणारी चवळी, शेंग चवळी

**गोना-न्हे**—पु (चादा) गोणपाट, दरट गोण-णा पहा

**गोनें**—क्रि (गा) दुखण्यानें विपडें रक गोंत पहा

**गोप**—स्त्री एक प्रकारचें गवत नागरमोथा, गोपुर

**गोप, गोपचार, गोपद गोपद्म, गोपाल-ळ गोपाष्टमी, गोपाळकाला, गोपाळखेळ, गोपाळीं**—'गो' (गाय) शब्दामध्यें पहा

**गोप(पी)चंदन**—न १ द्वारकेकडील, गंधासारखी अंगास लावावयाची पांढरी माती गोपमाती, याचे गंधांत मुद्रा बुडवून टिळे लावतात २ सर्वस्वीं नाश बेचिराखी राखरांगोळी (देशाची) [स]

**गोप**—गोफ पहा [हिं]

**गोपन**—न १ लपविणें, छपविणें २ राखणें, ठेवणें, रक्षणें, संरक्षण संगोपन शब्द रूढ आहे [स गुप्=गुप्त ठेवणें] ०नीय-वि छपविण्यास, रक्षण्यास योग्य [स]

**गोपरू**—पु एक प्रकारची बागडी

**गोपा**—पु (लहान्या मुलास लडिवाळपणें म्हणतात) तान्हें मूल (गोप=श्रीकृष्ण यावरून) २ गर्भाधानाचे दिवशीं जिचा गर्भाधानसंस्कार असतो त्या स्त्रीच्या हातांत मुलाप्रमाणें कुंची वगैरे घालून द्यावयाचा नारळ किंवा कपड्याचा गुंडाळा ३ लग्नांत नवरानवरीच्या अंगावर किंवा इतर प्रसंगीं पाहुण्यांच्या अथवा जमलेल्या मंडळीच्या अंगावर मुलाचें मूत म्हणून ज्यातील रंग शिंपडतात तो वस्त्राचा गोळा, बदका (क्रि० मुतवणें) ४ मुलाचें नांव ठेवतांना पाळण्याच्या खालूनवरून कुंची घातलेला नारळ बायका एकमेकींच्या हातीं देतात तो. —बदलापुर

२१२.५ स्वर्गाचे स्वर्गाला राख्खा, हालचाल करतां न येणारें मूल, गोळागोळा [ सं. ]

गोपानशी-सी—स्त्री. छपराच्या भागास जी येणारा मुदरेचा टाव्ट, छपराचा बाजा, छप्पर 'गोपानशीला भगवीत मोती।' –सादह ५.२० [सं. गोपानसी]

गोपायिता—वि रक्षक, रक्षण करणारा [ सं ]

गोपिका, गोपी, गोप्रदान, गोप्रसव-शांति—'गो' (गाय) शब्दामध्ये पहा.

गोपित—वि गुपित १ गुप्त, झांकलेलें २ राखलेलें, रक्षण केलेलें [ सं –गुप ]

गोपिपी—पु एक लहान काळा पक्षी

गोपुच्छ(यति) स्त्री (ताल) गायनांतील विलंबित, मध्य मध्य व अनी द्रुत अशी ल्यीची गति असणें [ सं ]

गोपुर—पु न गांवच्या वेशीवरील, देवळाच्या प्राकारावरील, राजवाड्याच्या महाद्वारावरील, मजलेदार, नक्षीदार किंवा मूर्ती वगैरे काढलेली इमारत ही द्राविडी शिल्पपद्धति दक्षिण हिंदुस्थानांत रूढ आहे 'एक घडवी मंदिरा गोपुरीं'। –एरुस्त ६ १७ २ अशी वर इमारत असलेलें महाद्वार, वेस इ० ३ (सामा) महाद्वार, वेस, फाटक ४ घरांत भिंतीवर चित्र काढतात तो नक्षी ५ (क) गोपुराकार विशिष्ट रचना [सं]

गोपुर—पु नागरभाषा गवत

गोप्य—वि १ गोपनीय, लपविण्यास, छपविण्यास योग्य, अवश्य किंवा शक्य असा आयुष्य, द्रव्य, गृहच्छिद्र, मंत्र, मैथुन, भेषज, दान, मान, अपमान इ० नऊ बाबी आहेत २ गुप्त 'तुका म्हणे माझ्या वडिलांचें ठेवणें। गोप्य नारायणें न करावें।' –तुगा १२९८ –न एक प्रकारचें गहाण तांब्याची भांडीं इत्यादि सांसारिक वस्तू या गहाणावर वापरल्यास व्याज मिळत नाहीं –याज्ञवल्क्यस्मृति, व्यवहाराध्याय ५९ [ सं ]

गोफ—पु १ गळ्यांत किंवा कमरेस घालावयाचा एक दागिना (सोनें, चांदी, पक्कीव रेशीम यांचा) २ विणलेला चाबूक, दोरी, पट, चांगला वळीव जाड दोरा ३ कमरेचा करगोटा ४ एक खेळ, निरनिराळे दोरीचे पदर घेऊन अनेकजण टिपऱ्या खेळत त्याचा गोफ विणतात तो, पौराणिक नाटकांतून कृष्णलीलेंत असे गोफ गोप-गोपी रंगभूमीवर विणीत 'गोपालकृष्णा आला आपण गोफ खेळू' –रासक्रीडा २१ [सं गुंफ]

गोफ(फी)ण गोफणें—स्त्रीन दगड मारण्यासाठीं दोरीची, चामड्याची, रबराची केलेली विशेष प्रकारची आकृति साधन, दगड फेंकण्याचें साधन, एक हत्यार 'हातीं घेवोनि गोफणा।' –कथा ६ १९ ५३ [सं गुंफन, प्रा गुंफण] ०गुंडा-गोटा-पु १ गोफणींतून मारावयाचा दगड २ (ल) हुषार, चुणचुणीत माणूस गोफणणें-सक्रि गोफणीनें फेंकणें, मारणें, गोफण मारणें. 'एके चिंतामणि गोफणिला। तो येऊन अंगणांत पडिला।' –ह ४ २१.

गोंफा—पु १ घोटा (पायाचा) २ गोंफा, घुबडा (बगीचा) [सं गुल्फ]

गोंफा(फ)टणें—सक्रि १ गुरफटणें, धरणें, पकडणें, गुंडाळणें, ओढून घेणें (आपल्यांत) २ पेचांत घालणें, गोंधळविणें 'भवाच्या मिळोनि गोळणी। गोफाटली नराणी।' –ह ७ १५९ ३ गुल-विणें, चढविणें, फशीं पाडणें ४ (ल) वेठ धरणें, गडबडगुंडा करणें, कसें तरी, अनुरतेनसी करणें (लोकांच्या साधुपीनें, पैशानें) ५ भागविणें, निवड करणें 'पांचशें रुपयांचें काम सरें परंतु पैशाचे अडचणीमुळें सरासरी हजार रुपयांत गोफाटून घेतलें' ६ वश्यें, वेढणें –अक्रि १ श्वास कोंडणें, दम छाटणें, गुदमरणें २ गुंतमळणें

गोफाटणें—सक्रि झुगारणें, गोफणणें पहा

गोफाणा—पु बंध, पेच, अडचण, घोटाळा, पचाईत (फक्त सप्तमी विभक्तींत प्रयोग) (क्रि० पाडणें, सांपडणें, पडणें) –ण्यांत पडणें-घालणें–अडचणींत, पेचांत सांपडणें, सांपड-विणें [सं गुफ, गोफ?]

गोफ्त-गो—स्त्री संभाषण, बोलाचाली 'त्याउपर बहुत गोफ्त-गो जाली' –रा २० ३८ [फा गुफ्त्-गो]

गोंब-बी—स्त्री गोम, घोण गोम पहा

गोंबटी-टें—गोमटी-टें पहा

गोयड—न १ गुरांच्या शेणामुताचा राडा गोबर पहा. २ भ्रमगोंगळा, खिचडी गोवडणें-अक्रि घाणीनें, राडीनें लिड-बिडणें (भांडें, वस्तु जागा), गोवाडणें-सक्रि १ शेणानें, घाणीनें माखणें (भांडें, वस्तु जागा), सारवणें २ एकत्र करणें, मिसळणें, गोंधळ उडविणें [सं गो]

गोयर, गोयेर—पु १ (कु गो) राख, शेण, इ० २ रान [सं गो का गोबर=रान, हिं ]

गोवर—पु (घे) गोवर पहा [का ]

गोयरहारी(वाणा)—(संगीत) गौडारी पहा

गोयरा—वि १ मोठ्या पोटाचें, बेडौल दिसणारें, स्वाभाविक फुगीर (भांडें, मडकें) २ (निंदेनें) थसकट, चापट चेहऱ्याचा, फुगीर चेहऱ्याचा ३ (व्यापक) विद्रूप, बेडौल, कुरूप (माणूस) ४ (गो) एक मोठा मासा गोब्रू पहा [का गुबर] ०गणेश-पु गुबगुबीत व थाटोळया अंगाचा माणूस (गणपती सारखा) [हिं ] गोयराळ-स्त्री केळीची एक जात

गोयस्थान—वि गाईसारख्या छातीचा (घोडा) (दिसण्यांत खराब परंतु खोडी नाहीं असा) –अश्वप १ १०४ [गो+वक्ष-स्थान-वस्तान]

गोवा—पु गोळा, मोठा घास 'भाताचे गावेच्या गोवे हाणणें.'

गोबी-भी—स्त्री (माळवी) कोबी (भाजी) [ हिं गोभी= पाथरी ]

गोबे घोबे—न अचानक लाभ, घबाड, सापडलेला गुप्त ठेवा, नशिबाची रपा उमटणें, हबोलें (क्रि० येणें, सांपडणें, मिळणें, हातास लागणें )

गोब्र—पु (कों ) राखी रंगाचा मासा, हे मासे दिवाळीच्या सुम रास पकडतात गोबरा पहा

गोभ—न (व ) शिंदीच्या झाडास त्यातील शिंदी धर ण्यासाठीं टांगलेलें मडकें

गोभी—स्त्री एक औषधी वनस्पती, पाथरी [स गोजिव्हा, हिं गोभी ]

गोम—स्त्री १ पुष्कळ पायाचा एक किडा, गोंव, घोण 'गोमीस पाय बहुत, एक पाय मोडला तरी उणें पडत नाहीं ' –भाव ८२ २ घोडयाच्या ७२ खोडीं पैकीं एक, शेपटीकडे रोख असलेल्या परतलेल्या केसाची रेष, भोंवरा अशुभचिन्ह–लक्षण पहा ३ सरळ केसाची गोमाकार रेषा, डोक्याकडील रोखाची असलेली गोम ही शुभ मानतात पण डोक्यावर असेल तर अशुभ ४ (ल ) दोष, ऐब, व्यंग, खोड, गुणामध्ये एखादी उणीव ५ लुगडें, धोतर इ० च्या काठातील गोमेसारखा बाण, विनरींतील गोमेसारखी नक्षी ६ खुबी, मर्म, सार, गुह्य [प्रा दे गोमी, का गोंबे=शाखा ] म्ह० गोमेचे पाय तिला भारी नसतात सामाशब्द- ०चिवळ–पुन दोन फाट्यांच्या शेपटीची काळसर चिमणी ०पठाडी–स्त्री १ मोठी गोम २ (ल ) मोठा दोष, मुख्य मर्म, खुबी गोमीकाठ–पु गोमेसारखी वीण अस लेला वस्त्राचा काठ गोमीकाठी–वि गोमीच्या विणीचे काठ असलेलें (लुगडें, धोतर इ० )

गोम—पु (गो ) गोंद [ पोर्तु, तुल० इ गम् ]

गोमगाला—पु (क ) दंगा, मस्ती, गडबड, गोंगाट, गलबला 'गोमगाला कराल तर मार खाल ' [ध्व गों, गल ]

गोमजी—गोमा–जी पहा

गोमटा—पु विणकामासाठीं ओव्या, वह्या तयार करावया साठीं केलेला पाच पेडी दोरा ओवी पहा

गोमटा-टें—वि १ ( काव्य ) गोड, सुदर, चांगलें, मनो हर का ने या जगीं तुजपरतें। गोमटेंचि नाहीं।' –रास १ ९६५ २ सुरूप, सुदर, गौर ( वर्ण, रग ), गोऱ्या वर्णाचा

गोमटी—स्त्री एक प्रकारची काचेची बागडी

गोमटी—स्त्री (गो ) मान गोमटार बसप-मानेवर बसणें, हुद्दास पेटणें [का गोमाळे=कठमणी गोमनाळी=गळा ?]

गोमटें–न चांगलेंपण, सुरेखपण 'गोमटें काय शब्दाचें। एकेक थाणू।' –अमृ ६ ११.

गोमं(मां)-तक—पु गोंवें प्रांत, अपरांतकाचा एक भाग [ गोम + अंतक राजवाडे, गोमन्त + क ] गोमांतकी–वि गोंव्याविषयीं, गोव्यांतील ( आंबा, पत्रावळ इ० )

गोमा—पु १ इच्छित वस्तूविषयीं उदासीनपणाचें किंवा नावडतेपणाचें ढोंग दाखविणें, ज्याविषयीं उत्तम माहिती आहे त्याबद्दलचें अज्ञानपणाचें मिष (क्रि० करणें, लावणें) २ मोठे पणाचा डौल, आव ३ ढोंग, बतावणी ०गणेश पितळी दरवाजा–(मोंगली अमलांतील एका चतुर भिक्षेकऱ्याच्या गोष्टी वरून हा पितळी दरवाजा नावाच्या वेशीवर बसून मालावर बेपरवाना जकात घेई ) आढयतासोर, स्वत स उत्कट इच्छा असून दुसऱ्याकडून आग्रह करून घेणारा

गोमाजी, गोमाजी कापशा—पु १ उद्धटपणें इच्छा कर णारास उत्तरादाखल योजिलेलें काहीं तरी नांव २ कोणी तरी, अलबत्यागलबत्या, अगदीं अप्रसिद्ध, क्षुद्र माणूस, ह्, अ 'गोमाजीनें उठून तिमाजीच्या घरावर दरवडा घालावा ' –नि ३ लुडबुडया, लाडा कारभार करणारा ४ (सरकारी हिशेब) एखादा कूळदार पण शेतसारा न भरलेल्या माणसाबद्दल हें टोपण नाव घालतात या माणसाच्या साऱ्याबद्दल पाटील जबाबदार असतो ५ पूर्वी एक प्रसिद्ध पुरुष होऊन गेला 'तुम्ही कोण मोठे गोमाजी कापशे गेला ?' =तुम्ही मोठे थानीराव ? ०ना तिमाजी–पु कोणी तरी फालतू, ज्याचें नाव सागावयाची गरज नाहीं असा कोणी तरी ०सोमाजी–पुअ अलबतेगलबते, साळकोजीमाळ कोजी, वाटेल ते लोक ( तिरस्कारार्थी ) ०ची दिवाळी– स्त्री (कु ) कुडाळदेशकर आद्यगौड ब्राह्मण राजघराण्यांतील गोमाजी नावाच्या पुरुषाच्या नावें मार्गशीर्ष शुद्ध १ रोजीं कुडाळ प्रातात पाळला जाणारा सण –मठगावचा शिलालेख पृ ७०

गोमीच—न घोडयाची एक खोडी व्यग चिमूट पहा

गोमेटा, गोमेटी-टी—(गो कों ) एक वेल, हिचें फळ तोंडल्यासारखें पण दोडक्यासारखें कवेंदार आणि पिकल्यावर मधाप्रमाणें गोड असतें वेलीचा ताणा –वदलापूर १५३ गोमेटें-टें–न गोमेटीचें फळ

गोमेद—न एक रत्न, वैडूर्य, याचा रग गोमूत्रासारखा असतो शिवधातु, शिलमणी, हा पुनखडीचा पोटभेद आहे हा फार कठिण असल्यानें याचे रसायनशाळेतील खलबत्ते, छत्रीच्या मुठी, सुऱ्या इ० करतात, याजवर रग देतां येतो हें रत्न राहूला प्रिय आहे [ स ]

गोंय—न गोंवें प्रात ०बाबू–पु गोव्यांतील रहिवासी गोंवेकर

गोयडॉ—पु. (गो.) दांड.

गोयदी—स्त्री. (गो.) गोपदी पहा.

गोयए—पु. (कु.) लांकूड कातण्याचें हत्यार.

गोयला—पु. (कों.) सरपणाची मोळी, आंटूड भारा (दोन हात लांबीचा).

गोया—अ. म्हणजे, जणूं काय. 'जे ये समयीं आपले येणें गोया करामत जाली.' –रा १.१८८. [फा.]

गोयॉ—स्त्री. (गो.) गुराख्यांचा लांब स्वर, हेल, हरळी. [गो......ओ; ध्व]

गोयाया—पु. मंद, आळशी माणूस; मूर्ख, अनाडी माणूस; गरीब, बावळा माणूस.

गोर—स्त्री. गळा; मान. 'रात्रिदिना घरीं कधीं गोर गोंविली मज गाईचीं।–पला ८० ब. [प्रा. दे. गोरा]

गोर—पु. गोवर (रोग) पहा.

गोर—पु. गुजरांतील ब्राह्मणेतरांचा उपाध्याय. –बदलापूर २५०. [सं. गुरु]

गोर कपण—न. (प्र. गोरकफन) मूठमाती; उत्तरक्रिया; प्रेतसंस्कार. 'गोर-कपणेचीं साहित्यें करून त्यांचीं सार्थकें केलीं.' –भाव १०७. [फा. गोर्=पुरणें+अर. कफन्=प्रेतावरील वस्त्र]

गोरख—पु. १ गुराखी; गुरें राखणारा. २ गोरखनाथ; गोरख (कानफाटे) संप्रदायाचा आदिपुरुष. [सं. गोरक्ष; प्रा गोरक्ख] सामाशब्द– ०गांजा–पु. तागाच्या किंवा भांगेच्या सुद्याप्रमाणें फुटें येणारी औषधी वनस्पती. ही नळगुदावर देतात. ०चाळा-सांखळी–पुस्त्री १ भोंवतीं कड्या असलेला लोखंडी गज. हा गोसाव्यांच्या हातांत असतो. २ (ल.) संबंधाची गुंतागुंत; परस्परावलंबन (अनेक अंतर्विवाहांनीं कुटुंबीयांत, परस्पर जामीनकीनें गावकऱ्यांत; धुंपणांत, काटेरी झुडपांत). ०चिंच–स्त्री. १ एक प्रकारच्या चिंचेचें झाड व फळ. हें मोठें असतें. फळांतील गीर पित्तशामक, रुचकर, पथ्यकारक आहे. २ गोरक्षी नांवाचें झुडप. ०नाथ–पु एक नाथपंथीय श्रेष्ठ पुरुष. मच्छिंद्रनाथाचा शिष्य. याचे संप्रदायी कानफाटे योगी होत. ०पंथी–मार्गी–वि. गोरखनाथाचा अनुयायी. ०मंत्र–पु. गोरखनाथानें उपदेशिलेला मंत्र. ०मुहूर्त–पु. गोरखनाथानें सांगितलेल्या अनेक मुहूर्तांस सर्वसामान्य शब्द.

गोरगरीब—पु. अव. गरीब व दरिद्री माणसें; गरीब लोक, अनाथ; गरजू; भणंगभिकारी [विस्तारवाचक प्रत्यय+गरीब]

गोरजी—पु. (कों.) जैनांचा ग्रामगुरु. [सं. गुरु गु गोर+जी]

गोरटा–टी—वि. गोरा; गोऱ्या रंगाचा (माणूस); गोरा (रंग). सुंदर; सुरेख. गोरटी–स्त्री. १ सुंदर, गोरी स्त्री. (सामा.) २ स्त्री; बाई; 'तों मथुरेच्या गोरटी। ज्यांची केवळ प्रपंच दृष्टी।' –ह २१.३३. गोरटेला–वि. साधारण गोरा. [सं. गौर; प्रा. गोर]

गोरथ-थें—न. (कु.पे.) कमरेखालीं न मुरडलेलें, सरळ रहाणारें इरलें (खोळीच्या आकाराचें); याचे उलट कमरमोडी इरलें. [का. गोरगु]

गोरबंद—पु. घोडा, उंट यांच्या खोगिराचा पुढील बंद. [गोर=मान+बंद]

गोरवीकटगी—स्त्री. (गोरवीची काठी) माकडीच्या (तेलकट) झाडाची मशालीसारखी उपयोगांत आणावयाची फांदी. प्रवासी किंवा जासूद रात्रीच्या वेळीं हिचा उपयोग करतात. [का. गोरवी=मशालीचें झाड+कटगी=काडी]

गोरस(सा)ण-न—न. (चांभारी) कातडें मऊ होण्यासाठीं व कमावण्यासाठीं, कुरडलेल्या एरंड्या व दहीं, हळद, ताक यांचें मिश्रण. (क्रि. देणें; लावणें; चोळणें). [गोरस ?]

गोरसणें—अक्रि. साफसूफ करून, खतमूत घालून पेरण्यासाठीं तयार करणें (शेत जमीन); मशागत करणें.

गोरक्ष—पु. गोरखनाथ; गोरख पहा. ०क–१ गोरख; गुराखी. २ गुरांची संरक्षक देवता. गोमध्यें पहा. ०घटी–स्त्री पारद, लोह, ताम्र हीं तीन भस्में समभाग घेऊन त्यांना रिंगणीच्या फळाच्या रसाच्या २१ भावना देऊन मुगाएवढी गोळी करावी. ही तोंडांत धरल्यानें सर्व प्रकारच्या स्वरभंगाचा नाश करते. –योर १.६६४.

गोरा—पु. गोऱ्हा; गाईचें वासरूं, खोंड. [हिं. गोरू]

गोरा—पु. १ गोरा माणूस. २ साहेब; इंग्रज; युरोपियन माणूस. –वि. १ उजळ; गौर (वर्ण); गोऱ्या रंगाचा. २ पांढरा; शुभ्र (तांदूळ, कापड). [सं. गौर; प्रा. गोर] म्ह० एक गोरी आणि बत्तीस खोड्या चोरी. सामाशब्द ०गोमटा–वि. गोऱ्या रंगाचा व सुंदर रूपाचा; देखणा. म्ह० गोरागोमटा नवरदेव (कपाळ) करंटा= देखणा पण हतभागी. 'दुर्गीचा नवरा लग्नांत गोरागोमटा पण पुढें ... कपाळकरंटा निघाला. –पकोघे ०गोरापान–गोरापान–वि. अतिशय गोरा. [गोरा+पान=आधिक्यवाचक प्रत्यय] ०पावसा–वि (ना.) गोरागोमटा; देखणा. ०भर्रांट–वि. (ना.) गोरापान. ०भुरका–वि. गोरा व किंचित भुरका; तांबुस गोरा. ०माजा–पु. पांढरें मायफळ, मायफळाची एक जात. ०मोरा–वि. चर्या पालटलेला; पांढरा पडलेला; प्रेताप्रमाणें किंवा कागदाप्रमाणें पांढराफटफटीत (भय इ० नीं). [का. मोरे=तोंड] ०गोरेला–वि. गोरटेला.

**गोरांजन**—न १ गोरोचन पहा २ ईश्वरप्राप्तीसाठीं स्वतःस अग्नींत जाळून घेणें, अग्निकाष्ठ भक्षण करणें 'करोत तपादिसाधनें। कोणी साधात गोरांजनें।' –तुगा २६२१

**गोराडू**—पु कोनफळ, जमीनींत उत्पन्न होणारा एक भाजीचा कंद हा भाजून, उकडून उपासाला खातात

**गोराण-णी**—स्त्री दलदल, खाडीच्या किनारा यात होणारें एक झाड, याच्या सालीचा उपयोग कातडीं कमावण्याकडे आणि झाडाच्या अर्काचा उपयोग कपड्यांना तपकिरी रंग देण्यास होतो

**गोराळ**—न (चांदा) तेल ठेवण्याची दगडी

**गोरी**—पु १ फासेपारधी 'कीं गारियाचें गायन।' –रावि २ २३ २ (ल) त्याचें गाणें 'का गोरीचिया भुली। मृग व्याधा दृष्टि न घाली।' –ज्ञा १३ ७३९ गौरी पहा

**गोरू**—न (कु) (अव) गोरवा गुरू पहा [हिं]

**गोराव(प)**—पु (गो) गर्भ, मगज, गर [स गर्भ]

**गोल**—पु १ गोलक, वर्तुळाकार, वाटोळी, वर्तुळस्तंभाकार, वरवंट्यासारखी वस्तु, ज्या भरीवाच्या पृष्ठावरील बिंदु मध्यबिंदूपासून समान अंतरावर असतात तो, गोळा २ मंडळ, वर्तुळ, परिधिवृत्ताकार आयत ३ कृत्रिम गोल, वर्तुळ, खगोल, भूगोल, स्वगोल पहा ४ गोलदार दांडा, वासा, चरकावर केलेला गोलदार दांडा ५ वर्तुळपणा, वर्तुलत्व, लंबवर्तुलत्व ६ (चेंडू दांडू खेळ) लाकडी चेंडू ७ नक्षीदार काठ, पदर (पागोट्याचा) ८ घोळ, थवा, जमाव, कळप, झुंड ९ सैन्याची एक रचना 'चौफेर घाघुना गोल।' –सप्राम ६० १० लोंढा, झोल, झोंब (आगोचा) ११ राशीचक्रमंडलाचा एक भाग किंवा अर्ध 'वृषभराशीचा ग्रह उत्तरगोलांत जाणावा' १२ फुलांचा गुच्छ, घुनका, गोटा तुरा पहा १३ नदींतील एक मासा १४ गोफ, वरगोटा यांच्या पदराची एक तार (सोनें, चांदीची) १५ (विणकाम) वशारन्याच्या सांधीच्या फणीत घालण्याच्या उपयोगी सागवानी २॥–३ हात लांबीची वाटोळी काठी १६ गोळा, तोफेचा गोळा –वि वाटोळा, वर्तुळाकार, लंबवर्तुळागार, वर्तुलस्तंभाकार [स] सामाशब्द– ०कल्प–ज्या गोलाच्या समोरासमोरच्या दोन बाजू चपट्या किंवा फुग लेल्या असतात तो ०चवडदी–स्त्री (कासार) भांडें घडवितांना ठोकठोकून, कमजास्त जाड असेल तेथें सारखें करण्याचा चौरस हातोडा ०ची–स्त्री १ गोलाकार २ (सुतारी) खांब वगैरे चौरस लाकडांच्या कोपऱ्यास गोलाकार देण्याचें हत्यार, याला (कु) गोलची रोखणहि म्हणतात (क्रि० मारणें) ४ (चांभारी) रेषा मारण्याचें हत्यार ०टा–पु (इमारत काम) जाड, गोल पण आंखूड बांधा जाड घुमटा असलेला बांधा ०थरें–वि (गो) सैल ०दडा–दाड–दाडा–दोडा–पु एक मोठा सरळ सोट वृक्ष, याचें फळ भाजून खातात व हें औषधी आहे **गोलंदाज**–पु तोफ डागणारा, तोफची, गोळा फेकणारा [फा गोलंदाज् स गोल] **गोलंदाजी**–स्त्री तोफ डागण्याचें काम, तोफांची सरबत्ती [स गोल+फा दाजी] **गोलदानी**–स्त्री बंदुकवाल्याच्या कमरेस बांधलेलें गोळया ठेवण्याचें शिंग [स गोल+फा. दानी] ०दार–वि १ वर्तुळाकार, वाटोळें २ आकडेदार (मिशा) ३ मांसल, भरदार (हात, मांडी) ४ नक्षीदार पदराचें (पागोटें) ०परिघ–पु महावृत्ताचा घेर, मर्यादारेषा –सूर्ये १० ०बाह्य–वि (शाप) गोलाच्या पृष्ठभागाप्रमाणें बाहेरील अंगानें गोल (इ) कॉन्व्हेक्स ०मापकयंत्र–न (शाप) कोणत्याहि गोलाची किंवा त्याच्या तुकड्याची त्रिज्या आणि एखाद्या पदार्थाची जाडी काढण्याचें यंत्र (इ) स्फेरोमिटर ०मिंट–(को) मासे पकडण्याचें एक जाळें ०सर–वि थोडें गोलाकार, गोल **गोलाची लंब संस्था**–स्त्री विषुववृत्तावरून आढळणारी स्थिति; या ठिकाणीं विषुववृत्त व त्याच्याशीं समांतर जीं वृत्तें आहेत तीं क्षितिजावर लंब होतात –मराठी ६ वें पुस्तक पृ ३१६ (१८७५) **गोलाची-वक्रसंस्था**–स्त्री जेव्हां एक ध्रुव क्षितिजाच्यावर आहे आणि एक क्षितिजाच्या खालीं आहे तेव्हां विषुववृत्त व त्याच्याशीं समांतर दुसरीं वृत्तें यांचें क्षितिजाशीं पडणारे वक्रकोन मराठी पुस्तक ६ वें पृ ३१६ (१८७५) **गोलाट–ठ, गोल्हाट गोलाटी**–नस्त्री खालीं डोकें वर पाय करून मारलेली उलटी उडी, कोल्हाटा (क्रि० घेणें, मारणें) **गोलांतर**–वि आंतून गोल, गगनाकृति, पोकळ गोलाच्या आंतील भागाप्रमाणें असलेलें (इ) कॉनकेव्ह **गोलाध्याय**–पु गोलासंबंधीं विवरण करणारा गणितशास्त्राचा भाग भास्कराचार्यांच्या सिद्धांतशिरोमणीचा हा एक भाग आहे **गोलार्ध**–पु गोलाचा अर्धा भाग उ० पूर्व–पश्चिम गोलार्ध [स गोल]

**गोल**—पु १ फादरबुक खेळामध्यें डाव होण्याकरितां हद्दीवरील दोन खांबामधील ज्या रेषेंतून चेंडू दवडावा लागतो ती रेषा (क्रि० करणें) डाव २ ध्येय [इ गोल]

**गोल(ळ)क**—पु १ ब्राह्मणविधवाच्या संततीचा वंश, जंत, जारजवर्ग गोलकातील दोन भेद (१) कुंडगोलक–पु नवरा असलेल्या (मुख्यत्वें ब्राह्मण) स्त्रीची अनौरस संतति (२) रंडगोलक–पु (ब्राह्मण) विधवेची अनौरस संतति [स]

**गोलक**—न पैसे ठेवण्याची व ते आंत टाकण्यासाठीं वर भोंक असलेली बंद पेटी [फा घोलक ?]

**गोलक**—पु १ एखादी वाटोळी वस्तु, गोळा २ अवकाशयुक्त वस्तु हा शब्द इंद्रियास जोडतात उदा० कर्णगोलक= कानाची पाळुली, कानाचा बाहेरील कान नासागोलक=

बाहेरील दिसणारें नाक, नाकाचा एक्दर भाग नेत्र-मुख-इंद्रिय-गोलक इ० इंद्रिय-गोलक (अव)=इंद्रियग्राम, इंद्रियवर्ग (सामान्यत) ज्ञानेंद्रिय २ 'देवताशक्ति असल्यावाचून केवळ इंद्रियगोलकानीं कार्य होत नाहीं '

**गोलमाल**—पु गलबला, गडबड, गोंगाट, आरडाओरड 'हा गोलमाल त्याचाच असला पाहिजे '–सूर्यप्र ८१ [हिं]

**गोलसर**—स्त्री (ना) धकुळीचें थाड –वि साधारण गोल

**गोला**—पु गोल्या पहा

**गोला**—गोळा पहा

**गोलाकार**—वि गोलसर [गोल+आकार]

**गोलां(ळा)गुल(ळ)**—पु एक जातीचें वानर, नीळ, काळ्या रंगाचें व गाईच्या शेंपटीसारखी शेंपटी असलेलें वानर, माकड 'पुढें चालती भार गोलांगुलाचे '–राक १५२ –वि दुबळा निर्बल 'समर्थ माहेरींचें बळ। तेणें स्त्रिया उत्स्तळ। भ्रतार मानुनि गोळागुळ। अव्हेरिती सर्वस्वें ॥' –मुआदि ९ २२ [स गो=गाय+लांगूल=शेंपटी]

**गोली**—स्त्री १ वोळपें कुळव किंवा इतर काहीं आउतें यांना लावलेला आकडा, लोखंडी बाकदार गळ

**गोली**—स्त्री (कु हेट) १ मातीची लहान घागर, कळशी २ (गो) गोलें=द्रव पदार्थ मोजण्याचें चारशेरी माप [गोल]

**गोलेवाला-गोल्या**—पु गोल्यानें तांदूळ सडणारा व त्यावर उपजीविका करणारा माणूस

**गोल्या**—पु शेवटीं वाटोळा दगड लाविलेलें मुसळ दगडी मुसळ

**गोल्या**—स्त्री (कु) सुतारी हत्यार, रोखणीचा एक प्रकार (गोलचीच्या उलट)

**गोल्या**—पु १ कोळप्याच्या दात्या (दिंडा) वरील आडवी लोखंडी पट्टी कोळप्याच्या दिंडात बसविलेला भाग, दर दिंडास असे दोन गाले असतात २ दोन घडीव बाजूचा, पायखाना, जिना यास लावण्यांत येणारा अर्धगोलाकार दगड

**गोल्या**—पु लहान घागर गोली –बदलापूर ६५ [स गोल-ला]

**गोल्हाट**—पु १ गोलाट पहा २ छातीच्या आतील पोकळींत जो उलटा प्राण आहे त्यातील ज्ञानवृत्तीला इंद्रियावाचून स्वत च्या स्वरूपाचा यथार्थ बोध होत नाहीं अशा त्या प्राणवायु राहण्याच्या ठिकाणास गोल्हाट म्हणतात –व ख पारखकृत ज्ञानेश्वरचरित्र पृ ९३ 'तिसरें जें का गोल्हाट। तेज तत्त्वाचें मूळ पीठ।' –सिस ७ २६२ औट पीठावरलें योगशास्त्रोक्त स्थान औटपीठ पहा 'औटपीठें गोल्हाट म्हणती।' –बोधवैभव (जगन्नाथ) २० [गोल, कोल्हाट]

**गोल्ही**—स्त्री (व) दोन तासांचें कोटकें [गोली]

**गोव-वा,वी**—स्त्रीपु १ गुंता, गुंतागुंत, अडथळा, गुताड (ल) २ मकट, घोटाळा, अडचण 'उदंड गोवा केला लोकीं' 'होती मृगजळें गोवी केली' –तुगा ७१५ ३ कायम अडविणें (एखाद्यास एखाद्या कामीं, हुद्यावर) [स गोपय्, प्रा गोव २]

**गोवई**—वि गोमातकी, गोव प्रांतासबंधी (भाषा इ०) [गोवें]

**गोवणी**—स्त्री ओंवण, गुंथण, जुळणी, जोडणी [गोवणें]

**गोवणें**—उक्रि १ गुंफणें, गुंथणें, ओंवणें (मणी फुलें) २ गाठ देणें, गुतविणें, बांधणें (वेंस, खुंट्यास पशु) 'तो गोविला वाळक कमळ या।' –सारुह १ ७५ ३ गुतविणें, अडकविणें, घालणें (शाळेंत मूल किंवा उमेदवारींत, विवाहांत, उद्योगांत, माणूस) ४ अडकविणें, बांधून घेणें (रोखा, वचन यांनीं) 'वचनीं गोवून वायुकुमरा। नाथ मच्छिंद्रातें मागीतलें।' –नव १९ ७६ ५ गोकाटणें, पेचांत पाडणें जे थोरथोरासी गोवी। जाणपणे' –दा १ ३ २३ ६ भाषणांत गुतविणें, पकडणें 'वाचाबळें जन गोवती।' ७ लक्ष वेधणें, गुतविणें, अवधानांत धरून ठेवणें 'मला गोष्टीखालीं गोवून आपण चोरी करून पळाला' [स गोपन, प्रा गोवण २]

**गोंवर-रें**—पुन अंगावर देवीसारखा पण लहान पुरळ येणारा एक रोग हा विशेषत लहान मुलांस होतो (क्रि० येणें, निघणें, मावळणें, चिरमुटणें, कानपणें, बाहेर पडणें इ०) [स गोवर्ण (गोवरांत अंग गायीच्या रंगाप्रमाणें होतें त्यावरून) तुल० का गोब्बर] ०पोटीं पडणें-गोंवर बाहेर न पडणें, अशामुळें पोटांत ऊष्णता राहून मुलाला पुढें जड जातें

**गोवर्धनी गाय**—स्त्री गोरोचन असलेली गाय –बदलापूर ७२

**गोवसा**—पु नवस गामध्ये पहा २ –शर

**गोवळगाथा**—पु घोटाळा, भानगड, गोंधळ, घोळ गवाळग्रथ [गवाळ+गाथा]

**गोवळजेणें**—सक्रि घुसळणें –शर

**गोवाइ**—स्त्री गुतागुत गोवा पहा 'एय उपदशामानि गोवाइ।' –माज्ञा ३ ११

**गोवारें**—पु (कु) साक्षीदार साक्ष २

**गोवारें**—न समुदाय २ 'निरवूनि तुका चालला गोवारें। देवापासीं भार साडवूनि।' –तुगा २०८१

**गोवारी**—स्त्री भाजीची शेंग गवारी, एक झाड व शेंग एक उपधान्य

**गोविंद**—पु १ श्रीकृष्ण भगवानाचें एक नाव २ कावळीच्या झाडाचें फूल ३ (गो) एक जातीचा कावळा ४ तांबडा कांचेचा मणी [स] सामाशब्द– ०नामसंकीर्तन-पुन्हां पुन्हां

गोविंद, गोविंद, म्हणणें; गोविंदनामाचें भजन. ०मणी-पु. गोविंद अर्थ ४ पहा. ०विडा-पु गोंदविडा; खालीं चौकोनी बैठक असून चारी बाजूंनीं वर निमुळता होत जाऊन वर कोन असलेला विडा; हा ८ पानांचा असतो.

**गोविंदफळ**—न. किंकिणी; वाघंटें; तोंडांत टाकल्यावर हें गोविंद गोविंद म्हणतें असें म्हणतात. **गोविंदी**-स्त्री. वाघंटीचा वेल. [सं.] **गोविंदें**-न. वाघंटीचें फळ; गोविंदफळ.

**गोवी**—पु हेरिंग वर्गाच्या माशासारखा एक जातीचा मासा. –प्राणिमो ८७.

**गोवें**—न. गोमंतकांतील एक शहर.

**गोवें**—न. १ अर्धवट घट्ट झालेलें दूध; अदमुरें दहीं. २ मृदु, भोळा, सहज वळणारा व उदार धनी. ३ चांगल्या मिळकतीचा, बैठा रोजगार. ४ श्रमाशिवाय चांगल्या गोष्टी मिळण्याचें साधन ५ घबाड; ध्यानींमनीं नसलेला लाभ, फायदा; मोठा फायदा, नफा. 'भावें उगवीशी गोवें बोलसि निज भाव।' –देप (आरती) २. ०सांपडणें-घबाड हातीं लागणें.

**गोवें**—न. पराचीं; माळा.

**गोवेगिरी**—स्त्री. एक केळीची जात. हिचे केळें वनकेळी-सारखें असतें. परंतु साल जाडीला कमी असतें. –बागेची माहिती १४७.

**गोव्या**—वि. (रा. कु.) निष्काळजी व अव्यवस्थित; ढिला व गयाळी; गोंधळ्या व विसराळु; गयाळ–ळी; गबाळी–ळ्या; गैरा, गैरात, गैरी, गावदी, गल्लान, झाबऱ्या, भोंगळ या वर्गा-तील त्या अर्थाचा हा शब्द आहे.

**गोश(ष)पेच**—पु. १ कानावरून बांधलेली टापशी; थंडीच्या दिवसांत कानावरून उपरणें, रुमाल बांधतात तो; कानपट्टे २ एक शिरोभूषण 'चिमणा गोशपेच त्यावरी कलगी झळके फार।' –मव्व ३६. [फा. गोश=कान. गोशूपेच=टापशी; पागोट्या वरील अलंकार]

**गोश(ष)माल-ली, गोश्माल-ली, गोस्माल**—स्त्री १ कानउघाडणी; कान पिळणी; शिक्षा; नतिजा. 'आम्ही हराम खोर असें खचित यकीन जालें असल्यास आम्हास परिच्छिन्न गोश्माली करावी.' –ऐस्फुले ४९. २ चोरटा हल्ला 'ओवतें हिंडून गोषमाल देऊन त्याचा मुलूख मारून धुंदी करावी' –मराचियोशा ५७. [फा. गोश=कान+मालना=घासणें. फा गोश्माली=कानउघडणी, शिक्षा; गोश्माल=कान पिळणें]

**गोशा-षा-सा**—पु १ धनुष्याचें टोंक. २ कातकऱ्याच्या धनुकलीची मूठ. ३ वस्त्राचा शेवट, टोंक, पदर. ४ अंत पुर; पडदपोशी; पडदा; बुरखा. ५ परपुरुषापुढें तोंडावर बुरखा घेतल्या-शिवाय स्त्रीनें केव्हांहि येऊं नये अशी चाल. [फा. गोशा] ०निशीन-वि. १ एकांतवासी; निवृत्त. २ गोशा असणारी; गोषांतील (स्त्री.) **गोशेनशीन**-क्रिवि. गुप्तपणें. 'अशीं पत्रें सवाईसिंगानीं राजास गोशेनशीन लिहिलीं.' –जोरा १०६. [फा. गोशा+निशीन]

**गोशवारा, गोशेरा, गोश्वा(श्वा, स्वा)रा, गोसारा**—पु. १ विस्ताराच्या हकीकतनाम्यावरून तयार केलेला संक्षिप्त उतारा; संक्षिप्त टांचण, हकीकत, सूची. २ सारांश; निष्कर्ष; रोख; अभिप्राय; तात्पर्य. ३ चित्रांवरून तयार केलेली खेड्यां-तील जमीनीबाबत थोडक्यात माहिती. [फा. गोश्वारा]

**गोश्वारा**—पु. कर्णकुंडल. 'दोन गोश्वारे.' –दिमाश १. १०५. [फा. गोश=कान]

**गोश्गुजार**—वि. श्रुत. 'अजाहे दोस्ती तुम्हांस गोश्गु-जार करून ठेवितों हें निमित्य उलट येईल.' –रा ५.१६४. [फा. गोश्गुजार]

**गोष**—न. मांस; गोमांस. 'असिस्टंट बटलरला बाजारांतून गोष, अंडीं, लोणी वगैरे आणण्यास त्यानें पाठवून दिलें.' –नपुक ३२. [फा. गोश्त]

**गोष्ट**—स्त्री. १ कथा; दंतकथा; आख्यान. २ (व्यापक) वाक्य; शब्द; पद; उच्चार; चकार; उल्लेख. 'तुम्हीं येथें गोष्टी बोलूं नका.' ३ कृत्य; काम; प्रकरण; भाव; व्यवहार. 'मज-पासून अशी गोष्ट घडणार नाहीं.' ४ वृत्त; वृत्तांत, घडलेला प्रसंग; घटना. ५ स्थिति; अवस्था; प्रकार. 'श्रीमंत लोक कितीही खर्च करोत त्यांची गोष्टच निराळी.' ६ (पुराव्याचा कायदा) ज्याचें ज्ञान इंद्रियांच्या योगानें होतें अशी कोणतीहि वस्तु किंवा वस्तूची स्थिति अथवा संबंध; मनुष्याच्या मनाची कोणतीहि स्थिति. (इं.) फॅक्ट. [सं. गोष्ठी] (वाप्र.) **पक्क्या गोष्टींत**-एकदम; झटक्यासरशीं; सपाट्यास, चटकन. ०काढणें-खोड काढणें. **गोष्टी खापलणें**-क्रि (व.) गप्पा छाटणें. म्ह० (व) गोष्टीचा खाप विसरला मायबाप ०फोडणें-गुप्त प्रगट करणें, जाहीर करणें. **गोष्टी सांगणें**-१ बोलणें; संभाषण करणें; गप्पा छाटणें, वार्ता करणें. 'ठाव्या आहेत मला सांगा यथेष्ट गोष्टी अन्या या।' –मोउद्योग १३ ३७ २ (ना) सबबी सांगणें; वयादी लावणें. सामाशब्द– **गोष्टम**-वि (व ना.) गप्पीदास; गोष्टीवेल्हाळ, वाताड्या. ०मात-स्त्री. गोष्ट अर्थ १ पहा. 'एखादी गोष्टमात सांग म्हणजे धीर करमेल' ०श्राद्ध-न. १ अडचणीमुळें सर्वोपचारयुक्त श्राद्ध करण्यास सवड नसेल तेव्हां अनुकल्पानें केवळ शब्दांनीं केलेलें श्राद्ध. २ (ल) निवळ गप्पा-टक, बडबड; निरर्थक गोष्टी. **गोष्टिप्रिय-लंपट-वेल्हाळ**-वि १ गोष्टी ऐकण्याचा किंवा सांगण्याचा शोक असलेला; कथा-प्रिय. २ गप्पागोष्टींनी परिपूर्ण. **गोष्टिका(मा)ना(था)**-स्त्रीअव गप्पाष्टकें; व्यर्थ संभाषण; निव्वळ गोष्टी व कथा. [सं.]

**गोष्ठांवाल**—स्त्री (गो) एक रानटी वेल

**गोष्ठेशूर**—वि घरातील शूर, घरगोहो [स]

**गोस**—पु (गो) तीन वितींचें माप

**गोसाई-वी**—पु (ना) १ पावसाळ्यात दिसणारा एक लहान किडा याची वरची बाजू लाल मखमालीसारखी असते मृगातील किडा २ बाजरीवरील एक किडा

**गोसावी-मी-ई**—पु १ ज्यानें सांसारिक इ० सुखाचा त्याग केला असा योगी, याचीं वस्त्रें भगवीं असतात, यांपैकीं कांहीं मुंडण करतात २ (ल) घरदार, बायकापोरें यांच्या विरहित माणूस, फटिंग ३ हरिदास ४ (जुना पत्रव्यवहार) सन्मानदर्शक एक पदवी ५ मालक, धनी 'मुषकारूढ गणेश गोसावी।' –वेसीस्व ६ ४२ ६ वाजविण्याची मातीची चिमणी, भुरकट रंगाची चिमणी (पाखरूं), ७ तव्यास वर राख लावून त्यावर केलेली भाकर, गाकर ८ केळीची एक जात **गोसावी मढा-सावडा**–पु (निंदार्थी) गोसावी **गोसावीपण**–न गोसाव्याचा धर्म, चाल, रीत **गोसावीण**–स्त्री धनीण, मालकीण 'पैं जीवाचे कर्सी उतरलीं। ते दासी कीं गोसावीण झाली।' –ज्ञा १८ ९१२ **गोसावीपण**–न प्रभुत्व 'जी जालेनि पाइकें आलें। तें गोसावीपण केवीं बोलें।' –ज्ञा १८ २२ [स गोस्वामी]

**गोस्त**—न मांस गोष पहा [फा गोश्त]

**गोस्तनी**—स्त्री द्राक्षे [स गो+स्तन]

**गोस्तनदेवी**–स्त्री गाईच्या सडावरील गाठीतून रस काढून माणसाच्या शरीरात टोचून घालण्याचा डॉ. जेनर याचा शोध यामुळें आलेले फोड [स गोस्तन+देवी]

**गोहरू**—पु (गोंडी) गहू (धान्य) –विवि ८ १ ३

**गोहर**—पु (ना) १ हुरहुर, काळजी २ खोडी, चाळा अवगुण **गोहरी**-वि (ना) खोडकर, अवगुणी

**गोहा**—स्त्री १ ग्वाही, साक्ष 'गाहीवीण जाऊं नये। राजद्वारा।' –दा २ २ २० २ साक्षाची जबानी ३ साक्षीदार [फा गुवाही] ०**दार**–पु साक्षीदार 'गोहीदाराचें जरी मोड़ तरी साहेबास गुन्हेगारी देऊं' –रा १८ ३५

**गोहो**—पु १ (घरगुती भाषा) नवरा पति धो 'सुखें योळव दावी गोहा। माझ दु ख नेणा पाहा॥' –तुगा २९५७ २ बाप्या, तरणाताठा वयात आलेला माणूस, गोखमा ३ वस्ताद मारतापीर, मार्क मी त्याचा गोहो आहे मजपुढें येऊं द्या 'हें औषध पित्ताचा गोहो आहे' ४ तोडीस तोड शेरास सव्वाशेर सवाई [स गोध=पति गुढ प्रा दे गोह= योद्धा पुरुष मुखिया]

**गोळ**—१ गोल पहा २ अडें

**गोळ**—(गो) १ एक भाजी (वेली) घोळ २ एक झाड ३ एक प्रकारची मासळी [स गोल] **गोळगोळकी**-स्त्री (वै) एक वनस्पती

**गोळ**—पु (गो) गळ **गोळाक टाघप**-हात बांधून टाकणें ०**दिवप**-१ फासावर चढविणें, २ मुलास धाडी (शिक्षा) देणें **गोळार मारप**-फांशी देणें

**गोळक**—पु गोलक पहा -**काचें सोंवळें**–न खोटें सोवळें (गोळकांना सोंवळ्याचा अधिकार नाहीं या समजुतीनें) म्ह० गोळकाचें सोंवळें सारा वेळ विळविळें

**गोळंकार**—पु (गो) दुखण्यामुळें आलेली असहाय्य स्थिति, खोडाविडी होऊन पडणें

**गोळंकारी**—वि थाकलेला, पोंक आलेला (वार्धक्य, वात, अशक्तपणा यामुळें), खोडाविडी होऊन पडलेला

**गोळवा**—वि (कु) आळशी, अजागळ [स गोल? म गोळा]

**गोळंवी**—स्त्री पाण्यातील एक लहान प्राणी

**गोळा**—पु १ गोल, गोलक, चेंडू २ वर्तुलाकार पदार्थ, पिंड, भेला, डिखळ, रास ३ जथा, जमाव, मेळा (मनुष्य, पशु वस्तु याचा) ४ (ल) हातपाय नसलेला किंवा ते लुळे झालेला माणूस, पागळा ५ (निंदार्थी) जेवण, भाकर-तुकडा, पिंड, घास ६ धुपावणें, दुवेतणें, गर्भपात, स्राव ७ नाकांतील चांदीचा बेसर (मोत्याऐवजीं) ८ फळातील विशिष्ट नांव नाहीं अशा अठी, बीं, गर, गर्भांश इ० ना लावतात जसें– बदाम-पिस्ते–काजू–भुईमूग–ताड–उडे–एलची–गोळा 'हीं मोत्यें शुद्ध कर्दळाचे गोळे आहेत' ९ (व) लाडू ढोकळा 'बेसनाचे-गूळपापडीचे गोळे' १० प्लेगची गाठ ११ तोफेची मोठी गोळी १२ सांठा समूह १३ (गो) गोल आकाराचें भांडें, गुड गुडा –वि १ चिंब या अर्थी ओला शब्दाबरोबर प्रयोग 'चिरगुटाचा ओला गोळा पडला आहे' 'हीं लाकडें ओलीं गोळ आहेत' २ एकत्रित एकत्र होई असा [स गोलक प्रा गोलओ, अप गोलउ हिं व गोला, प गोळा] (वाप्र) ०**करणें**–एकत्रित करणें ०**गिळणें**–(लाच) खाणें ०**टाकणें**-गर्भपात होणें ०**देणें**–जवें दिवसास एक वेळ गोळा दिल्हा म्हणजे आठा प्रहराची काळजी वारली' ०**मारणें**–गपापा करून टाकणें ०**होणें**–१ गोळ्याप्रमाणें गानें एकत्रित होणें झोपेनें या मुलाचा गोळा होऊन गेला आहे' **गोळा विणें**–उक्रि (गजा) १ गोळा–जमा करणें २ (ल) मिळविणें सपादणें **गोळेगावाला वेढा घालणें–पडणें**–अक्रि जेवावयास बसणें सामाशब्द– ०**गोळी**–स्त्री परस्पर (बंदुकी–तोफा यांच्या) गोळ्याचा भडीमार, मोठा तोफेचा भडिमार

०वेरीज–स्त्री १ (अंकगणित) ठोक बेरीज किंवा तेरीज २ (ल) तात्पर्य, सारांश, निष्कर्ष, मथितार्थ ०करणें–(हिशेब) लबाडीनें कांहीं बाबी दाबून किंवा खोट्या लिहून ठोक बेरीज किंवा तेरीज देणें ०भर–वि. पोटभर, भूक शांत होई इतका ०भाजी–स्त्री पीठ लावून किंवा तांदुळाच्या कण्या घालून केलेली भाजी, हिच्या उलट मोकळी भाजी

**गोळिंव गोळींम**—स्त्री गोळंबी पहा

**गोळी**—स्त्री १ (सामा) लहान गोळा, गोला, गोलक, गोटी २ बंदुकीचा गोळा ३ चोळमटलेल्या कपड्यांचा लहान ढीग, रास ४ (ना) वेटूल ५ (ना) पटकी, कॉलरा ६ (गो) लहान तांब्या, घागर, विदलें ७ (राजा) खाडीतील चिख लाचा वीतभर लांबी–रुंदी–उंचीचा गोळा या गोळ्याचा बांध टिकाऊ असून यावर नाचणी चांगली होते ८ गुराचा एक रोग (इ) ॲन्थ्रॅक्स [स गुली, प्रा गोलिया] (वाप्र) ०घालणें–१ बंदुकीची गोळी मारणें ०चढविणें–मादक पदार्थांची गोळी खाणें (आलून) ०मारणें–स्वत पुढें न होता दुसऱ्याकडून इष्ट कार्य घडवून आणणें, अप्रत्यक्षत काम करून घेणें ०लागणें–१ मात्रा लागल्यामुळें ती होणें २ कार्य नेमकें होणें, मात्रा लागू पडणें सामाशब्द– ०बार–पु बंदुकीच्या गोळ्याची फैर, बंदुक उडविणें ०चा–ळ्याचा टप्पा, गोळीमारणी–पुस्त्री बंदुकीच्या किंवा तोफेच्या गोळ्याचा मारा जेथपर्यंत जातो तें अंतर **गोळी–ळे बेरीज**–स्त्री गोळाबेरीज पहा

**गोळुजणें**—सक्रि घुसळणें ? –नागा १७०९ –शर

**गोळेगणित**—न (गणित) गोळ्याच्या राशींचें गणित, चढत्या उतरत्या राशींचें गणित [स]

**गोळणवराचो खेळ**—पु (गो) विटीदांडूचा खेळ

**गोळूणा**—स्त्री (गो) विटी

**गोळ्या गोल्या**—पु (का) लहान मडकें, घागर. [स गोर]

**गोळ्या**—पु तांदूळ सडणारा, गोली–ल्या पहा

**गोळ्हाट, गोळ्हाटचक्र**—गोल्हाट पहा

**गौ**—स्त्री गाय (पशु) गो पहा [स] ०कोश– गोकोश पहा ०खाना– गोखाना पहा **गौंड–गौंडी**–पुनस्त्री गुराचा मार्ग गोवड पहा –स्त्रीच २ ८९ **गौमासी–मुखी**–गोमाशी, गोमुखी पहा ' तुम्हा लागीनिलिओ गौमासिया।तरि वारा जा का।' –शिशु २११ **गौळण–गौळवाडा–गौळा–ळी**–गव ळ्यें पहा

**गौड**—पु १ गौर, गौडबंगाल, बंगाल देशातील या नांवाचा प्राचीन प्रांत व त्याची राजधानी २ एक ब्राह्मण जात व तींतील व्यक्ति, पंचगौड –वि गूढ जाणणारा [स] सामासिकशब्द– ०बंगाल– (गौड व बंगाल या देशांत पूर्वी गारुडविद्या फार होत्या म्हणून) (ल) गारुड, तंत्रमंत्र, जादूटोणा ३ (ल) युक्त्या, मसलती, हिकमती, लबाडी ४ (ल) गूढ, कूट रचना 'गौडबंगाल रच ण्यात त्यानें (मोरोपंतानें) आपला काळ घालविला' –नि ८८९ ५ खोल डाव, कट करणें ६ चमत्कार, अद्भुत घटना ०बंगाली– वि १ गौडबंगाल जादूटोणा करणारा, २ गौड–बंगाल देशविष यक ०मल्हार–पु (संगीत) गायनातील एक राग यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात जाति संपूर्ण–संपूर्ण वादी मध्यम व संवादी धैवत गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर ०सारस्वत– सारस्वत ब्राह्मणाची जात सारस्वत पहा

**गौड**—वि गुळासंबंधी, गुळाचा [स गुड]

**गौंडरी टोपी**—स्त्री जिच्यावर गुंफलें सलम्याचें काम असतें अशी टोपी, ही फार टिकाऊ असते

**गौडा**—पु पाटील, गांवचा मुख्य अधिकारी [का]

**गौडारी(राणी)**—स्त्री (संगीत) तानसेन हा गौड ब्राह्मण असल्यानें त्याच्या म्हणण्याच्या ध्रुवपदपद्धतीस हें नाव पडलें आहे [गौड]

**गौडी**—स्त्री गुळापासून काढलेली दारू [स गुड]

**गौडी**—स्त्री (संगीत) एक रागिणी [गौड]

**गौंडी, गौंड्या**—गवंडी–ड्या पहा

**गौडुंकी**—स्त्री (गो) एक प्रकारचा कर

**गौण**—न १ न्यून, अभाव, तुटवडा, कमीपणा २ अपूर्णत्व, हीनता, तफावत –वि १ कमी प्रतीचा, हलक्या प्रतीचा, कमी महत्त्वाचा, अप्रधान २ आनुकल्पिक, गौणभूत बदला ३ मुख्य नव्हे तें, दुय्यम ' मूळबंधाचें लक्षण। वज्रासन गौण। नाम यासी॥' –ज्ञा ६ १९९ [स] ०मानणें–कमी लेखणें ' तें तीर्थ घालता वदनीं। ब्रह्मरस गौण मानी। ०कल्प–पु १ अमुख्य, अप्रधान हेतु किंवा उद्देश २ दुय्यम ध्येय, विकल्प, अनुकल्प, बदला, प्रतिनिधि ०पक्ष–पु १ कमजोर, खालच्या दर्जाचा, अमुख्य, अप्रधान पक्ष, बाजू (वाद, गोष्टी, प्रमेय यांचा) २ गौणकल्प ३ (सामा) हलका पक्ष, बाजी ०मुख्य न्याय–पु तारतम्याचा नियम (मुख्यामुख्य, मौक्तिक व अल कारिक प्रधान अप्रधान यातील) मुख्य पक्ष संभवत असता गौण अंगिकारू नये या अर्थी वापरतात **गौणीवृत्ति**–स्त्री शब्दाची स्वाभिधेय गुणसंबंधामुळें अर्थांतराच्या ठायीं असलेली प्रवृत्ति [स]

**गौतमी**—स्त्री १ गोदावरी नदी ' गौतमी तीरीं उत्पन्न होऊन।' –सप्र ३ ४० २ गाय (पशु) ' की गौतमी देखता पंचानन। भयें कापत चळचळा।' –भवि ९ १५७ [स गौतम एक ऋषि]

**गौप्य**—वि १ गोप्य, गूढ, गुप्त ' परतु गुज तें जाणावें । गौप्य आहे । '–दा ६ २ २० गुप्त ठेवण्यास लायक, गुप्त गोष्ट, रहस्य [ स गोप्य ]

**गौर**—वि १ गोरा, शुभ्र, निर्मळ, स्वच्छ (माणूस, वर्ण, रग–शरीराचा) २ तेजस्वी, कांतिमान ' गौरकाय व सरकार यावि षयींचें त्याचें पक्षपातित्व लोकांच्या चांगलें नजरेस आलें ' –भ्रम ७ २७१ ०काय–पु युरोपीयन माणूस ' –केले १ २६९ ०स्वर–पु रानगाढव

**गौर**—स्त्री पार्वती, भवानी, देवी, गौरी [ स ] (वाप्र ) **०आणणें**–ज्येष्ठागौरीची स्थापना करणें भाद्रपद शुद्ध षष्ठी किंवा सप्तमीस नदी, ओढा, यांच्या कांठच पाच किंवा सात खडे घेऊन, धुवून, ताटीवरील तबकडींत ठेवून आणून त्याची पूजा दारात गौर आणणाऱ्या मुलींनी घरीं येताना तोंडात पाणी घेऊन मागे न पहाता मुक्यानें देवापाशीं ते ( खडे=गौर ) आणून ठेवावयाचे व मग चूळ थुकावयाची असते (गाडग्याची) **०उभी करणें**–तपेलें किंवा तसेच भाडें घेऊन त्यास नवें लुगडें नेसवून वर मुखवटा ( किंवा खापराची वेळणी ) बसवून मग दागिने घालून मूर्ति तयार करणें ( गाडग्याची ) **०उतरविणें**–भाद्रपद शुद्ध षष्ठी–सप्तमीस गौर आणावयाच्या दिवशीं दोरे घ्यावयाचे असतात, ते गणपतीचा व कुमारिका आणि मुंज्या मुलाचा याचा आठ पदरी, व सवाष्णीचा व गौरीचा सोळा पदरी, असे घेऊन आठपदरी दोऱ्यास आठ सोळापदरी दोऱ्यास सोळा अशा गाठी देऊन त्यात आघाडा खोबरें, दूर्वा व रेशमी दोरा बांधून मग ते दोर हळदीनें पिवळे करून गौरीपुढें ठेवून त्यांची पूजा करून गळ्यात बांधतात नतर दहिभाताचा नैवेद्य दाखवून गौर ( सुगड ) एकीकडे ठेवतात **०जागविणें** गौरीच्या सन्मानार्थ जागरण करणें **०जेवणें**–सासरहून माहेरीं आलेली सवाष्ण जेवू घालणें, यावेळीं गुळाची पोळी गव्हल्याची खीर व करंज्या करतात **०बोळविणें**–( ज्येष्ठा गौर ) दहिभात करंजी ही शिदोरी व पूजेचें सामान घेऊन, जेथून गौरी ( खडे ) आणल्या तेथें जाऊन त्यांची पूजा करून ओटी भरावी व शिदोरी आणि गौरीचे खडे पाण्यात सोडून कांठची वाळू घेऊन घरीं आल्यावर ती वाळू सर्वत्र फेकणें इ० विधि ( गाडग्याची ) **०बसविणें**–श्रावणातल्या पहिल्या शुक्रवारीं एका सुगडात तांदुळ हळकुंड घालून वर वेळणी झाकून त्यास सोवळ्याचा खण किंवा चोळी पांघरविणें **०लिहिणें**–प्रथम सुगड व मातीची वेळणी यास काव लावून ती वाळल्यावर चुन्यानें नाक डोळे कान तोंड इ० आकृति काढून कोळशाच्या पुडीनें केसाचा भाग काढणे मग हळदीचा रंग करून त्याचे दागिने चितरावे शेवटीं सुगडाचें तोंडावर रंगविलेली वेळणी बसविणें

**गौर**—स्त्री खोल व पूर्ण विचार ' याची हरएकविशीं गौर करित जाणें ' –रा ३ २०५ [ अर गौर ]

**गौरनर**—पु प्रांताधिप, गव्हर्नर ( अप ) [ इ गव्हर्नर् ]

**गौरव**—न वजन, गुरुत्व, जडपणा ' पारदाचें गौरव इतर पदार्थांत नाहीं ' २ –पुन अब्रू मोठेपणा, भारदस्ती, मान्यता, सन्मान ( काम, मनुष्य यांचा ) ' आपले घरीं कोणी गृहस्थ आला असतां त्याचा गौरव करावा ' ३ वजन, भारदरी मुलाखत, योग्यता 'श्रीमंताजवळ याचें गौरव आहे ' ४ सत्कार, मान, आदर, पूजा (क्रि० करणें, ठेवणें, राखणें) ५ डौल, थाट माट, शोभा, बडेजाव, वैभव ' काय हा आरंभरभेचा गौरवु ' –ज्ञा ६ ४६२ ६ विनाकारण जास्त श्रम प्रयत्न कारणीं लावण्याचा दोष दुःख, श्रम अप्रिय क्लेशस्थिति याच्या उलट लाघव, हाल, त्रास, कठिण गोष्ट थोडा असता पर्यीं चालणें यात गौरव आहे ' [ स गुरु–गौरव ] **गौरवण**–न मोठेपणा देणें, सन्मान सत्कार **गौर(व)विणें**–उक्रि १ मानसन्मान करणें, मोठेपणा देणें, आदरानें वागविणें, गौरव करणें ' दिव्यालंकार वस्त्रें गौरवुनि । मंडपात बैसविल्या ' २ ( ल ) अंगावर वस्त्र जळणें (जळणें शब्द अशुभ आहे म्हणून त्याऐवजीं ) विस्तवाजवळ येऊ नको लुगडें गौरवेल ' **गौरवी**–वि गौरवयुक्त, आदरशील सन्माननीय, सभ्य

**गौरशी**—स्त्री १ खोल चौकशी, सूक्ष्म परीक्षा गौर पहा ' आमची गौरशी करून आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणुकेस हजीर आहों ' –ऐस्फुले ५२ २ ( चुकीनें ) कदर, सर्फराजी, गौरव ' आम्ही कामकाज केलें हें धनी दृष्टीनें पाहून गौरशी करील म्हणोन आस्था होती ' –पया १०० [ फा घौर्+रसी ]

**गौरी**—स्त्री (संगीत)एक राग याचे दोन प्रकार –पहिल्या प्रकारात षड्ज कोमल ऋषभ तीव्र गांधार कोमल मध्यम पंचम कोमल धैवत तीव्र निषाद हे स्वर लागतात आरोहात गांधार व धैवत वर्ज्य जाति ओडव संपूर्ण वादी ऋषभ संवादी पंचम गान समय सायंकाळ प्रकार दुसरा–यात षड्ज कोमल ऋषभ, तीव्र मध्यम पंचम, कोमल धैवत तीव्र निषाद हे स्वर लागतात गांधार व धैवत हे स्वर वर्ज्य अवरोहात गांधार वर्ज्य जाति औडुव षाडव वादी ऋषभ व संवादी पंचम, गानसमय सायंकाळ

**गौरी**—स्त्री १ गौर पार्वती, देवी भवानी २ ऋतुप्राप्त न झालेली मुलगी कन्या कुमारी कुमारिका ३ दहा वर्षांच्या वयाची अविवाहित मुलगी ४ देवीच्या पूजेचा भाद्रपद शुद्ध पक्षातील जागर व उत्सव ( क्रि० जागविणें ) गौर जागविणे पहा ५ गौरवर्णाची स्त्री, गोरी ' कनक चंपक दाम गौरी ' [ स ] सामाशब्द– **गौरीचा पेंड**–पु भाद्रपदात शेताचे बांध

घालण्यासाठी खणलेली ही माती फार चिकण असते या महिन्यात गौरीचा उत्सव असतो म्हणून यास हे नाव पडले –चा हळवा–पु नाचणीची एक जात. –चे डोहळे–पुअव चैत्रात पडणारी पावसाची बुरबुर ०तृतीया–स्त्री चैत्र शुद्ध तृतीया ०फळ–न एका काटेरी झुडपाचें फळ ०शंकर–पु १ एकमुखी रुद्राक्ष २ कठा, दाणे (मोती) ०हर–हार–पु १ शिवपार्वती २ वाङ्‌निश्चय झाल्यावर, वधूमडपी वर येण्यापूर्वी वधूनें जिची पूजा करावयाची ती पार्वती (आणि शंकर) कुमारी चार वोळवी व एक कलस अशा चार उतरडी चार बाजूस व मागच्या बाजूस मधोमध आणखी एक उतरड मांडून त्याच्या मध्यें धुतलेल्या पाटयावर धुतलेले तांदूळ ठेवून त्यावर ठेवावयाची अन्नपूर्णा, गौरीहाराचें साहित्य 'मांडिला गौरीहार।' –वसा ४६ ०हर पूजणें–१ वरील देवीची पचामृती पूजा करणें व लग्न लागेपर्यंत तिला कुंकुममिश्रित अक्षता वाहात राहणें २ (ल) लग्नाविषयी शिवपार्वतीची आराधना करणें गौरीहार सुतविणें–गौरीहाराच्या प्रत्येक मडक्याच्या गळ्याभोंवती सुताचे तीन फेरे घेणें –वदलापूर २०१

**गौरी**—न गायनाचा एक प्रकार, पारध्याचें गाणें 'पारधी घाट वाये। साधावया गौरी गाये। तेथ हरिण लुब्ध होये। आइकावया ॥' –ज्ञाप्र ७२० गारी पहा

**गौरी**—स्त्री शेणाची गोंवरी, तिचा तुकडा, भुसकट इ० गवरी गोवरी पहा

**गौल**—वि गोड मधुर 'मज तुझे अति आरप बोल। परि अमृताहूनि दिसती गौल' –स्वादि ६ १ २९ [स गुड–ल= गूळ, गु गोल्य]

**गौल्य, गौलता**—स्त्री रुचि, मधुरता. 'हा गा साकर आणि दूध। हे गौल्य कीर प्रसिद्ध।' –ज्ञा ३ २२६ २ मृदुता, माधुरी, मधुरता (भाषणात) 'गौल्यता नाहीं वचनाचें।' –दा १ ६ १५

**गौल्यता**—स्त्री सुबकपणा, सुंदरता (आकृति अक्षर याची) [स गोल, गोल्ता]

**गौव्या**—वि (माण) (महारातील एक शिवी) गर्भात नाचा, सापडलेला [गवसणें]

**गौसणी, गौळण गौळधाडा, गौळा, गौळी**—गव मध्यें पहा

**गौसायळ**—स्त्री घायळ, अगावर काटे असणाऱ्या साळ (जनावर)ची एक जात –दा ३ ७ ८ १

**गौसी, गोसी**—स्त्री परस्परसबध, सांखळी 'आणि विषयेंद्रियां गौसी। स्वभावें सव भूतांसी।' –ज्ञा १४ १२

**ग्याज**—स्त्री बैलाच्या गळयांतील घाट किंवा ठोकळा (मधली लोखडी घंटा) जींत बांधलेला असतो ती दोरी बैलाच्या गळयातील घाट [?]

**ग्याझि(झे)ट**—न बातमी–वर्तमानपत्र, पत्रक, आज्ञापत्र (सरकारी), गॅझिट पहा [इ] **ग्याझेटियर**–न भूगोलविषयक कोश, स्थलकोश, स्थलवर्णनकोश

**ग्याट**—न गेट पहारा, पोलीस चौकी 'गेला कोळयाचे ग्याटाला।' –ऐपो ४६ [इ गेट]

**ग्यादरिंग**—न सम्मेलन, जमाव, गर्दी, समाज, मडळी, सभा [इ गॅदरिंग]

**ग्यान**—न ज्ञान पहा [स ज्ञान] ०गंड–वि अल्पज्ञान व फार गर्व असलेला 'तुका म्हणे ग्यानगंड। देवा सुखें पावो नाड।' –तुगा ३१८१ **ग्यानी**—पु ज्ञानी माणूस

**ग्यान, ग्यानदास**—न गुन्हे करणाऱ्या लोकांचें घरफोडीचें (पळी, बत्ता यासारखें, सहा पासून अठरा इंच लांबीचें) एक हत्यार –गुजा १२२

**ग्यारटी**—स्त्री हमी, जामीनकी पडयाळाची गॅरटी' [इ]

**ग्यारिसन**—पु फौजबद ठाणें, सैन्याचें ठाणें, बदोबस्तासाठीं फौज ठेवण्याचें ठिकाण, शिबंदी [इ गॅरिसन]

**ग्यारेव करणें**—क्रि (व) पळून जाणें, सूबाल्या करणें 'त्यानें ग्यारेव केली'

**ग्यालन**—पु पातळ प्रवाही पदार्थ मापण्याचें एक कैली माप हें सामान्यत सहा मोठया बाटल्याएवढें असतें [इ गॅलन]

**ग्यालरी**—स्त्री १ गॅलेरी, सज्जा २ (नाटक) नाटकगृहांतील दुसऱ्या मजल्यावरील प्रेक्षक बसण्याची जागा [इ गॅलरी]

**ग्याली**—स्त्री (छाप) मुद्रापाट, ठसेपाट, प्रथित मुद्रापात्र, स्टिकेंत जुळविलेला मजकूर, स्टीक भरल्यानतर उतरून (काढून) ठेवण्याचें साधन हिचे कॉलम् गॅली व पेज गॅली असे दोन प्रकार आहेत [इ] **ग्यालीप्रुफ**–न कच्चें मुद्रित, कच्चा छाप, शुद्ध करण्याचा छापील खर्डा, ठसेपाटाचा छाप [इ गॅली]

**ग्रँट**—स्त्री १ द्रव्यसाहाय, मदत २ सरकारकडून मिळणारी वार्षिक मदत (खातें, शिक्षणसंस्था इ० ना) [इ ग्रँट]

**ग्रंथ**—पु १ परस्पर सगतवार अर्थाच्या वाक्याचा रचनाविशिष्ट समुदाय पोथी, पुस्तक (गद्य किंवा पद्य याचें) २ (ल व शब्दश) गुफणी, गुंठवणी, जोडणी, सपादणी ३ पुस्तक भाग, अध्याय, परिच्छेद इ० ४ बत्तीस अक्षरांचें वृत्त किंवा वृत्ताची ओळ 'व्यासकृत महाभारत लक्षमय प्रसिद्ध हा मारी।' –मोआदि १ ९ (एका अनुष्टुभात ३२ अक्षरें असतात व अनुष्टुभालाहि ग्रंथ म्हणतात त्यावरून ३२ ची सख्या) ५ (ल)

योजना; बेत; कट; मसलत. 'बाळोबा आणि भाऊ हा सगळा एक ग्रंथ आहे.' –अस्तंभा ९६. ६ प्रसंग; गोष्ट; हकीकत (व्यवहार इ० संबंधी). 'आमचा पूर्वापार ग्रंथ ऐकून मग न्याय करा.' ७ पराचा कावळा; एवढ्याचें एवढें करणें; विस्तार. ८ अर्थ, संगति. 'त्यांनीं राजीनामा कां दिला याचा ग्रंथ लावणें कठीण.' –के २७.५.३०. ९ अकांडतांडव; धुमाड. [सं. ग्रथ् = रचणें] (वाप्र.) ०आटोपणें–(काम) संपणें; (कार्य) नाश होणें, (माणूस) मरणें. 'पण आमच्या दुर्दैवानें सर्वच ग्रंथ आटोपला।' –भयंकरदिव्य. प्र-ग्रंथन–न. गुंफण; जुळण; बांधणी; रचना. 'आणि माझें तव आघवें। ग्रथन येणेंचि भावें।' –ज्ञा १३.३२८. [सं.] ०पंचक–न. (लि.) पवित्रशास्त्रांतील पहिलीं पांच पुस्तकें. हीं मोशे यानें लिहिल्याचें मानितात. (इं.) पेंटाटयूक. 'ग्रंथपंचकामध्यें इस्राएल लोकांचें नेमशास्त्र आहे.' ०विस्तार–पु. ग्रंथांतील गोष्टींचा, भाषेचा विस्तार, पाल्हाळ; मोठा ग्रंथ. सामाशब्द– ०कर्ता–कार–वि. पुस्तक तयार करणारा, रचणारा कवि; लेखक; संपादक. प्र-ग्रंथणें–उक्रि. (काव्य.) १ अर्थानुसंधानपूर्वक अनेक वाक्यें एकत्र गुंफणें, बांधणें, जुळणें, रचणें (पद्य, कविता) ग्रंथरचना करणें; ग्रंथ संपादणें. 'जें मी संजात ग्रंथलों देख। आचार्यें कीं।' –ज्ञा १८.१७६९. 'ग्रथिलें भारत ज्यानें त्यालाहि स्वमनिं सौख्य वाटेना।' २ गुंफणें; ओंवणें (पुष्पादि). ३ एकत्रित करणें; जुळणें. [सं. ग्रथन] ग्रंथाची–ग्रंथांतर टीका–स्त्री. एका पुस्तकानें दुसऱ्या पुस्तकाचें विवरण करणें. ग्रंथावरचा मालकी हक्क–पु. (कायदा). ग्रंथलेखकाचा त्या ग्रंथाचें पुनःप्रकाशन, भाषांतर इत्यादिसंबंधी हक्क. (इं.) कॉपीराईट. ग्रंथीय–थी–वि. पुस्तकासंबंधीं; पुस्तकांतील. ग्रंथोपजीवी–वि. ग्रंथ लिहून (रचून) पोट भरणारा. 'आणि ग्रंथोपजीवियें। विशेषीं लोकीं इयें' –ज्ञा १८.१८००. [सं. ग्रंथ+उपजीविन्]

ग्रंथि-ग्रंथिका—पुस्त्री. १ गांठ २ लांकडावरील गुलुंब; गांठ. ३ वेत, बोरू यांची गांठ, संधि, पेरें. ४ (ल.) शरीराचे सांधे. ५ बंधन; संबंध; नातें; लागाबांधा (लग्न इ० चा). ६ (ल.) घोंटाळा; गुंतागुंत; गळफांस; फासा; गुंतविण्याचें, गोंवण्याचें कोणतेंहि कारण जसें.–मोह–माया–संशय–अज्ञान-ग्रंथि. 'मा मी विश्वेश्वर भेटे। आणि जीवग्रंथी न सुटे।' –ज्ञा १८.१४०४. ७ गर्द; उठाणु; बाघणा. ग्लँड या इंग्रजी शब्दास प्रतिशब्द. [सं. ग्रथ्=बांधणें]

ग्रंथिक संन्निपात—पु. ज्या तापांत संधिभागांत गांठ येते असा ताप, ज्वर; प्लेग. ग्रंथिका–स्त्री. बरगडीचें हाड. 'मेरु शोभला निजपृष्ठींचा कणा। चौदा लोकेंसीं ग्रंथिका जाणा।' –स्वादि ७.४.२०. ग्रंथिरोग–पु. अंगावर गांठी गाठी उठणारा रोग.

ग्रथित—वि. ग्रथन केलेलें; गुंफलेलें; जुळलेलें; रचलेलें. [सं.]

ग्रॅफाइट—पु. एक खनिज पदार्थ; हा काळा व मऊ असतो. याच्या शिसपेनसिली करतात. [इं.]

ग्रसणें—उक्रि. (काव्य) गिळणें; आच्छादणें; व्यापणें. ग्रासणें पहा. ग्रसन–न. गिळणें. [सं. ग्रसन]

ग्रसित, ग्रस्त—वि. १ गिळलेलें; खाल्लेलें. 'सर्पानें मंडूक ग्रस्त केला.' २ अक्षर, पद गाळून उच्चारलेलें; खाल्लेलें; गाळलेलें. ३ (ल.) गिळंकृत, आत्मसात केलेलें; घालमेल-अफरातफर केलेलें. ४ व्यापलेलें. ५ गट्ट केलेला; हरवलेला; धरलेला; मारलेला; पीडिलेला; ग्रस्त झालेला अशा अर्थी समासांत योजतात; जसें–कामग्रस्त=मदनानें त्रस्त; चिंता–दारिद्र्य–भूत–राहु–शाप–काल–भय–भार–रोग–शत्रु–संकट–व्याधि–ग्रस्त=चिंता, गरीबी इत्यादिकांनीं पीडिलेला. [सं. ग्रस्=भक्षण करणें; ग्रस्त] ग्रस्तास्त–पु. ग्रहण असतांनाच (तें सुटण्यापूर्वी) सूर्य किंवा चंद्र मावळणें. ग्रस्तोदय–पु. ग्रहण असतांना सूर्य किंवा चंद्र यांचा होणारा उदय.

ग्रह—पु १ घेणें; स्वीकार; अंगीकार; धरणें. २ चंद्र किंवा सूर्य यांचें ग्रहण (राहुकेतुकडून). ३ सूर्याभोंवतीं फिरणारा गोल (पृथ्वी, बुध, शुक्र, गुरु, मंगळ इ०चा); ज्योतिःशास्त्राप्रमाणें हे (सूर्यासह) नऊ आहेत; (सामा.) केंद्रस्थ, उष्ण व देदीप्यमान पदार्थाभोंवतीं फिरणारा, कमी उष्णतेचा परप्रकाश गोल–सूर्य २२; (ग्रहाभोंवतीं फिरणारा तो उपग्रह) ग्रह हा ताऱ्याप्रमाणें दिसतो. पृथ्वीच्या दैनंदिन गतीमुळें हा उगवतो व मावळतो आणि स्वतःच्या गतीनें ताऱ्यांमधून पूर्वेकडून पश्चिमेकडे जातो. परप्रकाश असल्यानें याचें तेज स्थिर असतें. –सृष्टि. ४ एक प्रकारचें पिशाच्च, गिरा. 'जैसा ग्रहातें पंचाक्षरी। अनुमानी कां।'–ज्ञा २८५. (यापासून ल.) व्याधि, उपाधि, पीडा इ०; तापदायक माणूस; खनपटीस बसणारा, पाठीस लागणारा इ० बद्दल म्हणतात. ५ कल्पना; भावना; मत. ६ चिकाटी. ७ उमज; अधिगम (एखाद्याच्या अर्थाचा); बुद्धि; अर्थग्रहण, अर्थबोध; धारणा; समजूत. ८ मगर; एक मोठा मासा; ग्राह. 'गज सरोवरीं ग्रहग्रस्त। स्त्रियापुत्रीं सांडिला जीत।'–एभा १२.८५. [सं.] सामाशब्द–०कुंडली–स्त्री. पंचांगांतील ग्रहांच्या दशा दाखविणारी आकृति. ०गणित–न. ग्रहांच्या गतीविषयींचें गणित. ०गति–स्त्री. (फलज्योतिष किंवा ज्योतिःशास्त्र) १ ग्रहांची गति २ दुष्ट ग्रहाचा विशिष्ट परिणाम (मुख्यत्वें माणसाचें नशीब पाहतांना) 'गृहस्थ पडले ग्रहगतींत.' ०चार–पु. सूर्य किंवा इतर ग्रह यांची गति, भ्रमण. ०जप–पु ग्रह प्रसन्न होण्यासाठीं त्या त्या ग्रहाच्या विशिष्ट मंत्राचा करावयाचा जप. ०दशा–स्त्री. मनुष्यादिकांस

प्राप्त होणारी शुभाशुभ फलसूचक सूर्यादि ग्रहाची दशा, दृष्टि, अवस्था, काल ०दान–न नवग्रहांना प्रसन्न करण्यासाठीं ब्राह्मणाला द्यावयाचें दान ०पीठ–न ग्रहमख करण्यासाठीं नवग्रह देवता मांडण्याचा पाट, चौरंग ०पीडा–बाधा–स्त्री. १ प्रतिकूल ग्रह किंवा ग्रहयोग यापासून उत्पन्न होणारें दुःख, दारिद्र्य, आजारीपण इ० २ भूतपिशाच्च बाधा ०बल–न विवक्षित राशीस ग्रहाची अनुकूलता ( विवाह, उपनयन, मंगल कृत्य करण्याविषयीं ) ०मख–यज्ञ–पु ग्रहांना अनुकूल करून घेण्यासाठीं, ग्रहांच्या प्रीत्यर्थ करावयाचा यज्ञ, ग्रहशांति, नवग्रहांना उद्देशून करावयाचा होम, हा होम विवाह, मुंज व इतर शांतीच्या प्रसंगीं करतात ०मंडळ–न ग्रहगोल, सर्व ग्रहांचें चक्र ०मैत्री–स्त्री वधूवरांच्या पत्रिकांचा मेळ पत्रिका जुळणें, पटणें राशींच स्वामी सात असल्यानें, ज्या राशींत नवरी जन्मली आणि ज्या राशींत नवरा जन्मला, त्या दोन्हीं राशींचा स्वामी एक असणें किंवा एकमेकांस अनुकूल असणें ०योग–पु शुभाशुभदायक ग्रहांचा योग, स्थिति ०वैर–न १ ग्रहांचें शत्रुत्व २ पत्रिका न जमणें याच्या उलट ग्रहमैत्री ०शांति–स्त्री ग्रहमख ०साधन–न १ (कोष्टक गणित किंवा दुर्बीण इ० यंत्रें यांच्या साह्यानें ) ग्रहदर्शनाचा निश्चय, ग्रहांचें स्थळ व गति यांचें शोधन, ग्रहांचे वध घेणें २ ग्रहांची आराधना ०सारणी–स्त्री अमुक ग्रह अमुक ठिकाणीं आहे याचा निश्चय करण्याचीं गणितें किंवा कोष्टकें, ग्रहसाधनाचें गणित ग्रहानुकूल्य–न ग्रहांची प्रसन्नता, ग्रहबल ग्रहावेश–ग्रहपीडा ग्रहेश–पु सूर्य

ग्रह—पु (ताल ) ताल देण्याचा प्रारंभ याचे प्रकार चार–सम, अतीत, अनागत व विषम [ सं ] ०मोक्षविचक्षण–वि ( संगीत ) ग्रह व न्यास याचे नियम जाणणारा ०मोक्षविचक्षणत्व–न ( संगीत ) ग्रह व न्यास याचे नियम जाणणें

ग्रह–कलह–कृत्य–छिद्र–द्वार—गृह मध्यें पहा

ग्रहण—न १ घेणें, स्वीकारणें, धरणें, अंगीकार, धारणा, इ० उदा० विषयग्रहण, स्वादग्रहण इ० ग्रह पहा २ (सामा ) दोन खस्थ पदार्थांमध्यें तिसरा येऊन एक अदृश्य होणें सूर्याच्या आड चंद्र आल्यामुळें किंवा चंद्रावर पृथ्वीची छाया पडल्यामुळें जें सूर्य–चंद्र बिंबाचें आच्छादन होतें तें पूर्ण ( खग्रास ) अपूर्ण व कंकणाकृति असे ग्रहणाचे तीन प्रकार आहेत ग्रहणाच्या प्रारंभास स्पर्शकाल मध्यास मध्यकाल व अंतास मोक्षकाल म्हणतात. खग्रासाच्या प्रारंभास संमीलनकाल आणि शेवटास उन्मीलनकाल म्हणतात, सुमारें १८ वर्षें व १० महिन्यांनीं पुन्हां तींच तींच ग्रहणें येतात –सृष्टिज्ञान ( भिडेकृत ) १४ चंद्रसूर्यांचा ग्रास सूर्यग्रहण–न ( अमावास्येस ) चंद्राची छाया पृथ्वीवर पडल्यानें कांहीं वेळ सूर्य न दिसणें अशी स्थिति चंद्रग्रहण–न (पौर्णिमेस) पृथ्वीची छाया चंद्रावर पडल्यानें कांहीं काळ चंद्र न दिसणें अशी स्थिति पृथ्वी, चंद्र व सूर्य हे फिरत असतांना एका रेषेंत आले म्हणजे ग्रहणें होतात चंद्राच्या कक्षापातास राहू, केतु म्हणतात, सूर्यग्रहणाचा प्रारंभ पश्चिमेकडे व शेवट पूर्वेकडे होतो, याच्या उलट चंद्राचा होतो ग्रहणपट–पु कुंडली, जन्मपत्रिका ‘ मग वाचिला ग्रहणपट । सत्यभामेचा ॥ ’ –कथा ५.२.१७ ग्रहणफळ–न ग्रहणकालाचीं फलज्योतिषावरून निघणारीं भविष्यें ग्रहण लागणें–१ चंद्रसूर्य अदृश्य होणें २ ( ल ) संकटग्रस्त होणें ग्रहण सुटणें–( ल ) संकटावस्थेंतून मुक्त होणें ‘ ग्रहण सुटलें ’ –टि २ ९८ ग्रहणाशौच–न. ग्रहणामुळें प्राप्त झालेला विटाळ ग्रहणकालांत मानलेली अस्पृश्यता

ग्रहणी—स्त्री १ संग्रहणी, रक्तातिसार २ तान्ह्या लहानसर आतडीं ३ शरीरांतील उष्णताप्रसारक व चैतन्योत्पादक भाग, धमनी. [ सं ]

ग्रहणीय—वि घेणें, स्वीकारणें, ताब्यां घेणें, पकडणें वगैरेस योग्य, ग्राह्य, ग्रहण पहा [ सं ]

ग्रहस्त–स्थ—पु गृहस्थ पहा

ग्रहस्वर—पु ( संगीत ) गीताच्या प्रारंभाचा स्वर

ग्राईक—वि १ गिऱ्हाईक पहा २ ( ल. ) गुणग्राहक [ ग्राहक ]

ग्राथिक—वि १ ग्रंथासंबंधीं, ग्रंथांत आढळलेलें, लेखी [ सं ग्रंथ ] २ गुंफलेला, ओंवलेला, रचलेला [ ग्रथ् ]

ग्रानाईट—पु एक प्रकारचा दगड, यांत स्फटिक, चंद्रकांत व अभ्रक हे भिन्न भिन्न प्रमाणांत मिश्रित असतात हा फार कठिण व टिकाऊ असतो हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं हा सांपडतो [ इं ]

ग्राम—पु १ गांव खेडें २ ( संगीत ) सप्तस्वरांतील मुख्य तीन अवधी याचे प्रकार तीन–षड्जग्राम, मध्यमग्राम व गांधारग्राम सात स्वरांचा समूह ( इं ) गॅमट ३ गांवांतील प्रमुख किंवा माननीय माणूस ४ अरेराव, कचाट्या, जरब बसविणारा, कचाटींत धरणारा माणस ‘ तो कसला ग्राम त्याच्या बरोबर भांडून तुझा परिणाम लागणार नाहीं ’ ५ जमाव, समुदाय ‘ मुतेंद्रिना ऐसा वाग । ग्राम कर्मेंद्रियांचा । ’ –यथादि ३ ९२ ( समासांत ) इंद्रिय–गुण–पुण्य–भूत–स्वर–ग्राम ‘ इंद्रिय ग्रामावरी येणें नाहीं । ’ –ज्ञा ५ १०५ [ सं ] सामासशब्द– ०कंटक–कुठार–पु चहाड्या, निंदा, त्रास, तंटे इ० लावणारा, गांवगुंड, गांवची पीडा, व्याद दुष्ट, वाईट माणूस ग्रामकी–स्त्री गांवजोशी किंवा पाटील इ० चें काम गांवकी ०कूळ–केसरी–सिंह–पु १ ( ल ) गांवांतील कुत्रें ‘ इया ग्रामसिंहाचिया ठायीं ’ –ज्ञा १३ ६८० २ ( ल ) भेदरट माणूस ०खर्च–पु १ गांवचा खर्च २ फुकट किंवा विनाकारण खर्च,

ज्याचा मोबदला नाहीं असा खर्च ०जोशी-ज्योतिषी-पु गावचा जोशी, हा पंचाग सांगणें, पत्रिका पहाणें, मुहूर्त काढणें इ० कामें करतो 'आधीं होता ग्रामजोशी। राज्यपद आलें त्यासी। त्याचें हिंडणें राहीना। मूळ स्वभाव जाईना ॥' -तुगा ग्रामज्य-न ग्राम्य, मैथुन, सुरत क्रीडा 'ग्रामज्य आठवे चित्तीं।' -दा २ ५ २८ ग्रामणी-पु १ (काव्य, विद्वानाचें सभाषण) पाटील, गावचा मुख्य २ (लौकिक) गावगुंड, चावट, वाईट, कुटाळक्या, पीडादायक माणूस, ह्याद 'रामनामें विव र्जित। ग्रामणी बोलिजे तें ग्राम्य गीत।' -एभा ८ १६९ ३ गावचा महार -स्त्री कुटाळकी, गावकी. ग्रामिणी पहा 'आनित्य ग्रामणी मस्ती सदा।' -दा २ ३ ६ -वि मुख्य, श्रेष्ठ, प्रमुख ग्रामणीक-न हरामखोरपणा, ग्रामणी, ग्रामिणी पहा 'तरी जी पाहता हेंहि ग्रामणीक। दिसोनि यतसे कीं निटक।' -सादि १२ २ १०८ ग्रामण्य-न १ मुख्यत जातीसबधींचा किंवा इतर गावकीचा तटा, खटला २ बहिष्कार ३ जातीच्या खट त्यासबधीं चौकशीसाठीं भरणारी ग्रामसभा, जातगगा ०ग्रय-न (सगीत) ग्राम अर्थ २ पहा ०थिल्लर-न गावांतील ल्हा लपें तळें, डबकें 'कीं गतधवेचें यौवन। कीं ग्रामथिल्लराचें जीवन।' ०दुर्गा-स्त्री गावची कुलदेवी, भवानी, ग्रामाधिका रिणी देवता ०देऊळ-न गांवातील सार्वजनिक देऊळ ०देव-देवता-दैवत-पुक्लीन १ ग्रामाधिकारी-रिणी, गावचा कुल देव-देवी २ या देवतेच्या खर्चास इनाम दिलेली जमीन, उत्पन्न, ग्रामदेवीची जमीन ०धर्म-पु गावचे धार्मिक विधी, नियम, चालीरिती इ० परंपरेनें चालत आलेला गांवचा धर्म ०नेत्र-न (ल) महार, गावचा जागल्या ०पंचायत-सभा-संस्था-स्त्री गावची सर्व व्यवस्था पाहणारी संस्था खेड्यातील म्युनिसिपालटी, ग्रामस्वराज्य ०पशु-पु माणसाळलेलें जनावर ०विदुटी-स्त्री खेड्यातील गल्ली, बिदी 'तव ते गोधन ग्रामविदुटी। अपार मोळी असती चव्हाटी।' -नव १३ ११५ ०याजक-पु गावचा उपा ध्याय, ग्रामोपाध्याय ०लेखक-पु कुळकर्णी 'ग्रामलेखक ते स्थळीं।' -निमा (आत्मचरित्र १ १०१) ०सूकर-पु गावडुकर ०स्त-स्थ-वि गावात राहणारा, गावचा रहिवासी, गावकरी 'ऐसें बोलून ग्रामस्तानें' -नव १० १६३ 'आताच भोगू तरी हे पहाट। ग्रामस्थ येतांच भंगेल हाट।' ग्रामाचार-पु ग्रामधर्म पहा ग्रामांतर-न १ दुसरें गाव २ आपलें गाव सोडून परगावीं जाणें ग्रामाधिकार-कारी-पु गावासबधीं अधिकार, तो गाजवि णारा माणूस, अधिकारी, गावकामगार ग्रामाधिपति-पु पाटील 'ग्रामाधिपतिरूपें श्रीरघुवीरें जाण।' -सप्र २ ३४ ग्रामिणी-स्त्री हरामखोरी, चहाडी इ० ग्रामणीक पहा ग्रामोपाध्याय-पु गावचा उपाध्याय, ग्रामजोशी, ग्रामयाजक पहा ग्राम्य-वि १ खेड्यात झालेला, जन्मलेला, गावात उत्पन्न झालेलें किंवा गांवासबधीं २ गावटी, गांवढाणी, गांवढळ, खेडवळ ३ माण साळलेला (पशु) याच्या उलट रानटी ४ लागवडीनें उत्पन्न केलेलें (शेतीचें उत्पन्न), याच्या उलट आपोआप झालेलें ५ प्राकृत व इतर देशी (भाषा), याच्या उलट संस्कृत ६ प्रापचिक, ससारी, याच्या उलट वन्य=जगलांत राहणारा ७ अश्लील, अशिष्ट, असभ्य ८ अतिशय विषयासक्त ग्राम्यगीत-न १ अश्लील पद, लावणी. २ खेडवळ गाणें, पवाडा इ० ग्राम्यधर्म-सभोग, ग्रामज्य पहा ग्रामस्त्री-स्त्री वेश्या, राड 'ग्राम्य स्त्रियाचे सगतीं जाणें।' -एभा ८ १३९ ग्राम्यालाप-पु १ खेडवळ गप्पागोष्टी २ लावणी, शृंगारपर कविता [स]

ग्रामोफोन-पु फोनोग्राफ, ध्वनियत्र, गाणारें यत्र [इं]

ग्राव-पु (शाप) दगड, लिथियम या शब्दाचा शब्दास प्रतिशब्द ०काम्ल-न. ग्लायकोलिक ॲसिड [स ग्रावन्]

ग्राव-पु १ धोंडा, दगड 'मुखें फाडिती ताडिती ग्राव धोंडा' -मुरामा, युद्धकांड ११४ २ मेघ ३ पर्वत 'ग्रावामाहुनि मूर्तीं उतरली ते स्वर्णदी सत्वरी।' -वैराग्यशतक ६८ [स ग्रावन्]

ग्रास-पु १ घास, अन्न २ गट्ट करणें, गिळणें ३ ग्रहण किंवा ग्रहण लागलेला भाग ४ राज्य, संस्थान, सरदारी वडील मुलास मिळते, म्हणून धाकट्या मुलास इतमाम चालविण्या साठीं जो ऐवज मिळता तो -मागा ४१ ५ नाश 'ग्रासातेंही ग्रासुनि पुरता।' -ज्ञा १५ ५४९ [स] (वाप्र) ग्रासणें-सक्रि १ गिळणें, गट्ट करणें २ लाच घेणें, अफरातफर करणें ३ (ल) व्यापणें आच्छादणें (ढगानें आकाश, राहूनें चद्र सूर्य) ४ (ल) गजणें (एखादी धातु), एखाद्या पदार्थानें खाली जाणें, कीट होणें. ५ निरुत्तर करणें, कुटित करणें, गतिहीन करणें ६ नाश करणें 'ना अर्जुना मी काळु। आणि ग्रासिजे तो माझा खेळु।' -ज्ञा ११ ४९१ ७ (काहींच्यामतें) त्रासविणें, पीडणें छळणें (तोंडाचा) ०नेणें, काढणें-काम पुरें होत आलें असता त्याचा नाश होणें-करणें आयत्यावेळीं कार्य बिघडणें, बिघाड करणें म्ह० प्रथमग्रासे मक्षिकापात [स ग्रास, ग्रसन]

ग्राह-पु १ नक्र, मगर, सुसर २ पाणहत्ती ३ (सामा) समुद्रातील कोणताहि मोठा प्राणी, जलचर 'गज करवडी महा-ग्राह।' -एरुस्व १० ८० ग्राहक, ग्राही, ग्राहिक-वि १ धरु णारा, घेणारा, स्वीकारणारा २ (ल) योग्य गुणग्रहण कर णारा, चाहता ३ ज्ञाता, जाणता 'यथें कोणी ग्राहक असल्यास न्यायशास्त्रातील विषय काढू' (समासात) गुणग्राहक-रस ग्राहक इ० ४ गिऱ्हाईक, माल विकत घेणारा 'ग्राहीक पातला परमनिका।' -मुआदि १८ १२९ ग्राहकबुद्धि-स्त्री विषय

महणाविषयीं कुशल बुद्धि –वि तद्विशिष्ट मनुष्य ग्राहकी-हिकी, ग्राहिकै-स्त्री १ गिऱ्हाइकी २ खरेदी ' आतां सुखेंसि जीविता । कैची ग्राहिकी किजेल पाडुवुता ' –ज्ञा ९ ४९७

ग्राह्य–वि १ मान्य, कबूल २ स्वीकारणें, घेणें, धरणें, पकडणें वगैरेस योग्य, शक्य, जरूर, पात्र ग्राह्यांश–पु तथ्य, सार, मुख्य भाग, चांगला किंवा उपयोगी पडण्याजोगा अंश, तात्पर्यार्थ [ स ]

ग्री(ग्रि)वा—स्त्री १ गळ्याच्या पाठीमागील बाजू मन्या भ्रात, ( सामा ) मान. २ कंठ, गळा ' उदासीन जातो ग्रिवा दाटलाहे।' –राक १९५ ०घंटा–स्त्री गळयाची घंट, गळया वरील डेरा ' उपरि सोळावा अध्यावो । तो ग्रीवेघंटेचा आवो । ' –ज्ञा १८ ४० ०प्रणाली–स्त्री (प्राणिशास्त्र) कवचधर वर्गापैकीं शीर्ष व वक्ष यामधील करकोंचा ०कशेरू–पु ( प्राणिशास्त्र ) मानेचा मणा, ( इ ) सर्व्हिकल व्हर्टेब्रा

ग्रीष्म-ग्रीष्मर्तु—पु ज्येष्ठ–आषाढ असा दोन महिन्यांचा काळ, उन्हाळा ' नातरी ग्रीष्मकाळीं सरिता । शोषूनि जातीं समस्ता ' –ज्ञा २ ३५९ [ स ]

ग्रूत—( गो ) १ काचा वसविण्याची लाबी २ पिठाची खळ

ग्रेट—पु ( छाप ) जबरा, पायका टाईपापेक्षा थोडा मोठा टाईप, हा सोळा पॉइंट असतो [ इ ग्रेट प्रायमर ]

ग्रोस—पु बारा डझन, १४४ संख्या [ इ ]

ग्लान—वि ग्लानीनें युक्त, श्रांत, थकलेला, खिन्न, क्लांत, श्रमलेला ( दुखणें, शोक, श्रम इ० नीं ) [ स ग्लै ]

ग्लाति, ग्लानि—स्त्री १ माघ, सुस्ती, मांदगी २ खिन्नता, खंती आयुष्य निमालें आतुलियेकडे । ते ग्लानीचि नाहीं । ' –ज्ञा ९ ५११ ३ नम्रपणाची प्रार्थना, काकुळत, विनवणी ' ग्लाति लिहिता वेळोवेळा ।' –एरुस्व ४ ४४ ४ क्लांति, श्रांतपणा ५ दु ख पश्चात्ताप ' वासना नदी महापुरीं । प्राणि बुडतां ग्लानी करी । ' –ज्ञा ५ २ १२ ६ उतरती कळा, दुर्बलता [ स ग्लै ]

ग्लास—पु १ पेला ( कांचेचा, धातूचा ) २ ( ल ) दारू, मद्य [ इ ]

ग्लिसरिन—न एक औषध पाक तेलें व चर्बी यांत सापडणारा द्रव्यांश शोधन क्रियेनें निराळा काढल्यावर हें तयार होतें हें चिकट रंगहीन चवीस गोड, पातळ, व जखमेस आरामकारक यहीन अंग फुटल्यास त्यावर गुणकारी, हवेंत न उडणारें असें आहे [ इ ]

ग्लोब—पु पृथ्वीचा, दिव्य क्या कांचचा (किंवा सामान्य कोणताही ) गोल [ इ ]

ग्वड्ड—वि (कर्ना ) थाप्र (जनावर) 'ती म्हैस ग्वड्ड आहे ' [ का ]

ग्वळूळी—स्त्री ( वे ) तुरीचें टरफल [ का ]

ग्वाड—न ( कु वे ) गूळ, गोड [ गोड ]

ग्वाही—स्त्री गोही, साक्ष, शाहिदी, शपथेवर दिलेली जबानी, साक्षीपत्र ' दुष्ट आचरण ग्वाही माझें मन । ' –तुगा १८५७ –पु साक्षीदार [ फा गुवाही ] म्ह० मना एवढा ग्वाही त्रिभुवनात नाहीं ' ०दार–वि साक्षीदार

---

# घ

घ—व्यंजनमालेतील चौथें व्यंजन, ग ह्या वर्णाचें महाप्राणोच्चार्य रूप अक्षरविकास –पहिली अवस्था अशोक गिरनार लेख, दुसरी रुद्रदाम गिरनारलेख, तिसरी प्रतिहार बाउक जोधपूरलेख, चवथी परमार उदयादित्य उदेपूरलेख, पाचवी उज्जनीलेख, प्रचलित अवस्था इ. स १२०८ मधील परमार धारावर्ष याच्या वेळचा ओरिआ इ० लेख

घइलट, घइलाड, घईस—घैलट पहा

घई—गई, गय पहा ' योग्य जाहला सग म्हणावा काय घई या कैवारासी । ' –राला ४३

घई—स्त्री (घराच्या दालनाची ) गर्भी विस्तार रुंदी, (समासांत ) दुघई, चौघई इ० [ ? तुल० स गृही, गति, प्रा गइ= प्रकार हिं घाई=मार्ग, हिं घाई=दोन बोटांतील अंतर ]

घऊस—वि लठ्ठ, घट्टपुष्ट, –स्त्री घुशीसारखा लठ्ठ माणूस ' शरिरानें बनली घऊस । तुला निजाया बसायाची हौस । ' –पला ७७ [ घूस ]

घऊस—वि घौस पहा

घगाट—पु सोसाटा, घोंगाट पहा

घंगाळ—न घोंगाट, कडक थंडी, गारठा ( क्रि० पडणें, सुटणें ) [ ? ]

घंगा( घा )ळ—न एक भांडें, गंगाळ पहा ०पोतें-टोपलें–गंगाळपोतें, गंगाळटोपलें पहा

घघाची विद्या घघाची बाराखडी—स्त्री ( घच्या बाराखडींतील) घेणें या क्रियापदापासून झालेला विशिष्ट वाक्प्रचार घेऊं जाणें पण देऊं न जाणें अशी वृत्ति दुसऱ्याचें घेण्याचें, लाटण्याचें ज्ञान, स्वभाव, लोभ हावरेपणा, स्वार्थी वृत्ति, अप्पलपोटेपणा याच्या उलट ददाची विद्या=दुसऱ्याला देण्याचा स्वभाव ' त्याला घघाची बाराखडी ठाऊक आहे पण ददाची येत नाहीं '

घंघाळी—स्त्री (कों) एका जातीची माशी, गोमाशी. [ध्व घ]

घजन्फर—पु १ सिंह २ (ल) वीर, योद्धा [अर घझन्फर्] ०जंग-पु एक बहुमानाची, युद्धनैपुण्यदर्शक पदवी, युद्धात सिंहाप्रमाणें शूर, रणसिंह. –मव ५८ [अर् घझन्फर= सिंह+फा जंग=युद्ध]

घट—पु १ पाणी इ० ठेवण्याचें भांडें, घडा, घागर (मातीची किंवा धातूची) 'जैसी भाडघटशरावीं। तदाकारें असे पृथ्वी।' –ज्ञा १३ ८७२ २ नवरात्रांत उपास्य देवतेजवळ पाण्यानें भरून ठेवलेली मातीची घागर, घडा, कलश, नवरात्र बसणें, विशेष प्रकारची देवीची पूजा ३ (ल) विश्व, ईश्वरानें निर्माण केलेलें यच्चयावत् जगत्, शरीर इ० सृष्ट जीव, पदार्थ 'म्हणौनि प्राणिजाताच्या घटीं। करूनि दृदावरी आगिठी।' –ज्ञा १५ ४०७ 'तें विस्तारिलें सव घटीं।' ४ वाद्यविशेष दक्षिण हिंदुस्थानात मातीचा माठ पालथा घालून त्याच्या पाटीवर दोन्ही हातानीं तबल्यासारखें वाजवून गायनाची साथ करतात ५ नवरात्राकरितां कुंभाराकडून मातीची घागर घेण्याचा हक्क [स घट] (वाप्र) घटीं बसणें–अक्रि १ (नवरात्र इ०कात) आराध्य देवता घटावर अधिष्ठित होणें, देवतेची स्थापना होणें २ घटस्थापन करणारा यजमान अथवा उपाध्याय यानीं घट असे पर्यंत व्रतनियमानें असणें ३ (ल.) (आजारामुळें–आळसानें किंवा काहीं कारणानें) घरात बसून असणें ४ (स्त्रीनें) विटाळशी होणें अस्पर्शपणामुळें निरुद्योगी बसून असणें सामाशब्द–०क्रिया–स्त्री (गो) घटस्फोट पहा 'तदनंतर हिंदूरीतिप्रमाणें विधियुक्त घट क्रिया करून '–राजकार ५ (गोमतकातील रीतिभाती, भाषां तर १८८०) ०पट घटपटं–स्त्री न न्यायशास्त्रात नेहमीं घट (घडा) व पट (वस्त्र) यांचीं उदाहरणें देण्याची चाल आहे त्यात घट व पट हे शब्द पुढील अर्थी रूढ आहेत–१ फुशारकीचें–शेखीचें–चढाईचें–पोकळ ऐटीचें–भाषण २ असंबद्ध, टाळाटाळीच बोलणें, लप्पछप्प थाप ३ निष्कारण उरस्फोड वाचाळता, व्यर्थ बडबड, मायाकूट वितंडवाद शब्दावडंबर उ० (कवी निरंकुशतेच भोक्ते असल्यामुळें नैयायिक व वय्याकरणी यांनीं घातलेल्या भाषेवरील व्याकरणविषयक निर्बंधाच्या खटाटो पास घटपट असें हेटाळणीनें संबोधितात कवींना साहजिकच व्याकरणविषयक सूक्ष्म निर्बंध म्हणजे व्यर्थ उरस्फोड मायाकूट आहे असें वाटतें) 'नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती। वैकुंठ पेठ मोठी नामावरि हीनदीन खट पटती।' –कीर्तन १ ३७ [घट+पट] घटपटा–स्त्री (व) खटपट, अवडंबर, लटपट 'त्याच्या लग्नाच्या वेळीं मोठी घटपटा झाली' ०भंग–पु घटाचा नाश, घागर फुटणें 'घटभंगीं घटाकाशें। आकाश जेवीं।' –ज्ञा १४ ५४ ०मठ–पु १ घट आणि मठ. २ (ल) सर्व सृष्टवस्तु (ज्यांत पोकळ अवकाश आहे अशा) 'घटमठ नाम मात्र। व्योम व्यापक सर्वत्र।' –य २६२ 'मजवरी घालती व्यर्थ माळ मी सर्वातीत निर्मळ। जैसें आकाश केवळ। घटमठाशीं वेगळें।' –ह ७ १५२ घटाकाश आणि मठाकाश असे प्रयोग वेदांतांत ऐकू येतात [घट=घागर+मठ= मठ–राहण्याचें ठिकाण, घर] ०माळ–स्त्री नवरात्रात देवीच्या पूजेकरितां स्थापन केलेला घट व त्यावर सोडलेली फुलांची माळ, देवताप्रीत्यर्थ बसविलेला माळेसहित घट [घट+माला] ०वात–स्त्री १ नवरात्रांत घट बसविणें व अखंड दिवा लावणें २ या हक्काचें वेतन, मान 'होळीस पोळी व घटवात वगैरे मानपान जो घ्यावयाचा तो घेतो' –मवाप २ १७२ [घट+वात (दिव्यातील वात)] ०वांटप–पु न (कों) घर दार, भांडींकुंडीं, जमीन जुमला इ०कांची (भावाभावात–नातेवाईकांत) वाटणी, [घट+वाटणें] ०स्थापना–स्त्री घट बसविणें, आश्विन शुद्ध प्रतिपदेस मातीच्या स्थंडिलावर घट ठेवून त्यावर पूर्णपात्र ठेवून त्यात कुलदेवतेची स्थापना करून तिची नऊ दिवस पूजा करतात, दररोज घटावर फुलांची नवी माळ लोंबती बांधतात, अखंड दीप जाळतात आणि सप्तशतीचा पाठ इ०कर्म करतात त्या विधीस घटस्थापना म्हणतात, देवतेची घटावर स्थापना, देवप्रतिष्ठा [घट+स्थापना] ०स्फोट–पु (घागर फोडणें) १ गुन्हेगाराचा जिवंतपणीं प्रेतविधि जो पतित प्रायश्चित्त घेऊं इच्छित नाहीं त्याला वाळीत टाकण्या करिता –समाजाच्या दृष्टीनें तो मेलेलाच आहे असें दर्शविण्या करिता–मातीची घागर फोडणें इ० अशुभ क्रिया–विधि २ जातिबहिष्कृत करणें ३ नवरा–बायकोची फारकत पंचायतीच्या किंवा कोर्टाच्या मदतीनें विवाहाचें बंधन रद्द ठरवून नवरा–बायको दोन्ही स्वतंत्र होणें, काडीमोड (इ) डायव्होर्स 'इंग्रज लोकातील घटस्फोटाचे वाईट वाईट खटले कोर्टापुढें येतात ' –टि ४ ९५ 'जारकर्मांत विधवा गरोदर सापडली असता तिला बहिष्कृत करून तिचा घटस्फोट नामक विधी करतात' –व्युनि २ घटाकाश–न (वदांत) घटातील पोकळी अवकाश, रिती जागा कोण घरोनियां आकाश। घरीं घातलें सावकाश। तरी घटयोग घटाकाश। मिथ्या गगनास नांव आलें।' –एभा १३ ७३२ –दा ८ ७ ४९ [घट+आकाश=पोकळी]

घट—न (गो) सोंगट्या वगैरेच्या पटातील घर

घट—वि (प्र) घट्ट घट्ट पहा ०करणें सक्रि (ना) तोंडपाठ करणें घोकणें

घट घटती—स्त्री १ दागिने तयार करताना घासताना, कानसताना त्याचे गोळा न करता येण्यासारखे परमाणु उडाल्यानें

मूळ वजनांत येणारी तूट. 'गाळणींत, घाट करण्यांत अगर वहिवाटींत लागलेली घट खर्चे घालण्याची मंजूरी देणें.' (वडोदें) खानगी खात्यांतील अंमलदारांचे अधिकार १७८. २ धान्य मापतांना, तूप इ० पदार्थ तोलतांना मूळ मापांत–वजनांत होणारा कमीपणा; तूट; घस. 'आमचा माल निर्मळ असुन त्यांत घट फार निघाली अशा प्रकारचे पुष्कळ बोभाटे नेहमीं पत्रांतून येतात.' –मुंव्या प्रस्तावना ५. ३ नुकसान (गळती, नास, आटणी इ० मुळें झालेलें); तूट. (क्रि० येणें; लागणें). 'हाली शिक्याला घटती कीं बढती?' ४ (सामा.)=ह्रास; उतार; कमती होणें. (क्रि० येणें, लागणें). ५ (मातकाम) घोटकाम करतांना किंवा कोरीव काम करतांना खालीं पडलेली माती. [सं. घट्= घासणें, हलवणें, मारणें; हिं. घटना, घटती] ०वध–स्त्री. (गु.) (वजन–माप–इ० कांतील) तूट अथवा वाढ; कमजास्तपणा; [घट=तूट+ सं. वृध्–वध=वाढ]

**घटक**—वि. १ मध्यस्थ; मध्यस्थी करणारा; दोन पक्षांत तडजोड करणारा (विशेषत: लग्नें जुळवितांना). २ (सामा.) व्यवस्थापक; म्यानेजर. ३ घडविणारा; कार्यसाधक. 'कोधन नामा यत्नें आला नृपकार्यसिद्धिचा घटक।' –मोरा १.७२.४ ज्योतिषी. ५ अवयव; अवयवभूत. 'अगदीं प्रथम मूत्राचा घटक यूरिया हा सेंद्रियसंयुक्त पदार्थ कृत्रिमरीत्या करण्यांत आला.' –सेंपु १.२. 'आतां दुधाच्या घटक पदार्थाविषयीं विचार करूं.' –विवि ८.२.२१. ६ मूलमान; एकं; एकाक; परमाणू. (इं.) युनिट. 'यानंतर गाव सुद्दन घराणें हा सामाजिक घटक झाला.' –सासं २.४१६. ७ कार्यकर्ता; व्यापारकर्ता; पर्यायानें ईश्वर. [सं.] ०कण–पु. अंशभूत, अवयवभूत अणु. 'मांसाच्या घटक–कणास चलनवलनाचें ... इत्यादि कामें नेमलेलीं असतात' –आरोशा १.४. [घटक+कण] ०द्रव्य–(मिश्र पदार्थांतील, धातूंतील) अवयवभूत पदार्थ; [घटक+द्रव्य] ०धातु–पु मिश्रधातूंतील अवयवभूत मूल धातु. 'पण कांहीं गुणानीं मिश्रधातु घटक धातूंहून भिन्न असतो.' –मराठी ६ वें पुस्तक पृ १६८. (१८७५) [घटक+धातु] ०प्रेरणा स्त्री. फलित प्रेरणा ज्या निरनिराळ्या प्रेरणांपासुन उत्पन्न झालेली असते त्यापैकीं प्रत्येक, अवयवभूत प्रेरणा. 'फलित प्रेरणेच्या संबंधानें प्रत्येक प्रेरणेस घटकप्रेरणा म्हणतात.' –यंस्थि ६. [घटक+प्रेरणा] ०भाग–पु फलाचा अंश, रचनेंतील मूळ निरनिराळे भाग; (इं.) रिझॉल्व्ह्ड पार्ट. 'जेव्हां घटकप्रेरणा एकमेकांशीं काटकोन करतात तेव्हां त्यापैकीं प्रत्येक घटकास मूळ प्रेरणेचा त्या दिशेंतील घटकभाग असें म्हणतात.' –यंस्थि १५. [घटक+भाग] ०मूलतत्त्व–न. (मिश्रपदार्थांतील, धातूंतील) अंशभूत असलेलें ., घटकभाग. [घटक+मूलतत्त्व] –कावयव–पु. अवयव-अंगभूत, एक भाग; घटक, घटकद्रव्य. (इं.) कॉन्स्टिट्युएंट. 'हिंदुस्थान देश इंग्रजी साम्राज्याचा अद्याप घटकावयव झाला नसला तरी एक मोठा पोषक भाग आहे असें कोणीही कबूल करील.' –टि २.४४३. [घटक+अवयव]

**घटका**—स्त्री. १ साठ पळांचा किंवा चोवीस मिनिटांचा काळ; एक विशिष्ट कालविभाग; कालाचें एक परिमाण; दिवस व रात्र मिळून होणाऱ्या कालाचा साठावा भाग; अडीच घटकांचा एक तास होतो. २ साठ पळांनीं भरून बुडण्याजोगें तांब्याचें सच्छिद्र पात्र; ज्योतिषी लोक या पात्राचा विवाहादिप्रसंगीं घटका मोजण्याकडे उपयोग करतात. [सं. घटि] (वाप्र.) (एखाद्याची) **घटका घातलेली असणें**–एखाद्यास अतकाळच्या वेदना होऊं लागणें; मरणोन्मुख अवस्था, स्थिति असणें; अंतकाल जवळ येणें. (मरण्याची, एखादें कृत्य करण्याची). ०घालणें– निश्चित वेळ ठरवणें; 'त्याची घटका घातली आहे.'=तो आतां मरेल, घटकेनें मरेल अशा अवस्थेस आला आहे. ०भरणें– १ दिलेली, ठरलेली मुदत संपणें. २ विनाशकाल जवळ येणें; आयुर्मर्यादा पूर्ण होणें, संपणें; आयुष्य संपुष्टांत येणें; 'इंग्लिशांच्या सत्तेची घटका आतां भरत आली आहे.' –के १०.६.३०. [सं. घटिका] सामाशब्द– ०भर–क्रिवि. १ तूर्त; सध्या. २ थोडा वेळ; अंमळ; किंचितकाल. [घटका+भरणें] **घटकाभर पडणें**–अक्रि. थोडा वेळ विश्रांति घेणें. ०वेळ–स्त्री. नेमकी वेळ; निश्चित समय. –**केचा गुण**–पु. कालमहात्म्य; वेळेचा गुण, सामर्थ्य; वेळेचा परिणाम; विशिष्ट कालीं विशिष्ट क्रिया घडल्यामुळें त्या कालाचा त्या क्रियेवर होणारा सामान्यत: वाईट परिणाम. –**केचें घड्याळ**–न. (ल) क्षणभंगुर जीवित; नश्वर देह अशाश्वत वस्तु इ० जगण्याची शाश्वति नसते तेव्हां म्हणतात.

**घटघट–टां**—क्रिवि. पाण्याचा घोट गिळण्याच्या, पिण्याच्या आवाजाचा वाचक शब्द. (क्रि० पिणें; घोटणें). 'घटघट त्या स्वाहितासुगुदका पी।' –मोकर्ण ४५.१४. [ध्व. घट् द्वि.]

**घटण–णा**—अस्त्री. १ (प्र.) घटन–ना पहा २ भेट; एकी; एकत्र येणें; संघटण. 'महाकार्यार्थे आगमन। होता झालें आमुचें घटण।' –निमा १.१५०. [सं. घटन]

**घटणिया**—स्त्री. (घटण) घडणी; ठेवणी; रचना. 'दोही वाही घटणिया चांगी' –वसा २६. [सं. घट्]

**घटणूक**—स्त्री. घटना अर्थ ४ पहा.

**घटणें**—अक्रि. घडणें, होणें. घडणें पहा. 'ऐसेनिहि प्राणसंकटें। जरी विपायें या निघणें घटे।' –ज्ञा २.२०५ 'जयाचेनि भवव्यथा तुटे। अज्ञानापासूनि सुटे। तो ईश्वर हें न घटे। काय म्हणूनि॥' –विउ ११.२६. [सं. घट्–घटन]

घटणें—अक्रि. १ (कापड इ०) आकसणें; आखुडणें. २ (धान्य; तेल, तूप, गूळ इ० पदार्थ मापांत, वजनांत) कमी होणें. 'दोन मण गूळ आणला त्यांत पांच शेर घटला.' ३ (शरीर, अवयव इ०) बळकट होणें; मजबूत होणें; भरदार बनणें; सुदृढ बनणें. ४ (शास्त्राभ्यास, कला, इ० व्यासंगानें) घोकून घोकून घोटून घोटून पक्का होणें; दृढता पावणें. 'गांवठी शाळेंतील मुलें अक्षर घटावें म्हणून अक्षरांच्या नकला करितात.' –विवि ८.८ १४८. ५ (शास्त्रांत, कलेंत मनुष्यानें) तरबेज, निष्णात, कुशल होणें; सरावणें. 'त्या कामामध्यें मी घटलों, माझा हात घटला, माझी बुद्धि घटली.' ६ योग्य दिसणें; शोभणें; साजणें; सजणें; बेताचें होणें. ७ (काव्य.) कमी होणें; शांत होणें; नाहीशीं होणें; शमणें. 'जैसे भाजिलें करवटें। तेणें क्षुधा न घटे।' ८ घट्टे पडणें; (शिथिल अवयव) दृढ होणें; झिजणें. 'कटि खांदे वाहतां घटले।' –मध्वमुनि (नवनीत पृ. ४४६.) [सं. घट्–घट]

घटना–न—स्त्रीन. १ घडणें; बनविणें; घडण; रचना; विधि घटना. 'हे सर्व जगत् ईश्वराची घटना आहे.' २ हस्तकौशल्य; कलाकुसरीचें काम. ३ प्रसंग; बनाव; घडणें; उपस्थिति. 'काननामाजीं पडलें घटन। डोंगराण्यीं कैचें जीवन।' –दावि २८०. ४ घटणूक; (लग्न इ० काच्या संबंधांत) रदबदली, मध्यस्थी; घडवून आणण्याची खटपट. बेत; सल्लामसलत. 'येईल शीघ्र घटना करुनी तियेची।' –र ३०. 'उभय पक्षांसी ऐक्य घटना साधिजेल.' 'तुम्ही घटना कराल तर त्याचें लग्न होईल.' ५ कार्याची योजना. 'कोणत्याही एका घटनेचा विघाड झाला असतां तिच्या जागीं दुसरी घटना करावयाची झाली तर ...' –केले १.४१. ६ राज्याच्या –सभेच्या–संस्थेच्या अंतर्व्यवस्थेची–कारभाराची नियमावली; कायदेकानू. 'हिंदी स्त्रियांच्या सुनिर्व्हसितीच्या घटनेबद्दलचा हा लेख येथें संपवितों.' –केले १ ४९. ७ बनावणी, निर्मिति; बनण्याची क्रिया, पद्धत. ८ (शाप.) संयोगीकरण; समाहार. (इं.) कॉंपोझिशन. [सं. घट्–घटना] सामाशब्द– घटनात्मक–वि. १ विधायक; रचनात्मक. २ बनावट, निर्मिति, घटना याबद्दलचा; घटनेसंबंधीं. [घटना+आत्मक] ०दर्शकसारणी, घटकसारणी–स्त्री. (रसा.) रासायनिक संयुक्त पदार्थ कोणत्या मूलद्रव्यांचा बनलेला आहे, ते मूल पदार्थ कसे निराळे करतां येतात इ० माहिती दर्शविणारी सारणी, आराखडा. (इं.) स्ट्रक्चरल फार्म्युला. [घटना+दर्शक+सारणी=आराखडा] ०मंडळ–न. (एखाद्या संस्थेची, सभेची, राज्य मंडळाची) घटना तयार करण्याकरितां नेमलेलें मंडळ. [घटना+मंडळ] ०सादृश्य–न. समधर्मता; तुल्यजातीयता; सममूलता; घटनेंतील सारखेपणा. (इं) होमोलोजी. [घटना+सादृश्य]

घटपाण—न. (गो.) घट्टपणा. शक्ति; सामर्थ्य; बळकटपणा. [घट्टपणा अप.]

घटमान—वि. १ चालू असलेलें; हातीं घरलेलें; हातांत घेतलेलें. २ होणारें; घडणारें; घडण्याजोगें; संभवनीय. 'म्हणूनि दुर्घटत्व हें भूषण। मायेसी नव्हे दूषण। तीं जरी असे घटमान। तरी माया नव्हे ती।' –विपु ३.३७. [सं.]

घटमूट–मुठ—वि. १ घट्टधाकट; सुदृढ; मजबूत बांध्याचा; भक्कम. २ टिकाऊ; मजबूत, घट्ट विणीचें (धोतर, कापड इ०) भरींव; ऐवजदार. 'गुलमट कलसे, घटमुठ दिसती, हुमनाबादी निपटनिरुंदी, कलबुर्गा हलबुर्गा लगडें।' –अमृत ४९. [म. घट+मुठ=एक अर्थहीन प्रत्यय; द्विरुक्ति]

घटवटना—स्त्री. १ घटणूक; मध्यस्थी; घाटाघाट; चर्चा; रदबदली; जुळवाजुळव (विशेषतः लग्नासंबंधींची). 'मुलाच्या लग्नाची घटवटना चालली आहे.' २ विचार; चर्चा; घाटाघाट. 'जावें न जावें अशी मनाशीं घटवटना करीत तो इकडे आहे.' –वज्राघात १३३. [घटना]

घटवाई—पु. (हिं.) घाटावरील कर घेणारा. [घाट+वर्ति]

घटवाई, घटाई—स्त्री. घट्टमूटपणा. घटाई पहा.

घटविणें—उक्रि. १ (घटणें प्रयोजक) (कपडा, वस्त्र इ०) आखुड करणें; घट करणें. २ (शरीर, शरीरावयव) सुदृढ करणें; मजबूत बनविणें; कमाविणें. ३ (परिशीलनानें कला, शास्त्र इ० कांत) पारंगतता मिळविणें; सराव करणें; अभ्यास करणें. ४ (श्लोक इ०) घोकून पाठ करणें. ५ कोरड्या लेखणीनें अक्षरें पुन्हा पुन्हा गिरवून हातास त्या अक्षरांनें वळण देणें. ६ (पैसा इ०). उधळणें; अति व्यय करणें; भरमसाट खर्चणें. [घटणें]

घटसर्प—पु. (प्र.) घांटसर्प; गळ्यास होणारा एक (सर्पाकृति) रोग. हा गुरानाहि होतो. (इं.) डिफ्थेरिया. [सं. घाट=गळा+सर्प]

घटसान—वि. (गो.) घटमूट; बळकट; घट्ट; मजबूत. [का. घट्टिसु=शक्ति मिळविणें]

घटा—स्त्री. १ समुदाय; जमाव; टोळी; कळप. 'जैसें न गणिजे पंचाननें। गजघटातें।' –ज्ञा १.९२. 'हरिकरिघटेसि जैसा त्या कुरुसेनेसि वासवी रगडी।' –मोविराट. ४ ८१. २ मेघजाल; मेघमंडळ. [सं.]

घटा—पु १ (कों.) भोपळ्याचें, कलिंगडाचें कोंवळें फळ. २ हरभऱ्याचा टरफलासहित दाणा, शेंग. घाटा पहा. –स्त्री. (प्रा.) घडण; घटाव; रचनाविशेष; घाट; तऱ्हा; बांधा. 'शरिरसपती तरुण तयारित गई घटा दुसरी।' –प्रला १५४. [सं. घट्]

**घटा, घट्टा**—पु घसवटणें इ०कारणानीं शरीराच्या एखाद्या अवयवावरील भागाचें रक्त मरून घट झालेली जागा, घटा पहा

**घटा**—स्त्री १ एक वाद्यविशेष, घाट, ही काशाची केलेली व ओतीव असते हिचा आकार मोठ्या पेल्यासारखा असून हिच्या वरच्या अगास मोठी दोरी ओवण्यासाठीं कडी असते आंतल्या बाजूस पोकळीमध्यें (आवाज, नाद निघण्याकरिता) लोखंडी, लाकडी लोळी लावतात काहींस वरच्या बाजूस धरण्या करिता मूठ बसविलेली असते, हिचे लहान-मोठे अनेक आकार असतात 'गिडिबिडिया दौंडका दुटाळा। घटा जेगटें मृदंग।' –कमुरा ४० ११ २ तास, तासाचे टोक वाजवण्याकरितां मिश्र धातूची केलेली वर्तुळाकार तबकडी, ३ (माणूस, वाहन इ०) आल्याचें किंवा इतर कांहीं सुचना देण्याचें साधन ४ (ल) पुरुषाचें जननेंद्रिय, शिस्न –पु (व खा) तास, तासाचा अवधि 'तू दोन घटे थांब' [स घट्=शब्द करणें, स घटा] (वाप्र) ०वाजणें-हालणें-अक्रि (एखादा पदार्थ) सपणें, खलास होणें, फन्ना उडणें 'घरात वाजे नकार घटा।' सामाशब्द—०घोष—पु १ घटाचा घटचा आवाज २ (ल) गाजावाजा, बोभाटा, प्रसिद्धि, [घटा+घोष=आवाज] ०देवी—स्त्री एक क्षुद्र देवता, 'घटादेवी म्हणे मी श्रीरामघाटीं। श्रीगुरुभक्तिच्या परिपाटीं।' –सप्र५ १७ ०पथ—पु (ज्यावरून गळ्यात घटा असलेले बैल येत जात आहेत असा) हमरस्ता, राजमार्ग, रहदारीचा रस्ता [स घटा+पथ=रस्ता] ०पळी—स्त्री (माण) जेवण्याचें पितळेचें भाडें ०पारधी—पु घटानादानें हरिणास भुलवून फासात अडक विणारा पारधी घटापारधी जैसा। मधुर नादें मृगमानसा। भुलवोनिया पाडी फांसा।' –भारा, बाल २ २६ [घटा+पारधी] ०पुष्प—न घटेच्या आकाराचें पांढरें किंवा निळें फुल [घटा+ पुष्प=फूल] ०वहव्या—वि (तुच्छतेनें) पुजारी, पूजा करणारा 'कृष्णरावाच्या पदरीं गोविंदपत नुसता घटावडव्या होता'—कोरकि ३५ [घटा+वडविणें] ०शास्त्र—न या शास्त्रात घटा कशा करतात व वाजवितात या सबंधीं माहिती असते (इ) कॅम्पेनॉलॉजी

**घटाई**—स्त्री १ घटवाई, घटाई पहा २ तूट, कमीपणा, घट [घटणें]

**घटाघट-टा, घटाटा**—क्रिवि पाणी इ० पितांना, गिळ तांना होणाऱ्या घट घट आवाजानें, घट् घट् आवाज करीत घटघट पहा [ध्व घट् द्वि]

**घटाघोळ**—पु घपाघोळ पहा

**घटाटोप**—पु १ (गाडी पालखी, हौदा, पलग, देव्हारा इ०वरचा) घुमटाकार चादवा, मडपी, छत्र २ घुमट डेरा, [स घट+आटोप]

**घटाटोप**—पु खटाटोप पहा

**घटाव**—पु १ (सैन्य इ०काची) माडणी, रचना. 'कलम ज्यारीचे घटाव मचले। मोंगलावर मोर्चे रचले।' –ऐपो २१४. २ (सुरू असलेल्या, योजिलेल्या कामाच्या दिग्दर्शनार्थ) माड णूक, थाटमाट, देखावा, डौल. (क्रि० घालणें), 'गतिचा अवघा साज करून या घटाव घडून।'—होला १०० ३ (भाषणाचा, कृतीचा) झोक, स्वरूप, ढब, रूपरेखा 'बाई घटाव खुब स्वारिचा। चाले गोल थटून बाहारिचा।'—प्रला ११७ ४ मिलाफ, मेळ, बनाव, प्रयोग अनेक पदार्थ एकत्र केल्यानें उत्पन्न होणारा गुणविशेष, उत्पन्न होणारा परस्परांचा आनुकूल्य भाव 'आनंद घटाव ब्रह्म कराव।' –दावि २१२ 'आवाडीच्या भाजीचा आणि तेलाचा घटाव चागला मनतो' ५ (सामा) घटना पहा [स घट् द्वि घटाव]

**घटावणें**—अक्रि घटणें, सराईत होणें 'भापणें उतरून ठेवण्याच्या कलेत तो घटावत गेला' –नि ६९१ [घटणें]

**घटिका**—स्त्री १ साठ पळें, चोवीस मिनिटें मिळून होणारा काल, घडी, घटका पहा 'म्हणोनि उपजतखेंवो सुडाली। लग्न घटिका।' –ज्ञा ६ ४७१ सामाशब्द– ०यत्र–न घटियंत्र, रहाटगाडगें, 'उपजे तें नाशे। नाशलें तें पुनरपि दिसे।हें घटिकायत्र तैसें। परिभ्रमे गा।' –ज्ञा २ १५९ [घटिका= लहान मडकें+यंत्र=चक्र] ०स्थापन–ना–न स्त्री विवाहादि मगल कार्यांत मुहूर्त साधण्याकरितां बरोबर वेळ मोजण्या करितां सूर्योदय होताक्षणीं पाण्यात घटिका (पात्र) टाकण्याचा विधि [घटिका+स्थापन]

**घंटिका**—स्त्री १ लहान घटा, घागरी, घुंगरू, क्षुद्र घंटिका पहा २ पडजीभ, ३ गळ्याची घाटी, गळ्याचा अस्थिमणि, कंठमणि, ग्रीवामणि 'माजि घटिका लोपे। वरी बहु जो आरोपे। तो जाल्घर म्हणिपे। पडुइमरा।' –ज्ञा ६ २०८ 'घटिकवरी हनुवटी साग।'–कृष्णदासकृत अपरोक्षानुभव ११ ८४ [स]

**घटित**—न (विप्र) घटीत. १ पत्रिकावरून ठरणारें वधूवराच्या ग्रहाचें आनुकूल्य, (वधुवरांच्या) ग्रहयोगाची जुळणी, पत्रिका जुळणें (क्रि० उतरणें जमणें, काढणें, पाहणें, ठरवणें) कृष्ण अगुणाचा अरूप। कन्या सगुण आणि स्वरूप। दोहींसीं घटिताचा विकल्प। शून्यसकल्प सायरीकें॥' –एरुस्व १ ९६ २ मैत्री, सख्य, मिलाफ (क्रि० जुळणें, जमणें होणें, जुगणें) ३ दैव, नशीब संचित, दैवयोग पूर्वकर्म, भवितव्य 'शरीर सबधाचें कारण। घटित आहे मज अधीन।' –एरुस्व ३ ३४ –वि (समासात) युक्त, बनलेला, रचलेला, केलेला, याअर्थीं उ० सुशब्दघटित, अनुस्वारघटित

**घटितार्थ**—पु. १ चाल करून, विचारविनिमय करून काढलेला निर्णय, निकाल; ठरविलेला बेत. २ दैवयोग; भवितव्य; कर्मगति. ‘त्यांनीं चांगल्यास मुलगी यावी असें योजिलें होतें परंतु तिचा घटितार्थ होता तसें झालें.’ ३ (वधूवरांचें) घटित; पत्रिकांचा मेळ, जुळणी; घटित अर्थ १ पहा. ‘ब्राह्मणीं घटितार्थ पाहिलें। गुण छत्तीसही उतरले।’ –भवि २.५७. [सं. घटित+अर्थ]

**घटी-टि**—स्त्री. १ घटका; घटिका पहा. २ घडी; घड्याळ; तासाचे ठोके वाजण्याकरितां केलेली मिश्र धातूची वाटोळी व जाड तबकडी; तास. ३ लहान भांडें, मडकें; (समासांत) काचघटी; मृद्‌घटी; ताम्रघटी; सुवर्णघटी. [सं.] ॰यंत्र–न. १ रहाटगाडगें २ वेळ मोजण्याचें साधन; कालदर्शक यंत्र; घटका; वाळूचें घड्याळ; घड्याळ. ‘घटियंत्राचा काटा घडोघडी अंक तेंच ते दावी।’ –विक ७. [सं. घटी=घटका+यंत्र] ॰लग्न–न. गोरजखेरीज कोणत्याहि शुभ मुहुर्तावर लागणारें लग्न; याच्या उलट गोधूल (गोरज) लग्न. [सं. घटी=घटका+लग्न]

**घटी**—स्त्री. (गो.) खुबी; कळ; युक्ति. [सं. घट्]

**घटी**—वि. कडक; टणक (चोरू इ०). ‘नाना देशींचे वरु आणावे। घटी बारिक सरळे घ्यावे।’ –दा १९.१.१६. [घट्ट]

**घंटी**—स्त्री. (गु हिं.) दळण्याचें जातें. घंटी पहा.

**घटीगोत्र**—न. पत्रिका आणि गणगोत्र; (क्रि॰ मिळणें; येणें; जमणें; जुळणें; उतरणें). **–गोत्रीं–जुळणें–जमणें–मिळणें ठरणें**–अक्रि. (वधूवरांचें) पत्रिका व गोत्र या बाबतींत जुळणें; कांहीं विरोध न येणें (विवाहासंबंधीं वाटाघाटींत या वाक्प्रचारांचा उपयोग करतात). [घटित (अप.)+गोत्र=कुळ]

**घंटीचोर**—पु. (कर्ना.) चोराची एक जात; भामटा; उचल्या. [का. गंटी=गांठोडें+चोर]

**घटीव**—वि. १ सुदृढ, बळकट, कणखर झालेलें (शरीर, शरीरावयव). २ घटलेलें; चांगलें वळलेलें; वळणदार (अक्षर, लेखन, हात). ३ परिशीलनानें, अभ्यासानें पक्की झालेली (कला, विद्या) ४ कसबी; सराईत झालेला; सरावलेला; कुशल बनलेला (मनुष्य). ५ (सराईत हातानें) उत्तमरीतीनें केलेलें; तडीस नेलेलें, उत्कृष्टपणें साधलेलें (काम इ०). [सं. घट्; म. घटणें=घट्ट होणें; बळकट होणें]

**घटें**—क्रिवि. घट्टपणें; निश्चयेंकरून; खात्रीनें. –मनको [घट्ट]

**घटोत्कच**—पु. भीमास हिडिंबा नामक राक्षसीपासून झालेला मुलगा. हा अत्यंत शूर व इंद्रजालविद्येंत कुशल होता. [सं] (वाप्र.)**–चाचा बाजार**–पु. १ माया; मायावी बाजार; घटोत्कचानें वत्सला–अभिमन्यु यांच्या विवाहाच्या वेळीं एक मायावी बाजार तयार केला होता, या कथेवरून. २ (ल.) फसवणूक. **–ची माया**–स्त्री. (ल.) फसवणूक; कपटयुक्ति; भुरळ. ‘आमचे महाजन आतां मात्र याच्या घटोत्कची मायेंत पूर्णपणें सापडल्यासारखे दिसतात.’ –माझी बहीण.

**घट्ट**—वि. १ बळकट; मजबूत; भक्कम; घटमूठ (शरीर, मनुष्य, कापड इ०). २ घन; दाट; पाण्याचा अंश कमी असलेलें (दहीं, दूध, पातळ पदार्थ). ‘वरण घट्ट असावें.’ ‘आजचें दहीं चांगलें घट्ट आहे.’ ३ पक्कें आवळलेलें; गच्च बसलेलें; सैल नसलेलें (झाकण, चौकट, पट्टी) ‘पागोटें घट्ट बांध.’ ४ दुःखाला न भिणारें; कठोर; हळुवार नसलेलें (मन इ०). ‘मन अंमळ घट्ट केलें पाहिजे.’ रप्र १०६. ५ अचाट; न डळमळणारें. ‘पाहा धैर्य हें केवढें घट्ट।’ –दावि ३९. ६ निलाजरा; निर्लज्ज, बेशरम; कोडगा; निगरगट्ट. ‘घट्ट मोटी हो जोगडी जाती।’ –दावि ३४७. [सं. घृष्ट; प्रा. घट्ठ किंवा सं. घट्, घट्ट; तुल॰ का. घट्टिसु=बळ येणें?] ॰करणें–सक्रि. पाठ करणें; घोकून घोकून मनांत पक्के करणें. ॰द्रव्य–न. घन पदार्थ [घट्ट+द्रव्य=पदार्थ]

**घट्टण, घट्टाण**—न. (गो.) निर्मूलन; निःसंतान. [घटणें=कमी होणें]

**घट्टंपट्टं, घट्टमूट, घट्टा, घट्टाघोळ**—वि. घटपट्ट, घटमूट, इ० पहा.

**घट्टव**—न. (गो.) जमीनदोस्त झालेल्या इमारतीच्या खुणा; पडक्या इमारतीचे अवशेष. [घटणें, घट्टा]

**घट्टा**—पु. घर्षणाच्या योगानें शरीराच्या त्वचेला पडणारी खूण; घटा. ‘पाणी वाहून वाहून खांद्यास घट्टे पडले.’ [सं. घृष्ट; प्रा. घट्ट]

**घट्टाई**—स्त्री. घट्टपणा. १ (कापडाचा) घटमूटपणा; विणीचा घट्टपणा. २ (शरीराचा, इमारतीचा) भक्कमपणा; दृढता; मजबूतपणा. ३ (पातळ पदार्थांचा) घट्टपणा, पाण्याचा भाग कमी असलेली स्थिति, दाटपणा; घनता. ४ आवळपणा; पक्केपणा (बांधलेल्या पट्टीचा, बंधनाचा). [घट्ट]

**घट्टी**—स्त्री. (खा.) जात्याची तळी, घरटी. [सं. घरट्; सं. घट्ट=घर्षण करणें?] **घट्टया**–स्त्रीअव. जातें.

**घट्टीकरण**—न. (रसा.) द्रवस्थितींतून घनस्थितींत रूपान्तर करणें, घनीकरण, विरजणें. [घट्ट+सं. करण]

**घट्ठ**—पु काठी, दंडा. ‘हातीं घट्ठ, शरीर घट्ट प्रथमे येकाचि ये सासुरा।’ –आ नवरस चरित्र ३२.

**घड**—पु. १ (फळाचा) गुच्छ; घोंस; लोंगर. ‘का येऊनि फळाचा घडु। पाठवी केळीची वाढु।’ –ज्ञा १८.९६८. २ आकार; डौल, घाट ‘बाप विंदानी हृषीकेश। तेणें घड कळास मेळविला।’ –एभा २८.६९६. ३ (ल) कृपण. ४ चार पांच वाट्या जडून कोंडिवरी, चटण्या इ० ठेवण्याचें तबकासारखें

केलेलें पात्र, संच, पाळें. 'चांदीच्या वाटयांचा घड मध, तूप व साखर ठेवलेला.' -ऐरापुप्र ८.४१३. ५ टोळी; जमाव; झुंड. 'राक्षसांचे घड घड। कांपले दो तेथवां।' ६ (कों.) जुळणी; मिश्रण; मिलाफ; ऐक्य; बनाव. ७ (उ.) सख्यभाव; सलोखा. 'साखर आणि दूध यांचा घड चांगला जमतो.' ८ (गामा.) समुदाय; जूट; जुडगा. [सं. घट्ट; प्रा. घड]

घडई—स्त्री. घडण; घडकाम. 'हातानें घडई पुरी करून भांड्यास सुबकपणा आणावा लागतो.' -पदाव ४८. [घडणें]

घडका—स्त्री. (गो.) धटका पहा.

घडकाम—न. १ (धातूचीं भांडीं वगैरे) घडण्याचें, बनविण्याचें काम, कला. 'येथील कासार घडकाम मात्र करतात, ओतीव काम करीत नाहींत.' २ (भांडीं वगैरे) घडण्याच्या कामांतील कुशलता, कारागिरी. ३ (हातोड्यानें घडलेल्या, ठोकून तयार केलेल्या वस्तूंचा) घाट; आकार; घडण; ढाळ. [घडणें+काम] घडकामी-काम्या-वि. फक्त घडकाम करणारा (कासार, लोहार). [घडकाम]

घडगशीळ—न. खडकाळ, ओबडधोबड उतरण. -वि. (राजा.) खडकाळ, ओबडधोबड, कडा तुटलेला. [गडगा+शीळ ?]

घडघंच—वि. (कर.) रगड; विपुल. गडगच पहा.

घडघड-डां—क्रिवि. १ (गाडी, रथ इ० चालतांना होणारा) घड घड असा आवाज करीत. २ अस्खलित; न अडखळतां; मोठ्यानें; सरसर. 'हा मुलगा घडघड वाचतो.' [ध्व. घड् द्वि.]

घडघडणें—अक्रि. १ गडगडाट होणें, करणें; गडगडणें. 'संहार प्रळजे मेघु घडघडिला। कीं खवळला महाकाळु डाडाइला।' -शिशु १०७७. 'घडघडीत चक्रवाटी। ते की मेघाचे गजर।' -उषा ८३१. २ (गाडी, रथ, इ० चालतांना) घडघड आवाज होणें; कडाडणें; घडघड, खडखड आवाज करीत (रथ गाडी इ०) चालणें; खालीं पडणें; कोसळणें. 'रथ घडघडिला समीरगतीं।' -ह १८.११८. ३ (बेत, काम, मसलत) ढांसळणें; निष्फळ होणें, रसातळाला जाणें. 'त्यांची मसलत घडघडली.' ४ (ल.) मरणें. 'तो दुखण्यांत घडघडला.' ५ घरघर आवाज करणें. 'वळे जिभेची बोबडी। कफें कंठ घडघडी।' -दा ३.५.३७. [घडघड]

घडघडा—पु. गडगडा; पाणी काढण्याचा लांकडी, लोखंडी आंसाभोंवतीं फिरणारा टोकळा; फिरकी. 'विहिरीचें पाणी लोखंडी पोहरा व साखळी यांनीं रहाटावरून अथवा घडघड्या वरून काढावें.' -आरोग्य १.११. [ध्व. घडघड]

घडघडाट—पु. घडघड असा मोठा आवाज; गडगडाट; कडकडाट; खडखडाट. 'करणाकीर्तनाच्या लोटें। कथा करावी घडघडाटें।' -दा ४.२.१२. -क्रिवि. १ घडघडां; अस्खलित. 'रत्नखचित मांडलासे पाट। त्यावरी बैसविला द्विजश्रेष्ठ। संकल्प म्हणतसे घडघडाट।' -नै ७३.१९. २ (गाड्या, रथ इ० यांच्या) घडघड, खडखड आवाजानें युक्त होत. 'तुका म्हणे वाट वाट। वैकुंठींची घडघडाट।' [घडघड या अतिशय]

घडघडे—क्रिवि. पटापट; तडाक्यानें. घडाघड पहा. -शर.

घडघशील—(राजा.) घडगशीळ पहा.

घडघूप—वि. निबिड; दाट (अंधार); 'तें देखोनियां विवर। गजबजिले वानरवीर। भीतरीं घडघूप अंधार। रविचंद्र असेना॥' -मारा, किष्किंधा १४.७६. गुडुप पहा. [सं. प्रा. घट=निबिड+धूप=धूम-धूम्र. गडगूप का. गुडुपु. गुडगु=लोखंडाची कोंब]

घडघोंस—पु. घोसाळ्यांचा घड. घडघोसाळी-स्त्री. घोसाळ्याची एक जात; एक प्रकारच्या घोसाळ्याची वेल. हिला घोसाळ्यांचे घड येतात; सातपुती; सहस्रफळी. घडघोसाळें-न. घडघोसाळीचें फळ. एक प्रकारचें घोसाळें, गिलकें; सातपुतें; सहस्रफळ. [घड+घोसाळी]

घडण—स्त्री. १ (घडून केलेल्या वस्तूंचा) घाट, डौल; आकार; ढाळ. 'या दागिन्याची घडण चांगली आहे.' २ घडण्याचें कौशल्य, हातोटी. 'या सोनाराच्या घडणीपेक्षां त्या सोनाराची घडण चांगली आहे.' ३ (दागिने, भांडीं) घडण्याची, बनविण्याची मजुरी; घडणावळ. ४ घटना; कृति -न. भांडीं घडण्याकरितां कासाराच दिलेला धातूचा पत्रा, मोड इ०. 'त्या सोनारापाशीं दोन महिने घडण दिलें आहे.' [सं. घटन; प्रा. घडण]

घडणावळ—स्त्री. १ घडकामाची मजुरी, किंमत. २ (राजा.) घाट; घडण; आकार. ३ (क.) घडण्याची कुशलता; घडकामांतील कारागिरी, हातोटी. [घडणें]

घडणी—स्त्री. १ घडणें; करणें; बनविणें. २ (घडलेल्या दागिन्यांचा, वस्तूंचा) घाट; डौल, ढाळ; ढब. ३ घडण्याचें कौशल्य, कारागिरी, हातोटी. ४ कुळकर्ण्यानें ठेवावयाचा गांवांतील कुळवार हिशेबी तक्ता. ५ प्रांतवार सरसालीचे जमाबंदीचे वगैरे हिशेब व प्रांतवार सरसालांत झालेले हुकूम यांची प्रांतवार खतावणी. -इनाम ५१. ६ समुदाय; जमाव. 'येती ऋषींच्या घडणी।' -वसा ४५. [घडण]

घडणें, घडून येणें—अक्रि. १ जुळून येणें; होणें; बनणें; अस्तित्वांत येणें. २ उत्पन्न होणें. 'हें आंग तंव घडलें। जीवींचि आधीं जडलें।' -ज्ञ ३.२५५. ३ पार पडणें; शेवटास जाणें. 'तेथें वाणिज्यधर्मो घडे कैचा।' -एरुस्व २.२९. 'सुसंगति सदा

घडो।'–केका ११८. ४ मिळणें; होणें; जुळून येणें; साधणें. 'घडे शत्रु लोकांत त्याचा प्रवेश।' ५ (एखाद्याकडून एखादी गोष्ट) सिद्धीस, तडीस जाणें; 'आमच्या हातानें तुमचें कार्य जितकें घडेल तितकें करूं' [सं. घटन; प्रा. घडण]

घडणें—उक्रि. १ हातोड्यानें ठोकून ठोकून, तासून तासून, भट्टींत तापवून, कोरून आकार देणें, बनविणें; तयार करणें; निर्माण करणें; उत्पन्न करणें.'शब्द कैसा घडिजे। प्रमेयीं कैसें पां चढिजे।' –ज्ञा १८.१७६७. 'ते लावण्याची लतिका । तिसी घडे अंबिका।'–कथा १.३.३६. २ (माहिती, हिशेब, जमाखर्च) लिहून काढणें; नमूद करणें; तयार करणें; आकारणें. [सं. घटन; प्रा. घडण; सिं. घडणुं; गुज. घडवुं]

घडणें—उक्रि. १ स्पर्श करणें; शिवणें. 'तो शूद्र मला घडला.' या क्रियापदाचा प्रयोग करतांना कर्त्याची नेहमीं प्रथमाच पाहिजे. कर्ता तृतीयेचा नसावा. २ भेटणें 'नातरी उद्यानीं माधवी घेढ।' –ज्ञा १.४३. [सं. घृष्–घृष्ट–घट्ट=घांसणें; स्पर्शणें]

घडता—वि. योग्य; मान्य; जुळणारें. 'तैसें घडतें प्रमेय घेइजे ।उणें तें मज देईजे।'–ज्ञा १५.५९५. [सं. घट्. तुल० गुज. घटतुं]

घडती—स्त्री. घटती पहा.

घडतें—न. १ प्राप्ति; २ अनुकूलता. म्हणौनि शास्त्राचें घडतें। नोहे प्रकारें बहुतें॥'–ज्ञा १७.२९. ३ साधन –शर.

घडत्यास पडता—वि. समयोचित; प्रसंगोपात्त; त्या त्या वेळेला योग्य; प्रसंगाला अनुरूप. [घडणें+मोडणें]

घडघड—क्रिवि. भांडीं इ० परस्पर लागल्यामुळें होणाऱ्या घड्घड् आवाजानें. [ध्व. घड् द्वि.]

घडघडणें—अक्रि. घडघड शब्द होईल अशा तऱ्हेनें (भांडीं इ० परस्परांस लागल्यानें) वाजणें; खडखडणें. [ध्व. घड्]

घडघडशां—क्रिवि. (प्र.) गडवडां (क्रि० लोळणें इ०) गडवडां पहा.

घडमाळ—स्त्री. (कों.) रहाटगाडग्यावरील लोटयांची, मडक्यांची एकेरी माळ; रहाटाची माळ. [घड+माळ]

घड(डा)मोड—स्त्री. १ (भांडीं, मडकीं, दागिने इ०) घडण्याची आणि मोडण्याची क्रिया; बनविणें व नष्ट करणें; २ (ल.) देण्याघेण्याचा, खरेदी–विक्रीचा, उसनें घेण्या–देण्याचा व्यवहार; खटाटोप; उचापत; धंदा; व्यवहार; व्यापार. ३ फेरफार; उलथापालथ; (सरकारी नोकर) ठेवणें काढणें; बदलणें; जुन्याच्या जागीं नवीन आणणें इ० किंवा नवें–जुनें करणें. ४ रचना; थाट; बनावट; घडण (यंत्रावयवाची, भागाची इ०).५ (धंद्यांतील, व्यापारांतील) भानगडी; गुंतागुंत; गाशा गुंडाळणें दिवाळें इ०. ६ (एखाद्या श्लोकाची, कवितेची, वताऱ्याची) गुंतागुंत; घोंटाळा; क्लिष्टता; लपेटी (कवीच्या काव्यरचनेंतील) गुंतागुंत; क्लिष्टता; नाना तऱ्हेच्या युक्त्या. ७ (नाटकांतील–नाटकाच्या संविधानकांतील) कूट; डावपेच; खुबी; गुंतागुंत. ८ (सामा.) कुशलता; चातुर्य; खुबी; हातोटी; कला (एकत्र मांडणें, विवरण करणें; वागविणें इ० ची) [घडणें+मोडणें]

ईश्वराची(ब्रह्मदेवाची) घडामोड–स्त्री. चढविणें व खालीं पाडणें हा परमेश्वराचा व्यापार–खेळ. संसारांतील चढउतार; अवस्थांतरें. घडमोडणें–अक्रि (काव्य.)घडलें, बनवलें आणि मोडलें जाणें; उत्पन्न आणि नष्ट होणें. 'तुमच्या इच्छामात्रें निश्चितीं। अनंत सृष्टि घडमोडती।' [घडमोड]

घडला घाट—वि. १ अगोदरच; आयता घडून तयार केलेला. २ (सामा.) आयता; तयार; तयार करून ठेवलेला; घडितघाट. [घडणें+घाट=आकार, ढाळ]

घडली, घडी, घल्डी, घडळी—स्त्री. (व.ना. खा.) लहान घडा; घागर; कळशी. [सं. घटिका; प्रा. घडिआ, घडी; म. घडा]

घडवंची—स्त्री. १ घडोंची; तिवई; लांकडाच्या फळीस तीन किंवा चार पाय बसवून केलेली बैठक, चौकट (घागरी, भांडीं, पेटया इ० सामान ठेवण्याकरितां केलेली). लांकडी चार पायी चौकट; चौकी;शिडी; (इं) स्टूल. २ (कों.) (भात इ० झोडण्याची) घोडी. [सं. घट+उच्च; हिं.घडोंचा–ची; का. गडंची, गडगंची; सिं. घडाम्जी]

घडवट—न. १ घडवलेली वस्तु. २ (ल.) देह. ३ पायघडी. 'वेगीं मंडपासी चला। घडवटें आधीं घाला।' –एरुस्व १५.१२. [सं. घट्; प्रा. घड; म. घडणें, घडी]

घडवण—न. (राजा.) घडण पहा.

घडव(वि)णें—उक्रि. १ उत्पन्न करणें; बनविणें. 'तेथ इच्छा आणि बुद्धी। घडवी अहंकारेंसीं आधीं।' –ज्ञा १३.९६८. २ घडवून आणणें, जुळवून आणणें; साधणें; शेवटास नेणें. ३ तयार करणें; बनविणें. 'तोडयाचा जोड तुम्हि। कां घडविल कां घडविला।' –मसाप २.१.२७ [घडणें प्रयोजक]

घडवशी—स्त्री. १ मृदंग ठेवण्याची घडवंची; घोडी; २ लाकडी पाय असलेली बैठक, चौकी. (हा शब्द घडवंची याअर्थी चुकीनें लिहितात, व वापरतात) [घडवंची अप.]

घडशी–सी—पु. १ कर्नाटक प्रांतांतील वाजंत्र्याचा–गाण्या–बजावण्याचा धंदा करणारी एक हलकी जात. २ घडशी जातीचा मनुष्य; 'लग्नमुजीत लोक शंभरपासुन हजारपर्यंत पैका नासतात. पैकीं घडशाला, आचाऱ्याला, दारू जाळायला ......शे. ९९ व १ उपाध्याला व धार्मिक विधीला मिळ्ळे।' –खेया ७२.

घडशी—वि स्त्री. (राजा.) १ विटाळ झालेली. २ विटाळशी; [घडणें=शिवणें]

घडसण—स्त्री (व.) १ गर्दी; दाटी; खेचाखेच. 'एवढ्या घडसणींत तूं कां शिरतोस !' २ अडचण; अडचण. 'घराला आग लागून नुकसान झालें, तितक्यांतच लग्नाचीही घडसण आली, असा चोहोंकडून मी जेर झालों.'

घडसणें—सक्रि. (अक्षरें इ० पुन्हां पुन्हां काढून) घोटणें; घटवणें. 'ब्राह्मणें बालवय अक्षर। घडसुनी करावें सुंदर।' —दा १९.१.१. [घडणें]

घडळ—स्त्री. (गो.) घडण. [घडण]

घडा—पु. १ घागर; घट; मडकें. 'अवतरली गाडग्या घडां। पृथ्वी अनोळख जाली मूढां।' —ज्ञा १८.५४३. २ ताडाच्या पोंगीला (ताडी काढण्याकरितां) लावावयाचें गाडगें. ३ जम; घडी. —शर. [सं. घट; प्रा. घड; हिं. पं. घडा; गु सिं. घडो] (वाप्र.) घडा फोडणें-संकेत, खरें तत्त्व बाहेर सांगणें; गुप्त गोष्ट प्रगट करणें. (एखाद्याचा) घडा भरणें-अपराधांची परमावधि होऊन शिक्षेस पात्र होणें. 'त्याचा घडा भरला म्हणजे त्याला शासन होईलच होईल' (आयुष्याचा) घडा भरणें-१ अंतकाल जवळ येणें; आयुष्य संपणें. २(ल) अधिकाराची मुदत संपण्याच्या बेतांत येणें. (पापाचा) घडा भरणें-(पापपुण्यें सांठविण्यासाठीं घडे असतात या कल्पनेवरून) दुष्कृत्यांचा कळस होऊन त्याचें फळ भोगण्याची वेळ येणें. (फुट्या) घड्यानें पाणी भरणें-वाहणें-१ निष्फळ काबाडकष्ट करणें; निरर्थक उद्योग, मेहनत करणें. २ अतिशय हाल काढणें; कष्ट करणें. सामाशब्द- ०बाजी-स्त्री. दारू उडविण्याचा प्रकार; मडक्यांत फटाके, चिचुद्र्या इ० ठांसून त्यांचा घडाका करणें; (प्र.) घडेबाजी पहा.

घडाई—स्त्री. १ (दागिने, भांडीं इ०) घडण्याची मजुरी. घडणावळ, घडणावळ अर्थ १ पहा २ घडकामाची, घडण्याची, घिसाड कामाची मजुरी. ३ (दागिने, भांडीं, दगड इ०) घडण्याचें काम, घडकाम [घडणें] ०दार-वि. घडण्याचा धंदा करणारा (घिसाडी, शिलावट इ०) [घडाई+दार प्रत्यय]

घडाघड—स्त्री १ लोहार, तांबट इ० कांच्या येथें हातोड्यानें चालणारी ठोकाठोक, घडण्याच्या कामानें होणारा आवाज. २ घडण्याचा व्यापार; घडकाम. 'त्या तांबटाच्या घरीं नित्य घडाघड चालते.' [घडणें द्वि.]

घडाघड-डां—क्रिवि. १ पदार्थ एकामागून एक उंचावरून गडगडत, धडाधड, पडतांना होणाऱ्या घड्घड् आवाजाप्रमाणें, गडग्यांची रास, घर कोसळल्यानें होणाऱ्या घड्घड् आवाजाप्रमाणें. २ न अडखळतां; अस्खलित; घडघडा. 'हस्तलिखित पोथ्या त्यां घडघड वाचूं शकत.' —कोरकि २२. घडघड पहा.

घडाड—पु. घडघड अशा आवाजाचा अतिरेक; धडधडाट; गडगडाट; घणघणाट इ०. [घडघडचा अतिशय]

घडाडणें—अक्रि. कोसळणें. घडघडणें पहा. [घडाड]

घडाडां—क्रिवि. मोठ्यानें घडाड आवाज करीत, होत; घडघडा; एकावर एक पडण्याच्या आवाजानें. 'धावा घेती, घडाडां रचिति रिचविती सिंधुमध्यें घडाडां।' —मासेतु ९ [ध्व.]

घडापड—स्त्री. (राजा.) विटाळ; स्पर्श (विशेषतः हलक्या जातीचा). [घडणें=शिवणें, स्पर्श करणें+पडणें]

घडामोड—स्त्री. घडमोड पहा.

घडारणें—अक्रि. (कु.) वृक्ष, फळांच्या घडांनीं बहरणें, घोसांनीं युक्त होणें. 'गुदस्तां याच एकेरी फळें आलीं होतीं परंतु यंदा घडारला आहे.' [घड=घोस]

घडाव, घडावण—स्त्री. १ घडणावळ. घडाई अर्थ १ पहा. २ घडण या शब्दाच्या बाकीच्या अर्थीहि कधीं कधीं वापरतात. [प्रा. घडाव, घडणें, तुल० गुज. घडामण]

घडावलें—न. (गो.) लहान घड. [घड]

घडाळ, घडाळजी, घडाळटिपरूं, घडाळें—घड्याळ मध्यें पहा.

घडिक—क्रिवि. एका घटकेंत; एके वेळीं, क्षणीं. 'घडिक म्हणति जाऊ प्राणही हे असावे।' —माऊद.३.६३. [घडी=घटका+एक]

घडिघडि, घडीघडी—क्रिवि. प्रत्येक घटकेस; प्रत्येक क्षणीं; वारंवार; घटकोघटकीं; पदोपदीं. 'स्मरे घडिघडि प्रभो भवपयोधिच्या पारदा।' —केका ११५. 'घडिघडि घडि मरण तुझे आस्वती रामा।' [घडी=घटका द्वि.]

घडितघाट—वि. आयता घडलेला; विक्रीकरितां घडून ठेवलेला; तयार. (जिन्नस, दागिना, भांडें इ०) घडलाघाट पहा. [घडणें+घाट]

घडि(डी)बंद—वि. १ घडी केलेला. २ ज्याची घडी मोडली नाहीं असा; नवाकोरा (धोतरजोडा इ०). [घडी+बंद]

घडिया—स्त्री. पात्र, तस्त. 'शुद्धमती हेतसे विडिया। पीक धरावया सुवर्णघडिया।' —एरुस्व १६.३३. [सं. घटिका; प्रा घडिआ]

घडियाल—न. घड्याळ पहा. 'नफेरी मह मोरचंग। घडियाल बाजे चंग।' —देवनाथ कृष्णजन्म ७२.

घडी—स्त्री. १ घटका; साठ पळांचा अथवा चोवीस मिनिटांचा अवधि. 'तो अवकाळ मेघु काय घडी। राहात आहे।' —ज्ञा १७.२५१. २ (ल) थोडासा वेळ; क्षण. 'पृथ्वीचिया पैसारा।—माजीं घडी न लागतां धनुर्धरा।' —ज्ञा १०.२४०. ३ योग्य संधि; वेळ; काळ. 'ही पुन्हां न ये बा घडी।' —राल'

८८. ४ कालमापनाचें साधन; तास; घटका; वाळूचें घड्याळ; घड्याळ इ०. ५ (सामा.) तास (इंग्रजी ६० मिनिटांचा; वेळ मोजण्याचें साधारण माप तास असल्यानें तासाऐवजीं सुद्धां घडी शब्द वापरतात. [सं. घटी; प्रा. घडि; हिं. गु. ब. पं. घडी] (वाप.) (एखाद्याची) घडी भरणें–१ घटका भरणें पहा. 'आला यमगृं पिशाच आपण घडी भराया मामी।' –विक ५५. २ दिवस भोगण्याची वेळ येणें; घडा भरणें. घडीघटकेचा गुण–(एखादी गोष्ट अमुक प्रकारेंच कां घडली, तशीच कां घडली नाहीं हें सांगतां येत नसलें म्हणजे वरील वाक्प्रचाराचा उपयोग करतात) एखादी गोष्ट ज्यावेळीं–ज्याक्षणीं घडली असेल त्या विवक्षित वेळेचें सामर्थ्य, प्रभाव, गुण. ०घडीं, घडोघडीं–क्रिवि पुन्हां पुन्हां; वारंवार; पदोपदीं; घटकोघटकीं घडिघडि पहा. [घडी द्वि.] म्ह० घडीघडी लाथ दाढी= हरघडीला रागावणें चरफडणें किंवा दाढी धरणें. घडीचें घड्याळ–ळें–न. क्षणभंगुर जीवित, शरीर; पाण्यावरचा बुडबुडा. ०भर–क्रिवि. घटकाभर; थोडा वेळ. [घडी+भरणें] ०भरानें–क्रिवि. थोड्या वेळानें घटकाभरानें; एका घटकेनंतर; मागाहून. घडीघट–स्त्री. मुहूर्त; घटका. 'बोले इंद्र सुरपती। आलि घडीघटीयांची आईती। नोवरा येऊंद्या लवती। संभ्रमेंसी।' –कालिकापुराण १६.४२. [सं. घटी+घटी; म घडी+घट]

घडी—स्त्री. १ एकेरी वस्त्र, कागद इ० दुहेरी, तिहेरी, चौपदरी केलें असतां होणारी स्थिति, आकार; दुमड; चुण; निरी. 'इयें पदें नव्हतीं फुडिया। गगनाचियाचि घडिया। येथ आमुची मति बुडिया। याव न निपे॥' –ज्ञा ७.१९५. २ दुमडलेली, घुणलेली स्थिति. ३ घडीवर कापड, वस्त्र इ०; उ० लुगड्याची घडी; कापडाचा, वस्त्राचा तागा. ४ (ल.) संच; बस्तान; जम; संघटित स्थिति; ऐक्य; सलोखा (क्रि० बसणें; जमणें; विघडणें; मोडणें); 'घडी जों मानाची विघडलि असे तोंवरि घडी।' –वामन भामाविलास ११ (नवनीत पृ १००). ५ रचना; निर्मिति. 'घडी स्त्रीजातीची घडविलि असे ख्याति सुघडी।' –वामन भामाविलास ११ नवनीत पृ. १००. [सं. घट्=रचणें] (वाप.) ०फोडणें–(ढोराचा धंदा) चामड्यास चुना देऊन त्याची घडी घालतात ती दोन–तीन दिवसांनीं उलगडणें. ०बसणें–१ समज पटणें, समजूत होऊन सलोखा होणें; 'तुमची उभयताची घडी बसली म्हणजे मी पैका देईन.' २ बस्तान, जम बसणें; 'आतां मात्र मनाजोगती घडी बसली.' –विवि ८ १ १७४. ३ योजलेलें कार्य यथास्थित जुळणें. ०बसविणें–जम बसविणें; सुयंत्रित करणें; 'बुद्धिमतीनें स्वतां बसविली पतिराज्याची घडी।' –विक २८. ०विघडणें–१ दोन व्यक्तींत असलेला सलोखा नष्ट होणें; बेबनाव होणें; विघुष्ट येणें. 'त्याची आमची घडी बसली होती ती विघडली.' २ (धंद्याची, कारभाराची, राज्याची) अस्ताव्यस्त, दुर्व्यवस्था, सुस्थिति नाहींशी होणें; विस्कळितपणा येणें; (कार्यांचा) सुघटितपणा नष्ट होणें. 'पुण्याच्या राज्यकारभाराची घडी विघडली होती.' –इंप १३७. सामाशब्द– –ची टोपी–स्त्री. मोडता, घडी घालतां येण्याजोगी टोपी; होडीच्या आकाराची टोपी. –ची पोळी–स्त्री. पदर सुटलेली, चौघडी पोळी; दुमडून लाटलेली पोळी. ०पदरपालव–पु. घडी घातलेल्या वस्त्राचा (लुगड्याचा, पैठणीचा) वरचा पदर. [घडी+पदर] ०बंद–वि. घडी केलेलें; घडी न मोडलेलें (वस्त्र, लुगडें, मृदंग इ०). घडिबंद पहा. [घडी+बंद]

घडी—स्त्री. पायघडी; वरून चालण्याकरितां अंथरलेलें वस्त्र, कापड इ० 'एवं द्विधा गमाधिचिया। तैसी चालतां नेनी घडिया। तळीं उपर जाणविती तया। उपनिषदें।' –विठ १.७९.

घडी—स्त्री. १ लहान घागर. –शर. २ भंडारी लोक दारू काढण्यासाठीं माडावर जें मडकें लावतात तें. घडा पहा.

घडीत—न. १ घडण्याकरितां दिलेली धातु, धातूचा पत्रा, तुकडा, मोड इ०. २ घडलेला जिन्नस; घडविलेला पदार्थ. ३ घडणावळ; घडण्याची मजुरी. 'हा तोळपाव एक रुपयाचें घडीत मागतो.' ४ (दागिन्याचा, भांड्याचा) घाट; घडण; ढाळ; रचना. 'चातुर्य येवे चतुराननाचें। घडीत आलें तर आननाचें।' –साकह २.३९. म्ह० १ घडीत मुडवून घडणावळीचा तगादा= एका नुकसानींत दुसऱ्या नुकसानीची भर. २ करारनाम सांगितलेलें काम न करून, विघडवून कामाची मजुरी मागणें. [घडणें= बनविणें]

घंटीत—न. (गो.) विकून येणारी किंमत.

घडीव—वि. १ घडून, हातोडा इ० नें ठोकून ठोकून तयार केलेला (जिन्नस, दागिना, भांडें इ०). याच्या उलट ओतीव. २ हातावर केलेली (पोळी), याच्या उलट थापटीव, लाटीव. [घडणें=बनविणें, तयार करणें] ०लोखंड–न. घडलेलें लोखंड; याच्या उलट ओतीव. (इं) रॉट आयर्न [घडणें]

घडुला—पु. (प्र.) घोडुला पहा.

घडुली–लें—स्त्रीन. लहान मडकें, घडा, डेरा. 'वैसी घडुलि तोंडवरि भरिलि।' –पंच ५.९. [म. घडा; हिं. घडोला]

घडुलें—न. (कु.) केळीचा लहान, सुकलाच बाहेर पडलेला कोंवळा घड, लोंगर. [घड]

घडेबाजी—स्त्री. १ मडक्यांत फटाके वगैरे भरून त्यांना बत्ती देणें; आतषबाजी; दारूकाम. '...झाडें नानाप्रकारचीं व घडेबाजी...दारू सुटावयाची.' –ख ४५८७. (क्रि० उडविणें;

करणें, लावणें ) २ ( ल ) एकदम होणारा वाद्यांचा गजर, कड कडाट [ घडा+बाजी हिं ]

**घडेस्री काढणें**—अक्रि ( कु ) कानउघाडणी करणें

**घडोघडी**—क्रि. वारवार, पदोपदीं, क्षणोक्षणीं, घटको घटकीं, हरघडी, घडिघडि [ घडी द्वि ]

**घडोंची घडोची**—स्त्री. ( व भा ) घडवची पद्दा [हिं ]

**घडोशी**—स्त्री ( कों. ) घडवची, घडवशी पद्दा

**घडौतें**—न साधन ( कार्य इ० चें ), घडवून आणतें तें [ घडणें ]

**घ(घॉ)डुॅ**—पु ( गो ) भाजलेल्या तांदुळाचें पीठ पाण्यांत कालवून तयार केलेलें पक्वान्न, हें पद्य ब्राह्मणांत प्रचलित आहे

**घड्यावरघेळ**—पु वरगळ भाताची एक जात

**घड्याळ**—न १ वाळूचें कालमापक यन्त्र, वाळूचें घटपाळ २ तासाचे ठोके जीवर वाजवितात ती घंटा, तास ' स्वराज्यांत घड्याळ वाजविण्याचा मान सरकारकडून मिळे स्वारीमध्यें ताशे वाजंत्रीप्रमाणें घड्याळहि वाजवीत '—वाड्बाखा २ १२१ 'घटिका पाणी पिते आणि घड्याळ टोले खातें '—गुप्तमंजूष १५३ ३ कालमापनाचें आधुनिक यंत्र, यांत तबकडीवर तास, मिनिटें इ०दाखविणारे काटे असून हें यंत्र स्प्रिंग किंवा चाकावरच्या वजनानें चालतें याला ठराविक वेळीं किल्ली द्यावयाची असते ' स्विस व अमेरिकन कारखानदारांची घड्याळें करण्याबद्दल फार प्रसिद्धि आहे —ज्ञाको घ ४ ४ कांहीं विशिष्ट गोष्ट दर्शविणारें यंत्र ( उदा० मोटारींतील पेट्रोल, हवा, इ०, इंजनांतील वाफ इ०, किटसन् बत्तींतील हवेचा दाब ) ५ एक प्रकारची भाताची जात —मराठी ६ वें पुस्तक पृ ३१९ ( १८७५ ) [ स घटी=घटिका+ आलय=घर प्रा घडिआलय, हिं घडियाल] **घड्याळजी**–जी–पु १ तासाचे ठोके वाजविणारा कामगार २ घड्याळें दुरुस्त करणारा, घड्याळें विकणारा [ घड्याळ, सिं घड्यालूचीं ] ०**टिपरूं**–न १ घड्याळ वाजविण्याची लाकडी मोगरी २ ( ल ) भाकर व मिरची ' शुद्ध देशांत गेला म्हणजे घड्याळटिपरुशीं गाठ ' [ घड्याळ+टिपरू ]

**घण**—नपु लोखंड, तांबें इ० ठोकण्याचा, घडण्याचा लोखंडी मोठा हातोडा ' घणाचें घाईं पिटे तैसा । '—विउ २ ७ ' जैसे ऐरणीवरी घण । तैसे हाणिती असणपण । '—कथा १ १३.९८ [ स घन=लोखंडी गदा प्रा घण ] म्ह० १ हिऱ्याची परीक्षा घणावांचून होत नाहीं २ घणाचे घाव सोसील तो हिरा ( हिरा हा अत्यंत कठिण पदार्थ आहे घण मारल्यानेंहि तो फुटत नाहीं यावरून )=लोकनिंदला, संकटांना जो जुमानीत नाहीं तोच थोर होय [ वै स घन्=हन –मसाप ... निरुक्त भाषांतर ७८ ] ०**करी**–पु ( ... मारणारा मनुष्य गडी [ घण+करणें ] ०**कोरा**–वि १ घणाखालून नुकताच निघालेला ( रुपया, मोहोर इ० नाणें ) २ ( ल ) अगदीं कोरा, कोराकरकरीत, कारागिरींतून नुकताच बाहेर पडलेला, [घण+कोरा] –**णाखालचा**–वि १ घणकोरा, टांकसाळींतून नुकताच बाहेर निघालेला ( रुपया, नाणें इ० ) २ कोराकरकरीत ( जिन्नस ), कारागिराच्या हातून नुकताच तयार झालेला (जिन्नस, दागिना इ०

**घण**–वि १ दाट, घट्ट, पाण्याचा अंश, द्रवांश कमी असलेलें ( द्रवपदार्थ, मद्य इ० ) ' या मद्यापेक्षां हा मद्य घण आहे ' ' सांभारें घण झालें आहे ' ' घण ताक '=दाट ताक २ अविरल, जोराच्या सरीचा अतिशय ( पाऊस इ० च्या ) ३ दाट विणीचा (कपडा, कागद इ०) घट्ट, विणलेला ४ किर्र, निबिड, गहन (अरण्य झाडी इ०) ५ जाड, जाडसर (लाकडाची फळी इ०) ६ गर्दीचा, दाटीचा, खेंचाखेंच झालेला ( मनुष्यांचा जमाव, गर्दी इ० ) ७ हट्टानें मौन धारण केलेला, स्तब्ध, घन पहा [स घन, प्रा घण, गु घणो, सिं घणि ] ०**दाट**–स्त्री ( काव्य. ) गर्दी, खेंचाखेंच, जमाव, समुदाय ' त्या यमुनातिरीं यादवांची हो घणदाट ' –वि १ अतिशय दाट, संकीर्ण, गच्चगच्च ' जैसें जें क्षेत्र पिकत। तों तों कणसें घणदाट दिसत। ' २ ( सामा ) दाट, घट्ट (द्रवपदार्थ), निबिड, गहन, गर्द ( झाडी, अरण्य ), भरगच्च, भरींव, ऐवज- दार (देणग्या, इनाम इ०) जोराचा (पाऊस). ०**दाट**–**टी**–स्त्री. ( काव्य ) जीवश्चकंठश्च स्नेह, दाट परिचय, मैत्री ' आतांशीं त्याचें व याचें घणदाट आहे ' [ घन+दाट ] ०**सर**–वि १ दाटसर, बरेंच दाट ( ताक इ० ) २ राकट, कणखर(मनुष्य इ०). जाडाभरडा (कपडा) भक्कम, ऐवजदार, मजबूत, [ घण+सर प्रत्यय]

**घण**—( कों नाविक ) एक प्रकारचें जाळें

**घणकणें**—अक्रि ( भोंवरा इ० गरगरा फिरताना ) घण्ण्ण्ण् ऽऽण् असा आवाज करणें, वाजणें ' प्रेमवस्या त्रिवेणी संगम घणघणाट घणके भवरा। '—पला १४ [ध्व घण्ण्]

**घणगा**—पु ( दादर ) गगन पहा

**घणघण**—स्त्री १ घंटा इ० कांचा घण घण असा आवाज. २ ठक्ठक, ठाट् इ० कोणताहि आवाज ३ चिलटाचें गुणगुणणें, गुणु ४ स्पष्ट व खणखणीत गाणें, म्हणणें, बोलणें ५ ( ना ) कटकट किरकीर [ ध्व घण् द्वि ]

**घणघण-णां**—क्रिवि १ झण्झण्, छण्छण्, झणत्कार, टणत्कार इ०कांच्या होणाऱ्या घणघण अशा आवाजानें ( क्रि० वाजणें करणें ) २ स्पष्ट व खणखणीत आवाजानें [ ध्व घण् द्वि ]

**घणघणघंटा**—स्त्री ( ल ) नकारघंटा ठणठणीतपणा पूर्ण अभाव आज घरामध्यें तुपाची घणघणघंटा वाजली आहे ' ( विहिरी इ० कांचा ) ठणठणीत कोरडेपणा ' या विहिरींत चार महिने पाणी असतें, मग घणघणघंटा। ' [ घणघण+घंटा ]

**घणघणणें**—अक्रि. १ घणघण असा (घंटा इ०कांचा) आवाज करणें; छगछगणें; झणझण वाजणें; खणखणणें. २ (मनुष्याचा आवाज कंठ इ०) खणखणीत, साफ, स्पष्ट असणें. 'त्या गवयाचा कंठ घणघणतो.'

**घणघणाट**—पु. घणघण या आवाजाचा अतिशय, अतिरेक; मोठा घणघण असा आवाज; (घंटा इ० कांचें) मोठ्यानें वाजणें; (वाद्यांचा) दणदणाट; खणखणाट; झणत्कार; कडाका. [घणघण]

**घणघणावचें**—क्रि. (गो.) १ मोठा आवाज काढणें. २ कीर्ति पसरणें.

**घणघणीत**—वि. ठणठणीत; खणखणीत; स्पष्ट; मोकळा; कानाला भेधणारा; घणघणणारा (आवाज).

**घणघाव, घणघावू(उ)क**—वि. (राजा.) १ (कडाणी लोकांत रूढ). जाडेंभरडें; दणकट; दाट विणीचें (कापड). २ बोजड; अजस्र; जाडाजुडा; मोठाधाटा (दागिना इ०). दांडगा; मजबूत; भक्कम (मनुष्य). [घण=हातोडा+घाव]

**घणघोर-घणाघोर**—घनघोर पहा. 'मौंजीबंधन लग्न रायाचें खुपरायाचें झालें घणघोर।'–ऐपो १६७.

**घणघोष**—पु. दणघण असा आवाज; नाद; ध्वनि. 'झळंबाचे घणघोषीं। मिळतां दुंधि घालितांशें आकाशा।'–शिशु १०१८. [घण=घण असा ध्वनि+घोष]

**घणमणणें**—अक्रि. घाबरणें; डगमगणें; मागें पुढें पहाणें, फिकीरींत पडणें. 'ज्ञानी हीन स्वनाशीं घणमणति, न त्या साहवे मानहानी।'–मोकृष्ण ५७.४. 'करीं स्वर्णस्पर्शे किमपि न महात्मा घणमणी।'–मोअंबरीष ८८. (नवनीत पृ. ३७१) [सं. घन=घण+मन्=विचार करणें]

**घणवट, घणवटणें**—घनवट, घनवटणें पहा.

**घणस, घणसा**—पु. सर्पाची एक जात, घोणस. [सं. घोनस; प्रा. घोणस] म्ह० घणसापुढें गरुड चालत नाहीं=घोणस गारुड्याच्या मंत्रतंत्राला वश होत नाहीं यावरून लक्षणेनें), शिरजोरापुढें चोराचें, दुष्टाचें कांहीं चालत नाहीं. **घणसाचें**–न. (राजा.) घोणसाचा दंश. 'त्याला घणसाचें झालें, वांचला तर वांचेल.' [घणस]

**घणसकांडें, घणसवेल**—नस्त्री. एक वेल. घोणसकांडें, घोणस वेल असेंहि म्हणतात. ही घोणसाच्या विषावर उपयुक्त आहे असें मानितात

**घणसर**—स्त्री. (वै.) केकताड; एक प्रकारची वनस्पति; घायपात.

**घणसा**—पु १ घगसें; एका जातीचें पडवळ. २ घणस पहा.

**घणसा**—पु. भोपळ्याची एक जात. [सं. घनवास]

**घणसें पडवळ**—न. पडवळाची एक जात; हें आंखुड असतें यास घणसा, घोणसें असेंहि म्हणतात. [सं. घनवास]

**घणा**—पु. (वै.) घाणा. [फा. घन=तेल काढावयाचा मोठा जड दगड; म. घाणा]

**घणा**—पु. अतिशय मोठा घण; हातोडा. [घण] घण्याघायीं-क्रिवि. घणाच्या (उत्साहपर–उत्तेजनपर) आवाजांत ०नांदणें–असणें–नेहमीं दागिने हातोड्याखालीं असणें. (ल.) श्रीमंत असणें. [घणा+घाव]

**घणा**—पु. संपत्ति; धन. [अर. घना]

**घणाघणा**—पु. (व.) तुंबून राहिलेलें काम.

**घणाघणा**—पु. कटकट; घणघण. [ध्व. घण्]

**घणाट्या**—ऑमव. १ निरर्थक, कंटाळवाणे हेलपाटे, हिसके फेऱ्या; पायपिटी. २ (सामा.) व्यर्थ शीण; फुकट प्रयत्न. (क्रि० खाणें; घेणें). [घण?]

**घणाणघंटा**—पु. घणघणघंटा पहा.

**घणाणां**—क्रिवि. घणघणां पहा.

**घणावणें**—अक्रि. दृढ होणें; निश्चित होणें. 'सुषुप्ति बैसे घणावोनी।'–ज्ञा १४.१४२. [सं. घन; प्रा. घण]

**घतणें**—अक्रि. इजा करणें; बाधणें; अपाय होणें; हानिकारक होणें. [सं. घात]

**घतन**—न. १ घातुक, अपायकारक, मारक, वस्तु किंवा गोष्ट. २ संकट; धोका; प्राणसंकट. ३ (सामा.) नुकसान; नाश. ४ प्राणनाश. ५ घात पहा. 'रसरसली नवती नुतन। तुजकरितां केली जतन। त्यागितां करिन जिव घतन।'–प्रला १७८.–वि. १ घातुक; अपायकारक; मारक. २ (सामा.) अनर्थकारक; अहितावह. [सं. घात, घातन]

**घन**—पु. लोहाराचा मोठा हातोडा. घण पहा. 'घन सांडस नागफणी। रात हात हातवडे ऐरणी।'–कथा ३.१७.९४. [सं.] ०कोरा–वि. घणकोरा पहा. ०वर्धनीय–वि. (पदार्थ.) प्रसरणशील; घनानें ठोकल्यानें किंवा दाब घातल्यानें न मोडतां पसरणारें. (इं.) मॅलिएबल्. [घन=हातोडा+वर्धनीय=वाढण्याजोगा] ०वर्धनीयत्व–न. (पदार्थ.) हातोड्यानें ठोकल्यानें किंवा दाब घातल्यानें प्रसरण पावण्याचा पदार्थाचा धर्म; पदार्थविज्ञानशास्त्रांत सांगितलेल्या पदार्थांच्या अंगच्या गुणांपैकीं एक. (इं.) मॅलिॲबिलिटी. [घनवर्धनीय]

**घन**—न. १ तास; पितळेचें, काशाचें वाद्य याअर्थी सर्वसाधारण शब्द; घड्याळ. 'घनाचा घमंड तंत लावितो लया।'–दावि १६३. २ घंटा, करताल, टाळ, झांज, झेंगट इ० प्रमाणें

I. घण. १ जाड; जाडेंभरडें; घट्ट विणीचें (कापड). ( पातळ नसलेलें ( ताक इ० ). ३ दाट; गर्द; निबिड डी, पालवी इ० ). ४ दुर्भेद्य ( अंधार ). ५ जाड; ी). ६ घुमेपणानें स्तब्ध असलेला (मनुष्य). ७ गाढ; इ०). 'ना स्वरूप अवस्थान । ते सुषुप्ति कां घन। '–ज्ञा १४.७४. ८ मोठा; जोराचा; मोठ्या सरींचा ). 'इंदिराकळशा इंद्र वर्षेता घन घन धारा।' –र ाढ; अप्रवाही; द्रव, वायुरूप पदार्थाविरहित. [ सं. ] -- ०घोर-घनाघोर-वि. १ निबिड; दाट; जोराचा ढग ). २ भयंकर; निकराचें; तुंबल, हातघाईचें ( युद्ध. ४ मद्दिमाराची; आवेशाची; जोराची ( शिवीगाळ ). स्य ( झोंप. ) ५ दाट; निबिड; गर्द ( अंधार, झाडी, ). ६ दाट; गजबजलेला; खेंचाखेंचीचा; गडगच्च ( मनु- माव,पीक, फळें इ० ). [ घन+घोर=भयंकर ] ०चर्मक- कातडीचा ( पाणघोडा इ० ). [ सं. घन=जाड+चर्म= ०दाट-वि. १ गडगच्च, निबिड, 'भरला घनदाट ।' २ घट्ट; पातळ नसलेला ( द्रवपदार्थ ) ३ ( ल. ) सलगीचा; जिवलग; सलोख्याचा (स्नेहभाव, मैत्री). पहा. ४ गजबजलेला; खेंचाखेंचीचा (जमाव, सभा इ०). भा बैसली घनदाट।' –शनि ८. घणदाट पहा. [ घन= किंवा दग+दाट ] ०दाटणें-गर्दी होणें; खेंचाखेंच होणें. नदाटली विमानीं।' –देवीचीभूपाळी ३०. [ घनदाट ] -स्त्री. १ जीवश्चकंठश्च स्नेह, मैत्री; जिवलग सख्य. २ दाटी. घणदाटी पहा. [ घनदाट ] ०प्रसरण-न. .) घन पदार्थाचें उष्णतेनें प्रसरण पावणें; आकारमानांत इं. ) एक्स्पॅन्शन्. [ घन+प्रसरण=पसरणें ] ०रूप द्रव्य- काराचा, लांबी, रुंदी व उंची असलेला पदार्थ, घट्ट, नसलेला पदार्थ. [ घन+रूप+द्रव्य=पदार्थ ] ०वट-वि. त; जाड; घट्ट विणीचें ( कापड इ० ). २ ( काव्य. ) क; श्रेष्ठ, सर्वव्यापी; सर्वांचा सारभूत. ३ ( काव्य. ) वजनदार. 'मेरुपासाव घनवटें। जीं हिरीं जालीं ...अ ३०. ४ ( काव्य. ) भरींव; भरदार: 'कीं भूस । तपणिता राहे घनवट।' –ज्ञा २.१३०. –अमृ ा ११.१७. –दा ६.१०.२२. ५ घट्ट; कठिण. घनवट। लघुत्वें बोली हळुवट।' –विड ११. ी येतुली घनवट ऐसे। पृथ्वीचि जाणे।' –ज्ञा [ घन=दाट+वृत्त किंवा वत् ] ०वटता-स्त्री. भारी- ा; घट्टपणा. [घनवट] ०वटपण-न. घट्टपणा; भरींव- पणा; घनता. 'शब्दफोल अर्थ असे। घनवटपणें।' ०.२०. 'कीं अवधान आणि श्रवण। कीं पृथ्वी आणि घनवटपण।' –भवि ४५.१२९. [ घनवट ] ०वाड-वि. निबिड; दाट; गर्द. –शर. [ घनवट ] ०विरोध-पु. ( पदार्थ. ) पदार्थाच्या आकारमानामुळें उत्पन्न होणारी प्रतिबंधक शक्ति. ( इं. ) व्हॉल्यूमरेझिस्टिव्हिटि. [सं. घन+विरोध=प्रतिबंध] घना- कार-पु भरींव आकार; गोळ्याचा आकार; लगड. 'पुढती तो घनाकारु हारपे। जे वेळीं अलंकार होती।' –ज्ञा ८.१७३. [ घन=भरींव, घट्ट+आकार=रूप ] ०सर-वि. दाट; विपुल; ऐवज- दार; भरदार. 'पिकें होतां धान्यें घनसरीं स्वस्त विकती।' –दावि २२५. घणसर पहा. [ घन+सर प्रत्यय ] घनांधकार- पु. ( काव्य. ) दाट काळोख; घोर अंधार. 'घनांधकारात शिवा जसा वर्नी।' –मृच्छकटिक. [ घन=दाट+अंधकार=अंधार ] घनाज्ञान-न. गाढ, घोर अज्ञान. [ सं. घन=गाढ+अज्ञान ] घनीकरण-न. ( पदार्थ. ) पातळ, वायुरूप पदार्थ घट्ट करणें. ( इं. ) कन्डेन्सेशन. [ सं. ] घनीभवन-न. ( पदार्थ. ) पातळ, वायुरूप पदार्थ दाट, घट्ट होणें. उ० पाण्याचें बर्फ बनणें, पातळ मेण थिजून घट्ट होणें. ( इं. ) सॉलिडिफिकेशन्. –सूव २६. [ सं. ] घनीभूत-वि. गोळ्याच्या, लगडीच्या रूपानें असलेलें; घट्ट झालेलें; आकार धारण करणारें. 'नाना घनीभूत सुवर्ण। जैसें न्याहाळितां साधारण।' –ज्ञा १.४४. [ सं. ]

घनगडा—पु. ( व. ) फोडून वेगळें केलेलें मडक्याचें तोंड; मडक्याचा कांठ. 'घनगडा घातला गळ्यात।'

घनघन—स्त्री. ( व. ) १ किरकीर २ कुरकुर. [ ध्व. घन द्वि. ]

घनणें—अक्रि. ( खा. ) घाणणें; दुर्गंधि येणें. [ घाण ]

घनतुरूप—पु तोफखाना. 'विजयादशमीच्या स्वारीला घनतुरूप पागा रिसाला।' –गापो ३५. [ इं. गन्ट्रुप ]

घनपाग—न. ( राजा. ) मासे पकडण्याचें बारीक भोंकाचें जाळें; हें आडपागापेक्षा लहान असतें. [ घन=दाट+पाग=जाळें ]

घनपाठी—१ वि. वेदाचा घनपाठ म्हणणारा; घन नांवाची वेदाची विकृति पठण करणारा ( जटा, माला, शिखा, रेखा, ध्वज, दंड, रथ व घन अशा वेदपठणाच्या आठ विकृती आहेत); नमो रुद्रेभ्यो ये, हें वाक्य पुढीलप्रमाणें घनपाठात म्हणतात.— नमो रुद्रेभ्यो रुद्रेभ्यो नमो नमो रुद्रेभ्यो ये ये रुद्रेभ्यो नमो नमो रुद्रेभ्यो ये इ० २ वेदपारंगत; मोठा विद्वान्; वैदिक. 'विप्र शोभती वेद-घनपाठि।' –दत्तपदें २५. [ सं. घन=वेद म्हण- ण्याची विशिष्ट पद्धत+पाठ ]

घनमणणें—अक्रि. घणमणणें पहा. घाबरणें; डगमगणें. 'बरगडी रगडीत असे सदा। घनमणी न मनींहुनि तो कदा।' –किंगवि ३२ [ घन+मणि ]

घनघटणें—अक्रि ( काव्य ) १ गडगच्च, घनदाट भरणें, ( सभा इ० ), दाटणें; जमणें; चिकार भरणें. 'सभा घनवटली

अपार।' –वेसीस्व १.१७.' तेज घनवटे घनवटे हृदयभुवनीं।' –वेप १९०. २ ऐक्य होणें; सामानाधिकरण्य होणें. ' चंचळ निश्चळ घनवटे। हें तों घडेना।' –दा १५.१०.१४. ३ दाटी, गर्दी करणें; खेंचाखेंच होणें; चेंगराचेंगर होणें. [ घनवट ]

**घनवटा**—स्त्री. ( निजण्याची ) गादी, गालिचा. –मनको.

**घनवेल**—स्त्री. एका तऱ्हेचें कापड.

**घना**—वि. ( नंद भाषा ) सोळा. ' घना रुपये उसनवार आणले. ' ' ह्या लुगड्याची घना रुपये किंमत घे. ' [ घन=१६ घनाक्षरी ]

**घनाट्या**—स्त्रीअव. घणाट्या पहा.

**घनाना**—पु. ( व. ) घोंटाळा. 'तुमच्या न येण्यानें कामाचा सगळा घनाना झाला.' [ ध्व. घणाणा ]

**घनावणें**—अक्रि. घन होणें; घट्ट बनणें. [ घन=दाट ]

**घनावणें**—अक्रि. ( आकाश ) ढगांनीं युक्त होणें; अभ्राच्छादित होणें. [ घन=ढग ]

**घनाक्षरी**—स्त्री. मराठींतील एक ओंवीसारखा सोळा चरणांचा छंद, वृत्त; याचे चार पाद असतात. प्रत्येक पादाच्या पोटीं चार चरण असतात. पहिल्या तीन चरणात प्रत्येकीं आठ अक्षरें व बारा मात्रा असतात; चौथ्या चरणात सात अक्षरें व अकरा मात्रा असाव्यात. प्रत्येक पादांत तीन तीन चरणांचीं यमकें व प्रत्येक पादाच्या चौथ्या चौथ्या चरणांचीं यमकें असावीं हा सामान्य नियम. उद० 'अहो कैकयी हें काय। केलें तुवा हाय हाय। न म्हणवे तुज माय॥ जन्मोजन्मीं वैरिणी।' [ सं. घन+अक्षर ]

**घनिष्ठ**—वि. अतिशय दाट, दृढ, बळकट. ' आपण व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा संबंध घनिष्ठ होण्याचा योग आला. ' –साहित्यसेवकास अनाहूत पत्रें ( गं. दे. खानोलकरकृत ) पत्र ६ वें. [ सं ]

**घनू**—वि. ( माण. ) पुष्कळ; विपुल; भरपूर. [ सं. घन; तुल० गुज. घणुं ]

**घप–कन–कर–दिशीं–दिनीं**—क्रिवि. वासाचा–घाणीचा आकस्मिकपणा व विपुलता ध्वनित करणारीं. –क्रिवि. ( वास ध्वनित करणाऱ्या शब्दांबरोबर योजतात. ) एकदम वास, घाण सोडून, ' कवाड उघडतांच घपकन वास आला. ' गपकन् पहा.

चिवडा; संकर. ३ ( कामांचा, हिशेबाचा, पदार्थांचा एकत्र मिळाल्यामुळें होणारा ) गोंधळ; घोंटाळा; अव्यवस्था. ' या पोथीचा त्या पोरानें घप्पाघोळ करून टाकला. ' ४ अनेक कार्यें, धंदे एकत्र आल्यानें उडणारी तारांबळ, धादल, ताणाताण. ५ लगबग; धामधूम; धायकूत.

**घबकें**—न. अवचित होणारा लाभ; अलभ्य, आगंतुकलाभ; घबाड; टाळक; टावकें. ( क्रि० लागणें; मिळणें; सांपडणें ). गबका पहा.

**घबघबीत**—वि. ( प्र. ) गबगबीत; गबगबीत पहा.

**घबदूल**—वि. गलेलठ्ठ; घट्टपुष्ट; भक्कम; दांडगा. गबदूल पहा

**घबराट, घबराहट**—स्त्री. ( म. ना. ) १ ( रोग्याचा ) जीव घाबरणें; बेचैन वाटणें; कहाली होणें; गलबलणें. २ ( ल. ) भीति, धास्ती; दुःख. ३ गोंधळ; घोंटाळा. [ हिं. घबराहट. म. घाबरणें ]

**घबाड**—न. १ एक शुभ मुहूर्त; सूर्यनक्षत्रापासून चंद्रनक्षत्रापर्यंत मोजून येणाऱ्या संख्येला तीन या संख्येनें गुणून गुणाकारांत चालू तिथि मिळवून आलेल्या संख्येला सातानीं भागून बाकी तीन उरल्यास त्या दिवशीं हा योग येतो असें समजतात. २ ( सामा. ) शुभ वेळ, मुहूर्त; सुयोग. ' त्याला जेव्हां अकस्मात एवढें द्रव्य मिळालें त्याजवरून असें दिसतें कीं त्यावेळयीं त्यास घबाड साधलें होतें. ' ३ ( ल. ) आकस्मिक लाभ; अनायासें झालेली मोठी द्रव्यप्राप्ति; लाट. ( क्रि० मिळणें; साधणें). 'गाण विहंगमें गेला। घबाड अवचित पावला।' –दावि २७४. ' मी एक पैशाचें घबाड पाहतों आहें. ' –मोर १२. ०चूक–स्त्री. मोठी चूक; घोडचूक. ०दैव–न. सुदैव, मोठें भाग्य. ०माप–न. १ बाजारांत चालणाऱ्या शिरस्त्याच्या मापापेक्षां, वजनापेक्षां मोठें माप, वजन. ' हे दहा पायली गहूं आहेत, परंतु त्या घबाड मापानें मोजले असतां आठ पायल्या भरतील. ' २ मोठा आहार असणाऱ्या माणसाचें पोट, कधीं तृप्त न होणारा कोठा. ' चार माणसाचें अन्न या तुझ्या घबाड मापास पाहिजे. ' ०मुहूर्त–पु. घबाड अर्थ १ पहा. ०घशिला–पु. दांडगा वशिला; कार्य साधण्याकरितां मोठ्या माणसाकडून घातलेली गळ; ०षष्ठी–स्त्री. ज्या षष्ठीला घबाड मुहूर्त येतो ती षष्ठी. [ घबाड+षष्ठी ]

**घम**—क्रिवि. स्तब्धपणें; मुकाटयानें. घम्म पहा.

**घम**—स्त्री. गम. १ क्षमा; अपराध गिळणें; सहन करणें; सहनशीलता; गय; गई; ( क्रि० खाणें; करणें; घेणें; म्हणणें ). २ दम; विश्रांति; विसावा. ( क्रि० खाणें ). गम पहा. –क्रिवि. शरीरांत एकदम वेदना किंवा चमक उत्पन्न झाली असतांना निघणारा उद्गार; हाय! आयायो! ( क्रि० करणें ) हाय पहा. [ अर. घम्=दुःख ]

**घम**—पु (अव.घमे.) (वे.) डेपाळें; गुळाच्या ढेपा घालण्याकरितां केलेलें भांडें. घमेलें पहा. [सं. घर्म; प्रा. घम्म=कढई]

**घम-फर-फन-दिशीं**—क्रिवि. घपकर-कन्-दिशीं पहा.

**घमघम**—पु. ( गो. ) घमघमाट पहा. –क्रिवि. १ अतिशयित सुवासाच्या दर्पाचें निदर्शक क्रियाविशेषण. 'मोगरीजवळून गेलों तर घमघम वास आला–सुटला.' २ एकदम; भरपूर; सुरळितपणें; संतोषानें. 'गाय घमघम दूध देते.' 'दूध घमघम पडतें.' ३ धडकून; जोरानें. 'छडी लागे चमचम विद्या येई घम घम.' [ ध्व. प्रा. घमघम ] **घमघमणें**–अक्रि. अतिशय सुवास येणें; सुगंधानें, फुलादि दरवळणाऱ्या वासानें युक्त होणें. 'कीं तें वैराग्यवल्लीचीं सुमनें। प्रेमसुवासें घमघमती॥' 'येथें कायहो फुलें घमघमतात.' **घमघमाट**–पु. वासाची अतिशयता; मधुर व उग्र वासांचा संयोग; सुगंधाचा अतिरेक–दर्प; फार दरवळणारा सुगंध; 'फुलाचा घमघमाट व मन्यांचा झुळझुळ आवाज यांपासून मोठा आवाज होई'–पान्ह ३७. **घमघमीत**–वि. उग्र, मधुर आणि दरवळणारा ( सुगंध ); घमघम सुवासयुक्त ( फोडणी इ० पदार्थ ); खमंग. 'आजची भाजी घमघमीत आहे.' [ घमघम ]

**घमट गुळवणी**—न. १ घमंड गुळवणी पहा. २ तोंडापुरतें लाडीगोडीचें भाषण; गोड थापेबाजी; खुशामत. [ घमंड+गुळवणी=गुळाचें पाणी ]

**घमड**—वि. धामड पहा.

**घमंड-डी**—स्त्री. १ विपुलता; प्राचुर्य; अतिशयता; रेलचेल; समृद्धि; अतिरेक 'आज लाडवांची घमंड झाली.' २ (कामाचा, काळजीचा) रगाडा; नेट; कचका; निबिडता. 'आज कामाची घरांत घमंडी आहे.' 'अशा ह्या कर्जाचे पेंचाचे घमंडींत तो अद्यापि पडला आहे.' –व्यनि ९०. ३ थाट; बहार; मजा; रंग. 'केलें घमंड कीर्तनीं।, –दावि ४१६. 'घमंडी मोठी न्हायाची। केंस पसरूनि उदवायाची।' –प्रला २१७ ४ अतिशय उपभोग; चैन; चंगळ. 'त्यावेळेस त्यांची खाण्यापिण्याची व नानाप्रकारचे मळीण विषयोपभोग घेण्याची मोठी घमंडी उडली.' –व्यनि ४३ ५ घोष; गजर; एकतानता; नाद मधुरता. 'ताळमृदांगघमंडी। मिळोनि जाता उठे अधिक आवडी।' –दावि १७५. 'घमंडी टाळांची घाई। करटाळिया फडकती पाहीं।' –ह १०.१४१. –वि. १ कर्णमधुर; सुस्वर; सुश्राव्य. 'भजन कीर्तन घमंड करित।' –दावि १६७. २ भरपूर; विपुल; समृद्ध; मोठा; मनसोक्त. 'नटोनि घमंड नाचो लाऊं लोकां।' –दावि १४. 'धाकार घमंड मांडला।' –वेसीस्व ११.७७. [ हिं.घमंड=गर्व ]

**घमंड-डी, घमेंड**—स्त्री. १ पोकळ ऐट; डौल; ताठा. २ अहंकार; गर्व. [ हिं. घमंड=गर्व, अहंकार ] **घमंड, घमंडखोर, घमंडानंद, घमंडानंदी, घमंडानंदन, घमंडीनाथ**–वि. १ ( जो पोटाशिवाय दुसऱ्या कशाकडेहि लक्ष्य देत नाहीं अशा माणसास उपरोधोक्तीनें लावावयाचा शब्द ) पोटभरू; पोटबाबू. २ चैनी; खुशालचेंडू; रंगेल; विलासी. ३ प्रौढी मारणारा; बढाईखोर; गर्विष्ठ. 'कां घमेंडे हो ठाकिला संसार।' –दावि ३०९. 'पेनिलोप राणीच्या पाणिग्रहणार्थ जमलेल्या राजपुत्रांप्रमाणें घमंडानंदन आहेत.' –आवि ३.

**घमंडगुळवणी**–न. लापशी इ० गोडसर पातळ पदार्थ बिघडून बेचव, पाणचट झाले असतांना त्यांना तिरस्कारानें लावावयाचा शब्द; गरगट; डपळवणी; खरकटवणी; घमटगुळवणी. [ घमंड=समृद्धि+गुळवणी=गुळचट पाणी ]

**घमत**–स्त्री. ( कों. ) तारवास भोंक पडून त्यांतून तारवाच्या तळाच्या भागांत साचलेलें किंवा झिरपलेलें पाणी; गलबतांतील गाळ पाणी. गमत पहा.

**घमतड-डी**—स्त्री. (राजा.) जेथें घमत सांचते ती जागा; गलबताचें पोट. गमतड पहा.

**घमताड**—स्त्री. १ ( कों. ) घमतड. २ गलबतांतील गाळ पाणी. गमताड पहा.

**घमशा(स्या)न**—न. १ ( क्रियेचें आधिक्य, जोर किंवा पदार्थांची रेलचेल दाखविण्यासाठीं अनियमितपणें या शब्दाचा उपयोग करतात ) धांगडधिंगा; धुमश्चक्री; खिदळा; धुडगूस. ( क्रि० घालणें; मांडणें ). २ चमचमाट; खाणें, पिणें, गाणें, वजावणें इ० प्रकारांची चैनबाजी; धूमधडाका. ३ ( पावसाची, खाद्यपदार्थांची, पिकांची ) रेलचेल; चंगळ; लयलूट; समृद्धि; विपुलता. 'साहित संगीत प्रसंग मानें। करावीं कथेचीं घमशानें।' –दा १८.३१८. 'त्याच्या घरीं खाण्यापिण्याविषयीं तोटा नाहीं, घमशान आहे.' ४ दाडगाई; लाथाळी; तुडवणी. 'माझ्या अंथरुणावर घमशान घालून दुर्दशा करून टाकली.' ५ पराभव; फडशा; धुव्वा (वाद, शिवीगाळ इ० मध्यें). –वि. १ धिप्पाड; भक्कम; धटिंगण; दांडगा ( मनुष्य ). २ भव्य; शोभिवंत; छानदार; नामी ( इमारत इ० ). ३ भक्कम; दणगट; मजबूत; टिकाऊ (,कापड, दोर इ० ). ४ घमंडानंदन; विलासी;

चेनबाज; रुशालचेंद ( मनुष्य ). [तुल० सं. घोर+श्मशान ? हिं. घमसान=तुंबळ युद्ध; गु घमशाण=रणधुमाळी, धुमश्चक्री; सिं.घम्शानु= गर्दी, गडबड; सं. घस्मर ?]

घमाधम–मां—क्रिवि. धमधम पहा. [ हिं. ]

घमामा—क्रिवि. घमाघमा, भरारा; घमघम. ' दोहूं चला रे गाई घमामा । ' –दावि ७६९. [घमघम ]

घमेलें—न १ लोखंडी पाटी, टोपली, तगारी. २ आग-गाडीच्या रुळाखालीं आधार देण्याकरितां पालथी घातलेली लोखंडी जाड तगारी, एका स्लीपरखालीं ह्या दोन्ही बाजूस दोन असतात. ३ घम, घेपाळें. [ सं घर्म=उष्णता+आलय; प्रा. घम्म+ आलय ]

घम्म—क्रिवि. ( बायकी ) स्तब्ध; मुकाट्यानें. घम पहा. ' पण मास्तरीणबाई अगदीं घम्म बसल्या, अगदीं रामा ! शिवा ! गोविंदा ! ' –सराद १०. [ घुमा–म्या ]

घम्मनमेट—वि. ( माण. ) खंबीर; घट्ट; पक्का. [ घम+ मेट; का. मिट्टु–मिट्टि=रास, ढीग ]

घर—न. १ रहावयासाठीं बांधलेली जागा; वाडा. २ एका कुटुंबांतील ( एके ठिकाणीं ) राहणारी मंडळी; कुटुंब. ३ गृहस्था-श्रमधर्म, संसार; प्रपंच. ' त्याला नोकरी लागताच त्यानें स्वतंत्र घर थाटलें ' ४ एखाद्या व्यवसायांत जुटीनें काम करणारीं माणसें, मंडळी, संस्था; अड्डीची जागा. ५ ( उंदीर, चिचुंदरी इ०कांचें ) बीळ, घरटें. ६ एखादा पदार्थ शिरकवण्यासाठीं केलेला दरा, भोंक, खाचण, खांचण ' भिंतीस घर करून मग खुंटी ठोक. ' ७ ( मालकाच्या इच्छेविरुद्ध मिळविलेलें, बळकावलेलें ) वस्तीचें ठिकाण ' कांट्यानें माझ्या टांचेंत घर केलें ' ८ एखादी वस्तु सुरक्षितपणें ठेवण्यासाठीं केलेलें धातूचें, लांकडाचें आवरण, वेष्टण, कोश, इ० चष्म्याचें घर. ' माझ्या चष्म्याचें घर चामड्याचें आहे. ' ९ पेटींतील, टाइपाच्या केसींतील कप्पा, खण, खाना १० सोंगट्याच्या, बुद्धिबळाच्या पटावरील, पंचांगां-तील ( प्रत्येक ) चौक, चौरस, मोहऱ्याचा मूळचा चौरस; मोहऱ्याचा मारा ' राजा एक घर पुढें कर ' ' घोडा अडीच घरें ( एकाच वेळीं ) चालतो. ' ११ ( ज्यो. ) कुंडलीच्या कोष्टकां-तील सूर्य, चंद्र इ० ग्रहांचें स्थान १२ घराणें, वंश, कुळ ' त्याचें घर कुलीनाचें आहे. ' ' त्याच्या घराला पदर आहे. '=त्याच्या वंशांत परजातीची भेसळ झाली आहे ' १३ उत्पत्तिस्थान; प्रांत, प्रदेश, ठिकाण, ठाणें ( वारा, पाऊस, प्रेम, विकार, रोग इ०कांचें ), ' सर्वज्ञतेचि परी । चिन्मात्राचे तोंडावरी । परी ते आन घरीं । जाणिजेना ।' –अमृ ७ १३०. ' कोंकण नारळांचें घर आहे. ' १४ रोग इ०कांच्या उत्पत्तीचें कारण, मूळ, उगम, जन्मस्थान, खाण. ' मागें हें खरुजेचें घर आहे. ' ' आळस हें दारिद्र्याचें घर आहे. ' १५ वादांतील आधारभूत मुद्दा, प्रतिष्ठान, गमक, प्रमाण. १६ सतार इ०. वाद्यांतील सुराचें स्थान; सनईसारख्या वाद्याच्या दोन भोकांमधील अंतर; सतारीच्या दोन पडद्यांमधील अंतर. १७ शास्त्र, कला इ०कांतील खुबी, मर्म, रहस्य, .मख्खी, किल्ली. ' तुम्ही गातां खरे पण तुमच्या हातीं गाण्याचें घर लागलें नाहीं. ' ' गुणाकार, भागाकार हें हिशेबाचें घर. ' १८ सामर्थ्य; संपत्ति; ऐपत; आवांका, कुवत. ' जें कांहीं करणें तें आपलें घर पाहून करावें. ' १९ मृदंग इ० चर्मवाद्याचा, वादी, दोरी इ० परिच्छेदानें परिच्छिन्न प्रांत, जागा. २० ( संगीत ) तान, सूर यांची हद्द, मर्यादा, क्षेत्र. २१ ( अडचणीच्या, पराभवाच्या वेळीं ) निसटून जाण्या-साठीं करून ठेवलेली योजना; आडपडदा; पळवाट; कवच; ' हा घर ठेवून बोलतो. ' २२ खुद्द; आपण स्वतः; स्वतःचा देह. म्ह० इच्छी परा तें येई घरा. ' २३ ( वर्तमानपत्राचा, पत्र-काचा, कोष्टकाचा रकाना, सदर. ( इं. ) कॉलम. ' येऊन जाऊन पत्रप्रकाशकास स्वतःचा असा मजकूर दर खेपेस फारतर दोन तीन घरें घालणें येतें. ' –नि १५. २४ वयोमानाचा विभाग; कालमर्यादा. ' हा नवा गृहस्थ पन्नाशीच्या घरांत आला होता. ' –कोरकि ३२. २५ ( मचव्याचें पोळें वगैरेंतील ) छिद्र. ' केळीच्या सोपटाचीं घरें ज्यांनीं पाहिलीं असतील ' –मराठी सहावें पुस्तक पृ. २२५. ( १८७५ ) २६ ठाणें; ठिकाण. ' कुबल, बांकी घरें । शिवराजाच्या हाता आलीं ' –ऐपो ९. २७ बायको; स्त्री. ' घरांत विचारा. ' घर उघडणें पहा. [ सं. गृह; प्रा. घर; तुल० गु. घर; सिं घरु, बं. घर; आर्मेजि. खर; फ्रेंजि. खेर; पोर्तु जि केर. ] ( वाप्र. ) ०आघाडणें–( कों. ) घर जळून खाक होणें. ०उघडणें–१ लग्न करून संसार थाटणें. ' नारोपंतांनी आतां घर उघडलें आहे, ते पूर्वीचे नारोपंत नव्हत ! ' २ एखा-द्याचें लग्न करून देऊन त्याचा संसार मांडून देणें. ' सदुभाऊंनीं आपली मुलगी त्या भटाच्या मुलास देऊन त्याचें घर उघडलें ' ०करणें–१ बिऱ्हाड करणें; रहावयास जागा घेऊन तींत जेवण खाण इ० व्यापार करावयास लागणें. ' चार महिने मी खाणाव-ळींत जेवीत असे, आतां घर केलें आहे ' २ ( त्रासदायक वस्तूंनीं ) ठाणें देणें; रहाणें; वास्तव्य करणें ' काट्यानें माझ्या टांचेंत घर केलें. ' ' माझ्या हृदयांत घर करून बसून त्यानें मला घायाळ केलें. ' –वाय २.३. ०खालीं करणें–घर सोडून जाणें, घर मोकळें करून देणें. ' गावांत प्लेगचें मान वाढतें असल्यामुळें सर्वांनीं आपापलीं घरें खालीं केलीं. ' ०घालणें– ( एखाद्याच्या ) घराचा नाश करणें. ०घेणें–१ ( सामा. ) लुबा-डणें, लुटणें; नागविणें; बुचाडणें. ' मग रेणुकेनें बोलिलें । अहो लेंकुरें कैसें घर घेतलें । ' –कालिकापुराण २३.४०. ' ज्या

ठिकाणीं वादविवादाचा किंवा भांडणाचा कांहीं उपयोग नसतो त्या ठिकाणीं पडून घर घेणें यांतच मुत्सद्दीपणा असतो.' –चंप ८४. २ (एखाद्याचा) नाश करणें. 'म्हणती जन्मोनि द्रौपदीनें। आमचें घर घेतलें तिणें।' –जै ७१.९९. ३ (त्रासदायक वस्तु) घर करून बसणें, ठाणें देऊन बसणें; घर करणें अर्थ २ पहा. ०चालविणें–प्रपंचाची, संसाराची जबाबदारी पाहणें. म्ह० घर चालवी तो घराचा वैरी. ०जोडणें–इतर घराण्यांशीं, जातींशीं, लोकांशीं इ० मैत्री, शरीरसंबंध घडवून आणणें; मोठा संबंध, सलोखा उत्पन्न करणें. 'लक्ष्मीपतीचें घर थोर जोडे।' –सारुह २ १. याच्या उलट घर तुटणें. ०डोईवर घेणें–आरडा ओरड करून घर दणाणून सोडणें; घरांत दांडगाई, कलकलाट, धिंगामस्ती करणें. 'वडील माणसें घरीं नाहींत हें पाहून मुलांनीं घर डोईवर घेतलें.' ०तुटणें–मैत्रीचा, नात्याचा संबंध नाहींसा होणें; स्नेहांत बिघाड होणें. (दुसऱ्याचें) ०दाखविणें–१ आपल्या घरीं कोणी त्रासदायक मनुष्य आला असतां कांहीं युक्तीनें त्याला दुसऱ्याच्या घरीं लावून देऊन आपला त्रास चुकविणें; (एखाद्याची) ब्याद, पीडा टाळणें. २ घालवून देणें; घराबाहेर काढणें. ०धरणें–१ घरांत बसून राहणें; घराच्या बाहेर न पडणें (संकटाच्या, दंगलीच्या वेळीं पळून जाणें, पळ काढणें, गुंगारा देणें, निसटणें याच्या उलट). २ (रोग इ० नीं शरीरावर) अंमल बसविणें; एखादा आजार पक्केपणानें जडणें. 'दम्यानें त्याच्या शरीरांत घर धरलें.' ३ चिटकून राहणें; चंचलपणा न करतां एकाच ठिकाणीं भिस्त ठेवून असणें. ४ (बुद्धिबळांत, सोंगट्यांत) सोंगटी एकाच घरांत ठेवून घर अडविणें. ०धुणें, धुवून नेणें–१ एखाद्याचें असेल नसेल तें लबाडीनें गिळंकृत करणें; हिरावून नेणें; नागविणें; बुचाडणें. 'तुम्ही कारकुनावर फार भरंवसा टाकून राहूं नका, तो संधि सापडल्यास तुमचें घर धुवावयास कमी करणार नाहीं.' २ नागविणें; लुबाडणें; लुटणें; अगदीं नंगा करणें. 'शंभर वर्षांनीं घर धुवून नेल्यानंतर ही ओळख आम्हास पटूं लागली आहे.' –टिव्या. घर ना दार देवळीं बिऱ्हाड–फटिंग, सडा, ज्याला घरदार नाहीं अशा मनुष्यास उद्देशून अथवा ज्याला बायकामुलांचा संसाराचा पाश नाहीं अशाला उद्देशून या शब्दसहतीचा उपयोग करतात. ०निघणें–(स्त्रीन) नवऱ्याला सोडून दुसऱ्या मनुष्याबरोबर नांदणें; (सामा) दुसऱ्याच्या घरांत, कुटुंबांत निघून जाणें. 'माझें घर निघाली.' –वाडमा २. २०९. ०नेसविणें–घरावर गवत घालून तें शाकारणें, घर गवत इ० कांनीं आच्छादणें; (वों) घर शिवणें ०पहाणें–१ (एखाद्याच्या) घराकडे वक्रदृष्टि करणें, (रोगाचा, मृत्यूचा) घरावर पगडा बसणें; घरांत शिरकाव करणें). 'कालानें एखाद्याचें घर पाहिलें कीं तें बुडालेंच म्हणून समजावें.' 'म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण काळ घर पाहतो.' २ (बायकी) वधूवराचें योग्य स्थळ निवडणें. 'सुशील तारेनें आपल्या पुण्यबलाच्या साह्यानें योग्य घर पाहून ... ... ...' –रजपूतकुमारी तारा. (आनंदी रमण.) ०पालथें घालणें–(घर, गांवइ०) १ हरवलेली वस्तु शोधण्यासाठीं घराचा कानाकोपरा धुंडाळणें. 'त्या बाईनें आपला सोन्याचा फुटका मणि शोधण्यासाठीं सारें घर पालथें घातलें.' २ सर्व घरांत; गांवांत हिंडणें; भटकणें. 'त्या मुलाला रांगतां येऊं लागल्यापासून तें सारें घर पालथें घालूं लागलें आहे.' ०पुजणें–१ आपलें काम करून घेण्यासाठीं एखाद्याच्या घरीं आर्जव, खुशामत करण्यास वारंवार जाणें. २ (घरें पुजणें) आपला उद्योग न करतां दुसऱ्याच्या घरीं भटक्या मारणें. ०फोडणें–१ संसार आटोपणें, आवरणें. २ कुटुंबांतील माणसांत फूट पाडणें; घरात वितुष्ट आणणें. 'बायका घरें फोडतात.' ३ घरास भोंक पाडून आंत (चोरी करण्यासाठीं.) शिरकाव करून घेणें; घर फोडतो तो घरफोड्या. ०बसणें–कर्ता मनुष्य नाहींसा झाल्यामुळें, दुर्दैवाच्या घाल्यामुळें कुटुंब विपन्नावस्थेस पोहोंचणें; घराची वाताहत, दुर्दशा होणें. ०बसविणें–संसार थाटणें; घर मुलाबाळांनीं भरून टाकणें (स्त्रीच्या विवाहोत्तर जीवनाच्या बाबतींत या वाक्प्रचाराचा उपयोग करतात). 'माझी बायको मेली म्हणून मीं मुलाचें लग्न करून दिलें, म्हटलें कीं सून तरी घर बसवील.' ०बुडणें–१ कुटुंबाची नासाडी, दुर्दशा होणें; कुटुंब धुळीस मिळणें. २ संतति नसल्यामुळें वंशाचा लोप होणें. ०बुडविणें–१ (एखाद्याच्या) कुटुंबाचा विध्वंस करणें; संसाराचा सत्यनास करणें. २ घरास कालिमा आणणें. ०भंगणें–कुटुंब मोडणें, विस्कळित होणें; कुटुंबास उतरती कळा लागणें; कुटुंबाचा नाश होणें; मंडळींत फूट पडणें. 'बापलेकांत तंटे लागल्यामुळें तें घर भंगलें.' ०भरणें–१ दुसऱ्यास बुडवून, त्याची उपेक्षा करून आपण श्रीमंत बनणें. २ दुसऱ्याचें घर लुटणें, धुणें. व स्वतः गबर होणें. घर भलें कीं आपण भला–लोकांच्या उठाठेवींत, उचापतींत न पडता आपल्या उद्योगांत गर्क असणारा (मनुष्य). ०मांडणें–थाटणें–(संसारोपयोगी जिनसांनीं) घर नीटनेटकें करणें, घराची सजावट करणें. ०मारणें–घर लुटणें. घर म्हणून ठेवणें–एखादी वस्तु, सामान प्रसंगविशेषीं उपयोगी पडण्याकरितां संग्रही ठेवणें; प्रत्येक वस्तु जतन करून ठेवणें. ०रिघणें–घर निघणें पहा 'घर रिघे जाई उठोनि बाहेरी।' ०लागणें–घर भयाण भासणें (एखाद्याचा मुलगा अथवा पत्नी वारली असतां घरातील भयाण स्थिति वर्णितांना ह्या वाक्प्रचाराचा उपयोग करतात). घराचा उंबरठा चढणें–घरात प्रवेश करणें. 'जर तूं माझ्या घरची एखादीहि गोष्ट बाहेर कोणाला सांगशील तर माझ्या घराचा उंबरठा चढण्याची मी तुला मनाई करीन.'

**घराचा पायगुण**-घरातील माणसाची वागणूक, वर्तणूक, वर्तन, शिस्त, घराचें पुण्य पाप. **घराचा पायगुणच तसा, घरची खुंटी तशी**-कुटुंबातील माणसाची वागण्याची रीत असेल त्याप्रमाणें, एखाद्या कुटुंबातील माणसाच्या सर्वसाधारण अशा वाईट व्यसनास खोडीस, सवयीस उद्देशून म्हणतात. **घराचा वासा ओढणें**-ज्याच्यामुळें एखादें काम, धंदा चालावयाचें व जें नसल्यास बंद पडावयाचें असें साधन, वस्तु, गोष्ट ओढणें, एखाद्या मोठ्या कामातून फार जरूरीचें साधन नाहींसें करणें, अडवणूक करणें. 'आमच्या मंडळींतून पाटीलबुवानीं रामभाऊस फितविलें, आतां आम्ही काय करूं शकूं! त्यांनीं आमच्या घराचा वासाच ओढला.' **खालच्या घराचे वासे मोजणें**-कृतघ्न होणें, केलेला उपकार विसरणें **घरात, घरीं**- (ल) पतीनें पत्नीबद्दल शिष्ट संप्रदायानें वापरण्याचा शब्द याच्या उलट पत्नी नवऱ्या संबधीं बोलतांना 'बाहेर' या शब्दाचा उपयोग करते 'तुम्हांला पदार्थ दिला तर घरांत मनास येणार नाहीं.' 'हा जिनस घरांत दाखवून आणतों'-विवि १०.५-७ १२७. **घरांतले**-विमव. (बायकी) नवरा, पति, तिकडचे, तिकडची स्वारी 'आमच्या घरांतल्यांनीं दादासाहेबांना दारूचें व्यसन लावलें'-एकच प्याला **घरांतील मंडळी**-स्त्री (सांकेतिक) बायको, पत्नी 'पाहूं घरांतील मंडळीस कसाकाय पसंत पडतो तो'-विवि ७. १० १२७ **घरात पैशाचा-सोन्याचा धूर निघणें-निघत असणें**-घरची अतिशय श्रीमंती असणें, **घरांत समजणें**-कुटुंबातील तंटा चव्हाट्यावर न आणणें, घरातल्याघरात तंटा मिटविणें, आपापसात समजूत घडवून आणणें **घराला राम राम ठोकणें**-घर सोडून जाणें 'आज या घराला रामराम ठोकण्यापेक्षा घरकाभर जुलमाचा रामराम पतकरला'-भा ९०. **घरावरकाम्ट्या घालणें-गोवरी ठेवणें-निखारा ठेवणें**-एखाद्याच्या कुटुंबाची धूळधाण बदनामी करणें, **घरावर कुत्रें चढविणें**- (गोव्याकडे घरावर कुत्रें चढल्यास घर सोडावें लागतें यावरून) १ एखाद्याच्या घरांत कलागती, भांडणें लावून तंटे, तंटे उत्पन्न करणें, २ दुहावा करणें, अडचणींत आणणें **घरावर गवत रुजणें**- घर ओसाड, उजाड पडणें. **घरास आग लावणें**-(ल) एखादें दुष्कृत्य करून घराचा नाश करणे. **घरास कांटी लागणें**-घर उध्वस्त होणें, घरांत कोणी न राहणें **घरास कांटी लावणें**-१ घराच्या भोंवतीं कांटे काटक्या लावून येणें-जाणें बंद करणें २ (ल.) घर उजाड उध्वस्त ओसाड करणें **घरास हाड बांधणें**, **घरावर टाहळा टाकणें**- (एखाद्यास) वाळींत टाकणें, समाजांतून बहिष्कृत करणें, जाती बाहेर टाकणें (गत जमीन मळा, बाग) **घरीं भरणें**-स्वत वहिवाटणें. **घरीं बसणें**- (एखादा मनुष्य) उद्योगधंदा नसल्यामुळें, सोडून दिल्यामुळें घरीं रिकामा असणें, बेकार होणें 'तो एक वर्ष झालें घरीं बसला आहे' (एखाद्याच्या) **घरीं पाणी भरणें**-(एखादा मनुष्य, गोष्ट) एखाद्याच्या सेवेंत तत्पर असणें, त्यास पूर्णपणें वश असणें 'उद्योगाचे घरीं। ऋद्धिसिद्धि पाणीभरी' **घरीं येणें**-(एखादी स्त्री) विधवा झाल्यामुळें सासरच्या आश्रयाच्या अभावीं पितृगृहीं, माहेरीं परत येणें, विधवा होणें. 'कुटुंब मोठें, दोन बहिणी घरीं आलेल्या'-मनोरंजन आगरकर अंक **घरीं तसा दारीं देवळीं तसा बिन्हाडीं**, **घरीं दारीं सारखाच**-सर्व ठिकाणीं सारखाच वागणारा, (सामा) सर्वत्र उपद्रवकारक असलेला (मनुष्य, मूल), जसा स्वत च्या घरीं उपद्रवकारक तसाच दुसऱ्याच्या घरीं उपद्रवकारक असलेला (मनुष्य, मुलगा). **आल्या घरचा**-वि. पुनर्विवाहित स्त्रीस पहिल्या नवऱ्यापासून झालेला (मुलगा) म्ह० १ घर फिरलें म्हणजे घराचे वासेहि फिरतात=(एखाद्या) घरांतल्या मुख्याची खपा मर्जी, नाराजी झाली तर घरांतलीं लहानमोठीं नोकरचाकर सर्वच माणसें त्याच्या विरुद्ध उठतात. सामाशब्द- ०असामी-स्त्री १ वतनवाडी, जमीनजुमला, मालमत्ता २ घरकामासंबधाचा मनुष्य, घराकडचा माणूस ०कज्जा-पु घरांतील तंटा, कौटुंबिक भांडण, गृहकलह ०करी-पु १ पत्नीनें नवऱ्यास उद्देशून वापरावयाचा शब्द, घरधनी, कारभारी, यजमान, घरमालक 'माझे घरकरी गावाला गेले' ०करीण-स्त्री पतीनें पत्नीविषयीं वापरावयाचा शब्द, कारभारीण 'माझ्या घरकरणीला तिच्यामुळें आराम वाटतो'-कोरकि ३१५ १ घरधनीण, घरची मालकीण यजमानीण ०कलह-पु घरांतील भांडण, घरांतील माणसांचें दायग्रहणादिविषयक भांडण, आपसांतील भांडण अंत कलह ०कसबी-पु आपल्या अकलहुषारीनें घरगुती जरूरीचे जिनस घरच्याघरीं तयार करणारा व घरची मोडतोड दुरुस्त करणारा मनुष्य. घरचा कारागीर बाहेर काम करून उपजीविका न करणारा माणूस ०कहाणी-काहाणी-स्त्री (वाईट अर्थी उपयोग) घरांतल्या खाजगी गोष्टींचें कथन.. ०कांता-स्त्री (गो) घरधनीण, बायको, घरकरीण [स. गृह+कान्ता] ०काम-न घरगुती काम घरासबंधीं कोणतेंहि काम, प्रपंचाचें काम 'बायकांचा धंदा घरकामाचा लावतात' ०काम्या-वि घरांतील, कुटुंबांतील किरकोळ कामें करण्यास ठेवलेला नोकर गडी, घरांतील काम करणारा [घरकाम] ०कार-री-पु (गो कु) १ नवरा, पति २ घरचा यजमान, घरधनी, मालक [स गृह+कार] घरकरी पहा ०कारणी-पु घरचें सर्व काम पाहणारा, कारभारी, दिवाणजी, खाजगी कारभारी ०कुंडा-पु (वों) १ पक्ष्याचें घरटें, कोठें २ (ल) आश्रय स्थान, 'आम्हीं तुझ्या विश्रांतीचा घरकुंडा सोडतोत हें आमचे

अद्वैतज्ञानाचें पाप आम्हास तोलत नाहींसे होऊन आम्ही खालीं पडों लागलों ' –दादोबा, यशोदा पांडुरंग [ स गृह+कुड ] ०कुवडा–कुवा–कोंबा–घरकोंग्या–कोंडा–कुडा–कोंघा–कोंवडा–घुबडा–पु (घरातला घुबड, कोंबडा इ प्राणी) (दुबळ्या व सुस्त माणसाला–प्राण्याला तिरस्कारानें लावावयाचा शब्द) नेहमीं घरात राहाणारा, एकलकोंड्या, माणुसघाण्या, चारचौघात उठणें, बसणें, गप्पा मारणें इ० ज्यास आवडत नाहीं असा, कधीं बाहेर न पडणारा मनुष्य, घरबशा ०कुल्ली–वि (ग्रा ) बहुधा घराबाहेर न पडणारी ( स्त्री ), घरकोंबडी ०केळ–स्त्री (ग्रा ) गावठी कळ घरीं लावलेली केळ ०खटला–लें–पुन. १ घरचा कामधंदा, गृहकृत्य, प्रपंच, शेतभात इ० घरासंबंधीं काम २ घराची, कुटुंबाची काळजी, जबाबदारी–अडचणी इ० ३ गृहकलह, घरांतील भांडण ०खप्या–वि घरातील धुणें, पाणी भरणें, इ० सामान्य कामाकरिता ठेवलेला गडी, घरच्या कामाचा माणूस, घरकाम्या पहा [ घर+खपणें=काम करणें, कष्ट करणें ] ०खबर–स्त्री घरातील व्यवहाराची उठाठेव–चौकशी, घराकडची खबर, बातमी ' उगाच पेठे खाटे वर तुज कशास व्हाव्या घरखबरा । ' –राला २२ [ घर+खबर=बातमी ] ०खर्च–पु कुटुंबपोषणाला लागणारा खर्च, प्रपंचाचा खर्च ०खातें–न घरखर्चाचें मांडलेलें खातें, खानगी खातें ०खास(ज)गा–वि घरातील मालमत्ता, कामें, कारखाना इ० संबंधीं, घरगुती बाबीसंबंधीं, घरगुती, खासगी व्यवहारबाबत ०गणती–स्त्री १ गावातील घरांची संख्या २ गावांतील घरांची मोजणी, मोजदाद ३ गांवातील घरांच्या मोजणीचा हिशब तपशील (क्रि० करणें, काढणें)[घर+गणती=मोजणी] ०गाडा–पु संसाराची कामें, जबाबदारी, प्रपंचाची राहाटी प्रपंच संसार, घरखटला ( क्रि० हांकणें, चालवणें, सभाळणें ) ०गुलाम–पु घरांतील नोकर, गडी ' चौदाशें घरगुलाम सुटले या निजपा याला । '–ऐपो ३१३ ०गोहो–पु चुलीपाशीं, बायकांत आणि शांत शौर्य दाखविणारा मनुष्य, गहेदूर, घरांतील माणसांवर जरब ठेवणारा पण बाहेर भागुबाईपणा करणारा पुरुष [ घर+गोहो=नवरा, पुरुष ] ०घरटी–स्त्री दारोदार, एकसारखी फेरी घालणें (क्रि० करणें) ' चंद्र कथुनि मग महेंद्रगृहीं घरघरटी करित बायां । ' –भामहायळ १९१ ०घाला–ल्या, घरघालू–वि १ भाड खाऊ, फसवाफसवी करणारा, चिल्दर ' भिजल्या पारी कशी होरी ग ह घरघाली । ' –राला ४० २ कुळाची अब्रू घालवणारा, घर बुडव्या दुसऱ्याचें घर बुडविणारा किंवा व्यसनादिकांनीं आपलें घर बुडवून घणारा ' कशी घरघाली रांड बसली आम्हां गिळून । ' –राला ४१ ३ सर्व नाश करणारा ' भयानका क्षिति झाली घर घाली रुद्रविशति अग्नि फांकली । ' –ऐपा ३६८ [घर+घालणें, तुल० गु घरघालु=द्रोही, खर्चीक ] ०घुशा–सा–वि सर्व दिवसभर उदासवाणा घरात बसणारा, घरबशा, घरकोंबडा, घरकुबडा पहा [घर+घुसणें] ०घुशी–सी–स्त्री नवऱ्याचें घर सोडून दुसऱ्याच्या घरांत नांदणारी, दुसऱ्याचा हात धरून गेलेली विवाहित स्त्री ' कोण धागड रांड घरघुशी । ' –राला ७८ [ घर+घुसणें ] ०घेऊ–घेणा–वि घराचा, कुटुंबाचा नाश धुळधाण करणारा, घरघाला, घरबुडव्या, दुसऱ्यास मोह पाडून, फसवून त्याचें घर बळकावणारा जळो आग लागो रे ! तुझि मुरली हे घरघेणी । ' –दप ८० ' लांबलचक वेणी, विणुन त्रिवेणी, घरघेणी अवतरली । ' –प्रला १११ [ घर+घेणें ] ०चार, घराचार–पु १ कुटुंबाची रीतभात, घराची चालचालणूक कौटुंबिक रूढी, वहिवाट म्ह० घरासारखा घरचार कुळासारखा आचार २ गृहस्थधर्म, संसार, प्रपंच –ज्ञे १०६ ' दु खाचा घरचार निर्धन जिणें भोगावरी घालणें । ' –किंगुदाम ५० [ स गृहाचार, म घर+आचार=वर्तन ] ०चारिणी, ०चारीण–स्त्री ( काव्य ) गृहपत्नी, घरधनीण यजमानीण, घरमालकीण 'शेवटीं नवनीत पाहता नयनीं । घरचारिणी संतोषे । ' [ स गृहचारिणी] ०जमा–स्त्री घरावरील कर, घरपट्टी घरजाव(वा)ई–पु बायकोसह सासऱ्याच्या घरीं राहणारा जांवई, सासऱ्यानें आपल्या घरींच ठेवून घेतलेला जावई, सासऱ्याच्या घरीं राहून तयील कारभार पाहणारा जावई ' तो संसाराचा आपण । घर जांवई झाला जाण । देहाभिमानासि संपूर्ण । एकात्मपण मांडिलें ॥' –एभा २२ ५९२ [ घर+जावई ] ०जांवई करणें–सक्रि १ ( एखाद्यास ) सर्वसंपत्तीसह कन्यादान करणें, जावयाला घरीं ठेवून घेणें, त्याला आपली जिंदगी देणें ' त्याला त्यानीं घरजांवईच केला आहे ' –इप २७ २ ( उप ) एखादी उसनी घेतलेली वस्तु लाटण्याच्या हेतूनें, मालकानें परत मिळण्याविषयीं तगादा लावीपर्यंत, ठेवून घेणें ०जांवई होऊन बसणें–अक्रि आपल्यावर सोपविलेल्या कामाचा किंवा धंद्याचा नफा किफायत आपल्याच कामीं लावण, आपणच घेऊन टाकणें ०जिंदगी, जिनगानी–स्त्री १ घरांतील सामानसुमान, उपकरणीं, भांडीकुंडीं, द्रव्याव्यतिरिक्त इतर मालमत्ता, घरांतील जंगम चीजवस्त, मिळकत २ ( सामा ) मिळकत, इस्टेट ' पादशहाची घरजिनगानी समग्र लुटून ' –ख ८ ४२२४ [घर फा झिंदगी, झिंदगानी=मालमत्ता, जन्म संसार ] ०जुगूत–जोगावणी–स्त्री १ काटकसर, मितव्यय, थोडक्यात घराचा निर्वाह २ घरांतील जरूरीची संपादणी, कमाचसा निर्वाह एक हेतु आहे तिणें घर जुगूत मात्र होत्ये –शास्त्रीको [ घर+जुगुत=युक्ति+जोगवणी=प्राप्तीची व खर्चाची तोंडमिळवणी ] ०टका–टक्का–पु घरपट्टी घरजमा, घरावरील कर ०टण–णा–घरठाण अर्थ २ घरवद

पहा ०टीप-स्त्री १ गावांतील घरांची गणती (क्रि० करणें; काढणें) २ घरमोजणीचा हिशब, तपशील, घरगणती पहा [घर+टीप=टिपणें, लिहिणें] (वाप्र) ०टीप काढणें-करणें-घेणें-(ल) (शाप, दुरीत, आजीत, कामसण देत) गावांतील एकहि घर न वगळतां सर्व घरांची हजेरी घेणें, कोणतीहि क्रिया, रोग, प्रादुर्भाव गावांतील एकहि घर न वगळतां होणें 'यंदा जरीमरीनें या गावाची घरटीप घेतली' ०टोळ-स्त्री. (को) प्रत्येक घराचा झाडा, झडती 'त्या गावची घरटोळ घतली तेव्हां चोर सांपडला' घरडोळ पहा ०ठा(ठ)ण-न १ घर ज्या जागेवर बांधलेलें आहे ती इमारत बांधून राहण्याच्या कामासाठीं उपयोगांत आणलेला जमीनीचा विभाग -ऍडरहिंदू कोड २ मोडलेल्या घराचा चौथरा, पडक्या घराची जागा घरबद पहा [स गृहस्थान, म घर+ठाणा-ण] ०ठाव-पु १ नवरा, पति, भ्रतार 'मुदतींत आपल्याकडे नादण्यास न नेल्यास मी दुसरा घरठाव करीन' २ अनीतिकारक आश्रय, रखेलीचा दर्जा, रखेलीस दिलेला आश्रय 'नीरांजनीला मुंबईत एका गुजराथी धनवानानें चांगला घरठाव दिला होता' -वहकलेली तरुणी (हडप) ८ ०डहुळी-डोळी, -डोळ-स्त्री १ घराचा झाडा, झडती, बारीक तपासणी 'मग धावली त बाहुली। मेघ घेऊनि घरडहुळी।' -ज्ञा ६ २१६ 'तया आघवियांचि भातु। घरडोळी घेऊनि असे पाहतु।' -ज्ञा ११ ५८६ २ प्रत्येक घराची केलेली झडती. (क्रि० घेणें) [घर+डहुळणें=ढवळणें] ०डुकर-न १ गांवडुकर, पाळीव डुकर २ निंदाव्यंजक (कुटुंबातील) आळशी, निरुद्योगी स्त्री [घर+डुकर] ०तंटा-पु गृहकलह, घरांतील भांडण [घर+तंटा] ०दार-न (व्यापक) कुटुंब, घरांतील माणसें, चीजवस्त इ० प्रपंचाचा पसारा, खटलें, [घर+दार] (वाप्र) **घरदार खाऊन घासे तोंडीं लावणें**-सारी धनदौलत नासून, फस्त करून कफल्लक बनणें, ०दार विकणें-घर व त्यांतील मालमत्ता विकणें, सर्व स्थावर जिंदगी घालविणें म्ह० एक पाहुणा म्हणजे घरदार पाहुणें=एका पाहुण्यासाठीं कांहीं मिष्टान्न केलें तर तें घरांतील सर्व मंडळींस वाढावें लागतें ०देणें-न घरपट्टी, घरटका ०धणी-नी-पु १ यजमान, गृहपति, घरांतील कर्ता माणूस 'निर्वीरा धरणी म्हणे घरधणी गोंवुनी राज पणीं।' -आसी ५२ २ पति, नवरा, घरकरी 'मग घरधन्यास्नी पकडूनइयेनी न्ये' -चाय २ २ ०धंदा-पु घरांतील कामधाम, गृहकृत्य [घर+धंदा] ०धनीण-स्त्री १ घरमालकीण, यजमानीण २ पत्नी बायको, घरकरीण 'माझी घरधनीण फार चांगली आहे' -विवि ८ २ ४० ०नाशा-वि घराचा, कुटुंबाचा नाश, धुळधाण करणारा, घरघाल्या [घर+नाशणें] ०निघ(घो)णी-स्त्री १ घरनिघी पहा. २ (क) घरभरणी अथवा गृहप्रवेश शब्दाबद्दल वापरतात केव्हां केव्हां या दोन्हीहि शब्दांबद्दल योजतात [घर+निघणें] ०निघी-स्त्री वाईट चालीची, दुर्वर्तनी, व्यभिचारिणी स्त्री, घरांतून बाहेर पडलेली, स्वैर, व्यभिचारिणी स्त्री 'कीं घरनिघेचें सवाष्णपण।' -नव १८ १७२ [घर+निघणें=निघून जाणें, सोडणें] ०निघ्या-पु १ स्वतःचें कुटुंब, घर जात सोडून दुसऱ्या घरांत, जातींत जाणारा, दुर्वर्तनी, व्यभिचारी मनुष्य २ एखाद्या व्यभिचारिणी स्त्रीनें बाळगलेला, ठेवलेला पुरुष, जार [घर+निघणें] ०पट्टी-ट्टी-स्त्री १ घरटका, घरदेणें, घरावरील कर, हल्लींसारखी घरपट्टी पूर्वी असे मात्र ती सरकारांत वसूल होई पुणें येथें शक १७१८-१९ मध्यें घरांतील दर खणास सालीना ५ रु घरपट्टी घेत. मात्र घरांत भाडेकरी किंवा दुकानदार ठेवल्यास घेत स्वतःचें दुकान असल्यास, किंवा भाडेकरी नसल्यास घेत नसत -दुसरा बाजीराव राजनिशी २७९-८० 'पंचाकडे घरपट्टी वसविण्याचा अधिकार आला -के १६ ४ ३०.२ एखाद्या कार्याकरितां प्रत्येक घरावर बसविलेली वर्गणी [घर+पट्टी=कर] ०पाग-पु निराश्रितता, आश्रयराहित्य 'तंव दरिद्रियासी ठाव तत्त्वतां। कोणीच न देती सर्वथा। जयें घरपाग पाहतां। बाहेर घालिती पिटोनि॥' -ह २९ ३५ [घर+पांग=उणीव] ०पांड्या-पु. घरातल्याघरांत, बायकांत बडबडणारा, पांडित्य दाखवणारा [घर+पांड्या=गांवकामगार] ०पाळी-स्त्री (सरकारला कांहीं जिनस पुरविण्याची, सरकाराचा विवक्षित हुकूम बजावण्याची, भिकाऱ्यांना अन्न देण्याची इ०) प्रत्येक घरावर येणारी पाळी, क्रम [घर+पाळी] ०पिसा-वि ज्याला घराचें वेड लागलें आहे असा, घरकोंबडा, घरकुडा, [घर+पिसा=वेडा] ०पिसें-न घराचें वेड, घरकुबडेपणा, घर सोडून कधीं फार बाहेर न जाणें [घर+पिसें=वेड] ०पोंच, पोंचता-वि. घरीं नेऊन पोंचविलेला, स्वाधीन केलेला (माल) [घर+पोहोंचविणें] ०प्रवेश-पु नवीन बांधलेल्या घराची वास्तुशांति करून त्यांत रहावयास जाण्याचा विधि (प्र) गृहप्रवेश पहा [म घर+स प्रवेश=शिरणें] **घरास राखण**-स्त्री १ घराचें रक्षण करणारा मनुष्य २ थोडासा संचय, शिल्लक, साठा, संग्रह 'सगळा गूळ खर्चूं नको घरास राखण थोडकासा ठेव.' घर म्हणून पहा. ०फूट-स्त्री आपसांतील दुही तटबखेडे, गृहकलह घर, राज्य इ० कांतील दुफळीनें वागणाऱ्या माणसामध्यें परस्पर वैरद्वेषभाव [घर+फूट=दुही, वैर] ०फोड-स्त्री घरांतील माणसांत कलि माजवून देणें, कलागती उत्पन्न करणें [घर+फोडणें=फूट पाडणें] ०फोडा-स्त्री १ (कायदा) एखाद्याच्या घरांत त्याच्या संमतीवाचून कुलूप-कडी काढून, मोडून किंवा मार्ग नाहीं अशा ठिकाणीं मार्ग करून (चोरी करण्याकरितां) प्रवेश करणें,

(पीनलकोडातील एक गुन्हा) २ घराची भिंत वगैरे फोडून झालेली चोरी (इ) हाउस् ब्रेकिंग [घर+फोडणें] ०फोडया–वि १ घरात, राज्यात फूट पाडणारा, दुही माजविणारा, घरफूट करणारा २ घरें फोडून चोरी करणारा [घर+फोडणें] ०बंद–पु १ (को) घराची वस्ती, संख्या 'त्या शहरात लाख घरबंद आहे [घर+बंद=राग] २ घराचा बंदोबस्त, घरावरील जप्ती, घर जप्त करणें, घराची रहदारी बंद करविणें, चौकी–पहारा बसविणें 'ऐकोनि यापरी तुफान गोष्टी। क्रोध संचरला राजयापोटीं। पाहरा घाहूनि घरबंदसाटीं। ठेविला यासी कारागृहीं।' –दावि ४५६ [घर+बंद=बंद करणें] ०बशा–वि उप घरकोंबडा, घरात बसून राहणारा [घर+बसणें] ०बसल्या–क्रिवि घरीं बसून, नोकरी, प्रवास वगैरे न करता, घरच्याघरीं, घर न सोडता (ल) आयतें श्रमाविना (क्रि० मिळणें, मिळवणें) 'तुम्ही आपले पैसे व्याजीं लावा म्हणजे तुम्हाला घरबसल्या सालीना पाचशें रुपये मिळतील' ०बाडी–स्त्री बेवारसी घराचें भाडें (ब्रिटिशपूर्व अमदानींत, काहीं शहरातून सरकार हें वसूल करीत असे) घरवाडी पहा ०बार–न घरदार, घरातील मंडळी व मालमत्ता, संसार, प्रपंचाचा पसारा 'तेवि घरबार टाकून गावींचे जन।' –दावि ४१२ 'घरबार बंधु सुत दार सख तुजसाठिं सकळ त्यजिले।' –देप २७ [सं गृह+भृ म घर+भार, हिं घरबार, गु घरबार] ०बारी–पु १ कुटुंबवत्सल, बायकोपोराचा धनी, गृहस्थाश्रमी, संसारी 'भार्या मित्र घरबारिया।' –सुवन १८७१ २ घरधनी, घरकरी, नवरा, पति 'का रुसला गे माझा तो घरबारी।' –होला १४८ [सं गृह+भृ, म घरबार, हिं घरबारी, गु घरबारी] म्ह० ना घरबारी ना गोसावी=धड संसारीहि नाहीं की वैरागी नाहीं अशा मनुष्याबद्दल योजतात ०बारीपणा–पु गृहस्थपणा, कर्तेपणा 'पुरुषास घरबारीपणा प्राप्त होतो' –विवि ८२३५ [घरबारी] ०बुडवेपणा–पु १ घराचा नाश करण्याचें कर्म २ देशद्रोह, स्वदेशाशीं, स्वदेशीयाशीं, स्वराज्याशीं बेइमान होणें 'हा प्रयत्न त्याच्या इतर प्रयत्नाप्रमाणेंच घर बुडवेपणाचा आहे हें आम्ही सागावयास नकोच' –टि १ ५४८ [घर बुडविणें] ०बुडव्या–वि अत्यंत त्रासदायक, दुसऱ्याच्या नाशाची नेहमीं खटपट करणारा घरघाल्या स्वतःच्या दुसऱ्याच्या घरादाराचा नाश करणारा, देशद्रोही [घर+बुडविणें] ०बुडी, ०बूड–स्त्री १ (एखाद्याच्या) संपत्तीचा, दौलतीचा नाश सर्वस्वाचा नाश २ एखादें घर कुटुंब अनिवात नष्ट होणें एखाद्या कुळाचा, वंशाचें निसंतान होणें [घर+बुडणें] ०बेग(ज) मी–स्त्री कुटुंबाच्या खर्चाकरितां धान्यादिकांचा केलेला साठा पुरवठा समग्र प्रपंचासाठीं केलेली तरतूद [घर+फा बगमी=साठा] ०बेरया–पु (राजा.) घराची आंदाणी करणारा (इ) घरो ३ ११ इजिनिअर [घर+बेतणें] ०बैठा–वि १ घरीं बसून करता येण्यासारखें (काम, चाकरी, धंदा) बाहेर न जाता, नोकरी वगैरे न करता स्वतःच्या घरीं, देशात करता येण्याजोगा २ घरात बसणारा (नोकरी, चाकरीशिवाय), बेकार –क्रिवि (सविभक्तिक) घरीं बसून राहिलें असता, घरबसल्या पहा [घर+बैठणें] ०भंग–पु १ घराचा नाश, विध्वंस 'जिवलगाचा सोडिला संग। अव चिता जाला घरभग।' –दा ३२६० २ (ल) कुळाचा, कुटुंबाचा नाश, कुलनाश [घर+भंग] ०भर–वि (कर्तृत्वानें, वजनानें) घर, कुटुंब भरून टाकणारा–री, घरात विशेष वजन असणारा–री, घरातील जबाबदार –क्रिवि घरात सर्व ठिकाणीं, सर्वजागीं 'त्यानें तुला घरभर शोधलें [घर+भरणें] ०भरणी–स्त्री १ गृहप्रवेश, नवीन बांधलेल्या घरात राहण्यास जाण्याच्या वेळीं करावयाचा धार्मिक विधि, वास्तुशांति, घररिघणी पहा २ पतीच्या घरीं वधूचा प्रथम प्रवेश होताना करण्याचा विधि, नव वधूचा गृहप्रवेश, गृहप्रवेशाचा समारंभ, वरात, घररिगवणी, घररिघवणी 'वधूवरें मिरवून। घरभरणी करविली।' –र ४८ ०भरवण–णी–स्त्री (गो कु) गृहप्रवेश, वरात, घरभरणी अर्थ २ पहा [घर+भरवणें] ०भाऊ–पु कुटुंबातील मनुष्य, नातलग, कुटुंबाच्या मालमत्तेचा, वतनवाडीचा वाटेकरी, हिस्सेदार, दायाद ०भाट–पु १ (कु) घराच्या आजूबाजूची आपल्या मालकीची जागा, जमीन, घरवाडी, बिसवाट २ (गो) घराशजारचा, सभोंवारचा नारळीचा बाग [घर+भाट] ०भांडवल–न १ कुटुंबातील मालमत्ता, जिंदगी, इस्टेट २ एखाद्याचा खाजगी द्रव्यनिधि, ठेव, उसना काढलेला, कर्जाऊ काढलेला पैसा, द्रव्यनिधि याच्या उलट [घर+भांडवल] ०भांडवली–वि घरच्या, स्वतःच्या भांडवलावर व्यापार करणारा [घर भांडवल] ०भाडें–न दुसऱ्याच्या घरात राहण्याबद्दल त्यास द्यावयाचा पैसा, भाडें [घर+भाडें] ०भारी–पु (प्र) घरबारी १ घरबारी पहा २ ब्रह्मचारी, सन्यासी याच्या उलट गृहस्थाश्रमी ०भेद–पु कुटुंबाच्या माणसांतील आपसातील भांडण, तंटा, फाटाफूट घरफूट ०भेदी–द्या–वि १ स्वार्थानें, दुष्टपणानें परक्याला शत्रूला घरात घेणारा, फितूर, देशद्रोही २ घरचा, राज्याचा, पक्का माहितगार घरचीं सर्व बिंगें ज्यास अवगत आहेत असा म्ह० घरभेदी लंकादहन=घरभेद्या मनुष्य एका जाळणाऱ्या मारुतीप्रमाणें असतो ३ घरातील राज्यातील कृत्यें, गुप्त बातम्या बाहेर फोडणारा घर फोडणारा. 'घरभेद्या द्रोहीनि जन्हा।' –समामगातें १४० ४ घरात कुटुंबात, राज्यात तंटा, कलह लावणारा ०भोंदू–वि १ लोकांचीं घरें (त्यांना फसवून) धुळीस मिळवणारा २ (सामा) ठक, बिलंद प्रसिद्ध असा लुच्चा, लफंगा (मनुष्य) [घर+भोंदू=फसविणारा] ०महार–

पु रावता महार ०मारू-ऱ्या-वि शेजाऱ्यास नेहमीं उपद्रव देणारा, शेजाऱ्याच्या नाशाविषयीं नेहमीं खटपट करणारा ०माशी-स्त्री घरात वावरणारी माशी, हिच्या उलट रानमाशी ०मेढा-मेढ्या-पु घरातील कर्ता, मुख्य मनुष्य, कुटुंबाचा आधारस्तभ, घराचा खांब पहा [स गृह+मेथि, प्रा मेढी, म घर+मेढा=खांब] ०मेळीं-क्रिवि आपसांत, घरीं, खाजगी रीतीनें, आप्तेष्टमंडळीमध्यें (तंट्याचा निवाडा, तडजोड करणें) 'घरमेळीं निकाल केला' [घर+मेळ, तुल० गु घरमेळे=आपसात] ०मोड-स्त्री. घर मोडून तें विकणें 'कांहीं दिवसपर्यंत यथें घरमोडीचा व्यापार उत्तम समजला जात होता' -टि १ १६९ [घर+मोडणें] ०राखण-स्त्री १ (प्रां) घराची पाळत, रक्षण, पहारा २ घरराखणारा, घरावर पहारा ठेवणारा [म घर+राखणें] ०राख्या-वि घराचें रक्षण करणारा, घराचा पहारेकरी, घरराखण [घर+राखणें] ०रिघणी, ०रिघवणी-स्त्री १ नवीन बांधलेल्या घरांत प्रवेश करतेवळीं करावयाचा धार्मिक विधि, घरभरणी अर्थ १ पहा २ घरचा कारभार, घरकाम 'रचुन विविध दहकुटी। तो घररिघवणी परिपाठी।' -विपू ७ १२८ [घर+रिघणें=प्रवेश करणें] ०रिघणें-घरात येणें, प्रवेश करणें 'घररिघे न बाहता भजकाऱ्या।' -दावि १६१ ०लाठ्या-वि (महानु) घरातील लाठ्या, लठ्या, घरपाड्या, गृहपहित, घरात प्रौढी मिरविणारा, राडयाराघोजी 'ऐसेआ घरलाठेआ बोला। तो चेंधु मानवला।'-शिशु ८९९ [घर+लठ्ठ?] ०वट-ड-स्त्री १ (कु गो) एखाद्या कुटुंबाची सर्वसाधारण, समायिक जिंदगी, मालमत्ता, कुटुंबाचें सदस्येंचें सवसाधारण काम, प्रकरण घरोग्रे पहा २ (गो) कुळ, कुटुंब, परपरा ३ आनुवंशिक , रोग, भूतबाधा इ० आनुवंशिक संस्कार [स गृह+वृत्त, प्रा वट] ०वण-न (कों) घरपट्टी, घरासबधीं सरकार देणें ०वणी-न घराच्या छपरावरून पडणारें पावसाचें पाणी याचा धुण्याकडे उपयोग करतात [स गृह म घर+ स वन, प्रा वण=पाणी] ०वंद-पु (राजा) घरठाणा, पडक्या घराचा चौथरा, पडलेल्या घराची जागा -वि घरदाज, कुलीन, खानदानीचा 'शहर पुणें हरहमेष भरलें वाडे बांधिती घरवदानी।' -ऐपो ४२० [गृहवत?] ०वरौत स्त्री १ घरवात, प्रपच, ससारकथा, घरवात पहा २ -न नवरा बायको, दांपत्य, जोडपें 'तीं अनादि घरवरौतें। व्याली ब्रह्मादि प्रपचातें।' -विउ ६५ 'पुढती घरवरौतें। वदिली तिये।' -अमृ १४९ [गृह+वृत्-वर्तित] ०वसात-द स्त्री १ वसति, रहाणें वास, मुक्काम २ घराची जागा घराची जागा आणि सभोवतालचें (मालकीचें) आवार परसु मोकळी जागा, अंगण [घर+वसाहत] ०वाटणी, ०वाटा ०हिस्सा-स्त्रीपु घराच्या मालमत्तेंतील स्वतःचा, खाजगी, हिस्सा, भाग [घर+वांटणी] ०वाडी-स्त्री (को) ज्यात घर बांधिलेलें असतें तें आवार, वाडी कोणाच्या अनेक वाड्या असतात, त्यापैकीं जींत धन्याचें घर असतें ती वाडी [घर+वाडी] ०वात-स्त्री ससार, प्रपच, ससाराच्या गोष्टी, प्रपचाचा पसारा, घरवरौत, घरकाम. 'घरवातें माटवीं दोघें। ॐ गोसावी सेजे रिग। दैपत्यपणें आगे। स्वामिणी जे॥' -अमृ १ १३ 'ऐसी तें घरवात वाढली। खातीं तोंडें मिळाली।' -दा ३ ४ ६ [स गृहवार्ता] ०वाला-वि १ घराचा मालक २ (खा) नवरा, घरधनी, पति [घर+वाला स्वामित्वदर्शक प्रत्यय, तुल० गु घरवाळो] ०वाली-वि (खा) बायको, पत्नी, घरधनीण 'माझ्या घरवालीनें साखर पेरताच त्यानें सर्व सांगितलें।' -राणी चद्रावती ५३ [घर+वाली, गु घरवाळी] ०वासी-वि कुटुंबवत्सल, प्रपचांत वागणारा [घर+वास=राहणें] ०वेडा-वि १ घरपिसा २ बाहेर राहून अतिशय कटाळल्यामुळें घरीं जाण्यास उत्सुक झालेला, (इ) होमसिक् ०शाकारणी-०शिवणी-स्त्री घरावरील छपराची दुरुस्ती करणें, घरावर गवत वगैरे घालून पावसापासून सरक्षणाची व्यवस्था करणें, घराच्या छपराचीं कौलें चाळणें [घर+शाकारणें, शिवणें] ०शोधणी-स्त्री १ स्वतःचीं खाजगी कामें पहाणें २ स्वतःच्या साधनसामर्थ्याचा विचार करणें, स्वतःची कुवत अजमावणें [घर+शोधणें] ०संजोग-पु १ एखाद्या कामास लागणारा घरचा सरंजाम 'त्या हरदासाचा घरसजोग आहे' =कीर्तनास लागणारीं साधनें तबला, पेटी, टाळ इ० हीं त्या हरदासाच्या घरचींच आहेत २ काटकसरीचा प्रपच, घरजुगूत, घरव्यवस्था ३ सुव्यवस्थित घरातील सुखसोयी, समृद्धता [घर+स संयोग, प्रा सजोग=सरंजाम] ०सजोगणी-स्त्री घरसजोग अर्थ २ पहा घरजुगूत, काटकसर, मितव्यय ०समजूत-स्त्री घरातल्याघरात, आपआपसात स्नेहभावानें, सलोख्यानें केलेली तंट्याची तडजोड, समजावणी ०संसार-पु कुटुंबासबधीं कामें, घरकाम, प्रपच ०सारा-पु घरावरील कर, घरपट्टी, घरटक्का [घर+सारा=कर] ०सोकील-वि घरीं राहून खाण्यास सोकावलेला, घरीं आयतें खाण्यास मिळत असल्यानें घर सोडून बाहेर जात नाहीं असा, घराची चटक लागलेला (बैल, रेडा इ० पशु) [घर+सोकणें] ०स्थिति-स्त्री १ घराची स्थिति, घरस्थीत पहा २ गृहस्थाश्रमधर्म, ससार, प्रपच 'कपीस अर्पिली कन्या शांती। मग मांडिली घरस्थिति।' -कथा ३ ३ ६३ [स गृहस्थिति] ०स्थीत-स्त्री घराची, कुटुंबाची रीतभात चालचलणूक, वर्तन, आचार, स्थिति म्ह० अगणावरून घरस्थीत जाणावी=अगणाच्या चांगल्या किंवा वाईट स्थितीवरून त्या घरातील मडळीचा आचार कसा आहे तें समजतें

शितावरून भाताची परीक्षा या अर्थी [घर+स्थिति अप] **घराचा खाब, घराचा धारण, घराचें पांघरूण**–पुन (ल) घरातील कर्ता माणूस, घरातला मुख्य, घरमेढ्या **घराचार**–पु १ संसार, प्रपंच, गृहस्थाश्रमधर्म, घरकाम 'परी अभ्यंतरीं घराचार मांडे।' –विपू ७ १३८ 'यापरी निज नोवरा। प्रकृती गोविला घराचारा।' –एभा २४ ३२ –कालिकापुराण ४ ३५ २ (ल) पसारा, व्याप 'तेय वासनेचा घराचार। न मांडे पैं। –सिस ४ २०७ ३ घरातील मंडळींची राहाटी, रीतभात, आचरण, वागणूक, व्यवहार 'वंध्यापुत्राचा घराचार। तैसा जीवासि संसार।' –एभा २६ ३० [स गृह+आचार] **घराचारी**–वि १ घरदाज २ नवरा, पति, घरकरी, दादला 'ऐशिया स्त्रियाचे घराचारी। खराच्या परी नादती।' –एभा १३ २१४ [घराचार] **घरास राखण**–स्त्री १ घराचें रक्षण करणारा मनुष्य २ थोडासा संचय, शिल्लक, साठा, संग्रह 'सगळा गूळ खर्चू नको घरास राखण थोडकासा ठेव' घर म्हणून पहा **घरींवसल्या**–क्रिवि घरबसल्या पहा **घरोपाध्या**–पु कुलोपाध्याय, कुलगुरु, कुलाचा पुरोहित, भटजी [घर+उपाध्याय, अशुद्ध समास]

**घरकंद**—पु एक प्रकारचा कंद (सामा) कोनफळ, गोराडू

**घरका**—पु १ (कु) कांटा इ० कानीं कातर्डीत, पायात केलेलें घर २ वस्त्र, लाकडाची फळी इ०कास पाडलेलें छिद्र, भोंक [घर]

**घरकुरती**—(प्र) घरगुती पहा [गृह+कृति]

**घरकु(कू)ल**—न १ ल्हान घर, भातुकलीच्या खेळातील मुलींनीं केलेलें ल्हानसें घर, खेळातील घर 'तिया खेळती करिती घरकुली।' –ज्ञा ९ ३७४ ३ ल्हानसें झोपडीवजा घर 'वस्ती करिता झावळयाचें घरकूल करीन' –पाव्ह २८ २ घरटें, खोप **घराचें घरकुल होणें, घरकुलें होणें** (दादर) वाताहत होणें 'त्याच्या घराचे अगदीं घरकुलें झालें'

**घरकुली**—स्त्री घरकूल अर्थ १ पहा 'करूनि ब्रह्मांडाची घरकुली। माजी बैसविली ब्रह्मादिक बाहुली।' –जै २९ ४५

**घरगॅ(बॅ)रें**—न (गो) पिरपीर, ढुमणें

**घरंगळणें**—अक्रि गडबडत जाणें, उतरत्या जागेवरून घसरत, गडबडत खालीं येणें, घरळणें, उतारावरून खालीं घसरणें, 'नाहीं तर विचारास खालीं आधार न सापडल्यामुळें विचारे श्रोत्यांकडे घरंगळत जायचे' –नि ११२ [ध्व घर ? +गळणें]

**घरगुती, घरघराऊ, घरगती**—वि १ घरचा, घरीं तयार केलेला (माल सामान, वस्तु), घरीं वाढविलेला, पाळलेला (घोडा, पशु) घरीं लावलेलें (रोप, झाड इ०) 'दोन घोडीं भाड्याचीं केलीं, दोन घरगुतीं होतीं' २ घरचा, भाड्याचा, उसना, बाजाराऊ याच्या उलट [स गृह=घर+कृति=करणें, (अप) घरकुरती (कुण)]

**घरगुती**—क्रिवि १ स्वत च्या अंगमेहनतीनें, कौशल्यानें २ घरच्या माणसाकडून 'आम्ही रहाट घरगुती भरला'

**घरघर**—स्त्री १ चरक, रहाट, जातें, इ० काचा होणारा घर्र् असा आवाज २ कंठात कफ दाटल्यामुळें होणारा घोगरा, विशिष्ट आवाज (विशेषत मरणासन्न माणसाचा) 'मग कशाची जाते घरघर।' –तोब १४ [ध्व, घर द्वि] **०लागणें**–अगदीं थोड्या अवकाशात मरणार अशा स्थितींत असणें, मरण्याच्या बेताला येणें

**घरघर–रां**—क्रिवि जातें, चरक, रहाट इ०कांच्या होणाऱ्या घरघर आवाजाप्रमाणें, तसा आवाज करीत [ध्व, घर् द्वि]

**घरघरणें**—अक्रि घरघर वाजणें, कंठ कफानें दाटल्यामुळें घरघर आवाज होणें, घरघर असा आवाज करणें [घरघर]

**घरघरा–री**—पुस्त्री मरावयास टेकलेल्या माणसाच्या घशातील घरघर आवाज घरघर अर्थ २ पहा (क्रि० लागणें, वाजणें). [घरघर]

**घरघशा**—पु प्र गरगशा गरगशा पहा

**घरघुती**—वि खाजगी, घरासंबंधीं (प्र) घरगुती पहा

**घरघुंबी**—स्त्री ओलसर जागेंत राहणारा एक ल्हान प्राणी, हा सहसा बाहेर दिसत नाहीं नेहमीं आपल्या घरात मातीखालीं असतो हा प्राणी जर स्वत चें ठिकाण सोडून घरांत येताना दिसला तर कोंकणात तें पाहुणे येण्याचें लक्षण समजलें जातें **–घरघुबेपणा**–पु एकलकोंडेपणा, घरघुबडेपणा

**घरचा**—वि १ कुटुंबातील, घरांतील (माणूस), घरात जन्मलेला, वाढलेला, तयार केलेला इ० 'घरचा उठला चोर गेला' २ (ल) नवरा, पति 'आम्हास आता फार रात्र झाली, घरचीं रागें भरतील' –रत्न ५ ४ ३ स्वत - सिद्ध, स्वसंपन्न, दुसऱ्याची अपेक्षा न लागणारा उ० घरचा गाणार, सुतार, विद्वान इ० ४ (सामा) घरगुती पहा (वाप्र) **०कारागीर –कसबी**–पु घर शब्दामध्यें घरकसबी पहा **०दाणा**–पु घरीं उत्पन्न केलेलें, घरच्या शेतातलें धान्य, स्वत चा धान्याचा सांठा, वेगमी, याचप्रमाणें घरची विद्या, घरचें द्रव्य इ० **०विद्वान**–वि स्वत च्या कामापुरती विद्या शिकलेला, नेहमीच्या, किरकोळ कामात, बाबींत त्या त्या कामातील तज्ज्ञाचें साहाय्य ज्यास घ्यावें लागत नाहीं असा, **०सुखी**–वि खाऊन पिऊन सुखी, सुखवस्तु, निर्वाहाकरितां धंदा, नोकरी ज्यास करावी लागत नाहीं असा **–ची उतरंड–फूट**–स्त्री (मा)

दुसऱ्याला निरुत्तर करण्याच्या अथवा त्याची फजिती करण्याच्या हेतूनें वापरण्यात येणारा हलकट शब्दप्रयोग -ची विद्या-स्त्री कुटुंबात चालत आलेली विद्या, धर्याचें ज्ञान, घरीं शिकता येण्यासारखी विद्या -ची सोयत-स्त्री कुटुंबांतील माणसाची, नातलगाची, ओळखीच्या, सलगीच्या माणसाची सोबत सगत (प्रवास वगैरेसाठीं) -चें द्रव्य-न कुटुंबातील द्रव्याचा निधि, खासगी, स्वत चें द्रव्य घरचा ना घाटचा—वि कोण, कुटला, कोणाचा, काय उपयोगाचा इ० ज्यासबधीं कांहींहि सागता येत नाहीं असा (मनुष्य, पदार्थ, प्राणी) अगदीं अनोळखी, परकी

घरट-टा-टी—पु स्त्री १ घिरटी, धान्य भरडण्यासाठीं दळण्यासाठीं केलेलें मोठें जातें 'हिरे, माणकें, मोतीं सर्व जबरदस्त घरटाखालीं घालून त्याचा चुरा केला' -वज्राघात ६६ २ (कों) भात भरडण्याचें मोठें जातें ३ दळणारा, धान्य इ० दळून पोट भरणारा, घरट भुयारी याजवर मोहरर्फा मलिक वरीं याचे कारकीर्दीपासुन होता तो . ' -मसाप २ १६३ ४ -स्त्री न गस्त, घिरटी -मनको • [स घरट्ट=मोठें जातें]

घरटण-णा—न पु पडलेल्या घराची जागा, जमीन, चौथरा घरठाण अर्थ २ पहा [घर+ठाण (स्थान अप)]

घरटणें-उक्रि भरडणें, घरटात घालुन दळणें [घरट]

घरटा-ठा—पु (कों) १ पक्ष्याचें घरटें, कोठें 'या लक्षयोजनाबुधि-परतीरीं आमुचा असे घरटा।' -मोकर्ण २८ ५७ २ घर रहावयाचें ठिकाण, ब्रह्मगद्दो राक्षसु। प्रामु घरटा पाडी वोसु।' -गीता २ ३४१५ ३ आश्रयस्थान ठिकाण 'विश्वाचिया अभिलाषा। पायपाखाळजिया दशा। घरटा जाला।' -ज्ञा १८६५१ ४ पडलेल्या घराची ओसाड जागा जमीन चौथरा, घरठाण ५ काटा इ०कानीं वातडींत केलेलें छिद्र घर, एखादी वस्तु राहील ठेवता येईल असें भोंक ६ न्हाणीघर, -शर [घर+स्था ठाव] घरटाण-न (कु) पडीत घर घरटण पहा

घरटा—स्त्री १ घिरटी, फेरी गिरकी, 'तुमनें गुफिलीं वीरगुटीं। त्यावरी मधुकराची घरटी।' -एभा ३ ८३६ -दावि २१३ 'सप घरण्यासाठीं धारानें दहा घरटया घातल्या' २ गस्त पहारा (इ) राउड 'यापरी स्वयें मन। दुर्ग पत्तासी आपण। त्यासी सबाह्य राखण। घरटी जाण स्वयें करी।' -एभा २२ ३०६ तुमच्या घराभोंवतीं सुदर्शनचक्राला घरटी करायला लावतों' -नामना ८२ ३ येरझार हेलपाटा खप, खेटा, जाणें न परत येणें इ० कांची निष्फळ क्रिया कृपणाच्या घरीं कितीहि घरट्या घातल्या तरी तो काय देणार ?' ४ (ल) आडकाठी कैद प्रतिबंध 'जयातें अभ्यासाची घरटी। यमनियमांची ताटी।' -ज्ञा ३ ३११ [ध्व] ०कर कार-वि १ गस्त घालणारा, पहारा करणारा, राखणदार, रखवालदार 'रामाश्रमीं अहोरात्र। जटायु झाला घरटीकार।' -मारा-किष्किंधा १६ १३२ 'घरटीकार मी तुमचा।' -मुआदि ५ ४४ गांवांत गस्ती जागती घरटीकर।' -मक ३४ १०० २ चार, हेर, गुप्तपोलीस ३ (सामा) आसूद, बातमीदार 'तों सभेस घरटीकार सांगत। रावणासन्मुख वर्तलेलें।' -रावि १९ १७३ [घरटी+कार=करणारा]

घरटी—स्त्री (कों) भात भरडण्याचें मोठें जातें जातिणी, घरट -वि घरटांत घालून भरडलेलें भात [स घरट, म घरट] ०पोती-स्त्री गांवचें सगळें दळण दळून देण्याचा मक्ता [घरटी+खोती=मक्ता] ०भर-सारा-पु मराठ्यांच्या अमदानींत जाल्यावर, घरटांवर बसविलेला कर

घरटी—स्त्री १ (कों) प्रत्येक घराचा, कुटुंबाचा वर्गणीतील वाटणीतील भाग, हिस्सा घरपट्टी २ (राजा) वर्गणी, पट्टी, दंड, दणग्या देण्याच्या किंवा घेण्याच्या बाबतींत स्वतंत्र पणें मोजलेलें प्रत्येक घर [घर+पनी]

घरटी घरटीस—क्रिवि (कों) प्रत्येक घरागणीक, घरोघर, प्रत्येक घरीं, एकहि घर न वगळता, 'त्यानें घरटीस पाच पाच रुपये दिले, घेतले' 'खोजेवाडीस घरटी काठी चालू आहे इतका नाहक्या उपद्रव डोळ्यांनीं पाहिला' -खेया २५ ०आमंत्रण न गांवांतील प्रत्येक घरीं दिलेलें जेवणाचें निमंत्रण बोलावणें

घरटें—न घरटा, पक्षी, प्राणी इ०कांचें घर, रहावयाचें ठिकाण, बोळ, घरटा पहा

घरठा—पु १ घरटा, पक्ष्याचें घरटें, खुराडें २ ठिकाण, ठाव, स्थान 'कीं ब्रह्मविद्येचा घरठा। अन्य चोराचा कुरठा। कीं परमपुरुषाचा बसैठा। राजमठु तो॥' -ऋ ३८ [स गृह+स्था, घर+ठाव]

घरड—पुन घरट पहा

घरडई—स्त्री १ मरणोन्मुख माणसाच्या तोंडाला पडणारी कोरड व घशांत होणारी जळजळ २ (सामा) अजीर्णामुळें येणारी करपट ढेकर गरडई पहा (क्रि० लागणें, येणें) [ध्व]

घरडणें—उक्रि १ घरटात घालुन (धान्य इ०) भरडणें २ (माणसाची प्राण्याची मान गळा, नरडी) वाकडेतिकडे ताडणें खाडणें छिंदणें खापलणें, चोचावून तोडणें [घरट]

घरडा—पु १ भरडताना जात्याचा होणारा घरघर आवाज २ (ल) गाढ झोपेंत मतकाळीं होणारी घशातील घरघर (क्रि० लागणें) [घरडणें तुल० गु घेरडो]

घरडा—पु (राजा) घरटें विशेषत ज्यात एखादी वस्तु राहील ठेवता येईल असें लहानसें भोंक, पोकळी घरका अर्थ १ पहा

घरडा—पु बैलाची एकसारखी पण जलद चाल [ध्व घर]

**घरडुळणें**—अक्रि. घराचा झाडा घेणें; धुंडाळणें, कानाकोपऱ्यांतून शोधणें; घरडोळ. [ घर+ढहुळण ]

**घरण-णी**—स्त्री. १ ( राजा. कु.) घरधनीण; घरांतील मुख्य कारभारीण; गृहपत्नी; गृहिणी. २ पत्नी; बायको; घरधनीण. [ सं. गृहिणी; हिं. घरनी ]

**घरण**—न.घरटक्का किंवा बाणटक्का. -बदलापूर ३६३; ४०२.

**घरत**—स्त्री (प्र.)गरत;कुलीन व सभ्य (विधवा, सधवा)स्त्री; मर्यादशील व अनुदार स्त्री. गरत पहा. [ सं. गृह+रत ]

**घरंदाज**—वि. १ खटलेवाईक; कुटुंबवत्सल. २ एके ठिकाणीं कायमची वस्ती, घरदार करून राहिलेला; कायमचा रहिवासी ३ कुलीन; अभिजात; स्वसत्तेच्या घरांत अन्नानें राहणारा; खानदानीचा; चांगल्या कुळांतील. [ घर+फा. अंदोख़्=मिळणें ]

**घरन(नो)ठें**—न. म्हशीच्या, रेड्याच्या ( कांहींच्या मतें उंटाच्याहि ) उरोभागीं पुढच्या दोन पायांमध्यें असलेला मांसल भाग, आवाळूं. [ ? ]

**घरप**—स्त्री. ( गो. ) गव्यांची भाजी.

**घरली**—वि.स्त्री; बायको; घरधनीण. [ प्रा. घरिल्ली=गृहिणी; म. घर+ईल-ली=घरील-घरली ]

**घरंब, घरवसा**—पु. ( को. ) घराच्या छपराला, न झाडलेल्या भिंतींना लागलेलीं कोळिष्टकें, जाळीं, जळमटें; केरडोक. घेरू; घेरोसा. [ घर+वसणें ? ]

**घरचत**—स्त्री. ( गो. ) घरसंसारासंबंधींची कथा, गोष्ट. ( घर शब्दांत ) घरवरीत पहा.

**घरवी**—स्त्री. ( कु. ) घरासाठीं काढलेलें, घरास लावलेलें इमारती लांकूड, गवत, वासे इ० सामान, साहित्य. [ घर+वी प्रत्यय ]

**घरसणें**—अक्रि. अंगावर धांवून, रवसइन, घसरून येणें. 'आली घरांतुनि तदा घरसुन नारी।'—आकृ ५. [ घसरणें वर्णविपर्यासानें ]

**घरसा**—वि. ( गो. ) घारा ( डोळा ). [ घार ]

**घरळणें**—अक्रि. १ गडबडत, सरपटत, गडगडत जाणें. २ घरंगळणें; उतारावरून घसरत खालीं जाणें; घुळणें. **घरळता**—वि घुळता; घरंगळेल, गडगडेल असा.

**घरा**—पु १ ( कांटा, गळू इ० मुळें अंगाला पडलेलें ) छिद्र, भोंक; लहान घर; घरडा. यात काहीं जाऊन बसेल अशा तऱ्हेचें तें असतें घरडा (राजा.) पहा. २ ( सामा. ) छिद्र; भोंक. घर पहा. 'धरिल कसा सद्रस तो, ज्या क्लशाच्या घरा बुडाला च।' —मोअनु ८ ३९. ३ जखम; व्रण; क्षत. [ म. घर; बं. घरा= छिद्र; तुल० अर घार=जखम, खोंक ]

**घरा-रे-पाडणें-पडणें**—एखाद्याचें वर्म काढणें; टोचून बोलणें; काळजास धका बसेल असें उणें भाषण करणें. 'पडलें हातें हृदया धर्मोक्त धिरडियासि जेविं घरे।'—मोद्रोण २३.८७.

**घराऊ**—वि. १ घरगुती; घरासंबंधीं; कुटुंबासंबंधीं. २ घरचें घरींच बोलावयाची; खाजगी ( गोष्ट ). 'घराऊ गोष्ट बाहेर बोलूं नये.' ३ घरीं तयार केलेला ( जिन्नस ); घरीं वाढलेला, बाळगलेला ( पशु ); घरीं लावून वाढविलेलें ( झाड इ० ). ४ घरचा; स्वपक्षीय; परका, भाडोत्री याच्या उलट [ म. घर+आऊ प्रत्यय; तुल० बं. घराऊ; सिं. घरू ]

**घराक**—वि. गिऱ्हाईक, ग्राहक. [ सं. ग्राहक; गु घराक ]
**घराकी**-स्त्री. गिऱ्हाइकी. -मौज २-६ ३०.

**घराडा**—पु. (प्र.) घरडा पहा. भरडण्याचा आवाज. [ध्व.]

**घराणा-णें**—पुन. १ कुळ; वंश; कुळी; गोत्र. 'म्हणती पाखिज आमुचा घराणा। गुरुउपदेश नाहीं लाहुणा।'—दावि १५०. २ वंशांतील माणसें; घराण्यांतील मंडळी. ३ ठिकाण; स्थान. 'इये पुन्रावृत्तीचीं घराणीं। आघवी एकवटती जयाचिया प्रयाणीं।' —ज्ञा ८.२३४. [ हिं. घराना; म. घर ]

**घराणी**—स्त्री. ( गो. ) घरधनीण; गृहपत्नी; यजमानीण; गृहिणी. घरकाम, घरणी पहा. [ सं. गृहिणी; प्रा. घरणी,घरिणी ]

**घराणें**—वि. साधन; योग?—शर.

**घरूं**—न. ( कों. ) १ कीड लागलेल्या लांकडाचें पीठ, भुसा. २ जळमटें; कोळिष्टकें; घरंब, घरवसा पहा. [ घर ]

**घरूं**—वि. घरचें; खाजगी; घरगुती. 'चोरीच्या गुन्ह्याबद्दलचा विचार करतां रुपये २८॥ सरकारी नसुन केशव नाथू याचे घरूं होते.' —विक्षिप्त ३.८२. [ म घराऊ ]

**घरोटा**—पु घरटें 'जशी रानपक्षीण बांधी घरोटा।'—अर्वाचीन ४९९. [ घर ]

**घरोटी**—स्त्री. (कों )कुटुंबाची समायिक मालमत्ता; वडिलोपार्जित मिळकत, इस्टेट; घरवट पहा. 'घरोटीपैकीं गुरें वांटावयाचीं आहेत' [ घरवट ]

**घरोबा**—पु १वस्तुत.एका घरचे नसता मित्रपणामुळे घरच्यासारखा झालेला स्नेहभाव; घरच्या माणसासारखा जिव्हाळ्याचा स्नेहसंबंध, ऐक्यभाव, बंधुभाव; भाईवदी; भाइचारा; एकमेकाकडे जाणें-येणें; दाजारप्रेम. 'ताद्रूप्य रासभस्त्रियेपासीं। तिचा घरोबा वाहे शिरीं।'—भारा, बाल ९६२. २ (बायकी) घरकाम; गृहकृत्य; घरातील कारभार. 'त्वां आपला चालवितां घरोबा। धरूं नये किंचितमात्र लोभा।'—साछह ७ १२०. ३ प्रपंच; संसार; गृहस्थाश्रम. 'घरोबा मांडिला दंडकाधारें। वाढली वाइको उपजलीं पोरें।'—दावि ४०. ४ (ल). लग्न, विवाह; घरठाव. ( क्रि० करणें. ) 'बायकोनें दुसरा घरोबा सोनाराशीं केला.' —योमारो २.१५३. [ घर+ओवा प्रत्यय, तुल० गु घरोबो ]

**घरोसा, घेरोसा, घरघसा**—पु (कों बे. तंजा ) खळमट घरवसा व घरव पहा.

**घरौते**—पु गृहस्थाश्रमी मनुष्य, पुरुष, गृहस्थ. ०**घरौते-अव** ( घरवरौत ) १ नवरा-बायको, स्त्रीपुरुष, दंपती, दांपत्य, जोडपें, 'तुम्ही घरौतें वरौतें । दोघे निजानंदभरितें । अमूर्ते झाला मूर्तिमंतें । भक्तानुग्रहासी ॥' –विठ ११ ७४ २ घरदार, गण गोत 'घर' मध्यें घरवरौत पहा

**घर्म**—पु घाम, स्वेद, अतिश्रमामुळें त्वचेवर येणारा ओलावा घाम पहा. [ सं ] ०**रंध्र**–न घामावाटे शरीरांतील घाण ज्यांतून बाहेर पडते असें ( शरीराच्या ) त्वचेवरील अत्यंत सूक्ष्म छिद्र हीं छिद्रें फार सूक्ष्म असून शरीराच्या त्वचेवर लक्षावधि आहेत [सं घर्म=घाम+सं रंध्र–छिद्र] ०**स्राव**–पु घाम येणें [सं घर्म+स्राव=वाहणें ]

**घर्वड**—स्त्री ( गो )वंश, कुल, कुटुंब ( प्र ) घरवड अर्थ २ पहा

**घर्वत-ता**—स्त्री (गो ) घरांतील सामान, ( प्र ) घरवत पहा

**घर्वस, घर्वास**—पु (गो. ) घर, घरांतील राहणी, घरवसात पहा [घर+वास ]

**घर्षक**—वि घासणारा –न घासण्याचें, पुसण्याचें साधन, रबर [ सं ]

**घर्षण**—न १ घासण्याची क्रिया, घासणें २ ( पदार्थ ) एका पदार्थाच्या सपाट पृष्ठभागावरून दुसऱ्या पदार्थास ओढूं लागलों तर संलग्न पृष्ठभागांच्या खरबरीतपणामुळें आपल्या कार्यास होणाऱ्या प्रतिबंधास घर्षण म्हणतात –यस्थि २ ( इं ) फ्रिक्शन् ३ (ल ) ( एखाद्या गोष्टीचा, विद्येचा ) अतिशय व्यासंग, अभ्यास, परिश्रम ४ एखाद्या गोष्टीची वादविवादानें केलेली वाटाघाट, चर्चा, छेडून केलेली पृच्छा, चिकित्सा ५ भांडण, कलागत, तंटा, कटकट बखेडा ६ घसट [ सं ] ०**जन्य**–वि ( पदारसा )घासण्यानें उत्पन्न होणारा [घर्षण+जन्य=उत्पन्न होणारा] –**णाचा प्रतिबंध**–पु ( पदा ) घर्षणानें होणारा प्रतिबंध, ( इं ) फ्रिक्शनल् रेझीस्टन्स्–रसायु **घर्षणें**–उक्रि घासणें [सं घर्षण ] **घर्षित**–वि घासलेलें [ सं ]

**घल**—पु ( कों ) (पातळ पदार्थाचा) अमळसा दाटपणा, चिकटपणा ( हा पाहिजे तसा नसल्यास म्हणतात )

**घलणें**—उक्रि १ उडी मारणें, 'तरी न घलूनि महापुरीं । न घेपे बुडणयाची शियारी ।' –ज्ञा १६ ६९ २ घालणें, मारणें (दाभ ६०) 'न घला न घला खड्ग । राया आमुचे प्राण ।' –उषा १७६९ [प्रा घल्ल=फेंकणें, घालणें म घालणें ]

**घल्डी**—स्त्री ( खा ) कळशी, लहान घागर, घडली 'घल्डीभर पाणी लय होईन' [ घडा घडली वर्णव्यत्यास ]

**घल्ळ**—न ( व ) पाणी भरण्याचें लहान भांडें, घडली; कळशी [ घडली–घल्डी–घल्ळी ]

**घवकर**—क्रिवि एकदम, एकाएकीं 'अकस्मात अवचिता । घवकरि सस्वरूप देखतां ।' –एभा १३ ६७१ [ ध्व ]

**घवघव-वां**—क्रिवि. १ घोंगावत २ बेसुमारपणें, अतिशय दाटीनें, गजबजून, दाट, गच्च 'दक्षिणेस ब्राह्मण घवघव मिळाले' 'घवघव माणसें जमलीं' ३ घमघम 'घवघव वास सुटला' [ ध्व घव! घव! अथवा घो! घो! या माशांच्या घव्याच्या आवाजाचा अनुकरणवाचक शब्द ]

**घवघवणें**—अक्रि १ चोहोंकडे सुगंध दरवळणें, सुवासाचा घमघमाट होणें २ शोभणें, शोभून दिसणें 'हरितनूच्या आश्रयें पूर्ण । अलंकार घवघविती ।' –ह १८ ६४ 'चरणीं घवघवती नेपुरें ।' –कथा १ १ १२ ३ घू घू असा आवाज करणें –नागा २२८५ ४ दमदुमणें, छुनछुनणें –शर [ घवघव ]

**घवघवी**—वि घवघवीत पहा ठळक, स्पष्ट 'रामप्रताप आल्यादरें । मात्रुका अर्थ घवघवी ।' –वेसीस्व ६ १२ –क्रिवि थाटानें, थाटमाटानें 'मुषकारूढ गणेश गोसावी । रायें पुजिला घवघवी ।' –वेसीस्व ६ ४२ [ घवघव ]

**घवघवी(वि)त**—वि १ पहातांच डोळ्यांना आनंद देणारा, डोळ्यांत भरणारा, भरदार, भव्य २ गोंडस, गुबगुबीत, धष्टपुष्ट, मोठा आणि देखणा (पुरुष, स्त्री) 'घवघवीत डोळा पहाताती ।' –रामदासी २ १२२ ३ ठळक, ठसठसीत, भरदार, डोळ्यांत भरणारा ( दागिना, डोळा ), हलका, खुरटा बारीक याच्या उलट ४ खूप दागिने घालून शोभणारी (स्त्री, मुलगी), तेजस्वी, भव्य, शोभणारा, भरदार (चेहरा, मुख) 'कासे कशिला सोनसळा । अपाद रुळे वनमाळा । घनसांवळा घवघवित ॥' –एभा २ ५५१ 'वंदे तें अवसी घवघवित जीचा मुखविधू ।' –सारुह ८ ८७ 'रत्नभूषणीं घवघवीत ।' –मुआदि ५ ६ ५ ठळक, स्पष्ट, मोठा, चांगला ऐकूं येणारा 'घणघोष घवघवीत ।'–मुवन १३ १०६ ६ चमचमीत, उंची खाद्य पदार्थांनीं भरलेलें (जेवणाचें ताट, पान ) 'वाढिलेंच असे घवघवीत ।' –रामदासी २ ८१ ७ दरवळणाऱ्या सुगंधानें युक्त, सुवासाच्या घमघमाटानें युक्त [ घवघव ]

**घवसुवें**—अक्रि ( गो ) ( गवसणें ) मर्म समजणें, खुबी लक्ष्यांत येणें, वर्म सांपडणें [ गवसणें ]

**घवा**—पु (मावळी) खोल खळगा, तळखडकाला मिळणारा खड्डा 'काल जोराचा पाऊस पडल्यामुळें पाणी तालींत शिरून तीमध्यें घवा पडूं लागला' [ सं गह्वर, प्रा गव्वर ? तुल० का गवि=दरी, गुहा ]

**घव्य**—वि. तेजस्वी. 'नाना उदास घव्य मूर्ति । -सप्र ५.३३. **०वाणी**-वि. तेजस्वी. 'तंव समर्थमूर्ति घव्यवाणी देखिली।' -सप्र २.२२. [ घव ]

**घशा**—पु. (कों.) चुन्यासारखी पांढरी असलेली एक प्रकारची माती.

**घशिटा, घशिटें, घशीट, घशेट, घशेटा**—स्त्री.न. (खोगिराला) तंग घासटूं नये म्हणून खोगिराच्या प्रत्येक भागाला लावलेलें चामड्याचें अस्तर. [ घासणें ]

**घष्टणी-णी**—स्त्री. १ घांसाघांसी. 'घष्टणी घिसणी घसमरपणें। घसर घसरूं घसारवाणें।' -दा १४.४.४. २ (गो.) भांडीं घांसण्याची नोकरी; कामाकष्टाची नोकरी; दास्य. [ सं. घृष्-घृष्ट ]

**घष्ट(स्ट)णें**—सक्रि. १ घांसणें. 'जो सांपडला काळचपेटीं। पडपडों। पुनरपि होईल कष्टी। याक न लागे घष्टिला च घष्टी।' -दावि २२८. २ कष्टानें काढणें, कंठणें (वेळ, काळ). 'मनीं राम वेष्टी बळें काळ घष्टी।' -दावि २१६. [ घष्टा ]

**घष्टा**—पु. घसटा-टी. १ पदार्थ घांसतांना त्याला दिलेला जोराचा घसडा; पदार्थ घांसण्याकरितां त्यावरून हात इ० फिरविण्याची क्रिया. 'तांब्या काळा पडला आहे, चार अधिक उणे, पंच मार म्हणजे स्वच्छ होईल.' २ एखाद्याच्या शेजारून जोरानें जातांना लागलेला धक्का, घसरा. [ सं. घृष्ट ]

**घष्टें**—न. (ग्राम्य) तूप; कढविलेलें लोणी.

**घस**—स्त्री. झुपका; गुच्छ; घड. (प्र.) घोंस पहा.

**घस**—स्त्री. १ व्यापारांत आलेली तूट; तोटा; नुकसान; घूड; खोट. (क्रि० सोसणें; बसणें; लागणें, येणें). २ (गळण्यानें, झिरपण्यानें, सुकल्यानें, घांसलें गेल्यानें) पदार्थांच्या मूळच्या मापांत, वजनांत येणारी तूट, न्यूनता, झीज, घट. 'दोन मण गुळांत दहा शेर घस आली.' 'घशीबद्दल लांकूड आकारात धरूं नये.' ३ सोनें पारखताना कसावर उमटलेली सोन्याची रेघ, सोन्याचा कस. [ सं. घृष्; प्रा. घस; म. घासणें ]

**घस**—स्त्री. १ (कु.) भांडें, कढई, किटली, मडकें इ० सतत चुलीवर ठेवल्यानें त्याच्या बुडाला जमणारा मशेरीचा थर; खरप; खरपी; मस; जळ. २ लोणी कढविल्यानंतर भांड्याच्या तळाला बसणारी बेरी.

**घस**—वि. (राजा.) एकदम उतरतें; उभ्या उतरणीचें (छप्पर इ०).

**घस-कन-कर-दिशीं**—क्रिवि. १ धान्य इ० एकदम पुष्कळ ओततांना होणाऱ्या घस् घस् अशा आवाजानें. २ (ल.) एकदम; एखाद्या कामाची तडकाफडकी व चटपट यांचा निदर्शक शब्द. 'त्यानें घसकन भाताची वेळणी माझे पानांत ओतली.' 'त्यानें घसदिशीं दहा रुपये काढून दिले.' [ ध्व. ]

**घसका**—पु. १ रट्टा; धपाटा; घोंयट अथवा धारेच्या शस्त्रानें दिलेला तडाखा; २ घसरा; ओरखडा; घष्टा अर्थ २ पहा. ३ घसडा; हिसका; हिसडा; गचका; हयका. [ घांसणें; किंवा घस् ध्व. ]

**घसकाविणें, घसकावून, घसकून**—कचकाविणें इ० पहा.

**घसक्या**—वि. घसट्या. १ ज्याच्या कामांत नाजुकपणा नाहीं असा; घसमुसळ्या; भाडदांड; रानवट; अडाणी; दांडगा (मजूर, कामकरी इ०). २ (ल.) बदफैली; अत्यंत कामुक; विषयलंपट; बाहेरख्याली; इष्कबाज. [ घासणें ]

**घसघशा**—वि. १ नेहमीं कटकट, कुरकूर, धुसफूस, हमरी तुमरी करणारा; घसघस करण्याची संवय ज्याला आहे असा. २ घासाघीस करणारा; करार, खरेदी विक्रीचा व्यवहार करतांना घिसघीस करणारा; घासघोस घालणारा. [ घासणें ]

**घसघशी(सी)त**—वि. धवधवीत अर्थ २, ३, ६ पहा. -क्रिवि. १ अघळपघळ; ऐसपैसपणानें; पुरेपूर; भरपूरपणें; तब्बल. 'त्याला दिवसास घसघशीत शेर भात लागतो.' 'घसघशीत पांच रुपये घेतलेस, आतां मागेंपुढें काय करितोस.' २ खसखशीत अर्थ १-३ पहा. ३ विपुलपणें; अघळपघळ; रेट; रेलचेलीनें (वस्तु, क्रिया इ० होणें).

**घसघशीत**—वि. (कु.) साधारण कढत; गरम असलेलें (अंग, शरीर).

**घसघस**—स्त्री १ घासाघीस; जिकीर; चिणचिण; खाराखीर; (पदार्थ विकत घेतांना होणारी) कोरडी तक्रार; निरर्थक ओढाताण. 'तुम्ही कांहीं विकत घेणार कीं कोरडी घसघस लावणार.' २ (एखाद्यास) सदोदित दोष लावणें आणि राग भरणें, निंदा करणें. ३ कुरकूर; धुसफूस; कुरबूर; खाजगी कुटुंबांतील कटकट, चडफड, चिणचिण. 'घसघस करितां विटे। सगट लोक।' -दा १९.७.२१. ४ कडाकयाचा, धडाक्याचा वादविवाद, चर्चा; तंडणें; रिकामा वाद. (क्रि० करणें; लावणें; घालणें; माडणें). ५ सैन्याचा किरकोळ हल्ला. ? [ सं. घर्ष् म. घासणें ]

**घसट, घसटणी, घसणी**—स्त्री. घरोबा, संघटण; मैत्री; सलोखा; विशेष परिचय, घसरट. 'कोणाशींहि झाली तरी घसट ठेवावी, पण अतिप्रसंग करूं नये.' -विकारविलसत १९. [ घांसणें ]

**घसटणें**—अक्रि घांसणें १ चालतांना (एखाद्या पदार्थाशीं, भिंतीशीं) घासून जाणें, घमवटणें; घसटून किंवा चाटून जाणें; ओरखडणें; घांसणें. 'त्या भिंतीशीं त्याचें अंग घसटताच वरची त्वचा निघाली.' २ एकमेकांस कळण्याजोगा स्पर्श करून, खेटून जाणें. 'तो चांभार त्या ब्राह्मणास घसटून गेला.' ३ घांसणें

चोळणें, चोळवटणें, रगडणें. ४ निष्काळजीपणानें, बेदरकारपणें, लाटालाटीनें एखादी गोष्ट, काम रेटून नेणें, दडपणें, फारशी काळजी न घेता ( काम ) करून टाकणें. 'न निवडतांच भाजी तशीच घसटली ' [ घांसणें ]

**घसटी**—स्त्री एखादा पदार्थ दुसऱ्यावरी घासून गेल्याची खूण, घरा, घसरा, ओरखडा (प्राय या शब्दाचा अनेकवचनीं प्रयोग करतात ) [ घसटणें ]

**घसट्या**—वि १ अडाणी, भडमुट्ठा, दांडगा, लाटघा घसमुसळ्या ( मजूर, कामकरी ) घसक्या अर्थ १ पहा २ सुस्त, मद, गाफील, टाणपा, हांचन्या [ घसटणें ]

**घसडा**—पु ( विप्र ) घसरा, घसरा पहा

**घसण**—स्त्री १ ( कों ) व्यापारातील, धंद्यातील तूट, तोटा, नुकसान, घट, घस २ अति परिचय, घसट पहा ३ संगत, सघर्ष 'आणि फळाचिया हावा। हृदयीं कामा जाला रिगावा। कीं तयाचिय घसणी दिवा। ज्ञानाचा गेला।' —ज्ञा ७ १३९. 'ऐसी पचमहाभूतांची वणी। आंत गुणत्रयाची कसणी। ऐशिया चिये घसणीं। पडियेला जो॥' —सिस २ १६० ४ सघर्ष, स्पर्श 'गगन असानिया जनीं। मैळेना जनघसणीं।' —एभा ७ ४४४ ५ सवय, सराव, —शार ( क्रि० पडणें, पाडणें ) ६ बैलाची गाडी उतरणीला लागली असता चाकाला लावावयाचा लाकडाचा दांडा, खरडी [ स घर्षण, प्रा घसण ]

**घसणी**—स्त्री १ घर्षण, घांसण्याची क्रिया 'शिला पानीय वरि घसणी पडतसे, चदना ! रे ! ।' —दासोपतपदें, राजवाडे ग्रथ माला पृ ५ २ घसण अर्थ ६ पहा ३ खर्च, व्यय, नाश र्‍हास 'पतीची शक्ति अल्पवयात अविचारानें घसणीस पडल्यामुळें पुढें उपयोगास पडेल इतकी रहात नाहीं ' —विवाहविज्ञान ७ [ घासणें ]

**घसणें**—अक्रि घसरून खालीं येणें, निसळणें 'अशोकवनि घातीं (?) निवसे। तारा क्षितिवरि काय घसे।' —निमा १ ४ [ घसरणें ]

**घसन**—न युद्ध, लढाई, धुमश्चक्री घमसान अर्थ ४ पहा 'उठीली अणीया भाले। जवळीं पांच पाच सले। गाढासनीं दोनी दोनी वर्गे। भोजे घसनी पातले॥' —उपा ८२४ [ स घर्षण हिं घमसान, गु घमशाण म घमशान अप ]

**घसमट**—स्त्री ( कु )दृढपरिचय, घसट घसरट [ घासणें ]

**घसमरपण**—न खाकरून खाकरून घसा खाण्याची क्रिया, व्यापार —मनको घस्मर पहा [ घस्मर ]

**घसमस**—स्त्री ( कों ) धुमफूस, कटकट, तटाबखेडा, बाचाबाच खटका क्चकच, कलागत, धसफस, धडाधडी [ घासणें ]

**घसमस**—वि असार —दार

**घसर**—स्त्री ( दर, भाव, किंमत ) उतरणें, कमी होणें, (बाजारात एखाद्या मालास) मदी येणें [ घसरणें ] •**गुंडी**—स्त्री १ अधोगति, अवनति, अपकर्ष, उतरती कळा, उच्चपदावरून खालीं येणें, घसरणें 'जुन्या शिक्षकांची अशीच घसरगुंडी झालेली आहे ' —मावि १०५ २ (खेळ ) घसरून खालीं येण्या साठीं उतरत्या फळीचें केलेलें साधन [ घसरणें+गुडी—गुडा= गोळा ]

**घसरट**—स्त्री दाट परिचय, मैत्री, घसट पहा [ घासणें ]

**घसरट**—वि निसरतीं, निसरडें असणारी, गुळगुळीत ( जागा ), घसरता, निसरडा, गुळगुळीत [ घसरणें ]

**घसरड-ण**—स्त्री १ निसरडें असलेली, गुळगुळीत, घस रती जागा २ ( घसरण ) घसरगुंडी अर्थ १ पहा [ घसरणें ]

**घसरडा**—वि निसरडा, गुळगुळीत, घसरट, घसरून पडण्याजोगी, घसरट (—वि ) पहा [ घसरणें ]

**घसरंडा**—पु ( ना व ) घसरड, घसरण, निसरडी जागा [ घसरणें ]

**घसरडें**—न १ निसरडें, घसरड, घसरण २ घसरडपणा, गुळगुळीतपणा [ घसरणें ]

**घसरण घसरड**—स्त्री घसरड पहा

**घसरणी**—स्त्री १ घसरण्याची क्रिया. २ निसरडी जागा, घसरडें [ घसरणें ]

**घसरणें**—अक्रि १ निसरणें, निसटणें, घरळणें, गुळकणें, उतरणीवरून, घसरड्यावरून सरकत, गरगळत जाणें २ ( ल ) एखाद्याच्या अंगावर जोरानें, त्वेषानें तुटून पडणें, चाल करून जाणें, चढाई करणें, एखाद्यास राग भरावयाला, निंदायला आवेशानें पुढ सरसावणें, एखाद्यावर जोराचा शाब्दिक हल्ला चढ विणें, एखाद्याच्या तोंडास लागणें 'जोत्याची त्याच्यावर घसरून पडला ' —स्वप ३१ 'दोघाना फसविण्याचा त्यानें बेत केला पण दोघे त्याजवर घसरले ' —विवि ८ ६ ११० ३ एखाद्या कामास आवेशानें, जोरानें लागणें, जुपून घेणें 'तें काम मी चार दिवस घसरून तडीस नलें ' ४ चुकणें, चळणें, च्यवणें 'बोलत होता ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी, मग जो घसरला तो रांडवाजीच्या गोष्टी सांगू लागला ' ५ अधिकार, हुद्दा, आश्रय इ०कापासून च्युत होणें, ( नोकरींतून ) कमी होण, बडतर्फ होणें, तो त्या मामलतीवरून घसरला ' ६ ( शरीर इ० ) क्षीण होणें, खडणें, ( शरीरप्रकृति ) ढासळणें, 'अलीकडे त्याची प्रकृति बरीच घसरली आहे ' ७ मूळ स्वरूप नष्ट होणें, र्‍हास पावणें, उच्चपदावरून ढळणें, उतरती कळा लागणें 'चांदीचा भाव घसरला आहे ' —के १० ६ ३० ( व्यवहारांत, व्यापारात

खोंच बसल्यानें) खालीं येणें; ढवघाईस येणें. 'त्या व्यापारांत पांच हजाराची खोंच येतांच तो घसरला.' ८ (धैर्य, आत्मविश्वास) गलित होणें, गारठणें, पार निघून जाणें, नष्ट होणें, ढळणें, डगमगणें, डळमळणें. ९ (मनुष्य) खचणें; डगमगणें; कचरणें; हटणें. १० (व.) पळून जाणें; पोबारा करणें; हातावर तुरी देणें. [ध्व. घस्+सं. सृ-सर; किंवा सं. घर्षण, म. घासणें, सिं गीसिरणु]

**घसरपट्टी**—स्त्री. १ (ग्राम्य) खरडपट्टी; बेमुर्वतपणें केलेली निर्भर्त्सना; खरड; योडंती. (क्रि० काढणें; निघणें); २ जडयाचें, जडावाचें काम करावयाचें एक हत्यार. -शर.

**घसरवट**—वि. निसरडी; घसरडी (जागा). [घसरणें]

**घसरा**—पु. १ घसडा; ओरखडा; घष्टा; (एखाद्या पदार्थास) जोरानें घांसून, चाटून जाणें; चाटून गेल्यानें पडणारी खुण; हिसडा (क्रि० मारणें). २ सपाटा; वेग; जोर. 'तैसीं घसरें मिसळेलीं। दोन्हीं दळें।' -शिशु १०४२. ३ शेजारून झपाट्यानें जातांना दिलेला रेटा; धक्का. ४ रट्टा; तडाखा. ५ (ल.) राग; कोप. 'महादेवाला लवुन तुम्ही जा रे पदर पसरा। कठीण जाचिल त्याचा घसरा।' -प्रला १३५. ६ धमकावणीचा, खडसण्याचा, खणकावण्याचा, दटावणीचा आविर्भाव, भाषण; गुरकावणी; दटावणी. (क्रि० देणें; करणें; घालणें). 'त्या चोरास घसरा देतांच तो कबूल झाला.' ७ तुटून पडणें; हल्ला करणें. 'रा. रा. गुरुजींनीं जागें केल्यावर त्याजवर विनाकारण घसरा करून ...' -टि २ ८१. ८ व्यापारांत, धंद्यांत आलेली बूड, नुकसान, घस, तूट, तोटा. ९ दुर्दैवाचा घाला, तडाखा; (संकटाचा) धक्का. 'जय अपजय परस्वाधीन बसला घसरा।' -ऐपो २३५. 'नाहीं तरी बसल एखादा घसरा.' -राला ३९. [घसरणें; गु. घसारो]

**घसरा**—पु. दिवस. [सं. घस्र अप.]

**घसराघसर-री**—स्त्री. हिसकाहिसकी; धक्काबुक्की; ओढाओढी; झुंज; झोंबाझोंबी. [घसरणें द्वि.]

**घसंबकर**—क्रिवि. जड पदार्थ पाण्यांत एकदम पडतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें; धपकन; डुबकन; दब्बकन. [ध्व. घसंब+करणें]

**घसवट, घसवटा, घसाटा**—स्त्रीपु. १ (एखाद्या कामाचा, कलेचा) राबता; सराव. २ परिचय; घसट; दाट ओळख. ३ वहिवाट. **घसटीस, घसटीखालीं पडणें**—१ एखाद्या कामाचा, कलेचा राबता, सराव होणें. २ दाट परिचय होणें; घसट, घसरट होणें. [घसवटणें]

**घसवटणें**—अक्रि. १ घांसले जाणें; झिजणें; खरचटून जाणें; घासटणें, घाटलें जाणें; घासल्यानें झिजून जाणें. 'अहो आत्मेपणीं न संटों। स्वसंवित्तीं न घसवटों।' -अमृ ८.४. 'अथवा तें घसवटेना। अथवा अदृश्य होयेना।' -दा १.९. १०. २ घांसणें; घांसटणें. 'वायोचा कातरा घसवटे। तेणें उष्ण वन्हि पेटे।' -दा १३.३.८. ३ घसवटीस पडणें; सराव होणें; अंगीं मुरणें, जडणें. ४ (मनुष्य, पशु, वस्तु) चांगली राबती असणें; सारखी उपयोगांत आणली जाणें; अभ्यस्त होणें. 'या कामांत तो चार दिवस घसवटेल तेव्हां उपयोगी पडेल' [घसट]

**घसवटा**—पु. सराव; निरंतर चालूपणा. घसवट पहा. 'तो बैल घसवटयाखालीं पडेल तेव्हां नरम होईल' [घसवटणें]

**घसवटी**—स्त्री. १ घसवट पहा. २ घसरा; खरचटून पडलेला ओरखडा; घष्टा. 'पाषाणघाव घसवटी। अदृश्यपणें मिरवेले।' -नव २४.१३०. [घसवटणें]

**घसा**—पु. राब वाहून नेण्याची बिनचाकी गाडी. -बदलापूर २९४. घसे पहा. [घासणें, घसरणें]

**घसा**—पु. १ गळयाच्या आंतील भाग; नरडें; अन्ननलिका. २ श्वासनलिका. ३ आवाज; कंठध्वनि. 'त्याचा घसा गोड आहे.' [सं. घस्-खाणें, गिळणें] (वाप्र.) ०**कोरडा करणें**—फार वेळ बोलत राहणें; घसा कोरडा होईपर्यंत एखाद्यास उपदेश, एखाद्याशीं मायाकूट करणें. ०**खाणें**—घशाशीं घुरघुरणें; घशांत घरघर आवाज होणें. घसा वाजणें. 'घसर घसरूं घसा खाणें। घुमघुमोंचि घुमणें। योग्य नव्हे॥' -दा १४.४.४. **घशाखालीं उतरणें**—१ गिळला जाणें; गिळंकृत होणें. २ (ल.) लाच खालेला, लबाडीनें लाटलेला पैसा पचविला जाणें. ३ कबजांत जाणें. 'पण एतद्देशीय संस्थानें मात्र सरकारच्या घशाखालीं उतरविलीं.' -नि. **घशांत घालणें**—बळकावणें; गिळंकृत करणें; (एखाद्या मालमत्तेवर) बळेंच हक्क सांगून (ती) बळकावणें. 'दुसऱ्याचे देश घशांत घालण्याची असुरी लालसा टिकणार नाहीं.' -के १४.६.३०. **घशांत टाकणें**—गिळंकृत करणें, लाटणें. 'सरकारचा विचार इंदूरची इस्टेट घशांत टाकण्याचा होता.' -विक्षिप्त ३.१६४. **घशांत पीक धरणें-अडकणें**—पाऊस न पडल्यामुळें पिकांची, कणसांची वाढ खुंटणें. **घशांतून काढणें**—खाल्लेला, गिळंकृत केलेला पैसा, चोरलेला माल इ० ओकावयास, परत द्यावयास भाग पाडणें. **घशाबाहेर पडणें**—१ गिळंकृत केलेली वस्तु, पैसा बाहेर ओकून पडणें. २ (पिकाच्या पोटरी येणें; पीक निसवणें, पिकाचें कणीस लोंबर बाहेर पडणें. ०**पसरणें**—(एखादी वस्तु खाण्याकरितां, गिळण्याकरितां) आ करणें; तोंड उघडणें; अधाशीभूतपणानें पहाणें ०**फुटणें**—(मुलगा) वयांत आल्यामुळें त्याचा आवाज, स्वर बदलणें; आवाजाची कोमलता नष्ट होऊन तो मर्दानी बनणें, घांटी फुटणें; घांटी पहा ०**बसणें**—(ओरडण्यानें, तेलकट, इ० पदार्थ खाल्यानें) आवाज घोगरा होणें, शब्दाचे उच्चार अस्पष्ट होणें. ०**वाजणें**—घोरणें; (घसा) घरघर वाजणें (प्रयोगांत कर्त्यांची षष्ठी असावी लागते)

**घसाघस-सां, घसासां**—क्रिवि. १ गवत कापतांना, पदार्थ चावतांना, चर्वण करतांना होणाऱ्या घस् घस् अशा आवाजाप्रमाणें; समासम. २ उपळ्यादृष्टीनें; मनमोकळपणें; मनास येईल तसें; बेसुमार ( पैसा खर्च करणें, खाणें इ० ). [ ध्व. ]

**घसाघसी**—स्त्री. (व.) तकार; भांडण; घासाघीस. [ घासणें, घासाघीस ]

**घसाटा**—पु. घसवट पहा.

**घसाड**—वि. ( अशिष्ट भाषेंत ) विपुल; पुष्कळ; रगड.

**घसाडणें**—उक्रि. १ चोळणें; घांसणें; उजळा देणें; घांसटणें. २ ( धान्य इ० ) भरडणें. [ घासणें ]

**घसारा**—पु. १ दहा-पांच औषधें उगाळून एकत्र केलेलें सरबरीत मिश्रण. २ ( आसन्नमरण मनुष्यास लागलेली ) घरघर; घरटा. ३ ( एखादा पदार्थ दुसऱ्या पदार्थास लागून गेल्यानें पडणारा ) ओरखडा, रेघोटया; घस; घसरा. घसरा पहा. ' चामड्यास घसरा लागूं नये म्हणून त्यावर लांकडी चिपा बसवाव्या.' –स्वारीनियम ( बडोदें ) ५५ ४ झीज, इमारत, यंत्रें, सामान वगैरे वापरल्यामुळें त्यांच्या किंमतींत पडणारी तूट, न्यून, उणेपणा. [ घासणें ]

**घसास-सां**—क्रिवि. घसाघस पहा. ' वीर तोडिती घसास शिर फोडिती ठसास शुळ टोचिती भसास आपगुद्दी नेणती।' –दावि ४९६. [ ध्व. ]

**घसिट**—पुस्त्री. ( संगीत ) इच्छित उंच स्वरापासून ध्वनींत खंड पडूं न देता इच्छित नीच ( खालच्या ) स्वराकडे जाणें.

**घसिटा**—पु १ जोरानें घांसण्याची, चोळण्याची, पुसण्याची क्रिया, घशा; घसडा; ( क्रि० मारणें ). २ ( क. ) घसरा शब्दाच्या इतर अर्थीहि उपयोग होतो. [ घासणें ]

**घसीट, घसि(से)टा, घसेंट**—पुस्त्रीन. घशीट पहा.

**घसें**—न ( को ) भातखाचरांत उपयोगी पडणारी एकचाकी हातगाडी; आवणाचे मूठ नेण्यासाठीं केलेलें गाडीसारखें लांकडी वाहन. घसा पहा. [ घासणें, घसरणें ]

**घसेल**—वि. ( व ) १ कंजूष; कृपण. २ घासाघीस करणारा. [ घासणें ]

**घस्टणी**—स्त्री. ( गो. ) घष्टणी पहा.

**घस्टणें**—अक्रि. १ घट्टे पडणें. घासणें, घष्टणें पहा. २ (ल) झिजणें. ' वक्तयाच्या मुखा पाठ पडिलें । श्रोतयाचे श्रवण घस्टोनि गेले।' –दावि २४१. [ घर्षण ]

**घस्टुचें**—क्रि ( गो. ) खेटून, धक्के मारून चालणें

**घस्त**—स्त्री. १ व्यापारांत आलेली घट, तूट, तोटा. २ (पदार्थ सुकल्यानें, गळण्यानें, त्याच्या मापांत, वजनात आलेली) तूट, कमीपणा. घस पहा. [ सं. घृष्ट ]

**घस्त**—स्त्री. गस्त; घरटी; पहारा. (प्र.) गस्त पहा. ' महाराजांची प्रकृति नीट होऊन ते हमेशाप्रमाणें छावणींत घस्त घालूं लागले.।' –विध्विस ३.२४३. [ फा. गश्त ]

**घस्मर**—वि. जाड; घटमूठ; जाडाभरडा; बळकट; मजबूत ( कापड, कपडा, भांडें, शरीर ). ०पण–न. ( मनाची ) बळकटी; धैर्य. ' घ घ घस्मरपणेंचि मायाममता दुर्लभ।' –दावि २११. [ सं. घस्मर ]

**घस्मर**—वि. खादाड; अधाशी; रपाटून जेवणारा; अत्याहारी; वृकोदर; बहुभक्ष; खाद्वंदत. २ ( ल. ) ( दुसऱ्याचा ) नाश, निसतान करणारा; दुसऱ्याला गिळणारा. [ सं. ]

**घस्र**—न. दिवस. ' तेथें घस्रें दिनेकें क्रमुनि पुनरपि श्रीनटेशोपकंठीं।' –वीरेश्वर, उपमन्युचरित्र २२. [ सं. घस्र ]

**घळ**—स्त्री. ( पाण्याच्या ओघानें धुपून डोंगराच्या दोन्ही देडामध्यें पडलेली ) भेग; खांचण; ओहळ; लवण; खोलगट जागा; गुहा; ' अरण्यांत गेले पर्वताची घळ।' –रामदासी१.२५. ' घळमवडघाहून सुरतमाकत नऊ वाजण्याच्या सुमारास मोरघळीस आलों. –खेया ४४. –स्त्रीपु ( घुशींनीं भिंतींत पोखरून पाडलेलें ) भोंक; चीळ. ( खड्डे, पाणी इ०कांनीं ) खडकाला, बंधाऱ्याला पोखरून पाडलेलें छिद्र. [ ध्व. घळ ]

**घळ**—पु ( राजा. ) झाडावरून आंबे वगैरे काढण्याची जाळी लावलेली काठी; झेला; झेली; आंकी. २ विहिरींत पडलेली घागर, बादली इ० वस्तु काढण्याचा गळ. [ गळ ]

**घळ**—वि. ( गो. ) सढळ जिभेचा; भडभड्या; बडबड करणारा; ( मनुष्य ) [ अघळ ? ]

**घळक**—स्त्री. ( अशिष्ट ). विपुलता; लयलूट; चंगळ; रेलचेल. –वि. १ विपुल, भरपूर. २ फार उत्पन्नाचा, किफायतीचा ( धंदा ). [ ध्व. घळ ]

**घळघळ-ळां**—क्रिवि. घटघटां, आकंठ; पुष्कळ; विपुल. ' आधीं उदक आणविलें। घळघळां उदंड घेतलें।' –दा १८. १०.१९. अश्रूंची व पाण्याच्या प्रवाहाची विपुलता, अनिरुद्धता इ०कांचा वाचक शब्द. १ डोळयातून खळखळ अश्रु ढाळीत. ' पोराची आठवण झाली म्हणजे ती घळघळ रडूं लागते.' २ खळखळ आवाज करीत ( पाणी इ० वाहतांना ). ३ सईलसर; अघळपघळपणें, सुरकुटीतपणें (दागिने, कपडे अंगाला होणें, बसणें). [ ध्व घळ–खळ द्वि. ] ०घंटा–पु. १ घणघण घंटा; पोकळपणा; रितेपणा. २ पूर्ण अभाव; शून्यभाव. [ घणघणघंटा ] ०पोतें–वि. ( ल. ) अंगास नीट न येणारा, सैल होणारा, पोत्यासारखा घळघळां लोंबणारा ( कपडा, दागिना, जोडा इ० ). [ घळघळ+पोतें ] ०माळा–स्त्री अव हात बारीक, रोडका असल्यानें सैल होणाऱ्या व त्यामुळें माळांप्रमाणें घळघळ वाजणाऱ्या बांगड्या,

काढणें, अगदीं ढिल्या होणाऱ्या बागड्या [घळघळ+माळा] ०बाह्या–वि (उप) ज्याच्या अंगावरील कपडे घळघळा लोंबत आहेत असा (मनुष्य) घळघळ पोत्याचा [घळघळ+बाह्या=खडोबाचा भक्त]

**घळघळणें**—अक्रि १ (शरीर वाळल्यामुळें कपडे, बांगड्या, दागिने इ०) अगाल, सैल ढिले होणें (मोत्याचें वेज, छिद्र मोठें झाल्यानें तें) ढिलें, सैल होऊन तारेंत, दोऱ्यात हाल सरकू लागणें २ आजारीपणामुळें सांधे ढिले पडून अशक्तता वाटणें, गळाठा येणें, (शरीर) गळाल्यासारखें होणें 'कालच्या उपोषणानें मी केवळ घळघळलों' [घळघळ]

**घळघळाट**—पु १ (कपड्याचा, दागिन्याचा) फाजील, अवास्तव सैलपणा, घळघळा लोंबत राहण्याची अवस्था, झोल, पोतें २ (अश्रू इ०काच्या) सतत धारा, सारखा लागलेला ओघ, सतत अश्रुधारा, पुष्कळसा मोठा प्रवाह, लोट ३ (सामा) समृद्धि, विपुलता, लयलूट [घळघळ]

**घळघळाट**—क्रिवि १ घटघटा, भरभर, अधाशीपणानें (पाणी इ० पिणें) २ (कपडे, दागिने इ०) अतिशय सैलपणानें लोंबत घळघळ अर्थ ३ पहा [घळघळ]

**घळघळीत**—वि १ सैल, ढिला, घळघळ लोंबणारा, घळघळणारा (आंगरखा, कपडा, दागिना), घळघळ पोतें २ मोठें झालेलें, रुंदावलेलें (कानाचें भोंक, मोत्याचें वेजें इ०), ३ मोकळा, निष्कपट, खुल्या दिलाचा, संकोचरहित (मनुष्य, स्वभाव, सवय, व्यवहार इ०) ४ उघड, निष्कपट, प्रांजल, अकृत्रिम, मोकळ्या मनाचें, मनमोकळेपणाचें (वर्णन, भाषण इ०) –क्रिवि १ रगडून, भरपूर, मनमुराद 'त्याच्या घरीं लाडू घळघळीत वाढले' २ मोकळेपणानें, अघळपघळ, प्रशस्तपणानें 'नदीमध्यें घळघळीत स्नान करावयास सांपडत नाहीं' ३ (अशिष्टपणें, अतिलोभानें म्हणताना) पुरेपूर, घसघशीत, भरपूर 'घळघळीत अडीच हात धोतरजोडा मला लागतो' 'त्याच्या पोटाला घळघळीत दोन शेराचें अन्न पाहिजे' [घळघळ]

**घळण**—नस्त्री १ पाण्याच्या प्रवाहानें पडलेली खोवण खाचण, घळ, ओघळ, नाला 'त्या खडकांतील भेगा व घळणी पाहून एकदर अनुमान होईल' –मू ३३ २ पाण्याच्या नेटानें घळून घळून झालेली उतरती जागा, निसरडी जागा, जमीन, घसरण. [घळणें]

**घळणें**—अक्रि १ पाण्याच्या प्रवाहानें माती धुपून जाणें (नदीतीर, बांध यांची) २ खडक धुपून जाऊन घळ, ओघळ, चर पडणें ३ मोत्याचें वेज दागिन्याच्या वजनानें नाक, कानाचें छिद्र मोठें होणें, सैल होणें ४ (सामा) हारांतून, माळेंतून ओंवलेलीं मोत्यें, मणी, फुलें निखळणें, ओघळणें, घळून पडणें, ओघळणें पहा [घळ, स गल्]

**घळब(म)ळीत**—वि घळघळीत (–वि) अर्थ ३, ४ पहा

**घळम(मे)ळ**—स्त्री १ (प्र) घालमेल (एखाद्या कामाची) घादल, खवदव, दगदग, तारांबळ, उपद्व्याप २ (बाह्य वस्तूंचा, मनाचा) गोंधळ, घोळ, घोंटाळा (क्रि० पडणें, होणें, चालणें) घप्पाघोळ पहा 'कोणी आड येईना या चिंदा । अशी घळमळ पडली सदा ।' –पला ८८ [घालमेल]

**घळय**—स्त्री (को) घळण, घळ पहा

**घळसणचें**—अक्रि (गो) चुकणें, घसरणें

**घळा(ळ)मेळ**—स्त्री मोकळ्या मनाचा, स्नेहभावाचा सबंध, दळणवळण, व्यवहार **घळामेळीचा** वि विशेष सलगीचा, दाट परिचयाचा [घळमळीत, घळणें+मळ]

**घळ्या**—वि निष्काळजी, बेसावध, अनवधानी, दुर्लक्ष्य करणारा, हयगय करणारा, विसराळू २ ओंगळ व गबाळेपणाचें स्वरूप व वर्तन असलेला [तुल० गु घेलो=मूर्ख]

**घाइ**—स्त्री घाय, घाव, घाई, घायी पहा घाईबद्दल काव्यांतील रूप घाव याचें तृतीया विभक्तीचें रूप 'चेंदु घाईं मातला। हाक दओनि उसळैला।'–शिशु १०६७ 'निष्कपटा होआवें। उसिणा घ ईं जुझावें।'–ज्ञा २ १९० 'कशालागी हरी हा वधील एके घाईं।'–भफला ५३

**घाइटा**—पु (क) घाई, गडबड, त्वरा 'कायरे घाइटा लावला आहेस?' [घाई+टा प्रत्यय]

**घाइवटा**—पु (काव्य) घाव, जखम, वार, शस्त्राचा आघात (प्र) घायवटा 'इद्रवज्राचे घाइवटे लागता। मज श्रम न वाटे।' [घाय+वटा प्रत्यय]

**घाई**—स्त्री १ त्वरा, जलदी, गर्दी २ तातडी, उतावीळ, घादल, लगबग, घायकुत ३ घामधूम, धडाका, गडबड, तडाखा 'कन्यागतात जी स्नानाची घाई चालली होती' ४ धुमाळी, धुमाकूळ, धांगडधिंगा, धुमाफळी, दंगा 'तववरिच मूताची घाई। जव मनवादी नाहीं पावला।' **घाइ(ई)घाईनें**–क्रिवि अगदीं गडबडीनें, गर्दीनें लगबगीनें [घाई द्वि] **घाईं**–क्रिवि घाईनें, तडकाफडकी ०स येणें–अक्रि (व) जिकीरीस येणें, त्रासून जाणें, नम्र होणें

**घाई**—स्त्री १ घाय, घाव पहा ठोका, दणका २ (नगारा इ० चर्मवाद्याचा) दणदणाट, गजर 'दिशाचक्र बहिरैलें। घाईं निशानाचा।' –शिशु ५८५ –हंडे ४० म्ह० जेथें नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई' ३ (को) समीतांतील, वादनांतील ताल, गति, वाद्याची गत, बोल, विशेषत द्रुतगति [स घात, धाति, प्रा घाई]

**घसाघस-सां, घसासां**—क्रिवि. १ गवत कापतांना, पदार्थ चावतांना, चर्वण करतांना होणाऱ्या घस् घस् अशा आवाजाप्रमाणें; ससासस. २ उधळपट्टीनें; मनमोकळपणें; मनास येईल तसें; बेसुमार ( पैसा खर्च करणें, खाणें इ० ). [ ध्व. ]

**घसाघसी**—स्त्री. (व.) तकार; भांडण, घासाघीस. [ घासणें, घासाघीस ]

**घसाटा**—पु. घसवट पहा.

**घसाड**—वि. ( अशिष्ट भाषेंत ) विपुल; पुष्कळ; रगड.

**घसाडणें**—उक्रि. १ चोळणें; घांसणें; उजळा देणें; घासटणें. २ ( धान्य इ० ) भरडणें. [ घासणें ]

**घसारा**—पु. १ दहा-पांच औषधें उगाळून एकत्र केलेलें सरबरीत मिश्रण. २ ( आसन्नमरण मनुष्यास लागलेली ) घरघर; घरखा. ३ ( एखादा पदार्थ दुसऱ्या पदार्थास लागून गेल्यानें पडणारा ) ओरखडा; रेघोट्या; घस; घसरा. घसरा पहा. ' घामस्यास घसरा लागूं नये म्हणून त्यावर लांकडी चिपा बसवाव्या.' –स्वारीनियम ( बडोदें ) ५५. ४ हीज, इमारत, यंत्रें, सामान वगैरे वापरल्यामुळें त्यांच्या किंमतींत पडणारी तूट, न्यून, उणेंपणा. [ घासणें ]

**घसास-सां**—क्रिवि. घसाघस पहा. ' वीर तोडिती घसास सिर फोडिती ठसास शुळ टोचिती भसास आपशुद्धी नेणती।' –दावि ४९६. [ ध्व. ]

**घसिट**—पुस्त्री. ( संगीत ) इच्छित उंच स्वरापासून ध्वनीत खंड पडूं न देतां इच्छित नीच ( खालच्या ) स्वराकडे जाणें.

**घसिटा**—पु. १ जोरानें घांसण्याची, चोळण्याची, पुसण्याची क्रिया; घटा; घसडा; ( क्रि० मारणें ). २ ( क ) घसरा शब्दाच्या इतर अर्थीहि उपयोग होतो. [ घासणें ]

**घसीट, घसि(से) टा, घसेटे**—पुस्त्रीन. घसीट पहा.

**घसें**—न. (कों ) भातखाचरांत उपयोगी पडणारी एकचाकी हातगाडी; आवणाचें मूठ नेण्यासाठीं केलेलें गाडीसारखें लांकडी वाहन. घसा पहा. [ घासणें, घसरणें ]

**घसेल**—वि. ( व ) १ कंजूष, कृपण. २ घासाघीस करणारा. [ घासणें ]

**घस्टणी**—स्त्री. ( गो. ) घष्टणी पहा.

**घस्टणें**—अक्रि. १ घट्टे पडणें. घासणें, घष्टणें पहा. २ (ल) झिजणें ' वक्तयाच्या मुखा पाठ पडिलें। श्रोतयाचे श्रवण घस्टोनि गेलें।' –दावि २४१. [ घर्षण ]

**घस्टुचें**—क्रि. ( गो. ) खेटून, धक्के मारून चालणें.

**घस्त**—स्त्री. १ व्यापारांत आलेली घट, खूड, तोटा. २ (पदार्थ सुकल्यानें, गळण्यानें, त्याच्या मापांत, वजनांत आलेली) तूट, कमीपणा. घस पहा. [ सं. घृष्ट ]

**घस्त**—स्त्री. गस्त; फेरी; पहारा. (प्र.) गस्त पहा. ' महाराजांची प्रकृति नीट होऊन ते हमेशाप्रमाणे छावणींत घस्त घालूं लागले.।' –विविज्ञान १.२४३. [ फा. गश्त ]

**घस्मर**—वि. जाड; घट्टमूठ; जाडाभरडा; बळकट; मजबूत ( कापड, कपडा, भांडें, शरीर ). ०पण–न. ( मनाची ) बळकटी; धैर्य. ' घ घ घस्मरपणेंचि मायाममता उलंघ।' –दावि २१३. [ सं. घस्मर ]

**घस्मर**—वि. खादाड; अधाशी; रपाटून जेवणारा; अत्याहारी; वृकोदर; बहुभक्ष; खादूनंदन. २ ( ल. ) ( दुसऱ्याचा ) नाश, निःपात करणारा; दुसऱ्याला गिळणारा. [ सं. ]

**घस्र**—न. दिवस. ' तेथें घस्रे दितेकें क्रमुनि पुनरपि श्रीनटेशोपकंठीं।' –चौरेश्वर, उपमन्युचरित्र २२. [ सं. घस्र ]

**घळ**—स्त्री. ( पाण्याच्या ओघानें धुपून डोंगराच्या दोन्हीं देहामध्यें पडलेली ) भेग; खाचण; ओहळ; लवण; खोलगट जागा; गुहा; ' अरण्यांत गेले पर्वताची घळ।' –रामदासी२.२५. ' घळसवडपाहून सुक्तमारुत नऊ वाजण्याच्या सुमारास मोरघळीस आलों. –खेया ४४. –खीड ( घुशींनीं भिंतींत पोखरून पाडलेलें ) भोंक; बीळ. ( खडडे, पाणी इ०कांनीं ) खडकाला, बंधाऱ्याला पोखरून पाडलेलें छिद्र. [ ध्व. घळ ]

**घळ**—पु. ( राजा. ) झाडावरून आंबे वगैरे काढण्याची जाळी लावलेली काठी; झेला; झेली; आंखी. २ विहिरींत पडलेली घागर, बादली इ० वस्तु काढण्याचा गळ. [ गळ ]

**घळ**—वि. ( गो. ) सढळ जिभेचा; भडभड्या; बडबड करणारा; ( मनुष्य ) [ अघळ ? ]

**घळक**—स्त्री. ( अशिष्ट ). विपुलता; लयलूट; चंगळ; रेलचेल. –वि. १ विपुल, भरपूर. २ फार उत्पन्नाचा, किफायतीचा ( धंदा ) [ ध्व. घळ ]

**घळघळ-ळां**—क्रिवि. घटघटां; आकंठ, पुष्कळ; विपुल. ' आधीं उदक आणविलें। घळघळां उदंड घेतलें।' –दा १८.१०.१९. अश्रूंची व पाण्याच्या प्रवाहाची विपुलता, अनिरुद्धता इ०कांचा वाचक शब्द. १ डोळ्यांतून खळखळ अश्रु ढाळीत ' पोराची आठवण झाली म्हणजे ती घळघळ रडूं लागते.' २ खळखळ आवाज करीत ( पाणी इ० वाहतांना ). ३ सैलसर; अघळपघळपणें, सुटसुटीतपणें (दागिने, कपडे अंगाला होणें, बसणें) [ ध्व. घळ–खळ द्वि. ] ०घंटा–पु. १ घणघण घंटा; पोकळपणा; रितेपणा. २ पूर्ण अभाव; शून्यभाव. [ घणघणघंटा ] ०पोतें–वि. ( ल. ) अंगास नीट न येणारा, सैल होणारा, पोत्यासारखा घळघळां लोंबणारा ( कपडा, दागिना, जोडा इ० ). [ घळघळ+पोतें ] ०माळा–स्त्रीअव हात पारीक, रोडका असल्यानें सैल होणाऱ्या व त्यामुळें माळांप्रमाणें घळघळ वाजणाऱ्या बांगड्या,

कांकणें; अगदीं ढिल्या होणाऱ्या वांगड्या. [ घळघळ+माळा ] ०वाघ्या-वि. (उप) ज्याच्या अंगावरील कपडे घळघळां लोंबत आहेत असा ( मनुष्य ). घळघळ पोत्याचा. [ घळघळ+वाघ्या= खंडोबाचा भक्त ]

**घळघळणें**—अक्रि. १ (शरीर वाळल्यामुळें कपडे, वांगड्या, दागिने इ० ) अंगाला, सैल ढिले होणें. ( मोत्याचें वेजें, छिद्र मोठें झाल्यानें तें ) ढिलें, सैल होऊन तारेंत, दोऱ्यांत हालूं, सरकूं लागणें. २ आजारीपणामुळें सांधे ढिले पडून अशक्तता वाटणें; गळाठा येणें; ( शरीर )गळाल्यासारखें होणें. 'कालच्या उपोषणानें मी केवळ घळघळलों.' [ घळघळ ]

**घळघळाट**—पु. १ ( कपड्यांचा, दागिन्यांचा ) फाजील, अवास्तव सैलपणा; घळघळां लोंबत राहण्याची अवस्था; झोल; पोतें. २ ( अश्रु इ०कांच्या ) संतत धारा; सारखा लागलेला ओघ; संतत अश्रुधारा; पुष्कळमा मोठा प्रवाह, लोट. ३ (सामा ) समृद्धि; विपुलता; लयलूट. [ घळघळ ]

**घळघळाट**—क्रिवि. १ घटघटां, भरभर; अधाशीपणानें (पाणी इ० पिणें ). २ ( कपडे, दागिने इ० ) अतिशय सैलपणानें लोंबत. घळघळ अर्थ ३ पहा. [ घळघळ ]

**घळघळीत**—वि. १ सैल; ढिला; घळघळ लोंबणारा; घळघळणारा ( आंगरखा, कपडा, दागिना ); घळघळ पोतें. २ मोठें झालेलें; रुंदावलेलें ( कानाचें भोंक, मोत्याचें वेजें इ० ); ३ मोकळा; निष्कपट; खुल्या दिलाचा; संकोचरहित ( मनुष्य, स्वभाव, संबंध, व्यवहार इ० ). ४ उघड, निष्कपट; प्रांजल; अकृत्रिम; मोकळ्या मनाचें; मनमोकळेपणाचें ( वर्तन, भाषण इ० ). -क्रिवि. १ रगडून; भरपूर; मनमुराद. 'त्याच्या घरीं लाडू घळघळीत वाढले.' २ मोकळेपणानें; अघळपघळ; प्रशस्तपणानें. 'नदीमध्यें घळघळीत स्नान करावयास सांपडत नाहीं.' ३ (अशिष्टपणें, अतिलोभानें म्हणतांना)पुरेपूर; घसरशीत; भरपूर. 'घळघळीत अडीच हात धोतरजोडा मला लागतो.' 'त्याच्या पोटाला घळघळीत दोन शेराचें अन्न पाहिजे.' [ घळघळ ]

**घळण**—नस्त्री. १ पाण्याच्या प्रवाहानें पडलेली खोवण, खांचण, घळ, ओघळ, नाला. 'त्या खडकातील भेगा व घळणी पाहून एकंदर ... अनुमान होईल.' -मू ३३. २ पाण्याच्या नेटानें घळून घळून झालेली उतरती जागा; निमरडी जागा, जमीन; घसरण. [ घळणें ]

**घळणें**—अक्रि. १ पाण्याच्या प्रवाहानें माती धुपून जाणें ( नदीतीर, बांध यांची ). २ खडक धुपून जाऊन घळ, ओघळ, चर पडणें. ३ मोत्याचें वेजें, दागिन्याच्या वजनानें नाक, कानाचें छिद्र मोठें होणें, सैल होणें. ४ ( मामा. ) हारांतून, माळेंतून ओंवलेलीं मोत्यें, मणी, फुलें निखळणें, ओघळणें, घळून पडणें; ओघळणें पहा. [ घळ; सं. गल् ]

**घळव(म)ळीत**—वि. घळघळीत (-वि.) अर्थ ३, ४ पहा.

**घळम(मे)ळ**—स्त्री. १ (प्र.) घालमेल ( एखाद्या कामाची ) धांदल; खवदव; दगदग; तारंबळ; उपद्व्याप. २ ( बाह्य वस्तूचा, मनाचा ) गोंधळ; घोळ; घोंटाळा. ( क्रि० पडणें; होणें; चालणें). घप्पाघोळ पहा. 'कोणी आड येईना या चिंदा । अशी घळमळ पडली मदा ।' -पला ८६. [ घालमेल ]

**घळय**—स्त्री. ( कों. ) घळण, घळ पहा.

**घळसणचें**—अक्रि. ( गो. ) चुकणें; घसरणें.

**घळा(ळ)मेळ**—स्त्री. मोकळया मनाचा, स्नेहभावाचा संबंध, दळणवळण, व्यवहार. **घळामेळीचा**-वि. विशेष सलगीचा; दाट परिचयाचा. [ घळमळीत; घळणें+मळ ]

**घळ्या**—वि. निष्काळजी; बेसावध; अनवधानी; दुर्लक्ष्य करणारा; हयगय करणारा; विसराळू. २ ओंगळ व गबाळेपणाचें स्वरूप व वर्तन असलेला. [ तुल० गु. घेलो=मूर्ख ]

**घाइ**—स्त्री. घाय, घाव, घाई, घायी पहा. घाईबद्दल काव्यांतील रूप. घाव याचें तृतीया विभक्तीचें रूप. 'चैद्यु घाई मातला। हाक देओनि उसळैला।'-शिशु १०६७. 'निष्कपटा होआवें। उसिणा घाई झुंजावें।'-ज्ञा २.१९०. 'कंमालागीं हरी हा वधील एके घाई।'-अफला ५३.

**घाइटा**—पु ( क ) घाई; गडबड, त्वरा. 'कायरे घाइटा लावला आहेस?' [ घाई+टा प्रत्यय ]

**घाइवटा**—पु. ( काव्य. ) घाव; जखम; वार; शस्त्राचा आघात. ( प्र. )घायवटा. 'इंद्रवज्राचे घाइवटे लागतां। मज श्रम न वाटे।' [ घाय+वटा प्रत्यय ]

**घाई**—स्त्री. १ त्वरा; जलदी; गर्दी. २ तातडी; उतावीळ; धांदल; लगबग; घायकूत. ३ धामधूम; धडाका; गडबड; तडाखा. 'कन्यागमनांत जी लग्नाची घाई चालली होती. ...' ४ धुमाळी; धुमाकूळ; धांगडधिंगा; धुमाफळी; दंगा. 'तंववरिच भूतांची घाई। जंव मंत्रवादी नाहीं पावला।' **घाइ(ई)घाईनें**-क्रिवि. अगदीं गडबडीनें; गर्दीनं; लगबगीनें. [ घाई द्वि. ] **घाई**-क्रिवि. घाईनें, तडकाफडकी. ०स **येणें**-अक्रि ( व. ) जिकीरीस येणें; त्रासून जाणें; त्रस्त होणें.

**घाई**—स्त्री. १ घाय, घाव पहा. ठोका, दणका. २ ( नगारा इ० चर्मवाद्यांचा ) दणदणाट; गजर. 'दिशाचक्र बहिरेलें। घाई निशानाचां।' -शिशु ५८५.-हरि६.४०. म्ह० जेथें नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई.' ३ ( कों. ) संगीतांतील, वादनांतील ताल, गति; वाद्याची गत, बोल; विशेषतः द्रुतगति. [ सं. घात, घाति; प्रा. घाई.]

**घसाघस-सां, घसासां**—क्रिवि. १ गवत कापतांना, पदार्थ चावतांना, घर्षण करतांना होणाऱ्या घस् घस् अशा आवाजाप्रमाणें; ससाखस. २ उधळपट्टीनें, मनमोकळपणें; मनास येईल तसें; बेसुमार ( पैसा खर्च करणें, खाणें इ० ). [ ध्व. ]

**घसाघसी**—स्त्री. (व.) तकार; भांडण, घासाघीस. [ घासणें, घासाघीस ]

**घसाटा**—पु. घसवट पहा.

**घसाड**—वि. ( अशिष्ट भाषेत ) विपुल; पुष्कळ; रगड.

**घसाडणें**—उक्रि. १ चोळणें; घासणें; उजळा देणें; घासटणें. २ ( धान्य इ० ) भरडणें. [ घासणें ]

**घसारा**—पु १ दहा-पांच औषधें उगाळून एकत्र केलेलें सरबरीत मिश्रण. २ ( आसन्नमरण मनुष्यास लागलेली ) घरघर; घरडा. ३ ( एखादा पदार्थ दुसऱ्या पदार्थास लागून गेल्यानें पडणारा ) ओरखडा; रेघोटया; घस; घसरा. घसरा पहा. ' चामड्यास घसरा लागूं नये म्हणून त्यावर लांकडी चिपा घसवाव्या.' -स्वारीनियम ( बडोदें ) ५५. ४ झीज; इमारत, यंत्रें, सामान वगैरे वापरल्यामुळें त्यांच्या किंमतींत पडणारी तूट, न्यून, उणेंपणा. [ घासणें ]

**घसास-सां**—क्रिवि. घसाघस पहा. ' वीर तोडिती घसास सिर फोडिती ठसास शूळ टोचिती भसास आपशुद्धी नेणती।' -दावि ४१६. [ ध्व. ]

**घसिट**—पुस्त्री. ( संगीत ) इच्छित उंच स्वरापासून ध्वनींत खंड पडूं न देतां इच्छित नीच ( खालच्या ) स्वराकडे आणें.

**घसिटा**—पु १ जोरानें घासण्याची, चोळण्याची, पुसण्याची क्रिया; घटा; घसडा, ( क्रि० मारणें ). २ ( क. ) घसरा शब्दाच्या इतर अर्थीहि उपयोग होतो. [ घासणें ]

**घसीट, घसि(से)टा, घसेटें**—पुस्त्रीन. घसीट पहा.

**घसें**—न. (कों ) भातखाचरांत उपयोगी पडणारी एकचाकी हातगाडी; आवणाचे मूठ नेण्यासाठीं केलेलें गाडीसारखें लांकडी वाहन. घसा पहा. [ घासणें, घसरणें ]

**घसेल**—वि. ( व ) १ कंजूष; कृपण. २ घासाघीस करणारा. [ घासणें ]

**घस्टणी**—स्त्री. ( गो. ) घटणी पहा.

**घस्टणें**—अक्रि. १ घट्टे पडणें, घासणें, घटणें पहा. २ (ल ) झिजणें. ' वक्तयाच्या मुखा पाठ पडिलें । श्रोतयाचे श्रवण घस्टोनि गेले । ' -दावि २४१. [ घर्षण ]

**घस्टुचें**—क्रि ( गो ) खेटून, धक्के मारून चालणें.

**घस्त**—स्त्री. १ व्यापारांत आलेली घट, बूड, तोटा. २ (पदार्थ सुकल्यानें, गळण्यानें, त्याच्या मापांत, वजनांत आलेली) तूट, कमीपणा. घस पहा. [ सं. घृष्ट ]

**घस्त**—स्त्री. गस्त; फेरी; पहारा. (प्र ) गस्त पहा. ' महाराजांची प्रकृति नीट होऊन ते हंमेशाप्रमाणें छावणींत घस्त घालूं लागले. । ' -विद्विस ३.२४३. [ फा. गश्त ]

**घस्मर**—वि. जाड; घट्टमूठ; जाडाभरडा; बळकट; मजबूत ( कापड, कपडा, भांडें, शरीर ). ०पण-न. ( मनाची ) बळकटी; धैर्य. ' घ घ घस्मरपणेंचि मायाममता खंडप । ' -दावि २१३. [ सं. घस्मर ]

**घस्मर**—वि. खादाड; अधाशी; रपाटून जेवणारा; अत्याहारी; वृकोदर; बहुभक्ष; खादूंनंदन. २ (ल.) ( दुसऱ्याचा ) नाश, निःपात करणारा; दुसऱ्याला गिळणारा. [ सं. ]

**घस्र**—न. दिवस ' तेथें घस्रें क्तिकें क्रमुनि पुनरपि श्रीनटेशोपकंठीं । ' -वीरेश्वर, उपमन्युचरित्र २२. [ सं. घस्र ]

**घळ**—स्त्री. ( पाण्याच्या ओघानें धुपून डोंगराच्या दोन्हीं दंडामध्यें पडलेली ) भेग; खाचण; ओहळ; लवण; खोलगट जागा; गुहा; ' अरण्यांत गेले पर्वताची घळ । ' -रामदासी २.२५. ' पळसखडयाहून सुरतमाकत नऊ वाजण्याच्या सुमारास मोरघळीस आलों. -खेया ४४. -स्त्रीपु. ( घुशींनीं भिंतींत पोखरून पाडलेलें ) भोंक; बीळ. ( खेकडे, पाणी इ०कांनीं ) खडकाला, बंधाऱ्याला पोखरून पाडलेलें छिद्र. [ ध्व. घळ ]

**घळ**—पु. ( राजा. ) झाडावरून आंबे वगैरे काढण्याची जाळी लावलेली काठी; झेला; झेली; आंखी. २ विहिरींत पडलेली घागर, बादली इ० वस्तु काढण्याचा गळ. [ गळ ]

**घळ**—वि. ( गो. ) सढळ जिभेचा; भडभडया; बडबड करणारा; ( मनुष्य ) [ अघळ ? ]

**घळक**—स्त्री. ( अशिष्ट ). विपुलता; लयलूट; चंगळ; रेलचेल. -वि. १ विपुल, भरपूर २ फार उत्पन्नाचा, किफायतीचा ( धंदा ). [ ध्व. घळ ]

**घळघळ-ळां**—क्रिवि. घटघटां; आकंठ; पुष्कळ; विपुल. ' आधीं उदक आणविलें । घळघळां उदंड घेतलें । ' -दा १८. १०.१९. अश्रूंची व पाण्याच्या प्रवाहाची विपुलता, अनिरुद्धता इ०कांचा वाचक शब्द. १ डोळयांतून खळखळ अश्रु ढाळीत. ' पोराची आठवण झाली म्हणजे ती घळघळ रडूं लागते.' २ खळखळ आवाज करीत ( पाणी इ० वाहतांना ). ३ सैलसर; अघळपघळपणें, सुटसुटीतपणें (दागिने, कपडे अंगाला होणें, बसणें). [ ध्व. घळ-खळ द्वि. ] ०घंटा-पु. १ घणघण घंटा; पोकळपणा; रितेपणा. २ पूर्ण अभाव; शून्यभाव. [ घणघणघंटा ] ०पोर्तें-वि. (ल. ) अंगास नीट न येणारा, सैल होणारा, पोत्यासारखा घळघळां लोंबणारा ( कपडा, दागिना, जोडा इ० ). [ घळघळ+पोतें ] ०माळा-स्त्री अव हात बारीक, रोडका असल्यानें सैल होणाऱ्या व त्यामुळें माळांप्रमाणें घळघळ वाजणाऱ्या बांगडया,

कांकणें; अगदीं ढिल्या होणाऱ्या बांगड्या. [ घळघळ+माळा ] ०वाघ्या–वि. (उप.) ज्याच्या अंगावरील कपडे घळघळां लोंबत आहेत असा ( मनुष्य ). घळघळ पोत्याचा. [ घळघळ+वाघ्या= खंडोबाचा भक्त ]

**घळघळणें**—अक्रि. १ (शरीर वाळल्यामुळें कपडे, बांगड्या, दागिने इ० ) अंगाला, सैल ढिले होणें. ( मोत्याचें वेजें, छिद्र मोठें झाल्यानें तें ) ढिलें, सैल होऊन तारेंत, दोऱ्यांत हालें, सरकूं लागणें. २ आजारीपणामुळें सांधे ढिले पडून अशक्तता वाटणें; गळाठा येणें; ( शरीर )गळाल्यासारखें होणें. 'कालच्या उपोषणानें मी केवळ घळघळलों.' [ घळघळ ]

**घळघळाट**—पु १ ( कपड्यांचा, दागिन्यांचा ) फाजील, अवास्तव सैलपणा; घळघळां लोंबत राहण्याची अवस्था; झोल; पोतें. २ ( अश्रू इ०कांच्या ) संतत धारा; सारखा लागलेला ओघ; संतत अश्रुधारा; पुष्कळसा मोठा प्रवाह, लोट. ३ (सामा ) समृद्धि; विपुलता; लयलूट [ घळघळ ]

**घळघळाट**—क्रिवि. १ घटघटां, भरभर; अधाशीपणानें (पाणी इ० पिणें ). २ ( कपडे, दागिने इ० ) अतिशय सैलपणानें लोंबत. घळघळ अर्थ ३ पहा. [ घळघळ ]

**घळघळीत**—वि. १ सैल; ढिला; घळघळ लोंबणारा; घळघळणारा ( आंगरखा, कपडा, दागिना ); घळघळ पोतें. २ मोठें झालेलें; रुंदावलेलें ( कानाचें भोंक, मोत्याचें वेजें इ० ); ३ मोकळा; निष्कपट; खुल्या दिलाचा; संकोचरहित ( मनुष्य, स्वभाव, संबंध, व्यवहार इ० ), ४ उघड; निष्कपट; प्रांजल; अकृत्रिम; मोकळ्या मनाचें; मनमोकळेपणाचें ( वर्तन, भाषण इ० ). –क्रिवि. १ रगडून; भरपूर; मनमुराद. 'त्याच्या घरीं लाडू घळघळीत वाढले.' २ मोकळेपणानें, अघळपघळ; प्रशस्तपणानें. 'नदीमध्यें घळघळीत स्नान करावयास सांपडत नाहीं.' ३ (अशिष्टपणें, अतिलोभानें म्हणतांना)पुरेपूर; घसघशीत; भरपूर. 'घळघळीत अडीच हात धोतरजोडा मला लागतो.' 'त्याच्या पोटाला घळघळीत दोन शेराचें अन्न पाहिजे.' [ घळघळ ]

**घळण**—नस्त्री. १ पाण्याच्या प्रवाहानें पडलेली खोबण, खांचण, घळ, ओघळ, नाला. 'ह्या खडकांतील भेगा व घळणी पाहून एकंदर ... अनुमान होईल.' –मू ३३. २ पाण्याच्या नेटानें धसून घळून झालेली उतरती जागा; निसरडी जागा, जमीन; घसरण. [ घळणें ]

**घळणें**—अक्रि. १ पाण्याच्या प्रवाहानें माती धुपून जाणें ( नदीतीर, बांध याची ). २ खडक धुपून जाऊन घळ, ओघळ, चर पडणें. ३ मोत्याचें वेजें, दागिन्याच्या वजनानें नाक, कानाचें छिद्र मोठें होणें, सैल होणें. ४ ( सामा. ) हारांतून, माळेंतून ओंवलेलीं मोत्यें, मणी, फुलें निखळणें, ओघळणें, घळून पडणें; ओघळणें पहा. [ घळ; सं. गल् ]

**घळव(म)ळीत**—वि. घळघळीत (–वि.) अर्थ ३, ४ पहा.

**घळम(मे)ळ**—स्त्री. १ (प्र.) घालमेल ( एखाद्या कामाची ) धांदल; खवदव; दगदग; तारंबळ; उपद्व्याप. २ ( बाह्य वस्तूचा, मनाचा ) गोंधळ; घोळ; घोंटाळा. ( क्रि० पडणें; होणें; चालणें). घप्पाघोळ पहा. 'कोणी आड येईना या चिंदा । अशी घळमळ पडली मदा ।' –पला ८६. [ घालमेल ]

**घळय**—स्त्री. ( कों. ) घळण, घळ पहा.

**घळसणचें**—अक्रि. ( गो. ) चुकणें; घसरणें.

**घळा(ळ)मेळ**—स्त्री. मोकळ्या मनाचा, स्नेहभावाचा संबंध, दळणवळण, व्यवहार. घळामेळीचा-वि. विशेष सलगीचा; दाट परिचयाचा. [ घळमळीत; घळणें+मळ ]

**घळ्या**—वि. निष्काळजी; बेसावध; अनवधानी; दुर्लक्ष्य करणारा; हयगय करणारा; विसराळू. २ ओंगळ व गबाळेपणाचें स्वरूप व वर्तन असलेला. [ तुल० गु. घेलो=मूर्ख ]

**घाइ**—स्त्री. घाय, घाव, घाई, घायी पहा. घाईबद्दल काव्यांतील रूप. घाव याचें तृतीया विभक्तीचें रूप. 'चेंदु घाईं मातला। हाक देओनि उमळैला।'–शिशु १०६७. 'निष्कपटा होआवें। उसिणा घाईं जुंझावें।'–ज्ञा २.१९०. 'कंसालागी हरी हा वधील एके घाईं।'–अफला ५३.

**घाइटा**—पु ( क. ) घाई; गडबड, त्वरा. 'कायरे घाइटा लावला आहेस?' [ घाई+टा प्रत्यय ]

**घाइवटा**—पु.( काव्य. ) घाव; जखम; वार; शस्त्राचा आघात. ( प्र. )घायवटा. 'इंद्रवज्राचे घाइवटे लागतां। मज श्रम न वाटे।' [ घाय+वटा प्रत्यय ]

**घाई**—स्त्री. १ त्वरा; जलदी; गर्दी. २ तांतडी; उतावीळ; धांदल; लगबग, घायकुत. ३ धामधूम; धडाका; गडबड; तडाखा. 'कन्यागतांत जी लग्नाची घाई चालली होती. ...' ४ धुमाळी; धुमाकूळ; धागडधिंगा. धुमाफळी; दंगा. 'तंववरिच भूतांची घाई। जंव मंत्रवादी नाहीं पावला।' घाइ(ई)घाईनें–क्रिवि. अगदीं गडबडीनें, गर्दीनें; लगबगीनें. [ घाई द्वि ] घाईं–क्रिवि. घाईनें, तडकाफडकी. ०स येणें–अक्रि. ( व. ) जिकीरीस येणें; त्रासून जाणें; त्रस्त होणें.

**घाई**—स्त्री. १ घाय, घाव पहा. ठोका; दणका. २ ( नगारा इ० चर्मवाद्यांचा ) दणदणाट; गजर. 'दिशाचक्र बहिरैलें। घाई निशानाचां।' –शिशु ५८५.–ह३६.४०. म्ह० जेथें नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई.' ३ ( कों.) संगीतांतील, वाद्यांतील ताल, गति; वाद्याची गत, बोल; विशेषतः द्रुतगति. [ सं. घात, घाति; प्रा. घाई.]

**घसाघस-सां, घसासां**—क्रिवि. १ गवत कापतांना, पदार्थ चावतांना, चर्वण करतांना होणाऱ्या घस् घस् अशा आवाजाप्रमाणें; ससाखस. २ उधळपट्टीनें; मनमोकळेपणें; मनास येईल तसें; बेसुमार ( पैसा खर्च करणें, खाणें इ० ). [ ध्व. ]

**घसाघसी**—स्त्री. (व.) तकार; भांडण; घासाघीस. [ घासणें, घासाघीस ]

**घसाटा**—पु घसवट पहा.

**घसाड**—वि. ( अशिष्ट भाषेंत ) विपुल; पुष्कळ; रगड.

**घसाडणें**—उक्रि. १ चोळणें; घांसणें; उजळा देणें; घांसटणें. २ ( धान्य इ० ) भरडणें. [ घासणें ]

**घसारा**—पु १ दहा-पांच औषधें उगाळून एकत्र केलेलें सरबरीत मिश्रण. २ ( आसन्नमरण मनुष्यास लागलेली ) घरघर; घरटा. ३ ( एखादा पदार्थ दुसऱ्या पदार्थास लागून गेल्यानें पडणारा ),ओरखडा; रेघोटया; घस; घसरा. घसरा पहा. ' चामड्यास घसरा लागूं नये म्हणून त्यावर लांकडी चिपा बसवाव्या.' –स्वारीनियम ( बडोदें ) ५५. ४ झीज; इमारत, यंत्रें, सामान वगैरे वापरल्यामुळें त्यांच्या किंमतींत पडणारी तूट, न्यून, उणेपणा. [ घासणें ]

**घसास-सां**—क्रिवि. घसाघस पहा. ' वीर तोडिती घसास सिर फोडिती टसास शुळ टोचिती भसास आपशुद्धी नेणती ।' –दावि ४१६. [ ध्व. ]

**घसिट**—पुस्त्री. ( संगीत ) इच्छित उंच स्वरापासुन ध्वनींत खंड पडूं न देतां इच्छित नीच ( खालच्या ) स्वराकडे जाणें.

**घसिटा**—पु १ जोरानें घांसण्याची, चोळण्याची, पुसण्याची क्रिया; घष्टा; घसडा; ( क्रि० मारणें ). २ ( क. ) घसरा शब्दाच्या इतर अर्थीहि उपयोग होतो. [ घासणें ]

**घसीट, घसि(से) टा, घसेंट**—पुस्त्रीन घशीट पहा.

**घसें**—न. (कों.) भातखाचरांत उपयोगी पडणारी एकचाकी हातगाडी; आवणाचे मुठ नेण्यासाठीं केलेलें गाडीसारखें लांकडी वाहन. घसा पहा. [ घासणें, घसरणें ]

**घसेल**—वि. ( व ) १ कंजूष; कृपण. २ घासाघीस करणारा. [ घासणें ]

**घस्टणी**—स्त्री. ( गो. ) घष्टणी पहा.

**घस्टणें**—अक्रि. १ घट्टे पडणें. घासणें, घष्टणें पहा. २ (ल ) किटणें. ' वक्तयाच्या मुखा पाठ पडिलें । श्रोतयाचे श्रवण घस्टोनि गेले ।' –दावि २४१. [ घर्षण ]

**घस्टुचें**—क्रि. ( गो ) खेटून, धक्के मारून चालणें.

**घस्त**—स्त्री. १ व्यापारांत आलेली घट, बूड, तोटा. २ (पदार्थ सुकल्यानें, गळल्यानें, त्याच्या मापांत, वजनांत आलेली) तूट, कमीपणा. घस पहा. [ सं. घृष्ट ]

**घस्त**—स्त्री. गस्त; घरटी; पहारा. (प्र.) गस्त पहा. ' महाराजांची प्रकृति नीट होऊन ते हमेशाप्रमाणें छावणींत घस्त घालूं लागले. ।' –विक्षिप्त ३.२४३. [ फा. गश्त ]

**घस्मर**—वि. जाड; घटमूठ; जाडाभरडा; बळकट; मजबूत ( कापड, कपडा, भांडें, शरीर ). ०पण–न. ( मनाची ) बळकटी; धैर्य. ' घ घ घस्मरपणेंचि मायाममता उलंघ ।' –दावि २१३. [ सं. घस्मर ]

**घस्मर**—वि. खादाड; अधाशी; रपाटून जेवणारा; अत्याहारी; वृकोदर; बहुभक्ष; खादूनंदन. २ ( ल. ) ( दुसऱ्याचा ) नाश, निसतान करणारा; दुसऱ्याला गिळणारा. [ सं. ]

**घस्र**—न. दिवस ' तेथें घस्रें कितेकें क्रमुनि पुनरपि थीनंटशोपकंठीं ।' –वीरेश्वर, उपमन्युचरित्र २२. [ सं. घस्र ]

**घळ**—स्त्री. ( पाण्याच्या ओघानें धुपून डोंगराच्या दोन्हीं दंडामध्यें पडलेली ) भेग; खाचण; ओहळ; लवण, खोलगट जागा; गुहा; ' अरण्यांत गेले पर्वताची घळ । '–रामदासी२.२५. ' पळसवडयाहून सुरतमाकत नऊ वाजण्याच्या सुमारास मोरघळीस आलों. –खेया ४४. –स्त्रीपु. ( घुशींनीं भितींत पोखरून पाडलेलें ) भोंक; बीळ. ( खेकडे, पाणी इ०कांनीं ) खडकाला, बंधाऱ्याला पोखरून पाडलेलें छिद्र. [ ध्व. घळ ]

**घळ**—पु ( राजा. ) झाडावरून आंबे वगैरे काढण्याची जाळी लावलेली काठी; झेला; झेली; आंखी. २ विहिरींत पडलेली घागर, बादली इ० वस्तू काढण्याचा गळ. [ गळ ]

**घळ**—वि. ( गो. ) सढळ जिभेचा; भडभड्या, बडबड करणारा; ( मनुष्य ) [ अघळ ? ]

**घळक**—स्त्री. ( अशिष्ट ). विपुलता, लयलूट; चंगळ, रेलचेल. –वि. १ विपुल; भरपूर. २ फार उत्पन्नाचा, किफायतीचा ( धंदा ). [ ध्व. घळ ]

**घळघळ-ळां**—क्रिवि. घटघटां; आकंठ; पुष्कळ; विपुल. ' आधीं उदक आणविलें । घळघळां उदंड घेतलें । '–दा १८. १०.१९. अश्रूंची व पाण्याच्या प्रवाहाची विपुलता, अनिरुद्धता इ०काचा वाचक शब्द. १ डोळ्यांतून खळखळ अश्रू ढाळीत. ' पोराची आठवण झाली म्हणजे ती घळघळ रडूं लागते.' २ खळखळ आवाज करीत ( पाणी इ० वाहतांना ). ३ सैलसर; अघळपघळपणें, सुटसुटीतपणें (दागिने, कपडे अंगाला होणें, बसणें). [ ध्व. घळ–खळ द्वि. ] ०घंटा–पु. १ घणघण घटा; पोकळपणा; रितेपणा. २ पूर्ण अभाव; शून्यभाव. [ घणघणघंटा ] ०पोतें–वि. ( ल. ) अंगास नीट न येणारा, सैल होणारा, पोत्यासारखा घळघळा लोंबणारा ( कपडा, दागिना, जोडा इ० ). [ घळघळ+पोतें ] ०माळा–स्त्री.अव हात बारीक, रोडका असल्यानें सैल होणाऱ्या व त्यामुळें माळांप्रमाणें घळघळ वाजणाऱ्या बांगड्या,

कांकणें; अगदीं ढिल्या होणाऱ्या बांगड्या. [ घळघळ+माळा ] ०वाघ्या-वि. (उप.) ज्याच्या अंगावरील कपडे घळघळां लोंबत आहेत असा ( मनुष्य ). घळघळ पोत्याचा. [ घळघळ+वाघ्या= खंडोबाचा भक्त ]

**घळघळणें**—अक्रि. १ (शरीर वाळल्यामुळें कपडे, बांगड्या, दागिने इ० ) अंगाला, सैल ढिले होणें. ( मोत्याचें वेजें, छिद्र मोठें झाल्यानें तें ) ढिलें, सैल होऊन तारेंत, दोऱ्यांत हालें, सरकूं लागणें. २ आजारीपणामुळें सांधे ढिले पडून अशक्तता वाटणें; गळाठा येणें; ( शरीर )गळाल्यासारखें होणें. 'कालच्या उपोषणानें मी केवळ घळघळलों.' [ घळघळ ]

**घळघळाट**—पु. १ ( कपड्यांचा, दागिन्यांचा ) फाजील, अवास्तव सैलपणा; घळघळां लोंबत राहण्याची अवस्था; झोल; पोतें. २ ( अश्रु इ०कांच्या ) संतत धारा; सारखा लागलेला ओघ; संतत अश्रुधारा; पुष्कळसा मोठा प्रवाह, लोट. ३ (सामा.) समृद्धि; विपुलता; लयलूट. [ घळघळ ]

**घळघळाट**—क्रिवि १ घटघटां, भसभर; अधाशीपणानें (पाणी इ० पिणें ). २ ( कपडे, दागिने इ० ) अतिशय सैलपणानें लोंबत. घळघळ अर्थ ३ पहा. [ घळघळ ]

**घळघळीत**—वि. १ सैल; ढिला; घळघळ लोंबणारा; घळघळणारा ( अंगरखा, कपडा, दागिना ); घळघळ पोतें. २ मोठें झालेलें; रुंदावलेलें ( कानाचें भोंक, मोत्याचें वेजें इ० ); ३ मोकळा; निष्कपट; खुल्या दिलाचा; संकोचरहित ( मनुष्य, स्वभाव, संबंध, व्यवहार इ० ). ४ उघड; निष्कपट; प्रांजल; अकृत्रिम; मोकळ्या मनाचें; मनमोकळेपणाचें ( वर्तन, भाषण इ० ). -क्रिवि. १ रगडून; भरपूर; मनमुराद. 'त्याच्या घरीं लाडू घळघळीत वाढले.' २ मोकळेपणानें; अघळपघळ; प्रशस्तपणानें. 'नदीमध्यें घळघळीत स्नान करावयास सांपडत नाहीं.' ३ (अशिष्टपणें, अतिलोभानें म्हणतांना) पुरेपूर; घसघशीत; भरपूर. 'घळघळीत अडीच हात धोतरजोडा मला लागतो.' 'त्याच्या पोटाला घळघळीत दोन शेराचें अन्न पाहिजे.' [ घळघळ ]

**घळण**—नस्त्री. १ पाण्याच्या प्रवाहानें पडलेली खोबण, खांचण, घळ, ओघळ, नाला. 'त्या खडकातील भेगा व घळणी पाहून एकंदर ... अनुमान होईल.' -मू ३३. २ पाण्याच्या नेटानें धरून धरून झालेली उतरती जागा; निसरडी जागा, जमीन; घसरण. [ घळणें ]

**घळणें**—अक्रि. १ पाण्याच्या प्रवाहानें माती धुपून जाणें ( नदीतीर, बांध यांची ). २ खडक धुपून जाऊन घळ, ओघळ, चर पडणें. ३ मोत्याचें वेजें, दागिन्याच्या वजनानें नाक, कानाचें छिद्र मोठें होणें, सैल होणें. ४ (सामा.) हारांतून, माळेंतून ओंवलेलीं मोत्यें, मणी, फुलें निखळणें, ओघळणें, घळून पडणें; ओघळणें पहा. [ घळ; सं. गल् ]

**घळब(म)ळीत**—वि. घळघळीत (-वि.) अर्थ ३, ४ पहा.

**घळम(मे)ळ**—स्त्री. १ (प्र.) घालमेल ( एखाद्या कामाची ) धांदल; खवदव; दगदग; तारांबळ; उपद्व्याप. २ ( बाह्य वस्तूचा, मनाचा ) गोंधळ; घोळ; घोंटाळा. ( क्रि० पडणें; होणें; चालणें). घप्पाघोळ पहा. 'कोणी आड येईना या चिंदा । अशी घळमळ पडली मदा ।' -पला ८६. [ घालमेल ]

**घळय**—स्त्री. ( कों. ) घळण, घळ पहा.

**घळसणचें**—अक्रि. ( गो. ) चुकणें; घसरणें.

**घळा(ळ)मेळ**—स्त्री. मोकळ्या मनाचा, स्नेहभावाचा संबंध, दळणवळण, व्यवहार. **घळामेळीचा**-वि. विशेष सलगीचा; दाट परिचयाचा. [ घळमळीत; घळणें+मळ ]

**घळ्या**—वि. निष्काळजी; बेसावध; अनवधानी; दुर्लक्ष्य करणारा; हयगय करणारा; विसराळू. २ ओंगळ व गबाळेपणाचें स्वरूप व वर्तन असलेला. [ तुल० गु. घेलो=मूर्ख ]

**घाइ**—स्त्री. घाय, घाव, घाई, घायी पहा. घाईबद्दल काव्यांतील रूप. घाव याचें तृतीया विभक्तीचें रूप. 'चैद्यु घाई मातला । हाक देओनि उमळैला ।'-शिशु १०६७. 'निष्कपटा होआवें । उसिणा घाईं झुंजावें ।'-ज्ञा २.१९०. 'कंसालागी हरी हा वधील एके घाईं ।'-अफला ५३.

**घाइटा**—पु ( क ) घाई; गडबड, त्वरा. 'कायरे घाइटा लावला आहेस?' [ घाई+टा प्रत्यय ]

**घाइवटा**—पु. ( काव्य. ) घाव; जखम; वार, शस्त्राचा आघात. ( प्र. )घायवटा. 'इंद्रवज्राचे घाइवटे लागतां । मज श्रम न वाटे ।' [ घाय+वटा प्रत्यय ]

**घाई**—स्त्री. १ त्वरा, जलदी; गर्दी. २ तातडी; उतावीळ; धांदल, लगबग; घायकूत. ३ धामधूम; धडाका; गडबड; तडाखा. 'कन्यागतांत जी लग्नाची घाई चालली होती. ...' ४ धुमाळी; धुमाकूळ; धांगडधिंगा, धुमाफळी; दंगा. 'तंववरिच भूतांची घाई । जंव मंत्रवादी नाहीं पावला ।' **घाइ(ई)घाईनें**-क्रिवि. अगदीं गडबडीनें; गर्दीनें; लगबगीनें. [ घाई द्वि. ] **घाईं**-क्रिवि. घाईनें, तडकाफडकी. ०स येणें-अक्रि ( व. ) जिकीरीस येणें; त्रासून जाणें; त्रस्त होणें.

**घाई**—स्त्री. १ घाय, घाव पहा. ठोका; दणका. २ ( नगारा इ० चर्मवाद्यांचा ) दणदणाट; गजर. 'दिशाचक्र बहिरैलें । घाई निशानाचा ।' -शिशु ५८५.-हरि ६.४०. म्हण जेथें नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई.' ३ ( कों. ) संगीतांतील, वाद्यांतील ताल, गति; वाद्याची गत, बोल; विशेषतः द्रुतगति. [ सं. घात, घाति; प्रा. घाई. ]

**घाउस, घाऊस**—पु १ घास; रुचका. 'जे जे ठाय समांस। तेथ आहाच जोडे घाउस।' –ज्ञा ६.२२१. २ खाणारा भक्षण करण्यास उत्सुक. –ज्ञा ६.२२१. ३ खाण्याची इच्छा. [ सं. घस्=खाणें; ग्रस्=गिळणें ]

**घाऊक**—वि. १ ठोकळ; भरींव; मोठी ( रक्कम; संख्या, आंकडा) याच्या उलट किरकोळ; बारीकसारीक. 'घाऊक घाऊक रकमा काय असतील त्या सांग, किरकोळ मग पाहूं.' २ सगळा; सर्वच्या सर्व; अशेष, उक्ता; उधडा. ३ ठोकविक्रीनें; एकठोक, ठोकबंद 'घाऊक माल घेतला तर स्वस्त मिळेल.' [ घाव+ऊक प्रत्यय ]

**घाऊल**—न नफा; फायदा; किफायत ( विप्र. ) गाऊल; गाऊल पहा.

**घाए**—पु. घाव; घाय; वार. घाय पहा. 'तंव चेंदु भणें हो हो राहें। माझा घाए साहें॥' –शिशु १०७१. **घाएवटणें**—अक्रि जखमी होणें; जखमेनें जर्जर होणें; घायवटणें पहा. 'कटाक्षीं मन घाएवटें।'–शिशु ६६६.

**घांग**—स्त्री. १ दखलगिरि; सावधानता; जाणीव. ( क्रि० ठेवणें; राखणें; धरणें; असणें; राहणें ) 'त्याला मेजवानीची घांगही नव्हती.'–अस्तंभा १३५. २ आठवण; आठवणूक; सई; स्मरण; याद. ( क्रि० येणें; आठवणें ). ( दोन्ही अर्थी सामान्यतः अकरण रूपीं प्रयोग करतात. )

**घांग**—वि. ( कों. ) १ कांहीं एका गोष्टीविषयीं अंगीं सामर्थ्य असुन रडण्याचा स्वभाव असलेला ( मनुष्य ); रडगा; कोणी पैसा मागितला असतांना, काम करावयास सांगितलें असतां नाकारणारा, माघार घेणारा; रडगाणें गाणारा. २ रडवा; थोड्याश्या इजेनें मोठी आरडाओरड करणारा. ०चाळे–पुअव. १ ( पैसा देण्याविषयीं, काम करण्याविषयीं असमर्थतेबद्दल ) कुरकूर; पिरपीर, रडगाणें. २ ( थोडासा धक्का लागल्यानें दुबळ्या, अशक्त प्राण्याचें ) केंविलवाणें व मोठ्यानें आक्रोश करणें; किंकाळी. [ घांग+चाळे ]

**घागर**—स्त्री ( तांबें, पितळ, माती इ०काचें ) पाणी ठेवण्याचें आवळ गळ्याचें भांडें; घड्या पेक्षां मोठ्या आकाराचें पाणी ठेवण्याचें भांडें; मोठी कळशी; घट. 'अमूप अमृत फल क्षीर घागरी। दध्योदनेसीं वायन करी।'–भारा, बाल १२.२३. 'घागरीची तहान पण घोटानेंच भागवायाला हवी.'–जन्मरहस्य २४. १ ( दारूकाम ) एक दारूचें झाड; खापराची घागर घेऊन तिच्या मुखाला जाळीदार भोकें पाडून त्या प्रत्येक भोंकाच्या तोंडाशीं बाण ठेवतात. तोंडावर भुईनळा ठेवून नळा दाखवितात. मग झाड उडतें व सभोंवार तारे व बाण उडतात. [ सं. गर्गरी; प्रा. गग्गरी; घग्घर; सिं. घागरि ] ( वाप्र ) **घागर उद्वणें**–महालक्ष्मीच्या दिवशीं रात्रीं बायका शेगडीवर ऊद घालून वर घागर धरतात ती क्रिया –बदलापूर २१५. –री **फुंकणें**–आश्विन शुद्ध अष्टमीच्या रात्रीं महालक्ष्मीची स्थापना करून तिची पूजा करून तिच्यापुढें स्त्रिया घागरींत तोंडाचा फुंकर घालून घुमतात ती क्रिया. **पालथ्या घागरीवर पाणी**–( पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यास तें तिच्या आत न जातां वाहून जातें यावरून ) निरुपयोगी, निरर्थक उपदेश. जेथें उपदेश ठसत नाहीं तेथें प्रयोग. सामाशब्द– ०**गडचासुभा**–पु पाणी भरण्याची नोकरी; पाणक्याचें काम. ०**गडची सुभेदारी**–स्त्री. पाणक्याची नोकरी **घागराळें**–न. प्रवासांत खोगिराला घागर अडकविण्याकरितां काट्याची व दोऱ्यांची केलेली विशिष्ट रचना, चौकट. [ घागर+आळें ] **घागऱ्याआंबा**–पु आंब्याची एक मोठी जात; घागरी एवढा आंबा. [ घागरी+आंबा ]

**घागरघोळ**—पु. अनेक घुंगरू एकत्र करून केलेलें वाद्यविशेष; चाळ. 'वाजवीत वाघें खेळत खेळ। शिंगें कहाळा घागरघोळ।' –निगा ४२. [ घागरी+घोळ=समुदाय ]

**घांगरणें**—अक्रि. घाबरून, घांगरून जाणें; भयभीत होणें; भांबावणें; गांगरणें.

**घागरपट्टा**—पु. ( गो. ) घागऱ्यांचा केलेला मुलांच्या कंबरेंत घालावयाचा रुप्याचा दागिना; घागऱ्यांचा कमरपटा, करगोटा. [ घागरी+पट्टा ]

**घाग(गु)रमाळ–ळा**—स्त्री १ ( हत्ती, बैल इ० प्राण्यांच्या गळ्यात घालावयाची ) घुंगुरांची माळ; गळघांटी. 'कीं ते कृष्णपक्षींची रजनी। चंद्रशोभा हरेली दशनी। घागरमाळांचे मणी। तारागणें कीं॥' –कथा ४.९.४१. 'शिवराम शिंग घेऊन येतो व भोंतद्दारास घागरमाळा वाजवावयाची खुणेनें आज्ञा देतो.' –बाळ २.१५५. २ ( सामा. ) मोठी घागऱ्यांची माळ. 'मखरीं लोंबती घागरमाळा।' –अमृतसुदामचरित्र पृ. १४. [ घागरी+माळ ]

**घागरा**—पु. गुजराथी, मारवाडी स्त्रियांचें परकरासारखें नेसावयाचें घेरेदार, घोळदार वस्त्र; लहेंगा [ दे. प्रा. घग्घर, गाग्गर; हिं घघरा; गु. घाघरो; सिं. घघिरो ] **घागरेवाली**–स्त्री. हायलंडर पलटण; या पलटणींतील शिपाई कमरेला लहंग्यासारखें वस्त्र गुंडाळतात. –सन १८५७. पृ. ११२. [ हिं. घागरा पलटन ]

**घागरा**—पु. १ मुलांचा खेळावयाचा एक प्रकारचा खुळखुळा. २ एक वनस्पतिविशेष. हिचें बी मोठें व भरदार असुन वरील कवच मऊ असतें. [ ध्व. सं. घर्घरा का. गग्गर ]

**घागरी**—स्त्री घट; घागर पहा. 'परी तो न सांडीच घागरी। अमृताची॥' –कथा ४.१४.१८८. [ सं. गर्गरी; प्रा. गग्गरी ]

**घागरी**—स्त्री. १ ( लहान मुलांच्या करगोट्यास असलेले; नर्तिकेच्या पायांतील चाळांत असलेले ) घुंगरू; घांटी; क्षुद्रघंटिका;

एक अलंकार 'झुणझुणशब्दा करिति घागऱ्या तालावरती गाती।' -कम ४ १०९ २ (कों) घागरा नावाची वनस्पति, तिचें फळ [स घर्घरी दा गग्गर] घागरा-घागऱ्या गाचीड-पु मोठ्या जातीचा गोचीड [घागरी+गोचीड] घागऱ्यादेवी-स्त्री अव (रोग) देवींचा एक प्रकार ह्या देवी घागऱ्याएवढ्या मोठ्या असतात देवी शब्द पहा [घागरी+देवी] घागऱ्यांचा कर्नाटकी पट्टा-पु स्त्रियांचा एक कमर पट्ट्यासारखा दागिना हा चांदीचा अथवा सोन्याचा असतो याला पुढें घाग-या असतात ह्याचे दोन-तीन रचनाविशेष आहेत घागऱ्याची गरसोळी-स्त्री (व) ठुशी घागऱ्याचे वाळे-पु अव घागऱ्या लावलेले वाळे 'नाकांत अद्यापि कांहीं नव्हतें हातात बांगडी दखल नव्हती, पायांत मात्र चांदीचे घागऱ्याचे वाळे होते' -मुद ५

**घागऱ्याघोळ**—पु १ मनाची उडालेली त्रेधा गोंधळ, घाबरगुंडी, 'ह्या मुलानें माझ्या जिवाचा घागऱ्याघोळ केला' २ (कामाची, वस्तूची, पदार्थांची) अव्यवस्था, गोंधळ, घोटाळा, अस्ताव्यस्त स्थिति [घागरी+घोळ=घोटाळा]

**घागरें**—न कणकहाचें बुड ज्या लाकडाच्या तुकड्याच्या खांवणींत बसवलेलें असतें तें लाकूड, भोंवरी

**घाँगा**—पु (गो) (मुलांच्या भाषेत) बागुलबोवा

**घागावणें, घागाइणें**—अक्रि (व) भीतीनें गांगरून जाणें गोंधळून जाणें सुचेनासें होणें, भांबावणें, घागरणें 'तैसीच घागाइली तिये एकें वेळे।' -भाए ३२२

**घागुरी**—स्त्री (साष्टीकोळी) घागरी, घुंगरू 'तिनें बांधिल्या पायाला घागुऱ्या।' -मसाप १ ९ १९

**घागूड**—पु (कों) फुलतील गड्डा, कंद (ज्याला पाकळ्या फुटलल्या असतात तो) (कमळाच्या) पाकळ्या गळाल्या नतर राहिलेला गड्डा, दांडा

**घागेर**—स्त्री (खा) घागर

**घाघर**—स्त्री (प्र) घागर पहा

**घाघरणें**—अक्रि घागरणें पहा

**घाघरा**—पु (प्र) घागरा पहा [गु घाघरो]

**घोंघा**—पु (गो) पाणलोट उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह [ध्व घोघो]

**घाघु(घो)सणें घागोसणें**—उक्रि १ घासाघीस करणें २ बारकाईनें शोधणें, चिकित्सापूर्वक छाननी करणें 'जें मना आकळितां चुकाडे। घाघुसितां बुद्धी नातुडे।' -ज्ञा ५ ९७

**घाची**—पु तेली [दे प्रा घचिय गु घाची का गाण=तेलाचा घाणा गाणिग=तेली दे प्रा घाण, म घाणा]

**घा(घां)ट**—स्त्री १ घसा, घशाचा बाहेरील भाग, घांटी, कंठ, कंठमणि 'गेलें घांटीं झालें माती' २ गळा, कंठ, आवाज [स घांट] (वाप्र) घांटी फुटणें-१ (मुलाच्या) आवाजातील कोमलता जाऊन तो मोठा, प्रौढ होणें, हें (मुलगा) वयात येण्याचें लक्षण आहे 'घांटी फुटला =बदसूर झाला २ (गाण्याचा) आवाज घोगरा होणें, स्वरभेद होणें, स्वर बिघडणें, आवाज चिरकणें बसणें, घांटीं शेंदूर ओतणें-(पेय खाद्य पदार्थांत मिसळून) शेंदूर गिळावयाला, खायला लावणें, प्रतिपक्षीय गवयाचा कंठ बिघडविण्याकरिता ही युक्ति करतात सामाशब्द- ०कार-स्त्री गळ्याचा भाग नरडी 'असें कुभांड करून दांड होऊन भाड धरिसी घाटकोर।' -होला ३७ [घाट+कोर=कड, बाजू] ०रोग-पु गुरांना घशात होणारा एक रोग [घाट+रोग] ०सर्प-पु घशात होणारा एक रोग, घटसर्प हा कफदोषामुळें होतो, ह्यानें गळ्यांत लांबट व जाड अशी सूज उत्पन्न होऊन अन्नमार्ग बंद होतो इ डिफ्थेरिया

**घांट**—स्त्री १ घंटा, जनावराच्या गळ्यातील घंटा 'वाजती शंख घांटा। मी जाते वैकुंठा।' -मसाप २ १ २२ २ (उप) गुप्त गोष्ट सर्वांना सांगत सुटणारा, चोंबडा, चहाडखोर माणूस, बोंबल्यागणेश, जिभेचा, कानाचा हलका, छुतरा, गजघंटा [स घंटा] (वाप्र) घांटेखालीं उभें राहणें-(शपथेचा एक प्रकार) शपथ घेणें सामाशब्द- ०कार-वि (गो) घंटा ओतणारा शिल्पकार [घांट+करणें] ०पट्टा-पान-पुन ज्याला लहान लहान घंटा, घुंगरू अडकविलेले असतात किंवा एकच लोखंडी पितळी घांट, बांधलेली असते असा बैलाच्या गळ्यात बांधण्याचा चामड्याचा, गोणपाटाचा पट्टा [घांट+पट्टा-पान] ०पारधी-पु घंटानादानें हरिणास फसवून, त्यास फांसात अडकविणारा पारधी 'घांटपारधी पाश पसरी। त्यावरी तो मृगांत धरी।' -एभा २६ २३६ [घांट+पारधी] ०सर-पु १ बैलाच्या गळ्यातील लहान लहान घुंगरांची, घंटांची माळ घुंगुरमाळ २ बैलाच्या गळ्यांतील घुंगुरमाळ जींत ओविलेली असते ती दोरी [घांट+सर=दोरा माळ]

**घाट**—पु १ देश एकमेकापासून भिन्न करणारी पर्वताची रांग, दोन देशाच्या सरहद्दीवरील पर्वताची रांग २ (विशेष अर्थानें) सह्याद्रीची रांग ३ डोंगर ओलांडून जावयाचा रस्ता, डोंगरावरील वाट खिंडीतील रस्ता उ० खंडाळ्याचा घाट, कात्रजचा घाट डोंगरावरील अडचणीची व बिकट वाट उ० रुंद तोंडीचा घाट 'तेहवळीं कुचपर्वताचा घाटीं। ओळघता होळे आले आयतुटीं।' -शिशु ५९० 'लष्कर चाल पेणोपेणीं घाटा हाडत उतरलें।' -ऐपो ८१ ४ नदी तलाव इ० काठच्या काठावर नावेतून उतरण्या करिता नावेंत बसण्याकरितां बांधलेला

**घाउस, घाऊस**—पु १ घास; लचका. 'जे जे ठाय समांस । तेथ आहाच जोडे घाउस ।' –ज्ञा ६.२३१. २ खाणारा भक्षण करण्यास उत्सुक. –ज्ञा ६.२३१. ३ खाण्याची इच्छा. [ सं. घस्=खाणें; ग्रस्=गिळणें ]

**घाऊक**—वि. १ ठोकळ; भरीव; मोठी ( रक्कम; संख्या, आकडा) याच्या उलट किरकोळ; बारीकसारीक. 'घाऊक घाऊक रकमा काय असतील त्या सांग, किरकोळ मग पाहूं ' २ सगळा; सर्वच्या सर्व, अशेष; उक्ता; उधडा. ३ ठोकविक्रीनें; एकठोक; ठोक बंद 'घाऊक माल घेतला तर स्वस्त मिळेल.' [ घाव+ऊक प्रत्यय]

**घाऊल**—न. नफा; फायदा; किफायत ( विप्र. ) गाऊल; गाऊल पहा.

**घाप**—पु घाव; घाय; वार. घाय पहा. 'तंव चेद्य भणे हो हो राहें । माझा घाए साहें ॥' –शिशु १०७१. **घापवटणें**–अक्रि जखमी होणें; जखमेनें जर्जर होणें, घायवटणें पहा. 'कटाक्षीं मन घाएवटे ।'–शिशु ६६६.

**घांग**—स्त्री. १ दखलगिरि; सावधानता; जाणीव. (क्रि० ठेवणें; गसणें; धरणें; असणें; राहणें ). 'त्याला मेजवानीची घांगही नव्हती.'–अस्तंभा १३५. २ आठवण, आठवणूक; सई; स्मरण; याद. ( क्रि० येणें; आठवणें ) ( दोन्ही अर्थी सामान्यतः अकरण रूपीं प्रयोग करतात.)

**घांग**—वि. (कों.) १ कांहीं एका गोष्टीविषयीं अंगीं सामर्थ्य असून रडण्याचा स्वभाव असलेला ( मनुष्य ); रडया; कोणी पैसा मागितला असताना, काम करावयास सांगितलें असता नाकारणारा, माघार घेणारा; रडगाणें गाणारा. २ रडवा, थोडयाश्या इजेनें मोठी आरडाओरड करणारा. **०चाळे**–पुअव. १ ( पैसा देण्याविषयीं, काम करण्याविषयीं अक्षमतेबद्दल ) कुरकूर; पिरपीर; रडगाणें. २ ( थोडासा धक्का लागल्यानें दुबळ्या, अशक्त प्राण्याचें ) केविलवाणें व मोठ्यानें आक्रोश करणें; किंकाळी. [ घांग+चाळे ]

**घागर**—स्त्री ( तांबें, पितळ, माती इ०कांचें ) पाणी ठेवण्याचें आंवळ गळ्याचें भांडें; घडया पेक्षां मोठया आकाराचें पाणी ठेवण्याचें भांडें; मोठी कळशी; घट. 'अमूप अमृत फल क्षीर घागरी । दुर्योदनेसीं वायन करी ।'–भारा, बाल १२.२३. 'घागरीची तहान पण घोटानेंच भागवायाला हवी.'–जन्मरहस्य २४. १ ( दारूकाम ) एक दारूचें झाड; खापराची घागर घेऊन तिच्या बुडाला जाळीदार भोकें पाडून त्या प्रत्येक भोंकाच्या तोंडाशीं बाण ठेवतात. तोंडावर भुईनळा ठेवून नळा दाखवितात. वर झाड उडतें व सभोंवार तारे व बाण उडतात. [ सं. गर्गरी; प्रा. गग्गरी; घग्घर; सिं. घाघरि ] ( बाप्र ) **घागर उदघणें-महा**लक्ष्मीच्या दिवशीं रात्रीं बायका दोगडीवर कद घालून वर घागर धरतात ती क्रिया –बदलापूर २१५. **–री फुंकणें**–आश्विन शुद्ध अष्टमीच्या रात्रीं महालक्ष्मीची स्थापना करून तिची पूजा करून तिच्यापुढें स्त्रिया घागरींत तोंडाचा फुंकर घालून घुमतात ती क्रिया. **पालथ्या घागरीवर पाणी**–( पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यास तें तिच्या आत न जातां वाहून जातें यावरून ) निष्पयोगी, निरर्थक उपदेश जेथें उपदेश ठसत नाहीं तेथें प्रयोग. सामाशब्द– **०गडचासुभा**–पु पाणी भरण्याची नोकरी; पाणक्याचें काम. **०गडची सुभेदारी**–स्त्री. पाणक्याची नोकरी **घागराळें**–न. प्रवासांत खोगिराला घागर अडकविण्याकरितां काठ्यांची व दोऱ्यांची केलेली विशिष्ट रचना, चौकट. [ घागर+आळें ] **घागऱ्याआंबा**–पु आंब्याची एक मोठी जात; घागरी एवढा आंबा. [ घागरी+आंबा ]

**घागरघोळ**—पु. अनेक घुंगरू एकत्र करून केलेलें वाद्य विशेष; चाळ. 'वाजवीत वाद्यें खेळत खळ । शिंगें कहाळा घागरघोळ ।'–निगा ४२. [ घागरी+घोळ=समुदाय ]

**घांगरणें**—अक्रि. घाबरून, घांगरून जाणें; भयभीत होणें; भांबावणें; गांगरणें.

**घागरपट्टा**—पु. (गो.) घागऱ्यांचा केलेला, मुलांच्या कंबरेंत घालावयाचा रुप्याचा दागिना; घागऱ्यांचा कमरपटा, करगोटा. [ घागरी+पट्टा ]

**घाग(गु)रमाळ-ळा**—स्त्री. १ ( हत्ती, बैल इ० प्राण्यांच्या गळ्यांत घालावयाची ) घुंगुरांची माळ; गळघांटी. 'कीं ते कृष्णपक्षींची रजनी । चंद्रशोभा उडेली दशनी । घागरमाळेचे मणी । तारागणें कीं ॥'–कथा ४.६.४१. 'शिवराम शिंग घेऊन येतो व मोतद्दारास घागरमाळा वाजवावयाची खुणेनें आज्ञा देतो.'–वाळ २.१५५. २ (सामा.) मोठी घागऱ्यांची माळ. 'मखरीं लोंबती घागरमाळा ।'–अमृतसुदामचरित्र पृ. १४. [ घागरी+माळ ]

**घागरा**—पु. गुजराथी, मारवाडी स्त्रियांचें परकरासारखें नेसावयाचें घेरेदार, घोळदार वस्त्र; लहेंगा [ दे. प्रा. घग्घर, गागर; हिं घघरा, गु. घाघरो; सिं. घघिरो ] **घागरेवाली**–स्त्री. हायलंडर पलटण; या पलटणींतील शिपाई कमरेला लहंग्यासारखें वस्त्र गुंडाळतात. –सन १८५७. पृ. १९२. [ हिं. घागरा पल्टन ]

**घागरा**—पु १ मुलांचा खेळावयाचा एक प्रकारचा खुळखुळा २ एक वनस्पतिविशेष. हिचें बी मोठें व भरदार असून वरील कवच मऊ असतें. [ ध्व. सं. घर्घरा का. गग्गर ]

**घागरी**—स्त्री घट, घागर पहा. 'परी सो न सांडीच घागरी । अमृताची ॥'–कथा ४.१४.१८८. [ सं. गर्गरी; प्रा. गग्गरी ]

**घागरी**—स्त्री. १ ( लहान मुलांच्या करगोटयास असलेले; नर्तिकेच्या पायांतील चाळांत असलेले ) घुंगरू; घांटी; क्षुद्रघंटिका;

एक अलंकार. 'झुणझुणशब्दा करिति घागऱ्या तालावरती गाती ।' –कमं ४.१०९. २ (कों.) घागरा नांवाची वनस्पति; तिचें फळ. [सं. घर्घरी. का. गग्गर] **घागरा-घागऱ्या गोचीड**–पु मोठ्या जातीचा गोचीड. [घागरी+गोचीड] **घागऱ्यादेवी**–स्त्री. अव. (रोग) देवींचा एक प्रकार. ह्या देवी घागऱ्यांएवढ्या मोठ्या असतात. देवी शब्द पहा. [घागरी+देवी] **घागऱ्यांचा कर्नाटकी पट्टा**–पु. स्त्रियाचा एक कमरपट्यासारखा दागिना. हा चांदीचा अयवा सोन्याचा असतो. याला पुढें घागऱ्या असतात. ह्याचे दोन-तीन रचनाविशेष आहेत. **घागऱ्यांची गरसोळी**–स्त्री. (व.) ठुशी. **घागऱ्यांचे वाळे**–पु.अव. घागऱ्या लावलेले वाळे. 'नाकांत अद्यापि कांहीं नव्हतें, हातात बांगडी देखील नव्हती, पायांत मात्र चांदीचे घागऱ्याचे वाळे होते.' –मुद्रे ५.

**घागऱ्याघोळ**—पु १ मनाची उडालेली त्रेधा, गोंधळ; घाबरगुंडी; 'ह्या मुलानें माझ्या जिवाचा घागऱ्याघोळ केला.' २ (कामांची, वस्तूंची, पदार्थांची) अव्यवस्था; गोंधळ; ...था; अस्ताव्यस्त स्थिति. [घागरी+घोळ=घोंटाळा]

...**रें**—न. कणकडाचें बूड ज्या लांकडाच्या तुकड्यांच्या ...त बसवलेलें असतें तें लांकूड, भोंवरी.

...**गा**—पु. (गो.) (मुलांच्या भाषेंत) बागुलबोवा.

...**गावणें, घागाइणें**—अक्रि. (व.) भीतीनें गांगरून ...गोंधळून जाणें; सुचेनासें होणें; मांबावणें; घांगरणें. 'तैसीच ...री तियें एकें वेळें ।' –भाए ३२२.

...**गुरी**—स्त्री. (साष्टीकोळी) घागरी; घुंगरूं. 'तिनें ...या पायाला घागुऱ्या ।' –मसाप १.९.१९.

...**गूड**—पु. (कों.) फुलांतील गड्डा, कंद (ज्याला पाकळ्या ...या असतात तो); (कमळाच्या) पाकळ्या गळाल्या- राहिलेला गड्डा, दांडा.

**घागेर**—स्त्री. (खा.) घागर.

**घाघर**—स्त्री. (प्र.) घागर पहा.

**घांघरणें**—अक्रि. घांगरणें पहा.

**घाघरा**—पु. (प्र.) घागरा पहा. [गु. घाघरो]

**घॉघॉ**—पु. (गो.) पाणलोट; उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह. [ध्व. घोघो]

**घांघु(घो)सणें, घांगोसणें**—उक्रि. १ घासाघीस करणें. २ बारकाईनें शोधणें; चिकित्सापूर्वक छाननी करणें. 'जें मना आकळितां कुवाडें । घांघुसितां बुद्धी नातुडे ।' –ज्ञा ५.६७.

**घांची**—पु तेली. [दे. प्रा. घंचिय; गु. घांची, का. गाण=तेलाचा घाणा; गाणिग=तेली. दे. प्रा. घाण; म. घाणा]

**घा(घां)ट**—स्त्री. १ घसा; घशाचा बाहेरील भाग; घांटी; कंठ, कंठमणि. 'गेलें घांटीं झालें माती.' २ गळा; कंठ; आवाज. [सं. घाट] (वाप्र.) **घांटी फुटणें**–१ (मुलाच्या) आवाजांतील कोमलता जाऊन तो मोठा, प्रौढ होणें; हें (मुलगा) वयांत येण्याचें लक्षण आहे. 'घांटी फुटला'=बदसुर झाला. २ (गाणाऱ्याचा) आवाज घोगरा होणें; स्वरभेद होणें; स्वर बिघडणें; आवाज चिरकणें, बसणें; **घांटीं शेंदूर ओतणें**–(पेय, खाद्यपदार्थांत मिसळून) शेंदूर गिळावयाला, खायला लावणें; प्रतिपक्षीय गवयाचा कंठ बिघडविण्याकरितां ही युक्ति करतात. सामाशब्द– ०**कोर**–स्त्री. गळ्याचा भाग; नरडी. 'असें कुभांड करून दांड होऊन भांड धरिसी घाटकोर ।' –होला ३७. [घाट+कोर=कड, बाजू] ०**रोग**–पु. गुरांना घशात होणारा एक रोग. [घाट+रोग] ०**सर्प**–पु. घशांत होणारा एक रोग; घटसर्प हा कफदोषामुळें होतो, ह्यानें गळ्यांत लांबट व जाड अशी सूज उत्पन्न होऊन अन्नमार्ग बंद होतो. इं. डिफ्थेरिया

**घांट**—स्त्री. १ घंटा; जनावराच्या गळ्यांतील घंटा. 'वाजती शंख घांटा । मी जातें वैकुंठा ।' –मसाप २.१.२२. २ (उप.) गुप्त गोष्ट सर्वांना सांगत सुटणारा, चोंबडा, चहाडखोर माणूस, बोंबल्यागणेश; जिभेचा, कानाचा हलका; लुतरा; गजघंटा. [सं. घंटा] (वाप्र.) **घांटेखालीं उभें राहणें**–(शपथेचा एक प्रकार) शपथ घेणें सामाशब्द– ०**कार**–वि. (गो.) घंटा ओतणारा शिल्पकार. [घाट+करणें] ०**पट्टा-पान**–पुन. ज्याला लहान लहान घंटा, घुंगरु अडकविलेले असतात, किंवा एकच लोखंडी, पितळी घाट, बांधलेली असते असा बैलाच्या गळ्यांत बांधण्याचा चामड्याचा, गोणपाटाचा पट्टा. [घांट+पट्टा-पान] ०**पारधी**–पु. घंटानादानें हरिणास फसवून, त्यास फासात अडकविणारा पारधी. 'घाटपारधी पाश पसरी । त्यावरी तो मृगातें धरी ।' –एभा २६.२३६. [घाट+पारधी] ०**सर**–पु. १ बैलाच्या गळ्यातील लहान लहान घुंगराची, घटाची माळ; घुंगुरमाळ. २ बैलाच्या गळ्यांतील घुंगुरमाळ जींत ओंविलेली असते ती दोरी. [घाट+सर=दोरा, माळ]

**घाट**—पु. १ देश एकमेकांपासुन भिन्न करणारी पर्वताची रांग, दोन देशांच्या सरहद्दीवरील पर्वताची रांग. २ (विशेष अर्थानें) सह्याद्रीची रांग. ३ डोंगर ओलांडून जावयाचा रस्ता; डोंगरावरील वाट; खिंडीतील रस्ता. उ० खंडाळ्याचा घाट; कात्रजचा घाट; डोंगरावरील अडचणीची व बिकट वाट. उ० रड तोंडीचा घाट. 'तेव्हवेळीं कुचपर्वताचा घाटीं । ओलघता होळे जाले आयेतुटीं ।' –शिशु ५६०. 'लष्कर चाल पेणोपेणीं घाटा झाडत उतरले ।' –ऐपो ८१. ४ नदी, तलाव इ० कांच्या कांठावर नावेंतून उतरण्या करितां, नावेंत बसण्याकरितां बांधलेला

घाउस, घाऊस—पु १ घात; लचका. 'जे जे ठाय समांस। तेथ माहाच ओढे घाउस।'—ज्ञा ६.२३१. २ खाणारा ग्रहण करण्यास उत्सुक. —ज्ञा ६.२३१. ३ खाण्याची इच्छा. [सं. घस्=खाणें; ग्ल्=गिळणें]

घाऊक—वि. १ ठोकळ; भरीव, मोठी (रक्कम, संख्या, आकडा) याच्या उलट किरकोळ, बारीकसारीक. 'घाऊक घाऊक रकमा काय असतील त्या सांग, किरकोळ मग पाहूं' २ सगळा; सर्वच्या सर्व; अशेष, उक्ता; उधडा. ३ ठोकविक्रीनें; एकठोक, ठोकचंद 'घाऊक माल घेतला तर स्वस्त मिळेल.' [घाव+ऊक प्रत्यय]

घाऊल—न नफा; फायदा; किफायत (विप्र.) गाऊल, गाऊल पहा.

घाप—पु घाव; घाय, वार. घाय पहा. 'तंव चेतु गेणे हो हो राहे। माझा घाए साहे॥' —शिशु १०७१ घापवटणें—अक्रि जखमी होणें, जखमेनें जर्जर होणें, घायवटणें पहा. 'कटाक्षीं मन घाएवटें।'—शिशु ६६६.

घांग—स्त्री. १ दखलगिरि; सावधानता; जाणीव. (क्रि० ठेवणें, गसणें; धरणें; असणें; राहणें). 'त्याला मेजवानीची घांगही नव्हती.'—अस्तंभा १३५ २ आठवण, आठवणूक, सई; स्मरण; याद (क्रि० येणें; आठवणें) (दोन्ही अर्थी सामान्यतः अकरण रूपीं प्रयोग करतात)

घांग—वि (कों.) १ कांहीं एका गोष्टीविषयीं अंगीं सामर्थ्य असून रडण्याचा स्वभाव असलेला (मनुष्य), रडया; कोणी पैसा मागितला असतांना, काम करावयास सांगितलें असता नाकारणारा, माघार घेणारा, रडगाणें गाणारा. २ रडवा, थोडयाश्या इजेनें मोठी आरडाओरड करणारा. ०चाळे—पुअव. १ (पैसा देण्याविषयीं, काम करण्याविषयीं अक्षमतेबद्दल) कुरकूर, पिरपीर, रडगाणें. २ (थोडासा धक्का लागल्यानें दुबळ्या, अशक्त प्राण्याचें) केविलवाणें व मोठयानें आक्रोश करणें; किंकाळी. [घांग+चाळे]

घागर—स्त्री (तांबें, पितळ, माती इ०काचें) पाणी ठेवण्याचें आवळ गळ्याचें भांडें; पहया पेक्षां मोठया आकाराचें पाणी ठेवण्याचें भांडें; मोठी कळशी, घट. 'अमूप अमृत फल क्षीर घागरी। दध्योदनेसीं वायन करी।'—भारा, बाल १२.२३. 'घागरीची लहान पण घोटानेंच भागवायाला हवी'—जन्मरहस्य २८. १ (दारूकाम) एक दारूचें झाड, खापराची घागर घेऊन तिच्या बुडाला जाळीदार भोकें पाडून त्या प्रत्येक भोकाच्या तोंडाशीं बाण ठेवतात. तोंडावर भुईनळा ठेवून नळा दाखवितात वर झाड उडतें व सभोंवार तारे व बाण उडतात. [स गर्गरी; प्रा गग्गरी, घाघर; सिं घाघरि] (वाप्र) घागर उदवर्णे—महालक्ष्मीच्या दिवशीं रात्रीं बायका शेगडीवर ऊद घालून वर घागर धरतात ती क्रिया —बदलापूर २१५ —री फुंकणें—आश्विन शुद्ध अष्टमीच्या रात्रीं महालक्ष्मीची स्थापना करून तिची पूजा करून तिच्यापुढें स्त्रिया घागरींत तोंडाचा फुंकर घालून घुमतात ती क्रिया. पालथ्या घागरीवर पाणी—(पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यास तें तिच्या आत न जातां बाहून जातें यावरून) निष्फळ प्रयत्न, निरर्थक उपदेश जेथें उपदेश टिकत नाहीं तेथें प्रयोग. सामाशब्द— ०गडचासुभा—पु पाणी भरण्याची नोकरी, पाणक्याचें काम. ०गडचीं सुभेदारी—स्त्री. पाणक्याची नोकरी घागराळें—न. प्रवासांत रोगिराला घागर अडकविण्याकरितां काठयांची व दोऱ्यांची केलेली विशिष्ट रचना, चौकट [घागर+आळें] घागऱ्याआंबा—पु. आंब्याची एक मोठी जात; घागरी एवढा आंबा. [घागरी+आंबा]

घागरघोळ—पु. अनेक घुंगरू एकत्र करून केलेलें वाद्यविशेष; चाळ. 'वाजवीत वाधें खेळत खेळ। शिंगें कहाळा घागरघोळ।' —निगा ४२. [घागरी+घोळ=समुदाय]

घांगरणें—अक्रि घाबरून, घांगरून जाणें, भयभीत होणें, भांबावणें; गांगरणें

घागरपटा—पु. (गो.) घागऱ्यांचा केलेला मुलाच्या कंबरेंत घालावयाचा रुप्याचा दागिना, घागऱ्यांचा कमरपटा, करगोटा. [घागरी+पट्टा]

घाग(गु)रमाळ-ळा—स्त्री १ (हत्ती, बैल इ० प्राण्यांच्या गळयांत घालावयाची) घुगुरांची माळ, गळघाटी. 'कीं ते कृष्णपक्षींची रजनी। चंद्रशोभा उदेली दशनीं। घागरमाळांचे मणी। ता गणें कीं॥' —कथा ४.९ ४१ 'शिवराम शिंग घेऊन येतो व मोतद्दारास घागरमाळा वाजवावयाची खुणेनें आज्ञा देतो.'—बाळ २.१५५. २ (सामा.) मोठी घागऱ्यांची माळ. 'मखरीं लोंबती घागरमाळा।' —अमृतसुदामचरित्र पृ ३४. [घागरी+माळ]

घागरा—पु गुजराथी, मारवाडी स्त्रियांचें परकरासारखें नेसावयाचें घेरेदार, घोळदार वस्त्र, लहेंगा [दे. प्रा. घग्घर, गागर, हिं घघरा, गु. घाघरो, सिं. घघिरो] घागरेवाली—स्त्री. हायलंडर पल्टण, या पल्टणींतील शिपाई कमरेला घागऱ्यासारखें वस्त्र गुंडाळतात —सन १८५७. पृ. १९२. [हिं. घागरा पलटन]

घागरा—पु १ मुलांचा खेळावयाचा एक प्रकारचा खुळखुळा २ एक वनस्पतिविशेष हिचें बी मोठें व भरदार असून वरील कवच मऊ असतें [ब्रा. सं. घर्घरा का. गग्गर]

घागरी—स्त्री घट, घागर पहा. 'परी तो न साडीच घागरी। अमृताची॥' —कथा ४ १४.१८८. [सं. गर्गरी, प्रा. गग्गरी]

घागरी—स्त्री. १ (लहान मुलांच्या करगोटयास असलेले, नर्तिकेच्या पायांतील चाळांत असलेले) घुंगरू, घाटी, क्षुद्रघंटिका;

एक अलंकार 'झुणझुणशब्दा करिति घागऱ्या तालावरती गाती।' -कम ४ १०९ २ (कों) घागरा नावाची वनस्पति, तिचें फळ [स घर्घरी का गग्गर] घागरा-घागऱ्या गोचीड-पु मोठ्या जातीचा गोचीड [घागरी+गोचीड] घागऱ्यादेवी-स्त्री अव (रोग) देवींचा एक प्रकार ह्या देवी घ.ग-याएवढ्या मोठ्या असतात देवी शब्द पहा [घागरी+देवी] घागऱ्यांचा कर्नाटकी पट्टा-पु स्त्रियांचा एक कमर पट्ट्यासारखा दागिना हा चांदीचा अथवा सोन्याचा असतो याला पुढें घागऱ्या असतात ह्याचे दोन-तीन रचनाविशेष आहेत घागऱ्यांचा गरसोळी-स्त्री (व) तुशी घागऱ्यांचे वाळे-पु अव घागऱ्या लावलेले वाळे 'नाकात अद्यापि काहीं नव्हतें हातात बागडी देखील नव्हती, पायात मात्र चांदीचे घागऱ्याचे वाळे होते' -सुद ५

घागऱ्याघोळ—पु १ मनाची उडालेली त्रेधा, गोंधळ, घाबरगुंडी, 'ह्या मुलानें माझ्या जिवाचा घागऱ्याघोळ केला' २ (कामाची, वस्तूची, पदार्थाची) अव्यवस्था, गोंधळ, घोटाळा, अस्ताव्यस्त स्थिति [घागरी+घोळ=घोटाळा]

घागरें—न कणेकडाचें बुड ज्या लाकडाच्या तुकड्याच्या खोचणींत बसवलेलें असतें तें लाकूड, भोवरी

घाँगा—पु (गो) (मुलांच्या भाषेत) बागुलबोवा

घागावणें, घागाइणें—अकि (व) भीतीनें गांगरून जाणें, गोंधळून जाणें, सुचेनासें होणें, भांबावणें, घागरणें 'तैशीच घागाइली तियें एकें वेळे।' -भाए ३२२

घागुरी—स्त्री (साष्टीकोळी) घागरी, घुंगरू 'तिनें बांधिल्या पायाला घागुऱ्या।' -मसाप १ ९ १९

घागूड—पु (कों) फुलांतील गड्डा, कंद (ज्याला पाकळ्या फुटलेल्या असतात तो), (कमळाच्या) पाकळ्या गळाल्या नंतर राहिलेला गड्डा, दांडा

घागेर—स्त्री (खा) घागर

घाघर—स्त्री (प्र) घागर पहा

घाघरणें—अकि घागरणें पहा

घाघरा—पु (प्र) घागरा पहा [गु घाघरो]

घाँघों—पु (गो) पाणलोट, उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह [ध्व. घोघो]

घाघु(घो)सणें घागोसणें—उकि १ घासाघीस करणें २ बारकाईनें शोधणें, चिकित्सापूर्वक छाननी करणें 'जें मना आक ळिता बुडाले। घाघुसितां बुद्धी नातुडे।' -ज्ञा ५ ६७

घाची—पु तेली [दे प्रा घंचिय, गु घांची, का गाण=तेलाचा घाणा, गाणिग=तेली दे प्रा घाण, म घाणा]

घा(घां)ट—स्त्री १ घसा, घशाचा बाहेरील भाग, घाटी, कंठ, कंठमणि 'गेलें घाटीं झालें माती' २ गळा, कंठ, आवाज [स घाट] (वाप्र) घांटी फुटणें-१ (मुलाच्या) आवा जातील कोमलता जाऊन तो मोठा, प्रौढ होणें, हें (मुलगा) वयात येण्याचें लक्षण आहे 'घांटी फुटली'=वदसूर झाला २ (गाणाऱ्याचा) आवाज घोगरा होणें, स्वरभेद होणें, स्वर बिघडणें, आवाज चिरकणें, बसणें, घांटीं शेंदूर ओतणें-(पेय खाद्य पदार्थात मिसळून) शेंदूर गिळावयाला, खायला लावणें, प्रति पक्षीय गवयाचा कंठ बिघडविण्याकरिता ही युक्ति करतात सामा शब्द- ०कोर-स्त्री गळ्याचा भाग नरडी 'अमें कुभांड करून दाड होऊन भांड धरिसी घाटकोर।' -होला ३७ [घाट+कोर=कड, बाजू] ०रोग-पु गुरांना घशात होणारा एक रोग [घांट+रोग] ०सर्प-पु घशात होणारा एक रोग, घटसर्प हा कफदोषा मुळें होतो, ह्यानें गळ्यात लांबट व जाड अशी सूज उत्पन्न होऊन अन्नमार्ग बंद होतो इ डिफ्थेरिया

घांट—स्त्री १ घंटा, जनावराच्या गळ्यातील घंटा 'वाजती शंख घांटा। मी जाते वैकुंठा।' -मसाप २ १ २२ २ (उप) गुप्त गोष्ट सर्वांना सांगत सुटणारा, चोंबडा, चहाडखोर माणूस, बोंबल्यागणेश, जिभेचा, कानाचा हलका, लुतरा, गजघंटा [स घंटा] (वाप्र) घांटेखालीं उभें राहणें-(शपथेचा एक प्रकार) शपथ घेणें सामाशब्द- ०कार-वि (गो) घंटा ओतणारा शिल्प कार [घांट+करणें] ०पट्टा-पान-पुन ज्याला ल्हान ल्हान घंटा, घुंगरु अडकविलेले असतात, किंवा एकच लोखंडी, पितळी घांट, बांधलेली असते असा बैलाच्या गळ्यात बांधण्याचा चाम ड्याचा, गोणपाटाचा पट्टा [घांट+पट्टा-पान] ०पारधी-पु घंटानादानें हरिणास फसवून, त्यास फासात अडकविणारा पारधी 'घाटपारधी पाश पसरी। त्यावरी तो मृगांत धरी।' -एभा २६ २३६ [घाट+पारधी] ०सर-पु १ बैलाच्या गळ्यातील ल्हान ल्हान घुंगरांची, घंटांची माळ, घुंगुरमाळ २ बैलाच्या गळ्यातील घुंगुरमाळ जींत ओविलेली असते ती दोरी [घांट+सर=दोरा, माळ]

घाट—पु १ देश एकमेकांपासून भिन्न करणारी पर्वताची रांग दोन देशांच्या सरहद्दीवरील पर्वताची रांग २ (विशेष अर्थानें) सह्याद्रीची रांग ३ डोंगर ओलांडून जावयाचा रस्ता, डोंगरावरील वाट खिंडीतील रस्ता उ० खंडाळ्याचा घाट, कात्रजचा घाट डोंगरावरील अडचणीची व बिकट वाट उ० रुद्र तोंडीचा घाट 'तेहवळीं कुचपर्वताचां घाटीं। ओळघतां डोळे जाले आयतुटीं।' -शिशु ५६० 'लष्कर चाल पेणोपेणीं घाटा हाडत उतरलें।' -ऐपो ८१ ४ नदी तलाव इ० कांच्या काठावर नावेतून उतरण्या करिता, नावेंत बसण्याकरितां बांधलेला

धक्का; नदीकांठीं बांधलेला दगडी धक्का. ५ पाण्याचा उपयोग चांगला करतां यावा म्हणून सोयीची दगडी बांधणी ( विशेषतः पायऱ्यांची ). नदीवरील पायऱ्या. उ० ब्राह्मणघाट; धोबीघाट. 'ज्या नांव तीर्थ वरि घाटहि रम्य आहे ।' –नरहरि गंगारत्नमाला १५९ ( नवनीत पृ. ४३३ ). ६ धरण; बंधारा; धक्का. ' आणि सुटलिया सिंधु जलाचा लोटु । न शके धरूं सैंधवाचा घाटु । ' –ज्ञा ९.१२४. ७ सह्याद्रीच्या रांगेच्या पूर्वेकडील देश, प्रदेश; सह्याद्रीचें पठार ( ज्यास कोंकणसापेक्ष देश हें नांव आहे ). 'आम्ही घांटावरचीं माणसें आहोंत.' –कोरकि ४८३.' सालमजकुरीं घाट चांगला पिकला. ' [ सं. घट्ट=घाट; तुल० का. गट्ट, घट्ट, घाट; हिं. सिं. घाटी=डोंगरांतील रस्ता; बं. घट्ट, घाईट] (वाप्र.) **घाटांत अडवणें–धरणें–मारणें**–( चोर, लुटारू, डोंगरांतील घाटांत किंवा अडचणीच्या मार्गांत वाटसरूंना गांठून त्यांना लुबाडतात त्यावरून ल. ) एखाद्याच्या अडचणीचा फायदा घेणें; एखाद्याला अडचणीच्या वेळीं अडवून धरणें. **०कावला**–पु. घाट चढून आल्यावर घाटावरील चौकीचा द्यावयाचा कर. ' घाट कावला खुशकीवर घाटी . ऐन जिनस वगैरे येईल किंवा जाईल ... त्यास दरवेळीं घ्यावयाचा शिरस्ता रुपये ... ' –मसाप १.२.१८४. [घाट+कौल] **०नाळ**–स्त्री. डोंगरामधील अरुंद रस्ता; वाट; खिंडींतील मार्ग. [ घाट+नाळ=डोंगरांतील अरुंद वाट ] **घाटपांडे–ड्या**–पु. नदीच्या, डोंगराच्या घाटावरील जकात वसूल करणारा अधिकारी; घाटाच्या तोंडाशीं जकात घेणारा अधिकारी; जकातदार; –योमारो २.२३८. [घाट+पांड्या=कारकून] **०पाय–पाया**–पु घाटाचा पायथा. ' घाटपायापासून घाटमाथा कोसभर उंच आहे ' [घाट+पाय] **०बंदी**–स्त्री. १ (डोंगरांतील) घाटांतून कोणी रहदारी करूं नये म्हणून केलेला बंदोबस्त. २ ( नदीचा, डोंगराचा ) घाट बांधण्याकरितां झालेला खर्च वसूल करण्यासाठीं बसविलेला कर, पट्टी [घाट+बंदी=बंदोबस्त, मनाई] **०बुर्डी**–स्त्री ( राजा. ) घाटाचा पायथा, घाटपाया. [ घाट+बुड ] **०माथा**–पु. १ डोंगराचा माथा; डोंगरावरील सर्वांत उच भाग, पठार. २ ( डोंगरांतील ) खिंडींतून जाणारा अरुंद रस्ता; घाटांतील सर्वांत उंच भाग [ घाट+माथा ] **०रखवाली**–पु. घाटावरील रखवालदार, पहारेकरी. **०घळ–ळी**–वि. घाटावरचा; सह्याद्रीच्या पूर्वेकडील मुलुखांतील; देशावरचा ( मनुष्य ) हा शब्द विशेषतः घाटावरील लोकास उद्देशून वापरतात. घटी हा शब्द घाटावरील प्राणी व पदार्थ यांचा वाचक आहे. **०सरी**–स्त्री. पर्वताच्या, रांगेच्या उतरणीचा अगदीं वरचा प्रदेश; घाटमाथ्याच्या आजूबाजूचा प्रदेश, घाटमाथा. ' घाटसरीचे किल्ले प्रायः पाडले ' **घाटोघाट**–क्रिवि. निरनिराळ्या घाटांतून. 'झगझगढ जळतडें घाटोघाट । ' –पेपो २४१. [ घाट द्वि. ]

**घाट**–पु. १ ( भांडी, दागिने इ० कांचा ) आकार; घडण; डौल; ढब; ठेवण; रचना. ' अति तरल विलोकी घाट ते मेखलांचे । ' –सारुह ३.३८. 'चेहेरा घाटानें लांबट होता.' –कोरकि २२. २ (ल.) ( बेत, मसलत, हातीं घेतलेलें काम इ० कांचें ) बाह्य स्वरूप; रागरंग; रंगरूप. 'या मसलतीचा घाट कसा दिसतो?' ३ ( हेतु, योजना इ० कांचा ) आविर्भाव; अवडंबर; उठाव; आव. ' वास्तव त्यानें स्वयंवराचा घाट तिच्या घातला.' –विक ३१ ४ योजना; बनाव; बेत. ' हा घाट जमून आला तर काय बहार होईल ! ' –अस्तंभा ८९. ५ विशिष्ट घडण; आकृति; बैठक; साज. ' लावले समयाचे घाट । केले उदबत्त्यांचे घाट । ' –मसाप २.१.२३. [सं. घट्ट=रचणें, करणें, म. घडणें; गु. घाट; सिं. घाटु ] (वाप्र.) **०घालणें**–बेत योजणें, करणें. सामाशब्द– **०काम**–न. १ (बांधकाम) कोनाडे, कमानी यांवर केलेलें नकशी काम. २ ( सोनारकाम ) सरी, वांकी वगैरे हातांनीं करण्याचें व त्यांस आकार देण्याचें काम. **०घडाव**–वि. कमजास्त. [घाट+घडणें ] **०शुद्ध**–वि सुंदर; सुबक घाटाचा, घडणीचा. **०सूद**–वि. ( अशिष्ट ) घाटशुद्ध पहा. [ घाट+शुद्ध ]

**घाट**–स्त्री १ घाटलेले हरभरे, डाळ. २ ( मिठाई, मिष्टान्न इ० करितां ) शिजविलेलें पीठ. ३ हरभऱ्यावर पडणारा तांबेरा, गोरवा, एक रोग. ( यानें हरभऱ्याचा घाटा भरत नाहीं ) (क्रि० पडणें ). ४ आटघाट, आरवाट पहा. ( घाटणें ]

**घाट**–पु ( कों. नाविक ) आडी व गलबताच्या बाजूच्या फळ्या जोडणारा खिळा. मालवण, गोमांतकाकडे कविला किंवा खिळे या ऐवजीं सुमाचे दोर लावून फळ्या जोडतात.

**घॉट**–न. ( गो. ) एक हलक्या प्रतीचा आंबा.

**घाटण**–न. १ डाळ शिजवून, ती ठेंचून तोंडीलावण्याकरितां केलेलें दाट कालवण; घाट. 'जुना करार, नवा करार, कुराण, झेंदावेस्ता वेद या सर्वांचें आपल्या परिपक्वबुद्धीनें घाटण करून आमचे नूतन सामाजिक जसें आपल्या एकेश्वरास भक्तीं मसालेदार खाद्य देतील तसें आमच्या जुन्या भक्तमंडळीकडून कोठून मिळणार '–नि ८१८.२ (पळी इ०कानें) चेंदामेंदा करणें ठेचणें; घोटणें, ढवळणें; ( क्रि० घालणें ) [ सं घट्टन; म. घाटणें

**घाटणा**–पु (कु.) ( खलाचा ) बत्ता; घोटा; (उखळीचा) वरवंटा; घाटणागुंडा; घाट पहा. घाटवाहनांत डाळ इ० घाटायाचा लांबोडा दगड. [ घाटणें ]

**घाट(टा)णा–घाटणेरा**–पु (लाह्यांसाठी) खापरांत धान्य भाजतांना तें ढवळण्यासाठीं, वर-खालीं करण्यासाठीं एक टोंकास चिंध्या बांधून गोंड केलेली काठी, दांडकें. [ घाटणें ]

**घाटणूक**–स्त्री. (ग्रां.) (एखादी गोष्ट–विशेषतः लग्न संबंधीं ) जुळवून आणण्यासंबंधीचीं बोलणी, घाटाघाट, बोलाचाली; घटवटना; घटणूक. [ घाटणें+णूक प्रत्यय ]

**घाटणें**—उक्रि. १ (पळीनें, दांडयानें, चमच्यानें इ०) ठेंचणें, चेंचणें, घोंटणें; ढवळणें. 'तुज लाविलें स्वतेजें म्यांच कढी–भात–वरण घाटाया।'–मोगदा २.१६. २ आघात, प्रहार करणें; घावटणें; घडवणें; ठोकणें; ताडण करणें. 'वीं तयाही पाठीं। जें वेळीं लोह मांसातें घांटी। ते वेळीं विजयश्रियेच्या पाटीं। एकुचि वैसे॥'–ज्ञा ७.१२. ३ (ल.) त्रास देणें; गांजणें; सतावणें; बेजार करणें; छळणें; जाचणें; कुतरओढ करणें. ४ चर्चा, खल, वाटाघाट करणें; (विषय, गोष्ट) घोळणें. 'पंधरा दिवस तें लग्न घाटत होतें पण सिद्धीस गेलें नाहीं.' ५ (ग्रामा.) एकजीव करणें; मिळविणें. [सं. घट्ट, घट्टन; प्रा. घट्टण, बं. घाँटा= ढवळणें] **घाटून वाटून**–क्रिवि. १ घोटून आणि पिष्ट करून; चेंदामेंदा, चेंचा करून. २ छळून; सतावून; त्रस्त करून (क्रि०खाणें; पिणें; गिळणें) (प्र.) वाटून घाटून. वाटणें पहा.

**घाटणें**—अक्रि. घडणें; होणें. 'जीये दीसी माहाप्रळयो घाटे। उदधीचें वळण फुटे॥'–उपा ११२३. [सं. घट्=घडणें]

**घाटणें**—न. १ घाटण्याकरितां ज्याचा उपयोग करतात तो दांडा, चमचा, पळी; घाटणा; घाटणेरा; ढवळण्याचें साधन. २ घाटण्याची, घोटण्याची, ढवळण्याची क्रिया. ३ (खा. कुंभारी) मडक्याचें बूड घासण्याचें लांकडी हत्यार, साधन, उपकरण. [घाटणें]

**घाट(ड)पण**—न. (गो.) (प्र.) घाडीपण; पिशाच, दैवत प्रसन्न करून घेण्यासाठीं घाडी (मांत्रिक, जादूगार) जो विधि, मंत्रतंत्र करतात तें. [घाडी+पण]

**घाटरूं-रें**—न. १ (बैलाच्या गळ्यांतील) लहान घंटा; लहान टोकरा; २ (निंदार्थी) घांट; घंटा. म्ह० ढोरान ढोर मेलें कुत्र्याच्या गळ्यांत घाटरूं आलें.' =(कुटुंबांतील) मोठीं कर्तीं माणसें जाऊन हलक्यांच्या हातांत अधिकार आला. [घांट= घंटा]

**घाटरूं**–न. १ घांटी; कंठनाल; कंठमणि; नरडें. २ पशूंतील एक रोग; घाटसर्प. [घाट=घसा, कंठनाल]

**घाटलें**—न. १ (राजा.) घांटलें; तांदुळाच्या कण्या व नारळाच्या चवाचें दूध यांची घगसर खीर; गूळ, खोबरें, पाणी व तांदुळाचें पीठ यांची बनविलेली खीर; गुळवण्यास पीठ लावून घाटून केलेलें (कोंकणी) पक्वान्न, खाद्य. यास गोडें असेंहि म्हणतात. २ (दादर) पिठलें. [घाटणें]

**घाटवाई(ह)न**—न. घाटण्याचें थाईन–उखळ; पुरणाची डाळ किंवा इतर पदार्थ घोटण्यासाठीं केलेली लांकडी किंवा दगडी उखळी; ज्यानें घोटावयाचें त्या दगडास घाटणा, घाटणेरा असें म्हणतात. [घाटणें+(कों.) थाईन=थाल; उखळी]

**घाटा**—पु. घाटपांडया; देशाच्या मर्यादेवर जकात वसूल करणारा अधिकारी; यावरून घाटे आडनाव पडलें असावें. –राजवाडे–ग्रंथमाला [सं. घाट; हिं. घाटिया]

**घाटा**—पु. १ घाटणा, घाटणेरा पहा. २ बाजरी, उडीद, मूग इ० शिजवून व वाटून गुरांकरितां केलेलें पौष्टिक खाद्य. 'एकाचिया घाटया टोके। एका फिके उपचार।'–तुगा १८०. ३ जोंधळयाच्या, बाजरीच्या कण्या शिजवून तयार केलेलें खाद्य; भात 'ज्या भक्षिती केवळ ताक घाटा।'–सारुह ३.१६. [घाटणें=ढवळणें, घोंटणें] ०**घुगरी**–स्त्री. (ल.) गरीबाचें अन्न; मीठभाकर. 'घाटा घुगऱ्या कोरड्या भाकरी।'–निगा १००. [घाटा+घुगरी]

**घाटा**—पु. जनावर ओढण्यासाठीं महारांना देण्यांत येणारें धान्य. –गांगा १०५.

**घाटा**—पु. (दे.) हातोडा. (गो.) घाटियो.

**घाटा**—पु. (व.) तोटा; घट; बूड; तूट; घस. 'ज्यांत त्यांत घाटाच येत गेला तर चरितार्थ कसा चालेल?' [घटणें]

**घाँटा**—पु (गो.) पांच हात लांबीचें एक जुनें माप.

**घाँटा**—पु (गो) दाणे, तंबाखू इ०कांत आढळणारा किडा.

**घा(घां)टा, घाटाणा**—पु. ओल्या हरभऱ्याचा टरफलासहित असलेला दाणा. 'घाटा दिसे परी दाणा नाहीं।'–एभा १०.५२७. [सं. घंटा; म. घांट?]

**घाटाई**—स्त्री. एका देवीचें नांव. –खेया

**घाटाघाट**—स्त्री. १ (एखाद्या गोष्टीविषयीं, कार्याविषयीं) बराच वेळ चाललेला खल; वाटाघाट; चर्चा. २ (एखादा पातळ पदार्थ, डाळ इ०) जोरानें, घाईनें घाटण्याची क्रिया. [घाटणें द्वि]

**घाटाणा**—पु. घाटणें, घाटणा–घाटणेरा पहा. [घाटणें]

**घांटी**—स्त्री. घसा; गळा. 'पूर्वी तुम्हां नाहीं भेटी। तरि कां येणें धरिली घांटी।'–गीता २.२२६१. २ घाट; कंठमणि; कंठनाल; नरडें. 'तिणें पसरिताचि जाभाडी। हनुमंत सवेग घाली उडी। आकळितां जिव्हा लडबडी। तव घाटीयुद्धीं रिघाला।'–भारा किष्किंधा १८.६८. [सं. घाट] (वाप्र) ०**फाडून बोलणें**–मोठ्यानें बोलणें; ओरडून, खेकसून बोलणें; जीव खाऊन, तोडून, लाऊन बोलणें; गळा काढून रडणें, ओरडणें; शिरा ताणून बोलणें; गळेफोड करणें. ०**खाजवणें**–(व.) घसा खवखवणें ०**चिप–चीप होणें**–१ गळा, आवाज बसणें. २ गळ्यांतील, घशांतील विकारामुळें गिळतां न येणें. ०**पडणें**–(व.) आवाज बसणें. ०**फुटणें–बदलणें**–१ (मुलगा वयांत आल्यामुळें) आवाज प्रौढ होणें. २ (गाण्यांत) आवाज बसणें; आवाज घोगरा

होणें; कंठ फुटणें. ०घसणें-(मा.) गळ्यांतील विकारामुळें आवाज बिघडणें. ०घर येणें-(व.) जिवावर येणें; दुष्कर वाटणें. 'काम मोठें घाटीवर येतें तिच्या.'

घाटी—स्त्री. लहान घाट; डोंगरांतील लहान चढण; डोंगर चढावयाची बांधलेली वाट. 'आसपासची जमीन डोंगराळ म्हणून अनेक लहान पण दमविणाऱ्या घाटया चढाव्या व उतराव्या लागत.' —विवि ८.१.७. 'सूर्य वर येतो आहे तों कुंचेलीची घाटी चढूं लागले.' —सह्याद्री १७१. [घाट=डोंगरांतील रस्ता]

घाटी —वि. घाटावरचा; देशावरचा; सह्याद्रीवरच्या प्रदेशांतील; घाटवळ हा शब्द लोकांसाठीं व घाटी हा जनावरें, माल यांसाठीं वापरतात. मुंबईंत नोकराला घाटी म्हणतात. 'तवांपासुन बघा घाटी झालोया.' —संगीत घोटाळा ७ [घाट] ०खंडी—स्त्री. वीस मणांची खंडी; घाटावरील खंडीचें माप.

घांटी—स्त्री. लहान घंटा (बैल इ० पशूंच्या गळ्यांत बांधण्याची); पितळी लहान घांट, घंटा. [सं. घंटा; म. घाट] ०खालीं उभे राहणें-शपथ घेण्याचा एक प्रकार; बेल भंडार—उचलणें, देवाचा निर्माल्य उचलणें ह्याप्रमाणेंच देवळाच्या घंटेखालीं उभें राहून खरें असेल तें सांगावें असा प्रघात आहे. 'घांटीखालीं उभें राहणें, देवावरची बेल-तुळस उचलणें, कृष्णेच्या पाण्यांत उतरणें, हीं साधनें अत्यंत कठिण प्रसंगीं व अज्ञात वृत्तांतास्तव जुनीं माणसें अमलांत आणीत.'—खेया २८.

घांटी—स्त्री. साखरेची गांठी, गांठी पहा.

घाटींव—वि. १ घोटलेला; वडविलेला; तुडविलेला; चेंदामेंदा केलेला; ठेंचलेला; (पळी, चमचा इ० नीं) ढवळलेला; घोटलेला. २ ग्रासलेला, ग्रस्त झालेला; छळलेला; गांजलेला. ३ वादावाद, चर्चा, वादावाद केलेला. [घाटणें]

घाटू—पु पळीच्या आकाराचें पण मोठें-लांकडाचें-डाळ इ० घोटण्याचें, ढवळण्याचें उपकरण; लांकडी मोठी पळी; एका टोंकास मोठें ठवळें असलेलें-दांडकें. [घाटणें]

घाटोळा—वि. (उप.) घाटवळ. घाटवळ या शब्दाचें तुच्छतादर्शक रूप. [घाटवळ]

घाट्या—पु तीर्थाच्या ठिकाणीं घाटावर स्नान करणारांना गंध व भस्म पुरवून उपजीविका करणारा ब्राह्मण, गंगापुत्र; (सामा.) घाटावरचा ब्राह्मण. [घाट; हिं. घाटिया]

घाट्या—स्त्रीअव. रांधलेल्या कण्या.-शर घाटा अर्थ २, ३ पहा.

घा(घां)ट्या, घाटिया—पु. लहान हातोडा; नकशीचें, कलाकुसरीचें काम करावयाचें सोनाराचें, कासाराचें एक हत्यार; लहान हातोडी. [घाटणें=वडवणें]

घाड—स्त्री. भात्याणाची पेंडी; भाताच्या पेंढ्याची गड्डी, वळकटी. [सं. घट्ट=घट]

घाड—स्त्री. व्रण; क्षत; जखम. 'महाराज, कोळिष्टक कशाला? घाव भरून काढायला?' —रोज्यु २२. [घाड=व्रण होणें]

घाड—पु. (विणकाम) (बे.) विणावयाच्या कापडाच्या कांठात फुलें उठविण्याकरितां चक्रें बसवलेला लांकडी सांचा, चाळ. हा मागावर टांगलेला असतो. [घडणें]

घाड—पु. (कुंभारकाम) एक प्रकारचें चक्र, चाक; जें फिरवून दुसऱ्या चाकास, यंत्रास गति देतां येते तें.

घाड—स्त्री. (सोनारकाम) सोनें, चांदी इ० धातूंची तार ओढून बारीक करण्यासाठीं लागणारी एक करवतीसारखी भोंदे असलेली फळी; एक विशिष्ट रचना, योजना. [घाडणें]

घाडकी—स्त्री. घाडपण, देवळांतील गुरवाचें काम, धंदा, हक्क. [घाडी=(देवळांतील) गुरव]

घाडणें—सक्रि. घडणें याचें प्रयोजक रूप. घडवणें. 'चंद्रबिंबाचेनि पाडें। पांतां दीसतुमे चोखडें। अहवाह घाडिलें दळवाडें। कापूरकेळीचें।' —शिशु ७६३. [सं. घट्]

घोंडपांघल—न. (गो.) वनस्पतिविशेष.

घाडवस—पु (कु.) घाड्याचा, गुरवाचा वंश. [घाडी+वंश]

घोंडयाल—स्त्री. (गो.) घोटवेल पहा.

घाडी—पु. १ (राजा.) देवस्कीचा एक अधिकारी; देवळांतील झाडलोट, दिवाबत्ती करणारा शूद्र जातीचा नोकर. गांवकर अर्थ २ पहा. यालाच कांहीं ठिकाणीं गुरव असें म्हणतात. 'नंतर घाडी व गुरव घरोघरीं येऊन शिपणें करतात.' —मसाप ४४.२६१. २ (गो.हेट.) मांत्रिक; जादूटोणा करणारा. याच्या डोक्यावर जटा असतात, हा जातीनें शूद्र असून याच्या अंगांत वारें संचरल्यावर भूत-पिशाचासंबंधीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें हा सांगतो. याला भूतपिशाच्चावरोबर बोलणारा मध्यस्थ समजतात. ०पण-न. घाडीचा धंदा; कौल, प्रसाद इ० देणें, भुतें काढणें इ०. ०विद्या-स्त्री. घाडी लोकांची विद्या; मंत्रतंत्र; जादूटोणा; अंगाराधुपारा.

घांडॉ—पु. (गो.) नदीचें खारें पाणी शेतांत शिरण्यासाठीं ठेवलेलें द्वार. घाडोंमारप=घांडों बंद करणें.

घाण—स्त्री. १ वास; गंध. 'जैसें खालारा धांवे पाणी। भ्रमर पुष्पाचिये घाणीं।' —ज्ञा १८.४८१. २ दुर्गंध; दुर्गंधी; नाकाला न आवडणारा वास; दर्प; ओरडाण. ३ घ्राणेंद्रियाला, डोळ्याना न आवडणारी ओंगळ वस्तु; केरकचरा; खेद; रेंदा; राडा. 'अंगणांत घाण पडली ती काढून टाक.' ४ (तिरस्कारार्थी) घाणेरडा, वाशेरा, घाणेरा मनुष्य, पदार्थ. 'हा घोतरजोडा

आठ हात ! ही घाण मला नको ' ५ (कामातील, हिशेबातील घालमेल, घोटाळा, अव्यवस्था, गफलत, गोंधळ, भानगड, (मनुष्याचा, कामाचा) घप्पाघोळ, हुबेलडी, गळहाटा, दुर्दशा, फजिती, (पदार्थांचा, सामानाचा) चिवडा, विचका, बचबच, चवढय 'कामाची सगळी घाण केलीस' –विवि १० ५–७ १२९ –विक्षिप्त ३ १६८ ६ एखाद्या व्यवहारासबंधी अवशिष्ट खटलें, काम, वाकी ' मागील घाण काढून टाका, नतर दुसरा पैका घ्या ' –उद्गा छी ! थू ! तिरस्कार, चीड, त्रास, मत्सर याचा वाचक शब्द [स घ्राण=नाक, प्रा घाण, फ्रें जि खन] (वाप्र) ०येणें–दुर्गंध येणें, वाईट वास मारणें घाणणें, घाण(णा)वणें–अक्रि वाईट घास येणें, वास मारणें, उग्र वास, दर्प येणें ' हरि कथा विरहित जें वदन । तें केवळ मयप्याचें भाडें जाण । विषय कृमी परिपूर्ण । निंदा दुर्गंधीनें घाणतसे । '–ऐं ४२ ७ सामाशब्द– ०फद्या–वि खवट, वासाळ, घाण मारणारें, योग्य मर्यादेपली कडे कढवल्यानें वास मारणारें (तूप, भात इ०) [घाण+कढणें] घाणट, घाणवट–वि १ दुर्गंधयुक्त, वाईट वास मारणारा, घाणेरा २ (ल) बीभत्स, ओंगळ, किळस, तिटकारा, शिसारी आणणारा [घाण+ट वट प्रत्यय] ०पाणी–न वाईट, घाणेरडें, पाणी, गढूळ पाणी, मोरीचें पाणी ०यारॉ–पु (गो) दुर्गंध युक्त पानाची एक वनस्पति, घाणेरी –वि घाणेरडा, घाणेरा [घाणेरा] ०घट–स्त्री १ (प्रा) घाणीची, दुर्गंधयुक्त जागा २ घाण येणारी, घाणेरडी वस्तु पदार्थ –वि घाणट पहा ०घास–पु दुर्गंध, वाईट वास घाणीचा–वि १ वास स्वाद लज्जत असलेला २ (ल) एखाद्याशीं दूरचा सबध असलेला, लावच्या नात्याचा ' हा॰ हिचे घाणीचा आहे '=आश्रितत्वादि सबधविशिष्ट आहे घाणेरडा, घाणेरा घाणेल–ला–वि १ दुर्गंधी, वाईट वास येणारा, वास मारणारा, वाशेरा २ मलिन, घामट, गलिच्छ, किळसवाणा, ओंगळ, शिसारी, ओकारी, तिट कारा उत्पन्न करणारा (पदार्थ, काम, कृति, मनुष्य). ' पांडव किमपि न वदती तू वदसि सभेंत शब्द घाणेरे । '–मोसभा ४ ८९. ३ खवचट, कुटाळ, कुचाळ (मनुष्य, भाषण) ४ गढळ, लुच्चा, शिंगाऊ फल्लडी, पाटीतलें मास, वदफैल (मनुष्य). [घाण]

घाण घाणवट, घाणसत, घाणपत्र—वि महाण, महाणवट, महाणसत महाणपत्र प०। ' जैसा घाणवटियाचा दऊ । '

घाण—स्त्री चुन्याची घाणी, घाणा [प्रा दे घाण स घाणा, का गाण] घाणेकार–पु (गो) चरकशाला तेल पिळ णारा, घाणा चालविणारा ०माकड–न (ना) शिमग्याच्या दिवसांत जमीनींत एक साधारण उच खांब रोंवून व त्याच्यावर एक आडवा दांडा ठेवून त्या दांड्याच्या दोन टोकांवर मुलें अथवा माकडें बसवून फिरविण्यासाठीं केलेली रचना [घाणा+माकड] ०वट–टा–स्त्री १ घाणा २ (तेलाचा) घाणा ज्या जागेवर असतो ती जागा [घाणा+वट–टा=ओटा] ०वड–स्त्री (माण) उसाचा रस साठविण्याचें भाडें ठेवण्याकरिता आणि पिळलेलीं चिपाडें घेण्याकरिता मनुष्यास बसण्यासाठीं केलेलें डबरें [घाणा+वाटी, प्रा दे वट्ट=पेला]

घाणा—पु १ तीळ, भुईमुग, करडई वगैरेचें तेल काढ ण्याचें साधन, यत्र, साचा, तेलाची गिरणी ' घाणा गाळिले गुडे । तेथ तेल ना पेंडी जोडे । '–ज्ञा १७ ४१९ २ तेल्याच्या घाण्याची लाट जींत फिरते ती लाकडी कुंडी ३ एका वेळीं जातें, गिरणी, घाणा इ० मध्यें घालावयाचा घास, एकवार घालावयाचें परिमाण, तेल काढण्यासाठीं घाण्यात घालावयाचें तिळाचें, कर डईचें एका खपेचें परिमाण खापरात भाजण्याच्या, उखळांत काढण्याच्या पदार्थांचें धान्याचें औषधाचें एक वेळेचें परिमाण, भर, हता. ४ उसाचा रस गाळण्याचा चरक ' रणभूमीचा घाणा करोनि सरिसा । महाकाळु इक्षु गाळीतुसे जैसा । –शिशु १०४३ ५ मकरसक्रांतीच्या दिवशीं ब्राह्मणास दान देण्याकरिता स्त्रिया उखळावर जी धान्याची रास ठेवतात ती ६ काढण्याचा विधि (देवक बसण्यापूर्वीचा), लग्न मुज, इ० मगल कार्यांत दुरडींत तांदूळ घालून सौभाग्यवती स्त्रिया मगलगीतें गात ते तांदूळ काढ तात तो विधि, मगलविधीच्या आरभीं कांडण्याचा समारभ कर-तात तो (क्रि० भरणें, घालणें) लग्न किंवा मुज याच्या साहि-त्याला आरभ करण्याची सूचक ही घाण्याची चाल असावी ही शास्त्रोक्त नाहीं ७ चुना मळण्याची घाणी ८दौलतींत उगीच केसणी घालून ठेविली असता होणारी विशिष्ट स्थिति, अवस्था –शास्त्रीको [प्रा दे घाण, का गाण, गु घाण, सिं घाणो=तेल्याचा घाणा, तुल० प्रहाणक–गहाणअ–घाणअ–घाणा –राजवाडे, पाटणचा शिलालेख शके ११२८, मूळ अर्थ घाण्यांतला घास, हता] (वाप्र) घाणा करणें–१ (मनुष्यास प्राण्यास) छळणें, त्रास देणें, गांजणें सतावून सोडणें, शक्तीबाहेर काम करावयास लावणें २ (कागद कापड, कपडे इ०) विसकटून टाकणें, अस्ताव्यस्त करणें, चुरडणें, चुरडणें, चुरगुट्यांनीं युक्त करणें घुसडणें घाण्यात घालणें–(एखाद्यास) मोठ्या सकटांत लोटणें, पेंचात पाडणें घाण्यातून पिळणें–काढणें–१ पिंगरणें, चिरडणें, पिटून काढणें २ (एखाद्यास त्याच्या) शक्तीबाहेरचें काम सांगून करावयास लावून, नि सत्त्व निर्बल बनविणें (एखाद्याचा) भुगा पाडणें घाणेकार–पु (गो) तेली, तेलविक्या [घाणा+करणें]

घाणाळ—वि लांब नाकाचा, घनाळ –दार घानाळ पहा [स घोणा=नाक]

**घाणा**—स्त्री १ घाणा अर्थ १, ३ ते ५ व ७ पहा २ सुन्याच्या पाणीचे दगडी चाक [दे प्रा घाण]

**घाणी**—स्त्री घाण, दुर्गंध, वाईट वास 'ऐसेनि कहीं विपायें । सदसा वरपडा होये । तरी घाणी सुटे सव गाह । व्याघ्र जैसा ।' –ज्ञा १७ १५८ [घाण]

**घाणेरडा, घाणेरा-घाणेल-ला**—१ घाणट, घाणवट पहा २ कटाळवाणा, नावडीचा, वाईट (पदार्थ, भाषण इ०) 'घाणेरड्या गोष्टी येथें बोलू नको' [घाण]

**घाणेरी**—स्त्री एक दुर्गंधयुक्त वनस्पतिविशेष 'तोरण, चिमट व घाणेरी या कांटरी झुडपांसरीस उपयुक्त लाकूड मिळेल तर शपथ' –खया १३ [घाण]

**घाणेरी मुंगी**—स्त्री. जिला घाण येते अशी मुग्यांची एक जात

**घात**—पु १ वध, ठार मारणें, उच्छेद, संहार 'घाता त्या उभयांस मी मज विधि घातास योजीतसे ।' –र ११. २ आघात करणें, आघात, प्रहार, मारा, घाव; तडाखा –ज्ञा ३ २१६ 'घावोनि हाणिती त्यातें । एकेंचि घातें शतचूर्ण ।' –एरुस्व ८ ४६ ३ (कामाचा, धंद्याचा, व्यवहाराचा, मसलतीचा, योजनेचा) बिघाड, चकाचूर, नाश, नासाडी, विध्वंस, उच्छेद, (एखाद्या मनुष्याचा) नाश, हानि, नुकसान (क्रि० करणें) 'म्हणऊनि आपणचि आपणपेया । घातु कीजतु असे धनंजया ।' –ज्ञा ६ ७० 'राहूचा घात केला विषसदृजनिला काण सेवील त्याला ।' [सं घात=वध, नाश] (वाप्र) **घातणें**–अक्रि घात करणें, मारणें –शर (या शब्दापासून सामासिक शब्द वाटेल तसे साधिले आहेत समासांत हा शब्द पूर्वपदीं (अ) अथवा (आ) उत्तरपदींहि योजतात उ० (अ) आत्मघात पक्षघात, प्राणघात, सर्वस्वघात, शस्त्रघात इ० (आ) घातयोग, घातकरण, घातवेळा, घाततिथि इ० (पहिल्या प्रकारांत या शब्दाचा नाश प्रहार या अर्थी व दुसऱ्यांत अशुभ, अमंगल या अर्थी उपयोग होतो) सामाशब्द– **घातक-की**–वि घातुक, हिंसक, मारक, नाशकारक, अनर्थकारक, अपकारक, अपायकारक, नाश करणारा, ठार मारणारा [सं] **०करी**–वि १ ठार मारणारा, वध करणारा, मारेकरी २ उपद्रव करणारा, अपायकारक, नाशकारक (वस्तु, मनुष्य, जिंदगी) [घात+करणें] **०घेणा**–वि घातकी पुढल्या घात शब्दाखालीं पहा **०चतुर्दशी**–स्त्री भाद्रपद वद्य चतुर्दशी या दिवशीं लढाईत अथवा अपघातानें मेलेल्या पितरांचें महालय श्राद्ध करतात [सं] **०चतुष्टय**–न (ज्यो) घातकारक अनिष्ट असा चौकडा, घातचंद्र, घाततिथि घातनक्षत्र व घातवार यांचा समूह [घात+चतुष्टय=चारांचा समुदाय] **०चंद्र**–पु (ज्यो) २ अशुभ नक्षत्रीं आलेला चंद्र, हा अनिष्टकारक असतो [सं] **०तिथि**–स्त्री (ज्यो) अशुभ, अनिष्ट तिथि [सं] **०नक्षत्र**–न (ज्यो) अशुभ नक्षत्र [सं] **०पात**–पु १ (व्यापक) ठार मारणें, पगू करणें, अपू करणें, हत्या, अपकार करणें २ जाळपोळ, नाश, वध, तोटा, इजा, अपकार 'मनुष्यानें कोणाचाही घातपात करूनये' [घात+ठार मारणें+पात=पडणें, पाडणें] **०पाती**–वि घातपात करण्याचा ज्याचा स्वभाव आहे तो, अपकारी, दुष्ट [घातपात] **०मारॉ-मारायणॉ**–वि (गो) घातकी, दुष्ट [घात+मारणें] **०वार**–पु (ज्यो) आठवड्याच्या सात दिवसांपैकीं (एखाद्यास) अनिष्ट असलेला दिवस, ज्या दिवशीं एखाद्याचें कोणतेंहि काम सिद्धीस जात नाहीं असा अशुभ, अनिष्ट दिवस 'राजाची निघाली स्वारी मशालची म्हणे माझा घातवार.' **०वेळ**–स्त्री १ घातुक, अनिष्ट वेळ २ मरणाचा, घोर संकटाचा, अरिष्टाचा, समय, जिवावरचा प्रसंग, प्राणसंकटाची वेळ [घात+म वेळ] **घातीव**–न प्राणघातक शस्त्र 'हीं अर्थसाधक भ्राता पूर्ण । परी घातीव घणार प्राण ।' –नव १८ १६९ [घात] **घातुक**–वि १ घातक, हिंसक, ठार मारणारा, प्राणनाशक, क्रूर, नाश करणारा 'घातुक पक्षी' –प्राणिमा ६३ २ अपायकारक, अनिष्ट, दुष्ट, घातक पहा [घात]

**घात**—पु. १ (गणित) समान संख्यांचा गुणाकार, एका संख्येला त्याच संख्येनें गुणिलें असतां त्यास त्या संख्येचा घात केला असें म्हणतात त्याच संख्येला त्याच संख्येनें गुणण्याची आवृत्ति अथवा त्या आवृत्तीच्या संख्येचा अंक, तीन या संख्येचा नऊ हा द्विघात व सत्तावीस हा त्रिघात आहे [सं] **०कर्म**–न एखाद्या संख्येचा निर्दिष्ट घात करणें; एखाद्या संख्येला त्याच संख्येनें निर्दिष्ट केलेल्या वेळां गुणण्याची क्रिया [घात=गुणाकार+कर्म=क्रिया] **०प्रकाशक**–वि (बीज) एखाद्या संख्येस त्याच संख्येनें किती वेळां घात करावयाचा, गुणावयाचें, गुणिलें आहे तें दाखविणारा (आंकडा, अंक) हा अंक मूळ संख्येच्या डोक्यावर लिहितात उदा० ३[६] यांत ६ घातप्रकाशक समजावा [घात+प्रकाशक=दाखवणारा]

**घात**—स्त्री (शेती इ० कांच्या कामांची ऋतुपरत्वें येणाऱ्या, पिकणाऱ्या, धान्याची) योग्य वेळ, मोसम, हंगाम उ० पेरण्याची घात, कापण्याची घात, आंब्याची घात उसाची घात, लग्नाची घात इ० 'या दिवसांत उत्तरा व हस्त या पावसानें पेरणीस घात थोडी उशिरा आली आहे' –खया १६ [ ] (वाप्र) **०घेणें**–(एखाद्या, मनुष्याचा, कार्याचा मसलतीचा) आणीबाणीच्या वेळीं नाश करणें मातेरें करणें, बुडवणें, (एखाद्यास आलेली संधि घालवून देऊन त्याची निराशा करून त्यास लुबाडणें (एखाद्या मनुष्याची, कामाची) संधि दवडणें, हुकविणें

'कापणीची घात पावसानें नेली.' **घातीचे दिवस**-पुअव. १ हंगामाचे दिवस. २ (ल.) सत्तेचा, चलतीचा भरभराटीचा, उपभोगाचा काळ, दिवस. **०घेणा-घेण्या**-वि. अवसान-घातकी; आणीबाणीच्या वेळीं घात, दगा करणारा. 'जैसा वैद्य दुराचारी। केली सर्वस्वें बोहरी। आणि सेखीं भीड करी। घात घेणा।' -दा ५.२.२६. [घात+घेणें] **०वाफ**-स्त्री. एकदां पर्जन्यवृष्टि होऊन गेल्यानंतर पुन्हां पर्जन्यवृष्टि होईपर्यंतचा (जमीनींतून वाफ इ० निघत असलेला) पेरणीस अत्यंत अनुकूल असा काळ. (क्रि० संभाळणें; जपणें). 'क्षेत्र गुणें बीज अंकुरे। तें अनंतधावृत्ती विकारें। घातवाफ ते आदरें। साधूनि घेतली।' -गीता १३.१७६. [घात+वाफ]

**घांतड**—स्त्री. (हेट; नाविक) घामत (गलबतांतील, होडीं-तील) पाणी काढण्याची जागा. गमतड पहा. [घामत]

**घानाळ**—वि. लांब नाकाचा. 'दांतिरें बोचिरें घानाळ। प्राणहीन श्रोत्रहीन बरळ।' -दा ३.६.४३. [सं. घोणा=नाक]

**घानो(नौ)डी**—स्त्री. घाण्याचा बैल फिरण्याचा गोल मार्ग; घाण्याची भोंवरी; घाण्याचा मार्ग. (सामा.) घाणा. 'कर्मभू मीचिए घानौडि। बांधौनि मिथ्या ज्ञानाची झांपडी। काळें भवं-ढिलीं बापुडीं। जीव पशुवें॥' -ऋ ३०. 'डोळां अज्ञानें झांपडी। मोवें देहबुद्धि घानोडी।' -दावि ३५४. [घाणा]

**घापणें, घापतणें**—उक्रि. १ घालणें, घातलें जाणें. 'नाना गगनौलाचिया माळा। घांसिच्या जालया गळां। घापती तो सोहळा। पाविजतसे॥' -अमृ ७ ८२. २ घालवून देणें; बाहेर टाकणें; सोडणें.'जरी आत्मा तूं एकसरा। हेंही म्हणतां दातारा। तरी आंतुल तूं बाहेरा। घापतासि।' -ज्ञा १८.२३. -अमृ ७. १९०. [घालणेचें कर्मणि रूप]

**घाव**—स्त्री. (राजा.) डोंगराच्या बाजूंत, कातळांत पड-लेलें खिंडार, भोंक, भगदाड. आंत जातां येण्याजोगें डोंगराचें बीळ. [सं. गर्भ; प्रा. गब्भ; हिं. घाव]

**घाबरणें, घाभरावणें**—अक्रि. १ (दुःख, शोक, वेदना, आकस्मिक क्षोभ, मनोविकार इ० कांनीं) आक्रांत, आकुल होणें; २ बावरणें; भयभीत होणें, गांगरून जाणें; गोंधळणें, कांहीं सुचेनासें होणें. [सं. गह्वर; प्रा. गब्भर; हिं. घबराना; तुल० का. गाबु=भीति; गाबरी=घाबरलेला; घाबरि=घोटाळा, भीति]

**घाबरा**—वि. १ (दुःख, शोक, वेदना, भीति इ० कांनीं) व्याकुल झालेला; घाबरलेला; बावरलेला; भीतीनें गोंधळून, गांग-रून गेलेला. २ उतावळा. 'म्हणा मज उतावेळा गुणचि घेतला घावरें। असो मन असेंचि धा भजत्वर्हिमेघा बरें।' -केका ४५. [घाबरणें]

**घाबरा(र)विणें**—सक्रि. १ घाबरायाला लावणें; घाबरून सोडणें; भिवविणें; भयाकुल करणें. २ घोटाळ्यांत, गळफटयांत पाडणें; गोंधळून सोडणें. [घाबरणें प्रयोजक]

**घाबाड**—न. (प्र.) घबाड पहा.

**घाबिरणें**—अक्रि. घाबरणें पहा. 'घाबिरले न सुचे पुढें।'. -दावि ३४. **घाबिरा**-वि. घाबरा पहा. 'स्वप्नदुःखें घाबिरा जाला। या नांव भ्रम।' -दा १०.६.१९. 'न दिसत निज-नेत्रीं घाबिरा फार झाला।' -माधव रामायण अयोध्याकांड २४.

**घाबोय, घाबोली**—स्त्री. (गो.) एक प्रकारचा मासा; घाबो.

**घाम**—पु. ऊन, ज्वर, उष्णता, श्रम इ०कांनीं अंगाच्या त्वचेच्या छिद्रांतुन गळणारें पाणी; घर्म; स्वेद; स्वेदोदक. २ ओलें लांकूड जळत असतांना त्यांतून बाहेर येणारा द्रव. ३ विस्तवावर पाणी असलेलें भांडें ठेवून त्यावर झांकण ठेविलें असतां झांकणाच्या आंतील बाजूस जमणारे (वाफेच्या) पाण्याचे) थेंब. ४ कठोर हृदयाला, पाषाणहृदयाला फुटलेला पाझर; दया; द्रव. [सं. घर्म; प्रा. घम्म; तुल० गु. घाम; बं. घाम; फ्रें. जि. खम=सुर्य, ऊन] (वाप्र.) **०सुटणें**-बावरणें; भीतीनें अंगास दरदरून घाम येणें. 'राघोबादादांना हें भाषण ऐकतांच घाम सुटला.'-इंप६७. सामाशब्द- **०गंडा**-पु. (ना.) उष्णतेमुळें उत्पन्न होणारी पुळी. [सं. घर्म; म. घाम+सं. गंड=फोड, पुळी] **घाम(मा)घूम**-स्त्री. १ धापा टाकण्याची, गुदमरण्याची, श्रमानें क्षीण आल्याची, उकडण्याची अवस्था; (श्रमानें, उन्हानें भीतीनें) घामानें डबडबण्याची स्थिति; अंगांतून घामाच्या धारा निघून जीव कासावीस झालेली अवस्था. -वि. (श्रमानें, भीतीनें, उन्हानें) घाम सुटलेलें; घामानें डबडबलेलें (अंग, मनुष्य); श्रमानें थकलेला; धापा टाकीत असलेला; सुस्कारे टाकीत असलेला. [घाम+घुमणें] **घामट-ड**-वि. ओंगळ; अस्वच्छ; घाणेरडा; गैदी; ज्याच्या अंगाला नेहमीं घाम येऊन घाण येते असा; मलिन. **घामटघाण, घामठाण, घामघाण, घाम-साण**-स्त्री. घामाची घाण, दुर्गंध. [घाम+घाण] **घामटा**-पु. (को.) १ अति श्रमामुळें आलेला घाम, निढळाचा घाम. (क्रि० काढणें; निघणें). 'चौघांचे घाम त्याच्यावर पडल्यामुळें त्याचा घामटा निघाला' २ अतिशय श्रमाची अवस्था; पिट्टा पडणें. [घाम] **घामाझोकळ**-वि (व.) घामानें डबडबलेला; घामा-घूम. (क्रि० होणें) 'पन्नास दंड व पन्नास बैठका मारल्यानें तो घामाझोकळ झाला.' **घामावणें, घामे(मै)जणें, घामेणें**-अक्रि. १ (राजा.) श्रमादिकांमुळें शरीर घामानें युक्त होणें. 'ऐसा मीचि एक जगीं। जया नाना कर्मांची यज्ञांगी। तेणें वियोग

**घाणी**—स्त्री १ घाणा अर्थ १, ३ ते ५ व ७ पहा २ चुन्याच्या घाणीचें दगडी चाक [दे प्रा घाण]

**घाणी**—स्त्री घाण, दुर्गंध, वाईट वास 'ऐसेनि कहीं विपायें। सदचा वरपडा होये। तरी घाणी सुटे तव राहे। व्याघ्रु जैसा।'—ज्ञा १७ १५८ [घाण]

**घाणेरडा, घाणेरा-घाणेल-ला**—१ घाणट, घाणवट पहा २ कटाळवाणा, नावडीचा वाईट (पदार्थ, भाषण इ०) 'घाणेरड्या गोष्टी येथें बोलू नको' [घाण]

**घाणेरी**—स्त्री एक दुर्गंधयुक्त वनस्पतिविशेष 'तोरण, चिमट व घाणेरी या कांटेरी झुडपांखेरीज उपयुक्त लाकूड मिळेल तर शपथ'—खया ३३ [घाण]

**घाणेरी मुंगी**—स्त्री जिला घाण येत अशी मुंग्याची एक जात

**घात**—पु १ वध, ठार मारणें, उच्छेद, संहार 'घाता त्या उभयांस मी मज विधि घातास योजीलस।'—र ११ २ आघात करणें, आघात, प्रहार, मारा, घाव, तडाखा —ज्ञा ३ २१६ 'घावोनि हाणिती त्यातें। एकेंचि घातें शतचूर्ण।'—एरुस्व ८ ४६ ३ (कामाचा, धंद्याचा, व्यवहाराचा, मसलतीचा, योजनेचा) बिघाड, चकाचूर, नाश, नासाडी, विध्वंस, उच्छेद, (एखाद्या मनुष्याचा) नाश, हानि, नुकसान (क्रि० करणें) 'म्हणऊनि आपणचि आपणपेया। घातु कीजतु असे धनंजया।'—ज्ञा ६ ७० 'राहूचा घात केला विषसहजनिला कोण सेवील त्याला।' [सं. घात=वध, नाश] (वाप्र) घातणें-शक्रि घात करणें मारणें —शर (या शब्दापासून सामासिक शब्द वाटेल तसे साधिले आहेत समासांत हा शब्द पूर्वपदीं (अ) अथवा (आ) उत्तरपदींहि योजतात उ० (अ) आत्मघात पक्षघात, प्राणघात, सर्वस्वघात, शत्रुघात इ० (आ) घातयोग, घातकरण, घातवेळा, घाततिथि इ० (पहिल्या प्रकारांत या शब्दाचा नाश प्रहार या अर्थी व दुसऱ्यांत अशुभ, अमंगल या अर्थी उपयोग होतो) सामाशब्द— **घातक-की**-वि घातुक, हिंसक, मारक, नाशकारक, अनर्थकारक अपकारक, अपायकारक नाश करणारा, ठार मारणारा [सं] **०करी**-वि १ ठार मारणारा, वध करणारा, मारेकरी २ उपद्रव करणारा, अपायकारक नाशकारक (वस्तु मनुष्य, जिंदगी) [घात+करणें] **०घेणा**-वि घातकी पुढल्या घात शब्दाखालीं पहा **०चतुर्दशी**-स्त्री भाद्रपद वद्य चतुर्दशी या दिवशीं लढाईंत अथवा अपघातानें मेलेल्या पितरांचें महालय श्राद्ध करतात [सं] **०चतुष्टय**-न (ज्यो) घातकारक अनिष्ट असा चौकडा, घातचंद्र, घाततिथि, घातनक्षत्र व घातवार यांचा समूह [घात+चतुष्टय=चारांचा समुदाय] **०चंद्र**-पु (ज्यो) अशुभ नक्षत्रीं आलेला चंद्र, हा अनिष्टकारक असतो [सं] **०तिथि**-स्त्री (ज्यो) अशुभ, अनिष्ट तिथि [सं] **०नक्षत्र**-न (ज्यो) अशुभ नक्षत्र [सं] **०पात**-पु १ (व्यापक) ठार मारणें, पंगू लंगडा, अधू करणें, हत्या, अपकार करणें २ जाळपाळ, नाश, वध, तोटा, इजा, अपकार 'मनुष्यानें कोणाचाही घातपात करूं नये' [घात+ठार मारणें+पात=पडणें, पाडणें] **०पाती**-वि घातपात करण्याचा ज्याचा स्वभाव आहे तो, अपकारी, दुष्ट [घातपात] **०मारी-मारावणा**-वि (गा) घातकी, दुष्ट [घात+मारणें] **०वार**-पु (ज्यो) आठवड्याच्या सात दिवसांपैकीं (एखाद्यास) अनिष्ट असलेला दिवस, ज्या दिवशीं एखाद्याचें कोणतेंहि काम सिद्धीस जात नाहीं असा अशुभ, अनिष्ट दिवस 'राजाची निघाली स्वारी मशालची म्हणे माझा घातवार' **०वेळ**-स्त्री १ घातुक, अनिष्ट वेळ २ मरणाचा, घोर संकटाचा, अरिष्टाचा, समय, जिवावरचा प्रसंग, प्राणसंकटाची वेळ [घात+म वेळ] **घातीव**-न प्राणघातक शस्त्र 'वरी अर्थसाधक श्रोता पूर्ण। परी घातीव घणार प्राण।'—नव १८ १६९ [घात] **घातुक**-वि १ घातक, हिंसक, ठार मारणारा, प्राणनाशक, क्रूर, नाश करणारा 'घातुक पक्षी'—प्राणिमो ६३ २ अपायकारक, अनिष्ट, दुष्ट, घातक पहा [घात]

**घात**—पु १ (गणित) समान संख्यांचा गुणाकार, एका संख्येला त्याच संख्येनें गुणिलें असतां त्यास त्या संख्येचा घात केला असें म्हणतात, त्याच संख्येला त्याच संख्येनें गुणण्याची आवृत्ति अथवा त्या आवृत्तीच्या संख्येचा अंक, तीन या संख्येचा नऊ हा द्विघात व सत्तावीस हा त्रिघात आहे [सं] **०कर्म**-न एखाद्या संख्येचा निर्दिष्ट घात करणें, एखाद्या संख्येला त्याच संख्येनें निर्दिष्ट केलेल्या वेळां गुणण्याची क्रिया [घात=गुणाकार+कर्म=क्रिया] **०प्रकाशक**-वि (बीज) एखाद्या संख्येस त्याच संख्येनें किती वेळां घात करावयाचा गुणावयाचें, गुणिलें आहे तें दाखविणारा (आंकडा, अंक) हा अंक मूळ संख्येच्या डोक्यावर लिहितात उदा० ३[६] यांत ६ घातप्रकाशक समजावा [घात+प्रकाशक=दाखवणारा]

**घात**—स्त्री (शेती इ० कांच्या कामांची, ऋतुपरत्वें येणाऱ्या, पिकणाऱ्या, धान्याची) योग्य वेळ, मोसम, हंगाम उ० पेरण्याची घात, कापण्याची घात, आंब्याची घात उसाची घात, लग्नाची घात इ० 'या दिवसांत उत्तरा व हस्त या पावसानें परणीस घात थोडी उशिरा आली आहे'—खया १६ [ ] (वाप्र) **०घेणें**-(एखाद्या, मनुष्याचा, कार्याचा, मसलतीचा) आणीबाणीच्या वेळीं नाश करणें, मातेरें करणें, बुडवणें, (एखाद्यास आलेली संधि घालवून देऊन त्याची निराशा करून त्यास) लुबाडणें (एखाद्या मनुष्याची, कामाची) संधि दवडणें, दुर्कावणें

'कापणीची घात पावसानें नेली.' घातीचे दिवस-पुअव. १ हंगामाचे दिवस. २ (ल.) सत्तेचा, चलतीचा भरभराटीचा, उपभोगाचा काळ, दिवस. ०घेणा-घेण्या-वि. अवसान-घातकी; आणीबाणीच्या वेळीं घात, दगा करणारा. 'जैसा वैद्य दुराचारी। केली सर्वस्वें बोहरी। आणि सेखीं भीड करी। घात घेणा।' -दा ५.२.२६. [घात+घेणें] ०वाफ-स्त्री. एकदां पर्जन्यवृष्टि होऊन गेल्यानंतर पुन्हां पर्जन्यवृष्टि होईपर्यंतचा (जमीनींतून वाफ इ० निघत असलेला) पेरणीस अत्यंत अनुकूल असा काळ. (क्रि० संभाळणें; जपणें). 'क्षेत्र गुणें बीज अंकुरे। तें अनंतधावृत्ती विकारे। घातवाफ ते आदरें। साधूनि घेतली।' -गीता १३.१७६. [घात+वाफ]

**घांतड**—स्त्री. (हेट; नाविक) घामत (गलबतांतील, होडींतील) पाणी काढण्याची जागा. गमतड पहा. [घामत]

**घानाळ**—वि. लांब नाकाचा. 'दांतिरें बोचिरें घानाळ। प्राणहीन श्रोत्रहीन वरळ।' -दा ३.६.४३. [सं. घोणा=नाक]

**घानो(नौ)डी**—स्त्री. घाण्याचा बैल फिरण्याचा गोल मार्ग; घाण्याची भोंवरी; घाण्याचा मार्ग. (सामा.) घाणा. 'कर्मभूमीचिए घानौडि। बांधोनि मिथ्या ज्ञानाची झांपडी। काळें भवंडिलीं बापुडीं। जीव पशुवें॥' -ऋ ३०. 'डोळां अज्ञानें झांपडी। भोवें देहबुद्धि घानोडी।' -दावि ३५४. [घाणा]

**घापणें, घापतणें**—उक्रि. १ घालणें; घातलें जाणें. 'नाना गगनीलाचिया माळा। बांझेच्या जालया गळां। घापती तो सोहळा। पाविजतसे॥' -अमृ ७ ८२. २ घालवून देणें; बाहेर टाकणें; सोडणें.'जरी आत्मा तूं एकसरा। हेंदी म्हणतां दातारा। तरी आंतुल तूं बाहेरा। घापतासि।' -ज्ञा १८.७३. -अमृ ७.१९०. [घालणेचें कर्मणि रूप]

**घाब**—स्त्री. (राजा.) डोंगराच्या बाजूंत, कातळांत पडलेलें खिडार, भोंक, भगदाड. आंत जातां येण्याजोगें डोंगराचें बीळ. [सं. गर्भ; प्रा. गब्भ; हिं. घाव]

**घाबरणें, घाभरावणें**—अक्रि. १ (दुःख, शोक, वेदना, आकस्मिक क्षोभ, मनोविकार इ० कांनीं) आक्रांत, आकुल होणें; २ घाबरणें; भयभीत होणें; गांगरून जाणें; गोंधळणें; कांहीं सुचेनासें होणें. [सं. गह्वर; प्रा. गब्भर; हिं. घबराना, तुल० का गाबु=भीति; गाबरी=घाबरलेला; घाबरि=घोटाळा, भीति]

**घाबरा**—वि. १ (दुःख, शोक, वेदना, भीति इ० कांनीं) व्याकुळ झालेला; घाबरलेला; बावरलेला; भीतीनें गोंधळून, गांगरून गेलेला. २ उतावळा. 'म्हणा मज उतावळा गुणचि घेतला घाबरें। असो मन असेंचि वा भजत्स्वर्दिमेषा बरें।' -केका ४५. [घाबरणें]

**घाबरा(र)विणें**—सक्रि. १ घाबरायाला लावणें; घाबरून सोडणें; भिवविणें; भयाकुल करणें. २ घोटाळयांत, गळफटयांत पाडणें; गोंधळून सोडणें. [घाबरणें प्रयोजक]

**घायाड**—न. (प्र.) घबाड पहा.

**घाविरणें**—अक्रि. घाबरणें पहा. 'घाविरले न सुचे पुढें।' -दावि ३४. घाविरा-वि. घाबरा पहा. 'स्वप्नदुःखें घाविरा जाला। या नांव भ्रम।' -दा १०.६.१९. 'न दिसत निजनेत्रीं घाबिरा फार झाला।' -माधव रामायण अयोध्याकांड २४.

**घावोय, घावोली**—स्त्री. (गो.) एक प्रकारचा मासा; घावो.

**घाम**—पु. उन, ज्वर, उष्णता, श्रम इ०कांनीं अंगाच्या त्वचेच्या छिद्रांतून गळणारें पाणी; घर्म; स्वेद; स्वेदोदक. २ ओलें लांकूड जळत असतांना त्यांतून बाहेर येणारा द्रव. ३ विस्तवावर पाणी असलेलें भांडें ठेवून त्यावर झांकण ठेविलें असतां झांकणाच्या आंतील बाजूस जमणारे (वाफेच्या) पाण्याचे) थेंब. ४ कठोर हृदयाला, पाषाणहृदयाला फुटलेला पाझर; दया; द्रव. [सं. घर्म; प्रा. घम्म; तुल० गु. घाम; बं. घाम; फ्रें. जि. खम=सूर्य, उन] (वाप्र.) ०सुटणें-वावरणें; भीतीनें अंगास दरदरून घाम येणें. 'राघोबादादांना हें भाषण ऐकतांच घाम सुटला.'-इंप६७. सामाशब्द- ०गंडा-पु. (ना.) उष्णतेमुळें उत्पन्न होणारी पुळी. [सं. घर्म; म. घाम+सं. गंड=फोड, पुळी] घाम(मा)घूम-स्त्री. १ धापा टाकण्याची, गुदमरण्याची, श्रमानें क्षीण आल्याची, उकडण्याची अवस्था; (श्रमानें, उन्हानें भीतीनें) घामानें डबडबण्याची स्थिति; अंगांतून घामाच्या धारा निघून जीव कासावीस झालेली अवस्था. -वि. (श्रमानें, भीतीनें, उन्हानें) घाम सुटलेलें; घामानें डबडबलेलें (अंग, मनुष्य); श्रमानें थकलेला; धापा टाकीत असलेला; सुस्कारे टाकीत असलेला. [घाम+घुमणें] घामट-ड-वि. ओंगळ; अस्वच्छ; घाणेरडा; गैदी; ज्याच्या अंगाला नेहमीं घाम येऊन घाण येते असा, मलिन. घामटघाण, घामठाण, घामघाण, घामसाण-स्त्री. घामाची घाण, दुर्गंध [घाम+घाण] घामटा-पु. (कों.) १ अति श्रमामुळें आलेला घाम; निढळाचा घाम. (क्रि० काढणें, निघणें) 'चौघाचें काम त्याच्यावर पडल्यामुळें त्याचा घामटा निघाला' २ अतिशय श्रमाची अवस्था; पिट्टा पडणें. [घाम] घामाझोकळ-वि. (व.) घामानें डबडबलेला; घामाघूम. (क्रि० होणें) 'पन्नास दंड व पन्नास बैठका मारल्यानें तो घामाझोकळ झाला.' घामावणें, घामे(मै)जणें, घामेणें-अक्रि. १ (राजा.) श्रमादिकामुळें शरीर घामानें युक्त होणें. 'ऐसा मीचि एक जगीं। जया नाना कर्मांची थकांगी। तेणें वियोग

दुःखाचिया आगी। तनु घामेजेना॥' -ज्ञाप्र १११४. 'धाके धाकें घामेजत। दही देत गुतल्यें।' -एभा १०.८.२ श्रमी होणें; श्रमानें थकणें, शिणणें. 'नाना परांचीं मुतीं। दाटणी नव्हे शिनी। तैसा नाना द्वंद्वीं प्राप्तीं। घामेजेना।' -ज्ञा ११.३४८. ३ (ल.) द्रवणें; कींव, दया येणें; हृदयास पाझर फुटणें 'चित्ती अंध म्हणे सुत शत वधितो, लेशही न घामेला।' -मोआश्रम १.२२. [घाम] घामेला-ल-वि. घामानें डबडबलेला; घाम आलेला. 'ये उठुनिहि घामेला, जनभावीं वांचला जरि मधां मेला।' -मोकृष्ण ३६.१०.

घामणें—सक्रि. टार मारणें; नाश करणें. 'शुंभ निशुंभा चिया घामणारा। मोहनी रुप धरा दैत्यांतका।' -निगा २०९.

घामत—स्त्री. (कों. कु. हेट.) (नाविक) होडींत, गलबतांत पाझरुन आलेलें समुद्राचें पाणी; घमत.

घामोळी—स्त्री. घामानें अंगावर उठणारी पुळी, पुरळ, पुटकुळी. [घाम+ओळी]

घामोळें—न.१ जिच्या योगानें अंगावर कांटे उभे राहतात, अंग चुणचुणतें, अशी उष्णता, ऊन. २ घामानें अंगावर उठणारा पुरळ, पुळी; घामोळी. ३ घाम शोषून घेण्याचें साधन-अंगरख्याच्या बगलेला, पागोट्याला, आंतील बाजूस लावलेला कापडाचा तुकडा, फडकें; जोड्याच्या आंतील बाजूस लावलेला कातड्याचा तुकडा; खोगिराखालीं लावलेला, ठेवलेला बुरणुसाचा तुकडा. [सं. घर्मावली, घर्मावलय, म घाम+ओळें प्रत्यय]

घाम्यौचें—अक्रि (गो.) घाम सुटणें, येणें; घामावणें; घामणें. [घाम]

घाय—पु १ जखम. 'डोळां हरळ न शिरे। घायीं कोत न जिरे।' -ज्ञा १३ ५३८. -एरुस्व १२ २७ २ शस्त्राचा वार, घाव, आघात 'दु खशोकाच्या घाईं। मारिलियाची सेचि नाहीं।' -ज्ञा ७.१०७ -१ ५८ [सं. घात=प्रहार; प्रा घाय; का. हिं. गु. घाय] (वाप्र) घायावर घाय घालणें-पहिल्या जखमे वरच दुसरा घाव घालणें; जखमेवर मीठ टाकणें; दु खावर डागण्या देणें; मेलेल्यास मारणें घायास येणें-अक्रि. संकटाच्या, नुकसानीच्या, दुःखाच्या परिस्थितीत पडणें, सांपडणें सामाशब्द- ०कटर-कटार-खेंडर-वि. (राजा.) कोडगा; निगरगट्ट, लातखुक्या; लातखाऊ; निसुक, कितीहि मारलें किंवा रागावून बोललें तरी न सुधारणारा. [घाय+कहर?] ०कुठार-खोर-वि थोडीशी इजा झाली असता मोठ्यानें ओरडून फार इजा झाली आहे असें भासविणारा, कांगावखोर; कांगावखोर. [घाय+कुठार] ०तेल-न. बिबा, राळ, अफिहळद, गंधक, मोरचूत, हळदीचें पान इ० तेलांत मिसळून जखम इ०कांस लावण्याकरितां केलेलें मलम; यास भडकतेल असेंहि म्हणतात. घायभर-पु. चांगला प्रहार; शस्त्राहून लागलेला वार. ०घट-१ न. जखम; व्रण; घाव; -वि. घायाळ; जखमी झालेला. 'अवखटूनि आदळे पोट। म्हणे मी घायवट पडलों की।' -एभा २२.६२५. 'अल्प घायवट उरलें।' -कमुरा २३.६३. [घाय+वट प्रत्यय] ०वटणें-अक्रि. १ घाव लागून जखम होऊन जर्जर होणें; घायाळ होणें. २ (ल.) मनाला अतिशय अस्वस्थता वाटणें; कसेंसेंच वाटणें, आजारी असणें, होणें. ०वटा-पु. १ घाव; तडाखा; प्रहार; २ जखम; व्रण. ३ अतिशय क्षीण. ०वारा-वारें-पु न. १ जखम; व्रण; शस्त्राचा वार. २ घाव लागण्याची किंवा घाव लागून व्याकुळ झाल्यामुळें उत्पन्न होणारी भीति. 'वीरीं देखलें घायवारें। म्हणती पळा रे पळा रे।' -एरुस्व १२.१९.-भाए१५६. -कथा ६.१६.५५. [घाय+वारा]

घाय—स्त्री. त्वरा; जलदी; घाई. (प्र.) घाई पहा. [घाई] सामाशब्द- ०कूत-स्त्रीन. १ मोठी धांदल, उतावळेपणा; तांतडी. (क्रि० येणें). २ (एखादें काम करण्याबद्दल) दुसऱ्यास लावलेली निकड, तगादा, नेट, आग्रह. (क्रि० लावणें; देणें; करणें; मांडणें). ३ ताप येण्यापूर्वी होणारी तगमग, काहिली, अस्वस्थता. (क्रि० येणें). ४ खाजविण्याची अनिवार प्रवृत्ति, अतिशय कंडू; खाजेची इसळी. (क्रि०येणें). [घाय=घाई+कुथणें किंवा आकूत] ०कुतीस येणें-अक्रि. उतावळेपणाची, घाई करण्याची, सदर येणें; अतिशय घाईला, अडीच कांड्यावर येणें. ०कुतेपणा-पु. (मनाची) दम न निघण्यासारखी अवस्था; अस्वस्थता; उतावळेपणा; घायकूत करण्याचा स्वभाव. 'त्याचा उतावळेपणा, घायकुतेपणा, प्रेमळपणा व रागीटपणा हे सर्व गुण अतिरेकामुळें हास्यास्पद होतात.' -सुदे १५१. घायकुत्या-वि. घायकूत करण्याचा स्वभाव ज्याचा आहे असा; घाई करण्याचा, उतावळेपणाचा स्वभाव ज्याचा तो; हुल्हुल्या; स्वतः घायकूत करणारा किंवा दुसऱ्याला घायकूत करावयाला लावणारा. 'परंतु बळवंतराव घायकुत्या माणूस नव्हता.'-भयंकरदिव्य घायकोत-स्त्री. (माण.) घायकूत पहा.

घायटा—पु. घाव; तडाखा; घायवटा; घावटा. 'ठेचा लागती मोडती कांटे। विसती शस्त्रांचे घायटे!' -दा ३.७.४. [घाय+टा प्रत्यय]

घायडाय—पु आणीबाणीचा प्रसंग, घावडाव पहा.

घायतळ—वि. १ घेरी; भोंवळ, भोंवंड; चक्कर. (क्रि० येणें) २ आघातानें, तडाख्यानें येणारा बेशुद्धपणा; मूर्च्छा; बेसावधपणा. (क्रि० येणें) ३ (ल) विस्मय; आश्चर्य; अचंबा; चकभूल ४ घायातळ पहा. [घाय+का. तलें=डोकें?]

घायताव(वि)णें—उक्रि (कों.) घायकुतीस येणें; घाई, उतावीळ करणें, घाबरविणें; गडबड, लगबग करणें, करावयास लावणें; दुसरा घाबरेल अशी त्यास घाई करणें. [घाई]

**घायपत, घायपात, घायमार, घायमारी**—स्त्री ही कोरफडीसारखी दिसणारी अतिशय उपयुक्त व औषधि वनस्पति आहे हिंदुस्थानातील उष्ण व सर्द प्रदेशात ही वनस्पति होते हिचा उपयोग औषधी अन्न पेय साखर, द्राक्षासव, सायणा सारखें द्रव्य इत्यादि करण्याकडे होतो हिच्यापासून निघणाऱ्या तंतूचे वाखाचे दोर, चटया, कुचले इ० करतात [ घाय=घाव+ पात ? ]

**घायवरणें**—अक्रि घाबरणें, भयचकित होणें गोंधळणें

**घायली**—स्त्री झुजणाऱ्या, लढणाऱ्या दोन जनावरामध्यें पडणाऱ्या तिसऱ्या जनावरास लावावयाचा शब्द [ स घात ]

**घायातळ**—स्त्री खालचा भाग **घायातळीं-ळा-आणणें**-सक्रि खालीं, जमीनीवर पाडणें 'धनुष्य घालोनिया गळां। सोडुनि आणिला घायातळा। -एरुस्व १२ १३६ 'श्रीरामें हल घेऊनी धिर दिरा घायातळीं आणिल।' -मुद्गल कृत रुक्मिणीस्वयवर ११ [ स घात+तल ]

**घायाळ**—स्त्री घायपत-पात पहा

**घायाळ**—न १ लढाईत मेलेल्या अपघातानें मृत्यु पाव लेल्या पितरांचें महालय श्राद्ध ०**चतुर्दशी**-स्त्री भाद्रपद शुद्ध चतुर्दशी या दिवशीं घायाळाचें, अपघातानें मेलेल्याचें महालय श्राद्ध करतात

**घायाळ**—वि १ जखमी झालेला घावाचे वार ज्याच्या अंगावर झाले आहेत असा, आघातानें घावानें, व्याकुळ झालेला 'रण तुबळ, घुमतें घायाळ, गणती नाहीं मुड्याची।' -ऐपो १८५. घायका भिवयांचें धनुष्य करून मदनाचे विषारी बाण सोडून पुरुषाना घायाळ करितात '-वाय १३ २ (ल ) ( दान्यांत वादांत ) चीत कुंठित प्रतिहत केलेला पराजय कुप्रसिद्धि इ०कारणांमुळें मानखडना पावलेला ३ कमजोर झालेला (रोग शत्रु इ० ) ४ ( लाजिरवाण्या कृत्यामुळें ) मान खालीं घालणारा समाजात (आपलें) तोंड लपविणारा 'त्याच्या पोरीनें व्यभिचार केला म्हणून तो घायाळ झाला [ घाय ]

**घार**—स्त्री १ एक पक्षिविशेष 'गीध घारी काहेसरें।' -दावि २२४ २ घारीच्या आकाराचा व तिच्यासारखा दिसणारा कागदाचा केलेला पतंग [स गृध्र प्र ? घारी] (वाप्र) **घारी सारखी वाट पहाणें**-एखाद्याच्या येण्याच्या वाटेकडे (घारी प्रमाणें त्यावर हल्ला करण्याकरिता) बारीक लक्ष देऊन टपून बसणें डोळ्यात तेल घालून बसणें सामाशब्द- ०**पट**-न (बे )घारी सारखा केलेला कागदाचा पतंग [घार+पाट=वस्त्र कागद] ०**मोर**-न लहान मुलाचा आळचो माळचोसारखा एक खेळ [ घार+ मोर] ०**मोर करणें**-लहान मुलास पायाच्या धुरीवर घेऊन ( घारीप्रमाणें ) उंच करणें ०**वड**-स्त्री. लहान घार

**घारकूट, घारवीट**—न तांदूळ व उडीद एके ठिकाणीं दळून केलेलें जाडें पीठ

**घारगा**—पु एक खाद्यविशेष, पक्वान्न, तांदुळाच्या, गव्हाच्या रव्यात किंवा साज्यांत गूळ घालून त्याची थापटी-चांदकी करून ती तुपात तळतात त्यास म्हणतात, तांबड्या भोपळ्यांत कणिक मळून त्याचा गोळा करून त्याच्या थापट्या तुपात तळून काढ तात त्यास भोपळ्याचे घारगे म्हणतात [प्रा दे घारिया, गु घारी, का गारिग, तुल० स घार्तिक, का घारिगु=तळणें]

**घारणें**—अक्रि १ व्यापणें, घेरणें 'नेणें आपुलें पारिखें। घारलें तें आपल्या दुःखें।' -निगा २८३ २ कैफ इ० का मुळें उन्मत्त होणें, माजणें ३ चढणें, घेरणें, बाधणें (विष इ०), पस रणें 'परि तें बुद्धि विषयविखें। घारिली होती।' -ज्ञा १० १५८ 'भव भुजगाचेनि गरळें। हे जीवजात घारलें।' -भाए ७७१ 'त्यासी सर्प नाहीं लागला। मा विखें केवीं तो घारला।' -एभा २३ ५९७ [स घृ प्रा घार]

**घारपीठ-घडा**—पु घडयाचा एक प्रकार, आयतोळा

**घारवीट**—न घारकूट पहा

**घारा**—वि. १ मांजराच्या डोळ्याच्या रंगाचा ( डोळा ) २ घारडोळ्या ( माणूस ) **घारडोळ्या**—वि घारा, मांज राच्या डोळ्यांच्या रंगाचे डोळे आहेत असा, मांजरडोळ्या [ घारा+डोळा ] **घारेला, घारोळा**–वि गारोळा १ किंचित, थोडासा घारा ( डोळा ) २ किंचित थोडासा घारडोळ्या [घारा+एला ओळ प्रत्यय ] **घाऱ्या**–वि घारोळ्या [ घारा ]

**घारी**—स्त्री ( काव्य ) घार 'घारी अंबरीं करूनि। उड्डूनि पावली स्वस्थानीं।' [ प्रा घारी ] **घारूड**–न १ घारींचा समुदाय २ ( कों ) घार [ घार ]

**घारी**—स्त्री पुरण घालून तळलेली गव्हाची पुरी घारगा सफेद फेणिया पदरोपदरीं। शुद्ध शर्करा भरली भरीं। अमृत फळें ठेविलीं वरी। अभेद घारी वाढल्या।' -एरुस्व १४ १२०, -जै १६ ११० [प्रा दे घारिया गु घारी] ०**पुरी**-स्त्री घारी पुरीचा एक प्रकार 'घाऱ्यापुऱ्या पच मधुरस। श्रद्धापूर्वक ठेविल्या।' -नव ९ ११७ -सारुह ६ ७८ [ घारी+पुरी ]

**घाल**—स्त्री १ ( एखाद्यावर केलेला ) हल्ला चढाई, घाला, चाल (क्रि० घालणें पाडणें पडणें) २ ( ल ) ( आर्थिक ) नाश आघात खराबी नुकसानी (क्रि० घालणें पाडणें पडणें) ३ ( सामा ) ( दैवानें मनुष्यानें एखाद्यावर आणलेलें ) महा संकट अनर्थ आपत्ति ( क्रि० पडणें )

**घॉल**—वि ( गो ) दाट झाडी

**घालण**—स्त्री ( अशिष्ट ) १ संकट आपत्ति, (क्रि० घालणें) 'बहु घालणीं घातलें पूवपापें।' -दावि १६५ २ मार्गांतील

अडण्याचें, अडकण्याचें, रुतण्याचें, फसण्याचें ठिकाण; रुतण; दलदल. ३ (ल.) अवघड, दुर्बोध कविता. ४ नुकसानीची बाब; बुडीचा धंदा; आतबट्ट्याचा व्यवहार. 'यंदाच्या व्यवहारांत हजार रुपयांची घालण पडली.' ५ चोर, दरोडेखोर, लुटारू इ० कांचा उपद्रव असलेलें मार्गावरील ठिकाण, जागा; चोरखिंड; घालणीचें रान. 'चोरें पाव्हतीलें घालण पाहोनी।' –रामदासी २.१३१. 'मार्गांस चार ठिकाणीं घालण आहे, संभाळून जा.' ६ फशीं, तोंडघशीं पडण्याची अवस्था; तोहमत. 'दहांनीं आपली घरें भरलीं आणि मजवर घालण घातली.' [घालणें] घालणीस पडणें–मोठ्या व दु:खकारक अशा असहिष्णुतेस, उतावळेपणास बळी पडणें.

घालणी—स्त्री. घाला; छापा; हल्ला. 'मग अवचीती घालूं घालणी। इंद्रिएग्रामी।' –ऋ ५६. 'म्हणउनि मागें परतलें मन। घालणीचें रान देखोनियां।' –तुगा ८१०. [तु. का. घळणे=भांडण, युद्ध]

घालणें—न. हल्ला; घाला; छापा. 'अनुर्धा कारणें। पडलें अवचीतें घालणें।' –उषा ८९९. 'कोपावरी घालणें घातलें। कापट्य अंतरीं कुटिलें।' –दा ५.३.५०. [का. घळणे]

घालणें—सक्रि. १ ठेवणें; राखणें; स्थित करणें. 'भंवती अर्बीयांची राणे। तेथें घातली ते राजकुमारी।' –उषा २१. २४. 'सर्व माल आधीं घरांत घाल.' २ सोडणें; टाकणें; फेकणें; टाकून देणें; फेकून देणें. 'उडी घालितो संकटीं स्वामि तैसा।' –राम ३७. 'घोडा घालण्याची सोय नसेल अशा खड-काळ व डोंगराळ मुलखांत डुकराची शिकार गोळीनेंच करावी लागते.' –डुकराची शिकार (बडोदें) १. 'त्याला काठीवर भार घालून चालावें लागे.' –कोरकि ३२. ३ उडी टाकणें 'वणवा मियां आघवा। पांखेंचि पुसोनि घेयावा। पतंगु या हांवा। घाली जेवीं।' –ज्ञा १४.१६१ 'रागें समा घातलें आगीं। यालागीं याज्ञिकाचें शिर भंगी।' –एभा ५. १७७. ४ जडविणें; लावणें; तल्लीन करणें. 'स्वरूपीं घातलें मना। यातनेसी केली यातना।' –दा ५ ९.५४. ५ मारणें; फेकणें; प्रक्षेपणें, फेकून मारणें. 'अभिमंन्युनी पंनकासवें। बाणु घातला ईश्वरें।' –उषा १६९४. 'इंद्राच्या या कपटी वारांगनेच्या डोक्यात विश्वामित्रानें जर कमंडलु घातला असता तरच असल्या स्त्रीजातीचा योग्य सन्मान झाला असता.' –नाकु ३ ९१. ६ ओतणें. 'दुधांत पाणी घालणें.' ७ पसरणें; बाहेर मांडणें, मांडून ठेवणें; रचणें; ठेवणें. 'आकाशीं घातीला मंडप।' –मसाप ७.२६. ८ (आंत) खुपसणें; भोसकणें 'घे सुरी घाल उरीं.' ९ (एखाद्या पदार्थांत दुसरा पदार्थ) शिरकावणें, प्रविष्ट करणें; 'पिशवींत पैसे घाल' १० (एखाद्या कामाला मनुष्य, जनावर) लावणें; जुंपणें; नेमणें; योजणें. 'मुलगा पढावयास घातला.' 'तो गव्ही भात कांडाव-यास घाला.' ११ (दुकान, शाळा, बाजार इ०) मांडणें; स्थापन करणें; सुरू करणें. १२ (अंगावर धारण करण्याच्या विवक्षित वस्तु) धारण करणें; परिधान करणें; चढविणें. 'अंगांत अंगरखा, डोकींत पागोटें, पायांत जोडा घातला.' 'नाकांत नथ व बोटांत आंगठी घाल.' १३ (अन्न, खाद्यपदार्थ इ०) वाढणें. 'मला भात घाल.' १४ एखाद्यावर अनिष्ट संकट आणणें; गोत्यांत आणणें; (एखाद्याच्या) नुकसानीस कारण होणें; गळा घालणें; (एखाद्यास) बुडविणें. 'त्यानें मला दहा रुपयांस घातलें.' १५ (मूल) प्रसवणें; (अंडीं) टाकणें; गाळणें. १६ (प्रश्न, उदा-हरण, कोडें इ०) सोडवावयास देणें, सांगणें; हिशेब सांगणें. १७ एखाद्यास एखादी गोष्ट करण्यास अथवा न करण्यास शपथ इ० देणें; शपथ इ० कांचा जोर, आग्रह करणें; शपथ घालणें. १८ बाहेर टाकणें; काढणें; काढून देणें; घालविणें. 'या चोरास प्रथम घराबाहेर घाल.' १९ (दरारा, धाक, भीति, भूल इ०) उत्पन्न करणें; उपस्थित करणें; उठवणें; उद्दीपित करणें. २० (वाद, गोंधळ इ०) करणें; माजविणें. २१ (भिंत, कूड इ०) बांधणें; उभारणें; रचणें. २२ (भोजन, समाराधना, ब्राह्मण, मित्र इ० कांस) अर्पण करणें; देणें. २३ (एखादें काम) सुरू करणें; आरंभणें. 'तिनें गहूं दळावयास घातले.' 'त्यानें घर बांधावयास घातलें.' २४ (चाल, संप्रदाय) प्रचलित करणें; रूढ करणें. २५ (सणाच्या दिवशीं पुरण इ० खाद्यपदार्थ) खावयास, नैवेद्यास सिद्ध करणें. मंगलप्रसंगीं ब्राह्मण जेवावयास घालणें. घालणें हा धातु कांहीं नामास जोडूनहि वापरतात. उदा० (गोष्ट) कानावर घालणें; (मुलाला) विऱ्यावर घालणें इ० या धातूचे अर्थ अनेक आहेत, पण त्या सर्वांचा भावार्थ ठेवणें; स्थापणें; मांडणें; लावणें असा आहे. [प्रा. घल; तु. का घळणे भांडण, युद्ध, मारामारी; हिं. घालना] (वाप्र.) घालून घेणें–(हट्टानें, जोरानें, वेगासरशीं) स्वत:चें शरीर, अंग खालीं वरून आंत टाकणें, फेकणें; एकदम अंग टाकणें. 'त्याला फेफरें आलें म्हणजे तो आगींत घालून घेतो.' 'नदी भरतां भरतां घालुनिया घेती।' –रामदास–रामदासी भा. १५. पृ. २६४. 'भूतळीं भरत घालुनि घे हो। त्या स्थळींहूनि न चित्त निघे हो।' –वामन भरतभाव ५१. 'हें वर्तमान मल्हारराव यांनीं ऐकतांक्षणींच अंबारींत घालून घेतलें.' –भाब ७४. घालून पाडून बोलणें–वक्रोक्तीनें उपरोधिक भाषेत निंदा करणें, दोष देणें; टोमणा मारणें, खोचून बोलणें. 'टोंचून, घालून पाडून बोलण्याच्या कामांत बायका पटाईत असतात.' –संगीत मेनका ११. पदराखाली घालणें–एखाद्यास दोष देणें, लावणें. 'कष्टी होऊनिया लेखीं। प्रारब्धावरी घालिती।' –दा १२.२. ५. या धातूचें समासांत घाल असें रूप होतें. घाल–घालणें या क्रियापदाचें समासांत योजावयाचें रूप. यावरून

पुढील सामासिक शब्द बनले आहेत. ०काढ–स्त्री. (कांहीं जिन्नस, सामान इ० विशिष्ट ठिकाणीं) पुन्हां पुन्हां घालण्याची व तेथून काढण्याची क्रिया, व्यापार; उपसाउपस; (जिनसाची) उगीच्या उगीच हालवाहलव करण्याचा व्यापार; चालढकल पहा. [घालणें+काढणें] ०घसर–स्त्री. १ लांबणीवर टाकणें; टंगळमंगळ; दिरंगाई; चालढकल. 'आज पाहूं उद्या पाहूं अशी घालघसर केली तर ऐनवेळीं कांहींच करतां यावयाचें नाहीं.' –हिंदु(गोवें) १३.८.१९२९. २ रपाटणें; खच्चून भरणें; कोंबणें; ठासणें; चोंदून भरणें. ३ अनास्था; आळसामुळें दुर्लक्ष. 'अध्ययनाविषयीं घालघसर करशील तर फसला जाशील.' ४ घालघुसड शब्दाच्या कांहीं अर्थीहि या शब्दाचा उपयोग करतात. घालघुसड पहा. [घालणें+घसरणें] ०घसरपणा–पु. चुका कर ण्याचा स्वभाव; बेंधळेपणा. [घालघसर] ०घसऱ्या–वि. दिरंगाई, टंगळमंगळ, चालढकल करणारा. [घालघसर] ०घुसड–स्त्री. १ (एखादें काम, धंदा इ०) स्वैरपणानें, मनसोक्तपणें, दपटणें; पुढें चालवणें, ढकलणें. २ (एखादें काम) दडपण्याची, लाटण्याची, लोटण्याची क्रिया; वेठ वारून, विगार काढून, गडबडगुंडा करून (एखादें काम) करण्याची क्रिया. ३ जमाखर्च इ० यांत) अव्यवस्थितपणें, लबाडीनें बाकी, रकमा घुसडणें. ४ मूळग्रंथांत पदरचा भाग) लबाडीनें दडपून देणें; घुसडणें. ५ गोंधळ; घोटाळा इ०नीं युक्त भाषण, व्यवहार; लबाडीचा व्यवहार; लपंडाव. 'मी वचन मोडून कांहीं घालघुसड केली तर मग त्याला काय समजणार आहे?'–नाल २.१८८. [घालणें+घुसडणें]

घालपांड्या–पु. १ विनदिक्कत (दुसऱ्याचा) घात, नाश करणारा, कळलाव्या, आगलाव्या, घातकी मनुष्य. २ वरून मात्र बावळा, वेडा दिसणारा पण आंतून कावेबाज असलेला मनुष्य; वेड पांघरणारा मनुष्य; घालवेडा पहा. [घालणें=जुडविणें, गुरुसानीत आणणें+पांड्या] घालपिसा–वि. वेडेपणाचें, बावळटपणाचें सोंग, ढोंग करणारा; वेड पांघरणारा; घालवेडा, [घालणें+पिसा=वेडा] घालपिसें–न. वेडाचें ढोंग; बाह्यात्कारी धारण केलेला वेडेपणा, खुळेपणा, बावळेपणा. [घालणें+पिसें]

घालफेड–डी–स्त्री. घालफेल; तळमळ; काहिली; (ताप इ०नें) जीव कासावीस होऊन शरीराची होणारी चळवळ; घालमेल अर्थ ७ पहा. 'नवन्सिलयतल्पीं लीजला नीजवीती। घडिघडि करिते हे भीमकी घालफेडी।'–सारुह २.६५. [घालणें+फेडणें] घालफेल–स्त्री. (कों.) (आजारी मनुष्याची होणारी) तळमळ; तगमग; कासाविसी; काहिली; तापाच्या काहिलीमुळें आजारी माणसानें इतस्ततः केलेलें शरीराचें चलन वलन. घालमेल–ली–स्त्री. १ (वस्तूंचा, हिशेबाचा, कामांचा) घोंटाळा; अस्ताव्यस्तपणा; अव्यवस्थितपणा; गोंधळ. २ धांदल; गडबड; गर्दी; धामधूम; धुमाळी. ३ सरमिसळ; सर्व एकांत एक मिसळणें; उलथापालथ. ४ (ल.) एकसारखी मसलत, हिकमत, युक्ति, बेत करणें; डावपेंच खेळणें; साहसाच्या धाडसाच्या कामांत स्वतःस गुंतवणें; (उपजीविकेसाठीं) अनेक उलाढाली करणें; मामलत इ० व्यवहारांची अदलाबदल, घडघटना. ५ (एखादें कार्य जुळवून, घडवून आणण्याची अनेक प्रकारची) खटपट; मसलत; गडबड; धांदल. 'तो सध्यां लग्नाच्या घालमेलींत आहे.' ६ सुरळीतपणें चाललेल्या व्यापारांत, क्रमांत झालेला अडथळा, भंग, खळ. 'पथ्यामध्यें घालमेल न झाल्यास गुण येईल.' ७ (ताप इ०कांच्या योगानें होणारी शरीराची) तगमग; तळमळ; कासाविसी; काहिली. 'नारायण नादें ज्याचिये ठायीं। सहज तेथें नाहीं घालमेली॥'–तुगा २९. घालफेल पहा. ८ तगमगीमुळें (आजारी माणसानें चालवलेली शरीराची) चळवळ; चुळबुळ. 'तिचा जीव घालमेल घालूं लागला'–चंद्र १४०. ९ पोटांतील क्षुब्धता, कालवाकालव. १० (पित्तक्षोभामुळें) उसासणें; उसासा येणें; (उकाड्यामुळें, उबाऱ्यामुळें शरीराचा होणारा) गदका; गदमदणें; गदगदणें; चवढव पहा. ११ (व्यवहारांतील, हिशोबांतील) अफरातफर, डावपेंच; घोंटाळा; गोंधळ; छक्केपंजे; लपंडाव; लुच्चेगिरी. १२ (गो.) भानगड. [घालणें+मेळ; हिं. घालमेल; गु. घालमेल] घालमेलणें–घालमेल करणें; उलथापालथ, गोंधळ, घोंटाळा करणें. [घालमेल] घालमेली–स्त्रीअव. (गो.) हेलपाटे; येरझारा; त्यापासून होणारा त्रास. [घालमेल] घालमेल्या–ली–वि. १ घालमेल, चवढव, अव्यवस्था करण्याचा स्वभाव असणारा. २ चळवळ्या; खटपटी, नाना युक्ती, हिकमती काढणारा, योजणारा; उलाढाली; कारस्थानी. [घालमेल] घालवेड–न. वेडाचें सोंग; बाह्यात्कारी धारण केलेलें वेडेपण; खुळेपणा; घालपिसें. [घालणें+वेड] घालवेडा–वि. वेडाची बतावणी करणारा; बाहेरून वेड पांघरणारा परंतु आंतून धूर्त, लुच्च्या असलेला. [घालवेड] घालाघाली–स्त्री. (कामाचा) गोंधळ; घुडगूस; घालमेल. 'घालाघाली घालिती नित्य सासा। टाकूं बाई नेदिती हा उसासा॥'–सारुह ७.१०६. [घालणें द्वि.] घालामेल–स्त्री. (गो.) व्याकुळता; घालमेल अर्थ ७ पहा. घालामेलणें–अक्रि. (गो.) कासावीस होणें; तगमगणें; व्याकुळ होणें [घालमेल]

घालव(वि)णें–उक्रि. १ विवक्षित स्थळीं असलेला (पदार्थ, मनुष्य) दूर करणें; काढून टाकणें; हाकलणें; हांकून देणें. 'याना एकदा येथून घालवून दिलें होतें.'–विक्षिप्त २.४३. २ धाडणें; पाठविणें; पिटाळणें; 'मी गडी गावास घालविला आहे, आतांच येईल.' ३ (आळ, आरोप इ०कांचें) निराकरण; निरसन, निरास करणें, काढून टाकणें; (प्रायश्चित्त इ० नीं पाप इ०) क्षालन

करणें; नाहींसें करणें; धुवून टाकणें. ४ (पैसा, संपत्ति इ०) उध-ळणें; उडविणें; बेफामपणें खर्च करणें. ५ (वेळ, आरोग्य, तारुण्य इ०ची) नासाडी करणें; आळसानें दवडणें; नष्ट करणें. ६ काढणें; कंठणें; अतिक्रांत करणें. 'घालवि दिवसा मनांतरी वसुनि ।' -विवि ८.६.१२०. ७ (अब्रू, पत, संधि, लाभ इ०) गमावणें. ८ (काम, धंदा इ०ची) नासाडी करणें; चुथडा करणें; विघात करणें; मातेरें करणें; धुळीस मिळवणें. ९ (गणित) (एका संख्येतून दुसरी संख्या) वजा, बाद करणें; वगळणें; काढून टाकणें; कमी करणें. 'विसांतून पंधरा घालविले तर पांच राह-तात.' १० (एखाद्या मनुष्यास त्यास जावयाच्या ठिकाणा-पर्यंत किंवा मार्गाच्या कांहीं अंतरापर्यंत सोबत) पोंचविणें; करणें; निरोप देणें; बोळविणें. 'सासु पती कांता मूल येक करून । गृहामी नेऊन घालविली ॥' -रामदासी २.१३८. ११ (दिवा इ०) मालविणें; विझविणें. 'रदनिके, घालविलास दिवा?' -मृ १३. [घालणें]

घालवर—स्त्री. (कु. कुण.) धार. 'घालवर आकाशात अतिशय उंच उडते.'

घाला—पु. १ हल्ला; धाड, चाल; प्रहार; मारा; छापा. (क्रि० घालणें; पडणें). 'धांवोनि घाला घातला कामें ।' -एक-नाथ-नरनारायणाख्यान. 'बाळकपणीं घातला घाला । काम धांडाळ उठिला । तरुणपणीं ॥' -दा १८.३.४. 'घाला घालूं त्यांवरि ज्याहीं वधिले छद्मनि अनघाला ।' -मोसौप्तिक १.७. २ (एखाद्यावर आणलेलें) मोठें संकट; अरिष्ट; आपत्ति; घात. (क्रि० घालणें). 'सर्वस्व नाश जेणें तो याहुनि कोण वद नवा घाला ।' -मोभीष्म ७.३५. 'कसा गुप्ति घाला केला रावसाहे-बाला ।' -ऐपो १६८. [घालणें]

घाला—पु. एक प्रकारचा मासा. हा मलबार किनाऱ्यावर सांपडतो. -प्राणिमो ८१.

घालीबजंग—वि. रणशूर; युद्धनिपुण; रणगाजी. [अर. घालिब्=बरचढ, जोरदार+फा. जंग=युद्ध]

घालू, घाल्या, घालपाडू—वि. १ लबाडीनें, फसवे-गिरीनें व्यापार, व्यवहार करणारा. २ (दुसऱ्यास) गोत्यांत, पेचांत, संकटांत आणण्याचा स्वभाव ज्याचा तो. ३ कर्ज इ० रूपानें दुसऱ्याचें द्रव्य घेऊन तें बुडविणारा. [घालणें]

घाव—पु घाय १ शस्त्र, हत्यार, इ०कांनी केलेला प्रहार; वार; तडाखा; आघात. 'म्हणौनी नीसाना घावो दीधला ।' -उषा ८१७. 'अशा गुटगुटीत आणि तेजस्वी शरीरावर घाव करण्यास आपला कांहीं हात वाहयाचा नाहीं' -नि १७०. २ (शस्त्र, हत्यार इ०कांच्या प्रहारानें झालेली) जखम; व्रण; घाय; क्षत. ३ (व्यापारांत झालेलें) नुकसान; तोटा; बूड; (धंद्यात बस-लेला) धक्का; ठोकर. (क्रि० बसणें; लागणें; पडणें; भरणें). [सं. घात; प्रा. घाय; सिं. घाउ] (वाप्र.) घाव लावणें-(बायकी) (एखाद्या पदार्थाला, धान्याला) उखळींत घालून हळू हळू कांडणें. (निशाणीं) घाव घालणें-१ युद्धारंभनिदर्शक दुंदुभि वाजविणें; शत्रूवर चढाई करून जाणें. 'घाव तेव्हां घातला निशाणीं । तेणें दुमदुमली अवनी ।' -ह २१.२४. २ (कपडे धुतांना) आपटणें; चोपणें; धुणें. 'पडदाणीचा घातला घाव ।' -मसाप २.२२. म्ह० १ एक घाव दोन तुकडे=एखाद्या वाद-ग्रस्त प्रकरणाचा एका झटक्यासरशीं-तडाख्यासरशीं निकाल लावणें. 'काय? एक घाव दोन तुकडे करा!' -धनुर्भंग १८. २ टांकीचे घाव सोसल्यावांचून देवपण येत नाहीं=दगडाला टांकीनें घडून देवाच्या मूर्तीचा आकार आणतात, यावरून अनेक अडचणी, कष्ट, संकटें सोसल्याशिवाय वैभव प्राप्त होत नाहीं.

घावघवित—वि. घवघवीत पहा. 'अष्टसिद्धि तीर्थांचा तोडरु । चरणीं घावघवित मनोहरु ।' -शिशु १४.

घावटणें, घावटळणें—उक्रि. १ (कों.) हळू हळू कांडणें; सडणें; कुटणें; हळू हळू घाव देणें; अर्धमुर्धें मोडणें; चुरणें. 'तांदूळ अमळसे घावटून आण.' २ लहानशी जखम करणें; घसटणें; खरचटणें; खाजरणें; ओरखडणें; हळू हळू प्रहार करणें. 'चोरांनीं त्यास घावटलें.' [घाव]

घावटा—पु. १ (शस्त्रानें, हत्यारानें झालेली) जखम; क्षत; व्रण. २ शस्त्रानें झालेल्या जखमेची खूण; जखमेचा व्रण; वटा. [घाव+टा प्रत्यय]

घावडों—पु. (गो.) नुकसान; तोटा; बूड.

घावडाव—पु १ एखादी गोष्ट करण्याला अनुकूल स्थिति; योग्य संधि, काल, प्रसंग. 'काळ घेऊं नेदीं वाव । आला तो राखें घावडाव ।' -तुगा ३३८. 'माझ्या घावडावांत जेव्हां येईल तेव्हां मी घर बांधीन.' २ कचाटी; पकड; तावड; पेंच; आवांका: कबजा; अधिकार. 'हातां आला घावडाव । आमुचा मायबाप देव ।' -तुगा ६४४. 'हा ज्या दिवशीं माझ्या घावडावांत सांप-डेल त्या दिवशीं मी याचें पारिपत्य करीन.' ३ (-अव.) युक्त्या; कपटाच्या शकली; लुच्चेगिरीचे उपाय; छक्केपंजे; कावा; डाव. 'मासा मारा करावा म्हणून हा अनेक प्रकारचे घावडाव करतो.' ४ (-अव) प्रयत्न; खटपटी; बेत; हिकमती; युक्त्या. 'घावडाव करून पहावे, काम साधलें तर साधलें' ५ घाव; वार. 'निवडे घावडाव । म्हाया अंगीं ।' -तुगा २३०६. [घाव+डाव; डाव द्वि]

घावणें—अक्रि. (विप्र) गावणें, सांपडणें; आढळणें. गावणें पहा. 'गुरु उदार माउली प्रणतिसौख्यसाउली । जया नरांसि फावली तयांसि सिद्धि घावली ।' -निमा १.१५. [गावणें]

**घावणी**—स्त्री घावन पहा 'त्या पुऱ्या पोळ्या घावण्या तेथें काय उणें।' –अफला ५७

**घावन**—न दगडाची उखळी, उखळ, घाटवाईन [घाव? स ग्रावन्]

**घावन-ना**—पु (को राजा इट) तांदुळाच्या पिठाचें केलेलें पोळीसारखें एक सच्छिद्र खाद्य, धिरडें (का) डोशे कोर्डे–'चार आले पाहुणे चार केले घावने एकेकाच्या तोंडीं दोन दोन' 'घावन पाताळयाच्या ओळी।'–मसाप २ १ २३

**घावशे, घावस**—पुस्त्री (गो कु) माशाची एक जात

**घॉशॉ**—पु (गो) लहान मुलाच्या पोटात होणारा एक विकार

**घाशि(शी)रामी**—स्त्री १ (घाशीराम नावाचा पुण्यातील एक जुलमी कोतवाल सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत होऊन गेला तो तलंगी ब्राह्मणाना लहान लहान काठड्यात अन्नपाण्या वांचून कोंडून ठेवीत असे त्यावरून) श्वासावरोध होण्याइतकी माणसाची गर्दी, दाटी, कोंडमार २ घाशिराम कोतवाल याच्या कारकीर्दीसारखा जुलमी अंमल कारकीर्द, झोटिंगपाच्छाई, करडा अमल 'चार दिवस घाशीरामी चालवून घेतलेल्या अर्वाच्य पंडित मंडळीची आमच्या देशासंबधीं एक मोठी समजूत ही आहे कीं, आमचा देश केवळ श्वासनभरण झाला आहे' –नि [घाशिराम]

**घाश्या**—पु (माण) गाशा पहा [म गाशा, गु घासियो, अर घाशिआ]

**घाश्याल**—न (कु) घास्तेल, रॉकेल, करोसीन. [इ गॅस+ऑईल]

**घा(घा)स**—पु १ तोंडात घालून चर्वण करिता येईल इतका खाद्य पदार्थाचा अंश, परिमाण, तोंडात मावेल इतका अन्नाचा गोळा, कवळ २ घाण्यात, जात्यात घालावयाचा वैर धीचा एक वेळचा हप्ता, परिमाण, 'घास लहान घाल म्हणजे पीठ बारीक येईल' ३ जात्याच्या भोंकांत, खळगींत, घिरटी पाशीं दळलें न जाता शिल्लक राहणाऱ्या दाण्याचा समुदाय (क्रि० धरणें) 'हें जातें घास धरतें' [स ग्रास, किंवा घस्= खाणें, सं प्रा. घास, फें जि स्रास] (वाप्र) ०उतरणें –काढणें–चिरणें–मोडणें–शिजविलेल्या अन्नाचा, भाताचा घासाएवढा गोळा घेऊन त्यावर तेल वगैरे घालून व रेघोट्या काढून अन्नाचा वीट आलेल्या माणसावरून उतरून–ओंवाळून तो घास अग्नींत किंवा घराच्या बाहेर टाकतात तो प्रकार, परक्या माणसाची दृष्ट अन्नास लागून पुढें खाणारास अन्नाची किळस, वीट येतो तेव्हां हा प्रकार करतात ०करणें– भरणें–(एखाद्यास) अतिशय छळणें सळो का पळो करून सोडणें ०काढणें–जात्यांत दळलें न जातां राहणारे दाणे काढून टाकून जातें साफ करणें ०देणें–१ विवाहसमारंभांतील जेवणाच्या वेळीं नवपरिणीत वधूवरानीं उखाणे घेऊन एकमेकांच्या तोंडात घास घालणें २ भरविणें, जेऊं घालणें म्ह० घास भर देणें आणि कोसभर नेणें=थोडक्या मोबदल्यात बरेचसें काम करून घेणें 'घासभर देणें आणि कोसभर नेणें ही अवस्था या लोकाना नकोशी झाली आहे' –खेया **घासीं गू खाणें**–(अक्षरश) (अन्न खात असताना त्याबरोबर विष्ठा भक्षण करणें उ० एखादी आई जेवीत असताना तिचें मूल तिच्या मांडीवर हगतें व न कळत, त्या विष्ठेचा अंश अन्नाबरोबर आईच्या पोटात जाता यावरून•) एखाद्यासाठीं अतिशय कष्ट सोसणें, हरप्रयत्न करणें, खस्ता खाणें सामाशब्द– ०खाऊ–वि. (उप) आयतें खाण्याशिवाय दुसऱ्या कशाकडेहि लक्ष न देणारा (कुटुंबातील आयदी, निरुद्योगी, मनुष्य) [घास+खाणें] ०मुटका– पु पिशाचाचा उपद्रव टाळण्यासाठीं, त्याना संतुष्ट करण्याकरिता बाहेर टाकावयाचा अन्नाचा गोळा (क्रि० देणें, टाकणें, उतरणें)

**घास**—पु गवत, वाळलेलें गवत, तृण 'अरिवरि शर जेंवि अग्न्युपरि घास।' –मोकर्ण १४ ६१ [स घास, हिं घास] सामाशब्द– ०कटाऊ–काढू–वि (गवत कापण्याचें काम करण्याला लायक) १ अडाणी घटिंगण, घसमुसळ्या २ (उप) बिन धारेची, बोथट तरवार, शस्त्र ३ (उप) शिपाई, तरवारीनें लडणारा [घास+काटणें=कापणें] ०काटणी–स्त्री १ गवताची कापणी २ सरकारी जमिनीवरील गवत कापण्याबद्दलचा कर, फी [घास+काटणी=कापणी] ०काडी–स्त्री (व्यापक) गवत, कडबा, वैरण इ० ०गहाण–न गहाणाचा एक प्रकार यात व्याजाऐवजी गहाण टाकलेल्या जमिनीचें उत्पन्न धनकोनें घ्यावयाचें असतें. [घास+गहाण] ०दाणा–पु १ सैन्याला गवत व वैरण पुरविण्याच्या खर्चासाठीं बसविलेला कर, खंडणी हा कर मराठे लोक मुलुख गिरीच्या काळात स्वतःच्या लष्करासाठीं शत्रूच्या गावातून वसूल करीत हा राजाराम छत्रपतीच्या वेळीं संताजी, धनाजी, व रामचंद्र अमात्य यानीं उत्पन्न केला तो वसूल करण्याचें काम नागपूरकर भोसल्याकडे बहुधा असे घोडयास गवत व चंदी मिळावी ह्या उद्देशानें हा कर घेत असत हा सुमारें शेंकडा दोन असे (–पया ३५०) व पैसा किंवा धान्यरूपानें वसूल केला जात असे –रा १० ३२३ याला मेजवानी असेंहि म्हणतात (–वाडसभा २ ३०३) 'जमीनीच्या उत्पन्नाप्रमाणें दोनपंचमांश हिस्सा घासदाण्याच्या रूपानें वसूल घेण्याचा खुद्द गावाशीं ठराव केला' –गागा ८ 'ह्या दोघा वीरांनीं घासदाणा म्हणून तिसरी एक बाब वसूल करण्याचा प्रघात घातला' –स्वप २५९ २ (सामा) सरबराई, दाणावैरण, पाहुण्याची बडदास्त [म घास+

दाणा, गु घासदाणे, हिं घासदाना] ०वाला, घासीवाला–पु गवत विकणारा 'कवाडी तुरक घासीवाले।' –दावि ७०

**घास**—स्त्री मोत्यास छेद पाडण्यानें वजनांत होणारी घट, कमीपणा, घस –जनि परिशिष्ट ( बडोदें ) ३ [स घर्षू, प्रा घास, म घासणें, घस, गु घास=तोटा] ०काम–न (सोनारी) दागिने वगैरे घांसून त्यांस झिलाई, तजेला देण्याचें काम

**घासघीस**—स्त्री घासाघीस पहा

**घा(घां)सटणें**—उक्रि १ घासणें, खरचटणें, खरवडणें, घसटणें २ ( ल ) फुचाडणें, लुबाडणें, बुडविणें, नागविणें. 'मला त्यानें शमर रुपयास घांसटलें' –अक्रि. १ घासलें जाणें, घसवटणें यावरून २ ( एखाद्यास व्यापारधंद्यांत ) बूड येणें, ठोकर बसणें, तोटा होणें 'त्या व्यवहारांत मी फार घासल्लों' [ घासणें ]

**घा(घां)सण**—स्त्री (कों) ( व्यापारांत आलेली ) घस, बूड, नुकसानी, तोटा ( क्रि० बसणें, लागणें, येणें ) [घासणें]

**घा(घां)सणी**—स्त्री १ घासण्याची, जोरानें पुसण्याची, घासटण्याची, उटण्याची, उजळा देण्याची क्रिया, घासण्याचा व्यापार २ ज्यानें घासावयाचें, उजळा द्यावयाचा, तो पदार्थ, घासण्याचा पदार्थ उ० अंगघासणी, दातघासणी ३ ( भांडीं इ० घासण्यास केलेला ) गवत, पानें, काथ्या इ० काचा चोंथा ४ ( ल ) कचाकची, घासाघास, जिगजीग, कटकट, भांडाभांडी, चकमक ५ गाजणूक, जाच, छळ [ घासणें ]

**घा(घां)सणें**—उक्रि १ घर्षण करणें, चोळणें, जोरानें पुसणें, साफ करणें, घासटणें २ खरडणें, झाजरणें, ओरबडणें. ३ राग भरणें, कानउघाडणी करणें, खरडपट्टी काढणें, खडसणें ४ वाद विवाद, चर्चा, भवति न भवति, काथ्याकूट करणें ५ (एखाद्यास व्यवहारात) फसविणें, बुडविणें, फुचाडणें ६ ( ल ) पुन पुन ( एखाद्या अभ्यासाची ) आवृत्ति करणें, घोकणें, पाठ करणें, घट करणें 'हा श्लोक दहादा घासला म्हणजे पाठ होईल' ७ पढवून तयार करणें, पढविणें, मेहनतीनें अभ्यास करविणें 'हीं पोरें घासलीं पाहिजेत, तेव्हां दोन अक्षरें येतील' ८ ( ज्ञान इ० कांस) उजळा देणें, गज घालविणें, आवृत्ति करून ( ज्ञान इ० ) तयार ठेवणें –अक्रि १ घासलें जाणें २ ( ल ) ( एखाद्याशीं ) भांडणें, झगडणें, चकमक होणें, खेटणें, वरकशी लावणें, स्पर्धा करणें ३ घासाघीस करणें, आग्रह, अट, हट्ट धरणें, ओढून धरणें [स घर्षण प्रा, घासण, हिं घिसना, गु घसवु सिं घशो, मैं स्तोस] घासून घेणें–१ (निराशेनें, संतापानें, निष्फळ झालेल्या मत्सरानें) हात चोळणें, चुरमळणें, चडफडणें 'तू आपल्या घरीं घासून घेतलेस म्हणून त्याचा केसही वाकडा होणार नाहीं' २ सोसणें, सहन करणें (नुकसान, दु ख) म्ह० घासून घ्यावें पण होऊन घेऊ नये=वेळ पडल्यास वाटेल तें नुकसान सोसावें पण लोक आपणास हसतील, टपका देतील असें करू नये

**घासलेट**—न केरोसीन तेल, घासतेल, रॉकेल [ गॅसतेलचा अप इ गॅस=वायु,+म तेल]

**घासाघा(घी)स, घांसाघां(घी)स**—स्त्री १ पुन पुन घासणें, यावरून २ ( ल ) नेहमीं खडकावणें, खरडपट्टी काढणें, कानउघाडणी करणें ३ वादविवाद, चर्चा, काथ्याकूट ४ काचाकाच, कलागत, कटकट ५ खाराखीर, जिकीर, ओढून धरणें, घिसघीस करणें, ओढाताण ६ ( स्पर्धा, मत्सर इ० कांनीं होणारी ) कचाकची, चकमक, झगडाझगडी, भांडाभांडी, अतिशय वरकशी लावणें ( क्रि० करणें, घालणें, मांडणें, लावणें ) ७ सैन्याचे फिरकोळ हल्ले प्रतिहल्ले [ घासणें द्वि ]

**घासापूस**—स्त्री ( गो ) चौकशी घासापुसचें–अक्रि ( गो ) १ चौकशी करणें २ घासाघीस करणें [ घासणें+पुसणें ]

**घासारी**—पु. (सोनारी) घासणारा, मोतीं वगैरेवरील खरड घासून त्यास आकार व तजेला देणारा [ घासणें ]

**घासावचें**—( गो ) घास मारणें [ घांस ]

**घासावणें**—अक्रि ( गो ) ( दुखण्यामुळें अंथरुणावर ) खितपत पडणें, अशक्त होत जाणें [ घासणें ]

**घासी**—स्त्री कष्ट, त्रास, दु ख 'पापियांची घासी कां लावावी। तो पापाविना असता।'–शिपु २ ५ २१ [का घासि= श्रम, कष्ट, त्रास ]

**घासीव**–वि. घासलेला, खरडलेला, घासटलेला [ घासणें ]

**घाळ**—स्त्री. (कों) ( पाण्याच्या प्रवाहानें, जोरानें पडलेला ) ओहळ, घळ, चर, खाच [ घाळणें ]

**घाळ**—वि १ ( प्र ) गहाळ, गाहाळ, अव्यवस्थित, घोटाळ्या, गोंधळ्या, विसराळू ( मनुष्य), अस्ताव्यस्त, विस्कळित, गोंधळयुक्त ( काम, धंदा, कागदपत्र इ० ) २ ( गो ) गाफील बेशुद्ध, असंबद्ध घाळाजाणें–( गो. ) चुकणें, सांडणें घाळापडणें–( गो ) १ सांडणें, गहाळ होणें २ ढिलें पडणें. [गहाळ] ०घोळ–पु १ (बेत, मसलत, वस्तु काम इ० कांचा) गोंधळ, घोटाळा खिचडी, अव्यवस्था, गोंधकार २ धांदल गडबड, हैराणगत

**घॉळंकार**—पु ( गो ) गोलकार गोलाकार पहा [घोळ]

**घॉळकावचें**—क्रि ( गो ) हेलपाटे, खेपा घालावयास लावणें, नाचविणें

**घाळण**—स्त्री ( कों ) घळण (भिंत, बांध, धरण यांतील) भेग, भगदाड, खिंड, खिंडार. ( क्रि० पडणें, होणें ) [घळणें]

**घाळणें**—अक्रि ( मोत्याचें वेज, कानाचें छिद्र ) मोठें, सैल होणें, घळणें [ घळणें ]

घाळणें—सक्रि गमावणें, हरवणें, भलत्या जागीं ठेवणें,गहाळणें –अक्रि १ विसरून घोडचूक करणें, गोंधळल्यामुळें चुकणें, घसरणें, बेसावधपणें फसणें २ आडमार्गानें जाणें,भटकणें, भलतीकडे जाणें (प्र ) गहाळणें [ गहाळणें ]

घिगी—स्त्री (राजा ) तुळया, ओंडके, वहालें इ० उच चढवण्यासाठीं केलेली दोन लाकडांची कैची, वाकलेल्या, कलकेल्या झाडाला धीर, आधार देण्याकरितां लावलेली कैची घिग्या लावणें–( असमर्थ, नाखूष मनुष्यास एखादें काम करण्याची ) उठावणी देणें, चेतविणें, रडतराऊत घोड्यावर बसविणें

घिट्टी—स्त्री (गो ) घिरटी

घिरगीस—पु कीड लागलेल्या लाकडाचें पीठ

घिरघिरचें—अक्रि. (गो ) १ घेरी येणें २ फिरत राहणें, गरगर फिरणें [ गिर्‌गिर् ]

घिरघिराट—पु ( जातें इ०कांचा) घरघाट, घर्‌घर् आवाज [ ध्व. घिर द्वि ]

घिरघिरें—न सहान मुलांचें एक प्रकारचें खेळणें, एक प्रकारचें भिरभिरें गिरगिरें [ ध्व घिर् ]

घिरघिसा—पु वाळवीनें खाल्लेल्या लाकडाचा भुगा, किरकिसा पहा

घि(घिं)रट—पु १ (राजा कु गो ) (प्र ) घरट भात भरडण्याचें जातें, मोठें जातें, घरट पहा २ वेढा, फेरा, घेर, गराडा, घिरटी तेथें अलिकुलाचा घिरट।’–कथा १ १ १४ [ स घट्ट ]

घिरट–टी—स्त्री (कर ) (जातींतील ) धराफणिक एकेक माणसास दिलेलें जेवण, मेजवानी घरटी आमंत्रण पहा ‘त घिरट घालणार आहेत ’

घिरटणें—सक्रि (राजा ) घ(घि)रटात धान्य इ० घालून भरडणें [ घिरट ]

घिरटी—स्त्री १ जातें, घरटी २ वर्तुलाकार फिरणें, फरी, गिरकी, गिरकांडा, भ्रमण (क्रि०) घालणें ‘नाना अवताराच्या घिरटी।स्वयें घेत परमात्मा।’–ह १८ १७३ ३ वळसा फेरा, (क्रि० घालणें ) ४ हेलपाटा, येरझार, फरी, (निष्फळ झालेली) खेप ५ गस्त, (पोलिसाचा ) फिरता पहारा, (इ ) राउंड. ६ लपत छपत, चोरून लपून, गिरकी घेणें, गिरकी घेत टेहळणें, उदा० घार आकाशात घिरट्या घालते ‘ काळ चोर घिरट्या बहु घाली। पामरा तुज कशी नीज आली।’ घरटी पहा

घिरटी—वि घरटात घालून भरडलेलें ( भात इ० ) [घिरट]

घिवर—धीवर पहा

घिसघिशा—वि घिसघिस, घासाघीस करणारा स्वभाव ज्याचा तो [ घिसघिस ]

घिसघि(घी)स—स्त्री घासाघीस पहा

घिसण—न घासणें, घर्षण, घासणी ‘अग्नी सकळा ठाईं आहे। कठीण घिसणीं प्रगट होये।’–दा १६.५ २० [ घासणें, हिं घिसना ]

घिसणें—सक्रि (अशिष्ट ) घासणें. [ घासणें, हिं घिसना ]

घिसा—पु घिसाडी ‘घिसा चतुर अपाडेंसीं।’–प्रयराज (महाराष्ट्र सारस्वत ) २ ६०

घिसाडी—वि १ जाडेंभरडें लोहारकाम करणारी एक हलकी जात, ही स्थायिक नसते २ वरील जातीचा मनुष्य, लोहार

घिस्सा—पु कुस्तींतील एक डाव, यात आपल्या एका हातानें जोडीदाराच्या बरगडीवरून हात घालून आपल्या बाजूच्या जोडीदाराच्या मांडीजवळ चड्डी धरून आपल्या दुसऱ्या हातानें जोडीदाराच्या आपल्या जवळ असलेल्या हातानें कोपर धरून जोडीदाराला ओढून चीत करतात [ म घिसणें, हिं घसीटना ] ०चतुरशिंगी–स्त्री आपल्या एका हातानें जोडीदाराच्या आपल्याकडील कुल्ल्यावर चड्डींत हात घालून धरून आपल्या दुसऱ्या हातानें जोडीदाराच्या बगलेंतून हात घालून जोडीदाराच्या पलीकडील हाताचें मनगट धरून आपल्याकडे ओढून आपला मागील गुडघा जोडीदाराच्या मानेवर व डोक्यावर ठेवून जोडीदारास चीत करणें यास चतुरशिंगी घिस्सा म्हणतात ०नाल मोडण्याचा–पु आपल्या हातानें जोडीदाराचा बाहेरचा पाय पजानें धरून दुसऱ्या हातानें जोडीदाराचा आपल्याकडे असलेला हात कोंपरावर धरून आपल्याकडे जोडीदारास झटका देऊन चीत करणें ०बाळसागळ्याचा–पु आपल्या हातानें जोडीदाराच्या आपल्याकडील पायाच्या घोट्यावरून हात घालून जोडीदाराच्या पायाच्या पजावर आपला मुडा टेंकून आपल्या हाताच्या पजानें जोडीदाराची मांडी धरून आपल्या बाहेरच्या पायानें जोडीदाराच्या आपल्याकडच्या हाताच्या कोंपऱ्यास आपल्या पायाच्या तळव्याचा दाब देऊन जोडीदारास चीत करणें ०लपेट–पु आपला एक पायाचा पजा जोडीदाराच्या गुडघ्याच्या लवणींत घालून आपला जो पाय जोडीदाराच्या गुडघ्याच्या लवणींत घातला आहे त्याच बाजूच्या आपल्या हातानें जोडीदाराच्या बाहेरील हाताचें मनगट धरून त्याच्या बगलेंतून आपल्याकडे ओढून आपला दुसरा हात जोडीदाराचा जो हात ओढला असेल त्या मुडघावर ठेवून आपल्या पायानें जोडीदाराच्या गुडघ्याच्या लवणींत घातलेला पाय वर उचलून झटका देऊन जोडीदारास चीत करणें याला लपेटघिस्सा म्हणतात ०शोरेगरी–पु जोडीदारास लाव करून एका हातानें बरगडीवरून आपला हात पोहोंचेल त्या ठिकाणीं, जांघाड्यात, चड्डींत हात घालून जोडीदाराच्या

आपल्या जवळ असलेल्या पायाच्या पोटरीवर जोडीदाराकडील आपल्या पायाचा पजा ठेवून आपलें डोकें जोडीदाराच्या आपल्या बाजूच्या हाताच्या मुडयावर ठेवून आपल्या चडडीस धरलेल्या धरगडीस कळ येईल असा दाब देऊन त्याला चीत करणें

**घिस्सी**—स्त्री. (व ) एका बाजूनें फरफटत जाण्यासाठीं (गाडीच्या) आखाला चाकाऐवजीं बांधलेलें तिरपें लाकूड [ घिसणें ]

**घी**—(राजा कु ) घे बद्दल वापरतात 'माजे दोन सबाद ऐकोन घी'—ममाप २ ३६७

**घी**—न. तूप [स. घृत, प्रा घिअ, हिं गु घी ] म्ह० १ (गु )घीनो दोडियो अने दोडियानु घी=वाण्यांचा फसवेगिरीचा ल्टपटीचा प्रकार, लटपटीचा, फसवेगिरीचा हिशेब इ० २ घीगया पर कुपा तो गया नहीं=घालेल्या गोष्टीबद्दल काहीं तरी समजूत करणें ३ घी देखा पर बडगा नहीं देखा सामाशब्द- **०गुत्ता**—पु गावच्या जमीनदाराचा किरकोळीनें तूप खरेदी व विक्री करण्याचा हक्क, मक्ता **घीवकेणी**—पु तूप विकणारा 'खोत कुणबी दाणे दाणी। घीव केणी।'—दावि ७० [ घीव=घी अप केणी=विकणारा ]

**घीवर-घेवर**—पु फेसलेल्या रव्याचें तळून, पाकवून केलेलें पुरीसारखें पक्वान्न [स घृतवर, प्रा घेवर ] **तांदुळाचे घीवर**—पु तांदुळाच्या पिठात दाट दूध घालून व सबगोळ करून व ताप वलेल्या तुपात तें ओतून चांगले पसरट घीवर तयार करतात ते **०पात्र**—न घीवर ज्यात करतात तें पात्र

**घीस**—स्त्री झीज शरीरें घीस साहाणें। दुर्जनासीं मिळोन जाणें। निंदकास उपकार करणें। हा सत्त्वगुण।'—दा २ ७ ६९ [घिसणें=घासणें तुल० का घासी=श्रम दु ख]

**घुई**—स्त्री १ (ना ) अळवाचा कांदा, अळकुडी २ (ना व ) कोय अठोळी बाठी [ हिं घोयां ]

**घुई**—स्त्री (व ) रातकिडा [ ध्व ]

**घुक**—वि (ना )काळाकु घोर निबिड, घनदाट अंधार घुक पडला होता '

**घुग**—पु भुगा भ्रमर 'तेव्हा तळ्यात म्हैस बसली होती तिच्या शिंगात घुग होऊन धाकटा मुलगा जाऊन बसला '—मसाप १ २ २३ [ ध्व गु]

**घुगघुगी**—स्त्री गळयाच्या घाटीखालचा, कंठमण्याच्या खालचा गोलसर भाग

**घुंग(गू)ट**—पु डोक्यावरून व तोंडावरून घेतलेलें वस्त्र, कपडा, तोंडावरून आच्छादनार्थ घेतलेलें वस्त्र, बुरखा [ हिं घूघट=बुरखा पडदा, गु घुघट, तुल० स गुठन, प्रा अगुंठ ]

**घुंगरटें**—न चिलट, मच्छर, चेंबरें, डास घुगरट पड़ा. [ ध्व गु, गु ]

**घुगरा**—पु (राजा. ) ( नाविक ) चार मोठे जाडे दोर घेऊन त्याचा एक मोठा जाडा ( गलबताच्या उपयोगाचा ) करण्याची क्रिया यासाठीं एक लाकडी चौकट वगैरेचें यंत्र असतें

**घुगरा**—पु ( ना ) एका टोकास घुगरू बांधलेली काठी हिचा ताल धरण्यास उपयोग होतो [ घुगरू ]

**घु(घुं)गरावणें**—अक्रि १ (प्रां. ) चिडून, संतापून (एखाद्याच्या ) धसकन् अंगावर येणें, ( एखाद्यावर ) तुटून पडणें, २ घुडकावणें

**घुगरी**—स्त्री १ न भरडता, सालीसकट शिजविलेलें (विशेषत द्विदल ) धान्य, शिजविलेले हरभरे, कडधान्य, हरभऱ्याची उसळ 'घुगऱ्या वांटूनि निजप्रीतिनें । आली रुक्मिणी राउळासी।' २ (व ) चणे, तूर वाटाणे इ०ची उसळ ३ धान्याची, पिकाची मळणी झाल्यानंतर शेतकरी कमाविसदार, पाटील सरकार याना जी धान्याची ( त्यानीं घुगऱ्या कराव्या म्हणून ) नजर करतो ती, हें एक प्रकारचें बलुतें आहे धान्य खळयात मळल्यानंतर शेतकरी गावच्या अधिकाऱ्यांस (त्यांच्या) हक्कादाखल देतो 'याबरी पाटील कुळकर्णी याची। काय रीत परभारा नेमणुकीची। घुगरी किंवा बलुत्याची। ते लावणीवर कोणे विधी॥ '—पैमासंद्र (एखाद्याच्या) **सटीच्या घुगऱ्या खाणें-खालेल्या असणें**-(एखाद्यापेक्षा ) ज्ञानानें व अनुभवानें पुष्कळच अधिक चतुर व प्रौढ असणें, वयानें मोठा असणें (मुलीच्या दिवशीं—मूल जन्मल्याच्या सहाव्या दिवशीं-सटी देवीची पूजा करून तिला घुगऱ्याचा नैवेद्य दाखवितात आप्तेष्टानांहि घुगऱ्या वाटतात त्यावरून)एखाद्याच्या सटीच्या घुगऱ्या खाहेला मनुष्य त्या ( दुसऱ्या ) मनुष्यापेक्षा अनुभवानें वयानें ज्ञानानें पुष्कळच अधिक असणार त्याला लहान माणसानें शिकवू नये )

**घुगरू**—पु मोगऱ्याची एक जात

**घुगरू**—पु (काव्य) घुगट घोंगती 'मग धावळीचा घुगरू घेऊनि। अभीची करीत मानसपूजा।'

**घुंगरू, घुगुर**—पुन न घागरी, हा पोकळ असून ह्याचा आकार करवंदाएवढा गोल असतो याच्या वरच्या बाजूस दोरा ओंवण्याजोगी कडी, नाकें असतें हा पोकळ असून आंत खडा घातलेला असतो, त्यामुळें कोमल आवाज होतो ह्याची दोरींत माळ ओंवून तो चाळ नर्तिका नाचतांना पायाच्या घोटयाजवळ बांधतात मोठे घुगरू शोभेसाठीं जनावरांच्या गळयांत बांधतात [ ध्व घु+स रू–रव हिं घुघरू सिं घिंघिरू ] **घुगुरमाळ**—स्त्री. घुगरांची केलेली माळ ही माळ बैल इ० पशूच्या गळयांत घालतात

**घुगरू**—न रेशमाची एक जात —मुव्या ९७

**घुंगरूट, घुंगु(घु)रटें-डें घुगडें**—न १ चिलट, मच्छर, कंबरें, (लहान) डांस 'घुगडीं म्हणती आमुचें घर। निश्चयेंसी।' –दा ११०४१ २ (ल) लहान मुलगा, अगदीं लहान व अशक्त मनुष्य [घुगरू]

**घुगस**—पु भोंवतालीं कोट असलेल्या शहराच्या, गांवाच्या वेशीपुढे असणारा बाहेरचा कोट, बाह्यकोट [घुगट]

**घुगा**—पु १ पूर्णपणें उमललेली कळी २ (को) छपरावर घातलेल्या भातेणाच्या जुन्या पेंढया, घरावरील तृणाची कुसकी गुडी

**घुंगार**—पु कोणताहि पदार्थ-विशेषत मास इ०-नरमसर शिजल्यावर खालीं उतरून थंड होऊं द्यावा, थंड झाल्यावर त्याचें कोंडाळें करून त्यात एक निखारा ठेवावा आणि त्यावर तूप ओतून लागलीच भांडयावर झाकण ठेवावें या कृतीस घुगार असें म्हणतात –गृशि २ ३७ (क्रि० देणें)

**घुगी**—स्त्री १ पाऊस इ० कापासुन संरक्षणार्थ डोक्यावर घालावयाची घुंगुमाची, सखलादीची घोंगी, खोळ, घुंगुसाचें शिरस्त्राण, बनातीची कुंची [फा कूकी, हिं घूगी]

**घुगी**—स्त्री (कों) वाऱ्याचा झपाटा, वाऱ्याची वावटळ, भोंवरी

**घुगी**—स्त्री (कों) किंकाळी, कर्कश आरोळी, किंचाळी. [स घु=शब्द करणें, फा घुगा]

**घुगी, घुगुम**—स्त्री (गो) घुबड [स घूक] **घुगु, घुगुवाळ**-घुघु घुघुवाळ पहा

**घुंगुट**—पु घुंगट पहा 'स्त्रीची साक्ष घुंगुट घालुन किंवा पडद्यात घालुन घ्यावी?'–न्यासे ३४ ०**पट**–पु बुरखा, बुरख्याचें वस्त्र 'घुगुटपट काढुनिया हळुच लागे काना।' बयाबाई रामदासी–राजवाडे ९३ [घुगट+पट=वस्त्र]

**घुंगुर**—पुन घुगरू पहा 'त्या खालते घुंगुर सज्ज घाली।' –सारुह ६ ३० 'होती नाद निघे सुमजु हलनी जीं कांचिचीं घुगुरें।'–कम २ ६८ ०**माळ**–घुगरूमध्यें पहा ०**वाळा**–पु घुगरू, घागऱ्या लावलेला (लहान मुलाच्या पायात घालावयाचा) वाळा 'वाजवरे वाळा। वेल्हाळा। रुमझुम घुंगुरवाळा।' –वाग्विजयती

**घुंगु(घु)रडा-रुडा-डें**—पुन घुगरटें पहा. 'घुगुरुडऐसे वदन। म्हणे पर्वत सगळा ग्रासीन।'–ह ३५ १०९.

**घुग्गू**—पु (व) राग, घुस्सा 'एवढयाशान घुग्गू येतो'

**घुघर(रू)ट**—न घुगरटें पहा

**घुघरी**—स्त्री घुगरी पहा.

**घुघाट-टी**—पुस्त्री घुबडाचा शब्द, घू कार दिवाभीताचे घुघाट।'–मुआदि ३६ ५८ 'क्रूर श्वापदाची दाटी। दिवाभीताची घुघाटी।'–भारा बाल १२ ६३ [ध्व घु+आट प्रत्यय]

**घुंघाणें**—न घुबडांचा आवाज, घूत्कार, घुघाट. 'दिवसा दिवाभीत घुघाणें। राजद्वारीं श्वानें सेंघ रडती।'–एभा ३० ६५ [ध्व घू घू+याणें]

**घुघातणें**—अक्रि (घुबड इ० कांनीं) शब्द करणें, घू घू शब्द करणें, गुणगुणणें 'जैसे सर्व लोक निजलिया। उलूक उठे घुघातु।' –हको? [ध्व घू घू]

**घुघु**—स्त्री घुबड, पारवा, होला इ० कांचा आवाज, घूत्कार [ध्व स. घु]

**घुघु**—वि १ लहान, चिमुकलें, छबकडें, कुकुलें (मूल अथवा पोरकटपणा ज्यांच्या अंगीं आहे असा मोठा मुलगा किंवा मुलगी). २ खुजा, दुबळा (मनुष्य) [कुका–कु] ०**वाळ**–न अजाणतें मूल, लेकरू, कुकुवाळ, घुघुलें बाळ घुघु अर्थ १ पहा [घुघु+बाळ] **घुघुलें बाळ**–न लहान मूल, कुकुवाळ, कुकुल बाळ, घुघुबाळ [घुघु]

**घुंघुर, घुंघुरटें-डें, घुंघुरडा**-घुगरू, घुगरटें पहा

**घुघुरदा**—पु घों घों आवाज करणारा भुंगा, भ्रमर, भोंवरा. [ध्व. घु]

**घुंघूर**—पु १ (प्र) घुगूर, घुगरू पहा २ घागूड, फुलाचा कांदा.

**घुट**—पु (गो) बहुमतानें केलेला ठराव [स घट्ट]

**घुट-कन्-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि १ घुटक्यासरशी, गट्कन, पाणी इ० गिळण्याच्या आवाजाप्रमाणें (क्रि० पिणें) २ एकदम, खुटकन (क्रि० जाणें) 'घुटकन् प्राण गेला' [ध्व]

**घुटका**—पु १ गुटका. पाणी इ० पातळ पदार्थांचा घोट, आवंढा, चूळ (क्रि० घेणें) गुटका पहा [प्रा घुं हिं घूट, म घोट, का गुटकु सिं घुट्को]

**घुटका**—पु एखादें काम करताना अवयवविशेषाला अलौकिक शक्ति येण्याकरिता योगी वैरागी लोक तोंडात धरण्याकरिता जी गोळी देतात ती (प्र) गुटका, गुटिका गुगे, ताईत, गुडी गुटका पहा. काहींना काहीं प्रयत्न व्हावा। पूवजन्मदस्यु जटिळ बोलावा। घुटका बनवावा कीं गुटका।'–दावि २६०. [स गुटिका]

**घुटघुट-टां**—क्रिवि घगाघग, घटघटा, घटघट पहा 'मूल घुटघुट दूध पिणें' [ध्व घुट् द्वि]

**घुटना**—न कुस्तींतील एक डाव आपले दोन्ही हात जोडीदाराच्या आपलेकडील बगलेंतुन घालून बाहेरील हात दंड धरून ओढ वा व आपल्या पायाची नळी जोडीदाराच्या मानेवर ठेवून जोडीदाराला त्याचा धरलेला दंड आढून व मानवर पाय देऊन त्याला चीत करणें [हिं घुटना=गुडघा]

घुटम(मु)ळणें—अक्रि. १ अंतकाळची घरघर लागली असतांना प्राण न जातां घोटाळत राहणें. २ गुटमळणें; गुरमळणें. ३ रेंगाळणें; अडखळणें; मागें-पुढें करणें.

घुटराण—वि. (ना.) १ अतिशय घाणेरडा (वास); २ दुर्गंधयुक्त.

घुटवळणें—अक्रि. अंतकाळच्या वेदनांनीं युक्त होणें; आंचके देणें; तडफडणें; प्राण जाण्याची पाळी येणें. 'एका तिडके-बरोबर तो घुटवळला.' २ प्राण कंठास येणें. 'सर्पदंश होतांच प्राण घुटवळला.' ३ (एखाद्या मनुष्याच्या, पदार्थाच्या उत्कंठे-मुळें) घाबरें होणें; धायकुतावणें. 'त्याचा प्राण आईसाठीं घुटवळला आहे.' [घोटणें+वळणें]

घुटा—पु. (वे.) गुठा; एक प्रकारचें औत; गुठा-ठें पहा.

घुटी—स्त्री. १ गुटी; जायफळ इ० औषधें उगाळून त्यांत दूध घालून तान्ह्या मुलास पाजावयाचें मिश्रण. 'नाहीं दिधली घुटी स्वहस्तें।' –देकृष्णजन्म (पद) ५३. 'तुज उगाळुनी पाजितें घुटी।' –मध्व २५. २ उंसाचें पेरें, कांड. ३ योगी, बैरागी देतात ती अजब शक्तिदायक गुटिका; गोळी; गुटका, घुटका पहा. [सं. गुटी=गोळी; का. गुट्टि; हिं. घूटी; गु. घुटी] ०देणें–सक्रि. भारणें; मोंदणें; भुलविणें; भुरळ घालणें; मोहनी घालणें. ०बसणें–(गुटिकेचा) परिणाम होणें; अंमल दिसूं लागणें, लागू पडणें.

घुटुघुटू—क्रिवि. घटाघटा. [घटघट]

घुटें—न. उडदाच्या डाळीचें फोडणी, मसाला इ० घालून केलेलें वरण, आमटी

घुटूर—न. प्राणोत्क्रमण होतांना कंठांतून निघणारा आवाज. –क्रिवि घुटकन्; घुटदिशीं [ध्व.]

घुटूटा—पु. (कर) मुठींत दांडू धरला असतांना दांडूच्या करंगळीकडील बाजूला पुढं आणून दाडूवर चिन्नी ठेवावयाची व ती पुन्हां उडवून त्याच बाजूनें पुन्हा चिन्नी मारणें 'घुट्टा घुकला.'

घुट्टा—वि. (व) ठेंगणा; ठेंगू बुटा; गिड्डा. 'घुट्या नव-ऱ्याला घुटी बायको बरी' [का. गुड्ड]

घुडु—न. (माण.) ससाचें पिलूं.

घुड—पु. (गो) घुमट.

घुडगा—पु (कों) गुडघा. [गुडघा]

घुडंग—न. (राजा.) घुबड.

घुडघुडी—स्त्री. (कु) गुडगुडी पहा.

घुडणें—अक्रि. (प्रवास–निघणें, जेवणें, मरणें इ० करा-यास) सिद्ध होणें; (प्रवास, अनंतत्वाचा प्रवास करण्याच्या) बेतांत असणें. 'तो निघावयास, जेवण्यास, जाण्यास घुडला.' [सं. घट्] घुडाघूड–स्त्री. (राजा.) (जाण्याला, काम कर-ण्याला) सिद्ध, तयार होणें; प्रवासास जाण्याच्या वेळची (माणसाची, पशूची) सिद्धता, तयारी, सज्जीकरण. 'तुमची घुडाघूड होईल तों मीं जेवून येईन.' [घुडणें द्वि.]

घुडवो—पु. (कु.) शेतास पाणी देण्याकरितां दोन्ही बाजूस दोन दोन दोऱ्या बांधलेली, एक हात लांबीची चपटी टोपली या टोपलीनें दोन इसम डबक्यांतील पाणी वर शेतांत फेकूं शकतात. (गो.) घुडों.

घुडॉ–डी—पुस्त्री. (गो.) शेताचा विभाग.

घुडा–ड्या—पु. वरंगळ जातीच्या तांदुळांतील एक प्रका-रचा तांदुळ. –वि. वरंगळ जातीचा (तांदुळ). ०वरंगळ–पु. वरंगळ जातीचा एक प्रकारचा तांदूळ.

घुडी—स्त्री. कबुतरखाना; खुराडें; घूड पहा.

घुडी—स्त्री. (कु.) गुडी पहा.

घुडे–डा—नपु. आकारानें अर्धवर्तुळाकार व उंच असें शेतास पाणी देण्याचें एक प्रकारचें सूप. (कु.) घुडवो पहा.

घुडु—न. १ (क्षिमता येण्याच्या वेळचा) पोटांत होणारा गडगड आवाज. २ मेघगर्जना; विजांचा कडकडाट; गडगडाट. [ध्व. का. गुडु]

घुण—पु. लांकूड कोरणारा एक किडा. 'कै खट्वांग जुनें घुणें लिहिलें? हें खड्ग कैचें करीं।' –निमा १.६६. [सं.]

घुणाक्षर–न. १ घुण नांवाच्या किड्यानें लाकूड कोरल्यावर उमटलेल्या, उठलेल्या अक्षराची आकृति; किड्यानें कोरलेल्या जागचें अक्षराकार चिन्ह. 'विपायें घुणाक्षर पडे। टाळिये कावळा सांपडे।' –ज्ञा १७.३०१. २ भुंग्याच्या गुंजारवांत, गुणगुण-ण्यांत अक्षरासारखें भासतें, ऐकायला येतें तें. [घुण+अक्षर] घुणाक्षरन्याय–पु. (न्याय) घुणाक्षरावरून बनविलेला न्याय-शास्त्रांतील एक न्याय. किड्यानें सहजगत्या कोरलेल्या आकृतींत एखाद्या अक्षराचें, वस्तूचें, मनुष्याचें, साम्य (चित्र) आढळतें. यावरून यदृच्छाघटित अकल्पित गोष्टीस हा न्याय लावतात. सहजासहजीं घडणारी गोष्ट; असंकल्पित घटना. 'हा घुणाक्षर-न्यायानें या कटकटींतून खरोखरच नांव विचारण्याचा कानडी प्रश्न उमटला कीं काय?' –मा ६३. [घुण+अक्षर+न्याय]

घुणघुणा—पु. नाकपुड्यांतील पडद्याचा खालचा मांसल भाग; नाकांतील एक अवयव; गुणगुणा; घोळाणा; घोणा. [सं. घोणा=नाक]

घुणघुणाट—पु. घों घों असा आवाज. [ध्व. घुण द्वि.+आट प्रत्यय]

घुणा—पु. १ (सोनारी) सांखळीचा, दागिन्याचा दुहेरी दुवा; आंवळ गांठ (याचा आकार ८ सारखा असतो) (क्रि० देणें). २ बिरडें; गेंद; पेंच; बोंडी; मणी (तोडा इ० दागि-न्यांचा). ३ दोरांची, सांखळ्यांची एकांत एक गुंतून

(शोभेसाठीं) केलेली मोठी गांठ, गोंडा, झुबका. ४ लांकडाशीं लांकूड जोडून तीं तेथें घट्ट रहावीं असा बांधण्याचा प्रकार. ५ (उतरणीवर गतीचा अवरोध करण्याकरितां) गाडीच्या चाकांच्या मागें घालावयाचा लांकडाचा दांडा, काठी, खरडी. (क्रि० घालणें, लावणें). 'गाडीला घुणा लावा.' ६ (ल.) अडचळा. 'चालू कार्याला घुणा घालण्यासारखें होईल.' [सं. घोणा? तुल० का. गुणी=चाबकाची मूठ] ०घालणें–अडथळा करणें; व्यत्यय आणणें. ०घेणें–एखादें ओझें घट्ट बांधताना दोराची दुहेरी अढी, दुमड, विळखा (घोणा) घेणें.

घुणा–ण्या—वि. दुर्मुखलेला; एकलकोंड्या; आंतल्या गांठीचा; तोंडाचा जड; घुम्या पहा. [सं. घृणा; हिं. घुणा]

घुनी—स्त्री. (माण.) फार लहान कान असलेली मेंढी.

घुन्या—वि. (व.) घुणा–ण्या पहा.

घुबड—न. १ घू घू शब्द करणारा एक पक्षी; उलूक. हा दिवसां दडून बसतो (म्हणून यास दिवाभीत असेंहि म्हणतात) व रात्रीं भक्ष्य शोधण्याकरितां बाहेर पडतो. हा उंदरांचा संहार करतो. घुबड व त्याचा घूं घूं आवाज हीं सर्वत्र अशुभ मानलीं जातात. २ (निंदार्थी) हिडिस व ओंगळ दिसणारी म्हातारी स्त्री. [ध्व. घूघू+ड प्रत्यय] ०तोंड्या–वि. (निंदार्थी) एक शिवी; घुबडासारखें तोंड असणारा. [घुबड+तोंड]

घुंयड—स्त्री. (वे.) गर्दी; झुंबड. [का. गुंपु, गुमी=गर्दी]

घुंबरडा—पु. १ कबुतरांचा घू घूं असा आवाज. २ (ल.) गोंगाट; कलकलाट (मुलांचा–खेळण्याच्या वेळेचा). (क्रि० घालणें; करणें). [ध्व. घुंब+रडा प्रत्यय. हंबरडा प्रमाणें]

घुयॉ—पु. (गो.) ताडमाडाच्या बुडतास वेष्टून असलेला कापसासारखा भुगा; चकमकीपासून उत्पन्न होणारी ठिणगी यावर घेतात. चकमकीचा कापूस.

घुबुकेल—न. टावकें; गुप्त ठेवा. घबुकेल पहा. (क्रि० लागणें; सांपडणें)

घुम—स्त्री. गोम; घोण. –बदलापूर १२८.

घुम, घूम—पु. (गो. कु.) कानाच्या मधल्या पाळींत घालण्याची लहान मुरकी; कुडें.

घुमकट—न. (वे.) चाकाच्या तुंब्यावरील धावेप्रमाणें असलेली लोखंडी कंगणी, कडें. गुमकट पहा. [का. गुब=चाकाचा मांदळा+कट=वेढें]

घुमकांघचें—क्रि. (गो.) गुद्दे मारणें; ठोंसे देणें; ढोंसणें. [गो. घुमकों=गुद्दा]

घुमकी—स्त्री. (वादन) डाव्या हाताने बाय्यावर तळ हाताचा मनगटाजवळील भाग टेकून बोटांनीं जो गंभीर ध्वनि काढितात तो. [ध्व]

घुमको—पु. (गो.) गुद्दा; ठोंसा; ढोंसा. [ध्व]

घुमघुमणें—अक्रि. (तोफ इ० कांचा) घुमघुम आवाज होणें; दुमदुमणें; दणाणणें; दणदणणें; घोषणें; घुमणें. 'घुमघुमती घोषा। वेदपथांच्या।' –ज्ञा १५.१८८. 'तेणें दिशा घुमघुमती।' –राविं [ध्व. घुम् द्वि.]

घुमट—पु. देऊळ इ० कांच्या कळसाखालीं असलेला डेऱ्याच्या आकाराचा बंदिस्त; कळस; घटाटोप; डेऱ्याच्या आकाराचें छप्पर. –न. घुमटाच्या आकाराचें एक चर्मवाद्य. हें घुमटाच्या आकाराच्या मातीच्या (मोठ्या) घड्याच्या तोंडास चामडें लावून तयार करतात. 'थोड्या वेळानें मध्यभागीं बसलेल्या तिघा–चौघां इसमानीं आपापल्या घुमटावर प्रास्ताविक थापा देण्यास सुरवात केली.' –सह्याद्री ६६. [फा. गुम्बज्–द्; हिं. गुम्मट=मनोरा, डेरा]

घुमटला—वि. (ना.) घुम्या; एकलकोंडा; मुकस्तंभ. [घुमा]

घुमटा—पु. (विशिष्ट वाद्यांचा) घुमणारा आवाज; गजर. [घुमणें]

घुमटी—स्त्री. १ लहान घुमट. २ (गो.) देव्हारा. [घुमट]

घुमड—पु. १ घुम; डोळ्यांतील खुपऱ्या. (क्रि० येणें; फोडणें; बसणें). २ (मुलांच्या भाषेंत) पापण्यांचा तांबडा अंतर्भाग (जो भिवविण्याकरितां बाहेर काढतात तो). 'त्या पोरानें मला डोळ्याचे घुमड दाखवले.'

घुमण—न. घुबड. [ध्व]

घुमणें—अक्रि. १ (तोफ इ० कांचा व गंभीर शब्द) दुमदुमणें; दणाणणें; घोषणें; प्रतिध्वनियुक्त होणें; हवेंत भरून राहाणें. 'जंव नाद्य नाहीं पवना। तंव वाचा आथी गगना। म्हणऊनि घुमे।' –ज्ञा ६.२७८. २ (वाद्यें इ० कानीं) आंतल्या आंत बराच वेळ खोल आवाज काढणें. ३ (वाद, गप्प, आजार, आवाज, खेळ इ०) रेंगाळणें; लांबत जाणें; चिघळणें; रेंगणें. ४ (पिशाचसंचारामुळें, थंडीच्या हुडहुडीमुळें, अति श्रमामुळें, रेंगाळलेल्या दुखण्यामुळें, हरीक इ० कांचा माद चढल्यानें) हूं हूं करणें; धापलणें; उमासणें; लाहक्या देणें; धापा, सुस्कारे टाकणें; कुंथणें. 'तरवारीनें कैक मेले कैक घायाळ तिथें घुमती।' –विवि ८.४.८०. ५ (हरीक इ० धान्य, पदार्थ) चिवचिवणें; उमळणें, खतखतणें; फसफसणें. 'हे हरीक कांहींसे घुमतात, निवळले म्हणजे चांगले होतील.' ६ (अंगांत संचारलेलें भूत) चेष्टा करूं लागणें; खेळणें; हालचाल करणें. ७ (पारवे इ० पक्ष्यांनीं आपला) घूं घूं असा आवाज करणें. (पक्ष्यांनीं) तारगंभीर आवाज करणें, गाणें. 'जेवीं घुमति पारवे पंक्ति। तेवीं वाजति पादभूषणें।' 'पंचमस्वरें पक्षी घुमती। राघव स्मरणें

गर्जोनिया ।' ८ (एखाद्या गोष्टीची) बराच काळ बोलवा असणें 'ते माडा बांधणार हें वर्षभर घुमत आहे ' ९ (एखादी गोष्ट गुप्तपणें) कर्णोपकर्णी पसरणें, पसरलेली असणें 'तिनें पाट केलें आहे हे वर्तमान दोन महिने गावात घुमत आहे ' १० लवकर पुरें व्हावें म्हणुन चालु झालेलें कार्य लांबणीवर पडणं. 'तें काम चालू होऊन पाच वर्षे झालीं, अद्युन घुमतेंच आहे, समा सीस गेलें नाहीं ' [स घूर्णन, प्रा घुम्म, घुम्मण, सिं घुमणु]

**घुमपट**—पु. (गो) गाडीच्या तुब्यासभोंवार असलेला लोखंडी वाळा, कडें, घुमकट पहा [का गुब=चाकाचा मादळा+पट्टी]

**घुमरणें**—अक्रि (कों.) १ (पिशाचसंचार होऊन) घुमणें, हु हु असा आवाज करणें, अंगात यणें २ (भूत-पिशाचानें) चेष्टा करणें, खेळणें, वारें शिरणें [घुमणें]

**घुमरा**—वि थोडासा अम्मल, माज, शिसारी आणणारा, घुमणारा (हरीकाचा प्रकार). [घुमणें]

**घुमराई**—स्त्री विपुलता, घुमरी 'येकच रणवाद्याची घाई। वीरश्रीची घुमराई ।'—होला १८८ —ऐपो २९८ [घुमरी]

**घुमरी**—स्त्री १ मुगळ्याचा एक खेळ, यात तोंडानें घुमण्यासारखा आवाज काढून नाचतात (क्रि० घालणें) २ मोठमोठ्यानें आरडणें, ओरडणें (क्रि० घालणें) 'घुमरी घालीत जोर बैठक दवळात व शेतात दखील फावेल तेव्हा मारावी ' —खेया ३ एक प्रकारचें वाद्य. 'घुमऱ्या मोहऱ्या पावे सुस्वर ।' —ह १० १५ [घुमणें]

**घुमरी**—स्त्री (काव्य) १ लयलूट, विपुलता, चंगळाई, सुकाळ, समृद्धि, भर उत्कर्ष 'त्याचिया विकासी आलिया घुमरी । आल्या गाईवरी अधिक गाई ।' —तुगा २९ २ (ल०) पीक, धान्य, दाणा 'मेघा तोषोनि यावरी । इच्छिल्या ऐसी वृष्टि करी । तेणें पिकती घुमरी । आणि गोधनेंही दुभती ॥'—निगा ४६ —वि भरपूर, विपुल, समृद्ध 'ऐशिया योजा परी । बीजें पेरिलिया क्षेत्रीं । पीक पिकेल घुमरी ।' —एभा ६ ३०७ [ध्व]

**घुमवणें**—सक्रि (आवाज इ०) पसरविणें, निनादित करणें 'जनीं घुमवली स्वातंत्र्याची धैर्य उत्तजक वाणी ।' —विक १७ [घुमणें]

**घुमशाण**—न (गो) धांगडधिंगा, मनसोक्त नाच [घुम शान]

**घुमशान**—न घमसान पहा (गो) घुमशाण

**घुमा**—पु. १ (भोंवऱ्याच्या खेळात) भोंवऱ्याच्या डोक्यावर पाडलेला खोंचा, डाव जिंकणारानें हरलेल्याच्या भोंवऱ्यावर आपला भोंवरा मारणें २ (मनुष्य, पशु वठणीवर आणण्याकरितां, पशु माणसाळविण्याकरितां त्याला दिलेला) चोप, दणका, दणकारा, धक्का, धपाटा, कठोरपणानें वागविणें, जरब दाखविणें (क्रि० घालणें, गाजविणें) 'हा भारी दांडगाई करतो दोन दिवस घुमा घालावा म्हणजे वठणीस येईल ' ३ (अतिशय काम केल्यानें, आजारीपणानें आलेला) क्षीण, थकवा, निरुत्साह, (छळणुकीमुळें, तगाद्यामुळें आलेला) ग्रासीकपणा, हुळहुळेपणा, (बेदम मार मिळाल्यानें अंगाचा उडालेला) खुर्दा, चकनाचूर, खुरमा, चकाचूर (क्रि० घालणें, गाजविणें, घेणें) 'ह्या लोकानें माझा घुमा घातला ' ४ मोडकळी, खुरदा, चूर [? का गुम्मु=मारणें] **घुमेबाजी**-स्त्री भोंवऱ्याचा एक खेळ, भोंवऱ्याच्या खेळात डाव जिंकणारानें जिंकलेल्या गड्याच्या भोंवऱ्यास खोंच देण्याचा प्रकार

**घुमा**—पु १ (एखादें काम धंदा) दिरंगाईवर, लांबणीवर टाकून बसणें, चालढकल झालेली अवस्था (क्रि० घालणें, कर्माची पद्धी) २ (एखाद्या हातीं घेतलेल्या कामाची चालविलेली) दिरंगाई, चालढकल, ढ्यगय, अळटळ, चेंगटाई (क्रि० घालून बसणें, घेणें) [घुमणें]

**घुमा**—पु एक प्रकारचा नाच, खेळ. 'नाचे गं घुमा।' —मसाप २ २३४ [ध्व]

**घुमा-म्या**—वि १ दुर्मुखलेला, एकलकोंडा, मनमोकळा नसलेला २ वरून स्तब्ध पण आंतल्याआत घुमफुसणारा, आंतल्या गाठीचा, खोल मनाचा ३ मुखस्तंभ, तोंडाचा जड, अबोल्या, मितभाषी. ४ (ल) टोंण्या, सुस्त, जड, दगड, टोणपा (मनुष्य) [तुल० प्रा गुम्म=मुग्ध, घाबरा, व्याकुळ, का गुब=संकोच एकलकोंडेपणा] **घुमावाघ**-पु १ गर्जना न करता सावजावर झडप घालणारा वाघ २ (ल) वाच्यता, उगाच वटवट न करता आपलें काम साधून घेणारा खोल मनाचा मनुष्य ३ अतिशय आळशी मनुष्य (आळशी वाघाप्रमाणें) —शाको **घुमें वेड**-न १ कोणाशींहि न बोलण्याचें, मुखस्तंभाप्रमाणें वेड २ वरील वेडाचें ढोंग, सोंग (क्रि० घेणें) [घुमें+वेड]

**घुमाऊ घुमाव**—पु १ गांवकरी, शेतकरी यांजपासून (गाव, शेत याबद्दल) सरकारी वसुलापेक्षा घेतलेला जादा आकार २ (रत्नागिरी, कोल्हापूर इ० भागात) आवराई कुरण, शेत जमीन इ० काचा मक्ता कौल —क्रिवि (कर)खंडानें, मक्त्यानें, कौलानें 'जमीन दोन वर्षांकरितां घुमाऊ दिली आहे ' [हिं घुमान=एक बलाची जोडी एका दिवसात जितकी नागरील तितकी जमीन]

**घुमाट**—न (कु हट) एक वाद्य घुमट अर्थ २ पहा

**घुमाणघुस्का**—वि (बे) आतल्या गांठीचा, घुमा, खोल मनाचा पण कपटी [घुमा+घुसा=राग]

**घुमार**—न घुमण्याचें कार्य, किंवा घुमारा पहा 'मायेचें घुमार सर्वांगीं भरलें वारें ।' –दावि ५०१ [घुमणें]

**घुमारणें**—अक्रि (कैफ, मादक पदार्थ इ० काच्या) अमलानें, माजानें युक्त होणें, धुंदी, कैफ चढणें 'तेणें घुमारिला भीमसेन। परि कपट नेणती धर्मार्जुन। मग निजेला पडुनंदन। वृकोदर तो।' –कथा ५ ११ २९

**घुमारा**—पु मांत्रिक, पंचाक्षरी 'कोणी वैद्य घुमारा पहा बाई आसल पुरता ।' –पला ९६ [घुमरणें]

**घुमारा**—पु घुमणारा आवाज, नाद 'न रुग रवि दृढ वेरा। काढुनि दे आतील घुमारा।' –ह ६ ११ [घुमरणें]

**घुमारा, घुम्मा**—पु (बे) एक प्रकारचा पक्षी

**घुमारा-रें**—पुन (पिशाच भूत इ० काचा) अंगात संचार होणें, वारें येणें, अवसर, संचार 'काय आता घुमारें येईल अंगासी।' –व ३१ [घुमरणें]

**घुमारीन**—वि घुमणारा, अंगात वारें येणारा (देह अंग) पछाडलें जाईल असें 'नाहीं यत वारें अंगासी माक्षीया। घुमारीन काया नव्ह माक्षी। –व ३५ [घुमरणें]

**घुमा(म)रणें**—सक्रि फिरावयास लावणें, चक्कर करणें, फिरवणें [हिं घुमाव=फिरवणें, सिं घुमाइणु=फिरविणें]

**घुमिली**—वि धुंद माज आलेला, तर्र झालेला (डोळा इ०) 'राधा हरिला पुसती नेत्र विलसती लाल भासती उघड दिसती दृष्ट घुमिली।' –होला २२ [घुमणें=माजणें, कैफ येणें]

**घुमें**—न (राजा) घुमा अर्थ २ पहा (क्रि० घालणें)

**घुयऱ्या**—वि (व) धुम्या

**घुरकणी**—स्त्री (गो) वाघाची डुरकावणी डरकाळी गुरकणी पहा [घुरकणें]

**घुरकणें**—अक्रि (वाघ इ० नें) आरडणें, आरोळी टाकणें गुरकणें पहा 'पदतळीं असती दोनी व्याघ्र। घुरकोनि पाहती रूप उग्र।' –दावि ३४४ [हिं घुरकना, म गुरकणें ध्व]

**घुरकों**—वि (गा) डुरकणारा, घुरकणारा, डुरक्या फोडणारा (वाघ इ०) [घुरकणें]

**घुरकी**—स्त्री (दे) घुमरी अर्थ १ पहा

**घुरगडी**—स्त्री (हट) एक प्रकारचा हुक्का गुरगुडी पहा

**घु(गु)रगुटणें**—अक्रि गुरगुरणें पहा

**घुरगुटां**—पु (गा) कोळी (कीटक) [गुरगुरणें]

**घुरघुर घुरघूर**—स्त्री गुरगुर पहा घरघर 'दडपे धनुर्ध्वज। दाढी करी घुरघुर। पाणें पेंगी दशा दूर। कधीं नाहीं देखिली।' [ध्व गुरगुर प्रा घुरुघुरत गु घुरघुर] **घुरघुरणें**—अक्रि १ गुरगुरणें पहा २ वाजणें 'दारांदिशीं वाहाळ्या। घुरघुरिती दिवाळ्या।' –शिशु ५२३ [घुरघुर] **घुरघुर घात**—पु दाहो १ ११ ज्याच्या योगानें पोटात गुरगुरतें व स्नायूच्या शक्ती क्षीण होतात असा वाताचा विकार [घुरघुर+वात] **घुरघुरावणें**—अक्रि डुरकाळी फोडणें, गुरगुरणें, गुरकणें, गुरकावणें.

**घुरघुरा**—पु एक किडा, घोगरा [ध्व घुरघुर, हिं घुरघुरा]

**घुरघूस**—पुस्त्री गुरगूज पहा एक टोंक अणकुचीदार असून दुसऱ्या टोंकास लोखंडी बारीक कड्या बसविलेलें, एका जातीच्या फकीराच्या हातात असलेलें हत्यार, पैसे मागितले असता न दिल्यास तो फकीर हें हत्यार आपल्या छातींत, मांडींत खुपसण्याचा आव आणतो व अशा रीतीनें आपणाविषयीं दया उत्पन्न करून पैसे उपटतो [फा गुर्झ, गुरगूज]

**घुरघूस**—क्रिवि° गाढ, स्वस्थ, घोरत गुरघुस पहा (क्रि० निजणें) °**मारणें**–पाय पोटाशीं घेऊन निजणें, गुरगुटून निजणें [गुरघुस]

**घुरट-टा**–वि १ ज्याच्या अंगास दूध, दहीं, ताक, लोणी इ० काचा कुजट व उग्रस वास येतो असा (बकरा, माजर, वाघ इ०) 'दुभिये अंगीं घुरट घाणी। बहु खासी दूध सुप लाणी।' –तुगा १२९ २ घामट, घाणेरडी घाणेरी घुरटी तुला तरि कसी ते मानली नाकळ। –निमा १६६ 'घुरटे घाणेर वोंगळ गोवळी।' –व ५२९ [उग्रट वर्णविपर्यास] –**टाण**–स्त्री (बकरा माजर इ० जनावराच्या अंगाची यणारी) उग्रट, कुजट घाण, घुरटाण [घुरट+घाण]

**घुरणें**—अक्रि १ घोरणें २ घुर्घुर् आवाज करणें (माजर इ० नीं) [स घुर्]

**घुरदळणें**—अक्रि इकडून तिकडे उड्या मारणें, धांगडधिंगा घालणें, धिंगामस्ती करणें, धुडगूस, धिंगाणा घालणें, खिदडणें जिगडणें –सक्रि गुधडणें पहा [घुरदळा]

**घुरदळा-ळें**—पुन १ गुधडा पहा २ खिदडा, धिंगाणा, धांगडधिंगा धिंगामस्ती (क्रि० घालणें, मांडणें) [स.घुर्=आवाज करणें+दल्=फोडणें नासणें म घुरणें+दळणें]

**घुरदळी-ळ**—स्त्री घुरदळा अर्थ २ पहा (क्रि० घालणें, मांडणें) [घुरदळा]

**घुरप्याउंदीर**—पु १ मोठ्या जातीचा उंदीर शेतातील उंदीर २ (ल) अहल बिलंदर नार ३ कावबाज व कारस्थानी पाताळयंत्री मनुष्य

**घुरम**—स्त्री (गो) दोन टोंकानें द्वारें

**घुरमळणें**—अक्रि घुरमळणें १ (एखाद्या पदार्थाभोंवती) घिरट्या घालून घुटमळणें रगाळणें भावडणें (उ० पतंग दिवा भोंवती, माशा गोड पदार्थाभोवती घुरमळ्यान लागे) २ (काही एका कारणानें) एखाद्याच्या भोंवतीं असणें, पुढे पुढे करणें, लाळ घोटणें ३ (विसरभोळा आलेल्या दिव्याची ज्योत निपून घालणारा

जातील अशा तऱ्हेनें वापरणें, अनास्था चुयडा करणें –अक्रि रेंटून, जोरानें आत शिरणें, (स्वत स) जोरानें आत ढकलणें [घुसणें, हिं घुसेडना]

**घुसडा**—पु. (वाईट रीतीनें वापरलेल्या कपडे, कागद, पुस्तकें इ० काचा) चुयडा, चोळामोळा दुर्दशा, चेंचा, चेंदा, घुडगूस (मनुष्य, जनावर इ० ची) फार काम करून घतल्यानें झालेली दुर्दशा, भुसडा, दामगी वळलेली स्थिति [घुसडणें] ०**घुसड**-स्त्री (वस्त्र, कागद, पुस्तकें इ० काची) तुडवातुडव, चोळामोळा, हिसकाहिसक, चुयडा, (मनुष्य जनावर इ० काचा फार कामानें पडलेला) भुसडा, दामटी [घुसडणें द्वि]

**घुसणी**—स्त्री (गाट्याचा खेळ) गोट्याच्या खेळात हरलेल्या गड्यास द्यावयाची एक प्रकारची शिक्षा इचे कोंपर घुसणी, पेरघुसणी व कानघुसणी असे तीन प्रकार आहेत [घुसणें] **कोंपरघुसणी**–स्त्री हरलेल्या गड्यानें, कोपरानें उडवीत गोटी गलींत नेणें **पेरघुसणी**–स्त्री यात बोटाच्या पेऱ्यानें गोटी गलींत उडवीत न्यावी लागते **कानघुसणी**–स्त्री यात कानानें गोटी गलींत न्यावयाची असते

**घुसणें**—अक्रि १ जोरानें आत शिरणें, प्रवेश करून घेणें, दपटून शिरकणें, दुर्गम अशा स्थळीं गर्दीत बळानें, युक्तीनें प्रवेश करून घेणें 'त्या दाटीमध्यें तो घुसला' २ (ल) (हक्क, अधिकार, आमन्त्रण नसतां जमातींत) आगंतुकाप्रमाणें, प्रविष्ट होणें शिरणें, आगंतुक जाणें, 'त्यास जातीमध्यें घेत नव्हते पण तो युक्तीनें घुसला' [स गवेषण, म गवसणी, हिं घुसना]

**घुसडणें, घुसडा**— (कु) घुमडणें, घुसडा पहा

**घुसपणी**—स्त्री (गो) गुलागुत, गोंधळ, घोंटाळा [गो. गुसपूचे]

**घुसपटणें**—घुसमटणें पहा

**घुसपागोंधळ**—पु गुतागुत, घोंटाळा

**घुसपाल**—पु (गो) (कान इ०) पिळण्याची, पिरगळण्याची क्रिया, कानाला खडा लावणें, पुन्हा न करण्याचा निश्चय [अर गोश्माल?] **कानाघुसपाल**–पु (गो) कानपिटी, कानास खडा लावणं [कान+घुसपाल]

**घुसपूचें**—अक्रि (गो) गुंतणें, गोंधळणें (प्रयोजक) घुसपावचें.

**घुसमट**—स्त्री १ श्वासनिरोध, जीव कोंडणें २ घुसमड पहा

**घुसमटणी**—स्त्री (गो) गुदमरणी, श्वासाचा कोंडमारा [घुसमटणें]

**घुसमटणें**—अक्रि. १ दम कोंडल्यासारखें होणें, गुदमरणें श्वासावरोध होणें 'मी धुरानें घुसमटलों' २ (ल) कोंडमारा झाल्यानें, तोंड दाबून बुक्कीचा मार अशी अवस्था झाल्यानें अगदीं जेरीस येणें, कोंडमारा होणें, अडचणलें जाणें ३ घुमडलें जाणें, अस्ताव्यस्त होणें, चोळवटून जाणें, चुयडा होणें [स घृष्+मृद्]

**घुसमटमार**—पु (गो) गुदमरणें, कोंडमारा, दम कोंडणें. [घुसमटणें]

**घुसमड**—स्त्री १ तुडवणी, चुथडा पाडणें, मर्दन, चोळामोळा २ घुडगूस, धिंगाणा, धिंगामस्ती, धागडधिंगा [घुसमटणें]

**घुसमाट(ड)णें**—सक्रि १ (ना) (एखाद्याची) रग जिरविणें, (एखाद्याला) जमीनीवर लोळवून त्याचीं गात्रें शिथिल करणें २ रगडणें, दडपणें 'मुरगाळीता कान। घुसमाडील सावधान।' –तुगा ३२०६. ३ कोंडमारा करणें [घुसमटणें]

**घुसमांडणें**—सक्रि कोंडमारा करणें –शर [घुसमटणें प्रयोजक]

**घुसलखाना, घुसल्खाना, घुसळखाना, घुसूलखाना**—पु १ स्नानगृह न्हाणीघर २ खल्वतखाना, एकांताची खोली –मदरु १५३ [अर घुस्ल्=स्नान+फा खाना=घर]

**घुसवि(व)णें**—सक्रि आत ढकलणें, रेटून (आत) घालणें, शिरकवणें, घुमडणें, बळेंनें, जोरानें रेटणें [घुसणें प्रयोजक]

**घुसळखांब**—पु (ताक, दहीं इ०) घुसळण्याची रवी दोरीनें ज्या खांबास अडकविलेली असते तो खांब, घुसळण्यास उपयोगी खांब 'माझें नाव घुसळखांबांत' –सुघु २ [घुसळणें+खांब]

**घुसळण**—न १ घुसळण्यासाठीं भांड्यांत घातलेलें दहीं, विरजण इ० 'उठुनी प्रात काळीं गौळणी घुसळण घुसळीती।' –भज १० २ घुसळण्याची क्रिया [घुसळणें] ०**पात्र**–न विरजण घुसळण्याचें भांडें [घुसळण+पात्र=भांडें]

**घुसळणें**—सक्रि १ (दहीं इ० भांड्यात घालून) रवीनें मथणें, मथन करणें, ढवळणें २ गदगदा जोरानें हलविणें, इकडून तिकडे ढकलणें ३ (एखाद्यास) फार किंवा अवघड कामें सांगून दमविणें, भागविणें, राबविणें बेजार करणें, जेरीस, जिकीरीस आणणें, घाम काढणें याच अर्थी **हाडें घुसळण** असादि प्रयोग आहे 'मला अनेक उद्योग सांगून घुसळू नकोस' 'ह्या श्लोकानें मला भारी घुसळलें तर्व्हा लागला' [प्रा घुसल, आर्मेनियन जि सुसेल]

**घुसळप**—न (क) घुसळण्याची क्रिया घुसळण अर्थ १ पहा 'घुसळपानें हात दुखूं लागले' [घुसळणें]

**घुसळा**—पु १ घुसळून निघालेला पदार्थ २ (घुसळून काढलेला) लोण्याचा गोळा नवनीत [घुसळणें]

**घुसळीव**—वि घुसळलेला, मंथन केलेला [घुसळणें]

जातील अशा तऱ्हेनें वापरणें, अनास्था, चुयडा करणें –अक्रि रेंदन, जोरानें आत शिरणें, (स्वत स) जोरानें आत ढकलणें [घुसणें, हिं घुसेडना]

**घुसडा**—पु. (वाईट रीतीनें वापरलेल्या कपडे, कागद, पुस्तकें इ० काचा) चुयडा, चोळामोळा, दुर्दशा, चेंचा, चेंदा, धुडगूस, (मनुष्य, जनावर इ० ची) फार काम करून घेतल्यानें झालेली दुर्दशा, भुसडा, दामटी वळलेली स्थिति [घुसडणें] ०**घुसड**-स्त्री (वस्त्र, कागद, पुस्तकें इ० काची) तुडवातुडव, चोळामोळा, हिसकाहिसक, चुयडा, (मनुष्य जनावर इ० काचा फार कामानें पडलेला) भुसडा, दामटी [घुसडणें द्वि]

**घुसणी**—स्त्री (गोट्याचा खेळ) गोट्याच्या खेळांत हरलेल्या गड्यास द्यावयाची एक प्रकारची शिक्षा इचे कोंपर घुसणी, पेरघुसणी व कानघुसणी असे तीन प्रकार आहेत [घुसणें] **कोंपरघुसणी**–स्त्री हरलेल्या गड्यानें कोपरानें उडवीत गोटी गलींत नेणें **पेरघुसणी**–स्त्री यात बोटाच्या पेऱ्यानें गोटी गलींत उडवीत न्यावी लागते **कानघुसणी**–स्त्री यात कानानें गोटी गलींत न्यावयाची असते

**घुसणें**—अक्रि १ जोरानें आत शिरणें, प्रवेश करून घेणें, दपटून शिरकणें, दुर्गम अशा स्थळीं गर्दीत बळानें, युक्तीनें प्रवेश करून घेणें 'त्या दाटीमध्यें तो घुसला' २ (ल) (हक्क, अधिकार, आमंत्रण नसता जमातींत) आगंतुकाप्रमाणें, प्रविष्ट होणें शिरणें, आगंतुक जाणें, 'त्यास जातीमध्यें घेत नव्हते पण तो युक्तीनें घुसला' [म गवेषण, म गवसणी, हिं घुसना]

**घुसदणें, घुसदा**—(कु) घुसडणें, घुसडा पहा

**घुसपणी**—स्त्री (गो) गुतागुत, गोंधळ, घोंटाळा [गो. गुसपूचे]

**घुसपटणें**—घुसमटणें पहा

**घुसपागोंधळ**—पु गुतागुत, घोंटाळा

**घुसपाल**—पु (गो) (कान इ०) पिळण्याची, पिरगळण्याची क्रिया, कानाला खडा लावणें, पुन्हा न करण्याचा निश्चय [अर गोशमाल ?] **कानाघुसपाल**-पु (गो) कानपिळी, कानास खडा लावण [कान+घुसपाल]

**घुसपूचें**—अक्रि (गो) गुतणें, गोंधळणें (प्रयोजक) घुसपावचें

**घुसमट**—स्त्री १ श्वासनिरोध जीव कोंडणें २ घुसमड पहा

**घुसमटणी**—स्त्री (गो) गुदमरणी, श्वासाचा कोंडमारा [घुसमटणें]

**घुसमटणें**—अक्रि १ दम कोंडल्यासारखें होणें, गुदमरणें श्वासावरोध होणें 'मी धुरानें घुसमटलों' २ (ल) कोंडमारा झाल्यानें, तोंड दाबून बुक्कीचा मार अशी अवस्था झाल्यानें अगदीं जेरीस येणें, कोंडमारा होणें, अडचणलें जाणें ३ घुसडले जाणें, अस्ताव्यस्त होणें, चोळवटून जाणें, चुयडा होणें [स घृष्+मुट्]

**घुसमटमार**—पु (गो) गुदमरणें, कोंडमारा, दम कोंडणें. [घुसमटणें]

**घुसमड**—स्त्री १ तुडवणी, गुधडा पाडणें, मर्दन, चोळामोळा २ धुडगूस, धिंगाणा, धिंगामस्ती, धागडधिंगा [घुसमटणें]

**घुसमाट(ड)णें**—सक्रि १ (ना) (एखाद्याची) रग जिरविणें, (एखाद्याला) जमीनीवर लोळवून त्याचीं गात्रें शिथिल करणें २ रगडणें, दडपणें मुरगाळीता कान। घुसमाडील सावधान।' –तुगा ३२०६. ३ कोंडमारा करणें [घुसमटणें]

**घुसमांडणें**—सक्रि कोंडमारा करणें –शर [घुसमटणें प्रयोजक]

**घुसलखाना, घुसल्खाना घुसळखाना, घुसूलखाना**—पु १ स्नानगृह न्हाणीघर २ खल्वतखाना, एकांताची खोली –मदरु १५३ [अर घुस्ल्=स्नान+फा खाना=घर]

**घुसवि(व)णें**—उक्रि आंत ढकलणें, रेटून (आत) घालणें, शिरकवणें, घुसडणें, ढकलणें, जोरानें रेटणें [घुसणें प्रयोजक]

**घुसळखांब**—पु (ताक, दहीं इ०) घुसळण्याची रवी दोरीनें ज्या खांबास अडकविली असते तो खांब, घुसळण्यास उपयोगी खांब 'माझें नाव घुसळखांबात' –सुपु २ [घुसळणें+खांब]

**घुसळण**—न १ घुसळण्यासाठीं भांड्यांत घातलेलें दहीं, विरजण इ० 'उठुनी प्रात काळीं गौळणी घुसळण घुसळीती।' –भज १० २ घुसळण्याची क्रिया [घुसळणें] ०**पात्र**–न विरजण घुसळण्याचें भांडें [घुसळण+पात्र=भांडें]

**घुसळणें**—सक्रि १ (दहीं इ० भांड्यात घालून) रवीनं मथणें, मथन करणें, ढवळणें २ गदगदा जोरानें हलविणें, इकडून तिकडे ढकलणें ३ (एखाद्यास) फार किंवा अवघड कामें सांगून दमविणें भागविणें राबविणें बेजार करणें, जेरीस, जिकीरीस आणणें घाम काढणें याच अर्थी **हाडें घुसळणें** असाहि प्रयोग आहे मज अनेक उद्योग सांगून घुसळू नकोस' 'त्या श्लोकानें मला भारी घुसळलें तव्हां लागला' [ध्व प्रा घुसल, आर्मेनियन जि खुसरु]

**घुसळप**—न (क) घुसळण्याची क्रिया घुसळण अर्थ १ पहा घुसळपानें हात दुखूं लागले' [घुसळणें]

**घुसळा**—पु १ घुसळून निघालेला पदार्थ २ (घुसळून काढलेला) लोण्याचा गोळा नवनीत [घुसळणें]

**घुसळीव**—वि घुसळलेला, मंथन केलेला [घुसळणें]

घुसा घुस्सा—पु राग रागाची लहर 'माठा घुसा जोंधळ्याचा कडबा वगैरे उभी टाकें करून लावलेली रास [का.
यत्न' -मदह ११७ [अर घुस्मा] म्ह० कमकुवत घुस्सा गूढ ]
वहुत

घुसा-घुस्सा—पु ठोसा, गुद्दा, धपका, धक्का, तडाखा [हिं घुसा, म घुमणें ]

घुसाडणें—सक्रि (ना ) घुसमाटणें पहा [घुसडणें प्रयोजक]

घुस्तावचें—सक्रि (गो ) पायांनीं तुडविणें

घुस्मारणें—सक्रि. मारणें, घुसमटून मारणें गुदमरून ठार करणें 'यणे गोपाळें चाणूर घुस्मारिला ।' -दावि २० [अर घुस्स=गळा दाबणें कोंडमारा करणें घुमणें+मारणें, तुल० घस्मर]

घुळघुळ-ळा—क्रिवि पाझरणाऱ्या झुळझुळ वाहणाऱ्या पाण्याचा किंवा किणकिणणाऱ्या घंटांप्रमाणें आवाज होत, घळ घळा, खळखळा. [ध्व ]

घुळघुळणें—अक्रि १ (पोट पोटांत ) गुरगुरणें, गडगडणें, घुळघुळ शब्द होणें 'पोट घुळघुळतें, पोटांत घुळघुळतें' २ (चिरपणाऱ्या पाण्यानें ) घुळघुळ असा आवाज करणें ३ गडबडत, गडगडत, लोळत जाणें, घुळत जाणें [घुळघुळ] घुळघुळत जाणें-येणें-अक्रि घुळघुळणें अर्थ ३ पहा

घुळणा—पु नाकांतील पडदा, घोणा, घोळणा [घोणा]

घुळणें—अक्रि लोळणें, गडबडणें, गडबडत जाणें, घरळणें, लोटत जाणें [ध्व घुळ]

घुळमडचें—अक्रि (गो ) श्वास, दम कोंडल्यानें गुदमरणें, घुसमटणें अर्थ १ पहा

घुळी—पु देवाला अर्पण केलेला बैल, पोळ, सांड (हा नेहमीं मोकळा फिरत असून ह्याजकडून कोणतेंहि काम करून घेत नाहींत ) (क्रि० सोडणें ) 'तारुण्याच्या मदें न मानी कोणासी। सदा मुसमुसी घुळी जैसा ॥' -तुगा ३१७४ २ (ल ) रिकामा, धष्टपुष्ट माणूस पोळ [का गूळी]

घूक—पु घुबड, दिवाभीत 'देत परघूकातें सुहृदब्जांचे प्रभाकर दरा जं।' -मोद्रोण १२ २५ [स ]

घूं घू—उद्गा घुबडाचा आवाज, ओरडणें 'कुंभकर्णाच्या घरावरी । दिवाभीत घू घू करी ।' -भारा बाल ७६ [ध्व घू हिं ]

घूघू—उद्गा भुंग माशा इ० कांचा आवाज -मसाप १ ३ २१ [ध्व गुगु]

घू(घूं)ट—वि (कों ) लठ्ठ व ठेंगू धष्टपुष्ट आणि बुटका

घूड—पु १ घोंस, पुंज पुंजका, घड गुच्छ २ वाप इ० दागिन्यास लावतात तो मोत्यांचा घोंस झुबका ३ (मा ) देवळाचा घुमट मनोरा, डेरा ४ -पु न (क मर ) कोंबड्या झाकून ठेवण्याची मातीची घुमटी, कोंबड्यांचें घर ५ (वे )

घूम—पु डोळ्याच्या पापणीच्या आंतील वानूस होणारा रोग, (सामा. ) खुपरी, घुमड (क्रि० येणें, फुटणें, होणें ) २ (भोंवऱ्यांच्या खेळांत) हरलेल्या गड्याच्या भोंवऱ्यास पाडलेला खोंचा ३ घूमपेंडीच्या खेळांतील व आट्यापाट्यामधील एक पारिभाषिक शब्द [का गुम्मु=मारणें ]

घूम—पु (कवायत) अर्धचक्र मारणें, -सव्या ४० [स घूर्ण, प्रा घुम्म, म घुमणें, हिं घूम=फेर, चक्कर, घेर] ०जाव—कवायतींतील एक हुकूम हा हुकूम मिळाल्यास ज्या दिशेस आपलें तोंड असेल तें तिच्या विरुद्ध दिशेला करणें, हुकुमाच्या वेळीं उजव्या बाजूनेंच नेहमीं वळावयाचें असतें

घूय घालणें—न (कु ) मुलांचा एक खेळ यांत एखाद्या मुलास कांबळ्याखालीं झांकून त्याला टाहळ्यांनीं सोडपून रागास आणून सवंगड्यांस पकडावयास लावावयाचें असतें

घूर—पु (गो. ) माशाची एक जात

घूर्ण—वि धुंद, मस्त माजलेला. 'अहंमदामदें उन्मत्त पूर्ण । देह तारुण्यें अति घूर्ण ।' -एभा ३ ५१७ २ भ्रमणारा, घुमणारा [सं ]

घूर्णन—न गरगर फिरणें, परिभ्रमण करणें, फेर घेणें, भोंवडणें, गिरकी घेणें [स घूर्ण्-घूर्णन ]

घूर्णित—वि १ गरगर फिरविलेलें, भ्रमविलेलें, भ्रमण करावयास लावलेलें २ (ल ) बेसावध, धुंद 'एकें घूर्णितें सावधें ।' -ज्ञा ११ १२६ ०करण-न (नृत्य) उजवा हात बाजूस करून वाटोळा फिरवणें, डावा हात दोलित करणें, पायाचें स्वस्तिक करून त्या स्वस्तिकांतून पाय दूर करणें हा प्रकार [स ] ०नेत्र-, ०लोचन-पु न १ गरगर फिरणारा डोळा २ (ल ) (मद्य काम इ०कानीं ) धुंद, लाल झालेला, तारवटलेला डोळा -वि १ ज्याचे डोळे गरगर फिरताहेत असा २ (ल ) (मद्य इ० कानीं ) धुंद, तारवटलेले आहेत डोळे ज्याचे असा [स घूर्णित+नेत्र, लोचन=डोळा ]

घूल—पु एक प्रकारचा नरभक्षक वन्य राक्षस 'तो कांहीं घूल किंवा सैतान नव्हता' -वज्राघात ११० [अर घूल् ]

घूल—स्त्री १ (राजा ) घुला नांवाच्या माशाची एक जात घुला पहा २ (गो ) एक प्रकारची पिंवळ्या रंगाची व टिपक असलेली मोठी कवडी गोटी, घुला पहा ३ एक प्रकारचें झाड

घूस—स्त्री १ उंदराच्या जातीचा पण उंदरापेक्षा मोठा प्राणी, 'कां न मदन बांधावें कीं त्यात पुढें बिळें करिल घूस ।' -मो स्फुट आर्या २ (नवनीत) पृ २५४ २ (उप ) अतिशय

काळ्या वर्णाची स्त्री ( अतिशय काळया पुरुषास काळा माजर असें म्हणतात ) (अव ) घुशी [स गृहेशया, हिं घूस] **घुशीचा सापळा**-पु १ घुशी पकडण्याकरिता केलेला पिंजरा २ (ल ) ( एखाद्यास ) सकटात, पेचात आणण्याकरिता रचलेला डाव, व्यूह ' हा घुशीचा सापळा कसा तयार केला गेला हें गूढ उकलणें कठीण नाहीं ' –केळकरकृत टिळकचरित्र खड ३ भाग ६ पृ १०

**घूस**—स्त्री (कु गो ) पाखडताना धान्यातून निघणारें, उडणारें भुसकट माती इ०

**घृणा**—स्त्री १ दया, कृपा, अनुकपा, कींव, कळवळा, करुणा २ वीट, तिरस्कार, कटाळा [ स ]

**घृणी**—वि दयाळु कृपावत, दयार्द्र, मायाळु कनवाळु, करुणाशील [ स घृणा ]

**घृत**—न तूप आज्य ' मथवा इद्रियें आणि प्राण। हेचि यज्ञोपचारभरण । अज्ञान घृत।' –ज्ञा ९ २४० ' घृत सोडुनि कोण करिल आ तेला।' –मोउद्योग ६ ३५ [ स ] ०**कुभ**-पु (काव्य) कामातुर प्रियकरा–रमणाबद्दल कवि हा शब्द वापरतात [ घृत+कुभ=घडा ] ०**कुमारी**–स्त्री कोरफड, कुमारी कुवारकाडें, कुवारी [ स ] ०**कु(क)ल्या**–स्त्री. १ ( भाजनाच्या वेळीं ) पानात वाढणारे तुपाचे पाट, यावरून २(ल ) (जेवणात) तुपाची व इतर पक्वानाची समृद्धि, चंगळाई, चमचमीत जेवण वाजसनेयी संहितेंत ( ६ १२ ) हा प्रयोग येतो. [ स घृत+स कुल्या=नदी पाट ] ०**कुल्ल्या मधुकुल्ल्या**–स्त्री १ ( तुपाचे पाट व मधाचे पाट ) तूप व गोड पदार्थ याची चगळ, रेलचेल समृद्धि २ (ल ) मिष्टान्नाचें सुग्रास व चमचमीत भोजन पुराणाचा शिमगा जेव्हापासुन सुरू झाला व भटाच्या घृतकुल्या मधुकुल्या दशात प्रवृत्त झाल्या तेव्हापासुन कौशल्य चट सारें पार वाहून गेलें ' –नि [ घृतकुल्या+मधु+कुल्या ] ०**धेनु**–स्त्री तुपाचा गोळा घेऊन त्यास गाय कल्पून त्याची पूजा करून ब्राह्मणास दान करतात ती [ घृत+धेनु=गाय ] ०**पक्व–पाचित**–वि तुपांत तळलेलें, शिजविलेलें ( खाद्य ) [ घृत+स पक्व–पाचित= शिजलेलें शिजविलेलें ] ०**बुद्धि**–स्त्री बुद्धीचा जडपणा मद जड बुद्धी बुद्धीची ग्राहकशक्ति तीव्र नसणें (पाण्यात तुपाचा थेंब थिजतो किंवा फार हळू हळू पसरतो यावरून ) याच्या उलट तैलबुद्धि ( कारण तेलाचा थेंब पाण्यावर फार जलद पसरतो ) २ –वि मदबुद्धीचा, तल्लख बुद्धि ग्रहणशक्ति नसणारा [ घृत+बुद्धि ] ०**विपाक**–पु ( रसा ) तूप खतखतणें फसफसणें रासायनिक विकृति पावणें साखरेचा दुग्धविपाक व नतर घृतविपाक होऊ शकत '–सेंपु २ ५४ [ घृत+विपाक=विकृति ] ०**श्राद्ध**–न तीर्थयात्रा करण्याच्या उद्देशानें घराहून निघताना करावयाचें श्राद्ध यातील मुख्य द्रव्य घृत( तूप ) असतें म्हणून यास हें नांव आहे –तीप्र परिशिष्ट २ पृ २ **घृताम्ल**–न ( रसा ) गाईच्या लोण्यात असलेलें एक अम्ल कॉडलिव्हर ऑईल व दुसऱ्या काहीं चरब्या व काहीं उद्भिज्ज कोटींतहि हें सापडतें दधिजाम्ल ( इ ) ब्युटिरिक ॲसिड –सेंपु २ ५४ [ घृत+अम्ल=ॲसिड ]

**घृष्ट**—वि घासलेलें, चोळलेलें घर्षण पावलेलें [ स ] ०**तल**–न घोड्याच्या पायास होणारा एक रोग हा घोड्याच्या खुराचे तळवे अधिक घासले गेल्यानें होतो –अश्वप २ ३८ [ घृष्ट+तल=तळ ]

**घृष्टि**—स्त्री १ घर्षण, घासणें, ' का दोहीं काष्ठाचिय घृष्टी– माजी वन्हि एक उठी।' –ज्ञा १८ ११५९ २ (ल ) ससर्ग, सहवास, सघट्ट, घसण ' काय द्विजु अत्यजघृष्टी। अत्यजु नोहे।' –ज्ञा १७ ५१ [ स घृष् ]

**घृष्णेश्वर**—पु बारा ज्योतिर्लिंगापैकीं एका शिवलिंगाचें नाव, हें स्थान निजाम हद्दींत वेरूळजवळ आहे –वि (ल ) मदधी, बध्यड, दगडोबा [ स घुसृण ? घृष्ण+ईश्वर ]

**घेऊघेवडी**—स्त्री. लोभी, खादाड स्त्री [ घेणें+घेवडी ]

**घेऊपांशरी, घेऊपाशेऱ्या घेऊपा(पा)सरी, घेऊ (ओ)वा, घेओपासरी**—वि नेहमी दुसऱ्यापासून घेणारा, उसन काढणारा परंतु दुसऱ्यास कधीं देण्याची, उमनें देण्याची सवय नसलेला ( मनुष्य ), अप्पलपोट्या, स्वार्थी [ घेणें+पासरी= पाचशेरा, घेऊपाशेरी ]

**घेऊंपांशेरी**—स्त्री १ दुसऱ्यापासुन विकत घेतांना दुकानदार वापरतात तें पाच शेराचें माप ( हें सर्वसाधारण मापापेक्षा किंचित् मोठें असतें ) २ विवेकबुद्धिविरुद्ध, अयोग्य, अन्याय्य लोभीपणा, अनितीमूलक लोभ –वि दुसऱ्याचे जिनस गैरवाजवीपण, जुलमानें लाटणारा, लाटण्याची इच्छा धरणारा, दुर्वृत्त लोभी [ घेणें+पाशेरी=पासरी ]

**घेगडी घेंगरी, घेडी घेडीमुगी, घेडा**—स्त्री पु एका जातीची तांबडी व आकारानें मोठी असलेली मुगी, घेवडी, चावड, ही चावते या मुग्या समुदायानें राहतात [ घेवडा ? तुल० स घुड=एक मोठी काळी माशी ]

**घेगा–घा, घेंगा–घा**—पु १ एखाद्यास काहीं काम करण्यास भाग पाडण्याकरिता त्याला सर्वांनी मिळून दिलली उठावणी, नेट ( क्रि० करणें ) ढोकणें २ ( एखाद्या विरुद्ध उठलेलें ) काहूर गिल्ला ओरड गवगवा, ( क्रि० करणें ) ३ (एखाद्या कामात उद्योगांत केलेला ) जोराचा व निर्धाराचा नेट प्रयत्न हल्ला, गर्दी, चढाई गल्गार पहा ' हा हा म्हणतां त्यांनी घेगा केला ' ४ ( एखाद्या कामाची ) तांतडी घाई निकड ( क्रि० होणें ) [ घेण ? घेघे ]

**घेगाटणें**—अक्रि (व) १ रेटत घालणें, दरडावून बोलणें, घेंगावणें गेंगाटणें पहा.

**घेंगा(घा)वणें**—अक्रि १ (एखाद्यावर) कडकडणें, जळफळणें, तोंड टाकणें, चवताळणें, घेमार करणें २ घेंग्या मुळें, गर्दीमुळें रजीस येणें, (कामाच्या निकडीमुळें) बेजार होणें [घेंगा]

**घेघे**—स्त्री १ नेटाचा प्रयत्न, जोराचा, निकराचा हल्ला, घेंगा २ लढाईच्या वेळीं हल्ला करतांना आवेशानें ('हा वार घे' अशा अर्थी) योद्धे हा शब्द उच्चारतात 'तोंडानें बोलुनि घे घे।'–सप्रामगीतें ७६ [घेणें द्वि] ०मार–पु १ निकराचा, नेटाचा, जोराचा एकत्रितपणें प्रयत्न, हल्ला, चोहोंकडून अने कांचा पराकाष्ठेचा प्रयत्न 'घेघेमार केला तेव्हां त्याचें घर विकलें' २ (ल) हातपाईची लढाई (कारण अशा वेळीं घे, घे, मार, मार अशी वीरश्रीची भाषा चालू असते) –क्रिवि घाईनें, उतावीळपणानें, मागें पुढें न पाहतां, विचार न करितां, 'सपत्ति यतांच घेघेमार घरें बांधली' 'घेघेमार लिहू नका, विचार करून लिहा' घेघेमारी–स्त्री १ घेघेमार पहा २ दाणा दाण 'धोपा जाली घेघेमारी। पळती भरले दिशा चारी।' –तुगा २३३९ [घे+घे+मार]

**घेटा**—पु बोकड, एडका, मेंढा 'शिकारी सबधात प्राथमिक व्यवस्था करण्यासाठीं पाठवलेल्या अमलदारांस पाडे, घेटे मिळवून देण्यासाठीं '–सिहाचे व वाघाचे शिकारीसबधीं नियम (बडोदें) ४ घेटी–स्त्री बकरी, कोंकरूं [हिं घेटा=डुक्कर, गु घेटी, घेटु=बकरी]

**घेटू(टो)ळी**—स्त्री (वैद्यक) एक प्रकारची वनस्पती हीस पुनर्नवा असें म्हणतात हिचे पाढरी व काळी असे दोन प्रकार आहेत

**घेणी**—स्त्री. १ घेणें, ग्रहण करणें, स्वीकार 'अहो प्रत्यक्षादि प्रमाणीं। कीजे जयाची घेणी।'–अमृ ७ ४२ –ज्ञा १६ १६४ २ (गंजिफाचा खेळ) दशावतारी गंजिफांतील एक पारिभाषिक सज्ञा, ज्या गड्याकडे राजा असून वजीर नसेल त्याचा वजीरवाल्या इसमाकडून डाव घेण्याचा हक्क, तलफ ३ (ल्मात) दुसऱ्या पक्षाकडून घ्यावयाची रक्कम, जिन्नस इ०, करणी, हुडा [घेणें]

**घेणें**—सक्रि १ स्वीकारणें अंगीकारणें, (आपल्या) हातात येईलसा करणें 'त्यात घेऊं ये तितुकें घ्यावें।'–दा १५ ९ ३२ 'घेयीं तूं मधुपर्क पावन बरें सद्भमपात्रीं असे।'–निमा १ १३. २ धरणें पकडणें हिसकणें, झोंबाडणें 'जे घेय हातीं बरवी विपची।'–वाडद १ २ ३ लागणें, बसणें; मिळणें (मार इ०) 'तेथें गलास तर मार घेशील.' ४ समजणें, मानणें 'घेय दुजें नाहींचि घेई। सर्वत्र मी गा।'–ज्ञा १५ ४११ ५ ऐकणें 'वाक्य घेऊनि हरखली आई।' –दावि १६० 'तुझ्या सजणे हा समाचार घेतां'–र ११ ६ समाविष्ट, प्रविष्ट, अतर्भूत करणें, आत येऊ देणें 'त्या माणसास जातींत घेतलें' ७ कवटाळणें, कैवार घेणें, पत्करणें, स्वीकारणें, अंगीकारणें, उचलणें (पक्ष, बाजू, धर्म इ०) 'त्यानें खिस्ती धर्म घेतला' ८ कबूल, मान्य करणें, मान्यता देणें, संमति, अनुमोदन देणें; प्राग्र समजणें 'त्या आशकेचें त्यानें समाधान केलें तें तुम्ही घेतलें काय?' ९ योग्यता, किंमत जाणणें (गुणांची), आदरणें, चांगलें लेखणें (गुणाबरोबर उप योग). १० मनांत आणणें बाळगणें, ठेवणें (शंका, संशय, तिरस्कार इ०) 'मागें हांसति गौळणी हरिपुढें ह्या घेतलीसे भ्रमें।'–आकृष्ण ३८ ११ आविर्भाव आणणें, पांघरणें, बळेंनें धारण करणें (वेड, सोंग इ०) १२ (भय, रोग, मोह इ० कांच्या) तावडींत जाणें, (ज्वर, भय, मोह, दुखणें इ० कानीं) घेरलें जाणें, व्यथित होणें 'आणि तेणें आपुलेपणाचेनि माहें। तुम्ही सत घेतले असा बहुवें।'–ज्ञा १ १७ 'जुपडि नेत्र घे भीतिला।'–केका १०. १३ मुरवणें, हरण करणें, नाश करणें, मुदरणें (प्राण, शील इ०) १४ छाटणें, तोडून टाकणें, कापणें 'तुझें नाक–कान घेईन' 'ह्या भाताचे शेंड चारचार बोटें घेतले म्हणजे पडणार नाहीं' १५ लागणें, आवश्यकता असणें, खर्ची पाडणें, खपवणें, अटवणें, खाणें (वेळ, स्थळ, शक्ति) 'हें काम दोन वर्षे घेईल' 'हें गांठाळ लांकूड फोडण्यास फार बळ घेतें' १६ खडकावणें, खडसणें, ठोक देणें, मारणें 'मी त्याला भलें घेतलें' १७ विशिष्ट आचरण, वर्तन, कृति करणें (उ० शोध वाद, गांठ, लढाई माप घेणें), शोध घेणें=तपास करणें, चौकशी करणें, वाद, लढाई घेणें=वाद लढाई उपस्थित करणें, माप घेणें=मोजणें (लांबी, रुंदी इ० मध्यें), उडी घेणें=उडी टाकणें, गांठ घेणें=बांधणें इ० १८ हस्तगत करणें मिळवणें, पैदा करणें शोधून मिळवून आणणं, संपादन करणें (खबर बातमी, चाहूल, पायरव) १९ हातानें देणें उचलून देणें, जवळ नेणें (ह्या अर्थी नेहमीं आज्ञार्थीच प्रयोग होतो) 'ती दौत इकडे घ्या' २० जोडणें मिळविणें, स्वत वर आणणें, ओढून घेणें (उपहास निंदा मार), विषय होणें (निंदा, मार इ० चा) 'अरे पोरा दाटीमध्यें तुडवून घेशील' 'मारून हांसून, घासून, नागवून घेशील' २१ पलीकड जाणें, ओलांडणें (डोंगर, विशिष्ट स्थिति), संपविणें, शेवटास नेणें, सिद्धीस नेणें (प्रवास मजल इ०). 'त्यानें दहा कोसांची मजल घेतली' २२ जोडणें, सामील करणें, वाढविणें 'हा ओगा फार अरुंद झाला आणखी दोन हात घ' २३ स्वत स जोडणें, जडवून घेणें, लावून घेणें (सवय, खोड, व्यसन) २४ आणणें, घालणें, माथीं मारणें, अंगाला

चिकटविणें ( आरोप, आळ, बालट तुफान ) २५ ( एखाद्या वस्तूनें दुसऱ्या वस्तूचा स्वत वर ) परिणाम होऊ देणें, विकार पावणें, परिणाम लागू करून घेणें. 'ओलें लाकूड आग घेत नाहीं ' ' तेलकट वस्त्र पाणी घेत नाहीं ' २६ जवळ येऊ देणें, पाजणें ' ती गाय वासरू घेत नाहीं ' २७ मारणें, बळी घेणं, नाश करणें ' ही नदी, हें तळें, ती विहीर वर्षांत एक माणूस घेते. ' ' माझा भाऊ भुतानें घेतला. ' २८ जाणें, पळून जाणें, एखाद्याचा आश्रय करणें ' काळयवन भेणें थोर। तेणें घेतल गिरिकंदर। ' २९ स्थापणं, ठेवणें, आदरानें स्पर्श करणें ' येऊनि तुजजवळीं। चरण घेतिल तव भाळीं। ' –रत्न १७ ३० वळणें, कल होणें, एखादी गोष्ट करावयास तयार होणें ( मन इ०नीं ) ' त्यामुळे ह्याचा शब्दश अर्थ करण्यास आमचें मन घेत नाहीं ' –मसाप २ ११७ ३१ (बुद्धिबळाचा खेळ ) एकानें दुसऱ्याचें मोहरें मारणें ( कित्येक वेळीं क्रियापदाच्या पुढें घेणें याचें रूप मन सोक्तपणें लावतात अशा ठिकाणीं तें कारक हा क्रियेचा कर्ता आहे असें दाखवितें, तर कांहीं ठिकाणीं शब्दावर जोर देण्या करिता त्याचा उपयोग करतात, विशेषत कर्त्याविषयीं जोरानें बोलावयाचें असल्यास क्रियापदास जोडून घेणें याचा प्रयोग करतात परंतु सामान्यत अशा वाक्यरचनेनें विशेष अर्थ ध्वनित होत नाहीं व वाक्य चांगल्या रीतीनें पुरें करण्याकरताच केवळ याचा उपयोग करतात ' पारानें हात पाडून घेतला ' कांहीं वेळां एखादी क्रिया आटोपून, उरकून टाकणें या अर्थी पूर्वकालवाचक धातुसाधितास घेणें हा शब्द जोडतात. उ० स्नान करून घ्या, मी भात शिजवून घेतों, हें तुम्ही शिजवून घ्या इतक्या ब्राह्मणास गंध लावून घेतों आणि वाटी स्वाधीन करतों) ' घेऊं देणें–या शब्दसहतीचा उपयोग पूर्वकालवाचक धातु साधितांना जोडून करतात अशा वेळीं त्याचा अर्थ एखाद्यास एखाद्या क्रियेचा विषय, त्या क्रियेच्या आधीन होऊ देणें किंवा एखाद्यानें स्वत करतां एखादी गोष्ट करणें असा होतो जसें– 'रडून–जेवून–पिऊन–बसून–उठून–धुवून–घेऊ दे ' घे म्हटल्या, घे म्हटल्यावर–क्रिवि (जी जी गोष्ट, कृत्य करता येईल ती ती गोष्ट, कृत्य करण्याला ज धडकावतात अशा अहदांड व तापट लोकांच्या रीतीला अनुलक्षून हा विशिष्ट प्रयोग रूढ झाला आहे) उतावीळपणानें, एकदम, विचार न करतां ' तो घे म्हटल्या शिव्या देणार नाहीं ' घ्या–क्रि इकडे पहा, हे पहा (लक्ष्यवेध घ्याकरतां याचा उपयोग करतात ) ( घेणें ह्या क्रियापदाचे निरनिराळ्या स्वरूपांत अनेक प्रयोग होत असल्यानें ह्या स्थळीं सर्व देतां येणें शक्य नाहीं ) ठस्थापन–घर–चालीवर–जागा–शेवट–लोडीवर–स्वरवर–पाव–पर हा–पाठ–रान–इ० अनेक शब्दांना जोडून घेणें या क्रियापदाचा प्रयोग होतो त्याचप्रमाणें देणें, टाकणें, मारणें, घालणें व पाडणें या धातूं प्रमाणें अनेक धातुसाधितांना जोडूनहि घेणें शब्दाचा प्रयोग करतात उ० आटोपता–काढता–चालता–काढता–घेणें. श्वास, रजा, सूड इ० शब्दांना जोडूनहि घेणें या क्रियापदाचा उपयोग होतो शिवाय उपयोग करणें, गिळणें, सहन करणें सोसणें (रोग, व्यसन इ०), जडवून घेणें इ० अनेक अर्थ होतात. म्ह० घेऊं जाणतो, देऊ जाणत नाहीं [ स ग्रह्, प्रा गेण्ह, झें. गेरेप्, गॉ ग्रेइप, जर्म ग्रेफ, लिथु ग्रेब्जु स्ला ग्रॅबल्जु, हिब्रू ग्रेम, ग्री ग्रीफॉस, लॅ गेरा, पोलि गार्निआक ]

घेणें—न उसनी दिलेली, परत यावयाची रक्कम, प्राप्ति घेणें–देणें पहा सामाशब्द– ०करी–दार–वि १ सावकार, धनको, कर्जदार २ कांहीं एक काम न करतां जो पोटभर खाण्यास मिळ ण्याचा हक्क सांगतो तो ( नातेवाईक मनुष्य, आजारी नोकर ) [ घेणें+करणें, घेणें+फा. दार ] ०देणें–न १ उसनें देणें व घेणें, देवघेव, व्यवहार ( एखाद्याशीं करण्याचा) ' मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं। मंदावों लागती।' –ज्ञा १६ १२ २ व्यापार, दळण वळण, उदीम [ घेणें+देणें ]

घेता—धावि घेणारा ' जे मुकुटाचे वृथा नटति घेते। ' –मोआश्रम ४ २४ [ घेणें ]

घेता–देता—वि नेहमीं पैसे उसनवार, कर्जाऊ घेऊन वेळेच्या वेळीं फेडणारा, कर्जाच्या बाबतींत चोख व्यवहार करणारा, नेहमीचा गिऱ्हाईक घेत्या दे या कुळास पैसा द्यावा ' [ घेणें+देणें] घेता देता–क्रिवि (व्यापारात) शेवटीं नक्की ठरविण्याच्या वेळीं, देवघेवीच्या रदबदलीच्या शेवटीं, प्रत्यक्ष देवघेवीच्या वेळीं, किंमत ठरवून खरेदी करावयाच्या वेळीं 'सनगाची किंमत दहा रुपये सांगता, घेता देता एक दोन रुपये उतरील '

घेतावणा—वि घेण्याकडेच प्रवृत्ति असलेला, याच्या उलट देतावणा [घेणें+वण–णा प्रत्यय] ०देतावणा–वि उसन देण्या कडे व घेण्याकडे प्रवृत्ति असलेला, यावरून शेजारधर्माचें दळण वळण ठेवण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा

घेतें—न अंत.करण

घेपणें—सक्रि १ घेणें, ग्रहण करणें ' तव आउलिये फळीं हात। न घेपतिही।' –अमृ २ १८ –अक्रि २ घेतलें, ग्रासलें जाणें, वेढलें जाणें ' तो कामनामात्र न घेपे। –ज्ञा ३ ७१ [ घेणें, प्रा घे–घेप्पन ] घेप(पि)जणें–(घेपणें प्रयोजक) वेढणें, ग्रासणें ' न घेपिजतीं सर्पी गरुड जैसे। ' –ज्ञा १५ २९५

घेपाट—पु ( व ) (एखाद्या गोष्टीसाठीं एखाद्याचा )हट, एकसारखें पाठीस लागणें. ( क्रि० घेणें ) ' आण्याचाच घेपाट घेतल तर्‍हां पाठवावें लागेल ' [ घेणें+पाठ ? ]

घेपुदेपु घेपादेपो—पु १ ज्यापासून कांहीं लाभ नाहीं असें उसनवार घेणें–देणें बिनव्याजानें पैसे देणें 'सहावा करिसि

गहयारे घेउदेउ नाना।'–देव २११ 'व्याजाच्या लोभावाचून व्यर्थ घेणो देणो कोण करतो' २ (ग्रामा) फिरून फिरून केलेली व त्रासदायक अशी देवघेव [घेणें+देणें]

**घेमार**—पुस्त्री घे घेमार पहा 'घ मार सुरू जे झाली।' सम मराठे १२५ [घणें+मार] ०गर्दी–स्त्री धनचक्कर, अतिशय गडबड 'पण अशा घेमारगर्दीत तसें करण्यास फारच थोडी सवड सांपडते' –पालें १००

**घेर-रा**—पु १ परिघ, फेर, वेढा, मंडल 'या किल्ल्याचा घेर पांच कोस आहे' २ (अंगरखा इ० वस्त्राचा) घोळ, पालव, झोल, पदर ३ शेंडीभोंवतीं राखलेले केसांचें वर्तुळ, सजाफ, सजाब ४ कुरण, घई, आवार [सं ग्रह्, हिं] ०दार–वि १ मोठा घेर, परीघ असलेला २ मोठा घोळ, सजाफ, फेर असलेला (अंगरखा इ०) 'बारा हुजारांना केशरी झगा। घेरदार बारा हजार।' –ऐपो ४४ ३ मोठा घेर असलेली शेंडी [घेर]

**घेरणा**—स्त्री वेढा, विळखा, घेरा 'कालभुजगाचिया घेरणी। तैसिया दिठी झकिती कामिनी।' –दाव ४४५ [घेरणें]

**घेरणें**—सक्रि १ सर्व बाजूंनी वेढणें, वेढा देणें, वेष्टणें, गराडा घालणें 'फौजेनें त्याला चोहोंकडून घेरलें' २ (एखाद्यास) संकटात गोवणें, पेचात आणणें, कचाटींत सांपडविणें 'हा कोण घुटमळतो आहे येथें? स्वारीला घेरलें पाहिजे' –पुण्यप्रभाव ३ (ताप, भूक, झोंप इ० कानीं) पछाडणें, व्याकुळ करणें, ग्रासणें 'कामानें त्यास घेरलें आहे' [सं. ग्रह्, घेर, हिं घेरना, तुल० सिं घेरणु]

**घेरविणें**—सक्रि (किता, वळण अक्षरें इ०) कोरड्या लेखणीनें गिरविणें, वळविणें, किरयावरून लेखणी फिरविणें [घेरणें प्रयोजक]

**घेरा**—पु घेर पहा १ परिघ, घेर, फेर, भोंवतालचा भाग, प्रदेश २ वेढा, वेष्टण, गराडा 'ह्याच हेमूनें स १६११ त मेवाडप्रांतास घेरा घातला' –इलाखुदरी ९ ३ डोंगरी किल्ल्याच्या भोंवतालचा तीन–चार कोस घराचा प्रदेश, प्रांत, किल्ल्यावरील सरकारी अधिकाऱ्याच्या व किल्ल्याच्या इतर खर्चास पुरेल इतकें उत्पन्न ह्या घेऱ्याच्या प्रदेशाचें असे ह्या प्रांत किल्लेदाराच्या ताब्यात असे किल्ला घेणारास घेऱ्याची मालकी आपोआप मिळे –शिच प्र ३ 'किता घेरा रायेगडी गाव –मसाप २ २ १३७ 'विशाळगडच्या घेऱ्यांत आमचा गाव आहे' ४ शेंडीभोंवतीं ठेवलेली केसाची वर्तुळाकृति पट्टी ५ एक वाद्यविशेष हें मोठ्या डफासारखें असतें, जिलीची सबघानें एकवाद्य –कलावत खातें (बडोदे) ११४ ६ पेंच, गोता, अडचण, कचाटी [सं ग्रह्, हिं घेर, गु घेरावो, सिं घेरो, तुल० गिर=वाटोळें]

**घेराघेरी, घेरघर**—स्त्री १ गनिमी लढाई –होके १५.२ घेढा 'मोगल फौजा चहूंकडून उतरून घेरघर केला आहे' –पेद २० ८६ [घेरणें द्वि]

**घेरी**—स्त्री. चक्कर, भोंवळ, मूर्च्छा, भोंड (क्रि० येणें). [घेरणें]

**घेळू**—पु (कों) १ कीड लागलेल्या लाकडांतून पडणारें भूस धरू पहा २ न झाडलेल्या भिंतीवर, छपराला लागलेली कोळिष्टकें, जळमटें, घेरोसा

**घेरोसा**—पु धुळीच्या, धुराच्या योगानें भिंतीवर, छपराला जमणारीं जळमटें, घरोसा पहा [घरोसा]

**घेऱ्या**—पु सुनळी तयार करतांना तिला पीळ देणारा मनुष्य [घेरा]

**घेलचोधा**—वि. (कों) (अशिष्ट) मूर्ख, मंद, घोडचुका करणारा, अजागळ, विसराळू, निष्काळजी [गु घेला=मूर्ख मनुष्य+चोधा]

**घेलाशेट**—पु (उप) १ अति हव्यास असलेला मूर्ख, चिकट मनुष्य २ दलाढाल्या व्यापारी ३ अर्धवट, बावळट माणूस [गु घेलो+शेट]

**घेव**—पु (कु) (एखाद्यापासून) घ्यावयाचा, यावयाचा जिन्नस, पैसा इ० घेणें 'त्यापासून माझा कांहीं घेव घ्याव याचा आहे' [घेणें]

**घेव**—वि घेण्याजोगें 'घेव ये तेंचि घ्यावें। घेव न ये तें साडावें।' –दा ११ ४ २४ [घेणें]

**घेवडा**—पु १ एक वेल, यास वालाचा वेल असेंहि म्हणतात २ (सामा) वरील वेलाची शेंग, हिला घेवडी, घेंगडी असेंहि म्हणतात याच्या पांढरा, पिवळा, काळा, चवळारी, घोड घेवडा व गर्वा घेवडा अशा अनेक जाती आहेत शेंगाची व दाण्याची भाजी करतात **घेवडी**–स्त्री १ घेवड्याचा वेल शेंग, फळ, दाणा २ घेवडी मुगी, घेडी पहा **घेवडें**–न (कु) घेवड्याची शेंग

**घेवणी**—स्त्री (चि) घणी, घेण, येणें [घेणें]

**घेवदेव, घेवादेवा-वी**—स्त्रीपु १ व्यापारधंदा, उदीम २ देवघव, घेणें–देणें इ० चा व्यवहार, दळणवळण 'त्याचा व आमचा उदीमसंबंधें घेवदेव आहे' [घेणें+देणें]

**घेवपत-धंदा-व्यापार-व्यवहार-उदीम**—पु नांवापुरतें भांडवल असून बहुतेक पतीवर चालविलेला धंदा, व्यापार [घेणें+पत+धंदा]

**घेवघा**—वि दुसऱ्यापासून निरंतर मागून घेण्याचा स्वभाव असलेला घेऊपाशी पहा [घेणें]

**घेवादेवा**—पु (कों) घेवदेव पहा

**घेवाणदेवाण**—न (संक्रात वगैरे प्रसंगीं सुवासिनी स्त्रिया परस्पराना वाण (वायन) देतात-घेतात त्यावरून) १ आपसातलें (उसनें) देणें-घेणें, देवघेव २ पैशाचा व्यवहार ३ (मेजवानी लाभ, नुकसानी, भेट, अहेर इ० काची) परत फेड, परत करणें, प्रतिक्रिया [घेणें+वाण+देणें+वाण]

**घेवारी**—पु १ घाऊक माल घेऊन किरकोळीनें विकणारा, केवट्या, डाळपिठ्या, हिंगमिऱ्या वाणी २ (प्रा) बागेतील निपज, पदास, माळवें विकत घेऊन बाजारात किरकोळीनें विकणारा व्यापारी

**घेवासें**—क्रिवि. (राजा कुण) घेता येण्यासारखें —मसाप २ ४ ३६० [घेणें]

**घेर(रां)व**—पु (गो कु हेट) घेरू, कोळिष्टक, कोळिजन, जळमट, घेरोसा पहा

**घैलाट, घैलाड, घैरा, घैस**—वि (कों) मूर्ख व हेकेखोर, अगदीं वेडगळ, अजागळ व आळशी, स्वच्छंदी व मठ्ठ [गु घेल्स=वेडा, घेलाई=वेडेपणा] **घैलटचाली**—स्त्री (कों) असमंजसपणाचा हेकेखोरपणा, वेडगळपणा, घैलटपणा [घैलट+चाली=वर्तन]

**घों**—उद्गा सोसाट्याचा वारा, समुद्राच्या लाटा इ०काचा मोठा आवाज 'आणिक श्रीकृष्णाचें बोलणें। घों करी आलें श्रवणें।'—ज्ञा ९ ५२२ [ध्व घों+करणें]

**घो-घोव**—पु. (रा वे गो) १ नवरा २ पुरुष, गोहो पहा [प्रा गोह=पुरुष, जार]

**घोऊरा**—पु (राजा. को.) नवरा; घो पहा

**घोक**—पु घोष, गजर, 'सांगितलें सर्ती करा नामाचा घोक।'—निगा २३५ 'किंवा जैसें तें चातक। मेघा उद्धु करिता घोक।'—स्वादि १२ ८२ २ घोकणी, चिंता, काळजी [स घोष]

**घोकणें**—सक्रि १ पुन पुन म्हणून पाठ करणें, घोष करणें, पाठ म्हणणें 'आम्ही अहर्निशीं नाम घोकूं।' —रामदास स्फुट अभंग ४७ (नवनीत पृ १५४) 'गोरक्ष घोकितां सद्धि देशी।'—नव १० ४० २ (एखाद्या गोष्टीची) जपमाळ घेणें, घोष लावणें, वारंवार सांगणें, उच्चारणें [सं घुष्-घोषण, हिं घोकना] म्ह० (व) घोकति विद्या खोदति पाणी=घोकल्यानें विद्या व खोदल्यानें पाणी मिळतें (पर्यायानें) कोणतीहि गोष्ट श्रमानें साध्य होते ' **घोककाम्या**—वि अर्थाकडे लक्ष न देता सदर्भ लक्षांत न घेता घोकपट्टी करणारा (विद्यार्थी), दुसऱ्याच्या सांगण्याचा हेतु मर्म लक्षांत न घेता सांगण्याप्रमाणें अक्षरश चालणारा [घोकणें+काम] **घोकणी**—स्त्री १ (एखादी गोष्ट लक्ष्यांत रहावी म्हणून) पुन पुन घोकण्याची क्रिया, आवृत्ति (क्रि० करणें, घेणें) 'अनुनित हरि करि ही घोकणी।'—राला ८८. दाको ३ २४ २ त्याच त्याच गोष्टीचा पुन पुनः उच्चार, निदिध्यास, एकच गोष्ट धरून बसणें, आपली इच्छा, हेतु पुन्हा पुन्हा सांगणें (क्रि० घेणें, लावणें, करणें, लागणें, मांडणें, धरणें) 'सुख असल्यावर दिनासारिखे का भौंति फिरते। घोकण्या करिते।' —सला २० 'त्या मुलानें आईची घोकणी घेतली आहे ' [घोकणें]

**घोकपट्टी**—स्त्री घोकण्याची क्रिया, घोकणी अर्थ १ पहा (क्रि० करणें) 'दुसऱ्या इयत्तेंत फळयावरील शब्द मुलांनी आपल्या वहींत उतरून घेऊ नयेत, कारण या योगानें घोकपट्टी करण्याची सवय मुलाना लागते '—अध्यापन ७४ [घोकणें+पट्टी] **घोकीव**—वि १ पाठ केलेला, घोकलेला (धडा इ०) 'याचें घोकीव पांडित्य आहे ' २ स्मरणात, ध्यानात पक्का ठेवलेला मनात पक्का ठसलेला **घोकीव. घोक्या**—वि १ समजूत न घेता, ध्यानात न ठेवता निव्वळ घोकपट्टी करणारा, मंद (विद्यार्थी) २ पोपटपची करणारा, घोकनच फक्त ध्यानात ठेवणारा, (क) कोणत्या वेळीं काय बोलावयाचें हें पढविलेला, लाच घेऊन बनावट साक्ष देणारा (साक्षीदार इ०) [घोकणें] **घोक्या**—वि घोकणारा, घोकपट्टीनें अभ्यास करणारा, घोककाम्या अर्थ १ पहा [घोकणें]

**घोकमळ**—वि (गो) अतिशय पातळ, पाणचट (सांबारें कॉफी इ०)

**घोख**—पु घोष, गजर, गर्जना [स घोष]

**घोंग**—न सोंग, वेष 'नदालयीं बाळक घोंग त्याचें। ब्रह्मादिकां दुर्लभ सोंग त्याचें।'—साहद १ ६० [हिं घूघी-घोंगी=खोळ]

**घोंगट, घोंगाट, घोंघट**—न १ तोंडावरून घेतलेलें वस्त्र, बुरखा, घुंगट पहा २ (ल) भरलेलें आभाळ, पाऊस ढवरून आलेलें आकाश (क्रि० घालणें) [स गुठ्-गुठन, हिं घुंघट] ०घालणें-रुसणें

**घोंगट, घोंगाट**—न १ घों घों शब्द करणाऱ्या, घोंगावणाऱ्या माशांचा समुदाय, गोंगाट २ घुंगुरट, 'मज सिंहाति बळ दाविसी। घोंगटाचें।'—कथा ३ १० ७९ ३ झट, लचांड, झेंगट, शुक्रकाष्ठ [ध्व घों]

**घोंगड**—न (व) कांबळें, घोंगडें

**घोंगडी**—स्त्री कांबळ्याचें एक पट्टें, दोन घोंगड्या उभ्या शिवून जोडल्या असतां कांबळा होतो 'येरे घोंगडीच्या पांघरणारा। गाई वळणारा।'—भज ९३ २ कर्नाटकी कांबळ्यासारखीच पण भारी किंमतीची व पांढरी मोठी असते ती [घोंगट]

**घोंगडें**—न १ घोंगडी अर्थ १ पहा, कांबळ्याचें एक पट्टें २ कांबळें ३ लचांड, लोढणें, पायखाडाबिडी, दुस्सह, दुर्वाग्र परतु करणें अवश्य असलेलें काम इ० ४ (शिम्या देऊन धडे मारून,

उपहास करून एखाद्याची केलेली ) फजीती, त्रेधा, हबेलंडी, दुर्दशा ' या चौघांनीं माझें घोंगडें केलें ' [ घोंगट ] ( ग्राम्र ) ०गळ्यात येणें-पडणें-एखादें लचांड मागें लागणें, 'त्याच्या गळ्यात पोराचें घोंगडें पडलें आहे ' ( एखाद्याच्या गळ्यांत ) घोंगड घालणें-एखाद्यास कांहीं उपद्रवकारक काम सांगणें, एखाद्याच्या मागें त्रासदायक कर्तव्य, लचांड लावून देणें ' तो, लचांडी आहे, तुमच्या गळ्यात एखादें घोंगडें घालील ' म्ह० गरिबाचें गलें घोंगडें गरीब पडलें उघडें सामाशब्द- घोंगडगुचो-स्त्री ( व ) पाऊस निवारण्यास वापराव याची घोंगड्याचा कुचो [ घोंगडें+कुची ] घोंगडवाऊ-पु द्वाड मुलांना भिवविणारा घोंगडें पांघरलेला मनुष्य, बागुलबोवा [ घोंगडें+बाऊ ] घोंगड्या-वि १ ( ल ) घोंगडी पांघरणारा, (यावरून) गरीब कामकरी, मजूर २ काळ्या रंगाचा मोठा मुरवट

घोंगण—न गुरफटून घेतलेली स्थिति [ घोंगट ]

घोंगण—न गोळा केलेला कचरा, गळहाटा, राडा, खळ मळ, घाण, खिचडी ( अशा वस्तूवर माशा घों घों करतात त्यावरून शब्दप्रयोग ) [ ध्व. घों, घोंगणें ]

घोंगणा—पु. नाकपुड्यातील पडद्याचा मांसल भाग, घोणा [ स घ्राण-घोणा ]

घोंगणें—अक्रि १ घों घों असा आवाज करणें, गर्जणें ( वारा, लाटा इ०नीं ) २ घोंगावणें, घों घों आवाज करणें ( माशा इ०नीं ) ' माशा घोंगती भाड्यावर। म्हणोनि वस्त्र झांकिलें तयावर।' ३ एकत्र जमणें, गर्दी, गिल्ला करणें [ ध्व , घों घों ]

घोंगता-ती-तें—पु स्त्री न ( कु ) १ घोंगडी हदीच्या बाजूनें दुमडून एका बाजूस शिवून केलेली खोळ, याचा उप योग भूस, कांड इ० पदार्थ साठविण्याकडे करतात २ पावसा पासून रक्षण करण्याकरिता कांबळ्याची केलेली घुगी, घुगट खोळ ( क्रि० घेणें ) ३ ( लहान मुलाची ) कुंची, एक प्रकारचा झगा घोंगशी पहा [ हिं घोंग, म घोंगट ]

घोंगत्याकुंवर—पु पुष्य नक्षत्राचें एक नांव, कारण या नक्षत्राचा पाऊस फार पडत असल्यानें घोंगत्याचा खप फार होतो [ घोंगता+कुंवर ]

घोगर—न ( ना ) मोठें घुगरूं

घोगरा—पु नदींतील एक प्रकारचा मासा

घोग(घ)रा—वि १ फुटक्या मडक्याच्या ध्वनीप्रमाण म्हशीच्या ओरडण्यासारखा असलेला ( आवाज ) बसलेला, फुटलेला, पिचका ( आवाज, कंठ ) २ फुटलेल्या, पिचक्या बस लेल्या आवाजाचा ( मनुष्य ) [ स घर्घर प्रा घग्घर, का गोग्गर ]

घोगला—पु १ फोड २ भाजल्यानें, देवीनें येतो तसा फोड

घोगली—वि पोचट, पोकळ ' 'पेरण्याकरितां सरकी घोगल्या कापसाची, अर्थात घोगली सरकी कमी आहे अशी घ्यावी ' —महाराष्ट्रदीपवल, पृ १४ ऑगष्ट १९३०

घोंगशी—स्त्री १ ( व ) लहानसें कमानीवजा देऊळ २ ( सर्व अर्थी ) घोंगता पहा ३ फाडून ढावळा पडलेल्या मकास चोहोंकडून आटपून घेऊन शिवलें असता येणारा झोळ

घोंगस—स्त्री ( व. ) घोंगता अर्थ २ पहा पावसाकरितां केलेली घोंगडीची खोळ, घुगी [ घोंगशी ]

घोगा—पु. ओरड, गिल्ला ' जलद चला ऐसा घोगा करू लागले ' —मदरु २ २७ [ फा घुघा ]

घोंगा—पु ( कु ) घोंगडबाऊ, बागुलबुवा [ प्रा. घघल, हिं घोंघा ]

घोंगाट-ड-घोंगाण—न १ तोंडावरून वस्त्र, बुरखा घेत लेली अवस्था, घुगट ( क्रि० घालणें, मारणें, घेणें ) ' आज काय घोंगाट घालून बसलास ? ' २ पावसाचें अवडंबर अंधारी, मळभ. ' पावसानें घोंगाट घातला आहे ' घोंगट, घोंघट पहा [ घोंग ]

घोंगाट-ण—न १ माशाचा, मुंग्याचा गुणगुणाट २ माशाचा थवा, समुदाय, घोळका ' जें का खरकटलें मरकटलें। अत्यंत घोंगाणें घोंगाळिलें।'—हको ३ ( ल ) लोटालोटी, झोंबा झोंबी, घेचेमार, झोड, धूम, रेटारेटी इ० भिकाऱ्यांची भिक्षा मिळविण्यासाठीं इ० ( क्रि० पडणें, बसणें, जमणें, उडणें ) घोंगड पहा ४ गोंगाट पहा

घोंगाडणें—अक्रि एकत्र जमणें, दाटणें, गोळा होणें ( आका शांत ढग इ० ) [ घोंगणें ]

घोंगाणा—पु नाकपुड्यांतील पडद्याचा मांसल भाग, घोणा घोंगणा पहा

घोंगाणा—वि १ आरडाओरड करणारा, घोंगावणारा २ ओंगळ घाणेरडा ' काय घोंगाणी पाषाणी। ताकामध्यें घाटी लाणी।' —तुगा ६२३ [ घोंगणें ]

घोंगायणें घोंगावणें—अक्रि घों घों करणें, घों घों ( माशा इ० कानीं ) धरणें, ( माशा इ० बसल्यामुळें ) बुजबुजणें, घाणे रडें होणें हे बहुतांचें उच्छिष्ट ताट। घोंगायलें विकारीं।'—मुरशु ४०८ २ मोठ्यानें घों घों करीत जाणें गोळा होणें [ ध्व घों घों ]

घोगार घोगारणें—घोंगाड घोंगाडणें पहा

घोंगावणें, घोंगेणें—अक्रि ( प्र ) घोंघावणें, घोंघेणें पहा

घों(घा)गी—स्त्री पावसापासून रक्षण करण्याकरितां, डोक्या वर घेण्याकरिता केलेला घोंगता, खोळ घुगी अर्थ १ पहा [ हिं घूघी=पिशवी, थैली ]

**घोगे-गें-घे, घोंगें-घें**—क्रिवि १ घों घों आवाज करीत २ (ल) जलदीनें, सत्वर –वि. मोठें 'तुका म्हणे आम्हां जोगें। विठ्ठल घोगें खरें माप।' –तुगा १७९८

**घोंगे(घे)रा**— पु भुंग्याच्या जातीचा एक लहान किडा. हा बांबू कोरतो व जमीनींत बीळ करून राहतो, घुंघुरा [ध्व घोंगणें]

**घोंगो**—पु (गो कु) वागुलशेवा, घोंगडवाऊ.

**घोग्या**—वि (व) वेडगळ, मूर्ख, कोणाकडूनहि सहज फसविला जाणारा [हिं घोंगा=मूर्ख मनुष्य]

**घोघ्रा**—पु एक प्रकारचा मासा घोगरा पहा

**घोंघट**—न घोंगट घोंगाट पहा.

**घो(घों)घाट-ण**—पु १ समुद्र नदी, वारा इ० कांचा घों घों असा आवाज, घोंगाट पहा (क्रि० घालणें) २ भुंगे, माशा इ० कांचा घोळ, गुणगुणाट, घोंगाट ३ गलबला, गिल्ला, हुल्लड, हाकाटी, कलकलाट (क्रि० करणें, मांडणें, घालणें) ४ (ल) गाजावाजा, गवगवा, परिस्फोट, डंका वाजणें (क्रि० करणें) [ध्व घों]

**घोंघाणी माशी**—स्त्री १ गु गु करीत येऊन मेवामिठाई इ० खाद्यपदार्थावर बसणारी (मोठी) माशी यावरून २ (ल) भोजनभाऊ पंक्तिपठाण, पंक्तिबारगीर, ताज्या घोड्यावरील गोमाशी परान्नपुष्ट [घोंघणें+माशी]

**घोघारिया**—पु कापसाची एक जात –कृषि ३८५ [गु.]

**घोघारी**—वि घोघो वदरासवर्धी (कापूस, खोबरें इ० जिन्नस) [गु घोघारिया]

**घोंघावणें**—अक्रि घोंगावणें पहा

**घोघावणें घोघेणें**—अक्रि (राजा) (समुद्र, धारा इ० कानीं) घों घों असा आवाज करणें, गर्जणें [ध्व घों द्वि]

**घोघें**—क्रिवि १ घों घों असा आवाज करीत 'पै सरितेचेनि ओघें। सिंधुजळा मीनलें घोघें।' –ज्ञा ८ ८४ २ (ल) सत्वर जल्दीनें, त्वरित [ध्व. घों]

**घोघें**—न १ घबाड, डबोल आकस्मिक सापडलेला ठेवा, झालेला लाभ 'तें एक मोठें घोघें सापडलें' –विवि १० ५ ते ७ १२४ –वि मोठें

**घो घो घों घों**—न एखाद्या पदार्थाभोंवतीं जमणाऱ्या माशाच्या थव्याचा आवाज [ध्व]

**घो घो**—पु १ समुद्र, वारा, नदीचा प्रवाह पूर इ० कांचा आवाज, गर्जना 'घो घो शब्दें पूर चालला।' –नरहरि गंगारत्नमाला कटाव (नवनीत पृ ४२५) 'जीवजंतु घो घो शब्द करूं लागतात –पाव्ह ५६ २ (गो) धवधबा –क्रिवि १ लाटांच्या आपटण्याच्या, वाऱ्याच्या, घोंघावण्याच्या पावसाच्या गर्जनेच्या आवाजाप्रमाणें शब्द करीत, होत २ (मनुष्याच्या घोळक्याच्या) गोंगाटाच्या, गल्बल्याच्या, गलक्याच्या, आवाजाप्रमाणें, खूप खेचाखेचीनें, (माणसें इ० कानीं) गजबजत, पेव फुटल्याप्रमाणें घोंगावत, धवधवा, धवधव पहा [ध्व द्वि]

**घोघ्या**—वि घो घो करणारा, घोघावणारा [घो घो]

**घोघ्यांचें**—अक्रि (गो.) घोघावणें, घो घो असा आवाज होणें [ध्व घा]

**घोट**—पु (पाणी इ० द्रव पदार्थ) गिळण्याचें एक वेळेचें परिमाण, घुटका, चूळ 'बहु उग्र गमे घेता गरळाचा जेंवि घोट कामारी।' –मोभीष्म ८ ४९ [प्रा घोट्ट=पिणें, हिं घुटकना=गिळणें, घोट ध्व] (वा॰) (जिवाचा) **घोट घेणें-करणें-भरणें**–सक्रि (एखाद्याचा घोट करणें, गिळणें) अतिशय छळून, गांजून हैराण करणें, प्राण घेणें, ठार मारणें 'तैं घोंट भरू धावसी। देखताचि घेसी जिवें त्यातें। –एभा ५ २ 'विवेकबळें जन्ममृत्याचा। घोट भरिला जेणें।' –दा ७ १० २८

**घोंट**—स्त्री १ (कों) एक कांटेरी वनस्पतिविशेष २ –स्त्री (राजा.) एक जंगली कांटेरी वल, हिच्या कोंवळ्या पानाची भाजी करतात ३ –न सदर वनस्पतीचें फळ ४ –न (कों) झाडावरच पिकून कठिण झालेली सुपारी, घोंटसुपारी ॰**सुपारी**–स्त्री (कों) झाडावरच पिकून कठिण झालेली सुपारी, घोंट अर्थ ४ पहा. [घोंट+सुपारी]

**घोट, घोटक**—पु १ घोडा, अश्व 'निजकरें तव स्यंदन घोटका। धरिन मी करिं शत्रु सघोटका।' –वामन विराट ६ १११ 'ते काळ्याल करिघोटक-भटभेक खावया सुटले।' –मोभीष्म ३ ५९ २ (युद्धिबळात) घोडा या नावाचें मोहरें [स घोटक, अर घोश]

**घोटखोर**—पु १ पाणबुड्या २ दक्षिणेंतील कांहीं मराठा संस्थानांत गावचा पाणबुड्या हा एक सरकारी नोकर म्हणून समजला जातो विहिरींत, तळ्यात पडलेल्या जिनसा काढून देणें हें ह्याचें काम असतें [हिं घोट+खोर प्रत्यय]

**घोटणी**—स्त्री १ घोटण्याची क्रिया २ (सोनारी) सोन्याचे मणी घोटण्याची सारखे करण्याची आवटी, घोटण्याचें हत्यार, साधन ३ (ना) कन्कट, घासाघीस जिगजिग [घोटण]

**घोटणें**—न घोटण्याचें उपकरण, घोटणी, घोटा –खानगी खातें–लागतीचे नियम (बडोदें) ३८ [घोटणें]

**घोटणें**—उक्रि १ गिळणें. 'अथवा मीना गळु घोटे –ज्ञा ७ ९४ –एभा १० ३५० 'अगस्ती धावे समुद्र घोटूं।' –मुरमा ७ १८ –केका १०४ २ (ल०) सहन करणें, भोगणें (दु ख, अपमान) 'मुनि त्या अपमानातें घोटी जेंवि त्रिलोचन गरातें।' –मोआदि २२ ७ [प्रा घोट्ट, म घोट ध्व]

**घोटणें**—सक्रि १ ( कागद इ० ) गुळगुळीत करण्याकरितां ( कवडा इ० ) कठिण व गुळगुळीत पदार्थानें घासणें २ कुटणें, खलांत घालून बारीक करणें, वाटणें, उगाळून बारीक करणें, गरगटणें ३ नीट मिश्रण होण्याकरितां हलविणें, ढवळणें, मळणें, खलणें ४ ( श्लोक, धडा इ० ) पाठ करून पक्का करणें, घटवणें, ( अक्षरें किंवा, वळण ) घटविणें, गिरवणें, घोटविणें, वळविणें [ हिं घोटना, सिं घोटणु ध्व ]

**घोटवाल**—पु वालाची एक जात याची शेंग चापट व लहान असून दाणा वाटोळा करवदासारखा असतो

**घोटविणें**—सक्रि १ ( अक्षरें, कित्ता इ० ) गिरविणें, वळविणें, घोटणें २ ( ल ) ( एखादी गोष्ट ) मनांत घोळविणें [ घोटणें ]

**घोटवेल**—स्त्री १ एक रानटी वेल २ तांदळाची एक जात

**घो(घों)टा**—पु १ भांगेचें एक पेय, वेलदोडे, बदाम इ० मसाल्याच्या पदार्थांसह घोटून केलेलें भांगेचें पेय 'ब्राह्मणाचें तीर्थ घेतां त्रास मोठा । प्रेमें घेतो घोटा घटाघटा ।' –तुगा ४२३४ २ दागिने घोटण्याचें, झिलई देण्याचें एक हत्यार, हें गार किंवा एखादा दगड मुठींत बसवून केलेलें असतें घोटणी पहा ३ लाकडी लाठ्या, मुसळ वगैरे [ घोटणें ]

**घोटा**—पु पायाचा डोळा, खुबा, पायाची नळी व घवडा यांच्यामधील सांध्याचें हाड [ सं घुट्–टी घोटक –भांडारकर ]

**घोटेस्नान**—न १ फक्त घोट, पाय धुणें २ ( ल ) छोटें लहानसें स्नान [ घोटा+स्नान ]

**घो(घों)टाळणी**—स्त्री १ इकडे–तिकडे भटकणें, भ्रमणें भटक्या मारणें २ घिरट्या घालणें, घुम्मळणें, घोटाळणें [ घोटाळणें ]

**घो(घों)टाळणें, घोटळणें**—अक्रि १ ( गुतागुतीच्या मार्गांत चक्रव्यूहांत ) इकडे तिकडे, मागेंपुढें फिरणें, भ्रमणें २ कोंडाळणें, वळणें, तोंड फिरविणें, दिशा बदलत फिरणें, भोंवणें, गरगर फिरणें, घुटमळणें इ० कोंडलेल्या जागेंतील वारा २ ( गवताच्या काड्या, केरकचरा इ० वाऱ्याच्या झोतावर ) इतस्ततः उडणें, गरगर फिरत राहणें ३ (नदी इ०) वळणावळणांनीं वहात जाणें, भोंवरे करीत वाहाणें ४ ( मन इ० ) गोंधळून जाणें, घोंटाळ्यांत पडणें, दिङ्मूढ होणें, बावरणें, गडबडून जाणें, गुंतणें, 'तें सगळ तितक्या रुपयांनीं देण्याविषयीं त्याचें घोंटाळत होतें' [ सं गुट्–घोट–घोंटाळणें–गुंटाळणें=लपणें, आत ओढणें, –भाअ १८३२ ] –सक्रि गोंधळून टाकणें गुंतवणें घुटमळ्यांत पाडणें, घुटमळावयास लावणें 'जाला परी वध मोहनी । घोटाळीत माझे प्राणालागुनी ।' –नव २१४९ [ घोटाळणें प्रयोजक ]

**घोटाळणें**—सक्रि १ घाटणें, घोटविणें, घोटून गुळगुळीत व टणक करणें (जमीन, भिंत इ०) 'चीत्र लीहावेयाची भाईंती केली । नीट भींती कापडीली । घडी सारुनी घोटाळली । वर्ते घडी मेळवीली ।' –उषा २८ १३ २ किरयांतील अक्षरावरून कोरडी लेखणी फिरवून अक्षरें गिरवणें, घटविणें, वळविणें, घोटणें ४ अर्थ पहा [ घोटणें ]

**घो(घों)टाळा**—पु १ ( वारा, पाणी, गवताच्या काड्या, धूळ इ०काची ) गिरक्या, घिरट्या, वळणें घेत जाण्याची स्थिति, गरगरा फिरणें, भ्रमण करणें २ ( कामें, हिशेब, वस्तु इ०काचा ) गोंधळ, अस्ताव्यस्त स्थिति, गल्हाटा, गुतागुत, गोलंकार, खिचडी 'त्या पोरानें पोथीचा घोंटाळा करून टाकला' ३ ( मनाची ) गोंधळून, बावरून, दिङ्मूढ होऊन गेलेली अवस्था, मनाचा गोंधळ ४ नागमोडीची, वेडीवाकडी जागा, स्थल, गुंतागुंतीचें काम ५ ( वाऱ्यानें ) दिशा, रोंख बदलणें, घोंटाळणें 'वाऱ्याच्या घोटाळ्यात सांपडून तें गलबत बुडूं लागलें' ६ एककार, गोलकार [ घोटाळणें ]

**घोटाळा–ळें**—पु न कागद घोटण्याचा कवडा, घोटा, घोटकवडा 'सुन्या कातऱ्या जागाईत । खळी घोंटाळें तागाईत ।' –दा १९ १ १५ [ घोटणें, घोटाळणें ]

**घो(घों)टी**—स्त्री बोरासारखीं पण कठिण फळें येणारें एक कांटेरी झाड [ सं घोटा ]

**घोटी**—स्त्री ( ना व ) लहान आकाराचा आंबा, ( प्र ) गोटी 'ही घोटी खा, इला साखरघोटी म्हणतात' [ गोटी ] ०झेला–पु घोटी आंबे झाडावरून काढावयाचें जाळें [घोटी+झेला ]

**घोंटी**—स्त्री ( कु ) १ फणसाच्या गऱ्यांतील बी, आठळी २ गाईची कांस. ३ घोटराचा पदर कनवटीस खोवून, ल्गोटाचा सोंगटा पदर वर करून खोंवला असता होणारा घोळ [ ओंटी ]

**घोंटीव**—वि १ घोटलेलें घोटून घोटून, घासून घासून गुळगुळीत केलेलें २ उजळा दिलेलें, चकचकीत केलेलें 'पधरे याची चोखडी । घोंटीव जैशी ॥' –ज्ञा ६ २२४. 'हिरा घोंटीव व तासलेला नसून.' –पदाव ७० ३ चांगलें वळविलेलें, मेहनत घेऊन काढलेलें ( अक्षर ) ४ टराविक, टरीव, विवक्षित, नेहमींच्या प्रचारांतील 'इतर लोक नव्या–जुन्या पद्धतींच्या घोंटीव शिक्या दडून वळ मारून नेत असतील' –विविज्ञा १ ५९ [ घोटणें ] ०काम–न १ मातीच्या चित्राचा ओबडधोबडपणा जाण्याकरितां तें चित्र घोटून गुळगुळीत करण्याचें काम २ ( रंग इ० ) घोटण्याचें काम

**घोटी(टू)क**—पु (गो) १ एका जातीचें झाड घोटी पहा २ वरुर झाडाचें फळ

**घोटें**—न (राजा) गुरास औषध इ० पाजण्याचें नळकांडें, नळी [घोटणें=पिणें]

**घोटें**—न घोटी या झाडाचें फळ

**घोंटेर, घोटीर**—पु (गो) पक्ष्याचें घरटें, 'नेलीं घोंटेरीचीं पिलें चोरुनु। पक्षे नाथिली।' —शिपु ११४२ [स कोटर, म घरटें]

**घोंटोणी**—स्त्री (गो.) आपोष्णी, आपोशन [घोटणें=पिणें, गिळणें]

**घोट्या**—पु १ जड्यांचें, दागिने इ० घोटण्याचें उपकरण, घोटणी पहा २ गवड्याचें गिलावा गुळगुळीत करण्याचें हत्यार, साधन —वि १ अभ्यास घोटणारा, पाठ करणारा, नुसताच पाठावर भर देणारा, मदबुद्धि, ढोर मेहनती २ एकसारखें घोकणें, पाठ करणें, मोठ्यानें वारवार म्हणणें 'चक्कू ताडया घोट्या अभ्यासाचे प्रकार हे तीन।' [घोटणें=गुळगुळीत करणें]

**घोड**—घोडा या शब्दाचें समासाच्या पूर्वपदीं येणारें रूप उ० घोडनवरा, घोडग्रह, घोडदौड इ० घोडपूर्वपदी सामासिक शब्दाकरिता घोडा हा शब्द पहा

**घोडा**—पु १ खुर असलेला एक चतुष्पाद प्राणिविशेष ह्याचा उपयोग ओझें वाहण्याच्या, गाडी ओढण्याच्या व बसण्याच्या कामीं करतात ह्याच्या जाती अनेक आहेत अरबी घोडे जगप्रसिद्ध आहेत लहान घोड्यास तट्टू व घोड्याच्या पोरास शिंगरू म्हणतात घोड्याच्या आकृतीवरून, गतीवरून, उपयोगावरून व लक्षणेनें हा शब्द अनेक वस्तूस लावतात २ बुद्धिबळाच्या खेळातील एक मोहरा हा सर्व बाजूनीं दोन सरळ व एक आडवें (अडीच) घर जातो या मोहऱ्याचा विशेष हा आहे कीं हा इतर मोहऱ्याच्या डोक्यावरून उडून जातो, तशी गति इतर मोहऱ्याना नसते ३ बंदुकींतील हातोडीच्या आकाराचा अवयवविशेष हा दाबला असता ठिणगी उत्पन्न होते व बंदुकीचा बार उडतो, चाप ४ (मुलाचे खेळ) दोन पायात काठी घालून (तिला घोडा मानून) मुलें धावतात तो काठीचा घोडा. ५ (उप) मूर्ख व टोणग्या असा वयस्क मुलगा, वयानें मोठा पण पोरकट मनुष्य ६ वस्त्रें, कपडे ठेवण्यासाठीं खुंट्या ठोकलेला खांब, स्नान करणाऱ्या माणसाचे कपडे ठेवण्याकरिता जमिनींत रोंवलेली काठी, खांब, (इ) स्टँड ७ (ल) शरीर वाहून नेतात म्हणून पायास लक्षणेनें (दहावोटी) घोडा असें संबोधितात तगड्या 'आमचा दोन पायाचा घोडा आम्हाला इवें तयें वाहून नेईल' ८ पाळणा टांगण्यासाठीं एका आडव्या लांकडाला चार पाय लावून करतात ती रचना, घोडी ९ पालखीचा दांडा ज्याला बसविलेला असतो तें दुबेळकें बेचक, पालखी तवे ल्यान वगैरे ठेवताना ज्यावर ठेवतात तीं दुबेळकें असलेलीं लाकडें प्रत्येकीं १० गाड्याच्या बैठकीच्या चौकटीचीं दोन बाजूचीं लांब लाकडें प्रत्येकी, गाडीच्या दांड्यास आधार द्यावयाचें दुबेळकें ११ मूल रांगावयास लागलें असता दोन हात व दोन गुडघे जमीनीला टेकून करतें ती घोड्यासारखी आकृति (क्रि० करणें) १२ मृदंग, पखवाज ठेवण्याची घडवंची, घोडी, (दिवे इ० लावण्याची) दोन बाजूस पायऱ्या असलेली घडवंची, (पिपें, पेट्या ठेवण्याची) लाकडी घडवंची १३ नारळ सोलण्याचा, शेंड्यास सुरी बसविलेला खांब, नारळ सोलण्याचा एक प्रकारचा साचा १४ समुद्राच्या भरतीच्या पाण्याचा चढ, फुगोटी, फुगारा, लाटेचा उच भाग, नद्याच्या मुखातून वर गेलेलें समुद्राच्या भरतीचें पाणी —सृष्टि ५७. १५ ओबडधोबड असा आकडा, फासा, पकड १६ (ल) घोडेस्वार 'तीन हजार घोडा पेशव्याचे तैनातींत ठेवावा' —विवि ८ ७ १२९ १७ दाराच्या दुहेरी चौकटीच्या वरच्या बाजूचे, परस्पराला जोडणारे दोन लाकडी तुकडे (त्याच्याच जोडीच्या खालच्या बाजूच्या तुकड्यास छिली म्हणतात) १८ (खाटीक इ०कांचें) साकटणें, एकोटन, खाटकाचा ठोकळा १९ (मुद्रण) केसी व ग्याली ठेवण्यासाठीं केलेली घडवंचीवजा चौकट २० फळा, चित्रफलक इ० उभा ठेवण्याची लाकडी उभी चौकट २१ (कों) रहाटगाड्याचें कोळवें ज्यावर ठेवतात ती लाकडी चौकट २२ (पोहण्याचा) चार भोपळ्याचा तराफा २३ (गो) (विटीदांडूचा खेळ) विटी मारण्याचा एक प्रकार. (क्रि० मारणें) [स घोटक, प्रा घाड, गु घोडो, मिं घोडो, स्पॅनिश जि गोरो, अर घारा] **घोडी**—स्त्री १ घोडा या जातीच्या प्राण्याची मादी २ सतार, तंबोरा इ० ततुवाद्याच्या भोपळ्याच्या मध्यावर हस्तीदंती अगर लाकडाची पाटाच्या आकृतीची एक इंची किंवा दीड-इंची पट्टीची बैठक, तिच्यावरून तारा पुढें खुंटीस गुंडाळलेल्या असतात ३ मुलाना शिक्षा देण्याकरितां निला हातानें धरून शिक्षा दिल्या लोंबकळत असतो अशी आढ्यापासून लोंबणारी दोरी, फासा, मुलास टांगण्यासाठीं उंच बांधलेली दोरी अशी शिक्षा पूर्वी शाळांतून फार देत (क्रि० घेणें, देणें) 'एखाद्या मुलाशीं माझे वाकड आलं कीं, रचल्च त्याच्यावर किटाळ आणि दिलीच त्याला पंतांनीकडून घोडी' —चद्रग ८० ४ उभें राहून पखवाज वाजविण्याकरिता पखवाज ठेवावयाची घडवंची 'इतक्यात देवळाच्या एका कोपऱ्यात मृदंग ठेवावयाची उंच घोडी सुनदाला दिसली —सुद २५ ५ गवत इ० वाहण्याकरिता खगाऱ्यावर उभारलेला सांगाडा, चौकट ६ फळा जमीनीपासून उंच ठेवण्याकरिता व त्याला उतार देण्याकरिता केलेली लाकडी चौकट, सांगाडा ७ वयस्क असून पोरकटपणा करणारी, खिदळणारी मुलगी खिदडी धांगडधिंगी, भोपळदेवता, घोडकुदळ ८ (सुतारी) तासावयाचें लाकूड हलू नये म्हणून त्याला आधारभूत असें दुसरें लाकूड, चौकट इ० सोईनें बसवितात तें.

९ (विणकामांत) सूत उकलण्यासाठीं केलेलें लाकडी चौकटीसारखें साधन १० (सोनारी) पायांत घालावयाच्या साखळ्यांच्या कड्या वाकविण्यासाठीं असलेला बोटाइतका जाड असा निमुळता मोळा. ११ (हेट नाविक) पोरकें (लहान) शीड उभें करण्यासाठीं असलेलें कमानीसारखें लाकूड १२ वघाऱ्याच्या मुखाशीं (पाणी सोडण्याच्या ठिकाणीं) पडद्यासारखी बांधलेली भिंत हिच्यावरून पाणी जात असतें १३ (हेट) गलबताच्या कडेस शौच्यास बसण्याकरितां टांगलेली लाकडी चौकट १४ साकटणें, सकोटण, घोडा अर्थ १७ पहा १५ तीन पायाचें दिवा ठेवण्याचें सुरडी तिकाटणें, तिवई १६ पागास जे दोन आडात मारितात ते प्रत्येकी १७ हत्तीवरील चौकट, हौदा 'साहेब नौबतीकरितां हत्तींवर लाकडी घोडी घालून '-ऐरा १ ५०६ १८ उभें खुगाळें (इ) स्टँड 'तिकोनी खुंट्यांची घोडी आणि रुमाल ठेवावे '-स्वारीनियम ७० १९ सामान ठेवण्याचा घोडा घोडें-न १ सामा (लिंगभेद नधरतां) घोडा या जातीं तील जनावर 'कृष्णाकाठचीं घोडीं सडपातळ पण चपळ असतात.' २ खगाऱ्याच्या साटीच्या चौकटीचीं दोन बाजूचीं उभीं लाकडें, घोडा अर्थ ९ पहा घोडकें अर्थ १ पहा ३ चार ओंपळे लावलेला पाण्यावर तरंगणारा तराफा घोडा अर्थ २१ पहा ४ (व) गाडीचे दांडे-जूं ज्यावर ठेवतात तें दुबेळकें घोडा अर्थ ९ पहा [स घोडा] (वाप्र) घोडा आडवा घालणें-(एखाद्या कार्यांत) अडथळा, विघ्न आणणें 'आणि म्हणूनच तुम्ही घोडा आडवा घातलास वाटतें?'-चद्रप्र ६८ ०उभा करणें-बांधणें-(घोडा) थोडा वेळ थांबवणें, जरासें थांबणें, घाई न करणें (घाईंत व घाटलींत असणाऱ्या मनुष्यास उद्देशून ह्या वाक्प्रचाराचा उपयोग करतात) ०काढणें-१ (बांधून ठेवलेला घोडा बाहेर नेणें) घोडा हाकारणें पिटाळणें. २ (ल) (एखाद्यानें) पळ काढणें पोबारा करणें, निसटणें ०चाल विणें-(कर) (ल) डोकें खाजवणें युक्ति लढविणें ०टाकणें-घोडा फेकणें, उडवणें, अंगावर घालणें 'आरेरे टाकौनि घोडा। मणती याचिभां अडें उपडा।' -शिशु १४१ ०मैदान जवळ असणें-(घोडा धावण्यात कसा काय आहे याची परीक्षा त्यास मैदानांत पळवून करतां येते यावरून) ज्याची परीक्षा करावयाची तो पदार्थ मनुष्य व परीक्षेस लागणारी सामग्री हीं दोन्ही जवळ असणें असा अर्थ होतो, एखाद्या गोष्टीची निरर्थक चर्चा न करतां तिला कसोटीला लावणें कसोटीची वेळ किंवा सामुग्री जवळ असणें हा सूय हा जयद्रथ 'कोरडी बढाई कशाला पाहिजे? घोडामैदान जवळच आहे' ०हाकणें-पळून जाणें, निघून जाणें; पोबारा करणें घोडा काढणें पहा 'पतोजीबुवास पाहून त्या पोरानें घोडा हाकला' घोडी चाढणें-भरविणें-सजि (माण) घोडीस घोडा दाखविणें, देणें, घोडी फळविणें घोडी घेणें-(एखाद्याशीं) घासणें, कटकट करणें, मत्सरबुद्धीनें दोष काढणें घोडें उभें करणें-अडथळा आणणें 'बाळासाहेब नातूसारख्यांनीं विशेष प्रसंगीं एखादें घोडें उभें केलें तरी त्याकडे दुर्लक्ष्य करून ज्यानें त्यानें आपला पथ सुधारावा'-आगर ३ १४४ (एखाद्याचें) घोडें थकणें-एखाद्यानें (प्रवास, धंदा, व्यापार, अभ्यास इ०कांत) थकून जाणें, हतबल होणें, पुढें रेटण्याची शक्ति न उरणें (एखाद्यानें आपलें) घोडें पुढें दामटणें-ढकलणें-हांकणें-घालणें- १ इतरांच्या पूर्वी आपला कार्यभाग साधून घेण्याचा घाईनें प्रयत्न करणें 'या शर्यतींत जो तो आपलें घोडें पुढें दामटायला पहात आहे'-नि 'ब्रिटिश वसाहतींनीं आपल्या हक्काचें घोडें पुढें दामटलें' -सास २ ४४६ २ लुब्रेपणानें दुसऱ्यांच्या संभाषणांत तोंड घालून त्यांच्यावर आपले विचार लादणें (एखाद्याचें) घोडें मारणें-एखाद्याचें नुकसान करून त्याला राग आणणें (पूर्वी प्रवासाचें मुख्य साधन घोडें असे प्रवासाचें घोडें ठार केल्यास त्याचा प्रवास थांबत असे व त्यामुळें त्याचें फार नुकसान होई यावरून) एखाद्याचें फार नुकसान करणें 'मी काय तुझें घोडें मारलें आहे?' (आपलें) घोडें पुढें ढकलणें-आपलें काम प्रथम करू लागणें, आपल्या कामाला महत्त्व देणें गाडी खालचें घोडें-संसारादि निर्वाहक मालमत्ता, वाडी इ० आधारभूत मुख्य साधन म्ह० आपलें गाडीखालचें घोडें गेलें, मग त्यावर महार बसो कीं चांभार बसो घोडीं आडवीं घालणें-१ शत्रूवर तुटून पडून त्याच्या चालीला, पळाला अडथळा करणें २ (ल) (एखाद्यास त्याच्या कामांत) संकट, अडथळा, व्यत्यय आणणें 'जर त्यांणीं आपल्यावर चालून घेतलें तर आम्ही आडवीं घोडीं घालतों'-ख ४२१७ घोडीं घालणें-घोड्याच्या अनीना उचलणें-घोडदळांतील सर्व स्वारांनीं ईर्षेनें शत्रूवर एकदम तुटून पडणें -हाके २ घोड्याच्या, हत्तीच्या पायांनीं येणें व मुंगीच्या पायांनीं जाणें-(आजार संकट, अडचण ई० च्या संबंधांत हा वाक्प्रचार योजतात) जलदीनें येणें व धिमेधिमें जाणें, आजार इ० जलदीनें येतात पण अतिशय हळू हळू नाहींसे होतात यावरून वरील वाक्प्रचार रूढ आहे (एखाद्याच्या) घोड्यानें पे (पेंड) खाणें-या वाक्प्रचारांत पेण=प्रवासांतील टप्पा मुक्कामाची जागा या ऐवजीं चुकीनें पेंड हा शब्द उपयोग आणतात लोकांच्या प्रवासांत निरनिराळ्या टप्प्याच्या ठिकाणीं घोडीं उभीं रहात त्यामुळें टप्प्याचें ठिकाण आलें कीं घोडें तेथें अडे, पुढें जात नसे यावरून वरील वाक्प्रचार एखादें काम करतांना कोणी अडून बसल्यास त्यास 'तुझें घोडें कुठें पे

खातें ' असें विचारताना उपयोगात आणतात **घोड्यापुढें धावणें**–जिकीरीचें, दगदगीचें, कष्टाचें काम करणें (एखाद्याच्या) **घोड्यापुढें धावणें**–एखाद्याची कष्टाची सेवा, चाकरी करणें, ( उप ) एखाद्याची ओंगळ खुशामत करणें, एखाद्याची थुंकी झेलणें **घोड्यावर घोडा घालणें**–(लिलाव इ० कात) चढाओढ करणें, एखाद्यानें कलेल्या किंमतीपेक्षा अधिक किंमत पुकारणें, उडीवर उडी घालणें **घोड्यावर बसणें**–दारू पिऊन झिंगणें, ताठ्यात असणें **घोड्यावर बसून येणें**–घाईनें येणें, आपलें काम तातडीनें करण्यास दुसऱ्यास घाई करणें **सर घोड्या पाणी खोल किंवा पाणा पी**–( घोड्या मागें हट, पाणी खाल आहे तेथूनच पाणी पी ) गोष्ट मोठी कठिण आहे, मागें परतता येणें शक्य आहे तोंच परतावें याअर्थी म्ह० १ घोडा आपल्या गुणानें दाणा खाता=चागला घोडा खूप काम करून आपल्याला खाद्यहि जास्त मिळवतो त्याला जास्त देण्यास मालक असंतुष्ट नसतो यावरून चागला चाकर आपल्या गुणानें व मेहनतीनें मालकाकडून पगार वाढवून घतो २ घोडा स्वार (माह) ओळखतो=बसणारा कच्चा कीं पक्का आहे हें घोडा ओळखू शकतो ( यावरून ), आपला मालक कडक कीं नरम आहे हें हाताखालचीं माणसें ओळखू शकतात ३ ( व ) जाय रे घोड्या खाय रे हरळी=घोड्याला हरळी खावयास मोकाट सोडण्यास ( घोड्याला ) तें चागलेंच होईल, पथ्यावरच पडेल म्ह० १ घोडा मरे भारें शिंगरू मरे येरझारें=घोडी ओझें किंवा माणूस वाहून नेत असता तिचें शिंगरूहि तिच्याबरोबर जात असतें घोडीच्या प्रत्येक हेलपाट्याबरोबर शिंगरूहि हेलपाटा खातें. यावरून प्रत्यक्ष काम करणारास श्रम हातातच पण त्याच्या सहवासात असणारांना सुद्धा जवळ जवळ तितकेच श्रम होतात. २ वरातीमागून घोडें=लग्नाच्या वरातीच्या मिरवणुकींत सर्वांच्या पुढें शृंगारलेलें कोतवाली घोडें चालवण्याची चाल आहे यावरून वरात निघून गेल्यावर मागाहून शृंगारलेलें घोडें नेणें व्यर्थ होय किंवा औचित्यास धरून होत नाहीं त्याप्रमाणें एखादी गोष्ट होऊन गेल्यावर मागाहून तत्संबधींचीं साधनें जुळविणें व्यर्थ होय ३ माझें घोडें आणि जाऊ दे पुढें=इतरांचें काहीहि होवो माझें काम आधीं झालें पाहिजे स्वार्थी माणसाची निंदा करतांना या म्हणीचा उपयोग करतात समासात घोडा शब्द पूर्व पदीं आल्यास त्याचीं घोड किंवा कधीं कधीं घोडे अथवा घोड व घोड, अशीं दोन्ही रूपें होतात उ० घोडचूक, घोडेस्वार घोड(डे)चिल्टइ० सामासशब्द–**घोडकट घोडकें**–न ( घोडपाला निरस्काराने लावावयाचा शब्द ) घोडकें, मदाक व थिल्लर घोडें, मुलाचा तद्वद **घोडकुदळ**–पु १ ( उप ) मुजाचें वय झालेलें मुलगी असून मुंज न झालेला मुलगा, घोडमुंज्या २ –स्त्री. (उप ) वय

असून लग्न न झालेली दांडगट नाचरी मुलगी, घोडी, घोडगी, भोपळ देवता, घोडनवरी, घोडी पहा **घोडकूल**–न १ (गो ) लहान घोडें, तद्वद २ (खा ) ओट्याच्या खाबावर तिरपा टेंकू ( कर्ण ) देऊन त्यावर कोरलेली घोड्याची आकृति **घोडकें–का**–नपु १ ज्याच्या भरीला करळ्या व तरसे घालून गाड्याची तक्तपोशी, बैठक तयार करतात अशीं चौकटींतील दोन बाजूचीं दोन उभीं लाब लाकडें २ तेल्याच्या घाण्याच्या कातरीला खिळलेलें व जुंदाचा दोर बाधावयाचें लाकूड **घोडके**–ढोराचा गुरु –मागा २६ **घोडकेळ**–न (क )एक हलक्या जातीचें भसाडें केळें [ घोडा+ केळें ] **घोडक्या–का**–पु १ घोड्याचा खिजमतगार मोतद्दार. ' घोड्यास शिपाई काय करिल घोडका । ' –ऐपो ३७२ २ चाबुकस्वार, अश्वशिक्षक, घोडा अर्थ ९ मधील शेवटचा अर्थ पहा **घोडकास**–पु ( गो ) तीन मैलाचा काम **घोडगा–गी**–पुस्त्री ( उप ) वयानें प्रौढ पण पोरकटपणा, नाचरेपणा अंगीं असलेला मुलगा, मुलगी, घोडा अर्थ ५ पहा घोडी अर्थ ७ पहा **घोड(डे)गाठ**–स्त्री ( बुद्धिबळाचा खेळ ) एकमेकाच्या जोरात असलली घोड्याची दुक्कल **घोडचवड**–स्त्री घोडदौड, घोडा चौफेर उडविणें, चवडचाल ' घोडचवडीखालीं नाना पुण्याला आला ' –ऐपा १६२ [ घोडा+चवड=विशिष्ट चाल ] **घोडचाल**–स्त्री घोड्याची चाल ( ल ) जलद चाल [ घोडा+ चाल ] **घोड(डे)चिलट**–न मोठें चिलट, डास, मच्छर **घोडचूक**–स्त्री मोठी व अक्षम्य चूक. **घोडचोट्या**–वि १ (मनुष्य) (अश्लील) घोड्याच्या चोटासारखा मोठा चोट ज्याचा आहे असा २ (निंदार्थी) मुंज न झालेला, वाढलेला मुलगा, घोडकुदळ, घोडमुंज्या **घोडजावई**–पु ( उप ) मोठ्या वयाचा नवरामुलगा, घोडनवरा **घोडजाळी**–स्त्री (भोंवऱ्याचा खेळ) विरुद्ध पक्षाच्या भोंवऱ्याला खोंचा देऊन आपला भोंवरा दूर जाऊन फिरत राहील अशा रीतीनें भोंवरा फेकण्याचा प्रकार [ घोडा+जाळी=दारी ] **घोडतोंड्या**–वि घोड्याच्या तोंडासारखा लांबट चेहरा असलेला, कुरूप, लांबट, ओबडधोबड तोंडवळ्याचा [घोड+तोंड= चेहरा ] **घोडदळ**–न १ घोडस्वारांचें सैन्य, फौज २ सैन्यांतील घोडस्वारांचें पथक, तुकडी [ घोडा+दळ=सैन्य ] **घोडदौड**–स्त्री घोड्यासारखें पळणें, घोड्याची दौड, जलद जाणें [ घोडा+दौड=पळणें ] **घोडनट**–न ज्याचें एक तोंड आढ्यावर व एक लगीवर येऊन दरम्यान तिरपें राहतें असें लाकूड टाकतात **घोडनवरा**–पु (उप ) प्रौढवयाचा नवरामुलगा, घोडजांवई **घोड(डे)नवरी**–स्त्री ( उप ) मोठ्या वयाची नवरीमुलगी, वधू योग्य व सामान्य वयोमर्यादेबाहेर अविवाहित राहिलेली ह मोठमोठ्या घोडनवऱ्या घरात बाळगल्यास परि उपवर णाम बर ! ' –ज्ञाम **घोड(डे)पाळणा**–पु घोडपाळ (लाकडी

हुरभरा. २ (ल.) बुंदीच्या लाडवास तिरस्कारानें म्हणतात. **घोड्याचा पूत-लेंक**-पु. (उप.) मूर्ख; गाढव; गद्धा. **घोड्याची चाकरी**-स्त्री. घोड्यांना दररोज चोळणें, खरारा करणें इ० काम. **घोड्याची जीभ**-स्त्री. (राजा.) एक वनस्पतिविशेष. **घोड्याची मुंज, घोड्याचें बारसें**-स्त्रीन. एखादा कोठें जावयास निघाला असतां एखाद्या अधिक प्रसंगी व फाजिल चौकशी करणाऱ्या माणसानें त्यास कां, कुठें जातां असें विचारलें असतां म्हणतात. **घोड्यांचें नाटक**-न. (ना.) सर्कस. **घोड्याचें मूत**-न. १ कुत्र्याचें मूत; अळंबें; भुईछत्री. २ कुजलेल्या लांकडांतून फुटलेलें अळंबें. **घोड्याच्या पाठीवर**-क्रिवि. भरधाव; झरकन; त्वरेनें. (क्रि० जाणें; करणें). **घोड्याच्या पाठीवरचा कोस**-पु. कंटाळवाणा व लांब णीचा कोस, घोड्यावरून गेल्यासच कोसाएवढें व कंटाळवाणें न वाटणारें अंतर.

**घोडशी**—स्त्री. (राजा. कुण) घडवंची.

**घोडसर**—पु. घोड्यांची पागा. -स्त्रीचरित्र २.१३५. [घोडा+सर=सोपा, रांग]

**घोडागद्यान**—पु. एक प्रकारचा गद्यान; एक नाणें आहे. -चौऱ्याशीचा शिलालेख, पंढरपूर (शक ११९५).

**घोडाचोळी**—स्त्री. गंधक, पारा, हरताळ इ० एकत्र करून केलेली गोळी. हिला संस्कृत भाषेंत अश्वकंचुकी असें म्हणतात.

**घोडाचज**—न. वेखंड. -मुंव्या १६७. घोडा वच पहा.

**घोडीकुर**—स्त्री. कुरघोडी. 'घोडीवरी होईल स्वार। त्याचा बहुत पडेल भार। भाराखालें निघेल बूर। पोरें म्हणती घोडीकुर।' -मध्व १७७. [घोडी+कुर; ध्व]

**घोडुला**—पु. घोडला पहा. (क्रि० करणें).

**घोडूक**—न. (गो.) घोडकें पहा.

**घोडेकातरा**—पु. एक औषधी जिन्नस.

**घोडेकुसळी**—स्त्री. एक प्रकारचें जाड गवत; घोडेघास; घोडशाडा. 'तिकांडी घोडेकुसळी।' -गीता २.५२८६.

**घोण**—स्त्री. १ पुष्कळ पाय असलेला एक सरपटणारा क्षुद्र प्राणी; गोम. [घोणस?] म्ह० घोणीचा एक पाय मोडला तर ती लंगडी होत नाहीं. =घोणेस पुष्कळ पाय असतात त्यापैकीं एखादा पाय जर मोडला तरी तिचें फारसें नुकसान होत नाहीं. तिच्या चालण्याच्या कामात व्यत्यय येत नाहीं. त्यावरून अनेक साधनांनीं सज्ज, संपन्न माणसाचें थोडेसें नुकसान झालें तरी तो डगमगणार नाहीं असा अर्थ होतो.

**घोण**—स्त्री. (कों.) १ घराचीं काटकोनात असणारीं पाखीं जेथें मिळतात तो संधि, सांधा. सदर सांध्यावरील वासा; कोनवांसा; यास घोणवासा असेंहि म्हणतात. २ दुःखानें, खिन्न मनानें गुडघ्यांत मान घालून बसण्याची अवस्था; खिन्नावस्था. (क्रि० घालून बसणें) 'ते भीमकी हें मग घोण घाली।' -सारुद २.६९. **०घालणें**-(व.) लाबणीवर टाकणें; लांबविणें. 'त्याच्या दुखण्यानें घोण घातली नसती तर गेलों असतों.' **०वासा**-पु. घोण अर्थ २ पहा.

**घोण**—स्त्री (गो.) धार.

**घोणशा**—वि. (कों.) सुस्त, मंद; लठ्ठ व आळशी.

**घोणस**—पु. (कों.) सर्पाची एक विषारी जात; हा सर्प जाड असून चार पांच फूट लांब असतो. याचा रंग पिवळसर असून पाठीवर मध्यभागीं काळ्या मोठ्या ठिपक्यांची रांगी रांग असते. हा फार विषारी असतो. घणस पहा. 'जसा नकुळ घाणसा गमला।' -मोउद्योग ११.१२० [सं. घोण(न)म; प्रा. घोणस] **०कांडें**-न. एक वनस्पतिविशेष ही दिसण्यांत घोणसासारखी दिसते व हिचीं वेटोळींहि घोणसाच्या वेटाळ्यासारखीं दिसतात. गुरांना घोणस सर्प चावला असतां तीं ही वनस्पति जेथें असेल तेथें जातात व ती खातात. [घोणस+कांडें] **-सें पडवळ**-न. पडवळाची एक आंखूड जात.

**घोणा**—पु. १ नाक. 'येता तल्पसमीप कांत ललना ते वक्र घोणा करी।' -विरस १७. २ दोन्ही नाकपुडांमधील मांसल पडदा; घुळणा; घोळणा; घुणघुणा. [सं. घ्राण-घोणा] **०फुटणें**-उन्हामुळें, उष्णतेमुळें नाकांतून रक्त वाहूं लागणें.

**घोणा**—पु (राजा.) वाळवी किडा. [सं. घुण]

**घोणाटणें**—सक्रि. मोठ्यानें ओरडून, आरडाओरड करून (गुरें, हरिण, शिकार इ०) एके ठिकाणी हांकून आणणें, हांकणें. -अक्रि. १ (माशा, भुंगे इ०) घों घों करीत एकत्र जमणें. २ डरकाळ्या फोडीत, हुंबरत हुबरत एकत्र होणें, जमणें. (गुरें इ०). [ध्व घोण, घों]

**घोणाटणें**—अक्रि. (राजा. कुण.) निश्चेष्ट, कासावीस होणें; घायाळ होणें. -मसाप २.४ ३६०. [घोणा]

**घोणाटा**—पु. १ (माशा इ०) घोंघावत एकत्र जमणें, घोंघावणें. २ (काम, वस्तु, व्यवहार इ०कांचा) गोंधळ, गुंतागुंत, घोंटाळा, अव्यवस्थितपणा. [घोणाटणें]

**घोण्या**—पु १ पाख्याचा सांधा. घोण अर्थ १ पहा;. घोणवासा २ घोणवाशावर, पाटिसावर जे नळे घालतात ते समुदायानें. [घोण]

**घोन**—न. (व.) नाक. [सं. घ्राण-घोणा] **०यागविणें**-नाकाचा शेंडा वाकविणें; डोकें खालीं करणें.

**घोंप**—पु. (कों.) झुबका; गुच्छ; फुलें, शेंगा, बीं इ०नीं असणारा देंठ, झुपका; घड; घोंस.

चौकटीला ) टांगलेला पाळणा, हलयाना न टांगतां जमीनीवर घोड्यास अडकविलेला पाळण्याचा एक प्रकार घोडा ८ अर्थ पहा घोड[illegible]पिंपळी–स्त्री पिंपळीची मोटी जात, हिच्या उलट लवंगी पिंपळी घोड्या[illegible]-नायक–पु घोड्याला ( विशेषत बुद्धिबळातील घोड्याला ) प्रेमानें किंवा प्रोत्साहन[illegible] संबोधण्याचा शब्द [ घोडा+पुत्र=मुलगा ] घोडपेटें–न १ दोन भोपळे पुढें व दोन[illegible] मागें बांधून केलेला तराफा, घोडा अर्थ २१ पहा. २ भोपळ्यावर दोन्ही बाजूस पाय टाकून घोड्यासारखें बसून पाण्यावर तरणें, तरणें घोडबच्य–न दुबळा घोडा पुष्ट होण्यास एक औषध ' घोडबच्य पावशेर, राई पावशेर भाजलेलीं काळीं मिरें पावशेर मिश्रणापैकीं आतपाव दररोज देत जावें ' –अश्वप १ १७५ घोडबांव–स्त्री ( कु ) घोड्यांना पाणी पिता येईल अशा तऱ्हेनें बांधलेली विहीर [ घोड+बाव=विहीर ] घोडबाही–स्त्री १ दाराच्या दुहेरी चौकटीच्या आंतल्या चौकटीतील दोन्ही बाजूचे खांब २ खटाऱ्याच्या बैठकीच्या चौकटीच्या दोन बाजूच्या लांब लांकडांपैकीं प्रत्येक, घोडकें, घोडें पहा, [ घोडा+बाही=बाजू ] घोडवाळ–वि ( उप ) पोरचाळे करणारा प्रौढ पुरुष स्त्री पोरकट माणूस [घोडा+बाळ] घोडब्रह्मचारी–पु ( उप ) लग्नाचें वय कधींच झालें असूनहि अविवाहित राहिलेला मुलगा, घोडनवरा [ घोडा+ब्रह्मचारी ] घोडमल्ली–स्त्री ( बुद्धिबळांचा खेळ ) घोड्यानें मात करण्याचा प्रकार प्रतिपक्षाचे घोडें व राजा आणि आपले घोडें, राजा व एकच प्यादें राखून प्यादमात करणें, घोडमात घोड(डे)मात –स्त्री ( बुद्धिबळांचा खेळ ) घोड्यानें राजाला दिलेली मात, घोडमल्ली पहा [ घोडा+फा मात्=कोंडणें ] घोडमाशी–स्त्री १ मोठ्या आकाराची हिरवी काळसर माशी २ ( ग्रामा ) मोठी माशी घोडमासा–पु एक प्रकारचा मासा सागराश्व ह्याचें तोंड काहींसें घोड्यासारखें दिसतें यास लांब शेपूट असतें हा नेहमी उभा पोहतो घोडमुख ख्या–पु १ घोड्याचें तोंड असलेला किन्नर नांवाच्या देवयोनींतील पुरुष याचें वर्णन पुराणांतरीं सांपडतें २ ( ल ) अगदीं कुरूप घोडतोंड्या माणूस एक मीर बलें भुरळें पींगळें । घोडमुखें । –दाव २८५ घोडमुंगळा–पु मोठा व काळा मुंगळा घोडमुंगी–स्त्री मोठ्या काळ्या जातीची मुंगी घोड(डे)मुंज्या–पु उप १ मुंज होण्याचें वय झालें [illegible] मुलगा २ लग्न न झालेला प्रौढ मुंज्या असून मुंज न [illegible] [घोडा+मुंज्या] घोडला पु मूल रांगत असताना त्याची होणारी घोड्यासारखी आकृति घोडा अर्थ १० पहा घोडली–स्त्री ( कों हेट ) ( [illegible] ) शौचास बसण्याकरितां ज्यास एक चौकट चार दोन्ही [illegible]नी अडकवितात ती [ घोडा ] घोडवळ–स्त्री १ बांधलेल्या घोड्यांची ओळ, रांग २ घोड्यांचा तबेला,

घोडशाळा, घोडसाळ, यावरून ( ग्रामा ) तबेला, ' रोडेला हत्ती घोडवळींतून जाणार नाहीं ' ३ लांबचलांब, टेंगणें व बेढब घर, मागरघर, दांडसाळ, केवळ तबेल्यासारखें असलेलें घर; कोठडी ४ ( उप ) घोडनवरी ५ न झोडपलेल्या, झोडपून दाणे न काढलेल्या धान्याच्या पेंढ्यांची रास, गंजी [ घोडा+ओळ ] घोड( डे )वाट–स्त्री घोड्यांकरितां केलेली, फक्त घोड्याला जातां येईल अशी वाट, रस्ता ( विशेषत डोंगर इ० यांच्यावरून ), उलट गाडीवाट [ घोडा+वाट ] घोडविवाह–पु विषमविवाह ' आपली नात शोभेल अशा दहा वर्षांच्या पोरीशीं लग्न लावण्यास तयार असतात व असा घोडविवाह करूनहि फिरून समाजांत हिंडण्यास त्यास दिक्कत वाटत नाहीं ' –टि ४ ५६ [ घोडा+विवाह ] घोडवेल–स्त्री ( शकिलिक ) घोड्याची लीद ( औषधांत घोड्याच्या लिदीचा उपयोग करावयाचा असल्यास तिचा निर्देश ह्या शब्दानें करतात ) घोडशह–पु ( बुद्धिबळांचा खेळ ) घोड्यानें दिलेला शह [ घोडा+शह ] घोडशाळा घोडसाळ–स्त्री १ घोड्यांचा तबेला घोडवळ अर्थ २ पहा [ घोडा+शाळा=घर ] घोडशिष्य–पु ( निंदार्थी ) विद्यार्जन करूं पाहणारा मोठ्या वयाचा विद्यार्थी, मोठेपणीं शिकावयास लागणारा मनुष्य घोडशीर–स्त्री १ पायाच्या टांचेच्या वरच्या बाजूस असलेली शीर नाडी दवणशीर घोंडशीर प०ा २ ( क ) पायाचा किंवा हाताचा स्नायु घोडसटवा–स्त्री. १ उग्र स्वरूप धारण केलेली देवी ( क्रि० लागणें ) २ घोडी व्याल्यापासून सहाव्या दिवशीं करावयाची सटवीची पूजा ( एखादीला ) ०लागणें–१ घोडसटवीप्रमाणें उग्र व विक्राळ दिसणें २ घोडसटवीची बाधा होणें घोडेखाद–स्त्री १ घोड्याचें चरणें हरळी खाणें ' या घोडेखादीमुळें माळावर एक काडी राहिली नाहीं ' २ फक्त घोड्यांना चरतां खातां येईल इतक्या वाढीचें गवत ' ह्या माळावर मोठें गवत नाहीं घोडेखाद कोठें कोठें आहे [ घोडा+खाद=खाणें ] घोडेखोत–पु घोडे भाड्यानें देण्याचा धंदा करणारा भाड्याच्या घोड्याचा नाईक [घोडा+खोत=मक्तदार] घोडेघाटी–स्त्री एक प्रकारचें रेशमी कापड घोडेघास–न १ विलायती गवत, लसूण घास २ घोडकुसळी पहा [ घोडा+घास=गवत ] घोडेपाऊल–न एक वनस्पतिविशेष [ घोडा+पाऊल ] घोडेराऊत, घोडेस्वार–पु घोड्यावरील शिपाई घोड्यापवढी चूक स्त्री फार मोठी चूक ढोबळ चूक घोडचूक पहा घोड्या गोंवर–पु एक प्रकारचा गोंवराचा आजार याच्या पुटकुळ्या मोठ्या असतात [ घोडा–मोठा+गोंवर ] घोड्याचा–पु ( निंदार्थी ) घोड्यावर बसलेला मनुष्य घोडेस्वार ' तें पहा घोड्याचे चालले मागून स्वारी यतीसें वाटतें ' घोड्याचा दाणा–पु १ ( — )

हुरभरा २ ( ल ) बुंदीच्या लाडवास तिरस्कारानें म्हणतात **घोड्याचा पूत-लेंक-पु** ( उप ) मूर्ख, गाढव, गद्दा **घोड्याची चाकरी-स्त्री** घोड्याना दररोज चोळणें, खरारा करणें इ०काम **घोड्याची जीभ-स्त्री** (राजा ) एक वनस्पति-विशेष **घोड्याची मुंज, घोड्याचें बारसें-स्त्रीन** एखादा कोठें जावयास निघाला असता एखाद्या अधिक प्रसगी व फाजिल चौकशी करणाऱ्या माणसानें त्यास का कुठें जाता असें विचारलें असता म्हणतात **घोड्याचें नाटक-न** ( ना ) सर्कस **घोड्याचें मूत-न** १ कुत्र्याचें मूत, अळंबें, भुईछत्री २ कुजलेल्या लाकडातुन फुटलेलें अळंबें **घोड्याच्या पाठीवर-** क्रिवि भरधाव, झरकन, त्वरेनें ( क्रि० जाणें, करणें ) **घोड्याच्या पाठीवरचा कोस-पु** कटाळवाणा व लाब पल्याचा कोस, घोड्यावरून गेल्यासच कोसाएवढें व कंटाळवाणें न वाटणारें अतर.

**घोडशी**—स्त्री ( राजा कुण ) घडवची

**घोडसर**—पु. घोड्याची पागा —स्त्रीचरित्र २ १३५ [ घोडा+सर=सोपा, राग ]

**घोडागयान**—पु एक प्रकारचा गयान, एक नाणें आहे —चौऱ्याशीचा शिलालेख, पढरपूर ( शक ११९५ )

**घोडाचोळी**—स्त्री गधक, पारा, हरताळ इ० एकत्र करून केलेली गोळी हिला सस्कृत भाषेत अश्वकचुकी असें म्हणतात

**घोडावज**—न वेखड —मुऱ्या १६७ घोडा वच पहा

**घोडीकुर**—स्त्री कुरघोडी 'घोडीवरी होईल स्वार। त्याचा बहुत पडेल भार। भारास्वाले निघेल धूर। पोरें म्हणती घोडीकुर।' —मध्व १७७ [ घोडी+कुर्, ध्व ]

**घोडुला**—पु घोडला पहा ( क्रि० करणें )

**घोडूक**—न ( गो ) घोडकें पहा.

**घोडेकातरा**—पु एक औषधी जिनस

**घोडेकुसळी**—स्त्री एक प्रकारचें जाड गवत, घोडेघास, घोडशाडा 'तिकाडी घोडेकुसळी।' —गीता २ ५२८६.

**घोण**—स्त्री १ पुष्कळ पाय असलेला एक सरपटणारा क्षुद्र प्राणी, गोम [ घोणस१ ] म्ह० घोणीचा एक पाय मोडला तर ती लगडी होत नाहीं =घोणेस पुष्कळ पाय असतात त्यापैकीं एखादा पाय जर मोडला तरी तिचें फारसें नुकसान होत नाहीं तिच्या चालण्याच्या कामांत व्यत्यय येत नाहीं त्यावरून अनेक साधनांनीं सज्ज, सपन्न माणसाचें थोडेसें नुकसान झालें तरी तो डगमगणार नाहीं असा अर्थ होतो

**घोण**—स्त्री ( कों ) १ घराचीं काटकोनात असणारीं पाखीं जेथें मिळतात ती सधि, साधा सदर सांध्यावरील वासा, कोनवांसा, यास घोणवासा असेंहि म्हणतात २ दु खानें, खिन्न मनानें गुडघ्यात मान घालून बसण्याची अवस्था, खिन्नावस्था ( क्रि० घालून बसणें ) 'ते भीमकी हें मग घोण घाली।' —सारुह २ ६९. ०घालणें—(व ) लावणीवर टाकणें, लावविणें 'त्याच्या दुखण्यानें घोण घातली नसती तर गेलों असतों ' ०वासा—पु घोण अर्थ २ पहा



**घोण**—स्त्री ( गो ) धार

**घोणशा**—वि ( कों ) सुस्त, मद, लठ्ठ व आळशी

**घोणस**—पु (कों ) सर्पाची एक विषारी जात, हा सर्प जाड असुन चार पाच फूट लाब असतो याचा रग पिवळसर असून पाठीवर मध्यभागीं काळ्या मोठ्या ठिपक्यांची ठमी राग असते हा फार विषारी असतो घणस पहा 'जमा नकुळ घाणसा गमला।' —मोउद्योग ११ १२० [ स घोण(न)स, प्रा घोण्स] ०कांडें—न एक वनस्पतिविशेष ही दिसण्यात घोणसासारखी दिसते व हिचीं वेटोळींहि घोणसाच्या वेटाळ्यासारखीं दिसतात गुराना घोणस सर्प चावला असता तीं ही वनस्पति जेथें असेल तेथें जातात व ती खातात [ घोणस+कांडें ] —सें पडघळ—न पडवळाची एक आखूड जात

**घोणा**—पु १ नाक 'येता तल्पसमीप कांत ललना ते वक्र घोणा करी।' —विरस १७ २ दोन्ही नाकपुडामधील मासल पडदा, घुळणा, घोळणा, घुणघुणा [सं घ्राण-घोणा] ०फुटणें—उन्हामुळें, उष्णतेमुळें नाकातुन रक्त वाहू लागणें

**घोणा**—पु ( राजा ) वाळवी किडा [ स घुण ]

**घोणाटणें**—सक्रि मोठ्यानें ओरडून, आरडाओरड करून ( गुरें हरिण, शिकार इ० ) एके ठिकाणी हांकून आणणें, हाकणें —अक्रि. १ ( माशा, भुंगे इ० ) घों घों करीत एकत्र जमणें. २ हरकाळ्या फोडीत, हुबरत हुबरत एकत्र होणें, जमणें (गुरें इ०) [ ध्व घोण, घों ]

**घोणाटणें**—अक्रि ( राजा कुण ) निश्चेष्ट कासावीस होणें, घायाळ होणें —मसाप २ ४ ३६० [ घोणा ]

**घोणाटा**—पु १ ( माशा इ० ) घोंघावत एकत्र जमणें, घोंघावणें २ ( काम, वस्तु व्यवहार इ०कांचा ) गोंधळ, गुंतागुत, घोंटाळा, अव्यवस्थितपणा [ घोणाटणें ]

**घोण्या**—पु १ पाख्यांचा सांधा. घोण अर्थ १ पहा, घोणवासा २ घोणवासावर, पाटिमावर जे नळे घालतात ते समुदायानें [ घोण ]

**घोन**—न ( व ) नाक [स घ्राण-घोणा ] ०धागविणें—नाकाचा शेंडा वांकविणें, डोकें खालीं करणें

**घोंप**—पु ( कों ) झुबका, गुच्छ, फुलें, शेंगा, बीं इ०ना असणारा देठ, झुपका, घड, घोंस

**घोपड**—पु (ना) मोठें, सुजें व पसरट असें मळवें, कुत्र्याचें मूत

**घोपाण**—स्त्री. (कु) मर्दपणा, शक्ति, ताकद –मसाप ४ २८० [घोव=नवरा+पण]

**घोबार**—न भ्रम –शर

**घोवें**—न १ अकल्पित रीतीनें झालेला मोठा लाभ, घबाड, घबूक (क्रि० येणें, मिळणें, सांपडणें, हातास लागणें) 'त्यास घावें सांपडतांच तो चढला' २ (व्यापार इ० कांत) सट्यानें झालेला फायदा 'त्यानें व्यापारांत घोवें तर साधलें' ३ अल्प प्रयासानें संसाराचा निर्वाह व्हावयाजोगें द्रव्य धान्य इ० देणारा यजमान किंवा शेत 'तो यजमान याला मोठें घावें सांपडलें आहे' [घबाड]

**घोमेटी, घोमेटें**—स्त्रीन गोमेटा, गोमेटें पहा.

**घोयटीक**—स्त्री (गो) सराव, अभ्यास, घसरट

**घोयरा**—पु सरडयाच्या जातीचा एक प्राणी

**घोर**—पु १ वीणा इ० वाद्यांतील खर्ज स्वराची तार (वाद्यांतील) खर्ज स्वर २ झोपेंतलें घोरणें, मृत्युसमयीं होणारा घशांतील घरघर असा आवाज 'हा वेदार्थसागरु। जया निद्रिताचा घोरु। तो स्वयें सर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादला।'–ज्ञा १ ७२ 'आपण गाढ झाले निद्रिस्त। चलनवलन सांडूनि स्थित। कटीं घोर वाजवी।'–नव १३ १६२ ३ काळजी, धास्ती, मानसिक अस्वस्थता, खुणखुण, चिंता (क्रि० करणें, लागणें) 'त्याचा निर्त्याचा घोर नाहींसा होऊन त्याची स्वभाववृत्ति प्रबळ झाली'–नि ७०३ निरुपाय झाली गोष्ट कबर बसली घोरानें। –ऐपो ४१२ ४ अन्य स्थळीं गेलेल्या माणसा बद्दल घेतलेली खत, घोकणी (क्रि० घेणें, कर्माची षष्ठी) 'पोरानें आईचा घोर घेतला' ५ आक्रोश, आकांत, रडारड, कोलाहल 'तो मरताच पोराबाळांनीं एकच घोर केला' ६ आरडाओरड, गलबला, गिल्ला, गल्का, गोंगाट कल्ला 'हा काय मजुरदाराचा घोर पडला' ७ हल्ला 'केला मर्गी घोर निशाच रानीं।'–आविश्वा २० 'तनी धरला सवता घोर'–ऐपो ३५२ ८ मरण्याच्या वेळची घरघर ९ संकट 'घोर हा नको। फार कष्टलों।' 'मानअपमानाचे पडिले। आतीच घोरीं।–दावि २६० –वि अघोर १ भयंकर, भयप्रद, भयानक, विक्राळ (मुद्रा आवाज काम, घडणाऱ्या गोष्टी) म्हणऊनि संसाराहूनि थोर। आणिक नाहीं पाप घोर।' 'नव्हे सार संसार हा घोर आहे।'–राम ६६ २ गाढ घनघोर (निद्रा) 'त्यास घोर निद्रा लागली' ३ निबिड दाट घनदाट, गाढ, (अंधार अरण्य इ०) 'मी राजाच्या सदनीं अथवा रानीं शिरेन।–खरे, जन्मभूमि ४ घनघोर, तुंबळ; हातघाईचें, निकराचें (युद्ध लढाई, इ०) कलह उत्पादी अति घोर।'–एभा १ २०४ ५ अचाट, अवाढव्य, अगडबंबाळ (इमारत) ६ अफाट (भरलेली नदी) [स. घोर] **घोरंदर, घोरांदर**–वि (काव्य) भयंकर, घोर शब्दांतील विशेषणाचे सर्व अर्थ पहा 'झोटी घरूनि पाडिती अपार। घोरांदर मांडिलें।'–एरुस्व ८ ४४ 'युद्ध मांडिलें घोरंदर।'–मुआदि १३ ३२ 'युद्ध जाहलें घोरांदर। सकळ राजे पराभविले॥'–ह २६.५७ [म घोरतर] **घोरवेळ**–स्त्री (ज्यो) १ अशुभ, अनिष्ट भयसूचक वेळ २ (अनिष्टतेच्या ध्वनितार्थावरून) दुपारीं तिन्हीसांजा, टळटळीत मध्यान्ह **घोरासुराचें आख्यान**–न (उप) झाराइत झोंप, घोर झोंप 'पादून टेवलेलें अथरूण पायानेच उलगडून ही अशी घोरासुराच्या आख्यानाला सुरवात'–फाटक नाट्यछटा २.

**घोरकंड**—पु भाराच्याची एक जात –बागेची माहिती ५५

**घोरकार**—पुअव (एखाद्या कार्याबद्दलचा) पराकाष्ठेचा प्रयत्न खटाटोप, नेटाचा, आवेशाचा यत्न, अनेक प्रकारची हलाडाल, साहस, हिकमत इ० 'त्यानें घोरकार करून घर बांधलें, विहीर खणली, लग्न केलें' [घोर+आकार किंवा कार=यत्न उद्योग] म्ह० असत्याचे विकार नसत्याचे घोरकार=ज्याच्या जवळ साधनांची विपुलता आहे त्याचें कार्य सहज सिद्धीस जातें परंतु ज्याच्या जवळ कांहींच साधन नाहीं त्याला कार्य शेवटास नेण्यास फार खटाटोप करावा लागतो

**घोरड**—न. (राजा) सुस्त, मंदी, नेभळा, अव्यवस्थित, झोंपाळु अशा माणसाला तिरस्कारानें लावावयाचा शब्द [घोरणें]

**घोरडदेव**—पु (व) १ सर्व पदार्थांच्या शिजलेल्या मिश्रणाचा नैवेद्य ज्याला लागतो असें दैवत 'आमच्या घरीं घोरडदेव आहे' २ (ल) अनेक पदार्थांचें मिश्रण, खिचडी

**घोरणें**—अक्रि झोंपेंत घर्र घर्र असा आवाजानें श्वासोच्छ्वास करणें [स घुर्, घुरण, म घोर] म्ह० गायघारे गोठा भरे, बैल घोरे धनी मरे

**घोरपड**—स्त्री १ सरड्याचा जातीचा एक मोठा प्राणी, हिची गणना सरपटणाऱ्या प्राण्याच्या वर्गांत होते हिला उष्ण व ओलाव्याची हवा लागते हिची चरबी औषधी आहे ही आपल्या नखांनीं खडकास अतिशय घट्ट धरू शकते शक १०४९ च्या शिलाहार ताम्रपटांत हा शब्द येतो २ (ल) लचाड, लिगाड, त्रासदायक काम मनुष्य 'ही घोरपड विश्वामित्राच्या गळ्यांत पडली'–नाकु ३ १४ 'माझ्या गळ्यांत ह्या कामाची घोरपड घालू नकोस' ३ अरिष्ट, मोठें संकट, आळ, तुफान 'बाळकृष्णपंतावर कोणती घोरपड येणार हें पाहण्याकरितां टपून आहोंत'–विक्षिप्त १ ३७ (एखाद्यावर) **घोरपड आणणें**–सक्रि एखाद्यास गोत्यांत आणणें, संकटांत आणणें 'त्या

विचाऱ्यावर त्यांनीं घोरपड आणून त्याला राजीनामा द्यावयाला भाग पाडल ' (एखाद्यावर) **घोरपड येणें**–संकटांत, पेचात, अडचणींत सांपडणें

**घोरबंद**—पु खोगिराचा पुढचा बंद गोरबंद पहा

**घोरांटी**—स्त्री. (प्रां ) मरणसमयीं लागणारी घरघर, घोर [ घोर+अंत ]

**घोरां(रं)दर**—न तुंबळ, घनघोर, निकराचें युद्ध घोर पहा [ स घोरतर ]

**घोरेणी**—स्त्री (गो ) घोरणें, घरघर

**घोरोप**—पु (गो ) मगज [ स गर्भ ]

**घोल**—पु (कों ) दोन डोंगरामधील खिंड, दरी, खोल खिडार ' मोठे पर्वताचे घोल पुढें या खोल खोल ' –न (कु) गर्द झाडी असणारी राई –स्त्री (गो ) १ ढोल, गुहा २ पर सांत जाण्याचें दार [ घळ ]

**घोल**—पुन पाणी न घालता व लोणी न काढता घुसळलेलें दहीं –योर १ १५५ [ स ]

**घोलणें**—उक्रि (खा ) (सुतारकाम ) लाकडास पाडलेली भोकें पटाशीनें साफ करणें

**घोलमडणें**—सक्रि (माण ) चिलमडणें, घोळणें

**घोलसरी**—स्त्री (व ) बकुळीचें झाड

**घोलसा**—पु (कु ) येरझार, येजा (क्रि० घालणें )

**घोलांकार**—पु घोळकार पहा

**घोलांट-टी**—स्त्रीन कोलांटी उडी ' एकनाथाचे ग्रंथ व त्याचें चरित्र याच्या परिशीलनानें मंडळातील लोकाच्या घोलाटया उलटया पडतील अशी शका स्वप्नीं तरी येणें उचित होईल काय ' –भागवत, देशीभाषा १० [ प्रा घोल ]

**घोलाणा**—पु घोळाणा पहा

**घोला(ळा)णा**—पु घोळणा पहा

**घोलावणी**—स्त्री भुलावणी, फुसलावणी [ घोलावणें ]

**घोलावणें**—उक्रि फुसलावणें, भुलविणें, भोंदणें, गोंजारणें, घुलावणें पहा [ हिं घुलवाना, घोळणें प्रयोजक ]

**घोव**—पु (कों रा कु. गो ) नवरा, पति, गोहो पहा [प्रा गोहो] ०**करीण**–स्त्री (राजा ) पत्नी, बायको सौभाग्य वती स्त्री, सवाष्ण [ घोव+करीण ] **घोवकी**–स्त्री पुरुषत्व मर्दपणा, पौरुष [ घोव ] म्ह० घोवास नाहीं घोवकी बायको करी शिनळकी=नवऱ्याच्या अंगीं पौरुष नसलें म्हणजे बायको परपुरुषाशीं संबंध ठेवते **घोवगाडा**–पु १ नवरा दीर, इ० सासरचें माणूस, पालनकर्ता माणूस २ तिरस्कारार्थी नवऱ्या-सहि हा शब्द लावरतात [म घोव+का गडा=नवरा] **घोवदी**–पु (राजा ) पुरुष, बाप्या, गृहस्थ श्रीयुत **घोवपण-पणा**–नपु १ नवेरपण २ पुरुषत्व, पौरुष, घोवकी घोपाण पहा

**घोवया**–पु (गो ) नायकिणीचा मुलगा **घोवसांडा(दिवस)**–पु (कु ) उन्हाळ्याचा दिवस [ घोव=नवरा+सांडणें ? ]

**घोंशे**—(गो ) जताचा विकार

**घोष**—पु घोंस (मोत्यें इ० काचा), झुबका ' मणिजामणीचे घोषे । कमलकांति होति हंसासें । ' –शिशु ४०९ [ घोंस ]

**घोष**—पु गवळीवाडा, गवळ्याची वस्ती ' गुरुसुत महेंद्र धनु धन शर ते जलवृष्टि सैन्य तो घोष । ' –मोकर्ण १३ १२ ' चाले झुकावुनि पुढें चमकोनि घोषा । ' –आर्क ३ [ स ] ०**मंदीर**–न गोठा, गुरें बांधावयाचें घर ' तो राधेची सासू म्हातारी । तीही नसे कदा घरीं । सदा राहे घोषमंदिरीं । दधि मथनाकारणें । ' –ह ८ ५८ [ घोष+मंदिर=घर ] ०**यात्रा**–स्त्री गाई म्हशी इ० पशूचें अरण्यात चरणें, बागडणें इ० पाहण्याची क्रीडा [ स घोष+यात्रा ]

**घोष**—पु १ (समुद्र, ढग, अध्ययन, पठण इ० कांचा ) मोठा एकसारखा होणारा गंभीर आवाज, गर्जना, गजर ' पढता श्रीकृष्ण पवाडे । ठिकसा वाला घोंपु पडे । '–शिशु २० ' ते जय जय घोष कलरवें । स्वर्गी वाजवितातीं आघवे । ' –ज्ञा ११ ३३६ २ परा वाचा, परा, पश्यंति, मध्यमा व वैखरी या चार वाणीं-पैकीं परा वाणी, यांनाच अनुक्रमें घोष, ध्वनि, नाद व आकार अशींहि नावें आहेत ' पैं मंत्रबीजा जाहला अंकुर । घोषध्वनी नादाकार । ' –ज्ञा ९ २७५ ३ घोकणें, पाठ करणें ४ (आपला उद्देश, इच्छा इ० काचा) पुन पुन उच्चार करणें, सांगणें, घोकणी अर्थ २ पहा एकाच गोष्टीचा निदिध्यास (क्रि० घेणें, लावणें, लागणें, मांडणें ) [ स. घुष–घोष ]

**घोषण-णा**—नस्त्री. १ मोठ्यानें बोलणें, वाजविणें, ऐक विणें २ प्रसिद्ध करणें, जाहीर करणें, प्रसिद्धि [ घोष ] **घोष विणें**–सक्रि जाहीर करणें, दवंडी पिटवून कळविणें, प्रसिद्ध करणें ' मग नगरीं घोषविलें कीं कोणी करिल जो सुरापान । ' –मामौसल १२० [ घोष ]

**घोषी**—न १ मिश्रितपणा २ भाडवल –मनको

**घोस**—पु मास, गोस, गोष ' अबा त्या वाइनें घोस गाईचा पाहिला । ' –ऐपो ५८ [ फा गोश्त, हिं गोश्त ]

**घो(घों)स**—पु (मोत्यें फुलें इ० काचा ) गुच्छ, झुपका, तुरा, झुमका ' सन्मुख भेटला राजहंस । मुक्ताफळाचा घोंस मुखीं धरूनी । ' –मारा बाल १२ २४ –वि मोठा, देखणा, पुरा, भरपूर लट्ठ व दिखाऊ, धवधवीत [ स गुच्छ, प्रा. गोच्छ, हिं गुच्छा सिं छुगा ] ०**दार**–वि (मोत्यांचा) घोंस असलेलें (कर्ण भूषण इ०) , घोस लागलेला, घोसांनीं युक्त, भरदार ०**दार फुल बाजी**–स्त्री फुलबाजीचा एक प्रकार हिची फुलें पुष्कळ पडतात ०**दोडका**–पु दोडक्याची एक जात यास घड येतात ' घोस

दोडके घांगीं सगळीं ।' –अमृत ७३. ०वाळी–स्त्री. मोत्यांचे घोस लावलेली कानांत घालावयाची वाळी. 'कोयिंयिरी, टोपण, घोंसवाळया ।' –सारुह ६.२४. 'घोसवाळया पर्डीच्या बाळया ल्याली सुंदर ।' –अफला ५५. [ घोस+वाळी ] ०वाळें–पुनव. दागिन्यांत लटकता बांधावयाचा लोलक, ताईत, करण. –जनि पारिभाषिक शब्द ३. ०वाला–पु. पैलूचा अगर बिन पैलूचा पण टोंकावर भोंक असलेला लोबट हिरा.

**घो(घों)स**—पु १ ( नाविक कों. हेट. ) शिडाचा पुढील ( नाळीकडील ) भाग; परवाणाचें नाळीजवळचें टोंक; हें दुसऱ्या टोंकापेक्षां जाड असतें. शीड दोन्ही टोंकांनीं परवाणाला बांधलेलें असतें. हें केन्द्रांहि डोलकाठीच्या मागें जात नाहीं; वाऱ्याच्या दिशेप्रमाणें शीड बांधण्याचा एक प्रकार व दमाण हा दुसरा प्रकार आहे. 'घोस घ्या; घोस !' –शेक्सपियर नाटयमाला, तुफान पृ. ३. २ शीड बांधण्याची दोरी. ३ वाऱ्याची दिशा. ४ गलबतानें प्रवास करणें; विवक्षित स्थळीं गलबतानें केलेली फेरी; समुद्रावरील सफर. 'मुंबईच्या घोंसास दहा रुपये पडतात.' [ सं. घोष ]

**घो(घों)स**—पु (आवेश, उत्साह, ऐश्वर्य, वैभव, इ०कांचा) प्रकर्ष; वैपुल्य; भर; जोस. 'तो भर घोसांत मेला ' [फा. गोष] **भर घोसानें, भर घोंसानिशीं. भरल्या घोंसानें**–क्रिवि. सर्व शक्ति एकवटून; नेटानें व छातीठोकपणानें; भगीरथ प्रयत्नानें. 'भर घोंसानिशीं किल्ला घेतला.' 'भरल्या घोसानें डोंगरावर चढला.' **घोसांत असणें**–अक्रि. ( गो. घोंसार आसप )ऐश्वर्यांत दंग असणें; मनोराज्य करणें.

**घोसणें**—उक्रि १ शोधणें. २ गवसणें; सांपडणें. [ म. गवसणें ]

**घोसळणें**—उक्रि (व.) १ जमिनीवर लोळणें, घासणें. २ जमिनीवर लोळवणें; घासणें; ढोसलणें [ घुसळणें ]

**घोस(सा)ळें**—न. घोसाळीं पहा.

**घोंसा**—पु ( कों. ) फुलाचा गजरा, गुच्छ. [ घोंस ]

**घोंसाळ**—वि. घोष करणारा; आवाज करणारा. 'चंद्रकांताचेयां घाळानेयां वरी। घोंसाळेयां कांकणां चांकरीं ।' –शिशु ३४०. –शिशु ५९०. [ घोष+आळ प्रत्यय ]

**घोंसाळ**—वि १ घोसांनीं युक्त; घोसांनीं, घडांनीं लटकलेला; २ ( ल. ) गुटगुटीत. 'सुनीळु घोंसाळें । निन्द्रा शोभेति डोळे ।' –शिशु ४१८. 'ऐसा यमदमीं घोंसाळिया । उठनी तपाचिया डाहाळिया ।' –ज्ञा १५.१६०. [ घोस ]

**घोसाळवेल**—स्त्री. तांदुळाची एक जात हा जातीचा तांदूळ जाडा असून लवकर तयार होतो.

**घो(घों)साळी**—स्त्री. एक प्रकारची वेली; हिच्या फळाची भाजी व भर्त्ते करतात; गिलक्यांचा वेल. [ प्रा. दे. घोसाली ]

**घो(घों)साळें**—न. १ घोसाळीचें फळ; गिलकें; पारोसें. २ कित्येकांच्या मतें घोसाळें हा फळांचा जातिवाचक शब्द आहे. त्याचे शिरघोसाळीं अथवा दोडकी; तेलघोसाळी; पारोसी घोसाळीं असे अनेक प्रकार आहेत. ३ ( गो. ) दोडकें. ४ क्षुद्र पदार्थ; बहुधा शून्य; नास्तिवाचक. 'तूं पैसे मागायला जातो आहेस पण तूं त्याच्या जवळून घेणार काय ? घोसाळें !'

**घोंसुलें**—न. घोंस; घड. [ घोंस ]

**घोळ**—स्त्री. (कों. गो.) तांबडसर पांढऱ्या रंगाचा (समुद्रांतील ) एक मासा.

**घोळ**—पु. १ पुन पुनः हलवणें; घोळणें; फिरविणें; छानणें; यावरून २ ( ल. ) चर्चा; वादविवाद; छाननी; वाटाघाट; मंथन. 'हा शास्त्राविषयीं चार दिवस घोळ घातला तेव्हां सिद्धांत झाला.' ३ गोंधळ, घोंटाळा; अडवणूक. 'उगा लोळसा घोळ मोटा करी तो ।' –राक १.३६. 'पुरी माजि नानापरी घोळ केला ।' –राक १.३०. ३ ( वस्तूचा, सामानाचा, हिशेबाचा, कामांचा ) गोंधळ; गळफांटा; घोंटाळा; घप्पाघोळ; अस्ताव्यस्तपणा; गुंतागुंत. ४ गडबड; धांदल; तारंबळ, त्रेधा. ५ धामधूम; लगबगीची हालचाल; दौडादौड, धांवाधाव. ( क्रि० घालणें; मांडणें ). 'दुजी नों मुलीचा म्हणे थाग नाहीं । असा माडिला घोळ पौराजनाहीं ।' –अर्वाचीन १३५. ६ काठीच्या टोंकास कोयंडा बसवून त्यात लोखंडाचे तुकडे घातलेली खुळखुळ असा आवाज करणारी कडी. रात्रींच्या वेळीं चालतांना सापांना भिवविण्यास हिचा उपयोग करतात. ७ ( वाघ्या इ० लोकांचें ) लोखंडाच्या कांबीस कडया अडकवलेलें वाद्यविशेष. 'टाळ घोळ मृदंग कुसरीं । नाना चरित्रें गाती गजरीं ।' –एभा ११.१२७४. –ह २.१२२. 'मंजुळ नादीं घोळ । टिम कारिती ।' –शिपु २.३९.१७. ८ ( राजा. ) धान्य इ० सुपांत चाळणींत घोळल्यानंतर मागें राहिलेला गाळसाळ, गदळ भाग ९ ( व ) तोरडी; स्त्रियांच्या पायांत घालावयाचा एक अलंकार. १० ( क. ) हरभऱ्याचा अगर तुरीचा कोंडा. [ घोळणें ] ०काठी–स्त्री. एका टोंकाला लोखंडी कडीमध्यें लोखंडाचे तुकडे अडकविलेली, खुळखुळ आवाज करणारी काठी; खुळखुळी काठी घोळ अर्थ ६ पहा. **घोळं(ळां)कार**–पु. गोंधळ; घोंटाळा; गोलंकार घोळ ३,४,५ अर्थ पहा. 'त्या लग्नात सगळा घोळंकार माजला ' **घोळपाट**–पु. ( व ) घोटाळा, गोंधळ 'त्यानें जो घोळपाट घातला तो काहीं पुसूच नका ' **घाळघोटघा**–पु १ एक प्रकारचा गवहला. २ हरकाम्या, हरहुन्नरी, छुडबुडया मनुष्य; एक ना धड भाराभर चिंध्या अशी स्थिति ज्याची आहे असा मनुष्य.

घोळ—पु. १ (अंगरख्याचा) घेर; खालचा परिघ;( लुगडें, परकर, धोतर इ० कांचा ); ओचा; सोगा; पदर. 'पीतांबराचा बहु घोळ लोळे।' –साछ ५.३४. 'घोळ चारु चरणावरि लोळे।' –शशिसेना २०२. २ (गो.) मासे भडकण्यासाठीं जाळ्याच्या टोंकावर बांधलेली पिशवी. घोळ 'कोटंया–कोटमा–पु. कापडाचा घोळ लावलेला खंडोबाच्या वाघ्याचा भिक्षा मागण्याचा चौकोनी लाकडी कोटंबा; खंडोबाचे भक्त याची पूजा करतात. 'त्या खिरीपैकीं वाघ्या मुरळी यांस त्यांचा घोळकोटंबा भरून खीर द्यावी लागते.' –ऐरा २०३. घोळदार–वि. ज्याचा उत्तम घोळ आहे असें (वस्त्र, काठी इ०). घोळ अर्थ ६, ८ पहा.

घोळ—स्त्री. डोंगरामधील दरी; कपार; खवदड; घळ; घळ पहा. 'त्या पर्वतश्रेणींतील घोळी फारच गडद व भयंकर आहेत.'

घोळ—स्त्री. एक पालेभाजी. हिच्या दोन जाती आहेत. उत्तर हिंदुस्थानांत हिला कुलफा हें नांव आहे. [सं. घोली]

घोळका—पु. १ (मनुष्यांचा, प्राण्यांचा) आरडा ओरडा, दांडगाई इ०करणारा अव्यवस्थित समुदाय, जमाव, गर्दी. 'दार उघडतांच अगांतुकांचा घोळकाचा घोळका आंत शिरला.' २ गोंगाट; गलबला; कलकलाट. (क्रि० चालणें; होणें; पडणें; माडणें; करणें). ३ (कामें, प्रकरणें इ. कांचा) घोंटाळा; गोंधळ; खिचडी. [घोळ+का प्रत्यय]

घोळचें—अक्रि. (गो.) उपयोगी पडणें.

घोळकाकडी—स्त्री. (व.) तोंडलें.

घोळकांवचें—अक्रि. (गो.) घोटाळणें; घोटाळत राहणें.

घोळटीक, घोळटीकाय—स्त्री. (गो.) सराव; ओळख; घरोबा; घसरट; घोयटीक. [घोळणें]

घोळणा—न. १ सुपानें, चाळणीनें (धान्य इ०) घोळण्याची क्रिया. २ सुपांत, चाळणींत घोळावयाचा धान्याचा एका वेळचा हप्ता; एकवार घोळे' असें सुपात घेतलेलें धान्य. ३ (व.) पोळी लाटतांना तिला लावावयाचें पीठ, पिठी. [घोळणें]

घोळणा—पु. १ (कों.) धान्य भाजतांना तें हलविण्यासाठीं एका टोंकास चिंध्याचा चेंडूसारखा वोळा बांधलेली काठी किंवा दाडू, घाटाणा; घाटणा; घाटू; घाटणा पहा. 'घोळण्या नांव लक्षुमण। करितें भजेन लाह्यांचें।' –निगा २८६. २ भात चाळावयाची बारीक वेळूची चाळण. ३ ठसे उठविण्याचें सोनाराचें एक साधन, हत्यार. [घोळणें]

घोळणा—पु नाकपुडयामधील पडद्याचा खालचा, मुळाचा मांसल भाग, घोणा पहा

घोळणी—स्त्री. १ घोळण्याची क्रिया; घोळण. घोळण अर्थ १ पहा. २ सोनाराचें एक हत्यार; घोळणा अर्थ ३ पहा. एका काशाच्या कांबेला दोन चार ओहोळ पाडलेले असतात.

घोळणी—स्त्री. १ (राजा. कुण.) प्रदर; धुपणी. –मसाप २.२६०.

घोळणी पुनीव—स्त्री. (व.) भाद्रपद शुद्ध पौर्णिमा.

घोळणें—न. घाटणा; घाटाणा; घाटू; घोळणा अर्थ १ पहा. [प्रा. घोल]

घोळणें, घोळविणें—उक्रि. १ (धान्य इ. सुपांत घालून हलकें, बारीक, जड मोठे इ० दाणे निराळे करण्याकरितां) इकडे तिकडे हलविणें; हिंदळणें; पाखडणें. २ (दोन किंवा अधिक पदार्थांचें) मिश्रण होण्याकरितां ताट, परात; सुप इ०कांत घालून हलविणें; खुदळणें; ढवळणें; माखणें; लेपणें. 'ऐक्यें घोळिली शुद्धि कैसी। मानु श्रोत्यांसी वाढविला।' –एमा १.४६३. 'लाडवांच्या कळ्या पाकांत घोळून लाडू बांधावे.' ३ जोरानें ओढणें व ढकलणें; खुदळणें; अपाय होईल अशा तऱ्हेनें ओढाताण, हिसकाहिसक करणें; घोळसावणें. 'त्या मल्लानें दुसऱ्या मल्लास एकतासभर घोळविलें.' ४ (गंजिफांचा खेळ) गंजिफांची, पत्यांची गलत करणें; पिसणें. ५ (एखादी गोष्ट) चिंतनाचा, वादाचा, चर्चेचा विषय करणें; वाटाघाट करणें; वादविवाद करणें; विचार करणें; (एखादी गोष्ट) पुनःपुनः मनांत आणून मनन करणें, घाटणें; 'निमुटपणें वर पाहूं लागली म्हणजे असें वाटे कीं कांहीं तरी तिच्या मनात घोळत आहे.' –पाव्ह १८. 'त्याच्या मनांत सर्वदा शास्त्र घोळत असतें.' ६ त्रास देणें; छळणें; जेरीस आणणें; सतावणें; जाचणें; कष्टविणें. 'यालागीं दुकाळा करितों मनन। आम्हांहि घोळिला बहुता परीनें।' –दावि २७. 'लोळावें मांडीवरि तेणें द्रोणादिकांसि घोळावें।' –मोद्रोण ३ ८५. 'त्या श्लोकानें मला चार घटका घोळलें तेव्हां त्याचा अर्थ लागला.' 'घोड्यानें मला दिवसभर घोळलें तेव्हा सांपडला.' 'त्याला दुखण्यानें दोन महिने घोळलें.' ७ (सुतार–सोनारकाम) तासून, घासून, घोटून, गुळगुळीत करणें. 'कुऱ्हाडीचा दांडा अमळसा घोळ, मग चांगला बसेल.' ८ खोदून खोदून विचारणें; उलट सुलट प्रश्न विचारणें; 'चोरास जेव्हां घोळघोळून घेतलें तेव्हा कबूल झाला.' ९ (एखाद्या कामांत) सरावणें; वहिवाटणें; राबत्यास पडणें. 'त्या कामात मी नवशिका नाहीं, दोन वर्षे घोळलेला आहें.' 'हा घोडा दोन चार दिवस घोळला म्हणजे बसावयास येईल.' १० (एखाद्या गोष्टीशीं, गोष्टीचा) नेहमीं प्रसंग पडणें, (एखादि वस्तु उदा० रुपये, दागिने इ०) हातात खेळवणें; इकडून तिकडे देणें, इकडून तिकडे ठेवणें. 'हातीं रुपये घोळवण्याजोगा प्रामाणिक माणूस कामावर ठेवावा.' ११ चोळामोळा करणें, वापरणें; वरदळींत, वापरण्यांत येणें, आणणें. 'हा आंगरखा खडखडीत लागतो पण दोन दिवस घोळला म्हणजे मऊ होईल.' १२ चाळविणें; छळविणें; भुलविणें.

'घातकी न ऐसा तैसा दुसरा । घाळितों नृपाला घेउनी ।' –दावि ४५५. [स घुण्-घूर्ण् प्रा घाल्=घुमविणें, हिं घालना] घाळ॰ घोळून घोळून घोळून–क्रिवि १ आळून पालटून, बदल करून, आळीपाळीनें, एकामागून एक (क्रि॰ करणें, खाणें, घेणें देणें) 'नित्य एकाच ब्राह्मणास दान देतास, हें काय? घोळून घोळून सांगावें' २ वारंवार, पुन पुन घोळण्याची क्रिया करून, पुन पुन इकडून तिकडे हलवून, ढकलून, घोळसून चर्चा करून, मनांत आणून, उच्चारून, घोळणें याच्या त्या त्या अर्थी द्विरुक्तिनें क्रिया करून 'हा मंत्र लोकांच्या तोंडीं आपोआप येतो व ताच घोळघोळून पाठ होऊन जातो' –यास २ ४०१ [घोळणें द्वि] घोळीव–वि १ घोळलेला घोळणें पहा. २ गुळगुळीत केलेला 'सर्वांगानें गोल असा घोळीव हिरा कोणी गिळल्यास त्यापासून इजा होत नाहीं' –पदाव १ ७० ३ (व) गाळीव निवडक [घाळणें] घोळन–क्रिवि (गो) एक दिलानें श्रमविभागानें घोळवि(व)णें–सक्रि घोळणें पहा 'मृदंग पदर जात स्वजनाकरवीं हि वह घाळविल।' –मोसभा ९ ४४ [घोळणें प्रयोजक]

घोळमाडणें—उक्रि १ ओढाताण करणें, हिसडाहिसडी करणें, त्रास देणें २ छळणें, गाजणें, जाचणें, त्रासविणें, सतावणें ३ (क) घोळणें इतर अर्थी [घोळणें]

घोळरी घाळस घोळसो—स्त्रीपु (गो) माशाची एक जात

घोळसणें, घोळसावणें—उक्रि घोळणें १ (चूर्ण द्रव पदार्थ इ॰त) ढवळणें २ (एक पदार्थ दुसऱ्या पदार्थांत भिनून जाईल अशा तऱ्हेनें) हलविणें, मिसळणें खालीं–वर करणें उलथा पालथ करणें ३ (ल) कुचलणें, कुटा काढणें खुबलणें, लोळविणें, मारपीट करणें खुदलणें 'देह घोळसिता नरकद्वारीं । तो अणुभरी कुथेना ।' एभा २६ ३४० 'लोभदंशें घोळसून । कासावीस केला ।' –दा १२ ४९ 'सात्यकिचेही बाण-व्रज झाले त्या वृथासि घोळसिते ।' –मोकर्ण १९ ५ ४ घोळणें, वाटोळें फिरविणें. 'नाचविसी धाय गे धोळसुनि भोय।' –लिगा ९० [घोळणें]

घोळा(ळ)णा—पु नाकपुडयांमधील पडद्याचा मांसल भाग गुणगुणा, घाळणा घोणा पहा [म घोणा=नाक] ॰फुटणें–नाकांतून (उन्हामुळें उष्णतेमुळें) रक्त वाहू लागणें

घोळाणा—पु (व) गोंधळ गुतागुत घोंटाळा घोळ अर्थ ३ ४,५ पहा

घोळाणा—पु १ हरभऱ्याचा हुळा ज्वारीचा हुरडा इ॰ जो हातावर चोळून मीठ घालून खातात तो 'हुरडा ओंब्या घोळाणा । तिळगुळेंसि चाखविल सुजाणा।' –एभा ३१ ४०१ २ (व ना) कडू निंबाची कोवळी पानें, चिंच, विवे इ॰ कांचें मिश्रण करून त्याला फोडणी देऊन तयार केलेला पदार्थ हा आर्द्रा नक्षत्राच्या सुरवातीस–बदलत्या ऋतुमानाचा शरीरावर होणारा परिणाम टाळण्यासाठीं–खातात [घाळणें?]

घोळाना-णा—पु (व.) कच्ची पालभाजी कुसकरून तिखट, मीठ, तेल वगैरे घालून केलेला खाद्यपदार्थ, घोळणा. [घोळणें]

घोळी—स्त्री (व) एक प्रकारची भाजी [घोळ]

घाळ्हाटमंडळ—(प्र) गोल्हाट पहा

घोंस—वि १ (को.) खणखणीत, टणटणीत, जोर, पहाडी (आवाज, वाद्य) २ (रूढ) मोठा व देखणा, ठसठशीत, ठम केबाज, घबघबीत (दागिना इ॰) लहान, किरकोळ याच्या उलट

घोंसाळी—स्त्री एक वेल, घोसाळी पहा

घ्न—वि (समासांत) ठार मारणारा, नाश करणारा, उदा॰ कृतघ्न=केलेला उपकार विसरणारा, रोगघ्न=रोग नाहीसा करणारें; वातघ्न=वात नाहींसा करणारें, कफघ्न, दोषघ्न इ॰ [स हन्=मारणें]

घ्या—उद्गा पहा! ऐका! हें घे! अतां! या अर्थी

घ्यों, घेंचचें—सक्रि (गो) घेणें

घ्राण—न १ नाक नासिका 'घ्राणीं लाविजती मुक्ताफळें। तरी तयाचें काय कळे। मोल मान॥' –ज्ञा १५ ३९५–गुच ३६ १६० २ ज्यानें वास कळतो तें इंद्रिय घ्राणेंद्रिय 'घेयावया फुलचि जालें घ्राण। आपुली द्रुती॥' –अमृ २ ५७ –एभा १ २५१. [स] घ्राणानुमेय–वि. वासानें ज्याचें अस्तित्व कळतें तो (पदार्थ) वासानें कळण्याजोगा 'हो कां घ्राणानुमेयो। यवा कां हातीं घेवो।' –अमृ ७ २३८ [घ्राण+अनुमेय=ओळखता येण्यासारखा] घ्राणेंद्रिय–न ज्यानें वासाचें ज्ञान होतें तें (पंचज्ञानेंद्रियांपैकीं) इंद्रिय, घ्राण अर्थ २ पहा [घ्राण+इंद्रिय] घ्रात वि वास घेतलेलें, हुंगलेलें [स] घ्राता–वि वास घेणारा, हुंगणारा 'वास सुवास सुमन। घ्रेय घ्राता आणि घ्राण। कृष्ण मकरंदें जाण। विश्रांति संपूर्ण स्वयें येती॥' –एभा १ २५२ [स] घ्रेय–वि वास घेण्यास योग्य, ज्याचा वास घ्यावयाचा तें 'घ्रेय घ्राता आणि घ्राण।' –एभा १.२५२ [स]

---

## ङ

ङ—व्यंजनमालेतील पांचवें व्यंजन अक्षरविकास–तीन अवस्था पहिली बुद्धगया येथील स्तंभावरील लेखांत आढळते हा ङ चौकोनी वसासारखा आहे दुसरी मंदोसर (इ स ५३२) व तिसरी उज्जयिनीच्या लेखांत (११ वें शतक) आढळते. हें व्यंजन आरंभीं असलेले शब्द मराठींत मुळींच नाहींत

---

# च

च—सहावें व्यंजन. याचा उच्चार संस्कृतांत तालव्य होतो, पण मराठींत बहुधा दंततालव्य होतो, उदा० चमचा, चवरी. अक्षरविकास — तीन अवस्था-पहिली अशोककालीन, दुसरी इ स. दुसऱ्या शतकांतील मथुरेच्या लेखांत व तिसरी ११ व्या शतकांतील उज्जयिनी लेखांत कान्याविरहित ग सदृश आकृती पासून आजचा विकास आहे

च—अ १ निश्चय, खात्री, स्पष्टपणा, वैशिष्ट्य, स्वतः पण इ० दाखविणारें अव्यय उदा० तुम्हींच या=इतरास न पाठ विता तुम्ही स्वतः या, तुम्ही याच=कसेंहि करून, न चुकतां या, तो चोरच आहे=तो चोरीचाच धंदा करणारा आहे, तोच चोर आहे=इतर कोणी नाहीं तो स्वतः चोर आहे 'मी जेव लाच उठलों=जेवण होताक्षणीं उठलों, मी येईनच=येईनच येईन (खात्रीनें, निःसंशय मी येईन) २ या अव्ययाला कधीं गुणद र्शक अर्थ असतो उदा० तो पंडित बराच आहे=चालण्यासारखा (उपयोगी पडेल असा) आहे ३ सदृश, सारखा पढलेला ग्रंथ बहुत दिवस न पाहिला असतां परका परकाच दिसूं लागतो' [स चित्]

चइणें—अक्रि (महानु) जागा होणें 'चइला तंव लटिके।' —चक्रधर सिद्धांत सूत्रें ५३ [स चित्, प्रा चेअ]

चइत-त्र—पु चैत्र महिना 'श्री सकु ११९८ धाता संवत्सरे चइत्र सुध १५' —चौऱ्याशीचा शिलालेख [स चैत्र, प्रा चइत्त]

चई—स्त्री १ केस किंवा लोकर खाणारा एक रोग कातर, उदरी. चाई पहा. (क्रि० लागणें) २ गुराचा एक रोग —शे १० १३१.

चईन—चैन पहा

चउकडे, चउत्रा, चउथरा चऊक, चऊन चऊथ— चौकडे चौत्रा, चौथरा इ० चौ मध्यें पहा 'कोणी चउत्र घालोनि जाण। निर्मळ जागा करिती सारऊन।' —महिकथा २५ ६४ 'सवाहात रुमालावर चऊक भरविला।' —पला ९७

चउदशी—स्त्री शुक्ल किंवा कृष्ण पक्षांतील चौदावा दिवस चतुर्दशी [स चतुर्दशी, प्रा चउदसी]

चऊर—पु जमीन मोजण्याचें एक परिमाण चाहूर पहा

चऊर, चऊरगोंडा —चवर, चवरगोंडा पहा

चक—पु. १ वचक धाक जरब, वजन पगडा (मत्ता, अधिकार यांचा) अप्रचलित अधिकारमान्यता 'मामलतदार नवा होता परंतु एका अपराध्याचें शासन होतांच सर्वांवर चक बसला.' २ कायदा नियम, कानू, शासन, ठरलेली पद्धत 'नित्य नवें सांगू नका एक चक बांधून द्या त्याप्रमाणें मी वर्तेन ३ जुनी, नेहमींची पद्धति, रीत, वहिवाट 'त्या मंडळीचा प्रातःस्नान करण्याविषयीं बारा वर्षे एकसारखा चक चालला आहे ४ हक्काची रक्कम, दस्तुरी, कर, फी 'माझा दोन रुपये चक येणें आहे' [शक? तुल० स चक्र]

चक—पु एकी, एकमत, ऐक्य, सगनमत, जूट, सख्य, मिलाफ 'ग्रामस्थांचा चक असल्यावर सरकारचा जोर चालत नाहीं [स चक्र, प्रा चक्क]

चक—पु तंबाखूच्या आळ्यावरचें आच्छादन झांकण [तुल० गु. चक=पडदा]

चक—पु. १ अधिकारांतील, मालकीची, वांटयास आलेली जमीन नंबर, क्षेत्र. २ लागवड करावयास घेतलेली सलग, मोठी, लांबलचक जमीन, मोठें जमीनीचें क्षेत्र ३ विभाग लेल्या जमिनीचा एक भाग, तुकडा, जुन्या जमाबंदी दप्तरांतून याचा अर्थ गांवकऱ्याकडून घेऊन तिन्हाइतास लागवडीकरितां दिलेली जमीन असा आहे जमीन मोजणींत याचा अर्थ एका नंबरांतील दुसरें शेत (शेतांतलें शेत) असा आहे. —विल्सनकोश [हिं चक, ते चेकु=तुकडा]

चक—पु (सरकारी नोकरांत रूढ) ताकीद, ठपका, कान उघाडणी (क्रि० येणें ठेवणें, घालणें) [इ चेक]

चक—चक्क पहा दिले जरी पांपाख स्वामीला चक 'दौलत रायानें।' —सला ५२

चकई—स्त्री चकवा पक्ष्याची मादी चकवी पहा [स चक्रवाकी, प्रा चक्कवाई, हिं]

चकचक—न (अशिष्ट) दूध

चकचक—क्रिवि १ चकचकीतपणानें, डोळे दिपून जाण्यासारखें, झकझक्, लखलख २ स्पष्टपणें, चक्क पहा 'चक चक चुकावेना। चाट चावट चळावेना।' —दा १४ ४ ६ —वि चकचकीत पहा —पुन चकचकीत पदार्थ थाट, चकचकाट 'तेथें कांहीं चकचक दिसतें' [हयावरून स चक्=प्रकाशणें, चाक चक्य=तेज, प्रभा, म चक चकचकणें]

चकचक-गा—क्रिवि श्वानादिकांच्या जलप्राशनसमयीं होणाऱ्या शब्दाप्रमाणें शब्द करून, चाटतांना, पितांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें [ध्व चक! चक!]

चकचकणें—अक्रि प्रकाशणें, लकाकणें, चमकणें, झळ कणें (बीज हिरा इ०) 'काय तो हिरा चकचकतो' [स चक]

चकचकणें—अक्रि १ चकचक चुकचुक आवाज काढणें, चुकचुकणें (पाल, साप इ०नीं) २ (ल) खेद करणें, दुःख

करणें; चक असा ध्वनि काढणें (इळहळण्याच्या वेळीं तोंडांतून चक असा ध्वनि निघतो त्यावरून). 'मैकराचा पाहुं जाती। लेंडी चकचकून पडती।' -दावि ४०३. [ध्व. चक]

**चकचकाट**—पु. झगझगी; लखलखाट; झगझगाट; चमचमाट, प्रखर प्रकाश; डोळे दिपण्याजोगा दिव्याचा प्रकाश. [चकचक]

**चकचकायणें**—अकि. (माकड, पक्षी इ०नीं) चकचक असा शब्द करणें. [ध्व. चकचक]

**चकचकायिणें**—उक्रि. डोळ्यापुढें चक होईल, काजवे चमकतील अशा जोरानें कानशिलावर चपराक मारणें; थोबाडींत लगावणें. 'एक कानशिलावर च०चकाविली तेव्हां कबूल झाला.' [सं. चक]

**चकचकी**—स्त्री. १ तेज; प्रभा. २ लकाकी; उजळा; झकाई; चकचकीतपणा. 'हिऱ्याची चकचकी गारगोटीस याव याची नाहीं.' [सं. चक्]

**चकचकीत**—वि. १ सतेज; लकलकीत, प्रकाशमान; चमकणारें. २ (ल.) लकपक; चापचोप; नीटनेटका; स्वच्छ; व्यवस्थेशीर; ठाकठीक; नीटस; शुद्ध (माणसें, वस्तु, स्थळें, इ०). [चकचक] ०पणा-पु. चकाकी; तेज, लखलखीतपणा.

**चकचूर, चकचुरी**—चकाचूर, चकनाचूर पहा. 'चकचूर करिति कर छर चरण शिर सुरकुलज रणशूर तदा।' -भाय २९. 'कपि धैर्यता जरी वरी। तैं होता चकचुरी निर्नाम।' -भारा किष्किंधा १७.१३४.

**चकट**—स्त्री. (चि.) चटक पहा. (चटक वर्णविपर्यास)

**चकडमकड**—स्त्री. (व.) सोंगढोंग; चाल्ढील. 'आतां चकडमकड करण्यांत काय अर्थ?' [मनःकल्पित शब्दरचना]

**चकड्डी**—स्त्री. आठां(चवां)चा समूह, समुदाय. [का. चेक्कु=पदा]

**चकण**—स्त्री. (कों. ठाणें) घुरांड्यांच्या मधून जोखडाच्या खालीं घातलेली लांकडी पट्टी. -मसाप २५२. [सं. चंकुण=गाडी]

**चकणा**—वि. तिरवें पाहणारा; काणा. [सं. चक्षुष्काण-चक्खाण-चकाण-चकणा. -भाम १८३२.]

**चकणी**—स्त्री (बायकी) पैसे, कवड्या इत्यादिकांच्या खेळांत जी चकण्याची पाळी येते ती; चकणें. [सं. चक्कलन=वाटोळा घेर; म. चकणें]

**चकणें**—क्रि. १ आश्चर्यांत किंवा कौतुकांत निमग्न असणें; गोंधळणें; भांबावणें, भूल पडणें. 'त्या शालेचा भडक रंग पाहतांच मी चकलों आणि दोनशें रुपये दिले.' 'मदनें मति त्याचीही कीडा चकली।' -रास ९. २ (ल.) फसणें. 'लॉर्ड कर्झन साहेबांच्या राजकीय धोरणासंबंधानें बोलतांना हे चकतील...' -टि २.५१४. ३ भय पावणें; दचकणें. 'देखनी चमकतां चकती ते। भावती जिवन वेंचकती ते।' -आनंदतनय नवरत्नचरित्र. [सं. चक्, चकित]

**चकणें**—चुकणें पहा.

**चकणें**—क्रि. १ (बायकी) सपंगाव व छापोच्या खेळांत सर्व मुलींनीं घेर धरून उभें राहून डाव्या उताण्या हातावर उजवा हात पालथा किंवा उताणा मारणें व त्यावरून हार कोणावर तें ठरविणें; गडी ठरविणें. २ गोट्या किंवा कवड्या यांच्या खेळांत प्रारंभीं खळींत पैसा टाकणें. [सं. चक्कलन=वाटोळा घेर]

**चकती**—स्त्री. १ वाटोळी, सपाट, पातळ अशी कोणतीहि वस्तु किंवा पदार्थ, (केळें, काकडी, कंद इ० कांची) खाप, फोड; चांदकी; चांदुकली; चापटी; पातळ वडी; वाटोळा तुकडा. २ चिठ्ठी; पत्र; कागद; तिकिट; कार्ड. 'आपली चकती मिळाली.' =आपलें पत्र मिळालें. (राजारामशास्त्री भागवत यांनीं हा इं. कार्ड याला नवीन शब्द बनविलेला दिसतो). 'मी त्याचे वरोबर शेटजीनीं देण्याकरितां चकती पाठविली आहे.' ३ सनद; पास; दस्तक. ४ शिपायांचा बिल्ला. 'एक चपराशी चकती पाहून रयत घरघरी चकरी जशी।' -पला ६५. ५ यादी. -रा ३८००. ६ मांसाचा पातळ तुकडा; परसंदा पहा. -शुशि २.९. [सं. चक्रवत्; प्रा. चक्कवत्ति; हिं. चकती]

**चकदळ**—न. १ (फलादिकांची) लहान चकती; खाप; वाटोळा कातळा. २ वाटोळा डाग, तुकडा, स्थळ. ३ पापुद्रा; खवला. ४ (व.) वडा. **चकदळी**—स्त्री. १ लहान भाकरी, पोळी; थापटी; वडी. २ कोणत्याहि नळकंड्याच्या आकाराच्या पदार्थाची पातळ चकती. [सं. चक्र+दल]

**चकंदळ-ळा**—पुन. १ वर्तुळाकार तुकडा, जागा. २ नायटा किंवा गजकर्ण किंवा इतर रोगाचा वाटोळा चकदा; खवला; स्फोट. ३ भिंतीवर ओल्यामुळें किंवा गिलावा पडल्यामुळें पडलेला डाग. ४ धान्य पेरलेल्या किंवा उभ्या शेतात असलेली उघडी जागा, पीक न उगविलेली जागा. ५ कोणतीहि वाटोळी, उघडी जागा. ६ (ल.) हिशेबांत फट, भगदाड, अफरातफर; हिशेबांत मोकळी जागा सोडणें, किंवा लबाडी, गफलत करणें. 'ते रुपये खाऊन अगदीं चकंदळ केलें' ७ कपा; फडशा; (खाद्यपदार्थांचा) स्वच्छपणा. ८ लोकांचें कडें, समुदाय मंडळ. [सं. चक्र+मंडल]

**चकदा**—पु. १ शरीरावरचा वाटोळा डाग; खवला. २ पापुद्रा; कपळा, खपला; साल; कातळा. (क्रि० उडणें; निघणें; काढणें; तोडणें). चकदळ पहा [सं. चक्र+दल]

**चकन(ना)चूर**—पु १ चुरणा; चूड; भुगा; तुकडेतुकडे; खंड; समुदाय (फुटलेल्या, मोडलेल्या पदार्थांचा); छिन्नभिन्न झालेला गोळा. २ मोडलें गेल्याची, भंग झाल्याची कल्पना, समज 'अंगाचा चकनचूर झाला.' ३ सत्यनाश; नायनाट. ४ मति भ्रमानें

आलेला थकवा -वि १ छिनविच्छिन, भग्न, तुकडे तुकडे झालेला ( पदार्थ ) २ थकलेला, भागलेला, दमलेला, मरगळीस आलेला, आपल्याला नष्टप्राय समजणारा ( मनुष्य शरीर ) [ चकती+चूर हिं. चकनाचूर ]

**चकनळचें**—अक्रि ( गो ) १ पोटात ढवळणे २ पातळ पदार्थ हिसळणे, हलणे ( बाटली, भांडे इ०कात )

**चकनामा**—पु १ गावच्या जमिनी, तनखे, गायराने, इनामे याची माहिती, हिशेब, यादी २ वतनाच्या, शेताच्या मर्यादा सीमा ज्यात नमूद केल्या आहेत असा कागद चतु सीमापत्र ३ करारनामा, दस्तैवज ४ हुकुमनामा, फतवा [चक+नामा ]

**चकपक**—स्त्री १ चपळाई, चापल्य, तरतरीतपणा २ नीटनेटकेपणा, ठाकठिकी ( माणसाची ) ३ स्वच्छता तेजेला 'गळे चकपक अंगीचे नीधोनी ।' -निगा ६३ -वि नीटनेटका, व्यवस्थित, सुग्मुगीत झुळझुळीत, निर्मळ व स्वच्छ लकपक ( मनुष्य, स्थळ, वस्त्र, वस्तूची मांडणी ) [ चक द्वि ]

**चकबंदी**—स्त्री १ जमीन, शेत, वतन याच्या चतु सीमा ठरविणे मर्यादा घालून देणे २ जमिनीची आकारणी, सारा ठरविणे, साऱ्याचा दर निश्चित करणे आणेवारी काढणे [चक+बंदी ]

**चकभूल**—स्त्री आश्चर्य, विस्मय, भ्रांति, संभ्रम, समोहा वस्था अचंबा 'हें पाहून विद्याधरानें पुत्राची चकभूल जावी म्हणून तेथें एक बंगला होता त्या ठिकाणीं त्यास नेऊन भोजन घातलें ' -बाळ २ ११७ -वि आश्चर्यचकित, विस्मित, विमोहित दिङ्मूढ [ स चकित+ हिं भूल चकणें+भुलणें ]

**चकमक**—स्त्री १ अग्नीची ठिणगी पाडणारी गारगोटी व पोलादी पट्टी (याच्या घर्षणानें ठिणगी पडते), विस्तवाचें साधन 'त्याजवळ विस्तव पाडण्यास चकमक नव्हती -पाव्ह २६ २ पोलादी पट्टी, पोलाद ३ (ल ) गोळागोळी, भांडण झटापट, शाब्दाशाब्द परस्पर आघात ४ कलह, युद्ध, मारामारी वगैरे ( क्रि० झडणें उडणें, होणें ) 'पहिल्या चकमकींत माधवाचा जय झाला ' -नाकु ३ ७ [ तुर्की चक् मक्=गारेपासून ठिणगी पाड णारें पोलाद चापी बंदूक तुल० स चक्=प्रकाशणें म चक्क]

**चकमकणें**—अक्रि चकचकणें, प्रकाशणें, लखलखणें, झळ कणें [ चकमक ]

**चकया**—पु ( कु ) वाजविण्याचा टाळ [ म चक, प्रा चक्कय ? ध्व ]

**चकरणें**—अक्रि ( को ) किंचित फिरविणें वळविणें ( बहाल, सिरा, इ० जड पदार्थ ) [ म चक प्रा चक्कर ]

**चकरणें**—अक्रि चुकणें, प्रमाद करणें, चूक करणें [चकणें] घको १ २६

**चकरदंड**—पु एक प्रकारचा व्यायाम, कसरत, चक्रदंड [ स चक्र+दंड ]

**चकरदांतॉं**—पु ( गो ) चकल्या करण्याचें यंत्र, सोऱ्या [ स. चक्रदंत, म चक्कर+दात ]

**चकरमकर**—स्त्री १ युक्त्या, डावपेंच, हिकमती, घाव डाव, चेष्टा, लपडाव. २ सबबी, बहाणा मिष खोटीं कारणें सांगणें ३ भीति, भय, धडकी, त्रधा ( क्रि० भुलणें, भुलवणें, कर्त्याची किंवा कर्माची षष्ठी ) ४ (खा ) गमजा [ चक्कर द्वि हिं ] ०पाहणें-अत्यंत भयभीत होऊन गांगरून सभोंवार पाहणें

**चकरावणें**—अक्रि ( ना ) चकित होणें, स्तंभित होणें. [ हिं चकराना ]

**चकरी**—स्त्री १ ( चांभारी ) देरा व मोट एकत्र शिवण्या साठीं डेऱ्याचा मधला कापून काढलेला गोल भाग, ठिगळ २ ( राजा ) घेरी [ स चक्र, चक्कर, हिं चकरी ]

**चकला**—पु १ अनेक परगणे मिळून बनलेला देशाचा विभाग २ शहराचा भाग, पेठ मोहल्ला ३ शहराच्या, महा लाच्या विशिष्ट भागांतील खटले चालविण्याची जागा, कोर्ट, कचेरी, पेठेची, वाड्याची मॅजिस्ट्रेट कचेरी, कोतवाली ४ सराफ कट्टा ५ अड्डा तळ ( मजूर, गाड्या, जनावरें यांचा ), सुग. ६ ( भिक्षेकऱ्यांत ) अगदीं सकाळीं भिक्षा मागण्याकरितां ठराविक ठिकाणीं उभें राहण्याची पद्धत, वहिवाट 'आज माझा चकला आहे ' ७ अशा ठिकाणीं मागितलेली, दिलेली भिक्षा 'त्यांनी चकला केला ' ' मला चकला द्या ' [ स चक्र, प्रा चक्कल, हिं चकला ]

**चकला**—पु (राजा ) एक हलक्या प्रकारचें गर्भमुक्ती यंत्र [ हिं ]

**चकला**—पु (कों राजा ) अनेक प्रकारचीं फुलें वगैरे कोर लेली पट्टी, दागिन्यावर टीक अगर फुलें उठविण्याचा सोनाराचा ठसा [ हिं चकलना=दाबणें, वर दाब टाकणें ]

**चकला, घाका**—पु ( सोनारी ) जरींतून काढलेली चांदी

**चकली**—स्त्री १ धातूची किंवा धातूच्या पत्र्याची चकती, गोल लहान तुकडा विशेषेंत साम्ब्रदीन एवढ्या शिशाच्या चकल्या घालतात -गुजा १४ २ हरभऱ्याची डाळ, तांदूळ, उडदाची डाळ गहू जिरें वगैरे पदार्थांचें पीठ मळून एका सच्छिद्र सोऱ्यांतून तें कढईतल्या तेलांत अगर तुपांत गोलाकार जिलबीप्रमाणें तळून काढतात तो पदार्थ [स चक्र प्रा चक्कलिभ= चक्राकार ] ०पात्र-सांचा-नपु चकल्या तयार करण्याचा सांचा, सोऱ्या

**चकल्या**—पु ( दे ) चकल्यावर, शहराच्या चवाठ्यावर असणारा चौकीदार, कोतवाल, मॅजिस्ट्रेट, चटला पहा

**चकवणी-विणी**—स्त्री १ दिशाभूल, भुरळ २ ठकबाजी, थापा, फसवणूक ' ज्यानें दगे झाले त्यांनीं खेटे घालीत असावें आणि ज्यानीं दगे आह, त्यांनीं . . एकसारख्या चकविण्या दाखवीत असावें —भागर [ चकविणें ]

**चकवा**-पु कोळपाच्या, नावाडपाच्या गाण्यांतील एक प्रकार, नाव वल्हवितांना नावाडी म्हणतात तें गाणें

**चकवा**—पु हंसाच्या जातीचा एक पक्षी, चक्रवाक [ स चक्रवाक, प्रा चक्कवाग-य, हिं चकवा ] **चकवी**—स्त्री चकवा पक्ष्याची मादी, चकई [ प्रा चक्कवाई ] •

**चकवा**—पु १ एखाद्या ठिकाणीं रात्रीच्या वगैरे वेळीं दिशाभ्रम वगैरे होऊन अगर भूल पडून मनुष्य भलतीकडे जातो, त्यास म्हणतात (क्रि० भेटणें, होणें ) २ ( व ) भूल पाडणारें भूत ' चकव्यानें भुलविलें म्हणून वाट चुकलों ' [ स चकित ? म चकणें=भुलणें ]

**चकविणें**—सक्रि १ भुलविणें, चकित करणें, गोंधळांत पाडणें, दिपविणें, मोह घालणें २ डोळ्यांत धूळ फेकणें, फस विणें, ठकविणें, भूलथाप देणें [ स चकित, म चकणें प्रयोजक ]

**चकसणें**—अक्रि (को )एखाद्या पदार्थाची गोडी, लज्जत चटक लागल्यामुळें तो मिळविण्यासाठीं उत्कंठित होणें, आतुर असणें, पुन पुन झटणें [ चव+कसणें ? तुल० चपक ]

**चकळ**—न तुकडा भाग, कांड [ स शकल ]

**चकळी**—स्त्री. चिळकांडी, धार ( दूध, रक्त रस इ०ची ) [ चळक ]

**चकाकणें**—स्त्री ( चकचकणेंचा अतिशय ) झळकणें, चम कणें, लखलखणें, झळझळणें, प्रकाशमान होणें, झकपकणें [ स चकास् म चकाकी ]

**चकाकी**—स्त्री ( चकचकीचा अतिशय ) १ चकचकीतपणा, लकाकणें, झळझळणें, चकचकाट २ एकसारखा पडणारा मोठा प्रखर प्रकाश, तेज प्रभा खनिज पदार्थांच्या अंगीं चकाकी असते ' —पदार्थ १ ५

**चकाचकी**—स्त्री १ तळपणें चकमक, खणखणाट ( तर वारीचा ) २ हमरीतुमरी, भांडण, झटापट, झकापकी ( क्रि० झडणें उडणें ) [ चकचक ]

**चकाचूर**—चक्काचूर पहा

**चकाट**—स्त्री ( राजा ) चट चटक पहा

**चकाट-टा**—न चेष्टा चकाट्या येकमेकां करिती चकाट ' —शिपु १ १ १३८

**चकाटणें**—चाकाटणें पहा [ चक ]

**चकाटी-ट्या**—स्त्री (नेहमीं अनेकवचनी प्रयोग) रिकाम्या गप्पा, गमतीच्या गोष्टी, वार्ता, चेष्टा; गप्पागोष्टी, वायफळ गोष्टी ( क्रि० पिटणें; मारणें ) ' भोजनाचे पदार्थ शिजत लावल्यावर चकाट्या पिटीत बसू नये ' —गृशि २ ४ [ स चकाट ( चक+अट )—चकाट=लुच्चा, सोदा —भाअ १८३२ ]

**चकाणा**—वि ( प्रां ) चकणा पहा

**चकांदळ-ळा**—नपु चकदळ पहा

**चकाभूल**—स्त्री. तिरपीट, गाळण, घाबरगुंडी ( क्रि० करणें, होणें ) ( कर्त्याची व कर्माची षष्ठी ) [ चक+भूल ]

**चकार**—पु च हें अक्षर [स च+कृ] ०शब्द-पु किंचितहि भाषण, एक अक्षरसुद्धा, अवाक्षर, शब्द, व्यक्त उद्गार (निषेधार्थी प्रयोग ) ' घरांत मोठमोठ्या गोष्टी करतोस सभेंत चकारशब्द तोंडावाटे निघावयाचा नाहीं ' ' याप्रमाणें तो दिवस गेला, आण्णासाहेबांनी त्यासंबंधानें एक चकार शब्दहि काढला नाहीं ' —यशवंतराव खरे [ म चकार ( ध्व )+शब्द ]

**चकार**—वि ( व ) चलाख

**चकार-रा-री**—पु स्त्री (सांकेतिक) चवली, दोन आण्याचें नाणें, (पावलीबद्दल पकार-री असाहि संकेत आहे ) 'ही दक्षिणा कांहीं चकारी पकारीवर भागावयाची नाहीं किमानपक्षीं बाण (५)सख्या तर खरी ' —मराठीची सजावट १ ५४ [ म च= चवल+कार ]

**चकारचिल्हा-चिल्ह्यातला**—वि ( उप ) चहाडखोर, चुगलखोर [ म च=चहाड+अर चिलाइयाह् म चिल्हा ]

**चकारा**—स्त्री ( संकेत ) चहाडी [ म च+कारी ]

**चकारी**—स्त्री १ गाडीच्या चाकाची खुण, चाकोरें गराडी २ गाडीचें वळणें, फिरविणें ( क्रि० घेणें ) ' अडचणीच्या जाग्यांत चकारी घेऊं नये पैस जागा पहावी ' ३ गाड्या फिर विण्याकरितां रस्त्यापासून कांहीं अंतरावर एका बाजूला जी जागा केलेली असते ती ४ काठीनें मारून फिरवीत न्यावयाचें लहान मुलांचें चाक [ स चक्र+आकार, म चाक ]

**चकाव चकाव**—क्रिवि १ वानराच्या टोळींतील म्होर क्याच्या आवाजाप्रमाणें आवाज करून चकचक २ खातांना जो चकचक आवाज होतो त्यासारखें, मचामचा [ ध्व ]

**चकित**—वि १ डोळे दिपलेला, विस्मित, आश्चर्ययुक्त ' ऐसि ऋषि होऊनि चकित । म्हणे राया आपुलें आर्त । दात्याची सामुग्री पाहोनि तेथ । मागावें काई । ' —कथा ६ १९ १५३ २ गोंधळलेला, भांबावलेला, भयभीत-चकित दचकलेला ( क्रि० होणें ) 'नेली सभेंत साध्वी न्हावें शिवता जिला चकित वातें । ' —मोगदा २ ३ [ स ]

**चकीर**—न दोरा घालून फिरविण्याचें लहानसें लाकडी चाक, चकी पहा [स चक्र, म चक्कर]

**चकुलीं**—न अव (गो) चकल्या, चकली पहा [का चक्कुली]

**चकै**—स्त्री चूकभूल, भ्रम, भुरळ 'आपण आतोनि ठिकरिया। बहु चकै झातया। आणिली जगीं।'—ज्ञा १८ ५३९ [स चकित, प्रा चक्किय?]

**चकोट**—वि (वे कर) चोखट, उत्तम, चागलें (मुसलमानात किंवा मराठ्यात रूढ) 'चकोट बोलाव' 'चकाट माल गि हाइकाला यावा.' [स चोक्ष=शुद्ध, निर्मळ, का चोक्कट]

**चकोत्र-त्रा, चकोतरा**—पु एक फळ, पपनस [हिं]

**चकोंदळ-ळा**—नपु चकंदळ, चकदळ पहा

**चकोर**—पु एक पक्षी, हा चद्रकिरणावर जगतो असा कवि संकेत आहे चद्राबद्दल याचें प्रेम प्रसिद्ध आहे 'जैसें शारदीयेचे चद्रकळे-। माजीं अमृतकण कोंवळे। ते वेंचिती मनें मवाळें। चकोरतलगें।'—ज्ञा १ ५६ 'बा हू मजवि म्हण न त्या द्विप दंगाराचिया चकोरा हू।'—मोविराट ४ ६७ [स] **चंद्र चकोर न्याय**—पु (चातक जसा मेघाची तसा चकोर चद्राची वाट पहात असतो यावरून) एखाद्यावर आपलें जीवित अवलंबून असणें किंवा एखाद्याची वाट पहाणें 'माझा नदपिता यशोदा जननी। दोघे कठीं प्राण ठेवुनी। वाट पाहती दिनरजनीं। चद्रचकोरन्यायसीं।'—ह २१ ७२

**चक्क**—न १ डोळे दिपायाजोगें आकस्मिक तेज, लख्खकन प्रकाश (क्रि० होणें) प्रथम चक्क झालें एकदा मग कडकडून वीज पडली' २ आकस्मिक येणारा नवा विचार. 'विचार करता करता त्यास एकदम चक्क झालें.'—सूर्योदय ८४ —वि १ सतेज, प्रकाशमान, लकाकणारा, चकचकणारा (सराफ लोक हा शब्द सोनें रुपें, यास प्रथम वापरीत, नतर इतरांकडून तो पुढील अर्थी वस्त्रें, भूषणें, घर इत्यादींस लावण्यात येऊ लागला) लखलखीत, नीटनेटका, ठाकठीक, सुरेख, स्वच्छ, चागला, झकास 'त्यानें आपलें घर चक्क करून ठेविलें आहे' —वि क्रिवि, आश्चर्यात बुडालेला, चकित 'त्याजवर जडलेल्या रत्नांचें पाणी पाहून तो चक्कच झाला'—विवि१० ५ते ७ १२६ —क्रिवि १ स्पष्टपणें, डोळ्यासमोर, धडधडीत ती आपल्या प्रियकराला चक्क सागत'—नाकु ३ ४६ २ पूर्णपणें पुरेपूर 'आता चक्क उजाडलें.' 'मापट्याच्या भातात दाघेजण चक्क जेवतील' [स चक् म चकचक] ०कर-कन-दिशीं,

**चक्कन, चक्कर**—क्रिवि चक्क होऊन, डाळ दिपून जाण्याजोगा, एकदम प्रकाश पडून, झळाळून 'आणि एकाएकीं चक्कन उजेड पडून मोठा गडगडाट होतो'—मराठी ६ वें पुस्तक (आवृ २) पृ ३६ [चक्क+कर प्रत्यय]

**चक्कर**—न १ एक खळगें, चकी, भोंवरा २ कडें, मडळ, वर्तुलाकृति रस्ता किंवा जमीनीचा भाग, डोंगराचा किंवा खडक्याचा वाटोळा किंवा पुढें आलेला भाग. ३ (अश्वविद्या) घोडा मडलावर धरण्याची जागा ४—न स्त्री भोंवळ, भोवड, घेरी ५ चुन्याची घाणी, घाणा ६ पित्तप्रकोपामुळें डोळ्यापुढें उभें राहणारें चक्र किंवा मडळ, डोळ्यापुढें काजवे चमकणें ७ खळें, तेजोवलय, कडें, परिवेष, परिधि (चद्रसूर्य, देवादिक इ० यांच्या भोंवतीं असणारें) ८ फेरी, गरका, वळसा, हेलपाटा, येरझारा (क्रि० घेणें) ९ चाकें. १० विष्णूचें सुदर्शन चक्र ११ (व) शेंडीचा घेरा 'या वेळीं शेंडीला चक्कर ठेविलें' १२ तऱ्हेवाईक, चक्रम मनुष्य, विचित्र, विक्षिप्त माणूस 'काय चक्कर आहस?' १३ काहीं तरी क्षुल्लक काम [स चक्र] (वाप्र) (एखाद्यावर) **चक्करफिरणें**—१ (सुदर्शन चक्रावरून प्रयोग) ईश्वराच्या कृपा छत्राखालीं असणें २ दु खें, सकटें यात गुरफटणें किंवा यानीं घेरणें, वेष्टणें, सकटात सापडणें ०**मारणें, मारून येणें**—फेरी, गरका, वळसा, हेलपाटा, येरझार घालून येणें, जाणें येणें, जाऊन परत येणें. 'किल्ल्यावरून चक्कर मारून परत तुझ्या महालाकडे येतो'—कोरकि २९ 'दुकानाकडे चक्कर मारून ये' **चक्करावर धरणें**—१ घोडा मडलाकार फिरविणें २ (ल) कचाटींत, जरबेत धरणें **चक्करघाट**—स्त्री (विणकाम) (बे) ताण्यातील दोरे खालींवर होऊन धोटा जाण्यास वाट मिळण्यासाठीं फणीस दोरीनें फणीच्या वरच्या भागास जोडलेली चक्राकृति वस्तु [सं चक्र+घाट]

**चक्करभेंडी**—स्त्री एक फुलझाड, याचीं फुलें सकाळीं पाढरीं असतात व तींच संध्याकाळीं गुलाबी रगाचीं होतात —बागेची माहिती १००

**चक्का, चक्का दहीं**—पुन १ दह्याचा एक प्रकार, घट्ट किंवा साखर दाट विरजलेलें दूध, सुरीनें कापण्याजोगें दहीं, श्रीखंडाच्या उपयोगी दहीं 'चक्कादहीं मसाल्याचे खमग तादूळ'—मृ ३ २ (सकेत) यथेष्ट व मिष्टान्न भोजन 'आज चक्का कोणीकडे धरला' [हिं चकन=दाट, चक्का=दहीं]

**चक्काचक्की**—स्त्री हमरीतुमरी, तपडभाडण, झकापकी, चकाचकी पहा 'दोहोंकडून दाघा जबरदस्ताची चक्काचक्की उडू लागली म्हणजे हलक्यासलक्यानें तींत पडू नये'—विकार

**चक्काटा**—पु (बालभाषा) गमत (क्रि० दाखविणें) [चक्क, का आटा=खेळ]

**चक्की**—स्त्री १ जातें २ पिठाची गिरणी ३ (व्यायाम) मानेचा व्यायाम करण्यासाठीं दगडाचें केलेलें कडें सख्या ६२.

चाभारी ) चामडें कापण्याचा लाकडी गोल ठोकळा [ स
हिं ]

चक्कोर—वि (प्रां) विस्मित झालेला, आश्चर्यचकित
आ [ स चकित ]

चक्र—न १ रथ, गाडी, इ०चें चाक, कुंभाराचें चाक.
भवडीचें दंड । भ्रम चक्र ।' –ज्ञा १८ ३१०. २ चाकासारखें
आयुध, विशेषत विष्णूचें सुदर्शन चक्र 'कैसें चक्र हन
दा। सौम्यतेजें मिरवे ।' –ज्ञा ११ ६०४ ३ एक खेळणें,
चकीर, चक्कर ४ बोटावरच्या वर्तुलाकार रेषा, या शुभ
त (याच्या उलट शंखाकृति रेषा अशुभ समजतात) ५ सैन्य,
मूह, जथा, जमाव 'स्वचक्र परचक्र' 'पालाणिने त्वरित
शा रवा हो ! '–वामन, विराट ५ ११ ६ राष्ट्र, देश, भू
प्रांत, जिल्हा ७ (मकत) वड (खाद्य पदार्थ) ८ (विणकाम)
च्या कपाळकाठीच्या शेवटाला अडकविलेलीं दोन चाकें,
कपाळकाठी किंवा ढेकणी याच्या ऐवजीं ज्या चाकाचा
ग करतात तें नक्षीच्या कामाच्या दोन्या–काठाचा चाळा
असें लाकडी चाक, ज्यावर सूत गुंडाळतात तें चाक (रीळ)
ाकार सैन्यरचना, व्यूह 'चक्रव्यूह' १० पाण्याचा भोंवरा,
११ भविष्यकथनासाठीं किंवा जातक वर्तविण्याकरितां
ची आकृति, कुंडली १२ (शारीरशास्त्रात) शरीराचे
, प्राणस्थानें प्रत्येकीं एकंदर सहा आहेत, आधार–लिंग–
हत्–कंठ–भ्रू–चक्र षट्चक्रभेद पहा 'येक सांगती अष्टांग
नाना चक्रें ।' –दा ५ ४ २४ १३ संवत्सराचें मंडल
, आवृत्ति १४ (ज्यो ) मंडल वर्तुळ, राशिचक्र,
पचक्र १५ (कुण ) संकट गोंधळ, घोटाळा, कोंड, फास
चक्रांत घालणें–येणें=फसणें ) १६ ( सामा ) मंडलाकार
करणारा, खालचा वर–वरचा खालीं होणारा रहाटगाडग्या
फिरणारा पदार्थ, वस्तु, स्थिति. वायुचक्र' समाजचक्र
ज्यकांति १८ ( शाप ) पेशी, पिंड, ( इ. ) सेल १९
गांत कल्पिलेलें एक चक्र हीं चक्रें सहा आहेत मूलाधार,
ान मणिपूर, अनाहत, विशुद्ध, सहस्रार ऊर्ध्व तळौतें
तया सवामाजि चक्रांचे । पदर उरती ।' –ज्ञा ६ २३७
चक्रवाक पक्षी चक्रापरीच सजलों असता फिराया ।'–र १७
माशब्द– ०गति–स्त्री वर्तुळाकार (आपल्या भोंवतालीं
ीत) गति चक्रावर्तें व गरगर फिरणें. नित्य जे उदयास्त
तें चक्रगतीनें आणि प्रहास राश्यंतर होतें हें स्वगतीनें'
०चाळ–वि चमत्कार करणारा, लीलानाटकी 'तुका
चक्रचाळे। वेड बळें लाविलें।'–तुगा २१२४ 'स्वर्ग
मर्गी ठेईल गुढाळ । कान्हो चक्रचाळ पडरीचा। –निगा
[ चक्र+चाळणें ] ०दंड–पु. एक व्यायामपद्धति दोन्ही
हातांचे तळवे जमिनीवर टेकून ते स्थिर ठेवून पायांनीं वर्तुलाकृति
फिरणें–व्यायाम मासिक ४ १९२२ चक्रदंड पहा ०धर–पु
१ सुदर्शन चक्र धारण करणारा, विष्णु २ महानुभाव पंथातील
प्रमुख महात्मा [ स चक्र+धर ] ०नेमिक्रम–पु फिरणाऱ्या
चाकाच्या धावेचा वरचा भाग खालीं व खालचा भाग वर जातो व
पुन वर खालीं होतो याप्रमाणें परिस्थिति बदलणारा क्रम, उच्च–
नीच स्थित्यंतरें, जगाची चांगल्या दिवसामागून वाईट नंतर
पुन्हां चांगले दिवस अशी रहाटी. [ चक्र+नेमि=परीघ+क्रम ]
०पाणी–पु सुदर्शनचक्र धारण करणारा विष्णु, चक्रधर 'मनुज
तनुज जैसा भूतळीं चक्रपाणी ।' –वामन रुक्मिणीपत्रिका १५
[ स ] ०पाळणा–पु यात्रेच्या, जत्रेच्या प्रसंगीं टांगलेला फिरत
पाळणें २ गोलाकार फिरणारा पाळणा, झोला ०पाळ–पु १
प्रांताचा सुभेदार २ चक्ररक्षक, रथी युद्ध करीत असतां रथाच्या
चाकाचें रक्षण व योग्य गतिमध्यें चलन यावर देखरेख कर-
णारा योद्धा 'कीं दों पार्श्वीं दोघे भीमार्जुन चक्रपाळ जेविं
रवी ।' –मोभीष्म ११ ५१ [ स चक्रपाल ] ०भेंड–डी–स्त्री
एक झाड, याचें फळ चक्राकार असतें चक्रभेंडी पहा ०पूजा–
स्त्री चक्राची पूजा करण्याचा खानदेशातील कुलाचार ०भेद–पु
युक्ति, हिकमत, डावपेंच, छक्केपंजे, युक्तिप्रयुक्ति, कावा [स.
चक्र+भेद, शकटभेद याचा प्रतिशब्द ] ०मंडल(करण)–न
(नृत्य,) आणवें होऊन गुडघ्याच्या आतील बाजूनें दोन्ही हातांनीं
पायास विळखा घालणें [ स ] ०रक्षक–पु चक्रपाल पहा.
०वत्–क्रिवि चक्राप्रमाणें–सारखा, वर्तुलाकार, गरगर चक्रा
कार 'पायीं धरोनि अवलीळा । तारक चक्रवत् भोंवडिला ।'
[ स ] ०वर्ती–र्त्ती–पु चक्राचा अधिपति, एका समुद्रापासून
दुसऱ्या समुद्रापर्यंत असलेल्या पृथ्वीचा राजा, समुद्रवलयांकित
पृथ्वीचा राजा, सार्वभौम राजा, बादशहा 'जे चैतन्यचक्रव-
र्तीची शोभा । जिया विश्वबिंबाचिया प्रभा । '–ज्ञा ६ २७२.
'पुढें पुढें राघव चक्रवर्ती । संगें प्रिया मानसतापहर्ती ।' –सुरामा
[ स ] ०वर्तिनी–स्त्री बादशाहीण, सार्वभौमराज्ञी 'चक्र
वर्तिनी श्री महाराणी व्हिक्टोरिया यास आमची अशी
प्रार्थना आहे कीं' —टि १ ६६७ [ स ] ०वर्तीघोडा–पु
घोड्याचा एक प्रकार याच्या नाकाच्या मध्यभागीं भोंवरा असतो
–अश्वप १ २५. ०वाक–पु एक पक्षी यामध्यें दिवसा नरमादीचें
संमीलन व रात्रीं वियोग होतो असा कविसंकेत तया चक्रवाकाचें
मिथुन । सामरस्याचें समाधान।' –ज्ञा १८.८ ०वाक घोडा–
पु घोड्याचा एक प्रकार सर्व अंग पिवळें चारी पाय पांढरे व
होळे भेंतरंगाचे असा घोडा –अश्वप १ २५ [ स ] ०वाट–
स्त्री रथाच्या चक्राची चाकोरी 'परसैन्य देखानि दृष्टी । वों
चालिला जगजेठी । पडपडिल्या चक्रवाटी । उठाउठीं पातला ।'

–एरुस्व १० ४४ ०घाटी–स्त्री. वावटळ (क्रि० घडघडणें) 'घडघडीत चक्रवाटी।' –उषा ८३१. ०वाढ– ०वाढ व्याज–स्त्रीन दर वर्षास अथवा ठरविलेल्या मुदतीस व्याजाचा हिशेब करून तें व्याज मुदलात मिळवितात आणि ती रक्कम (रास) दुसऱ्या वर्षाचे किंवा मुदतीच व्याजासही मुद्दल धरतात, अशा रीतीनें जें व्याज होतें तें, व्याजाला व्याज आकारणें ०वात–पु. सोसाट्याचा वारा, वावटळ [स ]०वाल–पु १ क्षितिज, काळी धार २ पृथ्वीच्या भोंवतीं कल्पिलेली पर्वताची ओळ, मडळ [स] ०वाल–पु एक पक्षी [म] ०वाहा–वि १ चक्र वाळगणारा २ चक्रधर, विष्णु (कुंभार), 'चक्र वाहा का देवेंसी। केवि कुलाळा करू सरिमी।' –ऋ ४७ [स चक्र+वह्] ०वृद्धि–स्त्री चक्रवाढव्याज पहा [स] ०वेला–स्त्री (रूढ) चक्रवेळ फलज्योतिषशास्त्रातील एक वेळ मुहूर्त, याचेळीं आरभ केलेलें कोणतेंहि कार्य फार दिवस रेंगाळत राहतें [स ] ०व्यूह–विमू–विहू–पु १ एक विशिष्ट प्रकारची सैन्याची वाटोळी रचना, या सैन्यरचनेंत शत्रूचा प्रवेश होऊं शकत नाहीं. 'चक्रव्यूह गुरु द्रोण। रचिता झाला अद्भुत।' –पाप्र ४५.४ २ मोठी मसलत, कपटकारस्थान, कट, सकटाचा डाव रचणें, जाळें पसरणें, फार खोल, भानगडीचा, गुतागुतीचा केलेला बेत. 'आक्रपाचा भ्रामक चक्रव्यूह रचून अभिमन्यूप्रमाणें बुद्धिमान्...नेटिव लोकाचा छल व वध करण्यास लॉर्ड कर्झन याच्या कारकीर्दीत हिंदुस्थानसरकारनें तयार व्हावें' –टि २ ५२३ [स चक्र+व्यूह, म विमू, विहू=व्यूह] चक्राकार–पु वर्तुळ, चक्रासारखी आकृति –वि. वाटोळी, चक्राप्रमाणें गोल [म] ०कार मासा–पु. एक प्रकारचा मासा, (इ) स्टार फिश –प्राणिमो ११६ चक्रांकित, चक्रांगीत, चक्रांगद–पु १ चक्राकार रेषांचीं वर्तुळें, चिन्हें अस लेला पाढरा दगड, याची द्वारका मानून पूजा करण्यात येते हा समुद्रकांठीं सापडतो 'चक्रागीत चक्रतीर्थाहुनी। घेऊन येती।' –दा १९ ५ ३ 'सीळा सप्ताकित नवाकित। शालिग्राम शकलें चक्राकित।' –दा ४ ५ ६ २ (घोड्यें) अगावर देवीचे व्रण किंवा इतर काहीं विद्रूपता असणारा इसम [स चक्र+अकित] चक्रात–पु कट, कारस्थान 'विलिदारसाहेबाच्या विरुद्ध त्यानें चक्रात केला' –कोरकि६१ चक्रावळ–चक्रायाल–१ चक्रवाढ पहा चक्रावाळ–२ स्त्री घोड्याचें एक लक्षण, अगावर अनेक केसांचे भोंवर असणें, हें घोड्याचें अशुभ लक्षण मानितात [स चक्र+आवलि] चक्रावळ–स्त्री घोड्याचा एक रोग –अश्वप ० २५८.

चक्रं—वि तऱ्हेवाईक विक्षिप्त, चक्कर (मनुष्य). [म.]

चक्रापत्ति—स्त्री एका वस्तूचा दुसरीस दुसरीचा तिसरीस आणि तिसरीचा पहिलीस असा जो परस्परावर आधार तो, चक्राप्रमाणें फेरा. [स ]

चक्रम—पु १ दोन रुपये दहा आणे किंमतीचा एक होन २ तऱ्हेवाईक माणूस, चक्र पहा

चंक्रमण—न १ (शाखाचक्रमणाचें सक्षिप्त रूप, वानरांचें या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारणें यावरून) कसेंतरी जाणें, उड्या मारीत जाणें २ अक्रमिक किंवा उडाणटप्पूपणाचा अभ्यास [सं ]

चक्रावळ—स्त्री घोड्याचा रोग, यानें घोड्याच्या पायाच्या तळावरचा मेंदा फुटतो, कठिण होतो आणि चेपला असता दुखतो. –अश्वप २ २५८

चक्री—स्त्री १ वेदपठण, पुराण, कीर्तन, भजन, गायन याचा एकत्र जमून समवयस्कं, समानशील व्यक्तींनीं केलेला कार्यक्रम २ पागोट्याच्या विणीवर चक्राकार एकावर एक पट्या बसवून करतात ती रचना, पागोट्याचें चाक (चक्राकार वेढे असणारें), चाकाप्रमाणें बाधलेलें पागोटें ३ एक खेळणें, भिंगरी ४ सभोंवार कळ्या व मध्यें एखादें फूल असा पुष्पगुच्छ, फुलाचा तुरा पागोट्यावर अलंकार म्हणून लावतात ती ५ परपरा ६ (व ) पाढरें अगर इतर रंगाचें ढागर ७ बटाट्यातील एक रोग. ८ (गो ) चकली (खाद्य) ९ समुदाय, मडल, कपु [स चक्र] (ग्राम ) ०उडविणें–उपहास करणें, छि थू करणें, टोमणा मारणें, छद्मी भाषण करणें, (एखाद्याची) फजीती करणें ०करणें–१ उपहास करणें २ परस्परात दाडगाईनें किंवा धिंगामस्तीनें (एखाद्याची) ओढाताण करणें ०गुंग करणें–गुंगविणें–उतरणें–भुलविणें–१ (चक्री=अक्कल) एखाद्याच्या पगडीचा–पागोट्याचा अगदीं पुढचा भाग (म्हणज अभिमान, शौर्य निदर्शक) ओढून काढणं किंवा त्यास गोंधळात पाडणें, फजीत करणें, नक्षा उतरणें २ (ल ) लाथ लाथ बुक्का, डोलाचीं, आदबतचीं वाक्यें जिरविणें, पोल पाडणें, एखाद्याचा नक्शा, तोरा उतरविणें, मानहानि करणें, कान उपटणें ०गुंग होणें–भुलणें–उतरणें–गोंधळणें, आशाला हाणें, खुरणे किंवा कुंठित होणें, अक्कल गुंग होणें. ०फिरविणें–पगडी फिरविणें १ पागोट्याचा चक्रीचा पाठीमागचा भाग पुढें आणून दोन हात करण्यास अगर लढण्यास सिद्ध होणें २ बाजू बदलणें, विरुद्ध पक्ष स्वीकारणें सामासाखर– ०झोंप–स्त्री जींत निजणारा वाटोळा वाटोळा फिरतो, लोळतो अशी झोंप. ०दार–वि १ पुढें चक्री असणारें (पागोटें मुलाची टोपी) २ वाटोळें, चाकासारखें ०पुराण–न एकाच बैठकीत एकामागून एक असे अनेकांनीं सांगितलेलें पुराण चक्री पहा [स चक्र+पुराण] ०परिषद–स्त्री जींत प्रत्यक्ष सभासदाला आपलें म्हणणं स्पष्ट पणें मांडता येतें, प्रत्येकजण सारख्या योग्यतेचा गणला जातो अशी सभा (इ ) राऊंडटेबल कॉन्फरन्स

**चक्री**—पु कुभार 'दे येक म्हणतां कोरी घागरी । हास्य करोनि चक्री अतरीं। पाच रुपया याल जरी तरी। पहा देईन सुदर वदे।' –दावि २३५ –वि चक्र धारण करणारा (विष्णु, कुभार) 'दिनमणि तव नोडे चदसा रग चक्री' –मुरामाभरण्य १०१

**चखणें, चुंखणें**—(प्रा ) चोखणें पहा [ हिं चखना ]

**चखांदळ**—चकदळ पहा

**चखोट**— वि स्वच्छ, निर्मळ, शुद्ध, उत्तम, सुरेख, छान, चागला 'गोपोच्छिष्टा वळला वळला कां वासुदेव न चखोटा।' –मोउद्योग ७ ७० [स चोक्ष=शुद्ध, निर्मळ, का चोक्कट] ०तेल-न (तजा ) गोड तेल, तिळाचें तेल

**चंग**—पु १ अल्गुजासारखें एक वाद्य 'हातात घेऊन चग रग जमवीला।' –हापो १५ २ मोठा डफ ३ (ल ) घुगरा सारखे वाजणारें कडें ''हरिनाम वाजवि चग, अहो चग।' –देप ६६ ३ (ना ) वावडी उडताना फडफड वाजावयासाठीं तिला कागद कातरून त्याचा जो फरारा लावतात तो, पतगाची शेपटी ४ चगकाचनी गजिफाच्या आठ रगातील पहिला रग ५ घुगुर माळ, चगाळ, बैलाचा एक दागिना (गु ) घटा –खाला ५१ ६ (फुकीनें ? ) पैज, प्रतिज्ञा ( चग बाधणें या प्रयोगावरून अर्थ बनला असावा ) [ का ] (वाप्र ) ०बाधणें-१ ( पचग बाधणें असा मूळ प्रयोग असेल ) उद्युक्त होणें, कबर बाधणें 'तें काम करण्यास त्यानें चग बाधला' २ पैज, फुशारकी म'रणें, खात्री॰ पूर्वक सागण, ठासुन प्रतिज्ञा करणें 'एखाद्या मर्त्यानें मी अमुक वर्षे जगेन असा चग बाधणें हा केवळ मूर्खपणा होईल' ०चाळ गणें–चौर्य विद्या इत्यादिकाचा अंश, वाणा वाळगणें सामा-शब्द- ०कांचनी-वि. गजिफाचा एक जुना प्रकार. या गजि फाच्या जोडातील आठ बाजूची नावें चग, कांचन बरात, कुमाश, ताज, गुलाम रूप व शमशेर याहून दशावतारी गजिफा हा निराळा प्रकार आहे ०चिखलत –चिलत –चिल्लत –चिल्लद्–चिल्ली–चल्ली–स्त्री गजिफांच्या खेळातील कांहीं विशिष्ट सज्ञा खेळात शेवटीं शवटीं दोन रगाचीं दोन पानें राहिलीं असता खेळणारानें एक पान उतार्णे पडावें म्हणून दोन पान जुडून वर उडविण्याचा प्रकार चचल पहा ०राणी–स्त्री १प्रमातील स्त्री, प्रियपात्र, अतिपरिचित स्त्री. २ चग डावांतील राणी

**चग**—वि. १ चपळ, चलाख, चुणचुणीत, हुशार, तैल-बुद्धीचा (मुलगा) २ चागलें, सुरेख [स चग, प्रा द चग, तुल० का चन्नु–चम्ग ]

**चगडग**—स्त्री १ चचाट, खटाटे, उलाढाल, जोखमीचें क॰ २ धाडमेटी करणें, भानगडी उत्पन्न करणें साहसाचा व्यापार, उदीम. ३ (क ) भव्यवस्था, गोंधळ ( काम, हिशब वगैरेचा ) [ ध्व ] चगडग्या–वि चगडग करणारा, कचाटें उडविणारा, चळवळ्या, उलाढाली करणारा, साहसी, व्यापार करण्यांत धाडसी [ चगडग ]

**चगण्या**—स्त्रीअव. (बायकी) भाव, डौल, दिमाख, मकड, फुर्रा, मिजास ( क्रि० करणें, लावणें, आटवणें, जडणें ).

**चगदळ–दाळ–ळें, चगदळी**—चकदळ, चकदळी पहा

**चगदा**—चवदा पहा.

**चगळणें**—उक्रि चघळणें पहा 'चगळितो गिळितो धन वदता।' –र ५८

**चंगळ, चगळपट्टी, चगळवटी, चंगळा**—स्त्री १ वैपुल्य प्रचुरता, भरपूर, समृद्धि रेलचेल, लयलूट यदा आम्ही खूप फटाके घेतले आणि मुबईहूनहि माल त्यामुळें घरांत फटा-क्यांची चगळ झाली' २ समृद्धता, भरभराट, चलचलाट, चालता काळ, सधनता, सुबत्ता, वैभवाची स्थिति ३ परिपूर्णता, तृप्ति ४ चैन, मजा हिंदुस्थान म्हणजे आपल्या तरवार बहा-दर पूर्वजानीं एक चैनीची जागा आपणास करून ठेवली आहे तर्थे मनास येईल तशी चगळ करावी' –नि ७५६ ०उडणें–लाट, लयलूट, रेलचेल होणें

**चंगा**—वि. क्रिवि १ चागला, निर्मळ, शुद्ध, पवित्र 'मन असे चगा तर काथाटींत( काखोटींत–काठेवाडात) च गगा' २ चांगली, रुचकर, उत्तम, चखोट 'आजची भाजी बहुतच चगा झाली होती' [स चग, हिं चगा, का चगु=बरा ]

**चगाराणी**—चंगराणी पहा

**चंगाळ–ळें**—न (व ) घोड्याच्या बैलाच्या गळ्यांत, गाडीच्या भोंवतालीं लहान घटाची माळ बाधतात ती, घुगुर माळ चग अर्थ ५ पहा [ चग+आली, म आळें ]

**चंगाळ–ळी**—स्त्री १ चगळ, वैपुल्य, समृद्धि २ परिपूर्ति, रेलचेल, शिसारी, अतितृप्ति चगळ पहा

**चंगी, चगीभगी**—पु १ दुर्व्यसनी, बदफैल, ढगी 'वेद शास्त्र पूर्ण निपुण । जाऊनि ब्राह्मणगण। चगीभगी मूढ पूर्ण। तुळसी आज लाधले।' २ अफू, भांग, गाजा वगैरे व्यसनांच्या अधीन, गजड 'हुपिसर पदरीं चगीभगी।' –ऐपो २१८ [ गु चगी= अफू+भाग ]

**चगेल**—वि १ (खा ) वेडा 'त्या चगेलाच नांव नको घेयना' २ चावट. –भात्रै ७ १ ते ४ [ चघळ ? ]

**चघळ**—न चघळून बाहेर टाकलेला, तुडविलेला चारा( जना वरांनीं, गुरानें खाल्ल्या चाऱ्याचा अवशिष्ट भाग, पाचोळा, गळाटा ( कोंकणात पुल्लिंगी योजतात ) –वि १ एकाच गोष्टीचा घोष लावून कपाळ उठविणारा, तोंडाची एकसारखी टकळी चाल विणारा २ असबद्ध तात्पर्य नाहीं असें बोलणारा ३ शुष्क, पाल्हाळिक, नीरस ( भाषण ). ४ सुस्त, मंगट, मद, जडबुद्धीने

करें जाणारें ( काय, गोष्ट ). ५ औदासिन्यपूर्ण, एकांगी ६ एकमार्गी, एकलकोंडा ( इसम ) [ स गॄ=खाऊनबाहेर टाकणें चघळणें पहा ]

**चघळ**—वि रुंदावल्यामुळें, उघडल्यामुळें, वापरल्यामुळें, मोठें केल्यामुळें सैल ढिला, शिथिल, पोकळ ( खिळा, भोंक, कुलुप यत्र, जोडा, कपडा इ० ) [ हिं चकला=रुंद ]

**चघळणें**—अक्रि खाण्याचा पदार्थ तोंडातल्या तोंडात घोळवणें, फिरविणें, चर्वण करणें, रवथ करणें [ स गॄ-जिगल-( सप्तत )-चिघल-चघळ –भाअ १८३२ हिं चिकलना, म. चावणें व घोळणें ]

**चघळचघळ चघळचुघळ**—नपुस्त्री १ गुरांनी अर्धे वट खाऊन अवशेष राहिलेला, तुडविलेला चारा, वैरण, धाट्क, गुरानी खाऊन उरलेला चारा ' त्यात घे घालुन चघळाचुघळाचा भारा '–तोव ९२ २ ( ल ) मूर्खपणाचें भाषण, वटवट, बडबड, निरर्गल प्रलाप [ चघळ द्वि ]

**चघाळ**—चघळ पहा

**चंघी**—वि (प्रां) वेगवान् –शर [ स जंघा ]

**चंच**—वि १ धूर्त, हुशार दक्ष, वाकबगार, चतुर २ तरुख, चपळ, चलाख तरतरीत चचिवाग पहा [स चच्=उडया मारणें, चपळाई करणें, चचु=हुशार हिं चम्या=ते जातात, लॅ स्युक्तरि]

**चंच**—पु ( कों ) कसुन घेतलेली व सूक्ष्म अशी तपा सणी, परीक्षा, बारीक तपासणी, चौकशी

**चंचकारी**—स्त्री गोडगोड भाषण, खुशामती बोलणें ? ' धरूनि चचकारी सुपारा सगट । करूनिया गट्ट धीट जालों । '–दावि २४० [ चच ]

**च(चं)चणें, चचकरणें, चंचरणें**—अक्रि १ (सांकेतिक) मरणें ' चचसा नाहीं म्हणती म्हातारा । '–अमृ ७२ २ कामा वरून, नोकरीवरून दूर होणें, बडतर्फ होणें चसणें पहा **चंची पडणें**–मरणें –खिपु [ तुल० प्रा चच=एक नरक ]

**चंचनी**—वि एक घर हिरवें, एक काळें उभार व आडवणहि एकघर हिरवें व एक काळें किनार कोणत्याहि प्रकारची रेशमी असें ( लुगडें, वस्त्र )

**चंचल**—वि १ हलणारा, सरणारा, कापणारा, डगमग णारा धावणारा २ अस्थिर, अधीर लहरी, तरल ३ क्षणभगुर, अशाश्वत क्षणिक, फारवळ न टिकणारें, उडून जाणारें नाहींसें होणारें ' गधक व फास्फरस हे दोन चचल अप्रवाही पदार्थ आहत ' ४ नाचरी, चाळक, स्वैरिणी, स्वेच्छाचारी ( स्त्री ) ५ चपल चलाख, तलख [ स चचल, चल्=हलणें ] **चच लता**–स्त्री १ अस्थिरता, अनिश्चितता, अशाश्वतता २ सक्रमा वस्था ' इग्लडच्या इतिहासाचा हा काळ पराकाष्ठेचा चचलतेचा असल्यामुळें नाटककारास आपल्या नाटकांत गुफण्याजोग्या पुष्कळ गोष्टी त्याच्या डोळ्यांपुढें घडत असतील '–विकार **०चित्त**–वि क्षणिक बुद्धीचा, लहरी, अस्थिर मनाचा, कमकुवत [ सं ] **०पणा**–पु चचलता, अस्थिरता, स्वैरपणा. ' घोलण्यांत चचलपणा असण्याचें कारण विचारात चचलपणा असतो. .तो कृतींतही उतरतो '–शिवपावित्र्य ७०

**चचल**—स्त्री (गजिफा) अखेरीच्या वेळीं उतारी करणारा जवळ राहिलेल्या रगाचीं पानें दोन असुन त्याच्या वरील दोन हुकुम दोघाकडे असल्यास उतारी करणारानें दोन्हा पानें एकमे कास जुळून वर फेंकिलीं असतां जो रग उताणा पडेल त्या रगाचा हुकुम ज्याकडे असेल त्यानें खेळावें ही पानें फेंकण्याची क्रिया, चगचिखलत पहा

**चचविणें**—उक्रि १ दग्यानें, विष घालून किंवा दुसऱ्या कोणत्याहि निंद्य व गुप्त उपायानीं एखाद्यास ठार मारणें, फस वून मारणें २ एखाद्याचा नाश, बडतर्फी घडवून आणणें ३ (सांके-तिक ) वाट लावणें, निकाल लावणें, करणें [ म चचणें, चसणें ]

**चंचळ**—वि चचल पहा 'चचळीं चचळ निश्चळीं निश्चळ ।' –तुगा ३८६५ ' नाना शरीरीं चचळ । अखड करी चळवळ । ' –दा १५ ५ २४ **०वेळ-ळा**–स्त्री दिवसाच्या किंवा रात्रीच्या ज्या तीस घटका त्यांच्या आठ विभागापैकीं एक वेळ पहा

**चचळाकारी**–वि चचाळाकार ' चचळाकारी तितुकी माया मारिक जाय विलया । '–दा ११ २ १ [ चचल+आकार ]

**चंचा**—स्त्री १ गवत, काड, पेंढा किंवा भुसा भरून ठेविलेली मनुष्याकृति बुजगावणें २ ( ल ) रोडका, अशक्त, हातपाय अधू किंवा काडीसारखे आहेत असा माणूस, पेंढयाच्या माणसा-प्रमाणें हातपाय निर्जीव, लु० असणारा मनुष्य [ स चचा ]

**चचाट**—न अवडबर, स्तोम 'का चचाट करणें नियमाचे.'

**चचिवाग, चंचियाज, चचुवाग**—वि १ हुशार, चतुर, कर्तबगार, शहाणा, दक्ष २ चपळ, तरुख, चुणचुणीत [ चच ]

**चची**—स्त्री सुपारी, कात, लवग, पान इ० विडयाचें सामान ठेवण्यासाठीं निरनिराळे चढते कप्पे असलेली पिशवी ही वळकटी करून गुडाळता येते बटवा 'मार्मिक रावाच्या चचीतला हलुच एक बार भरला '–नाकु ३ ३५ [ स चचा=वेताची वगैरे विणलेली टोपली ? स चच पाच बोटें रुंदीनें माप तुल० सच ? ]

**चचु चचुपुट**—स्त्रीन चोंच, पक्ष्याचें तोंड [ स ]

**चंचुप्रवेश**—पु अल्प शिरकाव होणें, किंचित पगडा बसणें, थोडीशी वाट वाव मिळणें थोडा हात शिरकणें त्याचा बदो-बस्त चागला यामुळें राज्यात कोणाचा चचुप्रवश होत नाहीं ' [ म चचु+प्रवेश ] म्ह० चचुप्रवेशे मुसलप्रवेश =चोंच खुपसण्या इतकी जागा मिळाली पुरे कीं हळू हळू मुसळ जाण्याइतकी

मोठी जागा करतां येते प्रथम थोडासा अवकाश मिळाला म्हणजे तेवढयावर जास्त जागा मिळवितां येते, भटाला दिली ओसरी भट हात पाय पसरी या अर्थी **चंचुप्रवेश करणें**-थोडासा हात घालणें, आत किंचित् शिरकाव करणें

**चंचू**—वि निष्णात, हुषार [ स चचु=प्रख्यात, हुशार ]

**चचोर-री**—चिचोर-री पहा

**चच्कारा**—पु ( कों ) सुभाषित

**चट**—पु श्राद्धसमयीं आमंत्रित ब्राह्मण हजर नसला किंवा ब्राह्मण मिळाला नाहीं तर त्याऐवजीं अर्चन, पूजन करण्याकरितां ब्राह्मणस्थानीं ठेविलेली दर्भांची प्रतिमा, दर्भ. ' का एकुलत्या एक पोरीचे कन्यादान तिसऱ्याकरवीं चटावर करून घेऊ ? '—भा ६९ [ स ] ०श्राद्ध-न ब्राह्मणस्थानीं चट ठेवून केलेलें श्राद्ध

**चटावर**-चट पहा

**चट**—स्त्री १ चव, आवड, आस्वाद, गोडी २ चटक, नाद, सवय, गोडी लागल्यामुळें चैन न पडणें, व्यसन ' अखंडित चटे त्यानीं लावियेला कान्हा । आवडे तयाचे संकल्प वाहाती मना । ' —तुगा १३२ [ स चाटु म चाटणें, का. चग ]

**चट**—स्त्री. पातळ थर, गिलावा रंग, सफेती इ०काचा पातळ हात लेप ( क्रि० देणें ) [ म चाटणें ]

**चट**—वि चावट, चपळपणाची ( गोष्ट ) ' ऐकोनिया चट गोष्टी । येर धावती येरापाठीं । '—एभा ५ १८७

**चट**—क्रिवि १ एकदम सर्व, सारेच, निःशेष असे, त्वकर, एकूणएक, एकंदर, साफ, झाडून ( क्रि० जाणें, खाणें ) ' या घरचीं चट माणसें यात्रेस गलीं आहेत ' ' आले होते योगी देवर्षि महर्षि सिद्ध चट सारे । '—मोभनु ५ ४०. २ भक्षणकरून, खाऊन, चट पहा ( क्रि० करणें ) 'सद्दर्शनचि सुदर्शन करि गट चट कटक अतरायाचें ।'—मोआदि १० ८५ [ म झटिति चटकन्, ध्व]

**चट**—क्रिवि १ चटकन पहा २ आपसुक आपण होऊन ' बोलावू नकोस, मागाहून चट येईल '

**चट**—वि ( माळवी ) वस्ताद [ हिं चट=कृपण ]

**चटई**—स्त्री कळक, खजुरी, शिंदी इ०काच्या पानाची किंवा काव्याची केलेली हातरी, अथरी, विविधप्रकारच्या गवता पासून रंगीबेरंगी व तद्वत् वेळ्या सतरंज्या बनवितात त्याप्रत्येकी [ स झट्=एकत्र होणें गुतणें, हिं ] ०भरणें-( चांभारी ) चटईची वीण घालणें ०चप्पल-स्त्री चामडयाच्या वाद्या चटई-सारख्या विणून केलेली चपलाची एक जात, वहाणा **चटईची घाट**-स्त्री चटईच्या विणकरीसारखी घडण असणारा स्त्रियांचा एक दडात घालावयाचा अलंकार दागिना, हातरीच्या वाकी

**चटक**—पु चिमणी, चिमणा, पक्षिविशेष ' श्येनासीं धृष्टपणें गाठि बळें घालितां जसा चटक । ' —मोद्रोण १० ८२ [ स चटक ] ०पाक-पु चिमण्यापासून तयार केलेला एक औषधी पाक, हा फार पौष्टिक असतो [ स ]

**चटक**—अ अतिशयितता, आधिक्य दर्शविणारा प्रत्यय पिवळा या शब्दास जोडून उपयोग पिवळा चटक=पिवळाजरद

**चटक**—स्त्री. १ रुचि, गोडी, चट, अफेक, जडलेली आवड, नाद, चव ( क्रि० लागणें ) ' कादंबऱ्या वाचण्याची ज्यास एकदां चटक लागते त्यास मग दुसरें काहींच वाचावेसें वाटत नाहीं ' —नि ७५ २ दुर्व्यसन, खोड, रीत, बोलणेंचालणें इ० गोष्टींतहि काही विशिष्ट सवय ' याला बोलतांना 'जेते कीं नाहीं' म्हणायाची चटक लागली आहे ' ३ प्रिय वस्तूच्या वियोगामुळें व ती वस्तु पुन्हा मिळावी अशी उत्कंठा लागल्यामुळें होणारें दुःख, मनस्ताप, चटका, हुरहुर ( क्रि० लावणें, लागणें, बसणें ) ' चटक लाउनी सोडावें । भल्या मनुष्यासी । '—दा १९ २ १३ 'गुरुनें चटक लाविली मोठी ' [ चट ]

**चटक**—स्त्री तडफ, हुशारी 'जगामध्यें जर मनुष्याच्या अंगात थोडी चटक नसेल तर नुसत्या ज्ञानाचा तादृश उपयोग नाहीं '—मौनयौवना ( आवृ २ ) १४३ [ ध्व चट् ]

**चटक**—स्त्री छान [ स चटुल ] ०दार-वि छानदार, लज्जतदार, स्वादिष्ट, रुचकर

**चटकचटक**—क्रिवि १ स्त्रियांच्या पायातील जोडयाच्या आवाजाप्रमाणें २ झपझप, चटचट, भराभर, धडधड, झरझर ( क्रि० चालणें, धावणें, बोलणें ) [ ध्व ]

**चटकचांदणी-चांदिणी**—स्त्री ( काव्य ) १ सुंदर, नखरेबाज स्त्री, चित्ताकर्षक, मादक, नखरेल तरुणी, नाजुक स्त्री ' हीं रान अशी चटकचांदणी खाशी । ध्या बहार उठा किति घालु हात हनवटीशी । '—प्रला २ ( सामा ) अति सुंदर तरुणी, खुपसुरत ' दोघीहि रूपानें चटकचांदण्या असतील, पण एकीस माणीक मोत्यानीं आपणांस लेवविण्याची हौस असेल (दुसरीस नसेल) ' —नि ७७८ [ म चटक+चांदणी=नक्षत्र ]

**चटकचांदणें**—न १ स्वच्छ किंवा टिप्पूर पडलेलें चांदणें २ शुक्रप्रकाश, शुक्राचें चांदणें

**चटकणी**—स्त्री ( व ) दारें, खिडक्या इ० काच्या फळ्या वाऱ्यानें लागू नयेत म्हणून त्यास लाविलेली अटक, चिमणी ' चटकणी मोडली म्हणून खिडकी वाऱ्यानें लागते ' [ ध्व ]

**चटकणा, चटकाणी**—स्त्री १ चापट, चपराक, तडाखा, टोला, फटकारा, फटका ' त्याला खोटें बोलल्याबद्दल बापानें चांगली चटकणी ठेवून दिली ' २ चाबकाचा तडाखा, आघात [ ध्व चट, का चटुक=तडाखा, फटका, हिं चटकना ]

**चट-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि १ चाबूक छडी मारल्याच्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन, सपकन् कडकन्,

ताडकन् २ एक चुटकींत, उठाउठीं, चपकन्, पापणी लवते न लवते तोंच, झटक्यास, झटपट, त्वरेनें ( क्रि० जाणें, येणें ) [ ध्व स चट् कृत्वा, –भाभ १८१२ का चटकने ]

**चटका**—पु (विणकाम) सुताची तारेची गोल गुडाळी, लड

**चटका**—पु. १ दाह, भाजणारी उष्णता, तल्खाई, प्रखरता, ( सूर्य, अग्नि किंवा तापलला पदार्थ यापासून उत्पन्न होणारी ), ताप २ कल किंवा तिखट पदार्थ खाल्ल्यानें घशाशीं होणारी आग, अशी आग होण्याचा गुणधर्म ( क्रि० लागणें ) ३ पाळल्यामुळें किंवा तिखट पदार्थ खाल्ल्यामुळें होणाऱ्या तात्कालिक वेदना, दु खावेग. ( क्रि०बसणें ). ४ पोळल्यामुळें पडलेला डाग, जखम ५ अत करणाला होणाऱ्या वेदना, मनस्ताप, आधि, चरका, सताप, मानसिक यातना, चुटपूट, रुखरुख (क्रि० बसणें, लागणें). 'मी सोडुनि आलों तटका। तों जिवा लागला चटका। –मध्व २२० ६व्यगोक्ति, औपरोधिक मर्मभेदी भाषण, प्रतिक्षेप, टोमणा, टोला, जिव्हारी लागणारी व झोंबण्यासारखी टीका. ( क्रि० मारणें ) ७ काळजी, चिंता, आस्था, कळकळ, पर्वा, दरकार 'मनासि चटका म्हणुनी तव पदीं लगबग येत बालिका। ' –स्वयवर नाटक ८ विरह, दु ख, हुरहुर, एखादी वस्तु परत मिळण्याविषयीं लागलेली उत्कठा, चटक, चुटपूट, ध्यास, छद, तहान (क्रि० लागणें, लावणें, बसणें ) ' च च चटका लागला पावसी पद उच। ' –दावि २९३. 'लोभ हरीचा लटका.. लावुनि गेला चटका ' 'तो माळी दादल्या केला। तो विहिरींत पडून मेला। त्याचें काहीं वाटत नाहीं मला। सख्याचा चटका लागुनि गेला।' ९ साडसानें दिलेला डाग, चरका (क्रि० देणें, लावणें) 'बसतेचि चटक लावीत। शुद्धावरि मुखत्वें।' १० *मोरचूत वगैरे लावून सोनें अग्नींत तापविणें* ( क्रि० देणें ) ११ ( जहल्लक्षणेनें ) या कृत्यास लागणारी साधनसामुग्री, द्रव्य साहित्य, साधनीभूत पदार्थाचा सच १२ व्यापारात ठोकर, तोटा, धप्पड, अद्दल ( क्रि० बसणें, लागणें ) ' जामीनकी विषयीं मला असा चटका बसला आहे कीं पुन्हा जन्मांत कोणास जामीन राहू नये ' १३ मिऱ्याचें तिखट तिखट चटणी, विशेषत हरभऱ्याची डाळ वाटून दहीं व ओल्या मिरच्या घालून करतात तो १४ (को ) खमग काकडी १५ ( राहिलेल्या मर्यादेसाठीं ) चटक, चरका पहा [ सं चट्=जखम करणें, म चाटण, भाजरणें, घसटून जाणें] म्ह० ( व चटकामटका तोंडाला फाटकें घातर गाडीला= खायला चम मीठ हवें व अगावर फाटके कपडे चालतात अशा माणसाला म्हणतात

**चटका**—पु चाळा चालेल जागता चटका। हा असाच पटकाचटका। ' –पाळणेसग्रह पृ १७ [ ध्व चटक ]

**चटका**—वि. चोर, लबाड, ठक. 'चटक गावगुड गारडी। येक आणिती कावडो। ' –दावि ४७४ [ चट् करणारा ]

**चटकावणें**—सक्रि १ फटकारा लगावणें, सटकावणें. २ ( माण ) चावणें, लचका तोडणें, तुल० ( गु ) चटका मारणें= चावणें [ चटकणी ]

**चटकी**—स्त्री. १ हाताचें एक बोट व आंगठा याच्या साहाय्यानें जो ध्वनि होतो तो, चुटकी पहा २ चकाटया, गप्पाष्टकें ( क्रि० पिटणें, मारणें ) [ ध्व ] **चटक्यांचा(चे)मांडव**–पु एक बाई आजारी पडली असता तिनें दुखण्यांतून बरें होण्यासाठीं देवास एक मांडव घालीन असा नवस केला तिनें आपला नवस प्रत्येक खावागणिक चुसल्या चुटक्या वाजवून पुरा केला या वरून काहीं एक मोठया कार्याविषयीं उद्योग न करता चुटक्या वाजवून त्यासबधीं बलबाताच्या गोष्टी सांगणें, रिकाम्या आढ्यतेचे, पोकळ डौलाचे, दिमाखाचे, बडेजावीचे, बढाईखोर शब्द, भाषण ' तुला चटक्याचे मांडव घालायला काय होतें पण जातीन काम करावें ह निराळें ' आळशी, चेंगट व चाल्हाळ लावणाऱ्या नोकराला लावतात. ' असे चटक्याचे मांडव घालणारे पुष्कळ असतात ' म्ह० चटक्याचा मांडव होत नाहीं =एखादें मोठें कार्य किंवा व्यापार, वेळ आणि मेहनत याशिवाय होत नाहीं

**चटकोरा**—पु ( व. ) लाकडी मोठा टाळ; एक गोंडी वाद्य

**चटक्याचग**—पु. चग वाद्य वाजविणारा ' भाट बैकाटी टोलीके। चटक्याचंग। ' –दावि ४७४ [ चटक+चग ]

**चटक्याचटक्यांत, चटक्यापटक्यात**—क्रिवि. चटकन्, हां हां म्हणता, निमिषमात्रांत, एका पळात, चुटकीसरशीं [ ध्व चटक+पटक ]

**चटचट-टां**—क्रिवि १ चाबूक, कारडा, छडी इत्यादि *काच्या हाणाऱ्या ध्वनीप्रमाणें ध्वनि होऊन, चटकन् पहा* ( क्रि० लागणें, वाजणें) ' चटचटा चटक्या वाजती। ' –दा १८९३ ' पायीं खडावा चटचट करिती। ' –सौभद्र २ एखाद्या वस्तूच्या तटतटण्याचें अगर ठेकूण, पिसा, डास वगैरे चावण्याचें, उडण्याचें अनुकरण होऊन ' त्या खोलींत चिलटें चटचट चावतात ' ३ एकदम एखादा पदार्थ जळल्या-भाजल्यावर जो चटचट आवाज होतो त्याप्रमाणें ( क्रि० भाजणें, लागणें ) ' पाय चटचट भाजतात ' ४ (सामा ) त्वरेनें, झट्कन्, लगबगीनें ' मुलांनों जेवण चटचट आटपा ' [ ध्व चट ]

**चटचटणें**—अक्रि १ चटचट आवाज करणें, खतखतणें ( एखादी चरचरत, तटतटत, फुरफुरत, असलेली वस्तु, पदार्थ ) ' झुणका चांगला चटचट् लागला म्हणजे उतर ' २ उन्हात ताप त्यानें भाजून करपून निघणें ' अग चटचटतें आहे ' ३ (कर ) आवळणें. [ ध्व चटचट ]

**चटचटणें**—अक्रि कमी पडणें, चणचण होणें, उणीव पडणें, टचाई होणें. ' आणखी दोन महिने गेले कीं गावच्या

पिण्याच्या विहिरीचें पाणी चटचट्ट लागतें म्हणतात ' -खेया २१ [ ध्व पाणी नसल्यामुळें ओठ्याचा होणारा आवाज ]

**चटचटीत**—वि १ न शिजलेला, मऊ न झालेला, अपक्व, टचटचीत, कच्चा ( भात, सांजा, धान्य ) २ तार तारा निघण्या इतका दाट झालेला ( उसाचा रस ), चिकचिकीत, चिचगिचीत [ टच+टचीत ]

**चटचटीत**—वि १ लखलखणारें, चकचकणारें ( हत्यार, पातें ) २ गुळगुळीत गुळगुळीत ( हजामत ), किंवा तासून काढलेलें (गद्द डोसकें) ३ भडक, गहिरा, दाट, झकाकणारा, लकाकणारा ( रंग ) ' चटचटीत पिवळा, पांढरा, काळा, तांबडा, हिरवा, रंग ' [ स चट्टु चटुल ] '

**चटणी, चटनी**—स्त्री. १ मिरच्या, कोथिंबीर, खोबरें, घालून जें तिखट किंवा तोंडीलावणें करतात ती २ ( ल ) धस धस तोडलेली, फोडलेली, मोडलेली अवस्था, मोडतोड तुकडे तुकडे झालेली, छिन्नभिन्न, विकलांग केलेली, चेंगरलेली अशी स्थिति, चेंदामेंदा, चकाचूर, पुरा नाश ' या शमर मनुष्यांनीं एका क्षणांत त्याचे पांचशें माणसांची चटणी करून टाकली ३ पराजित, अपमानीत, पाडाव केलेली भावावलेली गोंधळलेली स्थिति, ४ ( व्यापक ) तिखट, मीठ मसाले घालून केलेलें तोंडीलावणें, चटका ठेंचा, कांगर, तिळकूट ६ कोणताहि चव अगर रुचि वाढविणारा खाद्य पदार्थ, वस्तु, [ स चट्=फोडणें, हिं चटनी, सिं चटिणी ]

**चटपट**—स्त्री १ कांहीं अनिष्ट किंवा नुकसान झाल्यामुळें जी अंत करणास दु खाची टोंचणी लागते ती, चिंता, काळजी हुरहुर, खंत चुटपुट पहा ' चित्तीं चिंतेची चटपट । ' -मुसभा १६ १३७ ' चटपटी लागली ससारी । ' -दावि ८३ २ उत्कंठा, छंद, सोस, ध्यास, चटका ( क्रि० लागणें ) [ चुट पुट ]

**चटपट**—स्त्री १ (पत्त्यांचा, गंजिफांचा हात, दस्त) भ्रतवार लावणें, पानांची हातातल्या हातात गल्लत करणें, पानें लावणें २ चपळाई, चापल्य, तल्लखपणा चलाखी ३ वस्तऱ्याला पला टण्यावर घासून धार लावणें ४ धार सारखी करण्याचें कातडें [ ध्व चट द्वि ]

**चटपट-टां**—क्रिवि १ एका चुटकीसरशीं, लवकर झट कन, सत्वर, त्वरेनें जलदीनें, घाईनें, क्षणक्षासरशीं, शीघ्र ' आवरता लागतां चटपट । नामस्मरण करावें । ' -दा ४ ३ ६ [ ध्व चटपट सिं चट्पटि हिं चटपट ]

**चटपटणें**—अक्रि तडफडणें, चुटपुट लागणें, व्याकुल बेचैन होणें, दु खाची टोंचणी लागणें, हुरहुर, काळजी लागणें, चुट पुटणें पहा [ चटपट ]

**चटपटणें**—न ( को ) भिजलेले चणे परतून जें तोंडीलावणें करतात तें [ चटचट ]

**चटपटी-ट्या**—वि १ तल्लख, चलाख, हुषार, तरतरीत, चपळ २ कचाटणा, रोकठोकखोर, उलाढाल्या (व्यापारांत वगैरे) [ ध्व चटपट ]

**चटपटी-ट्या**—वि एखादी गोष्ट मनास लावून घेणारा, चिंताग्रस्त, चुटपुट लावून घेणारा, काळजी करणारा [ चुटपुट ]

**चटमट**—न (गो ) ( हाडी चालवितांना ) बांबू मारण्याचा एक प्रकार

**चटम्**—न ( म गवंडीकाम ) पडदीच्या चौकटीची मधील लाकडें

**चटाई**—चटई पहा

**चटाचट-टां**—क्रिवि चटचट पहा ( चटचट शब्दापेक्षां या शब्दांत जास्त जोर, अतिशयितता, आवृत्ति आहे )

**चटार**—वि चटोर १ ग्राम्य, पाचकळ, छिचोर, टारगा, अप्रगल्भ, हलकट, छट, सोदा, हलका, अचावचा, अद्वातद्वा भाषण करणारा २ बेढंगी, बदफैली, दुराचारी, विषयासक्त [ स चाटु ]

**चटावणें**—अक्रि चट लागणें १ गोडी, चटक, छंद, लागणें, जडणें २ खोड, सवय, व्यसन, छंद, रीत, पद्धत लागणें, जडणें, पडणें, सवकणें, चरणें पहा [ म चट ]

**चटी**—स्त्री आवड, चट पहा ' वाणीसहि लाउ चटि हरि नाम । ' -मोकृष्ण ४६.११०

**चटी**—स्त्री ( जुमरी ) लंगोट ' पहिलवान चटी नेसला ' [ चड्डी ]

**चटी, चटीपटी**—चढी, चढीपढी पहा

**चटूघटाथ**—पु कृपण, कंजूष माणूस

**चटेल**—वि चट लागलेला, व्यभिचारी 'या चटेलमैनेच्या कोनाऱ्यावर तुम्ही इमारत उभारलेली । ' -तोब ७७ [ चट+ एल प्रत्यय ]

**चटोर**—वि चावट, हलकट, छिचोर चटार पहा

**चटोवटी**—स्त्री ( ग्रां ) चढाओढ बरोबरी, प्रतिस्पर्धा, चुरस -क्रिवि चढाओढीनें, प्रतिस्पर्धेनें, चुरशीनें. [ चढणें+ वाढणें, गो चढीवाढी ]

**चट्ट**—क्रिवि पार, एकदर, सबध, साफ, झाडून, चाटून पुसून एकूण, चट पहा [ प्रा दे चट्ट=चाटणें ]

**चट्टा**—पु १ चुरचुर करणारा, वेदना करणारा भाग,चायटा, खाज सुटणारा पुरळ, दुखापत, क्षत खवद २ वण, डाग क्षत, चिन्ह ( क्रि० पडणें ) ३ (ल ) तोटा, दुर्दैवाचा आघात, कोण त्याहि कृत्यांत धधांत आलेली लागलेली तोहमत, ठेंच खोट नुकसान, तूट, धस, चाट ( क्रि० येणें, बसणें ) ' यदा भाताच व्यवहारात पांचशें रुपये चट्टा बसला ' [ हिं म चाटणें ]

**चट्टा**—पु फडशा, फन्ना, नि शेषपणा –क्रिवि. चट्ट पहा. **०मट्टा**–पु १ खाऊन नि शेष करणें, फडशा, फन्ना, ताव मारणें; सप्पा करणें. 'त्या दोघाचा श्वापदानीं केव्हांच चट्टामट्टा उड विला असता.' –स्वप १९८ २ (ल) नाश, नागवणूक 'मला खाली पाहून माझा चट्टामट्टा करण्याची तुझी इच्छा आहे '–के १० ६ ३० ३ (बायकी) भातुकलीच्या खेळात खेळ सपल्या वर मुली खाण्याचे सर्व पदार्थ खाऊन टाकतात तो 'चट्टामट्टा बाळंभट्टा बाळभट्टाची शेंडी उपटा –मुलींचीं गाणीं [म चट्टा+ मट्टा(मटमट आवाज)]

**चट्टी**—स्त्री (काश्मीर) यात्रेकरू, उतारू लोकास राहण्या-साठीं केलेलें गवताचें छप्पर [तट्टी]

**चट्टी**—स्त्री चट्टा, व्यापारांत आलेला तोटा, नुकसान, हानि, ठोकर, तूट (क्रि० बसणें, येणें, लागणें)

**चट्टी, चणणी**—स्त्री (गो.) चढण

**चट्टीपट्टी**—स्त्री १ अंगावरील भूषणें, वेणीफणी वगैरे शृंगार, शरीरमडन २ छानछोक दिसण्याजोगा रचनाप्रकार, नट्टा पट्टा, फाजील नीटनेटकेपणा, भपकेपणा, चापचोप 'चट्टीपट्टीचा बोभाटा क्षिपरी मारी झपाटा ' [पट्टी द्वि]

**चट्टेकरी**—पु पट्टेवाला, चपराशी, हरकामी नोकर [हिं चटेकार=हाफकास्ट, युरेशियन ?]

**चड**—पु चढ, चढणें पहा –शअ. चढून नतर, ओलांडून 'धाहिती पर्वताचड पैलाड।' –दावि २०१ [प्रा चड] **०घेणें**–(चांभारी) जोड्यास वळण देणें

**चंड**—पु महादेवाच्या मूर्तीजवळ बसविलेली ओबडधोबड दगडी मूर्ति. ह्यास कोणी महादेवाचा गण समजतात, स्कध –वि. १ रागीट, क्रोधिष्ट, तामसी, तापट, उग्र २ (समासात) जोराचा, कडक, तीव्र, प्रखर उदा० चडवात, चडांशु, चडकिरण–कोप–घन–भानु इ० 'चडवातें ज्योति। आहत जैसी।'–ज्ञा २ ३२३ ३ (काव्य) मोठा, विशाल, अवजड, अवाढव्य, स्थूल 'किंवा घालून चडपाषाण।' –रावि २० २७ 'पायीं चडशिळा बाधिती। महा नरकीं बुडविती।' **०किरण**–पु सूर्य 'निशातीं उगव चडकिरण।' [स]

**चडक, चडकण, चडकणा, चडकणी, चडकाणी**—स्त्री १ चपराक, चापट, थप्पड 'तयाकडे पहावें क्षणभरी। चडका हाणाव्या मुखावरी।' –कथा १ १० १४६ 'नातरी जैसें चडकणा। गगन हाणितलें अर्जुना।' –ज्ञा १७ ४१८ 'बळें हाणोनि चडकण। घायें प्राण घेतला।' –भारा किष्किंधा १४. ५२ 'कोपा चढला अत्यद्भुत। धावोनि मारी चडकाणा।' –मु हरिचंद्राख्यान (नवनीत पृ २०३) २ तडाखा, मारा, आघात 'रामा कामाचिये चडके। प्राणी पूर्वदृष्ट न देखे। जाति कुळासि नोळखे। अभिलाष गुणें।' –कथा २ ५ ८३. [ध्व. चड, प्रा दे चडक]

**चड–कन–कर–दिनीं–दिशीं**—क्रिवि चाबकानें, छडीनें मारलेल्या फटकाऱ्याच्या किंवा तडाख्याच्या आघाजाप्रमाणें आवाज होऊन, फाडकन 'चडकुनि मिथिलेसी मारियेला हरीनें।' –अकक २ कृष्ण–कौतुक ६३ [ध्व]

**चंडकाई, चंडावाई**—स्त्री एक दवता 'दवी नामें चड-जाई वाघजाई ... .. चडकाई या दवतांच्या यावतींत, चहूंकडे आग्लाई, मोंगलाई माजून राहिली असुन . .' –खेया ५६. 'तुकाई यमाई नमू चडावाई।' –दावि ११८ [स. चडी, चडिका+म आई]

**चंडगो**—पु. (को.) माशाची एक जात हे आश्विनकार्ति-कात सापडतात

**चडचड**—स्त्री धान्य, द्रव्य इ० कांची दुर्लभता, दुर्मिळता; अडचण, चणचण, टचाई, कमतरता

**चडचड–डां**—क्रिवि चापट, छडी मारण्याच्या आवाजा-प्रमाण आवाज करून, फाडफाड [ध्व चड]

**चडचडणें**—अक्रि १ केस विंचरतांना, हिसडतांना, ओढले असतां केसाचा चडचड आवाज होणें, तडतडणें २ बाजार भाव बेसुमार वाढणें, चढणें, जबर होणें, दर कडाडणें [म चडचड]

**चडचडीत**—वि चटचटीत पहा.

**चडचडीचा**—वि तेजीचा, भरभराटीचा (व्यापार, धंदा इ०) [चडचड]

**चडप्रचड**—वि १ प्रखर, तीक्ष्ण, तीव्र, जालीम, जाज्वल्य; भयकर. २ वरचढ, जास्त प्रखर, एकापेक्षा एक अधिक जालीम; तळख [स चड+प्रचड]

**चडफड, चडफडणी**—स्त्री १ जळफळ, धुसमुस, कड-कडणें, फुफावणें, रागानें दात ओठ चावणें; कातावणें, चडफडाट. 'त्याला सारा दिवस चडफड लागली आहे ' २ तापात होणारी तळमळ, घालमेल, अस्वस्थपणा, काहिली [ध्व चड+फड, तुल० स. चड्=रागावणें]

**चडफडणें**—अक्रि १ जळफळणें; धुसमुसणें, आदळआपट करणें, मोठ्या सतापानें क्रोधाविष्ट होऊन हातपाय आपटणें, कोपास चढणें, रागानें दात ओठ खाणें 'मग ज्ञानें चडफडी। जाणि-वेच खुर खोडी।' –ज्ञा १४.१४९ 'दसतां श्रीमत स्वरूप। दुर्जन जेविं चडफडती।' २ तळमळणें; तापात घालमेल घालणें, माशासारखें तडफडणें, हातपाय झाडणें, पाखडणें जळा वेगळी मासोळी जैसी। चडफडी।' [चडफड] **चडफणें**–अक्रि जळ फळणें, तडफडणें, सतापणें 'स्वर्गसुखें चडफाये।' –भाए १७५

**चडफडाट**—पु (चडफडचा अतिशय) तडफडाट, रागामुळें वेड्यासारखी वागणूक, जळजळाट, रागाचा उद्रेक, संताप, चडफड करणें [चडफड]

**चंडमुंड**—पु १ दोन प्रबल दैत्यांचीं नांवें यावरून २ (ल.) शौर्य, बल विद्या इत्यादि गुणांनीं सारखे विख्यात अशा जोडीला म्हणतात [स चंड+मुंड]

**चडवा-वी**—पु स्त्री पाणी भरलेला माठ ठेवण्याची घडवंची 'पाणी भरून ठेवण्याकरितां चडवी व झाकणसुद्धा माठ वगैरे .. '–ऐरापुप्र ९ ४५१ [चढणें]

**चडवड**—न (प्र) चढवढ पहा

**चंडवात**—पु मोठा, प्रचंड, सोसाट्याचा वारा, वावटळ, वादळ, वायघूळ ज्ञा २ ३२३ 'चडवातें जैसी कर्दळी। उलथोनि पाडू जी समूळीं।' –एरुस्व १५ ११४ [स चंड+वात]

**चडळ**—न. १ (प्रां) भिंतीपासून सुटलेला चुन्याचा, गिलाव्याचा विटाचा भाग, तुकडा, पोपडा, धापुडा 'भिंतीचिया चडळा। पदराचा पुंज वेगळा।' –अमृ ५ ५९ २ जोड, तुकडा 'तें चडळ नस्ता अटराळ। चहुकडे।' –दा १७ १० ७ [स चट्=फोडणें, विभागणें ?]

**चंडातक**—पु ल्हान चोळी, काचोळी 'तदुपरि तिस अर्पी पीत चंडातकातें।' –सारुह ८.७४ [स]

**चंडाल**—पु १ ब्राह्मण स्त्री व शूद्र पुरुष यांपासून झालेल्या संततीच्या जातींपैकीं, संकर, मिश्र जातीच्या अतिशय नीचवर्गापैकीं एक, अत्यज, महार, चांभार, मांग इ० २ (ल) नीच, घाणेरडा, तुच्छ, तिरस्कार वाटण्यासारखा, ज्याचें दर्शन नकोसें वाटतें असा, अति पापी मनुष्य ३ क्रूर, राक्षसी, अधम, मांग हृदयाचा, भयंकर, दुष्ट असा मनुष्य अगर कृत्य –वि. दुष्ट, निर्घृण, अत्यंत वाईट सामासांत चांडाल–कर्म–कृत्य–सेवा इ० [स चाडाल] ०वृत्ति–स्त्री अधमता, नीचपणा, अघोरपणा, भयानकत्व अत्यंत दुष्टपणा, कापट्य, क्रौर्य –वि अधम, नीच, दुष्ट, उलट्या काळजाचा

**चडाव**—पु (गो) १ चढ, चढण २ पायमोजा

**चंडांश-शु**—पु सूर्य 'मैं चंद्र चंडांशु डोळां। दावितासि कोप प्रसाद लीळा।' –ज्ञा ११.३११ –एभा २७ [स चंड+अंशु=किरण]

**चंडाळ**—चंडाल पहा ०खत–न रद्द झालेलें, मुदतीबाहेर गेलेलें, निरुपयोगी खत, रोखा, कर्जफेड झाल्यानंतर कुळाचा सावकाराजवळ जो दस्तैवज राहतो तो ०चौकडी–स्त्री दुष्ट माणसांची जूट, कुचाळखोर लोकांचा कंपू, गट, टोळी, मुठाण, दबाव कंपू

**चंडाळण्या**—स्त्रीअव (व) सटाळ्या, खोड्या 'नाहक आमच्या चंडाळण्या करू नका.' [चांडाल+णी प्रत्यय]

**चंडाळी**—स्त्री १ दुष्ट कृत्य, नीचपणा, विक्षिप्तपणाचीं, राक्षसी कृत्यें, क्रोधाचा किंवा संतापाचा झटका. २ संतापलेल्या मुलाचें मोठमोठ्यानें आरडणें–ओरडणें, उच्छृंखल, बेताल होऊन वेडेवेडे चार करणें (क्रि० येणें) [चंडाळ]

**चंडाळी, चंडाळीण**—स्त्री १ चंडाळ जातीची स्त्री २ (ल.) अत्यंत ओंगळ, किळसवाणी स्त्री ३ तामसी, पाषाणहृदयी, अघोर कृत्यें करणारी स्त्री, कैदाशीण

**चंडिका, चंडी**—स्त्री १ दुर्गादेवता, महाकाली, भवानी. 'सुवर्णाचिया चंडिका। सुवर्णाचुळेंचि देखा।' –ज्ञा १८ ४४४ 'रक्षी चंडी शक्ती। मद्यमांस भक्षिती।' –तुगा ७९१ २ (ल.) (चंडीसारखी) अति रागीट, कैदाशीण, निर्दय स्त्री [स]

**चंडु**—पु. एक शस्त्र 'नागरचंडु आणि सुरी। असिलता बाणधारी।' –कथा ३ ११ ११५

**चंडोल**—पु १ एक गाणारा पक्षी २ (ल) हुषार, बोलका माणूस 'वाटेल त्याच्या मनातील हालचाल ओळखणारे चंडोल पुरुषोत्तमराव पटेल ना।' –इप १० ३ रंगेल, आनंदी प्राणी ४ सैन्याची पिछाडी, सैन्याच्या पिछाडीची रक्षक फौज '(निजामाचा) चंडोल अगदीं बुडविला' –रा १ २५७ 'या वेळीं यशवंतरावांनीं मोठ्या पराक्रमानें कवठ्याचे रानांत मोंगलाचे चंडोलाचा अगदीं मोड केला' –धार संस्थानचा इतिहास ३७ ५ सर्व बाजूनीं व्याप्त करण्याची क्रिया –धार ६ नीटनेटका, टाकटिक्या, छबडा, गोजीरवाणा माणूस. [हिं]

**चंडोल**—पु अफू, विड्याचीं पानें इत्यादिकांचें बनविलेलें मिश्रण, अमली पदार्थ **अफूचा चंडोल**–पु चिलमींत घालून अफू ओढणें (क्रि० करणें) ०खाना–पु. अफू किंवा चंडोल तयार करण्याची किंवा ओढण्याची जागा, स्थळ

**चड्डी**—स्त्री १ कुस्ती, तालीम करतेवेळीं वापरावयाची लांडी विजार, जांघ, पहिलवान लोक लंगोट कसून वर एक फक्त मांडीपावेतोंच लांब असणारा विजारीसारखा कपडा चढवितात तो २ ल्हान मुलांची गुडघ्यापर्यंतची विजार 'चड्डी ओंवळ आहे' [का चड्डी]

**चढ**—पु १ चढण, चढाव, उंच भाग, पर्वतादिकांचा उंच होत गेलेला प्रदेश 'आता सडकेला येथून चढ लागला' २ वाढती, वाढ, उन्नति संवर्धन, वृद्धि (संपत्ति, स्थिति, हुद्दा, दर्जा, मोल, माप, किंमत धारण यांची) 'पुण्याचे मापानें मोजलेला पदार्थ कोंकणी मापानें मोजला असतां कांहीं चढ येतो' ३ चढावा, बरोबरी होऊन जास्त येणें ४ वाढवलेली पट्टी कर, कारावाढी (क्रि० वाढवणें, देणें) ५ हल्ला करणें, एखाद्यावर

तुटून पडणें, एखाद्यावर चढाव, चाल करणें, हल्ला, मोहीम, चढाई 'रघोजीच्या सैन्यावर चढ केल्यामुळें त्याच्या सैन्याची धादल उडाली' –विवि ८ ७ १३३ 'तो प्रथम चढ करून माझे अंगा वर आला' ६ वरचष्मा, वर ताण करणें, मागें पाडणें, जिंकणें अतिक्रम, वरचढ, मागें टाकणें 'याण त्याचे मामलतीवर चढ केला' ७ पूर 'उदकाचेनि अति चढें। आकाश न बुडे सर्वथा।' –एभा २८ ३४३ –वि श्रेष्ठ, श्रेष्ठ दर्जाचा, वरचढ, जिंकणारा 'एकाहुनि चढ एक जगामधि थोरपणाला मिरवु नको।' 'वोवी चढी दावि वोंवी। कथा वदवी श्रीराम॥' –भारा किष्किंधा १५ [ चढणें, हिं प, गु चड, सिं चड्हु ]( वाप्र ) ०देणें– १ भर घालणें, उत्तेजन देणें 'भाऊसाहेबानें चढ दिला।' –ऐपो १५०. २ लिलावांत अगोदर किंमत सांगणें, किंमत चढविणें ०घसणें–वाढणें, जास्ती होणें **चढावर चढ देणें**–जास्तींत जास्त चढणें, वाढणें, वरवर जाणें **चढास–चढी देणें**–उत्तेजन देणें, काम करण्यास भर देणें **चढीस भरणें, चढीस–चढी लागणें**–१ मोठ्या जोरानें, निश्चयानें, कितीहि संकटें आलीं तरी इच्छा पुरविणें, पाठीमागें लागणें २ लिलावांत जास्त किंमत बोलणें ३ प्रतिस्पर्धेनें चढाओढीनें, ईर्षेनें, इरेस पेटून एकादी गोष्ट करणें, इरेस पेटणें 'उगीच चढी लागून पांच रुपयाचें कापड पांचशेंस घेऊं नका' सामाशब्द–०**उतर–उतार**–स्त्रीपु १ चढणें व उतरणें, चढण उतरण, वर जाणें व खालीं येणें 'विहिरींतलें पाणी आणावयास मला चढउतार करवत नाहीं' २ जास्तकमी होणें, भरणें व कमी होणें कमीजास्त प्रमाण होणें प्रमाण सारखें नसणें (ताप, दुखणें इ० चें) ३ उत्कर्षापकर्ष, क्षयवृद्धि. ४ आशा निराशा, एक वेळ दुःखाचा तर एक वेळ समाधानाचा विचार 'म्हणोन मनात चढउतार करूं लागले परंतु बाहेर व्यंगोक्ति शब्द बोलेनात' –भाव १०३ **चढण चढणी**–स्त्री १ चढ, चढाव, चढती, उंच होत गेलेली जागा चढणीस घोडा उतरणीस, रेवगीस रेडा २ उंचपणा उभटपणा **चढण उतरण**–चढउतर पहा **चढणारी कमान**—चढती कमान पहा पेशवाईच्या अस्ताला त्यावेळच्या मुत्सद्द्यांच्या महत्वाकांक्षेची चढणारी कमान नडली' –अस्तभा ७

**चढणें**—अक्रि १ वर जाणें, ऊर्ध्व गमन करणें. आरूढणें वर बसणें (डोंगर, टेंकडी, घोडा झाड इ० च्या) २ उंच जाणें होणें वाढणें, खूप उंच असणें (इमारत तारा) ३ वृद्धि पावणें, वाढणें जास्त होणें अधिक होणें, फुगणें, मोठा आकार होणें विस्तृत होणें (समुद्र संपत्ति ज्वर) त्या विहिरीस पाणी चढलें कालच्या उपासानें आज पित्त चढलें ४ महाग होणें (किंमत, धारण) 'सोन्याचा भाव चढला आहे ५ कडक होणें, जलाल होणें, तीव्र होणें (भांग) 'भांग जसजशी छिनावी तसतशी चढती' ६ अम्मल चढणें, मद चढणें, निशा येणें, उन्माद चढून गिरकी येणें, कैफ येणें ( विष, मादक औषधि द्रव्य, विखार, उवाक्षा इ० नीं ) 'मला घोटा कधीं चढत नाहीं' ७ शिरणें, जाणें, शरीर त्यात जाणें (चोळी, आंगरखा इ० अंगांत) (बंदुकींत बाण नटें, मगीन) 'आंगरखा चांगला चढतो पण जोडा चढत नाहीं' आंत जाणें ( खुंटी, खिळा, खीळ ) 'ही खुंटी छिद्रांत चढत नाहीं अमळ तास' ८ साचणें, तुंबणें, थकणें, चढत राहणें, हळूहळू वाढत जाणें ( ऋण, शंका, प्रश्न, इ० ) 'माझे वीस दिवस चढले त्याचा पैसा द्या' 'माझे पांचशें रुपये त्याजवर चढले' ९ गर्वानें ताठणें, फुगणें, उन्मत्त होणें 'एकदा कोठें लढाईत यश आलें तर ते गृहस्थ अलीकडे चढले आहेत १० आच्छादणें, आवरण होणें, वर पसरणें, आक्रमणें ( धूळ, काजळ जंग, बुरसा, शेवाळ). ११ ( देवादिकांना ) वाहिलें जाणें, अर्पण केलें जाणें 'शेंहुची फुलें देवास चढत नाहींत' १२ सूर मोठा होणें, वाढणें, उंच होणें ( गातांना आवाज, वाद्य इ० ) १३ फिरणें, वर जाणें, उलटणें ( अम्मल चढला असतां, अथवा प्राणोत्क्रमण समयीं डोळे) १४ बसणें, लागणें, लावला जाणें ( गिलावा, रंग, लेप, तेल, हात ) 'ह्या भिंतीवर शेंदरी रंग चढला म्हणजे चांगली दिसेल' १५ खुलणें, चकचकीत दिसणें, पूर्णत्वास पोंचणें ( रंग किंवा रंगविलेला पदार्थ, वस्तु ) 'हिंगुळामध्यें लिंबूचा रस पिळला म्हणजे रंग चांगला चढतो' १६ ताणला जाणें (पखवाज मृदंग ) १७ (धनुष्यास) गुण लावणें, सज्ज करणें १८ प्राप्त होणें, येणें, लाभणें 'जेणें करितां महिमा चढे। विरक्तासी।' –दा २ ९ २ [स उद्घलन–प्रा उच्चडन चड्ढन, सिं चड्हणु] म्ह० चढेल तो पडेल पोहेल तो बुडेल **चढे चढ्या चढत्या घोड्यानिशीं**–क्रिवि (घोड्यावर बसला असतांनाच, एक वेळहि खालीं न उतरतां ) एका तडाख्यानें, एका दौडींत, न थांबतां, मोठ्या आवेशानें 'शत्रु जो आला तो लागलाच चढे घोड्यानिशीं किल्ल्यावर गेला' 'नादिरशहा याची फौज चढत्या घोड्यानिशीं दिल्लीस पोहोंचली' –भाव २३

**चढता**—वि १ चढणीचा, उंचट, चढावाचा, उंचवट पायरीचे दगड अमळसे चढत लाव' २ वाढणारा सुधारत जाणारा, चांगला होणारा, प्रगतिपर 'चढत वाढत प्रेमा। –दावि १६६ चांगलें काम केलेंस तर तुला चढता रोजगार मिळेल' ३ उच्च, आध्यात्मिक विचाराचा चढता अर्थ लागला। तरी अंतरात्मा चढतचि गेला। –दा १३ ७ १३ ४ (ल) उंच, उच्च तार (स्वर) चढत्या स्वरांत गायच पाहिजे –नाकु ३ २९ [म चढणें] ०**दिवस**–पु चढती वेळ पहा ०**पाया** पु सुधारत चाललेली स्थिति, अवस्था ( एखाद्याच्या दैवाची ), उत्कर्षाचा आरंभ व हळू हळू पुढें गति उर्जितावस्था भरभराटीची स्थिति

**चढती**—स्त्री १ वाढ, प्रगति, सुधारणा, उत्कर्ष 'सवाई माधवराव पेशवे सवाई चढती राज्याला ।' –ऐपो १७६ २ श्रेष्ठ पणा, उच्च दर्जा 'मन चढतीही मानिति तीची मी झालें खाली ।' –रत्न २० ३ चढती, वाढती, चढता पाया. [म चढणें] सामाशब्द– ०उतरती–स्त्री चढउतार, उत्कर्षापकर्ष ०कमान–न–स्त्री (धनुष्याची चढती असलेली बाजू) वाढत्या उत्कर्षाची स्थिति, वाढतें मान, प्रमाण, चढती कळा, चालता काळ; भरभराटीचा काळ, समृद्धीचा काळ, उदयकाल, दैवाचा अनुकूल काल. ०कळा–स्त्री १ ज्या काळांत चंद्राच्या कळा वाढत जातात ते दिवस शुक्ल पक्षाचे दिवस २ (ल) भाग्याचे दिवस, भरभराटीची स्थिति अवस्था, उत्कर्षकाल 'चढतीकळा धन्याची जाणुन वीर असे भीडती ।' –ऐपो २११ ०गोष्ट सांगणें–फुशारकीनें, आढ्यतेनें, अतिशयोक्तीनें बोलणें ०दौलत–स्त्री वाढत असलेली श्रीमंती, वाढती भरभराट ०पडती–स्त्री चढउतार 'चढतीपडती वस्तुमात्राच्या मागें लागलीच आहे' –इलासुदरी १०७ (मकरदमाला) २० ०पराई–पायरी–स्त्री चढता पाया पहा ०पराई–वाढतें वय 'चढती पराई जाऊन उतरती पराई लागली' [पराई=ज्वानी] ०बाजू–स्त्री १ गंजिफांच्या डावांत आलेली (एका, दुरी, तिरी अशा चढत्या क्रमानें) चांगली चांगलीं पानें २ (ल) भरभराटीचे दिवस, उत्कर्षाचा काळ, चढती कमान, कळा पहा ०भाजणी–स्त्री (गणित) हलक्या परिमाणाच्या अंकास भारी परिमाणाचें रूप देण्याची कृति उ० आण्याचे रुपये करणें वगैरे ०भावना–स्त्री चढता, वाढता कल, चिन्ह जोर, भर (रोग, संपत्ति इ०चा) ०मुदत–स्त्री वाढणारी मुदत चढतीमुदतीची हुंडी–ज्यामनुष्याकरितां हुंडी करावयाची त्याच्या सोईसाठीं नेहमींपेक्षां ज्यास्त मुदतीची केलेली हुंडी **चढती वाढती**–वि १ एकसारखी वाढत जाणारी 'चढती वाढती गोडी । भगवद्भजनाची ।' –दा १४ ३ २३ २ जास्त जास्त, उत्तरोत्तर वाढत जाणारें 'चढतें वाढतें वाढवावें । पूजन देवाचें ।' –दा ४ ७ ३ ०वेळ–वेळा–स्त्री १ चढणारी, वाढणारी वेळ, सूर्योदयापासुन मध्यान्हापर्यंत, सकाळ व दुपार, पूर्वाण्ह 'चढते वेळेस रक्त काढूं नये' २ भरभराटीचा, उत्कर्षाचा काळ ०श्रेढी–स्त्री. (गणित) या श्रेढींत एकया एकापुढें एक वाढत जातात याच्या उलट उतरती श्रेढी ०हळद–स्त्री (रमात) पायाकडून वर हळद लावणें (मृत्यूनंतर वर खालीं–उतरती हळद लावितात –बदलापूर २५

**चढतें व्याज**—न चक्रवाढव्याज

**चढत्यापुठ्याचा**—वि भरदार कुल्ल्याचा (घोडा)

**चढपट्टी**—स्त्री वाढविलेली, जादा पट्टी, कर

**चढला**—वि वाढलेला, जास्ती झालेला, जादा (पगार) [चढलेला]

**चढपट**—पु चढ, चढण, उपवटा –वि वाढणारें, चढावें, चढणीचा, चढावाचा, उंचट [चढ]

**चढघडी**—क्रिवि (प्र) चढवरी, चढाओढीनें 'पुरे शिवदीचा थाट मभोंवता दाट पाहाला उडी । राहिले उभे चढ घडी ।' –पला ४ २१ [चढाओढ]

**चढपड**—पुस्त्री चढचढपणा, श्रेष्ठता, चढ, प्राबल्य (क्रि० चढणें). [चढ द्वि]

**चढयण-उतरण**—न जिनगीच्या जुन्या मालकाचें नांव काढून जो नवा मालक झाला असेल त्याचें नांव सरकारदप्तरीं दाखल करणें [चढवणें+उतरणें]

**चढवणी**—स्त्री लग्नापूर्वी मुलीवर वस्त्रालंकार घालणें –बदलापूर २६८–२६९ चढावा पहा [चढवणें]

**चढव(वि)णें**—सक्रि १ वर जाण्यास, वसण्यास, आरूढ होण्यास लावणें, करविणें, वर बसविणें २ उठविणें, वाढविणें, जास्ती करणें सुजविणें, फुगविणें 'धनी (साम्हरिनचा) भाव चढविण्यास कबूल आहे' –गुजा १५ ३ ताणणें, आकर्षणें, लावणें (धनुष्यास गुण) 'सारंगधनुका चढाउनु गुणु ।' –उषा १६५३ ४ मारणें, लगावणें, तडकाविणें (चापट, तडाखा, रपाटा) 'दोन तोंडावर चढविल्या आणि कबूल झाला.' ५ तोंडांत घालणें, पिणें (तंबाखू भांग इ०) 'तंबाखूची गोळी चढवावी आणि गावयास बसावें' ६ ईर्ष्येस लावणें, चेतविणें, स्फुरविणें, भर देणें, तयार करणें, उद्युक्त करणें, कपटानें स्तुति करणें 'समर्थ एकदां कौतुक नीच यातीस चढविलें ।' –सप्र २ ७६ ७ अंगांत घालणें (पोषाख) 'योग्य तो पोषाख चढवावा' –ऐरा २ ४८ [म चढणें प्रयोजक, हिं चढवाना] **चढवून येणें**–१ (भांग, दारू, इ०) पिऊन येणें २ रंगावणें, एकदम सतावणें, कैफ आल्याप्रमाणें वागणें, बोलणें

**चढवाचढव**—स्त्री हें चढीव तें चढीव इ० रूप व्यापार, चढविण्याची क्रिया

**चढवोहट**—स्त्री १ चढणें–उतरणें २ भरती–ओहटी 'समुद्रीं चढवोहट चाडें ।' –एभा ८ ५८ [चढणें+ओहटणें]

**चढा**—वि १ उंच, उच्च पहाडी, उदात्त (आवाज सूर) २ ताणलेला (पखवाज) चढ्या सुराचा (मृदंग इ०) ३ जास्त, अधिक चढ पहा 'बाबा, तू हा जो आपल्यापुरता चढा व विशेष हक्क सांगतोस' –सास २ ४१३ [चढ] ०बुचडा–पु मानेपासून वर ओढलेला, ओंवळलेला बुचडा –खराद ३७

**चढाई**—स्त्री १ हल्ला, चाल, अंगावर जाण्याची क्रिया, मोहीम, स्वारी करणें 'तलवार पुण्यावर धरून मोंगल आला चढाई करून ।' –ऐपो २३० [चढ+आई प्रत्यय] चढाईच्या

गोष्टी-स्त्रीअव दरडावणीच्या, भरेरावीच्या, दिमाखाच्या, मगरूरीच्या गोष्टी, गुरकावणी.

**चढाईत**—पु १ पटाईत घोडेस्वार, अश्वारोहणकुशल २ झाडावर किल्ल्यावर चढण्यात पटाईत, निष्णात, चपळ

**चढाऊ**—वि १ चढता येण्यासारखा, चढून जाण्यासारखा, वर जाता येण्यासारखा (वृक्ष डोंगर, टेकडी इ० ) २ आक्रमशील, पुढे चालून जाणारा 'अत्यजाम शील विशय चढाऊ पुढाऱ्यांनीं '-सास २ ४४४ [ चढ+आऊ प्रत्यय ]

**चढाऊ**—पु (व ) टाच उच असुन बद असलेला ( मुसलमानी ) जोडा चढाव पहा

**चढाचा**—वि १ जास्ती होणारा, वाढणारा, जास्ती करणारा वाढविणारा २ ज्याला चढ वाढ आहे असा, वृद्धिंगत होणारा, वाढीचा ( औषध, भाषण ध्वनि, आवाज ) ३ दुराग्रहानें, मगरूरीनें वाढणारी, बेपर्वाईची ( भाषा, आचरण, चालचालणूक ) [ चढ ]

**चढाव**—पु चढ पहा ( फारसा प्रचारात नाहीं ) [ चढ+आव प्रत्यय ]

**चढाव**—पु पायांत मागच्या बाजूनें चढवितां येणारा जोडा [ म चढ, हिं चढौवा ]

**चढावणें**—न ( चाभारी ) आव्यावर किंवा तुळईवर चामडें अडकविण्यासाठीं केलेली काठी, अडकावणें

**चढावणी-नी**—स्त्री १ चढ हल्ला २ वरताण, वरचढपणा 'तेथ वसताकरितां चढावनी । ग्रिष्मिंअें केली रीगवणी ।'-शिशु ६२१

**चढावा**—पु १ परदेशी लोकांत नवरदेवाकडून विवाह विधींत पचासमक्ष मुलीकरिता आलेला पोषाख व इतर वस्त्रें, -वदलापूर २७३ २ भेट नजर [ हिं चढाव=देवाला भेट ]

**चढावा**—पु १ वर ताण वरचष्मा 'कैवल्याही चढावा । करित विषयसेवा ।'-अमृ ९ ३०. २ वाढ वृद्धि 'अपेक्षे नाहीं रिगा । सुखासि चढावा । जयाचें असणें । -ज्ञा १२ १७२ ३ पूट लप चढ 'चौथा मेळौनि पाचवा । तया हरि चढना करुनि चढावा ।'-श्व ९३ [ म चढणें ]

**चढावाचें धोरण**—चढाई करण्याच धोरण, प्रथम चढाई हल्ला करणें चढावाचें धोरण स्वीकारून भारताचार्यांवर तुटून पडलों '-नाकु ३ ६७.

**चढासूर**—पु चढविलला वाढविलेला स्वर, आवाज ( गवयाचा ) [ चढ+सूर ]

**चढिन्नले**—चढल ( काव्यात चढले बद्दल चढिन्नले असें रूप येतें ) -मुवन १ ३६

**चढी**—वि १ सरस, वरचढ, श्रेष्ठ, उत्कृष्ट, थोर 'एकाहुन एक चढी जगामधि थोरपणाला मिरवु नको ।'-अफला ६० २ अधिक उच 'वृक्ष एकाहुन एकेक चढी ।'-ऐपो २४१ ।

**चढीत**—पु ( कों. ) अधिकमास

**चढेल**—वि. १ गर्विष्ठ, बेपर्वा, मगरूर गर्वी, मानी, उद्धट, उन्मत्त, शेफारलेला, ताठरलेला २ उच्च, उच [ चढ+एल प्रत्यय]

**चढोवढसा**—क्रिवि जास्त जास्त चढोवढी पहा 'मन तोष भरेल चढोवढसा ।' -दावि २१९

**चढोवढी, चढोवाढी**—स्त्री. ईर्षेची चढाओढ, झटापट, झुज ( या शब्दाचा प्रयोग सामान्यत तृतीया व षष्ठी विभक्तींत करतात ) -वि. चढतें-वाढतें **चढोवढीनें**-स्पर्धेनें, ईर्षेनें, वर ताण वरचढ करण्याच्या आवेशानें इच्छेनें **चढोवढीचा**-वि ईर्षेचा, स्पर्धेचा

**चढोवढी**—क्रिवि ( काव्य ) १ जास्त जास्त, उत्तरोत्तर, अधिकाधिक, वाढत्या प्रमाणान, चढीचढीनें 'वाढतें दु ख तयासी। अहर्निशीं चढोवढी।'-एभा ९ २३ 'दया अहिंसा विष्णुभक्ति। चढोव.ी मज धावी।'-मुधन १५ ३३ २ चढाओढीनें, अहमहमिकेनें 'नारद प्र[illegible]ादि भक्त कोडी। चढोवढी धावती।'-एभा १९ २३२

**चण**—स्त्री ठेवण, बांधा 'त्याची चणच ल्हान '-व्रावि ३९ 'स्वाराचा घोडा काळ्या रगाचा असून ल्हान चणीचा होता '-कोरकि ४२४

**चणक**—पु हरभरा [ स ]

**चणक चणाक**—स्त्री ( गो ) एक मोठा मासा, हा स्वादिष्ट असतो -मसाप ३ ३

**चण-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि चाबूक छडी, काठी इ०नीं केलेल्या आघाताप्रमाण आवाज होऊन, चटकन, फाडकन [ ध्व स चण्=शब्द करणें ]

**चणका**—पु १ विंचू साप, पिसू इ०नीं केलल्या दशामुळें त्याच्या चावण्यानें होणारी चुणचुण, वदना २ चिमटा घेतल्यानें किंवा डागल्यानें जी तीव्र वेदना होते ती ३ मिरीं खाल्ल्यानें तोंडाची ऊन लागल्यानें अगाची जी आग होते ती ४ फोडणीचा तडतड चरचर आवाज ( क्रि० मारणें लागणें, बसण ) ५ रागाचा सपाटा झटका, फणकारा ( क्रि० येणें, लागणें ) [ ध्व चण ]

**चणकावणें**—अक्रि १ चुणचुणणें, वेदना होणें, तिडीक उठणें ( विंचू साप ढेकूण, पिसा, मुंग्या, पिसोळे इत्यादि कांच्या दशानें चावण्यानें ) २ चावणें दश करण ( विंचू साप इ० प्राण्यांनीं ) 'विंचू चणकावला ' [ चणका ]

चणकायिणें—सक्रि १ जाराने मारणें; चमकून मारणें, टोकणें २ (ल) स्मरणशक्ति आठवण ताजी करणें, उजळणें [चणका]

चणच—वि तल्लख; चणचणीत, बुद्धिमान, हुषार, तैलबुद्धीचा (मुलगा)

चणचण—स्त्री १ कमतरता, कमालीची उणीव, अडचण; गरज चडचड. (अन्न, पाणी वस्त्र इ०ची) २ तंगचाई, महागाई, दुर्भिक्ष अडचण, तारंबळ ३ ठणका, तिडतिड, चुणचुण, ठुमठुम चणचण (क्रिवि) पहा

चणचण-णां—क्रिवि १ रिकाम्या भांड्याचा, मडक्याचा जो खणखण किंवा ठणठण आवाज होतो त्याप्रमाणे ध्वनि होऊन खणखणा, ठणठण २ जखमेच्या किंवा क्षताच्या वेदनांप्रमाणे किंवा तिडकांप्रमाणे ३ छडी मारली असता होणाऱ्या ध्वनीप्रमाणें ध्वनि होऊन ४ ढेकूण, पिसा, मुरकुटें डसतांना जी चळवळ, गमबज कली जाते त्याचे निदर्शक, चडचड, चटचट. 'मुरकुट चणचण तोडतात' 'मग चण चण पिसा आणि ढेकूण खाणी।' —दावि १ ५ मोठ्याने, स्पष्टपणें 'शब्द बोलताती चणचणा रे।' —दावि ७८० [ध्व]

चणचणणें—अक्रि १ (को) फार वाढणें, चढणें (भाव, दर, किंमत धारण) २ चुणचुणणें, तिडीक मारणें (जखम, क्षत), वेदनामुळें लागू होणें, परिणाम होणें (क्षतावर घातलेलें मीठ), व्यथा प्राप्त होणें ३ कडकडून भूक लागणें, क्षुधा अत्यंत प्रदीप्त होणें ४ छडी, चाबूक इ०च्या फटकाऱ्यानें, तडाख्यानें चणचण असा आवाज होणें, छमछम फाडफाड लागणें [चणचण]

चणचणाट—पु १ (चणचणचा अतिशय) अतिशय अडचण, तारांबळ २ पैसा, संपत्ति इ०चें दुर्भिक्ष, अडचण ३ अतिशय महागाई ४ पिसा वगैरेंनीं अतिशय चावणें, फार चुरचुर, मोठा चटका [चणचण]

चणचणात—वि १ यथायोग्य व ठीक मालमसाला घातला आहे किंवा ज्यांत मीठमिरची चुरचुरीत लावली आहे असा, चमचमीत, मसालेदार, झणझणीत (भाजी झुणका) २ तल्लख, चुणचुणीत चुरचुरीत चलाख, हुषार बुद्धिमान (मूल) ३ प्रखर तीव्र (सूर्यकिरण) ४ फणफणीत कडकडीत जळजळीत रसरशीत (ताप) ५ तीव्र कडक (भूक) ६ तिडीक मारणार, ठणठणणारें, वेदना होत असलेलें (क्षत, जखम) ७ कडत [चणचण]

चणफण—स्त्री दग्ध झालेल्या भागाची चुणचुण वेदना, तिडीक फुणफुण [ध्व]

चणपाणी—न हरभऱ्याच्या पिठाचे पिठलें किंवा आमटी [चणा+पाणी स. चण=हरभरा+वण=पाणी] ०मिठपाणी—न गरीबी जेवण, कदान्न, पालापाचोळा, कोंडामोंडा ०मिठपाणी पिऊन असणें—केवळ मनोदकावर राहण्याची पाळी येणें, वाईट अवस्था येणें

चणा—पु १ हरभरा (मोठ्या दाण्याचा) 'वानराचे ठेवणें। गारफळ आणि चणे।' —भारा किष्किंधा १३ १०१. २ (व) पाण्यांत घालावयाचे दाणे प्रत्येकी, चणे घातलेल्या पाण्या पूर्वी मुलांच्या पायांत घालीत असत. 'घागुऱ्या चरणि चाळ चण्याच्या।' —शशिसेना [स चणक, प्रा चण, चणअ]

चणेफुटाणे—पुअव भाजलेले हरभरे फुटाणे [चणा+फुटाणा] पैशाचे चणेफुटाणे करणें—उधळणें, उधळपट्टीनें खर्च, व्यय करणें (पैसा, द्रव्य, सामग्री) चण्याचे झाडावर चढविणें—(हरभऱ्याच्या झाडावर चढविणें) खुशामत करून किंवा तोंडापुरतें वाखाणून एखाद्यास चढविणें, फुगविणें, उन्मत्त करणें

चणाचण-णां चणाणा—क्रिवि चणचण, चणचण पहा.

चणाणणें—अक्रि १ (चणचणणेंचा अतिशय) अतिशय वाढणें, चढणें २ अतिशय जबर वेदना होणें, ठणकणें किंवा तिडकणें ३ अतिशय खाखा सुटणें, खाखावणें ४ वाजणें 'स्वर मृदंग चणाणित वीणे।' —दावि ४३१ [ध्व]

चणी—स्त्री १ (गु) बारीक हरभरा २ (वै.) मसूर [चणा]

चणेबोर—न बारीक बोराची जात चण्याएवढें बोर

चणोरा-र—वि लहान, अल्प आकाराचा लहान आकृतीचा (वेत, पावटा, घेवडा, शेंग इ०च्या निरनिराळ्या जाती दर्शविण्यासाठीं हें विशेषण लावतात) [चणा+आर प्रत्यय] ०वेत-पु लहान आकाराचा वेत

चतकोर चतकर—पुस्त्री १ (भाकर, पोळी, फळ, लाडू इ०चा) चतुर्थांश, पाव भाग, चारापैकीं एक भाग 'आमच्या तील कांहीं चतकोर-अर्धी शहाणी मंडळी म्हणूं लागली आहे' —टि १ ३७० २ लहान तुकडा [स चतु+म कोर] ०भर—वि चतकोराएवढा, लहानसा 'चतकोरभर वाट' [चतकोर+भर प्रत्यय]

चतुर्—वि १ चार, चतुर्गुण—गणित इ० २ श्रावक किंवा जैन लोकांमध्ये जे दोन भेद आहेत त्यापैकीं एक. ह्याचा धंदा शेतकीचा, दुसरे पंचम हे व्यापारी आहेत [स]

चतुर—वि १ अत्यंत हुषार बुद्धिमान तीव्र बुद्धीचा, चुणचुणीत, वाकबगार, चाणाक्ष युक्तिवान्, हरहुन्नरी, कुशल, धूर्त सूज्ञ समजस 'चतुर तो चतुरांग जाणे। इतर तीं वेडीं।' —दा १३ १० २५ २ लेखन चित्रें कला, शास्त्रें इ० विद्यांत प्रवीण ३ व्यवहारज्ञ, व्यावहारिक ४ (संगीत) गायनशास्त्रापेक्षा गायनकलेमध्यें जो अधिक प्रवीण तो [स] चतुर(करण)—न

(नृत्य) डावा हात वांकवून छातीसमोर आणणें व उजव्या हाताचीं करंगळीशिवाय सर्व बोटें मिटविणें व उजवा पाय जमीनीवर हळू हळू आपटणें [स] चतुर(मुखई)-न (नृत्य) भुवया माहुक दिसतील अशा तऱ्हेनें दोन्ही बाजूस लाविणें सौम्य स्पर्श व ललित शृंगाराच्या वेळीं हें प्रकर्म करावें [स]

चतुरक(हस्त)—न (नृत्य) आंगठा मिटवून त्यावर करंगळीशिवाय तीन बोटें मिटवणें व करंगळी उभी ठेवणें [स]

चतुरंग—न १ (संगीत) पहिल्यात चिजांचे बोल, दुसऱ्यात तनानादि अक्षरें, तिसऱ्यात स्वर, चौथ्यात पखवाजाचे बोल अशा प्रकारचें गीताई पद्य २ बुद्धिबळाचा खेळ यांत घोडा, उंट, हत्ती व प्यादीं हीं चार अंगें असतात -वि १ ज्याला चार अंगें, शक्ती, साधनें (हत्ती, घोडे, रथ, पायदळ इ०) आहेत अशा प्रकारचें (सैन्य), सेनेचें विशेषण 'चतुरंगा परिवारा। सजोडिया रहंवरा।'—ज्ञा ११ ३९७ २ कपाळावर चार दिशास चार भोंवरे असलेला (घोडा) —अश्व १ ८७ [सं] सामासशब्द- ०दळ-सेना-नस्त्री हत्ती, घोडे, रथ, पायदळ हीं चार अंगें ज्यात आहेत असें सैन्य 'रथकुंजर पालाणा। सन्नद्ध करा चतुरंगसेना।'—एहस्व ५ ३९ ०बल-न. १ चतुरंग सैन्य २ (आधुनिक) घोडदळ, पायदळ, आरमार व वैमानिक दळ ०लिपी-स्त्री बुद्धिबळाच्या खेळातील खेळया उतरण्याची संक्षिप्त लेखन पद्धति जसें. राघो=राजाचा घोडा, वउं×हप्या=वजिराचा उंट हत्तीच्या घरातील प्यादें मारतो, घो (रा२)—उ ३ = राजाच्या दुसऱ्या घरातील घोडा उंटाच्या तिसऱ्या घरीं जाता, ००० =राजा वजिराकडील बुरजात जातो इत्यादि

चतुरसावाजी—पु (विपरीतल) मूर्ख माणूस, अकलेचा कांदा [चतुर+साबाजी=विजापुरच्या राजाचा साबाजी या नावाचा बुद्धिवान वजीर]

चतुरस्र—पु चौकोन, चौरस -वि १ चौकोनी, चाहों-कडून सारखा २ (ल) चतुर, गुंडा, चाणाक्ष, हुशार, तरबेज, निष्णात, पारंगत [स] चतुरस्र(जाति)-स्त्री (ताल) पहिला विभाग ज्यामध्यें चार मात्रांचा असलाच पाहिजे असा एक दक्षिणेकडील तालाचा प्रकार ०युतहस्त-पु (नृत्य) दोन हाताचीं दोन्हीं कोपरें खांद्याच्या सरळ रेषेंत येतील इतकीं उंच करणें व हात खटकामुख करणें व हाताचे तळवे प्रेक्षकाकडे येतील अशा रीतीनें ते छातीपासुन आठ अंगुळें अंतरावर धरणें

चतुराई—स्त्री १ (काव्यांत व नेहमीं बोलण्यांत चत्राई किंवा चतराई) १ चतुरपणा, हुषारी, चुणचुणितपणा, चातुर्य, कुशलता, चाणाक्षपणा, कुशाग्रबुद्धि, बुद्धिमत्ता, बुद्धिमत्तेचा विलक्षणपणा २ चतुर स्त्री 'फूल दउनि तिला उतराई। होइ मी समज हे चतुराई।'—वामन भामाविलास (नवनीत पृ १०१). [चतुर+आई प्रत्यय]

शको ३ २८

चतुरानंद—पु आत्मानंद, ब्रह्मानंद, अविद्यानंद व विषयानंद हे चार आनंद [सं चतुर्+आनंद]

चतुरानन, चतुरास्य—वि चार तोंडांचा (ब्रह्मदेव) 'जियेतें सर्जूं न शके चतुरानन।'—एहस्व ६ १०१ [सं चतुर्+आनन, आस्य=तोंड]

चतुराय, चतराय—(कु गा) चतुराई पहा.

चतुरायुध—न शंख, चक्र, गदा व पद्म ०क्षेत्रें-नअव १ शंखक्षेत्र-जगन्नाथपुरी २ चक्रक्षेत्र-भुवनेश्वरी (कलकत्ता) ३ गदाक्षेत्र-जयपूर (कलकत्ता) ४ पद्मक्षेत्र-मैत्रावन (कोनारक)

चतुराश्रम—पु ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास असे चार आश्रम 'चतुराश्रमवर्णे। एणु पुरुषु चतुर्था दिसे।'—ज्ञा १८ ६२९ आश्रम पहा [स]

चतुर्घात—पु एकाच संख्येला त्याच संख्येनें चारदां गुणून जी संख्या येते ती [सं]

चतुर्थ—वि चवथा -पु (ल) कात, मोक्ष, दंड इ. ना संकेतानें म्हणतात कारण ते प्रत्येकीं गाथापल्या वर्गातील चवथ्या स्थानचे आहेत उदा० १ पान, सुपारी, चुना, कात २ धर्म, अर्थ, काम, मोक्ष ३ साम, दाम, भेद, दंड इ० [सं]

चतुर्थाश्रम—पु. ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व सन्यास या चार आश्रमांपैकीं शेवटला, म्हणजे संन्यास [सं] 'मी आता संसार सोडून चतुर्थाश्रम धारण करणार.'—विवि १० १० २२५

चतुर्थी—स्त्री १ चौथी तिथि (शुक्ल व कृष्ण पक्षातील), विनायकी, संकष्टी चतुर्थी 'चतुर्थी तुझ्या मी करिन अवध्या थोर गजरें।'—सारुह ६ १०७ २ चौथी विभक्ति -वि. चौथी 'सर्वेत्यामें चतुर्थी। भक्ति जैसी।'—ज्ञा १४ २७० [स]

चतुर्दल-ळ—वि. चार दलांचें, पाकळयाचें, प्रकारचें, बाजूचें 'गुदस्थानीं चक्र आधार। तेथें चतुर्दळ कमळ सुंदर।'—स्वादि ९ ३ ५४ [म]

चतुर्दश—वि १ चौदा २ चौदावा [स] ०भुवनें, लोक-नपु ७ लोक व ७ पाताळ मिळून १४ भुवनें, लोक, भू, भुवर्, स्वर्, मह, जन, तप, सत्य, हे सप्त लोक आणि अतळ, वितळ, सुतळ, रसातळ, महातळ, तळातळ, पाताळ, हीं सप्त पाताळें मिळून एकंदर चौदा भुवनें होतात —एभा १३ ६३० 'तुजसाठीं जगजेठी भुवनें चतुर्दश शोधिलीं।'—देप ७५ ०विद्या-स्त्री चार वेद (ऋग्वेद यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद), सहा शास्त्रें (छंद, निरुक्त, व्याकरण, ज्योतिष, शिक्षा, कल्प), न्याय, मीमांसा, पुराण, धर्म मिळून चौदा विद्या [स] ०विद्याधाम-वि उत्तम विद्वान मनुष्य, पंडित [स]

चतुर्दशागलोह—पु रास्ना, कापूर, तालीसपत्र, ब्राह्मी, शिलाजित, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथे

वावडिंग व चित्रकमूळ हीं चौदा औषधें आणि लोहभस्म १४ भाग यांचें चूर्ण, तूप व मध यांशीं खावें हें क्षुधाकारक, बलवर्धक व पुष्टिकारक आहे –योर १.५६७

**चतुर्दशी**—स्त्री चांद्रमासांतील दरएक पक्षांतील चौदावी तिथि. [सं.]

**चतुर्दिक्षु**—वि चारीदिशांकडील, चोहोंकडील 'चतुर्दिक्षु धारा। न लाहे निघों बाहिरा।' –ज्ञा ११ ४११ [स चतु + दिक्=दिशा]

**चतुर्धा**—क्रिवि चार प्रकारचा, चार तऱ्हांनीं, प्रकारांनीं 'चतुराश्रमवशें। एकु पुरुष चतुर्धा दिसे।' –ज्ञा १८ १२९ [सं]

**चतुर्भुज**—वि १ ज्याला चार हात आहेत असा (देव, विष्णु), गुणवाचक शब्द 'जयांनि इयें द्विभुजें हन चतुर्भुजें। सुरकार्यचिनि व्याजें। घेयोंघेयों येसी।' –ज्ञा ११ ८३ २ चार बाजू, तोंडें किंवा पृष्ठभाग असलेला 'याचे चपटे चतुर्भुज स्फटिक असतात' –सेंपू २ २५ ३ (ल) मुसक्या बांधलेला, कैदी, मुसक्या बांधल्या आहेत असा, हात मागें बांधलेला (क्रि० होणें; करणें) 'अत पुरांत असा पांचटपणा करायला लागलें म्हणजे चतुर्भुज होण्याला उशीर लागत नाहीं' –मूक ४ (ल) विवाहबद्ध; लग्न झालेला 'मन्त्र एक अक्षर पुढें बदललास तर असा चतुर्भुज होण्याऐवजीं तसा चतुर्भुज होशील' –भा ५० [स]

**चतुर्मास**—पु पावसाळा, पावसाळ्याचे चार महिने, आषाढ शु॥ १० पासून कार्तिक शु॥ १० किंवा १५ पर्यंतचा (चार महिन्यांचा) काळ, चातुर्मास्य पहा [स]

**चतुर्मासारंभ**—पु चतुर्मासाचा आरंभाचा दिवस; आषाढ शु॥ दशमी, पावसाळ्याचा आरंभ किंवा आरंभाचा दिवस, या दिवशीं चातुर्मासांत वर्ज्य समजलेले (कांदे, वांगीं इ०) पदार्थ चापून खातात [स]

**चतुर्मुख, चतुर्वक्त्र चतुर्वदन**—पु ब्रह्मदेव, चतुरानन, चतुरास्य

**चतुर्मूल्य**—वि चौथ्या दर्जाची किंमत असणारा (इ) टेट्राव्हॅलंट 'कर्बिल हा चतुर्मूल्य आहे' –सेंपू १ ३१० [स.]

**चतुर्वर्ग**—पु. धर्म, अर्थ, काम मोक्ष हे चार पुरुषार्थ या चार गोष्टींसाठीं मनुष्यानें खटाटोप करावयाचा असतो 'देखिले आजि तुमचे चरण। चतुर्वर्ग फळ पावलों।' [स]

**चतुर्विध**—वि १ चार प्रकारचा, जातीचा, चतुर्धा 'मंगळ रागातें आळवीत। चतुर्विधा दडींचे वितावत।' –दाव ३१३ २ सर्व जातीचा, प्रकारचा 'चतुर्विधु ठसा। उमटों लागे आपैसा।' –ज्ञा ७ २३ [स] ०अन्न–न्नें–न चार प्रकारचें अन्न, खाद्य (खाण्याचा) चोष्य (चोखण्याचा), लेह्य (चाटण्याचा), पेय (पिण्याचा) पदार्थ 'मद्रूपें नव्हे अधिक न्यून। पचवी अन्न चतुर्विध।' –एभा १० ६१८. ०जाति–स्त्री. स्त्रियांचे मुख्यत चार वर्ग– पद्मिनी, चित्रिणी, शंखिणी, हस्तिनी, आणखी उपभेदहि आहेत ०मुक्ति–स्त्री सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता हे मुक्तीचे चार भेद आहेत ०वाचा–स्त्री परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी या चार वाचांचा समुदाय 'तूं चतुर्विध वाचेंत। प्रसवलासी निरुतें।' –विपू १ ७

**चतुर्व्याज**—न क्षेत्र, ज्ञान अज्ञान आणि ज्ञेय असे चार प्रकार 'तैसें एकचि चतुर्व्याजें। कथिलें आम्हीं।' –ज्ञा १३ ९५०.

**चतुर्व्यूह**—पु १ वासुदेव, संकर्षण, अनिरुद्ध आणि प्रद्युम्न असे पृथ्वीस आधारभूत असलेले चार व्यूह आहेत त्यांच्या समुच्चयाचें नांव. २ विष्णु [स]

**चतुर्हस्ती**—वि १ चार हात असलेला २ (ल) माकड 'माकडें आपल्या हातांनीं व पायांनीं एखादी वस्तु धरू शकतात म्हणून त्यास म्हणतात –प्राणिमो १८ [स चतु +हस्त]

**चतुर्दशास्त्री**—पु न्याय, व्याकरण, पूर्व आणि उत्तर मीमांसा हीं जो पढला आहे असा मनुष्य, यांपैकीं कोणत्याहि चार शास्त्रांत पारंगत [स]

**चतु षष्टिकला**—स्त्री चौसष्टकला पहा [स]

**चतुष्क, चतुष्टय**—न चारांचा समुदाय, चौकडा 'चित्त चतुष्टय बाहाळिका। कोंभजेतो।' –ज्ञा १५ ९७ या पदानें युक्त असे बरेच समास आहेत उ० अंत करणचतुष्टय, अनुबंधचतुष्टय, आश्रमचतुष्टय, पुरुषार्थचतुष्टय, अवस्थाचतुष्टय, उपायचतुष्टय, पदचतुष्टय, प्रमाणचतुष्टय, योनीचतुष्टय, वर्णचतुष्टय, वाक्चतुष्टय, व्यूहचतुष्टय, समुद्रचतुष्टय, साधनचतुष्टय, सेनांगचतुष्टय इ० [स]

**चतुष्कोण**—पु चौकोन, चौरस, चार बाजू किंवा कोपरे असलेली वस्तु –वि चार कोनांचा, चार कोपरे ज्याला आहेत असा, चौकोनी [स]

**चतुष्टई, चतुष्टयी**—स्त्री १ चौघे किंवा कांहींजण मिळून एखाद्या व्यवहाराची जी चौकशी करतात ती, पंचाची तपासणी, परीक्षा विचक्षणा २ बोभाटा, प्रसिद्धि, वाच्यता, गवगवा, गौप्यस्फोट 'कुकर्म झालें असता त्याची चतुष्टई करूं नये' [स चतुष्टय]

**चतुष्पथ**—नपु चौक, चवाठा, चार रस्ते मिळण्याचें ठिकाण 'ते सवादचतुष्पथींचे। गणेश जाहलें।' –ज्ञा १० १२४ [स]

**चतुष्पद, चतुष्पाद**—वि चार पाय असलेला (पशु, जनावर) 'परि भक्तांचेनि नावें। चतुष्पदादि आघवे।' –ज्ञा १२ ९३ –एरुस्व १८ १३ [स]

**चतुस्समुद्र**—पु समुद्रचतुष्टय पहा [स] ०वलयांकित– वि चार समुद्रांनीं वेष्टिलेली (पृथ्वी)

**चतु सीमा**—स्त्री. ( विह ) चतुश्शीम-श्शीमा १ चारी दिशाकडची हद्द, चोहों बाजूची मर्यादा ( शेत, गांव इ० ची ) २ या मर्यादा ठरविणें, रेखणें, घालून देणें (क्रि० करणें) [ स ] ०पूर्वक-क्रिवि चारी सीमा नक्की करून, नोंदून, ठरवून

**चतु सूत्री**—स्त्री चार तत्त्वाचा चौकडा 'स्वदेशी बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही लोकमान्याची चतु सूत्री असे ' -वि. चार प्रकारचा, तत्त्वाचा, नियमाचा ( कार्यक्रम, व्यवहार इ० ) [ स चतु +सूत्र ]

**चतोडा**—पु ( व ) घेरा

**चत्र-त्रा**—वि शहाणा, चतुर पहा [ चतुर अप ]

**चत्राई**—स्त्री फाजील हुषारी, चतुरपणा, चतुराई पहा 'हे पहा! चत्राई करीत बसण्यात काहीं तात्पर्य नाहीं -यशख

**चत्राय**—स्त्री (गा ) १ सूक्ष्म दृष्टि २ आठवण, सूचकता चतुराई पहा

**चत्वर**—पु चौक, अंगण 'पाहे तों अलकापुरीसम दिसे रत्नप्रभे चत्वरें।' -नरहरि, दानव्रत १२ [ स ]

**चत्वार**—वि चार [ स ] ०गुण-पु चार प्रकारचे गुण 'तमोगुण रजोगुण। सत्वगुण शुद्धसत्वगुण। ऐसे हे चत्वार गुण। चौदेहाचे।' -दा १७ ९ ५ [स] ०देह-पु चार प्रकारचे देह. 'स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण। ऐसे हे चत्वार देह जाण।' -दा १७ ९ १. ०भूतग्राम-पु जारज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज्ज या चाराचा समुदाय ०भोग-पु चार प्रकारचे भोग स्थूलभोग प्रविक्तभोग। आनंदभोग आनंदावभासभोग। ऐसे हे चत्वार भोग।' -दा १८ ९ ३ ०मुक्ति-स्त्री चतुर्विध मुक्ति पहा 'पहिली मुक्ती ते स्वलोकता। दुसरी ते समीपता। तिसरी ते स्वरूपता। चौथी सायोज्य मुक्ती। -दा ४ ९ २९ ०वर्ण-पु ब्राह्मण क्षत्रिय वश्य, शूद्र हे चार वर्ण. ०शक्ति-स्त्री चार शक्ती, चार प्रकारचें सामर्थ्य क्रियाशक्ति द्रव्यशक्ती। इच्छाशक्ति ज्ञानशक्ती। ऐशा चत्वार शक्ती।' -दा १७ ९ ६

**चत्वारि अनुबंधन**—न विषय, संबंध, प्रयोजन आणि अधिकारी या च रींचा जो समुच्चय तो अनुबंधचतुष्टय पहा

**चंद**—चांद पहा [ स चंद्र प्रा चंद ]

**चंद्**—वि काहीं, थोडें [ फा ] ०दर चंद्-वि कित्येक, विविध

**चंदन**—न एक झाड हें २० त ४० फूट उंच वाढतें याचें पान कडुनिंबा सारखें असून लाकूड फार सुवासिक असतें याच्या पेटया पंखे, चित्र अत्तरें, तेलें इ० बनवितात चंदन औषधी आहे 'मंदारामल बकुल बिल्व कुट अशोक चंदन जाती। -नरहरि गंगारत्नमाला ( नवनीत पृ ४३२ ) -न १ या झाडाचें लाकूड, गाभ्याचा तुकडा खोड. २ ( चंदनाच ) गंध, लाकूड उगाळून दवास लावण्यासाठीं करतात तें ३ ( ल ) नाश, धूळधाण, उच्छेद निर्दाळण, सत्यनाश, नुकसान ( क्रि० करणें ) 'पेंढा ऱ्यानीं गांव लुटून चंदन केलें.' 'पोरानें पोळयाचें चंदन करून टाकलें.' [ स ] ( बाप्र ) ०उडविणें-१ नाश करणें, उध्वस्त करणें, चक्काचूर करणें २ (व) बरोबर नेम मारणें ०काढणें-खडकून ठोकणें, यथास्थित बदडविणें, चापणें सामाशब्द- ०काचोळी-स्त्री काचोळीच्या आकाराचा अंगास लावलेला चंदनाचा लेप 'चंदन काचोळया रेखिल्या। पाटावाच्या चोळिया।' -कालिका पुराण १६ ४७ ०चारोळी-स्त्री चंदन वृक्षाचें बीं-बीज ०बटवा-पु एक पालेभाजी ही औषधी असून संग्रहणी, कोड, मुळव्याध इ० वर गुणकारी आहे -योर १ ४१. ०हौशी-वि गुलजार, गुलहौशी, चैनी ऐषआरामी, विषयी, खुशालचंद **चंदनी**-वि चंदन काष्टाचा, काष्ठमयधीचा ( तल, चौरंग, द०हारा इ० ) 'चंदनि वृक्ष तोडावया। तोडावया।' -मसाप ( कोंकणी गाणीं ) २८ ०अत्तर-तेल-न. चंदनाचें जें अत्तर किंवा तेल काढतात तें यास चंदनेल असेंहि म्हणतात ०पोपट, **चंदन्या पोपट**-पु एका जातीचा पोपट, याच्या गळयावर व पंखावर तांबड्या रेघा व पट्टे असतात

**चंदरविल्ली**—स्त्री ( स्थापत्य ) चपटीं कवलें 'बेळगाव-कडे छपरातील वाशावर चंदरविल्ली बसवितात ' -मॅरट २८६ [ चंद्र+विल्ली ]

**चंदर**—पु एक वृक्ष, यास चांदा, चांदाडा, चांदवडा असेंहि म्हणतात याचीं पानें एकबाजूस वांगेळीं व शवटीं निमुळतीं होत गेलेलीं असतात

**चंदा**—पु १ वर्गणी, सर्वसाधारण पट्टीचा अंश, हिस्सा २ वर्गणीनें पैसा गोळा करणें उभारणें ( क्रि० करणें ) [ फा ]

**चंदा**—पु एक वृक्ष

**चंदा**—पु चंद्र, चंद, चांद पहा.

**चंदाचंदा**—स्त्री लुगड्याची एक जात 'चंदाचंदी और कल्दर।' -अमृत ४९ [ चंद=चंद्र द्वि ? ]

**चंदाजी**—पु ( व ) आगंतुक, अनाहुत

**चंदी**—स्त्री १ घाणा, उंट इ० कास नित्यश जो दाणा देतात तो २ ( ल ) कुटुंबाला दररोजचा लागणारा खर्च अगर सामुग्री (क्रि० चालणें) ३ (ना ) उकाडा, रतीब (दूध इ०चा) [हिं] ०दाणा-पु गुराचा घास वेठ बिगार चंदीदाणा, चारटा वर्गणी वगैर -खेया२ **आपला चंदी वाढवून खाणें**-चांगलें मेहनतीनें व परिश्रमानें काम करून आपला मुशाहिरा वतन, पगार वाढवून घेणें आपल्या गुणानीं वर येण

**चंदीचंदावर**—न जिंजी तंजावर 'चंदीचंदावरचा नाच पाहती।' -गापो ३५. [ चंदी=जिंजी+चंदावर=तंजावर ]

**चंदुलाल**—पु विना १ हा जातीचा खत्री असून निजामचा मुख्य दिवाण होता याचा दानधर्माबद्दल लौकिक असे २ (ल) फाजील दानशूर, उधळ्या, चैनी माणूस म्ह० (व) चंदुलाल मरगये चंदुलालके नोकर घरघर लगगये=खुशालचंद माणजावरी वर खूप चैनी केल्या परंतु तो मरताच भीक मागण्याची ज्यास पाळी आली त्यास म्हणतात

**चंदेरी-री**—वि चंदेरी गांवीं तयार केलेलें बनविलेलें किंवा त्या गावासंबंधीं (वाटी, तांब्या, पातेली, पागोटें, शेला) चंदेर हें पेठेच्या दक्षिण तीरावर गांव असून उमरावतीच्या कापसाचीं येथें वस्त्रें विणतात हे कापड अतिशय मूल्यवान असल्यानें फक्त बडे लोकच वापरीत पूर्वी चंदेरें ही एक कापडाची पेठ असे 'नाना भांतनीं करून पोषाग चंदेरी तऱ्हा।' -ऐपो १११. 'चंदेरी ताटासारखा मध्यावर उंचट व कांठाकडे उतरता असे हे तवे असतात ' -मृदि २ १५

**चंदोरी**—स्त्री (तिरस्कारार्थी) पातळ भाकरी, चानकी [स चंद्र, हिं चंदिर]

**चंदोल**—पु. चंडोल, एक गाणारा पक्षी. [चंडोल]

**चद्दर**—स्त्री. १ चादर, वस्त्र २ त्याप्रमाणें उपयोग करावयाचा लाव पत्रा. 'प्रयोजनाच्या कामास तंच्याऐवजी चद्दर सोयीची ' ३ पसरलेला; आंथरलेला थर ' रुपयाची तर चद्दर लावून दिली होती ' [हिं चद्दर=धातूचा तुकडा, चादर पहा]

**चंद्र**—पु आकाशांत दिसणारा एक कलायुक्त व सूर्यप्रकाशित गोल, पृथ्वीचा उपग्रह, नवग्रहांतील दुसरा ग्रह, चंद्रमा, चांद; चांदोबा, सोम २ मुसलमानी तारीख. 'आज चंद्र तेरावा माह मोहरम ' ३ (ल) कित्येक गाई, म्हशी इत्यादिकांच्या तोंडावर जो पांढरा ठिपका असतो तो ४ स्त्रिया कपाळावर जी अर्ध चंद्राकृति गोंदतात ती कोर ५ मोराच्या पिसांतील डोळा ६ चंद्रामृत 'तैसें शरीर होये। जे वेळीं कुंडलिनी चंद्र पिये।' —ज्ञा ६ २५९ ७ (तंजा) स्त्रियांच्या नाकांतील एक अलंकार ८ डोक्यांतील एक चंद्राकार दागिना. [सं] (वाप्र) (सुताने) चंद्र ओंवाळणें—द्वितीयेच्या दिवशीं दिसणाऱ्या नूतन चंद्रावरून सूत किंवा दशी ओंवाळणें यामुळें नूतन वस्त्र मिळतात अशी समजूत आहे ०पिकणें—पूर्ण चंद्रबिंबाचा प्रकाश पडणें 'चंद्र पिकलासे अंबरीं। तें पिक घ्यावें कीं चकोरीं।' —कथा १ ८ ६२ ०मोहरणें—(माण) चंद्र उगवणें चंद्रानें कौबद्दा करणें—चंद्राला खळें पडणें म्ह०चंद्रम् दिवटे दिवम् थाळी=(व्यंगार्थानें) अत्यंत दरिद्रावस्था, ज्याच्या घरात चंद्र हा दिवटीचें काम करतो व नागवेलीचें पान थाळीच्याऐवजीं उपयोगी पडतें सामासिक शब्द—०कर—पु. १ चंद्रकिरण 'शारदीचा चंद्रकर। चाकता जैसा' —ज्ञा १८ ४०६ २ चंद्रकळा लुगडें. 'पाट हरनि मार नसली चंद्रकरकाळी।' —मसाप १.१ २ ०कला-ळा—स्त्री. १ चंद्राची कला, चंद्रबिंबाचा सोळावा भाग. २ एक प्रकारचें एकरंगी लुगडें (तांबडें अथवा काळें) चंद्रकळा गंगा जमुना= रंभार व आडवण काळें, किनार एक बाजू हिरवी, एक बाजू तांबडी असें एक स्त्रियांचें वस्त्र ३ चंद्राचा प्रकाश, किरण. 'जैसें शारदीयेचे चंद्रकळे—। माजीं अमृत कण कोंवळे।' —ज्ञा १ ५६ ०कांत—पु एक काल्पनिक रत्न, मणि, चंद्राचे किरण यावर पडले असतां याला पाझर फुटतो असा समज आहे. 'अहो चंद्रकांतु द्रवतां कीर होये। परि तें हातवटी चंद्रीं की आहे।' —ज्ञा १.२१ ०कांती—वि चंद्रकांताचा बनविलेला (वाटी). [सं.] ०कोर—स्त्री चंद्राची कोर, किनार (कु) १ चंद्रकोरेच्या आकाराचें एक सुवर्णाचें शिरोभूषण या कोरेला लागूनच नाग व विष्णुमूर्ति कोरण्याची हल्लीं नवी तऱ्हा निघाली असून त्याच्या पुढच्या बाजूस घागऱ्या लावितात २ (कों) कपाळावरची कुंकवाची अगदीं बारीक लहान कोर [चंद्र+कोर, तुल० सं. चंद्रकेयूर (—राजवाडे भाक १८३४)] ०ग्रहण—न चंद्रास लागणारें ग्रहण. ग्रहण पहा. पृथ्वीच्या छायेंत चंद्र आला असतां त्याला ग्रहण लागतें तें [सं] ०घार-घारी—स्त्री. (विनोदार्थी) कानशिलावर लावलेली चपराक, चापटी, मार (क्रि०दाखवणें, देणें) 'मुष्टिमोदक चंद्रघाऱ्या दिल्या म्हणजे विद्या येते.' [चंद्र+घार (पक्षी)] ०चकोरन्याय—पु चंद्र अमृतबिंदु स्रवतो व चकोर सेवन करतो त्यावरून असणारा चंद्र व चकोर यांमधील संबंध ०चूडशेखर—पु महादेव, शंकर. याच्या जटेंत चंद्रकला असते यावरून. [सं] ०जोत, ज्योति—स्त्री १ चंद्रासारखा प्रकाश देणारें दारूकाम, हवाई, याचे निरनिराळे प्रकार आहेत—सफेद, तांबडी, लाल, हिरवीगार, पिवळी, अस्मानी, किरमिजी, गुलेनारा, आबाशाई, आंबळी, नारिंगी, प्याजी. 'चंद्रज्योती चंद्राकार। तेजें अंबर प्रकाशे॥' —ह २ १२९ २ (व) मोगली एरंड याच्या बिया विषारी असतात, परंतु जाळल्या असतां चंद्राप्रमाणें प्रकाश पडतो ३ चांदणें, चंद्रप्रकाश ४ (उप) कुटुंबादिकाला लागलेला कलंक, डाग ५ डोळ्यांत घालावयाचें एक औषध [चंद्र+ज्योति] ०ज्योत्स्ना—स्त्री. (काव्य) चंद्रप्रकाश, चांदणें 'सुखीं चंद्रज्योत्स्ना अवयव यथापूर्व वरवे।' ०धणी—स्त्री मनाची तृप्ति 'बाळ चोखे लोंगी। आजी घेऊ चंद्रधणी।' —तुगा २२८. ०नक्षत्र—न चंद्राधिष्ठित नक्षत्र [सं] ०पर्व—न चंद्रग्रहणाचा काल, अवधि [सं] ०प्रभा वटी—स्त्री. रससिंदूर, सुवर्णभस्म, अभ्रकभस्म हीं सर्व समभाग, सर्वांबरोबर खैराचा कात आंचरस घेऊन सर्वांचा एकत्र खल करून सावरीच्या मुळ्यांच्या रसानें एकत्र दोन प्रहर खलून हरभऱ्याएवढ्या गोळ्या करतात ती ही अतिसारावर गुणकारी आहे —योर १ ४३४ ०फूल—न सोन्याचा एक दागिना. —ऐरापु विवि ४२९ ०फल-ळ—

न १ चंद्राची अनुकूलता. माणसाच्या जन्मराशीला चंद्राचें साहाय्य २ (ल ) मदत, साहाय्य 'नेदावें चोराशीं चंद्रबळ।' –तुगा ३२५३ ओढून चंद्रबळ आणणें–१ एखादी गोष्ट इष्ट असताहि वरपांगीं तिच्याविषयीं अनिच्छा दाखविणें, भाडें वढे घेणें 'आजीनें मला हाका मारल्या मी बराच वेळ ऊं ऊं करून ओढून चंद्रबळ आणिलें ... शवटी दुर्गीनें मला ओढून नेलें.' –पकोधे. २ अंगीं प्रतिष्ठा नसतां बळेंच धारण करणें (एखाद्यास) चंद्रबळ देणें–एखाद्यास कांहीं कार्याविषयीं उत्तेजन देणें –तुगा ३२५३. °वाळी–स्त्री (कु) कानांतील एक मोत्यांचा दागिना चंद्रपरवा यामध्यें चंद्रकोरेप्रमाणें हिरकणी बसवितात °बिंब–न चंद्राचें बिंब, मंडल, गोल [स] °मजकूर–पु (व) (विनोदानें) रोजची चंदी °मंडळ–न १ चंद्रलोक, चंद्रभुवन, चंद्राचें राज्य २ चंद्रबिंब. 'शुद्ध चंद्रमंडल पाहून स्नान करावें' [स] °मणि–पु एक काल्पनिक रत्न चंद्रकांत पहा चंद्रमा–पु १ चंद्र. 'मुखचंद्रीं चंद्रमा।' –एरुस्व ७.१७ २ (तंजा) एक शिरोभूषण [स] °मुखी–वदना–स्त्री. चंद्रासारखें जिचें तोंड आहे अशी रूपवती स्त्री, सुंदर स्त्री [स] °मूलिका, मूळ–स्त्रीन एक वनस्पति [सं] °मौळी–पु शंकर 'उठोनिया प्रात काळीं। वदनीं वदा चंद्रमौळी।' –भूपाळी गंगेची ६ 'नाम जपतां चंद्रमौळी। नामें तरला वाल्हा कोळी।' –तुगा २५२२ –वि (डोक्यावर चंद्र धारण करणारा) ज्याच्या छपरांतून चंद्रकिरणांचा प्रवेश आंत होतो असें (म्हणजे मोडकळीस आलेलें, जीर्ण झालेलें) घर इमारत, पडक्या घराला थ्याजोकीनें म्हणतात [स चंद्रमौलि=शंकर] म्ह° कळीवर नारळी आणि घर चंद्रमौळी °रेखा–स्त्री चंद्राची कोर. 'पाडिव्याची चंद्ररेखा। निरुती दावावया शाखा।' –ज्ञा १५ ४७०. [स] °वती–स्त्री चांदणें 'नदीतटीं रात्रीं न चंद्रवती।' –जगन्नाथ (शक १६६९) राजवाडे ग्रंथमाला °विकासी–वि चंद्रोदयानंतर उमलणारें (कमलादि पुष्प) °शाला–स्त्री उंच माडी, गच्ची 'चंद्रासही स्पर्शति चंद्रशाळा।' –सारुह ५ २० °समुद्रन्याय–चंद्रोदयानें समुद्रास भरती येते या न्यायानें 'बॉसवेल यास या महापंडिताचें (जॉन्सनचें) वक्तृत्वसेवन करण्याची अतोनात इच्छा होती व इकडे जॉन्सन यासहि कोणी भाविक श्रोता मिळाला असता चंद्रसमुद्रन्यायानें त्याच्या वाणीस माठें भरतें येई' –नि ६८६ °सूर–पु (योगशास्त्र) डाव्या नाकपुडीनें श्वास सोडणें याच्या उलट सूर्यसूर °सूर्य–पु (चंद्र आणि सूर्य) इडा व पिंगला या दोन नाड्या 'चंद्रसूर्यां बुझावणी। करूनि अनुहताची सुडावणी।' –ज्ञा १२ ५४ °सूर्यसंपुट–न वरील दोन नाड्यांचें संगमस्थान 'बंधत्रयाचीं घरटीं। चंद्रसूर्य संपुटीं। सुये चित्त।' –ज्ञा १३ ५०८. °हार–पु. स्त्रियांच्या गळ्यांतील एक अलंकार, सोन्याच्या कड्याची माळ

चंद्रकांत—पु (संगीत) गायनशास्त्रांतील एक राग या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात आरोहांत मध्यम वर्ज्य जाति षाडव-संपूर्ण, वादी गांधार, संवादी निषाद गानसमय रात्रीचा पहिला प्रहर [स]

चंद्रय, चंद्राय—पु चांदवा, छत, चांदणीमंडप 'चौभुता वस्तें काए केले। तेया शोभवते आकाश रचिलें। चंद्रयाचें परी विस्तरिलें। विशाल वस्तें।' –शिपु १ २ ४१ [चंद्र+आयत ?]

चंद्रवेली—स्त्री भंगी, चांभार खेरीज करून सर्व प्रकारच्या हिंदु-मुसलमानांचा एक गुन्हेगार पंथ –गुजा १६८

चंद्रस, चंद्रुस, चंद्रास—पु एका झाडाचा सुवासिक चीक, राळ, निघंटांत यास सर्जनिर्यास म्हटलें आहे 'विझवावया वडवानळा। धांविनला शुष्क तृणाचा पुतळा। लाक्षादंड हातीं घेतला। ओडण खादी चंद्रसाचें।' –ह २४.३१ [अर. सुंदरोस्, लॅ. सन्दरक, ग्री सन्दरकी]

चंद्रसेनीऊद—पु उदाची एक चांगली जात [चंद्रस]

चंद्रसेनीकापूर—पु कापराची एक सुवासिक जात [चंद्रस]

चंद्रामृत—न पु १ सतरावी कळा, चंद्रकिरणांतून होणारा अमृताचा स्राव 'सूर्य विकासिनी नेघ चंद्रामृत। वाट पाहे अस्त उदयाची।' –तुगा ७५७ 'तृषाक्रांत जैसा इच्छित जीवन। चकोर हा जाण चंद्रामृता।' –ब १५५ २ योगिक मतें मस्तकांत असणाऱ्या तळ्यांतील अमृत. 'तव वरिलेकडेनि ढाळें। चंद्रामृताचें तळें।' –ज्ञा ६ २४७ [स]

चंद्रार्क, चंद्रार्कवरि—क्रिवि (काव्य) चंद्रसूर्य आहेत तोंपावेतों, यावच्चंद्रदिवाकरौ, सतत, कायमचें निरंतर 'मग चंद्रार्कवरि। पुत्रपौत्रीं नांदाल।' [चंद्र+अर्क=सूर्य]

चंद्रावळी—स्त्री १ कृष्णाच्या अष्टनायिकांतील जी राही तिची बहीण. 'अविद्या चारिली चंद्रावळी।' –एरुस्व ८ २७ २ एक प्रकारचें गाणें [स]

चंद्रिका—स्त्री १ चांदणें, चंद्रप्रकाश 'जळीं चंद्रिकेचिया पसरतीं वली।' त वाढी चंद्रें नाहीं वाढविली।' –ज्ञा ९ १२३ २ (रंगारी) रंगाला येणारा तजेला, झिलाई, सफाई [स]

चंद्री—स्त्री १ तंद्री, टक, एकसारखी नजर, एकलय, एकाग्रता, ध्यानावस्था (प्राणोत्क्रमणसमयीं किंवा मद्याच्या धुंदींत) 'चंद्री लागे होय विरूप। जठराग्निहि विझे।' –स्वादि ११ ५ ३१ २ मनाची एकाग्रता झाली असता, एकाकडेच सारखें लक्ष लागलें असतां बुबुळांना जी निश्चलता येते ती (क्रि° लागणें) 'येकाच्या बैसल्या अमृतकळा। यकास चंद्री लागली डोळा।'

–दा ३ ५ ४ ' दृष्टीं वधियेला गजानें तो वैरी । तेणें नेत्रीं चंद्री लागलीस ।' ३ निश्चल न बसण्याजोगी स्थिति, ' दिवसभर मेल्याला चंद्री लागली आहे ' ४ अतिशय तल्फटा, चिंता ' परी सततीवाण दिसे दरिद्री । म्हणानी लागली मनीं चंद्री ।' –मुसभा ६ ८ ( एखाद्याची ) चंद्री मुलणें–गुग होणें–( हर्ष, भय, आश्चर्य यांच्या योगानें ) बावरणें, घाबरणें, गडबडणें, वेद्रोप होणें, बभान, गुग होणें ' लाकांचीं घरें भडभडा पेत चला हत पाहशील तर चंद्री गुग होईल ' –शाळ २ १ ० ४ [ स चंद्र ]

चंद्रो—स्त्री चदरी, पितळी वाटी. [ चदरी ]

चंद्री, चम्द्या—वि कपाळावर पांढरा ठिपका असणारी ( गाय, बैल, म्हैस, रेडा इ० ) [ चंद्र ]

चंद्रोदय—पु १ चंद्राचा उदय, चंद्राचें उगवणें २ दर महिन्यास चंद्राचा जो प्रथम उदय होतो तो, शुद्ध प्रतिपदा [ चंद्र+उदय ]

चनका, चनकावणें, चनकाविणें—चणका, चणकावणें, चणकाविणें पहा

चनी—स्त्री. ( महानु ) मोहर, बहर ' ज्ञानतरुची पहिली चनी ते । एसी हाय ' –भाए ५४१ [ हिं चनी=डाळीचा चुरा ? ]

चनाडा —पु ( ना ) कक्षाचा घेरा, सजाव [ चणोरा ? ]

चनफन—पुअव खोड्या, चाळे, चेष्टा, अपढंग ( कधीं एकवचनी प्रयोग ) [ छदफद अप ]

चन्नी—स्त्री (माण ) कपाळावर लहान पांढरा टिकला असलेली मेंढी [ चंद्री ]

चप—पु चपार, कौलाऱ्याचा छाट इमारत अगर रस्त्याचा कोंपरा पुढें आलेला असतो तो वळणावर छाटून टाकणें, ( इ ) चाफर

चप—न ( गो ) पोंचा आदळल्यामुळें भांड्यास आलेला बांक, वाकडेपणा [ चेपणें ]

चप—उद्गा गप! चीप! चूप! बोलूं नका –क्रिवि गप, स्तब्धपणें, शांतपणें, मुकाट्यानें, गुपचीप ( क्रि० बसणें, राहणें इ० ) [ स चप्–दाबणें, प्रा चप्प=दाबणें, म चपणें, गु चप=गप्प, हिं चपना=चूप होणें ]

चपई—वि चाफ्याप्रमाणें पिवळ्या रंगाचा ' ( कमरबंद ) चपई रंगाचा, सव्वातीन वार लांबीचा ' –खानो ३५ [ चपक प्रा चपय ]

चपक चपकण चपका—चवक, चवकण, चवका यांचा उच्चारभेद चवक इ० शब्द पहा

चपक—पु एक पुष्पवृक्ष, चाफा, हिरवा, सोन व पांढरा अशा याच्या जाती आहेत याच्या फुलावर भुंगा गुंजारव करीत नाहीं हा चाफा विषारी असल्यामुळें फुलांतील रस चाखल्यास तो मरतो असा कविसंकेत आहे ' पतंग कवळी दीपिकलिका । मधुकर सेवान चपका । विवर भाऊनि सर्पमुखा । मूषक जैसा प्रवेशा ।' –मुसादि २८१९ –न चाफ्याचें फूल [ स ] ०माला–स्त्री एका वृत्ताचें नाव, याला रूपवती, रुक्मवती अशींहि नावें आहेत याच्या एकेका चरणांत दहा अक्षरें व भ म स ग हे गण असतात उदा० ' धांव मुकुंदा दुष्टविमर्दा । धाव रमेशा दु खविनाशा ।'

चप–कन–कर–दिनीं–दिशीं—क्रिवि एका पळांत, निमिषार्धांत, अति त्वरेनें, लवकर, झटदिशीं, तावडतोब चटकन पहा ( क्रि० जाणें, येणें, उठणें इ० ) [ ध्व चप ]

चपकणें—अक्रि ( ना ) भांड्याला पोचा पडणें [ चप ]

चपकल, चपखल, चपका—चवकल पहा त्याबरोबर तें दार नरमाषावर फिरून पितळेच्या चौकटीत स्वदिशीं आवाज करून चपखल बसलें ' –कोरकि ३६६

चपका—पु १ चपकन मारलेली थाप चापट, चापटी, रपका, तडाखा ( क्रि० देणें ) चवक पहा २ ( गो ) पंजा [ चप ]

चपका—पु १ मारचूत, टाकणखार, काव इत्यादि लावून दागिना किंवा सोनें तावण व तें विस्तवात घालणें ( क्रि० देणें ) २ उजळा, जिल्हई देण्याची एक तऱ्हा, रीत पद्धत ३ दहीं, ताक वगैरेंचा आंबटपणा मोडण्यासाठीं तापविलेल्या पळींत तेल, जिरें, हिंग, मोहऱ्या वगैरे घालून ती पळी दहीं इ० कांत बुडविणें किंवा घालणें, फोडणी [ चप हिं. चपकाना ]

चपका—स्त्रीअव. ( खा ) चमका

चपचप—वि ( व ) ओला, भिज [ चिप्प ]

चपचप–पां—क्रिवि चटकन, झटपट, तडकाफडकी, पटकन 'चपचप जेव ' [ ध्व चप ]

चपचपणें—१ चवचवणें पहा ' अंगातला अंगरखा घामानें चपचपला ! ' २ मुरणें, ( गुणधर्म इ० नीं ) युक्त होणें ' सल्फ्युरिक आसिडांत चपचपलेले पार्मेस दगडाचे तुकडे ' रसापु १२१

चपटा–डा—वि १ बसका व सपाट नकटा, चापट बसकट, कमी उंच २ चेपटलेला, चिवळ, चापटलला, ठोकलला, चमरठ चापट पहा ३ लहान बारीक (डाळे) ४ ( व ) नकटा० [ स चपट, चपेट=हाताचा तळवा, म चापट तुल० फा चपट=सपाटपणा ]

चपटा–टे—पुन (कों ) एक प्रकारची कालस हा एका बाजूस करवतीसारखी असते [ चपटा ]

**चपटी-डी**—स्त्री १ ठोकून, चोपून चापट केलेली कोण तीहि वस्तु पदार्थ (पैसा, तिंबलेल्या कणकेचा गोळा, उदा). 'एडक्याचे टकरेनें पैशाची चपटी झाली' २ जोंधळ्याची हलकी (अरगडीसारखी) जात, ही गुजराथेंत होते —कृषि २६६ ३ दुध्या मोंपळ्याची एक जात —कृषि ६०३ [स चिपट, चिपिट]

**चपडा**—वि (सांकेतिक, भाजीपाला व्यवहार) दोन सख्या

**चपडा**—पु (व) शिवण्याचा दोरा गुंडाळलेलें पाकीट, दोऱ्याचें पाकीट [चापट]

**चपडाई**—स्त्री (खा) चपळाई —भाश्रे ७ १ ते ४

**चपडाई**—स्त्री (जरतारी धंदा) १ सुत चापट करणें २ चपण्याचें यंत्र

**चपडाक, चपराक**—स्त्री चापट, थप्पड [म चपट, चपेट]

**चपडा(टा)लाख, चपडीलाख चपडी**—स्त्री पातळ तुकड्याची, चकत्या पाडलेली लाख लाखेचा एक प्रकार [हिं चपडा लाक]

**चपडास, चपडाशी**—चपरास, चपराशी पहा [सिं चपिडासी]

**चपणी**—स्त्री वल्ह्याची फळी, वल्ह्याचें पातें —वि १ चपटें, बसकट, नकटें (नाक) २ चपटया नाकाचा, बसक्या नाकाचा, नकटा [स चपट]

**चपणी**—स्त्री झाकण, झाकणी, झाकण्याचें भांडें, वाडगा. —पेरापुप्र ९ ४५१ [हिं चपनी]

**चंपत होणें**—अक्रि १ एकदम अदृश्य होणें, नाहींसें होणें २ चटकन् निघून जाणें, दडी मारून बसणें, लपून बसणें, तोंड काळें करणें (कांहीं अपराध किंवा गुन्हा केल्यामुळें) [स चप्=जाणें, हिं चपत=अदृश्य, चपत्=पळून जाणें]

**चपताळ-तळा-ताळा, चपताड, चपताडा**—वि चापट, थापटका, पातळ आणि सपाट, चिपताळ चपटा पहा

**चपना**—वि १ डावखुरा २ डावा, उजव्या हातानें ज्या प्रमाणें काम झटपट सुलभतेनें व सुबक होतें तसेंच डाव्या हातानें करणारास म्हणतात 'हा चपन्या हातानें काम झरझर करतो.' [फा चप्=डावा हात]

**चपपक**—न धैर्य, चपूपक् ? 'तेणें चपपक त्याचें गेलें। म्हणे ओढवलें दुर्मरण।' —निगा १८

**चपरंग**—पुस्त्री चांगली नीट घासलेली, गुळगुळीत केलेली कवडी (मुलांच्या खेळांत चढण्या-टाकण्याकरितां)

**चपराक**—स्त्री चापट, थप्पड, चपडाक [ध्व]

**चपराकणें**—उक्रि चापट मारणें, थप्पड मारणें, रपाटा लगावणें, थालणें [चपराक]

**चपराशी-सी**—पु चपरास (बिल्ला) धारण करणारा, जासूद, नोकर, शिपाई, दूत, हरकारा, पट्टेवाला, सरकारी शिपाई [हिं]

**चपरास**—स्त्री १ शिपायाच्या गळ्यातील पट्टयावरील बिल्ला, बकल (पितळ, इ० धातूचा) २ मेणबत्ती इ० चा आकडा अडकविण्यासाठीं खाच, भिंत इ० कास जो धातूचा पत्रा किंवा चकती बसवितात ती ३ छातीचें कवच ४ बिजागरी कडी, जी कडी बसविण्यास मागें चापट भाग असतो ती [हिं]

**चपराळकी**—स्त्री चपराक, थप्पड 'त्यावर चपराळकी सारखें दुसरें रामबाण औषध नाहीं' —आगर ३ १०६ [ध्व]

**चपल, चपळ**—वि १ चलाख, तरतरीत, तल्लख, हुषार. २ चचल, अस्थिर, तरल, चुळबुळ्या ३ स्वैरिणी, स्वेच्छाचारी, छिचोर; उठवळ (स्त्री) ४ त्वरा असणारा, निसटणारा, हातीं न लागणारा ५ (शाप) उडून जाणारी, वायुपरिणामी, बाष्पभावी. (इ) व्होलटाईल [स चपल]

**चपल-ळ, चंपल, चपळी**—स्त्री पायांतील वहाण, चप्पल 'हा जरी गभीर होये। तरी चपल्या का खाये।' —कालिका पुराण १४ १४२ [ध्व चप, हिं चप्पल]

**चपला-ळा**—स्त्री १ वीज 'कीं अगावरी चपळा पडे।' —राधि ४४९ 'मधुनि मधुनि ही चचल चपला।' —मृ २ स्वैरिणी, कुलटा स्त्री 'फिरवित मकला। चपला भिंगरी।' मानाप —वि. चपळ पहा

**चपलिव्ह**—स्त्री एनॅमलची एक पद्धत पत्र्यावर खाचा पाडून एनॅमलची पूड टाकून कुरुंदाच्या दगडानें घासतात आणि जिल्हई चढवितात

**चपळा**—पु एक झुडप (इ) मिमोसा

**चपळाई**—स्त्री. १ चपळपणा, चलाखी, तरतरी, तल्लखपणा 'ही चपळाई वर्णनीय नव्हे काय?' —स्वप २ जलदी, त्वरा, घाई. [स चपल]

**चपा**—पु १ (व खा) चमचा २ (खा) दोन शेर धान्याचें माप

**चपाचप-पा**—क्रिवि चटकन्, चपकन चटदिशीं, झपा झप, झटकन्, चपचप पहा

**चपाट**—न रासरांगोळी, निःशेषता, मलनाश, उध्वस्त जमीनदोस्त केलेली किंवा खाऊन फडशा पाडलेली स्थिति 'चावोनी चपाट केलें भक्त भाळे। अव्यक्त ठेविलें निजप्रेम।' —ब ७०५ 'त्यानें शभर लाडवाचें एका क्षणात खाऊन चपाट केलें —वि १ उध्वस्त केलेला, जमीनदोस्त केलेला, सपाट करून टाकलेला, लुटलेला 'पेंढाऱ्यानीं गांवचे गांव चपाट करून टाकले' २ मारलेला, फन्ना उडविलेला; साफ, चाटूनपुसून स्वच्छ,

गुळगुळीत केलेला. 'त्याने दहा माकऱ्या खाऊन चपाट केल्या' [चपटा, चापट, चापणे]

**चपाटचें**—उक्रि (गो.) काबीज, हस्तगत करणें

**चपाटणें**—उक्रि (कु) १ खाऊन टाकणें; फन्ना उडविणें; यथेच्छ खाणें, चपाट करणें २ चटकन, झटकन उरकून टाकणें, आटोपणें (काम-धंदा). [चपाट]

**चपाटा**—पु १ वेग, सपाटा, झपाटा पहा. 'जो निघालों तो एका चपाट्यानें वीस कोस गेलों' २ (गो.) तावडी, हल्ला, मार. 'शिवाजीराजाचा चपाटा। फाजिलखान मारा वाटा' -ऐपो ७१ ३ झटका. 'याचे हातचे चपाट्यानें त्याचे डोकी वरचें पागोटें पडलें' [चप]

**चपाटी**—स्त्री १ चापट, थप्पड, रवका. २ (व) चिंचेच्या झाडाची तोडलेली फांदी [चपाट]

**चपाती**—स्त्री १ लाटण्यानें लाटल्यावाचून केलेली भाकर, पोळी. २ (सामा) पातळ पोळी, रोटी [हिं]

**चपापणें**—क्रि १ दचकणें, भिणें, घाबरणें, वचकणें 'कोतवालाचें शिंग वाजताच चोर चपापले' २ संकोच वाटणें, लज्जा किंवा भीति यामुळें माघार घेणें, मागें सरणें, दबणें, आकस्मिक लाजेनें वृत्तींत बदल होणें 'कृष्ण येतांच सर्व स्त्रिया चपापल्या.' [हिं चपना द्वि]

**चपापविणें**—उक्रि लाजविणें, शरमविणें, लज्जित करणें, ओशाळा करणें, मान खालीं घालावयास लावणें [चपापणें प्रयोजक]

**चपापां**—क्रिवि चपाचप-पा पहा

**चपाषष्ठी**—स्त्री मार्गशीर्ष शु॥ ६, खंडोबाचा सण. या दिवशीं खंडेरावानें मल्लासुराचा वध केला [सं]

**चपाष्टमी**—स्त्री. मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी, या दिवशीं खंडोबाचा कुळधर्म करावयाचा असतो [सं]

**चंपी**—स्त्री (गु) १ मर्दन, अंग रगडणें, चेपणें २ चेंदामेंदा 'पूर्वी हत्तीच्या पायीं बांधून त्याची चंपी करून सोडीत' -विक्षिप्त २ ४७ [स चप्=दाबणें, प्रा चप=दाबणें] ०उडविणें, करणें-फजीती करणें, थट्टा करणें या अर्थी वापरतात

**चंपू**—पु गद्यपद्यमय काव्य, उदा० नलचंपू, भारतचंपू, भोजचंपू इ० [स]

**चपेट**—स्त्री १ चापट, थापड, थप्पड, आघात, प्रहार, चपेटा, तडाखा (वाघाच्या किंवा मांजराच्या पंजाचा, हाताचा) 'मृत्युव्याघ्रे चपेटघात। मारूनि प्राण घेतला।' -मुमादि २७ १०६ 'माइल काय हरिची गज, गरुडाचीहि लावक चपेट।' -मोवद्योग १२ २४ २ दुर्दैवाचा किंवा मकट्याचा तडाखा, झपाटा ३ धंद्यांत बसलेली टोकर किंवा आलेली तूट (क्रि० मारणें, बसणें) 'यंदा गुरें मेल्यामुळें मोठी चपेट बसली' ४ तुफान किंवा एखाद्याचा हल्ला, धाड. ५ पिकावर हिंव, चिकटा, मोवा पडून किंवा पीक उंदरांनीं खाऊन झालेला नाश ६ भूत, पिशाच यांचा तडाखा, झपाटा ७ जुलमी राजाकडून, माणसाकडून झालेलें दु.ख, ताप ८ लढाईंत किंवा युद्धांत बसलेला आघात, लागलेला मार. ९ (ल) हाताची चापट, तडाखा -एभा १ ४४ 'घायपडरीची चाट। जव नाहीं चपेट। घात पडिला काळाचा।' -तु २५६४ १० वर्चस्व, सत्ता, मुठींत येणें 'ता माझे चपेटींत येईल त्या दिवशीं मारून निर्मंतान करीन' -वि १ इ० पाडलेला, उध्वस्त केलेला, जमीनदोस्त केलेला, उजाड पाडलेला २ (ल) खाऊन फस्त केलेला, सारून टाकलेला, लक्ष साफ केलेला चपेट (-नाम) पहा [म] ०साधणें-(व्यापारात वगैरे) चांगला लाग साधणें, चांगलें बस्तान बसणें, नीट सधान लागणें

**चपेटणें**—सक्रि मारणें, तडाखे लगावणें, झोडपणें 'हस्ति दंत दोघे घेऊन। पुढें चपेटनी धापनाराय [illegible] २९ ११' [illegible]

**चपेटा**—पु १ चपेट, चापट, [illegible]पट, चापटी, 'सिंहाचा जो बाल तोही चपेटा। मा[illegible] (गा.) पंजा मोठा।' -मराठी चवथें पुस्तक पृ १[illegible] झोत, तोसाटा ३ (काव्य) दांडगा, ज[illegible]चा हल्ला, [illegible]न येणारा, धांवणारा, धडकणारा, भयंकर लोंढा, पूर 'असो यशोदा ऐके सादर। गाऱ्हाणियाचे चपेटे थोर।' १६३. ४ (क) चपाटा, झपाटा 'तुज लागला एक[illegible] कोंचा चपेटा।' -भज ५३ [चपेटा]

**चप्प**—उद्गा गप्प! चीप! -[illegible]

**चप्पल**-ळ, चप्पली-ळी-[illegible]

**चप्पी**—स्त्री १ सबंध [illegible] करणें २ अंग रगडणें, [illegible] ३ वस्त्राचा [illegible], पट पोपाखाच्या [illegible], घडया चापूनचोपून बस[illegible]

**चप्पू**—वि १ सावध, हुशार, काळजीचा, आस्थेनें लक्षांत वाळगणारा, विवेकी, दूरदर्शी, शहाणा २ हुशार, समजूतदार (लहान मुलाला म्हणतात).

**चंव**—स्त्री चेपणें, दाबणें, चप पहा 'तावदानें ल बसवून चंव मारावी' -मॅरट २५

**चवक, चवकण चवका**—वचक, वचकण, वचका या शब्दापासून वर्णव्यत्यासानें झालेले शब्द

**चवकणें**—अक्रि चपापणें, वचकणें, दबणें, चपापणें पहा [वचकणें]

**चवकल, चवखल**—क्रिवि १ बरोबर, नीट, ठाकठीक ततोतंत, नमका, जसा हवा तसा 'हा चिरा चवकल बसला' २ (ल) समतवार, योग्य प्रकारें, लागू पडेल अशा रीतीनें

'त्याच्या प्रश्नास प्रत्युत्तर चवकल उतरलें, पहलें ' –वि १ अनुकूल सयुक्त, साजेसा, योग्य, युक्त, बरोबर २ न्यायाचा, खरा, रास्त

**चवचवणें**—अक्रि ओलें थबथबीत असणें, पाण्यानें पूर्ण पणें भिजलेलें असणें, चपचपणें [ ध्व ठिबकण्याचा चब चब आवाज ]

**चवचवीत**—विक्रिवि ओली, थबथबीत, चपचपीत, (पाणी, तूप इ० नीं ) थबथबीत, लिबलिबीत, चिंब, भिजलेलें (क्रि० भिजणें ) [ ध्व ]

**चवडच, चवडचीत चवढच, चवढचीत**—वि. ढवळ लेले, गदळ झालेलें, गढूळ ( पाणी )

**चवडा**—पु अवडा पहा हनुमतावरी अकस्मात। वेगें लोटला विनतासुत । चवडा चचूनें झडपित । परि किंचित न हाले।' –ह ३१.१४४

**चवडाक**—स्त्री चपडाक, चपराक पहा

तुकड्याची च, **चवडच**—स्त्री १ गढूळ किंवा घाण करण्याकरिता चपडा लाक ]डणें, हलविणें, एखादा घाणेरडा पदार्थ त्यात खळबळणें

चपडास वा चिबचिबीत करणें, पाणी कुचमल्यामुळें झालेली चपिडासी ] दार्थ, वस्त)फिरविणें,इकडे तिकडे फेकणें, अस्ताव्यस्त

चपणी अवाखर करणें ३ दुसऱ्याना त्रास होईल अशा रीतीनें १ चपटें, व ाखुड करणें, लाडा कारभार करणें, ढवळाढवळ ४ ( अन नाकाचा, चिवडणें, निवडणें, भेसळ करणें ५ वेतावर वेत करणें,

चपणी करणें, पैसा मिळविण्यासाठीं सर्व प्रकारच्या खेकटयात –ऐरापुप्र ९ ४५ पडणें, शिरणें, घालमेल, खटपट उपद्व्याप.

चपत हो स्त्री रेंदाडपणा ( पाणी इ० काचा ) ७ अव्यवस्थित २ चम्कन् ि वहा उखरवाखर ( वस्तूचा, पदार्थांचा ) ८ चिवडा काळें करणें (स्त्री पु ) ९ घोळ, घोळकार ( स्वच्छ आणि अस्वच्छ चप्=जाणें हि ाक० ( युक्त्या, बेत, मसलती ) पराभूत होणें,

चपताळ– फसणें, वाया जाणें ११ स्थानभ्रष्टता, अस्ताव्य चापट, था ( वस्तु कामें, मनुष्यें इ० चा ) [ ध्व चवडच, चिव

चपनढवळणें ]

प्रमाणें **चवढवी, चवडवी**—स्त्री व्यभिचारिणी, बदफैली स्त्री

**चवढवी-व्या, चवडवी व्या**—वि १ मनस्वी खेकटे खोर व साहसी, उपद्व्यापी, पैशासाठीं नाना तऱ्हेच्या हिक मती आणि युक्त्या करणारा, घालमेल्या, चळवळया २ ( ना ) हरहुन्नरी, अष्टपैलू चवडच पहा

**चवरख**—न चापट, चपराक ( क्रि० मारणें, चढवणें, उडून देणें )

**चवरचवर**—क्रिवि अवरचवर, अचावचा, वडवड करून, खवलब, बुरबुर, तोंडास येईल तसें, अद्वातद्वा. ( क्रि० बोलणें ) दाको १ २९

–न १ गप्पाष्टकें, चकाटया, गोष्टिप्रसाद, रिकामी वटवट २ ( विप्र ) अवरचवर, अरबटचरबट, गरीबाचें, अल्प, शिळेंपाकें, वेचव अन्न [ ध्व अवरचवर, फा चर्ब्=स्निग्ध अस्खलित भाषण द्वि ]

**चवरा, चवरट**—वि ( व ) वडवड करणारा, वाजवीपेक्षा जास्त बोलणारा, वाचाळ

**चंवा**—वि तरळ, चचल, हलणारें ' चित्सौंदर्या चंवा नयनीं सुवाया हत्लखवा वरिल्या विंवा । ' –अमृत १०१ [ स चम्=हलणें, जाणें ] ०रुमाल–पु एक वस्त्र

**चवाचणें**—१ थबकणें, दबकणें ' चवाविती थवाविती । काल्वे पाट । ' –दा १६ ४ २५ २ थबकणें, दचकणें, चपा पणें पहा

**चवावा**—क्रिवि. चवचव असा आवाज होऊन ' सहज चालता चवावा । पाणी वाजे । ' –दावि २४४ [ ध्व ]

**चविणा-ना, चवीना**—पु १ चावून खाण्याचे पदार्थ, भाजलेलें धान्य, हरभरे, फुटाणे इ० २ ( अशिष्ट ) चावण्याचें, चर्वण्याचें, चर्वण करण्याचें यत्र, दाढा. ३ ( सामा ) चर्वण, सारखें तोंड चालणें ' पोराचा दिवसभर चविणा चालला ' [ स चर्वण, हिं. चबाना=चर्वण करणें, चबेना=भाजका पदार्थ चणे इ० ]

**चवुतरा, चवुत्रा**—पु १ महालाच्या किंवा पेठेच्या मुख्य अधिकाऱ्याची, कोतवालाची, न्यायाधिशाची कचेरी, चावडी, चौकी २ दस्तुरी घेण्याचें स्थळ, नाका, नाकें–वाडमा २ १०७ ३ चौकोनी ओटा, उचवटा, चौथरा ४ रिकामटे कडया लोकाचें वाता मारण्याचें स्थळ, जागा, कुटाळाचा अड्डा, खुट [ हि चबूतरा चबूत्रा, तुल म चौथरा, चवुतरा ]

**चबू-भू**—पु पोट मोठें पण गळा लहान असें उभट भांडें, गडवा, गिंडी, एक धातूच पात्र, सुरई, गडू [का चबु] (बाप्र ) ०होणें–निरुत्तर होणें, स्तब्ध बसावयास लागणें सामाशब्द– ०गबाळें–न (सोवळेंभाडें) १ भाडींकुडीं, कपडेलत्ते वगैरे सामान सुमान २ बिऱ्हाड, वस्ती, बस्तान ' मनुष्य एकदा कोणत्याहि गोष्टीविषयीं अत्यत आतुर झाला म्हणजे सारासार विचार व शक्याशक्यतेचा सभव ओळखणारी त्याच्यातील अक्कल आपलें चबुगबाळें उचलून पार चालती होते ' –वाईकर भटजी [ चबू+गबाळें=मुकटा वगैरे ठेवण्याची पिशवी, फडकें ] ०गबाळें आटोपणें–निघून जाण्यासाठीं सामानाची आवरा आवर करणें बाधाबाध करणें, मुक्काम हलविणें, बिऱ्हाड उचलणें ' आपलें चबुगबाळें आटापून तो तुळापुरी आला ' –स्वप ११ ०गबाळें फेकणें–बळेंच आमत्रण लावणें, आगतुक जाणें

**चंपेल, चंपेली, चंपेली अत्तर**—चमेल, चमेली, चमेली अत्तर पहा.

**चमळ**—वि. ढिला; सैल; भिजल्याच्या, वापरल्याच्या योगानें इ०. पसरट झालेला; लापट.

**चंभारकुकडा**—पु. (व.) कोकीळ पक्षी.

**चमक**—स्त्री. १ लकाकी; तकतकी; चकाकी; झगमग; छटा; झळक. (क्रि० मारणें). 'धातूसारखी चमक.' २ विजेचा प्रकाश. 'जैसी स्याम मेघडंबरी । चमका मारिती चपळापरी ।' —नव १५.१४०. २ (ल.) पेच; हूल, हुलकावणी; ज्याची नुसती हुलकावणी दाखवावयाची असा प्रहार; हेतूचें खोटें दिग्दर्शन; बतावणी; ढोंग. 'एकीकडे चमक दावोनी । सवेंचि गदा हाणिती फिरवोनी ।' ३ (स्नायूंचें) स्फुरण; हलणें; उडणें; धमक. (पाठींत, कमरेंत, पोटांत, डोक्यांत, अवयवांत उठणारी) तिडीक; रिणक; ठणका; वेदना; उसण. (क्रि० मारणें; येणें; उठणें; निघणें; भरणें; चालणें; चढणें; काढणें; उतरवणें). धमक पहा. ४ प्रभा; तेज; लकाकी (सोनें, हिरा इ० ची). ५ एक अलंकार. चमकी पहा. ६ बूज; धावरटपणा. 'प्रथम त्याला माणसाकडून त्याची चमक घालवावयाची असते' —चिमा १२. [ हिं. चमक; सं. कम्=प्रकाशणें किंवा चमत्कृ ]

**चमकणें**—अक्रि. १ लखलखणें; चकाकणें; तकतकणें. २ चमकून चालणें; डौलानें चालणें; नखऱ्यानें चालणें; ठुमकत चालणें. (स्त्रियासंबंधीं) 'त्या मागें जनक कुमारी । हंसगति चमकतसे ।' ३ (कों.) चालणें. 'पारिखा पाईं कृष्ण ठाके । हें बोलणें समूळ लटिकें । ऐसें जाणोनि निश्चकें । चरणीं चमके वैदर्भी ।' —एरुस्व ६.६६. 'व्याधि हरूनि चमकिला । खडाखडां पावलीं ।' —शिपु २.३६.६७. ४ शिणका लागल्यामुळें व्यथित होणें. ५ दचकणें; बुजणें; भिणें. 'वाघ जवळ येण्यास चमकणार नाहीं.' ६ चमक भरल्यासारखें करणें. 'देदे म्हणोनि चमके, करि फार धाई ।' —आपू २३.७ पुन्हां प्रकट होणें; वारंवार येणें. [ सं. चमत्कृ; किंवा कम्=प्रकाशणें; चमक; हिं. चमकना ]

**चमकणें**—अक्रि. आश्चर्यचकित होणें. 'प्रबोध पारवे घुमघुमिती । तेणें वागेश्वरी चमके चित्तीं ।' —एरुस्व २.७. [ सं. चमत्कृ; प्रा. चमक ]

**चमकबिजली**—स्त्री. चपळ व सौंदर्यसंपन्न स्त्री. —वि. (व.) नाचरी; नखरेबाज (स्त्री). [ चमकणें+बिजली ]

**चमकविणें, चमकाविणें**—उक्रि. १ शोभविणें; लकाकविणें; चकाकविणें २ रपाटून, सडकून फटके मारणें, छड्या मारणें; डोळ्यांपुढें काजवे चमकतील असें करणें; मारणें; रागें भरणें. ३ शृंगारचेष्टा करणें (डोळे, नथ इ० कांची चमक बाहेर दिसे अशा प्रकारें). —अक्रि विराजणें; विलसणें; चमकून दिसणें. [ चमकणें प्रयोजक ]

**चमकी**—स्त्री. १ छडी; वेताटी; वेत; वेताची काठी; चाबूक; चमकविण्याचें साधन, चाबकाचा मार, फटका. 'अंगावरती चमक्यांची ओळ ।' —भफला ६५. २ कानांतला सोन्याचा टोलक किंवा लवंग; *स्त्रिया–विशेषतः मुली–नाकांत घालतात* तो सोन्याचा दागिना; नथेवर, गुंडीवर शोभा येण्याकरितां जी हिरकणी बसवितात ती; मुगवट; मुरकी. ३ हिरा, कांच इ० चा तुकडा; टिकली. ४ (जरतारधंदा) बनावट रेशीम. 'चमकी गोफ' =बनावट रेशमाचा (चपटा) गोफ. [ चमक ]

**चमकु(को)रा**—पु. (व.) अळू; पोथीचीं पानें. 'चमकोऱ्याची भाजी केली होती.' [ सं. चामा=मर्द+कूरा=पालेभाजी]

**चमचम-मां**—क्रिवि. १ छडी मारतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें ध्वनि होऊन; छमछम, चटचट. म्ह० छडी लागे चमचम विद्या येई घमघम. २ पायांच्या बोटांतील वाघ्यांचें छणछण वाजणें; छन्छन्. 'वाघऱ्या चमचम वाजतात.' [ ध्व. चमचम]

**चमचमणें**—अक्रि. १ (कु.) झोंबणें; चुरचुरणें. २ चमकणें. 'भालावर घर्मबिंदु चमचमती ।' —विक ६१ [ चमचम ]

**चमचमाट**—पु. रोषणाई; आरास; झगझग; चकचकाट (दिवे, रत्नें, दिमाख भडक पोषाख यांचा). विजेचें लकाकणें, चकचकाटणें; लकाकी; झकझकाट; शोभा. 'दिवाळींत घरोघर दिव्यांचा चमचमाट असतो.' [ चमचम; हिं. चमचमाहट ]

**चमचमाट**—पु. १ भोजनाच्या पदार्थांची चंगळ, विपुलता; समृद्धि; बहार; दिवाळी; धुमाळी; रंगलूट; चमशान; धुमचक्री; सुग्रास जेवणें. २ (अन्नाचा, खाद्य पदार्थांचा) उत्तम मसाले वगैरे घालून आलेला खमखमीतपणा; खमंगपणा. [ सं. चम्=खाणें; तुल० चमचम ]

**चमचमी(मि)त**—वि. १ चांगला मालमसाला घालून तयार करविलेला, शिजविलेला; खमखमीत; खमंग; रुचकर. २ विपुल; रगड; लागेल तितका; यथेष्ट (पक्वान्नें, खेळ, क्रीडा, दारूकाम). ३ स्वच्छ, निर्मळ; अघळपघळ. 'मधेंचि चमचमित लिहावें ।' —दा १९.१.११. [ सं. चम्=खाणें; चमचम ]

**चमचा**—पु. एक प्रकारची उथळ व लांबट तोंडाची लहान पळी. [ सं. चमस; फा. चम्चा; हिं. चमचा ]

**चमडी**—स्त्री. चामडी; कातडें; त्वचा. [ सं. चर्म; हिं. चमडा ] म्ह० १ चमडी फाटे वस्त्र न फाटे=अत्यंत चिवट कापड. २ (व) चमडी जाय पण दमडी न जाय=अत्यंत कंजूष माणसाला लावतात.

**चमत्कार, चमत्कृति**—पु. १ आश्चर्य; आश्चर्यकारक वस्तु, वृत्त, स्थिति, गोष्ट, प्रकार, देखावा. 'श्लेषयुक्त शब्दाच्या एका अर्थाबरोबर दुसराही अर्थ सुचून चमत्कृति उत्पन्न करितां येते.' —जन्मरहस्य ११. २ आश्चर्य; नवल; अचंबा. (क्रि० होणें;

वाटणें ) ३ देव, औषध इ० पदार्थांचा आश्चर्य वाटावयाजोगा अनुभव [स चमत्कृ-कार]

**चमत्कारणें**—अक्रि. चमत्कार वाटणें, आश्चर्यचकित होणें, विस्मित होणें, नवल वाटणें 'देखूनि अजगराची मातु। चमत्कारिला प्रमित सुतु।' -मुआदि ३ ८० मुनि मनीं चमत्कारला। म्हणे हें काय आठवलें इला। जाणोनिया सध्याकाळा। केवीं मागे ऋतुदान।' -जै ७८ ४० -स्वादि ८ ३ ४९, [चमत्कार]

**चमत्कारिक, चमत्कारी, चमत्कृत**—वि १ आश्चर्यकारक, विलक्षण, अचबा वाटण्यासारखा, अद्भुत २ ( निंदार्थी) विलक्षण, गैर रीतीचा, चालीचा ३ विशेष, असाधारण, असामान्य [स]

**चमन**—पु १ फुलबाग, फुलांचा ताटवा ।' फिरोन विलोकितां तें स्थळीं चमन।' -दावि ४०३ २ दिखाऊपणा, भपका, दिमाख, डौल, थाटमाट, भव्यपणा, डामडौल, झगझगाट ( मंगल समारंभाचा ) ३ बहार, चैन, चंगळ, मजा 'न करी आचमन, आहे चमन।' -अमृत (कटाव) पृ २५ ४ अत्यानंद मनीं चमन भरून।'-भज ६९ [फा चमन्] ०दहीं-न सुवासिक दहीं तीन शेर दूध तापत ठेवून अडीच शेर उरवावें, निवल्यावर त्यात १५ भार साखर घालून आंबट ताक विरजणास घालावें, भांड्याच्या तोंडावर गुलाबाचीं फुलें ठेवावीं दुसरे दिवशीं फुलें काढून दहीं वाढण्यास घ्यावें -पाक ४७

**चमनी**—वि. रंगेल, गमत खेळ, करमणूक यांचा शौकी, ख्यालीखुशालीचा [चमन]

**चमरी, चमरमृग**—स्त्रीपु वनगाय, मृगविशेष याच्या पुच्छाच्या केसांची चवरी करतात [स चमर]

**चमस**—पु १ यज्ञात सोमरस ज्या लाकडी पात्रांतून ठेवतात तें पात्र हें चौकोनी असतें चमस आणिलें चौमुखी पात्र। यालागीं।' -कथा ३ ८ १३९ २ चमचा पळी [स चमस]

**चमार**—पु. चांभार [स चर्मकार, प्रा चम्मार, हिं चमार]

**चमू**—स्त्री सेना सैन्य 'पांडव-चमू-पतीचें मथुनि चमू पाडिलें पतित्व रितें।' -मोभीष्म ४ १० [स]

**चमेटी**—स्त्री हत्तीच्या पायास बांधण्याचा फास [स चर्मेष्ट, प्रा चम्मेट्ठ हिं चमोरी]

**चमेल, चमेली**—स्त्रीन १ एक फुलझाड व त्याचें फूल २ चमेलीचें अत्तर, तेल

**चमेली**—स्त्री तोफेचे गोळे मोजण्याचें लोखंडाचें माप, वजन ०नळा-पु एक प्रकारचा भुईनळा -अभि २१

**चम्मन**—स्त्री चैन, चमन पहा 'चम्मन चालते आहे लेकाची त्या बाईच्या देणग्यावर' -वज्राघात ११४

**चय**—पु १ एके ठिकाणी रास करणें, राशि, एकत्र जमाव, समूह समूह (समासांत) अपचय, संचय, समुच्चय २ भूमिति श्रेढी ३ गणितश्रेढी [स ची-चय]

**चम्मा**—(कों ) ताव, हात मारणें. [चमन]

**चयन**—न गोळा करणें, एकत्र जमविणें, रास करणें. संचय, समूह. -पु १ अग्निचिति, अग्निष्टोमादि सोमयज्ञास जोडून करावयाचें एक श्रौतकर्म यांत विशिष्ट आकाराच्या विटा तयार करून त्या श्येन, कूर्म इ० आकाराच्या मांडून त्याची वेदी करून त्यावर याग करावयाचा असतो २ अशा प्रकारचा यज्ञ [स]

**चयन**—स्त्री १ चैन, स्वत स रंजविणें, बागातून फिरणें, भ्रमण करणें, भटकणें, सहल करणें, खेळांत, क्रीडेंत विविध करमणुकींत दंग असणें, मजा मारणें इ०, मजा, गमत, चैन पहा. २ विश्रांति, आराम, सुख, स्वास्थ्य. [चैन] ०पडणें चैन पडणें-आराम वाटणें ०बाजी-स्त्री चैन, चनबाजी

**चयनी**—वि सुखाचा, चैनीचा, रंजनाचा शौकी चैनी पहा

**चर**—न १ अंतरिक्षातील तारादिकांचें ग्वेस ( ग्वेवरून प्रथम याम्योत्तर जातें असें मानलें आहे ) उगवणें आणि त्याचें एखाद्या विवक्षित स्थळीं उगवणें या दोहोंच्या कालातील अंतर, रेखांतर, स्पष्टपरिधि २ ( फलज्योतिष ) सोमवार ३ ( सांकेतिक) गमन -वि १ हलणारा, जंगम, चालणारा, सरणारा, जाणारा, चलनशील, ज्याचें स्थित्यंतर करता येतें असा ( वस्तु किंवा पदार्थ, मालमत्ता, चीजवस्त ) चर°च्य जलचर, खेचर, भूचर, वनचर 'स्थिरचर व्यापुनि अवघा तो परमात्मा दशांगुळें उरला।' -धुंडिराजकृत प्रल्हादचरित्र २ स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका इ० नक्षत्रें ३ मेष, कर्क, तुला मकर इ० राशी, एखादी गोष्ट किंवा कार्य करण्यास आरंभ या नक्षत्रराशींच्या वेळीं केल्यास फल निष्पत्ति लवकर होते, परंतु तें कार्य चिरस्थायी व्हावें असें वाटत असल्यास या काळात आरंभ करता कामा नये असें फलज्योतिष सांगतें नक्षत्रें, राशी, लग्नें यांचे तीन पुढील प्रकार केले आहेत — १ चर=चरस्वभाव २ स्थिर= स्थिरस्वभाव व ३ द्विस्वभाव चरराशी -मेष कर्क तुला, मकर स्थिरराशी -वृषभ, सिंह, वृश्चिक कुंभ द्विस्वभाव- मिथुन, कन्या धन, मीन ४ ( व्यापक ) चालण्याच्या, सरण्याच्या, पळण्याच्या बेतात असलेला, गमनोन्मुख झालेला, निघण्याच्या बेतांत असलेला, निघायला अगदीं तयार झालेला [स चर्=चालणें] सामासशब्द- ०खंड-न चर अर्थ १ पहा विषुवांशासंबंधीं अंतर, चरार्ध;

चरदल ०ज्या-स्त्री चराची ज्या ०मूर्ति-स्त्री रविबिंब, अगर दिङ्मोच्या वर्गी मिरविण्यांत येणारी लहान मूर्ति, उत्सवमूर्ति

चर—पु कोटाच्या, किल्ल्याच्या भोंवतालचा खंदक खाच, लांबलचक खळगा, खाई, खड्डा, दरळ, टरळी, जमिनीखालीं केलेलें भुयार -पुस्त्री १ (घासल्याच्या, चोळल्याच्या योगानें किंवा इतर कारणानें पडलेला ) ओरखडा, चरा ओरखाडा, (क्रि० पडणें) २ चिरडणें, चिपळणें, चरत जाणें ( अशाम मण, इ० ). ३ कैवाकवेगामुळें द्रवपदार्थ पसरणें [ हिं, म चरणें ]

चर—पु (कोळी) कोळपाजवळ असलेला मोठा पुरा -गुभा ९८

चरक—पु १ उसाचा रस काढावयाचा बैलाच्या घाण्या-सारखा लांकडी घाणा, यत्र २ ( उप ) दांत आणि जबडे, टाळीं, तोंड ( पीठ करण्याचें जणू यत्र ) ३ कातण्याचें काम, धातुमय पात्रावर नंगी कापसातील सरकी काढून तो साफ करणें, किंवा दुसरीं अशाच प्रकारचीं कामें करण्यासाठीं जें यंत्र असतें तें, उजळा देण्याचें नक्षी करण्याचें यत्र ४ दळण्याचें, पीठ करण्याचें, वाटण्याचें यत्र 'पुरण वाटण्याचा चरक' ५ चक्कर मारणें, फेरा घालणें, गिरक्या घालणें ६ (ल) कोणतीहि एखादी गोष्ट सतत चालू राहणें, सतत चालणारें काम 'खाण्याचा लिहिण्याचा, स्वयपाकाचा पाहुण्यांचा चरक चालला आहे' ७ जिल्हई करण्याचें यत्र [फा. चर्ख, तुल० स चक्र-चक्कर, चरक] (वाप्र) चरकीं धरणें-१ चरकावर लावणें, धरणें २ (ल) कामांत धरणें, खूप मेहनत करविणें, सारखें खपविणें ( एखा द्याच्या कामांत, धंदांत अभ्यासांत ), एखाद्या कामावर इकडे तिकडे न होऊ देतां कुयविणें

चरक—पु (जरतार धंदा) वाटोळी मोठी परडी ०पाठ-पु पटवकरी कामासाठीं सुताचा विडा

चरक-ख—क्रिवि चक्र गुग कुंठित स्तंभित, आश्चर्य चकित ( क्रि० होणें ) 'माझीबुद्धि अक्कल चरक झाली' 'मी चरख झालों' [ चरकणें ]

चरकट—पु १ चन्हाट पाल्हाळिक गोष्ट, मिळमिळीत, नीरस चघळपणाची गोष्ट चरपटपंजरी, चावटाई २ (प्रां) चापटी, चपराक ( क्रि० मारणें, चढवणें ) [ स चर्पट ]

चरकटणें—१ ( राजा ) गबाळीपणानें व सैल असे दोर खड वळणें कशी तरी घाईनें दोरी वळणें २ (ल) भरकटणें, सरासरी निष्काळजीपणानें करणें, गडबडगुंडा करणें, घोंटाळा करणें गुरकाटणें, भलतेंच करणें 'एका क्षणांत त्यानें दहा बद चरकटले म्हणून त्यांत फार अशुद्धें पडलीं ३ तासणें [चरकट]

चरकट्या—वि निष्काळजीपणानें कसें तरी सरासरी काम करणारा घिसाडघाई करणारा, दडप्या [ चरकटणें ]

चरकणें—अक्रि, फाटणें, टरकावणें -अक्रि १ फाटल्या सारखें होणें, वाटणें, अंत करण द्विधा होणें, अत्यत व्यथित होणें, कष्ट दुःख होणें, व्यग्र होणें, कष्टी होणें 'सुवर्ण की त्याच्या घर बत असे तो दिसपना।' -विवि ८ १ ७० २ ( भीतीमुळें ) गांगावणें, प्रेधा होणें, गोंधळणें, घाबरणें 'बाप दृष्टीस पडतांच मी चरकलों' 'घमेस जातांच त्याची बुद्धि चरकली' ३ (व) मनांत समजणें (प्र) तरकणें [ध्व फाटण्याचा चर आवाज]

चर-चर-कर-दिनीं-दिशीं—क्रिवि. १ फाडतांना, टर कर्तांना, भाजतांना जो आवाज होतो त्या सारखा ध्वनि होऊन, टरकून ( क्रि० फाटणें, चिरणें ) २ एकदम शहारे येऊन, वेदना उत्पन्न होऊन, व्यथा पावून

चरचपूजा—स्त्री (व.) आकडपाला किंवा गळाला टोंचत, लोंबकळत राहणें, बगाड घेणें [चाक=चक्र+पूजा]

चरका—पु १ जळलें, भाजलें असतांना जो चर्र आवाज किंवा वेदना होते ती २ चटका डाग, डाव ( क्रि० बसणें ) ३ भाजीला फोडणी घातली किंवा भाजी फोडणीस टाकली असतां जो चर्र आवाज होतो तो; तापविलेलें हत्यार पात्र इ० पाण्यांत बुडविलें किंवा त्यावर पाणी टाकलें असतां जो आवाज होतो तो ( क्रि० बसणें, देणें ) ४ मनाला होणाऱ्या वेदना, चटका, अत करणावर आकस्मिक बसणारा घाव, मर्मभेद, धक्का 'बघुनि त्या भयकर मृता या हृदया चरका बसला।' -शारदा [ध्व चर्र फा चरका=लहान जखम]

चरका—चरखा पहा.

चरकी—स्त्री ( चांभारी ) कोंकराचें अगर करडाचें पाढऱ्या रंगावर कमाविलेलें कातडें

चरकी—वि चरकावर धरून साफ केलेलें, जिल्हई दिलेलें, पॉलिश केलेलें ( भांडें ) [ चरक ]

चरकी-खी—१ ( चाकू कातर इ० स ) धार लावण्याचें यत्र चाक 'भांडीं, जमुरे चरख्या आदिकरून यंत्रें गुरजागुरजास ठेवावीं' -मराभा १३ २ चरकीबाण ( शोभेच्या ) दारूचा एक प्रकार. ( दारूनें भरलेली लोखंडी नळी काटीला बाधतात ) ३ लोंकर, ताग अबाडी इ० चे धागे काढण्याकरितां केलेलें लांकडाचें साधन यत्र, तकुटी, चाती ४ चरक घाणा 'घाणा चरखी सिरकला। चाकाखालें सापडला।' -दा ३ ७ ८४ [ फा चर्खा, स चक्र-चक्री ]

चरकें—न ( गो ) काजूच्या बियांच्या खेळांत बियांच्या जमावाचें नांव

चरक्या—वि चरक चालविणारा

चरख, चरखी—चरक चरकी पहा

**चरखा**—पु सुत काढण्याचें यंत्र, रहाट [ फा चर्खा, सं चक्र ] ०**कारागिरी**-स्त्री चरख्यावर सुत काढण्याची कला 'हिंदुस्थानची प्राचीन चरखाकारागिरी नशी बुडाली याबद्दल ऊर बडवावा.' –नाकु ३ १६

**चरखावणें**—( ना ) चणखावणें पहा

**चरगण**—न १ कुरण, गायरान, गायरानांतील जमीन २ चारा, गायरानांत उगवलेलें गवत 'पाऊस पडला तरी चरगण व्हावयाला एक महिना पाहिजे' [ चरणें ]

**चरचर-रा**—स्त्री १ चुरचुर, तीक्ष्ण, तीव्र वेदना, सुपत असलेलें दुःख, इजा, झणझणणें. ( क्रि० लागणें ) २ ( ल ) पश्चात्ताप, रुखरुख, हुरहुर ( क्रि० लागणें ) ३ तीक्ष्णता (शस्त्र, हत्यार इ० ची ) ४ खोंच, खमंगपणा, औद्धत्य, चपलता (भाषणाची) –क्रिवि. १ चिरण्याचे, टरकण्याचे वेळीं होणाऱ्या आवाजाचें अनुकरण २ फडफडणें झडझडणें, खडखडणें, सरसरणें थुंकणें, थुंकत बोलणें, फुमकारणें, तडतडणें, चरचरणें, वाळलेलें गवत कापणें धसाधस कापणें इ० क्रियांच्या आवाजासारखा ध्वनि होऊन 'मग कठनाळ चरचर तो सत्य करावया विरुद कापी।' –मोकर्ण ४५ १४. 'धावे कीं चरचरा नरा खावें।' –मोआदि ३० २१ 'पुनरपि त्या पापानीं सद्विप्र कुमार चरचरां चिरिला।' मोआदि ९ २६ ३ तडकाफडकीं किंवा भरभर बोलणें, लिहिणें, शिकणें, या व इतर क्रियांच्या तऱ्हांचें अनुकरणात्मक ४ पोळल्या-भाजल्या, प्रमाणें वेदना देत 'चरचर चुरचुर लागेना। ऐसें करावें।' –दा १४ ४ ७ –वि क्रिवि. तीक्ष्ण, तिखट ( धार ) ( क्रि० करणें, लावणें ) [ ध्व चर्र् द्वि ]

**चरचरणें**—अक्रि १ चरचर आवाज करणें २ चरकणें पहा

**चरचरीत**—वि १ खरखरीत, भरभरीत, खुपणारें, जाडेंभरडें ( जीभ, वाळलेलीं पानें, वाळू, पीठ इ० ) २ तिखट, चणचणीत, झणझणीत, तोंडाला भाजणारें, झोंबणारें (तिखट, मसाला घातल्यामुळें पदार्थ) ३ खरमरीत, ठसठशीत, स्पष्ट व खडखडीत ( भाषण हुकूम ) ४ तिखट, तीक्ष्ण ( धार ) –क्रिवि पुरेपूर, धडधडीत, निखालस, तब्बल, बरोबर खास, नक्की 'हें कापड चरचरीत पधरा हात लांब आहे' चरचरीत पंचवीस रुपये पडतील' [ चरचर ]

**चरचीक**—वि ( राजा. ) तल्लख, हुषार, दक्ष, चणचणीत, चमिबाग

**चरचोंडा**—वि ( को ) चव्हाडी गवगवा, बोंबाबोंब करणारा, वेडयावेडयासारखें बोलणारा वल्गना, जल्पना करणारा, भकणारा, बोंबल्यागणेश, सर्व उघड करून दाखविणारा ( मूर्ख माणूस )

**चरट**—न. ( क ) चव्हाट, दोर, शेरी 'तरी त्याला भ्राती चरट न दिसे सर्पचि दिसे।' –वामन स्फुट श्लोक ९ ५.

**चरटी**—स्त्री ( वे ) नारळाची करटी [ का ]

**चरड, चरंडा**—नपु कोंडा, भुस, भरडा, कण्या, न दळले गेलले दाणे ( जोंधळा, गहूं याचे ) [ चुरडणें, चुरडा ]

**चरडक, चरढक**—न चपळपणानें लावलेली भाषा, चर्पटपंजरी, पाल्हाळ ( क्रि० लावणें, करणें; माडणें ) [चरड+क प्रत्यय ]

**चरडणें**—उक्रि भरडणें (धान्य, भात), सालपटें काढण्याकरिता जात्यात घालून जाड दळणें, जाडेंभरडें दळणें

**चरडभरड**—स्त्री १ जाडेंभरडें दळणें, चरडणें किंवा भरडणें २ अशा रीतीनें दळलेला-भरडलेला पदार्थ [ चरडणें+भरडणें ]

**चरण**—न १ पाय २ छंदाचा, वृत्ताचा, एक भाग, पाद. ३ चतुर्थांश ( श्लोक, नक्षत्र, रुपया इ० चा ) ४ प्रथम चरण, आरंभ, प्रथमभाग ५ अभग इ० प्राकृत कवितेचें, गीताचें कडवें ६ हस्त नक्षत्राचा चतुर्थ पाद, चतुर्थांश कुणबी लोकात या चार पादाना अनुक्रमें लोखडी, तांबेरी, रुपेरी, सोनेरी असें म्हणतात कारण पहिल्या पादात पडलेल्या पावसाच्या योगानें जमीन कठिण होते, दुसऱ्यामुळें चागली होते, तिसऱ्या व चवथ्यामुळें विशेष चागली होते ७ जोडा 'शाहूमहाराज मध्यघराच्या दरवाजात गेले व तेथें चरण टाकिले' [स चरण+चर्=जाणें] (वाप्र ) ०**लागणें**-घरीं येणें, भेटणें, आगमन होणें 'आपले चरण माझ्या वाड्यास लागावे अशी इच्छा धरून . विनंति करितों' –रत्न १६ ०**धरणें, चरणीं लागणें**-१ आश्रय करणें, आश्रय करून राहणें २ शरण जाणें, प्रार्थना किंवा मिनतवाऱ्या करणें ३ नमस्कार, वंदन करणें 'सौमित्र चरणीं लागला। ते स्थळीं शंकर स्थापिला।' सामाशंकर- ०**चारिया, चारी-च्यारी**-वि १ पादचारी, चरणचाली पहा तो कैवल्यनाथु चरण चारिया। पदें ठेवी जेथ वरिया।' –ऋ २२ २ पायउतार, पायदळ वीर भद्र चरणच्यारी।' –उषा १३५१ ०**चाल**-स्त्री पायीं चालणें, गमन करणें **चरणचाली, चरणचालीनें**-क्रिवि १ नुसत्या पायानीं पायीं 'तैसी माया माहेर साडूनि वेगीं। चरणचाली निघाली। –एरुस्व ६ ६४. 'राज्य हिरोनि वल्कलवसनीं। चरणचाली दवडिले वनीं।' –मुसभा १६ १३५ २ पायउतार, पायदळ, वाहनाशिवाय, चरणचारी अर्थ २ पहा 'चरणचाली सत्यजित। पुढती झुजा मीनला। –मुआदि ३२ ६५ ०**तळ**–नपु तळपाय पायाचा तळवा चरणतळें देव्हडीं। आधारद्रुमाच्या बुडीं।' –ज्ञा ६ १९३ ०**तळवट**–पु तळपाय, बुड 'अक्षयवीट चरणतळवटीं।' –भूपाळी विठ्ठलाची पृ २४ ०**तीर्थ**–न गुरु,

ब्राह्मण इ० ज्या पायाचें तीर्थ [ स ] ०दासी-पु एक वैष्णव पंथ, स्थापक चरणदास ०धूलि-धूळ-रज-पु १ पायधूळ 'शिवादि चरणरज वांछित। त्या मज पाठविलें लिखित।' -एरुस्व ५.५३ २ पायांची धूळ, दासानुदास (कागदोपत्रीं लिहिणारानें केलेला स्वत चा नम्र निर्देश) 'स्वामीचे सेवेसी चरणरज रामाजी पंत' 'महाराज मी आपली चरणधूलि आहे' ०युगुल-न दोन पाय 'अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल।' -ज्ञा १.१९ [स] ०संपुट-पु (उप) जोडे. [चरण+संपुट=पात्र] ०संवाहन न पाय चेपणें, पाय चुरणें, रगडणें 'सेज मी साहीन। चरण संवाहन। मीचि करीन।' -ज्ञा१३.४२३ चरणांगुष्ठ-पु पायाचा आंगठा 'कीं सतुष्टीसी सतुष्टी। चरणांगुष्टी जयाचे।' -एभा १.३९ [सं.] चरणांबुज-न पादरूपी कमळ, पदकमळ, पाय 'तुका म्हणे फळ। चरणांबुज हें सकळ।' -तुगा ११९९ [स] चरणामृत-चरणोदक-पुन चरणतीर्थ पहा [स] चरणारविंद-न (काव्य) पादकमळ, चरणांबुज पहा 'अतीं तुझ्याच वरणें चरणारविंदा।' -वामन रुक्मिणीपत्रिका १४ चरणारविंदीं मिलिंदायमान होणें-(वाप्र) कमळाचे ठायीं रममाण होणाऱ्या भ्रमराप्रमाणें पायाची एकनिष्ठपणें सेवा करणें हांजी हांजी करणें, खुषमस्करी करणें [स]

**चरण**—स्त्री १ गायरान, कुरण, गायरानांतील गवत-जमीन २ गुरें चरण्याबद्दल सरकारांत द्यावी लागणारी रक्कम, चराई ३ चरण्याचा व्यापार 'त्या गाईपेक्षां ह्या गाईची चरण जलद आहे.' गुरचरण पहा [चरणें]

**चरणारा**—वि १ चरत जाणारा, चिडणारा २ (शाप) मासनाशक (इ) करोजिव्ह [चरणें ३ पहा]

**चरणें**—अक्रि (गुरानें) गवत, पाला इ० खाणें २ वेंचणें, टिपणें (दाणे), खाणें (पद्मानीं चारा) ३ (ल) घर करणें, पसरणें वाढत जाणें चिडणें (व्रण, क्षत) अपकारक तऱ्हेनें, जलदीनें पसरणें (फोड आणणारा एखादा पदार्थ) 'व्रण चरत चालला' ४ गब्बर होणें, श्रीमंत होणें, पैसा कमावणें ५ सारा दिवस कांहीं तरी खात असणें ६ वाढणें, जास्त होणें (विद्या) ७ चीर पडणें, तडकणें [स. चर] म्ह० फिरे तो चरे=परिश्रम करणारा मनुष्य श्रीमंत होतो

**चरणें**—अक्रि लागणें, चालणें, जाणें, चढणें, शिरणें 'देखे बोलेवा ढगलु न चरे।' -ज्ञा ८.८९ [स चर्]

**चरणें**—उक्रि (लोंकरीचें सूत, पेड) हातावर पिळणें, गुडाळणें वळविणें, वळणें

**चरदलें**—न चर, चरखड पहा. [स.]

**चरप**—स्त्री (व.) गाडीच्या चाकाचा मार 'बैलाला फार चरपा लागल्या'

**चरपट चरपटपंजरिका, चरपट-चर्पटपंजरी**—स्त्री १ पाल्हाळ, चऱ्हाट, कंटाळवाणें, लांबलचक निरूपण, कथन, लापनिका २ (चरपटपंजरी) श्री शंकराचार्यांचें एक स्तोत्र [स]

**चरपट्टी**—स्त्री (स्थापत्य) लांकडी सांध्याचा एक प्रकार एका लांकडांत खोल खांच घेऊन व दुसऱ्याच्या अगाबाहेर पट्टी काढून एकमेकांत बसविणें (इ) टंग ॲंड ग्रोव -मॅरट ५९ [चर+पट्टी]

**चरपूस**—स्त्री (व) थांत, दमलेला, थकलेला 'कामाच कष्टांनीं चरपूस झाला'

**चरपूस**—वि (ना.) खरपूस पहा

**चरप्रतिष्ठा**—स्त्री तात्पुरतें कायमचें नव्हे असें देव-देवताप्रस्थापन किंवा देवमूर्तीची प्रतिष्ठा करणें अधिवासन पहा

**चरफड, चरफडाट**—चडफड इ० पहा

**चरफडणें**—१ तळमळणें चडफडणें पहा 'अमर अमृतातें सेवित। तेही चरफडित हरिदासा।' -एरुस्व १.७७ २ रागावून बोलणें 'सांगो काय परिमवें नृप भीष्माजवळ जें चरफडे ते?।' -मोभीष्म ६.४५

**चरफी**—स्त्री जाड-भरड दळलेली कणीक

**चरब**—क्रिवि १ तब्बल, बरोबर ठाम, हमखास, भरभक्कम 'तो गांव येथून चरब कोसभर आहे' 'हा धोतरजोडा चरब दहा हात लांब आहे' -वि १ अतिशय भारी, जबर (दर, किंमत). २ अरबच्या ऐवजीं उपयोग [अर अर्ब, फा चर्ब]

**चरबट**—स्त्री. १ कंटाळवाणें भाषण, चऱ्हाट (क्रि० लावणें, मांडणें) २ उद्धटपणा, दांडगेपणा [चरब]-वि १ ओबडधोबड खरखरीत, चरबरीत 'फरशांचा पृष्ठभाग साधारण चरबट माठीव असावा' -मॅरट ५५ २ जिभेला चरचरीत, कठिण लागणारा (खाद्य पदार्थ) ३ तीव्र, तीक्ष्ण (धार, अपशब्द, निंदा, निर्भत्सना) ४ हिकमती, शहाणा, कल्पक, धूर्त 'सेणती चऱ्हाडिणी चरबटा।' -एरुस्व १४.५९ ५ उद्धट, दांडगा ६ फाजील बडबड करणारा, चर्पटपंजरी करणारा, रिकामा गप्पिष्ट 'भारीच चरबट आहे हा पोर' ७ (ल) बेचव, चव न समजणारी (जीभ) जीभ चरबट झाली आहे'

**चरबटणें**—अक्रि. १ खरखरीत किंवा चरबट होणें (लस, नागवेलीचें पान इ० खाल्ल्यामुळें जीभ, तोंड) २ धुळीच्या, फोडाच्या, खवल्यांच्या योगानें खरखरीत, चरबरीत होणें (शरीर) ३ खरखरीत असणें, होणें (खरकटें, राख माती चिकटून राहिल्यामुळें भांडीं हात वगैरे), कामाच्या योगानें खरखरीत चरचरीत जाड होणें (हात) ४ ओरखडला जाणें, ओरबडला जाणें, खरडणें, खरचटणें, अस्ताव्यस्तपणें किंवा धसफस केल्यानें फाटणें (शरीर, अवयव) ५ चाटून जाणें, घासून जाणें 'वाघाची

नखें चरचरलीं ' ' सापाचा दांत चरबटला मात्र ' ' न्हाण्यानें बैस चरबटले उगीच ' ' गोळी चरवटली ' ६ धडवडणें, वट घट करणें, चकाटया पिटणें [ चरवट ]

**चरवटणें**—उक्रि ( क ) जोरानें, घसमुसळेपणानें घासणें, चोळणें, चोपडणें, तासणें, रधणें, छाटणें

**चरवटणें**—उक्रि चरबीनें माखणें, चरबी लावणें, लागणें ' लवकरच नव्या चरवटलेल्या काडतुसाचें प्रकरण उद्भवलें —सन १८५७. ४०७. [ चरबी ]

**चरवत्तर**—क्रिवि ( ना ) तर्र, थबथबीत

**चरवदर**—वि ( व ) आसरट, मधाळया

**चरवर**—वि ( प्रां ) आडेंभरडें, रुक्ष, गरीबीचें ( अन्न ) चरबट पहा [ फा चर्ब ]

**चरवर, चरवरचरवर**—वि उद्धट, दांडगा, धीट, चर मरीत

**चरवरीत**—वि १ खरखरीत, खरबरीत, जाड, राठ, बोचका २ कठिण, टणक, अपक्व, नीट शिजलेले नाहीं किंवा ज्याचा रस झाला नाहीं असे ( तादूळ, भाजी )

**चरवा**—स्त्री प्राणिजन्य व वनस्पतिजन्य स्निग्ध पदार्थ मेद वसा, मांसस्नेह, माखण, ओशट, मासाचें तेल [ फा चर्बी ]

**चरवेट**—स्त्री खाडीमध्यें आढळणारा एक मासा

**चरबेंचें चरबेंचवें**—अक्रि ( गो ) अगात चरबी येणें [ चरबी ]

**चरम**—वि. शेवटचा, अंत्य, अंतीचा, अंतिम. [स ] सामा शब्द—०काल—पु शेवटची वेळ, घटका, मरणकाळ ०कोटी—पु शेवटचा उपाय अंतिम साधन ०गति—स्त्री शेवटली गति, मोक्ष ०ज—पु धाकटा मुलगा ' हा मोठा मुलगा व हा चरमज आहे ' [ चरम+ज ] ०प्रत्यय—पु ( व्या ) ज्यावरून दुसरे प्रत्यय होत नाहींत ते प्रत्यय [ स ] ०युक्ति—स्त्री शेवटचा उपाय हिकमत तोड ०लक्ष्य—न. खरी खुरी गोष्ट, अंतिम, अखेरचें, अगदीं सत्य, अखेरचें ध्येय निर्णय ब्रह्मज्ञान पहा ०स्थिति—स्त्री समाधिरूप अवस्था [ स ] ०ज्ञान—न शेवटलें किंवा अखेरचें ज्ञान, पूर्ण, अंतिम सत्य. ब्रह्मज्ञान पहा [ स ] **चरमावयव**—स्त्री शेवटचा, अखेरचा भाग, अंश **चरमावस्था**—स्त्री शेवटची स्थिति

**चरम**—न (गो ) मुळाच्या अतिवृद्धीमुळें जमिनीस येणारा घट्टपणा, टणकपणा

**चरमकांठ**—पु ( नाशिक ) जरीच्या काठाची एक जात

**चरमर**—स्त्री १ तिखटपणा, खमखमीतपणा, चरमरीतपणा २ ( ल ) खवटपणा, जहालपणा ( भाषा इ० चा ), उद्धटपणा, दांडगेपणा ३ चपलपणा, चुणचुणीतपणा ( भाषण इ० चा ) **चरमरचरमर**—क्रिवि उद्धटपणानें, दांडगेपणानें, खरमरीतपणानें

**चरमरीत**—वि १ मालमसाला घातलेलें, खमखमीत, चण चणीत, झणझणीत, चवदार, झोंबणारें २ उद्धट, दांडगा. ३ चुणचुणीत, हुषार, चपल, तल्लख. ४ चरमर पहा [ ध्व चर्र् द्वि ]

**चररर**—क्रिवि एखादी वस्तु जोरानें फाटत किंवा टरका वत असतां होणाऱ्या आवाजासारखा आवाज होऊन [ ध्व ]

**चरवट**—न विवक्षित आकृतीचें मातीचें भांडें, थाळा [ चरवी ? ]

**चरवण, चरवा**—नपु १ कुरण, गायरान २ गायरानाची जमीन ३ गुरचराई गुरें चारणीस लावल्याबद्दल द्यावी लागणारी मजुरी, किंमत. [ चरणें+वण प्रत्यय ]

**चरवा**—पु ( व. ) कोंडवाड्यातील गुराची सोडबांध करणारा नोकर, गुराखी ' आज चरवा कामावर आला नाहीं ' [ चरणें हिं चरवैया ]

**चरविणें**—उक्रि कळप किंवा खिल्लारें चारणें, गुरें चारणें, चारणीस घालणें मावगाईकरवीं चरविती पीक । ' —दावि ४०६ [ चरणें प्रयोजक ]

**चरवी**—स्त्री १ दूध काढण्याचें भांडें, कासंडी ' गंगाळें चरव्या अनेक निवडी सोन्यारुप्यांची जडें । ' —सारुह ३ ४३ २ ( कों ) मधाचें पोळें [का चरविगे, तुल० स चरु=यज्ञपात्र]

**चरवी**—स्त्री तटाला असलेले तोफांचे झरोके प्रत्येकीं ? तटाचा वरचा भाग ' सुवर्णमय दुर्गे दिसती । चरव्या झळकती शेषफणाकृती । रजनीमार्जी वाटती । नक्षत्रें वरीं जडियेलीं । ' —ह २९ ६४

**चरवें**—न चारा, पशु पक्षी इ० चें खाद्य [ चरणें ]

**चरवेदार**—पु गुराखी, मोतद्दार, जनावरांवर देखरेख करणारा, त्यांना चारून आणणारा नोकर. चरवा पहा —वाडमा १ ३४१

**चरस**—पु दवासहित काढलेला भांगेच्या झाडावरील बोंडाचा मादक द्रव, एक मादक पदार्थ ( क्रि० पिणें, ओढणें ) [ हिं चरस चर्स ]

**चरसा**—पु १ कातडें (विशेषत काळ्या रंगाच्या गुराचें), सबंध कातडें २ दरसाल एक कातडें देण्याबद्दल चांभारावर कर बसवितात तो. [ हिं ]

**चरळ**—स्त्री ओळ पंक्ति, मालिका. होतो निंदा परि हा लांवित शब्दाच्या चरळा । ' —देप ९९ [ चर ]

**चरा**—पु १ ओरखडा, रेषा, घासल्यामुळें जी रेषा पडते तो. २ खांडा, खाड ( शस्त्राच्या पातीचें ) [ चर ]

**चराई**—स्त्री १ गुरांच्या चरण्याबद्दल पैसा द्यावा लागतो तो, कुरणाचें भाडें, चरण २ गुरें राखण्याबद्दल जी मजुरी देतात ती, राखणावळ [ चरणें ]

**चराचर**—स्त्री १ परंपरा, पिढयानुपिढया चालत आलेली रीत, वहिवाट २ स्थावरजंगम जग, पदार्थ, सजीवनिर्जीव सृष्टि, अखिल विश्व 'प्रसवतसे अक्षर । म्हणऊनि हे चराचर । ब्रह्म वद ।' -ज्ञा ३ १३६ ३ जगातील लोक, जग, जनता 'गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी । कोठें चराचरी त्याग केला ।'-तुगा ३२५० [ सं चर+अचर ]-वि १ सजीवनिर्जिव, चलाचल, हालणारी व न हालणारी, स्थावर-जंगम (वस्तु, गोष्ट इ०) २ परंपरागत असा 'आम्हीच वेगळे झालों असें नव्हे चराचर संप्रदाय असाच चालला आहे ' [ सं ] ०पति-पु ( काव्य ) स्थावर जंगम वस्तूंचा स्वामी, नियंता, ईश्वर. [ सं. ]

**चराचर-रां, चरच्चर-रा, चरारां**—क्रिवि १ टरा टर, जोरानें फाडीत, चिरीत असताना जो आवाज होतो तसा आवाज होऊन २ फुटणाऱ्या, मोडणाऱ्या मोठ्या तडतड किंवा कडकड आवाजाचें उद्बोधक ३ वेपर्वाई आवेश, त्वरा यांचें निदर्शक ( क्रि० खाणें, बोलणें, लिहिणें, वाचणें ) चरचर पहा [ चरचर ध्व ]

**चरांट**—न चरट, चऱ्हाट पहा.

**चराटचें**—उक्रि ( गो ) आवळणें [ चराट ]

**चराडणें**—अक्रि ( चरचरणेंचा अतिशय ) चरचरणें पहा

**चराडी**—स्त्री चौर भेग ( कागद, पान इ० ची )

**चराधें**—न चर, चरखड पहा

**चराळ**—क्रिवि ( व ) जोरानें, धोधो, सतत 'पाऊस तर चराळ चालला होता, पावसात जाण्याची हिंमत चालेना ' [ सं चर्, ध्व ]

**चरित**—न आचरण, चरित्र पहा 'बाळपणीं कृष्णानें काय चरित केलें तें मला सांग ' 'चरित मुकुंदाचं ।' -दाव ४९६ २ कथा, गोष्ट 'कथिन चरितरूपें व्यासभावार्थ हो तो।' ३ कीर्ति, प्रभाव पद चरित दाविजे त्रिजगदब्जकीलालसें ।' -केका १९ [ सं चर्, चरित ]

**चरितार्थ**—पु १ (कामाची, धंद्याची ) सिद्धि, संपादणी, हेतु साध्य होणें सफळ होणें, शेवटास जाणें, इच्छा तृप्त होणें, तृप्ति २ कशी तरी धरीवाईट, सरासरी सार्थकता, शेवट 'पाचशें रुपयानीं लग्नाचा चरितार्थ होईल ' ३ कसा तरी, स्वल्प सामुग्रीनें, उदरनिर्वाह 'मणभर भातामध्यें कसा तरी चरितार्थ करतों ४ पोट भरणें, उदरभरण, उदरनिर्वाह 'स्त्रियानीं घरचीं कृत्यें सभा ळावीं आणि पुरुषानीं पराक्रम करून दोघांचा चरितार्थ चालवावा ' -गुप्तमंजूष ४. -वि सिद्धीस गेलेला, लागू पडलेला, पूर्ण केलेला, अभिप्रेत अर्थी स्वीकार केलेला ( नियम, विधि, आज्ञा ) समाधान पावलेला, तृप्त झालेला (मनुष्य) [ सं चरित+अर्थ ]

**चरित्र**—न चरित १ कृत्यें, क्रिया, आचरण, वर्तन 'य दरो चरित्र केलें नारायणें ।' -तुगा ८५. २ अवस्था, स्थिति, प्रकार 'आपोनि चरित्र जवळीच होतां । माली अनंता कृपा मग ।' -तुगा १०९ ३ देवाचे, वीराचे पराक्रम, महत्कृत्यें, मर्दुम कीचीं कामें. 'स्त्रीचें चरित्र आणि पुरुषाचें भाग्य कोणास समजत नाहीं ' ४ इतिहास, कथा, गोष्ट, प्रकार 'तें गुणभेदचरित्र । ऐसें आहे ।' -ज्ञा १८ ५२३ ५ विशिष्ट व्यक्तीचा आयुष्यक्रम, तो वर्णन करणारा ग्रंथ [ सं चरित ]

**चरिंदा**—पु १ वैरण, घोड्याचें, गुरांचें खाद्य, दाणा व चारा 'पगार व चरिंदा वगैरे खर्च '-स्वारीनियम ( बडोदें ) ५६ २ ( सामा ) कुरण, कडबा, गवत ३ गायरानात गुरें राखण्याबद्दल जो पैसा द्यावा लागतो तो. ४ खाद्य 'चरिंदे लाविले हेरब वदना ।' -सप्र ९.२३. [ फा. चराइद्=चरणें, सं चर् ]

**चरी**—स्त्री ( कों ) १ लहानसा चर, खदक, खाच, मोरी, नहर, गटार २ लोंकर किंवा सुत हातावर वळून कलेली दोरी 'दोन हजार वांव लांब चऱ्याची शिडी तयार करून बरोबर घेतली '-नवीरमाळपुरें ४६ [ चर पासून अल्पत्वदर्शक ]

**चरी**—स्त्री पंजाबात होणारी जोंधळयाची हलकी जात -कृषि २६७

**चरी**—( व ) चरवी पहा.

**चरीव**—न ( कों ) १ गुरचरण, कुरण, गायरानाची जमीन. २ घास, गवत, चरगण पहा [ चरणें ]

**चरु**—पु १ शिजवलेले तांदूळ, भात 'कीं होमशाळेंतुन श्वान । जाय चरुपात्र घेऊन ।' २ ( गो ) पिशाच्यास अर्पण कर ण्यासाठीं शिजविलेला भात ३ पिंड ( भाताचे ) ४ ( खा ) ताव्या [ सं चरु, हिं चरुआ ] **चरुस्थाली**-स्त्री १ भात ठेवण्याचें भांडें, हवि ठेवण्याचें पात्र २ स्वयंपाक, पाकनिष्पत्ति, पाकक्रिया [ सं चरु+स्थाली=भांडें ]

**चरुचमकुरा**—स्त्री एक भाजी, भद्र चवळी कवळी चरुचमकुरा ।' -अमृत ६२ [ चमकुरा पहा यास निरर्थक अ प्रासार्थ चरु शब्द लावून ]

**चरोळें**—न तूप ठेवण्याचें रोगण दिलेलें मडकें, माती पात्र लासलोटी

**चर्काखर्का**—पु चरका, चटका. 'रमा कीं उर्वशी उमटर चर्काखर्का गेली लाऊन ।' -पला ४ ३७ [ चरका द्वि ]

**चर्गासतार**—स्त्री एक वाद्य -देहु ९५

**चर्क**—न ( गो ) होकायंत्र. [ सं चक्र ]

**चर्च**—न १ सार्वजनिक ख्रिस्ती देवालय, उपासनामंदि २ ख्रिस्ती महामंडळ, ख्रिस्ती मंडळी [ इं ]

**चर्चणें, चर्चिणें**—उक्रि. ( काव्य. ) १ फासणें; चोपडणें; माखणें ( चंदन, राख ). २ उटी लावणें. 'चंदनातें कायसेनि चर्चावें।' -ज्ञा १०.१२. ३ चर्चा करणें. 'मवे ना चर्चे। पाडे ना राचें।' -ज्ञा १३.११११. 'ज्या देवा स्तवितातिं वेद समुदे शास्त्रें जया चर्चिती।'-निमा १.७. [ सं. चर्चन ]

**चर्चन**—न. १ चर्चणें; लेप देणें; चोपडणें; माखणें ( चंदन, राख इ० ). २ लेप; उटी. [ सं. ]

**चर्चराट**—पु. कापण्याचा, चिरण्याचा चरचर असा आवाज. 'चरचरित चचारी चर्चराटें चरारी।' -दावि २७८. [ ध्व. चर चर+आट प्रत्यय ]

**चर्चरी**—स्त्री. चरचरी; मनांतील घुटपुट; काळजी; आधि. 'डगाचि व्यर्थ चर्चरी।' -दावि ७७६.

**चर्चरी**—स्त्री. ( गो. ) एक प्रकारचा वेल.

**चर्चा**—स्त्री. १ प्रासंगिक उल्लेख; वरवर उच्चारणें. ( क्रि० निघणें ). 'आज तुमची तेथें चर्चा निघाली होती.' २ वार्ता; बातमी. ३ (देवादिकांच्या) अवतारांचें, महत्कृत्यांचें, पराक्रमाचें, वर्णन, निरूपण, कथन. 'सर्वकाल भगवच्चर्चा करीत असावें.' ४ एखाद्याच्या पाठीमागें केलेली निंदा. 'हे तुमचे तोंडावर गोड बोलतात पण मागें तुमची चर्चा करीत असतात.' ५ चर्चन; लेप देणें; उटणें. ६ दोनहि पक्षांनीं आलटून पालटून किंवा एकापुढचें एक म्हणणें ( पद, चरण, श्लोक इ० ); गवयांनीं एकत्र गाणें. ७ ( ल ) चढाओढ; भांडण; कलह; वादविवाद; उत्तरप्रत्युत्तर; उहापोह; वाटाघाट. 'अवसरीं उदार। आत्मचर्चे चतुर। एन्हवीं वेडा।' -ज्ञा १३.२११. ८ विचार [ सं. चर्च्=चर्चा ]

**चर्चित**—वि. माखलेलें; चोपडलेलें; लिप्त. [ सं. ]

**चर्पट**—चरपट पहा. ॰**पंजरी**-स्त्री. १ एका स्तोत्राचें नांव. चरपटपंजरी पहा. २ ( ल ) मनस्वी लांबचलाव गोष्ट, भाषण, बडबड, चऱ्हाट. 'भास्करभाऊची ती स्थिती पाहून सीतारामाला वाईट वाटलें, पण पंडयाजीची चर्पटपंजरी चाललीच होती.' —जग हें असें आहे.

**चर्पटिका**—स्त्री. १ एक वृत्त २ निरूपण; लांबलचक वाय-फळ भाषण; चर्पटपंजरी. ३ अलंकृत; सुसंस्कृत, प्रौढ, भारदस्त वाक्य. [ सं. ]

**चर्फडणें**—क्रि. चरफडणें पहा. 'नाना निग्रहें पिडावें। देह-दुःखें चर्फडावें।' -दा २.६.२६.

**चर्ब**—वि. वरचढ. 'आपण साऱ्यांवर चर्ब असावें' -रा ५.१२७. [ फा. ]

**चर्वण**—न. चर्वण; चावणें. 'अपुले वोंठा चर्वण करिती।' —शिपु २.४४.५०. [ चर्वण ]

**चर्वी**—स्त्री. चरबी पहा.

**चर्म**—न. १ कमावलेलें कातडें; चामडें; चाम. 'चर्म रंगु लागे रोहिदासासंगें।' -तुगा ३६९१. २ साल; वरील आवरण; त्वचा. ३ ढाल. 'खड्गचर्म देई आणोन।' -जै ३१.३२. 'करुनि शरनसी दृढ रथ चर्मासह खड्गही टाकल भाचा।'-मोकर्ण ३.२८. [ सं. ] सामाशब्द- **चर्मक, चर्मकार**-पु. चांभार; मोची; जोडे शिवणारा. 'नाम न म्हणे ज्याचें तोंड। तेंचि चर्मकाचें कुंड।' -तुगा २५०८. [ सं. ] **चर्मका**-स्त्री. पखाल. 'चौमुखिया चर्मका जळपूर्णा।' -कमुरा २७.९८. **चर्मकील**-पु. चामखीळ; हा वात, पित्त, कफ या तीन कारणांपासून होतो. वातज, पित्तज, कफज, असे याचे प्रकार आहेत. [ सं. ] **चर्म॰कुंड, चर्मकाचें कुंड**-न. कातडीं भिजत घालण्याची चामा॰राची कुंडी. [ चर्म+कुंड ] ॰**चक्षु-दृष्टि**-नस्त्री. पाहण्याचे डोळे; व्यावहारिक पदार्थांचा बोध होणारे डोळे; भौतिक डोळे; दृष्टि; पाहण्याची शक्ति. याच्या उलट ज्ञानचक्षु; दिव्यचक्षु. [ सं. ] ॰**दंड**-पु ( संकेतानें ) शिश्न; लिंग. [ सं. ] ॰**धन**-न. मेंढरें, घोडे, बैल इ० जनावरें हेंच धन. 'चर्मधन गहाण घेऊन पैसा देऊं नये.' [ सं. ] ॰**पत्र**-न. चामड्याचा विशिष्ट संस्कार करून बनविलेला कागद. इं. पार्चमेंट. ॰**पादुका**-स्त्री. पायांतील जोडा; वहाण. [ सं. ] ॰**फरोश**-पु. कमावलेलीं कातडीं व चामडीं यांचा व्यापार करणारा. ॰**वाद्य**-न. चामड्यानें मढविलेलें वाद्य; पखवाज; नगारा; तबला; डग्गा इ० [ सं. ] **चर्मातु**-न. (दे.) कातडें. -तुगा ४५४. -शर. **चर्मिकी**-स्त्री. चांभारीण. 'मातंगीचें नाम तुळशी। चर्मिकीचें नाम काशी।' —दा १४.१०.१५. [ सं. ] **चर्मी**-वि. चामड्याचा; कातड्याचा ( जोडा इ० ). [ सं. ] ॰**जोडा**-पु. १ चामड्याचा जोडा. २ एक हक्क;(सरकाराला, वतनदाराला) चांभार लोकांपासुन कराव्या किंवा हकाच्या रूपानें जो जोडा मिळतो किंवा घेतला जातो तो.

**चर्या**—स्त्री. १ पद्धत; चाल; रीत; तऱ्हा; आचरण. 'रोजगार लागल्यापासुन अलीकडेस त्याची चर्या पालटली.' २ मुद्रा; चेहरा; रूप; तोंडवळा; तोंडाची घडण; ( रोगी किंवा निरोगी ) चेहेऱ्यावर किंवा मुद्रेवर जी कळा, छटा, चिन्ह, तेज असतें ती. 'दुखण्यानें त्याचे तोंडाची चर्या फिरली.' 'हा ब्राह्मण आहे असें म्हणता परंतु यावर ब्राह्मणाची चर्या दिसत नाहीं.' ३ विहित कर्माचें, रूढीचें सतत आचरण, पाळणूक. 'व्रताची हे चर्या त्वरित फळ देईल सवळा।' ४ रचना; बांधणी 'उभारिली दुर्गें दारवटे फांजी। कोटी चर्या माजीं शोभलिया।' -तुगा १००. ५ संचार; गमन. ६ लीला; पराक्रम. 'हे असो दासाची अगाध चर्या।' -दावि ४६७. ७ युक्ति; मसलत. 'भवध्या मानली हे चर्या। म्हणती प्रगट बोलूं नका।' —पाप्र ८.९७. ८ वहिवाट; व्यवहार. 'चर्या हे तुमचे त्या

मतिमंदा ।'–दावि ४६७ [स] ०पालटणें–पालटणें–चेहेऱ्यावर टवटवी येणें, तजला दिसू लागणें (आजारपणानंतर) चेहे ऱ्यावरील विकार बदलणें, काळवंडणें (अपराधाच्या भयाच्या जाणिवेमुळें)

चर्र—न एकदम भय वाटल्यामुळें पोटाच्या खालच्या बाजूस जो धक्का बसतो किंवा वेदना होते ती, धसका, पोटांत गोळा उठणें (या शब्दाचा उपयोग नामाप्रमाणें करतात) 'बाप पाहतांच पोटामध्यें चर्र झालें '–क्रिवि फाडतांना, चिरतांना, भाजतांना, डागतांना जो आवाज होतो तसा ध्वनि होऊन [ध्व]

चर्वण—न १ चावणें, चघळणें; दातांनीं बारीक करणें, रवंथ २ चावण्याचा पदार्थ (भाजलेलें धान्य इ०) [स]

चर्वणा—स्त्री (साहित्य) एक अलंकार, एखाद्या गोष्टी विषयीं आपलें मत वाढत्या स्वरानें, जोरानें पुन्हां पुन्हां उच्चारणें, पुनरुच्चारण उदा० ही चांगलीच, हीच चांगली, चांगलीच ही इ० २ (वाटाघाट करतांना, हुकूम सोडतांना इ०) निरर्थक पुनरुच्चारण, अनेक शब्दप्रयोग करून तीच गोष्ट वारंवार सांगणें (निंदार्थी प्रयोग) काथ्याकूट ३ सर्व प्रकारची भाषणशैली व युक्तिवाद लढविणें [स]

चर्वणें—सक्रि (काव्य) चावणें, चघळणें [स चर्वण]

चर्वित—वि चावलेला, चघळलेला, रवंथ केलेला, चर्वण झालेला (पदार्थ) [स] ०चर्वण–न. १ चघळलेलें पुन्हां चघळणें, चावलेलें पुन्हां चावणें २ काथ्याकूट, निष्फळ, रिकामी पुनरुक्ति, निरर्थक पुनरुच्चारण (विनंति, हकीकत गोष्ट वगैरेंचें) 'तुकडे चर्वित चर्वणोपम सुखें जीं तीच तीं भोगितां। संसारीं न तिरस्कृती उपजते हे कोण निर्लज्जता ॥'–वामन स्फुट श्लोक ६७ (नवनीत पृ १४१) [सं चर्वित+चर्वण]

चर्वी—चरबी पहा 'आटीव दुधाच्या चर्व्या झोंकाव्या' –तोव ९

चर्वेदार—पु मोतद्दार चरवेदार पहा 'वोपुनि तुरगा चर्वेदारकरीं।'–दावि २८० [चरणें]

चर्चो—पु (गो) चोरीचा व्यवहार

चऱ्हा—पु. १ घासल्यामुळें पडलेला ओरखडा २ चाकू सुरं, तरवार यांच्या पातीला पडलेली खांच चरा पहा

चऱ्हाट—न १ दोर जाड दोरी, दोरखंड, (ध) धाद २ चर्पटपंजरी, पाल्हाळ कंटाळवाणें भाषण (क्रि० वळणें, लावणें) 'अहमद याप्रमाणें आपलें लांबलचक चऱ्हाट वळीत असतांना दोन घटका निघून गेल्या '–उप काल [स वराट] म्ह० देवाची गेली घाट (तर) गुरवाचें गेलें च ऱ्हाट

चल—पु चाल, हल्ला 'जाणों दारिद्र्यावरि निघिनीं सज्जन बळेंचि चलवला–मोअश्वमेध ४ ८६ –वि १ हालणारें, चालू असलेलें, गतिमान, जंगम २ विनाशी, क्षणिक, चंचल, अस्थिर [स] ०चित्र–न चलच्चित्र पहा ०कर्ण–पु. पृथ्वीपासून ग्रहाचें जें अंतर तें [स] ०त्रिज्या–स्त्री सूर्याच्या मध्यबिंदू पासून ग्रहाच्या मध्यबिंदूपर्यंत काढिलेली रेषा

चलकंप—चळकांप पहा (चळकांपबद्दल संस्कृत शब्द) 'एका सुटला चलकंप। गेला वळदर्प गळोनी।' [स]

चलखाई, चलखपणा—स्त्रीपु चलाखी पहा 'वैय्याकरण्याच्या दृष्टीस जे तिचे दूषण प्रकार दिसतात तच तिच्या अंगीं अर्थव्यंजकता, माधुर्य, चलखपणा वगैरे गुण आणणारे असतात' –नि १२२

चलचल, चलचलाट—स्त्रीपु १ चलती, भरभराट, अनुकूल काळ २ अधिकार, वर्चस्व, वजन [स चल]

चलटा—न एक सुंदर फळ झाड पावसाळ्याच्या आरंभीं यास पांढऱ्या रंगाचीं फुलें येतात. त्यांस मधुर वास असतो फळ नारळायेवढें मोठें असतें तें पावसाळाअखेर पिकतें. फळावरील टरफल आंबट असून तें खाण्याच्या उपयोगी असतें हें झाड कलकत्याकडे होतें –वानेची माहिती पृ १५१

चलणें—अक्रि १ निघणें, गमन करणें सुटणें, चालावयास लागणें, प्रवासास आरंभ करणें, जाण्यास निघणें (बहुवर्तमान, पुढें, मागें यांबरोबर प्रयोग बहुधा विध्यर्थी, क्वचित भविष्यीं, भूतकाळीं मुळींच नाहीं) २ चालणें यामर्थी कुकीनें उपयोग [स चलन]

चलती—स्त्री १ भरभराट, अभ्युदय, सुकाळ, चांगले दिवस 'चायावांचून बैल दमके कर्जबदी झाला। चलतीचे सोयरे धायरे कोणी पुसेना याला।'–पला ८६. २ अमल, वजन, वर्चस्व, सामर्थ्याचा किंवा अधिकाराचा काळ ३ प्रवेश, रिघाव, प्राप्ति म्ह० चलती तिकडे भरती=जो समृद्ध आहे त्याला हवी ती वस्तु–मनुष्य मिळू शकतो ज्याच्याजवळ संपत्ति आहे त्याला वाटेल तें करण्याची मुभा आहे –वि चालू, उपयोगांत असणारें, लागणारें ०दप्तर–न चालू व्यवहारास लागणारें दप्तर फडणिसाकडे असणारा पेशवा दप्तराचा भाग

चलच्चित्र चलच्चित्रपट—नपु हालचाल करणाऱ्या चित्राचा देखावा, सिनेमा, सिनेमाचित्रपट [स]

चलन—न १ चालणें, जाणें, निघून जाणें, वाटेला लागणें २ चालणूक, वागणूक 'चिंतामण किंवाचें चलन चांगलें नव्हतें' –विक्षिप्त ३ ६७ ३ (शाप) पदार्थाचा एके स्थानापासून दुसऱ्या स्थानाकडे जाण्याचा व्यापार ४–स्त्री नाणें नाण्याची चाल, प्रकार, वहिवाट, देवघेवींत उपयोगी पडणारीं नाणीं कागद इ० 'सर्वमान्यता हें चलनाचें मुख्य अंग समजलें पाहिजे' ५ पैसे पोंचल्याची चिठ्ठी, पावती, याद, चलान

०(तारा)-(नृत्य) डोळ्यांची बुबुळें ह्या बाजूकडून त्या बाजू कडे सारखीं हालवीत राहणें, हा अभिनय वीर व रौद्ररसद्योतक असतो [स] ०चलन-न चालणें, हलणें, सरकणें, हालचाल करणें, जीवाची गति, व्यापार, जिवंत प्राण्याची हालचाल, चळवळ [स]

**चलनी**—वि चलनात, वापरीत असणारें, बाजारांत चाल णारें, चालू (नाणें) (सामासांत) गावचलनी, पेठचलनी, बाजार चलनी, सरकारचलनी, चलनीनोटा [चलन]

**चल्फल**—न बाह्यग्रहाचा वार्षिक स्थानभेद व अंतस्थ ग्रहाचें इनापगम (सूर्यापासून अंतर) [स]

**चलविचल**—स्त्री १ अनिश्चितता, अस्थिरता, अनि त्यता, अस्थायित्व, अध्रुवता 'त्याचे मामलतीची कालपासून चलविचल दिसते' २ (क्र) घासोड, अकडतिकड, इकडतिकड —वि चचल, अस्थिर, अध्रुव, अस्थायी, अनिश्चित, अनिर्णीत [स चल+विचल, हिं चलविचल]

**चलबुलाई-बुलावणी**—स्त्री फिरून फिरून केलेलें, त्रास दायक किंवा निकडीनें, सत्तेनें केलेलें बोलावणें, तांतडीचें बोला वणें, समन्स [हिं चलना+बुलाना]

**चलराशि**—स्त्री उत्तरायणसंपात सुमारें ७२ वर्षांस १ अंश ह्याप्रमाणें क्रांतिवृत्तातून पश्चिमेकडे चळत असतो ह्या चल संपातापासून राशिचक्राचे जे तीस तीस अंशाचे भाग होतात त्यांना चलराशि म्हणतात -सूर्य १८ [स]

**चलवादी**—वि (व) माहखोर, एक बायकी शिवी

**चलसंक्रांति**—स्त्री सूर्याला चलराशिक्रमणाला जो काळ लागतो तो, सौरमास, चलराशि पहा -सूर्य १८. [स]

**चलाऊ**—वि चालण्यासारखा, चालढकल करण्यासारखा, काम भागविण्यासारखा कामचलाऊ पहा [चलणें, हिं]

**चलाक-ख**—वि हुशार, चाणाक्ष, पाणीदार, धूर्त, तर तरीत, तल्लख, चपळ, चुणचुणीत, जलद, झपाट्या, चविवाग [फा. चालाक्, तुल स चल्]

**चलाकी-खी**—स्त्री १ तल्लखपणा, चपळपणा, चुणचुणीत पणा, हुषारी, धूर्तता, चाणाक्षपणा २ नजरबंदी, दिशाभूल, फसवणूक, हातचलाखी 'डॉ परांजप्यांचा लष्करी शिक्षणाचा ठराव अयशस्वी झाला सरकारनें लायकीची चलाखी केली' -टिळक हायस्कूल (कऱ्हाड) त्रैमासिक [फा चालाकी]

**चलाचल**—वि १ चल व अचल, स्थिर व अस्थिर, स्थावर जंगम २ (ल) सजीव व निर्जीव चराचर पहा [स चल+अचल]

**चलाधिकार**—पु पगारी नोकरी, चाकरी, याच्या उलट स्थिराधिकार.

**चलान**—न (तुरुंगातील सांकेतिक भाषा) अट्टल चोर, दरोडेखोर, खुनी इ० चा समुदाय

**चलान**—न खटला भरणें (क्रि० करणें) नऊ जणांस चलान न करितां सोडण्यांत आलें' -के २२ ७ ३० [स चल्, हिं]

**चलान**—न मालाची यादी, पास, मालाबरोबर पाठवि लेला कागद इन्व्हॉइस खजिन्यांत रकमेबरोबर पाठवावयाचा कागद [हिं]

**चलित**—वि १ चलन पावलेला, जो हलला आहे असा २ (शाप.) फिरणारा ३ चालू असलेला [स] ०चित्त-वि चचल मन असलेला 'जयजय देव निश्चळ। चलितचित्तपानतु दिल।' -ज्ञा १८ ६.

**चलितगर्भरोग**—पु गर्भाशयात गर्भाचें फिरणें हा रोग गर्भधारणेपासून ५ व्या किंवा ६ व्या महिन्यात होतो [स]

**चलितोरु(करण)**—न (नृत्य) हात व्यावर्तित व परा वर्तित करून झुकतुड करणें व मग मांड्या हलविणें

**चली**—स्त्री (गो) मुलगी, चेगी [स चेटी]

**चलो**—पु (गो.) मुलगा, चेडा, चेला पहा [पोर्तु जिप्सी चलार, तुल० स चेटक, हिं चेला]

**चलोच्च**—न ग्रहाच्या कक्षेतील सूर्याला जवळ असणारा बिंदु, नीच [स]

**चल्मा**—पु (व) ओहोळाच्या काठची ल्हानशी विहीर 'आम्ही चल्म्याचें पाणी पितों' [का चिलिमे=ओढ्यातील वाळूत खोदलेला खड्डा, झरे]

**चव**—स्त्री १ रुचि, गोडी, (जिभेनें, कानानें, समज शक्तीनें) ग्रहण बोध ज्वरिता जसें रसितपथ्य सद्वचन न दुर्जना तसें चव दे।' -मोसभा ४ ८७ २ आवड, गोडी, आस्वाद, रुचिरता, स्वारस्य ' 'सत्कीर्तिची सदा चव घे।' -मोआदि ११ ६७ 'या व्यापारात चव राहिली नाहीं' ३ सौख्य, आराम सोईस्करता (धदा नोकरी इ०ची) ०काढणें-चोख दळपणा, चौंढळपणा करणें (खाण्यात) ०घेणें-पाहणें-१ स्वाद, गोडी पाहणें, चाखणें २ अनुभवानें जाणणें **चवेस पडणें**-पसत पडणें, मानवणें, आवडणें म्ह० १ गाढवास गुळाची चव काय? २ बधिरास काय गायनाची चव? ३ तापल्या पाण्यास चव येत नाहीं=एकदा स्नेह तुटला म्हणजे पुन जडत नाहीं

**चव**—पु चेव, स्पर्धेच्या योगानं उत्पन्न झालेला आवेश, एखादी गोष्ट करण्याविषयीं आलेली उकळी उत्कंठा, कढ (क्रि० येणें) 'मद्विरीं अद्युनि का चव नाला।' -किगदि ५३ [चव]

**चव**—पु नारळाचा कीस [का चिम्बु=खरडणें, तासणें]

**चव**—पु मोत्याची संख्या व वजन यावरून त्याच्या किंमतीचें बसविलेलें प्रमाण, मोत्याची किंमत काढण्याची रीत, नियम चव हें मोत्याचें वजन नसून किंमतीचें परिमाण आहे

**चव**—न (व) नांगराचें-ज्यावर फाळ बसवितात त्या भागाचें बारीक लाकडी टोंक

**चवई**—स्त्री चौरंग पडवची ( चार पायांची ), चवकी पहा [ चौ+पाय-पायी ]

**चवई, चवईण**—स्त्री. एक प्रकारची रानवेल या जातीचें केळें फार बारीक व खाण्याच्या निरुपयोगी असतें पावसाळ्यांत इचे कांदे आपोआप फुटतात पानाचा उपयोग केळीच्या पानांसारखा ( भोजनाकडे ) करतात

**चवक**—पु १ काळ्या मिऱ्याच्या झाडाचें मूळ, मिरवेलीचें मूळ, चवगिऱ्याचें मूळ, एक औषधि २ जिला पिंपळी येते अशी एक वनस्पति [ स चविक ] *

**चवक**—न १ आश्चर्य २ भीति, धाक, वचक 'अत्यंत न्याहारं पाहता । चवकु पडेल प्राण्याच्या चित्ता । -एभा ३ ४५८ ३ अधीरपणा 'थरक सरक दावी चवक । अति निःशंक निजगडा । ' -एरुस्व १२ १२७ [ चक्र ? ]

**चवक**—चौक पहा 'मागेत कोण्ही चवकास सेला ।' -साछ ७ ९५

**चवकट, चवकडा, चवकडी, चवकळशा, चवकी, चवखणी, चवचें, चवचाल चवटकें, चवकशी, चवकस, चवकसणें, चवकसदार, चवकळ चवकाळ, चवकी, चवकीदार, चवकीदारी, चवकीपाहरा, चवंगा, चवघडा, चवघडी, चवघला, चवघाघार, चवघुलकी, चवघुला, चवघे**—चौमध्ये पहा

**चवकणें**—क्रि १ भिणें, दचकणें, चकित होणें, सशयांत पडणें 'जैसें कामे कवळिलिया माराकें । विरहिणी भोग होती पारिकें। रिपूंचिया परी चवक । चहातें दखोनी । ' -ज्ञाप्र ७६७ -एभा २४ ३०६ २ माघार घेणें, मागें पाऊल टाकणें 'धैर्य धरोनि उभा ठाके । मृगभावें मागें चवके । ' -भारा बाल २ २४ [ चक्र ]

**चवकी**—स्त्री चवरंग, चौका. 'त्यामध्यें चवकीस । जानकीवर विराजे । ' -वेसीस्व ८ १३ [ चौकी ]

**चवगिरा**—पु मिरवेल चवक पहा

**चवचव**—स्त्री गल्हाटा, चवढव, कालवाकालव, अतिशय गोंधळ, दुर्दशा, अव्यवस्था ( वस्तु, कामें, माणसें इ० ची ) चावचाव; चिवचिव [ ध्व ]

**चवचवणें**—अक्रि ( कों ) चिडखोर बनणें, अडचणीच्या, सतापदायक परिस्थितींत चेवणें, सतापून जाणें, कातवणें, कावणें चिवचिवणें पहा [ ध्व चवचव ]

**चवचवीत**—वि ( कु गो ) बेचव

**चवचिंदी**—स्त्री ( ना ) अंदाधुंदी; झोटिंगपाच्छाई

**चवटकें**—न. एकतारी वाद्य चवडकें पहा

**चवठा**—पु चार रस्ते जेथें एकत्र मिळतात तें स्थळ चवाठा पहा

**चवठांई, चवढाई**—अ चार जागीं, चौठायीं पहा

**चवड**—स्त्री चळत, रास, ढीग ( पोळ्या, भाकरी इ०चा ) [ का सिवडि ]

**चवड**—न १ नारळीस येणारे शहाळ्यांचे झुबके २ नारळाचे पापुद्रे, वेष्टन चोड पहा

**चवड**—वि ( गो. ) साडेचार ही संख्या [ चौ+अर्ध, चव+अर्ध ]

**चवंडकें**—न एकतारी, गोंधळी लोकांचें वाद्य, तुणतुणें. 'तमाशांत चवडक्यावाचून चालत नाहीं ' चौंडकें पहा म्ह० सर्डीत नवटकें आणि कटकांत चवडकें कोठें पहावें ? '

**चवडचाल**—स्त्री घोड्याची एक चाल, दुडकी, लाब फिरतीच्या घोड्यास योग्य अशी विशिष्ट चाल [ चवड-चौड+चाल ]

**चवडशी**—स्त्री चपट्या तोंडाचा हातोडा, भांड्याचा गळा अगर तोंड सारखें करण्यासाठीं उपयोगी पडणारा हातोडा -बदलापूर ९६

**चवडा**—पु १ पावलाचा मधला भाग, तळपायाचा बोटाजवळचा प्रदेश 'तो तुवली चवडा । कोण्हेयांवरी । ' -शिशु ४८६ २ पावलाचा एक रोग, वाघचवडा ३ हाताच्या तळव्यासहि म्हणतात 'न्याहाळा पां केवढा । पसरलासे चवडा । ' -ज्ञा १३. ६४ ४ तळव्यास होणारा रोग वाघचवडा पहा. ५ ( व ) आगावर एखाद्या ठिकाणीं झुजून घर आलेली जागा [ सं चपेटा, प्रा चविडा ] **चवड्यावर असणें**-पायांच्या बोटांवर, टाचा न टेकता बसणें **चवड्यावर चालणें**-अतिशय जलदीनें चालणें, फार घाईंत असणें

**चवडा**—वि केद 'विश्वामित्राची त्यी-चवडी चौदा फूट पाढरी दाढी धरून . ' -नाकु ३ ३० [ हिं ]

**चवडा**—पु भात कापल्यावर जमीनींत राहिलेला बुडखा -कृषि २३७

**चवडॉ**—पु ( गो ) एक पोळी

**चवडी**—स्त्री आवरण, आच्छादन चवडा २ पहा ' जेवि पुरुष जीर्ण वस्त्र सांडी । नवीं पांघुरे घडिघडी । तैशी स्थूळ देहाची चवडी । भोगी देही । ' -कथा ६ १२ १२०

**चवढव**—स्त्री गोंधळाचें, भानगडीचें स्वरूप चवचव पहा 'मराठी भाषेविषयीं नाक मुरडणें व तिची चवढव सांगणें या भानगडींत आमच्या ख्रिस्ती बधूनीं फार करून पडूच नये ' -नि ९१७.

**चवढाळ चवढाळणें, चवथरा चवथा, चवधारी, चवरग चवतकोर**—चौ मध्यें पहा

**चवणा-ना**—पु १ आवड, गोडी, चटक २ व्यसन, खोड, वाईट संवय, दुर्गुण, चाळा 'एवढ्या पोरास तबाखुचा चवणा लागला हे ठीक नव्हे' ३ नखरा [चव, चवणें] **चवणे करणें**-(ना) मिजास करणें, नखरे करणें, हट्ट धरून बसणें **चवणेखोर**-वि (ना) मिजासी

**चवणें**—अक्रि १ चळणें, स्वैराचारी, बदफैली, व्यसनी बनणें, वहकणें. २ वेड लागणें, वेडें होणें [सं च्यु-च्यवन, प्रा चवण]

**चवत(ता)ळणें**—अक्रि १ क्रुद्ध होणें, सतापणें, आवेशानें दात-ओठ खाणें, आदळ-आपट करणें, वटवट करणें. २ (व्यापक) चेकळणें, चौताळणें पहा. [चौताल]

**चवताळें**—न केरकचरा गळाठा काढण्याचें एक लांकडाचें दाताळें, कुळव एका लाकडात चौदा दात (मेखा) बसवून हें केलेलें असतें [स चतुर्दश+आलय म चवदा+आळें]

**चवदा**—हा शब्द व याचे सामासिक शब्द चौदा या शब्दामध्यें पहा [स चतुर्देशन्, प्रा चाउद्दाह, हिं चौदह]

**चवदार**—वि रुचकर, लज्जतदार चव पहा [चव+दार प्रत्यय]

**चवधारी**—वि येवडा निवडुंग याची जात चौधारी पहा

**चवधव**—स्त्री चव, रुचि, गोडी [चव द्वि]

**चवधव**—स्त्री अव्यवस्था, चवढव पहा

**चवन**—न (गो) क्षत, किवण पहा.

**चवनट**—वि १ चोखदळ, मिजाजखोर, गोडघाशा २ बीभत्स, विचकट, शिवराळ ३ (सामा) चावट चावनट [चवणा]

**चवर**—स्त्री महाबळेश्वरीं उगवणारी एक वनस्पति

**चवर चवर**—१ चवरी, चामर 'लागली वायाची धाई। चवरें ढळती दोहीं बाहीं।' –एरुस्व ६ १४ २ (लेखणी, काठी सुरी इ० च्या शेवटास) मारून आपटून पिंजल्यामुळें आलेला चवरीसारखा आकार, चोंचण ३ (गो) मोहोर [स चामर हिं चँवर] **चवर-चवरगोंडा**-पु (व) श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीं बैलाच्या शिंगास बांधलेला झाडाच्या सालींचा किंवा तागाचा झुबकेदार साज **०धर** वि चवरी वारणारा मी तळ उपरु जाणविता। चवरधारु हातुदता।' –ज्ञा १३ ४१७

**चवरंग**—१ चौरंग पहा २ खुडुक होणें पंगुपणा 'केला चढून चवरंग पतीचा धरामधीं पडले खाडे।' पला ७५ –वि हातपाय तोडलेला चौरंग पहा

**चवरडोल**—पु १ अंबारी, हौदा 'सहस्रकरी मदोन्मत्त। चवरडोल त्यां पृष्ठीं।' –मुविराट ८२ २ देव्हारा, गाडी इ० वरील चांदवा, छत, मंडपी, मेघडंबरी [स चतुर-चवर-चार+डोल=घुमट]

**चवरडोली**—स्त्री १ मूर्तीवरील मंडपी, दवावरील छत २ स्त्रियाकरिता छायावरून वाहण्याची एक डोली

**चवरा**—पु (कों) नदीच्या, खाडीच्या नजीक असलेला व पाण्यानें कधीं कधीं वेढिला जाणारा भूप्रदेश

**चवरी**—स्त्री वनगाईच्या केसाच्या झुबक्यास सोनें, रुपें इ० ची दांडी बसवून देव, राजा किंवा इतर मोठी व्यक्ति यांच्या अंगावरील माशा वगैरे वारण्यासाठीं केलेलें कुंच्यासारखें साधन, चवरी दणें हा पूर्वी एक मोठा मान असे व तो सरकारातून खर्चासह मिळे –वाडसमा ३ २०७ 'मोकळी चवरी देसी। चिरीव गमे।' –ज्ञा १ ८३२७ [स चामर, हिं चँवर] **०वरदार**-वि चवरी वारणारा, ढाळणारा, चवरधर **०गोंडो**-पु (गो) पालखीचा किंवा मुडावळीचा गोंडा

**चवराभवरी**—स्त्री (खा) विवाहातील सप्तपदीचा विधि [चवरी=सभोंवतीं+भवरी=फिरणें]

**चवरें**—न १ मस्तक, शिखर, माथा.'ब्रह्मभुवन गा चवरें। लोकाचळाचें।' –ज्ञा ८ १५४ २ शेवट 'येता धारणेचे नि पैसारें। ऊर्मी ध्यानाचें चवरें। सापडे तव।' ज्ञा ६ ५८ ३ गादी, सिंहासन, आसन 'चैतन्याचया। चवरेयावरी।' –शिशु ३६ [हिं चौरा=चबूतरा, तुल० स. चौड-ल]

**चवरेचाळ, चवरेचाळीस चवरेसाळ, चवरेताळीस**—वि ४४ चौवचाळीस, चाळीस अधिक चार ही संख्या [स चतुस्+चत्वारिंशत्, प्रा चउत्तालीस चउआलीस, हिं चौआलीस चवालीस गु चुम्माळीस-श]

**चवऱ्याण्णव, चवऱ्यांशी**—चौऱ्याण्णव, चौऱ्यांशी पहा

**चवल-ली**—पुस्त्री रुपयाचा आठवा भाग, हिस्सा, दोन आणे, दोन आणे किंमतीचें एक नाणें दुअेली

**चवलीचा मामला**—पु शळ्यामेंढ्यावरच्या कराची मामलत मक्त्यानें दणें घेणें

**चवल्या**—वि दोन आणे रोजावर लावलेला इसम, चवलीचा मजूर [चवल]

**चवल्या**—स्त्रीअव (व) गमज्या

**चवल्यापावल्या**—स्त्री (कु) (ल) कच्चींबच्चीं [चवली+पावली]

**चवविणें**—सक्रि (काव्य) १ जागृत करणें, २ चेतविणें, प्रोत्साहन देणें मनोगुण इंद्रिया चववित्ती।' –मुआदि २० ६५. [स च्यवन]

**चवसट**—वि (प्र ) चौसष्ट, चौसष्ट, ६४ संख्या [ स चतु षष्टी ]

**चवसा**—क्रिवि चारसदा ( दिशांनी ) 'परस्परें पाहती असें जन दळीं वहिल महिन्मा चवसा ।' –पला [ चौ+सदा ]

**चवसून**—क्रिवि ( राजा कुण. ) चोहोंकडून, सर्वप्रकारें [ चौ+सून ]

**चवळवेल**—पुस्त्री चवळीचा वेल, एका द्विदल धान्याचा वेल चवळी पहा

**च(च)वळा, चवळई, चवळाई**—पुस्त्री एक पालेभाजी

**चवळी, चंवळी**—स्त्री १ एक कडधान्य, हिची शेंग चार अंगळापासून वीतभर लांबीची असते चवळीच्या बारकी चवळी, बहाणी, तांबचवळी, काळ्या तोंडाची चवळी, आळगुदा अशा जाती आहेत २ चवळीच्या पानाची किंवा शेंगांची भाजी

**चवळी**—स्त्री १ अफवा, बातमी; वदंता, आवई ( क्रि० निघणें, उठणें, पिकणें, होणें, राहणें) २ थोमाटा करणें, बेअब्रू, अपमान उपहास करणें, गवगवा किंवा चर्चा करणें ३ अशी बेअब्रूची, बभ्र्याची स्थिति किंवा अवस्था (क्रि० करणें, होणें) ४ ( गो ) चवळयो=बात, थाप, गप्प [ चावळणें ]

**चवा**—पु लांकूड उंच चढविण्याकरितां दोन लांकडें किंवा वासे एकत्र बांधून जी कैची करतात ती कातर

**चवाई**—स्त्री चोरंग, चवई पहा 'चारी पुरुषार्थांची चवाई। तेंचि आसन त्यावरी पाहीं।' –एरुस्व १४ ८० (गो.) चवाय.

**चवाटकें**—न तूप तेल इ० मापण्याचें माप, परिमाण, शेराचा सोळावा हिस्सा, छटाक [ चौ+टांक ]

**चवाठा**—पु १ जेथें चार रस्ते मिळतात तें स्थळ, चौक, चव्हाटा, खुट २ गप्पीदास, रिकामटेकड्या बाता झोंकणारे जेथें बसतात तें ठिकाण (उदा० खाणावळ, न्हाव्याचें दुकान, हमरस्त्यावरचें झाड इ० ) चावडी. [ चौ+वाट स चतुष्पथ ] **चवाठ्या-(ठ्या)वर आणणें**–उघडकीस आणणें, गौप्यस्फोट करणें गुप्त गोष्ट जाहीर करणें 'घरगुती भांडणें चवाठ्यावर आणणें बरें नाहीं '

**चवाठा**—पु ( कशेळी ) देवस्कीचा दव

**चवाणमाणकी**—स्त्री ( कु ) समुद्रमाणकी, समुद्रफेंस

**चवार**—स्त्री आउत –शे ७

**चवारी**—स्त्री सुपारींतील एक जात या जातीचें फळ लहान कोंवळें असताच खातात जून झाल्यावर तें फार कठिण होतें

**चवाळ**—स्त्री १ एकमेंध विणलेले चार पचे 'चार पचे एका लगत एक विणल्ले असले तर त्या सर्वांस मिळून चवाळ म्हणतात '–मराठी ३ रें पु ए ७८ (आ ४) २ ( व ) झूल चवाळें पहा

**चवाळी**—स्त्री चवळी पहा. 'दोंतावून मुद्दीच चवाळी येऊं लागली आहे ' –राया

**चवाळा-मण**—पु एक प्रकारचा मण या मणाचें वजन सुरतीं ११४२ रु १० मासे, ८ पै भार असतें –मुव्या १०१

**चवाळें**—१ चवाळ पहा २ ही दोन पदरांची आडीमरडी घोंगडी चौरस असून लहान असते हाच कांबळ्यांत व यांत फरक आहे, लहान उणास घोंगडी 'एक नवारीची खाट, त्यावर चवाळशासारखें काहीं तरी टाकलेलें ' –यशापात ८७ ३ ( को ) ज्याच्या साहाय्यानें चार माणसें ओझें नेतात तें वासे आणि दोऱ्या, घोंगा इ० उचलून नेण्यास वांशास दोरी बांधून करतात तें साधन ४ चार माणसें (दगड इ०) ओझें उचलून आणतात ती क्रिया ५ गवाळें या शब्दानंतर शब्दपूरणार्थ उपयोग. ६ ( व ) बैलाच्या पाठीवर घालण्याची झूल 'आमचें चवाळें हरवलें ' [ चौ+आळें ]

**चविक, चविका**—पुस्त्री १ पिंपळी वनस्पति २ निघंटांत हिला चवक ( काळी मिरी जिला येतात अशा वनस्पतीचें मूळ ) म्हणतात [ स ]

**चविणें**—क्रि मोकाट सुटणें, चळणें, चवणें पहा 'निष्कपणास्तव शुष्कपणें गिरा । शुष्कवना चविते ।' –माप ५२

**चविनट**—वि ज्याला चव नाहीं तो, नष्टरुचि 'चविनटानें कालविलें । नाना अन्नें ।' –दा १७ १० १५ चव (चाव) नट पहा

**चविष्ट**—वि चवदार, रुचकर, स्वादिष्ट [ चव ]

**च(वि,वी)**—स्त्री १ (काव्य) चव रुचि, गोडी, जिभेनें ग्रहण करणें 'दाविली आपुली चवि ।' –रास ३ ७० २ आस्वाद, बऱ्यावाईटाची परीक्षा, चाचणी ( क्रि० पाहणें ) 'की तेंचि चवी करूनि पाहिजे । तव अमृत आहे ।' –ज्ञा ६ ३ [ का सवि, त चवी, ता सुवै, म चवी ]

**चवी चवीण, चवेण-णी, चवैण**—स्त्री रानकेळ चवई चवईण पहा

**चवे( व्वे-व्हे )चाळ-चाळीस, चवे( व्वे-व्हे )ताळ-ताळीस**—वि चाळीस अधिक चार ही संख्या, ४४, चवेचाळ पहा [ चौ+चाळीस ]

**चव्य**—न १ पिंपळी २ मिरवेलीचें मूळ चवक पहा [ स ]

**चव्या चव्वा**—पु १ गंजिफाच्या, पत्त्याच्या डावातील चार ठिपक्यांचें पान 'चव्या-तिर्रीसारखीं हलकीं पानें आलीं आहेत ' २ फाशांतील चार, चाराचें दान [ चौ ]

**चव्वल**—पु दोन आण्यांचें नाणें, चवल-ली पहा [ चवली ]

**चव्वीस**—वि चोवीस, २४ ही संख्या [ चौ+वीस ]

**चव्हाटा**—पु १ चवाठा पहा 'चव्हाट्यावरचीं कुत्रीं भाकरीच्या तुकड्यानें तरी भुंकायचीं थांबतात ' –वेड्याचा

बाजार ५ २ (कों ) होळीच्या समारंभाची जागा. [चौ+वाट, सिं चौवाटो ]

चव्हाळें—न जाभाडा, जबडा

**चश्मा-श्मा, चस्मा**—पु १ आरशी, चाळशी, डोळ्यांची भिंगें, उपनेत्र 'अधिकाराचे चष्मे याच्या डोळ्यास लागल्या वर त्याला पूर्वीचें जग निराळ्या रंगाचें दिसू लागतें ' -टि ३ ३३७ २ पदवी, ओटी ३ नाटकगृहातील प्रेक्षकासाठीं केलेली खास खोली ४ दोन खांबामधील किंवा तुळयांमधील जागा, खण [फा चश्म्=डोळा, चश्म=आरशी, तुल० स चक्षुष्मत्] ०(अमुक)**चश्म्यांतून पाहणें**-अमक्या प्रकारची, विशिष्ट दृष्टि ठेवणें, अमुक दृष्टीनें पाहणें -के १७ ४ ३० ०**पोशी**-स्त्री डोळेझाक 'गोष्टी बोलेल त्याच चश्मपोशी करून ऐकल्या पाहिजेत ' -मरिठवि २.३१४.

**चषक**—पु पला, भांडें, पात्र, प्याला [स ]

**चसणें**—अक्रि. (कुण ) (सोनारी) १ फसणें, बसणें, बुडणें (धंदा, पैसा) २ चाकरीवरून, हुद्यावरून दूर होणें, निघणें ३ मरणें चवणें पहा [हिं चसना, तुल० स चष्=मारणें] **चसणे(णा)पुरास-जाणें**-मरणें

**चहड, चहडणें**—चढ, चढणें पहा 'मग चहडुनि माण्या-मरी।' -दप ७०

**चहरा**—पु चेहरा पहा

**चहरेदार-बाज**—चेहरेदार-बाज पहा

**चहलदा**—पु बजारी लोकांवरील जुना कर -विल्सनकोश

**चहा**—पुस्त्री १ आवड, वासना, हौस (मनुष्य, वस्तु इ० ची) २ अपेक्षा, आशा ३ आस्था, आदर, प्रेम, मान, वाहवा, कीर्ति 'आपल्या धनीची लोकांत चहा होते हें पाहून तिला धन्यता वाटत असे ' -कोरकि २६ [प्रा चाह हिं चाय, चाहा, चाह=इच्छा, प्रेम, स इच्छा ]

**चहा**—पु. १ एक झाड व त्याचीं पानें, या पानापासून तयार केलेलें एक पेय २ गवती चहा [फा चा, जपानी चा, पोर्तु शा, चिनी चा, सिं चाहि] **चहाचा काढा**-पु पुष्कळ उकळून कढत केलेला चहा, वाईट चहा **चहादानी-णी**-स्त्री चहा करावयाचें एक पात्रविशेष, किटली [फा. चादान्] ०**पाणी**-न तोंड धुवून चहा घेणें इ० सकाळचें कर्म, (सामा ) चहापान, फराळ 'तो उठून चहापाणी व्हायला अजून चांगला दीड तास पाहिजे ' -मु १०

**चहाटळ**—वि १ चावट, एकसारखी बडबड, वटवट क र णारा, एकाच गोष्टीवर कंटाळवाणें चर्वितचर्वण करणारा २ क्षणपटीस बसणारा, पिच्छा पुरविणारा, थोकडी लावणारा, चपळ, ३ टवाळीनें उगाच थट्टा करणारा, षट्कर्णी करणारा, गजरघंटा ४ (सामा ) फाजील, वात्रट, टवाळ [चौ+वाट किंवा हाट?]

**चहाड**—वि १ लोकांचीं दुष्कृत्यें, गुप्त गोष्टी बाहेर फोड णारा २ बनावट गोष्टी सांगणारा, मनचें सांगणारा, खोटेंनाटें सांगणारा ३ चुगलखोर, लावालावी करणारा, चहाड्या सांग णारा, निंदक [प्रा दे चाड=मायावी, कपटी ? का चाडि= निन्दा] ०**खोर-चुचका-लुतरा**-वि चहाड्या करणारा, चुगल्या करणारा मी कांहीं चहाडचुचका नाहीं सांगायला ' -बाळ २ १८९

**चहाड**—वि शिजविला असतांहि मऊ होत नाहीं तो, भिजत घातला असता फुगत नाहीं किंवा ज्याला मोड येत नाहीं असा, कुच्चर, अशिजा (दाणा ) चाड पहा

**चहाडणें**—उक्रि. (क ) चुगल्या, चहाड्या करणें [चहाड] म्ह० वाढल्यापेक्षा चहाडलें गोड=निंदा, चहाड्या या वाढलेल्या अन्नापेक्षां गोड लागतात

**चहाडा**—पु (व ) सध्याकाळीं इशान्यादाखल डफडें वाजविणें

**चहाडी**—स्त्री १ लावालावी, चुगली, दुसऱ्याचीं वर्म-रहस्यें प्रकट करणें 'एऱ्हवीं चहाडा चहाडीची गोडी । ब्रह्मविद्ये नाहीं कुडी । ' -शिशु १३३ २ बनावट गोष्ट, निंदा, खोटेंनाटें [चहाड का चाडि] ०**चुगली**-स्त्री (व्यापक )चहाडी [का चाडिचुकलि ]

**चहाण**—न (व ) गाय, म्हैस यांचें जननेंद्रिय

**चहाणें**—सक्रि. चाहणें पहा

**चहाता**—वि चहा करणारा, आवड बाळगणारा, भक्त [चहा]

**चहाळ**—पु (व खा ) चाहूल, आवाज, शब्द ०**घेणें**-(व ) कानोसा घेणें

**चहाळी**—स्त्री चहाडी पहा. 'जिव्हा म्हणे चहाळी करी। रविचंद्रीवरी आणि हांसें।' -निगा ८७

**चहु-हुं-हू**—वि १ चार, चौ यांचें समासांत योजावयाचें रूप २ (साक ) चार वद 'सा चहू वेगळा अठरा निराळा। गाऊं वाजवूं एक चाळा रे।' -तुगा २४६ [स चतुस्, चौ] (वाप्र ) **चहूं पायांनीं दोहीं पायांनीं उतरणें**-शिंगरूं, वासरूं, पाडा वगैरेनीं चार पाय किंवा दोन पाय पुढें करून जन्मणें सामासशब्द- ०**कडला-कडील**-वि सभोंवतालच्या दिशाकडील, सव बाजूचा, सार्वत्रिक. ०**कडून**-क्रिवि सर्व प्रदेशाकडून, सर्व बाजूकडून, जिकडूनतिकडून 'स्वगजादि भी तो गज मारित येता चहूंकडुन चंचे।' -मोभीष्म ५ ५३ ०**कडे-दिशांस-फेर-फेरी**-क्रिवि. चाहींकडे, सभोंवार, जिकडेतिकडे, सर्व बाजूंना 'सदा भय वाट चहूंकडे। तरी दश-ग्रीम जाणिजे।' -ह ६ १०९ ०**कोण**-क्रिवि चोहींकडून

०देह-पु स्थूल सूक्ष्म, कारण, महाकारण हे चार देह. ' चहूं देहांची अहंकृती। स्वप्नींही न धरिती हरिभक्त।'-एभा २ ७१० ०रंगी-वि चहुरंगी, वेढंगी 'चोरटा चहुरंगी बल्चंड।' -आम २६. ०वाचा-वाणी-स्त्री परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार वाचा 'ते अनिर्वाच्या निश्चगोष्टी। चहूंवाचांमाजीं वाटी।' -एभा १ २१ -एभा ३ २८९

चहुत्रा, चहुतरा—पु चबुत्रा पहा 'लोखंडी चहुतऱ्यावर घोड्यावर बसलेला पुतळा उभा केला ' -कोरकि ३३७

चहुत्रा, चहोत्रा—पु दरमहा दरशेंकडा चार दराचें व्याज [ चौ+उत्तर ]

चहू—पु नाराळाचा कीस चर पहा

चहूटा-चहोटा—पु चवाठा पहा 'चहोटा पडला उताणा।' -गीता १.१९०४ 'प्राणसख्याचा महाल चहूटा। जागा धरा जा चहूकुन वाटा।' -पला ४ ८

चहे—पुभव पाण्यांतील एक पक्षी -शृशि २ १० [ एव चहा, हिं चाहा; स चाष ]

चळ—पु १ घसरणें, चचलपणा, चाचल्य, अस्थिरता 'जागेला तर चळ पडतोच परंतु द्रव्याला पडतो ' २ अंतर, फरक, च्यवन, च्युति, नि सरण (वचन, कायदा, नियम आचार इ० पासून) 'वचनासि चळ नव्हे माझ्या।' 'मन्त्र देवता साध्य करण्याविषयीं जे नियम सांगितले आहेत त्यांत यत्किंचित चळ झाला तर अनर्थ होतो ' ३ खुळ, चित्तभ्रम, बुद्धिभ्रंश, भ्रम इ० *काम-द्रव्य-मद्य-शास्त्र-स्त्री-चळ* (क्रि० लागणें) 'तरलों म्हणुनि धरिला ताठा। त्यासी चळ झाला फाटा।' -तुगा २८७७ ४ हाव, उत्कटेच्छा, अधीरपणा, उतावीळपणा वेड, खाज (क्रि० घेणें, भरणें, येणें, लागणें) -पुस्त्री १ एकसारखा नाद, छंद, हट्ट, खत (मुलें घेतात ती) (क्रि० घेणें) -स्त्री मूल रडत असतां तें रडें न आटोपण्याजोगी अवस्था त्यास प्राप्त होते ती. [ स चल् ] ०भरणें-वेड लागणें 'द्रव्याच्या दोर्केकडून किती काला भरला चळ।' -ऐपो ३८८

चळक—स्त्री. १ टोळी, मंडळी, जमात झुंड, समुदाय, जमाव २ पावसाचा वर्षाव, मोठी पर्जन्यवृष्टि, पावसाची सर (क्रि० येणें, पडणें) ३ जोराचा प्रवाह, लोंढा, पूर (एखाद्या रसाचा किंवा पदार्थाचा) ४ धाड, हल्ला मुसंडी, झपाट्यानें येणें, जाणें (घोडेस्वार, मनुष्यें, जनावरें, कुत्रीं इ० नीं) ५ रास, ढीग चळथ पहा [ स चल् ] सामाशब्द- ०धार-वि शरीरावर सरी येणारा, मुसळधारेप्रमाणें (पाऊस)

चळकणें—अक्रि चळणें पहा 'धातु कराया गेला। वेद मुळीं चळकला।' -दावि २०१

चळकप-काप—पु १ कांपरें, थरकांप, भीतीनें गागरून जाऊन शरीरास सुटणारा कंप, धडकी (क्रि० भरणें, सुटणें) 'एकास सुटला चळकप। गेला बळदर्पे गळोनियां।'-रावि ८ ६० २ (ल) पावरगुंडी [ चळ+कंप, स चल्कप ]

चळका—स्त्री एक वाद्य 'गोमुखी चळका चौंडकी दुटाळ।' -ह २२ २७ [ ध्व ? ]

चळकांडी—स्त्री चिळकांडी पहा

चळचळ-ळा—क्रिवि १ थरथर, लटलट (कांपणें) 'माल कापे चळचळां। -दा ३ ५ ३८ 'दिग्गज चळचळां कांपती। २ चळचळ शब्द होई असा, फळफळां (अति भयानें गागरून मुतणें) 'नदी फुफाती चळचळ रेरे।' -दावि २५२ [ स चल् ]

चळचळाट—पु १ (कुण) विपुलता, रेलचेल, चंगळ, ल्यलूट (खाद्य, पदार्थ पक्वान्नें इ० ची) २ समृद्धि, वैपुल्य (गाई म्हशी, गुरें, धान्य, पैसा इ०) ३ (क) दरारा, दब दबा, दहशत, धाक, जरब ४ भीतीनें थरथर कांपणें चळाळ पहा [ चळचळ ]

चळचळीत—वि (कुण) १ विपुल, भरपूर, समृद्ध, प्रचुर, पुष्कळ (मेजवानीच प्रसंगींचे उत्तमोत्तम पदार्थ) २ जींत मिष्ट पदार्थांची चंगळ आहे अशी (मेजवानी) [ चळचळ ]

चळचूक—स्त्री (सर्वसमावेशक अर्थी) दोष, व्यत्यय, चूक, कमतरता, टंगळमंगळ, कमजास्तपणा, अल्पस्वल्प विप र्यास (कांहीं एक नियमामध्यें) [ चळ+चूक ]

चळण—न चलनवलन, हालचाल, जिवतपणा 'जोंवरी चळण या तोंवरी म्हणती माझा।' -तुगा ३५१ [ स चलन ]

०वळण-न १ चलनवलन, हालचाल, काम २ चालचलणूक, वागणूक आचरण 'संपत्ति आल्यापासून त्यानें चळणवळण फिरलें ' [ स चलनवलन ]

चळणें—अक्रि १ खुळा, मूर्ख, भ्रमिष्ट होणें, बनणें 'कार्या कार्य न समजे चळला तो वृद्ध काय सांगावें।' -मोभीष्म ११ १६ २ क्षुब्ध होणें 'चळला वायू वाहटुळी। चेष्टे तैसा।' -ज्ञा १८ ६६६ ३ चूक करणें, प्रमाद होणें, घसरणें ४ च्युत होणें, ढळणें, हलणें, सोडून जाणें, सोडणें ५ चालणें 'कां उचलिलें वायुवशें। चळे शुष्क पत्र जैसें।' -ज्ञा ३ ६१ ६ निस टणें, वगळला जाणें स्मरणांतून जाणें, माहीतशी होणें 'सगुण भक्ति ते चळे।' -दा ४ १० ३१ ७ (कों) दीर्घ रोदन करणें, एकसारखें रडणें (मूल) [ स चलन ] चळोकापळो करणें-सतावून सोडणें (प्र) चळोकापळो करणें

चळतागुण्या—पु सुतारकामात फळी कोनदार कापा वयाची असल्यास ज्या चळत्या काटकोनाचे कोन मापून घेतात तो (इं स्लैडिंगस्केअर)

चळथ चळत—स्त्री १ गड्डी, चवड, रास ढीग 'सदा उच्छिष्टांच्या उचलिसि अवघ्यात चळथा।' -सारुह ६ १५२.

'तेथल्या पत्रावळीच्या चळथींतली एक पत्रावळ आण.' २ समुदाय. 'म्हणूनि असुराचिया चळथा । पार्था उजू धाविन्नल्या।'–मुआदि ४९.११०. ३ फोड; फांक; तुकडा. 'फाडूनि वदन केल्या चळथा।' –निगा १८. ४ चक्र; फेरा; पाळी. 'अमृत म्हणे हरिभजनें चुकती जन्ममरण चळथा रे।'–अमृत ११५. ५ रांग; पंक्ति. 'मम क्षेमें चालती चळथा। कपिपुंग वाचिया।' –कमुरा २.७८. **चळथणें, चळतणें**—अक्रि. रचणें; रास करणें. [ सं. चलित ? ]

**चळथा**—स्त्री. श्वासोछ्वासक्रिया. –शर. [ सं. ]

**चळवळ, चळवळणें, चळवळाट**—चळवळ पहा.

**चळवळीत**—वि. चांगलें तेलतुपानें माखलेलें; तुपट, अगर तेलकट.

**चळवळ**—स्त्री. १ हालचाल; चलनवलन. 'वायु चळवळेंसीं। जिराला व्योमाचिये कुसी।' –अमृ १.४८. २ अव्यवस्था, वळवळ; चांचल्य. ३ उद्योग; गडबड; खटपट. 'सामर्थ्य आहे चळवळेचें। जो जो करील तयाचें।' –दा २०.४.२६. ४ समाजांत उत्पन्न केलेली जागृति; चेतना; उठावणी. 'राजकीय चळवळ करणारापाशीं संपत्तीच असली पाहिजे असें नाहीं.' –टिल्या. ५ प्रचार; प्रसार. 'स्वदेशी चळवळ.' ६ खळवळ; अशांतता. [ सं. चलनवलन; प्रा. चलनवलण ]

**चळवळणें**—अक्रि. १ अस्वस्थ असणें; अस्वस्थतासूचक हालचाल करणें; हातपाय हलविणें (आजारी मनुष्यानें). २ वळवळ करणें; इकडेतिकडे धांवणें ( मुलानें ). ३ हालचाल करणें; फिरणें; हलणें. 'जें चळवळिजे अनिळें। तें दैविकेनि जी निज बळें।' –ज्ञा १४.९. ४ उद्योगी असणें; खटपट करणें. [ सं. चल्+वल् ]

**चळवळाट**—पु. अतिशय मोठी चळवळ; क्षुब्धता; मोठी खळवळ. [ चळवळ+आट प्रत्यय ]

**चळवळ्या**—वि. १ चळवळ करणारा; अचपळ; धुळधुळ्या. २ उलाढाल्या; साहसी; चवढव्या. ३ प्रचार, प्रसार करणारा. ४ लोकांत जागृति उत्पन्न करणारा. 'श्री. शिंदे हे राजकीय चळवळे नाहींत.' –के १७.५.३०.

**चळविणें**—उक्रि. १ वेड लावणें; खूळ लावणें; बुद्धिभ्रंश करणें; मूर्ख बनविणें. २ गोंधळविणें; भांबाविणें; आडमार्गांत, भ्रमांत, घोंटाळ्यांत घालणें. ३ हलविणें; सरकविणें; सरकूं देणें. [ चळणें प्रयोजक ]

**चळाचळ-ळां, चळाळां**—क्रिवि चळचळां पहा.

**चळाळ**—पु १ भीतीनें लटलट, थरथर कांपणें; थरकांप ( क्रि० सुटणें; होणें ) २ खळाळ; खळखळ आवाज. 'शुष्क जळाचे चळाळ। धारा धबाबे भळाळ।' –दा ११.७.४. [ चळचळ ]

**चळाळणें**—अक्रि. १ भळभळां वाहणें; फळफळणें; प्रवाह चालणें ( थानांतून, कासेंतून दूध, रक्त, मूत्र, घाम, इ०चा ). २ (इंद्रिय, अवयव वगैरे). वाहणें, प्रवाह सुरू होणें. [ध्व. चळ ? चळ ?]

**चळिया**—स्त्री. चंचलता.

**चळी**—स्त्री. १ सांडणें; सांडलवंड; सांडलेला पदार्थ ( पीठ धान्य, साखर इ० ). २ धारा. 'अहंकाराचिया चळिया। वरि मदत्रयाचिया उकळिया।' –ज्ञा ७.७५. [ चळ ] **चळीं पडणें**–चळणें; नाहींशी होणें; उडून जाणें; दूर होणें ( झोंप इ० ). 'माझी झोंप चळीं पडली.'

**चळीं**—क्रिवि. भळभळ. 'चळीं कांपती लागला घायवारा।' –दावि ४६५.

**चळें**—न. १ ( आंतील ) कांहीं धान्य काढून घेतल्यामुळें सैल झालेला मुडा. २ ( कु. ) मुडी बांधण्याच्या दोरीची जुडी. मुडी पहा. [ का. चळति=सैल, ढिला; सं. चल् ]

**चळेल**—वि. ( गु. ) चळ लागलेला; वेडा; भ्रमिष्ट; खुळचट; पागल. [ चळ ]

**चळोवळिक**—स्त्री. चुळबुळ; चळवळ. 'फुन बहुतीं चळोवळिकां पुढें रीगतांती।' –शिशु ६६८.

**चक्षु, चक्ष**—न. डोळा; नेत्र; नयन; आंख; पाहण्याचें इंद्रिय 'बाह्यत्वचा श्रवण। चक्षु रसना घ्राण। हे पंचविध जाण। इंद्रियें गा।' –ज्ञा १८ ४९९. 'जगीं पाहता ज्ञानचक्षीं न रक्षे।' –दावि ५७. [सं. चक्षुस्, चक्षस्; फा. चश्म] म्ह० चक्षुर्वैसत्यं= डोळ्यानें पाहिलें तें खरें.

**चक्षुरिंद्रिय**—न. नेत्ररूप जें इंद्रिय तें; नजर; दृष्टि; चक्षु. [ सं. ]

**चक्षुरुन्मीलन, चक्षुर्दान**—न. डोळे उघडणें; दृष्टि देणें; मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करतांना किंवा दक्षिणाचाराच्या संप्रदायाच्या विधींत मूर्तीला दृष्टि देण्याचा किंवा तिचे नेत्र उघडण्याचा जो विधि करतात तें. [ सं. ]

**चक्षुर्विषय**—पु. १ दृश्य वस्तु; दृष्टीला दिसणारा पदार्थ. २ दृष्टीचा टापू; क्षितिज. [ सं. ]

**चक्षुःश्रवा**—पु. ( डोळे हेच ज्याचे कान आहेत असा ) सर्प; शेष 'तुझे पवाडे देवाधिदेवा। वर्णितां शिणला चक्षुश्रवा।' [ सं. ]

**चक्षुमान्**—वि. १ ज्यास डोळे आहेत असा; पाहणारा; डोळस. २ ज्याचे नेत्र सुंदर आहेत असा. [ सं. ]

**चक्षु(क्षु)रोग**—पु नेत्रविकार; नेत्ररोग. [ सं. ]

**च्या**—१ षष्ठी विभक्तीचा प्रत्यय, याचे अर्थ– १ मिळकत किंवा ताबा. 'हें त्याचें घर.' २ विनियोग; विवक्षित उपयोग, योजना. 'हा बसावयाचा घोडा.' 'ती स्नानाची धोंड.' ३

एखाद्या क्रियेचा काल किंवा कालाचें समकालीनत्व. 'मी दुपारचा येईन' 'तो सांजचा गेला' 'तो केव्हांचा येऊन बसला आहे' ४ संबंध, अन्वय 'तो गांवाचा पाटील' 'मुलाचा बाप' 'झाडाचें पान' 'नित्य स्नानाचा ब्राह्मण' 'घरचा पैका' ५ पूर्ति, पूर्णता, साकल्य 'पैक्याचा पैका'= सर्व पैसा, 'घरचें घर' =सबंध घर; 'महिन्याचा महिना.' अशा रीतीनें विभक्तिप्रत्यय लागलेल्या नामाची द्विरुक्ति होते उदा० बापाचा बाप गेला घोंगडयाचा हात गेला ६ अवस्थांतर, फरक 'दरिद्र्याचा श्रीमंत होतो श्रीमंताचा दरिद्री होतो' चा हा प्रत्यय लागल्यामुळें नामाचें रूपांतर विकल्पेंकरून होतें नामरूपांतरांत प्रासंगिक संबंध किंवा अन्वय दृष्टीस पडतो उदा० 'घरचा धनी' =घराचा मालक 'घरचा पैका '= घरापासून उत्पन्न झालेला पैसा. रूपांतर नसेल तेव्हां विशेष निकट, जवळचा संबंध, स्वाधीनता, अवलंब या सारखे अर्थ होतात उदा० 'घरचा धनी =कुटुंबाचा मुख्य, 'घरचा पैका = घरांतलें भांडवल, 'घरचीं माणसें'=घरांतील माणसें 'अंगचें बळ' =शरीरसामर्थ्य सारांश नामाचें सामान्यरूप झालें असतां 'चा' हा षष्ठी विभक्तिप्रत्यय असतो व तदभावीं चा हा त्या नामास विशेषणरूप देतो [सं स्य]

**चां**—(महानु) चा, षष्ठीचा प्रत्यय 'जंमातळीं नेदाचो कुमरु।' –दाव ११९ [सं स्य]

**चाई**—स्त्री १ एक प्रकारचें झुडूप याचीं पानें खातात २ एका वनस्पतीचें मूळ **चाईचा मोहोर**–पु चाईच्या झाडाचा मोहोर हा व चाईचीं पानें खाण्यांत येतात

**चाई**—स्त्री केंसाला व लोंकरीला होणारा रोग, याला कातर, कातरी, उदरी असेंहि म्हणतात (व) कसर (क्रि० लागणें) केंसांच्या ठिकाणीं विकार होऊन त्या जागेचे केंस एकाएकीं गळून पडतात असा रोग 'चाई चाटी लाळ गळे। या नांव आध्यात्मिक।' –दा ३ ६ ५१ [हिं चाई]

**चाईन**—स्त्री एक रानवेल हिचीं पानें खाण्याच्या उपयोगी असतात

**चाउटी**—स्त्री (काव्य) १ कंटाळवाणी बडबड, बाष्कळ गप्पा चावटी पहा 'येक म्हणती सांडा गोठी। वायांचि करित। चाउटी।' –दा ८ १० १४. 'वाउगी चाउटी काम खोटीं।' २ चावटपणा, बाष्टपणा, फाजिलपणा, भलती गोष्ट 'भलतेंची कायें रे करिसी चाउटी।' –दावि २८ [स. वाचाट–चावट–टी]

**चाउरी, चाऊरी**—स्त्री (महानु) मंडपी, घुमट आच्छादन, चवरी, चारपाया वरील मेघडंबरी, चादर 'काळाचेया मुगुटावरि। जयाचिय आज्ञेची चाउरी।' –ऋ ७७ 'पद्मरागाचेया रंगावरी। घातली क्षीरोदक चाउरी।' –शिशु ६४ [स चतुर्=चार, प्रा दे चउरिया चवरी=मंडप, गु चोरी]

**चाऊ**—पु कान (चाऊमाऊ हा खेळ कान धरून खेळतात) [तें चेवी, का किवी] **०माऊ**–पु लहान मुलांचा एक खेळ. या खेळांत एकमेकांचे कान धरून 'चाऊमाऊ पत्रवळीचें पाणी पीऊं इ० गाणें म्हणतात 'तीं मुलें चाऊमाऊनें खेळत आहेत.'

**चाऊर**—पु चावर, चाहूर पहा.

**चाऊर**—पु. (बाग.) तांदूळ [सं तंदुल ; प्रा दे चाउल= चावल]

**चाऊळ**—चाहूल पहा

**चाऊस**—पु पोलीस अधिकारी, जमादार [तुर्की चावुश]

**चाक**—न १ गाडी, रथ इ० स गतिदायक वर्तुलाकार साधन २ ज्यावर दोर घालून विहिरीचें पाणी ओढतात तें चक्र, कप्पी, रहाटी. ३ मडक्यास आकार देण्याचें (कुंभाराचें) साधन [सं. चक्र, प्रा चक्क, पं चक्क, सिं चकु, हिं चाक, बं चाका, फा चर्ख, ग्री चक्र, ग्री कुक्लोस्] (वाप्र) **०आघळणें**–चाकावर नवीन धाव बसविणें. **०वर येणें**–१ चाकाचा खालचा भाग वर येणें, यावरून २ (ल) अडचणींतून चांगल्या स्थितीस येणें, अवनतीमागून उन्नति होणें 'आपल्या राष्ट्ररूपी गाडीचें चाक आतां वर आलें पाहिजे' –टिळक **०बुडणें**–सूर्य मावळणें, दिवस मावळणें. **०दांडा**–पु. (मोट असलेल्या विहिरीच्या) चाकाचा आंस, रहाटगाडग्याचा कणा, चाकाचा फिरत राहणारा कणा **०दोरीचा खेळ**–पु चक्रीचा खेळ, या खेळांत चक्र एकदां खालीं सोडलें म्हणजे दोरीच्या स्थितिस्थापकत्वामुळें पुन्हां आपोआप वर येतें **०पट्टी–पाटी**–स्त्री १ ज्यावर चाकाचा कणा बसविलेला असतो त्या लांकडाच्या दोन दांड्या ज्यांत बसविलेल्या असतात ती आडवी दांडी २ मोटेच्या विहिरीला जे दोन उभे खांब असतात त्यांना जोडणारें आडवें लांकूड ३ एक कर, टोल

**चाक**—स्त्री. दृष्ट, दृष्टिबाधा **०काढणें**–मीठ मोहऱ्या ओवाळून टाकणें, लोण उतरणें

**चाक**—न (शिंपी) तोंड, फट (कापडास असलेली), न शिवलेला भाग 'कोटाला चाक ठेवल्यानें नीट बसतां येतें' [सं चक्क्, हिं चाक्] **०करणें**–फाडणें, कापणें 'उभयतांचे पोट चाक करावे म्हणोन आज्ञा केली आहे' –दिमरा २ ८२

**चाक**—वि नीटनेटका, चकपक, टाकठीक, लक्क, चक्क पहा [तु० चाक्=चपळ तयार] **०चोप**–वि तडफदार, नीटनेटका, टाकठीक सुरेख, लकपक चाक पहा **०चोप–चोपी**–स्त्री १ नीटनेटकेपणा, टाकटिकी, चकपकपणा, चापचोपी २ थाटणें, नटणें, (शरीराचें), दाबणें, साफ, गुळगुळीत करणें, मोठ्या दक्षतेनें किंवा नीट काळजीपूर्वक शेवटास नेणें, तडीस नेणें ३ नीटनेटकेपणा, चकपकपणा (गुणें किंवा सत्व या दृष्टीनें असणारा), टापटीप **०पाक**–वि नीटनेटका, व्यवस्थित, वेतावाताचा चकपक पहा

**चाकचक्य**—न चकचकीतपणा, तेज, चमक, लकलकीतपणा, लकाकी, झकपक, डोळे दिपून टाकण्याजोगें तेज (विद्युल्लता, हिरा इ०चें) 'केवळ बाह्य चाकचक्याचा फार दिवस टिकाव निघत नाहीं' –नि [स]

**चाकटणें**—अक्रि १ आश्चर्यचकित होणें; विस्मित होणें २ गोंधळणें, बावरणें चाकाटणें पहा 'सिद्ध चाकटले समस्त। जाले विस्मित महा ऋषी।'–भारा १ १५ ३ (माण) पश्चात्ताप होणें [चक्र]

**चाकण**—स्त्री एका जातीचा साप

**चाकवंदी**—चकवदी पहा

**चाकर**—पु नोकर, सेवक, गडी 'ज्या घरीं हरिचा कर नाहीं। त्या घरीं हरि चाकर नाहीं।' [फा] म्ह० १ धन्याला धत्तुरा आणि चाकराला मलिदा=एखाद्या वस्तुवर ज्याचा वास्तविक हक्क आहे त्याला ती न मिळता भलत्याच माणसानें त्या वस्तुचा उपभोग घ्यावा या अर्थी उपयोग २ कोणाची होऊ नये बाईल आणि कोणाचा होऊ नये चाकर=बायको आणि चाकर या दोघानाहि यजमानाच्या तंत्रानें वागावें लागतें यावरून सामाशब्द– ०चुकर–नफर–पुअव चाकरमाणसें, नोकरचाकर, गृहभृत्य, सेवकजन, घरकाम करणारे गडी, मजूर हुजरे, हलकारे इ० एकवचनीहि प्रयोग होतो [चाकर+नफर] ०ड्या–वि माडोत्र्या, मजुऱ्या, नोकरड्या (चाकर निंदाव्यजक) ०पेशा–पु १ (समुदायार्थी) गडी, हुजरे, घरकाम करणारे सेवक २ चाकराचें काम, पेशा, हुद्दा, पदवी, मोलमजुरी ३ दास, नोकर, हुजऱ्या [चाकर+फा पेशह्] ०मनुष्य–पु (सरकारी) नोकर, अमलदार 'त्या राज्यात जे चाकरमनुष्य त्यानीं मात्र हत्यार बाधावें ..' –भाव ४७ ०मानी–न्या–वि (प्रतिष्ठार्थी) ज्याचें चाकराचें नातें किंवा पेशा आहे असा माणूस, चाकरमाणूस, आश्रित 'पावतो मुशारा चाकरमाना।' –दावि २११ [चाकर+मानई]

**चाकराचाकरीं, चाकरानफरीं**—क्रिवि चाकराकडून, चाकरामार्फत

**चाकरी**—स्त्री चाकराचें काम सेवा, नोकरी, शुश्रूषा 'का मोटा भाग्यलाभ स्वसुकृत फळलें तें नव्हे चाकरी ती।' –मोकृष्ण ५६ ४१ 'स्वदास समर्थी जपे तरि न देवरा चाकरी।' –कका ८४ [फा] म्ह० चाकरी करावी भाकरी खावी=अगोदर काम करावें मग जेवावें ०चुकरी–स्त्री (०व्यापक) रोजगार, नोकरी, धंदा, काहीं तरी उद्योग [चाकरी द्वि] ०चोर–वि अंग चोरून किंवा चुकारपणानें काम करणारा, चुकारतट्टू

**चाकरीया जमीन चाकरिया**–स्त्री नोकरी करण्याच्या कबुलीनें सारा न घेतां दिलेली जमीन, इनाम जमीन प्रपचार्थ, धमार्थ जमीनीप्रमाणें (पहा).

**चाकल**—पु घोड्याचा एक रोग यामध्यें माड्यांवर किंवा पोटाखालीं सहाणेएवढी वाटोळी सूज येते –अश्वप २ २८३ [स चक्र, चक्रल]

**चाकवत**—पु एक पालभाजी, ही सारक, यह, त्रिदोष नाशक व पाचक आहे [स चक्रवत् चक्रवर्त, फा चकोतु]

**चाकवारा**—पु (महानु) वावटळ, चक्रवात, भवरा 'भवेंधडाचा चाक्वारा।' –शिशु ४४८ [स चक्रवात]

**चाकळ**—वि (प्रा) अति बडबड्या, बोलका चपळ पहा

**चाकळा**—पु. १ घास, तुकडा, चकती 'तेवींचि संतोपाचे चाकळे। अखड चुपळी।' –ज्ञा १ १८१. २ गुदद्वाराच्या मासाचा गोळा [स चक्र]

**चाकाटणें**—अकि. दिपून जाणें, आश्चर्यानें थक्क होणें, चकित होणें 'चित्त चाकाटलें आइ घेत।' –ज्ञा १ ५२७ 'अर्जुनही चाकाटला तेथ।' –मुआदि ३० १८९ 'चित्त चाकाटलें स्वरूपामाझारी। न निघे बाहेरी सुखावलों।' –तुगा ४३२६ [चक्र]

**चाकाट्या**—स्त्रीअव चकाट्या, गप्पा, शिळोप्याच्या गोष्टी चकाट्या पहा (क्रि० पिटणें, मारणें)

**चाकारी**—स्त्री गाडी चालली असतां तिच्या चाकाची रेघ धुळींत किंवा चिखलात उमटते ती, चाकोरी, चकारी पहा. [स. चक्र, म चाक]

**चाकी**—स्त्री १ धातु, लाकूड इ० चा वाटोळा तुकडा २ चपटा, बसकट, वाटोळा भोंपळा, कोहळा, सुताचा गड्डा. ३ गुळाच्या ढेपेसारखा ल्हान खडा ४ चक्री वडाटा ५ चक्राकार चकती कडें (इ) नट् ६ चक्की, जातें ७ चाती, टकळी ८ (कों) रहाटाच्या तुबजोडावर बसविलेलें एक ल्हान चाक [स. चक्र, म चाक, हिं चाकी]

**चाकू**—पु १ लेखणी करण्याचें, आंबे इ० फळ कापण्याचें एक लहान हत्यार, शस्त्रविशेष, लहान सुरी २ चाकूसारखें युद्धाचें एक हत्यार [फा] ०मारणें–नमुना दाखविण्यासाठीं चाकूनें धान्याचें पोतें कापून आतील माल काढणें

**चाकोत–चाकोता**—चाकवत पहा

**चाकोत्या**—वि (व) (निंदाव्यजक) मध्येंमध्यें लुडबुडणारा 'हा चाकोत्या मिरवत होता

**चाकोंदळ**—चक्रदळ, चक्रदळ पहा

**चाको–रा री–रें**—पुस्त्रीन १ गाडीच्या चाकानीं पडलेला रस्ता, चाकारी पहा 'ते वेळीं कर्मराहाटीचा चाकोरा। भ्रमणीं पडे।' –ज्ञाप्र २४४ २ गाडी गेल्याबद्दलची किंवा आल्याबद्दलची चाकाची खूण 'इंद्रियाचा चाकोरा। भवसी गरगरां।' –भाए २०९ [चाक+ओरा=ओरखडा]

**चाकोली**—(व.) चाकोरी पहा

चाकोली—स्त्री. (व.) १ चकली. 'आज चाकोल्या खाल्या.' २ (व.) होळींत जाळण्यासाठीं हाताच्या बोटावर केलेल्या शेण्या. 'चाकोळ्यांची माळ होळींत टाकली.' [सं. चक्रल=चाकोळें; म. चकली]

चाकोलेट—न. एक मिठाई; कोकोच्या वड्या. [इं.]

चाकोळें—न. (कों.) रिकामटेकड्या लोकांचा अड्डा, कोंडाळें; चौकडी; मंडळी; क्लब; चाखोळें. [चाक+ओळ]

चाख—वि. नीटनेटकें; चकपक; चाक पहा.

चाखणी—स्त्री. चाखणें; चाखण्याची क्रिया. [चाखणें]

चाखणें—उक्रि. गोष्टी समजण्यासाठीं खाऊन पाहणें; चव घेणें; रुचि, आस्वाद घेणें; लक्षणेनेंहि हा शब्द पुष्कळ वेळां योजतात. [सं. चष्; प्रा. चक्खण; हिं. चाखना] (वाप्र.) **चाखतमाखत बोलणें**–नाजूक तऱ्हेनें, रुचि, चव घेत जेवणें (भूक नसतांना); चिकित्सा करीत किंवा नाकाओठावर जेवणें. **चाखतमाखत जेवणें**–अडखळत, थांबत थांबत बोलणें. **चाखून रांधणें**–अगोदर चाखून किंवा रुचि पाहून अथवा किंचित खाऊन पाहून मग. शिजविणें (स्वयंपाक्याला पदार्थ चांगला झाला किंवा नाहीं हें चाखल्याशिवाय समजत नाहीं. म्हणून या वाक्प्रचाराचा उपयोग निषेधार्थी व शेवटाविषयीं, परिणामाविषयीं अनिश्चित किंवा संशयित असणें या अर्थी करतात). **चुकीविषयीं कोणी चाखून रांधलें नाहीं**–कोणालाही आपल्या हातून चूक व्हावयाची नाहीं अशी खात्री बाळगतां येत नाहीं. म्ह० १ तळें राखील तो पाणी चाखील. २ चाखलें नाहीं पण देखलें तर असेल.

चाखंदळ—वि. चोखंदळ पहा.

चाखवटी—स्त्री. चव; चाखण. 'त्या स्वादामृताची चाखवटी।' –रामदासी २.४४. [चांखणें+वटी प्रत्यय]

चाखवत—चाकवत पहा.

चाखविणें—उक्रि. १ चव घेण्यास लावणें. 'कर्माचा तुज परिपाक चाखवाया।' –मोअंबरीष (नवनीत पृ. २६१.). २ (ल.) थोबाडींत मारणें; चपराक लगावणें; श्रीमुखांत भडकाविणें. 'तोंडांत जेव्हां दोन चाखविल्या तेव्हां कबूल झाला.' [चाखणें प्रयोजक]

चाखळ—चखळ पहा.

चाखुंदा—पु. (प्रां.) चिचका; बाईट व त्रासदायक गति, दशा; पेंचा, गोंधळ; दुर्दशा.

चाखेणें—उक्रि. (महानु) अनुभविणें; चाखणें पहा. 'चाखेति स्वामिकृपेची गोडी। म्हणति स्वर्गसुखें राकडीं॥' –भ्र २६. [चाखणें]

चाखो-खो—पु. (गो.) फणसाची भाजी.

चाखोळा—पु. मुंजीच्या वेळीं आई मुंज्या मुलाला आपल्या ताटांत भोजनास घेते तो समारंभ; मातृभोजन. यावेळीं मुलगा शेवटचें आईचें उष्टें खातो. [चाखणें+ओळा–ळें प्रत्यय, सं. आलयपासून]

चाखोळी-ळें—पुन. (कों.) अड्डा; बैठक. चाकोळें पहा.

चांग—वि. १ चांगला; बरा; उत्तम, छानदार. 'ते वेळीं भूमि तैसें चांग। चोख जें असणें। –अमृ ४.४३. 'कोणास लाभ घडतां सुख त्यांस वाटे। ते लाविती रिपुस बोधुनि चांग वाटे।' –अर्वाचीन २२१. २ धीट; धैर्यवान; शूर. 'एकां उभयांचि प्राण गेले। चांगाचे दांत बैसले।' –ज्ञा १.१३५. [सं. चंग= सुंदर; सुदृढ; तुल० का. चन्न–न्नु=सुंदर] ०चाली–वि. चांगल्या चाली(गती)चा 'सकलहि कलहंसीला रिझवा चांग चाली.' –आसी ७४. **चांगट**–वि. (काव्य) सुंदर; सुरेख; सुबक; गोजिरवाणा; सुरूप देखणा. [चांग+ट प्रत्यय]

चांग, चांगदेव—पु. चांगोबा; शिवाचा अवतार जो भैरव तो; एका ज्योतिर्लिंगाचें नांव. चांगभला पहा. (शके ११५५ चा पंढरपूर शिलालेख) चांगा असेंहि रूप येतें उदा० चांग–वटेश्वर– चक्रपाणी–सत्यसिद्ध इ०.

चांगटणें—क्रि. थक्क होणें. –शर. १

चांगभला—पु. भैरवउपासक यात्रेकरूंचा समुदाय, ज्योतिर्लिंगाचे भक्त, हमाल, मजूर इत्यादि (कीं ज्यांना पुष्कळ लांबवर जोरानें ओढणें, उचलणें इत्यादि क्रिया कराव्या लागतात असे) एकदम मोठ्यानें जो गजर करतात तो. या शब्दाचा अर्थ कल्याण अगर चांगलें होऊं दे असा आहे. भैरवाच्या प्रार्थनेचा शब्द. उदोउदो! सिंधी माणसें एकमेकांस भेटलीं असतां 'चांगोभला' (=चांगलें चाललें आहे ना!) असें उच्चारतात. महारात चांगभलें असें नमस्कारार्थी उच्चारतात. (का. चांगु=शाबास, भले या अर्थी+भला; सिं. चंगभलाई तुल० सं. चंद्रमाल] ०करणें–जयजयकार करणें; स्तुति करणें; प्रशंसा करणें. 'खायाला यथेष्ट मिळतें म्हणून चांगभला करतो.'

चांगमांग—पु. स्त्रियांचा वहापट्टा, वेणीफणी. [चांग+मांग]

चांगमेल—चांगभला महादेव. –बदलापूर ८०.

चांगला—वि. १ उत्तम; बरा; छान; योग्य; नीट; साफ सुफ असा. 'चार मंडळी बसायची जागा चांगली लागते.' २ भरभराटीचा; समृद्ध; गब्बर; सुखी; ज्याचा चालता काळ आहे असा. ३ नेहमीचा; सांप्रदायिक; शिरस्त्याचा; रूढीस धरुनसा; लोकप्रचाराचा; लोकरिवाजाप्रमाणें योग्य. [सं. चंग; म. चांग; का. चन्न=सुंदर; तुळु. चांगाल=सुंदर] **चांगलेपण–णा**–नपु चांगलें असणें; भलेपण; उत्तमपणा.

**चागा-गी-गें**—वि चांगला, चाग पहा 'हें स्मरे तो चागु। बहुतामध्यें।' -विपू २ ९०

**चांगावा-वें**—पुन. चागुलपणा, उत्तमत्व 'जे गीतार्थाचें चांगावें। मोक्षोपायपर आघवें।' -ज्ञा १८ १२३० [चांग]

**चांगुलपण-णा**—नपु चागलेपण पहा

**चाघा**—पु. (सोनारी) चांदी ठोकून वाढविण्याचा हातोडा, घघा ?

**चांच**—वि हुषार, चपळ, चलाख, दक्ष (मूल) चच पहा 'समय न कळे वेडगळ बुद्धि। विजाती स शुद्धि चाच चाट।' -तुगा ३७४१.

**चांच**—न. चाचे लोकांची टोळी, चाचा

**चॉच**—न (कु) १ आब्याच्या बाठीस किंवा सालीस असणारे बारीक तंतू २ सुगटाच्या अगावरील खवले

**चाचड**—पु मोठा तांबड्या रंगाचा मुंगळा, दाल्या -न एक क्षुद्र जंतु

**चाचण-णी**—न स्त्री १ चाचड २ डांस, मच्छर, चिलट, 'पिसा पिसोळे चाचण।' -दा ३.७ ७ 'चाचण्या म्हणती आमुचें घर।' -दा १० १० ४१

**चाचणी, चाचणी, चांचण**—स्त्री साखरेचा पाक (मिठाई, मुरब्याकरिता केलेला) **-चाचणीचें बेसन**-न. हरभऱ्याची भिजलेली डाळ वाटून लाल पडेपर्यंत परतून काढावी व त्यावर दूध शिंपून ढवळावें नतर साखरेचा पक्का पाक करून त्यांत वेलदोडे वगैरे मसाला टाकून त्यात पीठ घालून त्याचे लाडू करावे

**चाचणी, चाचणी, चाचणूक, चाचणूक चाचण**—स्त्री १ परीक्षा करणें, चव पाहणें, पारखणें, तपासणी, परीक्षा. (क्रि० करणें, पाहणें, घेणें) 'तो पंडित काय काय पढला आहे याची मी चाचणी पाहिली' २ (सोनारी) कसासाठीं ठेवलेला भाग (चांदी-सोन्याचा)-जनि (बडोदें) [स चच् म चोचणें ?]

**चाचपड चाचपड**—न पहाटेचा अंधुक अंधुक उजेड, प्रकाश, संधिप्रकाश अरुणोदयाच्या वेळींचा प्रकाश [चप् द्वि] -क्रिवि. (अंधारांत हातांनीं चाचपडतात त्याप्रमाणें) अंधुक, अस्पष्ट तुरळक (क्रि० दिसणें) [चाचपडणें द्वि]

**चाचपडणें, चाचपळणें**—अक्रि चाचपणें १ दिसत नसल्यामुळें अगर अंधार असल्यामुळें हातांनीं स्पर्श करून धोरणा धोरणानें चालणें 'मोहअंधारीं मणी पडला। तो युक्तीच्या हातीं चाचपडला।' -एरुस्व ५ ८५ २ (ल) भीतभीत काचकूच करीत-शंका घेत बोलणें, लागत लागत अडखळत बोलणें (प्रश्नास उत्तर देताना) बहुधा, चाचपडत बोलणें असा प्रयोग करतात ३ धडपडत जाणें, धडपडणें [स चप् (अभ्यास)]

**चाचपडत, चाचपत**-(या धातुसाधिताचा उपयोग क्रियाविशेषणाप्रमाणें करतात) अडखळत, रडतखडत, रेंगत, धोरणा धोरणानें, शंका घेत घेत "चंद्र आकाशांत पूर्ण तेजानें तळपत असतां त्याला शोधण्याकरितां अंधारात चाचपडत जावें लागतें कीं ?' -वधू २९

**चाचपणें**—उक्रि १ हातांनीं स्पर्श करून पाहणें, समजण्यासाठीं दाबून पाहणें (दुखावलेला अवयव अगर एखादी वस्तु) २ विशिष्ट वस्तु आहे किंवा नाहीं पाहाण्यासाठीं हात लावणें, दाबणें 'चिमणी आणि यमुना यांनीं आपल्या पिशव्या चाचपल्या' ३ हात लावणें, स्पर्श करणें (लाचाचा ऐवज). ४ चाचपडणें पहा

**चाचर**—स्त्री १ बोलताना अडखळण्याची क्रिया, खोडी, बोलताना लागणें, बोबडी 'किंबहुना सात्विका आठा। चांचरु माडता उमेठा।' -ज्ञा १८ १६०६ [का चच्चर=घाई, गडबड, तुल० स चर् अभ्यास] २ घेरी, तोल जाणें 'व्याकुळ निर्बळ चाचर आउनि कामिनि काय वदे सखियाला।' -अकक २ -वस्त्रलिंग द्वादशमास १४

**चाचर**—स्त्री काळजी; रक्षण 'पोरा चाचर चाकरासि कधुनी दारा समुदायसीं।' -आनंदरस चरित्र ६ [का. चचर= काळजी]

**चाचर**—न मच्छर, चिलट

**चाचर**—पु (कों) तुकडे टरफल, चर, चिंध्या (उंदरांनीं कुरतडलेल्या वस्तूच्या)

**चांचर**—वि चंचल, कुरळें 'वरुनि चाचर केशहि वाकुडे। -वामन रुक्मिणीविलास १२ -स्वादि ७ ४ ७ [स. चर्चरीक= केसाचा वाकडेपणा, कुरळ]

**चाचरणें चाचरणें, चाचरत जाणें**—अक्रि १ झुकणें, रळणें, झोकांड्या खाणें 'ब्रह्मांचिये झगटेली। परा चाचरेली -ऋ १४ २ (ल) भलतीकडेच भरकटत जाणें, विषयांतर करणें, बहकणें, भटकणें, वाहवण स्वत कोठें आहोंत हें विसरणें ३ अडखळणें, बोलण्यात काकू करणें, कचरणें चाचपडणें पहा ४ अडखळणें ठेच लागणें 'जैसें आंधळें चाचरोन पडे। गारीं आणि गडधरा।' -दा ५ १ ३७ ५ भुलणें [का चच्चर=घाई, गडबड, तुल० स चर् अभ्यास]

**चांचरा**—वि बोबडा, तोतरा, अडखळणारा, चोचरा, [चाचरणें]

**चाचरी चाचरीमुद्रा**—स्त्री समाधि लावलेल्या योग्याची एक मुद्रा, ध्यानस्थ स्थिति, पापण्या व बुबुळें हलवीत भ्रूमध्यावर पहात बसण्याची, धारणाप्रकरणीं तिसरी मुद्रा [चाचरणें+मुद्रा]

**चा(चां)चरा चाचारी, चाचारं**—क्रिवि १ झोके, झोकांच्या खात, ( क्रि० जाणें ) 'चाचरी जात सुपर्णे । महाद्वारी मूर्च्छा यऊन।' –ह ३१ १२४ २ कांकू करीत, कासकूस करीत, क्षणिक विसराळूपणानें ३ घसटून, निसटून; चुकून एकीकडे, भलतीकडे 'तेणें हात चाचरी गेला। मिशी आदरली ते वेळा ।' –रावि १९ १८३ ४ तातडीनें, लगबगीनें 'इतुकिया अवसरीं । पातला गणेश ब्रह्मचारी । रावणापुढें चाचरी ।' –गुच ६ १५३ ५ माघारून, फिरून 'डोळा न पाहावे सुंदरी । दृष्टी जातसे चाचरीं।' –एरुस्व १५६६ ६ अडखळत, लँगत, चोवडया शब्दांनीं 'तो एक बाळ बोले चाचरें । त्यास तैसेंच वेढा वती ।' –ह ५ १०४ [चाचर] **चांचरी चांचरी जेवणें**–रेंगाळत, नखरे करीत, नाजूकपणानें चिकित्सता करीत जेवणें.

**चांचरी**—स्त्री १ झोकांडया, झोक (क्रि० खाणें) २ चोवडी, अडखळणें, घोटाळणें, काकू करणें (भाषणांत) (क्रि० जाणें) [चाचरणें]

**चाचल**—पु चाहूल, ध्वनि, आवाज 'इतक्यात दार वाजविल्याचा चाचल येतो' –कफा १९ [ध्व]

**चांचल्य**—न १ चचलपणा, अस्थिरता, अस्वास्थ्य (मन, स्वभाव इ० चें), चालमेल, अस्वस्थता २ क्षणिकत्व, नश्वरता, अशाश्वतता [स चंचल]

**चांचवर**—न (गो) पीठ, कणीक, कोंडा वगैरेचें मिश्रण

**चाचा**—पु समुद्रावरील लुटारू, लुटारू जात [चांच= अरबी समुद्रातील बेट तुल०, स चचा=कुपुरुष ?]

**चाचावणें**—अक्रि चेवणें, जळफळणें, गुरगुरणें, कातावणें पहा

**चाचावणें**—सक्रि १ हलकेंच चेचणें, चोंचणी, चाकू इ०नीं इद्द इद्द बरेच हत्याराचे घाव मारणें, तोडणें, चेचणें (तास ताना, तुकडे करतांना, चिरा पाडताना), चोंचावणें पहा २ उपभोग करणें 'अति निष्ठुर वेकहीन निद्रित प्राणीं यथेष्ट चाचावी।' –मोकर्ण ३९ ५ [स चचु, म चाचु=चोंच, तुल० का चन्चु=मारणें, खुरडणें]

**चाची**—स्त्री चांच्यांची जात

**चांचु-चू**—स्त्री चोंच 'तिऐ प्रियें भणौनि चांचु-आडे सोविती । चुंबनालागी ॥' –शिशु ६४७ [स चंचु]

**चाचुर**—वि भुरभुर उडणारे (कुरळे केस) चाचर पहा 'विस्तीर्ण दिसती ललाट पटलें । शोभती चाचुर कुरळे ।' –कथा ४.६ १२३ [चांचरणें तुल० स चंचल]

**चाचुरी**—स्त्री चाचरण्याची क्रिया

**चा(चां)चुवडें, चाचुवडा**—नपु चोंच, चचुपुट 'जैं पाखिरू एकु चाचुवाडा धरौनि उपटिलें।' –शिशु ८६७ 'ते चकोरें चांचुवडें । उचलितीना।' –ज्ञा १३ ३२५ –एभा ७. ५७५ [स. चचु]

**चाचुवेस**—स्त्री चोंच, तोंड –शर ?

**चांचू**—न. १ एकहि अक्षर, शब्द, म पहा (निषेधार्थी प्रयोग) 'त्याला सभेमध्यें मीं चाचू करू देणार नाहीं' 'एवढे तेथें बसले होते पण त्यापुढें कोणी चाचू केलें नाहीं' २ जागरूकता, सावधानता, अस्तित्व दर्शविणारा आवाज, हुंकार, खाकरणें अगर दुसरें काही शब्दोच्चारण, हुंकांचू [ध्व]

**चांचेगिरी**—स्त्री समुद्रावर जहाज किंवा त्यांतील माल इ०ची लुटालूट करण्याचा धंदा, काठेवाडनजीक अरबी समुद्रात चाच नावाचें बेट आहे, तेथील लोक पूर्वी समुद्रावर लुटारूपणा करीत असत त्यावरून हा शब्द रूढ झाला असावा चाचा पहा.

**चांचोड**—स्त्री चोंच चाचुवडें पहा

**चाट**—वि. १ हलकट, नीच, लबाड, सोदा, व्यसनी, लुच्चा, हरामखोर, पाजी, चावट 'मेळवूनी चाट करी गुराखान, –तुगा २५०९ २ चाहटळ, चावट, वात्रट 'तरी गुज घेऊनि चाट ।' –परमा १४ २१ 'गोकुळींचीं मुलें चाट। तेणें समस्त केलीं पैं।' –ह ७ ६० [स चाट]

**चाट**—वि १ रिकामी बडबड करणारा, गप्पीदास, चपळ 'चाट चावट वाजट ।' –दा २ ३ ३० २ गजघटा; तोंडाळ तोंड स्वाधीन नसणारा [स. वाचाट, सं चाटु] ०पणा–न चपळपणा –हको वाक्यवृत्ति २२२२

**चाट**—स्त्री गप्प, बात (क्रि० देणें, मारणें) 'दिली चाट ठेवून' [ध्व, स चाटु, तुल० इ चॅट] ०देणें–हातावर तुरी देऊन निसटणें, एखादें काम पतकरून न करणें, फसविणें.

**चाट**—स्त्री १ (व) कुस्तींत जोडीदारास पाडण्यासाठीं त्याच्या पायांत जोरानें पाय घालणें, पायाची धडक देणें (क्रि० मारणें) २ तडाखा, 'आणि ही पायावरची चाटहि त्याच्याच फटकाऱ्याची' –चग्र ४३ 'शिवाजीनें अफजुलखानास चांगलीच चाट दिली' ३ तोटा, झीज, नुकसान (क्रि० बसणें) 'त्या व्यापारांत त्याला चांगलीच चाट बसली' [ध्व किंवा स चट्= तोडणें, मार करणें]

**चाट**—पु. तबल्याच्या पुढ्याचा कडेचा भाग, कांठावरची वाजविण्याची बाजू 'चाटीवर वाजीव' 'चाट खुलली नाहीं' चाटी पहा

**चाट**—स्त्री. इच्छा –शर [हिं]

**चांट**—स्त्री (गो) १ टांच २ (ल) प्रगति, पुढें पाऊल [टांच]

**चाटक**—स्त्री रमणीयता, सौंदर्य -शर [स चाटुक]

**चाटंक**—पु (गणित बगालप्रात) पाचतोळे वजनाचें परिमाण -छअं १९९. [म चार+टाक]

**चाटकेवुटके, चाटलेवुटले**—न. (ना) मुलाच्या खेळातील भाईकुडी, चूलबोळकी

**चाटण**—न पुष्कळ औषधी उगाळून किंवा कुटून जें रसायन बनवितात तें, लेह, चाटण्याचें औषध [चाटणें]

**चाटणें**—उक्रि १ जिभेनें ग्रहण करणें, जिभेनें खाणें २ (ल) ओझरता स्पर्श होणें, घासून जाणें (गोळा, गोळी, बाण) ३ (ल) नागवणें, लुबाडणें 'मोंगलाचें दायामुळें रयत चाटली गेली' -बाद्मा २ ६९ [ध्व. चट् प्रा दे चट्ट=चाटणें, हिं] (वाप्र.) **चाटलें आणि बाटलेंसें होणें**-सुखाच्या थोड्याशा सेवनाबद्दल जितक्या शिक्षा किंवा प्रायश्चित्तें असतील तीं भोगणें **चाटून पुसून खाणें**-सारें खाऊन टाकणें, ताट निपटणें **चाटून पुसून जेवणें**-उदासीन वृत्तीनें चव न घेता जेवणें **चाटूनपुसून नेणें**-सपशेल लुटणें, निव्वळ नागविणें, निःशेष नेणें

**चाटवण**—न १ पहिल्या पावसानें उगवलेली हिरवळ, आंखुड गवत २ चाटण पहा [चाटणें]

**चाटळ**—वि चाभट, धटवध्या, कुचाळखोर, चाट, चहाटळ पहा

**चाटा**—पु पल्ला, अतर 'अशा संकटानें रोज कूच करून वीस पचवीस कोसांचा चाटा पाडावा' -भाव ७८ (टीप) [चाटणें]

**चाटा**—पु (विणकाम) नळ्या, ज्यावर बॉबिन बसवून ती फिरली असतां बॉबिनवर सूत गुडाळलें जातें तो (इ.) स्पिंडल

**चाटा**—पु मुलगा -शर

**चाटा**—वि स्वच्छंदी, स्वैराचारी -शर [चाट]

**चाटाई**—स्त्री, चाभटपणा 'का करिशी चाटाई।' -दावि २४१ [चाट]

**चाटार**—वि बडबड्या -शर१ [चाट]

**चाटी**—स्त्री तबला अथवा पखवाज यांचे दुहेरी कातड्यानें मढविलेल्या तोंडाच्या कडेचें, सुमार दोन बोटें रुंदीचें गोल कातडें चाट पहा.

**चाटी**—वि चावट, चाट पहा 'निगुरीक चाटी जल्पती तें न्यायें।' -दावि २७३

**चाटी, चाट्या**—पु १ कापडाच्या व्यापाऱ्याची जात कापडवाला 'चाटी आणि सराफ सोनार।' -जे १०.४० 'द्वारकेचा सभाग्य चाटा। वस्त्रश्रेणी पुरवी अचाटा।' २ (ब) कोष्टी [त शेट्टी तामिळ=चेट्टी]

**चाटु**—वि मनाला संतोष देणारें; सुखद, हृदयगम, मनोहर (चेहरा भाषण, कृत्य) 'अगाधु चाटु स्तवितां।' -दाव २९७ [स] **चाटुक**-वि गुळचट, गोड [स]

**चाटु-टू**—पु १ लांकडाची पळी (स्वयपाकाची), डाव; चमचा 'जैसा चाटु क्षीरीआत।' -एमा १०४६७ 'पुरुष चाटुकरूनि चढ चाटी।' -यथादी १३ ९२ २ नाव चालवितांना पाणी तोडण्याचें हत्यार, वल्हें ३ माडाचीं फुलें ज्या भांड्यात कुजत ठेवतात त्याच्या तोंडावर ठेवण्यासाठीं लाकडाचें केलेलें, शंकराच्या पिंडीसारखें हत्याच्या तोंडाच्या आकाराहून कमी आकाराचें जें भांडें तें -बदलापूर ३१० [प्रा चट्टु, प चट्टू, हिं चाटी]

**चाटू**—पु मोठ्या ढेंकणासारखा एक जलकीटक

**चाटू**—वि १ लांचखाऊ २ मूठचेप्या दाब्या, लाच देणारा. [चाटणें]

**चाट्याभाट्या**—वि वाचाल, बोलघेवडा, बहुभाषी, स्तुतिपाठकासारखें बोलणारा [चाट+भाट]

**चाड-डी**—स्त्री १ आवड, गोडी, चटक, छंद 'दास्यावरि जेआ। आति चाड।' -ऋ २४ 'वाईट गोष्टींची आम्हास चाड लागत चालली आहे' -विवि ८ ४ ७४ 'आणि आकर्णी नसली चाड। तरीन लागती गोड अक्षकया।' १ जरूरी, इच्छा, गरज 'जैं सायेचिये चाडें। हहुळिजे दुधाचें भाडें।' -अमृ ७ ७४ 'आपुलिये चाडे सज्ञाना। योग्य नोहे।' -ज्ञा ४ ८४ 'कंठ शोषला उदक चाडें।' -मुआदि २ ११४ ३ बुद्धि ४ पर्वा, भीड, किंमत, मर्यादा, मुरवत, मुलाजा 'त्याला याची चाड नाहीं आम्हां भीड।' -तुगा ११० [स. चाटु, प्रा चाडु?] म्ह० १ रोग्यासी कुपथ्याची चाड २ ज्याची लागे चाड तो उदे ताडमाड=ज्याचें लोक फार अगत्य ठेवतात तो आपल्याच तोऱ्यांत असतो

**चाड**—न चाडें पहा ०दोर-री-पुस्त्री १ चाडें पाभरीला बांधण्याची दोरी २ जिला चाडेगांठ मारलेली आहे अशी दोरी [चाडें+दोर]

**चाड**—न (खा) झाड 'चाडातोले हुतो' -भि १८.

**चाड, चाडखोर, चाडी-चाड्या**—चहाड, चहाडखोर, चहाडी पहा

**चाडयेरो**—वि (कों) चहाडखोर 'तो सगो चाडयेरो' -लोकक्या २ २८

**चाडर**—स्त्री चादर पहा 'रत्नजडित चाडरिया।' -कृमुरा २ ११९

**चाडा**—वि (कों) बडबड्या, लबरा, तोंडाचा ढिला, फटकळ, शिवराळ, ज्याच्या तोंडांत कांहीं रहात नाहीं असा, वाचाळ [चाट]

**चांडा**—वि. (वे.) निलाजरा.

**चांडा-डी-डें**—वि. (क.) लाडावलेला; लाडका. 'तुमचा मुलगा चांडा झाला आहे.' 'असल्या चांडया मुलांना दोन हात दूर ठेवले पाहिजे.'

**चांडाल-ळ**—१ अति नीच माणूस. चंडाल पहा. 'चांडाळ पूर्विचा वैरी। ...उलट त्या विचारिस मारी।'—शारदा. २ महार; मांग; अस्पृश्य. 'नाना चांडाळमंदिरांशीं। अवचटें आलिया संन्यासी।'—ज्ञा १६.१७६. [सं. चंडाल] **चांडाळ चौकडी, चांडाळी**—चंडाळ पहा. ०खत—जळीत खत; चंडाळखत पहा. 'त्या सावकाराचें ४००० रुपयांचे खत चांडाळखत झालें.'

**चाडी**—स्त्री. चहाडी पहा. 'चाडी केली ज्यांनीं त्यांचा शिरच्छेद।'—रामदास २.७२. [का.]

**चाडी-डू**—स्त्री. किंमत; पर्वा; जरूरी. चाड पहा. 'तरी नसती कीर्तिची मला चाडी।' —केक १५ 'लोह परिसाची चाडू। देवा रे।'—त्र्यंबक, स्तोत्रमाला ९३४. [चाड] **चाडीस अडणें**—मोहास, लोभाला गुंतणें. 'सवे चाडीस अडलें। अज्ञान तें पैं।'—सिसं ४.१५७.

**चाडी**—स्त्री. (व.) नरसाळें; चाडें.

**चाडें-डें**—न १ समईंत ज्या ठिकाणीं तेल वात घालतात तो वाटीसारखा भाग; टवळें. २ ज्यांत वरच्या टवळ्यांतलें तेल ठिबकतें तो भाग ३ बीं पेरण्याकरितां पाभरीवर जी लांकडाची वाटी असते ती. यांतून धान्याची मूठ सोडतात. 'ज्ञानदेव म्हणे मी चाडें। सद्गुरूंनीं केला कोड।'—ज्ञा ६.४९२. —एभा ६.३०६. ०फूल—न समईचा वरचा भाग (ज्यांत तेल घालतात तो) याला फूल असेंहि म्हणतात. चाडे (१) **चाडयावर मूठ(चाडेमूठ)धरणें**—(पेरण्यास आरंभ करणें यावरून) कोणतीहि गोष्ट-कार्य आरंभिणें. **चाडेमूठ लागणें-चालणें**—इ० वाक्प्रचार, पेरण्याचें कार्य, पेरणी चालू आहे, सुरू झाली हें दर्शवितात.

**चाडेगांठ**—स्त्री एक तऱ्हेची गांठ; पेंडेगांठ; साधी व सोपी गांठ.

**चाड्डी, चड्डॉ**—पु (गो.) बाटविलेला वैश्य; एक जात.

**चाढें**—न. (कों.) सांबाचा उथला

**चाणकें**—न (ना.) तुणतुणें. चौंडकें

**चाणक्य**—पु १ एक दक्षमंत्री ब्राह्मण. यानें पुष्कळ कारस्थानें करून मगध देशच्या नंद राजवंशाचा नि:पात केला व चंद्रगुप्त मौर्यास गादी मिळवून दिली यावरून. २ (ल.) अतिशय पाताळयंत्री व कारस्थानी मनुष्य. [सं.]

**चाणक्य, चाणक्ष, चाणाक्ष**—वि. बुद्धिमान्; आत्या धूर्त; चतुर; उत्तम वक्ता इ० गुणांनीं युक्त असा (मनुष्य), चलाख; हुषार (मुलगा, स्त्री). 'चाणाक्ष हा शब्द चाणक्य या महा धूर्त व चतुर ब्राह्मणाच्या नांवावरून मराठींत आलेला आहे.'—चंद्रगुप्त ३६. [चाणक्य-अप.]

**चाणूक**—स्त्री. (प्रां.) चुणूक पहा.

**चात**—पुस्त्री. १ सूत काढण्याचा चाकाचा जो गरगर फिरणारा अवयव, भाग असतो तो; ज्यावर सूत गुंडाळलें जातें ती सळई, सुई. चात चातीपेक्षां मोठा असून तो रहाटाला जोडलेला असतो. परंतु चाती ही स्वतंत्रहि फिरकीसारखी वाटोळी व हातानें सूत काढण्यास उपयोगी अशी चकती असते. २ सोनाराची भोंकें पाडण्याची लोखंडी सळई, सामता; भोंक पाडण्याचें साधन. ३ चातीच्या आकाराचा लांबट मळसूत्रासारखे करवे असलेला शिंपला, शंख. [प्रा. दे. चत्त=सूत काढण्याचें साधन; तुल० सं. तर्कु; सं. कृत्=सूत कांतणें]

**चातक**—पु. एक पक्षी, हा ढगांतील पाणी पिऊन राहाणारा आहे. म्हणून हा नेहमीं ढगाची अत्यंत उत्कंठेनें वाट पहात असतो अशी याची प्रसिद्धि आहे. 'पाहाणां भरोवरी आपवी। मेघ चातकांसी रिचवी।'—ज्ञा १५.२० [सं.] **चातक न्यायें-करून**—क्रिवि. मोठया उत्सुकतेनें; पराकाष्ठेच्या प्रबल उत्कंठेनें (वाट पहात बसणें, प्रतीक्षा करणें.)

**चातली**—स्त्री. (व) जानव्याच्या सुताला पीळ देण्यासाठीं केलेली भिंगरी. [चात]

**चाती**—स्त्री. १ छाप मारून नाणें पाडण्यासाठीं (सोनें, रुपें, तांबें या धातूचा) केलेला वाटोळा व चपटा तुकडा; चकती. २ वजन म्हणून उपयोगात येणारी (शिसें इ० ची) वाटोळी चकती. ३ लावण्यासाठीं जी वाटोळी दामटी (कणीक इ० ची) करतात ती; पोळी किंवा पिठाची वर्तुळाकार दामटी; एखादा पदार्थाची थापटी, वडी, चकती, लाटी. ४ सूत काढण्याच्या रहाटाचें चाक; त्या चाकाचा लोखंडी दांडा; सूत काढण्यासाठीं, पीळ देण्यासाठीं पैशाला किंवा धातूच्या चकतीला मधोमध भोंक पाडून त्यात दांडा घालून केलेलें यंत्र; टकळी. ५ सूत भरलेली सुताची कांडी; बॉबीन. [प्रा. दे. चत्त; म. चात पहा]

**चातुर**—वि. १ (काव्य पोवाडे) शहाणा; हुषार; बुद्धिमान्, समजूतदार; कुशल 'दादू चातुर बोलला।'—ऐपो ९६. २ (विशेषत. *लावण्यामध्यें*) प्रियकर; सखा. [सं. चतुर]

**चातुरंग-दळ**—न. सैन्य; चतुरंग पहा. 'सवे चातुरंग चाले नीट। जैसीं जमाची राज वाट।'—शिशु ९३१.

**चातुराश्रम्य**—न. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यास या चार आश्रमांचा समूह. [सं.]

**चातुरी**—स्त्री. (काव्य-पोवाडे) हुषारी; चतुराई; धूर्तता; कौशल्य; कल्पकता; करामत. [सं. चतुर]

**चातुर्जातक**—वि दालचिनी वेलदोडा, पत्री, नागकेशर हीं चार द्रव्यें एकत्र करून बनविलेलें औषध [स चतुर्+जातक]

**चातुर्थक-र्थिक**—पु दर चवथ्या दिवशीं येणारा हिंव ताप, चौथरें हींव 'चातुर्थक तरि नोहे।' –गीता १ १६४९ [स ]

**चातुर्थिक**—पु शूद्र, चातुर्वर्ण्यांतील चवथा वर्ण 'चातुर्थिक वदे नाहीं स्मरण।' –दावि १५१ [स चतुर्थ]

**चातुर्दक्ष**—क्रिवि चहू बाजूस, चान्ही दिशांच्या ठायीं 'सवरितु नगराची बरव। तैसे चातुर्दक्ष आरव।' –ऋ १५ [स चतुर्+दिक्]

**चातुर्भद्र**—न अतिविष, सुठ, नागरमोथा, गुळवेल या चार उत्तम औषधी द्रव्यांचा समुच्चय [स ]

**चातुर्मास(स्य)**—न १ (चतुर्मास अप) चार महिन्याचा काल आषाढ शु॥ ११ ते कार्तिक शु॥ ११ हा काल चतुर्मास पहा 'नाहीं तरी चातुर्मासात हा रमाचा विषय हवा कशाला?' २ शीत, उष्ण व पर्जन्य याचा जो चार चार महिन्याचा अवधि तो प्रत्येकीं ३ या चार महिन्याच्या काळात केलेलीं व्रतें वैकल्यें, होमहवनें वगैरे ४ एक विशिष्ट इष्टि. [स ]

**चातुर्य**—न चतुरपणा, बुद्धिमत्ता, हुशारी, बुद्धिसामर्थ्य, कर्तृत्व, 'मुख्य मनोगत राखणें। हेंचि चातुर्याचीं लक्षणें।' –दा ११ १० २५ [स ] ०**कळा**–स्त्री चातुर्य ही एक कला मानण्यात येते [चातुर्य+कला]

**चातुर्वर्ण्य**—न चार वर्णांचा समुदाय, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या हिंदुसमाजातील चार आद्य जाती, वर्ग, वर्ण 'चातुर्वर्ण्याच्या कल्पनेचे अवशेष प्राचीन ग्रीक व इराणी लोकांत आढळून येतात' [स ]

**चातेंपोतें**—न (व्यापक) सोनार, शिंपी जव्हेरी, इत्यादींचीं लहानसहान किरकोळ हत्यारें, उपकरणें (समुच्चयार्थी) [चात+पोतें]

**चाथा**—पु सार 'कथित सुरस गाथा, सव ससार चाथा।' –आमा ९ [चोथा]

**चाथी**—स्त्री. बडबड 'आणि ईश्वराचिया खती। नुवधि याचि करिती चांथी।' –ज्ञा १६ ३१४ [स चाटु तु० इ चॅट]

**चांद**—पु १ चंद्र 'देखोनि निजप्रबोध चांद। भरतें अगाध सुख दाटे।' –एभा २० २ 'वदलीं हृदयात नांदतो तव माझा अभिलाष चांद तो।' –मोरा १ ३७५ २ चंद्राच्या आकाराचा दागिना, बिल्ला, पदक 'तीन चांदाचा अहागिरदार' ३ (वे) चांदई ४ एक प्रकारचें दारूकाम, यांत चंद्राच्या आकाराच्या कांडी असतात व उडतांना निरनिराळ्या रंगांचे तारे बाहेर पडतात, [स चंद्र प्रा चन्द, हिं गु म चांद, प चद, सिं. चद्र] (वाप्र) **चांदाची वृद्धि असणें**–द्वितीयेच्या चंद्राप्रमाणे वाढणें 'चांदाची वृद्धि असो नांदा सानद सानुग स्वस्थ।' –मोआदि ३५.७७ **चाद बांधणें**–भिंतीस पाऊस लागू नये म्हणून आढोसा बांधणें

**चांदई**—स्त्री १ दुपाखी घराची आढयापर्यंतची उंच भिंत, कडेची रुद भिंत, करा –शिल्प २०२ [का चदी]

**चांदकी**—स्त्री लहानशी भाकरी, पोळी [स चंद्र, म चांद]

**चांदड**—वि (दे) वृद्ध अशक्त किंवा दुर्बळ, जराग्रस्त, जख्खड मनुष्य, पशु

**चांदणापाख**—पु शुक्ल पक्ष [स चंद्र+पक्ष]

**चांदणी**—स्त्री १ लहान तारा, तारका २ घोडा दाणा खात असता त्याच्या पाठीवर झूल, फडकें किंवा चिरगूट वगैरे आच्छादन नसेल तर त्याना नक्षत्रापासून होणारी बाधा किंवा विकार होतो ता ३ छत, चांदवा. ४ राखडीसारखा परंतु जरा लहान असा स्त्रियांचा दागिना. ५ घोड्याच्या कपाळावरील पांढरा अशुभ डाग ०**तरारणें**–आशाळभूतपणें पाहणें, भीति, क्षुधा, राग इ० कारणानें कावरीबावरी मुद्रा होणें, डोळ्यापुढें काजवे चमकणें. 'दोनप्रहरां यास खावयास न मिळालें तर कशी चांदणी तरारती' म्ह० चांदण्यात निजती आणी माडीची हवा पहाती= कंगाल स्थितींत चैन व भोग भोगण्याची आशा करणाऱ्या माणसास ही म्हण लावतात. ०**रात-रात्र**–स्त्री ज्या रात्रीस चांदणें असत अशी रात्र

**चांदणीकेदार**—पु (राग) गायनशास्त्रांतील एक राग, यात षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात आरोहांत ऋषभ व गांधार वर्ज्य व अवरोहात गांधार वर्ज्य जाति औडुव, षाडव वादी मध्यम, सवादी षड्ज गानसमय रात्रीचा पहिला प्रहर [स ]

**चांदणें**—न १ चंद्रप्रकाश २ प्रहाचा प्रकाश [स चंद्र हिंदी चादनी] ०**पाठ-टिपुर**–चकचकीत स्वच्छ पिठासारखें चांदणें (क्रि० पडणें) **चांदिणां**–क्रिवि चांदण्यांत 'काई चांदिणां उठे लहरी। मृगजळाची।' –अमृ ७५ [चांदणें]

**चांदमारी**—स्त्री नेम मारण्याचा अभ्यास, लक्ष्यवेध, (लक्ष्य चंद्राकृति असतें यावरून) [हिं म चंद्र+मारणें]

**चादर**—स्त्री कौलाचा पांढरा बावटा 'त्यापेक्षां चादर फिरवून किल्ला स्वाधीन करू –गासचिशाब १५

**चादर चादरी**—स्त्री (हिं) १ पलंगपोस, वस्त्राचें आच्छादन बैठकीचें वस्त्र 'भीमकें कला बैसकार। चादरिया घातल्या अरुवार।' –कथा १ ८ १४८ २ धबधब्याचें पाणी खालीं पडत असतांना दिसणारा देखावा ? [चद्दर पहा]

चांद्र—वि. (गो.) कपाळावर पांढरा ठिपका असणारी गाय, बैल [चांद]

चांद्रात-त्र—स्त्री. (हिं.) १ सूर्यचंद्रसंगमानंतर किंवा अमवास्या झाल्यावर येणारी पहिली चांदणी रात्र. २ चांदणे असलेली रात्र. ३ (ल.) आनंदाचा काळ; सढळ हाताचा खर्च. [सं. चंद्र+रात्रि; चंद्रात्मन्-चंदरत-चांदरात-भाम १८३२] ०होणे-ज्या रात्रीं प्रथम चंद्र दर्शन होतें त्या रात्रीपासून मुसलमानी महिन्यास प्रारंभ होतो व त्या रात्रीं नोकर-चाकर लोकांस पगार मिळतो त्यावरून पैसा मिळणें; द्रव्यप्राप्ति होणें; चैन होणें इत्यादि.

चांदला—पु. १ (पितळ, रुपें, कांच इ० चा) कुंकवावर लावण्याची चकचकीत टिकली. २ गंधाचा मोठा टिळा. ३ टिकली; पुतळी. –बदलापूर २४०. [चांद]

चांदवड-डा—पु. १ एक वृक्ष, याचीं पानें एका बाजूस वाटोळीं व शेवटीं निमुळतीं होत जातात व देठ मध्यभागीं असतो २ –नपु कुंभा, धामण इ० वृक्षांचा ताजा काढलेला सालीचा (खोडापासून निराळा केलेला.) तुकडा; खाप.

चांदवड-डी—वि. नाशिक जिल्ह्यांत चांदवड गांवीं पाडलेले (रुपये, अगर तत्संबंधीं).

चांदवा—पु (हिं.) १ पाळणा, मंडप यांच्यावर जें छत असतें तें. 'पालखाळा तरि चांदवा धरीति।' –मुक्तावसर. २ देव, देवता यांच्यापुढें टांगलेली लाकडी चौकट, मंडपी. 'चांदवा मोत्यांचा गुंफीयेला।' –रासक्रिडा २०. ३ मोरच; मोरचाच्या मध्यभागीं असलेला चंच भाग. ४ बायका कपाळावर कुंकवाच्या खालीं जी टिकली लावतात ती. ५ टोपीचा वर्तुळाकार भाग [चंद्र]

चांदवेल—स्त्री एका जातीची वेल.

चांदसलामी—स्त्री. (हिं) १ नूतन चंद्र उगवण्याच्या दिवशीं सरदाराला अगर उमरावाला दिलेली सलामी, मुजरा. २ प्रसंगोपात्त चाकरीवर असणें (मुजरापणा करणाऱ्या चाकरा विषयीं बोलताना) 'हा चाकर एखाद वेळेस चांदसलामी सारखा दृष्टीस पडतो.'

चादळ—न. एक झाड. –वेहु १४१.

चांदा-द्या—वि. १ कपाळावर पांढरा ठिपका असणारा (बैल). २ डोक्यावर सफेत ठिपका असणारा लहान मासा. हा किनाऱ्याकिनाऱ्यानें फिरतो. [सं. चंद्र]

चांदा, चांदाडा—पु एक वृक्ष; चांदवड पहा. [चांद]

चांदामांदा—पु लहान मुलांचा खेळ. 'चांदामादा गिर गिर कांदा, अर्धी भाकरी सगळा कादा, टी ऽऽ कल्यो. टीकल्यो' म्हणून मुलाच्या कपाळाला हात लावावयाचा.

चांदिणापाख-चांदिणी-चांदिणें—चांदणापाख पहा.

चांदिणी—स्त्री. १ चांदणें. [चंद्र] २ चांदणी. ०रात्र-स्त्री. चंद्रप्रकाशाची रात्र.

चांदिणें—वि. पांढरें.

चांदिणें—न. चांदणें पहा.

चांदी—स्त्री. (हिं.) १ शुद्ध रुपें; लगडीचें रुपें; वीट; चीप; चांदी नरम, पांढऱ्या रंगाची, जड, रंग न बदलणारी अशी असते. २ रुपें. ३ अशुद्ध रुपें. [सं. चंद्र] ०आटणें-आटविणें-१ (ल) खरपूस समाचार घेणें; रग जिरविणें. 'गप्प बैस नाहींतर चांदी आटवीन.' २ (ल.) जिवावर बेतणें. 'पण जर का...कटकटींत सांपडलों तर चांदी आटल्याशिवाय राहावयाची नाहीं.' –तोबं १५८. ०उडणें-नाश होणें; अतोनात नाश होणें; नुकसान होणें; त्रेधा उडणें. 'पंचमुलखांतील लोकांकरितां आमची चांदी आणखी किती दिवस उडणार ......' –टि २.२.६३. ०करणें-नाश करणें; खाक करणें; बिघडविणें; नासणें, उधळून टाकणें.

चांदी—स्त्री. चट्टा; पांढरें कोड. [चंद्र]

चांदुकली—स्त्री. लहान भाकरी; पोळी; चांदकी. [चांद; चांदकी]

चांदे—न. १ बैल, रेडा यांच्या कपाळावरचा पांढरा डाग, ठिपका. २ (कु.) डोक्यावर सफेत टिकल्या असणारा मासा. [चंद्र]

चांदोड—पु. चांदवड पहा.

चांदोडी—पु. (चांभारी) मारवाडी जोडा (हा सामान्यतः बायका वापरतात).

चांदोबा—पु चंद्र. 'पण ते आकाशचे पक्ष चांदोबाच्या सवबीवर मोलें साहबांनीं तोडले,..'–टिव्या. [चांद] चांदोबा दाखविणें-एकाद्यास उताणा पाडून त्याच्या डोळ्यांपुढें १०० चंद्र दिसू लागतील अशी कानशिलांत चपराक मारणें.

चांदोवा—पु. चांदवा पहा. 'नाना पवड मंडप चांदोवे।' –दा ४.५.२४.

चांद्र, चांद्रिक—वि. चंद्रासंबंधीं; चंद्राविषयीं. [सं.]

चांद्रमान—न. चंद्राच्या फेऱ्यावरून, स्थितिगतीवरून केलेली गणना; कालमापन. अमावास्येपासून किंवा पौर्णिमेपासून सुरू होणारा महिना. चांद्रमानानें वर्षाचे दिवस ३५४ होतात. 'एवंच चांद्रमानें तेराही स्पष्ट सारिले अब्द।' –मोविराट ४.६३. [सं.]

चांद्रमास—पु. चंद्र एकदां पूर्ण झाल्यापासून पुन्हां पूर्ण होईपर्यंत किंवा एका रात्रीं मुळींच न दिसल्यापासून पुन्हा दिसेनासा होईपर्यंत जाणारा काळ '(नक्षत्रप्रदक्षिणेनंतर) सूर्याची युति होण्यास चंद्राला २ दिवस ५ तास आणखी लागतात या कालास यौतिक मास किंवा चांद्रमास म्हणतात. हा

मास २९ दिवस १४ तास आणि १४ मिनिटे ह्यानीं पूर्ण होतो ' -मराठी सहावें पुस्तक ( गा २ ) पृ ३३६ [ स ]

**चांद्रवर्ष**—न बारा चांद्रमासाचा काळ 'सौरवर्षापेक्षां चांद्रवर्ष कमी आहे ' -मराठी ६ वें पुस्तक पृ २११

**चांद्रायण**—न पौर्णिमेस पधरा घास खाणें व नतर वद्य-पक्षात रोज एकेक घास कमी कमी करून शुक्लपक्षात एकक घास वाढविणें अशा प्रकारचें प्रायश्चित्तात्मक व्रत हें चद्राच्या क्षय वृद्धीप्रमाणें करतात 'अथवा एकांतरा कृच्छ्री। चांद्रायणें मासो पवासीं।' -ज्ञा १७ ३६४ [ स ]

**चाधई**—चादई पहा

**चानक्या**—स्त्रीअव ( चद्रपुरी ) बशा [ चद्र ]

**चानी**—स्त्री ( कों ) खार नावाचा प्राणी 'चुकचुक चान्या राघती।' -मसाप

**चानूक**—चुणूक पहा

**चाप**—न धनुष्य [ स ]

**चाप**—पु बदुकीचा घोडा [ स चप्=दाबणें, हिं चाप ] **चाप झाडणें**—बदुक, पिस्तुल वगैरे उडविणें **चापाची बंदूक**-स्त्री घोडा असलेली बदूक याच्या उलट तोडयाची बदूक

**चाप**—पु १ कापसाचे गठे दाबात घालण्याचें एक यत्र २ शारीरिक दु ख अगर तीव्र वेदना देणारें एक यत्रसाधन ( कान, अड वगैरे ठिकाणीं लावतात ) ३ ( कु ) उदरास दाबून मार ण्याचा लोखडी सापळा [ स चप्=दाबणें ] **०लावणें**-छळ करणें, गाजणूक करणें

**चाप**—पु कानाची पाळ -शर चापा पहा [ चापणें ]

**चाप**—पु एक पक्षी, हा वाळवी, नाकतोडे, टोळ खातो

**चाप**—पु ( क ) खणाळें, काहीं मखड खणाचा तुकडा, समु दाय, (व्यापाऱ्यात रूढ) कालखणाचे चार चाप खपले ' 'चापा मागें आम्हाला आठ आणे तरी मिळायाला पाहिजे का नको ? '

**चाप**—स्त्री ( क ) ढीग, रास, थडी **०लावणें**-( क ) रचून ठेवणें [ स च्ट्? ]

**चाप**—पु ढोलाच्या एका बाजूवर टिपरू व दुसऱ्या बाजू वर हाताचीं बोटें मारून बोल काढतात ती ढोलाची बाजू हाताचीं बोटें मारून बोल काढावयाच्या बाजूला चाप आणि दुसऱ्या बाजूला धुमाड म्हणतात

**चाप**—पु तमाखूची लागवड -शे ६ १८४

**चाप**—स्त्री ( व. ) तट्या लहानसा तट्या, झाप ' भिंती वर चापा टाकल्या म्हणजे भिंती पाणी खाणार नाहींत '

**चांप**—स्त्री उडी, उड्डाण झाप ( क्रि० करणें )

**चापकर्ण**—न १ ज्या ( वर्तुळाची ) २ धनुष्याची दोरी [ स ]

**चापकेसी**—स्त्री धमकावणी -शर

**चापचणें**—अक्रि चापसणें पहा [ दे ]

**चापचोप, चापचोपी**—पुस्त्री चाकचोप चाकचोपी पहा 'मस्तकीं मुदराकडी फाकडी चापचोपमधें सदा।' -पला ४ ३३

**चापट-टी**—वि सखल असून चपटा, थबकट किंवा बस कट, चेपटलेला, थापटलेला, ठोकून सपाट केलेला [ स चिपिट ]

**चापट-टी**—स्त्री थप्पड, चपराक थापट [ स चपेट ] **०पोळी**-स्त्री तळहातानें मारलेली चपराक **चापडपोळी धम्मक लाडू देणें**=गुद्दे, थपडा मारणें

**चापटणें**—उक्रि चापट करण्यासाठीं ठोकणें, प्रहार करणें, ठोकून ठोकून चपटा करणें [ चापणें ]

**चापटी**—स्त्री १ ठोकून चापट केलेला पदार्थ २ चपराक ३ लहान पातळ भाकरी

**चापट्या**—वि ( कों ) चिकट

**चापडी**—स्त्री एक प्रकारची कारागिरी -देहु ९७

**चापणी**—स्त्री १ दाबात घालण्याचा व्यापार 'काप साची चापणी केल्यावांचून गठ्ठे बाधावयास येत नाहींत ' २ अफू तयार करताना अफूच्या गोट्या ( गोळे ) दाबून पाहण्याचें काम या गोट्यावर अफूच्या पानाची भुकणी घालून त्या पधरा-वीस दिवस ठेवलेल्या असतात त्यावरील भुकणी झाडून गोट्या दाबून पाहतात त्यास चापणी म्हणतात -कृषि ५१० [ चापण ]

**चापणें**—उक्रि १ चेपणें, दाबणें, पिळून काढणें २ दाबणें, लाटणें, गिळकृत करणें ( लाच वगैरे ) [ स चप्=दावणें, हिं. चापना ]

**चापणें**—अक्रि १ चाचपडणें, चापसणें दु खाची जागा शोधण्यासाठीं दाबणें, स्पर्श करणें २ लाच घेणें, खाणें [स चप्= सात्त्वन करणें, स्तब्ध करणें ]

**चापणें**—अक्रि. ( कु ) १ दबकावणें, कान उघाडणी करणें २ धमकी देणें ३ पुष्कळ खाणें [ स चप् ]

**चापती**—स्त्री ( कों ) उटाळीसारखा जिचा उपयोग करतात अशी काठी किंवा दांडी, तरफ

**चापर-पाटा**—पु ( विटांचें बांधकाम ) खिडक्या व आळ्या याच्या पायऱ्याचा गिलावा सपाट असतो म्हणून त्यास चापर-पाटा असें म्हणतात

**चापऱ्या**—पु ( व ) शिंदीच्या पातींचा विणलेला बोऱ्या, 'चऱ्हई हातरी चापऱ्यावर बसला होता '

**चापलता**—स्त्री धनुष्य -हको [ स चाप+लता ]

**चापल्य**—न १ चपलता, चपळाई, चलाखी २ चचल पणा, चचलप्रकृति, अस्थिरता

**चांपसणें**—अक्रि चाचपडणें, चापणें पहा

**चापसाचापसी**—स्त्री १ चाचपडण्याची क्रिया, घाईघाईनें तपासणें २ लांचलुचपत, लांच घेणें-देणें, खुप दडवादडवी करणें, लाच खाण्याचा क्रम, सपाटा. [ चापसणें ]

**चापा**—पु कानाची पाळ ' कांहीं तजविजी करून कानांचे चापे लांब करावे अशी कोठें कोठें एक चाल असे.' –मराठी ६ वें पुस्तक पृ ३४ ( १८७५ ) [ चापणें ]

**चापा**—पु एक दागिना.

**चापा, चांपा, चाफा**—पु १ एक पुष्पवृक्ष २ एक विवक्षित दारूकाम [ सं चंपक ]

**चापाचंदन**—न सप्पा, मायनाट ' सान्या तूपवाखरेचें चापाचंदन केलें ' [ चापणें+चंदन ]

**चापाचाप, चापाचापी**—स्त्री १ दाबणें किंवा स्पर्श करून पाहणें चांपणें पहा २ दाबादाब या अर्थी, लपवालपवी, छपवाछपवी

**चापी**—वि चापाची, घोडा असलेली (बंदूक) [ चाप ]

**चापीचोपी**—स्त्री १ नट्टापट्टा, साज शृंगार करणें, सजविणें ( शरीर ) २ दाबणें व साफ करणें ३ मोठ्या दक्षतेनें, हुशारीनें, कसोशीनें करणें, सपविणें ४ ठाकठीकपणा, व्यवस्थितपणा. ५ उचलाउचल, घालकाढ, चाचपाचाचप (क्रि० मांडणें )

**चापी घनुकटा**—पु उंदीर धरण्याचा एक प्रकारचा सापळा

**चापीयमापन**—न त्रिज्यातुल्य चापाचें एक माप धरून कोण मोजण्याचा प्रकार [ सं ]

**चापु**—पु चाकू

**चापूनचोपून**—क्रिवि चोपून चापून पहा

**चापें**—न. १ चापा नामक पुष्पवृक्षाचें फूल २ ( साभा ) फणसांतील गऱ्यामोंवतीं असणारीं पातीं [ चांपा ]

**चापेकळी**—स्त्री चाफ्याची कळी 'चापेकळिया मिरवत। चापेकळी जानकी।' –वेसीस्व ९ १२४ **चापेकळ्यांची माळ**–स्त्री चापेकळ्याप्रमाणें आकृति असलेल्या सोन्याच्या किंवा चांदीच्या मण्यांची माळ–हार

**चापेखण, चांपेखण**—पु घराचा सर्वांत मोठा खण चौकाच्या कोंपऱ्यावर दोन बाजू मिळतात त्या ठिकाणीं होणारा मोठा खण 'चापेखण चौकडिया। वधूलागीं कोठडिया।' –मुआदि २९ ५०

**चांपेगौर-गौरी**—वि चाफ्याप्रमाणें गोरी असलेली 'तो चांपेगौर अभिवंदिला।' –भाए ३ एकें चांपेगौरी कवळें। हरितें एकें।' –ज्ञा ११ १२५. [ सं चंपक+गौर ]

**चांपेपण**—न सुगंध [ चापा ]

**चांपेमोळ**—न. छपराच्या आढ्याचीं दोन्हीं टोकें

**चा(चां)पेल**—न. चाफ्याच्या फुलांचें 'काढिली हळद चोगली। चापेल तेलें मोहिली।' –स्त्रीगीत १४ [ चापा+तेल ]

**चांपेसट**—स्त्री ( कुण ) चंपाषष्ठी

**चांपोळ, चांपोळी**—नस्त्री चाफ्याची कळी किंवा फूल. ' नाना चांपा चांपोळी पूजिला।' –ज्ञा १८ ८५२ [ चापा+कळी ]

**चांफणें, चांफसणें, चांफा, चांफे, चांफेकळी, चांफेखण, चाफणें**—चापणें, चापसणें वगैरे पहा.

**चाफरा**—न ( कु ) चार बियांचीं फळें

**चाफलणें**—अक्रि १ ( व ) चाचपडणें, अडखळणें ' तो चाफलत चालतो ' २ (व ) अर्धवट चावणें 'दात नाहींत म्हणून चाफलत खातो '

**चाफा**—पु एक फुलझाड याच्या सोनचाफा, हिरवा चाफा, पांढरा चाफा, तांबडा चाफा, नाग चाफा इ० निरनिराळ्या जाती आहेत पांढऱ्या चाफ्याची साल, चीक व शेंग फार औषधी आहे सर्प विषावर शेंगेचा उपयोग होतो [ सं चंपक ]

**चाफा**—चापा पहा

**चाफेकळी**—स्त्री चापेकळी पहा

**चाफेल**—न चापेल पहा ' फुलेलें चाफेल घेउनी।' –वेसीस्व ८ ७.

**चांब**—पु चामडें ' चांबाचें पहा दाम चालती ज्याचा तो मुल्ला काजी।' –पला ६९ [ सं चर्म ] ०रडा–पु चांभार

**चांबऊ चांब**—( विरू. ) चामऊ पहा

**चांबडा**—पु ( रूढ ) जबडा, अवडा, आभाडा, तोंड [ सं चर्व्=चावणें ]

**चांबडी, चांबडें**—( प्र ) चामडी, चामडें ' जैसें धर्माचें चांबडें।' –कथा १ १ ५२ [ सं चर्म ] ०लोंबविणें–शरीराची कातडी निघेपर्यंत मारणें, मरेमरेतोंवर मारणें 'शिपायानें कैद्याची चांबडी लोंबविली '

**चांबरणें**—अक्रि ( को ) गोंधळणें, भांबावणें, चकित होणें, सुचेनासें होणें

**चावा**—पु १ चावणें, खाणें, जेवणें (क्रि० करणें, पाडणें) २ चावण्याचें यंत्र, चावण्याचा उद्योग. ' ह्या पोराचा दिवसभर चावा चालला असतो ' ३ खाण्याचा पदार्थ, चावण्याचा पदार्थ [ सं चर्वण, हिं चाबना ] ०चबीना–पु. चावून खाण्याचा पदार्थ, खाण्याची क्रिया

**चाबुकणें, चाबकणें**—उक्रि घोड्यास चाबुक मारणें, चाबकाचा फटकारा लगावणें [ चाबूक ]

**चाबुकस्वार**—पु चाबूकस्वार पहा

**चाबुळी**—स्त्री एक झुडूप

**चाबू**—वि ( कुण ) खादाड, अधाशी [ चावणें ]

**चाबूक**—पु १ घोड्यास, बैलास मारण्यासाठीं काठी दोरी, वादी वगैरे लावून केलेला कोरडा, आसुड २ ( ल ) जाज्वल्य, चरचरीत, उद्दीपक औषध, रसायन ३ (ल) तिखट मिरची [फा चाबुक=कोरडा ] ( वाप्र ) ०ओढणें-सपासप चाबूक लगावणें, मारणें सामाशब्द- ०स्वार-पु. १ घोडेस्वार २ घोड्यास शिक्षण देणारा ०स्वारी-स्त्री चाबूकस्वाराचें काम, धंदा [हिं चाबूकसवार-री ]

**चांबोटा-टी**—पु स्त्री ( प्र ) चामोटा-टी पहा

**चामरा**—वि ( व ) वटवट्या, शेखी मिरविणारा, कुचाळखोर, गौप्यस्फोटन करणारा, वात्रट, लावालावी करणारा [स चर्वण, हिं चाभड़ना ]

**चामाड**—चावडा पहा 'प्रेमसुखा आड । काय वाजतें चामाड ।' -तुगा २९९२

**चांभार**—पु. कातड्याचे जोडे, वहाणा वगैरेचा धंदा करणारी जात अगर ०व्यक्ति [ स चर्मकार ] ०की-स्त्री चांभाराचा धंदा, चामड्याच्या वस्तु तयार करण्याचा कारखाना. ०कुकडी-स्त्री (व )भारद्वाज पक्षी ०गोचीड, चांभारी-र्‍या गोचीड-पुस्त्री १ गुराच्या अंगावरील एक प्रकारची गोचीड. २ ( ल ) अत्यंत लोचट, चेंगट मनुष्य ०चतुराई-चौकशी-स्त्री १ कसोशीनें सूक्ष्म दृष्टीनें केलेली परीक्षा, अतिशय घासाघीस २ नसती उठाठेव, पचाईत, एखाद्या कार्यांत उगाच निष्कारण दोष काढणें, खोड ठेवणें, अति चिकित्सा ३ मूल्यापीचें, भुरळ पाडणारें भाषण, थतरमतर, घमटगुळवणी ०चाळवणी-स्त्री चाळवण्या दाखवणें, लावणीवर टाकणें, टोलवाटोलव करणें, धाब्यावर बसविणें ( चांभार जोडा शिवावयास दिला असता आज देऊ उद्यां देऊ अशा चाळवण्या दाखवितो यावरून ) ०डा-पु चांभार ( निंदाव्यंजक ) ०फट स्त्री ( राजा )नसती पचाईत ०रीण-स्त्री चांभार स्त्री ०वाडा-पु चांभार लोकांच्या वस्तीचा भाग पेठ मोहल्ला ०हिरडा चांभारी हिरडा-पु एक झाड व त्याचें पिवळें फळ, चामडें रंगविण्याकडे याचा उपयोग करतात बाळ हिरडा व सुरवारी हिरडा अशा दुसऱ्या दोन जाती आहेत

**चांभारी**—स्त्री एक प्रकारचें झुडूप

**चामारी**—स्त्री ( व ) ढोराच्या जनावराच्या अंगावर उमटलेला माराचा वळ किंवा व्रण 'बैलाच्या अंगावर चांभाऱ्या पडल्या होत्या '

**चाम**—न १ कातडें, चामडें 'घातला चामाचा बोकसा' -भाए ७५८ 'येरवेट्या(ठ्या)पोट भरी। चाम मसकाच परी।' -तुगा २५५१ २ एक नाणें म्ह० एक आण्याचे तीस दाम एक दामाचे तीस चाम 'राजाकरी तैसे दाम। चाम तेही चालती। -तुगा ३६६० [स चर्म ] **चामाचे दाम चालविणें**-अधिकाराच्या जोरावर कातड्याचें नाणें सुरू करणें, आपला अधिकार वाटेल तसा चालविणें, अनन्वित कृत्यें बिनदिक्कत करणें

**चामऊ चाम, चामवा चामू**—स्त्री शरीरावर, अंगावर वाढणारी ऊ, गोचीड, याहून चिरू निराळी 'गोचिड अशुद्ध सेविती। चामवा मासांत घुसती।' -दा १ १० ५४ [ स चर्म+म ऊ ]

**चामकणें**—अक्रि जाणें, चालणें, 'मातें साण्डोनी पुढारें। पाय कैसे चामकती।' -मुवन ७ १२३.

**चाम(की)खीळ चामखोड, चामफोड**—स्त्री पु पु व्यानवायु कफाला घेऊन शरीराच्या बाह्यत्वचेवर फोडासारखा उत्पन्न करतो तो मोड त्यास वदना नसतात -योर १ ३६५ 'वाग तिळ सुरमें लासें। चामखिळ गलडें मसें।' -दा ३ ६ ५० [स चर्मकील ]

**चामकूट**—पु ( कु ) चामखीळ

**चामगोचीड**—स्त्री पु गुराच्या अंगावरील गोचीड

**चामचिराई**—स्त्री कातड्यासारखे पंख असणारें वाघुळ किंवा पाकोळी

**चामचोट**—पु शिस्न, पुरुषाचें जननेंद्रिय [स चर्म+चोट]

**चामचोरी**—स्त्री गुराढोराची चोरी याच्या उलट दाम चोरी=पैशाअडक्याची चोरी [ चर्म+चोरी ]

**चामट**—वि १ चिवट, वातड २ दृढ, पक्की, मजबूत बसलेली, न सुटणारी, जाम ( उटाची पकड, मस्वलाची मिठी ) ३ चगट चिक्ट ( माणूस )

**चामठा**—पु ( राजा ) नदींतील खेकडा

**चामडी**—स्त्री अगाच कातडें, त्वचा, कातडें वगैरे [स चर्म, आर्मेनियन जिप्सी त्सम] ०लोंबविणें-कातडी काढणें, बेदम मारणें, चाबकानें छडीनें निर्दयपणानें झोडपून काढणें

**चामडें**—न. १ कातड, साल, साल्टी, बाह्यांग. २ कमावलेलें कातडें [ स चर्म ] ( वाप्र ) ०फुटणें-कातडी सोलून निघणें 'शिवाय हातापायांच्याहि चामड्या फुटल्या होत्या ' -स्वपरि १९५ ०रंगविणें-१ ( व ) कातडें कमावणें, मेलेल्या जनावराचें उघडलेलें कातडें जोडा तयार करण्यास योग्य होईल असें करणें २ मारणें सामाशब्द-**चामड्याचा पट्टा**-पु वस्तरा साफ करण्यासाठीं हजाम ज्या कातड्याच्या पट्ट्यावर तो वस्तरा घांसतो तो **चामडेंढेरक चामरढेल**-पुक्लीन मोठा बेडूक

चामढोक—पु (व) पाण्यांतील एक कीटक 'विहिरीच्या पाण्यांत चामढोक झाले'

चामफोड—पु चामखीळ

चामर—न १चवरी पहा (क्रि० ढाळणें, धारणें) 'मग वर्णामाजीं छत्रचामर।' –ज्ञा १ ४७५ २ एक वृत्त याच्या चर णांत १५अक्षरें व र ज र ज र असे गण असतात उदा० 'राधिका पहावयास जातसे रमापती। प्राणनाससमान त्यास वृद्ध गोप कोपती।' [स]

चामवा—चामऊ पहा

चामाठी—स्त्री. चाबूक

चामाडौला—पु दृश्य, देखावा, थाटमाट, ढोंग, बतावणी, आविर्भाव, डामडौल (क्रि० करणें, मांडणें, मिरवणें)

चामाडौली—वि (व) चोंबडा, मध्ये लुडबुडणारा 'मोठा चामाडौली आहे तो'

चामीकर—न (काव्य) शुद्ध सोनें, सुवर्णालंकार [स] कंठ

चामीकरन्याय—पु स्वतःच्या गळ्यांत दागिना असून शोधार्थ एखाद्या स्त्रीनें चोहोंकडे तपास करणें, यावरून एखादी वस्तु जव ळच असून तिचा सर्व गावभर तपास करणें

चामी गोचीड—स्त्रीपु जनावराच्या अंगावरील गोचीड

चामुंडा—स्त्री पार्वतीचें नाव 'प्राणशक्ति चामुंडे। प्रहारूनि सकल्प मेंढे।' –ज्ञा १२ ५३ [स]

चामू—चामऊ पहा

चामोटा-टी—पुस्त्री १ कातड्याचे हातमोजे किंवा पाय-मोजे (क्रि० खिळणें) २ कातड्याची वादी अगर पट्टी

चाम्हार, चाम्हारकी, चाम्हार गोचीड, चाम्हार चतुराई, चाम्हारचौकशी, चाम्हार चाळवणी, चाम्हा रडा, चाम्हारवाडा, चाम्हार हिरडा, चाम्हारी— चांभार मध्ये पहा

चाय—स्त्री (कुण) अर्थ, उपयोग, मातब्बरी चहा पहा

चार, चारचार—पुअव १ चेष्टा, चाळे, ढंग, छंद, सोंग, वेड्यासारख्या गोष्टी, थेर 'त्यजुनी चार विचार करी बरा।' 'मना आले करिता चार। त्या फार हा एकला।' –तुगा १४८ २ थट्टेबाजी, ख्याल, मौजा, लहर, नाजूकपणाची ऐट, दिमाख ३ गाठ दिल्यावाचून जाडणें साधणें (क्रिया कार्य किंवा त्या प्रकारची अवस्था) [स चर् आचार]

चार—पु चाड पहा. 'आता मोटी थार। माझी नका धरू चार।' –तुगा १४५

चार—पु १ हेर, गुप्त दूत, टेहळणी करणारे जासूद 'राजा प्रमाणें जरी आम्हाला चार किंवा डिटेक्टिव्ह ठेवता आले नाहींत तरी एवढें खूप समजा की परमेश्वर सर्वांत मोठा डिटेक्टिव्ह आहे' –टिव्या २ दूत, निरोप्या, सेवक 'चार प्रेरिले असख्यात' –मुविराट ४१० [स चर्, चार] ०चक्षु–न राजाचे हेररूपी डोळे 'राजास चार चक्षु असावे' –वि हेर हेच ज्याचे डोळे आहेत असा (राजा, सेनानी) 'राजा चारचक्षु असतो' –वद १०४

चार—स्त्री १ हिरवें गवत, नुकतेंच उगवलेलें हिरवें गार गवत २ गुरांनीं खाण्याजोगा हिरवा पदार्थ (झाडपाला, हरळी वगैरे) ०कूट–न (को) नुकतेंच उगवलेलें कोवळें गवत

चार—पु १एक वृक्ष, याचीं पानें मोहाच्या पानासारखीं मोठीं व लांबट असतात हीं झाडें महाबळेश्वर, गंगातीर, गुजराथ या भागांत असून याच्या पानांच्या पत्रावळी करतात २–न (राजा) या वृक्षाचीं फळें 'चारांच्या पक्व फळांचा रंग जांभळा असतो.'

चार—पु चार झाडाच्या बिया चारोळ्या ह्या मिठाईंत व पक्वान्नांत घालतात

चार—पु फणसाचे गऱ्याभोंवतीं जे बारीक तत्वाकार अव यव असतात ते प्रत्येकी, पाती ०खड–न १ फणसाचा तुकडा किंवा अलग केलेला भाग २ ज्यांतील गरे काढून घेतले आहेत असा फणसाचा भाग, चारीसकट किंवा सागूळीसकट जो फणसाचा भाग तो ३ वरील काटे अगर आवरण काढल्या नंतर अगर गरे काढल्यानंतर फणसाची सागूळ राहते ती ४ गर काढलेला फणस (या चार अर्थांपैकीं कांहीं अर्थ कोंकणातील एका भागांत प्रचलित आहेत, कांहीं दुसऱ्यांत प्रचलित आहेत दुसरा अर्थ बहुधा सार्वत्रिक आहे)

चार—पु एक हलक्या जातीचें बोर, ज्यांत मगज नसून केवळ सालपट व बीं असणारें बारीक जातीचें बोर. याच्या झाडास चाराचें झाड असें म्हणतात

चार—वि १ ४, चार ही संख्या २ एक परिमित संख्या दर्शविणारें 'त्याला चार गोष्टी समजावून सांग' 'त्याचेजवळ चार पैसे आहेत' ३ चवथ्या प्रतीची, (वसुलीच्या कागदात वापर-तात) [स चतुर्, फा चाहरम्, च्यारम्, फ्रें जिप्सी स्तर, आर्मेनि स्सतर, झें तेस्सारेस्स] सामासशब्द– ०अभिमानी–पुअव विश्व, तैजस प्राज्ञ प्रत्यगात्मा हे शरीरांतील चार अव स्थांचे अभिमानी ०अवस्था–स्त्रीअव जागृति, स्वप्न सुषुप्ति आणि तुर्या या चार अवस्था ०अक्षरें–नअव थोडीशी विद्या, विद्येचें एक परिमाण माप 'ज्यास चार अक्षरें येतात त्यासच ठेवावें' त्याला चार अक्षरें आलीं कीं दर्शो कोठें तरी नोकरींत अडकवून' [चतुर्+अक्षर] ०आणी–स्त्री (व) पावली, चार आण्याचें नाणें ०आत्मे–पुअव जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा व निर्मलात्मा. ०काणे-ने-न्हे–पु.अव तिफाशीं खेळातले एक विशिष्ट दान चार पगड ०खण–पु निवाऱ्याची जागा, रहावयाची एखादी लहानशी खोली ०खणी–स्त्री एक प्रकारचें कापड –देहु १५० ०खाणी–स्त्रीअव प्राणिवर्गांतील

व वनस्पतिवर्गातील सृष्ट पदार्थांचे अगर वस्तूचे कल्पिलेले चार वर्ग–अंडज, जारज, स्वेदज उद्भिज्ज 'चारी वर्ण चार खाणी। चारी युगें चारी वाणी। चारी पुरुषार्थ चहु लक्षणी। मुक्तीची मांडणी चतुर्धा।' –एभा ३ ७७ चत्वार भूतग्राम पहा •खुट-खुट–क्रिवि चोहोंकडे, सर्वत्र 'अक्कल कोटचे येट राहणार चार खुट फिरलों शाही। –पला ४ १३ •खुंट जहागीर–स्त्री. पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चार दिशाकडे भिक्षेकऱ्याच्या झोळीचे कोंपरे असतात झोळीचा विस्तार हाच जहागिरीचा प्रदेश यावरून लक्षणेनें भिक्षेकऱ्याची वृत्ति, दरिद्री स्थिति 'चार खुटाची जहागिरी असल्यावर कुणाची पर्वा राहील' •गोमी–वि ज्याच्या किनारीमध्यें रेशमी चार गामी असतात असें (लुगडें) •गोष्टी लावणें, करणें–वडिलांकडे आक्षेप काढणें •गोष्टी सांगणें–मन वळविण्या जोगें, समजून पटण्यासारखें भाषण करणें •घेणें–चार देणें–शेजारधर्मानें देणें, घेणें करणें •चौघे–पुअव चार–पाच माणसें, कांहीं थोडकी माणसें •डोळे–पुअव दोन माणसें (एकाच कामात गुतलेलीं) 'तुमचे आणि माझे असे चार डोळे झाले म्हणजे चुकी होण्याचा संभव कमी' •दाणे–पुअव तिफाशी डावातील एक विशिष्ट दान, चार काणे •दिवस–पुअव. थोडे दिवस, थोडा काल, कांहीं काळ. म्ह० चार दिवस सासूच आणि चार दिवस सुनेचे •दिशा–स्त्रीअव पूर्व, पश्चिम दक्षिण, उत्तर या दिशा चार दिशा मोकळ्या होणें–वाटेल तिकडे जाण्याला जग सगळें मोकळें असणें •दोष–पुअव आत्माश्रयता, अन्योन्याश्रयता चक्रकापत्ति व अनवस्था हे चार दोष विकल्प विषयीं शास्त्रात सांगितले आहेत •धामें–नअव हिंदुस्थानात उत्तरेस केदारेश्वर दक्षिणेस रामेश्वर (हीं शिवधामें), पूर्वेस जग न्नाथ व पश्चिमेस द्वारका (हीं दोन विष्णु धामें) हीं देवस्थानें [चतुर्+धाम] चारपंजम–वि चवथ्या व पाचव्या प्रतीचें हलक्या दर्जाचें रेशीम [फा चाहरम्+पंजम्=चार व पांच] •पायी–स्त्री खाट, पलंग [स चतुर्+पद हिं. चारपाई] •पुरुषार्थ–पु धर्म अर्थ, काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ •बैली–वि जिला बैलाच्या दोन जाड्या म्हणजे चार बैल लागतात अशी (गाडी मोट) •भक्त–पुअव आर्त, जिज्ञासु अर्थी आणि ज्ञानी हे चार प्रकारचे भक्त •मुक्ति–चत्वारमुक्ति पहा •युगें–नअव कृत (किंवा सत्य) त्रेता, द्वापार व कलि हीं चार युगें •लोक–पुअव १ स्वर्ग मृत्यु पाताळ आणि कैलास २ समाज, समाजातील माणसें, चार स्नेही •वर्ण–पुअव चातुर्वर्ण्य पहा •वाटा–स्त्रीअव १ काणतीहि बाहेरची वाट २ (ल) विस्तीर्ण जगात प्रयाण हिंडण्याची परवानगी देहा वाटा किंवा बारा वाटा असेंहि म्हण तात. 'तुला चारी वाटा मोकळया आहेत जा कसा! •वाणी–चतुर्विध वाचा पहा •स्थानें–नअव नेत्र कंठ, हृदय आणि मूर्ध्नि हीं स्थानें •हात होणें–१ लठ्ठालठ्ठी होणें, हात घाईवर येणें २ लग्न होऊन कर्तासवर्ता होणें चारही ठाव–पुअव. भात, वरण, भाजी पोळी हे जेवणांतील मुख्य मुख्य पदार्थ, म्हणजे उत्तम प्रकारचें जेवण याच्या उलट 'पन्याळ टिपरू' =निवळ चटणीभाकरी

**चार**—क्रिवि प्रकर्षद्योतक म्हणून हिरवा या शब्दापुढे अत्यंत हिरवा, हिरवागार या अर्थी योजितात 'या पागोट्याचा रंग हिरवाचार आहे'

**चारकट**—न वरील साल काढलेला व वाळलेला दोडका. गाईचें अंग खाजविण्याकडे याचा उपयोग करतात

**चारकट, चारगट, चारट**—वि. १ वात्रट, चावट, खोडसाळ खट्याळ, दुर्गुणी कुटाळखोर, कुचेष्टेखोर वाह्यात, खोडकर उत्पाती, उपद्व्यापी, चहाडखोर फंदी २ लहरी, विनोदी, छांदिष्ट, दुसऱ्याचीं मर्में बाहेर काढणारा, थट्टेखोर [स चारभट–चारहट–चारगट–भाअ १८३४, चार+कृत] •पणा–पु वात्रटपणा, लहरीपणा 'लग्नात अलीकडे चारगटपणा फार वाढला आहे' –जगन्नाथ (शक १६६९, राजवाडे ग्रंथमाला)

**चारकटा, चारकट**—पुन (कों) गऱ्याशिवाय फणसामध्यें जीं पातीं वगैरे असतात तो भाग कोंवळया फणसाच्या आतील भाग याची शिजवून भाजी करतात चारखंड पहा

**चारकळशा**—पु (संमा) चौकळशा, एक जात

**चारखुबा**—स्त्री. १ मुसलमानी तऱ्हेचा एक उंची पोशाख. २ चौकटीदार कापड [अर्]

**चारकूर**—पु (सिं) मरळमासा –बडोदें–मरळ माशाची पैदास प्रस्तावना १

**चारगट**—चारकट पहा

**चारगॉ**—पु (गो.) ववडा पक्ष्याची एक जात

**चारजमा, चारजामा**—पु १ वस्त्राच्या पडद्याचें बनविलेलें व झालरी लावलेलें खोगीर (क्रि० घालणें, कसणें, ठेवणें) २ घोड्यावर खोगीर चढविणें (क्रि० करणें.)

**चारट**—वि १ हिरवें २ चारकट पहा

**चारण**—पु धान्य मिठ वगैरेची न आण करणारी एक जात तांडेवाले [स चर=फिरणें]

**चारण**—पु १ देवयोनींतील एक भेद २ भाट, स्तुतिपाठक [स]

**चारणी**—स्त्री १ चरण्याची क्रिया (द्वितीया विभक्तींत चारणीवर चारणीस चारणीला पाठविणें, घालणें, ठेवणें=(गुराना) चरण्यास सोडणें 'भाकड गुरें घरीं ठेवू नका चारणीस पाठवा' २ गुराकडून खावविणें 'तुरीची

चारणी झाली म्हणजे पीक चांगलें होतें ' ' ह्या बांधाच्या दोन चारण्या झाल्या ' [ सं चर्=खाणें ]

**चारणें**—उक्रि १ गवत खाण्यासाठीं गुरांना कुरणांत घालणें. २ खावविणें, भरविणें ' लोणी मुला(स) चारितसा स्वधामीं । ' ३ ( ल. ) लाच, पैसा देणें ( पैसा चारणें, लाच चारणें ), लांच देणें ४ गांठ दिल्यावांचून जोडणें, सांधणें ५ विषयसेवन करणें ' जो इंद्रियं अन्हासवा । चारी एथ । ' –ज्ञा १३ ७७०

**चारवट**—न. (माण )जनावरानें गवत चावून खाल्यानंतर रवथ करण्यापूर्वीचा पोटांत राहिलेला खाद्य पदार्थ [ सं चर्= खाणें ]

**चारा**—पु पशु पक्षी यांचा आहार, भक्ष्य, खाद्य ( गवत, पाला, दाणे किडे, कीटक इ० ) गव्हाचें भूस, कुठार, कुटार, कडधान्याचें भूस ' चारा घेतला पोटभरी । कमळांचा । ' –कथा १ ३ ५७ 'गगनीं लागला कोसळ । चारा कोण पुरवी त्याला ।' 'गुराचा स्वाभाविक चारा म्हणजे गवत होय ' [ सं चर्=खाणें, हिं चारह् ]

**चाराचारानीं, चारेंचारें**—क्रिवि चोखंदळपणानें, मिष्टस्तपणानें, नाजूकपणानें, बारकाईनें, नाक मुरडून, तोंड वेंडेंवाकडें करून, तोऱ्यानें, नखरेबाजपणानें ( क्रि० जेवणें, खाणें, पिणें, बोलणें, चालणें, लिहिणें, इ० ) [ चार करून ]

**चाराचुरा**—पु. पदार्थांचे बारीक तुकडे, भुगा ( क्रि० करणें पडणें ) ' पुण्यें जोखुनी चाराचुरा । समान आलिया तुलाभारा। –एभा २ २२० [ चुरा द्वि ]

**चाराघोरा-मोरा**—पु गवत वगैरे ' एक चाराघोरा गुतले नाहीं जीवन चित्तीं । ' –तुगा १७० [ चारा द्वि ]

**चारी**—वि पु जाणारा किंवा चालणारा (समासांत) अध- आकाश–ग्राम–जल–पाद–वन–चारी [ सं चर्=चालणें ]

**चारी**—स्त्री मोटेच्या विहीरीचें उतरतें क्षेत्र मोटेची उतरण, धाव [ सं चर् ]

**चारी**—पु स्त्री ( सातारा ) पाट, कालवा, कालव्याच्या मोठ्या पाटापासून जो लहान पाट शेतांत नेतात तो [ चर ]

**चारी, चाऱ्ही**—वि चार चारी या शब्दापासून होणारे सामासिक शब्द चार मध्यें पहा [ सं चत्वारि–चआरि–चाऱ्ही ] ०चे सहा होणें–लेकुरवाळें होणें; मूल होणें ' आतां मला दक्षतेनें वागलें पाहिजे, कारण आमचे चारीचे सहा हात झाले '

**चारी ( अभिनय )**—स्त्री ( नृत्य ) नर्तनांत एका पायानें केली जाणारी क्रिया. हिचे दोन भेद आहेत–भौमीचारी व आकाशिकी चारी

**चारु**—पु. चाळे 'त्या पितरांचे मांडिले चारु । ऐसा पुत्र निपजला । ' –भ ४६६ [ सं चर् ]

**चारु**—वि चांगलें, उत्तम, सुंदर, रमणीय, देखणें (मनुष्य किंवा वस्तु ) [ सं ] ०गात्र–वि रूपवान्, सुस्वरूप, सुंदर व ठाकठीक अवयवांचा ' तो घनश्याम चारुगात्र ' ' नंद म्हणे राजीवनेत्रा । शालिग्राम दृष्टि चारुगात्रा । ' ०गात्री–वि. सुंदर अवयवांची, सर्वांगसुंदर ०वर्णा–वि रूपवती, सुंदर ०स्थळ–न १ उत्तमोत्तम ठिकाण, सुंदर मनोहर स्थान २ ब्रह्मस्वरूप ' चारुस्थळीं एकाहारी । एकागाचा ॥ ' –अमृ १ २ ' जो आत्मबुद्धि शरीरीं । चारुस्थळीं । ' –ज्ञा ६ ७२

**चारुळें**—न भांडें, परवी

**चारुळी**—वि (खा) चवथी ' गोठ चारुळी ' –भि १३.

**चारू**—पु. चारा, गवत ' नाना वसों घातला चारू । मायां तुरविला तुरू । ' –ज्ञा १७ २८१ [ चारा ]

**चारोळी, चारोळें**—स्त्रीन १ चार या झाडाच्या फळाची बी, चारोळ्या भाजून पेढे, बर्फी इ० मिठाईवर घालतात २ चंदनाची बी, चंदनचारोळी ०सांभारें–न चारोळ्या घालून केलेलें सांभारें, एक खाद्य पदार्थ ' चांगला चमचमित फोडणी देउनि चरारीत चारोळी सांभारें । ' –अमृत ३४

**चार्वाक**—पु. एक नास्तिक तत्त्वज्ञ यावरून कोणीहि नास्तिक मताचा प्रवर्तक ' कीं वेदांतापुढें चार्वाक । कीं शंकरापुढें मशक । ' [ सं ] ०मत–न धर्म, कर्म, परलोक हीं सर्व मिथ्या आहेत, मृत्यु हाच मोक्ष, चैतन्ययुक्त देह तोच आत्मा, देह हा पृथ्वी, आप, तेज वगैरे पंचमहाभूतांपासून उत्पन्न होऊन त्यास आपोआप चैतन्य प्राप्त होतें तेव्हां जन्मास आल्यावर मनुष्यानें द्रव्य मिळवून चैन करावी अशीं चार्वाकाचीं मतें होतीं. [ सं ] ०वाद–पु चार्वाकमताचें प्रतिपादन [ सं ] ०वादी–वि चार्वाकमताचा पुरस्कार करणारा [ सं ]

**चाऱ्ही**—वि चारी पहा

**चाल**—स्त्री जाणें, गमन करणें, मार्ग आक्रमण करणें, प्रवास करणें ' आज मला दहा कोसांची चाल पडली ' २ रीत, वहिवाट, पद्धत, रिवाज, परिपाठ, प्रघात ' या बेटांतील जुन्या लोकांच्या चालीप्रमाणें त्याचा पोषाख होता ' –पाब्द १ ' त्या देशीं स्त्रिया कासोटा घालीत नाहींत, अशी चाल आहे ' ३ चालण्याचा झोंक, पाऊल टाकण्याची, चालण्याची ढब, ऐट ४ घोड्याचा कदम, किंवा गति, याच्या कांहीं तऱ्हा पुढीलप्रमाणें आहेत–कुकर, चौकर, धुदकी, चवक, दुडक, दुडकी, दुडकी, पावरी; चौक, टाकण, वाजी; भरधाव, दुदरूक, सांडक, रहिवाळ, दुलत, सांधी, दुडक, हुदुक, तुरतुर इ० ५ चलन, फैलाव; प्रसार ' मुंबईंत पुरती चपयाची चाल आहे ' ६ काम भागविणें, गुजराण करणें, ऐवजी, बदली योजना ' सोंवळें दुसरें कांहीं नाहीं म्हणून धाबळीवर

चाल करतों ' ७ सत्ता; वर्चस्व वजन, अधिकार, चलती 'दरबारात त्याची चाल होती तेथपर्यंत त्याचें वाकडें कोणाच्या नेंहि झालें नाहीं ' ८ वागणूक, आचार, वर्तणूक, वर्तन 'यावरून तो उमेदवार सभ्य चालीचा आहे हें मी ताडिलें ९ प्रकार, जाति तऱ्हा ( काव्यातील छंदविषयक ), गाण्यातील तान, स्वर, गति १० हल्ला करणें किंवा अंगावर तुटून पडणें, चढाई. ( क्रि० करणें ). ११ दुसऱ्या भिंतीचा जोड मिळण्याकरितां ठेवलेला भिंतीच्या शेवटाचा बाहेर आलेला भाग, आणखी जोड करतां यावी म्हणून छपराची खाडे पाडलेली कड १२ उसाचा रस गाळण्याच्या चरकाच्या नरमादीमध्यें जी मळसूत्रासारखी खोवण व पुढें काढ लेला भाग असतो ती १३ बुद्धिबळाच्या खेळांत मोहऱ्यानें केलेली खेळी किंवा हल्ला [ स चल्=चालणें ] ( वाप्र ) **चाल करणें**-तुटून पडणें, हल्ला करणें, चढाई करणें. **चालीवर घेणें**-भागविणें, गुजारा करणें, निर्वाह करणें, चालवून घेणें, करविणें **चालीस लागणें**-मार्गास लागणें, चालू होणें, सुरवात करणें. ( धंदा, कृत्य यास ) **चालीस लावणें**-चालावयास लावणें, चालू करणें, सुरवात करून देणें

**चाल**—वि विशिष्ट ठिकाणीं चालू असलेलें, किंवा पाडलेलें नाणें (समासात) पुणेंचाल, चांदवडचाल, समशेरीचाल, नाशिक चाल सामाशब्द- ०**चर्या**-स्त्री वागणूक, रीतभात, नेहमींचें आचरण, 'रोजगार लागताच त्याची चालचर्या फिरली ' ०**चलन, चलणूक, चलाण चलाव**-स्त्री वर्तणूक, आचार-विचार, वर्तन ०**चलाऊ**-वि १ चालण्याजोगा; वेळेस उपयोगी पडण्यासारखा २ प्रसंगोपात्त आचरण ठेवणारा ३ कसें तरी काम भागविणारा ०**चलाक**-ख-वि मजबूत, बळकट आणि तडख मनुष्य, वेगवान्, चपळ जनावर [ चाल+फा चालाक ] ०**चलाकी**-खी-स्त्री चपळाई, वेग ( घोड्याचा जनावराचा ), चापल्य, तडखपणा ०**ढकल-ढाळ**-स्त्री १ कामाची हयगय, आळसानें कालावधीवर टाकणें, लोंबविणें, कसेंबसें ओरबाडत करणें २ गरज भागविणें, जोगावणी करणें ३ संकटात किंवा हालअपेष्टांत आयुष्य कंठणें ४ कार्य लांबणीवर टाकणें, दिवस गतीवर लोंबविणें, ढकलाढकल करणें [चालणें+ढकलणें] ०**ढाळ**-पु रवय, क्रम, रीतभात, कार्यपद्धति, संप्रदाय, परिपाठ

**चालक**—पु. पायाचा एक रोग 'कुजी आणी चालक। या नांव आध्यात्मिक।'-दा ३ ६ ४६ 'चालक निसल्या पुळी आली। बैसवेना।'-दा १८ १० २४ -वि १ मुख्य सूत्रधार, रस्त्या चालविणारा २ गति देणारा, चालविणारा, वागविणारा हांकणारा ३ जलद चालणारा, वेगवान्, चपळ ०**वाऊ**-पु पायाचे सांधे धरणारा एक रोग ०**वाऊ** वायू, **वाऊचा मणी**-पु कांचेची आंगठी किंवा पांढरी गारगोटी मढून पायास घोट्यावर बांधतात ती ०**शक्ति**-स्त्री प्रेरक शक्ति, स्फूर्ति आणणारी शक्ति 'राष्ट्रीय पक्ष ही चालकशक्ति आहे.' शाको ३ ११

**चालकाबोलका**—वि १ चालण्याबोलण्याला समर्थ असलेला, चालूबोलूं लागलेलें ( मूल ) २ बोलून चांगला, भला, गोड तोंडाचा गोड, मिळूनमिसळून वागणारा

**चालगती**—पु ( कु ) मुदतीनें आणलेलें पिशाच्च, अनुकूल पिशाच्च [ चाल+गति ] ०**आणणें**-कुटुंबाची भरभराट होण्यासाठीं अनुकूल पिशाच्च आणणें

**चालट**—पु एक प्रकारचा मासा

**चालणा**—वि., चालणारा 'तें मी होईन सुखासन। तें मीचि वाहीन आपण। भोई होईन चालणा।'-एभा १२ ५६ ६

**चालणें**—उक्रि १ गमन करणें, जाणें, मार्ग क्रमण करणें, रस्ता क्रमणें, जाण्यासाठीं पावलें टाकणें 'मी दिवसास पंधरा कोस चालतों ' २ पुढें जाणें, प्रगति होणें, चालू असणें, सुरू असणें 'त्या वकिलाचे हातामध्यें माझें काम यथायोग्य चालतें ' 'कोश चालला ' 'घर चाललें ' ३ जाणें, लोटणें, गतींत असणें, कंठिला जाणें ( दिवस, भरभराट, आयुष्य ), चालू राहणें, वर्षानुवर्षे अस्तित्वात असणें ( जिंदगी, रीतरिवाज ) 'ही माझी वृत्ति पांचशें वर्षं चालली ' ४ अधिकार, वर्चस्व असणें, प्राधान्य असणें, पटणें, यश येणें 'त्या मनुष्याचें कोठेंही चालत नाहीं ' ५ मान्य केलें जाणें, पसंत पडणें, उपयोगात असणें, चालू देणें, बाजारांत व्यवहारात घेणें, स्वीकारणें ( नाणें, गोष्ट, वागणूक, हकीकत ). 'हें नाणें, ही गोष्ट, तुझी चेष्टा, त्याची उनाडकी एथें चालणार नाहीं ' 'तू दिल्ला रुपाया आमच्या मुलखात चालत नाही '-गुजा ३७ ६ वागणें, वर्तणें, ऐकणें ( आज्ञा, हुकूम) 'गुरु जसें सांगतील तसें चालावें ' वैद्य सांगेल तसें चालावें.' ७ कामास, उपयोगास पडणें, पुरवणें, समाधान करणें, भागणें. 'ओलेंकोरडें जसें मिळेल तसें मला चालेल ' 'चालला तर गाडा नाहीं तर वाडा '=उपयोगी असला तर सोय नाहीं तर अडचण ८ चालू असणें, सुरू असणें (काम, यंत्र ) ९ विवक्षित, विशिष्ट गतीनें, ढबीनें, नेकीनें, गमन करणें, चालण्याची क्रिया करणें १० योग्य होणें, उपयोगी पडणें, उतरणें, जमणें; हेतूला, उद्देशाला योग्य असणें. ११ लिहिण्यास वजनें ( लेखणी वगैरे ) १२ दरवळणें भरून जाणें ( सुवास वगैरेनीं ) १३ उपाय, युक्ति असणें 'आलें दवाजीच्या मना। तेथें कोणाचें चालेना।' ( या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ गमन किंवा गति असा आहे) [ स चर्= हलणें, चलन, प्रा चलइ, फा चरिदन, झेंद चर, ग्रीक पल्य ] ( वाप्र ) **घमकून चालणें**-ऐटींत चालणें 'चाले कुकामुनि पुढें चमकोनि योधा।'-आक १ **चालता घेणें**-चालून घेणें,

गुजारा करणें चालू होणें चालून जाणें-हल्ला करणें चढाई करणें; स्वारी करणें 'हिंदुस्थान सरकाराचें लष्करी धोरण जरी रशिया संबधानें बचावाचें असलें तथापि एकंदरीनें चालून जाण्याचेंच आहे' -टि२ ३५७ चालू(चालों)न देणें-न ऐकणें. 'चालों न देवि मत, करि मन तैशाचेंहि बदय पाप तिचें' -मोमभा ३ ५१

चालता—वि १ चालू असणारा, गतींत, उपयोगांत असणारा, सुरू असलेला २ उपयोगांत येण्यासारखें, तीक्ष्ण (धार किंवा धार लावलेलें हत्यार, शस्त्र) ३ प्रचारांत असणारा, अस्तित्वांत असलेला वर्चस्व असलेला [चालणें] सामाशब्द- ०कज्जा, मोकद्दमा-पु सुरू असलेला तंटा, भांडण किंवा प्रकरण ०काळ-पु भरभराटीचा काळ, उत्कर्षाचे दिवस. 'या तुम्हा चालता काळ। खायाला मिळती सकळ।' -अमृत ११८ ०गाडा-पु सरळ चाललेला गाडा, सुरळीत चाललेला क्रम, परिपाठ, एखादें काम म्ह० चालत्या गाड्यास खीळ घालणें= सुरळीतपणें चाललेल्या कामांत विघ्न करणें ०घोडा-पु कामांत असलेला, वापरण्यांत असलेला, जिवंत घोडा चालत्या घोड्यावरच्या गोमाशा-घोडा जिवंत असतांनाच त्याच्या अंगावर गोमाशा बसतात मेल्यावर बसत नाहींत, यावरून ल्यक्षणेनें माणसाजवळ पैसा, अधिकार असतो तोंपर्यंतच लोक त्यास चाहतात आश्रयाला असणारे कार्यसाधु लाळघोटे लोक यांना म्हणतात चालत्या पायीं-क्रिवि चालत असतांनाच, न थांबतां, तावडतोब 'चालत्या पायीं परतणें' ०बोलता-वि १ मूर्तिमंत २ ज्याला चालतां बोलतां येत असें (मूल) ०बोलता चालतबोलत असता-क्रिवि १ चटदिन, सहजासहजीं, लवकर अनायासें 'तो म्हातारा चालतां बोलतां मेला' २ अल्पकाळांत, एकाएकीं, तात्काळ इतक्यांत चालतांबोलतां दौत कोणी नेली.' 'हे आठ महिने राहिले ते चालतां बोलतां जातील' ०रुपया-नाणें-पुन व्यवहारांत चालू असलेला रुपया अगर नाणें ०रुमाल-पु (कचेरीकामांत, प्रकरणांत) चालू प्रकरणांचा समूह चालतीतजलक चालतें पुढचें-हेहि शब्द याच अर्थानें वापरतात ०सैपाक-पु साधा, सोपा, सहज होण्याजोगा सैपाक, दिजत असतां फारसें लक्ष्य घावें लागत नाहीं असा स्वयंपाक

चालती—वि चालू असलेली, चालणारी, सुरू असणारी [चालणें] (वाप्र) ०स लावणें-सुरू करणें, चालू करणें 'गाडी चालतीस लावून आलों.' 'काम चालतीस लावून आलांत तर आपणांस त्याजकडे जाण्यास वेळ फावेल' सामाशब्द- ०मजल-मजील चालता कूच-स्त्री न थांबतां कूच मार्गक्रमण करणें ०वहिवाट-स्त्री चा १ देखरेख उपभोग मालकी (परंपरागत आलेल्या जिंदगीचा) प्रस्तुत उपभोग

चालतें—वि चालू असणारें; सुरू असणारें [चालणें] सामाशब्द- ०औषध-न रोग्याला नेहमीप्रमाणें चालण्यास फिरण्याची मोकळीक ठेवणारें औषध ०काम-न. चालण्याची क्षमता किंवा समर्थता, गमनक्षमता 'गाड्याचें चालतें काम फलें' ०कालवण-न सहज किंवा चालतांचालतां तयार केलेलें कालवण, विशेषत पिठलें किंवा कांदा ०दप्तर-न १ चालू सरकारी कामासाठीं नेमिलेली मंडळी अगर कचेरी, कारखाना २ चालू कामाकरतां तयार करून ठेवलेले कागदपत्र ३ (अजहदलक्षणेनें) चालू काम ०नांव-न टोपण नांव व्यावहारिक नांव पहा

चालन—न १ (कपराचीं कौलें, पुस्तकाचीं पानें, गंजिफा, विड्याचीं पानें इ०) चाळविणें, उलथीपालथी करणें; (महत्त्वाचीं वर्तविलेलें गणित, शास्त्रीय मूलतत्त्वें) पुन्हा करून पाहणें अगर उलटून पाहणें, नीट व्यवस्थेशीर लावण्याकरतां, बसविण्याकरतां, फेरतपासणीकरितां, परीक्षा करण्याकरितां, शोध काढण्याकरतां, तपासण्याकरतां छानण्याकरितां फिरविणें अगर उलटणें २ महादिकांच्या अस्तोदयाचें अंतर आणून क्षेपक कल्पितात तें, अशा प्रकारें मिळवून, वजा करून काढलेलें अंतर, फेरबदल ३ चालवणें, सरकणें, गति [सं चल्-चालन]

चालना—स्त्री १ गति, प्रेरणा २ उजळणी.

चालवर्तणूक चालचलणूक—स्त्री (वि प्र) चालचलणूक, (व्यापक) वागणूक वर्तन

चालविणें—उक्रि १ सुरू व्हावयास लावणें, गति अगर चालना देणें, सुरू करणें 'सोके धर्मशाळा चालवावी। नूतनचि कार्यें।' -दा ४ ७ ४. २ चालू वहिवाट, परिपाठ ठेवणें, गति, कारभार चालू ठेवणें ३ चालू करणें, प्रसृत करणें, उभारणें ४ क्रम चालू राखणें, हाकणें, उपयोगांत आणणें प्रचारांत, व्यवहारांत, कामांत आणणें ५ परामर्श घेणें, समाधान करणें, उपयोगी पडणें ६ साजेसें, अनुरूप करणें, योग्य व ठीक जमवून देणें ७ (व्याक) शब्दाचीं सर्व रूपें सांगणें, चालण्यास लावणें विशिष्ट शब्दाचें सर्व व्याकरण सांगणें. ८ खोटें नाणें दुसऱ्याला मोठ्या हातचलाखीनें घ्यावयास लावणें किंवा देणें ९ मारणें (हत्यार काठी वगैरे) 'गर्दी दूर करण्याकरतां पोलिसांनीं लाठी चालविली' १० कारभार हाकणें (गादी, संस्था यांचा) ११ लिहिणें (लेखणीनें) १२ नेणें, घेऊन जाणें 'गुरें कोंडवाड्याकडे चालविलीं' [चालणें] काळ्या पाण्यावर चालविणें-काळ्या पाण्याची शिक्षा देणें, दूरदेशीं नेऊन टाकणें

चालाख—वि (व) हुशार, चपळ, तरतरीत [फा चालाक]

चालाणापालाणा—पु (महानु) सैन्याचा मुक्काम संपवून डेरे राहुट्या वगैरे सामानासह कूच करण्याची तयारी अगर

विद्वता 'चालाणापालाणा भणओनि आफाविलिया मेरी' –धवळे पूर्वार्ध २६ [चालणें द्वि]

चालित—वि चालण्यास लावलेला, चालविलेला [स]

चाली—स्त्री उसाच्या चरकाच्या नवरानवरीमधील कोरलेले मळसूत्र चाल १२ पहा

चाली—स्त्री १ प्रवेश, वशिला, वजन 'ज्याची चाली रायापाशीं। लाच द्वाता ये तयासी।' –एभा २८ ६६४ २ व्याप 'सकळ सृष्टीची चाली येथुनी।' –दा २० २.१७ ३ चाल याचें अनेकवचन [चालणें] (वाप्र•) चालीस लावणें–मार्गास लावणें, उपयुक्त करणें 'किल्लेकोटाची राहिली इमारत नवी चालीस लावून ...' –मराभा ५ सामाशब्द– चालीवजा–वि १ चालीप्रमाणें, रूढीबरहुकूम, सर्वसमत, साप्रदायिक, सामान्य 'त्याचें घर खबरदार नव्हे, चालीवजा आहे २ कामचलाऊ, निर्वाहापुरेसें वेळ भागवून नेणारें, प्रसगोपात्त असें [चालणें]

चालु—वि चालता, सुरू असलेला, सध्याचा, प्रचलित [चालणें]

चालूक—वि चालक, जलद जाणारा, चपळ. [चालणें]

चाव—पु (क) वर्चस्व, अधिकार, सत्ता 'त्याचा चाव घरात माजला आहे' 'तुझा चाव मी चालू देणार नाहीं'

चावका—वि चावणारा, चावरा (कुत्रा वगैरे) [चावणें]

चावट—वि चिवट, वातड, चावण्यास कठिण (भक्ष्य पदार्थ वगैरे) [स चर्वण, म चावणें]

चावट—वि १ वाह्यळ बडबड करणारा, वाचट, तोंडाळ, चपळ, चहाटळ 'चावट गोष्टींचीं प्रचारातील पुस्तकें त्यास (पाल्ला) आवडत नसत.' –पाव्ह ८५ २ तिरस्कारपूर्वक नापसती दर्शविणारें, सत्यातल्या लहान माणसाला लावण्यांत येणारें उपपद 'केव्हा चालविलें खडे झुपतिपे काठि तुला चावटा।' –देवीसुधा मनोरजन जून १९२१ ३ झीज झाल्यामुळे ढिलें अगर सल झालेलें (बिजागऱ्या, स्थावर माल, यंत्रें) [स. वाचाट]

चावटा—स्त्री वटवट, बडबड. 'तव दैत्येश म्हणे वाजटा। व्यर्थ कां करिसी चावटा। तव सैन्य लाविलें वाटा वाटा। हें काय दृष्टीं न देखसी।' –अ ७९ ६७ [वाचाट]

चावटाई चावटगिरी, चावटपणा—स्त्री वात्रटपणा, वडबडेपणा, वाचाळता, पाजीपणा [चावट]

चावटी—स्त्री (काव्य) चावटाई, चाव्टी पहा (क्रि० करणें, पिटणें) तैसा मीं जरीं तुम्हाप्रती। चावटी करीतसें बाळमती।' –ज्ञा ९ १६ कथी चावटीचे बोल। हिंग क्षिरीं मिथ्या फोल।' –तुगा ३०४४

चावडी—स्त्री १ कोतवालाची कचेरी, बाजारांतील पोलीस चौकी 'बा, म्हणज त्यानें मला आयतेंच चावडीवर न्यावें' –मृ ४३ २ गावांतील कामकाजाची जागा, गावकचेरी ३ प्रवासी, उतारू वगैरेसाठीं असलेली धर्मशाळा, अड्डा वगैरे ४ कुटाळक्यांचा अड्डा (हॉटेल किंवा न्हाव्याचें दुकान याप्रमाणें). ५ सारा, सरकारला द्यावयाचा कर 'तलाठ्याश रुपये १६।१२।२० काय चावडी म्हणेल ती रयतेनें द्यावी' –खेया १७ [स चौवाडी, चन्द्वाटी, हिं चावडी] म्ह० चावडीवर दरवडा=ज्यानें लोकांचें सरक्षण करावयाचें त्या पोलीस अधिकाऱ्याला स्वत चेंच रक्षण करता येईनासें झालें म्हणजे ही म्हण योजितात

चावणें—उक्रि १ चर्वण करणें, दाताखालीं रगडणें २ दश करणें, दातानीं जखम करणें, नागी वगैरे टोंचणें साप, कुत्रा. इ० नांवील चावणें, विंचू चावणें ३ (ल) दु ख देणें, टोंचणें उदा० जोडा चावणें ४ पोटात तोडणें, आतड्यास पीळ पडणें ५ डोकें दुखणें, डोक्यास खाज सुटणें, चिवचिवणें, बेचैन होणें ६ आत्मसात करणें, लाच घेणें त्यानें या कामांत त्यापासुन शभर रुपये चावले.' [स चर्वण, प्रॅजि चम] (वाप्र) चावत बोलणें–दात आवळून बोलणें. चावूं कां गिळूं करणें–एखाद्याच्या नाशास उद्युक्त होणें. चावून घालणें–पुष्कळ विवरण करून आणि पुन पुन बोलून सागणें अथवा शिकविणें चावून चिवून खरचणें–कृपणपणें, कजूषपणानें खर्च अथवा उपयोग करणें चावून चिकट करणें–१ (विरघळू दिली असता आपोआप सहज विरघळणारी वस्तु विनाकारण चावून चावून चिवट, चिकट करणें) स्वत ला फसवून घेणें, लोचटपणामुळे काम बिघडून घेणें, दुराग्रहपूर्वक घासाघिशीनतर पहिल्यापेक्षां कठिणतर अटी अथवा कनिष्ठ प्रतीच्या वस्तु स्वीकारणें २ कटाळवाणी बडबड करणें, जपमाळ घेणें, व्यर्थ काथ्याकूट करणें चावून चिवून ठेवणें–अतिशय काटकसरीनें सचय करणें चावून चिवून संसार करणें–४र चालविणें–काटकसरीन संसार चालविणें चिवून चावून अथवा चिवून चावून असेंहि म्हणतात

चावणें—न खाव वाढविण्याकरतां त्यास जाडलेला तुकडा

चावदस-सी—स्त्री चतुर्दशी (कुग) चौदस पहा 'चौथ मोटकी पाह। आणि गणेशाचाचि होये। चावदसी म्हणे माय। तुझाच वो दुर्गे।' –ज्ञा १३ ८१८ 'चारा असि कृष्णपक्षि चावदसी।' –माकंड २८ ४. [स चतुर्दशी]

चावदसी—स्त्री जागृतावस्था, जागपणा, जागृती

चावदिवस, चावदास—पु (कु) आश्विन वद्य चतुर्दशी

चावनट—वि वात्रट, बडबड्या, पाजी, कटकटी करणारा. [चावट]

चावर—पु १ (सामा) चाहूर 'त्या सर्गी क्षिति कितव चावर। व्याधिजी प्रभु मर्थे जिया वर।' –वामन वणुगुप

२.१०. २ उंसाकरतां खोल वाफे तयार करण्याचें हत्यार. ३ (कु.) पावर.

**चावर**—स्त्री. नांगराच्या पुरीपुढच्या बैलजोडीची जागा. 'चावरीला वांझोटी म्हैस बांध.' चाहुर, चाहूर, चाव्हर पहा. **चावरीचा**–वि. नांगराच्या दुसऱ्या जोडीला योग्य असा. 'हा बैल चावरीचा आहे.'

**चावरा**—वि. चावणारा (घोडा इ०). [सं. चर्व्]

**चावरा**—स्त्री. चौरंग. [सं. चतुर्]

**चावरा**—पु. जनावरांनी चावून तुडविलेला चारा. [सं. चर्व्]

**चावरा, चावरी, चावरीमोट, चावऱ्या**—चाव्हरी मध्यें पहा.

**चावरी**—स्त्री. (वै.) चावलेल्या अन्नाचा किंवा गवताचा जनावरापुढें पडलेला अवशेष [सं. चर्व्]

**चावरी**—स्त्री (काव्य) एक प्रकारची घडवंची, तिवई. 'रत्नजडित चावरिया। ठायीं ठायीं मांडिल्या।' [सं. चतुर्]

**चावल**—स्त्री. १ चाहूल; हालचाल. २ उपदेश. 'तेथें पांचाल देश सुभिक्ष सुकाळ। भिक्षेचा नाहीं दुष्काळ। ऐसा करोनिया चावल। गेला व्यास देवो।'—कथा ५.१२.८३. [सं. चल्]

**चावल**—पु तांदूळ. [सं. तंडुल; हिं. चावल]

**चावलीन**—न. (कु.) ल्हान मुलांस औषध देण्याचें ल्हान कांचेचें भांडें.

**चावळ**—स्त्री. चळवळ. [सं. चल्]

**चावळ**—स्त्री. चौफणी पामर. –कृषि २७२. [सं. चतुर्]

**चावळणें**—अक्रि. १ बोलणें. 'आपुलिया मना परवी। असमाई गोठी जीवीं। ते कवणेंसि चावळावी। जरी ऐक्य जाहलें।'—ज्ञा ६.११८. २ बडबडणें; भलभलतें बोलणें 'चावळ ताठी वाग्जल्प। अर्थहीन उमजेना।' –मुवादि १९.७६. ३ ज्वर, भय, निद्रा इत्यादि कारणामुळें विचूक बोलूं लागणें; बरळणें. 'भय घेतलें मानसीं। म्हणोनि भलतें चावळसी।'—रावि २३.८३. [सं. स्वप्+चल्=चल् हा धातु. चलनें–चवळणें–चवळणें–चावळणें=झोपेंत चलन करणें. –भाअ १८३२. सं. चलन-वलन]

**चावळी**—स्त्री. निरर्थक बडबड. [चावळणें]

**चावा**—पु. दंश; दंशाचें चिन्ह; व्रण; दातानें केलेली जखम [सं. चर्व्=चावणें; तुल० का. कच्चु–चावणें] ०चवीना–पु लांच 'प्रवासांत ठिकठिकाणीं वाटाड्यांना चावाचवीना धावा लागतो.' मारणें–लग्गा साधणें.

**चावाचीव**—स्त्री. असंतोष; कुरकुर; विनाकारण केलेली हरकत, टाळाटाळ इ० [चिवचिव]

**चाविरा**—वि. १ चावणारा; चावण्याची संवय असलेला. २ चंचल; स्वैर; चळवळ करणारा; भटकणारा. 'मीचि एक तिहीं लोकीं। स्वाचारनिष्ठ स्वयंपाकी। यापरी स्वकर्मादिकीं। मन होय अधिकीं चाविरें।'—एभा २१.६३६. [चर्वणें]

**चावी**—स्त्री. १ किल्ली. २ खुबी. ३ हार्मोनियममधील सुराची पट्टी. ४ बांधकामातील कमानीच्या मध्याचा दगड. [कों. हिं. गु. तुर्की पोर्तु. चावे]

**चाव्येकार**—पु. (गो.) किल्लीवाला; कोठीवाला. 'आज चाव्येकार कामार येवंक ना=आज किल्लीवाला कामावर आला नाहीं.

**चाव्हरतें**—न. (व्या.) गौरीहार आणणें. 'चाव्हरतेला मेडळी चला.' [सं. चतुर्]

**चाव्हरा**—पु शेतकऱ्याचा लांब चाबूक; कातड्याचा, चामड्याचा चार बैल हांकावयाचा कोरडा. [सं. चतुर्]

**चाव्हरी**—स्त्री. बैलाची दुसरी जोडी लावावयाचा सोलाचा, दोराचा पुढचा भाग. [सं. चतुर्=चार] **चाव्हरी–रे–बैल**–पुअव. पुढल्या जोखडाला जुंपलेली बैलांची दुसरी जोडी (यावरून सहा बैली–आठ बैली–दहा बैली–सोळा बैली–चाव्हरी हे सामासिक शब्द होतात). ०मोट–स्त्री. बैलांच्या दोन जोड्यांनीं ओढावयाची मोट. –च्या आसुड–पु. चार बैल जोडले असतां वापरावयाचा शेतकऱ्याचा लांब चाबूक, कोरडा, आसूड.

**चाष–श–स**—पु. पक्षिविशेष; तास पक्षी; भास खंजन; खंजरीट; मणिकंठ असेंहि म्हणतात. [सं. चाष]

**चाषगति**—स्त्री. (नृत्य) उजवा पाय पुढें सरकवून पुन्हां पहिल्या जागेच्या मागें ठेवणें, व डावा पाय मागें गेलेल्या त्या उजव्या पायाजवळ आणून ठेवणें. [सं. चाष+गति]

**चास**—स्त्री. नांगरतांना पडलेली नांगराची रेघ; नांगराचा तास; नागरट. [तुल. हिं. चास-(स्त्री). शेती; कृषिकर्म; नांगरणें] **चासेचास**–क्रिवि नांगरानें पाडलेल्या प्रत्येक रेषेंत, पाभरीच्या प्रत्येक तासांत. 'जिया अमृत लेशालागीं सायास। तयाचा पाउस केला चारी मास। पृथ्वी वाहून चासेचास। चिंतामणि पेरिले।'—ज्ञा ११ ५८२.

**चासणी**—स्त्री. साखरेचा पाक. चाचणी पहा. 'खडीसाखरेची भुकटी करून ती अदपाव पाण्यांत टाकावी व तिची चासणी तयार करावी.' –कृषि २.३२.

**चासणी, चासणूक**—स्त्री. चाचणी; चाचणूक.

**चासपणें**—अक्रि. चापसणें.

**चाह**—स्त्री. चहा पहा. [हिं. चाह–आवड]

**चाहटळ चाहड, चाहडखोर, चाहडबुचका**—चहाटळ इत्यादि पहा

**चाहणें**—उक्रि आवडणें, प्रिय असें मानणें, मान्य करणें, 'मला तो भारी चाहतो' [स इच्छा, हिं चाह=आवड, प्रेम]

**चाहा**—स्त्री चहा पहा

**चाहाड**—वि चहाड पहा

**चाहादाणी**—स्त्री चहा पहा

**चाहाळ**—पु (व) चाहूल, आवाज. 'कोणी चालल्याचा चाहाळ झाला' [स चल्]

**चाहुरी, चाहुरीमोट**—चावर, चाहूर, चाव्हरी पहा.

**चाहुली-ळी**—स्त्री चाहूल, आवाज, हालचालीनें होणारा शब्द 'राक्षस झाला तेव्हि वेळीं। जाणोनि विप्राची चाहुली।' —कथा २ १३ १२१ [स चल्] ०मारणें—चाहूल लागू न देणें, आवाज न करता चालणें 'गडी ठेवूनिया बाहेरी। चाहुली मारूनियां सचार करी। तव या शिंकियाचिया हारी। चाचपडता सापडल्या।' —निगा ३६

**चाहूर**—पुन १ एकशेंवीस विघे २ चार बैली आउतातील पुढची जोडी, धुरवीच्या पुढची जोडी चावर चाव्हर, चाहुरी पहा ३ धान्य वारवण्याची घडवंची, वावडी [स चतुर्]

**चाहूल**—स्त्री पडसाद; कानोसा, मनुष्याच्या अथवा जनावराच्या हालचालीचा आवाज चिन्ह, माणसाच्या येण्याची सूचना. 'जागा रे गोपाळांनों ठायींठायीं जागा। चाहुलीनें भागा दूर मजपासूनी।' —तुगा २५१ [चाल+हूल]

**चाळ**—स्त्री अनेक बिऱ्हाडासाठीं बांधलेली एकाच नमुन्याच्या घरांची पटी [स शाला—साळ—चाळ—भाण १८३२]

**चाळ**—पु १ पैंजण, नाचताना पायास बांधावयाची घुंगराची माळ २ शोधणें, हुडकणें ३ उलथापालथ, धडामोड इ० यावरून (ल) कारवाई, माताळयंत्र ४ धोतरजोड्याचीं दोन पानें जेथें कापून वेगळीं करावयाचीं असतात तेथें वाण्याचे तंतु न विणतां रिकामी सोडलेली जागा, करळी, धोतरजोडा इ० स जी पुरळ असते ती ५ चाळणें, हाल्चाल, हलविणें ६ (कु) नदींतील भोंवरा ७ तोंडानें घातलेली शीळ, सू असा आवाज, चाळाच्या आवाजाप्रमाणें केलेला आवाज ८ एक प्रकाराचा गजकर्णाचा किडा ९ भरतीच्या वेळीं पाण्याबरोबर येणारे मासे पकडण्यासाठीं खारे पाटात केलेले खड्डे १० खेळावयाच्या सागरगोट्यांचा संच ११ काठांत नक्शी उठवण्याचें विणकामाचें साधन १२ —स्त्री खोडी, चाळा. १३ पट्टी 'चौदा-चाळ कोंकण।' —मुभादि २६ २८ [स चल्]

**०चोळ**—न (कु) अनपेक्षित लाभ

**चाळक**—न आश्चर्य —शर

**चाळक**—पु चाळक वाऊ नामक व्याधि (गजकर्ण) चालक पहा

**चाळक**—वि चालविणारा, प्रेरक, गति देणारा जसें—विश्वचालक, चक्रचालक, चित्रचालक इ०. 'कोण होईल तो ब्रह्मांडचाळक।' —तुगा २६६८ [स चालक]

**चाळक**—वि १ खोडकर, नाल्य, खट्याळ 'द्वाड आपेसी वोंगळ। चाळक चुबक लव्याळ।' —दा २ ३ २८. २ नखरेबाज छिचोर (स्त्री) [स चल्] ०भवानी—स्त्री चटकचांदणी, नखरेबाज, छिचोर चाळे करणारी स्त्री, पुढें पुढें करणारी चावट स्त्री

**चाळढाळ**—पु १ चालढकल, अडचण दूर करणें, कसेंहि करून मागणी पुरविणें 'एवढा माझा चाळढाळ पाच रुपयाचा करावा' 'कसाही चाळढाळ करून रुपये देऊन टाकावे' २ हालचाल 'जियेतें अलुमालु। रूपागुणाचा चाळढालु। ते अल तैसाही खेळु। लेखा आणि।' —ज्ञा १३ ९८५ 'जयेसी पाहाता आलुमालु। रूपागुणाचा चाळढालु। परि असेल तैसाहि खेळ। आणीतसे रूपातें।' —स्वादि १३ ३ ३८

**चाळण**—स्त्री १ धान्य, पीठ इ० चाळण्याचें सच्छिद्र साधन २ (ल) पुष्कळ झरे असलेली विहीर ३ झिरझिरीत विणीचें अथवा जीर्ण झालेलें कापड ४ —न चाळावयाचा पदार्थ, धान्य पीठ वगैरे ५ चाळण्याची क्रिया ६ चाळल्यानंतर राहिलेलें भूस, केर कचरा [स चालन]

**चाळणपुळी**—स्त्री. चाळपुळी, दूरवर पसरणारी पुळी, व्रण, क्षत

**चाळणा**—पु. १ लाह्या भाजताना दोन हात लांबीच्या काठीच्या टोंकाला कापड गुंडाळून लाह्या हलविण्यासाठीं केलेलें साधन, घाटाणा, घोळणा २ गहू डाळी इ० चाळण्यासाठीं केलेली पत्र्याची मोठी चाळणी [स चालन]

**चाळणावळ**—स्त्री चाळण्यासाठीं दिलेली मजुरी, पैसे

**चाळणी**—स्त्री १ धान्य, पीठ इ० चाळण्याचें साधन. २ उलथापालथ ३ गंजिफाची पिसणी ४ घराची कौलें चाकारण्याची क्रिया ५ शोधणें, हुडकणें ६ (ल) सूक्ष्म चिकित्सा, छाननी 'आम्ही घेतलेल्या चाळणींत अखेरीस कांहीं नावडतच खडे राहिल्यास' —टि २ १०४ [स चालनी] चाळणींत पाणी घालून जीव देणें—विनाकारण जिवावर उदार होणें, अत्यंत निराश होणें, कोरड्या विहिरींत जीव देणें

**चाळणें**—सक्रि १ करणें 'ऐसा चाळीत नाना युक्ती' —मुभादि ४१ ३ २ पेलणें, झेपणें 'परी जेणें धर्मासी चालिजे। यश गौरव त्यासीच साजे।' —मुसभा ७ ७० 'नावेक चाळवूं धीरेंधा पाठीं पुरवूं कामना।' —मुवन ४ १०९ ३ फिरविणें 'बायका

ऐसें मुखें दोहींकडे। डोळा चाळितां अपाडे। '–ज्ञा १५ १३५ ४ चाळणींत घालून गाळणें ५ पुस्तकाचीं पानें घराची कौलें, बिछान्याचीं पानें इ० उलटणें, गंजिफा पिसणें 'यदा बंगल्याचीं कौलें चाळलीं नाहींत म्हणून फार गळतें ६ धुंडाळणें, शोधणें उदा० घरघर, देशदेश, गावगाव चाळणें 'सगळें घर चाळलें, तरी आंगठी सापडत नाहीं ' [स चलन] **चाळूनचाळून, चाळूनपाळून**-क्रिवि पुन पुन उचलून, फिरवून, उलटापालट करून, अदलाबदल करून

**चाळणो**—पु १ (गो) मोठी चाळणी २ चाळल्यानंतर चाळणींत राहिलेला शेष

**चाळपुळी**—स्त्री एक व्रण, रोग, यांत प्रथम एक पुळी उठून नंतर तिच्या भोंवतीं अनेक पुळ्या उठतात व चाळणीसारखा व्रण होतो [चाळ+पुळी]

**चाळवट**—न थोपटण्यापूर्वीचें हातानें तयार केलेलें मातीचें भांडें –बदलापूर ६६

**चाळवण-णी, चाळवणूक**—स्त्री आशा लावून दिरंगाईवर टाकणें, झुलविणें, टाळाटाळ करणें, आज ये उद्या ये असें सांगणें, खेटे घालावयास लावणें 'त्यानें पैशाची चाळवणी चालविली आहे ' [स चालन]

**चाळवणें**—अक्रि १ भलतेंच सांगून नादीं लावणें, फसविणें 'काय आम्हां चाळविसी वायाविण। म्हणती दुरून देखिलासी।' –तुगा ३८ २ झुलविणें 'ब्राह्मणासी आशा लावून। चाळवी कदा न करी दान।' ३ –सक्रि, निसटविणें बाजूस सरकविणें, हलविणें, ढळण्यास लावणें [स चालन]

**चाळवाचाळव**—स्त्री १ अनेक प्रकारें केलेली चाळवणूक, झुलवणी, आशा लावणें २ एकसारखी उलथापालथ करणें, खालींवर करणें, उसकटणें ३ चिडविणें

**चाळविणें**—सक्रि, १ झुलविणें, आशा लावणें, वेडें करणें 'कोणी यकें चाळविलें। कोणी यकें भ्रष्टविलें।'–दा ३ ७ १६ २ हलविणें, चलन देणें, प्रवृत्त करणें 'तंव श्रुतिचे कोड साधे। चाळविलों फळश्रुतीचेनि मागें।'–मृ २८ ३ आजूबाजूस फिरविणें ४ घसरावयास, निसटावयास, झुकावयास लावणें, मूळ जागेवरून हलविणें ५ चेष्टा करणें, व्यर्थ आशा लावणें, हरभऱ्याच्या झाडावर चढविणें ६ चीड येईलसें करणें, त्रास देणें, खोडी काढणें

**चाळशी-सी, चाळिशी-सी**—स्त्री १ वयाला चाळीस वर्षें झाल्यावर दृष्टींत येणारा अधूपणा. २ चाळीस वर्षांचें वय ३ चष्मा 'चाळसी लाग प्राणिया। या नांव आध्यात्मिक।' –दा ३.६ ४९

**चाळा**—पु १ छंद, नाद, सवय, व्यासंग 'देवपूजेचा चाळा। हातीं सोंगट्यांचा चाळा ' 'वाचेसी शिवनामाचा चाळा ' २ वेड 'चाळा लावियेला गोप गोपीनाथें '–तुगा ११२ ३ खोडी 'उगला राहें न करी चाळा। तुज किती सांगों गोवळा।' –तुगा १२९ ४ पदार्थ जोडण्याचा सांधा, कळाशींत बसविण्याचा प्रकार उदा० शेवट खालीं करून बोटें एकमेकांत अडकविणें इ० सांधा, जोड, जसें–हाताचा, मनगटाचा–मानेचा–खवाटयाचा–गुडघ्याचा चाळा ५ भुताच्या अथवा पिशाचाच्या एका वर्गाचें नांव ६ हातमागाचा पावडा व पावसरा जोडणारी दोरी ७ जेथ भाग करावयाचे आहेत तेथल्या कपड्याचा न विणलेला भाग, कापडातील आडवे किंवा उभे यापैकीं एका जातीचे दोरे न विणले गेलेला भाग, करळी चाळ पट्टा ८ मागातील ओवी किंवा वही ह्या नांवानें ओळखला जाणारा भाग [स चल्] **०लागणें**–क्रि नाद किंवा छंद लागणें **०लावणें**–अक्रि नाद किंवा छंद लावणें 'चाळा लावूनि गोवितासी। दावूनिया लपसी। लपोनि कवळा जासी। तैसा भाव न करी आम्हांसी रे गोविंदा।'–ज्ञानदेव

**चाळाचाळ-चाळी**—स्त्री उलथापालथ, उसकाउसक, खालींवर करणें

**चाळाचूळ**—वि उतावळा –घार

**चाळाबोळा**—पु १ हातानें चुरगळून चोळाबोळा केलेला कागद अथवा कापड, बऱ्याच सुरकुत्या पडलेला कागद अथवा कपडा २ चाळाबोळा करण्याची क्रिया ३ (ल) (प्रवाशाप्रमाणें अथवा लुटारूप्रमाणें) घाईघाईनें, अव्यवस्थित रीतीनें केलेली सामानाची, कपड्यांची, कागदांची बांधाबांध. [चाळणें]

**चाळाळ**—पु लाटांचा किंवा पाण्याचा खळाळ 'पहाट जाहल चाळाळ। पाणियाचें।' –लिपु २ २७ ७९ [ध्व]

**चाळिता**—पु हलविणारा, प्रेरक, गति देणारा 'ज्या हालविल्या प्राणु हाले। जो जगातें चाळिता।' –ज्ञा९ २८३ –एभा १ १७ [स चल्, म. चालणें]

**चाळिशी**—स्त्री चाळशी पहा.

**चाळिसा**—स्त्रीअव (कुण) चाळीसाचा समुच्चय, अनेक चाळीस

**चाळिसा**—पु १ चाळीस शेरांचा मण २ सामान्यत चाळिसाचा समुदाय ३ चाळीस हात कापड ४ चाळीस मनुष्यें अथवा पशू लागणारें ओझें [चाळीस]

**चाळींपाळींनें, चाळूनपाळून**—क्रिवि आळीपाळीनें, पाळीपाळीनें, आलटूनपालटून [म चाळणें]

**चाळींव**—वि १ चाळलेला, चाळावयाचा २ (ल.) गाळींव

**चाळीस**—वि ४०, चार दशक

**चाळीसपत्र**—न चष्मा, उपनेत्र

**चालु**—पु टाकून बोलणें 'उपहासु चालु। वर्मे स्पर्शु। -ज्ञा १३ २७०. [चाळा]

**चाळूंद्रा**—वि चाळे करणारा, खोडकर, खटयाळ

**चाळूनपाळून**—क्रिवि भाळीपाळीनें चाळीपाळीनें पहा

**चाळें**—न फसविण्याची युक्ति, छक्केपंजे -शार -तुगा [चाळा]

**चाळेखोर**—वि खोडकर, खटयाळ, वाभ्रट, द्वड

**चाळेकृत्य**—न चहाटळपणाचें कृत्य

**चाळेगत**—पु (कु) भुताचा जमाव, पिशाच्चाचा समुदाय

**चाळौणी**—स्त्री (गा) टाळाटाळ, दिरंगाई, चाळवा चाळव 'पैशे मागल्या चाळौणी दाखिता' =पैसे मागितल्या-वर आज-उद्या करतो [म चाळवणी]

**चाक्षुप**—न प्रत्यक्ष ज्ञान डोळयापासून होणारें ज्ञान -पु सहावा मनु -वि १ नेत्रविषयक, डोळयासंबधीं, दृष्टीसंबधीं २ दृश्य, दिसणारें [सं चक्षुस्=डोळा]

**चाक्षुपी**—वि डोळयासंबधाची, दृष्टिविषयक -स्त्री एक अस्त्र 'मग योजिता झाला चाक्षुपी। कामिनी सैन्य वधावया।' -जै २२ ५८ [स] -प्रेम-न दृष्टिविषयक प्रेम, बाह्य स्वरूपावरून उत्पन्न होणारें प्रेम 'चाक्षुपी प्रेमाच्या पहिल्याच दृष्टीनें आपण मापुक बद्ध होतात' -विद्याहरण पृ २० -विद्या-स्त्री जादु गिरी, नजरबंदीची विद्या, दृष्टिमोह करण्याची विद्या, जगातील कोणताहि पदार्थ आपल्या चक्षूंनीं जसा पहावा असें इच्छावें तसा तो दिसणें ह्या विद्येला चाक्षुपीविद्या म्हणतात ही चित्ररथ गधर्वानें अर्जुनास दिली होती. 'अर्जुनें सावधानें ते क्षणां। चाक्षुपी विद्या अपिपली।' -जै ७५ १७३ 'मी चाक्षुपी स्वविद्या वर्तो घ्या दिव्य पांचशत वाजी।' -मोआदि ३१ २५

**चि**—एक प्रत्यय च पहा 'प्रेक्षक त्या युद्धाहुनि बहु वर्णिति आपुलेंचि ते पुण्य।' -मोकर्ण १० १०. 'स्मर-हर-पुरसाचि हरमरथ नाचे।' -मोकर्ण ४ ४

**चिआं**—चा चें सामान्यरूप, षष्ठी विभक्तीचा प्रत्यय, च्या 'भ्रमराचिआं झांदा। वरी पडत।' -दाव १४३ 'जें श्रीकृष्णा चिआं अवळिका।' -दाव १० १२२

**चिऊ-ऊ**—स्त्री चिमणी या पक्ष्याचें ल्हान मुलांच्या भाषेंतील नांव जसें काऊ-चिऊ

**चिक**—पु बांबूच्या बारीक कामटयाचा केलेला पडदा चिकाचा पडदा पहा [फा चीए चीक्]

**चिकचिक**—स्त्री चिकटी, चिकटाई [स चिक्कण, ध्व]।

**चिकचिकणें**—अक्रि चिकट होणें (घाम इ० कापासुन शरीर इ०) (गो) चिकचिकुक [चिकट]

**चिकचिकाट**—पु फारच चिकटपणा, अत्यंत चिकटपणा [चिकचिक]

**चिकचिक्त-कीत**—वि चिकट, चिकटणारें, डकणारें, घामानें चिकट झालेला. [चिकटणें]

**चिकचीक**—स्त्री चिकटपणा, पाऊस पडल्यामुळें जमीनी वर चिखल वगैरे होणें

**चिकट**—वि १ चिकटपणा असलेला, चिकटणारा २ (ल) कंजूष, कद्रू, घासाघीस करणारा (ल) ३ चिवट व मजबूत बांध्याचा (माणूस) ४ लाळघोटया, पिच्छा पुरविणारा चावून चिकट, चावणें, चावून पहा ०पदार्थ-पु उद, धूप, गुग्गुळ वगैरे वस्तू ०भेंडी-भोंकर-वि (ल) पिच्छा पुरविणारा, लोचट [स चिक्कण, म चीक]

**चिकटण**—स्त्री चिकटपणा.

**चिकटणें**—१ चिकटपणामुळें एक पदार्थ दुसऱ्या पदा-र्थाशीं संलग्न होणें २ (ल) एक पदार्थ दुसऱ्याच्या अगदीं जवळ येणें 'संपत्ति आली म्हणजे सोयरींधायरीं बरेंच येऊन चिकटतात' ३ एक पदार्थ, वस्तु दुसऱ्यास लागून असणें. 'माझें घर त्याच्या घरास चिकटून आहे' ४ खोडी, सवय, व्यसन जडणें 'त्याला विडीचें व्यसन चिकटलें'

**चिकटपट**—स्त्री (जमीनीची) स्निग्धता, कस इ०

**चिकटघण**—न चिकटविण्याचे पदार्थ गोंद, डिंक, खळ, सरस [चिकटणेंपासून प्रयोजक]

**चिकटव(वि)णें, चिकटाविणें**—सक्रि गोंदानें डकविणें

**चिकटा**—पु १ केसांत, कातडीत चिकटून असलेला मळ, केसांचा चिकटपणा २ पावसाची बारीक सर पडल्यावर होणारा जमीनीचा चिकचिकीतपणा ३ असमेंतून वाहणारा चिकट पु इ०; गाई, म्हशी इ०कांच्या स्तनांतून येणारा चिकट दुग्धांश ४ डाळी वर किंवा धान्यावर रोगरूपानें येणारा चिकट पदार्थ, बुरशी ५ एक प्रकारचें गवत ६ दळतांना जात्याच्या तळीस चिकटलेलें पीठ ७ रोगट हवेनें झाडांना, जनावरांना होणारा रोग ८ पक्षी पकडण्याकरितां केलेला चिकट पदार्थ [चिकट] ०पडणें-क्रि पिकांवर पानउवा पडणें

**चिकटा**—पु पुढऱ्यांचे नेसावयाचें मुकटपामारिमें सोवळ्याचें रेशमी किंवा लोंकरीचें वस्त्र [का चिक्कू-ल्हान] **चिकटें**—न. सोवळ्याचें, ल्हान्या रुमालें वस्त्र [का चिक्कू=ल्हान]

**चिकटाई**—स्त्री चिकटपणा

**चिकटी**—स्त्री. १ केसांतील चिकट मळ २ घामटपणा, ओंगळपणा ३ जात्याच्या तळीस पीठ चिकटल्यामुळें जात्यास येणारा चिकटपणा; नव्या धान्याचा चिकटपणा ४ चिंचोक्याची खळ

**चिकटीव**—वि चिकटवून तयार केलेलें, गोंदानें, सरसानें, खळीनें डकविलेलें.

**चिकट्या**—वि लोंचट, पिच्छा पुरविणारा, निसरडा [चिकट]

**चिकण**—वि १ कठिण (दगड), चिवट (लांकूड), मजबूत (कापड, कागद दोरा), कणखर, दमदार, कसदार (मनुष्य, जनावर) २ द्रव्यसपन्न (मनुष्य) ३ चिकट स्निग्ध (जमीन) ४ ज्यांत कस विशेष आहे असें (दूध) किंवा असें दूध देणारी (गाय) ५ कजूष, चिक्कू, कृपण ६ गुळगुळीत [चिकट] सामाशब्द- ०कांकडी-स्त्री तवसें, एक प्रकारची कांकडी -कृपि ५८२ ०खडू-पु पांढरी माती, एक प्रकारचा शाडू ०चोपडा-वि. १ स्निग्ध, चिकट (जमीन) २ गुळगुळीत (दगड, कागद लांकूड) ३ मऊ, चिवट मजबूत (रेशीम) ४ चकचकीत, पॉलिश केलेलें ०चोपडें-न जास्त तेल किंवा चरबी असलेले स्निग्ध खाद्य ओशट पदार्थ (तेल चरबी इ०चा) ०जमीन-स्त्री जिला चिकटपणा फार असतो अशी जमीन, जींत वीस भागांपेक्षां रेतीचा भाग कमी असतो, व ऐशीं भागांपेक्षां चिकणमातीचा भाग अधिक असतो अशी जमीन -कृषि १६ ०माती-स्त्री फार चिकटपणा ज्यांत असलेली माती, अल्युमिना व सिलीका यांच्या मिश्रणानें बनलेली माती -पदाव ३७ -वट-वि ओशट, चिकट(जमीन) ०सुपारी-स्त्री झाडावरून कच्ची काढून दुधांत शिजवून वाळविलेली सुपारी 'चिकणसुपारी कात जो केवडयाचा' [स चिक्कण]

**चिकणा**—पु एक औषधी वनस्पती, यास चुव असेंहि दुसरें नांव आहे

**चिकणा-ना**—वि स्निग्ध, तेलकट, चमकदार, गुळगुळीत [स चिक्कण, हिं चिकना]

**चिकणाई**—स्त्री स्निग्धपणा, गुळगुळितपणा, तेलकटपणा

**चिकणी**—स्त्री १ एक प्रकारचें झाड २ एक प्रकारचा मासा -वि चिकण पहा ०जमीन, माती सुपारी-चिकण पहा

**चिकरणें**—सकि विखरणें, विलग करणें

**चिकलवणी**—वि (गो) दलदलीत, चिखल व पाणी यांनी युक्त

**चिकलवाणो**—वि (गो) अमंगळ घाणेरडा, चिखलांत फिरून तसाच राहणारा

**चिकवडी**—स्त्री तांदुळाचें पीठ मीठ-मिरच्यांसह शिजवून त्याच्या बारीक बारीक वड्या वस्त्रावर घालून उन्हांत वाळवून तेलांत तळून खावयास करतात तें एक प्रकारचें तोंडीलावणें [चीक+वडी]

**चिकशा-स्या**—स्त्री १ संशय, खुरखुर, संदेह, आशंका, (क्रि० आणणें, बाळगणें, धरणें, वागविणें, येणें, उठणें, घागणें इ०) २ कटाळा, वीट [स चिकित्सा] ०येणें-वीट येणें

**चिकसा**—पु अंगास लावण्याकरितां केलेलें एक प्रकारचें सुगंधी द्रव्य, जोंधळा, हळद इ० वांटून अंगास लावण्याकरितां केलेलें उटणें 'नाना सुठिता देहदशा। काल्वूनि लाविजे चिकसा।' -अमृ ७,७२

**चिकसें**—न एक प्रकारचा खाण्याचा पदार्थ, दरभन्याची डाळ पाण्यात भिजत घालून ठेवून वाटावी नंतर त्यांत जायफळ वेलची पूड, बदामबी, पिस्ते, खिसमिस व पिठीसाखर मिसळून त्यात चमचाभर सोडा टाकावा व मिश्रणाचा गोळा तूप लावलेल्या ताटांत थापावा तें ताट भट्टींत ठेवून खालींवर जाळ लावावा चांगलें भाजल्यावर रोटासारखे तुकडे पाडावेत हेंच मोदकपात्रात वाफूनही कोणी उकडून काढतात बेसन दुधांतहि भिजवून करण्याचा रिवाज आहे -गृशि १ ४५२.

**चिकाचा पडदा**—पु बांबूच्या बारीक कामट्यांचा केलेला पडदा चिक पहा

**चिकाड, चिकचिकाट**—पु चिगचिग, गचपच, रेंदा डपणा

**चिकाटी**—स्त्री १ पक्षी धरण्यासाठीं केलेला चिकट पदार्थ, चुना, सफेता लावलेली काठी, किंवा तो चिकट पदार्थ (चुना, सफेता) 'सुणीं ससाणे चिकाटी खोंचरा। घेऊनि निघती डोंगरा। पारधी जैसे।' -ज्ञा १६ ३४५ २ बळाची परीक्षा पहावयासाठीं एकानें दुसऱ्याचें मनगट धरावयाचें आणि दुसऱ्यानें तें सोडवून ज्याव याचें व पुन्हा त्याचें धरावयाचें हा जो प्रकार तो, मनगटाची पकड, 'पहलियां हातीं हात धोरा धरिसी चिकाटी।' -भिमा ९६ (क्रि० धरणें, सोडणें) ३ पहिलवानाची विशिष्ट पकड ४ (ल) वादविवादात प्रतिपक्षाची अडवणूक करण्यासाठीं घातलेला प्रश्न ५ चिवटपणा (लांकडाचा) ६ धडाडी, नेट, करारीपणा, सोशीकपणा, निग्रह ७ चिकटपणा ८ (ल) लबाडपणा, लोचटपणा, टाळूलचाटन ९ चिरगुटा, दीर्घसूत्रीपणा-स्वभाव १० मजबूत भाव (सोदयावरील स्वाराची)

**चिकाडा**—पु एक प्रकारचें दुधाळ झाड शेर [चीक]

**चिकार**—क्रिवि पूर्णपणें, खच्चून, रिकामी जागा न ठेवतां (क्रि० भरणें) 'हें गलबत माणसांनीं चिकार भरलें आहे' -वि दाट, गच्च, फार, कल्पनातीत

**चिकार, चिकारा**—पु (हिं) कसारी लोकांची सतार, दोन तारांची किनरी, एक गोंडी वाद्य

चिकारा—पु नावड, तिटकारा किळस

चिकारी—स्त्री सतारीस लावलेल्या सात तारांपैकीं शेवटची (सातवी) तार [ ध्व ]

चिकारीबोली-भाषा—स्त्री शब्दाला आरंभी च-चि लावून त्यातील वर्णांची उलटापालट करून बोलण्याची सांकेतिक भाषा उदा० चलाम चिलाम=मला, चलातु-चिलातु-तुला इ०

चिकार—न. ( नदभाषा ) मूल, पोर

चिकाळ-ळा, चिकाळ्या—वि फार चीक असलेलें ( झाड, फणस, आंबा ) [ चीक ]

चिकित( चिबुक )—न ( नृत्य ) खालचे-वरचे दात एकमेकापासून दूर ठेवणें जांभई आली असें दाखविण्याच्या वेळीं नृत्यांत हा अभिनय करितात

चिकित्सक—पु १ वैद्य २ ( ल ) काथ्याकूट करणारा, कीस काढणारा, खोदूनखोदून चौकसणारा ( विशेषकरून मूर्ख व ढोंगी असा मानलेला ) ३ भावी परीक्षावत, परीक्षक, कलावत ४ दर्दी, तज्ञ, [ स कित्-जाणण, रोगमुक्त-बरें करणें, इच्छिणें, शंका घेणें, जगणें, राहणें ]

चिकित्सनीय—वि औषधी, औषध म्हणून देण्यास योग्य, चिकित्सा करण्याजोगा, उपायसाध्य [ स ]

चिकित्सा—स्त्री १ वैद्यकी, वैद्यक्रिया, उपचार 'ते हिंसा निवारावया केली। चिकित्सा कां।' –ज्ञा १३ २२५ 'रोगाची योग्य चिकित्सा करणारे वैद्य फार थोडे' –योर १ ३ २ रोगासंबंधीं साध्यासाध्य विचार व औषधयोजना ३ रोगाची परीक्षा ४ (ल ) सूक्ष्म निरीक्षण. (विशेषत फाजील, विचक्षणापूर्ण असें) ५ कांक्षा, वितर्क, कुकल्पना, अदेशा, आपल्या आशंकांनीं मनात उत्पन्न केलेले तरंग ( क्रि० येणें ) [ स ]

चिकित्सालय—न रुग्णालय, दवाखाना [ स चिकित्सा+आलय ]

चिकित्सेखोर—वि उगीच काथ्याकूट करणारा, दिक्कतखोर, कांडी, फाजील चिकित्सा करणारा, भलभलते संशय-शंका घेणारा ( मनुष्य ) [ स चिकित्सा+खोर ]

चिकी—स्त्री १ पातळ चिकट पदार्थ, गोंद, खळ २ पाक झणारा आंबूस गूळ. ३ काकवी ४ दाट होईल इतकी कढविलेली साखर, पाक ५ उडदाच्या पिठाची खळ ६ तावदानें चौकटींत घट बसविण्याचें लुकण, लांबी इ०, लोटणाची लाख

चिकीचा—वि चीक काढलेला ( लहान कापड, कपडा ) [ चीक ]

चिकार—वि किचकट, त्रासाचें, घोटाळ्याचें, सतावणाऱ्या व क्षुद्र बाबींनीं पूर्ण असें ( काम-धदा ) जिद्दीरीचें दको १ १४

चिकीर्षा—स्त्री. करण्याची इच्छा, [ स कृ=करणें या पासून इच्छादर्शक भाववाचक नाम ]

चिकीर्षित—वि करू इच्छिलेलें, करण्यासाठीं योजिलेलें [ स चिकीर्षा ]

चिकीर्षु—वि करूं इच्छिणारा, करण्याची इच्छा ज्याला आहे असा [ स चिकीर्षा ]

चिकू, चिक्कू—पु १ एक आवट-गोड, साधारणपणें बटाट्या एवढें फळ –वि कंजूष कृपण, कद्रू, हाताचा जड

चिके—क्रिवि. क्षणभर, जरा, कांहीं क्षण 'चिके रहा मी आतां येतों' [ का चिक्क्=लहान ]

चिकोटा—पु चिकटा शब्दांतील १,२,३ ४,६,८ अर्थ पहा [ चीक ]

चिकोटी—स्त्री चिकाटी पहा

चिकोडा—पु. जोंधळ्यावर पडणारा रोग, फार थंडी पडली म्हणजे जोंधळ्याच्या पातींवर एक चिकट पदार्थ तयार होतो तो.

चिकोरपणा—पु ( व ) थट्टेखोरपणा, छिचोरपणा 'असा चिकोरपणा चालवाल तर तुम्हाला येथून घालवून दिलें जाईल'

चिकोरी—स्त्री मातीची पणती

चिकोरी—स्त्री ( व. ) ( प्राय बहुवचनी प्रयोग ) थट्टा, मस्करी 'जन्मभर तुम्ही चिकोऱ्याच केल्या, तुम्हाला भारदस्तपणा कधीं येणार?' [ छिचोरी ]

चिकोल—पु ( कुण ) (चिखल अप ), गारा, रेंदा, राड.

चिक्कट—वि चिकट पहा

चिक्कण—वि चिक्कण पहा

चिक्कर—वि लहान, चिमुकलें, क्षुद्रक, आकारात कमी ( फळें, फुलें, अक्षरें, आकृति, विड्याचीं पानें इ० ) [ का. चिक्क्=लहान ]

चिक्की—स्त्री चिकी पहा

चिक्कू—पु चिकू पहा.

चिक्र—न. ( गो ) कपबशी 'चे प्योक चिक हाड' =चहा प्यावयाला कपबशी आण [ पो शिकर, इ सॉसर, तुल० म चक्र ]

चिखल—पु गारा, रेंदा [ स चिकिल-चिखल-राजवाडे, चिक्खल्ल-राजवाडे, स क्लिद-चिक्लिद –नारायणशास्त्री मराठे वाई ) ] ( वाप्र ) ०करणें-भाताचें रोप लावण्यापूर्वी करण्यांत यणारी दुसरी नांगरट –बदलापूर २८७ शेतात चिखलासारखी जमीन करणें गल्लागीत रवरबीत करणें, मिसळणें चिखलांत घोडा टाकणें-भलत्याच भानगडींत पडून स्वत स त्रास करून घेणें चिखलात रुतलेली गाय-असहाय्य मनुष्य, स्त्री; संकटांत सांपडलेली व्यक्ति म्ह० ( व ) चिखल पाण्याला

सोडत नाहीं व पाणी चिखलाला सोडत नाहीं=परात बापलेकांत किंवा आईमुलींत भांडण झालें तरी कांहीं वेळानें तीं एक होतात त्याला म्हणतात.

चिखलणें—अकि १ पावसानें जमीन चिखलयुक्त होणें. २ चिखल्याचा विकार होणें. ३ रेंदाड करणें.

चिखलणें—सकि. हांकणें; लोटणें (हत्ती, घोडा). चेतवणें; पुढें ढकलणें.

चिखलधुणी—स्त्री. (कों.) भाताची पेरणी, पेरणी करणाऱ्या मजुराचें कामानंतरचें हातपाय धुणें, स्नान करणें, अवजारें वगैरे धुवून काढणें इ० काम. [म. चिखल+धुणें]

चिखलमावळी-मावी—स्त्री. (व.) ज्येष्ठ कृष्ण अमावास्या. 'चिखलमावळीपासून आमचा हिशेब करा.'

चिखलवट—स्त्री. दाराचा उंबरा. -वि. १ जेथें लवकर चिखल होतो अशी (जागा, जमीन). २ जेथें चिखल झाला आहे अशी (जागा, जमीन); चिडचिडीत; रेंदाड.

चिखलवणी—न. चिखलानें युक्त पाणी; गढूळ पाणी. [चिखल+पाणी]

चिखलवाट—स्त्री. ज्यावर चिखल झाला आहे असा रस्ता; चिखलाची वाट. [चिखल+वाट]

चिखली—स्त्री. पावसाळ्यांत चिखलांतून हिंडल्यानें पायाच्या बोटांच्या बेचक्यांमध्यें ओलसरपणा उत्पन्न होतो आणि त्या ठिकाणीं कंड सुटून आग होते व ठणका लागतो असा विकार, चिखलात फिरल्यामुळे पायांच्या बेचक्यांत होणारा विकार; -अव. चिखल्या 'चिखल्या जिव्हाळ्या लागती। या नांव आदिभूतिक।' -दा ३.७.२२.

चिखल्या—पु हळीशींत रुमणें खुंटी मारून बसवितात ती खुंटी. -बदलापूर २८७.

चिखोरा—पु (व.) नखांनीं घेतलेला चिमटा; नखांनीं त्वचेवर काढलेला ओरखडा; चिमकोरा.

चिखोल—पु चिखल. 'हा शोणितमांसांचा झाला सर्वत्र दुर्गम चिखोल।' -मोकर्ण १२.३५.

चिगचिग, चिगढाण, चिगधाण—स्त्री १ चिकचिक; चिडचिड; फारच चिखल होणें. २ घामानें अंगास येणारा चिकटपणा; चिबचिब.

चिगचिग—वि. चिखलानें युक्त; रेंदाड.

चिगट—वि. चिकट पहा.

चिगलेबिगले—पु. (कर्ना.) फांसेपारधी. [का. चिगरी= हरिण+बलेगार=फास लावणारा]

चिगर—वि. किरकोळ.

चिगळ-ळी, चिंगूळ—स्त्री. १ अतिशय लहान मासा; २ लहान पिलूं, लेंकरूं इ० ३ चिमुकलें गाजर, बटाटा, कांदा, अपक्व फळ इ०. चिंगळ्या-पु. एक गोड्या पाण्यांतील मासा. -प्राणिमो ८१. चिंग्री-पु. एका जातीचा मासा. 'चिंग्री या जातीचे मासे घेतांना फार जपलें पाहिजे.' -आरोग्य १.११४.

चिगा(गो)टी—स्त्री. १ लहानसा भोंवरा. २ (ल.) चलाख, चपळ, मोहक मूल. ३ टेंगू मनुष्य.

चिगुटी—स्त्री. (गि) चिंधोटी; चिंधी. 'कोबराला इ लेंगुटी आन मुनकाये इ चिगुटी.' =कंबरेला ही लँगोटी आणि डोक्याला ही चिंधोटी. -गि १५.

चिघरा—पु एक प्रकारचा तिळावरील रोग (ज्यानें दाणा चांगला भरत नाहीं, पोंचट होतो असा). -कृषि ३५१.

चिघळ—पु (कों.) गूळ, साखर, मीठ इ० पदार्थांस जो द्रव सुटतो तो. -स्त्री. एक प्रकारची रानभाजी.

चिघळणें—अकि. पाझरणें; गळणें; स्रवणें (मीठ, साखर, गूळ इ०). [सं. गल्=गळणें; म. चीक+गळणें; का. चिगिल= चिकट होणें]

चिघळ्या—वि. पाझरणारा; वितळणारा; (हवेंतील ओलाव्यानें) झिरपणारा (गूळ, साखर इ० पदार्थ). -देवी-स्त्री. अव ज्यांतून पू वाहतो अशा देवी; कथल्या देवी.

चिंघुर—वि. लहान; चिमुकला; छोटा; ठुसर. चिरकर पहा.

चिंच—स्त्री. या नांवाचें एक झाड आणि त्याचें फळ. ओसाड व जंगली भागांत हीं झाडें आपोआप वाढतात. याचें खोड उंच असून फार जाड असतें. झाड सावकाश वाढतें. याचा विस्तार मोठा असतो. चिंचेचें फळ आंबट असून स्वयंपाकांत भाज्या वगैरे पदार्थांत त्याचा उपयोग करतात. चिंच पित्तशामक व रक्तशुद्धिकारक आहे. चिंचेचें सार व पन्हें करतात. पाला व फुलें यांची भाजी करतात. [सं. चिंचा] गोरखचिंच-स्त्री. हें फळ मोठें असून आंत तांबडा गर असतो. रुचि गोड असते. ही औषधी आहे. चिंचेचा तक्कू-पु. (व.) गाभुळल्या चिंचा वाटून त्यांत तिखट, मीठ घालून केलेला पदार्थ.

चिंचुकली—स्त्री. चिमटी.

चिंचणी, चिंचणी—स्त्री. १ गवतांत अथवा भातखाचरांत उगवणारी एक वनस्पति, हळीवासारखें एक प्रकारचें गवत. २ चिंच. 'चिंचण्या तोडूं झाडावर।' -दावि २६२.

चिंचतसर—न. चिंचेवरील कर.

चिंचप(पे)टी—स्त्री. स्त्रियांचें एक कंठभूषण; चिंचेच्या पानांच्या आकाराच्या सोन्याच्या पेट्यांवर मोत्यांचे किंवा

हिरकण्यांचे कोंदणकाम करून त्या पेटया वज्रटिकेप्रमाणें रेशमानें पटवून केलेला अलंकार [ म चिंच+पटी-पेटी ]

**चिंचपटो**—पु (कु ) (अव ) चिंचपटे, चिंचपेटी

**चिंचपानी**—वि चिंचेच्या पानाच्या रुंदीचे काठ असणारा ( धोतरजोडा ) [ चिंच+पान ]

**चिंचमोहर**—पु ( वे ) मेथी, मोहरी, हळद, चिंच यांची चटणी, चिंचेचें चोक्क-त्वक् चिंचेचें पाणी, मिरची, मीठ यांस फोडणी देणें

**चिंच चा)रो**—पु ( गो ) चिंचोका, चिंचेचें बी

**चिंचवणी**—न चिंच कोळलेलें पाणी, चिंचेचें पाणी [ चिंच+पाणी ]

**चिंचळा**—पु १ दिव्याच्या वातींची काजळी, कोजळी २ तेलाच्या दिव्यापासुन पडणारे जळते कण, फुलें यांपैकी प्रत्येक

**चिंचादर**—स्त्री. ( गो ) चिचुंदरी, उंदराची एक जात

**चिंचारा**—पु ( कु ) चिंचोका, चिंचरो पहा

**चिंचावणें**—अक्रि चिवचिव करणें, चिवचिवणें [ ध्व ]

**चिंचि**—स्त्री रानकिडयाचा, रातकिडयांचा आवाज चिम ॰याचा चिंवचिंव शब्द [ ध्व ]

**चिंचिणी**—स्त्री भातात, गवतांत वाढणारें एक रोप ( हें दुभत्या गाईंना खाऊं घालतात ) चिचणी पहा

**चिंचुकली**—स्त्री चिमटा ॰घेणें-अक्रि चिमटा घेणें

**चिंचुदरी, चिंचोंदरी, चिंचुद्री चिंचोंद्रा**—स्त्री १ उंदराची एक जात, उंदरासारखा परंतु आखुड शेपटीचा व चूंचू आवाज करणारा एक प्राणी (याचा कस्तुरीसारखा वास येतो ) २ एक प्रकारचें चक्राकार फिरणारें दारूकाम [ स छुछुंदरी-छुछुंदर-छुछु+उंदर-चिचुंद्र-री -भाभ १८३२ ]

**चिंचुरटी-डी चिंचोरटी-डी**—स्त्री वाग्याच्या जातीची एक वनस्पति

**चिंचुरटें-डें चिंचोरटें डें**—न चिंचुरटीचे फळ 'चिंचुरटयाची भाजी करा '

**चिंचोका**—पु चिंचेतील बीं 'चिंचोका भाजून खातात चिंचोक्याच्या बारीक भुकणीची घोंगडी बुरणुस इ॰कास लावण्या साठीं खळ करितात

**चिंचाणी**—स्त्री ( व ) चिंच दाट कोळून त्यात गूळ, खावन्याचा कीस चारोळी घालून सर्वपित्री अमावास्येस करि तात तो पदार्थ [ चिंच+पाणी ]

**चिंचोंदरा**—वि चपळ हुषार, चुरुचुरु बोलणारा ( मुलगा)

**चिंचोंद्री, चिंचुंद्री**—स्त्री चिचुंदरी पहा

**चिचोर रा छिचार**—वि अचावचा बोलणारा, पोकळ डौल करणारा, दुर्व्यसनी, क्षुद्र, हलकट, विषयासक्त असणारा, हलकट (मनुष्य )

**चिचोरडा**—वि ( व ) क्षुल्लक ( जीव ) 'एवढासा चिचो रडा आहे, पण मोठा हुषार आहे '

**चिचोरा चिंचोरा**—पु ( व ) चिंचोका, चिंचेतील बी, ' मुलें चिंचोरे खेळतात '

**चिचोरी**—स्त्री छिचोर वर्तन, हलकटपणा, क्षुद्रपणा, पोकळ ऐटबाजपणा, पोरकटपणा, स्वभावाचा, वर्तनाचा मूर्खपणा

**चिंचोरी**—स्त्री ( खा ) चिंचोका

**चिंचाळा-ळ**—॰वि निमुळता, हळू हळू अरुंद होत जाणारा, चिवळ, ( हत्तीच्या सोंडेप्रमाणें ) क्रमानें बारीक होत जाणारा

**चिचोळा**—पु दिव्याच्या वातीची काजळी, कोळिष्टक चिंजळा पहा

**चिच्छक्ति**—स्त्री सचेतन तत्त्व, शुद्ध चैतन्य, परमात्मा, बुद्धि मन [ स चित्+शक्ति ]

**चिजपट, चिजवट, चिजरीज**—वि गिचमिड, चिताड ( अक्षरें ), वाईट रीतीनें लिहिलेलें, काढलेलें

**चिट**—क्रिवि निमूटपणें, स्तब्धपणें, मुकाटयानें, चूप ॰राहणें-अक्रि चूप बसणें, राहणें 'मी इतकें बोललों, परंतु तो चिट राहिला '

**चिटकी**—स्त्री हाताचें मधलें बोट व आंगठा याच्या संयोग वियोगानें होणारा आवाज,चुटकी 'शतसहस्र वाजवी ज्या जेवविता माय दवकी चिटक्या । '-मोसयोग ७ ७६ [ध्व का चिटकु चिटिके ] **चिटक्याचे माडव**-पुअव चटक्याचे माडव पहा

**चिटकी**—स्त्री विशिष्ट आकाराचें मातीचें भांडें

**चिटकी**—स्त्री १ मुळयाची शेंग, डिंगरी २ एका विशिष्ट वनस्पतीची शेंग, एरंडाचें बारीक जातीचें बी ३ गवारी

**चिटकुला**—वि ल्हान, चिमुकला, छोटासा [ का चिटि= ल्हान ]

**चिटकें**—न अर्ध्या कोळव्या इतकें किंवा शेराच्या सोळाव्या भागाइतकें माप [ का. चिट्टे ]

**चिटकोबा**—पु मातीचें लिंग 'चिटकोबाला पाटावर बसवा व हळदकुंकु लावा '

**चिटचिट-टा**—क्रिवि दूध काढावयाच्या भांडयात थेंब थेंब गळणाऱ्या दुधाच्या होणाऱ्या शब्दाप्रमाणें वासरू गाईचें दूध पीत असतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें [ ध्व ]

**चिटणी**—स्त्री ( चिटणपासुन नाम ) चिटणें पहा ॰स पडणें-मूल वासरू याच्या नि शेष पिण्यानें ( गाईचे ) क्षीण होत जाणं 'वासरू चिटून चिटून पितें म्हणून गाय चिटणीस पडली [ ध्व ]

**चिटणें**—सक्रि १ कांसेतील, स्तनांतील दूध संपल्यावरहि येंब येंब दूध काढणें, पिळणें 'काय पिटून पिटून ( दूध ) काढ तोस, वासराला ठेव ' २ -न. येंब येंब पिळून काढलेलें दूध [ ध्व ]

**चिटणें**—अक्रि (पालीनें) चिट असा शब्द करणें, पालीच्या आवाजाचा वाचक धातु [ ध्व ]

**चिटनविशी, चिटनिशी**—स्त्री १ चिटनिसाचें काम, अधिकार २ चिटणीसपद्धतीच्या लिहिणें, निश्चळ पत्रें लिहिण्याचें काम

**चिटनवीस, चिटनीस, चिटणीस**—पु पत्रें व पत्रांचे जबाब लिहिणारा सरकारी अधिकारी, सरकारी कचेऱ्यांतील शिरस्तेदाराचा वाचक शब्द [फा चिट=चिठ्ठी+नविस्=लिहिणारा]

**चिटनिशी**—वि १ चिटनिसाच्या खात्यासंबंधी, नोंद णीचें, लिहून घेण्याचें ( काम ) २ चिटणिसाच्या अक्षराप्रमाणें सुंदर, ल्हान ( अक्षर )

**चिटपट, चिटपिट**—क्रिवि खरडलेलें, गिचमिड लिहिलेलें -न खरडलेला, गिचमिड लिहिलेला कागदाचा तुकडा

**चिटपाखरूं**—न कोणीहि ( मनुष्य, पक्षी, जनावर इ० ), ल्हान पाखरू सुद्धां (या शब्दाचा उपयोग नेहमीं नकारणरूपींच करतात ) ' मी त्या वाड्यांत शिरलों तेव्हां मला तेथें चिटपाखरूहि आढळलें नाहीं ' [स कीट+(हि ) पक्षक] ०नसणें–अक्रि पूर्ण शून्यता, शांतता, असणें

**चिटमिटा**—वि. पुटमुटा, पुरपुरता, जेमतेम पुरेल असा

**चिटलिंग चिटू**—पु ल्हान पण हुशार व मोहक मूल [ तुल० इं चिट=चिमुकलें, ल्हान मूल, तरुण स्त्री ]

**चिटलेलें**—वि धार काढून झाल्यावर जोरजोरानें, प्रयासानें पिळून काढलेलें ( दूध )

**चिटवी, चिटी**—वि चिटाचें, चिटानें आच्छादिलेलें, चिटानें केलेलें [ चीट ]

**चिटी**—वि चिटवी पहा

**चिटी-चिठी-चिठ्ठा**—स्त्री १ ल्हानसें पत्र २ लिहिण्याच्या उपयोगी असा कागदाचा ल्हान तुकडा, चिटोरें, कपटा [ स चिट्, हिं चिठ्ठी, तुल० इं चिट ] ०मसाला-ले-पु सरकारी हुकूम पोचविणारास त्यातेकडून मिळणारी पोटगी ' चिठी मसाला मौजे कोलोसे इनाम गाव पैकी सालाबादी जमा आहेत '–मसाप २ १५३ प्रतिवादीस बोलविण्याची फी –बदलापूर ३६३

**चिटुकली**—वि चिमुकली, ल्हान ' आधीं या बाहुलीच रक्षण करायच कशाला आणि ही चिटुकली उद्या तिच रक्षण करणार काय ? ' –सुदे ५८

**चिटू**—पु ल्हान, हुषार मूल [ तुल० इं चिट ]

**चिटूक**—पुन. एका पक्ष्याचें नांव

**चिट्टी-ट्ठी, चिटो-ठी**—स्त्री चिटी पहा १ छोटें पत्र २ हुंडी [ स चिट्=निरोप घेऊन पाठविणें-चिट्टीका-चिटी, –भाअ १८३२; तुo हिं चिठ्ठी, इं चिट् ] **चिठ्ठी उतरणें**–( वर किंवा विषयीं या शब्दयोगी अव्ययास जोडून उपयोग ) मरण्याची सनद मिळणें. ( श्रीमंताची, देवाची इ० )

**चिठ्ठी उतरणें**–एखाद्याकडून पैशाची विलक्षण मदत होणें

**चिठ्ठी-ठ्या टाकणें**–आपल्या मनांत जो प्रश्न असेल त्याची होकारार्थी व नकारार्थी अथवा संभाव्य असतील तितकीं उत्तरें कागदाच्या सारख्या निरनिराळ्या चिठ्ठ्यांवर लिहून त्या गुरफटून देवासमोर टाकून आपल्या प्रश्नाचें बरोबर तें उत्तर देण्यास प्रार्थून त्या चिठ्ठ्यांपैकीं एक ल्हान मुलास उचलावयास सांगून अथवा जीवर पहिल्यानें माशी बसेल अशी चिठ्ठी वाचणें आणि तींत लिहिलेलें आपल्या प्रश्नाचें उत्तर असें समजणें

**चिठ्ठी फिरविणें–माघारें टाकणें**–मरणाचें आमंत्रण नाकारणें, असाध्य दुखण्यांतून बरें होणें.

**चिठडी-चिठोडी, चिटो(ठो)रा, चिटोरें**—स्त्रीपुन कागदाचा लिहिलेला, लिहिण्याकरितां घेतलेला ल्हान तुकडा, कपटा, वरील शब्दांपैकीं चिठडी, चिठोडी हे शब्द चिंधी या अर्थींहि वापरतात [ चिठ्ठी ]

**चिठ्ठ-ठ्ठी**—पुस्त्री १ जमाबंदीचा तक्ता २ जमिन्यावर केलेली मागणी. ३ इनामचिठ्ठी, इनाम जमिनीचा तक्ता ४ ( प्रांतांतील ) पगारदारांच्या पगारवाटणीचा तक्ता ५ ( लावणी हा शब्द पूर्वी जोडल्यास ) लागवड केलेल्या जमिनीचें पत्रक

**चिठ्ठीचपाटी**—स्त्री चिठ्ठी वगैरे, चिठ्ठीचिठ्ठी [चिठ्ठी+चपाटी ]

**चिड, चिडा, चिडचिड्या**—वि १ रेंदाड, चिखलाचा २ चिडखोर

**चिडका**—वि चिडणारा, लवकर रागावणारा [ तुल० का. सिड्डु ]

**चिडखोर, चिढखोर**—वि लवकर चिडणारा, गरम होणारा, रागावणारा [ चिडणें+खोर ]

**चिडचिड**—स्त्री १ थोडक्या जागेत पुष्कळ माणसें, पदार्थ असल्यानें होणारी दाटी, गर्दी, अडचण. २ चिकचिक, रेंदाडपणा ३ ( घाम आल्यानें ) शरीराचा चिकटपणा, चिबचिब ३ कुरकुर.

**चिडचिडणें**—अक्रि १ चिखलानें युक्त, रेंदाड होणें (जमीन जागा इ०) २ चिकट होणें, चिडचिडीत होणें (डोळे, शरीर इ०) ३ चिडणें, त्रासणें

**चिडचिडा**—वि १ चिपळाचा, चिखलानें युक्त असा, रेंदाड २ त्रासिक, चिडणारा, चिडखोर.

**चिडचिडीत**—वि १ चिखलानें युक्त, रेंदाचा, निसरडा २ (घामानें) चिकट झालेलें (डोकें, शरीर), चिपचिबीत

**चिडचिड्या**—वि चिडखोर, तिडतिडा, त्रासिक [चिड चिडणें]

**चिडचीड**—स्त्री दाटी, गर्दी

**चिड(ढ)णें**—अक्रि १ चीड, राग येणें, कावणें, सतापणें २ फोड झालेल्या, सडलेल्या जागेंतून, मास वगैरे वर येणें उभ रणें, उतणें [तुल० हि चीडना=रागावणें, का सिडि=रागावणें, सिट्टु=राग]

**चिडमिड**—स्त्री अतिशय दाटी, गर्दी, गोंधळ, गर्दीपासून उत्पन्न होणारा संकुचितपणा, अडचण

**चिडमिडणें**—अक्रि चिडमिड करणें, अग फिरविणें, हलणें, सरणें (गर्दीत, दाटींत) [का चिडुकु=हलविणें, ढवळणें]

**चिड(ढ)रा**—वि चिडका, चिडखोर, चिडचिड्या, तिड-तिडया [चिडणें]

**चिड(ढ)वणी**—स्त्री खिजवणी (एखाद्यास) कुत्सित बोलून, त्याचें वर्म काढून राग आणणें, चिडविणें [चिडणें] ०च्या **गोष्टी**-स्त्रीअव राग, संताप चीड आणणाऱ्या गोष्टी. ०चें **भाषण**-न मनोवृत्तींना चालना देणारें भाषण, चेतविणारें भाषण, राग आणणारें भाषण.

**चिडविणें**—सक्रि चेतविणें, खिजविणें, चीड, राग, संताप येईलसें बोलणें

**चिडा**—न. चिमणी, पाखरू -पदलापूर १२८.

**चिडाणी**—स्त्री १ कटिर, कटिरी जागा क्रोधाचें प्रबल भरलें। भरी द्रैपाचिया तरियातें। असूया तिरस्काराची तेथें। चिडाणी उते अतिरति।'-एभा २ ९७ २ कुजकेपणा, कुजणें, 'अन्नाचिया चिडाणीं। पीडती पशुपक्षिप्राणी।'-एभा २३ ८५१ ३ घाण, कुपात्र, घाणेरडें भांडें 'जे का दुर्गंधाची पोहणी। जे उतली चिडाणी विष्टेची। -एभा २६ २०३

**चिडिकामिडी चिडिमिडी**—स्त्री दाटी गर्दी, चेगरा चेंगरी गोंधळ [का चिडुपु=चेंगरणें, चिडुगोडु=अन्यवस्था]

**चिडी**—स्त्री (व) चिमणी एक प्रकारचा टिनचा ल्हानसा दिवा चिडी लाव म्हणजे उजेड पडेल'

**चिडी चिडिया**—स्त्री चिमणी. 'काळी चिडी काकण घारी'-एभा १० ५८१ 'तेणें ते चिडी हाता घडनि शिळेवरि उपटिली।'-पच १४० चिडया चिमणे कावळे।'-दावि २४४ [हिं चिडिया तुल० स चटका]

**चिडीकामिडी**—स्त्री चिडिकामिडी पहा

**चिडीमिडी**—स्त्री चिडिकामिडी पहा

**चिड्**—क्रिवि (वे) वाढ खुटलेलें 'भात चिड् धरलें' =भात थबावलें भाताची वाढ खुटली

**चिढखोर, चिढणें चिढरा, चिढवणी**—चिडखोर इ० पहा

**चिणका, चिणकारा**—पु १ फणकारा, संताप, रागाचा झटका, क्रोधावेश (क्रि० येणें, लागणें). २ तिटकारा, किळस, शिसारी (क्रि० येणें) [ध्व]

**चिणका-क्या**—वि चिडका, चिडखोर, रागीट

**चिणकारणें**—अक्रि रागाचा, संतापाचा झटका येणें. [चिणका]

**चिणकुला**—वि (विद) चिमकुला, ल्हान, चिमकुला [का चिण्ण=मूल]

**चिणचिण**—स्त्री १ (उष्णतेनें, उन्हानें होणारी) चुण-चुण, आग २ धुसफुस, रागाची कुरकुर, चडफड, फणफण 'क्रोधें करी चिणचिण। ता येक पढतमूर्ख।'-दा २ १० ३३ 'सोसवेना चिणचिण केली। तेथें तामस वृत्ती दिसोन आली।' -दा १९ ७ ५ [ध्व]

**चिणचिण-णि**—क्रिवि रातकिड्याच्या शब्दासारखा शब्द करून [ध्व]

**चिणणें**—सक्रि वीट, दगड, इ० रचून बुजविणें (दार, खिडकी इ०), 'धर्माचा दारवटा दडतर चिणिला हा कशी फार खोटा।'-निमा १५७ २ (वीळ इ०कात) दगड, माती ठोकून भरणें ३ ठासणें (ल्हानशा जागेंत माणसें, सामान), कोंबणें, चेंदणें ४ जिवत गाडणें (एखाद्या माणसाला भिंतीच्या पोकळींत जुलमानें घालून), भिंत बाधून काढणें ५ ठार मारणें ६ चेतविणें, खिजविणें, चिढविणें

**चिणाचीण**—स्त्री अनेक खिडक्या, बिळें इ० बुजविण्याचें काम, कृत्य

**चिणो**—पु (गु) राळा -कृपि २९३

**चिणोरा**—वि चिमुकला, ल्हानुला, ल्हानसा [का चिण्ण=मूल]

**चित्**—स्त्री ज्ञान, बुद्धि, चैतन्य शुद्ध ज्ञान-चैतन्यरूपी ईश्वर, ब्रह्म आत्मा, मन [स चित्=ब्रह्म आत्मा, चैतन्य ज्ञान]

**चित्**—न (गो) मन चित्त पहा

**चित**—वि उताणा पाठीवर निजलेला चीत पहा ०**करणें**-सक्रि उताणा पाडणें, कुस्तींत जिंकणें [हिं चित=उताणा]

**चितक**—वि चिंतणारा, चिंतन करणारा, इच्छिणारा, मनात आणणारा, बाळगणारा, (समासात) शुभचिंतक, अभीष्ट चिंतक, अनिष्टचिंतक इ०. [स चिन्त्=विचार करणें]

**चितकपडा**—स्त्री (खेळात) उताणी पडलेली कवडी (याच्या उलट पडी कवडी)

**चितग, चितांग**—पु स्त्री (स्त्रा) स्त्रियांच्या गळ्यातील सोन्याचा, चांदीचा पट्टीसारखा एक दागिना चिताक पहा.

**चितड**—वि गिचमिड लिहिलेलें, खरडलेलें, खोडाखोडी केलेलें, काट मारलेलें (लिखाण)

**चितणी चितणूक**—स्त्री चिंतन करणें, विचार करणें, (गुरुच्या उपदेशाचें) मनन करणें [ स चिन्त् ]

**चिंतणें**—उक्रि १ चिंतन, विचार करणें, मनांत धरणें योजणें 'तुम्ही अंक चिंता, मी प्रहरभर चिंतितों पण कांहीं सुचत नाहीं' २ मनन करणें (कांहीं एक गोष्ट कशी होईल, कशी करतां येईल इ० सर्वंधानें) विचार करणें 'लग्न कसें होईल हें मी चिंतीत होतों' ३ इच्छिणें, देवाजवळ मागणें (कल्याण, शुभ, अकल्याण इ०) 'समस्तही चिंतू लागले। रघुपतीस कल्याण।' ४ मनांत रचणें, कल्पिणें, धरणें, काढणें 'चिंतिला मनोरथ पूर्ण होय। एक आवर्तन करिताचि।' ५ (शिकलेला, ऐकिलेला विषय) मनात घोळविणें, मनन करणें ६ वेत करणें, योजणें 'चिंतण घडेना पदरीं पडेना' [ स चिन्त्=विचार, मनन करणें ]

**चिंतन**—न मनन, ध्यान, विचार करण्याचा व्यापार; ध्यास [ स चिन्त् ]

**चितनिका, चिंतनी चिंतना**—स्त्री मनन, ध्यान, विचार (विशेषत गुरूनें शिकविलेल्या गोष्टी मनात साठविण्या साठीं), मनन, चिंतन करणें

**चिंतनीय**—वि मनन, ध्यान, विचार करण्यास योग्य, ज्याचें ध्यान मनन, चिंतन करावयाचें तें [ स चिन्त् ]

**चितपावन**—पु कोंकणस्थ ब्राह्मण [ क्षेत्र+पावन-चेत्तपावन-चितपावन=परशुराम क्षेत्राला पवित्र करणारे, किंवा क्षिति+पावन-चिति+पावन-चितपावन=पृथ्वीला पवित्र करणारे, -भाम १८३२, चित्तपोलन=चिपळोणचे राहणारे ]

**चितय**—स्त्री अजगरासारखें एक जनावर हें आकारानें मोठें, मंद व निरुपद्रवी असतें २ ज्याचा रंग पिवळा फार गरीब, डोक्यावर कुकवासारखा टिळा गाईच्या तोंडासारखें तोंड, चावत नाहीं अशा सर्पाची एक जात —बदलापूर ३४७

**चितरकथी-थ्या**—वि पौराणिक कथांचीं चित्रें काढून त्यांवरून कथा सांगणारी एक जात किंवा तींतील व्यक्ति चित्रांचें विवरण करणारा [ स चित्र+कथ् ]

**चितरणें**—उक्रि १ चित्रांनीं आकृतींनीं आच्छादणें (जमीन भिंत इ०) (जमीनीवर भिंतीवर) चित्रें काढणें 'हृदयभिंति वरी चितरावा।' —दावि २७२ २ (कागदावर) रेघोट्या फराटे मारणें ३ वाईट रीतीनें चित्रें, आकृती इ० काढणें ४ (वाऱ्यानें) आकाश बारीक ढगांनीं आच्छादित करणें [ स चित्र, चित्र् तुल० हिं चितरना ]

**चितरणें**—अक्रि १ (जमीनीवर भिंतीवर) चित्रें, आकृती काढणें, २ (कागदावर) खरडणें, रेघोट्या, फराटे काढणें ३ (चित्रांतील रेषाप्रमाणें) बारीक बारीक धारांचा पाऊस पडणें, झिमझिम पाऊस पडणें

**चिंतवणी**—स्त्री १ काळजी, चिंता, 'तुम्हांचि तयाची चिंतवणी। मजचि पडली।' —ज्ञा ९ ३३८ 'हा निरोधु सांडावयालागीं। धैर्याचिया चागचागीं। चिंतवणी जितीं आंगीं। वाहे जो कां।' —ज्ञा १८ ६३८ २ ध्यास लावणारी गोष्ट

**चिंतवणें**—न चिंतन मनन करण्याची क्रिया 'अया सर्वत्र सर्वपणें। सर्वांही काळीं असणें। जें पावूनि चिंतवणें। हिंपुटी जाहलें।' —ज्ञा १२ ४३

**चिंतवन**—स्त्री, चिंता, काळजी 'पाडियेलों वनीं थोर चिंतवनीं। उशीर का अझूनि लाविंयेला।' —तुगा १६०६ [चिंतन]

**चितवृत्ती**—स्त्री मन स्थिति, चित्तवृत्ति —शर [स चित्त+वृत्ति ]

**चितळ**—पु न अंगावर ठिपके असलेले, आखूड शिंगाचें किंवा बिनशिंगाचें हरिण, चित्रमृग; 'एकत्र मृग व्याघ्र चितळ।' —दाव १४२ **चितळी**—वि चित्रमृगाच्या रंगाचा, चित्रमृगा सारखा (प्राणी) 'एके मोहरीं मोरी पारडीं। एके वाघी चितळी पुढीं।' —दाव २८१ [ स चित्रल=चित्रविचित्र ]

**चिता**—स्त्री प्रेतदहनासाठीं रचलेला लांकडाचा ढीग, सरण [ स चिता ] म्ह० 'चितेपेक्षा चिंता कठीण' ०भस्म—न चितेंतील राख ०भूमि—स्त्री स्मशान, ज्या जागेवर प्रेत जाळ तात ती जागा

**चिता, चितेवान**—चित्ता, चित्तवान पहा

**चिंता**—स्त्री १ काळजी, फिकीर; विवंचना, हुरहुर २ चिंतन, विचार करणें, मनन करणें इ० चिंतन पहा ३ हरकत, अडचण, 'आम्हासही नाहीं स्वप्नीं दुश्चिता। प्रत्यक्ष बोलतां काय चिंता।' —तुगा १२३३ [ स ] (ग्राम्र) **चिंता नाहीं**—हरकत नाहीं (एखाद्या वस्तूची, माणसाची) **चिंतावणें**—अक्रि काळजी करणें, काळजींत पडणें, विवंचनेंत पडणें, चिंताकुल होणें, 'मग सुभद्रापति चिंतावला।' —जे १५ ३३ तसचि सुत त्याजला म्हणुनि फार चिंतावला।' —तिमा ३ १४ **चिंता वाहणें**—एखाद्याची सुस्थिति, उत्कर्ष कसा होईल याचा विचार करणें सामाशब्द—**चिंताकुल चिंताक्रांत चिंताग्रस्त चिंतातुर, चिंतान्वित**—वि काळजीनें ग्रासलेला, खंगलेला, गांजलेला **चिंताग्नि—चिंताज्वर**—पु पराकाष्ठेची काळजी घोर चिंता, चिंतारूपी अग्नि ज्वर, ताप 'जळतो चिंताग्नीमीतरीं। मेघ सकरी वर्षें तू।' ०मणि—पु १ चिंतिलेलें इष्ट वस्तु देणारें स्वर्गीय

रत्न, 'कां चिंतामणि जालया हातीं । सदा विजयवृत्ति मनोरथीं ।' –ज्ञा १ २४ २ गणपति, गणेश 'धुंडी विनटला तुझ्या चरणीं । दयाळ्व तू चिंतामणी ।' –चिंतामणीविजय २ ६ ३ परीस, ज्याच्या स्पर्शानें लोखंडाचें सोन होतें तो कल्पित दगड 'चिंतामणीचा होता स्पर्श । सुवर्ण करी लोहांश । –गुच ५ ६८ ४ (उप ) चिंचवणी, चिंचेचें पाणी ५ –वि ज्याचे मानेवरील केस खुरापर्यंत लांब आहेत असा (घोडा) –मवाप २ ५६ ०रत्न–न चिंतामणी, एक रत्न 'से पाषाणही आघवे । चिंता रत्नें कां नोहावें ।' –ज्ञा १८ १६४३ ०रोग–पु काळजी हा एक रोग, काळजीरूपी रोग 'चिंतारोगें जन ऐसे क्षीण काय होतात।' –मोआदि १२ ८५ [ चिंता+रोग ] चिंतार्णव–पु काळजीरूपी समुद्र, निरनिराळया पुष्कळ गोष्टींची काळजी [ स चिंता=काळजी+अर्णव=समुद्र ]

चिंताक–चिताक—पुस्त्री हा अलंकार सोन्याचा असून मराठे लोकांतील स्त्रिया वापरतात. याचा आकार पट्टयासारखा असून तो गळयात सरीसारखा घालतात नाचाच्या वेळींहि तो गळयात दागिना होता, परंतु आठव्या शतकाच्या सुमारास तो कमरेचा दागिना होता असें दिसतें. ' चिंतिका कटिशृंखला ' –हारावली 'तसेंच (त्याचा) आकार पट्टयाप्रमाणें नसून साखळीसारखा होता.' –मसाप २ ३८ 'फिटला चिंतेचा अभिलाख । म्हणोनी न घाली चिताक । कृष्णपदींचा पदाक। तचि पदक हृदयींचें। '–एरुस्व ७ ३७ 'सरी चिताक भोंवरी । अलंकाराचिया परी । नामें झालीं दुरी । एक सोनें आटिता ।' –तुगा ३७७५ [ स चित्र+अंक–अंकन, रेखा ]

चिताग—पु ( खा ) चिताक पहा 'नवरीचा चिताग अन वाकरवाळया गहान टाकीसन रुपये कहाडीन '

चिताड, चितड, चिताडगुतार—वि गिचमिड लिहि लेलें, डाग पडलेलें, रेघोटया, फराटे ओढलेलें [ चितरणें ]

चिताड—क्रिवि ( कुण ) पूर्णपणें चीत 'कायदा फास झाला कीं रयत चिताड मेली ' –खेया १३.

चितारणी—स्त्री चित्रें काढणारी स्त्री 'अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी । तेथ चितारणी हे त्रिपुटी । प्रसिद्ध जे कां। ' –ज्ञा १८ ४६०

चितारणें—सक्रि चितरणें पहा 'जे सुखें चितारूनिया। फळती दुःखें।' –ज्ञा १४ २६२ 'नाना चित्रीं चिताराव्या । तैंच चित्रें।' –दा १९ १ १९

चितारी—पु चित्रें काढणारा, चित्रकार, चित्रें रंगविणारा [ स चित्रकार, तुल० हिं चितेरा ]

चितावणें—सक्रि १ जागे करणें, सूचना देणें २ चिड विणें, त्रास देणें, खोडी काढणें, सतावणें [ स चित्; तुल० हिं चितावना=सूचना, इशारा, आठवण ]

चिति—स्त्री सहा काटकोन–चौकोनी पृष्ठांनीं मर्यादित अस लेली घनाकृति उदा० पुस्तक, पेटी, चौकोनी ओटा इ० [ सं ची=गोळा करणें ]

चिति—पु विशिष्ट आकाराच्या विटा मांडून तयार करा वयाची यज्ञवेदि चयन पहा

चिंतित—वि चिंतिलेलें, मनांत आणलेलें, मनन केलेलें. [ सं चिंतित ]

चितो—स्त्री बुरा, बुरसा, बुरशी 'अन्न बरेच दिवस राहिलें तर त्यावर चितो येते ' चितेणें–अक्रि पांढऱ्या बुरशीनें युक्त होणें, बुरसणें [ चित्र ]

चितोडा–ड—पु. घोडयाचा एक रंग, पाढऱ्या अंगावर तांबडे ठिपके असलेला ( घोडयाचा ) रंग, तद्विशिष्ट घोडयाचा प्रकार –अश्वप १ २७ [ स चित्र ]

चितोडी—वि चितोड गांवासंबंधीं, चितोडचा उदा० चितोडी रुपाया

चित्कला–ळा—स्त्री १ प्राण्याचें सचेतनत्व, ज्ञानशक्ति, चैतन्य ' जे त्रिभुवनपतीची चित्कळा । ब्रह्मांडमाळा घडी मोडी । ' २ जीवनकला, जीव ' तू प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा । मैत्रियेचि चित्कळा । धनुर्धरा ।' –ज्ञा ४ २९ [ स चित= ब्रह्म, चैतन्य+कला=अंश ]

चित्कलि(ळि)का—स्त्री चैतन्यकालिका, ज्ञानरूप ज्योति. ' अर्जुनालागीं चित्कळिका । उजळलिया श्रीकृष्णें । ' –ज्ञा ११ १७८ [ स चित्=चैतन्य+कलिका=कळी ]

चित्त—न मन, अन्त करण, बुद्धि, वृत्त्यात्मक अन्त करण पंचकातील चवथा अवयव, मनोवृत्ति विकार, भावना राग इ० कांचें अधिष्ठान मानलेलें हृदयस्थान 'जे वस्तुचा निश्चयें केला । पुढें तेंचि चित्तु लागला । तें चित्त बोल्लिया बोला । येथार्थ मानावें।' –दा १७ ८ ८ [स ](वाप्र) ०उडून जाणें–अक्रि १ घाबरणें, उदास होणें, मन न रमणें (कर्त्याची षष्ठी असते) 'तें ऐकून महाराजांचें चित्त उडून गेलें '–चद्र १३४ २ एखाद्या गोष्टी विषयीं मन विटणें नावड उत्पन्न होणें ०पुरविणें–वि लक्ष्य देणें, लक्ष्यपूर्वक ऐकणें. चित्तात खाणें–अक्रि मनास लागणें, वाईट वाटणें सामाशब्द– ०क–वि हुषार, चलाख, अल्पवयस्क असून मोठया विषयाकडे चित्त लावण्याचा स्वभाव ज्याचा तो चित्तंगम–वि हृदयंगम, मनोवेधक, हृदयस्पर्शी माझीं मी निवडूनि अर्पिलि फुलें अत्यंत चित्तंगम । '–टिक१५२ ०गेह–न हृदयरूपी घर मन हेंच घर, मन विकल्प प्रवेशला ते समयीं । चित्तगेहीं कैकेयीच्या । '–रावि ९ १६१. [ स चित्त+गेह=घर ] ०चतुष्टय–न मन, बुद्धि, चित्त व अहंकार या चारांचा समुदाय

' चित्तचतुष्टय शाहाळिका । कोंभेजेतो । ' –ज्ञा १५ ९७ 'चित्त चतुष्टय चमत्कार । मन बुद्धी चित्त अहंकार । ' एभा २२ ३५० –एभा १.११२ [स चित्त=मन+चतुष्टय=चारांचा समुदाय] ०चमत्कार–पु आश्चर्य, अचंबा, आनंदाश्चर्य [सं चित्त+चमत्कार] ०चाळक–वि १ इच्छेचें, मनोवृत्तींचें नियमन करणारा (ईश्वर). ' चित्तचाळक विदेशरण । तो हरि माझ्या मनीं भरला । ' ' जयजय सकळ चित्तचाळका । ' २ मन रमविणारा; मनोरंजक, मन चाळविणारा, विकारयुक्त करणारा [सं चित्त+चालक] ०चोर–चोरटा–वि मन हरण करणारा; चित्ताकर्षक [स चित्त+चोर] ०ज–पु मदन, कामदेव, मनांत जन्मणारा (मदन) [सं चित्त=मन+ज=जन्मणारा] ०जडसंयोग–पु. आत्मा आणि शरीर यांचा संयोग [स चित्त=चैतन्य+जड=स्थूल (शरीर, देह)+सम्+योग=एकत्र येणें] ०निग्रह–पु मनाचें संयमन, नियमन, मन ताब्यांत ठेवणें (स चित्त+निग्रह=ताब्यांत, दाबांत ठेवणें] ०निर्वृत्ति–स्त्री. मनाची शांति, चित्ताची विश्रांति [स चित्त+निर+वृत्ति] ०पावन–पु चितपावन पहा ०पोळ्या–पु चितपावनांना तुच्छतेनें, उपहासानें संबोधण्याचा शब्द ०प्रसन्न–वि समाधानी, संतुष्ट, शांत चित्ताचा [स चित्त+प्रसन्न=तुष्ट, शांत] ०भ्रंश–पु. १ मानसिक शक्तींचा भंग, म्हातारचळ. २ देहभानाचा नाश, चित्तभ्रम, डोकें ठिकाणावर नसणें, डोकें फिरणें [स चित्त+भ्रंश] ०भ्रामक–वि मनाला मोहून टाकणारा, चित्ताकर्षक, मन वेडें करणारा [स. चित्त+भ्रामक] ०लहरी–स्त्रीअव मनस्तरंग, मनाची हुक्की, मनोविकार, मनाचे छंद, तरंग, विलास इ० ' ब्रह्मानंद सागरीं । विराल्या चित्तलहरी । ' [स चित्त=मन+लहरी=लाटा, तरंग] ०विभ्रम–पु मन बहकणें, बुद्धिभ्रंश, मन ठिकाणावर नसणें [स चित्त=मन+वि=विरुद्ध+भ्रम=फिरणें] ०वृत्ति–स्त्री १ लक्ष्य, मन चित्तवृत्ति ठिकाणीं नाहीं फिरली, बदलली, उडून गेली ' २ मनाच्या लहरी, तरंग, परिभ्रमण, वगैरे चित्तवृत्ती घटकेघटकेंत पालटतात ' [स चित्त=मन+वृत्ति=वर्तन, वागणें, असणें] ०वेधक–वि मन आकर्षिणारा, मन हलवून सोडणारा, अन्त करणास भिडणारा, हृदयंगम, [स चित्त+वेधक=वेधणारा] ०वैकल्य–न मनोभ्रम, बुद्धिभ्रंश, मन बहकून जाणें. [स चित्त+वैकल्य=विकलता, भ्रम, पशुपणा] ०शुद्धि–स्त्री मनाचा शुद्धपणा, पवित्रपणा, मनाचें रागद्वेषादि वाईट भावनांपासून अलिप्त राहणें ' चित्तशुद्धि नसलिया जाणा । एकांतीं मांडिती देवार्चना । पुढें आठवी मन कामना । तें रानोरान हिंडवी । [स चित्त+शुद्धि] ०संकोच–पु १ मनोनिग्रह, मनावरील दाब २ (विनयामुळें होणारा) मनाचा लाजाळूपणा, भिडस्तपणा, शालीनता [सं चित्त+संकोच=आखुडपणा, भिडस्तपणा] ०समाधान–न मनाचें स्वास्थ्य, चित्ताची शांति, संतुष्टता [स चित्त+सम्+आ+धा=धन] ०स्थैर्य–न मन स्वास्थ्य, मनाची स्थिरता, शांति [स चित्त+स्थैर्य=स्थिरता] ०हीन–वि मन ठिकाणावर नसणारा, मनावर योग्य संस्कार नसलेला, अप्रबुद्ध ' तें आघवेंचि गेलें वाया । जे चित्तहीन । ' –ज्ञा ९ १७८ [स चित्त=मन+हीन=टाकलेलें, वाईट शून्य] चित्ताची आर्द्रता–स्त्री मनाचा कोंवळेपणा, चित्ताची मृदुता चित्तायिला–वि सजीव, विचारी, चित्तप्रसन्न ' मा मी तव चित्तायिला । आणि श्रीगुरु ऐसा दाटुला । ' –ज्ञा १८ १७३२ चित्तैकाग्र्य–न मनाची एकाग्रता एकतानता [स चित्त+ऐकाग्र्य=एकाग्रता]

चित्तळ—पु चितळ पहा

चित्ता—पु वाघाच्या जातीचें एक जनावर, चिक्या, चिवट, चिवळ्या वाघ, याच्या अंगावर ठिपके असतात हा रानावनांत, झुडपांत, डोंगरांत वस्ती करून असतो हा अत्यंत चपळ व सावध असून अत्यंत क्रूर व हिंस्र पशु आहे हिंदुस्थानात हा मनुष्य-भक्षक प्राणी म्हणून प्रसिद्ध आहे. [स चित्रक, प्रा चित्तओ, हिं चीता, गु चित्तो, फ्रेंजि चिचइ=मांजर]

चित्तेवान—पु राजाच्या, सरदाराच्या संग्रहाला असलेल्या चित्त्यांची निगा राखणारा अधिकारी

चित्पावन, चित्तपावन—पु चितपावन पहा

चिंत्य—वि विचार करण्यास योग्य, मननीय, लक्ष्यांत घेण्याजोगा, विचार, मनन, करण्यास योग्य, आवश्यक, शक्य [स चिन्त्+य]

चित्र—न १ रंगीत तसबीर, रेषांनीं रंगांनीं दगड, कागद, धातूचीं भांडीं इ०कांवर काढलेली, किंवा माती इ०द्रव्यांनीं बनविलेली मनुष्य, जनावर, काहीं पदार्थ, देश इ०कांची आकृति २ पत्त्याच्या डावांतील गंजिफांतील चित्रांपैकीं (राजा, राणी, गुलाम, यांपैकीं) एक ३ चित्रविचित्र रंग. ४ मृगजल ५ आश्चर्य, नवल ' द्रोणवधें रिपु मानिति जय मानूं या, न चित्र हें तोही । ' –मोकर्ण २ ५ ६ विचित्रपणा, विचित्रपणाचे चाळे मातें पाहुनि चित्र काय करिता कां पां ! तुम्हीही असे । ' –आसु ४२ –वि १ आश्चर्यकारक, चमत्कारिक २ निरनिराळ्या रंगाचा, बहुविध, नानाप्रकारचा 'दिसों लागलीं चित्र चिन्हें सुखाचीं । ' सामाशब्द– ०क–पु. १ चित्ता, चिवळ्या वाघ २ एक औषधी वनस्पति ३ चित्रकार, चितारी 'गर्विष्ठ चित्रक शस्त्रधारी ' –गुच ३६ ६७ ४ एक प्रकारचें रत्न, बेरंग, तोरं [स चित्रक] ०कथी–थ्या–पु पुराणांतील राजांचीं, देवांचीं, वीरांचीं चित्रें दाखवून त्यांचें विवरण करून, त्यांच्या दंतकथा सांगून, त्यावर उपजीविका करणारा मनुष्य चितरकथी पहा [चित्र+कथणें] ०कला–स्त्री चित्रें काढण्याची कला, सृष्टिसौंदर्याचें अगर एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचें

किंवा एखाद्या व्यक्तीचें हुबेहुब चित्र कागदावर अगर सपाट फलका वर काढणें या कलेस चित्रकला म्हणतात 'चित्रकलेची ललितकला मध्यें गणना आहे ' ०काई-वि अपूर्व देहाचा, ज्याचें विचित्र शरीर आहे तो [स चित्र+काय=देह, शरीर] ०कार-पु चित्रें काढणारा, चितारी, चित्रें बनविणारा [स चित्र+कार=करणारा] ०काव्य न ज्यात ध्वनि अथवा व्यंग्यार्थ नसून केवळ शब्दांच्या रचनेची चमत्कृति मात्र असते असें काव्य [स चित्र+काव्य] ०गुप्त-पु १ मनुष्यमात्राची पापपुण्याची नोंद ठेवणारा यमाच्या दरबारातील फडणीस २ (ल) हिशेबाच्या, लिहिण्याच्या कामात तरबेज असलेला मनुष्य, कलमबहाद्दर (उप.) लोकांची गुप्त व निंद्य कृत्यें दुष्ट हेतूनें पहात असणारा [स चित्र+गुप्त= रक्षिलेलें, कोणास न कळणारें] ०पट-पु चित्रें काढलेलें कापड, नकाशा, सिनेमाची फिल्म [स चित्र=तसबीर+पट=वस्त्र] ०मणी-पु ठिपक्यांनीं युक्त असें रत्न ' नीलमणी हे कण सोन्याचे चित्रमणी तिकडे । ' -टिक ४८ [स चित्र=चित्रविचित्र+मणी= रत्न] ०भंगी-वि एका किंवा तीन पायांनीं पांढरा असलेला (घोडा) -अश्वप १९८ हा अशुभ मानितात अरजल-जली-जल पहा ०मार्ग-पु. (वादन) दोन मात्रा प्रमाणाचा ताल [स चित्र+मार्ग] ०मूळ-स्त्री एका वनस्पतीचें नाव [स चित्र+ मूल=मूळ] ०योग-पु मातीचीं चित्रें तयार करण्याची कला [चित्र+ योग] ०रथ-पु एका गंधर्वाचें नाव ' चित्ररथु मी गंधर्वा । सकळिकामाजी ।' -ज्ञा १० २३६ ०रेखा-स्त्री १ चित्राची रूप रेषा, बाह्यरेषा, आराखडा २ एका सुंदर स्त्रीचें नाव उषेची दासी ३ चित्रासारखी जिची रूपरेषा आहे अशी सुंदर स्त्री. ०लेखन-न चित्रें काढण्याची कला, चित्रें काढणें ' कृषिकर्मशास्त्र किंवा चित्रलेखन हे विषय घेऊन जे परीक्षा देतील त्यांसच नोकरीस लायक समजलें जाईल ' -रसापु १ [स चित्र+लेखन=लिहिणें] ०लेखसृष्टि-स्त्री चित्रकाराची सृष्टि, चित्रसृष्टि [स चित्र+लेख+ सृष्टि=जग] ०लेप-पु १ गोपीचंदन अथवा गंधगोळ्या यांची केलेली मूर्ति ' ताम्याचे देव चित्रलेप । ' -दा १९५१ २ तसबीर, भिंतीवर काढलेलीं चित्रें ' तटस्त जैसी चित्रलेपें । ' -वेसीस्व ५७ [स चित्र+लेप=लिहिणें, लिंपणें, चोपडणें] ०वज्रतुंड-न एक प्रकारच्या रत्नाचें नाव [स चित्र+वज्र+ तुंड] ०विचित्र-वि चमत्कारिक निरनिराळ्या रंगाचें आश्चर्य-कारक, नानाविध [स चित्र+विचित्र] ०शाकापूपभक्ष्य-विकारक्रिया स्त्री नाना प्रकारच्या भाज्या पक्वान्नें इ० तयार करण्याची कला [स चित्र=नानाविध+शाक=भाजी+ अपूप=अनरसा, घारगा इ०+भक्ष्य=खाद्य पदार्थ+क्रिया=कर ण्याची कला] ०शाळा-स्त्री चित्रसंग्रहाचा दिवाणखाना [स चित्र+शाला] ०संग्रहालय-न म्युनिसिपालिटीसारख्या संस्था सौंदर्य, कला, मनोहर रंगकाम, आकृतिविशेष इ०कानीं युक्त, मानवी विचारांचीं व कल्पनांचीं स्थित्यंतरें दाखविणारीं चित्रें लोकांना पाहण्याकरितां ज्या ठिकाणीं संग्रहित करून ठेवितात तें ठिकाण [स चित्र+संग्रह+आलय] चित्राचें बाहुलें-न उप ज्यास बाहुल्याप्रमाणें वागवितां येतें असा आश्रित मनुष्य चित्रासारखा-वि (ल) स्तब्ध, मूक, निश्चल चित्रासारखें चालणें-बोलणें-हसणें इ-क्रिक्रि सुंदर, मधुर, मनोहर चालणें, बोलणें, हंसणें इ० चित्रित वि १ चित्रांनीं युक्त, ज्यावर चित्रें काढलीं आहेत असा २ स्तंभित, दिङ्मूढ, आश्च र्यानें थक्क, चकित झालेला [स चित्रित] चित्रींव-वि चित्रा तील, चित्रांत काढलेलें; चितारलेलें ' आण पोकळीचे पेंडवळें । आणा चित्रींव फळें । धीर हे देखें । ' -ज्ञा ११ ४६४. [चित्र] चित्रींचा लेख-लेप-पु १ भिंतीवर काढलेलें चित्र 'चित्रींच्या लेपें उठीउठी । प्रळय चपळा मासिली । ' २ (ल) देखण्या मनुष्यास व प्राण्यासबंधीं म्हणतात, सुंदरी, सुंदर स्त्री

**चित्रा**—स्त्री सत्तावीस नक्षत्रांपैकीं चवदावें नक्षत्र [स] म्ह० पडतील चित्रा तर भात न खाय कुत्रा=चित्राच्या पाव सानें धान्याची समृद्धि होते त्यास अनुलक्षून ही म्हण आहे. चित्राचें ऊन न चित्रा हें पर्जन्यनक्षत्र असताना पडणारें ऊन हें रूक्ष व कडक असतें याचे कांहीं आश्चर्यकारक गुण सांगतात उदा० उचीं वस्त्रें या उन्हांत तापविलीं तर त्यांना कसर लागत नाहीं हरिणाच्या पाठी (ह्या उन्हानें) काळ्या होतात

**चित्रान्न**—न १ खिचडी. २ साखरभात [स चित्र= रंगीबेरंगी+अन्न]

**चित्रालंकार**—पु साहित्यशास्त्रांतील एका अलंकाराचें नाव याचे दोन प्रकार आहेत-(१) प्रश्नवाक्यांतच उत्तर असतें तो (२) दोन किंवा अधिक प्रश्नांना एकच उत्तर असतें तेव्हां होतो तो

**चित्रावती, चित्राहुति चित्राथी चित्रावथी**—स्त्री अव भोजनारंभीं ब्राह्मणादि पात्रास परिषेक केलेल्या परिषेकाच्या बाहेर उजव्या बाजूस देवतांना उद्देशून जे भाताचे लहान घास ठेवतात ते त्यांची संख्या संप्रदायपरत्वें दोन ते पांचपर्यंत असते [स चित्राहुति]

**चित्राविणें**—सक्रि चितरणें पहा

**चित्रास्वाती**—स्त्री सत्तावीस नक्षत्रांतील चवदावें व पंधरावें नक्षत्र चित्रा आणि स्वाती या पर्जन्यनक्षत्रांचा पाऊस [चित्रा+ स्वाती] म्ह० पडतील चित्रास्वाती तर पिकतील माणीकमोतीं पण कापूस न मिळे वातीं=चित्रा आणि स्वाती या नक्षत्रांत पाऊस पडेल तर धान्याची अतिशय समृद्धि होईल, पण कापसाचें पीक मात्र बुडेल.

**चिन्नाहुति चिन्नायती(थी), चिन्नाथी**—स्त्री चिन्नावती पहा [स चित्र=चित्रयुक्त इ + आहुति]

**चित्रिणी**—स्त्री कामशास्त्रानुसार ठरविलेल्या स्त्रियांच्या चार (पद्मिनी, चित्रिणी, हस्तिनी, शंखिनी इ०) वर्गांपैकी एक, नानाविध बुद्धींनी व गुणांनीं युक्त स्त्री. [स चित्रिणी]

**चित्सागर**—पु. ज्ञानसिंधु ज्ञानरूपी समुद्र [स चित्=ज्ञान+सागर=समुद्र] **चित्साक्षी-चित्स्वरूप**-पु ईश्वर [स चित्+साक्षी] **चित्सुख**—न १ चित्मध्यें असणारें सुख; ज्ञानमय आनंद २ -वि ज्याचें चित् हेंच सुख आहे तो, ज्ञानमय आनंदाचा भोक्ता [चित्+सुख] ॰गेह—न ईश्वर, ज्ञानमयशांति, आनंद इ० काचें स्थान, घर ठिकाण **चित्स्वरूप**-वि ज्ञानरूप, ज्ञान हेंच रूप ज्याचें तो (ईश्वर)

**चिथड, चिथाड, चितड**—वि चितड पहा

**चिथडा**—पु चिंधी, फडका, रगडें, फाटलेला कपडा [हिं चिथडा-चिंधी]

**चिथडा**—पु माणसाच्या जनावराच्या अंगावरील तीळ, मस डाग, फळावरील डाग [चित्र]

**चिथडी**—स्त्री. १ चिंधी, फडका, रगडें, बुरकें, चिरगूट २ वस्त्रादिकांस लावलेलें ठिगळ

**चिथडें**—न पातळ साल, सालपट, टरफल, पापुद्रा

**चिथणें**—अक्रि चिडणें, रागावणें, कावणें [स चित्-पाहणें समजणें]

**चिथ(था)वणी**—स्त्री १ (वाईट गोष्ट करावयाला दुसऱ्यास दिलेलें) प्रोत्साहन; उत्तेजन २ (एखाद्याच्या विरुद्ध दुसऱ्यास दिलेली) उठावणी ३ चिडविणें, संतापविणें [चेतविणें]

**चिथ(था)विणें**—सक्रि १ (वाईट गोष्ट करण्यास दुसऱ्यास) भर उत्तेजन प्रोत्साहन देणें २ (एखाद्याच्या विरुद्ध दुसऱ्यास) चेतविणें, भडकविणें [चेतविणें]

**चिंद्**—न चिन्ह, लक्षण, खूण 'सेवीं काहीं तुझें नव्हे बा। हें मायेचें चिंद।' -देप १८५ [स चिन्ह]

**चिदचिद्ग्रंथी**—स्त्री चैतन्य व जड देह यांची गाठ भेट, जड व चैतन्य यांचा परस्पराध्यास. 'जीव नासे शिवपणेंसी। चिदचिद्ग्रंथीसी अहंकारू।' -एभा २० ३७८ [स चित्=चैतन्य+अचित्=जड, स्थूल अचेतन+ग्रंथी=गाठ भेट]

**चिंद(ध)डी, चिंदी-धी चिंदीचोळा चिंधुकली चिंदो(धो)डी**—स्त्री चिंधी पहा

**चिदंबर**—न १ चैतन्यरूप आकाश चिदाकाश 'कां प्रतीतिपाखीं चिदंबरा। गोसावियां नोहावें।' -ज्ञा ७ १५४ २ चिद्रूप वस्त्र, चैतन्यस्वरूप वस्त्र [स चित्=चैतन्य+अंबर=आकाश वस्त्र]

**चिदंभोधि**—पु. चित्सागर, ब्रह्म, चैतन्यरूप समुद्र. [स चित्+अम्भस्=पाणी+धि]

**चिंदर-चिंदरी**—स्त्री चिंधी, चिरगूट

**चिदाकार**—वि चैतन्यस्वरूप [स चित्+आकार=रूप]

**चिदाकाश**—न चैतन्यस्वरूप आकाश 'आलां ज्ञातृहेया विहीन। चिदाकाश।' -ज्ञा १८ ९७५ 'उपाधीवेगळें आकाश। तया नांव चिदाकाश।' -दा ८ ७ ५२ [स चित्+आकाश]

**चिदानंद**—पु ज्ञानमय आनंद; ब्रह्मानंद [स चित्+आनंद]

**चिदाभास**—पु. (प्राण्याचें) सचेतन तत्त्व, ज्ञानाभास, चैतन्याचा आभास, जीव [स चित्+आभास]

**चिद्गगन**—न चैतन्यस्वरूप आकाश 'भोगवी जो चिद्गगन। -भुवनदिवा' -ज्ञा १६ ६ [स चित्+गगन=आकाश]

**चिद्घन**—वि चैतन्यमय, ज्ञानमय (ईश्वर) [चित्+घन=व दाट]

**चिद्भैरव**—पु ज्ञानरूप शंकर, सांब शिव 'नाचतया पुण्यगिरी। चिद्भैरवाच्या खापरी। मन पवनाची खीचपुरी वाढूनिया।' -ज्ञा १८ १०४० [स चि+भैरव=शंकर]

**चिद्भ्रमर**—पु चैतन्यस्वरूप भ्रमर, भुंगा 'लिंगदेह कमळाचा। पोटीं वेंचतया चिद्भ्रमराचा। बंदिमोक्षु जयाचा। उदैला होय।' -ज्ञा १६ ४ [स चित्+भ्रमर=भुंगा]

**चिद्रत्न**—न चैतन्य, ज्ञानरूप रत्न 'मी चिद्रत्न तुझें। असता हातीं।' -ज्ञा १८ २८२ [स चित्+रत्न]

**चिद्रु(द्रू)प**—वि चैतन्यरूपी शुद्धज्ञानस्वरूपी (ईश्वर) 'तो साक्षी चिद्रुपु। कर्मप्रवृत्तीचा सकल्पु। वठी तो का निरोपु। आपणचि दे।' -ज्ञा १८ ४५७ [स चित्+रूप]

**चिद्वृत्ति**—स्त्री १ चैतन्यस्वरूप वृत्ति असणें २ माया, आदिप्रकृति 'तेथ चिद्वृत्ती पहिलें। महत्तत्त्व उमललें। तें पान वाल्हेंदुल्हें। एक निघे।' -ज्ञा १५ ९४ [स चित्+वृत्ति]

**चिद्शक्ति**—स्त्री १ (काव्य) (विक चिच्छक्ति) चैतन्यरूपी शक्ति, शुद्धज्ञानस्वरूप शक्ति, आदिप्रकृति 'परम पुरुषाची चिच्छक्ति। मज मात्र भेटेल निश्चिती।' २ प्राण्यांतील सचेतन तत्त्व [स चित्+शक्ति]

**चिंधडी**—स्त्री १ (चिंधीचें तुच्छतादर्शक रूप) जीर्ण व फाटक्या कापडाचा तुकडा, बुरकें रगडें २ कपची, चिरफळी, शिलपी ढलपी [चिंधी] -**ड्या उडणें**-उडून जाणें-चिंध्या चिंध्या होणें, तुकडे तुकडे होणें, नाश होणें

**चिंधाचोळा चिंधीचोळा**—पु (तप) चिरगूट पांघरूण [चिंधी+चोळा]

**चिंधा(ध्या)देवी**—स्त्री १ जिला रस्त्यानें जाणारे लोक चिंध्या अर्पण करितात अशी एक रस्त्यावरील देवता (या चिंध्या

रस्त्याच्या बाजूस असलेल्या झाडास बांधितात). २ (ल.) चिंध्या गाळणारी, नेभळी शामळभटीण. ३ एका काठीला चिंध्या गुंडाळून केलेली मुलींच्या खेळांतील देवी.

चिंधी—स्त्री. कापडाचा, जमीनीचा, अरुंद पण लांब असा वांकडातिकडा किंवा सरळ तुकडा, पट्टा, पटी; फाटलेलें वस्त्र; फटकूर. [सं. छिद्; तु. का. चिंदी]

चिंधुकली—स्त्री. चिंधूक याचा लघुत्ववाचक शब्द; लहान, बारीक चिंधी; लंगोटी. [चिंधूक]

चिंधूक-ट—न. (उप.) लहान चिंधी; फटकूर. [चिंधी]

चिंधोटी—स्त्री. चिंधी; घांदोटी; चिरफळी. म्ह० चिंधोटीची घांदोटी=मुळांत टाकाऊ असून त्याच्यापेक्षांहि टाकाऊ होणें.

चिंध्यापीर—पु. १ ज्या पीराला चिंध्या वाहतात तो. २ (उप.) गोधड्या–चिंध्या–फटकुऱ्या बुवा. [चिंध्या+पीर]

चिन(ना)ई—वि. चीनदेशाचा; चीनदेशासंबंधीं; चिनी. [चिनी]

चिनका-क्या—वि. चिडखोर; रागीट; तामसी. चिणका पहा.

चिनका-गा—वि. लहानगा; छोटा; चिमुकला (मुलगा). [का. चिण्ण=मूल; चिन्न=लघुता]

चिनका, चिनकारा, चिनकारणें—चिणका, चिणकारा, चिणकारणें पहा.

चिनकाविणें—सक्रि. १ चिडविणें; चेतविणें; खाजविणें; आठवण ताजी करणें; डिवचणें; टोचणें. २ इशारा, खूण करणें. [चिन्ह ?]

चिनकु(गु)ला—वि. छोटा; लहानसा; चिमुकला; चिमणा. चिणकुला पहा. [का. चिन्न=लघुत्व]

चिनख—स्त्री. (व.) चिंता; काळजी. 'परीक्षेची चिनख टेव.'

चिनचिन, चिनीचिनी—क्रिवि. रात्रीच्या आवाजाप्रमाणें शब्द करून; रातकिड्याच्या आवाजाप्रमाणें. चिणचिण पहा. 'रात्र चिनचिन करत्ये.' [ध्व]

चिनचिनी—स्त्री. १ कटकट. २ रात्र. [ध्व.]

चिनट, चिलट—न. डांस; मच्छर; इ०

चिनणें—सक्रि. चिणणें पहा. [सं चि]

चिनमुला—वि. लहान; छोटा; खुरेख (डांस, ठेंगु मनुष्य). [का. चिन्न=लघुत्व]

चिना, चिनों—स्त्री. (कु) एक प्रकारचें फळ; चिनी; एक कंद.

चिनाई—पु जमीनीवरील एक पक्षी; यास चिनी असेंहि म्हणतात. –मृशि २१०.

चिनाई—वि. चिनई पहा

चिनाटी—वि. लहानसा पण सुंदर; नीटनेटका. [का. चिन्न=लहानपणा]

चिनापटणी, चेनापटणी—वि. मद्रास संबंधीं; मद्रासचा; मद्रास कडील.

चिनापट्टण—न. मद्रास. [का. चिन्न सोनें+पट्टण शहर]

चिनारी—स्त्री. (गो.) घेरी.

चिनिमारो—वि. (कु.) लहानसा, चिमुकला. [का. चिन्न]

चिनी—स्त्री. कोनफळाची एक जात; चिनी कोनफळ.

चिनी—स्त्री. (इटीदांडूच्या खेळांतील) विटी. [का. चिनी]

चिनी—स्त्री. (व.) (धोतराची) चुणी.

चिनी—स्त्री. एक प्रकारची पांढरी पिठी साखर. बंगालमध्यें सामान्यतः साखरेस म्हणतात. कदाचित हीं चीनमधून येत असावी. –वि. चीन देशाचा; चीनदेशासंबंधीं; चीनदेशातील. [चीन] ०कापूर–पु. कापराची पांढरी जात (चीनदेशांतून हा कापूर येतो असा समज आहे). ०माती–स्त्री. चिकण मातीचा एक प्रकार; ही शुभ्र पांढरी असते. हिचींच चिनी भांडीं (पेले, बशा, चहादाण्या इ०) करतात. ०मोहोर–स्त्री. चीनदेशांतील एक नाणें; याची किंमत साडेचौदा रुपये असते.

चिनी—स्त्री. १ ज्यानें पत्रा तोडतात तो लोखंडी जाड खिळा; छिनी. २ भांड्यावर नांव घालण्याचें हत्यार. –बदलापूर ९६. [सं. छिद्=छेदणें]

चिनुक(ग)ला—वि. चिमुकला; इवलासा; छोटा. [का. चिन्न]

चिनुला—वि. छोटा; लहानगा; न्हानुला; चिमुकला. [का. चिन्न]

चिनें—न. १ चिनी कोनफळाचा वेल. २ चिनी कोनफळाचें मूळ, कद. चिनी पहा.

चिनोरा—वि. लहान पण सुंदर; मनोहर; चिमुकलें (मूल, पिलूं, वस्तु इ०). [का. चिन्न]

चिन्नादाणी-नी—वि. चुणचुणीत आणि हुषार (मुलगा); चलाख; हजरजबाबी (पोर, मूल). [का. चिन्न=लहानपणा. छोटेपणा]

चिर्ले—न. (बे.) रताळें.

चिन्मय, चिन्मात्र—वि. १ ज्ञानस्वरूप; चैतन्यरूप; शुद्धज्ञानमय (ईश्वर, ब्रह्म) २ शुद्ध ज्ञानानें, बुद्धीनें युक्त [सं. चित्=ज्ञान+मय=युक्त, पूर्ण] 'रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न। चिन्मय अंजन सुदलें डोळां।' –तुगा ४०३६. ०खाणी–स्त्री. शुद्ध ज्ञानाचा सांठा. 'ब्रह्मादींची खूण पिंडीं ओळखावी। द्या वेगळी पाही चिन्मयखाणी।'

चिन्मात्र—वि. १ शुद्ध ज्ञानस्वरूपी, चैतन्यरूप, चिन्मय असा ईश्वर, ब्रह्म, परमात्मा. 'तेंस नेणणें जें गेलें। तेणें जाणणेंहि

नेलें। मग निष्क्रिय ठरलें । चिन्मात्रचि। '-ज्ञा १८.९७७. २ चिन्मय; चैतन्यरूप असें. [ सं. चित्=चैतन्य+मात्र=केवळ ]

**चिन्ह**—चिह्न पहा.

**चिप, चीप**—क्रिवि. चूप; गप्प; कांहीं न बोलतां; हूं कां चूं न करतां; अगदीं स्तब्ध. 'काय इतनाथिंशिशुच्या शब्द उचित सांत्वनीं पडे चिप हा।'-मोउद्योग १०.९३. 'निळा म्हणे चिप चरणें धरूनियां निग।न पडवी कोडियांत घ्याता हा धीरंग।' -निगा९६. [ म. चिपणें=मिटणें. ध्व. तुल० का. चिप्पु=शिंपला ]

**चिपका**—वि. ( वर्णविपर्यासानें झालेलें पिचका याचें रूप ). १ अर्धवट मिटलेला; चिपड्या; मंद तेजाचा; ज्यांतून पाणी गळतें आहे असा ( डोळा ). २ पिचक्या डोळ्याचा ( मनुष्य ).

**चिपकी**—स्त्री. चिमूट; चिमटी ( तपकीर इ० कांची ).

**चिपकुरा**—पु. अळू; एक प्रकारची पालेभाजी. चमकुरा पहा.

**चिपचिपणें**—चपचपणें, चवचवणें इ० पहा.

**चिपचिपीत**—चवचवीत पहा.

**चिपट-ड**—न. १ द्विदल धान्याची कवचासकट, वरील पापुद्र्यासकट असलेली डाळिंबी अथवा असल्या डाळिंब्यांचा समुदाय. २ डाळीवर राहिलेलें फोलकट, डोळ. [ सं. चिपट=सपाट ]

**चिपट, चिपटचिपट, चिपड**—न पहाटेचा संधिप्रकाश; प्रभातकाल, अरुणोदय.

**चिपट**—स्त्री. ( कारवार ) संध्येची पळी; आचमनी -शर

**चिपटी**—स्त्री. १ रस काढून घेतलेला, पिळलेला ऊंस, ऊंसाचें चिपाड. २ खावयाला न मिळाल्यामुळें, आजारामुळें वाळलेली पोटाची खपाटी, शरीराची, अंगाची दामटी, रोडावलेलें शरीर, पोट इ०. ३ झाडाची बारीक फांदी; फोंक; शिपटी; शिमटी. [ सं. चिपिट=सपाट, चापट ]

**चिपटें**—न. पावशेराचें माप.

**चिपड**—न. १ डाळींतील फोलासकट असलेला डोळ, दाणा; डाळींतील फोलासकट असलेल्या दाण्यांचा समुदाय चिपट पहा. २ पोकळ, न भरलेला धान्याचा दाणा. ३ रस काढून घेतलेलें ऊंसाचें चिपाड, कडबा. चिपटी पहा. [ सं. चिपिट ]

**चिपड**—न डोळ्याला येणारा चिकट पांढरा मळ; डोळ्यांतील चिकट मळाचा तंतु; तुकडा. 'डोळांनिघती चिपडें। नाकीं दाटलीं मेकडें।'-दा ३ १ २१ [ सं. चिपिट ]

**चिप(पा)ड, चिपडचिपड, चिपाडचिपाड**—वि. अंधुक अंधुक; अस्पष्ट दिसणारें; धुकट दिसणारें. [ चिपड ] ०दिसणें-१ ( डोळ्यांतील अधूपणामुळें ) अंधुक अंधुक दिसणें. २ धुंदुकमुंदुक; अंधुक पहाटेचा प्रकाश पडणें; फटफटणें.

**चिपडचिपड, चिपाडचिपाड**—न. पहाटेचा संधिप्रकाश; अरुणोदय; प्रभात होऊं लागणें; फटफटणें.

**चिपडणें**—अक्रि. (डोळ्यांस) चिकटा, चिपड येणें; चिकट्यानें डोळे चिकटणें. [ चिपड ]

**चिपडा**—पु. डोळ्यांतील चिकट मळ, पू, पू. -वि. १ चिकटा आलेला ( डोळा ) 'पाहों न शकति कोण्ही अन डोळे भासुते जसे चिपडे।'-मोअनु ९.२७.२ चिपडलेल्या डोळ्याचा; मिचमिच्या डोळ्याचा ( मनुष्य ). 'चिपडे अमंगळ तीं पोरें। प्रिय कृष्णासी अद्भुत. रें।'-रासक्रीडा २२. [ सं. चिपिट ]

**चिपडी**—स्त्री. डोळ्याचें पातें लवण्यास लागणारा काळ; क्षणार्ध; निमेष. [ सं. चप्=दाबणें ]

**चिपडें**—न. डोळ्यांतील चिकट मळ. [ चिपड ]

**चिपणें**—सक्रि. चेपणें; दाबणें; मिटणें या रूपांत या क्रियापदाचे जुळविणें, एकमेकांजवळ आणणें, एकमेकांशीं जोडणें; संलग्न होणें इ० अर्थ होतात. उदा० **पाय चिपणें**-( उडी मारतांना ) पाय एकमेकांशीं जोडणें, जुळविणें. **फांसे चिपणें**-( दान टाकतांना ) इष्ट त्या दानाचे फांसे जुळविणें. **घसा चिपणें**-घसा, आवाज बसणें **डोळे चिपणें**-चिपडानें डोळे चिकटणें. **डोळे चिपणें, नाक चिपणें, हातानें चिपणें**-( खुणावितांना, सूचना करितांना ) डोळे मिटून, मिचकावून, नाकावर बोट ठेवून, हात दाबून खुणावणें. **तोंड चिपणें**-( तापात ) ओंठ एकमेकास चिकटणें. [ सं. चप्=दाबणें ],

**चिपतळ-तळा-ताळा**—वि. बसकट; चबकट; चपटा. [ चीप+तळ ]

**चिपताळा**—वि. चिपतळ पहा.

**चिपनळी**—स्त्री. १ पिचकारी; पाण्याची धार जोरानें दूर उडविण्याकरितां केलेलें नळीच्या आकाराचें एक यंत्र. २ सळईच्या आकाराचें एक वैद्यकीय हत्यार. [ चिप+नळी ] ०मारणें-अक्रि. पिचकारी, सळई मारणें.

**चिपली**—स्त्री. एक प्रकारची पिवळी माती.-मराठी ६ वें पुस्तक पृ. ११५.

**चिपळी**—स्त्री. १ पिचकारी. २ सळईसारखें वैद्यकीय शस्त्र, कापसाची वात. ३ ओघळ; ओहोळ. ४ पाण्याची चिळकांडी. 'धारा धवावे खळाळ। चिपळ्या चळक्या भळाळ।' -दा ११.७ ४. पिकलेलें रसभरित फळ दाबलें असतांना उडणारी चिळकांडी; पिकलेलें गळू दाबलें असतां उडणारी रक्त, पू इ०कांची चिळकांडी. ५ मांड्याची पकड. [ सं. चप्=दाबणें ] **चिपळींत धरणें**-मांड्यांच्या पकडींत दाबणें.

**चिपळी**—स्त्री ( बव. चिपळ्या ) तीन बोटें रुंद व वीतभर लांब असलेल्या लांकडाचे दोन तुकडे घेऊन त्यांस मधल्या बाजूनें चापट

व बाहेरील बाजूने निमगोल करून माशाच्या आकार आणतात यातील प्रत्येकात शेंडयाच्या बाजूत दोन पातळ पितळी चकत्या व शेपटाच्या बाजूत घुंगरू बसवितात प्रत्येकीस मध्यभागीं वाट अडकविण्यास पितळी आंगठी बसविलेली असते हाताचा आंगठा व मधलें बोट ह्यात हे दोन भाग अडकवून भजन, कीर्तन इ०काच्या वेळीं ताल धरतात [स चप्=दाबणें, का चप्पळि=टाळी, टाळया वाजविणें]

**चिपळी**—स्त्री (क) पावसाची सर 'पावसाची चिपळी जाऊ द मग जा [ध्व]

**चिपांझी**—पु आशिया व आफ्रिका या दोन खंडात आढळणारी हीनपुच्छ वानराची एक जात

**चिपाट-ड**—न १ उसातील रस पिळून काढल्यावर राहिलेला (उसाचा) कडवा 'उसाचीं चिपाडें साडुनी। जैसा रस घेईल गाळुनी' –विउ ६ ६७ २ (ल) पोट खपाटीं गेलेला, दुबळा झालला मनुष्य ३ डोळ्यातील चिकट मलाश, चिपडा, गू डोळ्यांतील चिपडयाचा तंतु अथवा थोडासा भाग [स चिपिट=चापट का चिप्पु=खडबडीत कवच, साल, चिप्प=उसाचा चोया]

**चिपाडया**-वि गुन्हाळांतील चिपाडांची वारावार करणारा

**चिपाडचिपाड**—क्रिवि. चिपडचिपड पहा

**चिपाडें**—न रस काढल्यानतर राहिलेला उसाचा कडवा

**चिपारी**—स्त्री एक विशिष्ट वनस्पति

**चिपारी**—स्त्री खडकातील, डोंगरातील भेग, कपार, 'खदड खिंडीच्या चिपारींतून सारखे पाण्याचे प्रवाह वहात होते' –स्वप २८ [कपार पहा]

**चिपारी**—स्त्री चामाराची बारीक आरी –बदलापूर १८६

**चिपिटास्थि**—स्त्री चापट हाड. [स चिपिट=चापट+अस्थि=हाड]

**चिपीउडी**—स्त्री पाय जुळवून मारलेली उडी [चिपणें+उडी]

**चिपुटचिंगळी**—स्त्री चिटपांखरू या शब्दाचा अकरण रूपी प्राय प्रयाग करतात उदा० 'त्या गांवात चिपुटचिंगळीहि राहिली नाहीं'

**चिपुळी**—स्त्री (मह नु) चिपळी चिपळी 'कनककमळांची चिपुळी। पेमोनी करतळी। लिंपिता जाला वनमाळी।' –शिशु ६६२. [ध्व]

**चिपुळी**—स्त्री (लि) चिळकांडी, चिरकांडी रक्ता चिया चिपुळिया उधळती। वेदना भारली भत्तुती।' –शिशु २४९ ११ [ध्व]

**चिपोटा**—पु लाकडातील अथवा दगडातील भेग, छिद्र पोकळी बुजविण्यासाठीं उपयोगात आणलेला लाकडाचा तुकडा, चीप, कपची इ०. (अंगाचा, शरीराचा, पोटाचा) [स चिपिट=चापट] ०होणें–अंग, शरीर, पोट आजारानें, अशक्तपणानें, खावयास न मिळाल्यानें खपाट, कृश होणें

**चिपोटी**—स्त्री वरून व खालून दाब देऊन बांधून काढलेली गठडी, गांठोडें [स चिपिट]

**चिपोरा**—पु (व.) (दगडाचा, सुपारीचा) बारीक तुकडा

**चिपोळणा, चिपुळणा, चिपोळा**—पु चित्पावन, कोंकणस्थ ब्राह्मण [चिपळूण]

**चिपोळी**—स्त्री १ (दगडाची, लाकडाची ल्हान चीप, कपची धलपी २ कथेकरी, भजनकरी याच्या हातातील वाजवावयाच्या चिपळ्या प्रत्येकीं

**चिप्प**—वि ओलें चिंब

**चिप्प**—क्रिवि शात गप्प, चूप स्तब्ध, गपचीप

**चिप्पड**—न चिपड पहा

**चिंब**—न पूर्णपण न पोसलेली शेंग, दाणे काढून घेतलेली (भाताची, वरीची वालाची) शेंग, लोंबी

**चिंब**—न बांबूची कामटी, कांबीट इ०

**चिंब**—वि गळण्याइतका भिजलेला, चिबचिबीत थबथबलेला भिजलेला [स स्तिम् भिजणें]

**चिंबका**—वि १ चेंबटलेला, चपटा झालला, बसकलेला २ सुरकुतलेला, वळया, चिरम्या पडलेला, चिरमुटलेला [चिंब]

**चिंबखडा**—पु चिमखडा पहा

**चिंबचलें**—न नभरलेला दाणा (मुख्यत्वें भाताचा) [चिंब] म्ह० चिंबचलें शेतचें थोटेपांगुळ पाटचें =स्वत च्या शेतांतील टाकाऊ धान्य भाग्यच मानलें जातें व व्यंग असलेलें पोटचें पोर प्रिय असतें

**चिबचिब-बां**—क्रिवि पाऊस पडणें, पाण्याचे थेंब टपकणें इत्यादिकांच्या आवाजाप्रमाणें अवाज होऊन [ध्व]

**चिबचिब**—स्त्री १ (कपडे इ०कांचा) ओलेचिंबपणा, चिबचिबीतपणा. २ (रस्त्याची) चिखचिख चिगचिग ३ (जमीनीचा) दलदलीतपणा, निसरडेपणा

**चिबचिबणें**—अक्रि १ (कपडे इ०) ओले चिंब भिजणें, पाण्यानें थबथबणें २ (जमीन) निसरडी, गुळगुळीत होणें, चिखलानें युक्त होणं, चिखचिखीत होणें, रेंदाडणें [चिबचिब]

**चिबचिबीत**—वि १ ओलें चिंब, पाण्यानें थबथबलेलें ज्यांतून पाण्याचे थेंब टपकत आहेत असें २ चिखचिखीत, चिखलाची, दलदलीत, निसरडी, रेंदाड (जमीन) [चिबचिब]

चिंचट—स्त्री. (अव. चिंचटा) बांबूची कामटी, पट्टी; कांबीट. 'बांबूच्या बारीक बारीक चिंचटा करून उभ्या आडव्या बसवीत' -कृषि ४८६.

चिंचट, चिमट—वि. १ चिवट (लांकूड). २ मुरकुत्या, वळया पडलेलें. ३ हिरवट; कच्चें; पूर्णपणें न पिकलेलें; आंत रस, द्रव असलेलें (धान्य, कणीस) ४ आंबट ओलें; पूर्णपणें न वाळलेलें (वस्त्र इ०). [चिव]

चिंचटणें—सक्रि. १ चिमटा घेणें. २ चिमटणें; दाबणें; पिळणें; चेंगरणें. [चिवणें]

चिंच(चो)ड—वि. दलदल; पाणथळ; शिलाण, (जमीन) [चिबचिब] ०भुई-जमीन-स्त्री. दलदलीची जमीन; पाणथळ जमीन. ०रान-न. पाणथळ रान; शिलाण.

चिंचडीण—स्त्री. (राजा.) चिवुडाची वेली; दोंदाडाची वेली.

चिंचणें—अक्रि. चिरमुटणें (फळें इ०); आकसणें (लांकूड, कातडी); मुरकुतणें. -सक्रि. १ चेंपणें; दाबणें; जोरानें एकत्र करणें. २ चिरफाळणें; पिंजणें. [का. चिपु=भेग, चीर]

चिंचणें, चिंचळणें—सक्रि. दाबणें;; चिरणें. -बार.

चिंचपोल—न. भाताचा, वरीचा, नाच्याचा, कडधान्याचा न पोसलेला, न भरलेला दाणा; पोंचट, पोकळ दाणा.

चिंचल्लें—वि. (खा.) वाह्यात; खोडकर; द्वाड. 'काय चिवल्लें पोर आहे.' [हिं. चिचिल, चिचिल्ला=पोरकट, वांड]

चिंचळ—पु. धान्य खाणारा एक पक्षी.

चिंचळ—स्त्री. डोक्यावर ओझें घेतांना तें डोक्याला रुतूं नये म्हणून डोक्यावर ठेवण्यासाठीं केलेलें कपड्याचें, फडक्याचें, गवताचें वेटोळें; चुंबळ. [चिवणें]

चिंचळणें—सक्रि. (कान इ० शरीरावयव) चिमटींत धरून आवळणें; दाबणें; चिमटा घेणें; चिंचटणें. [चिवणें]

चिंचा—पु. (व.) फुलोरा. 'देवापुढें चिंचा ठेव.'

चिंचा—वि. १ चिरम्या, मुरकुत्या, वळया पडलेला; आकसलेला. २ चापटलेला; दाबलेला; चेंगरलेला; चेंचलेला; चिरडलेला. [चिवणें]

चिंचु—पु (गो.) आवळ गळयाचें पाणी प्यावयाचें एक भांडें; चेंबू [चिंवणें]

चिंचुक—पु १ हनुवटी. २ (नृत्य) हनवटीचे अभिनय, हे ओंठ, जीभ व दात यांच्या साहाय्यानें करितात. हे सात प्रकारचे आहेत, ते-चिबुक-कुट्टन-खंडन-छिन्न-चिक्कित-दष्ट,-लेहन-सम. [सं.]

चिंचुता—पु. माला; तिराळा असलेलें पोलादी पातें. -बदलापूर १२६.

चिंचूड—न. दोंदाड; वाद्क; चिवडें. [सं. चिर्भिट-चिब्भिड-चिबीड-चिबूड; -राजवाडे ग्रंथमाला]

चिंचूळ—स्त्री. (को.) चुंबळ. चिवळ पहा.

चिंचोणी—न. ऊंसाची लागवड केल्यावर त्यांस पांच सहा दिवसांनीं द्यावयाचें पाणी. अंबवणी पहा. [चिंब+वन=पाणी]

चिंचोरी—स्त्री. खेकड्याची एक जात; हिरवागार, काळा खेकडा. -बदलापूर ३३८.

चिंभ—न. पूर्णपणें न भरलेली, दाणा काढून घेतलेली शेंग; चिंब पहा.

चिमट-ड, चिमूट-ड—स्त्री. दोंदाडाची, चिवुडाची वेली. -न. दोंदाड; चिबूड; वाद्क; राजापुराकडे यालाच चिभाड, चिवुड म्हणतात. कांहीं प्रांतांत फूट असेंहि म्हणतात. 'द्राणतां चिमटि वालुके खातु असे.' -पंच १.२६. २ पूर्णपणें वाढ होण्यापूर्वी पिवळा पडलेला आंबा. [चिर्भिट]

चिमाटी—स्त्री. बांबूची एक अगदीं बारीक जात.

चिमावनी—स्त्री. (व.) वांकुली; वेडावून दाखविणें. 'तो मला चिमावन्या दाखवितो.'

चिमुड—स्त्री. चिमट पहा.

चिमूळ—स्त्री. चिवळ पहा.

चिम—न. (कु.) पोल; फोलकट; पोंचट भात. [चिंब, पूर्णपणें न भरलेला]

चिमकणें—सक्रि. (मिचकणें याचें वर्णविपर्यासानें झालेलें रूप.) (डोळयानें) खूण, इशारा, संकेत करणें. [सं. स्मील्=(डोळयाची) उघडझांक]

चिमका, चिमकु(को)ला—वि. ल्हान, छोटा; चिमुकला.

चिमकु(को)रा—पु (अंगाला घेतलेला) चिमटा; (अंगावर नखांनीं काढलेला) चिचकुरा, ओरखडा. ०घेणें-चिमटा, चिमटी घेणें. [का. चिमटु=चिमटा घेणें]

चिमकुरादळ—पु एक प्रकारच्या अळवाची भाजी. चमकु(को)रा, चिमकुरा पहा. 'चिमकुरादळ चिवनि चांगली चमचमीत फोडणी देउनि चागरित।' -अमृत ३४.

चिमकुला—वि. ल्हानसा; चिमणासा; छोटा; न्हानुला. (गो.) चिमकुलो. [का. चिम]

चिमखडा—पु १ (कामटीवरून गोटाच्या, जोरानें फेंकावयाचा) ल्हान खडा. २ (ल) चलाख, चुणचुणीत, चाणाक्ष मुलगा. ३ रस्त्याच्या बाजूची दगडांची रास; रस्त्यावर मारल्यागेल्या लोकांनीं एक एक दगड टाकिल्यामुळें जमलेला दगडांचा ढीग. चिमणखडा पहा.

चिमखु(खो)रा, चिमकु(को)रा, चिमको(खो)डा—पु एक पालेभाजी; अर्थ चमकोरा पहा.

**चिमखुरा**—पु. १ (बोटांनीं घेतलेला) चिमटा. २ नखांनीं काढलेला ओरखडा; चिचकुरा. चिमकुरा पहा.

**चिमचिमणें**—सक्रि. कुजबुजणें; निंदणें. 'चटक चांदण्या मज चिमचिमती । तारे तरुणे दर्पण गणति ।'-अननीधनक. [ध्व]

**चिमचिमणें**—अक्रि. (कु.) झोंबणें; चावणें; दुखणें. [ध्व]

**चिमट**—स्त्री. १ (अंगास घेतलेला) चिमटा; चिमखुरा. २ चिमूट; चुकटी; हाताचा आंगठा आणि पुढलें बोट यांच्या जुळणीनें घेतलेल्या पदार्थाचें परिमाण; आंगठा व तर्जनी यांची जुळणी. ३ स्पर्श केला असतां जिचीं पानें मिटतात अशी लाजाळु सारखी वनस्पति. [सं. मुचुटी=चिमटी वर्णव्यत्यास; का. चिमट्ट+चिमटा घेणें]

**चिमट**—वि. चिवट पहा.

**चिमटणें**—अक्रि. चिमटा घेणें; दाबणें; चिमटींत धरून आवळणें. २ चेंगरणें; चिरडणें; चेपणें; चिवटणें. ३ आकसणें; संकोच पावणें; संकुचित होणें; मुरकुट्या पडणें. [चिमट]

**चिमटा**—पु. १ हाताचा आंगठा व तर्जनी यांच्या परस्पर दाबाची पकड; चिमखुरा; चिचकुरा. २ पदार्थ धर धरण्याकरितां, पिळवटण्याकरितां, उचलण्याकरितां, उपटण्याकरितां केलेलें सोनार इ०काचें हत्यार. ३ (ल.) एकमेकांस मिळणाऱ्या (परस्परांशीं लघुकोन करणाऱ्या) दोन नद्यांमधील, दोन रस्त्यांमधील जमीनीचा त्रिकोणाकृति चिंचोळा भाग. ४ (ल.) इकडे आड तिकडे विहीर अशा प्रकारची पेंचाची, अडचणीची, संकटाची स्थिति. ५ (चिमट्यानें केस इ०) उपटणें. [चिमट] (वाप्र.) **चिमटा घेणें**—एखाद्यास झोंबेल, बोचेल असें बोलणें, तशी कृति करणें. ०**धरणें**—न्हाव्याकडून चिमटा करवून, केस उपटून घेणें. -**ट्यांतधरणें**—पेंचात धरणें; अडचणींत आणणें. -**ट्यांत सांपडणें**-अडचणींत, पेंचांत पडणें, धरलें जाणें.

**चिमटा**—वि. कपाळावर दोन भोंवरे असलेला (घोडा). -मसाप २.५६.

**चिमटी**—स्त्री. चिमट (तपकीर इ० काची). [चिमट] ०**टाकणें**-विषादि उतरायासाठीं मंत्र घालणें. ०**लावणें**—युक्तिप्रयुक्तीनें कोणाएकास वश करणें. ०**चालविणें**—कोणाएकानें मरावें म्हणून त्याजवर मंत्रप्रयोग करणें.

**चिमटी**—स्त्री. डोंगरावर पसरणारें एक कांटेरी झुडप.

**चिमटो**—पु. (गो.) चिमटा; चिमखोरा. [चिमट]

**चिमडी**—स्त्री. (सांकेतिक) तलवार -गुजा.

**चिमणखडा**—पु. कामटीनें, गलोलीनें, धनुकलीनें जोरानें उडवावयाचा बारीक खडा. [का. चिम्मु=बोटानें उडविणें]

**चिमणचारा**—पु गवताची एक जात; हें गवत चिमण्यांना विशेष आवडतें म्हणून यास हें नांव पडलें असावें. [चिमणी+चारा]

**चिमणचिटकें**—न. प्रातःकाळची चिमण्यांची चिवचिव सुरू होण्याची वेळ. [चिमणी+चिटकें]

**चिमणडोळ्या**—वि. चिमणीच्या डोळ्यांप्रमाणें लहान, बारीक डोळे असलेला (मनुष्य). [चिमणी+डोळा]

**चिमणबाग**—पु.स्त्री. लहानसा बाग. 'तिच्या (वाडीच्या) मध्यभागीं एक लहानसा चिमणबाग असे.' -पाव्ह ३७. [चिमणा=लहान+बाग]

**चिमणसा, चिमणा**—वि. चिमुकला; इवलासा; छोटासा; लहान पण सुरेख; लहान आकाराचा. [चिमणा+सा]

**चिमणसाळ**—स्त्री. एक प्रकारचें भात. [चिमणी=लहान+साळ]

**चिमणा**—पु. चिमणी या पक्ष्यांतील नर. -वि. चिमकुला; न्हानुला; लहानगा; लहान (मूल). 'आझापिलें फिरविण्या चिमण्यास नाहीं ।'-मनोरंजन, जून १९२१.

**चिमणाचारा**—पु. चिमणचारा पहा.

**चिमणी**—स्त्री. १ एक प्रकारचा लहान पक्षी. हा रानांत न राहतां मनुष्यानें गजबजलेल्या वस्तींत राहतो. हा जगातील बहुतेक भागांत आढळतो. याची उपजीविका धान्य व किडे यांवर असते. २ चिमण्यांतील मादी. ३ लांकडाचें, मातीचें चिमणीचें चित्र, ज्यांतून शिटी वाजवितां येते तें. ४ दोन बाटोळ्या खापऱ्यांस चामडें मढवून केलेलें खेळणें; कुडमुडें. ५ दारांचीं, खिडक्यांचीं तावदानें बंद करण्याच्या उपयोगी असलेलें, कटयाभोंवतीं फिरणारें चिमणीच्या आकाराचें लांकडी बोंड. ६ केळफुलांतील कावळ्याच्या, चोराच्या तळांतील कोश. हा शुभ्र व अर्धवट पारदर्शक असतो. हा भाजीला निरुपयोगी असतो. (वाप्र) -**च्या दांतानें फोडणें**-(सुपारीसारखा) खाद्य पदार्थ वस्त्रांत गुंडाळून दांतांनीं फोडणें. असें केल्यानें तो पदार्थ मुखरसदूषित, दुसऱ्या माणसानें खावयास उष्टा होत नाहीं अशी (मुलांची) समजूत आहे. ०**सारखें तोंड करणें**-(निराशेमुळें, दुःखामुळें, अपमानामुळें) मुद्रा, तोंड, चेहरा उतरणें; निस्तेज होणें; एवढेंसें तोंड करणें. 'पण पहा तो कसें चिमणीसारखें तोंड करून बसला आहे.'-गुप्तमंजुष -**चे पोहे**-पु एक प्रकारच्या गवताचें बीं. हें चिमण्यांस फार आवडतें. पोहे पहा. -**ची मुरकुंड**-स्त्री. एक प्रकारची चिमण्यांच्या चित्रांनीं (भिंत इ०कांवर) काढलेली, रंगविलेली वर्तुळाकृति. हींत चिमण्यांचीं तोंडें बाहेर असतात [सं. चीव्-चिवणी-चिमणी-राजवाडे, ग्रंथमाला]

**चिमणी**—स्त्री. १ (गिरण्यांतील, कारखान्यांतील) उंच धुरांडें. 'पुण्याच्या आसपास शेंकडों चिमण्या उभ्या राहतील...' -टि १.१६९. २ धारें (धूर बाहेर घालविण्यासाठीं पराला असतें तें). ३ रॉकेलच्या दिव्याच्या बर्नरवर ठेवण्याची कांचेची

नळी, फुगा इ० २ तेल इ० ओतण्यापाठीं केलेलें नरसाळें ५ टिनच्या पत्र्याचा धुराडदिवा [ इ चिमूली ]

चिमणें, चिमळणें—सक्रि चिवणें, चिवळणें पहा

चिमणो—पु. ( गो ) चिमणी, मोठा टिनचा दिवा.

चिमाटी—स्त्री ( थांमारी ) तजाची, (जोडपावरील भाग खोची) मागील दोन टोकें जोडण्यास मध्यस्थी धरलेली चामड्याची चीर

चिमी, चिमू—स्त्री लहान मुलांच्या भाषेतील चिमणीचा वाचक शब्द

चिमुकला—वि चिमकुला पहा

चिमुटणें—सक्रि चिमटा घेणें, दाबणें; पिळणें, चिमटणें, पिरगळणें 'तैशी सुबद्ध आटली । पुर्गी हाती दाटली । तें वस्त्र पनें चिमुटली । सावध होय ।' –ज्ञा ६ २२५. [ चिमूट ]

चिमुरडा—वि (उप ) लहान, मुळगा, टिल्या, पूर्ण वाढ न झालेला ( मुलगा )

चिमु(मो)रा—पु चिमटा, चिमखोरा, (ग्रामा ) चिचकुरा, ओरखडा (बाप्र ) ०उठणें-अक्रि ओरखडा, चिचकुरा पडणें ०काढणें-चिमखोरा काढणें. ०घेणें-चिमटा घेणें [ चिमटा ]

चिमू(मो)ट—स्त्री. १ चिमट ( तपकीर इ० पदार्थाची ) २ चुकटी, चिमटी, चिमकोडा ३ घोड्याच्या कपाळावरील एक अशुभ चिन्ह, घोड्याच्या कपाळावरील दान भोवरें जोडणारी केसांची रेषा, चिमटा, चुपका पहा [ स मुचुटी=चिमट, चुटकी, मुचुटयगुलिमोटन– त्रिकांडशेष–मुचुटि–चिमुट–चिमूट–राजवाडे, मयमाला; का. चिमटु=चिमटा घेणें ]

चिमोटा —पु चिमटा, चिमखोरा [चिमटा] ०घेणें–चिमटा चिमखोरा घेणें 'आपणास चिमोटा घतला । तेणें कासाविस जाला। '–दा १२ १० २४

चिमोरा—पु. चिमटा, चिमखोरा 'सासुरवास गालोरे । हुणके लासणें चिमारे । –दा १ ७ २५ [ चिमटा ]

चिमोरा-री-रें—पुस्त्रीन. नदींतील खेकड्याची एक जात

चिमोला—वि (ग्रा ) लहान व सुंदर, चिमुकला, छोटा

चिम्म—वि भिजलेलें, चिंब ( –वि ) पहा

चिर—न वस्त्र 'कैचीं चिरामध्यें चिरें । मना धरें आलें तें । ' –तुगा १०१७ 'हरिपदिं लागा मागा । धन धान्य चिरें।' –भाबु ७ [ स चीर=वस्त्र ]

चिर—क्रिवि दीर्घकाळ पर्यंत बरेच, दिवस [ स चिर=दीर्घ काळपर्यंत ] ०काल–क्रिवि फार काळपर्यंत, फार दिवस पावेतो ०स्थायी–वि फार काळ टिकणारा राहणारा ०भोजी–वि दीर्घ काळपर्यंत ( राज्य ) उपभोगणारा, राज्य करणारा

चिरक—स्त्री (ग्रा ) तिटकारा, वीट, शिसारी, किळस

चिरकखोर—वि (ग्रा ) तनदवाईक; कटाळखोर; मिजासी ( आजारीपणामुळे ) चोखनळ झालेला

चिरकं(कां)डी—स्त्री १ ( दूध, रस, रक्त, मूत्र इ०कांची ) जोरानें बाहेर पडणारी, उडणारी धार, चिळकांडी २ पिचकारी ३ (ल ) पावसाची आराची सर [ ध्व ] ०लागणें-( दूध रक्त, रस, मूत्र इ०कांची ) जोरांत धार उडणें, पावसाची सर येणें.

चिरकणें—उक्रि चर्, टर् आवाज होऊन, कडकन फाटणें, फाडणें (वस्त्र इ०) [ध्व चर्=कापड फाडतांना होणारा आवाज]

चिरकणें—अक्रि १ आमांशादि विकाराप्रमाणें लहान मुलास, आजारी मनुष्यास एकदम पण थोडें शौचास होणें २ ( हत्तीचें ) चीत्कार करणें ३ ( मातीच्या, काचेच्या भांड्यास ) चीर, तडा पडणें ४ ( वयांत आल्यावर मुलाचा फार गायन केल्यामुळें गव याचा ) आवाज फुटणें, बदसूर होणें (ग्रामा ) ( गवयाचा आवाज गातांना ) मधून मधून बदसुर होणें ५ बिघडणें, फसणें, फिसकणें ( धंदा, मसलत, बत इ० ) ६ ( रागाच्या भरांत आवे शांन) बडबड लागणें [ध्व चर् ।]

चिर-कर-कन-दिनी दिशीं —क्रिवि चिळकन्, टर्कन, चिरै, टरै अशा आवाज करीत टरदिशीं

चिरका—स्त्री डोंगरावरील हरळीसारखें गवत –मसाप ३ २४६

चिरका—वि १ सहज फाटला, चिरला, कापला जाणारा, टिसूळ (कागद लाकूड इ० ), २ फाटलेला ( कागद ) भेग, फट चीर पडलेलें ( लाकूड, दगड ) [ चिरणें ]

चिरका—वि चिरकणारा

चिरकांडी—स्त्री चिरकंडी पहा

चिरकाव—स्त्री (प्रां ) चीप (सोन्याची, चांदीची ) [ चीर+कांव ]

चिरकाम—न (कों ) करवतानें लांकडें कापण्याचें काम, ओरेकशाचें काम [ चिरणें+काम ] चिरकामी–पु ( राजा ) लांकूड कापण्याचा धंदा करणारा, ओरेकश, ओरेकशी-ह्या.

चिरकाल-ळ—क्रिवि बहुतकाळ, दीर्घकाळपर्यंत [ सं चिर+काल ] चिरकालिक-वि. फार दिवस टिकणारें राहणारें फार दिवसांपासून चालत आलेलें [ सं चिर+काल+इक ] चिरकाळी-वि ( प्रां ) पुरातन, फार जुनें बहुत दिवसांचे [ स चिर+काल ]

चिरकाळी—स्त्री चिरटी, पट्टी (लांकडाची, पानाची कागदाची ) [ चिरणें ]

चिरकी—स्त्री चिरकांडी, जोरानें उडणारी पाण्याची रक्ताची, रसाची, मूत्राची धार २ पिचकारी. ३ आंतड्याचा

एक विकार आमाशामुळें थोडा थोडा विसर्जिलेला मळ [चिरकणें] ०स येणें-अक्रि (कों) थकणें, दमणें, जिकीरीस येणें

**चिरकी-क्या**—वि. (ग्रा) ज्यास लवकर किळस, कंटाळा, वीट येतो असा (मनुष्य), खतखोर, ज्यास मळमळ सुटली आहे असा [चिरक=कंटाळा, वीट]

**चिरकुट-कूट**—न १ कापड, कपडा २ चिंधी, फाटलेलें कापड, चिंधुक, फत्कूर 'सर्वांगीं लोंबलें मास। चिरकुटा सारिखें।' -दा ३ ५ ४६ 'जैसे मूषकानीं फाडिलें। चिरकुट।' -दावि २९४ चिरगुट पहा. [स चीर=वस्त्र कुट अल्पार्थी]

**चिरक्या**—वि. (कों) लाकडें कापण्याचा धंदा करणारा, अरेकशाचें काम करणारा [चिरणें]

**चिरखांव**—पु (कों) तुळई उभी चिरून, कापून केलेला खाव [चिरणें+खाव]

**चिरंगट**—स्त्री (राजा) (पदार्थांची, वस्तूची, सामानाची) ठेंचाठेंच, गर्दी, खेंचाखेंच. [चिरडणें]

**चिरगटणें, चिरंगटणें**—उक्रि (दोन पदार्थांच्या कैचींत, पेंचात, दावात, सापडून) चिरडलें जाणें, चिरडणें, दाबणें, चेंगरणें, दाबलें जाणें [चिरडणें]

**चिरंगटाचिरंगट**—स्त्री (सामा) चेंगराचेंगर, ठेंचाठेंच [चिरगटणें]

**चिरगुट-गूट**—न १ (उप) कापड, कपडा, वस्त्र २ चिंधी, चिरटी, फडकें, चिंधूर [स चीर] ०पांघरूण-न आपरा पांघरावयाचे कपडे, वस्त्रप्रावरण, कपडालत्ता वगैरे [स चीर=वस्त्र+प्रावरण]

**चिरघोडी**—स्त्री (सामा) कुरघोडी बेडूकउडीचा, घुरघोडीचा खेळ

**चिरचिर**—स्त्री (कों) चिगचिग, रपरप, चिबचिब, रेंदड

**चिरचिर-रा**—क्रिवि चिरकन्, टरकन्, चर्र् आवाज करीत [ध्व चिर चिर!]

**चिरचिर-रा-रि**—क्रिवि झुरझुर पाऊस पडत, झिरी मिरि, झिरिझिरि

**चिरचिरणें**—अक्रि १ ओरडणें, चीत्कार करणें (हत्ती इ०कांचें) २ (कोणाएकावर) रागावणें ३ तडकणें, तडासणें, फुटणें, चिरकणें (आवाज) ४ आवाज होऊन फाटणें

**चिरचिरीत**—वि जुनें, झिरझिरीत, विरविरीत झालेलें (कापड) [ध्व चिर=फाटतेवेळीं होणारा आवाज]

**चिरचिऱ्या**—वि. तापट स्वभावाचा, चिडखोर, अल्प निमित्तावरून चिडणारा (मनुष्य)

**चिरचोळी**—स्त्री एक प्रकारचें झाड, (सामा) गेळ ह्या नांवानें ओळखलें जाणारें झाड -ळें-न गेळफळ, चिरचोळीचें फळ



**चिरंजीव**—पु १ पुत्र, मुलगा 'पण आपले चिरंजीव आपणास उलट लिहिणार नाहीत कशावरून!' -पकोघे २ प्रत्रास, धाकट्या माणसास, आपल्यापेक्षां कमी वयाच्या मनुष्यास पत्र लिहितांना त्याच्या नांवामागें लावावयाचें उपपद, शब्द उदा० 'चिरंजीव गोपाळ यास अनेक आशीर्वाद' ३ अमरपुरुष, ब्रह्मकल्पापर्यंत जगणाऱ्या सात पुरुषांपैकीं प्रत्येक (अश्वत्थामा, बली, व्यास, मारुती, बिभीषण, कृप, परशुराम हे सात पुरुष चिरंजीव आहेत) ४ दीर्घायुषी, फार दिवस वांचणारा, चिरकाल टिकणारा 'तेणें न लोटती जे भाग्याचे। दसती ते स्वर्गींचे चिरंजीव।' -ज्ञा ८ १५७ 'सुश्री सुकीर्ति होईल गतिही बरवी प्रजा चिरंजीव।' -मोभनु ८५ [स चिर=फार दिवस, दीर्घकाळ+जीव्=जगणें, वांचणें] **चिरंजीवी**-स्त्री मुलगी, कन्या [चिरजीव] -वि. चिरकाल जगणारा, दीर्घायुषी [चिर+जीविन्]

**चिरट-टूं. चिलट**—न डास, घुगुरटें, मच्छर, मुरकूट. चिलट पहा

**चिरंट**—न चिऱ्हाटीचें फळ

**चिरटा**—पु एका बाजूपासून फाडून घेतलेला केळीच्या पानाचा तुकडा, फाळका [चिरणें]

**चिर(रा)टी**—स्त्री (चिरटा या शब्दापासून लघुत्ववाचक) १ चिरटा, कळीच्या पानाचा एका बाजूनें फाडलेला तुकडा 'मात्राचिया त्रिपुटिया। प्रणव काय केला चिरटिया।' -अमृ १५८ २ जमीनीचा चिंचोळा तुकडा ३ चिंधी, चिरफळी, पट्टी (कापडाची, कागदाची).

**चिरटें**—न (कापडाची, कागदाची) चिरोटी, तुकडा, कळीचा फाळका [स चीर]

**चिरटोळी**—स्त्री लहान मुलास स्तनपान करण्याचें शिकविण्यासाठीं कापसाचा बोळा दुधांत भिजवून चोखावयास देतात ता मूल जन्मल्याबरोबर त्यास स्तनपान करता येत नाहीं म्हणून अशा रीतीनें दूध पाजतात

**चिरड, चीड**—स्त्री १ रोष, दसदा, राग, त्रास, उणें उत्तर, मर्मश्रवण इ०कांपासून होणारा मनाचा क्षोभ, अपमान जाणवणें, राग [क्रि० भरणें] २ चिडखोरपणा, क्रोधस्वभाव, शीघ्रकोपीपणा ३ तिटकारा, तिरस्कार, कंटाळा (क्रि० येणें) [चिडणें]

**चिरड(डी)खोर, चिरडी**—वि चिडणारा लवकर रागावणारा, तिडतिडा, चिडचिड्या, खिसखिशा, दिरवट, दिक्कतखोर [चिरड+खोर]

**चिरडणें**—उक्रि चपणें, दाबणें, चेंगरणें चिरगटणें, दाबामुळे फुटणें, फाटणें [वै.स रिष्=नाश करणें, मारणें, नष्ट होणें, इजा करणें -भाम १८३५]

**चिरडणें**—अक्रि रागावणें, चिडणें, संतापणें

चिरडी—स्त्री. लहान मुलीचें लुगडें. ०नेसणें-( ल. ) रागानें, संतापानें फणफणणें, धुमसणें; तळपायाची आग मस्तकाला जाणें. ०मागणें-रागावणें ( रागानें फणफणणाऱ्या मुलामुलीसंबंधीं म्हणतात ).

चिरडीचपटी—वि. चप आणि ताठ; हाडकुळ्या आणि कडक; शीघ्रकोपी.

चिरण—स्त्री. १ उभें चिरलेलें केळीच्या पानाचें अर्धे, तुकडा; फाळका २ चीर; भेग; तडा; फट. ३ अरुंद रस्ता; बोळ ( दोन घरांमधील ). [ चिरणें ]

चिरणा—पु. फाळका. चिरण अर्थ १ पहा.

चिरणी—स्त्री. १ चिरण; केळीच्या पानाचा मधून उभा कापलेला तुकडा, फाळका. २ लाकडाला, दगडाला पाडलेली खोबण, खांचण ३ खाचगळगा; खोबण पाडण्याचें हत्यार, एक प्रकारचें किकरें; अरुंद पटाशी. ४ भिंतीचा पुढें आलेला भाग ( ज्याचा बसण्यासाठीं किंवा वस्तु ठेवण्यासाठीं उपयोग होतो तो ); भिंतीचा कंगोरा, जई; छपेली. ५ आडोशासाठीं केलेली एक विटेची भिंत. ६ करंज्यांचे कांठ कापण्याची कातण. ७ एक प्रकारची लहान गाडी. [ चिरणें ]

चिरणें—न. १ सुतारकामांतील एक हत्यार; एक प्रकारची लहान पटाशी; किकरें. २ कातण. ३ कागदाची जाळी खोदावयाचें हत्यार ४ मूर्ती कोरण्याचें हत्यार. [ चिरणें]

चिरणें—उक्रि १ फाडणें; कापणें; चीर पाडणें. ( ग्राम्य ) उभा चिरणें-लांबीच्या बाजूनें कापणें; फाडणें. 'महाकाळ उभा चिरीन बाणीं।' २ पसरणें. 'एकीकडे त्यानें चिरिल्या वागुरा। ठेविले श्वानपुत्रा एकीकडे।' -तुगा ३ ( मर्यादा इ० ) आखणें. 'मग महा भूतांचे एकवाट। सैरा घेटाळूनि माट। भूतग्रामाचे आघाट। चिरिले चारी।' -ज्ञा ११.४५. ४ वेगळाले भाग करणें. 'तेणें भावशुद्धि चिया वाटे। विखुरले विकल्पाचे कांटे। मग चिरिले अव्हांटे। अप्रवृत्तीचे।' -ज्ञा ७ १७०. [ वैसं. चिरि=कापणें; जखमी करणें; ठार मारणें; तुल० हिं. चिरना ध्व. ]

चिरंतन—वि १ जुना; प्राचीन; पुरातन; शाश्वत. २ चिरजीव. 'तरी मागें कायि हे होती। चिरंतन।' -ज्ञा २.१८ [ सं. चिरम्+तन=फार काळ टिकणारें ]

चिरपणें, चिरपुटणें, चिरपिटणें—अक्रि. ( आजारीपणामुळें, अशक्तपणामुळें ) एकदम, न कळत पण थोडें शौचास होणें; चिरकणें. [ ध्व. चिर ]

चिरपुट-टी—स्त्री. ( गो. ) एक प्रकारची वनस्पती. ही हात-दीड हात उंच असून हिला पांढरट हिरवट लहानशा वाटोळशा बोराएवढीं फळें येतात हीं फळें खातात.

चिरफळ—स्त्री. एक प्रकारचें झाड. -न. चिरफळीचें फळ. याची मिरमिर लागते. याला कोंकणांत तिरफळ असेंहि म्हणतात.

चिरफळ, चिरफाळी, चिरफोळी—स्त्री ( वस्त्र, लांकूड, कागद इ०काचा ) फाडून, चिरून काढलेला लांबट तुकडा; चिरटी; चिंधी. [ सं. चीर=वस्त्र+फलक=पट्टी ]

चिरपुट—न. ( कु. ) एक प्रकारचें लहान झाड व त्याचें फळ.

चिरबोटी—स्त्री. एक वनस्पती; कपाळफोडी पहा

चिरबोटें—न. चिरबोटीचें फळ; कपाळफोडा पहा.

चिरमी—स्त्री. १ मनुष्याचें शरीर, लांकूड, फळ इ०कांतील रसांश कमी झाल्यामुळें वरील त्वचा आकुंचित होऊन पडलेली सुरकुती. २ वस्त्र इ०कांस पडलेली घडी. [ चीर ]

चिरमी जोडा—पु. उंच्या आकाराचा एकतळी जोडा; मारवाड्यांच्या लग्नांत लागणारा एक जोडा. [ चर्मीजोडा ]

चिरमुटणें—अक्रि सुरकुत्या, घड्या पडणें; चिरम्यांनीं युक्त होणें. [ चिरमी ]

चिरवट—वि. गिचमिड लिहिलेलें; खरडलेलें; चिताक.

चिरंवटा—पु गव्हाचा रवा व मैदा एकत्र करून आंत गोड पदार्थ भरून केलेली चौकोनी पुरी; चिरोटा पहा.

चिरस्थाई-स्थायी—वि. कायम टिकणारें; पुष्कळ काळपर्यंत राहणारें, टिकणारें; शाश्वत; चिरंतन. 'एऱ्हवीं जगदाकाराचें शिरें। जें चिरस्थायीयाचे घुरे।' -ज्ञा ८.१५४. [ सं. चिर=फार वेळ+स्थायिन्=राहणारा, टिकणारा, असणारा ]

चिरा—पु कौमार्य; क्वांरी; कुमारीदशा. ०उखळणें, उतरणें-कौमार्य नष्ट करणें; वेश्येच्या अनुपभुक्त मुलीशीं प्रथम संभोग करणें. 'चिरा उखळा माझा राव नशा। घेऊन तुम्ही पलंगावर बसा।' -पला ४.२५.

चिरा—पु जरीच्या उभ्या कांड्या असलेलें अरुंद व लहान पागोटें; मंदील. 'शिरीं बांधियेला चिरा। खोंवी मोतियांचा तुरा।' -अमृत १२७. 'भिरविचिल चिरा, शिरावर तुरा।' -अमृत ५१. [ सं. चीर=वस्त्र ]

चिरा—पु १ बाका. २ इमारती घडीव दगड; खाणींतून सुरुंग लावून उडविलेला दगडाचा, खडकाचा तुकडा, खपला; दगड, शिळा. 'हरिनें कामा घातला चिरा। विसवरा मुकविलें।' -तुगा १२३. ३ बांधावरील हद्दीचा दगड (ग्राम्य) ०उलथणें-( कोणी लठ्ठ मनुष्य ) एकाएकीं मरण पावणें ०घालणें-सक्रि. धोंडा घालणें, नाहींसें करणें; नष्ट करणें. 'तुका म्हणे घालूं जिवपणा चिरा। जाऊं त्या माहेरा निजाचिया।' -तुगा २५५४. ०पडणें-१ धोंडा, दगड पडणें. २ ( ल ) ( एखादी क्रिया ) बंद पडणें. 'शरीरा येणें सरे। किंबहुना येरझारे। चिरा पडे।'

–ज्ञा १२ १३६ (वाप्र) –चिऱ्यांचा पाया–पु. १ दगडी पाया २ (ल) (स्त्रीसततीहून विरुद्धगुण, भिन्न अशी) पुरुष सतति (स्त्रीसतति दुसऱ्या कुळांतच जाते आणि पुरुषसतती मूळच्या कुळात कायम राहते म्हणून पुरुषसततीस चिऱ्याचा पाया असें म्हणतात) ३ (ल) स्थैर्य, भक्कमपणा असलेलें राज्य, मालमत्ता, हुद्दा, उद्योग, मसलत इ० चिऱ्यावरची रेघ–स्त्री १ दगडावरील लेख २ (ल) कधीं न पुसलें जाणारें लिखाण ३ कधींही न मोडली जाणारी चाल ४ इराणी लोकाचा एक कायदा

चिराई—स्त्री लाकडें कापण्याची मजुरी [चिरणें]

चिराई(य)त—स्त्री किराईत, काडेचिराईत किराईत पहा

चिराक-ख—चिराग पहा

चिराख, चिराखदान—चिराग पहा

चिराखबत्ती—स्त्री. (देवळातील, मशिदीतील, घरातील) दिवे लावण्याची अथवा व्यवस्थेनें ठेवण्याची क्रिया [फा चिराग्+बत्ती] ०करणें–दिवे लावणें, साफसूफ करणें इ०काम करणे

चिराखी—स्त्री १ (मुसलमानांच्या) पिराजवळ दिवा बत्ती लावणें पिरास फुलाचे हार इ० वस्तु अर्पण करणें इत्यादि कार्य २ वरील कामाबद्दल मिळणारें सरकारी वेतन वर्षासन ३ वरील काम करण्याची नोकरी, कामगिरी. ४ फकीरास सध्याकाळीं द्यावयाची भिक्षा [फा चिराग्=दिवा]

चिराग—पु दिवा, दिव्यांची रांग ठेवण्याची चौकट [फा. चिराग्=दिवा] ०दान–न १ दीपस्तंभ, दीपमाला २ शोभे करिता ओळीनें लावलेल्या दिव्यांचा समुदाय [फा चिराग्+दान]

चिरांबा—पु चिरलेला आणि खारलेला आंबा [चिरणें+आंबा]

चिरायु—वि दीर्घायुषी, बरेंच आयुष्य असलेला [सं. चिर=फार काळ+आयुस्=आयुष्य]

चिरी(रिं)चिरा—स्त्री (व) चिरचीर

चिरि(रीं)मिरी—स्त्री लहानशी लांच, बक्षिशी, बक्षीस म्हणून दिलेला पैसा साहेबाची भेट घ्यावयाची म्हणजे शिपा याला चिरिमिरी द्यावी '–क २६ ७ ३० [चिरी द्वि] ०घेणें–सक्रि बक्षिशी घेणें, लहानशी लाच घेणें तार घेऊन आलेला शिपाई चिरमिरी घेतल्याशिवाय जाईना '

चिरी—स्त्री १ कळीच्या पानाची चिरटी २ भेग, चीर, ओरखडा ३ (कुंकवाची गंधाची) बारीक कोर, रेघ मार्गी शोभे कस्तुरी। जैसी त अर्धचंद्राची चिरी।' –कथा १.२ ६१. ४ एखाद्या वस्तूंना चिरून केलेला तुकडा 'तव तेथिचे अव सरीं। जरा नामें निशाचरी। तियेन देखिल्या दोन्ही चिरे'। रात्रिमार्गी।' –कथा ४ १६ ७४ [चिरणें]

चिरी—स्त्री लहान साडी, चिरडी [स चीर=वस्त्र, चीवर (री)–चिअरी–चिरी –भाअ १८३४] ०पट्टी–स्त्री बायकाची वेणीफणी, काजळ कुंकू इ० प्रसाधनविधि [चिरी+पट्टी]

चिरीक—स्त्री आकस्मिक भीति धास्ती, गाळण, त्रेधा, तिरपिट [फा]

चिरीमिरी—स्त्री चिरिमिरी पहा

चिरीव—वि चिरलेलें, फोडलेलें, फाटलेलें करवतीनें कापलेलें, उभ चिरलेलें 'मोकळी चवरी ऐसी। चिरीव गमे।' –ज्ञा १८ ३२७ [म चिरणें]

चिरू—स्त्री (राजा) कपड्यात होणारी मोठी व पाढरी ऊ [स चीर=वस्त्र+म ऊ]

चिरुट—पु निवळ तबाखूचीच विडी, चुट्टा [ता शुरुट्टु=वळकटी गुडाळी, इ चिरूट्, पो शारूट्]

चिरेकार—पु (गो) इमारतीचे दगड घडून विकणारा

चिरेख(खा)ण—स्त्री चिरे व्हावयाजोगे दगड जींतून निघतात अशी खाण [चिरा+खाण]

चिरेबंदी—स्त्री १ घडीव दगडाचें बाधकाम, चिऱ्यांनीं केलेली बंदिस्ती, फरशी, फरसबंदी २ (ल) दमदार व स्निग्ध पदार्थांचें भोजन ३ –वि चिऱ्यांनीं बाधलेला, भक्कम मजबूत [म चिरा+बंदी] ०पाया–घर–काम–पुन घडीव दगडांनीं बाधलेला पाया–घर–काम ०पाया घालणें–(ल) (कोणत्याही कार्याचा) भक्कम पाया घालणें, पक्केपणीं आरंभ करणें

चिरो—पु (गो) चौकोनी दगड

चिरोंजी—स्त्री चारोळी, चार नामक झाडाचें बीं.

चिरो(रों)टा, चिन्होटा—पु गव्हाचा रवा व मैदा एकत्र मळून त्याची पोळी लाटून तीस आठ नऊ पदरा घालून त्या घडीचे चौकोनी लहान तुकडे तुपात तळून करतात पक्वान्न 'राहु सुदीचे गामट। तिये चिरोटे धाकुटे।' –मसाप २ २३

चिरोटी—स्त्री लहान चिरोटा

चिरो(रों)टी—स्त्री १ कळीच्या पानाची चिरफळी; फाळका २ जमिनीचा कापडाचा कागदाचा लांबट तुकडा, पट्टी, चिंधी [चिरणें]

चिन्दघटा चिन्होंटा—पु चिरवटा चिरोटा पहा

चिन्हा(न्हा)ट—न चन्हाट दोरखंड [चन्हाट]

चिन्हाट–टें—न चिन्हाटीचें फळ

चिन्हाटी—स्त्री १६ वनी –कृपि ५०७

चिल—न भकूच्या शेतांतील गवत

**चिल**—स्त्री. घार. ( अव. चिला ) 'होले तितर गोंवा चिला ।' –दावि २४४. [ सं. चिल्ला ]

**चिलकं(कां)डी**—स्त्री. चिरकंडी पहा.

**चिलका**—स्त्री. (क.) बरग्यावरची फळी. 'बरग्यावर चिलका बसवा' 'चिलका चांगली बसली नाहीं.' [ किलचा वर्णव्यत्यास ]

**चिलख(क)त**—न. शरीराला बंदुकीची गोळी किंवा तरवारीचा, शस्त्राचा वार लागूं नये म्हणून घालावयाचा लोखंडी कड्यांचा, पट्ट्यांचा आंगरखा; शरीरत्राण. [ फा. चिहिल्‌ह्द् ]

**चिलरी**—वि. १ चांगला; उत्कृष्ट; आमी, उंची. २ घणकोरा; मूर्तिमंत ( रुपया इ० नाणें ) [ हिं. चिलक=चकाकी ]

**चिलघोळ**—स्त्री. बारीक पानांची घोळ नांवाची भाजी. [ चिल+घोळ ]

**चिलचिलाट**—पु ( मनुष्यें, पक्षी, माकडें इ०कांच्या ) घोळक्याचा आवाज; किलकिलाट; गलबला. [ ध्व ]

**चिलट**—न. १ डांस. २ घुंगरटें. ३ उवरांतील कीटक.

**चिलण**—स्त्री. ( कों. ) १ चीर; चिरण; भेग; तडा. २ खिंड; भगदाड. ३ बोळ, शेरी [ चीर ]

**चिलप**—स्त्री. (गो.) चामड्याचा पट्टा बसविलेल्या खडावा, प्रत्येकी; चपल. [ चपल ]

**चिलपाट**—पु ( व. ) कुणबी लोकांतील एक प्रकारचा खेळ.

**चिलविलाट**—पु चिलचिलाट पहा

**चिल(ली)म**—स्त्री १ तंबाखु इ० आत घालून वर अग्नि ठेवण्याचें हुक्क्याचें मातीचें पात्र; तंबाखूचा धूर ओढण्याची मातीची नळी २ चिलमींत घातलेली तंबाखु इ०. [ हि फा चिलिम ] **चिलमी**-वि १ चिलीमबाज, तंबाकू ओढणारा २ चंगीभंगी लोकांनीं उठवलेली लोणकढी ( कंडी, थाप, गप्प ).

**चिलवंत**—पु लिंगायतांच्या ( चिलवत, पंचम, तिलवली व कुलुग या चार आश्रमांपैकीं एका आश्रमाचें नांव अथवा त्या आश्रमांतील पुरुष

**चिलपाण**-न, **चिलवणा**-ना—वि. ठेंगू; खुजट; बुटका ( मनुष्य, जनावर इ० ). [ का. चिल्ले, चिल्ले=लहान; क्षुद्र ]

**चिला**—पु (विरू. चिरा ) जरीच्या उभ्या काड्या असलेलें लहान पागोटें; मदील चिरा पहा

**चिलार-री, चिल्हार-री**—स्त्री एका वनस्पतीचें, वेलीचें नांव. इच्या र्थ स वाल म्हणतात.

**चिलारी**—वि. लहानगा; छोटा; चिमकुला. 'यमुना जमुनाची बारीक वाळू । तेथें खेळे चिलारी बाळ ।' –मसाप ४ २५१ [ का. चिल्ले ]

**चिलिचिव(च्ची)ल**—वि. ( दें. ) चिलचिविलीत, चिकचिकीत.

**चिली, चिलये**—स्त्री. ( हेट. ) आग्नेयी दिशा.

**चिलीपाट**—स्त्री. ( व. ) आट्यापाट्यासारखा एक खेळ.

**चिलींपिलीं**—नअव. १ मुलेंबाळें; कच्चींबच्चीं; बालबच्चीं. २ मकरसंक्रांतीच्या दिवशीं स्त्रिया ब्राह्मणांस सुगडाचें वाण देतांना त्यांत जीं बारीक बारीक बोळकीं घालतात तीं. [ पिलीं द्वि तुल० का. चिल्लिपिल्ली=सर्वत्र पसरलेलें; द्वि. ] **चिल्यापिल्याची पाटी**-स्त्री. ( व. ) ( ल. ) मुलेंबाळें असलेली स्त्री.

**चिलीविली**—न ( कु. ) चिलींपिलीं अर्थ २ पहा.

**चिलीम, चिलिमी**—चिलम, चिलमी पहा.

**चिलेवखतर**—न चिलखत; शरीरत्राण 'आगांतील चिलेवखतर घातिलें लिहून आलें सविस्तर ।' - गापो ८०. [ फा. चिहिल्+बख्तर् ]

**चिल्या**—पु. १ आग्नेयीकडील वारा. चिली पहा. २ होडी सरपटत किनाऱ्यावर नेण्याकरितां केलेली फळ्यांची रचना.

**चिल्ल**—पु घार. [ सं चिल्ल ]

**चिल्लर, चिल्हार, चिल्हेर**—पु. हलकीं नाणीं; खुर्दा –वि. किरकोळ; बारीकसारीक; लहानसहान. 'धुर्डीतसे चिल्लर थिल्लरातें ।' –र ५५ [ का. चिल्लर=लहान, लहानसें नाणें ] ०**खर्च**-पु १ किरकोळ खर्च. २ एतद्देशीय बगुलीनोकरास दिलेली सादीलवारी. ०**जमा**-स्त्री. बगुलाच्या लहान बाबी, ( जमाबंदींतील ) जमेच्या लहानसहान रकमा. ०**देणें घेणें**-न. लहान प्रमाणावर देवघेव. ०**मंडळी**—स्त्री. मुलाबाळांचा जमाव. ०**सामान**-न किरकोळ लहान सहान वस्तू **चिल्हार-री**-स्त्री. ( उप ) बाजारबुणगे.

**चिल्लर, चिल्हार, चिल्हारी**—स्त्री. वनस्पतिविशेष.

**चिल्ला**—पु. धनुष्याची दोरी. 'धनुष्यबाण वीर कंकण रात्रंदिवस चढवून चिल्ले ।' –पला १०९. [ हिं. ]

**चिल्ला**—पु. चाळीस दिवसाचें उपोषण व ध्यानमग्नता. 'तुम्ही चिल्ल्यांतून उठले याची खबर लिहिली मालूम जाली.' –ब्रप २३९. [ फा. ]

**चिल्लावणें**—अक्रि. ( व. ) रडणें; ओरडणें [ ध्व ]

**चिव**—पु ( कु ) मासे पकडण्यासाठीं घातलेला बधारा

**चिवचिव**—स्त्री चिमणी, उंदीर वगैरे प्राण्यांचा आवाज. २ रागावलेल्या लोकांचा, तगादा करणाऱ्यांचा, भिकाऱ्यांचा, शाळेंतील मुलांचा कलकलाट. 'तुम्हीं सगळे मला चिवचिव लोडूं नका, एक जण सांगा.' 'बाजारात त्याची चिवचिव झाली.' =बाजारांत लोक त्याच्या भोंवतीं जमून निंदेचा, तगाद्याचा, निर्भर्त्सनेचा कलकलाट करूं लागले. ३ चीत झालेल्या पहिलवानास, मुष्टियोद्ध्याचें पुटपुटणें, चडफडणें, कबुली देणें. ४ असंतुष्टपणानें स्वतःच्या मनाची कशीबशी समजूत घालून घेणें;

अक्षमतेची, दुबळेपणाची पिरपिर [ स चीव्=बोलणें द्वि, चीव्-भाषार्थे-राजवाडे प्रथमाला ]

**चिवचिवणें**—अक्रि १ ( चिमण्याचें ) चिवचिव आवाज करणें, (उदराचें) चूचू करणें २ चिडणें, कावणें, खिजणें ३ (जखम, गळू इ० ) ठुमठुसणें, शिणका मारणें ४ ( अम्ल पदार्थ ) फेनयुक्त होऊन फुरफुरणें फिद्‌फिदणें ५ ( पक्वान्न ) बचब आणि पाणचट होणें [ चिवचिव ]

**चिवचिवाट**—पु अतिशय चिवचिव, पराकाष्ठेची चिवचिव. [ चिवचिव ]

**चिवट**—न जाडया-भरडया सुताची गुंडाळी, ही बहुधा दहा बारा हात लांब असते आणि तानवटाभोवतालच्या शंभर दोनशें फेऱ्याची असते

**चिवट**—वि १ वातड, चामट, चिकट, ( उप ) सोसाळु, चिकट कृपण, हिमटा. २ कुसकरलेलें, चेंगरलेलें, चिवडलेलें (अन्न, फळें इ० ) ०पणा-पु चिकटपणा, सोशीकपणा, निग्रह, धारणा 'हा जो चिवटपणा आमच्यात आहे तोच आमच्या जिवंत पणाचें कारण आहे ' -टिव्या

**चिवटणें**—अक्रि चुरडणें, मेंदामेंदा करणें, एकत्र होणें, चिमटणें

**चिवटा**—पु कितान, गलबताच्या शिडाचें जाड कापड

**चिवटॉग नवटॉग**—न (कु ) कच्चीबच्ची, चिल्लीपिल्ली.

**चिवटी**—स्त्री ( व. ) चोय चोयटी, शिळक

**चिवटी**—वि चिवटाचें केलेलें, चिवटासबंधी

**चिवडणी**—स्त्री १ चिवडण्याची क्रिया २ ( ल ) चिड विणें, खिजविणें, सतापविणें ०मांडणें, लावणें-चिडविणें, खिजविण्यास सुरवात करणें.

**चिवडणें**—सक्रि १ काला करणें, कुसकरणें चेंगरणें, चुरडणें २ अव्यवस्थित करणें, चवढव करणें, यचावचा कालवणें, [ स चिपिट-पोहा ]

**चिवडा**—पु १ ( अन्न फळें, फुलें इ० पदार्थांची ) पुन-पुन चिवडल्यामुळें झालेली दुर्दशा भसळ २ ( ल ) बिघाड, विचका घोटाळा, बचबच 'मूखा करितां चिवडा होय। भजा लसीचा।' दारिद्र्यें चिवडाचि सर्व, दवडा यारीवडापावडा।' -आमु ५ ३ पोहे चुरमुरे, हरभऱ्याचें डाळें इ० अनेक पदार्थ तळून एकत्र मिसळून केलेलें तिखटमिठाचें खाद्य [ स चिपिट= पोहा ]

**चिवडाचिवड**—स्त्री १ पुन पुन चिवडणें, काला करणें, घालमेल करणें २ घालमेल, सरमसळ खिचडी. [ चिवडणें ]

**चिवणें**—न एक प्रकारचा मासा

**चिवर चिंवर**—न फणसाच्या गऱ्याभोंवतालचें ततूचें वेष्टण, पातीं [ स चीव्=झाकणें, आच्छादणें ]

**चिवरें**—न कच्चें पोफळ, सुपारीचें कच्चें सालासकट फळ

**चिवली**—स्त्री एक प्रकारचें रेशमी कापड [ स चीव्= झाकणें ]

**चिवली**—स्त्री चिवा जातीचा जंगली बांबू ( चिवा बागेंत लावतात ) [ चिवा ]

**चिवळ**—वि १ रोड, सडपातळ, बारीक, प्रमाणाबाहेर लहान घेराचा 'जें हलुवट ना गहिंस। जें चिवळ ना सपाश।' -एमा १.६७९ २ लांब आणि बारीक, चपटा केलेला, चेपटलेला ३ ( वे ) अरुंद [ चिवळणें ]

**चिवळ**—स्त्री (व ) उन्हाळ्यात होणारी एक पालेभाजी

**चिवळणें**—सक्रि १ हातानें दाबणें आणि मर्दणें, ( फळें इ० ) हातानीं दाबून चोळून मऊ करणें. २ चेपटणें, चापट करणें, लाबट करणें [ का चिव्वु=सालणें ]

**चिवळी**—स्त्री (कु ) नद्यादिकांच्या काठीं असलेली अरुंद वाट

**चिवा**—पु. लहान जातीचा बांबू. [ का चिव्वे=काठी ]

**चिवार, चीवार**—स्त्रीन १ चिवा जातीचें बांबूचें बेट. २ एका जातीचें गवत [ चिवा ]

**चिवारी**—स्त्री. ( इट ) बांबूची भरीव काठी, बांबू [चिवा]

**चिवाळणें**—अक्रि ( कु ) बारीक होणें [ चिवळणें ]

**चिवून चावून**—क्रिवि. काटकसरीनें, कोरून कोरून, जेम तेम, मितव्ययानें 'चिवूनचावून पन्नास रुपये जमविले ' चावूनचिवून पहा

**चिहळणें, चिहाळणें, चिळणें**—अक्रि प्र चिघळणें (मीठ, साखर, गूळ इ० पदार्थ) द्रवणें, झिरपणें, गळणें, निचरणें. [ चिघळणें ]

**चिहाळ**—पु. ( कों ) घाम, पाझर, ( मीठ इ० कांचा ) स्राव, निचरा, दमटपणा [ म चिहळण ]

**चिह्न, चिन्ह**—न १ ( जणें करून विवक्षित प्रकारानें कोणी ए० मनुष्य, वस्तु पदार्थ ओळखला जातो अशी ) खूण, निशाणी, उ० मस तीळ, डाग, ठिकें इ० २ ( साहचर्य, समानाधिकरण्य इ० नियमामुळें कोणी एका गोष्टीचें, गुणादिकाचें ) ज्ञापक, गमक, अभिज्ञान, व्यजन, उ० क्रॉस, स्वस्तिक, बिल्ला इ दक्षिण वायु सुटला हें पर्जन्याचें चिन्ह दिसतें ' 'या स्वारींत छत्रचाम रादि राजाचीं चिन्हें दिसत नाहींत त्यावरून येथें राजा नसेल ' 'तम्हा हें कांहीं मला धड चिन्ह दिसत नाहीं ' -रत्न ३ ३ ३ ( गणितशास्त्र रसायनशास्त्र ) पारिभाषिक सांकेतिक खुणा उ० अधिक (+), उण(−), गुणिल (×) भागिलें (−) इ० ४ ( लाकडाच्या फळीनें, बंदुकीच्या बारानें, दिली जाणारी ) सुचना

५ अवलक्षण, लोकविलक्षण कृति, चाळा, खोडी 'असीं काय चिन्हें आरंभलीस' ६ अवलक्षणी विचित्र, खोडकर द्वाड लोक विलक्षण असा मनुष्य, मूल हा मुलगा एक चिन्हच आहे ७ ज्ञापक अगर गमक गोष्ट, वस्तु निदानाच्या पाच प्रकारांपैकीं चौथा प्रकार (रोगाचें) बाह्यलक्षण उ० पिवळे डोळे, पांढरी जीभ इ० 'नाना रोगाची परीक्षा। नाना चिन्हांची परीक्षा। हें ज्ञान नव्हे।' -दा ५ ५ १५ चिह्नित-वि खूण केलेला, डाग, ठिपका, असलेला, आकृति काढलेला, ज्यावर चिन्ह आहे असा [स]

चिळक(कां)डी, चिळकी—स्त्री (सामा) चिरकांडी, (रक्ताची, दुधाची) जोरानें बाहेर उडणारी धार [का चिळकिसु=शिंपडणें]

चिळण—स्त्री चिलम पहा

चिळवें—न एक माप, कोळव्याचा निमा भाग, शेराचा चतिसावा भाग

चिळस-सो-शी—स्त्री किळस, वीट, तिरस्कार, शिसारी 'किंबहुना चिळसी। पात्र होईन।' -ज्ञा १३ ५७३ ०खोर-खाऊ-वि खतखोर, कटाळखोर, भिकारखोर, चोखनळ, जिभेचा शिंदळ चिकित्सेखोर चिळसी-वि चिळसखोर पहा. चिळसणें-अक्रि १ कटाळणें, विटणें, कटाळा तिटकारा, शिसारी येणें 'मग अपुलियाचि लाळे। चिळसाय जैसा।'—ज्ञाप्र ६१० 'तेंही सार्यो चिळसा। सणें तुम्ही।' -ज्ञा १८ १५१ [किळस]

चिळहाट—पु (कों) घाम, चीक, चिहाळ, पाझर (मीठ, साखर इ० काचा) [चिहळणें]

ची—अ (काव्य) वि च पहा

ची—स्त्री (कुस्ती खेळणारांतील) पराभव दुर्बलता कबूल करण्याचा शब्द [ध्व] ०म्हणणें-अक्रि, चीत झालों असें कबूल करणें 'मी त्याला अखेरीस ची म्हणावयास लावलें २ वेगानें जाणाऱ्या गोळीचा सू सू असा आवाज

चीक—पु १ (वड, उंबर रुई शेर इ० झाडाचें) दूध, चिकट पदार्थ (बाभूळ निंब इ० झाडाचा) डिंक २ नुकत्याच प्रसूत झालेल्या स्त्रीच्या नुकत्याच व्यालेल्या गाय म्हैस इ० पशूच्या स्तनांतील चिकट दूध, नवप्रसूत मानव पशुजातीय स्त्रीच्या स्तनांतील चिकट दूध ३ बलक गोंद ४ चिकवड्या अथवा पापड्या बनविण्यासाठीं शिजविलेलें तांदुळाचें पीठ ५ केळीच्या सोंगा पासून किंवा गहू इ० धान्यें भिजत घालून वाटून त्यापासून काढलेलें सत्त्व ६ तिळाच्या तेलांत काढलेलें चमेलीचें सत्त्व [स चिक्कण] चिकानें-चिकें वोळला—वि त्याच्या चिकण रसानें प्रचुर झालेला, खाण्यास योग्य, पक्क झालेला (जोंधळा, बाजरी इ० कांची कणसें खाण्यास योग्य झालीं असतां त्यांस म्हणतात)

चीकसा—पु चिकसा पहा

चीची—स्त्री १ छी थू, फजिती 'जिकडेतिकडे होते चीची। अवलक्षणें।' -दा १९ ३ २४ २ फोल, निरर्थक, क्षणभंगुर 'कायामाया दों दिसांची। आदिअंतीं अवघी चीची।' -दा १५ ८ ३८ [ध्व]

चींचीं—उद्गा पराभवाच्या कबुलीचा वाचक शब्द 'मी त्यास चींचीं करावयास लाविलें' [ची द्वि]

चीज—स्त्री गाणें, पद 'त्यानें रावदारींतल्या मारदस्त हिंदुस्थानी चिजा अशाच्या तशा म्हटल्या' २ लकबीनें गाण्या करितां रचलेलें पद, गीत [फा चीझ्]

चीज—स्त्री १ वस्तु गोष्ट, (सामा) चित्ताकर्षक चमत्कारिक, सुंदर वस्तु गोष्ट 'गायनासारखी दुसरी चीज नाहीं' —न सार्थकता, सफलता 'परिक्षेत तो पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाला, त्याच्या अभ्यासाचें चीज झालें' [फा चीझ्] ०वस्त-स्त्री सामानसुमान, भांडींकुंडीं, वस्त्रप्रावरण वगैरे

चीझ—न दुधाचा केलेला एक खाद्य प्रकार दहीं व मध्यां तील बलक हे घुसळून बदामाच्या पिठांत मिसळाव साखर व लोणी घालून तें मिश्रण चुलीवर घाटून उतरावें म्हणजे चीझ तयार होतें -गृशि १ ५४१ [इं]

चीट—न. छापून चित्रविचित्र केलेलें एक प्रकारचें कापड, छीट [स क्षिप्त, हिं छीट]

चीड—स्त्री १ चिरड, तिटकारा घुस्सा राग, संताप २ शीघ्रकोपीपणा, रागीटपणा. [चिडणें हिं]

चीड—पु कोयड्यासह असलेला कल्दार रुपया हा कजा रणी स्त्रिया गळ्यामध्यें घालतात -गुजा

चीण—स्त्री १ (वस्त्रादिकांस पडलेली) सुरकुती, (परकर, इजार इ०कास घातलेली) चुणी, निरी २ (जमीन, भिंत इ० कांस पडलेली) भेग, चीर, फट ३ (कों) घरास माल येऊ नये म्हणून चिणून बसविलेला दगडाचा थर ४ चाणली ठोकलेली, चोपलेली, जमीन, गच्ची [स चि=एकत्र करणें]

चीत—वि १ कुस्तींत पराभूत होऊन उताणा पडलेला, जमिनीला पाठ लागलेला २ (ल) जमीनदोस्त केलेला, नाश पावलेला, खराब झालेला व्यापारांत गमावलेला (पैसा) ३ (कवड्याच्या खेळांत) उताणी पडलेली (कवडी) (याच्या उलट पट) ४ चितारलेलें, खरडलेलें, गिचमिड लिहिलेलें [स जित, हिं चित] ०करणें-जमीनदोस्त करणें, ठार मारणें, उताणा पाडणें पराजित करणें

चीत्कार—पु हत्तीचें ओरडणें 'चीत्कारकरी जाणो पतिला चाटावया म्हणे गुड घे।' -मोद्रोण २ ५० [ध्व स]

चीन—पुन १ चिनीचें मूळ, रताळयाची एक जात. २ –पुस्त्री (प्र) चीण (कपड्याला, कागदाला, पडलेली) सुरकुती, सुणी, निरी ३ (जमिनींतील, भिंतींतील) फट, भेग [चीण]

चीन—पु चीन नामक देश चिनी रेशीम–न चीन देशांतील रेशीम, हलक्या जातीचें रेशीम ०मेंधी–स्त्री मेंदीची एक जात

चीनचीनी—स्त्री रात्रीं चिनचिन आवाज करणारा प्राणी, रातकिडा 'नीजों नव्हे सकाळी वेळी। रातीं काळी चीनचीनी। –तुगा ४१६४ [ध्व]

चीप—न (कों) खाडींतून, खाऱ्या दलदलींतून वाढणारें, टेंगणें पण फैलावणारें एक प्रकारचें झाड 'तेथेंच आज खारवट पाण्यावर पोसणारीं हीं दळमत्रीं इपळींचीं व चिपीचीं झाडें मातलीं आहेत' –सह्याद्रीच्या पायथ्याशीं १४

चीप—स्त्री १ दगड, लाकूड, सोनें इ०काचा पातळ, सपाट तुकडा, पाचर; कपची, धलपी 'विविधा कौस्तुभाची दाटी। चीप दाटत होती कंठीं।' –ज्ञा १८ १५५६ २ फुलाची माळ तुरा पहा ३ (विशेषत लहान मुलांस होणारा) आतड्याचा एक प्रकारचा विकार ४ (चांभारी) टाचेचा मागचा भाग उंच करण्याकरिता, सुधारण्याकरितां लावलेला चामड्याचा तुकडा [स चिपिट]

चीप—वि गप्प, स्तब्ध, चूप

चीप-थ—वि ओला, चिंब, निथळता थबथबीत चबचबीत

चीप—क्रिवि लवकर, जलद [स क्षिप्र चिप्प–चीप –भाभ १८३४]

चीफसाहेब—पु (व) फौजदार, दरोगा

चीथ—वि चिंब, चबचबीत, चीप पहा

चीर—न वस्त्र, कपडा, (सामा) अन्तर्वस्त्र 'पाचवण चीर नेसो देतसा' –भाए १२१ 'जानकी फाडी चीरपदर। अलंकार बांधोनि समग्र। मारुतीकडे टाकिलें। –रावि १५ १८६ –वेमीस्व ९ १५३ [म] ०गुट–न (नेसावयाचें) लहान वस्त्र वस्त्राचा तुकडा अंतर्वस्त्र [स चीर=वस्त्र+का गुट=गुप्त, आंतील] ०चोळी–स्त्री मकरसंक्रांतीच्या दिवशीं सुवासिनी स्त्रिया एकमेकींस चोळी आणि लुगड्याचें जें वाण देतात तें ०घाण–न (स्त्रियांत रूढ) वधूच्या नातलग स्त्रियांस आहेर म्हणून वरपक्षाकडून आलेलें लुगडें वगैरे. उदा० आजेचीर, मामेचीर [चीर+वाण]

चीर—स्त्री १ फट भेग तडा २ (बायकी) कुंकवाची चंद्रकोर लावण्याची चांदीची काडी ३ कुंकवाची चंद्रकोर [स हिं] ०जाणें–तडा, भेग पडणें

चीर—न एक प्रकारचें झाड या जातीच्या झाडांपासून राळ तयार करितात यापासून टरपेंटाईन निघतें यांस इंग्रजींत पाईनचें झाड म्हणतात डेहराडून येथील जंगलांत हीं झाडें पुष्कळ आहेत

चीर—पु जखियाच्या डावापैकीं एक, यांत बेंबीच्या उजव्या बाजूला मारून डावीकडे चिरत जावें लागतें [चिरण]

चील—स्त्री एक प्रकारची पालेभाजी 'ते हजारों हजार थोर थोर मनुष्य नागवे उघडे केवळ भणग कंगाल अन्नरहित, वस्त्रानें रहित, कळाहीन चीलाची भाजी खात आले' –भाव १२५. [चिलघोळ पहा]

चील—स्त्री १ (राजा) भेग, फाट चीर २ खिंड, बोळ, दरी चिलण [चीर]

चील—स्त्री (गो) १ पोतें (गाणपाटाचें) २ राजपुन्याचें झाड [स चिल्=वस्त्र परिधान करणें, चेल=वस्त्र, हिंदू, चैलिम्=झाकणें, लॅ चेल प्राज हिलु गों. हुलजा]

चील—न चामड्याला लागलेलें मांस –बदलापूर १८५

चीळ—स्त्री (स्तनांतून, सडांतून) एकदम निघणारी दुधाची चिळकांडी, पान्हा ०फुटणें–अक्रि पान्हा फुटणें

चुइटी—स्त्री १ घोड्याच्या माथ्याळाच्या केसांच्या वळलेल्या वेणीस जोडलेली शाटणीची, फितीची चिरमी, धादोटी चिंधी, पट्टी २ उसाच्या गंडेरीचा, जोंधळ्याच्या ताटाचा चावून राहिलेला चोथा [स चिपिट=सपाट]

चुइगी चुई चोय—स्त्री १ पत्रावळीचीं पानें जोडण्यासाठीं (पत्रावळी लावण्यासाठीं) केलेली बोरूची, बांबूची बारीक काडी, चोय, चोई चोयटी २ फणीचा कंगव्याचा दांत घ्यावयाजोगी, दात म्हणून असलेली बांबूची बारीक सळई ३ डफावरील बोल काढण्यासाठीं वापरावयाची लवचीक वेताची काडी [स सूचि–ची=बारीक सळई सुई]

चुई चोय—स्त्री चुइगी पहा

चुकचुक—स्त्री पालीचा आवाज, कांहीं जातीच्या पक्ष्याचा आवाज [ध्व]

चुकचुक-का—क्रिवि. चुकचुक अशा शब्दानें, चुक चुक असा आवाज करीत [ध्व]

चुकचुकणें—अक्रि. पालीचें, कांहीं विशिष्ट पक्ष्यांचें चुक् चुक आवाज करणें [चुक् द्वि]

चुकटी—स्त्री १ चिमट चिमूट, २ (हाताचा आंगठा व मधलें बोट यांनीं वाजणारी चुटकी चटकी पहा ३ भुकटी पूड ४ (एखाद्या कामांतील) युक्ती, हातखंडा, प्रवीणता –क्रिवि कचकचां, कडकडून मोठी आरमटी करूनि चुकटी दतावळी वाजुनी।' –आसी ४२ [ध्व हिं चुटकी] ०साधणें-येणें-बसणें–युक्ती साधणें, हातोटी येणें इ० [हिं.]

**चुकणें**—अक्रि १ चूक, प्रमाद करणें, नको तें करणें; अपराध करणें 'लिहिणार चुकतो पोहणार बुडतो' २ मार्गापासून चळणें, बहकणें, भटणें, भलत्या रस्त्याला जाणें. 'वळण वळण चुकों नये। हेकाडपणें।' –दा १४४१३ 'चुकला फकीर मशिदींत शोधावा' ३ कामांत कसूर, कुचराई करणें, कामचुकारपणा करणें मी चाकरीमध्यें कधीं चुकलों नाहीं ४ (नेम, लक्ष्य इ०) न साधणें, न लागणें, अतरणें, हुकणें 'वाटा लागे तरि गगना भेट। एन्हवीं चुकें।' –ज्ञा ८ २५३ ५ व्हावयाचें टळणें, न घडणें 'गेलें तें येत नाहीं, होणार तें चुकत नाहीं' 'सरकारचें देणें चुकावयाचें नाहीं' 'अपमृत्यू चुकला' ६ (इष्ट योग्य वेळांत, पद्धतींत) कमी किंवा जास्त होणें 'तुम्ही वेळ चुकलांत' 'चुकला तो मुकला' ७ संख्येमध्यें आकड्याचा फरक पडणें, लागणें, आकडा कमी येणें ८ गफलतीनें, नजरचुकीनें वगळला, टाकला जाणें, गळणें ९ (हिशेब) चुकता करणें, फेड करणें, (कर्जा) तुटणें, तोडणें, (खटल्याचा) निवाडा होणें, करणें 'हिशेब, खटला, कर्जा चुकला' १० (कांहीं एक काम, गोष्ट) केली जाणें, समाप्त होणें 'मी तर त्यास वचन देऊन चुकलों' [स श्कु=चुक+णें=चुकणें श्कु म्हणजे उडी मारणें, गति करणें करून चुकणें म्हणजे करून पुढें जाणें, –भाम १८३५, स च्यु=मार्गभ्रष्ट होणें, च्युत, स चुक= दु ख देणें अथवा भोगणें, प्रा चुक्कइ, का चुकी=डाग] (धात्र) **चुकल्या चुकल्या सारखें होणें**–आपल्या सवयीचें माणूस किंवा वस्तु जवळ नसल्यामुळें परक्या ठिकाणीं गेल्यामुळें चित्तास अस्वस्थ वाटणें 'घरची सर्व मंडळी परगावीं गेल्यानें मला आज चुकल्या चुकल्यासारखें झालें आहे.' सामाशब्द–**चुकतचुकत–माकत–चाकत**–क्रिवि चुका करीत, घसरत, चुकतां चुकतां, वेड्यावाकड्या पद्धतीनें, अडखळत 'चुकत माकत आठवलें। इतुकें संकळित बोलिलें। न्यूनपूर्ण क्षमा केलें। पाहिजे श्रोतीं।' –दा १३ ५ १९ 'त्याला श्लोक पाठ येत नाहीं, चुकतमाकत म्हणेल' [चुकणें द्वि] **चुकलामाकला–चाकला**–वि नजरचुकीनें राहून गेलेला, योग्य वेळीं हजर न राहिलेला, वाट चुकून भलतीकडे गेलेला [चुकला द्वि] **चुकून माकून–चाकून**–क्रिवि चुकीमुळें, नजरचुकीनें, दुर्लक्ष होऊन [चुकून द्वि] **चुकूनसुद्धा**–क्रिवि चुकीनें देखील (नेहमी नकारणरूपी प्रयोग) 'मी चुकूनसुद्धा त्याच्या वाटेस जात नाहीं'

**चुकता**—वि पुरा केलला बाकी नसलेला (हिशेब), फेडलेलें (कर्ज) निकालास लावलेला, तोडलेला, मिटविलला (कज्जा, दावा, खटला) [चुकणें] ०**करणें–करून देणें**–सक्रि १ निकालास लावणें 'सरकारची बाकी चुकती केली' 'सावकाराचा पैका, मांड्याचा कज्जा, लोकांचें कर्ज माझा हिशेब त्यानें चुकता करून दिला.' २ बाकी राहिलेला (हिशेब) शिल्लक असलेलें (कर्ज), वादग्रस्त असलेला (वाटा), अंगावर असलेला (हप्ता), निकालास न लावलेला 'चुकते रुपये दिले' 'चुकता पगार लष्करास मिळाला' 'चुकती बाकी दिली' चुकता पैका, हिशेब वाटा, हप्ता इ० ' [चुकणें]

**चुकर**—वि गोंधळलेला; घाबरा, बावरा, आश्चर्यानें, धोटा झाल्यानें गुंग, स्तब्ध झालेला [चुकणें]

**चुकरा**—वि (दे) चुकणारा; चुका करणारा [चुकणें]

**चुकली**—स्त्री प्र. चुगली पहा चहाडी

**चुकवती चुकतीं**—स्त्री कर्जाची फेड, तडजोड, कर्जाचा निकाल लावणें [चुकविणें]

**चुकवाचुकव-वी**—स्त्री १ टंगळमंगळ अळमटळम (एखादें कार्य आपल्यास करावें लागेल म्हणून कुचरपणें त्यासंबंधीं केलेली) टाळाटाळ; उडवाउडव, आज उद्यां करणें, दुर्लक्ष्य करणें २ (अनेक देण्याचा, कर्जाचा) निकाल, तडजोड, वारावार [चुकविणें द्वि)]

**चुकविणें**—सक्रि १ (नजर) टाळणें, झुकविणें, चुकवाचुकव करणें, झुकांडी देणें २ घोटाळ्यांत पाडणें, चूक करावयास लावणें, फसविणें ३ (कर्ज, देणें इ०) निकालांत काढणें, वारावार करणें 'सदर अदालतीनें जिल्हे कोर्टाचे निवाड्यावरील अपिलें चुकवावीं' –न्यासे ४ 'त्यास बोलावून आणून चौकशी करून तटा आम्ही चुकवितों' –मसाप २.१६७ [चुकणें पासून प्रयोजक]

**चुका**—पु चूक, घोटाळा 'परांतरासि न लावावा धका। कदापि पडों नेदावा चुका।' –दा १२ १० २० चूक पहा

**चुका**—पु १ एक प्रकारची वनस्पति, ही पोटावर घातली असतां गर्भ उमळून पडतो २ एक पालेभाजी, आंबट चुका, ही भाजी बारामास होते, ही अग्निदीपक, उष्ण रुचिकर, पित्तल, आणि सारक आहे धोत्र्याच्या विषावर हिचा उतारा देतात [स चुक्रिका]

**चुका**—पु. हिशेबाचा निकाल.

**चुकाऊ**—वि (काम, कर्तव्य) टाळणारा, चुकविणारा, (कामात) कुचरपणा, टंगळमंगळ करणारा [चुकणें]

**चुकाचूक**—स्त्री १ फार मोठी चूक, घोडचूक, घोंटाळा गोंधळ बहकणें २ परस्पराची चुकामूक गांठ न पडणें [चुकणें]

**चुकांडी**—स्त्री झुकांडी, दृष्टि चुकवून पळून जाणें, हातावर तुरी देऊन पळून जाणें, फसविणें [चुकविणें] ०**देणें**–चुकविणें, झुकांडी देणें [चुकविणें]

**चुकामुकी, चुकामूक**—स्त्री १ परस्परांची भेट व्हावी अशा संकेत असतां तो चुकणें व गांठ न पडणें 'चुकामुकी माजि

माय देखताचि वाडेकाहें बाळ जसें गळां पडे ।' –अमृतधुव ६ 'अमोनिया सम्यक् जाणा चुकामुक । भुल्ले निश्चक मन्त्रीं तन्त्रीं । २ योजिलेल्या अनेक साधनात मेळाचा, ऐक्याचा अभाव • [ चुकणें द्रि ]

**चुकार-री-रू**—वि वाट चुकलेलें, भटक्या मारणारें, दूर वळलेले (जनावर वस्तु) (जनावर, वस्तु हरवल्यावर परक्याकडून सापडल्यावर त्यासबधींहि हा शब्द योजतात) [चुकणें]

**चुकार, चुकारचट्टू-तट्टू चुकारी-चुकारू-चुकायू**—(आपणास सागितलेल्या, नेमून दिलेल्या कामाची) चुकवाचुकव, टाळाटाळ टगळमगळ करणारा, कुचराई करणारा, चुकाऊ

**चुकाऱ्या जाणें**—अक्रि चुकणें नाहींसें होणें, मरणें नाश पावणें 'पणतोंहें भक्षितो पणजा । मूल बापास मारी वाजा । चुकाऱ्या गेला राजा । चौथा जणाचा ।' –दा १५५२ [चुकणें]

**चुकावणा**—वि चुकार, चुकारतट्टू चुकवाचुकव करणारा [चुकविणें]

**चुकावणी**—स्त्री. नजर चुकविणें, टाळणें, डोळा चुकविणें [चुकविणें]

**चुकाव(वि)णें**—सक्रि १चुकविणें, खोटें करणें 'लाकीं केलें तें चुकावी । लोकिं भाविलें तें उलथवी ।' –दा ११ १० ११ २ टाळणें, नजर, डोळा चुकविणें 'मातें करीं धरिल देउनि एक लीला । चाले चुकावुनि पुढें चमकोनि घोपा । विबाधरा शशिमुखी विक्रमजुषोपा ।' –आक ३ [चुकणेंचे प्रयोजक रूप]

**चुकी**—स्त्री १ चूक दोष अशुद्धता २ अपराध ३ अपराधाबद्दल शिक्षकानें केलेली शिक्षा [चूक] ०ची **अर्जी**-स्त्री पुरवणी अर्ज, अधिक खुलासा करणारा अर्ज ०ठेवणें-अक्रि (ल) दोष लावणें, मागें सारणें टाकणें 'ज साहित्यातें बोजाची । अमृतातें चुकी ठेवी । गोडिसेपणें ।' –ज्ञा १३ ११५६

**चुकुर, चुकूर**—पु १ भ्रम, भ्राति २ चुकवाचुकव –वि भ्रमिष्ट, आश्चर्यानें चकित झालेला, बावरलेला, गोंधळलेला 'लपोनिया दरी चुकुर माउली । नाहीं हात केगी निद्रा सांडी ।' –तुगा १५८२ 'तुका म्हणे सग दशी कोण्या काळीं । चुकुर दुबेळी होतों आम्ही ।' –तुगा 'चुकुर होइजे मानसें । या नाव आध्यात्मिक ।' –दा ३ ६ ५० ०पणा-पु भ्रमिष्टपणा. अनाचार मोह नये चुकुरपणें । –दा २ २ ३४ [चुक]

**चुकोट**—वि (राजा) चांगलें, चोखट पहा –मसापर २ ३६०

**चुकोती**—स्त्री (कर्जाची) फेड, तडजोड, बारावार, परवाना, व्यवस्था [चुकती]

**चुक्का**—पु चुका पहा

**चुक्र**—पु १ एक पालेभाजी, चुका पहा २ धान्यापासुन बनविलेला सिरका [स]

**चुंखणें, चुखणें**—सक्रि चोखणें पहा

**चुंग**—स्त्री. पल्टण, तुकडी, ताफा, टोळी, कळप, सघ, झुंड, (सामा) जमाव समुदाय

**चुंगडा, चुंगडें**—पुन १ एकत्र बाधलेला मोत्याच्या लडींचा, सराचा समुदाय, पेंडाळें २ (पेढयाचें, ताटाचें, वेताचें, केसाचें आगकाड्याचें लहान सळयाचें, काठयाचें) जुडगें, जुडी, पेंडी, पुडका, जुवड

**चुंगडी**—वि (तजावरी, गुज) किरकोळ, थोडें, चिल्लर 'अमर सिगानें अकरा वर्षे चुगडी दिवस राज्य केलें' –तजाउर मराठी ऐतिहासिक शिलालिपी पृ ११४ (१९०७) [का चुगु= शेवटचा भाग तुकडा]

**चुगल, चुगलखोर चुगलीखोर**—वि चहाडखोर, पाठ तू निंदणारा खोटेंनाटें सांगणारा, कुटाळखोर, बालटखोर, कुचाळखोर, चहाड, तुफानखोर, कानाशीं लागणारा, लावालावी करणारा [चुगली]

**चुंगल**—स्त्री (व) चिमटी 'त्याची चुगल लौकर सुटत नाहीं, त्याचेजवळ पैसा मात्र रगड आहे' [स चतुर्+अगुल, फा चुगाऊ]

**चुगली**—स्त्री चहाडी, लावालावी, कुचाळी, बालट, द्वेषभावानें एखाद्याची वाईट मूर्खपणाची कृत्यें फोडणें [का. चुकलि, चुकालि=असत्य, निंदा] ०खाणें-सक्रि निंदा, लावालावी कुटाळी करणें

**चुंगा**—पु समुदाय, सघ –शर

**चुंगाल**—पु १ पजा २ (ल) जुल्म, जबरदस्तीचा ताबा. 'बहुत खुशवखत जाले कीं जबरदस्ताच्या चुगालापासुन गरिबाचें वतन खलास जालें' –रा २० ४९ [चुगल पहा. फा चुगाल्]

**चुगी**—स्त्री १ चुग पहा २ गवताची, कडब्याची पेंढी ३ शहरांत विकल्या जाणाऱ्या वस्तूवर बसविलेला कर [हिं चुगी= मूठभर धान्य चुगल]

**चुच**—स्त्री चोंच पहा 'दहीं घालोनि महाडोहीं । चुची धरोनि कांटिजे अहीं ।' –मुमादि ३२ ७५ [स चञ्चु]

**चुच**—स्त्री एक औषधी वनस्पति चिरणा नावाची वनस्पति

**चुचकार चुचकाविणें**—सक्रि १ (बुजालेलें, बेफाम झालेलें जनावर शांत करण्यासाठीं) ओठानीं चु चु असा विशिष्ट शब्द करून गोंजारणें. २ लाडीगोडी लावणें, आंजारणें गोंजारणें, मन वळविणें, फूस लावणें, थोपटणें [ध्व]

**चुचर, चुचरट**—न आंबा इ० फळांतील रेषा

**चुचळा**—पु (कु) समई मालविल्यानतर शिल्लक राहणारें वातीचें टोक, दिव्याचा काजवा कोजळी चुतुरा पहा

चुचा—स्त्री १ ल्हान पक्षी पकडला, दुखवला गेला असतां त्यानें केलेला केविलवाणा आवाज २ (ल)(पडद्याच्यासारखा) केविलवाणा, आर्त, दु खाचा आवाज [ध्व ]

चुचावणें चुंच वणें—अक्रि. १ (मदुकीची गोळी) सजसणें, झणकारणें, चुं चुं करणें २ (उदीर इ० ) चूं चूं करणें. ३ हूं कां चूं करणें, शब्द करणें 'एवढे लोक बसले होते पण कोणीही चुचावलें नाहीं ' [ध्व ]

चुंचु चुंचू—स्त्री चोंच [स चञ्चु]

चुचुरा—पु (कु ) दिव्याची चोंगळी चुचळा पहा

चुचू—स्त्री वृक्षविशेष

चुट्-टन्-कर-दिशीं—क्रिवि १ चटकन झटकन् २ चुटकीसरशी, एका क्षणांत, निमेषांत [ध्व ]

चुटकल—न (ना ) चिपळीसारखें एक गोंडी वाद्य

चुटका—पु १ अगदीं ल्हान पण विनोदी, हास्यकारक गोष्ट, आख्यायिका गाणें, लोकोक्तीची कविता, उपहासपर पोवाडा, विनोदी दोहे, उखाणा प्रहेलिका, अन्तर्लापिका इ० 'गुणें वेधी भेदी रसिकचि बळा रम्य चुटका ।' -दावि २२३. २ (झोपेची) डुकली, थोडकीशी स्वप्नमय झोंप (क्रि० लागणें, पडणें) 'स्वप्नाचा उगीच चुटका पडला.' ३ (चिलमीचा विडीचा) झुरका, (उसाचा रस, दूध पाणी इ० कांचा) घोंट (क्रि० घेणें) ४ लाल तापविलेल्या लोखंडानें दिलेला डाग, चटका (क्रि० देणें) ५ मनाला चुटपुट, हुरहुर लागणारी गोष्ट, मनाला लागून राहणारी, लागलेली गोष्ट

चुटका—पु (क) रहाटाला गुंडाळलेल्या पंचवीस फेऱ्यांचें सूत कितिही व्यवस्थेनें कोष्टी लोकांवर नजर ठेवली तरी ते एक चुटकाभर सूत काढून ठेवल्याशिवाय राहणार नाहींत ' [हिं ]

चुटका-की—पु (गोंडी) पायांतील जोडवें

चुटकी—स्त्री १ (हाताचा अंगठा व मधलें बोट यांच्या संयोगवियोगानें वाजणारी) चिटकी, चुटचुट असा आवाज २ चिमूट, चिमटी, हाताचा अंगठा व मधलें बोट यांच्या चिमटींत राहील इतका कोणत्याही पदार्थाचा अंश, चुटकी ३ स्त्रियांच्या पायाच्या अंगठ्यांत घालावयाचें चांदीचें वेढे जोडवें [स छोटिका, हिं चुटकी, तुल० का चिटिके ] चुटक्याचे मांडव-पु. चटक्याचे मांडव पहा

चुटचुला—पु छोटासा चुटका -शर [हिं ]

चुटकुला—वि छोटा, चिमकुला, इवलासा, ल्हानगा; चिटकुला

चुटपुंजी-ज्या—वि अ तुटपुंजा, तुटपुंज्या, ल्हानसा, थोड्याशा भांडवलावर केलेला (व्यापार, धंदा) तुटपुंजी पहा

चुटपुट—स्त्री तळमळ, चडफड, तडफड, खंत, हुरहुर, चुरचुर, पश्चात्तापाचा चटका, न करावी ती गोष्ट केल्यामुळें, न व्हावी ती गोष्ट झाल्यामुळें होणारी मनाची चडफड. [ध्व ] ०लागणें-अक्रि (मनाला) हुरहुर, खंत, तळमळ वाटणें 'मी रागाच्या सपाट्यांत वडील माणसाला थोडेसें टाकून बोललों, त्याची मला चुटपुट लागली आहे ' 'कोण आलें हातें, तें पुढे पणी समजून येईपर्यंत मनाला मोठी चुटपुट लागावयाची ' -पडघे

चुटपुट चुटपुटता, चुटपुटीत, चुटपुटा, चुटपुटता, चुटमुटा—वि बेताचा, अगदीं मोजका, हवा असेल तितकाच, आटोपशीर, अल्प, जेमतेम पुरेल इतका [स चुट्ट= कमी होणें-पडणें+पुट्ट=कमी पडणें, होणें] ०होणें-अक्रि (अन्नादि पदार्थ) अगदींच बेतवात, मोजकें होणें

चुटपुट—स्त्री. चुरचुर पहा

चुटाचुर्मा चुटिया, चुटिया चुरमा, चुटीयाचुरमा, चुट्याचुरमा—पु कणिकेचे गाकर चुरून त्यांत तूपसाखर घालून केलेले लाडू [स चुट्ट=कुटणें+चूर=चूर्ण करणें ]

चुटिमुटि, चुठिमुटी—वि अपुरा, बेताचा, तुटपुंजा, -क्रिवि काटकसरीनें, अगदीं बेताबातानें, हात राखून (खर्च करणें )

चुटी—स्त्री (विह ) चुट्टी पहा

चुटी, चुट्टी—स्त्री १ चिरूट; सिगार, तंबाखूच्या पानाची विडीप्रमाणें ओढण्यासाठीं केलेली वळी, सुंग. २ चिमूट

चुट्टा—पु. १ केळीच्या पानांत वळलेली विडी २ बंगाली चिरूट ३ तंबाखू ओढण्याची नळी, चिलीम [का चुट्टि, चुरुट्ट चुं=तंबाखूची वळकटी ]

चुडणी—स्त्री (कों ) अंधाऱ्या रात्रीं प्रवास करतांना उजेडासाठीं सणकाड्या, माडाच्या पोई पिंजून केलेले तुकडे इ० कांची जुडी पेटवून घेतात ती दिवटी. 'काळोख पडला आहे चुडणी घेऊन जा ' चुडी पहा

चुडत—न (कु )नारळीचें, ताडाचें पान; क्वचित भेरली माडाच्या पानासहि म्हणतात

चुडती—स्त्री. (कु बेट ) नारळीच्या चुडताची पाती, माडाच्या झांपाची पाती (गो )उजेडाकरितां पेटवायची दिवटी

चुडतें—न चुडत पहा

चुडवत—न चुडत पहा

चुडा—पु १ कांकण, बांगडी २ (ल ) स्त्रियांचें सौभाग्य (कारण नवरा मेल्यावर स्त्री करभूषण घालीत नाहीं ) 'करी लागपाठ चित्त वित्त नको पाहों । असईं तो चुडा तुज भोगईल नाहो ।' -तुगा २८८ 'हे जन्म मक्षयीं द

माथा चुडा।' –मसाप २ २१ चूडा पहा [स चूडा=शेंडी, करभूषण, काकण, का चुडेय=सोन्याची बागडी] (वाप्र) ०भरणें–लेणें–१ बागड्या भरणें, सौभाग्यवती होणें. 'जन्म सावित्री चुडा ल्याली '–नामना ९० २ (उप) मिठ्याप्रमाणें मागें सरणें, हटणें सामाशब्द– **चुडेदान**–न एखाद्या स्त्रीच्या नवऱ्याचा जीव वाचविणें, एखाद्या स्त्रीचें सौभाग्य राखणें [चुडा+दान] **चुडेदान देणें**–एखाद्या स्त्रीच्या पतीस मारण्याची वेळ आली असतां तिच्या सौभाग्याकडे लक्ष्य देऊन त्याचे प्राण वाचविणें, सौभाग्य कायम राखणें 'रखमादेवी म्हणे देईं चुडेदान। संरक्षी रे प्राण भ्रताराचा। –तुगा 'तुमचे माझ्यावर किती उपकार झाले म्हणून सांगू, तुम्ही मला चुडेदान दिलेत' –तोब **चुडेदान मागणें**–वैधव्य येऊ नये, सौभाग्य कायम, अखंडित रहावें अशी प्रार्थना करणें, पतीचें जीवित, प्राण रक्षण व्हावें अशी विनति करणें **चुड्यावरची बांगडी**–स्त्री बागड्याच्या विक्रीवर फुकट दिली जाणारी बागडी

**चुडाचोंवडा**—वि लुच्चेपणानें पुढें पुढें करणारा, फार लुडबुड करणारा, फाजील, अवास्तव कारभार करणारा, लुडबुड्या [चोंबडा द्वि]

**चुडात, चुडित**—न (देट कु) नारळीची झावळी, नारळाच्या झाडाचा झाप चुडत पहा

**चुडियार**—पु बागड्या करणारा

**चुडी**—स्त्री अंधाऱ्या रात्री उजेडाकरितां सणकाड्या, माडाच्या झापाची शिरें इ०कांची जुडी पेटवून केलेली दिवटी, चुडणी, पेटविलेली गवताची पेंढी, जुडी 'क्षणार्धात जिकडे तिकडे चुड्या पेटून उजेड झाला '–स्वप [जुडी, दे चुडुली] ०पुनव–स्त्री माघ शुद्ध पौर्णिमा. कोंकणात ह्या दिवशीं होळीस सुरवात होते ह्यादिवशीं रात्रीं घरासमोर व गांवाच्या सीमेची खूण दर्शविणाऱ्या देवाभोंवतीं, दगडाभोंवती चुड्या, दिवट्या फिरवितात [चुडी+पुनव]

**चुडी**—स्त्री बागडी चुडा पहा [तु हिं चुरी]

**चुडी**—स्त्री (घा) शिजविण्याची क्रिया

**चुडीत**—न (कों) चुडत, नारळीचा न विणलेला झाप, झावळी, चुडत पहा

**चुडेरहाट–चुडेराहट**—पु (कों) एक प्रकारचा पाणरहाट, कनेरडास चोवीस रवे माळून केलेला रहाट

**चुडेल**—स्त्री (गुज) स्त्रीरूप दुष्ट पिशाच, हडळ [हिं चुडैल, स चूडा]

**चुंडो**—पु (मिश्रो) पाय 'आने राती तियाज ओटापे हुणादोच चुडो घोलीन हुवी रेवो' =आणि रात्रीं त्याच्याच ओट्यावर कंगास रोते पोटांत पाय घालून निजावें '–मि २५

**चुड्या**— वि १ दिवटी धरणारा, चूड धरणारा. २ (ल) आगलाव्या, कळलाव्या, लावालावी करणारा, कज्जेदलाल, कळचेट्या [चुडी]

**चुण–कन–कर–दिनीं–दिशीं**—क्रिवि चुणण असा आवाज करीत, मणमण करीत, गोंगावत, सू सू करीत, सगमणा [ध्व]

**चुणकस**—स्त्री कापडास चुण्या पाडण्याचें, करण्याचें शिंप्याचें हत्यार [चुणी]

**चुणकळी**—स्त्री ज्याचा भाजून चुना करितात असा भुसभुशीत खडा, दगड, चुनखडी. [चुना+कळी]

**चुणका**—पु (प्र) चुणूक पहा

**चुणका**—वि (०प्रा) १ तरतरीत, हुशार, चलाख, चपळ, चुणचुणीत (मुलगा) २ (प्र) चुनका, निवडक, निवडीव, वेंचक, उत्कृष्ट [चुणणें=निवडणें]

**चुणखडा**—पु १ निवडक, वेचीव, उत्कृष्ट रत्न २ (ल) चणचणीत आणि आनंदी मूल, मनुष्य [चुणणें+खडा]

**चुणचुण**—स्त्री १ चुरचुर, सणसण, झणझण, तिडीक, फुणफुण (क्रि० लागणें, होणें, करणें) २ (ल) पस्तावा, मनस्ताप, रुखरुख, हुरहुर (क्रि० लागणें) [ध्व स. चुण्=टोंचणें द्वि]

**चुणचुणणें**—अक्रि. १ चुणचुण करणें, चुरचुरणें, झणझणणें, ठसठसणें २ चुणण् असा शब्द होईल असें उडी इ० कामुळें लागणें [चुणचुण]

**चुणचुणाट**—पु. चरचराट, सणसणाट, फार तीव्र चुणचुण, अतिशय झणझणणें (क्रि० लागणें, होणें, करणें) [चुणचुण]

**चुणचुणीत**—वि तरतरीत हुशार, चलाख, चमचमीत (मुलगा)

**चुणचूण**—स्त्री चुणचुण पहा

**चुणणें**—उक्रि १ निऱ्या करणें, (वस्त्रास) चुण्या पाडणें २ (विड्याचीं पानें इ०) चळत लावून ठेवणें, व्यवस्थेशीर रीतीनें रचणें [स चूण्–आकर्षणें, संकोच करणें]

**चुणणें**—सक्रि निवडणें [हिं चुनना, स चयन, चुण्=विभागणें]

**चुणफुण चुणफुणणें चुणफुणाट**—चुणचुण इ० पहा

**चुणी**—स्त्री निरी, निरी, सुरकुती, दुमड, सळ, मोड, दूण [स चूण्=आकर्षण संकोच करणें आंखूड करणें]

**चुणी**—स्त्री. कांहीं कण्या मिसळलेला भरड कोंडा, डाळीचीं सालपटें धान्याचे कण इ० मिश्रित असा गुरांस खावयास घालावयाचा कोंडा चुण [स चूर्ण]

**चुणी**—स्त्री *लहान माणकी, लहान माणिक* हिरा, हिरकणी 'कनकगर्भाचो धगधगित। मुक्तमणी दाळ दत। रत्न चुणी झळावत। तजलहरी लोटती।' –ख्रीस्त ९ १२७ [सं चूर्ण, हिं चुनी=धान्याची कणी, माणिक]

**चुणूक**—स्त्री १ (एखाद्या शास्त्राचा, कामाचा) नमुना; योग, लज्जत, आस्वाद (कृतीचा, कार्यपद्धतीचा). थोडासा मासला, मासल्याकरितां म्हणून दिलेलें शिक्षण, पाठ; (एखाद्या उद्दिष्ट क्रियेचें) अंधुक, अग्रसूचक, दिग्दर्शन (क्रि० दाखविणें; पाहणें) २ थोडीशी चुणचुण, चुरचुर, फुणफुण •दार-बाज-वि. टरतरीत; चुणचुणीत, चलाख; पाणीदार; हुशार.

**चुतड, चुतड्डा, चुताड**—नपु. (अश्लील) स्त्रीचें गुह्यांग, जननेंद्रिय [स चुत; च्यु]

**चुतवावळा, चुतिया, चुत्या, चुत्यानंदन चुतिया नंदन**—वि (ग्राम्य) बावळट; मूर्ख; व्यवहारज्ञानशून्य, खुळा; खुळचट [चुत. हिं चुतिया=खुळा]

**चुथडणें**—सक्रि नष्ट करणें, नाहींसें करणें 'समुद्रा, तेणें त्या सकल खलनौका चुथडवूं।' -केक ३३. [चुथडा]

**चुथडा**—पु (ग्रा.) उलथापालथीनें वस्तूंची, सामानाची झालेली सरमिसळ, अस्ताव्यस्त स्थिति, घालमेल, दुर्दशा, खोडाखोड; डाग इ०कांनीं (लिखाणाची) झालेली दुर्दशा, बिघाड; खराबी, कार्याची अव्यवस्था; विचका. [चुथणें]

**चुथणें**—सक्रि. (ग्रा.) चाळाचाळ, उचलाउचल करून धुंडाळणें; अस्ताव्यस्त रीतीनें उलटापालट करणें; अनेक वस्तूंतून एखादी वस्तु गहाळ झालेली असल्यास ती शोधण्यासाठीं सर्व वस्तूंची उलथापालथ, गडबड होईल असें करणें [सं चुथ् ?]

**चुथाचुथ**—स्त्री चाळाचाळ करून झालेली दुर्दशा, घालमेल, अस्ताव्यस्तपणा, गोंधळ, खोडाखोड, डाग इ० कांनीं (लिखाणाची) झालेली दुर्दशा, चुथडा [चुथणें द्वि]

**चुनकट**—स्त्री चिवटकाळ -मूव ८५ चुना असलेले, चुनेरी -पदाव १ १०. [चुना]

**चुनकळी चुन्याची कळी**—स्त्री. भाजलेल्या चुन्याचा खडा, न विरविलेल्या चुन्याचा खडा चुन्याच्या कळ्या पाण्यांत घालून कळीचा चुना तयार करतात [चुना+कळी]

**चुनका**—वि. निवडक, वेचक, शेलका. चुणका अर्थ २ पहा. [चुनणें]

**चुनखडा**—पु १ न भाजलेला चुन्याचा खडा २ भाजलेला पण न विरविलेला चुन्याचा खडा ३ भाजलेल्या आणि उमलविलेल्या चुन्याच्या गोळ्याचा खडूसारखा रेघा, आकृति काढण्याचा तुकडा [चुना+खडा]

**चुनखडा**—पु १ निवडक रत्न २ (ल) हुशार, चपळ, चुणचुणीत मुलगा, माणूस [चुनणें+खडा]

**चुनखडी**—स्त्री. १ न भाजलेल्या चुन्याच्या खड्यांचा समुदाय. २ जींत चुनखडे असतात अशी माती. [चुना+खडी]

**चुनखडी**—स्त्री (ल) चुणचुणीत व आनंदी मूल. [चुनखडा]-वि जींत चुनखडे खूप आहेत अशी, चुनखड्यांनीं युक्त. (जमीन, जागा). [चुनखडा]

**चुनखाण**—स्त्री चुनखडीची खाण. [चुना+खाण]

**चुनडी**—स्त्री. १ एक प्रकारचें रत्न, याच्या सहा जाती आहेत हें निळ्या रंगाशिवाय बाकी सर्व रंगाचें आढळतें. यास संस्कृतांत पुलकमणी व इंग्रजींत गार्नेट म्हणतात

**चुनडी**—स्त्री. (क) १ चुंदडी, ठिपक्याठिपक्याचें, थेंबाथेंबाचें (स्त्रियांचें) एक प्रकारचें वस्त्र; बुटीदार लुगडें. २ चुनडीवरील ठिपका. [हिं चुनरी]

**चुनणें**—सक्रि (विप्र.) चुणणें पहा 'एकचि वस्त्र होतें अडजुनें। तें ठेविलें चुनोनि भितीवरी।'

**चुनणें**—सक्रि निवडणें, चुणणें पहा [हिं. चुनना=निवडणें]

**चुनपटी-पट्टी**—स्त्री विड्याबरोबर खाण्याच्या चुन्याचें पान. चुना लावलेलें पान [चुना+पट्टी]

**चुनभट्टी**—स्त्री. चुना भाजण्याची भट्टी; चुनखडी भाजून चुना करण्याची भट्टी. [चुना+भट्टी]

**चुनलाखडा**—वि. (व) कळलाव्या

**चुनवटा**—पु चुनखडीची खाण, चुनखाण. [चुना+ठाव]

**चुनवणी**—न चुन्याची निवळ. [चुना+पाणी]

**चुना**—पु. १ शिंपा, कालवें, चुनखडीचे दगड भाजून व विरवून त्यांचें केलेलें चूर्ण. चुना बांधकामाला वापरतात सुरती, परखाडी इ० याच्या जाती आहेत २ (ल.) विध्वंस; निर्दलन. [स चूर्ण=चुना, प्रा चुण्ण, हिं चूना; गु चुनो] (वाप) •करणें-(ल.) एखाद्या पदार्थाचा मारून, खाऊन सत्यानास, विध्वंस करणें. (प्रतिपक्षीयाच्या) नाकास चुना लावणें-आपल्या कार्याला आड येणाऱ्या माणसाचें कांहीं चालू न देतां आपलें कार्य साधणें. •होणें-(ल) नाश होणें, खराबी होणें 'केळीच्या पानाचा सडून चुना झाला' सामाशब्द-चुनळ, चुनाळ, चुनाळें-न विड्याच्या पानास लावण्याचा चुना ठेवण्याचें लहानसें पात्र, डबी [स चूर्ण+आलय] चुनेखाण-स्त्री चुन्याची खाण, चुनखाण; चुनखडीच्या दगडाची खाण [चुना+खाण] चुनेगच्ची-स्त्री. १ चुन्यानें बांधलेली आगाशी २ (ल.) सुरती तंबाखू चुना लावून खाणें यासहि चुनेगच्ची म्हणतात -वि चुन्याचा गिलावा करून बांधलेलें [चुना+गच्ची] चुनेरी-वि चुन्याचें बनलेलें 'याचें कवच चुनेरी पदार्थाचें बनलेलें असतें' -प्राणिमो ८ [चुना] चुनौटा-टी-पुस्त्री चुनाळें [स. चूर्णवती; हिं चुनौटी] चुन्याचा गिलावा-पु घराच्या भिंती इ० कांच्या पृष्ठभागावर चढविलेला चुन्याचा थर चुन्याचा घाणा-पु. चुना बारीक करण्याची, चुना, रेती इ० एकत्र करून

बारीक करण्याची घाणी **चुन्याची निवळा**-स्त्री चुनवणी, विरविलेला चुना तळाशीं बसल्यावर वर राहिलेलें पाणी, (इं) लाइम् वॉटर. **चुन्याचें चाक**-न चुन्याच्या घाणींतील चाक **चुन्याचे दगड**-अव चुनखडीचे दगड, जे भाजून चुना तयार करतात ते दगड **चुन्याच्या कळ्या**-स्त्रीअव भाजलेल चुनखडीचे दगड

**चुनी**—स्त्री (प्र) सर्वार्थी चुणी पहा 'जडविल्या चुन्या बेसरी। करून चुसरी। नयनाची खोचली सुरी।' -पला ४ २३

**चुनीदा**—वि निवडक 'त्याचे उपरावधास जनरल मडोर याणें आपले हमराहांपैकीं बेश चुनीदी जमी येत पाठविली -पया ४८१ [चुणणें]

**चुघडी**—स्त्री (तंजावरी) चुनडी

**चुपकड**—न १ रहाटगाडग्याच्या माळेचीं लाकडें, ज्यावर रहाटगाडग्याचीं मडकीं बांधतात तीं ल्हान लाकडें, खापेकड २ रहाटगाडग्याचें चाक -शर

**चुपकणी, चुपकणें, चुपकळणें, चुपकी चुपचुपणें, चुपचुपीत**—(प्र) चुबकणी इ० पहा

**चुप्प चुपचाप**—क्रिवि १ गप्प, स्तब्ध, गुपचुप, मुकाटपानें, कांहीं आवाज न करता २ -उद्गा गप्पाहा, बोलू नको, खामोष [स चुप्-मंदया गतौ-राजवाडे धातुमाला, हिं चुप, चुपचाप, लिथु कोपु जम हुफेन, इं हॉप]

**चुंफणी**—स्त्री. १ (मुलाचें) चोखणें, रिंगणें २ ल्हान मुलाच्या गळ्यांत बांधलेली चोखणी -शर [चुफणें=चोखणें]

**चुफणें, चुंपणें**—उक्रि (फळांतील रस) चोखणें, (स्तनांतील दूध) पिणें, तोंडानें फळ इ०कांतून रस आकर्षण करणें [स चुब् हिं चूमना, का चिपु=चोखणें]

**चुंफा**—पु १ तोंडानें फळांतील रस स्तनांतील दूध ओढून घेण्याची क्रिया २ एका वेळीं ओढून घतलेला फळांतील रस, स्तनांतील दूध [चुफणें] ०घेणें-फळांतील रस स्तनांतील दूध एक वेळ ओढून घेतां येईल तेवढा घेणें [चुफणें]

**चुंब**—स्त्री. (राजा) गर्दी, दाटी, झोड, झुंड [स चुब] ०पडणें-एखाद्यावर, एखाद्या वस्तूवर गर्दी होणें, झोड उठणें, झुंड लोटणें

**चुबक**—स्त्री टोंचलेलें, वेधलेलें ल्हानसें भोंक छिद्र

**चुंबक**—पु लोहचुंबक 'चुंबकसन्निधानमात्रें लोह भ्रमतसे विचित्रें।' -विउ २ ५७ [स] ०जन्यविद्युत्-यंत्र-न लोहचुंबक क्षेत्र त तांब्याच्या तारांची वेगाळी जाराने फिरविल्यामुळें यांत्रिक शक्तीचें विद्युच्छक्तींत रूपांतर करणारें यंत्र यास इंग्रजींत डायनॅमो म्हणतात 'चुंबकजन्य विद्युत्यंत्रामुळें १९ व्या शतकांत यांत्रिक सुधारणेंत फार उपयुक्त आणि महत्त्वाच्या अशा घडामोडी झाल्या आहेत' -ज्ञाको च १८३ ०त्व-न कांहीं जातींच्या दगडाचा लोखंडास आकर्षण करण्याचा गुण एखाद्या लोखंडाच्या तुकड्याभोंवतीं विद्युत्-प्रवाह सुरू केल्यास त्यांत चुंबकत्व उत्पन्न होतें. (इं) मॅग्नेटिझम **चुंबकाकर्षण**-न. लोहचुंबकाच्या अंगीं असलेली लोखंडास आपल्याकडे ओढण्याची शक्ति [स चुंबक+आकर्षण] **चुंबकीय दृक्शास्त्र**-न प्रकाश व चुंबकत्व यांच्या परस्पर संबंधाचें शास्त्र याचा प्रथम शोध फॅराडे यानें लाविला

**चुंबक**—वि १ (ल) चुंबन, मुका घेणारा, लंपट, विषयी २ कृपण, कद्रू, कंजुष, कवडीचुंबक 'द्रोह आपेसी वोंगळ। चाळक चुंबक लव्याळ।' -दा २ ३ २८ [चुंबणें]

**चुबकडा**—वि ल्हान आकाराचा व गरगरीत, वाटोळसर, अटस आणि सुबक (घोडा, मनुष्य).

**चुबकणी**—स्त्री. धुवावयाचें वस्त्र दोन्ही हातानीं धरून दगडावर कुसकरण्याची, चिवळण्याची, मर्दण्याची क्रिया [चुबकणें]

**चुबकणें**—उक्रि १ धुवावयाचें वस्त्र दोन्हीं हातानी दगडावर चुबचुब आवाज होईल अशा रीतीनें कुसकरणें, चिवळणें, मर्दन करणें, चोळणें २ खुपसणें, टोंचणें, बोंचणें, छिद्र पाडणें. [ध्व]

**चुबकणें**—अक्रि थांबणें, कुंठित, स्तब्ध, तटस्थ होणें, मौनावणें 'सभा अवलोकितां दृष्टीं। शोभासमुद्र हेलावे पोटीं। चक्षु पोहणार उठाउठी। ऐलकांठीं चुबकले।' -मुसभा २ ७७ [स स्तभ्]

**चुबकणें**—न शिल्पकाराचें एक हत्यार

**चुबकती उडी**—स्त्री मोटकुळी उडीच्या उलट उडी. दोन्ही पाय जोडून पाण्यांत टाकलेली उभी सरळ उडी [चुबकणें+उडी]

**चुबकवड्या**—स्त्री (व) गोळ्यांचें सांचारें

**चुबकळणें**—उक्रि बुचकळणें, बुडविणें. 'जे आनंदसमुद्रीं कुंभ। चुबकळोनि भरिले।' -ज्ञा ९ १९१ 'मग हात चुबकळुनि पहात। तव निर्मळ सरा आतुनि येत।' -अक्रि १ बुडणें, गटांगळ्या खाणें २ (ल) मौनावणें, कुंठित होणें चुबुकळणें पहा [बुचकळणें]

**चुबकळा**—स्त्री बुडी, बुचकळी, बुटकुळी [चुबकळणें] ०मारणें-बुडी, बुचकळी मारणें 'बाट त्याचिया तजात। चद्रसूर्य चुबकळ्या मारित।' [बुचकळी]

**चुबका**—पु १ (गवताचा केसाचा, पानांचा) झुबका, बुचका, गुच्छ, झुपका, दोरा, तुरा २ पुंजका, जमाव, घोळका 'जेथ जेथें गूळ पडला तथ तथें मुंग्यांचे चुबके जमले' [स स्तबक]

**चुबकुळी**—स्त्री चुबकळी, पहा 'एक म्हणती कटाटी। पाणीणपाणाचा भेगी। चुबकुळ्या मारितां हिंपुटी। कासाविस व्हावें।' -दा ८ १० १८

**चुयचुयणें**—अक्रि चिंब होणें, ओलेंगच्च होणें, थबथबणें, चिचचिचणें [ ध्व , चुय द्वि ]

**चुयचुयीत**—वि ( पाण्यानें ) चिंब झालेलें, थबथबणारें [ध्व चुय द्वि ] ०भिजणें-अक्रि पाणी ठिपकेल, थबथबेल इतकें भिजणें, चिंब भिजणें

**चुयणें**—उक्रि मुका, चुंबन घेणें [ सं चुंबन, फ्रॅ. जि चुर, चुम ]

**चुयणें**—उक्रि १ ( स्तन, फळ इ० ) चोखणें, सेवन करणें. 'परी तें वेगळपणें भोगिजे। जैसें पक्षियें फळ चुंबिजे।' -ज्ञा ५ १३१ २ ( ल ) चोखून शुष्क करणें, ( ताप, भूतखेचार, पिशाचबाधा इ० यांनी ) कृश, क्षीण करणें. [ सं चुम्ब्, तुल० गॉ कुश्न्, हिन्द्‌ पोगइ, जिप्सी चोचिओव् ]

**चुयणें**—सक्रि ओढणें, आकर्षणें [ सं चुंबन ]

**चुयन**—न १ मुका घेण्याची क्रिया २ मुका ३ आकर्षण ( क्रि० घेणें, देणें ) [ स ]

**चुय(म)ळ**—स्त्री. १ डोक्यावरील ओझ्याखालीं, घागरी खालीं ठेवावयाची कापडाची, चिरगुटाची गुंडाळी, वेटोळें २ ( ल ) मुळव्याधीच्या मोडाचें वेटाळें, वेढ [ प्रा चुंभल, का सिंबी, सिंबळ ]

**चुयळ**—न ( को ) उसाचें चिपाड

**चुया**—पु ( मुग्यांचा, अळ्यांचा, कीटकांचा ) पुंजका, पुंजका, मुंड घोळ जमाव [चुंबन] ०पडणें बसणें-जमणें-एखाद्या पदार्थावर मुंग्यांची माशांचा झुंड पडणें

**चुंबित**—वि चुंबन घेतलेलें, चुंबिलेलें [ स ]

**चुयी**—स्त्री दाटी, गर्दी ( प्र ) चोंदी पहा

**चुयी**—वि १ चुंबन घेणारा २ ( ल ) पोंचणारा, आदण रा इ० गगनचुंबी, मुखचुंबी, चंद्रचुंबी इ० [ चुंबणें ]

**चुंबीत**—क्रिवि आपण होऊन, मुकाट्यानें, निमूटपणें, मुकाट, आपखुष, खालीं मान घालून, नाक मुठींत धरून 'दोन काट्या लाव राहून मग तो चुंबीत करील' [ चुंबन ]

**चुंबुकडा**—वि लहान पण गरगरीत, चुबका पहा

**चुबुकणें**—सक्रि वधण, छेदणें, टोंचणें [ हिं चुभाना ]

**चुबुकणें**—अक्रि शिरणें, आत जाणें बोंचणें. [हिं चुभना]

**चुबुकळणें**—सक्रि बुडविणें 'तिंये प्रमेयाचीच होकां वळणी। की ब्रह्मरसाच्या सागरीं। चुबुकळणी।' -ज्ञा ७ १८८

**चुबुकळणें**—अक्रि चुबुकळी बुडी मारणें 'नाहीं धारण ध्यान। नाहीं समाधि आसन। चुबुकळीत आनंदघन। आपणामाजीं।' -परमा १३ ५

**चुमळ**—स्त्री चुंबळ पहा [ प्रा चुंभल, दे चुंभळ, का सिंबल ]

**चुमळ**—स्त्री गुडघ्याचा दर, भोंक खाजतांना अंगावर गळूं नये म्हणून पहारीच्या टोंकाभोंवती बांधलेली कापडाची गुंडाळी [ प्रा चुंभल ]

**चुमळ**—वि मायाभूलत, हावरा, लोभी 'रिद्धिसिद्धि देवी। आम्ही चुमळी नव्हों तयी।' -तुगा १४५५ [स चुम्ब्=चुंबन घेणें ]

**चुमळणें**—सक्रि चुचकारणें, कुरवाळणें 'वोतु जवि सुधा रसें घोळिलें। की चांदिणां चुमळिलें।' -शिशु १९

**चुंमळी**—स्त्री व्यभिचारी स्त्री 'चुमळीशीं करी चुंमळीपण। अंगीं वसे गुण क्रियाहीन।' -तुगा ३१२२ [स चुम्ब्=चुंबन घेणें ]

**चुमळ्या**—वि कामी, विषयासक्त, स्त्रीलंपट

**चुमुळीजणें**—सक्रि बुडविणें 'वसळत तेलाची कढई। तयें चुमुळाजनी सगायी। तळिली कुरवडी सांडयी। तैसे होती।' -दाप्र ३०३

**चुमक**—वि ( व ) कंजूष, कृपण [ चुबक ]

**चुमळ, चुमकळ, चुमडी**—स्त्री ( गो. ) चुंबळ

**चुयटा, चुर्या**—स्त्री चुइटी, चुई पहा.

**चुर-कन-कर-दिशीं-दिनीं**—क्रिवि कापड फाटतांना, फाडतांना, तापलेलें लोखंड पाण्यात बुडवितांना होणाऱ्या चुर्र् अशा शब्दाप्रमाणें, चुर्र् असा आवाज करीत [ ध्व चुर्र् ]

**चुरका**—पु ( विप्र ) चरका पहा

**चुरंगटणें, चुरग(गा)ळणें**—सक्रि १ ( कागद, कापड, फूल इ० ) चुरडणें, चेपणें, कुसकरणें, चोळामोळा करणें, रगडणें २ ( मनुष्य, पशु इ० यांस ) दांडगाईनें वागविणें, भलत्याच रीतीनें उपयोग करून खराब करणें ३ खराब करणें, अव्यवस्थित, विस्कळित करणें [ चुरणें ]

**चुरग(गा)ळा, चुरगळामुरगळा, चुरगाळामुरगाळा**—पु १ चुरगळून पिळवटून, चेंगरून, कुसकरून केलेली दुर्दशा, चोळामोळा करून केलेली खराबी २ ( ल ) ( कामानें, श्रमानें, आजारीपणानें, काळजीनें झालेली शरीराची ) दुर्दशा [ चुरणें+गाळणें ] ०करणें-चोळामोळा, दुर्दशा करणें

**चुरचुर**—स्त्री १ भाजल्यामुळें, जखमेस मीठ इ० क्षार पदार्थ लागल्यामुळें, औषध झोंबल्यामुळें होणारी थोडीशी आग, वेदना २ ( ल ) ( एखाद्या कृत्याबद्दल मनाला लागलेली ) टोंचणी, हुरहुर, रुखरुख, पश्चात्ताप, खेद, काळजी, अनुताप ३ कटकट कचाच, वाचावाच, धुसफुस, धासाधास [ स चुर्=जळणें, द्वि ] ०चालणें-कटकट सुरू असणें, धुसफूस चालणें इ० ०लागणें-हुरहुर वाटणें, रुखरुख लागणें, पश्चात्ताप वाटणें

**चुरचुर-रां**—क्रिवि १ पदार्थ तळतांना होणाऱ्या चुर्र् आवाजाप्रमाणें, चुरचुर आवाज करीत २ चुणचुण, फडफडां,

चरचर, न अडखळता (क्रि० बोलणें) ३ (कापड इ० एकदम फाटताना होणारा चर्र् आवाज करीत (क्रि० जाणें) [ध्व चर्, द्वि ]

**चुरचुरणें**—अक्रि १ थोडीशी आग होणें, चुरचुर होणें, चुणचुणणें, सणसणणें, २ (ल ) पश्चात्ताप होणें, मनाला लागणें, खेद होणें, चुटपुट, हुरहुर खत वाटणें 'तेणें करून दुसऱ्या स्त्रिया आपणास तसी संपदा नाहीं म्हणून आपल्या मनात चुरचुरत असतात ' –व्यनि ३५ [चुरचुर]

**चुरचुराट**—पु १ अतिशय चुरचुर, चुणचुण, सणसणाट, फुणफुण २ (ल.) अतिशय खेद होणें, मनस्वी वाईट वाटणें, फार हुरहुर खत चुटपुट [चुरचुर]

**चुरचुरीत**—वि १ सुकें आणि तळण्यास योग्य, कुरकुरीत, तुडतुडीत, खुमखुशीत २ खडखडीत वाळलेलें, पूर्ण सुकलेलें (धोतर इ० ) ' धोतर चुरचुरीत वाळलें ' [चुरचुर]

**चुरचूर**—स्त्री चुरचुर पहा

**चुरचूरणें**—अक्रि चुरचुरणें पहा

**चुरचोंडा, चुरचोंवडा**—वि वटवट्या, लुब्रा, बडबड्या, (दुसरे बोलत असतां) मध्यें तोंड घालून बोलणारा, टकळी लावणारा चरचोंडा पहा [चुरणें+चोंवडा]

**चुरडई-य**—स्त्री सापाची एक जात

**चुरडणी**—स्त्री चुरडणें, चोळामोळा करणें, चेपणें, दाबणें, चेंगरणें, कुसकरणें [चुरडणें]

**चुरडणें**—सक्रि १ दाबून चुरा करणें २ चुरगळणें, कुसकरणें, चोळामोळा करणें (चुरणें आणि चुरडणें हे शब्द जरी समानार्थक आहेत तरी चुरडणें याच्या अर्थांत अधिक उग्रता आहे चुरडून कायमचा नाश होतो तसा चुरण्यानें होत नाहीं ). [स चूर्ण ]

**चुरडा**—पु चोळामोळा, कुसकरा, चुराडा, चुरडलेली, चिवडलेली स्थिति [चुरडणें ]

**चुरण**—न (हट ) सुरण

**चुरण**—न (व ) (धान्याची ) मळणी [स चूर्ण ]

**चुरण**—न (गो ) १ करंज्यांत घालावयाचें सारण, पुरण २ चूर्ण औषधी पूड [स चूर्ण ]

**चुरणें**—सक्रि १ (हातानें कुसकरून, दाबून ) चुरा, भुगा, चूर्ण करणें, बारीक बारीक तुकडे करणें २ (ल ) (शरीराचे अवयव ) दाबणें आणि कुसकरणें, चेपणें, रगडणें, मर्दणें, चंपी करणें हलक्या हातानें दाबणें, चोळणें 'पार्थ स्वहस्तें चुरी पादां । ' –मुमादि ३९ ३ ३ (ल ) दुःखानें, संतापानें हात चोळणें 'लोक शोकें चुरिती कर । म्हणती अनर्थ घोर । ' –मुसभा १४ १६६ ४ चुरगळणें चोळामोळा करणें, दांडगपणानें विस्कळित अव्यवस्थित करणें, चुरगटणें ५ कचक्यानें किंवा जोराच्या दाबानें अपकृत, खराब करणें [स छुरण= घासणें–चुरणें (पाय वगैरे) –भाम १८३२ स चूर्ण=पूड करणें ]

**चुरखुरा, चुरखुरीत**—वि तीक्ष्ण

**चुरम(मु)टणें**—अक्रि सुरकुत्या, वळया पडणें, चिरमटणें, चिरम्यांनीं युक्त होणें, (सामा ) आकुंचन पावणें, आकसणें, संकोचणें, अटरणें, चिमटणें [चिरमी ]

**चुरम(मु)टी**—स्त्री सुरकुती, वळी, चिरमी

**चुरमरणें**—सक्रि (प्रा ) सुरकुत्या, वळया पाडणें, गुधडणें, गुरडावणें, मुरडणें

**चुरमा**—पु एक पक्वान्नविशेष चुटाचुर्मा पहा [हिं ] ०येणें–आगमोडे येणें

**चुरमुर**—स्त्री १ शोक, तळमळ, झुरणी, हायहुय, विव्हळणी २ कुरकुर, कुरबुर, पुटपुटणें, मुळमुळणें, संताप, रुसवा, रुखरुख ३ (वरील प्रकारानीं दर्शविली जाणारी ) चीड, संताप, रुसवा, खेद, हुरहुर इ० [चुरणें+मुरणें ]

**चुरमुरणें**—अक्रि १ तळमळणें, विव्हळणें, शोक करणें, खेद करणें २ असंतुष्टपणानें कुरकुरणें, चरफडणें, मुळमुळणें [चुरमुर ]

**चुरमुरत**—क्रिवि तळमळत विव्हळत, शोक करीत, कुरकुरत, चरफडत **चुरमुरत, मुरमुरत बसणें**–शोक करीत, तळमळत बसणें

**चुरमुरा-री**—पुस्त्री भात उष्ण पाण्यात भिजवून त्याचे तांदूळ करून खापरात भाजून करतात ते पोहे ओलवून भाजून करतात ते, कुरमुरे [ध्व ] ०**खाणें–खात बसणें–देत बसणें**–(उप ) जागच्याजागीं मुकाट्यानें चुरमुरत, चरफडत बसणें धुसफुसत राहणें, आशाभंग झाल्यामुळें खजील होणें –**च्याचे लाडू खाणें**–(उप ) जेवण न मिळाल्यामुळें चुरमुरत राहणें

**चुरमुरा, चुरखुरा**—वि झणझणीत, चुरचुरणारें, तीक्ष्ण ' आधींच द्रव्यें चुरमुरीं । वरि परिवडिजती मोहरीं । जिव्हा घेता होती धुवारीं । नाकें तोंडें । ' –ज्ञा १७ १४६

**चुरमूर**—स्त्री चुरमुर पहा

**चुरली**—स्त्री (कु ) खेकडा.

**चुरवट**—वि (प्रां )१ चुरलेला, चुरडलेला २ चुरगळलेला, चोळामोळा केलेला [चुरणें ]

**चुरस**—स्त्री १ द्वेष, वैमनस्य, अदावत, वैर, अकस दावा, डाव २ स्पर्धा ईर्षा, दुसऱ्यावर चढाई करण्याची इच्छा [स चिकीर्षा ? ] –वि अपमानानें, स्पर्धेनें चिडलेला, खिन्न झालेला, रुसलेला खुनशी –शाका

**चुरसाचुरस**—स्त्री एकमेकातील मत्सर, हेवा, द्वेष, दावा, स्पर्धा 'स्वान्या करून सरदार सुडविती रिपु चुरसाचुरसा।' -ऐपो ३०४ [ चुरस द्वि ]

**चुरसी**—वि द्वेष, मत्सर करणारा, डाव धरणारा, मनात अढी बाळगणारा, खुनशी, हाडवैरी, दीर्घद्वेषी [ चुरस ]

**चुरा**—पु १ (ठेचण्यानें, मोडण्यानें, फुटण्यानें, फाडण्यानें झालेले एखाद्या पदार्थाचे ) बारीक बारीक तुकडे, कुटके, कण इ०, भुगा २ (ल) (शरीराची) जर्जर स्थिति, शैथिल्य, ग्लानि, शीण, ठठवण [ सं छुरा=चुरा( चुन्याचा वगैरे )-भाअ १८३२ स चूर्ण ]

**चुराचारा**—पु तुकडेतुकडे, काटेकुटके, चाराचुरा, (कोणताही पदार्थ फुटून, मोडून त्याचे झालेले) तुकडे इ०, भुगा [ चुरा द्वि ]

**चुराडा**—पु. १ ( पदार्थ फुटून, तुटून त्याचा झालेला ) चकनाचूर, चकाचूर, भुगा, नाश, खुर्दा, खराबी 'कालचक्रानें आजपर्यंत मोठमोठ्या राज्यांचा पार चुराडा झाला' -पाव्द १० २ (ल) (अति श्रमानें शरीरास आलेली) ग्लानि, थकवा, शीण, गळाठा, ठठवण ३ (मसलतीची) नासाडी, खराबी, नाश [ चुरा ]

**चुरी**—स्त्री डाळीचा भरडा, चूर. [ स चूर्ण ]

**चुरचुर, चुरूंचुरूं**—क्रिवि. उद्धटपणानें, मर्यादा सोडून, चुरचुरा ( बोलणें )

**चुर्र**—क्रिवि वरवर जाळताना, भाजताना, डागताना, तापलेले धातूचे तुकडे पाण्यात बुडविताना होणाऱ्या चुर्र्‌चुर् अशा आवाजासारखा शब्द करीत [ ध्व चुर्र ]

**चुल**—स्त्री ( प्र ) चूल पहा

**चुलइत**—न ( कों ) होडीचें वल्हें अडकविण्याची खुंटी, चुलत ( -न ) पहा

**चुलत**—वि चुलत्याच्या संबंधाचा, चुलत्यावरून, चुलत्याच्या बाजूच्या नातेविषयक शब्दास हा शब्द उपसर्गाप्रमाणें लावतात [ चुलता ] जसें ०**आजा**-पु आजाचा भाऊ बापाचा किंवा आईचा चुलता ०**आजी**-स्त्री बापाची किंवा आईची चुलती, चुलत आजाची बायको ०**चुलता**-पु बापाचा चुलत भाऊ ०**दीर**-पु नवऱ्याचा चुलत भाऊ ०**नणंद**-स्त्री नवऱ्याची चुलत बहीण ०**बहीण**-स्त्री, चुलत्याची मुलगी ०**भाऊ**-पु चुलत्याचा मुलगा ०**मामा**-पु मामाचा चुलत भाऊ ०**सासरा**-पु आपल्या सासऱ्याचा भाऊ ०**सासू**-स्त्री आपल्या सासूची भाऊ, किंवा बायकोची चुलती ( चुलत हा शब्द एक अंश दूरचा शरीरसंबंध दाखवितो आणि चुलतचुलत हा शब्द एकापेक्षा अधिक -म्हणजे दोन किंवाहि- दूरचा असो शरीरसंबंध दर्शवितो -**चुलत चुलत भाऊ**-पु बापाच्या चुलत भावाचा मुलगा

**चुलत, चुलइत चुलेत, चुलत**—न होडीचें वल्हें ज्यावर ठेवून उभ्या दांड्याला टेकून खेचतात तो दांडा, खुंटा

**चुलता**—पु बापाचा भाऊ काका [स क्षुल्लतात-चुल्लताअ-चूल्ता-चुलता=बापाचा धाकटा भाऊ, -भाअ १८३२, चुल्लध्य=निराळी चूल करून राहणारा -शर ]

**चुलती**—स्त्री चुलत्याची बायको, काकी, काकू

**चुलदान**—न गलबतावरील विस्तव पटवावयाचें भांडें [ चूल+फा दान ]

**चुलमानवशा**—वि १ चूल व मानवस सोडून न जाणारा, घरकोंबडा, रांधयारांधोबा, बटकया बाईलबाप्या २ ( ल ) नेभळट, दुबळा, क्लीब, बायकी [ चुल+मानवस ]

**चुलवण, चुलाण**—न उसाचा रस शिजविण्याची, आटविण्याची भट्टी [ चूल ]

**चुलवा**—पु तात्पुरती केलेली चूल, ओबडधोबड चूल [चूल]

**चुलवान ण, चुलाणण, चुलाण**—न १ उसाचा रस कढविण्याची काहिली ठेवावयाची चूल भट्टी २ चुलींची रांग ३ मोठी चूल [ चुल+आगण ]

**चुला, चुल्ला**—पु वैल नमकेली मोठी चूल [ स चुल्लि ]

**चुलाईभाजी**—स्त्री एक वनस्पति

**चुलणें**—अक्रि. ( भिल्ली ) भांडण, तक्रार करणें 'एकेकी वेनी चुलायां लाग्या' असें दोघींचे भांडण लागलें -भि २३ [ हिं चिल्लाना ]

**चुलाण**—न चुलवण पहा

**चुलाणें**—न ( कों ) लहान चूल [ चुलाण ]

**चुल्लिकापूजन**—न १ चुलीची पूजा, आराधना, सेवा २ ( ल ) स्वयंपाक 'त्यानें आपलें अन्न तयार करण्यास चुल्लिका पूजन केलें.' -चद्र ४१

**चुवा**—पु चंदनाच्या लाकडापासून केलेला एक सुवासिक पदार्थ 'चुवा चंदन कस्तुरी हो मैलागिरी।' -सला ३ [ हिं चोआँ, चोवा ]

**चुवा, चुहा**—पु १ उंदीर २ ( ल ) हुशार, तरतरीत, चप्पू मनुष्य [ हिं चूहा=उंदीर ] -**चुहेदान, चुवेदान**-न उंदराचा सांपळा, पिंजरा [ हिं चूहा+फा दान ]

**चुवा, चुव्वा**—पु ( व ) तळ्यामध्यें उन्हाळ्यांत पाण्यासाठीं खणलेली विहीर [ स कूप, हिं कुंआँ=लहान विहीर ] **चुवा ध रणें**—अक्रि बांधी भगर मिरच्या लावल्यानंतर पाऊस न पडल्यास तांब्यातांब्यानें रोपाच्या बुडाशीं पाणी घालणें

**चुस्त**—वि १ तंग, घट, वेताचा, नीटनेटका 'जरी मुहासे पायजमे चुस्त पायाला जी।' २ धूर्त, हुषार 'आपल्या चुस्त चलाखीनें महाराजाची कृपा संपादिली '—विक्षिप्त ३ ५३ [ फा ]

**चुहा**—पु चुवा, चुहा पहा

**चुळ-कर-कन-दिनीं-दिशीं**—क्रिवि पाण्याची दुधाची एकदम चिरकाडी उडताना होणाऱ्या चुळ् आवाजाप्रमाणें आवाज करीत ( चुळकन इ० कानीं एकदम चिरकाडी उडताना होणारा चुळ् आवाज दर्शविला जातो. चुळचुळ ह्या शब्दानें चुळ चुळ असा एकसारखा आवाज दर्शविला जातो ) [ ध्व ]

**चुळका**—पु १ पाणी, दूध इ० द्रवपदार्थ घेण्याकरिता, राहण्याकरितां केलेला हाताचा विशिष्ट आकाराचा, खोलगट तळवा २ हाताच्या खोल केलेल्या तळव्यात, चुळक्यात मावेल इतकें पाणी, दूध इ० पदार्थ, चूळ [स चुलुक=चूळ] ०भरणें-चूळ भरणें म्ह० चुळक्यात पाणी घेऊन जीव देणें ( उप ) अशक्य गोष्ट मूर्खपणानें शक्य करू पाहणें, कोरड्या विहिरींत जीव देणें

**चुळका**—पु डोंगराचें शिखर, मस्तक, चुळका 'सिंहाचळाचिये चुळके।' —भाए १

**चुळकें**—न एक बायकी शिवी.

**चुळचुळ**—स्त्री निकड, तातडी; घाई, अधीरता, उत्कंठा, उठवणी. [ हिं चुलचुल —मसाप २ ३ २४३, ध्व चुळ द्वि ] ०लावणें-सक्रि अतिशय उतावीळ, त्वरा, घाई करणें ०लागणें —अक्रि उतावीळ होणें, अधीर होणें, ( एखादें काम, गोष्ट ) केव्हा करीन असें होणें ०मुंगळा-पु मुलांच्या खेळातील एक शब्द ( उप ) ज्याला फार घाई झाली आहे, जो फार अधीर झाला आहे असा मनुष्य **चुळचुळ मुंगळा पळीपळी तेल**-मुलांच्या एका खेळाचें नांव

**चुळचुळ-ळां**—क्रिवि चुळ, चुळ आवाज करीत [ ध्व ]

**चुळचुळा**—पु १ अधीरता, उतावीळ, चुळचुळ, उत्कंठा २ ( ल ) खाज, खवखव ( क्रि० सुटणें ) ३ खेद, पश्चात्ताप, मनाची अस्वस्थता, हुरहुर इ० [ चुळचुळ ]

**चुळचुळा-ळ्या**—वि अधीर, उतावळा, उत्कंठित, सोत्कंठ, अस्वस्थ [ चुळचुळ ]

**चुळणी**—स्त्री चूळ भरण्यासाठीं तोंडांत घेतलेलें पाणी, गुळणा, चूळ

**चुळत**—न चुलत, चुलेत पहा

**चुळबुळ**—स्त्री १ चळवळ, कटपळ, उठबैस, वळवळ लहान मुलाचा खेळकरपणा (क्रि० करणें, चालविणें, मांडणें, लावणें) २ पिसवांची चपळ हालचाल

शको ३ ३८

**चुळबुळणें**—अक्रि १ तेल, तूप, चिवट पदार्थ यानीं लिप्त होणें २ ( झोपेंत, तापात ) तळमळणें, अस्वस्थ होणें, ( मूल ) वळवळणें, चुळबुळ करणें

**चुळबुळा-ळ्या**—वि अस्वस्थ, चुळबुळ करणारा, चळवळ्या, ऊठपळ करणारा, एका ठिकाणीं शांत न बसणारा, अधीर [ चुळबुळ, तुल० हिं चुलबुला ]

**चुळबुळाट**—पु चाळकपणा, चपळाई, अतिशय चुळबुळ, वळवळाट, ( लहान मुलांची ) अधीरता [ चुळबुळ, तुल० हिं चुलबुलाहट ]

**चुळबुळाव(वि,णें**—उक्रि ( तेल, ओशट पदार्थ इ० लावून ) चुळबुळीत करणें, उटी उटणें, माखण लावणें, चोपडणें [चुळबुळणें]

**चळबुळीत**—वि तेल चोपडलेला, ओशटलेला, बुळबुळीत [ चुळबुळणें ]

**चुळमुळ**—स्त्री १ चुळबुळ, वळवळ, चळवळ ( क्रि० करणें, लावणें ) २ अधीरता, उत्कंठा, उतावीळ ३ घुसफूस चिरचीर, मुळमुळणें ( क्रि० करणें ) [चुळबुळ]

**चुळमुळणें**—अक्रि १ चुळबुळ करणें २ उतावीळ होणें, उत्कंठा लागणें. ३ घुसमुसणें, मुळमुळणें [ चुळमुळ ]

**चुळी. चूळ**—स्त्री ( द्रव पदार्थ राहण्याकरिता ) खोल केलेला तळहात, चुळका

**चुळुक**—वि सुंदर, चमकणारें 'एकें सावियाचि चुळकीं। जैसा ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं।' —ज्ञा ११ १३३.

**चुळेत**—न चुलत-चुलेत पहा

**चुळोदक**—न चूळभर पाणी 'का चुळोदकें आपापती। अर्घ्यु नेदिजे।' —ज्ञा ९ १३ [ चूळ+उदक=पाणी ]

**चुळोवळिका**—स्त्री. चपलता चळोवळिका पहा. 'हाव भावाचिया चुळोवळिका।' —भाए ३१०

**चुल्हा**—पु ( खा ) चूळ

**चूं**—नस्त्री १ धनुष्याचा टणत्कार २ बंदुकीच्या गोळीचा सणसणाट ३ नाजुक सौम्य आवाज, शब्द उदा० उंदराचें चुचावणें, आजारी माणसाचा दुःखाच्या चमकेचा उद्गार [ध्व चूं=चुं] ०म्हणणें-करणें-सक्रि. चुचावणें, गोंगावणें, सणसणणें

**चू चुवा चुहा**—पु ( क ) ओल्या खोबऱ्याचा-हळद मिश्रित-कीस, चव पहा 'चू नें-चुव्यानें-शेका' 'चू वाळला आहे

**चूक**—स्त्री दोष, चुकी, अपराध, गैरवाजवी कृत्य, घडू नये अशी गोष्ट, गफलत, हयगय, भ्रम [चुकणें पहा स च्युति, हिं चूक] ०डाव-पु सोंगट्याच्या खेळात चुकीनें दिलेला डाव ०दान-न चुकीचें दान ०भूल-स्त्री नजरचुकीनें, विस्मरणानें राहिलेला, झालेला दोष, अशुद्ध इ०, अशुद्ध, व्यंग, दोष, कसर, न्यून इ०

काच्या अर्थाचा व्यापक शब्द [ चूक+भूल=भ्रम, विस्मृति ] म्ह० चूक भूल द्यावी घ्यावी=हिशेबात काहीं बाबी चुकीच्या असल्यास किंवा काहीं बाबी नजरचुकीनें दाखविल्या नसल्यास, लिहावयाच्या राहून गेल्या असल्यास, देण्याघेण्यांत त्या दुरुस्त करण्या जाण्या व्यवहारात, देवघेवींत, व्यापारांत उभय पक्षांनीं एकमेकास दोष कळवून देणें तें द्यावें व घेणें निघेल तें घ्यावें

चूक—स्त्री ल्हान खिळा

चूचुक—न स्तनाचें अग्र, बोंड [ स ]

चूचूं—न चिमण्यांचें चिवचिवणें, उदराचें चुचावणें [ ध्व चू द्वि ]

चूटणी—स्त्री निवडणूक —मौज ५-६ ३० [ स चुण्ट्=विभाग करणें गु. चूटणी ]

चूड—न काहर जातीचा साप याचें शरीर चकचकीत असतें म्हणून यास हें नांव देतात, रग बांडा, विषारी पावसाळयांत विशेष आढळणारी अशी सापाची एक जात —बदलापूर ३४४

चूड—पु मुकुट, तुरा [ सं चूडा ]

चूड—स्त्री १ चुडी, उजेडासाठीं पेटविलेली नारळीच्या झापांच्या पातींची, सणकाड्याची, गवताची जुडी 'तीं (झाडें) काहीं आणून डोमिंगोनें एक चूड बनविली' —पाव्ह ३२ २ ( भात पेरणीच्या वेळीं हातांत धरून लावण्याचा ) भाताच्या रोपाचा झुबका [ जुडी, जूड, तुल० का. सुडु, सुडि=गवताची पेंढी, दे चुडुली ] ०उचलणें-धरणें-लावणें-सक्रि. (ल.) एखाद्यावर खोटा आरोप, बालंट उभारणें ०फिरविणें-सक्रि (ल ) प्रजेची दुर्दशा होईल अशा तऱ्हेनें देश गांव इ० लुटणें, जाळणें, पोळणें

चूडा—स्त्री १ शेंडी २ मोराच्या डोक्यावरील तुरा, कोणताहि तुरा, गुच्छ, शेखर ३ ( ल ) मुकुट, शिखर, शेंडा [ स चूडा=शिखा शेंडी, प्रा चूला, तुल० हिं चुटिया, चुन्ली, चोटी, गु चोटली ] ०कर्म-न चौल, ल्हान मुलाचें जावळ काढून प्रथम शेंडी ठेवण्याचा विधि [स चूडा+कर्म] ०मणी-पु शिरोरत्न, मस्तकीं धारण केलेला मणि, रत्न 'हस्तें ओढिल वस्त्र सुचिल तदा चूडामणी मागणें ।' —विठ्ठल, रसमंजरी ६८ ( ल ) अत्युत्तम कर्तबगार माणूस, वस्तु, अतिशय निपुण मनुष्य उ० सगीतचूडामणी, चिकित्सकचूडामणी इ० [ स चूडा+मणि ] ०रत्न न तुऱ्यांतील रत्न, मस्तकीं धारण केलेलें रत्न —वि (ल ) अग्रेसर, अग्रभागी असणारें 'जो मातें सेवी किरीटी। तो दोय भक्तांच्या मुकुटीं। चूडारत्न।' —ज्ञा १४ ४०० [ स चूडा+रत्न ]

चूण—स्त्री न गुरास खावयास घालावयाचा हरभरे इ० द्विदल धान्याचा भुसा आणि कोंडा, आबोण [ स चूर्ण, तुल० का चिम्मि ]

चूण—न (बा ) बेसनाचें, हरभऱ्याच्या डाळीचें पीठ [ चूर्ण ]

चूण—स्त्री ल्हान माणिक, हिरकणी, ल्हानसें रत्न, चुणी पहा. [ स चुण्=तोडणें, कापणें, स. चूर्ण ]

चूण—स्त्री वळी, सुरकुती, चुणी, वळकटी, मुरड, निरी, वस्त्राची मुरडलेली, सुरकुतलेली अवस्था [ सं चूण्=आकसणें, आखुड होणें ] ०कस-स्त्री कातण्याचें, चुण्या पाडण्याचें हत्यार चुणकस पहा [ चूण+फा खेंचणें, ओढणें या अर्थी कस प्रत्यय ]

चूत—पु आम्रवृक्ष, आंब्याचें झाड 'ल्हा पिके आपवी। तव चूत वाघे पाल्वीं।' —ज्ञा १८ १२४ [ स ] ०फळ-न आंबा, आम्रवृक्षाचें फळ जैसें एकेचि चूतफळें। इंद्रिया वेगळ वेगळ।' —ज्ञा १८ ४७३ [स चूत+फल] —तांकुर-पु आंब्याचा मोहोर [ चूत+अंकुर ]

चूत—स्त्री (अश्लील) स्त्रियांचें जननेंद्रिय, योनि [ स च्युति, चुत ] ०पिसा वि. (व.) स्त्रीलंपट, कामुक [चूत+पिसा=वेडा]

चूतिया, चूत्या—वि मूर्ख, ज्याला काहीं समजत नाहीं असा चुतबावळा इ० पहा [ प्रा चोत्त-चोत्तओ या शब्दाचा अर्थ प्राकृतांत चांगला असा आहे विपरीत लक्षणेनें पाजी असा बनला —राजवाडे, प्रथमाला, हिं चूतिया ]

चून—न. ( कु गो ) नारळाची खवट, खवलेलें खोबरें. २ (व ) बेसन ३ धासकामात खालीं पडलेला पत्थराचा भुसा ४ (गो ) चूर्ण, औषधी पूड [ स चूर्ण, हिं चून=पीठ, चूर्ण ]

चूनडी—स्त्री ल्हान लुगडें, चुनडी पहा 'एक म्हणे पैल माझी चूनडी ।' —आपद ९५ [ हिं चुनरी, म. चुण ]

चूनचीड—न बिडाचें मूस हें शोभेच्या दारूकामांत घाल तात याचा प्रकाश तांबडा पडतो [ चून+चीड ]

चूनवडा—पु ( गो ) गव्हाच्या पिठाचा साजा घालून तुपांत तळून केलेला वडा [ चून+वडा ]

चूप—क्रिवि गप्प, स्तब्ध, निमूटपणें चुप्प पहा 'चूप आग लावायची आहे मला' —नाकु ३ ४१ [ स. चुप्=हळूच जाण ]

चूर—पु १ चूर्ण, भुगा, तुकडेतुकडे, खुर्दा, चुरा, पूड 'असुराचें अस्थिपंजर। चूर होती लागता।' —शिव २५ १४६ 'तव-सुत-दुर्मुख-बाण-मातें केला रणांगणीं चूर।' —मोकर्ण ४ १२ २ (ल ) ( अति श्रमानें, थकव्यानें, तापानें झालेला ) गळाठा, ग्लानि, तठवण, शैथिल्य [ स चूर्ण, तुल० हिं चूर ] ०चार-पु तुकडा, कपटा, कण, (अव ) तुकडे, कपटे, कण, इ० [ चूर द्वि ] चूरवर्ग-पु अग्निज दगडाच्या दोन वर्गांपैकीं एक, खडकाचा एक प्रकार, या वर्गांत ज्वालामुखीपासून जे पदार्थ

उडून मोकळे बाहेर निघतात त्यापासून झालेले खडक येतात –मू ७९

चूर—वि मग्न, गुंग, गर्क, तल्लीन, निमग्न, गढून गेलेला ०होणें–अक्रि १ (अभ्यासांत निद्रेत, निशेंत, मद्याच्या धुंदींत, प्रेमलीलेंत) गुंग गर्क मग्न होणें २ खजिल होणें, थिजणें, आश्चर्यचकित होणें, विस्मय पावणें, गोंधळून जाणें 'आपणा स्वतःहून अधिक बुद्धिवान अशा स्त्रीशीं बोलत आहों ही खात्री पटून तो मनात चूरच झाला –नवलपूरचा संस्थानिक क १५ ५ ३४ [हिं चूर होना–बारीक बारीक तुकडे होणें, चूर्ण होणें, निशेंत इ० धुंद होणें]

चूर्ण—न १ पूड, पीठ, भुकटी, औषधादिकाची कुटून वस्त्रगाळ केलेली पूड, बुकणी २ चुना [स] ०खंड–न चुनखडी, चुनखडीचा दगड [स चूर्ण=चुना+खंड=तुकडा]

चूर्णिका—स्त्री १ गद्यात्मक तात्पर्यरूप टीका २ (ल) शब्दालंकार व अर्थालंकार यांनीं प्रचुर असें वाक्य, लिखाण इ०, एक प्रकारचें गद्यात्मक वृत्त, छंद उदा० श्रीमद्भागवतीं। शुक मुनीस पुसे परिक्षिती। अस्मत्पितामही सुभद्रासती। अर्जुनें वरिली कवण्या रीती। –निमा ३ ६७ [स]

चूल—स्त्री पदार्थास उष्णता देण्यासाठीं, अन्न शिजविण्यासाठीं केलेली मातीची वीत–दीड वीत उंचीची चार बोटें आडोची अर्धवर्तुलाकार रचना हिच्या पोकळींत लाकडें पेटवून विस्तव घालतात व माथ्यावर भांडें ठेवितात [स चुल्ली, प्रा चुल्ली, तुल० हिं चुल्हा–चुल्ही, गु चुलो] (वाप्र) ०अडणें–पैशाची अत्यंत अडचण असणें स्वयंपाक करून जेवण्याइतकही पैसे नसणें 'आज चूल्च अडली म्हणून दुसऱ्याजवळ पैसे मागणें भाग झालें,' चुलींत जाणें–अक्रि नाश पावणें, विध्वंस होणें, निरुपयोगी ठरणें 'त्याच्या अकला चुलींत का जातात?' –एक चुलींतून निघून वैलांत पडणें–आगींतून निघून फोफाट्यात पडणें, एका संकटातून वाचल्यावर दुसऱ्या त्यासारख्याच संकटात पडणें चुलींत माजरें व्यालेलीं असणें–१ (ल) एखाद्याची अतिशय विपन्नावस्था, दारिद्र्यावस्था होणें २ कारणपरत्वें घरातील सर्व माणसें परगांवीं गेल्यानें चूल पेटविण्याचें बंद पडणें चुलीला अक्षत देणें–एखाद्या घरचीं सर्व मंडळी जेवावयास बोलावणें चुलीला अक्षत लागणें–घरातील सर्व मंडळीस दुसरीकडे जेवावयास जावयाचें असल्यामुळें चुलीनें न पेटतां राहणें कोणतेंही धर्मकृत्य सफलें म्हणजे ब्राह्मण इष्ट देवतावर अक्षता टाकून तें सफल असें सूचित करितात त्यावरून चुलीचें त्या दिवसापुरतें काम नसणें असें वरील वाक्प्रचारानें दर्शवितात चुलीला विरजण पडणें–चुलींतील अग्नि विझणें चुलीजवळ शौर्य दाखविणें–घर कोंबडेपणा करणें रांध्याराघोबा बनणें चुलीशीं डोकें खुपसणें–स्वयंपाकाची जिगजिग सहन करणें 'घरातील किती तरी कामें करावीं लागतात, याची काहीं दाद आहे का? दोन्हीवेळा चुलीशीं डोकें खुपसावें' म्ह० १ घरोघर मातीच्या चुली=सर्व घरीं वागण्याचा सारखाच प्रकार सापडावयाचा २ बायकाचें शहाणपण चुलीपुरतें–पाशीं=बायकांना जगातील व्यवहाराच्या खुब्या, ठाऊक असणें शक्य नाहीं सामाशब्द– ०खंड–न (उप) (बायकी) चूल 'घरात चुलखंड घडावल आहे, तिथ माझी हाड लावू का तुमचीं?' –एक ०जाळ्या–वि ऊसाच्या गुऱ्हाळात काहिलीखालील भट्टींत ऊसाच्या चिपाडाचें जळण घालणारा, जाळ्या [चूल+जाळणें] ०दान–न १ चुली ज्यावर घातल्या आहेत तो मातीचा ओटा २ चूल ०पोतेरें–न चूल झाडणें, सारवणें इ० स्वयंपाकाच्या तयारीच्या पूर्वीचें काम, याच्या उलट चूलभुई या दोन्ही शब्दांची वरील अर्थी अदलाबदल होते चूलपोतेरें करणें–चूल झाडून, सारवून स्वयंपाकाची तयारी करणें म्ह० सर्वसिद्ध आणि चुलीस पोतेरें=खायायला मात्र सर्व (जेवण) सिद्ध, तयार आहे पण पाहू गेलें असता चुलीला पोतेरें घालणें चाललेलें आहे. (वरवर काहीं अन्नाच्या सव्वा थापा मारणें पण वस्तुस्थिति अगदीं निराळी असणें या अर्थी ही म्हण वापरतात) ०भानवशा–वि घरघुश्या, रांध्याराघोबा, चुलीपाशीं बसण्याची आवड असणारा [चूल+भानवस=चुलीच्या मागील बाजूस भांडीं वगैरे ठेवण्यासाठीं केलेला ओट्यासारखा भाग] ०भान(ण)वस–भान(नो)स–स्त्रीपु १ चुलीच्या मागील मातीचा, चुन्याचा ओटा २ चूल सारवणें, चुलींत पेटवण घालणें, वर भांडीं ठेवून स्वयंपाकास लागणें इ० चुलीपुढील कामें चूलभानवस झाडली–सारविली–लिंपली–अटपली–जेवण तयार आहे या अर्थी [चूल+भानवस] ०भुई–स्त्री स्वयंपाकानंतर, जेवणानंतर चुलीजवळील भांडीं आणि ताटें काढून टाकून जागा साफ करणें, सारवणें इ० काम या अर्थी कुणबीनें चूलपोतेरें या शब्दाचाहि उपयोग करतात [चूल+भुई=जमीन]

चूप—स्त्री मजा, गमत 'पण संध्याची चूप न हीं यायची!' –सु ९१ 'ही एक बोल्शेविझमची चूप टेऊन दिला आहे महाराज!' –नाकु ३ २२

चूळ—स्त्री १ चुळका, द्रवपदार्थ राहण्याकरितां खोल कलेला तळहात चुळका पहा २ तोंडात घालून खळखळून बाहेर टाकण्यासाठीं तोंडांत घतलेलें पाणी, गुळणी 'कीं चूळ जो जलधिची करि त्या मुनीची–।' –वामन लोपामुद्रासंवाद ६ [स चुलुक प्रा चुचुली]

चूळ—स्त्री १ (खा) खाज, कंडू २ खुमखुमी, बलवत्तर इच्छा [हिं चुल] ०करणें अक्रि खाज सुटणें

चेआ—(काव्य) चा चे सामान्यरूप षष्ठी विभक्तीचा प्रत्यय, चिया, च्या 'जा ने कृपावताचेआ द्वारा।' –ऋ २८

चेतवण—न अग्नि उत्पन्न करण्याकरितां, पेटविण्याकरितां उपयोगांत आणण्याचें गवत, काडया, पलप्या काटक्या इ०; गूल चूड पेटवण [ चेतविणें ]

चेतवणी—स्त्री. सुचना, इशारा. [ स चित्, चेतणें; गु चेतवणी, हिं चेतावनी ]

चेतवणें—अक्रि १ क्षुब्ध होणें, विकारवश होणें २ खिन्न, लज्जित होणें 'दशोनि मोहमे चेतवला । तव तेचि परोतीं मृत्यु पातला ।' –शिशु १ २२ १९ [ स चित्–चेतणें ]

चेत(ता)वणें—अक्रि १ पेटणें, चेतणें. २ रद्द कोसळणें, (लहान मुलास) रडण्याची लहर येणें [ स चित्–चेतणें ]

चेत(ता)विणें—सक्रि १ पेटविणें, पाजळणें, दिलगाविणें, प्रदीप्त करणें २ (ल) उद्दीपित करणें क्षुब्ध करणें, क्षोभविणें 'कळणें रुणझुणती प्रचंड । मनातें चेतवावया ।' –मुआदि १९ २२ ३ चैतन्ययुक्त करणें, जीव घालणें, जिवंत करणें; उत्तेजन देणें, फिरून जिवंत करणें. 'जें जडातें जीववी । चितनेतें चेतवी । मनाकरवीं मानवी । शोक मोहो ।' –ज्ञा ७ २०. 'तुका म्हणे जगें ऐसें चेतविलें । त्याच्यानें उगलें कैसें नव्हे ।' –तुगा १२४६ [ चेतणें प्रयोजक ]

चेतव्य—वि. १ चिंतनीय, विचार करण्याजोगा विचार करण्यास शक्य, योग्य आवश्यक इ० २ जिवंत करण्यास, चैतन्य देण्यास जागृत करण्यास योग्य, शक्य, आवश्यक इ० [ स चित् ]

चेत(ता)ळणें—अक्रि खवळणें, संतापणें, प्रक्षुब्ध होणें; पेटणें चेतळणें पहा [ चेतणें ]

चेत(ता)ळणें—सक्रि १ (लांकडें हालवून, ठसकारून अग्नि) प्रदीप्त करणें २ (ल) प्रबुद्ध जागृत करणें, चेतविणें, उचल, उठावणी करणें ३ (ल) राग, द्वेष मत्सर उत्साह क्रोध इ० मनोविकारांना चालना देणें (भावना) उद्दीपित करणें [ चेतणें ]

चेता—वि (व) जागा; जागृत सावध 'परि चेता चेतयिता जाला । दोनी तोचि ।' –अमृ २ ६६ रातभर चेता रहा ' [ चेतन ]

चेतानंद रेशीम—न एक प्रकारचें रेशीम

चेती—स्त्री चुरशेपणा चुरसलेली अवस्था चुरा चिती पहा

चेत्य, चैत्य—वि ज्ञेय जाणण्यास योग्य शक्य इ० 'तें चित्त चैत्यत्यागें । मातेंचि भजे ।' –ज्ञा १८ १२६७ 'ऐसें चैत्यजातें साविलें । चित्त माझ्याठायीं जडलें ।' –माज्ञा १८ १२६८ [ स चित्=जाणणें जागें होणें+य ]

चेंद—स्त्री १ चेंगट दाटी, गर्दी खेंचाखेंच २ (पाणी साठल्यामुळें पाऊस पडल्यामुळें होणारी) चिखचिख, चेंदरड, रेंदाड चिखल, निसरडें ३ गिळगिळीत बिळबिळीत, चिपळ णाऱ्या, पायळणाऱ्या, चेंदरलेल्या (खरबुजें, आंबे, गूळ इ०) पदार्थांची रास [ चेंदणें ]

चेंदणें—सक्रि १ चुरडणें, दाबणें, चेचणें, ठेंचणें, चेंगरला जाईपर्यंत दाबणें २ (एखादा पदार्थ) ठासून भरणें, कोंबणें 'बरणींत साखर चेंदून भर म्हणजे सगळी मावेल '

चेंदरड—स्त्री (राजा.) चेंद अर्थ २ व ३ पहा [ चेंदरणें ]

चेंदरणें चेंदाटणें—सक्रि चुरडणें, कुसकरणें, दाबणें, मर्दणें, ठेंचणें [ चेंदणें ]

चेंदा—पु चेंचा, ठेंचा (फळें इ०कांची) चेंदरलेली, दाब लेली, चिरडलेली स्थिति अवस्था, ठेंचलेला, चेंचलेला पदार्थ २ (बऱ्याच लोकांची आजारामुळें झालेली) अशक्तावस्था, ग्लानि, उठवण; दुर्बलावस्था (क्रि० वळणें) ३ चिखचिख, चिकचिक, रद्दा, चिखल ४ दाटी, गर्दी, खेंचाखेंच ठेंचाठेंच [ चेंदणें ] ०चेंद–स्त्री ठेंचाठेंच, चेंगराचेंगर, गर्दी, दाटी, चेपा चेप, ठेंचाठेंचीमुळ, दाटीमुळें, चेंगराचेंगरीमुळें झालेली नासाडी, दुरवस्था [ चेंदणें द्वि ]

चेंदाटा, चेंदामेंदा चेंदुमेंदु चेंदु—पु चुराडा, चिरड लेली, चेंचाटलेली, खोमललेली, ठेंचलेली, कुसकरलेली स्थिति या शब्दांचा अर्थ चेंदा या शब्दाच्या अर्थाहून भिन्न आहे कारण चेंदाटा इ० शब्द नेहमींच चुराडा, नाश इ० अर्थ दर्शं वितात पण चेंदा हा शब्द केव्हां केव्हां भक्ष्य पदार्थांच्या, अन्नाच्या काल्यासही लावतात [ चेंदा ]

चेंदाड—स्त्री. १ दाटी, गर्दी, ठेंचाठेंच, चगरट, रगाडा, दाटण २ (पाणी सांडल्यामुळें, पावसामुळें झालेली) चिक चीक, रपरप रेंदाड, राड, चिखचिख

चेंदामेंदा—पु चेंदाटा पहा ०करणें–चुराडा, नाश करणें, ठेंचणें, चेंचून नाश करणें; कुसकरणें

चेंदुमेंदु—पु चेंदाटा पहा

चेन—स्त्री (कु) राड, पाणी सांचून झालेली रेंदाड

चेन—शअ (काव्य) पासून,–च्यानें 'आत्म्याचनी आप पवन । पवनाचेन प्रगटे अग्न ।' –दा १६ १० ६

चेन—स्त्री जमीन मोजण्याची लोखंडी सांखळी ही ६६ फूट लांब असते [ इ चेन्=सांखळी ] ०लाइन–स्त्री शेतातील परस्परांपासून दूरची ठिकाणें सांधणारी जी रेषा कल्पितात आणि जीवर इतर कोणबिंदूपासून लंब कल्पितात ती रेषा [ इ चेन+लाइन=रेषा ]

चेनापटनी–णी—वि चिनापट्टणसंबंधीं, मद्राससंबंधीं, मद्रासेकडील [ हिं ]

चेनि–नी—शअ (काव्य) –च्यानें, मुळें, पासून, –च्यायोगानें 'जाओनि पूर्णगिरीचनि घाटे । कळां आस्वादितांतो ।'

–दाव १५०. 'अवघें त्रैलोक्यचि चाले। जयाचेनी।' –दा ११.८.२. 'जयाचेनि गुह्यज्ञान। प्रगटे जनीं।' –दा १.५.१.

**चेप**—स्त्री.पु १ दाव; चेपणी; ठासणी; दाटी होणें. २ दाटी; गर्दी; कचाटी. 'विधिनिषेधाचे सांपडलों चेपे। एक एका लोपे निवडेना।' –तुगा १५०७. 'त्या गलबतावर माणसांचा भारी चेप झाला आहे.' ३ रोग बोकाळणें; रोगाची सांथ 'गांवांत देवीचा चेप झाला आहे.' ४ पु. (कों.) कांटेरी काड्याकुड्यांचा दाबून बांधलेला भारा; काट्यांचा फेसाटा. –स्त्री १ गुळाची चपटी ढेप. २ एकास-एक चिकटलेल्या काग दांचा, जटा वळलेल्या केंसांचा समुदाय; केंसांतील गुंतवळाचा पुंजका. [ चेपणें ]

**चेपकडें**—न. (राजा.) चेप, काट्यांचा फेंसाटा बांधून लहान करण्याच्या, घट्ट दाबण्याच्या उपयोगी अशा बांबूंच्या दोन कामट्या, चिरट्या.

**चेपट**—वि. चापट; बसकट; थबकट; चापटलेला; चिपतळ; चपताळा. [ चेपणें ]

**चेपटणी**—स्त्री. दाबून, ठोकून, पसरट, चापट करण्याची क्रिया. [ चेपटणें ]

**चेपटणें**—सक्रि. दाबून, दडपून चापट, पसरट करणें; चेपून सपाट करणें. [ चेपणें ]

**चेपण-णें**—न. (एखादा पदार्थ) चेपण्याकरितां, दाबण्या करितां त्याच्यावर ठेवलेलें वजन, दडपण. [ चेपणें ]

**चेपणी**—स्त्री. १ गर्वाचें थापटणें; करणी. २ दाब देण्याची, चेपण्याची क्रिया; दडपण; दाब. [ चेपणें ]

**चेपणी**—स्त्री. १ अट. २ आढी. 'एन्हवीं चादिणें पिकविजन आहे चेपणीं। कीं वारया धापत आहे वाहणी।' –ज्ञा ९.२०.

**चेपणें**—सक्रि. १ चापणें; दाबणें; आवळणें; दाबून सपाट करणें; दाबून लहान करणें; जोरानें दाबणें. २ स्पर्श करणें; हात लावणें. 'जैसा वेश्याभोगीं कवडा वेंचे। मग दारही चेपूं न ये तियेचें।' –ज्ञा ९.३२९. [ सं. चप्=कुटणें; वाटणें, दाबणें ]

**चेपणें**—अक्रि. (पाया, भिंत, तुळई, खांब) खचणें; दबणें

**चेपणें**—न. (कु.) जमीन चोपण्यासाठीं केलेलें लांकडी आऊत; चोपणें. [ चेपणें ]

**चेपली-ळी**—स्त्री. (राजा.) वहाण; पायतण. चप्पल पहा.

**चेपा**—वि. बसकट; थबकट; दाबल्यामुळें सपाट झालेला; चापट; चपटा. [ चेपणें ]

**चेपाचेप**—स्त्री. १ दाटी; गर्दी; ठेंचाठेंच २ (ल.) दाबा दाबी; छपवाछपव; दडपून टाकणें. [ चेपणें. द्वि. ]

**चेपाटी**—स्त्री. मागावरील गोणपाटाची खालचीं सुतें चेपण्या-साठीं व विणलेला भाग दाबण्याकरितां त्यावर दडपला आणाऱ्या नळधाला (बांबूच्या पोकळ काठीला) आगा करून देण्यासाठीं उपयोगांत आणलेली काठी, पट्टी. [ चेपणें+काठी ]

**चेपारा**—पु. चेप; दाटी; गर्दी; दाब. [ चेपणें ]

**चेपावलें**—न. (कों.) स्त्रियांनीं पायांत घालावयाची वहाण.

**चेपें**—न. (राजा. कु.) बसकी चपटी टोपी; विशेषतः लष्करांतील शिपायांची, अधिकाऱ्यांची हॅट; टोपी.

**चेंबट, चेमट, चिंब**—वि. १ ओलसर; दमट; आंबट ओलें (कापड, कपडा इ०). २ चिवट (लांकूड इ०). ३ सुर-कुतलेलें; चिमटलेलें; कोमेजलेलें; वाळलेलें आणि आकसलेलें.

**चेंबटणें, चेमटणें**—सक्रि. (शरीराचा अवयव इ०) दाबणें; चेपणें; चिरडणें; पिळणें; चेंगरणें.

**चेंबणें**—सक्रि. चेंबटणें पहा.

**चेंबरी, चेमरी**—स्त्री. (प्रां.) कोंडकें आणि एलें यांच्या जोडीला किंवा नुसत्या एल्यालाहि लावावयाचा शब्द; कोंडकें आणि एलें पहा.

**चेमट, चेमटणें, चेमणें**—चेंबट, चेंबटणें इ० पहा.

**चेया**—(काव्य.) चेमा पहा. 'जाला दीक्षागुरू आचार्या। सृष्टिचेया।' –ऋ ५.

**चेयिरा**—वि. जागा; जागृत. चेइरा पहा. 'चेयिरा करि-ताहि अवगणोनि। घोरती घोरें पुन्हपुनः।' –दावि २३४.

**चेर**—स्त्री. (प्रां.) खिजवणी; खाजवणी; चिडवणी; क्षोभ; गांजणूक; क्षुब्धावस्था; चेतवलेली स्थिति [ सं. चेतन ] ०गाडी–पु. खिजविणारा; चेतविणारा; चिडविणारा; आगलाव्या.

**चेर**—शअ. (गो.) वर उ० मेजाचेर=मेजावर.

**चेर-रा**—पु. एक रानटी वनस्पति. या झाडापासून एक प्रकारचा चिकट पदार्थ निघतो यांचें कांटेरी बोंड असून त्याला तीन खापे असतात व आंत सहा बिया असतात.

**चेरणें**—अक्रि. (प्रां.) चेकळणें पहा.

**चेरा**—पु फजिती; टवाळी; हा शब्द फजिती या शब्दाला जोडून योजतात. फजिती चेरा=फजिती; खूप फजिती. फजिती पहा. 'अनवाद लोकनिंद पिशुनाचे चेरे। साहूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरें।' –तुगा २९५. 'चेरा फार करूनि अश्व रथही हेरा परी झोडिले।' –वामन, विराट ७.७०. [ तु का. चेह्र=चेष्टा, थट्टा, गम्मत ]

**चेरामोरा**—पु. तोंडवळा; रंगरूप; मुद्रा; चेहरेपट्टी. [ चेहरा द्वि. ]

**चेरी**—स्त्री चिरी अर्थ १ व ३ पहा.

**चेल**—न. कापड; वस्त्र; कपडे. सचेलस्नान पहा. [ सं. चेल= वस्त्र ]

**चेलगडी**—पु. १ खेळगडी. २ चेरगडी पहा.

**चेइ(ई)णें चेणें**—अक्रि जागृत होणें, जागें होणें, निजून उठणें, निद्रेचा त्याग करणें 'चेइलिया आपुलें ज्ञान। जैसें नाहींचि होय स्वप्न।'—ज्ञा १५ ५५९ 'तव तो चोंढ म्हणे तें गोपुरम नेतां चेईल'—पच ३.१७ [सं चित्=जागृत होणें, प्रा चेअ]

**चेइरा, चेइला**—वि जागृत, जागा 'न देखे स्वप्न किरीटी। चेइला जैसा।'—ज्ञा १८ ४३६ 'निद्रा साइनि चेइरा झाला। तो स्वप्नभयापासुन सुटला।'—दा ५ ९ ३३ [चेइणें]

**चेइरी, चेइरें**—स्त्रीन जागृति 'आतु महानदा चेइरें जाइलें। बाहेरि मात्रांचें वळ हारपोनि गेलें।'—ज्ञा ११ २४६ [चेइणें]

**चेइलेपण**—न जागृतावस्था; जागेपणा 'काय कीजिती चेइलेपणीं। स्वप्नींचीं तिर्थें बोलणीं।'—ज्ञा १५ २१८० [चेइला=जागा+पण=अवस्था]

**चेक**—पु (अधिकाऱ्याचा) दपटशा, तंबी, दाब, अड थळा, विरोध [इ. चेक्] ०**करणें**—तपासणी करणें ०**ठेवणें**-**घालणें**—दाब ठेवणें, शह घालणें ०**येणें**—दाब येणें, निरोध, अडथळा येणें, होणें

**चेक**—पु कापडाचा एक प्रकार, चौकटीदार कापड [इ]

**चेक**—पु दाखविल्यावरोवर पैसे देण्यासाठीं सावकारावर, पेढीवर दिलेली चिठ्ठी, हुंडी, दर्शनी हुंडी [इं चेक्]

**चेकाळ**—स्त्री चगळ, रेलचेल, विपुलता, बाहुल्य, प्राचुर्य, लयलूट, आबादानी, हेल, गडगजता, भडिमार

**चेक(का)ळणें**—अक्रि १ निश्चयानें, आवेशानें जोरानें उद्योगास, कामास, खेळावयास लागणें, आवेशानें प्रवृत्त होणें २ (घोडा, बैल इ०) मुजणें, बेफाम होणें ३ (पाऊस, वारा इ०) जोरात, सोसाट्यानें सुरू होणें ४ (मूल इ०) बेमुमार रडणें ५ (आग इ०) भडकणें, पसरणें ६ (धान्य, फळें इ०) माजणें, विपुल होणें, (धान्य, फळें इ० चा) सुकाळ होणें, बेहद्द पीक येणें (या क्रियापदाचा उपयोग अनियमित आहे सामान्यपणें या शब्दाच्या सर्व प्रयोगांमध्यें अमर्याद विपुलतेचा प्राचुर्याचा भास अभिप्रेत असतो)

**चेंगट-टी-ट्या**—वि १ आळशी, सुस्त, मंद, गमणारा, दिरंगाईनें काम करणारा (मनुष्य), दीर्घसूत्री, रमतगमत काम करणारा २ लांबणीवर पडलेलें, भिजत पडलेलें, रेंगाळत चाल लेलें (काम) ३ (गैरवाजवीपणानें) चिकट, लोंचट, खणपटीस बसणारा [सं चिर=फारवेळ+कार=करणारा]

**चेंगटाई**—स्त्री १ चेंगटपणा, गमण्याची सवय, दिरंगाई, दीर्घसूत्रीपणा २ त्रासदायक असा लोचटपणा. [चेंगट]

**चेंगट्या**—वि चेंगट पहा

**चेंगरट**—स्त्री दाटी, गर्दी, भीड, अडचण, संकोच [चेंगरणें]

**चेंगर(ड)णें**—उक्रि चिरगटणें, चेंबरणें, चिरडल असा तऱ्हेनें दाबणें, चेपणें, दाबलें, चेपलें जाणें, चेंदा होणें

**चेंगराचेंगर, चेंगडाचेंगड**—स्त्री १ चेंदाचेंदी, चेपा चेपी २ चेंदाचेंदी, दाबादाबी होऊन झालेली स्थिति [चेंगरणें द्वि]

**चेंघळणें**—अक्रि चिघळणें पहा.

**चेंच**—स्त्री (गो) ठेंच

**चे(चें)चकट, चेचट**—वि थोडाबहुत चेंचका [चेचणें]

**चेचका**—वि १ अनेक चरे पडून विरूप झालेला (रुपाया इ०) २ खोमलेला, चेंचलेला, ठोकलेला, खोंचा पडलेला [चेंचणें]

**चेच(चा)ड**—वि १ कांहींसा चेंचका (रुपाया इ०) २ उचमखळ, खडकाळ, खडबडीत, चोराचिलटांचा (रस्ता), ३ (ल) दुर्गम, दुर्बोध, घोटाळ्यांत टाकणारा, किचकट (ग्रंथ, श्लोक इ०) [चेंचणें]

**चेचणें, चेंचणें, चे(चें)चरणें**—उक्रि १ टेंचणें, चेंदरणें, चिरडणें २ दणकावणें, कुटणें, रपाटणें, ठोकणें, मारणें, पिटणें 'चोराला चागलाच काठयांनीं चेंचून काढला'

**चेचा**—पु (प्रा) (विहू) ठेचा; धने व मिरच्या एकत्र ठेंचून, कुटून केलेली जाडीभरडी चटणी [चेचणें]

**चेचाड**—वि (माण) जड, अवजड, धड चेचड पहा

**चेंचूड**—स्त्री (गो.) लाल मुंगी, चावड 'घरात चेंचूड आयल्यात'

**चेंचें**—न (अन्न इ० करिता) पक्ष्याच्या पिलाची चींव चींव [ध्व] ०**करणें**—(ल) दीनवाणीनें विनवणी करणें

**चेट**—पु दास, सेवक, चाकर 'तिकडे चेट, इकडे चिट, हें आहे तरी काय?'—मू १३ [स]

**चेट, चेट(ट्ट)क**—स्त्रीन. १ जादूटोणा, जादूगिरी, करणी, मंत्रतंत्र. २ (ल) कपट, शाठ्य, छक्केपंजे, चकरमकर [स चेट, हिं चेटक=जादु]

**चेटका-की, चेटक्या, चेटकाळ्या**—वि १ जादूटोणा मंत्रतंत्र, करणी करणारा, कवटाळ्या, जारणमारणाचा प्रयोग कर णारा २ (ल) दुसऱ्याचा घातपात करणारा, दुसऱ्याच्या नाशा साठीं गूढ हिकमती योजणारा, कारस्थानी [चेटक]

**चेटकी**—वि चेटका पहा 'मैंद भोंदु परद्वारी। भुरेकरी चेटकी।'—दा २ १ ३१.

**चेटकीण**—स्त्री जादूटोणा, जारणमारण, करणी करणारी स्त्री [चेटक]

**चेटक्या**—वि चेटका पहा

**चेटणी**—स्त्री (गो) चटणी, तिखट

चेटा—पु मुलगा 'सुईणीपुढें चेटा लपणार नाहीं' या म्हणीशिवाय हा शब्द इतरत्र क्वचित आढळतो 'सुइणीपुढें चेटा। काय लपविसी चाटा।' –तुगा ६२३. [स चेट²]

चेटाळणें—अक्रि सचरणें, वारें शिरणें [स चेष्ट्]

चेटी—स्त्री दासी, सेविका [स]

चेटूक—न (विप्र) चेटक पहा

चेड—स्त्री (कों) मुलगी, तरुण स्त्री [स चेट, चेटी]

चेड, चेडूं, चेडरूं—न (कों) ल्हान मूल चेड पहा

चेडको—वि (गो.) आईबापनसलेला, पोरका

चेडचळ—पु पक्षिविशेष, तुरा असलेला चडोल पक्षी.

चेडवा—स्त्री (कों) मुलगी [चेड]

चेडा—पु १ चेटुक, करणी, जारणमारण, जादुटोणा 'कोणी येकाचा श्राप जडे। कोणी येकें केले चेडे।'–दा ३.७ १५ 'तुका म्हणे आता आवरावा चेडा। लटिकी पीडा पाडु रगा।' –तुगा १२८० २ भूतविशेष, एक प्रकारचें पिशाच्च, याचा लोकाना मारण्याकडे उपयोग केला जातो 'रिचविती जळतकुडीं। लाविती चेड्याच्या तोंडीं।' –ज्ञा १७ ९७ ३ महाराचा देव, (अव) चेडे –वदलापूर ४९२ ४ मुलाची मरणोत्तर दशा –वदलापूर ४९२ [चेट]

चेडा—पु (कों) (गो) मुलगा [स चेट, तुल हिं चेंडा=तरुण]

चेंडा—पु (झाडाचा) शेंडा 'मग पाय ठेऊनि खादिय वरी। चेंडा झेंपावला हरी।' –निगा ४४

चेडी—स्त्री (गो) मुलगी [चेड]

चेडीपण—वि (गो) पोरका, आईबापनसलेला (मुलगा), चेडका [चेड]

चेडु(डुं) चेडूं—स्त्री (कों) मुलगी, कुमारी, कुवार २ –न मूल

चेंडू—पु १ खेळण्याकरिता केलेला चिंध्याचा रबराचा वाटोळा गोळा २ (ल) ठेंगणा परतु वाटोळा गरगरीत मनुष्य ३ रांगोळीचा एक प्रकार [स गेंडुक=चेंडु तुल० का चडु हिं गेंद गु चेंडु] ०फळी–स्त्री १ फळीनें आणि चेंडूनें खेळाव ह्यावयाचा एक खेळ कृष्ण खेळ चेंडूफळी म।' –मसाप २ ३० २ (इ) क्रिकेट [चेंडू+फळी]

चेंडूल चेंडोल—पु (विह) डोक्यावर तुरा असलेला चडोल पक्षी

चेडें—न चटुक, चेडा पहा

चेंढळमेंढळ—स्त्री मुलें, पारवाळें, कारटीं.

चेंढायनी—स्त्री (व) चाळा, नाद, छद.

चेणें—न जागृति, जागेपणा, जागृतावस्था 'ययाचेनि बोभाटें। आत्मयाची झोंप लोटे। पूर्ण तरी स्मरण न फिटे। जें चेणेंचि निद कीं।' –अमृ ३ १ [स. चेतन]

चेणें, चेयिणें—अक्रि. जागृत होणें, जागें होणें 'तुरेंचि चयिलिया। नीद जैसी।' –अमृ २ ४१, चेइणें पहा [स चेतन]

चेत—न चित्त, मन, अन्त करण [स. चेतस्=मन]

चेत—वि जागा, जागृत 'असतेनि देहें एतुला। जो चेतुचि दिसे निदेला।' –ज्ञा ६ ६५ [स चेतस्=सजीवपणा, जागृति]

चेत—स्त्री पेट, भडका [चेतन] ०घेणें–सक्रि पेट घेणें, भडका होणें ०येणें–अक्रि (आग) भडकणें, पेटणें [चेतणें]

चेत—वि १ मूर्च्छित, बेशुद्ध, निश्चेष्ट २ चीत, पाठीवर पडलेला, उताणा [स अचेतन याचें अपभ्रष्ट रूप]

चेतई—स्त्री (वाई) एक वनस्पति

चेतणें—अक्रि १ (विस्तव, आग इ०) पेटणें, भडकणें, जळणें २ (ल)(काम, क्रोध इ०) जागृत उद्दीपित होणें 'चित्त आपुलें आपण जिंतिलें। ते निश्चित्त जेय सुतलें। चेतीचिना।' –ज्ञा ५ १४८ –सक्रि ३ पेटविणें, भडकविणें, उद्दीपित करणें [सं. चित्–चेतयति, तुल० हिं चेतना]

चेतणें—सक्रि अगात (भूत, पिशाच) आणणें, (भूत) घालणें [स चित्=चेतना होणें]

चेतन—न १ जागेपण, जागृति, उद्बोध, सजीवपणा, जिवतपणा 'त्याणें झालें मज चेतन। ज्ञानसूर्य प्रकाशून।'–गुच १९ ४ –वि १ सजीव, जिवत २ विषयवेदनक्षम, सचेतन ३ शुद्धीवर असलेला [स चेतन=प्राणी, बुद्धि, मन] चेतनाचेतन–वि सजीव व निर्जिव (सृष्टि), जीव (सृष्टि) व जड (सृष्टि) (सचेतन व अचेतन सृष्टि), ईश्वरनिर्मित सर्व (विश्व) [स चेतन=जिवत+अचेतन=जड, निर्जीव]

चेतना—स्त्री १ जीवनशक्ति, प्राणशक्ति, जीव, प्राण 'म्हणोनि अग्नीविण दहीं। चेतना न येरे।' –ज्ञा ८ २१४ 'चेतनारूपें इंद्रियवृत्ती। जे चाळिती सर्वदा।' –एभा १ १७ २ पुरुषत्व, पौरुष जननशक्ति ३ आकलनशक्ति, ग्रहणशक्ति, बुद्धि, चित्त, मन, ज्ञानशक्ति विवेकाचे लोपल्या भान। स्तब्ध चेतना होय जाण।' –एभा २१ २१८ [स चेतना=प्राण बुद्धि] ०वर्ग–पु इंद्रियसमुदाय 'हा चेतनावर्गु आघवा। मरणीं अस टवरवा। –ज्ञा ८ २१० [स चेतना+वर्ग=समुदाय] ०शून्यत्व–न बधिरपणा, बधिरता. [स चेतना+शून्यत्व=अभाव]

चेतव—पु क्षुब्धता, भावना, विकारवशता, (एखाद्या साहसकृत्यासबधींचा) आवेश, अभिनिवेश, क्षोभ, उद्दीपन, उत्साह (क्रि० येणें, अगीं आणणें) २ जिवतपणा, प्राणशक्ति ३ पाझर, स्राव (क्रि० फुटणें सुटणें) [स चेतन]

**चेला**—पु शिष्य; छात्र 'चेल्यांचा गुळाळ । पिटद्रव मग पाळ ।' –तुगा २८१९ 'मी विधात्याचा चेला मनणार.' –नाकु ३ २७ [स चेट, हिं चेला=शिष्य, शागीर्द]

**चेला**—पु (गो) मुलगा, चलो, चेडा [स चेटक, हिं चेला]

**चेली**—स्त्री शिष्या म्ह० चेलीचे कान गोसाव्याच्या हातीं=नोकराला मालकाच्या तन्हें वागलेच पाहिजे व मारक सावल तें करेंच पाहिजे [हिं चेला याचें स्त्री रूप]

**चेव**—पु १ जाग, जागृति, जागें होणें झोपेंतून उठणें, चेतना 'दगडे वाजतां दणदणा । चेव आला पांचाजणा ।' –मुआदि ३७ ३८ 'तव कृमी लोपोनि रायासी । पावला चेवो ।' –कथा २ १५ ७१ २ उद्दीपन, ईर्षा, स्पर्धा, आवेश; त्वेष, चेतव [स चित्=चेतन, चेतस्] ०येणें–आवेश येणें, उत्साह वाढणें

**चेवचेव, चेंवचेंवणें**—चिवचिव, चिवचिवणें पहा

**चेवचेव**—स्त्री (व) त्रास, जिगजिग

**चेवणा**—वि चिवलेला, उच्छृंखल 'जो मायाचिया चेवणा । सर्वांगाचा चोळणा ।' –एभा १७ ५१७ [चव]

**चेवणें**—अकि १ उच्छृंखल, बेताल बदफैल होणें, भ्रष्टाचारी होणें, भ्रष्ट होणें २ ढळणें, मुकणें 'तो आशाचक्रावरोनि चेवला । कल्या मुकला कष्टासी ।' –एभा १२ ३५० 'अच्युत म्हणिजे चेवत नाहीं । –दा ९ १ २६ जेवीं स्वर्गीहून चेवले । पुण्य सरतां भूलोकीं ।' –अ ४३ ४५ ३ चळणें, वेडे होणें, (एखाद्या गोष्टीचें) वेड लागणें, उन्मत्त होणें नादीं लागणें 'विषयीं चेवलों मीपणा मुकलों । शरण तुज आलों पांडुरंगा ।' –तुगा ९४७. [स च्यवन]

**चेवणें**—अकि त्रासणें, चेतणें 'तव देखला स्फुरत । नारद कळी लावित । त्यासी पुसे जगन्नाथ । कां चेवलासि ।' –कथा ३ १० १० [स चेतन]

**चेवव(वि)णें**—सकि जागें, जागृत करणें, प्रबुद्ध करणें चेतविणें 'जैसा एकला जग चेववी । सहस्रकरु ।' –ज्ञा ६ २० 'कां निदेलें चेववुनी । चेवविलें जैसें ।' –अमृ ५ २४. 'विरक्त चेववावे । मुमुक्षनिरूपणें ।' –दा २ ९ ३८ [स चित्–चेतन]

**चेवा**—पु जागृति, जागेपणा

**चेवाचेवानें**—क्रिवि तणतणून रागावून चिडून, त्वेषानें 'अशा रीतीनें तो चेवाचेवानें बोलू लागला तेव्हां मिसेस स्वीटनें त्याला दाबलें ' –सुरे १५१ [चेव]

**चेवाडी**—स्त्री कुचेष्टा

**चेष्टक**—वि १ चिडविणारा, खिजविणारा त्रास देणारा, कुचाळखोर, खोडकर. २ चेतविणारा, उत्तेजन देणारा [चेष्टणें]

**चेष्ट(टे)खोर, चेष्ट(टे)बाज**—वि (चित्र) चेष्टेखोर, चेष्टेबाज, चेष्टेखोर पहा

**चेष्टणें**—अकि चलनवलनादि क्रिया करतां येणें, चलनवलन करणें, वर्तणें, वागणें, हालचाल करणें 'जयें चेष्टे पुत्राधीन । दारुयंत्र ।' –ज्ञा १ ८१ 'चेष्टन' परि पुतळनु तरिही त्या चेष्ट सोतविना ।' –निमा २ ८७ [स चेष्ट्=हालचाल चलनवलन करणें, वागणें]

**चेष्ट(टा)विणें**—सकि १ प्रबुद्ध, जागें करणें, उठविणें, हालचाल करावयास लावणें. 'देह जगें स्वभावें धनंजया । जालें तें अपैसया । चेष्टवीच दैं ।' –ज्ञा १८ ४२८ 'अहो समस्त मायतें । सगुण ब्रह्म चेष्टवितें ।' २ चिडविणें, सतावविणें, चेतविणें खवळावी, उठावणी करणें ३ सचेतन, जिवंत करणें, जीव घालणें, उत्साह उत्पन्न करणें [चेष्टणें]

**चेष्टा**—स्त्री १ चलनवलनादि क्रिया, व्यापार, (जिवंत प्राण्याची) हालचाल, चळवळ 'जे चेष्टा त गुणाधीन । आपैसी असे ।' –ज्ञा ३ ५३ २ हावभाव, वेडीवाकडी उडी, प्रयत्न ३ खोडी, चीड आणणारें कृत्य टवाळकी, खिजवणारें भाषण ४ दुसऱ्याला सतावण्याला एखादा पिशाचास उठवणें [सं चेष्टा=हालचाल चलनवलन कर्म] ०करणें–थट्टा करणें, चिडविणें, खिजविणें –घणें–विणें–सकि १ एखाद्याला दुसऱ्या॰विरुद्ध भांडण्यास प्रवृत्त करणें २ एखाद्याविरुद्ध पिशाचाला चेतविणें, उठविणें [चेष्टणें] –टेखोर–बाज–वि थट्टेखोर, मस्करी करणारा, खोड्या टवाळ्या, कुचाळ्या करणारा ०घणी–स्त्री १ खोडी, कुचाळी, चीड आणणारी गोष्ट २ (एखाद्याविरुद्ध) पिशाच्चास चेतवणें [चेष्टाविणें] ०घणीचें भूत–न १ (एखाद्यास सतावण्याकरितां) चेतविलेलें उठविलेलें भूत पिशाच २ (ल) (एखाद्याविरुद्ध) भांडण करण्यास चिथविलेला शांत व निरुपद्रवी मनुष्य

**चेष्टाकार**—वि (गो) चेष्टा, खोड्या थट्टा करणारा, चेष्टेखोर [चेष्टा]

**चेष्टित**—न कृत्य, आचार कृति, कर्म, हालचाल 'आतां आइलिया भ्रमहत । जैसें पिशाचाचें चित्त । मग इंद्रियांचें चेष्टित । विकळु दिसे ।' –ज्ञा ५ ५७ –वि आचरलेलें, केलेलें हालचाल करण्याची शक्ति असलेलें, चलन पावलेलें इ० [स चेष्टित]

**चेस**—पु (छाप) छापण्याचा मजकूर कंपोज केलेला फॉर्म छापतांना ज्या लोखंडी चौकटीत घट्ट बसवितात ती लोखंडी चौकट [इं]

**चेसरटपणा**—पु लोचटपणा कोडगेपणा अन्यायमूलक निर्बंधाच्या कर्दमांत लोळत राहिल्यानें त्यांच्या मनाला असा चेसरटपणा आला होता ' –रजपुताचा भीष्म

**चेहरगडी**—पु चेरगडी पहा

चेहरणें, चेहरावणें—अक्रि (ग्रा) चेकळणें पहा

चेह(हे)रा—पु. १ मुख, तोंड, रूप, तोंडवळा, रंग, वर्ण आणि मुखचर्या (ज्यावरून एखाद्याच्या आजारीपणाचा किंवा निरोगी स्थितीचा बोध होतो) या दोहोंबद्दल हा शब्द वापरतात 'चेहरा भव्य व मनोवेधक होता.' –पाव्ह ३ (क्रि० उतरणें, पालटणें, बदलणें, टवटवीत होणें) २ मुद्रा, चर्या, सुरत [फा चिह्र'] ०करणें, बनविणें–दाढी वगैरे करवून, मिशा वळवून चेहरा मोहक, आकर्षक करणें सामाशब्द– चेहरेदार–बाज–वि सुंदर व आकर्षक चेहरा असलेला, भव्य चेहऱ्याचा, देखणा, गोरागोमटा. [चेहरा+बाज प्रत्यय] चेह(हे)रेपट्टी–स्त्री १ तोंडवळा, चेहऱ्याची ठेवण २ तोंडवळयाच्या वर्णनाचा तपशील [चेहरा+पट्टी] ०मोह(हो)रा, चेहेरामोह(हो)रा–पु तोंडवळा, चेहऱ्याची ठेवण [चेहरा+मोहरा=मुख]

चेहराविणें—सक्रि चेतविणें, खिजविणें, चेष्टविणें

चेहरेदार-बाज, चेहरेपट्टी, चेहेरामोहरा—चेहरा पहा

चेहलक(ख)त, चेहलकत—न (विरू) चिलखत पहा

चेहल—पु १ घाम, (साखर, गूळ इ० कास सुटलेला) द्रव, पाझर –स्त्री विपुलता, प्राचुर्य, समृद्धि, चगळ [हिं]

चेहळणें—अक्रि (मीठ, साखर, गूळ इ० पदार्थ) ओलसर होऊन पाझरणें, पातळ होऊन वाहू लागणें, पाघळणें, द्रवणें, वितळणें [चेहल]

चेहेल—चेहल पहा

चेहेळणें—चेहळणें पहा

चेळ—स्त्री १ (प्र चेल), समृद्धि, वैपुल्य, चगळ २ –पु (विप्र) चळ, चळ अर्थ ३ व ४ पहा [हिं]

चेळणें—उक्रि. जोरानें मार शिरकावणें, ठासणें, चेंदणें, चिणणें [स चल्]

चेळणें, चिळणें, चिहळणें—अक्रि १ ओलसर होऊन पाघळणें, चिघळणें पहा २ बारगळणें, वेडे चाळे करणें चेकळणें पहा

चेळपंत्रा, चेंदरला—वि (व) वेडेचार करणारा 'चेळपत्रा कुठला! वेस खालीं.'

चेळा—वि (ग्रां) हटी, खोडकर, टवाळ, वात्रट, कुचाळ (मूल, पोर) [स चल्]

चेळें—न (ग्रां) १ चळ, खुळ, पिसें, वेड, भ्रांतिष्टपणा, म्हातारचळ (क्रि० भरणें, येणें, लागणें, घेणें) २ (ग्रां) दुराग्रह, हट, मायाकूट, जिकीर [स चल्]

चैत—पु चैत्र महिना. [स चैत्र हिं चैत]



चैतन्य—न १ जीव, प्राण, शरीरातील चालक, प्रवर्तक शक्ति, आत्मा 'जैसें गतायुषी शरीरीं। चैतन्य वासु न करी।' –ज्ञा ३ १०९ २ ज्ञानकला, ग्रहणशक्ति, आकलनशक्ति, विषयवेदनशक्ति ३ चित्त, मन. 'इयावरी तो पंडूचा। कुमरु सद्भावो जीवींचा। पुसत तो चैतन्याचा। कामीं ऐका।' –ज्ञा १६.४७० ४ जीवमात्रांना प्रवर्तक, चालक, चेतना देणारी देवता, शक्ति, तत्त्व, परमात्मा, जीवमात्रात, भूतमात्रात व्यापून असणारें तत्त्व, ईश्वर 'जड पदार्थ चेतविले तें। म्हणौनि चैतन्य बोलिजेतें।' –दा २०.२१ [स. चित्–चैतन्य] ०गाभा–ज्योति–मूर्ति मूस–स्वरूप–रूप–चैतन्याचा गाभा, ज्योति, मूर्ति इ० असा परमेश्वर, विश्वाला चैतन्य देणारा ०शक्ति–स्त्री चिच्छक्ति, सर्व विश्वाला प्रवर्तक अशी शक्ति, जीवनक्रिया 'शास्त्रज्ञाचें असें मत होतें कीं . . चैतन्यशक्तीच्या सहाय्यानेच सेंद्रिय पदार्थ बनतात, आणि त्यास कृत्रिमरीत्या तयार करतां येणार नाहीं परंतु ती समजूत आता राहिली नाहीं' –सेंपू १.२ [स चैतन्य+शक्ति]

चैतन्य—पु एका वैष्णव पंथाचा संस्थापक व धर्मसुधारक

चैताळणें—अक्रि हवरणें 'गाई चैताळताती हर्षे। तैसेचि पाडे व्रज गोप।' निगा ५०

चैत्य—वि जाणण्यास योग्य चेत्य पहा

चैत्य—न १ एखाद्या वृक्षाभोंवतीं बांधलेला पार २ बौद्धांनीं कोरलेल्या लेण्यातील मोठें दालन, यांत स्तूप असतो ३ पिंपळाचें झाड. [स चैत्य] ०द्रुम–पु. पिंपळाचें झाड, गांवातील मोठा वृक्ष [स चैत्य+द्रुम=झाड]

चैत्र—पु हिंदूंच्या बारा महिन्यांपैकीं पहिला महिना हा इंग्रजी मार्च–एप्रिलच्या सुमारास असतो [स चैत्र] ०गौर–री, चैत्रागौर–री–स्त्री १ चैत्र महिन्यात स्त्रियांकडून पूजिली जाणारी पार्वतीची प्रतिमा, मूर्ति २ चैत्र महिन्यात एखाद्या शुभ दिवशीं पार्वतीची प्रतिमा थाटानें मांडून स्त्रिया सुवासिनींना हळदकुंकू देण्याचा जो समारंभ करतात तो [चैत्र+गौर–री=पार्वती] ०गौर–डोल्हारा बसविणें–सक्रि दोन्हीकडे दोन खांब व मध्यें झोपाळा व त्याच्यावर देवी, अशा लांकडी अथवा पितळी चौकटींत अन्नपूर्णा देवी बसवून चैत्र शुद्ध तृतीयेपासून वैशाखशुद्ध तृतीयेपर्यंत त्या देवीची, शजारीं सुपारी व लेकुरवाळें हळकुंड ठेवून पूजा करणें ०पालवी–पल्लव–स्त्रीपु चैत्र महिन्यांत (वसंत ऋतूमुळें) झाडांना फुटणारी नवी पालवी [चैत्र+पालवी] ०शिंपणें–न चैत्राच्या महिन्यांत भुरभुर पडणारा पाऊस [चैत्र+शिंपणें] –त्रा–वि चैत्राच्या महिन्यांतील, चैत्र महिन्यासंबंधीं [चैत्र] –त्रांगण–न चैत्रात पार्वतीच्या पूजनानिमित्त स्त्रिया तुळशीपुढें, अंगणात ज्या रांगोळ्या घालतात तें [चैत्र+अंगण] –त्रागौरा–री–स्त्री चैत्र

गौर-री पहा. -त्री-स्त्री. १ चैत्र महिन्यांतील पौर्णिमा, चैत्रशुद्ध पौर्णिमा २ चैत्र महिन्यांत भरणारी वर्षाची यात्रा -वि चैत्र महिन्यांतील, चैत्रमहिन्यासंबंधी. [ स ]

चैद्य—पु चेदि वंशाचा राजा शिशुपाल 'की मगध चैद्यवैरें। चैद्यादिकीं।' -ज्ञा ९ ४१६ [ स ]

चैन—स्त्री १ आराम, सुख, विश्राम, विसावा, स्वस्थता, मजा, आनंद २ ऐषआरामाचा, सुखविलासाचा विषय, गोष्ट (अर्थशास्त्र) चोटचा मजा भोगविण्यासाठीं ज्यांच्या उत्पादनास अतिशय मेहनत पडली आहे अशा गोष्टींसाठीं केलेला खर्च -शाको च २०२ 'चैन ही व्यक्तीला घातक व समाजाला मारक आहे' -शाको च २०२ [हिं चैन=आराम. स शयन] ०मारणें-मजा करणें, सुख भोगणें ०बाज चैनीबाज-वि सुखाभिलाषी, चुरहौसी, विलासी, ऐषआरामी, रंगेल [चैन+बाज प्रत्यय] ०बाजी, चैनीबाजी-स्त्री चैन करणें मजा मारणें, विलास सुखाधीनता, ऐषआरामानें वागणें [म चैनबाज] ०गड्डी चैनी गड्डी पु मजा मारणारा, चैन करणारा मनुष्य [चैन+गड्डी] -नी-वि चैन करणारा, मजा मारणारा [चैन]

चैल—न वस्त्र, कापड, कपडा, चेल पहा

चैली—स्त्री धलपी ढलपी, सालपट [हिं चैला, म चिरणें]

चो—(गो कों) षष्ठीच्या प्रत्ययाबद्दलचा, चा बद्दलचा प्रत्यय उदा० 'सावकाराचो सगादो पाटीवर हा'

चो—पु (व) १ आंब्याच्या किसाचें लोणचें 'काल चो घातला' २ (व) चिंध्या 'लुगड्याचा फाडून चो झाला' चव पहा

चोइटी—स्त्री चुई, चुरगी पहा 'नाना साली भक्षिल्या। अथवा चोइट्या चोखिल्या।' -दा ६ २ ४

चोक—पु चौक -मौज २ ६ ३० [गु चाक]

चोकडिया—क्रिवि (काव्य) चोहींकडे 'तद्दत इचे बैठक अयन लावियले चोकडिया।' -देप ५८ [चौधा=चार]

चोकडी—स्त्री मोरी -मौज २ ६ ३० [गु चोकडी]

चोकशी—स्त्री चौकशी पहा [गु]

चोख—पु एक वनस्पतिविशेष

चोख-खी—न स्त्री शुद्धपणा निर्मळपणा पांढरेपणा शुभ्रपणा स्वच्छता 'मग नचलतें कलंकवीण। शशिबिंब जैसें परिपूर्ण। तैसें चोखी शृंगारपण। मनाचें जें।' -ज्ञा १७ २३० [स चोक्ष तुल० का चोख तुल० गु चोख=स्वच्छता]

चोख—वि १ शुद्ध, निर्मळ निष्कलंक चांगलें, अस्सल स्वच्छ निर्मळ 'तें निजज्ञानही चोख। जाणता मीचि।' -ज्ञा ५ ४३६ 'ग्रंथारंभ पहिला चोख। मुक्त मुमुक्षु इतर लोक।' -एभा १११०४ २ उत्तम उत्कृष्ट थोर; श्रेष्ठ 'अर्जुनाचे भाग्य चोख।' -मुवन १ ७८ ३ प्रामाणिक [स. चोक्ष=स्वच्छ, शुद्ध आनंददायक, प्रा चोक्ख; तुल० हिं चोखा, गु चोख चोखुं, का चाख] ०माणसाचें:- चोखट-वि चांगला; उत्तम, शुद्ध, सुंदर, चखोट 'ऐसा महिमा घनवट। गंगा तैसी चोखट।' -ज्ञा २ २१२ 'बहुतां जन्मांचा शेवट। नरदेह पावे अवचट। येथें वर्तावें चोखट। नीतिन्यायें।' -दा ११ ३ १ [चोख, का चोकट] म्ह० (व) चोखट बिरा दातीं गुरा=जी बहुत स्वच्छ करतें, परंतु जिचे दांत स्वच्छ नसतात, पिवळे असतात अशा स्त्रीस उद्देशून ही म्हण योजतात चोखटा-टी-टें, चोखडा-डी-डें-वि (काव्य) चांगला, शुद्ध, दृढ, निष्कलंक; निर्मळ, चखोट 'चंद्र चकोरा चोखडी। बोलें अमृतधारी आवडी।' -ऋ ५२ 'तैसें श्रद्धेचें दृढवाडें। आणि क्षीर चोखडें। परी प्राणियांच्या पडे। विभागीं जें।' -ज्ञा १७ ५५. 'ऐसे निरवधि चोखडे। स्वामिभक्त।' -ज्ञा १ ११२ [चोखट] चोखटाई-स्त्री चांगुलपणा; शुद्धता, चोखटपणा कुशलता, उत्कृष्टता; स्वच्छपणा, प्रामाणिकपणा [चोखट तुल० हिं चोखाई, गु चोक्खाई] चोखटा ईंची भाजी-स्त्री निर्लेप भाजी, वडी, खरकटी न झालेली भाजी, याच्या उलट खरकटी खरकटा पहा चोखटीव—स्त्री चांगुलपणा, शुद्धपणा, निर्मळता 'चोखटिवा आपुलिया। बुडिला उणा घेयावया। तया दर्पणाचीचि परी धनंजया। केली आम्हां।' -ज्ञा १५.५७९ [चोखट] चोखटेल—न करडई, तीळ खुरासनी इ०कांचें तेल, गोडें तेल; याच्या उलट कडू तेल [चोखट]

चोखड—वि (खा व) पाव, चौथा हिस्सा, एकचतुर्थांश भाग, चतकोर [चौ=चार+खड=भाग]

चोखणी—स्त्री उटी, उटणें शरीर, केश स्वच्छ करण्याकरितां लावावयाचें शिककाई इ० मसाल्यांचें सुगंधी मिश्रण 'मग ते सुगंध चोखणी। श्रीमंत धुतला लावनी।' -वेसीस्व ८ १५ [चोख=स्वच्छ शुद्ध, निर्मळ]

चोखणी—स्त्री १ लहान मुलास चोखण्यासाठीं द्यावयाचें रिंगणें, चोखणें २ चोखण्याची क्रिया [चोखणें]

चोखणें—सक्रि चुकणें, चोपणें, ओंठानीं दाबून (आं०यां तील रस, स्तनांतील दूध इ०) तोंडांत ओढून घेणें [स चुष्-चोषण-चोखणें]

चोखदळ चोखन(ने)ळ—वि नाजूक टापटिपीचा, खाण्याच्या बाबतींत मिजासखोर चिकित्सेखोर, जिभेचा शिंदळ कजाळखोर [चोख]

चोखलण-न—न अंग धासणें चोळणें स्वच्छ करणें इ० 'यशोदा माता घालीत पाणी। चोखलण वेळोवेळां करीती।' -श्रीगीत २०. [चोख]

**चोखलणी**—स्त्री चोखलण्याची क्रिया. [ चोखलणें ]

**चोखल(ळ)णें, चोखाळणें**—सक्रि. १ गवत आणि तण काढून ( जागा, जमीन ) साफ करणें. २ ( झाडांच्या बारीक बारीक फाजील फांद्या व पानें ) छाटणें; खडसणें. ३ ( दांत ) कोरणें; कोरून साफ करणें. ४ पायांतून कांटा काढून पाय मोकळा करणें. ५ ( रस्ता, भांडीं, कपडा ) धुवून, पुसून, घासून साफ करणें. 'ह्याच्या चोखाळल्या वाटा। नलगे पुसाव्या धोपटा।' ६ ( खराब दाणे ) वेंचणें; निवडणें. ७ धुंडाळणें; बारकाईनें शोधणें; झाडा घेणें; नग्न, नागवा करणें; नागविणें. ८ तेलानें ( लहान मुलाची टाळू ) भरणें; माखणें. ९ ( एखादा मार्ग ) अवलंबणें. [ चोख ]

**चोखळ**--वि. शुद्ध; निष्कलंक; उत्कृष्ट. 'तेशी भाषा माझी चोखळ।' -ख्रिपु १.१ १२२. [ चोख ]

**चोखळा**—पु तुकडा. 'कां केळीचा गाभा मोडला। चोखळा अमुडला आकाशाचा।' -अमृ ७.६९.

**चोखा**—पु १ ( गु. ) तांदूळ. २ ( कु. ) देवाचारासंबंधीं उपड्या हवेंत, अंगणात वगैरे शिजविलेला भात.

**चोखा**—वि. चोख; निर्मळ; शुद्ध; निर्भेळ; अस्सल; चोखट. ०कीड-वि. चांगलें व हिणकस. 'परी परिसाचा वरकलीं। नाहीं चोखाकिडाची बोली।' -ज्ञा १७.४०७. [ चोख+कीड=हिणकस ]

**चोखांदळ**—वि. चोखनळ; चोखंदळ; चिकित्सक; चिकित्सा करणारा. 'वाङ्मयांत नवोनव अशा चोखांदळ ग्रंथांची भर पडून वाङ्मयाची अभिवृद्धि होते.' -महाराष्ट्रीय नाटककार ( अभिप्राय-किर्लोस्कर मासिक )

**चोखामेळा**—पु. १ महार जातींत पूर्वी होऊन गेलेला एक संत. २ (ल.) (सामा.) महार. 'संत झाले चोखेमेळे फार। टिळा टोपीमाळांचे भार।' -पला ६७.

**चोखारी**—वि. चोखनळ; ( खेवण्याच्या बाबतींत ) चिकित्सेखोर. [ चोख ] म्ह० भिकारी आणि चोखारी=भिकारी असून खाण्याच्या बाबतींत चिकित्सा करणारा (इतरत्र उपयोग क्वचित).

**चोखाळ-ळा**—वि. चोखनळ; चिकित्सा करून जेवणारा; जीभर्दिदळ; खाण्याच्या बाबतींत सूक्ष्म आवडीनिवडी असणारा. 'पण बकरें इतकें चोखाळ आहे तरी मेंढरें ज्याला शिवणार नाहीं असें कांहीं खाणें बकरें खातें.' -मराठी ३ रें पुस्तक पृ. १३ ( १८७१ ). [ चोखणें ]

**चोखाळ**—वि. (काव्य.) १ स्वच्छ, शुद्ध; निर्मळ, सोज्वळ 'स्वर्मेचि देणें चोखाळें। करी दशादिकें सखळें।' -ज्ञा १७.३१८. २ निष्कलंक; पवित्र; निर्दोष. 'की चोखाळ वाटे जी क्षिती। तिजवर चालती सकळ याती।' -भवि ३३.४४. ३ चोख पहा. [चोख; तुल० का. चोक्कळ=पावित्र्य, सौंदर्य ] **चोखाळणें**-उक्रि. १ स्वच्छ करणें; शुद्ध करणें; शुद्ध होणें. 'तैसे यमनियमीं कडस्ले। जे तपोज्ञानीं चोखाळले।' -ज्ञा ४.६५. 'जीव हा चोखाळला तुझिया कृपासलिलें।' -शिगीता ५८. २ चोखळणें या शब्दाचे बाकीचे अर्थ पहा. 'राष्ट्रास योग्य मार्ग चोखाळण्याची सुबुद्धि दे.' -के १२.७ ३०. ०त-ता-वि. निर्मळ; शुद्ध; चोखाळ पहा. 'जेणें चोखाळत दिसे न्याय। तो व्यवसायांत व्यवसाय।' -ज्ञा १०. २८६. ०पणा-पण-पुन. १ नीटनेटकेपणा; स्वच्छपणा; शुद्धपणा. 'वरि पंच धारगोरी। आळंगी चोखाळपणें।' -ऋ ८१. २ निर्मळपणा; निर्दोषता. 'चोखाळपणें झळकती। पल्लवसडका।' -ज्ञा १.९. 'तैसे हरिकथाश्रवणेंवीण। जीवा काई चोखाळेपण।' -दाव १२. [ चोखाळ+पण-णा ]

**चोखाळा**—पु. (चोखाळणें पासून नाम) १ पूर्णपणें साफसूफ, स्वच्छ करणें. २ शोधणें; धुंडाळणें, बारीक रीतीनें तपासणें; पाहाणें; निरीक्षण करणें इ०. [चोखाळणें] ०घेणें-कसोशीनें झाडा घेणें; शोध करणें; तपासणें.

**चोखी**—स्त्री. १ चागुलपणा. 'विवचूं जातां चोख। चोखी बोलीं।' -ज्ञा १८.७६८. २ निर्मळपणा; शुभ्रपणा, स्वच्छपणा. 'काळिमा सांडील कोळसा। वरी चोखी होईल वायसा। राक्षसही मांसा। विटों शके।' -ज्ञा १६.२८५ [ चोख ]

**चोखुट, चोखोट**—वि. सुरेख; चांगलें; चखोट; चोखट. चोखी पहा. 'वडे केले चोखुट।' -मसाप २३.

**चोखौळ**—न. चांगलें फूल. 'स्वकर्माच्या चोखौळीं। मज पूजा कहनि भली।' -ज्ञा १८..१२४७. [ चोख फूल ? ]

**चोंग(गा)ई**—स्त्री. पुरुषाचें जननेंद्रिय. [ हिं. चोंगा=नळी; कु. चोंगो=चार आंगुळाचें माप ]

**चोंगडी**—पु. एक प्रकारचा मासा.

**चोगला**—पु. ( प्र. ) चौगुला, चौपला, चौघुला पहा.

**चोगा**—पु. एक पायघोळ अंगरखा. [ का. चोंगे. गो. चोगो; तुल० इं. टोगा ]

**चोंगा**—पु. (क.) रोटासारखा एक खाद्य पदार्थ ( मुसलमानांत रूढ ) 'त्या फकीरानें चोंगा आणला आहे तो ठेवून घे.'

**चोंगा-गी**—पु. (कों.) १ चार बोटें रुंदीचें माप; हाताच्या पंजाच्या रुंदीचें माप, चौंगा. (कु. चोंगो=) चार अंगुळांचें माप. २ दोन पंजाच्या रुंदीइतक्या काठीचें माप; आठ अंगुळें. [ चौ+अंगुली ]

**चोंगे**—स्त्री. चिलीम; धुम्र. [ का. ]

**चोंधा**—पु. (व.) एक हात व हाताची वळविलेली मूठ मिळून होणाऱ्या लांबीचें परिमाण, मुंडा हात. 'चोंधा टाकून हें धोतर मोज.' [ चोंगा ]

**चोंच**—स्त्री १ पक्ष्याच्या तोंडाचा अग्रभाग, चञ्चु, पक्ष्याचें तोंड २ (ल) पागोट्याची, पगडीची कोकी, कोचकी, टापू ३ चाकू, कातर इ० शस्त्राची टोंकदार अणी, शेंडा ४ कपाळावरील कडाला त्रिकोणाकृति देऊन केलेली, चोंचीच्या आकाराची, हजामत, चेहरापट्टी (सामान्यत मारवाड्यांत हा प्रकार आढळतो) (क्रि० करणें, ठेवणें) [स चञ्चु=चोंच, तुल० म टोंच] म्ह० अगोदर चारा मग चोंच=प्राणी जन्मण्याच्या अगोदरच ईश्वरानें त्याच्या निर्वाहाची व्यवस्था केलेली असते.

**चोंचण**—न १ नारळ, सुपारी इ० कांच्या भोंवतालच्या तंतुमय वेष्टनाचा पुंजका, नारळाची शेंडी २ (फार ठोकलेल्या खिळ्याच्या, खुंटीच्या माथ्याची अथवा फार वापरलेल्या लेखणीच्या टोंकाची) नारळाच्या शेंडीप्रमाणें झालेली अवस्था, खडबडीतपणा, चोंचण्यामुळें बनलेला गुच्छ [चोंच]

**चोंचणें**—चोचाविणें पहा

**चोंचर, चोंचरट**—न आंबा इ० फळांतील रेषा, तंतु.

**चों(चो)चरा**—वि (राजा) अडखळत बोलणारा, तोतरा, चाचरणारा [ध्व]

**चोच(चे)ला**—पु १ (लावण्यांतून रूढ) यार, जोबन २ प्राणनाथ, प्रियकर, जिवलग (स्त्रीनें पतीस किंवा प्रियकरास उद्देशून वापरावयाचा शब्द) ३ हावभाव, डौल, नखरा, छिचोरपणा ४ इष्कबाजी, विलास, लीला, कामचेष्टा ५ कोड, कौतुक [चोंच, हिं चोंचला=खेळकरपणा]

**चोंचा**—पु १ तुवडी, रोंवी लावण्यापूर्वी वस्तरा इ० कानीं मारलेली फासणी २ औषधाकरितां दिलेली डागणी ३ डाग दिल्यानें कातडीवर पडलेली खूण, डाग, मूळ, सामान्यत अनेकवचनी प्रयोग उदा० चोचे देणें, मारणें [चोंच]

**चोंचावणें**—अक्रि (धनुष्यापासून सुटलेल्या बाणाचें, गोफणीनें फेंकलेल्या दगडाचें सूसू करणें, घोंगणें, सणसणणें) [ध्व]

**चोचाविणें**—सक्रि १ चोंच मारणें, कुरतडणें २ (आवळे आंब इ०कांना शस्त्रानें) टोंचे मारणें, टोंचून टोंचून बारीक बारीक छिद्रं पाडणें, चोंचणें, (मुळा, काकडी इ० लिंबीवर उभी फिरवून फिरवून कोशिंबिरीकरितां) बारीक बारीक चिंधोट्या, कुचा खुरचा करणें ३ खाडणें, खापलणें, तुकडे करणें [चोंच]

**चोचो**—पु भोपळ्याच्या वर्गांतील एक वेल सिलोन व मद्रासकडे याची बरीच लागवड करितात याच्या फळाचा मोरंबा परदेशीं फार खपतो -शाको च २०३

**चोज**—न १ नवल, आश्चर्य, आश्चर्यकारक गोष्ट, चमत्कार 'अहो पाहतां वीर प्रतिभासे। एथ नवलावो काय असे। परि न पाहतांही दिसे। चोज आइका।'–ज्ञा ११ २२९ पाहत होतां गगानुज। म्हणे कैसें झालें चोज।'–गुच १९ ४४, २ कौतुक, लाड. 'नातरी बालक बोबडा बोली। कां बाळुडा विचुका पाउलीं। ते चोज करूनि माउली। रिझे जेवीं।'–ज्ञा १ ६ 'हातीं धरूनियां काढिला बाहेरी। देखोनियां करी चोज त्यासी।'–तुगा २० (क्रि० करणें) ३ प्रेम, प्रीति. 'पाहा पां नवल कैसें चोज। कें उपदेशु केउतें झुज।'–ज्ञा १ १२३ ४ कामत 'भीमा दाखवी आपलें चोज।'–मुविराट ५ ९१ ५ नखरा, चेष्टा, चाळा, गमत, मजा (अनेकवचनी प्रयोग) (क्रि० करणें) [स. चोद्य=आश्चर्य, नवल, प्रा चोज्ज] (बाप्र) (जिवाचें)–**चोज करणें**–नखरे, चाळे करणें, आपण नाजूक आहोंत असें मानणें, जिवाचें कोडकौतुक पुरविणें, स्वत ला फार जपणें **चोजणें**-अक्रि (काव्य) समजून, कळून येणें, कल्पनेस नवलाईप्रमाणें दिसून येणें, वाटणें, मनास कौतुकास्पद भासणें 'कां काळा राहे काळावळा। तो आपणा ना आणिकां। न चोजवे तरि असिका। हा मी बाणे।'–अमृ ४ ३६ 'हें ज्ञानासीं न चोजवे। ध्यानासी ही नागवे।' सामाशब्द– ०**बावळा**–वि चमत्कारिक, विलक्षण, तऱ्हेवाईक, खुळचट, अर्धवट, वेडसर (बोलणें, भाषण) [चोज+बावळा] **चोजवणें-विणें**–अक्रि १ (काव्य) कौतुकास्पद असणें, वाटणें, होणें. 'द्वारकेचें केणें निश्चित। पंढरीस आलें चोजवत।' २ समजणें, आकळणें, कळून येणें 'तया सजया येणें बोलें। रायाचें हृदय चोजवलें। –ज्ञा १ ५ 'कवण कार्य तें यथार्थ। चोज वेरा अनुमाना।'–मुवन ८ ११७ 'ब्रह्म इंद्रियांच्या मेळें। चोजवेना।'–दा ७ २ ४ ३ आवडणें, कौतुक वाटणें 'ब्रह्मांडनायक चोजवेना। हें बरें नव्हे।'–दा ६ १ १३ ४ संतोषणें, प्रसन्न होणें 'सद्गुरूचें कृपें चोजवतो देव।'–दावि ३३३ –सक्रि १ आश्चर्यचकित करणें, नवल वाटावयास लावणें, विस्मित करणें 'राया चोजविलें वचनीं।' २ कौतुक करणें 'चोजवित घरा येती। ज्यांचा देखती शुद्ध भाव।'–निगा १६४ ३ शोधणें, तपास करणें 'कांचाचा खाणार चोजवी कस्तुरी। आपण भिकारी अर्थ नेणें।'–तुगा ८९२ **चोजावणें**–अक्रि चोजणें, कौतुकाकुल, विस्मित होणें 'राय चोजावला वचनीं।'–मुआदि १८ ३३ [चोज]

**चोजविनी**—स्त्री आनंद कौतुक, आश्चर्य वाटणारी गोष्ट 'तरी त्यास चोजविनी फार झाली।'–भवक २, कृष्णकौतुक ४७

**चोट**—स्त्री १ तडाखा, घाव, दुखापत, शस्त्रानें, मुष्टीनें केलेला प्रहार, बुक्की, गुद्दा २ (व ल) हल्ला, धाड 'आज लाडवावर चोट आहे.' ३ (ल) (व्यापारांतील, धंद्यांतील) धस, तोटा, नुकसान, दुर्दैवाचा घाला (क्रि० लागणें) 'जव कमाई न होय। चोट धाड घनकी रे।'–तुगा ४२९ ४ दैवयोगानें

झालेला अकल्पित लाभ, अनपेक्षित रीतीनें झालेला फायदा, लाग (क्रि० साधणें, लागणें, लावणें) 'व्यवहारात एखाद्या वळेस चोट साधते तेव्हा चार पैसे मिळतात ' 'ही हाताची चोट गमावू नकोस ' ५ गाडी व गावगुड याच्या खेळात परस्परावर डाव लागू झाल्यामुळें होणारी वेदना ६ (व) शर्यत 'आमची दोघाची चोट लागली ' (क्रि० खेळणें) ७ (व) शर्यतींत लावलेला पण 'पैसा चोट खेळू ' ८ (सामा) जखम, व्यथा 'दुःखाची काळजामध्ये लागली चोट जी जी।' –प्रला १९३ [हिं, तुल० स चुट् (चोटयति)=कापणें, छेदणें]

**चोंट**—पु (अश्लील) पुरुषाचें जननेंद्रिय, शिश्न. **–चोंटाळ**–वि (ग) बाहेरख्याली करणारा, रंडीबाज

**चोंट(ड)कें**—न गोंधळी, शाहीर इ० काचें एका तारेचें तंतुवाद्य, एकतारी, तुणतुणें, चौंडकें पहा

**चोटणें**—अक्रि (गु) चिकटणें –मौज २६३०

**चोंटली**—स्त्री (लहान मुलाचें) शिश्न, चोट लिंग, बुली

**चोट(टा)ळणें**—सक्रि १ फसविणें, ठकविणें, मुंडणें, भोंदणें, धरणें, (व्यवहारात) नाडणें, लुबाडणें २ कस्पटाप्रमाणें मानणें, अगदीं तुच्छ लेखणें [चोंट]

**चोटियाचुरमा, चोट्याचुरमा**—पु चुटियाचुरमा पहा

**चोटी**—स्त्री (व) शेंडी [प्रा चोट्टी=शेंडी, हिं चोटी] **०भोंवरी**–स्त्री घोड्याच्या (कपाळावरील) शेंडीखालचा भोंवरा, घेरा [चोटी+भोंवरी]

**चोटी चोटीचुरमा**—पु चुटियाचुरमा पहा 'चोटी चुरमा मालपुवे अनि।' –अमृत ६२ 'चोटी मुगदल बुंदी विशेष।' –नव ९ ११७

**चोट्टा**—वि (ना) (विदार्थी) चोरी करणारा, चोरटा [चोरटा हिं]

**चोट्टी**—स्त्री (गो) चौरटी

**चोड**—न १ (कों) नारळावरील (सुकलेलें) ततुमय वेष्टन साल फळाच्या (जायफळाच्या) वरची साल नारळाच्या चोडा सारखी जाड असते'–मराठी ३ रें पु पृ २४ (१८७३) कवच, आवरण काथ्या, चवड २ नारळावरील काथ्याच्या तुकड्याचा अर्धा भाग एका टोंकाला ठचून मीठ इ० गाळा करण्यासाठीं केलेली कुचली कुंचा ३ पिळून काढलेल्या उसाचें चिपाड [स चूडा, प्रा चोड हिं चोंडा]

**चोंड**—न (कों) भाताचें लहान शेत; चोंदा चोंढा पहा

**चोंडक**—पु तुणतुणेवाला

**चोंडरें**—न तोंड

**चोंडकें-गें**—न एकतारी, तुणतुणें, चोंटकें पहा 'गोंधळ्याच्दा मागें चोंडकें वाजविणारा असतोच'

**चोंडण**—न सोडण, नारळावरील ततुमय आवरण चोड अर्थ १ पहा –कृषि ७४९ [चोड]

**चोंडा**—पु (कों) भाताच्या रोपांची जुडी, झुपका, चोंढा पहा

**चोंढ-ढा, चोंढी-चोंढें**—पुस्त्रीन १ बांध घातलेलें भाताचें खाचर २ खाच, खळगा –ज्ञा ७ ७९ 'जयजय देवी श्रीदुढें। क्षणें घालिशी विश्व चोंढें।' –स्वानु १ ४ १६ ३ पाण्याचा डोह, गर्ता, खोल पाणी. 'चोंढिये पायरु गेला। तैसनि जो बुडाला।' –ज्ञा १२ ५४९ –एभा ११ १०६९.

**चोढाळ-ळा-ळ्या चोढळणें, चोढाळणें**—चौढाळ पहा

**चोंढणें**—सक्रि. (गु) चिकटविणें –मौज २६३०

**चोंढोळी**—स्त्री (व) विटाळ, हस्तस्पर्श इ० दोष, चव ढव 'त्या हंड्यातील पाणी चोंढोळीचें झालें आहे, म्हणून तें मला स्वयपाकाला चालत नाहीं ' [चौंढाळणें]

**चोणकेपणा**—वि (व) लुडबुड, चोंबडेपणा

**चोणक्या**—वि (ना) लुडबुड, वठाठेव करणारा, चोंबडा

**चोतकर, चोतकोर**—पुस्त्री (पोळी, भाकरी, लाडू, फळ इ० कांचा) चवथा, पाव हिस्सा, तुकडा, (प्र) चतकोर [चत कोर, स चतु कृत्वा–चतकुर–चोतकोर अचा ओ होऊन चोतकोर झालें –भाम १८३२]

**चोतरी**—स्त्री चोया, चोयट पहा. 'नीतिरूपी इक्षुदंडाचा आस्वाद न घेता त्याची नुसती चोतरी हातीं देण्यात तुम्हाला काय पुरुषार्थ वाटतो कोणास ठाऊक?' –नीतिशास्त्रप्रवेश २४२ [चोया]

**चोथड**—पु चोथा, (पदार्थ, ऊस इ०) चोखल्यानतर, चावल्यानतर, चघळल्यानतर अवशिष्ट राहिलेला रद्दी अंश, टाकाऊ भाग [चोथा]

**चों(चो)थडी**—स्त्री १ चिंधडी, तुकडें, ठिगळ, धासणी. २ नासक्या दुधाची गुठळी, दह्याची दवडी ३ पदार्थ चावून रस हीन झालेला, थुंकून टाकावयाचा रद्दी भाग, चोथा [चोथा+वडी]

**चोथल(ळ)णें**—सक्रि चोथ्यानें धासणीनें चिंधीनें पुसणें, घासणें २ (शरीर भांडें इ० काला तल माती, राख, चिखल रक्त इ०) फासणें, लावणें चोपडणें, चोळणें, माखणें –अक्रि (दहीं, दूध इ०) चोथापाणी होणें [चोथा]

**चोथवा, चो(चौ)था**—पु (खा) एक माप, चोम्याचा चतुर्थांश किंवा एक पायली भसक चोथवा करून त्यावर शिक्का सरकारी।' –पला ७० [स चतुर्थ, प्रा चउत्थ म चवथा]

**चोथा चोंथा**—पु १ सत्त्व काढून घेतल्यानतर राहिलेला पदार्थाचा त्याज्य भाग, चोथड 'आल्याचा रस काढुन पडून राहिलेला चोथा मला खाण्यास दे ' २ (मांडीं घासण्याकरितां,

भोंकाला दट्या देण्यास अशी उपयोगी) गवताची गुंडाळी, चिंधीचा बोळा, पाचण इ० ३ भाताचें रोप -मग्राप २ २५४ ४ नासक्या दह्याचा, दुधाचा गाळ, पः भाग, चिपाडी ५ एका चिमटींत भाताच्या रोपाच्या जितक्या काड्या घेतील त्यांचा समूह -बदलापूर २८७ [स चुस्त] ०पाणी-न १ नासलेल्या दुधाच्या वाईट विरजलेल्या दह्याच्या गुठळ्या व पाणी २ गुठळ्या व पाणी, चिपाड्याव पाणी यांनीं युक्त झालेला कोणताही द्रव पदार्थ. 'या पाण्यांत साबू लवकर फेंसाळत नाहीं व त्याचें चोथापाणी होतें ' -आरोग्य १.९४ [चोथा+पाणी]

चोथी—वि (गो) १ वाईटबुद्धीचा २ चौथा

चोंद—स्त्री (व) जखम, व्रण 'त्याच्या कपाळाला चोंद पडली ' [स चुद्]

चोंदणें, चोंदडणें—उक्रि १ चोंदणें, ठासणें, ठोंबरणें; ठासून भरणें २ (चिंध्यांनीं, बोळ्यांनीं) बुजविणें, बंद करणें [स चोदन] चोंदणी-स्त्री चोंदण्याची क्रिया [चोंदणें]

चोदणें—उक्रि (ग्राम्य) समागम, संगम, मैथुन करणें, संभोगणें, उपभोगणें (या क्रियापदावरून बऱ्याचशा शिव्यांचे शब्द बनले आहेत) [स चुद्=चोदणें, हिं चोदना]

चोदना—स्त्री प्रेरणा, अंत स्फूर्ति -गीर ६९ [स]

चोदयावळा—वि. ल्यावीनें, लुच्चेगिरीनें बावळी मुद्रा धारण करणारा, फसवेगिरीनें वेड पांघरणारा, ढोंगी [चोदणें+बावळा]

चोंदळणें—उक्रि १ पायाखालीं तुडविणें, मळणें. २ पायांनीं तुडवून पाणी गढूळ करणें, ढवळणें, गाळ करणें [चोंदणें]

चोंदा—पु १ भोंक बुजविण्यासाठीं उपयोग केलेल्या चिंध्यांचा, चिरगुटांचा बोळा, दट्या, बंदुकींत ठासलेला चिंध्यांचा गोळा २ बंदुकींत चिंध्या ठासण्याची भोंकांत चिंध्यांचा दट्या देण्याची क्रिया. [चोंदणें]

चोंदाट(ड)णें—उक्रि चोंदणें पहा [चोंदणें]

चोंदी—स्त्री १ चोंदा अर्थ १ पहा २ फसवणूक, लुबाडणें (क्रि० देणें, बसणें) ०घालणें-देणें-बसणें-बसवणें-चिंध्या इ० कांचा दट्या देऊन बंद करणें ०देणें-(तोंडांत) बोळा देणें ०देऊन जाणें-अक्रि (ल) (एखाद्याला लुच्चेगिरीनें) फसवून पळून जाणें, भोळावण, मुडणें, डोक्यावर हात फिरवून जाणें [चोंदणें]

चादीचा, चोदिच्चा—वि (अपशब्द) एक शिवी बदफैलीचा, रांडेचा, हलकट [चोदणें]

चोदू, चादूनंदन चाचा—पु एक शिवी, छिनालसनी, रंडीबाज इष्कबाज, जारकर्मी [चोदणें]

चोधळा—वि डोळ्यानें अधू, मिचक्या, मिचमिच्या डोळ्याचा. [हिं चौंधला]

चोन—पु १ तडाखा, चोट पहा. २ (ल) विलास, चैन, रंग 'आग लागो तुझ्या चोन्याला ! ' -देपो ५२

चोनणें—(गो) चोंदणें पहा

चोप—पु १ थापटीनें जमीन इ० ठोकण्याची, टणक करण्याची क्रिया; चोपणी २ ठोक, मार (क्रि० घेणें, देणें, मारणें, काढणें, बसणें) ३ विणकराच्या फणीचा शेवटचा भाग, या जागीं या ठिकाणीं दांते बारीक व अबलबळ असतात ४ दंड, काठी; चोब पहा. -पुस्त्री १ (ल) जरब, दाब, निदमन, नियमन, निग्रह, शासन (क्रि० करणें, देणें, बसणें) २ (अभ्यासामुळें, प्राविण्यामुळें मनाला लागलेली) संवय, परिपाठ, शहता, (क्रि० लागणें) 'चोप लाऊन मनाप्रति वेगें । सर्व नीट पडली अनुरागें।' -शाहिसेना ५२ (कवि जगन्नाथ शके १६६९ राजवाडे ग्रंथमाला) -स्त्री १ (ताड, माड, सुरमाड इ० कांच्या खोडाची) उभी चिरफळी, सोपट, लांब फाळी २ (व) काळजी, चिंता, खबरदारी इ० (व) ज्याची त्याला चोप नाहीं, शेण पुजिला शोप नाहीं =मालक स्वत बेफिकीर, पण तिन्हाइताला त्याची काळजी अधिक ३ (व) चौघडा वाजवावयाची बारीक व लहान काठी, ढोलकें नगारा वाजविण्याचें टिपरें, टिपरी 'नगाऱ्यास दोन चोपा लागतात. ' ४ (व) (घाम इ० कांचा) ओलावा 'घामाची चोप आली म्हणजे ताप उतरेल '=पुष्कळ घाम आला म्हणजे ताप उतरेल [चोपणें का चोब्] (वाप्र) ०धरणें-१ (जमीन, गच्ची इ०) सपाट, साफ होऊन एका पातळींत येणें २ (मनुष्य) शिस्तीचा, बखशीर, व्यवस्थित, गंभीर, शांत बनणें, ताळ्यावर येणें

चोपई—स्त्री. सापसुरळी, सरड्याची एक जात

चोपचिनी—स्त्री एक औषधी वनस्पति ही चीन देशांतील असल्यानें हें नांव पडलें असावें चावचिनी पहा

चोपट—न १ सोपट, चोप 'सरस उभ घालिजे घाणा। रस पिळूनि मोर मादणा। रिता चोपटीं कवडी पाणा। तैं भती आणा शाहिलों।' -एभा १० ४६८ २ (गो) ताड, माड, सुरमाड इ० च्या खोडाची उभी चिरफळी, चोप [चोप] ०करणें-नष्ट करणें, पार सपाट, साफ करणें 'मुसलमानोकु चोपट किये और धर्म कायम रखा ' -इम १८९

चोपट—वि. चौकोनी, चतुरस्र, घन (लांकूड) [चौपटअप]

चोपट—वि तेलकट, गुळगुळीत, (सामा) चोपड, ओशट गुळगुळीत [चोपडणें]

चोपटणें—सक्रि १ (जमीन, गच्ची इ० चोपणीनें) ठोकून सपाट व गुळगुळीत करणें, ठोकून खालीं बसविणें, टणक करणें

२ मारणें, ठोकणें, पिटणें, बडवणें 'मास्तरानें मुलास चांगलें चोपटून काढलें ' -अक्रि १ (शरीर) झडणें, कृशतेमुळें बारीक होणें २ (जमीन, गच्ची इ०) दबणें, खचणें, खालीं बसणें [चोपणें]

**चोपटणें**—अक्रि (प्रा) बुळबुळीत, तुळतुळीत, ओशट होणें [चोपड]

**चोपड**—वि तेल चोपडलेलें, बुळबुळीत, तुळतुळीत, ओशटानें युक्त

**चोपड**—वि (नदभाषा) चौदा 'उघानु काटीवरी चोप डूची भास। नत्रा राजस मिरवतसे।'.—तुगा ४४५९.

**चोपड**—पु चौपट, एक खेळ, हा लाव फाशानीं खेळतात 'गजीफा, सतरंज चोपड नर्वे तें नर्देही साग जे।' -सारुह ३ ४६. [चौपट हिं चौपड]

**चोपड, चोपडण**—न (तेल, तूप, चरबी इ०) स्निग्ध पदार्थ, ओशट [प्रा चोप्पड] म्ह० उष्टें खावें चोपडाचें आशेस्तव=फायद्याकरिता थोडेसें पाप केल्यास हरकत नाहीं फायदा वगैरे काहीं नसता पाप करणें मूर्खपणाचें होय

**चोपड-डा, चोपडण**—पुन १ अंग, केंस यांस लावाव याचें तेल इ० 'नीटचि युक्ति पहाता हें कीं मी कृष्णवाद चोपड तें।' -मोमनु ७ ४४ २ केसांना तेल इ० चोपडण्याची क्रिया. ३ शरीराच्या दुखावलेल्या अवयवास, थकलेल्या जनावरास तेलांत औषधें कालवून करावयाचें मालिस, चिखल किंवा चिंचेचीं पानें बकरीच्या रक्तात भिजवून द्यावयाचा लेप ४ वरील लेप लाव ण्याची, मालिश करण्याची क्रिया. ५ वरील मालिश केलेली, लेप लावलेली अवस्था [चोपडणें]

**चोपडण**—न १ चोपड, चोपड-डा पहा २ (हेट) गल बतास तेल किंवा रंग लावण्याची क्रिया (क्रि० करणें). ३ गल बताच्या पाण्यांत बुडणाऱ्या भागास लावण्याचा तेलचुन्याचा रंग

**चोपडणें**—उक्रि (तेल, तूप इ० कांनीं) माखणें, लेपणें, चोपडून नरम, गुळगुळीत करणें, चोपडण करणें [प्रा चोप्पड म चोपड, हिं. चुपडना]

**चोपडा**—पु १ चोपड पहा २ (गु) वनस्पतींना होणारा एक रोग, यासच मेकाड असें म्हणतात

**चोपडा**—वि १ गुळगुळीत, बुळबुळीत, चिकण, मऊ आणि सपाट २ तेलकट तुपकट, चिकट ०घटचटीत-वि गुळगुळीत, तळतळीत, पॉलिश केलेला, उजळ, चकचकीत, लस लशीत. ०देवदार-वि (व)(ल) वरपांगी भलेपणा दाखविणारा, साळसूद (मनुष्य) ०दोडका-पु (ना) घोसाळें [चोपडा+ दोडका] ०पैसा-पु गुळगुळीत, वरील छाप गेलेला पैसा, खोटा पैसा ०लाख-स्त्री वर्खाची लाख (प्र) चपडा लाख [चोपडा+ लाख]

**चोपडी**—स्त्री १ एक साचाचे अनेक कागद एकत्र शिवून लिहावयासाठीं केलेली वही शिवलेलें, बांधलेलें पुस्तक, वही, ल्हानसें पुस्तक २ हिशेबाचें पुस्तक, जमाखर्चाची वही [हिं चौपत्री, गु. चोपडी]

**चोपड्या**—पु चोपडलेला पदार्थ -शार [चोपडणें]

**चोपडें**—न ल्हानसें किंवा भिकार पुस्तक [स चतुस्=चार+पत्र=पान]

**चोपडें**—न पीतांबर, कोणतेंहि रेशमी वस्त्र

**चोपण**—वि (प्रा) चिकण (जमीन, माती) [चोपड] ०माती—स्त्री एक प्रकारची चिकण माती [चोपण+माती]

**चोपण-णी, चोपणें**—स्त्रीन १ (जमीन इ०) चोपण्याची, ठोकण्याची क्रिया (चोपणें पासून नाम) २ गवंड्याचें जमीन चोप ण्याचें लाकडी हत्यार हें हात दीड हात लांब, वीतभर रुंद व चार पांच बोटें जाड असून, याला हातांत धरण्यासाठीं मागें एक मूठ असते ३ ल्हान मुलाचें रिंगणें, चोखणी ४ तेलकट कापड चिकण मातींत भिजवून ठेवणें [फा चोब्=काठी? ध्व चोप]

**चोपणें**—सक्रि १ चोपटणें, (जमीन इ०) चोपणीनें ठोंकून सपाट, साफ, टणक, गुळगुळीत करणें. २ (ल) मारणें, बडविणें, ठोकणें, पिटणें -अक्रि १ (जमीन, भुई इ०) खचून, खालीं बसून सपाट दिसणें २ रोड, अशक्त होणें, कृश होणें, वाळणें. 'जनीं वनीं तुजसाठीं मनीं झुरतां मी चोपलें।' -होला ९४

**चोपणें**—उक्रि (सामा) चुफणें, चोखणें.

**चोपदार**—पु (प्र) चोबदार, वेत्रधारी, सोन्याची, चांदीची काठी हातांत धरून राजाच्यापुढें चालणारा हुजऱ्या हा प्रसंगोचित ललकारतो, व राजापुढें येणाराचें नांव उच्चारतो. दरबारांत अव्य वस्थित बसणारांना इशारा देतो याच्या जोडीला भालदार शब्द येतो. [फा चोब्दार, हिं चोबदार]

**चोपन**—पु (व) दलदलीची जागा, जमीन 'चोपनावर चिखल आहे।' [चोपण पहा]

**चोपय**—स्त्री चोपई, सरड्याच्या जातीचा एक प्राणी, सापसुरळी

**चोपरू**—वि (नंदभाषा) (क) चौदा 'आजच्या सात क्यांत चोपरू आणे नफा झाला ' चोपड पहा

**चोपाचोप**—स्त्री १ (जमीन, भुई इ०) चापण्यानें सारखी ठोकण्याची क्रिया २ (ल) याला चोप, त्याला चोप अशा रीतीनें मार देण्याची, चोप देण्याची क्रिया, धक्काधक्की, ठोका-ठोकी, धुंदी काढणें [चापणें द्वि]

**चोपाटणें**—अक्रि (राजा) थकणें, कृश होणें [चोपटणें]

**चोपाडणें**—सक्रि (राजा) चोपडणें, फासणें तेल इ० लावून बुळबुळीत करणें चोपडणें [चोपड]

चोपाय—पु. ( गो. ) पक्ष्याचा पंजा.

चोपा(फा)ळा—पु १ झोपाळा; झोंपा; दोला; आंदोला. २ ( कु. ) फळ्यांची चार खुरांची, खाट, चोपाळा. [ सं. चौ+फलक=फळा; हिं. चौपाला=पालखी, रथ ]

चोपूनचापून—क्रिवि. १ ( जमीन, भुई इ० ) चांगल्या रीतीनें ठोकून; सपाट, साफ, गुळगुळीत करून. २ (धोतर, उपरणें, फेटा, पटका इ०) चांगल्या रीतीनें दाबून, चेपून, योग्य रीतीनें धारण करून. ' चोपूनचापून धोतर पागोटें बांधून चालले राजश्री ' [ चोपून द्वि ]

चोफाळ—पु. पातळ पासोडी, चादर. –घर [ चौ+पल्लव, पालव; हिं. चौपाल ]

चोपचिनी—स्त्री. एक वनस्पति; औषधी; चोपचिनी पहा. [ फा. चोब् चिनी ] ०चूर्ण—न. वरींच औषधें कुटून केलेलें चूर्ण. [ चोबचिनी=चूर्ण ]

चोंवट(ड)पणा—चोंबडेपणा पहा. –भ्राम् ५.

चोंवडा—वि. १ लावालावी करणारा, चुगलखोर, चहाडखोर; इकडचें तिकडे आणि तिकडचें इकडे करणारा २ उगाच लुडबुड करणारा; लुब्रा; लांडा कारभार करणारा; चरचोंबा. ३ कोडगा. ०चाट्ट—वि. १ लाळघोट्या; थुंकी झेलणारा; हांजी हांजीखोर, नाचरा. २ लुडबुड्या; लांडा कारभारी. ३ चुगलखोर; चहाडखोर

चोंवडकी, चोंबडे चाळे—स्त्रीपु. १ लांडा कारभार; लुडबुडे-पणा. २ सांगासांगी; लुतेरपणा; इकडची गोष्ट तिकडे करणें. ३ चहाडी; चुगली; निंदा. [ चोंबडा+चाळा ] चोंबडेपणा—पु. चुगलखोरपणा; चहाडखोरपणा; लुडबुड. ( क्रि० करणें ) [ चोंबडा ]

चोंवणें—उक्रि. ( छिद्रांत ) बोळा देणें; दट्या बसविणें; कोंबणें; चोंदणें.

चोपदार—पु. चोपदार पहा. [फा. चोब्=काठी, दंड+दार] ०भालदार—पुअव हातांत सोन्याचांदीच्या काठ्या व भाले घेऊन राजापुढें, मोठ्या अधिकाऱ्यापुढें चालणारे हुजरे [फा. चोपदार+भालदार]

चोयळणें, चोंयळणें—सक्रि. ( विप्र. ) चोबाळणें पहा.

चोंवळणें—उक्रि. ( शरीर, आंग इ० ) तेलानें माखणें, चोळणें, तेलानें मर्दन करणें.

चोंयळाचोंवळ—स्त्री. परस्पर, सार्वत्रिक फसवाफसवी; फुसलावणी; धुलावणी. [चोंवणें द्वि.]

चोवा—पु ( को. ) भात, इतर धान्य पेरणीकरितां, वाहून नेण्याकरितां केलेला भाताच्या पेंढ्याचा कणगा. मुडा पहा

चोंवा—पु १ तोंड बंद करण्याकरितां (तोंडांत) कोंबलेली वस्तु, बोळा; एखाद्या भोकांत दट्याप्रमाणें कोंबलेला चिंध्यांचा गोळा. ( क्रि० देणें; घालणें; बसविणें; बसणें ). २ गांठ, गुच्छ, झुबका, जुबका, जुडी, केस, पानें, गवत इ० वस्तूंचा ( खोगीर इ०कांत घालण्याकरितां केलेला ) गट्टा, गठ्ठा. ३ ( गो. ) शेत पेरणीचा एक प्रकार. ४ ( गो. ) चोंवॉ=जमाव. [ चोंबणें ]

चोबा-भा—पु सोळा पायल्यांच्या मणाचा चवथा हिस्सा; चार पायलीचें माप. [ चौ=चार ]

चोबा-भा—पु. गंगापुत्र; उपाध्याय; क्षेत्रोपाध्याय(विशेषतः मथुरेचे) –गांगा २८५. ' आम्हां मथुराजीच्या चोम्यां सारखा सुखी प्राणी पृथ्वीच्या पाठीवर कोणी तरी असेल काय?' –तोचं २. [ सं. चतुर्वेदी; हिं. चौबे ]

चोंबारा—पु. चवाठा. –शर [ हिं. चौबारा ]

चोबाळणी—स्त्री. ( गो. ) १ उपाद्व्याप. २ व्यवहार. ३ भानगड. ' नसल्यो चोबाळण्यो ' =अनवश्यक भानगडी.

चो(चों)बाळणें—उक्रि. १ ( मुलाला, जनावराला ) थोपटणें; गोंजारणें; शांत करणें; राग शमविणें. २ ( ल. ) गोड गोड बोलून, थापा देऊन फसविणें; एखाद्याच्या तोंडावरून हात फिरविणें. [ सं. चौभू=खुशामत करणें ]

चोबी—वि. लांकडी. ' नबाबाचे डेरे व चोबी बंगला जाऊन उभा राहिला. ' –रा ७.९८. [ फा. ]

चोंबी—स्त्री. ( कुकींनें ) चोंदी. पहा.

चोबीना—पु. १ लांकडें. २ लांकुडकाम. –रा ७ खलप २.७६. [ फा. चोबीन ]

चोंभळणें—सक्रि. तेल माखणें, चोपडणें. चोंबळणें पहा.

चोभा—पु ऊंसाचें वाढें.

चोमा—पु ( व. ) कानाच्या खालचा गोल भाग.

चोंभाळणें—सक्रि. चोबाळणें पहा

चोमडा—वि. ( ग्रामा. ) चोंबडा पहा. चोमडेपणा—पु. चोंबडेपणा पहा ' विंदुताई, लागलीस चोमडेपणा करायला ! ' –मा १७६.

चोमडा—पु ( गो. ) मोठें वेटोळें, गुंडाळी.

चोमण-णें—न. ( अश्लील ) पुरुषाचें जननेंद्रिय.

चोमणी—स्त्री. ( अश्लील ) लहान मुलाचें जननेंद्रिय; बुत्री; लुंगी.

चोय—न. ( कु. ) उंसाचें गुऱ्हाळ.

चोय—स्त्री. ( कु. ) चुड पहा. नारळी किंवा त्यासारख्या झाडांवर असणाऱ्या फुलांचा झुबका; गुच्छ. ०काडी—स्त्री. बांबूची पातळ पण टिकाऊ काडी. यांचा उदबत्त्या करण्याकडे उपयोग होतो. चोयटी—स्त्री. चुडटी पहा.

चोयोंचोयो—स्त्री ( गो. ) तापवून विरजलेलें दूध.

चोर—पु. १ चोरणारा, चोरी करणारा, दुसऱ्याची वस्तु त्याला नकळत, जबरदस्तीनें लुबाडणारा माणूस. ' चोर भांबरी

करावा । घमतोच सांभाळावा ।' –दा ११ ९ ९ २ (एखाद्या पासून कांहीं गोष्ट वगैरे इ०) छपवून, लपवून ठेवणारा, (एखादी गोष्ट स्वतःपाशींच) दाबून ठेवणारा, दडपून टाकणारा ३ केवडयांतील फणीच्या दांड्यांतील कठिण व पसरट माथ्याची वाढीं दांडा याप्रमाणें दांडा असेंहि म्हणतात हा भाजीच्या उपयोगी नसतो म्हणून फेंकून देतात ४ (समासांत) प्रच्छन्न, गुप्त, उघड न केलेला, छपविलेला, राखून ठेवलेला, खाजगी, आड, बाजूचा, कोंपऱ्याचा इ० अर्थी उ० चोर-अक्षर-अरगळ-कप्पा-खिडकी-गांठ-जिना इ० असे अनेक सामासिक शब्द बनले आहेत व बनवितां येतात त्यांपैकीं महत्त्वाचे सामासिक शब्द पुढें दिले आहेत ५ (गंजिफा, पत्ते, इ० खेळांतील परिभाषा) एक पान, प्रत्येक रंगांतील हुकुमाच्या खेरीज इतर पान, पत्ता 'त्याच्या हातांत एकच बाकी राहिलेला पत्ता हुकुम नसावा तो चोर असावा' ६ (स्वतःस) मागें राखणारा चोरून ठेवणारा, अंग काढतें घेणारा, चुकविणारा, चुकार या अर्थी पुढें चोर शब्द लावून अनेक सामासिक शब्द होतात उदा० कलमचोर=लिहितांना कांहीं गोष्टी राखून ठेवणारा, दाबून ठेवणारा, वगळणारा, चोरून ठेवणारा, सांगितल्याबरहुकूम न लिहिणारा खांदचोर=१ दुसऱ्याबरोबर काम करतांना जो आपला खांदा काढता घेतो तो (मनुष्य, पशु इ०) कामचुकार २ (ल) निकडीच्या वेळीं मदत, द्रव्य देण्याचें कर्तव्य न करणारा, तोंडघशीं पाडणारा चाकरीचोर=लबाडीनें चाकरींत सेवेंत कुचराई, अंगचोरपणा करणारा पाठचोर=सहज रीतीनें, सहजासहजीं पाठीवर बसूं न देणारा (घोडा), सहजासहजीं पाठीवर ओझें न ठेवूं देणारा (बैल) पायचोर=१ एखाद्या कामांतून, कामांतून गुप्तपणें, गपचिप काढतें घेणारा अंग काढून घेणारा २ चोरटेपणानें, हळूच, आवाज होऊं न देतां पाऊल टाकणारा, चाहूल न देणारा ३ चालण्यांत पळण्यांत कुचराई करणारा (मनुष्य, घोडा) बळचोर=बळ राखून जेवढें खर्चावें तेवढें न खर्चून काम करणारा, चुकार, मनःपूर्वक शक्य तितकें शक्तिसामर्थ्य खर्च न करणारा मतलबचोर=आपला हेतु वेत गुप्त ठेवणारा, मतलबाचा थांग लागूं न देणारा मसलतचोर=१ स्वतःची योजना मसलत गुप्त ठेवणारा २ दुसऱ्याची मसलत फोडणारा, काढून घेणारा विद्याचोर=१ शिकवयाच्या विद्येचा शास्त्राचा कांहीं भाग विद्यार्थ्यापासून चोरून ठेवणारा, पुरी विद्या न देणारा (शिक्षक) २ विद्या चोरणारा, चोरून शास्त्रीय ज्ञान गुप्त संपादन करणारा नकळत विद्या मिळविणारा (शिष्य) इ० अंगचोर कामचोर इ० आणखी अनेक सामासिक शब्द आहेत वरील शब्द कामचोरू खादचोरू अंगचोरू असेहि योजण्याचा प्रघात आहे [स] (वाप्र) चोराची दावण देणें–चोरांची दावण बांधून त्यांचीं डोकीं सड

फको ३ ४०

कणें, चावकानें बडवणें सूत्र० १ चोराच्या मनांत चांदणें=चोर ला चांदण्याचें भय वाटतें, कारण त्यांत त्याची चोरी उघडकीस येण्याची भीति असते चोराचें मन नेहमीं त्यास खात असतें अपराध्याला नसती शंका येत असते 'बाटति सद्गुण तो तो प्रेम करिति लोक पांडवावरि त । चोरांसि चांदणें तापचि वतें सुयोधना अरिलें ।' –मोमभा १० २ चोरावर मोर=एखा चोराला लुबाडणारा दुसरा सवाई चोर, एक वरचढ एक, शेरास सवाशेर तो आतां चोरावर मोर होण्याच्या विचारांत गढून गेला होता '–स्वप्र २१३ सामाशब्द– ०अंक–अंक–आंक– पु १ कापडाच्या गांठीवर, कापडावर, विक्रीच्या वस्तूवर घातलेला खरी किंमत दाखविणारा, कल्पित बारीक आंकडा हा आंकडा दुकानदाराच्या स्वतःच्या उपयोगाकरितां असतो हा गिऱ्हाइकास कळावयाचा नसतो. गिऱ्हाइकाकरितां किंमतीचा दुसरा मोठा पण खोटा आंकडा दिलेला असतो २ हस्तलिखित पुस्तकाच्या पानावर घातलेला अनुक्रमाचा बारीक आंकडा ३ (सामा) गुप्त आंकडा [चोर=गुप्त, खासगी+अंक=आंकडा] ०ओटा–स्त्री दिसण्यांत लहान पण फार दूध देणारी (गाईची, म्हशीची) ओटी, कांस ०ओटी भरणें–सक्रि स्त्रीच्या प्रथम गर्भारपणाच्या तिसऱ्या किंवा चवथ्या महिन्यांत खासगी रीतीनें (गरोदर खास शिक्याखालीं ठरवून) ओटी भरणें तीन महिने पर्यंत स्त्री गर्भार आहे हें निश्चित करतां येत नाहीं यावरून या समारंभास चोरओटी म्हणतात ओटीभरण पहा [चोर=गुप्त+ओटी] ०ओवा–पु एक प्रकारचा ओवा ०कांटा–पु १ तापाची बारीक कसर, घडीचा बारीक कांटा, चोरटा ताप (क्रि० येणें, लागणें भरणें, वाटणें) २ खोटा तराजू [चोर+कांटा=दांडी तराजू] ०कांठी–स्त्री (शिकार) जनावर मारण्याची एक युक्ति चारपांच मनुष्यें समोरून पन्नास फुटां वरून घोंगडी पांघरून एकदम ओरडत पळत येऊन जनावराच्या पायांजवळ व तोंडाजवळ येऊन पडतात लोळतात व तोंड उघडून त्यास गोंजारतात या क्रियेस चोरकांठी म्हणतात –चिमा १५ ०काम–न १ कितीहि केलें तरी दुसऱ्याच्या डोळ्यांत न भरणारें काम २ पार पडल्यावर ज्याचे फारच थोडे अवशेष शिल्लक राहतात असें काम ०कोनाडा–पु कोनाड्यांत असलेला सहज न कळणारा दुसरा गुप्त कोनाडा [चोर=गुप्त+कोनाडा] ०क्रांत क्रांति–स्त्री चोराची पुंडाई चोरांनीं केलेली लुटालूट नासधूस धुळधाण [चोर+क्रांति=पुंडाई वगैरे] ०खडी–वि कोंदणांत बसविलेलें 'लेईला अलंकार भूषणें परवडी । दिव्य रत्नें चोरखडी खेवणें तया ।' –निगा १२४ ०खण पु १ (पेटींतील कपाटांतील) गुप्त कप्पा, खण, पुड २ घरांतील बिनमहत्त्वाची, बारीक खोली भाग [चोर=

गुप्त+खण ] ०खाई–स्त्री मुसाफरावर हल्ला करून लुटण्याच्या सोयीची खबदाडीची दऱ्याखोऱ्यांतील अडचणीची जागा, अडद खिंड [चोर+खाई=खोलगट जागा] ०खिंड–स्त्री चोरांनी प्रवाशांना लुटण्याच्या सोयीची दोन डोंगरांतील अरुंद वाट चोरखाई पहा ०खिडकी–स्त्री १ एकांतात बसावयाची लहान खिडकी २ (ल) (लेखांतील भाषणांतील) पकड, सोडवण, छिद्र (लेखांतून, भाषणांतून) निसटावयासाठीं केलेली संदिग्ध वाक्यरचना, पळवाट ३ प्रसंगविशेषीं निसटून, पळून जाण्यासाठीं केलेली लहान व गुप्त खिडकी ०खिसा–पु आंगरख्याचा, कोटाचा गुप्त खिसा ०गल्ली–स्त्री (चोरांना लपण्याच्या सोयीची) आडगल्ली बोळ ०गस्त–स्त्री रात्रीं दुसऱ्याला कळू न देतां पोलीस लोक मुकाट्यानें जी फेरी घालतात ती, गुप्तपणें घातलेला रस्त्यावरील फिरता पहारा, मुकी गस्त, बाद्याशिवाय गुपचुप घातलेली गस्त याच्या उलट गजगस्त [चोर+गस्त=पहाऱ्याची फेरी] ०गस्तीनें–क्रिवि लपूनछपून, कोणास समजू न देतां, गुप्तपणें (क्रि० जाणें, येणें, आणें, फिरणें) याच्या उलट उघड मराठी ०गांठ–स्त्री गुप्त गांठ, दिसून न येणारी गांठ ०घडी–स्त्री अपुरी घडी, लहान घडी, गिऱ्हाईक कापड विकत घेतांना त्याची लांबी घड्यांवरून, खळांवरून ठरवितात म्हणून त्यांना फसविण्यासाठीं व्यापारी एका घडीच्या पोटांत दुसरी लहान अपुरी घडी घालतो ती ०घर–न गुप्त खोली, कप्पा, खण, खाना ०घाई–स्त्री १ चोर आले असतां उडणारी धांदल, घाई २ (ल) अतिशय धांदल, धांवपळ ०चाऊ(हू)ल–स्त्री गुप्तपणें ऐकून, पाहून लागलेली एखाद्या माणसाच्या, जनावराच्या अस्तित्वाची हालचालीची चाहूल, कानोसा [चोर=गुप्तपणें+चाहूल=कानोसा, हालचालीचा आवाज] ०चिरटा–चिलटा–चिलट–पु चोर वगैरे 'हल्लीं चोराचिलटाचा इथें फार त्रास आहे' –भा ५२ 'वेळप्रसंग पडल्यास चोराचिरट्यांपासून संरक्षण करण्याला उपयोगी पडतील असे शिपाई प्यादे वगैरे प्रकारचे लोक त्याजपाशीं फारच थोडे होते' –विंध्याचल १११ [चोर+चिरट, किंवा चोर द्वि] ०चुया–पु १ गुप्तपणें दिलेला बोळा, दट्टया २ (ल) लांच (क्रि० पडणें, देणें) [चोर+चुया=कापडाचा, चिंध्यांचा बोळा, दट्टया] ०जासूद–पु गुप्त हर चार, टेहळ्या, (इ) डिटेक्टिव्ह –राज्यको ११७ ०ताजवा–पु खोटी तराजू, चोरकाटा ०ताप–पु हातास न लागणारा परंतु शरीरांत असणारा बारीक ताप हाडी ज्वर, तापाचीं सतत असलेलीं बारीक लक्षणें, चोरटा ताप [चोर+ताप] ०थरा–पु (महानु) खोटें नाणें चोरमोहा पहा 'टाक पाहिला चोरथरा ब्रह्मविद्येचा ।' –भाए ६३५ 'ऐसा प्रपंच टांक चोरथरा । मूढीं सुखभोगाचिया मोहरा ।' –ज्ञाप्र ५८० ०दरवाजा–दार–पुन गुप्त, खाजगी दार, मागचें दार ०धाड–धाडा–स्त्रीपु चोरांनी केलेला आकस्मिक घाला, हल्ला, दरवडा, डाका ०नजर–स्त्री १ (दुसऱ्याला) नकळत पाहणें, डोकावून पाहणें, गुप्तपणें टेहळणी करण्याकरितां टाकलेली नजर, चोरून पाहणें, चोरटी दृष्टि 'घरांतील बायका चोरनजरेनें जावयाकडे पाहतात' –मोर २४ २ चोरासारखी मुद्रा, चर्या, दृष्टि [चोर+नजर=दृष्टि] ०पडदा–पु १ आंतील गुप्त पडदा २ शरीराच्या आंतील पडदा, अंतस्त्वचा ०पण–न (बायकी) मुलींच्या खेळांत येणारी चोर होण्याची पाळी ज्या मुलीवर डाव असतो ती जर डाव न देतां जाऊं लागली तर इतर मुली तिला आपलें चोरपण दुसरीस देऊन जाण्यास सांगतात, [चोर+पण] ०पाइकी–स्त्री चोरून हल्ला करणें –पया ६६ –शर [चोर+पाइकी] ०पाऊल–पाय–न पु आवाज न करतां टाकलेलें पाऊल, पावलाचा शब्द न करतां चालणें, चोरटें चालणें, चोर चाहूल. ०पावलांनीं–क्रिवि मुकाट्यानें, शब्द न करतां. 'चला चोरपावलांनींच पुरुषोत्तमरावांच्या वाड्यांत' –इप ३१ ०पाणी–न दुखणेकऱ्यास, नुकतेंच दुखण्यांतून उठलेल्यास–खोलींत स्नान घालण्याकरितां तयार केलेलें औषधियुक्त तापविलेलें पाणी ०पान्हा–पु १ धार काढतेवेळीं गाय किंवा म्हैस मुद्दाम कांसेचा संकोच करून दुधाचा कांहीं अंश वासरासाठीं राखून ठेवते तो. २ असें राखून ठेवलेलें दूध बळजरीनें काढतात तें, गाईनें, म्हशीनें नाखुषीनें दिलेलें थोडें दूध ३ (ल) लघवी केल्यानंतर पुन्हां थोडथोडी होणारी लघवी, न कळत लघवीस होणें, लघवीस थोडें थोडें होणें, 'सेवा साहुनि आयतना । टाळी पडोनि ठाती काना । मुततां लागे चोरपान्हा । तरी देहाभिमाना वाढवी ।' –एभा २२ ५२८ [चोर+पान्हा] ०पाळत–पाळती–स्त्री आपण दृष्टीस न पडतां दुसऱ्याची, दुसऱ्याच्या घरची, बातमी युक्तीनें काढण्याचा प्रकार, गुप्त रीतीनें ठेवलेली पाळत, पाळत पाळती पहा [चोर+पाळत=नजर] ०पेठ–स्त्री ज्यांत खोटीं वजनें वापरतात व चोरटा धंदा चालतो असा बाजाराचा गांव, पेठ, चोरबाजार ०पोर न (समुच्चयार्थी) चोर, उचल्या, भामटा इ० लहानसहान चोऱ्या करणारीं चोरटीं पोरें, उचल्ये इ० ०बातमी स्त्री हेराकडून समजलेली गुप्त बातमी, चोरपाळतीनें कळलेली बातमी –शिदि २६९ ०भय–न चोरांपासून उत्पन्न होणारी भीति ०भूक–स्त्री १ थोडी शिल्लक राहिलेली, पूर्णपणें न शमलेली भूक २ थोडेसें खाऊन शांत होणारी भूक, किंचित् भूक (क्रि० लागणें, येणें, सुटणें, वाटणें) ०महाल पु १ गुप्त जागा, खोली २ रखेल्या ठेवलेली जागा, दासीमहाल ०म(मु)ळ्या–क्रिवि लपून छपून, गुप्तपणें, पाळत ठेवून, गुपचुप गुप्तपणें (टेहळणें) (क्रि० पाहणें) ०मूठ–स्त्री

पकडलेल्या जनावरास तीन दिवस एका जागेवर पडूं देतात, त्यास चोरमूठ म्हणतात. –विमा १. ॰मोळा–पु चोरांचा शिक्का; खोटें नाणें; चोरपरा पहा. 'हा चोरमोळा अधिका। प्रपंचाचा ठसा स्टका । जो प्रवृत्ति पहिला लोकीं। अज्ञानांचा।' –ज्ञाप्र ५४९. 'अवघेचि आले चोरमोळे। नरदेहावांचोनिया।' –भाए २४७. [चोर+मोळा; का. मोळे=खिळा; म. मोळा=रीत] ॰रान–न. चोर, लुटारू इ॰कांनीं युक्त असें रान. [चोर+रान] ॰लक्षण–न. चोरटेपणाचा स्वभाव दाखविणारी मुद्रा, नजर, चेहऱ्याचें वळण, चालण्याची धाटी इ॰; (पाहिलेला मनुष्य) चोर आहे असें दर्शविणारें लक्षण; चोरटेपणाची छाप. [चोर=चोरी करणारा+लक्षण=चिन्ह] ॰वड–वंड, चोरावडा–धंडा. चोरवण–वाण. चोरवें–स्त्रीपुन. चोरांनीं केलेला उत्पात, धुमाकूळ, अनर्थ, नासाडी, लुटालूट, चोर फार माजल्यामुळें उत्पन्न झालेली दुर्दशा. (क्रि॰ सुटणें; मातणें; होणें; माजणें; उठणें; मोडणें; दाबणें; दबणें). [चोर+वड–ण प्रत्यय] ॰वाट–स्त्री. गुप्त वाट, मार्ग. 'किल्ल्यांतून व वाड्यांतून बाहेर पडावयास चोरवाटा असत.' –कोरकि १९१. ॰वाडा–पु. १ चोरांचा अड्डा; चोरांची वस्ती. २ ज्या घरांतील सर्वच माणसें चोराप्रमाणें वागतात तें घर. ॰विद्या–स्त्री. १ गूढ, अज्ञात शास्त्र, कला. २ फारच थोड्या लोकांस माहीत असणारी व क्वचितच शिकविली जाणारी विद्या. गुप्त विद्या; ३ जारणमारणाची, जडीबुटीची विद्या. [चोर+विद्या] ॰वेळ–ळा–स्त्री.१ दिवसाच्या किंवा रात्रीच्या तीस घटकांचे प्रत्येकीं तीनपूर्णांक तीन चतुर्थांश घटकेचे असे आठ भाग कल्पिले आहेत त्यास अमृतवेळ, काळवेळ, शुभवेळ इ॰ नांवें आहेत, त्या आठांपैकीं एका वेळेस चोरवेळ किंवा चंचल वेळ असें म्हणतात. वेळ पहा २ ज्या वेळीं चोरांची विशेष भीति असते ती वेळ ॰शिवण–स्त्री आंतील, बाहेर न दिसणारी शिवण; गुप्त शिवण. ॰हट्टी–हाटी–स्त्री. चोरवाडा; चोरांचा अड्डा, चोरांचें वसतिस्थान [चोर+हट्टी=हाट, बाजार] ॰हरकारा–पु. गुप्त दूत. –राव्यको १.१८. [चोर+हरकारा=निरोप देणारा दूत, हलकारा] चोरापोरी–मोरी, चोरींपोरीं–क्रिवि चोरांनीं आणि चोरट्या लनाड पोरांनीं; चोर, भामटे इ॰ कडून (चोरून नेलेला इ॰). 'गुळाची ढेप चोरापोरीं गेली.' [चोर+पोर] चोरामोरा–क्रिवि. चोरट्या मुद्रेनें; चोरटेपणानें; चोरूनमारून 'असा चोरामोरा किती दिवस वहिवाटणार.' –सूर्यग्र १२९.

चोरटा—पु. चोर 'सर्व मुलखांत चोरट्याचा उपद्रव फार होता.' –विवि ८.८ १५४ —वि. १ फसव्या, अप्रामाणिक, लुच्चा २ खाजगी; गुप्त; लोकांना न कळत करावयाचा (धंदा, व्यापार इ॰) 'चोरट्या पापामुळें मन जितकें भित्रें होतें तितकें भित्रें दुसऱ्या कशानें होत नाहीं.' –धाय ४.१. ३ वरून न दिसणारा (ताप इ॰). [चोर] (वाप्र.) चोरट्यासारखें होणें–संकोच वाटणें, कांहीं अपराध, चूक केल्याप्रमाणें वाटणें. 'बाळू व सुनंदा यांना मागदींच चोरट्यासारखें झालें होतें, तें आतां जाऊन तेही सुशीलेकडे अर्धस्फुट स्मितरेषेनें पहात आपआपल्या बिऱ्हाडीं गेले.' –सुंद ८. म्ह॰ चोरटा हुशार मेहनती दिलगीर. सामाशब्द– ॰ताप–पु. बारीक ताप; चोरताप; हाडीज्वर; रोज नकळत थोडाबहुत असणारा ताप; कणकण. ॰धंदा, चोरटीविद्या–पुस्त्री. १ गुप्त धंदा; लपून छपून करावयाचा धंदा; ठकबाजीचा, फसवेगिरीचा धंदा. २ ज्यांत लाभ न होतां उलट खोट येते असा धंदा. चोरटावा–पु चोरटेपणा; चोरवड. –गागा २२९. चोरटावें–टाई–नस्त्री. (सामा.) चोरावें, चोरवडा, चोरवण पहा. चोरटी–स्त्री चोरून होणारें नुकसान. 'वेठ, बिगार चंदीदाणा, चोरटी, वर्गणी.' –खेया २२. ॰नजर–स्त्री चोरनजर; चोरून पहाणें. 'मी पोहत असतांना ज्या प्रेमाच्या चोरट्या नजरेनें तूं मजकडे पहात होतीस ... –धाय ५ २. चोरटें–न. चोराचा उपद्रव. –शर. चोरटे चाळे–पु चोरासारखें आचरण, वागणूक. (नेहमीं बहुवचनीं प्रयोग). चोरटेंपण–न. चोरटेपणा; चौर्य; चोराची कृति वगैरे. [चोरटा] चोरटें पीक–न. कणसांत चांगलें भरलेलें पण काड्यांच्या बारीकपणामुळें उठावदार न दिसणारें, वरून भिकार दिसणारें पीक.

चोरणें—उक्रि. १ दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करणें; दुसऱ्याची वस्तु त्याला न कळत लांबविणें. २ गुप्त ठेवणें; दाबून, दडपून टाकणें (एखादी गोष्ट, माहिती इ॰); (सामा.) लपविणें; छपविणें 'हृदयास बाग्र संचलें। परी तें विषास चोरलें। –दा ९. २.५. ३ (एखादी गोष्ट) चोरून गुप्तपणें करणें. चोरणें हा शब्द पुढें जोडून अनेक वाक्प्रचार होतात. त्यापैकीं कांहीं पुढें दिले आहेत अंग चोरणें=कुचराई करणें; फार श्रम न घेतां काम करणें; दिरंगाईनें काम करणें. अंग–हात–पाय–डोळे–चोरणें–हात, पाय इ॰ अवयव संकुचित, आंखूड करणें, ओढून घेणें. पान्हा चोरणें=पान्हून स्तनांत उतरलेल्या दुधाचें वर आकर्षण करणें (गाय, म्हैस इ॰ नीं) [चोरी] (वाप्र) चोरून–मारून–क्रिवि, दुराचरणानें, चोरीमारीनें. बेकायदेशीर कृत्यें करून पोट भरणें (क्रि॰ जाणें, येणें, फिरणें, शिनळकी करणें) गुप्तपणें, लोकांस न कळत, चोरटेपणानें.

चोरशी—स्त्री पटाशी, किकरें

चोरळी—स्त्री चोरवेळ 'जेणें पाहालिये पाहाटे। भेदाची चोरली फिटे। रिघती आत्मानुभववाटे। पांथिक योगी।' –ज्ञा १६ ७ [चोर+वेळ]

चोरा—पु १ (कु) बिब्बा तापवून दुसऱ्या भागावर दिलेला चटका, चरका. २ (सामा) (कों.) डाग, चरका.

चोरा—पु (गु) १ गोठा आटा २ देवडी ३ पोलीसचौकी, फरासखाना 'तेव्हां त्यास नोळख्यासाठीं ती शिपाली आणि चोऱ्यावर आली '–मोंग २६३०. [स चतुर=चार, म चौतरा, चवुतरा, चउतरा हिं चोरा]

चोराड-चोराडी—स्त्री चोरवडी, चोरापें, चोरवण पहा [चोर]

चोरावें-चोरावा—पु १ (चोरावें) चोरोंच्या भयासाठीं, लुग-लुगीवारीं फिरतीवर किंवा चार, दरोडेखोराच्या दंगलीत भमण २ चोरवड-ण पहा [चोर]

चोरी—स्त्री १ चोरण्याची क्रिया, चोराचें कर्म, (कायदा) दुसऱ्याला नकळत चीजवस्तु लांबविणें, मालकाच्या परवानगी वाचून त्याच्या ताब्यांतून जंगम माल अप्रामाणिकपणें नेणें २ गुप्तपणें केलेलें (भलतेंच) कर्म, चोरटें कर्म, वृत्ति, लपूनछपून केलेली गोष्ट, छपवणी ३ (एखादी गोष्ट) छपविणें, दावणें, दडपून ठेवणें, गुप्त ठेवणें, वगळणें, वाजूस ठेवणें ४ मनाई, आड काठी, प्रतिबंध, निर्यन्त्रणा; न करण्याची, बोलण्याची, दडपून टाकण्याची जरूरी, आवश्यकता, संयमन (क्रि० होणें, असणें) 'श्रीमंतांना जवळ पैसा व रत्ताकपडा असून त्याचा उपभोग घेण्याची चोरी झाली होती '–गुजरातचा इतिहास 'आमच्या जवळ दागिने असून ते ह्या खेडेगांवऱ्या राहाणीमुळें अंगावर घाल ण्याची सुद्धां चोरी झाली आहे '५ अन्याय, अपराध 'काय केली ईश्वरा तुझ्या घरिं चोरी ।'–प्रला १६४ [स चौरिका, प्रा चोरिआ, हिं. चोरी, म. चुरि] म्ह० १ चोरीचे चौदा हात=चोरीचा माल फार स्वस्त विकला जातो, चोरलेलें कापड कापायला चौदा हात देखील वतां येतें २ शेताआड चोरी आणि दादल्या आड शिंदळकी (चालली आहे) ०चकारी-चपाटी—स्त्री चोरी, दरोडा, उचलेगिरी, सोदगिरी, बदमाषी, ठकबाजी [चोरी द्वि] ०चा माल—पु चोरलेला माल, वस्तु ०रीची वाव—स्त्री १ चोरून आणलेली वस्तु, चोरीशीं संबंध अस लेली गोष्ट २ काळीवेरी गोष्ट, काळेंबेरें, जीबद्दल उघड बोलता येत नाहीं अशी गोष्ट, संशयास्पद कृत्य ३ ज्याचें खरें स्वरूप आपणास कळलेलें नाहीं असा व्यवहार बाब इ०, गुप्त गोष्ट ०छपी—क्रिवि चोरून लपून, लपून छपून, चोरून [चोरणें+छपणें] ०मारी-मारी—स्त्री चोरणें, मारणें, लुटणें, ठोकणें इ० व्यापार, धंदा, दरोडेखोरी, सोदेगिरी, ठकबाजी चोरीचपाटी 'तो चोरी-मारी करून पोट भरतो '[चोरी+मारी=मारणें] ०लबाडी—स्त्री चोरी आणि फसवेगिरी, चोरी आणि लबाडी

चोरीव—वि चोरलेला, चोरून आणलेला, मिळविलेला [चोरणें]

चोरूनमारून—क्रिवि लपूनछपून, चोरीमारी करून इ० चोरणें पहा

चोरंग, चरोंग—पु (गो) चारा [चरणें]

चोलणें—सक्रि चोळणें पहा.

चोला-ळा—पु शरीराकडचा, पायशिवाय वरील भाग, धडाचा वरचा व कांड याशिवाय भाग; उत्तमांग आच्छादन कर णारा एक प्रकारचा अंगरखा [स चोल, हिं चोला]

चोंगी—स्त्री (व) पूजेचीं उपकरणें ठेवण्याचा पेटारा, सपळी.

चोव-वा—पु (कों) १ ओल्या खोबऱ्याचा कीस, खर वण, खरवलेले ओलें खोबरें २ दूध काढून घेतल्यावर राहिलेला खोबऱ्याचा चोथा चव पहा

चोवडा—पु (व) एक खाद्यविशेष; उडदाची डाळ भिजवून व वाटून तींत खोबऱ्याचा कीस घालून तेलांत तळून केलेला वडा; किमाचा वडा [चो=चोव, कीस+वडा]

चोवडी—स्त्री. चोयटी, चुयटी, रस चोखून घेतल्यावर (ऊस इ०कांचा) राहिलेला चोथा 'नाना भूस आणि कण । येकचि म्हणणें अप्रमाण । रस चोवडिया येण । खाइाणा सेवी ।'–दा १८५३० [चोव-य+डी प्रत्यय]

चोवा-हा—पु १ चंदनापासून केलेला एक पदार्थ, चंदनाची उटी, चुवा पहा 'चोवा कस्तुरी बुका सघर। भरूनि पुष्पांजळी समोर।'–एभा २७३३० 'टिळे केशर कस्तुरी। चोवे चंदन कुसरी।'–वेसीस्व १२.१२ २ अगडबार –राज्यको ३१२ [हिं]

चोंवा—वि दुष्ट, घुकलेला, निर्लज्ज –शर [चोव]

चोवीस—वि १ २४ ही संख्या, वीस आणि चार २ (सांकेतिक) अठरा पुराणें व सहा शास्त्रें मिळून 'वेदश्रुति तुज म्हणती कोणी । चावीस ठेंगणीं पाडोल्लिता।' –तुगा ८७०. [स चतुर्विंशति, प्रा चउवीस, हिं चौबीस, गु चोवीस] ०अवतार—पु मत्स्य, कच्छ, वराह इ० दहा अवतार व नारायण, शौनक, नारद स्वायंभू कपिलमुनि, दत्त त्रेय, ऋषभदेव, हंस, हयग्रीव, पृथुराजा, ध्रुव, धन्वंतरी, मोहिनी ज्यास अनेक कारणास्तव विष्णूनें घतलेले १४ अवतार –भागवत स्कं १ अ २ श्लोक ५ ते २६ मध्यें वर्णिले आहेत 'भगवताचे वर्णी पुरुषावतार सार चोवीस।'–मामभा १ ३ ०अक्षरीमंत्र—पु गायत्री मंत्र ०मावळें—नअव जुन्नरापासून चाकण पर्यंत १२ मावळें घांटावरील व पुण्यापासून शिरवळपर्यंत १२ मावळें कोंकणातील मावळ पहा

चोपक—वि वर ओढून घेणारा, वर आकर्षून घेणारा (यंत्र पंप इ०) शोषक 'ह्या यंत्रानें पाण्याचें चोषण करता येतें व तें वर चढविता येतें म्हणून त्यास चोपक व उच्चालक असें म्हणावें' –मराठी ६ वें पुस्तक पृ ९८ दुसरी आवृत्ति (१८७५) [स चुष्]

**चोपण**—न (पप इ०नीं पाणी) ओढून घेणें, खेचून घेणें, (सामा.) चोम्वणें; शोषणें. 'चोपणाच्या योगानें वेंबात पाणी वर चढतें अशी लोकांची समजूत आहे.' –मराठी ६ वें पु. पृ. ९७. आवृत्ति २री (१८७५) [सं.] ०क्रिया- (पप इ०कानें) पाणी ओढून घेण्याची क्रिया; (सामा) चोखण्याची क्रिया. 'परंतु चोपणक्रियेनें एवढेंच होतें की दम्याखालच्या वंबांतील प्रदेशांत निर्वात प्रदेश होतो. –मराठी ६ वें पु ९७ आवृत्ति २ (१८७५) [सं. चोपण+क्रिया]

**चोष्य**—वि. चोखण्याचा, चोखण्यास योग्य; चोखण्याजोगा [सं. चुष्]

**चोंशीं**—क्रिवि (गो.) चारी बाजूंनीं [चों=चार+शीं=तृतीयेचा प्रत्यय]

**चोहटं**—वि (काव्य.) उत्तम; सुरेख; उत्कृष्ट 'नातरी सहोदरा चोहटा। वेव्हार लाविसी।' –कालिका १४ ६६ [चोखट]

**चोहट-टा, चोहोटा, चौहटा**—पु बाजारचौक; चार रस्ते जेथें येऊन मिळतात ती जागा; (प्र) चवाठा पहा. 'उन्नद् विषयाचा पेटा। होत मनाचा चोहटा।' –ज्ञा ८.१८४. 'ऐसा क्रोधाचा वसौटा। होय तमाचा चोहटा।' –एभा ५ १०१. 'आम्ही न वजों तया वाटा। नाचूं पंढरी चोहटा।' –तुगा २६२१.

**चोह(हो)टी**—स्त्री. (प्र) चुहटी; चुहं पहा. चुहटी.

**चोहा**—पु (व) मिरचीचें किंवा तंबाखूचें रोप लाविल्यानंतर पाऊस न आल्यास त्या रोपास विहिरीचें पाणी देतात तें. (क्रि० घालणें) [हिं. चोहा=ल्हान विहीर]

**चोहाट, चोहाटा, चोहोटा**—पु. १ चवाठा पहा. 'भरला मोक्षाचा चोहाटा। सज्जन संगें।' –दा ३ १०.२०. २ चौकी. 'लोभ मलारिचा चोहोटा। दांभिकता ही हळदी कुटा।' –मुआदि १.६५ 'परि वाटेमधि चोहाटे बाधिले।' –अमृत २३ [चो=चार+हाट=बाजार]

**चोहीं(हों)कडे, चोहोकोन-कोनीं**—क्रिवि सर्व बाजूंस; चहूंकडे; चारी बाजूंस; चारी बाजूस चहूंकडे पहा. 'चोहोकोनी गंगोदक पाटी न्हाणिती।' –वसा २१ [चौ+कडे]

**चोहोंचा आकडा**—पु (ल) प्रशस्त घातलेली मांडी; आसनमांडी. ती चार या आकड्यासारखी दिसते म्हणून (क्रि० घालणें)

**चोळ**—स्त्री १ (गाडींत भरून, बैलावर गोण्यांतून नेलेल्या धान्याचे कण एकमेकांवर) चोळले, घासले गेल्यामुळें, फुटून, चुरडून गेल्यामुळें मूळच्या मापात येणारा तुटवडा २ वापरल्यानें झालेली एखाद्या वस्तूची झीज, घासाघास, फुटतूट, मजनांत कमीपणा इ० ३ (जखम, गळू इ०) चोळलें, घासलें गेल्यामुळें होणारा विकोप, वाढ, अधिक विकृति. (क्रि० भरणें). ४ (रस्ता, जमीन, शहर इ०कांची) रहदारीची, वर्दळीची स्थिति; वर्दळीमुळें धुराळ्यानें युक्त झालेली जमीन, रस्ता. ५ (उभ्या पिकाची; शेताची गुरांनीं केलेली) तुडवातुडव; वर्दळ. 'मार्गावरच्या शेतास गुरांची चोळ फार लागते.' ६ (धान्याची) नासधूस, चोळामोळ, तुडवातुडव झालेली स्थिति. [चोळणें]

**चोळ, चोळाची जमीन**—पु (माण व.) १ खोरें; ल्हानशा खोऱ्यांतील उतरणीची जमीन; दोन उंचवट्यांवरून उतरती होत आलेली जमीन. 'काळी मळी पाढरी चोळ। परि ते केवळ वसुधाची।' –एमा ४.२६४. २ खोऱ्यांतील सुपीक जमीन.

**चोळकट**—न. (अल्पार्थी) चोळी.

**चोळकी-खी**—पु. (गो.) केळीच्या पानाचा ल्हानसा तुकडा, फाळका. [तळवा]

**चोळखण-खंड**—पु चोळीचा खण; एक चोळी व्हावयाजोगा कापडाचा तुकडा. 'चोळखण हे नित्य प्रचारातील उपायन आहे.' –भाग्र १०.३.१२६. [चोळी+खंड]

**चोळखा**—पु तुकडा; (प्र.) चोखळा पहा.

**चोळटणें, चोळवटणें**—अक्रि १ (वस्त्र इ०) घासलें, चोळलें जाणें. २ चुरगटणें; चुरडणें; (वस्त्र इ०ची) फार वापरल्यानें तकाकी, ताठरपणा नष्ट होणें; चुरडणें.–सक्रि. (वस्त्र इ०). ओबडधोबडपणानें चोळणें; चुरडणें; कुसकरणें; चिवडणें; (पदार्थाची) खराबी होईल अशा रीतीनें (तो) वापरणें; नासधूस करणें. [चोळणें]

**चोळण**—स्त्री. (गुरांच्या वर्दळीनें होणारी शेताची, पिकाची) तुडवातुडव; चोळ; चोळाचोळ; वर्दळीमुळें, रहदारीमुळें (शेत इ०कांस) होणारा उपद्रव [चोळ]

**चोळणा**—पु गुडघ्यापर्यंतची आखूड विजार; मांडचोळणा; चड्डी, लाडी पाटलोण, तुमान. (चोळण्यात विंचू, उंदीर, सरडे घालून तो अपराध्यास शिक्षा म्हणून नेसवीत' –रा १६. १२. [का. चल्लण=वेगवेगळ्या लांबीची चड्डी]

**चोळणी**—स्त्री. १ (शरीर इ०) चोळण्याची, रगडण्याची क्रिया; मर्दन, संवाहन, चंपी. २ कणसें चोळून (धान्याचे) दाणे निराळे करणें ३ (ल) सेवा; संवाहन, लाच देण्याचा एक प्रकार. 'कोर्ट कचेऱ्या आणि बंगले उंवरठे झिजवून हात दावणी, पायचपी, विनवणी, चोळणी इत्यादि प्रकार करण्याचे अपूर्व प्रसंग जुन्या लोकांच्या परिचयाचे नव्हते' –खेया २८. ४ चोळवटलेली स्थिति, खाबा; नाश. [चोळणें] ०मो(म)ळणी–स्त्री गुराच्या पायाखालीं कणसें तुडवून दाणे निराळे करणें इ० काम, चोळून व मळून कणसापासून धान्य निराळे करण्याची क्रिया. 'दादा, घाई करूं नका चोळणीमळणी होऊं द्या

मग करवे घ्या ' [ चोळणी=चोळणें+मळणी=गुरांच्या पाया खाली तुडविणें ]

**चोळणें**—उक्रि १ धान्य मळण्याकरितां, शरीराच्या शिरा सैल होण्याकरितां, माती स्वच्छ करण्याकरितां त्यावरून जोरानें हात फिरविणें, रगडणें, घासणें, मासणें २ मर्दन करणें, ( शरीरात ) तेल मर्दन करून जिरवणें, चपी करणें, मळणें -अक्रि चुरचुटणें, एखाद्या गोष्टीबद्दल हळहळणें, ( मनाला ) पश्चात्ताप होणें ' आतां चोळून काय उपयोग, मागेंच जपलें असतें तर ठीक झालें असतें ' [ स चुल्, किंवा चुल्ल् ] ०मळणें—चोळणें [ चोळणें द्वि , चोळणें+मळणें ]

**चोळणें चोळो**—नपु ( गो ) विजारीसह असलेला एक प्रकारचा सदरा, चोळणा, झगा, अंगरखा [ चोळणा ]

**चोळपडणें**—सक्रि मळणें ( धान्य इ० ) ' धान्याचीं कणसें चोळपडण्याचे हेच दिवस ' [ चोळणें+पडणें, सहाय्यक धातु ]

**चोळमालीश-स**—स्त्री ( घोड्याचें ) अंग चेपणें, त्यास मालिश, खरारा करणें इ० काम [ चोळणें+फा मालिश्=मर्दन करणें ]

**चोळलाग**—पु चोळीचा लाग, सांधा, हातीखालीं (चोळीतील बगलेच्या त्रिकोणी तुकड्याखालीं ) लावलेला, असलेला ( कापडाचा ) तुकडा, सांधा लाग पहा

**चोळवटणी**—स्त्री जोरानें घासण्याची, चाळवटण्याची क्रिया [ चोळवटणें ]

**चोळवटणें**—उक्रि चुरगटणें, चुरडणें, चोळटणें पहा 'हळूच ठेव माकराया पोथ्या चोळवटतील बरें ' -बाळ २.१३४ 'पक्ष्यांचीं पिसें पावसानें चोळवटून नासून जाण्यासारखीं आहेत ' -मराठी ६ वें पुस्तक पृ ६ आवृ २ री ( १८७५ ) [ चोळणें प्रयोजक ]

**चोळा**—पु पदर व काठ याशिवाय बाकीचा वस्त्राचा भाग चोला पहा [ स चोल, हिं चोला ]

**चाळा**—स्त्री ( गु ) मळमुदा, चवळी पहा

**चोळा**—पु १ (महानु ) चोळेचा रंग, पुढ. 'इश्वर ज्याना चिया चोळा । मना काले दिजती वेळोंवेळा । ' -माए ६८६ ' अनुरागाचिये चोळ । ' -माए ७९६ [चोळणें] **चोळा देणें**-( चांभारी ) सालहिरड्याच्या रंगात चामडें ठेवल्यावर रोज दोन तीन वेळां च मडें चोळणें

**चोळाखा**—पु (व ) हाल, हलकपेष्टा 'आमच्या जिवाचे चोळाखे झाले ' [ चोळणें ]

**चोळाखा**—पु १ चोळीचा खण, चोळखण 'चोळाखा न फुटे या कलेवराचा । ' -माए १४७ २ अंगरखा ' तुवां परम पुरवें । याचिजे शरिराचे चोळाखे । ' -ज्ञ ५० वरील दोन्ही अवतरणांत ' तुकडा ' हा अर्थ समवतो चाळखा पहा

**चोळाचोळ-ळी, चोळामोळ चोळामोळा**—स्त्रीपु १ गुरांनीं पिकांची केलेली तुडवातुडव २ ( सामा ) चुरण्याची, चेंगरण्याची, गुंघडण्याची, चुमकरण्याची क्रिया, चोळून चुरडून, कुसकरून, चेंगरून झालेली दुर्दशा ३ गुंघडणें, कुसकरणें, चुरडणें ४ नाश, खराबी ' त्याचा होइल चोळामोळा ।' -केक ८८ [ चोळाचोळ=चोळणें द्वि , चोळामोळ=चोळणें+मळणें ]

**चोळी**—स्त्री १ स्त्रियाचा उरोभाग व बाह्या झाकणारें शिवलेलें वस्त्र कपडा (कचुकीची-कांचोळीची गाठ ही मागें असते व चोळीला पुढें गांठ देतात ) ' तेवीं वरौती पाखीं उचलिलीं । चोळियांचीं । ' -शिशु ५५९ ' सदऱ्याच्या बाह्या चोळीवजा सरकीव म्हणजे झालें ' -वेश्यांचा बाजार २ कपड्याचें अंग, अंगरख्याचा छातीभोंवतालचा भाग, चोळा, ( याच्या उलट घेर, घोळ ) ३ ( ल. ) स्त्रीस इनाम दिलेली जमीन, हद्द व समासाशिवाय खेरीज समासांत चोळीबद्दल चोळ होतें उदा० चोळकट, चोळखण, चोळलाग इ० [ स चोल, हिं सिं. चोली ] ०चिंधी- चिरगूट—स्त्रीन कपडेलत्ते, वस्त्रप्रावरण, विशेषत स्त्रियाचा कपडालत्ता ' नाक्यावर चोळीचिंधी सोडून पाहतात ' [चोळी+चिंधी=चिरगूट] ०बांगडी-स्त्री १ (व्यापक ) स्त्रियांचा कपडालत्ता, दागदागिने इ० २ स्त्रियांनां द्यावयाचीं वस्त्रें ३ स्त्रियांचा ( वेणीफणी, लुगडें नेसणें, इ० ) वेषभूषेचा विधि. वेणीफणीचें साहित्य शृंगारसाज ४ (ल ) (बायकी) सौभाग्यवती स्त्रियांना देणगी म्हणून ज्या वस्तु देतात त्याना समुच्चयानें चोळीबांगडी म्हणतात सुवासिनीस चोळी व बांगडी ही कमीत कमी देणगी होय ५ माहेरपण, दरसाल कपडेलत्ते घेऊन देऊन बायकांची विचारपूस करणें (क्रि० करणें) ६ ज्यांचे पती सरकार कामात मृत्युमुखीं पडले त्या स्त्रियोंना सरकारांतून मिळणारी पोटगी, इनाम वतन ७ इनाम ( सौभाग्यवती स्त्रीस ) ८ (व ) बहीण मानून दिलेला आहेर वगैरे, ( उपचारार्थी ) आमंत्रिणा [ चोळी+बांगडी ]

**चोळें**—न ( कों ) चौल, चावळ काढून शेंडी राखण्याचा संस्कार, चूडाकर्म ' भली भडीच वर्षे चोळें करिती । ' -वसा १० [ स चौल ]

**चौ चौं**—वि १ चार या शब्दाचा उपयोग स्वतंत्रपणें होत नाहीं केवळ समासांतच उपयोग करतात ' जेवीं मदोन्मत्त हस्ती । चौ दांतांचे । ' -कथा १ १२ ९५ ' वनचरी उठिल चौकड । आईत । ' -दावि २२१ २ ( सांकेतिक ) चार वद ' तो हा पढरीचा राणा । पुसा सद्गा चौं अठरां जणां । ' -तुगा २५३६

[स चतुर्=चार, प्रा चउ, तुल० हिं चौ] चौवरआढी, चौचा अंक-आकडा-घालून बसणें-प्रशस्त मांडी घालणें

**चौक**—पु १ चौकोनी अंगण, जागा २ (घोड्याची) चारी पाय उचलून भरधाव, डौलदार पळण्याची चाल, 'चिन्हें काढून चौक रजविले ।'-ऐपो २११ चारी पाय उचलून भरधाव डौलदार पळण्याची चाल. 'असा घोड्यावानी चौक टाक '-चद्रप ६१ ३ लावणींतील अंतरा, पोवाड्यातील कडवें, एक भाग, एक छंद ४ फाशावरील चार ठिपक्यांची संख्या, चारांचें दान ५ चौसोपी वाडा, घराचा, मंदिराचा चौकोनी मध्यभाग, देवळांतील गाभाऱ्याच्या समोरील सभामंडपांतील खांबामधील चौकोनी जागा ६ चवाठा, चार रस्ते येऊन मिळतात अशी शहरांतील चौकोनी जागा उ० मोतीचौक, टिळक चौक, शहरांतील मोठी पण मोकळी उघडी जागा (या ठिकाणीं बाजार भरतो, च वडी असते) ७ लग्नादि मंगल समारंभांत पाटपासोड्यावर गहूं, तांदूळ यांनीं काढलेला चौकोन 'चौक भरियेला मासनीं । पाचारिली कुळस्वामिनी ।'-तुगा २८२ 'हे मांडिली रत्नजडीत चौकी । मुक्ताफळांच्या वसलीत चौकीं ।'-सारह ६ १७ ८ रांगोळीचा एक प्रकार, नानाविध रंगांनीं काढलेली वेलींची मालिका 'सदैवीं जेथ अपुला हातीं । चौक भरिले निगुती ।'-ऋ ७३ ९ (मनुष्याच्या) कमरेवरचा पाठीचा भाग, बगडा, (पशूचें) ढुंगण, ढिमोरा १० चौकोनी कापड, रुमाल 'मेणकापडाचे चौक '-प्रसूतिकृत्यादर्श ११ ११ (बे.) चौकडा, मुलांच्या कानांतील एक दागिना १२ (बे) विमग्यांतील रात्रीचा जलसा १३ (सोनारी) हुशीचा एक भाग १४ (कु) चौकट -अ चोक, कोणत्याहि संख्येची चौपट दर्शविणारा शब्द उ० तीन चौक (चोक) बारा, पांच चौक वीस इ० [स चतुष्क, प्रा चउक्क हिं चौक, सिं चोकु] (वाप्र) चौक भरणें-चौकपासोडा पहा सातव्या चौकांत बसणें-अक्रि १ (घराच्या) अतिशय आंतल्या भागांत, खोलींत बसणें २ (ल) भेद, दर्शन अगदीं दुर्लभ होईल अशा प्रकारें राहणें सामासिक शब्द- ०चाकर-पु सोंगट्यांतील एक पारिभाषिक शब्द ०नहाण-न लग्नसमारंभांत विहिणीला, वराच्या आईला, मखरांत बसवून थाटानें घातलेलें स्नान [चौक+नहाण=स्नान] ०पासोडा-पु १ मंगलकार्यांत प्रथम रांगोळी घालून तीवर चौरंगावर, पाटावर शाल इ० घालून त्यावर गहूं तांदुळ यांचा चौकोन काढून वधूस, वरास, वधूस त्यांच्या आईबापांस बसण्याकरितां केलेलें आसन चौक अर्थ ७ पहा. २ (क-हाड) मुलींचा एक खेळ, पासोडी पांघरलेल्या मुलीस आवाजावरून ओळखणें [चौक+पासोडा]

**चौकट**—स्त्री चवकट १ चार लांकडें चांगलीं तासून त्यांना त्यांच्या टोकांशीं काटकोनांत सांधून, जखडून बनविलेला चौकोन उ० दाराची, खिडकीची, तसबिरीची चौकट (सामा) चार तुकडे जोडून साधून केलेली चौकोनाकृति, चार कडा, बाजू असलेली वस्तु २ मोट ज्याला बांधलेली असते तो चार लोखंडी पट्ट्यांचा सांगाडा ३ चौकोनी मोकळी जागा, चव्हाटा, देवळांतील, घरांतील चौक इ०, चौक अर्थ ५।६ पहा ४ मारका, जखीण, तळखबा व समंध या भुतांचा जमाव, टोळी, चौकडा ५ चार दुष्ट माणसांची टोळी, चांडाळचौकडी ६ पत्त्यांतील (इस्पिक, बदाम, चौकट किलवर या) चार रंगांपैकीं एक (लाल) चौकोनी रंग, या रंगाचें पान, तांबडें पान उ० चौकटचा राजा, एक्का, गुलाम इ० [म चौ, स काष्ठ=लाकूड, प्रा. चउकट्ठी, तुल० हिं. चौखट] ०पांढरी-स्त्री (विणकाम) लुगड्यांतील एक प्रकार, फणीचीं तीन घरें काळा ताणा व एक घर पांढरा ताणा अशी उभार व आडवणहि त्याचप्रमाणें विणून केलेलें लुगडें [चौकट+पांढरी] चौकटीचें मरण-न (मारका, अखीण, तळखबा व समंध या) चार भुतांनीं पछाडल्यामुळें ओढवलेलें मरण

**चौकटा**—पु १ हत्तीवरील एक प्रकारचा हौदा 'श्रीमंत राजपुत्र स्वारींत जात असल्यास त्यांच्याकरितां शिकारी चौकट्यासह हत्ती. पाठवावा '-डुकराची शिकार (बडोदें) १५ 'सेनाखासखेल समशेर बहादुर आंग्रे चौकट्यांत बसून हमेशा जातात।'-गापो ७५ २ चौकडीची गाडी [चौकट]

**चौकड**—स्त्री चौकट (हेली राजा) पाण्याच्या तोंडावर बसावयाची चौकट हिच्यावर घाणा हांकणारा बसून पाण्यांत गव्हित सारणें, लाटीवर पाणी शिंपणें, बैल हांकणें इ० कामें करतो [चौ+कड]

**चौकडा**—पु १ पुरुषांचें एक कर्णभूषण, हल्लीं हें कुणबी लोक कानांत घालतात यांत सोन्याच्या चार कड्या असून प्रत्येक कानांत दोन याप्रमाणें कानाभोंवतीं घालतात, चार कुड्यांचा समुदाय २ नथेंतील किंवा डुलांतील सारख्या चार मोत्यांचा समुदाय ३ कोणत्याहि चार वस्तूंचा, माणसांचा समुदाय ४ घोड्याचें खिदळणें, बागडणें, चारी पाय उचलून भरधांव, डौलदार चालणें, चौक अर्थ २ पहा. ५ कापडाचा, लुगड्यांचा आठ नगांचा समुदाय

**चौकडी**—स्त्री. १ चार वस्तूंचा समुदाय (चार कागद, नाणीं, मोतीं इ०) २ एकजुटीच्या, विचाराच्या चार मनुष्यांचा समुदाय, उदा० चांडाळचौकडी ३ कापडावरील, लुगड्यावरील चौकट, आडव्या-उभ्या रेषा, चतुरस्र चिन्ह ४ हरिणाचें उड्या मारणें, बागडणें, हरिणाची उडी ५ कृत, त्रेता, द्वापर व कली या युगांचा मिळून होणारा काल, उ० चौदा चौकड्या रावणाचें राज्य म्हणजे चौकड्या इंद्राचें राज्य 'ॐ

चौकडिया सद्गुरु जाणे । तैं टाकेंडाची विशुद्धि होये ।' –ज्ञा ८.१५६. 'चौदा चौकडिया आयुष्यगणना । चंपुरशं जाणा कुंभदेवी ।' –मुग २४६३. ६ (क.) आठ नगांचा समुदाय; चोवीस मुरे किंवा होवे. 'आज मी चौकडी सणगें विकली.' 'एक चौकडी गुळाचा काय भाव आहे ?' [चौकटी] (वाप्र) ०भुलणें–गुंग होणें–मोहून, गुंगून जाणें; भांबावून जाणें; बावचळणें; गोंधळणें. सामाशब्द– ०चा–डप्याचा–वि. चौकटी असलेलें (कापड, लुगडें इ०). ०ची गाडी–स्त्री. चार घोड्यांची राजाच्या स्वारीची गाडी, बग्गी, रथ. 'स्वारीबरोबर पिछाडीस एक चौकडीची गाडी ठेविणें' –ऐराप्र प्र. ९.५१०. चौकटा पहा.

**चौंकडे–चौकडो**—क्रिवि. चोहोंबाजूस, चहूंकडे; चोहोंकडे पहा. 'चौघे चौंकडे घोडिती । येक ते सोंकून पाडिती ।' –दा ३.८.२४. 'शिष्यवृंद मिळाले चौकडो बहुत ।' –दावि २४०. [चौं + कड]

**चौकणी–चौकणी विरा**—चौकोनी पहा.

**चौकणें**—अक्रि. (घोडा इ० नें) चौक टाकीत चालणें, नाचणें, बागडणें. [चौक]

**चौकशी–सी**—स्त्री. १ काळजीपूर्वक विचारपूस; निर्णयाविषयीं पुरतेपणीं विचार. २ शोध; तपास; छडा, पत्ता लावणें; पडताळा पाहणें. ३ इन्साफाव्यतिरिक्त गुन्ह्याबाबत मॅजिस्ट्रेट किंवा कोर्ट जें जें काम करतें तें. [हिं. चौकसी] ०ठेवणें–१ देखरेख असणें; व्यवस्था पाहणें. २ काळजी घेणें; तपासणी करणें.

**चौकस**—वि. १ हरतरीत; चाणाक्ष; चतुर; धोरणी. २ विचक्षण; चौकशी करण्यात कुशल; शोधक; जिज्ञासु. 'सारासारा निवडूनि चौकस द्विज,त जे निर्मळ मानसौकस ।' –मोकृष्ण ६९.३ ३ सावध; दक्ष. ४ स्पष्ट; निश्चित. 'जुन्या कारकीर्दीत कारखान्याचे चौकस विभाग झालेले नसल्यामुळें त्यांच्या हकीकतीची पुष्कळच गुंतागुंत होण्याचा व वारंवार पुनरुक्ति होण्याचा संभव असल्यानें...' –पेरा प्रस्तावना ३ [हिं. चौकस= दक्ष, सावध; तुल० सं चतुःकष] **चौकसणें**–उक्रि. १ शोधणें; तपासणें; छानणें २ परीक्षणें; पारखणें; कसाला लावणें. [चौकस] ०दार–वि १ धूर्त; शहाणा; शोधकबुद्धीचा; धोरणी; चतुर, विचक्षण. २ चौकशी, तपास, शोध करण्यास नेमलेला, लावलेला (मनुष्य, चाकर). ३ तपासनीस, पाहणी करणारा; देखरेख ठेवणारा. [चौकसी+फा. दार] ०नीस–वि. तपासनीस; पाहणी करणारा; देखरेख करणारा, (इं.) इन्स्पेक्टर. [चौकसी+फा॰ नवीस्]

**चौक(का)ळ**—स्त्री. (कुण.) रेलचेल; सुकाळ; चंगळ, विपुलता. –वि. विपुल, पुरून उरण्याइतका; भरपूर. चेकळ पहा.

**चौकळशा**—वि. १ महाराष्ट्रांतील एक क्षत्रिय जात. या जातींत लग्नप्रसंगीं वराच्या डोहल्यावर चार कलश ठेवण्याचा प्रघात आहे म्हणून यांस हें नांव पडलें. २ चौकळशा जातीचा मनुष्य. [चौं+कलश]

**चौका**—पु. प्रवासांत स्वयंपाकासाठीं साफ केलेली व सारविलेली चौकोनी जागा. 'आपला आमचा चौका निराळा, सगळे निराळें.' –सूर्दैम १११. [चौक; हिं. चौका=स्वयंपाकघर] ०पासन–न. प्रवासांत जागा साफ करून धूळ झाडून स्वयंपाक वगैरे करून जेवण तयार करणें, मांडीं घालणें, इ० काम; स्वयंपाकपाणी. 'देशचा गडी अमरा म्हणजे चौकापासन करतो.' [हिं. चौका+बासन=भांडें, पात्र]

**चौंका**—पु जरब; धाक. –दार [हिं. चौंक=दचकणें, अचंबा]

**चौकी**—स्त्री. १ शहराच्या, रस्त्याच्या विशिष्ट भागांत चोर, गामटे इ०कांचा बंदोबस्त करण्याकरितां ठेवलेली शिपायांची तुकडी. –पया ५१. 'हे स्वयंपाक करून जेवतात तों चौकी आली.' –स्वप १४९. २ पाहाऱ्याकरितां, बंदोबस्ताकरितां ठेवलेल्या शिपायांचें ठाणें, गेट; नाकें. ३ पाहारा; राखण. 'सयाभोंवती चौकी बळकट ।' –दावि ३९१ 'माझ्या घराची चौकी तुम्ही करा.' ४ (वीणा इ० तंतुवाद्यांतील) घोडी; तारदान; अट ५ चौरंग; घडवंची; देव वगैरे ठेवण्यासाठीं केलेली लाकडी, चौकोनी बैठक; आसंदी; तक्त. 'मुकुट काढुनी मस्तकिं वरले । चंदनचौकीवरि विस्तरिले ।' –अमृत ३१. 'तें मांडिली रत्नजडीत चौकी ।' –सारु ६.१७ 'गज रथ तुरंग सिंहासनें । चौकिया निबिका सुखासनें ।' –दा ४.७६. ६ चार ध्रुपदाचा समुदाय. ७ (बायकी) प्रकार, विधि, संस्कार. 'चवथ्या दिवशीं चवथी चौकी । बाळबाळंतिणिची न्हाणी हो होती ।' –पाळणेसंग्रह पृ. ३. ८ (गो.) घराची ओसरी. ९ दुधाचे दात; (माणसाची) पुढील दातांची चौकडी. १० देवडी; आल्यागेल्याची चौकशी, वर्दी जेथें होते ती जागा, पाहारा. ११ नाकें; ठाणें, बैठक. 'जव माणकोबानीं चौकी मांडुनी । सभोंवतीं भावें रंग भरुनी ।' –दावि ७८६. [सं. चतुष्किका; प्रा. चउक्किआ=चौक, हिं. चौकी=बसण्याचा पलंग; पहारा] (वाप्र.) ०देणें–पहारा करणें; राखण करणें. सामाशब्द––चे दांत–पुअव. (माणसाचे, मुलाचे) दुधाचे दांत, पुढील दांत, ज्यांचा पदार्थ फाडण्याकडे उपयोग होतो ते, चौकडीचे दात. हे प्रत्येक जाभाडांत चार असे एकंदर आठ असतात. 'कर्णी कुंडलें तळपती । लघुदंत चौकीचे झळकती ।' –ह ४.१७२. ०दार–पु पहारेकरी, रखवालदार; चौकीवरील शिपाई. 'नजीबखान रोहिला याणें चौकीदाराचा शिरच्छेद केला.' –भाब २९. [हिं. चौकी+दार]

०दारी-स्त्री १ पहारा ठेवण्याचें, रखवालदाराचें काम २ पहारा ठेवण्याबद्दलचें वेतन ३ चौकीदाराबाबत गावकऱ्यावर बसविलेला कर [चौकीदार हिं] ०पहारा-पाहरा-पाहारा-पु. राखण, रखवाली, बंदोबस्त ( क्रि० असणें, होणें, करणें ) -पया १०५ 'त्या किल्ल्याभोंवता चौकीपाहरा चांगला आहे ' [ हिं चौकी+पहरा ] ०यात-पु पहारेकरी, रखवालदार 'प्रत्येक जलाशयावर दोन चौकीयात ठेवावे ' -मराळ माशाची पैदास ( बडोदें ) ६ [ चौकी ]

चौकीं—अ चोक, चारानें गुणतांना म्हणावयाचा शब्द उदा० एकीं चोकीं चार, चार चौकीं सोळा

चौकूण—क्रिवि ( अप ) चहूंकडून, सर्व बाजूंनीं

चौकोन-ण—पु चार बाजू असलेली सरलरेषाकृति , चार कोनानीं युक्त अशी आकृति [ स चतुष्कोण, प्रा चउक्कोण, चौ=चार+कोन=कोपरा]चौकोन नी,चौकोण-णी,चौकून-वूनी-वि चार कोन, कोपरे असलेला ( दगड, जमीनीचा भाग, आकृति इ० ) -नी-णी चिरा-पु १ चारी बाजूंनीं घड लेला दगड २ ( ल ) हव्या त्या कामाला पुढें होणारा, हव्या त्या मंडळींत साजणारा किंवा खपणारा माणूस, अष्टपैलु मनुष्य, चौरस, बहुश्रुत चौकोनांवर्चे-क्रि ( गो ) पदार्थ चौकोनी करणें

चौख—पु ( गो ) भिंतींत बसविलेलें कपाट [ म चौक ]

चौख—वि परीक्षक, तज्ज्ञ ' वरील टीकाकार यास मराठी भाषेचे चौख कोणी नेमले हेंही आम्हास कळत नाहीं ' -नि ११८ [ चोखणें ]

चौखंड—वि ( व ) चतकोर, पाव ' चौखंड भाकर वाढ ' [ चौ+खंड=तुकडा ]

चौखंड—पु ( गो ) सुपारीच्या घड्याला वेष्टणाऱ्या खोवीचा केलेला द्रोण, फालोटयाचा किंवा विरीचा द्रोण

चौखणी—वि १ चार मजली ( इमारत इ० ) २ चार खण, भाग असलेलें ( घर ) [ चौ+खण ]

चौखंदा—पु ( सामा ) चौखुंदा पहा

चौखर—पु ( व ) १ सोंगटयाचा पट २ ( व ) चौरस्त्याची जागा, चौक

चौख(खु)रणें—सक्रि जखडून बांधणें, चारी बाजूंनीं ताणून बांधणें, चौखारणें पहा 'पार्था तें गा तम । रचूनि ऐसें वर्म । चौखुरी देहात्म । मानियातें । ' -ज्ञा १४ १७७ ' मोघरी मार बुधलेमार । चौखरून उगारें मार । ' -दा ३ ७ ६५ [ चौ+खुर ]

चौखांबा—पु ( राजा. ) देवासमोर उभें राहून शपथ घेण्याची जागा [ चौ+खांब ]

चौखांबी—स्त्री ( राजा ) १ देवळाचा गाभारा ( हा बहुधा चार खांबाचा असतो ) २ मूर्ति असलेल्या गाभाऱ्याच्या पुढील जागा, सभामंडप, मंडपी [ चौ+खांब ]

चौखार—चौखुरीं पहा

चौखारणें—उक्रि. घट्ट आवळणें, ताणणें, ओढणें ( विशेष जोर आणण्याकरितां इतर क्रियापदासह योजितात. उदा० चौखारून बांधणें, कसणें, आवळणें, ओढणें इ० ) [ चौ+खुर ]

चौखुंट—क्रिवि. चारी दिशांना व्यापून ( जहागीर इ० ), चोहोंकडे, सर्वत्र, चारखुंट पहा. [ चौ+खुंट ] ०जाहगीर-स्त्री चारखुंट जाहगीर पहा.

चौखुंटी—स्त्री बाळंतपणाच्या चौथ्या दिवशीं करावयाचा विधि

चौखुंटीमार—पु एखाद्या मनुष्यास त्याच्या पोटावर निजवून व चार खुंटांस त्याचे हातपाय बांधून त्याच्या पाठीवर दिलेला मार ( चोर, दरोडेखोर पैसे काढण्यासाठीं असला मार देतात ) [ चौ+खुंट+मार ]

चौखुंदा—पु ( कापड, कागद, जमीन इ० याचा ) चौकोनी तुकडा 'वर्तुळाकार क्षेत्रासी पाही । मध्यें चौखुंदा लवलाही । ' -पैमा. -वि रुंद, प्रशस्त, मोठा, ऐसपैस उदा० चौखुंदा रस्ता, मार्ग, चिरा, छाती इ०

चौखुरणें—अक्रि ( वासरूं, शिंगरूं ) चार पायांच्या खुरांनीं युक्त असें जन्मणें [ चौ+खुर ]

चौखुरी—स्त्री बाज, खाट -वि चतुष्पाद, चार पाय, खूर असलेला ( प्राणी, पशु ) -शर [ चौ+खुर ] ०उडी-स्त्री चारी पायांनीं मारलेली उडी ( क्रि० मारणें, टाकणें )

चौखुरीं—क्रिवि. १ चार खुरांच्या बाबतींत, विषयीं, चार पायांच्या खुरांनीं ( युक्त जन्मणें ) ( क्रि० उतरणें ) २ चारी पाय उचलून चौखूर पहा [ चौखुरी+उडी ]

चौखुरें—न ( पु ) खावयास योग्य असा चार पायांचा प्राणी, चतुष्पाद खाद्य प्राणी उ० बकरा इ० [ चौ+खुर ]

चौखूर—क्रिवि एकदम चारी पाय उचलून ( उडी मारणें, पळणें इ० ), चौखुरीं ( क्रि० उडणें, धावणें, उडीमारणें, टाकणें ) 'चौखूर निघे त्वेषाची । घोड दौड संताजीची । ' -संग्रामगीतें १६ ' घोडा चौखूर उडत चालला आहे ' [ चौ+खुर ] ( बाप्र ) ०दूध काढणें-( गाईच्या, म्हशीच्या ) चारी सडांतील दूध काढणें ( गाईचे सड व खाटचे खूर यांमधील कल्पित साम्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. )

चौगण—स्त्री टाईच्या, सियरतालाच्या चवथ्या हिश्शा इतका काळ मूळ तालाच्या चौपट जलद ताल ' ( पखवाजींत ) सर्व

तंतुवायाची आणि नाचणाराचीहि साथ तोडा, दुगण, चौगण सुद्धां करता आली पाहिजे ' -कला १९ [ चौ+गण ]

चौगर्द-गर्दा—क्रिवि चोहींकडून, सर्व बाजूस, चोहोंबाजूंनी (पाऊस इ० येणें) [ हि चहुँ+फा गिर्द्=परिघ, भोंवतालचा प्रदेश ]

चौगस्त—न चार वर्षांमागील वर्ष [ हि चहुँ=चार+फा गुजश्त=गत, झालेलें ]. चौगस्तां-क्रिवि चार वर्षांपूर्वी, गुदस्तां, तिगस्तां इ० प्रमाणें 'चौगस्तां मी काशीस गेलों होतों '

चौंगा—पु चार बोटें रुंदी, चार बोटांच्या प्रमाणाचें (लांबीचें, रुंदीचें) माप, चार अंगुळें, हाताच्या चार बोटांच्या मुळाशीं दिलेला दोऱ्याचा वेढा [ स 'चतुर्=चार+अंगुल= बोट, प्रा चउ+अंगुल ]

चौ(ग)गान—न मैदान, पटांगण ' तेणें घोडा फिरविला चौगानांत ।' -शनि ९६ [ हिं ]

चौगीर्द—क्रिवि चारी बाजूनीं चौगर्द पहा. 'एकाएकीं उडी घालू नये दुरूनच चौगीर्द धरून भांडियांचा मार देत असावें ' -मराआ ३६

चौगुण—वि १ चौपट, चतुर्गुण २ चौथा गुण जो शुद्ध सत्त्व गुण त्यानें युक्त असा ' येती पाणीया मिळोनि जगजेठी । चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं ।' -तुगा १३५ [ चौ+गुण, सं चतुर्+गुण=पट, हिं चौगुना ] चौगुणित-वि चार पटीनें, चौपटें, चतुर्गुणित, चौगुणी [ सं चतुर्+गुणित= गुणलेलें, प्रा चउ+गुणित ] चौगुणी—स्त्री चौपट. ' जें कर्म मांडवला सुयें । तयाची चौगुणी येती पाहे ।' -ज्ञा १८ ७४७ ' चौगुणीनें जरि पूर्ण शीतभानु । नव्हे ऐसा तरि कलानिधी वानूं । -र १ [ चौगुण ]

चौगु(घु)ला—पु एक गावकामगार, वतनदार, अधिकारी, गावाच्या बारा बलुत्यांपैकीं एक, गावपाटलाच्या हाताखालील एक कामगार, महालाच्या चौगुल्याला देशचौगुला म्हणत -वाडसाछ १३९

चौघ-घी-घे—वि चार, चौघे पहा [ स चतुर्=चार ]

चौघडा—पु १ देवालयांतून, राजवाड्यांतून नित्य चार, चार घटकांनीं वाजविण्याकरितां काढ नगारे, नौबती, सूर, सनई इ० वाद्यांचा संच -हार. प्रत्येकी दोन याप्रमाणें दोन मनुष्यांनीं वाजवावयाच्या चार नगाऱ्यांचा समुदाय यांपैकीं दोन नगारे व दोन टिमक्या-खिळा असतात यावरून नौबती सूर, सनई इ० वाद्यांच्या समुदायासहि हाच शब्द लावतात 'झडतो नामाचा चौघडा ।' -भज ६३. २ एक मान (चौघडा वाजविण्याचा) हा मराठी राज्यांत विजयी सरदारास मिळे, त्याबद्दल सरकारांतून त्यास सालीना १२०० रु ची नेमणूक मिळे [ स चतुर्+घटि=घडी, घटिका चतुर+घट=घडा ] ०वाजणें-(कर्त्याची षष्ठी). (ल) एखाद्याची बदनामी होणें चौघडी, ड्या-वि चौघड्यांतील नगारा व झील वाजविणारा. [चौघडा]

चौघडा, चौघड्याची अयटी—पु स्त्री सोन्याचांदीच्या पत्र्यावर ठसे उमटवण्याचें सोनाराचें एक साधन [चौ+घडा]

चौघडी—स्त्री १ वस्त्राची, कागदाची चार पदरी घडी २ बायकांचें पांघरण्याचें चार पदरी वस्त्र बहुधा लुगड्याचीच चौघडी करतात [ चौ+घडी ].

चौघ(घु)ला—पु. चौगुला पहा. चौघुलपणा, चौघुलकी-पुस्त्री चौगुल्याचें काम, अधिकार [ चौघुला ]

चौघाचार—पु १ लोकांच्या मत्सराचा, अभिशापाचा, द्वेषाचा अमंगल वचनाचा भोंवणारा परिणाम, (लहान मुलास लागणारी) लोकांची दृष्ट (क्रि० बाधणें) २ (क) प्रसिद्ध करणें, फोडणें, लोकांस सांगणें, ३ (एखाद्या वस्तूवरील) पुष्कळांची मालकी, समायीक हक्क, सार्वजनिक सत्ता ४ (क) सामान्य व्यवहार आचार, लोकरीति ५ चौघांनीं केलेला न्याय, पंचाईत, निवाडा ' राखिला हा होता बहु चौघाचार । साक्षीनें वेव्हार निवडिला ।' -तुगा १२१७ ' बहिणी म्हणे चाल करूं चौघाचार । येसोनि वेव्हार निवडीती ।' -ब ४९१ [ चौघे=चार जण-लोक+आचार=व्यवहार ]

चौघे-घी--वि पुअव १ चार जण, चार आणि चौघे या दोहोंच्या अर्थात थोडासा फरक आहे चार शब्द सर्वसाधारणपणें वापरतात परंतु चौघे हा शब्द सजीव प्राण्यास उद्देशून-विशेषत मनुष्यास उद्देशून वापरतात (-स्त्री=चौघी-चौघ्या, -न चौघें-चौघीं) २ थोडे, तिघे-चौघे, तीन-चार ३ जग, जनता, समाज, लोक, जन उदा० चौघांचा विचार, बुद्धि, रीत 'चौघांची वाट ती आमची-आपली वाट ' 'चौघांत जावें लागतें ' 'चौघांत बातमी पसरली ' ४ (सांकेतिक) चार वेद. ' न मनी चौघांचीं उत्तरें । उठवालें नावर ।' -ऋ ४४ ५ चार देह, सूक्ष्म, स्थूल कारण व महाकारण देह, शरीर राजस विठाबाई माझें ध्यान दुहो पायीं वो । त्यजूनियां चौघांसी लावी आपुलिये सोई वो ।' -तुगा २८९ ६ चार मुक्ती ' चौघी जणी तटस्थ पाहती । स्वरूपस्थिति न वर्णवे ।' -ह ३ २ ७ चार वाचा (परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी) 'कृष्ण वर्णूनियां श्रेष्ठ । चौघे गर्जताती भाट ।' -एरुस्व ६७६ [ चौ=चार ] (वाप्र ) चौघांत असणें-अक्रि लोकांत, समाजांत वावरणें, वागणें, लौकिक राखणें चौघांवर ताण घेणें-(उप ) लोकमत झुगारून देणें, जनतेचा, समाजाचा निर्णय धाब्यावर बसविणें, अधिक खच ताण, लकेर घेणें, लोकांवर ताण करणें

**चौघेरा**—वि (विणकाम) एकेका घरातून दोन फणीच्या दोन तारा घेऊन दाट विणलेलें (वस्त्र) [चौ+घेर]

**चौचक**—न कवाड, दाराच्या फळ्या, झडपा 'नवद्वारा चिया चौचकीं। वाणुनि सयतीची आडवकी।' -ज्ञा १२.५२ [चौकट]

**चौचाकी पाढर**—स्त्री गाव गावकरी, गाववस्ती, गावचे गरीब सुखवस्तु इ० सर्व लोक (क्रि० मिळणें, जमणें, गोळा होणें) चौचाकी यातील चार चाकांच्या अर्थासबंधीं बराच मतभेद आहे काहींच्या मतें ही चौचाकें म्हणजे देशमुख, देशपांड्या, पाटील व कुळकर्णी हीं (चार चाकें) होत काहीं लोक सुतारांचे, कुंभारांचें, तेल्याचें व गवळ्याचें अशीं (गावाचीं) चार चाकें मानितात, कोणी १ लें सरकार, २ रें पाटील कुळकर्णी, देशपांड्या, देशमुख, ३ रें मिरासदार शेतकरी इ० समुच्चयानें व ४ थें बलुतेदार अशीं चार चाकें मानितात काहीं लोक असें म्हणतात कीं खेडेगावचे लोक जो कोणी नेता भेटेल त्याच्या तंत्रानें वेळेनुसार वागणारे, प्रसंग पाहून पुढेंमागें, उजवीकडे, डावीकडे वळणारे व न अस्थिर बुद्धीचे असतात त्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे

**चौचाल**—वि १ चवचाल, प्रत्येक नव्या कल्पनेनें, चालीनें, मोहून जाऊन तीप्रमाणें वागणारा २ लहरी, स्वेच्छाचारी, स्वच्छंदी ३ नाना कुरापती, लफडीं करणारा ४ भटक्या, मसण बडबड्या, नगरभवान्या, चहाडखोर, गप्पीदास, वाचाळ (हा अर्थ स्त्रियांच्यासबंधीं विशेष रूढ आहे) ५ स्वेच्छाचारी, दुःशील, नाचरी नटवी (स्त्री) [चौ+चाल=वर्तन, वागणूक]

**चौचिंधी**—स्त्री अदाधुदी, बजबजी 'नानाफडणीस याच्या मृत्यूनंतर पुणें दरबारात जी चौचिंधी माजली -सन १८५७ पृ ६० [चौ=चार+चिंधी]

**चौचें**—क्रि १ (गो) पाहणें २ चालणें

**चौजार**—न चातुर्थिक ज्वर, दर चौथ्या दिवशीं येणारा पडीताप [चौ+ज्वर]

**चौटक**—पु चार टांकांचें परिमाण, छटाक, शेराच्या सोळाव्या भागाचें माप, वजन, चवटकें [चौ+टांक]

**चौटचें**—न चोंडकें पहा

**चौटांकी**—वि चार टकयाचा (द्रोण) [चौ+टांका]

**चौडक**—वि ज्याला चार डंक्याचा मान आहे असा 'नृप चौडक गर्जती सुखें। लेला लागला म्हणाति। -मुवन १४ १२ [चौ+डंका]

**चौडका-का-कें चौंटकें**—पुअोन चवडे चोंडकें पहा 'आणि सहस्रार्जुन सत्रिवारीं मारिला। त्याचिया धडाचा चौडका केला।' -स्वादि १ ६ ७७ 'गामुखी चळका चौडकी दुटाळ।' -ह २३ ७७ 'एक मरणाचेनि धाकें। काखे रामाच चौडकें। प्रपचगोंधळाचेनि हरिखें। उदो म्हणोनि नाचती।' -एरुस्व ११ ६० [का चौडिके]

**चौडचाल**—स्त्री (घोड्याचें) पुढील पाय जलद उचलून झपाट्यानें चालणें चवडचाल पहा

**चौडाळ, चौंढळ**—वि चौढाळ-ळ्या पहा 'काय गाढ बोलणें भुजवर चालणें मुरवत चौडाळपाची।' -सला ३९

**चौडाळणें**—अक्रि (गाय, म्हैस याची कास) प्रसूतीची वेळ जवळ आली असता विस्तृत होणें [हिं. चौडा=रुंद, म चवडा]

**चौंडाळणें**—सक्रि सकर करणें, बिघडविणें, चौढाळणें पहा 'गोवळीजन विटाळिले। चौडाळिला व्यभिचारें।' -मुसभा ११ २६

**चौढाळ**—न जातिधर्मविरहित आचरण -शर घोंटाळा 'हाटाचे चौढाळे कोण जाणे।' -रामदास स्फुट अभग, नवनीत पृ. १५१

**चौढाळ**—वि चार उतरत्या बाजू असलेलें (छपर, छावणी) [चौ+ढाळ=उतार]

**चौढाळ-ळा-ळ्या**—वि १ चौंढळ, चव्हाटळ, पाचकळ २ हरएक कामात ढवळाढवळ करणारा, कामात गोंधळ घालणारा, घोंटाळा करणारा, चोहींकडून एखाद्या कार्याचा टवळा करणारा. [चौ+ढाळणें=ढवळणें]

**चौढाळणें**—अक्रि -सक्रि जातिनिर्बंध विवाहबंधन तोडून सवगोलकार होईल अशा तऱ्हेनें वागणें, कामुकतेचा अतिरेक करणें, ताळतंत्र सोडून सभोग करणें, चौंडाळणें 'बहुत माजला गोवळ। गोकूळ चवडाळिलें सकळ।' -सक्रि १ धालमेल हलवाहलव करून गोंधळ करणें, बिघाड करणें, विचका करणें, अनेकांनीं मिळून एखाद्या कार्याचा विचका करणें २ बाटविणें 'चौढाळिलें गोकुळ सर्व येणें।' -साकृद १ ६९ [चौ+ढाळणें=ढवळणें]

**चौढाळें**—न गर्दी, दाटी -शर

**चौणा**—पु चवणा पहा

**चौत**—पु (फळ, कद भाकरी इ० कांचा) चवथा भाग, हिस्सा चतकोर -स्त्री चतुर्थी तिथी, (प्र) चौथ पहा [चौथ] ०कर कोर-पु (राजा) चतकोर पहा

**चौतर्फ-तर्फा-तर्फी**—वि चार राजे, मालक मुख्य असलेला देश रा य नागोठणें (नागाठण्याचा अमल) चौतर्फ आहे' -क्रिवि चोहोंकडे-कडून सर्व बाजूस-बाजूंनीं, चौगर्दा [चौ=चार अर तरफ् तर्फ-बाजू पक्ष]

**चौत(ता)ळणें**—चवताळणें, चौताळणें पहा

**चौतार-री**—वि १ चार तारांचे, सुताच धाग्याचे पेटे अस लेलें (कापड) २ चार तंतु एकत्र करून विणलेला (पितांबर इ०) [चौ+तार]

**चौताल-ला**—पु. वादनातील एक ताल, ठेका. ह्यात मात्रा बारा व विभाग सहा आहेत. चार टाळ्यांचे ठोके लागणारा धृपद इ० [ चौ+ताल=ठेका ]

**चौताला-ली**—वि. चौतालांतील; चौताल ह्या ठेक्यांतील ( धृपद इ० ). [ चौताल ]

**चौताली**—वि. चार मजली; चार तालांची ( इमारत, जहाज इ० ) [ चौ+ताल=मजला ]

**चौताळ**—क्रिवि. चौखूर; चारी पायांनी उड्या मारीत. ' निळा म्हणे फुंगात उठी। चौताळ लागे पाठी । ' -निगा २४ [ चवताळणें ]

**चौताळणें**—अक्रि. चवताळणें पहा. १ पिसाळणें; क्षोभणें ' मज लक्षितां मन आवळे । मज विसरतां तें चौताळे । ' -एभा १६.१७०. ' सिंव्यत्नुगर्भीत दुष्कर्मे तें नीच । चौताळती म्लेंच्छ क्षोभलासे । ' -दावि ३१५. २ धांवून येणें; आवेशानें पळत सुटणें. ' चौताळती गगनपंथें । देखे वारू चारही तें । ' -मुसाभा १२ १९२. ३ वेगानें जाणें. 'वेगें सारथ्यातें म्हणत । चपळ चौताळों दे रथ । कृष्णनाथ जेथें असे । ' -एरुस्व १२.६९. ४ विस्तार पावणें, पसरणें ' माझी बळी होऊन गेले । पृथ्वीवरी चौताळले । ' -दा १६.३.२६. [ चौ+ताल ]

**चौतीस**—वि. ३४ संख्या; तीस आणि चार. [सं. चतुस्त्रिंशत्; प्रा. चउतीस; तुल० गुज. चोतरीस ]

**चौतुकडा**—वि. चार तुकड्यांनीं बनविलेला; चार तुकड्यांचा. [ चौ+तुकडा ]

**चौतुकी, चौतूक**—वि चार कडवीं, विभाग असलेलें (धृपद). अस्ताई, अंतरा व आभोग यानीं युक्त असें ( धृपद ). [ चौथ ]

**चौतू**—वि चौतारी पहा

**चौत्य**—चतुर्थांश, पाव हिस्सा. -शर. [ चौथ ]

**चौत्रा**—पु चवुत्रा; ओटा, चौथरा. [ म. चौ+थर; हिं. चौथरा, फा. चौतरा ]

**चौथ**—स्त्री १ चतुर्थी तिथि. २ (कों.) लोणी वगैरे तोलण्याचें अट्ठेचाळीस दुदोडी शिवराई पैसेभार वजन ३ चतुर्थांश ४ चौथाई; मुसलमानांच्या अमलाखालील प्रांतातून सरकारी वसुलाच्या एकचतुर्थांश खंडणी मराठे वसूल करीत असत ती. ही खंडणी वसूल केल्यावर मराठे तिची पुढील प्रमाणें वांटणी करीत-चौथाईचा चतुर्थांश राजा स्वत.करितां ठेवीत असे आणि ह्या हिश्शास राजबाबती असें म्हणत बाकी राहिलेल्या रकमेंपैकीं म्हणजे मोकाशापैकीं सर्व चौथाईच्या साहोत्र्या इतकी ( शे ६ इतकी ) रकम पंतसचिवास देत असत बाकी राहिलेला ( चौथाईचा एकुणसत्तर शंभरांश) हिस्सा ज्याला ऐनमोकासा म्हणत त्याची विशिष्ट अटीवर सरदार-जहागीरदारांत वांटणी होत असे. यांनी मराठ्यांच्या स्वारीच्या वेळीं सैन्य पुरवावयाचें असे. कांहीं प्रांतांत मगळपा चौथाईवर शेकडा तीन इतकी रकम वसूल घालीत असत. तिला नाडगौडा असें म्हणत. मराठ्यांच्या अमलाखालीं ते प्रांत आल्यावरहि वरीलप्रमाणें चौथाई वसूल करून वर सांगितल्या प्रमाणें तिची वांटणी होत असे. ५ मुसलमानांच्या अमदानींत दाव्यांत, लवादांत यशस्वी झालेल्या व्यक्तीनें प्रतिपक्षाकडून चौथ घ्यावी असा नियम असे. दाव्यांतील ऐवजांतील (रकमेंतील) रुपयास चार आण्याइतकी साधारणतः ही रकम असे. ६ कामावर माहोत्री लाविलेल्या नोकरांच्या पगाराच्या रकमेचा चतुर्थांश मुख्य अंमलदारास मिळत असे त्यासही चौथ म्हणत ७ शिवाय कोर्टांतील बेलीफास प्रोसेस बद्दल दिलेल्या मजुरीचा चतुर्थांश नाजराम मिळत असे त्यासहि चौथ म्हणत. -वि. चतकोर (भाकरी). [सं. चतुर्थ; प्रा. चउत्थ] (वाप्र ) चौथीचा चंद्र(चांद) पहाणें—कांहीं तरी आळ, किटाळ येणें; चतुर्थीचा चंद्र पाहिला असतां चोरीचा आळ देतो असा समज आहे. 'चौथीचा चांद पाहिलांत याचा हा परिणाम वरें का ?' -भामना ८६. ०कर. कोर-पुस्त्री. (प्र.) चतकोर पहा. ०भरणी-स्त्री. १ भाद्रपद वद्यांत ज्या दिवशीं भरणी नक्षत्रीं चंद्र असतो असा ( तृतीयेचा, चतुर्थीचा, पंचमीचा ) दिवस. २ मागील बारामहिन्यांत गेलेल्या माणसांचे या दिवशीं केलेलें श्राद्ध; भरणी श्राद्ध. [ चौथ=चतुर्थी+भरणी=भरणी नक्षत्र ]

**चौथरा, चौत्रा**—पु घर घर इ० बांधण्यासाठीं बांधलेला चौकोनी ओटा; चवुत्रा; घरटा; घराखालचा चौकोनी उंच ओटा. [ म. चौ+थर; फा. चौथरा, हिं चौंतरा ]

**चौथरा, चौथल**—पुस्त्री. १ शेतांतील एकूण उत्पन्नाचा चौथा हिस्सा. २ शेत खंडानें देण्याचा एक प्रकार. यांत शेताचा मालक स्वामित्वाबद्दल शेताच्या उत्पन्नापैकीं चतुर्थांश स्वत ला ठेवून बाकी कुळास देतो [ चौथ ]

**चौथा**—पु (खा.) एक माप. चोयवा पहा.

**चौथा**—वि. पहिला, दुसरा, या अनुक्रमातील तिसऱ्याच्या पुढचा व पाचव्याचा मागचा; चार ही संख्या ज्यानें पूर्ण होते तो [ सं चतुर्थ; प्रा. चउत्थ ] ०पुरुषार्थ-पु धर्म, अर्थ, काम, मोक्ष या मनुष्यानें साधावयाच्या चार पुरुषार्थांपैकीं चौथा जो मोक्ष तो. [ चौथा + पुरुष + अर्थ = साधावयाची गोष्ट ] -थी भक्ति- स्त्री ज्ञानभक्ति

**चौथाई**—स्त्री १ चौथा हिस्सा; चतुर्थांश. २ खंडणी; कर; हक्क चौथ अर्थ ३-७ पहा ३ मराठे अमदानींत सरकारनें जर भाऊबंदांनीं तोडले किंवा मालमत्तेची वाटणी केली तर एकचतुर्थांश रकम जी सरकार घेई ती. 'वाटणी करून देऊन सरकारची चौथाई घेऊन सरकारांत जमा करणें.' -वाडमा २.१६३. [ चौथ ] ०अंमल-पु. चौथाई वसूल करण्याचा हक्क. [ चौथाई+अंमल ]

**चोथाग्न**—न ( कु ) विवाहसमयींचा वधूंचे नाव ठेवण्या-च्या आधींचा विधि

**चौथेली**—स्त्री चौथल, शेताच्या उत्पन्नाचा चौथा हिस्सा चौथरा पहा

**चौदंती**—वि १ चार दांत ज्याला आहेत असा ( हत्ती ) 'जेवीं मदोन्मत्त हस्ती । चौ दंताचे ।' –कथा १.१३ ९५ २ ऐरावताचें विशेषण, चतुर्दंत=ऐरावत. 'ते चौदंते चोखडे। क्षीरसागरींचे ॥' –शिशु ५४१ [ चौ+दंत=दात ]

**चौदस**—स्त्री चतुर्दशी तिथि [ स चतुर्दशी, प्रा चउ-दसी, गो गु चौदस ]

**चौदा**—स्त्री चौदा विद्या 'चौदाजणींची ठेव । नचले स्वरूप वर्णावया ।' –ह ३ ३ –वि १४ संख्या, दहा आणि चार [ स चतुर्दश, प्रा चउद्दाह, हिं चौदह, ब चौद्द, उ गु चौद, प. चौदा ] सामाश०द- ०इंद्र-पु ब्रह्मदेवाच्या एका दिवसाच्या कालात जसे पृथ्वीवर एकामागून एक असे चौदा मनु राज्य करून जातात त्याचप्रमाणें स्वर्गात एकामागून एक चौदा इंद्र त्या कालात राज्य करून जातात म्ह० चौदा इंद्र झाले तरी इंद्राणी एकच (सभोंवतीं अनेक फेरफार होत असतांना देखील जी एकच व्यक्ति, वस्तु संस्था, विधि चालू इ० टिकून राहते तिचें वर्णन करताना या म्हणीचा उपयोग करतात) ०गोत्रें-नअव (कोंकणस्थ ब्राह्मणांचीं ) अत्रि, कपि, काश्यप, कौंडिण्य कौशिक, गार्ग्य, जामदग्न्य, नित्युंदन, बाभ्रव्य, भारद्वाज वत्स, वासिष्ठ विष्णुवृद्ध व शांडिल्य ०चौकड्या-वि चौदा चौकड्यांचें राज्य असणारा 'चौदा चौकडिया लंकापति । त्याची कोण झाली गति ।'–तुगा ०चौकड्यांचें राज्य-न कृत, त्रेता द्वापार व कलि हीं चार युगें मिळून एक चौकडी होते अशा चौदा चौकड्या होईपर्यंत केलेलें राज्य, अतिशय दीर्घकाल केलेलें राज्य, रावणाचें राज्य 'सर्व देवाना बंदींत टाकणारा व चौदा चौकड्या राज्य करणारा रावण स्वत च्या प्रतापासवधाच्या चुकीच्या कल्पनेला बळी पडला.' –कीचकवध ०तंतुवाद्यें-वीणा वीन, रुद्रवीणा, एकतारी, सारंगी, सतार, सारमंडळ, तुंबरी ( तंबुरी ), सरोद, कोंका, रबाब मदनमंडळ ताउस व तुणतुणें ०ताल-ळ-वि चौदा मजले उंच, फार उंच, गगनभेदी [ चौदा+ताल ] ०नाऊ-पु. चौदा अलुते अलुतेदार पहा [ चौदा+नाऊ=अलुतेदार ] ०ब्रह्में-नअव शब्द मीतिकाक्षर ख, सर्व, चैतन्य सत्ता साक्ष सगुण, निर्गुण, वाच्य, अनुभव आनंद तदाकार व अनु(नि)र्वाच्य ब्रह्म –दा ७ ३ ५ ते ९ ०भवनें भुवनें-नअव. चौदा लोक, सप्तस्वर्ग आणि सप्तपाताळ मिळून चौदा लोक भू , भुवर् स्वर्, महर् जन तप, सत्य हे सात लोक आणि अतल, वितल सुतल, महातल, रसातल, तलातल व पाताल हे सात पाताल लोक मिळून चौदा लोक ०मनु-सात साताचे दोन वर्ग (१) स्वायंभुव, स्वारोचिष, औत्तमी, तामस रैवत, चाक्षुष, वैवस्वत (२) सावर्णि मनु –सावर्णि, दक्ष ब्रह्म धर्म, रुद्र, देव व इंद्रसावर्णि ०रत्नें नअव देव आणि दानव यांनीं समुद्रमथन करून चौदा मूल्यवान वस्तु काढिल्या त्या लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा, धन्वंतरी, चंद्र, कामधेनु, ऐरावत, रंभा ( आदिअप्सरा ), उच्चैश्रवा नामक सप्तमुखी घोडा, कालकूट विष, धनुष्य (शार्ङ्ग), पांचजन्य शंख, अमृत ०लोक-पुअव चौदा भवनें पहा 'तेतिस कोटि देव सकळ । चौदा लोक सुवर्णाचळ । वेष्टित राहिले ।' –दा ४ १० १४ ०विद्या-स्त्रीअव ऋक्, यजुस् साम, अथर्व हे चार वेद व शिक्षा, छंद, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष, कल्प हीं सहा वेदांगें व न्याय मीमांसा, पुराणें, धर्मशास्त्र मिळून चौदा विद्या 'चौदा विद्या ज्याच हातीं ।' –नेपाळी गणपतिची पू ३ **चौदावें रत्न**-न १ (चुकीनें) चाबूक २ (ल) खरपूस मार( चौदा रत्नें वर्णन करणाऱ्या 'लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक ' श्लोकातील 'शंखोऽमृत चाम्बुधे ' या तिसऱ्या पादाच्या शवटीं 'चाम्बुधे ' बद्दल चुकीनें चाबूक असें वाचल्यानें चादावें रत्न म्हणजे च बुक असा अर्थ, किंवा चौदावें रत्न (अमृत) निघाल्यावर दैत्याना बसलेल्या मारावरून शिक्षा ) 'आम्ही इतके धीट आहों कीं चवदावें रत्न आमच्या दृष्टीस पडलें कीं पुरे, आम्ही आपले पाय लावून पळत सुटलोंच ' –आगरकर ३ भावड्या माणसाची केलेली खोडी, फसवणूक **चौदावेंरत्न दाखविणें**–चाबकानें मारणें, खरपूस समाचार घेणें

**चौदिवाली**– स्त्री चारी बाजूंनीं भिंती असलेलें चौकोनी अंगण, पटांगण, चौक [ हिं चौ=चार+दिवाल=भिंत ]

**चौदिसा**—क्रिवि चार दिवसापूर्वीं 'अमई । निरखिली म्यां चारटी चौदिसा ग ।' –आक १८ [चौ=चार+दिस=दिवस]

**चौधरी**—पु १ गांवचा एक सरकारी अधिकारी, पाटलाच, मदतनीस, कांहीं प्रांतात यालाच सरदेशमुख आणि सवसामान्य पणें चौगुला म्हणतात 'सेट्या ना चौधरी । पादेपणवाहे शिरीं ।' –तुगा ३० ५९ 'भक्ति नाहीं राजापधानाचे घरीं । भक्ति नाहीं पारीं चौधर्‍याचे । –ब ३९५ २ श्रेष्ठ मुख्य मनुष्य, पुढारी 'अवघ्या शिंदळाचा चौधरी । नवाजी आणिल बायका । –अमृत १२९ ३ एखाद्या समाजातील जातींतील, धंद्यातील मुख्य मनुष्य, वजनदार माणूस, पुढारी ४ बैलगाडी हाकणारा कामगार 'चांदीची बगलागाडी स्वारींत कोतल चालण्यास नेण्याकरिता एक बैल जोडी द्यावी आणि चौधऱ्याचीहि नेमणूक करावी '–पेशवाप्र ९ ५११ [ हिं चौधरी ] **चौधरीण**–स्त्री चौधरीची पत्नी

**चौधार-रा**—वि चार धारा, बाजू कडा असलेले, चौधारी 'शतयोजनें रुंद लांब । चौधार रत्नमणीचे खांब ।

आटोनिया शातकुंभ।' -सुसमा ४ १२ [चौं=चार+धार=दंड, बाजू]

**चौधारी**—पु १ चार कडा असलेली घेवड्याची एक जात २ चौधारी निवडुंग -वि चार कडा असलेला चार धारांनीं युक्त असा, चौधार [चौं+धार] ०**घेवडा**-पु. चौधारी घेवडा, घेवड्याची एक जात ०**निवडुंग**-न पु चार धारा, कडा असलेला निवडुंग [चौधारी+निवडुंग]

**चौनट**—वि १ चवनट, चावनट पहा (खाण्यापिण्याच्या बाबतींत) चोखनळ, चिकित्सेखोर २ (ग्र) चवनट, चावट, चहाटळ, फाजील, विचकट [चव+स नट्]

**चौपई-य**— स्त्री सापसुरळी, चोपई पहा

**चौपट**—स्त्री १ सोंगट्या व दोन किंवा तीन फासे अथवा सात कवड्यांनीं खेळण्याचा एक खेळ. 'रंगीत चौपट तुशी खेळाया पडे पटेन जान गडे।' -पला १०८ २ सोंगट्या खेळावयाचा (घरें आखलेला) पट [चौं=चार+पट=वस्त्र] -वि चारपट, चारांनीं गुणलेलें, चतुर्गुणित [चौं=चार+पट=गुणाकार]

**चौपट्टा**—पु १ चौकोनी सपाट व विस्तृत मैदान, जागा २ रुंद व सपाट प्रदेश. -वि (क) चौकोनी, सपाट व विस्तृत (मैदान) [चौं+पट्टा]

**चौपड**—पु एक खेळ, चोपड पहा [हिं]

**चौपदरा-पद्रा**—वि झोळीसारखा, चारपदर एके ठिकाणीं बांधलेला, 'हातीं पायीं धरिला। मग तो चौपद्रा केला। काळाचां हातीं पडला। लागले मारू।' -गीता २ २३८० २ (बे) चौपदरी, चार पदरी [चौ=चार+पदर] ०**पसरणें**-चौपदरी गळा काढणें, रडणें, भेकणें

**चौपदरी**—स्त्री चौकोनी फडक्याचीं चार टोकें एकत्र धरून भिक्षेसाठीं बनविलेली झोळी, मधुकरीचें फडकें, भिकाऱ्याची झोळी 'अनक्षत्रवाल्यास जशा चौपदरीचा योग यावा त्याप्रमाणें या भरतभूमिवासी जडभरताची आजला हालहवाल होऊन गेली आहे' -केसरी -वि १ चार पदराचा, पेडाचा (दोर इ०). २ चौपदी, चार पदर होतील अशा रीतीनें घडी घातलेलें (लुगडें, धोतर इ०) [चा=चार+पदर=कोपरा, टोंक] (वाप्र) ०**गळा काढणें**-मोठ्यानें रडणें, ओरडणें ०(**हातीं**) **घेणें-येणें**-भिक्षा मागण्याचा धंदा आरंभिणें, भीक मागणें 'अलीकडे तू मुळींच अभ्यास करीत नाहींस, पुढें चौपदरी हातीं येणार आहेस कीं काय?' ०**चा जहागिरदार**-पु (उप) भिकारी 'चौपदरीचा जहागिरदार, नी मिजास बादशहाची'

**चौपन्न**—वि ५४ संख्या, पन्नास आणि चार [प्रा चउपन्न-पण्ण, हिं चौवन, गुप चोपन]

**चौपाइ-ई**—स्त्री. १ चार पायांची खाट 'रत्नपुढा देखिला मचकु। मणों चौपाइ शेपू।' -ऋ ८५ २ एक हिंदी वृत्त छंद [स चतुष्पादिका, प्रा चउपाइया; हिं चौपा(प)ई, म चौं+पाय]

**चौपा(पां)खी**—वि. चार पाख्यांचें (घर), चार उतरत्या बाजवांची ज्याची छावणी आहे असें (घर, इमारत) चार छपरांनीं आच्छादिलेलें (घर इ०) [चौं+पाख=छप्पर]

**चौपाट**—वि चौरस, चौकोनी केलेला (इमारती लाकडाचा तुकडा) [चौं+पट] ०**चौपाटणें**-(लांकूड इ०) तासून चौकोनी, चौपट करणें [चौपट]

**चौपाट**—क्रिवि भरधाव, चौखूर (क्रि० काढणें, पळणें; धावणें, निघणें) चौपाठी पहा

**चौपाठी**—क्रिवि चौपाट, भरधाव, चौखूर 'सोनजादी उधळोनि मार्गें। धावती चौपाठी।' -शिशु ५७७ [चौं+पाट किंवा पाठ]

**चौपानी**—स्त्री पाण्यात वाढणारी एक चार पानांची वनस्पति, भाजी [चौं+पान]

**चौपाय**—पु चार पाय हा शब्द कांहीं विशिष्ट वाक्प्रचारांत आढळतो उदा० **चौपायाचा**-वि चारपायांचा. **चौपायांनीं**-क्रिवि चार पायांनीं.

**चौपायीं**—क्रिवि १ चारी पायांच्या ठिकाणीं, बाबतींत २ भरधांव, चौखुर, चौपाठी, चार पायांवर [चौं+पाय] (वाप्र) ०**उगवणें-उजवणें**-१ (घोडा इ०) चारी पायात चांगला आणि सर्व लक्षणांत बरोबर आणि चांगला निघणें, यावरून २ (उप) सर्व लाज टाकणें, उच्छृंखल होणें, चोरी, शिंदळकी, चहाडी, लबाडी इ० मध्यें अट्टल तरबेज बनणें ०**उतरणें**-१ (वासरू, शिंगरू इ०) चारी पायांच्या खुरांनीं जन्मास येणें, जन्मकाळीं पायाचे चारी खूर पांढरे असणें चौखुरीं उतरणें पहा २ चारी पायांत भोपळेपणा येणें, थकल्यामुळें पाय जड होणें पायात गोळे येणें ०**काढणें**-(घोडा इ०) भाधांव फेकणें ०**धावणें-पळणें-उडणें-सुटणें-निघणें**-(घोडा इ०) भरधाव पळणें

**चौपायी**—स्त्री (प्र) चौपाई, चार पायी, खाट -वि चार पायांचा, चतुष्पाद [चौं+पाय]

**चौपारीं**—क्रिवि चाऱ्ही बाजूनीं, सर्वकडून, चौपाशीं पहा जैसा तडाग भरला विशाळ। त्याचे चौपारीं फुटलें जळ।' -पांप्र ५० १९२ [चौं+पार]

**चौपालवी**—स्त्री चौपदरी, भिक्षेची झोळी 'चौपालवी बांधोनि करीं। भीक मागावी दारोदारीं।' -एभा ३ ४६४ [चौ+स. पल्लव-पाल्लव=पदर]

**चौपाशी, चौपास-सी**—क्रिवि. चारी बाजूंस; चोहोंकडे; सर्व बाजूंस; सर्वत्र. 'महाभयाचीं मूतें चौपाशीं। अहर्निशीं झोंबती।' –एभा २.२८०. 'शोभा चौपाशीं आणावी।' –एरुस्व १४.४७. [ सं. चतुर्+पार्श्व=बाजू; प्रा. चउ=चार+पास=जवळ, समीप ]

**चौपाहरी-हारी**—स्त्री. चार प्रहरांचा समुदाय. 'रात्रीची चौपाहरी। वेचलियां अवधारीं। डोळ्या तमारी। मिळे जैसा।' –ज्ञा १८.९६७ 'पुढती दिहाची चौपाहारी फिटे। आणि हा आकारसमुद्र आटे।' –ज्ञा ८.१६१. [ चौ=चार; सं. प्रहर; प्रा पहर=साडेसात घटका; चौ+पाहारा ]

**चौपाळा**—पु. चोपाळा पहा.

**चौपुटी**—स्त्री. (सामा.) चौपदरी; भिक्षामागण्याची झोळी. –वि. १ चार पुडें असलेली; चौपुडी पहा. २ (महानु.) चौकोनी. 'आसन सोरठा उर्णपटीं। पुढां मांचळी चौपुटी।' –ऋ ८०. [ चौ=चार+पुट=पुड, कोन ] ०घेणें–भिक्षा मागण्याचा धंदा आरंभिणें

**चौपुडी**—वि. चार पुडें, खण, कप्पे असलेली (पेटी, करंडा). [ सं. चतुर्+पुट; प्रा. चउप्पुड; म. चौ+पुड ]

**चौपेट**—स्त्री १ एखाद्या इमारतीच्या चारी बाजूनीं, अंगानीं वेष्टिलेलें चौकोनी अंगण, जागा; चौक. २ (गो.) चौसोपा. [ चौ+पेट=पेटी ]

**चौफळ**—वि. १ चौकोनी; चतुष्कोणाकृति. 'घटाकारें वेटाळें। तेथ नभ गमे वाटोळें। मठीं तरी चौफळें। आवे दिसे।' –ज्ञा १३ ८९७. २ चौपट; चारपट. 'मोठें चौफळ। अंगीं उच्छिष्टाचें बळ।' –तुगा २३५८: [ चौ+फल ]

**चौफ(फा)ळा**—पु. (राजा.) चौरंग; चौपाळा; जिचा खाटेप्रमाणें, चौपाळ्याप्रमाणें उपयोग करितात अशी पायासहित किंवा पायाशिवाय असलेली फळयाची चौकट. [ चौ=चार+फळी ]

**चौफळणें**-सक्रि. चौरंग, चोपाळा करणें. 'आतां हृदय हें आपुलें। चौफळुनियां भलें। वरी बैसऊं पाउलें। श्रीगुरूचीं।' –ज्ञा १५ १. [ चोपाला; चौफाळा ]

**चौफळा**—पु. (विणकाम) (लुगड्याचे, खणाचे) सर्व सळ एक जागीं जमवून त्याची घातलेली घडी. [ चौ+फलक ]

**चौफुला**—पु १ लवंग, वेलदोडे, जायपत्री इ० विड्याच्या मसाल्याचे पदार्थ निरनिराळे ठेवण्याकरितां फुलाच्या आकाराचा, चार किंवा सहा, सात पुडाचा डबा; पानसुपारीचा डबा; कचोळें. 'खुशालित वर बसावया बांधुन दिधला झुला। रुपेरी तस्त तवक चौफुला।' –प्रला २१५ २ सराफाची वजनें ठेवण्याची वाटोळी पिशवी, बटवा. ३ एक पितळी, घनाकृति पांच लहान मोठे खळगे असलेलें, सोनाराचें उपकरण, याच्यावर सोन्याचांदीचे पत्रे हातोड्यानें बडवून मंगळसूत्र इ०कांत ओवण्याच्या मण्यांच्या वाट्या बनवितात. ४ (कों.) पत्रावळीचा एक प्रकार. यांत मधल्या पानाभोवतीं चार पानें लाविलेलीं असतात. [ चौ+फूल ]

**चौफुली**—स्त्री. १ नक्षत्राच्या आकाराची फुली (कापड इ० कांवर काढतात तशी); चांदणी. २ उभ्या रेघेवर बरोबर मध्यावर तिच्या इतकीच लांब आडवी रेघ दिली असतां होणारी आकृति; फुली; ३ एक प्रकारचा मोत्याचा (कानांत घालण्याचा) लहान दागिना. ४ रांगोळींतील चार ठिपक्यांची चौकट. [ चौ+फूल ]

**चौफेर-री**—क्रिवि. चारी बाजूंनीं; चहूंकडून; जिकडेतिकडे; चौगर्द. 'तंव पावले ऋपेश्वर। देवीं दाटलें अंबर। अग्नि लाविला चौफेर। परशुरामें।' –कथा १.१३.१०७. [ चौ+फेर ] (वाप्र) ०उडणें–(ल.) घोलण्यांत भलतीकडे वाहवणें; विसंगत विधानें करणें. २ चारी दिशांना उधळणें. ०काढणें–(घोडा इ०) भरधांव पळविणें; चौखुर दामटणें. ०निघणें-उडणें-लागणें-जाणें–चौखूर, भरधांव पळूं लागणें.

**चौबक**—स्त्री. विटीदांड्च्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. विटी खालीं पडूं न देतां वरचेवर दांडूनें चार वेळां लागोपाठ उडविण्याची क्रिया.

**चौबंदी**—स्त्री. १ गांवठी कागदाचा ताव, प्रत्येकाचे दोन वखें (पानें) असे याचे दुमडून चार बंद केलेले असतात. २ (कागद इ० कांची) चार घड्या पाडलेली स्थिति, गुण. ३ घोड्याच्या चारी पायांस नालबंदी करण्याची क्रिया; नव्यानें नालबंदी करणें. –वि. चारांचा बनलेला. १ चार बंद वखें ज्यास आहे तो (गांवठी कागदाचा ताव). २ चारी पायांस मारलेले (घोड्याचे नाल). ३ चार बंदांनीं गांठलेलें (कुंपण इ०). ४ चतुर्गुणी; चारपट; चारांनीं संबद्ध. [ हिं. चौबंदी ]

**चौबळा**—वि. चौकोनी –शर.

**चौबा**—पु. एक ब्राह्मण जात. चोभा पहा. चार वेदांचा अभ्यास करणारा ब्राह्मण असा मूळ अर्थ असुन हल्लीं उत्तरहिंदुस्थानी अशिक्षित ब्राह्मणास म्हणतात.

**चौवार-रा-री**—पुन १ चव्हाटा; नगरांतील चार रस्ते ज्या ठिकाणीं मिळतात तो चौक. 'म्हणौनि वाचेचा चौवारा। घातलिया धर्माचा पसारा।' –ज्ञा १६.२२३. 'तपोव्रताचिया विंध्या। गुंडाळोनि देहनाम बाहुलिया। वाचेच्या चौवारिया। ज्ञान देती पोसणें।' –मुआदि १ ६२. २ (घरासमोरील) चौक; अंगण 'रिठेमाळ अति बरवी। करीं घेऊनिया सादावी। नद चौवारा जाऊनि।' –निगा ११. ३ चौपारी; दिवाणखाना; मंदिर. 'हाट चौहोटे तीवरी। मढ मंडप चौवारी। देखे

धर्मशाळा।' –मर १० 'नवरत्नांची चौघारी।' –शिशु ६११. [चौ+फा धार=दरबार, मंदिर]–क्रिवि चोहोंकडून, सर्वबाजूंनी 'उगवरा दिनराज बाण आले चौबारा।' –ब ६०५ [चौ+बारी=खिडकी, बार=द्वार]

**चौपारी**—स्त्री सोंगट्यांच्या खेळांतील पारिभाषिक शब्द चार एकरंगी सोंगट्या मेळ्याने होणारा, येणारा डाव, दान, चौरटी

**चौपारी**—वि. एकामागून एक असे चार बार करणारा (फटाका) [चौ+बार=आवाज (बंदुक इ० कांचा)]

**चौबारी**—वि घरांतून चार वर्षां (फळांचा) बहार देणारें झाड [स चतुर्+वार, चौ+वार=वार, बहर]

**चौबुरजी**—स्त्री १ चार बुरूज असलेली गढी, कोट, लहानसा किल्ला 'त्या चौबुरजीत सारे दहा शिपाई आहेत' २ शत्रूपासून बचावाचें ठिकाण, लहान दुर्ग ३ एक प्रकारचा लांकडी किल्ला असा किल्ला संरक्षणाकरितां करीत असत व त्यांतून तोफांचा मारा करतां यावा म्हणून भिंतींत भोकें ठेविलेलीं असत. ४ असमानी महाल, उंचावरील तटबंदी केलेला महाल, वाडा इ० –वि चार बुरूज ज्याला आहेत असा (किल्ला इ०) [चौ=बुरूज]

**चौबे**—पु ब्राह्मणांतील एक जात. चोबा-भा पहा [स चतुर्वेदी, हिं चौबे]

**चौभास**—वि १ चार भाषा जाणणारा २ (ल) हुषार, चलाख, तरतरीत, जाणता, चौकस [चौ=चार+भाषा]–क्रिवि (चार भाषा प्रांतांत) चोहोंकडे, चारी बाजूला, सर्वत्र 'उदीम चालला चौभास। वावरवर्णा धारिखा।' –मुआदि २५ ५३

**चौमास**—पु चार मास, चार महिन्यांचा काल, विशेषत पावसाळ्याचे चार महिने [स चतुर्मास प्रा चाउमास, चौ=चार+मास=महिना, तुल० हिं चौमास गु चोमासु]

**चौमुलुख**—क्रिवि चारहि मुलखांत, सर्वत्र 'चौमुलुख धिंड काढून।' –सप्रामगीतें ३५ [चौ+मुलुख]

**चौमुळी**—वि (प्र) चौमोळी पहा

**चौमेखणें**—उक्रि. हात पाठीमागें बांधणें, मुसक्या बांधणें, चतुर्भुज करणें [चौ=चार+मेख]

**चौमेर**—स्त्रीपु चवाठा [स चतुर्=चार, प्रा दे मेरा=मर्यादा म चौ+मेर=(शेताची) मर्यादा, कड]

**चौमेर-रीं-रें**—क्रिवि (शेताच्या) चारी बाजूनीं मेरांनीं, कडांनीं, चौफेर, चहूंकडून ना तरी रणीं शव साडिजे। तें चौमेरी गिधीं विदारिजे।' –ज्ञा २ २०० 'तें शेत चौमेर सारखें लागलें आहे' [स चतुर्+मेर]

**चौमोळी**—वि चार पाखी असलेले, चौपाखी (घर इ०) [चौ=चार+स मौलि=शिखर, मोळ=छपराचें पाखें]

**चौर**—स्त्री १ (काव्य) (प्र) चवरी पहा २ चवा, चवर गोंडा पहा. [चवरी]

**चौर**—पु जमीन मोजण्याचें एक परिमाण, (प्र) चाहूर पहा

**चौरकानी**—वि. (दुमडून घड्या पाडलेल्या कागदाच्या) चार रकान्यांना व्यापून असणारी (रेघ). ०रेघ-ओळ–स्त्री दुमडलेल्या कागदाच्या चार रकान्यांतून जाणारी- रेघ, ओळ, मुलीस, विद्यार्थ्यास, आश्रितास पत्र लिहितांना मधी (चार रकान्यांतून जाणारी) ओळ काढतात (क्रि० काढणें, आढणें) [चौ+रकाना]

**चौरंग**—पु १ चार पाय असलेली, स्नान इ० करतांना बसावयास घेण्यासाठीं केलेली लांकडी चौकी, लांकडाचें चौकोनी, चार पायांचें आसन, बैठक २ (ल) वि हातापायानें विरहित असा, पंगु 'त्या पतोनि राजकन्येसी सांगती। कीं चौरंगा करा जो निश्चिती। तो दैदेर तम्न्याच्या गृहाप्रती। पाणी हांकीत बैसला।' –शनि २३६ [स चतुर्+अंग, प्रा चउरंग] (बाप्र) चौरंगणें–उक्रि (एखाद्याचे) हातपाय छाटून पंगू करणें, चौरंग बनविणें. [चौरंग] ०होणें, हातापायाचा चौरंग होणें–१ (थंडीनें, दुखण्यानें) शरीर आंखडणें, बधण्याचा एक प्रकार 'करून चौरंग चौरंग देहाचा।' –भज ५४ २ (चोर इ०) हातपाय जखडून बांधला जाणें ०वायु–पु घोड्याचा एक रोग, यानें घोड्याचे चारी पाय धुजतात –अश्वप २ १८०

**चौरंगी**—पु चौरंगीनाथ, नवनाथांपैकीं एक, हा हस्तपाद विरहित होता 'तो मत्स्येंद्र सांगी। भमावयवा चौरंगी। भेटला कीं तो सर्वांगीं। संपूर्ण जाला।' –ज्ञा १८ १७५३ –वि १ चौरंगाप्रमाणें, चौरंगासंबंधीं. २ बधयाचा एक प्रकार –शृंदि १ १६३ ०राघू–पु एक वनस्पतिविशेष

**चौरडोल-ली**—पुस्त्री अंबारी, चवरडोल पहा 'काम सुनेरी बहुत मुलायम चौरडोल हलकडिया।' –दप ५८ –साहद ७ ५२

**चौरपंचक**—न (ज्यो) चोरपचक पांच अशुभ मुहूर्तांपैकीं एक अग्निपचक, मृत्युपचक राजपचक व हानिपचक हीं इतर चार अशुभ पचकें होत या मुहूर्तावर प्रवासास निघाल्यास चोर दरवडेखोर यांपासून त्रास होतो अग्निचक पचक पहा.

**चौरली**—स्त्री चोरवेळ, चोरळी पहा –हको

**चौरशी**—स्त्री एक प्रकारचा सामता, सुताराचें छिद्र पाडण्याचें एक हत्यार किकरें चोरशी पहा

**चौरस**—पु ज्याच्या सर्व बाजू समान व सर्व कोन काटकोन असतात तो चौकान, समचतुष्कोन –वि १ चौकोनी, चतुरस्र,

(शेत इ०) २ साफ तासून चौरसानी केलेला (इमारती लाकडाचा तुकडा, खाव इ०) ३ (ल) चतुर हुशार चौरसानी चिरा हर एक कामात प्रवीण [स चतुर्=चार+अस्र=कोन प्रा चउरस हिं चौरस गु चोरस] सामासशब्द- ०पण-न चौरसपण, प्रमाणबद्धता कोनाचा प्रमाणशीरपणा 'परि ते माझ कैसे। दवा चेनि कृपावस। दोन्ही माडले मरिस। चौरसुपणें।' -ऋ ७१ [चौरस] ०मान-न चौरस माप प्रमाण क्षेत्रमान जमीन इ० काचें क्षेत्र लिहिण्याची साधण्याची पद्धति उदा० १०० चौरस यार्ड चारशें चौरस फूट [चौरस=च कोनी क्षेत्र+मान=मोजणें]

**चौरस्ता**—क्रिवि चारी अनेक रस्त्यावर रस्त्यातून चारी रस्त्याच्या बाजूनें चारी बाजूनीं चोहोंकडून चौफेर [चौ+रस्ता]

**चौरों पडणें**—अक्रि (कु) एखाद वस्तूला फार मागणी असणें

**चौराशा**—स्त्री (को) एक सुतारी हत्यार चोरशी चौरशी पहा

**चौं(चौ)री**—स्त्री मोर्चेल चवरी पहा वसूनशानी दानी फडकवर चौरी उडवीत। -विवि ८ ४ ८० ०वर्दार-वारदार-पु चवरी ढाळणारा चवरीवरदार पहा

**चौरेचाळ-चाळीस चोरेताळ-ताळीस**—वि ४४ संख्या चाळीस आणि चार चवरचाळीस पहा [स चतुश्चत्वारिंशत् प्रा चउत्तालीस हिं चौआलीस चवालीस गु चुम्मालीस]

**चौरे(ऱ्या)हत्तर**—वि ७४ संख्या सत्तर आणि चार [स चतुस्सप्तति प्रा चउहत्तरि हिं चौहत्तर गुज चुम्मोत्तर]

**चौर्य**—न चोरणें चोरण्याची क्रिया [स]

**चौऱ्याण्णव**—वि ९४ संख्या नव्वद आणि चार [स चतुर्नवति, प्रा चउणउइ हिं चौराणव गुज चोराणु]

**चौऱ्यायशी चोऱ्याशी**—वि १ ८४ संख्या एंशी आणि चार २ (ल) चौऱ्याशी लक्ष योनी जीवास प्राप्त होणार अनेक जन्म 'उत्तम तनु जाइल मग फेर चौऱ्याशी फिरणा।' -दप ६८ अघ संचित दोषानें फिरणें चौऱ्याशीं। -दसपदें १ ९३ [स चतुर शीति प्रा चउरासी हिं चौरासी] (वाप्र) ०आसनें-नअव हठयोगातील (योगयाच्या) बैठकीच्या निरनिराळ्या चौऱ्याशी तऱ्हा शरीररचना उदा० शीर्षासन पद्मासन, मयूरासन वकासन सर्वांगासन इ० म्ह०(माम्य) एका शरीवर चौऱ्याशी आसनें =एकच मनुष्यास अनेकांनीं अनेक कामें पहावीं लागणें -चाफेरा-फेरका-पु १ चौऱ्यायशी लक्ष योनींतून भ्रमण, पुन्हा जन्म पुन्हा मरण असें ८४ लक्ष वेळा होणें जीवास चौऱ्यायशीलक्ष निरनिराळ्या देहातून रूपातून भ्रमण कल्यानंतर मोक्ष मिळतो अशी हिंदूची समजूत आहे तसें पुढें जन्मनरा। तुटवी चौऱ्याशीचा फेरा। -एकनाथ तुका म्हणे नहाणा हाईर मल्हारा। चाऱ्याशीचा फेरा फिरों नको।' -तुगा ३०१८ २ (ल) पुनर्जन्म संसारयातना पुन चाऱ्यायशीच्या फेऱ्यात पडलात म्हणून समजा -नामना ४१ ३ (ल) अत्यंत गुंतागुंतीची स्थिति न उकलता येणारा घोटाळ्याचा प्रश्न ०जन्मयातना-स्त्री चौऱ्यायशी लक्ष योनींतून जन्ममरणाच्या भ्रमणाचें दुःख न चुकता जन्म चाऱ्याशी यातना। -निगा १२४ ०लक्षयोनि-लक्षजीवयोनि-स्त्रीअव जीवाला एका मागून एक घ्यावयाच निरनिराळे चौऱ्यायशी लक्ष जन्म चौऱ्याशीलक्ष योनींतून फिरल्यानंतर जीवाला मोक्ष प्राप्ति होते अशी हिंदची समजूत आहे चार अडज स्वदज व उद्भिज या चार खाणींतून उत्पत्ती निरनिराळ्या एकवीस लक्ष योनी मिळून चौऱ्याशी लक्ष योनी होतात किंवा २० लक्ष वृक्षादि स्थावर योनी ११ लक्ष कीटकयोनी ९ लक्ष जलचर योनी पक्ष्यांच्या १० लक्ष योनी ३० लक्ष पशुयोनी व ४ लक्ष मनुष्ययोनी मिळून ८४ लक्ष योनी होतात प्राप्त चौऱ्याशी लक्ष योनी।' -दप ३६ चौऱ्याशीलक्ष जीवयोनी। शास्त्रीं अवघे नेमुनी बोलिलें असे। -दा १० ६ ३

**चौऱ्याहत्तर**—वि ७४ संख्या सत्तर आणि चार चौरेहत्तर पहा

**चौल**—न लहान मुलाची शेंडी राखण्याचा विधि चूडाकर्म चोळें चौल तें कुमारावस्था जाण। ब्राह्मणपण उपनयनें। -एभा २१ १५१ [स]

**चौली**—स्त्री दोन आणे किंमतीचें (चांदीचें) नाणें दुवेली (प्र) चवल-ली पहा

**चौवा**—पु १ चव्वा गंजिफातील पत्त्यांतील कोणत्याहि रंगाचें चार ठिपक्यांचें पान चव्वा पहा (२) फाशाच्या खेळातील चाराचें दान [चार]

**चौवा(व्हा)टा**—पु चार रस्ते जेथें एकमेकास मिळतात तें ठिकाण चौक चवाठा अर्थ १ पहा [चा+वाट]

**चौविशी**—स्त्री चाविसांचा समुदाय -वि चोवीस भाग ज्याच्या पोटात आहेत असा (गेर इ०) [चोवीस]

**चौवीस**—वि २४ संख्या वीस आणि चार चोवीस चव्वीस [स चतुर्विंशति प्रा चउवीस हिं चौवीस गु चावास]

**चौवेचाळ-ताळ चौवेचाळीस ताळीस**—वि ४४ संख्या चाळीस आणि चार चौरेचाळ पहा

**चौवेत-वेती**—वि चार वेळा व्यालेली (गाय म्हैस इ०) [चौ=चार+वेणें=प्रसवणें वेत]

**चौशाला**—पु शल्यागारखें एक वस्त्र अंगावरी चौशाला दोन जोडिया हात्या -पद १८ ८८ [चौ=चार+शाला=वस्त्र विशेष]

**चौशीं-र्यां**—क्रिवि (गो) चारी बाजूंनीं, चहूंकडून 'चौशीं सक्ट आयली' [चौ]

**चौशेरी**—स्त्री चार शेरांचें माप, वजन —वि चार शेरांचें बनलेलें (माप, वजन) [चौ=चार+शेर]

**चौस**—पु (गो) खाणणाचा भाग, [चौ]

**चौसर**—चौसार पहा

**चौसष्ट-ट**—वि ६४ संख्या, साठ आणि चार [सं चतु षष्टि, प्रा चउसट्ठी, तुल० हिं चौसठ, गु चोसट-ठ] सामाशब्द—

**०कला-कळा**—स्त्रीअव लिहिणें वाचणें गाणें नाचणें, चित्रें काढणें इ० चौसष्ट कौशल्याचीं कामें 'चौदा विद्या चौसष्ट कला' या चौसष्ट कला कोणत्या याबद्दल निश्चित मत नाहीं सर्व कलांची यादी करयास त्या चौसष्टापेक्षां जास्त भरतील निरनिराळ्या ग्रंथातून चौसष्ट कलांची भिन्न भिन्न यादी आहे श्रीमद्भागवत, शुक्रनीति, वात्सायन कामसूत्र वार्ताविद्या दण्डनीति इ० कांत चौसष्ट कलांच्या भिन्न भिन्न याद्या आहेत त्यांपैकीं वात्स्यायन कामसूत्रांतील यादी पुढें दिली आहे—१ गायन २ वादन ३ नृत्य ४ नाट्य ५ आलेख्य=लिहिणें वगैरे ६ विशेषकच्छेद्य=निशाण मारणें ७ तण्डुलकुसुमबलिप्रकार=तांदूळ व फुलें यांच्या तऱ्हतऱ्हेच्या आकृती करणें ८ पुष्पास्तरण=फुलांचे गालीचे काढणें ९ दशनवसनांगराग=निरनिराळ्या रंगांनीं दात सुशोभित करणें वस्त्रावर वेलबुट्टी काढणें व अंगास उटी लावणें अंग गोंदणें इ० १० मणिभूमिकाकर्म=त्रिकोण चौकोन इ० आकृतींनीं जमिनीवर रत्नांची, मण्यांची रचना करणें ११ शयनरचना=नाना तऱ्हेच्या बिछायती वगैरे घालणें व बिछायती वस्तू नीटनेटक्या ठेवणें इ० १२ उदकवाद्य=जलतरंग यासारखीं वाद्यें तयार करणें व वाजविणें १३ चित्रयोग=मातीचीं चित्रें तयार करणें १४ माल्यग्रथनविकल्प=फुलांचे हार तुरे गजरे इ० तयार करणें १५ शेखरापीडयोजन=तुरे इ०नीं मुकुट टोप सुशोभित करणें १६ नेपथ्यप्रयोग=नाटकांतील पात्रें (पडद्या आड) रंगविणें, त्यांना नटविणें इ० १७ सुगंधयुक्ति=सुवासिक पदार्थ तयार करणें १८ कर्णपत्रभंग=कानावर कोंवळ्या पाकळ्या ठेवून ते सुशोभित करणें १९ भूषणयोजन=सोन्याचे अलंकार करणें घालणें नीटनेटके ठेवणें इ० २० ऐंद्रजाल=जादुगिरी २१ कौचुमारयोग=अंग रंगवून निरनिराळीं रूपें धारण करणें बहुरूप्याची कला २२ हस्तलाघव=हातचलाखी २३ चित्रशाकापूपभक्ष्यविकारक्रिया=नाना तऱ्हेच्या भाज्या व पक्वान्नें तयार करणें २४ पानकरसरागासवयोजना=नाना तऱ्हेचीं पेयें करणें तऱ्हेतऱ्हेच्या रसांचीं पुटें देणें पदार्थांवर निरनिराळे रंग देणें व मद्य तयार करणें २५ सूचीवायकर्म=शिवणकला २६ सूत्रक्रीडा=बाहुल्या नाचविणें भोंवरे फिरविणें इ० २७ वीणाडमरुक वाद्यवादन=वीणा डमरू इ० वाद्यें वाजविणें २८ प्रहेलिका=उखाणे जिंकणें २९ प्रतिमाला=भेंड्या लावणें ३० दुर्वाचकयोग=कठोर वर्णमिश्रित श्लोकपठण ३१ वाचन ३२ नाटकाख्यायिकादर्शन=नाटकें प्रहसनें इ० करून दाखविणें ३३ काव्यसमस्यापूरण=दुसऱ्यानें दिलेला अपूर्ण श्लोक पुरा करून देणें ३४ पट्टिकावेत्रबाणविकल्प=छडी पट्टा, बाण तरवार इ०वाच्या उपयोगांत नैपुण्य ३५ तक्षकर्म=कातरकाम, जाळ्या इ० करणें ३६ तक्षण=सुतारकाम ३७ वास्तुविद्या=घरें बांधणें ३८ रौप्यरत्नपरीक्षा=रत्नें व नाणीं यांची परीक्षा करणें ३९ धातुवाद=अशोधित धातु शुद्ध करणें इ० ४० मणिरागज्ञान=रत्नांना रंग देणें इ० ४१ आकरज्ञान=खाणी कशा व कोठें सांपडतील इ० सांगणें ४२ वृक्षायुर्वेद=वृक्षाची जोपासना वाढ व त्याचें आयुष्य वाढविणें इ० विषयीं ज्ञान ४३ मेषकुक्कुटलावकयुद्धविधि=एडका कोंबडा लावी पक्षी यांच्या झोंब्या लावणें ४४ शुकसारिकाप्रलापन=पोपट मैना इ०कांना बोलावयास शिकविणें ४५ उत्सादन=पतंग उडविणें ४६ केशमार्जनकौशल=केसांना नानाविध तेलें लावणें व त्यांची नानाविधप्रकारें रचना करणें ४७ अक्षरमुष्टिकाकथन=मनांतील अक्षरें विचार इ० व मुठींत काय आहे तें सांगणें ४८ म्लेच्छित कुतर्कविकल्प=करपत्री, नेत्रपल्लवी इ० भाषांची योजना करणें ४९ देशभाषाज्ञान=देशभाषा जाणणें ५० पुष्पशकटिकानिर्मितिज्ञान=बागबगीचे करणें इ०चें ज्ञान ५१ यंत्रमातृकाधारण=गूढ यंत्रें तयार करणें ५२ मातृकासवाच्य=मंत्र टाकणें भारणें ५३ मानसी काव्यक्रिया=न बोलता मनांतल्या मनांत काव्यें रचणें ५४ अभिधानकोश=अनेक कोशांचें ज्ञान ५५ छंदोज्ञान=छंद शास्त्राची माहिती ५६ क्रियाविकल्प=चमत्कार करून दाखवणें ५७ वस्त्रगोपन=वस्त्रें नेहमीं नवीं राहतील अशा युक्तीनें ठेवणें कापसाचें वस्त्र रेशमी दिसेल असें करणें ५८ छलितकयोग=खुपमस्करीपणा ५९ द्यूतविशेष=जुगार, फासे खेळणें इ० ६० आकर्षक्रीडा=दुसऱ्याची मत्ता (मनानें) स्वहस्तगत करणें ६१ बालक्रीडनक=लहान मुलांचीं खेळणीं बनविणें इ० ६२ वैनायिकीविद्याज्ञान=विघ्नें नाहींशीं करण्याची जादू, युक्ति इ०चें ज्ञान ६३ वैतालिकी विद्याज्ञान=भूत वेताळ, पिशाच्च इत्यादिकांविषयीं ज्ञान ६४ वैजयिक विद्याज्ञान=एका प्रकारच्या मंत्रविद्येचें ज्ञान इ० —ज्ञाको क १५३ अधिक माहितीकरिता —ज्ञाको भाग १०, कला व —मसाप १ २ ७ पहा [चौसष्ट+कला]

**चौसष्टा**—स्त्री १ एकाच जातीच्या चौसष्ट वस्तूंचा समुदाय २ (एका पदार्थाच्या) एकाच रंगाच्या चार सोंगट्या मारल्या गेल्यानें अंगावर येणारी बाजू (सोंगट्यांतील) चौबारी ३ चौसष्ट कला 'शिणल्या बहुत चौसष्टी। स्वरूप तुझें वर्णितां। —ह ३ ४ [चौसष्ट] **०पिंपळी**—स्त्री चौसष्ट प्रहर खलून औषधाकरितां तयार केलेली पिंपळी [चौसष्ट+पिंपळी] **०मूर्छना**—स्त्रीअव मूर्छनेच

(स्वरभेदाचे) ६४ प्रकार 'तर्गे साही राग छत्तीस भार्या। चौसष्टी मूर्च्छना दावूनिया। अनेक उपरागाच्या क्रिया। गाइल्या तेव्हा रिमाने।'–ह २१ ११९

**चौसा**—वि (वाइ) खालच्या व वरच्या दाढा आलेला (बैल इ०) 'हा खोंड चौसा आहे [चौ]

**चौसार चोसारखेळ**—पु १सोंगट्या, बुद्धिबळाचा खेळ २ बुद्धिबळाचा, सोंगट्याचा पट, इ० –वि १ चार सोंगट्यासबधी, चार -सारासबधी, बुद्धिबळाच्या खेळातील एक पारिभाषिक शब्द २(प्रा) चौकोनी [स चतुर्=चार+सार=बुद्धिबळातील सोंगटी प्रा चउसार]

**चौसा(स)रणी**—स्त्री चौथ्यानदा (नांगरण्याची, वाचण्याची आवृत्ती करण्याची) क्रिया करणे –क्रिवि चौथ्याने चौथ्यानदा [चौसार] **चौसा(स,रणे**–उक्रि (नांगरणे, वाचणे उजळणी करणे इ० क्रिया) चौथ्यादा करणे चवथी पाळी करणे [चौ+सारणे]

**चौसीम**—स्त्री चौथ्या प्रकारची हलकी जमीन –वदलापूर ३६८ [फा]

**चौसोपी**—स्त्री १ चार सोप्याची जागा वाड्याचा एक भाग, चौक 'मानकरी, सरदार वगैरेंची तजवीज चौसोपीत लावावी' –डुकराची शिकार २ २ चार सोप्याचा समुदाय –वि चार सोप्याची (इमारत, घर इ०) [चौ=चार+सोपा]

**चौह(हा)टा**—पु चोहटा पहा 'मग म्लेंछाचे वसौटे। दागर्णे हन केकाटे। का शिविरें चौहट। नगरींच ते। –माज्ञा १७२९४ [चौ+हाट]

**चोहद्द**—स्त्री चतु सीमा दाखविणारा तक्ता, नकाशा [चौ=चार+हद्द]

**चौहो(हा)ट**—पु चौकाकृति दुकाने, चौकातील चतुर्वीही दुकाने चोहट, चोहटा चव्हाठा पहा 'रचनाविशेषे विचित्री। हाट चौहोटे तीयरी।'–ऋ २० [चौ+हाट]

**चौहाशी**—वि चारी बाजूना नक्षीदार काठ असलेली (शाल इ०) [हिं चौ=चार+हाशिया=काठ किनारा]

**चौहु**—वि चारहि 'अत करणचतुष्टय चौहु श्रुतीसि वरिलें। –ब ५८७ [चौ=चार+ही प्रत्यय]

**चौळा-ळी**—चवळा-ळी पहा

**च्यरित्र**—न (प्र) चरित्र पहा [चरित्र अप]

**च्यवणें**—अक्रि १ (काव्य) घसरणे ढळणे पडणे 'जननीकुक्षींतूनि क्रोधें च्यवला म्हणानि ता च्यवन।'–मोआदि ३१७ २ (ल) पतन पावणे भ्रष्ट होणे नीतिमत्तेपासून ढळणें, चळणें विंडादक क्रियांगेंपें च्यवती सव पूर्वज। –वामन राम गोवी गीता १४१ [स च्यवन=पडणे]

**च्यवन**—न १ घसरणें, पडणे, दूर होणें च्युति २ पाजरणें स्रवणें गळणें [स]

**च्यवन**—स्त्री (गो) कलावतीण, नायकीण

**च्यहरा, च्यहरेदार-बाज**—चहरा, चेहरदार पहा

**च्या, च्याव**—पु (गो) चहा (अप)

**च्याऊम्याऊ**—स्त्री ल्हान मुलाचा एक खेळ यात मुलें एकमेकाचे कान धरून गाणें म्हणतात या खेळातील पदारभीं च्याऊम्याऊ इ० शब्द आहेत च्यावम्याव पहा

**च्याच्या**—स्त्री १ पक्ष्याच्या पिलाचा किंवा पक्षी दुखावल्यावेळचा, पकडल्यावेळचा आवाज किंचाळी, चावचाव २ (ल) पिरपिर करणें रडगाणें लावणें, गयावया करणें (क्रि० करणें) –क्रि व १ गयावया करीत पिरपिर करीत २ पक्षाच्या पिलानें केलेल्या दुखापतीच्या आवाजासारखा आवाज करीत [ध्व]

**च्यान**—प्रत्यय (कुण गो) पासून या अर्थी उदा० कालच्यान=कालपासून (देवाच्यान, गळ्याचान यातील च्यान शब्द शपथवाचक 'ची आण' असा आहे)

**च्याप्या**—स्त्रीक्रिवि १ मोठ्या कुटुंबातील चिल्यापिल्याचा एकत्रित गोंगाट २ (ल) पोरेंबाळें, चिलींपिलीं 'माझ्या मागें च्याप्या आहे, तुम्ही सडसोट!' [ध्व]

**च्यामर**—न. चामर, चवरी 'च्यामरें वीजणें विळासती।' –वेसीस्व १८५ [स चामर=चवरी]

**च्यार**—वि चार पहा

**च्यारी**—वि चारही 'ऐसे च्यारी आत्मे।'–दा ८७४५

**च्यावच्याव**—स्त्री. च्याच्या, चिवचिव, ओरड, वटवट, गोंगाट [ध्व]

**च्यावम्याव, च्याऊम्याऊ**—स्त्री १ ल्हान मुलाचा एक खेळ २ (ल) भित्रेपणानें कच खाणें, माघार घेणें, कचरणें [म्याव द्वि]

**च्युत**—वि भ्रष्ट झालेला पडलेला, गळालेला, घसरलेला, गळित (समासात) पदच्युत स्थानच्युत, अधिकारच्युत वधच्युत इ० 'नातरी जळदच्युता। पाणिया उचित सरिता। –ज्ञा १८ ८८६ कामबाणीं नव्हे च्युत। यालागीं नावें तो अच्युत। –एरुस्व ७५९ [स]

**च्युति**—स्त्री १ घसरलेली, खालवलेली स्थिति, अवस्था, भ्रष्ट अवस्था उतरती कळा ऱ्हास २ (शाप) मार्ग सोडणें सरणें सरकणें (इ) डिव्हिएशन [स] ०द्वाण पु जहाजावरच्या लोखडाच्या आकर्षणानें ख चिंदूमधून जाणाऱ्या वर्तुळाहीं होणारा यत्राच्या सुईनें केलेला कोन

**च्येल**—न (गो) तावडा व जाड कपडा [स चेल]

**च्योड**—पु (गो) पवे ब्राह्मणाचा मुलगा [चड]

# छ

छ—वर्णमालेंतील सातवें व्यंजन. आधुनिकाक्षराच्या घडणीच्या चार अवस्था आहेत पहिली अशोकाच्या गिरनार लेखांत, दुसरी इ. स. पहिल्या व दुसऱ्या शतकांतील मथुरेच्या लेखांत, तिसरी ११ व्या शतकांतील उज्जयिनी लेखांत व चवथी तिसऱ्या अवस्थे पासून बनली आहे.

छ—उद्गा. १ नापसंती किंवा तिरस्कार दाखविणारें अव्यय; 'छ हा काय मागतो बगाळ आपलें!' छि! छि! थू! थू. २ जुन्या कागदपत्रांत छ अक्षरी गण मुसलमानी तारखेसाठीं (चंद्र या अर्थी) लिहिलेली असते. जसें–छ ५ मोहरम=मोहरमची पांचवी तारीख ३ पोथीच्या शेवटीं समाप्तिसूचक चिन्ह म्हणून लिहितात

छई—स्त्री. मानमोडीचा गुरांचा रोग. [ ]

छक—पु (लोहारी) वस्तु पकडण्यासाठीं जबड्याच्या आकृती सारखी पकड, चक. [इं. चेक, तुल० सं. चक्=प्रतिघात करणें]

छक(क)ड—स्त्री. १ थप्पड, चपराक (क्रि० मारणें) २ (ल.) दुर्दैवाचा फेरा, तोटा (व्यापारांत). (क्रि० बसणें, येणें). ३ लुच्चेगिरी, कपट. (क्रि० देणें). 'वाण्यानें मला धान्यांत छकड दिली.' ४ पैशाचा तगादा. (क्रि० बसणें). 'सावकाराची छकड बसली तेव्हां गुरें आड करून पैसा द्यावा लागला' ५ गाण्याचा एक प्रकार, लावणी. 'डफावर थाप मारून छकड म्हणतो.'–नाकु ३ ७४. ६ वादविवाद झगडा, झोंबी तंटा. [स. चक्=प्रतिघात करणें, हिं. ध्व]

छकडभेद—पुअ. युक्त्या, कपट, डावपेंच. [हिं. छकड+भेद. स. शकट+भेद]

छकडा—पु १ एकबैली गाडी (दारूगोळा, सामान, तबुडेरे वगैरे न्यावयाची). २ तशा घातलेली गाडी ३ (व.) रेंगी पेक्षा किंचित मोठी गाडी रेंडू पायटाणी, रकला, एक्का. [स. शकट] छकडी—स्त्री. छकडा पहा

छकडी—स्त्री सहा संख्येचें माप किंवा गट समुदाय (कागद, फाशावरील सहा ठिपके, आव, रुपये इ०चा) तिफाशी सोंगट्यांतील सहाचें दान [स षट्क] ०चें माप—न. पाचाचा फाडा (फळाचा पण प्रत्येक फाड्यावर एक जास्ती शेकडा घेतला असता एकशेंवीस फळें मिळतात) सहाच्या गटानें केलेलें माप.

छकडें—न लहान मुलाचें लाडकें नांव छकुडें. 'दैव लहानें मुलें आलें छकडे।' –दावि ३८०.

छकणें—अक्रि १ खाडणें रघ मारणें (व्यापाऱ्याच्या वही मधील चाव) २ फसणें, ठकणें ३ आश्चर्यचकित होणें, गोंधळून जाणें, दिपणें. स. चक्=प्रतिघात करणें]

छकल-ली—स्त्री. तुकडा, भाग, फाट, फोड. [स. शकल]

छकाछकपणी—स्त्री. फसवणूक, हुलकावणी. (क्रि० दाखविणें) [छकणें]

छकाछकी—स्त्री. १ सांडणें, रेघ मारणें, बदलणें. शुद्ध करणें. २ फसविणें. मूर्ख बनविणें धाप्यावर बसविणें. [छकविणें]

छक(का)विणें—सक्रि. फसविणें ठकविणें. [छकणें प्रयोजक]

छकाछकी—स्त्री. १ (व.) चकमक, झटापट. २ (व) थाटाची मेजवानी. 'आज आमच्या येथें छकाछकी आहे.'

छक्क—वि. १ आश्चर्यचकित–भरित, विस्मित भ्रांत. २ (व) अतिशय अशक्त. 'दुखणें लागल्यामुळें त्याची प्रकृति छक होऊन गेली'

छक्कड—स्त्री झगडा. छकड अर्थ ६ पहा. 'शास्त्रीय पद्धतींतील हेत्वनुमानांची केवळ बुद्धिग्राह्य नीरस छक्कड सुटल्याचें कोणासही ... वाईट वाटणार नाहीं.' –नीर ४६२. ०भेद–छकडभेद पहा. ०धापडी–स्त्री आधळीकोशिंबिरीचा खेळ.

छक्का—पु. १ पत्त्यांतील सहा ठिपक्याचा पत्ता. २ फाशांतील सहा हें दान. ३ सहाचा समुदाय. ४ छक्कापंजा पहा. [षट्क] ०पंजा–पु. पत्त्याचा खेळ. छक्केपंजे–अव १ लबाडी, कपट युक्ति डावपेंच लपंडाव २ (काव्य) कट; भेद, अतलीपिसा ३ बनावटपणा, नकलीपणा फाल्हाळ. (पंजाच्या ठिकाणीं हातचलाखीनें छक्क्या किंवा छक्क्याच्या ठिकाणीं पंजा आणतात त्यावरून वरील अर्थ लाक्षणिक बनले आहेत) (क्रि० करणें, ओळखणें) [सं. षट्क, हिं छक्का=सहा+सं पंच, पंजा=पांच]

छचोर-रा—वि. रंगेल, हलकट चटोर, बदफैली [सं. छित्वर–छित्तर–छिच्चर–छिचोर, छित्वरो धूर्त (उणादि २८८) –भाग १८३२.] ०री–छिछोरी–स्त्री. छचोरपणा, हलकटपणा

छट—वि १ लुच्चा, सोदा, कपटी, फसव्या. २ कृपण, चिक्कू [स शठ]

छटका—पु १ धपली, तुकडा (क्रि० उडणें, उडविणें) २ पुष्पगुच्छ ३ (ल) शेवटास गोंडा असलेला लहानसा चाबूक [ध्व.]

छटकारा—पु (सोनारी) रेगोटाळीनें दागिन्यावर काढलेली बारीक रेघ [ध्व]

छटफट—स्त्री टवाळी, निंदा, छी–थू (क्रि० करणें, लावणें मांडणें चालविणें) –क्रिवि निंदा करून टवाळी करून [ध्व]

छटा—स्त्री १ रंग छाया लहर, पद्धत, लकब (बोलणें, विचार करणें इ० ची) २ चव लज्जत लकेरी 'ह्या औषधांत तुपाची छटा मारते' ३ प्रतिबिंब, झाक उपाधि अर्थ १ पहा 'स्फटिकावर जास्वंदीची छटा मारते म्हणून तांबूस दिसतो' [स क्षिप्त, प्रा छित्त]

**छटा**—पु १ छप्पा, टप्पा मर्यादा, आटोका, पल्ला २ शैली [ हिं ]

**छटा(टां)क**—पु शेराचा सोळावा भाग (वजनी, मापी) [ सं षट्+टंक ]

**छटाकी**—स्त्री १ छटाकभाराचें वजन किंवा माप २ (ल) सुग्रास जेवणास कुत्सितार्थी म्हणतात (पूर्वी एक छटाक तूप प्रत्येकास वाटण्यात येत असावें) 'आज छटाकी कोणीकडे झाली ?'

**छगाछट-टां**—क्रिवि खपाखप सटासट अशा त्वरेनें कापताना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन [ ध्व ]

**छटेल-ला**—वि १ छिंगलेला, मत्त २ बदफैली छचोर दुर्व्यसनी, मोकाट छाकटा

**छट्टा**—पु १ टप्पा अंतर पल्ला छटा पहा 'तो गाव एथून दाहा कोसाच्या छट्यावर आहे' २ डाग 'जुन्या ओल्या रंगावर छट्टे पडले असतील —मॅरट ७४ **बाणाचा छट्टा गोळीचा छट्टा**—पु बाणाची फेंक, गोळीचा पल्ला

**छड**—पु (काशी) सळ (खणाचा), घडीमुळें पडलेली रेघ

**छडणी, छडणूक**—स्त्री १ छळणूक, त्रास, यातना (ल) २ (ल) बारीक तपास, कसून तपासणें [ छेडणें ]

**छडणें**—उक्रि १ त्रास देणें छळणूक करणें, गांजणें 'यैसे बहुता + + + छडून काईल केले. —पेद ६ ५५ २ (ल) कसून, खोदखोदून विचारणें, छेडणें तपासणी करणें ३ सुर लावणें (गाण्याचा), रागदारींत म्हणणें जसें—ताल छडणें, राग छडणें ४ सतार, वीणा, बीन वाजविणें [ हिं छेडना. स छिद्-छेद् ]

**छडा**—पु १ बारीक तपास चौकशी माग, पत्ता, ठिकाण (वस्तूचा) (क्रि० लावणें लागणें) २ रेशमाचा गोफ किंवा सोन्याची साखळी (जिच्यामध्यें हातातील किंवा गळ्यातील दागिना ओवलेला असतो) ३ खिशातील घड्याळाची साखळी. ४ धाग्याचें शेवट, टोंक [ छडणें ] ०**छड**—स्त्री. बारीक तपास परीक्षा

**छडाछड-डां**—क्रिवि. सपासप, छडीनें किंवा फटक्यानें मारिलें असताना होणाऱ्या आवाजाप्रमाणें [ ध्व ]

**छडी**—स्त्री. १ वेताची चमकी, बारीक लांब काठी २ चोपदाराच्या हातातील चांदी-सोन्याची काठी ३ वस्त्रातील विशिष्ट रंगाची रेघ, ओळ, पट्टी 'छडी जुनरी रंग नाना तऱ्हेची।' —विठ्ठल द्रौपदी वस्त्रहरण ७१ म्हण० छडी लागे छमछम विद्या येई घमघम, छडी कांहीं लागेना विद्या कांहीं येईना, छडीवर पडली सावगी आम्हांस विद्या पावली ०**दार-बरदार**—पु चोपदार —वि छडीसारखे उभे पट्टे असलेलें (कापड) ०**पट्टा**—पु दांडपट्ट्यासारखा काठी आणि फरीचा खेळ [ स. शर. हिं छड-छडी ]

**छड्डू मारणें**—सक्रि दंड थोपटणें (कुस्तीपूर्वी) [ हिं ]

**छण-कण-कन्-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि. विशिष्ट आवाजासह, ठण-कण-दिशीं, रुपये मोजताना होणाऱ्या आवाजासारखा आवाज करून [ ध्व ]

**छणछण-णां**—क्रिवि. १ ठण-कन-दिशीं सामान्यत रोख, सरळ, मुक्त हस्तानें पैसा देणें या अर्थी 'छण छण रुपये दिल्यावाचून कोणी कोणाचा ओशाळा होत नाहीं' २ पायातील चाळांच्या किंवा घुंगुराच्या होणाऱ्या आवाजासारखा ध्वनि होऊन (क्रि० छणछणणें) **छणछणाट**—पु १ छणछण असा मोठा आवाज २ (ल) दुष्काळाची मोठी हाकाटी खणखणाट ३ जोराची चावाचाव (माशा, डास यानी केलेली) **छणाणणें**—अक्रि. छणछणणें पहा **छणछणणें**—सक्रि रुपये, ताशा इ० चा छणछण असा आवाज होणें

**छणी**—स्त्री (वे) १ छिणी, दगड कोरण्याचें टोंकदार एक लोखंडी हत्यार [ सं छिद् ]

**छत्**—उद्गा १ हट, फट छि! फू! तिरस्कार, नापसंतिदर्शक उद्गार २ नकार, निषेधदर्शक उद्गार

**छत**—न १ पर्दई तक्तपोशी अभ्रा, आच्छादन चांदणी; चादण (कापड, फळ्या, चुन्याचा गिलावा याची) 'महाली जरीचा छत चिरवीला।' —पला ४ ३ (क्रि० बांधणें भरणें) २ तेज, चकचकाट ३ (काशी) गच्ची [ सं छत्र छद्=आच्छादन करणें ] ०**बांधणें-भरणें**—पराकाष्ठेची बहार करणें रंग आणणें शोभा आणणें (उत्तम गवई गाताना, किंवा उत्तम वक्ता बोलताना अनुक्रमें गाण्याला आणि विषयाला) **छतविणें**—उक्रि छत लावणें, चादवा लावणें

**छतार**—स्त्री सहा तारांचें एक ततुवाद्य. सतार [ सं षट्+तारा हिं छेतार ]

**छनीननऊ**—पुअव (तीन फाशाचा खेळ) फाशावरील नऊ सख्येचें दान (जसें एका फाशावरील ६ एकावरील २ व एकावर १)

**छत्ता**—पु (ना) छत्री [ हिं. स. छत्र ]

**छत्तिशी**—स्त्री १ छत्तीस परिमाणाचें वजन (तोळा, शेर) मण इ०चें) २ छत्तिसांचा समुदाय (माणसें, गुरें इ०चा) ३ (कों) छत्तीस माणसांची आवश्यकता असणारें काम, किंवा भजन ४ (वैद्य) छत्तीस औषधांचा समुदाय **छत्तीस**—वि ३६ संख्या [ सं षट्त्रिंशत्=छत्तीस ]

**छत्तिसाचा आंकडा**—पु (ल) दावा वितुष्ट ३६ या आंकड्यांत एकमेकांचीं तोंडें विरुद्ध दिशांस दिसतात त्यावरून ज्यांचें कधीं पटत नाहीं असें वैर याच्या उलट ६३ **छत्तीस भार्या**—

स्त्रीअव (संगीत) छत्तीस रागिणी 'तेणें साही राग छत्तीस भार्या। चौसष्टी मूर्च्छना दावूनिया। अनेक उपरागाच्या क्रिया। गाइल्या तेव्हा रिसालें।'–ह १५ ११९ **छत्तिसा**–वि (व) कावचाज, धूर्त

**छत्र**—न १ राजचिन्हाची छत्री (विशेषत पाढऱ्या रंगाची) २ देवाच्या मूर्ती–प्रभावळीस आकडा वसवून त्याच्या टोंकावर बसविलेली व देवाच्या डोकीवर येण्यासारखी चांदीची, सोन्याची छत्री ३ (ल) आश्रय, संरक्षण 'रडे गोपिकाबाई एकटी छत्र दिसेना नयनीं।'–ऐपो १३५ ४ छत्री (पावसाळयात वापरण्याची) ५ (काशी) अन्नसत्र [सं] ०**धरणें**–स्वारींत असताना राजावर छत्री धरणें, गाढवावरून धिंड काढताना केरसुणीचें छत्र धरणें 'कैकेयीचें शिरोवपन करून छत्र धरोत कोणीही।'–रावि १० १९७ 'मेघानीं छत्र धरिलें=आकाश मेघाच्छादित झालें' [स] ०**चामर**–राजवैभवाचें चिन्ह, छत्री आणि चौरी राजचिन्हदर्शक वस्तु [सं छत्र+चामर] ०**चामर–सिंहासन**–न राजचिन्हें, राज्याधिकारदर्शक वस्तु ०**पति**–पु १ सार्वभौम राजा; श्री शिवाजी महाराजांनीं ही पदवी धारण केली होती ती त्यांच्या वंशात शेवटपर्यंत होती २ श्री शिवाजी महाराजांनीं पाडलेलें तांब्याचें नाणें याच्या एका बाजूस दोन आडव्या रेघा असतात व दुसऱ्या बाजूस 'श्री शिवराज छत्रपति' अशीं अक्षरें असतात याला दुदंडी पैसा असेंहि नाव होतें, सरासरी वीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात हें नाणें प्रचारांत होतें ३ (काशी) अन्नसत्रांत जेवणारा म्ह० छत्रपति कीं पत्रपती=राजा किंवा भिकारी ०**बंध**–पु छत्राकार कोष्टकांकित चिन्ह करून प्रति कोष्टकात अक्षरें लिहितात त्यात छत्रांत पाति अक्षरें दैवस्थानी जातात, तीं द्विवार वाचलीं म्हणजे श्लोक होतो तो ०**भंग**–पु वडील माणसाचा मृत्यु मृताच्या आप्तेष्टाकडे समाचारास गेलें असता (मृत मनुष्य वडील असेल तर) छत्र नाहीसें झालें असें म्हणतात पूर्वकालीं विधवा स्त्रीच्या समाचारास गेल्यावर 'छत्र मोडलें' असें म्हणण्याचा परिपाठ असावा असें कोशार्यावरून दिसतें. 'वैधव्ये नृपनाशे च छत्रभङ्ग प्रकीर्तित।'–निकांडशेष –मसाप २ ३८

**छत्राक**—न अळवें, कुत्र्याचें मूत [स छत्र]

**छत्री**—पु १ ऊन्ह किंवा पाऊस लागू नये म्हणून मेघडवरी आकाराचें डोक्यावर धरावयाचें साधन छत्ता, आतपत्र २ समाधिवर तीवर बांधलेली इमारत ३ छत्राक, अळवें, एक वनस्पति, याचा देठ आणि पानें छत्रीसारखीं असतात आणि त्याचा उपयोग श्रावणातील रविवारी पूजेकरिता करितात –वि छत्रधारी, छत्रपति [सं. छद्=आच्छादणें, झांकणें, छत्र]

—वि राजावर छत्री धरणारा

**छंद**—पु १ शब्दांची गानयोग्य विशिष्ट रचना, काव्याचें वृत्त 'गायत्री छंद जे म्हणिजे'–ज्ञा १० २८३. २ ध्यास, ओढा, आवड (चाल्या–वाईट गोष्टींची) (क्रि० घेणें, धरणें, लागणें). 'असा धरि छंद। जाइ तुटोनिया भवबंद।' ३ उत्कट इच्छा, आग्रह; हट्ट, नाद, सोस 'ऐसा नाथिला छंदु अंत करणें। घेऊनि ठाके।'–ज्ञा ६.७४ ४ मर्जी इच्छा, खुषी 'यजमानाच्या छंदानें आम्हास चालावें लागतें.' ५ खोडया, उनाडपणाचें वर्तन, त्याली खुशाली. 'ती नाना छंद करून मोकळी झाली'–निचं ४५ ६ कांचेच्या बांगडीवर रंगीबेरंगी लाखेची नक्षी केलेली हातांतील एक प्रकारची बांगडी ७नक्षीदार, चांदीच्या जाड सुताचें पायांत घालावयाचें पैंजण ८ वेदाचें एक अंग, छंद शास्त्राचा ग्रंथ [स.] **छंदास लागणें–भरणें**=नादीं लागणें, मोहून जाणें सामाशब्द०**खोर–बाईक**–वि छांदिष्ट लहरी, नादी ०**फंद–चिछंद**–पुअव चाफळपणा, खोडया ढग, धुमाकूळ, नखरे (क्रि० करणें, मांडणें, लागणें) 'अजुनि किती दाखवसील छंद फंदें।'–होरा ८९ ०**मरण**–न इच्छामरण 'छंदमरण अति दुर्जय अमरांत नसे असी महा मरता।'–मोभीष्म ११ १५४. **छंदःशास्त्र**–न श्लोकादिकांच्या रचनेसंबंधीं प्रमाणभूत असणारें शास्त्र वृत्तशास्त्र **छंदानुरोध**–पु दुसऱ्याच्या कलानें जाणें, आर्जव, खुशामत **छंदिष्ट**–वि १ छंदखोर पहा २ चेष्टेखोर विनोदी [सं छदस्] **छंदीफंदी**–वि वाईट चालीचा, सवयीचा, छंदखोर व्यसनी **छंदोबद्ध**–वि पद्यरूप, कवितावद्ध **छंदोभंग**–पु (काव्य) गणाच्या नियमाचें उल्लंघन गण मोजण्यातील चूक, वृत्तनियमाचें उल्लंघन, अनियमित रचना **छंदोवती**–स्त्री (संगीत) चौथ्या श्रुतीचें नाव

**छदाम**—पु १ पैशाचा एकचतुर्थांश (नाणें) दोन दमडया, सहा दाम २ (ल) अल्प अंश, किंचित भाग, जवळजवळ अभाव 'एथे छदाम मिळावयाचा नाहीं.' 'मी तुझा छदाम लागत नाहीं' =यांहीं एक मिळायचें नाहीं–लागत नाहीं इ० [सं. षट्+द्रम्म, हिं छे+दाम]

**छदोन आठ**—पु (तिफाशी खेळ) फाशावरील आठ हें दान (एकावर सहा व दोहोंवर एक एक असें) [छ+दोन+आठ]

**छद्म**—न १कपट, लुच्चेगिरी, कपटाचा वेष समासांत छद्मकृति–भाषण–वाक्य–वेश–व्यवहार 'छद्में कल्याण नसे ऐकावें प्रथम हें तदुक्तपण।'–मोसभा ६ १०१ २ व्यंग, दोष, छिद्र, उणेपणा 'कोणाचें छद्म दहाजणांत काढू नये' ३ उपरोधिक भाषण किंवा त्यांतील खोंच, वर्म 'त्यास गर्भ श्रीमंत म्हणून म्हणताच खुष झाला, पण आंतील छद्म त्याला समजलें नाहीं' ४ इंगित, मतलब, गर्भितार्थ (कविता, वाक्य यांचा) 'ह्या श्लोकांतील छद्म निघाल्यावाचून तो चांगला समजणार नाहीं' [स]

**छद्मी**–वि १ कपटी, खोडकर, मतलबी २ मर्मभेदक, तिरमट

छन—स्त्री (वे) छिनी पहा

छन्न—वि आच्छादित, झाकलेलें [स छद्=आच्छादणें]

छन्नी—स्त्री भोंक पाडण्याचें, तोडण्याचें हत्यार छिणी पहा

छपणें—अक्रि लपून बसणें, दडणें, गुप्त रहाणें [स क्षिप्, हिं छिपना] छपवणी, छपवणूक, छपावणी—स्त्री लप विण्याची क्रिया यावरून घालणें छपवाछपवी—स्त्री. छपवणी

छपविणें-छपावणें—सक्रि लपविणें, दडविणें (शब्दश व ल)

छप(प्प)न्न—वि ५६ अक, पन्नास अधिक सहा, ५६ देश, भाषा व सस्कृतकोश आहेत अशी समजूत आहे 'छप्पन्न देश अनुतापें नाचनाती तथवा।'—ह ५ ७८ [स षट्पचाशत, प्रा छपन्न] ०वेळ-हजार—क्रिवि अनेकवार या अर्थी (यावरून) छपन्ना, छपन्न्या—वि १ अनेक देश हिंडून, अनेक भाषा शिकून आलेला (माणूस), त्यावरून २ (ल) लुच्चा, धूर्त, फसव्या ०दिवाळ्या—वि सदोदित दिवाळें काढणारा

छप(प्प)र—न १ घरावरचें आच्छादन, कौलार २ ताटी, चौकट (घराची पाखी झाकण्यासाठीं, सावलीसाठीं, वाटल तेथें उभी करिता येण्यासारखी) ३ पलगावरचें छत ४ झोंपडी, खोंपट ५ (ल) डोक्यावरील वाढलेले केंस ६ (चाभारी) चपलेच्या खालच्या तळावरील वरचें तळ (क्रि० कापणें) [फा सिपहर= आकाश, गोल, स क्षिप्=टाकणें, हिं छपर, प्रा छिप्पीर=गवत, तृण] ०पलंग—पु छत असलेला पलग किंवा खाट ०बद—पु १ शाकारणी करणारा माणूस २ खोटीं नाणीं पाडणारी एक गुन्हेगार जात, यात छेपुडे आणि बारा गुडे असे पोटभेद आहेत गुजा ०बंदी—स्त्री १ शाकारणी २ तात्पुरत्या झोंपडया बाधणें बांधलेल्या झोंपडयाची रांग —वि छपर असलेलें, छपरी छपरी—स्त्री १ ल्हान झोंपडी, खोंपटी २ (व) पडवी, ओसरी

छपाई—स्त्री १ छापण्याची क्रिया २ छापण्याची मजुरी [छापणें]

छपा(पा)छप—क्रिवि छटाछट पहा [ध्व]

छपेली—स्त्री १ वाडयापुढील चुनेगच्ची २ आगाशी, तगाच्या वरील गच्ची, सफेली [फा सिफाली=मातीचें केललें]

छप्पा—पु १ शिक्का, उठाव मोहोर (क्रि० मारणें) २ कपाळावरील गधाचा टिळा (क्रि० लावणें) ३ शत्रूवर अचानक घातलेला हल्ला (क्रि० घालणें) साका पहा [स क्षिप्, हिं. छपना] (बाप्र) ०चढणें—शत्रूवर जोराचा हल्ला करणें, पुष्कळ नाश होणें (रागानें) ०छप्पी—स्त्री छपाछप पहा कापाकापी, सपासपी 'पहिल्यांनी गोळागोळी झाली मग छप्पी चालली [ध्व] ०पाणी—न एक मुलींचा खेळ हा खेळ पुष्कळ मुली एकत्र होऊन खेळतात त्यांत एकीवर शिवण्याची पाळी येत व तिनें कोण त्यादि एका मुलीस शिवून डाव फेडावयाचा असतो ती मुलगी आता आपणास शिवणार असें जर एखाद्या मुलीस वाटलें तर तिनें बसावयाचें व जिच्यावर डाव असेल त्या मुलीनें बसलेल्या मुलीच्या डोक्यावर छप्पा घालावयाचा व तीस दुसऱ्या मुलीनें हात दिल्याशिवाय तिनें उठावयाचें नाहीं (क्रि० घालणें) छप्पी—स्त्री. (कोल्हापुरी) छडी (क्रि० खाणें)

छब—स्त्री १ आकार, ठेवण आकृति, घडण, रूप (विशेषत प्रिय). २ नीटनेटकपणा, सौंदर्य, शोभा, चालण्याचालण्याची ढब, मुद्रा, नूर [स छवि, हिं छब] ०कडा-डी—वि सुंदर, मोहक, गोजिरवाणा छबडें—न गोजिरवाणें मूल ०दार—वि १ सुंदर, सुरेख आकाराचा डौलाचा २ मनाला आवडणारा, मोहक (काम, आकार, रूप) छबना-न्या—वि गोंडस सुरेख, नीटनेटका, मोहक, विशेषत (पोकळ, दिखाऊ) छबिला-छबेला—वि गोजिरवाणा छबदार पहा

छ(छा)बडी—स्त्री फळें वगैरे ठेवण्याकरितां बांबूची केलेली करडी

छबि(बी)ना—पु १ घोडदळाचा पहारा, रातपहारा (लष्कर किंवा किल्ला याच्या भोंवतालचा, लष्कर चालू असता आघाडीचा, राजा, देव याच्या मिरवणुकीस असणारा) 'जागो जाग छबिने भाऊच।'—ऐपो ११३ स्वारीमध्यें असणारें घोडदळ किंवा पायदळ २ आरमारातील पहारा करणारें जहाज किंवा काफिला ३ (कु) कस्टम खात्याची पहारेकऱ्याची जलद जाणारी होडी, सरकारी प्रवासी गलबत याच्या बांधणींत व आकारात बराच फरक असतो [फा शबीना]

छबी—स्त्री तसबीर, चित्र [फा शबीह्] ०दार—छबदार पहा.

छबुकडा—छबकडा पहा

छब्बा—पु १ सकेतानें रुपयास म्हणतात 'आज दक्षिणा छब्बा आली कीं छत्रपती?' २ सुंदर, सुरेख, हुशार मुलगा

छमकणें—अक्रि १ छणछणणें पहा २ (स्त्रीचें) ठुमकत चालणें [ध्व]

छम-कर-कन्-दिनीं-दिशीं—क्रिवि दागिन्याचा छम छम आवाज, पैशाचा आवाज, छडीच्या माराचा आवाज यासारखा आवाज होऊन [ध्व]

छमकाविणें—उक्रि सढळ हातानें खर्च करणें

छमछम-मा—क्रिवि छमकन छणछण-णा पहा

छमछमाट—पु छणछणचा मोठा आवाज (नृत्य त्याली खुशाली यामध्यें) ०छमा—स्त्री छमछमाट पहा [ध्व]

छरा—पु (गवडी) तीन घमेलीं वाळू व एक घमेलें सिमेंट याच्या मिश्रणाचा भिंतीवर सडकून मारावयाचा लेप [ध्व नं छर]

छर्दी—स्त्री ओकारी, उलटी [स छर्द=ओकारी]

**छर्रा**—पु १ बंदुकीची बारीक गोळी २ खिळे, दगड, गोळ्या वगैरेचा तोफेंतील बार, खुर्दा [स क्षर्=क्षरणें हिं ] **छर्रे उडविणें**–(ल) जोरदार आणि आवेशानें भाषण करणें

**छल–ळ**—पु १ कपटवेष, रूप, सोंग २ ढोंग, थतावणी ३ त्रास, सतावणी ४ कपट, लुच्चेगिरी 'धर्म म्हणे छळ करिसी मर्यादा त्यजुनि दाविसी कामें।' –मोसभा ४५ [स ] **छलक**–वि छळ करणारा, त्रास देणारा **छलना**–स्त्री छळ अर्थ ३ पहा

**छल(ळ)कट**—वि (कों) उंच आणि सडपातळ

**छल्ला**—पु हाताच्या बोटांत घालावयाची अटपैलू सोन्याची आंगठी, सत्र [स छल्ली=लता हिं ]

**छल्ली**—वि (व) छचोर छाकटा

**छवि**—स्त्री प्रकाश, कांति तेज लावण्य, सौंदर्य, शोभा [स छवि. तु० फा शबीह]

**छळ**—छल पहा [स छल] **छळीं छळणें**–त्रास देणें **छळक–छळणा**–छलक, छलना पहा **छळण–छळणी–छळणूक**–नस्त्री छळ अर्थ ३ पहा **छळणें**–उक्रि १ त्रास देणें, गांजणें, सतावणें २ भयभीत होणें **०वाद**–पु १ छल अर्थ ३ पहा २(राजा)त्रासदायक स्वभाव **०वादी**–वि छलक पहा 'छळवादी आणी दोषी।' –दा २ ३ १२ [छल]

**छाउ**—पु आश्रय, सावली [स छाया]

**छाउणी–नी**—छावणी पहा

**छाक**—स्त्री झाक

**छाकटा**—वि छटल पहा मदोन्मत्त, नखरेबाज, छचोर, धुंद [स शठ]

**छाकणें**—अक्रि झिंगणें, नशा करणें (दारू पिऊन)

**छाग, छागल**—पु १ बोकड २ कातड्याचा पोहरा [स] **छागवस्त्र**–न लोकरीचें कापड 'तिळ कृष्णाजिन छागवस्त्रें।' –एुच ३७६

**छां–छुं–छू**—उद्गा १ जादू, मंत्रतंत्र करतांना म्हणावयाचा मंत्र २(ल) दिखाऊ प्रयत्न थोडवर 'त्यानीं घटकाभर छांछू करून किल्ला स्वाधीन केला' पोकळ आरडाओरडा धामधूम खोकला, खाकरा (लक्ष वेधण्यासाठीं केलेली) 'यजमान उगाच क्षणभर येऊन छांछू करून जातात पण तितक्यानेंच लोक सावध असतात' [ध्व ]

**छाट**—पु १ खाप तुकडा, धांदोटी २ तोडावयाचा किंवा तोडलेला भाग (पाहिजे असलेला आकार यावा म्हणून) ३ खालीं उरलेला गाळसाळ निवडून टाकलेला भाग, ४ वर्गीकरण, निवड 'हीं दीमर माल्यें सारखीं नाहींत छाट करून घ्रती लावा ५ (हिं) चाती –वि (ना) लबाड धूर्त धुरंधर. [स खडन, हिं ] **०छूट**–स्त्री १ छाट अर्थ १ पहा २ कापणें टल्पा ३ (ल) छाटणी **छाटणी**–स्त्री कापणी, तोडण्याची क्रिया छाट पहा **छाटणें**–सक्रि १ कापणें, तोडणें, भादरणें, कातरणें २ खुडणें ३ वर्गवारी लावणें, निवडणें 'व्यापारी लोक फळें सरसकट घेऊन छाटून विकतात ४ भट्टींत न घालतां वस्त्र चुबकून धुणें ५ झटकन कापणें 'तरवारीनें गळा छाटला' ६ हलक्या हातानें मळ नाहींसा करणें, झाडणें ७ कपात करणें (पगार, खर्च यांत) ८ गप्पा मारणें, वादविवाद करणें (गप्पा, राजकीय वर्तमान) ९ (पाणी वगैरे) शिंपडणें १० श्वास, दम कोंडून धरणें ११ कत्तल करणें (सैन्याची) १२ प्रवाहांतील पाण्याची धार हातानें तोडीत पोहणें, या अर्थांचे पुढील शब्दहि आहेत कत्तल करणें–उडविणें, खांडोळी करणें, लेखण्या करणें, सफाई, लोथी, लोदी पाडणें खापलणें, गुच्छे पाडणें, सफा उडविणें (कफ, रोग) छाटणें–या रोगासंबंधीं चर्चा करून निदान करणें [स खडन हिं छाटना]

**छाटा**—पु १ एक थेंब, शितोडा, तुषार (क्रि० मारणें उडविणें, उडणें, येणें) २ टप्पा, छटा पहा 'तो तथून मिळल्यास सोळा कोसाचा छाटा होता' –भाव ६८ ३ डाग, ठिपका (रत्नांतील एक दोष) [छाटणें] **०छाट**–स्त्री १ कापाकापी २ (ल) कपात (पगारात, खर्चांत)

**छाटी**—स्त्री १ संन्याशाचें अंगावरचें वस्त्र २ नाक पुसावयाचा हातरुमाल [सं शाटी]

**छाटीव**—वि १ कापलेला, छाटलेला २ वेंचक; निवडक छाटणें पहा

**छाड**—पु गुराचा एक रोग, घटसर्प

**छाण**—स्त्री परीक्षा, छाणणी; तपासणी, निवड [स शाण]

**छाता**—पु (काशी) १ छत्री २ मधमाशीचें पोळें [स छत्र]

**छाताड**—न छाती (तिरस्कारानें किंवा आश्चर्यानें ह्रंद छातीस म्हणतात) [छाती+आड]

**छाती**—स्त्री १ वक्षस्थळ, उरोभाग २ स्त्रियांचे स्तन ३ (ल) धैर्य, धाडस हिंमत साहस जास्त माहितीसाठीं उर शब्द पहा [सं वक्षस+स्थिति] (वाप्र) **०करणें–काढणें**–धैर्य दाखविणें **०चा, छातीदार**–वि धाडसी धैर्यवान **०चा काट**–पु अतिशय धाडसीपणा धैर्यवान होणें (क्रि० करणें) **०चा व्यापार**–पु नफ्यासाठीं फार दिवस वाट पाहण्याचा व्यापार धाडसी व्यापार **०धडधडणें**–धडकी भरणें भीति वाटणें **०पिटणें**–दुःखानें छाती बडविणें **०फाटणें**–दुःखानें अंतःकरण विदीर्ण होणें **०भरून येणें**–दुःखाचा उमाळा येणें दुःखानें हृदय दाटणें **०ला हात लावून म्हणणें–सांगणें**–खात्रीपूर्वक, न कचरतां सांगणें **०वर करून–काढून–चालणें**–ऐटींत चालणें

०वर दगड ठेवणें-( ल ) संकटात टाकणें, पाडणें ०स लावणें-आलिंगिणें सामाशब्द- ०ठाव-पु छातीइतकें खोल पाणी याच्या उलट घुडत ठाव ०ठोक-क्रिवि सडेतोड धैर्यानें निर्भयपणें ०दार-वि छातीचा पहा ०पूर-वि १ रुंद आणि भरदार उराचा २ धीट धाडसी, धैर्यवान ०फोड-स्त्री उरस्फोड पहा [ हिं ]

छात्र—पु शिष्य विद्यार्थी [ स ] -आश्रम-पु विद्यार्थी रहावयाची जागा, ( इ ) बोर्डिंग होस्टेल

छात्रक—न घोड्याची चौथी चाल [ स ]

छादस—पु वेदशास्त्रसंपन्न पुरोहित; उपाध्याय [ स छद]

छादसवृत्ति-छादिष्ट-छार्दास-छादसी-१ वैदिक रनादी, राडकर, टवाळ, नादिष्ट ता हवाईक लहरी मूळ शब्द छदस=वेद वेदात इर्लीच्या व्याकरणाच्या नियमाहून भिन्न अशी पुष्कळ रूपें आहत त्यावरून छादस (छादिष्ट) म्हणज नियमाला सोडून वागणारा, स्वैरवर्तन करणारा असा अर्थ चालू छादसी म्हणती हा मुळा हुनि।'-दावि ३२ ०धाडा-पु छादिष्टपणा

छान—स्त्री चाळणी, शोध, तपास विचार, वनन ( मराठींत याचा उपयोग मुख्यत लाक्षणिक करितात ) [ स चालन किंवा क्षारण, हिं छान=चाळणी ] छानणी-नी-स्त्री बारीक तपास, परीक्षा वादविवाद, उहापोह छानणें-सक्रि १ गाळणें २ चाळणें ३ ( ल ) बारीक तपास करणें, चोकशी करणें ४ ( ल ) निव डून काढणें

छान—स्त्री १ ऐट, नखरा, झकपक 'चक्रीदार पागोटें घालून छान करून कोणीकडे चाललास?' २ डामडौल सौंदर्य टवटवीतपणा ( घर, बाग, कपडे याचा ) ३ चांगुलपणा उत्तम पणा, लज्जत खुमारी (विषयतृप्तीच्या जिन्नसाबद्दल) पुण्याच्या तपकिरींतील छान काहीं निराळीच आहे ' ४ टीका उजळा 'आमच्या प्रतिपक्ष्याची वरील शब्दनयावर उडविलेली छान होय -नि ५११ -वि अतिशय उत्तम झळकफळक वस्तु छानदार 'हें फळ मोठें छान आहे ' [ अर शान ] ( वाप्र ) ०उतरणें उडणें-चांगलें होणें सुशोभित होणें कालच्या गाण्याची मोठी छान उतरली उडाली ०मारणें-थाटमाट करणें प्रावीण्य दाखविणें सामाशब्द- ०छु छो)की-स्त्री डाम डौल दिमाख चनीपणी शोभा नखरेपणा [ अर शान-उ-शौकत ] ०छूक-छोक-वि अक्कडबाज डौलदार थाटमाट कर णारा, चकचकादगी झाकदार ऐटबाज ०दार-वि १ सुरेख भपकेबाज डामडौलाचा २ छानछूक पहा [ फा शान्दार=प्रति ष्ठित ] ०दारी-स्त्री भपका डामडौल सुरेखपणा 'त्याचा स्वभाव छानदारीचा आहे -वाप्रसंगा ५१ ०मोड-पु अपमान अप्रतिष्ठा, पाणउतारा

छानी—स्त्री टेप गौरव 'किंवा हेंहि तितकें पसंतीस न पडून याहूनहि छानी करण्याचें मनात आणल्यास '-नि ११? [ छान ] छानीवा-वि सुंदर छानदार थाटमाटाचा

छाप—पु १ टाईप ठसा, मिळा, छापण्याचें अक्षर २ ठसा छापण्याचें साधन ३ थाप (तबला, मृदंग यावरील) ४ ( ल -स्त्री ) वर्चस्व, दाब 'त्या पंडिताची सर्वांवर छाप बसली ' ५ परि पूर्णता, पूर्ण कौशल्य नैपुण्य त्याचा बालण्याकरण्याचा छाप यारा बारा जन्मात यावयाचा नाहीं ' ६ हात टाकणें ( पोहण्यात ) ( क्रि० टाकणें ) -स्त्रीन खोगिराखालचें बुरणूस घामोळें नमदा, अडीच हात लांब, दोन हात रुंद आणि सनंध असल्यास स्त्रीलिंगी व तुकडा असल्यास नपुसकलिंगी वापरतात शिक्का [ स चप्= दाबणें हिं ] ०टाकणें-डामडौल करणें प्रयत्न करणें जोगचा प्रयत्न दर्शविणें ०देणें-भूलथाप देणें छापेखालीं-एखाद्याच्या वजनाखालीं (क्रि० असणें चालणें वागणें निभणें) ०कागद-(कु) टिपकागद ०कार छापारी-वि (गो) शिक्का छापणारा, करणारा ०खाना-पु १ छापण्याचा कारखाना, मुद्रणालय २ टाकसाळ ०छूप-स्त्री १ डागडुजी साफसफाई (क्रि० करणें) २ ( ल ) थापाथापी, हुलकावणी धाब्यावर बसविणें (क्रि० करणें ) ०णावळ-छपाई छापण्याची मजुरी छापणी-स्त्री छपाई ठसे मारणें कापडावर रंग चढविणें

छापणें—सक्रि १ मुद्रित करणें, ठसा उमटविणें एकसारख्या प्रती काढणें २ लिंपणें ( भिंत वगैरे ) ३ ( कु ) शाई टिपणें [ स चप् ]

छापा—पु १ छाप अर्थ १ २ पहा २ छप्पा पहा अचा नक हल्ला [फा चापीदन तुर्की चापीत] ०खालचा गृहस्थ-पु वर्चस्वाखालील माणूस तावदार ०पाणी खेळ-छप्पापाणी पहा

छापारी-पु छापणारा कपड्यावर निरनिराळ्या प्रकारची नक्षी उडविणारा रंगारी लोकांची एक जात [ छापणें ]

छापी—स्त्री १ हातोटी कसब हुकमत प्रभुत्व आदर्शवत्व २ (नाशिक) नाक पुसावयाचें फडकें चिलमीखालीं गुंडाळावयाचें फडकें शापी -वि १ ठसा मारलेलें छापलेलें २ राजाचा छाप असलेला ( फा द ) ३ विशेष प्रकारचा छाप असलेला (रुपया) ०खोगीर-पु बुरणुसाच्या बाजू असलेलें खोगीर छापील-व- वि छापी अर्थ १ पहा ०सुलाखी-वि १ छाप आणि सुलाख अस लेलें (रुपया खरा किंवा खोटा आहे हें पाहण्यासाठीं विशिष्ट प्रकारचा ठसा त्यावर आहे किंवा नाहीं ह व भोक पाडून त्यात हिणकस धातु आहे की कसें हें पहावयाचें असे) २ पुष्कळ ठसे मारलेला (रुपया-यामुळें याचें वजन कमी भरतें )

छापेकरी—पु १ नाण्यावर किंवा कचेरींत शिक्के मार णारा अधिकारी २ छापा घालणारा लष्करी अधिकारी

छापो—छप्पापाणी खेळ पहा

छाय—स्त्री छाया, सावली 'दिवस गेलिया टाकील छाय।' –तुगा ७०१ [सं छाया]

छाया—स्त्री १ सावली २ प्रतिबिंब ३ आच्छादन; आश्रय, पडदा, रक्षण 'निवारोनी जाय माया। ऐसी छाया जयाची।' –तुगा ७ ४लक्षण, चिन्ह, निदर्शक गोष्ट (रोग, मनोविकार यांची) 'डोळे पिवळे झाले म्हणून कामिणीची छाया दिसते' 'मुखावर क्रोधाची छाया दिसते' ५ अंधुक प्रतिमा किंचित दर्शन प्रतिबिंब; मुद्रा, चर्या, अस्पष्ट पडछाया 'जोर लागत नाहीं परंतु त्यात राजनीतीची छाया दिसते' ६ थोडेसें साम्य. 'रामभाऊची छाया त्याच्यावर दिसते म्हणून हा त्याचा मुलगा' ७ स्वरूप, कांति, सर्वसाधारण देखावा, टवटवी शोभा 'झाडाला एक महिना पाणी मिळताच त्याची छाया पालटली' ८ (सं नाटकांत) प्राकृतभाषेची अर्थबोधक संस्कृत पदादिरूप व्याख्या ९ छद्म अर्थ ३ पहा १० रूपांतर प्रतिबिंब, प्रतिकृति, भाषांतर 'पण यास भाषांतर ही संज्ञा नसून छाया हें नांव आजपर्यंत चालत आलें आहे' –नि १८३ ११ सूर्याची स्त्री १२ भास [सं] ०धरणें–(पाऊस, मेघ, आभाळ यांनीं) छायेनें, अंधारानें भरून टाकणें ०ग्रह–पु. सावलीनें प्राण्यास खालीं ओढून घेणारा मासा किंवा इतर प्राणी ०चित्र–न १ पडद्यावर पाडलेली चित्राची छाया 'स्वमायेचें आडवस्त्र। लावूनि एकला खेळवी सूत्र। बाहेरी नटी छायाचित्र।' –ज्ञा १८।१३०३ २ सूर्यप्रकाशाच्या साहाय्यानें काढलेलें चित्र, फोटो ०चित्रपेटिका–स्त्री भिंग व आरशाच्या सहाय्यानें पदार्थांचीं चित्रें काढण्यास मदत करणारी एक पेटी या पेटींत एक भिंग (लेन्स) व त्यासमोर पंचेचाळीस अंशाचा कोन करून एक आरसा असतो, त्यामुळें पुढील वस्तूची प्रतिमा एका बाजूस वळवून घेता येते [इं कॅमेरा ऑब्स्क्यूरा] ०नायक–पु सूर्य. 'छायानायकसा निदाघ समयीं छाया करी तो विधू' –र ७ ०निधि–एक पक्षी याची सावली ज्याच्यावर पडेल तो श्रीमंत होतो असा समज आहे ०नुहरण–न टोबळ भाषांतर, अनुकरण ०पुरुष–पु उन्हांत किंवा चांदण्यांत उभें राहून आपल्या छायेकडे सतत पहात असतां एकाएकीं सूर्य, चंद्र यांकडे पाहिलें म्हणजे जो पुरुष दिसतो तो, स्वरशास्त्रांत हा प्रसिद्ध आहे ०मंडप–पु १ छायाचित्र अर्थ १ पहा 'छाया मंडपीची सेना। सृष्टिगारिसींच रचना.' –दा ८।१।३६ २ मॅजिक लॅन्टर्नचा खेळ ०मंडपी–छायाचित्राचा खेळ खेळणारा ०रंग–पु सूर्य ०रोटी–धुगरोटी–दोन कृपणांची गोष्ट एक भाकरीची सावली पाण्यांत पाडून तें पाणी पिई आणि दुसरा भाकरी पाण्यांत बुडवून तें पाणी पिई ०लग राग–पु (राग) दुसऱ्या एखाद्या रागाच्या साहाय्यानें रंजनकारी होणारा राग ०विकार–पु. (कों.) ज्याची सावली पडली असतां मनुष्यास मृत्यु येतो अशी मण्यार (साप)

छायानट—पु (राग) गायन शास्त्रांतील एक राग या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात जाति संपूर्ण, वादी पंचम, संवादी ऋषभ, गानसमय रात्रीचा पहिला प्रहर [सं]

छाल(न, छयीला, छयेला—वि नखरेबाज, सुंदर, अतिशय देखणा, (पुरुष, स्त्री) [हिं छबिला]

छाय—स्त्री छाया [सं छाया, हिं]

छावड-छावडें—न लहान मुलाचें लाडकें नांव, छबुकडें. [सं शावक, हिं छावा]

छावणी-नी—स्त्री १ लष्कराचा तळ २ लष्करासाठीं तात्पुरतें बांधलेलें छप्पर किंवा इमारत ३ (घरावरचें) छपर व त्याची शाकारणी ४ खिडकीवरील किंवा दरवाजावरील चिरांच्या कामाखालील फळी जमिनीच्या पोटांतील नळावरील दगडी छपर किंवा कमान. ०चा दगड–पु वरील कामांत वापरलेला आच्छादनाचा दगड. [सं. छादनी, प्रा छावणी]

छावणें—सक्रि. (ना.) शाकारणें (घर)

छावा—पु १ सिंहाचें, हत्तीचें पिलूं २ (ल) सुंदर मनुष्य, मूल, रेडा, किंवा शूर 'जो होळकराचा छावा.'–विक १४ ३ कोणत्याहि प्राण्याचें लहान पोर [सं शावक, फ्रें जि चावो, छावो]

छि छिछि—उद्गा तिरस्कार, तुच्छता, नापसंती दर्शक अव्यय छिथू–स्त्री फजिती, छीथू, दुर्यो, दुरदुरू (क्रि० करणें)

छिक्का—स्त्री शिंक, शिंकणें (क्रि० करणें) [सं]

छिचडी—स्त्री मासाचा टाकाऊ भाग, नेहमी अनेकवचनीं (छिचड्या असा) वापरण्यांत येतो [छिलणें?]

छिचो(छो)र-री—वि छचोर पहा

छिटकणी—स्त्री (कशी) पडणें, शिंपडणें (पाणी इ०) छिटकाव–पु सडा, शिंपण [हिं छिटकना]

छिटणें–छिटाऊ–छिटाव–छिटाऊबंदर–छिटावणें—शिटणें इ० शिटाऊ पहा

छिटझर्दा—न जर भरलेलें चीट, जरीचें चित्रविचित्र कापड, एक प्रकारचें कापड –देहु १९५ [चीट पहा]

छिटपि(फि)ट—स्त्री तिरस्कारानें नाकारणें छिडिसफिडिस, कमी लेखणें (क्रि० करणें लावणें) [ध्व]–वि सोडलेलें, ओरखडलेलें गिचमिड –क्रिवि धडपडत, फजिती करीत

छिटा-छिट्टा—पु उडविलेला शिंतोडा, डाग मोत्यावरील किंवा फळावरील डाग [सं क्षिप्त, हिं छींटा]

छिटी—वि चिटाचें केलेलें [चीट पहा]

छिड(ट)कणें—क्रि रंगविणें, रंगाचा छिटकाव देणें [सं क्षिप्–फेंकणें, हिं छिडकना] छिडकाव–पु १ शिंपडण्याची

क्रिया शिंतोडे टाकणें २ शिंतोड्यानें पाडलेले डाग किंवा ठिपके [ हिं छिडकाव ]

**छिणा**—स्त्री धातूचा तुकडा तोडण्याचें पोलादी हत्यार

**छिणा(नी)क**—स्त्री शिळक, वाताची कळ, वेदना, शिणक (क्रि० भरणें निघणें मारणें येणें होणें)

**छिंद**—स्त्री कापलेली वस्तु तुकडा शकल –वि छाटलेलें कापलेलें खच्ची केलेलें, तोडलेलें [ स छिन्न ] **छिंदणें**—सक्रि १ (काव्य) कापणें, तोडणें छिन्नभिन्न करणें २ (ना) भिडणें स्पर्श करणें थांबविणें अडथळा करणें [ स छिद ]

**छिद्र**—न १ भोंक छेद पोकळी दर बीळ 'छिद्राचा आश्रय उंदीर कुळवाडी।' –तुगा १९८३ २ (ल) उणीव न्यूनता दोष ३ (ल) प्रवेश बीळ मार्ग गुप्त दोष, कमीपणा गुह्य, अपूर्णता, मर्म मर्माची जागा 'आमची दारू सपली हें छिद्र शत्रूस कळलें तर ते आताच घाला घालील' ४ गुप्त मार्ग (किल्ला) चोरखिडकी, पळवाट ५ कपट छद्म [ स ] **०पाडणें**—प्रवेश मार्ग शोधणें **०पाहाणें**—न्यून दोष पाहणें **छिद्रात निघणें**—टक्के होणें नमणें **०दर्शी–दर्शि**—वि दुसऱ्याचे दोष न्यून पाहणारा **–द्रान्वेषण**—न न्यून पाहाणें दोष पहाणें **–द्रान्वेषी**—वि छिद्रदर्शी

**छिनाल**—वि व्यभिचारी शिंदळ, शिनाळ, बदफैली (पुरुष किंवा स्त्री) [ स छिन्न+नारी हिं छिनाल ] **०खाना**—पु कुंटणखाना वेश्यागृह **०चाळा**—पु वेश्याचे नखरे, हावभाव **०चार्दीचा**—वि व्यभिचारोत्पन्न, व्यभिचारापासून झालेला **०नखरा**—पु छिनाल चाळा पहा **०पुरा**—पु छिनालखाना पहा **छिनाला–छिनाला**—वि १ शिंदळकी करणारा (पुरुष स्त्री) २ निर्लज्ज

**छिनाव(वि)णें**—सक्रि हिसकावून घेणें बळजबरीनें घेणें [ स छिन्न हिं छिनाना ]

**छिनी**—स्त्री मुळ्याच्या पानासारखीं पानें असलेलें झाड

**छिप्पी**—स्त्री शिणी पहा

**छिन्न**—न १ तासलेला पृष्ठभाग २ ओबडधोबड तुकडा किंवा ढपला –वि तासलेलें कापलेलें विभागलेलें [ स छिद्–भिन्न ] **०पुच्छ** वि शेपूट कापलेला **०हस्त–कर्ण–नासिक**—वि हात कान नाक तुटलेला **छिन्नभिन्न**—वि अस्ताव्यस्त, तुकडे केलेले, पाडलेले फाडलेले [ स ] **०कटि**—न नृत्यांत एका पायावर उभे राहून दुसरा पाय ताठ ठेवून पुढें मागें हालवीत राहण्यानें कंबरेचा पुढेंमागें हलत राहण्याची स्थिति फार व्यायामानें थकणें धावणें वीर दाखविण्याच्या वेळीं हा अभिनय करितात

**छिपटा**—स्त्री चिपटी चमची छडी

**छिलका, छिलटा, छिलपा**—पु १ ढलपा, चीप, चिरपी, टरफल २ कातडें, साल [ हिं ]

**छिलणें**—सक्रि तासणें चोळणें रखणें, साल काढणें [ स छिद् हिं छिलना ]

**छिलवा छिलवागजरा**—पु दाट एकमेकात गुतवून केलेली फुलाची माळ, देठें खोवून केलेला पुष्पगुच्छ 'आणवा गहान छिलवा।' –सला ७ [ छिलणें ]

**छिला–छिलें**—स्त्रीन दरवाज्याच्या दुहेरी चौकटीची खालची जोडलेली दोन लाकडें वरच्या लाकडांना घोडा किंवा मेंधरा म्हणतात

**छी**—छि पहा

**छींट**—न चीट रंगविलेलें छाप मारलेलें सुती अथवा तागी कापड, चित्रवस्त्र [ स क्षिप्त ]

**छीट**—स्त्री गीध पक्ष्याची विष्ठा [ स क्षिप्त ]

**छींपा**—वि (माळवी) कपडे छापणारा रंगारी, खडी काढणारा [ छापणें ]

**छील**—स्त्री (सोनारी) चांदी सोनें इ० धातूच्या सुताची गोल कडी

**छु**—उद्गा कुत्र्याला सूचना करण्याचा हाकलण्याचा शब्द **छुक छुत**—उद्गा मांजराला हाकलण्याचा शब्द [ ध्व ] **०छु छु–छु** पहा याच्या उलट यु यु **०छुक म्हणणें–करणें**—शांत राहण्यास सांगणें [ ध्व स तुच्छ ]

**छुट्टा**—पु (गोंड) गोंडी नायकाच्या गळ्यातील कांचेच्या मण्यांची गळसरी

**छुट्टी**—स्त्री सुटी [ स छुट्=छेदन हिं छुटना सुटणें ]

**छुणछुणणें**—अक्रि छुमछुमणें छुणछुणणें तिडीक येणें [ छुणछुण ] **छुणछुणाट**—पु जास्त जोराचा तिडीक छुमछुम **छुणछुणा**—स्त्री तिडीक धडधड, छुणछुण छमछम [ ध्व ]

**छुत**—उद्गा छु पहा छुक [ ध्व ]

**छुमछुम–मा**—क्रिवि घागऱ्याच्या आवाजासारखा छम छम शब्द होऊन 'बहु रुचिर नूपुरें छुमछुमा तशा वाजती।' –क म २ ७५ [ ध्व ]

**छुरिका छुरी**—स्त्री सुरी [ स छुर्=कापणें, पोर्तु=चाकू छाग ] **०बंध**—पु हुन्नर सुरीनें ज्यानीं सन्मान आहे

**छू**—छु पहा **०करणें–म्हणणें**—कुत्र्यास भावण्याचा इशारा देणें (ल) (भांडण वैर करण्यासाठीं) उत्तेजन देणें

**छूट**—स्त्री छटा चकाकी, तेज (रत्नाचें)

**छे छेछे**—उद्गा नापसंति तिरस्कारदर्शक शब्द [ ध्व ]

**छेकणें**—सक्रि छकणें पहा

छेका—पु पाट; रेघ ( खोडून काढण्यासाठीं ओढलेली ) छेकापन्हुति–स्त्री एक अर्थालंकार, वाक्याचा अर्थ फिरवण्यासाठीं असा एखादा श्लेषात्मक शब्द घालावयाचा कीं ज्याच्यामुळें श्रोतयास जो अर्थ समजले असतील त्याहून तो भिन्न व्हावा उदा० ' गवरतपरि पयोधरातें रगडुनि पडतो तुटी । कायहा धीट म्हणावा तरी । ना नराचा मूल कायगे सांग बन्दुम्याहारी । नव्हेगे मारुत मेघोदरीं ' –राला १५ छेकोक्ति–स्त्री वक्रोक्ति, वाकडें, दुटप्पी, उपरोधिक भाषण छेकापन्हुति पहा छेकानुप्रास–पु दोन अथवा अधिक वर्णांची पुनरावृत्ति, वृत्त्यनुप्रासाहून विरुद्ध, गुणभिन्न 'नव्हहि नव्हे ज्या कार्या त्या वाटावा कसास करवाल ' –मो

छेटा, छेडणें, छेडा—छटा, छडणें, छडा पहा (ग्राम्य) छेटपानी करणें–(ना) त्रास देणें खोडी करणें, कुचेष्टा करणें छेडी जाणें–(ना) त्रास दणें वगैरे

छेद—पु १ ल्हान छिद्र भोंक छिद्र पहा २ चीर, फट भेग ३ कापणें दोन करणें, तोडणें ४ (गणित) अंशस्थानीय आकड्यास ज्या अंकानें भागावयाचें तो, मुख्य वस्तूचे किती भाग करावयाचे तें दाखविणारा अंक उ० एकचतुर्थांश यथें एका वस्तूचे ४ भाग करून त्यातील एक घ्यावयाचा ५ (गणित) भाजक ६ अंतर ७ जडपदार्थ उभा–आडवा कापला म्हणजे तो कापलेला भाग (६) सेक्शन [ सं छिद्=कापणें ] ०पाडून लिहिणें–मध्यें जागा सोडून लिहिणें सामाशब्द– ०छेदक–वि १ तोडणारा, कापणारा, भाग करणारा २ (गणित) भाजक ३ छेद अर्थ ४ पहा –पु नक्षत्रांचें स्थान आणि गति दाखविण्यासाठीं काढलेलें चित्र [ स ]

छेदणें—सक्रि १ कापणें, छाटणें तोडणें चिरणें भाग करणें २ मोत्याला वध पाडणें ३ दुभागणें ४ नाश करणें तोडणें कापणें [ स छिद्–कापणें ] छेदन–न छेद, कापण्याची क्रिया. ०बिंदु–पु (भूमिति) ज्या ठिकाणीं दोन रेषा किंवा वर्तुळें एकमेकास छेदतात तो ०रेषा–स्त्री जिच्या योगानें दुसरी रेषा कापली जाते ती छेदनीय–वि छेदावयास योग्य भागाहे छेदभेद–पु तोडमोड ' किंबहुना साडावे । छेदभेद । –ज्ञा १७ २१२ छेदित–वि कापलेला, भाग केलेला छेद्य–वि छेदनीय पहा [ स ]

छेंदणें—अक्रि (व) अडकणें, लागणें आपटणें ' विहिरींतून पाणी काढताना भांडें दगडाला छेंदलें ' [ स छिद् ]

छेलछबि(बी)ला—वि छलछबीला पहा ' नको मला ऊतर बऊ छेलछबल्या रे । –प्रभा १७९ [ स ]

छेला—पु (काव्य) नखरबाज माणूस अक्कडबाज माणूस

छेळणें—न अणकुचीदार लोखंडी गज, पहार, राळें –सक्रि पहार वगैरे टोकणें, टोचणें

छोकरा–री—पुस्त्री मुलगा, मुलगी [ स शावक+रा, प्रा छावक+रा, हिं ]

छोटा—वि ल्हान [ सं क्षुद्र हिं ] ०मोठा–बडा–वि ल्हानमोठा ०हजेरी–स्त्री सकाळची न्याहारी (हा शब्द युरोपियन लोकांच्या बटलरी भाषेंत रूढ आहे) छोटेखानी–वि सरासरीचा, मध्यम, दुय्यम दर्जाचा .

छोटी—पु गुरांचा एक रोग, घटसर्प

छोनछडी—स्त्री (माण) कलवीण स्त्री

छोल—पु (सुनारी) रंधा [ छिलणें ]

छोलदारी—पु तिकोनी तंबू बिया पाल [ स छोरण+धारण हिं छोरना+धारना हिं ]

---

# ज

ज—आठवें व्यंजन वर्णविकास–याच्या चार अवस्था असून पहिली गिरनार शिलालेखात, दुसरी इ स २ ऱ्या शतकातील नाशिकच्या शिलालेखात ( यांतील ज इंग्रजी E या अक्षरासारखा आहे ), तिसरी झालपाटन यथील लेखात ( इ स ६८९ ) व चौथी ११ व्या शतकातील उज्जयिनी यथील लेखात आढळतें –वि (संस्कृत शब्दापुढें जोडला असता) जन्मलेला, उत्पन्न झालेला निघालेला इ० अर्थ होतात जसें–अंडज, स्वेदज, जलज, पंकज, कफज इ० ज, जर्वे–पुन (ल) जेवण (जेवण शब्दातील आद्याक्षरावरून)

जा॥ खर—विनाम (सांकेतिक) जमादिलाखर, मुसलमानी वर्षाचा ६ वा महिना जा॥ वल–जमादिलावल, मुसलमानी वर्षाचा ५ वा महिना

जइत—न (गो) जय [ स जी=जिंकणें ]

जई–जै—स्त्री १ जेथें भिंत छपरास मिळते त्या ठिकाणीं आतील बाजूस राहिलेली जागा यथें कांहीं वस्तु ठेवता येतात तसेंच वितयकदा विटांचा थर बाहेरील बाजूस काढून अशी जागा मुद्दाम केलेली असते २ (वे) विहीर पडूं नये म्हणून धर लागे पर्यंत खणलेली जमीन

जई, जईं—क्रिवि (काव्य) जेव्हा ज्यावेळीं, त्याच्या उलट कईं ' कृपा करुनि धाडिला जइ मदीय बंधु स्वयें । ' –मोकृष्ण ५८५ [ स यदा ]

जईनच, जईनसईन, जईनमईन—विक्रिवि १ (अशिष्ट) कारणापुरतें, बेताचें २ पुष्कळ, विपुल, भरखळ, भरपूर

जईपट्टी—स्त्री (व सोनारी) तगडावरील बाजूची उभी पट्टी

**जईफ, जयफ जैफ**—वि कष्टी, क्षीण, अशक्त 'आम्हीं जईफ झालों आहों बहुत दिवस वाचत नाहीं' –रा १ २८ [अर् झईफ्]

**जउळी-जऊळ**—जोळी, जौळी पहा

**जक**—१ शिपत, पराभव, धक्का, थप्पड, तवी 'एवढी जक खडर्यावर हजरतीस बसली' –रा ५ १६ २ (नाविक) एखाद्या लाकडास फूट गेल्यास मजबुतीसाठीं दोरीनें चार–सहा फेरे घेतात ते [अर दक्क=पीठ करणें]

**जंक**—न नावेचा एक प्रकार [इ]

**जक(ख)ड**—स्त्री १ ताण ओढ (क्रि० ताणणें, आवळणें) २ गारठ्यानें आखडणें (हा शब्द बाधणें, टाकणें, धरणें, राखणें या शब्दाशीं जोडून योजतात) [अर दक्क=पीठ करणें]

**जक्षणी**—स्त्री (माण) शेतातील एक देवता, जखीण [स यक्षिणी]

**जक्ला**—वि (अशिष्ट) सगळें, सपूर्ण, सर्व, अनीवात [स सकल ?]

**जकात**—स्त्री कर, सायर, दस्तुरी, कराडगिरी, स्थलांतरित (आयात व निर्गत) व्यापारी जिनसावरील कर, (मूळ अर्थ मुसल्मानात प्राप्तीचा कांहीं ठराविक अश धर्मादाय म्हणून काढून इमामाचे स्वाधीन करावयाचा असा सप्रदाय असे, त्यावरून धर्मादाय कर, पा) [अर झकात] ॰**दार**–वि जकात वसुल करणारा अधिकारी किंवा मक्तेदार रोमी सरकारच्या कारकीर्दीत जे लोक नाक्यावर बसून जकात वसूल करीत असत ते हे लोक परकी सरकारची नोकरी करून आपल्याच बधुजनापासून अन्यायानें वाजवीपेक्षा अधिक पैसा घेत व अन्य मार्गानींहि जुलूम करीत, यामुळें यहुदी लोक जकातदाराम नीच लेखून त्याच्याशीं अन्न व्यवहारहि करीत नसत ॰**नाकें**–न १ जकात वसूल करण्याची जागा, ठाणें २ (ल) ज्यावर जाता येता कपाळ आपटतें असा टेंगणा दरवाजा –**ऱ्या**–वि १ जकातदार २ एक पक्षी हा ज्या पक्ष्याला निकला त्याचें एक पीस उपटतो म्हणून त्यास म्हणतात

**जकि(के)रा**—पु १ अडगळ, जुना गल्लाटा, रास (घुमटें, कापड, कागद इ०ची) २ कोठार, साठा, सचय 'ठाण्यात दारू व तोफेचे गाळे वाणवगैरे जकिरा पक्ता आहे' –ख ९ ४५०३ [अर झखीरा] **जकीरखाना**–पु कोठार, गजीखाना, अठरा कारखान्यातील एक **जकिरी**–वि दारूगोळ्याचें 'त्याजवर सामान जकिरी पूर्वील प्रमाणें राखावें' –मराचियाशा ३०.

**जखड-ड**—वि बुड्ढा वृद्ध अशक्त, क्षीण [अर दक्क=पीठ करणें]

**जखडणें**—सक्रि घट्ट बाधणें ताणून, आवळून बाधणें, इकडे तिकडे हालचाल करता येणार नाहीं असा तऱ्हेनें बाधणें [जकड पहा] साम शब्द– **जखडबंदी**–स्त्री बधन (गुरू खुरपाळा) (क्रि० करणें) २ (ल) भाग पाडणें, उपकाराखालीं आणणें ३ बधन, आकलन, वेष्टन (क्रि० करणें) **जखडाजखड-डी**–स्त्री बाधणें व आवळणें, घट्ट आवळणी (क्रि० करणें, होणें, चालणें)

**जखडीन**—स्त्री जखीण पहा

**जखम**—स्त्री १ दुखापत, घाव, व्रण, आघात (शस्त्रादिकानें झालेला) २ जोखीम या अर्थानें चुकीचा उपयोग, व्यापारात तोटा, धक्का (क्रि० बसणें) [फा झखम्] ॰**पट्टी**–स्त्री जखमेवरील मलमपट्टी ॰**भरणें**–जखम बरी होणें.

**जखमाणा-ना**—न दुखापत झालेल्या शिपायाना सरकारातून मिळालेलें इनाम, पैका 'जखमानेही दिले' –रा ४.१०७.

**जखमी**–वि १ घायाळ २ ओरखडलेलें दुखावलेलें, जखम झालेला **जखमेवर मीठ घालणें**–दु खावर डाग देणें

**जखाई जुखाई**—स्त्री दोन क्षुद्र स्त्री देवता यावरून सर्व क्षुद्र देवताना नाव देतात [स यक्ष+आई]

**जखात(द)दार**—जकातदार पहा

**जखि(खे)रा**—जकिरा पहा

**ज(जि)खीण-न**—स्त्री जखाई जुखाई पहा १ एखादी बाळंतीण मेली असता किंवा एखाद्या स्त्रीनें पाण्यात जीव दिला असता तिचें जें पिशाच्च होतें तें, हडळ २ एक क्षुद्र देवता 'जखिणी दवी म्हणे जी सर्वकर्तारा।' –सप्र ५ १० डखीण पहा [स यक्षिणी]

**जखर, जखखड, जखरल**—वि अतिशय म्हातारा आणि अशक्त, थकलेला (म्हातारा शब्दाशीं योजून) (माण) जखड [जक्कड]

**जग**—न. १ स्थावरजंगमरूप अखिल सृष्टि, विश्व, पृथ्वी, दुनिया २ ब्रह्मांड माणसाचें वसतिस्थान मनुष्यजात, लोक [स जगत्] (वाप्र) **जगातून उठणें**–१ लोकाचारविरुद्ध वागणें २ (वैधव्यामुळें आपत्तीमुळें) सर्वस्वी बुडणें **जगाबाहेरील-निराळी चाल**–लोकविलक्षण चाल **जगामुलखानें सोडलेला**–जातीबाहेर टाकलेला, साऱ्या गावाची ओवाळणी, साऱ्या दुनियेची खरवड **म्ह०** आपण भला तर जग भलें आपण मेला जग बुडालें सामाशब्द– ॰**गोळ**–पु (काव्य) पृथ्वीरूपी गोल 'जैसा महाप्रलयीं जगगोळ। जाहाला उदकाचें महागोळ।' ॰**चालक**–वि (काव्य) जगाचें भरणपोषण करणारा (ईश्वर) **जगच्छेद**–जगतछद पहा **जगजाहीर**–वि सर्व लोकांना माहित असलेला, प्रसिद्ध असलेला ॰**जीवन**–न जगज्जीवन पहा ॰**जुग**–न (महानु) मोठी आपत्ति जगावर आकाश कोसळणें 'औचितें जगजुग पडिले राजराजेश्वरी।' ॰**जूट**–पु मुत्सद्दी व्यवस्था ॰**जेठी**–पु (काव्य) १ जगामधील मोठा (ईश्वर) २ जगातील बलवान पुरुष, मल्ल 'आम्हीं जगजेठी असता।' –एरुस्व ६ ३५

–ज्जनक–पु जग उत्पन्न करणारा जगत्कारण पहा –ज्जीवन–न १ जगाचें जीवन; जीव सृष्टीचें जगण्याचें साधन (पाऊसपाणी, अन्न इ०) २ सजीव प्राण्यांचें अस्तित्व –वि जगाचें धारण पोषण करणारा (ईश्वर) ०झंपू–वि (महानु) जगाला झोंबणारा 'उधटेआ देवा जगझंपु।' –शिशु १५४ ०झोडी–स्त्री बगीक,दासी 'लाज धर्ती भाडे। जगझोडी राड।' –तुगा २६० ०डंबर–न १ अवडंबर; अवाढव्य पण निरर्थक थाटमाट, धामधूम, आव (विद्या, पैसा याचा) (क्रि० मांडणें) २ अफाट जगास आश्चर्यानें म्हणतात, विश्वविस्तार, एखादी अवाढव्य, विस्तीर्ण वस्तु 'हो हा जगडंबरु।' –ज्ञा. १५४७ [सं जगत्+अंबर] –ड्व्याळ–ड्व्याळ–वि. प्रचंड अवाढव्य (इमारत, शरीर, अरण्य), प्रमाणरहित, बोजड (पदार्थ) [सं जगत्+व्याल] ०ढाल–ढाळ–पु ध्वज, झेंडा [सं जगत्+ढाल] जगत्–न जग अर्थ १,२, पहा जगती–स्त्री १ जग अर्थ १, २ पहा 'किं पळता सरली अवघी जगती।' २ (महानु) मठ 'पूर्वाभिमुखजगती असे।' –स्र १०६ जगती तल–न पृथ्वीतल पृथ्वीचा पृष्ठभाग जगत्कर्ता–पु ब्रह्मदेवाचें एक नाव जगज्जनक पहा –त्कारण–न जगाला उत्पन्न करणारी शक्ति, हा शब्द निरनिराळे पंथ, ईश्वर, माया, प्रधान, पर माणु, या निरनिराळ्या शब्दांना लावतात जगत्त्रय–न स्वर्ग, मृत्यु पाताळ जगत्पति–प्रभु–पु जगाचा धनी, नियंता, ईश्वर किंवा राजा जगत्पालक–पाळक–वि जगाचें पालन करणारा जगत्प्रसिद्ध–वि जगजाहीर पहा जगत्प्राण–पु हवा, वायु जगद्बंधु–पु विश्वबंधु सर्व सृष्टीवर प्रेम करणारा. जगत्शेट पु १ फार श्रीमंत २ (ल) निर्धन पुरुष जगत्शेटीचा–नातू–वि निर्धन मनुष्य जगत्स्रष्टा–जगज्जनक पहा जगत्स्वामी–पु जगाचा धनी जगत्क्षय–जगाचा नाश जगदंत पु जगाचा नाश शेवट अखेर [जगत्+अंत] ०दंबा–दंबिका–स्त्री पार्वती देवी जगाची माता 'विन्पुरा जाहली जगदंबा।'–एरुस्व ५७३ [जगत्+अंबा] ०दळ–दाळ–वि १ जगाला भरडणारा 'दापीतआ दवाचा जगदळा।' –शिशु १५१ २ (बायकी) जगाशीं भांडणारा ०दात्मा–जगदीश–दीश्वर–पु ईश्वर; ब्रह्म [जगत्+आत्मा, ईश, ईश्वर] ०दाभास–पु विश्वमादृश्य, जडरूप माया, बाह्य सृष्टि [जगत्+आभास] ०दुद्धार पु १ जगाचा उद्धार, मुक्ति २–वि जगाचा उद्धार करणारा [जगत्+उद्धार] –द्गुरु पु १ ईश्वर २ श्रीशंकराचार्यांची पदवी ३ थिऑसफी पंथांतील गुरुस्थानी मानलेली श्रेष्ठ विभूति –द्भूषण न जगाचा अलंकार ईश्वर –द्वंद्य–वि सर्व जगास पूज्य –द्विनाश–जगत्क्षय पहा –द्विलक्षण वि १ सर्व जगाहून निराळा, विलक्षण २ बायकात; चमत्कारिक तऱ्हेवाईक जगधाम–जग निवास–वि (काव्य) सगळें जग व्यापून राहणारा; परमेश्वर, सर्व जग हें ज्याचें घर आहे असा ०नाड–स्त्री जगदळ–दाळ पहा ०नाथ–पु १ जगाचा स्वामी २ पुरी येथील श्रीविष्णूची मूर्ति इ० आयता हातीं अन् जगन्नाथ=स्वतःस पूर्ण स्वातंत्र्य असणें [जगत्+नाथ] ०नायक–पु जगाचा स्वामी, पालनकर्ता, ईश्वर [जगत्+नायक] ०निंद्य–वि सर्व जग ज्याची निंदा करतें असा ०नियता–वि जगाच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणारा –न्मंगल–वि जगाचें कल्याण करणारा 'माळा हे कमळा विचारुनि गळा घाली जगन्मंगला।' –न्माता–स्त्री १ जगाची आई जगदंबा २ (ल) मातृतुल्य स्त्री –न्मित्र–पु जगद्बंधु पहा आवडतें मूल, सुस्वभावी माणूस –न्मोहना–स्त्री जगाला भुलविणारी स्त्री ०प्रसिद्ध–जगजाहीर पहा ०बोळ पु १ (महानु) जगाला पारखा होणें 'त्यागा जगबोळ जाहाला।' –भाए ५१ २ वइ कातबोळ. 'नारदा होतुमें जगबोळाचें मानु।' –भाए ६३ ०भाड–वि जगदळ पहा ०मित्र–मैत्र–वि सर्व जगाशीं मैत्री करणारा ०लीला–स्त्री १ जगाची रीत, सर्वसामान्य लोकांची वागणूक, पद्धति, समजूत वगैरे 'जगलीला अशीच, बऱ्याला वाईट वाईटाला बरें म्हणावें' २ आधिभौतिक मोह, माया; खोटया जगाचा खऱ्या जगाप्रमाणें भास

जंग—पु १ गंज, कीट, (लोखंड, तांबें, पितळ यावरील) तांबरा (क्रि० चढणें) २ (ल) मलीनता, क्षीणता, जडता, मालिन्य, उपयोगांत नसल्यामुळें येणारी ग्लानि 'बारा वर्षें आवृत्ति केली नाहीं म्हणून माझ्या विद्येवर जंग चढला [फा झंग] जंगट–वि गंजलेलें ०दैणें–पुष्कळ दिवस टिकणें, राहणें (एखाद्या धंद्यात, कृत्यांत माणूस किंवा वस्तु) जंगणें–क्रि कीट चढणें

जंग–पुस्त्री लढाई 'या जंगेत पांच मोहरे मृत्यु पावले' [फा जंग, तुल० सं जंज्=युद्ध करणें] हा शब्द फारसा प्रचारांत नाहीं पण पुढील वाक्प्रचारांत त्याचा उपयोग करितात जगजंग पछाडणें–अतिशय श्रम करणें, कष्ट करणें, जाराची लढाई करणें सामाशब्द– ०जोड–जूट–पु १ भरपूर व चांगली स्थिति, सुबत्ता, उत्तम प्रकारच्या साधनांनीं अनुकूल अवस्था २ भरलेलें घरदार, संसार (पुष्कळ मुलें–बाळें, चाकर–नौकर असलेला) ३ योग्य जोड, जसें 'जुनीं नवीं हत्यारें मिळून त्याचा जगजोड बरा बसला' ४ संजोग जुळणी, माहित्य (क्रि० घालणें, करणें) ५ मैत्री 'जगजोड यासी करावा ऐसा मनसबा घातला आहे' –पेद २०४५ ६ युद्धाची व्यवस्था 'जगजोड बनेल' –ख १०५३४५

जंगट—न. झेंगट, मशालचा ताम, घड्याळ, देवापुढें आरती वगैरे म्हणतांना वाजवावयाचें, भिकाऱ्याच्या हातात असतें तें वाद्य [ध्व.]

**जंगड, जगडा** स्त्री एकत्र जुपलेल्या पशूतील स्नेह निकट संबंध योग यावरून दाट मैत्री [स युज=जोडणें]

**जगणूक**—स्त्री निर्वाह जगण्याची क्रिया जीवन 'आज तर आमची जगणूक झाली उद्याचें उद्या, देव आहे' [जगणें]

**जगणें**-क्रि १ जिवंत रहाणें, अस्तित्वात असणें २ वाचणें, निभावणें रक्षण होणें 'ह्या जरीमरींतून जो जगेल तो पुढचें वर्ष पाहील' [स जीव्=जगणें]

**जगताप्रंथ**—पु १ आपत्तींतून वर येणें भयंकर दुखण्यातून बरें होण्याची स्थिति (क्रि० (जगत्या पथास) लागणें, लावणें) २ (ल) बुडू आल्यानंतर पुन्हा धंदा सावरणें, उभारणें (क्रि० लागणें लावणें) [जगणें + पथ]

**जगता**—स्त्री (काव्य) एक वैदिक छंद याचे चार चरण असून प्रत्येक चरणात १२ अक्षरें असतात [स]

**जगन्नाथी**—पु एक प्रकारचा पक्का जाड वस्त्र -वि जगन्नाथ शहरासंबंधीं (धातूची भांडीं, हक्क)

**जंगम**—स्त्री (गो) एक रानफळ व त्याचें झाड

**जगम**—वि हलविता येण्यासारखें, चल याच्या उलट स्थावर-अचल 'नाना हे तों जगमजना'-रास १ १०२३ [स गम्=जाणें] **०जिंदगी माल-मिळकत**-स्त्री.पु.स्त्री हलविता येणारी संपत्ति, भांडींकुंडीं (२) (कायदा) जमीन व भूमीशीं संलग्न असणाऱ्या वस्तू किंवा अशा संलग्न वस्तूशीं लगट्न राहणाऱ्या वस्तूखेरीजकरून इतर वस्तु **०विष** न प्राणिज विष, याच्या उलट वनस्पतिजन्य किंवा खनिज हें स्थावर विष

**जंगम**—पु शिवपूजकांची एक जात व व्यक्ति लिंगाईत लोकांचा गुरु **०ढवळें** न समारंभातील आचारविचारशून्यता [जंगम+ढवळणें] **०पट्टा**-पु १ जंगम लोकांच्या कपाळावरील लांबलचक भस्माचा पट्टा त्यावरून २ (ल) (उप) यासारखें एखाद्या वाईनें लाविलेलें कुंकू **०विद्या**-स्त्री जंगम जातीची, धर्माची शास्त्रें ६० **०शेटाई**-स्त्री (कों) ओढूनताणून आणि ... प्रतिष्ठा **जंगमी**-वि जंगम लोकांसंबंधीं

**जंगम्या**—पु खरीपाच्या जोंधळ्यावरील रोग यानें ताटें वाढू लागतात व ताटांवर डिंगतात -कृषि २७०

**जगर**—न अग्रज्र [फा]

**जगर-रें**—न गारें पहा

**जग(गा)ल**—स्त्री (गो कु) नारळाचा पाळ

**जंगल टंगला, जंगाल**—पु गंज वळक नवसागर आणि जगल यांचें चूर्ण दारूत मिश्रण करण्याने त्यापासून हिरवी ज्वाला उत्पन्न होते अग्निक्रीडा पृ १५ -वि जंगल गंजलेलें [फा]

**जंगल**—न अरण्य झाडी उजाड आगाड नापीक मनुष्य, पक्षी नसलेली, निर्जन जागा [स](ग्राम) **०फिरणें**-शौचास जाणें हागयास जाणें म्ह० जंगलचा वाघ-पाचभारा सामासिक शब्द—**०खरडा**-पु कापणी होण्यापूर्वीचें पिकाचें पाहणीपत्रक आणेवारी अंदाजपत्रक **०गरक गर्क**-वि झाडाझुडपानीं भरलेलें (जमीन, शेत) 'बागाईत जमीन जंगल गर्क पाणी पाटमुद्धा जाहली आहे' -वाड समा २ २४४ [जंगल+गर्क] **०चिमणी**-स्त्री एक प्रकारची चिमणी (पक्षी) चोचा बिलबिली, ही साध्या चिमणी पेक्षा ल्हान असून हिचें पोट पिवळें व चोंच आणि पाठ काळी असते **जंगलग**-वि जंगली रानवट खडवळ, अडाणी **०शाही**-स्त्री रानराज्य 'त्यावेळीं जंगलशाहीच्या बादशहाची सिंहगर्जना सुरू होऊन वरच्या अस्मानी सुलतानाला जर्मनीचा जबाब मिळतो' -गडकरी, राजसंन्यास ५

**जंगला**-पु एक रागिणी

**जगला**—पु (माळवी) कठडा

**जंगली**-वि १ जंगलवरक पहा २ रानटी रायवळ रानामधील (सर्व प्रकारचीं झाडें-शिसू साग याखेरीज) ३ मुद्दाम लागवड न केलेलें (झाड) ४ न सुधारलेला, खेडवळ अडाणी निर्माणसाळलेला (पशु माणूस, लोक) ५ जंगलात राहणारा ६ जंगलासंबधीं [जंगल] सामासिक शब्द—**०कापशी** स्त्री एक वनस्पती **०गांजा**-पु एक वनस्पती **०चमेली** स्त्री रानटी चमेली **०चिमणी**-स्त्री जंगल-चिमणी पहा **०जट**-वि खेडवळ **०जायफळ-बदाम-हिरडा** नपु रानटी जायफळ, बदाम, हिरडा (हा हिरडा कोंवळा घेऊन वाळविला म्हणजे त्याला बाळ हिरडा (हरितकी) म्हणतात

**जगलावचें**—क्रि. (गो) वीज चमकणें

**जगवण**-स्त्री जगणूक पहा नादवणूक [ज ...]

**जगविणें**—सक्रि वाचविणें राखणें सांभाळणें [जगणें]

**०जगधून-तगधून** क्रिवि काटकसरीनें, हात राखून (खाद्य पदार्थ खर्चणें) सापस्कारानें काळजी घेउन

**जगाविणें**—सक्रि सूचना करणें ताकीद देणें जागा करणें [स जागृ हिं जगाना]

**जंगी**—स्त्री १ बंदुकीनी गोळी मारण्यासाठीं तटाला ठेवलेलें भोंक २ (गा) ल्हान खिडकी [फा जंग=लढाई]

**जगी**—स्त्री गडी, दाट मैत्री [जग]

**जंगी**—वि १ लढाइविषयीं लष्करी २ मोठा भयंकर जंगी आवाज ... राहिला जंगी -एपा १८२ **जंगी तायूत**-पु स्वारी ... शस्त्राचा कलगा तापून **०सामान**-पु युद्धसामुग्री **०लढाई** स्त्री घनचक्कर लढाइ युद्ध **०जहाज**-न युद्धनौका **०भोयरा-भोंवरा**-पु भांभीं अशा आवाज करणारा भोंवरा

**जगीपुर**—न ग्रामाचा एक नाव -मुळ्या १७

**जग(गो)गूल**—न (गा) वीज

**जगौंचें**—सक्रि (गो) वाचविणें जगविणें

**जघन**—पु १ कटिप्रदेश जांघ ओगड (स्त्रियांचा) २ (काव्य) ढुंगण कंबर धरिली जघन द्वयकरीं। –नि ११२१ [स]

**जघन्य**—वि १ हलकें नीच २ शरीराचा पाठीमागचा –स्त्री अपकीर्ति [जघन] ०वृत्ति स्त्री अप्रशस्त हलकी नीच चाल

**जघन्य**—वि १ जगजाहीर 'हें शून्यवादि याचें मत जघन्य।' –कथा ६ ११९ [स जगत्] **जघन्यात होणें**-जगजाहीर होणें (मूर्खपणानें किंवा वाईट कृत्य) 'कीर्ति जघन्यात झाली।' –अफला ५१

**जघा-घ**—स्त्री १ मांडी सबंध पाय जघन पहा २ पोटरी [स] **०त्राण** न मांडीचें किंवा पोटरीचें चिलखत ०ल ळ **जघी** वि वेगवान चपल (घोडा) 'जघाल जो पवन-सम-गतिचे सव घ। –र ७ हे वामनैक पद भूमि नपोनि जघी। –र ४

**जचणें**—अक्रि मेहनत घेणें फार श्रम करणें 'कीं नेरा बापाचेया पुत्र जचे।' -ज्ञा १३ ५४२ [जाचणें पहा]

**जजार**—पु १ ओंगे २ त्रास प्रयत्नाची पराकाष्ठा (क्रि० तोडणें) [जजाल–म जग=युद्ध करणें]

**जजाल-ळ**—पु १ त्रास कष्ट दगदग चिंता उपद्व्याप गुंतागुंत संसारातील अडचणी 'नगज्जाळ नजाळ हा सर्व तूर।' –दावि ८ २ आधिव्याधि लेढणें यातना त्रास (माणसाच्या कामाचा) 'ही शायरी पाठीमागें मोठा जजाळ आहे' **०तोडणें**-अति त्रास कष्ट सोसणें **०पछाडणें**-१ छळणें यातना देणें २ खूप प्रयत्न करणें जोराचा प्रयत्न करणें

**जजि(झी)या**—पु (मूळ अर्थ संरक्षणाकरिता वदला पैसा) मुसलमानेतरांवरील डोईपट्टी कर हा प्रथम महमद पैगंबरानें वसूल केला होता न्यायाच मार्गानें पाहतां जजिया घेणेचा कायदा केवळ गैर –वाड सनदा १५० [अर जिझया]

**जजिरा जजीर**—पु १ पाण्यातील किल्ला जलदुर्ग २ कुलाबा जिल्ह्यातील एक संस्थान व किल्ला [अर जजीरा=बेट]

**जजिरा**—स्त्री *१ लहान साखळी २ कमान (धनुष्याची)* शेंडा ३ जाळी गवाक्ष –वि तीक्ष्ण 'भवयकमाना ओढुन मारसी नत्रबाण जजिरी।' –प्रला १०६ [फा जंजीर] **०गोळी** स्त्री जोडगोळी

**जजीर**—स्त्री १ जजिरी पहा [फा झंजीर] २ नग एक जजीर फील पया १८४ ३ बेडी 'गळ्यात जजीर तोफेची' –मराचिथोरा ६६ **०तोडणें** जजाळ तोडणें **०बंद** वि भर भक्कम संगीन (भारत) २ अगदी बरोबर (हिशेब) ३ मुसंगत (भाषण लेखन)

**जजू**—पु (औपराधिक) यजुर्वेदी लोक [स यजुस्]

**जज्ज ज्य**—पु दिवाणी कोर्टांत अध्यक्षस्थानीं बसणारा अम्मलदार न्यायाधीश 'चुकला रमाचा जोडा पाई खाडा जज्य झाले।' –पला ८३ [इ]

**जंज्याळ**—स्त्री जजाल पहा लाकडी बैठक (दस्ता) असलेली मोठ्या तोंडाची बदूक हिच्या तोंडाचा व्यास १।–२ इंच असून नळीची लांबी ७ वितीं असते हा तोंडयाच्या बदुकीसारखी दिसते हिला इग्रजीत ब्लडरबस असें नाव दिलें आहे [स जजाळणें युद्ध करणें]

**जट**—स्त्री १ पड वळलेले केस (शंकर किंवा साधू लोक यांचे) न विंचरल्यामुळें, तेल वगैरे न लावल्यामुळें एरासएक चिकटलेल्या गुंतलेल्या केसांच्या कपाळावर व पाठीवर लोंबत राहणाऱ्या बटा, वळया जटा २ संघ जूट जमाव **जटणें**-अक्रि एकत्र होणें जुळणें [स जट्=गुंतणें]

**जटल्ली**—स्त्री (व) थाप, बात 'तू खूप जटली ठोकली'

**जटा**—स्त्री १ जट अर्थ १ पहा २ वेसाची गुंतागुंत (गो) जटि ३ वैदिक वाङ्मयातील पठणविषयक एक विकृति संहितेच्या दोन पदांचा संधि करून म्हणणें त्यास क्रम म्हणतात व त्या दोन पदांच्या पुढील पद त्यास जोडून त्या तीन पदांची संहिता करून तीं तीन पदें उलट म्हणणें उदा० 'अग्निमीळे ईळेग्निमग्नि मीळे। ईळेपुरोहित पुरोहितमीळ ईळे पुरोहित।' इ० [स जटा, सटा, में जि जर] सामासिकशब्द– **०गौर**-स्त्री एक औषधी वनस्पति इच्यावर शेवाळ्यासारख्या रेषा असतात व ही गौरीला वाहतात **०जूट**-पु केसांचा समूह जटा पहा 'जटाजूट एका मुकुट माथां शिरीं।' –तुगा २०५० **०धारी**-वि जटा धारण करणारा (शंकर गोसावी इ०) **०पाठी**-वि १ जटेचा पाठ करणारा (जटा अर्थ ३ पहा) अशासारखेच क्रम-घन शाखा-पाठी असे वेदपाठकांचे प्रकार आहेत २ ज्यानीं आपल्या जटा पाठीवर सोडल्या आहेत असा **०भार** पु जट अर्थ १ पहा 'सावळिया जटाभार। वरि मुकुट घातला सुंदर।' **०मासी मांसी** स्त्री पुष्कळ दिवस टिकणारी वनस्पति ही हिमालयात सापडते हिच्या तीन जातींपैकीं सुगंधी जात अधिक उपयोगी *असून हिच्या मुळ्यांचें* तेल केस काळे होण्याकरिता उपयोगात आणितात [स]

**जटाळ्या जटाळयावान**-वि जटा धारण करणारा

**जटायु**—पु रामायणातील एक गृध्र राजा [स]

**जटित**—वि जडित 'कर्णी माळा मुखीं पान। नविन सूर्नी।' –गीला १४८२ [स जट्=संघात करणें]

**जटिल जटील**—वि जटाधारी पहा [स] **०नेपड**-न काळें वेसड **जटिली** वि जटिलासबंधीं जटाधारी पहा [जटिल]

**जठर**—न पोट उदर [स] **जठराग्नि जठरानल**-पु पोटातील अग्नि पचनशक्ति

**जड**—स्त्री मुळी [ हिं जड, सं जट ] ( वाप्र ) ०**दावणें**-एखाद्या झाडाची फांदी मध्येंच जमीनींत पुरल्यावर त्या खादीस मुळ्या फुटून त्या खादीचें नवीन कलम करणें

**जड**—स्त्री धन, पैसा, मालमत्ता 'त्या सावकाराची लाख रुपयाची जड आहे' [ स ]

**जड**—वि १ भारी, वजनदार, उचलावयास कठिण २ (ल) मद, आळशी, मूर्ख 'मी अत्यंत जड असें।'-ज्ञा ३ १८ ३ शीत ४ पचनाला कठिण ( अन्न, पाणी ) याच्या उलट हलकें ५ दु खी, दु ख देणारें ६ त्रासदायक, कठिण, महत्त्वाचें ( काम ) 'मदुद्धरण मात्र का जड तुम्हा दिसे वा रिती।'-कका १९ इ० केलें नाहीं तोंवर जड खाले नाहीं तोंवर गोड ७ मोठेपणाचा, मानाचा, अधिकाराचा ८ भारी किंमतीचा, मौल्यवान ९ गंभीर विद्वत्ताप्रचुर परिपूर्ण ( टीका, वाद, विषय ) १० भयंकर जबर ( रोग ) ११ झोंपाळू त्रासलेला, थकलेला, दमलेला १२ अचेतन भौतिक 'जड परि जवळिका।'-ज्ञा ६ ११६ १३ द्वित्त कठोर (अक्षर) १४ (वेदांत) धन, द्रव, वायुरूप नव्हे असें, भौतिक शरीर [ स ] ( वाप्र ) ०**घरणें**-मोठा समजणें ०**वाटणें** कठिण, दु खदायक, त्रासदायक असणें ०**लागणें**-अधिकाधिक वाढत जाणें ( रोग, अडचण ) शेवटीं जबरदस्त होणें ( बूड, गाड ) ०**होणें**-प्रतिष्ठेमुळें एखाद्यास गर्व चढणें सामाशब्द- ०**अवघड**-न कठिण संकट आणि अडचण याना व्यापक संज्ञा ०**गीर**-वि ( लुटीच्या भारानें ) मारावलेलें -चित्रगुप्त ११९ ०**ग्रंथि**-पु (वेदांत) आत्म्याचा भौतिक पदार्थांशीं संबंध तसेंच बाह्य वस्तूंशीं संबध 'जड ग्रंथि सुटला म्हणज ज्ञानप्राप्ति' [ स ] ०**चिदैक्य**-न मन आणि दृश्य पदार्थ यांचें ऐक्य 'आत्मा न देखत मनीं व्यक्ति ऐकरीति। पवित्र ते जडचिदैक्य सुखें करीती। [स] ०**जीववाद**-पु सर्व आधिभौतिक व मानसिक चैतन्य जड प्रकृतिपासून झालें असें प्रतिपादणाऱ्या कोणत्याहि तत्वज्ञानमतास जडजीववाद हा शब्द लावतात ०**जूग** न ओझें आणि भार ( धंद्याचा, काळजीचा ) 'संसाराचें जडजूग जोडल्या पुनारर आहे ०**जोखीम**-न संभवनीय आपत्ति, अनर्थ ( सर्व आपत्ती किंवा एखादी आपत्ति ) 'वाटेनें काहीं जड जोखाम पडल्यास वर्गे करावें' **जड डोसकें डोस्सें**-न हजामत करावयास कठिण अशा राठ केंस असलेल्या डोक्यास न्हावी लोक म्हणतात [ जड+डोसकें ] **जडता-जडत्व** स्त्रीन १ ( शाप ) प्रेरणारूप कारणा वाचून आपली स्थिर अवस्था अथवा सरळ रेषेंत समचलनावस्था न बदलण्याचा जो पदार्थाचा धर्म त्यास जडता म्हणावें -यमू २१२ २ वजन सुस्ती -**त्वाकर्षण** न गुरुत्वाकर्षण ०**दुखणें**-न निवारवचें दुखणें असाध्य रोग ०**द्रव्य** पु जागा व्यापणारा, वजनदार, ज्ञानेंद्रियानीं कळणारा स्थूल पदार्थ ०**पारडें**, **जडव** मनो १ ४४

**पारडें**-न १ सुबत्ता, भरभराट ( तराजूच्या ज्या पारड्यात वजन जास्त असतें तें पारडें खालीं जातें व कमी वजनाचें वर जातें यावरून ) २ समृद्ध माणूस ३ त्रासदायक काम ( क्रि० उचलणें, वाहणें, उतरणें, सोसणें ) **जड बुडाचा**-वि ( ल ) श्रीमंत आणि वजनदार ( मनुष्य ) [ जड+बूड ] ०**बुद्धि-मति**-स्त्री बुद्धीचा जडपणा, बुद्धिमांद्य -वि मूर्ख, अडाणी ०**चोका**-पु गलेलठ्ठ, स्थूल ( माणूस, जनावर, वस्तु ) ०**भरत**-पु १ एक ऋषी २ ( ल ) आळशी, सुस्त माणूस ०**भारी**-न ( काव्य ) संकट, आपत्ति 'पडता जडभारी। दासीं आठवावा हरी।'-वि कठिण, त्रासदायक 'माझिये जीवींचें काहीं जडभारी।'-तुगा ८५८ ०**भ्रम**-पु आधिभौतिक पदार्थाचें चुकीचें ज्ञान, सृष्टि शाश्वत असल्याबद्दल चुकीचा समज 'उद्धरी नित्य जडभ्रम तीतें। राम उद्धरि जगा कमतीतें।' ०**वाद**-पु सर्व विश्वाची जडप्रकृति व गति यांनीं खुलासा करण्याची पद्धति सर्व मानसिक क्रियांचा खुलासा आधिभौतिक व रासायनिक फरकांनीं होतो असें हें मत म्हणतें पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ, प्राणिशास्त्रज्ञ व जीवनशास्त्रज्ञ हें मत प्रतिपादन करितात ०**शीळ-ळ**-वि जड, वजनदार भारी वजनाचा, अवजड **जडात्मकता**-स्त्री सुस्तपणा बुद्धिमांद्य, मदपणा, उदासीनता 'म्या शापिली तरि जडात्मकता मनीची।' [ स ] **जडाद्वैत**-न एका जड प्रकृतींतच सर्व गोष्टींचा समावेश करणारें, अद्वैत, सृष्टीचें मूळ -गीर १५९ **जडान्न**-न पचायला कठिण असें अन्न [स जड+अन्न] **जडार्थ**-पु आधिभौतिक पदार्थ [स]

**जडकाम**—न जोडण्याचें काम सांधकाम [ जडणें+काम ]

**जडकावणें**—अक्रि रोग, पाऊस इ० पहिल्यापेक्षा अधिक होणें, वाढणें, वठावणें जडावणें पहा 'दोन दिवस अपथ्य करिताच ताप जडावला' (ना) जड पडणें, दुखु लागणें (अग)

**जडबिंब**—न ( वर्ग ) भाताताल ज्या दाण्यात फार सत्वांश नसतो परतु जे पालापेक्षा थोडे जड असतात त्याना जडबिंब म्हणतात जडपांजिन पहा

**जड(जर)जवाहीर**—न सोनें, रत्नें वगैरेना व्यापक संज्ञा 'सर्व जिनस अग्नास जरजवाहर नागपुरास घेऊन जाऊन ...'-रा ७ -रापप १ ३ [ फा जर्=सोनें+अर जवाहिर्=रत्न ]

**जडण**—स्त्री १ जडकाम सांधकाम २ (ल) आत बसविणें जडविणें खोचणें (रत्न इ० सोन्याच्या कोंदणात) ३ जोड, सांधा. 'त्या सांध्याची जडण चांगली आहे' ४ जडणावळ, जोडण्याची मजुरी [जडणें] **जडणावळ**-स्त्री १ जडण अर्थ ४ पहा २ जोडण्यामध्यें कौशल्य चातुर्य

**जडणा**—स्त्री १ जडण अर्थ १ पहा २ ( ? ) पायतणाची शिवणावळ [ जडणें ]

**जडणें जडविणें**—उक्रि १ सांधणें एकत्र होणें २ (ल) कोंदणात बसविणें (रत्न वगैरे) ३ (उ) ठाम बसणें नोकरीवर कायम होणें (अधिकाराच्या जागेवर माणूस रोग वगैरे गवय) 'तो चाकरीवर राहावयास गेला तो जडला की नाहीं ?' ४ चिकटणें धरणें बाधणें एव वासना जडल्या हरिरूपाची। —भा २ १८८ [गं युज हिं जडाना]

**जडतार-तारी**—जरतार-तारी पहा

**जडप**—न (रासा) १ जडकाम साधकाम २ जडण अर्थ १ पहा ३ निरनिराळ्या नमुन्याचा एकाक्यता मिळाफ मळा जुळणी (अनमोल कृत्य ? काही सामग्री ?) (क्रि० बसविणें बसणें) [जडणें]

**जडप-पें**—वि १ बिकट मागायाचा (काम धंदा) २ भयंकर (दुखणें) जास्त मागाचा (पदार्थ वस्तु) [अर डब]

**जडपलिंज**—न पोपटपशी थोडें जड भात नर्मचित्र पहा

**जडयळा वणा**—स्त्री जुळणी जाडणी, साधकाम [जडणें]

**जडाई**—स्त्री १ जोडकाम (कला आणि काम) २ जोड कामाची मजुरी [जडणें]

**जडाजड जडी**—स्त्री एक करण्याची क्रिया साधकाम रचना (भिन्नी वस्तु द०ची अनेक मागावाबद्दल ०परिस्थितीनें कलली) [जडणें]

**जडाव**—पु १ जडणी कोंदणात बसविण्याचें काम बसविलेली स्थिति २ रचना तरतूद त्या प्रमाणें मोर्चेबंदीचा जमावाचा जडाव लाग-तोफा दरवील देऊन '—पेद ३ ११६ ३ हुद्यावर कायमची नमणूक [जडणें] ०जोहर-हार **जडावाचे दागिने**—नपु अव सोन्याच्या कोंदणात रत्नें वगैरे बसवून केलेले अलंकार दागिने

**जडावणें**—अक्रि १ जोर वाढणें (पाऊस वारा रोग इ०चा) तव्हा ती (जखम) जडावून राजास मृत्यूची चिन्हें होऊ लागलीं इग्लडची बखर पृ ११९ २ भरभराटीस येणें (बसलेला व्यापार) ३ जड होणें (नासायक ओझें) ४ सुस्त बधिर होणें (शरीर) ५ संपन्न होणें श्रीमंत होणें गाडीखालीं ऊव येणें जड्कावणे पहा [जड]

**जडित जडीत**—न रत्नखचित अलंकार —वि रत्नखचित ल्याली नवरतें भूषण। एपो ७ [जडणें] ०जोहार-जोहार—जडावजोहर पहा

**जडी**—स्त्री वषभर जगणाऱ्या कापशीची एक जात —कृषि ३८४

**जडी**—स्त्री मूळ औषधी पाळें [स जट हिं जड] ०धरण—१ मूळ धरणें २ (उ) कायम बळकट होणें **जडी बुटी**—स्त्री १ औषधी गुण असलेलें झाडाचें मूळ २ आप ल्याकरितां साठवून ठेवलेला पैसा ३ (ल) अद्भुत रीतीनें काय घडवून आणणारी अशी वस्तु तावीत गंडा दोरा वगैरे

**जडीप-थ**—जडप-थ पहा

**जडीय**—न तुकड्यातुकड्याचा जोडून केलेला पदार्थ —वि १ सांधलेलें शिवलेलें (मुख्य वस्तूला दुसरी वस्तु) २ जाडलेलें, ठिगळ मारलेलें तुकडे तुकडे एकत्र केलेलें ३ जोड लेलें ४ कोंदणात बसविलेलें 'हा दागिना जडीव आहे' [जडणें]

**जडया**—पु (अव, जड) पच्चीकाम जडितकाम करणारा पची गर 'जडलाक त्याच्या (हिऱ्याच्या) योगानें रत्नें कापितात' —मराठी ६ वें पुस्तक पृ ११४ [जडणें] **जडया भाऊ**—पु लपनी करून काम मुद्दा साधणारा 'हा त्या गावचा प्राचीन उपाध्याय नव्हे जडया आहे' ०**गणपति**—पु निरनिराळे हात-पायादि सर्व अवयव जोडलेला गणपती याच्या उलट ठसा किंवा छापाचा गणपती

**जडु**—न (वै) आजार रोग [का जड्डु]

**जण-णी-णें**—पु न (अव) माणूस व्यक्ति असामी, लोक या शब्दाच्या मागें संख्यावाचक शब्द लावतात जसें दोन-तीन-चार-जण ऐसे तिघे जण प्रबुद्ध थोर चाल।' —पंच १ २ दोघे-तिघे-चौघे जण किंवा व्यक्ति हा शब्द फक्त मनुष्या नाच लावितात जन पहा [सि जन] (वाप्र) **जण हाराचें-जण चोराचें**—काहीं लोक चोराच्या बाजूला काहीं लोक धन्याच्या बाजूला असतात असाना उमजून **जणाचे हाती दोन घांडे**—काणल्याहि तऱ्हेनें वागलें तरी लोक खूप राहात नाहींत याअर्थी **जणात मिसळून राहाणें-असणें** लोकात मिळून मिसळून राहणें-असणें **जणकथा-चाल-जाहीर-मर्यादा-लज्जा-वाद**—जन मध्यें पहा [सं जन प जणा गु जण सिं जणो फ्रेंजी जनो]

**जणु-जणों**—अ जसें काय जसें काहीं जणुकाय मला वाटलें दर्शनी मुख दिसलें जणु चंद्र उगवला।' [सं ज्ञा=जाणणें-जान=मला वाटतें]

**जत**—स्त्री संघ जूट संयोग एकविचार [स युति] ०**नामा**—पु वंशावळ वंशवृक्ष

**जत**—पु पक्वाशयात उत्पन्न होणारे वाटोळे चपटे निळे काळे कृमी हे फार वाढले म्हणजे आमाशयाकडे येतात व त्यामुळें श्वासो च्छ्वास व्हावा यास घाण येत याचे पाच प्रकार आहेत यांच्या हाल चालीनें मळ पातळ होतो व शूळ अशक्तता फिकटपणा अभि माय वगैरे विकार होतात —योर १ ५१५ [स जतु] ०**वाताळें**—न जतामुळें फुगणारें पोट ०**विकार**—पु पोटात जत झाल्या मुळें होणारा बिघाड **जताचा उपद्रव** पु जतापासून होणारी पीडा दुःख

**जतकारणी-णें**—जतावणी-विणें पहा

**जतकी**—स्त्री (वे) बैलाच्या गळ्यातील पट्टे [का जतिगि]

**जतन-जतनें**—क्रिवि काळजीनें ठेवलेलें (क्रि० करणें टेवणें, राखणें, असणें) 'तुझा पैका मजकडे जतन आहे'

**जतन, जतना, जतनाई**—स्त्री निगा, जपणूक, तत्परता, काळजीपूर्वक रक्षण, संरक्षण, संगोपन 'हें आता जतन करी नाम।' —तुगा १६४८ 'जतन करीत मानें स्वाधिन कला न कापिता नाळ।' [स यत्न] **जतनेस-नाईस-ठेवणें-धारणें-असणें**—कोणाच्या स्वाधीन काळजीनें उपचार होण्यासाठीं संरक्षण होण्यासाठीं ठेवणें. **जतनाविणें** सक्रि काळजी घेणें रक्षण करणें, शुश्रूषा करणें, सुरक्षित राखणें **जतने**-क्रिवि (कु) सभादून, जपून, सावधगिरीनें 'बुळबुळीत झाड आहे जतने चढ' **जतनेऊन**-क्रिवि (कु) काळजीपूर्वक, सावधगिरीनें, निगा राखून [जतन]

**जतनाय**—स्त्री (गो) संचय साठा [स यत]

**जतर**—न १ (सा सोनारी) तार काढण्याचें यंत्र पट्टी २ (आश्चर्यकारक आणि कल्पक) यंत्र ३ तीक्ष्ण धारेचें शस्त्र आयुध [स यंत्र] **०पट्टी-पाटी**-स्त्री (सोनारी) एकापक्षा एक बारीक अशीं अनेक भोकें पाडलेली लाकडी जाड पट्टी या भोंकातून तार ओढून अवश्य तितकी बारीक करतात (गो) जतीर **०मतर**—पुन १ जादूटोणा छा छू, छु मतर थातुरमातुर २ (दिल्ली) वेध शाळा (सवाई जयसिंगानें बांधलेली) [स यंत्र+मंत्र]

**जतराय**—(गो) चावटपणा, फाजीलपणा [चतुराई]

**जतान**—स्त्री. (कु) शुश्रूषा [जतन]

**जतावणी**—स्त्री सूचना, इशारा, ताकीद [जताविणें]

**जताविणें**—सक्रि सूचना देणें बजावणें, हुकूम करणें सक्तीनें मना करणें [हिं जताना स यत्]

**जती**—पु जैन लोकांतील संन्याशी साधु यति २ योगी. 'कोमलांग राजीवनेत्र नव्हे शिवासारखा जती।' —प्रला ७ [स यति] **जत्या म्हणणें**—जती (यति) चे पवित्र लेख (स्तोत्रपाठ) वाचणें 'त्यानें आम्हा देखतां साचार। जत्या कल्या पाठांतर।' यावरून (उ) **०म्हाणणें मारणें** गप्पा छाटणें मारणें

**जती**—स्त्री यात्रा, यात्रा 'पुढें येत दिंडी। तिथी जती चाले थाटी।' —तुगा २८४ [यात्रा]

**जती**—स्त्री (व) (अव जत्या) कापाराच्या वड्या वर व किल्ल्याच्या खालीं बसविलेल्या गोलचीच्या लहान पट्ट्या

**जतामता जथ मथी**—स्त्री १ एकजूट एकविचार संयोग, एकमत २ (कायदा) एकाची पूर्णपणें किंवा पुष्कळांची पृथक्पणें किंवा सर्वांबद्दल एकाची, किंवा प्रत्येकाची स्वत बद्दल आणि सर्वां बद्दल जबाबदारी पृ जती एक मती पहा [स युति + मति, जथणें + मथणें]

**जतार**—न १ (कु) कुंभाराचें चाक २ (गा) कापसाची सरकी काढण्याचें यंत्र, कापूस गोठण्याचा रहाट जीन [स यंत्र]

**जतु**—पु सजीव प्राणी-विशेषत सरपटणारा प्राणी किंवा कीटक कृमि (खाच्या जातींतील) [स जन्=उत्पन्न होणें] **०शास्त्र**-न रोगकारक कृमींबद्दल विवेचन करणारें शास्त्र

**जतो, जथो जत्ता**—पु (कों राजा गो) (कुण) ग्रंथामधील नवरानवरीला लागणारें किंवा अहेराचें कापड [जथणें]

**जत्र**—क्रिवि (काव्य) जेथें 'जत्र जीव तत्र शिव हें तों न ये मानिया मनासी।' —ज्ञागा २९६ [स यत्र]

**जत्र**—न १ यंत्र २ जंतरपट्टी पहा ३ ताफ चतुर जत्राचरि चीत मार।' —ज्ञा ११ ३९५ ४ (गो) लाकूड पासरण्याचें साधन [स यंत्र] **जत्रांतून ओढणें**—१ (ल) कडक शिस्त लावणें (दाडग्या मुलास) २ कसोशीनें पाहणी, परीक्षा करणें (हिशेब, जमीनीमध्यें) **जत्रातून ओढलेला**—वि अतिशय कृश झालेला, चरकातून काढलेला **जत्रीं ओतलेला**—वि बाधसूत, साच्यात ओतल्याप्रमाणें सुरेख **जत्रीं धरणें**—कडक रीतीनें वागवून काम घेणें, तरवारीच्या धारेवर धरणें **पट्टी-जत्राची पट्टी**—स्त्री जंतरपट्टी पहा **०मंत्र**—जंतरमंतर पहा

**जत्रा**—स्त्री १ यात्रा, मेळा (देवाप्रीत्यर्थ उत्सवसंबंधी) २ यात्रेकरूंचा मेळा ३ यात्रेचें ठिकाण, क्षेत्र [स यात्रा] **०करणें**—१ क्षुद्र देवतांना बकरें कोंबडें इ० बळी देणें २ (क) भूतबाधा न होण्याबद्दल कोंबडें किंवा बकरें मारणें

**जत्री**—स्त्री १ क्रमवार यादी, सूचीपत्र अनुक्रमणिका, कोष्टक, गोष्टी किंवा हकिकती याची परंपरा साखळी शकावली जसें—वाय याची चवाची-दराची-बऱ्याची सनाची जंत्री, हकीकतीची, गोष्टींची हिशोबाची प्रथाची-जत्री २ सनवार कोष्टक ३ (बडोदें) यादी सूची कॅटलॉग ४ (बडोदे) अदाजपत्रक, बजेट —वि यत्रानें तयार केलेलें, बनवलेलें [स यंत्र]

**जत्री**—स्त्री (व) मूस 'त्याची बायको इतकी सुस्वरूप होती कीं जशी काहीं जत्रींतून ओतली आहे' [स यंत्र]

**जत्रु**—न गळ्याजवळील हासळीचें (सरीचें) हाड [स]

**जत्रेकरी-करू**—पु यात्रेकरू-करी [स यात्रा]

**जथ**—स्त्री जूट जमाव, समुदाय [स यूथ] **जथणें**—सक्रि १ एक ठिकाणीं जमणें युक्त्या-प्रयुक्त्या करून एकत्र जमविणें, गोळा करणें (पैशाची रक्कम) तयार करणें बांधणें (इमारत) एका रांगेत जमणें उठणें चालीस लागणें आरंभ करणें (दुकान धंदा इ०) 'मी युक्तिप्रयुक्तीनें हजार रुपये जथले होते' 'चौघाकडून चार लाकडें आणून एकदाचें घर जथलें' 'घोंडयावर घोंटे घालून लग्न जथलें' २ तयार करणें रचणें (पुस्तक) ३

जोडणें, जुळविणें 'कोणाशी यमी गोष्ट मी जथू।'–पचेमुच १६ (गो) जथवें=जुळून येणें, माचणें जथविणें–सक्रि जमविणें गोळा करणें, एकत्र आणणें, घडवून आणणें

**जथा**—पु १ समूह तांडा, मंडळी २ कुटुंब, वंश, जात, कुळ, टाळी 'सूर्यवंशी जथा निवा।'–वेसीस्व ६ ५२. [स यूथ; हिं जथा] ०जथ-पत-थ–स्त्री १ समूह ढीग, एकत्र जमाव; युक्तिप्रयुक्तीनें केलेला (पैशाचा) संचय २ एकत्र आणणें, सर्व बाजूंनीं गोळा करणें (अस्ताव्यस्त पडलेले पदार्थ) ३ धंदा किंवा काम याच्यासाठीं केलेली सर्व तऱ्हेची उपाययोजना ०बंध–क्रिवि एकदम, एकत्र ०घळ–स्त्री १ जथा अर्थ २ पहा २ (आनुवंशिकता रोग, दुर्गुण इ०ची) 'दागिनींना विशेषत उपयोग करितात **जथेकरी**–पुअव. गोतऱ्यांच्या टोळ्या **जथेवार**–क्रिवि कुळवार **जथो**–पु (चि.) ज्या वधूवरांचें लग्न व्हावयाचें त्यांचीं वडील आणि धाकटीं भावंडें आई-बाप इ० चा समूह (लग्न जुळविण्यापूर्वी पहाण्याचें एक आवश्यक कृत्य) –मसाप २ ३६५

**जदीद**—वि १ नवीन (शिपाई चाकर) २ अलीकडचा नुकता 'जदीद करार झाला'–मं ७ ३५७० [अर जदीद्]

**जंद्री**—स्त्री (कु गो) धार्यांत घालण्याची-रुप्याची सांखळी, तोडा (अव) जद्यो [फा झर्जीर–जंजीर पहा]

**जधीं**—क्रिवि जेव्हां, ज्या दिवशीं 'जधीपासुन हरि जन्मला आनंद चित्तीं।'–पला २४ [स यदा]

**जन**—पु. १ माणूस (व्यक्तिश व एकत्र) 'तुज नको जन कोण म्हणे असें।'–र ४७ २ जमाव (माणसाचा) (समासात) मनुष्य जन=मनुष्यजात श्वजन=कुत्र्याची जात ३ जग, लोक 'जैसा जनामाजी खेचर।'–ज्ञा ५ ९९ म्ह० एकावें जनाचें करावें मनाचें ४ (प्र) पु एव मी 'प्रसाद चतुरा कसा तरि करा वरा हा जन।'–केका ६३ [स] **जनकथा**–स्त्री (प्रमाणरहित) दंतकथा, गोष्ट, परंपरागत हकीकत आख्यायिका [स जन+कथा] **जनचर्चा**–स्त्री लोकचर्चा, बोलवा ०चार-चाल–पु स्त्री जनाचार, सर्वसामान्य लोकाची चाल, रीत ०जाहीर–वि जगजाहीर [जन+अर. जाहिर] **जनता** स्त्री लोकसमूह समाज 'शतयाजनें तदाश्रित जनता ती सर्व दुःख निस्तीर्णा।'–मोसभा १ २३ **जनदाटी**–स्त्री लोकांची गर्दी 'तैसी जनदाटी बहु जाली।'–दावि ४२६ ०नीति–स्त्री सामान्य समाजाची नीति लोकवर्तन ०पद–पु देश, प्रांत ०पदधर्म–पु जननीति पहा ०पदभाषा–स्त्री देशी भाषा. 'गीर्वाण शब्द पुष्कळ जनपद भाषांचि दिसता थोडी।'–मो मंत्ररामायण, परिभाषा १७ ०प्रवाद–पु बाजार गप्प कंडी ०प्रवाह–पु जनरीत ०प्रवृत्ति–स्त्री लोकप्रवृत्ति लोकांची चालचलणूक, रूढी, प्रघात ०मर्यादा–स्त्री सामान्य चाल, रीत, प्रवृत्ति लोकरीत ०रंजन–न लोकांस आवडेल अशी कृति लोकांची करमणूक, त्यांस सुख देणें, लोकांचें रंजन, लोकतुष्टि ०रव–पु १ गोंगाट (लोकांचा), बोलाचाल, वर्दळ ०रीति-रीत–स्त्री लोकांची चालचलणूक, वागण्याची पद्धति जनप्रवृत्ति पहा ०रूढ–वि लोकांत चालत आलेलें ०रूढी-रूढ–स्त्री लोकांची चाल-रीत ०लज्जा-लाज–स्त्री १ लोकांस काय वाटेल यासबंधीं आदर लोकमताला मान देणें २ लोकांची भीति ०लोक–पु १ प्रत्येक मनुष्य २ सप्तलोकांपैकीं पांचवा लोक सप्तलोक पहा ०वदंती-वाणी–स्त्री जनप्रवाद पहा ०वन–न संसार आणि अरण्य गृहस्थाश्रम, आणि वानप्रस्थाश्रम 'अहंता टाकूनि सर्वस्वें। जनवन समान मानें।' ०वाक्य जनार्दन–सर्व लोकांचें म्हणणें तें देवाचेंच ही समज पांचामुखीं परमेश्वर ०वाढ–स्त्री दिढी, दुढी इत्यादि सर्व लोकांनीं योग्य अशी ठरविलेली (अगाऊ दिलेल्या धान्याची) वाढ ०वाद–वार्ता-श्रुत–पुस्त्री जनप्रवाद पहा ०व्यवहार-शिरस्ता–पु जनरूढी, जनरीत पहा ०स्थान–न दंडकारण्यांतील एक ठिकाण विशेषत नाशिक जवळचा प्रदेश 'जनस्थानीं वाट पाहे श्रीराम कृपानिधि।'–मप्र २ ७५ **जनस्वी**–वि लोकांसारखा वागणारा. 'महायोगी आणी जनस्वी। जनामारिखें।'–दा १ ८ ११ **जनाचार**–पु जनरीत –क्रिवि लोकवहिवाटीप्रमाणें **जनापवाद**–पु. दोषारोप, टपका 'लीलावती शिकतो तो दरिद्री होतो असा जनापवाद मात्र आहे' 'हार सख्य पार जातां हृदयींच जनापवाद शर थारे।'–मोवन ९ ५० **जनींजनार्दन**–सर्व लोक हे देव स्वरूपी आहेत अशी कल्पना. लोकमत हेंच देवाचें मत 'जनीं जनार्दन म्हणोनी जना। संतुष्ट करावें।'–दा १८ ४ ३७ **जनींमनीं**–क्रिवि (काव्य) आत-बाहेर प्रकट आणि गुप्त **जनींवनीं**–क्रिवि. गांवांत आणि (अथवा) वनांतरांत, लोकसमाजांत आणि अरण्यांत

**जनक**—पु पिता, बाप 'करुनि जनक माया धावता वेग गाढी।'–मुरामा ६ २९९ [स] –वि उत्पन्न करणारा, कारक समासांत–हास्य-प्रीति-मृत्यु-अनिष्ट-कल्याण-जनक. **जनकपिता**–पु जन्म देणारा बाप याचे उलट दत्तक घेतो तो पिता **जनणें**–अक्रि प्रसवणें विणें जन्म देणें [स जन्=जन्मणें]

**जनन**—न जन्म, उत्पत्ति [स] ०शांति–स्त्री अनिष्ट ग्रहावर जन्म झाल्यास शास्त्रोक्त जी शांति करावयाची ती **जननशास्त्र**–न उत्पत्तिशास्त्र –नाशौच–न सोयर वृद्धि ०स्थान–न. जन्मठिकाण ०स्थितिलय–न उत्पत्ति-स्थिति-नाश **जननी**–स्त्री आई माता **जनि**–स्त्री जनन जन्म **जनित**–वि जन्म केला उत्पन्न झालेला, तयार केलेला (समासांत) –संताप-संपत्ति गर्व-क्रोध-भय-लोभ-शोक-जनित **जनिता**–पु निर्माणकर्ता,

कारण, कर्ता, बाप पिता **जनिष्यमाण**—वि ज्याचा जन्म व्हाव याचा आहे असा, जन्मास यावयाचा [स ] **जनु**—जन्म 'घेता नाव जिवें अनंत जनुचें जें पाप दहीं असे। —नरहरि—गंगारत्न माला २४ (नवनीत पृ ४१९ )

**जनगी**—स्त्री (गो) पायातील साखळी, तोडा जनीर, जड्री पट्टा

**जनेल**—न (गो ) खिडकी [पो जनेग]

**जनाजा**—वि मानेवर केसाचे चार भोंवरे असणारा (घोडा)

**जनात**—स्त्री (नाविक) जास्त मजबुतीसाटीं काठाच्या खालीं जाडी फळी घडतात ती ही जनात सर्वच गलबतास असत नाहीं जनातीची फळी घडण्याच्या फळीपेक्षा जाड असते

**जनानखाना, जनाना, जनदारखाना**—पु अत पुर गोपा राणीवसा राज्यातील एक खातें [फा झनान्=स्त्रिया] **जनानी** वि १ वायकासाठीं केलेले वायकाना योग्य असे (वस्त्र, पदार्थ) २ बायकी गळयाला शोभणारें (गाणें पेहराव) ३ वायकी (वागणूक हावभाव, विचार, आवाज) ४ वायकी, नेभळेपणाचें, नामर्दपणाचें याच्या उलट पुरुषी ५ हिजडा नपु सक [फा झनानी]

**जनाब**—सबोधन स्वामी, महाराज [अर जनाब]

**जनाब**—पु १ उवरठा २ अगण बाजू 'ख वदाचे जना बात सेवक लोकानीं हजर असावें —रा ३ ७१ [अर जनाब्= श्रेष्ठत्व] **०आली** १ महाराज बहुमानदर्शक सबोधन २ उंच उवरा.

**जनाया**—पु (व ) मुलावाळाचा खटला पसारा [जन]

**जनार्दन**—पु विष्णु [स ]

**जनार्दना ऊद**—पु पिंवळसर आणि चागल्या जातीचा ऊद

**जनावर**—न १ पशु चतुष्पाद प्राणी २(ल)साप [फा जानवर मूळ फारशी शब्दाचा अर्थ प्राणी असा आहे मराठी फक्त पशूला लावतात तु०० स जन=जन्मणें] (वाप्र) **०उखळणें**—(माण ) पायाचें मूळ सुजणें सांधा निखळणें **०ठिपणें** मार लल्या दगडानें जनावराचा पाय दुखावला जाणें **०तणफुटणें**-गवत खाऊन खूप फुगणें **०तुरट असणें**-थोडें दूध देणारें असणें **०वागरल्यासारखें दिसणें**-दुखणें अमल्यासारखें दिसणें

**जनित करण)**—न (नृत्य) एक हात वक्ष स्थळावर टेवणें व दुसरा हात लोंबत सोडणें व चवडयावर उभे राहणें **०भौमि चारी**—स्त्री (नृत्य) एक हात मुष्टिहस्त करून छातीवर टेवणें व त्याच बाजूचा पाय अग्रतलसचर करणें [स ]

**जनी जनीचें पान**—स्त्रीन एक प्रकारचें विडयाचें पान, पान वलीचा प्रकार हें लहान काळें, सुवासिक तिखट, दोन्ही बाजूला रोंच असलेलें व बायकाना खावयास योग्य म्हणून यास बाइरीचें पान म्हणतात

**जनुगा-जनूब**—स्त्री दक्षिणदिशा [फा ]

**जनाबा**—पु कर्नाटकात पडाला म्हणतात

**जनोबाभट्टी**—वि मोडी अक्षर लिहिण्याची एक धाटी, विवलकरी वळणापक्षा सरस जनोबा नावाच्या लेखकावरून

**जन्नत-नशीन**—वि कैलासवासी, स्वर्गवासी [फा जन्नत्= स्वर्ग+निशीन]

**जव्हा**—क्रिवि (गो ) जेव्हा

**जन्म**—पु न. १ उत्पत्ति प्रसव २ आयुष्यमान 'मी जन्मात खोटें बोललों नाहीं ३ (समासांत) जन्मापासून एकदर आयुष्यभर जसें—जन्म—रंडा •ोड •ाठ इ० [स जन् =उत्पन्न होणें] (वाप्र) **०येणें**-अस्तित्वात येणें **०जाणें**-(आळसाम•ें) आयुष्य खर्च होणें **जन्मणें** १ उत्पन्न होणें जन्मास येणें निपजणें उपजणें २ जन्म देणें **जन्म न्हाणें पहाणें-येणें**-(ल ) ऋतुस्नात होणें न्हाण येणें **०दुणें**-गळत होणें प्रसृत होणें **जन्मांचा**-१ जन्मप्रभृति जन्मापासून नवे जन्माचा रोग=वंशपरपरचा, जन्मापासून असलेला रोग जन्माचा रागी= जन्मापासून आजारी २ जन्मभर टिकणार जसें—जन्माचा जोडा— सोबती=अत्यत ऋणानुबधी मित्र पतिपत्नीसबध **जन्माचा पदर घेणें** एखाद्याच्या पालनपोषणाची जबाबदारी जन्मभर अगावर घेणें **—चा पाटा वरवगा घेणें** एखाद्यास जन्मभर पोसणें, त्याच्यासाटीं श्रम घेणें **—ची आठवण राहणें**-१जन्मभर स्मरण टेवणें कधींहि विस्मृति न होणें २ पत्री अल्ल घडणें **—चे कर्मी कमा**-जन्मातून एकदा होणारी, वारवार न होणारी गोष्ट कृत्य नामार्थी याचा क्रियाविशेषणासारखा उपयोग करितात 'त्यानें जन्माचकर्मी एक मुंज केली परतु दमडी दमडी दक्षिणा दिली —**तून जाणें**-(क ) निरुपयोगी होणें (कर्तव्यशून्यमाणसा सबधीं योजतात) **जन्मास घालणें** अस्तित्वात आणणें **०घाल णारास रडणें** जन्मदात्याच्या नावानें खडे फोडणें **जन्मास येणें**-अस्तित्वात येणें **नवा जन्म होणें**-एखाद्या भयकर अप घातातून किंवा रोगातून उठणें **अन्य जन्मीं**-दुसऱ्या जन्मात म्ह० १ जन्मीं नाहीं तें कर्मी (अनिष्ट गोष्ट दाखविताना म्हणतात) २ जन्मा आला हेला आणि पाणी वाहता मेला समासशब्द— **०करंटा**-वि जन्मापासून दरिद्री दुर्दैवी **०कर्म**-न १आयुष्यातील विशेष काम आश्रमधर्म २ उत्पत्ति आणि कार्य आयुष्यातील एक दर हकीकत तू काय समजलास? तुझें जन्मकर्म मला ठाऊक आहे' **०काल-ळ**-पु १ जन्माचा वेळ २ जन्मपत्रिका ३ सब आयुष्य म्ह० जी खोड बाळा ती जन्मकाळा **०कुटाळ, जन्माचा**

**कुटाळ**-पु नेहमींचा कुचेष्टा करणारा. नेहमीं कुटाळी करणारा **०कुंडली**-स्त्री ज्या लग्नावर जन्म होतो त्या लग्नकाळचें ग्रहांच्या स्थितीचें कोष्टक **०कुन्हाड**-स्त्री (ल) नेहमींचा त्रास देणारा, गाव कुन्हाड सतत त्रास देणारा **०खुंट** पु (खोखोचा किंवा खोक डाला खळ) सीमेवरच, दोन टोंकावरचे गडी (माणूस किंवा वस्तु) **०खोड**-स्त्री जन्मापासून लागलेला किंवा हाडीं मासीं खिळलेला दुर्गुण **०गांठ**-स्त्री १ जन्मभर टिकणारा संबंध २ वाढदिवस [म जन्म+ग्रंथि] **०गुण**-पु स्वाभाविक गुणधर्म **०चुडेल-चुडैल**-स्त्री (निंदार्थी) भांडखोर, वजाग स्त्री **०जन्मांतरीं-०जन्मीं**-क्रिवि पूर्वीपासून झालेल्या सर्व जन्मांमध्यें आणि ह्या जन्मात अनेक जन्मात **०जुगाक**-क्रिवि (गो) आजन्म, प्राण असेपर्यंत **०जूग**-वि जन्मभर पुरेल असें 'जन्मजूग हातात। विभूतिचा गोळा।'-अमृत १२८ **०जोड**-स्त्री जन्मभर पुरेल इतका साठा **०जोडा**-पु जन्मगांठ पहा **०टिपण**-न जन्म पत्रिका **०त.**-क्रिवि १ जन्मापासून, जन्मामध्यें 'जन्मत वाईट गोष्ट मजपासून घडली नाहीं' २ स्वाभाविक, स्वभावत 'कोणी जन्मत शहाणा असतो कोणी पढून होतो' **जन्मतिथि**-स्त्री वाढदिवस जन्मकालची मिति **०दगदगी**-वि नेहमीं काळजीचा, नेहमींचा चिंतानात **०दरिद्री-भिकारी**-वि जन्मापासून भिकारी **०दिन-दिवस**-पु वाढदिवस जन्मतिथि **०नक्षत्र**-न ज्या नक्षत्रावर जन्म झाला तें **०नाम-नाव**-न जन्मनक्षत्राच्या संबधानें अवकहडा चक्रावरून (बारशाच्या दिवशीं) ठेवलेलें नाव **०पंक्ता-पत्र-पत्रिका-पत्री**-स्त्रीनस्त्री जन्माच्या वेळचें वर्ष, तिथि, राशी, कुंडली इ० लिहिलेला कागद व त्यावरून सगळ्या जन्मामधील घडणाऱ्या गोष्टींचें तयार केलेलें कोष्टक, जन्मटिपण 'याची करा जी जन्मपत्री।'-कथा ५४१५ **०पाश**-पु जन्म, आयुष्य संपेपर्यंत मागें लागलेलें संकट, लचाड **०प्रभृति**-क्रिवि जन्म झाल्यापासून **०भाषा**-स्त्री. मातृभाषा मायभाषा, मूल जन्मापासून जी भाषा बोलतें ती **०भूमि-भूमिका**-स्त्री माय देश जेथें जन्म झाला ती जागा **०मरण**-न जन्मणें आणि मरणें, याची परंपरा जन्ममरणाची आवृत्ति 'पुनरपि जननं पुनरपि मरणं।' **०मरणाधीन**-वि जन्ममृत्यूच्या स्वाधीन ज्या गोष्टीस जन्म व मृत्यु लागलेले आहेत अशी (अशाश्वतपणा दाखविणारी) **०मर्याद**-क्रिवि मृत्यु यईपर्यंत सर्व जन्मभर आजीव **०मास**-पु ज्या महिन्यात जन्म झाला तो महिना **०योग**-पु जन्मकालीन ग्रहांची शुभाशुभ फलसूचक स्थिति **०राशि-रास**-पुस्त्री ज्या राशीवर जन्म झाला ती, जन्मकालीं चद्र ज्या राशीस असेल ती रास **०रोग**-पु जन्मापासून जडलला रोग **०रोगी**-वि जन्मापासून आजारी, नेहमींचा दुखणेकरी **०लग्न**-न जन्मकालीं जी राशी उदय पावत असल ती **०लिखित**-जन्मपत्र पहा **०वर-भर**-क्रिवि आयुष्यभर 'जन्मवरी स्वार्थ केला।'-दा ३५५ **०विता**-वि जन्म देणारा. **०व्रती**-वि जन्मभर व्रत घेणारे आचरणारा **०सवाशीण-सौभाग्यवती**-स्त्री १ सौभाग्य मरणारी २ (ल) वेश्या **०सळ**-वि जन्मापासून खोडकर त्रासदायक (मूल) **०सांड**-स्त्री जन्मापासून एखाद्या गोष्टीपासून पराङ्मुखता (क्रि० देणें, करणें) **०साफल्य-सार्थक्य**-न आयुष्यातील ध्येयाची सिद्धि **०सावित्री**-स्त्री १ (आशीर्वाद देताना) जन्मसवाशीण 'तू जन्मसावित्री होसी। चद्रार्कवरी राहसी।'-कथा १७१७१ २ (ल) पांघरण्याचें किंवा नेसावयाचें जें कधीं धुतलें जात नाहीं असें वस्त्र **०सोंवळा**-वि १ जन्मसावित्री अर्थ २ पहा २ (पवित्र समारंभामध्यें) तसलें सोंवळें नेसणारा **०सौभाग्य**-न जन्मापासून चांगलें नशीब **०स्थ**-वि जन्मलग्नामध्यें असलेला जन्माच्या वेळेचा (ग्रहकुंडलींतील) **०स्थान**-न १ जन्मभूमि २ जन्मलग्न **०स्थानीं लघुशंका करणें**-१ मातृगमन, मातागमन २ (ल) उपकार करणारावर अपकार करणें कृतघ्नता **०स्वभाव**-पु जन्मापासूनची वृत्ति, वागण्याची तऱ्हा जन्माची प्रकृति **-ची गांठ**-विवाहासारखा कधीं न तुटणारा संबध **-ची जोड**-१ जन्मजोड पहा २ पतिपत्नी-बापलेक संबध **ची भाकरी-बेगमी**-जन्मभर टिकणारें पोटापाण्याचें साधन **-ची साट**-जन्माची भाकर पहा **जन्माचें सार्थक**-जन्मातील ध्येय उद्देश, हेतु (क्रि० करणें) **जन्मांतर**-न १ दुसरा जन्म (मागचा किंवा पुढचा) २ नशीब दैव 'ह्या पालखीत बसावें असें माझें जन्मांतर नाहीं' **०आठविणें**-लहानपणचे दिवस आठविणें **०उघडणें**-नशीब चांगलें अथवा वाईट अनुभवास येणें **०काढणें**-(ल)-बद्दलचा अस्सल दस्तैवज शोधून काढणें **०सांपडणें-मिळणें-हातास लागणें**-वरील प्रकारचा दस्तैवज मिळणें, सापडणें **०पाहणें-शोधणें-तपासणें**-जन्मपत्रिका पाहणें ससारातील कामकाज पाहणें **०फुटणें**-नशीब फुटणें, दुर्दैव ओढवणें **जन्मांतरीं न घडणें-न होणें**-संबध जन्मांत न होणें **जन्मांतर-कथा-गोष्ट-हकिकत**-स्त्री मागच्या आयुष्यातील गोष्ट किंवा चांगलें कृत्य **जन्मांतर(रीं,चा-वैरी-दुष्मन-दावेदार**-वि मागील जन्मामधील शत्रु याच्या उलट जन्मांतरींचा मित्र, सहकारी (ग्राम्य) **जन्मांतरींचा द्वेष-वैर मैत्री**-ऋणानुबंध इ० वगैरे **जन्मांतराचें ज्ञान**-न लहान मूल किंवा प्राणी याच्यामधील दिसून येणारी उपजत बुद्धि **जन्मांतरयोग**-पु मागच्या जन्मीं केलेल्या चांगल्या कृत्यामुळें या जन्मीं सुख मिळतें ही कल्पना **जन्मादारभ्य**-क्रिवि जन्मापासून (आतापर्यंत) **जन्मांध**-वि जन्मापासून किंवा उपजत आंधळा **जन्माष्टमी**-स्त्री गोकुळअष्टमी श्रावण वद्य अष्टमी **जन्माक्षर**-न पचांगामध्यें अवकहडा चक्रात

जन्मनक्षत्राला जें अक्षर असतें तें. **जन्मोजन्म-जन्मी**-क्रिवि या व पुढील जन्मात, अनेक जन्मात निरतर. जन्मजन्मातरीं पहा. **जन्मान्तरी-जन्मोत्री**-स्त्री जन्मपत्र पहा 'वरिष्ठे वर्तविजी जन्मोत्री। यामीं दोन पुत्र आणि येक स्त्री।' -कथा ३ ३ ७१

**जन्य**—न युद्ध 'नृपभगदत्तादि नरवरा जन्य।' -मोभीष्म ११ ७६ [स]

**जन्य**—वि. १ जन्मलेला, उत्पन्न झालेला, तयार केलेला. (समासात) पित्त-कफ-वात-शोक-क्रोध-काम-जल-अज्ञान-जन्य २ अद्यापि जन्मणारा (भविष्यकाळीं) **०जनक**-वि उत्पन्न होणारा व करणारा याचा जो परस्पर सबध तो; पुत्रपिता (संबंध), कार्य-कर्तृ (सबध)

**जन्यराग**—पु (संगीत) थाटामध्यें वर्गीकृत केलेला राग विशिष्ट थाटावरून तयार झालेला राग.

**जप**—पु. १ वेदऋचा, गायत्री इत्यादि मत्र याचें पुन पुन्हा पठण आवृत्ति, देवाचें नाव इ० मनातल्यामनात पठण करणें २ मत्र म्हणत जपाची माळ ओढणें ३ (ल) निदिध्यास, उच्चार करणें, विवरण करणें (कार्य, इच्छा याचें) (क्रि० धरणें, घेणें) [स] **०जाप्य**-न जप व त्यासारखें इतर धार्मिक कृत्य. सकाळीं स्नान करून काहीं जपजाप्य केलें पाहिजे' **०तप**-जप जाप्य पहा **०माला-माळ-माळा**-स्त्री जपाची संख्या मोजावयाची माळ **०घेणें**-जप अर्थ ४ पहा **०यज्ञ**-पु नामस्मरणरूपी यज्ञ **जप्या-पी**-वि. जप करणारा **जपीतपी**-वि नेमानें जप व तप करणारा

**जपण-णी, जपणूक**—१ स्त्री. जतन, साभाळ, राखण, वाट पहात बसणें पाळत (क्रि० करणें जपणीस बसणें, लागणें) २ लक्ष लावणें 'निजपर्णीं जपणी जड दाविना। -वामन, गृहदर्पण ८१ [जपणें] **जपणें**-अक्रि १ साभाळ करणें, लक्षपूर्वक नजर ठेवणें 'चाकरास जपलें पाहिजे नाहीं तर जोगवील' २ लक्षपूर्वक पाळणें, पहाणें 'पथ्यास जपलें असता औषधाचा गुण लवकर येतो' ३ सावधानपणानें, काळजीपूर्वक वाट पहाणें 'हगामास जपलें तर जिन्नस सवग मिळतो' टपणें, टपून बसणें 'तुची स्त्री परम सुदर। न्यावया जपती असुर।' [सं गुप्] **जपून**-धातुअ. काळजीपूर्वक

**जपणें**—अक्रि १ पुन्हा पुन्हा उच्चारणें, वारवार म्हणणें, जप करणें २ (ल) सारखी कुरकुर करणें, रडगाणें गाणें 'द्रव्य गलें तें गेलें आता गेलें गेलें असें जपतोस कशास?' [स जप= मनात म्हणणें]

**जगतब, जबतब**—क्रिवि कसें तरी मोठ्या कष्टानें जब तब पहा

**जंपती**—पु दपती, नवराबायको [स दंपती]

**जपा**—स्त्री जासवद (झाड व त्याचें फूल) [स] **०कुसुम**-न जासवदीचें फूल 'जपाकुसुम तेथेंचि विंबलें।' -रयावा ९ २५५

**जपाळ**—पु जेपाळ, जयपाळ पहा (एक औषधी)

**जप्त**—पु नियत्रण, दबाव. 'असे लोकावर जप्त कसा राहील?' -रा ५ ५२ -वि पकडलेलें, धरलेलें, सरकारजमा; (सरकारनें) अटकाव केलेलें [अर झब्त] **-मुलूक**-वि प्रदेशनेता (सताजी घोरपडयाचा किताब) **०रप्त, जप्त रफ्त**-पु बदोबस्त, व्यवस्था. 'करारवाके जप्त-रफ्त करू' -रा ६ ६१२ [फा. झब्त-उ-रब्त्] **जप्ती**-स्त्री १ जप्त करण्याची क्रिया. हरण, नागवणूक, अम्मल, ताबा, जप्त केलेला माल २ (कायदा) मिळकतीवर खाजगी ताब्याऐवजी कोर्टाचा ताबा सुरू करणें ३ (ल) नजरकैद 'तुझे घरीं तुजवर जप्ती करी सख सर्वेनाही।' -होला १०३ **जप्तीदार-वाला**-पु १ बेलीफ जप्ती करणारा अमल्दार २ (को) रत्नागिरी जिल्ह्यातील खोतीगावात वसुलाकरिता सरकारनें नेमलेला नोकर, तलाठी, खोत कबुलायत देत नाहीं त्या वेळीं गाव जप्तींत टाकून सरकार त्या वर्षांपुरती वहिवाट करतें

**जफा**—वि (कु) फाजील, जास्त जापा पहा

**जंब**—पु टोंग [स दभ]

**जब, जबा, जबे**—स्त्री विधीपूर्वक हत्या, वध, ठार करणें 'पुढे गाय जब केली।' -ऐपो ११ (क्रि० करणें) 'काजीनें जबा करून द्यावी -भाइचमं१ ६४ [अर झब्ह]

**जबडा**—पु तोंड, जाभाड, दाभाड (खालचा आणि वरचा या विशेषणासहित) वासलेलें तोंड. [हिं स जभ्=जम्भ]

**जबतब**—क्रिवि जेमतेम, कसें तरी. जपतब पहा. [हिं]

**जंबया, जंबिया जंब्या**—वि एक प्रकारची कट्यार; खजीर [फा जंबिया]

**जबर**—पु (पत्याचा खेळ) डाव्या हातचा भिडू, खेळणारा

**जबर-रा**—स्त्री दरारा, वरचढपणा 'जबर त्याची सबसे ज्यादा गादीवर दवलतराव शिंदा।' -ऐपो १५२ -वि श्रेष्ठ, ताकतवान (माणूस, पशु) जोराचा सोसाट्याचा (पाऊस, वारा), कठिण त्रासदायक (काम, ओझें) जगी, मोठें (घर, नदी, झाड) उभट, कठिण (चढ, चढण) देण्यास कठिण, फार अवाढव्य (किंमत, दर) दुर्धट त्रासदायक (रोग) लाब लचक कंटाळवाणा (रस्ता मार्ग, प्रवास) अगडबब, अवजड (दागिना) (प्रमाणराहित्य आणि प्रचडपणा दाखविण्यासाठीं योजतात) [अर जब्र फा झबर्] सामाशब्द- **०जंग**-पु ल्हान तोफ -वि शूर जवानमर्द लढवय्या [अर. जब्र+फा-जग] **०दस्त**-वि १ जुलमी अन्यायी, दडप्या २ श्रेष्ठ, मजबूत, बळकट, मोठया योग्यतेचा याच्या उलट जेरदस्त ३ अदलावदलीनें जबर बरोबर योजतात [फा झबर्दस्त] म्ह० (व)

जबरदस्तचा ठेंगा शिरपर = जबरदस्तापुढें कुणाचेंच चालत नाहीं. ०दस्ती–स्त्री. १ जुलूम; जोर; अन्याय; बलात्कार. 'इंग्रजांची जबरदस्ती सर्वांवर पडली असें वाटतें.'–ख ११.६०१०. २ आवेशाचें कृत्य, यत्न, श्रम. 'जबरदस्तीनें नदी डोंगरावरून नेली.' जबरा–पु (छापखाना) मोठा टाईप; मजकुरांतील स्थलनामें व व्यक्तिनामें या टाईपांत घेण्याची वहिवाट आहे. जबरी–स्त्री. जबरदस्ती. 'पादशाही जबरीनें घेईल.'–चित्रगुप्त पृ ३४. [फा. झबरी] जबरीची चोरी–स्त्री. (कायदा) दरोडा; कोणा मनुष्यास जीव घेण्याची वगैरे भीति घालून त्याच्यासमक्ष त्याच्या ताब्यांतून जंगम माल नेणें. जबरी-संभोग–पु (कायदा) कोणा स्त्रीशीं तिच्या सम्मतीवांचून किंवा भय घालून मिळविलेल्या संमतीनें किंवा नवऱ्याचें नातें आहे अशी फसवणूक करून केलेला संभोग, बलात्कार.

जबजंग–दस्त—जबर मध्यें पहा.

जबात—वि (गो.) हुषार; कुशाग्रबुद्धीचा; निष्णात.

जबान—स्त्री १ जीभ. २ वाणी, वचन. (क्रि० येणें; घालणें). [फा. झबान् तुल० सं. जिह्वा] जबानी–स्त्री. साक्ष; (न्यायाधिशापुढील) साक्षीदाराचें लेखी, तोंडी म्हणणें, हकीगत. जबानीहुकूम–पु तोंडी हुकूम; लेखी नव्हे तो.

जबाब—पु १ उत्तर; प्रत्युत्तर; कांहीं एका प्रश्नास दिलेला जाब २ हुंडीबरोबरचें पत्र ३ (कायदा) प्रतिज्ञा ४ तोंड. 'वाऱ्याचें भोंक वेंवडें आहे व त्याचा जबाब मोठें आहे'–सूर्योदय १०९ [अर जवाब्] (वाप्र) जबाबर्णे–क्रि उत्तर देणें हुजर-जबाबी–तावडतोब उत्तर देणारा. सामासिकशब्द– ०दार–वि ज्याच्यावर जबाबदारी आहे असा; जिम्मेदार; जोखीम घेणारा, भरंवशाचा. [फा जवाब्दार] ०दार प्रातिनिधिक राज्यशासनपद्धति–स्त्री जेथील कार्यकर्ते लोकप्रतिनिधींस जबाबदार असतात अशी राज्यव्यवस्था; रिस्पॉन्सिबल गव्हर्नमेंट या इंग्रजी शब्दास बनविलेला मराठी प्रतिशब्द ०दारी–स्त्री जिम्मा; जोखीम, भार [फा जवाब्दारी] ०निशी–नीस–जबाबनिशी–नीस पहा ०सवाल–जाबसाल–पु बोलणें उत्तर प्रत्युत्तर. 'आम्ही जबाब सवाल केला जे.'–तरा ८१. जबाबी–वि १ उत्तरें देण्यात तयार. हुशार २ तासाचे ठोके वाजणारें (घड्याळ). 'एक घड्याळ जबाबी'–रा १२.६८. ३ (कायदा) शपथ–प्रमाण करून न्यायासनापुढें सांगितलेली हकीगत, दिलेलें उत्तर ४ (कों.) मामलेदाराच्या हाताखालचा जबाबलिहून घेणारा (कारकून) ०कार्ड–न जोडचिठ्ठी; उत्तर देण्याकरितां कार्ड जोडलेलें असतें असें कार्ड, रिप्लायकार्ड या इंग्रजी शब्दास प्रतिशब्द. ०हुंडी–स्त्री पेढीवर पैसे भरून ज्याला पैसे पाठवावयाचे असतील त्याच्या नावची पेढीवाल्या कडून घेतलेली पावती

जंबाळ—पु १ चिखल, राड; रेंदा. २ पाण्यात वाढणारें एक झाड; (लॅटिन) व्हॅलिस नेरिया. 'तों तो फुगे कुगेहद्वारीं मुखीं हि जैसि जेवाळ।'–मोकर्ण २८.१९. [सं. जंबाल]

जंबीर—पुन १ लिंबू २ लिंबाची एक जात. [सं. जंबीराम्ल–न लिंबापासून निघणारें अम्ल. (इं) सायट्रिक ॲसिड.

जंबु–बू—स्त्री जांभूळ (झाड आणि फळ) [सं.] ०द्वीप–न १ हिंदुस्थान २ काश्मीराजवळील जम्मु संस्थान. [सं]

जंबु(बू)क—पु कोल्हा [सं.]

जबु(बु)न—वि १ वाईट; घाण, खराब 'जबुन हें कर्नाटकचें जळ।'–ऐपो ७४ २ दरिद्री गरीब, म्याड. 'वऱ्हाडचे महार जबुन म्हणतात.'–रा १.११७. [अर जुबुन=म्याडपणा, फा झबून्]

जंबुरक, जंबूर, जंबुरा—पु. उंटावरील एक लहान तोफ 'सुतनाळी जंबुरे उंटावर रोंखुन।'–ऐपो १०९. [फा. झंबूरक्, झंबुरा]

जंबुर्दी—वि. पाचेसारखा हिरवा रंग असलेलें (हिरव्या मखमलादीविषयीं उपयोग). [फा. झुमुर्रुद=पाच]

जंबू—पु गुजराथेंतील एक ब्राह्मण जात व तींतील व्यक्ति. यांची वस्ती वऱ्हाडतहि आहे खिस्ती ब्राह्मण हे नगरकडे आढळतात

जबेतराश–स—वि. हजरजबाबी; उत्तर देण्यास तत्पर; बोलण्यात हुषार [फा. जबान् = जीभ + तराश = कापणारा] ०तराशी–स्त्री. हजरजबाबीपणा. ०फरास–वि. वक्तृत्व करणारा [फा जबान्+फराश]

जंबेरी—स्त्री कागदी लिंबाची गोड जात; जंबीर पहा.

जंबोरा—पु मोठा अंबर; खिळे उपटण्याचा चिमटा

जब्बर–दस्त—जबरदस्त पहा

जंभ—पु दंभ, ढोंग, गर्व, अहंकार [सं. दंभ]

जंभोरा—वि (ना) अतिशय आंबट (दहीं वगैरे) [सं. जंबीर]

जम—पु व्यवस्था, मेळ, जोड, जमाव मिलाफ, बनाव, जुळवाजुळव, संबद्धता (वाद्य, पदार्थ, नानाप्रकारचे स्वभाव इ०ची) मिलाफ, जुळणी, एकी (बोलणें, भाषण, हिशोब यांचा). (क्रि० पडणें; बसणें) [अर. जम्अ=जमणें, सं. यम्] ०खट्टा पु. (व.) जमाव, गर्दी; अड्डा. 'जमखट्टा जमला आहे तुमच्या घरीं.' जमचें–अक्रि. (गो.) जमणें. ०जमा–स्त्री. (गायन) दोन स्वरांपासून तीन किंवा चार स्वरापर्यंतो एकत्रपणा करून वेगवेगळे प्रकार करून दाखविण्याची क्रिया. –कला (बडोदें) १३४. ०जुट–पु. जंगजोड पहा. [जमणें+जुटणें] ०बाजमव–स्त्री निरनिराळ्या ठिकाणाहून एकत्र करणें. ०विणें–सक्रि. १ एकत्र करणें; गोळा

करणें २ गाठविणें, थिजविणें, दाट करणें (द्रवपदार्थ) ३ पट विणें, मिलाफ घालणें, जमणें पहा

**जमई**—स्त्री एक शस्त्र, जमदाड पहा. 'हत्यार जमई जम दाड माडु घेऊन हातीं।' -ऐपो १०९

**जमखाण-न, जमखाना**—पु सुखासन,जाजम मोठी सत रंजी 'तिवाशा जमखान टाकिलें।' -ऐपो १५ [फा जमुखानाह्]

**जमणें**—अक्रि १ एकत्र येणें, एकवटणें. २ घट्ट होणें, गोठणें, थिजणें इ० ३ दृढ आणि बळकट होणें (शरीर) 'या औषधानीं शरीर जमेल' ४ साचणें, चांगला होणें,, फळास येणें (भाजी पाला, उद्योग) ५ भरभराटीला येणें (उद्योग, प्रयत्न, काम) 'सवार जमत नाहीं' ६ मिलाफ होणें, सांगड असणें, मेळ बसणें, जुळणें, पटणें, एकमत होणें (नानाप्रकारचे स्वभाव, घटकावयव), जम पहा. एकत्र होणें मिश्रित होणें 'हे परभुमध्यें जमून गले' ७ मधुर होणें मजूळ होणें कानास गोड लागणें (गाणें) 'उघडया जागेमध्यें गाणें चागलें जमत नाहीं' ८ भरभराटीस यणें, श्रीमत होणें [हिं जमना, सं यम्-यमन तुल० अर जम्अ-जम्म= गर्दी, दाटी]

**जमदग्नि**—पु १ एक ऋषि २ (ल) शीघ्रकोपी माणूस

**जमदड-दाड-दाढा-दाढा**—स्त्रीपु लाब पल्याची तल वार 'जमदाड माडु घेऊन हातीं।' -ऐपो १०९ -वि रुद्र, धटिंगण, अगडबब. [स यमदड-दष्ट्रा]

**जमन, जमनविलावर**—यमन, यमनविलावर पहा

**जमनीच**—स्त्री वधुवरातील अत पट, पडदा [स जवनिका]

**जमनीस**—पु १ एक वसुली अधिकारी २ फरासखान्या वरील एक अधिकारी [फा जमनवीश्]

**जमयेत**—स्त्री मडळी, जमात पहा

**जमरूद**—पु १ पेरूचें झाड आणि फळ. २ पाच (जवाहीर) 'जमरूद पाचेचा जोड एक' -रा ७, -खलप १२१ [फा झुमुर्रुद्=पाच]

**जमा**—स्त्री १ आय, जमाव, समूह, नफा, उत्पन्न (जमीन, दुसऱ्याकडून रोख अगर अन्य रूपानें आलेली रक्कम,गावें यांचें); प्राप्ति, मिळकत २ (ल) गणना, अतर्भाव 'आमची योरातहि जमा नाहीं आणि पोरातहि नाहीं' ३ एकूण रक्कम, बेरीज [अर जम्अ, स यम्] -वि एके ठिकाणीं जमविलेलें, गोळा केलेलें (वाप्र) **०करणें-धरणें**-१ जमाखर्चाच्या वहींत रक्कम जमेच्या बाजूला लिहिणें २ गोळा करणें, एकत्र जमविणें 'उच्छिष्ट फळें जमा करी।' -देवदास, सतमालिका ६७ **जमेंत न खर्चांत**-मुळींच महत्त्वाचें नसणें सामाशब्द- **०कामिल-कमाल**-पु पुरापुरा, कायमचा, शेवटचा सारा **०कदीम**-पु जुन्याकाळापासून चालत आलेला सारा **०डन**-सक्रि (खा) जमविणें **०तकसीम**-निरनिराळ्या प्रांताच्या साऱ्याच्या कराची जमेची बेरीज -भाइ वर्ष ७. अंक १-४ **०पंचोत्र**-न बाहेरून येणाऱ्या मालावरील जकात **०बंदी**-स्त्री १ शेतसारा, दरवर्षी द्यावयाचा आकार, जमीनीची पहाणी करून ठरविलेला आकार २ नियमित जमा व वसूल, सामान्य कर ३ शेतसाऱ्याचा जमाखर्च. [फा जम्अ+ बंदी] **०बंदी जमा**-स्त्री जमीन मोजणीच्या वेळेस अधिकाऱ्यानें ठरवलेली जमाबंदी किंवा वसूल याच्या उलट हाळबदी जमा **०वसूल**-पु सरकारचावडी वसूलाची रक्कम (सरकारी) [अर] **०वसूलबाकी**-स्त्री जमेचा वसूल, कर आणि राहिलेली बाकी

**जमाखर्च**—पु १ आय-व्यय २ हिशोब, व्यक्ति किंवा *संस्था यानीं चालविलेल्या उद्योगधंद्यासंबधीं होणाऱ्या देवघेवीची* व्यवस्थित रीतीनें ठेवलेली नोंद [अर जम्अ+खर्च] (वाप्र) **जमाखर्च बरोबर असणें**-नफातोटा बरोबर असणें, शिल्क बाकी पूज्य **०खर्च नसणें**-महत्त्वाचें नसणें **०खर्ची उगवि (व)णें**-१ जमाखर्चांत दाखल करणें, माडणें २ कोणत्याहि कामाला, नोकरीला योग्य करणें म्ह० १ जमाखर्ची न पडे ताळा पर्ती कागद केला काळा २ आजा मेला नातू झाला जमा- खर्च बरोबर सामाशब्द- **०खर्ची**-वि १ हिशोबासंबधीं २ शिल्क कमीजास्त न होता, देणें घेणें चटतें किंवा कमी होतें ती ३ जमाखर्च लिहिण्यात हुषार

**जमाजम**—स्त्री १ एकत्र जमणें, गोळा होणें २ पुष्कळ लोकाचा जमाव. (क्रि० जमणें)

**जमात**—स्त्री १ जमाव 'पाहुनी गोधनाची जमात।' -नव १३ ५९ २ सभा, मंडळी थवा, सैन्याची तुकडी, एकत्र जमलेली मडळी, पचायत म्ह० जमात तो करामत (समासात) पाय दळ जमात=पायदळाची तुकडी, स्वारजमात=घोडदळाची तुकडी [अर जमाअत] सामाशब्द- **०खाना, जमायतखाना**-पु मशीदीचे तिन्ही बाजूस जमातीस बसण्यासाठीं बाधलेला दुमजली अगर तिमजली सोपा -ऐस्फुले २ ३४ **०त(ती)दार-जमा द्दार**-पु सैन्याच्या टोळीचा नायक, जमादार [फा जमाअत्- दार] **०त(ती)दारी-जमाद्दारी**-स्त्री जमादाराचा हुद्दा आणि पदवी [फा] **जमाती**-वि सैन्याविषयीं जसें-जमाती-खर्च- दरमाहा-मोहजबा-शिल्क-हिशेब

**जमादार**—पु १ जमातदार पहा २ कपनीच्या सैन्यातील एक अधिकारी ३ (हिर हरकारा, शिपाई याच्या)टोळीचा मुख्य **जमादारी**-स्त्री जमादाराचें काम आणि हुद्दा

**जमादिलाखर**—पु मुसल्मानी वर्षाचा सहावा महिना. [अर जुमादीयुल आखिर्]

**जमादिला(लो)वल**—पु मुसल्मानी वर्षातील पाचवा महिना. [अर जुमादीयुल अव्वल]

**जमादिस्सानी**—पु जमादिलाखर पहा [अर जुमादिस्सानी]

**जमान**—पु जबाबदार हमीदार जामीन प्रतिभू 'किंवा त्यांचा जमान घऊन,' –रा १५ २४ [अर ज़मान] ०खतया–पु जामीनपत्र हमीपत्र मुचलका **जमानत–नात**–स्त्री जामिनकी जबाबदारी (वि० पणें) ०**दार**–पु हमीदार जामीन [अर ज़मानुदार]

**जमाना**—पु १ हंगाम ऋतु २ काळ, वक्त; युग 'आजी जमानाच असरचा आला आहे' –म ११ १८३ [अर ज़माना] (वाप्र) **उलटा जमाना आहे**–विपरीत काळ आहे 'उलटा जमाना आला।' –भपलग ६६

**जमायर्दी**—स्त्री सैन्याची भरती सैन्याची गर्दी, समुदाय 'अशा जमावाची करून।' –ऐपा १०७ जमा पहा

**जमालगोटा**—पु (व) नेपाळ्यांची याने शौचास साफ होते

**जमाव**—पु १ जमात पहा २ अनेक वस्तूंचा समूह ३ फौज. ४ जमाव या शब्दाचा जम या शब्दाचेच निरनिराळे अर्थ आहेत त्याप्रमाणेंहि उपयोग करतात [अर जम्अ] (वाप्र) ०**पडणें**–कायम करून घेणें (धंदा, हुद्दा) दृढ–स्थिर–भरभराटीचा–चांगला होणें (धंदा, व्यापार) –**धामली**–क्रिवि जमाव, गट करून टोळीनें (केलेली चोरी), मंडळीनिशीं–नें (केलेलें कृत्य)

**जमामर्दी**—स्त्री पराक्रम, बहादुरी

**जमाविणें**—स्त्री एकत्र जमवणें गोळा करणें.

**जमिदार–री**—जमादार–दारी पहा

**जमिनीलोक**—पुअ इनामदारवर्ग

**जमियत**—स्त्री मंडळी, सैन्य जमात पहा

**जमी**—स्त्री जमीन ०**दार**–न जमीनीचा मालक ०**दोस्त**–पु १ भुईकोट 'जमीदोस्त किल्ले इंग्रजाचे लढाईत परिच्छिन्न होय याचे नाहीत' –रा ७ ६१ २ जमीनीशीं खिळलेला, जमीनदोस्त

**जमीन**—स्त्री १ भूमी, धरणी भुई नद्या, समुद्र आणि वातावरण याखेरीजची जागा २ पृथ्वीचा पृष्ठभाग ३ तट, जागा 'येथून दहा कोस जमीन चालले म्हणजे समुद्र लागेल' ३ शेत लागवडीची जागा 'राजापूर प्रांतीं सगळा कातळ आहे जमीन थोडी' ४ गच्ची मजल्यावरची भुई अथवा पेंडाची तयार केलेली भुई ५ वस्त्राच्या बाजूच्या काठामधील आतील अंग, तवा ६ चित्राची पार्श्वभूमि ७ (ल) मूळ आधार भुई पहा जमिनीचे प्रकार – पड जमीन=नापीक जमीन वहित जमीन=लागवडीची जमीन तणेली जमीन=गवत माजलेली जमीन करळ–चोपण–खळगा जमीन=काहीं खोलीवर चुनखडीसारखा टणक थर असलेली, हींतून पाणी लवकर झिरपत नाहीं आगरी जमीन=समुद्र किनारीं नदीच्या किंवा खाडीच्या काठीं असणारी रेताड जमीन हींत रेतीपेक्षा मातीचा अंश अधिक असल्या मुळें नारळीच्या बागा करतात पाणथळी=गावा, वारंवार वईल गुरगी, बागाईत यांच्या लागवडीची जमीन मध्यम काळी=इंदाव रील जमीन हींत २ ते ४ फूट माती असून गाळ मुरुम असतो भारी काळी जमीन=मोठ्या नद्यांच्या दोन्ही तीरांतील पंधरा–वीस फूट खोल काळी माती असलेली जमीन, कृष्णांट जमीन=(वों) डोंगराच्या उतारावर ठिकठिकाणीं बांध घालून केलेली भात जमीन केदार जमीन–मळ्यांच्या वरची काळी अथवा तांबूस जमीन गावठाण–गाळी जमीन=गाळ साचून केलेली, हीस ग्रगी, बनदुर सापट, भारी इ० नावें आहेत पुळणी=(वों) वाळूची किंवा रेताड जमीन हींत नारळाची लागवड होते हीस रेव, रेवट, शेंद्री इ० नावें आहेत पणगळ्यी=(वों) ओढ्यानाल्याच्या काठीं बांध घालून केलेली जमीन बावळ, मरी=(वों) डोंगराच्या माथ्यावरील वातावर संपताच मातीनें येऊन झालेली मळसडी=वाहत्या पाण्यानें तयार झालेल्या असतात त्यांची वावरें बनवीत नाहीत त्या देशातील जिरायत जमिनी–तीच्या माळराण टेकिनात अशा जमिनींवर टाळें, कल्याण जिल्ह्यांत पावसाळीं वरत होतें या प्रकारच्या जमीनींना माळरट म्हणून एक भेद आहे घाटावरील वरकळ जमीन व कोंकणातील माळरट जमीन यांत बरेच साम्य आहे मरई=नदीकांठचा, गाळानें साचलेली वायगण=(राजा) पावसाळी भात काढल्यावर रब्बीच्या वेळीं डोंगरातील पाटाच्या पाण्यावर भाताचें दुसरें पीक काढिता येणारी वरकस=डोंगराच्या उतारावरील जमीन हिचें भराड असें दुसरें नाव आहे हिचे प्रकार दोन–डोंगरी व माळ पहिलीची मशागत होत नाहीं म्हणून करतात जंगली भागात हिच्यात कुमरी–डाहळ्या यांपद्धतीनें नाचणी वरी, सावा, कुराजणी तीळ इ० पिकें काढितात दुसरींत बैलाची नांगरट करितां येते शेत जमीन=डोंगराच्या खालच्या भागात असणारी व सतत पाण्याचा झिरपा असणारी मळी जमीन=दरीच्या पायथ्याशीं असणारी जमीन हीस बेट्, गाळ अशी दुसरी नावें आहेत पाणथळ जमीन=स्वाभाविक सखलपणामुळें पावसाळ्यात पाणी साचणारी जमीन हीस काळगंद असें दुसरें नाव आहे मशीजमीन=डोंगराच्या उतरणीवर एकाखालीं एक बांध घालून केलेली जमीन हीस मॉलॉय आर्डी, मॅरोड अशी दुसरी नावें आहेत [फा ज़मीन्; झेन्द झेम] (वाप्र) ०**अस्मान एक होणें**–१ सपाटून पाऊस पडणें, धुरळा धुकें यांनीं दिशा धुंद होणें २ (ल) अतिशय गर्विष्ठ होणें ०**अस्मानाचें अंतर**–फार मोठें अंतर, दुरावा ०**उकरणें**–आनंदानी भुई उकरणें (संकटग्रस्त भीतिग्रस्त होऊन घोडा टापेनें जमीन उकरतो तसें) ०**आढणें**–जमीन लागवडीस आणणें ०**धरणें**–१ जागीपणामुळें अधरणाला खिळणें २ रोगाला वश होणें ०**मारी ठेवणें**–बागाईत पिकाकरितां जमीन रिकामी ठेवून वावाच्यात एकच पीक काढणें

०धापेला येणें–पेरण्याच्या हंगामाला येणें. ०सोडणें–१ जमिनींतून वर येणें, दिसणें (पीक). २ (ल) दुखणें, दारिद्र्य इ० तून वर येणें, उठणें जमीनीधर पाय नसणें–चपळ घोडा, जलद पळणारा, गडबडया माणूस यासंबंधीं योजितात. –स पाठ,अंग) लागणें–घर पडणें–दुखण्यानें किंवा अतिशय दारिद्र्यानें पीडणें. –स पाय लागणें–रोगमुक्त होणें. –स मिळणें–सर्वस्वी नाश होणें (अक्षरश. आणि ल). म्ह० जर्मीन बादशहाची लेक माय बापाची. सामाशब्द–०उत्पन्न–न १ जमीनीचें उत्पन्न. २ सारा किंवा वसूल. ०जुमला–पु खेडेगांवातील सगळी जमीन, घर, दार, वतन वाडी, कुरणें यास व्यापक अर्थानें म्हणतात [फा. झमीन+अर. जुम्ला=सर्व] ०झाडा–पु जमीनी, गाव, खेडें, यांची एक विस्तृत याद, यादी ०दार–पु वंशपरंपरेचे सरकारी वतनदार, कामदार; जसें–देशमुख–देशपांड्या, (कोठेंकोठें) पाटील, कुलकर्णी. जमीनदार, जमीदार–पु १ (व.) इंग्रजीपूर्वीच्या राज्यांतील सनदी सरंजामी माणसें. २ स्वतः सारी मेहनतानी म्हणून कांहीं टक्के (शेंकडा दहा टक्के) वसूल कापून घेऊन बाकीचा वसूल उगवून सरकारांत पाठविणारा; वतनदार. [फा. झमींदार, झमीन्दार] ०दार व कुळें–पुनर्भव. शेतीच्या उपयोगाच्या बऱ्याच जमिनी स्वत च्या मालकीच्या असलेला सधन मनुष्य, त्या जमिनीचे वेगवेगळे गट करून ते जमिनीची लागवड करणाऱ्या गरीब लोकांस ठराविक मुदतीपुरते देतो व त्यापासुन जमिनीच्या भाड्याबद्दल कर (खंड) घेतो, अशा व्यवहारात जमिनीचे मालकास जमीनदार व जमीन करणाऱ्यास कुळ अशी संज्ञा आहे. जमीनदारी–स्त्री १ जमीनदाराचा हक्क, हुद्दा, धंदा; जमीनखंड इ० २ (ल) लुच्चेगिरी, छक्केपंजे ०दारी मत–न (ल) लबाडीचें, खोटें मत [फा] ०दारी जमा–स्त्री जमीनदाराकडून येणारा सरकारसारा, वसूल ०दोस्त–वि. १ (कुस्ती) जमीनीला खिळविलेला, लोळविलेला. २ सर्वस्वीं नाश झालेला, फन्ना झालेला ०धारा–स्त्री. जमीनीचा कर; सारा. ०नीस–नवीस–पु. १ शेत, जमीन, पिकें इत्यादींची पहाणी करून सारा ठरविणारा अधिकारी. २ (क.) दप्तरदार [फा. जमीन+नवीश] ०बाब–स्त्री सारा कर ०महसूल–पु जमीनबाब जमीनीपासुन कराच्या रूपानें होणारें सरकारी उत्पन्न ०माजणी–स्त्री जमीनीचें क्षेत्र मोजून जमाबंदी करणें ०शिरस्ता–पु जमिनीची पहाणी करून प्रत लावून ठरविलेला सरकारसारा. ०सांड–क्रिवि (राजा) जमिनीपासन निराळें (उचललेलें ओझें)

जमीये, जमे—वि सर्व एकंदर 'जमीये दोस्तास मुबारक लाये'–पया ४८२ [फा जमीइ–जम्इ]

जमीव—वि १ जमविलेलें, एकत्र केलेलें. २ गोठलेलें, थिजलेलें जमणें पहा ३ वस्तु घेउन तयार केलेलें (पत्त, चिखलाची भिंत).

जमेत, जमेदार, जमेदारी, जमेयत, जमयात—जमात–दार–दारी पहा 'ते व आपली जमेत चालून पुढें आले.'–मराचिथोशा ३२.

जमचें—सक्रि. (गो.) जमविणें; एकत्र करणें.

जम्मत—स्त्री (ल्हान मुलाच्या भाषेंत) गम्मत.

जम्मन—वि (व) भला मोठा, जंगी. 'जम्मन सर्प निघाला.'

जय—पु. १ यश, सिद्धि. विजय, फत्ते; जयोत्सव. २ देवाला नमन करतांना त्याच्या नांवाच्या पूर्वी लावितात. ३ अर्जुन ४ भारत; कुरुपांडवकथा. 'तैसाचि लोमहर्षणनंदन उग्रश्रवा हि जयवक्ता।'–मोआदि १.६ [सं] (वाप्र) ०करणें–जिंकणें; यशस्वी होणें. जयास जाणें–भरभराटीस येणें (यत्न, उपाय, आयुष्य) सामाशब्द– ०गोपाळ–पु. गुजराथी लोकांतील नमस्काराचा पर्याय शब्द ०घंटा–स्त्री जय झाल्यावर वाजविण्याची घंटा. ०घोष–पु. चांगली गोष्ट किंवा जय झाला असता तो सर्वांस कळावा म्हणून वाद्य वगैरेचा केलेला हर्षध्वनि. ०जय, जयजयकार–पु. १ स्तुतिकीर्तन, जयघोष. –शब. लाड करणें, थोपटणें; कुरवाळणें. –उद्गा. भले शाबास! भले पट्ठे! इ. उद्गार. जयगीत, जयाचें गाणें. 'जय जय स्वसंवेद्या।'–ज्ञा १.१. ०जया–उद्गा. जयनाद. ०जयवंती–स्त्री. (राग) गायनशास्त्रांतील एक राग. ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण वादी ऋषभ. संवादी पंचम. गानसमय रात्रीच्या दुसऱ्या प्रहराचा शेवट आरोहात तीव्र गांधार व तीव्र निषाद व अवरोहात कोमल गांधार, कोमल निषाद घेतात. ०ढाक–पु. जय झाला असतां वाजवावयाचा नगारा, ढोलगें. ०तिरम वि भरभराटलेलें (राज्य). ०तीर–पु (कु.) दसऱ्याची वेंगुर्ल्यांकडील जत्रा. [सं. जैत्र] ०दुंदुभि–पु जय झाला असता वाजविलेल्या नगाऱ्याचा आवाज व तो नगारा ०ध्वनि–पु. १ जयघोष २ (ल.) कोणताहि मंगलसूचक शब्द ०पताका–स्त्री जयाचें निशाण ०पत्र–न ज्याचा पराभव झाला त्यानें लिहून दिलेलें जयाचें पत्र, लेखी कबुली, कागद (कुस्ती, पंडितांतील वाद, फिर्यादअर्जाद यांतील). ०प्रतिष्ठा–स्त्री जयामुळें मिळालेला मान, वैभव ०प्रतिष्ठित–वि जयानें प्रसिद्ध झालेला, जेता म्हणून नांव मिळविलेला. ०प्रस्थान–न लढाईवर जाणें स्वारीः कूच, मोहीम (मोठ्या फौजेनें) ०फळ–न १ (काव्य) जय २ (कुस्तीनें) जायफळ. ०मंगळ–वि बऱ्या डोळ्याचा (घोडा) डोकें, कपाळ, मान, छाती, ओंठ, बेंबी या प्रत्येकावर एकएक देसाचा भोंवरा आणि पोटावर दोन व कुशीवर (पुठ्यावर) एकएक भोंवरा असलेला (घोडा) हें याचें शुभलक्षण होय. –अश्वप १.९१. ०वाद्य–न. जय झाला

असता वाजवावयाचें वाद्य 'जय वाद्य नित्य वाजती।' -ऐपो ३१८ ०वान-वंत-वि यशस्वी, जयी ०विजय-पु विष्णूचे दोन द्वारपाळ ०शब्द-पु १ जयाचा ध्वनि, शब्द, दोन सैन्यें भिडलीं असता म्हणावयाचा वीरशब्द २ राजा लढाईला निघाला असता त्यास ब्राह्मणानीं दिलेला आशीर्वाद ०श्री-स्त्री. जयानें मिळालेलें तेज, टवटवी शोभा ०श्रीराम-सीताराम-उद्गा वैरागी लोकातील एकमेकाना नमस्कार करताना उच्चारावयाचा शब्द ०स्तंभ-पु जय मिळालेल्या ठिकाणीं जयाचें स्मारक म्हणून उभारलेला खांब (दगडी, लाकडी), रणस्तंभ ०स्वी-वि नेहमीं विजय पावणारा (अर्थी स्वी असणाऱ्या संस्कृत शब्दाचें अनुकरण)

**जँय, जय**—क्रिवि (कु) जेथें ०सर-क्रिवि (कु) जेथपर्यंत ०सून-क्रिवि (कु) जेथून [सं यत्र]

**जयत्**—पु (संगीत) एक राग यात षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, तीव्र धैवत हे स्वर लागतात जाति औडुव औडुव वादी पंचम, संवादी षड्ज गानसमय सायंकाळ. ०कल्याण-पु एक राग यात षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, तीव्र धैवत हे स्वर लागतात जाति औडुव-औडुव वादी पंचम, संवादी ऋषभ गानसमय रात्रीचा पहिला प्रहर [सं]

**जयतन**—न (व) सरपण, जळण, जळवण [जळतण]

**जयंती**—स्त्री १ देवाची जन्मतिथि (विशेषत दशावतारांची), अवतारी पुरुषाचा जन्मदिवस व त्या दिवसाचा उत्सव, वाढदिवस 'जयंत्या उपोषणें नाना साधनें।' —दा ४१३२ २ एक झाड व त्याचें फळ याच्या फळाच्या माळा करतात

**जयपाळ**—पु एक वनस्पति, याचें बीं, हें उष्ण, सारक, जड, कडू असून वाति, ज्वर, कुष्ठ, व्रण कफ वद्द कृमी, विष यांचा नाश करणारें आहे —योर १२५१ [सं जयपाल]

**जया**—स्त्री १ (ज्यो) तृतीया, अष्टमी आणि त्रयोदशी या तिथी २ भांग [सं]

**जया जये**—सर्वनाम ज्या, ज्याला, ज्यानें 'जया राहे पाठा तर।'—दा २७८० 'जये संगतीनें मती राम सोडी।'—राम ४५ ०चेनि-ज्याच्यानें 'जयाचेनि सें समाधान भंग।' —राम ४५

**जयावह**—वि १ जयोत्पादक, यशकारक, फायदेशीर हितावह (सदाचरण इ०) 'मातापितरांचे आज्ञोल्लंघन केलें असता जयावह होणार नाहीं' २ मंगलदायक जयसूचक (शकुन) [सं जय+आवह प्रत्यय]

**जयाविजया**—स्त्री या दोन देवता आहेत, स्वारीवर निघण्यापूर्वी योद्धे लोक जय मिळविण्यासाठीं यांची पूजाअर्चा करितात [सं जया+विजया]

**जयी**—वि विजयी, जय झालेला, जय मिळविलेला [जय]

**जयीं**—क्रिवि जेव्हा, जें पद्धा [प्रा जइआ, सं यदा]

**जयेजणें**—अक्रि जिंकणें, जिंकता येणें 'तुका म्हणे पदोपदीं कान्हो वनमाळी। जयेजत मग सेवटिला एक वेळीं' —तुगा ३२५ [अंगेजणें प्रमाणें जयपासून घटना]

**जय्यत, जय्यद**—वि पूर्ण, अगदीं 'त्यातील पल्टण जय्यद बर्बाद जाली' —होके ११६ २ सिद्ध 'तयारी जय्यत आहे' [अर झाइद्=अतिशय]

**जर**—पु १ ताप २ तापाच्या पुटकुळ्या, पुरळ 'तापानें त्याच्या तोंडावर जर उमटला आहे' [सं. ज्वर प्रा जर] (वाप्र) ०उतर्णे-(ताप गेल्यानंतर) अंगावर, तोंडावर पुरळ उठणें ०जाणें-दुखणें येणें, रोग उत्पन्न होणें शिवीशाप देताना योजतात 'तुझे हातावरून जर जावो ०बांधणें-ताप नाहींसा होण्यासाठीं मंतरलेला दोरा, गंडा, ताईत हातात, मनगटात बांधणें ०भरणें-होणें-१ अंगात ताप भरणें २ (ल) अशक्त, नालायक, अयोग्य होणें (प्राणि आणि वस्तु यासंबधानें नकारार्थी अथवा प्रश्नार्थी योजितात) 'धोतरजोड्याला वर्षभर टिकायाला काय जर झाला आहे?' 'तुला चाकरी करायला काय जर भरला आहे?' सामाशब्द- ०करी-वि तापकरी माणूस ०डा-पु जर, ज्वर, जरडा, जरंडा भरणें=ताप भरणें 'उन्हाळीं जरडा पावसाळीं विजाळवती।' -वसा २० ०बंद-पु. ताप बंद करावयाचा मंत्र ०लपेट-स्त्री तापाची साथ

**जर**—पुस्त्री १ कलावतूचें वस्त्र, सोन्यारुप्याची तार, कलावतु २ (व) सोनें, पैसा 'जर पदरीं जर नसला तर तो नर संसारी येऊन बैल।' —पला [फा झर्=सोनें] सामाशब्द- ०कडी-स्त्री (कलावतु काम) धाग्याना पीळ देण्यासाठीं जिच्यामधून चांदीवरून दोरे घेतात ती कडी ०कमर-पु सुवर्णकटिबंध, कटिसूत्र —राव्यको २१६ ०खाना-पु सुवर्णशाळा —राव्यको २२१ ०जरियान-न सोनें आणि सोन्याच्या वस्तू द्रव्य आणि अलंकार कलावतु आणि कलावतूचें काम, कशिदा (समुदायार्थी प्रयोग) [फा झर्+झरीन] ०तार-स्त्रीन १ कलावतु २ हलक्या धातूवर सोनें, रुपें, चांदी चढवून त्या धातूची तार काढून ती रेशमी अगर सुती धाग्यावर गुंडाळणें यास जरतार म्हणतात हलक्या धातूवर सोनें, चांदी चढवून तार काढून केलेल्या जरतारीस खोटी जरतार म्हणतात व चांदीवर सोनें चढवून काढलेल्या तारेच्या जरतारीस खरी जर म्हणतात ०तारी-वि कलावतूचें, जरतार असलेलें (पीतांबर पागोटें इ०) ०दोज-पु कलावतूचें काम करणारा [फा झर्दोज] ०दोजी-स्त्री कलाबतूचें काम —वि भरजरी जरीचा 'खाशा स्वारीकरतां भरगच्ची लोड गाद्या बिछा जरदोजी गादीलोड लाविणें' —ऐरा २७

०बाब-बाफ्त-वि. जरतारी, भरजरी जरदोजी पहा [फा ] ०यान-न. सोनें, रुपें, इ० द्रव्य, चादी-सोन्याचे दागिने जर जरियान पहा ०मिना-पु भरजरी मौल्यवान वस्तु, जर्मीना 'जरमिना जरबाब. .आदिकरून अशेष वस्तुजात याचा उदीम चालवावा'-मराआ ? २१ जरीटोपी-स्त्री एक शिरोभूषण 'जरीटोपीस पिंपळपान।' -मध्व २५

जर-उभ संकेतबोधक अव्यय, अमुक गोष्ट घडली तर अशा अर्थी पूर्वीची अट, निर्बंध, वस्तुस्थिति दाखविणारें अव्यय हा शब्द पुढील शब्दाशीं जोडूनहि वापरतात्-वा, करिता, काय, करून, होऊन जसें-जर का तो आला तर मी देईन [स यत्-यदि-यहिं] ०करितां-उद्गा.जरी (एखादे वेळीं), जरी (एखाद्या रीतीनें), जरी (यद्यपि, अथापि) ०तर-(जर आणि तर) अट, कार्य कारणभावी बोलणें 'मला जरतर नको, काय असेल तें स्पष्ट साग'

जरकबरक-वि लखलखित, चमत्कृत, तेजस्वी, तजेलदार, उजळपाजळ [अर वर्क्-वीज द्वि ]

जरंगा-पु मासे पकडण्याचें जाळें 'आता बुद्धाप्याच्या तरगा-। माजी मतिभ्रशाचा जरगा।'-ज्ञा ७ ८६ [जर-तंतु+अंग ?]

जरगूड-न १ आंब्याच्या कोईभोंवतीं ज्या रेषा असतात त्या, केसरपुंज २ आवाडी, काथ्या, पिंपळाच्या मुळ्या इ०दींच्या ततूचा गड्डा, जाळें, जुडी, ततुसमूह [जर-ततु+का गड्डे=गोळा] जरगुडी-वि रेशाळ ततुमय दोऱ्याचा

जरजर-वि १ (प्र) जर्जर, थकलेला, म्हातारा, जीर्ण, जुना झालेला (प्राणी, वस्तु) २ पराभूत निर्वीर्य 'इंद्रादि निर्जर समरगणी। जरजर केले प्रतापें। [स जर्जर]

जरठ, जरंड-वि १ निबर, म्हातारा, जीर्ण, वृद्ध २ दुर्बल थकलेला, अशक्त, कमजोर [स जरा+स्थ, जरठ]

जरड-स्त्री दोर, रेषा, दोराळपणा, तंतुमयता (निबर भाजीपाल्याची) [जर]

जरड-डा-जरठ पहा [स जरठ-जरड]

जरडा, जरडी-स्त्री जख्ख, म्हातारी स्त्री, विशेषत सुवासिनी स्त्री म्हातारी हा शब्द कोंकणात वृद्ध विधवेलाच लावितात [स जरा-जरठा, प्रा जरडा, जरडा]

जरंडी-स्त्री (कों) पानथरी, कौल्द 'जरडी घोळाणा गडमाळा।'-दा ३ ६ ३७ [सं ज्वर]

जरडेल-वि ततुमय, रेषाळ, जरगुडी पहा [जरड, तुल० स जरडी=एक गवत ?]

जरण-स्त्री पचन 'अन्नात स्टार्च मिसळला म्हणजे अन्नाचें जरण चागलें होतें'-विवि ? २५८ [स जॄ-जीर्ण]

जरणी-स्त्री एक औषधी वनस्पति

जरत्कारु-वि १ एक ऋषि हा फार अशक्त होता (यावरून) २ (ल) फार अशक्त, रोडका, मुडदाबेव, कृशशरीर [सं]

जरद्-अ जर्द पहा

जरदा-पु खाण्याची तंबाखु (चागली कमाविलेली) -वि. पिवळा, पिवळ्या रंगाचा (घोडा) [फा झर्द] -दाइत-वि पिंवळ्या रंगाचा (घोडा) जरदा भात-शेवईभात -गृदि १ ३७२

जरदाळू-पु एक फळझाड हें साधारण उचीचें असून पश्चिम हिमालयात याची लागवड होते या झाडापासुन बदामा सारखा डिंक निघतो.त्यास चेरीगम म्हणतात याचीं फळें खातात [फा जर्द=पिवळा+आलु=कंद फळ]

जरप-न (गो) पाऊस पडल्यानंतर खणून पेरणी करावयाचें शेत

जरब-स्त्री १ धाक, भयोत्पादक तेज, वजन छाप 'त्या राजाची अशी जरब होती कीं, नाव ऐकताच शत्रु थरथरा कांपत असत' २ दरारा दटावणी (क्रि० देणें, दाखविणें) 'त्याला जरब देताच तो करकन् वळला ३ भीति, धास्ती वचक (क्रि० खाणें, धरणें पावणें, घेणें) 'चाबूकस्वारावाचून घोडा जरब खाणार नाहीं 'पतोजीची हाक ऐकताच पोराला जरब बसली' ४ तोफ 'मोठमोठया पल्याच्या जरबा।' -ऐपो २१६ 'शिंदही बाणाचे रोख पाहून जरबा सुरू करितात'-ख ११ ५६६१ ५ शिक्षा मार 'ज्यानीं मग्रूरी केली त्याचे प्रातास व त्यास जरब दिली'-मराचियोशा ४७, ६ नाणें पाडणें छाप, शिक्का 'अलीगोहराचा शिक्का दिल्लींत पडला पातशहाची जरब मोडून याचें नांवें करणें.' -रा १ ३६३ [अर. झर्ब] (वाप्र) ०खाणें-भीति बाळगणें. 'हा दाडगा कोणाची जरब खाणार नाहीं' ०पिणें-भीति घेणें जरबणें-भिणें, भय पावणें, धास्ती घेणें, धाकात असणें सामाशब्द-जरब,जरबदार-वि १ अतिशय मोठें, प्रचंड (ओझें, माप) 'त्या मापापेक्षा हें माप जरब आहे २ फार जड, भारी, जबर (किंमत, दर) 'या लुगड्यास आठ रुपये किंमत जरब' ३ त्रासदायक, जुल्मी, कठिण (नोकरी, धदा) ४ थकवा आणणारें, फार जड, भारी, राक्षसी (ओझें) (अतिशयपणा विस्तृतपणा, भारीपणा किंवा त्रासदायकपणा दाखविण्यासाठीं या शब्दाचा उपयोग करितात) ०वान-वि १ दराऱ्याचा २ कर्तृत्ववान 'जरबवान पुरुष आहे त्याचे तोंडात दौलत आहे'-हौक १०९ जरबी-वि १ अरेरावी, वचक, धास्ती बसविणारा. २ भयकर, जुल्मी, त्रासदायक भयोत्पादक ३ तीक्ष्ण प्रखर (शस्त्र, पशु) [जरब]

जरबंद-पु घोड्याचें पिछाडें जरबद पहा

**जरंथा**—पु. (राजा.) एक आर्वी आवट आंब्याची जात हा खाला असतां तात्काळ ताप येतो म्हणतात. [सं. ज्वर–ज्र+आंबा]

**जरस**—न. बारीक ओंब्यासारखें धी. हें पोटदुखीवर देतात. जिरवरण. –मुंब्या १४५.

**जरा**—स्त्री. १ म्हातारपण, वयस्कता. 'आणि तयाचिपरी जरा। न टेंकतां शरीरा।' –ज्ञा ११.५५४. 'कृतांत–कटका–मल-ध्वज जरा दिसों लागली।' –केका ४६. २ शिथिलता; अशक्त पणा, दौर्बल्य.

**जरा**—क्रिवि. १ तिळमात्र, किंचित. थोडेसें; थोड्या प्रमाणानें. 'जरा थांब मी म्हणजे आता सुपारी उतरेल. २ अमळसा; थोडा वेळ. 'राहोनी जवळी नयेसि कधिही मद्दृष्टिपातीं जरा।' –कर्म २.५४. [अर. झर्रा=अणुमात्र] **जराक–कसा, जरासा**–क्रिवि. थोडेसें, किंचितसें जरा पहा. त्या कृष्णसारथिपुढें होशिल मूक, न जराक बकशील' –मोद्रोण १७.४१. [अर. झर्रा+एक, असा] **०शानें**–क्रिवि. १ थोडक्या वेळानें. 'जराशानें आमच्या सेनापतीसाहेबांच्या महालात जाऊन तूं तें पत्र दे.' –शाय १.१.

**जराबाजरा–बादरा, जराबजरा**—पु. किरकोळ वस्तु; सटरफटर; लहान सहान गोष्टी. 'ऐवज व चीजवस्त गेलेलें जराबाजरा सुद्धां गड स्वाधीन करावा.' –ख ११.५७०४. 'हा जराबाजरा घेउनि आला घरीं। नाहीं सुपटोपली वेरुंटि ताग्डी।' –राला १६. २ कणन कण, एकूणएक वस्तु. 'इनामाचें जराबजरा पावतें कीजे.' –रा १५.१६४. –वि ईषन्मात्र, किंचित्, थोडकीशीहि (चूक, अंतर इ०). 'मी चोरी केली आहे यात जराबाजरा अंतर पडल्यास सर्वांचा गुन्हेगार' [फा. झर्रा]

**जरायु**—न (प्रसूतीनंतरची) वार; गर्भकोश; गर्भवेष्टण, खोळ; गर्भाशय. [सं.] **०ज**–वि. गर्भाशयापासून उत्पन्न झालेला (मनुष्य, पशु). जीवाच्या प्रकारांपैकीं एक. अंडज, स्वेदज, उद्भिज पहा

**जरार–रा**—पु उग्रपणा, रानटीपणा, क्रूरपणा, तापटपणा. [अर जरीर=क्रूर जलाल?]

**जरारा–री, जरिदा**—वि. एकटा, सडा; फटिंग, ज्याला बायकापोरें, नोकरचाकर नाहींत असा. 'जरारा राहिला आहे' –पेद २.१६६. 'जरिदा होऊन बऱ्हाणपुरचे पारिपत्यास येणार' –रा १२७ [अर जरीदा]

**जरारा**—वि फरारी –शर

**जरियान**—न १ सोन्याचे दागिने, सोनेरी भरजरी कापड, कशिदा २ सोन्याचांदीचे दागिने, जडजवाहीर [फा. झरियन्; जरीन्]

**जरी–रीं**—उभ १ यद्यपि, अथापि, तरी देखील २ जर (–उ.) पहा [सं यर्हि] **०पण**–उभ जरी असें आहे तरी; परंतु जर, याच्या उलट तरी पण.

**जरी**—स्त्री. तापाची सांथ [सं. ज्वर, म. जर] **०मरी**–स्त्री. रोगाची सांथ (विशेषत पटकीची); बाल्या. देवी. (सामा) पटकी वगैरा (गोरगरीब देवीची जशी एक देवी असते तशी या रोगाची एक देवी कल्पून तिची पूजा करितात)

**जरी**—स्त्री सोनेरी अथवा रुप्याच्या तारा –वि. जरीच्या, सोन्यारुप्याच्या तारांनीं विणलेला. 'जरी कांठी–रुमाल, पागोटें, पातळ, शेला.' 'जरी सामान.' –सभासद ६८. [फा. झरीन्] **०कांठी**–वि काठांत जर असलेला; जरीच्या काठाचा. **०जरतार**–स्त्रीन. जुनी जर; जुन्या वस्त्राची जर, जुना कलाबतु, काठ, शाला, सोनेरी नक्षी इ० कांचे तुकडे इ० (जरीपुराणेवाले ओरडताना हा शब्दप्रयोग करतात) **०पटका**–पु १ मराठ्यांचें मुख्य निशाण, स्वारीवर जो सेनापती जाईल त्याच्या हवालीं हें निशाण सरकारांतून करीत असत. 'ठेवून हत्तीवर जरिपटका! निघाले रावसाहेब पटका।' –प्रला. २ जरीचा कमरबंद; काऱ्या. मोहिमेवर जाणाऱ्या सेनापतींना हा पेशव्यांकडून मिळे. **०पटका-रुपया–पटकी(क्या)चा रुपया**–पु जरीपटक्याचें चिन्ह असलेला अंकुशी रुपाया. **०पदरी**–वि. जरीचा पदर असलेलें (पागोटें; शेला). **०बादली**–वि. जरीच्या, कलाबतूच्या उभ्या काड्या असलेलें (कापड). 'जरी बादले सांर चांदवे सोगा झाला चौफेर.' –ऐपो १७७ [जरी+बादल=जर, कलाबतू] **०बाज**–वि. कलाबतूनें विणलेलें, भरजरी. (प्र.) जरबाज पहा. **०बुट्टी–बुटी**–स्त्री. १ जरीजरतार पहा. २ जुनी जर (जरीबुटी) गाळली असतां तींतून जी चांदी निघते ती. ३ जरतारी बुट्टी, ठिपके. ४ (ल) गुप्त ठेवा, राखून ठेवलेले दागदागिने, पैसा.

**जरीब**—पु. १ जमीन मोजण्याचें माप, दोरी किंवा साखळी. २ (अव.) जमिनीची मोजणी, पहाणी 'विघेवार सेत पाहून जरीबाचे रुईने पायमाली ...घेईन' –पेद २०.२१५.–वि. जरधेदार पहा. [अर] **०खर्डा–खर्डा**–पु. जमीन मोजणीचा तक्ता **०दार**–पु जमीन मोजणारा, सर्कल इन्स्पेक्टर

**जरून**—उभ जर, यद्यपि. [जर होऊन, करून]

**जरूर**—स्त्रीन. अपरिहार्य कारण, गरज, जरूरी, अवश्यकता, जरूरत 'तुम्हास जाण्याचें जरूरच असल्यास जावें' –क्रिवि. १ अवश्य, कर्मेहि करून, अगत्य, काहीं असलें, झालें तरी. २ क्वचित्, क्वचित, विरळा 'ह्या दुखण्यातून त्याचें वांचणें जरूर दिसतें' ३ जलद; तावडतोब; त्वरा; त्वरित 'माझें जेवण होईतों इतक्यात जरूर जाऊन ये' [फा जरूर्] **जरूरत–रात**–स्त्री जरूरी; आवश्यकता 'कोणास वर्षास कायद्यावें थार्ची जरूरात तुमचे विचारें असेल त्याची याद पाठविणें' –ख ८.४२००.[अर जरूरत्] **जरूराती**–वि कामचलाऊ, हंगामी. 'काहीं लोक लागल्यास जरूराती ठेवणें व दंगा वारलियावर दूर

करणें '–वाडसमा १२० जरूरी–स्त्री आवश्यकता, गरज, परवा [फा जरूरी] जरूरीयत–वि जरूरीची आवश्यक [फा ज़रूर्]

जरेणें—अक्रि (राजा) ज्वरानें युक्त होणें, ताप येणें, भरणें [स ज्वर म जर]

जर्गा—पु मंडळ, वेढा 'सर्वांनीं जर्गा एकच केल्यास काम तमाम होऊन नफे फार होतील '–रा १९ ३७ [फा]

जर्गार—पु सोनार [फा ज़र्गर]

जर्जर, जर्जरीत—वि १ वार्धक्यामुळें थकलेला, क्षीण झालेला 'जर्जर झाल्या निंदक हे अवघे होतीं।'–श्रीधरकृत पदें (नवनीत) पृ ४४४ २ पीडित, पछाडलेला 'तैसा तो धनुर्धरु। अन्यत्र दुखें जर्जरु।'–ज्ञा १ २७० [स]

जर्द—वि सोनेरी, पिवळा 'नवाव जर्दा अंबारीत '–पया ५४–अ १ पिवळा आणि तांबडा या शब्दांचें गुणाधिक्य दाखविण्यासाठीं जर्द हा शब्द त्यास जोडतात 'पिवळा–तांबडा जर्द.' 'जर्द तांबडा ' २ काळा आणि हिरवा या शब्दानाहि जर्द शब्द जोडतात [फा ज़र्द]

जर्दा—जरदा पहा

जर्ब—स्त्री १ जरब पहा २ प्रहार तडाखा –वि टार –भाव (टीप) ७८ [अर ज़र्ब]

जर्बाबी—वि भरजरी, जरीबाब पहा खुशी मखमल जर्बाबी मडान मांडिल्या होत्या '–रा १ ४२

जर्मन सिल्व्हर—स्त्रीन एक प्रकारची धातु विलायती चांदी तीन भाग तांब्यात एक भाग निकेल धातु मिश्र केली म्हणजे रुप्यासारख्या पांढऱ्या रंगाची मिश्र धातु बनते, त्यात थोडें जस्त मिळवून जर्मन सिल्व्हर करितात याचीं नाना तऱ्हेचीं भांडीं तयार करितात [इ]

जर्हि–ऱ्ही—उअ जर, जरी पहा. 'अगो जर्हि कृष्ण हृदिस्थ।'–रास २ ७८

जल—न वैभव झकाकी –रा ५ ७६ जलील पहा [अर जल्ल]

जल—न पाणी, उदक तोय अंबु, नीर [स] म्ह० जलात राहून माशाशीं वैर. (वाप्र) जलीं, स्थलीं, काष्ठीं, पाषाणीं– १ मूळ सर्व ठिकाणीं ज्याचें अस्तित्व अशा देवाबद्दल म्हणतात २ (ल) ज्या त्या गोष्टींत व जेथें तेथें डोकें खुपसणारा, भेरणारा, पिच्छा पुरविणारा अशा माणसा बद्दलहि योजतात सामाशब्द– ०कुक्कुट–पु पाणकोंबडा ०कूप–पु विहीर (पाणी असलेली) याच्या उलट शुष्क कूप कुंड–न (खि) ज्या कुंडात अगर पानात बाप्तिस्म्याकरिता पाणी ठेवतात तें (इ) फाँट 'बाळकास घेऊन आलेल्या लोकांनीं प्रार्थनेंतील दुसरा पाठ झाल्यावर लग लेच जलकुंडाजवळ यावें –साप्रा १० १०५ ०केलि–क्रीडा–१ विषयीपुरुष स्त्रियासहवर्तमान जलामध्यें विलास करतात ती. २ पाण्यामधील खेळ, नावा वल्हविण्याची, पोहण्याची शर्यत 'क्षीरधितीर विहारी जलकेलि करू नदींत गगनीच्या।'–हंसकार्तीय आख्यान, मोकर्ण २८ २५ ३ नदी–समुद्रपर्यटन ०क्रिया–स्त्री १ पितरांचें तर्पण २ पाण्याचें कार्य धुणें वगैरे ०खोकड–पु एक मासा –प्राणिमो ८५ ०गतिशास्त्र–पु (शाप) पदार्थांच्या पाण्यातील गतीसबंधीं नियम दाखविणारें शास्त्र (इ) हायड्रो डायनामिक्स ०चर–न १ पाण्यातील प्राणी 'जैसे जळचर जळसांडे। आणि तत्क्षणीं मरण मांडे।'–ज्ञा ३ ११७ २ (सकेतानें) समुद्रापलीकडून आलेला परकीय माणूस, द्वीपांतरचा मनुष्य ३ युरोपियन लोक इग्रज लोक 'जल्चर तयार झाले '–रा १० १७५ 'प्रताप महिमा थोर जळामधिं परि जलचर अडविला।'–ऐपो ३०४ ०ज–वि (काव्य) पाण्यापासून उत्पन्न झालेला, पाण्यात जन्म पावलेला (मेघ, कमळ इ०). ०जघोष–मेघगर्जना 'लक्ष दीपाचा प्रकाश। जलजघोष घगवरी।' ०जंतु पु जलचर, जलसचारी प्राणी, जलामध्यें उत्पन्न होणारे जंतु (प्रत्ययी) ०तरंग–पु १ लाट, लहरी २ एक वाद्य, बारापासून बावीसापर्यंत चिनीमातीचे लहानमोठे पले घेऊन, वाजविणारा ते आपल्यापुढें अर्धवर्तुलाकार मांडितो, मग त्यातून इच्छित स्वराचा ध्वनि निघण्यासाठीं त्यात कमीअधिक पाणी घालतो व दोन बारीक छड्या दोन हातात घेऊन पेल्यावर मारून इच्छित रागाची गत वाजवितो, अशा रीतीनें तयार केलेलें वाद्य ०ताडन–न (पाण्यास कितीहि मारलें तरी तें दुभग होत नाहीं यावरून) (ल) निष्फळ श्रम, प्रयत्न 'ही बाब जलताडणासारखी व्यर्थ होती '–सास २ ९३ ०द–धर–पु मेघ जलदजालपटल–न अभ्रपटल आभाळ, ढगानीं व्याप्त आकाश जलदेवता–स्त्री पाण्यातील देवता, अप्सरा ०धर केदार–पु (सगीत) एक राग, यात षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम पंचम, तीव्र धैवत तीन निषाद हे स्वर लागतात जाति षाडव–षाडव वादी पंचम, सवादी ऋषभ गान समय रात्रीचा पहिला प्रहर ०धि–निधि–पु १ (काव्य) पाण्याचा संचय, समुद्र 'जेणें जलनिधि आटला आचमनीं।' २ (अंकगणित) दहा शंकू किंवा एकावर चौदा पूज्यें इतकी सख्या ०नाडी–स्त्री जमिनीच्या पोटातून जाणारी पाण्याची शीर, पृथ्वीच्या पोटातील पाण्याचा मार्ग ०पक्षी–पु पाण्यातील पक्षी ०पाई–स्त्री एक औषधी वनस्पति ०पान–न १ जलप्राशन पाणी पिणें २ (कादी) फराळ ०पादचारी–वि पाण्यातून पायानीं चालणारा एक पक्षिवर्ग याचे पाय लांब व उघड असतात –प्राणिमा ५८ ०प्रलय–पु ज्या वेळीं सर्व पृथ्वी पाण्यात बुडून जाते असा शकल्पाचा काल ०प्रवाह–पु गंगाप्रवाह (थोर पुरुषाची रक्षा, अस्थि,

देवाचा निर्माल्य इ० ) पवित्र नदीमध्यें सोडावयाची क्रिया ०प्राय-वि जलपूरित पाण्याची समृद्धि असलेला (देश) [सं ] ०बुद्बुद-पुन १ पाण्यावरचा बुडबुडा २ (ल ) क्षणभंगुरता, क्षणिकत्व दाखविणारी गोष्ट पाण्यावरचा बुडबुडा पहा ०मंदिर-न नदी, सरोवर यांच्या पाण्यात बांधलेलें किंवा नदीच्या काठीं तळघराप्रमाणें बांधलेलें घर ( उन्हाळ्यासाठीं ) जलांतील क्रीडा-गृह धारागृह ०मय-न सर्वत्र पाण्याचा फैलाव, भोंवताली पाण्यावाचून कांहीं नाहीं अशी जी अवस्था ती 'समुद्रांत भारी लाट गेलें म्हणजे सर्व जलमय दिसतें ' –वि १ जलपूर्ण, जलप्राय पहा ( देश, जागा, फळ ) २ पाण्यानें झालेलें (बर्फ, गार) 'गार जलमय पडली यामुळें क्षणांत तिचें जल होऊन गेलें ' ३ पाण्यात बुडालेलें ( गाव, देश) ०मनुष्य-पुन जळमाणूस पहा ०मार्ग- १ गलबतें वगैरे जाण्याचा पाण्यामधील मार्ग, याच्या उलट खुष्कीचा मार्ग २ समुद्रावरील कर आयातनिर्गत माला वरील पट्टी, याच्या विरुद्ध जकात, ही जमीनीवर असते ०यंत्र-न १ कारंजें ' उठेत जेथें जलयंत्र धारा । '–सारुह ५ १७ २ रहाट पाणचक्की, लाट इ० पाण्याचीं यंत्रें ३ पाण्याच्या जोरा वर चालणारें यंत्र ०यात्रा-स्त्री जलप्रवास (जलमार्गानें) पर देशगमन ०यान-न होडी, नाव गलबत, तराडें इ० पाण्यातील प्रवासाचें वाहन ०राज-पु (शाप) ज्यामध्यें सोनें विरघळतें असें अम्ल (इ ) ॲक्वारेजिया ०रुह-न पाण्यात वाढणारें कमळ ०वास-पु कांहीं काळ बेंबीपर्यंत पाण्यात उभें राहण्याची तप श्चर्या (साधूची) ०विहार-पु जलक्रीडा पहा ०व्याल-पु. पाणसाप ०शाक-स्त्री (ल )मासे पाणसाप 'बंगाली बाबूस ताजें जलशाक व महाराष्ट्रीय ब्राह्मणास लोणकढें तूप पाहिजे '–टि १ १७४ [जल+शाक=भाजी ] ०शोधक-न पाण्यांतील गाळ काढून शुद्ध करणारें यंत्र अथवा पात्र ( इ ) फिल्टर, ऑइज डाइज ०शोष-पु १ तहानेनें घसा कोरडा होणें तृषता ... २ दुष्काळ अनावृष्टि अवर्षण ०शोषक-पु ... २ पाणी शोषून ओढून घेणारें, हवेतील आर्द्रता दाखविणारें ( यंत्र ) ( इ ) हायग्रोस्कोपिक ०श्वास... जरारा ... ०श्वसपुट न माशास श्वासोच्छ्वास करण्यास साह्य करणारी शरीरातील एक पिशवी गळ्तुडी ०सत्र-न पाणपोई, जळ छत्र पहा ०समाधि-स्त्री १ पाण्यात बुडून मरणें, सन्याशानें पाण्यात घेतलेली जिवंत समाधि, पाण्यात उतरून स्वतःस बुडवून घेणें फक्त सन्याशानेंच प्रयाग येथें जलसमाधि घ्यावी असा शास्त्रनिर्बंध आहे ०स्थलभ्रम-पु १ हें पाणी कीं जमीन याबद्दलचा भ्रम पडणें २ महापुरानें पाणी व जमीन एक होऊन जाणें सर्व जलमय होणें ०स्थितिशास्त्र-न पाण्यामध्यें पदार्थ स्थिर राहण्यासंबंधींचे नियम व गुणधर्म सांगणारें शास्त्र ( इ ) हाय ड्रोस्टॅटिक्स जलाचा विकार-पु पाण्याची विकृति, अवस्थांतर (गार, बर्फ, वाफ इ० ) जलांज(ञ्ज)ली-स्त्री मृताच्या दहाव्या दिवशीं अश्म्यावर मृताच्या नांवानें तिलमिश्रित पाणी सोडणें, तिलां जली देणें, सोडणें (क्रि० सोडणें, देणें) 'देऊनि जलांजली स्वप्रियसुत धरूनि म्हणुनि हा रडत।' –मोगभा ७.७२ [जल+ अंजलि ] जलाधिवासन-न १ एखाद्या देवतेच्या मूर्तीची मंदि रांत कायमची स्थापना करण्यापूर्वी एक रात्रभर ती मूर्ती पाण्यांत ठेवण्याचा विधि. २ (सामा ) मूर्तीची मिरवणुक काढण्याच्या पूर्वरात्रीं वरीलप्रमाणें अशीच करावयाची क्रिया जलार्णव-वि (ना ) पाण्यानें भरपूर, तुडुंब [जलवत्] जलाभास-पु मृगजल जलाशय-पु पाण्याचा सांठा, स्थान (समुद्र, तळीं ह्वकें तलाव इ० ) 'शैल वृक्षांचीं ठुटें । जलाशय परिसरें।' –ज्ञा ११ ११२ जलोत्सर्गंत्र-न पाणढोसळी ( इ ) फ्लशिंग पॉट जलोदर-पु पोटांत पाणी झाल्यामुळें होणारा रोग, उदर [सं ]

जलॅक–न (गो ) कोट

जलजलाट—पु (व) भरभराट उत्कर्ष [हिं जल्जलाहट]

जलद—क्रिवि शीघ्र त्वकर, त्वरेनें –वि १ चपळ, हुशार २ त्वकर काम करणारें, गुण देणारें (औषध) ३ भडकणारा, त्वकर उडणारा, ज्वालाग्राही (स्वभाव, बंदुकीची दारू) [अर जल्द] ०कलम-स्त्री झपाट्यानें लिहिणें, लिहिण्याचें कसब, लेखणी –वि जलदकलमी पहा ०कलमी-वि झपाट्यानें लिहि णारा, कलमबहाद्दर. ०तिताला-(ताल) तिल्वाडा शब्द पहा जलदी–स्त्री त्वरा, घाई गडबड, चपलता 'जल्दीस आतां विमत आहे '–रा ११ ५२ –क्रिवि त्वरेनें, जलद [फा जल्दी ] जलदाई–स्त्री चपळता घाई ; 'रघुनाथें भली केलि जलदाई कबर शकली (... स्फाडली ) ।'

जलम—जन्म (अप ) पहा [हिं ] ०जुग-क्रिवि मरे पर्यंत –बदलापूर ५२ [जन्म+जुगणें ]

जलसा—जल्सा पहा,

जलाद—पु फांसी देणारा मांग –वि (ल ) कठोर, जुल्मी ' अम्मलदार हमदानी जलाद '–ऐटी ५ १० [अर जल्लाद ]

जलामर्णे—अक्रि (कु ) जन्मणें (अप ) (वण ) जल मणें [जन्म ]

जलाल जलेल—वि १ तीक्ष्ण तिखट २ उग्र तापट, कडक जालीम (स्वभाव ) ३ रखरखीत जाज्वल्य तीव्र (आग, उष्णता) ४ झोंबणारी कापविणारी (थंडी) ५ तीव्र जहाल जळत जाणारें (औषध विष ) ६ तीक्ष्ण धारेचें (शस्त्र ) ७ भेदक क्लेशदायक दुःसह (दुःख आजार ) [अर जलाल] जलाली–स्त्री उग्रता तीव्रता, कडवपणा [जलाल]

**जलाल**—पु जुलूम जबरदस्ती जलेल पहा 'रयतेवर जलाल होऊन रयत पीडा पावते —मराआ २४

**जला-वतन**—न हद्दपारी वतनापासुन दूर करणें वतन काढून घेणें (क्रि० करणें) 'ह्याडे यांचें पारपत्य जला-वतन करणें —वाडसनदा ७०. [अर जला=हद्दपारी]

**जलीत**—न भुरदड —बदलापूर ३८६ जळीत पहा

**जलाल**—वि १ प्रकाशमान २ वैभवसपन्न 'नवाबाची दौलत बहुत जलील झालियांस आणखी जल देणें अथवा रोनक आणणें हा यख्तियार तुम्हाकडे आहे —रा ५७. [अर]

**जलूका, जलौका**—स्त्री जळू [स]

**जलूस-प-शा**—पु १ सिंहासनारूढ होणें राज्य करणें २ वर्चस्व हितसंबंध ३ समारभ 'मोठा जलूस जाहला —ऐटि १६५ ४ कीर्ति प्रख्याति 'माधवरावसाहेब यांचे जरबेचा जलूश मोठा' —होकै ४२ [अर जुलूस] ०**सन**—न राज्यारोहण शक (कोणत्याहि मुसलमान राजाचा) **जलूशा**—वि राज्यारोहणापासून मोजण्यात आलेला (सन) [अर जुलूसी]

**जलेल-ली**—स्त्री जुलूम जबरदस्ती अन्याय जबरी, जलाल 'रयतेवर जलेली न होऊ देता वाजवी करावी —मसाप २.१६६ [अर जलाल]

**जलेहखाना**—पु समारभाचें स्थान जिलौखाना पहा

**जल्प-जल्पना**—पुस्त्री वडबड, वल्गना, वरळणें मूर्ख पणाच्या गप्पा, बढाईचें, प्रौढीचें भाषण 'मातला हस्ती क्षोभला सर्पु। अठला ब्राह्मण पेटला द्वीपु। अमर्याद स्त्रियाचा जल्पु। आवरूं न शक विधाता।' —मुआदि १६ १६९ **जल्पक**—वि बड बड्या निंदक 'आतित्याई जल्पक। —दा २ ३ २६ **जल्पणें**—अक्रि १ प्रौढी सा णें ०वें वाहणें २ बडबडणें पोकळ बढाया मारणें —सक्रि बोलणें उच्चार करणें 'सदा परनिंदा जल्पती। सीतासती तेथें कैची। [स जल्प्=बडबडणें] ०**वाद**—पु बड बड, जल्पना 'अहं ममतेचिया जल्पवादीं। —ज्ञा ७ ०६

**जल्म**—पु (बायकी) जन्म पहा [हिं जल्म] ०**भर**—क्रिवि जन्मभर ०**भास**—स्त्री (गो) जन्मभाषा [जन्म+भाषा] **जल्म चें मातेरें**—जन्माचें नुकसान 'तुमच्यामुळ मी माझ्या जल्माच मातेरं करून घतल —मु ५०

**जल्मा**—पु (गो) शतातील दवकृत्यें करणारा माणूस

**जल्ह्द**—जल्द पहा

**जल्हो**—पु (गो) झुरळ

**जल्सा**—पु १ बैठक, संमेलन 'जल्शात जें ठरेल त्याची विनती लिहिण्यात यईल —रा ५ १४४ २ गाण्या-बजावण्याची मैफल ३ तमाशा. [अर] शको ३ ४६

**जव**—पु १ यव, सातु, हें झाड दोन-तीन फूट उंच वाढतें; जवाच्या भाकरी करितात व जनावराना चंदी म्हणून घालतात धार्मिक विधींत याचा उपयोग करितात २ या धान्याच्या लाबीचें माप, एक मोजण्याचें माप (सहा मोहऱ्या इतकें). ३ आगठ्याच्या दुसऱ्या पेऱ्यावरील यवाकृति रेषा ही माणसाची चागली स्थिति, स्वास्थ्य दर्शविते ४ कर्णात, माळेत घालण्याचा यवाच्या आकाराचा सोन्याचा मणी ५ बायकांच्या हातातील एक प्रकारचें कारण जवा पहा [स यव फ्रें जि जोव हिं जौ, जव] ०**खार**—पु जवाचा पेंढा जाळून केलेला खार औषधि क्षार, सोरा [स यवक्षार] ०**माळा**—स्त्री आगठ्यावरील यवाकृति रेषा सामुद्रिक ही पाहतात **जवळी**—स्त्री (गो) लाख सोन्याचा मणी जव अर्थ ४ पहा **जवा आगळा**—वि जरासें जास्त, थोडासा जास्त 'तो कबर तर हा जवाआगळा कुवर'

**जव**—पु वेग, गति 'आज्ञा घेऊनि दारुकात्मज हय प्रेरी ज्वें आले।' —मोकृष्ण ७७ १. 'धडधड वात्या जवें जसा विटपी।' [स जु=पुढें जाणें] ०**न**—वि वेगवान् 'धृतराष्ट्रायें वराया गाधारीतें नदीसुतें जवन त्या गधारपतिकड पाठविला दूतवर जसा पवन। —मोआदि १० ८९ 'नोह हा पवन जवन वाट भासतो —मृ ०४

**जव**—क्रिवि १ जोपर्यंत २ पावेतों पर्यंत 'मी जव स्नान करून येईं तव तू भाजी चीर ३ जों त्याच वेळेस, तोंच ४ जेव्हा, जें 'मुखासि जव पातली श्रम अरण्य ऐसीं पदें। —केका ८० [स यदा, यावत् प्रा जइ, फ्रें जि जौ] ०**जव**—क्रिवि जों जों ०**पर्यंत-पावतो**—क्रिवि जोपर्यंत; ज्या वेळेपर्यंत **जवर, जवरी** क्रिवि जोंपर्यंत जववर पहा 'करी स्मरण भूपती जवर आळवोनी पदा। —नरहरि गगारत्नमाला ८१ (नव नीत पृ ४२०) 'जवरी चदन झिजेना। तव तो सुगध कळेना। —दा १२ ० १७ ०**र, जउदर लो** जव (व) जेव्हा ०**जववर-वरा, जववरपर्यंत पावतो** क्रिवि (काव्य) जोपर्यंत ०**सर** क्रिवि (क) जोंपर्यंत

**जवणें, जवाणें जवावणें**—अक्रि १ एकत्र जाडें एकमेकात गच्च बसविणें सांधणें २ वस्त्र गोळा करणें ३ एकत्र घट्ट गच्च बाधणें ४ बाधणें, जखडणें (सुटलेला पशु) ५ गाठ घालणें बाधणें [स युज् किंवा जु=पुढें जाणें]

**जवखेळ**—वि एकत्र केलेलें, गोळा, जमा केलेलें

**जवंजाळ-जाळ**—पु श्वास यातायात जजाळ पहा

**जवजे**—स्त्री —जी बायको वोम पहा कागदपत्रामध्यें नवऱ्याच्या नावाच्या मागें हा शब्द लावितात जसें—मुगाई जवज कृष्णा [अर औजा=बायको]

**ज(ज)वट**—न १ (ग्रा) मडळी, टोळी, जमाव, कपू समुदाय २ जोडपें, जुळें 'तैसीं जाण जवटें। दोन्ही इयें एकवटें।' –ज्ञा १३ ९६१ [जवणें] **जवटणें**–अक्रि जवळ करणें जवळणें पहा 'तृणेंतें निवग़ी क्षमेस जवगी गर्वोदिकातें पिटी।' –नीतिशतक

**जवत**—वि (कुलाबा वों) १ जास्त जादा २ व्यर्थ

**जवनि(नी)क-निका**—स्त्री १ पडदा; कनात 'तंव महाभूताची जवनिक फिटे।' –ज्ञा ६ १०६ २ वस्त्र, आड पडदा 'फेडुनी जन्माची जवनीक।' –भाए ६०४ ३ सस्कातील एक अक ४ नाटकाचा पडदा [स यवनिका]

**जवरा**—पु १ स्मशानातील पिशाच्च, काळ, मृत्यु यम 'म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण जवरा सोंवकतो २ गोमानी मसणा, कुत्रा इ० ज्याचा काहीं सबध नाहीं अशा कल्पित व्यक्तीचा बोध करण्याकरितां योजितात काहीं एक कार्य मनात नसता काणी सुद्धा करणार नाहीं याअर्थीं याचा उपयोग करतात 'तुझें लग्न करावयास कोण जवरा खोळवला आहे [स. यमराज ?]

**जवशी, जवस**—स्त्री एक धान्य, अळशी पहा याचें तेल काढतात गळू वगैरेवर बाधण्यासाठीं पोटीस करितात, चटणी करितात तेलाचा उपयोग वऱ्हाडात स्वयपाकात करितात याच्या वाखाच्या ततूंचा केलेला कपडा मौल्यवान व टिकाऊ असतो [स अतसी, यव यवस ?]

**जवळ**—शअ १ सनिध, निकट, पाशीं (स्थलवाचक, कालवाचक गोष्टी, पदार्थाचें, मनुष्याचें सादृश्य किंवा नात्याचें निकटवर्तित्व दाखविण्यासाठीं व्यापकपणें हा शब्द योजितात) २ वरोबर, स्वाधीन, ताब्यात 'त्याचे जवळ द्रव्य आहे' ३ स, ला, तें या विभक्तिप्रत्ययार्थींहि योजितात 'त्याजवळ दे' 'त्याजवळ साग' –वि १ नजीकचा, निकटचा 'या रस्त्यानें तें ठिकाण जवळ आहे २ नात्याचा, आप्त [स यु युत, प्रा जुध, म जू जव] (वाप्र) **०करणें**–१ घरातल्या माणसात सामील करणें, विश्वासात घेणें, साभाळ करणें, काळजी घेणें 'पुरुषोत्तमरावाना राघोबादादानीं जवळ केलें' –इप ९ २ एखादी वस्तु निकट आणणें सनिध जाणें 'पाऊस आला लवकर गाव जवळ करा' **०उभा करणें**–आपल्या समोर येऊ राहू देणें जवळ करणें, सबध ठेवणें (नकारार्थी प्रयोग) **०घेऊन**–जवळ आणून, प्रीतीनें, दयेनें ममतेनें **०जाणें**–१ समीप जाणें २ समोग करणें गमन करणें उपभोगणें **०धरणें**–आपल्या चाकरामध्यें गणना करणें, जवळ करणें पहा सामासिक शब्द– **०चा**–वि निकट सबधीं, निकटवर्ती (जागा, वेळ, नातें या अनुरोधानें) **०जवळ**–क्रिवि १ बहुतक बहुतांशीं 'त्याची परीक्षा उत्तमा जवळजवळ झाली' २ शजारीशजारीं, सेटून **०नातें**–न १ जवळचा नात्याचा सबध, आप्तपणा २ निकट सबध, सलग्नता **०पास**–क्रिवि जवळच, सनिध, आसपास, शजारीं, हाताशीं. **०ला-ळील**–वि जवळचा पहा **०स(सा)र**–क्रिवि शेजारीं, जवळपास **जवळी, जवळीक**–स्त्री १ सानिध्य, निकटता, शेजार 'बीज जळाची जवळीक लाहे।' –ज्ञा ५.१०९ 'कीं वस्तूचीं जवळीकु जाली।' –दाव २६७ २ निकट सबध, जवळची सोयरीक, आप्तपणा 'नात्याची जशी जवळीक तशी आदराची कोंवळीक' ३ सलगी, मैत्री 'हा लुच्चा माणूस याची इतकी जवळीक कामाची नाहीं' ४ सिद्धि लाभ 'परी पुत्रप्राप्तीची जवळीक। न लाभेचि तेणें ऐश्वर्य सुख। परम दुःख त्या वाटे।' –मुसभा ६ ९ –वि १ जवळ असणारें, जवळचें 'जें श्रीकृष्णाचिआ जवळिका।' –दाव १२२ २ अनुचर सेवक **जवळिकें**–क्रिवि जवळ, सनिध 'ऐसें बोलोनि सुरासुरगण पाचारिले जवळिकें। –मुआदि ४ १५६ **जवळील**—वि जवळचा **जवळून**–क्रिवि १ पासून (गति. दाखवून) मी त्याजवळून आलों' २ शेजारून, बाजूनें 'तो आमचे गावाजवळून गेला' ३ –च्यापासून घेऊन, काढून 'त्यानें मजजवळून रुपये नेले' ४ कडून, मार्फत 'हे भांडें मजजवळून फुटलें' ५ पैकीं, आतून, आसमतातून, सानिध्यामुळें

**जवळ**—वि (गो) जुळें 'जवळ येधु घेतले कडिये।' –मुआदि १६ १३० [स युगल]

**जवळ**—न (को) १ वादळ २ वादळी ढग, मेघजाल, अभ्र **जवळी**–वि १ वादळाला योग्य वादळातून पार पडण्याजोगें, जवळातून चालायाजोगी (मोठीं गलबतें) २ वादळाचा (वारा) [फा जौलान=फिरणारा, भटकणारा]

**जवळ**—पु दक्षिण कोंकणातील ब्राह्मणातील एक पोटजात व तींतील व्यक्ति याना खोत असेंहि म्हणतात हे जवळात म्हणजे वादळात किंवा भटकत आले म्हणून ही सज्ञा पावले असे म्हणतात [जवळ=वादळ तुल फा जौलान=फिरणारा]

**जवळी**—स्त्री लग्नानंतर प्रथम द्यावयाची साडीचोळी, वस्त्रें

**जवळी**—स्त्री (वे) वाणल्याही औतास द्यावयाचा जोड. [जव–जवळ]

**जवळो**—स्त्री (गो) शेतात पाणी खेळवण्यास केलेला लहान पाट

**जवा**—पु १ स्त्रियांच्या हातातील एक सोन्याचें काकण, यात जवाच्या आकाराच्या कळ्या बसविलेल्या असतात २ त्या काकणातील एक जवाची कळी, दाणा, अवयव [सं यव, म जव] **जव्याची माळ**–स्त्री सान्याच्या जवाका मण्याची माळ

**जवा**—पु १ जोड साधा, कळाशी (दोन लाकडाच्या तुकड्याचा) (क्रि० बसणें, मिळणें) 'या कळ्याचा जवा

चागला वसविला आहे म्हणून एकमधी दिसतें ' २ (ल) मिलाफ, मेळ (माणसाचा) 'कमा ब्रह्मदेव प्रारभीं चुकला जवा। मुर्ठी सग न करता जगीं जाहला मवगवा।' –प्रला २००. ' एक साधु आणि एक सोदा ह्याचा जवा बसायाचा नाहीं ' ३ रचनेची जोड, जम, जुळणी, वस 'हा श्लोक रचीत होतों पण काहीं केल्या जवा वसेना ' ४ ताळा मेळ, सगति (हिशेब, अजमास, युक्ति याची) 'लग्नाविषयीं पधरा दिवस वाटाघाट केली परतु जवा वसत नाहीं ' [स यम्=जमणें]

**जवा**—पु. सरोद वगैरे वाद्यें वाजविण्याची एक इचभर लाबीची हस्तिदती काडी [जव]

**जवाई**—पु जावई पहा

**जवाद**—वि मोठें, जादा, जास्त, अधिक (सख्या, प्रमाण, विस्तृतता यात) [अर झैद्=झियाद]

**जवादी-दें**—स्त्रीन (कों) कस्तुरी माजरांचें अड अडातील कस्तुरी 'अगी जवादी चर्चिली।'–वसा ३ [अर फा झवाद] **॰पेर**—न लिहिण्याचा काळा बोरू (जवादि माजराच्या रंगा वरून). **॰मांजर-विडाळ-विडाळक**—पुन, (काव्य) गधमार्जार, ज्याच्या अडास सुवास येत असतो असें एक माजर, कस्तुरी मार्जार 'जवादी मार्जरें काळवीट,'–ऐपो २४२ 'जवादा माजराचा आड मिळाला तर .. आम्हास पाठवून देणें '–रा १७५२ 'जवादी विडाळाचें वृषण। मस्तकीं खोंविती श्रीमत जन। रासभाचें स्वायमान (कर्ण)। कोणी ह्यातें नातळे।'–मुसभा ५६०

**जवादें**—न (कु) घोरपड [अर झवाद]

**जवाधा**—पु वल्ली नावाचें जनावर जवादी पहा –बदला पूर १२५

**जवान**—पु १ ज्वानींतील तरुण, युवक २ पुरुष व्यक्ति (म्हातारपणापर्यंत) तरणाताठा माणूस ३ (व) शिपाई गडी ४ (खा) सोबती, मित्र –वि तरुण, तरणा बाड [स युवन, फा जवान्] **॰कट्टा-पट्ठा-जमान**—पु धट्टाकट्टा तरण तरणाबाड तगडा [फा जवान+कट्टा हिं पट्ठा] **॰मर्द, जवामर्द**—वि १ (तरुण आणि शूर) शूर, धाडशी साहसी २ जवानकट्टा, तरणा तगडा, चलाख ३ दिलदार, उदार [फा] **॰मर्दी, जवाँमर्दी**—स्त्री १ शौर्य पराक्रम, धाडस २ शौर्याचीं कृत्यें काहीं किल्ल्यांणीं पादशाहींत गर्लीं तीं जवॉमर्दीनें घेतलीं '–मराचिथोशा ७४ ३ औदार्य दिलदारी

**जवानी**—स्त्री १ ज्वानी तारुण्य तारुण्यावस्था २ तारुण्यातील जोम, भर [फा] **॰दिवानी**—स्त्री तारुण्य आणि जोम (आधिक्य दाखविण्यासाठीं) तारुण्याचा माज, जोर [जवानी द्वि]

**जवाब-बी**—जवाव-जवावी पहा **॰दार**—वि हमीदार, जिमेदार, जवाबदार [फा] **॰दारी**—स्त्री हमी जिम्मा **॰निशी**—स्त्री जवाबनीस याचें काम व हुद्दा **॰नीस**—पु १ अर्जाला उत्तर देणारा कामदार २ (चुकीनें) शिरस्तेदार, चिटणीस [फा] **॰साल-सवाल-साली**—जाव-साल-साली पहा 'आपले मार्फतीचा जवाब सवाल, याजकरिता करार गुजरून गेला असता सवुरी करण्यात आली '–रा २२६३.

**जवाबी**—वि ज्याला उत्तराची गरज आहे असा, ज्यापासून किंवा ज्याच्या उत्तराची जरूर असते असा (सामासात) जवाबी-हुकुम-पत्र-अर्जी-हुडी इ० तसेंच जवाबी-फौजदारी काम-खातें-प्रकरण इ० [जवाब]

**जवार-री, जव्हारी**—स्त्री १ मोठ्या शहरा शेजारचीं खेडीं २ ल्हान पेठ (कापडाची), नागपूर, नारायणपेठ, इ० कापडाच्या मोठ्या पेठा आहेत त्याजवळच्या ल्हान ल्हान पेठा. प्रत्येकी 'हा धोतरजोडा पेठेचा आहे कीं जवारी आहे ?' [अर जुवार=शेजार] **॰चा-जवारी**—वि गावठी, खेड्यात उत्पन्न, तयार झालेलें (तूप, वस्त्र, इ०).

**जवार**—न १ (गो) जवाहिर पहा २ जवाहिऱ्याचा धदा 'जवार केले तरी फिटेना।' –दा १९७२० [अर जौहर, अव जवाहिर्]

**जवार-री**—स्त्री. एक धान्य, जोंधळा, ज्वारी [स यव+नाल-जोनाल, हिं जुआर, ज्वार, का जोळ]

**जंवाली**—स्त्री बैलाचें जोत, जुपणी, जू बाधण्याचा पट्टा [जू] जुवाली पहा

**जवाशी-सी, जवासा**—स्त्री एक वनस्पती, तानडा धमासा [स यवास हिं जवासा, गु जवासो]

**जवास**—पु (कों) एक मासा

**जवासा**—पु जवादी माजराचें अड

**जवाहीर-हर**—न १ रत्न, मौल्यवान मणी २ रत्नें, मोतीं इ० ३ रत्नाचे दागिने ४ भारी रत्नाची व उत्तम कारागिरीची तरवार [अर जवाहिर्, फा झेवर] **॰खाना**—पु रत्नशाळा, रत्नभाडार **जवाहिरी-हरी**—पु जवाहिराचा व्यापार करणारा, जव्हेरी, जोहरी, रत्नपारखी **जवाहिरी**—वि १ रत्नासबधीं २ जवारीबद्दल चुकीनें योजतात

**जवी**—वि. जलद चपळ, वेगवान [स जव=वेग]

**जव्हय**—क्रिवि (खा) जेव्हा

**जव्हर**—न विशेष गुण यावरी मनुष्याचें जव्हर जाणणार असे शक्स होणें दुर्लभ '–ऐटि ३१७ [अर]

**जव्ह(व्हा)र-री, जव्हेर-री**—जवाहीर-हिरी पहा [फा जव्हरी]

**जव्हार, जव्हारी, जव्हाली**—जवार, जवाली पहा

**जव्हारी**—१ तंबोऱ्याच्या तारांचा ध्वनि गोड निघावा म्हणून घोडीवर ज्या ठिकाणीं तारा टेकतात त्याखालीं थोडा कापूस अथवा सूत घालून तारेचा ध्वनि सुलविण्याची जागा. २ सतारीची तार घोडीवर ज्या ठिकाणीं टेकते ती जागा [हिं.जुवरी]

**जसद**—न (शाप.) एक खनिज धातु. जस्त (इं.) झिंक [सं. यशद] ०गंधकिद—न. जसद व गंधक यांच्या संयोगापासून बनलेला खनिज पदार्थ. (इं.) झिंकसल्फाइड.

**जशन**—पु समारंभ उत्सव. 'पादशहांनीं...जशन केला.' —ऐमग ०.६० [फा. जश्न्]

**जसा होता तसा, जसाचेतसा**—वि जसा तो होता तसाच त्या दोहोंच विशिष्ट चेष्टेपासून न बदललेला. [जसा+तसा]

**जसास तसा**—वि ज्याला जसा हवा तसा. जसा एक तसा दुसरा. सारख्यास सारखा. 'हीं वायको जशास तसी भेटली.' —ह० जश स तसे भेटे मनचा संशय फिटे.

**जसो-सो**—(राजा.) जसा–जसा.

**जस**—न.-(कुण.) यश जय उत्कर्ष. [सं यश]

**जसन**—न विनोद आवडत्या मनोरंजक प्रकार. 'नाना माने नाना जसने,' –दा ०२.५.६ [फा. जश्न=मेजवानी समारंभ]

**जसला, जशेला, जसेला**—वि. ज्याप्रकारचा, आकाराचा. तशेचा तसला–तसेला याच्या पूर्वी हा शब्द जोडतात. [जसा+ला प्रत्यय]

**जसा**—वि ज्या रीतीचा, ज्या प्रकारचा, ज्यालीचा. 'जसें तुमचें म्हणें तसें मालें मती जाणें' —क्रिवि १ ज्याप्रमाणें, मानानें २ जों: ज्यावेळीं एक गोष्ट घडत आहे तोंच तसा या शब्दाच्या आधीं योजितात. 'मी जसा गेलों तसा तो पळाला.' ३ जेव्हां 'दिव्य श्रीमंदित तो राम जसा दंडकावना गेला। पूजुनि मुनि म्हणति तुज्या पदें विमाचा दिला ि गेला।' —मोरामंत्ररामायण बाळकांड १. [सं यादृश प्रा जइस] ०चे तसा—वि जसाचा तसा. जसा होता तसाच मुळींच फरक न झालेला 'तुमचें तूप जसेचें तसें आहे' ०तसा, जसतसा—(विशेषणासारखा उपयोग करितात परंतु प्राय हें क्रियापदाचे गुणदोष दाखविणारें क्रियाविशेषण असतें तथापि कर्माच्या लिंगवचना प्रमाणें याचीं रूपें बदलतात) —वि वेडावाकडा, कसाबसा, कसातरी जसा येईल तसा 'करू स्तव जसातसा फळ नव्हे जना याच का।' —केका २८ जसातसा, जसें तसें करून, जसें जैसेंपरी—क्रिवि १ कसें तरी, कोणत्या तरी (भल्याबुऱ्या) साधनांनीं 'या मामलेदारानें जसेतसे दोन लक्ष रुपये मिळविले' २ काहीं तरी (निरिच्छा, उदासीनता, अनिश्चय, शैथिल्य दर्शविण्याकडे उपयोग) 'हा माणूस माझ्या कामाचा नाहीं,जशी तशी चाकरी करितो.' 'अवुद्ध वाकुडें जैसें तैसें परि। वाचेनें तो हरि उच्चारूं।' ३ मोठ्या कष्टानें, श्रमानें (दीर्घप्रयत्न, प्रयास दर्शवितांना) 'जसें तसें करून एकदाचें घर बांधिलें.' 'चोर पाठीस लागले होते मी जसा तसा घरास पोंचलों.' [जसा+तसा]

**जसें जेसें**—क्रिवि. ज्या प्रकारें; ज्या प्रमाणें. [जसा] ह० जसें पेरावें तसें उगवें.'

**जस्टिफाय**—क्रि. १ मजकुराची एक ओळ जुळवून झाली म्हणजे स्टिकच्या रुंदीप्रमाणें ओळीची लांबी धरून प्रत्येक शब्दांत सारखें अंतर पडण्यासाठीं कमी जास्त स्पेस घालून ओळ सारखी करणें. २ एकाच ओळींत वेगवेगळ्या जातीचे टाईप असल्यास सर्वांत जाड जो टाईप असेल त्या बरोबर सर्व टाईपांची जाडी (लहान टाईपास भर देऊन) सारखी करणें. —मुद्रण ५. [इं. जस्टिफाय=समर्थन करणें]

**जस्त**—न एक हलकी धातु कथील व शिसें यांची मिश्र धातु याचा रंग काळसरपांढरा. याचे पत्रे व तार काढिता येते तापवून ठोकल्यावर पसरतें [सं. यशद प्रा जसद] ०फूल—न जस्त तापून फुगलें म्हणजे जो पांढरा पदार्थ होतो तो. **जस्ती**—वि. जस्तासंबंधीं. **जस्तीचोड**—जस्त वितळून एरंडाचे कढईत ओतावें व निवेपर्यंत तांब्याच्या तपेलीनें खलावें म्हणजे त्याचा वाळूसारखा चूर होतो तें —अग्निक्रीडा २५.

**जहत्स्वार्थ लक्षणा–लक्षण**—स्त्रीन. जहल्लक्षणा पहा

**जहत्स्वार्थ वृत्ति**—स्त्री. सामासिक शब्दाचा वर्ग, ह्यांत शब्दाचा मूळचा धात्वर्थ सोडून लाक्षणिक अर्थ घेतला जातो. जसें देवाना प्रिय =अशोक.

**जहदजहल्लक्षणा–लक्षण**—स्त्रीन ज्यांत शब्दार्थाचा काहीं भाग ग्राह्य असतो व काहीं भाग त्याज्य असतो अशी व्याख्या किंवा वर्ग. जसें– तो हा मनुष्य अथवा काल जो मनुष्य आला होता तो हाच पुढें उभा आहे=तो मनुष्य हा आहे, तो पूर्वीं गेलेला मनुष्य हा जवळ हजर आहे ह्या ठिकाणीं वर्तमानकाल व भूतकाल ह्यांच्या मधील भेदाचा विचार त्याज्य केला आहे (जहत्), परंतु दोन्ही काळीं असणारा माणूस ग्राह्य धरला आहे (अजहत्) जहल्लक्षणा, अजहल्लक्षणा पहा. 'उपाधि दोनी टाकणें। अधिष्ठान दोहींचे उरणें। हीस म्हणती शास्त्रनिपुण। जहदजहल्लक्षणा।' —वामन, निगमसार ७ ७९.

**जहन**—न. जहान. १ पृथ्वी. २ जनता. लोक, मनुष्यजात. [फा जहन्] ०नशीन—वि श्रुत, माहीत 'मेहेरबानास जहन नशीन व्हावी म्हणोन तपशिल रकमी केलें असे.' —ख ७ ३५७४. [फा जहन+निशीन्]

**जहन्नम**—पु नरक, अग्निस्थान [अर. फा जहन्नम=नरक]

**जहमत–मती**—स्त्री. १ श्रम २ आजार —राजवा ३ २०. —वि. आजारी 'राजा जहमत जहाला आहे' —सभासद ४२. [अर जहमत्]

**जहर**—न विख, गर विष –क्रिवि विषाइतका कडू अप्रिय (जास्त जोर देण्यासाठीं अतिशय कडू म्हणून सांगताना कडू शब्दाबरोबरयोजितात) 'कुटकी कडूकडू जहर आहे' [फा झहर्] ०बद–पु एक रोग यानें जनावराच्या पोटाखालीं किंवा अंडावर फोड येतात –अश्वप २ ११५

**जहरी**—वि विषारी (प्राणी, वनस्पति, पदार्थ) [फा झह्‌री] ०**कुचला** पु एकप्रकारची औषधि ०**खोबरें**–न जहरी नारळांतील खोबरें ०**नारळ**–पु नारळाची एक जात यांचें खोबरें कडू असून औषधोपयोगी असतें ०**मोहरा, जहर मोहरा**–पु १ गर्द हिरव्या रंगाचा दगड हा सापाचें विष उतर णारा आहे २ (ल) जगाल, जहाल शिपाई इ०

**जहल्लक्षणा–लक्षण**—स्त्री न जिचा शब्दश किंवा वास्तविक अर्थ न घेता केवळ लक्षणेनें अर्थ लावावयाचा असतो अशी व्याख्या अर्थ पाण्यावर गाव म्हणजे पाण्याच्या काठावर गाव (पाण्याच्या सपाटीवर नव्हे) आपल्या पानावर येणें=पानाच्यावर नव्हे तर पानाजवळ याच्या उलट अजहल्लक्षणा (पहा) 'जहल्लक्षण बोलिजे त्याग। अजहल्लक्षण तो अत्याग। जहदजहल्लक्षण त्यागा त्याग।' 'शबळांश सांडिजे। शुद्धांश मांडिजे। हें जहल्लक्षण बोलिजे। वेदांतशास्त्रीं।' 'जहल्लक्षणा जे म्हणिजे। ते त्यागलक्षणा जाणिजे।' –गीता १३-२९१ [स जहत्+लक्षणा]

**जहा**—स्त्री नजर 'नैनाची करडी जहा।' –प्रला ११८

**जहागिरदार जहागिरी, जहागीर**—जाहगीर–दार पहा

**जहाज**—न १ तारू गलबत जल्यान २ (ल) अगडबंब, थल्थलीत मनुष्य भले मोठें धोतर, पासोडी शेला इ० स धूड या अर्थी म्हणतात [अर जहाझ्]

**जहाजम**—न, जाजम, सुनाडा, जहाज अर्थ २ पहा [जहाज]

**जहानी**—क्रिवि निमित्तें कारणें 'जहाती भडारा –रा १५ १५३ [अर निहात=कारण, फा ब–जिहति।

**जहांदाद**—वि जग पाहिलेला अनुभविक 'उमदा मरदार व जहांदीद होत –रा २२ ०५ [फा जहानदीदा]

**जहान**—न १ पृथ्वी जगत (माणसानीं वसलेलें) २ मनुष्य जात लोक विश्व ३ (ल) थवा जमाव (क्रि० जमणें लोटणें) ४ फौज सैन्य तीन लाख मिळाली जहान पशवेशाई। –ऐपा २३३ [फा जहान] **जहापन्हा** पु १ राजा २ (सरकारी कागदपत्रांतून) एखादा मोठा अधिकारी [फा जहान्पनाह= जगाचा रक्षणकर्ता]

**जहा(हा)मर्द–मर्दी**—जवानमर्द–मर्दी (चुकीनें) पहा जहा मर्द तरवारकराचे। –ऐपो २१८ जहामर्दी ससार दाविते करून तुम्हाला वधा। –पला ८५

**जहावाज–वाद**—जाहवाज पहा

**जहार**—पु (ना) जोहार पहा

**जहाल**—वि १ कडक उग्र, तीक्ष्ण, जलाल २ हिसट जळजळीत ३ करारी तापट रागीट मवाळ नसणारा ४ हिंदु स्थानांतील एक जुना राजकारणी पक्ष याच पक्षाला पुढें राष्ट्रीय अर्से नाव पडलें याच्या विरुद्ध पक्ष तो मवाळ पक्ष [हिं झाल, म झळ तुल० स ज्वर] ०**जाणें**–एखाद्यावर कावणें, आग पाखडणें **जहाली**–स्त्री, उग्रता तापटपणा; भयंकरपणा निरकटपणा (मनुष्य, स्वभाव, मिर्ची, औषध याचा)

**जहालीम, जहालम**—वि जालीम निकराचा 'याची त्याची सरमिसळ होऊन जहालीम तरवार चालिल्या' –मदरु २३ [जालीम]

**जहूर**—पु प्रसिद्धि, जाहिरी 'सरकारचे वचनाची कायमी कशी हें आईदे जहुरात येईल' –रा १० १६६ [अर झुहूर] **जुहुरात येणें**–प्रसिद्ध होणें –ख ३५७२

**जळ**—न पाणी, उदक सामासिक शब्द जल शब्दांत पहा [सं जल]

**जळ**—स्त्री १ (धातु, लोणी, मेण, इ०) तापल्या–कढ विल्या–वितळविल्यावेळीं गेलेला भाग जळालेला, वाया गेलेला भाग जळून, तापून कमी आलेला भाग २ भाड्याच्या बुडाची मस, करप –पु १ राग, संताप रोष 'त्याला शिवी देताच जो जळ आला आणि तोंडावर चावविली २ आवेश (वाईट अर्थी) ताठरपणा रग, दुराग्रह जिद्द ३ जळफळाट आढी [जळणें] ०**कट–जळकट**–वि थोडासा जळलेला, होरपळलेला, करपलेला, भाजलेला **जळका**–पु (नाशिक) १ फार उष्णता, लाही (शरीराची) २ जोराची खाज, कडु (क्रि० सुटणें, होणें) ३ पित्तापासून घशात जळजळणें, खवखवणें पोटात डाचणें आग होणें ४ हेवा मत्सर जळफळाट जळ (क्रि० येणें) **जळकें**–न (राजा) भात शेतीस होणारा एक रो। –वि जळकट

**जळ**—स्त्री पर्दईमधील दोन फळ्याच्या सांध्यावरील तुकडा, रीप जती पहा

**जळकागी**—स्त्री (कु व) मासळी, खारवलेले मासे [जल]

**जळगणें**—अक्रि (वों) १ (भात नागली इ० पीक) उन्हानें किंवा इतर कारणानें करपणें चार दिवस तापी पडताच आवण जळगलें २ किंचित भाजणें जळणें, करपणें [जळणें]

**जळछत्र**—न पाणपोई [स जल+सत्र]

**जळजळ**—स्त्री १ अंतर्दाह वेदना (पित्तानें, तिखटानें) आग (क्रि० सुटणें) 'मिर्ची चावताच उपाय नाहींसा तोंडाला जळजळाट सुटला' २ जुलूम, जबरदस्ती ३ क्रोधयुक्त मत्सर मनात जळणें, पोटात राग (क्रि० सुटणें) ४ प्रेमाची, मायेची

आच, अतिशय प्रीति, कळकळ जळजळणें—अक्रि १ घशात किंवा पोटात दाह होणें (उन्ह, तिखट अन्नापासून किंवा पित्ता पासून) (अकर्तृक प्रयोग) जसें– 'पोटात–उरांत–घशात–जळ जळतें' २ (व) (वर शब्दाबरोबर प्रयोग) तडफडणें, रागानें जळणें, जळफळणें ३ तापानें बाहिली होणें [जळजळ] जळ जळाट–पु १ (जळजळचा अतिशय) कडक आग, उष्णता, पोळणें, भाजणें दाह; अतिशय जळजळ (गळा, डोकें, पोट, घसा या ठिकाणीं) २ रागाचें कृत्य, उपद्रव, भयंकर जुलूम; अत्याचार (क्रि० करणें, माडणें, चालविणें, बसविणें) 'मामले दाराचा जळजळाट भारी हो। म्हणून तीं कुळें परागंदा झालीं ३ निष्ठुरपणा अतिशय कडकपणा ४ दरारा, धाक 'पूर्वी त्याबरोबर वाद सांगावा, तर त्याचा जळजळाट होता त्यामुळें उपाय नव्हता जळजळीत–वि १ अतिशय उष्ण, कढत, उकळणारें (पाणी, वस्तु) २ तिखट, तीक्ष्ण, कडक (मसाला, मद्य) ३ (व्यापक) शुद्ध, स्वच्छ, लखलखीत (रुपया, द्रव्य) 'त्या सणगाला मीं जळजळीत दहा रुपये दिले'–क्रिवि पूर्णपणें, पूर्ण, पुष्कळ प्रमाणानें, भरपूर, घळघळीत

**जळण**—न १ जाळावयाचें सरपण, गोवऱ्या, लाकडें इ० 'चुलींत जळण घाल म्हणजे पाणी तापेल' २ (ल) निरुपयोगी, फुकटकामाचा माणूस (फक्त जळण्यास योग्य) [स ज्वल्, ज्वलन प्रा जलण, म जळणें]

**जळणूक**—स्त्री भाजणी, त्रास, जाच, जुलूम; यातना, वेदना देणें (जाळणुकीबद्दल वापरतात)

**जळणें**—अक्रि १ पेटणें, अग्निसंयोगानें दग्ध होणें २ ज्वाला येणें, निघणें, प्रज्वलित होणें (आग, दिवा) 'रात्रीस चारी प्रहर दिवा जळत होता' ३ होरपळणें, करपणें, नष्ट होणें (कडक थंडीनें अथवा उन्हानें पीक) ४ आग होणें (अंगाची), जळफळणें, लाही होणें, तडफडणें (राग, लोभ इ० विकारानीं) ५ फणफणणें, जळजळणें, दाह होणें (ताप, पित्त इ० च्या वेळीं) 'तो तापानें कसा जळतो आहे' ६ (पत्त्याचा खेळ) खर्ची होणें; निरुपयोगी होणें (वास्तविक पत्ता टाकावयाचा असता टाकला नाही म्हणून, किंवा मोठ्या पानाबरोबर, किंवा दुसऱ्या रंगाच्या हातात, टाकल्यानें) ७ (ल) संतापणें, जळफळणें, तडफडणें (लोभ, राग इ० नीं) 'त्याच्या अंगीं किती मस्ती जळती आहे [स ज्वल, ज्वलन प्रा जळण हिं जलना] (वाप्र) जळो जळोजळो जळलें–जाळ तें। मरूदे! (रागानें किंवा तिरस्कारानें काढलेला उद्गार) 'जळोजळो तयाचा जप। व्यर्थ काय कोरडा प्रताप। नजळणें–आगीनेंसुद्धा जळण्यासारखें नसणें अतिशय समृद्ध भरपूर असणें (पीक, पैसा, मालमत्ता). म्ह० १ जळत घर भाड्यानें कोण घेतो २ कोरड्याबरोबर ओलें जळतें ३ जळत भाकर त्याची पळत हातात जावें=अतिशय जरूरीच्या वेळीं होईल तितकी घाई करणें

**जळत**—वि कढत, उष्ण, आगीसारखें, ऊन, उकळतें धग धगीत जळजळीत पहा. [जळणें] (वाप्र) ०टांग–पु (ल) दुसऱ्याचें विनाशायचें काम, लष्करच्या भाकरी; विकत श्राद्ध खायावर घेणें या शब्दाशीं जोडून वापरतात ०घर–अतिशय धोक्याचें किंवा निन पायाचें काम, वस्तु (विकत घेतलली, मिळालेली, पत्करलेली) विकत श्राद्ध नसता उपद्व्याप, भाडण (भाड्यानें घेणें यानरोबर योजतात) जळत्याघरचा वासा–पळता वासा–दिवाळ खोराच्या मालमत्तेंतून जें काय हातीं लागेल तें, चोराच्या हातची लंगोटी या अर्थी म्ह० 'जळत घर भाड्यानें जुनें जोंधळे काढल्यानें (घेऊं नयेत)' सामाशब्द–जळता पाय जाळणारा–वि आपला नाश होत असताहि हट्ट न सोडणारा, जाणूनबुजून संकट ओढून घेणारा जळतोंड्या–वि दुर्दैवी, कमनशिबाचा (माणूस) [जळणें+तोंड] जळत्या–वि १ आग लावणारा (घर, मालमत्ता याना), घर जाळणारा २ (ल) दोष काढणारा, निंदक, आळ घेणारा

**जळतण**—न (व) सरपण, जळण पहा 'जळतणाची गाडी विकत घे' [जळणें+तृण]

**जळताड**—वि (व) हेवा करणारा [जळणें]

**जळती**—स्त्री (ना) (अपचनामुळें घशात होणारी) जळ-जळ (क्रि० लागणें)

**जळप जळंप**—पु १ दाह भरर उष्णता 'धेनु गोप तया जळपानें। या विषानल चढे जळपानें। २ क्रोधाचा आवेश, अतिशय संताप ३ ज्या व्यवहाराचा दृढ अभ्यास झाला असेल त्याचें स्वप्न पडणें (क्रि० पडणें) –स्त्री जळ धातूचा रस केल्या वर, तापविल्यावर निघालेला मळ, वाया गेलेला, जळालेला भाग [जळ+प्रत्यय] जळापणें–क्रिवि (कु) चिडणें, चवताळणें बडबडणें, जळपणें पहा [स जल्प]

**जळपणें**—अक्रि (काव्य) रागानें चरफडणें, भडकणें, जळ फळणें 'का पूर्ण चंद्र देखता नयनीं। राहू मनीं जळपत'

**जळपिंपळी**—स्त्री पिंपळीची एक जात

**जळफळ**—स्त्री तडफडाट रागानें लाल होणें, मनात जळणें जळफळणें–अक्रि १ रागानें संतप्त होणें 'अपमानानें जळ फळुनी।'–सप्रामगीतें ५० २ ऊन होणें (तापानें शरीर) जळ फळीत–वि १ उष्ण आगीसारखें ऊन जळजळीत २ क्रोधयुक्त, संतप्त [जळणें]

**जळंधट**—१ लाळ, कफ, खाकरा 'तयाचि पाहे या तोंडा। थिंईल जळवटाचा लोंढा।'–ज्ञा १३ ५६४ २ जळमट पहा [स जाल, म झळव]

**जळथंब**—न पाण्याचा भरपूरपणा, थेंगठ, पाणी बाहेर साडणें (नदी, तलाव, विहीर यातील). —वि पाण्यानें भरपूर, तुडुंब, जलमय (नदी इ०)

**जळमट**—न १ घराच्या पाख्यावरचें किंवा भितीवरील कोळिष्टक, मुतेरा २ पीठ, फळें, धान्य नासलें असता त्यामधून निघणार दोरे, जाळें, कृमिजन्य दोरा ३ तोंडातून निघणारा कफ, शेंबूड, गोठलेलें रक्त इत्यादिकाचे तत्तू जळंबट पहा

**जळमंडप**—पु फळसुनी बाहुल्याचा खेळ [जल+मडप] **जळमंडपी-पु** १ जळमडप खेळ दाखविणारा, खेळया. २ खेळातील बाहुली. 'की जळमंडपियाचें नाचणें जाण। फळसूत्रा धीन असे कीं!' -भवि ५७ २१३

**जळमळणें**—अक्रि पाण्यानें काठोकाठ भरणें. [स जल-मय] **जळमळीत**-वि पाण्यानें काठोकाठ भरलेलें, तुडुंब.

**जळमनुष्य-माणूस**—पु १ मत्स्यकन्या-पुत्र, पाण्यात राहणारी एक कल्पित मनुष्यजात व तींतील व्यक्ति, जलमनुष्य पहा 'गोपानीं जळमनुष्य मारिलें।' —ह १३.१६८ २ (ल) कोळीजात, कोळी ३ अतिशय ऱ्हान खुजा, माणूस.

**जळमुंग**—स्त्री (गो) एक प्रकारची बारीक मुंगी ही चावली असता फार आग होते

**जळें(ळा)र**—न (गो) डास, मच्छर

**जळवण**—न लाकडें, सरपण, जळण —बदलापूर २१ [जळण]

**जळवण-वणी**—स्त्री (गो) १ जाळणूक, गाजणूक २ सत्तेच्या जोरावर दिलेला त्रास [जाळणें] **जळवणी**-वि (गो) सत्तेच्या जोरावर त्रास देणारा [जळवण] **जळवणें**-अक्रि (व) त्रास देणें

**जळवात**—पु ज्यानें हातापायाची जळजळ होते असा एक रोग (प्र) जाळवात, विपादिका [जाळ+वात]

**जळवेकरी**—पु जळवा विकणारा, लावणारा माणूस. [जळवा]

**जळाऊ**—वि सरपणाजोगें, जाळण्यास योग्य [जळणें]

**जळीत**—न १ जळ अर्थ १ व जळप (-स्त्री) पहा धातु तापविण्यात किंवा वितळविण्यात आलेलें नुकसान (क्रि० जाणें) २ जळालेलें घर, गंज, पीक इ० अग्नीनें झालेलें कोण तेंहि नुकसान ३ अन्यायानें लादलेला कर, दंड, ओझें, भुर्दंड पहा 'त्याचा पैका मीं खाल्ला नसता पन्नास रुपये उगीच जळीत यावे लागले' ४ जाळण्याकरिता ठेवलेला पदार्थ (सरपण, गवत इ०) [स ज्वल्] (ग्राम्र) ०**जाळणें**-अन्यायानें त्रास देणें (जें जळलें आहे किंवा जळत आहे तेंच पुन्हा जाळणें) सामा शब्द- ०**खत**-पु १ कुळाकडून येणें राहिलेली बाकी आल्या नंतर त्या कर्जखतास किंवा दस्तऐवजास म्हणतात २ सदर बाकी मिळत नाहीं असें दिसून आल्यावर त्या बाकीसंबधीं जवळ असलेलें करारपत्रक, थुडीत रकमेचें खत ०**बाकी**-स्त्री १ बाकी राहिलेला, थावयाचा पैसा (रयत, कूळ याजकडील). २ जी परत येण्याची आशा नाहीं अशी बाकी

**जळीपळीचीं भांडणें**—नभव घरास आग लावणें,दुसऱ्याची बायको काढून नेणें किंवा विधवा अगर कुमारिका गरोदर करणें यासारखीं भाडणें (ही खेडेगावातील भाडणाची तऱ्हा आहे) —गाणा ३३

**जळींमळीं**—क्रिवि (कु) तिकडेतिकडे

**जळू, जळूका**—स्त्री १ एक जलजंतु हे वलयान्वित प्राणी जमीनीच्या आश्रयानें राहणारे आहेत यास करवतीसारखे तीन दात असून त्यायोगें हा प्राणी एखाद्या प्राण्यास दश करून त्याचें रक्त शोषून घेतो शरीरातील अशुद्ध रक्त काढून टाकण्यासाठीं जळवाचा उपयोग करितात 'गोंची जळवा अशुद्ध घेती।'—दा १ १० ५५ २ (राजा) आघातादि कारणानें शरीरातील रक्त नासून एकत्र जमतें तो ३ (ल्हान मुलाची) थोडथोडें सारखें पिण्याची क्रिया, थान लवकर न सोडणाऱ्या मुलांस म्हणतात [स जलौका; प्रा जलोआ, हिं जलू, गुज जळो]

**जळौंचें**—सक्रि (गो) सत्तेच्या जोरावर लोकास त्रास देणें जळवण पहा

**जळ्ळं, जळ्ळं मेलं**—उद्गा, (बायकी) नापसतीदर्शक किंवा त्रासदायक उद्गार, जळो! आग लागो! 'जळ्ळं मेलं माझ नशीब खोट!'

**जां**—शअ (राजा) जों.

**जाइजणा**—वि जाणारा, नाहींसा होणारा, अशाश्वत 'धन कण लक्ष्मी सकळ।जाइजणें।' —दा ३ १० ४७ 'बळि म्हणे गा ब्राह्मणा। मी न सोडी नारायणा। जीव ही क्वणे जाइजणा। दीधला नाहीं।'-कथा २ ४ ४५ [स या-यायिन्=जाणारा, प्रा जाइ म जाणें]

**जाइत्री**—स्त्री (व) जायपत्री पहा [स जातिपत्री]

**जाई**—स्त्री एक फुलवेल व तिचें फूल मालती या वेलाच्या सुमारें १५० जाती आहेत मूलस्थान आशियाखड फुलें पाढरीं असून सुकुमार, नाजूक व सुवासिक असतात जाईच्या फुलाचें अत्तर काढतात [स जाति प्रा. जाई] **जाईऊळ, जाऊळ**-न जाईचें फूल 'फाकणें कीं सुकणें। जाउळाचें।' —अमृ ४ ८ [स जातुल प्रा जाउल]

**जाईफळ**—न जायफळ पहा [जातिफल, प्रा जाइफल] **जाईफळी**-स्त्री जायफळाचें झाड

**जाउपें**—न १ जावपें पहा २ वत्स, लेकरू, मूल 'क्षीर सागराचें जाउपें।' —दाव २८२ ३ जुळें मूल

जाऊ—स्त्री. नवऱ्याच्या भावाची, दिराची बायको. [सं. यातृ; प्रा. जाऊ] ०भाऊ नसणें–धाक दाखविणारा, ताब्यांत ठेवणारा कोणी नसणें; स्वतंत्र असणें.

जाऊक, जावक—न (व.) गाईचें किंवा म्हशीचें वासरूं; जाउपें, जावपें पहा. 'गाईला हें दुसरें जाऊक आहे.' [सं. जन्–जात]

जाकच—पु घोड्यास जीन तंग बांधलें असतां होणारा रोग. यानें फोड उठतात. –अश्वप २ ३०१.

जाकलीं—क्रिवि ज्यावेळीं (अप.)

जाकळणें—वि १ भासणें; 'धर्मे जाकळे लागल्या सर्पे।' –मुआदि ३२.७३ २ विव्हळ होणें; पोळणें; कळवळणें 'शोकें जाकळे राजा धर्म।' –मुआदि २९.११९. ३ व्यापणें. 'दिठी जाकळोनि निर्धो पाहे।' –ज्ञा. ६.२६७. ४ मोह पावणें. [ते. जाळिलि=पसरणें; का. जाळिसु]

जाकि (की) ट—न सदऱ्यावर घालावयाचा कपडा; बिन बाह्याची बंडी. (इं.) जॅकेट.

जाख—स्त्री. गवताच्या मुळाचे तंतु; तण. हे ८.६२. [सं. शाखा, शिखा?]

जोख—न. (गो.) वजन.

जाखणें—उक्रि. (व.) संभाळणें

जाखणें—उक्रि. (व.) जोखणें पहा.

जाखमाता, जाखाई, जाखाईजोखाई—स्त्री. एक क्षुद्र देवता. जखाईजोखाई पहा. 'जाखमाता मायराणी।' –दा ४.५ १६ 'नव्हे जाखाईजोखाई। मायराणी मेसाबाई।' –तुगा ७९१. [सं. यक्ष. प्रा जक्ख.]

जा(जां)खीण—स्त्री जखीण पहा. [सं. यक्षिणी, प्रा. जक्खिणी.

जाग—पु (वों) १ (कुण.) मृताच्या दहाव्या किंवा बाराव्या रात्रीं केलेलें जागरण. अंगांत येऊन आपल्या मरणाचें कारण सांगावें, पुरलेल्या पैशाची जागा दाखवावी किंवा आपल्या गुप्त गोष्टी सांगाव्या म्हणून त्याच्या कुटुंबातील माणसें जागरण करितात. यावेळीं चार देवझाडें मिळवून वाद्यादि पूर्वक समारंभ करतात. –स्त्री. १ जागृतावस्था; जागरण (क्रि० होणें. येणें) २ (राजा) हालचाल, गडबड गजबज (घर, खेडेगाव यांतील) ३ गर्दी; गोंगाट (दाट वस्तींतील, जत्रेंतील). ४ कोण-त्याहि प्राण्याची एखाद्या जागेंतील सतत वस्ति, पाहरा, वचक बसण्याजोगें अस्तित्व. 'त्या रानांत वाघाची जाग होती म्हणून गुरें जात नसत' 'घरांत मांजराची जाग असली म्हणजे उंदराचा उपद्रव होत नाहीं.' ५ वस्ती. 'यक्षेश्वराच्या डोंगरावर मनुष्याची जाग असल्यामुळें तो डोंगर न चढतां...' –स्वप ३६४ ६ (गो.) चाहूल. [सं. जागृ] सामाशब्द– ०भाग–स्त्री जाग अर्थ ४ पहा. जागणा–वि जागा· जागृत जागता–वि. १ जागरूक; सावध; दक्ष २ शक्ति, गुण आणि सामर्थ्य यांनीं युक्त. तात्काल फलदायी; उपासकाला पावणारी (देवाची मूर्ति, मंत्र-तंत्र, औषध) 'या गावचा देव असा जागता आहे कीं, तत्काल धावण्यास पोंचतो.' मंत्र जागता असला तर तत्काल विष उतरेल.' ३ तजेलदार; तेजस्वी; टवटवी असणारा; ज्याची सुधारणा आणि रक्षण काळजीपूर्वक होतें असा. संस्कृतिसंपन्न. सुस्थितीनें युक्त (धर्म, विधि, चाल) ४ तरतरीत जोमदार (मन, बुद्धि इ०). ५ ताजेतवानें. न गंजलेलें, मलिन नसलेलें (मिळविलेलें ज्ञान) ६ लोकांच्या डोळ्यापुढें असणारा व ज्याची लोकांना नेहमीं आठवण होते असा. अविस्मृत (निघालेला माणूस, गोष्ट, प्रसंग) जागती जोत–स्त्री. जागता अर्थ २ पहा कडक, सामर्थ्यानें युक्त अशी देवी, देव, मंत्र, औषध, सद्य परिणामी तात्काल फळदायी गोष्ट; खडखडीत दैवत; रामबाण औषध, (पुष्कळ देवस्थानांतून कांहीं विशिष्ट प्रसंगीं मूर्तीच्या अंगांतून ज्योत बाहेर पडते व म्हणून देवत्व नष्ट झालें नसून अद्याप आहे असें मानतात) 'जागती जोती वाढिली हनुमान रूपें।' –सप्र ३ ४२ [जागती+ज्योत] जागतीझोंप–निद्रा–स्त्री १ गाढ नसलेली झोंप; थोडीशी चाहूल लागतांच जाग येते अशी झोंप. २ डुलक्या घेणें, पेंगणें. ०भाषा–स्त्री प्रचलित भाषा; जिवंत भाषा. 'संस्कृत जागती भाषा नाहीं' जागणें–अक्रि. १ जागत राहणें, सावध राहणें; लक्ष ठेवणें. २ निजून उठणें, जागें होणें, असणें, झोंप न घेणें, टाकून देणें. 'सूर्य देखोनि उदयावळीं। जागिजले समस्त।' –मुआदि २९ १३०. ३ पाहरा करणें. सावधगिरी ठेवणें ४ लक्ष देणें. दखल ठेवणें; काळजी घेणें (धंदा, नोकरी, इनाम, शपथ, वचन यांची) 'त्यानें वचन दिलें होतें पण त्यास तो जागला नाहीं' ५ ताजें असणें; म्हटल्यावेळीं तयार असणें. आठवणें. कायम राहणें. स्मरणें (अभ्यासिलेलें शास्त्र इ०) 'व्यासगानें श्रुत जागे।' –लेलेशास्त्री म्ह० १ सारी रात्र जागली आणि शेंगवालीं राधलीं=व्यर्थ श्रम आणि प्रयत्न २ जागेल त्याची वाढ आणि निजेल त्याला रोगगा. [सं जागृ–जागरण] जागर–रण–पुन. १ जागेपणा जागृता-वस्था.' 'पोराचे गडबडीमुळें रात्रीस चारी प्रहर जागर पडला' २ निद्रा संयमन. देखरेख पाहरा ३ पोवती (नारळी, श्रावणशुद्ध) पौर्णिमा. ४ देवतेच्या उद्देशानें विवक्षित कालपर्यंत जागण्याचा प्रकार 'नवरात्रामध्यें देवाजवळ कथा करून मध्यरात्रपर्यंत प्रतिदिनीं जागर करितों' ५ (गो) पुरातन कालचें नाटक ६ पुनरावृत्ति. उजळणी करणें. नवें, ताजें करणें (वेदशोषानें मंत्र).

'मंत्रजागर' [सं. जागृ] ०घालणें-(माण.) गोंधळाच्या नावानें वाघ्यामुरळ्या आणून त्यांची पूजा करून त्याना जेवावयास घालून नाचविणें. जागरा-वि. १ भारी जागणारा. २ जागा राहणारा; दक्ष; सावध. जागरूक-वि. १ जागता पहा. २ स्पष्ट; उघड; टिकाऊ. सोंडावर फेंकता येण्याजोगा (पुरावा). ३ जागणदील. जागरें-न. जागृति; जागेपण 'नीद मारूनि जागरें। नांदिजे जैसि।'–अमृ ४.१. जागल-स्त्री. १ पहारा; राखण; सावधानता. २ पहारेकऱ्याचा पगार. ३ जागरण, जागृतावस्था. 'मला रात्रीं जागल पडली.' जागलकी-स्त्री. जागल्याबद्दलची मजुरी; राखणावळ. 'गांवांत पांडे, गाडी मुक्कामाला रात्रीं राहिली तर महार जागले अर्थात आणा जागल्की घेतात.'–गांगा ९७. जागल्या-ळ्या-पु पहारेकरी. रखवालदार; प्रवाशांच्या सामानावर पाहरा करणारा गांवांतील महार. रामोशी. जागव(वि,णें)-सक्रि १ जागें, जागृत करणें, ठेवणें; जागें राहून काळ काढणें. २ पहारा करणें, नजर ठेवणें. ३ (सामा) राखणें; पाळणें, ठेवणें, वाक्यरचनेंत याचा पुष्कळ शब्दांशीं जोडून उपयोग करितात. जसें- अन्न-नाम-नांव जागविणें=अन्न, नांव सांभाळणें; शील राखणें. दिवस जागविणें=दिवस राखणें, त्या दिवशीं जें कर्तव्य, जें विधी करावयाचे असतील ते करणें नियम-नेम-जागविणें=स्वतःचा नेम, चाल राखणें, चालविणें. सती जागविणें=सतीची चिता प्रज्वलित ठेवणें, विझूं न देणें. गौर जागविणें=गौरीला, देवीला जागविणें, रात्रभर गौरीप्रीत्यर्थ जागरण करणें. जागसूद-वि. १ ज्याची झोंप चटकन उघडते असा; चटकन् जागा होणारा. २ जागता, सावध 'तूं जागसूद ऐस मी निजतों.' ३ सावध, गाढ नसलेली (झोंप).

जांग-स्त्री. (विप्र.) जांघ १ मांडी, ऊरू २ गुह्येंद्रिय प्रदेश, कटिसंधि जांगवळ, जांघवळ-पु (गो) जांगेस घेतलेला चिमटा.

जांग-स्त्री. (गो.) ओरखडा

. जांगजोड-पु जंगजोड पहा

जांगट-न. झेंगट, जंगट पहा

जांगड-न. १ (परत करावयाच्या बोलीनें) दुकानांतून मोघम आणलेला माल, पाहून पसंत करण्यासाठीं आणलेला, घेतलेला माल २ शिंप्यापासून किंवा कापडवाल्यापासून विक्रीसाठीं आणिलेलें कापड, कपडा. 'हीं लुगडीं खचित करून आणिलीं आहा कीं जांगड आणिलीं आहा.' ३ वरील प्रकारानें घेतलेल्या मालाचा हिशेब किंवा हिशोबाची वही; जांगड वही ४ (जनावरें) एकत्र बांधणें, दावण ५ जोड, सांगड घालणें (शिकण्यासाठीं विद्वानाशीं विद्यार्थ्याची) (क्रि० घालणें, करणें). संगतींत ठेवणें. ६ सांगड, संगत, प्रीति; संबंध –क्रिवि. कायम विक्रीच्या ठरावाशिवाय घेतलेला (दुकानांतील माल). ०वही-स्त्री. जांगड माल जींत टिपला आहे अशी वही.

जांगड-न. (तिरस्कारार्थी) जांग; जंघा.

जांगट-न. (ना.) लढाईनें किंवा अन्य प्रकारानें मिळविलेलें द्रव्य.

जागतिक-वि. १ जगाची; जगासंबंधीं. 'जागतिक शांततेला जो धक्का बसणार आहे...'–केसरी १७.६.३०. २ विश्वव्यापी; सार्वत्रिक. [सं. जगत्]

जा(जां)गल-स्त्री. १ जांगड; सांगड; जोडगी. २ (गवंडी) एका दगडांत खाचा घेऊन त्यांत दुसरा दगड बसविणें; दोन दगडांना खाचा घेऊन ते लोखंडी वाराने सांधणें. [सं. युग्; म. जुग, जुंगणें]

जांगला-ळा-वि. १ रानटी. २ (तिरस्कारार्थी) युरोपियन लोकांस उपहासानें लावलेलें विशेषण. ३ जांगली-ळी पहा. [सं. जंगल]

जांगली-ळी--पु (कों.) गुराखी; गवळी. –वि. जंगली; रानटी. [सं जांगल]

जागा-वि. १ जागृत; झोपेंत नसलेला. २ (ल.) सावध; दक्ष, सावधान. 'तन्मत मान्य मला, कीं नय तच्चित्तीं असे सदा-जागा।'–मोसभा ४.१०१. ३ ताळ्यावर, शुद्धीवर आलेलें (मन, वृत्ति). 'भरतजननि जागी होय रामप्रतापें।'–वामन, भरतभाव ८९. ४ स्वस्थ; शांतचित्त ? [जागणें]

जागा-स्त्रीपु १ स्थळ; स्थान. २ खाली, रिकामें स्थळ; अवकाश; वाव. ३ हुद्दा, नोकरी, अधिकाराचें ठिकाण; दर्जा 'मुलगी देणें ती चांगली जागा पाहून द्या.' 'फडणविसाची जागा रिकामी आहे.' ४ बदला, ऐवजीं स्थळ ५ स्थळ, पाया, आधार (प्रमाण, पुरावा, समर्थन या साठीं). 'ती आसामी चालत होती तों आमची पांचशें रुपयांची जागा असे.' ६ साधन; कारण, निमित्त; सवड (कृत्यासाठीं). 'धनी उठून जातांच चाकरास खेळावयास जागा झाली.' ७ उभें राहण्याचें ठिकाण, आधार; साधन; युक्ति; बल सामर्थ्य. 'त्यापाशीं पांचपन्नास रुपयांची जागा आहे.' ८ किल्ला, ठाणें 'तो जागा सुरुंगानें बुरूज उडवून घेतला.'–चित्रगुप्त ८७ –मराचिथोरा ४२. [फा. जाय्-गाह्] ०जागचे जागीं-क्रिवि १ त्याच स्थळीं, असलेल्या जाग्यावर 'महामारीनें माणसें जागचेजागीं मरतात' २ आपण होऊन, दुसऱ्यानें न सांगतां; मनाचे मनात 'कोणी त्याला न बोलता तो जागचे जागीं रुसला तर रुसो.' 'म्या तर काहीं सांगितलें नाहीं तो जागचे जागीं कल्पना काढतो.' जागां-गीं-गें-क्रिवि. ठिकाणीं, –च्या ऐवजीं, बद्दल. 'त्याना आम्ही वडिलाचे जागीं मानितों.' ०जुगा-पागा-स्त्री. स्थळ; जागा वगैरे [जागा द्वि.] दोन जागां करणें-होणें-दोन भाग

शनो. ३. ४७

करणें द्विभागणें **जागा घेणें**–रिकामी केलेली जागा स्वीकारणें, बदला येणें ०**भरणें**–नमगूक करणें, होणें

**जागाईत**—वि रखवालदार जागल्या पहा [जागणें]

**जागाईत**—स्त्री समासफळी मार्थी लिहावयासाठीं काग दास रथा आसावयाची फळी ‘सुन्या कातन्या जागाईत।’ –दा १९ १ १५ [जागा]

**जागाड**—न (तिरस्कारार्थी) जाग माडी [स जघा म जाग+ड प्रत्यय] **जांगिया**—पु (बडोदें) (पहिलवानाची) चड्डी [स जघा, हिं जांघिया=चड्डी]

**जागिरदार – जागिरी – जागीर – जाघिरदार– जाघिरी**—हीं रूपें विशष प्रचारात नाहींत (तरी व्युत्पत्तिदृष्ट्या बरोबर आहत) जाहगीरदार, जाहगिरी जहागिर पहा

**जागी**—स्त्री (तेली) ही दुबळकी (पण वासुदेव प्याल्यातील नळी प्रमाणें) नळी असुन एक भाग घाण्याच्या अर्धापर्यंत पुरेल इतका व दुसरा भाग लांब असतो जागी जमिनीपासुन थोडया अंतरावर घाण्याच्या बाहेरून अडकविलेली असत

**जागुलिक**—पु सर्पवैद्य सर्पाच्या विषावर औषध दणारा वैद्य विषघ्न औषधाचा व्यापारी, गारुडी [स जांगुल=विष जांगुलिक]

**जागृत**—वि १ जागा सावध २ (ल) सावधचित्त दक्ष, तत्पर [स] ०**निद्रा–झोप–नीज**–स्त्री १ तंद्री जागेपणीं निद्रावस्था २ पेंगणें डुलकी घणें जागती झोप पहा ०**स्थान**–न जागती ज्योत पहा **जागृति**–स्त्री १ जागपणा सावधपणा. जें दैवत नवसाला पावतें किंवा ज्याबद्दल साक्षात्कार होतो, प्रत्यय येतो अशी समजूत असतें असें दैवत २ (ल) सावधानता, दक्षता ३ खळबळ चळवळ निवतपणा ‘आमच्या देशात असल्या उत्सवानें जागृति करण्याचा आमचा हेतु आहे’ टिळ्या. **जागेकर**–जागल्या पहा ‘भित्र्या घाग्ती जागेकर.’ –जै ६३ ६६ **जागेश्वर**–पु जागती ज्योत ‘बद तो जागेश्वरू।’ –ज्ञा ६ ४४६ **जागेसुती**–वि जागृत ‘देव जाग सुती असती।’ –कथाकल्पपुराण १६ ८. **जागोवा**–पु जागरण ‘दिहा खोणें रात्री जागोवा।’ –ज्ञा १६ ३४० **जाग्रण**–न जागरण पहा

**जाग्र(गृ)दवस्था जागृतावस्था**–स्त्री जागृति सावधपणा ह्याखेरीज स्वप्नावस्था आणि सुषुप्त्यवस्था अशा दोन अवस्था निराळ्या आहेत [स जागृ=जागें होणें]

**जाघ**—स्त्री मांडी, कटिसंधि जांग पहा

**जाघओढ**—पु जांगोड पहा

**जाघ(घा)ड**—न (तिरस्कारार्थी) जांघ जागाड

**जाघभोंवरी**—वि मांडीवर भोंवरा असणारा (घोड्याची एक खोड) (अशल्या प्रकारचा घोडा अशुभदायक होय) [जाघ+ भोंवरा]

**जाघिव**—पु मुलगा ‘श्रीकृष्णाचा जाघिवा होईजे। तरि लावण्याचें पडप लाहिजे।’ –शिशु ३७० –वि (महानु) मांडी पासूनचा, मांडीवरचा (मुलगा) [जाघ]

**जाच**—पु १ त्रास, गांजणूक छळणूक यातना, जेरीस आणणें, बेजार करणें ‘जाहु याचे हे तर आम्हां हा सोसवेल जाच कसा।’ –मोसभा ५ ३६. २ असातता, व्याधि पीडा उपाधि, अस्वास्थ्याचें मूळ **जाचक**–वि जाचणारा जाचास कारणीभूत, त्रासदायक (उद्योग, धंदा) ‘हिशोबाचें खटलें अर्धवट ठेवूं नकोस मागें पुढें जाचक होईल’ **जाचजुलूम**–पु अतिशय जाच, छळ, त्रास पीडा जुलूम इ० उपद्रव (क्रि० करणें चालविणें) **जाचण– जाचणी, जाचणूक**–स्त्री गांजणूक जाच अर्थ १ पहा **जाचणें** सक्रि त्रास देणें छळणें गांजणें –अक्रि १ घट्ट बसणें, चालण्यास कठिण वाटणें, जाणें, कष्टानें हलणें किंवा प्रवेश करणें, त्रास होईल असा दाब बसणें २ बोचक, जाचक होणें अवघड जाणें पीडणें ३ अर्थ करण्याला कठिण जाणें (कविता वाक्य) ४ घडून येण्यास अशक्य, असंभवनीय होणें असंभाव्य, अशक्य असणें ५ अडणें, खुंटणें (घोडा) **जाचिन्नणें**–(काव्य) दुःख पावणें ‘कीटकिंडु जैसा जाचिनला पैं।’ –ज्ञा १६ २८२ [स जम्?]

**जाचद जाचांद्रा**—वि (कों) पिचक्या डोळ्याचा, पिचका आचोंद्रा पहा [तद्रा=चद्रा]

**जाचद–द्रा जाचोंद्रा**—वि (कु कों) त्रास देणारा, छळणारा (मूळ जनावर आजारी माणूस, इ०) **जाचद**–पु त्रास छळ गांजणूक जाच पहा [जाच]

**जाजती ज्यादती**—वि जास्त अधिक आणखी –स्त्री १ वढती २ जोरावारी, जबरदस्ती ‘जाजतीनें पुढेंच होऊन वरा आपल हातून गेला हा प्रकार’ –चित्रगुप्त ३१ ३ आधिक्य ‘कामाचा माणूस पाहून तैनात जाजतीनें इनामास करणें ती सरकारकुनानीं करावी’ –सभासद ६० ४ जुलूम, पीडा, अधिकपणा ‘ठाणीं इकडील असता ज्यादती करून टिपूनें घेतलीं’ –रा ७ २१ [अर. ज़ियादत्+ई] ०**आजार**–पु जुलूम, पीडा –बाड बाबा २ ११५ ०**जलाल**–पु जुलूम ‘याजकडे आले आहेत यास कोणी कज्या भांडण व जाजती जलाल करूं नये’ –ख ७ ३७८६

**जाजम–जीम**—न बसावयाची बैठक, रंगविलेल्या चित्राचें खालीं खारव्याचें अस्तर असलेलें वस्त्र बिछाईत [फा जाजिम, हिं जाजम] **जाजमी छीट**–न जाजमाच्या उपयोगाचें एक प्रकारचें चीट छापेरी पासोडी वगैरे

**जाजावणें**—अक्रि १ रागावणें कावणें, अंगावर येणें ‘जाजावला कुरुपती बहु मानसीं रे।’ –वामन विराट ७ १७१. २ सुरडणें, चिरडणें ३ मरणें मरण पावणें माणूस, गुरू इ०

अतिशय श्रमानें किंवा आग्रहानें) ४ भारणें; ग्रस्त होणें 'माझा पुरें जाजावग।' –दा ३ ६ ४ 'आजानीं आनंदें रडत।' –स्वादि २ १ ५५ [जा' जा? किंवा जाच?]

**जाहु-हू**—स्त्री आळ संशय, आरोप. 'स्त्रिये जाहू पेउ नये।'–दा २.२ २१. २ भांडण तिरस्कार.

**जाज्वल-ज्वल्य**—वि १ तेजस्वी, प्रखर (सूर्य, अग्नि) २ चकचकीत तातडीन(धातु) ३ गुणकारी, वीर्यवान (औषध, मंत्र) 'ही मात्रा अशी जाज्वल्य आहे कीं वायु तत्काळ उतरेल' ४ तापट तेजस्वी, जशास तसा, उत्साही (माणूस) ५ रागीट, भयंकर, जागतीजोत (देवता) ६ मोठी कार्यक्षम, तीक्ष्ण, उच्च दर्जाची (बुद्धि) 'त्याची विचारशक्तीहि मोठी जाज्वल्य असावी' –नि २०६ **जाज्वल्यमान**–वि १ जाज्वल्य, चकचकीत, लख लखीत २ प्रखर तेजस्वी (अग्नि) [स ज्वल्]

**जाट**—पु रजपुतातील एक जात व तींतील व्यक्ति [हिं]

**जाटिल्य**—न तपस्या, तप 'कार्णी येक कार्य पैं तें। जाटि ल्यादिक न करें।' –दा ९ ४.३९ [सं जटिल]

**जाटी**—स्त्री (तंजा) छाटी [स. शाटी]

**जाटी**—स्त्री (तंजा.) चाबूक [स जटा, म झ्याट]

**जाठर**—वि जठरा–पोटासंबंधीं, उदरस्थ 'जठरवायु'.[स]

**जाड**—न १ घन, ठोकळा, २ आडपडदा 'हृद हृद त्याचें पुण्य जळे वाड। वाटलें हें जाड तिमिराचें।' –तुगा ४० –वि १ स्थूल, जाडगा (तक्ता, फळी) २ जाडेंभरडें, खरखरीत (कापड) ३ दाट, फार पातळ नसणारा (प्रवाही पदार्थ) ४ थोराड वण गर (शरीर) ५ जड, मोठें (ओझें) ६ भारदस्त, प्रौढ थोर, कठिण 'प्रबंध कविता जाड वचनें।'–दा ११ ६ ८ ७ मोठी, भव्य, प्रचंड 'पुन्हा देखता जाड जीवीं गळालों। –रामदास (करुणा ष्टक) ८ लठ्ठ, दाडगा, स्थूल (माणूस, शरीर) ९ घट्ट, जाडा पहा [स जड] **जाडगा, जाडगेला**–वि जाड, लठ्ठ, धष्टपुष्ट गब दुल (मनुष्य, प्राणी) 'रेडे किंवा काणे याच्यासारखा अमळ जाडगेला असा मासा त्यास गावला' –नि १०९१ **०सर**–वि किंचित् जाड **०सुतो**–वि जाडयाभरडया सुताचें विणीचें(कापड) **जाडा, जाडगा**–वि १ जाड पहा २ मोठा विद्वान, प्रतिभा संपन्न; भारदस्त (पंडित, कविता, कल्पना कोटी, लेख इ०) ३ भरींव अर्थपूर्ण गहन **जाडाधांगडा–भरडा**–वि १ ओबड धोबड, खरखरीत (वस्त्र) भरड दळलेलें भरडलेलें भरभरीत (पीठ) **जाडी**–स्त्री १ जाडपणा, घनता २ स्थूलता लठ्ठपणा ३ दाटपणा, जाड पहा ४ धुरीच्या पुढील चाकोरीच्या बैलाचें जू, शिवाळ **जाडें(डीं)प्रकरण**–न असामान्य माणूस वजनदार विद्वान श्रीमंत माणूस, धेंड 'वरील दोघांहूनहि जाडी प्रकरण जे वरील महाविख्यात स्वामी त्यांच्याविषयीं कांहीं लिहून हा भाग आट पतों –नि १३९ **०धार**–मोठा फवारा 'जाडे धारहि लाविती धडधडां त्याचा उठे तो ध्वनी।'–केक १४१ **जाडेला**–वि १ जाडा, लठ्ठ २ जाडगर, जाडा पहा [स जड]

**जाड**—न पर्यंग, कासोटा 'एकीं वयसेचें जाड बांधलें। मग मन्मथोचिथयें कामे लागे।' –ज्ञा ७ ८१ [त जार्डा=वस्त्र]

**जाडजुडी**—स्त्री (व) घोंघी (एक जंतु). [का जाड=घोंघी]

**जाडयो**—नअ विवाहादि कार्यात पाय धुतल्यावर पावलावर काढावयाच्या कुंकवाच्या रेघा, चौकोनाकृति तळावरकडे हळद, चुना पाण्यात मिसळून त्याच्या रेघा ओढतात (क्रि० काढणें) [तुल० या जाडे=पावलाच्या खुणा]

**जाडी**—स्त्री (तंजा) वरणी, सुरई [तामिळ ई जर]

**जाड्य**—न १ वजन, जडत्व २ (ल) मंदपणा, आळस, सुस्तपणा ३ अज्ञान, मूर्खपणा 'तुला शोक लागत नाहीं हें कांहीं जाड्य नव्हे' ४ औदासिन्य, बेफिकीरपणा ५ जडपणा, अपा- चकता, अविश्वास्यता, पचन न होण्याचा धर्म (अन्नाचा) 'उडि दाचे ठायीं जाड्य बहुत आहे' ६ पचन न झाल्यामुळें शरीरास आलेलें जडत्व, वायूचा अवष्टंभ, अजीर्ण ७ थंडी, हींव 'भरो- वासा जाड्यें आलें असे।' –पूनावसर

**जाड्याल**—न (कु) तेलात पदार्थ तळल्यावर शिल्लक राहि- लेलें तेल [जाडें+तेल=जाडेल]

**जाण**—स्त्री १ ज्ञान, ओळख २ कृपा, दया याची जाणीव, कृतज्ञता, प्रत्युपकारशील वृत्ति २ नोकरीचा किंवा श्रमाचा गौरव, गुणज्ञता, गुणाचें चीज करणें, गुणग्राहकता (क्रि० जाणणें) 'आम्ही श्रम केला पण त्याची जाण त्यानें जाणली –वि १ जाणता, समजणारा, निपुण 'तरी जाणा नेणा सकळां।' –ज्ञा ५ १६ २ ज्ञानवान बुद्धिवान, वजनदार, विचारशील 'जाण मनुष्यावर संकटीं उपकार केला असता तो विसरत नाहीं' ३ लक्ष घालणारा मानणारा, काळजी घेणारा 'नव्हे सर्गी कोणी मुक्ति याचा जाण।' –तुगा १४९२ 'दरिद्र्याचा जाण विक्रमराजा।' ४ कृतज्ञ प्रत्युपकारशील 'जाण मनुष्यावर संकटीं उपकार केले असता ता विसरत नाहीं' ५ सज्ञान अज्ञान अजाण नसणारा साखरेचा इद्रावण घडू। जाणा गोड नेणा कडू।' –एभा २८ ४६७ ६ भोक्ता रसिक 'परि सौरभ्य नेणे तिहीं। भ्रमरीं जाणीं जें।' –माज्ञा १५ ५९४ [सं ज्ञान, प्रा जाण] (वाप्र) **०असणें**–(म्हैस) तिला जसजसें खाणें घालावें तसतसें तिचे कासेस अधिक दूध येत असणें **जाणउ-ऊ**–(काव्य) जाणों, असें जाणलें, मानलें जावो, असा विचार केला जावो **जाणपण**– न १ ज्ञान, विद्वत्ता 'सतापुढें जाणपण। सर्वथा आपण न मिर वावें।' –एभा ३ ३५७ २ जाणतपण 'जाणपणें न पिएति आव। –शिशु ८४ ३ अस्तित्व 'तवीं द्वैताचें जाणपण जाणवी

असें जें ज्ञान।' –ज्ञा ३ ४११ जाणवणी–स्त्री १ सूचना, इशारा २ जाणीव. 'ऐसी होता जाणवणी' –रास १.१२९ जाणवाय–स्त्री. (गो) १ शहाणपणा २ जाणीव. 'तो हाळ्यांनी अधू म्हणायाची जाणवाय देर '–वि. (गो.) पाजिल प्रौढी घाळगणारा. चेष्टेने 'तू फारच जाणवाय झाला आहेस ' जाणन(सा)ळ–वि चतुर, जाणणारा, जाणता पहा. –स्त्री चातुर्य, नैपुण्य, ओळख, माहिती. जाणस(सा)ळणें–अक्रि जाणत असणें, चतुर असणें, निपुण असणें, अनुभव आणि व्यवहार असणें, व्यवहारात पडणें.–सक्रि. परीक्षा करणें, कसोटीस लावणें; अनुभव पाहणें

**जाणणें**—उक्रि १ समजणें, कळणें, ज्ञान असणें, उमजणें, ध्यानीपूर्वक माहीत असणें 'वर्णभेद मनुष्यमात्र जाणतो, पशु जाणत नाहीं.' २ (ल) ओळखणें, दयेनें, मानानें, गौरवानें वागविणें (जुन्या ओळखीच्या दीन, गरीब माणसास). 'भल्या माणसावर उपकार केला असता तो जाणतो.' ३ जाणीव असणें, मान्य करणें, मानणें, प्रत्युपकाराची, मोबदला देण्याची बुद्धि असणें (नोकरी, श्रम, उपकार याबद्दल) ४ भोगणें, संभोग करणें ५ गुणविशिष्ट माहीत असणें 'हा तुम्हास भला वाटतो पण मी याला पक्का जाणतो.' ६ प्रतिसत्कार करणें, लाभानुरूप वागणें (जनावरांनीं) 'या गाईला दाणें घातलें ती जाणत्ये' [सं. ज्ञान, प्रा जाण मेजि. जन] न जाणो–कोणास ठाऊक? कोण सांगूं शकेल? असेंहि असेल, असेलहि या अर्थी जाणत, जाणतजाणत–क्रिवि जाणूनबुजून, समजूनउमजून, बुद्ध्या; जाणून जाणतमूर्ख–वि जाणत असून मूर्खपणाचें ढोंग करणारा, ढोंगी मूर्ख [जाणणें+मूर्ख]

**जाणता**—वि १ शहाणा 'भव बुडवी म्हणुनिच तव भजनीं सनकादि जाणता रमला।' –मोउद्योग ६ १. २ जाण, निपुण ३ तरबेज, हुशार (रोग बरा करण्यात, सुतिकाशास्त्रात), पंचाक्षरी, मांत्रिक, वैद्य, पशुवैद्य ४ (ल) धूर्त, लुच्चा (जसें–चोराचा माग लावणारा, पाण्याचा थांग लावणारा) ५ निवाडा करणारा, न्यायाधीश ६ एखाद्या गोष्टीचा गौरव करणारा गुणग्राहक, आश्रयदाता 'शास्त्रविद्येचा आता कोणी जाणता नाहीं' ७ (श्रम, उपकार इ०) ओळखणारा, आभारी होणारा 'मी नित्यश विचारपूर्वक लिहिण्याचा श्रम करितों याचा जाणता कोणी नाहीं ७ परीक्षा करणारा, परीक्षक, वऱ्यावाइटाची पारख करणारा ८ वयात आलेला, सज्ञाण ९ वडीलधारा (माणूस) [सं ज्ञा] ०वर–नवरा–पु वयात आलेला नवरा जाणती–स्त्री १ बुद्धि 'धर्माधर्म रूपें जियें। तियें न चोजविता जायें। जाणती जे का।' –ज्ञा १८ ७२० २ (कु) वयात आलेली, ऋतुमती स्त्री [सं ज्ञा] ०होणें–ऋतुस्नात होणें, न्हातीधुती होणें ०पकळा–स्त्री १ परिपक्व, पूर्ण ज्ञानाचें तेज (जाणपणा आल्यानरचें). बुद्धीची चमक (क्रि० येणें). २ बुद्धि (निर्वत प्राण्याची) (कल्पेचीं एक). जीवनकळा, प्रेतकळा यासारखी आणखी दुसरीं रूपें होतात ३ अप्रत्यक्ष विषय दर्शन, त्रिकाळ आणि त्रिस्थळ यामधील गूढ वस्तूचें ज्ञान ४ ज्याच्यामुळें भूतबाधा जाणली जाते असा एक मंत्र ०वधू–नवरी–स्त्री. जाणती अर्थ २ पहा (क्रि० होणें)

**जाणवणें**—क्रि समजणें, कळणें, जाणणें 'ऐसा ज्ञानीं विचारी। तंव आणवलें मुरारी।' –कथा १ ४ १०४ [जाणणें]

**जाणविणें**–उक्रि १ समजाविणें, जाणण्यास लावणें २ समजावून, कळून देणें, आपलें अस्तित्व भासविणें, ३ बाधणें अपायकारक परिणाम करणें (औषधें, सराव नसणाऱ्या गोष्टी इ०) 'जाणण–पित्त–जडान–जाणवलें' [जाणणें प्रयोजक, सं ज्ञापय, प्रा जाणाव]

**जाणवसा**—पु वस्ती, जानवसा पहा

**जाणाई, जाणाईजोखाई**—स्त्री. सटवाई, मायराणी, काळकाई यासारखी एक क्षुद्र देवी [जाणणें–जाणाई द्वि]

**जाणावें**—न ज्ञेयविषय, जाणण्याची गोष्ट 'जाणता ना जाणणें। जाणावें उरे।' –ज्ञा १८ ५३३

**जाणिजे**—क्रि (आज्ञार्थ) जाणावें, समजावें कीं, जाहीर करितो कीं, ध्यानात आणावें (पत्रामध्यें हा शब्द नेहमीं योजितात)

**जाणी**—वि ज्ञानी, शहाणा 'तिजे वालुखें तरि जाणी।' –दाव ३२६ [सं ज्ञानी, प्रा जाणी]

**जाणीतणें**—क्रि, जाणवणें 'कृष्णकंठायेरि वैसता मदन। जाणीतला मानसीं।' –मुआदि १३ ७७

**जाणीव**—स्त्री १ जाणण्याची शक्ति, विषयग्रहणशक्ति, बुद्धि 'नातरी जाणिवेच्या आयणी।' –ज्ञा २ १२९ 'या देहीं जाणीव रूपें करून आत्मस्वरूप राहतें' २ समज, समजूत, ज्ञान 'म्हणोनि जाणीव स्फुरविसी।' –परमा १ १३ 'होईल थोरपण जाणिवेचा भार। दूरावती दूर पाय तुझे।' जाणुपण–न, ज्ञान, जाणीव 'परि एकें कासी थोर अभिमानु। जाणुपणाचा।' –दाव ३७१

**जाणू, जाणो**—उभ जणू जणु काय, जसें काय, यासारखें, माझ्यामतें [सं जाने]

**जाणून, जाणूनउमजून–पुसून–बुजून–समजून–सव रून**—क्रिवि समजून उमजून, विचारपूर्वक, बुद्धिपुरस्सर उघड्या डोळ्यांनीं, ज्ञातत 'मुला, जाणूनपुसूनच हा कागद मी तुला दिला' –वाळ २ ६५ [जाणणें, उमजणें, पुसणें इ०]

**जाणें**—अक्रि १ गमन करणें, चालू लागणें, प्रवास करणें, पुढें सरणें, पूर्वस्थळ सोडणें 'तो या गावातून पळून गेला' २ पूर्वस्थळ सोडून विवक्षित स्थळ गांठणें 'तो उद्यां पुण्यास जाणार

आहे. २ निघून जाणें, नाहींसें होणें, नाश पावणें, हरणें. इत्यादि अर्थानें 'या दोनादयांनी परंतु कधीं जात नाहीं पण आज गेली.' ३ लोटणें, क्रमणें (वेळ). 'हां हां म्हणतां वर्ष गेलें.' ४ विशिष्ट प्रवेश करणें, भाग दिसणें समाविष्ट करणें. 'या पोतांत भोपळा लेखणी जात नाहीं.' ५ (विशेषतः भूतकाळांत उपयोग) पावणें, मरणें, नाश होणें, बिघडणें, टाकाऊ होणें, मळणें, अनुपयोगी होणें 'ही पादत्राणें चांगली पण कंपनीत गेली.' 'हा वगळा विद्वान पण अभिमानानें गेला.' ६ पडून देणें, होणें (नजराणा, मुद्दा, योग्य किंवा रुढ मार्गाचें उल्लंघन) 'हा आपल्या घरा उलगा पण शुद्धीवर कांहीं गेले' 'रोज औषध देतो असें त्यांत एक दिवस मात्र टाकून गेलें, रोगानें घर केलें' ७ एखाद्यापासून दुरावणें, पडून येणें (स्पष्टीनें एखादी गुप्तीची गोष्ट) 'ती गोष्ट मजपासून गेली नाहीं.' ८ वजा होणें कमी होणें. 'दहांतून पांच गेले तेव्हां राहिले पांच' ९ निर्बल होणें; शक्ति जाणें गुण जाणें (इंद्रिय, औषध याचा) १० अनुसरणें पाठीमागून जाणें. वेधणें, अभिप्रेत होणें (मन, बोलें, कान, प्रीति इ०) (वर अथवा कडे शब्दावरोबर प्रयोग) 'चांगली पादत्राणें कर्जानें निजवर लोकांची इच्छा जाते' ११ दिलें जाणें (शब्द, वचन—भूतकाळीं उपयोग) १२ विझणें (दिवा, प्रकाश, अग्नि). 'वाऱ्यामुळे त्यांच्यावरोबर दिवा गेला' १३ न्हाण, नाश होणें, झिजणें (शरीर) १४ एखाद्या स्त्रीशीं रत होणें, संभोग करणें. १५ कांहीं एक पदार्थांनें विवक्षित कालपर्यंत टिकणें. 'याला धोतरजोडा सहा महिनेपर्यंतसुद्धां जात नाहीं' वगैरे क्रियापदाच्या वर्तमानकालवाचक विशेषणावरोबर या क्रियापदाचा उपयोग केला असतां त्याचा अर्थ क्रियासातत्य दर्शविण्याकडे होतो. उदा० जसा व्यापार वाढवाल तसा मी पैसा देत जाईन. २ सकर्मक क्रियापदाच्या पूर्णभूतकाळावरोबर उपयोग केला असता कर्मकर्तरीचा अर्थ होतो जसें— तुला शिक्षा केली जाईल ३ धातुप्रत्ययांत धातुसाधितार्थी उपयोग केला असतां याचा अर्थ क्रियापूर्णता दर्शविण्याकडे होतो. जसें— तळ्यांतील पाणी आटून गेलें शरीर थकून गेलें ४ दुसऱ्या क्रियापदाच्या आज्ञार्थी रूपानंतर या क्रियापदाच्या आज्ञार्थाचा उपयोग केला असता पहिल्या क्रियापदावर जोर दिला जाऊन, क्रियेचा जोरदारपणा सिद्ध होतो जसें—आण जा, ठेव जा, दे जा कर जा इ० [सं. या. प्रा. जा, फ्रेंजि जा, रशियन या] (वाप्र) **जाजा येये**—स्त्री निरर्थक पुन पुन जाणें येणें, खेपा 'माझ्यानें हें हजारदा जाजा येये करवत नाहीं' [जाणें–येणें] **जायाचा–जायां, जायांस**—कैंसविशेषी उसना घेतलेला, आपल्या हातातून पुढें मागें जाणारा, दुसऱ्याचा (कपडा, रत्नें वस्तु) म्ह० जायाचें देणें लाजिरवाणें **गेलामेला. गेलामेला गतला**—सर्वस्वी गेला. अजीवात, कायमचा नाहींसा झाला. (माझें, तुझें, त्याचें इ०) —पाय जाणें–येणें! —मग, त्याग, तुल्य, त्याची काय पर्वा, किमत ' **गेला तो मेला**—गेलेलें पुन्हा भरून येत नाहीं **गेलेला असणें**—पाहाण्यांत, अनुभवांत, आढळण्यांत, ऐकण्यांत येणें, असणें. 'हे मला गेलेलें आहे. —तें मला ठाऊक आहे

**जाणीं**—उभ जर्णु. जणु काय जाणूं जसें काहीं 'कार्यानि वार्षिक सो जाणो तव रघुच्या मना मथितो।' —मोरगी ४.१५ [सं जानें] **०परी**—क्रिवि पाहण्यांत येतात जाणण्याच्या वेळेपासून, अनुभवाच्या, सज्ञानपणाच्या, जाणपणाच्या काळापासून. 'माझे जाणोपरी त्याचे घरीं लक्ष्मी पाणी भरीत होती' याच्या ऐवजी **जाणोपरीचें** अगोदर [जाण+उपरि=पासून]

**जात**—वि उत्पन्न केलेला विशेषत समासात उपयोग उदा० वृक्ष–फल जल–कमल–जात 'लक्ष्मीपासून जात जो अभिमान तो दारिद्र्यानें जातो' जेव्हां जात हें समासामध्यें दुसरें पद असतें तेव्हां त्याचा अर्थ —ज्यापासून उत्पन्न झालेला, जन्मलेला असा होतो. परंतु जेव्हां पहिलें पद असतें तेव्हां —ला झालेला असा अर्थ होतो. जसें— 'पक्षी जातपक्ष झाले म्हणजे आईला सोडतात. याप्रमाणें जातक्रोध, जातकाम, जातलोभ=क्रोधानें, कामानें, लोभानें आविष्ट व क्रोधजात, कामजात, लोभजात=क्रोधापासून इ० झालेला. असे दोन्ही प्रकारचे समास वाटेल तितके होतात. जसें— जात–गर्भ–भोजन–अभ्यंग–संस्कार–आनंद–रोमाच–दुःख–सुख. इ०.

**जात**—क्रिवि गुणविशेषणाचे पूर्वी जोर देण्यासाठी एक या शब्दासह लाविलेला उपसर्ग. जसें— एकजात पाढरा–पिवळा–मऊ= पूर्ण पांढरा पूर्ण पिवळा, पूर्ण मऊ [जात=प्रकार]

**जात**—स्त्री. १ प्रकार, वर्ग, कुळ, वंश 'याचे गाण्याची जात निराळी, त्याचे निराळी' २ जन्मस्वभाव मूळस्वभाव, अंगचागुण 'तो अट सोडणार नाहीं त्याची जातच अशी' ३ चातुर्वर्ण्यांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार किंवा याच्यांतील अनेक पोटजाती जाति पहा ४ रजकण, बिंदु, तिळमात्र (नकारार्थी उपयोग) (तुल० इ जॉट) 'त्याचे अंगीं शहाणपणाची जात नाहीं' —न समुदाय, जमाव, समूह समुच्चय; मध 'तैसा विषय जातांचा मरा। वाजो नेदिजे इंद्रियद्वारा।' —ज्ञा १६ ९० नेहमीं समासात उपयोग याचीं उदाहरणें असंख्य आहेत जसें— वस्त्रजात=सर्व प्रकारचीं वस्त्रें वस्त्रातील सर्व प्रकार, नमुने, वस्त्र या नावाखालीं येणारे सर्व, याचप्रमाणें धातु–शब्द–गुण–अर्थ–द्रव्य–जात इ० [स जात] (वाप्र) **जातीवर जाणें–येणें**—मूळस्वभावाप्रमाणें करणें स्वभावात बदल न करणें (निंदार्थी योजतात) म्ह० १ जात कळते पण मत कळत नाहीं. २ (व) रीत बाटली म्हणून जात थोडीच बाटली. सामाशब्द— **०करी**—पु जातींतला माणूस, ज्ञातिबांधव **०कुळी, कुळ**—स्त्रीन

जात आणि वंश यासंबंधीं सर्व माहिती (लग्नाच्यावेळीं ही शोधून काढून हिचा विचार होतो). 'मुलगी सुरूप नव्हे पण जातकुळी चांगली म्हणून करितों.' ०गंगा-जमात-स्त्री. एकंदर सर्व जात, एकत्र जमलेली सर्व जात (जातींत घेणें, बाहेर टाकणें इ० प्रश्नाचा विचार करण्यासाठीं) 'जातगंगेला व लोकगंगेला भ्याले पाहिजे.'-भाऊ १९ [जात+गंगा, जात अर. +जमाअत] ०गोत-न स्वत ची जात आणि स्वतच्या गोत्रांतील माणसें याबद्दल समुच्चयार्थी; आपल्या जातीचीं व गोताचीं माणसें. 'त्याला प्रायश्चित्त दिलें तेथें सर्व जातगोत मिळालें होतें.' ०चावडी-स्त्री. सरकारी गांवचावडीखेरिज स्वतंत्र एखाद्या जातीनें बांधलेली चावडी, निवाडाकचेरी. 'सार्वजनिक कामासाठीं गावचावड्याखेरीज स्वतंत्र जातचावड्या बांधल्या.' -गांगा ५५ ०चौगुला-पु. जातींतल्या, जातपंचायतींतल्या अम्मलदारांतील प्रमुख -गांगा २८. ०जेवण-न सर्व जातीला दिलेलें जेवण, जातींतील सर्व माणसांची पंगत, ज्ञातिभोजन ०पंच-पु जातींतील प्रमुख अधिकारी. 'वडर, कैकाडी, कोल्हाटी, कुंचेवाले वगैरे जातींत ब्राह्मणाला न बोलावतां जातपंच लग्नें लावितात' -गांगा ११३ ०पाटील-पु जातीनें नेमून दिलेला मुख्य अम्मलदार; जातचौगुला पहा. ०पात-स्त्री. १ जातकुळी, जातगोत पहा. 'त्याची जातपात समजल्यावांचून आम्हीं पंक्तीस घेणार नाहीं.' २ जातगंगा पहा ३ बहिष्कृत माणसानें जातींत परत यावयाच्या वेळीं जातीला घातलेलें जेवण; जातजेवण. ०पूत स्त्री जात आणि वंश 'जातकुळ' जातगोत पहा. [सं जाति+पुत्र] जातपूतचा-वि शुद्ध वंशाचा, बीजाचा, कुलीन. ०भाई-भाऊ-पु जातिबांधव, स्वजातीय माणूस. 'आपल्या जातभाईच्या हितारिता सरकार त्या सनदीचा कसा दुरुपयोग करितें ...' -टि १.५०२ 'या गावात त्याचा कोणी जातभाऊ असता तर उपयोगी पडता.' ०लग-वि. १ मोठ्या कुळांतील, जातींतील (जनावरें, फळें) 'त्या गाईपेक्षा-पेरूपेक्षां-ही-हा जातलग आहे' २ (क.) स्वत च्या जातीचा, जातीसंबंधाचा ०वार-क्रिवि. जातीप्रमाणें निरनिराळे (कर, नोंद, निवडणूक, प्रतिनिधि)

जात-स्त्री स्वत 'आता मदार नाना याचे जातीवर आहे.'-ऐटी १ ०५ [अर ज्ञात्] (वाप्र) (आपले)जातीवर करणें-स्वत च्याच अकलेनें, शक्तीनें आणि साधनानीं कोणतेंहि कृत्य करणें 'वडिलाचा पैसा न वेचता यानें आपलें जातीवर लग्न केलें' जातीवर करणें-घेणें-देणें-करणें-मांडणें-स्वत च्या शक्तीनें, सामर्थ्यानें करणें सामाशब्द- ०इनाम-न स्वतच्या हयातीपुरतें, वंशपरंपरेचें नव्हे असें, सरंजामी नव्हे असें इनाम ०कतबा पु (कायदा) जातमुचलका ०खुद-क्रिवि. (अप.) जातखुद-द स्वत संबंधीं जातनिशीं-क्रिवि खास स्वत, खुद आपण; जातीनें ०निसबत-स्वत: लिहून दिलेला लेख क्रिवि. स्वत, खुद; जातीनें. ०पत्र-मुचलका-नपु स्वतच्या नांवानें केलेला करार, करारनामा; स्वत ची लेखी जबानी. स्वतसंबंधी करारपत्र. [अर. ज्ञात, तुर्की मुच्लका, मुचल्का] ०मुखतार-वि १ स्वैर; अगदीं स्वतंत्र; बंधनापासून मुक्त. २ कुलमुखत्यार, कुल्कारभारी. ३ जातचौगुला-पाटील ०मुबारक-स्त्री. खुद; श्रीमंत, राजा; स्वामी 'सरकारचें जात-मुबारकेचें लक्ष सोडून जे असतील त्यांचा बंदोबस्त मनोदयानुरूप केला जाईल.' -रा ७.२९. ०व्यवहार-पु जातीनें व्यवहार करण्यास योग्य, पंधरावर्षांवरचा तरुण माणूस, कायद्यांत आलेला; सज्ञान (हल्लीं एकवीस वर्षांचा) ०सरंजाम-जागीर-पु. लष्करी चाकरीबद्दल स्वत चा पगार म्हणून मिळालेली नेमणूक किंवा इनाम; जेवढा उत्पन्नाचा भाग शिलेदाराचे, सरदाराचे अगर मुत्सद्याचे जातीचे निर्वाहार्थ दिला असतो तो, जातीनिशी लष्करी चाकरी केली पाहिजे या करारावर दिलेला सरंजाम. जातीनें-क्रिवि १ स्वभावत; जन्मस्वभावानें, प्रकृत्या. २ स्वत खुद. 'लढाई घेऊं जातीनें'-ऐपो १९१. 'तो जातीनें बोलावूं आला त्यापेक्षा भोजनास गेलें पाहिजे.' जातीचा-स्वतचा. 'इंग्रजी कैदम...जातीचे घोड्यास चांदीचे नाल करून नालबंदी करीत होता.' -मद६ १००.

जांत, जांत-न १ बैल शिकण्याकरिता केलेला खुंटारा; याला एक आडवें लाकूड असतें; तें खांद्यावर घेऊन खुंटाभोंवतीं बैल घाटोळा फिरतो. जनावरास वळणीस आणण्यासाठीं केलेलें साधन, एखाद्या माणसाला शिक्षा देण्याची रीत [यंत्र]

जांत-न (गो.) बैलांची जोडी, जोतें. [सं. युति] ०कर्‍या-पु. (गो.) शेत नांगरणारा

जातक-न. १ जन्मकाळच्या ग्रहांच्या स्थितीवरून माणसाच्या आयुष्यांत घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टींविषयींचें वर्णन करणारा ज्योतिषशास्त्राचा एक विषय, ताजक 'नंदें जातक वर्तवून। धनिभद्र नाम ठेविलें।'-ह ३.५३. २ कुंडली इ० वरून भविष्य वर्तविणें, शुभाशुभफलपरिज्ञान (क्रि० वर्तविणें) ३ विवाह कुळविन्यास लागणाऱ्या आठ गोष्टींपैकीं एक, विवाहयोग्यतेच्या आठ प्रकारांपैकीं योनिप्रकार ४ जातकर्म पहा. जातकर्म-न पुत्रावण, जातक; नूतन जन्म पावलेल्या बालकाचा पित्यानें करावयाचा संस्कार हा संस्कार सोळा संस्कारांपैकीं आहे या संस्कारांत सहाणेवर मध व तूप घालून त्यात सोनें उगाळून सोन्याचे रज त्या तूप-मधांत उतरल्यावर तें चाटण जन्मलेल्या बालकास पाजावयाचें असतें नंतर बालकाच्या उजव्या कानावर सुवर्ण टेकून पित्यानें बालकाच्या कानांत मंत्र जपावयाचा असतो -एभा २७.५८४. 'जातकर्म नामाभिधान। कटिसूत्र अन्नप्राशन।'-भारा, बाल ७.१२.

जातखँचो—वि. (काव्य) जातीधर्मीय. 'जैसें दीवा जात-वो लोपे। तापरग माढेचें।'—ज्ञा ९.७१. [जाणें+सं. क्षण]

जांतण, जातणी, जांतली—स्त्री. (राजा.) लहान जातें; सेजारलें जातें. जांतणी—स्त्री. मोठें जातें.

जातवेद—पु अग्नि 'मुद्रत दार धडाडी पेटिजे जातवेदें।' —मुंगमा मुद २१८ 'मग भरतें घेतविला जातवेद।' [सं.]

जांतां—न. (गु.) दळण्याचें जातें. 'वीं दळावेंआं पृथिवीचा जातां। पाळरावी वैरणें घातलें मजपातां।'—शिशु १०४४ [सं. यंत्र]

जातापाया—पु ऱ्हास; क्षय; नाश; उतरती कळा (क्रि० येणें, लागणें; होणें, सुचणें). [जाणें+पाय]

जाताधाकी—स्त्री. (कारागीर) पगार देऊन किंवा सर्व करून राहिलेली चाकरी; नोकरी [जाणें+चाकरी]

जाति—स्त्री १ (संगीत) रागाचा आरोह व अवरोह या मधील स्वरसंख्येवरून रागाचे जे प्रकार होतात ते प्रत्येकीं. त्यांची संख्या ९ आहे. त्यांची नावें–संपूर्ण–संपूर्ण, संपूर्ण–षाडव, संपूर्ण–औडुव, षाडव–संपूर्ण, षाडव–षाडव, षाडव–औडुव, औडुव–संपूर्ण, औडुव–षाडव, औडुव–औडुव २ (संगीत) न्यास, अंश, मद, इत्यादि स्वर, तसेंच ताल, कला, मार्ग हे ठराविक असून अमुक एक रस उत्पन्न व्हावा अशी योजना ज्या एखाद्या नियमबद्ध स्वररचनेंत असते ती. हिचे प्रकार दोन–शुद्ध जाति व विकृत जाति ३ (संगीत) मात्रानियमावरून तालाचे झालेले प्रकार प्रत्येकीं ह्या जाती पांच आहेत—चतुरस्र, त्र्यस्र, खंड, मिश्र व संकीर्ण. [सं. जाति]

जाति—स्त्री १ जात; प्रकार, वर्ग. २ वंश. कुळ, बीज. ३ वर्ग जात पहा ४ (गणित) अंश व छेद यांचें एकीकरण उदा० विशेष–शेष जाति ५ (साहित्य) एक अलंकार संस्कृत आणि प्राकृत या दोहोंतहि सारखेंच यांचलें जातील अशी अक्षराची रचना. ६ छंदाचा एक वर्ग. हा मात्रासंख्याक असून, षण्मात्रिक तालाचा व अष्टमात्रिक तालाचा अमे याचे दोन प्रकार आहेत. [सं.] ०दंड–पु १ जातीनें लादलेला कर. २ जातिबहिष्कृत माणसानें शुद्ध झाल्यावर जातीला द्यावयाचा दंड ०पक्ष–पु समुदायरीत्या जात, वर्ग, वंश (सबंध जात एक धरून विचार करताना) याच्या उलट व्यक्तिपक्ष=एकटा माणूस ०बंधु–पु जातींतील माणूस, जातभाऊ, जातभाई. ज्ञातिबांधव. ०भेद–पु वंश भिन्नत्वावरून, वर्णभिन्नत्वावरून अगर निरनिराळ्या उद्योगधंद्यावरून समाजाचे जे वेगवेगळाले गट बनले आहेत त्यास जाती म्हणतात जातीमधून भिन्न भिन्न प्रकार, आचार, रूढी उत्पन्न होतात त्यामुळें जातिभेद उत्पन्न होतात, जातींमधील भिन्नत्व, असमानता ०भ्रंश–पु जातिबहिष्कृत होणें, जातीस मुकणें. ०भ्रष्ट–वि. जातिबहिष्कृत; जातिबाह्य, वाटगा. ०मर्यादा–स्त्री. जातीचे नियम (चालचालणुकीचे); जातीनें घालून दिलेलें बंधन. ०लक्षण–न जातीचे विशेष किंवा सामान्य गुणधर्म; जातीची रीत, वर्तन. ०वंत–वि. १ उच्च घराण्यांतील, कुळांतील; खान दानीचा घरंदाज; कुलीन, उदार 'विजविज वरिताती जातिवंत पाखरें।'—सला ४१. २ जातलग पहा. ०वाचक–वि. १ (न्या) वर्ग–प्रकार–भेददर्शक (संज्ञा) याच्या उलट व्यक्तिवाचक २ सामान्य, वर्गवाचक (नाम) ०वैर–न जन्मत, स्वाभाविक वैर. ०व्यवहार–वेव्हार–पु विशिष्ट समाजामध्यें प्रचलित असलेल्या नीतिमार्गानें आचरण 'वीं जातिवेव्हारा परौता।'—ऋ १४. ०स्मृति–स्त्री. पूर्वजन्मस्मरण 'मग जाहली जातिस्मृती।'—मुच ११.९२ ०स्वभाव–पु. १ कुळाचा, जातीचा, वर्गाचा स्वभाव, जातिलक्षण २ जन्मस्वभाव; प्रकृतिस्वभाव.

जातीचा–वि १ जातीनें; जातीसंबंधानें 'हा जातीचा ब्राह्मण आहे' २ जन्मस्वभावाचा, प्रकृतीचा 'जन्मत व जातीचा–भला बरा–आंधळा–पांगळा–रोगी.' जातिवंत; अस्सल. 'तुका म्हणे तेथें पाहिजे जातीचें। येरा गावाळाचे काम नोहे.'—तुगा ३५८७. ३ खानदानीचा; मोठ्या कुळातला. म्ह० १ जातीची खावी लात परजातीचा नको भात. २ जातीकरिता खावी माती.

जातीचें लेकरूं–न. (ल.) लुच्चा माणूस; लबाड माणूस. ०पुती–पूत–स्त्री. वंश, कुळी, जातपूत पहा. म्ह० जाती तशी पुती, खाण तशी माती ०पुतीचा–वि. खानदानीचा; कुलीन.

जातीय–वि. जातीसंबंधाचा, जातीचा. 'साधूस स्वजातीय व विजातीय सर्वसमान आहेत' वृक्ष–ब्राह्मण–पाषाण जातीय इ०

जाती—स्त्री. जाई, वेल व फूल. 'जैसें जातीचें मुकुल। का तेज परी शीतल।'—ज्ञा १६.११५. [सं]

जातीण—स्त्री. (कों) १ भात भरडण्याचें मोठें लाकडी जातें. २ जात्याच्या आकाराचें दारूचें झाड ३ (राजा) जात्याची पेड, तळी, जातें. जातण पहा. ०करणें–(ठाणें) भात जातिणीवर भरडणें.

जातीपत्री—स्त्री. जायपत्री. जातीफळ–न जायफळ

जांतुली—स्त्री (कों) लहान जातें, जातली.

जा(जां)तें—न दळण्याचें साधन, यंत्र दोन वर्तुळाकार दगड एकमेकावर घासून मधील पदार्थाचा चुराडा करतील अशी यात योजना असते, घरी, घंटी, चक्की, जातीण 'दळुनिया पीठ केलें। काळ बैल तेंहि गिळी। ऐसें हें दुष्ट जातें। बहुता जनाला छळी।'—मध्व ३८९ [स यंत्र] म्ह० १ जात्यावर बसल्या गीत आठवतें=प्रसंग आला असता आपोआप हातून काम होतें. २ जात्यातले रडतात सुपातले हंसतात ०ओढणें–जातें फिरविणें. ०उकट्या–वि टाकी लावणारा. [जातें+उकटणें]

जॉनें जुतें—न (गो) वहाण [सं युन हिं जूता] ०कार–पु (गो) चांभार

जात्य, जात्यत्रिभुज—न (भूमिति.) काटकोन त्रिकोण [स जात्य=काटकोन+त्रिभुज=तिकोन]

जात्यंध—वि जन्मांध, उपजत आंधळा [स जाति+अंध]

जात्यभिमान—पु जातीचा अभिमान पहा

जात्या–त्या—क्रिवि १ स्वभावत जन्मस्वभावत प्रकृत्या 'तो जात्या बुद्धिवान खरा' २ स्वत. जातीनें 'अवदान करीत असता आपण जात्या आपले स्वकर्मी उजू तवाजू करून.' –भाव ५२ 'एवढा श्रीमंत असून जात्या.पायांनें फिरतो आहे'

जात्रा—स्त्री (गो) जत्रा पहा [स यात्रा, हिं जात्रा] जात्रेकार–वि जत्रेस गेलेला, जाणारा यात्रेकरू

जाबू—क्रिवि १ कायम सतत नेहमीं, नियमितपणानें (नोकरी, होणारा नफा, घडून येणारी गोष्ट) 'याची चाकरी जाबू आहे' –वि फार दिवसांची (जुनी, रूढ–चालरीत) [जयगें]

जा(ज्या)दा—पु १ अधिक जास्त २ विशेष निराळें स्वतंत्र जवाद पहा [अर झियादा] ०तलबी–स्त्री फाजील तगादा 'स्वराज्याचा अमल बाजवी मामुलप्रमाणें देत जावा, ज्यादा तलबी न करावी' –रुलप २ ११३ [फा] ०पोलीस–पु (इ) दंगखोर अगर बडाळीच्या भागात शिक्षा म्हणून अधिक लादलेले शिपायी, प्युनिटिव्ह 'जादा पोलीस ठेऊन बाकी सर्व काम त्याजवर सोपवावयाचें' –टि १ २८०

जादू—स्त्री १ माया, चेटूक, इंद्रजाळ, पिशाच्चविद्या, जारणमारण अभिचार, शाबरीमंत्र २ या विद्येचा प्रयोग [स यातु फा जादु] ०खोर–खोरा, जादूगर–गार–गीर–वि १ जादू करणारा, चेटक्या २ जादूविद्या जाणणारा, जादूत तज्ज्ञ ३ कपटी हिकमती 'शिवाजी राजा मोठा हुनेरवंत जादूखोर आहे' –मदरु १ ५३ ०गिरी–गरी–स्त्री चेटूक मोहनी जादू पहा 'जादूगिरी नजरबंदीनें दृष्टी फसते पण फार जुनी कलमबंदीनें सृष्टी फसते' –राजसंन्यास १८ ०चा कंदील–पु पडद्यावर चित्रें अगर देखावे दाखविण्याकरिता ज्या तीव्र प्रकाशाच्या कंदिलाचा उपयोग करितात तो (इ) मॅजिक लँटर्न ०टोणा–पु जादूविद्या भुतांखेरीज मंत्रतंत्र, जादू यांना व्यापक संज्ञा [फा जादू+का टोणें–फसविणें]

जान—पुस्त्री १ जीव आयुष्य २ प्राण आत्मा 'वजीर खानासी बाण लागता हौदात जान सोडिली।' –इपुस्त्रिपो २१४ जान गेलें तरी जमीन देणार नाहीं ३ (ल) प्रियकर प्रिया 'मेरा–री जान' [वै स जान=जन्म=आयुष्य 'कोविद जान मेधा' –ऋग्वेद ४ ५१ फा जान्] ०गिरी–स्त्री खून 'तर्से युध्दप्रसंग होऊन तुमची जानगिरी होईल' –वाड–शाछ ११४ जानजवान–जमान–धमान–वि. तरणाताठा, जवान. 'त्याचा एक जानजमान मुलगा थोडे दिवसापूर्वी वारला' [जान हि ०दार–वि (कों.) जेमतेम जिवंत, अतिशय आजारी, क्षीण (दुखणेकरी) [फा.]

जान—न (व) नुकसान 'घर जळाल्यानें त्याचें मोठें जान झालें'

जानक—का पु (गो) देवाला बळी द्यावयाचा रेडा

जानकुड–खोड—न (व) पखराच्या खोडावर घस बसविण्याकरिता लाविलेले उभे खुंट पखराचे दांत, पाय जानोळें.

जानपछान—पु ओळखीचा माणूस स्नेही –स्त्री ओळख, ओळखदेख [सं ज्ञान+प्रत्यभिज्ञान किंवा पश्चाज्ज्ञान, प्रा जाण+पच्छाजाण हिं जानपहचान]

जान(नि)वसा जानासा—पु १ वधू किंवा वरपक्षाचे गावात उतरावयाचे जागीं राहणें, उतरणें (क्रि० करणें देणें) वराचा–वधूचा तळ २ वधू–वर पक्षाला उतरण्यासाठीं दिलेलें घर जान वसघर, 'जानवशागी घर। दिधलें विशाळ सुंदर।' –ह २ ११४ जानवस(से)घर–न जानोसाकरितां दिलेलें घर, स्थान वधू–वराचा तळ, विन्हाड, वऱ्हाड [सं जनवास, किंवा जन्य=नवऱ्याचे मित्र+वास]

जानवळ–वळें जानोळें—न जानकुड पहा कुळवाचा पास बसविण्याचा खुंट, हे दोन असतात –मसाप २.३ ७७

जानवा—पु (सौधा) (जबिया) बॉकमधील एक डाव आपल्या हातातील जंबियानें आपल्या उजव्या बाजूला (अर्थात जोडीदाराच्या डाव्याबाजूला) जानवें असतें त्या ठिकाणीं वैरीच्या डाव्या बाजूपासून वर बरगडीच्या शिंपीपर्यंत कापत जाणें याच्या उलट डावाला (वरून खालीं कापत जाण्याला) जानवा उलटा म्हणतात. (पहा) जानवें सोडविणें, उतरणें पहा [स जानवें हिं जानवा]

जानवाळ—स्त्री खरूज (ल्हान पुरळ येणारी)

जानवें—न १ यज्ञोपवीत (उपनयनचिन्ह–सूत्र) २ (कुंभारी) मडकें चाकावर बनत असता त्याच्या मध्यभागीं वाळाळी चिकट वून ठेवतात ती सुताची दोरी –बदलापूर ६६ ३ लमण्या नावाच्या रत्नावर एखाद वेळीं दिसणारी पांढरी रेघ ४ (वे) नागराचा फाळ व फन जोडणारा लोखंडी वाटोळा तुकडा ५ (वे) गोइळ [स यज्ञोपवीत, प्रा जण्णोवीअ हिं प जनेऊ] (वाप्र) ०तोडावयास उठणें, जानव्यास हात घालणें–अतिशय रागावणें, चिडणें, जानवें तोडण्याचा धाक घालणें (जानवें तोडलें असता धर्म जाऊन अपवित्रपणा येतो) ०मोकळें करणें–उर्त्ते करणें–सुतकातून मोकळें होणें क्रियाकर्म करून शुद्ध होणें, दुसरें शुद्ध जानवें घालणें ०सोडविणें–उतरणें–जानव्याच्या जागीं

तरवारीचा वार करणें जानवा पहा ०धोतर फाडणें-टाकणें-१ अतिशय रागावणें डोक्यात राख घालणें २ निर्लज्ज, बदफैली होणें, बेफाम उधळणें जानव्याची लाज धरणें, जानव्यास लाजणें-(जानवें पवित्र म्हणून त्याचा मान राखणें) जानवें (धर्म) सांभाळण्यासाठीं तरी दुराचरण न करणें जानव्याधोत राची गांठ घालणें-१ अतिशय रागावणें रागानें बेफाम होणें २ (तुझ्या, त्याच्या या शब्दाशीं जोडून) दुसऱ्याच्या (जान व्याच्या) नाशाची धमकी देणें जानव्याला जानवें मिळणें-सजातीयाचें ऐक्य होणें, मिलाफ होणें, एक होणें जात ओळखणें जानव्यास घस्रा बांधणें-(पूर्वी वादविवादात निकल्यास जयपत्र घेणें किंवा आपण पराजित झाल्यास वस्त्रानें जानवें तोडणें असा क्रम असे) यावरून निकराची प्रतिज्ञा करणें ०जोड-पु पाच जानवीं जानव्याचा धनी-वि जानवें धारण करणारा वर्ग (ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य वर्ग)

जानी—वि जीवश्चकंठश्च, अति निकट, जिवाचा करिता, निवलग (दोस्त) [फा]

जानी—स्त्री १ खंडोबाच्या किंवा एखाद्या देवाच्या नावानें सोडलेली गाय, वासरू, गुरू किंवा मुलगी, देवगाय, मुरळी २ (ल) आडदांड मुलगी

जानीबैन, जानबैन—क्रिवि दुतर्फा, दोन्ही बाजूंनीं 'जानी बैन जुदागी नाहीं'—पया ४८४ [अर जानिबैन्]

जानीवें—पु घोडयाचा एक रोग यात एका किंवा चारी पाया वर मांडयाच्या आत गाठी येतात —अश्वप २ २८८ [स जानु]

जानु—पु गुडघा [स] ०जंघपाटरी—स्त्री (लावणी) गुडघा, मांडी आणि पोटरी ०वर्त—पु गुडघ्यावर किंवा गुडघ्या च्याजवळ असणारा भोंवरा हें घोडयाचें अशुभलक्षण आहे

जानू(उलटा)—पु (जवेया) वॉकमधील एक डाव ह्यात तील जवियानें जोडीदाराच्या आपल्या डाव्या बाजूच्या (अर्थात जोडीदाराच्या उजव्या बाजूच्या) गुडघ्याच्या बाहेरील डोळयावर जवियानें मारणें जानू(सीधा) जाडीदाराच्या डाव्या गुडघ्या वर मारणें या डावाला जानूसीधा म्हणतात

जानू जान्हवें—न जानवें पहा [हिं जनऊ जानवा]

जानेवारी—पु इंग्रजी वर्षाचा पहिला महिना [इ]

जान्हवी—स्त्री श्राद्धाच्या वेळीं शूद्र गळयात रेशमी दोरा गुंडाळतात तो [जानवें]

जान्हवी—स्त्री गंगानदी, भागिरथी न ज्ञानामृताची जान्हवी।'—ज्ञा १५ ५७२ 'जान्हवीस न्हावया थिल्लरोदक।' [स जह्नु]

जाप—पु १ जबाव, उत्तर जाब २ उच्चार ब्र ३ देवाला केलेली विनंति मागणें, नवस [जाब] ०लावणें—सक्रि देवा सको ३ ४८ पाशीं मागणें —न्यायप ४४९ जा(जा)पणें—सक्रि (मुंबई) सांगणें म्हणणें —अक्रि जाब देणें, रडून कारुण्यवृत्तीनें बोलणें, कबूली देणें (अपराध कबूल करताना किंवा पुढील चांगल्या वर्तनाची हमी देताना) जापविणें—उक्रि (जापणें प्रयोजक) स्पष्टपणें, मोठयानें सांगावयास लावणें (अपराध कबूल करताना किंवा पुढील चांगल्या वर्तनाची हमी देताना) गुन्हा मान्य करावयास लावणें ०साल—पु (राजा पुण) जाबसाल पहा —मसाप २ ४ ३६१

जापक—वि जप करणारा, जाप्यक 'ज गायत्री मंत्र जापक।'—भारा किष्किंधा ११ ९१ [स जप्]

जापाणणें—सक्रि १ आच्छादणें २ आरोपणें 'आता जापाणीं जापाणीं आपुलें।' —ज्ञा ११ ३८१ ३ अपमान करणें, भग्न करणें 'यक्ष देव जापागिला।'—दा. ६ ३५

जापारणें—अक्रि उलटून बोलणें प्रत्युत्तर करणें (दांडगा ईनें, उद्दामपणानें, उद्धटपणानें) [जाप]

जापाळ—पु जपाळ पहा

जापें, जावप—पु १ वेत वीण (गुराची) 'या गाईचीं किती जावपें झालीं' २ वासरू जाउपें पहा

जाप्ता—पु पाहारा जाबता पहा 'सरकारी सामानावर जाप्ता ठेवणें'—डुकराची शिकार (बडोदें) २१

जाफत, जियाफत, ज्याफत—स्त्री १ आतिथ्य, मेजवानी 'सरदार-दरकदाराच्या घरीं जाफत झाली'—वज्राघात १७८ २ नजर, भेट 'पाचशें रुपये नवाबानें जियाफत मेजवानी पाठविली त सेनवास दिधली'—रा १ ४३ जयाफत, असें दुसरें रूप आहे [अर जियाफत]

जाफरणें—अक्रि एखाद्यावर संतापणें, रागावणें, खेकसणें, उखडणें, तडफडणें आदळआपट करणें डाफरणें पहा

जाफरा—पु केशर [अर झअफरान्, हिं जाफरान]

जाफरमाना-मानी—वि केशरी केशरी रंगाचा 'मागें जाफरमानी व केशरीवुनाचा पोशाख पाठविले होते'—पद १९ ९८ [अर झअफरानी]

जाफराबादी—वि जाफराबादची, जाफराबाद गावची, गावासंबंधीं (विशेषत म्हैस गाय या संबंधीं वापरतात)

जाफरीगुंडा—स्त्री अ.बोली गुल्मखमल फुलाची एक जात

जाफा—वि क्रिवि वाजवीपेक्षा जास्ती अधिक ज्यादा, जास्त [अर इजाफा=वाढ जाड]

जाब जबाब—पु १ उत्तर 'कोणी काहीं तरी दान पुण्य करा। जाब नदा तरी जातों माघारा गा'—तुगा ३४७ २ हुंडी संबंधींचें पत्र जबाब पहा ३ बोलणें माप-भाषा बोलण्याचें चातुर्य [फा ज्वाब्] ०साल—पु १ प्रश्नोत्तर संभाषण बोलणें

तऱ्हा प्रमाणाप्रमाणें ज्वाबसाल कोणी न करीत ' –रा १३ १० २ बोल भाषण उच्चार ३ तह तहाचें बोलणें ' गोविंदराव बापुनीं नाऊ जावसाल लाविला। –ऐपो २८६ ४ जबाब सुमाला या दुष्कृत्याचा जावसाल ईश्वराच्या घरीं द्यावा लागेल ' [ अर जवाब्+सुआल् ] ०साली–वि १ हजीर जबाबी, न गडबडणारा २ प्रमाणभूत साध्य व्यवहारास उप युक्त ( कागद ) ०साली कागद–अव कामाचीं पत्रें, उत्तर प्रत्युत्तराचीं पत्रें

जाव—पु १ जाभळीच्या जातींतील एक झाड याचें फळ भोंकराप्रमाणें असून लाकूड इमारतीच्या उपयोगी पडतें फुलें पांटरीं व फळें पिवळसर असून मधुर व सुवासिक असतात –वैपि ७१९ २ रायजांभूळ, फळ व झाड ३ पेरु झाड आणि फळ ४ (कों) काजू ५ खरबुजाची एक जात याचा रंग तांबूस आणि आकार गोल असतो –कृषि ५७२ जाम पहा [ स जंबु ]

जाव—पु जाम एक प्रकारचें भांडें, पेला खालीं पेंदी असलेलें पुष्पपात्र ' जावलोटी पाण्यासीं। ' –स्त्रीगीत ९६ [ फा जाम ]

जाव, जावय जावोय—स्त्री ( कु गो. ) जांभई [ स जृंभा, प्रा जंभा, जभाइअ, म जांभई ]

जॉबकाम—न पंचांग, कॅटलॉग, जाहिराती वगैरे सारखें छपाईचें किरकोळ काम ( इ ) जॉबवर्क

जा–बजा ज्या–बज्या—क्रिवि स्थळोस्थळीं, ठिकठिकाणीं ऐशा ताकिदा जा–बजा पाठवाव्या ' –रा ७ ३५७५ [ फा जा= स्थळ, जा–ब–जा=सर्वत्र ]

जाबड—(माण) दाराच्या खालच्या बाजूस फळीला अस लेला माठा लोखंडी खिळा

जाबडणें—अक्रि १ ( क ) झोपेंत बोलणें २ ( राना ) वेड्यासारखी बडबड करणें बरळणें जावणें पहा [ ध्वनि ]

जाबडा—पु जबडा पहा

जाबणें—अक्रि ( गानडळ ) बरळणें बडबडणें ( तापांत, झोपेंत ) असंबद्ध भाषण करणें जाबडणें पहा [ जापणें ? ]

जाबत जाबीत—पु अधिकारी मुखत्यार जोतिंद्रीर मानभाऊ जाबती कमलनैन सेकीन समत निंब –रा १५ १७२ [ अर झाबित् ]

जाबता—पु १ कायदा, नियम २ अधिकारपत्र मुखत्यार पत्र अधिकार मान्यता मंजुरी ३ परवाना पास ४ पाहारा राखण सावत ५ मोजलेल्या जमिनीचा तुकडा ६ कैद ७ सर जाम किंवा इनाम याच्या अधिकाराची कलमवार याद ८ व्यापा ऱ्याला पाठविलेली मालाची याद, फर्द फरिस्त ' जातेसमयीं कुलकऱ्याचे स्थान घार गावाचे विवादीचे जाबता करावे ' –सभासद ९२ [ अर झाबिता ]

जाबता—पु १ अमल, कडक शिस्त ' लष्करचे लोकांनीं ताकीद न ऐकतां त्याच्या गर्दना मारिल्या, जाबता बसविला ' –मदरु १ ८५ २ दस्तरख [ अर झाबिता ]

जाब बांगडा—पु बांगडा माशातील एक जात

जाबरी—स्त्री नाचणीची एक तऱ्हा

जाबरी—स्त्री बऱ्हा दगडाचा कापलेला चिरा

जाब(भ)ळा—वि जांभळाच्या रंगाचा जाबळी–स्त्री जांभळाचें झाड जांबूळ [ स जंबू ]

जाबळा, जाभळा—पु ( गो ) मोठ्या छिद्राचें जाळें

जाबळी—स्त्री ( कु ) माणें ठेवण्यासाठीं केलेली जाळी दार परडी, टोपली

जांबा—पु १ एक जंगली झाड, जांब पहा २ एक प्रका रचा दगड हा तांबूस असतो कोंकणांत सापडतो –वि जांबी, जांबेथर पहा

जाबाड–डें—न जबडा, जाभाड तोंडाचा खाऱ्यावरचा भाग विशेषत खालचा जळचरें पसरिता जाबाडें ' –सुआदि ३० २३१ [ स जभास्थि, जंभा+हाड किंवा जभा+ड अल्पार्थी ]

जाबी, जाबी हुर्डी—स्त्री ( प्र ) जवावी जवाबी–हुर्डी पहा

जाबीर—पुन कागदी लिंबु ( प्र ) जबीर पहा

जांबुवंत—पु १ श्रीरामाच्या वानरसेनेंतील सर्वांत म्हातारा अम्वल त्यावरून २ (ल) मंडळींतील शहाणा म्हातारा माणूस, वृद्ध कवि वडीलधारा पुढारी [ स जांबवत् ]

जाम्बूनद—न सोनें ' पाषाण परिस भूमि जांबूनद।वराचा संबंध धातयाचा। ' –तुगा ३४९३ जांबूनदाचा पिळिला रस।' –वेमीस्व ७ ३३ २ धोतऱ्याचें फळ [ स ]

जांबूळ—स्त्रीन जांभळीचें झाड आणि फळ याचें लांकूड इमारतीच्या उपयोगी असून सालीचा रंगाकडे उपयोग करतात फळाचा रस औषधी आहे

जांबेथर जांबोशी—वि जांभळसर रंगाच्या दगडाचा थर असलेला (दगड धोंडा) भरलेल्या दगडाचा कोंकणात इमारतीकडे उपयोग करितात

जांबोल—पु ( कों ) माशाची एक जात हे दिवाळीच्या सुमारास पकडतात जावा पहा

जाभ—पु पेरू ६० जार पहा

जांभई जांभळी जांभाळी—स्त्री निद्रा, आळस इत्यादी मुळें तोंड पसरून निघणारा दीर्घ श्वास ( क्रि० येणें घेणें ) जांभळी हा शब्द वऱ्हाडांत रूढ आहे [ स जंभा प्रा जंभा, जंभाइआ, हिं जमाई ] म्ह० रात्र महिन्याची जांभई=दीर्घ सुस्तपणा कोणतेंहि काम त्वरा न होता उशिरानें पडण्याचा प्रकार

**जांभळा-ळी, जांभा, जांभाड-डें, जांभार, जांभूळ, जांभेथर**—जांभळा-ळी, जांभा, जांभाड, जांभीर, जांभूळ, जांबथर पहा

**जांभूळ देवदार**—पु एक सरळ वाढणारें सुरस झाड

**जाम**—पु एक प्रकारचें भांडें, जाव पहा

**जाम**—क्रिवि पक्कें, घट्ट (क्रि० बसणें). 'ती गिरकी जाम बसली.' [इं जॅम=चिरडणें, दाबणें]

**जामगी**—स्त्री तोफ अथवा बंदुकीचा तोडा, वात, काकडा, फटाक्याची वात, बत्ती 'दोन जामग्या झाडाने आड टगीस पडल्या' —मराचिथोशा ६० [फा] **०लावणें**–१ तोडा पेट विणें २ (ल) भाडण लावून टणें. ३ त्रास देणें छळ करणें **जामग्यांनीं भाजणें**–अतिशय जुलूम करणें. छळणें.

**जामजोड**—पु १ घोड्याच्या टाचेच्या खुरावर बांधाव याचे चामड्याच्या पट्ट्याचा जोड २ दोन वस्तूंची जोडी, दुक्कल [जाम+जोडी]

**जामण-न**—वि जामुन, ठेंगणा; बुटका, खुजा जामुन पहा. [म. वामन]

**जामदानी**—स्त्री १ ज्या कापडात विणून वेलपत्तीचा उठाव केला आहे असें कापड, एक प्रकारचें कापड, हें आ रूग्यास वाप रीत २ एक प्रकारची कातडी पिशवी, पटी (कपड्याची), बॅग, (इं) पोर्टमँटो [फा जामदानी]

**जामदार**—पु जामदारखान्यावरील अधिकारी, जवाहीर खान्याचा व वस्त्रागारावरील मुख्य अधिकारी खानाची खनी नदार हा दागीने, वस्त्रें सांभाळून लागेल त्यावेळीं देतो [फा] **०खाना**-पु १ सरकारी खजिना, जवाहिरखाना २ वस्त्रागार, कपड्याची कोठी 'रनदेचा मजकूर लिहिला तर प्रस्तुत जामदार खान्यात शाल नाहीं' —ऐप ७१. **जामदारी**–स्त्री जामदाराचें काम आणि हुद्दा

**जामा**—पु एक प्रकारचा आंगरखा, लांब झगा, पायघोळ आंगरखा (लग्नाच्या वेळीं नवऱ्याच्या अंगात असतो तसा) हा बहुधा मुसलमान वापरतात [फा] **०निमा**-पु १ (जामा व निमा) अंगात घालावयाचीं दोन वस्त्रें २ जामानिमा घालून सजणें, सुंदर वस्त्रांनीं नटणें ३ सर्व पोषाख (क्रि० करणें) [फा निमा=आतील बंडी]

**जामात-ता**—पु कन्यापति जावई [स जामातृ]

**जामीन**—पु १ कुळाचा सावकारास विश्वास राहण्यासाठीं मध्यें विश्वासार्थ राहिलेला माणूस २ खात्री पटविणारा मध्यस्थ, हमीदार, (इं) गॅरंटर 'एवढे विचारात का पडले आहा, तुम्ही हें औषध घ्या, गुण न आला तर मी जामीन' ३ (ल) पडायाला लागलेल्यास (खांब इ० स) घालून दिलेला धिरा, जोड तुकडा, आधारभूत वस्तु ४ पतंगाची दोरी हीं आचका खावयासाठीं असते ५ (सोंगट्या) तिफाशी सोंगट्याच्या डावातील एक विशिष्ट सोंगटी, पक्क्या रंगाची सोंगटी अडकून पडण्यासाठीं कच्च्या रंगाची जी सोंगटी मारतात ती. ६ विरजण (रात्रींच्या वेळीं नासणाऱ्या दुधाला विरजण हें जामिनाप्रमाणें असतें म्हणून) [अर] म्ह० जामीन रहा आणि गांठच वहा सामाशब्द– **०खत(द)था**-पु जामीनकीचा दस्तैवज जामीनपत्र [अर] **जामीनकी**-स्त्री. १ हमी, जबाबदारी (दिलेली, कबूल केलेली) (क्रि० देणें, घालणें, लिहिणें) २ जामीन राहण्याबाबत दिलेला पैसा ३ आरोपी कैदास सुटल्यास जामीनाकडून घेतलेला दंड, जामीनाचा जप्त केलेल्याचा पैसा **०गत-गिरी**–स्त्री १ हमी, जामीनकी (क्रि० देणें घालणें करणें) २ (ल) जामीन होऊन स्वतःला बांधून घेणें 'यतो म्हटलें त्यापेक्षा भोजनास गेलेंच पाहिजे एन्हवी जामीनगत सुटणार नाहीं **०दार**–वि हमी-दार, हमी घेणारा **०तलब**–स्त्री जामीनाची मागणी 'या निमित्तें साहेबाच्या स्वारांनीं जामीन–तलब केली, त्याजवरून मशारनिल्हेस आपण हुजीर–जामन असु' —रा १२ १६७ **०सांखळी**–स्त्री. १ एक घराणें दुसऱ्या घराण्यास जामीन राहतें, तिसरें पहिल्यास आणि चौथें तिसऱ्यास याप्रमाणें गावा तील सर्व कुटुंबांनीं एकमेकास जामीन रहाण्याची क्रिया. गावच्या वसुलाबद्दल सर्व रयतेची संयुक्त जबाबदारी. २ (ल) एकमेका वर अवलंबून असणें, अन्योन्य सापेक्षत्व, संबंधाची साखळी (कवितांचा भाग, नाटकाचें संविधानक यातील) 'यातला एकच खडा पाहून हिशेब मनात यणार नाहीं, कारण ही सर्व खड्यांची जामिनसाखळी आहे'

**जामुन-न, जामुण-न**—जामण-न पहा खुजा, ठेंगु 'एक दातिरें रासाडें फेंगडें। जामुन खुजें।' —दाव ७८६ 'गारोळें जामुन टाफरें।' —दा ३ ६ ४२ [स वामन] .

**जाय**—स्त्री (गो) जाई, एक फुलझाड आणि तिचें फूल जाई पहा

**जाय**—क्रि (गो) पाहिजे 'माका एक पुस्तक जाय' [स युज्–ज्यते] **जायचें**–क्रि (गो) पाहिजे असणें

**जायगड्या**—उद्गा रागाचा उद्गार येथून जा! चालता हो! [जा+गड्या]

**जायगणी**—स्त्री (गो) विचारपूस 'माझी जायगणी तुला नको' [स ज्ञा+जाणणें किंवा म जाणें–जाय]

**जायजण-णा, जायजाणा, जायवळ**—वि १ प्रसंग साजरा करण्यासाठीं उसनवार आणिलेले, परत बोलीनें आणिलेले (कापड, दागिने इ०) २ (ल) मुलगी (ती दुसऱ्याला द्याव याची म्हणून) ३ जाणारें, क्षणभंगुर, अस्थिर, नाशवत (शरीर) 'कसया मी आता वेंचू हें शरीर। आहे बारगीर जायजणें।'

–तुगा १७९१ 'जायनणें वचु निश्चय मानुनि तूं भज त्या रघुवीर पदाब्जा।' [जाणें+जण=जन, माणूस, स यात+जन प्रा जाय+जण म. जाणें+जण]

**जायतां**—वि (गो) पुष्कळ, पाहिजे जितका (अव) जायतें [जादा]

**जायदाती**—वि सनदी [फा जायदाद्]

**जायदाद**—स्त्री १ सैन्याच्या खर्चास लावून दिलेली जहागीर २ जागा, नेमणूक, उत्पन्न, मालमत्ता 'नवाब नजवखान यानीं मिर्जा शफीखान यास मेरट वगैरे अकरा महाल जायदाद दिली होती' –दिमरा १ १०१ [फा जाए–दाद्]

**जायदी खजूर**—स्त्री मोकळा, पेंड न बांधलेला खजूर याच्या उलट पेंड खजूर

**जायपत्री**—स्त्री जायफळावरची साल. ही औषधी असून विन्धात खातात [स जातीपत्र]

**जायपें**—न (कों) जावपें, गाई–म्हशीचें वासरूं जाउपें पहा

**जायफळ**—न (कों) औषधोपयोगी सुवासिक फळ, जायपत्रीच्या झाडाचें फळ, जायफळाभोंवतीं जायपत्री असते जायफळ हें उत्तेजक पाचक व वायुनाशक आहे [सं जातिफल, व हिं जायफळ]

**जायबंदा–बंदी, जायाबंदा–बंदी**—वि जखमी, दुखविलेला इजा झालेला, निरुपयोगी झालेला (मोडणें, फुटणें इ०मुळें) 'पाण्यावर जातांना पडला म्हणून त्या घोड्याचा पाय जायबंदी झाला' [अर झाइ=नष्ट+फा बंदी]

**जायबाळ**—न (कु) जायवळ, काकपक्ष, जावळ पहा [स. जात प्रा जाय=बच्चा+वाल=केंस]

**जायमान्**—वि अस्तित्वांत येणारें, उत्पन्न होणारें, भावी, [स जन्]

**जायलेणें**—न परत करावयाच्या बोलीनें आणिलेले दागिने. [जाणें+लेणें]

**जायवळ**—न (रा) जावळ पहा

**जायसर**—क्रिवि (गो) होईपर्यंत 'जेवचें आयसर'= जेवण होईपर्यंत [म जाणें+सरणें]

**जाया**—स्त्री बायको, भार्या पत्नी 'त्या दुष्टोक्तिश्रवणें धर्माची सकळीं पडे जाया।' –मोसभा ५ ३ 'असे तयाची मग मुख्य जाया।' –सारुह २ ४ [स] ०**पती**–पु नवराबायको, दांपत्य [स]

**जाया–जायां जाया**—विक्रिवि १ नष्ट २ खराब, नादुरुस्त 'नळ पाण्याचा जागा जागा जाया झाला आहे' –वाडसभा १ ३४ ३ घायाळ जखमी 'परतु कोणी जाया जखमी जाले नाहीं' –ख ८ ४३९० ४ निरुपयोगी. 'वांझेच्या मैथुनापरी गेलें वाया। बाडेल्याचें जाया जालें पीक।' –तुगा ३०४६ [अर झाइ=नष्ट] ०**देणें**–(गाय, दागिने, मालमत्ता इ०) गादण देणें (ही देणगी टाकून दिल्यासारखी असते म्हणून]

**जायां, जायास**—क्रिवि उसनवट उसनें म्हणून [जाणें] **जाया(यां)चा**–वि परत करावयाचा, उसना घेतलेला, जाणें, जायजगा पहा 'आता जायांचें जैसें लेणें। आगावरी आहाचवाणें।' –ज्ञा ९ ४१२ **जायाचा दागिना–ची वस्तु**–पुत्री (ल) मुलगी

**जायिजणा**—वि जायजगा अर्थ १ पहा.

**जायी**—स्त्री (कातकरी) मुलगी 'मी ब्राह्मणाची जायी आहें' –मसाप ३ ३१५ [स जात प्रा जाय]

**जा ये**—स्त्री १ उगाच ये जा करणें, जाणें व परतणें, पुढें मागें करणें, इकडेतिकडे व्यर्थ भटकणें, कटाळवाणी पायपीट निष्कारण येरझारा २ चुळबुळ, चळवळ ३ उगाच जाऊन येणें (क्रि० करणें, लावणें). [जाणें+येणें]

**जायेल**—वि (खा) १ गेलेला वाह्यात, अडाणी [जाणें+एल प्रत्यय]

**जार**—पु १ परस्त्रीशीं संबंध करणारा उपपति. घरंड २ प्रियकर दोस्त, यार (स्त्रीचा) ३ जारकर्म, व्यभिचार 'ज्यास न कळतां घडला जार। तिहीं रासमंडळीं खेळला यादवेंद्र।' –ह १८ १० [सं जार] ०**कर्म**–न व्यभिचार, बदफैलीपणा, विवाहित पुरुषानें अगर स्त्रीनें अन्य स्त्रीशीं अगर पुरुषाशीं केलेला संग, परशय्या, परद्वार, व्यभिचार (कायदा) जिचा नवरा जिवंत असल्याचें माहीत आहे अशा स्त्रीशीं तिच्या नवऱ्याच्या संमतीवाचून केलेला संभोग ०**कर्मी**–वि जारकर्म करणारा, व्यभिचारी बदफैली **जारज**–वि अनौरस जारकर्मापासुन झालेली (संतति) **जारिणी–रीण**–स्त्री व्यभिचारिणी, जारकर्मी स्त्री 'की वरपंगी जवीं जारीण। यावी भ्रतार सेवा करून।' **जारीवधू**–स्त्री जारकर्मी स्त्री 'जारीवधू न्यायज–नेमहारी।' –मुरामा बाल ८४

**जार**—पु १ गलगल समुद्राच्या काठाला साचलेला पांढरा फेंस २ प्रसूतीनंतर बाहेर पडलेली वार गर्भवेष्टन 'तुका म्हणे भार ज्याचा जार त्याशीं' –तुगा १३३४ ३ नुकत्याच जन्म झालेल्या मुलाच्या तोंडातून निघणारा फेंस, ओंठावरची कोमळ त्वचा [स जरायु] **तोंडाचा जार घाळलेला नसणें**–प्रौढ नसणें, बालबुद्धि असणें 'ओंठाच्या वरचाहि जार अजुनी नाहीं तुझ्या वाळला।' –कुशाख्यान ४१ (मराठी ५ वें पुस्तक, पृ १६५) **जारज**–वि गर्भाशयापासून झालेला जरायुज, पृथ्वीवरील जीवमात्राचा एक वर्ग अंडज, स्वेदज, उद्भिज हे इतर वर्ग आहेत.

'परि आर्धी तन स्वेदज। जारज उदभिज मणिन।' –ज्ञा १५. १४८ [स जरायुज]

**जार, ज्यार**—वि १ बेजार; त्रस्त, जेर 'तरी तोफेचे गाळे राहीना नवाब झाला मग जार।'–ऐपो २५९ 'राधा मदनानें जार। जरी असता मोठा मनोहर।'–पला २ २ जखमी, 'भाल्याच्या अणीनें दमन ज्यार केले।' [फा झार]

**जारजूट**—वि (कु) मात्य, हट्टी

**जारट**—वि कठिण, टणक (फळ, गड्ड) 'येके मधुरें अलवर्णी जारटें।'–स्वादि६ ४ ४७ [स जरठ] **जारटणें-जारसणें**—अक्रि १ टणक, कठिण होणें, आकसणें (कडक उन्हानें किंवा अकाली पावसानें फळें इ०) २ दडस, टणक, कठिण होणें आखडणें, आक्रमणें (गड्ड) ३ (ल) आजारीपणामुळें सुरकुत्या पडणें, वाळणें **जारटलें वागें**—न १ वाढून टणक झालेलें वागें २ (ल) वाढ खुरंटलेला माणूस खुजट, मोठ्या वयाचा पण ल्हान मुला सारखा दिसणारा माणूस

**जारण**—न १ मंत्रविद्या, जादुटोणा, वेड लागावें, मरावें, रोगी किंवा पङ्ग व्हावें इत्यादि करिता केलेला मंत्रप्रयोग २ (वैद्यक) वनस्पति धातु इ० चें भस्म करणें ३ लय शवट 'मग पवन टेलिया जारण। नीरींचें नीर।' –सिस ४ २१६ [स जॄ=जीर्ण होणें] **०मारण-मारण उच्चाटण**—न जारण, मारण व उच्चाटण हे मंत्रविद्येंतील तीन प्रकार आहेत शत्रूचें नुकसान (वेड, मरण, पङ्गपणा इ० नीं) व्हावें म्हणून केलेले जारण, मारण इ० च मंत्रप्रयोग, जादूटोणा यास व्यापक शब्द 'कठीण गाठ नानाशीं न चाले तथें जारण मारण।' –ऐपो ३९५

**झारत**—स्त्री यात्रा, पवित्रस्थानास भेट 'दर्गाहास जारत करून ' –दिमरा १ ११८ [अर झियारत्]

**जारस**—वि १ (कों) अद्याप रस गळत आहे अशा स्थितींतील, शेतातील भात पिकल्यावर त्याचा दाणा पुरता वाढू न देता कापतात तें, किंवा तमल्या प्रकारचे (तांदूळ) २ (सामा) रसाळ, ज्यातून रस गळत असतो असा 'एकें जारसें कचरचित।'–एरुस्व १४ १०७ [स जातरस]

**जारी**—स्त्री १ चालू असलेलें, विद्यमान सरकार, कायदा २ गणतादि सुरू असलेला व सार्वजनिक वसुलातून निराळा केलेला अम्मल (वसुलाचा भाग), सरदेशमुखी आणि चौथ अम्मल हीं ह्या सदरासालीं यतात हीं उपभोगणाऱ्याना जारी इनामदार म्हणतात ३ अधिकाराचा काल सत्ता अम्मल याचे दिवस चलती ४ कमाशी (क्रि० करणें) –वि १ चालू हयात विद्यमान, इनाम, चाकरी वर्षासन, सरजाम इत्यादि शब्दाशीं हा जोडतात २ सुरू 'त्याजकडे बोलणें चालणें ही जारी आहे –रा५ १८९ ३ दुसऱ्या-तिसऱ्यानें लागवडींत आणलेली (जमीन) [अर] **०करणें**—सुरू, प्रचलित करणें 'कपनीच्या नावाचा नवा रुपया हिंदुस्थानात जारी करण्यात आला '–सन १८५७ १०१ **जारीत आणणें**—प्रचारात आणणें जारी करणें पहा **०अम्मल**—पु जारी अर्थ १,२ पहा. चौथ, सरदेशमुखी पहा **०चिठ्ठा**—पु जारी अम्मलाचा (वसुलाच्या विभक्त भागाचा) हिशेब **०वसूल बाकी-वहिवाट-हिशोब**—स्त्रीपु सार्वजनिक पैशाचा चालू हिशेब **जारीनें**—१ जोरानें, वेगानें २ कसोशीनें

**जारी**—ज्वारी पहा

**जाणें**—न (गो) पावसाच्या सुरवातीस पेरण्याचें शेत 'आठदहा दिवस चागला पाऊस पडल्याशिवाय जाणेंची पेरणी करता येत नाहीं ' ३

**जाल**—स्त्री (विणकाम) मागच्या गारी (खड्डा) मध्यें असणारी लाकडी फळी, पावडी, धोटे इकडून तिकडे जाण्यासाठीं, पेला पाडण्यासाठीं हिचा उपयोग करतात

**जाल**—पु (ना) आरोप, आळ [स जाल]

**जाल**—न १ मासे पकडण्याचें जाळें २ अनेक वस्तूचा एकत्र समूह, समुदाय, जसें–कश–वर्ण–वृक्ष–शब्द–नक्षत्र–बाण–मेघ–ततु–जाल ३ (ल) गुंतण्याचें साधन, यत्र, सापळा, पाश जसें कर्म–भव–माया–मोह–विषयजाल [स जाल] **जालंदाज**—वि १ पाश टाकण्यात कुशल, युक्तीनें शत्रूला जाळ्यात धरणारा २ कपटी.

**जालंधर**—पु झरोका, जाळी

**जालंध(द)र**—पु १ गोसाव्यातील एक पंथ २ नाथ पंथातील नवनाथापैकीं एक ३•योगशास्त्रोक्त बंधत्रयातील कंठस्थानचा बंध. 'मग जालधर साटी।'–ज्ञा ६ ३०२ [स] **०देश**—पु पंजाबातील दक्षिण भाग

**जालनी**—वि जालना शहरासंबंधीं, जालनाचें (कापड इ०)

**जालप**—पु जयपाल, एका जातीच्या झाडाच्या मुळाची बुकणी ही फार तीक्ष्ण असून रेचकाच्या उपयोगी आहे –बालरोग चिकित्सा ५ ३३

**जालमी**—स्त्री जुलम 'याप्रमाणें जालमी व जलालीची चाल अलफखानची '–रा ७ १५० [फा झालिमी]

**जाली**—स्त्री (वे) बाभूळ

**जालीम जालम**—वि १ तीक्ष्ण, जलाल, कडक जोरदार वीर्यवान (औषध उपाय इ०). 'मोठमोठ्या जालीम मात्रा दिल्या तव्हा वायु उतरला ' २ जुलमी कडक (अम्मल, राज्य, कायदा) ३ वरचढ चढेल कडक, जहाल, अति तामसी (माणूस) 'दोघही कर्ते नामी सिपाई जालम असे निवडले ' –भाअ १८३४ ९२ [अर झालिम=क्रूर]

**जालें**—न जन्म, उत्पत्ति, उत्पन्न होणें, संभव 'जयाचें जालें बधा। उरो नेदी।'–ज्ञा १७ ४१२ [स जात]

जालोरी—वि जालोरी नांवाचे (मारवाड) एक शहर आहे त्यासंबंधी, मारवाडसंबंधी 'जालोरीचें केंकाणे धाव।'-शिशु ९३७

जा(जां)वई—पु १ मुलीचा नवरा, जामात २ (ल) बोलाविल्या-वाचविल्या शिवाय दुसऱ्याच्या घरीं जाऊन जेवीत राहणारा माणूस [वैदि जामेय, पूर्वी बहिणीचा मुलगा (जामेय) जावई करून घेत, तेव्हां शब्दहि तसाच (जामि=बहीण, जामेय=भाचा) बनला आहे सं जामातृ, प्रा जामाऊ हिं जमाई, पं जवाई, गो जावय, भी जामीतर फेंजि नमुत्रो, पॅलेस्टाईन जम्रो] म्ह० १ जावई न्हाला बापा पाणी प्याला (तिफला)=एका दगडानें दोन पक्षी मारण्याप्रमाणें २ असी लेक हवई, घरोघर जावई ३ सासवच दोंदावर जावई उदार. ४ जावयाचे गर्भाचें जेवण व लेकाबरोबर अभ्यास (मिळण्याला दैव पाहिजे) सामाशब्द- ०आग्रह-पु १ (जावयाला करतात त्याप्रमाणें) जेवणाखाण्याचा अतिशय आग्रह २ बरवर केलेला, तोंडदेखला आग्रह. ०जेवण-न (सणांतील जावयाचें जेवण) थोडथोडें, नाजुकपणानें खाणें, अल्पाहार ०डौल-पु (जावयासारखा) फाजील ऐट, दिमाख, यथास्थित दुसऱ्याच्या घरीं चैन करणें जांवईण-स्त्री जावयाची बहीण करवली ०पोशा(पा)क (ख)-पु अतिशय दाम डौलाचा, प्रसंगाला न साजणारा असा भपकेदार पोशाख ०शोध-पु मूर्खें बरोबर असता त्यांत ज्ञानाच्या घमेंडीनें अडाणी माणसानें सुबीचा घातलेला शोध, शुद्धाचें अशुद्ध करण्याचा खटाटोप, अनवश्यक दुरुस्ती (हा शब्द एका मूर्ख जावयाच्या गोष्टी वरून निघाला आहे) जांवयाचा बेटा-१ जावयाचा मुलगा. हा बहुत करून आपल्या कामाला निरुपयोगी असतो, कारण तो वेगळ्या कुळातला म्हणून त्याचें लक्ष आपल्याकडे लागणार नाहीं २ (ल) निरुपयोगी व आपल्याच ताऱ्यांत असणारा आप्त म्ह० १ जावयाचा बेटा कडेचीचापेगा २ जावयाचें पोर हरामखोर जांवयाचीचीड-स्त्री नाजुकपणादर्शक घेंची संज्ञा जावयाची पगत-स्त्री (जावयाच्या पंगतीस खासु सारखर तूप, पदार्थ इ० स्वस्त भरपूर वाढतें यावरून) (ल) श्रीमंतपणाची राहणी, जेवण

जावक—वि जावयाचा, पाठवावयाचा धाडावयाचा (कचेरीतून कागद हुकूम पत्र) याच्या उलट आवक [जाणें, हिं जाव] ०वारनिशी-स्त्री जाणाऱ्या कागदाचा मतलब लिहिण्याची वही, रजिस्टर

जावडें—न पुरुषाच्या रेगा, वोरें जाडवीं पहा 'पायीं मी तव अर्पितों अतिशयें आलवकें जावडें।' -निमा ११४

जावत, जावतकाल—क्रिवि जोपर्यंत 'माझा हातपाय जावत् चालतो आहे तों चार अक्षरें केलीस तर हातील. याच्या उलट तावत्, तावत्काल यावत, यावत्काळ पहा [सं यावत्+काल, प्रा जावदअ, जावा] म्ह० जावत तेलम् तावत्व्याख्यानम्

जावत्री—स्त्री (गो) जायपत्री [हिं]

जावपें—न (गों) पोर (गाई-म्हशीचें), बाळग पाडस [सं जन्=जन्मणें] जावपेस्त्रीण-स्त्री दुभती गाय किंवा म्हैस, पिणारें वासरू नसून असलेली गाय, म्हैस, ०शुद्ध-वि चांगले जावणें, पोर धणारी (म्हैस किंवा गाय) जावपेजानें घांस पासायास देणें-वासरास जें प्रथम जावपें होईल त्याला पोस घणारानें घ्यावें असा योगानें वासरू पोसणें देणें

जावरदा-दे, जावर्दा—वि १ बाहेर जावयाचा माल, निर्यात निर्गत याच्या उलट आवदा २ (ग्रं) जावक, बाहेर पाठविण्याचा कागद, हुकूम इ० [म जाणें, प्रा हिं जाव, आवरदा शब्दाप्रमाणें बनावट]

जावरी—स्त्री (राजा) चाळ

जावळ—पु १ लहान मुलाच्या डोक्यावरचे मूळचे केस 'हेंगुखळी आळवीते। जावळारी कुरवाळिते।' -मध्व २२ २ ते काढण्याचा विधि, चौल [स जात+वाल=केस, प्रा वाल]

जावळ—न (क) लुगड्याचा विशिष्ट काठ 'जावळी लुगडें'.

जावळा, जावळावळा—वि १ जुळें एकाकाळीं, एका गर्भातून उत्पन्न झालेलीं दोन अपत्यें 'पुत्र जावळे प्रसवली।' -मुआदि २७.२२५ २ जुळ्यातील एक जुळा भाऊ 'कौस्तुभाचा जावळा।' -मुसभा १४४८ -स्त्रीभव जावाजावा (एकवचन जाऊळ) [म यमल प्रा जमल] जावळफळ-न जुळें फळ, जोडफळ 'परस्परें क्षेम वक्त्रीं।उभयतां जाल्यामेळीं। जावळफळापरी।' -मुवन ८.११४.

जावळिया—पु १ शजारी, शेजारी पाजारी 'जावळिया सुख निपजे। ऐसें साधुत्व का दखिजे।'-ज्ञा १७.२१७ २ जुळा भाऊ 'कीं मदनाचा जावळिया।' -शिशु २६४ -वि जोडीचा सोबती 'जेव गरुडाचिये जावळियेचें।कांतलें चान्ही।' -ज्ञा १.१२८ जवळी पहा

जावळी—पु (जुनरी) विन शिंगाचा मेंढा

जावळी—पु १ भावंड 'कृतांताचिया जावळी।' -ज्ञा ११.३५६ २ सोबती, शजार -स्त्री बरोबरी, सादृश्य जावळीळि-वि जुळीं, आवळींजावळीं 'तयाचिये भार्येसि दोनि लेंकुरें जावळि जाहालि। -पच ५२ ०भावळी-वि १ भावाच्या बायकासबंधी, अनेक भाऊ आपल्या बायकांसह एकत्र असताना कोणा एकाचेंच स्वामित्व कुटुंबावर चालत नाहीं अशी परिस्थिति, व्यवहार, असल्यावळीं वापरतात 'जावळी भावळी ससार असला म्हणजे प्रपच करिता कामास नये' २ समाईक, सारखा, संयुक्त, समान (धंदा, प्रपंच इ० गोष्टी) (समासात) जावळी

भावळी–धंदा–विचार–मसार–खटे ॰हळद–स्त्री पिवळी आणि मऊ जातीची, मोठया जातीची हळद

**जावळें**—न जुवळ, जुळें मूल.

**जावा**—पु जाणें, गमन याच्या उलट येवा [स यापय्, प्रा जाव, हिं जाव] म्ह॰ यवा व्हावा जावा न व्हावा, येवा वरा जावा वाईट ॰येवा–पु १ जाणें येणें सपा दम्हा तिकडे प्रवास 'आमचा पुण्याकडे जावायवा होता तो पाहिजे ता देशाचा जिन्नस आणीत होतों २ (ल) दळणवळण, नेहमीं संबंध आश्रय वहिवाट [जाणें+येणें]

**जावाई-आग्रह-शोध-इ॰**—जावई पहा

**जावु**—स्त्री दिराची बायको जाऊ पहा

**जाश्वनीळ जाश्वनीळ**—पु शंकर [स जास्वन=जास्वद (निळी)+नीळ]

**जासवद–दी, जासुंद–दी, जास्वंद–दी**—स्त्रीन एक झाड व त्याचें फूल जासवंदीचें झाड मूळ चीन देशातील आहे या झाडाच्या सालीपासुन धागा निघतो, याचीं पाढरें, तांबडें, निळें, अशीं फुलें असतात फुलापासून रंग तयार होतात फुलाचा एतद्देशीय औषधांतहि उपयोग होतो या झाडापासुन पाढरी राळ निघत अतर्सालीच्या ततूचे मजबूत दोर होतात. 'शेंदुर चर्चिला मस्तकावरी। जास्वन सुमनाची पूजा शिरीं।'–श्रीगीत ७ [स जपा सुमन प्रा जासुमण] **जासवान**–वि जास्वदी रंगाचें 'डाळिंबानें जासवानें' –वमीस्व १ १५०

**जासु(सू)द**—पु १ निरोप्या, दूत, टपाल पोंचविणारा हरकारा, कासीद, बातमी पोहोंचविणारा 'जासुद हल्कार वकीलात।' –नव ११ ६७ २(ल) पतगाच्या दोरीवरून पतगाकडे जाण्यास सोडलेला कागदाचा तुकडा [अर जासूस्=हेर] ॰काठी–स्त्री हरकाऱ्याची (हातात धरण्याची काळया वांचूची) काठी ॰गिरी–स्त्री जासुदाचें काम, धंदा, हुद्दा ॰जोडी–स्त्री दोन जासूद बहुधा दोघे जासूद कामास बरोबर जातात ॰पट्टी–स्त्री जासुदाच्या खर्चासाठीं गावावर बसविलेला कर किंवा पट्टी **जासुदी**–स्त्री १ जासुदगीरी जासुदाचें काम २ जासुदानें आणिलेली बातमी ३ जासुदाची मजुरी, पगार –वि जासुदाविषयीं–संबधीं (चर्मी जोडा चाळ, इ॰) ॰जोडा–पु (जासुदाच्या लायक) जाडा, वेडावाकडा, ओबडधोबड जाडा (तिरस्कारार्थी योजना)

**जास्त–जास्ता**–वि १ अधिक पुष्कळ अतिशय २ फाजील जादा फालतू [अर झाइद, जियाद्]

**जास्ती**—स्त्री जुलूम, जोर जबरदस्ती जास्ती पहा [अर जियाद्] ॰जलाल–पु जुलूम 'जास्ती जगल –ख ७ ३७८४

**जाहगिर**—स्त्री १ हातातला दागिना 'गुजराथी कारणें अंगुस्तान न जाहगिर।' –अफला ५५ २ (व) बोटात घालण्याची घुंगराची आगटी (प) जहागिरी 'सोनागनें जहागिरी चालती केली आहे पण बोटात येत का?'

**जाह(हा)गीर–गिरी जागीर**—स्त्री १ सरकारातून मिळालेली जमिनीची अथवा वसुलाची इनाम किंवा धर्मादाय म्हणून देणगी ही सरकारी लष्कराच्या खर्चासाठीं किंवा एखाद्या व्यक्तीच्या अथवा कुटुंबाच्या पोषणासाठीं दिलेली असते ही इनामासारखी आर्डीच करविरहित नसते, जायदाद, इनामजमीन २ मोंगलानीं चार आणे मराठयास दिल्यावर त्याचे गावात अगर परगण्यात जे बारा आणे राहातात ते ३ देवादिकाच्या नमणुकीच्या खर्चाबद्दल गाव देतात तीं ४ (सामा) पत्रान लनखा [फा जाएगीर, जागीर] म्ह॰ चार गुट जाहागीर=चार खुट म्हणजे पृथ्वीचे चार कोपरे याची जाहागीर म्हणजे पृथ्वीवर हवें तिकडे भिक्षा मागण्याची मोकळीक (ल) भिक्षावृत्ति भिक्षादेही ॰अमल–पु १ सरदेशमुखी आणि चौथ वजा करून बाकी राहिलेल्या वसुलावरील हक्क २ मोकासा आणि चौथ वजा करून बाकी राहिलेल्या वसुलावरील हक्क ३ मराठयाची चौथाई व आणखी चौथा हिस्सा (फौजदारीसाठीं) वजा केल्यानंतर राहणाऱ्या वसुलाचा विशिष्ट भाग मोंगल सरकार काहीं जहागिरदाराकडून घेई तो ॰दार–पु जहागीर असलेला, मिळालेला इसम, सरदार इनामदार [फा]

**जाहज(जी)म, जाहजमी छीट**—जाजम पहा

**जाह(हां)बाज–बाद**—पुवि १ हुशार पगाईत कुशल 'जाहबाज लिहिणार, गाणार' २ पक्का वस्ताद ३ शूर धाडसी ४ पुरुषी वैदाशीण, कुल्या (स्त्री) [फा जान्‌बाझ=धाडसी] **जा(ज)हांबाजी–बाजपणा**–स्त्रीपु १ शौर्य, जिवावर उदार होऊन केलेला पराक्रम 'राघोपत सुभेदारास धरावें इतक्यात त्याणें जहाबाजी करून शिपायात पडून गेले –ख १५२ २ हुशारी, वस्तादगिरी. 'जाहबाजीचे हुनरें गेलें राज्य साधावें मराचिथोरा ३०. ३ वैदाशीणपणा, कजागपणा

**जाहर–री**—न विष जहर पहा 'विश्वासिलेनि मलयानिळें। परिमळाचें भुररें घातलें। जाहरीं अगस्तापु डविलें। वसताचा।' –शिशु २७२

**जाहल**—स्त्री १ भयकरपणा कडकपणा उग्रपणा २ साहस प्रखरता, वीर्य [हिं जहाल]

**जाहली जाहेली जाहलीयत**—स्त्री मूर्खपणा 'इतक्यानें दावसलाबत मोठी होती त मल्हारराव याच जाहेलीमुळें ह खराबी' –रा ७ खलप २७ 'दर्वार न करिता जाहलीयत करावी ह वर्तणूक राजास युक्त नाहीं –जोरा १०६ [अर जाहिली–यत]

**जाहली**—स्त्री (क) त्वरा, घाई

**जाहलीम**—वि जालीम पहा

जाहाती—वि जुलुमी 'नाहीं वेठी जेवा सारा। जाहाती नाहीं म्हणियारा। —तुगा ३६० [फा जाह=वैभव, थोरवी]

जाहागीरदार, जाहागिरी—गीर, जहाजम, जाहां याज, जाहाली, जाहालीम—जाहम र्थे पहा

जाहाज, जाहान, जाहाल—जहाज वगैरे पहा

जाहांमर्द—वि कोणत्याहि कामात पुढे उडी घालणारा, कधीं न हटणारा, खबीर जवानमर्द (अप) जहांमर्दी स्त्री जाहामर्देपणा, बहादुरी शूरपणा [जवानमर्द]

जाहि(ही)र—रा—वि १ सर्वश्रुत, प्रसिद्ध, सर्वांस कळविलेलें, व्यक्त ते खबर जाहीरा होऊनु,' —रा १५ २७४ २ सार्वजनिक रीतीनें प्रख्यात ३ विदित, माहीत 'हे खबर ज्यारो पादशाहासी जाहीर जाहाले —दम १३ ४ छापील प्रकाशित [अर झाहिर्] ०खबर—स्त्री जाहिरात नोटीस जाहीरणें—१ प्रसिद्ध होणें २ उघड होणें 'अथर्वण खोटा जाहीरला' —रा ८ ४३ ०दारी—स्त्री १ प्रसिद्धी २ बाह्य देखावा बाह्यात्कार जाहीर दारीनें सफाई ठीक नाहीं, दिलापासून साफ व्हावें'—रा ५ ११७ ३ बाह्य सलोखा, वरपागी मैत्री. 'सरदाराशीं आपसात चित्तशुद्धता नाहीं, जाहीरदारी मात्र परस्परें आहे' —दिमरा १ ३१८ ४ जाहिरी, प्रसिद्धि 'अद्यापि मसलतीचे वर्तमान जाहीरदारींत आलें नाहीं' —दिमरा १ ००९ ०नामा—पु १ प्रसिद्धि, डांगोरा, दवंडी २ जाहीर केलेला लेख, सरकारचें प्रसिद्धीपत्रक, नोटीस ३ (पाटनधारे खातें) मुख्य पिकात जें दुसऱ्या जातीचें पीक थोडें थोडें मिसळलेलें असतें तें ०सभा—स्त्री जाहीर ठिकाणीं भर लेली सभा; सर्वांना जेथें येण्यास आडकाठी नाहीं अशी सभा जाहिराणा, जाहिरी—पुस्त्री प्रसिद्धि उघडीक, जहूर 'ही गोष्ट आपणास कळावी म्हणून लिहिलें आहे, जाहिराण्यात आणू नये'—ख ८ ३९२५ —क्रिवि प्रसिद्धपणें, उघडपणें—रीतीनें, लौकिकात 'परंतु जाहिराणा तर यादीप्रमाणेंच कबूल करावें म्हणतील' —रा १२ १२८ जाहिरात—स्त्री १ प्रसिद्धीपत्रक, जाहीरनामा, प्रसिद्धीचें साधन २ स्वत तयार केलेल्या अथवा आणविलेल्या मालाची किंवा स्वत च्या धंद्याची वृत्तपत्रें, भिंतीवरील बोर्ड माहिती पत्रें, कॅटलॉग वगैरे साधनामार्फत जी प्रसिद्धि केली जाते ती 'विसावें शतक हें जाहिरातीचें युग आहे ३ कळविणें, प्रसिद्धि देणें. (क्रि० देणें, करणें लावणें) —क्रिवि प्रसिद्धपणें 'जाहिरात अगर अन्तरगर्ती या गोष्टीस त्याचें अनुमत नसावें'—रा १२ १२३ [अर झाहिरात] जाहिरी—स्त्री प्रसिद्धि जहूर 'यत्नखुनी पगाची नेकी व खुनी सव टोपीकरात जाहिरीस येई तें करणें वाजीव व लाजीम आहे —रा १० २८० जाहिरींत—क्रिवि. बाह्यत 'जाहिरींत बहुत स्नेह दाखवून' —दिमरा २ ९४

जाळ—पु १ विस्तव, ज्वाळा २ ताप, ज्वर (क्रि० येणें). ३ राग, संताप ४ आग किंवा तिखट याच्या स्पर्शापासून शरीरास होणारी व्यथा जळजळ, काहिली 'तळव्या जाळ सुटला। —वगा ६१ 'तिखट वाटल्यापासून माझे हातास जाळ सुटला आहे' [स ज्वाला प्रा जाला] (वाप्र) ०उठणें-(स-ला-शीं-प्रयोग) जळजळीत होणें लाल होणें (डोळे, हात, पाय) म्ह० जाळावाचून कड नाहीं मायेवांचून रड नाहीं. सामाशब्द-जाळदार—पु (गुऱ्हाळ) उसाच्या चुलाणाचें जाळ घालण्याचें तोंड, याच्यातून खराब हवा बाहेर येते [जाळणें + द्वार] जाळपा—पु (गुऱ्हाळ) जाळ टाकणारा, जळण लावणारा, माणूस जाळपोळ-पोळी—जाळभाज—स्त्री १ शेत भाजणें व तत्संबंधीं इतर कृत्यें यास व्यापक संज्ञा 'शेताची अद्यापि जाळपोळ करावयाची आहे, पाऊस तर अगावर आला' २ (ल) लुटारूंनीं केलेली नुकसानी 'पेंढाऱ्यांनीं त्या मुलुखाची जाळपोळ करील पैसा नेला' जाळव्या, जाळ्या—वि जाळपी पहा जाळवात—पुस्त्री हातापायाच्या तळव्याला घर्मावरोधापासून होणारा रोग जळवात [स ज्वाला+वात] जाळाऊ—वि जाळण्यास योग्य, जळणाच्या उपयोगी जळाऊ पहा

जाळ—स्त्री (व) कोळप्याची (डवऱ्याची) जोडी

जाळ—स्त्री लताऱ्हह जाळी, कुंज, दाट झुडपें [जाळें] ०वड—वेलींची जाळी 'जाळवड जरा झोडपाव म्हणजे काय असेल तें आपोआप बाहेर येईल' —चद्रग्र २१ —न १ (गो) मासे पकडण्याचें जाळें 'तरी जाळ पाणियें न भरे। —ज्ञा १६ ३२३ २ (समासात) समुदाय याअर्थी जसें- 'बाणजाळ सोडिलें।' —एरुस्व १० ४८ ३ (व) जनावर व्याल्यानंतर बाहेर पडणारा जार

जाळखा—वि (गो) १ जळणारा, आग लावणारा २ (ल.) त्रास देणारा खरूज झालेला मुलगा फारच जाळसा बनतो जाळगा पहा जाळखेपण—न त्रास [जाळ]

जाळगा—वि (राजा) दुराग्रही, हट्टी, छळवादी (मूल) [जाळणें]

जाळगी—स्त्री (चे) भोंवऱ्याला गुंडाळण्याची दोरी जाळी पहा [स जालक, का जालिग]

जाळगी—स्त्री (कु) मिर्ची (तोंड भाजतें यावरून) [जाळणें, जाळगा]

जाळण—नस्त्री (कों) सरपण इंधन, जाळावयाची वस्तु जळण पहा [जळणें]

जाळणी—स्त्री १ (गो) कळकळ २ विचारपूस [जाळणें]

जाळणेकार—वि (गो) कळकळ बाळगणारा, काळजी वाहणारा

जाळणूक जाळणी—स्त्री जळणूक, छळणूक, त्रास, जुलूम यातना [जाळणें]

**जाळणें**—सक्रि १ आग लावणें पेटविणें, जळेल असें करणें २ (ल) त्रास देणें, छळ करणें, यातना देणें, गांजणें 'तो आपल्या चाकरांस दिवसभर जाळितो' ३ केवळ जाळावयाच्या उपयोगी, निरुपयोगी किंवा अमंगळ असणें, करणें 'अंतरीं क्षमा नाहीं। तीं ग्रंथें तपें जाळसी काई।' ४ (ल) नीच उपायांनीं पोसणें, भरणें (पोट) [स ज्वल् प्रा जा जाल] (वाप्र) (पाणी) जाळणें—दैव अनुकूल असल्यामुळें मनास येतील त्या गोष्टी करणें (पोट) जाळणें—कसातरी वेडयावाकडया उपायांनीं उदरनिर्वाह करणें

**जाळप करणें**—सक्रि (कु) जमीन जाळणें, राब, दाट करणें

**जाळपुळी**—स्त्री एक त्वचारोग, आग करणारें व पसरणारें क्षत, मग चाळपुळी पहा [जाळणें+पुळी]

**जाळमाळ**—न गूढ कृति, कारस्थान 'असो गुप्तीचें जाळ माळ। सुचना सागनसे अद्भुमाळ।' —सुगभा १९ १८ [स. जाल+माला, म. जाळें+माळ]

**जाळवणी**—स्त्री (कु.) १ चौकशी, विचारपूस. जाळणी पहा. २ (ल) उठाठेव. [जाळ+वण प्रत्यय]

**जाळांधर**—न जाळी, झरोका, लहान खिडकी 'जाळांधरें मुक्तांचीं।' —त्रैसीस्व ३ ५० [स जाल, म जाळी+धारें]

**जाळी**—स्त्री १ जाळें जाळीचें, जाळीदार, भोंकें असलेलें काम, जाळीदार भोंकें पाडलेली वस्तु, कोणतेंहि नक्षीदार छिद्रयुक्त काम पडदा, चाळणी, आडव्याउभ्या पट्टया असणारें लाकडी काम इ० (क्रि० पाडणें, खोदणें, उकरणें, गुंफणें, घालणें) २ भोंवऱ्याची दारी ३ मुसकें (जनावराच्या तोंडास घालण्याचें) ४ वेलींचें घर, कुंज, गुंफा लतागृह, दाट झुडुप 'त्या करवंदीचे जाळींत वाघ बसला आहे पुढें जाऊं नका' ५ लग्नांत व इतर समारंभात मुलींच्या डोक्यावर घालावयाचा फुलांचा साज, फुलांचें कोणतेंहि जाळीदार काम, जाळीदाडा 'जीला फुलाची जड होय जाळी।' —सारह ५ १२९ ६ कुरळ्या, दशा, (धोतराच्या वगैरे) पदराच्या शेवटचे दोरे (विणल्यानंतर) राहणारे ७ माळका, सांगड (एखाद्या कामास बैल वगैरेंची) ८ अतिशय दाट मैत्री. स्नेह एक जूट ९ मंडळ संघ १० जोडी, बरोबरी, साम्यता (एका जोखडाखालील बैलाची इ०) ११ दावें, दोर (पशूंना बांधण्याचा) १२ विणलेल्या कापडाच्या काठाची करवत करवतीकाठ १३ (ल) पाश बंधन. 'प्रपंचाची जाळी न पडेचि' —रामदासी २ ७० १४ (कु) मध माशाचें पोळें १५ शेतात मेंढवाडा करावयाचा असला तर तट्ट्या वगैरेंच्या ऐवजीं केलेला जाळीप्रमाणें आडोसा १६ (खडीकाम) रंगाचा दाब कमजास्त करण्यासाठीं वापरावयाचा जाळीदार पडदा १७ ग्यासबत्तीचें मॅंटल १८ खिडकी, झरोका १९ पडदा, गोषा 'असे मर्यादेनें जाळींत टेंकिलीं' —मराचिस २८ [स जाल] शको. ३. ४९ —चा मणी—पु बायकाच्या गळ्यातील छिद्रयुक्त (जाळीदार) मणी मध्यें असलेला एक माळेसारखा दागिना —चें कमळ—न रांगोळीतील एक प्रकार ०दार—वि १ नक्षीचें केलेलें, जाळ्या लाविलेलें (मखर, देव्हारा इ०) २ जाळी खोदलेलें ०दांडा—पु डोल्यातील फुलाची जाळी

**जाळीतें**—न ज्ञान —मनको

**जाळीव**—वि १ जळाऊ २ जाळलेली, भाजलेली (बीं पेरण्यासाठीं, जमीन) ३ भाजलेल्या जमिनींमधील (पीक) ४ आतील घटकावयव भाजून तयार केलेलें (औषध, रसायन) ५ जळण्यास योग्य सरपणास योग्य (वस्तु) [जळणें]

**जाळें**—न १ दोऱ्यांनीं केलेलें अनेक छिद्रयुक्त साधन, गुंफणी, जाल, पाश २ जाळीदार काम, नक्षीचें काम, विरविरीत वस्त्र, चाळणीचा तळ ३ कोळीष्टक, कोळ्याचें घर, जळमट ४ कामाराची भाती ५ मागावरच्या वस्त्राला जाळी (करवती काठ) करण्याचें साधन हा गुलाडीचा एक भाग आहे गुलाडी पहा. ६ (ल) आगेका, तावा, कानू, कपटव्यूह 'तो केवळ सेवेमुळें स्त्रीच्या जाळ्यात सापडणें शक्य तरी आहे काय?' —नाकु ३ १३८ ७ रत्नात रेघा दिसतात तो रत्नातील दोष [स जाल] जाळ्यांत पकडणें—कानूत आणणें, कैचींत धरणें

**जिअणें**—अक्रि जिवणें, जगणें 'तनु जाली म्हातारी। जिआवें दीसु दोनि च्यारीं। —शिशु १३७ 'वरें मी मेल्यानें जिउनि मिथिळे काय रहसी।' —चनटकविकृत सीतास्वयंवर ७५ [स जीव्—जीव प्रा. जीअ, जीवन प्रा जीअण]

**जिआलें**—न जीवन, आयुष्य, निर्णे. 'तुझा स्नेहो सांडिलें। तरी जळो हें जिआलें। —शिशु १०१ [स जीव+आलय]

**जिउ-ऊ**—पु १ जीव प्राण 'राहेनाहे जाला हा जिउ। —होला १० २ प्राणी, जीवजंतु [स जीव, प्रा जीअ]

**जिऐं**—सर्व १ जे याची तृतीया ज्या 'जिऐं कामाचेनि बीजमंत्रें। पीट तिना।' —शिशु ८०१ २ जियें पहा

**जिक**—वि त्रस्त जिक्र पहा 'आमचें ही माणूस जिक जाहलें —रा ६ ४९७ [अर दिक्क]

**जिक जिक**—वि जिगजिग पहा 'जिक जिक जिक जिक दुःख पिकविलें।' —राला ७७

**जिकडचा-ला जिकडील**—वि ज्या बाजूचा, दिशेचा, प्रदेशीचा, संबंधाचा जो तो 'जिकडचा पाहुणा तिकडे [जिकडे]

**जिकडणें-नें जिकडून जिकडोन**—क्रिवि ज्याप्रदेशा बाजू—दिशे—कडून ही जमीन जिकडणें पाहिजे तिकडणें मोजा, शंभर काठ्या भरेल

**जिकडून तिकडून, जिकडणें तिकडणें**—क्रिवि १ सर्व बाजूनीं, चोहोंकडून सर्वत्र, सभोंवतीं, सर्वकडे हून पहा

**जिकडे**—क्रिवि १ ज्या प्रदेशाकडे, ज्या जागेकडे, दिशेकडे २ ज्या ठिकाणीं, जेथें [ जी+कडे ] ०तिकडे-क्रिवि सर्व ठिकाणीं, प्रत्येक स्थळीं, प्रत्येक बाजूला, प्रत्येक दिशेला, चोहोंकडे, सर्वत्र ' धंदा जिकडेतिकडे पर्जन्य सारखा पडतो आहे '

**जिकणाभानी, जिकणूक**—स्त्री (कवड्याचा खेळ) एक संज्ञा, कवळ गर्भावस्थातर नसून पण लावून डाव जिंकला असता कवड्या इ० दावयाचा संकेत करून गेल्यावर्षाचे असतो योजतात [ जिंकणें+भान ? ]

**जिकणी-णूक**—स्त्री (व) जय, विजय, यश, जिंकणें [ जिंकणें ]

**जिंकणें**—उक्रि १ पराभव करणें, पादाक्रांत करणें, पाडाव करणें २ जय मिळविणें, यशस्वी होणें, ( लढाई, शर्यत, खेळ यात ) ३ कह्यांत ठेवणें, ताब्या मिळविणें-मुठ्ठा करून घेणें, स्वाधीन ठेवणें (झोंप क्षुधा, तहान, रोग) ४ दडपणें दाबून टाकणें, कांहीं चालू न देणें ( विकार, वासना, मनोवृत्ति, लोभ, इच्छा, भोगेच्छा यांचें ) ' त्यानें काम जिंकला ' ५ वरचढ करणें सरसी करणें, आपल्या गुणांनीं इतर पदार्थ हलके करणें ' तुझे मुखानें चंद्रशोभा जिंकली ' ६ सोडविणें, झगडणें, फाड करणें, उत्तर देणें, काढणें, करणें ( कोडें ) ७ न्यायानें मिळविणें, स्वत्व सिद्ध करणें (विवादास्पद किंवा इतर द्रव्य) ' त्यानें पंचाइतेमध्यें दोन गाव जिंकिले ' —अक्रि १ संकटातून मुक्त होणें, निभावून जाणें ' एवढें स्म यथास्थित तडीस गेलें म्हणजे जिंकलें ' २ पराभूत होणें, जित होणें जुनें रूप ' जिकणें ' असें आहे ' संग्रामातें जिकण्हारू ' –गीता १ ७३५ [सं जी] (ग्राम्य) (ऊत्र) **जिंकणें**—धनोळखीमुळें एखाद्याच्या श्रेष्ठतेबद्दल भय वाटत असता तें ओळखीमुळें नाहींसें होणें भय वाटेनासें होणें, भीति जाणें ' नवा राजा झाला तेव्हां प्रजा जवळ जायाला वचकत असे पण आता ऊर जिंकली '

**जिकनी**—स्त्री (व) तोल सांभाळण्यासाठीं खालून दिलेला आधार, धीरा [ जुकणें ? ]

**जिकर**—पु (व) १ भानगडीची हकीकत, कर्मकहाणी ' त्यानें सर्व जिकर सांगितला ' २ जिकीर पहा

**जिकि(के)रा जिकीरखाना**—जकिरा, जकीरखाना पहा

**जिकिरी जिकीरखोर**—वि जिकीर करणारा

**जिकीर**—पुस्त्री १ कटकट, त्रासदायक प्रश्न, गोष्ट, भुणभुण, घासाधीस गळीं पडून, विनवण्या करून तगादा लावणें ( क्रि० करणें लावणें ) लढाईची गोष्ट लढाईत राहिली त्याचा जिकीर असा करावा पाहिजे ' –रा ५ १२ ' हर्गी ज्या समयीं इमजाचा जिकीर निघतो ' –दिसरा १ ९३ २ छळ, त्रास, जिगजिग (रसिक किंवा आजारी माणसाची) ( क्रि० देणें, करणें ) ३ नि सहाय स्थिति मेटाकुटी (सर्व प्रयत्न करून थकल्यानंतर, पैसा खर्च झाल्यावरची) ' डोळे यावे म्हणून त्यानें हजारों उपाय केले तथापि गुण येईना, यामुळें तो फार जिकीरीस आला [ फा जिक्रा–जिर्धार–जिगीर, पदार्थ घेण्याची इच्छा–भाअ १८३४, तुल० अर जिक्र्=स्मरण, दिग ] **जिकीरीस येणें**–मेटाकुटीस येणें, हैराण होणें –मराचिथोरा ६२ **जिकीरीची**–वि हताशपणाचें, नैराश्यपूर्ण (उत्तर) जिकिरीचीं उत्तरें –पाच ३२

**जिकूनतिकून**—क्रिवि (कुण) जिकडून तिकडून पहा

**जिकूनपस**—पु दम लागीवर होणें घोड्याचा एक रोग –अश्वप २ १८९

**जिक**—वि त्रासलेला, कंटाळलेला, वीट आलेला जिक पहा ' एवढे दिवस मी ससार केला पण आता जिक झालें ' [ अर दिक ]

**जिखणें**—सक्रि (गो) जिंकणें पहा

**जिगजिग**—स्त्री १ कटकट, किरकिर जिकीर पहा ( क्रि० लावणें माडणें ) २ श्रम व त्रास निष्फळ प्रयत्न, मेटाकुटी, जगण्यासाठीं धडपड जिकीर पहा. ' पैसा तर कोणाजवळ राहिला नाहीं सार जिगजिग करून आहेत ' –वि १ जिक पहा. २ जर्जर. ' दैवदत्तहि दरिद्रें येता कला पळात जिगजिग जी. ' –मामीम्स ६ ३५ [ फा जिक्जिक्=भोरड ]

**जिगजिग**—स्त्री (गो) चकचक **जिगजिगचें**–वि (गो) चकाकणें, झिगझिगणें पहा ' वर्षेकाळाचे वेळेस काजवे जिगजिगतील ' [ झग ! झग् ! ]

**जिगजिगो**—पु (गो) काजवा **जिगजिगायचें**–क्रि (गो) १ प्रकाश पाडणें २ (ल) भेडसावणें, त्रास देणें ' अरेरावी अधिकारी प्रजेला फारच जिगजिगावतात '

**जिगटा, जिगी**—पु (चे) चिकट पदार्थ [ का जिगट्ट, जिगी=चिकटपणा ]

**जिगर**—पु १ हृदय २ (ल) प्राण ' तुम्हाबरोबर आम्ही आपला जिगरच दिला आहे ' –रा ६ ३८२ –वि जिवलग, प्यारा [ फा जिगर्=मन हृदय जीव ] ०जान–दोस्त–जान दोस्त–वि जिवश्चकंठ्य मित्र ' तुझा जिगरदोस्त प्रस्तुत अशा विरहात सापडलेला आहे –भा ४८ ' बिचारा रोज सुभानजी म्हणून कोणी त्याचा जिगरजान दोस्त आहे, त्याची आठवण करतो ' –स्वप ३४९

**जिगरें**—न तांदुळाची एक जात

**जिगळी**—स्त्री (व) (शेतकी) कुरीची, पाभरीची जिभली

**जिगी**—स्त्री (कु) माडीवरची खिडकी जगी पहा

**जिगीषा**—स्त्री १ जिंकण्याची इच्छा. ' युद्धामध्यें जिगीषा मृत्युभयास हृदयात शिरू देत नाहीं ' २ महत्त्वाकांक्षा, थोर इच्छा ३ लढण्याची हौस लष्करी बाणा उत्साह ४ स्पर्धा, ईर्षा, ईर [स ] **जिगीषु**–वि जिंकण्याची, पुढें, वर जाण्याची इच्छा करणारा ' सर्व पृथ्वीचें राज्य जिंकून स्वर्गाविषयीं जिगीषु झाला ' २ महत्त्वाकांक्षी, स्पर्धालु

**जिजी**—स्त्री १ मोठी बहीण २ ( बहुमानार्थी ) कोणतीहि वयानें मोठी स्त्री ३ ( ठाणें ) मावशी –बदलापूर १२८ [जी ! जी ! ]

**जिणी**—स्त्री १ ( कों ) जीवन, जिणें २ जन्माची सफलता ' हो क्षाना मनाची जिणी । –ज्ञा १३ ११६० [ जिणें ]

**जिणें**—न जीवित, प्राण, अस्तित्व ' अशा तुज न जो भजे मनुज धिक् तयाचें जिणें । –केका ११ [ स जीवन हिं जिना ] –अक्रि जिवत राहणें, अस्तित्वान असणें जगणें (वाचणें याच्याशीं नेहमीं जोडून योजना) 'विश्व सर्व जेणें जिये । ' –ज्ञा ८ ८८ ०**वाचणें** –न जगून आपलें बरें चालणें, मनाप्रमाणें दिवस काढणें ' माझें जिणें वाचणें कसेंहि करून चाललेंच आहे ' –अक्रि ( जिणेंचें जोरदार रूप ) जिवन राहणें व निभावणें, निकरानें टिकाव धरणें

**जिणें, जिणणें**—अक्रि जिंकणें, जितणें ' कवणें कीर्तीसीं जिती । ' –ज्ञा १ ११३ 'कन्यात्रय जिणोनि पैजा । अनुजालागीं करणें भाजा । ' –मुआदि २३ १०४ [स जि प्रा जिण= जिंकणें] **जिणता**–वि जिंकणारा 'तो जिणता ना हारवी । '–ज्ञा १४ ३३८

**जित, जित**—वि १पराभव पावलेलें, जिंकलेलें २मिळविलेलें, स्वाधीन करून घेतलेलें, वरचढपणा सरशी केलेलें, वश केलेलें (समासात) जित–काम–क्रोध–लोभ–मोह–प्राण–द्रव्य–पण= कामक्रोध इ० जिंकलेला जेव्हा समासात प्रथमपदीं हा शब्द येतो तेव्हा उलट अर्थ होतो जसें–काम–क्रोध–स्त्री–जित=काम, क्रोध इत्यादिकांकडून जिंकला गेलेला **जितणें**, **जितणें**–उक्रि जिंकणें ' देवाचेनि दळें बहुवसें । अरिराजे जितिलें ऊनायासें । '–शिशु ७३५ ' तों शकुनि म्हणे जितिला तें थाडया चि चित्त न धर धरें । ' –मोसभा ४ ३ [ स जित ] ०**पत्र** न पराभव झालेल्या पक्षानें दिलेलें जयपत्र ( कुस्ती, वाद यातील )

**जित**—स्त्री विजय, जयानें प्राप्ति [ स ]

**जित**—वि ( राजा ) १ जिवत सचेतन २ ( ल ) कचाट नि सदाय ( विशेषत पिशाच्च, समंध अवदसा अशा शब्दांशीं जोडून) पिशाच पहा ' ही पोर जित अवदसा आहे ' ३ जाग रूक, गावंध [ जिवत अप ] ०**रोटी**–स्त्री काही मोडून दिलेल्या बायकोच्या उपजीविकेकरिता नवऱ्यास द्यावा लागणारा पैसा ०**वणी**–न ( राजा ) जिवत किंवा वाहतें पाणी ( पाटथळचें ) **जितेरहो**–उद्गा शाबास ! पक्का ! [ हिं ]

**जित**—वि जिवत ( प्र ) जीत [ जिवन ] ०**कोळसा**–पु. धगधगीत कोळसा, निखारा, जिता कोळसा पहा

**जितका, जितकाला, जितुला**—वि जेवढा पण [ स यावत्, प्रा जित्तिअ, जित्तिल, जित्तुल ] **जितक्याचा**–वि ज्या संख्येचा–प्रमाणाचा–अंशाचा पायरीचा याच्या उलट तितक्याचा. **जितक्यास तितका**–वि जेवढा उपयोगी पडेल तेवढा जेवढा योग्य असेल तेवढा, निवक्षित कार्यापुरता, फार नाहीं व थोडा नाहीं बेताचा ' आजचे लाडू जितक्यास तितके झाले नपुरही आले नाहीं आणि उरलेही नाहीं ' ' जितक्यास तितकें बोलणें बोलावें, अधिक बोलू नय '

**जितखोर**—वि हट्टी, दुराग्रही, भाडखोर जिद्दखोर पहा [ फा जिद्खोर ]

**जितपत**—वि जेवढें, जितकें, ज्या प्रमाणाचें, याच्या जोडीला तितपत **जितपर्यंत–पावेतों**–क्रिवि जेथपर्यंत, जों पर्यंत जितक्या वेळपर्यंत, जितक्या दूरपर्यंत [ जेथें+पावेतों ]

**जितर(रा)व**—न जीवनाला आधार असें जमिनीचें उत्पन्न, श्रम करणारा प्राणी, पिकलेलें उभें शेत, बागाईत व तें करणारीं ( घोडा, बैल, गाढव, गाय, रेडा, म्हैस इ० ) जनावरें ' माझें जितराव यदा बुडालें त्यामुळें मी सराबीस आलों ' ' घोड्याचें जितरव एकदा मोडलें म्हणजे कामातून जातें ' ' जीव यावा त्यापेक्षा जितरव गेलें तरी उत्तम म्हणोन घोडीं सोडलीं '–भाव ९१ [जीत=जिवत+राव] **म्ह०** कायाचें कोरन्यास, मानभावाची बायको आणि गाढवाचे जितरव यात श्रम नाहीं

**जित(तु)ला**—वि जेवढा जितका पहा

**जितवण, जितार्णे**—न १ औक्षण, निंबलोण कुरवडी, दृष्ट काढणें ' जितवण करूनि जननी । वस्तू साण्डिल्या वोवाळूनि ' –मुआदि २९ १६५ ' दिवस लागलिया माता । कोपावें कीं जीविता । नितार्णे कीजे । –ज्ञा १३ ३३६ २ जीवन जिवत पणा ' आता जितार्णे श्रीमूर्ती । चाहलें यिया । ' –ज्ञा ११ ६६६

**जि(जि)तवणी**—न ( वाहातें पाणी ) जीवन जिव्हाळा ' कर्मांचें आहे जितवणीं । ' –ज्ञा १८ ५१४ [ जितें=जिवत+वणी=पाणी ]

**जितवा**—वि जितका जितकावा पहा

**जिता**—वि १ जिवत २ ( ल ) न विझलेला ( विस्तव ) ३ राख न झालेला ( कोळसा निखारा ) ४ वाहणारें, न साचणारें ( पाणी ) ५ जिवत झऱ्यातून वाहणारें ( पाणी ) ६ चचळ, मारलेला–भस्म केलेला नव्हे असा ( पारा इ० धातु ) ७ चालू प्रचारातील ( भाषा, लिपी, चाल ) ८ उपयोगात असलेली, न

ह्रवेळी (वस्तु) ९ पडलें जाईल असें, तरतें न बुडणारें (वर्म) १० अगदीं जिवंत, निःसंशय जित पहा 'जिता पिशाच, समंध' ११ हिरवें असताना कापलेलें (गवत, भात) १२ जागरूक [स जीव-जीवत प्रा जिअ-जिअंत] (वाप्र) **जित्या पंथास लागणें**-भयंकर दुखण्यांतून उठणें जगण्याच्या मार्गांत असणें म्ह० १ जित्यारोगी मेल्यामाती=जित्याची खोड मेल्या शिवाय जात नाहीं **जिता**-क्रिवि जिवंत असा 'जिता नाडतील मत्पदीं।' -यथादि १६ ११८४ **जिता कीं मेला**-वि जिवंत आहे कीं मेला आहे असें समजण्यास कठिण असलेला मेल्यासारखा (नामशेष, स्तब्ध) 'चिप्प जिता कीं मेला बैस' 'सहा महिने झाले तो जिता कीं मेला काहीं आटळत नाहीं' **०कोळसा**-१ निखार पाण्यानें न विझविता जमिनींत पुरून तयार केलेला कोळसा २ धगधगीत जळत निखार याची पूड करून जखमाला लावितात ३ खकर पेट घेणारा कोळसा हा काहीं विशिष्ट लाकडापासून करतात **०जागता**-वि चांगला जिवंत असणारा, जागरूक समर्थ असणारा धडधडीत जिवंत 'तो जिता जागता असता त्याचें घर तुम्हीं कसें लुटलें' [जिता+जागणें] **०जीव**-पु (जीव शब्दाला जोर आणण्यासाठीं) जिवंत माणूस, सजीव प्राणी 'जिताजीव मारणें हें घोरकर्म आहे' -वि जिवंत, चेतनायुक्त (प्राणी) **०पिशाच, समंध-जिनीभवदशा**-जीवत पिशाच पहा

**जिताड**—स्त्री (कों) जळून गेलेल्या किंवा नाश पावलेल्या पिकामध्यें हिरवागार दिसणारा पिकाचा तुकडा [जिता]

**जिताडा, जितारा**—पु (कों) उन्हाळ्यात ओलाव्याच्या आश्रयानें उगवलेलें हिरवें गवत [जिता]

**जितासु**—वि जीवत, वाहतें (पाणी) [जित+असु=प्राण]

**जिती**—स्त्री १ वांचती दशा २ चैतन्य 'धैर्याचिया चाग चारीं। चितवणी जिती आगीं। वाह जो का।' -ज्ञा १८ ६३८ [जिता]

**जितेंद्रिय**—वि ज्यानें आपलीं इंद्रियें जिंकलीं आहेत असा, संयमी 'परी जितेंद्रियासीचि घडे। योग्यतावशें।' -ज्ञा ४ १४३ [सं]

**जितेर**—(गा) (सुतारी) दोन माणसांनीं ओढावयाचा रंधा जिसूळ पहा

**जित्रप-ब**—जिनरव पहा **जित्राप-ब**-न १ (व) २ पीक (कु) शेत

**जित्रा**—वि पानें गळालेलें झाड जित्रा

**जित्रुप**—न (व) जनावर जिनरव पहा

**जित्रुप**—न (गो) जथू काय खरामरीच 'लक्ष्मीच जित्रुप धरची' [स चित्रप]

**जिथचा-ला, जिथील**—वि जथचा, जेथील, ज्या जागेचा (संबंधदर्शक) [जेथें]

**जिथणें-नें**—क्रिवि जिथून

**जिथपर्यंत-पावेतों-वर, जिथोर**—क्रिवि १ जथपर्यंत ज्या जागेपर्यंत, 'एवा दमानें तू जिथवर धावत जाशील तिथवर मी जाईन' २ जोंवरी जितक्यावेळेपर्यंत, ज्यावेळेपर्यंत 'जिथवर वाट पहावयाची तिथवर पाहिली'

**जिथाळणें**—अक्रि (व) जिवंत होणें, कोंम फुटणें (झाड इ०स) [जिता]

**जिथून**—क्रिवि १ ज्या जागेपासून, जेथून 'मी जिथून आलों तिथूनच तू आलास' २ कधीं कधीं कालवाचक क्रियाविशेषणासारखा उपयोग, ज्यावेळेपासून कालापासून

**जिथें**—क्रिवि जेथें, ज्या जागेवर, ज्या ठिकाणीं [जेथें] **०तिथें**-क्रिवि सर्व ठिकाणीं, सर्वत्र 'हा जिथें तिथें हात धुवून पाठीस लागला आहे' म्ह० १ जिथें भरला दरा (पोट) तोच गांव बरा २ जिथें मिळाल्या दोघीतिघी तिथें निघे उगीदुगी=दोनतीन बायका एकत्र भेटल्या म्हणजे तिथें गुप्त गोष्टी बोलतात

**जिद्-जिद्द**—स्त्री १ हट्ट दुराग्रह, जिकीर, आडमुठेपणा २ कमोशी ३ आग्रह ४ निकर निकड 'दुर्गेकर हिंमतीनें झुंजत आहेत परंतु हैदरखान जिद्दीस आला आहे' -ख ६ ३०२९ ५ भांडण ६ उगाच विरोध हट्टाचा नकार जीद पहा [अर जिद्द=प्रयत्न] **०खोर, जिद्दी, जिद्दीखोर**-वि १ हट्टी, हेकट, दुराग्रही २ भांडखोर ३ आग्रही

**जिंद**—पु १ मेलल्या मुसलमानाचें पिशाच्च २ दुष्ट माणूस, कपटी मनुष्य सैतान ३ (व) हट्टी मुलगा 'तो फार जिंद आहे त्याड घतल्याशिवाय नाहीं ऐकावयाचा' [अर जिन्न]

**जिंद**—स्त्री जिद्द पहा 'जिंद बाळगिल्यास कामास येणार नाहीं' -पाव १८

**जिंदगी जिंदगानी-णी**—१ जिनगी पहा २ संसार 'इथरी कोणत्या सुरें जिंदगानी करावी' -रा १ १७८ 'काय उरली जिनगानी।' -राम ४५ [फा जिंदगी-गानी]

**जिन**—न कापूस लोडण्याचें यंत्र वाफेच्या योगानें सरक्या काढण्याचें यंत्र कारखाना [इं जिन् ऐंजिनचें लघुरूप]

**जिन**—पु समंध राक्षस जिंद पहा 'कुनवनांत कोणातरी जिनानें तुम्हास पछाडलें तर नाहीं?' -वज्राघात ११ [अर जिन्न]

**जिन**—पु जैन पंथातील विशिष्ट वर्गातील व्यक्ति तीर्थंकर अर्हत् २ बौद्ध पंथातील महान पुरुष बुद्ध -वि जितेंद्रिय [सं]

**जिन(जिवटा)**—वि (माण) धनलोभी

**जिनगर-गर-गार**—पु (जीन करणारा) १ खोगीर लगाम इ० कातडीसामान तयार करणारी जात व त्या जातींतील

व्यक्ति स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन्ही वर्गांत ही जात आढळते ' जिनगराला तानीद केरी । '–ऐपो ४३० २ चित्रें, बाहुल्या इ० तयार करणारी जात [फा झीन्‌गर] **जिनगरी**–वि १ जिनगरानें तयार केलेलें २ जिनगरासंबंधीं

**जिणगाणी, जिनगानी, जिनगी**—स्त्री १ जगणें प्राण धारण रूप स्थिति, जन्म, जीवित्व, अस्तित्व ' थू त्येच्या जिन गानीवर '–गड आला पण सिंह गेला २ उपजीविका, उदरनिर्वाह ३ मालमिळकत, इस्टेट, पुंजी, ऐवज (जमीनजुमला, वतनवाडी विर हित) जिंदगी पहा ' एकदा दत्तविधान झालें म्हणजे झाडून साऱ्या जिनगाणीवर आपला कबजा बसलाच ' –नि ६४० ४ अब्रू [फा झिंदगानी, झिंदगी]

**जिनजिन्नव**—न शेतांतील, वागेंतील, उभीं पीकें [हिं जिन=एक अर्थोत्कर्षक प्रत्यय+जिन्नव=जितरब, पीक]

**जिनपैरा-पैरें**—पुन (राजा) शेतकीच्या कामासाठीं शेजाऱ्याकडून मागून आणिलेला मजूर, उसनवार मजूर शेजा ऱ्याची पाळी आली असता त्याला आपणहि परत फेडीसाठीं असाच मजूर द्यावा लागतो [जिन+पैरा=मजूर]

**जिनबंद**—पु खोगराचा वद, जीन पहा (क्रि० करणें) ' घोड्याला लग तोवरी जिनवद कोरी । '–ऐपो ४२९ [जीन+ वद]

**जिन(न्न)स**—पुस्त्री १ वस्तु, पदार्थ (विक्रीचा, खरे दीचा) माल, चीज २ कोणतीहि एखादी वस्तु, काहीं एक पदार्थ 'त्याणें तुम्हापाशीं जिनस ठेविली आहे ती द्या ' ३ जात, प्रकार ४ क्षुद्रवस्तु व पदार्थ ' जिनसा बोले गर्जुन मोंगल काय आणिला जिन्नस।' –ऐपो २५८ [अर जिन्स्] (वाप्र) **एक जिनसा**–वि १ एकाच जातीचा किंवा वस्तूचा २ अगदीं एकसारखा, एकाच प्रकारचा **०उडविणें**–खर्चून टाकणें सामा शब्द– **०अजूनास**–स्त्री पदार्थ, माल, वस्तु ' मशारनिल्हे या जिनस अजूनासीच्या तलाशात शोधात आहे '–ऐटि ३ ६५ [अर अज्नास्=जिन्स्‌चें अव] **०खाना**–पु कोठार तळघर वखार सामान सांठविण्याची जागा –बाडबावा २ ४२– [फा] **जिनसाजिनसी**–वि हरतऱ्हेचें ' जडिताचा शृंगार पादपीं हिर हरजिनसाजिनसी । ' –अफला ५४ **०दार**–वि आत जिन्नस (पुरण) घालून तयार केलेली (रोटी) –गुशि २ १८ **०पानस**–पु १ अनेक प्रकारचा जिनस सामानसुमान हरजिनस २ कोठारातील सामान **०भाव**–पु बाजारभाव **०वर्तांळा**–पु धारा धान्यरूपानें भरावयाचा असल तऱ्हा भारी जातीच्या धान्याच्या बदला हलक्या जातीचें धान्य जास्त प्रमा णात धनात, तें जादा प्रमाण, माप भारी धान्याच्या मोबदला वर्तावळा **०वार**–वि १ निरनिराळ्यातऱ्हेचें, पुष्कळ जातीचें ' एकाच जातीचीं पुलें आणूं नको, जिनसवार घेऊन ये ' २ सुबक चित्रविचित्र, अतिशय चांगलें, उत्कृष्ट, भारी दर्जाचें (माल कापड) 'एखादें जिनसवार चीट आढळल्यास आणण्यासाठीं घेऊन या ' ३ प्रत्येक मालागणिक टेवलेग, दर जिनसाचा निर्देश केलेला (हिशोब, कागद) ' जिनसवार याद लिहून दे म्हणजे तो आणील ' ४ पिकासंबंधीं स्वतंत्र तक्ता जिनस वार जमावंदी= प्रत्येक जातीच्या पिकावर बसविलेल्या धाऱ्याचा तपशीलवार तक्ता **जिन्नसाना, जिनसजिन्नसाना, जिन्साना**–वि उच्च दर्जाचा, खरा जिनसवार अर्थ २ पहा –पु माल, सामान, कोठारी माल ' तेथें सरकारचा जिन्साना आहे त्याची मोजदाद त्यास देऊन पावती घेणें '–रा १२ १३६ **जिन(न्न)शी**–स्त्री वि १ मालाच्या वाहातुकीचें (जहाज) २ बारदान, भरताड भर लेलें, जिनस भरून आलेलें **जिनशी**–स्त्री कोठार, जिन्नसखाना ' तीन तोफा व दारूचे पेटारे बारा आणिले होते ते जिनशींत दाखल करविले '–रा ५ १९४ **जिन्नसी गलबत-तारू**–स्त्री माल वाहावयाचें तारू–गलबत **जिनसीवाले**–पुअव तोफ खान्याचा अधिकारी **जिनसी सामान**–न दारूगोळा, तोफ खान्याचें सामान

**जिनहार**—क्रिवि बिल्कूल सर्वथैव, हरगीज ' करारास जिनहार कसूर यणार नाहीं '–पया ४८४ [फा झिन्हार]

**जिना**—पु दादर, पायऱ्याची वाट सोपान [फा झीना]

**जिप्सी**—स्त्री युरोपातील एक भटकी जात व तींतील व्यक्ति जिप्सी हे मूळचे हिंदी होत [इजिप्शियनचा अप हे इजिप्तमधून आले असें युरोपियन मानीत]

**जिबट**—वि (गो) १ हलक्या जिभेचा २ वस्ता [जीभ]

**जिबर**—न (गो) एक मासळी

**जिबली**—स्त्री (गो) अर्धा कापलेला जोडयाचा तळ निभणी पहा

**जिबु(भु)ड**—स्त्रीन एक वेल आणि त्याचें फळ, चिभूड पहा [स चिर्भिट प्रा चिब्भड म चिभूड]

**जिभई**—स्त्री १ मागावर कापड विणताना तें ताठ धरावया याची पट्टी, कामटी (या पट्टीच्या टोकाना कापड दाबून त्यास हा ताठपणा आणतात) २ (काहीं ठिकाणीं) ज्या दोन दात्यांनीं मागाच्या वया आलटूनपालटून उचलल्या जातात अशा दोन बाजूच्या दोऱ्या [जीभचें लघुत्वरूप]

**जिभली**—स्त्री १ जीभ (लडिवाळपणें अथवा तिरस्कारानें योजतात) २ (कों) जीभ (साप, घोरपड, पोपट इ० ची) दुभा गलेली, चिरलेली जीभ (यावरून) ३ निभरयाच्या दोन मुख्य शिरा ४ झाड (तिरिरीच्या बाहेरच्या बाजूच्या उगवणारें) ५ (सामा) लहान जीभ ६ जीभ खरडण्याची बागडी, काडी इ०

[स जिव्हा, प्रा जिब्भा] ०कांठी–वि विशिष्ट काठावरून धोत राचें नांव –मराठी १ लें पुस्तक, पृ ७८ (१८७३) जिभल्या चाटणें–(ल) तोंडाला पाणी सुटणें, प्राप्तीची इच्छा करणें

जिभ(मो)ळा—स्त्री १ जीभ खरडण्याची काडी २ जिभली पहा ३ ओष्ठ्यांत–भाग (कि० चाटणें) 'जिभळ्या चाटणें.'

जिभा—पु (चाभारी) तळाच्या वरचा चामड्याचा दुसरा भाग [जीभ]

जिभागें—न (नाविक) पान्याला रोखून धरणारा व जहाजाला ' ति देणारा शिडाला बांधावयाचा कापड वगैरेचा तुकडा [जीभ+अग]

जिभा(भा)ळी—स्त्री नखाच्या खालचा मऊ, नाजुक कातडी जिव्हाळी अर्थ १ पहा. [स जीव]

जिभी—स्त्री जीभ खरडण्याची काडी, जिभली अर्थ ६ पहा [जीभ]

जिमखाना—पु व्यायामशाळा, तालीमखाना, क्लब [इ जिम्नॅस्टिक+हिं खाना]

जिमती—वि जबाबदार, हमीदार 'माझें नांवें पत्र जिमती खातरजमेनें पाठवावें' –मदवा २ ३३ [जिम्मा]

जिमा, जिम्मा—स्त्रीपु १ भार पत्कर हमी, जबाबदारी 'ज्यानीं लोकास मार्ग दाखवून काहीं प्रकारविशापानें ज्ञानामृत पाजण्याचा जिमा घेतला आहे –नि ८८७ 'मसलत ठरावी त्याप्रमाणें आपलाले जिम्म्यावर जावें' –पया २१५ २ विश्वास, जामीन (वस्तु, मनुष्य, कृत्य याचा) (इं) गॅरंटी ३ ताबा, हवाला 'हे दागिने एवढ तुमच्या जिम्मेस असूं' ४ (कायदा) तिसऱ्या इसमाचें वचन, जबाबदारी किंवा देणें पुरें करण्याचा करार, जामिनकी 'तुम्ही जर जिम्मा घ्याल तर त्याला हजार रुपये देतों' जिमेस करणें–स्वाधीन करणें, हवालीं करणें 'पनास हजार फौज व तीनशें तोफा तुझे जिमेस करितों' –भाव ४२ [अर जिम्मा] जिम्माफा(पा)रक–वि जबाबदारींतून मोकळा केलेला जिम्म्यांतून मुक्त [अर झिम्मा+अर फारिघ्=मुक्त] जिम्मेदार–वि जामीन जबाबदार, ज्यानें आपल्या अंगावर जबाबदारी घेतली आहे असा इसम [फा जिम्मादार] जिम्मेदारी–स्त्री जबाबदारी हमी नागरिक सैन्यातील जिम्मेदारी त्यांवर असे –इमू १६९

जिमा—स्त्री (वायव्यी) गणति जमा अंतर्भव 'माणसात वरील जिमा व्हावयाची नाहीं त्याची' –एक] जमा]

जिमीन—स्त्री (कुण) जमीन

जिमेनीस, जम्नीस—पु जमावसुलाचा एक अधिकारी 'जिमेनीस याणीं पोत, जामदारखाना, कोठी, बाजार वगैरे पैदास्ती कमाविसा जमा यावर दस्तगिरी करावी' –वाडसनदा १२६. [अर जम्=जमा+नीस]

जिरा—मना ज्या 'जिथें दोघें जीव प्राण। जिया दोघा।' –भट ११२ जियें–जीं–'जगाचीं जियें जनें।'–भगृ ११

जियादा— ज्यादा पहा [अर जियादा]

जियाफत—स्त्री मेजवानी, जाफत पहा –पेद२१ ३४ [अर]

जियारत—स्त्री प्रार्थना, जारत पहा 'दर्गेत जाऊन जियारत केली' –रा ११८३ [अर जियारत]

जियालें—न जगणें, जीवित, जिणें 'वरजटों हें जिआलें।' –ज्ञा २ ३६ [स जीव+आल्य, प्रा जिअ+अ आलें]

जियें—न जीव 'आहीं लाहानि जियें।' –ऋ २.

जियेचें—अक्रि (गो) वाचणें, जगणें 'वैद्याच्या वरतानीं तों जियेचें' [स जीव, प्रा जिअ]

जिरगा—पु तांदुळांतील एक प्रकार, जिरसाळ

जिरगा—पु पुढाऱ्याची किंवा मतदारांची मोठी सभा जर्गा पहा [फा जर्गा]

जिरजिरीत—वि (गो) जर्जर, फाटके झिरझिरीत पहा [स जर्जर]

जिरणी—स्त्री एक झुडूप

जिरणी—स्त्री आग सुरणें [स जॄ] ०पडणें–१ वर–सा–खालीं हे प्रत्यय लावून व त्याच्या पुढें पडणें, येणें क्रियापदें जोडून योजतात उदा० जिरणी–स–वर–खालीं–पडणें कमी पडणें, हलकें होणें उतरणें (ताप) याचा ताप जिरणीस पडल्यावर येईन' २ शरीरांत भिनणें, गुणावह होणें (औषध) ३ खासणें, पचणें पचनीं पडणें (खाण्याचा पदार्थ, औषध–नेहमीं उपयोग केल्यानें) 'मला तंबाखू जिरणीस पडला म्हणून गिळला' [जिरणें]

जिरणें—अक्रि १ शोषलें जाणें, भिनणें, मुरणें 'इतकें तूप डोकीला जिरव म्हणजे कपाळाचा ठणका राहील' २ आतल्या आत नाहींसें होणें बसणें, नष्ट होणें (पित्तामुळें गर्भ रुपणीं पोटाचा मोठेपणा, स्तनाची पुष्टता इ०) 'तिचें सहा महिन्याचें पोट जिरलें–गर्भ जिरला', 'स्तन जिरले' ३ बाह्यात्कारीं विकृति न होता कमी होणें, जाणें (घामाशिवाय ताप, पू झाल्याशिवाय गुल्म) 'तुझे आगीं मोडशी जिरली आहे म्हणून आंगावर गळवें उठतात' ४ दबणें, खालीं होणें, आतल्याआत राहणें, शांत होणें (गर्व, राग, आनंद) 'सवाई वळकट भेटताच त्याचा गर्व जिरला' ५ शोषलें जाणें पचनीं पडणें काहीं एक परिणाम न होणें (औषध विष याचा) 'सर्वे हालाहाल जिरेल। सेविलिया काई।' –ज्ञा ३ २०३ ६ गिळणें, गट्ट करणें, आधाशासारखें खाणें, नष्ट करणें (पैसा, पदार्थ यांची) ७ पचणें (अन्न) ९ (ल) अंगीं लागणें पूर्ण उपभोग मिळणें (अन्यायानें मिळविलेल्या पैशाचा) 'अन्यायानें घेतलेलें द्रव्य जिरत नाहीं' १० लबाडी, गुन्हा याबद्दल काहीं न होणें, जाचक न होणें शिक्षा झाल्याशिवाय सुटणें (गुन्हा इ० तून) पचणें

'त्याला दोन लाकडया जिरल्या म्हणून लगडीच करावी असें वाद लागले ' ११ आत सामावणें, राहणें, रापणें 'त्या गरव तात आणखी दोन खडीं ओझें घातलें तरी जिरेल ' १२ साधन सामुग्री खपणें, लागणें 'या घराच्या एका पाळ्याला हजार गुडया जिरल्या ' [स जॄ] (वाप्र) (कंडू-खय-खुमखुम-मोडशी)जिरणें-कमी होणें, जिरणें (सूड, द्वेष इ०च्या तीव्र भावना) जिर(रो)सपोट(टा)-लहान मूल पीत असता किंवा औषध घेत असता आई लडिवाळपणें म्हणते तो शब्द [स जॄ= जीर्यते, प्रा. जीरइ]

जिरमाणी—स्त्री पचन, जिरणी पहा

जिरमाणीं-माणीस पडणें—मानवणें, पचनी पडणें (सारखा उपयोग केल्यानें एखादें अन्न, औषध) जिरणीं पडणें पहा [सं जॄ-जीर्यमाण, म जिरणें]

जिरमुळॉ—पु (गो) एक प्रकारचा कंद विरवोळा पहा

जिरलें—न (कु) झुरळ [का]

जिरवण—न. पाचक औषध, अग्निवर्धक पदार्थ —स्त्री (गो) पचन [स जॄ=जिरणें]

जिरवणी—न १ जड अन्नाचें पचन होण्यासाठीं घेतलेला द्रव पदार्थ २ (ल) हरामखोरीचें कृत्य जिरविण्यासाठीं सांगित लेल्या कांहीं तरी सबबी, सारवण ३ जिरवणीचा पाऊस ४ जिरव णूक पहा जिरवणीचा पाऊस-पु मीनपाऊस, ज्याचें पाणी जमिनींत जिरून जातें असा पाऊस, याच्या उलट धोपटवणीचा पाऊस जिरवणूक-स्त्री १ शोषविणें, मुरविणें, पचविणें २ जिरवाजिरव पहा

जिरवाजिरव—स्त्री बाहेर येऊं न देणें, छपवाछपवी, दाबा दाब, निरवानिरव, सारवण

जिरविणें—उक्रि १ शोषविणें, मुरविणें, पचविणें 'तुझ्या जिरविलें बहु प्रणतमतु पोटें पण। ' -केका १८ २ दावणें, कमी करणें ३ बाहेर फुटूं-पडूं न देणें छपविणें ४ (मस्ती, रग, गुर्मी) खोडकी मोडणें, शिक्षा करणें [जिरणें प्रयोजक]

जिरवेल—स्त्री भाताची एक जात जिरगा पहा

जिरा—पु लोखंडाचें कडें [फा झिराह=कडीं असणारें लोखंडी चिलखत]

जिराइत—स्त्री मागातील एक पाटजात ही अहमदनगर जिल्यात आढळते -अस्तृ ४७

जिराइ(य)ती, जिराई(य)त जिरात—वि १ शेतातील पिकासंबंधीं (सारा, पाहणी इ०) 'जिराइती वसूल-पाहणी ' २ शेतीच्या कामाची, शेतीला योग्य असी (जमीन) ३ लागवडीच्या जमिनीवर उत्पन्न कलेलें ४-पावसावर पिकणारी, कोरडवाहू(जमीन, पीक) ५ उपऱ्या (मुसलमान किंवा कोणताहि परका माणूस-जो हिंदु लोकांत राहून त्याच्या चालीरितीप्रमाणें वागतो असा) याच्या उलट बागायती=अस्सल, मूळचा [अर झिराअ] ०गांव-पु जेथें बागा अथवा रब्बीचें पीक होत नाहीं असा गाव जिराईत-यत-न १ कोरडवाहू शेतीला योग्य अशी जमीन, याच्या उलट बागायत २ लागवडींतली जमीन ३ धान्याचीं शेतें-जमीन, ह्या जमीनींतील उत्पन्न याच्या उलट बागाईत=मळ्यांतील झाडें वगैरेचें-उत्पन्न, माळवद 'ऐसें आमुचें बागाईत। वरकड तुमचें जिराईत।' -मध्य ४०१ ४ केवळ पावसावर पिकणारें शेत-पीक [अर झिराअत्] जिरायत-जिरातखाना, जिराद-खाना-पु धान्याचें कोठार, सरकारी धान्याचें कोठार, अठरा कारखान्यापैकीं एक

जिरातखाना—पु धान्यागार -वाडबाबा २ ४२ [फा झिराह्=चिलखत, झिराव्=लढणें ?]

जिराफ—पु आफ्रिकेतील एक प्राणी, उष्ट्रव्याघ्र, चित्रोष्ट्र याची उंची डोक्यापासून पायापर्यंत साधारण बारा हात असते

जिराह—पु चिलखत, कवच [फा झिराह्=लोखंडी चिल-खत] जिरहगर-पु चिलखत करणारा -राव्यको १० १६.

जिरी—पु (व) जिरें पिकवणारी माळ्याची जात 'आमच्या गावात जिऱ्याची वस्ती पुष्कळ आहे ' [जिरें]

जिरें, जिरीं—न एकप्रकारचें सुवासिक धान्य याचा मसा-ल्यात उपयोग करतात हें रक्तशोधक व दाहशामक आहे [सं. जीर, फा झीरा, हिं जीरा, व जीर] जिरूं-न जिऱ्याचा दाणा जिरूंमिरूं-न जिरें व मिरें इ० मसाल्याच्या सामा नाला व्यापक शब्द, किराणा जिन्नस जिरेपाक-पु जिरें वगैरे घातलेला एक प्रकारचा पौष्टिक पाक, औषध जिरसाळ-स्त्री एका जातीचें भात, जिरवल पहा

जिरे-जिरा—नस्त्री चिलखत, जिराह पहा 'जरीचे झगियाचे अंतर्भागीं नवरी बारीक कडियाची लोखडी जिर ' -चित्रगुप्त ११९ [फा झिराह्] ०गार-पु जिरेहगर चिलखत करणारा [फा झिराह्+गार] जिरे-जिरेटोप-पु शिरस्त्राण 'जिरेटोप मटवा बाधून ' भाव १० 'शिरीं जिरेटोप घातला।' -ऐपो ३२

जिरेळ-ळी—स्त्री केळीची एक जात जिरेळें-न जिर-ळीचें फळ, केळें जीर पहा [जिरें+कळें ?]

जिरौंचें—अक्रि (गो) पचविणें, जिरविणें

जिलकाद—पु मुसलमानी (अरबी) वर्षाचा अकरावा महिना [अर झील्कअदा]

जिल(ली)बी—स्त्री एक मोठें पक्वान्न, मैद्याच्या पिठात लिंबाचा रस, तूप, उडदाचें पीठ व दहीं मिश्र करून तें मिश्रण दुसऱ्या दिवशीं जिल्बीपात्रानें तुपात तळून साखरेच्या पाकात

दाट्रा केश्रा कडपाच्या आकाराचा गोळा पदार्थ —मुदि १४१३ जिल्दी असेंहि शुद्ध रूप आहे [ हिं जल्दी जिल्दी ]

**जिलीद जिल्दन**—न बांधीव पुस्तक रेशगबंध —राव्य ८११० [फा]

**जिलाव, जिलव**—स्त्री १ समुदाय, इनाम, परिवार, इत्मान २ स्वारी, मिरवणूक (राजा किंवा देव यांची, यांत कोतवाली घोडे, झेंडे, चोपदारवाले, बंदुकवाले भालाईत, सांगवाले आणि बाणाईत असे सहा प्रकारचे लोक असतात,शिवाय कोतवाली घोडेहि असतात) 'श्रीमंताची भेट घेतली जिलीव चाले मागें।' -ऐपो २८९ [फा जिलौ,जिल्वी] ०दार-पु जिलीवमधील माणूस नोकर, दुजऱ्या ०हुद्दे-पुअव वरील ६ इ० सहा प्रकारचीं शस्त्रें धारण करणारे हुद्देदार **जिलवीस**-क्रिवि स्वारींत पुढें **जिलवीचा घोडा**-पु कोतवाली घोडा

**जिलेटीन**—न एक पदार्थ हे प्राण्यांचे मांस, अस्थी, कातडीं, खुर व शिंगें इत्यादिकांपासून तयार करितात याचा सरसा-सारखा उपयोग करितात

**जिलोह**—पु १ ल्याजमा 'त्यास छत्राची व जिलोहाची तयारी जल्दीनें करून पाठवावी' —दिमरा २ १५० २ थाट समारंभ [फा जिल्वा=भपका]**जिलोह्यानें**-क्रिवि थाटानें ०खाना, **जिलोखाना-जलोह खाना**-पु दरबारचें दालन सभास्थळ 'नवाबानीं हवेलीच जलोहखान्यापुढें एक तोफ ठेवली' —रा ५ १२० [फा जिलूखाना=देवडी, दिवाणखान्याशजारची खोली]

**जिलह, जिल्ह, जिल्हे**—स्त्री १ चकाकी उजळा तजेली २ पदार्थ गुळगुळीत करण्याची, चकचकीत करण्याची क्रिया, पॉलिश ३ तेज 'देवब्राह्मणाची मर्यादा नवाबबहादूर फार करितात म्हणानच दिवसेंदिवस दौलतीस जिल्ह व रौनक आहे' —रा १९ ५३ [अर जिला] ०गार-गार-पु उजळा देणारा ०दार-वि चकाकीत चकचकीत 'जिल्हेदार अपकर वाटत आज चरकी धरिले' —प्रला १ १९ **जिलेवत**-वि शोभिवंत चकचकीत 'तवराव जिलेवत नाचती समांगना आनंदात।' —प्रग ४१

**जिल्हा**—पु १ देशविभाग परगणा प्रांत (सामा) भाग देश पहा २ इलाख्याचा एक भाग यांत तालुके पाडलेले असतात व यावर कलेक्टर अधिकारी असतो ३ कागदाच्या बंदाचा अर्धा भाग (त्याला पाडलेल्या चार घड्यापैकी दोन घड्याची जागा) ४ मिश्र राग [अर चिला] **जिल्हेस**—बंदाच्या अर्ध्या भागात (कौल करार) लिहिण्याची तऱ्हा लिहून देणाराच्या सह्या उजव्या बाजूच्या जिल्ह्यात आणि साक्षीदाराच्या सह्या डाव्या बाजूच्या जिल्ह्यात असतात **जिल्हेचीन-चीनरघ**—नक्षी बंदाच्या चार रकान्यापैकी दोन रकान्यामधून काढलेली रघ ०दार-पु जिल्ह्यावरचा अधिकारी, सुभेदार पहा मराठी राज्यांत परगाण्यावरच्या अधिकाऱ्यालाहि हा हुद्दा असे २ (तुच्छेने) नगर तुरंगाचा अधिकारी [फा] ०मजिस्ट्रेट-पु (इं) डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, जिल्ह्याच्या कलेक्टरास १ ला वर्ग मॅजिस्ट्रेटचा अधिकार असतो म्हणून त्यालाच जिल्हा मॅजिस्ट्रेट म्हणतात

**जिल्हें**—न (कों) मासे धरण्याचें लहान जाळें

**जिल्हज**—पु मुसलमानी (अर्बी) वर्षांतील बारावा महिना [अर झील्हिज्जा]

**जिवट, जिवस**—वि १ रगदार पाणीदार जोरदार दमदार काटक (मनुष्य,जनावर) २ योग्य लायक समर्थ ऐपत मातब्बरी वगैरे असणारा ३ कटकट इ० कणखर 'अशा पुरुष स्थिती एक भोगिन जिवट असत रहा।' —प्रला १८८ ४ नफ्याचा फायद शीर उत्पन्नाचा (धंदा उद्योग) [से जीव+ट प्रत्यय]

**जिवडा**—पु १ (सामा) क्षुद्र जीव जंतु २ सरपटणारा प्राणी उरोगामी (साप किडा इ०) ३ प्रियपुत्रादिकास लडिवाळ पणाचें नांव (वकीजा, हिरा याप्रमाणें) [स जीव+डा=अल्पार्थी प्रत्यय]

**जिवणी**—स्त्री जवणी, तोंड दोन ओष्ठांमधील तोंड उघडण्याकरितां असलेली चीर फट 'त्या मुलाचे ओठ लाल असून जिवणी लहानसर होती' —कोरकि ४२९ [स जीवन]

**जिवणें**—अक्रि जगणें जिवंत असणें [स जीवन]

**जिवत जिवंत-कळा-कोळसा**—जीवनमध्यें पहा

**जिवती**—स्त्री मूल जन्मल्यानंतर सहावीच्या दिवशीं पुजावयाची एक देवता, सटवी 'रथी गुरुसेवा हे सच्छिष्यशिशुसि गाल्या जिवती।' —माउद्याग ८ ८८ २ तिची एक लहान प्रतिमा करून मुलाच्या गळ्यात बांधितात ती' ३ श्रावणमहिन्यात मुलास दीर्घायुष्य मिळावें म्हणून माता दर शुक्रवारीं पूजन करतात ती देवता [स जीवतिका]

**जिवता**—स्त्री (व) आषाढ वद्य अमावास्या [स दीपवती ?]

**जिवनळ**—पु (गो) दवनळ एकप्रकारचें गवत बोरू

**जिवलग**—वि जिव्हाळ्याचा, भावडता प्रिय, जिवास आधारभूत (पति मित्र पुत्र ईश्वर इ०) जीवलग पहा 'देवाच्या सख्यत्वासाठीं। पडाव्या जिवलग्यासी तुटी।' —दा ४ ८ ८

**जिववणें**—उक्रि जिवंत करणें जगविणें 'अन्न जिववी परिमित आहारीं। अधिक झालिया तेंचि मारी।' —मुआदि२० ८५ [जीवणें प्रयोजक]

**जिवसा**—वि जिवस पहा [स जीवसदृश] म्ह० १ तादूळ जिवसे पाहुणा निवसा १ पाहुणा निवसा आणि तादूळ निवस कसें साधते

**जिवा**—पु (राजा) जिता पहा [जीव]

**जिवा**—पु (नाविक) दोरीचे दोन पेड वळून झाल्या नंतर त्यांत मिळवावयाचा तिसरा पेड, शिडाच्या दोन पारटा ज्या जोडसुमक्या दोरीनें जोडलेल्या असतात तो गोट [जीव]

**जिवाचा**—हा शब्द व याचे समास जीव मध्यें पहा

**जिवाजीपंत**—पु (विनोदानें) जीव, प्राण, याच्या उलट मनाजीपंत (मन) 'मनाजीपंत निघून जातो जिवाजीपंतास जाव द्यावें पडतें'

**जिवाणूं-णें**—न (कों) (सामा) सर्पाच्या जातीचा प्राणी, क्षुद्र जीव, जंतु, किडा [जीव]

**जिवाद**—स्त्री (पु) घोरपड जवादें

**जिवानकल्ला**—पु जीवखडा, अश्मा —बदलापूर ७० [जीव+का कल्लु=दगड]

**जिवारा**—वि किडयानें खाल्लेला (पदार्थ) —मुंग्या १९२

**जिवाळा**—पु जिव्हाळा पहा (ए) १ दम २ जिवत पणा —वि सजीव 'लवणाची मासोळी। जरी होय जिवाळी।' —अमृ ७ ३६ [जीव]

**जिवाळें**—न (महानु) लहान कमळ 'चौसावरि निवाळीं। नवरत्नावीं।' —ऋ ७८

**जिव्हा**—स्त्री १ जीभ, रसनेंद्रिय 'जगामध्यें जगमित्र। जिव्हेपासीं आहे सूत्र।' —दा १९ २ १९ २ (ल) अग्नीची ज्वाळा ३ जिभेच्या आकाराची वस्तु [स जिह्वा] (वाप्र) **०खाणें**–राग नें, त्वेषानें जीभ चावणें **०वांकडी पडणें**–१ बेसमाजबदार पणानें बोलणें २ अर्धांगवायूनें जीभ लुळी पडणें **०विटाळणें**–१ जिव्हेचें रसज्ञान नष्ट करणें २ शिव्या वगैरे देऊन जीभ बाट विणें, जिभेनें पाप करणें ३ नालायक, वाईट मनुष्याची एखा द्याला शिफारस करणें, मध्यस्थी करणें **०हातीं धरणें**–१ फार शिरजोरी करणें २ अतिशय वटवटणें ३ अधाशीपणानें खाणें **जिव्हेला आडावेश असणें**–बोलण्याची मनाई, आडकाठी असणें, बोलण्याला आडपडदा असणें, इतर वाक्प्रचारासाठीं जीभ पहा सामासिकशब्द– **जिव्हाग्र**–न १ जिभेचा शेंडा, टोंक २ (ल) जिव्हार 'ती काठी त्याच जिव्हाग्रीं (मर्मस्थानीं) पडली' [स] **जिव्हाग्रीं असणें**–उपस्थित असणें, तोंडपाठ असणें 'जें तो पढला आहे तें त्याचे जिव्हाग्रीं आहे' **जिव्हा छेद**–पु जीभ कापणें (खरेपणा सिद्ध करण्यासाठीं याजिनात) **०दंश**–पु (जिभेला झोंबणारें, चटका बसणारें) तोंडीलवणें 'आणि राखेहूनि पोरडे। आंत बाहेरी यक पाडें। तो जिव्हादंशु आवडे। बहुतयां।' —ज्ञा १७ १४४ [स] **०दोष**–पु १ भाषणांतील दोष २ निर्मितील दोष, अडखळणें **०मूलीय**–वि क, ख वर्णांपूर्वींचा विसर्गोच्चार याची अर्धविसर्गपूर्वक क्कार अशी व्याख्या केली आहे उदा० अन्तःकरण, दुःख इ० **०रूढ**–वि वाटेल तेव्हां पाठ म्हणून दाखविता येणारा, जिव्हाग्रीं असणारा, सदा सिद्ध, अगदीं तयार **०रोग**–पु १ जिभेवरील सूज, फोड २ (नामा) जिभेला झालेला रोग **०स्तंभवात**–पु जिभेचा अवष्टंभ, जीभ लुळी पडणें **जिव्हेचा जड**–वि १ स्पष्ट, पूर्ण शब्दोच्चार करावयास असमर्थ बोलण्यांत खोट असणारा २ अबोल्या, फार बोलावयास नको असणारा



**जि(जिं)व्हार-री**—नस्त्री १ (काव्य) हृदय, आत्मा; चैतन्यस्थान, काळीज, अंतःकरण 'भेदितें आमुचें जिव्हार।' —रास ३ ८० २ (ल) प्राणाप्रमाणें जन्योत्पादक गोष्ट, तत्त्व, मर्म, सत्त्व जीवनकला 'जिव्हार मोडलें वैराग्याचें।' —माए ८४ 'जो वेद-शास्त्राचें जिव्हार।' ३ जीव 'शस्त्रांचीं जिव्हारें। आरोपुनी।' —ज्ञा. १ २२० ४ जीवाची गुप्त गोष्ट, रहस्य, काळीज, मर्म 'दट जया लागीं सत्त्वविले। लक्ष्मीयही राहविले। जिव्हार जें।' —ज्ञा ११ ११८ ५ जिव्हाळा 'ना तरी सकळ धर्मांचें माहेर। सज्जनाचें जिव्हार।' —ज्ञा १ ३१ जिव्हाळी पहा **जिव्हारीं**–क्रिवि १ नाजुक भागीं मर्मी काळजाच्या भागीं, अंतःकरणांत (जखम इ०) 'नरपति रमणी ते खोंचलीसे जिव्हारीं।' —सारद ३ ५७ [जीव]

**जिव्हाळ**—स्त्री जिव्हाळी पहा

**जिव्हाळा**—पु १ उगम, उत्पत्ति, मूळ, झरा 'या विहि रीचा जिव्हाळा लहान आहे यामुळें पाणी थोडें' २ आत्मा सार, मर्म, मुख्य तत्त्व 'नेणती मुक्तीचा जिव्हाळा।' —एरुस्व ७ ६३ 'जाणें भक्तीचा जिव्हाळा। तोचि दैवाचा पुतळा।' —तुगा, कीर्तन १ १२ ३ पोहोंच, आवाका, धारणाशक्ति 'मुलाचा जिव्हाळा पाहून अभ्यास सांगा' ४ कळवळा, काळजी, उत्कंठा, जीव लागणें, मन जडणें 'दुसऱ्याच्या दुःखाचा जिव्हाळ्याचा माणूस असावा' ५ (नौका इत्यादि लटवणें) घाटी आणि तारा जेथें एकत्र होतात त्या बिंदूवर जो कापूर लावतात तो, झाग ६ मर्मस्थल, वर्म ७ जीवित प्राण चैतन्याचें उगमस्थान, आधार 'नामरूपा तृप्ति जिव्हाळा।' —एरुस्व १६ ९२ 'विद्येचा जिव्हाळा व्यवहा राचा जिव्हाळा' ८ लाभ 'तनुचा जिव्हाळा। मानान हा।' —ज्ञा १२ १०८९ ९ माया ममता [स जीव+आलय] **जिव्हाळी**–स्त्री १ एखादी मर्माची जागा नाजुक वर्माचा भाग (नखाच्या, शिंगाच्या खालचा जिवट कानाच्या मागचा) सचेतन मर्माचा भाग मर्मस्थान (क्रि० लावणें लागणें) २ जिण्याचा झरा जिव्हाळा अर्थ ५ पहा [जीव+आलय] **जिव्हाळी–जिव्हाळीला लावणें.–लागणें**–मर्मभेद होणें (अक्षरश व ल०) चिवटा लागून राहणें **जिव्हाळ्याचा**–वि अत्यंत मैत्रीचा जिवलग, मायेचा काळजीचा कळकळीचा 'तो मालुदीखान याच्या जिव्हाळ्याचा होता' —भाव ५० 'मजला जिव्हाळ्याचा येथें कोणीही नाहीं म्हणून तूं मला मारतोस'

**जिव्हाळा**—स्त्री १ शिर (वाजविण्याचें), पिपाणी, पावें, अलगूज इत्यादींतून सूर निघण्यासाठीं त्याच्या तोंडांतून बसविलेला

धैर्ययुक्त शिर चपल तुरुंग २ पक्षीरूप पदार्थ (दे )०जुगार [जिह्वा]

जिष्णु—पु १ विष्णु २ अर्जुन –वि १ सर्वजित विजयी, जयशाली २ (सनगत) जिंकणारा [स जि=जिंकणें]

जिमाळा—स्त्री (शास्त्री) एक चोर –श ७ १७

जिस्त—वि (ग्रा ) बरोबर [दे जन्म पै पो ज़ुस्त]

जिहाद—न धर्मयुद्ध –मन १८०७ १८ [अर जिहाद]

जिह्वापुटि—स्त्री (नृत्य) दाताच्या न कटीच्या अशी जिव्हाग्र तुटि करून पडणें पापण्या मिटून आकुंचित करणें हा अभिनय असूया आळस, मत्सर हे भाव दर्शित करण्याकरिता नमन करा [स ]

जिह्या—स्त्री जिव्हा पहा

जिज्ञासा—स्त्री ज्ञानाची इच्छा अपूर्व शोधकबुद्धि [सं]

जिज्ञासु–वि १ ज्ञानाची इच्छा असणारा शोधक जिज्ञासु २ अभ्यासी विद्यार्थी वगैरे [स ज्ञा–जिज्ञासा]

जी—स्त्री जा याचें स्त्रीलिंगी एकवचनी रूप

जी—१ नावाच्या पुढें आदरार्थी, बहुमानार्थी लावावयाचा प्रत्यय जसें–गणपतरावजी, हनुमानजी, रामचंद्रजी साहेबजी २ हाक मारून विनय परिचय इत्यादि अर्थी लावावयाचा प्रत्यय 'अरे खड्ढ्यांनी' ३ प्रश्नार्थक संबोधन (यात उत्तर गृहीतच असतें) 'तिरस्कारशिशुवचनें अदयता शिव काय जी!' –केका १०६ ४ महाराज सरकार स्वामी याप्रमाणें विनयार्थी संबोधन 'ॐ नमो जी आद्या।'–ज्ञा १ १ ५ मान्यता होकार दर्शविण्यासाठी 'हां! असें' या अर्थाचा सवयीनें योजावयाचा शब्द 'अरे हें काम करशील ? जी महाराज' ६ व्यक्तीच्या विशेषनामास लावावयाचा सन्मानार्थी प्रत्यय उदा० आपाजी रघुजी सखाजी इ०, ब्राह्मणांत पंत किंवा वडिलांचें नाव जोडावयापूर्वी याचिलत नसे–कृष्णाजीपंत बाळाजी विश्वनाथ [स जयिन् प्रा जई] जीजी करणें जी म्हणणें–हांजीहांजी करणें खुषमस्करी करणें

जी—उद्गा पोवाडा लावणी यांच्या कडव्यांच्या शेवटीं साथ देऊन उच्चारावयाचा शब्द [ध्व]

जीऊ—पु जीव 'त्रिविध तापानें तापलें मी बहु। पाहुना का जीऊ प्राण माझा।' –व २१ [जीव]

जीक—वि अमित नम्र निक पहा

जीक—स्त्री (गो) जय 'अजच्या खेळांत तुला वरीच जीक झाली' [जिंकणें जीक]

जीण—न (गो ) जिंकणें

जीणणें—अकि जिंकणें जिणणें पहा 'कृष्ण मधुकराचा सर्वी। कवि जीणव।' –शिशु २६६

जीणें—न १ जन्म जगणें जिणें पहा 'काय जीणें मारिलें दुष्ट भले।' –विवेकसिंधु, प्रास्ताविक १८ (नवनीत पृ ०१२) [स जीव्]

जीत—वि जित जिता पहा 'जीती आत्माचें गर्भीस न भीजे। जीत मेल्या सारिसें।' –ज्ञानदेव ८८० ०ना मेला–वि जीवंत अथवा मेलेला इ० जीत ना मेला हरळीची मुळी= उन्हाळा धरा, व्यापार भरभराटीत असो किंवा मंद असो नेहमीं चाश तरी पावसाळ्यात होताच हरळीची मुळी पहा २ जिता वीं गेल जिवामध्यें पहा जीत हाडांला पिळणें–सर्व जन्म भर त्रासाशीं विरहून राहणें जीतणें–अकि जगणें, जीवंत राहणें 'जीवाति हे गरुड जीवहि चापप णी।'–मुक्तेश्वर आर्यांचें भाषांतर १ जीतवण–न दह शारीरावी क्रिया 'पुढी नी वा करून। भूमीं दावी ओवाळून।' –पाद्र ८१५९ ०सती–स्त्री (नवऱ्याच्या जिवंतपणीं आपणाला जाळून घेण्या प्रमाणें सतीत्वानें वागणारी) मोठी पतिव्रता स्त्री ०हत्या(ते)र–न जें नेहमीं हाताशीं असतें व ज्याचा उपयोग लागलीच करता येतो असें (तरवार भाला कट्यार यासारखें) हत्यार याच्या उलट बंदूक तोफ

जीत—स्त्री (व ) जय सरशी (खेळ पण होड यामधील) 'प्रसंग आला असतां युद्ध करावें, हार–जीत ईश्वराधीन' [स जि–जित]

जीत—स्त्री १ आग्रह जीद पहा 'हर्दम खावदासी जीत करावी '–पेद ६ ५९ २ (व ) पैज होड ईर 'तिनें तापून धरला पां। पडल्या जीति। –पला ७७ 'यमा आन आगाच पाहिजे, नाहीतर तुझामाझी जीत [अर जिद ]

जीताजें—न (पुराचा) एक प्रकारचा मासा

जीद—स्त्री निकड हट्ट जिद्द पहा 'राजे व व्यंकटराव मिळून करडे यानकरवीं जीद धरविली '–पेद २० १०८ [अर जिद ]

जीन—न कापडाची एक जात –मुव्या १२३

जीन—पु भूत जिंद जिन पहा 'दिलीरखानाच्या अंगात कोणी जीन शिरून बोलत आहे '–सूर्दंश १० [इ ]

जीन—वि म्हातारा वृद्ध जीर्ण 'पैसा जिकाचा हा करुनि बळें आहवा तुवा जीनें।'–मोभीष्म ४९ [स जीर्ण+प्रा जिण्ण]

जीन—नपु खोगिराचा एक प्रकार विशेषत विलायती चामड्याचें खोगीर पलाण 'जगीत जीन तयापृष्ठीं।'–मुसभा १४ ७८ [फा जीन] ०खोड–न खोगिरावर बसणाऱ्याच्या सुरक्षिततेसाठीं केलेला उंच आधार ०गर पु चामड्याचें काम करणारी एक जात व तींतील व्यक्ति हे लोक खोगीर लगाम, कातडी पेटे ताफ–बंदुकीचें कातडीसामान बाहुल्या खेळणीं

वगैरे करतात [फा जीनगार, तुल० स अजिनकार] ०गरी—वि १ जीनगरासबधी २ जिनगरानें केलेलें (सामान) —स्त्री जिनगराचा धंदा, कसब ०तुरटा—पु न्हाव्याच्या धोसटींतील वस्तरे ठेवण्याचा धुरणमाचा तुकडा ०पाटक—वि सर्व रंग एक सारखा व फक्त पाठ पटरी असणारा (घोडा—हा अशुभ असतात) —अश्व ११०१ [जीन+फरक] ०बंद—पु जीन आवळण्याची दोरी, पट्टा —गि खोगीर वगैरेनसुन तयार ०बंदी—स्त्री १ कूच करण्याची तयारी, मुसलेरी 'शिपायाच्या लष्करात आवई पडली त्याजवरून तेथें दोन प्रहरांत जीनबंदी जाहली'—रा ७ ४९८ स्वारी (मोहिमेंतील) 'पवनगेच्या पाण्यावर जीनबंदीनिशी राहिली' —रा ९ ४६७० [फा] ०बाजी—जीनबंदी पहा 'घानमरातून झुकत चाल्ही केली हावयावर जीनबाजी।'—पला ४१३

जीना—पु (महानु।) जिंकलेली वस्तु, दान 'कवणातें मागावा जीना।'—भाए १३१ [स जि—जिन]

जीभ—स्त्री तोंडातील एक अवयव, रसनेंद्रिय २ (ल) नंदीबैलाच्या पाटीवर जिभेच्या आकाराचें चिकटविलेलें कातडें वाटतें तें ३ जिभेच्या आकाराची वस्तु, भाग नखाची—डोळ्याची —सापाची जीभ पहा ४ कोंगी, एक प्रकारचें शीड ५ (व) रणगाडा किंवा पाळणा याची खालची बाजू ६ (नाविक) जिभे-सारखा लांबट पसरलेला फाटा 'नदीची जीभ लांबवर पसरली आहे' [स जिह्वा, प्रा जिब्भा फ्रें, जि जीब, जीभा] (वाप्र) ०काढणें—पदार्थ खाण्यासाठीं आधाळभूतपणा करणें ०चावणें—चावलीशी करून बोलणें—भिऊन, सकोच धरून, दबत दबत बोलणें ०चुरचुर घालणें—अयोग्य, अप्रासंगिक, वेडेवाकडें बोलणें ०जड असणें—लवकर पाठ करावयाला असमर्थ असणें जीभ जड होणें पहा ०जड होणें—१ (अस्पष्टोच्चारानें) बोलता न येणें चांगलें शुद्ध बोलता न येणें 'लहान मुलांनीं सुपारी खाल्यानें जीभ जड होते' २ मदबुद्धि होणें ०झडणें—(खोटें वगैरे बोलण्यानें) जीभ कुजून पडणें याचा नाहींशी होणें ०नरकात घालणें—पोरकळ वचनांनीं, रिकाम्या बडबडीनें वगैरे जीभ बाटविणें, खोटें बोलणें ०बाघटणें—गुप्त बर्ता फोडणें न बोलण्याची गोष्ट, गुप्त गोष्ट बोलणें ०बधिर होणें—जीभ जड होणें ०मोकळी सोडणें—वाटेल तसें बोलणें, कसलाहि नियम न पाळणें ०भाउणें—बोलणें बंद होणें मुखें वदेना [illegible] ०लवलव करणें—[illegible] ०लागणें—[illegible] [illegible] ०लळवळणें—(लहान मुलांनीं) [illegible] ०शिवशिवणें—[illegible] ०शिंदळ—निसरडी—स्त्री वाचाळ, बिन ताब्यातील जीभ —वि फटकळ, शिवीगाळ करणारी ०सोकणें—१ चटक लागणें २ चव घेणें (अन्नाची—सरावानें) ०सोकावणें—तोंड चटावणें जीभ सोकणें पहा ०हातीं धरणें—मन मानेल तसें बोलणें, खाणें. —भेचा पट्टा—अद्वातद्वा बोलणें, वाचाळता —भेचा पालट—खाण्यांत बदल, रोजचा खाण्याचा पदार्थ न खाता दुसरा खाणें —भेचा तोरा—अतिशय कडत पदार्थ खाल्यानें जीभ भाजून जाणें जिभेचे फुटाणे फुटणें—फाडफाड बोलणें (एकाच) जिभेनें साखर किंवा गू खाणें—एकाच वेळीं सम्मति आणि असम्मति देणें, बरवाईट म्हणणें, दोन्ही प्रकारें बोलणें —भेला टाळा लावणें—एखादी गोष्ट गुप्त ठेवणें —भेला चिमटा घेणें—बोलणें किंवा खाणें यापासून तोंड आवरणें —भेला डाग देणें—जीभ ताब्यात ठेवणें, जीभेला नियंत्रण घालणें जीभेवर असणें—१ तोंडपाठ असणें २ अगदीं ताज्या आठवणींत असणें ३ बोलून टाकण्याच्या तयारींत असणें —भेस—ला—आडवा—वेढा नसणें—वाचाळ बडबड करणें, निरर्थक प्रलाप काढणें. —भेस—ला आवरून धरणें—निर्बंध घालणें, जीभ आटोक्यांत ठेवणें —भेस—ला—टाचा देऊन कांहींएक ठेवणें—आपण न खाता दुसऱ्यासाठीं गोड पदार्थ राखून ठेवणें —भेस हाड नसणें—जीभ ताब्यात नसणें (खोटें बोलणें, शिवीगाळ करणें यात), खोटें, अपवाद बोलण्याचें भय नसणें म्ह० उचलली जीभ आणि लाविली टाळ्याला=विचार न करता बोलणें

जीमूत—पु मेघ ढग 'जीमूत प्रेरिले सत्वर।'—मुआदि ४९ ९८ [स] ०वर्ण—वि मेघवर्ण, निळा 'नीळ जीमूतवर्ण रघुवीर।'

जीय—पु जीव पहा जीयावें—जावें 'या वर्षी आतां जीयावें या परीस हे पण वरें,'—गीताचंद्रिका १ ८६

जीर—पु (गों) कोवळें देठ

जीरा—स्त्री लहान खारा ? [फा गिराह]

जीर्ण—पु जीर्णज्वर पहा —वि १ जुनें फाटकें तुटकें, वय झाला वरक गाललेले वापरलेलें (वस्त्र, वस्तु प्राणी) २ पचलेलें जिरलेलें (अन्न) [स जॄ=वृद्ध होणें] ०ज्वर—पु पुष्कळ दिवसाचा बारीक ताप हाडीताप जीर्णोद्धार—पु १ जुनी मूर्ति किंवा देऊळ यांची डागडुजी किंवा नवीन बांधणी, जुन्याचें नवें करणें २ (ल) जुनी वस्तु काढून नवी घेणें, बदल करणें जुन्या वस्तूचें नवें करणें

जील—पुस्त्री १ झीज सनळ वाद्यांपैकीं लहान डिमडी, डिमडी २ (व) पैंगाच्या गळ्यातील घुंगरें [फा झीर, तुल० स झिल्ली वाद्य] ०देणें—(व) उत्तेजन देणें, इशारा देणें 'जील देणारा कोणी सांपडायाच पाहिजे'

जील—पु (व) कातीरी झुडपाची दाट जाळी

**जीलसुभानी**—स्त्री पदशाहाची एक पदवी 'हजरत जील सुभानी यांणीं आज्ञा केली जे' —रा ६ ६०७ [फा झिल्लि-सुभानी=ईश्वराची छाया]

**जीव**—पु १ प्राण, जीवित २ प्राण असणारा सजीव प्राणी 'सर्व जीवांस ईश्वर पोसतो' ३ लहान कीटक, प्राणी (किडा, घुगरे, किसू, किडा इ०) 'या धान्यांत जीव झाले आहेत' ४ तेज वीर्य, जोम, धाक पाणी शक्ति, धैर्य कार्यक्षमता, सत्त्व सार (माणूस, घोडा, बैल इ०चें) ५ यश, नफा लाभ, अर्थ (कार्य काम उद्योग यांत) 'या व्यवहारामध्यें जीव नाहीं, करा न करा सारखा' ६ बळकटी स्थैर्य, मजबुती, टिकाऊ पणा, भक्कमपणा (पदार्थ, वस्त्र यांचा) 'इमारतीचा जीव हलका म्हणून बंद्याचें फाटली' ७ खरेपणा, सत्यता विश्वसनीयता, मिलाफ मेळ (बातमी वगैरेचा) 'या बातमीमध्यें, त्या मजकुरांत जीव नाहीं' ८ सौंदर्य, जोर (लिहिण्याचा) ९ मन प्रवृत्ति, धन 'एक जीव म्हणतो जावें एक म्हणतो न जावें' १० अंतरात्मा, सचेतन आत्मा जीवात्मा, पशु 'त्याच्यासाठीं माझा जीव भारी तडफडतो' ११ देवगुरु बृहस्पति 'त्याच्या आला परिसुनि यश निववायासि मन धरा जीव।' [स जीव, प्रा जीवो, सिं जीउ, हिं जी] (वाप्र) ◦**अधांतरीं उडणें**—संकटांत पडणें, भांबावून जाणें, घाबरून जाणें ◦**अर्धा करणें**—मनुष्याला अतिशय त्रास देणें सर्व शक्ति खर्च करणें (श्रम, व्यर्थ शिकवण इ०) ◦**अर्धा होणें**—भिणें, त्रासलें जाणें, गर्भगळित होणें श्रमणें दमणें, अर्धमेलें होणें ◦**आटणें**—१ मरेमरेतों काम करणें २ अतिशय थकून जाणें (मेहनत, काळजी इ०नीं) ◦**आडकणें-टांगणें-टांगला असणें**—आवडत्या वस्तूच्या प्राप्तीसाठीं घाबरें होणें, काळजी लागणें ◦**आवरणें**—(क) त्रासून, मन आवळणें 'त्याची दस्तगारी ठेवता ठेवता माझा जीव आटून गेला' ◦**उडणें**—१ नेम नाहींसें होणें भिणें २ भीति ग्रस्त होणें ◦**कंठगत येणें**—(क) १ मरणोन्मुख येणें २ मुश्किलीन पडणें ◦**कालविणें**—घाबरणें, अतिशय क्षोभ होणें, पाघरणें गडबडणें ◦**कीं प्राण करणें**—अतिशय प्रेम करणें ◦**कासावीस**—(ना) गुदमरणें ◦**कोरडा होणें-पडणें-घसा** पडणें थकणें अतिशय दमणें (आजार, श्रम, भूक यांनीं) ◦**खाऊन बसणें-सुकणें-राहणें**—आग्रह धरणें, आपला माघारी धरणें ◦**खाणें-घेणें जिवास खाणें**—एखाद्याच्या जिवावर उठणें कुरतडणें ◦**खाऊन काम करणें**—मनापासून लक्ष घालणें ◦**खालीं पडणें**—उत्कट इच्छा पूर्ण होणें साध्य गोष्ट मनाजोगी होणें ◦**गोळा होणें-मरणोन्मुख होणें** अति त्रास पावणें 'मी जीव देत असे कशास घोर । तें दां त्याचा भोग मि क्षण' —भागु २८ ◦**घेऊन पळणें**—जीव बचावून पळणें 'पळती जीव घेऊनिया ।' ◦**जाळणें-मारणें**—निग्रह करणें, दमन करणें (कामेच्छा, पाप वासना, मनोविकार यांचें) ◦**जाणें**—१ प्राण सोडणें २ निराश होणें, चित्त स्वस्थ नसणें ३ फार उत्कंठा लागणें, अतिशय हट्ट, छंद घेणें ४ (पूर्वकालवाचक धातुसाधित याच्या पाठीमागें असेल तर जाणें—रडून—हसून—वागून—जीव जाणें) =रडणें हासणें, खपणें (अतिशय जोरानें व मदतीनें) ◦**टाकून पळणें**—अतिशय लगबगीनें, घाईनें, एकदम पळणें, भिऊन पोबारा करणें ◦**टांगणीस लागणें**—१ एखाद्या वस्तूवर प्रीति करणें २ चिंताग्रस्त होणें ◦**ठिकाणीं नसणें**—अस्वस्थ असणें, चैन न पडणें ◦**डहुळणें-मळमळणें**—(ना) मळमळणें ◦**तुटणें**—१ अतिशय थकणें २ तळमळ लागणें एखाद्याचा ध्यास लागणें, एखाद्याबद्दल अतिशय काळजी वाटणें ◦**तोडणें**—दुःखानें संचित होणें ◦**तोडून करणें**—अतिशय मेहनतीनें करणें (काम, धंदा) ◦**थारीं असणें**—स्वस्थपणा असणें ◦**थारीं नसणें**—अस्वस्थ असणें चैन न पडणें ◦**थोडा थोडा होणें**—(ग्लानि, देणें इत्यादि कारणांनीं) अतिशय चिंताग्रस्त होणें, काळजी लागणें, भीति वाटणें, फार दुःख होणें, धैर्य खचणें ◦**देणें**—१ आत्महत्या करणें २ सगळें लक्ष घालणें, लक्ष देऊन करणें, पुष्कळ प्रयत्न करणें ◦**धडधड करणें**—काळजी, भीति वाटणें ◦**धरणें**—नवीन शक्ति मिळविणें, रंगारूपास येणें; बरें व्हावयास लागणें, जगणें, बाळसें लागणें (झाड वगैरे) ◦**धरून**—१ धैर्य धरून, उत्सुकतेनें, उत्साहानें (कृत्य करणें) २ जिवंत राहून, अस्तित्व ठेवून (कसा तरी याला जोडून योजना) ◦**धुकधुक धुकधुक करणें**—(ना) घाबरणें ◦**पछाडणें**—मोठ्या कळकळीनें, लाचारीनें नम्र होणें ◦**पडणें** एखाद्या गोष्टींत मनापासून शिरणें, गोडी लागणें, तत्पर होणें ◦**पाखडणें**—१ अतिशय मेहनत करणें, प्रयत्न करणें २ तळपळणें, तडफडणें ◦**पोळणें**—१ दुःख होणें २ चटका बसणें, धडा मिळणें ◦**प्यारा असणें**—जीवाविषयीं अतिप्रीति दाखविणें उदा० ज्याच्या त्याला जीव प्यारा ◦**फुटणें**—अतिशय उत्सुक होणें 'तुझे भेटीलागीं निशिदिवस माझा जिव फुटे।' —राह्व ६ १५८ ◦**बसणें**—(एखाद्यावर) मन बसणें प्रेम करणें, लोभ असणें ◦**भांड्यांत पडणें**—जीव स्वस्थ होणें ◦**मटक्यास येणें**—दमणें [illegible] थकून जाणें ◦**मुठींत धरणें**—१ काळजी पूर्वक स्वतःचें रक्षण करणें (धोक्यामुळें) २ स्वतःवर दाब ठेवून अत्यंत संयमन करणें ◦**मोठा, मोठा जीव करणें**—१ धाडसानें सहन करणें, धैर्य धरणें २ उदार होणें (खर्च वगैरे करतांना) [illegible] ◦**म्हैसेस देणें**—(उ) कष्टानें वागणें [illegible] तारणें [illegible] रक्षण करणें आत्म्यानें काम करणें ◦**लावणें**—प्रेम करणें माया लावणें ◦**वर-वरता**

भरणें-अतिशय उत्सुक होणें उत्कंठा लागणें ०वारा पिणें उदास असणें भयाण वाटणें ०सुटणें-अशक्त व्याकूळ होणें ०सुचित नसणें-काळजीत असणें ०सोडणें-१ मरणें २ जीव धोक्यात घालणें, स्वतःच्या जीवाची आहुति देणें ३ अतिशय इच्छा दर्शविणें ४ आजारी माणसावरून कोंबडें ओवाळून टाकणें (यानें आजाऱ्याचा रोग कोंबड्यावर जाऊन तो मरतो अशी समजूत) जिवा आगळा-वि एखाद्याच्या काम करण्याच्या शक्तीच्या बाहेर जिवाचा कलिजा-वि प्राणापेक्षाहि प्रिय जिवा(वि)ची गोष्ट-अन्तःकरणातील गोष्ट 'यरू सांग जीविंचा गोष्टी। त्याची आवडी जाग ती पोटीं।' -भारावज्र १७ जिवाची ग्वाही-पाळी देणें-खात्रीपूर्वक सांगणें जिवाचा घात करणें-१ आगेमागे प्रयत्न करणें जिवापाड मेहनत करणें २ अतिशय छळणें मारणें (जीव जाईपर्यंत) जिवाचा घोट घेणें-जीवाचा घात करणें मरेपर्यंत छळणें जिवाचा धडा करणें-साहसाचा प्रयत्न करण्यास तयार होणें जिवाचा लाळ करणें-१ जाव बदम करणें जिवाला त्रास देणें २ (ल) फार मेहनत घेणें जिवाची कायकाय करणें-(कुत्र्यासारिखें भुंकावयास लावणें म्हणजे) अतिशय छळणें जिवाचा सोबती-वि आयुष्याचा सोबती (नवराबायको रोग) जिवाची राळ वण करणें-अतिशय काम करणें (राळयाच्या काडीसारखें होणें) त्रास घेणें जिवाची हुल्लड करणें-मोठा नेटाचा प्रयत्न करणें जी(जि)वा अगोचर-वि शक्तीच्या बाहेर जिवाचं चार चार करणें-थेर करणें नाचणें चैन विलास करणें जिवाचें रान करणें-अतिशय कष्ट सोसणें जिवाजवळ गांठी बांधणें-मनात नीट ठसवून किंवा बिंबवून घेणें 'हरी हा अर्धु जिवाचिया गांठी। वा न बांधावा।' जिवात जीव आहे तोंपर्यंत-मरणें येईपर्यंत जन्मभर सदासर्वदा माझ्या जिवात जीव आहे तों पर्यंत मी तुला सोडून चार दिवस देखील राहणार नाहीं जिवात जीव घालणें-१ उत्तेजन देणें सांत्वन करणें धैर्य देणें २ आपलें व दुसऱ्याचें मन एक करणें आपले विचार दुसऱ्यास नीट समजावणें जिवात जाव येणें-गेलेली शक्ति धैर्य पुन्हा येणें धीर येणें जिवानिशीं-जिवासकट जिवानिशीं जाणें-मरणें (जुलमानें अकाली) म्ह० गांठी नाहीं जीव निशीं आणि खाणार ... जिवापरता-१ सामर्थ्याच्या बाहेर (श्रम वगैरे) यानें जिवापरतें करणें आलें आहे जिवावर बेतले तेव्हां ... २ प्राणापेक्षा प्रिय जिवापलीकडे जिवापेक्षा प्रिय जिवापाड-डें-क्रिवि जिवाचें मोल देऊन शक्तीबाहेर जिवा भावाचा-पु (सोबती चाकर पदार्थ गोष्ट कर्म) आपल्या रक्तच्या नात्याचा ... आवडता मूल्यवान वगैरे जीवा भावाने-स क्रिवि स्वतःसारखी स्वतःच्या विशेष जरूरीकरता

'हें पाखरूं एक जीवाभावास टाकिलें' जिवाभावानें जीवें भावें-क्रिवि अन्तःकरणापासून आर्ततेनें मनापासून उत्साहानें जगणें जिवाभ्यास-भ्यासानें-क्रिवि आपण एखाद्या भावानें आणि मनापासून जिवाभ्यासानें उद्धा श्रम करावा त्याचें फलप्राप्ति' जिवाला खाणें-दुःखानें झुरणें मनाला लागणें जिवाला चरचर लागणें-अतिशय चिंता लागणें जिवाला पाहीं-तगी करून घेणें-आत्महत्या करणें जीव देणें -ला लागणें-मनाला लागून राहणें झुरणें दिजणें जिवावर-स्वतःच्या शक्तीवर श्रमावर बुद्धीवर (नाणें काम करणें) जिवावर उठणें-दुसऱ्याच्या जिवाचा काळजी न करणें त्याचा जीव घ्यावयाला तयार होणें (दुसऱ्याच्या) जिवावर (आपलें) पोट भरणें-दुसऱ्यावर अवलंबून आपला उदरनिर्वाह चालविणें जिवावर उड्या मारणें-दुसऱ्याच्या पैशावर मद तीवर चैन करणें मारणें जिवावर उदार-जिवाची पर्वा न करणारा म्ह० जिवावर उदार ... लक्षशीं झुंजार जिवावरचा-जीव धोक्यात घालणारा जीवघेणा जिवावरचा-लाग-पाळी-गोष्ट-प्रसंग-खेळ-काम-लागलीच तात्काळ येणारा धोका संकट इ० जीव जाण्याचें भय असणारी गोष्ट जिवावरचा ताप-ज्वर-रोग-दुखणें-प्राणघातक ताप आजार इ० जिवावरचें आधण उतरणें-कठिण प्रसंगातून बचा वणें निभावणें जिवावर द्वारका करणें एखाद्याच्या आधारा वर आश्रयावर चैन करणें महत्कृत्य करणें मोठा उपकार करणें 'तुमच्या जिवावर एवढी द्वारका केलें घरदार दोमजला।' -प० ८५ जिवावर येणें-जि(व)तणें जिवाशीं गाठ पडणें-१ जीव धोक्यात पडणें मोठें संकट ओढवणें २ दुष्कर वाटणें ३ दिडणें जिवावरलाल-वि दुसऱ्याच्या मदतीवर चैन करणारा जिवाविशेष-क्रिवि स्वतःच्या शक्तीच्या पलीकडे जिवा साड-वि जीवाला धोका येण्याइतका (आजार त्रास) जिवाशी-जिवीं धरणें-बांधणें-अतिशय प्रीति करणें बहु मोल वाटणें काय इथें न धरावें अधन्त्वें भूप जन-वरा जावीं -मोवन १३ १८ जिवाच जहानगिरी करणें-होणें-जीवा वर मोठें संकट येणें आणणें संकटाचा प्रसंग ओढवणें जिवास जाव देणें प्रिय माणसामध्यें आपला जीव ठेवणें जिवास मुकणें-मरणें मृत्युपावणें जिवींचा-प्राणप्रिय जिवाच्या जिवीं लागणें-१ आवश्यक असणें प्रिय वाटणें २ मर्मभेद होणें जिवाला लागणें जिवांत घुस जाणें वस्ती होणें जीवित धन्य ती भरणें तसत एता दरि ... माया जीवें घुसरले -शिशु १ ८ जिवें जाणें-एखादें संकट टळून जिवंत राहणें जाव जाण्याचा प्रसंग असता जीव न जाता बचावणें आजी आम्हा येथें राखियलें देवें। नाहीं तरी जिवें न वांचतों। म्ह० १ ज्याच्या

त्याला जीव प्यारा २ जीवो जीवस्य जीवनम् सामासाब्द-०कण-पु अल्प जीवदशा, जीवांश 'जीवकणु जयाचा उपमर्दे।' -ज्ञा १८ ११७२ ०कळा-स्त्री जीवंत माणसाच्या तोंडावरचें तेज याच्या उलट प्रेतकळा ०कोश-पु (काव्य) प्राणाचें, आत्म्याचें आवरण, शरीर 'तैसें हिरण्यगर्भाचें अंग। प्रसिद्ध जीवकोश।' ०खडा-पु (गुण आगरी) अदमा -बदलापूर ४१ ०घात-न जीविताचा नाश वध ०घातक-की-वि १ प्राणाचा नाश करणारा २ छळ करणारा, त्रासदायक ०घेऊ-घेणा-घण्या-वि १ जीव जाईपर्यंत त्रास देणारा, लोचट (भिकारी) २ भारी कठिण (काम) ०जंतु-पु १ लहान किडा, प्राणी, किडा मुंगी इ० २ -अव सर्व प्राणिमात्र ०डा-पु क्षुद्र जीवजंतु निरश पहा 'नाहीं मान वडा तया दहिंवडा येंचा ग तो जीवडा।' -आसु - -पु क्षुद्रजीव, प्राणी (साप, किडा-मुंगी इ०) ०दवाळ-स्त्री जीवाची उपाधि 'हे अज्ञानकृत जीवदवाळ।' -रयोवा ८ १४१ ०त्व-न चैतन्य, जीवदशा 'जीवत्वदुर्गी आहिला।' -ज्ञा १७ २ ०दयालय-पु प्राणिमात्रावर दया दाखविणारी, प्राणिमात्राचा जीव वाचविण्याचा प्रयत्न करणारी मंडळी, गोरक्षण वगैरे करणारी समिति ०दशा-स्त्री १ आयुष्य, अस्तित्व, सचेतन स्थिति 'जीवदशा तोंपर्यंत संसार' २ आत्म ज्ञानावाचून जन्ममरणाच्या फेऱ्यात असावें अशी अवस्था ०दान-न १ जीवितार्चे देणें, देणगी, प्राण न घेणें २ दुसऱ्याच्या प्राणाचें रक्षण (क्रि० करणें, देणें) 'या रोगाम काहीं औषध देऊन तुम्ही मला जीवदान द्याल तर पहा' एखाद्या संकटातून वाचविणें ०दार-वि १ सचेतन, जिवंत २ (ल) धैर्यवान, पाणीदार, जोरदार, शक्तिवान ३ रसयुक्त, रसाळ ४ (ल) फायदेशीर (धंदा, उद्योग) ०धन-न गुरेंढोरें, जंगम माल मिळकत ०धर्म-पु अविद्या कामकर्मादिक ०धोंडा-पु (कों) अदमा जीवखडा ०पाप-(पापी आत्मा, बिघडलेला आत्मा) स्वत मध्यें किंवा दुसऱ्यात दुष्ट विचार आढळल्यानंतरचा दुःखाचा उद्गार ०प्राण-पु १ जीव आणि आत्मा, प्राण (जोर देण्यासाठीं वापरतात) 'मी तुजसाठीं जीवप्राण देतों' २ आवडता माणूस, लाडका, जीव की प्राण असा माणूस, मित्र ०भय-न जीव जाण्याचें भय ०भाव-पु १ जिवाचा भाव इच्छा मनीषा 'मागणें तें तुज मागों। जीवभाव तुज सांगों।' -तुगा १ ७८ २ आत्मा स्वत (जोरदार अर्थी) ३ जीवदशा 'हरिला सयाचा जीवभाव देवें।' ०योनि-स्त्री १ सरपटणारे प्राणी, क्षुद्र कीटक इ०चा वर्ग २ जरायुज प्राणि वर्ग, योनि पहा ०रखी-स्त्री (कों) दवाचा नक्षीदार दरवाजा ०रस-पु जीवन देणारा रस, (इ) प्रोटोप्लॅज्म् ०लग-वि १ (जीवास आश्रयभूत आधारभूत) आवडता, प्राणप्रिय (पति ईश्वर) 'माझिया जिवलगाविण। न करी गा आणिक ध्यान।' २ आप्त मित्र 'जीवलग जीव घेती।' -दावि पृ ' ८ ०शक्ति-स्त्री प्राणशक्ति, (इ) व्हायटल फोर्स ०शास्त्र-न लहान जीवासंबंधीं शास्त्र (इ) बायॉलॉजी ०सम-वि जीवट जीवसृष्टि-स्त्री सचेतन सृष्टि ०स्वर-पु (संगीत) वादी पहा ०हत्या-स्त्री जीवजंतु याचा नाश, वध, खून, प्राणिहत्या, हिंसा जीवश्चकंठश्च-वि अत्यंत प्रेमाचा, अति शय दृढ (मित्र, मैत्री) एकजीव जाणें, एकजीव येणें-मरणाच्या दारीं असणें, शक्तीची परमावधि होणें एकजीव होऊन जाणें-एकत्र होणें, साधून जाणें एकरूप, एकच होणें

**जीवणें**—अक्रि जगणें जिवणें पहा 'म्या केवि अन्त्यजन सख्यसुखें जिवावें।' -मुद्गलाचार्य आर्याचें भाषांतर १

**जीवत**—वि जीवंत पहा **जीवतपति-भर्तृका**-वि सुवा सिनी, सौभाग्यवती स्त्री [सं] -**पितृक**-वि आईबाप किंवा नुसता बाप जिवंत असलेला (माणूस) **जीवन्मातृक**-वि आई जिवंत असलेला (माणूस)

**जीवत**—वि जीव, प्राण असणारा, जिता [जीव] ०कळा-स्त्री (ल) जीवकळा पहा जिवंतपणाचें तेज, तजेला ०कोळसा-पु जिता कोळसा पहा ०नरकवास-पु जीवंत असून नरकाचे हाल भोगणें त्रासदायक स्थिति स्थळ, अति घाणीची जागा ०पितृक-वि जीवत्पितृक पहा ०पिशाच-संबंध(समंध)-अवदसा-पुस्त्री (ल) उपद्व्यापी, त्रासदायक माणूस, जीवलमूत ०भेट-स्त्री मरणो न्मुख माणसाची भेट, जिवंत असताना भेट (आसन्नमरण स्थितीं तील माणसाची) ०समाध-स्त्री जीवंतपणीं स्वतःस पुरून घेणें (व्याधिग्रस्त किंवा संन्यासी असें करतात) ०हत्या(ते)र-न तलवार, भाला इ०, जीवहत्यार पहा याच्या उलट मेलें हत्यार

**जीवनिका, जीवती**—स्त्री जिवती पहा 'ते असो प्रसन्न मायलेकरासि जीवती।' -मध्व १९

**जीवन**—न १ आयुष्य, अस्तित्व, प्राणधारणा, निर्वाह २ जगण्याचें, उदरनिर्वाहाचें साधन (नोकरी किंवा शेतिम, भक्ष्य, अन्न, उद्योग-धंदा) ३ कोणत्याहि वस्तूचा आहार भक्ष्य, धारणा-साधन, ज्याच्यावाचून जो पदार्थ जगत नाहीं तें त्याचें जीवन जसें-अग्नीचें जीवन वायु झाडाचें जीवन पाणी 'वदन कमलामृतथवग। तें जीवन मज तुझें।' -एरुस्व १ ५ ४ पाणी, जल ५ वमराई मोत्यें गोलपणात, रंगात, सारखेपणांत व तेजात सर्वो त्कृष्ट असतीं म्हणजे त्याम म्हणतात अशीं मोत्यें वजन १० ते १०० पर्यंत असलीं म्हणजे त्यास पत्र जीवन म्हणतात ६ वतन 'का सेवका दणी जीवन।' -ज्ञा ९ ९९ -वि आयुष्य देणारें, जीवदायक 'तें जीवन नाम जपत। तये वेसला ध्यानस्थ।' [सं] (वाप्र) ०आटणें-प्राण घाबरणें, आयुष्य देणें जगविणें।

'त्याती जीवन घालीन मी।' सामाशब्द- ०कलह-पु जगण्यासाठीं धडपड, कष्ट 'ह्या काळात जीवनकलह मोठ्या निकरानें चालला आहे' -टि १४५६ ०कला-ळा-स्त्री १ जीवकळा पहा यत्कश उत्कट प्रेरकळा, मरणकळा 'बुद्धिदान् मनुष्यास देहही करवेल पण जीवनकळा ईश्वराचे हाती' २ आयुष्य पुष्कळ दिवस राखण्याची युक्ति ०पाडें -नापाडी-गाडें-माफक-क्रिवि यथाशक्ति यथासाधन, शक्त्यनुसार सामर्थ्य तुल्य (काम सांगणें, दंड करणें, औषध देणें इ०) ०पाणी-न शक्ति जोर, आवेश, दम, योग्यता, धारणाशक्ति जीव अर्थ ४ पहा 'या घोड्याचें जीवनपाणी पाहून ओझें घालणें तें घाला' ०रसायन शास्त्र-पाश्चात्य वैद्यकातील एक प्रकार बारा क्षाराच्या औषधांचें शास्त्र मानवी शरीरात बारा क्षार असून त्यात एक अगर अधिक कमी झाल्यास रोग होतो, ही उणीव कमी असलेला क्षार शरीरात घालून भरून काढितात ०सूत्र-वि जीवाधार, जीवाचा चालक 'जय जग वें जीवनसूत्र। श्री महालया असे।' -ज्ञा १८ १८०३ ०हेतु-पु १ जगण्याचा हेतु कारण २ जीवाचें कार्य क्षम साधन -नापाय-पु १ निर्वाहसाधन, जीव राखण्याची युक्ति 'जीवनोपायो का जैसा। कोल्हाटियाचा।' -ज्ञा १८ ६०६ २ उदरनिर्वाह, शरीरधारणा ३ संकटापासून वाचण्याचा उपाय

**जीवन्मुक्त**—वि १ जीवतपणींच आत्मज्ञान होउन देहाभिमानापासून मुक्त झालेला, या जन्मीच संस्कार व पुढील जन्ममरणाच फेर यातून सुटलेला २ पूर्ण आत्मज्ञानी ३ अत्यंत विरक्त, संन्यस्त -मुक्ति-स्त्री आध्यात्मिक ज्ञानानें ऐहिक संस्कारापासून व पुढील जन्ममरणापासून झालेली सुटका, जीवन्मुक्ताची स्थिति -मृत-वि (जिवतपणींच मेलेला) १ दुष्कीर्ति प्राप्त झालेला, निंद्य पतित २ (ल) मूर्ख वेडा

**जीवविणें**—सक्रि चैतन्ययुक्त करणें जीवत करणें 'परि आता चराचर सोनि निर्विष, जें अमृताहूनि जीवविते।' -ज्ञा ९ ७४ 'आता एक करी ताता। जीवनी दऊन जीववी सुता।' -पप्र ५ ५२

**जीवा**—स्त्री (भूमिति) ज्या [ ]

**जीवाजीव**—पुअव जडाजड, प्राणी व वस्तु सजीव निर्जीव प्राणी सृष्टि [जीव+अजीव] जावाधार-पु जळस्थलात्मक पृथ्वी [जाव+अजीव+आधार] ०त्मा-पु जीवरूप आत्मा गुणांनीं बद्ध देहाभिमानी आत्मा 'जीवीं व्यापक ब्रह्मांश। त्यास जीवात्मा बोलिजे। -दा ८ ७ याच्याहून शिवात्मा किंवा परमात्मा-शुद्धआत्मा हा निराळा आहे

**जीवाभ्य-जीवादारभ्य**—क्रिवि १ जन्मापासून २ जीवत भर्गे पर्यंत जीवाभ्य श्रम साहस करून स्वामिकार्य करावें' -मराआ २५ ३ मनापासून, तनमनधनेकरून, जीवापलीकडे 'य समयीं जीवाभ्य श्रम करून दौलत वाचवू' -मराचिस ०१

**जीविका**—स्त्री १ उपजीविका, जीवनोपाय पहा 'यज्ञ ऐसें वर्तन। जीविकें करूं।' -ज्ञा १७ ३३९ २ शक्ति, सामर्थ्य, अनुकूलता 'त्याणें आपल्वे जीविकप्रमाणें धर्म केला'

**जीवित**—न जीव, आयुष्य, अस्तित्व, जिणें, प्राणधारणा -वि जीवत केलेला, सजीव केलेला जीवितेश-पु १ (काव्य) जीविताचा, आयुष्याचा शास्ता (दवना, यम, नवरा, प्रियकर इ०) २ जिवलग, प्रियकर माणूस जीवित्व-न प्राण, आयुष्य, अस्तित्व जीवित पहा 'वाळें ओढुनि काढिती बाहेर। जीवित्वावरि उदार त्या।' [जीवित]

**जीवी**—वि जगणारा, निर्वाह करणारा (समासात) भिक्षा-नौका अन्न-मांस-चिर-कल्प-जीवी [स ]

**जुअ**—पु जोडा, जोडी युग्म -वि जुळें 'जुआ सांगडीं।' -दाव २८० [स युग, प्रा जुग जुअ]

**जुआळिकारु**—वि जवळ असणारा, रहस्यातील, गुह्य गोष्टी सांगण्यास योग्य असा 'गुपितिजें जुआळिकारु। मातुसागितें।' -शिशु ३५४ [स द्युत्]

**जुई**—स्त्री एक पुष्पलता व तिचें फूल जाईच्या फुलापेक्षा हें फूल थोडें लहान असतें याचा औषधिगुण जाईप्रमाणेंच [सं यूथिका प्रा जूहिआ, हिं गु जुई, जुही]

**जुक(ख)ड, जुक(ख,ड)**—न जू जोखड पहा जुकाड-न जू (तिरस्कारार्थी) [स योक्त्र]

**जुकविणें**—अक्रि गाळणें फसविणें झुकविणें पहा 'या इष्कातें जुकविणें।' -होला ७६

**जुकाम**—न थंडी, पडसें -अश्वप १ १४५ [अर झुकाम्]

**जुक्ति**—स्त्री युक्ति जुगत पहा [सं युज्-युक्त]

**जुखेळ**—पु जुगार द्यूत [स द्यूत, प्रा जूअ, हिं जूआ+खेळ म जुवा]

**जुग**—न १ युग २ जुळें जोडी ३ एका घरात असलेल्या दोन सोंगट्या [स युग] ०डाव-पु सोंगट्या-फाशाच्या खेळातील एक डाव ज्या दानानें दोन सोंगट्यांचें जुग एकदम नेता यतें असें दान उदा० पोबारा, छक्का, पचरा दसदोकरा इ० ०दान-न १ जुगडाव पहा २ सुयाळे कागद वगैरे ठेवण्याची पिशवी जुजदान

**जुगट**—न गुजग (वर्ण विपर्यासानें)

**जुगणी**—न [illegible] (छातीवरील) [जुग, हिं ]

**जुगणें**—अक्रि १ भाग तुकडे जोडणें जुळविणें २ (ल) एकरूप होणें एकमत होणें, सिद्धयनुकूल परस्पर सुसंगत

होणें (दोन माणसांचे विचार, उपाय, पसंत) 'एक वेळ पडला सावट, दुसरा पडला मग यामुळें त्यांना कामात शोधावे जुगत नाहीं.' ३ मनजुगा पडणें; सख्य होणें, सहजोड होणें (पशु, पक्षी; स्त्री.नरी यांची). ४ मिलाफ करणें, परस्पर पटणें; जुळणें. अनुरूप पडणें होणें (स्कंधाचे वगैरे कोडी). 'आम्ही कापड येत हे होतें परंतु कापडवाल्याचें .आमचे जुगत नाहीं' ५ संभोगार्थ स्त्रीपुरुषांनी एकत्र होणें. ६ अनेक गोष्टया एका घरांत देणें. [सं युग] जुगल-स्त्री. १ जमाव, समूह. २ सख्य; मिलाफ, एकतानता (पशु, उपाय या वी). 'या मृदंगाची आणि गवयाची जुगल चांगली होते.' ३ लालना; बरोबरी. ४ जोडीनें गाणें; मेळणें; दुसऱ्याशीं आपलें जमविणें, गाय; एकमेकांचा संयोग. 'याला पुढें तसें गाता येत नाहीं पण मागून सुर देण्याविषयीं जुगल चांगली करितो.' ५ मन्न केलेलें लालन, ममत्व ६ (ग्रामा) जुग; जूट; जोडी. [सं युगल, प्रा जुगल] जुगविणें-१ एकत्र जोडणें, संयोग करणें. २ मेळ बसविणें; एक मिलाफ करणें ३ सख्य करून देणें; मैत्री करविणें. [जुगणें प्रयोजक]

जुगत--स्त्री. १ युक्ति, शक्कल; चातुर्य; हिकमत; व्यावहारिक हुषारी. २ जुगूत या अर्थीहि केव्हां केव्हां योजितात. ३ जुगूत पहा [सं. युज्-युक्त, युक्ति. फा. जुगत] जुगताई-स्त्री जुगत अर्थ १ पहा.

जुगंत—वि एकत्र; मीलित. 'कृपि झाले जुगंत.।' —सभा ४८. [जुगणें]

जुंगा—वि (ग्रा) तरतेज, हुषार; चतुर, कुशल.

जुंगा—पु शिंगा नावाचा मासा. 'जेथ सावजाचा धुधुवाटीं।' जुंगियाचां रगडनाटीं' —शिशु ३१९.

जुंगाड—न १ (कों.) झाडें, झुडपें, वेली इत्यादींच्या पाना-फांद्यांची गुंतागुंत, जुंबाड, दाट विस्ताराचें झाड, झुडप, जाळी. २ (ल) अगडबंब माणूस, रेडा, साप, मासा इ०. [जुगणें]

जुगांत—न प्रलय, घनघोर युद्ध [सं युग+अंत]

जुगार—पु द्रव्यप्राप्तीच्या लोभानें किंवा नशिबाची परीक्षा पाहण्याकरितां कवडी‌गंजीफांच्या खेळांत पैसे लावून खेळणें; जुवा, द्यूत, दर्त [सं द्यूतस्थ, प्रा जूआर] जुगारी-ऱ्या-वि जुगार खेळणारा, जुगाराचें व्यसन असलेला

जुगुप्सा—स्त्री निंदा निर्भर्त्सना; दोष देणें, लाजवणें [सं] जुगुप्सित—वि निंदिलेलें, दोष दिलेलें, तिरस्कृत [सं] ०दृष्टि—स्त्री. (नृत्य) डोळ्याचा मध्यभाग व पापण्या आकुंचित करणें हा भाव जुगुप्सायोतक आहे

जुगूत—१ कल्पक युक्ति, योजना, खुबीदार कल्पना ... सूट २ कला, कौशल्य; हातोटी, कार्याची सुरेख व्य... ठेवणी. ३ कावेबाजीनें प्रपंच चालविणें; निर्वाह करणें ... दशरथ कसा तरी संसारगाड्याची जुगूत करितो.' जुगत पहा [सं. युक्ति; हिं. जुगत]

जुगूल—स्त्री. जुगत पहा.

जुंगी—स्त्री. १ (गो.) युद्ध. २ निग्रह. जुंगा पहा

जुगोटा जोगी. जोगिड्डा—पु. पारव्याच्या रंगासारखा, पुच्छभर शेंव व आखूड पाय. हा निरिच, मोर, सगा यासारखा आहे, पाळत नाहीं. —पदलापूर ३४८. [सं. योगी]

जुग्म—न. युग. [सं. युग्म]

जु(जुं)ज-झ—स्त्री. युद्ध; लढाई; झोंबी; भांडण; कज्जा. 'न होमेंची जुंझ भांडण।' —शिशु १२०. [सं. युद्ध, प्रा. जुंज]

जुंजणें, जुजणें-अक्रि. लढणें, भांडण करणें. जुजता-वि. १ भिडणारा, दोन विरुद्ध दिशांनीं समोरासमोरून येऊन एकमेकांत मिळणाऱ्या तुळया, काटवा, ज्याचे तिरंगा टेकलेल्या व एकमेकांचा एकमेकांना आधार आहे असा. २ एकेका टोंकदारा वेगवेगळी कामास सुरुवात होऊन मध्यावर एकमेकांस मिळणारें (काम, शेताची कापणी इ०) ३ कागदाच्या वरील व खालील बाजूकडून लिहिण्यास प्रारंभ करून मध्यें येऊन संपणारें (लिखाण). [जुज, जुंज].

जुजदान—न. जुगदान पहा. कापडाची पिशवी, बटवा (कागद, पानें, सोंवळ्याची चीजवस्तु इ० ठेवण्याकरितां) 'जुजदान देखील आणिलें त्यांत दरबारखर्चाची यादी' —रा १०७१. [फा. जुज्+दान]

जुजबी—वि १ किरकोळ, तात्पुरती, सरासरी निर्वाहापुरती; कमजोर बांधणीची (इमारत) २ लहान प्रमाणावर चालविलेला; तात्पुरता, किरकोळ; यथा कथंचित निर्वाहापुरता (व्यवहार, धंदा). ३ थोडा, हलका, काहींसा, किंचित, क्षुद्र 'नासि जुजबी फौज आली.' —रा १८३१. ४ कामचलाऊ, तात्पुरता, हंगामी. 'नंतर ऑर्डिन सभेनें काहीं किरकोळ ... होऊन हवा सभेनें आपल्या स्वर्नेत काहीं जुजबी ... करण्याबद्दल ठराव केले' —पार्लमेंट ७४६ ५ आटो... (संसार) —क्रिवि. वेतावातानें; हद्द हद्द, तुरळक. [अर. जुज्वी]

जुजरशी—स्त्री. जुजरसी—सी—स्त्री १ काळजी, चिंता; लक्षपूर्वक ... ...ण्याची, पदार्थांची) (क्रि० ठेवणें, राखणें, करणें; पाहणें) ...क चौकशी. 'शहरचे दरवाजे तीन चार खुले, तेथें गाड... ...न 'येणाऱ्या जाणाऱ्याची जुजरसी बहुत आहे' —रा ... २ काळजीपूर्वक व्यवस्था, संभाळणी (काम, धंदा यांची). ...ी जुस्तसी]

जु(जुं)जाट—झुझाट पहा.

जुजा(झा)र—वि युद्धकुशल; युद्धाची आवड असणारा; वीर; शूर, लढवय्या. 'आधीं जुंजार; तुवां होणावें। मग जुंजावया

शस्त्र घेयावें।'—ज्ञा १८ १२८३ —न लढाई, युद्ध (क्रि० लागणें, होणें) [जुज]

**जुजुत्सु**—पु जपानमधील एका प्रसिद्ध खेळाचें नाव या खेळात शक्तीपेक्षा युक्तीचा जास्त उपयोग करून आपल्यापेक्षा अधिक भारी अशा गड्यास चीत करावयाचें असतें [जपानी तुल० स युयुत्सु]

**जुज्वियात**—न किरकोळ गोष्टी तपशील 'आम्हाकडील जुज्वियातचें फडच करून यावें'—रा ५ ११ जुजवी पहा [अर जुज्वीयात्]

**जुंझा-वात-वायु-मारुत-पवन**—पु (काव्य) झंझावात इ० पहा

**जुटणें**—अक्रि १ जोडले जाणें संयुक्त होणें मिळणें २ एकत्र जमणें, गोळा होणें नमणें ३ जुडणें याबद्दलहि कधीं कधीं योजितात [स युज्-यूय म जूट]

**जुटी**—स्त्री १ जूट ऐक्य मिलाफ २ टोळी राघ ३ गर्दी, जमाव, समाज [जुटणें]

**जुट्टा**—पु दहा विटा-कौलाचा समुदाय, ढीग [जुटणें] 'एवढेसी पडवी शाकारायाला पाचवी जुड कौलें लागलीं'

**जुडगा-गें, जुडका-कें**—पुन भारा, गड्डी पेंटी, लहानगा गड्डा, जुडी (आगकाड्या, भाजी, उसाची कांडीं, वारू, केस, इ०ची) [जुडणें]

**जुडवें**—क्रि (गो) आवळून करणें तुट्न पडणें जुडणें पहा

**जुडणी**—स्त्री १ जुळणी, साधणी जोडणी २ समुदाय, जुडगा [जुडणें]

**जुडणें**—अक्रि जुळणें १ लागणें, प्रवृत्त होणें, जोरानें धावून येणें, घुमणें, जुळणें 'जेवायाला सर्व जुडतात परंतु कामास कोणी जुळत नाहीं' २ एकत्र जमणें, येणें 'तो एकटा होता तोंपर्यंत मी त्याच्याबरोबर भांडलों मग ते जुडून येताच पळालों' ३ मिळणें जमणें, जुळणें, एकमत होणें विरोध न येणें (अनेक यातम्या, मनकूर याचा) ४ भिडणें विलगणें खटणें मथुरा जुडे अंतरी उडे।'—मध्व ४० —सक्रि १ व्यवस्थशीर व क्रमानें एकत्र करणें, जुळणें एकत्र रचणें क्रमानें लावणें २ लावणें, बसविणें, वर बसविणें, ठेवणें [स युज् प्रा जुडिअ]

**जुडा**—पु १ जुडगा समुदाय (आगकाड्या, भाजी, पेन्सिली, अगाडी याचा) २ गाठ जुडी बुचडा अंबाडा (केस, दोरे याचा) [जुडणें] **जुडाई**—स्त्री १ मिलाफ करणें नीतणें जोडणी २ जोडलेपणा संयुक्तता जूट ३ जुळविण्याची मजुरी ४ (गवंडी) बांधकाम

**जुडी**—स्त्री लहान जुडा जुडा पहा

यशो ३ ५१

**जुडी**—स्त्री १ सरकारी नोकरांना त्यांच्या नोकरीबद्दल बक्षीस दिलेली इनाम जमीन २ या जमिनीवरील सरकारी सारा, पट्टी

**जुडीव**—वि व्यवस्थित रीतीन जोडलेले, ठेवलेले, बसविलेले [जुडणें]

**जुतणें, जुंतणें**—सक्रि (व) जुंपणें, जोडणें 'तरी संसार पातीं जुतलिया। भवताचि असावें।'—ज्ञा ८ ४४ [स युत]

**जुतरी जुत्री**—स्त्री १ लहान ओढा, नाला, ओहोळ २ कोरडा ओढा ओढ्याचें कोरडें पात्र (प्र) झुतरी-त्री पहा

**जुना, जुती जुतें**—पुस्त्रीन पायताण, जोडा, वहाण, चप्पल (एक अथवा जोड) **जुती-ते पैजार**—स्त्री १ खेटराखेटरी, जोडा जोडी वाहणांनीं एकमेकास मारणें (क्रि० करणें, होणें, चालणें) भांडण 'सभ्या भावात देखील जुतेपैजार होते'—आगर ३ १८४

**जुती**—स्त्री जुंपणी

**जुत्पत्ती**—पु (काव्य) रणकुशल योद्धा, मोठा वीरा लढवय्या शूरवीर जेठी 'तो अंगद दक्षिणप्रांतीं। सर्वे देवोनि जुत्पत्ती। रामें धाडिले सीताशुद्धीसी।'—भारा किष्किंधा १६ १५१ [स युद्धपति]

**जुदा**—वि निराळा, वेगळा भिन्न, अलग [फा] **जुदाई-गी**—स्त्री निराळेपणा, वेगळीक, अंतर 'पंडित प्रधान व नबाब निजाम याचा तरिका एकदिलीचा कदिमापासोन चालत आला, हल्लीं त्यासी जुदागी नाहीं'—रा १० १६७

**जुनट, जुनवट**—वि १ जीर्ण प्राचीन, जुना २ अनुभविक, जुन्यासारखा 'जुनटु जुझारू हा वसु। नाहीं जयातें वस्तु।' —गीता १ ४३७ [म जीर्ण, प्रा जुण्ण+वत्—वट प्रत्यय] **जुनवट**—स्त्री नागवेली, वड इ० झाडाचीं पिकलेलीं पानें **जुनवान**—वि १ पिकलेलीं (पानें) २ जुनाट (झाड, वनस्पति)

**जुना**—वि १ पुराणा, प्राचीन पुरातन अर्वाचीन काळचा नव्हे असा 'आता जुनीं माणसें फारशीं राहिलीं नाहींत' २ फार दिवस वापरलेली (वस्तु) झिजलेला फाटलेला (जिन्नस) ३ समाप्त होऊन त्यास बराच काळ झाला आहे असा (व्यापार इ०) 'तुम्ही पंक्तीच जेवणार जेवून उठून जुने झाले, तरी तुझें जेवण होतच आहे [स जीर्ण प्रा जुण्ण गु जूनु] **०जोड**—पु दणकट दिवस टणक सशक्त (म्हाताऱ्या माणसास लावतात) **जुनाट**—वि १ जुना प्राचीन, फार दिवसाचा जुन्या काळचा 'आताचे मनुष्यापेक्षा जुनाट मनुष्य प्रामाणिक' २ पक्व, पक्व (बुद्धि विचार अनुभव झाड) या अर्थातें जुनाटलें झाड पाडून टाका **०पाना**—वि बराच जुना जुनापुराणा, वापरलेला, फाटलेला (कपडा भांडें घर) ३ जुना अर्थ ३ पहा **०पापी**—वि पुरा, बहाणा (म्हाताऱ्याबद्दल वापरतात) **०पुराणा**—वि १

जुनाट, जीर्ण, पुराणा. २ वापरलेला, झिजलेला; जुनापुराणा. ३ पर्वील उमेदीचा पार दिवसांचा (माणूस) ४ बहुत काळचा, जुना (कामदार, हुद्दा, घर, व्यापार) [जुना+हिं पुराणा] ०जुनावणें–अक्रि १ जून होणें, पक्‍व होणें, पक्के होणें, स्थायिक होणें, दृढावणें, टिकाऊ पणा येणें (वस्तु झाड, बुद्धि, अभ्यास, सल्ला, रोग इ०) २ (वाईट अर्थानें) तारुण्यातील जोर जाणें (पुरुषाचा), उतरत्या वयास लागणें जुनेरें, जुनेर–न (कों.) जुनें वस्त्र (विशिष्ट वापरावें जुनें लुगडें)

जुनरहुरहुनर—पु हिकमत, हुन्नेगिरी, युक्ति, करामत, लबाड, उपाय (हा शब्द व्यापक अर्थानें वापरतात) 'जुनर हुर हुनर करून मी पोट भरतों' [हुनर ची द्वि, किंवा जुनर+हुनर]

जुनरी—स्त्री जुनर करणारी स्त्री इ० जुनरी हरहुनरी=जुनर हरहुनरांतील लायकी हुशारी व गोंडगिरी वर्णन करताना वापरतात.

जुप—न कोठार भांडार 'नातरि देव–गजरांचीं जुपें। उघडिलीं मज पापा।' –भा ७३

जु(जुं)पण-णी—स्त्री १ जुपण्याची क्रिया २ जुंपणी ३ जुपण्याचा सादृश्यपणा, योग्यता, जोडगाडीशीं जुळतें असणें 'या बैलाची त्या बैलाची जुपण आहे' ४ (कु) बैलास बांधण्याची दोरी. –न (राजा) गाडीची धुरी, इगाड व जूं याना बांधणारी दोरी २ जाड, मजबूत पदराची–दुपेडी तिपेडी दोरी ३ (विणकाम) मागाच्या दुसऱ्या टोकाजवळचें सूत ताणणारें धनुष्याकृति लाकूड, या लाकडानें व गुरड्यानें हें सूत ताणलें जातें गुरडा पहा ०जु(जुं)पणें–उक्रि १ जोडणें २ (ल) गुंतविणें, कामास लावणें, लागणें ३ प्रारंभ करणें, व्यवस्था लावून देणें (काम, उद्योग, इ० चा) ४ प्रवृत्त होणें (युद्ध, वाद इ०स), सुरू होणें 'त्याची बोलता चालता अकस्मात लढाई जुंपली' [सं युज् प्रा. जुप्प] –न १ जुंपण अर्थ ३ पहा २ (विणकाम) कापड विणून झाल्यावर उरणारी एक ताण्याची शेवटें दुसऱ्या कापड विणावयाच्या ताण्यास जोडण्याचें साधन ३ (ल) उत्पत्ति, रचना 'जे पहिलें सृष्टीचें जुपणें।' –ज्ञा १४ ५७ ५ बैलाच्या गळ्यातील दोरी जोखडाचा भाग, दोरी, जुवणी, जुवाली पहा [सं युज्, प्रा जुप्प]

जुपन—न (व) जुपण पहा आऊताच्या जुंपण्याच्या चरडी, चन्हाट, वारती, वागरा मिळून

जुफण-णी-णें—जुपण–णी–णें पहा

जुफा—पु रानगांजा –मुव्या ११०

जुबा—पु पायघोळ झगा (सर्वांत वर घालण्याचा), झब्बा 'जुबा मोठ्या पटीच मखचा' –ऐटि २ ५० [फा.]

जुवाड–डा–डें जुंबडा–डें, जुंमाड—न १ वेणी किंवा शेंडी यांचा डोक्यावर बांधलेला बुचडा, गाठ २ समुदाय, झुबका, जुडगा (काड्या, केस, घोस, गुच्छा, केस, मोत्यांचे गट इ० चा) –दा ११ ११३ 'नुशिया भुजावें जुंवाड। हें भी कवीन दाट गंड।' –कथा २,१३ १४५ ३ मागाचें वेटोळें 'हातें रसिकेशी सर्पांचे। मुकुटीं सर्पांचीं जुम्बाडें।' –मुआदि २९ १०६ ४ दाट पानांचा वृक्ष, झुडुप, जाळी, झाडांच्या फांदीं, पानांची गुंता गुंत, दाट झाडी 'नाना वृक्षांचें जुंवाड।' –दा १० ९.२ ५ (विशिष्ट जुंवाड), माणसांची टोळी, समुदाय. 'माणसांच्या जुंवाडचीं जुवारें धावलीं' जुगाड पहा [सं युग्म, प्रा जुम्म, तुल० हिं जवड]

जुब्द(बद)तुल्–आमासील(अक्रान्)वल्—थोरात व समवयस्कांत श्रेष्ठ 'जुबदतुल अमासील बळवंतराव दत्ताजी देशमुख' –रा २० ११८ [अर जुब्द=सार, नवनीत, फा ]

जुमडा—पु (व) बुचडा जुवाड पहा

जुमला, जुम्ला—पु १ एकूण जमा, बेरीज, आकार 'नाकिर्दी अमेद जुम्ला पैकी। तें विर्दी बगाची निको।' –मैस्त्र (राजाधिकार) ११८ २ समुदाय ३ शंभर घोडेस्वारांची पलटण, शंभर–दीडशें शिपायांचें पायदळ [अर जुम्ला] जुमलेदार–पु १ जुमल्यावरचा अधिकारी, शताधिप –राव्यको ६ १ २ जमाखर्चाच्या खात्यांतील मुख्य हिशेबनीस

जुम(म्म)स—१ भय, धास्ती, दरारा 'येवायेवी जुमस खाणार नाहींत' –पेद ४ ५ २ वचक, फिकर जुमान पहा

जुमान, जूम, जुमास, जुमस—पुस्त्री १ जागा सोडणें, सरकणें, बदलणें, हार खाणें, हटणें (नेहमीं निषेधार्थी उपयोग) (क्रि० खाणें, प करणें) 'पाऊल जूम खात नाहीं किंवा खाऊं देत नाहीं' 'हा सावकार, हे दुराणी, हा हीनताप मला जुमान खाऊं देत नाहीं' २ धाक आदरयुक्त भीति, दरारा (व्यक्ति, वस्तु यासंबंधीं फार भयप्रद किंवा थोर अशी कल्पना) (क्रि० खाणें, पाळणें, पडणें, असणें) 'तूं डोळे वटारले म्हणून तो का तुला जुमान खातो आहे' [फा जुंबिश्=गति व फा गुमान=कल्पना, विचार. या दोन शब्दापासून वरील अर्थाचे शब्द बनले आहेत] जुमानणें–सक्रि १ किंमत मानणें, मान देणें, महत्त्वाचें, मातब्बर किंवा भयंकर आहे असें समजणें, भय बाळगणें, पर्वा करणें (निषेधार्थी उपयोग) 'जो सरकारला जुमानत नाहीं तो का कोतवालाला जुमानता?' २ कमाली लावणें, अजमावणें 'गोनी जुमानून पहा' ३ अनुल्लंघनीय, दुर्निवार आहे असें मानणें ४ गाठणें [फा गुमान]

जुमारात—स्त्री गुरुवार [अर हिं जुमेरात]

जुयटें—न (कों) नदींतील, खाडींतील बेट, नदीच्या पाण्यातील उघडा पडलेला लहानसा भाग [सं द्वीप जुवें पहा टें= अल्पत्वदर्शक]

जुर्रई—वि घोड्याचा एक रंग –अश्वप १ २८

**जुरत**—स्त्री धाडस, ताकद, मर्दुमकी, विशाद, शौर्य (निषेधार्थी प्रयोग) 'जुरत कोणाची पाहील मजकडे नजर करून वाकडी' –पला ६ 'मुर्बईवाले याची काय जुरत की कल नेतिकर ठगवितील त्यास तफावन करितील' –रा ७ ३५६९ [अर जुर्अत्] ०दार **जुरद्दार, जुरती**–वि धाडशी, शूर, धीट, हिंमतदार. [फा] ०**मेहनत**–स्त्री धैर्याची कोशीस 'पूर्वीपासोन जो रोणी जुरत मेहनत करीत आहे त्यास मुलखाम व खजान्यास व फोजेस कमी नाहीं' –दिमरा १ ३४

**जुरदा**—वि (माण) उत्तम

**जुरा**—पु ससाणा [अर जुर्रा]

**जुरा, जुरावावरा**—वि कुर्रेबाज, अकडबाज, रंगेल, नटवा 'सवाई यशवतराव जुरा।' –ऐपो ३९१

**जुर्बा(र्मा)ना**—पु दंड, शिक्षा [अर जुर्म=गुन्हा, अर मूळ जरीमान फा जुर्माना]

**जुलयगार**—स्त्री मिरवणुकींत ताबुताच्या बरोबर तरवार आणि भाला नेतात तो [अर जुलफकार=भोंक पाडणें, अलियाच्या तरवारीचें नाव]

**जुलमाना**—पु दड [अर जर्माना अप.]

**जुलाव**—पु १ ढाळ होण्याचें औषध, ढाळक, रेचक २ त्या औषधानें झालेला ढाळ, रच. [अर. जुलाब्]

**जुलूप**—न केसाचें झुलप, काकपक्ष [फा झुल्फ]

**जुलूम**—पु १ जबरदस्ती, जबरी, बलात्कार, परपीडा, अन्याय, अन्यायाचा दाब, प्रतिरोध २ जोराचें कृत्य, दीर्घ प्रयत्न, अतिशय श्रम एखाद्या गोष्टींत बेसुमारपणा या अर्थानें उपयोग होतो अतिशयपणा, जाजती, कमाल 'आज पावसानें जुलूम केला' 'पोरानें रडण्याचा जुलूम केला' ३ अतिशयवैपुल्य किंवा अवाढव्य आकारमान पाहून झालेली आश्चर्यचकित मनोवृत्ति दर्शविण्यासाठीं योजितात [अर झुल्म्] (समासात सिवा सामान्य रूपात जुलम असें रूप येतें) मामाशब्द– **जुलमाचा रामराम**–पु (आपल्याशीं नीट न वागणाऱ्या अधिकाऱ्याला तो जुलूम करील या भीतीनें, केलेला रामराम) निरुपायानें नाखुषीनें पत्करलेली गोष्ट, सभ्यपणें पण कडक हुकूम करून केवळ करावयाचाच पाहिजे नाहीं तर शिक्षा होईल अशा धाकामुळें केलेलें काम सक्तीनें करून घेतलेलें काम, नोकरी इ० 'आज या घराला रामराम ठोकण्यापेक्षा घटकाभर जुलमाचा रामराम पत्करला' –भा ९० **जुलमाजुलमीं, जुलमानें, जुलमाजुलमानें जुलमाजर**–क्रिवि १ जबरीनें, बळजोरीनें २ अतिशय श्रमानें कष्टानें जीव तोडून, होईल तितका प्रयत्न करून, युक्तिप्रयुक्तीनें [जुलूम द्वि] **जुलमी**–वि जबरदस्ती करणारा, कठोर प्रजापीडक अन्यायी [अर झुल्मी] **जुलूमजबरी**–स्त्री बलात्कार जुलूम ०**दस्ती–जास्ती**–स्त्री १ जुलूम –राजवाडे ०२ १२० २ जुलमाचा, जबरदस्तीचा व्यवहार किंवा आचरण, करडा अंमल, सक्ती, जबरदस्त उपाय [अर झुल्म+फा दस्त, फा जिआस्ती] ०**पादशाही**–स्त्री अतिशय जबरदस्ती, बलात्कार, बळजबरी, कडकपणा, मर्यादातिरेक, अमर्याद कृत्य (एखाद्या कृत्याचा बेसुमारपणा दर्शविण्यासाठीं योजनात) [अर झुल्म्+फा पादशाही] ०**बाजार**–पु ठराविक दिवसाहून अन्य दिवशीं भरावयास सांगितलेला बाजार

**जुलूप-स**—पु १ राज्यारोहण २ समारंभ, थाट, डामडौल, भपका, वैभव 'तिकडून दीडप्रहर रात्रीस मोठे जुलुसानें फिरिंगियासहवर्तमान शहरांत आले' –रा १ २७ जलूप पहा ३ मिरवणूक 'आज मुसलमानाचा जुलूस निघणार आहे' –वि वचनदार [अर जुलूस्]

**जुले**—पु इग्रजी वर्षाचा सातवा महिना [इ]

**जुल्कद्र**—वि. प्रतिष्ठित 'जुल्कद्र कृष्णराव नारायण' –रा १९ १०० [अर झुल्+कद्र]

**जुल्हाई जुलही**—पु मुसलमानी कोष्टी, विणकर [फा जौलाह्, हिं जुलाह्]

**जुंव**—न जोखड जू पहा

**जुवडी**—स्त्री (खा) जोडजू, जोडणी जुवाड–डी पहा

**जुवणी**—स्त्री १ कोळप्याची जोडी २ (राजा) जुपणी, जोतें (बैल इ० काच्या मानेस अडकावयाचें)

**जुंवळ**—न जुळें, जुळींमुळें, एका गर्भापासून उत्पन्न झालले दोन प्राणी [म युगल, प्रा जुगल, जुवल]

**जुवळा**—वि १ जुळा, जावळा जुळ्यापैकीं एक २ दुहेरी, जोडीनें वाढणारी (फळें) [जुवळ]

**जुंवळी**—स्त्री १ जोडपें, जोडा, जोडी युग्म २ जुळी [जुवळ]

**जुवा**—पु सांधा, जोड, जवा, एकमेकाशीं बरोबर मिळणें, जोडलें जाणें जवा पहा 'तीं (कौले) एकमेकात जुवा होऊन बसतील अशीं असावीं –मॅरट ८२ [स युज्]

**जु(जु)वा जुवें**—पुन (कों) नदींतील बेट उदा० कुंभारजुवें गोंव जू पहा [स द्वीप]

**जुवा जुवार**—पु १ फाशाचा खेळ द्यूत जुगार २ जुगारी 'तें निगों कीं जुवाराचें। टिटघर।' –ज्ञा १८ ६७३ [स द्यूत]

**जुवाड जुवाडी**—स्त्री ल्हान जोखड, नागराच्या चाहुरीच्या वगैरे पुढील बैलाच्या मानवरील जू [स युज्, प्रा जुभ]

**जुवा(मा)मर्दी**—स्त्री जवामर्दी, शौर्य जवानमर्दी पहा

**जुवारी**—वि जुगारी 'पाँ भाट का नागारी। सामान्य मिया का जुवारी।' –ज्ञा १७ २९६ [सं द्यूत, प्रा जूअ जूआरि=द्यूतकार]

**जुगारा**—स्त्री चौधळा नागी (धान्य) (जुगारी वागनी हे शब्द पुण प्रांतात आणि कोंकणी मंडळींत प्रचारांत आहेत परंतु देशावर त्याला जावळा सनगुणा म्हणतात [प्रा दे जुआरी हिं]

**जुगाली**—स्त्री (वर्‍हा) बैलाला जुंपण्याची दोरी जुवणी पहा [जू+आळी]

**जुगाज**—पु (गो) न्यायाधीश आपल्या वडिलांच्या आज्ञेच्या एका जुगीजाला या मिळणगारीच शेकऱ्याची चढी चमक लागली होती —सह्याद्री १०४ [पोर्तु ? जज्न]

**जुगराज**—वि फाशांनी धूत खेळणारा जुगारी [जुवा]

**जुगबाजी**—स्त्री द्यूत फाशाचा खेळ जुगार खेळण्याचा नाद

**जुग्वा जुगराज जुगबाजी**—जुवा इ० पहा

**जुगी**—स्त्री आनंद 'विश्वे घ्यावा साम्नून। ही एक जुगी जुटी। —किरकविता पृ १८३ [स जुष्=मानोपविणे]

**जुस्त**—वि (कु) योग्य बरोबर [स युक्त-युक्त तुल० इ जस्ट फ्रें जुस्त]

**जुळणा**—स्त्री १ परस्पराचा सयोग जुळण्याचा व्यापार मळानें किंवा व्यवस्थेशीर क्रमवार जुळणें एकत्रपणा रचना योग्य आणि नियमित एकत्रीकरण जुळणें पहा २ मेळ तुलना समता, जसे जवा त्या पदार्थाची आणि अभागाची जुळणी लागली होती आमचे जुळणास कोणी मिळत नाहीं [जुळणें]

**जुळणें**—उक्रि १ नियमितपणें एकावर एक ठेवणें (घरी वस्तु) बाजूला जाडणें (कापड मोठें करण्यासाठीं त्यास तुकडा) एकापुढें एक लावणें माडणें किंवा ठेवणें ही कळाशी सारखी जुळत नाही २ (शब्दश आणि ल०) मेळात एकत्र ठेवणें व्यवस्थित जुळविणें (यत्राचे भाग कवितेचे चरण धर्माची खाती पुस्तकें कागद पान ठस इ०) कागद पसरले आहेत ते नीट जुळून ठेव मेळ बसविणें एक जुळणी करणें एकत्र आणणें ठेवणें (अनेक हिशेब मजकूर नानाविध स्वभाव) तुम्ही गोष्ट सांगता पण हिचा पूर्व पर संबंध जुळत नाहीं [स युज् युगलित प्रा जुगलिय]

**जुळलेला**—वि १ एकत्र केलेला सयुक्त २ (वाढ) सव्वा सात किंवा आठ दात उगवलेला (बैल) हा बैल जुळलेला आहे त्याला सर्व दात आठ आहेत

**जुळव**—पु भारा जुडी —वदलापूर ६० [जुळणें]

**जुळविणें**—सक्रि एकत्र करणें मेळ घालणें [जुळणें प्रयोजक]

**जुळा**—वि १ जावळा जुळा आवळ्याजावळ्यांपैकी एक २ दुहेरी भवळाजवळ एकमेकास चिकटून उत्पन्न झालेली जोडीनें एकत्र वाढणारीं (दोन फळें) जुळा आवा फळें [स युगल]

**जुळाजु(ज्यो)ळ जुळ्याजुळव**—स्त्री १ व्यवस्थित मांडणी नीटनेटकी व्यवस्था (अनेक भाग व्यक्ति इ० ची) जुळणी पहा २ अनेक ठिकाणाहून आणून एके करणे मांडणे (वस्तु) तयारी [जुळणें]

**जुळारी**—पु मोडप जोडणारा जोडारी (इ) ज्वाइनर [जुळणें]

**जुळी**—स्त्री १ गड्डा नीग गड्डा जुडी युग्म जोड (विडयाची पानें पत्ते कागद इ० एकाच जातीच्या आणि एकाच आकाराच्या वस्तु) २ दोन वाळ्यांच्या दागिना दोन रत्नें किंवा सोनेरी मणी असलेले दोन तार ३ एकत्र वळविलेली दोन वातींची जोडी ४ (सामा) दुहेरी नाडवस्तु जुवळी पहा [जुळणें] ०दुड—स्त्री काचेच्या मण्यांच्या किंवा हिरव्या पोताच्या दोन पदरांत सोन्याचे दोन मणी घातलेला लहान मुलाच्या गळ्यातील दागिना

**जुळें**—न १ जोड मुलें आवळीजावळी मुलें जुवळ पहा २ यागड्याचा जोड किंवा यागड्याचें जुळें जुळी पहा ३ जोडी दुकल जुग याअर्थी—अंब्याचें—कळ्याचें—पत्त्यांचें—फळाचें—जुळें सापाचें जुळें=सापाचें मैथुन ४ नवरानवरी पुरुषस्त्री, मिथुन [स युगल]

**जू**—स्त्री ऊ (प्राणी) —वदलापूर १२८ [स यूका प्रा जूआ]

**जू**—न १ बैलाच्या मानेवरचें लाकूड जोखड जुव पहा २ (ल) ओझें वाया (नवयदारीचा धंद्याचा काळजीचा इ०) जबाबदारी [स युग् प्रा जूअ]

**जू**—न जुगार धूत छलितया विंदाना—। मार्जी जू तें मी विचक्षणा। —ज्ञा १० २८४ [स द्यूत प्रा जूअ]

**जू**—न (वर्‍हा) नदीतील बेट जुवा पहा [स द्वीप]

**जूग**—न १ मंडळी टोळी जूट त्या पोराचें जूग मोठें त्याच्यामुळें सभेंतील गडबड मोडणार नाहीं २ मंडळ कट समिती सघ ३ (सोंगट्याचा खेळ) दोन किंवा अधिक सोंगट्या एका घरात येणें ४ युग एक दीर्घ कालमान त्यांचें युग हीं चार आहेत युग पहा [स युग]

**जूग**—न (कु नाविक) दोऱ्या (दास्णी, अलाज सुगप) तयार करण्याकरिता केलेलें एक साधन [स युग]

**जूज**—वि थोडें किरकोळ क्षुद्र जूज कामाकरिता आपल्या पश्चात नाखुशी राखणें ठीक नाहीं —रा १९ १० [फा जुज्+न]

**जूट**—पुस्त्रीन १ जूग टोळी मंडळी, जुळलेली मंडळी २ एकोपा मनाचा एकी एकमत्य ३ समान ताळा ताघ दामु दाय वपु ४ नगजूट नगजोड पहा [स यूथ प्रा जूह किंवा स युक्त प्रा जुत्त] ०भाऊ पु हिस्सेदार इ० वर्गीतील परस्पर पुरुष एकत्र कुटुंबातील व्यक्ति

**जुडा**—पु (ना) भरणा कुचडा (फापा) [जुडा]

**जूद**—क्रिवि जास्त लवकर जल्द जूद चलाफ्ना ताबडतोब क्याजागा होयतं करणें —रा १९ ११ [फा जूद] ०तर—वि

विशप लोकर 'नूदत्तर खर्चाची मदत दम्साद पाचा ऐवज दऊन राणा कमन पाच्चावें' –पया ३८७ [शूदत्तर]

**जून**—पु इंग्रजी वर्षाचा सहावा महिना [इ]

**जून**—वि १ कोंवळपणा गेलेला, निबर, राठ, पक्का झाल्या मुळें कठिण झालेली (वनस्पति, फळें इ०) २ (ल) दृढ, परिपक्व घर (चांगल्या व वाईट अर्थी–समज, समजूत, बुद्धि) [जुना]

**जूप**—न अनेक खेळणारानीं चक्यावर उभें राहून प्रत्यकानें एकएक असे गर्गीत पैसे फेकावयाचे ज्याचा गर्तीत पैसा पडेल त्यानें गर्तीच्या बाहेर पडलेल्या (इतरानीं मागितलेल्या) पैशावर नेमका पैसा फेकून मारावयाचा व फेकलेले सर्व पैसे जिंकावयाचे असा खळातील एक सज्ञा, याच्या उलट ताग

**जूम**—पु १ जुमान पहा २ (कों) गलबताकरिता कथ्याचे दोर वरण्याचे एक साधन, जुग

**जूय**—स्त्री (गो) जुईचा वल व फूल

**जूरी**—स्त्री पच [इ]

**जूसर**—न (कुलाबा कों) जोखड –मसाप २ ३ ५२

**जूळ**—न जुळें, दुहेरी वस्तु जुळें पहा –स्त्री (प्रा) एकत्र बांधणें, जुपणें (दोन बैल इ०) (क्रि० घालणें) [स युगल]

**जृंभण, जृंभा**—नस्त्री जांभई जांभळी (क्रि० घेणें) [स]

**जृंभणें**—अक्रि (काव्य) १ जांभई देणें २ स्वस्थता पावणें 'जी! जी! याहुनि लाभ काय? म्हणुनी भूपाळचीं जृंभण।' –आसी ५७ [स जृंभण]

**जृंभावात**—पु ज्यामध्यें फार जांभया येतात असा वातरोग [स]

**जे**—उअ २ कीं, (हा शब्द पुढील विधानाचा दर्शक आहे) 'कारण कीं जे सानुकूळ श्रीगुरु।' –ज्ञा १ ७५ 'त्या पत्रात मजकूर लगाज '२ ज्यामुळें 'कैसें वो तुमचें करण। जे पुन्हा एओ पाहे मरण।' –शिशु ८९० [स यत् पा ज]

**जे**—अ (अशिष्ट) सन्मानदर्शक उल्लेखाचा शब्द जय शब्दाचा अपभ्रंश 'जे देव! जे देव' जय मंगलमूर्ती [स जय]

**जे**—सना (काव्य) जी या स्त्रीलिंगी शब्दाऐवजीं 'न आन नरळनर्सा।' –ऋ १ 'चित्रें गदा मनोरमा गरगर फिरवूनि साडिल जे गा।' –मोकर्ण ९ २६ –अ १ पादपूरणार्थक अव्यय २ अवतरणसूचक अव्यय म्हणते [प्रा]

**जें**—सना कोणतें संबंधी सर्वनाम तें याचें प्रतिसंबंधी जो या पुल्लिंगीचें नपुसकलिंगी रूप

**जेआ**—सना ज्या पदे ठेवी नाभा वरिया। –ऋ २२ [स यत्] ०चेनि–ज्याच्या 'जआचेनि चरणे पुनेतु।' –ऋ १८

**जेउता–ती–तें**—वि जेथ जिकडे 'मग जउती वाम पाहिज।' –ऋ ४ १९१ याच्या उलट तेउता–ती–तें २ जितकें, जेवढें [सं यावत् प्रा जत्तिय]

**जेका**—उअ (काव्य) कीं, (पुढील वाक्याचा दर्शक) का पहा 'जेका लंका बसली नवती पै।' [जे+का–एकाच अर्थी]

**जेगट**—न १ झेंगट, तास वाजविण्याचें धातूचें घड्याळ, हातघड्याळ (काशाचें) 'तव जेगट पीटानिलें। मध्यरात्रीचें।' –शिशु १६६ २ भिक्षेकऱ्याची वाजविण्याची थाळी, ताम, जगट पहा 'माथा सेंदुर दात खाली। जेगट हातीं सटवीचें।' –तुगा ४१६ ३ एक वाद्य (विशेषत देवळातील) 'जेगट मृदंग टाळ।' –दा २ ७ २४ [ध्व]

**जेगा**—न डोईवरील (पागोटयाला बांधण्याचा) एक मर्दानी अलंकार 'जेगा व शिर्पेच दिला' –ख ८ ४००० [फा जीघा]

**जेगोपाळ**—उअ संबोधन जय गोपाल! नमस्कार या अर्थी मारवाडी, वाणी, भाट इत्यादिकात रूढ

**जेजाणें**—न युद्ध, लढाई झुजणें पहा

**जेजाल**—स्त्री फिरविता येण्यासारखी लांब नळीची बंदूक 'रोखिल अघाडी जेजाला।' –ऐपो ११८ 'जजाल जुबर बाण करी वळवळ।' –राला १०१ [हिं जजाल] **जेजालन्दाज, जेजाल–बरदार**–पु जेजाल उडविणारा, डागणारा गोलंदाज [हिं]

**जेजावंती, जेजेवंती**—स्त्री (प्र) जयजयवंती एक रागिणी

**जेजाळ**—पु त्रास, जंजाळ पहा

**जेजे**—स्त्री त्राम, श्रम, उपद्रव, यातायात, कंटाळवाणी गोष्ट (क्रि० करणें देणें पडणें, पावणें, सासणें)

**जेजेकार**—जयजयकार पहा

**जेजेवंती**—स्त्री एक फुलवेल

**जेठ**—पु (खा) वडील दीर १ (कुग) ज्येष्ठ महिना [स ज्येष्ठ, प्रा जट्ठ, सिं जेठु]

**जेठ**—क्रिवि (खा) जेथें 'दूर जागा पाहिला तुहा बारा नाहीं नठ।' –होला ५३ [स यत्र]

**जेठ जेठया**—वि वडील ज्येष्ठ –बदलापूर २९ [स ज्येष्ठ]

**जेठणें**—उक्रि घट्ट ताणून बांधणें आवळणें **जेटून बांधणें–धरणें**–नाणें याचा रूढ प्रयोग

**जेठनट जेठाडी**—पु ज्येष्ठ महिना [स ज्येष्ठन्]

**जेठा**—पु गुडघे उभे करून बसल्यावर कमर व गुडघ्याच्या भोंवतीं वस्त्र गुंडाळून बांधतात तो प्रकार (क्रि० मारून बसणें) 'जेठा घालून सभे बैस।' –गुच्छधर मूर्खांचीं लक्षणें ७७ ०मारून बसणें–१ जम पहा २ (ल) उद्योग नसणें स्वस्थ बसणें

**जेठा**—पु दुसऱ्याचा दाढलेला पहिला आणि मोठा रस [स ज्येष्ठ हिं जेठा] ०माल–(व) पहिल्या प्रतीचा, उत्तम माल

**जेठाणी**—स्त्री (खा गु) थोरली जाऊ [स ज्येष्ठ प्रा जेठ स्त्री]

**जेठा**—पु १ मल्लविद्येतील, कुस्तीतील 'बोटि जेठा लागे। त्यांतील मान। शिरसाणी।' –मध्व १७ २ ज्येष्ठ, श्रेष्ठ, थोर 'मनोवर्गी थोरु जेठा।' –मुग्रभा ११.६६. [सं. ज्येष्ठ, म जेठ]

**जेठाडी, जेठाहें**—न ज्येष्ठाचा पाणगा पाऊस. [ज्येष्ठ]

**जेड**—पु (वे) कोडें [फा जाड]

**जेडला**—क्रिवि (चि) जेव्हा [म यारा, प्रा जेत्तिअ]

**जेडवळ, जेडोळ**—क्रिवि १ वाटेल तेथपर्यंत, जितका वेळपर्यंत २ जितका वेळ, ज्याच्या वाटेल तेवढा [जेवढा+वेळ]

**जेणॅ**—न जिणें पहा

**जेणें**—अ ज्यायोगें, ज्यामुळें 'जेणें गद शांति पावे।' –दा १६ २ [सं यद्, प्रा ज, म जे+णें–एणें करून] ०करिं, करून–ज्यायोगें, मुळें 'जेणेकरिं निःसंगार होय।' –वेच १.२७.

**जेतव्य**—वि जिंकण्यास योग्य असा [सं]

**जेता**—वि सं जिंकणारा, अजय विजयी, जयशाली. 'थोर आल्हाद जेत्यांचा।' –एरुस्व १२ ८१ [सं जेतृ]

**जेताश्री**—पु (संगीत) एक राग या रागात षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य जाती औडुव–संपूर्ण, वादी गांधार, संवादी निषाद, गायनवेळ सायंकाळ [सं]

**जेतुका-ला-लें**—विक्रिवि (काव्य) जितका, जेवढा (परिमाणवाचक) २ जितका (संख्यावाचक) 'अगनिधानि जे जतुल्नि क्षारावे त ततुल्नि क्षार्वी।' –चक्रधर सिद्धांतसूत्रें २१ ८ [सं यावत्, प्रा (अप) जेत्तुल]

**जेतुलाले**—वि जितके, जितके म्हणून 'दर्से जेतुलालें कर्म निपजे। तेतुलें आदिपुरुषीं जरी अर्पिजे।' –ज्ञा २ २७१

**जेतुर**—क्रिवि (कु) ज्यात

**जेतृत्व**—न जय विजयीपणा जिंकण्याचें सामर्थ्य [सं]

**जेथ**—क्रिवि (काव्य) जेथें ज्या ठिकाणीं, ज्या जागेवर (संबंधदर्शक) [ज्यें] **जेथचा जेथला, जेथील**–वि ज्या जागचा (संबंधदर्शक) **जेथपर्यंत-पावेतों-वर**–क्रिवि १ जितके ज्या जागेपर्यंत जो पर्यंत, ज्या वेळपर्यंत [जेथें]

**जेथू(थो)न, जेथने**—क्रिवि ज्या जागेपासून (संबंधदर्शक)

**जेथें**—क्रिवि जिथं ज्या ठिकाणीं (संबंधदर्शक) 'जेथें नाहीं उत्तम गुण। तें करंटपणाचें लक्षण।' –दा ११ २ २७ [सं यत्र, प्रा जत्थ] म्ह० जेथें खावें (खातो, खातोस इ०) तेथें हगावें (हगतो हगतोस इ०)=ज्यानें उपकार केला त्याचें नुकसान करणें ०कोठें–क्रिवि जेथें जेथें ज्या, कोणत्याहि ठिकाणीं ०तेथें, जेथूनतेथून–क्रिवि सर्वत्र, सर्व ठिकाणीं. 'निराकार पर उपरा। जेथें तेथें।'

**जेदूधा**—क्रिवि (को.) जेव्हां, जेधवां पहा 'यावरी जेदुवां झाली तेव्हां कांगे काय म्हणावा' –कोर २ ५० [सं यदा]

**जेदीस-दुस**—क्रिवि (गो) ज्या दिवशीं [ज=जो+दीस=दिवस]

**जेधपळ, जेधोळ**—क्रिवि जेव्हां जेवढा वेळ [सं यावत्-काल]

**जेधवां**—क्रिवि (काव्य) जेव्हां, ज्या वेळेस 'मातरीं जेधवां दिसे ठायीं।' –ज्ञा ६ ३५४ [सं यदा]

**जेन**—न १ कुरूप, लोखंडी खोगीर इ०लादून केलेलें एक जीन २ (व) निजावयाची गादी ३ (ना) लेप, दाट [जीन] **जेनाच्या पदरीं गांठ देणें–मारणें**–अशक्य काम करण्याचा प्रयत्न करणें ०बुद्धि–स्त्री कुरूपबुद्धि (ज्याप्रमाणें कुरूपाला मुद्रेनें पाहणारी भार्ये गुरुत जातात, त्याप्रमाणें ज्या याच्या बुद्धीवरील शाल्ये गम्भीर सेऊच नाहींसे होतात, त्याव रून), जडबुद्धि स्थूलमति –वि मूर्ख, जड

**जेपाळ**—पु जयपाळ एक औषधी वनस्पति. याच्या बीया जमालगोटा म्हणतात, ही लीन रेचक असून विंचवाच्या विषावर उगाळून लावतात कोंकणांत हीं झाडें होतात [सं जयपाल] म्ह० जमालगोट्याची मात्रा आणि वैकुंठाची यात्रा **जेपाळाचा ढाळ**–पु १ मोठा रेच २ (लक्षणेवरून व व्याजोक्तीनें) सर्वांवरची चुरी, अंगेंगेस्य चिंतामणी, प्रत्येक रोगावरील औषध, वडाखेर रोगावर रामबाण

**जेफा**—वि (कु) फाजील, जास्त जाफा पहा [जाफा]

**जेब**—पु खिसा 'मंडोयावर जाणें दोन दिवस तहकूब करावें, तें आपलें जेबांत आहे.' –मदबा १ ३० [फा जेब, का. जोब]

**जेब**—वि ठार (क्रि करणें) 'मग मनुष्य एक गडावरून धरून आणून लोकांवर जेब केलें' –भाव ४० [फा जबै]

**जेब-व-जीनत**–स्त्री शोभा 'त्याचे येण्यानें रौनक अधिक होईल, जेब व जीनत येईल' –रा ७ १५४ [फा. जेब्=अलंकार फा ज़ीन–व–ज़ीनत्]

**जेमते(थे)म**—क्रिवि कसें तरी करून, पराकाष्ठेनें, मोठ्या कष्टानें (यामध्यें केलेल्या कामांत अपूर्णता तरी असते किंवा पूर्णता असल्यास तर करणाराला निदान फार श्रम पडलेले असतात) 'विद्यार्थीही जेमतेम करून तरटी यातायात करतात' –नि १७१ 'सकाळीं निघाला तर जेमतेम तीन वाजेपर्यंत जाईल' [हिं गुज जेमतेम=जेमतेस]

**जेमन**—न जेवण 'जेणें तृप्तिस कामधेनु वरण्या पावेल वीं जेमनीं।' –मोकृष्ण २० ५८ [सं]

**जेय**—वि जिंकण्यासारखा, वश करून घेण्यासारखा, हस्तगत करण्यासारखा [ सं ]

**जेया**—सर्वनाम (काव्य) ज्याला, जया पहा 'देखत दखना आत्मघातु। घडला जेया।' –ऋ ८

**जेर**—वि १ कमी प्रकारचा, योग्यतेचा, अशक्त, लेचापेचा. २ हतवीर्य, दमलेला, भागलेला, थकलेला, नम्र, हैराण ( आजार, दारिद्र्य इ० नीं) (क्रि० होणें, आणणें) 'पडस्यानें त्याला मारी जेर केलें' ३ जीत, पराभूत, निर्बल 'त्याशानूखालीं तो जेर आहे' ४ हस्तगत 'तें स्थळ जेर करावें'–सभासद ५६ [फा झेर] **जेरकडी**—स्त्री लगामाची कडी ०**जप्त**–वि हस्तगत, स्वाधीन 'पाण्यात गड वसविले म्हणून दर्या जेरेप्त आहे'–चित्रगुप्त ८७ ०**जबर–जबरी**–वि १डाव्या अंगाचा जबर व उजव्या अंगाचा जेर अशा मर्कनानें खेळण्याचा गंजिफाचा एक खेळ २ दुर्बळ, सबळ 'त्यास रुळों न देता विघाड करावा, मग जेर–जबर कोण किती तें पहावें' –गोसखिशाव ८० ०**जरबी**–स्त्री (कुकीनें) जोर जबरी, जुलूम ०**दस्त**–वि १ जेर अर्थ १ पहा, दीन गरजु २ कमजोर, दुर्बल 'तिकडून इराणचे शहानें जेरदस्त केलें' –इम २६० याच्या उलट जबरदस्त ३ जेरजबर–री पहा ४ कारबीज, जेरजप्त 'ममताई दशपाडीस इर्णे तमाम प्रगणा जेरदस्त केला'–भतनीभाल्ड, अर्जदास्त पृ ७. [फा ] ०**दस्ती**–स्त्री १ विपन्नावस्था, दुर्बलता २ गंजिफाचे खेळातील एक संज्ञा [फा] ०**बार**–वि नम्र, हैराण 'तेथें जाऊन व्यर्थ जेरबार व्हावें, बरकड अर्थ नाहीं'–दिमरा १ २८७ [फा झेर्बार]

**जेरबंद**—पु घोड्याच्या पुढल्या पायातून घेऊन तंगातून काढून वर म्हारकीच्या कडीस बांधावयाचा चामडी पट्टा, ह्या सरो सरात ओंगलेस असतो या बंदाचा उपयोग जीन आवरून धर ण्याच्या व एखाद्यास मार देण्याच्या कामींहि होतो 'प्राणी रापदड पावत। जेरबंद चाबुक वत।' –दा ३ ७ ६३ [फा ] म्ह० १ जें न निघे सरधीं तें निघे जेरबंदीं, २ घोडा जेरबंदीं मनुष्य सबधीं (ओळखावा–समजावा–जाणावा) (एखाद्यावर) ०**उडविणें**–जेरबंदानें मारणें 'तो राउ मुजरीत बोलत नाहीं याजकरिता चार जेरबंद मारिले पाहिजेत'–रा ७ ३७१३ [फा झेरबंद]

**जेरबाकी**—स्त्री न उकळलेली वसूल बाकी

**जेरी**—स्त्री दुर्दशा, पडती, हैराणी 'किरणी याची जेरी, श्रीमंताची जबरी असें सामनाच वर्तमान आहे'–रा ४ ९८ [जेर]

**जेरी नारळ**—पु एक प्रकारचा नारळ जरी नारळ पहा

**जेल**—पु तुरुंग, कारागार बंदिशाळा कैदखाना [इं ]

**जेलर**—पु तुरुंगावरील मुख्य अधिकारी [इ ]

**जेवटा**—पु जेवण 'माडिला मायपोटीं जेवटा। मग घेती मरगटा।'–ज्ञाना ४.५ ४ [सं जेमन ]

**जेवडें**—न म्हसरें, टोणगें –शर [जिवडा]

**जेवढा**—वि १ जितका मोठा, जितका २ जितका (संख्या वाचक), याच्या उलट तेवढा ३ जो, कोणता (पुष्कळापैकीं), प्रत्येक, जो कोणी 'या मुलामध्यें जेवढा पढावा तेवढा शाहणा' एवढा पहा [स यावत्, प्रा जेवड]

**जेवण**—न १ भोजन, खाणें, अन्न भक्षण करण्याचा व्यापार (क्रि० जेवणें, करणें) २ जेवणाचे पदार्थ, वाढलेलें अन्न ३ आहार, खाण्याचें प्रमाण [स जेमन प जेंउणा] ०**कार**–पु (कु ) श्राद्धाच्या दिवशीं पितराच्या नांवें जेवावयास बोलाविलेला मनुष्य (हा शब्द ब्राह्मणेतरात रूढ आहे) ०**खाण, जेवणें खाणें**–न १ अन्न, खाद्य, खाण्याचे पदार्थ २ (सामा) भोजन, खाणें 'त्याच्या घरीं जेवण्याखाण्याची सोई नाहीं' ३ खाण्यापिण्याचा व्यापार 'आमचें जेवणखाण आटपेतों अजून चार घटका लाग तील' ०**घर**–न १ (को ) घरातील भोजनाची जागा, स्वयंपाक घर 'ती जेवणघरात गेली'–वाळ २ हॉटेल खाणावळ सन १८१३ सालीं मुंबईस हिंदूच्या फराळाच्या दुकानास जेवणघर म्हणत असत ०**रात्र**–स्त्री (व ) जेवणाची वेळ होण्याइतकी रात्र, सुमारें ८।९ वाजण्याची वेळ जेवणवेळ पहा ०**पत**–न जेवण्याच्या उपयोगाचें पान (केळ वगैरेचें) 'केळीची डांग मोठी असली तर चांगलीं पाच जेवणपत्रें होतात' [जेवण+पत्र] ०**वार**–पु ज्या दिवशीं उपवास करावयाचा नसतो असा दिवस, तिथि [जेवण+वार] ०**वेळ**–स्त्री भोजनकाळ थोरली जेवण वेळ=रात्रीं ९ वाजता धाकटी जेवण वेळ=सकाळीं ७ वाजता

**जेवणाईत**–पु १ जेवणारा माणूस २ पंगतीस घेतलेला आश्रित

**जेवणावळ**–स्त्री १ मेजवानी, भोजनसमारंभ (क्रि० करणें) २ जेवण्याबद्दलचा खर्च ३ (मुंबईस, जुन्या काळीं) जेवणघर, खाणावळ, हॉटेल [जेवणें]

**जेवणा, जेवणिआ**—वि (खा व ) उजवा (हात) 'तो ओळगिजे जेवणिये भुज।'–शिशु ३५० [जेवण करण्याचा हात म्हणून उजवा]

**जेवणी**—स्त्री १ धान्य मळणारे मजूर नोकर याच्या मजुरी बद्दल दिलेलें धान्य शिधा 'गावांत कार्ये प्रयोजन जाहाल्यास नारळ पानविडा जेवणी घ्यावी –मसाप १ १५११ २ तोंड, मुख, जिवणी 'नवरी लहान –मसाप ६ वें, पुरवणी पृ. २०४ (आगू ८) जिवणी पहा [जेवणें]

**जेवणें**—अक्रि १ खाणें भोजन करणें कधीं कधीं या क्रिया पदाचा कर्म असतें तथापि त्याचा संबंध कर्त्याशींच असतो उ० मी भात जेवला, भाकरी जेवले' २ (ल)फळ चाखणें भोगणें (एखाद्या कृत्याबद्दल इत्यादींचें) अनुभवणें परिणाम भोगणें 'पूर्वी दुष्कर्म करी त्याचें फळ आता जेवी' ३ लाच घेणें –न

(राज॰) दवळात जाणावळ [म जमन पाति जगार मंनि पमार गु जमन प जउणा हिं यवना] (वाप्र) जेविता ठाव टाकणें–पुढचें ताट टाकून देणें पानावरून उठणें जेरों जेवण... तयामाजा अत्यन नाइ। मग ब्राह्मण उठती ... ठाव टाकूनि। जेवू घालणें–१ खावयास देणें पोषण करणें २ वाढणें अन्न पुढें ठेवणें जेवून सेवा गाड–जेवण झाल्यानतर मग नोकरी वगैरे वरी चाकरी (दाहीकडून) जेवणें–ग्र्हसाया कामात दोन्ही पक्षाकडून पैसा घेणें किंवा एका पक्षाकडून पैसे (फी) घेऊन दुसऱ्या पक्षाकडून लाच घेणें (वकिल वगैरेंसंबंधीं योजतात) म्ह॰ १ जेवीन तर दुधाशीं (तुपाशीं) नाहीं तर उपाशीं=मी म्हणेन तसें नाहीं तर मुळींच नाहीं २ राधावें तसें जेवावें करावें तसें पावावें सामाशब्द–दुसऱ्याच्या ताटानें जेवणारा–वि १ दुसऱ्याचें बोलणें घेऊन तेंच पुन्हा बोलणारा २ स्वतःच्या मतानें काहीं न करणारा दुसऱ्याच्या मतानें वागणारा जेवण्या–पु (ग्रो) गम्मतीवरील जेवण करणारा जेवता गण–वि १ केवळ जेवण्याच्या कामाचा (माणूस) २ (ल) बिन कामाचा पण खादाड (माणूस) पुकटखाऊ भोजनभाऊ ता काहींमात्र उपयोगी नव्हे आपला जेवतागण आहे [जेवणें+गण] जेव्या–वि जेवणाच वेळीं हजर असणारा भोजनभाऊ जेवतागण पहा [जेवण]

जेवा—पु १ जेवण स्वर्ग भोजन आनचा जेवा तर बाहेर पडण्याची वाट उद्या २ जेवण्याचा कोरडा शिधा सामुग्री (धान्य पीठ इ॰) पूर्वी हलक्या सरकारी नोकरांना गावकऱ्यांकडून असा शिधा मिळे सरकारचा शिपाइ आला तो जेवा घेऊन गेला ३ अनरसर्च भोजन जेवणखर्च (चाकराचा) 'नाहीं वटा जेवा सारा। –तुगा २६० ॰पाडणें–साधणें–काढणें–जबरीनें जेवण मिळविणें [जेवणें]

जेवों—क्रिवि (काव्य) जसें ज्याप्रमाणें ज्या रीतीनें कृत कृत्य होय तसमत जेंवि पिता अर्पिता वरीं दुहिता –भाकण ७ ३२ [स यथा] ॰ते(वि)वीं–क्रिवि जसें असल तसें चांगलें किंवा वाईट कर्मेंजसें हरप्रकारें कल्याणाथ सुनेनें सासूचें जरि तवि सोसावें। –मोअनुशासन ७ १८ [स यथातथा]

जेव्हढा—वि (प्र) जेवढा पहा

जेव्हा—क्रिवि १ ज्या वेळस त्या समईं त्यावेळीं २ ज्यावेळीं तर ज्या कारणास्तव असें पहाता आम्हाला जेव्हा तो मारणार तेव्हा आम्हास जाता नय [स यदा गा जाह] ॰कधीं क्रिवि कधींकाळीं कदाचित् एखाद्या समयीं जेव्हां तेव्हां (असाच प्रकारचें दुसरें रूप केव्हा कधीं परंतु एव्हां कधीं तेव्हांकधीं अशीं रूपें दृष्ट नाहींत) ॰तेव्हा–क्रिवि स दित नेहमीं, प्रत्येक वेळेस सतत जेव्हांतेव्हां नको यऊ कनेव्हां तो य'

जेष्ठ जेष्ठमध जेष्ठरड—ज्येष्ठ इ॰ पहा

जेसणा—वि जसा जेवढा जितका याच्या उलट तेसणा जो तू जेसणा जैसा। तो तू तेसणा तैसा –गीता १ ३६ [स यादृश जैसेनि ?]

जेह—स्त्री जई पहा जेहीं–ज्यानीं 'जेहीं शोधून पाहिले। –दा १ ९ १२

जेहन-नशी(र्शी)न—वि शुल शारूम 'अक्षरश मनसूर नवाब सम्सामुद्दौला बहादूर यामा पत्रें वाचून दारगाह जहनशीन केलें' –रा १ ११४ [फा जिहन्–नशीन्]

जेह(हे)पटी—स्त्री माकव केस वेणीचीवर झिपरी झेपरी झिपरी पहा

जेहेते—वाप्र जे आहे ते (पुराणिक हरिदास याच्या तोंडी अवधारणाबोधक प्रयोग) जे पहा

जै—स्त्री भिंत व छपर यामधील जागा (काहीं पदार्थ ठेवण्यासाठीं) भिंतीच्या शवटावरील जागा वळचण जई पहा

जै—स्त्री (क) निर्जी चोपणें (मुसत ल्ल) चोगा गाई पहा 'मग्रू जै करूया चल

जै जैं जैअ—उअ (काव्य) जर ज्यापर्ती –क्रिवि १ जेव्हां त्यावेळस याच्या उलट कै कैं जैं जगादा भेग विला।' –दाव ५२ जैं कहीं देवें। अनुभविजे फावे। –ज्ञा ६ ३१७ २ (गा) जधें जेथून

जैकार—पु जयजयकार हुंकार जैकार गजर। तळप चरें चमत्कार।' –भाराकिष्किंधा १ ४४ [स जय+कृ]

जैत जैत्य जैत्र—पु जय तसें दृश्य जिंकतो हृष्टे। पाहिले जैताचिये कुडे।' –अमृ ७ १५४ ईश्वसुतावचानि जैत। येन आम्हां। –कथा २ ३ ११९ एका जैत्य एका हारी। –एरुस्व १२ ६४ [स जैतृत्व] ॰वादी–वि विजयी 'रणीं जैतवादी पाडा। यादव नरेंद्र। –शिशु १०८४

जैन—पु १ भारतातील एक प्राचीन धर्म याचा संस्थापक महावीर २ जिनमतानुयायी जैन धर्माचा माणूस हा वेदप्रामाण्य मानीत नाहींत याच्यात अहिंसा फार कडक प्रकारें पाळतात

जैनचैन जनमैन जैनसैन—क्रिक्रिवि चैनचैन पहा

जैपाळ—पु जेपाळ पहा

जैफ जयफ जईफ—वि (व) म्हातारा बुढ्ढा अशक्त फकीर जैफ जाला [अर झ फ्] जैफी जयफी–स्त्री म्हातारपण जयफी नगवाचा –रा ७ ८० [फा ज॰फी]

जैमिनी कानडा—पु (संगीत) एक राग यात षड्ज तीव्र ऋषभ कोमल गांधार कोमल मध्यम पचम तीव्र धैवत,

कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण, वादी ऋषभ, संवादी पंचम, गानसमय मध्यरात्र.

**जैयत**—वि. जय्यत. १ तयार; सज्ज; सिद्ध. २ हत्यारबंद; कधीं कधीं जैयत तयार–असेंहि म्हणतात.

**जैय्य**—वि. जिंकण्यास योग्य; जिंकण्यासारखा; वश होण्यासारखा. [ सं. ]

**जैल**—पु. मायना; सदर. [ अर. झील् ]

**जैसा–सी–सें**—वि. (काव्य.) ज्या प्रकारचा. जसा–सी–सें पहा. [ सं. यादृश; प्रा. जइस ]

**जैसीताराम, जैसाराम, जैसीरामबाबाजी**—जयसीताराम, जयश्रीराम, जयसीताराम बाबाजी, हे शब्द बैराग्यांना नमस्कार करितांना योजतात. [ हिं. ]

**जो**—सना. पुल्लिंगी संबंधी सर्वनाम; तो या शब्दाचा पूर्वगामी शब्द. [ सं. यत्; प्रा. ज ] **जो उठला तो, जो पहावा तो**–प्रत्येक माणूस; प्रत्येकजण.

**जो, जों**—अ. जंव; ज्या वेळेस; जेव्हां; हें अव्यय कोणत्याहि कृत्याचा जलद परिणाम, चापल्य, त्वरा दाखवितें. या अव्ययाचीं जो या सर्वनामाप्रमाणेंच जी आणि जे अशींहि रूपें होतात. उदा० 'जो टोला मारला तों लागलेच दोन तुकडे केले.' 'जी धाव मारली तों तेथें पोंचलों.'

**जों**—क्रिवि. १ जोंपर्यंत; ज्या काळापर्यंत; जेथपर्यंत. २ पावेतों; पर्यंत. ३ ज्या कालीं, अवधींत; ज्या क्षणीं. [ सं. यावत् ]

**जोइ(ई)स**—न. १ जोतिःशास्त्र. २ भाकित; भविष्य. ३ गणित. [ सं. ज्योतिष; प्रा. जोइस ] **जोइसी**–पु. जोशी. [ सं. ज्योतिषी, ज्यो–ज्योतिषिक; प्रा. जोइसिअ ]

**जोक(ख)ड**—न. १ जुखड; जूं; बैलाच्या मानेवरील दोन लांकडांपैकीं एक; शिळवट; जोटें. २ (गों.) (उंसाचा चरक) चरकाचा आडवा दांडा; याच्या एका टोकाला पाटीवर नवऱ्याचें डोकें व दुसऱ्या टोकाला दोलें असतें किंवा तें ओढकाठीला जोडलेलें असतें. ३ (ल.) काळजीचें ओझें. ४ (ल.) अधेलें, अजगर वगैरे जातीचा प्रचंड साप. [ सं. युग, योक्त्र ]

**जोकाड**—न. (कु.) जोकड पहा.

**जोकी**—(गो.) माशांची एक जात; हे दिवाळीच्या सुमारास पकडतात.

**जोक्तर**—स्त्री. वेश्याव्यवसाय करणारी चेटकीण. –गुजा ९.

**जोख**—स्त्री. जळू (प्राणी). [ सं. जलौका; हिं. जोक ]

**जोख**—न. १ भार; वजन. 'सहस्रखंडिकाप्रमाणें जोख।' –मु १२.१९१. २ मेळ; तुला; तुलना; जोखणें (क्रि० करणें). ३ (राजा.) माप; निश्चित आकार; भार. 'आला जोख उणा म्हणोनि वरता नंदीशही ठेविला।' –निमा १.४३. ४ प्रमाण; मान. 'तूं आपल्या पायाचें जोख दे म्हणजे जुतें करून आणील.' [ सं. जुष् ] **जोखणी**–वि. १ जोखणारा. 'वैश्य तुला धरि वाणी। सत्य वाचा सत्य जोखणी।' –एभा १२.८९. २ मापन; तुला. शको. ३.५२

**जोखणें**—उक्रि. १ माप, वजन करणें. २ (ल.) अजमास करणें; अजमास काढणें; परीक्षा पहाणें; (पदार्थांतील) तत्त्वांश तर्कानें जाणणें; तुलना करणें. –अक्रि. फायदा होणें; मिळणें; पदरांत पडणें. 'तुला या कज्ज्यांत भांडून काय जोखतें?' [ हिं. जोखना ] ०**माप**–न. वजनाचें प्रमाण; वजन केल्यानंतरचें माप. **जोखी**–वि. १ वजनी; वजनाचें (लांबीच्या किंवा घेरी मापाच्या नव्हे–माप). २ वजन केलेलें, ठरविलेलें. **जोखीव**–वि. वजन केलेलें; वजनानें ठरविलेलें. 'हें तूप जोखीव शेरभर आहे कीं मापी आहे.' [ जोखणें ]

**जोख(खी)म, जोखींव**—नस्त्री. १ धास्ती; भय; संकट. २ धोका; धोक्याचें काम; जिवावरचें काम; अचाट किंवा साहसाचें काम; परिणामाची चिंता. ३ धोक्यांत घातलेली वस्तु; धोका येईल असें द्रव्य, माल. 'हे हजार रुपये न्या म्हणतां पण वाटेनें आम्ही दुसऱ्याचें जोखीम नेत नाहीं.' ४ (व.) कोणत्याहि कामामध्यें आलेला तोटा, कमतरता (पैशाची इ०). ५ जबाबदारी; हमी. [ हिं. जोखिम ] ०**उठविणें**–अंगावर धोक्याचें काम घेणें; साहस करणें. **जोखमी**–वि. धोका असणारें; संकटाचें.

**जोखा**—स्त्री. बाई; स्त्री. [ सं. योषा ]

**जोखाई**—स्त्री. एक क्षुद्र देवी. 'नव्हे जाखाई जोखाई।' –तुगा ७९१.

**जोखी**—स्त्री. (राजा.) सणकाडी.

**जोखीण**—स्त्री. जळवा लावण्याचा धंदा करणारी स्त्री. [ जोख=जळू ]

**जोग**—पु. १संन्यास; संसारत्याग; कुटुंबपरित्यागपूर्वक वैराग्य; (क्रि० घेणें). 'एका पोटासाठीं जोग।' –तुगा ३४१६. २ हठयोग; योगाभ्यास; योग; चित्तवृत्तिनिरोध, समाधि. (क्रि० घेणें). 'हरी येथेंचि जोग आचरावा।' –नव १७.१३२. [ सं. योग ] ०**भरणें**–१ मुरळीची पाटी अन्नानें भरणें (हा पूजेचा एक प्रकार आहे). २ जोगिणीची दीक्षा देणें; जोगीण बनविणें. **जोगडा**–पु. (निंदाव्यंजक) वैरागी; गोसावडा; जोगी; योगी. 'जावोनी धरितांच तें म्हणतसे सोडी मला जोगड्या।' –उमाविलास ९. **जोगड्याचें भात**–पुन. एका जातीचें भात. **जोगणी**–स्त्री. भिक्षापात्र; तुंबा. **जोगणीमागणी**–स्त्रीअव. १ ज्येष्ठी अमावास्येच्या दिवशीं शिवेवर जाउन जो विधि करावयाचा असतो त्यासंबंधीं दोन देवता. बारावतुत्यांपैकीं दोघांस त्या दिवशीं या संज्ञा लावतात. २ संतिणी; जोगणी. नवरात्रामध्यें या भिक्षा मागण्यास येतात. **जोगण्या बांधणें**–(व.) मंत्रसामर्थ्यानें भीति घालविणें. 'वाघ दिसला नि तो भ्याला, म्हणून त्याच्या जोगण्या बांधतात.'

जोगण्या लावणें-(व) भीति, दहशत घालणें 'बापाच्या जोगण्या लागल्या त्याला' जोगती-पु १ हिंदु जातीचा हिजडा. २ कर्नाटकांतील येल्लम्मा देवीचा उपासक 'हिजड्या पुरुषाकारास्तव महाराष्ट्र पोटीं ज्याचा जन्म झाला आहे असा.' -भग्र १८.

जोगडी—स्त्री. ज्वारीची एक जात -शे १.११७

जोगता, जोगा—वि १ (कांहीं एका विशेषविषयीं) योग्य हा शब्द असा अपानें सुद्धा येत नाहीं, पाहिजे त्या शब्दाच्या प्रत्ययांत रूपास जोडून याचा प्रयोग होतो उदा० 'तो पुरुष पायाजोगता आहे' 'तो गड पहावयाजोगता आहे' २ (विशिष्ट पदार्थास) अनुरूप, साजेसा 'पायाजोगता जोडा' 'अंगाजोगता अंगरखा' [सं योग्य, प्रा जोग्ग]

जोगतिणी-तीण—स्त्री १ जोगवा मागणारी स्त्री. २ योगिणी (यल्लमा) देवीची स्त्रिया कर्नाटकांतील समजुतीप्रमाणें परशुरामाची माता रेणुका हिची भक्तीण ३ मंत्रतंत्र जाणणारी भिकारीण, जोगीण 'एका जोगतिणीच्या सांगण्यावरून तिनें दासांना गोंविंदहि गेपाळी रमाबाईनी सुगरणीनें मागलेला भात नेऊन टाकविला'

जोगम्मा—स्त्री. गवाळी आणि पांढरीवस्त्री, मुल्गी, गोसावीणाच्या वेष घुसलेली आणि अंगास राख फासलेली पोरगी, माळ अर्पीण, हिजडी. [जोगी+अम्मा]

जोगलणें—उक्रि (राजा) मदत करणें, सांभाळणें, हात देणें, आधार देणें (आजारी किंवा अशक्त माणसास) [सं योग= मदत+लावणें]

जोगली—स्त्री (कर्ना) मातीचा लहानसा परळ, थाळी (जेवण्याची) ठाणें जिल्ह्यांत जोगल्या असें पुल्लिंगी रूप आढळतें —बदलापूर ६५ [जागणें]

जोग(गा)वण-वणी-वणूक—स्त्री १ निर्वाह, पोषण, गुजारा 'प्रतिज्ञेनें अनुसरोनी। याहीर करि जोगावणी।' —दास २ ६०१. २ गमणें, आळस, दीर्घसूत्रीपणा, रेंगाळणें, सुस्तपणा ३ टकलपणी, चालढकल ४ (व) काळजीनें संरक्षण, निगा 'त्याच्या जोगवणीस कसलीहि उपमा साजत नाहीं' —नि ७६. ५ निर्वाहापुरतें उत्पन्न ६ (गो) जोगवण=शेतांतील एक दवबुत्य [जोग+वण प्रत्यय]

जोग(गा)वणें—अक्रि १ काम करताना गमणें, आळसानें काम करणें, दीर्घसूत्रीपणा करणें, रेंगाळणें २ (ल) चांगल्या प्रकारें चालणें, त्रास न होता सुलभपणें निर्वाह होणें 'रानात गवत झाल्यापासून गायी जोगावून दूध लागल्या' ३ चालढकल होणें, युक्तीप्रयुक्तीनें, मुट्टू हट्ट चालणें, कसा तरी वेतागवात होणें (संसार, प्रपंच) 'आमचा संसार २ हजार रुपयांत जोगावतो' ४ भरभराट होणें चांगलें चालणें फोंफावणें, पुष्ट होणें (प्राणी, वनस्पति) 'जोगावमें पोटीं स्तर। पटी भार वरि नाहीं।' —तुगा ३३५४ ५ पुरें होणें, काम भागणें 'तांदूळ उशाचे शिरीं जोगवेल' ६ तृप्त असणें 'आलोभूं वो तेणें। अनुभवहि जोगवेंगे।' —ज्ञा ११.३६१. [योग]

जोगवा, जोगेश्वरी—पु देवीच्या नांवानें पांच घरें मागितलेली भिक्षा देवीचे उपासक, परिचितजन 'जोगवा' म्हणून अशी भिक्षा मागतात म्ह० देवीचा जोगवा म्हटल्यानें कोणी देत नाहीं (क्रि० मागणें) जोगवेकर-करी-करीण-पुस्त्री जोगवा मागणारा-री

जोग(गा)विणें—उक्रि १ काळजी घेणें, चांगलें पोषण करणें, पाळणें (विशेषत प्राणी) २ काटकसरीनें वापरणें, सांभाळून मध्यम रीतीनें पोषण करणें, मोठेपणा देणें, कसें तरी गुजराण करणें ३ (ल) सेवादास्य करणें, कसेंबसें टाळणें, पार पाडणें 'पुढिलें देवें जोगावी।' —ज्ञा ११ ७१.५. 'तेणा एकाचि आपलें। जोगावी जो।' —ज्ञा ११ ६१० या क्रियापदाचे सकर्मक व अकर्मक हे अर्थ एकमेकांविरुद्ध आहेत, परंतु पहिला अर्थ अधिक प्रचारांतील आहे [सं योग, प्रा जोग]

जोगा-गें—वि योग्य, सारखा, जोगता पहा 'हा प्रसंगु अगे तुजचि जोग।' —ज्ञा १५ ६७ [सं योग्य, प्रा जोग्ग, प जोग, जोगा, सिं जोगु हिं गु जोग]

जोगिया—पु (संगीत) एक राग यांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात आरोहांत गांधार व निषाद वर्ज्य, अवरोहांत गांधार वर्ज्य, वादी षड्ज, संवादी मध्यम गानसमय प्रातःकाळ

जोगी—स्त्री एक रागिणी, असावरीची एक जात.

जोगी—पु १ गोसावी, वैरागी, संन्यासी 'जग जोगी जग जोगी। जागेजागे बोलती।' —तुगा १२६ २ एक प्रकारचा साप, याच्या अंगावर मरकट पट्टे असून हा फार विषारी असतो. ३ (कु) दुध्या भोपळा [सं योगी, प्रा जोगी] म्ह० १ जोग्यानें जोडलें आणि कुत्र्यानें खाल्लें २ नवा जोगी आणि गांडभर जटा=थोडें काम करून फार गर्विष्ठ बनणारा जोगिडा—पु सरसरडीचा रोगट व पिवळा दिसणारा सरडा —कृषि १०४

जोगीण—स्त्री १ जोग्याची बायको. २ देवीची भक्तीण, जोगी झालेली स्त्री ३ नाचणी धान्याची एक जात

जोगें—न एक जातीचें भात जोगड्याचें भात

जोगेटा—पु (को) (निंदेनें) १ जोगी, वैरागी २ जोगी नांवाचा साप [सं योगी]

जोगेश्वरा—पु (ल) पैल —मनको

जोग्या—पु कुस्तींतील एक पेंच, खांकेखालीं हात घालून वर उचलावयाचें व पुन्हा खालीं दाबावयाचें (क्रि० भरणें)

**जो(जों)जार**—पु १ कुटुंबादिरूप मोठा संसारखटला, मडळी, पसारा, व्याप (मोठा त्रासदायक व पोसण्यास कठिण) 'जोंजार प्रसवलासि बहुवसु।' –क ३२ 'नमोनि काहीं जोजार। सन्यासाश्रम शुद्ध सार।' –निमा ११६७ २ (ल) बोजा, त्रास, जजाळ, भार कष्ट, ओझें 'तरी जन्मोनि जोजारु साहिजे।'–ज्ञा ४ ३४ कर्त्याचा–कुटुंबाचा–घेण्यादेण्याचा इ० जोजार (व) जोजवार ३ कटकट, त्रास, कष्ट, खटपट 'कामया करिसी जोजार।' –दा ३ १० ४८ म्हं० ज्याचा भार त्याला जोजार

**जोजारणें, जोजारणें**—अक्रि १ मोठें कुटुंब, खटला असणें, त्याच्या जबाबदारीखालीं वाकून जाणें २ त्रासणें, कष्टणें 'प्रलय काळीं जोजावलासि।'–कथा ७ ७ १४६

**जोजारी**—वि कुटुंबभारानें त्रासलेला, मोठें कुटुंब असलेला

**जोजो**—उद्गा १ लहान मुलास निजवितांना म्हणावयाचा शब्द अंगाई 'जो जो जो जो रे कुळभूषणा, दशरथ नदना, बाळा जो जो रे।'–स्त्री लहान मुलाची निद्रा, गाई (क्रि० करणें). निजावयास जाणें, निजणें, झोपीं जाणें (लहान मुलें) [ध्व] ०करणें–(बालभाषा) निजणें, झोंपणें

**जोट–ठ**—पु भरभरीत व जाडें सुती कापड, पायरावयाची खादीची पासोडी, सुती शेला, शल्यासारखें वस्त्र 'एकवर्णी ततू नानावर्णी पट। कोण्ही जोट शेले पगडया।'–मध्व ५४१ [स जटा, हिं जूट]

**जोट–ठ**—पु (मावळ) मळईची जमीन [हिं जोत]

**जोटा**—पु पोत्यात माल भरून तोंड बद केल्यावर त्याच्या वर उलट बाजूनें दुसरें पोतें घालून तें शिवून तयार केलेली बगी, पार्सल [जोट, इ जूट।]

**जोटी–ठी. जोटीव, जोठीव**—वि जोटाच्या कापडाचें केलेलें (पंचा, आंगरखा इ०).

**जोठ**—पु खाव आणि तुळई याच्यामध्यें मजबुतीसाठीं घातलेला लाकडी तुकडा [जोड]

**जोड**—पुस्त्री १ दुक्कल, जोडी, जोडा, युग्म (एका जातीच्या दोन, दान, एकाचवेळीं चालणाऱ्या, असणाऱ्या वस्तु) 'पाटल्या जोड, कापी जोड, इ०' २ जोडी, सध, सच, ताफा (सोंगट्या खेळणाराचा, पुजापात्राचा, खेळणाराचा वाद्याचा वाजविणाराची), डाव (गंजिफाचा) सच (कपडे, धोतर व अंग वस्त्र याचा) सामान्यत सेंट ३ ठिगळ गाठी साधा लावलेला तुकडा, सयोग (वस्त्र लाकूड, धातू वगैरेस) ४ सूर लावण्यासाठीं सा, रि, ग, म, प ध, नी हे सुर खालीं–वर करीत आलाप घेणें ५ (–स्त्री) (अज्ञरदा व ल०) साठा, सचय, सग्रह मिळविलेलें द्रव्य 'आपल्या साऱ्या हयातीची जोड आपण भोळसरपणानें घालवून बसलें' ६ मिळकत लाभ, प्राप्ति 'जोड जोडिली मनुष्यदेहा ऐसी।'–तुगा ७१२ 'व्यर्थ भाकता ह्मत जोड काय!' ७ जोडलेला या अर्थी हा शब्द फळाच्या नावाच्या मागें जोडतात जसें– जोड–आवा–पेरू–कळ इ० ८ दुहेरी या अर्थानें जोड शब्दाचे समास होतात जसें– जोड–बटी–कट–राव –तुळई–पदर–भिंत इ० ' ९ गुनवण, साधा, सधव, सागड गुत वणूक (पशूची, माणसाची), जोडपणा, साखळी (क्रि० घालणें) १० विण्याच्या मधल्या दोन तारा, सतारीच्या मधल्या दोन (ज्या षड्ज स्वरात मिळविलेल्या असतात त्या) तारा ११ मैत्री, सख्य, जिव्हाळा. १२ बरोबरी, साम्य, साथ 'धर्मासि म्हणे वागा साधो जोडा नसेचि या दिवसा।'–मोविराट ७ १६ 'गुंगा व गामा याची जोड अगदीं अप्रतिम होती' १३ (बांधकाम) पुस्ती, नवीन गोष्टींची किंवा कांहीं कामाची वाढ. १४ (ओतकाम) दोन पिशव्याचा दोन हात नीं फुंकला जाणारा भाता १५ (कुस्ती) एक डाव जोडीदाराचा एक हात त्याच्या दोन्ही पायांतून धरून आपला दुसरा हात जोडीदाराच्या मानेवर ठेवून जोडीदाराची मान खालीं दाबून पायांतून जोडीदाराचा धरलेला हात वर उचलून त्याला चीत करणें [स युज्–योजय्, प्रा जोड, सं जुट्–बांधणें] (बाप्र) ०करणें–साधणें, मिळविणें 'पुण्याची करावया जोड, जीव हा सज्जला'–विक ६९ (पायाची) ०करणें–कृपा सपादणें 'मी आपले पायाची जोड केली आहे' ०देणें–लाभ, फायदा देणें 'सत्पदाची जोड। दे रे हरी।'–अमृत १०८ ३४. ०नसणें–बरोबरी न होणें, उपमा न मिळणें सामासिकशब्द– ०अक्षर–न (जोडाक्षर) जोडलेलें अक्षर उदा० क्ष, म्ह, स्त इ० ०करीण–वि जोडीची वस्तु 'अटकेची जोडकरीण तोफ पत्तलगर होती'–भाव ४० **जोडका**–वि (जोडणारा) मिळविणारा, संपादन करणारा, कमावता, मिळविता 'जोडका पुत्र देखोनी गुणी। जनक जैसा सुखावे।'–मुआदि ३० २२४ 'कालेला पति तोषि प्रीय हृदयीं जो का असे जोडका'–सदाशिव कविकृत उमाविलास ५ **जोडका–जोडता–पूत–राम–रावजी**–पु १ कुटुंबातील पैसा कमाविणारा मुलगा २ जातींतील कमावता पुरुष (अक्षरश व निंदार्थी) ३ (मराठी राज्यात) लोकाच्या विरुद्ध बातमी मिळविण्यासाठीं व त्यावरून दंड करून पैसा जमविण्यासाठीं प्रसग आणून देणारा, सरकारनें ठेवलेला नीच माणूस लोकाची अर्जीपिर्जी सरकारास कळविणारा पाजी माणूस ०काम–न १ निरनिराळे तयार केलेले भाग, जमविलेलें सामान जोडून केलेलें काम २ जोडधदा, मुख्य कामाखेरीज दुसरें काम ०कार–वि (गो) जोडका ०गहूं–पु खपल्या गहू ०गिरी–गीर–वि १ तुकडा जोडलेला, तुकडा जोडून केलेला 'या गाडयाचा आस जोडगिरी आहे' २ दुहेरी, दोन वस्तु ज्यात आहे असा, जोडाचा (खांब, विहिरीच्या भिंती, ओटाचे घर).

' घरास जोडगिरी राव दिले असता च गली घळाटी येते '—खी. १ साथ, मदत ( गवई, हरिदास यास ) ' हा पोऱ्या त्या हरिदासाचे मागे उभा राहून जोडगिरी चागली करितो ' २ दुहेरीपणा, दोन पदार्थांचें एकत्रीकरण ३ जोडलेली स्थिति, तुकड्याची बना वगी **०गोळी**—स्त्री १ दोन गोळयाचा मार २ एका बदुकींत एका वेळीं दोन गोळया ३ (ल.) दोहींकडून राटपट ४ ( ल ) जोडी, युग्म ' नवरदेवाची जोडगोळी ' **०चौकट**—स्त्री दुहेरी चौकट, याचा साचा ( विशेषत दाराचा ), दोन लाकडें यांचाला जोडून केलेला असतो **जोडजं**—( पुणें ) शेलाटी, ( नगर ) शिळनट, जडी, ( सातारा ) शवळ, शिवळ, ( खानदेश ) जोडणी जुवनी **जोडणी**—स्त्री जोड, साधा जोडणें, (जोडणें क्रियापदाचें धातुसाधित ), **जोडणें**—सक्रि १ साधणें, जुडविणें, शवनास सयोग करणें, एकत्र करणें ( दोन तुकडे ) २ मिळविणें, अधिक लावणें, जोड देणें ( लाबविण्यासाठीं ), एकावर एक किंवा एकापुढें एक ठेवणें ( दुसरा थर, अस्तर, लाबीचा तुकडा ) 'सस लातीस आतून पासोडी जोडली तेव्हा थडी राहिली ' ३ जवळ जवळ, लाबीच्या पुढें, बाजूस शेजारीं ठेवणें ' दोनी काठ्या जोडून पहा म्हणजे कोणती लाब तें कळेल ४ जुपणें, मानेवर जू ठेवणें किंवा खोगीर घालणें (गुरें, घोडे यांच्या) ५ (ल ) जागेवर गुतविणें, कामाला लावणें, चिकटविणें 'पोराग त्या चाकरीवर जोडून द्या ' ६ जमविणें, गोळा करणें, साचविणें ' ससारसवेंचि परमार्थ जोडे । ऐसें केवीं घडे जाणते हो । ' ७ पूर्ण करणें, तडीस नेणें, घडवून आणणें माझें एवढें लग्न जोडून द्या ' ८ मिळविणें, सपादणें, स्वत साठीं कायम करणें, दृढ करणें ( कृपा, स्नेह, मैत्री, आश्रय, धदा इ० ) ' आम्हीं जें जें जोडावें । तें समस्तीं इहीं भागावें । ' —ज्ञा १ २१७ ९ युक्ति काढणें, तजवीज करणें, उपाय करणें —अक्रि १ ताब्यात येणें मिळणें ' कीं राम्याग रसायण निर्मळ । अकस्मात जोडलें । ' २ ( व ) भरभराट होणें, भरमसाट मिळणें, लगा साधणें [स जुड्=बाधणें] म्ह० अधन्याचा जोडला आणि पिढीचा मोडला **जोडता**—वि मिळविता सपादन करणारा जोडका पहा **०दंड**—पु (व्यायाम) कसरत करण्यासाठीं दोन आडवीं लाकडें बसविलेली योजना ( इ ) पॅरलल बार **०नळी**—स्त्री दुहेरी नळी (बदुकीची) **०नाल**—पु तालीमखान्यातील एक वस्तु **जोडन**—न (राजा) जोड साधा, जोडणें, जुडविणें **०पट्टी**—स्त्री (लोखडी पाणरहाट) पोहोर एकमेकाशीं अडकवून माळ करण्यासाठीं प्रत्येक पोहऱ्यास दोन बाजूस बसविलेले लोखडी कामचे तुकडे **०पाडें**—क्रिवि, द्वद्वानें, भेदबुद्धीनें ' विधिनिषेध जोडपाडें । जेथ विराले सर्व पाडें । ' —एभा ७ ६७ **०पाहरा**—पु. दोन शिपायाचा पाहरा, जोडीचा पाहरा **जोडपी**—वि जोडीदार, सोबती, बरोबरीचा, जोडीचा जुळणारा, ( सजीव, निर्जीव वस्तु म थें ) ' तुला योग पाहिजे तो जोडपी पाहा ' —स्त्री ( व ) १ जुळणी, मेळ, एकत्र जोडणें २ जुळण्याग योग्य असणें, बरी बरी **जोडपें**—न ( पों ) नवराबायकोची जोडी 'अडचणींमुळें विवाहसंबंधांत बद्ध असीं स्त्रीपुरुषाची विसंगत जोडपीं दृष्टीस पडतात ' —टि ४ २ २ जुळें, एकदम जन्मलेला मुलगा व मुलगी **०फळ**—न ( काव्य ) जुळें फळ, दुहेरी फळ **०फळाचा सांधा**—पु १ ( ल ) मनाचा सयोग किंवा सबध, मनाचा एकत्र भाव ( चागलें वाईट, सुख दु ख इ० ) २ निकटची मैत्री, दाट स्नेह ' जैसा जोडफळाचा साधा । तैसा सुखदु खाचा बाधा । ' **०बंद**—पु एकास एक चिकटवून लांबविलेला कागद •

**जोडवें**—पु आगठ्याजवळच्या किंवा मधल्या ( पायाच्या किंवा हाताच्या ) बोटात घालावयाचें एक जाड व मोठें वळें (चादीचें किंवा सोन्याचें) *' जोडवी अनवट मासोळ्या ।'—स्त्रीगीत ६५*

**जोडा**—पु १ एकाच जातीच्या पदार्थांची जोडी, या पैकीं दोन पदार्थ प्राय एकत्र असतात ( पायातले जोडे, एक ताण्याचीं दोन धोतरें इ० ) विवाहित स्त्रीपुरुषाची जोडी ' हा जन्माचा जोडा आहे ' —मोर १९ सजीव प्राण्याचें (नरमादीचें) जोडपें ' हा पक्षियाचा जोडा । ' —कथा १ ३ ८५ जानव्याचा जोड (पाच जानवीं), दोन सोबती 'रामावसवत कबीर खळिया । जोडा बरा मिळाला रे । ' —तुगा २४३ २ पायातील जोड्यापैकीं एक, पायपोस कोणत्याहि जोडीपैकीं एक वस्तु सोबती मित्र ३ जोडीदार बरोबरीचा किंवा जोडीचा मनुष्य, वस्तु किंवा उदाहरण ४ बरोबरी, उपमा ( क्रि० नसणें ) ' त्याच्या पापासी नाहीं जोडा । ' ५ ( कुण टाणें ) भरणी नाद्यात आपल्या जातीच घालावयाचें मेहूण ६ ( ना ) भराडी गौरीच वेळीं मुली परड्यावर फुलाच्या पाकळ्याची जी चित्रविचित्र आकृति काढतात ती. [ जोड ] (वाप्र ) (कोणाचा) **जोडा कोणाचे पायांत नसणें**—जोडा पायात नसणें=कडाळी, घोंटाळा, अव्यवस्था असणें **०बांधणें-शिवणें**—पायातील जोड्याची जोडी तयार करणें **०फाडणें-झिजविणें**—( ल ) एखाद्याच्या भेटीसाठीं अनेक फेऱ्या किंवा खेट घालणें **०टाचणें**—( खाभारी ) रेशीम भरण्यासाठीं तनास अगनें भोक पाडणें **०मारणें, जोडेपूजा करणें**—खरडपट्टी काढणें, पायपूजा करणें [जोड] **जोडाई**—स्त्री जोडणावळ, निरनिराळ्या वस्तू किंवा तुकडे एकत्र जोडण्याची मजुरी [ हिं ] **जोडाजोडी**—स्त्री १ जुळवाजुळव ' करू जोडा जोडी अक्षराची । ' —तुगा १३६ २ परस्पराना जोडे मारणें मोठें भांडण मारामारी **जोडाक्षर**—न जोडअक्षर पहा सयुक्त वर्ण दोन किंवा अधिक व्यजनास पुढें एखादें अक्षर जोडल्यानें अथवा दोन किंवा दोहोंपेक्षा अधिक व्यजनें एकत्र जोडून मग

त्यांस स्वराचा योग केल्यानें जोडाक्षरें होतात. –मराठी भाषेचें व्याकरण पृ. ११.

**जोडी**—स्त्री. १ जोडा; जोडपें; युग्म (एका जातीचें); जुळें. 'ही मोत्यांची जोडी पाणीदार आहे.' २ संच; जोड (हरिदास, पुराणिक इ०चा–एक मुख्य व दुसरे मदतनीस यांसह). ३ बरोबरी; साम्य; तुल्यगुणत्व. 'याची त्याची जोडी बनली.' ४ (काव्य.) ठेवा; सांठा; राशी; लाभ. 'देवी म्हणे रहा क्षण करिसी निरयार्थ काय जोडि खळा।' –मोसभा ५.११७. 'गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी।' –तुगा ११६३.५ सरकारी सारा, पट्टी. जुडी पहा. ६ एका वेळीं फिरविण्याचे दोन मुद्गल. ७ प्रारब्ध; नशीब. 'तुझें कर्म असे सहज। आपली जोडी भोगावी।' –गुच २०.२१. ८ प्राप्ति; संग्रह. 'मानसा करि तयाचिच जोडी।' –सारह ४.१०४. **जोडीचा**–वि. जोडीसंबंधी; बरोबरीचा. **जोडीव**–वि. तुकडे जोडून केलेलें; ज्याला तुकडा जोडला आहे असें; जोडलेलें; एकत्र केलेलें; ठिगळ लावलेलें. [जोड]

**जोडें**—न. १ विवाहित जोडपें; जोडा (स्त्रीपुरुषांचा, नरमादीचा). २ (कों.) नारळांची जोडी. ३ (राजा.) हातापायांतील जोडवें; वळें.

**जोडेजोडे**—क्रिवि. (खा.) बरोबर; एकमेकांच्या संगतीनें. –भाऊ ७.१–८. [जोड द्वि.]

**जोत**—न. (कों.) १ जुंपलेल्या बैलांची जोडी (क्रि० बांधणें; लावणें; लागणें). २ बैलांच्या जोडीनें ओढलेला नांगर. 'जोत चाललें–धरलें–पडलें–सुटलें.' (खा.) ३ जुंपणी. ४ (कु.) दोन होड्यांनीं समुद्रांत जाऊन मासे मारतात तें जाळें. ५ (हिं.) नांगरणी; लावणी. ६ (व. खा.) बैलाच्या गळ्यास जूं अडकविण्याचा पट्टा. [सं. युत; फ्रेंजि. जुतो; सं. योक्त्र; प्रा. जोत्त; हिं. जोत; म. जोतें] **म्ह०** पुढील जोत तसें मागील जोत. ०**करी**–वि. (गो.) शेत नांगरणारा. जोतकरी पहा. **जोतणें**–(व. खा.) (बैल) जुवास जुंपणें. [सिं. जोटणु] ०**पात**–न. नांगर, बैल वगैरे शेतकीस लागणारें सामान.

**जोत**—पु. धुमट वाद्यावर म्हणावयाचें एक गीत. 'एक जोत गणपाम त्यानें आरंभ केला.' –सह्याद्रि ६८.

**जोत**—स्त्री. १ ज्वाला. २ तेज; उजेड; चकचकीतपणा; शोभा; चकाकी. 'जोत जरिपटक्याची' –ऐपो १९१. ३ तेज; पाणी; झकाकी (रत्नांची). ४ सफाई; चकाकी (वस्त्राची). ५ पाणी (शस्त्र किंवा हत्याराचें). ६ जोर; जोम; सत्त्व; तेज; बळ; जोरकसपणा (पाऊस, ऊन, पीक, पदार्थ, मनुष्य, प्राणी, धंदा, व्यापार इ० चा). ७ प्रख्यात माणूस किंवा कडक देवस्थान; जागती ज्योत. 'हा साधु किंवा हें देवस्थान मोठी जोत आहे.' ८ घरांतील जळजळ. (क्रि० लागणें). [सं. ज्योति] ०**धरणें**–तेज; शोभा, जोर, सौंदर्य संपादन करणें किंवा येणें. ०**कार**–वि. (गो.) देवाजवळील दिवे लावणारा. ०**दार**–वि. १ तेजस्वी; चकचकीत; लखलखणारा; प्रकाशमान. २ (ल.) शहाणा; धूर्त, समर्थ; हुषार; बुद्धिवान; प्रतिभाशाली.

**जोताड**—स्त्री. (ना.) ज्योत. [जोत] ०**लावणें**–(ना.) आगलावेपणा करणें.

**जोतिबा, जोतिर्लिंग**—न. महादेव; महादेवाचें लिंग, पिंडी; शंकराचें देवस्थान. [सं. ज्योतिर्लिंग]

**जोतीवंत**—वि जोतदार पहा. [सं. जोत–ती+वंत प्रत्यय]

**जोतें**—न. चिरेबंदी कडा, कांठ; हिच्या योगें घराची गच्ची किंवा ओटा सुरक्षित राहतो; चौथरा; गच्ची; उंच केलेली जागा. चिऱ्यांनीं बांधलेला ओटा; इमारत बांधण्यापूर्वीचें चिरेबंदी काम. 'गरुडपाचूचीं जोतीं।' –ह ३४.१३५. [सं. युक्त; प्रा. जुत्त?]

**जोतें**—न. १ जिनें बैलाचा गळा जोखडाशीं बांधला जातो ती दोरी किंवा पट्टा. २ जूं; शेळें [वै. सं. योक्त्र; प्रा. जोत्त; का. जत्तगी; हिं. जोत]

**जोतेकार**—पु. (गो.) चांभार; जुतें करणारा. [हिं. जूता=जोडा+कार]

**जो तो**—सना. १ जो कोणी; प्रत्येकजण; प्रत्येक मनुष्य; हरएक व्यक्ति. 'जो तो चेष्टवी मुला।' –माराबाल ९.७४. २ कोणी; कोणी एक; कोणी तरी. 'जो तो म्हणे हा प्रचंडवीर। सांगती रावणासी वडिवार।' –रावि २१.११४. [जो+तो]

**जोत्या**—वि. नांगऱ्या; नांगरणारा माणूस; जोत धरणारा गडी; शेतकरी; २ (ल.) गांवढळ; नांगऱ्या. ३ (ल.) मंदबुद्धि; ढ; अक्षरशत्रु. [जोत; हिं. जोतिआ]

**जोंधळा**—पु. एक धान्याचें रोप व त्याचा दाणा; ज्वारी (धान्य) किंवा त्याचें ताट. याच्या जाती:–उतावळी, निवळा, शाळू, रातडी, पिवळा जोंधळा, खुंडी, काळबोंडी, दूधमोगरा, याशिवाय केळी, अरगडी, डुकरी, वेंदरी, गडगूप इ० हलक्या जाती आहेत जोंधळ्याच्या भाजून लाह्या करतात व कुजवून दारू काढतात. पिठाची भाकरी होते. [सं. यावनाल; प्रा. जोण्णलिआ; का. जुनळ; तेलगु. जोन्न; हिं. जोन्हरी] **जोंधळी पोत**–स्त्री. जोंधळ्यासारखे बारीक सोन्याचे मणी असलेली व ४१५ पदरांची, मधोमध जाळीचा मणी किंवा वेलपान असलेली पोत. **जोंधळे उचलणें**–शपथ घेणें. (शपथेचा एक प्रकार).

**जोधा**—पु. योद्धा. –वि. १ मजबूत; धष्टपुष्ट; राकट; पहिलवानासारखा. 'हेरा कवणु तो जोधांचा मेळावा।' –शिशु ९४४. २ (व.) उंचापुरा; लठ्ठ व ठोकळ हातापायांचा. [सं. युध्]

**जोप–पें**—न. वासरूं; जावपें पहा. (गाईचें, म्हशीचें).

**जोपणें**—उक्रि पाळणें, रक्षण करणें, सांभाळणें, राखणें, जोपासणें [स गुप्=रक्षण करणें]

**जोपर्यंत-पावतों**—क्रिवि जो जाय-वारपर्यंत, ज्यावेळे पर्यंत, पर्यंत [सं यावत्]

**जोपा,जोपन**—स्त्री काळजी, निगा, संगोपन, संरक्षण, जोपासना 'जो पाहे सद्गविचार हृदयीं जोपा जनार्धी करी।'-र ४ [स गुप्]

**जोपाणें**—अक्रि धावणें 'मग ते अंगर जोपातां गुणीं पावे परिपुष्टा।'-गीता ११ १७८

**जोपारणें**—अक्रि जापारणें, उलट जवाब देणें, बेपर्वाई दाखविणें, उद्धट होणें जापारणें पहा 'वर मलाच उलटें असं काय करता हो म्हणून जोपाराव ?'-फाटक, नाटयछटा १ -सक्रि. झिडकारणें, तुच्छ मानणें, तिरस्कारबुद्धीनें नाकारणें.

**जोपाव(स,णें**—उक्रि. (कों.) काळजी घेणें, निगा राखणें, संगोपन करणें, बरदास्त ठेवणें (बागाईसंबंधीं गाईला लावतात व मनुष्यें, प्राणी वस्तु यासंबंधीं मनुष्यांना लावतात) [स गुप्]

**जोपासीर-ल, जोपा, जोपासना-सणी**—स्त्री (कों राजा) निगा, बरदास्त, काळजी, लक्षपूर्वक पालनपोषण किंवा सांभाळ, संगोपन करणें [स गुप्]

**जोंबडा**—पु (राजा) १ जुमडा, गवताचा भारा, गड्डा, गाठा. २ (विशेषत) शेतात टाकलेला किंवा फळझाडावर बांधलेला विडा, सरकारद्वाहीचें असें कांहीं चिन्ह यावरून शेत कापणें किंवा झाडावरचीं फळें तोडणें यास सरकारी मनाई आहे असें समजण्याची खूण 'या आंब्यास द्वाहीचा जोंबडा बांधला आहे, अजि पाडू नका' ३ (ल) सैल बांधलेली शेंडी [जुंबाड]

**जोबन**—पु १ (स्त्रीचा) स्तन कुच, थान 'तंग चोळी छातीवर जोबनकोवळे रसरसले।'-होला ८१ २ तारुण्य, ज्वानी [सं यौवन, प्रा जोव्वन, हिं जोबन]

**जोबाड**—न झोंबड, झोंबाड पहा

**जोबाळणी**—स्त्री जोपासना, जोपासीर, जोपा पहा [जोबाळणें]

**जोवा(मा)ळणें**—उक्रि १ (कों) जोपावणें पहा उत्तम रीतीनें राखणें जपणें 'एवढे दिवस दागिना जोंबाळून ठेविला होता म्हणून प्रसंगीं उपयोगी पडला' २ नेहमीं गोंजारणें, लाड करणें (लहान मूल इ० ना) 'ममतेनें पोरास घरीं जोंबाळून ठेविला तर तिथा कशी येईल' नेहमीं कुरवाळणें लडिवाळपणें वागविणें किंवा सांभाळणें, पाठीवरून हात फिरविणें (आवडता प्राणी, वस्तु यांच्या)

**जोरंदंड**—वि १ शक्तिमान, जोरदार बळकट. २ जवान मर्द, धिप्पाड, दांडगा गलेलठ्ठ

**जोम**—पुन १ घट्टमुटपणा, दाढर्य, घनपणा, शरीराच्या बांध्याचा व चेहऱ्याचा तजेला, भरदारपणा २ शारीरिक बळ, जोर, शक्ति, बळकटी (बांध्याच्या घट्टमुटपणामुळे) ३ जोर दम, अवसान [स यौवन, प्रा जोव्वण] **जोमांत असणें-१** (माण) जोरांत किंवा भरांत असणें २ जोरांत असणें, उत्साहयुक्त असणें **०दार-वि** १ घट्टमुट, दृढ, आवळी. २ शक्तिमान, बळकट, जोरदार ३ दमदार अवसानयुक्त

**जोयशी**—पु (कु) ज्योतिषी, जोशी [सं ज्योतिषी]

**जोर**—पुन १ जोम, शक्ति ताकद, बळकटी २ स्थैर्य, दाढर्य, गंभीरपणा, दमदारपणा, सहनशक्ति (सजीव प्राणी, वस्तु यांची) ३ वेग, शक्ति आघात तडाखा, नदीचा वेग (वारा, बंदुकीची गोळी यांचा) ४ जुलूम, जबरदस्ती, अन्याय ५ दाब ताण, नेट, वजनाचा भार 'सगळे कोई सारखे असले तर बरें, नाहीं तर टेंगणा असतो त्याचे माथ्यावर भारी जोर यतो' ६ जोष, पूर्ण वेग, भर (रोग, पाऊस, थंडी यांचा) ७ तालमींतील एक व्यायामविशेष, दंड (क्रि० काढणें) ८ (नाविक) पूर, समुद्राची भरती (विशेषत पौर्णिमा-अमावास्येच्या दिवशींची), भाग, उधाण ९ (यंत्रशास्त्र) प्रेरकशक्ति १० महत्त्व, भर 'या गोष्टीवर गव्हर्नरसाहेबांनीं बराच जोर दिला होता'-केले १ ११९ [फा झोर्, अर जोर्] (वाप्र) **०करणें-लावणें-जोरास येणें**= जबरदस्तीनें मागणें, अडवळा करणें, शक्तीची, बलात्काराची गरज उत्पन्न करणें, तडीस नेण्यास उतरण्यास कठिण करणें, जाणें 'आज पावेतों रुपये देतों दतों म्हणत होता पण अता जोरास आला त्यापेक्षां उपास घातले पाहिजेत' **०देणें-**१ पुष्टी, मदत, आधार देणें २ महत्त्व देणें, विशेष उल्लेख, निर्देश करणें **म्ह०** जोर थोडा, आणि घुस्सा बडा -भाव २८ सामाशब्द- **जोराचा**-वि नेटाचा; अति मोठा **०कस-दार-वान**-वि १ दंड काढणारा २ पहिलवान, ताकदवान बळकट सशक्त **०गत**-स्त्री (राजा) उधाण, उसाण, भांग, समुद्राची भरती (अमावास्या व पौर्णिमेची). 'पुनवेच्या व जोरगतीच्या दिवशीं भरतीच्या वेळीं मानसेचीं दारें बंद केल्यावरसुद्धा काय बिशाद होती'-सयाद्री १४ **०जबरी**-स्त्री जुलूम, जबरदस्ती **०तलब-ब**-स्त्री १ (कायदा) हजर राहण्यासाठीं जोरानें बोलावणें २ अन्यायपूर्वक हरण, बलात्कारानें हरण, बलात्कार 'जोरतलबनें घेऊन शिंद यांनीं आणिला म्हणून वर्तमान आहे'-ख १ ४१८४ 'माझें मनात आलें तर येईन, तुमचे जोरतलबेस भिणार नाहीं' **०तलबी-बी**-स्त्री जुलूम, जबरदस्ती -वि १ जुलमाचें, जबरीचें, जोराचें, बलात्काराची (हजेरी, पैसा उकळणें यासंबंधीं मागणी) 'त्यापेक्षा अमर जोरतलबीचा सुरू करावा'-मराचिथोशा ७७ २ मग्रूर अरेराव 'कोठें जोरतलबी माणसें असतील, हरामखोरास तवी पोहोंचावून

पैसा वसूल करून देणें ' –मदवा १ ११८ –पेद ६ १४९ [फा] ०तलवीटीर-सर–स्त्री. पत्त्याच्या खेळातील एक सज्ञा ०बळ–न शारीरिक बल, पाशवी शक्ति, आडदांडपणा, दांडगाईचा जोर, बळ, शुद्ध दांडगाई, जुलूम [फा झोर्+स. बल] ०पट्टी–स्त्री दोन थरास जोडणारी पट्टी 'जरूर पडल्यास वरवंड्या जोर पट्टीनें जोडाव्या ' –मॅरट१३ ०बेजोर-बेजोर क्रिवि जोरा वारीनें,जबरदस्तीनें 'इग्रज घाट चढोन येऊन जोरबेजोर होसकऱ्याचें ठाणें घेतलें.'–ख ९ ४४५४. 'प्रधानाच्या फौजेनें बदामीचा किल्ला जोरबेजोर फते केला ' –ख ८ ४०९०.

जोर–पु (गो) ज्वर ताप [सं ज्वर]

जोरा–पु १ अधिकार, सत्ता, जोम, सत्ता 'सावकाराचा जोरा कीं सरकाराचा जोरा ' २ जुलूम, जबरदस्ती अन्यायाचा दंड, शिक्षा ३ शह, जोर 'स्वामीचे पुण्यप्रतापें अवदालीस जोग पोचवून तेंवी वरतील.' –इम २६० [फा झोर्]

जोरावणें–अक्रि १ (अक्षरश व ल०) बळावणें, समर्थ, शक्तिमान, पराक्रमी, तेजस्वी होणें २ जुलमी होणें, माजणें 'जोरावले वनचरी थडकास देती ' –अर्वाचीन (खरे) ४५६ ३ जोराचा होणें (वारा, पाऊस, मनोविकार, रोग). 'झरझर चला, पाऊस जोरावल्यावर मजल आटोपणार नाहीं ' ४ जोरानें वाढणें, फोफावणें, 'पाणी मिळू लागताच झाड जोरावलें ' ०वर–वार–वि १जोरदार बलवान, समर्थ 'मालोजी जोरावर।' –मस्व ३१४ २ जुलमी, जबरीचा,जबरदस्त. ०वरी–वारी,जोरावा–स्त्रीपु १ बळजबरी, जुलूम, जबरदस्ती 'आपणावरी जोरावरी करिताती ' –रा २०. ४० २ पाठपुरावा, पाठबळ, मदत [फा झोरावर्]

जोरी–स्त्री ज्वारी, जोंधळा पहा [प्रा जोवारी, म ज्वारी, हिं जोरी]

जोरी–स्त्री. जुलूम, जबरदस्ती, पुंडावा 'त्रिलेवरी जोरी करितील ' –राज १६ ३४. बळजोरी शब्दांत हा शब्द येतो –वि (बुद्धिबळाचा खेळ) पाठिंबा किंवा जोर दिलेलें, दणारें (प्यादें) या डावात एका बाजूनें दुसऱ्याचें जोरात असलेलें मोहरें मारावयाचें नमतें [फा थोरी=बल]

जोरी–स्त्री (गो) तापाची साथ [स ज्वर]

जोरू–स्त्री स्त्री, पत्नी, बायको [जोड, हिं जोरू] म्ह० (व) जोरू सात, पैसा गाठ=नेहमीं पैसा गाठीला लावावा व बायको बरोबर असावी

जोर्णे–(गो) पाऊस पडतवेळीं पेरण्याची शेती जाणें पहा

जोल–स्त्री (प्रा) जमणें, साजणें शोभणें जुळणें जोलीचा–वि मिलाफी, जुळणारा, योग्य असणारा शोभणारा

जोल्ल–न (व) लाटेचा आघात [का जोल्लु=लाट]

जोव–स्त्री (गव) वीज [स जव गु, द. प्रा जोई=वीज] जोवणें–अक्रि. (राजा) वीज चमकणें [जाव, म योतन]

जोवणी–स्त्री (राजा) जोखडाची शिवळ, खुंटी, खीळ [जू+अडवणी ?]

जोवणें–अक्रि (राजा.) दाटी जमणें, होणें, घोंगावणें (माशा, मुग्या इ०) [सं योजन, प्रा जोअण=जोडणें]

जोंवर–वरी, जोंवरीं–क्रिवि १ जोंपर्यंत, त्यावेळेपर्यंत २ यावत्काल, जितका वेळपर्यंत [स यावत्]

जोवाल–स्त्री (राजा) जमीन भाजणें, टहाळे तोडणें इ० शेतीचें सर्व काम करण्यासाठीं अनेक शेतकऱ्यांचा जमलेला समूह, अनेक शेतकऱ्यांनीं एकवट काम करणें, डाळें साप इ पहा [जोवणें=एकत्र जमणें]

जोव्हारी–पु जोहरी पहा

जोश-ष-स–पु जोम, जोर, आवेश, वेग [फा जोश्]

जोशी–सी–पु १ पचांग, कुंडल्या समजून गावात सांगणारा, ज्योतिषी, भविष्य वर्तविणारा, भिक्षुकी, जोसकी करणारा ब्राह्मण (विशेषत धंदेवाईक), ग्रामजोशी पूर्वी ही वृत्ति असे व जोशाला गावात बलुतें घेण्याचीहि वहिवाट असे २ एक कुणब्यातील जात, बुडबुड जोशी (कुणब्यातील), हे सहदेवी मताचे मुहूर्त, ज्योतिष जाणतात ३ बगळ्याच्या जातींतील एक पक्षी, कुडुंबुंभा [स ज्योतिषी, प्रा जोइस, जोइसिअ]

जोसकी, जोसपणा, जोसपण–स्त्रीपुन गावजोशाची वृत्ति, धंदा, वतन जोसगंड–पु जोशास निंदार्थी म्हणतात

जोहनळा–पु (महानु) जोंधळा पहा 'शिशुपाळसैन्याचे जोहनळे। पीटु करोनु एकें वेळें। उखळीं वसुधेच्या।' –शिशु ९१४ [म यावनाल, देप्रा जोण्हलिया, हिं जोन्हरी]

जोहर–पुन १ अग्नि 'जोहरीं रचील सपातें।' –मुआदि ९७१ २ (ल) संकट 'मला सत्य घालील कीं जोहरीं तो।' –विमु ८८ ३ लाक्षागृह –ज्ञा ११६० 'येथीं लाक्षाजोहर रचिलें।' –गीता १ २३६१ [फा जोहर=अभिदिव्य किंवा जहर ?]

जोह(हा–हो)री–पु १ सराफ, जव्हेरी, जवाहिऱ्या, रत्नपरीक्षक 'जैसा रत्नामाजी जोहारी। रत्न पारखी आपुलें।' –मुआदि ४१ १०१ २ जुना जरतार विकत घेणारा, जरीपुराना वाला ३ आरसा, फण्या, चरकी मार्डी इ० जिन्नस विकण्यासाठीं दारोदार फिरणारा, अशी जात –शास्त्रीको ४ (व.) मणी, पोंवळी विकणारी एक जात [अर जौहरी]

जोहळा जोहया, जोहा, जोहा–पु (ना) जोंधळा पहा

जोहा(ह)र–न १ जवाहिर रत्नें इ० 'भागावर जोहार फार मुडके। पर्नी जणु पत्रास तेल फुलले।' –होरा १३५ २ जवाहिऱ्याचा धंदा मराठी [अर जौहर]

**जोहार**—पु नोकर लोक राजाला वंदन करिताना हा शब्द हे वीरा या अर्थी म्हणतात 'रायासि जोहार करुनि उचित स्थानि बैसविला'—पच १ १६ 'प्रजा येउनी राजसभे। जोहार करुनी राहिल उभे।'—मुहरिश्चंद्राख्यान ६६ (नवनीत पृ १८६) महार, चांभार वगैरे आपसात किंवा वरिष्ठांना नमस्कार करिताना हा शब्द योजतात 'जोहार जी मायबाप जोहार।'—तुगा ३३६ [म जयहर, योद्धार, प्रा जोहर] **जोहारणें**—अक्रि वदन करणें 'मग जाऊनि वंदीजन। जोहारिला नृपनंदन'—कथा ६ १५ २२ [फा जोहर]

**जोहार**—पु १ शिकराच्या वेळीं आपल्या बायका—मुलांचा नाश करण्याचें हिंदू वीरांचें कृत्य रजपूत लोकांत बायका अग्नि प्रवेश करीत २ अग्निमात होणें 'कपि जोहार जाले'—भाए १०१ [फा जौहर=अग्निदिव्य]

**जोळ**—स्त्री (गो) जडू (प्राणी) [जडू]

**जोळका**—न (कु) माडाची चाग

**जोळी**—स्त्री १ (गो) आतडें २ (ठाणें) नागराला बेल जोडण्याची दोरी —बदलापूर २८७

**जोळोंय, जळोंय**—पु (गो) जळण, सर्पण [म जळ]

**जोळ्ळ**—वि (वि) पोल (भाताचें) [का जोळ्ळु=पोल-पणा, अर्थहीनता]

**जोक्षीकनू**—क्रिवि (खा) फुरसुतीनें

**जौं**—क्रिवि जव, जोंपर्यंत [स यावत्]

**जौजा**—स्त्री पत्नी, स्त्री, जवेनें पहा 'राधा जौजे माधव=माधवाची पत्नी राधा' [अर जौजा=बायको]

**जौंजार**—पु त्रास, कटाळा, जोंजार पहा

**जौनपुरी**—पु (संगीत) एक राग यांत षड्ज तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात आरोहात गांधार वर्ज्य जाति षाडव संपूर्ण वादी धैवत संवादी गांधार, गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर [जौनपूर गांव]

**जौस, जौसगी**—वि (नदभापा) उत्तम चांगलें जोश—प पहा 'जौस लुगडयांना किंमत फार पडते'

**जौहर**—पु बायकामुलांना जाळून मारण्याची रजपुतांतील एक चाल जोहार पहा

**जौळ**—न १ (कों) अभ्र अभ्राच्छादित आकाश २ (राजा) सपाटयाचे वादळ जोराचा वारा याचा वेग दर ताशीं ५० मैल असतो [फा जौगन्—फिरता]

**जौळी**—वि १ वादळी तुफानी (हवा, वारा) २ वादळाचा परिणाम न होणारें, त्याला भार वण्यासाठीं तयार केलेलें (तारू)

**जौळ**—न (महानु) समूह 'आनंदरसाचें जौळ।'—भाए ६६१ [सं जाल]

**ज्यहान, ज्यहानपन्हा**—जहान इ० पहा

**ज्यहागिरदार, ज्यहागीर, ज्यहांबाज, ज्यहांबाद, ज्यहामर्द**—जाहगिरदार, जाहगीर, जहामर्द इ० पहा

**ज्या**—स्त्री, १ धनुष्याची दोरी. २ पृथ्वी ३ जीवा, एक ज्या, वर्तुळाच्या परिघातील कोणतेहि दोन बिंदूस सांधणारी सरळ रेषा [स]

**ज्याचा**—जो संबंधी सर्वनामाचें षष्ठीचें पुल्लिंगी एकवचनी रूप •तो—एकएकटा प्रत्येक माणूस स्वतंत्र 'ज्याचा तो पडला शहाणा, मग दुसऱ्यांनीं काय शिकवावें?' •ज्याला—सर्वांना प्रत्येकाला 'ज्याची त्याला काळजी पाहिजे, दुसरा किती पाहील?' **ज्याचें नांव तें**—भलतें मुळींच बिलकूल 'तिला त्याबद्दल मी पुष्कळ बळ घालू पाहिलें पण ज्याचें नाव तें हिचें एकच उत्तर'—मूर **ज्यात त्यांत**—प्रत्येक कामात, प्रकरणात 'ज्यांत त्यात तोंड घालणें बरें नाहीं' म्ह० ज्याचें करावें बरें तो म्हणतो माझेंच खरें=उपकारकत्यानें सांगितलेली आपल्या हिताची गोष्ट न ऐकणें

**ज्याज्म**—न (गो) जाजम

**ज्यादा, ज्यादुगिरी, ज्यादू, ज्याका, ज्यास्त**—जादा, जादुगिरी इ० पहा

**ज्यान, ज्यानजवान, ज्यानज्वानी ज्यानीज्वानी**—जवान इ० पहा

**ज्यान फाइदा**—पु तोटा, नफा [फा जियान्=तोटा+फायदा]

**ज्यापक्षीं, ज्यापेक्षां**—क्रिवि कारणासाठीं, कारण कीं, असा करिता याच्या उलट त्यापक्षीं त्यापेक्षा

**ज्याफत**—स्त्री मेजवानी, जाफत पहा 'रसिद्यामहीं त्यांनीं आपले येथें ज्याफतीस आणिलें होते'—तीप्र ८३ [अर झियाफत्]

**ज्याफल**—न (गणित) ज्यापासूनचें अवरूप फल, वर्तुल चापाचें माप, धनुफल [स]

**ज्याबी(बु)द**—वि सुरक्षित शाबूत, नादुरुस्त नसलेलें [अर शाबीत]

**ज्याम**—वि (गो) दुर्बल अशक्त

**ज्यामिति**—स्त्री (भूमिति) भूपरिमाण भूमापन भूमिति पृथ्वीचें क्षेत्रफळ [स ज्या=पृथ्वी+मिति=मोजणें]

**ज्यार**—वि बिमार हैराण, बेजार जार पहा 'माल्याच्या अपीनें इमज ज्यार केलें'—होपो १३ [फा झार्]

**ज्यारत**—स्त्री पवित्र स्थानास भेट यात्रा जारत पहा 'पिराची ज्यारत करून '—दिमरा १ २४७ [फा जियारत्]

ज्यारी—कि चारू जागी पहा

ज्यालें—न जीवित जन्म जगें, जिणें पण 'प्रिय प्रिय मानि ज्यालें।'—गीता १० ६८ ०पण-न जन्म आयुष्य

ज्याह(हा)गिरदार, ज्याहागार, ज्याहांबाज—जाह गिरदार इ० पहा

ज्याहा—क्रिवि (राजा) जें।

ज्युदी—स्त्री (गो) अंगरखा

ज्युबिली—स्त्री महोत्सव आनंदोत्सव एखाद्या गोष्टीस, संस्थेस अगर व्यक्तीस २५, ५०, ६० अगर अधिक वर्षें झालीं म्हणून करावयाचा उत्सव [इं]

ज्युस्ताज्युस्त—वि (गो) नीटनेटका व्यवस्थीर [पोर्तु में ज्युस्त इ जस्ट]

ज्यूरी—स्त्री पंच, पंचायत ज्यूरी पण [इं]

ज्येष्ठ—पु हिंदु वर्षांतील तिसरा महिना —वि १ सर्वांत वयानें मोठा वडील (भावंडामध्यें) वयानें थोर २ उत्तम उत्कृष्ट श्रेष्ठ [स] ज्येष्ठलय-पु (ताल) विलंबितलय पहा ०धार सांचा कायदा—ज्येष्ठाधिकार पहा. (इं) प्रायमॉजेनीचर लॉ ०मंगल-न विवाह किंवा उपनयन संस्कार [स] ०मध ज्येष्ठीमध-पुस्त्री एक औषधी वनस्पतीचें मूळ हा गोड असतो याचा अर्क खोकल्यावर देतात ०घड-स्त्री ज्येष्ठाचा काल सरत ज्या महिना (आखाडा पंधरवडा यासारखा बनलेला शब्द)

ज्येष्ठा—स्त्री सत्तावीस नक्षत्रांपैकीं अठरावें नक्षत्र [स] ०कनिष्ठा-स्त्री १ समुद्रमंथनांतून निघालेल्या दोन बहिणींपैकीं वडील (ज्येष्ठा) ती लक्ष्मी आणि धाकटी (कनिष्ठा) ती अलक्ष्मी हाय काहींच्या मतें फक्त लक्ष्मीच समुद्रमंथनांतून निघाली त्या वेळीं तिला ज्येष्ठा म्हणत व तिचें विष्णूशीं लग्न लागल्यावर तिलाच कनिष्ठा म्हणू लागले २ वरील बहिणींच्या पूजेचा दिवस भाद्रपद शुद्धांत ज्येष्ठा नक्षत्र ज्या दिवशीं येतें तो दिवस [स] ०गौर-गौरी-गौरी—स्त्री एक देवता भाद्रपदांतील ज्येष्ठा नक्षत्रीं हिची पूजा करितात ज्येष्ठांश-पु स्थान अवाप्तभाग सर्वांत वडील भावास वडिलार्जित मिळकतीचा सर्वांत जास्त हिस्सा मिळावयाचा हक्क साम्य सगळ्याच भावांना समसमान हिस्सा मिळतो ज्येष्ठाम न न ल्हान माइनें मोठ्या माइस लग्नात द्यावयाचा मानपान किंवा ल्हान मुलीच्या लग्नप्रसंगीं मोठ्या जावयास सासऱ्याकडून जो मानपान द्यावयाचा तो ज्येष्ठ जावयाची पूजा [स]

ज्येष्ठी—वि ज्येष्ठ महिन्यांतील (पौर्णिमा) [स]

ज्येष्ठ्य—न १ वडिलपणा वडीलकी २ श्रेष्ठत्व वर्चस्व [स]

ज्योतिष—न १ ज्योतिःशास्त्र ग्रहांची गति जाणण्याची विद्या सांवत्सरिक व ग्रहज्योतिष २ ज्योतिषाचा उद्योग व धंदा जोशीपणाची वृत्ति जोसगी [स] ०चक्र-न नक्षत्रगोल [स]

ज्योतिषी—पु १ ज्योतिःशास्त्र खगोलविद्यावेत्ता २ फलज्योतिष सांगणारा, जोशी गणक 'पढोनि मुहूर्तचिंतामण। जाला ज्योतिषी ब्राह्मण।'—मन ४३२ [स]

ज्योतिष्टोम—पु १ ज्यांत सोळा ऋत्विज लागतात असा एक यज्ञविशेष, अग्निष्टोम २ (विनोदार्थी) मोठा घोळ, जंगी तयारी असणारें काम [स ज्योतिस्+स्तोम]

ज्योतिष्मान्—वि तेजस्वी तेजःपुंज, स्वच्छ तेजस्वीत, सुंदर प्रकाशमान [स]

ज्यो(ति)ती-त—न १ जोत पहा उजेड तेज चकाकी प्रभा, प्रकाश २ वात ३ (काव्य) रूप 'तुका म्हणे हातीं। तुम्ही माझी एक ज्योति।'—तुगा ३७७२ ४ पाणी तेज (रत्नाचें) 'तैसीच हिऱ्याची ज्योती।'—यथा २ ,४० [स ज्योतिस्] ०रूप-स्वरूप-न प्रत्यक्ष प्रकाश स्वयंसिद्ध प्रकाश परमेश्वरास हा शब्द लावितात ज्योतिर्लोक-पु आकाशांतील नक्षत्रलोक [स] ज्योतिर्लिं(लिं)ग-पु शिवाचें लिंग हीं १२ आहेत बारा ज्योतिर्लिंग पहा 'सत्य ज्योतिर्लिंगें बारा। प्रात काळीं स्मरण करा।' भूपाळी ज्योतिर्लिंगाची पृ १० ज्योतिर्विद्या—स्त्री ज्योतिःशास्त्र ज्योतिःशास्त्र—न सूर्यचंद्र ग्रहतारे इ० आकाशांत संचार करणारे दिव्य पदार्थ अथवा ज्योती यांच्या वास्तविक व भासमान स्थिती व गती, त्यांचीं वास्तविक स्वरूपें, आकार व घटना इ० गोष्टींविषयीं अवलोकन व अनुमान यांवरून होणारें ज्ञान हा ज्याच्या विवेचनाचा विषय असें शास्त्र खगोलशास्त्र, फल ज्योतिषशास्त्र [स]

ज्योत्स्ना—स्त्री चांदणें चंद्रप्रकाश कौमुदी [स]

ज्वर—पु ताप पुढें दिलेल्या शब्दासंबंधानें वैद्यामध्यें फार मतभेद असल्यानें ते येथें सार्थ दिले आहेत ज्वराचे प्रकार—ऐकाहिक ज्वर—१ रोजच्या रोज येणारा ताप २ एकामागामाग चढउतार होणारा ताप द्व्याहिक ज्वर—१ दोन दिवसांच्या अंतरानें येणारा ताप २ रोज दोनदा भरणारा ताप ३ फक्त मध्यें एकच दिवस न येणारा ताप त्र्याहिक ज्वर=१ तिसरे दिवशीं येणारा (मध्यें दोन दिवस अगदीं न येणारा) ताप २ प्रत्येक तिसऱ्या दिवशीं येणारा ३ तीन दिवस सतत येणारा चातुर्थिक ज्वर= चवथ्या दिवशीं येणारा ताप आता माधवनिदानाच्या मतें—एका हिक—चढउताराचा ताप द्व्याहिक=एक दिवसाआड येणारा ताप त्र्याहिक=दोन दोन दिवस सोडून येणारा ताप चातुर्थिक=चवथ्या दिवशीं येणारा (यावद्दल मात्र सर्वांचें एकमत आहे) मात्र सतत-

ज्वर व सन्निपात यांमध्ये भेद आहे सन्निपात=चढउतार होणारा ताप सन्निपात=मस्तकास भ्रम करणारा ठणका रोज भरणारा ताप एक दिवसाआड ज्वर [स ] सन्निपात-०पाच(चा)धा-पु १ ताप निघाल्यानंतर रोगास दिवसाग्निवयास लागल्यावर पुन्हा उलटलेला ताप पाचवा पहा २ दृष्टीने उलटलेला ताप ०विपाक-पु तापाचा भर एक जागेत असलेला ताप. विपाक पहा [स ] ०सूप्ति-स्त्री तापाच्या गुंगीमुळे पडणारे स्वप्न, होणारा भास [स ] ज्वरांकुश-पु तापावरील एक औषध [स ]ज्वराति सार-पु तापावस्थेवरचा अतिसार, हगवण [स ] ज्वरांश-पु तापाची कसर, कणकण तापाची लक्षणें [स ] ज्वरित, ज्वरी-वि ताप आलेला [स ]

ज्वल ——वि जहालापेक्षा जास्त, सरकारविरोधी, कडक ( इं ) रॅडिकल –सुट [ सं ]

ज्व —न १ जळणें, दहन २ दिप्ति, अग्नि ३ जळणें, जळफळाट [स ]

ज्वलित—वि १ जळत असलेलें २ जळलेलें, दग्ध झालेलें [स ]

ज्वल्न—वि १ द्वेष, संताप, क्रोध, राग २ दुर्गंधि, घाण ३ भीति धाक, भयाची प्रबळ भावना [ जळप ]

ज्वात—न (कु ) जोत, जोत पहा

ज्वान, ज्वानकट्टा ज्वानपट्टा ज्वानमर्द, ज्वानमर्दी, ज्वामर्दी, ज्वा(नि)नी, ज्वानादिवानी—जवान इ० पहा 'अर्गी तारुण्याचा चढ्र ज्वानिचा कहर, मारित लहर, मदा तल्वार।' –राला ११३ [फा जुवान्-नी, स यौवन]

ज्वामर्द, ज्वामर्दी—जवानमर्द-मर्दी पहा

ज्वार, ज्वारी—स्त्री जोंधळा पहा [हिं ज्वारि] ०भड कणें–(व ) ज्वारी वाळणें

ज्वाला ज्वाळ-ळा—स्त्री ज्योत जाळ, अग्निशिखा, जळत असणारा दिवा [स] ०ग्राही–वि जळणारें जळण्याला योग्य लवकर पेट घेणारें [स] ०पटल–न ज्वालांचा समुदाय आगीचा लोंढा आगीचा झोत [ स ] ०माळी–पु अग्नि [स] ०मुखा–पु पृथ्वीच्या पोटातील उष्णतेमुळें वायु व रसरस ज्या पर्वताच्या तोंडावाटे बाहेर पडतात तो पर्वत –स्त्री एक देवी हिच्या मुखातून ज्वाला निघत असते

---

# झ

झ—वर्णमालेतील नववें व्यंजन याचे ज या वर्णाप्रमाणें दोन उच्चार आहेत एक तालव्य उदा० झिंगणें, झकार व दुसरा दंततालव्य उदा० झटों, झगा इ० अक्षरविकास—या अक्षराची जैन व दक्षिणी अशी दोन वळणें आहेत प्रस्तुत वळण दक्षिणी आहे या वर्णाची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार शिलालेखांत, दुसरी पुलुमावी याच्या लेखांत, तिसरी राजाशिवगणाच्या कोटा लेखांत (सन ७३८ ) व चौथी अवस्था इ सन ११ व्या शतकांतील एका हस्तलिखित पुस्तकांत सापडते पाचव्या अवस्थेंतील झ चवथी पासून तयार झालेला दिसतो

झऊल—वि (ना) (अशिष्ट) लफंगा, थापेबाज ०पणा–पु (ना ) थापेबाजी लफंगपणा

झक—स्त्री १ (या शब्दाचा निराळ्या अर्थी उपयोग होतो पण मूळचा अर्थ म झष=मासा यावरून निष्पन्न असावा) मासा २ (ल ) वाईट गोष्ट नियमर्म [ स झष=मासा, हिं झक=मूर्खपणा, पागलपणा, स झष्=मारणें, दुखविणें, अर झक्=फसविणें] (ग्राम ) ०मारणें–(अशिष्ट) १ ढोबळ चूक करणें, मूर्खाप्रमाणें वागणें २ नियमर्म, व्यभिचार इ० करणें, लोकसंप्रदायाविरुद्ध वागणें 'तो आईबापाचें ऐकत नाहीं झक मारतो ' ३ करूं नये ती गोष्ट करी असें कबूल करणें किंवा कबूल करून तिच्याबद्दलचा दोष आपल्या पदरात घेणें. 'मी तुमच्या नादास लागून पडलों, झक मारली (एखादी गोष्ट) झक मारीत झक(क)त करणें–जाणें–देणें–येणें– इच्छा नसताहि नाईलाज म्हणून करणें–जाणें इ० आपखुषीनें, खुशीत करणें इ० 'या भरवशानें दवडिलें तुम्हा। येईल झकमारु म्हणोनि।'–दावि ४५० झकत पहा झकमारीत राहणें–भीक मागणें नाइलाज म्हणून हात चोळीत बसणें, बोंबलत राहणें 'मागें दौलत किल्ले स्वामींचे स्वामी घेतील कर्जदार झक मारीत राहतील' –ख १ १७७ [ तुल० अर झकान=भिक्षा ] झक मारून झुणका खाणें– (क ) झकमारणें मूर्खपणा करणें, यकचे भाषणादि ग्राम्य अर्थ आहेत

झक—स्त्री झाक चमक दिपविणारा प्रकार 'झक पडे नयनीं। जाय निघोनि।'–दावि १७८ –वि झक, भपकेदार चकचकीत झगझगीत लखलख 'झळकत झक झळ घनदामिनी।' –दावि ४९६ [ध्वनिसादृश्यावरून अनुकरणवाचक शब्द स चकम्, चक, हिं झक साफ चकचकीत, चमक झक] ०झण– कन–कर–दिनीं–दिशीं–क्रिवि एकदम चमकून तेज पाडून चकाकत लखाकत

झकरणें—अक्रि चळकणें, झकाकणें चकाकणें 'शामकांतीची आकृती। हिरेजडीत झकरती।'–ह ३४ ११८ [झक द्वि ]

झकझक-झकी—स्त्री चकाकी, तेज, चमक, लखलखी, झळक (अग्नि, तारे, वगैरेची) —वि लखलखीत, चकचकीत, प्रकाशमान, झळकणारें. [झक द्वि] झकझक-झकां-क्रिवि लखलखकरीत चकचकत, झळकत झकझकणें-अक्रि चकाकणें, झगझगणें, लखाकणें, लखलखणें, चमकणें [झकझक] झकझकाट—पु लख लखाट, चकचकीतपणा, चकचकाट, अतिशय प्रकाश झकझकीत—वि चकाकणारें, तेजस्वी, झळकणारें, लखलखणारें, चकचकीत [झकझक]

झकटणें—अक्रि (काव्य) १ घसटणें (जाताना, येताना) घासून जाणें, चाटून जाणें, घसवटून जाणें २ झगडणें, भांडणें कलह करणें झगडणें पहा [देप्रा झगड=कलह]

झकणें—अक्रि १ विस्मित होणें, मोहून जाणें, घोटाळणें, फसणें, दिपून जाणें, थक होणें, चकणें 'येती ना द्विज केवळान्वय चके इष्यापुढें द्वारके।' —आमु १८ २ मोहून, भुरळून, हुरळून, गोंधळून जाणें, चुकणें भटकणें, मार्ग सोडून जाणें, वहकणें, चकणें, फसणें 'दसोदेसी गुरु करिती। शिष्य शिणती। गुरुची परिक्षा नेणती। झकोनि जाती।' —दावि १३५ [सं स्थग्]

झक(क)त—क्रिवि अवश्य, निरुपायास्तव, झकमारीत, चुरीत, आपोआप हा शब्द सर्व क्रियापदाचा गुण दाखवितो आणि पुरुषव वस्तु याम लागतो झक पहा [झक, सं धक्ति–मिगर्येधक्ति-झक्ति-झक्त —रा भाअ १८३४] म्ह० नाक दावलें म्हणजे झक्त तोंड उघडेल.

झकपक, झकमग, झगमग—स्त्री १ चकाकी, झळकी, चमक २ साफसुफी, चकचकीतपणा. ३ नीटनेटकेपणा, टापटीप —वि साफसुफ, चकचकीत, लख्ख [झक द्वि, गि झिगिमिगि]

झकमक—स्त्री चकमक, भांडण रगडा, खडाजंगी (क्रि० झडणें) 'झकमक सुरू झाली की अशा बातम्या निघायच्याच' —सूप्रम २३५ [चकमक]

झकवण-वणी, झकवणूक—स्त्री १ फसवणूक, ठकवणूक भुरघाप २ फसल गेल्याची स्थिति, भ्रम [झकविणें]

झकव(वि)णें—उक्रि १ दिपविणें, मोहून टाकणें २ (ल) चकविणें, भुलविणें, गादी लावून झुलविणें फसविणें 'साचचि तुट ले ना यन्ना। तुम्ही लटकें न झकवा।' —ऋ १०२ 'तयापरी रे देवा। मन झका न येसी मावा।' —ज्ञा १२३२ [झकणें प्रयोजक]

झकवाद—पु १ शुष्क वाद, विनडवाद २ लघडाव पसरव रीतीचें भाषण, टावाद ३ मिथ्यावाद अतिकर्षी भाषण उप देश 'आर्या कवीमाने झकवादी। बकवादी नेणीं मानवा।' —मुसभा १२.१४ 'म्हणोनिया म्रियचे बुद्धी। जो मन लागे झकवादी। तो नासेल अथवा विशुद्धि। पडेल पत्नीं।' —कथा ५-८४७ [झकणें=फसणें+वाद]

झकाकणें—अक्रि अतिशय झकझकणें, चकाकणें, लख लखणें, लखाकणें, झळकणें 'सतेजीक तेज झकावी लखाखी।' राक १९० [झक्कनकों, स चकास्]

झकाकी—स्त्री चकाकी, चकचकाट, झगझगाट, तेजस्विता, तरतरी [झकझकी]

झकाकीत-कत—वि १ चकचकीत, तेजपुंज, सतेज २ सफाईदार उजेलदार

झकाझक-झकां—क्रिवि १ धडाधड, खळखळ, गडोसरीं झडझडा (पैसा खर्च—जाणें) २ एकदम व एकमारखें गपदिरीं 'झकाझक डोळे झाकतात झोंप येते' [ध्व अनुकरण]

झकाझकी—स्त्री झकावी, भपका, पोकळ डौल 'झकापसी झकों नका। टराठसी ठकों नका।' —दावि २०८ [झक=प्रकाश द्वि]

झकाझरी—स्त्री भांडण, झगडा झकमक पहा

झकाझोक—स्त्री ऐट, नखरा, डौल, थाटमाट, नटनथटून डोलनें जाणें (क्रि० लावणें, मांडणें, करणें, वटून चालणें) [झक+झोक]

झकार—स्त्री (ना) उष्ण हवेची लपेट.

झंकार—पु झणझण, घणघण असा आवाज, झणत्कार, छुन्, छुन् आवाज (घंटेचा, किंवा नाचणाराच्या पायातील घुंग राचा, वाद्याचा इ०) 'जेसें निरजनीं उठे झंकारा।' —दावि ६८ [स. ध्व]

झकारपटी—स्त्री (गा) खरडपट्टी, खटसावणी खरपूस समाचार

झकास-शा—वि १ चागला, [illegible] २ (हु) ऐटबाज डौलदार ३ चकचकीत [illegible]

झक्क—वि १ चक, लख्ख, [illegible] चागलें दिसणारें २ झकास पहा

झख—पु (माण) मासा (क्रि० मारणें) [illegible]

झख-कण-कन-कर-दिनीं-दिशीं—क्रिवि झरम पे पहा

झखड—स्त्री झगडा झकमक —वि [illegible]दी, हेकेखोर हट्टी दुराग्रही [हिं]

झखी—वि (व ना) लागी छादिष्ट [हिं [illegible] झखी= वडवडया]

झनकू—पु १ (विणींदाच्या माळ) एक मग, सूत (मांडे) माजण्याचा परिमाणदर्शक शब्द, एक गच्च दार, [illegible] वगैरे. लेड इ० विकतात इत लागू शकून एक भारा होतो २ (का) जनागीच्या रात्रीं पान [illegible] दुसऱ्या [illegible] पान टाकून

भारी पानवाल्याला डारतील सर्व पानें छ्यायाग लावण्याची क्रिया झब्बू या अर्थी चुरीचा प्रयोग 'दुर्री टाक म्हणजे झब्बूची व्याद टळेल' ३ (अश्लील) मैथुन, स्त्रीसंग, समागम

**झगझग, झगझगणें, झगझगाट, झगझगीत, झगझगी**—झगमग इ० पहा.

**झंगट**—न एक वाद्य, ताल जेंगट पहा 'तूं प्रथम झंगट वाजीव'—वाय १ ७ [ध्व]

**झगट**—न त्याड, भानगड, झेंगट पहा.

**झगटणें**—उक्रि. १ जोरानें पकडणें, धरणें, कवटाळणें २ जोरानें पुसणें, घासणें ३ झाडणें, झटकणें 'हस्ती झगटी कवरी भार।'—नव २०.१८ —अक्रि. १ जोरानें झोंबणें, चिकटणें दाबणें रेटणें, भिडणें, चिरगणें 'झगटिये झगटें। पग चाच तैली।'—ज्ञा, ५९८ २ झगडणें, भांडणें (एखाद्यावर) चालून जाणें जागानें हल्ला करणें, तुटून पडणें, भिडणें, वाद करणें, अद ळणें पहा 'मेह मारुत झगटले। तैसे रथ अतिवेग टगटें।'—एरुस्व ११.२४. ३ जडणें, वेधणें 'माझ्या स्वरूपीं झगटलें मन।'—एभा १४ १६० [ध्व हिं झगडा, झगडणें पहा]

**झंगट**—स्त्री १ ताल, वाद्य जेंगट पहा. २ वाद्याचा गजर, कडकडाट (क्रि० उठणें, लागणें), गोंगाटानें युक्त असें भांडण, वादविवाद, कल्लोळ, गोंगाट, खडाजंगी (क्रि० लावणें, माडणें चालणें). ३ (व्यापक) (मेजवानींतील पदार्थ, गाणें, वाजवणें, नाचणें इ० कांची) विपुलता, दंगल, लयलूट —क्रिवि जोरानें, मोठ्या आवाजानें, कल्लकल्लागानें, दणदणाटानें (ततुवाद्यें इ० वाजणें) 'झगट झगट नौबत वाजे। तें एथेंच साजे।' [ध्व]

**झगडणें**—अक्रि १ भांडणें, तंटा करणें, वादविवाद करणें, हुज्जत घालणें, लढणें २ विलगणें, झोंबणें, झगडणें [द प्रा झगड=भांडण, का जगळ, हिं झगडना, सिं झगिडो]

**झगडा-ड**—पुस्त्री १ तंटा, भांडण, कलह २ कज्जा, मुकद्दमा खटला ३ लढाई, युद्ध 'तो दुःशासन राया सहदेवा बधुसीं करी झगडा।'—मोकर्ण ९ ६ ४ (नाटक) दोन पात्रांचा संगीत वादविवाद, संवाद, छक्कड 'अश्या पुष्कळ संगीत झगडे .. संगीत छक्कडी पाहिल्या आहेत'—संगीतघोटाळा ५ ५ (व) एकरूपता, मिश्रण 'रानहमापुढें। चाचूचें आगरडे। तोडी जेवीं झगडें। क्षीर नीराचें।'—ज्ञा १४२०७ [ध्व दप्रा झगड, का जगळ, हिं झगडा, गु झघडो, सिं. झगिडो]

**झगडाऊ-डू**—वि भांडखोर, भांडकुदळ कलहप्रिय, तंटेखोर **०झगड**—स्त्री १ भांडाभांडी (सामुदायिक, सार्वनिक), जोराचें भांडण कज्जा २ मुकद्दमा, खटला **०रगडा**—पु खडाजंगी, धडकाधडकी, गलबल्यानें युक्त असें मोठें भांडण [झगडणें+रगडणें]

**झगडी**—स्त्री भांडखोर; तंटेखोर, भांडकुदळ. 'वासनाबायको शेजारीण। झगडी कुटीळ मोटी दारुण।'—अज २१

**झगडेयार**—वि (गो.) भांडणारा, तंटेखोर, कलहप्रिय [झगडा+करणें]

**झगमग**—स्त्री १ चकाकी, लकाकी, झगझगपहा 'दीपाचिया झगमगा। जाळील हें पतंगा।'—ज्ञा १३ ७४० —वि लखलखीत, चकचकीत —दार [झक द्वि]

**झगमगणें, झगमगी, झगमगीत, झगागणें, झगागी, झगागीत**—झगझगणें इ० पहा

**झगमगणें**—अक्रि झळकणें 'केशर कस्तुरी भालीं झगमगिताहे।'—मप्र ४ १७

**झगमगी**—स्त्री चकाकी, तेज 'दखोनि दीपरूप झगमगी। उपभोगबुद्धी पतंगी।'—एभा ८ ८९

**झगमगीत**—वि तेजस्वी, तेजःपुंज 'त्रयोदश वर्षे रजनीत। झगमगीत होते पैं।'—पाप्र ३६.३३

**झगटे-टी**—स्त्री १ पद्धविलेल्या गोवऱ्याचा, खरखरीत निखाऱ्यांचा टीं। (स्वयंपाकासाठीं, शेकण्यासाठीं), २ (चि) थोडासा विस्तव असलेली तप्त राख ३ (सामा) शेगडी, आगटी 'शेतांतून शेतकरी लोक शीतनिवारणार्थ मोठमोठ्या झगट्या पेटवून सभोंवतीं बसले होते'—मौनयौवना, आवृ २. पृ. २१५ [ध्व झग=अग्निप्रकाश धग=विस्तव]

**झगोलें**—न लहान मुलांचा झगा, झबलें [झगा अल्प हिं झंगुली]

**झगा**—पु १ पायघोळ अंगरखा 'पाळी येकला निजगा। अंगीं चिवटा झगा।'—मव्व ३१ २ मागें गुंड्या असलेला व कमरेजवळ चुण्या असलेला मुलींचा गळ्यापासून पायापर्यंतचा पदर राजव्यवहारकोशांत याला प्रतिशब्द कंचुकी असा दिला आहे —राव्यको २ २५ [अर जुब्बा, फा जुगा, तुल० स झग्=झाकणें]

**झगारी**—स्त्री झगी, झकारी पहा

झगाझुगी—स्त्री (माण) झोंबाझोंबी, लोळालोळी

**झगार**—न १ पावसाची अंधारी मळभ आभाळ, मेघाचें अवडंबर (क्रि० येणें उठणें, निघणें घालणें) २ अभ्रपटल, ढगाचा समुदाय मोठा ढग ३ पावसाची सर (क्रि० पडणें)

**झगी**—स्त्री चकाकी, तेज झाक, झकाकी 'नेत्रीं काशिंपीचे अगीं। जडली रुपेपणाची झगी।'—एभा १२ २३९ [झक्-ग]

**झंजर**—पु (गो) घुंगुर. [ध्व, सं झर्झर प्रा झञ्झर=वाद्यविशेष]

**झंजळणें**—अक्रि. (व) सणाणणें, सतापणें [सं प्रा झंझा]

झंझा(झा)पवन-मारुत-वात-वायु-समीर—पु पर्ज न्ययुक्त वादळ, सोसाट्याचा वारा, वादळ, वावटळ, अतिशय जोराचा, गर्जना करणारा वारा, तुफान 'जैसा प्रकटतां झंझामारुत। जलदजात वितुळे' –ह १२०. 'शिरला कौरवकटकीं जैसा झंझागमीर हरनिवर्गी।'–मोभीष्म ७ १६ [स झंझा=वाऱ्याचा, पावसाचा आवाज, वादळ+मारुत=वारा]

झंझट—न (ना) झगट रचाड, गुऱ्हाट ब्याद [झंगट पहा]

झंझाना—पु (व) पंखा, विंझणा [स वीजन, म विंझणा]

झट—न. रचाड, लोढणें लिगाड, खेकटें, झंगट उपाधि, पाश्याचा (मनुष्य, प्रसंग, स्थिति यांस उपयोग) इतर अर्थी रचाड पहा 'मन्मनाथ म्हणे आलें होतें झट। परशरामभट दवा वाटे।' –मन ७६ –स्त्रीन १ आघात, धक्का धुमणी टोला रिमका, प्रहार (क्रि० लागणें) 'आदळतां मोहाचीं झटें। ज्याचा बोध कदा न पालटे।' –एभा २१३१० २ (व) ठेंच टाकर [स घट्‌-सघाते] ०घेणें–(व) वाल्ट रचणें, विनाकारण आरोप करणें ०लावणें–(व) कधाळा यदेपर्यंत गप्पा मारणें

झट झटसा—क्रिवि. लौकर, त्वरेनें, जलदीनें, झटकन झटदिशीसरशीं 'तेव्हां भीम उठोनी गेला बाहेर तूर्ण झटसा रे।' –कीर्तन ११८ [सं झटिति, हिं गु झट ध्व] ०कन–कर–दिनीं–दिशी–क्रिवि लौकर, जलदीनें, त्वरेनें चपल, लवकर झटझट, झटझटां झटाझट टां, झटाटा–क्रिवि झटकन पहा चपलतेनें, एका क्षणात, झटक्यासरशीं, लौकर लौकर, पटपट 'चला झटपटा वोसडुनि वाट। पटरी मूळ पीठ दूरी आहे।' –व ४५८ 'तो शतश पट झटपट फेडुनि भागे सभेत वेडावे।' –मोसभा.५ ८९ [ध्व झट्‌ द्वि]

झटक—स्त्री १ चटदिशीं जाऊन परत येणें फेरफटका फेरा, य जा (क्रि० मारणें) २ झटका, झटकारा, फटकारा तडाखा (क्रि० मारणें) 'हासें देखोनि मातें झटक उठविता काय सांगू कपाळा।' –आह २९ [ध्व झट्]

झटकणें—अक्रि १ सटकणें, झडाडणें झटकन्‌ निसटणें, २ (दुसऱ्यापासुन) विभक्त होणें निराळें राहणें संबंध तोडून वागणें, तुटक वागणं (या अर्थी हें क्रियापद सामान्यत फटकणें या क्रियापदाला जोडून येतें उदा० झटकून फटकून राहणें असणें) [झटक]

झटकणें, झटकाविणें—उक्रि १ झाडणें (वस्त्र) २ कपाटानें वाढून मारणें, फटकारा मारून, हिसका देऊन झाडणें ३ (धान्य, अग्नि इ० वर) वारा घालणें फोल, कोंडा इ० निघे असें करणें, पाखडणें. ४ पंखा इ० नें वारा घालून अग्नि प्रज्वलित करणें ५ हिसडणें, हिसडा देणें, झटका देणें, झाटणें (हात पाय इ०) 'कहीं लटके हलके झटके विजयी भवानी तलवार।' –हिरकणी, स्वातंत्र्य शार्दूल [झटक, हिं झटकना, गु झटकवुं]

झटका झटकारा—पु १ (काठी इ० काचा) तडाखा, फटकारा, टोला, आघात २ हिसका, हिसडा (हातानें, पायानें मारलेला) 'हातानें मारिल झटका।' –मग्रामगीतें ४७ ३ (वेद नेचा, दुःखाचा) आवेग, कळ, लहर, आचका, टिडीक, चमक, करक ४ (वाऱ्याचा) वेग, झपाटा, सपाटा, सोसाटा ५ (राग, वारा, संताप इ० काचा) फणकारा, झणकारा ६ झपाटा (भूत, पिशाच्च इ० काचा) ७ झोंका, पाय मागेंपुढें होणें (नृत्यातील) ८ (हाताचा, शरीराचा) हेलकावा, हलावा, झोक, झोल ९ (शस्त्राचा) झपाटा, फटकारा, फेर, मंडळ १० वस्त्राच्या शेव टाचा फटका, फटकारा (क्रि० मारणें, देणें, बसणें) ११ (धान्य इ० सुपात घालून किंवा पंख्यानें) फटकण्याची क्रिया, झटपण, पाखडणें. (क्रि० देणें) १२ (एखादा पदार्थ दुसऱ्यावर आदळ ल्यानें लागलेला) धक्का, ढुमणी, आघात, (पडताना लागलेला) ठोका, मार (क्रि० लागणें) १३ (उन्हाची) झळ, तिरीप १४ (रोग, जरीमरी, साथ इ० काचा) घाला, सपाटा, धाड (तापाचा पित्तविकार) १५ (पिकावर पडणारा) तांबेरा, मेकाडा १६ (व्यापारातील) तोटा, धक्का, टोकर (क्रि० लागणें, बसणें, मारणें) वरील सर्व अर्थी 'झटकारा' शब्दापेक्षा झटका याचाच जास्त उपयोग रूढ आहे [ध्व झट, हिं झटका] सामाशब्द– ०फटका–पु १ सर्व अर्थी झटका पहा २ (पावसाची) जोराची झड, झडी, वादळी पाऊस ३ जोराचा सपाटा, दाब जोर, झोर, तडाखा ४ तगादा, नेट, लकडा (एखाद्या कामाचा, धंद्याचा) [झटका+फटका] झटकारणें–उक्रि. १ झटकणें, झाडणें २ हिसडणें, ओढणें ३ झिडकारणें, तिरस्कारणें धिक्कारणें [झटकारा] झटक्यापटक्यांत–क्रिवि एका झटक्यात क्षणार्धात, झट्‌ दिशीं, झटक्यासरशीं [झटक+पटक] झटक्यासरशी–सरसा– क्रिवि १ फटक्यासरशीं फटकारा लागताच तडाखा बसताच २ एका हिसक्यासरशीं एकदम ओढताच ३ एका उडीसरशीं, उसळी सरशी–सरसा ४ जोरानें चपलतेनें झटकन ५ (रागाच्या सता पाच्या) फणक्यानें फणकाऱ्यानें झणकाऱ्यानें ६ एका आच क्यात एकदम एकाएकीं (प्राण जाणें मरून पडणें)

झटका—पु (तंजा म्हैसूर) एका घोड्याची छकड्याचा गाडी ही उचीला कमी असून बरीच लांब असत

झटकाविणें—उक्रि झटकणें पहा 'तें आपलें उर पाण्यात बुडवून तीं भिजलेलीं पिसें धुळीवर झटकावतें'–मराठी ६ वं पुस्तक (पृ २५) ६ आ २

**झटझोंबट**—न (व्यापक) १ तटस्पर्श, भांडाभांडी, भाडगलाट २ अडचणी, गिल्ले, सेकटी, लचांडें, पेंच, पेंचाइशी. [झट+झोंबट]

**झटणें**—अक्रि १ (एखाद्या गोष्टीविषयीं) नेटाचा प्रयत्न करणें, आटोकाट यत्न करणें, मनापासून श्रम घेणें, 'धराया रायाचे भट झटत येतांचि जवळी।' –मोकृष्ण ६२ ३४ २ (लढाईत, भांडणांत एखाद्याच्या अंगाशीं) भिडणें, झोंबणें, लगट करणें, तुटून पडणें 'तो गज गदाप्रहारें धृष्टद्युम्नें झटोनि लोळ विला।' –मोशल्य ३ ३७ [मं झट्=गुंतागुंत होणें]

**झटपट**—स्त्री १ त्वरा, घाई, जलदी, चपळाई, चलाखी (कामाची) (क्रि० घेणें, लावणें, धरणें, करणें) 'असें आळसावर करूं नको, थोडी झटपट धर' २ झटापट, चकमक, खडाजंगी हमरीतुमरी (क्रि० उडणें, होणें) 'स्पर्शे खटपट आणी चटपट। तऱ्हे झटपट आणी वटवट।' –दा २.३ ७ –क्रिवि चपळाईनें, झटदिशीं, चटकन, तडकाफडकी, लौकर, [ध्व देप्रा झडप्पड=त्वरित] **झटपट्या**–वि चलाख, चपळ, झपाट्यानें काम करणारा [झटपट]

**झटा**—पु झटापट, झुंज झट पहा 'बोलके पहिलवान कळवटे। तयासीच घ्यावे झटे।' –दा १९ ९ १९ [स झट्=संघातें]

**झटारणें**—अक्रि लागणें, चिकटणें 'लोखंड परिसा झगटलें जेव्हां।' –व ४४६ [झटा पहा]

**झटापट-पटी**—स्त्री १ भांडण, कलह, रागाचा वादविवाद, झटपट (क्रि० उडणें, झटणें, लागणें, होणें, लावणें, करणें) २ घाटाळा, घाई, गोंधळ, धावदौड, धादल ३ स्पर्धा, अहमहमिका. [ध्व स झट्+पट्]

**झटाळ**—न झट, झेंगट, लचांड. झट पहा [झट]

**झटा(ट्या)ळ-ळी**—वि नाना तऱ्हेच्या युक्त्या, हिकमती, कल्पना लढविणारा युक्तीबाज, मसलत्या २ कर्जबाजारीपणामुळें अनेक लचांडें मागें असलेला, पेंचांत सापडलेला ३ झोंट, शोंड, निर्लज्ज, अप्रामाणिक ४ (व) गळघट, चिकट, चिवट 'ही आसामी झटाळ आहे' [झट+आळ प्रत्यय] म्हण० झटाळ गट आणि फटकाळ नगरी=मनुष्य किंवा स्थळ याची दुर्व्यसनता दाखवितांना योजतात **झटा(ट्या)ळी**–स्त्री झटाळ माणसाची वृत्ति, धंदा झटाळपणा

**झटें**—न १ दोसणी, ओढाताण झोंबी, झुंज, झट पहा 'वनवीतीं वपारें। डोंगरा दहचति झटें।' –ऋ ७९ 'अहो तान्हयाचे लागतां झटें। तरी अधिकचि पान्हा फुटे।' –ज्ञा ९ १८ २ (ल) ऐक्य, एकरूपता 'तव महाभूतांची जवनिका फिटे। मग दोहींसि होय झटें।' –ज्ञा ६ ३०६ [झट]

**झटेपटे, झट्टेपट्टें**—न अव अटापीट, उरस्फोड, दगदग, अटाआट, यातायात (क्रि० लागणें, घेणें, सापडणें) [झटापट]

**झटेल-ली**—वि. चावटपणाच्या, खोडसरपणाच्या गोष्टी करण्यास पटाईत, पूर्ण हिकमती, त्रासदायक, उलपती झटाळ, झटाळ पहा [झट]

**झट्टी**—स्त्री (गो) १ नाटकाची तालीम २ परवचा, उजळणी

**झड**—स्त्री १ पावसाची एकसारखी वृष्टि, झिंबड, पाण्याचा सतत वर्षाव, त्यावरून २ (ल) एखाद्या वस्तूचा सारखा वर्षाव (क्रि० लागणें, धरणें) 'भीमावरि न गणुनि नरवृष्टीची झड करी करी लगट।' –मोद्रोण २ ४६ ३ जोराच्या पावसाचे उडणारे तुषार वावझड, शिंट ४ (ल) पावसाचे तुषार आंत येऊं नयेत म्हणून दार, खिडकी, पागोळ्या इ० वावर बनविलेलें झडप, तट्या, पासोडी, छप्पर, हायरी (सुपारीच्या झाडाची चुडतें) ५ (घार, गिधाड इ० हिंस्र प्राण्याची) झडप, झपेट झोंप ६ (ल) धाव उडी, झडपडा (एखादी वस्तु मिळावी म्हणून घातलेला) उत्कंठेनें घातलेली उडी झेंप 'झडकरि उड घाली धात पंचानना रे।' –रामदास, करुणाष्टकें (७ नवनीत पृ १७०) ७ एका वस्तूवर एकाच कालीं अनेकांची प्रवृत्ति (क्रि० घालणें, करणें, पडणें, लागणें) 'एकच विहीर पडली त्यामुळें सर्व लोकांची झड पडते' ८ (एकामागून एक येणाऱ्या गोष्टींची, माणसांची) मालिका, परंपरा (क्रि० लागणें, पडणें) [ध्व प्रा दे झडी=निरंतर वृष्टि]

**झड**—स्त्री १ (डोक्याचे केस, झाडाचा मोहोर, पानें इ० यांचें एकसारखें) गळणें, पड २ (ल) (शरीराची क्षय इ० रोगानें होणारी) झीज, क्षय, क्षयरोग (क्रि० घालणें, लागणें, पडणें) [झडणें पहा]

**झड**—स्त्री त्वरा, जलदी, घाई, 'पश्चात् देखु ल्यौनीं। पातलासे झड करोनि।' –शिशु ७३६ [स झटिति, प्रा झडि]

**झड**—स्त्री झुल, लगट, झोंबाझोंबी, हल्ला 'ज्याच्या शरीरबळाचें कोड। एकला लक्षावरी दे झड।' –एभा १७ १३९ [स झट्, म झट] **झडे येणें**–अक्रि लोभाविष्टपणें मागें लागणें 'तो गुरु नव्हे भिकारी। झडे आला।' –दा ५ २ २०

**झड**—स्त्री (गो) पिशाचबाधा

**झड**—वि (गो) हट्टी, शोंड, झट. हूड [शोंड]

**झडकणें**—सर्व अर्थी झटकणें पहा विशेषत झाडणें क्रियापदाच्या पुढें योजतात उदा० झाडून झडकून ठेव (धान्य, वित्त्व इ० घर)

**झड-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि झडकन इ० पहा

**झडकर, झडके**—क्रिवि झपाट्यानें -शार झडकन पहा

**झडकरी-करून**—क्रिवि (काव्य) लौकर, झटकन, जलदीनें, त्वरेनें 'ते वेळीं अर्जुन म्हणतसे देवा। आता झडकरी रथु पेलावा।'—ज्ञा १ १६९ 'सतोपोनि बोले रमारमण। भीमा येईं झडकरून।'—जैअ १०२१

**झडका**—वि क्षीण झालेलें रोडावलेलें, झडलेलें (शरीर, पानें) [झडणें]

**झडकारणें-काविणें**—झिडकारणें पहा

**झडगे**—न (क) भाताची एक जात

**झडझड-झडां**—क्रिवि १ जल्दीनें, झरझर, घाईनें, लगबगीनें झरझर-रा पहा 'उठोनि झडझड पळती जन।'—दावि ३१०. 'पींटतु सावरीतु आहे कासोडा। तेवींची चालत आहे झडझडा।'—उषा १८४७ २ धडधड, झडझड असा आवाज होऊन 'वायो झडझडा वाजे।'—दा १३ ९ ३६. [स झटिति, प्रा झडि, म झड द्वि.]

**झडझडणें**—अक्रि १ (एखाद्याच्या अंगावर) वसकन् येणें, वसवसा करणें, तिडतिडणें, खिसखिसणें (वर-शीं-अंगावर या शब्दाबरोबर प्रयोग) २ (एखाद्या कामावर) तुटून पडणें, झपाट्यानें लागणें [ध्व झर=त्वरित द्वि] **झडझड्या**—वि १ (एखाद्यावर) वसवस करणारा, अंगावर येणारा, तिडतिड्या, शिडशिड्या २ जोरानें धडाक्यानें काम करणारा, कामावर तुटून पडणारा, झटझटून कामास लागणारा [झडझडणें]

**झडझडाट**—पु १ जोरानें वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज, वेग, सोसाटा 'झडझडाटें सुटला वारा।'—मुआदि २६ ८१ २ घोष गर्जना ३ (ल) अस्तित्वाची मोठ्यानें जाणीव करून देणें 'माजीं वेदाचा पाला दाट। तो करी मुनिदेचा झडझडाट।'—ज्ञा १५ १९२ [ध्व झडझड]

**झडझडीत, झडझडून**—क्रिवि १ अर्थाला अधिक जोर आणण्याकरिता झाडणें या क्रियापदापूर्वी योजतात उदा० 'रोली झडझडीत, धडझडून झाड' २ जलदीनें, त्वरेनें, झडकरी पहा (क्रि० लागणें, चालणें, पळणें, धावणें, उठणें, मारणें, करणें इ०) ३ भिडकारून, झाडून 'मातुनि सुतसुयाननपक्षातें झडझडोनि या। सिंघ र।'—माउद्योग ११ १५ [ध्व झड द्वि]

**झडझोंयट**—न झटझोंबट पहा

**झडणें**—अक्रि १ (तोंड्याचे केंस शरीराचे अवयव, फळें, पानें इ०) गारगारसे गळणें, गळून पडणें तुटून पडणें 'हे हात पाय झडून जावोत'—नामना ८३ २ झिजणें क्षीण होणें, रोगानें नष्ट होणें 'आठ दिवस दुखणी वर हाताचे बावाचें दोंद पडले' ३ (रंग, चित्रें, लेखन इ०) निस्तेज फिके होणें ४ (ल) नाश पावणें, भग्नमनोरथ होणें 'कागद झडला झिडकारे। नळगेचि अम्बर।'—दा १९.१ ११ 'कुणी पदर धरून आड झडुन उभ्या राहती।'—प्रला २३२ ५ तुटणें, छिन्न होणें नाश पावणें 'जरि जिव्हा जाय झडोनी।' (इमारत छप्पर, व्यवस्था, संस्था इ०) मोडणें, ढासळणें [स शद् प्रा झर, म झड] **झडणी, झडणूक**—स्त्री झडण्याची गळण्याची, गळून पडण्याची क्रिया [झडणें]

**झडतपडत**—क्रिवि (प्र) पडतझडत १ साटत्साडत, गळतगळत, टपकतटपकत, झरतझरत (गवत, पानें, वाळू, राख इ० नेत असताना) २ धडपडत, कष्टाकष्टानें, ठेचाळत, मोठ्या दुःखानें, कसेंतरी. [झडणें+पडणें]

**झडणें**—अक्रि १ (चौघडा, झांज इ० वाद्यें वादविवाद इ० जोरानें) वाजणें 'झडे चौघडा अनेचे पुढें।'—पाळणेसंग्रह पृ ६. २ (बंदुका इ०) उडणें, धडाडणें ३ (सैन्याचा किंवा नोकरीचा) पगार ठरल्या वेळीं महिन्याचा महिन्यास मिळणें, भराभर, एकसारखा पैसा घेण्याचा क्रम सुरू असणें, अखंड पैसा मिळत असणें

**झडती**—स्त्री झाडा पहा १ (कायदा) (सामानाची, घरातील कागदपत्राची-पोलीस अधिकाऱ्यानें केलेली) बारीक तपासणी, झाडा, धुंडाळा. (क्रि० घेणें). (एखादी वस्तु सापडण्याकरिता केलेला) शोध, तपास, धुंडाळा. 'सुरी सापडली नाहीं म्हणून सगळ्या घराची झडती घेतली' ३ सैन्यगणना ४ (घरातील जंगम मिळकत, उत्पन्नाच्या बाबी इ० यांची) मोजदाद, गणना, गणती, मोजदादीची, हिशेबाची तपशीलवार यादी किंवा तपासणी 'झडती चिरंजीव राजश्री माधवराव नीलकंठ याचें लग्न'—भाऐ १० ३ १६ ५ (पैसा, हिशेब, अनादिक पदार्थांची सामुग्री इ० यांचा) फडशा, फन्ना, बेवारा, निःशेषता (क्रि० लावणें, देणें) ६ (सामा) हिशोब, झाडा, उलगडा 'जागों स्वाऽधर्माची वृत्ती यांचेंचि वीर ते झडती।'—मोकर्ण ३३ ४३ ७ (गो) ताळा ८ खेड्याच्या मुख्य उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब, सदर हिशेबाचा कुळकर्ण्याजवळ असणारा तक्ता, मामलेदारानें हुजुरून नेमणूक देहेदा व अनमास घेऊन त्या अन्वयें जी सरमाल प्रांताची वहिवाट करी त्या वहिवाटीचा मामलेदार तपशीलवार हिशेब तयार करी तो ९ (व) नाटकांतील भूमिकेच्या भाषणाचें लिखाण 'झडती चांगली पाठ कर' १० (व) उठावणी सपादणी भूमिका घेतल्या प्रमाणें वागणें 'सोंग घेतलें त्याची झडती दिली पाहिजे' ११ (कु) गणित उजळणी 'झडतीची तर मी एकाशींपर्यंत मजल गाठली होती'—कुलविहारी, मार्च १९२७ [झाड]

**झडती**—क्रिवि लौकर, त्वरेनें, झपाट्यानें 'नाना नीद धराया हातीं। घेऊनि उठिला झडती।'—अमृ ७ ७७ [स झटिति, प्रा झडति]

**झडप**—स्त्री १ झेंप, झप, उडी, उड्डाण, धाव, पकड (क्रि० घालणें) 'झडप घालून धाव घ्यावी।'—स्त्री १ दाराची, सिड

कीची फळी, तावदान कवाड, आगाशा २ (घोंगेप्रमाणें) पडदा [प्रा झंप, हिं झडप, गु झडप]

झडप—स्त्री झटपट त्वरा [दे प्रा झडप्प] झडपसे–क्रिवि (हिं) १ जोरानें, त्वरित २ गपच्यायामध्यें एक हुकुम हा निघाल्यावरोवर चालणारांना तत्काल इच अतगनें पाचडे टाकीत पुढें चालावयानें असतें —राज्या ७४

झडपड—स्त्री तडपड पहा आवाजाची धडपड, झटापट झडपडण्या–णी धडपडणा, तडफडणा [झड+पडणें]

झडपड—स्त्री झटपट पहा [झटपट प्रा झडप्पड] झडपड्या–वि चपळ, त्वरीत झपाट्यानें काम करणारा

झडपडा—पु झडप पहा पटकन, पटकावणें, हिसडा (क्रि० घालणें [झडप]

झडपण—न १ झडपण्याचें, वारा घालण्याचें साधन, पंखा २ झाकण, आच्छादन झाकण खिडकीची फळी झडपा [झडप]

झडपण–पणा—स्त्री १ भूतबाधा वाहरगावाःझपाटणें 'कशी मन करू या धाटाला झाली झडपणा। घेईना थान गे बाई कांही करत्या मनजना।' 'प्रीतिची मनगा जाहली तुम्ही झडपणा।' —राला ३ २ एकाएकीं झापानें पछाडणें [झडपणें]

झडपणा—स्त्री १ वारा घालण्याची, झडपण्याची क्रिया २ वारा घा ण्याचें साधन, पंखा झडपणें पहा ३ देव भूत गटकी इ०ची बाधा झडपणा पहा. 'घरीं रागानि घा जाणि झडपणी।' —निगा ७७ ४ निरसन —शर ५ झडप झपट झाप 'सामिन गरुडाची काय झडपणी चिमणी।' —मोमीमन १ ४७ [झडपणें]

झडपणें—न वारा घालण्याचें साधन, वारा घालण्याचें साधन, पंखा, सूप

झडपणें—सक्रि १ धान्य विस्कटवावर वारा घालणें वारवणें २ (भूत, पिशाच, देवता इ० वांनीं) पछाडणें, झपाटणें 'भूतें झडपोन मारिती।' —दा १ १० ५९ ३ झोडपणें, मारणें झोडपणें पहा 'झडपीनी वारवाचे मोहाळें।' —ज्ञा १७ ३ ४ पकडणें, धरणें 'गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा झडपी।' —मावर्ण ४५ ११ —अक्रि १ वाजणें (पाऊस) २ (काव्य) झेप घालणें, (पक्षी इ०नीं) उडी घरणें 'ता वरींचा पिंड झडपानी। धरीलें नेला अकस्मात।' —गवि ३ १८७ ३ धडपड करणें ज्ञानगय झालणें 'चाप उरीं दडप धडप मग आननपंक्ति धर रचली।' —वामनगीता ११ ४ झडणें धासती घेणें, दडपून जाणें 'वागुरेमाजी काय झडप। वीं वारचनीं रवि हारप। —ज्ञा ७८ १५ [प्रा दे झडप्प]

झडपपंखा—पु नोकरानीं वारा घालण्याचा मोठा पंखा पंखा मागाळची गोष्टगाशा लाविणें, झडपपंखा हजर ठेवणें —ऐरापु निनि ४६ [झडपणें+पंखा]

झडपा—पु १ (पक्षी इ०चाने) झाडण २ कांबळा, चापूच्या फाटा इ०कनि घनविलेलें (दगडीच्या इ०कानि) दार झांगा, झापा, ताटी, फाटक ३ बांबूच्या पट्टीचा पंखा [झडपणें]

झडपाझडपी—स्त्री १ वारा घालणें, वारवणें २ (ल) झोंपाझोंपी, भाराभुरी [झडपणें]

झडपी, झडपें—स्त्रीन ताटी, फाटक झडपा पहा

झडपीव—वि वारा घातलेलें, वारवलेलें [झडपणें]

झडा—स्त्री त्वरा, घाई जल्दी झड पहा

झडाका—पु (काठी, पदर, पाऊस, वारा यांचा) जलद सडाका, रग, प्रहार (क्रि० लागणें) या शब्दाचा झपाटा व धडाका या शब्दांच्या अर्थींहि क्वचित उपयोग होतो.

झडाझड–झडां–झडी, झडाड–डा—क्रिवि लौकर लौकर, झटपट, जल्दीनें 'अशुद्धाच महापुर वाहती शिरें उडाली झडाझडी।' —ऐपो १३४ [झड द्वि]

झडाड—पु १ (वारा, पाऊस इ०चा) जोर, गोंगाट, झपाटा, धडाका 'प्रळयवायुपनि झडाडे। आकाश निजस्वभावें तुटे।' —एभा ११ ४१२. २ (पंखाचा) फडफडाट, जोराची फडफड 'ज्याच्या पाखाचा झडाडा उन्मळी मुळ भारद्वाज।' —एभा २१ २

झडाडणें—अक्रि १ तातातावानें, रागानें लागणें २ जोरानें, उत्सुकतेनें लागणें ३ उत्साहानें पुढें चालणें, सुरू ठेवणें ४ (वारा) सों सों करीत वाहणें झडझड आवाज करीत वाहणें 'झडाडी ता वारा झडकत नभामाजि विजुळ।' —दावि २२७ [झडझडणें]

झडात—क्रिवि झडाडत, झडझड आवाज करीत 'बहुत बान झडान झडाडिलो।' —दावि ८६ [झडाडणें]

झडातावा—स्त्रीभर झरातावा पहा

झडिती—क्रिवि लौकर, झटकन्, जल्दीनें [स झटिति]

झडिवारा—पु जोराचा, सोसाट्याचा, वादळाचा वारा 'तव तेथें थोर पाउस पडला। झडिवारा तेणेंहि चळा। वृक्षाखालि वैसला।' —पच ३ १५ [झड+वारा]

झडी—स्त्री १ पावसाची एकसारखी वृष्टि, झड २ क्षयरोग झुरणी, रेंगाळत राहणारा क्षीण करणारा रोग 'झडी पडले मी क्षमळण नमरा कन्हा भोग देसी।' —हाग १७५ ३ (झाडें इ०काच्या पानाची) गळती, जीर्ण होऊन गळून पडणें 'कृपाति होय पानझडी।' —एभा ३ १५५ ४ उडी झडप 'तुका म्हणे आता झडी घालू पायें। पांडुरंगे माये तुझे पायीं।' —तुगा १६११ ५ पावसापासून रक्षण करणारें दार खिडक्या इ०कावरील झडपण, ताटी इ० [झडणें]

झडी—स्त्री १ घाई त्वरा २ उत्साद उमेद 'ओढीना न झडी धरूनि तुळवी शोणी न तोगी वरा।' —आसी ५० [स झटिति प्रा झडि]

**झट्टी**—स्त्री (नर) (मुलींच्या भाषेत) वट्टी एका हातातून दुसऱ्या हातात झेलणें. ‘ झट्टीकर ’

**झडया**—वि (रोगानें) क्षीण होत जाणारा, खगणारा, क्षयी (शिवीसारखा याचा उपयोग करतात) ‘ मेरया झडया ’ –शेक्स्पियर नाटयमाला–रोमिओ ज्यूलियट ८७ [झड] **०पडया**–स्त्रीभव झोंबाडया, झुकाडया, पायाचा थरकाप (क्रि० देणें, खाणें, जाणें) [झडणें+पडणें]

**झण–कन–कर–दिनीं–दिशीं**—क्रिवि १झणझण, सणसण, सु सू करीत (बंदुकीची गोळी, गोफणीचा दगड इ०जाणें) २ झट् कन झगदिशीं, झटक्यासरशीं, खट्कन [ध्व झण्]

**झणकवायु**—पु घोड्याच्या पायाला होणारा एक रोग यानें घोडा चालत असताना त्याच्या पायात शिणका भारते (इ) स्ट्रिंगहाल्ट –अश्वप २ १११ [झणक+वायु=वात]

**झणका**—पु १ झणकारा (विंचु इ०काच्या दशानें होणारा) सणका, सणसण, चुणचूण, तीव्र वेदना (क्रि० लागणें, सुटणें, वाटणें) २ (राग, मत्सर इ० मनोविकाराचा) झटका, झणकारा (क्रि० येणें) ‘ प्रेमाच्या झणक्यात हसावाई म्हणाली. ’ –स्वप ४८ ३ झणझण असा आवाज, छनछनाट, झणत्कार. ‘ नाण्याच्या झणक्यानें नाचणारीं भुतें दारिद्र्याच्या मनात दूर होतात ’ –संतेचे गुलाम ९२ [ध्व. झण्]

**झणकार–कारा**—पु १ टणत्कार, झणत्कार, झणझण असा आवाज, सणाटा, सणसणाट २ झटका, फटकारा, झटकारा ‘ झणकाऱ्याबरोबर दिवा गेला ’ ३ (बोलण्याची, काम करण्याची) चपळाई, हुशारी, झपाटा, वेग ४ (मनोविकाराचा) उद्रेक, फणकारा, लहर (क्रि० येणें) ५ (विंचु इ० कीटकाच्या दशानें होणारा) सणकारा, शिणका, चुणचूण, झणका (क्रि० मारणें) [ध्व झण्]

**झणका**—स्त्री १ (आघातानें, तडाख्यानें कानात, हातास इ० होणारी) झणझणी, भणभण २ चुणचूण, दाह तीव्र वेदना (नांगी मारल्यामुळें) ३ (अतिशय तिखट पदार्थ खाल्ल्यानें होणारी जिभेची, तोंडाची) आग, दाह, झणझण (क्रि० मारणें, वहणें, निघणें) वरील अर्थी **झणक्या** (अव) हें रूप जास्त प्रचारात आहे. [ध्व झण्]

*झणझण—स्त्री (गो) १ वारा झोंबणें २ झणझणी पहा*

**झणझण–झणां**—क्रिवि १ झणझण असा आवाज होऊन २ जलद, लौकर ३ फणकाऱ्यानें [ध्व]

**झणझणणें**—अक्रि १ झणझण आवाज करणें खणखणणें टणटणणें घणघणणें (टाळ वगैरेंनीं) २ (मोठा आवाज आघात इ०कानीं डोकें, हात, कान इ० अवयव) झणक्यानें युक्त होणें, भणभणणें, शिणशिणणें, थमकणें, टणकणें ‘ चापगुण झणत्कारें दिग्वारण मस्तकेंहि झणझणती। ’ –मोकर्ण ४८ ५१ ३ (तिखट इ० पदार्थांनीं तोंडाला, जिभेला) झोंबणें, आग होणें, भडका होणें ४ (विंचु इ० काच्या दशानें) सणका मारणें, चुणचुणणें, फुणफुणणें [झणझण]

झवो. ३ ५४

**झणझणाट**—पु १ (वाद्याचा) झणझण असा मोठा आवाज खणखणाट, घणघणाट, टणटणाट २ (आघातानें शरीरावयवात होणारा) भणभणाट, तीव्र वेदना ३ (तिखट पदार्थ तोंडात झोंबल्यानें होणारा) भडका, आग ४ (विंचु इ० च्या दशानें होणारी) तीव्र चुणचुण, शिणका [झणझण]

**झणझणी, झणझण**—स्त्री १ (अंगावर बुक्की मारल्यानें कानात होणारा) फणफणाट, वेदना २ (ऊन पदार्थ खाल्ल्यानें होणारी) तोंडाची आग ३ (नांगीच्या दशाची) रणरण (क्रि० येणें, सुटणें, लागणें, उठणें)

**झणझणीत**—वि फार तिखट, तोंडाला झोंबणारा, अतिशय मसालेदार, चरचरीत (पदार्थ, जेवण इ०) [झणझण]

**झणत्कार**—पु (नूपुरें, घागऱ्या, वाळे इ० काचा) झणाणाट, झणझण किंवा छुमछुम असा आवाज ‘ चरणीं वाजऱ्या नेपुरें। चालता गरजती झणत्कारें। ’ [सं]

**झणत्कारणें**—अक्रि (काव्य) झणत्कार करणें ‘ पदीं नेपुरें झणत्कारिती। ’ [झणत्कार]

**झणफण होणें**—अक्रि (कर) उडणें

**झणाझण–झणां**—क्रिवि एकसारखा झणझण, खणखण असा आवाज होऊन [ध्व झण द्वि]

**झणाटा**—पु १ (दगड इ० काचा किंवा इ० कावर होणारा) मोठा व आवाजयुक्त ठोका, मारा, तडाखा (क्रि० बसणें, मारणें) २ (बाण, चेंडू, बंदुकीची गोळी इ० काचा) गोंगावत, सु सु करीत लागलेला तडाखा (क्रि० लागणें, बसणें) ३ विंचवाच्या दशाचा झणकारा (क्रि० मारणें, बसणें, होणें, वाटणें) ४ (उन्हाची) झळ, निरोप (क्रि० लागणें, बसणें) ५ (मनोविकाराचा) उद्रेक, उमाळा (क्रि० येणें) ६ (सढळपणें) अचाटपणा मोटेपणा, विस्तीर्णता अवाढव्यपणा, अतिरेक, आधिक्य (आकार, संख्या, परिमाण, गुण इ० काचा, उदा० सापाचा–म्हशीचा–मुलखाचा–शेताचा–पिकाचा–पावसाचा–उन्हाचा–*वाऱ्याचा–थंडीचा–झणाटा), समासातहि उपयोग होतो,* तसेंच विशेषण व क्रियाविशेषणासारखाहि उपयोग होतो उदा० झणाटा साप, झणाटी म्हैस, झणाटा पाऊस इ० [ध्व झण्]

**झणाण**—पु अतिशय मोठा, झणझण, घणघण असा आवाज २ (बाण इ०काचा) झणझण असा आवाज ‘ बाण झणाण झणाणित झाली होताहे भडिमार। ’ –दारि ३३४. ३ (आघातानें, तडाख्यानें होणारी हाताची, कानाची) झणझण, शिणका [ध्व

झण्] झणाणणें—अक्रि १ (घाट इ० वाद्याचा) मोठ्यानें झणझण असा आवाज होणें 'वरय करी अश्वसाहणी । मागें तरटाचा कर झणाणी।' —एभा २०.२१६ २ (फोडणी, इ० कांचा) झण्झण. चुरचुर आवाज होणें, झणझणणें. [झणझणणें]

झणाणां—क्रिवि एकसारख्या झणझण असा मोठ्या आवाजानें, घणघणां, खणाणां ठणाणां 'घटका गेली पळें गेलीं तास वाजे झणाणा।' [ध्व.]

झणि-णीं, झणें—उभ (काव्य) १ कदाचित्, न जाणों, नाहीं तर 'तें देखोनि आदिपुरुष विस्मितु। म्हणे झणें होय पां अनु।' —ज्ञा १.१५९ 'म्हणेल अतुल कथा झणि म्हणाल तो आग्रही।' —केका १११ —क्रिवि लौकर, त्वरित, जलदीनें 'कीं जीव दहाचे धरणें। मज पाता सुटे झणें।' —मुह ६८ 'तया वैदर्भी देशि झणी पावे।' —र १८ [स क्षणे, म. क्षणि—झणि, सं शंदें—सणे—क्षणे—झणीं=शीघ्र —भाअ १८३४]

झणें—अ (काव्य) क्रियापदाला जोडून निषेधार्थी उपयोग करतात 'म्हणोनि अर्जुनी अर्जुना। झणें चित्त देसी या हीना।' —ज्ञा २.१७ —क्रिवि निश्चितपणे, खरोखर, निःसंशय, खात्रीनें 'केला कर्मी जें देयावें। तें झणें मज होआवें।' —माज्ञा १८ १११.

झनन्न—उभ (मंजुळ वाद्य, घुंगरू, पैंजण याचा) झणझण असा आवाज 'झननन झनन झनत्कारी।' —राला ३१ [ध्व झन्]

झनाट्या—वि. फार मोठा, दांडगा (वाघ, विंचू, साप इ०) झणाटा अर्थ ६ पहा 'तो मठ पण झनाट्या वाघ होता' —सूर्योदय ४ [झपाटा]

झनानणें—अक्रि (व) झणाणणें, झणाणणें झन्नावणें—सक्रि (व) झणझण होण्याइतकें जोरानें मारणें भडकावणें [ध्व झण्]

झनाना—पु जनानखाना, जनाना पहा [फा झन्=स्त्री, बायको]

झप-कन-कर-दिनीं-दिशी—क्रिवि झटकन, चटकन, लौकर, त्वरेनें, झपझप पहा

झपका—पु १ झुपका, झुमका पहा —वि झुपकेदार, 'झाड झपक फूल टपक।' —मसाप ४ ४ १५२

झप(पा)झप-झपां—क्रिवि झटकन झपकन पहा 'तो झपझप चालतो' 'सर्व गोष्टी त्याला झपाझप समजत असत.' —कोरकि ७२८ [झपाटा]

झपणें—क्रि (व) दबणें

झंपा—पु १ एक प्रकारची झाज २ (संगीत) एक तालाचें नांव हा कर्नाटक संगीत पद्धतींतील आहे त्याचे ६, ७, ८, १० व १२ असे पाच मात्राप्रकार आहेत [स]

झपाटणें—सक्रि १ (एखादी गोष्ट, काम) त्वरेनें तडका फडकी करून टाकणें, उरकणें, जलद संपादणें २ गट्ट करणें, बकाबका खाणें, खाऊन फस्त करणें ३ (भूत, पिशाच इ०कानीं) पछाडणें [ध्व झप्+सं पाटन=मोडणें, तोडणें, हिं झपटना] झपाटा—पु १ सपाटा, जोर, वेग, तडाखा आवेश, घाई (यात कौशल्याचा अंतर्भाव होतो) उदा० चालण्याचा-लिहिण्याचा-खाण्याचा-झपाटा २ (शस्त्र, पदर, इ०कानीं लागणारा) जोराचा तडाखा, घाव, फटका ३ जोर, आवेग, तीव्रता, उदा० तापाचा-वाऱ्याचा-ऊन्हाचा-जरीमरीचा-साथीचा-झपाटा ४ पछाडणूक, झडपणी, उदा० भुताचा-पिशाच्चांचा झपाटा ५ (पशु, पक्षी इ०कानीं भक्ष्यावर घातलेली) झडप, झपेट ६ अतिशयिता, अधिक्य उदा० हाताचा-बोलण्याचा-चालण्याचा-खाण्याचा-झपाटा ७ फटकारा, झटका उदा० पदराचा झपाटा ८ रिकामटेकडे, चटमक [ध्व झप म झपाटणें] (वाप्र) (एका) झपाट्यानें—क्रिवि एका झटक्यात, दमात, तडाख्यात (एखाद्याच्या) झपाट्यांत सांपडणें—कचाटींत, तावडीत सापडणें झपाट्यासरसा—क्रिवि झटक्यासरशीं, झटक्यात झपाट्या—वि चपळाईनें काम करणारा कामाचा उरक असलेला, झपाटा पहा. [झपाटा] झपाट्याचा वारा—पु तासीं तीस किंवा त्याहून अधिक वेगाचा वारा —मराठी ६ वें पुस्तक, पृ ३०१

झपाडणें—सक्रि (ना) निजविणें, झोपविणें [झाप]

झपाडी—वि (कों) अतिशय झोपी

झपाण—न डोंगराळ, अडचणीच्या प्रदेशांतील प्रवासाचें साधन वाहन हें पाळण्यासारखें असून यास चार माणसें उचलतात, डोली 'रघुनाथरावजींनीं त्या देशाचे रिवाजा प्रमाणें स्वत बसण्याकरिता एक झपाण केलें' —तीप्र ११ [प्रा झपण, हिं झप्पन]

झपापां—क्रिवि. झपझप पहा [झप द्वि]

झपु(पू)र्झा—उभ (काव्य) जा, पोरी, जा, हे वाक्य त्वरापूर्वक उच्चारतांना होणारा ध्वनि, शब्द हा शब्द केशवसुत कवीनें प्रस्थानदाच्या सीमेचा वाचक याअर्थी रूढ केला 'झपूर्झा! गडे झपूर्झा!' —केक १०१

झपेट—स्त्री १ (हिंस्र पक्ष्याची) झडप झाप, उडी २ पिशाच्चबाधा [झपाटा हिं]

झबक—न डुबरा, झुमका

झबलें—न लहान मुलाचें एक विशेष प्रकारचें अंगडें, हें अर्ध्या मांड्यापर्यंत लांब असतें हें सरवफामाचें, गळपट्टीचें व गुंड्याचें असें तीन प्रकारचें असतें अंगलें पहा. [अर जुब्बा, फा जुबा झबा हिं झगुला]

झ(झु)बा—पु अंगा मोठा, पायघोळ सदरा (मेहरुबाने सारखा) [अर जुब्बा=झगा, फा जुबा गु झभ्भो]

**झंबाद**—वि (गो) १ जहाजाज २ निणात

**झन्नू**—पु १ घमेंडखोर मनुष्य. २ शिष्ट समजला जाणारा, एखप्रतिष्ठित माणूस ३ (पत्याचा खेळ) एक गडी त्या खेळातील मारणी [ मि क्षत्रु=दौंब्या ]

**झॅम**—स्त्री (गो) झांप, डुलकी

**झमकणें**—अक्रि १ चमकणें झळकणें, चकाकणें, प्रकाशणें 'कुडलें तळपती नीळ। वरी जडिले झमकती।' —दा १२ १४ २ (ल) शोभणें 'बारा हजार घोडा पुण्यात कडकडीत। त्याशिवाय चमकती पागा नाहीं गणित।' —ऐपो १३० ३ झण झण असा आवाज करणें झणत्कार करणें 'विर्गे ताळेंघोळें झम कत गुणी दोषदहनीं।' —दावि २२२ ४ (व.) लढाई, भांडण जुंपणें, चकमक उडणें [चम् प्रमाणें झम्! ध्व दृश्य, हिं झमक= चमक]

**झमझम-झमां**—क्रिवि १ (घुंगराचा, पागऱ्याचा) रुण झुण, छुमछुम, झणझण असा आवाज होऊन २ जोराचा पाऊस पडत असताना होणाऱ्या झमझम अशा आवाजाप्रमाणें ध्वनि होऊन. झिमझिम पहा [ ध्व झम द्वि ] **झमझमा**–पु (संगीत) खटका अर्थ ३ पहा [झमझम] **झमझमाट**–पु १ नुपूर, चाळ, घुंगरू इ० काचा झमझम असा मोठा आवाज २ (ल) नृत्य, नर्तन, नाच [झमझम अर झम्चम=गाणें नाच] **झमाझमी**–स्त्री १ तरवारींची चकमक कचाकच, चकाचकी २ (ल) भांडण, कटकट, बाचाबाच खटका, चकमक [झमझम]

**झमेला**—पु बखेडा, धुडगूस, धुमाकूळ 'हुकमाप्रमाणें त्रिवर्गांनीं गडबड करून दिवसभर झमेला मांडला' —विक्षिप्त ३ ६६.

**झर**—स्त्री १ (गो) झरा २ (पदार्थाचा) झरून, झिजून गेलेला अंश 'हा गाळ म्हणूनच पाण्यानें वाहून आणलेली झर होय' —सृष्टि ४० [स क्षृ–झर=झिरणें, स झर-रा]

**झरक**—क्रिवि झरकन पहा 'शरीर थरक झरझरी रोम थर थरी अनचित्त वटतें।' —दावि ४१७ [झरकणें]

**थरकणें, झरकटावणें**—अक्रि (गो) ओरखडणें, खर चटणें

**झरकणें झुरकणें**—अक्रि १ झरकन निघून जाणें पोबारा, गच्छंती, पलायन, करणें सटकणें, निसटणें हातावर तुरी देणें 'नेठ गाडत उठली। बाण हाणाया झरकेती। गगनामध्यें।' —दावि ५०४ २ चरणें गटणें तों नरकती प्रेमाबु लोचनीं।' —दावि ३७५ [ध्व झर् स क्षृ क्षर्]

**झर-दन-कर-दिशीं-दिनीं**—क्रिवि झरकन, चटदिशीं, झटक्यासरशीं

**झरका**—पु (हालचाल, क्रिया, भाषण इ० च। ति) त्वरा, चपळाई, चापल्य चलाखपणा (क्रि० करणें, गाठणें, लावणें) [झरकणें] ०**देणें** सक्रि पिरका देणें चमविणें, हातावर तुरी देणें 'नाहीं तर दे झरका कापा गळा।' —सला •

**झरकुंड**—न जगल

**झरझर-रा, झराझर-रां, झरारां**—क्रिवि झपझप पहा. 'निर्झर झरझर उडया मारिती मृग विपिनीं उडती बागडती।' —विक ३१ [झर् द्वि]

**झरथरणें**—अक्रि स्फुरणें, फुरफुरणें, अंगावर शहारे येणें, थरथरणें 'शरीर झरक झरझरी रोम थरथरी अनचित्त वटतें।' —दावि ४१७ [झर द्वि]

**झरझरी**—स्त्री गुडगुडी हुक्का व त्याची नळी असता व्यस्त लोक गाश टाकून तरवऱ्या लावून बसे' —भाव ९९ [ध्व झर् हिं चरझर]

**झरझरीत**—वि विरविरीत, झिरझिरीत, विरळ विणीचें, अतिशय पातळ (वस्त्र) [स जर्जरित]

**झरणें**—अक्रि १ पाझरणें, बारीक धारेनें वाहणें, झिरपणें, २ पाघळणें, चिघळणें ३ गळणें, टपकणें, पाझरणें उदा० ताक ४ (शरीर, आयुष्य, संपत्ति, बुद्धि इ०) कमी होत जाणें, झडणें, झिजणें, क्षीण होणें 'पुष्कळ गंध उगाळ नको, खोड झरेल' [स क्षृ=झरणें, क्षृ=झिरणें, प्रा झरण, हिं झरना, गु झरवु]

**झरनाटबंद**—वि (व) मोठा, अवजड, अवाढव्य [झणाटा= अवजडपणा+बंद]

**झरनाटा**—पु (व) झपाटा, झगाटा [झणाटा]

**झरनाटून**—क्रिवि (व) सपाटून 'झरनाटून भूक लागते'

**झरम**—न एक प्रकारचा मासा

**झरवण**—न झरा, झिरपण [झरा+वण प्रत्यय]

**झरवणी**—न १ झऱ्याचें पाणी २ झिरपणारें, पाझरणारें, टिपकणारें पाणी [झरा+स वा=पाणी]

**झरस**—स्त्री एक वनस्पति ही कडू व गोड अशा दोन प्रकारची असून हिच्या पानांची भाजी करतात

**झरा**—पु १ जमीनींतून, खडकांतून झिरपणारें पाणी, त्याचा प्रवाह निरा वरळें वाहणें भाजर। उकऱ्या तगा चर।' —ना ११ ७३ २ (ल) पैशाचें सपत्तीनें उगमस्थान मूळ, निग, खाण ३ (द्रव्य इ० ची) सतत होणारी प्राप्ति [स क्षृ–झरा]

**झरा**—पु झारा पहा

**झराका**—पु चपळता, चलाखपणा झरका पहा

**झराझर-रा, झरारा**—क्रिवि झरझर पहा. 'मिळवनचीं कळ्यें करकर बाहेर पडलीं नव्हतीं' —निवि ८१ १६

झराट—स्त्री सत्त्व, एकसारखें, झप्पर 'तेणें लोटलें नगार जीवन। नभीं धन झराट तें।' —नव १४२३ [म झरणें]

झरातारा—स्त्री भव (ग्रां) जोराचा, वेगाचा प्रवाह, आटो- र्ट यन्त (क्रि० दणें)

झरार-रा—क्रिवि सत्त्वर पहा 'तुग हा झरार आला पुढें।' —रामदासी २ १५ 'अर्ती जाशिल र झरारा।'—मोहि- रायाहन स्फुट पदें (नवनीत पृ ४११)

झरी—स्त्री १ झरा आहट आडा 'नाना धान्या भिर- पनी।' —दा १६ ४ १ २ (वों कोंकणी) ग्यार म्हणून जी भात जमीन तयार करतात तिच्या बांध घालून आतील पाणी सोडण्यास बाजास जो फाज (दरवाजा) राखतात तेथपासुन ग्यारजमि तिच्या उच्च भागापर्यंत बारेला परलबदी नाला —कृषि २१४ [स झृ]

झरी—स्त्री ऱ्हास, क्षय, (संपत्ति, शरीर, आयुष्य इ० चा), कमी कमी होत जाणें क्षय पावणें (क्रि० लागणें) [स झृ=झरणें]

झरी—स्त्री झारी पहा

झरीपट्टी—स्त्री (गवंडी काम) भिंडच्या व जाळ्या याच्या पायथ्याची गिलाव्याची उतरती भिंत [झरणें+पट्टी]

झरु(रू)का, झरोका-खा-पु (भितीतील) लहान खिडकी, गवाक्ष, जाळी 'तिरां पडाते झरका उपडुन दान्द तया पड्टा करणी। —प्रग १५० 'मुखातुनी रोधिति ज्या झरोखे।'—माख्द ७ ६७ [ध्व झरझर]

झरू—पु अव मराठांची एक पोटजात याची वस्ती ठाणें जिल्ह्यात आढळते —अस्पृ ४२

झर्नाट्या—वि (व शुण) भगभव, अवाढव्य भन्नाट्या पहा 'अगा भर्नाट्या माणूस मी पाहिला नाहीं'

झल—स्त्री (व) झळ पहा [हिं]

झलक-की—स्त्री (व) तरतरी हुशारी चलाखपणा [हिं]

झला(ल्ला)ळ—स्त्री (काव्य) १ झळाळ चमक, तेज, चकाकी, लखाखी मुगुट माथा कोटी सूर्याचा झळाळ।' —तुगा ३ २ ज्वाळाचा डोंब भडका, जाळ [स ज्वल् हिं झल]

झल्लर—स्त्री (काव्य) झालर किनार मुक्ताफळांची झालरे। झुबकं रत्नमणीचे।' —वसीस्व ७ ८२ [स झल्लरी]

झल्लर—पु पाण्याच तुषार, आलच्या नीरन भार समार तुमारें। झरा मारितसे वर वारें। 'दावि ४४६ [स झिरी]

झल्लरी—स्त्री झांज मेगट टाळ नाद करिती ज्झल्लरी। मृदंगध्वनी त्यामाझारीं। —एहस्व ६ ७४ [स ध्व]

झ(झ)वणें—उक्रि (अश्लील) संभोगणें मैथुन करणें स्त्रीशीं रत होणें [स भ्रवन-झवणें-झवणें; स धव=नवरा, त्याचें मुख्य कर्म धवनं अथवा (-वि) धुवन(=रत) याचा अपभ्रंश झवणें —राजवाडे भाअ १८३३ दृष्टि० स च्यु-च्यव=जाणें हलणें]

झवकोर-वि (अश्लील) कामुक विषयांध ओंवळ ? रक आडनांवहि आहे [झवणें] झवतरोड-वि (अश्लील) रोडका, निस्तेज बारीक, अशक्त, दुबळा मनुष्य, हें एक आड- नावहि आहे [झवणें-रोड] झवर-घाडघड-स्त्री (अशिष्ट) एकमेकांची भरमसाट शिव्या देऊन केलेली निर्भर्त्सना शिव्यांची पाणेघ्या शिव्या देणें (क्रि० चालणें) [झवणें] झवाझवणें-सक्रि (अशिष्ट) शिव्या देऊन शाब्दिक काढणें, निर्भर्त्सना करणें, भलतें बोलणें [झवणें] झवाड्या-वि (अश्लील) व्यभिचारी, अति शय कामुक, विषयासक्त [झवणें]

झष—पु मासा [स]

झळ झळई—स्त्री १ उन्हाची तिरीप, धाप, धग, अंग भाजणारी उष्ण वाऱ्याची झुळुक (क्रि० लागणें, लागणें, टाकणें घमणें) 'तृषार्ता मरुदेशीं। झळे अमृतें बोळली जैसी।' —ज्ञा १८ १६१ 'कवळ माळ झळनें ग्रीष्मात जसा दगावि कोमेला। —मोभअ ५ ३२ २ अग्नीची धग, अट्टी, आच ३ मृगजळ 'उदकाचिया दाउनि आली। उष्ण पाहीं झळई।' —तुगा १६६३ —वि तेजस्वी, झगझगीत 'झळकत झक झळ घनदामिनी,' —दावि ४९६ [स ज्वल; धातु ज्वल् दिव्यू गल्] झळणें—अक्रि सूर्यकिरणांनीं तापणें (मग इ०) झळवट—वि उन्हानें तापलेलें, तापविलेलें (पाणी इ०) ०पाणी—न उन्हानें गरम झालेलें, केलेलें पाणी (घामोळें इ० रोगास उपयोगी) [झळ+पाणी]

झळ—स्त्री १ धातु तापविल्यानें होणारी घट धातु तापवि ताना निघून गेलेलें अशुद्ध द्रव्य २ (ल) व्यापारातील घट, तूट, बुड, टोकर (क्रि० लागणें) [स झला] झळणें—अक्रि उन्हात तापणें, उन्हानें गरम होणें (पाणी)

झळक—स्त्री १ उन्हाची झळ —दार २ चमक चकाकी (क्रि० मारणें) 'तेनें झळक दत किरीट तो साजे।' —गीतार्थदिका १ ७ [स झल] झळकणें—अक्रि १ चकाकणें, प्रकाशणें चमकणें, झाक मारणें २ शोभणें साजणें 'कर्णी झळके माळ मुक्ताफळांची।' —आरती गणपतीची 'कानीं झळकतें कुंडलें।'—उषा १० ८९ ३ दृष्टीस पडणें, आढळणें, दिसणें 'झम्पडा झळकती सकळ। प्राणी तेथें।' —दा १४४९ [स झगा म झळक, सिं झलकणु का जरकने=चकाकत स्पष्टपणें] ०झळक-स्त्री चकचकीतपणा, चकाकी, तेजस्विता ०वाणी —वि चकचकीत स्वच्छ झकाक णील [झळकणेंद्वि] झळझळणें—सक्रि १ चकचकीत करणें रस लखीत करणें २ (ल) (शस्त्र इ०) परजणें लखलखीत करणें 'कोल्हाटी शस्त्र दावी झळकावून। परी रणपंडित नव्हे तो।' —ह ५ १९३ [झळकणें प्रयोजक]

झळकी—न. (गो) मासळी [झळकणें]

**झळकणें**—अक्रि (ना) (पातळ पदार्थ इ०) हेलकावणें, डचकों, डचकून सांडणें, झुलकणें पहा [झुलणें]

**झळझळ–झळा**—स्त्री १ चकचकाट, लखलखाट, झिलई, तकाकी, उजळा, तजेला २ कवडसा —वाक्यवृत्ति १४६ ३ (गो) स्वच्छता, सफाई —क्रिवि चकचक करीत, झगमगीतपणें 'अतिमृदु पदतळ झळझळ तळपति।' —आविश्वा, चूर्णिका १ [स झला द्वि] **झळझळणें**–अक्रि (भांडीं, दागिने इ०) चकाकणें, चकचकीत दिसणें, चमकणें 'ओंकारातुन माया झाली हिऱ्यांहून झळझळे।' —पला ८ [झळझळ] **झळझळाट**–पु (झळझळचा अतिशय) अतिशय तेज, चकाकी, झगझगाट [झळ झळ] **झळझळावणें**–सक्रि (गो) स्वच्छ करणें, खळखळणें [झळझळणें] **झळझळीत**–वि १ चकचकीत, झगमगीत २ स्वच्छ, स्पष्ट ३ निर्मळ, शुद्ध झुळझुळीत पहा ४ (ल) थाटमाटाचा 'तुमच्या तेवढ्या झळझळीत देवपुजा पहाव्यात' —नामना ७५ —क्रिवि १ अगदीं उघडउघड, स्पष्टपणें, टळटळीतपणें, घडघडीत ह्या शब्दाचा सदर अर्थी सामान्यत निंदाव्यंजक शब्दाबरोबर उपयोग करतात उदा० झळझळीत–वेड–सादेगिरी–शिनळकी, झळफळीत–वेडा–सोदा–शिनळ 'तो झळफळीत वेडा आणि त्याला मुलगी दता?' २ (निषधार्थी) बिलकूल, अगदीं, मुळींच 'आज घरात झळझळीत तांदूळ नाहींत' [झळझळणें]

**झळणें**—अक्रि झाकलें जाणें, डाग पडणें झाळणें पहा

**झळपेंनचें**—अक्रि (गो) झोपेंत वरळणें

**झळफळ**—स्त्री झकपक, झगमगाट, चकाकी (ल) थाटमाट 'थाय केली चळफळ। दहबुद्धीचा रिगाळ।' —रामदास, स्फुट अभंग (नवनीत पृ १४७) [झळ द्वि] **झळफळणें**–१ झळकणें झळझळणें पहा 'मानीं कौस्तुभमणी झळफळी वो।' —दावि १०४ २ जळफळणें पहा [झळफळ] **झळफळाट**–पु १ झळझळाट पहा २ दाह, तडफडाट [झळफळ]

**झळफळीत**—वि १ झळफळीत पहा तेजस्वी 'रव धार्मी गार्ची तोंगलें झळफळितें श्रीनगवरि यति।' —क्र १२७ २ स्वच्छ निर्मळ 'झळफळित दर्पणें। माळा गमाजी आसनें।' —दा २ ७ ८२ ३ भरभराट पावणारा, भरभराटीचा, समृद्ध सपन्न [झळफळणें]

**झळंय**—पु शेपण, झळ, यळई जळप जळप पहा

**झळंर**—पु चादरा 'दों झळंयाचेनि मींपें। अनुरागें रात्ला असे।' —क्र ६८

**झळयणें, झळमणें**—अक्रि १ (जाताना एखाद्या पदार्थाशीं) घासणें, चाटून जाणें, घासवटणें, खरडणें २ भूत पिशाच्च यांनीं पटाडणें, झपाटणें ३ (काव्य) (दुःख, गर्व माया, मोह इ०कार्नी) पछाडणें, व्याप्त होणें, झोंबणें 'सर्वेचि प्राणी झळवला। माया जाळें।' —दा ३ ४ ४१ ४ ताप देणें, जाळणें, पोळणें 'प्राक्तनु चडासाचा रश्मी। थोर तातली कर्मभूमि। झाउवी पदुउर्मी। झळविला जो।' —ऋ १ ५ उन्हात तापविणें, ऊन देणें ६ स्पर्श करणें, स्पर्शणें, (ल) लेपणें 'कापूरकुमुदाचें पाणी। मर्दिजे चंद्रकिरणी। तेणें ते विरहिणी। झळवीजे।' —शिशु ७८५ [झळ] —अक्रि १ भरून येणें, उचंबळणें, डबडबणें, बुडणें 'तैसे होळे दीसति झळवेले। अश्रुपातीं।' —ऋ १६ २ हेलकावे, गटगळ्या खाणें 'जन्ममृत्यूचिया लाटीं। झळंवती इया सृष्टी।' —ज्ञा १२ ८७ ३ विरघळणें 'जैसें लवण जळें झळवलें।' —ज्ञा २ ३ ४ आदळणें, धक्के दिले जाणें, हादरणें, डगमगणें, मर्मी लागणें 'पै पुलराट तीचेनि उभडें। झळंवती सत्यलोकींचे हुडे।' —ज्ञा ७ ८४ ५ ओळंबणें, लोंबणें, लटकत राहणें 'त्या नदीच्या तीरावरून एक मोठें झाड झळवलें आहे' —सिंब ४५ ६ (गुच्छाच्या रूपानें फळें, फुलें झाडावर) लोंबत राहणें [तुल० का झली=घुपका] ७ (सूर्यकिरणांनीं पाण्यात किंवा मृगजळानें हवेंत) हेलकावे खाणें, हेलकावणें ८ (भूत, पिशाच्च इ०कांनीं) पछाडलें–झपाटलें जाणें, चिकटणें ९ झळ लागणें [झळ] **झळंवून धरणें**–(फळें इ०कानीं झाडापासून) लोंबत राहणें, लटकून राहणें, झळवणें अर्थ ६ पहा

**झळवुका**—पु झेला, गुच्छ 'वार्सीगाचे झळवुक दोहींकडे लागती।' —ऋ १३८

**झळम**—वि १ लोंबणारें, लटकत असलेलें, वाकलेलें, झळवणारें (झाड) (यामुळें) २ (ल) हटावयास कठिण (वृक्ष, शाखा इ०)

**झळमळणें, झळंबळण**—अक्रि १ (हालणारें पाणी, काच इ०) चकाकणें, चमकणें २ (झाडाच्या फांद्या इ० वाऱ्यानें) हलणें, हेलकावणें, हेलकावे खाणें [झळ द्वि]

**झळा(ळा)ळ–ळा–ळी**—स्त्रीपु १ (झळझळचा अतिशय) चकचकाट, लखलखाट, चकाकी, उज्ज्वलता, कांति 'कळस टिमाचे पाकळ। जसे दरील त झळाळ।' —ज्ञा १३ ४७४ २ तरंग —दार —वि १ चकाकणारा उज्ज्वल, झळकणारा 'थटा ढिआ दवाचा पाढा। तुं गापिनाथा।' —शिशु १५५ २ उन्हाच्या झळीमुळें उत्पन्न झालेलें (मृगजळ इ०) 'दशाही इंद्रियाच दश विषयरूप मृग त झळाळ उदकापाठि धाआति अज्ञानत्वें मर्गी रीग।' —ऋ १ (टीप) [झळ] **झळाळणें**–चकचकणें, तळपणें, चकाकणें चळझळणें पहा [झळाळ]

**झळी**—स्त्री (व) झुडुप

**झा, झा**—अक्रि ध्या पहा **०करणें**–पडून जाणें

**झाऊ–ट**—पु एक प्रकारचें सुरुमारखें झाड, शरणी

**झाऊ**—स्त्री (ना) झळ

झाऊ—वि १ विरविरी। विरविरीत पातळ विणीचा (कपडा इ०) २ हलका, पातळ नाजूक (दागिना, कागद भांडें इ०) ३ (ल) टाकाऊ निरुपयोगी, क्षुद्र वागणुकीचा (मनुष्य, निरास)

झाक—स्त्री १ (रत्नें, दागिने धातु रंग इ०कांची) चमक, चकाकी सफाई तेजस्विता २ (सोनें, रुपें इ०काचा) मुलामा गिल्टई ३ पावसाची धारांची सर (क्रि० येणें) ४ पक्ष्याची झुंड (टोळ इ०कांची) धाड, पक्ष्यांची झडप थाप (क्रि० येणें, पडणें, मारणें) 'वरीनि कापूरकळीं। भ्रमराची झाक उठिली।' —शिशु ६०१ ५ (थंडीची) शिरीष, माळ, ऊन किंवा धग हवेचा मारा (क्रि० लागणें, बसणें येणें वळून जाणें) ६ (ल) सुंदर भास, दृश्य 'दुष्काळामुळें शहर उमळलें नाहीं तर त्याची झाक मात्र दिसली' —विवि ८ ७ १३५ ७ झुळूक, छटा म्हातार पणाची झाक मारत' ८ इतर अर्थी धाक पहा [झक]

झाक—वि १ चकचकीत चकाकणारें चक २ (ल) (वडळपणानें) सुंदर, छान, झोकदार, दिखाऊ झक पहा

झा(झां)क—स्त्री १ (भूतबाधा, पित्त, उपासमार यांनी डोळ्यावर येणारी) झापड झाप तंद्रा (क्रि० पडणें, येणें घालणें) २ चक्कर भोंवळ घेरी ३ ग्लानि गुंगी सुस्ती, टाळे जड होणें व तारवटणें (क्रि० येणें) ४ (ढग झाडें इ०कांची) घनदाट) अंधारी छाया झापड काळोख (क्रि० घालणें पडणें) 'पाव सानें झाक घातली परंतु पडत नाहीं' [झाकणें पहा तुल० गु झाख=अंधारी, काळोख]

झाकचें—अक्रि (गो) वडवडणें, बरळणें [गो झाकचें= वडबड, हिं झखना झकना=वडवडणें, शोक करणें]

झा(झां)कण—न १ आच्छादन, टोपण ढापण २ (क) झापड व पड पहा [स छादन]

झा(झां)कणा—क्रिवि (रात्रा) झाकण घालून झाकण असलेल्या स्थितींत (भांडें इ० ठवणें असणें) (क्रि० ठेवणें घालणें, असणें) [झाकण]

झा(झां)कणी—स्त्री १ आच्छादन, भांडीं इ० कांवर झाकण्याची रीत, लवणी वळणी तमतजाचा चतकन भशि। उपासानना ढकुनि पाटणी। आदण वातूनि पदिपायवरी। झाकणी झाकिली उपासना। —दावि १०४ २ (बैल घोडा इ० जना वरांच्या डोळ्यांना लावावयाची) झापणी; अंधारी ३ आच्छादण्याची पाण्याचा लपविण्याची गुप्त ठेवण्याची क्रिया दाबा दाब, लपवणूक ४ (गुंगीमुळें) डोळ्यावर येणारी झापड 'मनद्वारची झाकणी पडानि ठेली।' [झाकण]

झाकणा—वि (गो) बरळणारा वडवडणारा [गो झाकचें= वडवडणें बरळणें]

झा(झां)कणें—न झाकण अ० १ पहा 'जेथें झाकणें कर्में कुडाचें। उघडिताच नय।' —दा २ १.१८

झा(झां)कणें—उक्रि १ आच्छादणें, झाकण घालणें 'त्यां मार्गीं याणाच्या सधानें। झाकिन यादवसैन्यें।' —मुवा १ ७० २ लपविणें, छपविणें ३ (ल) (एखादी गोष्ट व्यवहार) छपविणें, दाबून, लपवून ठेवणें, दाबादाबी करणें ४ (उपकार इ०) न भेरता तमच ठेवणें, राखणें 'तुम्हा ऐसा उपकार मी न झाकीं।' —र १३ [स चक्=(आच्छादणें)-झाँख-झाँक—भाअ १८३४ प्रा झप=झाकणें, गु झास्=पूर्णपणें व्यापणें किंवा स छादन] म्ह० न्हातीच धाड व खातीन गाठ झाकत नाहींत' (बाप्र) झाकउघड—स्त्री झाकणें आणि उघडणें उघडझाक पहा झाकली मूठ—स्त्री (एखाद्याची अप्रकट) स्वाभाविक स्थिति, परिस्थिति, स्वरूप म्ह० झाकली मूठ सव्वा लाखाची= आपण होऊन आपली (ज्ञान संपत्ति इ० ची) स्थिति उघडी करून दाखवू नये त्यांत आपली अब्रू राहते झाकलें माणीक—न (ल) दिसायला साधा पण खरोखर गुणी व विद्वान् मनुष्य झाकल्या पाठीचा—वि ज्याला काहीं सबब सांगता येईल किंवा जो फारसा अक्षम्य समजला जाणार नाहीं असा (अपराध इ०) झाकल्या पाठीनें—क्रिवि अब्रू गमावून न घेता प्रतिष्ठितपणानें, चोख कायम ठेवून झाकल्या मुठी-मुठीनें—क्रिवि गुपचूप, बभ्रा न करिता बोभाटा न होऊं देता कोणालाहि कळू न देतां, गुप्तपणें झाकसाक करणें—सक्रि (व) भावादावी करणें झाकून—क्रिवि सभेपानें —सार झा(झां)कपाक क-का—स्त्री १ जेवण झाल्यानंतरचीं स्वयंपाकघरातील उरलीसुरलीं कामें (समुच्च यानें) स्वयंपाक घरातील झाकापाक करून त्याही वर गेल्या' —कोरकि ३०३ २ जल्दीनें, गडबडीनें आवरणें, उरकणें [झाकणें द्वि] झाकीव—वि १ झाकण, ढापण असलेला (डबा, पेटी इ०) २ ज्यावर झाकण, आच्छादन ठेवलेलें आहे असा ३ झाकून ठेवलेला, लपवून ठेवलेला, बंद करून ठेवलेला [झाकणें] झाकय—वि झाकणारा [झाक]

झा(झां)कर—न १ अतिशय दाट व पुष्कळ फांद्या फुटल्या मुळें निरुंद दिसणारें (मिरची इ० कांच्यासारखें) झुडूप २ झाडाच्या अतिशय पानांचा गर्द निबिड भाग जाळी 'वानर आंब्याच्या झाकरांत जाऊन बसला आहे' ३ दाट पानें असलेली झाडाची खांदी उदा० बगी इ० कडविण्याकरिता तोडून आणून पुरतात तशी [स झास्-पूर्ण व्यापणें गु झाकरू=कांटेरी झुडूप]

झाकरणें—अक्रि (झुडूप झाड इ०) भरगच्च पानांनीं झाकलें जाणें—युक्त होणें, गुरफटलें दिसणें [झाकर]

झाकरी—क्रिवि तावातीन, गोवर त्वरित 'झाकरी अटु मातानि कातहें।' —मा ७ १९२ [झ्या+करणें]

**झाकली**—स्त्री (गु.) निळीचा रंग तयार करण्याच्या कारखान्यात निळीचें पाणी साठविण्याकरितां बांधलेला हौद. –गुजि ४१२

**झाकविणें**—झकविणें पहा

**झाकं(को)ळणें**—उक्रि १ झाकून ठेवणें, लपविणें, आच्छादित करणें, दडविणें २ घेरणें, व्यापणें, ग्रस्त करणें, छायेनें आक्रांत करणें, व्याप्त होणें 'झोंपेनें झाकळिला मियो।'–मुआदि १४० –अक्रि १ अंधुक होणें, मलिन होणें, अंधारून येणें (ढग वगैरेनीं) 'प्रभा पृथिवीवरी। चक्रावर्ती झाकळली धरी।' –एपा १२७ २ झाकुळणें, झाकोळणें पहा

**झाकाताप**—पु लपंडाव, छपवाछपवी 'प्रगट विवेक बोलेना। झाकातापा करी जना।' –दा १९ ६ ९

**झाकी**—स्त्री (व) मूक अभिनयाचें नाटक चालत्याबोलत्या माणसांचा सिनेमा [हिं झक झाक]

**झाकं**—स्त्री १ (ग्रा) मूर्च्छा, ग्लानीमुळें डोळ्यांवर येणारी झापड २ अंधारी, घेरी (क्रि० येणें, पडणें, मारणें). [झाकणें]

**झांकी**—स्त्री १ शोभिवंत मांडणी, आरास 'श्रावण महिन्यांत देवाच्या मंदिरांतून झांकी व रोषनाई होण्याचा रिवाज आहे' –विविध १ ७० २ ऐट, डौल [झक्]

**झांकु(को)ळणें**—उक्रि १ (काव्य) झाकणें, लपविणें, आच्छादित करणें 'यादव सैन्याचा महागिरी। शरधारीं झाकोळला।' –एरुस्व ८.४९ २ (ल) झाकलें जाणें, फिकें पडणें 'मत्स्य परी उर्ध्वदीपकाचीं। झांकुळेल म्हणऊनि उजोती।' –वामन, विराट ७ १४९ ३ व्याप्त होणें, लिप्त होणें 'परी तयाचेनि उर्मी। नाकोळेना।' –ज्ञा ३ ७० –अक्रि १ दिपणें, दिपून जाणें, चकित होणें २ बंद होणें, मिटणें (डोळे, पापण्या इ०) 'बुद्धीचें द्वार। झाकोळे जेणें।' –माज्ञा १३ ११५ ३ अंधारमय होणें, मायकाळ होणें 'झाकोळलें गगन सूर्य गला बिडून।'–ऐपा १२० [झाकणें]

**झाके**—अ क्वचित्–मनको

**झांगड**—स्त्री १ एक प्रकारचें वाद्य झगट 'झांगड नौबत वाजती गादण।' –ऐपो ११८ २ अनेक वाद्यांचा एकदम होणारा कडकडाट गजर ३ (व) लचांड लिगाड, झगट व्याद 'ती झांगड माझे मागें आहे' ४ भांडण कलह वाचावाच झांगडधिंगा [ध्व] **०झांगड**–स्त्री भांडाभांडी जोराचें, हमरीतुमरीचें भांडण नगडा –क्रिवि नगारा, नौबत यांच्या आवाजाच्या दणक्यानें मोठ्या गोंगाटानें गलबल्यानें **०धिंगा**–पु दंगाधडा धांगड धिंगा, धिंगाणा, धिंगामस्ती [झांगड द्वि]

**झांगड**—न (कु) मोठें विस्तारांचें जाळें

**झांगडू-डू**—वि (कर) उत्तम फक्कड, फाकडू १ प्रेमपात्र, स्नेही, यार २ प्रेमरहस्य, गुप्त प्रेम [झगट]

**झांगरा**—पु (ना व) उडवाउडव, थापेबाजी **झांगरे शिकवणें, झांगरेबाजी करणें**–(ना व) उडवाउडवीचीं उत्तरें देणें, बोलतांना एखाद्या गोष्टीचा थांग न लागू देणें

**झाज**—न जहाज पहा [फा जहाज]

**झाज**—स्त्री १ पंगा, दिवाणा २ तागी, पडदा बुरखा पहा. 'बाळियाच्या झाजी। दवण्याचे बुड घातोनी।'–ऐपो १५

**झांज-झ**—स्त्री. एक प्रकारचें ठणठणीत वाद्य, हें पुरीएवढ्या पितळेच्या तुकड्याच्या मध्यावर थोडी फुगवटी असलेलें व तींत दोरी ओंवण्याकरितां एक भोंक पाडलेलें असें असतें ओंवलेल्या दोरीस बाहेरील बाजूस धरण्याकरितां लाकडाची गोटी बांधतात प्रत्येक हातांत एक झांज घेऊन त्या परस्परांवर आपटून भजन, कीर्तनें इ० वेळीं ताल धरतात [ध्व, स, प्रा झल्ल, हिं झांज, सिं झांझु तुल० फा सज] (वाप्र) **झांज खाणें**–(व) गवयाची गळचेप करणें झांज झाडणें पहा 'आमच्यावर झांज खाण्यांत काय अर्थ आहे' **०झडणें–वाजणें**–अक्रि १ झांजा हातांत असणें, झांजा वाजविल्या जाणें २ एखाद्या कामांत असणें, चमक उडणें, भांडाभांडी होणें, मोठ्यानें ओरडून बोलणें. **०झाडणें**–एखाद्याची खरडपट्टी काढणें, ताशेरा झाडणें **झांजी-ज्या**–वि झांज वाजविणारा [झांज]

**झांज**—स्त्री मूर्च्छा, झीट, घेरी, चक्कर डोळे फिरणें (क्रि० येणें) [स झंझा]

**झाजट-र, झांजरमांजर, झाज(ज)ड माज(झ)ड**—नस्त्री १ पहाटेच्या वेळचा धुकट मुसमुसक, झुंजुमुंजु, पांगवरील लव दिसण्याजोगी पहाट (सामान्यतः द्विरुक्तीनें) उदा० 'झाजड झाजड झालें कीं लागलेंच औषध द्या' (क्रि० पडणें, होणें) २ सायंकाळच्या मंदप्रकाश 'सव्याकावीं मागत फिरतो महारा पोरा परी चारा। झाजर पडतां घेऊन पळ हा गडमुडेचा नित मारा।'–प्रला २४० –क्रिवि अंधुकअंधुक, मिणमिण [साज २]

**झांजर**—पु (हत्ती बैल घोडा इ० यांच्या पायांत घालावयाचा) वाळ्यासारखा छणछण वाजणारा दागिना –खानगी खातें लागतीचे नियम (बडोदें) पृ ५२ व ५५ [झांज]

**झाजर**—वि जीर्ण झालेला विरविरीत विरविरीत झालेला (कपडा इ०) 'एका अंगावर झाजर शेला तो जाती चुरचुरा।' –पला ८३ [स जर्जर, हिं झांझर=फाटलेला]

**झा(झां)जरणें**—उक्रि १ धमकावणें घासणें खरडणें, खरचणें 'चंद्रिकेच्या अंगावर झाजरल्यासारखें झालें' –निच १४ २ (ल) (राजा) धमकावणें, गरायाला टोपी किंवा गोता घालणें ३ वापरून खराब होणें, जीर्ण, जर्जर होणें, झिजणें, छिन्नभिन्न करणें, खराब

होणें, करणें 'ती जखम झाजरल्याइतकी . फटीण ठरली नाहीं ' –ज्ञामू २ ४ (ल ) पीडणें, पीडा देणें 'झाजरलीं पचबाणें एक मेकावरी पडितीं हरणें।'–भाए४३० [स जर्जर; म झाजर] (वाप्र) झाजर माडाचे गरे खाणें–(उप ) झाडावरून पडून अग गरचरल्यानें, ठेचल्यानें पीडित होणें झांजरता–वि ओझरता पहा झांजरला–वि झिजलेला, जर्जर झालेला 'दोन्ही खायाला दोन्ही घरे बाधल्या गरशी। वाकडा हातपुळा देह झाली झाजरशी।' –पला ८० [झाजरणें]

**झांजरा**—पु. चुरचुर, हुरहुर 'शत्रुनें तुज बांधिता रथि हुबरा सम वासरा। फोडिला अमशील तू मज लागण जिर्वी झाजरा।'–कुशलव्याख्यान ३२ (मराठी ५वे पु आवृत्ति ८, पृ १६१ )

**झाजरी**—स्त्री. ल्हान झाज, टाळ 'मोरवग झाजरी पनी-सपत्यही नानापरी। '–राला ३१

**झांजरी**—स्त्री (वे ) हुग्गी (गव्हाची कोंडा काढून केलेली खीर )

**झांजरी, झांजी**—स्त्री (व ) झोपडीच्या दाराची झडपी (गवत वगैरेची ), झाज पहा

**झाजाव(वि)णें**—सक्रि जोराजोरानें धसधस तोडणें, पुन्हा पुन्हा घाव मारणें, खापलणें; खाडणें, जाजावणें पहा

**झांजु**—न एका विशिष्ट तालात गावयाचें पद, पोवाडा

**झाझ**—झाज पहा

**झांझड-डी**—स्त्री झाजड पहा 'मोटकी जाली झाझडी।' –गीता २ २२८८

**झांझर-री**—स्त्री झाजरी पहा 'नाना ताळ झाझर मुदर मृदग।'–सप्र ९ ३१

**झांझरणें**—झाजरणें पहा

**झा झा झा झां**—उद्गा (घोडा, बैल इ०नें) जल्द चालावें म्हणून उच्चारावयाचा इशाऱ्याचा शब्द 'झा झा म्हणता प्राण कण्ठासि आले ' [ध्व झा द्वि ] (वाप्र ) झाझाचें करणें, झां म्हणणें–अक्रि निसटून जाणें, पलायन करणें हातावर तुरी देणें पोबारा करणें

**झाझान**—स्त्री (कर ) शिकस्त, पराकाष्ठा अटोकाट यत्न, यातायात (क्रि० करणें ) 'त्यानें झाझान केली पण काहीं एक जुळलें नाहीं ' [झा झा ?]

**झांझो**—स्त्री (व खा ) झाजी, कापसाच्या पऱ्हाट्यावी विण लेली ताटी [झाज]

**झाझू**—स्त्री १ कटकट, धुमपूरा बोंगाबाली २ झुमझुम छुनछुन असा आवाज [ध्व ]

**झां(झा)ट**—न १ (अश्लील ) शिस्नाच्या किंवा योनीच्या वरील केस, केसाचा समुदाय, गुह्यस्थानचे केस, शब्द शेट २ –स्त्री सारीं रोंवलेल्या वटा 'मोहाळीं पाखरावरी झाटा। पायीं नोपुरें क्षुद्र घटा।'–गीता १ ४८२ [स जट ? दग्रा झण्टी=ल्हा-नसा केशकलाप, हिं झाट ] ०मुंडावण–स्त्री गुह्येंद्रियावरील केस काढणें यावरून ) (तिरस्कारार्थी ) अतिशय क्षुद्र व सोपें काम [झाट+मुंडावण ] झांटोजी–वि (अशिष्ट) (उप ) व्यर्थ पुशा रकी मारणारा, ढोंगी, गर्विष्ठ माणूस), क्षुद्र हलका (माणूस) [झाट]

**झाड**—न १ वृक्ष, झुडूप, रोप, वनस्पति (ल्हान, मोठी) 'तूं फिरलास झाडोझाड मी फिरलो पानोपान '–तुझ्या पेक्षांहि मला जास्त माहिती आहे २ शाखायुक्त वस्तु, पदार्थ, वृक्षाकार वस्तु ३ मेणवत्ती इ० लावण्याचें काचेचें अंबर, पुष्कळशा उदवत्त्या लावण्याचें वृक्षाच्या आकाराचें धातूचें घर 'चादीच्या झाडातून उदवत्त्या खोंविल्या होत्या '–अरतभा १३५.४ दारु कामातील एक प्रकार, वृक्षाच्या आकाराचें दारूकाम ५ भूतानें पछाडलेलें माणूस 'ज्यास भूत पछाडलें त्या झाडास तें सुग्रास अन्न खाऊ देत नाहीं '–अरतभा ५८ ६ वश्राम, वश वळ ७ (कु ) चढुबीचा लांकडी भाग, दस्ता [स झाट, प्रा झाड ] (वाप्र ) ०उभें करणें–उत्कृष्ट रीतीनें एखादें काम वठविणें उदा० गायन, वादन, कीर्तन, व्याख्यान इ० इतक्या उत्तम शैलीनें करणें, रगविणें कीं जणु काय तें करणारा, एक विशाल व फळाफुलांनीं युक्त असा वृक्षच उभारीत आहे असें वाटावें कोण्या झाडाचा पाला–एखाद्याचा दिमाख, नशा, मगरूरी उतरण्या करितां उद्धटपणाची बुडबुड थांबविण्याकरितां, अभिमान, अधिकार झिडकारण्याकरितां योजावयाचा शब्द, अशा माणसाविषयीं क्षुद्रता व तिरस्कार दाखविणारा शब्दसमूह 'सुभेदार ? ह सुभेदार म्हणजे कोण्या झाडाचा पाला ? आम्ही ओळखीत नाहीं असें जाऊन साग जा ?'–नाट्यकथार्णव झाडाचे राऊन दिसणें, करणें–भीति इ०कामुळें झाड घोडेस्वार इ०कांच्या आकृतीप्रमाणें दिसणें दोरीचा साप बनविणें (बायबलात सुद्धा अशीच कल्पना जजेस् ९ ३५ मध्यें दृष्टीस पडते ) झाडावरचें भूत–(ल ) ज्याचा नामनिर्देश करणें अनिष्ट आहे अशा नीच, तिरस्करणीय मनुष्याबद्दल वापरावयाचा वाक्प्रचार (सुकल्या झाडास वा(पा)क लावणें– (सुकलेलें झाड इष्ट त्या दिशेनें वाकविता येणें शक्य नाहीं यावरून ल ) एखाद्या वृद्धास उपदेश करणें हनी, हव्यादी, पूर्वग्रहदूषित माणसास बोध करणें (पालथ्या घागरीवरच्या पाण्याप्रमाणें आहे) सामाशब्द झाडकी–स्त्री क्रि. झाडी ०कुट–न (गो ) वाळलेलें मोडून पडायास आलेलें झाड, कादी काम्टी ०खड–न १ जगल, झाडी, झाकर झुबाड, राई रान 'विशाळें बहु लागलीं झाडखडें।'–राक ११२ २ झुडपें, जाळी, ल्हान झाडाचा

समुदाय [झाड+खड] ०खडा–क्रिवि १ (वर दिलल्या झाड उभें करणें ह्या वाक्प्रचाराच्या उलट अर्थी–झाडाचीं पानें, फुलें, फळें, तोडून टाकलीं असता तें बढव व ओवडधोवड दिसतें या वरून) ओवडधोवड, अर्धवट, रुक्ष, नीरस अशास्त्रीय; अव्यवस्थित, बेशिस्त असें (गायन, वादन, कीर्तन, व्याख्यान इ०) २ गुरूपाशीं अभ्यास न करता नुसतें ऐकून आपल्याच अक्कलेनें वाज विगारा व त्याचें तें वादन, स्वयंसिद्ध (गवयी, वादन) 'त्याचा गाणा, वाणी, गाणें, वाजविणें, म्हणणें, झाडखडा आहे' [झाड+खडणें] ०खंडी–स्त्री (व) झाडें व झुडपें 'दरें दर्कुटें झाडखडी अनेकी।'–दावि –वि अरण्यमय, रानटींचा (प्रदेश, जागा इ०) [झाड+खड] ०गळ–वि वृक्षमय झाडखडी पहा ०झुलला–पु (व्यापक) लहानमोठ्या झाडाचा समुदाय, वृक्ष, झुडपें, रोपटीं [झाड द्वि] ०झाडोरा–झुडपी–झुडुलला–झुड–झुडुप–पुस्त्री न ल्हानमोठ्या झाडाचा समुदाय (समुच्चयार्थी, एकूणएक किंवा कोणतहि) झाडझडुपा पहा ०दस्त–पु फळझाडावरील कर 'झाडदस्त झाडे सुमारी ३१ येकूण रुपय' –मसाप २ २ १४३ [म झाड, फा दस्त=कर] ०पंचाल–वि १ (माकड अतिशय चपळ असल्यानें तें जणु काय एकाच वेळीं पाच झाडावर असल्याचा भास होतो यावरून) चपळ, तरतरीत, टुण टुणीत, चलाख २ चचल, चळवळ्या, चुळबुळ्या, पायावर भोंवरा असलेलें (मूल इ०) ०पदरी–वि किनारीमध्यें रेशमाचीं झाडें, फुलें काढलेलें (वस्त्र इ०) [झाड+पदर] ०पाला–पु १ (व्यापक) (औषधाच्या उपयोगी) वनस्पती, त्याचा पाला, मुळें इ० (सामा) वृक्ष, वनस्पति २ (व्यापक अर्थी) खाण्याच्या उपयोगाचा भाजी पाला, पानें इ० ०पाल्याचें औषध–न वनस्पतीपासून तयार केलेलें औषध, याच्या उलट रसायनी औषध–खनिज धातु–पदार्थ इ०कापासुन केलेलें [झाड+पाला] ०पेढ–ड–माड–पु (व्यापक) झाडमाडोरा पहा [हिं झाड+पेड=झाड माड] ०झाडरू–न लहान झाड, झुडुप 'या बाजूस रानातून, डोंगरावर दवणा, रामाठा, . वगैरे झाडरूच रगड'–मेया ४३ [प्राड] झाडशाई–स्त्री वस्त्रावर काढलेलीं झाडाझुडपाचीं चित्रें –वि झाडाचीं चित्रें ज्यावर आहेत असें (वस्त्र, भिंत, जमीन) झाडझना–वि (शब्दश अश्लील, पण तो अर्थ मनात येत नसल्यानें रूढ) उनाड, भटक्या, भणग, भटकभैरव, उडाणटप्पू [झाड+झवणें] झाडळ–ळी–स्त्री दाट झाडी, राई 'जीवधर्माचिया झाडळी। मनोरथाचिया वराजाळी।'–ज्ञाप्र २१६ झाडसुनें–न झाडकुत्रा कुत्र्याची एक जात 'पाणसुनीं झाडसुनीं। नाना प्रकारींचीं सुनीं।' –दावि २४४. [झाड+स शुन=सुना]

झाडण–स्त्री १ केरसुणी, झाडणी २ झाडण्याची क्रिया ३ (ल) (कर्ज, अनसामुग्री इ०काची) नि शेषता करण्याची क्रिया; फडशा पाडणें, देणें वारणें, काम पार पडणें [झाडणें]



झाडणा–वि झाडणारा 'मी झाडणा मी खिलारी।'–एभा १२ ५६१ [झाडणें]

झाडणी–स्त्री १ (खा कों) झाडण, केरसुणी 'चित्तीं म्हणे नृप अहा चवरी ती झाडणीच कीं केली।'–मोआदि १२ ७८. २ झाडणें, झाडून, झटकून टाकणें ३ अंगातील भूत, पिशाच्च इ० मंत्रतंत्रानीं काढणें, पिशाच, विष डोळ्यातील फूल इ०काढण्या करिता मांत्रिक करतात तो टाहाळ टाकण्याचा विधि, हकालपट्टी. 'अहमहिपासुर लागला जनीं। त्यासि करावया झाडणी। कृष्ण गुणी चालिला।'–एभा १२०८ ४ (ल.) रागें भरणें, कानउघा डणी, खरडपट्टी खडसावणी, निर्भर्त्सना [स झाटन, प्रा झाडण]

झाडणें–उक्रि १ (केरसुणी इ० नीं) केरकचरा काढून साफ करणें जागा निर्मळ करणें २ हसडणें झटकणें झटक्यानें हलविणें (ओलें वस्त्र, शेंडी इ०), (हात, पाय डोकें इ कास) झटका दों 'झाडिता आपला हात। तव आगासि असे जडित।'–परमा १० १९ ३ लोटून देणें 'त्यातें उडोनि झाडी झाले ते चूर्ण जेविं नगपातें।' –मोवन १२ २९ ४ काढून टाकणें, नाहींसें करणें 'लोक पारखुन सोडावे। राजकारणें अभिमान झाडावे।' –दा ११ ५ (विस्तव इ० कास) पत्यानें वारा घालणें, झड पणें ६ खरडपट्टी काढणें, खडसावणें, निर्भर्त्सना करणें 'बाळूला आणि नयाला लक्ष्मीकाकूनीं चागलेंच झाडलें' –सुद ५२ ७ (मागणाराचा, भिकाऱ्याचा) निषेध करणें, मनाई करणें, साफ नाकारणें, बंदी करणें 'अरीच स्मरावें श्रीरामराम। ऐसा कितेका जडला भ्रम। अमो गृहस्थानें भजनप्रेम पाहोनि मस्तक झाडिला।' –दावि २०२ ८ (सरकार, सावकार इ० काची) बाकी काढून टाकणें, देणें बेबाक करणें 'धन्याची बाकी हलु हलु झाडा।' –भज १३४ ९ (अंगातील भूत, पिशाच्च इ०) काढणें, हाकून लावणें १० (बंदूक इ०) उडविणें, गोळी मारणें –अक्रि (बंदूक इ० कानीं उडताना हात इ० अवयवास) हिसडा, झटका देणें [स झाटन, प्रा झाडण, हिं झाडना, गुज झडिसु=टाकणें, फेकणें, झाडणें=केरसुणी फेकणें] ०झट कणें–उक्रि केरसुणी इ० कानीं झाडून, फटक देऊन, धूळ उडवून साफ करणें, निर्मळ करणें झाडझपट–झटक–स्त्री १ (व्यापक) धूळ, केर इ० काढण्याचा, झाडण्याचा झटकण्याचा व्यापार, झाड झुड सडासंमार्जन २ (ल) (व्यापक) चोरीच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या लुबाडणें लुटणें इ० सव क्रिया 'त्यानें आजपावेतों झाडझपट करून पोट भरलें ३ लुटालूट, धूळधाण, दाणादाण 'पेंढारी यानीं त्या गावात जाऊन झाडझपट केली' [झाडणें+झपाटणें] झाडझुड–स्त्री थाडझपट अर्थ १ पहा 'माझी झाड झुड झाईतों तू पाणी घेऊन य' [झाडणें द्वि] झाडपट्टी–स्त्री १ जमीनीचा सारा किंवा घरपट्टी यावद्दलची बाकी चुकती

फण्याची गराराची मागणी २ (उप) गारहर्पणी, गडझाडणी, पाहणी (क्रि० करणें) [झाडणे+पर्णी=नर] **झाडपाखड**-स्त्री १ (धान्य इ०) सुपानें पाखडण्याची, झटकण्याची साफ करण्याची क्रिया २ (ल) कवडीकवडीचा हिशाब देणें-घेणें [झाडणें+पाखडणें] **झाडपि(पी)ड**-स्त्री झाडझूड, झाडलोट 'झाडपीडी करूनि मानऊ सनाला।' -दावि १५१ [झाडणें द्वि] **झाडपिड्या**-वि देऊळ मंदिर इ०चा झाडझूड, साफसूफ करणारा [झाडपिड] **झाडपानें**-न कर्जेफेडीचा शब्दाचा हिसा [झाडणें+पानें] **झाडफूक**-स्त्री (ना) अंगारा, धुपारा, मांत्रिकाकडून करावयाचा मंत्रोपचार (क्रि० करणें) [झाडणें+फुंकणें] **झाडफेड**-स्त्री (राजा) झाडाझाड झाडगट. [झाडणें+फेडणें] **झाडवाकी** स्त्री १ (कर्ज अनामतधुली इ० बाकी) पूर्ण निपटारा, वगैरे निरानिपटा २ कर्जफेडीचा शब्दाचा हिसा (क्रि० करून टाकणें, करणें) [झाडणें+बाकी] **झाडलोट**-स्त्री केर काढणें, सारवणें इ० झाडझूड [झाडणें+लोटणें] **झाडलोट्या**-वि झाडलोट करणारा -मगाप २ १ ३९७ [झाडलोट] **झाडवण**-स्त्रीन झाडण्याची क्रिया -पु (काव्य) १ झाडणारा 'चोखामेळा म्हणे मी तुमचा। झाडवण साचा म्हणवितों।' २ केरसुणी, झाडू [झाडणें प्रा झाडवण] **झाडसारव**, **झाडवणसारवण**, **झाडसारवण**-स्त्री (समुच्चयानें) (घर इ०) झाडणें व शेणानें सारवणें इ० क्रिया; साफसुफी 'झाडसारवण चाकर करताना त्याचीं भोंउविरडयासारखीं हात कमतीस यात काय नवल!' -नाट्य ३९ [झाडणें+सारवणें] **झाडून**-क्रिवि एकदर सर्व, यच्चयावत्; एकूणएक एकहि न वगळतां 'सुसचिव पौरमुख्य दुत आणविले सभेंत झाडूनी।' -मामौसल २ १९ -पया ७९ [झाडणें]

**झाडन-नी**—स्त्री झाडणी, (व) गवताची केलेली केरसुणी

**झाडनी**—स्त्री झाडणी अर्थ १ पहा (क्रि० करणें) 'भूतबाधा झालीसे इन्ग करा झाडनी यावडी।' -होला १४१ [झाडणी]

**झाडनी**—स्त्री (व) कडाक्याच्या थंडीनें किंवा फार आंबट पदार्थ खाल्ल्यानें (मनुष्यानें केलेली) हात पाय झाडणें इ० झाडण्याची क्रिया; शहारे आल्यासारखें करणें (क्रि० देणें) [झाडणें]

**झाडपचाळ**—पु सोनारांतील एक पोटजात किंवा त्या जातीचा मनुष्य (सोनार ही जात पांचाल ब्राह्मणांपैकीं आहे) [झाड+पांचाळ]

**झाडवळ**—वि झाडवाला 'आवघ झाडवळी महार। उतरले पार सहासगें।' -भन ६२ [झाडणें+स पतृ हिं वाला; म वळ प्रत्यय]

**झाडा**—पु १ (कायदा सामानसुमान इ० कांची सरकारी नोकरानें केलेली) झडती; बारीक तपासणी (क्रि० घेणें) २ (सामा) हिशेब चुकता करणें; हिशेब देणें-घेणें मिटविणें ३ (ल) पूर्णपणें काहीं लपवून न ठेवतां उघड करणें, सर्व स्वरूप प्रकट करणें; झाडा देणें 'अहतादि भावा आपुलिया। झाडा देऊनि आपवया।' -ज्ञा १५ २७९ ४ शुल्क; मलविसर्जन मलशुद्धि ५ फडशा, निकाल, फडशा, निरास 'त्याच दिसीं झाडा द्रव्याचा जाला।' -रामदासी २ ९९ ६ (गो गा) (भूत पिशाच्च, विखार इ० काढण्याकरितां मांत्रिकानें) टाकाटाकानें, केरसुणीनें केलेली झाडणी (क्रि० घालणें) [स झाटन; प्रा झाड हिं झाडा, गु सिं झाडो] (वाप्र) ०करणें-१ कर्ज फेडणें 'झाडा करून देऊ' -भाअ १८१५ २७१ २ नाश करणें, निकाल करणें 'ऐसा द्वादश वाणें झाडा केला।' -जै ३० १७ ३ शौच करणें, परसाकडे जाणें ०घेणें-बारकाईनें कसाशीनें तपास करणें 'छप्परबंदोच्या तळ्याचा झाडा बारकाईनें घ्यावा' -गुजा ४६ ०सुचविणें-विस्तारपूर्वक सांगणें 'श्रोते म्हणती न सुची झाडे। सुम निवारे लागोंया।' -एरुस्व १५ १५९ ०होणें-सफेदी 'आता बातमी हरकारे झाडा झाले लवकरी आणीक पाठविणें' -पद १० ११ **झाड्यास जाणें** शौचास जाणें सामाशब्द- ०झटका-पु (व्यापक) १ सरकारी नावें इ० कावर केली जाणारी झडती तपासणी इ० २ शौचमुखमार्जन, परसाकडे चोंडधुणें इ० [झाडणें+झटकणें] ०झडती-स्त्री १ (व्यापक) झाडाझटका अर्थ १ पहा २ (एखाद्याकडून) कवडीकवडीचा हिशेब घेणें, हिशाची कसून केलेली तपासणी विचारपूस (क्रि० घेणें) [झाडा+झडती] ०पत्र-पत्रक-न मामलतदारानें ठेवावयाचें वसुलाच्या झाडयाचें मासिक पत्रक निकालपत्र पहा [झाडा+पत्र-कागद] ०पवाडा-पाडा-पु १ कसून हिशेब मागणें; कडक रीतीनें जाब विचारणें २ अशा तऱ्हेनें दिलेला हिशेब जाब झडती (सामान्यतः अनेकवचनी प्रयोग) (क्रि० करणें, देणें, घेणें होणें, येणें) 'न सुचे वाकी नव्हे झाडापाडा।' -तुगा १५४३ या कामाविषयीं कोठें झाडेपवाडे याव लागतील काय कोण जाणे [झाडा+पवाडा=पाडा] ०बाकी-स्त्री (कर्जाच्या) बाकीचा निकाल फडशा 'नामदेवा म्हणती घ्यावा जन्म तुम्हीं। झाडाबाकी आम्ही करू येथें।' -रामदासी २ १४३ [झाडा+बाकी] **झाडावा**-पु तपासणी, शुद्धि -धार [झाडा] ०वारन्ट-न (कायदा) जंगम माल शोधून काढून मजिस्ट्रेटकडे हजर करण्याबद्दल पोलीस अमलदारास दिलेला हुकूम (इ) सर्चवॉरंट [म झाडा+इं वारन्ट=आज्ञा परवाना] **झाडेकरी**-पु (जकातीच्या नाक्यावर नेमलेला) झाडा घेणारा अधिकारी; जकात अंमलदार [झाडा+करणें] **झाडेकार**-पु (गो) भूतबाधा घालविणारा विष इ० उतरविणारा मांत्रिक [झाडा+करणें] **झाडेभवाडे**-पुअव (व) १ अळंगळ हयगय दिरंगाई 'आतां का झाडेभवाडे देता' २ हाल हालअपेष्टा भोग 'आमच्या जिवाचे झाडभवाडे आहेत' [झाडा+भोंवाडा]

**झाडी**—स्त्री १ झाडणें, झाडून टाकण्याची क्रिया 'मुरडिवें आगें झाडी करितु। अनियाळा डोळा मेंझ घेतु।'—शिशु ७१० २ निकाल, फडशा झाडा पहा ३ शुद्धि ' देहजाडयाचिया किटा। आवृत्तिपुटीं सुभटा। झाडी कीजे'—ज्ञा १७ ८०९ ४ लावविणें; पळविणें [झाडणें] ०करणें—झाडून टाकणें, निकाल, नाश करणें 'स्वानंदें तृप्ति झाली। झाडी केली भवरोगा।'—एभा १० २९

**झाडी**—स्त्री १ जंगली किंवा झाडाझुडपांनीं व्यापलेला प्रदेश, राई, झाडाचा समुदाय 'ज्याच्या रम्य तरुवरी पसरल्या झाडया किती सुंदर।'—केक १२८ २ झाडोरा, झाडझुडपांनीं व्याप्त अशी अवस्था, निबिडता ३ (ना ) चांदा व भंडारा हे अरण्यमय जिल्हे, याना झाडीपट्टी असेंहि म्हणतात [म झाड, का झाडी] ०वाट—स्त्री झाडींतून, जंगलांतून जाणारी वाट, जंगलांतील पायवाट या वाटेंत चोराची फार भीति असते ' झाडीवाट ते नेणती स्वामी। पुनासी न धाडिता समागमीं।'—दावि ३९२ [झाडी+वाट]

**झाडी**—स्त्री (हेट नाविक ) गलबताच्या वाकाच्यामध्यें उभें घातलेलें लाकूड, (गलबताच्या) वाकाची वाटी व भाग व गलबताची एकएक बाजू यास जोडणारा तिरपा वासा [झाड]

**झांडी**—स्त्री (ना गोंडी ) एक लहानसें लाकडी टाळासारखें गोंडी वाद्य [झाज, झाजडी]

**झाडू**—पुस्त्री १ केरसुणी, खराटा २ रस्ते झाडणारा, विशेषत भंगी, हलालखोर 'ही बया माझ्या शिकारखान्यामधीं झाडूचें काम करीत व्हती '—वाय २६ [झाडणें, हिं गु झाडू] ०खोर—पु (ना ) भंगी, मेहतर ०वाला—वि रस्ते झाडणारा; भंगी 'पहिल्याच झपाट्याला झाडुवाल्यांचें काम पत्करतें '—नाकु १ २८ [झाडू+वाला=धंदेवाचक प्रत्यय]

**झाडोरा, झाडौली**—पुस्त्री (वों ) १ दाट, गर्द झाडी, राई २ त्यामुळें होणारें अभेद्यत्व, दाट झाडेंझुडपें असणारी जागा. 'कल्पतरूचे झाडोरे।'—वेसीस्व ९ २० 'विचित्रा वेदवेलीं। दिसतीं सहजें सिद्धाओळीं। भावा भावाचिआ झाडौलीं। चहोंकडे।'—दाव ४४४ [झाड+आवली=रांग]

**झाडया**—धाना १ झाडूवाला, भंगी, हलालखोर २ सोदा, उचल्या, भामटा, चोर [झाडणें]

**झाडया**—धाना पिशाच्च किंवा देव यानीं पछाडलेला मनुष्य, (भूतांचें, पिशाच्चाचें) झाड [झाड]

**झांनन**—पु झनझन असा आवाज, झणझणाट झणत्कार छुमछुम, रुणझुण नाचण्याचा आवाज झनन पहा 'धिमकी धिमकी धिमधेरी—झननन झानन झनत्कारी।'—राला ३८ [ध्व झन्]

**झांप**—पु १ काटेरी झुडपाचें दाबून बांधलेलें मोठें ओझें, काटयाचा भारा २ झाडाची मोडलेली फांदी, झाकर ३ (वों ) नारळीच्या झाडाची फांदी चावळी, सावळी ४ नारळीची, माडाची चटईसारखी विणलेली झावळी, चुडनन, सावळीचा वळलेला तट्या, चटई हा छपराला उपयोगी पडतो ५ गुरें जाऊ नयेत म्हणून केलेलें फाटक, दुबळकें येटें, आँगर, झापा ६ दाराचें, खिडकीचें झडप, फळी ७ शेतातील गवताचें झोंपडी, गुरवाडा ' शेतात एकदोन घरें असलीं तर त्याना झाप म्हणतात '—गागा २ ८ कोंबडयामाटीं मोटया करंडयाच्या आकाराचें केलेलें तट्याचें खुराडें [प्रा झप=झाकणें, हिं झाप=झाकण, गु झाप=जाळें] ०टळ—न माडाची जुनी झावळी, जुनी झाप [झाप+टळ प्रत्यय]

**झांप**—न (गो ) गुतागुत, घुसगी पहा [गु झाप=नाळें]

**झां(झा)प**—स्त्री. १ पक्ष्याची झडप झेंप, उडी (क्रि० घालणें) २ (मनुष्य पोहताना, साप सरपटताना, कंबेवरील मूल एखाद्या ओळखीच्या माणसाच्या पुढें केलें असताना करतात ती) शरीराचा पुढील भाग थोडा उचावून पुढें झोंकण्याची क्रिया, झेंप (क्रि० टाकणें, मारणें घालणें, खाणें) ३ (चोर इ०काचा) हल्ला, छापा. (क्रि० घालणें, पडणें) [स झप=उडी, बुडी, व झॉंप तुल० इ जप्=उडी]

**झांप**—स्त्री (मूर्च्छा, भूतबाधा, पित्त इ०मुळें डोळ्यावर येणारी) गुंगी, झापड, ग्लानि, तंद्री [स स्वाप (झोंप)—स्वाप—झाप—झाप —भाभ १८३४]

**झां(झा)पड**—स्त्री १ (पित्त, मूर्च्छा इ०मुळें डोळ्यावर येणारी) झाप, गुंगी, ग्लानि, तंद्री, झोंपेचा पगडा, डोळे मिटू लागणें (क्रि० पडणें, घालणें) निद्रेच्छा, सुस्ती 'या स्वामीस लागलें वेड। सादर मृत्यूझापड।'—नव १५ ७४ २ ढगाची अंधारी, काळोखी, मळभ (क्रि० घालणें) ' मेघानी, पावसानें झापड घातली ' ३ तोंडावरून पांघरूण घेणें, वस्त्रानें तोंड झाकणें (क्रि० घालणें) ४ (ल ) भूल, मोह, भुरळ 'याम कालगतीमुळें झांपड पडली '—भाव ४८ ५ (ना ) आटोका, तावड, धाप ' लोक त्याना फितविण्यास आले परंतु ते त्याच्या झापडींत आले नाहींत '—सन १८५७ ४०८ ६ (खा ) पहाट, उष:काल, झांझरमांजर ७ जनावराच्या डोळ्याना बांधतात ती डापणी [झापणें, झाकणें] ०देणें—(व ) १ एखाद्याच्या तोंडावरून हाताचा पंजा उलटा करून डोक्यावरून खालीं उतरणें २ (ल) फसविणें

**झां(झा)पडी**—स्त्री १ झापड अर्थ १ पहा ' बाण सुटले कडाडी। पडली डोळिया झापडी।'—एरुस्व १० १९ २ अंधारी, झापड अर्थ ७ पहा ' का तेलियाचा ढोर पाही। डोळा झापडी स्वदर्हीं।'—एभा २१ २३१ ३ तोंडावरून वस्त्र गुंडाळणें, घुंघट, बुरखा ४ (व ) पावसाची झडप घरात येऊ नये म्हणून दारावर, खिडकीवर केलेली पत्र्याची, गवताची छपरी, झडप, पाजी ५ (सामा ) झापड पहा

**झांपण**—न झापड अर्थ १ पहा (क्रि० पडणें घालणें) —न १ झाकण ढापण २ झापडीच्या दाराची झडपी, झापा [झापणें]

**झांपणी**—स्त्री १ अधारी, झापड, झापण २ झाकण, ढापण [झापणें]

**झांपणें**—उक्रि झाकण घालून बद करणें, झाकणें, झाकण ठेवणें [झाप, हिं झापना]

**झापणें**—उक्रि (प्र) झेपणें पहा

**झापर**—न (ना) झोपडीचें फाटक, झापा [झाप]

**झापरें**—न. (ना) डोक्यावरील केंसाचें छप्पर; झिपऱ्या —वि केंसाळ [झिपरी]

**झांपा**—पु (शुपण, झोंपडी, गोठा याचा) तट्टया, कामट्या, गवत, झावळी इ०चा केलेला दरवाजा, फाटक, झाप 'रोज चार वार्धीर मारती, मुडकें उडविती दरक झाप्यास।'—गापा • [प्रा झप=झाकणें, गु झापो] म्हॅ० बैल गला झापा वला=वगतीमागून घोडे याप्रमाणें

**झापा(प)ळ**—न, १ झाकर, गर्द छाया, झाडाच्या फांद्यांचा निविडपणा, दाट झाडी २ ढगाची अंधेरी (क्रि० येणें) दाट फांद्या असलेलें (झाड), गर्द, निबिड, घन, दाट [झाप] **झाप(पा)ळणें**—अक्रि १ (झाड) दाट फांद्यांनीं, पालवीनें युक्त होणें, गर्द, घनदाट होणें २ (मेघ इ०नीं आकाश) दाटणें, व्यापणें, झाकोळणें भरून येणें [झापाळ]

**झांपाळो**—वि (गो) झोंपणारा, झोंपाळु

**झांपी**—स्त्री झापड —शर

**झाब**—स्त्री (खा) घेरी, मूर्च्छा —भारे ७ १-४

**झाबड**—वि (व) अगदीं वृद्ध, म्हातारपणामुळें रोड झालेलें, जख्खड (स्त्री) 'झाबड झाली आहे बाई, पण तिचे ढग कायम आहेत' [झावड ?]

**झांबड**—स्त्री १ हिसकावून घेणें २ (ल) लुबाडणें, लुटणें, लूट [झोंबड]

**झांवड**—स्त्री झापड, अंधार, काळोख (क्रि० पडणें) [झापड] **झाब(बा)डणी**—स्त्री हिसकावून घेणें, ठकमार, लुटा लूट नागवणूक [झोंवडणें] **झांब(बा)डणें**—उक्रि १ हिसकावून घेणें हिसडणें, हिसकणें जोरानें ओढणें 'शिरींचा पाडोनिया मुगुट। दाढाही झांवाडिले वळ।'—भारा किष्किंधा १६ १३६ २ लुटणें उबाडणें नागविणें बुचाडणें [झोंवडणें] **झांबडाझाबड**—स्त्री १ जोराची हिसकाहिसक, ओढाताण, झोंबाझोंबी २ लुटा लूट [झाबड द्वि]

**झावड**—वि वडील अतिशय मोठा अवाढव्य

**झावड-ड्या**—वि गोंधळ्या झावऱ्या भाव्या; भ्रमिष्ट

**झावडणें**—अक्रि (राजा) (आजारीपणामुळें) सुस्त होणें, मंद होणें मरगळणें

**झाव(म)रा-ऱ्या**—वि (राजा) (वर्तनात, दिसण्यात) गोंधळ्या, विसराळु, भ्रमिष्ट, गाफल्या, गबाळ्या, चुका करणारा [झावड]

**झावचला**—वि अशुद्ध, अस्पष्ट, मंद 'ना दिवस नव्हे सोज्वळ। जैसी झावळी सांजवेळ।'—एभा २५ •५१ [झावड]

**झावळ**—स्त्री लूट, जाळपोळ झावड पहा

**झावळा**—पु (कु) दोऱ्याची विणलेली पिशवी, जाळें झारें पहा

**झावळी**—स्त्री १ (गो हेट) पकडलेले मासे ठेवण्याचें कोळी लोकांचें लहान जाळें २ (हेट) जाडया सुताची विणलेली जाळी दार पिशवी (कु) गवत ठेवण्यासाठीं बैलगाडीच्या खालीं असलेली जाळी

**झावा-वू**—पु तेल ठेवण्याचा ओतण्याचा चामड्याचा बुदला, तळाचें कातडी भांडें [हिं झावा]

**झावु**—वि (प्र) झावू झाऊ झाऊ पहा

**झामड, झामडणें**—झावड, झावडणें इ० पहा

**झामरा**—वि केंसाळ, फार केंस असलेली कुत्र्याची जात, (ल माणसासहि म्हणतात)

**झायाझुया**—स्त्रीअव (उन्ह ताप यामुळें दिल्या जाणाऱ्या माठ्या) धापा सुस्कार; श्वासोच्छ्वास (क्रि० करणें, देणें, टाकणें, होणें) हायहुश —क्रिवि धापा टाकीत लाहुऱ्या, अहाळण्या देत [प्रा झाय=जळलेलें, दग्ध किंवा हाय ध्व]

**झार**—स्त्री (राजा) तांदूळ इ० धान्याचे कुटल्यानंतर, दळल्यानंतर चाळणीनें चाळून राहिलेले अतिशय बारीक कण [स झृ-क्षर् किंवा क्षर् प्रा झर]

**झार**—पु १रशिया प्रजासत्ताक होण्यापूर्वीच्या राजघराण्यातील राजाची पदवी २ (ल) जुलुमी राजा [लॅ सीझर, रशि झारी] **०शाही**—स्त्री १ झाराचा अंमल राज्य २ (ल) झार बादशहाच्या प्रमाणें जुलुमाचा व दडपशाहीचा अमल 'सरकारच्या झारशाही जुलुमाचा निषेध केला आहे'—क ७ ' ३०

**झार**—पुन समुद्रासारख्या नदींतून वाहून तीराला लागणारा एक बुळबुळीत पदार्थ —शर

**झार, झारें**—न (कोळी) समुद्रातील एक प्राणी याच्या समुदायास आकृतीवरून पोर्तुगीज लोकांनीं लहान जहाजाच्या नावानें संबोधितात (इ) फिझेलिया —प्राणिमो ११३ [देप्रा झारुआ= क्षुद्रजंतु]

**झार**—वि (तंतुवाद्याच्या तारेस झारा लाविला असता होणाऱ्या आवाजाप्रमाणें) खणखणीत उंच आवाजानें वाजणारी (कळ, तंतुवाद्य इ०) [ध्व]

झार—वि (गो.) अतिशय कडू, कडू जहर 'औषध कडू झार झालें आहे' [जहर]

झारगें—न (कों) मळणी झाल्यानंतर प्रथम ज्या चाळ ळीनें धान्य चाळतात ती झाळण, चाळणी [झारा]

झारगें—न १ (झाडावरून फळें काढण्याची) जाळी लाव लेली आकडी, झेल्या २ (सामा) जाळें, पिशवी ३ (कु) नारळ वगैरे आणण्यामाठीं दोऱ्याच्या जाळ्याची केलेली पिशवी, थैली झाबळा पहा [स क्षृ-झर् किंवा क्षर्]

झारणें—उक्रि १ (राजा) (माती, पीठ इ०) चाळणें, गाळणें २ सोनाराच्या शगडींतील राख, माती इ० चाळून चादी सोनें काढणें झारा, झारकरी पहा [स झृ-झर् किंवा क्षर्, प्रा झर]

झारवा—पु १ (उसाचा रस करत असताना त्यावरील किंवा तेलावरील) मळी काढण्याची अथवा छाटून काढण्याची परडी, झारें, टोपली २ तेलातील गाळ -शर [झारणें]

झारय—स्त्री (गो) खेकडे धरण्याचा गळ [झारा]

झारा, झारी-झाऱ्या, झारिया, झारेकरी—पु १ सोनाराच्या दुकानातील राख विकत घेऊन किंवा रस्ता इ०कातील पडलेला केरकचरा इ० चाळून गाळून तींतून सोन्याचे कण काढून त्याजवर चरितार्थ करणारी एक जात व तींतील व्यक्ति 'मिरविति गुणज्ञ कनका काढी सुक्ष्मा जपोनि झारा ज्या।'—मोमभा २ १ —ज्ञानाम ४४ धुळी माजीं सोनें जैसें। भेसळलें न दिसे। तें निवडू जाणे जैसें। झारियाचि पैं।'—विउ ४ ५९ 'सरंजामदाराची झारे कऱ्याप्रमाणें चौकशी सुरू झाली' २ (ल) कृपण मनुष्य [झारणें]

झारा—पु १ वीणा इ० तंतुवाद्याच्या घोडीजवळ तारेखालीं घातलेला कापूस, लोकरीची दशी जिव्हाळी (इच्या योगानें आवाज चढा होतो) २ तंतुवाद्यातील खर्ज स्वराची पितळी तार ३ झाऱ्याच्या योगानें निघणारा चांगला आवाज या आवाजा सारखा कंठातून निघणारा आवाज [ध्व झार]

झारा—पु १ दांडा असलेलें व एका टोकास सपाट वाटोळें व सच्छिद्र असलेलें स्वयपाकाचें पळीसारखें उपयोगी उपकरण यानें तळ गाळून कढईतील तळलेले पदार्थ वर काढता येतात तंजावरकडे याला पारीची पळी म्हणतात २ गाळण्याचें साधन गाळणी 'नीर बहुत ठाईं हिंडलें। झारा घालून मग निवळलें।' —दावि ७७१ ३ पाणी तापविण्याच्या बंबातील विस्तव ठेवण्याची जाळी [स क्षृ-क्षर् किंवा-क्षर् प्रा झर फा झिर]

झारी—पु झारेकरी वीं धुळींत हारपलें मुक्त। झारी निवडी सावचित्त।'—रावि ३१ ४५ [झारणें]

झारी—स्त्री १ लांब गळ्याचें पाणी थंड राखण्याचें (विश पत्र जस्ताचें) भांडें २ तोटी असलेला गडू 'निघे न झारींतुनि नीरबिंदु।'—वामन, वामनचरित्र १ ७७ ३ झाडांस पाणी घाला वयाचें जस्ताचें भांडें याला एक लांब तोटी असून तिचें तोंड पसरट व सच्छिद्र असतें ४ चहाची किटली ५ तोटी [स क्षृ-झर् किंवा क्षर् प्रा झर सिं झारी] ०चा अपकरा पु पाणी पिण्याच्या तोटीचा अपकरा गडू ०ची पळी—स्त्री (तंजा) झारा

झारें—न झारवा अर्थ १ पहा

झारेकरी झाऱ्या—झारा, झाऱ्या पहा

झाल—स्त्री १ डाली, वेळूचें केलेलें उथळ व पसरट शिपतर २ या शिपतरांत कणकीचे दिवे, फळें (आणि मराठ्यांत) पुरण पोळ्या, करंज्या, पापड इ० पदार्थ ठेवून याची पूजा करून ती विवाहसमारंभांत वधू वरगृहीं जाण्याच्यापूर्वी वराच्या आईस दान करितात, तो विधि ऐरणीवाल्र पहा 'चरव्या घागरी आणी झाली। हार हरे रत्नाचे।'—वमीस्व १४ ३९ [का जल्ली= वाटोळी वेळूची टोपली (धान्य ठेवण्याची), टुरडी? झारगें, झालर पहा]

झाल—स्त्री १ (कु), सुरमाडाच्या फळाचा व फुलाचा लोंबता घोंस २ सुरमाडाच्या पानाचें केलेलें पायपुसणें —पु पुढील बैलाच्या शिंगाला बांधावयाचा केसाचा गोंडा [प्रा झुत्र म झुलणें?]

झाल—स्त्री १ एखाद्याच्या अंगावर ल्हान मुगानें टाकलेली झेंप उडी, झाप (क्रि० टाकणें) २ (गाट्याच्या खळ्यांत) गोटी विशिष्ट मर्यादेच्या बाहेर पडणें, फेकणें (क्रि० खाणें) ३ एखाद्या वर रागानें धावून जाण्याची क्रिया (क्रि० जाणें) ४ झोल झोकाडी, चाचरी (क्रि० जाणें) —वि (प्र) जहाल पहा [झोल] ०जाणें-(कोणाएकावर) त्याला उद्देशून अमर्याद भाषण करणें

झाल—स्त्री (ना व) सायंकाळचा अंधार झांपड 'आम्ही बाजारातून परत आलों तों चांगलीच झाल पडली होती, लांबून माणूस ओळखता येईना' [स ज्वाल?]

झालणा—पु (कों) बांबूच्या कड्याला जाळें विणलेलें मासे धरावयाचें हातजाळें इकडे ह्याला हातझालणा असेंहि म्हण तात व रत्नागिरीकडे हातविंड हें नांव आहे [म जाळ म झाल]

झालर—स्त्री १ मंडप छत झगा इ० यास शोभा आणण्या साठीं लावावयाचा चुण्या घातलेल्या कापडाचा पट्टा सजाप, मगजी नक्षीदार काठ २ (नाट्य) राक्षसाच्या मागानें नमाव याचा लुगड्याचा—चुण्या पाडलेला—घागरा ३ (नाट्य) पडद्याच्या वरच्या बाजूस लोंबणारा कापडाचा चित्रित पट्टा उदा० महा लाची, आकाशाची जंगलाची झालर [हिं झालर]

झालर—स्त्री १ गुऱ्हाळातील मादण किंवा नांद यावरील चिऱ्याचें केलेलें झाकण, चाळणी, उसाचा रस गाळून घेण्याची विरळ विणीची टोपली २ विवाहसमारंभात वरातीच्या दिवशीं,

(गोपा मुलकिशाच्या वेळीं) भींत दिवे, रंगाचा तांब्या व बाळ कृष्णाची मूर्ति ठेवून जी मानकऱ्याच्या डोक्यावर ठेवतात ती झाल गोपा अर्थ ३ पहा [झाल]

**झालर**—स्त्री १ झांज, झांजरी, टाळ 'मुहूर्तविद झालर त्वरित वाजवी त्या क्षणीं।' –वीरेश्वरकविकृत सीताकल्याण १० २ मोठ्या आवाजाचें एक रणवाद्य 'चौघडे व नगारे व ढोल व झालरी व ताशे इत्यादि रणवाद्यें गांवांत कोणास वाजवूं देऊं नये, परंतु मंगलवाद्यें वाजविल्यास चिंता नाहीं' –विष्णुबुवा ब्रह्मचारीकृत–वेदोक्तधर्मप्रकाश पृ ४३६–४५० [स झल्लरी, हिं झालरी]

**झाला**—पु (वाद्य) सतारीच्या सर्व तारांवर (चिकारीच्या मुद्दां) द्रुत गतीनें भरारे बोल काढणें, वीन किंवा सतार वाजवीत असतां कड–वीरीच्या तारेंत ताल भरणें

**झालेपण**—न जन्म, आयुष्य 'विजेनिंग मुद्दाम आला म्हणोन नामोद्धरम व्हावें तरी झालेपणाचें सार्थक काय?' –भाव १० [म झाला=होणें याचा भूतकाळ+पण]

**झा(झा)व**—स्त्री (ना व) (उन्हाची) झळ, तिरीप 'दुसऱ्या उदाहरणात उन्हाची झाव, आसपासची घाण व अशक्तता .' –न्यायप १३१ [स दह् प्रा झाप=जळणें, जाळणें, प्रा. झावण=दहन किंवा झाळ] ॰काढणें–(व) एखाद्याची खरडपट्टी काढणें झावेला–वि (व) झळ लागल्यामुळें म्लान झालेला [झाव]

**झा(झा)वळ**—वि १ विसराळू भ्रमिष्ट, भ्रांतिष्ट, अजागळ, झावऱ्या 'बुद्धि झावळ जयाची। तो तें मानी।' –भयराज ६ ६७ २ विसराळूपणाचें, भ्रमिष्टपणाचें, गबाळपणाचें (वर्तन, भाषण इ०) ३ अस्पष्ट अंधुक, संदिग्ध 'पन्हवीं संकल्पाचिये सांज वेळे। नावेक तिमिरेजती बुद्धीचे डोळे। म्हणोनि अखंडित परि झावळे। भूतभिन्न ऐसें देखे।' –ज्ञा ९ ७२ [स श्यामल?] **झावळणें**–अकि भ्रमिष्ट होणें –शर ॰झावळ–मावळ–धावळ–नली झुजुमुजु झांजड, झांजडमांजड सर्व अर्थी पहा –क्रिवि अंधुकपणें

**झावळी**—स्त्री (को) ताडामाडाचा, पाकळाचा, सुरमाडाचा झाप, फादी (विणलेली किंवा साधी) सामान्यत सावळी असा शब्द आहे पण मुंबईच्या आसपास झावळी हा शब्द वापरतात ''सरळ भाट मुग्माड चकावर यत्र निवट झावळी।' –प्रला १५४ [स छाया+वल्ली]

**झा(झां)वळी–ळें**—स्त्रीन झांजड, अंधार, अस्पष्ट उजेड 'चांदणियाचें झावळें। दर्पणीं जैसें।' –भाए २९९ [स श्यामल?]

**झासाड**—न खडकावर आपटणारी पाण्याची लाट (क्रि॰ उसळणें उठणें पडणें)

**झासू**—वि शुष्क, निरकोळ झाऊ पहा

**झांस**—पु (महानु) दाट झाडी 'अनयांच आसुर। मेघ झांस दुर्धर। अतिस्नेहाचे पासर। उठाऊं देति।' –ज्ञान २७८ [टीप–ग्रंथातील अर्थ बरोबर नगारा स झष, प्रा झस=भाषा हा अर्थ नीट लागतो]

**झांसा**—पु. १ (दुसऱ्याला लुबाडण्याची, इजा किंवा दुःख देण्याची, वाईट करण्याची) धमकावणी, दहशत, दपटशा, धाक, भीति (झागा याच्या उलट अर्थी), अमुक गोष्ट न केल्यास पुढें तुम्हे अमुक तऱ्हेनें वाईट करीन अशी (एखाद्यास) सूचना, धमकावणी 'मायेचा पलाल्हार कैसा। निर्गुणी पाडी गुणाचा फांसा। दावूनि जीवपणाचा झांसा। रामारवळसा आवर्ती।' –एगा २१ ११७ २ ठगाईर, पुंडगिरी, ठकबेगिरी ' झगा करण्यास कोणी माणूस निघेल आणि त्यामुळें बंड, फितुर होईल तर भाजि केदानें सदर अदालतीची आज्ञा घेऊन ' –न्यामे १०० [स झष्=मारणें, इजा करणें, हिं झांसा=दगा, धोका, गु झांसो=राग झागा]

**झांसा**—पु तळमळ 'लाविसी हरि किती मज झांसा।' –दाव्ह ४ ११७ [स ध्यास]

**झांसुरणें**—अकि मनांत झुरणें, तळमळणें 'तेंहि अम्हणु सेवों सरे। कीं हाणिचेनि सिगें झांसुरे।' –ज्ञा १७ २११ [झांसा]

**झांसुरणें**—अकि आळसानें स्वस्थ पडून असणें, निचेष्ट पडणें 'उचितानुचित आचरें। झांसुरतां नाठवे जीवें।' –ज्ञा १४ १८४ [झांसा]

**झाळ**—स्त्री (उन्हाची) झळ, तिरीप, झळई 'झाळेंकरोनि म्लानलें मुख।' –दावि १५७ [स ज्वाल, झला]

**झोळणा**—पु (गो) पावसाचें कापडी छप्पर [झोळणा]

**झाळणी**—स्त्री १ झाळण्याची, डांक लावण्याची क्रिया, डाक लावून घर बसविणें २ झाळलेली, डांक लावलेली अवस्था [झाळणें]

**झाळणें**—उकि (धातूची भांडीं इ० कास) कस्तर, डांक लावून अग्नियोगानें सांधणें, जोडणें [स ज्वल्? हिं झालना, गु झाळवु]

**झि(झि)कणें**—सकि (राजा) वरचेवर झेलणें, पकडणें, धरणें **झिकणार**–वि (गो) झेलणारा [जिकणें?]

**झिक(ग)झिक(ग)**—स्त्री निगजिग पहा

**झिकझिकणें, झिकझि(मि)की, झिकझिकीत**—जिग मध्यें पहा

**झिकलेस**—स्त्री (भरतकाम) जरतारीचें वद जिगची लेस लीक पहा [झिक=जिग+इं लेस=फीत]

**झिकवण–वणी**—स्त्री पसवणी, झकवण–वणी पहा (क्रि॰ करणें, लावणें, मांडणें)

**झिकविणें**—उक्रि. चकविणें, फसविणें, ठकविणें झकवणें अर्थ १ पहा

**झिकापुरी कांऽ**—पु (नाशिक) जरीच्या काठाची एक जात

**झिगवें**—अक्रि (गो) खुरटणें, खगणें, रोडावत जाणें, झुरणें

**झिगझिग**—स्त्री १ जिगजिग, पायधरणी, मिन्नतवारी, त्रास दायक विनवणी २ किरकीर, पिरपिर, कटकट तकार ३ पाव साची बुरबुर ४ (हालचालींतील, कार्यांतील) मंदपणा, सुस्ताई, ढिलाई, दिरंगाई (क्रि० करणें, लावणें, मांडणें, चालविणें) –वि. त्रस्त, त्रासलेला, वेजार (अविरत श्रमानें) [ जिगजिग ]

**झिगझिग-झिगी**—स्त्री चमक, लुकलुकी चकाकी; झकाकी, तेज, झगझगी 'राहेल कमी कौस्तुभमणिपाशीं माणिकात झिग झिग जीं।' –मोभीष्म ६ ३५ [ध्व, झिग द्वि] **झिगझिगणें**–अक्रि चकाकणें लुकलुकणें, चमकणें [झिगझिग] **झिगझिगीत**–झगझगीत, चमकणारें, लुकलुकणारें चकाकणारें [ झिगझिग ]

**झिंगट**—न झिंगा नावाचा ल्हान मासा, झिंगाटी, कोळंबें [ सं चिंगट, हिं झिंगा ]

**झिंगट**—वि दारुड्या, निशाखोर, अमली, दारू पिऊन झिंग णारा [ झिंगणें ]

**झिंगडी**—पु (गो) चावटपणा

**झिंगणें**—अक्रि (दारू, अफू इ० मादक पदार्थांच्या सेवनानें) धुंद होणें, गुंगणें, बेशुद्ध होणें, गुंगून पडणें, कैफात, तारेंत येणें [?] **झिंगत चालणें**–(मद्यप्राशन इ० मुळें) झोंकाड्या खात जाणें **झिंगा, झिंग्या, झिंगीखोर**–वि दारुड्या झिंगट पहा [झिंगणें]

**झिंगनी मात**—पु (को) एक प्रकारचा गोड व पौष्टिक चारा, गवत 'वरच्या रानचा झिंगनी मात।'–मसाप ४ ४ २६४ [ झिंगनी+मात=चारा ]

**झिंगरडू**—न शेतात आढळणारा एक ल्हान कीटक [ देप्रा झिंगिरड ]

**झिंगरू**—न (तिरस्कारानें प्रेमानें) झिंगा नावाचा ल्हान मासा [ स चिंगट, हिं झिंगा दप्रा झिंगिर ]

**झिंगा**—पु ल्हान मासा 'जळीं राघव माशास अडविलें असख्य झिंग्यांनीं।, –ऐपो ४०३ [स चिंगट, हिं झींगा]

**झिंगा**—पु (राग इ० मनोविकाराचा) झटका, ल्हर आवेग झपाटा (क्रि० येणें) [ झिंगणें ]

**झिंगा**—पु गारुडी जादुगार, तमासगीर इ० लोकांच्या विशेष उपयोगातील अश्लील अर्थाचा एक शब्द

**झिंगाटो**—पु (गो) एक प्रकारचें राक्षसाचें सोंग [ पोर्तु झिंगात=राक्षस ]

**झिंगी**—स्त्री (नाविक वों) पडणास खालच्या अगास आधार म्हणून जोडतात तीं लाकडें

**झिंगी**—स्त्री जिल्हई, चकाकी, झिगझिगी पहा –राको २४७

**झिंगी**—स्त्री १ अमल, धुंदी, माज, गुंगी २ (ल) (संपत्ति इ० काच्या योगानें येणारा) ताठा, धुंदी; माजरेपणा, मस्ती ३ मादक द्रव्य, दारू, मद्य [ झिंगणें ] **०खाणें**–दारू पिणें **०खोर**–वि दारुड्या, झिंग्या

**झिंगी, झिंजी, झिंटी, झिंझोटी**—स्त्री तोंडावरून अस्ता व्यस्तपणें लोंबणारी केसाची बट, झिपरी (नेहमीं अनेकवचनी प्रयोग उदा० झिंग्या, झिंज्या) [ स झिंगी=झुडप ]

**झिंगुर्डें**—न (वृ) १ बारीक बारीक काटेरी बोंडें येणारें एक जगली झाड २ बाडगूळ

**झिजणें**—अक्रि १ घर्षण इ० काच्या योगानें क्षय पावणें, कमी होणें, झरणें 'मना चदनाचे परी त्वा झिजावें।' –राम ८ २ (शरीर इ०) रोडावत जाणें, कृश, क्षीण होणें ३ (ल) कष्ट घेणें, करणें उपयोगी पडणें 'झिजल्यावाचुनी कीर्ति कैंची। मान्यता नव्हे कीं पुढाची।' –दा १९ २ २४ [स क्षि–क्षयति, प्रा झिज्जइ, हिं छीव(ख)ना] **झिजणा-घळ**–स्त्री (एखाद्या वस्तूच्या आकारमानातील) घर्षण इ० काच्या योगानें झालेला कमीपणा, झीज, झिजणी [ झिजणें ] **झिजणी**–स्त्री १ झिजण्याची, कमी कमी होत जाण्याची क्रिया, रोडावणें, क्षीण होणें २ क्षयरोग, झिरफणी **झिजविणें**–सक्रि १ झिजण्यास लावणें घर्षण इ० कानें कमी करणें २ घसव टून जाणें घस, झीज सोसणें, झरविणें, काचविणें म्ह० आपणास झिजवावें तेव्हा दुसऱ्यास रिझवावें=स्वत शारीरिक सापत्तिक झीज सोसल्यावाचून दुसऱ्यास खूष करता येणार नाहीं [ झिजणें ]

**झिंजाड(ट)णें, झिंझाडणें**—उक्रि १ (एखाद्यास) केंस धरून खालीं पाडणें झिंजी धरून वाकविणें २ झिडकारणें 'थोरपणासि पाडिले। वैभवासि रिथाडिलें। महत्त्वासि झिंजाडिलें। विरक्तिबळें।' –दा ५ ९ ३८ ३ झुगारणें झाडणें (हात, पाय इ०) 'सोडवूनि मगरमिठी। झिंजाडोनि लोटिला।' –सुसभा ७ २५ –आसी ४५ ४ (ल) झिडकावणें, तिरस्कारणें हुर्यो, छी थू करणें झिटकारणें [ झिंजा ]

**झिंजार(ड)णें**—अक्रि १ (बदूक उडताना काठी मार ताना) प्रत्याघात होणें झटका देणें उसळी खाणें २ झटका बसणें प्रत्याघातानें (हात इ०) व्यथित होणें [ ध्व ? ] **झिंजारा-डा**–पु १ (बदूक तोफ इ० उडताना किंवा काठीनें मारताना होणारा) प्रत्याघात, धक्का, झटका, उलट खाणें (क्रि० होणें येणें) २ वरील धक्क्यानें (हात इ० कावर) होणारा परि णाम, वेदना (क्रि० बसणें)

झिंजी—स्त्री झिंगी पहा केसाची बट 'मिना मरूनि पाञ्ती।' –पाप्र १६ १८९

झिंजो(झा/टी), झिंझूटी—स्त्री (संगीत) एक राग ह्या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात, जाति संपूर्ण–संपूर्ण वादी गांधार, संवादी निषाद गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर हा सर्व नाल्कहि मानतात

झिज्या—पु एक प्रकारचा मुलाचा खेळ 'वाघोडी आणि आन्यापान्या। झिज्या बोकड अगल्गोट्या। भोंवर चर्के फेर वाटग्या। हेती काठ्या सत्वर।' –भवि २७२०

झिझ्या—स्त्रीअव केसाची झिंझी, झिंझोटी, झिंगी पहा

झिज्झा(झ्या)वात—पु झंझावात पहा [स झंझावात]

झिट—न झाडाची फांदी फरगानी –कृषि ५५५ झीट अर्थ १ पहा [स मिटी=झुडुप]

झिटकार(र)णें—उक्रि धिक्कारणें, तिरस्कारानें उडवून देणें, धुडकावणें, तिरस्कारा दाखवून मारणें झिडकारणें पहा [झट कारा]

झिटमिट—क्रिवि १ थेंबाथेंबानीं (दूध भांड्यात पडणें, पाणी इ० ठिपकणें, गळणें) २ कणाकणानीं, थोडा थोडा, थोडे थोडका, तीळतीळ (नफा इ० मिळणें) ३ क्वचित् क्वचित्, कुठें कुठें, तुरळक (पाऊस पडणें, पिकें इ० पिकणें) [ध्व मिट् द्वि]

झिटी—स्त्री झिंजी, झिपरी झिंगी पहा [स मिटी=झुडुप]

झिडकझिडकुं—क्रिवि झरारा, भरारा 'झिडकझिडकु धावे वारा।' –दा २० ८ २५ [झट]

झिडकणें, झिडकारणें झिडकाविणें—उक्रि धुतकारणें धुडकावणें कोणी आपणांतें धिक्कार करणें झटकारणें, तिरस्कारणें 'तिजलागीं पोटासि धरिता होये। तों ती तयातें झिडकावीत।' –जै ७७ १७ 'चांगळा निघ बाहेरी झिडकिलें मानांतरवें दडे।' –कीर्तन १ ८२ [झटक फिडका; हिं फिडकना]

झिडका—पु १ (हात पाय वस्त्र इ० कांचा) झटका, हिसका, झटकारा हिसडा २ इतर अर्थी थप्पा पहा. (क्रि० मारणें देणें) [झिडकणें] झिडकार–कारणी–पुस्त्री धिक्कार हमालणी हेटाळणी धुडकावणी [झिडकारणें]

झिडपुचें—सक्रि (गो) झिडकारणें

झिडवा—पु (गु) १ एकास एक चिकटलेले असा जोड केळ्याचें लोंगर –कृषि ४९० २ (गु) अफूचा दाडा, बोंड –कृषि ४९८

झिणकार—पु १ (वाद्यें इ० कांचा) झंकार झनत्कार २ (कठिण वस्तूवर आघात करण्यानें हात इ० कास मुणारी) मुणकी, झणझणी ३ झिडकार पहा [ध्व झिण]

झिणझिणणें—उक्रि १ झणाणणें, झणझण असा आवाज करणें, झनत्कार करणें २ झणझणणें हा शब्द इतर अर्थीहि उपयोगांत आणतात (हा शब्द हलका आवाज आणि लहानशी वेदना करणें दर्शवितो) [ध्व झिण द्वि]

झिणा—वि झिजलेला; घासलेला (दागिना, भांडें इ०) [स क्षीण, प्रा झीण, सिं झिणो]

झिण्या—स्त्रीअव पूर्णपणें न पोसलेले, पोंचट असे धान्याचे दाणे; हा शब्द एकवचनी (झिणी असा) क्वचितच आढळतो [झिणा]

झिनरी—स्त्री (ओतकाम) ओतलेली मूर्ति साफसूफ करतांना होणारी घट

झित्तर—न (व) शिंदीचें मोडलेलें टोपलें शिपतर

झिंद—पु मेलेल्या मुसलमानाचें पिशाच्च जिंद पहा 'तुमच्या घरान मिंद गेले' –धमाजी ८३ [जिंद]

झिंनों—पु (गो) एक प्रकारचें झाड

झिनी—स्त्री (महानु) ठिणगी 'तया प्रकाशाची झिनी। ते स्वर्गी झाली तरणी।' –ज्ञाप्र ४९० [ध्व मिनू]

झिप—क्रिवि जरद भरधाव? 'दानिता खड्गमु। वैसें राउतें अलु। सुरडता झिप वेगु। डाळां सुनावती ना।' –शिशु १४२१ [ध्व]

झिप—वि (नवीन बनावट शब्द) गळलेली, खालीं पडलेली, झिम पहा 'पहा फुलाची पखरण झिप्। माने गडेग। टिप् फुलें टिप्।' –कक ५७ –स्त्री राडा [स क्षिप्=टाकणें?]

झिपटी—स्त्री केसाची बट, झिंजी झिपरी अर्थ १ पहा

झि(झिं)परी—स्त्री १ झिंजी व झिपटी पहा 'माथा पिंगट झिपऱ्या मुखविर्ळी विक्राळ दंतावळी।' –आपू ४२ २ (ल) अजागळ, गबाळ गोवरी पण व्यभिचारी स्त्री, माभळ भगीण नेभळभगीण स्त्री म्ह० चीपरीचें वोभाट झिपरी मारी झपटे=अनओळखीनें राहणारी स्त्री व्यभिचारी नसताहि तिच्या सबधीं लोक वोभाट करतात परंतु एखादी माभळभटीण व्यभिचारी असूनहि समाजाचें तिकडे लक्ष्य जात नाहीं •धरणें–केस ओढणें अवहेलना करणें, प्रत्यक्ष शिक्षा करण्यास उद्युक्त होणें 'नेणा केव्हां धरूनि झिपरी देव घेईल झाड।' –आठल्ये झि(झिं)परा ऱ्या–वि ज्याचे केस लांब असून पिंजारलेले आहेत असा 'सर्वांत काम करणाऱ्या झिपऱ्या पोरीसारखी उडी मारून' –नाकु ३ १२ [झिपरी] झिपा-झिंगाराणी खेळ–पु एक प्रकारचा मुलींचा खेळ, यांत दोन्ही पक्षांतील गडी एकमेकांवर पाणी फेंकतात 'झिपा गे झिपा रामवरण झिपा। विषयाचे गोडी यामा नको करूं खेपा।' –ब ५९२ [ध्व झिप् स क्षिप्=झिपणें झिपणें]

**झिपुटा**—पु. झोक्याची, पाळण्याची, झोळीची ( झोके देण्याची ) दोरी; शेपटा. [ सं. शेप ]

**झिपोरडी**—स्त्री. (व.) झिपोटी. झिपरी, झिपटी पहा.

**झिप्पर**—न. ( कुंपणाचें, झोंपडीचें ) झांप, झडप, झोंपा.

**झिंबड-डी**—स्त्री. १ पावसाची जोराची झड. (क्रि० बसणें). २ (ल. मेजवानींतील, गाण्याच्या मजलशींतील, खेळांतील मंगळ; सामुग्रीची विपुलता; बहार-रंग. ३ ( कामाचा, धंद्याचा ) रगाडा; झोड. ४ ( माणसांची ) अतोनात गर्दी; झुंबड; झोड; दाटी. 'गिऱ्हाइकांची काय झिंबड पडली हो!' [ ध्व. झिम ]

**झियली**—स्त्री. (ना.) मिठाईची टोपली. [ फा. झंबील=) टोपली?]

**झिवा, झिंवं**—पु.न. पायघोळ ओंगरखा. झुवा व झवा पहा.

**झिवा**—पु. झिम्मा पहा.

**झिवी**—स्त्री. (कुण.) मुलींच्या वेणींतील रेशमी गोंडा.

**झिम**—क्रिवि. एकमारखा व जोरानें; मुसळधार (पाऊस पडणें) [ध्व. झिम]. **०झिम**—स्त्री. बारीक पण टिकाऊ पाऊस; भुरभुर **०झिम-झिमां**—क्रिवि. बारीक पण एकसारखा (पाऊस पडणें). झिमझिम पावसाच्या शब्दाचें अनुकरण. [ध्व. झिम् द्वि.]

**झिमटा**—वि. (वे.) कंजूष; कृपण; हिमटा. [ ध्व. झिम ]

**झिम(म्म)ड-डा, झिमर**—स्त्री. झिंबड ३ पहा. 'दररोज रात्रीं, दिवसा स्वामींच्या भोंवती ज्ञानेच्छु मंडळीची सारखी झिम्मड.' –नि ३४१. [ झुंबड ]

**झिमऱ्या गाळणें**—सकि. (व.) दुःख, शोक करीत बसणें.

**झिमुट**—वि. बारीक. झिमटा पहा. –विवि ८.३.४१.

**झिमोटा**—पु.(रागानें, तिरस्कारानें)कपाळास आंठ्या घालणें, नाक, तोंड मुरडणें, फेंदारणें; भ्रुकुटीभंग. ( क्रि० मारणें, घालणें )

**झिम्मा**—पु. मुलींचा एक खेळ. यांत मुली एकमेकीकडे तोंडें करून उभ्या राहून परस्परांच्या हातांच्या पंजावर पंजे मारून थोडेसें मार्गे जाऊन पुन्हां पुढें येऊन, परस्परांच्या हाताच्या पंजावर पंजे मारतात. [ ध्व. झिम ] **(एखाद्या घरीं भुतांनीं) झिम्मा खेळणें**–भुतें नाचणें, भुतांनीं घरांत खेळ करणें, धिंगाणा मांडणें.

**झियाफत**—स्त्री. मेजवानी. जाफत, जियाफत, ज्याफत इ० पहा. [ अर. झियाफत् ]

**झिरकणी**—स्त्री. ( विकट दुखण्यामुळें, जिवलग माणसाच्या विरहामुळें लागलेली ) झुरणी; झिजणी. झिरपणी पहा. [ झिरकणें ]

**झिरकणें**—अकि. रोडावणें; खंगणें; झिजणें; झुरणें; क्षय होणें. [ झिरपणें, सं. झृ-झर्=झरणें ]

**झिरकुंबणें**—अकि. ( गो. ) ढेल्ला जाणें.

शको. ३. ५६

**झिरकोगल्ल**—न. ( गो. ) बराच वांक आलेलें काकडी, दोडका यासारखें फळ.

**झिरंग**—पु. कढीनिंबाचें झाड. –स्त्री. ( वे. ) एक प्रकारचें गवत.

**झिरझिर-झिरी**—क्रिवि. झुरझुर; थेंबथेंब ( पाऊस पडणें ) [ झिरणें ]

**झिरझिरा झिरझिरीत**—वि. १ जीर्ण झालेलें; विरविरीत झालेलें; फाटलेलें ( वस्त्र ). २ पातळ; विरळ विणीचें. (कापड इ०). [ सं. झृ ( जुने होणें )-झीर्यति; हिं. झिरझिरा ]

**झिरणें, झिरणीस लागणें-पडणें-येणें**—अकि. झिजणें; झुरणें; कृश होत जाणें; झुरणीस लागणें. [ सं. झृ ]

**झिरपणें**—अकि. १ पाझरणें; गळणें; झरणें; स्रवणें (भांड्यांतून, खडकांतून, झऱ्यांतून पाणी इ०). २ झुरणें; झिजणें; खंगणें; थकणें. [ सं. झृ-झरण किंवा क्षरण; प्रा. झरण ] **झिरपण-पणी**—स्त्री. १ पाझर; गळती; झरण्याची क्रिया. २ झुरणी; झिजणी. (क्रि० घेणें). **-णीस लागणें-पडणें-येणें**–अकि. झुरणीस लागणें; खंगणें; झिजणीस पडणें; कृश होत जाणें.

**झिरपा**—पु. १ स्राव; पाझर; गळती ( एखाद्या फुटक्या भांड्याला असलेली, भांड्यांतून होणारी ). २ ओहळ; ओघळ; झरा. 'ठिकठिकाणीं सतत वहाणारे झरे व झिरपे असून...'–खेया ८. [ झिरपणें ]

**झिरबुटी**—पु. हळवार जमीनींतील भात. –बदलापूर २८३.

**झिरम(मि)ळी**—स्त्री. झिळमिळी पहा.

**झिरमिर, झिरिमिरि**—क्रिवि. थोडाथोडा; झुरझुर (पाऊस पडणें). 'मग झिरमिर वर्षावो निर्मिला।' –दावि ६६. [ध्व.; झिर द्वि.]

**झिरमिरी**—स्त्री. मूर्च्छा; घेरी; झीट. –शर. [ध्व. झिर् द्वि.]

**झिरमुळा**—पु. ( गो. ) एक प्रकारचा कंद.

**झिरमोळी**—स्त्री. (फुलमाळ्याचा धंदा) हाराच्या मध्यावर सोडलेले पदर. झिळमिळी पहा.

**झिरवणी**—न. झऱ्याचें पाणी; झरा. [ झिरा+पाणी ]

**झिरा**—पु. १ झरा; ओहळ. २ (ल.) उगम; उत्पत्तिस्थान;. 'त्याची नोकरी म्हणजे पैशाचा झिरा.' [ सं. झृ-झर् किंवा क्षर्; प्रा. झर ]

**झिरमिरू**—वि. झुरमुरू. १ सरासरी जीव मात्र धरून राहिलेला; अत्यंत अशक्त ( मनुष्य ); कसा तरी धुगधुगी धरून असलेला ( आजारी मनुष्य ). २ खंगलेल्या, खालावलेल्या स्थितींत असलेलें ( झाड; पीक इ० ). –क्रिवि. बारीकबारीक; तुरळक तुरळक; थोडथोडा; किंचित ( पाऊस, ऊन पडणें ). [झिरणें+मरणें] **०करणें**–१ मरमरू करणें; जिवंतपणाची किंचित धुगधुगी असणें;

(मरणसमयीं) जीवज्योति किलकिलणें. २ आजारी असणें; अतिशय दुबळें, अशक्त होणें.

झिरें—न. १ (कों.) (कुंपणाकरितां) झाडाची तोडलेली फांदी. फाटनी; झांकर. २ (दादर) बांबूचा बारीक दांडा.

झिर्पिटावणें—सक्रि. (गो.) झिडकारणें.

झिल—स्त्री. (व.) बैलाच्या गळयांतील लहान घुंगरांची माळ. झील पहा.

झिल, झिलगा—पु (कों. राजा. गो. वे.) मुलगा; झील पहा. 'परवाचे दिवशीं झिलगे भोंवडीवर गेले व आज परत आले.' –राग्रादी ११८. [सं. झला=मुलगी; हिन्दु. गहद=मुलगी]

झिलई, झिल(ल्ह)ई, झिला(ल्हा)ई, झिल्ही, झील—स्त्री. तारांगी; चकाकी. जिल्हई पहा. झिलीची–झिल्हईची–झिलेची माती, झिल्हई, झिल्ली—स्त्री. भांडीं, हत्यारें साफ करण्याकरितां वापरतात ती पिंवळसर तांबडी माती.

झिलपी—स्त्री. (व. ना.) झलपी, धलपी

झिलमट—न. जळमट पहा. कोळिष्टक. 'कानावोंपर्यंत कोठें जाळीं झिलमटें आहेत कां काय पाहून ...' –सुदे ११.

झिला–ल्या—पु. एक प्रकारचा नाग. 'मयोर मंडूक झिल्यादि नाग।' –दावि २५२.

झिलाण—न. १ पाणथळ जागा; दलदल, ओलवट जमीन. २ (जमीन इ० वांचा पाण्याच्या झऱ्याचा निदर्शक असा) ओलावा, ओलासरा; आर्द्रता; ओल. ३ जमिनीच्या पोटांतील झरा. झील पहा [सं. क्षीर=पाणी. हिं. झील=सरोवर]

झिलीं—क्रिवि. हळू –शर. (केशव. पद ५३८)

झिलकाद—पु अरबी अकरावा महिना. जिल्काद पहा. [अर. झील्+अदा]

झिल्लट—वि १ विरविरीत, झिरझिरीत (कापड). २ पातळ, अतिशय बारीक (कागद, मनुष्य इ०) ३ (ल.) क्षुद्र, विरळोळ, घाणेरडा (मनुष्य, जिन्नस) [हिं झिरी]

झिल्ली—स्त्री रातकिडा, राळ, मुखुट 'ज्या वनीं वरिति झिंकृत झिल्ली।' –आश ५ [सं]

झिल्ली—स्त्री (मांसाहारात) (जनावराच्या) मेंदूवरचा पापुद्रा. 'प्रथम झिलीसह तीन मेंदू वाफल्यावर त्यावरची झिल्ली काढून टाकावी' –गृशि २ ८५ [हिं; सं छाल]

झिल्लीम—स्त्रीन १ शिरस्त्राण २ (विशेषतः) मुखवटा (शिरस्त्राणाचा). [हिं झिल्म=चिलखत]

झिळमिटा–मिट्यार—पु (गो.) झुंजुमुंजु, झांजड, झांजर मांजर. झिळमिळणें पहा.

झिळमिळ–मिळां—क्रिवि झळंबत, झोलावत, हेलकावे खात, लोंबकळत (क्रि० लोंबणें, लटकणें, हालणें)

झिळमिळणें—अक्रि. (महानु.) लिकलिकणें, मिणमिणणें, मंदमंद प्रकाशणें. 'जीवज्योति झिळमिळीं हृदयात.' –भाए ७४. [सं. ज्वल्; झला=ज्योत. हिं. झिलमिला=हलणारी ज्योत]

झिळमिळी—स्त्री. १ नथ, हार इ० दागिन्यांस शोभेसाठीं लावलेलें लोंबणारें मोतीं, लोलक इ०. 'पायीं पैंजण सांखळ्या। नक्षिदार घरणांगुळ्या। लावून वरें झिळमिळ्या।' –होला ८०. २ काचेच्या झुंबराला लावलेला लोलक. ३ (पगडी इ० वाम) शोभेसाठीं लावलेला कलाबतूचा झुमका, पदरांचे दोरे, दशा, आंचळ्या. 'वरतीं टांगण्याकरितां कमानीचा घाट काढून खालीं झिळमिळ्या काढाव्या.' –रंगवल्लिका १.१६. ४ शोभेसाठीं लावलेल्या (कागद, झालर इ०कांच्या) चिरफळ्या. ५ जुनाट छपराला लोंबणारें कोळिष्टक, जळमट. ६ (ल.) लिकलिकी; मंदमंद प्रकाश; मिणमिण. 'निवरी काष्ठ सारखी। झिळमिळी करी।' –शिशु २.२२.४२. [सं. झला=ज्योत. देश. झिरी=लहरी, तरंग, हिं. झिलमिला=हलणारी ज्योत, एक प्रकारचा बारीक मऊ कपडा]

झिळें—न. (कों.) मासे धरण्याचें जाळें.

झीक–ग—पु. जरतार; कलाबतू.

झीग—स्त्री. मुळक्याचा टका.

झीज—स्त्री. १ (दागिने, भांडीं इ० कांची) वापरण्यानें, घर्षणानें होणारी घस; कांहीं अंश कमी होणें; वजनांत उणेपणा. २ (ल) शारीरिक कष्ट. ३ (व्यापार, व्यवहार इ० कांतील) घस; नुकसान, बूड. (क्रि० खाणें, बसणें; येणें) 'त्याच्या करितां मी बरीच तनमनधनानें झीज सोसली.' –टिसु ३. ४ (सामा.) क्षय; नाश. [झिजणें]

झा(झो)ट—स्त्री. १ (म्हातारपण इ० मुळें चालतांना जाणारी) झोकांडी, झोक; झोल. २ घेरी, मूर्च्छा, अंधेरी, भोंवळ. (क्रि० येणें). –न. १ काटक्या, टहाळ्या, फाद्या, उपटलेलीं वाळकीं रोपें यांचा भारा. हीं जमीन भाजण्यास उपयोगी असतात २ (नाविक. हेट.) दोरीला अडकवून ठेवण्याचें लांकूड. ३ (अशिष्ट) झेंगट; लचांड, अडथळा, पेंच, संकट; भाग, दशा. पुढील शब्द पहा.

झी(झीं)ट, झीद, झीण—स्त्री. (कों) १ जीर्ण व खरटलेलें, वठलेलें झाड, वनस्पति. २ अमल्या झाडाचें खोड, बुंधा, सोट. ३ असल्या वृक्षाची एखादुसरी उरलेली फांदी. ४ (ल) जर्जर झालेला, खंगलेला खप्पड, म्हातारा मनुष्य. ५ (ल.)(साथ इ० कात कुटुंबांतील बाकीचीं माणसें मेल्यामुळें) शिल्लक राहिलेला एकटाच पुरुष, वंशांकुर ६ (ल) अतिशय खंगलेला, गरीब, मर तुकडा माणूस, दुष्काळी माणूस. 'हें मूल वाढून झीट झालें' [झड, सं क्षीण, प्रा झीण]

झीटपीट—स्त्री (प्र) झटापट; चकमक 'येसियास त्याची याची झीटपीट झाली.' –पेद३.१२६.

**झीण**—स्त्री (चंदनाचें खोड, गधाचा रवा, हळकुंड इ० कांचे उगाळून उगाळून शिल्लक राहिलेलें) बोटूक, खोड, (एखाद्या पदार्थाचा) घासून घासून अवशिष्ट राहिलेला भाग [स क्षीण, प्रा झीण, हिं झीन, गु झिणु]

**झींग्या**—स्त्री झिंवी पहा 'त्याखालीं फुल तेंचि ताइत पहा झींग्यावरी आवळे।' –अक्क २ अनंत, सीतास्वयंवर ४५

**झील**—पु १ मुलगा, झिलगा (कों गो) चीलो 'तूं नदाचो झीलो, माका फडको दी।' –भज ८ –भवि ३५५५ २ एका झाडापासून केलेलें, उत्पन्न झालेलें दुसरें झाड 'हा आंबा त्या आंब्याचा झील आहे' ३ (ल) जवळजवळ नष्ट झालेल्या वंशातील जिवंत मनुष्य, वंशाचा अंकुर [स झल=मुलगी]

**झील**—स्त्री रत्न इ०वरील तेज [अर जिला, म जिल्हई] (वाप्र) (एखाद्याचा) **झील उडणें–उतरणें–बिघडणें**–(एखाद्याचें) वैभव खालावत जाणें, नष्ट होणें, कीर्तीचा, मानमरातबाचा नाश होणें **झील चढणें**–(कीर्तीची वृद्धि) (एखाद्याच्या) वैभवाची, मोठेपणाची भरभराट होणें **झील चढविणें**–१ अगदीं तक्तवीत, साफ हजामत करणें, तासणें २ (एखाद्यास) नावारूपास आणणें, प्रतिष्ठा मिळवून देणें, मोठेपणाला चढविणें.

**झील**—स्त्री (संगीत) १ गाण्यातील सफाई, टाकटिकी २ गाणाऱ्या कंठाचा कंप, गिटकडी ३ (वाद्य) सवळाच्या दोन टिमक्यांपैकीं लहान आकाराची खणखणीत आवाजाची टिमकी (मोठ्या व दब आवाजाच्या टिमकीस बंब म्हणतात) ४ (क) चौघडा 'झील सुरू करा' ५ एक प्रकारचें चर्मवाद्य हें कडया एवढ्या टिमकीच्या आकाराचें असून याला प्राय कडयाच्या मधून सभोंवार खाचा पाडून लोखंडी अगर पितळी गोल पत्र्या किंवा झांजा बसविलेल्या असतात ६ (तमाशात) गाण्यातील पालुपद, (तमाशातील) पुढील गाणारानीं म्हटलेल्या भागाचें मागील साथीदारानीं पालुपद म्हणून सुराचा आरोह शेवटास नेण्याची जी साथ करावयाची असते ती ७ (व) वैराच्या गळ्यातील घुंगरमाळ [स क्ष्वेडी, हिं झील फा झील] (वाप्र) **०ओढणें–धरणें–देणें**–१ (दुमग) गातानां त्याच्या सुराची साथ करणें २ (ल) (एखाद्याचा) अनुवाद करणें, री ओढणें, धरणें **झीलकरी, झील देणारा**–पु (तमाशातील) मुख्य गाणाऱ्याची झील ओढणार, भरणार, सुरकरी [झील+करणें]

**झील**—न (प्रां) एका नौकास बांधी लावलेली, झाडावरून ओंड इ० वाडग्याची बांबूची आकडी, शेला [शेलणें]

**झील**—पु १ पाणथळ, दलदलीची जागा, जमिनीचा ओलावा दमनरणा आर्द्रता, ओझरा 'एकेकडून पानें व दारणींची वृंदें व पाणियाची झील भमे भडकणीत उतरलों' –माब ५६ २ झरा, ओहोळ [स क्षीर हिं झील=सरोवर] **झीलाण**–न झिलाण पहा [झील]

**झील**—स्त्री (गो) १ दाट झाडी २ (गो) (विटीदांडूच्या खेळातील) एक सत्तक, झक्

**झील**—वि हलकें 'का मेघाचें आग झील। दिसे वारेंनि जैसें जाईल।' –ज्ञा १३.२१३ –क्रिवि हळू, मंदपणें [प्रा दे झिंगी= लहरी, तरंग?]

**झीलगो**—पु (कु) १ मुलगा २ गडी झिलगा पहा

**झीलफ**—पु (संगीत) एक राग ह्या रागांत षड्ज, कोमल ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात अवरोहांत ऋषभ वर्ज्य असतो जाति संपूर्ण-षाडव, वादी धैवत, संवादी गांधार, गानसमय दिवसाचा पहिला प्रहर

**झुई**—स्त्री नदींतील बेट, जुवा, जुवें, जू

**झुकणें**—अक्रि १ लवणें, वाकणें, एका बाजूस तोलणें, कलणें, वळणें २ डुलत डुलत, झोंके खात चालणें ३ रमत गमत, रेंगाळत चालणें, डौलानें, मिरवणुकींतल्या प्रमाणें चालणें 'घाटगे मोहिते माने पाटणकर झुकती।' –ऐपो १०७ ४ रूढि चुकणें निसटणें, पळून जाणें, हातावर तुरी देणें, पोबारा करणें ५ (आजारानें) कृश, रोड होणें 'तो पधरा दिवसांच्या तापानें बराच झुकला' [सं युज्–युक्, हिं जुक, झुकना, सिं. झुकणु] **झुकत झुकत**–क्रिवि डुलत डुलत, झोंके खात

**झुकवणी**—स्त्री १ वाकविण्याची, ओणविण्याची, कलविण्याची क्रिया २ झुकांडी, झुगार, हुलकावणी, टाळाटाळ, झुकवाझुकव [झुकविणें]

**झुकविणें**—सक्रि १ वांकविणें, नमविणें. २ फसविणें, चकविणें, झुकांडी, झुगारा देणें, हुलकावणें, निसटून जाणें. [झुकणें प्रयोजक]

**झुकाटणें, झुकांडणें**—अक्रि (एखाद्याच्या) हातावर तुरी देणें, पोबारा करणें निसटणें [झुकणें] **झुकाटा–टी झुकांडी, झुकाटणी**–पुस्त्री झुगारा, झुकवाझुकव, चकविणें, फसवून निसटून जाणें (क्रि० देणें) [झुकाटणें]

**झुकांडा–डी**—पुस्त्री १ झोल, तोल २ डुलणें, झोंक-झोकांडी, भेलकांडी, मिरवडी ३ झुगारा, पळ, निसटणें [झुकणें]

**झुकापुरी**—स्त्री (विनोदी शब्दप्रयोग) हुलकावणी देऊन निसटून जाण्याचा व्यापार, झुकांडी (क्रि० देणें) [झुकणें+पुर= शहर]

**झुंकार**—पु झणत्कार झंकार 'तेथें वाजी दणदणाटें। झुंकाराच्या।' –दा १०.११ –दया ३.११६८१ [ध्व, सं

प्रकार ] झुंकारणें–अक्रि झुंकार शब्द करणें, गुंजारव करणें 'भ्रमर झुंकरती झुंकारें।'–मुआदि २८९,

झुंग–स्त्री (प्रां.) ताडा, समुदाय, टोळी, झुंड. [ झुंड ]

झुगझुग–झुगा–क्रिवि अतिशय मंदपणें, मिणमिण, धुग धुगानें, अधुकपणें (दिवा, जीव–प्रकाशणें,असणें) म्ह० झुगझुग जिणें टुकटुक खाणें =गरीबीनें किंवा आजारीपणांत दिवस काढणाऱ्यास म्हणतात [ ध्व , झुग द्वि ] झुगझुगणें–अक्रि १ (दिवा प्राण) लिकलिकणें, मिणमिणणें धुगधुगी असणें २ फडफडणें, लुकलुकणें [ झुगझुग ] झुगझुगी–स्त्री (दिवा, जीव इ० याची) धुगधुगी, लिकलिक, मिणमिण, अति मंद प्रकाश [ झुगझुग ]

झुगटणें—सक्रि फेंकणें, दूर लोटणें; झुगारणें 'पुष्कर्मांगि सर्लमें झुगटिलें।'–दा ५ ९ ४८

झुगर—न झुबर

झुग(गा)र—न १ जाडेंभरडें व झिरझिरीत कापड २ समारंभांत पाटील, देशमुख इ०कास देण्याचा मानापानाचा पोषाख ३ टाकाऊ, क्षुद्र किंमतीचें कापड,वस्तु,मनुष्य इ० –वि जुनें व जीर्ण (वस्त्र इ०)

झुगारणें—सक्रि फेकणें, फेकून देणें; उडविणें, दूर लोटणें; भिरकावणें, झोंकणें, (ला ) झुगाडणें ' ताठी सनाळ कमलास तटीं झुगारी ।'–र ५६ झुगारपट्टी–स्त्री छक्केपंजे, आज–उद्यां अशीं सांगून कांहीं तरी पोकळ मतलबावर लावणीवर टाकणें, झुलकावणी, झुलवणी (क्रि० देणें) [ झुगारणें+पट्टी ] झुगारा–पु नजर चुकवून काढलेला पळ, झुकांडी चकविणें झुकांटा गुंगारा, टाळाटाळी, दगा झुगारपट्टी (क्रि० देणें) [ झुगारणें ]

झुगारणें—न दुबळें व वृद्ध मनुष्य, जनावर 'कागारत दुडदुडत गाडी असावा, हें झुगारणें काय नांगर हांकितें '

झुज–झू—नस्त्री १ लढाई युद्ध रण ' बहुतवरूनि कौरव। हे आतुर दुरवभाव। वांटिवावीण हाव। बांधिती झुंजीं।'–ज्ञा १ १७२ २ भांडण, कलह, झोंबाझोंबी [ स युद्ध प्रा जुज्झ, स युध् प्रा जुज हिं जूझ आर्मेनियन जिप्सी जुन ] (वाप्र ) झुंजणें झुज(झ)णें–१ लढणें, युद्ध करणें २ हुजत घालणें, भांडणें झुजविणें–१ झुंजण्यास लावणें लढविणें २ भांडणास प्रवृत्त करणें [ झुजणें ] ( पण्या–दाणे टाकून नावडे) झुंज लावणें १ आपल्या गमतीखातर रार्ड सोसूनहि लोकांना भांडाव यास प्रवृत्त करणें २ पक्षीस ठेवून त्यासाठीं एखाद्या मंडळांत, जूट असणाऱ्या लोकांत भांडण लावणें आपल्या स्वार्थीक दणगीनें एखाद्या गांवांत फूट पाडणें कलागत लावणें झुझांत राहणें–लढाईत ठार होणें झुझा(जा)स उभें राहणें–लढाई देणें लढाईस सिद्ध असणें 'मेजवानी म्हणून दहा लक्ष रुपये घेत असल्यास उत्तम, नाहींतर झुंजास उभें राहावें '–भाव ३१ सामाशब्द–

झुंजणार–रा–वि झुंजार, लढवय्या 'रागाराम पानशी परशु राम भाऊ भले झुजणार।'–ऐपो २५५ झुंजागाळ–स्त्री, (गो ) रणभूमि [ झुज+(गो ) गाळ=मैदान ] झुंजा(झा) र–रू–स्त्री १ लढाई, युद्ध, घनचक्कर (क्रि० लागणें, असणें, होणें ) २ –वि लढवय्या, युद्धनिपुण, रणशूर 'धाव घेतला झुंजारीं। केशिक सैन्य पळे दूरी।'–एरुस्व १० ३६ [ झुज ] झुंजा(झा)रराव–पु योद्ध्यास द्यावयाची एक पदवी, वीरपुरुष, शूरबहाद्दर, रणगाजी 'पुण्यातल्या तरुणांनीं मोठमोठ्या झुंजार रावांना चकविलें '–इंप्र १०० [ झुंजार+राव ] झुंजारी–वि (गो ) अगाशीं अंग लावून लढणारा, झुंजार (–वि ) पहा [ झुज ]

झुजता—वि जुजता पहा

झुजरूक मुंजरूक, झुंजुमुंजु, झुंजुकमुंजुक—न पहा टेचा संधिप्रकाश, अरुणोदयाच्या वेळेचा प्रकाश, झांजड पहा

झुजा(झा)र–झुंजा(झा)ट—स्त्री जोराचा वारा, वादळ, वावटळ, सुसाट्याचा वारा (क्रि० येणें ) –वि सोसाट्याचा,जोराचा, घोंघावणाचा, सनाटयाचा (वारा इ० ) 'तो सुटला झुंझाट वारा।' –वेसीस्व २ ४२ –क्रिवि १ सोसाट्यानें वाहात, घोंघाट्यानें वाहात (वारा इ० ) (क्रि० सुटणें ) २ जोरानें; चपळतेनें, चपळा ईनें (घोडा इ० धावणें ) [ ध्व स झंझा=वादळ, वाऱ्याचा आवाज झुंजणें ]

झु(झु)जा(झा)टा—पु (काव्य ) सोसाट्याचा वारा, वावटळ, (ग्र ) धुधाटा 'वात सुटला झुजाटें थोर।'–जै ३४. १८ [ ध्व झुंझाट ]

झुंजात—न तुफान, वादळ; झंझावात झुंजार पहा [ स झंझावात ]

झुंजुरकां–कीं–कें—क्रिवि पहाटेस, उजाडत उजाडत, अरुणोदयाच्या वेळीं

झुंझुरझुंझुर—क्रिवि थोडथोडें, अस्पष्टपणें, अंधुकपणें 'आतां पायाखालीं झुंझुरझुंझुर दिसूं लागतें '–निच

झुंझुरमाल–ळा—स्त्री बायकाचा एक दागिना –स्वप१३

झुट—न झुडप 'कनकनाम हा पलाश, तैसा क्षुद्र झुट धत्तूर।'–निक १८८ [ स ]

झुटकणें—अक्रि पटकन जाणें झुकांडी, गुंगारा देणें पळ काढणें, झटकणें पहा

झुटका—पु १ (विडी गुडगुडी इ० याचा) झुरका २ (उसाचा रस, दूध पाणी इ० पेयाचा) घोट, घुटका (क्रि० घेणें ) ३ छोटा विडी, चिलट ४ (गोष्ट, गाणें लेखन इ०कांचा) चुटका मजेदार उतारा ५ व्यंगोक्ति उखाणा, आह्वाणा कोडें, कूट प्रश्न ६ चुटका झुटका डुलकी 'निद्रेचा, झोंपेचा झुटका ' [ ध्व ]

झुटा, झुटेसानक—स्त्री १ उष्टें झाल्यामुळें दुसऱ्याच्या उपयोगी न पडणारें ताट, अन्न इ० २ (ल) कायमची, परत न घेता येण्यासारखी जहागीर, इनाम जमीन, सानक, खुर्दसानक पहा ३ इनामपत्र [स उच्छिष्ट हिं झूटा उष्टें+सानक=ताट]

झुटामुटा—क्रिवि १ 'दुधाचा, पिकाचा झुटामुटा' थोडथोडें, थेंबथेंब (दूध गळणें, पिकून काटणें) 'झुटामुटा धार पडती, वासरूं पितें, गाय दुभती, बाई दोहती' २ तुरळक तुरळक (पीक इ० येणें) 'झुटामुटा पीक आलेलें दिसतें' —पु (क) तुटवडा, दुष्काळ, कमतरता, तोटा [हिं]

झुट्यार—वि (कु) खट्याळ, स्वैर, हूड, द्वाड वानट 'ही मुलगी पहिल्या नवरची झुट्यार आहे' [मिं झुटो=कसबीण]

झुंड—स्त्री (मनुष्य, प्राणी इ० काची) टोळी, जमाव, गर्दी, समुदाय, (पशु इ०काचा) कळप, सिक्षार 'दैवें एकहि न मिळे जेथ मृगाच्या सदैव बहु झुंडी।' —मोकर्ण ४१ ५२ [स यूथ, हिं. गु झुंड]

झुंड—वि (प्र) झोंड, झोंट पहा [झोंड] झुंडाई—स्त्री झुंडपणा, दाडगाई झोंटाई पहा [झुंड]

झुडणें—क्षडणें पहा

झुडत(ता)र—न (निंदार्थी) १ खुरटें, पर्णहीन व कोमेज लेलें झुडुप २ खुजा व दुबळा माणूस, म्हातारपणानें जर्जर झालेला जख्खड मनुष्य, जनावर [झुडणें]

झुडतुडला—वि क्षीण, कृश झालेला, झुरतुडला पहा [झुरतुडणें]

झुड(डु)प—न १ लहान, खुजट व पसरणारें झाड २ (कों) दाट झाडी, झाडाची जाळी, झाडी; वृक्षवाटिका, झुडपी पहा

झुडपी—स्त्री (को) झुडुपांची दाटी, झाडी, लपून रहाव याजोगें अनेक फांद्यांनीं, वेलींनीं गच्च भरलेलें झाड, जाळी, झाड झुड [झुडुप]

झुडी—स्त्री (तामा) झुड झुड पहा

झुणका—न वडन, पिठलें, अळण

झुणझुण-झुणां—क्रिवि १ पायांतील पैंजण, नुपुर इ०काचा झुनझुन असा आवाज होऊन (क्रि० वाजणें) 'झुणझुण शब्द करिति धावत्या तान्हुल्याची गाता।' —रूम ८ १०९ २ सुं सुं करीत सोंसावत घोंगावत (वारा वाहणें) [ध्व झुण द्वि] झुणझुणणें—अक्रि १ (वारा इ० कानें) सुं सुं घां घां करणें, घोंगावणें, घोंघावणें २ (वीणा, बीन इ०तंतुवाद्यानें) तनन तनन्, झुन झुन करणें ३ (पायांतील पैंजण, वाळे इ० कानीं) झन झन, झुमझुम असा आवाज करणें क्रमशुणणें झुमझुमणें ४ घुणघुणणें, मणमणणें भणभणणें झुणझुणा-झुणी—स्त्री लहान मुलांचा एक प्रकारचा खुळखुळा [झुणझुणणें]

झुणा-ना—पु १ (मुलीचा) लहान लहंगा, परकर, लहान लुगडें (व) झुना=रंगीत पातळ 'जरतारि झुणा करनाटकिचा।' —अकक २ स्फिर, द्रौपदीवस्त्रहरण ७७ [हिं झूना]

झुणा, झुण्णा, झुना—पु लहान मुलींचा एक खेळ 'झुना बाई झुना। झुना घालूं रानीं।' —ममाप २ ३ २३२ [ध्व]

झुणूक—स्त्री किंचित् भास, चुणूक पहा

झुतरी, झुत्री—स्त्री १ लहान ओढा, नाला २ लहान ओढ्याचा पाट ३ पाटाचें कोरडें पात्र, तास [झुरती ?]

झुप(व)का, झुमका—पु १ गुच्छ, घोंस, पुंज, गेंद (फुलाचा, केसाचा इ०) २ कर्णफुलाला लावलेला लोंबणारा मोत्याचा घोंस, लोलक [हिं झुमका, तुल० अर झुमरा=गर्दी]

झुपकी—स्त्री (वेली इ० काची) जाळी, तुरा, पुंज, झुपका 'मुलीचे हातीं एक शतावरी नामक वेलीची झुपकी लागली होती' —धर्माजी ७५ [झुपका]

झुंपडी—स्त्री (गु) झोंपडी —मौज ता ७ ६ ३० [द प्रा झुपडा, क झोंपडी]

झुवकळी—स्त्री झुवक बाळी, झुवका, झुपका पहा

झुवका—पु झुपका पहा [हिं झुमका] —केदार—वि घुप कयांनीं युक्त, गोंडेदार, गेंदवाज [झुवका+दार] —के(क)बाळी, झुबेबाळी, झुवा ची, बें)—झुमुकबाळी—स्त्रीपुन मोत्याचा (पोंवळ्याचा) घोस खालीं लोंबत असलेली बाळी 'बुगड्या झुबकबाळ्याच्या जोडें।' —देवीदासकृत—भामावर्णन ४ —राजवाडे

झुवकी—स्त्री झुपकी, पुंज, पुंजका, राशी. 'पवित्रा ते केली परम असतां पापझुबकी।' —निमा २ ८७ [झुपका]

झु(झुं)वड—स्त्री १ दाटी, गर्दी, झिंबड, खेचाखेच, भोंवतीं गोळा होणें 'तसेंच त्याच्याही पलीकडे नैर्ऋत्येकडे उडालेली अशीच झुंबडही सहज दिसेल' —पालें ४५ (क्रि० वाटणें, पडणें) २ मिंबड पहा [तुल० अर झुमरा=गर्दी दाटी]

झुंबडा-डें—पुन (माण) (धान्याच्या कणसाची) जुडी, मोळकें, जुडगें जुवाड अर्थ २ पहा

झुंब(म)णें—अक्रि (गा) झोंबणें चावणें दंश करणें 'गयू घायाशी काल रातीं इच्चू (विंचू) झुंबला' [झोंबणें]

झुंबर—न १ अनेक दिवे लावता यावेत अशा रचनेचें बिलोरी कांचेचें लोंबणारें झाड दिव्यांचें झाड २ (सर्डोकाम) कमानीच्या नक्षीमध्यें झुंबराकारसी काढतात ती आकृति

झुंबर, झुंबड—न मोंगी झुंबर करिता तिथें कोण युगाचा याली।' —राग ४० —वि तुबळ, हातघाईचें, निकराचें (युद्ध) 'आठ दिवस दानपाठ लागली टक्कर झुंबर लढाई दोन्ही दळांत।' —ऐपो ३१५ [अर झुमरा=दाटी]

झुंवा—पु पायपोळ आवाग्या, झगा, झुबा पहा.

झुमकणें—अक्रि ठमकणें, ठुमकत, नखऱ्यानें, अकडीनें चालणें नखरनखरे, नाटकी पद्धतीनें चालणें [सं झुम]

झुमरदोडकें—न (गा) दोडक्याची एक लहान जात, याला घड येतात -मात्रि ७ १-४

झुमका—पु झुमरा, घुमका पहा [हिं झुमका; गु झुमरो=झुपका मि झुमक अर झुमरा]

झुमझुम-झुमां—क्रिवि पायांतील पाजण्यांचा, पैंजणाचा झुमझुम आवाज होऊन (क्रि० वाजणें, करणें) [ध्व झुम द्वि]

झुमड—स्त्री (गा) झुंड, झुबड पहा -मात्रि ७ १-४

झुर-कन-दन-दर—क्रिवि त्वरित, सपाट्यानें, झरकन पळत क्षणात 'आनंदवनीं भ्रतार होता। झुरकर उडाला गेला कैउता।'-चांगदेवगाथा ३१ [ध्व]

झुरकणी—स्त्री तांदुळांतील फार बारीक कणी [झुरा+कणी]

झुरकणें—सक्रि तपकीर चिलीम याचा झुरका, धारा इ० खूप जोरानें आत ओढणें दम मारणें [झुरका]

झुरकणें—अक्रि निसटणें, पळणें झुकांडी देणें

झुरका—पु १ जोरानें (तपकीर, वारा, विडी, गुडगुडीचा धूर इ०) आत ओढण्याची क्रिया, जोरानें मारलेला दम २ पातळ पदार्थाचा जोराचा घुटका घोट (क्रि० घेणें ओढणें) [ध्व झुर]

झुरझुर-झुरां, झुरझुरून—क्रिवि झुळझुळ-ळां, खळखळ-ळां गु(गु)ड-गु(गु)डां इ० (ओढ्याचें पाणी वाहतांना वाऱ्याची झुळूक आली असतां, तंबाकूची चिलीम, गुडगुडी ओढतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें) झरझरा पहा [ध्व] ०पळणें—जवळजवळ पण जलद पावलें टाकून पळणें (विंचू, लहान मूल इ०नीं), तुरतुर पळणें

झुरझुरणें—अक्रि १ झरणें, झिरपणें, ठिपकणें २ झुरणें, क्षीण होणें, झिजणें, क्षय पावणें (शरीर इ०) 'तुजसाठीं जैसी मैना झुरझुरी'-होला ११४ ३ हद्‌हद्‌ नाहींसें होणें, खुराडा, खुराडा होणें [झुरझुर, झुरणें]

झुरझुरपंजर—वि अत्यंत क्षीण झालेला, अस्थिपंजर उर लेला, हाडांचा सापळा असा दिसणारा (माणूस) [झुरणें+पंजर]

झुरझुरीत—वि १ विरविरीत पातळ विरळ विणीचें (कापड) २ उपयोग केल्यानें विरविरीत झालेलें फाटलेलें (वस्त्र) [सं जॄ=जीर्ण होणें]

झुरट—वि क्षीण अशक्त थकलेला [झुरणें]

झुरडी—स्त्री १ झुरकुती २ क्षीणता -शर

झुरण—न तांदूळ कांडल्यानंतर झालेली कणी तांदुळाचा झुरा झुरकणी पहा

झुरणी—स्त्री १ (प्रिय माणसाच्या वियोगानें प्राप्त होणारी शरीराची किंवा मनाची) क्षीणता क्षय झिजणी 'तो झुरणीस पडला किंवा त्याला झुरणी लागली' २ स्रवण, निदिध्यास ३ गळती, झरणी, झिरपणी [झुरणें]

झुरणें—अक्रि १ झिरपणें, स्राव होणें, झुरझुरणें पहा गळून जाणें २ झिजून, शुष्क हद्‌ हद्‌ नाहींसें होणें, झिजणें (पावसानें भिंत इ०) ३ दु खानें क्षीण होणें, रात घेणें, झुरणीस लागणें 'पग पाहून मोर झुरे' ४ (ल) डोळा चुकवून पळून जाणें, निसटणें 'साधुमता पाहुनि झुरा।'-सिम ३ १७५ [सं जॄ प्रा झूर]

झुरतडी—स्त्री (व,) झुरकुती, वळी

झुरती—स्त्री पलायन, पळ (क्रि० करणें) 'तुम्ही देखत चिरी झुरती करणें'-भाय ७८ [झुरणें]

झुरतुडला—वि १ कृश, झिजलेला, फार कमी झालेला २ थकलेला, क्षीण झालेला ३ (ल) गरीब, अशक्त, निरुपयोगी (वस्तु) [झुरणें]

झुरपणी-पणें—झिरपणी-पणें पहा

झुरमुरणें—अक्रि १ खालावणें, ऱ्हास पावणें, झिजणीस लागणें, दुखण्यास पडणें (प्राणी, झुडप) २ (प्रिय वस्तु-माणसें यांच्याबद्दल) झुरणीस लागणें शोकाकुल होणें, खंत करणें [झुरणें]

झुरमुरीत—वि (गो) थोडासा राग किंवा रागाचा आवेश आणलेला, क्षणक्षणीत, खरमरीत

झुरविणें—सक्रि रिझविणें, आनंद देणें 'तुकोबाचीं पदें अद्वैत प्रसिद्ध। त्याचा अनुवाद चित्त झुरवी'-ब ७१६ [रिझ-विणें-विपर्यास]

झुरळ-ळें—न १ घाणेरडा कीटकवर्गांतील षट्‌पाद जाती तील एक किडा, एक क्षुद्रजंतु २ पतंगाची एक जात [का चिरिळे] म्ह० समुद्राला झुरळाची गरज लागत (समुद्र आणि परशुराम यांच्या कथेवरून)

झुरळी—स्त्री १ झुरकुती वळी, चिरमी, वळकटी (मांस, फळ, वस्त्र इ० ला पडणारी), शिथिल चामड्याला पडलेली झुर कुती २ दुमड, दुण, घडी [हिं झुर्री, सं झरी]

झुरळूक—स्त्री अस्पष्ट, अंधुक, ओळखूं न येण्याजोगा देखावा किंवा आकृति (वस्तूची) -क्रिवि अंधुकपणें, अस्पष्टपणें (दिसणें)

झुरा—पु (जुनर) ओढा [झुरणें]

झुरा झुराबावरा—वि १ धाडसी, बेफिकीर, निधड्या छातीचा 'मिळालें दळ तीन लाख झुरा'-ऐपो २८७ २ बिन दिक्कत, नि संकोच, बेगुमान, निर्भीड ३ डामडौली, फाकडा रंगेल इश्कबाज 'तुम्ही झुरे बावर फंदी मुशाफर दिसतां।'-प्रला १९१ [फा झहरा=धीटपणा, धाडस+बावरा=मार्यचित्त]

झुरांटा—पु (गो) झुरका पहा

झुरांटी—स्त्री (गा) लाब धाड्याची बंदूक

**झुरी**—स्त्री लहान ओढा झुरा पहा

**झुरी**—स्त्री (वे) आंब्याच्या फळाच्या देठातील चीक

**झुरुका**—पु १ झुरका पहा २ झरोका पहा

**झुरुझुरु**—क्रिवि खळखळा इ० झुरझुरा पहा

**झुरुमुरु, झुरेमुरे**—क्रिवि झिरूमिरू पहा अत्यंत त्वरेनें 'तों झाडून फौज झुरेमुरे बाहेर निघून मैदानात आली ' –भाव ६६

**झुल(ल्ल)क**—स्त्री झुळूक पहा **झुलकणें**–अक्रि हळू हालणें किंवा हलविणें, फडफडणें (वाऱ्यात–निशाण, कापड, कागद इ०)

**झुलक(का)वणी, झुलवणी**—स्त्री भुलथाप, झुकावणी, चालढकल, चकवणी **झुलक(का)विणें–झुल(ला)विणें**–उक्रि १ भुलथाप देणें, वतावण्या सांगून झुलत ठेवणें नादीं लावणें, सबबी लावून लांबणीवर टाकणें २ आळसानें वेळ घालविणें [झुलणें]

**झुल(ल्ल)णा**—पु झोंपाळा, चोपाळा, पाळणा [हिं झूलना]

**झुल(ळ)णी**—स्त्री झोंका, डोल [झोलणें, हिं झूलना]

**झुलणें**—अक्रि १ अंग हालणें, डुलणें (हत्ती, चालत असता, घोडेस्वार दौडत असता) २ (ल) हळू हळू चालणें, रमतरमत चालणें, रेंगाळणें डुलणें पहा ३ (ल) हलणें (हसताना शरीर) ४ झोंका येणें, आंदोलणें [सं. दोलन, प्रा झुल्ल]

**झुलवा**—पु (मुसलमानांत) वेश्या किंवा विधवा हीस स्त्री म्हणून बाळगताना तिच्याशीं लग्नविधीप्रमाणें करावयाचा एक विधि (क्रि० लावून घेणें) [झुलविणें]

**झुल(ला)वा**—पु १ झोंका, आंदोलन २ चौपाळा, झुला

**झुलवा**—पु (गो) दवाल्यांत किंवा देवाच्या पालखीपुढें कलावंतिणींनीं गावयाचीं स्तुतिपर पदें [झुलविणें]

**झुलवाझुलव–झुलवी**—स्त्री झुलवणी पहा टोलवा टोलवी, कपटानें लांबणीवर टाकणें (क्रि० करणें, मांडणें, लावणें) [झुलविणें]

**झुला**—पु झोला १ दोन काठ्यांत लोंबकळणारी पाटी हीत बसून (जमीनीवर) झोंके घेता येतात, पाळणा, हिंदोळा, झोंपाळा, चौपाळा २ डोंगराच्या कडयावर, नदीतीरावर खांब वगैरे उभारून त्यांस दोरखंड बांधून त्या दोरावरून सरकणारी टोपली, तिच्यांतून जाण्याची योजना ३ वरीलप्रमाणें दोन कड्यांना तीरांना दोरी बांधून त्या दोरीच्या साहाय्यानें खालीं बांधलेल्या लाकडावरून जाण्याकरितां केलेला रस्ता, दोरीचा पूल उदा० 'लक्ष्मण झुला.' ४ झुल्या विटाचा झोंपाळा पाळणा [सं दोला, प्रा झुल्ल हिं झूला]

**झुला**—पु घाडगाचा राग फसगी पहा –अभंग २ १०९

**झुलार**—पु झोंपाळा पाळणा, झुला पहा 'परी पुत्र मोहाची मनाली । [illegible] झुलार ।' –नव १६ १७३

**झुल्यावणें**—न झुला, झोला पहा

**झुलूप**—न १ कुरळ्या केसाचा झुपका किंवा गुच्छ, कानावर लोंबलेले डोक्याचे केस २ लहान मुलाच्या टाळूवर व कानांवर ठेवण्यात येणारे केस, (बहुधा अनेकवचनी (झुलपें) प्रयोग), काकपक्ष [फा झुल्फ्]

**झुल, झुल**—पु (क) विटीदांडूच्या खेळातील संज्ञा, खडा, डाव, झब्बू

**झुवा**—झुवा पहा

**झुळकणें**—अक्रि हळू हळू व मधूनमधून वहाणें, झुळझुळ, मंदमंद वहाणें (वारा) [प्रा झुल, ध्व.]

**झुळका**—पु चुळका, चूळ (पाण्याची) (क्रि० घेणें, टाकणें) [ध्व]

**झुळकी**—वि (व) आलवणी रंगाचें आडवें सूत व हिरव्या सारख्या भडक रंगाचें उभें सूत घालून विणलेलें अशा रंगाचें (लुगडें) 'झुळकी रंगाचें लुगडें लवकर विकलें '

**झुळझुळां–ळ**—क्रिवि १ झुरझुर–रा पहा झऱ्याचा आवाज, पाण्याचें मंद वहाणें, मंद वायूचा आवाज, धुराचें वर जाणें इ०च्या आवाजाप्रमाणें (क्रि० वाहणें) २ अंधुक, अस्पष्ट (दिसणारी आकृति) **झुळझुळणें**–अक्रि झुळझुळा, हळू हळू, मंदमंद वहाणें (पाणी, वारा) [ध्व झुळ द्वि]

**झुळझुळीत**—वि १ चकचकीत, तेजस्वी, चांगली जिल्हई दिलेलें, झकपक, गुळगुळीत मोहरेदार, तकतकीत २ झकपक, स्वच्छ, सुंदर (लुगडें इ०) [सं झल्ल]

**झुळं(ळुं)बक**—न १ एक कर्णभूषण, लोलक –दार २ (महानु) झळाळी, तजेला 'मौक्तिकाचे झुळुंबकें ।' –शिशु ४२४ [सं ज्वलन्नक, किंवा प्रा झुल(=डोलते)+लंबक]

**झुळमुळी**—स्त्री झिळमिळी पहा 'चौकड्याचे व जाईचे मोती माझ्या झुळमुळ्या एवढेहि नाहींत !' –भाऊ ३ १

**झुळवणी**—न झुळझुळ वाहणारें पाणी [झुळ+पाणी]

**झुळा**—वि १ जुळें जुळ्यांतील एक २ दुहेरी (फळ) [जुळा]

**झुळूक, झुळकी, झुळक**—स्त्री १ वाऱ्याची मंदगति, लहर 'वाऱ्याची झुळकी आली ।' –निगु ६१३ २ (ल) अनुकूल बळ, गति (क्रि० वहाणें) 'व्यापार करीत असतां, एकादवेळ झुळूक वाहिली म्हणजे फलप्राप्त होते '३ अंधुक, अस्पष्ट दर्शन, अपूर्ण दृश्य (वस्तूच्या) आकाराचा किंचित्भाग ४ ओघ, मार्ग, अल्प प्रवाह चळवळ, प्रवृत्ति (वारा, विशेष प्रकारची हवा, पाऊस, उन्ह, धर्मी, व्यापारधंदा, रोगराई यांच इ० ची) ५ अल्प अनुभव ६ (ल) तडाखा चढाओढ –क्रिवि झुळझुळ पणें (क्रि० वाहणें) [सं दल् प्रा झुल ध्व झुळ]

**झू**—उद्गा पुऱ्याला एखाद्याच्या अंगावर घालतांना वरा पयाचा आवाज छू पहा [ध्व ]

**झूज-स**—न झुज पहा

**झूट**—स्त्री खोटी –वि लबाड खोटें असत्य (भाषण मजकूर) [सं शठ[1] प्रा झुट्ट=असत्य हिं झूठ]

**झूड**—स्त्री झुडप लहानसें झाड, झाडझुड [झाड हिं झूड]

**झूड-म**—स्त्री झुड १ तगादा निकड आग्रह २ भोंवतीं जमणें गर्दी करणें पुढें ढकलणें (क्रि० घालणें पडणें) [फा झुड्=जल्द]

**झूमरा**—पु (संगीत) एक ताल यांत चौदा मात्रा व चार विभाग आहेत

**झूर**—स्त्री १ भक्तिहर आगा ओक (वधारा, मातीची घागर वगैरेंतील) यांतून पाणी झिरपणें २ भक्तिरता ३ झिरपलेलें, गळालेलें पाणी द्रवपदार्थ [प्रा झुर म झुरण]

**झूर**—न सडतांना झालेल्या तांदुळाच्या कण्या चूर ०कणा–स्त्री झुराची कणी बारीक कणी झुरकणी पहा

**झूल-ला**—स्त्री घोडा हत्ती इ०च्या अंगावरील पाठीवरील वस्त्र आच्छादन यापरी पृथ्वी झुली व्यक्त। –नव ११ ७४ [हिं ]

**झूला**—पु झुला पहा [हिं ]

**झे**—अ ना अतिरिक्त दाखविणारा प्रत्यय विशेष जोर दाखविण्यासाठीं योजतात झें पाऊस पडला कीं चहूंकडे पाणी पाणी होऊन गेलें झें तो रगडून जवळ मग पोट फुगून उताणा पडला

**झेंगट**—न एक वाद्य झगट झगड पहा [ध्व जगट]

**झेंगट**—न १ कठिण काम त्रास लचांड बखेडा घोटाळ्याचा प्रश्न २ गुप्त कट हिकमत युक्तिप्रयुक्ति ३ (ल ) टवळी बाई रांड [जगट झगट पहा तुल० सं जैंगट–डोहाळे जेंगटे दोहद स्मृत । –हारावली ७१९ डोहाळे मलून पिरपीर असा अर्थ व त्यावरून सांप्रतचा अर्थ बनला]

**झेंगट्या**—वि हिकमती युक्तीबाज कट करणारा लफंग्या विनाकारण लचांडें आणणारा

**झेंजरणें**—अक्रि वाजविणें गाणें [ध्व जगट]

**झेंझर(ड)णें**—अक्रि थंडीनें जड होणें नाक चोंदणें घशी बाधणें सुन्न होणें

**झेज(झ)रणें**—उक्रि १ (राजा ) घासणें खरचटणें झाज रणें २ (ल ) भोगणें फसविणें ३ हालवून खिळखिळें करणें धमकावून करून वडेवाकडें वापरून नादुरूस्त करणें इजा करणें विघडविणें शिथिल करणें ४ (गो ) झजरचें–चेंचणें बडवणें टचणें –अक्रि झेंझर(ड)णें पहा (नाक)झेजरणें–पडशानें नाक चुळचुळ होणें

**झेटि**—स्त्री कुणाची पट 'कपाळ झटि मिरों थोट लाथि तरी लागी।'–निगा ९० [सं जटा झाट]

**झेंडा**—पु १ पताका निशाण ध्वज कारागिरी निशाण २ फुलांच्या माळा घालून मिरवणुकीनें चालविलेलें निशाण ३ थेंडा (नाचणारा) पहा ४ मोजणीकामगारची काठी निशाण [म ध्वज प्रा झय गि झंडो हिं झंडा स ध्वजदंड, का झेंडे] ०नाचविणें–मिरविणें–स्वतःची थोरी मिरविणें स्वतःस मोठे समजणें आपलाच पराक्रम सांगणें (पराक्रम केल्यानंतर विवाहानंतर झेंडा(थेंडा) नाचविण्याची चाल असे तीवरून) ०लावणें–रोवणें–एखादा मोठा पराक्रम करणें कीर्ति संपादणें ध्वज लावणें (हा शब्द उपहासिक अर्थानेंहि वापरतात) विठ्ठचा गजर हरि नामाचा झेंडा रोविला निशीआल्यावर झेंड रोविला।'–ऐपो २८९ ०गडा झेंडेपट्टा–स्त्री १ नवीन निशाणाचा मध्य भाग विण्यासाठीं गांवावर (व्यापारी प्रवासी यांच्यावरहि) बसविलेला कर २ झेंडा लावण्या–वापरण्याबद्दल कर ०घोगा–पु (व ) थेंडा झेंडा अर्थ ३ पहा 'उद्यां झेंडाबापा नाचावयाचा आहे।' [झेंडा+बाप्पा]

**झेंडू**—पु १ एक फूलझाड व त्याचें फूल याच्या कळ्या (लहान फुलें) तांबड्या मखमलीच्या चेंडूसारख्या दिसतात मखमाल २ पहारी साप चावल्यानंतर तोंडांतून बाहेर येणारा रक्तमिश्रित फेंस फेसकूट रक्ताची गुळणी (क्रि० येणें फुटणें) तत्काळचि झेंडू येऊन। तेंच त्याचा गेला प्राण। –भवि ५४ ४७ ३ (राजा ) गुराच्या पशांतील एक रोग [प्रा झडुअ] ०गेंद–पु चेंडूच्या आकाराचा गेंद गुच्छ

**झेंडोली-ळी**—स्त्री गवताची चूड थेंडोळी पहा

**झेंप**—स्त्री १ पुढें किंवा बाजूस कलण्याची गति झोंक तोल झोकांडा हेलकावा झाप (क्रि० देणें खाणें घेणें जाणें) झेंप घाली सुखरूप गगनपथ। –र १८ २ पक्ष्याची भक्ष्यावरील झडप ३ एखादा पदार्थ पकडण्यासाठीं पुढें मारलेली उडी थाप घाला सावकाश झेंप घाली वरी। –तुगा ५१ ४ पोहणाऱ्याची पुढें जाण्याची अथवा पाणी तोडण्यासाठीं लांब हात टाकण्याची गति इ० (क्रि० घालणें मारणें टाकणें) ५ लवक पाळणा झोंपाळा इ० ची झुलती गति आंदोलन डोल झोल मागेंपुढें होणें (क्रि० घालणें देणें घेणें) ६ (व ) अधांग दूर असलेली स्थिति [झाप पहा ]

**झेपगा**—स्त्री शिपरी अर्थ १ पहा

**झेंपणें**—अक्रि (खा ) पोहणें पाण्यावर तरंगणें खेळणें [झेंप]

**झे(झें)पणें, झे(झें)पाविणें**—उक्रि तोलणें, सोसणें, पूर्ण करणें, पार पाडणें, बनाविणें, करणें (एखादें कष्टसाध्य काम) 'प्रतिपादन करावयाचे गहन अर्थ कोत्या मराठी भाषेस झेपण्यास कठिण असें वाटून ' –नि २ 'बरी मसलत झेपावली' [झेप]

**झेपसा**—पु १ (कों) झोंपाळयाची दोरी, झेपुटा २ झोंका, दोल, डोल (क्रि० देणें, घेणें) [स झप, म झेपणें]

**झेपसा**—पु (प्रा) मातीचा ढेपसा, ढेंकूळ

**झे(झें)पावणें**—अक्रि १ (काव्य) उडी घालणें किंवा टाकणें 'कितीयक झेंपावती अतरार्ळी।'–राक ११३ २ झडप घालणें (पक्ष्यानें) 'कीं वृक्ष दाटला देखोनी फळीं। विहगम झेपावती।' ३ वेगानें येणें, उसळणें, झाप टाकणें (सापानें) 'लज्जेनें न पुसे सरिप्रति कदा कंदर्प झेंपावला।' –अक्क २ विट्ठल, रसमजरी ५९ ४ लुब्ध होणें, भुलणें, मागें लागणें 'पाहुन मोहरा तुनसारखा तुजवर झेपावती। तुला आपणेकडे मोहिती।' –होला ९३ [झेंप]

**झेपेलीन**—न एक प्रकारचें मोठें विमान हें याच नावाच्या एका जर्मन संशोधकानें १९०० सालीं निर्माण केलें [विशेषनामावरून]

**झेपुटा**—पु झोक्याची, पाळण्याची दोरी, झेपसा [स झेप]

**झेर(म)णें, झेमणें**—अक्रि १ (कों) कोमेजणें, वाळत जाणें (वृक्ष, लता इ०) २ झोपेची डुकली घेणें [झेम]

**झेम**—स्त्री (गो) डुलकी, झोंप

**झेरमोगे**—पु वद्रुखार –मुग्या १५०

**झेल**—स्त्री १ (गो) झोंका २ झोंपाळा, झोला 'तुटली ससाराची झेल' –अमृत ११३ ३ जाळें [स दोल्–दोला]

**०चेंडू**–पु (बडोदें) लॉनटेनीस खेळ –झेल चेंडूचा खेळ १ [झेल=जाळें+चेंडू]

**झेलगें**—न आंबे काढण्याची आकडी. झेल्णी अर्थ २ पहा.

**झेलचें**—अक्रि (गो) मार्गेपुढें होणें, डोलणें, झोका घेणें [झेल]

**झेलणी**—स्त्री १ पकडो, पकड २ फळें काढण्याची जाळें असलेली आकडी, झेलगें [झेलगें]

**झेलणें**—उक्रि १ फेंकलेली किंवा पडणारी वस्तु हातानें पकडणें, झिकणें २ (ल) तत्काळ (श्लेष, गर्भ वगैरे) ध्यानात ठेवणें, उचलणें, अनुसरणें ३ उत्सुकतेनें वदूं करणें, मान्यता देणें, परवानगी देणें (सूचना, विनंति वचन य म) ४ स्वीकारणें, ग्रहण करणें, पतकरणें (आव्हान इ०) [झेल] (शुभ्रा, शब्द इ०) **झेलणें**–आपल्या कामभागीं दुसऱ्याचे वाटेल ती गोष्ट ऐकणें

**झेलर्ता**—स्त्री (नाविक) वोडताप दमण भरण्याकरिता असलेली दोरी [झेल]

**झेलरवा**—पु (सोनारी) फीव, सोन्याच्या सुताच्या एका टोंकास दिव्यावर धरून केलेला रवा, गोळी (हा नथेसाठीं वापरतात)

**झेला**—पु १ पुष्पगुच्छ, फुलाचा झुबका, गोंदा, घोंका 'गमे चपक–कुसुमौघ हार झेला।' –र १८ २ झाडावर लोंबणारें मोठें जाळें, आखी यात झेलणीनें उतरलेले आंबे टाकतात (झेला, झेली, झेलें)–(पुल्लीन) हे शब्द (झेलण्याची आकडी या) एकाच अर्थानें काहींजण वापरतात ३ शेताला पाणी द्यावयाची एक प्रकारची टोपली ४ (पोतकाम) मण्यांचें एक प्रकारचें कुसरीचें काम [झेलणें]

**झेलौंचें**—क्रि (गो) मार्गेपुढें करणें, झोके घेणें, हलविणें झेलचें पहा [झेल]

**झोक**—पु (ना॑) झुबका, गुच्छ [हिं.]

**झोक**—पु डौल, दिमाख, ऐट [अर झोक्] **०दार**–डौलदार, ऐटबाज **झोकांत होणें**–चांगल्या प्रकारें, डौलात घडणें, होणें

**झो(झों)क**—पु १ कल, ओळंब्यातून एकीकडे कलणें, झुकणें, तोल (क्रि० जाणें) 'डोंगरावरून उतरताना झोक गेला तर रसातळाला जाण्याची भीति' २ (ल) वळण, रोंख, कल, दिशा, मोडणी, रीत, चाल, वृत्ति (सैन्य कूच करताना, स्वभावाची, भाषणाची इ०) 'वामनरावाचे बोलण्याचा झोक माझे लक्षात आला' ३ वाऱ्याचा मोठा झोत, वादळाचा तडाखा, झटका ४ झपाटा (वस्त्राच्या पदराचा) ५ (ल) भाषणाचा प्रवाह, वेग 'कोणी कसाहि शब्द सांगितला तरी हा बोलण्याचे झोंकाखालीं नेतो' 'श्लोक वाचण्याचा झोंक थांबवून अथाकडे धावावें लागतें' –विवि ८ ७ १२४ ६ प्रवृत्ति, तात्पर्य, रीत 'देशा–काळाचा झोंक पाहून वागावें' [हिं झुकणें झोक]

**०चिठ्ठी–चिठ्ठी**–स्त्री १ एखाद्यानें, एखाद्यास, एखाद्यावर काम न होण्याजोगी दिलेली चिठ्ठी, रोखा, करारपत्र (ज्यामुळें ती घेणाराची निराशा होईल असें) २ (ल) व्यर्थ दिलेला हेलपाटा, कपटवचन खोटी आशा (क्रि० देणें) **०पट्टी**–स्त्री पोकळवचन, भूलथाप, फुसलावणी झोकचिठ्ठी पहा (क्रि० देणें) **झोकली वातमी**–स्त्री उडत वातमी, हूल, अफवा

**झोकणी**—स्त्री १ झुकणें २ ढोसणें [झोकणें]

**झोकणें**—अक्रि १ ओळंब्यातून एकीकडे जाणें, कलणें, वाकणें नमणें २ झोंक खात जाणें झुकणें –उक्रि १ ढोसणें, मोठमोठे घोट घेणें, ढमढसा पिणें (दारू, दूध इ०) २ फेंकणें, झुगारणें ३ झेपणें, पुरें करणें, साधणें, पार पाडणें, करणें (कष्टसाध्य काम) ४ बेधडक गप्प टाकून देणें, सांगणें, (नमेल तें) उगविणें [झुकणें]

**झों(झो)का**—पु १ हलकावा, झोला, आंदोलन (क्रि० घेणें, खाणें, देणें, मारणें) २ यजन करताना लुच्चेगिरीनें

तराजूला मारलेला झटका, आचका ३ (ल) निष्कारण प्रवास, हेलपाटा, फेरा, धक्का, फुकट फेरी, चक्कर 'मी पधरा दिवस त्याचे घरीं झोंके खातों' 'त्या वाटेनें चार कोसांचा झोंका बसतो' ४ तोटा नुकसान (क्रि० बसणें) 'पाचशें रुपयांचे व्यापारांत दोनशें रुपये झोंका बसताच कमर बसली' ५ फसवणूक, लुच्चेगिरी गोता (क्रि० देणें) ६ झोंपाळा, झोला ०हलविणें, मागेंपुढें ओढणें (क्रि० टाकणें) ०झोंक-स्त्री १ फेकाफेक २ (ल) टाळाटाळ, सबबी सांगणें, दिवसगत लावणें, चालढकल ३ दुसऱ्यावर काम टाकणें, कोलाकोलव, टोल्वाटोल्व [झोंकणें द्वि] ०ठोका-पु बोलाफुलास गाठ पडणें, अवचित घडणारी गोष्ट, दैवयोग, तडाखा, लग्गा (नशिबाचा [झोंका+ठोका=ज्योतिषांतील पडताळा] झोंक्याठोक्यांत येणें-सहजगत्या किंवा दैवयोगानें घडून येणें.

**झोंकांडा-डी-डें**—पुस्त्रीन १ झुकांडी पुढली किंवा एका बाजूची गति, कल, झोंक (धुंद चालताना), तोल जाणें (क्रि० जाणें) २ झुकापुरी, निसटणें, तुरी देणें, झुकांडी (क्रि० देणें)

**झोग**—स्त्री झुकलेला, पुढें आलेला भाग (भोटवणीचे खांबाचा, सुळक्याचा इ०) [झोक]

**झोजा-झा, झोज्या-झ्या**—वि १ स्थूल, दमाल्या २ सुस्त, आळशी व मद ०मल्लारी-पु गबदुल, अजस्र माणूस कपड्यानें बोंगा आलेल्यास, मोठ्या माणसाचे कपडे घातलेल्यास म्हणतात [हिं झोज=दोंद]

**झोजा**—पु गाड़, गांडीया [अर झौजा=बायको]

**झोंट-टी**—स्त्री १ झिपरी, पुढील केस झुलुप, बट 'झोंटी धरूनि विराम्सुता।' -मुवि ६ ६२ २ लहान मुलाचें (शेंडी पूर्वीचें) जावळ ३ (सामा) शेंडी [स जटा, हिं] ०धरणी-स्त्री १ एकमेकाचे केस धरून ओढणें, भांडणें, केशाकेशी २ (ल) भांडण तंटा, कज्जा 'झोंटधरणी केशयुद्ध।' -मुआदि ३० १६०

**झोंट**—पु १ निर्लज्ज, अरेराव, सदसद्विचारशून्य माणूस २ (विशेषत) कर्ज फेडण्याच्या कामीं ल्वाडपणा किंवा खळखळ करणारा माणूस 'माझ्या वाटणीसच का झोंट कुळाची स्वनें!' ३ (सामा) अरेराव, जुलमी दांडगा माणूस झोंड पहा [स जट] ०धरणी-स्त्री १ झोंट माणसापासून कर्जफेड करून घेण्यासाठीं केलेले अतिशय श्रम, खटपट २ कृपा व्हावी म्हणून एखाद्याची केलेली हांजीहांजी, नीच सेवा, गाडगुलामी

**झोंटाई**—स्त्री झोंट माणसाचें वर्तन, वर्तणूक, दांडगाई, झोंडपणा [झोंट]

**झोंटाळणें**—क्रि शेंडी धरून ओढणें 'मन धावता कल्पने पाठीं। विवेक उगटी झोंटाळी।' -एभा २३ ९५

**झोंटिंग**—पु भूत, पिशाच्च (विशेषत मृत मुसलमानाचें) 'आग्या झोटिंग जखिणी। त्यास भजोन जन बुडाले।' -दा १३ ६७ २ (ल) घरदार, बायको मुलगा नसलेला, फटिंग माणूस ३ अव्यवस्थित, कुकर्मी, अव्दाड, त्रासदायक माणूस [स जोगिंग=शंकर! हिं झोटिंग=बेताल] ०पाच्छाई-पाद(याद)शाही-स्त्री १ बेबंदशाही, जुलमी व अव्यवस्थित कारभार, राज्यव्यवस्था 'सुधारलेल्या राज्यपद्धतीस अनुसरून काहीं गोष्टींत सर्वच झोटिंग पाच्छाई करता येत नाहीं' -टि ४ ३० २ अंदाधुंदी, गोंधळ, घोटाळा [झोटिंग+पादशाही] म्ह० बेबंदराज्य झोटिंग पादशाहा

**झोड**—स्त्री १ ठोक, मार, चोप (क्रि० मारणें, काढणें) (ल) यथास्थित दणकणें, झोडणें, खरपूस समाचार २ (भाताची, धान्याची इ०) झोडपणी ३ (ल) एकसारखा जोराचा पाऊस. (क्रि० बसणें, किंवा पावसानें झोड लावणें) ४ अतिरेक, पराकाष्ठा, अतिशय चालविणें उदा० गाण्याची, जेवण्याची, लिहिण्याची झोड (क्रि० लावणें, लागणें, पडणें) 'आज त्यानें दिवसभर पुराणाची झोड लाविली आहे' [झोडणें] ०काम-न ओबडधोबड, साधारण प्रतीचें काम, ज्यांत चातुर्यापेक्षा शक्तीची जास्त गरज आहे असें काम, अंगमेहनतीचें काम [झोडणें+काम] ०कामी-म्या-वि जिकीरीचें, त्रासदायक, हमालीचें काम करणारा, कसबी नव्हे असा (सुतार इ०) अकुशल [झोड+काम]

**झोंड**—पु १ झोंट पहा २ दांडगा, पुंड -भवि ५३ १२० ३ (विशेषत) निगरगट्ट कुळ 'नाहीं गळा पडणें झोंड।' -तुगा १७५४ झोंडगी-स्त्री निलाजरी, दांडगी स्त्री 'झोंडा झोंडगीचे योगी। फळें विजाती करंटीं।' -तुगा १९७४, झोडणें पहा

**झोडगा**—वि झोडण्याची आवड असणारा, मारकट, मारका, निर्लज्ज, हट्टी, हेकेखोर, ठोक देणारा [झोडणें]

**झोडगी**—स्त्री धान्याचीं कणसें झाडून त्यांतून दाणे काढण्याची क्रिया, झोडणी, झाडपणी [झोडणें]

**झोडगें**—न (राजा) झोडगी, निर्लज्ज स्वैरिणी, हट्टी स्त्री

**झोडझपाट-झपेट**—पुस्त्री १ जोराचा हल्ला धाड (मारण्यासाठीं किंवा लुटण्यासाठीं) २ मारामार, उलाढाल जुलूम मुस्कदाबी 'हा झोडझपाट करून पोट भरतो' झोडणें झपेटणें-झपाटणें-१ लुटालूट करणें, दरवडा घालणें २ हाणमार करीत राहणें, दांडगाईचें वर्तन ठेवणें [झोडणें+झपेटणें किंवा झपाटणें]

**झोडणी**—स्त्री १ भात झोडण्याकरिता आखडा ज्या दोरीनें बांधतात ती दोरी -बदलापुर २१० झोडपणी झोडगी पहा २ काठी इ०नीं मारण्याची क्रिया [झोडणें]

**झोडणें**—उक्रि १ बडविणें, कुटणें, झोडणी करणें, मळणें २ (ल) चांगलें मारणें, ठोकणें, झोडपणें, कुमलणें 'वरि बैसले असुर समस्त। त्यासि झोडून पाडिलें।' ३ रेटणें, भरडून काढणें, ओबडधोबडपणें भरमसाट करणें (काम, मेहनतीचें काम, व्याख्यान) ४ (अशिष्ट) घशांत कोंबणें, खच्चून भरणें "हा पचवीस लाडू झोडून आणखी घाल म्हणेल" ५ (ग्राम्य) संभोग करणें, झवणें ६ (खेळांत) डाव मारून घेणें [प्रा. झोडण=पटणें] **झोडून घेणें**-(गंजिफाचा खेळ) घेणी घेणारानें राजा बरोबर आणखी एक पान टाकून मारणें, देणी देणारा जर आपल्या सगतचा (उजव्या हाताकडील) असेल व देणीसाठीं उतरलेल्या पानाच्यावरील पान आपल्या हातांत असेल तर राजा बरोबर तें पान टाकून डाव घेणें असें केल्यानें या हाताचीं सहा पानें मिळतात ०**पट्टी**—स्त्री सरपूस मार, चोप ठोक (ल) खरडपट्टी [झोडणें+पट्टी]

**झोडपणें**—उक्रि झोडणें (शब्दश व ल) पहा १ ठोकणें, बडवणें २ ताव मारणें, फडशा पाडणें ३ झोडणें, बडवून दाणे इ० वेगळे करणें

**झोंडाई**—स्त्री निगरगट्टपणा, अरेरावी झोंटाई पहा

**झोडाझोड**—स्त्री १ यथास्थित चोप, मार, मारामारी, ठोकाठोकी २ (ल) चलाखी, चपळाई (काम, लढाई, पाऊस इ० तील) [झोडणें द्वि]

**झोडीव**—वि १ झोडलेलें, मळणी केलेलें २ (ल) ओबडधोबड रीतीनें तयार केलेलें, कसें बसें भरडून काढलेलें ३ वाकसानें कसें बसें छिलून काढलेलें (लाकूड) याच्या उलट तासीव [झोडणें]

**झाडोरा**—पु (कों) झाडी

**झोत, झोतावा**—पु १ आगीची मोठी ज्वाळा २ पाण्याचा मोठा प्रवाह, लोंटा, लोट (वरून खालीं पडणारा), धोत ३ (सामा) प्रवाह लाट (वारा, इ०ची) [स ज्योतिस्=उजेड, म ज्यात]

**झोती**—स्त्री धक्का, विक्षेप 'रचलेपणा पडेल। झोती हून।' —ज्ञा ११ ०५६

**झो(झों)प**—स्त्री निद्रा, नीज (क्रि० घेणें, येणें) [स स्वप्] म्ह० झोंपला धोंडा भुकला कोंडा **झोंपणें**—अक्रि निजणें **झोपीं जाणें**-झोप लागणें, झोंपणें ०**मोड**—स्त्री निद्राभंग, झोंपेंत पडणारा मोड, झोंप लागली असता मध्येंच जागें होणें करणें **झोपाळू, झोप्या, झोपाळ-ळ्या**—वि अतिशय झोंप घेणारा नेहमीं सुस्त

**झोंपडी-डें**—स्त्रीन १ गवताचें घर, खोपटी पर्णकुटी २ काड्यामाड्यांचें घर अगदीं गरिबाची राहण्याची जागा (झोंपडी पेक्षा झोपडें हें जास्त हलकेपणा दर्शवितें अगदीं कमी प्रतीची झोपडी=झोंपडें असाहि अर्थ करतात) [प्रा झुपडा, का झोंपडें]

**झांपण**—न बैलाच्या डोळ्यावरील ढापणी, झापण [झाप]

**झोंपय, झांपै**—स्त्री (गो) झोका, आंदोलन 'झोंपय काढ

**झो(झों)पा**—पु १ डोल, हेलकावा, झोका २ (कों) नांगरलेल्या जमिनींत धान्य पेरून ती जमीन सारखी करण्यासाठीं लांब दोरी बांधलेला टहाळाचा झुबका, केरसुणी ३ झापा, झोपाटा, झोंपडी किंवा कुपण याचें (बारीक फांद्याचें विणलेलें) ताटीवजा दार ४ झोंपडी, खोंपटी ५ झोपाळा, चौपाळा, झुला म्ह० बैल गेला न झोपा केला (लावला) =थडीनें बैल मेल्यावर गोठा बांधला

**झोपाट-टा**—पु, (व) ताटी, झोंपडीचें, कुपणाचें दार, झापा झोपा अर्थ ३ पहा

**झोंपळा**—पु झोक घेण्याचें साधन, हिंदोळा, चौपाळा, झुला [झोंप-पा+ळा प्रत्यय]

**झोंब**—न (गो) एक जातीचा शिंपा

**झोंबरळा**—पु (माण) झोंपाळा, हिंदोळा [झोकाळा]

**झोंबट**—न मैथुन, संभोग, तें करणारें जोडपें, झागडू (विशेषत सापाचें, प्राण्याचें)

**झोंब(वा)ट, झोंबडें**—न त्रासदायक काम किंवा माणूस, लचांड, कुलंगडें, कचाट, संकट, तरांबखडा [झुंबड, झोंबणें]

**झोंब(वा)ट, झांब(वा)ड-डें**—न तंटा, भांडण, कलह, सामुदायिक भांडण, वाद आणि त्याचे सर्व वादीप्रतिवादी 'झोंबटाचे झोंबट सरकारांत नेलें'

**झोंब(वा)डणी**—स्त्री १ ओढाओढ, हिसकणी २ लूट, चोरी [झोंबडणें]

**झोंबडणें**—उक्रि १ धान्याची मळणी करणें २ चोपणें घाव घालणें, आपटणें (धुतांना कपडे) ३ झोंबाडणें पहा

**झोंबडा**—वि १ (बायकी) निर्लज्जपणें, दांडगेपणानें अंगाशीं लगट करणारा, अंगास झोंबणारा, आवळणारा (अतिप्रसंग करणाऱ्या पुरुषास म्हणतात) २ लोचट, चिकट नकार दिला तरी पिच्छा पुरविणारा, अत्यंत आग्रही ३ चावणारी (मुंगी, माशी) [झोंबणें] ०**झोंबड**—स्त्री १ हिसकाहिसकी, ओढाओढी २ झगडणी झोंबी

**झोंबणी**—स्त्री १ कुस्ती झोंबी २ झगडाझगडी, हिसका हिसकी [झोंबणें]

**झोंब(म)णें**—अक्रि (हें क्रियापद कर्त्याच्या लिंगवचनाप्रमाणें चालतें) १ तीव्र वेदना होणें, मर्मभेद होणें (ल) बोचणें, टोंचणें, चावणें, चरचरणें, भणाणणें, चुणचुणणें, डसणें (जाळ, उपरोधिक शब्द किंवा भाषण, निंदा). 'दाही दुर्गीं झावती ज्वाळा।' २ डसणें (साप) 'कीं झोंबला कीं साप।'—मोकर्ण ६ ७६ नर्मानें

टोंचून तीव्र वेदना करणें ( विंचू इ०नीं ) ३ जोरानें व बलात्कारानें स्त्रीस आलिंगन, दाबून धरणें, पकडणें, अंगलट येणें, मिठी मारणें 'ऐसें वदोनि कर्ची झोंबे दुःशासन स्वभावाच्या' —मोसभा ७ ७० जोरानें धरणें ४ भांडणें, मस्ती करणें, युद्ध करणें, तुटून पडणें 'इकडे निशाणाकडे जनरांनी शिंदे झोंबतच होते' —भाव ६३ ५ (ल) ओढा असणें 'कृष्णाकडे झोंबति मायबापें।' —सारुह ७ ९२ ६ (ल) आकलन करणें, समजून घेणें 'बोलाआदि झोंबिजे। प्रमेयाचि।' —ज्ञा १ ५८ ७ (ल) झटून काम करणें 'नरनारी झोंबती साहित्य करिती।' —दावि १७२ ८ लगटणें, गुंतणें, बिलगणें, पकडणें 'उत्तरिया झोंबे तान्हें तें दूर करून।' —विक ११५ [का जोंपिसु=धरणें, धरा]

**झोंबणें**—अक्रि दाट येणें, गुच्छ बनणें, अतिशय लगडणें (फुलें, फळें, वगैरे) 'या मोगऱ्याला पाणी लावा म्हणजे हजारों फुलें झोंबतील' [का जोंपु=गुच्छ]

**झोंबरा**—वि १ तीव्र वेदना करणारा, देणारा मर्मभेद करणारा, जिव्हारीं लागणारा, दंश करणारा, टोंचणारा (अक्षरशः व ल) 'त्याचा विनोद कधींही झोंबरा नसे' —कोरकि ७२०. २ जोरानें लागणारा, अंगलट करणारा, जोरानें अंग आवळणारा, धरणारा, पकडणारा ३ एकदम चावणारा, तोडणारा ४ जळजळीत [झोंबणें]

**झोंगा**—पु तेल ठेवण्याचें भांडें झावा, झाबू पहा

**झोंबाडणें**—सक्रि, १ जोरानें, दांडगाईनें हिसकावून घेणें, धसकफसक करणें २ लुटणें, नागविणें, लुबाडून घेणें, चोरी करणें [झोंबणें] **झोंबाडा**—पु झोंबण्याचा प्रकार जबरीनें पकडणें, घेणें, घाला, हिसकावून घेणें, धाड, झेप (क्रि० घालणें, करणें, घेणें, मारणें) २ चोर, लुटारू, दरवडेखोर [झोंबाड]

**झोंबिन(ब-नि)णें**—सक्रि (काव्य) आलिंगणें झोंबणें पहा 'असासितु झोंबिनिलीं। प्राणवल्लभासि।' —शिशु ७०६. [झोंबणें]

**झोंबी**—स्त्री १ कुस्ती, झुंज, लढाई (क्रि० घेणें, खेळणें) 'कृष्णापुढें नाचती गोवळे। झोंबिया घेती एक वळें।' —ह १३ २२८ २ कज्जा, भांडण, तंटा (क्रि० घेणें) 'की बाधिलेती आरोचकें। झोंबिआ विणू।' —शिशु ११९ ३ अंगलगट, आलिंगन 'तारुण्याच्या बळें घेऊं धावलीस झोंबी।' —निगा ९६ [झोंबणें] ०लोंबी—स्त्री भगलट, कुस्ती 'झोंबीलोंबीघेउन। जाती टाकिती नेऊन।' —दावि ४०४

**झोगा**—पु (व) थोडेसें सामान मावण्याजोगी, गळ्यांत अडकविण्याची शिपायानवळची कापडी पिशवी, बॅग [हिं झोला]

**झोगा**—पु (बांधकाम) घाण्यातील घारें, झरोका

**झोरीमुशी**—स्त्री. समुद्रातील मुशी नावाच्या माशाची एक जात

**झोरी**—पु (राजा) श्रद्धता, अशक्तता [झुरणें]

**झोन्या**—पु (गा) १ जाड भुनाडा हा जाडगाभरड्या सुताचा असतो; धोन्या, पांढरें जाजम विथा सतरंजी २ (कों) सुताराचें एक हत्यार

**झोल-ळ**—पु १वस्त्राचा सैल व हलणारा टोंकाचा भाग, घोळ, घेर (अंगरखा इ०चा) २ परिधान केलेल्या वस्त्राचा इतर पदार्थांस लागणारा लांब भाग, झोळ, घोळ ३ कल, तोल एकदम एका बाजूस वळणारी गति, झोंक, झटका, घेर, गिरकी (क्रि० देणें) 'एकून मातेचा बोल। दिल्हा वनाकडे झोल।' ४ झोंका, झोल 'झोल झोलों देवापासी जागावें रे।' —दावि २०३ —वि यथवहीत 'वर्षे उतार झोल शेवटीं।' —अकक २ उद्धवचिद्घन, शुद्धभागवाद ७६ [सं दोल, प्रा झुल, म झुलणें हिं झुलना] **झोलांडा**—पु झोंक, झोंकाडी (क्रि० जाणें) **झोलणें**—अक्रि झोंका घेणें, देणें, खाणें, डोलणें, हालणें **झोलर, झोलार**—वि घोळानें, घुमीर, झोल आलेलें (वस्त्र, बाज वस्त्र, इ०) **झोलविणें**—सक्रि झोंके घेणें, खाणें देणें, हलविणें

**झोल**—वि (व) लफंगा, लबाड

**झोला**—पु १ झोंका (क्रि० देणें, घेणें) २ फसवणूक, गप्प, कपट, लबाडी, टाळाटाळ (क्रि० देणें) ३ झोल-ळ, पदर, काठ, सोगा ४ घोळ सुटलेला, सोडणें, झोलसुटारा (वस्त्राचा) ५ झोंपाळा, हिंदोळा ६ गोता, हिसका 'जो देता मधुकैटभ-कनककशिपुमुख-महासुरां झोले' —मोस्त्री २ ३० ७ धोका, संकट त्रास 'यमयातनेचा झोला। कठीण आहे।' —दा ११ ३ ८. ८ झोंक, कल, तोल, 'डोले बोलत बोल तों न धरवे गेलाचि झोला भला।' —आसी ४४ [सं दोला] ०झोल—स्त्री झुकाडी, टाळाटाळ, टोलवाटोलवी [झोलणें, झोलविणें हिं]

**झोलावणें**—अक्रि डगमगणें, थलथलीत, गबदुल होणें असणें [झोल]

**झोळ**—पु झोल पहा —वि (ल) मिथ्या, खोटा 'ते देह झोळ ऐसें मानुनी। ठेले आपणपें आपणचि होउनी।' —ज्ञा ८ ६० [झोल]

**झोळकवणें, झोळंबणें**—अक्रि लोंबकळणें, लोंबकळत राहणें, टेवणें, झाके घेणें, हेलकावणें, हेलकावे घेणें

**झोळकवा-कुंवा-खंवा-खुंवा**—पु सैलपणें इकडेतिकडे, पुढेंमागें हलणें, झोंक झोका, लोंबकळी, हलकावा (क्रि० घेणें खाणें) 'तदन्याय तत्वरतीं। देव उफराट झोळंब घेती।' —नव१२ १८१ २ झोपाळा, चोपाळा, पाळणा, झोला [स दोला+खाव]

**झोळण**—स्त्री घोळ झाळ, झुगवट (वस्त्र, छत इ०चा) २ सुरकुती, वळी, आठी [झोळ]

**झोळणा**—पु औषधाचा, विड्याच्या सामानाचा, चार तोंडाचा व चार दोऱ्याचा बटवा, पिशवी, दोंवती मोठी पिशवी २ चार कोंपरे एकत्र केलेलें वस्त्र ( आजाऱ्यास नेण्याचें ), जहा जावर जनावरें चढविण्याकरिता तयार केलली नवघण, शिंकें, शिंकाळी ३ पोतें (भूस, हलके पदार्थ ठेवण्याचें) [ स झोलिक= ल्हान पिशवी ]

**झोळणी**—स्त्री (व.) भाद्रपदातील गौरींच्या सणाच्या दिवशी करावयाचा एक पदार्थ [ झोळ ]

**झोळी**—स्त्री १ झोळणा पहा २ चौपदरी, दोन दोन कोंपऱ्याम गाठ दिलेलें फडकें ( भाजीचें, भिक्षेचें ) ३ वस्त्राचा पाळणा, दोऱ्याचा विणलेला पाळणा ४ (सामा) पिशवी [ स झौलिक-ल्हान पिशवी, प्रा झोलिआ, का जोळिगि, हि झोरी ] ०वंद—वि भिकारी, भीक मागण्याचा धंदा करणारा 'तो दाली वद मी झोळीवद ' **झोळी घेणें-सांवरणें**=भीक मागणें **झोळीपरगाव्याचा सुभा**—पु भिकेचा धंदा (क्रि० घेणें)

**झ्यड**—न (गो) लचाड 'हें झ्यड हागा विल्या आयशा काय ? '

**झ्या, झ्याझ्या**—उद्गा बैल, घोडा याना हाकताना उच्चारा वयाचा शब्द 'तो कोदडाचें घोडें वरूनी। झ्या झ्या म्हणानि ओढी मेदिनी।' —राचि ७ २४९ [ जा! जा! ] ०म्हणणें, करणें पळून जाणें, झुकाडी देणें

**झ्याऊ**—वि पादरापुसका, निर्जीव झाऊ पहा

**झ्याक-ग**—वि चकचकीत, प्रकाशमान झाक पहा

**झ्याझ्यात**—स्त्री (क) पराकाष्ठा, शिकस्त (क्रि० करणें)

**झ्याझ्यू झ्याट, झ्याप, झ्यापणें झ्याल, झ्योज्या**— हे व असलेच दुसरे शब्द झाझ्यू झाट इ०मध्यें पहा (यातील 'य' अक्षरानें या शब्दाचा उच्चार कठोर होतो )

**झ्येताय-व**—पु (गो) १ अशिक्षित २ किरिस्ताव माणूस [ पोर्तु, इ जेंटु ]

## ञ

ञ—वर्णमालेंतील दहावा वर्ण यानें आरंभ होणारा कोणताहि शब्द नाहीं हें अक्षर शब्दाच्यामध्यें किंवा शवटीं येतें अक्षर विकास—याच्या तीन अवस्था आहेत पहिली अशाक्कालीन दुसरी २ ऱ्या शतकांतील गिरनार लेखान व तिसरी अलाहाबाद स्तंभावरील लेखाच्या काळची ( ४ थें शतक )

## ट

ट—वर्णमालेंतील ११ वें आणि ट वर्गांतील १ लें अक्षर याचा उच्चार जीभ टाळ्याला जोरानें लावून करावा लागता अक्षर विकास—ञ प्रमाणेंच याच्या तीन काळच्या तीन अवस्था असुन त्या ञ च्या ठिकाणींच सापडतात —पु अक्षरशत्रु, मूर्ख, ढ **टफ करणें**—(ल) एखाद्या विषयाचें अल्पज्ञान होणें 'विद्यालयातून जे सस्कृतज्ञ बाहेर पडतात त्याना ट फ करण्याचें सामर्थ्य आलें न आलें कीं लगेच कोणत्याही शास्त्रावर व्याख्यान, निबध वगैरे सुरू झालेच —नि **टफ करीत वाचणें**—अडखळत किंवा चुका करीत वाचणें, एकेक अक्षर लावून वाचणें ( नवीन शिकणारा असें वाचतो ) **ट ला ट जुळविणें**=१ अक्षराला अक्षर जुळविणें २ ( ल ) हीन दर्जाचें काव्य, कविता करणें, चागला प्रतिभासंपन्न कवि नसणें 'असे ढ पुढें येणार आहेत हें जर त्या कवीला माहीत असतें तर त्यानेंहि ट ला ट जुळविण्याचे श्रम घेतले नसते '—मूक

**टऊर**—वि खोडकर, टवाळ, उनाड (मूल) (प्र) टोर पहा

**टक्**—पु (खा) औषधाचा एक भाग, डोस

**टक**—स्त्री १ कपाळाचा एकसारखा लागलेला ठणका, कपाळ उठणें (क्रि० लागणें) २ सतत एकाग्र दृष्टीनें पहाण्याचा प्रकार, एकसारखी दृष्टि (क्रि० लावणें, लागणें) 'डोळीया पडलें टका।' —ब २३४ ३ अखड आवाज (एकसारखा पाठ, अभ्यास, ओरड, रडें, भुरणें, गाणें, पाऊस पडणें इ०चा), सततपणा, अखडता टकळी, गुन्हाळ 'एकसारखी भाषणाची पडण्याची—म्हणण्याची—पावसाची—रडण्याची—टक लावली आहे '—न १ (काव्य) आश्चर्यामुळें होणारी एकाग्रता, एके ठिकाणीं दृष्टि, नवल, अत्यंत आश्चर्य, आश्चर्याचा अतिरेक, भूल (क्रि० पडणें) 'मागधासी पडलें टक। तन्मय ठेला मुहूर्त एक।'—एरुस्व ११ ४५ २ (ल) मौन, मुग्धपणा (आश्चर्यानें) 'वर्णिता थोरासि पडलें टक।'—भवि १७८ ३ एकाग्रता, एकसारखी नजर 'तेय तान्मय्या तान्मय्य पडलें। टकासी टक लागलें।' —ज्ञा ११ १९० ४ संकट —मनको [ ध्व व दृश्य तुल० सं तक्=लाग धरणें ] ०टक—स्त्री १ अखडपणा, सातत्य २ कटाळवाणें भाषण, बडबड, टकळी वटवट ३ सतत पिरपिर चिरचिर, रडणें (मुलाचें) (क्रि० लावणें, लागणें) —वि सतत, एकसारखें (पहाणें) ०क—टक—क्रिवि १ अनिमेषदृष्टीनें, एकसारखें रोखून (क्रि० पाहणें) 'तो मूल दिव्याकडे टकटक पाहातो ' २ (कानशिरें इ०) शिरशिरण्यानें उडण्यानें (क्रि० करणें)

**टक**—पु १ कपडा शिवण्याची एक तऱ्हा, टीप (क्रि० घालणें) २ चूण (आडवी) (इ) टॅक —शिरशि २ १०५

**टंक**—पु १ पाषाणाची छिनी टाकी 'झाला शिशिरा दर्षे जेवि शिळेलागि साशिता टंकें।'—मोआदि २ १०४ २ चार मासाचें वजन टाक पहा ३ शाईप, छापखान्याचा शिसा, ठसा, [ स ] —क्रिवि (जोरदार, अर्थद्योतक अव्यय याचा उपयोग

वजन—मापासंबंधींच्या क्रियापदाशीं व नामाशीं होतो ) १ ततो तत प्रमाणानें, अशानें भारभार, अगदीं वजनावरहुकूम ( क्रि० उतरणें, होणें ) 'पुण्याच मापानें दाणे आणिले ते आळंदीच मापानें टक उतरले ' —वि परस्पर तुल्य बरोबर 'हें वजन आणि तें माप टक आहेत ' [ स ] ०यत्र—न टाईपरायटर

**टकटक**—स्त्री १ चकचक चकाकी तकाकी ( सापाची ) २ सारखा ध्वनि ( घड्याळाचा ) [ ध्व ]

**टकटकणें**—अक्रि १ टवटवी येणें फुलणें, खुलणें ताने तवानें होणें जामदार दिसणें ( फुलें, चेहरा ) २ उडणें ठमकणें ( कानशिलें ) [ टकटक ]

**टकटकी**—स्त्री टवटवी, प्रफुल्लितपणा तुकतुकी (चेहऱ्याची)

**टकटकीत**—वि टवटवीत तुकतुकीत प्रफुल्ल (चेहरा पदार्थ)

**टकण**—न सवागी टाकणखार पहा

**टकणें**—अक्रि एकसारखें सकाम दृष्टीनें पाहणें टक लावून पाहणें टकमका पाहणें [ टक ]

**टकणें**—उक्रि १ मिळणें येणें लागणें 'परि वदनाचा शेवटु न टके।' —ज्ञा ११ २०२ २ साधणें प्राप्त होणें, करतां येणें साध्य होणें 'हे अगाध निज परिपूर्ण। वाळ्या भोळ्या न टके जाण।' —एभा २ ५१७ [ हिं टकना—चिकटणें ]

**टकणें**—क्रि शकणें करू शकणें टिकणें पहा —तुगा

**टकणें**—ठाकणें पहा

**टकणें**—क्रि टिकणें, स्थिर राहणें 'असा न टके माझें ध्यान।' —एभा २८ ६१७ [ टक ]

**टकबंदी**—स्त्री दर टक्यास (प्रत्येक १०० चौरस बिघ्यास) अमुक रक्कम असा जमिनीचा कायमचा ठरविलेला धारा —वि १ ( टका=१६ शिवराई ) टक्यामध्यें ठरविलेले, हिशेब केलेले ठेवलेले ) नहमींप्रमाणें रुपयात ठरविलेले नव्हे असे ) ( हिशोब रोखे ) २ टक्याच्या हिशाबानें ठरविलेली, अजमास केलेली ( जमीन ) [ टका+बंदी ]

**टकमक**—स्त्री १ पर्वताचा उंच कठिण तुटलेला, वरून खालीं पाहिलें असतां डोळे फिरतील असा सुळका किंवा कडा, अगदीं उभा कडा रायगड किल्ल्याच्या एका कड्यास टकमक टोंक असें नाव आहे २ निश्चलदृष्टि टक पहा

**टकमक-मकां**—क्रिवि निश्चलपणें चकित होऊन टकटक-टका पहा ( क्रि० पाहणें ) 'टकमक पाहत होत प्रभुमुखचंद्राकडचि चोनकम। —मोउद्योग ७ ९८ [ टक ]

**टकमक-मकी**—स्त्री गोगलगाय भोपळ्यासारखीं फळें येणारी एक वेल **टकमकें**—न टकमक वेलीचें फळ

**टकमकीत**—वि टकटकीत पहा

**टकर, टक्कल**—टक्कर टक्कल पहा

**टकराघा**—वि पोपटासारखा वाचाळ, टकळी लावणारा [टक्=टकळी+राघु] **टकराघोच्या गोष्टी सांगणें**—गप्पा मारणें, बाता लावणें

**टकली-लें**—स्त्रीन १ डोकें डोचकें विशेषत डोक्याची कवची २ सपाट जमीनीवरील उंचवटा, टेकडी

**टकल्या**—वि डोईस टक्कल पडलेला [ टक्कल ]

**टंकशाला टंकसाळ, टकसाळ**—स्त्री नाणें पाडण्याचा कारखाना टाकसाळ [स टंकशाला, हिं टकसाल] **टकसाळचा फुटका-फुटलेला**—वि (टाकसाळींतून सोडलेला) (ल ) जन्माचाच बिघडलेला, लहानपणापासून दुर्वृत्त, आईबापाच्या घरींच कुचकामी चाललेला, नीट शिक्षण न मिळालेला **टंकसाळ्या**—वि १ नाणीं पाडण्याकरिता ठेवलेला सोनार, याच्या उलट अग साळ्या २ ( सामा ) टांकसाळेंतील एखादा नोकर

**टकळा**—पु टकळा ( राजा ) विरहानें लागलेली घोकणी, वेध ध्यास जप टकळा इच्छा ( क्रि० घेणें धरणें लागणें ) 'सान्निध्य घडो टकळा घालुनि न वत्स सुरभिचा सुटला।' —मोअनु ४ ५८

**टकळी**—स्त्री १ एकसारखी बडबड, बडबड रडारड भुका भुक ( बडबड लोक मूल, कुत्रें इ०ची ) ( क्रि० लावणें लागणें ) २ घुरणी ध्यास टकळा पहा ( क्रि० धरणें घेणें ) साहनि दुधाची टकळी। गोंवारी गावधेनु वेंटाळी।' —ज्ञा १८ १७४ [ टक ]

**टकळी**—स्त्री कापसाचें सूत काढण्याची चाती [ टिकली ? ]

**टका**—पु १ एक नाणें याची किंमत वेगवेगळी आहे (अ) सोळा शिवराई पैसे (आ) चार पैसे एक आणा (इ) (गुजराथेंत) तीन पैसे (ई) (उत्तर हिंदुस्थान) दोन पैसे (उ) चार पाच आणे किंमतीचें नाणें —भाबै १२१ (ऊ) (सामा )एक रुपया ( हें प्रत्यक्ष नाणें नसावें वरील किंमतीचा वाचक शब्द असेल )'शेंकडा ६ टके ' २ पैका धन द्रव्य ३ कर (समासात) घरटका—टमटका—तोरणटका ४ १२० चौरस बिघे जमिनीचें एक माप [ स टंक=नाणें हिं टका ] **टके करणें**—१ पैसा जवळ करणें एखादी वस्तु विकून तिचे पैसे करणें २ फायदा नफा मिळवणें ३ बदसूल मिळविणें बरबाद होणें **टके शेर**—अतिशय स्वस्त पैशास पायली मातीमोल २ कवडी किंमतीचा क्षुद्र महत्त्व नसणारा 'हे पूर्वी मातब्बर होते ऐकीकडे टके शेर झाले '३ चांगलें किंवा वाईट एकाच मापानें एकाच योग्यतेचें समानमूल्य टका शेर भाजी टका शेर खाजा 'म्ह० टक्या कांटें र जातास सखा तोडावयास द्रव्यामुळें मैत्री मोडते याअर्थी

**टका-कें**—पुन १ निशाण ध्वज छत्र २ (ल०)प्रतिमा ठसा 'फणफणिती टकें निवाड।' —शिशु ५२८ ३ अभ्भाग, कोंब, धुमारा 'तो पाला तया धुमे। टक्यावरी।' —ज्ञा १५ १६६

३ ठसा, छाप 'स्त्री पुरुष नपुसकें। हे व्यक्तिभेदाचें टक।' –ज्ञा (कुंटे) ११.१६१ [का टकें=काठी, मेखें=निशाण, तुल० स टक=तलवार]

**टकाकां**—क्रिवि टकटक-का पहा (क्रि० पाहणें)

**टकाम्ल**—न (शाप) टाकणखारगचा तेजाब, फूल (इ) बोरासिक ॲसिड [टक+अम्ल]

**टकार**—पु धनुष्याच्या दोरीचा टणत्कार 'शिरले यवनाच्या श्रवणीं त्या टकार.' –विक २६ [स टणत्कार ध्व] **टंकारणें**–टण-कारणें

**ट(टं)कारी**—पु दगडाचीं जातीं तयार करणारी किंवा त्यास टकी लावणारी टाकाऱ्याची जात व तींतील एक व्यक्ति दगड घडण्याचें काम करणारी एक जात, व्यक्ति [स टक+कार, प्रा टक+आर]

**टंकी, टकीका-रा**—(संगीत) एक राग यात षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात जाति संपूर्ण-संपूर्ण, वादी पचम, संवादी ऋषभ, गानसमय सायंकाळ

**टकुचें, टकूच, टकोचें**—न डोकें, कान झाकणारें (वाय कांचें, ल्हान मुलाचें) टोपडें, कानटोपी, कुंची [टकुरें]

**टकुरें-ळें**—न १ डोकें, मस्तक, टाळू, टकोरें, बाडकें २ वरील भाग, तोंड [टाळकें]

**टकुली-ळी**—स्त्री टकळी पहा

**टकेकारी**—पु द्वारपाळ –शर

**टकेटोणपे**—पु अव ठोसे, आघात, प्रहार, ठेंचा (ल.) सकटें हालअपेष्टा, अडथळे (एकाद्या तडीस न्यावयाच्या विषयात किंवा आश्रय मिळविण्यात) अनुभव (क्रि० खाणें, घेणें, सोसणें, भोगणें) 'टकेटोणपे खाल्यावाचून मोठेपणा येत नाहीं' [टका=धक्का+टोणपा=काठी द्वि]

**टकोटक**—क्रिवि बरोबर तंतोतंत टक (–क्रिवि) पहा [टक द्वि]

**टकोर-रा**—वि मोठ्या आकाराचा साधारण मोठा, (दुसऱ्यापेक्षा) मोठी (सामा ल्हानसहान वस्तूबद्दल वापरतात)

**टकोर**—वि कठिण, कडक (गूळ माल) [ध्व टक+करणें]

**टकोर**—धुमी घोप न्या गोंगाट कडकड अखड एक सारखा आवाज टक अर्थ ३ पहा 'पावसानें आज टकोर लाविला आहे' [ध्व टक]

**टकोरणें, टकोरें**—टिकोरणें टिकोरें पहा

**टकोरा**—पु ठोसा रपाटा (फळी, काठी, दाडकें याचा) (क्रि० मारणें) टिकोरा पहा –मोन २ ६ ३०

**टकोरी, टकोरें, टकुरें, टक्कुरें, टकुल, टकोलें**—स्त्रीन (तिरस्कारार्थी) डोकें, टाळू, टाळकें [का टकोर=ल्हान टेमकी]

**टक्कर**—स्त्री १ (जनावराचीं) शिंगें किंवा कपाळ यानीं परस्परावर केलेला आघात, ढुसणी, धडक २ (ल) बरोबरी, स्पर्धा, चढाओढ करण्याचा प्रयत्न, सामना (क्रि० खाणें, मारणें) ३ (बैल एडके इ०) सशृंग पशूची झोंबी; कुस्ती [ध्व प्रा टक्कर]

**टक्कल**—न १ डोक्यावर मध्यभागीं केस नसणें, डोक्यावरील केस नसलेली जागा, केशहीनत्व (जरा, रोग, इ० कारणामुळें झालेलें) २ (ल) उभ्या पिकाच्या शेतातील पीक नसलेला जमिनीचा तुकडा, माळरान, उच व कोरड्या जमिनीचा प्रदेश ३ (तिरस्कारार्थी) तोंड, चेहरा 'मी आजपासून तुझें टक्कल पाहणार नाहीं' म्ह० उरीं केस माथा टक्कल=एकीकडे लाभ तर दुसरीकडे तोटा ०**माथ्या टक्कल्या**–वि खल्वाट, टक्कल असणारा

**टक्का, टक्केटोणपे**—टका, टकेटोणपे पहा

**टगचाई, टगडी**—तगचाई तगडी पहा

**टंगशी**—स्त्री (गो) डहाळी [का टोंगी=शाखा]

**टगळ**—स्त्री (क) युक्ति, खुबी, शैली (क्रि० साधणें) [का तगलु=गुतणें, अडकणें]

**टंगळमंगळ**—स्त्री न १ निष्काळजीपणानें, वरवर काम करणें २ हयगय, टाळाटाळ, काकू, मुद्दाम केलेला ढिंगटपणा, अनास्थेची चुकवाचुकव, बेपर्वाई 'पावसानें अलीकडे टगळमगळ आरंभिली आहे' –क्रिवि १ हयगयीनें, गमतगमत निष्काळजीनें, अनास्थेनें, आळसानें (काम करणें) २ ल्हरीनें, मधूनमधून, इकडेतिकडे करीत, थांबून थांबून, राहून राहून, हात राखून (वेळेवर, योग्य जागीं करावयाचें काम) ३ रडतखडत अटमटमस करीत, कचरत विचकत [सं तगनमगनम्–राजवाडे, स तग्+मग् का तगु=थांबणें, गमणें]

**टगेगिरी**—स्त्री मामटगिरी लुच्चेगिरी डाव, कपट

**टग्या**—वि १ लुच्चा उनाड गुंड एखादा गुंड टग्याही असें खलीची जागा अडवू शकेल –क १७३० २ गबदूल, गलेलठ्ठ, धटिंगण ३ तगडा निकोप सशक्त 'चागला टग्या आहेस' –हाकाध १९१ [का टक्कु=लबाडी, कपट]

**टग्या**—पु शिंसें आत भरलेली मोटी कवडी

**टच**—न (कों) जमलेली वेळ, योग्य प्रसंग, काळ (कामकाजाचा) हगाम, ऋतु सुगीची वेळ, तयारीचा, घातीचा समय

**टच**—स्त्री (मुबईतील सोनारात रूढ-१८५७ सालींहि) सोन्याचा दर्जा, कस [इ]

**टच-कन-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि (याचा उपयोग हृदय, चपळतेनें टोंचणें, भोंसकणें, खुपसणें इ० क्रियापदांबरोबर करितात) टच् शब्द होई असें टोंचणें, वाजणें इ० क्रियापदाच्या आवाजाच्या प्रकाराचें अनुकरणात्मक उदा० टचकन-डोळ्यास पाणी आलें-रक्त निघालें-पू उडाला-फोड (गळू-लिंबू-आवा-) फुटला-दगड सरचले इ० [ध्व]

**टचकरा, टचकारा, टचकारनीस**—तजरा इ० पहा

**टचका**—पु १ एक लांकडी खेळणें (हें लांकडी गोट्यांच्या घडाचें असतें) २ टोंच, टोंचणी, गेंचा ३ बोटानें किंवा गोटीनें हृदय मारलेली टिचकी, धक्का इ०, टच शब्द होईल असा प्रहार (क्रि० मारणें) ४ (टाइक्याळ रस्त्यांतून जाताना) गाडीला बसलेला आचका, धक्का ५ एकदम भळभळा स्राव (रक्त, पू, रस, अश्रू यांचा टच असा टिचकणें, मारणें याच्या आवाजारूपानें) ६ तुण तुण्यावरील लावण्या म्हणण्यातील श्लोक ७ सटका [ध्व. टच]

**टचटच-चा**—क्रिवि टोंचतांना, टोकताना, उवा-पिसवा इ० मारताना, गळू इ० ठुसठुसताना होणाऱ्या आवाजाप्रमाणें [ध्व टच द्वि]

**टचटचणें**—अक्रि १ ठुसठुसणें, टणटसणें, ताठरून कडक बनणें, टणकणें (गळू इ०) २ टच! टच! आवाज करणें [ध्व टचच]

**टचटचीत**—वि ठुसठुसणारें, टसटसणारें, ताठरून कडक बनलेलें, घट्ट, टणक, निबर (गळू), उच्च झालेलें, फुगलेलें (पोट), रक्त खाऊन फुगलेला (ढेकूण), रसरसीत (द्राक्षें) (विशेषत फुगणें, भरणें या क्रियापदावरोबर, क्रियाविशेषण असताना योज तात) —क्रिवि. सढळ हातानें, औदार्यानें (खर्च करणें)

**टचटचून**—क्रिवि १ विपुलतेनें, भरपूर, पुरेपूर, वाहून जाण्याजोगें, अतिशय (टोंचल्यावरोबर आत कोंडला गेलेला प्रवाही स्राव टोंचणें, फोडणें इ० शब्दावरोबर उपयोग) २ अतिशय, विपुल (रडणें, डोळ्यात पाणी येणें, सारखें खुपणें, जोरानें टण कणें या क्रियाचा आवाज प्रकार याचें अनुकरणवाचक) **टचाचणें**-अक्रि (रचडपणेंचा अतिशय) जोरानें सारखें खुपणें, टणकणें, सळक मारणें ठुसठुसणें (गळू इ०) [टच! टच!] **टचाचून टचाचा, टचाटच-चा**-क्रिवि टचटच, टचटचून याचीं आधिक्यदर्शक रूपें

**टचरणें**—अक्रि (व) कचरणें

**टचाई**—स्त्री महागाई दुर्मिळता, तगचाई पहा

**टटणी**—स्त्री घाणेरी, एक वनस्पति फूलझाड

**टटारणें**—सक्रि ताठणें (अंग इ०) तगटणें पहा [ताठर]

**टटोरी**—स्त्री १ (कों) धान्यानें भरलेलें घोसदार कणीस 'टगोरीस शेतें आलीं होतीं परतु पाऊस जाताच त्याच्या टगोऱ्या आवळल्या.' २ (सुण) अन्न किंवा श्वासनलिका, अन्नमार्ग [स टगी=एक भाग ? स?]

**टण**—वि १ कठिण, दृढ, भरीव, निबर, कडक २ (ल) तगडा, मजबूत, कणखर, बळकट 'टणक धाकुटीं। अवघीं सरतीं विठ्ठलीं।' —तुगा १५५ ३ खणखणीत, खडखडीत, निरोगी ४ प्रचंड, मोठा, स्थूल गंभीर 'ऐसा टणकु सिंहनादु।' —गीता १ ७५५. [ध्व]

**टणक, टणकारा, टणकभाग**—पु श्रमामुळें आलेला थकवा, शीण, भागवटा, बेजारपणा (क्रि० येणें) 'आता आहर असे टणक। निद्राकरी उगाची।' —भवि १२ १८ [टणक] **टण कणें, टणकारणें, टणकणें भागणें**—अक्रि पुष्कळ श्रमानें ग्लानी येणें, थकणें, दमणें, श्रमी होणें, शीण येणें

**टणकणें**—अक्रि १ (बायकी) फुरफुरणें, नकार करणें, फुर गटणें २ हिरमुसी होणें, दुर्मुखणें

**टण-कन-कर- दिनीं-दिशीं**—क्रिवि. टणक पदार्थास लागून मागें उसळलेल्या गोटी इ०च्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन, धनुष्याच्या टणत्कारासारखा, (उडया मारणें, नाचणें, बागडणें धुडपूस घालणें इ० क्रिया जोरदारपणें दर्शविण्यासाठींहि त्या त्या क्रियापदावरोबर हें क्रियाविशेषण योजतात) [ध्व]

**टणका**—वि टणक (-वि) पहा **टणकाई**—स्त्री १ काठिण्य, दृढता, घनता २ कणखरपणा, धष्टेपणा

**टणका, टणकारा**—पु १ विंचवाच्या नांगीचा टणकारा, दश, फणकारा (क्रि० मारणें) २ (ल) टोमणा, मर्मभेदक भाषण, व्याजोक्ति, व्यंगोक्ति, खोंचदार भाषण (क्रि० मारणें, मारून जाणें) [ध्व]

**टणका(रका)रणें**—सक्रि धनुष्याची दोरी वाजविणें 'टण् कारोनि धनुष्यही लवणी व्याधें मृगी मेरली।' —आनंदतनय, मृगीचरित्र ५ १७ [ध्व टणत्कार]

**टणटण-टणा**—क्रिवि टणकन-कर-दिनीं इ० पहा [ध्व] ०उडणें-चोलणें-टोमणा मारणें, खोंचदार उत्तर देणें, रागानें फाडफाड बोलणें इ० **टणटणणें**-अक्रि १ उडणें व उडी खाणें (चेंडूनें, उडया मारीत चालणें २ टोमणा मारणें, खोंचदार प्रत्युत्तर देणें ३ तणतणणें, अतिशय रागावणें, फार ताणणें

**टणटणीत**—वि १ तणतणीत तुटेपर्यंत ताणलेला २ शरी रानें अत्यंत सुदृढ व ठुणठुणीत

**टणत्कार**—पु टकार पहा [सं ध्व]

**टणाटण-णां टणाणा**—क्रिवि टणटण पहा (जोरदाररूप)

**टणु-णू-णू**—पुन आघातानें डोकें किंवा कपाळ यास आलेलें टेंगूळ 'कपाळास लागून टणु आलें' —रामदासी भाग १५ पृ ११८ [ध्व]

**टण्णा-न्ना**—पु योनी, चूत, स्त्रीजननेंद्रिय [ सिं टणो ]
**टनूचनू**—वि (व ) व्यवस्थित, ठाकठीक [ इ टॉप ]
**टनस**—पु (व ) ताठा, अहंकार
**टप**—पु १ चेंडूची उशी, उसळी २ खेळण्याची मोठी गोटी [ ध्व ]
**टप**—पु १ तंबूचें आच्छादन 'खाललें टप, आतलें टप, वरले टप' २ गाडीचें वरील आच्छादन, तट्ट्या [ इ टॉप ]
**टपकं**—वि टपोरें 'झाड झपक फूल टपक' —मसाप ४ ४ २५२
**टपकणें**—अकि १ थेंब थेंब पडणें, गळणें, झरणें [ ध्व ] २ (व ) येणें [ ध्व ]
**टप-कन-कर-दिनी-दिशीं**—क्रिवि १ टप् असा आवाज करून २ निमिषात क्षणात, फट्कन, चपकन [ ध्व ]
**टपकळ**—वि १ भरींव, भरपूर, मोठें व चांगलें भक्कम, ठळक, ठाकठ २ स्वच्छ, स्पष्ट, पूर्ण, पुरेपूर उठावदार ( खूण, अक्षर )
**टपका**—पु १ टपकत पडणारा पाण्याचा थेंब २ (ल ) एकसारखी गळती; झरणी ( पाऊस, फळें, साथींत मरणारीं माणसें किंवा जनावरें यांची ) (क्रि० लावणें) ३ ठपका, दोषारोप, डाग, आक्षेप, कालिमा ४ विड्याचें पिकलेलें पान [ ध्व ]
**टपकाळ दाणा सोडणें**—क्रि (व ) पेरताना वतानें जमिनींत दाणा सोडणें
**टपटप-टपां**—क्रिवि १टपकन पहा २ जलद क्षणात, झट क्यात [ ध्व ]
**टॅपटॅप**—वि (गो ) घाबरा, घाबरट
**टपणी**—स्त्री दक्षतेनें (दबा धरून) वाट पहात बसणें, जपणी, टेहळणी, पहारा [ टपणें ]
**टपणें**—अकि लपून लाऊन स्वस्थपणें वाट पहात बसणें, दबा धरून बसणें, टेहळणी करणें, जपत राहणें, संधि साधण्यासाठीं जपून बसणें 'ते अन्योन्यवधातें शस्त्रास्त्रगतिप्रवीणही टपती।' —मोकर्ण १० १५ [ हिं टपना ]
**टपराण**—न (कु ) टपर टपरा बोल, दोषारोप
**टपऱ्या**—वि १ (व ) हलकट २ दरिद्री ( डोक्यास टपर (फडकें ) बांधणारा यावरून ) 'ता फार टपऱ्या आहे'
**टपला**—पु चापट, चापटी, चपाटा थप्पड [ ध्व ]
**टपली**—स्त्री १ लाकडाची उडालेली टप्पी धपली सुरू लेल्या कातड्याची खपली (क्रि० निघणें, जाणें उडणें ) २ (ल ) तिरस्करणीय स्थिति अप्रतिष्ठा; सर्व प्रकारें मानखण्डना (क्रि० उडणें) नष्ट स्थिति थकावट दिसणारा (कामाराहीं कष्टासाठीं त्याचा गाठीं झालेला ) [ टपका-ली ] (क्रि० उडणें) **टपलेबाजी**—स्त्री थप्पडबाजी; चापटपोळी चारणें; सरपूस मार (क्रि० करणें, खाणें) घरो. ३ ५८

**टपाटप-पां**—क्रिवि टपटप-टपा पहा
**टपार**—स्त्री (हेट नाविक ) गलबतास पावसाची किंवा समुद्राच्या पाण्याची झड लागू नये म्हणून दोहों बाजूस बांधाव याची लाकडी साटी [ टप ]
**टपा(प्पा)ल**—न १ डाकघर २ डाक, पत्रें इ० [ टप्पा ] ०हंशील—न टपालानें पाठविण्यास तिकिटें इ० रुपानें लागणारा खर्च [ टपाल+हशील ]
**टपाला**—न घोड्याचा एक रंग —अश्वप १ २८
**टपूर**—पु धष्टपुष्ट मेंढा
**टपू(पो)र-रा**—पु काठीचा तडाखा टकोरा पहा (क्रि० मारणें) —वि. मोठा, मोठ्या आकाराचा, इतरांपेक्षा मोठा, पुष्कळा मध्यें मोठा
**टप्प-कन-कर-दिशीं**—टप-कन इ० पहा
**टप्पर**—न (व ) झाकण, पत्रा [ टप ]
**टप्पल**—न १ कणावरील खपरी (क्रि० उडणें, निघणें) २ (ल व शब्दश ) सर्वस्व जाणें चामडें निघणें 'माझें सचा खालीं-त्यामुळें—घर बांधण्यामध्यें—टप्पल उडालें किंवा निघालें'
**टप्पा**—पु १ (गायन ) एक चीज मियां शौरी यानें ही चीज तयार केली हिचा विषय शृंगार काफी, खमाज, भैरवी इ० रागात बहुधा ही वापरतात हींत तानबाजी फार लागते. २ (ताल ) यात १२ मात्रा व ४ विभाग असतात
**टप्पा**—पु १ चेंडू, बाण बंदुकीची गोळी यांच्या माऱ्याचें अंतर, पल्ला, मर्यादा २ अंतर दोन स्थानांतील—गावांतील अंतर 'त्या गावास दहा कोसाचा टप्पा आहे' ३ विसाव्याची किंवा थांबण्याची जागा, विशेषत डाक पोचविणारे धावते नोकर किंवा हमाल अथवा घोडे यांची अदलाबदल होते ती जागा, टेवलेली डाक टकडीवरील, घाटामधील विश्रांतीचें ठिकाण किंवा चढ, जिन्यावरील मधली थांबण्याची आडवी जागा ६ चेंडूची उशी ७ शिवण्याची एक तऱ्हा ८ (ल ) प्रवाह आघ आगेका, कक्षा ( भाषण, मन धारणाशक्ति यांचा ) 'जसजसें वर जावें तसतसा पृथ्वीचा अधिकअधिक भाग नजरेच्या टप्प्यात येतो' ९ दशविभाग धरा ( मोठें शहर व त्याभोंवतील भोंवतालची खेडीं मिळून) दस पहा ११ (बांध काम ) जई पहा (इ ) ऑफसेट [ का टप्पा अर्थ ] ०खाऊन येणें—१ मध्यें खालीं पडून पुन्हा उसळून पुढें जाणें उशी घेणें ( चेंडू इ० ) २ (ल ) तावडतोब परत येणें ( दूत निरोप्या ) ३ गमतगमत मध्यें विसावा खाऊन येणें ०मारणें—१ धावत विसावा घेणें ( बोलताना, वाचताना ) २ टप्पा खाऊन येणें पहा टप्प्यांत येणें=आटोक्यात आकलनशक्तींत येणें टप्पे लावणें—मुक्काम दर मुक्काम करणें ०गुजरा—

पु तोफाचा धमधमा, उचवटा. ' तटोतट टप्पेगुजरे बांधून . ' —मराभा १३

**टथ**—न १ लचट जस्ती भांडें २ पिंप [ इं.]

**टथकणें, टथका**—टपकणें, टपका पहा.

**टंथलणें, टम(मा)लणें**—उक्रि (ग्राम्य) संभोग करणें

**टथला**—पु तमला पहा

**टथुका, टथूक**—वि (ग्राम्य) मोटया आकाराचा, अजस्र, घेंड, धूड

**टंघु**—पु (व) १ माठें व वाटोळें बोर २ (ल) मोटया डोंडयाचें नाक, घोंड ' नाकाचा टंघू ' **टंघ्या**-पु (क) बेडुल

**टबोणा**—वि मोठा, मोटया आकाराचा, टपोरा पहा.

**टमका**—पु चापटी, थप्पड —मार [ ध्व टम ]

**टमकी, टमटम**—टिमकी, टिमटिम पहा

**टमटम**—स्त्री घोडयाची एक प्रकारची गाडी [ ध्व ] **०नगरी**—स्त्री १ प्रसिद्धि डांगोरा, गाजावाजा २ जेथें पुष्कळ गप्पीदास व चहाडखोर लोक राहतात तें गाव, गप्पांचें आगर **०राज्य**—न १ बेशिस्त, अव्यवस्थित कुटुंब, जमात, समाज २ गोंधळ, अव्यवस्था उदा० अजबजपुरी आणि टमटम राज्य

**टमटमीत**—वि टुमटुमीत पहा

**टर**—स्त्री १ फजीती, निंदा, मानहानि, निर्भर्त्सना, उपहास २ निंदास्पद स्थिति, टर (क्रि० उडविणें, करणें, उडणें, होणें) ३ (हिं) आग्रह, हट्ट —मनको

**टर**—स्त्री घुम, घरघर, करकर आवाज (भोंवरा, किरकिरें इ० चा)

**टरकणें**—उक्रि १ टर असा आवाज होईल अशा प्रकारें वस्त्र इ० फाडणें, तुकडे करणें २ चरकणें, भिणें ३ (ना) गुमारा दणें, त्याच पावलीं परतणें [ध्व टर, हिं टरकाना] **टरकन-कर-दिनीं-दिशीं**-क्रिवि टर असा फाटण्याच्या आवाजासारखा आवाज होऊन (क्रि० फाटणें, फाडणें) [ ध्व ]

**टरकमोहबत-मोबत**—स्त्री वरवर केलेली समजूत, सपादणी हांजीहाजी तोंडपुजा, लाघवी भाषण, खोटी किंवा पोकळ प्रीति

**टरकहाणी**—स्त्री कंटाळवाणी व त्रासदायक गोष्ट, भाषण, भाकडकथा, कटकट, टुरटुर, पिरपिर, भुणभुण

**टरका**—पु (राजा) अपानवायुध्वनि, पादण्याचा ढ असा आवाज पाद [ ध्व ]

**टरकांकडी**—स्त्री उन्हाळयात नदीच्या काठीं होणारी मोठी व लाल काकडी असें म्हणतात कीं पडवळ वराबरच असताना त्यात तवशाच्या बिया घालाव्या व पडवळ पिकल्यावर त्या बिया त्यातून काढून पेराव्या म्हणजे त्यापासून टरकाकडी उत्पन्न होते टरकाकडी पहा

**टरकाविणें**—उक्रि १ टर आवाज होईल असें फाडणें, तुकडे करणें २ (ल) कानउघाडणी करणें, रागावून किंवा रागानें बोलणें [ ध्व ]

**टरघाणी**—स्त्री मुलांचा एक खेळ, एका खांबावर एक आडवें लांकूड अडकविलेलें असून त्याच्या दोन टोकांना दोऱ्या बांधतात व त्यांना धरून दोन मुलें लोंबकळतात व तें आडवें लांकूड गरगर फिरवितात, तेव्हा टरटर असा आवाज होतो [ ध्व ]

**टरटर-रां, टरटरून**—क्रिवि वस्त्र टरकन फाडताना, कुजताना, गद्‌दु पादतांना, हगताना, पोळी इ० फुगताना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन तरतर पहा [ ध्व ]

**टरटरणें, टरारणें**—तरतरणें, तरारणें पहा

**टरपेन्टतेल, टरपेंटाईल-न**—न रंग कुटण्यासाठीं त्यांत वापरावयाचें देवदाराच्या झाडाचें एक तेल टारपीण तेल [ इं ]

**टरफ(फ)ल, टलफर, टर्फल**—न कवच, फोल, बाहेरची त्वचा, साल (पोफळ, बदाम, भुईमुग इ०ची), वाटाण्याची शेंग, चिंचेचें टोंदूक [ ध्व ]

**टरफूस, टरभोंवरा**—स्त्रीपु कानाशीं होणारी कटकट, किरकिर, त्रास, ओरड (क्रि० लावणें, मारणें, करणें) टुरफूस असेंहि रूप आढळतें [ टर ध्व ]

**टरबूज**—पुन तरबूज, कलिंगड [ फा तर्बुझ् ]

**टरंव टरव, टरांव टरांव टरौंव टरौंव**—क्रिवि बेडकांच्या ओरडण्याच्या आवाजाचें अनुकरणकरून [ ध्व ]

**टरळी**—स्त्री नाला, पाट, खंदक, मोरी, गटार, चर, खळी, पाळी

**टराटर-रा, टरारां, टरारून**—क्रिवि टरटर-रां पहा

**टरारणें**—अक्रि उत्तेजित होणें तरारणें पहा

**टरु**—न (राजा) भग, छिणा, वधिर जागा

**टर्न**—पु (छापखाना) कंपोज करतांना केसीच्या घरातील एखादें अक्षर संपल्यावर, त्या अक्षराच्या जागीं दुसरा एकादा उलटा टाईप (अक्षराची बाजू खालीं करून) टाकतात तो [ इं ]

**टर्रेबाज**—वि (ना) मुजोर, दांडगा [ ध्व टर+बाज ]

**टर्रेबाजी**—स्त्री (ना) मुजोरी, दांडगाई [ हिं ]

**टल्ला**—पु चक्कर, फेरी, फेरा [ हिं ] **टल्लेनविशी**-स्त्री (ना) रिकामटेकडेपणा [ हिं ]

**टल्लू**—वि ल्हान व जाड, टेंगणाठुसका

**टव**—पु (कासारी धंदा) पत्रा कापताना मध्यबिंदु काढण्याचें एक खिळ्यासारखें हत्यार —बदलापूर ९६

**टवका**—पु (कु) कुसनाचें घर, भोक, खोवण

**टवका**—पु पृष्ठभागावरचा किंवा शरीराचा ल्हानसा तुकडा (शस्त्राघातानीं इ० निघालेला) टोंका पहा

**टवकारणें**—अक्रि आश्चर्यें किंवा रागादिकानें मनुष्यानें डोळे व पशूनें कान ताठ करून एखाद्याकडे पाहणें, डोळे वगारून बघणें 'ऐकता मुरलीचा स्वर। गाई टवकारल्या समग्र।'—हवि १३ ४१

**टवक**—वि (गो) तुडुंब, भरपूर 'पॉट टवक भरा'

**टवंच**—न दु ख, त्रास, टोचणी 'कोणीहि टवच न देखे।' —ज्ञा १२ १८२

**टवचणें**—सक्रि कातडें काढणें [स, त्वच्]

**टवचळणें, टवचा, टवची**—टों मध्यें पहा

**टवटव**—स्त्री टवटवी, गोंडसपणा 'वरी टवटव अति बरवी।'—एभा ३ ३९० **टवटवणें**—अक्रि फुलणें, बहर येणें, ताजें दिसणें, खुलणें (फुलें, चेहरा) **टवटवा, टवटवीत**—वि प्रफुल्लित ताजा, ऐन उमेदींत आलेला, पाणीदार चेहेऱ्याचा, तेजस्वी 'मरणीं असे टवटवा।'—ज्ञा ८ २१० **टवटवी**—स्त्री प्रफुल्लता, तेज ताजेपणा, चेहेऱ्याची हुपारी, बहर

**टवणा-णी-णें**—स्त्री १ वजनी मापाबरोबरचें केली माप २ (कों राजा) वजनी पाच शेर मापाचा उभा तान्या —क्रिवि काठोकाठ, भरपूर (क्रि० भरणें, येणें)

**टवणें**—अक्रि (व) उतरणें, नरम होणें 'त्याचा ताप किंचित टवला आहे'

**टवरकी, टवरचाळ-चाळा**—स्त्रीपु उनाडटप्पूपणा, बदफैली, भटकेपणा, टवाळकी **टवरी**—वि भटक्या, उनाड, विषयी, बदफैली, उनाडटप्पू

**टवरा**—पु (कों) टवका, उडालेला तुकडा, विशेषत तोडलेला, फाडलेला इ० भाग

**टवसण**—वि (व) टणक, कडक 'म्हातारा बोलून टवसण आहे'

**टवळी**—स्त्री १ नारळाच्या करवटीचा काढलेला तुकडा, ढलपी २ ओलाण दिव्यामध्यें ज्या खोलगट तवकडींत तेल वात घालतात ती, पितळी पळी ३ डोक्याचा पुढचा भाग कपाळ ४ (बायकी टवाळ स्त्री) एक प्रकारचा शिवीचा शब्द ५ जोंधळा किंवा उस यातील एक प्रकारचें बाडगूळ [का टवळी] ०**अमावस्या-अवस**—स्त्री १ आषाढी अमावास्या, या दिवशीं टवळ्याची म्हणज दिव्याची पूजा करितात २ अभद्र किंवा अपशकुनी स्त्री

**टवळें-ळं**—न समई, दिवा किंवा पळीचें तोंड, चाडें (यात तेल व वात असते) 'हृदयटवळा दीपु।'—मुआदि १६ २१६ तुतारीचा टोंकाचा भाग सुनाळ्याचा, सर्पविरीच्या ढवीचा, कण्याचा अर्धा भाग, दुहरी शिंपीचें अर्ध, बांगीच्या आकाराचें मांसपाचें अर्ध, गोफणींत दगड ठेवावयाची जागा

**टवा**—पु डौल, टव

**टवाळ-ळ्या, टवाळ(ळी)खोर**—वि १ आळशी, उनाड, खोडकर, चाळे किंवा खोड्या करणारा, दुर्गुणानीं किंवा लुच्चेगिऱ्यानीं परिपूर्ण (मूल) २ नेहमीं निंदा करणारा, दोष काढणारा, निर्भर्त्सना, उपहास, चेष्टा करणारा, चटोर ३ लटकें, मिथ्या, निरर्थक 'तरी सार्डी म्हणे आघवें। टवाळ हें।'—ज्ञा १३ ८१०

**टवाळ, टवाळी, टवाळकी, टवाळगिरी**—स्त्री १ थट्टा, निंदा, उपहास, कुचेष्टा, नक्कल २ निरुद्योगी, स्वैर, त्रासदायक, खोडकर किंवा चहाटळपणाचें वर्तन किंवा वागणूक (मुलाची) ३ चटोरपणा [का टवळी]

**टवाळें**—न खोटेंपण, अवगुण, खोड्या, दोष, टवाळपणा 'ययाचीं टवाळें जाणें।'—शिशु ८६१

**टसर**—न एक प्रकारचें रेशमी जाड कापड [हिं स त्रसर]

**टहलणें, टहलता पाहरा**—टेहलणें इ० पहा

**टहळणी, टहळणें, टहळी, टहळ्या**—टेहळणी इ० पहा.

**टहारळ**—पु टाकळा, तरवटा या नावाची वनस्पति

**टहाळ**—पुन १ डहाळी, फांदी (झाडाची) २ लाख, वाटाणा, विशेषत हरभरा या द्विदल धान्याचें झुडुप [हिं]

**टहाळा-ळें**—पुन १ सपत्र ल्हान फांदी (झाडाची), डहाळी (झुडपाची तोडलेली) २ टहाळ अर्थ २ पहा

**टहाळी**—स्त्री ल्हान टहाळा टहाळा अर्थ १ पहा [हिं]

**टहू**—पु (व) मोठें बोर टट्टू पहा

**टळ-कण-कर दिशीं**—क्रिवि चकचकीत, लखलखीत, झळकन, चटदिशीं (दिसणें, रक्त निघणें, उसळणें, उडणें डोळ्यांत पाणी येणें) [ध्व]

**ट(त)ळका**—पु, बाबूची ल्हान चपटी हारगी, डाळी

**टळटळ, टळटळीत**—क्रिवि १ निखालस, चकचकीत, भर, ढळढळीत, उघड उघड हे जोरदार शब्द दोनप्रहर या अर्थाच्या शब्दाबरोबर योजतात भर दोनप्रहरच्या तेजानें युक्त 'टळटळीत दोनप्रहर किंवा दुपार झाली' 'टळटळित दुपारा जन्मला राम राणा।' २ क्वचित मध्यरात्र शब्दाबरोबरहि योजतात

**टळटळीत**—वि स्वच्छ, चकचकीत, मोठें आणि चकाकीत दिसणारें (अक्षर सुवर्ण, गर्द, मणि इ०) **टळटळणें**—दुपार मध्यान्ह होणें

**टळणें**—अक्रि १ जाणें, निघून जाणें, नाहींसें होणें (काळ, ऋतु, वक्त, दुःख) 'हे क्रियेचें न त्यजी त्याचे काळाग्नी भिडवितां सुनत टळें'—मोभीष्म ८.५५ २ पराङ्मुख होणें, न देणें पाळण्यास चुकणें, न जागणें (वचन शब्द इ०), अंतर पडणें ३ कलंडणें, कलणें (जहाज, नाव) ४ पडणें, टळणें 'टळली

गजहि न अन्य प्रेक्षक जे तेचि तेथवा पळती ।' –मोकर्ण ८ २२ म्ह० तळ जळे पीडा टळ

**टळोटळो**—न दुपारचें कडकडीत ऊन्ह किंवा प्रकाश, मध्यान्ह काल ' दुपार टळोटळा करती ' –क्रिवि दणदणीत, टळ टळीत चकचकीत किरणांनीं युक्त एकसारखा तेवत किंवा तळपत असणारा ( सूर्यप्रकाश, प्रदीप्त आग ). [ ध्व ]

**टाईप**—पु १ अक्षर वगैरेचा शिसें इ० धातूचा ठसा, खिळा २ नमुना ०**रायटर**–पु अक्षराच्या ठशाचें यंत्र टकयंत्र [ इं ]

**टाईम**—पु वेळ, काळ [ इं ]

**टाऊक**—न टावकें, आकस्मिक लाभ किंवा फायदा, घबाड, प्राप्ति

**टांक**—पु १ एक तोळ्याचें ( एकबहात्तरांश पक्का शेर ) वजन ९ मासाचें किंवा ४ मासाचें वजन 'तुका म्हणे घालू खडीमध्यें टांक।' –तुगा ३८७० ( सामा ) थोडीशी दारू २ लेखणीचें चिरलेलें टोंक त्या टोंकभर शाई ३ धातूच्या पत्र्यावरील देवतेचा ठसा यावरून (ल) एखाद्या समारंभाला अवश्य बोलावणें केलें पाहिजे असा प्रतिष्ठित माणूस ' जेथें चंद्रसूर्याचा टाक न पडे ।' –सिसं २ ३३ ४ ( काव्य ) एक रुपाया, कोणतेंहि चादीचें नाणें पडती बहुवस टाक ।' –ज्ञा ७ २५ ५ ( ल ) लेख ' अजूनपर्यंत एक टांक तरी ओढला आहेस ! ' ६ टाकी, छिनी ७ निब लावलेली अलीकडील प्रकारची एक लेखणी, ( कु ) बोरू ८ ( व ) टाच ' टाकेला कागद रुतला ' ९ ( गो ) खर्च करण्याची शक्ति ' पांच हजार हुडा देण्याची मला टाक नाहीं ' १० ( गो ) दगडासारखी घट्ट जमीन ११ ( व ) वाढ १२ एका जातीचा आंबा –स्त्री बरोबरी, समानधर्म ' हा आठ रुपयाचा धोतरजोडा आहे परंतु बारा रुपयाचे जोडयाची टाक टाकतो ' –वि कोरडा ठणठणीत (नदी तळें इ०). [ टंक ] ( वाप्र ) ०**गुंतणें**–हातचा लेख देऊन वचनास बांधून घेणें ०**मारणें**=लिखाण्यास घेणें, वसणें **टाकानें** ( **लेखणीच्या टाकानें** ) **गळा कापणें**=कुसल्या लिहीण्यानें दुसऱ्याचा नाश करणें म्ह० टाका आगळें लिहावें घासा उणें जेवावें

**टांकवें**—क्रि ( गो ) ऐपत असणें

**टाकटाक बोलणें**—क्रि ( व ) जरीस येणें

**टा(टां)कण**—पु १ ल्हान जातीचा घोडा २ ( कु ) नक्षीकामाचें एक सुनारी हत्यार, डाकणी [ टंक हिं टांगहन ] **टाकणचाल**–टाकण घोडयाची चाल

**टाकणखार**—पु एक प्रकारचा खार याचे तेल्या चौकोना, खड्या असे प्रकार असून हा अपचन अग्निमांद्य त्वचेचे रोग यावर गुणकारी आहे मातीच्या भांड्यास चिल्हई देण्यास हा उप योगी आहे इं बोरॅक्स

**टांकणी**—स्त्री १ पखवाजाच्या शाईच्या पुडीबाहेरचा काठा जवळचा भाग, चाट २ ( हरकी ) ल्हान रोपली, उलटे पाच पाय असलेला ल्हान नांगर [ टाकणें ]

**टाकणें**—सक्रि १ फेकणें उधळणें, हरवणें पाडणें काढणें काढून टाकणें दूर करणें, घालवणें २ सोडून देणें, त्याग करणें, अंगाबाहेर लोटणें स्वीकार न करणें, टेवणें, घेऊन न जाणें, वर्ज्य करणें ३ (बिछाईत इ०) पसरणें, घालणें ४ हवाली करणें, सोंपविणें अवलंबून ठेवणें ( उद्योग, ओझें, विश्वास ), दुसऱ्यावर विसंबणें, दुसऱ्यासाठीं ठेवणें ' ' हा त्याजवर टाकतो, तो त्याजवर, तो तिसऱ्यावर, या प्रमाणें ते बोलताहेत ' ५ पैज मारणें, पणास लावणें ६ फेंकणें पेरणें ( बीं ), कणीस येणें कोंब येणें वर काढणें, न घेणें ( थान ), भरधाव सोडणें ( घोडा ) हात टाकणें, मारणें अंग ( मास ) कृश, रोड होणें, उडी घालणें ' टाकू या भितरीं अग्नीमाजी ।' –तुगा १११८ ७ आकलन होणें, आवाक्यात येणें 'तें माझिये अल्पमतिसि । कवी टाके ।' –शिपु २ २८ ३७ ८ मिळणें, पावणें घडणें टाकणें हें क्रियापद घालणें, टेवणें या क्रियापदाप्रमाणें व्यापक अर्थानें तसेंच निरनिराळ्या प्रकारांनीं वापरण्यात येतें ठेवणें पहा या टाकणें क्रियापदापूर्वी अनिश्चिततादर्शक प्रत्यय, ऊन प्रत्यय, भूतकालवाचक धातुसाधित असल्यास त्याचा अर्थ चालू असलेल्या गोष्टीची पूर्णता दर्शवितो उदा० मारून टाकणें=ठार मारणें पाडून टाकणें=पार पाडणें रापशील फेकणें तसेंच खाऊन, देऊन टाकणें–लिहून–पिऊन टाकणें इ० ( वाप्र ) ( एखाद्याशीं ) **टाक टाकणें**–स्पर्धा किंवा बरोबरी करणें **टाकणें टाकणें**– औपचारिक ( मनापासून नव्हे अशी ) गोष्ट करणें फुकट नमस्कार करणें, वरवरचा दयावा करणें ( बोलावणें, भेटणें इ० चा ), मान किंवा मैत्री नसेल तथें कोरडा आदर करणें ' मी भोजनास जात नाहीं हे त्याला ठाऊक आहे परंतु तो उगीच टाकणें टाकायाला आला आहे ' २ टाक टाकणें पहा **टाकला**–निश्चित, कायम, हमखास ' रोग्याला भात नाहीं टाकला उतार ' ' या घोड्याचे टाकले शंभर रुपये यतील ' ' हा टाकला कळवतिणीच घरीं असतो ' **टाकलेला**–निश्चितपणें ठेवलेला, खात्रीचा, खरोखर अवश्य नहमीं नियमित ठवलेला असा ' डोंगरावर टाकलेला पाऊस असतो ' **टाकला–टाकून येणें**–फेकल्यासारखा नमका येणें, वरचेवर, नेहमी येणें ' त्याच्या घरीं पाहुणा टाकला–टाकून यतो ' **टाकला डाव पडणें**–( फाशातील दानावरून ) मनात योजलेली गोष्ट हटकून घडून येणें **टाकला रोजगार–उदीम–व्यापार**–एखाद्यावर सोंपविलेला, लादलेला व्यापार इ० **टाकलें अन्न–जेवण**–न चुकतां मिळावयाचें जेवण **टाकली किंमत**–आपण सांगितलेली व तावडतोब मिळालेली किंमत **टाकली गांठ पडणें–भेट घेणें**–खात्रीनें भेटणें, जरूरीच्या

कामासाठीं भेट घेणें **टाकून बोलणें**—तिरस्कारानें, तोडून बोलणें, खरडपट्टी काढणें [स त्यज्=सोडणें]

**टांकणें**—सक्रि.पुन्हा टांकी लावणें, जात्याचे गारीचे ठोके पुन्हा उजरणें, पहिल्यानेंच टांकी लावणें [स टक]

**टाकतोर**—अ (व) पर्यंत [टाकणें+तोंवर]

**टाकभाडें**—न जुमतें पोंचविण्याबद्दलचें, वाहतुकीचें भाडें [टाकणें+भाडें] **टाकभाड्याचें काम**=मोलाचें, हमालीचें, मनापासून न केलेलें काम

**टाकमटिका, टाकमटिकला, टाकमटिळा, टाकम टीक**—पु वेणीफणी, नटापट, टिळाटोपी, चटीपटी, चापचोपी, छानछुकी, डामडौल, सुरेखपणा, नखरा, डौल 'व्यभिचारीचा टाकमटिका। उपहास होती लोका।' –तुगा १७५९ [टिकला, टिळा द्वि]

**टाकलेली**—वि (बायको) परित्यक्ता, पतीकडून अवहेलना केलेली किंवा पत्नीधर्मानें न वागणारी (स्त्री) [टाकणें]

**टाकवणा**—वि (राजा.) फेकून देण्याच्या योग्यतेचा, गाळ साळ, रद्दड [टाकणें]

**टा(टां)कसाळ**—स्त्री नाणीं पाडण्याचा कारखाना [स टंक शाला] **०धर**—पु. झिजलेलें, ठोकलेलें, कापलेलें व म्हणून पुन्हा नवीन पाडण्याकरता टाकसाळींत परत आलेलें नाणें **टा(टां)कसाळी**—स्त्री टाकसाळीवर बसविलेला कर –वि. टाकसाळींत तयार झालेलें किंवा टाकसाळीसंबधीं (नाणें, मजूर) **टांकसाळ्या**—पु टाकसाळीवरील मुख्य अधिकारी

**टाक(के)साळ**—न. (कु) भाताची एक जात

**टाक(कु)ळणें**—अक्रि ताठरणें, भारावणें, दमणें, ताटकळणें, थकणें, श्रमणें (जागरणानें किंवा फार वाचण्यानें डोळे)

**टा(टां)कळा-ळी**—पु एक लहान झुडप याच्या पाल्याची भाजी औषधासाठी उपयोगी आहे अगावर बिब्बा उतल्यास याचा रस लावतात बियांची भाजून काफी करितात

**टांकलें**—न भातानील एक जात.

**टाका**—पु (माळवी) टरेला, उराविक कर

**टा(टां)का**—पु (शिवणकाम) १ टाचा, बंध (वस्त्र पत्रा वगैरे स दिलेला) २ (ल) शरीराचा सांधा-विशेषत पाठीचा मणका ३ मेकाडा (पिकावरील एक रोग) [स टक्=बांधणें] **०चालता होणें**– एखाद्या कामात प्रवेश होणें, मिळणें, चलती होणें, चतुप्रवेश करणें, काम सुरू होणें **टांके ढील-ढिले-करणें**–सांधे ढिले करणें, सपादून मारणें अतिशय काबाडकष्ट करणें **टांके-ढील-होणें**–१ सांधे निखळणें २ (ल) अत्यंत काम पडणें, ररपूस मार खाणें, फार काम पडल्यानें थकणें इ०.

**टाँकां**—पु १ (गो) लहान टोपली २ (गो) रानटी लोकांचें पकान

**टाकाऊ**—वि रद्दड, टाकून देण्यास योग्य [टाकणें]

**टाकाटाकी**—टाकोटाक पहा

**टाकारी**—पु टकारी, दगडी जात्यास टांकी देणारा [टक]

**टांकारी पिंजारी**–पु गरीब, दुबळ, हलका, नीच, भिन्ना माणूस

**टांकारी**—पु एक पक्षी

**टाकिणें, टाकिजणें**—सक्रि पावणें, गवसणें 'शेवीं टाकिजे काशी।' –ऋ १९.

**टा(टां)की**—स्त्री १ पाण्याचा हौद, टाकें, हाळ २ गुराचा पाणी पिण्याचा हौद, दोण. ३ पाथरवटाचें हत्यार, छिणी ४ जात्याला टांकीनें मारलेला ठोका, ठोके, गेंचे ५ग्यासबत्तीमधील, स्टोव्हमधील राकेल ठेवण्याची जागा [स टक्=बांधणें] (वाप्र) **टांकीचें तोंड, तोंडास टांकी दिलेली**=देवीचे वण असलेलें तोंड **०लागणें**=चतुप्रवेश होणें, मार्ग सापडणें. **०चालणें**=इलाज चालणें, क्रम चालविणें कोणताहि उद्योग, धंदा, कार्य चालू स्थितींत असणें **म्ह०** टाकीचे घाव सोसल्याविना देवपण येत नाहीं =कष्ट केल्याखेरीज थोरपण नाहीं.

**टाकी**—स्त्री १ कृति, आवड, आनेका २ (कर) तबल्याच्या शाईची कड ३ (तबल्याच्या) चाटीवर बोटानें काढलेला, होणारा मधुर ध्वनि [टक]

**टाकी**—स्त्री (ना) गंजिफाचे, पत्त्याचे खेळात प्रथम पान टाकण्याची पाळी [टाकणें]

**टाकु(को)लें**—न मस्तकाच्या कवटीचा पुढला भाग, टकुरें; टकोरें

**टाकुळणें**—टाकळणें पहा

**टाकें**—न खरबुजावरील एक रोग, अती थंडीनें वेल पांढरे पडतात असा रोग –कृषि ५७३

**टा(टां)कें**—न १ पाण्याचा हौद, टाकी, तळें २ (वो) मर्यादा दाखविण्यासाठीं खडपात पाडलेलें भोंक. [स टक्=बांधणें]

**टाकेकरी**—पु टाकारी टांकीनें जात्यास टांकी देणारा. (गो) टाकोर [टाकी+करी]

**टाकोटाक, टाकाटाक**—क्रिवि १ पाठोपाठ, मागोमाग, २ बरोबर, प्रमाणशीर, मापाबरोबर, गरजेपुरता, पुरेपूर; तंतोतंत ३ तावडतोब, झकिनें, एकामागून एक, अतिशय त्वरेनें 'तरी नाटोपे श्रीरंग। गवोटाकीं जानसे।' –मुसभा १५ १८७ [टाकणें]

**टाकोटाकी**—क्रिवि टाकता टाकता –शर

**टाक्तोर**—अ (व) पर्यंत, पावेतों, टाक्तोर. 'संध्याकाळ टाक्तोर'

**टांग, टांगडी**—स्त्री १ (अवहेलनेनें) तंगडी, पाय 'टांग धरूनिया गगनीं' –कुशलवाख्यान ३८ (मराठी पाचवें पुस्तक पृ ११५ 'छेदू कुंभकर्णाचें टांग।' –भारा बाल ५ १७ ढिरी पासून पावलापर्यंतचा पाय २ विशेषत ढेंग, दोन पाय जमीनीवर एकापुढें एक ताणून टाकले असता दोन पायांच्यामध्यें राहणारें अंतर 'टांगा टाकून शेत मोजलें' [स टंगा] **०बांधणें**–एखाद्याचें गुह्य समजून घेऊन त्यावर वरचष्मा मिळविणें **०तिरपणें**-१ (ग्राम्य) रम करणें २ आघोळ करणें **०मारणें**–१ (कुस्ती) पायावर लात मारून पाडणें २ फसविणें **टांगड्या तोडणें**–पायपिटी करणें **टांगेखालून जाणें**–हार जाणें, परामूत होणें, नम्र होणें **म्ह०** ज्याच्या टांगड्या त्याच्याच गळ्यात घालणें=एखाद्यास स्वत च्याच बोलण्यात पकडणें

**टांगणें**—सक्रि लोंबकळणें, लोंबविणें, लटकाविणें, अधांतरीं ठेवणें, अडकविणें **गळा टांगणें**–१ (गायन) स्वर विवक्षित अवधीपर्यंत मोठ्या श्रमानें पोंचणें २ **जीव टांगणें**–अंत करण ओढलें जाणें [स टंकण, हिं टांगना]

**टांगरा**—पु (कु) खुजा बैल

**टांगें, टांगूळ**—न दोरीला घट्ट पीळ बसण्यासाठीं व नंतर मारलेली गाठ आवळण्यासाठीं उपयोगात आणावयाची काठी, अशा तऱ्हेनें मारलेली गाठ [टांगणें]

**टांगल-गूल**—न (कु) मासे धरण्याचें मोठें जाळें वर ओढण्यासाठीं घेतलेला लहान दांडा

**टांगळ**—स्त्री (ग्राम्य) कसबीण राड –वि लाथ टांग्या, लाथा मारणारी (गाय)

**टांगा**—पु घोड्याची गाडी [टांगणें, हिं टांगा]

**टांगाटोळी**—स्त्री उचलबांगडी, हातपाय धरून उचलून नेणें [टांगणें]

**टांगें**—न १ (तिरस्कारार्थी) टांकुलें पहा 'प्रभुत्वें सारिणल कल्हणी। धनुर्वीति टांगें'–ॠ ६१ २ तंगडी 'काळाचें टांगें मोडिलें।' –दा ५ ९ ४१

**टा(टां)च**—स्त्री १ पायाची खोट २ घेणेकऱ्यानें किंवा सरकारानें घर इ० वर आणलेली जप्ती, हुकुमनाम्याची बजावणी [टंक] **उंच टाच करून चालणें, टाचेला माती (मळ) न लागू देणें**=गर्वपूर्वक व शुद्धाचरणानें वागणें, निरुपद्रवी व निष्कलंक असणें **टाचा घासणें**–तडफडणें, मरणसमयीं पाय झाडणें

**टां(टा)च**—स्त्री (व) रांग, एकसारखी ओळ, प्रवाह 'पत्राची तर टाच लागली'

**टाचकळ**—स्त्री टाचळा पहा

**टा(टां)चण**—न. १ नोंद करून, लिहून ठेवलेला मजकूर, अशा मजकुराचा कागद, टिप्पणी, टिप्पण, यादी, मजकूर लिहिण्याचा व्यापार २ स्मरणार्थ वही [टाचणें]

**टा(टां)चणी**—स्त्री १ टाचण अर्थ १ पहा २ कागद एकत्र टाचण्याची बिन नेढ्याची व माथें असलेली लहान सुई ३ उणीव, कमतरता, संकोच, टंचाई 'न करा टाचणी। येथें कांहीं आडचणी।' –तुगा २५४८ ४ दुर्दशा 'करावें स्वरूपतेमाजी स्थिरू। तंव तो टांचणीचा उतारू।' –एभा २० १८२. [टाचणें]

**टा(टां)चणें**—सक्रि १ अधर अधर शिवणें, टांचे देणें २ टाचण लिहिणें, टिपून ठेवणें, उतरून ठेवणें, नमूद करणें ३ टंचाई पडणें –शर [स टङ्क्=बांधणें]

**टांचरा**—स्त्री टाच 'टाचराच्या कुच्या मारा वेगीं।'–तुगा २९५१

**टा(टां)चरूं**—न १ टाचेला झालेलें गळू, गाठ २ टाच, टाचरा

**टाचलांडा**—पु (व) आखूड (गुडघ्यापर्यंत) शेपटी असलेला बैल

**टा(टां)चळणें-चाळणें**—सक्रि १ जनावरानें जलद चालावें म्हणून त्याला टाचेनें प्रहार करणें, टाच मारणें 'घोड्याला टाच देऊन चालू लागला' –कोरकि ४७८ २ (ल) चेतविणें, नेट लावणें, आग्रहानें प्रवृत्त करणें [टाच]

**टा(टां)चा, टाचका-गा, टाचें, टाचकें**—वि १ अपुरतें, लहान, तोकडें (वस्त्र इ०) 'याचें हृदय पहातां विपुल म्हणति कवि तथापि नभ टाचें।' –मोभीष्म ११३ थोडा, अल्प 'झाले प्राप्त विपुलगुण सुत तत्सबधयोग परि टाचा।'–मोअनु ६ १४ २ अरुंद, कमी घोळाचा

**टा(टां)चा**—पु टाका, शिवण (क्रि० मारणें, देणें, घेणें) **जिभेस-पोटास-टाचा देणें**–बोलणें आवरून धरणें, खावयास न मिळणें, पोटास चिमटा घेणें

**टाचें**—न टंचाई –शर

**टाचेचें फाळीज**—न १ मेहुणा, बायकोचा भाऊ (पायाच्या टाचेला जसें टोंचणें सहन होत नाहीं तसें बायकोच्या भावाला वाकडें बोललेलें तिला सहन होत नाहीं यावरून) २ अतिशय आवडती बायको ३ (ल) अतिशय आवडतें माणूस, प्रियपात्र, प्यारी वस्तु, जिवाचा कलिजा

**टाटाळ(व)णें**—सक्रि १ करकचून बांधणें 'टाटाओनी बांधा वहिला।' –शिशु १३१. २ (कों) तोडणें फाडणें, कापणें (केळीचें पान–हातानीं) [ध्व]

**टांटूं**—न. टाटू पहा [ध्व]

**टा(टां)टोळा**—पु १ (कों) केळीच्या पानाचा दांडा २ जोंधळा किंवा बाजरीचें धाट

**टाट्या**—पु (कों.) लहान रेडा, टोणगा

**टाण, टाणणें, टाणा, टाणाटाण**—(राजा.) ताण इ० पहा

**टाणकोल**—पु (वे ) (विणकाम) कापडाच्या मागावरील ताण्याला ताण बसण्यासाठीं शेवटीं वापरावयाचा तीरकमठा. [टाण= ताण+का कोलु=लाकूड, काठी ]

**टाण येणें**—क्रि (कर ) अंगात जोर येणें.

**टाणाटोणा**—पु १ जादुगिरी, मंत्रतंत्र, जारणमारण 'केले टाणेटोणे सारी।' –पला ९७ २ अर्धवट ज्ञान, तुटपुंजें ज्ञान, प्रत्येक विषयातील थोडथोडी माहिती, निरडक वेंचे (ग्रंथातील) [ हिं ]

**टाणें**—पु योग्य वेळ, प्रसंग, समय, वख्त, पक्वदशा, मोसम

**टानकूल**—न (विणकाम) वईच्या पेढ्यांत अडकावून त्याचे पेले पाडण्याचें लाकडी दोन हात लांब असलेलें साधन

**टा(टां)प**—स्त्री १ घोड्याच्या पुढील पायाचा होणारा टप्टप् असा आघात, घोड्यानें मागील पायानें मारलेली लाथ, त्याचा तळ पाय (क्रि० मारणें) २ बोटाच्या पेऱ्यानीं डोक्यावर मारलेली टिचरी (क्रि०मारणें) ३ मर्मभेदक टीका, टोमणा, निर्भर्त्सना (क्रि० मारणें) ४ छाट, तासगी (क्रि० मारणें। ५ आई जवळ नसताना लहान मुलानें घेतलेली रात, ध्यास, तळमळ. (क्रि० करणें, घेणें) ६ भाजीचें लहान झाड, तशा झाडाचा खुंटलेला अग्रभाग ७ –पु लेखात खुणेसाठीं केलेलें रेषारूप चिन्ह ८ (वि) (वहाण, जोडा यांचें) टांचेचें कापून तयार केलेलें कातडें **टापे(फे)खालीं असणें-चालणें-राहणें-वागणें**–एखाद्याच्या हुकुमात, ताब्यात असणें

**टापटीप**—स्त्री १ घासणें, चापूनचोपून नीट करणें, थाप टणें, थोपटणें २ नीटनेटकेपणा, सुव्यवस्था, रेखलेपणा, बेतबात, ठाकठिकी ३ –क्रिवि टापासटीप [ टाप द्वि ]

**टापटेप**—पुअव (कों ) उचवटे, टेंकाडें, वारुळें, टेंकड्या [ टेप द्वि ]

**टांपण**—न (गो ) टोचण्याचें आयुध

**टापणें**—अक्रि (दगड इ०ची ) बाजू–साफ करणें

**टापर**—स्त्री १ घोड्यानें मारलेली लाथ (क्रि० मारणें) २ बोटाच्या पेऱ्यानीं डोक्यावर केलेला आघात (क्रि० मारणें) ३ डोईस बांधावयाचें फडकें, टापशी (क्रि० घालणें, घेणें) **टापरण, टापरा**–नपु (टापरणेंपासून) मर्मभेदक शब्द टोमणा, व्याजोक्ति, टोसा आघात (अपराध, उपकार, कृपा इ० सबधानें ) (क्रि० ठेवणें, टापरा मारणें ) ०**वाजणें**–(ना) दिवाळें निघणें, फडशा पडणें, सपणें

**टापर**—न (ना ) मोठें लाकडी घुगरू –वि (ना ) वड वड्या (मनुष्य) [ ध्व ]

**टापर**—न (व ) (कुत्सितार्थी ) तोंड

**टापरण**—स्त्री टापर अर्थ ३ पहा (क्रि० घालणें, घेणें) –न उपकाराचें ओझें

**टापरणें**—न मोगरी, हातोडी, मेखसू

**टाप(फ)रणें, डाप(फ)रणें**—उक्रि १ रागावणें, चवताळणें, ठेंकसणें, खरडपट्टी काढणें, टोमणा मारणें, दटावणें, दम देणें २ (घोड्यानें) जमीन टापानीं ठोकणें ३ मोगरीनें खुंटी इ० ठोकणें, आत घुसविणें ४ (ल ) कोणी यथेष्टपणें वागू नये म्हणून त्यास एखाद्या कामात गुतवणें ५ एखाद्याचे दात त्याच्याच घशात घालणें, ज्याच्या तगड्या त्याच्या गळ्यात घालणें

**टापरा**—पु मोगरी, लाकडी मोठा खुंटा

**टापरी**—स्त्री (हेट) ओझ्याखालीं घेण्याची चुंबळ, बुचडी

**टापरी-टी**—स्त्री १ टापर अर्थ ३ पहा (क्रि० बांधणें– डोकीस रुमाल, धोतर, पागोटें इ० कांवरून बांधण्याचा एक प्रकार) २ पाऊस लागू नये म्हणून डाईवर घेतलेली कांबळ्याची खोळ (क्रि० बांधणें) ३ (राजा ) टक्कर, ढुस्सी (क्रि० मारणें )

**टाप(पु)सणें**—अक्रि सुजणें, फुगीर होणें ( शरीर, अवयव )

**टापसा**—पु सूज, फुगवटी, फोफशा, फुगीर भाग

**टापासटीप**—क्रिवि पुरेपूर, भरपूर, मागणीस पुरेल इतकें, प्रसगानुरूप, बेतासबेत

**टापू**—पु १ बेट, चोन्ही बाजूनीं पाण्यानें वेढलेला प्रदेश २ प्रांत, देश ३ टप्पा, मजल [ टप्पा ]

**टापू**—न १ झुडपाचा कोंवळा देंठ, शेंडा, लहान झुडूप किंवा भाजी (खावयास उपयोगी), त्याचा कोंब २ हरभऱ्याचा टहाळा, दाणा, दाणे काढून घेतलेली शेंग किंवा असल्या पोकळ शेंगेचा समूह ४ हरभरा, तूर, वाटाणा, मसूर, हुलगा, करडई, कोंथिंबीर यांचें रोप किंवा गवत, चारा, कोणताहि चारा, गवत, ल्हाळें, हरळी, बाजरी किंवा जोंधळ्याचें ताट [ हिं ]

**टाफ**—स्त्री टाप अर्थ १ पहा **टाफेखालीं असणें**–टाप मध्यें पहा

**टाफर**—१ टापर पहा २ हनुवटी व कान यावरून घेऊन पागोट्यावर बांधलेलें वस्त्र, पट्टा

**टाफरण, टाफरणें, टाफरा, टापसा, टाफू(फूं)**–टाप इ० पहा

**टाफरें**—वि घोडा टाप टाकतो त्याप्रमाणें ठेंचाळत चालणारें 'गारोळे जामून टाफरें।' –दा ३ ६ ४२ [ टाप ]

**टामटूम**—स्त्री गाजावाजा, भपका, शोभा, थाटमाट, दिखाऊपणा, तमाशा, डौल करण्याचा प्रकार टाणाटोणा –क्रिवि नगाऱ्याच्या आवाजाप्रमाणें, ढमढम [ हिं ]

**टाय**—स्त्री (व ) १ बैलाच्या गळ्यातील घंटा (व ) २ कोंवळें हरभऱ्याचें झाड

**टायफळा**—(पु ) भाताची एक जात

**टायपर्ा**—न (गो ) भितीची एक बाजू

**टायर**—स्त्री मोटार किंवा सायकल यांची रबराची पोकळ धांव हिच्यांत हवा भरलेली रबराची पोकळ नळी असते [ इं ]

**टायिट्ट**—पु स्त्री. एक उंच झाड

**टार**—पु घोडा (घोड्याची, त्याचप्रमाणें नार, गार, सार म्हणजे पायको, ज्वाहीर, भूत यांची किंमत नेहमीं बदलते किंवा कल्पनेच्या बाहेर पडते, यावरून) **टार**—न हिंगण किंवा दमडी किंमतीचा व रोडका घोडा 'याहावया पोथी वृद्ध टार।' —एभा १८ ३४८ त्यावरून खोडकर मुलास म्हणतात —वि खोडकर, द्वाड, टारगट

**टारगट, टारगा**—वि. १ टोणगा, घुटका, लहान आवा राया, गुंडा २ आगाऊ, अपुरता (मोठ्या माणसाचें वगैरे इ०) ३ खोडकर, द्वाड, घगोर फाजील [स टारक] **टारगेपणा**—पु वात्रटपणा, घगोरपणा, छचोर—टारगट—पणा.

**टारफुला**—पु जोंधळा, ऊस या पिकांत उगवणारी एक वनस्पति ही दुसऱ्या झाडांत आपल्या मुळ्या खुपसून स्वतःचा निर्वाह करते व दुसऱ्या पिकाचा नाश करते

**टारलें**—न ओबडधोबड पाळणा

**टाराटु(टो)री**—स्त्री १ पोकळ धाक, व्यर्थ भीति, फुकट अरेरावी २ निष्फळ प्रयत्न, दुराटूर [ध्व ]

**टाल**—वि (नंद भाषा) पन्नास सख्या, ५०

**टाल**—पुन (ना व ) इमारतीचीं किंवा सरपणाचीं लाकडें मिळण्याचें दुकान [इं स्टॉल]

**टाल**—पु (ना )सबंध डोक्याची केलेली गुळगुळीत हजामत

**टालमटोला**—पु कार्य लावणीवर टाकण्याचा प्रकार, टाळा टाळ, टगळ मगळ, दिवसगत लावणें, थापा देऊन चालविणें [ हिं ]

**टाली**—स्त्री (मद्दई, सकत) आठ आणे, अधेली [ हिं ]

**टाव**—पु टाहो पहा

**टा(टॉ)वेल**—पु अंग पुसावयाचा पंचा, रुमाल [इं ]

**टा(टा)स**—वि टाम कटोर, कठिण, भरीव घट्ट, भरभक्कम

**टास**—न (कु नाविक) लहान ओहाळांतून खारें पाणी वाहणें

**टाहकळ-ळी, टहाटळ**—स्त्री टाकळा वनस्पति 'सीवणी टाहकळी वेंकळी।' —कालिकापुराण १२ १४

**टाह(हा)ळ, टाह(हा)ळा टाह(हा)ळी**—टहाळ इ० पहा

**टाही**—स्त्री लहान मुलाचें टयाहा टयाहा रडें (क्रि० मारणें, भरणें, घेणें) [ध्व ]

**टाहुवा**—पु आक्रोश टाहो 'तंव टाहुवा करीति चक्र वाकें।' —ऋ १८ [ध्व ]

**टाहूर**—न १ दारूचा गुत्ता २ (गो ) टावरन [इं टॅव्हर्न]

**टाहो**—पु १ (मोर, पगळा इ० ) कांहीं पक्ष्यांचें ओरडणें (त्यावरून) २ दीर्घ आक्रोश, रडें, ओरड (मूल इ० चें) (क्रि० फोडणें, घेणें); लगेच मूल उपजल्यानंतरचें पहिलें रडें, टयाहां टयाहां (क्रि० फोडणें) 'झाला पुसार अद्भुतरूप करी टाहा फोडी तो टाहो।' —मोसभा १ ८० ३ हंबरडा, मोठ्यानें हाक मारणें, घोष, गर्जना 'मुका करी टाहो। पाहा रघुनाथाचा माहो।' —तुगा २१४१ ४ जमिनींतून वाफा निघणें (क्रि० फुटणें) ५ लाभ [ध्व ]

**टाळ**—पु १ कांशाची पोकळ झांज, (क्रि० वाजविणें, कुटणें). 'टाळ आणिकेचि कुर्नी।' —रामदास, स्फुट अभंग मूर्खपणपंचक (नवनीत पृ १५८) २ (संगीत) ताल धरणें ३ (व ) बैलाच्या गळ्यांतील घंटा [स ताल, हिं टाळ] ॰वाजणें—रागा, चोटा रानील वस्तु सपणें (घोड्याचे) टाळ वाजणें—पायांत पाय अडकणें **टाळ, टहाळ**—क्रिवि (कुत्र) स्पष्ट, पूर्ण 'डोंगरा पल्याड आवाज मी टाळ ऐकला' ॰फ्या-फर-दिशीं—क्रिवि स्पष्टपणें, उघडपणें, स्वच्छ (दिसणें क्रियापदावरोबर उपयोग) ॰कुट्या-घाशा—वि १ (निंदार्थी) टाळ वाजविणारा, ढोंगानें भजन करणारा २ पायात पाय अडकून चालणारा (घोडा). [टाळ+कुटणें] ॰घोळ-पु झांजा वगैरे वाद्यांचा मोठा गजर [टाळ+घोळ=गोंधळ] ॰ध(धा)री-ऱ्या **टाळकरी**—वि झांज वाजविणारा [टाळ+धरणें] ॰बद्ध—वि तालांत असलेला, ठेक्यात बसविलेलें —क्रिवि (गायन ) योग्य तालावरील (गाणें) [स तालबद्ध] ॰सूर-पु योग्यकाल व आवाज 'हा टाळसुरांत गातो' [टाळ+सुर]

**टाळ**—पु (वे शेती ) नांगराच्या पानाप्रमाणें दिसणारें, दिंडांत बसविलेलें पाभरीचें फण प्रत्येकी

**टाळ**—पु (कुत्र) लाकडीचें लहान पिल्लु

**टाळ**—पु (व) भ्रम झालेल्या रोग्यास टाळूवर बांधण्याचा एक औषधी उपाय

**टाळ**—वि ज्याला मधोमध एक वर्तुळ असतें तें (मोती)

**टाळ**—वि (कु ) शुभाशुभ गोष्टींत त्याचालाटीं वावरणारा (माणूस)

**टाळ**—पु (राजा ) टहाळ, लहान फांदी

**टाळकें**—न १ (निंदार्थी) डोकें मस्तक, चोडकें, टकलें २ (कु ) टाळक्या [स तालकम्] ॰ठोकणें—१ मारणें, बड विणें २ (ल ) ताण सणें

**टाळणें**—सक्रि १ काढून टाकणें दूर करणें, नाहींसें करणें, चुकविणें बंद करणें (संकट, दु ख, त्रास, साथ) २ करमणूक करणें, झुलविणें, घालविणें रंजन करणें ३ लोटणें घालविणें (वेळ)

**टाळून, टाळणें**–मोकळें होणें, व्यवस्था करणें, विरणें [ हिं टालना, का टलॅमु=टाळणें ]

**टाळनसार**—वि ( मोंगलाई ) सुरस, नीटनेटका

**टाळभेकरा**—वि ( धु ) वेडसर, तर्कटी, चक्रम

**टाळमटोळा**—पु टालमटोला पहा

**टाळा**—पु १ ढम्लाढक्ल, टोलाटोली, पोकळ बढाई (क्रि० मारणें ) २ टाळणें, वारणें, परिहार, अडथळा, गुंगारा ( त्रास, उपद्रव, सकट याना ) 'तो निजगुरुसुत म्हणुनि न द परिभव दे तयासि कवि टाळा।' –मोभीष्म ६ ५७ **०टाळ-ळी**–स्त्री चालढकल, भूलथाप चुकवाचुकव, पूर्ण नाश [ टाळणें ]

**टाळा**—पु १ तोंडाच्या वरच्या जवडयाचा आतील भाग २ (क. शिंपी) चादवा –शिकशि ३ ५१ ३ (चाभार) मोट शिवते वेळीं दोन अधोडींमधील वरच्या बाजूस लाविलेला कातडी तुकडा, जिभेच्या वरच्या चामडयाचा चागलाजाड भाग ४ (वे ) दाराचें एक झडप, फळी ५ ( वे ) जोंधळ्याचें ताट ( क्रि० लावणें ) **टाळा कोरणें**–वहाण, जोडा इ०च्या खालच्या तळास नक्षी पाडणें [ स तल ]

**टाळा**—पु ( राजा ) टहाळा, लहान खादी [ टाळणें ]

**टाळा**—पु ( वडोदें ) कुलूप ( क्रि० मारणें ) टाळी पहा [ त टाळमु, गु तालु ]

**टाळी**—पु १ एका तळहातावर दुसरा तळहात मारणें, तसें मारल्यानें होणारा आवाज ( क्रि० वाजविणें, वाजणें, पिटणें, मारणें ) २ (गायन) गाताना हातानें ताल धरणें (क्रि० पिटणें) 'मुखीं नाम हातीं टाळी।' –दा २ ७ ४१ ३ हात वाजविणें (फजीती, आनद दर्शविण्यासाठीं, संकेत करताना), (क्रि० पिटणें, वाजविणें ) ४ हातावर हात मारणें, वचन देणें (सौदा ठरविताना) ( क्रि० मारणें ) ५ उपेक्षा, रेंगाळणें ( क्रि० लावणें, देणें ) ६ लय, ध्यान, समाधि ब्रह्मटाळी पहा ( क्रि० लावणें ) 'पचविषय एकवटुनि। लाविली टाळी।' –सिपु २ ३१ ४१ ७ कानठाळी, दडा 'वाऱ्यानें जाऊ पाहे अवनी। टाळी कानीं बैसली।'–एरुस्व १२ १०५ (ग्राम्य ) [ स ताल ] **टाळीस टाळी देणें**–वरिष्ठाच्या म्हणण्यास मान तुकविणें हाजी हाजी करणें **०वाजणें**–लग्न लागणें **०देणें**–१ कोणत्याहि खेळास प्रारभ करणें २ कोणतीहि दुसऱ्यानें सांगितलेली गोष्ट पटली असें दाखविणें **म्ह०** १ एका हातानें टाळी वाजत नाहीं २ ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी (अन्नदात्याची स्तुती करावी लागते)

**टाळी**—पु कुलूप 'कामकळिकेसीं टाळी घातली।' –शिशु १५० [ ते टाळमु ]

**टाळी**—स्त्री ( राजा ) टाहळी, लहान फांदी, डाहाळी

**टाळी, अटाळी**—स्त्री १ विन छपराची चुनेगच्ची २ टिंगळ [ ? ]

शको ३ ५१

**टाळीपटकी**—स्त्री हातावर हात मारून ( वचन देऊन ) केलेला करार, पक्का करार ( सौदयाचा ) ( क्रि० करणें )

**टाळू**—स्त्री १ डोक्याचा वरील पुढचा भाग, मस्तकाग्र, कवटी २ टाळूवर ठेवलेले केंस ३ तालुप्रदेश, तोंडाच्या वरच्या जवडयाचा आतील भाग ४ ( चित्रा नक्षत्राच्या लेवडी चरणात पडलेल्या पावसानें ) जमिनीचा घनलेला चिकट व जाड थर, ( सामा ) जमीनीचा टणक थर, भाग ( क्रि० धरणें ) 'विहिरीची टाळू खणली, पाणी भरभर लागलें' ५ तवल्याच्या शाईचा मध्यभाग [ स तालु ] **०चा दात**–( सापाचा विषारी दात, टाळूपाशीं असतो आणि तो त्याला फार जपतो त्यावरून ) अतिशय आवडती वस्तु जिवाचा कलिजा **टाळू भरणें, टाळवेस लावणें**–( धायगी ) लहान मुलाच्या टाळूस तेल लावणें किंवा न्हाणासाठीं तेल मारणें ( मुलाच्या १२ व्या दिवसापासून ६ महिनेपर्यंत सकाळीं न्हाताना व रात्रीं निजताना सरासरी ५ तोळे तेल टाळूत जिरवितात पुढें सहा महिन्यानतर एक वर्षपर्यंत रोज न्हाताना २॥ तोळे तेल जिरवितात) **०भरणें**–( चाभारी ) टाचेखालचा भाग उचलून देणें **(मढयाच्या) टाळूवरचें लोणी खाणारा**–अतिशय कृपण व नीच **०वर तेल घालणें-ओतणें**–काम होणें, गरज भागणें, साहाय्य करणें. **०वर मिरें वाटणें**–एखाद्यावर पूर्ण ताबा चालविणें, अमल गाजविणें **०वर हात फिरविणें**–फसविणें बुडविणें **टाळूस-टाळेस-टाळवेस टिपरूं लागूं न देणें**–१ आपल्या अगावर येणारी बाजू मोठें शब्दपांडित्य करून उडवून देणें, काथ्याकूट करणें अघळपघळ पण मुद्दा सोडून बोलणें २ आरोप शेकू न देणें, सहन न करणें

**टाळूनखी**—भाडयाच्या साच्यावर दोन ओळी करण्याकरिता वापरावयाचें कासाराचें हत्यार –बदलापूर

**टाळें**—न १ कुलूप 'बद करीतसे सदनद्वार। कडी टाळें देऊनिया।' –नव २४ १२ २ कुलुपाच्या किंवा घडयाळाच्या खालचें किंवा वरचें अग, बाजू ३ पाण्याच्या नळामधील वाऱ्यासाठीं असलेलें उभें दार, त्या दाराची फळी, जमीनींतील मोरीमधील मळ काढण्यासाठीं जें मधोमध दार ठेवतात तें टाळी पहा

**टाळें**—न जोडयाचा तळ [ स तल ]

**टाळें**—न तोंडाचें वरचें जाभाड, ( उघडणें क्रियापदा बरोबर योजलें असता किंवा तोंड उघडें असता ) खालचें जाभाड, –अव टाळीं=दोन्ही जाभाडें जसें– दोन्हीहि टाळीं एकाशीं एक बसणें, मिटणें 'दिग्गजाचीं गाळीं बैसती।' [ स तालु ]

**टाळें**—न (कों ) झाडाच्या फांदीवरील मगाचें पोळें, गाळवें

**टाळेंभेकरें**—न १ एक जातीचें माकड २ मलबारातील एक रानटी जात व तींतील व्यक्ति (हे लोक कमरभोंवतीं

झाडाच्या लहान डहाळ्या किंवा पाला बांधतात व बाकीचें शरीर उघडें ठेवतात) [ टाळा=डहाळी+भेरें=हरिण ]

**टि(टी)क**—स्त्री टिकली; ख्या 'पायां सोनयाची टिक। सोनयासीं लागली दख।'—ज्ञा १४ ३८३ [ स तिलक ]

**टिकटिक-टिकां**—क्रिवि १ (करणें या क्रि॰ सह) मिणमिण (जळणें) २ उत्तेजन देणें, चेतविणें उठावणी करणें [ध्व] ॰करून राहणें—अत्यंत गरीबीत दिवस काढणें (शवटची धुगधुगी असणें असा मूळ अर्थ) **टिकटिकणें**—अक्रि. १ मिणमिणणें, झिरू मिरू असणें (मालवावयाच्या वेळचा दिवा २ (ल) मृत्यूच्या वेळची धुगधुगी ३ टिकटिक असा आवाज करणें. **टिकटिक-टिकी**—न स्त्री १ विझणाऱ्या दिव्याची मिणमिण, मरणसाची अखेरची धुगधुगी २ विशिष्ट आवाज (घड्याळ वगैरेचा) [ध्व]

**टिकणें**—अक्रि १ (एखाद्याजवळ) राहणें, वास करणें, (असलेल्या स्थिति) चालू असणें, चिकटून राहणें (स्वास्थ्याच्या दृष्टीनें) थारा असणें (माणसासंबंधीं योजतात) २ शवटपर्यंत कायम राहणें, तगणें, अप्रतिहत चालणें नाश न पावता राहणें, निभाव लागणें उभें असणें सहन करणें (वस्तूसंबंधीं योजितात) ३ (दुकानदारी) गिऱ्हाईक चिकटून राहणें याच्या उलट गिऱ्हाईक मारणें पहा ४ उडया मारणें (हरिण इ॰) [ हिं टिकना स टिक्—जाणें ]

**टिकमिरवणा**—वि (राजा) नीटनेटका (दिखाऊ पण पोकळ माणूस, वस्तु) [ टिका=गधाचा टिळा+मिरवणें ]

**टि(टि)करी**—स्त्री (ना) एक खेळ जमीनीवर विशिष्ट प्रकारची आकृति रेखाटून दगडी किंवा खापरी लहान तुकड्यानें रगडत खळावयाचा मुलाचा खळ मामामामींचा खळ

**टिकल**—स्त्री उडी, कुदी (क्रि॰ मारणें घेणें)

**टिकलग**—वि शोभिवंत जडित जडावाचा (अलंकार) 'तवीं नवगुणटिकलग। लेणें ब्राह्मणाचें अव्यंग।'—ज्ञा १८ ८५४

**टिकलस**—वि (व) नीटनेटका टापटिपीचा

**टिकला**—पु १ कपाळावर गंध गोपीचंदन कुंकु इ॰ ची वाटोळी किंवा इतर दुसऱ्या आकाराची लाविलेली खूण ही शोभेसाठीं किंवा निरनिराळ्या धर्मपंथाचा भेद दर्शविणारी असते तिलक २ (ल) कुळांतील किंवा जातींतील श्रेष्ठ पुरुष [स तिलक]

**टिकली**—स्त्री १ लहान टिकला टिपका २ वाफ्यातून उपटून दुसरीकडे पुन्हा लावावयाचें भाजीपाल्याचें राप रोपटें ३ बायकांच्या कपाळावर लावतात तो कुंकवाचा, काचेच्या लहान तुकड्याचा लहान टिकला लहान वाटोळी वस्तु (अभ्रक मेण, पोळी, रोटी, कांच जरतार ज्ञाग इ॰ ची) लहान पोळी चादकी ४ एक औषधी वनस्पति हिचीं पानें नखाएवढीं बारीक व फुलें तांबडीं किंवा पांढरीं असतात [टिकला लघुत्वदर्शक] ॰मिकली—स्त्री टाकमटिकला, वणीफणी, नट्टापट्टा, चापचोप; टिळाटोपी, नखरा [ टिकली ]

**टिकलें**—न (कु) पातळ कालवण

**टिकल्यापाणी**—न मुलींचा एक खेळ याचा उल्लेख वात्स्यायनसूत्रांत आढळतो —मसाप ४ २५७ [ टिकली ]

**टिकवणी**—स्त्री जपून ठेवणें, शाबुती [ टिकविणें ] ॰चा—वि ठेवणीचा, टिकाऊ काळजीपूर्वक वापरलेला

**टिकविणें**—सक्रि १ जपून ठेवणें, शाबूत राखणें, कायम राखणें २ (दुकानदारी) गिऱ्हाईक मिळवून कायम राखणें जोडणें ३ विकत घेतलेल्या मालाची किंमत रोख देणें [ टिकणें ]

**टिकशी**—स्त्री अंकुर, कोमल अग्र, देंठा, डिकशी.

**टिकसटिंगणा**—वि १ हलका; भुर्रकन उडणारा २ ऐटबाज टवदार, मलमल्यागलबल्या

**टिकसा**—वि (व) सुगंधी उटणें, चिकसा (अगास लाव ण्याचा) पहा

**टिका**—पु १ टिकला अर्थ १ पहा २ (ल) जनावराच्या कपाळावरील वाटोळा, पांढरा ठिपका ३ असा प्राणि 'टिका घोडा टिका बैल' [ स तिलक ] ॰लागणें—प्रख्यात होणें, कपाळावर शिक्का मारल्याप्रमाणें असणें (कुत्स्य गोष्ट) ॰ईत—वि गादीचा हक्कदार, युवराज ॰कपाळीं लागणें—डाग लागणें दोषारोप येणें **टिकशाचा धनी**—पु १ जवळ ज्ञान, पैसा, अधिकार, सत्ता इ॰ वास्तविक नसता परिस्थितीमुळें ज्याला मानमरातब मिळतो असा माणूस, कुळाचा धनी, मानापुरता मालक २ नामधारी मालक, राजा, सत्ताहीन पदाधिकारी व्यक्ति

**टिकाऊ**—वि शाबूत राहणारा, कायम असलेला, दमदार [ टिकणें ]

**टिकाची पाटली**—स्त्री सोन्याच्या मण्याची केलेली पाटली

**टिकाव**—पु कुदळ, पिकाव [ इ पिकॲक्स ]

**टिकाव-वा**—पु १ निभाव मजबुती; सतत टिकवणी (एखाद्या ठिकाणीं किंवा एखाद्या माणसाच्या संगतींत सुखानें, सोईनें) (क्रि॰ होणें निघणें) २ निभावणी निभावणूक स्थैर्य, खंबीरी सहनशक्ति (वस्तूची) (क्रि॰ होणें, निघणें)

**टिकाविणें**—सक्रि १ (हातानें, काठीनें) मारणें, लगावणें भडकाविणें २ टिकविणें पहा

**टिकिटिकि**—क्रिवि टिकटिक-का पहा [ ध्व ]

**टिकी**—स्त्री १ (ग्राम्य) उद्योग व्यापार धंदा, निर्वाहाचें साधन नोकरी (क्रि॰ लागणें सापडणें मिळणें) २ (वों) रोपाचा कोंब डिकशी, कोंब, पालवी ३ पंजाबांतील सहाय नावाचें फळ हें रुचकर असतें

**टिकु**—पु टिकला पहा

**टिकें**—पु १ ठिकें, तीळ, मस, डाग २ शेत, वावर

**टिकेकरी**—पु टिक्याचा धनी पहा

**टिकेलें**—वि. टिकलेलें, स्थिर [ टिकणें ]

**टिकोजी, टिकोबा**—पु १ ( निंदार्थी ) मानपानाच्या टिळ्याचा अधिकारी, बाजीराव, वडें धेंड 'तुम्ही कोण असे मोठे टिकोजी ?' २ टिक्याचा धनी पहा **म्ह०** (व) टिकोबा टिकाई विठोबारखुमाई=कुटुंबात फक्त नवराबायको दोघेच **एकला(टा) टिकोजी**–पु १ एकलकोंडा, कोणीहि मित्र, स्नेही वगैरे नसलेला माणूस २ जातींत किंवा सर्व कुटुंबात एकटाच उरलेला माणूस [ टिका ]

**टिकोर-रा**—वि १ मोठा, भसाडा, टकोर-रा(-वि) पहा २ चांगला

**टिकोरं**—न (व) जाड व आखूड काठी

**टिकोर-रें**—न मोठा व सुंदर घोडा

**टिकोरणें, टिकोरें, टिकोरा**—नपु १ काठी; सोटा, दांडकें २ (अश्लील) शिस्न ३ हा शब्द अतिशय मोठ्या व अतिशय लांबट वस्तूस लावितात 'टिकोरणें-शेत-पाऊस-पीक-डोंगर-वाडा' ४ ठोसा, तडाखा (विशेषत काठीचा) (क्रि० मारणें)

**टिकोरी, टकोरी**—स्त्री (व) डोक्याची कवची, टाळकें

**टिकोळें**—न (व) ल्हान पनावळ, टिकोळें

**टिकंटिळा**—पु (व) चरीपरी, नखरा 'टिकटिळा करण्यात दिवस जातो'

**टिकल**—स्त्री सततचा छळ, त्रास, खरडपट्टी, शिव्यांचा भडिमार (क्रि० लावणें, माडणें, करणें) [ टिक ! टिक ! ]

**टिका, टिकोजी, टिक्कोबा**—टिका इ० पहा

**टिक्की**—स्त्री (कर) नेट, चिमटी -वि (जुन्नर) कपाळावर पांढरा ठिपका असलेली (मेंढी)

**टिक्की**—स्त्री सोय, तजवीज, सधान, तरतूद (क्रि० जम विणें) **०लावणें**–चेरणाची सोय लावणें

**टिंगणें**—अक्रि लगडणें, अडखळणें ठेंचाळणें (पाय अधू झाल्यानें)

**टिंगल**—स्त्री (चांभारी) बारीक खिळा, टक्स.

**टिंगल**—स्त्री थट्टा, टिवल (क्रि० करणें, वाजविणें)

**टिच**—न (व) उसण

**टिंच-टीच**—स्त्री १ वीत अंगठा व त्याजवळील बोट यांच्या टोकातील महत्तम अंतर २ टिचकी, टिचका टचका ३ टाप, टचकी, बोटाचा प्रहार (क्रि० मारणें) **टिचकणें**—उक्रि टिचकी मारणें, प्रहार करणें

**टिच-कन-कर-दिनीं दिशीं**—क्रिवि टचक्या, टचकन, टिचकी मारल्यासारखा आवाज होऊन [ ध्व ]

**टिचका**—वि आखूड (वस्त्र), ल्हान, तोकडें (पागोटें)

**टिचकी**—स्त्री १ टिंच अर्थ २,३ पहा. (क्रि० मारणें, वाजविणें) 'ज्यानें टिचकीनें मारिली।' –ऐपो ४९ चुटकी २ ल्हान मुलाचें फुगीर पोट. (क्रि० फुगणें, वर यणें) [स छोटिका] **०पाणी**–(मुलींचा एक खेळ) या खेळात खेळणाराच्या दोन तुकड्या असतात प्रत्येक तुकडींतील मुख्यानें गड्यांचीं नावें बदलून समोरासमोर दोन्ही तुकड्या बसल्यावर एका तुकडींतील मुख्य आपल्या विरुद्ध तुकडींतील मुलीस दोन तुकड्यांच्यामध्यें बसवून तिचे डोळे झाकतो व आपल्या तुकडींतील मुलीस बदललेल्या नावानें हाक मारून डोळे झाकलेल्या मुलीच्या कपाळावर टिचकी मारावयास सांगतो व त्या डोळे झाकलेल्या मुलीस टिचकी कोणी मारली तें ओळखण्यास सांगतो तिनें मुलगी ओळखली तर ती मुलगी विरुद्ध तुकडींत जाते मग त्या तुकडीचा डाव सुरू होतो अशा सर्व मुली एक झाल्या कीं डाव संपतो [ ध्व टिच् ! ]

**टिचकुली**—स्त्री टिचकी अर्थ २ पहा

**टिचटिच-टिचां**—क्रिवि पोटातील कुटकुट आवाजाप्रमाणें आवाज होऊन 'पोट टिचटिच करत'

**टि(टिं)चणें**—उक्रि १ टिचकी मारणें २ गोटी, कवडी इ० लक्ष्यावर नेम मारणें, वेधणें ३ –अक्रि तडा जाणें, फुटणें, तडकणें (बांगडी, काचसामान इ०). ४ (ल) (पैसे) भरणें, देणें

**टिचर-रें**—न डोक्यांतील कृमि पडलेला व्रण, शरीराच्या कोणत्याहि भागात व्रणापासून पडलेलें छिद्र

**टिचा**—पु १ (विशेषत नावाचा टिचा-उडणें, पडणें, होणें, करणें या क्रियापदाबरोबर) अपकीर्ति, वाईट नाव, दुष्कीर्ति 'त्याचे नावाचा टिचा असा पडला आहे कीं तो सदासर्वदा लबाड बोलतो' २ (कों) ल्हान मुलाच्या कपाळावरील काजळाची तीट (क्रि० लावणें, लागणें)

**टिचिटिचि**—क्रिवि टिचटिच पहा

**टि(टिं)चें**—न तीव्र वेदना, पीडा (शरीरातील) (क्रि० भरणें, उतरणें)

**टिचें**—न गळू पुळी करट टिचर पहा

**टिच्चून**—क्रिवि प्रत्यक्ष, समोरासमोर, पाठीमागें नव्हे, भरपूर, रोखठोक

**टिट**—न पायाचा चवडा, तिकटें, चोंच 'टिटातु नळी। धरूनि ठाके।'–ज्ञा ६ ७७

**टिट(टे)घर**—न सोंगट्यातील कटघर, तिठ्यावरचें घर. 'तें जिंगे कीं जुवारांचें। टिटेघर'–ज्ञा १८ ६७३

**टिटव**—न १ (व) मोटवण, चाक व त्याखालचे दोन खांब इ० २ (खा) खांब व तुळई यांच्यामध्यें त्यांच्याच जाडीचा असलेला लांबट जाडी ठोकळा

**टिळो**—पु (कु.) (अव.) टिळे. वायकांच्या कपाळावरील खोंचलें पदक [ टिळा ]

**टीक**—न. ठिकाण, स्थान. 'जें ज्ञानें केलें टीक।'–ज्ञा१४.१००

**टीक**—स्त्री १ एक मोत्याचा किंवा जडावाचा गळ्यातील दागिना, उदा० वज्रटीक. 'टीक भांगार एकवट।' –ज्ञा १७. १४८. २ त्या दागिन्यांतील एक एक अवयव (ठुशींतील, वज्रटिकेंतील) ३ नथ, गळसरी, पाटली इ० दागिन्यावरील शोभेची मोत्यांची चौकडी किंवा लाविलेली हिरकणी अथवा सोन्याचा मणी; कुंकवावर चिकटविलेली कांचेची चमकी. ४ डोळ्यांतील मोतीबिंदु. ५ घोड्याच्या कपाळाचा पट्टा. 'सर्वांगीं सुंदर मुरेख। जिच्या नाकावरी पांढरें टीक।' –एभा ११.९६५. ६ (व.) –अव. टिका. हातावर काटलेल्या देवी; इनाक्युलेशन. 'प्लेगाच्या टिका काढून घे.' [ सं. तिलक ]

**टीका**—स्त्री. १ (कठिण ग्रंथावरील) व्याख्या; स्पष्टीकरण; विवरण, भाष्य; भाषांतरानें किंवा व्याख्येनें केलेलें अर्थविवरण; भाषांतर; टिप्पण अर्थ २ पहा. २ (ल) पाल्हाळ; विस्तार; अतिशयोक्ति. ३ (ल) गुणदोषविवेचन; दोषदर्शन, (पाठीमागें केलेली) निंदा; कुतर्कानें केलेलें मनस्वी शब्दपांडित्य. [ सं. ] ०**कार**–पु. विवरण करणारा; टीका (टीपा) देणारा, करणारा

**टीच, टींच**—स्त्री. टिच अर्थ १ पहा.

**टीच**—स्त्री. (कों.) लहान मुलाच्या कपाळावरील काजळाची टीट. (क्रि० लावणें).

**टीथआरी**—स्त्री. (चाभार) बुटाच्या कडेला नक्षी काढावयाची दात्यांची आरी. [ इं. टीथ=दात+आरी ]

**टीप, टिपेचा सूर**—पु. (गाणें) तृतीयसप्तकांतील स्वर; तारस्वरवादन प्रकार–या वादनांतील स्वर मध्यमाच्या दुपटीचे असतात.

**टीप**—स्त्री. १ कर वसविण्याकरितां घेतलेली जनावरें, झाडें इ० ची गणती, मोजणी. २ शिवण्याची एक तऱ्हा. (क्रि० भरणें) ३ सोडतींतील तिकिट. ४ गंजिफाच्या खेळांतील एक संज्ञा, तल्फ इ० डाव दुसऱ्याकडून आला असता एका पानाच्याऐवजीं दोन पानांनीं घेण्याचा प्रकार ५ (सोनार) दागिन्याच्या किंमतीचें, आकाराचें टिपण ६ आकडेवार नोंद, याद, यादी; बिल, हिशोब, फेरिस्त, टिपण, स्मरणपत्र, पैशाची हुंडी; वर्गणीची यादी ७ पुस्तकांतील मुख्य भागाचें, पृष्ठाच्या खालीं केलेलें विशेष स्पष्टीकरण ८ (कों) गाडीचें छप्पर किंवा गाडीमध्यें जीवर बसतात ती गाडीची साटी. –न. ९ नेम, नियम. १० अश्रूंचा थेंब ११ पीप, (ओतकाम) आमली पदार्थ तयार करण्याचें लाकडी पिंप. (वाप्र) ०**जमणें, बसणें**–बरहुकूम असणें, जुळणें, विरोध न येणें. ०**घालणें**–विशिष्ट तऱ्हेची शिवण घालणें. (चांभार) जोडयाचा लोपराजवळील भाग दोऱ्यानें शिवणें. ०**मारणें**–(शिंपी) शिवण घालणें. **टिपेस उतरणें**–टिपणावरोबर जमणें, असणें. सामाशब्द– ०**कर-नीस**–पु. (कर वसविण्या साठीं) गावांतील घरें, झाडें इ० ची मोजदाद करणारा अधिकारी. ०**गारी**–स्त्री (शिवणें) शिवण्याची एक तऱ्हा (क्रि० करणें). ०**दार**–वि. व्यवस्थितपणें वागणूक करणारा. ०**दोरा**–पु दुहेरी टाका. याच्या उलट धावता दोरा. **टीपनीस**–पु सैन्याची मोजदाद ठेवणारा आणि जकातीचा अधिकारीहि असे. [ टिपणें ]

**टीपकागद**—पु. शाई इ० टिपून घेण्याचा कागद. [ टिपणें+कागद ]

**टीर-री**—स्त्री ढुंगण, नितंब, कुल्ला, टिरी पहा. [ सं. कटीर ] ०**बडविणें-पिळणें**–आनंदानें ढुंगण थापटणें. ०**हालविणें**–डुल्त डुल्त चालणें.

**टीव**—स्त्री एक जातीचा पक्षी.

**टुई**—स्त्री. १ गोसावी नांवाच्या पक्ष्याचा आवाज. २ (ल) एकाच तानेनें गायन. (क्रि० लावणें) ३ टुमणें, तगादा, निकड. (क्रि० देणें, लावणें). [ ध्व. ]

**टुक**—स्त्री १ लहान तुकडा, थोडासा रतीब, खुराक. 'ढेंप लावित असे टुक यातें।'–किंगवि २३. २ रिस्त, रीत, तजवीज; व्यवस्था. 'नेणें संसाराची टुक।' –तुगा ४५५५. ३ कसोटी. 'जरी न उतरे टुके इतर भक्त भद्रा मुके।'–मोकृष्ण ५७.२७. –वि. थोडा; अल्प. [ का दुकि=सारांश, कल्पना ]

**टुकटुक-कां**—क्रिवि. १ आशेनें, उत्सुकतेनें, लोभानें पहाणें (दुर्मिळ वस्तूकडे). २ मिणमिण, अंधुकपणें (दिवा जळणें). (क्रि० करणें) ३ खुडुरडुं, गरीबीनें; जेमतेम (उपजीविका करणें) [ध्व] म्ह० झुगझुग जिणें टुकटुक खाणें. ०**पाणा बसणें**–एकटक लावून बसणें. **टुकटुकणें**–अक्रि. सोत्सुक पहाणें, रोखून बघणें. ०**दाखविणें**–(लहान मुलांत रूढ) बोटानें वेडावणें; वाकुल्या दाखविणें. ०**माकड, टुकटुकावल्यो**–(लहान मुलांत रूढ) आपण एखादा पदार्थ खात असतां वाकड्या बोटानें दुसऱ्यास हिणविणें. 'टुकटुक माकड, आम्ही खाऊं पापड, तुला देऊं मेकड.' **टुकटुकाविणें**–सक्रि टुकटुकमाकड करणें.

**टुकटुकी**—स्त्री. तजेला, टवटवी; तुकतुकी, पाणीदारपणा **टुकटुकीत**–वि ताजा, तजेलदार, टवटवीत (फुल, पान, चेहरा).

**टुकडवापू, टुकडमोडया, टुकडा, टुकडी**—तुकडवापू इ० पहा.

**टुकडा**—पु तुकडा. (व.) (घर) लांकडाची मोटी तुळई, वांसा

**टुकणी**—स्त्री (कोष्टी) विणकराच्या फणीच्या दात्याकरितां, वांबूच्या चोया करण्यासाठीं खोवणी पाडलेली फळी.

**टुकणी**—स्त्री. (व) (एखादा पदार्थ) मिळण्याच्या इच्छेनें तिष्ठत बसण्याची क्रिया (क्रि० लावणें)

**टुकणें**—अक्रि टुकणी अर्थ २ पहा, रोखून पाहणें [ टुक ]
**टुकी लागणें**-( व ) आशाळभूत नजरेनें पाहणें.

**टुकमुक-मुकु**—क्रिवि टुकटुक पहा.

**टुकळा**—पु धुरणी, खंत, नाद, छंद ( गैरहजर माणूस किंवा वस्तु याविषयीं ) [ टुक ]

**टुग, टुगर-ळ, टुंगूळ, टुंबर**—न टेंगूळ, गाठ ( शरीरावरील, झाडावरील ), जमीनीवरील ल्हान उचवटा, टेंकाड

**टुच-क्न-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि गादी, खरबूज इ० मऊ पदार्थांत सुई, दाभण इ० टोंचताना निघणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन [ ध्व ]

**टुचकु(फो)ली**—स्त्री वाकुल्या, थट्टा, चिमटा, टुसकी, टोंचणी, बुचगी, ढुसणी (एखादयास त्रास देण्यासाठीं). ( क्रि० करणें )

**टुण-क्न-कर-दिनीं-दिशीं, टुणटुणां-टूण**—क्रिवि टणक्न, टणटणा इ० पहा

**टुपणें**—सक्रि १ सुई किंवा इतर टोंकदार हत्यार आत खुपसणें, भोसकणें २ बीं जमीनींत खुपसणें, पेरणें ३ ( शिंपी ) शिवणें या क्रियापदापुढें जास्त स्पष्टीकरणार्थी योजतात उदा० शिवणेंटुपणें ४ सुईच्या नाकात दोरा घालणें —अक्रि खुपसणें, भोसकणें, टोंचणें, बोचणें ' काटा टुपला '

**टुपसा**—पु टोपसा पहा

**टुंबर, टुंबरूक**—न टेंगूळ, टुग, टुगर इ० पहा

**टुमटा(ठा)म**—स्त्री डामडौल, दिमाख, थाटमाट, टामटूम, भपका, अवडंबर [ ध्व ]

**टुमटु(ट)मीत**—वि १ नगाऱ्यासारखें ताणलेलें, गुबगुबीत (पोट इ०) २ मासल, गलेलठ्ठ, धष्टपुष्ट, ताजातवाना (पशु इ०) ३ ( ल ) मालमत्ता असलेला, खाऊनपिऊन सुखी [ध्व टुमटुम=नगाऱ्याचा शब्द ]

**टुमणी**—स्त्री १ तगादा, निकड (क्रि० लावणें, देणें, करणें) २ आश्रयदात्याची आठवण, स्मरण ठेवणें ( क्रि० लावणें, देणें, लागणें ). म्ह० लागल टुमणी तेजीला इशारत

**टुमणें**—न १ (व ) फुगणें २ तगादा, टोंचणी टुमणी अर्थ १ पहा

**टुमदार**—वि शोभिवंत, रम्य डौलदार, मोहक छानदार सुरेख

**टुया**—पु ल्हान जातीचा एक पोपट

**टुरटुर**—स्त्री १ बेडकाचा आवाज. २ ( ल ) एकसारखा त्रास देणारा आवाज, त्रासदायक तक्रार, धमकावणी, कुरकुर किरकिर ३ थोडा वेळपर्यंत चकित करून सोडण्यासारखें कृत्य ४ गमजा ५ टिरटिर पहा

**टुरटुर, टुरंटुरं, टुरुटुरु**—स्त्रीन १ ( बेडकाचा आवाज ) टराव टराव, डराव डराव ' त्याच्यापुढें टुरु टुरु टरौंटरौं शब्द हे किती करिसी । '-मोकर्ण २७ ९ [ ध्व ] २ वरील टुरटुर शब्दांतील अर्थ २ पहा भिकाऱ्याचा त्रास, तगादा टुरंटुरं पहा ( क्रि० करणें, लावणें, मांडणें )

**टुरफुस**—स्त्री १ टुरटुर २ ( ल ) खरडपट्टी, हजेरी, कान उघाडणी ( एखाद्याशीं या शब्दास जोडून ) ( क्रि० लावणें, मांडणें, करणें ) [ ध्व ]

**टुरमा**—वि १ ठेंगणा, ठुसका खुजट २ आखूड, गिड्डा ( अवयव )

**टुलटुल-लां, टुळटुळ-ळां**—क्रिवि रोखून, सोत्सुक, टक लावून ( क्रि० पाहणें, बघणें) 'ते टुळटुळा पाहे दाही दिशा ।' [ ध्व ]

**टुल्लू**—पु ( अश्लील ) शिश्न —वि ठेंगणा, टुरमा पहा

**टुवाल**—पु अंग पुसण्याचा पंचा, रुमाल टावेल पहा [ इ टॉवेल ]

**टुशी**—स्त्री (व ) चोळीची पुरवणी, जोड टुशी अर्थ २ पहा

**टुशी**—स्त्री ( व ) गव्हातील कोंड्यासुद्धां असणारे दाणे. [स तुष् ]

**टूक**—स्त्री १ कळ, गुरकिल्ली युक्ति, खुबी, मखली, फस विण्याची हिकमत, गूढ ( क्रि० साधणें, सापडणें ) २ धोरण, खुबी, हातोटी, कसब, उत्सुकता, कौशल्य, हुषारी, शीघ्रग्रहणशक्ति, कल्पकता, आकलनशक्ति, अभिरुचि, पटुत्व ३ (टोंक=अणकुची) जरूरीच्या वस्तु, स्वाभाविक गरज, सुस्थितीस आवश्यक परिस्थिति, काल, साधनसामुग्री, निगा, व्यवस्था वगैरे, काळजी, दक्षता ( माणूस, जनावर, वस्तु इ० ची ) ' शेताची टूक साभाळली पाहिजे '=सर्व प्रकारची काळजी योग्य वेळीं घेतली पाहिजे ४ टक रोखून पहाणी, एकाग्र दृष्टि टूक हा शब्द जेव्हां टूक राखावयाची या अर्थी असेल तेव्हां धरणें, सभाळणें, राखणें या क्रियापदाबरोबर योजतात आणि जेव्हां हयगय या अर्थी असेल तेव्हां चुकणें, टळणें अतरणें या क्रियापदाबरोबर योजतात **(जेवण) टूकेवर ठेवणें**—ऋतुकाळ, अन्नाचे गुणदोष व आपली प्रकृति हें सारें ध्यानात घेऊन जेवणें **टूकेनें-जेवणें-निजणें-टोलणें-औषध घेणें-देणें** इ०-या सर्व गोष्टी योग्यपणें, गरज आहे-नाहीं इ० पाहून काळजीनें व नियमितपणें करणें

**टूक**—स्त्री १ ( व ) औषधाचा टक मात्रा दुधाच्या दोन टुका देत जा ' २ ( व ) सवय

**टूम**—स्त्री १ चकचक, लखलख, डामडौल माठेपणाची टव, ऐट शोभा, दिखाऊपणा २ मनात भरण्यासारखा गुण, चिन्ह नवी व सुरेक वस्तु चमत्कारिक वस्तु नवीन व आश्चर्यकारक

**टिटवी, टिटवरी, टिटिवरी**—स्त्री १ बहुतेक व दिसण्यात सुरेख असा एक पक्षी याचें अंडें सोनेरी असून त्यास फार किंमत येते 'टिटवी यमाची तराळीन।'—भज ७३ २ टिटव अर्थ २ पहा ३ (कों) पाटस्थळ पिकास पाणी देण्याची सरी [स टिट्टिभ] म्ह० टिटवी देखील समुद्र आटविते =क्षुद्र माणूस देखील प्रसंगविशेषीं दीर्घ प्रयत्नानें मोठें कृत्य करतो (याबद्दलची एक गोष्ट आहे)

**टिटाळी**—स्त्री (कों) दोडा

**टिटिंम**—पु तांबूस रंगाचा नीलमणी

**टिणगिण्या**—स्त्रीअव (कों.) खोडया, चाळे, चेष्टा, लुच्चेगिरीची भाडणें, भक्कया (क्रि० मारणें, उनाडपणाचे चाळे करणें)

**टिणटिण-टिणा**—क्रिवि उडतउडत, उडया मारीत, उडी घेत (चेंडू) [ध्व] ०उड्या मारणें—उडया मारणें, खिदळणें; हुंदडणें (लहान मुलांनीं)

**टिनपाट**—न जस्ताचें वजनानें हलकें भांडें [इ टिन+पॉट] ०वाजणें—दिवाळें निघणें, फजिती पडणें

**टिपकणें**—अक्रि ठिबकणें [टिप! टिप! ध्व]

**टिपका**—पु १ ठिपका, थेंब, बिंदु २ डाग, खूण, चिन्ह ३ (ल) बारीक टिकला ४ गळती, सततची टिबकणी (पाऊस, गळणारें पाखें, ओलें वस्त्र यांची) (क्रि० लावणें) हळूहळू पण सततचा मार 'धपका सोसतो पण टिपका सोसत नाहीं.' [ध्व]

**टिपगारी-गिरी**—स्त्री चुन्यानें भिंत वगैरेच्या दरजा भरणें 'देऊळ गळत असे त्यास टिपगारी करविली'—तीप्र २७३

**टिपटिप**—स्त्री १ टिपका अर्थ ४ पहा (क्रि० गळणें) २ (ल) तगादा, निकड, टुमणें (क्रि० लावणें, मांडणें, करणें)

**टिपटिप, टिपटिपां**—क्रिवि गळण्याचा पटपट असा आवाज होऊन [ध्व]

**टिपण**—न १ चिठ्ठी, स्मरणपत्र, टांचण, यादी २ जन्मपत्रिका ३ उडी उशी (वाघ इ०ची) (क्रि० टाकणें) ४ (कों) नेमलेलें स्थान किंवा वेळ 'दीस उगवण्याच्या टिपणास' आणीबाणीचा प्रसंग निश्चित स्थान, तोफ किंवा बाण यांचें लक्ष्य, तार कीट टिपणास येणें—आटोक्यात येणें, आवाक्यात किंवा कक्षेत येणें टिपणवुक—न स्मरणवही, (पैसापखातें) जमी नीच्या लावीकरी टिपून ठेवण्याची वही

**टिपणा**—स्त्री १ याद टांचण इ० करण्याची क्रिया, टीप २ टिपण अर्थ १ पहा. [टिपणें]

**टि(टी)पनीस**—पु गावाची जमाखर्चाची वगैरे मोजदाद ठेवणारा अधिकारी [टिपणें+नवीस]

**टिपणें**—अक्रि १ थेंबथेंब पडणें गळणें स्राव होणें २ (वस्त्र इ०) शिवणें, टाका घालणें [ध्व टिप]

**टिपणें**—सक्रि १ टिपण, यादी करणें, टांचण करणें २ शाई, तेल इ० शोषून घेणें, वस्त्रानें पुसून काढणें ३ धान्याचा एक एक दाणा वेंचून घेणें ४ गोळी, बाण, चेंडू इ० नीं लक्ष्य वेधणें, नेम धरून मारणें (लढाईत) एकेक निवडून काढून ठार मारणें ५ चुना इ० नें भिंत सारवणें ६ (खेळ) ईर्षेनें पळून डाव, दगड, खेळगडी इ० स शिवणें, स्पर्श करणें ७ मोजताना स्पर्श करणें, लिहून ठेवणें ८ शिवणें, दोरा घालणें, टाका घालणें **टिपकागद**—पु शाई टिपून, शोषून घेण्याचा एक प्रकारचा कागद

**टिपर-खेळ-घाई-घाळी**—पुस्त्री टिपूरखेळ पहा **टिपरखेळा**—पु टिपूरखेळा पहा

**टिपरखेळें**—पु सोनाराची हातोडी टिपूरखेळें पहा

**टि(टिं)परघाई**—स्त्री घाईनें व जोरानें केलेलें कृत्य, अतिशय त्वरा जोराची धावपळ, गडबड 'क्षणभर तरवारीची टिपरघाई जाली'—भाव ४१ [टिपरू+घाई]

**टिपरी**—स्त्री १ मापी पावशेर २ वीतभर लांबीची लहान काठी, काडी (नगारा इ० वाद्यें वाजविण्याची, खेळातील, तसेंच हाताच्या बोटामध्यें पिरगळण्यासाठीं घालण्याची) ३ (वाद्य) ताल धरण्याची वीतभर लांबीची काठी, ही प्रत्येक हातात एक एक घेऊन एकावर एक आपटून ताल धरतात ४ एक प्रकारचा चाप 'कोणाहि नको टिपरी। हें नाकींची श्रेष्ठिजन कोटि परि।'—मोकृष्ण ४९.४७ यावरून ५ (ल.) अंगास घट्ट बसणारीं, जख्डून टाकणारीं वस्त्रेंभूषणें याना व अतिशय दमल्या-भागल्यानतरच्या अंग ताठरण्याला व इजेला किंवा वेदनेला हा शब्द यानि तात

**टिपरी पुनव-पूर्णिमा**—स्त्री त्रिपुरी पौर्णिमा

**टि(टिं)परु-रें**—न १ टिपरी अर्थ २ पहा २ दांडू ३ उसाचा तुकडा

**टिपस**—वि (व) तीन, पाच; पधरा ही सख्या

**टिपळण**—स्त्री (कों) विहीर इ०मध्यें पाणी टिपून टिपून भरावयाजोगी होणारी पाण्याची अल्पता [टिपणें]

**टिपीण**—स्त्री एक फुलवेल

**टिपुसणें**—अक्रि थेंब थेंब गळणें (भांडें, छप्पर, वस्त्र ०इ) हळू हळू पाझरणें, झिरपणें [टिपूस]

**टिपूं**—न थेंब, अश्रुबिंदु [टीप]

**टिपूर**—पु (राजा) त्रिपुर, दीपमाळ —विविक्रि चकचकीत, पांढरें शुभ्र (चांदणें) 'त्यावेळीं चांदणें टिपूर पडलें होतें'—अरुणोदय ४३ प्रकाशमान, तेजस्वी [सं त्रिपुर]

**टिपूर-खेळ-घाई-घाळी**—पुस्त्री नगाऱ्यावर टिपऱ्या वाजवून खेळावयाचा नाच **टिपूरखेळा**—पु वरील खेळात नाचणारा

टिंरखेळें—न (सोनारी) चौकुल्यावरील पत्रा बसवून ठाकण्याची हातोडी

टिपूस—न १ थेंब, बारीक थेंब २ पाण्याचा स्वल्पांश ३ (ल) ठिणगीनें जळून पडलेलें भोंक

टिप्पण—न टीप, खुलासा टिपण पहा

टिप्पणी—स्त्री टिप्पण, टीप, खुलासा, टीका, व्याख्या [स]

टिप्स—स्त्री (व) मिजास, ऐट

टिंब—न थेंब, अक्षरावरील अनुस्वार, अनुनासिकाची खूण, पूज्य

टिंबकणें—अक्रि थेंब थेंब गळणें (पाऊस, वस्त्रातून पाणी) [ध्व]

टिंबका, टिंबुक—पु १ ठिपका, थेंब २ डाग, कलंक, कालिमा

टिं(टुं)बर—न (व) १ टेंगूळ २ लहान टेकडी

टिंबा—पु (राजा) थेंब

टिंबो—स्त्री लहान मडकें, लहान दगडी

टिंब्या—पु (व) टेकाड, उंच जागा, उंचवटा, माथा 'एका टिंब्यावर घाट आहे, दुसऱ्यावर देऊळ आहे'

टिंब्बू—पु (व) दोष, ठपका 'शेवटीं आमच्यावर टिंब्बू टेवणं तुम्ही'

टिमा—पु १ पानवेलीवर पडणारा एक रोग, मेकाडा २ (चाभारी) टाका, टाचा

टिमकारणें—सक्रि १ मारणें, चोपणें २ (व) रागानें डोळे वटारून पहाणें, कान उभे करणें 'कान टिमकारल कुत्र्यानें'

टिमकी—स्त्री. लहान नगारा, टमकी [ध्व] म्ह० जेथें नगाऱ्याची घाई तेथें टिमकी तुझें काय? ०देणें—जाहीर करणें ०वाजविणें—१ अपकीर्ति होणें २ उदो उदो करणें, जाहीर करणें

टिमटिम—स्त्री १ टिमकीचा आवाज २ (ल) चैन, मजा 'हा दोन दिवस टिमटिम करतो, पुढें भीक मागल' [ध्व]

टिमटिमा—क्रिवि टमटम, ढमढमा, टिमकीच्या आवाजासारखा आवाज होऊन [ध्व]

टिंया—पु तांबड्या डोक्याचा लहान जातीचा पोपट

टिरटिर—स्त्री १ क्षणभंगुर तेजस्विता, चकचकाट, आनंद (गरीबाला भिकाऱ्याला एकाएकीं मिळालेल्या पैशानें होणारा किंवा ज्याचा महत्त्वाकांक्षी माणसास थोड्याशा प्राप्तीनें मिळालेल्या साधनापासून होणारा) दरिद्र्याचा चार दिवसाचा श्रीमंती डौल [ध्व] टिरटिरा—क्रिवि चमकून, चकचकाटानें झगमगीनें [ध्व]

टिरी टीर—स्त्री ढुंगण 'एक टिरीचा मृदंग करून। वाकुल्या दाविती वाजविती।'—ह १० १४५ ०पिटणें—अत्यानंद होणें ०पडघणें—मजा मारणें

टिन्या—वि खुजट व अशक्त (विशेषत पशु)

टिर्‍ऱ्या—वि हलकट, नीच, लुच्चा, दुर्गुणी

टिल्लू—वि लहान, खुजा, ठुस्का, ठेंगू व मजबूत

टिवंचणें, टिंवचळणें, टिवचा—टोंचणें मध्यें पहा

टिवटिवणें—अक्रि टिटवीप्रमाणें टिवटिव असा आवाज करणें 'टिटवे थोर टिवटिवती।'—मुआदि ३६.५८

टिवटिवें—न (गो) तुणतुणें

टिवल्या (ळ्या) बावल्या (ळ्या)—स्त्रीअव उनाडपणाचा किंवा तादृश योग्यता नसता केलेला सोदेगिरीचा डौल, खोड्या, उनाडपणा, कुचेष्टा, रिकामटेकड्या गोष्टी, छानछोकी, चटीपटी, बदफैली सवई अकडबाजी, नखरा, थट्टामस्करी, वेडेंवाकडें नाचणें, स्वैर व अनियमित कामें, टवाळक्या करीत हिंडणें, बाहुलीसारखें नटणें, मुरडणें [टिवली+बाहुली]

टिवळी—स्त्री नारळाच्या करवंटीचा तुकडा

टिवा—पु टिपका

टिवाटीव—स्त्री १ टिटवी पक्षी २ (ल) उंच व सडपातळ माणूस

टिवाळ—स्त्री (शेतकऱ्याची) शिदोरी

टिवाळ—स्त्री नडगी, वाद्यविशेष 'घुरघुरिती टिवाळा।'—शिशु ५२३

टिसवा—पु (कु) खच्ची केलेल्या झाडास येणारा नवा अंकुर.

टिळक—पु टिकला अर्थ १, २ पहा [स तिलक]

टिळका—पु (व) टिकला टिपका, बिंदु (तूप, दूध इ०चा), गुळगुळीत, चमकदार गोळी [टिळक]

टिळटिळीत—वि भरपूर व सतेज, चकचकीत, टुकटुकीत (गाल, द्राक्ष) [ध्व]

टिळा—पु १ टिकला अर्थ १ पहा, पोट, हात इ० वरील गंधाचे ठिपके २ कपाळावर गंध लावण्याचा नाम, यंत्र, छाप [स तिलक] (वाप्र) ०करणें—राज्यावर बसविणें 'कीं तुम्हासी टिळा करू मुदिनीं।'—कथा ३ १७ २० ०टोपी करणें—पवित्रपणाचा बाह्य देखावा करणें नटून थटून सुशोभित होणें ०वेशीस लावणें—गावातील सर्व जातींना जेवावयास बोलावणें सामान्यतः—०विडा—पु पाटलाचा एक हक्क टिळेडोळे—पुअव १ कणकेच्या किंवा मातीच्या मुखवट्यावर गंध व डोळे काढणें २ नेपथ्य, थाटमाट, नखरबाजी टिळेपटटे, टिळेमिळे—पुअव सर्व प्रकारच्या नखऱ्यांना व्यापक शब्द (क्रि० करणें, होणें) म्ह० टिळेपट्टे नायकाचे घरात हाल बायकांचे टिळेफाटे—पुअव (उपहासानें) वायकांच्या कपाळावरील लांबट व मळके मोठे कुंकू टिळ्याचा धनी—पु मुख्य, टिक्याचा धनी पहा

कल्पना, छाप, फॅशन, तऱ्हा, पद्धत, चाल, विचार ३ घाट युक्ति युगी (क्रि० काढणें) ०दार–वि १ मोठा व सुंदर, सुभग व भरपूर, तेज पुंज, तेजस्वी दुमदार पहा २ युक्तिप्रयुक्तीनें युक्त

टे(टें)क—स्त्री १ थकवा, थकावट, पुढें चालण्याची अशक्यता, दुर्दशा, कुंठितावस्था (हा शब्द व्यापक अर्थाचा असून तरी याचा मर्यादित उपयोग करतात) 'दहा लाद्‌ मार्इल म्हणत होतों परंतु पाच सातांत टेंक लागी' २ स्थैर्य, धैर्य पण निश्चय टाम समजूत, अवमान, सामर्थ्य, शिरस्त (आदरातिथ्य, धार्मिक विधि, दानधर्म यांतील) (क्रि० राखणें, सभाळणें, सोडणें) 'प्रसगीं २०० मुद्दा पाहुणे भोजनास आले तरी गृहस्थ टेक सोडावयाचा नाहीं' ३ स्वाभाविक व नेहमींच्या किंवा संबंधींच्या गरजा, पर्यासवय, परिपाठ टूक अर्थ ३ पहा (क्रि० राखणें, सभाळणें साधणें चालविणें उतरणें [टेंकों=थांबून रहणें, हिं टेक] ०धरणें–घ' धरणें, चिकटून राहणें नेट धरणें टेकीस येणें–दमून जाणें, असमर्थ होणें टेकीस टेक उतरणें–तोलास तोल देणें, बरोबरी करणें; स्पर्धा लावणें ०दार–टेकीचा पहा टेकीचा–वि आदरातिथ्यांत तत्पर, उदार, स्थिर, शेवटपर्यंत टिकाऊ

टेक—पुन ल्हान टेंकाड, डोंगर, उचवटा

टेक—न १ पेंव समूह, पुंज 'तेथ सिद्ध येती गा आलोटें। सुरवराचें टेकपुट।'–एभा १९.२३३ २ इच्छा (व) गुर्मी, गर्व, धैर्य ३ (व) हट्ट, दुराग्रह

टे(टें)कड–डें, टे(टें)कडी—नस्त्री ल्हान डोंगर टेंकाड, उचवटा, डोंगरी

टे(टें)कण–णें—न टेकू, टेंका, आधारभूत पदार्थ [हिं टेकना]

टे(टें)कणें—सक्रि १ आधारानें ठेवणें, राहणें २ (ल) एखाद्या पदावर, कामावर आशेनें अवलंबून राहणें, भरवशावर असणें खटपट न करता विसंबून राहणें 'ज्या त्या गोष्टींत सरकारावर जी टेंकण्याची त्यास सवय लागली'–नि ४११ ३ —अक्रि आधार घेणें, अंग टाकणें, ओणवणें, ठेपणें, रेलणें, (ल) अवलंबून राहणें ४ (ल) प्रवृत्त होणें 'आथिल्या प्रकारें काम नव्हे पुरा। म्हणूनि व्यभिचारा टेकलिंये।'–तुगा ३०२ [हिं टेकना]

टेकणें, टेकावणें—अक्रि (एखादी गोष्ट) पूर्ण होण्याच्या बेतात येणें, अगदीं जवळ जवळ येणें बेतात असणें. 'मरायास–वाळत व्हावयास टेकणें–टेंकावणें=मरणोन्मुख होणें, अगदीं वाळत होण्याच्या बेतात असणें

टेकबाज—वि (व) गर्विष्ठ

टे(टें)कवा, ट(टें)का, टे(टें)कावा—पु १ टेंकण पहा (क्रि० देणें) २ धिरावा किंवा पाठबळ, आधार दुजारा, पुष्टि (क्रि० देणें)

टेंकस—पु तारेचा आखूड खिळा

टे(टें)काड, टेंकूड—न १ उचवटा, ल्हान डोंगर, टेंकडी २ (ल) ढीग, रास (मोडकी इमारत, माती, चुना, कचरा इ०ची) ढीग, रास, गंज, वैपुल्य, (पुस्तकें, कागद, कपडे, धन, कर्ज, काळजी पापें, रोग इ० यें) उराचें टेंकाड–भरगच्च स्तन, भरदार छाती कपाळाचें टेंकाड–उंच कपाळ पोटाचें टेंकाड–गर्भवतीबाईचें पोट, पुगलेलें पोट

टेंकाडी–डी, टेकोळी—स्त्री ल्हान टेकडी, उचवटा माती ढीग या शब्दानें ल्हान टेकड किंवा न्काड दर्शवितात

टेंकी—वि (व) हट्टी, दुराग्रही

टेंकी, टेंकुली—स्त्री टेकडी पहा 'तुरियें गिरी टेंकुली।' –गीता १.११७४ 'वोळग उत्तर टेकिया।'–शिशु २.१४७

टेकू—पु १ ज्याच्यावर तरफ टेंकतात तो आधार किंवा स्थिरबिंदु २पाठबळ पुष्टि

टेंगळ–गूळ टेंकाळ—न आघातामुळें डोक्यास येणारी गांठ, उटगळ टुग, टुगर पहा

टेंगूळ—न (तजा) मद्रासी मकलीचा एक प्रकार [तामिळ तेन्=मध+कुळ्=मळी]

टेटर—वि (ना) मुजोर, हवेगोर, ताठर

टेटवी टेट—स्त्रीपु एक प्रकारचें झाड

टेटावणें—अक्रि टट करणें (पक्ष्याचें) टयांहा ट्यांहा करणें (ल्हान मुलाचें) [ध्व]

टेटारणें—सक्रि (कों) १ कळीच्या पानाचे न कापता हातानें फाडून तुकडे करणें २ चिडकारणें, धडा करणें [टटे ध्व]

टेटू—पु एक औषधी झाड

टेटे, टेंटें—न १ साळुंखी, ठिटवी इ० पक्ष्याचें ओरडणें २ –स्त्रीन ल्हान मुलांचें रडणें (क्रि० करणें, लावणें) ३ बोलावयास प्रारंभ करताना ल्हान मुलानें केलेला पहिला उच्चार (क्रि० करणें) –क्रिवि वरील प्रकारें आवाज करून [ध्व]

टेणपा—पु मारण्याच्या उपयोगाची जाड काठी, सोटा, दांडकें [ध्व का टाण्णी, टोणे, टोणपी, टोणप=सोटा, धडगा]

टेणपणें—क्रि काठीनें टेणप्यानें मारणें, झोडपणें [ध्व]

टेणा–ण्या—पु १ दिव्याची जाड वात २ ल्हु व धष्टपुष्ट प्राणी (ढकुण ऊ इ०)

टेणें—न उडी, उद्दी (क्रि० मारणें, घेणें)

टेनप—न (व) टणपा, जाड व वाटोळा लाकडाचा तुकडा

टेनप्या—वि (व) धधोंग (माणूस)

टेप—पुन १ टेक, उचवटा, ओग २ –स्त्री टक्कर ढुशी ३ –न (टेपवदल योजतात) (गुन्ह्याबद्दल दिलेली) शिक्षा, सजा याची मुदत ४ (राजा) डिखळ ढेंकूळ, ढप ५ (राजा)

निकावानें मारलेला तडाखा (क्रि० मारणें) ०टाप-पुभव (कों) टवडया, उचवटे इ० [टेप द्वि]

**टेप**—स्त्री (टिपी) कपडयाचें माप घेण्याचें साधन, इंचपट्टी (फितीची किंवा नाडीची) [इं]

**टेपण-णें**—न (राजा) खाव अपुरा पडल्यास त्याच्या वर किंवा खालीं भरतीसाठीं लाकडाचा बसवावयाचा तुकडा [स टिप्=फेकणें, टाकणें]

**टेपण, टेपर, टेपरण, टेपरें**—नपुन १ दोष, बोल, ठपका, उपरोधिक भाषण, अप्रत्यक्ष टीका, टापरण (अपराध, कृपा, उपकार याच्याविषयीं) (क्रि० मारणें, देणें, ठेवणें, येणें) २ निमित्त सबब, कारण [स टिप्=फेकणें, टाकणें]

**टेपर**—न उचवटा टेकाड

**टेंपर**—न (शाकारणी) खाचेंत कौल साफ बसविण्यासाठीं खालीं टकण द्यावयाचा कौलाचा तुकडा

**टेपरणें**—सक्रि १ टापरणें, ढकलणें रेटणें, कोलणें २ (ल) (निंदार्थी घेतैनें) गर्भार होणें.

**टेपरणें**—न मोगरी, बळकट दाडवें, सोटा

**टे(टें)परा**—पु १ उंचवटा टेकाड २ दोष बोल, ठपका; टोमणा (क्रि मारणें)

**टेपराण, टेपार**—न (राजा कुण) निमित्त जबाबदारी —मसाप ३ ६३१

**टेपलणें**—सक्रि १ फटकारणें, एखाद्याच्या अंगावर धावून जाऊन त्यास ठोकणें २ ढकलणें, रेटणें ३ टोमणा मारणें, उपरोधिक भाषण करणें ४ —अक्रि एकमेकावर आपटणें आदळणें, धडक लागणें धडकणें ५ (व) (अश्लील) गरोदर होणें 'इत कैयात दुसऱ्यादा टेपलली' ६ टेपरणें पहा

**टेपलें**—न (व) (तिरस्कारार्थी) गरोदरपणा, मोठें पोट 'लगेच तिचें टपलें आलें'

**टेपशी**—स्त्री १ (राजा) टापशी २ नकर

**टेपाड**—न टेकाड, लहान टेकडी 'तिकडचे मोठे गगनचुंबित पर्वत म्हणजे इकडचीं टेपाडें' —नि ५८६

**टेम**—वि (नदभाषा) तरा संख्या

**टेंब-भ टेंभा**—पुस्त्री (कों राजा) लहान टकडी, उंचवटा, टेंकाड

**टेंब(भ)रू, टेंब(भ)रें**—न टेंबुरणीचें फळ

**टेबल**—न १ लहान मेज २ वाचक [इं]

**टेंबली**—स्त्री (हटकरी नाविक) लोखडी गाळ चकती, चाक टेमलीपहा

**टेंबळी**—स्त्री १ फणसाच्या मार्लावरील काटा २ वाकुल्या दाखवितांना किंवा हसतांना बाहेर दिसणारे दात 'टेबळी काढून कां हसतास?'

**टेंबा**—पु (कों) झाडाचें, डोंगराचें शिखर, अग्र, टोंक, तुरा, शेंडा, शेवट टोंक

**टेंबा टेंभा**—पु १ झाडाचा फांदा, खुंट खांबासारखा उपयोग केलेला २ (ल) आधार आश्रय ३ काठीला बांधलेलीं पानें किंवा चिंध्या इ० गुंडाळून केलेली मशाल (दरोडेखोर, उजेडासाठीं हिचा उपयोग करितात), पलिता; दिवटी 'मग कुड लिंगियेचा टेंभा।' —ज्ञा १ ... ४ (गोंधळातील) दिवटी, दिवा ५ (माण) बिन काचेची व खालीं लाकूड असलेली टिनची राकेल तेलाची मोठी चिमणी मोठा काकडा ६ डौल ऐट, गर्व [दभ]

०पाजळणें—१ दिवा लावणें २ (ल) (कुत्सितार्थी) एखाद्या अप्रसिद्ध मनुष्यानें एखाद्या कृत्यानें किंवा श्रीमतीनें एकाएकीं पुढें येणें प्रकाश पाडणें, पराक्रम करून दाखविणें, डौल मारणें

**(आपला) टेंभा मिरविणें चालविणें**—दुसऱ्यावर आपलें वर्चस्व ठेवणें वरचष्मा करणें, वरचढ होणें, दिमाख दाखविणें ०मिरविणें—ऐट करणें, दाखविणें डामडौल करणें, **टेंभेकरी—टेंभ्या**—पु मशालजी (दरवडेखारातील)

**टेंबी**—स्त्री (कों) नारळाची शेंडी

**टबु(भु)रणी**—स्त्री १ एक जातीचें झाड २ एक प्रकारचा रुपया [स तिंदुक, प्रा तिंबरु]

**टेंबूस**—न टेंगूळ, ढेंबूस, गाठ (शरीर, झाड जमीन यावरील), उचवटा; उटगळ, धका

**टेंमर**—न (व) टेंवरू पहा टेंबुरणी फळ

**टेंभलणें**—अक्रि (व) ओरडणें, बोंबलणें, रडणें [ध्व]

**टेंभा**—टेंबा पहा

**टेंभा**—पु (व) पुरणाच्या पोळीचा कुसकरा व तूप याचा काला 'पोळीचा टेंभा कर व त्यावर तूप घे'

**टेंभी**—स्त्री टेकडी 'टेंभीवर मुंचेबंदी करून ' —पेद ३ ११७

**टेम, टेंव, टयोंब**—पु (कुण) वेळ वखत [इं टाइम]

**टेमली**—स्त्री (नाविक) एक लोखंडी पत्र्याचें कडें यास दोरी घट्ट बसण्यासाठीं बाहेरील अंगास खाच असते

**टेर**—स्त्री १ अति तृप्ति वीट मिठी शिसारी (अन्न इ०ची) २ टर धट चेष्टा फजीति (क्रि० करणें, उडवणें) ३ (व) तुकडा

**टेर**—पु गुवाचा विटेचा पोहो

**टेरको टेरू**—स्त्रीन (कों) १ न गराच्या जोसडाला मधोमध जेथें इमाड बांधावयाचें तेथें मारावयाची एक बोटभर खुंटी २ नागरजुगामध्यें इमाड बसविल्यावर तें निघू नये म्हणून बसविलेली खुंटी

**टेलटिकुरी, टेहलटिकोरी**—स्त्री (गा) अर्धेटळ, टाळाटाळ, उगाच भटकणें

**टेरगुलकरणें**—क्रि (व) चान्हीकडून बोलणें

**टेलिफोन**—पु शब्दवाहक यंत्र [इं.]

**टेल्लु**—वि टिरलु पहा

**टेव**—पु १ सोदेगिरीचे ढंग, युक्ति, वाईट संवय, दुर्लक्षण, नखरा, चरपट्टी, खोड हौस, आवड (क्रि० पडणें) २ ठेवण, आकृति, ढब 'मस्तरीची दिसे केवळ टेव।' –स्वादि ९ ५ ६४ ३ रीत 'नवल सामती ते टेव। युक्ति चातुर्य वैभव।' –एभा २२ ७३०

**टेव-वे, टेवरेव**—पु अव (राजा) नखरेबाज माणसाचे काहीं ढंग, युक्त्या, लकवी, खुब्या, मोहक हावभाव, छानछोकी

**टेवखोर**—वि नखरेबाज, अड्डेबाज, यागामागात राहणारा, ऐटबाज [टेव]

**टेंघण**—न टिपण अर्थ २ पहा ठराविक वेळ, योग्य प्रसंग

**टेरड**—स्त्री (व) बागेतील वान्या (पाण्याचे लहान पाट) फोडण्याची लाकडी कुदळ

**टेवा**—पु १ (राजा) जमीनींत किंवा भिंतींत पाडलेलें लहान भोंक, बीळ, जमीनींतील खळगा, खोलगटपणा २ क्षताचें शोधन ३ ढब, डौल [टोंचणें, टोवणें]

**टेस**—स्त्री (व) १ ताठा, गर्व २ ऐट, दिमाख, डौल, नखरा

**टेहणी**—स्त्री हेटाळणी, अनास्था, टवाळी, हंसें 'सासुरा होईल टेहणी।' –एरुस्व ८ ५२ २ पहारा, देखरेख रक्षण 'करी टेहणी तैसी।' –ज्ञा १३ ७०५ ३ अटकाव, प्रतिबंध

**टेहर**—स्त्री टेर, टर, अपमान, विटंबना, फजीति (क्रि० करणें, उडवणें, उडणें, होणें)

**टेहर**—पु गुवाचा, विष्टेचा पोहो किंवा ढीग, टेर (क्रि० घालणें, पडणें)

**टेहलणी, टेहली**—स्त्री इकडे तिकडे आजूबाजूस निरीक्षण करणें, फिरणें (क्रि० करणें)

**टेह(हे)लणें**—अक्रि टेहलणी करणें खेपा घालणें, पाहरा करणें, चोरीसाठीं गुप्तपणें न्याहाळून ठेवणें –सक्रि चालविणें, कदमावर चालविणें (घोडा इ०) [हिं टेहलना] **टेहलता पाहारा**–पु फिरता पाहरा **टेहलता पाहारेकरी**–पु फिरता पाहारेकरी, याच्या उलट बैठा पाहारा–पाहारेकरी

**टेहळटिकोरी**—स्त्री १ बारकाईनें पाहणें, टेहळणें, न्याहाळून पहाणें, इकडेतिकडे तपास करणें २ भटक्या मारणें, स्वैर गमन, उनाडकी ३ आर्जव, हांजीहांजी ४ (रागानें त्रासून) निरोपानिरोपी [टेहळणें+टिकोरी]

**टेहळणी, टेहळी**—स्त्री दुरून केलेली बारकाईची पहाणी, परीक्षा; बारीक दृष्टीनें पहारा करणें, दुरून एखाद्याच्या हालचालीवर नजर ठेवणें, गुप्त पोलीसाची नजर [टेहळणें]

**टेहळणें**—अक्रि सूक्ष्मदृष्टीनें पहाणें, चौकशीच्या नजरेनें पाहाणें, दुरून बारकाईनें पाहणें किंवा तपासणें; पहारा करणें, गुप्तपणें संशयित माणसावर नजर ठेवणें, एखादें गुप्तकृत्य उघडकीस आणण्यासाठीं पहारेकऱ्यानें बारकाईनें पहाणें 'हें अक्षर मला साफ टहळत नाहीं' पाहाणी करून सर्व गोष्टींचा तलास लावणें. [सं तत्+चल्, हिं टेहल्ना]

**टेहळ्या**—पु पहारेकरी, हेर, बातमीदार, गुप्त दूत, चौकीवर नेमलेला माणूस –वि टेहळणी करणारा, उत्सुकतेनें, बारकाईनें कसोशीनें पाहणारा [टेहळणें]

**टेहेर**—पुस्त्री टेहर पहा

**टेहेळटिकोरी, टेहेळणें, टेहेळता, टेहेळी, टेहेळ्या**—टेहळटिकोरी इ० पहा

**टेळकी**—वि (कु) टेहळ्या पहा

**टेळणी, टेळणें, टेळी, टेळ्या, टेळ्यो**—टेहळणी इ० पहा

**टो**—पु (गो.) टोव पहा [टेवा]

**टो(टों)क**—स्त्री १ चोंच २ –न शस्त्र, उपकरण, हत्यार, लेखण इ० ची अणकुची, अग्र, शेवट, त्यावरून जमीन, गाव, खेडें, इमारत याचा शेवटचा भाग किंवा जागा, प्रदेश ३ मोड, अंकुर [सं तोक्मन्]

**टोक**—स्त्री (व) दृष्टि, नजर (क्रि० लागणें, काढणें) [टक]

**टोंकण**—न (राजा) टोंक, अग्र, शेवट [टोंक]

**टोकणधार**—स्त्री (व) टणटण करणारी स्त्री 'बोलायला मोठी टोकणधार आहे' [टोकणें]

**टोकणणें**—सक्रि भुईमुगाचा एकेक दाणा जमीनींत पुरणें

**टोकणें**—सक्रि हटकणें, प्रश्न विचारणें, रोखणें, पुढें जाऊं न देणें (पाहारेकऱ्यानें) [हिं टोकना]

**टो(टों)कणें**—अक्रि १ एखाद्याकडे उत्सुकतेनें पाहाणें डुकणें, टक लावणें 'चाटावया श्रीअधरामृतासी। अहर्निशी टोकत।' –भारावाल ९ ६३ २ टोंकावणें, डोकावणें, डोकावून पाहणें निरखून पहाणें 'देवी बाहेर टोकता' ३ (व) दोष, ठपका देणें

**टो(टों)कर**—पु चामडयाची तेलाची पाटीसारखी लहान बुधली (बुदला उभा चिरला असता त्याचा एक भाग) चामडयानें मढविलेली डोणी (ही कधीं झाडाचें खोड पोखरून करतात) २ टोकरा, मोठी पाटी

**टो(टों)कर**—पु १ लाव व जाड बांबू म्ह० १ विंचू न्याला टोकर झाला (विंचवीण व्यायल्यावर मरते म्हणजे टोकासारखी–नळी बनते) =सुखसोई नाहींशा झाल्यानें होणाऱ्या दुःखास अनुलक्षून म्हणतात (वरील म्हणींत टोकर ऐवजीं टोलरहि

म्हणतात परंतु तेथें त्याचा अर्थ निराळा होतो ) २ अठरा हात टोकर फिरतो ( घरात ) ' =गेऱ्रास बाधलेल्या केरसुणीनें सर्व घर साफसुफ होतें, म्हणजे घरात कांहींहि मिळण्यासारखें राहिलें नाहीं

**टोकर**—पु १ ( व ) नारळाची करवंटी, कवच, टरफल, फोल २ ( व ) टीनपाट

**टोकर**—पु ( व ) सत्यनाश **टोकर करणें**-पैशाची उधळपट्टी करून नासाडी करणें

**टोकरी टोंकवी**—स्त्री १ चामडयाची किंवा चामडयानें मढविलेली लहान गोल पाटी २ ( राजा कु ) उनाड पशूच्या गळयातील वाद्भूची घाट, गळयातील लोढेणें [ टोकरा ]

**टोंकरी**—स्त्री १ लावट डोकें (साप, पाल, किंवा कांहीं पक्ष्यांचें ) २ (कों ) चोंच ३ जिभेचा शेंडा (साप, पाल इ० चा) [ टोंक ]

**टोंकरी-कारी कागद**—पु जाड विलायती कागद ( टकारी बंदराहून हा कागद मुंबईस पूर्वी येई अशी समजूत ), जाड पोर्तुगीज कागद, जाड टोकर=बाभूच्या पासून केलेला कागद

**टोकरेहुशील**—न नाववरचा कर

**टोकवणें**—क्रि टुकटुक करणें 'टोंकताल वाळा आणिकहि ।' —तुगा २३

**टोकला**—पु १ ध्यास, झुरणी, छंद, खनि ( क्रि० धरणें, घेणें, करणें, लागणें ) २ रोज लागणाऱ्या व ठरविलेला पैसा देऊन घेतलेल्या अन्नाच प्रमाण व असल्या प्रकारची रीत, ठरलेलें वेतन (अन्नाच्या रूपानें ) ( क्रि० लावणें, चालविणें, तोडणें, तुटणें ) ३ गाडीवान तोंडानें टकटक आवाज काढतो तो ( क्रि० वाजणें, वाजविणें )

**टोकळा**—पु भाताची एक जात

**टो(टों)का**—पु १ धान्यातील एक किडा २ ( घट्टेनें ) मोठा व ओबडधोबड द्रोण ३ माप, ताजवा

**टोकाचणी**—स्त्री डोकावणी, डोकें पुढें करून पाहणें

**टोकावणें**—अक्रि एखादी वस्तु बघण्यासाठीं डोकें पुढें करून पहाणें, (अन ) डोकावणें [ टोंक=अग्र ]

**टोंकारलो**—स्त्री मुलाच्या खेळातील एक विनोदी सज्ञा, टुकटुक माकड

**टोंकी**—स्त्री ( गो ) एक प्रकारची मासळी

**टोंकों**—पु १ ( गो ) लहान टोपली २ रानगी लाकांचें एक पवाड

**टोंग**—न ( कों ) टेंगूळ -वि हट्टी छांदिष्ट, उर्मट, हकट (मूल, स्त्री ), अडदांड, अनगेल, हूड, चढेल, शिरजोर ०दार-वि पोकळ डौली; बढाईखोर, पोकळ अरराव, पोकळ गर्विष्ठ, मगरूर

**टोंगळ**—वि १ जाड, ओबडधोबड ( काठी, दाडकें ) २ ( ल ) टोंगदार पहा

**टोंग(घ)ळा, टोंग्या**—पु ( व ) गुडघा

**टोंगा**—पु ( क ) खोळवा

**टोंगाई**—स्त्री टोंगपणा, मगरूरी, स्वैराचार; चढेल किंवा अडदाड वागणूक, आपढग ( मूल, स्त्री याचा ), दाडगाई, उर्मटपणा, उद्दाम सवय, जुलमी वागणूक [ टोंग ]

**टो(टों)च**—स्त्री १ चोंच २ –न टोचून पाडलेलें क्षत, बोंच [ स त्रोटी ]

**टो(टों)चणी**—स्त्री १ वेध, टोचण्याची क्रिया, सूक्ष्म अग्राचा तीव्र आघात २ जाचणी, टुमणी ३ फळाना भोकें पाडावयाचा टांचा, कांडीचें तीक्ष्ण टोंक [ टोंचणें ]

**टो(टों)चणें**—उक्रि अणकुचीदार शस्त्रानें किंवा वस्तूनें छिद्र पाडणें, बोचणें, भोक पाडणें, वेधणें, क्षत करणें ' सोनारानें कान टोंचल्याचें दु ख वाटत नाहीं ' २ ( ल ) मनास लागेल असें बोलणें, गाजणें, मर्मभेद करणें, खोंचून बोलणें ३ फळ, जखम इ० वर ओरखडणें, खरवडणें ४ आश्रयदात्याची इ० आठवण करून देणें

**टो(टों)चळणें**—सक्रि लहान छिद्र पडेल असें भोंसकणें, हळूच टोंचणें [ टोंचणें ]

**टो(टों)चा**—पु १ थोडसें टोंचल्यानें पडलेलें भोंक किंवा दगडातून टोंका काढल्यानें पडलेलें भोंक, अथवा लहान खाच, तसाच दगडाचा काढलेला टवका, कपरी २ टोंचल्याची खूण ३ फळाना भोंक पाडावयाची टोंचणी किंवा टोंचण्याचें हत्यार [ टोंचणें ]

**टो(टों)ची**—स्त्री टोचा अर्थ १,२ पहा (अल्पार्थी) [टोचा]

**टोटकें**—न १ लाकडाचा ओंडका, टोंकळा २ टणपा.

**टोटरा**—पु तोटरा, लाळेच्या अभावानें होणारी अवस्था, घशाचा कोरडपणा, तोटरा ( क्रि० बसणें )

**टोणकणें-ण्याविणें**—सक्रि दाडक्या-टोणक्यानें मारणें, झोडपणें, सडकून काढणें [ टोणका ]

**टोणका-कें टोणकूळ**—पुन दाडकें, टणपा, लट्ठ सोटा, ओंडका ओंडा ठोकळा [ का टोणि, टाण्णे=दाडकें ]

**टोणगट**—न ( तिरस्कारार्थी ) टोणगा

**टोणगा**—पु रेडा, हला, पुळगा म्ह० टोणग्याच्या कानीं किनरी=कोंबड्याला रत्न भलत्याचा उपयोग भलत्या ठिकाणीं या अर्थी

**टोणगी**—स्त्री १ म्हैस, रेडी २ ( ल ) मोठी व आडदाड मुलगी, धागडधिंगा घालणारी मुलगी

**टोणपणें**—सक्रि टोणकणें पहा [ टोणपा ]

**टोणपनाथ(शुद्ध)**—पु मूर्ख, धप्पड, आडदांड, जनुराय लाकडाचा ओंडा, असा मनुष्य

**टोणपा-पें, टोणा**—पु१ ओंडा; दांडकें टोणकें पहा 'पुण्य सरतां एकाएकीं । टोणपा बैसे मस्तकीं ।' 'शहाण्यास शब्द, मूर्खास टोणपा' —२ (ल) मूर्ख विद्याहीन, टोणपनाथ पहा [का टोण्णि]

**टोणपेश्वर**—पु टोणपा अर्थ १, २ पहा [टोणपा+ईश्वर]

**टोणा-ण्या**—पु १ जादू गल्लेल्द देवूण, ऊ, गोचीड २ (सोंगट्या) प्रतिपक्ष्यास दान पडू नये म्हणून हा शब्द उच्चारून मोठ्यानें ओरडतात. ३ जादू मंतरतंतर, टाणाटोणा 'तो मूढ नेणेच मुद्द टोणा।'—आगो २४ ४ (व) विटेचा किंवा मातीच्या ढेकळाचा तुकडा ५ टोला, घाव 'प्रगटिला जर तें हाणी टोणा।'—केक १०३ ६ (वे) सोटा, दांडकें ७ —वि मूर्ख, मद्द, निरर्थक (माणूस) [का टोण्णि, टोण्णे=दांडकें]

**टोणाटाणा-टाणी**—पुस्त्री टाणाटोणा पहा

**टोणी**—स्त्री लाकडाचा लहान ओंडका, गांठ [का टोण्णि]

**टोणें**—न १ केली मापावरोबरचें वजनी माप 'हें भांडें मणाचें टोणें आहे' २ (ल) कांहीं तरी विफायत किंवा नफा होण्याचा धंदा, जागा, अधिकार 'मिळकतीचीं चार टोणीं होतीं तीन उडालीं' ३ जड ओझें ४ वेडूक, टाणाटोणा

**टोणो**— १ (राजा कुग) टणका, हुमटुस २ (राजा) फार मोठा उवटा टेकाड ३ (कु) दांडकें, सोटा —वि (राजा) अडाणी; मूर्ख

**टोप**—पु १ धातूचें उभट व रुंद तोंडाचें भांडें २ (नाटक) केंसाची विणून तयार केलेली ४–६ वांटें रुंद व मानवर गांठ मारतां येईल इतक्या लांबीची पट्टी किंवा वेणी, बुचडा (पुरुषानें स्त्रीचें काम करावयाचें असल्यास) ३ (नाट) राजासाठीं केलेला व बेगड इ० चिकटविलेला लाकडी मुकुट, मुगवट, शिरस्त्राण 'घाडिया वाणली मोहाळी। कवण टोप रागावळी।' —एरुस्व ८ १५ [स स्तूप का गोप्प] ०कर—पु टोपी घालणारा युरोपियन माणूस [टोपी+कर] **टोपड्या**—पु (तिरस्कारार्थी) टोपकर पहा **टोपडें-रें**—न लहान मूल किंवा स्त्रिया यांची वदाची कानटोपी, कुंचडें

**टोपणें**—क्रि (गो) टोंचणें पहा भोंक पाडणें

**टोपड**—पु घोड्याचा एक रंग —अश्वप १ २८

**टोपण**—न १भारी भोंक पाडण्याचें हत्यार गिरमिट, सामता २ अंगुस्तान ३ नगाऱ्याचा खोका, सगाडा ४ झाकण आच्छादन, आवरण ५ टोपणनाव उर्फ प्रचारांतील नाव (मित्र किंवा कुटुंबातील मंडळी एखाद्यास ज्या नावानें हाक मारितात तें) व्यावहारिक नाव पहा ६ कानांतील एक प्रकारची वाळी 'कोंगिंबिरी टोपण घोसवाळया।' —माकु १ २४ [का गोप्प=झांकण] ०वाळी—स्त्री टोपण अर्थ ६ पहा हिचा आकार टोपणासारखा असून तिचा लोळा चपटा किंवा वाटोळा असतो

**टोपणी-णें**—न सुताराचें एक हत्यार, सामता (कु) टोपणा

**टोपणें, टोपसणें**—सक्रि १ टोपणा(सामत्या)नें भोंक पाडणें, निघणें, खुपसणें बारीक छिद्र पाडणें, क्षतयुक्त शरीरांत मोंसकणें २ साल काढण्यासाठीं ओलें लाकूड इ० मागरीनें किंवा दाडक्यानें ठेंचणें, बडविणें ३ खूप मार देणें, ठोकणें

**टोपन**—न (व) दांडीच्या जवळचें व दांडीस आधार म्हणून लाविलेलें आराडे लांकूड

**टोपपदर**—पु (लुगडें) ज्या पदरात उभें व आडवें सर्व रेशमिच असतें असा (लुगड्याचा) पदर

**टोपरवेणी**—स्त्री टोपवेणी, सगळया केसाची मुकुटासारखी घातलेली लहान मुलाची वेणी

**टोपरें, टोपें**—न टोपडें पहा

**टोपला**—पु १ मोठी वाटोळी पाटी, दुरडी, हारा २ (को) लहान टोपली

**टोपली, टोपलें**—स्त्रीन लहान टोपला, पाटी [टोपला]

**टोपशी**—स्त्री १ टापशी, धूम (क्रि० घेणें) २ डोक्याची कातडी ३ खिळ्याचें डोकें **टोपशी उडविणें**—जोरानें खरडपट्टी काढणें, थोडकी उडविणें

**टोपसण**—पु लहान पेटी, डबी, तारंत इ०चें टोपण, झांकण, आच्छादन

**टोपसणें**—अक्रि टापसणें, सुज येणें, सुजणें फुगणें —सक्रि टोपणें पहा

**टोपस(सा)ल**—न (ग्राम्य) साल, कातडें हा शब्द काढणें (—सक्रि) या क्रियापदावरोबर योजतात व निघणें (—अक्रि) या क्रियापदाबरोबरहि योजतात काढणें या क्रियापदाबरोबर योजिल्यास याचा अर्थ निवतपर्यंतच अगाचें कातडें सोलणें असा होतो उदा० 'तो इतक्यात आला तर टोपसल काढील' निघणें या क्रियापदाबरोबर याचा अर्थ नाश होणें दरिद्री होणें, फार खर्च होणें असा होतो उदा० 'त्या प्रयोजनात माझें टोपसल निघालें' [टापणें+साल]

**टोपसा**—पु १ डोकें व कान झाकले जातील अशा पद्धतीनें गुंडाळलेलें वस्त्र, टापशी (क्रि० बांधणें) २ सूज फुगवटी, फुगीरपणा, फोपशेपणा (क्रि० येणें चढणें उतरणें) ३ खिळयाचें डोकें [टोप] ०उडविणें—टोपशी उडविणें पहा

**टोपा**—पु १ एक प्रकारचें हरळें २ (गो) सोनें, चांदी आणण्याची लहान मूस [टोपी]

**टोपी**—स्त्री १ डोक्यावर पागोटयाखालीं घातलेलें शिरस्त्राण, कुल्ला, डोक्यावरची साधी टोपी, पावसाळ्यात डोक्यावर घेतात ती सरलाद इ०ची घोंगडीच्या खोळीसारखी मोठी कुंची, युरोपियन लोकाचें शिरस्त्राण, लष्करी पोशाखातील नाना प्रकारचीं डोक्या वरील आच्छादनें टोपण अर्थ २ पहा २ खेळ ३ (इमारत) खाब व इस्पिजर याच्यामधील बांधकाम याची घडण गोल किंवा इतर प्रकारचीहि असते [स स्तूप-टोप, प्रा टोपिआ, का टोप्प=झाकण, हिं टोपी] **०घालणें**-एखाद्यास बुडविणें, फसविणें, तोटयात आणणें गणेशटोपी घालणें पहा **टोपी सलामत, टोपीचें राज्य तपो, गादीटोपी सलामत**-साहेबाना आशीर्वाद देणें **०कर-वाला**-पु यूरोपियन माणूस, टोपी घालणारा मनुष्य

**टोपु**—पु फुगवटा, फुगारा, सूज, टापशी

**टोपूल**—न (कु) ल्हान टोपली

**टोपें**—न मोठा द्रोण

**टोमका**—पु. आलुत्यावलुत्याखेरीज रामोशी इ० गावातील इतर हकदार

**टोमणा-णें**—पुंन १ (विटीदाडू) विटीला मारलेला टोला, रट्टा, आघात २ (ल) व्याजोक्ति, खोंच, मर्मभेदक टीका, टचका, छद्मी भाषण [का]

**टोमणी**—स्त्री १ तगादा टुमणी पहा २ (जेवण्याचें) ल्हान ताट त्यावरून ३ (ल) गावमहारास दिलेली ल्हानशी इनामी जमीन. [का]

**टोमणें**—न सुमारें पाच शेराचें तल मोजण्याचें माप

**टोमसूळ**—वि (गो) वडील माणूस किंवा पालक याचा धाक नसलेला, टोल्या, उनाड (मूल, माणूस)

**टोमा(म्या)टो, टमाटा**—पु एक प्रकारच्या भाजीचें झुडप व त्याचें फळ हें हिरवें, तांबडें, पिवळें असतें वलवागें, विलायती वांगें, आरोग्यदृष्टया हें महत्त्वाचें असून त्यात ओजद्रव्य (व्हिटॅमिन) फार असल्यानें हें शरीरास शक्तिवर्धक आहे यानें पानथरी कमी होते व हगवणीचा विकार बंद होतो व पचनशक्ति वाढते

**टोलणें**—सक्रि १ दुसऱ्याच्या अंगावर काम टकलणें, टोलवणें चालवाचोलव करणें २ धक्काबुक्की करणें

**टोलभैरव**—पु उनाड माणूस धटिंगण व दांडगा माणूस

**टोल(ल्ह)र**—वि पोकळ किडयानीं पोखरलेलें, पोखरून पोकळ केलेलें (बीठ) कामक्रोधाचे उदीर। चारूनि टोलर करिती अपार।' -एरुख १८ ४७

**टोलवाटोलव-टोलवी**—स्त्री चालवाचोलव, ढकलाढकल घालढकल, टाळमटाळ, टाळाटाळ (उद्योगधंद्याची); इकडून तिकडे फिरवून दूर करणें

**टोलविणें**—सक्रि टोलाविणें पहा

**टोला**—पु १ दांडूचा किंवा काठीचा तडाखा, रट्टा, आघात, दगड किंवा रोडा याचा तडाखा, फटका, ठोका २ विटेचा तुकडा, रोडा ३ तडाखा, टोमणा, खोंचीचें भाषण (क्रि० देणें, मारणें) [हिंदी] **०टोल**-स्त्री टोलवाटोलव पहा [टोलणें] **०ठोसरा**-पु १ तडाखा, रपाटा २ (ल) टोमणा, खोंच (क्रि० देणें)

**टोला(ल्हा)र**—वि १ पोकळ, न भरलेलें (कणीस, धान्याचा दाणा, शेंग) २ किडयानें खाल्लेलें, पोकळ केलेलें (धान्य, लाकूड) ३ (ल) रोड, सुरकुतलेला, चिपडलेला (माणूस, जनावर) ४ पोकळ नळी (मेलेला विंचू, किडा याच्या शरीराची) 'विंचू व्याला टोलार झाला'

**टोलावणी**—स्त्री टोलवाटोलव पहा [टोलाविणें]

**टोलाविणें**—सक्रि १ चालढकलीवर काम टाकणें टोलणें पहा २ एकमेकावर ढकलणें ३ टोमणा मारणें, उपरोधिक भाषण करणें ४ फेंटाळणें, घालविणें 'मूर्खे स्वहित टोलाविलें।' -शिवदिनकेसरीचें पद (नवनीत पृ ४४५) ५ एखाद्या माणसास टाळणें [टोलणें]

**टोली**—स्त्री पैशाचा आठवा हिस्सा, अर्धी दमडी 'नलगे वेंचावी टोली धनानावें।' -तुगा १४

**टोलेजंग**—वि मजबूत, दांडगी, बळकट, खंबीर, धक्के खाऊन टिकलेली (इमारत, खांब इ०) २ अजस्र, भव्य, अत्यंत मोठें, प्रचंड [टोला+जंग]

**टोल्या**—वि टोलवाटोलव करणारा, चालढकल्या, आपल्या अंगावरचें काम दुसऱ्यावर ढकलणारा [टोलणें]

**टो(टों)व**—पु १ (राजा) ल्हान भोंक (जमीनींत किंवा भिंतींत पाडलेलें-खांब पुरण्यासाठीं किंवा झाड लावण्यासाठीं), कोणत्याहि पृष्ठभागावरील खाच, खळगा २ शिवेची खूण म्हणून किंवा मर्यादा दाखविणारें एक फूटभर गोल खणलेलें भोंक, खडा किंवा दगडावरील खूण ३ खोवण, दाराच्या उंबऱ्याचें घर टवा पहा

**टो(टों)वणी**—स्त्री (राजा) वाटाणे, पावटे इ० जमीनींत बोटानें भोंक पाडून पेरण्याची क्रिया, टुपणी

**टोवणें**—न एक माप टोमणें पहा **टोवणें भरणें**-इच्छा पूर्ण होणें

**टोव(वि)णें, टोंविणें**—सक्रि (राजा) टोवणी करणें, टोवणी करून जमीनींत बीं पेरणें २ टोचणें खुपसणें [टोचणें ध्व]

**टोहो**—पु (राजा) टोव पहा

**टोहा**—पु (ना) पत्त्यांचा एक विशिष्ट प्रकारचा खेळ, छक्क्यांचा डाव [ध्व]

**टोळ**—पु १ पिकांचा नाश करणारा व पंख असलेला एक किडा ही जात समुदाय करून राहणारी असून जगात सर्वत्र आढळते, हिची धाड फार नुकसानकारक होते २ नाकतोडा -वि

उडाणटप्पू, उनाड. [प्रा. टोल] ०कांत-कांत-धाड-स्त्री. टोळाचा हल्ला, धाड, झुंड. ०खाद-स्त्री. टोळांनीं केलेला नाश. २ -वि टोळांनीं खाल्लेलें (टोळखाज हें गावढळ रूप आहे).

टोळ—पु. दगडाचा वाटोळा गोटा. ०गोटा-पु. (व.) दगडाचा वाटोळा गोटा.

टोळ—पु (गो.) चिंचोळा पन्हाळ.

टोळ—पु. (वे.) १ गाडीची चौकट २ (वे) (गवंडी काम) खिडकी वगैरेच्या चौकटी मजबूत बसण्याकरितां चौकटीच्या बाजूला जास्त राखलेलीं लाकडें.

टोळ, टोळवण—स्त्री. (वे.) एक प्रकारचें गवत.

टोळका—पु (वे.) द्रोण.

टोळपणें—अक्रि. १ ओसरणें; कमी होणें, पडणें; मंदावणें २ (व्याजोक्तीनें) मरणें.

टोळभैरव—वि उनाड; उडाणटप्पू, रिकामटेकडा; टोळासारखी उगाच नासाडी करीत हिंडणारा; दांडगेश्वर; गावगुंड.

टोळी—स्त्री. मंडळी; टोळकें; समाज; सैन्याची तुकडी, समूह; झुंड; समुदाय, घोळका. २ टोळधाड.

टोळी—स्त्री. १ (गो.) एक प्रकारची मासळी २ (ब.) मोहाचें फळ.

टोंक, टोंका—पु टवका; धारेच्या शस्त्रानें कापलेला तुकडा, जवड्यानें तोडून काढलेला लगदा. (क्रि० घेणें; तोडणें).

टोंकारणी—स्त्री. रोखलेली दृष्टि, भेदक दृष्टि, सारखी टक. (क्रि० लावून पहाणें)

टो(टों)कारणें—सक्रि. (विशेषत पहाणें क्रि०बरोबर योजना). टोंकारून पहाणें; एकाग्र चित्तानें, कान ताठ करून व डोळे रोखून भेदक दृष्टीनें किंवा क्रोधानें डोळे वटारून पहाणें.

टोंकी—स्त्री. १ मस्तकाचा पुढील भाग, कवटीचा, कपाळाचा भाग; चोंटी. २ कापून काढलेला किंवा तोडून टाकलेला तुकडा. (क्रि० घेणें, तोडणें). ३ अर्धा भाग, भकल (अंड्याचें, कवठाचें, नारळाचें इ०)

टोंचणें, टोंचळणें, टोंचा, टोंची—टोंचणें इ० पहा.

टोर—वि खोडसाळ, टारगट, कुचेष्टेखोर, छाकिष्ट, सोदा; लुच्चा, हुच्चा, अप्रतिष्ठित, हलकट, चटोर. 'नहि तरि न म्हणीजे पोर हें टोरवाणी।' -अक्क २ वस्त्वलिंग, गजगौरीव्रत ३९.

टोळ—(महानु.) दिवेलावणी 'तें ज्ञान मंत्रविद्येची दीप कळा। सत्वगुणीं अधिकार टोळा।' -ज्ञाप्र ५४७

टोळी, टोळें, टोळी अमावास्या—टवळी, टवळें इ० पहा.

ट्या(ट्यां)व—न (कु.) टेकडी. टेंबा गहा. ग्राम्य उच्चार.

ट्यांहां, ट्यांहांट्यांहां—क्रिवि. लहान मुलाच्या रडण्यासारखा आवाज काढून. [ध्व.]

ट्यांहाळ, ट्यांहाळणें, ट्यांहाळी—टेहळ इ० पहा.

ट्रंक—स्त्री. लोखंडी पेटी. [इं.]

ट्रस्ट—पु. एखादी मिळकत, विशिष्ट उपयोगाकरितां कांहीं विश्वस्त गृहस्थांच्या हवाली करून केलेली व्यवस्था. [इं.]

ट्रस्टी—पु पंच; व्यवस्थापक; मृत्युपत्रान्वयें मालमत्तेच्या व्यवस्थेचा अधिकार ज्या लोकांस दिलेला असतो तो. [इं]

ट्राम, ट्रामवे—स्त्री. रस्त्यावरून रुळावरून चालणारी गाडी (विजेची, घोड्याची). [इं.]

---

# ठ

ठ—वर्णमालेंतील बारावें व्यंजन, ट मध्यें महाप्राण मिळविल्यानें हें अक्षर बनतें. अक्षरविकास —याच्या तीन अवस्था असून पहिली दिल्ली येथील शिवालिक स्तंभावरील शिलालेखांत दुसरी व तिसरी उज्जयिनी येथील लेखांत (११ वें शतक) आढळते. १० व्या शतकापर्यंत ठ नुसता वर्तुळाकृति होता.

ठक—पु. लुच्चा, फसव्या, धूर्त मनुष्य 'ठकउनि लुटावया पटु ठक नेवि ससार्थवाह सार्थातें।' -मोसभा ६.८९. -न. (काव्य) तटस्थपणा, आश्चर्यामुळें येणारी एकाग्रता, आश्चर्य, भुल, विस्मृति, दिङ्मूढता. (क्रि० पडणें). 'उभा जानकीरमण। वधूसहित सुलक्षण। उभयरूपाचें दरुशन। पाहाण्या ठक पडिलेंसे।' -वेसीस्व १०.१२१. -वि. तटस्थ. [सं स्थग, हिं. ठक, ठग] म्ह० 'ठकास महाठक भेटला.' ठकडा-डी-डें-ड्या-वि. लुच्चा; सोदा, फसविणारा, मोठा ठक. 'म्हणती ठकडा रे कान्हा।' -तुगा २१०. 'अवघ्या जातींमध्यें ठकडा सोनार। त्या घरीं व्यापार झारीयाचा.' ठकणा-णी-वि. ठकडा पहा 'कोण मिळाली ठकणी' -अफला ७८. ठकडेपणा-न फसवेगिरी. 'तें ठकडेपण श्रीपती। न चले मजप्रति सर्वथा।' -एभा २९.७२८. ०बूक-स्त्री फसवणूक, फसगत, लुच्चेगिरी, लबाडीनें केलेली नागवणूक ठकणें-अक्रि. १ फसणें; फसले जाणें; दगा होणें, निराशा होणें, बुडणें (धंद्यात) चुकणें. 'माझी ठकली वो बुद्धि।' -कथा १५.१४२. २ (युक्तीनें) थकणें, दमणें, श्रम होणें किंवा पावणें; वेद राहणें, खपणें, सरणें, अंतरणें. 'जरी राजा घरासि ये। तरी बहुत उपेगा जाये। आणि कीर्तीही होये। श्राद्ध न ठके।' -ज्ञा १७१८१. ३ -सक्रि. (को.) दगा देणें; नाडणें, ठार मारणें (असावध किंवा पूर्व तयारी नसता, सापाच्या दंशानें किंवा चोरानीं हल्ल्यांत) -अक्रि. आश्चर्यचकित होणें. 'पाहेना तंव चमत्कारें। अवधान

ठकलें ।' –ज्ञा ७ २०० [ हिं ठक्ना ] ०धंदा–पु फसवेगिरी, सोदेगिरी, लुच्चेगिरी, लुच्चेपणाचा व्यवहार ०बाज–वि ठक अर्थ १ पहा [ हिं ] ०बाजी–स्त्री १ ठकधंदा पहा २ (कायदा) कोणा मनुष्यास फसवून त्याचा माल देण्याविषयीं त्याचें मन वळविणें [हिं] ०वणी–ठकवणूक–स्त्री ठकधंदा पहा ०वरा–वि ठकविणारा, लुच्चा ठक अर्थ १ पहा. ठकवा–व्या, ठकाऊ, ठकारू(वू), ठकू–वि ठकवरा पहा ठकवाठकव–स्त्री नाना प्रकारची फसवणूक ठकवणी पहा [ठकविणें] ०विणें–सक्रि फसविणें, लबाडी करणें 'सुरासुरातें ठकवूनी । महादेव मोहिला ।' –एरुस्व २ १९ [ठकणें] ०विद्या, ठकूविद्या–स्त्री फसविण्याची कला, कपटयुक्ति, लबाडी, ठग लोकांचें चातुर्य ०व्याज–न फसवून घतलेलें व्याज, अमर्याद व्याज ०व्यापार–न कपटाचा व्यापार, धंदा, उद्योग ०सौदा–पु १ ज्या वस्तूनें किंवा मालानें फसविण्यात आलें तो माल २ ठकव्यापार पहा

ठकठक–स्त्री ठणठण किंवा टकटक असा ठोकण्याचा आवाज, दणका, किटकिट, धूमधडाका, त्रासदायक भुणभुण किंवा बडबड [ ध्व ] ठकटका–वि क्रिवि हातोड्यानें एखादी वस्तु ठोकली असता होणाऱ्या आवाजासारखा आवाज होऊन, त्यावरून कानठळ्या बसविणारा आवाज ठकठकणें–अक्रि ठक ! ठक ! आवाज करणें ( हातोडीनें ठोकून इ० )

ठकठकें–न शेतात दाणे खावयास आलेल्या पक्ष्यानीं भिऊन उडून जावें म्हणून वाजविलें असता ज्याचा आवाज होतो असें एक लाकडी यंत्र, खटखटें [ ध्व ]

ठकणें–अक्रि १ ठाकणें, उभा राहणें 'न ठके निषेध आड । न पडे विधीची भीड ।' –माज्ञा १६ १८८ २ घडणें, होणें, प्राप्त होणें 'नातरी देवो जैसें सांगतील । तैसें आपणपां जरी न ठकेल ।' –ज्ञा ६ ३३५ ३ राहणें, वास्तव्य करणें, असणें 'तयाचीं न ठकतीचि अगीं कामें ।' –ज्ञा १० १६६ ४ थांबणें, बंद पडणें 'जरी राजा घरासि ये । तरी बहुत उपेगा जाये । आणि कीर्तिही होये । श्राद्ध न ठके ।' –ज्ञा १७ १८६ [ स स्था ]

ठकणें–सक्रि फसणें ठकविणें, फसविणें 'म्हणशील मना इद म्यां ठकीलें' –व १२७

ठकाठकी–स्त्री लबाडी, ठकबाजी प्रत्ययेंविण प्रेत्न नाना । ठकाठकी ।' –दा १० २ ८

ठकार–पु ठ अक्षराचा आकार 'ठकाराचें ठाण सरीं धनुष्य बाण । मारुती सन्मुख उभा कर जोडून ।' –वि १ मनोहर सुंदर मोहक 'तटस्त जैसी चित्रलेपें । ठकार मूर्ती देखोनी ।' –वेसीस्व ५७ २ ठक, लुच्चा, चोर, ठकविणारा ३ तोटा येणारा ( धंदा, व्यापार )

ठकारणें–अक्रि होणें, बनणें, असणें, 'ठकारली व्यक्ति विठ्ठल वेषें ।' –व ३११ 'ठकारलेसें ब्रम्ह सर्वेहि बघता विठ्ठल वेषें ।' –व ६२६ [ स स्था ]

ठकावणें–सक्रि फसणें भुलणें 'तुका ठकावला ठायीं ।' –तुगा ८३४

ठकोर–पु परिपाठ, कार्यक्रम 'चालू दे नित्य भेटीचा ठकोर' –अफला ७७

ठकोर–पु एक जात व तींतील व्यक्ति, ठाकूर

ठग–पु एक जात व तींतील व्यक्ति पेशवाईच्या अखेरीस ठग नावाचे रानटी लोक विशेषत उत्तर हिंदुस्थानांत व सामान्यत दक्षिणेंत हिंडून प्रजेला ठकवून लुबाडण्याचा धंदा करीत व आपल्या हातरुमालानें ते लोकांचा प्राण घेत [ स स्थग, ठक ]

ठगणा–ण्या, ठगवणूक, ठगणें ठगबाज–जी, ठगणी, ठगवणूक, ठगविणें, ठगवरा, ठगवा–व्या, ठगविद्या, ठगाऊ–ठक मध्यें पहा

ठगणी–वि 'ठकणा–णी' पहा

ठगाई–स्त्री लुच्चेगिरी ठकबाजी पहा [ हिं ]

ठगाळ–वि लुच्चा, धूर्त 'कान्हो ठगाळ क्रीडा करी ।' –भज६२ [ ठक ]

ठगी–स्त्री ठग लोकांचा धंदा, फसवेगिरी

ठट्टा ठट्टामसक(स्क,ख)री ठट्टेबाजी–स्त्री थट्टा, दुसऱ्यास चीड यावयाजोगी चेष्टा विनोद, वाकुल्या, उपहास टवाळी ( क्रि० करणें ) [ हिं ] ठट्टा करून टाकणें–उपहास करणें, थट्टेचें स्वरूप देणें ठ(थ)ट्टेवर नेणें–विनोद करणें ठट्टेखोर–बाज–वि नेहमीं दुसऱ्याची थट्टा, विनोद करणारा, विनोदी [ म थट्टा, हिं ठट्टा+फा खोर ]

ठणक–स्त्री १ स्फुरण, कंप, कळ ( दुखावलेल्या अवयव किंवा क्षत याची) २ क्षीण शक्ति कण्हणें–पु ठाणअसा मोठा आवाज 'तीरा गोळ्याचे ठणक होती ।' –ऐपो ८३ [ध्व ठण ]

ठणक–स्त्री ठुसठुस व्यथा ( क्रि० होणें ) 'औषध दतो म्हणजे ठणक होणार नाहीं –अ हें अव्यय कोरडा, सुका या शब्दानंतर आलें असता त्याचा अर्थ पुरपूर अगदीं, निखालस (कोरडा, का ) असा होतो

ठण–कन–कर–दिनीं–दिशीं–क्रिवि धातूवर जड पदार्थानें मारलें असता होणाऱ्या अवाजाप्रमाणें आवाज होऊन, ठणकन इ० [ ध्व ]

ठणकणें–अक्रि स्फुरण पावणें ठणणें, ठणठण करणें, दुखणें, वेदना होणें ( व्रण क्षत इत्यादि ऐकू यईल इतक्या आवाजानें ) [ ध्व ठण' ठण' ]

**ठणका**—पु १ तीव्र वेदना, ठुसठुस, तिडीक, घमक, शिगर, दुःख २ वारा, थंडीचा कडका ३ थंडीची शिरशिरी हुड हुडी (क्रि० बसणें, लागणें) (क्रि० पडणें, सुटणें) [ठण! ठण!] ०बसविणें-(ना) खोड मोडणें, कायमचा बंदोबस्त करणें ठुणक-पुश्री वेडाची लहर (क्रि० येणें)

**ठणकावणें**—अक्रि १ ठुसठुसणें, ठुसावयास लागणें; ठुस ठुसणें २ –सक्रि भांड्याचा नाद पहाण्यासाठीं त्यावर टिचकी, टोला मारणें ३ चिडवानें नोंगी मारणें. ४ खरडपट्टी काढणें, कानउघाडणी करणें, भोसडणें; धाक दाखविणें ५ काम इ०चा तडकाफडकीं निकाल करणें, तावडतोब उरकून टाकणें. 'धार विचे वावर नागरून ठणकाविलं' ६ जोरानें चालविणें, बेदरकारपणें हाकणें (वाहन, पशु माणूस) [ध्व ठण]

**ठणठण-ठणा**—क्रिवि ठुसठुसां (वेदनेचा), घणघणां (हातो डीनें ठोरण्याचा खणखणां रिते भांडें वाजविल्याचा) इ० आवाजा प्रमाणें आवाज होऊन, बोंबलण्यासही लावतात. [ध्व ]

**ठणठणणें**—अक्रि १ (जखम इ०) जोरानें ठुसठुसणें, ठणठणणें, तीव्र वेदना होणें २ धातूचें भांडें खणखण वाजणें ३ ठणठण उडणें [ध्व ]

**ठणठणपाळ**—पु १ (किंवा त्यास मदनगोपाळ हा शब्द जोडून) मूर्ख, गयाळ किंवा दरिद्री मनुष्य, कफल्लक माणूस, विद्याहीन माणूस २ (ल) ठणठणाट पहा

**ठणठणाट**—पु १ घणघण असा आवाज (धातूच्या भांड्या वर हातोडीनें मारलें असता निघणारा) नाद. २ (तिजोरीतील), पाण्याचा खडखडाट, फन्ना, चट्टा (कोठडीतील वस्तूंचा) दारिद्र्य, गरिबी, पोकळपणा, कमतरता, गरज, बोंब, दुर्मिळता [ध्व ठण! ठण!]

**ठणठणीत**—वि १ खणखणीत (धातूचा नाद) २ (ल) खडखडीत (अतिशय कोरडेपणा) 'ही विहीर कोरडी ठणठणीत आहे' [ठण! ठण!]

**ठणण**—क्रिवि ठणठण-ठणा पहा

**ठणत्कार**—पु ठणत्कार पहा

**ठणणें**—अक्रि (व) कण्हणें, कुंथणें

**ठणाका, ठणाण**—पु ठणठणाट अर्थ १ पहा

**ठणाठण-णां ठणाणा**—क्रिवि ठणठण-ठणा पहा [ध्व.ठणां ठणां]

**ठणाणणें**—अक्रि ठणां असा मोठा आवाज होणें, वाजणें [ठणाण]

**ठपका**—पु १ दुष्कृत्याचा डाग, कलंक, कालिमा; बट्टा; गुन्ह्याचा आरोप, दूषण (क्रि०आणणें ठेवणें येणें) २ टपका, पडणारा थेंब [हिं]

**ठप(पे)कारणें**—सक्रि १ गुन्हा किंवा अपराध याची आठवण देणें, ठपका ठेवणें, टोमणा मारणें २ (ल) मर्मभेदक बोलणें, ठण-कावणें ३ गिळंकृत करणें, दाबणें ४ (धयात पैसा, नफा) खरमरीत किंवा कडक रीतीनें ताकीद देणें, हुकूम करणें [ठपका]

**ठपकाविणें**—सक्रि दोष देणें, लावणें, आरोप ठेवणें, अपराध लादणें (एखादें निंद्य कृत्य केल्याबद्दल) [ठपका]

**ठपठप-ठपां**—क्रिवि थेंब थेंब पाणी पडण्याच्या आवाजा प्रमाणें, धावताना घोड्याच्या टापाचा आवाज होतो त्याप्रमाणें आवाज होऊन, टपटपां-टपां [ध्व]

**ठमक**—स्त्री नगरा, चपटी **ठमकआई**—स्त्री थोराड व उफाडयाची स्त्री; ठुमकत चालणारी बाई, आडदांड, गुबदुल मूर्ख, वयानें लहान पण बहुत शहाणी मुलगी

**ठमकठाणवी**—स्त्री मोहक बांध्याची व ठुमकत चालणारी स्त्री [ठमकणें+ठाणवी]

**ठमकणें**—अक्रि नखऱ्यानें चालणें, डौलात, ऐटींत किंवा नटत मुरडत चालणें, ठुमकत ठुमकत चालणें, नाचण्यासारखें नख ऱ्यानें चालणें [ध्व हिं ठमकना]

**ठमका**—पु १ ऐटबाज चाल, थाटाची चालण्याची ढब, नखऱ्याची चाल २ रुसून किंवा रागानें घेतलेला गिरका, उसळी (क्रि० मारणें, मारून जाणें) [ध्व हिं]

**ठमकारा**—पु ताठा, गर्व, नखरा; उसनी ऐट 'विहीण बाईचा ठमकाराच मोठा' [ध्व ]

**ठमकी चाल**—स्त्री. सावकाश पण ऐटीची घोड्याची चाल

**ठमठमाट**—पु तोरा, ऐट, थाटमाट व अहपणा, पुढें पुढें करणें

**ठरणूक**—स्त्री ठराव, निकाल [ठरणें]

**ठरणें**—अक्रि १ निश्चय होणें, निकाल होणें, कायम होणें, निर्धार करणें, सिद्धांतास येणें २ रहाणें, वस्ती करणें, निभावणें, टिकणें, नांदणें 'निरंजनवनीं ठराल तेव्हां नित्यानें मराल हो।' –सोहिरोबा कृतपदें (नवनीत पृ ४५०) ३ गाभण होणें (गाय, घोडी इ०) ४ रणांगणात गाडून उभें राहणें 'लढाई मारू एकदा ठरून लढाई मारूरे।'–ऐपो २३४ ५ (कायदा) आरोप लागू पडणें, [स स्थिर, हिं ठहरना]

**ठरवणी-वणूक**—स्त्री ठरावणी पहा

**ठरवती**—स्त्री ठरोती पहा

**ठरविणें**—सक्रि निश्चित करणें, कायम करणें, नेमणें करार करणें [ठरणें प्रयोजक, हिं ठहराना]

**ठराव**—पु १ निकाल निश्चय निर्णय, पक्का निर्धार, करार २ स्थिरस्थावर वसति, राहणी, स्थैर्य, टिकाव ३ (कायदा) दाव्यातील मुख्य मागणीखेरीज इतर दाद मिळण्यासाठीं केलेल्या

अर्जावरल्या निकाल, इं ऑर्डर –सिव्हिल प्रो कोड ४ सभेंत मूळ किंवा उपसूचित स्वरूपात मान्य झालेली सूचना ५ (कायदा) नियम, रूढ, सिद्धांत [स स्थिर्, म ठरणें, हिं ]

**ठरावपत्र**—न (कायदा) दस्तऐवज, फैसला, निवाडपत्र, इं जजमेंट २ नियमाचें पत्रक, सूचना किंवा हुकमाची कलमबंदी, हुकुमपत्र

**ठरावबंद-पत्र**—पु ठरविलेली कलमें लिहिलेली यादी, मामलेदार वगैरेंना त्याच्या कामासंबंधानें आलेला सरकारी कागद (यात त्याना सूचना, वटहुकूम इ० लिहिलेले असत), कानूजाबता, कोणताहि ठराव, निवाडा किंवा त्यातील अटी अमलात आणण्यासाठीं दिलेलें आज्ञापत्र, एखाद्यास मक्त्यानें मामलत दिली असता त्यानें सरकारात सालअखेरीस किती पैसा किती हप्त्यानें द्यावा त्याची यादी

**ठरावणा-वणूक**—स्त्री. निकाल किंवा निर्णय, निश्चय करण्याचा व्यापार, कबुली २ टिकाव [ठरविणें]

**ठराविणें**—सक्रि विवादित गोष्ट ठरविण्य त येईल असें करणें [ठराव]

**ठरीव, ठराविक**—वि कायमचा, ठरलेला

**ठरोती, ठरवती**—स्त्री ठराव, निर्णय, करार, निश्चय, ठाम मत 'नतर धूर्त विशालमति सागे विहीरहुडा ठरोती।'-पैमापेंदु

**ठल**—वि (व) थट्टेखोर, विनोदी. **ठलेली**–स्त्री (व) थट्टा, मस्करी.

**ठलवा**—पु (व) बेकार, बिनरोजगारी माणूस

**ठलाल**—वि (व) चुचर ठक, वस्ताद

**ठवय**—पु (गो) सुतार

**ठवला**—पु जात्याचा खुंटा (खालच्या पेढीच्या छिद्रात बसवावयाचा हा लाकडाचा असतो) [म ठाव]

**ठंवस**—नपु वायदा, संकेत, नेमणूक

**ठवळ**—वि योग्य, शोभेसें, ठळक, ठसठशीत 'शृंगार अलंकार सोनेंयाचें। ठिकठवळ माणिक मोतियाचे।' –ख्रिपु १ ३० ५८

**ठस**—वि १ स्पष्ट, स्वच्छ, ठसठशीत, ढळढळीत, मनात भरण्याजोगें, झगझगीत (अक्षर, रंग) २ बळकट, पूर्ण, ठराविक (रुची, इ०) ३ मजबूत, भरगम, घट्ट विणलेलें, दणगट (कापड), निश्चित, निर्भीड 'ठसठोंवस खटनट।' –दा २ ३ ३२ भरींव (धान्याचा दाणा) [स स्था]

**ठसक**—स्त्री १ ठणका लागणारी जखम व्रण २ ठुमकत चालताना पायाच्या जोडव्यातून निघणारा आवाज, त्यावरून ३ (ल) ऐट, ढब, नाजूकपणा, नखरा, ठहाव मनावर पडणारी छाप, ठणकारा, तोरा (चालणें, नाचणें, भाषण करणें यातील) –पु सोवळा, डाम –क्रिवि ४ ठुमकत ठुमकत मुरडून पहात, (स्त्री, घोडी) (क्रि०चालणें) [ध्व ठस!] ०दार–वि नादयुक्त, वाजणारें (जोडवें) २ ऐटदार, नखरेबाज, ठमकाऱ्याचा (चालण्यात, घोड्यावर बसण्यात)



**ठस-कन-कर-दिनी-दिशीं**—क्रिवि खटकन्, धडकन् इ० (दोन कठिण वस्तु परस्परावर आदळल्यानें होणाऱ्या आवाजा प्रमाणें आवाज होऊन) [ध्व ]

**ठसका**—पु हरभऱ्याच्या डाळींत मसाला घालून तयार केलेली चटणी, चटका –गृहि १ २५७.

**ठसका, ठसकारा**—पु १कडत किंवा तिखट पदार्थ खाल्यानें, तपकीर ओढल्यानें, पाणी घशात एकदम गेल्यानें, नाक, डोळे वगैरेंत घशातून जाताना होणारी वेदना, ढास (क्रि० लागणें) २ ठस! शब्द होईल असा कपाळ इ०वर एखाद्या वस्तूचा आघात होऊन झालेला आवाज ३ बोलण्यातील जोर, छाप, वजनदारपणा, मर्मभेदक भाषण, कुत्सित भाषण, टोमणा **ठसक्याचा**–वि तडफदार, मोठ्या आवेशाचा, दृढनिश्चयी, ऐटबाज, रोखठोक, मर्मभेदक (माणूस, भाषण, धदा, कार्यक्रम) **ठसकेबाज**–वि फाकडा, छानदार, डौलदार, तडफदार, आवेशी, कडक, रोखठोक, जोरकस (माणूस इ०) [ध्व ]

**ठसठशी(सी)त**—वि १ ठुसठुस करणारें (गळूं, व्रण इ०) २ खडखडीत, स्पष्ट, हजरजबाबी, उत्साहवर्धक, सडेतोड (भाषण, कार्यक्रम), बोचणारें, उपरोधिक, टोमणा लगावणारा; चमचमीत, फोडणीचा, रुचकर (तिखट, उष्ण, तीक्ष्ण पदार्थ), तीक्ष्ण (मसाला) ४ घोंसदार, गरयुक्त, लठ्ठ (केळें, चिंच इ०) ५ ठळक, डोळ्यात भरणारें, चकचकीत, घस्मर (दागिने) [ठस]

**ठसठस**—स्त्री जोराची ठुसठुस, व्यथा, दु ख, ठणका [ध्व]

**ठसठस-ठसां**—क्रिवि १ ठुसठुसत, फुरफुरत (गळु इ०) २ कपाळ इ०ला जड पदार्थ फटकन लागून वेदना होऊन किंवा ठस दिशी लागण्याची क्रिया होऊन (लागणें, वाजणें), रपाटे, धपाटे मारण्याचा आवाज होऊन [ठस!]

**ठसठसणें**—अक्रि १ ठुसठुसणें ठणकणें, फुरफुरणें २ (ल) उमटणें 'मुख अतरीचें वाद्य ठसठसी।' –तुगा ११२

**ठसठोंबरा**—पु १ टोमणा, व्याजोक्ति, व्यंगोक्ति, तडाखा (क्रि० देणें) २ पाहुण्यास हलक्या प्रकारें वागविणें (भाताऐवजी काजी, कण्या इ० देऊन), पाहुण्याचा अनादर [ठस=ध्वनि+ टोंबरा=तडाखा] (वाप्र) ०वाटाण्याच्या अक्षत-तोंडावर रोखठोक, कडक, स्पष्ट खडखडीत उत्तर (क्रि० देणें, लावणें)

**ठस ठोंवस**—वि १ निर्भीड व अक्षरशत्रु अडाणी, टोंण्या. 'ठस टोंवस खट नट।' –दा २ ३ ३ २ ओबडधोबड, मोठाधाटा [ठस+ठोंबरा किंवा टोंण्या]

**ठसणें**—अक्रि १ खोलवर जाणें, ठसा उमटणें (मुद्रा, चिन्ह, छाप) २ (ल) सांगितलेलें, ऐकलेलें, पाहिलेलें, मनावर बिंबणें, पटणें दृढ राहणें, भरणें (उपदेश, गोष्ट) 'सकळांलागीं भाव ठसला। –नव १८ १८३ [हिं ठसना]

**ठमदार**—वि. झुमझुम, छुमछुम, रुणझुण किंवा ठमकेदार आवाज काढणारें (जोडवें) [ध्व]

**ठस**—वि जाड, मजबूत, ठोंबस

**ठसविणें**—सक्रि मनात उतरेल असें करणें, बिंबविणें, गळीं उतरविणें [ठसणें]

**ठसा**—पु १ मुद्रा, छाप, शिक्का (क्रि० देणें, करणें पाडणें) आकार रूप 'ते न मोडता अलंकारठसे।' —एभा २८ २६४ २ (आकृती इ०चा) छाप मारण्याचें साधन, साचा, हत्यार ३ ठोसा, घाव ४ (ल) मनावर पडलेलें प्रतिबिंब, समजून, ग्रह (क्रि० पडणें) ५ (ल) अधिकार, छाप मान 'परगणे पाटिल तुमचा सामरा जिकडे तिकडे ठसा।' —पला ८६ ६ (ल) प्रसिद्धि, कीर्ति 'आम्ही याज्ञिक या आनशा। तिन्ही ठसा तिहीं लोकीं।' —एभा ५ १४७ 'त्रिभुवनीं याचा। ठसा नलगे पुसावे।' —तुगा २८५ ७ प्रकार, रीत 'पावोनिया मुक्त दशा। देहीं भोग भोगी ठसा। त्यासि स्थावराचा ठसा। झालेंसा ठसिलें।' —एभा १० ७३१ ८ स्थिति 'एक क्षण पावोनि जाहला पिसा। पडिला अव्यवस्थ ठसा।' —एभा ११ १०१७ ९ (व) कफाचा बेडका १० अक्षराचें चिन्ह, धातूचा टाईप [स स्था, ठसणें हिं ठप्पा] **ठसॉल, ठसोल**—वि ठसाचें 'कोठीत म्हणाल ठसील नाणीं।' —वस्वसी ११ ७९ **ठसेकागद**—पु स्टांपकागद **ठसेवाला**—पु ठसा बनविणारा माणूस, इ फौंडर पचमेकर

**ठसाठस-ठसां**—क्रिवि ठसठस-ठसा पहा

**ठसामणें**—अक्रि अतिशय ठणका लागणें, ठुसठुसणें [ठसठसणें]

**ठस्स**—वि ठसठशीत पहा

**ठळक**—वि १ जाड, भरींव पुरपूर, मोठा, सुंदर (धातूचें पान अलंकार, वर्णप्रावर्णे) २ स्पष्ट, डळडळीत, मोकळें, स्वच्छ (अक्षर, आकृति खूण चादरें) ३ श्रेष्ठ, महत्त्वाचा प्रमुख (विशेषत, धनानें) ४ सुंदर, दिखाऊ, श्रेष्ठ, मजबूत धिप्पाड, उमदा, ठुमदार (प्राणी, वस्तु—सामान्यपणें) [का तळ्कु]

**ठळठळीत**—वि ठळक पहा मोठें व तुकतुकीत (गळे, अक्षर, चिन्ह)

**ठळणें**—अक्रि (लोखंडी कारखाना) काठ काढणें

**ठाइका**—वि तमाच —शार

**ठाईं**—(काव्य) ठिकाणीं स्थानीं जागीं [ठाव-य, ची सप्तमी] **०पडणें**—(काव्य) सापडणें, कळणें 'तो देव कोण्या गुणें। ठाईं पडे।' —दा ८ १ १५

**ठाईंचा-ची-चें**—वि (काव्य) मूळचा, पहिलाच, जात्याच 'तो ठाईंचा मानकरी।' —कालिकापुराण १० ४६

**ठाऊ-व, ठावो, ठाओ**—पु (काव्य) ठिकाण, जागा 'वहि भूमी जानयासी। ठाऊ कैसा परियसा।' —गुच ३६ १३० [स स्था]

**ठाऊक-का, ठाउका-वें**—वि (का) प्रख्यात प्रसिद्ध माहीत, माहितीचें, कळलेलें 'परी तयामाजी गतु आहे। जो प्राणातें घेऊनि जाये। तो जैसा ठाउवा नोहे साकल्येपणें।' —ज्ञा २ २१४ 'प्रभुस्तुति न ठाउकी परि तिच्या महा कामुका।' —केका २५ [का टाविके]

**ठाक**—पु ठसा

**ठाकठिकी**—स्त्री १ सुव्यवस्था, बेतवात, जम, जयच्या तेथें लावणें किंवा घालणें (सामान, वस्तु, पोषाक), व्यवस्था, नीटनेटकेपणा, चापचोप २ डागडुजी; दुरुस्ती, नीट करणें, टाप टीप [टीक द्वि] **ठाकठिक्या**—वि टापटीपीनें वागणारा, व्यवस्थित, मोहक, सुंदर **ठाकठीक**—वि क्रमवार, जेथच्या तेथें, व्यवस्थेशीर लावलेला, नीटनेटका, बरोबर [टीक द्वि]

**ठाकठोक**—क्रिवि १ हातोड्यानें ठोकलें असता निघणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन २ —वि रोख, प्रत्यक्ष, तत्काळ 'ठाकठोक माझी प्राप्ति। पगिस्त न हाती आणिकाचे।' —एभा १२ १० [ठोक] म्ह० ठाकठोक बोहणी रोख

**ठाकण-णी**—न. ठिकाण, स्थान, जागा. 'तुका म्हणे वाणी। वेचों बैसोन ठाकणीं।' —तुगा १४६९ [स स्थान]

**ठाकणें**—अक्रि १ सजणें, शोभणें २ (काव्य) (उभा या शब्दानें आरंभ होऊन) उभें राहणें; स्तब्ध राहणें, स्वस्थ उभें राहणें 'तिए ठाकीं न लगती जवळीं।' —शिशु ८५ ३ स्वीकारणें 'जिहीं टाकिलें चरणछत्र।' —एभा १९ ११४ ४ जवळ येणें, प्राप्त होणें 'जैसी नाव थडिये टाकिती।' —ज्ञा २ ३४९ ५ थांबणें, बंद होणें 'जैं यमनियम टाकती। तेथ इंद्रियें वैरा राहाती।' —ज्ञा १ २४१. ६ (व) चट्टा करणें ७ मर्जी असणें आवडणें 'मग करू दवा टाक ठेलें।' —ज्ञा ११ ३८ ८ पोहोंचणें 'ठाका वया निजबोधासि।' —एभा ७ ३५१ ९ गाठणें 'तेथें उचरिता पाउलीं। निजबोधाची पव्हे टाकली।' —एभा १० १६४ १० पटणें, खरें वाटणें 'श्रवण ऐकोनि नास्तिक। दवोचि नाहीं म्हणती देव। आहे म्हणती ते पोटपाटक। आम्हांसि विशेष ठाकेना।' —एभा ११ ७०३ ११ घडणें, शक्य असणें 'ठाके तो करावा जपतप।' —एभा १८ ३१८ १२ प्रत्यक्ष होणें, अनुभविणें 'माझें ठाकावया चिद्रूप।' —एभा १९ २५० १३ (व) वागणें १४ चेष्टा करणें १५ (ना) मस्ती करणें [स. स्था]

**ठाकत**—वि साध्य हातून घडण्यासारखें 'हें टाकतें वीं नागवे। हेंही नेणे।' —ज्ञा १४ १९० [ठाकणें]

**ठाकरी**—वि ठाकूर जातीचा

**ठाकल**—पु (व) साडा, नागा खड

**ठाकसठिकस**—वि ठाकठीक पहा टापटिपीचा, नीटनेटका (वेष, घरांतील सामान इ०)

**ठा(ठा)का**—पु १ नादयुक्त आघात, ठोसा; जोराजोराचें मारणें; कडाक्याचा रट्टा, तडाका, दगा, गलगा, घडाक्याचा आवाज (कडकड, तोफेचा आवाज, वादळाचा दणदणाट, हत्यारांचा खणखणाट, रणभारती माणसांची आरडाओरड याचा), घटपडाट २ जोराचा, एकसारखा सपाटा, तडाखा (वाचणें, पाठ करणें,

अभ्यास करणें, गाणें, खेळणें, खाणें, भाडणें, काम करणें इ०चा) 'पढण्याचा-म्हणण्याचा-टाका' (क्रि० लावणें) [ध्व ठण!] ०देणें-मारणें-प्रतिष्ठेनें मिळविणें

**ठाकाठिकी**—स्त्री ठाकठिकी पहा

**ठाकाठोका**—पु जोशाचें भविष्य (क्रि० उतरणें, पटणें, लागणें, लागू होणें, प्रत्ययास येणें) [ठोका द्वि]

**ठाक्जिणें**—अक्रि (काव्य) ठाकणें पहा

**ठाकी**—स्त्री १ चाल, रीत, मार्ग, पद्धत, सरणी, विशेष (भाषण, कृति इ०ची) (याचा उपयोग जेव्हे उतरणें, साधणें, आणणें या क्रियापदार्शी जोडून करतात तेथें त्याचा अर्थ अनुकरण करणें असा होतो) २ पखवाज वाजविण्याची एक तऱ्हा ३ युक्ति, खुबी, कला, रीत, योग्य सरणी किंवा व्यवस्था ४ घशात खाकरा आणून चाराच्या टोळीला केलेली इशारत (क्रि० देणें, वाजविणें) ५ योग्यता 'आतुं आपुली ठाकी पैं विसरे।'–ज्ञा ११ ९१ ६ (व) चालू कामात आलेला व्यत्यय, खड, खाडा, नागा, ठाकल [ठाकणें]

**ठाकु(कू)र**—पु १ देव, देवाची मूर्ति, ईश्वर २ एका जगली जातीचें नाव व तींतील व्यक्ति (हे उत्तर कोंकणात राहतात) ३ रजपूत किंवा भिल्ल टोळीचा नाईक, पाटील, सरदार (राजपुतान्यात), मालक मानाची एक पदवी, शूद्राच्या काहीं जातींचा उपाध्याय [ठाकणें] ०द्वार-दारा–न देऊळ, देवघर गाभारा **ठाकुरकी**, **ठाकुरी**–स्त्री (राखणें किंवा राखून असणें या क्रियापदासह) पत, नाव कीर्ति अब्रू लौकिक, मान दर्जा वजन (पुष्कळ नुकसान झालें तरी जो आपली कीर्ति चतुराईनें समाजात कायम टिकवितो अशा माणसाला हा शब्द लावितात), अल्प साधनानीं ससार इ० चालविण्याचा निर्वाह करण्याच्या प्रकारानीं राखिली जी महत्त्वादिरूप पूर्वस्थिति ती **ठाकुरजी**–पु (वैरागी) देव, मूर्ति **ठाकुरदास माडून बसणें**–डौल करणें, (शुद्धतेचें, पवित्रतेचें) प्रस्थ माजविणें

**ठाकुली**—स्त्री (कों) दोन दगड माडून तयार केलेली लहान मुलांची शौचाची सोय [ठाकणें]

**ठाकूनठोकून-ठुकून-ठिकून**—क्रिवि प्रसगानुरूप अनेक प्रकारच्या युक्तींनें, कलाकौशल्यानें, सावधगिरीनें दक्षतेनें, निगा राखून (क्रि० राखणें, करणें, चालविणें) (ठोकणें या क्रिया पदापासून बनविलेले असे शब्द पुष्कळ आहेत जरी ते प्रचारा तील व महत्त्वाचे अन्वर्थक आहेत तरी त्याचे विवरण करणें कठिण आहे तथापि त्याचा अर्थ साधारणपणें लक्ष्यात येतो) 'त्यानें गाकूनठाकून आजपावेतों राज्य राखिलें'

**ठाकून येणें**—अक्रि न विसरता येणें दत्त म्हणून उभें राहणें 'जिवा जन्मदारिद्र ठाकूनि आलें।'–राम १३८ [ठाकणें]

**ठा(ठा)केठोक**—वि चलाख, हुशार ठाकठीक ठाकठोक ठेयारे करून पाहिल पत त्याची।'–पला ७० [टाका+ठोकणें]

**ठाक्या**—पु शिमेकऱ्याचा हातोडा [ध्व]

**ठाग**—पु (कु) थाग पत्ता, जागा, ठावठिकाण

**ठांगणें**—वि ठागळ पहा, लाथाळ (गाय इ०)

**ठांगाड**—स्त्री (व) म्हैस (तिरस्कारार्थी) 'ठागाड आता दूध देईनाशी झाली'

**ठांगाळणें**—सक्रि (ग्राम्य) हडहड करणें, धिक्कारपूर्वक टाकणें, सोडणें, नाकारणें.

**ठाठू, ठाठ्ठ**—न १ बदुकीच्या सोडलेल्या गोळीचा ठ्ठ ठ्ठ असा अवाज, पुष्कळ वाद्याचा आवाज इ० २ छाछू पहा [ध्व]

**ठांठूरणें**—अक्रि थडीनें अवयव आकुचित होणें, गारठून जाणें

**ठाडा-डी-डें**—वि (काव्य) खडा, उभा, ताठ असलेला [हिं]

**ठाडेसरी**—वि पैसा, वस्त्रें याचा अभाव असलेला, कंगाल [ठाडा]

**ठाण**—न १ घोडें बाधण्याची जागा, तबेला, गोठा 'तानाजी सुभेदार जैसा ठाणात।'–ऐपो ५२ २ बाण मारतेसमई उभें राहण्याचा एक प्रकार, (एक गुडघा जमीनीवर टेंकून इ०) शरीराची ठेवण, पवित्रा 'करीं धनुष्यबाण अतरीं दिधलें ठाण।'–दावि १६४ ३ महालातील मुख्य गाव, ठाणें ४ स्थान, जागा, प्रदेश 'पावे जैसा वितिलें ठाण।' धक्का, ठिकाण, जागा, आसन, बैठक (घेतलेलें, राखलेलें, टाकलेलें, गमाविलेलें इ०) (या अर्थी क्रि० चालणें, ढळणें, हालणें, डगडगणें=आसनावरचें स्थैर्य नाहींसें होणें (–विशेषत घोड्यावरील), (ल) आपल्या स्थानावरून घसरणें, डळमळणें 'ठाण न चळे रणींहून।' ५ (ल) धैर्य ६ आकृति, शरीराचा आकार किंवा बाधा 'तुझें ठाण केवढें।'–ज्ञा ११ १७४ [स स्थान प्रें जि टन] (बाप्र) ०माडणें–अटळ आसन ठोकणें, अटळ उभें राहणें ०सोडणें–आसन मोडणें पलायन करणें, तळ सोडणें, सुटा उपटून (घोड्यानें) पळून जाणें सामाशब्द– **ठाणई**–स्त्री (व ना) लाकडाची समई वर पणती ठेवण्याची लाकडी घडवची **ठाणक**–न ठिकाण, स्थान, उतरण्याची किंवा राहण्याची जागा (ठाणें शब्दासारखा हा फारसा प्रचारात नाहीं) किरकोळ व ग्राम्य देवताचें ठिकाण, देव स्थान, देऊळ 'जागोजागीं खडोबाचीं ठाणकें आहेत' **ठाणगा**–पु १ (कों) किल्ल्यातील नायकवडी (किल्लेदाराच्या हाताखालचा) २ तालुक्याच्या ठाण्यातील जमाबदीकडील शिपाई ३ ठाणेदार ४ (व) वस्ताद, ठक फसव्या ०ठकार–न शरीराची ठेवण 'ठाणठकारें अति उत्तम।'–एभा ६ ४९ ०दिवी–स्त्री ठाण वई ठाणई (लाकडी किंवा लोखडी) 'तेचि करूनि ठाण दिवी।'–ज्ञा ६ २३ ०पट्टा–पु ठाणास बाधावयाचा पट्टा, दोर 'ठाणपट्टा व मुचाम नरम असावेत।'–अश्वप १ १२२ ०बद-बंदी **ठाणेबद-बंदी**–स्त्री पशूची ठाणावरील कोंडणूक, अडकवणी –वि ठाणावरच नेहमीं बाधून ठेवलेला (घोडा इ०) [हिं ठाणबद] ०माण–न (काव्य) शरीराचा बाधा, ठेवण, आकृति, ढब, तऱ्हा 'सिंहाकृति ठाणमाण।'–मुआदि १६ ८२ ०वई, **ठाणवी**–स्त्री १ ठाणई पहा 'हेमठाणवयावरी जडित तबकें।'–मुआदि ४२ ६२ २ (ल) खुजा बाई किंवा मुलगी

**ठाण**—न कापडाचा तागा

**ठाणठूण**—स्त्री (गो) खाणखूण

**ठाणांतर**—न पाहाऱ्याची जागा, चौकी 'प्रत्याहाराचिया ठाणांतरीं।' -ज्ञा १३ ५०७ **ठाणांतरी**-पु पहारेकरी 'ठाणांतरिया जैसा पाइक।' -ज्ञा १६ ३४० [ठाणें]

**ठाणें**—न १ तालुक्याचें मुख्य ठिकाण, दिवाणी अमलदाराचें, अधिकाऱ्याचें, सैन्याचें वगैरे ठिकाण, जागा 'नऊशें स्वार झाले ठार ठाणें घातें रस्त्याला।' -ऐपो १८० २ शिपायाचें राहण्याचें स्थान, गढी, किल्ला इ० ३ पोलीसचौकी, गेट ४ (ल) पाहुण्याचें फार दिवस राहणें, मुक्काम (क्रि० देणें, करणें) 'ठाणें घरीं जीवासी।' -तुगा ११५९ ५ घोड्याचा तबेला ६ स्वरूप, आकार, स्थिति 'इये नाहीं हेंचि रूप। ठाणें हें अति उमप।' -ज्ञा १४ ८८ [सं स्थान, हिं ठाना] ०घालणें-१ कायमचें वसतिस्थान करणें २ मोहीम करणें, स्वारी करणें ३ तळ पाडणें 'घातलें ठाणें जिव्हाग्रीं।' ०कर-०दार-पु ठाण्यावरील अधिकारी 'ते रावणाचे ठाणेकर।' -कथा ३ ४ ६४

**ठाणेसरी**—वि ठाणेसरी पहा

**ठाणो(णौ)री**—वि १ युद्धांत मेलेला 'म्हणौनि काम वैरी। जाला जेथ ठाणोरी।' -ज्ञा १८ १०६१-२ -पु वीरश्री अंगात संचारलेला योद्धा 'ठाणोरियाचे मवाने। आगिवीं घाय।' -ज्ञा १८ ४३९

**ठान, ठानबंद, ठानबंदी, ठानमान**—ठाण इ० पहा

**ठांब**—पु (कु) झाडाचा (विशेषत हळदीचा) लहान रोपा [सं स्तंभ]

**ठांबी**—स्त्री वासा, डांब, स्तंभ [सं स्तंभ]

**ठाम**—वि १ कायमचा, दृढ घट्ट ठरलेलें, स्थिर, नक्की निश्चित, पक्का जसें- ठाम मेख-ठाम बोलणें-ठाम किंमत (क्रि० करणें) २ दरीज, रकम, हिशेब, जमाखर्च इ० शब्दाबरोबर योजल्यास=नक्की दरीज इ०-कायमची रकम-सर्व रक्कम मिळवून किंवा वजा करून राहिलेली वाकी रकम ३ -क्रिवि यथाभरा, यथाप्रमाण, मापाप्रमाणें, टकोटक (वजन, माप या संबंधीं याचा उपयोग करितात) 'त्या वजनानें आणलेलें तूप या वजनानें ठाम भरलें' [हिं]

**ठामणें**—न ठावें, (तूप, तेल इ० ठेवण्याचें) एक प्रकारचें भांडें, पात्र 'घी गलें पण ठामणें तर राहिलें'

**ठाय**—पु १ ठाव, ठिकाण, स्थान, आश्रय, आसन २ अग्र वाढण्यासाठीं ठेवलेलें पान, पत्रावळ यावरून ३ (ल) जेवण्याचें ताट, भोजनपात्र; पत्रावळ -स्त्री ४ (वादन) मंदताल (ध्रुपद म्हणतांना, पखवाज वाजवितांना) सावकाश वाजविण्याचा किंवा म्हणण्याचा प्रकार; विलंबित, मध्यलयीच्या एका आवर्तनास लागणारा वेळ ५ (राजा) व्यालेल्या गाईचें दूध व वासरू या दोहोंस म्हणतात 'पेजें (दूध) व जावपें (वासरू)' ६ प्रकार -शर ७ गुरें, भांडीं इ० मोजतांना संख्यादर्शक म्हणून हें क्रियाविशेषण लावितात उदा० दोन ठाय, तीन ठाय [सं स्थान] **ठायीं घालणें**-ठिकाणीं नेमणें, ठेवणें, कायमचें धरणें 'नवा मासे कोंडीं। गुणदोष घालू ठायीं।' **ठायीं करणें**-सिद्ध करणें 'आत्मा अधिकारी पाहीं। येणें निरूपणें केलें ठायीं।' -एभा २८ ९६ **ठायीं ठायीं**-ठिकठिकाणीं, जिकडे तिकडे **ठायीं पडणें**-१ पत्ता लागणें, सापडणें, आढळणें, उघडकीस येणें 'ठायीं न पडे कें गेली।' -मुरंशु ३३ २ मेळ असणें, यथायोग्य जमणें, अनुकूल होणें; स्वभाव जमणें 'औषध ठाईं पडिलें दव पडेना' **ठायींना**-वि मूळचा **ठायक**-वि (व) नेमका 'तेथें ठायक जा' ०चूक-वि १ चुकलेला, भलत्याजागीं ठेवलेला, भलताच, विपरीत २ हरवलेली वस्तु कोठें ठेविली त्याचें भान नसणारा अथवा ती वस्तु ३ स्वतःस भटकया समजणारा ०ठिकाण-णा-नपु जागा जुगा, घरदार वसति ०ठिक-वि स्थिर, दृढ 'तेथ राहोनि ठाय ठिक।' -ज्ञा १० ७४ ०दुगण(न)-दुगूण-न-स्त्री ध्रुपद इ० सावकाश म्हणण्याचा किंवा मृदंगादि वाजविण्याचा जो काल, तितक्या कालामध्यें त ध्रुपद इ० दोन वेळ म्हणणें किंवा मृदंगादि वाजविणें ०पालट-पु राहत घर बदलणें, थारेपालट ०बसल्या-क्रिवि बसल्या बसल्या, बसल्याजागीं, घरबसल्या, एके ठिकाणीं बसून, आरामशीर (चाकरी, रोजगार, धंदा, व्यापार, पगार, दरमहा, जेवण, गुजराण इ० शब्दांबरोबर योजतात) ०वरी-क्रिवि येथपर्यंत 'कर्मी हा ठायवरी।' -ज्ञा १८ ६८ **ठायीं (ये-यें)ठाव**-अ जेथल्यातेथें नेमका 'तं ठायीं ठावो पडे। नासाग्रीं।' -ज्ञा ६ २०४ पूर्ण 'तैं ठायेठावो विठ्ठचि होये।' -ज्ञा ८ १५६ जसा हवा तसा 'तेव्हां ये वासनागर्भे। ठायेठावो।' -ज्ञा १४ ९४ **ठायेंठिकें**-अ ठाकठीक.

**ठार**—क्रिवि १ (क्रियापदाचा गुणदोष दाखविणारें जोरदार क्रिवि अव्यय ज्यावेळेस एकदम व पुरेपूर रोग, नाश, घात, हानि दर्शवावयाची किंवा करावयाची असेल तेव्हां हें योजतात) ताबडतोब; जागच्याजागीं, अगदीं, मुळींच (क्रि० मारणें करणें, होणें, इ०) 'सालमजकुरीं त्याचा व्यवहार ठार बुडाला' 'तीं दोन घरें जळून ठार झालीं' 'पाण्यानें शेताचे बांध ठार फुटले' २ मारलेला, बुडलेलें [हिं]

**ठार्माठेल**—क्रिवि भरगच्च, खच्चून भरलेलें

**ठाव**—पु १ तळ; खोली, बुड (विहीर, तळें, खाडा इ० चें) २ (ल) बुड, शेवटची मर्यादा, खोली, हद्द, सीमा, अंत ३ (ल) अज्ञात स्थान, प्रदेश (हरवलेल्या, शोधलेल्या वस्तूचा) (क्रि० लावणें, लागणें) 'चार दिवस शोधलों म्हशीचा ठाव लागत नाहीं' ४ जागा, स्थान, आश्रय; अधिष्ठान; बैठक सळ 'द माय धरणी ठाय' ५ मोकळी व स्वच्छ जागा, प्रदेश, अवकाश 'रानी गेली ठाव झाला।' ६ भोजनपात्र इ० ठाय अर्थ २ पहा 'बारा हजार लाविले ठाव।' -ऐपा ४२ ७ पत्ता, ज्ञान, मागमूस, थांग 'ठाव नाहीं बापाचा। अकुळी साचा श्रीकृष्ण' -एरुस्व ? ३ ८ भाव -शर (नामदेवगाथा ७८६) [सं स्थान, प्रा ठाय-ठाव] (बाप्र) ०करणें-१ (व) पानाचा नवरा करणें २ जेवलेल्या जागीं शेण लावणें 'जेवणास तू मग ठाव कोण करील' ०घेणें-पाहणें, खडा टाकून ठाव पहाणें-तळ शोधणें तर्यीं जाणें जागी पहाणें, पुरीद टाकून मोजणें, थांग किंवा शोध लावणें

अजमास काढणें, मनाची परीक्षा करणें **०लागणें**-सापडणें, आढळणें, उघडकीस येणें, वर येणें **०लावणें**-शोध करणें, पत्ता काढणें **०ना-ठिकाण**-पत्ता नसणें **०पुसणें-फेडणें**-नाहींसे करणें 'निवांत स्वचाचा ठावो फेडिला।' -ज्ञा १ २०० **०सोडणें**-योग्य जागेचा त्याग करणें **(चित्तानें, मनानें)ठाव सोडणें**-मनोभ्रंश होणें, घाबरणें, चलबिचल होणें, बेभान होणें **०चूक-ठिकाण-ठिकाणा-पालट**-ठायचूक इ० पहा

**ठाव**—पु (काव्य) टाव, टाहो

**ठाव**—पु (व ल) जनावर 'घरीं दोन ठाव आहेत'

**ठावका(का) ठावकें, ठावलें(ला)**—पुन. १ भोजनपात्र ठाय अर्थ २ पहा २ एक प्रकारचें भांडें ठामणें पहा ३ पणती [ठाव=जागा]

**ठावका-ठावा**—वि माहीत असलेला, ठाऊक ज्ञात. (काव्यात व अशिक्षित लोकात रूढ) 'ज्याला तपें सकळ ठावें।'

**ठावणें**—अक्रि राहणें 'लावि आत ठाऊनि कोपट।' -अमृ ४४. [स स्था]

**ठावर**—पु गड्ढ गाठ (एकदा जिरून पुन्हा उत्पन्न झालेली) (क्रि० धरणें)

**ठावा**—वि ठाऊक, ज्ञात, माहीत 'ठावा नाहीं ऐसा होता येथें।' -तुगा ९७ 'नसे ठावा ब्रह्मा, न शिव अथवा श्रीपति हरी।' -वामन, वेंचे (नवनीत पृ ८९)

**ठावा**—पु (व.ना) बाजेचा किंवा पलंगाचा खूर, पाय

**ठावें**—न ठिकाण -वि ठाऊक

**ठावो**—पु ठावठिकाण, मागमूस 'ठावो न पवता जयाचा।' -ज्ञा १५.१५. **०वरी**-क्रिवि पर्यंत, पावेतों

**ठास**—पु चाप किंवा तास पशी [स चाप]

**ठा(ठां)स**—वि १ दृढ टणक, कठिण (अतिशय दाबल्यानें किंवा ठोकल्यानें) २ अत्यंत उच्च, कर्कश (स्वर) ३ (ल) निश्चित, साफ निखालस, स्पष्ट (भाषण) विचारपूर्वक व दृढ निश्चयपूर्वक केलेली (युक्ति, गोष्ट), खरी चांगल्या आधाराची (बातमी) पक्का, अढळ, घट्ट ठाम (-वि) पहा [हिं]

**ठा(ठां)सणी**—स्त्री १ खच्चून भरणी, ठेंचणी २ (व) गजगोटा, दारू ठासण्याचें लाकूड ३ ठाम, बिनचूक बेरीज, हिशेब इ०) [ठामणें]

**ठा(ठां)सणें**—उक्रि १ खच्चून भरणें, ठेंचून भरणें, चेपून भरणें, घट्ट बसविणें २ अनेक रकमा एकत्र मिळवून बेरीज इ० करणें एकत्र करणें ३ (ल) भरपूर पिणें (दारू इ०) 'त्यानें पोटात दारू ठासली आहे' [ठमणें हिं ठासना]

**ठासर**—वि पैसेवाला श्रीमंत (कुळ)

**ठासा**—पु (विणकाम) कापडाचा विणलेला भाग गुतागुत नागीशी होऊन साफसूफ व पक्का होण्यासाठीं दितें किंवा फणी यानीं ठोकण्याची क्रिया [ठामणें]

**ठाळणा**—पु (व) मोटेचें पाणी पडण्याकरिता केलेला हौद थाराळें थाळणें

**ठाळा**—पु (वे) झाडाची ल्हान डहाळी

**ठिक**—पु चट्टा

**ठिकठाक**—वि ठाकठीक पहा

**ठिकडें**—न (व) चौकोनी तुकडा [हिं ठिकडा]

**ठिकडें**—न अंगठींतील रत्न, खडा -वि सुंदर, नमुनेदार ठिकडा (रत्न, आश्चर्यकारक वस्तु (ल) घोडा, माणूस इ०). 'नाजुक रपडें दिपडें ठिकडें जिकडे तिकडे असवारा।' -पला ४१२ [ठीक]

**ठिक(का)ण**—न (गो) बाग, जमीन [स्थान]

**ठिकणाती**—पु वलुत्या, वलुतेदार इ० [ठिकाण]

**ठिकणें**—अक्रि १ पावडावर चालणें, उडत चालणें बागडणें (घोडा हरिण इ०) २ (ल) ठमकणें, ठुमकत चालणें (स्त्रीनें) ३ स्थिर राहणें

**ठिकर**—वि ठिक्कर पहा

**ठिकरी**—स्त्री १ चीप तुकडा (दगड, मडकें, बाटली इ० चा), कपरी 'का वीजु वर्षोनि आभाळ ठिकरि या आतो भूताळ।' -ज्ञा १८ १३४ २ फोडणीचा एक प्रकार दगडाची खापरी तापवून तीवर लोणी, जिरें इ० घालून मग ही कढींत बुडवितात, तसेंच लोणचीं किंवा कढी हिच्यावर ओततात 'सावारीं कथिका बहु ठिकरीच्या' -कचेसुच ८ या कृतीनें कढीला आलेला रुचकर पणा ३ फुटकें, तुटकें भांडें, मडकें ४ (उपहा) पत्रावळ लावण्या साठीं आणलेलें ल्हान पान [हिं] (वाप्र) **०तापणें**-सपाटून भूक लागणें **ठिकऱ्या होणें**-१ तुकडे होणें, छिन्नभिन्न होणें २ थडीनें बोटास, ओठास चिरा पडणें, फुटणें **०चा खेळ**-१ निढान्यावरील उडया मारण्याचा खेळ २ दगड, खापरी यांची वाटोळी बारीक चकती घेऊन खेळावयाचा मुलांचा एक खेळ यात सहा घरें असतात-१ आसुक २ मासुक, ३ विंचू ४ पायटेकी, ५ खगरडोंगर, ६ समुद्रडोंगर इ० चौथ्या घरात दोन्ही पाय टेक तात, विंचवात पाय टेकीत नाहींत, बाकीच्या घरात लंगडत चाल तात गणपतीची पाली यथील फरसावर या खेळाचा विशेष प्रचार आढळतो यास अकटें दुकटें असेंहि म्हणतात

**ठिकला**—क्रिवि यथोचित, बरोबर नेमकें, ठीक 'धोंडा मारला तो ठिकला भिंतीवरच लागला' [ठीक=बरोबर] -वि ठिपके असलेली (कवडी इ०) [ठीक=डाग]

**ठिकवणी**—स्त्री जडावाचा दागिना 'ठिकवणीया पारखी न सीरे।' -भाए ५२९ **०या**-पु रत्नपारखी, जोहरी 'ठा नेण रत्नजाति जाणा ठिकवणीये।' -भाए ६७४

**ठिकसठाकस**—वि ठाकसठिकस पहा

**ठिकसा**—वि उचित ठीक असा 'ठिकसा योग्य योधु पडे।' -शिशु २०

**ठिका-ठिक्का**—पु (व) माठें रत्न

**ठिकाठोक**—वि १ ठीकठाक योग्य बरोबर तंतोतंत २ ठोकठोक [ठीक द्वि]

**ठिकाण-णा**—नपु १ (सामा) स्थान, जागा, स्थळ, *वसतिस्थान*, घर २ अज्ञात स्थान, पत्ता (हरवलेल्या किंवा शोध लेल्या वस्तूचा), (क्रि० लावणें, लागणें) ३ मिलाफ, एकवा क्यता, सुसंगति (भाषण, वर्तन याची) ४ सूचक चिन्ह, खूण, अट कळ (भावी गोष्टीची) ५ एखाद्या गोष्टीचा अभाव दाखविण्या साठीं नकारासह योजावयाचा शब्द 'दुपार झाली असून त्याचे स्नानास ठिकाण नाहीं' ६ (ल) बूड, तळ, खोली, मर्यादा, थाग 'शब्द किती आहेत याचा ठिकाण लागत नाहीं.' ७ आधार, पाया, थारा (बातमी इ० चा), आश्रय ८ वंशपरंपरागतची जागा, गाव, रहाण्याची जागा, घर, वस्ती 'सरदूज रोगाचें ठिकाण,' 'ओसाड गाव चोराचें ठिकाण' ९ स्वराची योग्य उच्चता, तार स्वर (क्रि० धरणें, साधणें, राखणें, सोडणें, सुटणें) १० सुपारीची बाग (गो) [स स्थान, हिं ठिकाना] (वाप्र) **०चा तुटणें**—जागा, कळप, वंशपरंपरागत घर इ० पासून दूर होणें, ताटातूट होणें **ठिकाणचा विंचू उतरणें-जाणें**—जेथें विंचू चावला त्या जागेची फुणफुण किंवा आग नाहींशी होणें. **ठिकाण पुसणें-मोडणें**—झाडून झटकून टाकणें, समूळ नाश करणें **ठिकाणावर आणणें**—पूर्वीच्या जागीं आणणें, पूर्वस्थितीवर आणणें **ठिकाणीं आणणें-लावणें**—परत मिळविणें, जाग्यावर आणणें **ठिकाणीं ठेवणें**—जागच्याजागीं, जेथील तथें ठेवणें **ठिकाणीं येणें-लागणें**—जेथल्यातेथें येणें, *बरोबर बसणें, परत आणणें, बस्तान बसणें*, परत मिळणें **ठिकाणीं लावणें-पाडणें**—पत्ता काढणें, मूळ ठिकाण शोधणें, मूळ बातमी मिळविणें सामाशब्द- **ठिकाणाचा अंक-पु** वस्तूची जेथें पैदास झाली तेथील मूळची खूण, नंबर **०चा रोग**-पु रोगाचें मूळ, मुख्य स्थानचा, मर्माचा रोग **०ची खरेदी**-स्त्री जेथें माल उत्पन्न होतो तेथेंच केलेली खरेदी **०णची बातमी-वार्ता-वर्तमान**—स्त्रीन खास मूळ जागची बातमी जेथें गोष्ट घडली त्याच जागेवरून मिळालेली माहिती इ० **ठिकाणदार**—वि वतनी जागा, घर, धंदा, काम इ० ज्यास आहे तो, जमीनदार याच्या उलट उपरी **०बद्ध**-वि आधार भूत, प्रमाणभूत (गोष्ट, बातमी इ०) *०मकाण-न (मोघमपणें)* वसतिस्थान, रहाण्याची जागा

**ठिकाळणें**—अक्रि (महानु) भेगणें 'ठिकाळला चैतन्य पुरीं।' -भाए ४४७

**ठिका(को)ळें, ठिगोळें**—न १ ल्हान पत्रावळ २ (ल) जमिनीचा लहानसा तुकडा याच्या उलट पट ३ शेतातील अलग राहिलेला तुकडा

**ठिकी**—स्त्री १ रास, गंजी २ इमारती लाकडाची गंजी, ढीग ३ धान्याच्या पाल्यांची रास, मुसलेल्या धान्याची रास ४ झाडाच्या बुंध्यामधून काढलेला लाकडी तुकडा, चाकाचा लाकडी तुंबा

**ठिकी**—स्त्री (गो) नाकात घालण्याची फुली, एक दागिना

**ठिकें**—न १ तुकडा, भाग, ठिगळ, जागा, शेताचा तुकडा २ डाग तीळ, ठिपका (शरीर, रत्न यांवरील) ३ ठिकाण, जागा **ठिकेकरी**-पु शेताचा मालक किंवा कर्ता **०बंदी**-स्त्री १ जमिनीचे तुकडे, भाग पाडणें, शेतीच्या उपयोगासाठीं जमिनीची वाटणी करणें २ शेताचें फेरिस्त, मोजणी इ० चें पत्रक **०वार**-क्रिवि (शेताच्या) तुकड्या-तुकड्यांनीं किंवा भागशः (वसविलेला सारा किंवा काढलेलें पीक)

**ठिंकें**—न चोचकें, गाठोडें (मालाचें, वस्तूंचें)

**ठिक्कर**—वि (अतिशय, खूप या अर्थानें काळा या शब्दास जोडतात) काळा कुळकुळीत, फारच काळा

**ठिगळ-ळ, ठिगळी**—नस्त्री जुन्या फाटक्या वस्त्राला लावलेली कणी, जोड, पट्टी, कप्पा, छिद्र इ० ला जोडलेला तुकडा (क्रि० लावणें, जोडणें) 'तीनशें साठ ठिगळ्यांची गोधडी वरी।' -भज ४७ 'आकाश फाटल्यावर ठिगळ काय द्यावें ?' [प्रा थिग्गल] **०णें**-सक्रि १ तुकडा जोडणें, पट्टी जोडणें २ (ल) गोळीनें किंवा तीरानें जखम करणें, वाळवी इ० नें वस्त्र खाऊन भोकें पाडणें, फळें नासत असताना ठिपक्यांनीं युक्त होणें, अथवा डागळणें

**ठिंगणा ठिंगू, ठिंग्या**—वि ठेंगणा पहा

**ठिंगळी**—स्त्री (कों) ठिणगी पहा

**ठिंग(गा)ळें**—न ठिकोळें पहा

**ठिगुर**—पु (कु) डेंबुक माशाची एक जात याच्या अंगावर काटे नसतात व याचा आकार सापासारखा असतो

**ठिगुळवाणें**—वि अनोळखीचें

**ठिणकणें**—अक्रि (कों) धुमसत धुमसत फार वेळ रडणें, स्फुंदणें २ ठणकणें, ठुसठुसणें [हिं ठनकना]

**ठिणगी**—स्त्री अग्निस्फुलिंग, ठिंगी **ठिणग्या गाळणें**—१ जोरानें एखाद्या वस्तूवर आपटलें असता भिरभिरी होणें चकचक होणें, यावरून २ (ल) अतिशय संतापणें, रागावणें

**ठिप(ब)कणें**—अक्रि थेंबथेंब पडणें, पाझरणें, गळणें, सांडणें (एखाद्या वस्तूमधून किंवा पासून), गळती लागणें; पाझरू देणें. [ध्व ठिप ! ठिप !]

**ठिप(ब)का**—पु १ थेंब, बिंदु २ कपाळावरील गंध इ० चा टिकला ३ (ल) अपकीर्तीचा डाग, कलंक [स स्तिप्]

**ठिपठिप-ठिपां**—क्रिवि टपटप-टपां (पाण्याचा बिंदु गळताना होणाऱ्या आवाजाप्रमाणें) [ध्व]

**ठिबरी**—स्त्री (गो) एक रोग

**ठिंबो**—पु (चि) थेंब, बिंदु ठिपका पहा

**ठिया-य्या**—पु एखाद्या वस्तूच्या खालीं दिलेला आधार, टेंकण (कावेरा, लहान खांब, लाकडाचा ठोकळा, दगड, पायरी, उथळें, ठेपसा) २ जागा स्थळ, ठिकाण (ज्यावर एखादी वस्तु उभारलेली असते किंवा उभारण्याचें ठरविलेलें असतें असें), (गवंडीकाम) भिंत किंवा विहीर इ० चा कंगोरा, जडें किंवा अडद सुपाटी, बैठक (नेमलेली) (भिंतीवरील) ३ जेठा मारून बसण्याची क्रिया (क्रि० मारणें) [स स्था, स्थित]

**ठिल, ठिल्लू, ठिल्या**—वि ठेंगणा, जाडजूड व गबदुल, बुजा

**ठिला-ली-ल्या**—पु दहींदूध ठेवण्याचें ल्हान मडकें —वि वाटोळा, जाडजूड, गद्दद

**ठिवणें**—( कुण ) ठेवणें पहा

**ठिसका**—पु (व) महत्त्व, टेंभा **ठिसकारत**–क्रिवि ठसकारत, ठसकाऱ्यानें 'तेव्हा रावानें ठिसकारत म्हटलें' –रज पुताचा भीष्म

**ठिसपिस**—स्त्री त्रास, दगदग

**ठिसरी**—स्त्री १ निंदा, तोहमत, कल्क, शिवीगाळ (अव प्रयोग)(क्रि० करणें, उडणें, उडविणें २ चिरटया, फूट, चिरा (थंडीनें ओठ, बोटें याना पडणाऱ्या) ३ तडे पडलेली किंवा तुकडे होणारी पोळी, भाकरी (वाईट कणिक किंवा वाईट पीठ तिंबल्या-मळल्यामुळें)

**ठिसूळ**—वि १ ढिसूळ, कटकन मोडणारें २ (ल) हलकें, अशक्त, फुसकें, पादराफुसका

**ठी**—स्त्री १ एका ठिकाणीं हरकत आल्यामुळें ज्या दुसऱ्या ठिकाणीं एखादा माणूस जातो तें ठिकाण, लिहिणें, वाचणें, गप्पा मारणें इ० करीत असता कांहीं अडथळयामुळें तें तसेंच अर्धवट सोडून दिलेलें स्थळ, एखादी गोष्ट सिद्ध करण्याचे उपयोगी आरंभापासून शेवटपर्यंतची कृति २ ठराविक वेळ, स्थळ, मुकाम 'जे उपसहरूनि कीजेल ठी।' –ज्ञा ७ ३० ३ योग्य, चोख व्यवस्था, युक्ति, मार्ग, रीत इ० ४ निंदा, दोष 'जो अमृतासि ठी ठेवी।' –ज्ञा २ ३६८ ५ निश्चय 'का पृथ्वीचिया तृणांकुरा। होईल ठी।' –ज्ञा १० ३०० ६ स्मरण, आठवण 'प्रतिक्षणीं काय ठी। करीतसे।' –अमृ ७ १८२ ७ मर्यादा, शेवट, सीमा 'सकळा ज्ञानाचा सेवटीं। करूनि आगमा ठी।' –ऋ ३ [स स्थिति-ठिइ-ठी] **ठीस ठी मिळणें**–(एका अर्धवट कवीच्या गोष्टीवरून) होकार देणें, कबुली देणें, जुळणें, जमणें अनुकूल असणें

**ठीक**—न १ आगठीवरील खडा टीक पहा ठिकडें अर्थ १ पहा २ अंगावरील तीळ, डाग ठिकें अर्थ २ पहा –स्त्री मोत्याचा झुबका

**ठीक**—वि १ उचित योग्य, यथार्थ, शुद्ध, सत्य २ पूर्ण, यथायोग्य, बेतार्चे [हिं] **०ठाक**–वि यथायोग्य, कमवार, नियमित, व्यवस्थित, योग्य प्रकारें सुधारलेलें [टीक द्वि] **०ताल**–पु ताळमेळ, जुळणी, समरसता, तादात्म्य, मिलाफ जम, एकवाक्यता

**ठीकलग**—पु रत्नजडित अलंकार 'भगओनि आगाथिलें टीकलग।' –दाव १७८ टिकलग पहा

**ठुकठुक, ठुकठुकणें, ठुकठुकें**—ठकठक इ० पहा

**ठुकणें**—सक्रि उरकणें, संपविणें, घडणें 'नाडिले यज्ञाधिकारी सुरगण। नाडिले स्वधाकाराचे पितृगण। नाडिले ऋषिभूतगण। बलितर्पण ठुकेना।' –एभा १८ २९९

**ठुकरणें**—सक्रि (राजा कु) काठीनें हळु हळु मारणें, चुरा करणें, चेचणें, घासणें

**ठुगणें**—सक्रि (व) फसविणें भोंदणें 'आयानाया ठुगता नि पैसे मिळविनो'

**ठुंठण**—न झाडाचें खोड, बुंधा, सुनाग्रा, कापून बाकी राहिलेला अवयव बोथटलेलें शस्त्र किंवा हत्यार खुंटा खुंट [हिं ठुंठा]

**ठुठा**—स्त्री १ बंदुकीच्या गोळयाचा ठुठु असा आवाज, दणका २ तोंडातोंडी, बाचाबाची, धसफस [ध्व]

**ठुंठी, ठुटा**—स्त्रीपु पिकाच्या रोपाचे बुंधे खाणारा एक रोग (भाद्रपदात फार पाऊस पडल्यास हा होतो) –कृषि १७४

**ठुणका**—पु १ रागाचा झटका, चीड, रुसवा (क्रि० येणें) २ बुकादा, ठोसा 'ठुणके लासणें चिमोर।' –दा ३ ७ २५ [ध्व]

**ठुणगा-का**—वि ठेंगणा, ठुसका, ल्हानसर आणि गट्टू

**ठुणगुण**—पु दांभिकपणा 'तुका म्हणे ठुणगुण देवें।' –तुगा ३१३९

**ठुणठुणणें**—अक्रि ठुसठुसणें, ठणका लागणें, फुणफुणणें [ठुण ? ठुण!]

**ठुनका**—पु (व) मनतत्राचा इलाज, छाछु [ध्व] **०देवणें** (व) खोडकी निरणें.

**ठुनठुन**—स्त्री (व) कुरकुर [ध्व]

**ठुनो**—स्त्री (व) आखूड केळ

**ठुबरा**—वि (ना) ठेंगणा पहा.

**ठुबरा**—पु (क) मकेभात, मके सडून त्याचा भात करून त्यात दहीं घालून फोडणी देऊन केलेला भात किंवा एक खाद्य

**ठुंब(ठुम)री**—स्त्री शृंगारिक लावणी, काव्य, चिजेचा एक प्रकार टप्प्याचे राग तेच ठुमरीच राग असतात यात शृंगाररस प्रधान असतो यात रागाची शुद्धता रहात नाहीं ठुमरी गाताना तिच्यातील अर्थ अभिनयानें व्यक्त करावा लागतो

**ठुमकणें, ठुमका**—ठमकणें, ठमका पहा

**ठुमठुमीत**—वि ठुमठुमीत पहा

**ठुरक**—पु (माळवा) मऱ्हाण्यातील गणग

**ठुला, ठुलू**—वि (राजा) खुजट, ठेंगणा पहा

**ठु(थु)ली**—स्त्री जाडीभरडी कणीक, जाड दळलेलें गव्हाचें पीठ, सांजा, भरडलेलें पीठ [फेंजि थुलो=जाडेंभरडें, आर्मिनियन नि थुल्व=विरजलेलें दूध, दहीं]

**ठुशी**—स्त्री १ स्त्रियांच्या गळ्यातील एक सोन्याच्या किंवा त्याचा किंवा पेटयाचा व खालीं मणी लाविलेला दागिना या पेट्याचा आकार इंग्रजी डब्ल्यूसारखा असून त्याची संख्या ५१ ते ५५ असत अशी प्रत्येक पत्री २ चोळीच्या बाहीमाल्च्या तिकोनी कापडी तुकडा, बगल ३ मळणीनतरचें थोडंसं दाणे राहिलेलें गव्हाचें कणीस ४ बुक्की ठोसा गुद्दा ५ गुरगार्ची दारू, किंवा ल्हान सुरा ६ (ल) टोमणा 'जाणूनबुजून तिनें ही ठुशी दिली हातीं' –क १७३०

**ठुशो, ठुश्यो**—वि (कु) प्रसिद्ध

**ठुस-कण-कर-दिनीं-दिशीं**—क्रिवि एकमेकावर दाबलेल्या वस्तूंच्या धप्पड आवाजाप्रमाणें, आवाज होऊन, ठुसकुशी [ध्व]

**ठुसका**—वि १ पिटुर, चटकन् मोडणारें २ लट्ठ; पोपला; गबदुल **ठुसका**-वि आखूड व बळकट, ठेंगा व लठ्ठ; जाड व सामगीन **ठुसका-ठुसकारा**-पु (राजा) १ ठसका पहा २ भरीव ३ (ना) ठेंगणा

**ठुसका-ठुसा**—वि (व) ठेंगणाठुसका

**ठुसठुशी(शी)त**—वि पिकलेलें व वेदना देणारें (गळू इ०), ठसठशीत पहा [ध्व]

**ठुसठुस-ठुसां**—क्रिवि शरीरास वेदना होत असतांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें ठणका लागला असतांना होणाऱ्या ठस ठसीप्रमाणें [ध्व]

**ठुसठुस**—स्त्री गळू किंवा गद पक्व झाला असतां होणारी ठुणठुण, ठणका [ध्व]

**ठुसठुसणें**—अक्रि गळू इ० स ठणका लागणें, ठुणठुणणें, धमकणें, वेदना होणें [ठुस! ठुस!]

**ठुसा**—पु उसाचा धक्का, लहान तुकडा (सोललेला), जोंध ळ्याचें मारलेलें ताट २-पु (ना) गुद्दा, ठोसा -वि (व) ठेंगणा, आखूड, ठुस्सा, ठोसा [ध्व हिं]

**ठूं**—न थोडयाशा कारणावरून केलेला दोषारोप (क्रि० ठेवणें) जो व्यापार किंवा पदार्थ मनास येत नाहीं त्याजवर ठेव लेलें यथाकथंचित् निमित्त

**ठून**—स्त्री (विणकाम) विणलेलें कापड गुंडाळण्यासाठीं, अस लेली लाकडी चौकोनी तीन हात लांबीची फळी

**ठेऊ**—वि १ राखीव ठेवणीचें २ शिल्लकेंत टाकण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा, काटकसरी [ठेवणें]

**ठेक**—पु अंकुर

**ठेका**—पु १ (ताल) विवक्षित तालाच्या एका आवर्तनाचे तबल्यावर किंवा पखवाजावर काढलेले समग्र बोल २ ताल (क्रि० धरणें) ३ मुसळधार पाऊस विलक्षण जोराचा ताप सपाटून तडाखा किंवा धारा (अभ्यास, काम, खेळ इ० चा) भाग पिकून जारानें चालविलेलें वेदाध्ययन किंवा आवृत्ति (क्रि० लावणें), ठसा अर्थ १ पहा ४ (व) तोरा ठसका धरून तिचाच ठेका मोगा थाहे' ५ मक्ता खोती करार (आपला) **ठेका चालविणें**—आपला हक्क, हु' चालविणें **ठेका लावून देणें**—आपलें वर्चस्व दुसऱ्याच्या मनावर ठसविणें [हिं]

**ठेकी**—स्त्री १ साधारणपणें १ पासून २० बिघ्यापर्यंतचें शेतजमिनीचें माप हें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळें असतें २ टीनमेकरची लहान हातोडी **ठेकीला येणें**-(माण) बेजार होणें

**ठेकेठोक**—वि ठेंगठोक पहा

**ठेकेदार**—पु मक्तेदार पट्टादार [हिं]

**ठेंगडा**—पु (ग्राम्य, अश्लील) गाढव (जनावर) गाढ विणीस ठेंगडी म्हणतात

**ठेंगडें**—न सोटा, सोडगा लाठी [हिं]

**ठेंगण**—वि फार्सी योग्यतेचा, तुच्छ, हलका 'परिस दिसे ठेंगण' -विपू १.७३

**ठेंगणा**—वि १ खुजा, वामनमूर्ति टिल्लू २ (ल.) नीच, हलका, उणा, 'होईल मदन ठेंगणा।'—यमा ६ 'त्याग आकाश ठेंगणें झालें आहे '=मदानें उन्मत्त झाला आहे [सं स्थगीयान्, पां जि स्थिगो] **०ठेंगणा-ठुसका**-वि मध्यम बांध्याचा, सुदर शरीराचा, हलका व बांधेसूद, सुटसुटीत [ठेंगणा द्वि]

**ठेंग(गें)मत**—पु ज्यास शास्त्राधार नाहीं असें मत, पाखंड मत, नास्तिक मत (क्रि० मांडणें, माजविणें, मातविणें) २ स्वम ताचा हट्ट, हेका ३ (पदन्यूनतापूर्वक, ठेंगमताचें नांव) टोपण नाव

**ठेंग(गा)ळणें**—अक्रि ठेंचाळणें, ठेंच लागणें

**ठेंगा**—पु १ सोडगा, सोटा, खुंट २ वाळलेला झाडाचा साट 'ठेंग्या कवि अंकुर।' —तुगा १०८६ ३ साबा सालचें उपळें, गुर्दी, बैठक ४ (अशिष्ट) शिश्न ५ ठेंसा, गर्व, डौल, पोकळ दरारा (क्रि० मिरविणें, थाडविणें, माजविणें, मातविणें, दाखविणें) ६ बंड, दंगा (क्रि० माजविणें, मातविणें, उठविणें, माडणें) ७ ठेंगमत, पाखंडमत (क्रि० माजवणें, मातवणें, माडणें), उमेंटपणा [हिं] -वि. (व) मध्येंच तोंड खुपसणारा, बीचमें मेरा चांदभाई उमेंट **०दाखविणें-ठेंग्यावर बसविणें**—(मूळचा अश्लील अर्थ, शिश्नावर बसविणें, परंतु व्यवहारात) लादणें, फसविणें, ठकविणें, प्रतारणा करणें, निराशा करून विटंबना करणें **०नाचविणें**—एखाद्यावर आपली इच्छा, मत लादणें **०नेसणें**—(हातांत सोटा तयार ठेवणें) साफ नाकारणें, तोंडावर नाकबूल जाणें म्हु० बाऱ्यावर वरात भुसावर ठेंगा

**ठेंगा-ग्या**—वि १ ठेंगणा २ उमेंट आडदांड, क्रूर, उद्धट

**ठेंगाठेंगी**—स्त्री चाळकच, नकार (मागणी, अर्ज, यासंबंधीं) [ठेंगा]

**ठेंगार(ळ)णें**—उक्रि १ ठेंगा दाखविणें पहा, फसविणें २ छी थू करणें, वाईट रीतीनें वागविणें [ग्राम्य ठेंगा=शिश्न]

**ठेंगू ठेंगूमामा ठेंगोजी**—वि ठेंगणा, खुजा, वामनमूर्ति (पुरुष, स्त्री) [सं स्थग]

**ठेंगेठाक**—वि अत्यंत हुषार, चलाख, तरतरीत, दुसऱ्यावर अधिकार किंवा ताबा गाजविणारा हुकमती

**ठेंगेपण**—न कृपणता कंजूषपणा

**ठेंग्या**—वि १ चढखोर दगलखोर २ नास्तिक, पाखांडी ३ ठेंगा पहा [ठेंगा]

**ठे(ठें)च**—स्त्री १ ठोकर; दगड इ० कास पाय अडकणें (क्रि० लागणें) २ (ल) तोटा, नुकसान हानि ३ गर्दी, भीड, फार दाटी **ठेंच लागणें**—अद्दल घडणें धडा शिकणें, वाईट अनुभव मिळणें [ध्व हिं ठेस] **०भरणें**—(आगरी) लग्नाच्या उद्यास हळदठुष्ट

लावणें —बदलापूर ३५ म्ह० पुढच्यास ठेच मागला शहाणा= पुढल्या मनुष्यास ठेच लागली म्हणजे मागला हुषार होतो

**ठेचणी**—स्त्री दुखापत, ठोक [ठेचणें]

**ठे(ठें)चणें**—उक्रि १ चेचणें, फोडणें, चिरडणें, मारणें २ दडपून किंवा खचून मरणें [ध्व हिं ठेंसना]

**ठेंचळणें**—उक्रि थोडेसें चिरडणें, फोडणें

**ठे(ठें)चा**—पु कोथिंबीर कुटून, आलें, लसूण, चिंच व मसाला आणि मिरची घालून दह्यात कालवून तयार केलेली चटणी [ठेंचणें]

**ठेंचाळणें**—अक्रि ठेंच लागणें [ध्व हिं ठेस]

**ठेटमत**—न ठेंगमत पहा

**ठेंटा**—वि ठेंटा, थोटा, थिटा, आखूड, ल्हान

**ठेठे**—क्रिवि १ कोरडया खोकल्याच्या ढासीचा आवाज, ठों! ठो (क्रि० लावणें) २ गाजावाजा, प्रसिद्धि (चोरी, दिवाळ खोरी, वाईट गोष्ट इ० ची) (क्रि० करणें, वाजवणें, माजवणें, माडणें) —क्रिवि वरीलप्रमाणें कोरडया खोकल्याच्या आवाजा प्रमाणें आवाज होऊन [ध्व]

**ठेणा, ठेणी, ठेणें**—पुस्त्रीन (कों) ठिणगी, चिणगी

**ठेणें**—अक्रि १ उभे राहणें, ताठ उभे राहणें (फक्त भूतकाळींच व काव्यात प्रयोग) 'विस्मित होऊन इंद्र ठेला।'—तुगा ८१ २ राहणें, थांबणें, बंद पडणें, कुंठित होणें ठेला पहा 'दीपीं दीपू एकवटला। मिळणीं एकचि होऊनि ठेला।'—एभा १० ३६३

**ठेप**—स्त्री १ टक्कर, भेट, अडथळा, संबंध किंवा संघ र्षण याच्यामुळें दोन गतिमान पदार्थाचा अटकाव, स्थिरता, विरुद्ध गतीनें येणाऱ्या वस्तूच्या गतीचा निरोध (क्रि० खाणें, बसणें) २ (ल) सीमा, मर्यादा, थांबण्याचें ठिकाण, हद्द 'पचा यतीची ठेप कोठपर्यंत आली?' ३ संकेत, वचन, नेमलेली वेळ, ठरविलेला काळ, मर्यादित मुदत (क्रि० करणें ठरविणें) 'उद्या सकाळीं भेटेन अशी त्यानें ठेप केली आहे' कालदर्शावधि निय मपूर्वक केलेला कार्यनियम ४ अपराधी माणसास कांहीं नियमित कालपर्यंत सरकारातून तुरुंगात जो प्रतिबंध करतात तो, कैद, शिक्षा ५ (लाकूडकाम) सांध्याचा एक प्रकार —मॅरेट २८ ६ पंचाय तप्रकरणीं वादीप्रतिवादीयापासून लिहून घ्यावयाची कलमवार यादी (वाप्र) **ठेप देणें**—अडथळा आणणें, मर्यादित करणें मुदतबंद करणें **०विणें**—उक्रि १ गति बंद करणें, मार्गांत अडथळा करणें, स्थिर करणें हालचाल करणाऱ्या वस्तूच्या मार्गांत अडथळा आणून अथवा विरोध करून ती थांबविणें, स्थिर करणें २ दुसऱ्यावर टेकल असें ठेवणें एखाद्याला आधारभूत किंवा एखाद्याच्या आश्रयानें ठेवणें ३ एखाद्या दिवसापर्यंत नेमणें, ठराविक काळीं योजणें [ठेप] **०ल्णें**—अक्रि १ आघात किंवा अडथळा यामुळें थांबणें वाढलें जाणें २ —उक्रि भोंदणें भुरळ पाडणें, चाळवण्या दाखविणें हद्द हद्द पार करणें हुरळविणें, गोंजारणें आशा लावून फसविणें **ठेपेस नेणें, लावणें**— जागच्या जागीं आणणें, पूर्वस्थळीं आणणें, नेमणें ठरविणें मामलत **०टाप**—स्त्री नियमितपणा, ठराविक स्थिति, टापटीप, ठासपणा, नेमकेपणा **०राई**—स्त्री टापटीप, व्यवस्था, व्यवस्थितपणा, योग्यायोग्यता, मर्यादा, सावधगिरी (वागणूक भाषण, कृत्य, शिक्षण इ०ची) **ठेपी(पे)चा**—वि १ मर्यादा किंवा कायदा पाळणारा, व्यवस्थित, टापटिपेचा (मनुष्य, व्यापार, धंदा) २ थेटचा अखेरपर्यंत जाणारा (प्रवासी), पुरणारें (काम)

**०ठेपणें**—अक्रि १ एकास एक लागून आदळायाजोगें जवळ येऊन भिडणें, आघातानें थांबणें, वाढणें २ टेंकणें, ओठंगणें, भिडणें, स्थितीप्रत प्राप्त होणें 'दगड होईल तितके एकमेकास ठेपून बसवावे'—मॅरेट ३० ३ येऊन थांबणें, प्रवास पूर्ण करणें ४ कांहीं एक कार्य अवश्य केलें पाहिजे अशा दशेस येणें, एखादी गोष्ट एखाद्या मितीपर्यंत करणें भाग पडणें 'वैशाखात मुलाची मुंज ठेपली आहे' [स स्थापय्]

**ठेपसा**—पु १ मातीचें ढेंकूळ, ढेपसा २ सुकाच शिल्गा वळलेला किंवा जाळून राख केलेला शेणाचा ढीग ३ सावाखालच्या पायाचा दगड, खुर्ची 'दगडाच्या बांधकामाचे नऊ इंच चौरस ठेपसे ठेवावे'—मॅरेट ५८

**ठेपा**—पु १ (चांभारी) टांचेच्या मागचा भाग उजरण्या साठीं केलेला लाकडी ठोकळा २ —पु (कों) आधार, टेंका

**ठेपाऊ-वू**—न (ना व) जरीकाठी रेशमी सोवळें, पीतांबर.

**ठेपी**—पु (व) ल्हान खुजट बैल याच अर्थी दुसरे शब्द थोडी, बदानी, फेडमी

**ठेपो, ठेपू**—(व) कूच दस्था [हिं]

**ठेंबा**—पु १ मेख, खुंटा, खांब, झाडाचा खुंटा, धीरा, टेंका (ल) आधारस्तंभ, आश्रय, मदत

**ठेंबूस**—न टेंगूस, टेंगूळ, गाठ, गुठळ, उंचवटा (शरीर, झाड, जमीन इ०वरचा)

**ठेंब**—न संकेत, ठराविक वेळ, काळ **०ढोक** वि (व) वस्ताद 'चायको चांगली टेंबडोक मिळाली आहे, ती त्याला आणते ताळ्यावर'

**ठेम**—न (हेट) धुळीचा उंचवटा

**ठेल**—स्त्रीपु १ वैपुल्य, भरपूरपणा बाहुल्य २ गर्दी, दाटी, घनपणा, दाढ्य ३ —पु दुगाणीचा खेळ ४ आपल्या दुगाणानें दुसऱ्याच्या दुगाणावर मारावयाचा टोला ५ (व) कळप ६ —वि भरपूर पुष्कळ विपुल पीक ठेल आलें' **ठेलणें**—उक्रि लोटणें ढकलणें दाबणें गर्दी करणें भिडणें 'रथ रथागी ठेलिती।'—वेमीस्व ७ १४ [हिं ठेलना] **ठेलमुगा**—पु १ दुगाणीचा खेळ २ ठेल अर्थ ४ पहा

**ठेला ठेली**—पुस्त्री १ मोठें गोण ल्हान गोण २ (उ) समु दाय, गर्दी 'तीन लोकांचा एकच ठेला।'—गोपी ७५२ **ठेलाठेल-ली**—स्त्री गर्दी, दाटी, रेलचेल वैपुल्य बाहुल्य 'अभिमानानें ठेला ठेली। सर्वी सारी लिपुली।'—तुगा ३४११ धक्काबुक्की [ठेलणें]

**ठेला**—पु (ना) हातगाडी ठेवण्याजोगें तात्पुरतें लाकडी फळ्यांचें केलेलें (पानपट्टीचें) दुकान (२) टोला

**ठेला-लीं-लें**—(भूतकालवाचक धातुसाधित वि. ठेपणें म्हणजे उभें राहणें या धातूचें-काव्यांत उपयोग) १ उभा राहिला 'ठेला आड्डनि हस्तक।' २ थांबला, स्थिर झाला, पुढिल झाला, राहिला 'बळें अन्यीं शोक सांगाय ठेला।'-राम ६३ [स स्था]

**ठेव**—स्त्री. १ साठा, संचय, पुरलेलें, स्थापिलेलें किंवा राखून ठेवलेलें द्रव्य 'सगुणस्याची ठेव।'-दा १२८ २ साग 'भीव लागण्याची ठेव।'-शा १४ ३ निक्षेप गहाणवट किंवा अनामत रकम किंवा अल्पव्याजानें ठेवलेलें द्रव्य पेढीवर ठेवलेला पैसा ४ (कायदा) द्रव्य [स स्थापय्]

**ठेव**—स्त्री. ढब, चाल, रीत, तऱ्हा, मार्ग, ढब, ठेवण 'त्या शुभ रूपाची ठेव।'-कथा ७८१४ [स स्था]

**ठेवण**—न. १ उतरण्याची, तळ देण्याची, बिऱ्हाडाची, जागा, नागरवाडा, वसा २ -स्त्री. विहिरींतील बांधकाम ज्यावर उभारलें जातें अशी दगडी किंवा टणक जमीनीची म्हणजे पायाची जागा, तसेंच या बांधकामातील मधले मधले थर त्यावरून ३ पाया, भक्कम जमीन, भक्कम पाया (घालणें, बळेन, अभ्यास यांतील) [ठेवणें]

**ठेवण, ठेवणा**—स्त्री. आकार, बांधा (शरीराचा), ढब, घाट, रूप रंग, (तोंड, शरीर, इमारत यांची) २ पद्धत, तऱ्हा, रीत, विशेष गुण, मार्मिकपणा, खुबी (भाषण, कृत्य यांचा)

**ठेवणस**—पु. (राजा) करार (देण्या जाण्याचा, कामाला लागण्याचा इ०)

**ठेवणा, ठेवणाईत**—वि. ठेवलेला, आश्रित, दास, नोकर. 'तो केवळ गल्मिाचा ठेवणाईत'-भाव २५

**ठेवणाऊ, ठेवणू, ठेवणुकी, ठेवणुकीचा**—वि. ठेवलेला, स्वाधीन केलेला, निक्षिप्त, विश्वासानें ठेवलेला [ठेवणें]

**ठेवणावळ**—स्त्री. ठेव राखण्याबद्दलचा खर्च, मजुरी

**ठेवणी, ठेवणें, ठेवी**—स्त्रीन. स्त्री. १ (काव्य) ठेव अर्थ १ पहा शुभध्न 'राहाणें ठेवणीं सांपडती।'-दा १८७१ २ निक्षेप, ठेव अर्थ २ पहा

**ठेवणूक**—स्त्री. ठेव अर्थ २ पहा [ठेवणें]

**ठेवणें**—न. ठेव अर्थ १, २ पहा 'कीं हें आदिशक्तीचें ठेवणें।'-दा १७३०

**ठेवणें**—सक्रि. १ राखणें, स्थापणें, मांडणें, लावणें, बाजूस काढणें २ एका बाजूस टाकणें, चिन्हांड मांडणें, (काम) करणें निराळें काढणें, शिल्लक राखणें एखादें कार्य काहीं काळ न करता तसेंच राखणें ३ राखणें वाचविणें, राखून ठेवणें, रक्षण करणें ४ जागेवर कायम राखणें, होणें, स्थापन करणें, नियुक्त करणें (काम हुद्दा यावर) ५ चाकरीस, नोकरीस, सेवेस राहवून घेणें किंवा बाळगणें (चाकर सैन्य) ६ कायम राखणें, जसेंच्या तसें जपून ठेवणें, राखणें, जोपासना करणें, अबाधित मानणें 'यानें त्याची प्रतिज्ञा ठेविली.' ७ घेऊन न जाणें, जेथल्या तेथें पडूं देणें 'पेंढाऱ्यांनीं कांहीं घर मागें घरांत ठेविलें नाहीं.' ८ रांड बाळगणें ९ एखादी वस्तु संरक्षणासाठीं दुसऱ्याचे स्वाधीन करून त्याजकडे राखणें [स. स्थापन, प्रा ठावण] (जेव्हां हें क्रियापद दुसऱ्या क्रियापदांच्या ऊन प्रत्ययांत धातु साधितांशीं योजतात, तेव्हां त्याचा अर्थ एखादी गोष्ट करणें, कोणत्याहि क्रियापदाच्या विषयाचें ठेवणें, किंवा तीच स्थिति राखणें, अथवा त्या क्रियेनें झालेली आकृति असा होतो जसें-हें पत्र लिहून ठेव, हें कापड घडी करून ठेव, ती गाय बांधून ठेव, दोनें पेरून ठेव, टाकींत पाणी घालून ठेव इ०, ठेवणें हें क्रियापद आणि टाकणें हें क्रियापद यामध्यें अर्थाच्या दृष्टीनें साधर्म्य व वैधर्म्यहि आहे दोन्हीहि क्रियापदें एखाद्या कृत्याची पूर्णता किंवा एखाद्या विषयाची पूर्णता दर्शवितात, परंतु ठेवणें हें क्रियापद नियमन्ये काळजी व लक्ष्य-विशेषण राखून ठेवण्यातील-कौशल्य दर्शवितें तर टाकणें हें क्रियापद एखादी वस्तु दूर, दोर किंवा कायमची सोडून देणें, तिचा त्याग करणें, हात धुवून मोकळें होणें, किंवा दुर्लक्ष्य, हयगय इ० अर्थ दर्शवितें जसें-त्याची पोथी त्याला वाचून टाक हातें देऊन फडशा करून टाक, तें झाड उपटून टाक इ० यात कसें तरी कार्य पूर्ण करण्याचा बोध होतो उलट ठेवणें क्रियापदाच्या स्पष्टीकरणार्थ वर दिलेलीं 'हें पत्र लिहून ठेव' इ० उदाहरणें पहा)

**ठेवरेघ**—स्त्री. १ ठेव, पैसा, साठा, संचय, पुंजी; भांडवल इ० व्यापक अर्थानें २ निक्षेप ३ व्यवस्था, शिस्त, क्रम 'त्याच्या घरची ठेवरेघ चांगली आहे' ४ टापटिपीनें लावणें, शिस्तीनें लावणें, क्रमवार ठेवणी 'जिकडे तिकडे ठेवरेघ करून बसले स्वस्थ' [ठेव+रेघ द्वि]

**ठेवलेली**—स्त्री. रांड, वेश्या, रख (व) ठेवली

**ठेवा, ठेवारेवा, ठेवी**—पु.पु.स्त्री. १ ठेव अर्थ १ पहा 'सुखाचा गर्भ पूर्ण ठेवा मनाला।'-वामन, वामनचरित्र १२ २ खाण ठेव अर्थ २ पहा ३ (ल) पापपुण्याचें गाठोडें ४ आकार [ठेवणें]

**ठेवाठेव-ठेवी**—स्त्री. उठाठेव, खटपट, त्रास, दगदग 'तुम्ही या ठेवाठेवींत न पडणें। सर्वदाही।'-कथा ४५१७८

**ठेवासाठा**—पु. संचय ठेव अर्थ १ पहा

**ठेवी**—स्त्री. रीत, प्रकार; मार्ग 'ते शिक्षीती अति नीच ठेवी।'-वामन नृसिंहदर्पण ७४

**ठेंस, ठेंसणें, ठेंसाळणें, ठेंसा**—ठेंच इ० पहा

**ठेसन**—न. (व) स्टेशन (आगगाडीचें) [इ स्टेशन]

**ठैरणें, ठैराव**—(व) ठरणें इ० पहा

**ढो**—पु. ल्हान मुलें आपल्या कपाळानें दुसऱ्याच्या कपाळावर हळूच आघात करतात तो, टक्कर (क्रि० देणें) [ध्व]

**ढोक**—पु. १ काठी सोटगा यानें दिलेला मार २ सतारीच्या तारेवर केलेला नखीचा आघात [ध्व हिं ढोक, का ढोकु]

**ढोक**—वि. १ जाड भरींव, जड, ठळक, भक्कम (धातूचीं भांडीं, दागिने) २ (ल) येथ प्रसिद्ध चोख (शिपाण, शहाणपण

घन इ० मध्यें ) ३ पूर्ण, फुटकळ नसलेलें, सर्व ( नंबर, सख्या )' सर्वसहित, समुदायानें, मोठ्या प्रमाणात, घाऊक, ठोकळ, एक दम जमेस धरलेलें ( रकम, बेरीज, माल, सौदा, खरदी इ० ) ' हिशेब ठोक समजा हो । ' –दावि २४२ **ठोकबद्द**–वि घाऊक, एकदम, सर्व **ठोक विक्री-विकरी**–स्त्री घाऊक विक्री, सख्यानें किंवा एकदम विक्री याच्या उलट किरकोळ विक्री

**ठोक**—पु (व) हगाम, मोसम, वत्तर 'या मुहूर्ताला त्याचा ठोक भारी आहे '

**ठोकजोशी**—पु सहदेवमताचे ठोके शिकून, डमरू वाजवून भिक्षा मागणारी व ठोकळ भविष्य सांगणारी शूद्र जोशाची एक जात व तींतील व्यक्ति, कुडबुड्या जोशी, पिंगळा जोशी [ ठोकळ ]

**ठोकठोक-कां**—क्रिवि ठाकठोक पहा [ ध्व ]

**ठोकडा-ळा**—पु ठोकळा **ठोकडा, ठोकड्या**–पु ( निंदार्थी ) सोनार **ठोकडा-ठोकडें**–पुन बैलाच्या गळ्यातील घटा ( लाकडाची, धातूची ) [ ध्व ]

**ठोकण**—न १ कांहीं तरी खात्रीनें प्राप्ति करून देणारें काम, एखादा पदार्थ किंवा व्यापार यापासून कालनियमानें उत्पन्न होणारें फल, त्याचा अनेकवार अनुभव घेऊन त्याचें निश्चित झालेलें प्रमाण व तो व्यापार, उत्पन्नाची वस्तु, धदा, काम व्यापार, जमीनजुमला ( ज्याच्यामुळें नियमितपणें उत्पन्न मिळतें असा ) ' हें शेत तीन खंडीचें ठोकण ' २ (ल) फायदा, धदा ' माझें नियमित ठोकण यदा उभें राहिलें नाहीं ' ३ ( कु ) अगावर राहि लेला देवीचा वण, खूण [ ठोकणें=मारणें किंवा मिळविणें ]

**ठोकण**—न झाडाचें जुनाट खोड, खुंगडा, खुगाग्रा

**ठोकणावळ**—स्त्री ठोकून बनविलेल्या वस्तूची मजुरी, घडणावळ, घडविलेल्या वस्तुची मजुरी. [ ठोकणें ]

**ठोकणी**—स्त्री १ आघात, ठोका, टोला २ गिलावा ठोकण्याची गवड्याची तीन धारांची लाकडी खुंटी व तिनें ठोकण्याचा व्यापार, चोपणी ( वे ) कोडता [ ठोकणें ] ३ ( को ) भंडारी जातींमध्यें लग्नात करवलीशिवाय तिच्या दुसऱ्या भैनिणी असतात त्याचे पाय धुण्याची क्रिया –मसाप ४४ २५५

**ठोकणें**—सक्रि १ ( दांडकें, काठी, हातोडा इ० नीं ) मारणें, चदडणें, ठाठावणें, आघात करणें २ हृद्‌च आघात करणें थोपटणें ३ करणें देणें, पाठविणें 'तो आजारी पडल्याबरोबर त्याला तार ठोकली ' (वाप्र) **अघाडी ठोकणें**–पहिला येणें पहिलें स्थान किंवा नंबर पटकावणें **अरोळी ठोकणें**–ओरडणें, मोठ्यानें टाहो फोडणें **अर्जी ठोकणें**–विनति करणें, अर्ज करणें **तबू ठोकणें**–तबू रोवणें, मारणें, दणें, उभारणें **बाहू-दड ठोकणें**–दडावर आघात (हातानें) करणें कुस्तीस तयार होणें 'किंचिच्छेप कुरुकटक भीमें ठोकूनि बाहु भुजबीले । ' –मोशल्य ४५ **धाव-धूम ठोकणें**–पळत सुटणें **पानें ठोकणें**–जेवण्याची पानें माडणें **फिर्याद ठोकणें**–तक्रारअर्ज गुदरणें **बोंब ठोकणें**–बोंब मारणें, दाख ध्वनी करणें **मुद्रा ठोकणें**–आभाळ्यानून भालाच्या मुद्रा पाडणें ठोकणें या क्रियापदाचे अर्थ मारणें या क्रियापदाप्रमाणें पुष्कळ आहेत सामान्यत ठोकणें, टोटावणें, फटकारणें, सुपा उडविणें, घाईनें किंवा ओबडधोबड रीतीनें सपविणें इ० अर्थ होतात जसें–आम्ही वाटेनें चार भाकरी, ठोकल्या आणि सरासरी जेवलों, पुष्कळ कामें जमली होतीं तीं मी कशीं तरी ठोकून निघून आलों **ठोकून देणें**–सक्रि गप्प मारणें, थाप मारणें, विन विचारानें सांगणें

**ठोकणें**—न १ ठोकणी १ पहा २ ठोकण्याचें हत्यार [ ध्व ]

**ठोकतापीर**—पु दाडगा, भांडखोर, नेहमीं मारामारीस तयार असलेला मनुष्य मारतापीर पहा [ ठोकणें ]

**ठोकताळा**—न अजमास, अटकळ, अजमासानें पाहिलेला हिशोबाचा पडताळा, प्रतीति, अनुभव, बरोबर अदाज ( क्रि० घालणें, घेणें, पहाणें )

**ठोकनापूर**—पु (व) ठोक, मार ' खूप ठोकनापूर काटला बायकोचा '

**ठोकमत**—न पाखडमत

**ठोकर**—स्त्री १ ठेंच ( क्रि० खाणें, लागणें ) २ ( व ) जोड्याचा अग्रभाग ३ धडक, धडाका, अडखून पडणें ४ (ल) तोटा, नुकसान, अदृष्ट, दुर्दैवाचा तडाखा ५ पायानें मारलेला तडाखा, लाथ, गुद्दा, तडाखा ( क्रि० मारणें ) [ हिं ]

**ठोकर**—पु तोफेच्या गाड्यास जोडलेली लहान पेटी

**ठोकर**—वि ( व ) जाड, लठ्ठ, ठोसर

**ठोकरणें**—अक्रि बोलण्यात झाडणें, भोसडणें, खरडपट्टी काढणें

**ठोकळ**—वि १ मोठा व चागला, जाडा व लठ्ठ, मजबूत, भरपूर, जोमदार भरींव २ अदाजी, ढळक, मुख्य, सरासरी, ढोबळ, घाऊक, ठोकबद्द ( एकूण बेरीज, बाब ) [ स स्थूल ]

**ठोकळा**—पु लाकडाचा ओंडका किंवा लहानसा सोट, गोल, गोलटा, शाईची दौत ठेवण्याचें लाकडी साधन किंवा कलमदान, सहाण, रेतीदाणी इ० आत बसविण्याकरिता कोरून काढलेलें लाकडी खोड किंवा तुकडा, शिळेची चौकट हत्याराचा दांडा किंवा मूठ, इ०, पाण्याच्या पाणोटें बाधण्याच्या पायाच्या आकाराचा लाकडी तुकडा २ ( व ) हरभऱ्याच्या भरड्याचा उकडून तयार केलेला वडा **ठोकळीबीट**–स्त्री नवरी बीट ही अरद व जाड आणि भावात महाग असते

**ठोका**—पु काठी हातोडा इ० चा तडाखा, आघात, प्रहार, धक्का, मारा २ धातूच्या भाड्यावरील हातोडीनें झालेली खूण ३ भविष्य (विशेषत हवेचें पावसापाण्याचें) (क्रि०उतरणें, चुकणें) अनुभव प्रचीति पडताळा ४ भविष्याप्रमाणें घडून आलेली गोष्ट, ५(व) टोणा चेटूक ६ सरसकट जमीन खडानें दणें किंवा एकदम सख्यानें लावणें ( विघखारीनें न लावणें ), अशी खडानें लाविलेली जमीन ७ सततचा व कंटाळवाणा आवाज न थांबणारा ठो ! ठो ! असा आवाज (क्रि० घेणें) ' रडण्याचा–बोलण्याचा–खदखदीचा ठोका ' [ ध्व ] **०ठोक**–स्त्री ठोकण्याची क्रिया –वि मोठा, भरीव, भरपूर ( वस्तु–विशेषत दागिना, भांडें ) वजनदार दु स कारक भयकर सर्वांत मोठा ( अपराध ) [ ठोक द्वि ] –क्रिवि अगदीं बरोबर, जसाचा तसा योग्य (क्रि० पुरणें होणें) [ठोकणें]

**ठोकण**—न ठोकण पहा

**ठाकाठोका**—पु भविष्यकथन ( जोशाचें ) [ ठोका द्वि ]

**ठोकारोखा**—पु धाऊक, व्यवहारासंबधीं रोखा, करारपत्र

**ठाकूनठोकून**—क्रिवि ठाकूनठोकून पहा

**ठोके**—स्त्री भटकणाऱ्या चोर जातींपैकीं एक जात —भागा २०१ **०करीण**–स्त्री ( व ) जादूटोणा करणारी स्त्री

**ठोक्या**—पु ( विद्यार्थी ) १ सोनार, सोनटक्क्या २ (साकेतिक ) जार, एखाद्या स्त्रीचें प्रियपात्र [ ठोकणें ]

**ठोंग**—पु १ अंगीं विद्वत्ता नसता अनेक क्चाटें करून गावात मोठेपणा पावलेला पुरुष, धटिंगण, दांडगा ठोकतापीर पहा २ (व ) थाट, गप्प, थाप **०मत**–न १ ठेंगमत पहा २ लफडें, धोताड, तोहमत फसविण्यासाठीं किंवा त्रास देण्यासाठीं सांगितलेली खोटी गोष्ट [ ठोंग+मत ]

**ठोंगळ**—पु १ टोकळा अर्थ १ पहा २ धट्टपुष्ट, दणकट तरुण, मस्त, टोणपा, इमामदांडगा, मूर्ख माणूस ३ रास, गंजी ४ झुधा, खोड ५ ( कु ) लहान जमाव, गर्दी. ६ –वि प्रसिद्ध, प्रख्यात

**ठोंगाई**—स्त्री आडदांडपणा, मस्ती, भाडखोर वर्तन, उद्दाम वागणूक [ ठोंग ]

**ठोंचला**—पु ( क ) टोमणा, छद्मी भाषण, वर्मी बोल 'आपल्या ठोंचल्याचा रोख मी ओळखला'

**ठोंटा**—वि हात, पाय, बोटें इ० नसलेला थोटा ( मनुष्य ), वठलेलें ( झाड ), थोंटुक झालेली ( वस्तु ) [ हिं ]

**ठोंठण**—न थोंटा अवयव थोट्क ठुठण पहा [ हिं ]

**ठोठावणें**—सक्रि भांड्याचा नाद पहाण्यासाठीं त्याच्यावर टिचक्या मारणें, दारावर थाप मारणें, (सोनारी ) हातोडीनें ठोकणें, ( कुंभारी ) मडक्यावर थापटणें, ( पत्त्याचा खेळ ) मोठें पान टाकून मारून घेणें किंवा झोडपून हात घेणें, दुसऱ्या बाजूचा पत्ता टोकणें २ ( ल ) टोमणे मारणें, निर्भर्त्सना करणें व्याजोक्तीनें बोलणें ( वाईट किंवा कृष्ण कृत्याबद्दल ), जारानें सांगणें ३ ठो ! ठो ! आवाज करणें खडबडविणें [ ठो ! ठो ! ]

**ठोठो**—क्रिवि टक ! टक ! टाप ! टाप ! [ ध्व ]

**ठोठो ठोठोबाडा**—स्त्री पु गोंगाट, गाजावाजा, बभ्रा, प्रसिद्धि ( वाईट कृत्याची ) ( क्रि० करणें ) [ ध्व ]

**ठोंब**—पु १ खाद्याविरहित खोड, खुंट, सोट, दांडा २ ( ल ) धटिंगण, आडदांड, ब्रह्मचारी किंवा निपुत्रिक, अक्षरशत्रु ३ झुबका गुच्छ ४ बोकड –न ५ भातीचें लहान झुडप ६ लहान मुलाची पहिल्यानें राखलेली शेंडी [ स स्तंभ ]

**ठोंबरणें**—सक्रि ( राजा ) भांड्यामध्यें पीठ इ० कोंबकोंबून भरणें, ठासणें कोंबणें, चेंदणें, दडपून भरणें [ ठोंबा ]

**ठोंबरा, ठोमरा**—पु १ मनगटानें मारलेला ठोसा २ ( ल ) टोमणा उपरोधिक भाषण उपहास ( क्रि० मारणें, देणें, करणें ) ३ जोंधळ्याच्या कण्याचा भात, घुगरी 'सोयऱ्यासी करी पाहुणेर बरा। वांढिला ठोंबरा सनालागीं।' –तुगा ४२१४ 'तुझी ऐ मानवसीच ठोंबरा खाऊनि असेन' –नागदेवस्मृति १७१ ( व ) बाजरी कांडून, फोडणीचे पाण्यात शिजवून तिखटमीठ घालून केलेल्या कण्या ४ भुसाखुद्दा धान्य, वाईट धान्य –वि ( व ) चोटाला टणक लागणारा ( भात इ० )

**ठोंबस**—वि ठोंब्या टमटोंबस पहा

**ठोंबा**—पु १ आरूढ व जाड काठी, दांडकें, सोट, वर चढण्यासाठीं पुरलेला डांभ २ ( ल ) मूर्ख. ठोंब्या पहा ३ (वि) कातड्यावर ठसर वडविण्याचा साचा, यानें तिहेरी फुली पडते

**ठोंब्या, ठोम्या**—वि अक्षरशत्रु, ढ, जड बुद्धीचा, मंद, मूर्ख मंदबुद्धीचा, अक्कलशून्य [स स्तुंभ–ठुंब–ठोंब –भाअ १८३५]

**ठोम, ठोमरा**—ठोंब, ठोंबरा पहा

**ठोमणा**—पु १ टोमणा ठोंबरा अर्थ २ पहा (क्रि० मारणें) २ (को ) गुद्दा, ठोसा ३ ( कु ) कणकेच्या–कळकाच्या कोंबाचा लहान तुकडा **०ठोंसरा**–पु आघात, टोमणा **ठोमणेठोसरे खाल्लेला**–वि टक्केटोणपे खाल्लेला, अनुभविक, जगातील हाल संकटें इ० अनुभवून शहाणा बनलेला

**ठोमन्**—न ( व ) मोठें, सपाट भांडें

**ठोमूस**—पु ( गो ) टोंक, टोंकदार काठी, दांडा.

**ठाला, ठोल्या**—पु १ घरदार, बायको, कुटुंब इ० नसलेला माणूस, फटिंग मनुष्य, नोकरी किंवा गाठीं पैसा नससेला, पत इ० नसलेला मनुष्य (अशा माणसाशीं देण्याघेण्याचा व्यवहार करण्यात धोका असतो ). अब्रूची चाड नसलेला २ ठोंब्या पहा ३ एखाद्या स्त्रीनें आपली कामेच्छा पूर्ण करण्यासाठीं ठेवलेला पुरुष, जार ४ गलेलठ्ठ गबदुल माणूस ५ ( व ) रिकामटेकडा किंवा मूर्ख माणूस [ स स्थूल ]

**ठोवर**—न ( व ) फुटकें मडकें

**ठोसर, ठोंसर**—वि १ जाडेंभरडें, घटमूठ, जाड ( कापड सोटा इ० ) २ ( ल ) अधुक, मंद ( दृष्टि ), टाकाऊ, निःसार किंवा पुळपुळीत ( भाषण युक्ति, बेत ) ३ ( व ) टोकळ, लठ्ठ, मोठें, जाड 'टांकाचें ठोंसरपण।' –दा १९ १ ५ ४ दणगट, शक्तिमान ५ ( ल ) व्यवहारात अनुभविक **०नजर**–स्त्री वरवर पहाणी, चौकशी, टेहळणी

**ठो(ठों)सरा, ठोसा, ठोसला**—पु ठोंबरा अर्थ १, २ पहा ( क्रि० मारणें, देणें )

**ठोसराई**—स्त्री पोकळ बढाई भपकेदार शब्द, भाषणाचें अवडंबर, डौल, प्रस्थ, स्तोम, डौलाचें भाषण, फुशारकी ( क्रि० मिरविणें, लावणें दाखविणें, नाचविणें ) [ ठोसर ]

**ठोसलो**—पु ( चि ) जाड व मजबूत बांगडी

**ठोसळ**—वि ( व ) टोकळ पहा

**ठो(ठों)सा**—पु रपाटा, धपाटा, रपका, रामगोला रट्टा, तडाखा, गुद्दा ( क्रि० मारणें, देणें )

**ठोळ्या**—वि ( व ) ठोल्या अर्थ ५ पहा

**ठ्यां करणें**—अक्रि ( क ) धूम ठोकणें, पळून जाणें